महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश

विभाग पहिला

अ—थ

संपादक
यशवंत रामकृष्ण दाते
चिंतामण गणेश कर्वे

महाराष्ट्र कोश मंडळ, लिमिटेड, पुणें.

महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश

विभाग पहिला

अ–थ

संपादक
यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए., एल्एल्. बी.
चिंतामण गणेश कर्वे, बी. ए.

महाराष्ट्र कोशमंडळ, लिमिटेड, पुणे.

इ. स. १९४२] किंमत १० रुपये [शालिवाहन शके १८६४

प्रकाशक —

महाराष्ट्र कोशमंडळ लिमिटेड, पुणें तर्फे
मॅनेजिंग डायरेक्टर, यशवंत रामकृष्ण दाते,
शब्दकोश कचेरी, टिळक स्मारक मंदिर, पुणें २.

मुद्रक —

पृष्ठें १ ते २२४—
शा. ल. लेले, मोदवृत्त प्रेस,
१३६ नारायण पेठ, पुणें २.

पृष्ठें २२५ पासून पुढें —
प्र. भा. काळे, प्रतिभा प्रेस,
३३५ शनिवार पेठ, पुणें २.

संपादकीय निवेदन

महाराष्ट्र शब्दकोश सात भागांत प्रसिद्ध केल्यानंतर पुन्हां हा ' महाराष्ट्र वाक्संप्रदायकोश ' काढण्याची जरूरी होती काय, असा बरोबर प्रश्न कोणी टाकणें अगदीं साहाजिक आहे. तेव्हां याला आमचें उत्तर असें कीं, हा कोश त्या कोशाला पूरक असाच आहे. शब्दकोश रचीत असतांना पुष्कळसे वाक्प्रचार आणि म्हणी हीं देतां आलीं नाहींत, कित्येकांचें सविस्तर विवेचन करतां आलें नाहीं, कीं त्यांची तौलनिक मांडणी योग्य तऱ्हेनें ठेवितां आली नाहीं. यासाठीं मुद्दाम स्वतंत्र कोश तयार करावा अशी योजना संपादकांनीं मागेंच करून त्याबाबत सामुग्री हळू हळू जमवून्हि ठेविली होती. शब्दकोशांत न आलेले वाक्प्रचार व म्हणी तेवढ्याच या कोशांत द्यावयाच्या म्हटलें तर हा स्वतंत्र व संपूर्ण कोश होऊं शकत नाहीं. तेव्हां कांहीं वाक्संप्रदायांच्या द्विरुक्तीची आपत्ति पत्करूनहि मागच्या कोशांत आलेल्या व न आलेल्या अशा सर्वच वाक्संप्रदायांचा अंतर्भाव यांत केला आहे. यामुळें हा कोश बराच वाढला खरा पण व्यवस्थित झाला.

शिवाय या कोशाचें वैशिष्ट्यहि आहेच. वऱ्हाड, गोमंतक, कोंकण, खानदेश इ. मराठीच्या प्रांतपरत्वें नवीन बऱ्याचशा म्हणी या कोशांत आढळतील. विशेषतः गोमंतकांतील म्हणी गोवें आणि कारवार या दोन्ही भागांतील दीडहजारावर आहेत. वऱ्हाडच्याहि तेवढ्याच आहेत. अवतरणेंहि शब्दकोशानंतर नवीन वाचलेल्या ग्रंथांतील व अद्ययावत् नियत-कालिकांतील घेतलेलीं दिसतील. तुलनेसाठीं संस्कृत, इंग्रजी, हिंदी, गुजराथी म्हणीहि दिलेल्या आहेत. त्या उद्बोधक वाटतील. कांहीं म्हणींच्या मागील गोष्टीहि घेतल्या आहेत. अशा तऱ्हेनें शक्यतों हा कोश अद्वितीय व उपयुक्त असाच करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यासाठीं आतांपर्यंत झालेले सर्व जुने प्रयत्न पाहून घेऊन मगच याची उभारणी केली. वाक्संप्रदायांचा एवढा मोठा स्वतंत्र कोश कोणत्याहि भारतीय भाषेंत तर नाहींच पण एखाद्या पाश्चात्य भाषेंत तरी आहे कीं काय या विषयीं शंकाच आहे. तेव्हां मंडळाच्या व संपादकांच्या आजपर्यंतच्या लौकिकाप्रमाणेंच हाहि संदर्भ-ग्रंथ मोठ्या परिश्रमानें व अत्यंत अडचणीच्या परिस्थितींत तयार केला आहे, हें सहजीं कळून येणार आहे. कोश तयार होत असतां महायुद्ध अधिकाधिक पेटत होतें व आतां तर सर्व जगच त्यानें झळंबलें आहे. कागदाचे भाव कल्पनातीत वाढले एवढेंच नव्हे तर कागद दुर्मीळ झाला व इतरहि सर्व वस्तूंचे भाव भरमसाट चढले. तेव्हां यावेळीं कोशाचें काम बंद ठेवलें असतें तरी कोणी नांवें ठेविलीं नसतीं; तथापि अशाहि अडचणींत केवळ कर्तव्यबुद्धीनें हा आश्वासित कोश बाहेर काढीत आहों. याचें जनता चीज करील अशी आशा बाळगतों.

कोशाला विस्तृत विवेचनात्मक व उपयुक्त माहितीची प्रस्तावना जोडण्याचा विचार आरंभीं होता, पण तो पहिला भाग अपेक्षेबाहेर वाढल्यानें पुढें ढकलावा लागत आहे. तसेंच ज्यांनीं ज्यांनीं या कोशाला आत्मीयबुद्धीनें पुष्कळच साहाय्य केलें त्यांचा कृतज्ञतापूर्वक नामनिर्देश पुढील भागांत करणार आहों. आज येथें मोघम या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानीत आहों.

महाराष्ट्र शब्दकोशाचें मोठें कार्य आटोपल्यानंतर महाराष्ट्र कोशमंडळ विराम न पावतां त्यानें पुढील दहा बारा वर्षांचीं ४/५ कार्यें योजून, तीं सिद्धीस नेण्याचें टरविलें. या कार्यांपैकीं 'महाराष्ट्र वाक्संप्रदायकोश' हें एक होतें. लवकरच दुसरा विभाग बाहेर पडून हें कार्य हातावेगळें होईल व शास्त्रीय परिभाषाकोश, इंग्रजी-मराठी कोश, पुरवणी शब्दकोश इ. च्या छपाईला आरंभ केला जाईल.

आमच्या कार्यपद्धतीची ओळख महाराष्ट्रीय जनतेला गेल्या पंचवीस वर्षांपासून आहे. आतांपावेतों तीन मोटमोठाले कोश तिनें प्रेमपूर्वक आणि कर्तव्यतत्परतेनें दिलेल्या साहाय्यामुळेंच निघाले. यापुढेंहि ती आमच्याकडून अशीच सेवा घेईल व आम्हांला कृतार्थ करील अशी दृढ आशा आहे.

संपादक

सुभाषितांचें महत्त्व

१ भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाणभारती।
तस्माद्धि काव्यं मधुरं तस्मादपि सुभाषितम् ॥

२ सुभाषितेन गीतेन युवतीनां च लीलया।
मनो न भिद्यते यस्य स योगी ह्यथवा पशुः ॥

३ सुभाषितमयैर्द्रव्यैः संग्रहं न करोति यः।
सोऽपि प्रस्तावयज्ञेषु कां प्रदास्यति दक्षिणाम् ॥

४ संसारकटुवृक्षस्य द्वे फले ह्यमृतोपमे।
सुभाषितरसास्वादः संगतिः सुजने जने ॥

५ सुभाषितरसास्वादबद्धरोमाञ्चकञ्चुकाः।
विनापि कामिनीसङ्गं कवयः सुखमासते।

६ पृथिव्यां त्रीणि रत्नानि जलमन्नं सुभाषितम्।
मूढैः पाषाणखण्डेषु रत्नसंज्ञा विधीयते ॥

७ धर्मो यशो नयो दाक्ष्यं मनोहारि सुभाषितम्।
इत्यादि गुणरत्नानां संग्रही नावसीदति ॥

८ द्राक्षाम्लानमुखी जाता शर्करा चाश्मतां गता।
सुभाषितरसस्याग्रे सुधा भीता दिवंगता ॥

९ कथमिह मनुष्यजन्मा संप्रविशति सदसि विबुधगमितायाम्।
येन न सुभाषितामृतमाल्हादि निपीतमातृप्तेः ॥

१० अवसरपठितं सर्वं सुभाषितत्वं प्रयात्यसूक्तमपि।
क्षुधि कदशनमपि नितरां भोक्तुः संपद्यते स्वादु ॥

११ यस्य वक्त्रकुहरे सुभाषितं नास्ति नाप्यवसरे प्रजल्पति।
आगतः सदसि धीमतामसौ लेप्यनिर्मित इवावभासते ॥

१२ सुभाषितं हारि विशत्यधोगलान्न दुर्जनस्यार्करिपोरिवामृतम्।
तदेव धत्ते हृदयेन सज्जनो हरिर्महारत्नमिवातिनिर्मलम् ॥

१३ नायं प्रयाति विकृतिं विरसो न यः स्यान्
न क्षीयते बहुजनैर्नितरां निपीतः।
जाड्यं निहन्ति रुचिमेति करोति तृप्तिं
नूनं सुभाषितरसोऽन्यरसातिशायी ॥

१४ खिन्नं चापि सुभाषितेन रमते स्वीयं मनः सर्वदा
श्रुत्वान्यस्य सुभाषितं खलु मनः श्रोतुं पुनर्वाञ्छति।
अज्ञाञ्ज्ञानवतोऽप्यनेन हि वशी कर्तुं समर्थो भवेत्।
कर्तव्यो हि सुभाषितस्म मनुजैरावश्यक संग्रहः ॥

(1) Proverbs are the daughters of daily experience.—**Dutch.**

(2) What flowers are to gardens, spices to food, gems to a garment, and stars to heaven, such are proverbs interwoven in speech.—**Hebrew.**

(3) Proverbs are the lamps to words. A proverb is to a speech what salt is to food.—**Arabic.**

(4) The people's voice the voice of God we call;
And what are proverbs but the people's voice?
Coined first and current made by common choice?
Then sure they must have weight and truth withal.—**Howell's Proverbs.**

(5) A proverb is an ornament to language.—**Persian.**

(6) Proverbs are patent teachers and maxims are moral demonstrations.
—**English.**

॥श्री॥

महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश

विभाग पहिला

अ

अ आ——अ आ येनातिल्याक अमर इत्याक ?—(गों.) अ आ न येणाऱ्याला अमरकोश कशाला ?

अईन——अईन रावणाची व आस लेंडकाची—रावण हा अत्यंत वैभवसंपन्न राजा होता. एखादा मनुष्य रावणाप्रमाणें ऐट तर करतो पण स्वतः खरोखर वैभवसंपन्न अगर खानदानीचा नसल्यामुळें मनांत भिकाऱ्यासारखी आकांक्षा धरतो; म्हणजे आपल्या योग्यतेपेक्षां अधिक अभिमान बाळगतो, अशास म्हणतात.

अइनीला मरावें, खरवडीला झुरावें—[अईन=ऐट. खरवड=पदार्थ शिजवलेल्या भांड्याच्या बुडाशीं चिकटून राहिलेला पदार्थ]जेवणाचें आमंत्रण ऐटीनें नाकारावयाचें आणि मग त्याच जेवणांतील शिळ्या तुकड्यांसाठीं हपापावयाचें; भलत्याच वेळीं अभिमान धरून स्वतः चें हंसें करून घ्यावयाचें.

अऋणी——अऋणी अप्रवासी तो सुखी—दिवसस्याष्टमे भागे शाकं पचति यो नरः । अऋणीचाप्रवासी च स वारिचर मोदते॥—यक्षप्रश्न, महाभारत. ज्याला कर्जाची विवंचना नसते व प्रवास करण्याचाहि प्रसंग येत नसल्यामुळें संकटांत सांपडण्याची किंवा स्वतःची गैरसोय होण्याची धास्ती नसते तो सुखी असतो.पूर्वी कर्जदाराचा तगादा आजच्यापेक्षां फार जाचक असे. तसेंच कर्ज असणें हा सामाजिक दृष्ट्याहि कमीपणा मानला जात असे. त्याचप्रमाणें पूर्वी प्रवासाचीं साधनें फार नसल्यामुळें प्रवास अत्यंत त्रासाचा व प्रसंगीं धोक्याचाहि असे; त्यामुळें या दोहोंपासून जो मुक्त असेल त्यास सुखी समजत असत. आज प्रवासाच्या सोई पुष्कळच वाढल्या आहेत व कर्ज काढणें फारसें कमीपणाचें मानीत नाहींत. वरील श्लोकाचा दुसरा पाठ असा अहिः—पंचमेऽहनि षष्टेवा शाकं पचति यो गृहे । अनृणी चाप्रवासीच स वारिचर मोदते ॥

अकटो——अकटोपासून विकटोपर्यंत; विकटोपर्यंत अध्ययन—शुभकार्यप्रसंगीं प्रथम पुण्याहवाचन वगैरे विधींस आरंभ करावयाच्या वेळीं संकल्पास सुरुवात करतांना गणपतीस वंदन करण्याकरितां ‘ सुमुखश्चैकदंतश्च कपिलो गजकर्णकः । लंबोदरश्च विकटो विघ्ननाशो गणाधिपः ॥ असा मंत्र म्हणतात. हा अगदीं प्रारंभीचा मंत्र असूनहि एखाद्यास यांतील विकटो या शब्दापर्यंतच पाठ असतें, पुढील अक्षरेंहि येत नसतात; अशा मनुष्यास त्याचें अत्यल्प अध्ययन दाखविण्याकरितां हा वाक्प्रचार योजतात. यावरून अज्ञानी, अध्ययन न केलेला, असा बोध होतो. ‘ द्वारकाबाईचे पतिराज असे सुलक्षणी कीं, त्यांनीं अकटोपासून विकटोपर्यंत अध्ययन करून दावा लावण्याचा घाट घातला.’—यशवंतराव खरे.

अकरण——अकरणे प्रत्यवाय—एखादी गोष्ट मनांतून करावयाची नसली म्हणजे मनुष्य अनेक सबबी व अडचणी पुढें मांडतो, अशा वेळीं योजतात. मनांत करावयाचें नसतां कांहीं तरी सबबी, व्यत्यय पुढें आणणें. तु०—न कर्त्याचा वार शनिवार.

अकरा——(१) इंद्रियें—पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें व एक मन.—(२) नरक—तामिस्र, अंधतामिस्र, रौरव, महारौरव, सांडस, कुंभीपाक, काळसूत्र, तप्तसूर्मि, वैतरणी, वज्रकंटक, असिपत्र.—कथा ६.४.१२७. या नांवाबद्दल एकवाक्यता नाहीं. (३) रुद्र—(अ) रैवत, अज, भौम, भव, वाम, वृषाकपि, अजैकपाद, उग्र, अहिर्बुध्न्य, बहुरूप, महान.—हंको. (आ) वीररुद्र, शंभु, गिरीश, अजैकपाद, अहिर्बुध्न्य, पिनाकी, अपराजित, भुवनाधीश्वर, कपाली, स्थाणु, भव. (इ) मन्यु, मनु, महानस, शिव, महान्, ऋतुध्वज, मरुरेता, भाव, काल, वामदेव, धृतव्रत.—व्यवहारदर्पण.

❀ **अकरा देव आणि उतावळीची पूजा**——घाईच्या

वेळीं पूजा करावयाची असली म्हणजे सर्व अकरा देवांस गंध फूल वगैरे वाहणें व सर्व उपचार करणें यास वेळ तर फार लागतो. यावरून घाईचें काम असतांनासुद्धां मध्यें जर अनेक गोष्टी आडव्या आल्या किंवा लवकर काम उरकावयाचें असूनहि त्याला अनेक लोकांची प्रथम संमति मिळवावयाची असली म्हणजे फार यातायात होते. ही गोष्ट या म्हणीनें व्यक्त होते.

अकरा देवांस एक एकादशणी—एकदांच रुद्राचीं अकरा आवर्तनें म्हणून अकरा देवांस एकादशणी केल्याचें पुण्य पदरांत घ्यावयाचें; म्हणजे एकाच कामांत अनेक कामें उरकून घ्यावयाचीं, असा अर्थ होतो. उदाहरणार्थ, एकाच पाकिटांतून अनेकांचीं पत्रें पाठविणें; एकाच पत्रांत अनेकांस नमस्कार लिहिणें.

अकरावा——**अकरावा बृहस्पति**—'बारावा बृहस्पति' या वाक्प्रचारावरून बनविलेला दिसतो. बारावा बृहस्पति=शत्रुत्व. तेव्हां अकरावा बृहस्पति=मैत्री, सख्य. अकराव्या स्थानीं कोणताहि ग्रह आला तरी तो शुभ फल देतो. तशांत गुरु हा स्वतःच शुभग्रह असल्यामुळें तो अकराव्या स्थानीं आला असतां पुष्कळच लाभदायक होतो. यावरून अत्यंत अनुकूल, भरभराटीचा काल, या वाक्प्रचारानें ध्वनित होतो.

अकरावा रुद्र—रुद्र ही प्रलय देवता असून अकरावा रुद्र ही त्यांतील अंतिम देवता होय. या रुद्राप्रमाणें अतिशय तापट माणूस. फार रागीट माणसास म्हणतात.

अकर्मा——**अकर्म्याची आई मरो, सकर्म्याची सासू मरो**—काम न करणाऱ्या आळशी माणसाला शिक्षा म्हणून त्याची आई मरावी, म्हणजे त्यास काम करावें लागेल; व कामसू उद्योगी माणसाला बक्षीस म्हणून त्याची सासू मरावी. म्हणजे त्याच्या बायकोचे लाड कमी होऊन ती त्याला कामांत मदत करूं लागेल. (?)

अकल्पित——**अकल्पित पांगळ्याला दैवानें ससा मिळाला**—पांगळा मनुष्य कांहीं ससा त्याच्या मागें लागून पकडूं शकत नाहीं, पण एखाद्या वेळेस अचानक तो त्याच्या हातीं लागतो. सामान्यतः अशक्य अशी एखादी गोष्ट अभावितपणें सहजच एखाद्या वेळीं घडून येते त्यावेळीं ही म्हण वापरतात. तु०—अंधेके हात बटेर.

अकांडतांडव——**अकांडतांडव करणें**—[अकांड+तांडव. शंकराच्या नृत्यास तांडव अशी संज्ञा आहे. हें नृत्य स्मशानांत भूतपिशाचांसमवेत होतें. अकांड=अकस्मात्; अकालीं.] १ भलत्याच वेळीं, अवेळीं मोठा गहजब उडविणें; रागानें ताशेरा झाडणें; तोंड सोडणें. 'आजेसासूबाईनीं तर जें काय अकांडतांडव केलें आहे तें कांहीं पुसूंच नये.'—पकोघे. २ महत्कार्य करणें; पराक्रम गाजविणें. 'शिवाजीला त्याच्या बापानें नावडत्या आईबरोबर पुनवडीस ठेविलें असतां दादोजी कोंडदेवानें लहानपणीं जें कांहीं त्यास शिकविलें, तेवढ्याच ज्ञानानें त्यानें पुढें केवढें अकांडतांडव केलें.'—नि.

अकाळ——**अकाळीं जें करणें, तें सर्व विपरीत होणें**—कोणतीहि गोष्ट भलत्याच वेळीं केली असतां तिचा परिणाम अहितकारक होतो. अयोग्य वेळीं केलेलें कार्य फसावयाचेंच.

अकाळीं जें फळ येतें, तें लवकर गळून पडतें—एखाद्या झाडाला जर योग्य हंगामांत फळें न येतां भलत्याच वेळीं फळें आलीं तर त्यांचें योग्य पोषण न होऊन तीं पिकेपर्यंत झाडावर राहात नाहींत तर मध्येंच गळून पडतात. म्हणजे भलत्याच वेळीं केलेलें काम फलदायक होत नाहीं.

अकिती——**अकिती आणि सणाची निचिती**—[अकिती=अक्षय्यतृतीया. निचिती=शेवट] सणांचा शेवट अक्षय्यतृतीयेनें होतो. अक्षय्यतृतीयेचा सण साधारण उन्हाळ्याच्या अखेरीस येतो. यानंतर पुढें पावसाळा सुरू व्हावयाचा असतो त्यामुळें शेतीचीं कामें वगैरे सुरू करावयाचीं असतात. जमिनीची मशागत, नांगरणी, पेरणी वगैरे कामांची नंतर घाई सुरू होते; यामुळें शेतकऱ्यांस यापुढें कांहीं काळ फुरसत नसल्यामुळें यापुढें सणांचे दिवस नसतात. ते पुन्हां आषाढी एकादशीनंतर सुरू होतात. 'आषाढी सण हांकारी' पहा.

अकुतोभय——(अप.) **अक्रतोभय**—ज्याला कोठूनहि भय नाहीं असा; अत्यंत सुरक्षित; मजबूत. 'मातीची भिंत घातली म्हणजे अक्रतोभय होईल.'

अंकुश——**अंकुश मारणें**—एखाद्या गोष्टीची पुन्हा पुन्हा आठवण करून देणें; वरचेवर तगादा करणें; टोंचणी लावणें; सारखें मागें लागून काम करून घेणें.

ꕥ **अंकुश आस्स म्हणु हस्ति मोलायिलीं**—(गो.) अंकुश आहे म्हणून हत्तीचें मोल करणें. नालासाठीं घोडा.

हत्तीला अंकुश केवढा असतो—हत्ती हा प्राणि जरी एवढा अवाढव्य असतो तरी त्याला ताब्यांत ठेवणारा अंकुश हा फार लहान असतो. त्याप्रमाणें एखादी लहानशी गोष्टहि फार मोठ्या गोष्टीचें नियंत्रण सहज करूं शकते. हस्ती स्थूलतरः स चांकुशवशः किं हस्तिमात्रोंकुशः।—पंच १.३५८.

अकृत्रिम——**अकृत्रिम मित्रभाव, तो जाणा उत्तम स्वभाव**—ज्या मनुष्याचा स्वभाव निष्कपट असतो, ज्या मित्राच्या ठिकाणीं आंत एक बाहेर एक असें नसतें, त्याचा स्वभाव उत्तम समजावा.

अकृत्रिमता ती सत्याची माता—सत्य हें स्वाभाविक आहे; त्यामध्यें कृत्रिमपणा नसतो. जी गोष्ट खरी

असते ती सांगावयाची झाली ह्मणजे जशी असेल तशी सांगितली म्हणजे झालें,तिच्याकरितां कांहीं जुळवाजुळव करावी लागत नाहीं.

अकेला——**अकेला चना भाड नही फोड सकता**— एकट्याच्या हातून कांहीं काम होत नाहीं. दुसऱ्याच्या साहाय्यावांचून एकटा काय करणार?—' उत्पतितोऽपि चणकः शक्तः किं भ्राष्टकं भंक्तुम् । '–पंच १.१४३.

अक्कल——**अक्कल गुंग होणें**–मति कुंठित होणें; एखाद्या गोष्टींत बुद्धि चालेनाशी होणें; एखाद्या गोष्टीवर कांहींहि उपाय न सुचणें.

अक्कल जाणें—बुद्धि नाहींशी होणें; शहाणपण नाहींसें होणें; वेळेवर बुद्धि न चालणें. एखाद्या प्रसंगीं काय करावें हें मुळींच सुचत नाहींसें होतें व मति गुंग होऊन जाते, अशा वेळेस म्हणतात. आधीं जाते अक्कल, मग जातें भांडवल.

अक्कल पुढें धावणें—बुद्धीचा योग्य उपयोग न करणें; भलत्याच गोष्टीकडे आपल्या बुद्धीचा व्यय करणें. ' नवी भरती करण्यांत महाराजांची अक्कल किती पुढें धावती याचें अनुमान होतें. '–विक्षिप्त २.९९.

अक्कल विकत घेणें—एखाद्या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन व त्या कामीं चांगली घस सोसून मग शहाणपण शिकणें. अनुभव हा शिक्षक चांगला आहे पण तो फार महाग आहे. एखाद्या कामीं चांगली ठेंच लागून शहाणपण आलें म्हणजे योजतात.

अक्कल विकून फुटाणे खाणें—अक्कल असेल तर वाटेल तें मिळवतां येईल पण तीच अक्कल फुटाण्यांस विकणें म्हणजे थोडक्या व तात्पुरत्या लाभाकरितां सर्वस्व गमावून बसण्यासारखें आहे.

अक्कल सांगणें—युक्ति सांगणें; सल्ला देणें; शहाणपणाच्या गोष्टी सांगणें.

अक्कल हुशारीनें—बुद्धिपूर्वक; जाणूनबुजून; सर्व योग्य माहिती मिळवून.

अक्कलेचा कांदा–गड्डा–गधडा—(औपरोधिक) मूर्ख; बेअकली; निर्बुद्ध; अडाणी मनुष्य. ज्यास मुळींच अक्कल नाहीं अशा मनुष्यास म्हणतात.

अक्कलेचा खंदक—अक्कल मुळींच नसणारा मनुष्य; ज्या मनुष्यामध्यें अक्कलेच्या ठिकाणीं केवळ खड्डा आहे किंवा खंदकासारखी ज्याची अक्कल खोल आहे असा मनुष्य; मूर्ख, अडाणी इसम. ' नानास वरच्यासारखीं अघळपघळ सर्टिफिकिटें देणारे तरी अक्कलेचे खंदक होते असें म्हणणें भाग आहे. '–नि.

अक्कलेचे तारे तोडणें—अविचारानें बोलणें; भरमसाट बोलणें; कांहींतरीच, योग्य अयोग्य न पाहतां, भलतेंच बोलणें.

॥ **अक्कल ठेवा चांगली, नाहीं तर होईल बावली**— शहाण्या माणसाखेरीज इतरांची बुद्धि अहितकर ठरते.

अक्कल नाहीं कवडीची नि नांव सहस्रबुद्धे—नांव मोठें पण लक्षण खोटें; नांवाचा शहाणा पण प्रत्यक्ष मूर्ख; दिसावयास चांगला पण निरुपयोगी. तु०–अमरसिंग तो मरगये, इ.

अक्कल नाहीं पण मुलगा तर दाणा आहे—[दाणा=शहाणा, चतुर] एखादा मुलगा बुद्धिवान् नसून फार चळवळ्या, खटपट्या असेल तर त्याबद्दल वाच्यार्थानें किंवा उपरोधानें म्हणतात.

अक्कल बडी कां लक्ष्मी (म्हैस) बडी—पैसा श्रेष्ठ कीं बुद्धि श्रेष्ठ, असा जर प्रश्न पडला तर त्याचें कोणीहि, बुद्धि श्रेष्ठ, असेंच उत्तर देईल. कारण बुद्धि असेल तर पैसा वाटेल तेवढा मिळवितां येईल. पण बुद्धि नसेल तर जवळ असलेलें द्रव्यहि राखतां येणार नाहीं. ही म्हण पटवून देणाऱ्या बऱ्याच गोष्टी सांगण्यांत येतात.

अक्कल बृहस्पतीची आणि समशेर शिकंदराची— बुद्धिवान मनुष्यांमध्यें बृहस्पति हा सर्वांत श्रेष्ठ होय. त्याचप्रमाणें शूर योद्धयांमध्यें शिकंदर ऊर्फ अलेक्झांडर हा अग्रगण्य होय.

अक्कलमंदको इषारा काफी—[अक्कलमंद=बुद्धिवान्. शहाण्याला नुसती सूचना पुरेशी होते. तु०–शहाण्याला मार शब्दाचा मूर्खाला टोणप्याचा.

अक्कलमंदोकी दूर बला—[बला=पीडा, संकट] जे बुध्दिवान असतात त्यांच्यापासून पीडा, संकटें वगैरे दूर राहतात; त्यांना कोणत्याहि गोष्टीपासून त्रास होत नाहीं. तु०–शहाण्याची बलाय दूर.

अक्कलकी तोती उड गयी—अकलेची पोपटीण उडून गेली. एखाद्याचें शहाणपण नष्ट झालें आहे, त्याची बुद्धि कार्य करीत नाहीं, असें दर्शवावयाचें असल्यास ही म्हण वापरण्यांत येते.

अक्कलसे खुदा जानना–पछानना—ज्याची बुध्दि तीव्र असेल किंवा जो आपल्या बुध्दीचा उपयोग करील त्याला परमेश्वराचेंहि ज्ञान होईल.

अक्कलेचा दुस्मान बेवकूब—ज्याला स्वतःला अक्कल नसते त्याला अकलेचें वावडेंच असणार व तो अक्कलवान मनुष्याचा शत्रु असणार हें उघडच आहे.

अक्कलेचे अमीर, सांगितली मेथी आणली कोथिंबीर— मेथी आणावयास सांगितली असतां जो कोथिंबीर आणतो त्याची अक्कल किती असणार ? यावरून बेअक्कली माणसाबद्दल योजतात.

अक्कलेचे भरें, क्षीर नीर वेगळें—हंसाच्या अंगांत दूध व पाणी मिसळलें असतां त्यांतील दूध तेवढें वेगळें करण्याचें कौशल्य असतें अशी समजूत आहे. त्यावरून दूध आणि पाणी

एकत्र केलें तरी ज्याच्या अंगीं तें ज्ञान आहे तो त्यांतून दूध आणि पाणी वेगळें काढतो. त्याप्रमाणें खरें-खोटें, चांगलें-वाईट असें एकत्र मिसळलेलें असलें तरी बुध्दिमान पुरुष मनांत समजून त्यांतील योग्य तें निवडून काढूं शकतो व त्याचा योग्य तो उपयोग करून घेतो.

अक्कलेचें मूळ विद्या—विद्या म्हणजे अध्ययन केल्याशिवाय अक्कल येत नाहीं; अभ्यासाशिवाय बुध्दि तीव्र होत नाहीं. ज्यास ज्ञान प्राप्त व्हावें अशी इच्छा असेल, चातुर्य, बुध्दि वाढावी असें वाटेल त्यानें अभ्यास केला पाहिजे. 'अभ्याससारिणी विद्या।'

अक्कलेनें काम होतें, बहुतां हातीं थोडें येतें—एखादें काम करावयास अनेक मनुष्यें लावलीं तर फार थोडें फळ मिळतें; पण त्याच कामीं जर एखाद्या बुद्धिवान मनुष्याची एकट्याचीच योजना केली तर तो आपल्या बुद्धीनें त्या कामांत पूर्ण यश मिळवितो. जें युक्तीनें कार्य होतें तें अनेक मनुष्यांच्या हातूनहि होत नाहीं.

अक्कलेहून विद्या जास्ती, ओझ्याप्रमाणें वाढती—मनुष्य जात्या कितीहि बुद्धिवान असला तरी त्याला अध्ययनाची जरूरी असते; विद्या ही अभ्यासानें सारखी वाढवितां येते, तथापि जर मुळांत मुळींच बुद्धि नसेल तर ओझेंभर विद्येचाहि कांहीं उपयोग होणार नाहीं. वर पहा.

अक्काबाई——अक्काबाईचा पाया—दुर्दैवाचीं पूर्वचिन्हें. लक्ष्मीची वडील बहीण अवदशा असें मानतात; म्हणून तीस अक्काबाई असें म्हणतात. या दोघी बहिणी कधींहि एकत्र नांदत नाहींत. तेव्हां **अक्काबाईची कृपा होणें** म्हणजे लक्ष्मीची अवकृपा ठेवलेलीच. तसेंच **अक्काबाई जवळ येणें** म्हणजे दारिद्य, हीनदशा, दैन्य यांची प्राप्ति होणें व वैभवादि दूर पळणें, असा अर्थ होतो.

अक्काबाईचा फेरा—दारिद्य; हीनदशा; अवदशेची स्थिति. अक्काबाईची दृष्टि आपणाकडे वळून तिची भेट होणें म्हणजे दारिद्य येणें.

अक्काबाईची कृपा-दया—दारिद्य. अक्काबाईची कृपा होणें म्हणजे लक्ष्मीची अवकृपा होणें, याचाच अर्थ गरीबी येणें.

अक्काबाईचें पोर-बाळ—दुर्दैव. अवदशेची संतती म्हणजे फळ हें दारिद्य, हीनदशा वगैरेच असणार. 'हें अक्काबाईचें पोर (१९०१ चें शेतकी बिल) सर्व इलाखा भिकारी करील.' –टि २.२६७.

❀ **अक्काबाई दोही दारीं फुगड्या घालती**—पूर्णपणें विपन्नावस्था आली असतां योजतात.

अक्काबाईच्या म्हशी, बकाबाईला उठाबशी—ज्या गोष्टीशीं एखाद्याचा कांहीं संबंध नाहीं त्या गोष्टींत त्यानें ढवळाढवळ करण्याबद्दल किंवा तिचा त्याला होणाऱ्या उपद्रवाबद्दल म्हणतात. ज्या गोष्टीशीं एखाद्या मनुष्याचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं त्या गोष्टीबद्दल त्यानें विनाकारण लुडबुड करीत असावें किंवा त्याला त्रास पडावा, हें मोठें चमत्कारिक आहे. 'कोणाच्या म्हशी, कोणाला उठाबशी' असाहि पाठ आहे.

अक्रीत——अक्रीत खाणें—१स्वतः पैसा देऊन विकत न घेतलेली वस्तु स्वीकारणें; बिन मोबदला, फुकट, एखादी वस्तु घेणें. २ अयोग्य रीतीनें एखादी वस्तु मिळविणें.

अक्रीत घेणें—१ मोफत, फुकट, मोबदला न देतां एखादी गोष्ट घेणें. २ अन्यायानें घेणें; लुबाडणें; लाटणें. ३ एखादी गोष्ट प्रमाणाबाहेर पैसा देऊन विकत घेणें.

अक्रीत देणें—१ वाजवीपेक्षां जास्त, प्रमाणाबाहेर एखाद्या वस्तूबद्दल मोबदला, व्याज वगैरे देणें. २ भलत्याच भावानें एखादी वस्तु देणें.

अक्रीत मिळविणें—अयोग्य मार्गानें मिळविणें; योग्य मोबदला दिल्याशिवाय, वाजवी परिश्रम केल्याशिवाय प्राप्त करून घेणें.

अक्रीतविक्या—भलतीच किंमत घेऊन विकणारा.

अक्रीताचा व्यवहार—अप्रामाणिक व्यवहार; अयोग्य व्यवहार.

अखंड——अखंड-सुवासिनी-सौभाग्यवती—वेश्या. एखादी सामान्य स्त्री घेतली तर तिचा पति कधीं तरी मरून तिचें सौभाग्य नष्ट होण्याचा संभव असतो. परंतु वेश्येला दररोजहि नवीन नवीन पति मिळणें शक्य असल्यामुळें तिचें सौभाग्य कधींहि नष्ट होण्याचा संभव नसून तें अखंड असतें; म्हणून तीस उपरोधिकपणें अखंड सुवासिनी किंवा सौभाग्यवती असें म्हणतात.

❀ **अखंड पक्वान्नें, रवंथ करिती पोळाप्रमाणें**—एखाद्या मनुष्यास नेहमीं चांगलें चमचमीत व यथेच्छ खावयास असून कोणतेंहि काम करावयाचें नसतें व केवळ आळसांत तो वेळ घालवीत असतो, अशाबद्दल म्हणतात.

अखंड सावधान असावें। दुश्चित कदापि नसावें।—मनुष्यानें नेहमीं दक्ष व समाधानी वृत्ति ठेवून असावें म्हणजे त्याची बुद्धि स्थिर असते. मनांत कुढेपणा किंवा कुविचार सहसा बाळगूं नये; कारण त्यामुळें मनांत विकार उत्पन्न होण्याचा संभव असतो. रामदासांनीं संभाजीस पाठविलेल्या पत्राची ही पहिली ओंवी आहे.

अखंड सुवासिनी गांवचा उंबरा पुजते—अखंड सुवासिनी म्हणजे वेश्या ही गांवांत घरोघरीं व्यभिचार करते. हिचें

आचरण स्वैर असल्यामुळें कोणत्याहि घरीं प्रवेश करण्यास तिला दिक्कत वाटत नाहीं.

अखेरी——अखेरी मारणें-साधणें-सांभाळणें--दशावतारी गंजीफांच्या खेळांत शेवटचा डाव जिंकणें याला फार महत्त्व आहे. कारण जो शेवटचा डाव जिंकील त्याला कितीहि पानें देणें झालें तरी तीं अखेरी मारल्यानें सुटतात. तेव्हां अखेरीस यश प्राप्त करून घेण्यांत महत्त्व आहे. यावरून मध्यंतरीं कितीहि अडचणी आल्या तरी शेवटीं यश मिळविणें; शेवट चांगला करणें; परिणामीं हितकर अशी गोष्ट करणें.

⁂ **अखेरी मारल्याशिवाय खेळ पुरा होत नाहीं**—दशावतारी गंजिफांच्या खेळांत अखेरच्या डावास फार महत्त्व असतें. तो डाव जो जिंकील त्यास कितीहि पानें देणें असलीं तरीं तीं सुटतात. पत्त्यांतहि शेवटच्या डावास दहा मार्क असतात. यावरून कोणतेंहि काम अर्धवट टाकूं नये. तु०—अनारम्भोहि कार्याणां प्रथमं बुद्धिलक्षणम् । प्रारब्धस्यान्तगमनम् द्वितीयं बुद्धिलक्षणम् ॥

अग——अग अग म्हशी, मला कां (कोठें) नेशी—एक मनुष्य नेहमीं बायकोवर रागावून मी घराबाहेर निघून जाईन असा तीस धाक दाखवीत असे. एकदां वैतागानें तिनें त्यास एके दिवशीं खुशाल घराबाहेर निघून जाण्यास सांगितलें. तेव्हां तो बाहेर पडला, पण जाणार कोठें ? अखेरीस कंटाळून त्यानें घरीं जावयाचें मनांत आणलें. पण आतां आपण होऊन परत जाणें लाजिरवाणें वाटून त्यानें आपली म्हैस रानांतून परत घरीं जात असलेली पाहिली व तिची शेपटी धरून ‘ अग अग म्हशी, मला कां नेशी ! ’ असें म्हणत शेवटीं स्वारी घरीं परत गेली व मला म्हशीनें परत आणलें असें बायकोस सांगूं लागली. यावरून एखादी आपत्ति आपणच आपल्यावर ओढवून घेऊन मग तींत स्वतःची नामुष्की होऊं लागली म्हणजे कसला तरी काडीचा आधार घेऊन, भलत्याच गोष्टीचें निमित्त पुढें करावयाचें, अशी वेळ आली असतां म्हणतात.

अंग——अंग ओढविणें—स्वतः पुढें होऊन एखादी गोष्ट अंगावर घेऊन ती पार पाडणें; आपल्यावर एखादी जबाबदारी घेणें; एखाद्या कार्यांत स्वतः पुढाकार घेणें, पुढें होणें. ‘ आपुलेंचि अंग तुम्हीं वोडविलें । त्याचें निवारिलें महादुःख ॥ ’

अंग काढणें-काढून घेणें--१ स्वतःवरची एखादी जबाबदारी टाळण्याकरितां एखाद्या गोष्टीशीं असलेला आपला संबंध सोडून देणें; एखाद्या कामांतून बाहेर पडणें; माघार घेणें. २ (गो. आंग काडप) दचकणें; भिणें; अंग चोरणें.

अंग घालणें—१ एखाद्या गोष्टींत स्वतः पडणें; मन घालणें; एखाद्या बाबतींत स्वतः लक्ष्य देणें; जबाबदारी घेणें. २ जमिनीवर अंग टाकणें. ‘ ऐकोनियां अंग घाली पृथ्वीवरी । ’ –दा ३.५.३०.

अंग घांसणें--परिश्रम करणें; स्वतः पुढें होऊन जबाबदारी पतकरणें व त्या कामांत स्वतः झीज सोसणें; स्वतःस तोषीस लागली तरी एखादें कार्य करणें. ‘ परांजप्यांनीं प्रामाणिकपणें अंग घांसून स्वतःची स्कीम करून कार्यास लागावें. ’–केले १.२६३.

अंग घेणें—भरणें—१ अंगावर मांस चढणें; गुबगुबीत होणें; शरीर सुदृढ होणें. २ (गो. अंग घेवप) कामांत भाग घेणें; मदत करणें; एखाद्या कार्यांत अंशभागी होणें.

अंग चढणें--१ स्पर्श होणें; लागणें; संबंध येणें. २ एका वर्गांत येणें; सदरांत पडणें. ‘ जे विधीसी नातुडे । तें निषेधाचें अंग चढे । ’–एभा ७.६९.

अंग चढून येणें—(व.) अंगांत तापाची कसर येणें; अंग कसकसूं लागणें; अंगांत ताप भरून येणें; अंग मोडून येणें; मरगळणें.

अंग चोरणें-जोगावणें—१ अंग राखून काम करणें, चुकारपणा करणें; कामाची टाळाटाळ करणें. ‘ संत सेवेसी अंग चोरी । दृष्टी न पडो तयावरी ॥ ’ २ एखादी गोष्ट (मार, खालीं पडणारी वस्तु इ.) चुकविण्याकरितां अंगाचीं गात्रें संकोचित करणें. ३ अरुंद मार्गांतून जातांना, दुसऱ्यास स्पर्श होऊं नये म्हणून अंगाचा संकोच करणें.

अंग जड करणें--(गो. अंग जड करप) एखाद्या कार्याची जबाबदारी अंगावर घेण्यास कांकूं करणें; एखाद्या कामांत भाग घेण्याचें टाळूं पहाणें किंवा त्या कामांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणें.

अंग जड जाणें--(गो. अंग जड जावप) अंगावर शहारे येणें; अंगावर कांटा उभा राहणें; शरीर जड वाटूं लागणें; शरीरास बधिरता येणें.

अंग झांकणें-लपविणें—एखाद्या कामांत स्वतः घेतलेला भाग दृष्टीस पडूं न देण्याचा, गुप्त ठेवण्याचा, प्रयत्न करणें; एखाद्या गोष्टींतील आपलें अस्तित्व उघडकीस न येऊं देण्याचा प्रयत्न करणें.

अंग झाडणें--एखादी वस्तु किंवा पदार्थ आपल्या अंगास चिकटला असतां तो जसा आपण झाडून टाकून त्याचा संबंध तोडतों, त्याप्रमाणें एखाद्या गोष्टीशीं आपला मुळींच संबंध नाहीं असें दाखविणें; एखादी गोष्ट नाकबूल करणें; साफ नाहीं म्हणून मोकळें होणें. ‘ आंग झाडिती न मर्मे । येणें बोलें ॥ ’ –ज्ञा १७.३७२.

अंग झाडून मोकळें होणें--आपला कांहीं संबंध नाहीं असें दाखविणें; दूर होणें; अंग काढून घेणें; संबंध सोडून देणें; जबाबदारी टाळणें.

अंग टाकणें--१ वाळणें; कृश होणें; क्षीण होणें. 'आई गेल्यापासून बाळानें अंग टाकलें आहे.' २ पडणें; झोंपणें; विश्रांतीसाठीं जमिनीवर वगैरे हातपाय पसरून निजणें. 'घरीं जाऊन केव्हां अंग टाकीन असें मला होतें.' ३ जोरानें देह जमीनीवर टाकणें; दुःख, शोक वगैरे अनावर झाल्यामुळें शरीरावरचा ताबा सुटून शरीर धरणीवर एकदम पडणें. 'आस खुंटुनी येतसे रडें। अंग टाकुनी भूमिसी पडे॥' -आ. यज्ञरक्षण.

अंग टेकणें—१ विश्रांतीसाठीं बसणें; स्थिर होणें. २ आश्रय घेणें; आधार घेणें. 'योगें अंग टेकिलें योगीं।'-अमृ ९.२६.

अंग दर्शविणें—एखाद्या गोष्टींत आपला हितसंबंध दाखविणें. 'ह्या कामीं महाराजांना तुम्ही आपलें अंग न दर्शविलें तर चांगलें होईल.'

अंग दाखविणें—एखाद्या गोष्टींत आपणास गम्य आहे असें दाखविणें; एखाद्या कलेंतील प्रावीण्य, एखाद्या कामांतील कौशल्य, चातुर्य नजरेस आणणें, व्यक्त करणें.

अंग दुडपणें—दुमडणें—दोडपणें—(गो. आंग दोडप) अंग चोरणें पहा.

अंग देणें—१ साहाय्य करणें; हातभार लावणें. २ प्रवृत्त होणें; वळणें; स्थान, अवसर देणें; आसरा देणें. 'सुखा अंग देऊं नये।'

अंग धरणें—१ लठ्ठ होणें; सुदृढ होणें; शरीरावर मांस येणें. २ अंग दुखणें; शरीर आंखडणें; संधिवातादि रोगांनीं शरीरगात्रें संकुचित होणें.

अंग न दाखविणें—मागें राहाणें; एखाद्या गोष्टीबद्दलची माहिती, कुशलता, पात्रता उघड न करणें; जबाबदारी टाळणें

अंगरक्षक——अंगरक्षक कसा असावा? तर तो १ मातबर नामांकित पाहिजे, २ विश्वासू पाहिजे, ३ निस्पृह पाहिजे, ४ प्रसंगीं प्राण समर्पण करणारा पाहिजे. हे चार गुण अंगीं असणाऱ्यास खास राजाचा अंगरक्षक ठेवावा —हच ५०.

अंग राखणें--अंग चोरून काम करणें; स्वतःवर संकट न येईल याची काळजी घेऊन काम करणें. 'वृद्ध यथाशक्ति समर करितो; नेणेचि अंग राखाया।'-मोद्रोण १६-८.

अंगची बुद्धि—उपजत बुद्धि; स्वतःची बुद्धि; उपजत शहाणपण; शिकून, पढवून आलेलें शहाणपण नव्हे; दुसऱ्याचें ऐकून अगर दुसऱ्याचा सल्ला घेऊन बनविलेला नव्हे तो विचार.

अंगाखांद्यावरचें—शरीरावर धारण करण्याचीं भूषणें, वस्त्रें वगैरे; वस्त्रालंकार; डागडागिने.

अंगाखालची; अंगाखालची बायको—विवाहादि संस्कारानें संबंध जडलेला नसून केवळ उपभोगापुरता जिच्याशीं संबंध आहे अशी स्त्री; रखेली; उपस्त्री; राख; अंगवस्त्र.

अंगाखालीं घालणें—१ आपली नसलेली वस्तु वगैरे आपल्या ताब्यांत घेणें; आपलें स्वत्व स्थापन करणें; अपहार करणें; दुसऱ्याची वस्तु वगैरे लाटणें. २ विशेषतः दुसऱ्याची स्त्री किंवा एखादी वेश्या स्वतःच्या उपभोगासाठीं राखून ठेवणें; एखाद्या स्त्रीस फूस लावून आपल्या नादीं लावणें. ३ भोग्य स्त्री म्हणून ठेवणें. "मस्तानी कलावंतीण आणली आहे तिचें म्हणणें जे, 'मजला अंगाखालीं घालावें.'"-पेच ३०.

अंगाखालीं पडणें—१ चिरपरिचित होणें; अभ्यासानें सहज साध्य होणें; संवयीचें होणें परिचित होणें, एखाद्या गोष्टीची वहिवाट पडणें. २ भोग देणें; परपुरुषाशीं रत होणें अंगसंग देणें.

अंगाचा आंकडा होणे--शरीरास वक्रता येणें; हातपाय वगैरे आंखडून शरीर वांकडें होणें; आंकडीनें पेटके येणें; अंग वांकडें होणें.

अंगाचा आळापिळा करणें—१ अंग पिळवटणें; आळे पिळे देणें; आळोखे पिळोखे देणें. २ अतिशय श्रम करणें; अतिशय आटाआट करणें; शक्तीबाहेर परिश्रम करणें; शरीरास अतिशय कष्ट देणें.

अंगाचा खकाणा करणें—[खकाणा=धगधगीत राख] (व.) संताप करून घेणें; अंगाची आग आग करून घेणें; भयंकर रागावणें व त्यामुळें स्वतःस त्रास करून घेणें.

अंगाचा खुर्दा करणें—[खुर्दा=मोड, तुकडे, चेंदामेंदा] अंग खिळखिळें करणें; अंग घुसळणें.

अंगाचा खुर्दा होणें—अतिशय श्रमानें अगदीं थकून जाणें; अंगाचीं सर्व गात्रें अगदीं दमून जाऊन मलूल होणें; गलितगात्र होणें; अंगाचे मणके ढिले होणें. 'बैलगाडीच्या प्रवासानें माझ्या अंगाचा खुर्दा होऊन गेला.'

अंगाचा तिळपापड होणें—अतिशय राग येणें; पायाची आग मस्तकास जाणें; अंगाची लाही लाही होणें. (तिळाचा पापड विस्तवावर टाकला असतां जसा एकदम फुगून येतो त्याप्रमाणें.) 'मी दहांच्या तोंडून ऐकलं आणि माझ्या अंगाचा असा तिळपापड झाला कीं सांगतां पुरवत नाहीं.' --मोर १५. तळपापड असाहि पाठ आहे. तेथें तळलेला पापड हा अर्थ अधिक सयुक्तिक दिसतो.

अंगाचा भडका-हुरपळा-होरपळा होणें—रागानें, संतापानें किंवा तापानें वगैरे अतिशय अंग तेंपण; अंगाची

भयंकर आग होणें; अंगाची लाही लाही होणें; अंग भाजून निघणें.

अंगाचा मळ न देणें—अतिशय कृपण, चिक्कू असणें. अंगाच्या मळाला काय किंमत? तो उलट दूर व्हवा अशी सर्वांची इच्छा असणार. पण कृपण माणूस तोहि फुकट जाऊं द्यावयाचा नाहीं. तु०–उष्ट्या हातानें कावळा न हांकणें.

अंगाची आग–लाहकी–लाही–होळी होणें—अतिशय संतापानें अंगाची आग आग होणें; अंगाचा भडका होणें; संतापानें लाल होणें. अंगाची लाही होणें, पहा.

अंगाची चौघडी करणें—१ शरीराच्या चार घड्या करणें; डोंबारी वगैरे कसरतींत करतो त्याप्रमाणें अंग अनेक प्रकारें दुमडून, मुरडुन दाखविणें. २थंडी, ताप वगैरेमुळें सर्व गात्रें पोटाशीं जुळून घेऊन निजणें; हातपाय आंखडणें; अंगाचें मुटकुळें करणें.

अंगाची लाही करणें—एखाद्या मनुष्याला भयंकर राग येईल अशी कृति करणें; एकाद्यास अत्यंत चिडविणें, संतापविणें वगैरे.

अंगाची लाही होणें—१ ज्याप्रमाणें आगीमुळें धान्याची लाही होते त्याप्रमाणें संतापानें शरीराचा भडका उडणें; रागानें वगैरे शरीराची भयंकर आग होणें; अंगाचा तिळपापड होणें; अतिशय राग येणें. ‘ तें तिजला खपलें नाहीं । अंगाची झाली लाही । ’–विक १७. ‘ होळकरांचे शब्दबाण वर्मी लागले ते त्याच्या काळजाला घरें पाडीत होते, आणि त्याचा असा जयजयकार झालेला पाहून त्याच्या अंगाची लाही झाली. ’ –पामो १९७. २ उष्मा, आग इ. नें घालमेल होणें, जीव कासावीस होणें.

अंगाचें अंथरूण करणें—ज्याप्रमाणें आपणांस अंथरूण हें दमल्यानंतर विश्रांतिकारक व सुखकारक होतें त्याप्रमाणें एखाद्यानें स्वतःबद्दलची काळजी सोडून दुसऱ्याकरितां सर्व प्रकारच्या संकटांना तोंड देणें; एखाद्यास सुख देण्याकरितां किंवा त्याच्या उपयोगी पडण्याकरितां स्वतःच्या शरीरास फार कष्ट देणें; आश्रय देणें; आधार देणें.

अंगाचें अंथरूण होणें— अंथरुणाला खिळणें; ताप वगैरे-मुळें अगदीं गळून जाणें; शरीरांत उठण्याबसण्याची शक्ति नाहींशी होणें; फार अशक्तता येणें.

अंगाचें कातडें काढून जोडा शिवणें—एखाद्यानें दुसऱ्या-वर अत्यंत उपकार केले असतां उपकृतास त्याचें इतकें ओझें वाटेंत कीं, त्यानें कांहींहि केलें तरी उपकर्त्याचा तो उतराई होऊं शकणार नाहीं. स्वतःच्या अंगाच्या कातड्याचे जोडे शिवून जरी त्याच्या पायांत घातले तरी ते उपकार फिटणार नाहींत अशी त्याची समजूत होते, अशा वेळीं वापरतात. उपकारांची अत्यंत तीव्रतेनें जाणीव बाळगणें; अतिशय कृतज्ञता मनांत वागविणें.

अंगाचे चकदे काढणें—अतिशय हाल करणें; अंगावर जखमा करणें; अंगाचे मांसाचे लचके काढणें; भयंकर छळ करणें; त्रास देणें.

अंगाचे धुडके उडविणें—अतिशय मार देणें; त्रास देणें; हालहाल करणें; शरीराच्या लकतऱ्या काढणें; चेंदामेंदा करणें; चिंधड्या चिंधड्या करणें.

अंगाचें पाणी करणें—होणें—अत्यंत परिश्रम करणें; इतके श्रम करणें कीं, अंगांतील रक्ताचें पाणी होऊन जाईल; घामाघूम होईपर्यंत श्रम करणें. ‘अंगाचें पाणी करूनच या हतभाग्य आयुष्याचे दिवस मला लोटले पाहिजेत. ’ –पाव्ह ९९.

अंगाच्या चिंध्या करणें—१ (व.) अंग ओरखडणें; अंगावर जखमा वगैरे होणें. २ त्रास देणें; छळणें; हाल करणें; अंगाचे धुडके करणें.

अंगांत मांग शिरणें—मनुष्यजातींत मांग हा अतिशय क्रूर आहे अशी समजूत आहे. यावरून एखाद्या मनुष्यास भयंकर संताप येऊन तो स्वतःस विसरून दुष्टपणाचें कृत्य करूं लागल्यास म्हणतात. भयंकर रागावणें; संतापणें; क्रोधानें अगदीं वेडें होणें; रागाच्या भरांत भलतेंच कृत्य करणें.

अंगांत ग्रंगी येणें–वारें घेणें–शिरणें—१भूतसंचार होणें; अवसर येणें. ‘ अंगीं घेऊनिया वारें दया देती । तयां भक्तां हातीं चोट आहे।। ’—तुगा २८४२. २ अति उत्साहानें काम करणें; एखाद्या तिसऱ्याच व्यक्तीचा अंगांत संचार झाल्याप्रमाणें स्वतःच्या शरीराची पर्वा न करतां एखाद्या बाबतींत अतिशय परीश्रम करणें.

अंगांत शीतकळा येणें—१ अंगाला शहारे येणें; अंग थंडीनें कांपू लागणें. २ (माण.) अंगांत वारें येणें; भूतादिकांचा संचार होणें.

अंगानिराळा–बाहेर टाकणें–झोंकणें–राखणें–सोडणें–झिडकारणें—१ एखादी जबाबदारी घेण्याशीं, एखादें कार्य करण्याशीं आपला संबंध नाहीं असें दाखवून त्यापासून अलिप्त राहाणें, मध्येंच सोडून देणें. २ एखाद्याशीं संबंध सोडून देणें; त्याला दूर करणें; त्याचा त्यागकरणें. ‘ पेशव्यांनीं आम्हांला अंगाबाहेर टाकलें आहे. ’ –अस्तभा १४.

अंगानिराळें करणें—अंगाबाहेर टाकणें पहा.

अंगाबरोबर होणें; अंगांत–अंगाला बसणें—एखादा कपडा बेताचा होणें; कपडा अंगाला ठीक बसणें.

अंगाला लावणें—१ अंगाला तेल वगैरे चोपडणें; तैल मर्दन करणें; सुगंधी उटणें वगैरे अंगास लावणें; मालिश करणें. 'नवी नवरी म्हणून अंगाला लावीन म्हटलें, नाहीं!'-झांमू. २ बाळंतिणीचें अंग तेलादिकांनीं रगडणें.

अंगावर—१ स्वतः; स्वतःच्या जबाबदारीवर. ' त्याच्या विम्याचे रुपये मी अंगावर भरले. ' २ तारण वगैरे न देतां, व्यक्तिशः जबाबदारीवर; जातीवर (कर्ज वगैरे काढणें).

एका अंगावर असणें—होणें—एका कुशीवर निजणें, पडून राहाणें; एका बाजूवर निजून असणें, वळणें.

अंगावर कांटा उभा राहाणें—भीतीनें अगर आनंदानें अंग रोमांचित होणें; शहारे येणें. ' महंमद तघलकाचीं क्रूर कृत्यें वाचून अंगावर कांटा उभा राहतो. '

अंगावर काढणें—आजार वगैरे मुकाट्यानें सोसणें; दुखणें काढण; जातीनें त्रास सहन करणं; स्वतः कष्ट सहन करणें.

अंगावर कोसळणें—कोसळून पडणें – ओघळणें—१ रागानें अंगावर चालून जाणें; अंगावर रागानें खेकसून ओरडणें; अंगावर हात टाकण्यास जाणें. २ संकट, आपत्ति अंगावर गुजरणें; एखाद्या विपत्तींत सांपडणें.

अंगावर खून चढणें—खून केल्यानंतर किंवा रक्तपात वगैरे केल्यानंतर एक प्रकारचा अंगामध्यें भयंकर आवेश येतो त्यास म्हणतात. अंगावर उन्माद चढणें. 'तत्काळ माझ्या अंगावर खून चढला. '–विवि १८७६.४.६४.

अंगावर गोण-गोणी येणें—(व.)अंगावर जोखीम येणें; एखाद्या कामाचें ओझें अंगावर येऊन पडणें; जबाबदारी पडणें; येऊन बेतणें.

अंगावर घेऊन—स्वतःवर जबाबदारी घेऊन; आपलें म्हणून; कैवार घेऊन; स्वतः पुढाकार घेऊन (करणें, बोलणें सांगणें, पुसणें).

अंगावर घेणें—१ स्त्रीनें मुलास प्यावयास घेणें; स्तनपान देणें. २ स्वतःवर जबाबदारी घेणें; एखाद्या कामांत पुढाकार घेणें. ३ आपला म्हणणें; एखाद्याचा कैवार घेणें, पक्ष घेणें.

अंगावर तुटणें–तुटून पडणें—हल्ला करणें; अंगावर चालून जाणें; एखाद्यावर भयंकर संतापणें.

अंगावर देणें—१ हल्ला करणें; अंगावर चालून जाणें; एखाद्यावर भयंकर संतापणें. २ जामिनकी किंवा गहाण न घेतां वैयक्तिक जबाबदारीवर कर्ज वगैरे देणें; बिनतारणावर वैयक्तिक पतीवर रक्कम देणें.

अंगावर देणें-बांधणें-भरणें-पोसणें-करणें इ.—स्वतःच्या जबाबदारीवर, स्वतः पुढाकार घेऊन, स्वतःच्या साधनांनीं वगैरे एखादी गोष्ट करण्यास सिद्ध होणें.

अंगावर पडणें-येणें—१ शिरावर पडणें; जबाबदारी येणें; एखादा माल विकावयास घेतला असतां योग्य भावांत विक्री न होतां तसाच पडून राहाणें. २ गळ्यांत येणें; एखादें काम स्वतःचा कांहीं संबंध नसतांहि करण्याची जबाबदारी येऊन पडणें. ३ चालून जाणें; वसकन अंगावर तुटून पडणें. ४ हल्ला करणें; चालून येणें.

अंगावर पिणें–खाणें—स्तनपान करणें; मूल बाहेरचा आहार घेण्यापूर्वी आईच्या दुधावर अवलंबून असतें. केवळ स्तनपान करण्याइतकें लहान असणें.

अंगावर बेतणें—१ अंगावर पडणें, कोसळणें. २ संकटांत सांपडणें.

अंगावर शेकणें—एखाद्या गोष्टीपासून इजा पोंहोचणें; नुकसान होणें; एखाद्या व्यापारांत खूड येणें; एखादें कुभांड येणें.

अंगावरचें—१ स्तनपान करणारें; आईचें दूध पिणारें; केवळ आईवर पोषणाकरितां अवलंबून असणारें (मूल); लहान मूल. २ आईचें दूध.

अंगावरचें जाणें—स्त्रियांस प्रदरादि रोग होणें; शरीरांतून रक्तादि जाणें; स्राव होणें; धुपणी लागणें.

अंगावरचें तोडणें—लहान मुलाचें अंगावर दूध पिणें बंद करणें; स्तनपान बंद करून मुलास इतर अन्न खाऊं घालावयास लागणें किंवा वरचें दूध पाजणें.

अंगावरचें मूल—आईच्या अंगावर पिणारें लहान मूल.

अंगावरून वारा जाणें—अर्धांग वायु होणें; पक्षघात होणें; अंगाचा कांहीं भाग बधिर, लुला होणें. ' भूतपिशाच्च लागलें, अंगावरून वारें गेलें' –दा ३.७.५५.

अंगास कुयला लागणें—कुयल्याचीं कुसें अंगास टोंचूं लागलीं म्हणजे भयंकर आग होते; यावरून एखादी गोष्ट समजल्यामुळें वगैरे अतिशय संतापणें; अतिशय राग येणें; रागानें अंगाची आग होणें; एखादें भाषण मर्मी झोंबणें.

अंगास झोंबणें—(व.) अंगास स्पर्श करणें; धरणें; एखाद्या स्त्रीच्या वगैरे अंगाशीं लगट करणें.

अंगास बसतें येणें—अंगास बरोबर होणें; एखादा कपडा वगैरे बेताचा होणें; ठीक बसणें. 'नोकरलोकांच्या अंगास बसते येतील असे पोषाक करण्यांत यावेत. '–खानगींतील नोकरांचे पोषाक (बडोदें).

अंगास मिरच्या लागणें— नाकास मिरच्या लागणें; एकदम राग येणें; अतिशय संताप येणें; एखादी गोष्ट ऐकून भयंकर चीड येणें.

अंगास मुंग्या येणें—वातादि विकारामुळें अंगाला एक प्रकारची बधिरता येणें; रुधिराभिसरण नीट न झाल्यामुळें

एखाद्या अवयवाची संज्ञा नाहींशी होणें; एखादा अवयव जड होणें.

अंगास-अंगीं लागणें--१ पुष्टिदायक होणें; शरीरास हितकारक होणें. २ शाबित होणें; लागू होणें; सिद्ध होणें; अंगीं चिकटणें (एखादा दोष, आरोप वगैरे).

अंगास लावणें--१ स्नानाच्या अगोदर तेल हळद अंगाला लावणें; मालिश करणें. २ बाळंतिणीच्या अंगाला तेल वगैरे लावणें व अंगमर्दन करणें.

अंगास लावणें, लादणें—एखाद्या गोष्टीचा एखाद्याशीं संबंध जोडणें; जबाबदारी चिकटविणें; गुन्हा, अपराध वगैरे शाबित करणें.

अंगीं-अंगें—१ स्वतः; जातीनें. 'अंगें करिताती आपण। दोघेजण मिळोनी॥'–एभा ७.५७८. २ वतीनें; मार्फत; प्रतिनिधिरूपानें. 'दादा अंगें वयनी सोयरी'.

अंगीं अन्न लागणें--अन्नाचा शरीरावर चांगला परिणाम होणें; शरीर पोसणें.

अंगीं असणें--१ जवळ, पदरीं, ठायीं असणें. २ कोणताहि गुण असणें.

अंगीं आणणें--१ आपल्यावर घेणें; पतकरणें; जबाबदारी स्वीकारणें. २ आपल्या ठिकाणीं असूं देणें; आपल्या स्वाधीन करून घेणें (एखादा गुण, कला वगैरे).

अंगीं आदळणें—अंगास चिकटणें; अंगावर कोसळणें. 'अंगीं आदळतो शोक।'–दावि ४१३.

अंगीं (एका अंगीं) उणा-अंग उणा--१ पोरका; माता पिता वगैरे कोणी नसलेला. २ व्यंग; एखादा अवयव नसलेला किंवा एखादें गात्र विकल असलेला. ३ सरळ नसलेला; ज्याची बाजू लंगडी आहे असा; निरपराधी नव्हे असा; दोषाची जाणीव असलेला. म्ह– अंगीं उणा तर जाणे खाणाखुणा.

अंगीं खिळणें--सर्व शरीरभर पसरणें; देह व्यापून राहणें; शरीराशीं एकजीव होणें; शरीरांत भिनणें.

अंगीं घुमारणें--पिशाच्चाचा शरीरांत संचार होणें; अंगांत येणें; अवसर येणें. 'आणि आंगीं घुमारिलें।'–दावि १५६.

अंगीं जिरणें--अंगवळणीं पडणें; संवयीचें होणें; शरीरांत पूर्णपणें भिनणें; आत्मसात होणें.

अंगीं ताठा भरणें--अतिशय गर्व होणें; फार अभिमान वाटणें. 'अंगीं भरलासे ताठा। वळणीं नये जैसा खुंटा।'- तु. गा.

अंगीं तीन (नऊ) मण तिखें जळणें--[तिखें=पोलाद] अतिशय गर्विष्ठ असणें; फार ताठ्यानें वागणें.

अंगीं तुटणें—कृश होणें; वाळणें; रोड होणें.

अंगीं दोष लावणें—आळ घेणें; एखाद्यावर दोषारोप करणें; अपराधी ठरविणें; गुन्हा शाबित करणें.

अंगीं नसणें--१ स्वतःस माहिती, अनुभव नसणें; ज्ञान नसणें; ठाऊक, अवगत नसणें. २ स्वाभाविक नसणें; मूळचा, अंगाचा, सहजजात नसणें. 'इतकें औद्धत्य त्याच्या अंगीं नाहीं.'

अंगीं पडणें--१ स्वीकारणें; पक्ष घेणें; अंगीकार करणें. 'हा अविद्येचा अंगीं पडे।'–अमृ ६.७. २ संवय होणें; स्वाभाविक वाटणें; अंगवळणीं पडणें; शरीरांत भिनणें, मुरणें.

अंगीं फुटणें--१ लठ्ठ होणें; अंग धरणें; मांसपिंडानें वाढणें. २ एखादा रोग वगैरे अंगावर स्पष्ट दिसूं लागणें; शरीरावर स्पष्ट आविष्कार होणें.

अंगीं बसणें--१ संवयीचें होणें; सुसाध्य असणें; अंगवळणीं पडणें. २ एखादा कपडा वगैरे अंगाला ठीक येणें, बेताचा होणें.

अंगीं बिऱ्हाड करणें-देणें--स्वतःच्या ठिकाणीं वास करूं देणें; आपल्या शरीरांत, हृदयांत, मनांत वगैरे थारा देणें; एखादा दुर्गुण, पापवासना वगैरेस आपल्या ठिकाणीं मूळ करूं देणें, त्यांस आश्रय देणें, अशी एखादी भावना मनांत उत्पन्न होऊं देणें.

अंगीं भरणें, अंगींमाशीं भरणें--लठ्ठ, गुटगुटीत होणें; पुष्ट होणें.

अंगीं भिनणें--अंगांत पक्कें मुरणें; एकजीव होणें; शरीराशीं समरस होणें; अंगवळणीं पडणें.

अंगीं माशा मारणें--अंगावर बसलेल्या माशाहि न हांकलण्याइतकें आळशी असणें; निरुद्योगी असणें; आळशी बनणें; स्वस्थ बसणें; अंगांत पराक्रम नसणें.

अंगीं मिरच्या लागणें-कुयले लागणें-झोंबणें— अंगाची आग होणें, लाही लाही होणें; अतिशय संतापानें जळफळणें; आपलें व्यंग उघडकीस आलें असतां, कोणी वर्म काढलें असतां रागानें शरीराची आगआग होणें.

अंगीं मुरणें--१ संवयीचा होणें; अंगवळणीं पडणें. २ हाडीं शिरणें; ताप वगैरे शरीरांत दीर्घकाल राहणें. ३ देवी, गोवर आंतल्याआंत नाहींसा होणें; शरीराबाहेर न पडतां तसाच एखादा रोग बरा होणें.

अंगीं येणें--पिशाच्चाचा संचार होणें; अंगांत येणें; भूतबाधा होणें. 'शूद्र एक त्याचे आंगीं आला बोले।'–रामदासी २. ११.

अंगीं लागणें--एखादा पदार्थ खाल्ला असतां तो योग्य

तऱ्हेनें पचून त्याचा शरीरपोषणाच्या कामीं उपयोग होणें; जिरणें; पचणें.

अंगीं वाजणें (बाजणें)—शरीरामध्यें वास करणें, उत्पन्न होणें; शोभून दिसणें. ' थोरपण अंगीं वाजे नाना । '–दावि १५.

अंगींचा उतारा—१ अनेक दिवस वापरून नंतर टाकून दिलेलें वस्त्र; अंगावरील वस्त्र. २ अंगावरून ओवाळून टाकलेला जिन्नस. ' तुझे अंगीचा उतारा । तो मज देईगा दातारा । ' –भज ४१.

अंगीची सावली करणें-अंगाची सावली, छाया करणें—आसरा देणें; संरक्षण करणें; पाठीशीं घालणें. 'आपुलिये अंगीची सावली । अहोरात्र करुनि तया रक्षी ॥ '

ॐ अंग (आंग) उदकान नितळ, मन सतान–नितळ.—(गो.) अंग जसें पाण्यानें स्वच्छ होतें तसें मन सत्यानें शुद्ध होतें.

अंग धांवें कामासाठीं गती झाली उफराटी—एखादा मनुष्य एखादें काम करण्यासाठीं पुष्कळ परिश्रम करतो. पण तो जर योग्य दिशेनें कामाला न लागतां भलत्याच दिशेनें काम करूं लागला तर त्याचे सर्व श्रम व्यर्थ होतात. तेव्हां विरुद्ध गतीनें कार्य केल्यास कांहीं उपयोग नाहीं. कार्य करावयाचें तें योग्य मार्गानें केलें पाहिजे, नाहींतर ज्या दिशेकडे जावयाचें त्याच्या उलट धांवूं लागल्यास इच्छित स्थलाच्या जवळ जाण्याच्या ऐवजीं त्यापासून दूर मात्र जाणें होईल.

अंग (आंग) भिजल्याबगर नुस्तें धरूं नज—(कों. गो.) पाण्यांत शिरून अंग भिजवून घेतल्याशिवाय मासे पकडतां येणार नाहींत. श्रमाशिवाय सुख मिळत नसतें.

अंग मेहेनतीचें काम तेणें मिळे आराम—मनुष्यानें शारीरिक श्रम केल्यास त्यानंतर शरीराला सुख मिळतें. आरोग्य राहण्यासाठीं मनुष्यास शारीरिक श्रम हे अवश्य आहेत.

अंगची शिंदळ तिला कुंटण कशाला—कुंटीण ही कुमार्गास लावणारी स्त्री असते; परंतु जी स्त्री स्वतःच दुराचारी आहे तिला दुसरी कोणी कुमार्गदर्शक लागत नाहीं. स्वाभाविकच दुराचारी माणसाला कोणाची मदत आवश्यक नसते. तु०– ' जातीची शिंदळी । तिला कोण कैसा वळी ॥ '–तुगा २९६५.

अंगचें पाप देईना, तो पुण्य कसचें देतो—पापासारखी त्याज्य वस्तूहि जो देत नाहीं तो पुण्य कसचें देतो ? जो मनुष्य दुसऱ्याच्या उपयोगी कधींहि पडत नाहीं अशा मनुष्याबद्दल योजतात.

अंगांत चोळी आणि गांवाला आरोळी—आपली वस्तु आपणाजवळ असतांना गांवभर तिचेबद्दल हरवली म्हणून ओरड करावयाची. तु०–खांकेत कळसा गांवाला वळसा.

अंगांत भरजरी अंगरखा आणि पायाला उन्हाचा तडाखा—सर्व शरीरावर उत्तम उंची पोशाख घातला व पायांत जर जोडा घातला नाहीं तर शरीरास उन्हापासून अत्यंत त्रास होणारच व मग त्या बहुमोल पोषाखाचा काय उपयोग ? याकरितां शरीर नुसतें शोभविण्यापेक्षां शरीरास आवश्यक गोष्टी पुरविणें अधिक श्रेयस्कर होय.

अंगानें लुकडा मनानें धुडफुडा—एखादा मनुष्य शरीरानें अशक्त असतो पण खंबीर मनाचा असतो, अशाबद्दल म्हणतात.

अंगापेक्षां बोंगा आणि कुठें जाशी सोंगा—स्वतःच्या शरीरापेक्षां आपल्या वस्त्राचे सोगे वगैरे जर जास्त मोठे असले तर बेढब दिसतें. यावरून मूळ गोष्टीपेक्षां आनुषंगिक गोष्टींचा बडेजाव किंवा विस्तार फार मोठा असल्यास म्हणतात. 'अंगापेक्षां बोंगा कुठें चाललास शिमग्यांतल्या सोंगा ' असाहि पाठ आहे.

अंगापेक्षां बोंगा जड–मोठा—मूळ गोष्टीपेक्षां आनुषंगिक गोष्टी वाजवीपेक्षां अधिक मोठ्या असूं नयेत.

अंगावर आली घोरपड आतां करतो चरफड—एखाद्या मनुष्यानें स्वतः होऊन आपल्यावर संकट ओढवून घेतलें व मागाहून त्याबद्दल कुरकुरूं लागला तर त्या चडफडीचा काय उपयोग ? स्वतः ओढून आणलेल्या संकटास स्वतःच तोंड दिलें पाहिजे; त्याबद्दल दुसऱ्या कोणासहि दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

अंगावर आलें शेपटावर गेलें—एखादें मोठें संकट आलें असतांहि अत्यंत कमी तोशीस लागून त्यांतून पार पडलें असतां वापरतात. प्राणावर बेतावयाची ती शेंपूट तुटूनच भागलें तर नशीबच म्हणावयाचें. प्राणावर आलेलें किंवा जीवावरचें शेंपटावर गेलें, असेंहि म्हणतात.

आली (आलें) अंगावर तर घेतली (घेतलें) शिंगावर—एखादी म्हैस किंवा गुरूं आपल्या मार्गानें जात असतां त्याच्या वाटेंत जर एखादी व्यक्ति वगैरे आली तर स्वाभाविकच तें तिला शिंगावर उचलून घेतल्याशिवाय राहाणार नाहीं. त्याप्रमाणें एखादा मनुष्य आपलें कार्य सरळ मार्गानें करीत असतां त्याच्या वाटेंत जर कोणी आडवा आला तर त्याचा अडथळा तो दूर केल्याशिवाय राहणार नाहीं व तो दूर करीत असतां जर आडव्या येणाऱ्या मनुष्याचें कांहीं नुकसान झालें व कार्य करणाऱ्या मनुष्याचा फायदा झाला तर तें योग्यच झालें असें आपण म्हणूं. त्याचप्रमाणें जर एखादें कार्य करीत असतां स्वतः प्रयत्न न करतांहि एखादी संधी आली किंवा लाभाची गोष्ट मध्यें आली तर तिचा फायदा करून घेणें हें सरळ क्रमप्राप्तच आहे. लक्षणेनें याचा अश्लील अर्थहि करतात.

अंगावर घातलं सोनं, नू अंगाला लावलं ढोनं—(व.)[ढोन-ण=लांकडाचा मोठा ओंडका. ढोनचें अनेकवचन ढोनं.] (अ) अंगावर सोन्याचे अलंकार घालणें मोठें जोखमीचें काम आहे. ते अलंकार संभाळण्यासाठीं भयंकर चिंता वाहावी लागते व तकलीफ सहन करावी लागते. अंगाला ढोनं म्ह. जळतीं लांकडें अथवा अग्नि लागल्यापासून जितकी तकलीफ होते तितकी सोन्याच्या दागिन्यापासून होते.

(आ) बायकोच्या अंगावर खूप सोन्याचे दागिने घातले आहेत पण तिला एकसारखा छळ सहन करावा लागतो आहे, तर त्या अंगावर सोनें घालण्याचा तिला काय उपयोग? अंगाला ढोणं लावणें म्हणजे जाळणें, विस्तव लावणें. "मुलीला सासर श्रीमंत सांपडलं खरं; दागदागिने लागतील तेवढे आहेत, पण सासुरवास भयंकर आहे. काय करतां श्रीमंती? अंगावर घातलं सोनं नी अंगाला लावलं ढोणं! एकपरी गरीबी बरी!"

अंगावर पडतां माल सोडवी त्याचें मुद्दल—एखादी आपणांस नको असलेली वस्तु आपल्या गळ्यांत पडली असली तर ती शक्य तितक्या लवकर विकून टाकून किंवा तिची व्यवस्था लावून पदरांत पडलेली किंमत घेऊन कमींत कमी नुकसान होईल अशी व्यवस्था करणें शहाणपणाचें असतें.

अंगावर पडलें ऊन दादला घेतो बायकोचे गुण—स्त्री जर आळशी असेल व ती अंगावर ऊन पडेपर्यंत निजून उठली नाहीं तर नवऱ्यासच उठून आवश्यक तीं सकाळचीं कामें करावीं लागतात व बायकोप्रमाणें घरांत राबावें लागतें. बायकोला पण दुखवितां येत नाहीं. प्रसंग येऊन ठेपला म्हणजे मनुष्य नरम होतो.

अंगावर पडें तर दुणें बळ चढें—एखादी जबाबदारी अंगावर पडलीच म्हणजे मनुष्य आपलें सर्व सामर्थ्य एकत्र करून कशी तरी ती पार पाडतोच; एखादें काम आपण आपणावर घेतलें किंवा आपल्या वांट्यांस आलें म्हणजे मनुष्य दुप्पट श्रम करूनहि तें पार पाडतो.

अंगावरचे केंस मोजवत नाहींत—अंगावर इतके केंस असतात कीं त्यांची गणना करणें अशक्य असतें व ते इतके एकासारखे एक असतात कीं त्यांतून एकापासून दुसरा निराळा ओळखणें शक्य नसतें; त्याप्रमाणें अनेक सारख्या वस्तूंतील एक. 'तिस्रः कोट्योर्ध कोटीच यानि लोमानि मानवे।'

अंगावरचें लेणें जन्मभर देणें—[लेणें=दागिने] १ दागिन्यांकरितां कर्ज करून ठेवून तें जन्मभर फेडीत बसणें हें केव्हांहि अयोग्य होईल; त्यापेक्षां दागिने न घातलेले बरें. २ परमेश्वर जें आपल्याला स्वाभाविक सौंदर्य देतो तें जन्मभर पुरतें; तें कधींहि आपणापासून कोणास काढून घेतां येत नाहीं. जे अंगावर घालावयाचे दागिने असतात ते कधीं मिळतात कधीं जातात, त्यांची शाश्वती नसते.

अंगावरलें, रांगतें आणि खेळतें, अशी संतती बाईल मिरविते—एखाद्या स्त्रीस वरच्यावर मुलें होत असलीं म्हणजे तीस म्हणतात. एक खेळूं लागतें तों दुसरें रांगूं लागतें, तोंच तिसरें अंगावर पीत असतें.

अंगाविना डंख लागत नाहीं—जेथें दंश करावयाचा त्या जागीं शरीराचा भाग असेल तरच दंश करतां येईल, नाहींतर कांहीं उपयोग होणार नाहीं. कांहींतरी आधार असल्याशिवाय कोणतीहि क्रिया करतां येत नाहीं. मुळांत कांहींतरी असल्याशिवाय कोणी नांवें ठेवीत नाहीं. तु०—अंगीं उणा तर जाणे खाणाखुणा.

अंगावेगळा घाय तुला लागे, मला काय?—आपल्याला ज्यापासून कांहीं घस लागत नाहीं अशा गोष्टीपासून दुसऱ्यास त्रास होत असेल तर आपण त्याची फिकीर करीत नाहीं.

अंगास रक्त लावून घायाळांत घुसावें—प्रत्यक्ष लढाईंत भाग घेण्याचें सामर्थ्य किंवा धैर्य नसलें म्हणजे लढाईंत असण्याचा बहाणा करण्याकरितां खोटेंच रक्त आपल्या अंगास लावून आपण जखमी झाल्याचें ढोंग करणें. एखादी गोष्ट करावयाची तर टाळणें पण तीपासून आपणांस नुकसान पोंचल्याचा बहाणा करणें.

अंगीं असतां पराक्रम, करूं नये हलकें काम—जर आपल्या अंगांत महत्त्वाची कामगिरी करण्याचें सामर्थ्य असेल तर आपली शक्ति हलकीं सलकीं कामें करण्यांत खर्च करूं नये. आपल्या योग्यतेचेंच काम आपण पतकरावें.

अंगीं असे तर कोपरीं फाटे—एखादें वस्त्र अंगावर वापरलें तरच तें फाटण्याचा संभव. कोणतेंहि काम करावयास लागलें तरच त्यांत झीज लागण्याचा संभव असतो. बाजूलाच राहिल्यावर कशाला घस लागेल?

अंगीं असेल तें काम आणि पदरीं असेल तो दाम—जी गोष्ट आपणांस स्वतःस करण्याचें सामर्थ्य असतें तीच गोष्ट होण्याचा संभव असतो व आपल्या गांठीं जो पैसा असतो तोच वेळेवर उपयोगी पडतो. दुसऱ्यावर अवलंबून राहून कांहीं उपयोग होत नाहीं. वेळेवर फसगत मात्र होण्याचा संभव असतो.

अंगीं उणा तर जाणे खाणाखुणा—ज्याच्या अंगांत एखादा दोष असतो त्याला त्यासंबंधीं सहज बोलणें निघालें तरी आपणासंबंधींच बोलत आहेत असें वाटतें. स्वतःच्या

दोषाची स्वतःला जास्त जाणीव असते.' 'चोराच्या मनांत चांदणें.' तु०-(इं.) If the cap fits wear it.

(माझ्या) अंगीं का माशा मेल्या आहेत?--आळशी मनुष्याच्या अंगावर माशा बसून त्या मेल्या तरी त्या काढून टाकण्याचेंहि काम त्याच्याकडून होत नाहीं. परंतु जो आळशी नाहीं तो याप्रमाणें वागणार नाहीं. जो पराक्रमी अथवा काम करणारा असेल त्याला स्वस्थ बसणें किंवा कोणताहि कमीपणा पतकरणें केव्हांहि आवडणार नाहीं.

अंगीं न लागे चोरीचा ठाव तोंवरी चोर दिसे साव—जोंपर्यंत एखाद्यावर चोरीचा आरोप सिद्ध होत नाहीं तोंपर्यंत तो सावच समजला जातो. प्रत्यक्ष एखाद्याच्या अंगीं दोष लावल्याशिवाय त्याला कोणी दोषी समजणार नाहीं. तु०-सांपडला तर चोर नाहींतर बादशहाहून थोर.

अंगीं नसतां गर्भछाया वंध्या डोहाळे सांगे वाया--शरीरांत गर्भाचीं कांहीं एक चिन्हें नसतां वंध्या स्त्री मला डोहाळे लागले आहेत असें सांगूं लागली तर त्याचा काय उपयोग? मुळांत आधार नसतां एखादें विधान केलें तर तें हास्यास्पद होतें.

अंगीं नाना कळा पण वेष बावळा—एखादा मनुष्य फार गुणी असतो पण त्याच्या पोषाखावरून वगैरे त्याच्या बुद्धीची प्रथम कल्पना येत नाहीं, तेव्हां ही म्हण वापरतात. बाहेरून दिसावयास बेढब पण आंत गुणी असा मनुष्य. 'वेष धरावा बावळा। अंतरीं असाव्या नाना कळा।'-दा. १५-५-३१.

अंगीं पांडित्याचा थोरपणा आणि मुद्याला मुळमुळपणा—आपण फार शहाणे, हुशार आहों म्हणून फुशारकी मारावयाची पण एखाद्या गोष्टीला मुद्देसूद उत्तर द्यावयाची वेळ आली म्हणजे मात्र टाळाटाळ करावयाची, अशा वृत्तीच्या मनुष्याबद्दल वापरतात.

अंगीं भरलासे ताठा, वळणीं नये जैसा खुंटा--एखादा मनुष्य अतिशय गर्विष्ठ असून कोणाचेंच ऐकत नसेल तर त्यास म्हणतात.-तुगा. ३१४५

अंगीं लागत नाहीं, भूक वाढत नाहीं—खाल्लेल्या अन्नाचेंच योग्य पचन होऊन त्याचा शरीरास उपयोग होत नसेल तर आणखी अन्न खाण्यासारखी भूक कशी लागणार? जेवढें आपल्या हातांत आहे त्याचाच जर आपणास योग्य उपभोग घेतां येत नसेल तर आणखी वैभवाची आशा करून तरी काय उपयोग?

अंगें केलें तें काम पदरीं असे तो दाम--'अंगीं असेल' इ. पहा.

अंगठा---**अंगठा दाखविणें**—१ नाहीं म्हणावयाचें झाल्यास मूठ मिटून अंगठा किंवा नकार घंटा दाखवितात त्यावरून; किंवा दानाचें उदक देतांना सरळ तळहातावर पुढें बोटांवरून पाणी सोडतात पण पितरांस उदक देतांना वांकडा हात करून अंगठ्यावरून पाणी सोडतात त्यावरून, नाहीं म्हणणें, नकार देणें. २ फसविणें; ठकविणें; प्रथम आशा दाखवून शेवटीं धोका देणें. 'तेवीं पुत्रापासोन सुखप्राप्ति। माता पिता होईल म्हणती। शेखीं पुत्र अंगोठा दाविती। केवळ भ्रांति पुत्रमोहो॥'-एभा ११.८२.

अंगठा धरणें--(अव.) अंगठे धरणें. हाताच्या बोटांनीं पायाचे आंगठे धरून उभे रहाणें हा एक शिक्षेचा प्रकार आहे. 'अंगठे धरून या म्हाताऱ्याला उभा करा'-बाबं २.१.

पायाचे अंगठे मुखांत धरणें—चुकी झाली म्हणून स्वतःस शिक्षा करून घेणें. वरील प्रमाणेंच एक शिक्षेचा प्रकार. 'हरि हरि दहापूर्वी कळतें तरि अंगठे मुखीं धरितों। अपराध कोटि पोटीं घालाया मुकुट पाय ते करितों॥'—मोस्त्री ६.६३.

अंगठ्याचा मान-अंगठे दाबणी-अंगठे दाम—विवाहसमयीं सप्तपदीच्या वेळीं वधूची बहीण वधूच्या उजव्या पायाचा अंगठा सातव्या तंदुलराशीजवळ दाबून धरते; तेव्हां तो सोडविण्यासाठीं नवऱ्यामुलानें तिला द्यावयाचें मानाचें खण, लुगडें वगैरे.

अंगठ्याची आग मस्तकास जाणें—रागानें नखशिखांत लाल होणें; तळपायाची आग मस्तकास जाणें; अतिशय रागावणें.

अंगठ्यांवर दिवस मोजणें—एखादी गोष्ट व्हावी अशी अतिशय उत्कंठा लागली असतां मध्यंतरीं जाणारा काळ फार दीर्घ वाटतो व प्रत्येक दिवस बोटें मोडून मोजून आपण इतके दिवस झाले असें रोज म्हणतों. यावरून एखाद्या गोष्टीची अतिशय आतुरतेनें वाट पहाणें.

अंगठ्यास आग लागणें—संकटांस प्रारंभ होणें; संकटाचें आगमन झालेलें असणें तथापि मुख्य संकट अद्यापि दूर असणें. रावणाच्या शरीरास दहन करण्यासाठीं प्रथम त्याच्या पायाच्या अंगठ्यास आग लावली पण तें शरीर इतकें मोठें आहे कीं, प्रत्यक्ष शरीरास आग लागण्यास पुष्कळ अवधि लागणार व अद्यापहि तो अंगठाच जळत आहे अशी समजूत आहे. यावरून संकटांस प्रारंभ झाला तरी मुख्य संकट पुढेंच असणें या अर्थी. प्रेतास अग्नि देतांनाहि प्रथम पायाकडून अग्नि देतात. तेव्हां अंगठ्यास आग लागली तरी प्रेतास जळण्यास बराच अवकाश लागतो. यावरून संकट येण्यास केवळ आरंभ होणें; त्याचे

परिणाम होण्यास अवधि असणें. 'अजून तर तुझ्या अंगठ्यास देखील आग लागली नाहीं'–धर्माजी ९१.

ॐ **अंगठा सुजला म्हणून डोंगराएवढा होईल काय?**— अंगठा सुजला व कितीहि सुजेनें वाढला तरी त्याच्या वाढीला मर्यादा आहे. तो कांहीं डोंगराएवढा मोठा होऊं शकत नाहीं. एखाद्या क्षुद्र वस्तूस प्रसंगवशात् कितीहि मोठेपणा प्राप्त झाला तरी त्याला कांहीं मर्यादा असते. तिच्याहून अतिशय मोठ्या वस्तूशीं ती बरोबरी कधींहि करूं शकत नाहीं.

अंगठ्यावरून दशासूर निर्माण करणें—[दशासूर= दशशीर=रावण] सीतेनें इतके दिवस रावणाच्या बंदीत असूनहि त्याला सबंध पाहिलें नव्हतें. फक्त त्याचा अंगठाच तिला दिसला. कैकेयीनें तो अंगठा तिला काढावयास सांगून त्यावरून सबंध रावणाचें चित्र तयार केलें व रामाला दाखवून दिलें कीं, सीता शुद्ध नाहीं; तिनें रावणाची मूर्ति हृदयांत वागविलेली आहे. अशी कथा सांगतात. यावरून राईचा पर्वत करणें. "सभ्य स्त्रीनें परपुरुषाकडे गायन शिकणें हें त्यांच्या जुन्या डोळयांना वाईट दिसलें असेल, हें मला कबूल आहे. पण असा अंगठ्यावरून दशासूर निर्माण करण्यापूर्वी त्यांनीं जरा खऱ्या खोट्याचा तरी विचार करावयाचा होता."–कुस्करलेलें हृदय १८८.

अंगठी——अंगठी कापली तरी मुतायचा नाहीं— [अंगठी=हातापायाचें बोट] एखाद्याचें बोट वगैरे कापलें असतां रक्तप्रवाह थांबावा म्हणून पाणी ओततात. परंतु पाणी आणावयास दूर तरी जावें लागतें किंवा कांहीं श्रम करावे लागतात; पण त्याऐवजीं लघवी करण्यास कांहीं श्रम करावयास लागत नाहींत. पण तेवढेंहि करून जो दुसऱ्याच्या उपयोगी पडत नाहीं अशा मनुष्याबद्दल तिरस्कारानें हा वाक्प्रचार वापरतात. अतिशय कृपण, दुसऱ्याच्या उपयोगी न पडणारा माणूस. या म्हणीचाच पर्याय–'कापल्या करंगळीवर देखील मुतायचा नाहीं.'

ज्याची अंगठी त्याच्याच डोळयांत घालणें—एखाद्यानें दुसऱ्याच्या डोळयांत घालण्याकरितां आपलें बोट पुढें केलें असतां तें पकडून उलट त्याच्याच डोळयांत घालणें. म्हणजे एखाद्यानें दुसऱ्यास फसविण्याकरितां एखादा व्यूह रचला असतां त्यांत त्यासच गुंतवून त्याच्या लबाडीचें फळ त्याच्या पदरांत बांधणें. दुसऱ्याकरितां खोदलेल्या खड्डयांत खोदणारासच पाडणें.

अंगठी सुजली म्हणून डोंगराएवढी होईल काय?— वर 'अंगठा सुजला–' पहा.

अंगडें——अंगड्याला सोडून धोंगड्याला धरणार— एखाद्या मनुष्याच्या अंगरख्याला धरलें असतां तो आधार अधिक बळकट; कारण अंगरखा अंगांत असतो. पण तो आधार सोडून त्याच्या धोंगड्याला धरल्यास धोंगडें टाकून तो निसटूं शकतो. तेव्हां अधिक बळकट असा आश्रय सोडून दिसायला मोठी पण कमी सुदृढ अशा गोष्टीचा आश्रय केल्यास उलट आपण अधिक निराधार होतों.

अंगण——अंगणीं जाणें—(बायकी) मोरीवर जाणें; पाय धुवावयास जाणें; लघवीस जाणें.

ॐ**घर सोडलें(म्हणजे)अंगण पारखें**—घराबरोबर अंगणाचाहि संबंध सुटतो. एकदां आपण एखादें घर सोडून दूर गेलों व त्या घरांतील मंडळीशीं संबंध सुटला, विशेषतः त्या मंडळीशीं वितुष्ट आलें म्हणजे त्या घराच्या अंगणांतहि आपणांस जातां येत नाहीं. एकदां वितुष्ट आलें, संबंध सुटला म्हणजे तो सर्वतोपरि सुटतो, अर्धवट रहात नाहीं.

अंगणावरून घराची कळा (ओळखते)—अंगणाच्या स्वच्छतेवरून घरामध्यें किती स्वच्छता असेल याची कल्पना येते. थोड्या भागावरून सर्व वस्तूंसंबंधीं अनुमान करतां येतें. तु०–'शितावरून भाताची परीक्षा.'

अंगतपंगत——अंगतपंगत तीच गड्याची संगत— एकत्र जेवण होण्यानें मैत्री वाढते. इतर गोष्टींच्यामुळें झालेल्या मैत्रीपेक्षां एकत्र भोजन केल्यानें होणारी मैत्री अधिक दृढ व चिरकालीन होते.

अगत्य——अगत्याचें काम स्वतः करावें—जी गोष्ट आपणाला जास्त जरूरीची किंवा आवश्यक वाटत असेल ती दुसऱ्यावर अवलंबून न ठेवतां स्वतः श्रम घेऊन करावी; तरच ती वेळेवर होते. नाहींतर दुसऱ्याच्या भरंवशावर राहून शेवटीं फसगत होण्याचा संभव असतो.

अंगद——अंगदनीति—रामानें रावणाशीं साम करण्याकरितां अंगदास शिष्टाईस पाठविलें त्यवेळीं त्यानें रावणास सामासंबंधीं केलेला बोध; यावरून सलोख्याचें बोलणें; सुनीति; सन्मार्गाचे नियम; विदुरनीति, भीष्मनीति याप्रमाणें.

अंगद शिष्टाई करणें—रावणानें सीता चोरून नेल्यावर रामानें त्यावर स्वारी केली; त्यवेळीं युद्ध सुरू होण्यापूर्वी सामोपचारानें रावणानें सीता परत करावी अशी मध्यस्थी करण्याकरितां वालीचा पुत्र अंगद यास रावणाकडे पाठविण्यांत आलें होतें. त्यावरून–मध्यस्थी करणें, सामोपचाराच्या गोष्टी सांगणें; भांडणतंटा मिटविण्याचा, टाळण्याचा प्रयत्न करणें. विपरीत अर्थानें—लुडबूड; लुब्रेपणा; चोंबडेपणा.

अंगरखा——अंगरख्याचे बंद तटातट तुटणें—मनुष्यास अतिशय आवेश आला म्हणजे ऊर भरून येऊन छाती फुगते;

त्यामुळें अंगरख्याचे बंद तुटतात. यावरून अतिशय आवेश चढणें; स्फुरण चढणें.–राणा भीमदेव नाटक.

अगर्वी——अगर्व्यासी भय नसे सगर्व्यासी शत्रु शिरीं बसे—जो मनुष्य गैरवाजवी अभिमानास पेटत नाहीं त्यास कोणापासूनहि भीति नसते, पण जो दुरभिमानी असतो तो आपल्या अभिमानामुळें शत्रु उत्पन्न करतो व प्रसंगीं त्यास हारहि खावी लागते.

अगस्त्य——अगस्ति ऋषीचा वायदा—प्राचीन काळीं हिमालयपर्वत व विंध्यपर्वत यांमध्यें उंचीबद्दल स्पर्धा लागून दोन्हीहि पर्वत उंच वाढूं लागले. तेव्हां लोकांच्या व्यवहारांत विशेषतः विंध्य पर्वताच्या वाढीमुळें फारच अडचण येऊं लागली. तेव्हां विंध्य पर्वत हा अगस्त्य ऋषीचा शिष्य असल्यामुळें लोकांनीं अगस्त्य ऋषीची हें संकट टाळण्याबद्दल प्रार्थना केली. तेव्हां अगस्त्य ऋषि हे विंध्य पर्वताकडे गेले. आपले गुरुजी येत आहेत असें पाहून विंध्य पर्वतानें त्यांस दंडवत घातलें. तेव्हां अगस्त्य ऋषि दक्षिणेकडे निघून आले व येतांना त्यांनीं विंध्य पर्वतास असें सांगितलें कीं, मी पुनः या मार्गानें येईपर्यंत तूं अशाच स्थितींत राहावेंस. तेव्हां विंध्य पर्वत आडवा पडलेल्या स्थितींतच अद्याप राहिला व अगस्त्य ऋषींनीं दक्षिणेंतच आश्रम करून वास्तव्य केलें व पुनः उत्तरेकडे गमनच केलें नाहीं. अशा रीतीनें विंध्य पर्वताशीं केलेला वायदा कधींच पुरा केला नाहीं. यावरून कधींच पुरा करावयाचा नाहीं असा वायदा. जो करार कधींच पुरा करावयाचा नाहीं असा करार.

अगा——अगा अगा देसाया, काष्टी नाय नेसाया—(कु.) [काष्टी=लंगोटी] पूर्वी कुडाळ प्रांतीं देसाई सत्ताधीश होते. त्यावेळीं वैभव, संपत्ति, सत्ता, कुळ वगैरे बाबतींत देसाई श्रेष्ठ असा समज होता. परंतु सावंताच्या मराठ्या घराण्यानें देसायांना पराजित करून स्वतःची सत्ता स्थापन केली. त्यानंतर देसायांना हलाखीची स्थिति प्राप्त झाली. तेव्हां देसायांची इतकी हीनस्थिति झाली कीं, त्यांस नेसण्यास पुरेसें वस्त्रहि राहिलें नाहीं. यावरून एका काळीं वैभवसंपन्न असलेल्या मनुष्यास दैन्यावस्था प्राप्त झाली असतां योजितात. (विविधवृत्त १९–२–३९ पान १८)

अगांची पगा उतवांक व्यांगा—(गो.) अव्यवस्थितपणामुळें दिवाळें.

अंगाई——अंगाई करणें—लहान मुलांना निजविण्यासाठीं बायका 'अंगू गाई!' असें शेवटीं पालुपद असलेलें गाणें म्हणतात. त्यावरून विनोदानें, झोंप घेणें, निजणें याअर्थी वापरतात. "आमचें आख्यान फार लांबून वाचकमंडळीपैकीं जर कोणास डुकल्या यायला लागल्या तर त्यांनीं खुशाल मधून उठून जाऊन अंगाई करावी."–नि.

अंगार——अंगार होणें—(व. घाटी) १ आग होणें; भडका होणें. २ अतिशय राग येणें; संताप येणें; लाही लाही होणें. ३ जळणें.

अंगारा——अंगारा करणें—१ भुताखेतांची पीडा नाहींशी होण्याकरितां, विषार उतरण्यासाठीं, रोग निवारण करण्यासाठीं मंतरलेलें भस्म लावणें; मंत्रतंत्रादि उपाय योजणें. २ (ल.) अंकित करणें; वश करणें; कबज्यांत आणणें; भुलविणें.

अंगारा धुपारा—१ कोणतेंहि अभिचारकर्म करावयाचें असतां अग्नि पेटवून त्यांत धूप वगैरे जाळून त्याचा धूर अंगावर घेणें, त्याची विभूति अंगाला लावणें वगैरे गोष्टी करावयाच्या असतात. त्यावरून कांहीं मांत्रिक, तांत्रिक, जादूटोणा वगैरे अर्थ होतो. २ (ल.) अंगारा किंवा धुपारा हा जसा केवळ वास घेण्यापुरता किंवा चिमूटभर अंगाला लावण्याकरितां असतो त्याप्रमाणें केवळ चिमूटभर फक्त नमुन्यापुरेशी प्रत्येकाच्या वांटणीस येईल अशी तुटपुंजी सामुग्री असली म्हणजे हा वाक्प्रचार योजतात. 'एवढ्याशा तांदुळाचा भात करून एवढ्या मोठ्या जमावास काय अंगारा धुपारा करावयाचा आहे?'

अंगारा लावणें—एखाद्यास प्रथम आशा लावून नंतर निराश करणें; अखेरीस फसविणें; धुपाटणें हातीं देणें.

***अंगारा धुपारा हा सारा मायेचा पसारा**—अंगारा धुपारा करणें, मंत्रतंत्र, चेटुक, कुयेडें करणें, तांत्रिक कर्म करणें वगैरे लोकभ्रमाच्या गोष्टी आहेत. त्यांत कांहीं अर्थ नसून लोक केवळ अज्ञानानें, भ्रमानें त्यांच्या पाठीस लागतात. त्यांत सत्य मुळींच नसतें.

अंगाऱ्याला गेला दिवस करायला आला—मनुष्य आजारी असला म्हणजे दैवी उपचार म्हणून देवाचा कौल घेऊन त्याचा अंगारा त्यास लावण्यांत येतो. अशा तऱ्हेचा देवाचा अंगारा आणण्याकरितां एखाद्या मनुष्यास पाठविलें असतां तो तिकडेच दीर्घकाळ राहून जों परत येतो तों आजारी मनुष्य मरण पावून त्याची उत्तरक्रिया चालू असते. अशावेळीं त्याला पाठविल्याचा काय उपयोग? एखादें काम करावयास सांगितलें तर त्याचें जोंपर्यंत प्रयोजन आहे तोंपर्यंत तें केलें तरच त्याचा उपयोग. त्याची गरज नाहींशी झाल्यावर केलें असतां तें निष्फळ होय.

अंगाऱ्याला गेला पांगारा घेऊन आला—एखादा मनुष्य आजारी असला म्हणजे अज्ञानी लोकांत देवास कौल लावून त्याचा अंगारा आणून लावावयाची पद्धति आहे. त्याप्रमाणें एखाद्या आजारी मनुष्याकरितां अंगारा आणावयास पाठविलेल्या मनुष्यानें तिकडेच दीर्घकाळ राहून इतका उशीर केला कीं,

इकडे हा रोगी मरण पावून त्यास दहन करण्याची वेळ आली व अंगारा आणावयाच्या ऐवजीं दहनाकरितां पांगाऱ्याचीं लांकडें आणावयाची त्यावर पाळी आली म्हणजे म्हणतात. एखाद्या कामांत इतका विलंब लावणें कीं तें काम सफल होण्याची वेळ टळून जाऊन पूर्ण बिघडल्यानंतर येणें. यावरून अत्यंत दिरंगाई करणें; विलंब लावणें; अतिशय दीर्घसूत्रीपणा करणें. २ मोठा पराक्रम करण्यासाठीं जाऊन अगदीं क्षुल्लक गोष्ट करून येणें.

अगुण——अगुण सगुणा न छेडिती तरी सगुण उन्मत्त होती—दुर्गुणी मनुष्य जर सद्गुणी मनुष्यांना उपसर्ग न देतील तर सद्गुणी माणसें फार शेफारून जातील. तु०-'निंदकाचें घर.'

अगुणी——अगुणिया स्तव न करी, लक्ष्मी जरी त्याचे घरीं पाणी भरी—एखादा दुर्गुणी मनुष्य जरी फार श्रीमंत असला तरी त्याची स्तुति करूं नये.

अंगुली——अंगुली निर्देश—१ एखाद्या व्यक्तीकडे वगैरे बोट करून दाखविणें. २ एखाद्या गोष्टीचा केवळ जातां जातां केलेला उल्लेख; मुख्य गोष्टीचें विवेचन करीत असतां मध्यंतरीं आनुषंगिक आलेल्या गोष्टीचें किंवा आपल्या विवेचनास आधारभूत असलेल्या एखाद्या दुसऱ्या गोष्टीचें साग्र विवेचन न करतां केवळ दिग्दर्शन करणें.

अंगुष्ठ——अंगुष्ठाची आग मस्तकांत जाणें—अत्यंत रागावणें; तळपायाची आग मस्तकांत जाणें; अंगाची लाही-लाही होणें. अंगठा पहा.

अंगुष्ठावरून दशशीर करणें—रावणाच्या अंगठयाचा आकार समजला असतां त्यावरून त्याच्या सर्व शरीराची कल्पना करणें. यावरून थोडासा आधार मिळाला तरी त्यावर एखादा मोठा व्यूह रचणें; एखाद्या गोष्टीचा केवळ अंशमात्र माहीत असतां तिचें अतिशयोक्तीनें रसभरित व साग्र विवेचन करूं जाणें; लहानाचें फार मोठें करून सांगणें; फुगवून सांगणें. अंगठा पहा.

अंगुळी——अंगुळी सुजली तरी डोंगराएवढी होत नाहीं—अंगठा पहा.

अगे——अगे अगे म्हशी मला कां नेशी—'अग अग-' पहा.

अगे जिभे लवसी, आपली आपल्या भोवसी—आपलीच जीभ जर भलतेच शब्द बोलली तर त्यापासून आपणांसच त्रास होतो. याकरितां नेहमीं आपण जे शब्द उच्चारावयाचे ते जपून उच्चारले पाहिजेत; उगाच भरमसाटपणें बोलण्यांत अर्थ नाहीं.

अगे माझे बायले, सर्व तुला वाहिलें—जो मनुष्य सर्वतोपरी बायकोच्या तंत्रानें चालतो त्यास अनुलक्षून ही म्हण वापरतात.

अंगेजणी——अंगेजणी करणें—स्वतः पुढें होऊन, अंगें करून परिश्रम करणें; अंगावर घेणें; स्वतः करण्याची जबाबदारी घेणें. 'ज्यांनीं रहावें त्यांनीं अंगेजणी करून बाकी भरावी.' —ख १४६५.

अगोट——अगोट दाखविणें, साधणें—अगोट हे वर्षअखेरीचे दिवस असतात. त्यावरून कोणत्याहि गोष्टीची अखेर करणें असा मूळ अर्थ असावा. नंतर लक्षणेनें मारणें, असा अर्थ. 'कुऱ्याला अगोट दाखीव.'

अगोदर——अगोदर असला त्यांत बैलावर बसला—एखादा मनुष्य स्वभावतःच आढयतेखोर असतो, कोणाशीं नीट बोलत नाहीं, कोणाचें काहीं काम करीत नाहीं. असा मनुष्य जर थोडासा मोठया पदास चढला किंवा त्यास थोडा फार अधिकार प्राप्त झाला तर तो अधिकच फुशारून जातो व गर्विष्ठ बनतो.

अगोदर खाईल मग तोंड धुवील—एखाद्या खादाड मनुष्यास उठल्याबरोबर प्रथम कांहींतरी खावयास लागतें. उठल्याबरोबर प्रथम शौचमुखमार्जन करण्यापूर्वींहि अगोदर तो खाण्याची चौकशी करील आणि खाल्ल्यानंतर मग कोणत्याहि कामासंबंधीं विचार करील. प्रथम एखादी न खाण्याजोगती वस्तु विचारपूस केल्याशिवाय अगर ती भक्ष्य आहे कीं अभक्ष्य आहे याचा विचार न करतां एखादा मनुष्य प्रथम खाऊन टाकतो आणि नंतर ती वाईट लागल्यावर किंवा अभक्ष्य आहे असें समजल्यानंतर तोंड धुऊन टाकण्याची खटपट करतो. त्यापेक्षां प्रथमच अधिक विचार करील तर ही मागाहून तोंड धुण्याची यातायात कशाला करावी लागेल? तेव्हां एखादी गोष्ट अवि-चारानें करून मग पश्चात्ताप पावण्यापेक्षां अगोदरच अधिक विचार केलेला चांगला नव्हे का?

अगोदर चारा मग चोंच—परमेश्वर जे जे प्राणी उत्पन्न करतो त्यांच्या भक्ष्याची तो अगोदरच योजना करून ठेवतो. पक्षाची चोंच निर्माण करण्यापूर्वींच तो त्याचा चारा निर्माण करीत असतो. त्याप्रमाणेंच मनुष्यानें एखादी जबाबदारी अंगावर घेण्यापूर्वीं ती पार पाडण्याची तजवीज अगाऊ करून ठेवणें श्रेयस्कर होय.

अगोदर भुक्ति मग भक्ति—प्रथम स्वतःच्या शरीरभोगाची तजवीज करावयाची व नंतर परमेश्वरभक्तीकडे वळावयाचें. मनुष्याचा स्वभावच जात्या स्वार्थी असतो. तो प्रथम स्वाभाविक-पणें स्वतःकडे पाहातो व नंतर इतर गोष्टींकडे लक्ष्य देतो. तु० आधीं स्वार्थ मग परमार्थ. आधीं पोटोबा मग विठोबा.

अगोदर शेणमाती, मग पोळीपाती—प्रथम शेणमातीनें चूल नीट सारवल्यानंतरच तीवर स्वयंपाक करावयाचा असतो.

तेव्हां प्रथम कष्ट केल्याशिवाय, हलकें काम केल्याशिवाय चांगलें फळ मिळत नाहीं.

अग्नि——अग्निकाष्ट भक्षणें, अग्निकाष्टें भक्षण करणें, अग्निकाष्ट सेवन करणें—स्वतःस अग्नींत जाळून घेणें;चिताप्रवेश करणें; आत्महत्या करणें. एखादी गोष्ट आपल्या हातून प्रतिज्ञेप्रमाणें न घडली तर आपण प्राण ठेवणार नाहीं अशी प्रतिज्ञा पूर्वी करण्याची पद्धति असे किंवा देह नकोसा झाला तर चिताप्रवेश करून देहत्याग करीत असत. " स्त्रिया शत्रुभयानें व पातिव्रत्य-रक्षणार्थ अग्निकाष्ठें भक्षण करण्याकरितां सतीचीं वाणें घेत." —लोकहितवादी. 'पूर्वीं जयद्रथवधसमयींहि अशीच अग्निकाष्ठें सेवन करीन म्हणून प्रतिज्ञा केलीस.'—सुरतसुधन्वानाटक पृ.२५.

अग्नि घेणें—लढाईमध्यें दारुगोळ्याचा मार सहन करणें; शत्रुपक्षाची गोलंदाजी व बंदुकीचा मारा वगैरे चालू असतां त्यांतून पुढें चाल करून जाणें.

अग्नि तृणानें झांकणें—संकटविषय दडवून ठेवणें; संकटाची जाणीव न देणें. संकटाची जाणीव झाल्यावरहि त्यावर योग्य उपाय न करतां कसें तरी करून तीं डोळ्याआड करावयाचीं व योग्य उपाय न करतां कांहींतरी क्षुल्लक गोष्टी करून त्याचें तात्पुरतें निवारण करावयाचें. 'पदरची मंडळीही पाहतां पाहतां अग्नि तृणानें झाकितात याचें आश्चर्य वाटतें. —सनदापत्रें पृ. १४९.

अग्नि देणें—दहन करणें; विशेषतः प्रेत दहन करणें; उत्तर-क्रिया करणें.

अग्निपंचक—फलज्योतिषांतील एक घातक योग. यांत अग्नीपासून भय असतें. शुक्ल प्रतिपदेपासून चालू तिथीपर्यंत मोजून त्यामध्यें चालू लग्न मिळवून त्या संख्येस नवानें भागावें बाकी दोन राहिल्यास तें अग्निपंचक होय. हा योग गृहकर्मास वर्ज्य मानतात.

अग्नीचा पर्जन्य वर्षणें—भयंकर संकट येणें; मोठा अनर्थ ओढवणें. 'अग्नीचा पर्जन्य वर्षला.'—खरे ३१३४.

अग्नीचा पाऊस पडणें—ज्याप्रमाणें आगीचा वर्षाव व्हावा त्याप्रमाणें चोहोंकडून अनेक भयंकर संकटें येऊन कोसळणें; अत्यंत जुलूम होणें; सर्व बाजूंनीं कठीण परिस्थिति होणें.

अग्नीवरि आज्य टाकणें—१ आगींत तूप, तेल ओतणें आग अधिक भडकविणें. २(ल.) रागावलेल्या मनुष्यास अधिक राग आणणें. ३ सुरू झालेल्या कलहांत भर टाकणें. 'अग्नीवरि आज्य टाकावें तसें पुरतेपणें ठसलें.'—भाव ३९.

⊛ **अग्नि काड्यांनीं पेटतो, मोठ्या लांकडें विझतो**—लहानशा आगकाडीनें विस्तव पेटतो पण त्यावर मोठें लांकूड घातलें असतां पेटण्याऐवजीं तो विझतो मात्र. एखादी लहान वस्तु जें कार्य करूं शकते तें मोठ्या वस्तूनें होत नाहीं, तर उलट बिघडतें.

अग्नि ज्वाळेवांचून तैशी उत्कंठा ज्ञानाविण—ज्या अग्नींतून ज्वाला निघत नाहींत त्याचा उपयोग करून घेतां येत नाहीं त्याप्रमाणें जर ज्ञानप्राप्ति झाली नसेल तर नुसती जिज्ञासा किंवा हौस असून कांहीं उपयोग नाहीं.

अग्नि न विझे कापसानें, क्रोध न शमे क्रूर भाषणें—अग्नींत जर कापूस टाकला तर तो विझण्याऐवजीं अधिकच पेट घेईल; त्याप्रमाणें आपण जर निष्ठुर भाषण करूं लागलों तर दुसऱ्याचा राग शांत होण्याऐवजीं अधिक वाढण्याचाच संभव असतो.

अग्निप्रवेशाला भय न वाटे सतीला—जी स्त्री सती जावयास तयार होते तिच्या मनाची स्वतःवर मृत्यु ओढवून घ्यावयाची तयारी असल्यामुळें तिला आगीची मुळींच भीति वाटत नाहीं. जो मनुष्य एखादें धाडसाचें कृत्य करावयास तयार होतो त्यास त्या कामीं येणाऱ्या संकटाची मुळींच क्षिति वाटत नाहीं. तो सर्व संकटांस तोंड द्यावयास तयारच असतो.

अग्नि हा चांगला चाकर पण वाईट धनी आहे—अग्नीस आपल्या कह्यांत ठेविलें तर त्यापासून अनेक उपयोग करून घेतां येतील, परंतु त्यास निरर्गल रीतीनें वागूं दिल्यास तो आपल्या सर्व घरादारांचा नाश करील.—ज्ञा. को. (आ) ३१.

अग्नीजवळ तूप ठेवलें तर तें विरघळल्याविना कसें राहील—दोन गोष्टी एकमेकांजवळ आल्या म्हणजे त्यांचा परस्परांवर परिणाम होणारच. तरुण मनुष्यानें सुंदर युवति पाहिली असतां त्याच्या भावना जागृत झाल्याशिवाय राहणार नाहींत. तेव्हां तुपाला आंच लागतांच तें जसें पातळ होण्याचा त्याचा धर्म आहे त्याप्रमाणें विकारांस अनुरूप गोष्टीची चेतना मिळाल्यास ते जागृत होणारच. तुलना—घृतकुंभसमा नारी तप्तांगारसमः पुमान्। तस्माद् घृतं च वन्हिंच नैकत्र स्थापयेद् बुधः॥ —सुर १८२.४०८.

अग्नीप्रमाणें वाणीबद्दलहि सावध राहिलें पाहिजे—भलत्याच ठिकाणीं अग्नि टाकला असतां आग लागण्याचा संभव असतो म्हणून विस्तवाशीं खेळ करणें चांगलें नाहीं; त्याप्रमाणेंच अधिक उणा शब्द बोलल्यानें कलह लागण्याचा संभव असतो. याकारितां शब्द बोलावयाचे ते जपून उच्चारले पाहिजेत.

अग्नीशिवाय धूर येत नाहीं वर—जेथें अग्निच नसेल तेथें धूर कोठून येणार? तेव्हां कांहीं तरी कारण असल्याशिवाय कार्य

एखाद्या अवयवाची संज्ञा नाहींशी होणें; एखादा अवयव जड होणें.

अंगास–अंगीं लागणें––१ पुष्टिदायक होणें; शरीरास हितकारक होणें. २ शाबित होणें; लागू होणें; सिद्ध होणें; अंगीं चिकटणें (एखादा दोष, आरोप वगैरे).

अंगास लावणें––१ स्नानाच्या अगोदर तेल हळद अंगाला लावणें; मालिश करणें. २ बाळंतिणीच्या अंगाला तेल वगैरे लावणें व अंगमर्दन करणें.

अंगास लावणें, लादणें—एखाद्या गोष्टीचा एखाद्याशीं संबंध जोडणें; जबाबदारी चिकटविणें; गुन्हा, अपराध वगैरे शाबित करणें.

अंगीं–अंगें—१ स्वतः; जातीनें. 'अंगें करिताती आपण। दोघेजण मिळोनी॥'–एभा ७.५७८. २ वतीनें; मार्फत; प्रतिनिधिरूपानें. 'दादा अंगें वयनी सोयरी'.

अंगीं अन्न लागणें––अन्नाचा शरीरावर चांगला परिणाम होणें; शरीर पोसणें.

अंगीं असणें––१ जवळ, पदरीं, ठायीं असणें. २ कोणताहि गुण असणें.

अंगीं आणणें––१ आपल्यावर घेणें; पतकरणें; जबाबदारी स्वीकारणें. २ आपल्या ठिकाणीं असूं देणें; आपल्या स्वाधीन करून घेणें (एखादा गुण, कला वगैरे).

अंगीं आदळणें—अंगास चिकटणें; अंगावर कोसळणें. 'अंगीं आदळतो शोक।'–दावि ४१३.

अंगीं (एका अंगीं) उणा–अंगें उणा––१ पोरका; माता पिता वगैरे कोणी नसलेला. २ व्यंग; एखादा अवयव नसलेला किंवा एखादें गात्र विकल असलेला. ३ सरळ नसलेला; ज्याची बाजू लंगडी आहे असा; निरपराधी नव्हे असा; दोषाची जाणीव असलेला. म्ह– अंगीं उणा तर जाणे खाणाखुणा.

अंगीं खिळणें––सर्व शरीरभर पसरणें; देह व्यापून राहणें; शरीराशीं एकजीव होणें; शरीरांत भिनणें.

अंगीं घुमारणें––पिशाच्चाचा शरीरांत संचार होणें; अंगांत येणें; अवसर येणें. 'आणि आंगीं घुमारिलें।'–दावि १५६.

अंगीं जिरणें––अंगवळणीं पडणें; संवयीचें होणें; शरीरांत पूर्णपणें भिनणें; आत्मसात होणें.

अंगीं ताठा भरणें––अतिशय गर्व होणें; फार अभिमान वाटणें. 'अंगीं भरलासे ताठा। वळणीं नये जैसा खुंटा।'- तु. गा.

अंगीं तीन (नऊ) मण तिखें जळणें––[तिखें=पोलाद] अतिशय गर्विष्ठ असणें; फार ताठ्यानें वागणें.

अंगीं तुटणें––कृश होणें; वाळणें; रोड होणें.

अंगीं दोष लावणें—आळ घेणें; एखाद्यावर दोषारोप करणें; अपराधी ठरविणें; गुन्हा शाबित करणें.

अंगीं नसणें––१ स्वतःस माहिती, अनुभव नसणें; ज्ञान नसणें; ठाऊक, अवगत नसणें. २ स्वाभाविक नसणें; मूळचा, अंगाचा, सहजजात नसणें. 'इतकें औद्धत्य त्याच्या अंगीं नाहीं.'

अंगीं पडणें––१ स्वीकारणें; पक्ष घेणें; अंगीकार करणें. 'हा अविद्येचो अंगीं पडे।'–अमृ ६.७. २ संवय होणें; स्वाभाविक वाटणें; अंगवळणीं पडणें; शरीरांत भिनणें, मुरणें.

अंगीं फुटणें––१ लठ्ठ होणें; अंग धरणें; मांसपिंडानें वाढणें. २ एखादा रोग वगैरे अंगावर स्पष्ट दिसूं लागणें; शरीरावर स्पष्ट आविष्कार होणें.

अंगीं बसणें––१ संवयीचें होणें; सुसाध्य असणें; अंगवळणीं पडणें. २ एखादा कपडा वगैरे अंगाला ठीक येणें, बेताचा होणें.

अंगीं बिऱ्हाड करणें–देणें––स्वतःच्या ठिकाणीं वास करूं देणें; आपल्या शरीरांत, हृदयांत, मनांत वगैरे थारा देणें; एखादा दुर्गुण, पापवासना वगैरेस आपल्या ठिकाणीं मूळ करूं देणें, त्यांस आश्रय देणें, अशी एखादी भावना मनांत उत्पन्न होऊं देणें.

अंगीं भरणें, अंगींमाशीं भरणें––लठ्ठ, गुटगुटीत होणें; पुष्ट होणें.

अंगीं भिनणें––अंगांत पक्कें मुरणें; एकजीव होणें; शरीराशीं समरस होणें; अंगवळणीं पडणें.

अंगीं माशा मारणें––अंगावर बसलेल्या माशाहि न हांकलण्याइतकें आळशी असणें; निरुद्योगी असणें; आळशी बनणें; स्वस्थ बसणें; अंगांत पराक्रम नसणें.

अंगीं मिरच्या लागणें–कुयले लागणें–झोंबणें—अंगाची आग होणें, लाही लाही होणें; अतिशय संतापानें जळफळणें; आपलें व्यंग उघडकीस आलें असतां, कोणी वर्म काढलें असतां रागानें शरीराची आगआग होणें.

अंगीं मुरणें––१ संवयीचा होणें; अंगवळणीं पडणें. २ हाडीं शिरणें; ताप वगैरे शरीरांत दीर्घकाल राहणें. ३ देवी, गोवर आंतल्याआंत नाहींसा होणें; शरिराबाहेर न पडतां तसाच एखादा रोग बरा होणें.

अंगीं येणें––पिशाच्चाचा संचार होणें; अंगांत येणें; भूतबाधा होणें. 'शूद्र एक त्याचे आंगीं आला चोले।'–रामदासी २. ११.

अंगीं लागणें––एखादा पदार्थ खाल्ला असतां तो योग्य

तऱ्हेनें पचून त्याचा शरीरपोषणाच्या कामीं उपयोग होणें; जिरणें; पचणें.

अंगीं वाजणें (वाजणें)—शरीरामध्यें वास करणें, उत्पन्न होणें; शोभून दिसणें. ' थोरपण अंगीं वाजे नाना । '—दावि १५.

अंगींचा उतारा—१ अनेक दिवस वापरून नंतर टाकून दिलेलें वस्त्र; अंगावरील वस्त्र. २ अंगावरून ओवाळून टाकलेला जिन्नस. ' तुझे अंगीचा उतारा। तो मज देईगा दातारा। ' —भज ४१.

अंगीची सावली करणें-अंगाची सावली, छाया करणें—आसरा देणें; संरक्षण करणें; पाठीशीं घालणें. 'आपुलिये अंगीची सावली। अहोरात्र करुनि तया रक्षी ॥ '

ॐ अंग (आंग) उद्‌कान नितळ, मन सतान-नितळ.--(गो.) अंग जसें पाण्यानें स्वच्छ होतें तसें मन सत्यानें शुद्ध होतें.

अंग धांवे कामासाठीं गती झाली उफराटी--एखादा मनुष्य एखादें काम करण्यासाठीं पुष्कळ परिश्रम करतो. पण तो जर योग्य दिशेनें कामाला न लागतां भलत्याच दिशेनें काम करूं लागला तर त्याचे सर्व श्रम व्यर्थ होतात. तेव्हां विरुद्ध गतीनें कार्य केल्यास कांहीं उपयोग नाहीं. कार्य करावयाचें तें योग्य मार्गानें केलें पाहिजे, नाहींतर ज्या दिशेकडे जावयाचें त्याच्या उलट धांवूं लागल्यास इच्छित स्थलाच्या जवळ जाण्याच्या ऐवजीं त्यापासून दूर मात्र जाणें होईल.

अंग (आंग) भिजल्याबगर नुस्तें धरूं नज--(कों. गो.) पाण्यांत शिरून अंग भिजवून घेतल्याशिवाय मासे पकडतां येणार नाहींत. श्रमाशिवाय सुख मिळत नसतें.

अंग मेहेनतीचें काम तेणें मिळे आराम--मनुष्यानें शारीरिक श्रम केल्यास त्यानंतर शरीराला सुख मिळतें. आरोग्य राहण्यासाठीं मनुष्यास शारीरिक श्रम हे अवश्य आहेत.

अंगची शिंदळ तिला कुंटण कशाला--कुंटीण ही कुमार्गास लावणारी स्त्री असते; परंतु जी स्त्री स्वतःच दुराचारी आहे तिला दुसरी कोणी कुमार्गदर्शक लागत नाहीं. स्वाभाविकच दुराचारी माणसाला कोणाची मदत आवश्यक नसते. तु०— ' जातीची शिंदळी । तिला कोण कैसा वळी ॥ '—तुगा २९६५.

अंगचें पाप देईना, तो पुण्य कसचें देतो--पापासारखी त्याज्य वस्तूंहि जो देत नाहीं तो पुण्य कसचें देतो ! जो मनुष्य दुसऱ्याच्या उपयोगी कधींहि पडत नाहीं अशा मनुष्याबद्दल योजतात.

अंगांत चोळी आणि गांवाला आरोळी—आपली वस्तु आपणाजवळ असतांना गांवभर तिचेबद्दल हरवली म्हणून ओरड करावयाची. तु०—खांकेंत कळसा गांवाला वळसा.

अंगांत भरजरी अंगरखा आणि पायाला उन्हाचा तडाखा—सर्व शरीरावर उत्तम उंची पोशाख घातला व पायांत जर जोडा घातला नाहीं तर शरीरास उन्हापासून अत्यंत त्रास होणारच व मग त्या बहुमोल पोषाखाचा काय उपयोग? याकरितां शरीर नुसतें शोभविण्यापेक्षां शरीरास आवश्यक गोष्टी पुरविणें अधिक श्रेयस्कर होय.

अंगानें लुकडा मनानें धुडफुडा—एखादा मनुष्य शरीरानें अशक्त असतो पण खंबीर मनाचा असतो, अशाबद्दल म्हणतात.

अंगापेक्षां बोंगा आणि कुठें जाशी सोंगा—स्वतःच्या शरीरापेक्षां आपल्या वस्त्राचे सोगे वगैरे जर जास्त मोठे असले तर बेढब दिसतें. यावरून मूळ गोष्टीपेक्षां आनुषंगिक गोष्टींचा बडेजाव किंवा विस्तार फार मोठा असल्यास म्हणतात. 'अंगापेक्षां बोंगा कुठें चाललास शिमग्यांतल्या सोंगा ' असाहि पाठ आहे.

अंगापेक्षां बोंगा जड-मोठा—मूळ गोष्टीपेक्षां आनुषंगिक गोष्टी वाजवीपेक्षां अधिक मोठ्या असूं नयेत.

अंगावर आली घोरपड आतां करतो चरफड—एखाद्या मनुष्यानें स्वतः होऊन आपल्यावर संकट ओढवून घेतलें व मागाहून त्याबद्दल कुरकुरूं लागला तर त्या चडफडीचा काय उपयोग ! स्वतः ओढून आणलेल्या संकटास स्वतःच तोंड दिलें पाहिजे; त्याबद्दल दुसऱ्या कोणासहि दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

अंगावर आलें शेपटावर गेलें—एखादें मोठें संकट आलें असतांहि अत्यंत कमी तोशीस लागून त्यांतून पार पडलें असतां वापरतात. प्राणावर बेतावयाची ती शेंपूट तुटूनच भागलें तर नशीबच म्हणावयाचें. प्राणावर आलेलें किंवा जीवावरचें शेंपटावर गेलें, असेंहि म्हणतात.

आली (आलें) अंगावर तर घेतली (घेतलें) शिंगावर—एखादी म्हैस किंवा गुरूं आपल्या मार्गानें जात असतां त्याच्या वाटेंत जर एखादी व्यक्ति वगैरे आली तर स्वाभाविकच तें तिला शिंगावर उचलून घेतल्याशिवाय राहाणार नाहीं. त्याप्रमाणें एखादा मनुष्य आपलें कार्य सरळ मार्गानें करीत असतां त्याच्या वाटेंत जर कोणी आडवा आला तर त्याचा अडथळा तो दूर केल्याशिवाय राहणार नाहीं व तो दूर करीत असतां जर आडव्या येणाऱ्या मनुष्याचें कांहीं नुकसान झालें व कार्य करणाऱ्या मनुष्याचा फायदा झाला तर तें योग्यच झालें असें आपण म्हणूं. त्याचप्रमाणें जर एखादें कार्य करीत असतां स्वतः प्रयत्न न करतांहि एखादी संधी आली किंवा लाभाची गोष्ट मध्यें आली तर तिचा फायदा करून घेणें हें सरळ क्रमप्राप्तच आहे. लक्षणेनें याचा अश्लील अर्थहि करतात.

अंगावर घातलं सोनं, नू अंगाला लावलं ढोनं—(व.)[ढोन-ण=लांकडाचा मोठा ओंडका. ढोनचें अनेकवचन ढोनं.] (अ) अंगावर सोन्याचे अलंकार घालणें मोठें जोखमीचें काम आहे. ते अलंकार संभाळण्यासाठीं भयंकर चिंता वाहावी लागते व तकलीफ सहन करावी लागते. अंगाला ढोनं म्ह. जळतीं लांकडें अथवा अग्नि लागल्यापासून जितकी तकलीफ होते तितकी सोन्याच्या दागिन्यापासून होते.

(आ) बायकोच्या अंगावर खूप सोन्याचे दागिने घातले आहेत पण तिला एकसारखा छळ सहन करावा लागतो आहे, तर त्या अंगावर सोनें घालण्याचा तिला काय उपयोग? अंगाला ढोणं लावणें म्हणजे जाळणें, विस्तव लावणें. " मुलीला सासर श्रीमंत सांपडलं खरं; दागदागिने लागतील तेवढे आहेत, पण सासुरवास भयंकर आहे. काय करतां श्रीमंती? अंगावर घातलं सोनं नी अंगाला लावलं ढोणं! एकपरी गरीबी बरी!"

अंगावर पडतां माल सोडवी त्याचें मुद्दल—एखादी आपणांस नको असलेली वस्तु आपल्या गळ्यांत पडली असली तर ती शक्य तितक्या लवकर विकून टाकून किंवा तिची व्यवस्था लावून पदरांत पडलेली किंमत घेऊन कमींत कमी नुकसान होईल अशी व्यवस्था करणें शहाणपणाचें असतें.

अंगावर पडलें ऊन दादला घेतो बायकोचे गुण—स्त्री जर आळशी असेल व ती अंगावर ऊन पडेपर्यंत निजून उठली नाहीं तर नवऱ्यासच उठून आवश्यक तीं सकाळचीं कामें करावीं लागतात व बायकोप्रमाणें घरांत राबावें लागतें. बायकोला पण दुखवितां येत नाहीं. प्रसंग येऊन ठेपला म्हणजे मनुष्य नरम होतो.

अंगावर पडें तर दुणें बळ चढें—एखादी जबाबदारी अंगावर पडलीच म्हणजे मनुष्य आपलें सर्व सामर्थ्य एकत्र करून कशी तरी ती पार पाडतोच; एखादें काम आपण आपणावर घेतलें किंवा आपल्या वांट्यांस आलें म्हणजे मनुष्य दुप्पट श्रम करूनहि तें पार पाडतो.

अंगावरचे केंस मोजवत नाहींत—अंगावर इतके केंस असतात कीं त्यांची गणना करणें अशक्य असतें व ते इतके एकासारखे एक असतात कीं त्यांतून एकापासून दुसरा निराळा ओळखणें शक्य नसतें; त्याप्रमाणें अनेक सारख्या वस्तूंतील एक. ' तिस्रः कोट्योऽर्ध कोटीच यानि लोमानि मानवे।'

अंगावरचें लेणें जन्मभर देणें—[लेणें=दागिने] १ दागिन्यांकरितां कर्ज करून ठेवून तें जन्मभर फेडीत बसणें हें केव्हांहि अयोग्य होईल; त्यापेक्षां दागिने न घातलेले बरें. २ परमेश्वर जें आपल्याला स्वाभाविक सौंदर्य देतो तें जन्मभर पुरतें; तें कधींहि आपणापासून कोणास काढून घेतां येत नाहीं. जे अंगावर घालवयाचे दागिने असतात ते कधीं मिळतात कधीं जातात, त्यांची शाश्वती नसते.

अंगावरलें, रांगतें आणि खेळतें, अशी संतती बाईल मिरविते—एखाद्या स्त्रीस वरचेवर मुलें होत असलीं म्हणजे तीस म्हणतात. एक खेळूं लागतें तों दुसरें रांगूं लागतें, तोंच तिसरें अंगावर पीत असतें.

अंगाविना डंख लागत नाहीं—जेथें दंश करावयाचा त्या जागीं शरीराचा भाग असेल तरच दंश करतां येईल, नाहींतर कांहीं उपयोग होणार नाहीं. कांहींतरी आधार असल्याशिवाय कोणतीहि क्रिया करतां येत नाहीं. मुळांत कांहींतरी असल्याशिवाय कोणी नांवें ठेवीत नाहीं. तु०—अंगीं उणा तर जाणे खाणा-खुणा.

अंगावेगळा घाय तुला लागे, मला काय?—आपल्याला ज्यापासून कांहीं धस लागत नाहीं अशा गोष्टीपासून दुसऱ्यास त्रास होत असेल तर आपण त्याची फिकीर करीत नाहीं.

अंगास रक्त लावून घायाळांत घुसावें—प्रत्यक्ष लढाईंत भाग घेण्याचें सामर्थ्य किंवा धैर्य नसलें म्हणजे लढाईंत असण्याचा बहाणा करण्याकरितां खोटेंच रक्त आपल्या अंगास लावून आपण जखमी झाल्याचें ढोंग करणें. एखादी गोष्ट करावयाची तर टाळणें पण तीपासून आपणांस नुकसान पोंचल्याचा बहाणा करणें.

अंगीं असतां पराक्रम, करूं नये हलकें काम—जर आपल्या अंगांत महत्त्वाची कामगिरी करण्याचें सामर्थ्य असेल तर आपली शक्ति हलकीं सलकीं कामें करण्यांत खर्च करूं नये. आपल्या योग्यतेचेंच काम आपण पतकरावें.

अंगीं असे तर कोपरीं फाटे—एखादें वस्त्र अंगावर वापरलें तरच तें फाटण्याचा संभव. कोणतेंहि काम करावयास लागलें तरच त्यांत झीज लागण्याचा संभव असतो. बाजूलाच राहिल्यावर कशाला धस लागेल?

अंगीं असेल तें काम आणि पदरीं असेल तो दाम—जी गोष्ट आपणांस स्वतःस करण्याचें सामर्थ्य असतें तीच गोष्ट होण्याचा संभव असतो व आपल्या गांठीं जो पैसा असतो तोच वेळेवर उपयोगी पडतो. दुसऱ्यावर अवलंबून राहून कांहीं उपयोग होत नाहीं. वेळेवर फसगत मात्र होण्याचा संभव असतो.

अंगीं उणा तर जाणे खाणाखुणा—ज्याच्या अंगांत एखादा दोष असतो त्याला त्यासंबंधीं सहज बोलणें निघालें तरी आपणासंबंधींच बोलत आहेत असें वाटतें. स्वतःच्या

दोषाची स्वतःला जास्त जाणीव असते. 'चोराच्या मनांत चांदणें.' तु०-(इं.) If the cap fits wear it.

(माझ्या) अंगीं का माशा मेल्या आहेत?--आळशी मनुष्याच्या अंगावर माशा बसून त्या मेल्या तरी त्या काढून टाकण्याचेंहि काम त्याच्याकडून होत नाहीं. परंतु जो आळशी नाहीं तो याप्रमाणें वागणार नाहीं. जो पराक्रमी अथवा काम करणारा असेल त्याला स्वस्थ बसणें किंवा कोणताहि कमीपणा पतकरणें केव्हांहि आवडणार नाहीं.

अंगीं न लागे चोरीचा ठाव तोंवरी चोर दिसे साव—जोंपर्यंत एखाद्यावर चोरीचा आरोप सिद्ध होत नाहीं तोंपर्यंत तो सावच समजला जातो. प्रत्यक्ष एखाद्याच्या अंगीं दोष लावल्याशिवाय त्याला कोणी दोषी समजणार नाहीं. तु०-सांपडला तर चोर नाहींतर बादशहाहून थोर.

अंगीं नसतां गर्भछाया वंध्या डोहाळे सांगे वाया--शरीरांत गर्भाचीं कांहीं एक चिन्हें नसतां वंध्या स्त्री मला डोहाळे लागले आहेत असें सांगूं लागली तर त्याचा काय उपयोग? मुळांत आधार नसतां एखादें विधान केलें तर तें हास्यास्पद होतें.

अंगीं नाना कळा पण वेष बावळा—एखादा मनुष्य फार गुणी असतो पण त्याच्या पोषाखावरून वगैरे त्याच्या बुद्धीची प्रथम कल्पना येत नाहीं, तेव्हां ही म्हण वापरतात. बाहेरून दिसावयास बेढब पण आंत गुणी असा मनुष्य. 'वेष धरावा बावळा। अंतरीं असाव्या नाना कळा।'–दा. १९-९-३१.

अंगीं पांडित्याचा थोरपणा आणि मुद्याला मुळमुळपणा—आपण फार शहाणे, हुशार आहों म्हणून फुशारकी मारावयाची पण एखाद्या गोष्टीला मुद्देसूद उत्तर द्यावयाची वेळ आली म्हणजे मात्र टाळाटाळ करावयाची, अशा वृत्तीच्या मनुष्याबद्दल वापरतात.

अंगीं भरलासे ताठा, बळणीं नये जैसा खुंटा—एखादा मनुष्य अतिशय गर्विष्ठ असून कोणाचेंच ऐकत नसेल तर त्यास म्हणतात.–तुगा. ३१४५

अंगीं लागत नाहीं, भूक वाढत नाहीं—खाल्लेल्या अन्नाचेंच योग्य पचन होऊन त्याचा शरीरास उपयोग होत नसेल तर आणखी अन्न खाण्यासारखी भूक कशी लागणार? जेवढें आपल्या हातांत आहे त्याचाच जर आपणास योग्य उपभोग घेतां येत नसेल तर आणखी वैभवाची आशा करून तरी काय उपयोग?

अंगें केलें तें काम पदरीं असे तो दाम—'अंगीं असेल' इ. पहा.

अंगठा---**अंगठा दाखविणें**—१ नाहीं म्हणावयाचें झाल्यास मूठ मिटून अंगठा किंवा नकार घंटा दाखवितात त्यावरून; किंवा दानाचें उदक देतांना सरळ तळहातावर पुढें बोटांवरून पाणी सोडतात पण पितरांस उदक देतांना वांकडा हात करून अंगठ्यावरून पाणी सोडतात त्यावरून, नाहीं म्हणणें, नकार देणें. २ फसविणें; ठकविणें; प्रथम आशा दाखवून शेवटीं धोका देणें. 'तेवीं पुत्रापासोन सुखप्राप्ति। माता पिता होईल म्हणती। शेखीं पुत्र अंगोठा दाविती। केवळ भ्रांति पुत्रमोहो॥'–एभा ११.८२.

अंगठा धरणें--(अव.) अंगठे धरणें. हाताच्या बोटांनीं पायाचे आंगठे धरून उभे रहाणें हा एक शिक्षेचा प्रकार आहे. 'अंगठे धरून या म्हाताऱ्याला उभा करा'–बाबं २.१.

पायाचे अंगठे मुखांत धरणें—चुकी झाली म्हणून स्वतःस शिक्षा करून घेणें. वरील प्रमाणेंच एक शिक्षेचा प्रकार. 'हरि हरि दहापूर्वी कळतें तरि अंगठे मुखीं धरितों। अपराध कोटि पोटीं घालाया मुकुट पाय ते करितों॥'—मोस्त्री ६.६३.

अंगठ्याचा मान–अंगठे दाबणी–अंगठे दाम—विवाहसमयीं सप्तपदीच्या वेळीं वधूची बहीण वधूच्या उजव्या पायाचा अंगठा सातव्या तंदुलराशीजवळ दाबून धरते; तेव्हां तो सोडविण्यासाठीं नवऱ्यामुलानें तिला द्यावयाचें मानाचें खण, लुगडें वगैरे.

अंगठ्याची आग मस्तकास जाणें—रागानें नखशिखांत लाल होणें; तळपायाची आग मस्तकास जाणें; अतिशय रागावणें.

अंगठ्यांवर दिवस मोजणें—एखादी गोष्ट व्हावी अशी अतिशय उत्कंठा लागली असतां मध्यंतरीं जाणारा काळ फार दीर्घ वाटतो व प्रत्येक दिवस बोटें मोडून मोजून आपण इतके दिवस झाले असें रोज म्हणतों. यावरून एखाद्या गोष्टीची अतिशय आतुरतेनें वाट पहाणें.

अंगठ्यास आग लागणें—संकटांस प्रारंभ होणें; संकटाचें आगमन झालेलें असणें तथापि मुख्य संकट अद्यापि दूर असणें. रावणाच्या शरीरास दहन करण्यासाठीं प्रथम त्याच्या पायाच्या अंगठ्यास आग लावली पण तें शरीर इतकें मोठें आहे कीं, प्रत्यक्ष शरीरास आग लागण्यास पुष्कळ अवधि लागणार व अद्यापहि तो अंगठाच जळत आहे अशी समजूत आहे. यावरून संकटांस प्रारंभ झाला तरी मुख्य संकट पुढेंच असणें या अर्थी. प्रेतास अग्नि देतांनाहि प्रथम पायाकडून अग्नि देतात. तेव्हां अंगठ्यास आग लागली तरी प्रेतास जळण्यास बराच अवकाश लागतो. यावरून संकट येण्यास केवळ आरंभ होणें; त्याचे

परिणाम होण्यास अवधि असणें. 'अजून तर तुझ्या अंगठ्यास देखील आग लागली नाहीं'-धर्माजी ९१.

* **अंगठा सुजला म्हणून डोंगराएवढा होईल काय?**—अंगठा सुजला व कितीहि सुजेनें वाढला तरी त्याच्या वाढीला मर्यादा आहे. तो कांहीं डोंगराएवढा मोठा होऊं शकत नाहीं. एखाद्या क्षुद्र वस्तूस प्रसंगवशात् कितीहि मोठेपणा प्राप्त झाला तरी त्याला कांहीं मर्यादा असते. तिच्याहून अतिशय मोठ्या वस्तूशीं ती बरोबरी कधींहि करूं शकत नाहीं.

अंगठ्यावरून दशासूर निर्माण करणें—[दशासूर=दशशीर=रावण] सीतेनें इतके दिवस रावणाच्या बंदीत असूनहि त्याला सबंध पाहिलें नव्हतें. फक्त त्याचा अंगठाच तिला दिसला. कैकेयीनें तो अंगठा तिला काढावयास सांगून त्यावरून सबंध रावणाचें चित्र तयार केलें व रामाला दाखवून दिलें कीं, सीता शुद्ध नाहीं; तिनें रावणाची मूर्ति हृदयांत वागविलेली आहे. अशी कथा सांगतात. यावरून राईचा पर्वत करणें. "सभ्य स्त्रीनें परपुरुषाकडे गायन शिकणें हें त्यांच्या जुन्या डोळ्यांना वाईट दिसलें असेल, हें मला कबूल आहे. पण असा अंगठ्यावरून दशासूर निर्माण करण्यापूर्वीं त्यांनीं जरा खऱ्या खोट्याचा तरी विचार करावयाचा होता."—कुस्करलेलें हृदय १८८.

अंगठी——अंगठी कापली तरी मुतायचा नाहीं—[अंगठी=हातापायाचें बोट] एखाद्याचें बोट वगैरे कापलें असतां रक्तप्रवाह थांबावा म्हणून पाणी ओततात. परंतु पाणी आणावयास दूर तरी जावें लागतें किंवा कांहीं श्रम करावे लागतात; पण त्याऐवजीं लघवी करण्यास कांहीं श्रम करावयास लागत नाहींत. पण तेवढेंहि करून जो दुसऱ्याच्या उपयोगी पडत नाहीं अशा मनुष्याबद्दल तिरस्कारानें हा वाक्प्रचार वापरतात. अतिशय कृपण, दुसऱ्याच्या उपयोगी न पडणारा माणूस. या म्हणीचाच पर्याय-'कापल्या करंगळीवर देखील मुतायचा नाहीं.'

ज्याची अंगठी त्याच्याच डोळ्यांत घालणें—एखाद्यानें दुसऱ्याच्या डोळ्यांत घालण्याकरितां आपलें बोट पुढें केलें असतां तें पकडून उलट त्याच्याच डोळ्यांत घालणें. म्हणजे एखाद्यानें दुसऱ्यास फसविण्याकरितां एखादा व्यूह रचला असतां त्यांत त्यासच गुंतवून त्याच्या लबाडीचें फळ त्याच्या पदरांत बांधणें. दुसऱ्याकरितां खोदलेल्या खड्डयांत खोदणारासच पाडणें.

अंगठी सुजली म्हणून डोंगराएवढी होईल काय?—वर 'अंगठा सुजला-' पहा.

अंगडें——अंगड्याला सोडून घोंगड्याला धरणार—एखाद्या मनुष्याच्या अंगरख्याला धरलें असतां तो आधार अधिक बळकट; कारण अंगरखा अंगांत असतो. पण तो आधार सोडून त्याच्या घोंगड्याला धरल्यास घोंगडें टाकून तो निसटूं शकतो. तेव्हां अधिक बळकट असा आश्रय सोडून दिसायला मोठी पण कमी सुदृढ अशा गोष्टीचा आश्रय केल्यास उलट आपण अधिक निराधार होतों.

अंगण——अंगणीं जाणें—(बायकी) मोरीवर जाणें; पाय धुवावयास जाणें; लघवीस जाणें.

* **घर सोडलें(म्हणजे)अंगण पारखें**—घराबरोबर अंगणाचाहि संबंध सुटतो. एकदां आपण एखादें घर सोडून दूर गेलों व त्या घरांतील मंडळीशीं संबंध सुटला, विशेषतः त्या मंडळीशीं वितुष्ट आलें म्हणजे त्या घराच्या अंगणांतहि आपणांस जातां येत नाहीं. एकदां वितुष्ट आलें, संबंध सुटला म्हणजे तो सर्वतोपरि सुटतो, अर्धवट रहात नाहीं.

अंगणावरून घराची कळा (ओळखते)—अंगणाच्या स्वच्छतेवरून घरामध्यें किती स्वच्छता असेल याची कल्पना येते. थोड्या भागावरून सर्व वस्तूंसंबंधीं अनुमान करतां येतें. तु०-'शितावरून भाताची परीक्षा.'

अंगतपंगत——अंगतपंगत तीच गड्याची संगत—एकत्र जेवण होण्यानें मैत्री वाढते. इतर गोष्टींच्यामुळें झालेल्या मैत्रीपेक्षां एकत्र भोजन केल्यानें होणारी मैत्री अधिक दृढ व चिरकालीन होते.

अगत्य——अगत्याचें काम स्वतः करावें—जी गोष्ट आपणाला जास्त जरूरीची किंवा आवश्यक वाटत असेल ती दुसऱ्यावर अवलंबून न ठेवतां स्वतः श्रम घेऊन करावी; तरच ती वेळेवर होते. नाहींतर दुसऱ्याच्या भरंवशावर राहून शेवटीं फसगत होण्याचा संभव असतो.

अंगद——अंगदनीति—रामानें रावणाशीं साम करण्याकरितां अंगदास शिष्टाईस पाठविलें त्यावेळीं त्यानें रावणास सामासंबंधीं केलेला बोध; यावरून सलोख्याचें बोलणें; सुनीति; सन्मार्गाचे नियम; विदुरनीति, भीष्मनीति याप्रमाणें.

अंगद शिष्टाई करणें—रावणानें सीता चोरून नेल्यावर रामानें त्यावर स्वारी केली; त्यावेळीं युद्ध सुरू होण्यापूर्वी सामोपचारानें रावणानें सीता परत करावी अशी मध्यस्थी करण्याकरितां वालीचा पुत्र अंगद यास रावणाकडे पाठविण्यांत आलें होतें. त्यावरून-मध्यस्थी करणें, सामोपचाराच्या गोष्टी सांगणें; भांडणतंटा मिटविण्याचा, टाळण्याचा प्रयत्न करणें. विपरीत अर्थानें—लुडबूड; लुब्रेपणा; चोंबडेपणा.

अंगरखा——अंगरख्याचे बंद तटातट तुटणें—मनुष्यास अतिशय आवेश आला म्हणजे ऊर भरून येऊन छाती फुगते;

त्यामुळें अंगरख्याचे बंद तुटतात. यावरून अतिशय आवेश चढणें; स्फुरण चढणें.—राणा भीमदेव नाटक.

अगर्वी——अगर्व्यासी भय नसे सगर्व्यासी शत्रु शिरीं बसे—जो मनुष्य गौरवाजवी अभिमानास पेटत नाहीं त्यास कोणापासूनहि भीति नसते, पण जो दुरभिमानी असतो तो आपल्या अभिमानामुळें शत्रु उत्पन्न करतो व प्रसंगीं त्यास हारहि खावी लागते.

अगस्त्य——अगस्ति ऋषींचा वायदा—प्राचीन काळीं हिमालयपर्वत व विंध्यपर्वत यांमध्यें उंचीबद्दल स्पर्धा लागून दोन्हीहि पर्वत उंच वाढूं लागले. तेव्हां लोकांच्या व्यवहारांत विशेषतः विंध्य पर्वताच्या वाढीमुळें फारच अडचण येऊं लागली. तेव्हां विंध्य पर्वत हा अगस्त्य ऋषीचा शिष्य असल्यामुळें लोकांनीं अगस्त्य ऋषींची हें संकट टाळण्याबद्दल प्रार्थना केली. तेव्हां अगस्त्य ऋषि हे विंध्य पर्वताकडे गेले. आपले गुरुजी येत आहेत असें पाहून विंध्य पर्वतानें त्यांस दंडवत घातलें. तेव्हां अगस्त्य ऋषि दक्षिणेकडे निघून आले व येतांना त्यांनीं विंध्य पर्वतास असें सांगितलें कीं, मी पुनः या मार्गानें येईपर्यंत तूं अशाच स्थितींत राहावेंस. तेव्हां विंध्य पर्वत आडवा पडलेल्या स्थितींतच अद्याप राहिला व अगस्त्य ऋषींनीं दक्षिणेंतच आश्रम करून वास्तव्य केलें व पुनः उत्तरेकडे गमनच केलें नाहीं. अशा रीतीनें विंध्य पर्वताशीं केलेला वायदा कधींच पुरा केला नाहीं. यावरून कधींच पुरा करावयाचा नाहीं असा वायदा. जो करार कधींच पुरा करावयाचा नाहीं असा करार.

अगा——अगा अगा देसाया, काष्टी नाय नेसाया—(कु.) [काष्टी=लंगोटी] पूर्वी कुडाळ प्रांतीं देसाई सत्ताधीश होते. त्यावेळीं वैभव, संपत्ति, सत्ता, कुळ वगैरे बाबतींत देसाई श्रेष्ठ असा समज होता. परंतु सावंताच्या मराठ्या घराण्यानें देसायांना पराजित करून स्वतःची सत्ता स्थापन केली. त्यानंतर देसायांना हलाखीची स्थिति प्राप्त झाली. तेव्हां देसायांची इतकी हीनस्थिति झाली कीं, त्यांस नेसण्यास पुरेसें वस्त्रहि राहिलें नाहीं. यावरून एका काळीं वैभवसंपन्न असलेल्या मनुष्यास दैन्यावस्था प्राप्त झाली असतां योजितात. (विविधवृत्त १९-२-३९ पान १८)

अगांची पगा उतवांक व्यांगा—(गो.) अव्यवस्थितपणामुळें दिवाळें.

अंगाई——अंगाई करणें—लहान मुलांना निजविण्यासाठीं बायका 'अंगू गाई !' असें शेवटीं पालुपद असलेलें गाणें म्हणतात. त्यावरून विनोदानें, झोंप घेणें, निजणें याअर्थी वापरतात. "आमचें आख्यान फार लांबून वाचकमंडळीपैकीं जर कोणास डुकल्या यायला लागल्या तर त्यांनीं खुशाल मधून उठून जाऊन अंगाई करावी."—नि.

अंगार——अंगार होणें—(व. घाटी) १ आग होणें; भडका होणें. २ अतिशय राग येणें; संताप येणें; लाही लाही होणें. ३ जळणें.

अंगारा——अंगारा करणें—१ भुताखेतांची पीडा नाहींशी होण्याकरितां, विषार उतरण्यासाठीं, रोग निवारण करण्यासाठीं मंतरलेलें भस्म लावणें; मंत्रतंत्रादि उपाय योजणें. २ (ल.) अंकित करणें; वश करणें; कबज्यांत आणणें; भुलविणें.

अंगारा धुपारा—१ कोणतेंहि अभिचारकर्म करावयाचें असतां अग्नि पेटवून त्यांत धूप वगैरे जाळून त्याचा धूर अंगावर घेणें, त्याची विभूति अंगाला लावणें वगैरे गोष्टी करावयाच्या असतात. त्यावरून कांहीं मांत्रिक, तांत्रिक, जादूटोणा वगैरे अर्थ होतो. २ (ल.) अंगारा किंवा धुपारा हा जसा केवळ वास घेण्यापुरता किंवा चिमूटभर अंगाला लावण्याकरितां असतो त्याप्रमाणें केवळ चिमूटभर फक्त नमुन्यापुरेशी प्रत्येकाच्या वांटणीस येईल अशी तुटपुंजी सामुग्री असली म्हणजे हा वाक्प्रचार योजतात. 'एवढ्याशा तांदुळाचा भात करून एवढ्या मोठ्या जमावास काय अंगारा धुपारा करावयाचा आहे ?'

अंगारा लावणें—एखाद्यास प्रथम आशा लावून नंतर निराश करणें; अखेरीस फसविणें; धुपाटणें हातीं देणें.

***अंगारा धुपारा हा सारा मायेचा पसारा**—अंगारा धुपारा करणें, मंत्रतंत्र, चेटुक, कुयेडें करणें, तांत्रिक कर्म करणें वगैरे लोकभ्रमाच्या गोष्टी आहेत. त्यांत कांहीं अर्थ नसून लोक केवळ अज्ञानानें, भ्रमानें त्यांच्या पाठीस लागतात. त्यांत सत्य मुळींच नसतें.

अंगाऱ्याला गेला दिवस करायला आला—मनुष्य आजारी असला म्हणजे दैवी उपचार म्हणून देवाचा कौल घेऊन त्याचा अंगारा त्यास लावण्यांत येतो. अशा तऱ्हेचा देवाचा अंगारा आणण्याकरितां एखाद्या मनुष्यास पाठविलें असतां तो तिकडेच दीर्घकाळ राहून जों परत येतो तों आजारी मनुष्य मरण पावून त्याची उत्तरक्रिया चालू असते. अशावेळीं त्याला पाठविल्याचा काय उपयोग ? एखादें काम करावयास सांगितलें तर त्याचें जोंपर्यंत प्रयोजन आहे तोंपर्यंत तें केलें तरच त्याचा उपयोग. त्याची गरज नाहींशी झाल्यावर केलें असतां तें निष्फळ होय.

अंगाऱ्याला गेला पांगारा घेऊन आला—एखादा मनुष्य आजारी असला म्हणजे अज्ञानी लोकांत देवास कौल लावून त्याचा अंगारा आणून लावावयाची पद्धति आहे. त्याप्रमाणें एखाद्या आजारी मनुष्याकरितां अंगारा आणावयास पाठविलेल्या मनुष्यानें तिकडेच दीर्घकाळ राहून इतका उशीर केला कीं,

इकडे हा रोगी मरण पावून त्यास दहन करण्याची वेळ आली व अंगारा आणावयाच्या ऐवजीं दहनाकरितां पांगाऱ्याचीं लांकडें आणावयाची त्यावर पाळी आली म्हणजे म्हणतात. एखाद्या कामांत इतका विलंब लावणें कीं तें काम सफल होण्याची वेळ टळून जाऊन पूर्ण बिघडल्यानंतर येणें. यावरून अत्यंत दिरंगाई करणें; विलंब लावणें; अतिशय दीर्घसूत्रीपणा करणें. २ मोठा पराक्रम करण्यासाठीं जाऊन अगदीं क्षुल्लक गोष्ट करून येणें.

अगुण——अगुण सगुणा न छेडिती तरी सगुण उन्मत्त होती—दुर्गुणी मनुष्य जर सद्गुणी मनुष्यांना उपसर्ग न देतील तर सद्गुणी माणसें फार शेफारून जातील. तु०—'निंदकाचें घर.'

अगुणी——अगुणिया स्तव न करी, लक्ष्मी जरी त्याचे घरीं पाणी भरी—एखादा दुर्गुणी मनुष्य जरी फार श्रीमंत असला तरी त्याची स्तुति करूं नये.

अंगुली——अंगुली निर्देश—१ एखाद्या व्यक्तीकडे वगैरे बोट करून दाखविणें. २ एखाद्या गोष्टीचा केवळ जातां जातां केलेला उल्लेख; मुख्य गोष्टीचें विवेचन करीत असतां मध्यंतरीं आनुषंगिक आलेल्या गोष्टीचें किंवा आपल्या विवेचनास आधारभूत असलेल्या एखाद्या दुसऱ्या गोष्टीचें साग्र विवेचन न करतां केवळ दिग्दर्शन करणें.

अंगुष्ठ——अंगुष्ठाची आग मस्तकांत जाणें—अत्यंत रागावणें; तळपायाची आग मस्तकांत जाणें; अंगाची लाही-लाही होणें. अंगठा पहा.

अंगुष्ठावरून दशशीर करणें—रावणाच्या अंगठ्याचा आकार समजला असतां त्यावरून त्याच्या सर्व शरीराची कल्पना करणें. यावरून थोडासा आधार मिळाला तरी त्यावर एखादा मोठा व्यूह रचणें; एखाद्या गोष्टीचा केवळ अंशमात्र माहीत असतां तिचें अतिशयोक्तीनें रसभरित व साग्र विवेचन करूं जाणें; लहानाचें फार मोठें करून सांगणें; फुगवून सांगणें. अंगठा पहा.

अंगुळी——अंगुळी सुजली तरी डोंगराएवढी होत नाहीं—अंगठा पहा.

अगे——अगे अगे म्हशी मला कां नेशी—'अग अग—' पहा.

अगे जिभे लवसी, आपली आपल्या भोवसी—आपलीच जीभ जर भलतेच शब्द बोलली तर त्यापासून आपणांसच त्रास होतो. याकरितां नेहमीं आपण जे शब्द उच्चारावयाचे ते जपून उच्चारले पाहिजेत; उगाच भरमसाटपणें बोलण्यांत अर्थ नाहीं.

अगे माझे बायले, सर्व तुला वाहिलें—जो मनुष्य सर्वतोपरी बायकोच्या तंत्रानें चालतो त्यास अनुलक्षून ही म्हण वापरतात.

अंगेजणी——अंगेजणी करणें—स्वतः पुढें होऊन, अंगें करून परिश्रम करणें; अंगावर घेणें; स्वतः करण्याची जबाबदारी घेणें. 'ज्यांनीं रहावें त्यांनीं अंगेजणी करून बाकी भरावी.' —ख १४६५.

अगोट——अगोट दाखविणें, साधणें—अगोट हे वर्षअखेरीचे दिवस असतात. त्यावरून कोणत्याहि गोष्टीचो अखेर करणें असा मूळ अर्थ असावा. नंतर लक्षणेनें मारणें, असा अर्थ. 'कुत्र्याला अगोट दाखीव.'

अगोदर——अगोदर असला त्यांत बैलावर बसला—एखादा मनुष्य स्वभावतःच आढ्यतेखोर असतो, कोणाशीं नीट बोलत नाहीं, कोणाचें काहीं काम करीत नाहीं. असा मनुष्य जर थोडासा मोठ्या पदास चढला किंवा त्यास थोडा फार अधिकार प्राप्त झाला तर तो अधिकच फुशारून जातो व गर्विष्ठ बनतो.

अगोदर खाईल मग तोंड धुवील—एखाद्या खादाड मनुष्यास उठल्याबरोबर प्रथम कांहींतरी खावयास लागतें. उठल्याबरोबर प्रथम शौचमुखमार्जन करण्यापूर्वीहि अगोदर तो खाण्याची चौकशी करील आणि खाल्ल्यानंतर मग कोणत्याहि कामासंबंधीं विचार करील. प्रथम एखादी न खाण्याजोगती वस्तु विचारपूस केल्याशिवाय अगर ती भक्ष्य आहे कीं अभक्ष्य आहे याचा विचार न करतां एखादा मनुष्य प्रथम खाऊन टाकतो आणि नंतर ती वाईट लागल्यावर किंवा अभक्ष्य आहे असें समजल्यानंतर तोंड धुऊन टाकण्याची खटपट करतो. त्यापेक्षां प्रथमच अधिक विचार करील तर ही मागाहून तोंड धुण्याची यातायात कशाला करावी लागेल? तेव्हां एखादी गोष्ट अविचारानें करून मग पश्चात्ताप पावण्यापेक्षां अगोदरच अधिक विचार केलेला चांगला नव्हे का?

अगोदर चारा मग चोंच—परमेश्वर जे जे प्राणी उत्पन्न करतो त्यांच्या भक्ष्याची तो अगोदरच योजना करून ठेवतो. पक्ष्याची चोंच निर्माण करण्यापूर्वीच तो त्याचा चारा निर्माण करीत असतो. त्याप्रमाणेंच मनुष्यानें एखादी जबाबदारी अंगावर घेण्यापूर्वी ती पार पाडण्याची तजवीज अगाऊ करून ठेवणें श्रेयस्कर होय.

अगोदर भुक्ति मग भक्ति—प्रथम स्वतःच्या शरीरभोगाची तजवीज करावयाची व नंतर परमेश्वरभक्तीकडे वळावयाचें. मनुष्याचा स्वभावच जात्या स्वार्थी असतो. तो प्रथम स्वाभाविक-पणें स्वतःकडे पाहातो व नंतर इतर गोष्टींकडे लक्ष्य देतो. तु० आधीं स्वार्थ मग परमार्थ. आधीं पोटोबा मग विठोबा.

अगोदर शेणमाती, मग पोळीपाती—प्रथम शेणमातीनें चूल नीट सारवल्यानंतरच तीवर स्वयंपाक करावयाचा असतो.

तेव्हां प्रथम कष्ट केल्याशिवाय, हलकें काम केल्याशिवाय चांगलें फळ मिळत नाहीं.

अग्नि——अग्निकाष्ट भक्षणें, अग्निकाष्टें भक्षण करणें, अग्निकाष्ट सेवन करणें—स्वतःस अग्नींत जाळून घेणें; चिताप्रवेश करणें; आत्महत्या करणें. एखादी गोष्ट आपल्या हातून प्रतिज्ञेप्रमाणें न घडली तर आपण प्राण ठेवणार नाहीं अशी प्रतिज्ञा पूर्वी करण्याची पद्धति असे किंवा देह नकोसा झाला तर चिताप्रवेश करून देहत्याग करीत असत. " स्त्रिया शत्रुभयानें व पातिव्रत्य-रक्षणार्थ अग्निकाष्ठें भक्षण करण्याकरितां सतीचीं वाणें घेत. " —लोकहितवादी. 'पूर्वीं जयद्रथवधसमयींहि अशीच अग्निकाष्ठें सेवन करीन म्हणून प्रतिज्ञा केलीस.'—सुरतसुधन्वानाटक पृ. २५.

अग्नि घेणें—लढाईमध्यें दारुगोळ्याचा मार सहन करणें; शत्रुपक्षाची गोलंदाजी व बंदुकीचा मारा वगैरे चालू असतां त्यांतून पुढें चाल करून जाणें.

अग्नि तृणानें झांकणें—संकटविषय दडवून ठेवणें; संकटाची जाणीव न देणें. संकटाची जाणीव झाल्यावरहि त्यावर योग्य उपाय न करतां कसें तरी करून ती डोळ्याआड करावयाची व योग्य उपाय न करतां कांहींतरी क्षुल्लक गोष्टी करून त्याचें तात्पुरतें निवारण करावयाचें. 'पदरची मंडळीही पाहतां पाहतां अग्नि तृणानें झाकितात याचें आश्चर्य वाटतें. —सनदापत्रें पृ. १४९.

अग्नि देणें—दहन करणें; विशेषतः प्रेत दहन करणें; उत्तर-क्रिया करणें.

अग्निपंचक—फलज्योतिषांतील एक घातक योग. यांत अग्नीपासून भय असतें. शुक्ल प्रतिपदेपासून चालू तिथीपर्यंत मोजून त्यामध्यें चालू लग्न मिळवून त्या संख्येस नवानें भागावें बाकी दोन राहिल्यास तें अग्निपंचक होय. हा योग गृहकर्मास वर्ज्य मानतात.

अग्नीचा पर्जन्य वर्षणें—भयंकर संकट येणें; मोठा अनर्थ ओढवणें. 'अग्नीचा पर्जन्य वर्षला.'—खरे ३१३४.

अग्नीचा पाऊस पडणें—ज्याप्रमाणें आगीचा वर्षाव व्हावा त्याप्रमाणें चोहोंकडून अनेक भयंकर संकटें येऊन कोसळणें; अत्यंत जुलूम होणें; सर्व बाजूंनीं कठीण परिस्थिति होणें.

अग्नीवरि आज्य टाकणें—१ आगींत तूप, तेल ओतणें आग अधिक भडकविणें. २(ल.) रागावलेल्या मनुष्यास अधिक राग आणणें. ३ सुरू झालेल्या कलहांत भर टाकणें. 'अग्नीवरि आज्य टाकावें तसें पुरतेपणें ठसलें.'—भाव ३९.

❀ **अग्नि काड्यांनीं पेटतो, मोठ्या लांकडें विझतो**—लहानशा आगकाडीनें विस्तव पेटतो पण त्यावर मोठें लांकूड घातलें असतां पेटण्याऐवजीं तो विझतो मात्र. एखादी लहान वस्तु जें कार्य करूं शकते तें मोठ्या वस्तूनें होत नाहीं, तर उलट बिघडतें.

अग्नि ज्वाळेवांचून तैशी उत्कंठा ज्ञानावीण—ज्या अग्नींतून ज्वाला निघत नाहींत त्याचा उपयोग करून घेतां येत नाहीं त्याप्रमाणें जर ज्ञानप्राप्ति झाली नसेल तर नुसती जिज्ञासा किंवा हौस असून कांहीं उपयोग नाहीं.

अग्नि न विझे कापसानें, क्रोध न शमे क्रूर भाषणें—अग्नींत जर कापूस टाकला तर तो विझण्याऐवजीं अधिकच पेट घेईल; त्याप्रमाणें आपण जर निष्ठुर भाषण करूं लागलों तर दुसऱ्याचा राग शांत होण्याऐवजीं अधिक वाढण्याचाच संभव असतो.

अग्निप्रवेशाला भय न वाटे सतीला—जी स्त्री सती जावयास तयार होते तिच्या मनाची स्वतःवर मृत्यु ओढवून घ्यावयाची तयारी असल्यामुळें तिला आगीची मुळींच भीति वाटत नाहीं. जो मनुष्य एखादें धाडसाचें कृत्य करावयास तयार होतो त्यास त्या कामीं येणाऱ्या संकटाची मुळींच क्षिति वाटत नाहीं. तो सर्व संकटांस तोंड द्यावयास तयारच असतो.

अग्नि हा चांगला चाकर पण वाईट धनी आहे—अग्नीस आपल्या कह्यांत ठेविलें तर त्यापासून अनेक उपयोग करून घेतां येतील, परंतु त्यास निरर्गल रीतीनें वागूं दिल्यास तो आपल्या सर्व घरादारांचा नाश करील.—ज्ञा. को. (आ) ३१.

अग्नीजवळ तूप ठेवलें तर तें विरघळल्याविना कसें राहील—दोन गोष्टी एकमेकांजवळ आल्या म्हणजे त्यांचा परस्परांवर परिणाम होणारच. तरुण मनुष्यानें सुंदर युवति पाहिली असतां त्याच्या भावना जागृत झाल्याशिवाय राहणार नाहींत. तेव्हां तुपाला आंच लागतांच तें जसें पातळ होण्याचा त्याचा धर्म आहे त्याप्रमाणें विकारांस अनुरूप गोष्टीची चेतना मिळाल्यास ते जागृत होणारच. तुलना—घृतकुंभसमा नारी तप्तांगारसमः पुमान् । तस्माद् घृतं च वन्हिंच नैकत्र स्थापयेद् बुधः ॥ —सुर १८२.४०८.

अग्नीप्रमाणें वाणीबद्दलहि सावध राहिलें पाहिजे—भलत्याच ठिकाणीं अग्नि टाकला असतां आग लागण्याचा संभव असतो म्हणून विस्तवाशीं खेळ करणें चांगलें नाहीं; त्याप्रमाणेंच अधिक उणा शब्द बोलल्यानें कलह लागण्याचा संभव असतो. याकरितां शब्द बोलावयाचे ते जपून उच्चारले पाहिजेत.

अग्नीशिवाय धूर येत नाहीं वर—जेथें अग्निच नसेल तेथें धूर कोठून येणार? तेव्हां कांहीं तरी कारण असल्याशिवाय कार्य

घडत नाहीं. मुळांतच जर कांहीं नसेल तर त्याचा परिणामहि आपणांस दिसणार नाहीं. ' यत्रयत्र धूमः तत्रतत्र वन्हिः । '

अग्नीसारखा प्राणी शत्रुमित्र न जाणी—अग्नीमध्यें चांगली वाईट कोणतीहि वस्तु टाकली तरी तो आपलें जाळण्याचें काम करतो. तो स्वतः ही वस्तु चांगली कीं वाईट हें पाहात नाहीं. त्याप्रमाणें सरळ धोपटमार्गी किंवा साधुवृत्ति जे लोक आहेत ते आपल्या शत्रुमित्रांशीं सारखेंच वर्तन करतात; त्यांना आपपरभाव नसतो.

अग्या——अग्या घेणें–धरणें–पतकरणें—पुढाकार घेणें; पुढें होणें.

अग्र—अग्रपूजेचा मान—पुढारीपणा; श्रेष्ठता. "जाधव०—पण आतां मोंगलाच्या पाठबळावर जेव्हां आम्ही सिंधखेडचे जाधव देवगिरीच्या तख्तावर विराजमान होऊं तेव्हां तरी अग्रपूजेचा मान आमचा आम्हांला मिळेल कीं नाहीं."–शि. सं. १. २

अंग्रेजी——अंग्रेजी टोपी, जेम फेरवी तेम सिधी—(गु.) आपल्याकडील पागोट्यांस पुढची बाजू व मागचो बाजू या अगदीं दिसण्यास वेगळ्या असतात. तसा इंग्रजी टोपीमध्यें पुढची बाजू व मागची बाजू यांमध्यें फारसा फरक नसतो. दोन्ही बाजू सारख्याच दिसतात; त्यामुळें ती कशीहि घातली तरी ती फिरविल्यासारखें न वाटतां सरळच आहे असें वाटतें. त्याप्रमाणें इंग्रजी नीति ही केव्हांहि बदलतां येते. इंग्रजी नीतिमध्यें आपलीं मतें बदलणें, पक्ष बदलणें वगैरे गोष्टींस फारसें महत्त्व देण्यांत येत नाहीं. आपल्या फायद्यासाठीं वेळेवर कसेंहि उलट सुलट बोललें तरी चालतें.

अघटित——अघटित वार्ता कोल्हें गेले तीर्था—कोल्ह्याला तीर्थास जाण्याचें कांहीं कारण नाहीं. तेव्हां एखाद्यानें कोल्हें तीर्थास गेल्याचा वार्ता सांगितली तर ती आपणाला आश्चर्यकारक वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. ती केवळ एक असंभाव्य गोष्ट म्हणून आपण समजूं.

अघळपघळ——अघळपघळ—व्यापक, मोठें, उदार, मनमोकळें (कार्य, वर्तन, भाषण, इ.). हें बहुधां कृत्रिम दिखाऊ असतें. 'अघळपघळ सारें घोर। कृतीच्या नांवें साधें पोर॥' —केसरी १७-३-३९ पान २०.

अघळपघळ बोलणें—घळघळीत तोंड भरून बोलणें.

❀ **अघळपघळ अन् घाल गोंधळ**—बोलण्यांत वागण्यांत मनमोकळा, उदार असलेला माणूस पुष्कळदां अव्यवस्थित व गचाळ आढळतो तेव्हां त्याच्या अघळपघळपणाचा आपल्याला साहजिक राग येतो. मितभाषणी, शिस्तीचा माणूस अशा वेळीं बरा वाटतो.

अघळपघळ बोलावें मनीं असेल तें करावें—जो मनुष्य स्वैरपणें भाषण व वर्तन करतो त्याबद्दल योजतात. ज्याच्या वाणीवर व आचरणावर निर्बंध नाहीं असा मनुष्य.

अघाडी——अघाडी घेणें—पुढाकार घेणें; पुढें होणें.

अघाडी मारणें—१ पहिल्यानें जाणें, पोंचणें, पुढें जाणें. "तोंपर्यंतच काय जी अघाडी असेल ती मारली पाहिजे." —चंद्रगुप्त १२१. २ सैन्याची बिनी कापणें.

अघाडी साधणें—दुसऱ्याच्या आधीं जाऊन पोंचणें व काम साधणें.

❀ **अघाडी शेत दुघाडी मळा**—१ एखाद्या मनुष्याची शेती निरनिराळ्या ठिकाणीं पसरलेली असली म्हणजे त्याला सर्व ठिकाणीं बरोबर लक्ष्य देतां येत नाहीं; त्यामुळें नीट व्यवस्था होत नाहीं. अशाप्रकारें कामाचा फार व्याप असला म्हणजे व सर्व ठिकाणीं सारखें लक्ष्य न देतां आल्यामुळें धांवाधांव होते. २ शेत लवकर पेरलें तर पीक चांगलें येतें व मळ्यावर फार परिश्रम केले तर फळ उत्तम मिळतें.

अघाडीचा गेला वेळ पिच्छाडी तरी सांभाळ—एखाद्या शत्रूला प्रथम जो विरोध करावयाचा तो जरी करतां आला नाहीं तरी मागाहून तरी त्याचा प्रतिकार करावा. एखाद्या गोष्टीला प्रतिबंध करतां आला नाहीं तरी मागाहून तरी प्रतिकार करणें अवश्य असतें. किंवा अर्धें अधिक आपल्या हातून गेलें तरी राहिलेलें तरी संभाळण्याचा प्रयत्न करणें अवश्य आहे. वास्तविक कोणतेंहि संकट येण्यापूर्वींच त्यास प्रतिबंध करण्याची तजवीज करणें अवश्य आहे. पण ती संधि जरी आपल्या हलगर्जीपणामुळें अगर अन्य कारणानें गेली तरी संकट आल्यावर तें निवारण करण्याची तरी शक्य ती खटपट करणें अवश्य आहे.

अंचल——अंचल फेडणें—(व.) लुगड्याच्या पदरानें दृष्ट काढणें.

अचाट——अचाट खाणें मसणांत जाणें—अधाशीपणा केला असतां त्यापासून त्रास व्हावयाचाच. सर्व रोगांचें मूळ अजीर्ण आहे; तेव्हां जो आपल्या शक्तीबाहेर खाईल त्यास विकृति होऊन मरणसुद्धां येण्याचा संभव असतो. अतिरेकाचा परिणाम चांगला होत नसतो.

अचाट बुद्धि आणि विलक्षण कल्पना—एखाद्या मनुष्यानें आपणास आकलन करतां येणार नाहीं अशी गोष्ट किंवा योजना सांगितली असतां म्हणतात. अलौकिक बुद्धिमत्तेबद्दलहि म्हणतात.

अचाट बुद्धि चालवावी (खेळवावी) आणि बळेंच लक्ष्मी मिळवावी–मागवावी–मेळवावी—बुद्धि कुशाग्र असून तिचा

जर योग्य उपयोग केला तर संपत्ति आपण होऊन चालून येतें.

अचाटाच्या पचाटा आणि बापशेटीचा बकाटा—दुसऱ्याची वस्तु मिळाली म्हणजे तिचा वाटेल तसा उपयोग करावयाचा. परभारें एखादी गोष्ट होत असेल तर वाटेल तसा आडवा हात मारून घ्यावयाचा.

अच्छेर——अच्छेर शेंडी, शेरभर घेरा—मुख्य गोष्टी-पेक्षां आनुषंगिक गोष्टीचाच पसारा अधिक असला म्हणजे म्हणतात.

अज——अजागजाची बरोबरी कशी होईल—हत्ती आणि बोकड यांची तुलना होऊं शकत नाहीं; त्याप्रमाणें एक अगदीं लहान व दुसरी अगदीं मोठी अशा वस्तूंची तुलना करणें अयोग्य आहे. अजा पहा.

अजगर——अजगरासारखें पडणें-पसरणें—अजगर हा आळशी असतोच, पण विशेषतः आहारानंतर तो अगदीं हालचाल केल्याशिवाय सुस्त पडतो. तेव्हां कोणतीहि पाठीमागें काळजी न बाळगतां स्वस्थ पडून राहणाऱ्या मनुष्यास म्हणतात.

अजगरासारखें पोसणें—अजगर हा सर्वांत मोठा सर्प आहे पण तो फार आळशी आहे. त्यावरून कांहीं उद्योग न करतांहि लठ्ठ होणाऱ्या मनुष्यास म्हणतात.

अजगरका दाता राम—अजगर हा जात्या आळशी असतो तरी त्यालाहि उपजीविकेपुरेसें भक्ष्य मिळतेंच. तेव्हां परमेश्वर सर्वांच्या योगक्षेमाची काळजी घेतो, तो आळशा-लाहि उपाशीं मरूं देत नाहीं. तुलना—' अजगर जनावर वारुळांत राहे। त्याजकडे पाहे पांडुरंग। ' –तुगा४५१७. ' अजगरका दाता राम. ' –भाब १८.

अजगरासारखा लोळत पडला साऱ्या कामाचा भणका झाला—एखाद्या मनुष्यानें आळस केल्यामुळें कामाचा सर्व बिघाड झाला असतां म्हणतात.

अंजन——अंजनत्रय—कालांजन, पुष्पांजन (पितळेचें कीट) व रसांजन.

अंजनहारी—नकळत दुसऱ्याच्या डोळ्यांतील काजळ काढून घेणारा; अट्टल चोर; सोदा; भामटा.

अजब——अजब चीज, बघण्याला नाहीं रीघ—एखादी चमत्कारिक गोष्ट घडली कीं ती पाहावयास लोकांची गर्दी स्वाभाविकपणेंच होते.

अजमत——जेथें अजमत तेथें करामत—[अजमत= प्रभाव, सामर्थ्य.] जेथें कांहीं सामर्थ्य, प्रभाव, श्रेष्ठता असेल तेथेंच पराक्रमाची संभाव्यता असते; शूर मनुष्याच्या हातूनच पराक्रम होतो.

अजमास——अजमासपंचे दाहोत्तरशें— दाहोदर्शें—अंदाजी विधान; कांहींतरी अंदाजानें ठोकून द्यावयाचें.

अजमासानें खोगीर खाणें—(क.) अनुमानानें विधान करणें; खरी माहिती मिळविल्याशिवाय केवळ अंदाजानें एखाद्या गोष्टीबद्दल बोलणें. [एक वैद्य होता. त्याला शास्त्राचें ज्ञान मुळींच नसून तो भोंवतालीं पाहून अजमासानें रोगपरीक्षा करी. एकदां रोग्याच्या खोलींत आदल्या दिवशीं पाहिलेलें खोगीर त्याला कांहीं दिसलें नाहीं. तेव्हां रोग्यानें काल खोगीर खाल्लें असा त्यानें अजमास करून त्याप्रमाणें निदान केलें !]

अजमासी खरो केन्नाच चुकचेना—(गो.) नेहमींच जो अंदाजी गोष्टी सांगतो तो केव्हांच निश्चितपणें विधान करीत नसल्यामुळें त्याचें विधान अजीबात चुकण्याचा फारसा संभव नसतो.

अंजलि——अंजलि जोडणें-बांधणें—नम्र होणें;नमस्कार करणें; बद्धहस्त होऊन नम्रपणें उभें रहाणें; हात जोडणें; प्रार्थना करणें.

अजा——अजा कृपाणीय न्याय—'अजोहि शस्त्रमगिल-त्किलैकः शस्त्रे विपन्ने शिरसास्य भूमौ। निकृन्तनं स्वस्य कंठस्य घोरं तद्वद्वैरं मा कृथाः पांडुपुत्रैः॥,–महाभारत सभापर्व ६६.८. एका बोकडाच्या मस्तकाच्या धडकीनें वधिकाच्या हातून शस्त्र भूमीवर पडून तें निरुपयोगी झालें. पण बोकडानें तें गिळण्याचा प्रयत्न केल्यावर त्या शस्त्रानें त्याचाच गळा चिरला गेला. आपल्याच फाजील कृत्यानें मरण ओढवून घेण्याचा प्रकार. ' विदुर म्हणे शस्त्रवधी गिळितां तत्काळ बोकडाला हें। तैसेंचि कर्म करिसी, रे मंद! न मृत्यु रोकडा लाहें॥ (' रे मंदा ! मृत्यु रोकडा लाहें ' असा पाठभेद)–मोसभा ४.८३.

[**चुकीचा प्रयोग व अर्थ**—शेळी जावयास व तिच्यावर तलवार पडावयास एकच गांठ पडणें; डोक्यावर तरवार टांगलेली असणें; नेहमीं एखादें संकट येण्याची धास्ती असणें. ' वर्तमानपत्रकर्त्यांच्या डोक्यावर प्रेस ॲक्टाची तरवार अजा-कृपाणीय न्यायानें टांगली आहे.']

अजागलस्तन—शेळीच्या गळ्याजवळचा मांसल अवयव. हा स्तनासारखा दिसतो पण यांत दूध नसतें. यावरून निरुपयोगी, कुचकामाची व्यक्ति अथवा वस्तु. ' प्रजा न रञ्जयेद्यस्तु राजा रक्षादिभिर्गुणैः। अजागलस्तनस्येव तस्य जन्म निरर्थकम्॥' किंवा ' धर्मार्थकाममोक्षाणां यस्यैकोपि न विद्यते। अजा० '

अजापुत्रं बालिं दद्यात्—नेहमीं जगांत दुर्बलास पीडा होते व त्रास सहन करावा लागतो. 'अश्वं नैव गजं नैव व्याघ्रं नैवच नैवच। अजापुत्रं बालिं दद्यात् देवो दुर्बलघातकः।' या मूळ श्लोकाप्रमाणें परमेश्वराला बळी द्यावयाचा तोसुद्धां कोणी वाघ

हत्ती वगैरेसारखा प्राणी पहात नाहींत, कारण ते सामर्थ्यवान असतात; तेव्हां बिचाऱ्या बोकडाला बळी देतात. यावरून परमेश्वर सुद्धां दुर्बळाचा साहाय्यक नसतो. दुर्बळ मनुष्याला सर्वांपासूनच त्रास सोसावा लागतो.

अजाण——**अजाण आणि आंधळें बरोबर**—आंधळ्याला दिसत नाहीं म्हणून आणि अडाण्याला कळत नाहीं म्हणून दोघेहि सारखेच. अडाणी माणूस अंधळ्यासारखाच असतो.

अजाण कुणबी दुप्पट राबे-पूर्णपणें समजावून घेतल्याशिवाय एखादी गोष्ट केली म्हणजे ती चुकते व पुन्हां करावी लागते; यामुळें अडाणी मनुष्याला कोणतीहि गोष्ट करावयास वाजवीपेक्षां अधिक, दुप्पट श्रम पडतात.

अजाणतें असावें पण वाईट नसावें—अज्ञान पतकरतें पण दुर्गुण पतकरत नाहींत. प्रत्यक्ष दुर्गुणापेक्षां अज्ञान पुष्कळच बरें 'अजाणतें असावें, वाईट जाणून नसावें' अशी मूळ म्हण स. वि. संग्रहांत आहे. अर्थ-चुकीचें समजण्यापेक्षां न समजलेलें बरें.

अंजारणें——**अंजारून गोंजारून**—१प्रेमानें कुरवाळून; तोंडावरून हात फिरवून; ममतेनें. २ आर्जवून; समजूत घालून.

अजी——**अजी, अजीची करा भाजी**—(मुलांच्या तोंडीं) घरांत आजीची अडगळ वाटते. तिला कोणीच विचारीत नाहीं.

खायला अजी करावयाला शेजी—खावयाच्या पुरतें आजीचें नातें सांगावयाचें व काम करावयाच्या वेळीं माल शेजाऱ्याप्रमाणें दूर रहावयाचें. जो मनुष्य लाभापुरता पुढें पुढें करतो व जबाबदारी घेण्याच्या वेळीं माल टाळाटाळी करतो त्याबद्दल म्हणतात.

अजून——**अजून अंगठ्याला आग लागली नाहीं.**—एखादें फार मोठें प्रचंड कार्य व्हावयाचें असून त्याचा फारच थोडा भाग प्रत्यक्ष झाला असल्यास व एकंदर कामास फारच दीर्घ अवधि लागेल अशी अपेक्षा असल्यास म्हणतात. एखादें संकट बरेंच दूर असून त्याची केवळ चुणूक लागल्यासहि अवधिदर्शक म्हणून हा शब्दप्रयोग करतात. 'अंगठा पहा.'

अजून पहिलाच दिवस आहे—पहिल्या क्रमांत कांहीं फरक नाहीं, आहे तसा आहे! न सुधारणाऱ्या व्यक्तीबद्दल म्हणतात. पहिल्या दिवशीं माणूस चुकतें तेव्हां त्याला समजावून सांगण्यांत येतें, पण पुन्हां तसेंच करावयास लागला म्हणजे ही म्हण वापरतात. कोणतीहि गोष्ट रंगारूपास यावयास कांहीं तरी काळ जावा लागतो. नवीनच आरंभ झालेल्या कार्याच्या यशापयशाचा अथवा चांगलेवाईटपणाचा अजमास एकदम लागत नाहीं. कांहीं तरी त्याची प्रगति झाली म्हणजे मत देतां येतें; तोंपर्यंत कोणतेंच मत बनवितां येत नाहीं.

अट——**अटीतटीचा सामना**—अतिशय चुरशीची चढाओढ; निकराची स्पर्धा.

अटक——**अटकेवर झेंडे लावणें**—[अटक हा गांव सिंधुतीरावर हिंदुस्थानच्या वायव्यसीमेवर आहे.] राघोबादादानें फार मोठा पराक्रम करून सर्व हिंदुस्थान पादाक्रांत केला व मराठ्यांचें निशाण अटकेच्या किल्ल्यावर नेऊन लावलें. यावरून फार मोठा पराक्रम करणें, अतिशय मोठें कार्य करणें, याअर्थीं वापरतात. 'अटकेवर झेंडे न्याया यापुढें आणितां कोठुनि भरारी'– विक९. औपरोधिक निंदागर्भ प्रयोगहि करण्यांत येतो. एखाद्यानें कांहीं विशेष कार्य न करतां बढाई मारल्यास त्यास हिणविण्याकरतांहि म्हणतात.

अटकेस झेंडा मिरविणें, नाचविणें—मोठें शतकृत्य करणें पराक्रम गाजविणें. वर पहा.

अटकळ——**अटकळ पंचविशी**—अंदाज; केवळ अनुमानधपक्यानें केलेलें विधान, कल्पना; पुरेसा आधार नसतां केलेला तर्क.

अटकळीचा फात्या (पढणें)—[फात्या=कुराणांतील सुरा, प्रार्थनामंत्र, विशेषतः मृतासंबंधी] अजमासानें कांहीं म्हणणें. ज्याचा अंदाज कधींच बरोबर येत नाहीं असा.

अटकळणें——**अटकळल्या देवास दंडवत**—मार्गांत जातांना ठेंच लागून पडल्यास सहज देवास नमस्कार झाला असें मानून घ्यावयाचें. तुल०-सहज पडे दंडवत घडे.

अटका——**अटक्याची कोंबडी आणि टका फळणावळ**—[अटका=अर्धा टका.] लहानशा कार्याला फार खर्च झाला म्हणजे म्हणतात. अडका पहा. तुल०-अडक्याची भवानी आणि सापिक्याचा शेंदूर.

अटणी——**वरण दाटणी बायको अटणी**—वरणाची डाळ जशी चांगली घाटल्याशिवाय वरण चांगल होत नाहीं त्याप्रमाणें बायकोला चांगली दाबांत, शिस्तींत ठेवल्याशिवाय ती चांगली रहात नाहीं.

दाळ घालावी दाटणींत लक घालावी अटणींत—वरण चांगलें व्हावें अशी इच्छा असेल तर शिजलेली डाळ चांगली घाटावी लागते. त्याप्रमाणें मुलगी सद्‌गुणी व्हावी अशी इच्छा असल्यास तिला चांगल्या शिस्तींत ठेवावी लागतें.

अटणें——**अटता वाल पिटता वाल वालवाल निसंतान**—सोनाराकडे एखादा दागिना करावयास सोनें दिलें म्हणजे तें तो प्रथम आटवितो व आटवण्यांत एखादा वालभर तरी त कमी होतें. नतर तो त ठोकून ठोकून त्याचा नग तयार करतो. या ठोकण्यांत वालभर तरी कमी होतें. याप्रमाणें

प्रत्येक कामांत वाल वाल प्रमाणें करतां करतां सर्व सोनें शेवटीं खलास होतें व दागिना करावयाचें दूरच राहतें.

अंटा——अंटा बंद करणें—(व.)[सं. अटा = भटकण्याची प्रवृत्ति अथवा संवय. अन्+अटा=अनटा. वास्तविक अटा बंद करणें किंवा अनटा करणें, असा वाक्प्रचार हवा. उच्चारदोषानें तो अंटा बंद करणें असें रूप पावला] याचा शब्दशः अर्थ-स्वेच्छाचार प्रवृत्तीला आळा घालणें. रूढार्थ-तकड बंद करणें, अगतिक स्थिति करणें. 'त्या देशच्या कडक थंडीनें तर आमची अंटा बंद केली.'

अठरा——**अठरा अखाडे**—१ अघोरी २ अरण्य ३ अवधूत ४ आनंद ५ आश्रम ६ इद्रं ७ उदासी ८ कानफाटया ९ कालवेला १० गोदंड ११ गोरखपंथी-नाथी १२ डवरा १३ नंगागिरी १४ निरंजनी १५ निर्वाणी १६ पुरी १७ भराडी १८ भारती. राऊळ, बन, सरभंगी, पर्वत, सागर, तीर्थ, सरस्वती वगैरेहि आणखी नांवें आहेत.

अठरा अध्याय गीता—भगवद् गीतेचे अध्याय १८ आहेत.

अठरा अक्षौहिणी सैन्य—कौरवपांडवांमध्यें भारती युद्ध झालें त्यांत कौरवांचें अकरा व पांडवांचें सात असें अठरा अक्षौहिणी सैन्य होतें.

अठरा उपधान्यें—(अ) १ सजगुरा २ भादली ३ वरी ४ नाचणी ५ बरग ६ कांग ७ खपले गहूं ८ मका ९ करडई १० राजगिरा ११ मटकी १२ पावटा १३ मूग १४ वाल १५ कारळा १६ देवभात १७ सातू १८ अंबाडी. (आ) १ सजगुरा २ नाचणी ३ वरी ४ मका ५ मटकी ६ राजगिरा ७ शिरस ८ पांढरफळी ९ जिरें १० मेथी ११ वेणुबीज १२ देवभात १३ कमळबीज १४ पाकड १५ अंबाडी १६ भेंडीबीज १७ गोवारी १८ कुड्याचें बीज. यांत खसखस व राळा धरून वीस संख्या करतात.

अठरा उपपुराणें—१ लघुकालिका २ बृहत्कालिका ३ पराशर ४ सिंह ५ नारद ६ सनत्कुमार ७ सौरै ८ दुर्वास ९ कपिल १० मानव ११ विष्णुधर्मोत्तर १२ शैवधर्म १३ माहेश्वर १४ नंदी १५ कुमार १६ औशनस १७ देवी १८ वरुण.

अठरा उपयाती—१ भिल्ल २ कोळी ३ मांग ४ अंत्यज ५ चांडाळ ६ पुल्कस ७ जिनगर ८ सलतानगर ९ चर्मक १० डोहर (ढोर) ११ भाट १२ बुरुड १३ रजक १४ दांगट १५ मोचेकरी १६ खाटिक १७ लोणारी १८ कैकाडी.-स्वादि ६.५.३७-३८.

अठरा कारखाने—राज्यकारभारांतील निरनिराळीं खातीं. यांच्या वेगवेगळ्या पुढें दिल्याप्रमाणें याद्या आढळतात. (अ) १ उष्ट्र २ खबुतर ३ जनान ४ जवाहीर ५ जामदार ६ जिकीर ७ तालिम ८ तोफ ९ थट्टी १० दप्तर ११ दारू १२ दिवान १३ नगार १४ पील १५ फरास १६ बंदी १७ मोदी १८ शिकार. (आ) १ तोप २ पील ३ उष्ट्र ४ फरास ५ शिकार ६ रथ ७ जामदार ८ जवाहीर ९ जिराईत १० नगार ११ दारु १२ वैद्य १३ लकड १४ इमारती १५ मुदबख १६ कुणबिणी १७ खासगत १८ थट्टी. (इ) १ खजीना २ दप्तर ३ जामदार ४ पील ५ जिराईत ६ अंबर ७ फरास ८ मुदबख ९ नगार १० सरबत ११ आबदार १२ शिकार १३ तालीम १४ दारु १५ उष्ट्र १६ बकरे १७ तोप १८ सराफ.

अठरा गुणांचा खंडोबा—१ अनेक दुर्गुण अंगीं असलेला मनुष्य. २ अनेक लबाड्या अंगीं असलेला. ३ अनेक रोग असलेलें मूल.

अठरा जाती—१ कुंभार २ तेली ३ कासार ४ तांबोळी ५ न्हावी ६ परीट ७ कलाल ८ कोष्टी ९ झारा (झारेकरी) १० महार (अथवा चांभार) ११ जैन १२ जती १३ ढुंडे १४ गुजर १५ मारवाडी १६ सोनार १७ सुतार १८ हलालखोर अथवा कसाब.

अठरा टोपकर—(अ) १ फिरंगी (पोर्तुगीज) २ वलंदेज (हालंड) ३ निविशयान (नॉर्वेजियन?) ४ यप्रदोर ५ ग्रेग (ग्रीक) ६ रखतार ७ लतियान (लॅटिन) ८ युहुदिन (ज्यू) ९ इंगरेज (इंग्रज) १० फरासिस (फ्रेंच) ११ कसनत्यान (शेटलंडियन-केल्टिक? कॉन्स्टँटिनोपाल?) १२ व्हिनेज (व्हेनिशियन) १३ दिनमार्क (डेन्मार्क) १५ उरुस (आयरिश किंवा रशियन) १५ रुमियान (रुमानियन अथवा रोमन) १६ तलियान (इटालियन) १७ सुवेंस (स्विस) १८ प्रेमरयान (पोमेरॉनियन)-भाइ १८३५. (आ) १ फिरंगी २ इंग्लिश ३ फ्रान्सिस ४ सिंध ५ पावलिस्त ६ क्रिस्त ७ ब्रह्मेय ८ डौन ९ ढुप १० क्राज ११ सुस्त १२ नाग १३ जर्मिनी १४ कालील १५ बांक १६ चीन १७ युवरेर १८ दौंडी.-कोको.

अठरा तत्त्वें—महान् (बुद्धि), अहंकार, मन, पंच तन्मात्रें आणि दहा इंद्रियें.-गीर १८५.

अठरा धान्यें—१ गहूं २ साल ३ तूर ४ जव ५ जोंधळा ६ वाटाणा ७ लाख ८ चणा ९ जवस १० मसूर ११ मूग १२ राळा १३ तीळ १४ हरीक १५ कुळीथ १६ सावा १७ उडीद १८ चवळी.

अठरा नारू-अलुतेदार—१ तेली, २ तांबोळी, ३ साळी, ४ सनगर, ५ शिंपी, ६ माळी, ७ गोंधळी, ८ डौरी, ९ भाट, १० ठाकर, ११ गोसावी १२ जंगम, १३ मुलाणा, १४ वाजंत्री, १५ घडशी, १६ कलावंत १७ तराळ किंवा कोरबू, १८ भोई.-गांगा १४.

अठरा पगड जात—१ तांबट २ पाथरवट ३ लोहार ४ सुतार ५ सोनार ६ कासार ७ कुंभार ८ देवळक (गुरव) ९ धनगर १० गवळी ११ लाड वाणी १२ जैन १३ कोष्टी १४ साळी १५ चितारी १६ माळी १७ तेली १८ रंगारी–स्वादि. ६.५.३५–३६. प्रत्येक जातीची पगडी बांधण्याची रीत निरनिराळी असते. यावरून जितक्या पगड्या तितक्या जाती; म्हणजे अनेक जाती, लोक. 'कालच्या यात्रेस अठरा पगड जात आली होती.'

अठरा पर्वें—महाभारताचीं अठरा पर्वें १ आदि २ सभा ३ वन ४ विराट ५ उद्योग ६ भीष्म ७ द्रोण ८ कर्ण ९ शल्य १० सौप्तिक ११ स्त्री १२ शांति १३ अनुशासन १४ अश्वमेध १५ आश्रमवासी १६ मौसल १७ महाप्रस्थानक १८ स्वर्गारोहण.

अठरा पुराणें—१ ब्रह्म २ पद्म ३ विष्णु ४ वायु किंवा शिव ५ लिंग ६ गरुड ७ नारद ८ भागवत ९ अग्नि १० स्कंद ११ भविष्य १२ ब्रह्मवैवर्त १३ मार्कंडेय १४ वामन १५ वराह १६ मत्स्य १७ कूर्म १८ ब्रह्मांड.

अठरा वर्ण— १ ब्राह्मण २ क्षत्रिय ३ वैश्य ४ शूद्र ५ कुंभार ६ गवळी ७ तेली ८ पांचाल (सोनार, सुतार, लोहार, तांबट, पाथरवट) ९ कोष्टी १० रंगारी ११ शिंपी १२ न्हावी, १३ पारधी १४ महार १५ धनगर १६ परीट १७ मांग १८ चांभार. 'ज्यास राज्य करणें त्यानें १८ वर्ण ४ जाती आपआपले धर्ममार्गें चालवावे. त्यांचा संग्रह करून ठेवावे'–शिवादि १२५.

❀ **अठरा धान्यांचें कडबोळें**—(अठरा धान्यें पहा) अनेक निरनिराळ्या प्रकारच्या गोष्टी एकत्र केल्या असतां योजतात. भाजणी (अठरा धान्यें एकत्र) करून तिचें कडबोळें केल्यास त्यास एकाहि धान्याची नीट चव लागत नाहीं. याप्रमाणें अनेक वस्तूंचा एकत्र मिलाफ केला असतां त्यांतील एकीचाहि प्रभाव आपणांस धड दिसत नाहीं.

अठरा नखी खेटरें राखीं, वीस नखी घर राखी—१ कुत्र्यास अठरा नखें असतात;त्याच्या मागच्या पायांस मागील नखें नसतात. मांजरास वीस नखें असतात. कुत्र्यास नेहमीं घराबाहेर पायतणें ठेवतात तेथें बसावयाला लावतात. त्यास घरांत शिरूं देत नाहींत कारण त्यास अपवित्र मानण्यांत येतें. मांजरास सर्व घरभर फिरण्याची मोकळीक असेत व तें उंदरांपासून घरांतील पदार्थांची राखण करतें. २ कांहीं कुत्र्यांस अठरा व कांहींस वीस नखें असतात अशी समजूत आहे व अशावेळीं अठरा नखी कुत्रें अशुभ व वीस नखी शुभ मानतात. ३ अठरा नखी हें कुत्रें व वीस नखी म्हणजे स्त्री असें समजून स्त्री ही घराचें रक्षण करते व कुत्रें जोड्यांजवळ बसत असेंहि मानतात.

अठरा पद्में दळ सांपडेना स्थळ—सीतेच्या शुद्धीकरतां अठरापद्में वानर पाठविले होते. पण इतक्याहि मंडळीस तिचें ठिकाण सांपडलें नाहीं. यावरून अनेक, वाजवीपेक्षां जास्ती कार्यकर्ते असतां मुळींच कार्य झालें नाहीं म्हणजे म्हणतात.

अठरा पुराणीं देवाची कहाणी—पुराणें जरी संख्येनें निरनिराळीं अठरा असलीं तरी त्या सर्वांत परमेश्वराचे गुणानुवाद हाच मुख्य विषय असतो. यावरून एकच मुद्दा निरनिराळ्या रीतीनें मांडला असतां मांडण्याची रीत जरी भिन्न भिन्न असली तरी प्रतिपादित तत्त्व एकच असलें म्हणजे ही म्हण वापरतात.

अठरा विश्वे दारिद्र्य—[विश्वा-विस्वा म्हणजे विसावा अंश. विसांपैकीं अठरा अंश दारिद्र्य] जवळजवळ पूर्ण दारिद्र्य; अत्यंत निकृष्ट स्थिति. 'घरांत अठरा० असतें; खावयाचे पदार्थ घेण्याची पंचाईत असते. तरी आईबापें मुलांस लहान लहान खेळणीं विकत घेऊन देत असतात.'–ओक. 'लोकांस अठरा विश्वे दारिद्र्यानें गांजलें असून खाण्याचीसुद्धां दिवसेंदिवस भ्रांत होऊं लागली आहे.'–नि.

अठ्ठावीस——**अठ्ठावीस दिवसांनीं चांदोबा पाहणें**—चांद्रमास हा सुमारें अठ्ठावीस दिवसांचा असतो व प्रतिपदेचा किंवा द्वितीयेचा चंद्र पाहाणें शुभ मानण्यांत येतें व अशी संधि महिन्यांतून एकदांच व सुमारें २८ दिवसांनीं येते. यावरून दीर्घ कालाच्या अंतरानें एखादी गोष्ट करणें.

अड, अडवें—आड, आडवें पहा.

अंड——**अंड काढणें–बडविणें**—बैलाचा वृषण ठेंचून टाकणें; बैल, घोडा यंत्रानें खच्ची करणें; बैल बडविणें.

अंड ब्रह्मांडास, कपाटीं जाणें—(अतिशय भीतीमुळें वृषण-शिश्न अगदीं संकुचित होऊन जातें. यावरून) त्रेधा उडणें; धीर सुटणें; गर्भगळित होणें.

अंड म्हणतां उंबर आणि ससा म्हणतां सांबर, अंड म्हणजे उंबर फळ म्हणणें, अंड म्हणतां उंबर कळेना—अगदीं अडाणी मनुष्य. ज्यांस अंड आणि उंबर किंवा ससा आणि सांबर यांमधील फरक कळत नाहीं असा.

अंडाखालीं खाजविणें—हांजी हांजी करणें; लोणी लावणें; अत्यंत नामुष्कीची खुशामत करणें.

अंडाचें निवणें करून बसणें, अंडावर अंड घालून बसणें, अंडावर डुक्क्या मारणें—[निवणें=चुंबळ, बूड] (व.) आळशीपणानें स्वस्थ बसणें; कांहीं न करतां आळसांत वेळ घालविणें.

अंडाचें निवणें नि चोटाची फडा करून बसणें—१ अगदीं निरुद्योगी बसणें. कांहीं न करतां आळसांत दिवस

घालवीत असणें. २ बाह्यतः निरिच्छ पण मनांतून लैंगिक सुखा विषयीं आतुर असणें.

दुसऱ्याच्या अंडानें विंचू मारणें—दुसऱ्याच्या नफा-नुकसानीची पर्वा न करतां त्याजकडून परभारें आपलें काम करून घेणें. तु०–पाहुण्याच्या हातानें साप मारणें.

अंडावर मूत गळणें—(शिश्न अगदीं लहान आंखूड असल्यास किंवा लुलें असल्यास साहजिक वृषणावर लघवीचें पाणी पडतें) १ अतिशय, अशक्त, निर्बल होणें. २ षंढ होणें.

अंडास येणें—वार्धक्यानें अशक्त होणें.

अंडास लोणी लावणें—एखाद्याची अगदीं लाजीरवाणी नोकरी करणें. त्याला बरें वाटावें म्हणून 'लोणी लावण्याचें' नामर्दाचें काम करणें. हांजी, हांजी आर्जवें, खुशामत करणें.

❀ **अंड कितीहि ताणलें तरी कपाळाला लागणार नाहीं**—प्रत्येक गोष्टीला विशिष्ट मर्यादा असते. त्याबाहेर ती गोष्ट जाऊं शकत नाहीं.

अंड विसरून सासुरवाडीस जाणें—एखादें काम करावयास जातांना मुख्य साधनच विसरून जाणें. हलगर्जीपणाची पराकाष्ठा.

अडकणें——अडकली गाय फटके खाय—एखादी गाय अडचणींत सांपडली म्हणजे तिला पळून जातां न आल्यामुळें मार खावा लागतो. त्याप्रमाणें एखादा मनुष्य अडचणींत आला असतां त्यास त्रास सहन करावा लागतो.

अडका——अडका गेला पैका गेला मग जन्म कशाला—निर्धन मनुष्याला आयुष्य कंठणें फार कठिण असतें. जोंपर्यंत जवळ द्रव्य आहे तोंपर्यंत जगण्यांत अर्थ असतो. दरिद्री मनुष्यास जीवन नकोसें होतें.

हातीं (हातांत) नाहीं अडका बाजारांत चालला (मारतोय) धडका—जवळ पैसा नसतां बेधडक बाजारांत गेलें तर कांहीं जिन्नस मिळावयाचा नाहीं. त्याप्रमाणें हातांत योग्य साधनें किंवा सामुग्री अथवा द्रव्य नसतां एखाद्या कार्यास बेधडक सुरुवात केली तर त्यांत यश येणें शक्य नाहीं.

जळला तुमचा अडका माझा मूलच लाडका—खेळामध्यें एक आई आपल्या मुलाला विकावयास तयार होते व तिच्या मुलाला एक अडक्याला मागणी येते. परंतु अखेरीस ती आपलें मूल द्यावयाचें नाकबूल करते व अडक्यापेक्षां आपलें मूलच अधिक लाडकें आहे असें सांगते. आईची द्रव्यापेक्षां मुलावरच माया अधिक असते हें सांगावयास नको. 'भोपळा घ्या भोपळा, केवढ्याला? अडक्याला. जळला तुमचा अडका माझा भोपळाच लाडका.' अशाप्रकारेंहि हा खेळ खेळतात.

अडक्या हत्ती झाला म्हणून काय भलत्यानें घ्यावा—हत्तीसारखी वस्तु जरी स्वस्त मिळत असली तरी ती बाळगण्याचें ज्यास सामर्थ्य नाहीं त्यानें तसली वस्तु घेण्यांत अर्थ नाहीं. कारण हत्तीला खावयास घालण्याचा खर्च पुष्कळ येणार व तो करण्याचें सामर्थ्य नसल्यास हत्तीचा काय उपयोग. 'अरे कृष्णा! अरे कान्हा मनमोहना!'—या एकनाथी पदांत ही उक्ति आहे.

अडक्याचा ऊंस, नवरा बायको खुष–(व.)अडका हें अत्यंत कमी किमतीचें नाणें पूर्वी चालू असे. अडक्यांत फार झालें तर एखादा ऊंस बाजारांत मिळावयाचा. अडक्याचे ऊंस आणून प्रेमी नवरा बायको त्यांचा उपभोग घेऊं लागले कीं प्रेमामुळें तेवढ्या उसानेंहि ते खुष झाले आहेत असा भास होतो. समाधान प्रेमावर अवलंबून आहे, पैशानें विकत मिळणाऱ्या वस्तूच्या परिणामावर नाहीं.

अडक्याचा सौदा येरझारा चौदा—अडक्याचा व्यवहार करण्याकरितां चौदा खेपा घालाव्या लागणें. क्षुल्लक कामाकरितां वाजवीपेक्षां जास्त श्रम पडणें.

अडक्याची अंबा आणि गोंधळाला रुपये बारा, अडक्याची भवानी (बोहोनी) आणि बारा रुपयांचा गोंधळ—क्षुल्लक गोष्टीसाठीं फाजील खर्च झाला म्हणजे म्हणतात.

अडक्याची केली वाण आणि लोणच्याची झाली घाण—थोडीशी काटकसर करण्याकरितां लोणच्यामध्यें पुरेसें मीठ वगैरे टाकलें नाहीं तर तें सर्व लोणचें खराब होतें. त्याप्रमाणें एखाद्या क्षुल्लक बाबीकडे जरूर तेवढें लक्ष्य न दिल्यामुळें किंवा एखाद्या किरकोळ बाबतींत कंजुषपणा दाखविल्यामुळें एखादे वेळीं मोठें कार्यहि बिघडून जातें अशावेळीं वापरतात.

अडक्याची देवता (भवानी, महामाया) सापिक्याचा सेंदूर—[सापिका=एक नाणें, शिवराई. अडका=अर्धा पैसा.] (देवाला सेंदूर फासण्याला देवमूर्तीपेक्षां जास्त खर्च.) एखाद्या क्षुल्लक गोष्टीसाठीं वाजवीपेक्षां जास्त खर्च केला असतां म्हणतात. अटका पहा.

अडक्याची सनकाडी लाख टक्क्याचा महाल फुंकते—सनकाडीची किंमत फार कमी असून ती पेटल्यानें, तिच्या योगानें फार किंमतीच्या मोठ्या घराचा जळून नाश होतो. यांतील भावार्थ–नीच मनुष्यहि मोठ्या श्रीमान् गृहस्थाची अब्रू घेऊन त्याची नासाडी करितो.

अडक्याच तेल आणलें, सासूबाईचें न्हाणें झालें, मामंजींची शेंडी झाली, उरलें सुरलें झांकून ठेविलें, तें

येऊन मांजरानें सांडलं, वेशीपर्यंत ओवळ गेला आणि पाटलाचा रेडा वाहून गेला !—अगदीं अल्पशा वस्तूनें मोठें कार्य झाल्याची वृथा प्रौढी मारणें; लहानशी गोष्ट खूब फुगवून सांगणें. आचरटपणाची अतिशयोक्ति.

अडक्याचें दिडकें पैशाचें सवाशेर—एखादी वस्तु पैशाला सव्वाशेर असतां अर्ध्या पैशास दीडशेर मिळणें शक्य नाहीं. परंतु ज्या मनुष्यास हिशेब येत नाहीं त्याला पैशाला अमुक तर अडक्याला अमुक असे सांगून फसवितां येतें. यावरून अडाणी मनुष्यानें किंवा त्याकरितां लबाडानें केलेला भलताच कांहीं तरी चुकीचा हिशेब व ठकबाजी याअर्थीं वापरतात.

अडक्याच्या बोहणीला (भवानीला) टक्क्याचा गोंधळ—एखादें क्षुल्लक काम करून घेण्याकरितां वाजवीपेक्षां जास्त अटापीटा करावा लागणें. कामाच्या मानानें खटपट फारच पडली असतां म्हणतात. तुल०—अडक्याची देवता व सापिक्याचा शेंदूर, चवलीची कोंबडी आणि पावली फळणावळ. अटका पहा.

अडक्यानें हत्ती मिळतो, पण कोण पोसतो ?—अडक्याला हत्ती पण पोसायला नाहीं शक्ति—(वर पहा)हत्ती अतिशय थोड्या किंमतींत किंबहुना फुकट मिळाला तरी तो पोसणें ही गोष्ट सोपी नाहीं. तेव्हां आपल्या आवांक्याबाहेरची गोष्ट स्वल्पांत होत असली तरी आपण पतकरण्यांत अर्थ नसतो.

अडकित्ता——अडकित्त्यांत धरणें—[अडकित्त्यांत सुपारी नीट धरल्यास ती तुकडे होऊनच बाहेर पडते.] अडचणींत धरणें, पकडणें; एखाद्यास पेचप्रसंगांत गांठणें.

अडकित्त्यांतील सुपारी, (गो.) अडकात्तेंतुलें फोपळ—अडचणींत सांपडलेला मनुष्य; पेंचांत सांपडलेली व्यक्ति.

अडखळणें——अडखळल्या देवास दंडवत—अडकळल्यास देवा दंडवत. अडखळून पडलेल्या मनुष्यानें देवास नमस्कार घातला हें बोलणें जितकें खरें आहे तितकेंच कोणी मनुष्य मुद्दाम आपल्या कामासाठीं दुसऱ्याचे आधीन झाला असून सहज मी आधीन झालों हेंहि बोलणें खरें आहे, अशा अर्थीं ही म्हण आहे. अटकळल्या० पहा.

अडचण——अडचणीचें दुःख (दुखणें) आणि जांवई वैद्य–अडचणीचे ठिकाणीं दुःख आणि जांवई वैद्य—'अवघड जागीं दुःख ' इ. पहा.

अडचणीच्या कामांत पडतो तो आपला गळा फांसून घेतो.—एखादा मनुष्य जाणूनबुजून संकट ओढवून घेतो तेव्हां त्याच्या गळ्यास फास लागल्यावांचून रहात नाहीं. अडचणीच्या कामांत हात घातल्यास तोशीस लागल्यावांचून रहात नाहीं.

अडजीभ—अडजीभ खाती पडजीभ बोंब मारती—पडजीभेचा खाण्याच्या कामीं कोणताहि उपयोग होत नाहीं पण ती जर सुजली तर खाण्यास अडचण पडते. यावरून एखाद्या मनुष्यास प्रत्यक्ष कोणत्याहि प्रकारची तोशीस न लागतांहि तो जेव्हां एखाद्या कार्यांत विघ्नें आणण्याचा प्रयत्न करतो किंवा विनाकारण तक्रारी करतो तेव्हां या म्हणीचा उपयोग करतात.

अडणी——अडणीवरचा (शंख)—१ मूर्ख; अडाणी; अशिक्षित मनुष्य. ' अशा तऱ्हेचे उद्‌गार अहोरात्र कानीं पडल्यामुळें म्हणा या शिकण्यासवरण्यांत तो अडणीवरचाच झाला.—यश. खरे. २ शंख नुसता ठेवला तर गरंगळतो म्हणून त्याला धातूची बैठक करतात, ती अडणी. यावरून उच्च स्थानीं बसलेला असा. उच्च स्थानावरचा बेअकली मनुष्य. मूर्ख मनुष्यासहि केव्हां केव्हां वैभव किंवा मोठा अधिकार प्राप्त होतो तेव्हां त्यास उद्देशून योजतात.

अडणें——अडती तेव्हां पडती, नाहीं तर (तेव्हां) टणटण उडती—मनुष्य अडचणींत सांपडलें म्हणजे नम्र होतें व स्वतःकडे कमीपणा पतकरतें. पण जेव्हां त्यास कोणत्याहि गोष्टीची अडचण नसते तेव्हां मोठ्या दिमाखानें वागतें. दुसऱ्याची गरज लागली म्हणजे मनुष्य अजीजी करतें पण तीच गरज नसली म्हणजे गर्वानें ताठून जातें.

अडला नारायण गाढवाचे पाय धरी—अडला हरी गाढवाचे पाय धरी—एखादा मनुष्य अडचणींत सांपडला असतां स्वतः कितीहि मोठ्या योग्यतेचा असला तरी एखाद्या हीन मनुष्याकडूनहि होणारा अपमान सहन करतो. गरजू माणूस वाटेल ती हलकी गोष्ट करण्यास तयार होतो. ' हा नारायण अडला। पायीं गद्धयाच्या पडला॥ '

अडली गाय फटके खाय—' अडकली गाय फटके खाय ' पहा.

अडलें कोल्हें मंगळ गाय—कोल्हा हा फार लबाड प्राणी मानण्यांत येतो व तो नेहमीं दुसऱ्यास ठकविण्याच्या मार्गांत असतो. तो कधीं चांगला आवाज काढीत नाहीं किंवा कोणाबद्दल बरें बोलत नाहीं. पण अडचणींत सांपडल्यावर त्याचा इलाज नसल्यामुळें मंगल गीत गाणेंहि त्याला भाग पडतें. त्याप्रमाणें मनुष्य अडचणींत सांपडला म्हणजे स्वभावाविरुद्ध गोष्टहि करण्यास तयार होतो.

[एका कोल्ह्यानें आपल्या फायद्यासाठीं सुसरीची मनधरणी तिच्या वर्णनपर गाणें म्हणून केली अशी गोष्ट आहे. ' सुस्वरी बाइ तुझी पाठ मऊ ' इ०.]

अडल्याचा सारथी भगवान—एखादा मनुष्य अडचणींत सांपडला असतां दुसऱ्या कोणीं त्याला मदत केली नाहीं तरी परमेश्वर त्यास साहाय्य करतो. तो कांहीं त्याची उपेक्षा करीत नाहीं.

अडल्याची काशी कोणी जावें तिजपाशीं—काशी क्षेत्रांत अन्नछत्रें पुष्कळ आहेत, तेथें कोणालाहि राहाण्याजेवण्याला फुकट मिळतें, तेव्हां ज्याला कोणी नाहीं, जो अगदीं अकिंचन आहे तो काशीवास पत्करतो. काशी ही सर्वांना थारा देते.

अडपणें——**अपडती नाहीं सासू दडपता नाहीं भाऊ (भावा)**—सासरीं सासू किंवा माहेरीं भाऊ असला म्हणजे स्त्री धाकांत असते, पण एखाद्या स्त्रीस सासरीं कोणी धाक दाखविण्यासारखें मनुष्य नसलें व माहेरींहि कोणी दाबांत ठेवणारें नसलें म्हणजे तिचें वर्तन स्वैर होण्याचा संभव असतोच.

अडबा——**अडबा करणें**—ढेकर देणें; दुसऱ्याचें उपटून गिळंकृत करणें.

अडवण——**अडवून कोणीं धरलें तरी काम न राहे त्याचथामुळें**—एखादें काम सुरू असतां मध्येंच कोणी अडून बसलें तरी त्याच्याकरितां कांहीं तें काम रहात नाहीं. कसें तरी कांहीं तरी युक्ति काढून किंवा दुसऱ्या कोणाचें साहाय्य घेऊन करणारा तें कसेंतरी पुरें करतोच. पण अडवणाऱ्याची मात्र हीन वृत्ति उघड होते.

अडाणी——**अडाणी कुणबी दुप्पट (दुणा) राबे**—**अडाणी० कृपणाला वरू लागे**—अजाण पहा.

अडाणी कुणबी दुहेरी राब हातांत लंगोटी उभ्यानें हाग—शेतकरी अडाणी असला म्हणजे त्याला दुप्पट काम पडतें व शौच्यास जाण्यासहि फुरसत नसते. वर पहा.

अडाणी जेवणार ताटाचा नाश—अडाणी झवणारा फोद्याचा नास—अडाणी यब्धा योनीचा नाश—अकुशल कारागीर माल बिघडून टाकतो.

अडाण्याचा आला गाडा वाटेवरच्या वेशी मोडा (पाडा)—बिहिरी काढा—अडाणी मनुष्य गाडा घेऊन आला व तो वेशींतून जाण्यासारखा नसला तर अन्य मार्गानें न जातां किंवा गाड्यावरील सामान काढून वेशींतून तो जाईल असें न करतां वेसच मोडावयास सांगतो. किंवा वाटेंतील विहीर बुजविण्यास सांगतो. त्याप्रमाणें अडाणी मनुष्य एक काम करीत असतां त्या कामामुळें दुसऱ्या कामाचा बिघाड होतो आहे किंवा काय तें पहात नाहीं व व्यवहारांत तारतम्य वापरीत नाहीं. तुल०– उंटावरचा शहाणा.

अडाण्याची गोळी भलत्यासच गिळी—अडाणी मनुष्यानें एखादी गोष्ट केली असतां तिचा परिणाम विपरीत होतो.

अंडाळें——**अंडाळें मंडाळें, केसांचें बिंडाळें, बायकोनें केलें तें गोड गिरास (ग्रास) लागलें, आईनें केलें तें कडू लागलें**—मनुष्याला आपली बायको आईपेक्षां प्रिय असते व तिची प्रत्येक कृति त्यास आवडते. तिच्या हातचा पदार्थ त्यास गोड लागतो. आईच्या हातचा तितका आवडत नाहीं मग ती बायको स्वरूपानें कशी कां असेना.

अडीच——**अडीच कांड्यावर येणें**—अगदीं पूर्णतेच्या जवळ येणें, समीप ठेपणें; (ल.) अतिशय उतावीळ होणें; घाईस येणें. गव्हाचें रोप अडीच कांडीं वाढलें म्हणजे पोटरीस येतें व त्यांतून ओंबी बाहेर पडण्याची वेळ येते यावरून कोणतीहि गोष्ट पूर्ण होण्याच्या बेतांत येणें व अशावेळीं साधारणतः घाई असते म्हणून एखादा मनुष्य अगदीं उतावीळ होणें.

अडीच बोटांवर आकाश उरलें—आकाश ठेंगणें होणें; गर्वानें फुगणें; स्वर्ग दोन बोटें उरणें.

अंडींपिल्लीं——**अंडींपिल्लीं उघडकीस आणणें—उचविणें**—सर्व बारीकसारीक गोष्टी, गुप्त गोष्टी, छिद्रें वगैरे उघड करणें, त्यांचा बाहेर बभ्रा, बोभाटा करणें. “ त्यांचीं सगळीं लांचलुचपतीचीं अंडींपिल्लीं उघडकीस आणणें वा उचविणें पुष्कळ अंशीं या बंदीलेखकांच्या हातींच असतें. ” — काळें पाणी १४८.

अंडींपिल्लीं ठाऊक असणें—सर्व इत्थंभूत माहिती असणें; एखाद्याच्या सर्व गुप्त गोष्टी, लागेबांधे, स्नेहसंबंध वगैरे सर्व तपशीलवार माहिती असणें.

[जे लोक अंड्यांसाठीं कोंबडीं बाळगतात. त्यांस कोंबड्यांचीं अंडीं किती आहेत, पिल्लें किती आहेत याची माहिती बरोबर असते.]

अंडींपिल्लीं बाहेर काढणें—पक्षी आपली अंडीं आणि पिल्लें लपवून ठेवतात यावरून गुप्त गोष्ट बाहेर काढणें, बिंगें फोडणें “ तो त्यांचीं सगळीं अंडींपिल्लीं बाहेर काढील ”–टि. ४·१३०.

अंडें——**अंडें गाळणें-घालणें-पडणें-करणें-होणें**—(कोंबडी ज्याप्रमाणें भीतीनें अंडें गाळतें त्याप्रमाणें), धैर्य खचणें; लटपटणें, गळाठणें; गलितधैर्य होणें; भेदरणें. भीतीनें मागें रहाणें; धास्ती घेणें, घाबरून अंग काढून घेणें. अतिशय घाबरणें; भीति घेणें; भीतीमुळें माघार घेणें; लेंड्या गाळणें; भेदरणें; गर्भगळित होणें.

अंड्यास येणें—१ अंडें टाकण्याच्या स्थितीस येणें, गर्भगळित होणें. २ (ल.) जिकीरीस येणें, मेट्यास येणें, अगदीं

अंधळें होणें—(बोट इ.), ठेंच लागल्यानंतर वरचेवर त्याच बोटास पुन्हां ठेंच लागते, तेव्हां त्या बोटास अंधळें झालें म्हणतात; कारण त्याचें स्पर्शज्ञान नष्ट होऊन तें बधिर होतें.

अंधळयाचा रस्ता–वाट–मार्ग—अंधळया मनुष्यासहि सहज जातां येईल असा, खांच खळगे नसलेला, दगडधोंडे वगैरे अडथळे नाहींत असा सरळ, रुंद, मोकळा रस्ता.

अंधळयाची काठी—१ अंधळयाला मुख्य आधार काठीचा. त्याची काठी काढून घेतल्यास तो अगतिक बनतो. यावरून आधारभूत गोष्ट, व्यक्ति. ' अंधळयाची काठी । हिरोनिया कडा लोटी ॥'–तुगा. १४३२. 'कीं ,अंधळयाची हिरून नेली काठी।–धावे.' २ म्हाताऱ्या माता पितरांचा एकुलता एक मुलगा. ' या अंधावृद्धाची राहों देतास एक जरि यष्टी । भीमा मी मानस तरी होऊं देत्यें कशास बहु कष्टी ॥' –स्त्रीपर्व.

अंधळयाची मिठी—अंधळा मनुष्य स्वतःस कांहीं दिसत नसल्यामुळें जो आधार सांपडेल तो सुटून जाऊं नये म्हणून त्यास घट्ट धरून ठेवतो कारण एक आधार सुटल्यास दुसरा सांपडेल अशी त्याची खात्री नसते. यावरून न सुटणारी घट्ट मिठी.

अंधळयापांगळयांची माळ, अंधळयाची माळ–माळका—१ अंधळे लोक एकामागून एक रांगेनें जातात तेव्हां केवळ पुढच्या मनुष्यावर अवलंबून मागील लोक जात असतात; ते स्वतः पुढील मार्ग चाचपून वगैरे पहात नाहींत तर आपल्या म्होरक्यावर केवळ विश्वसून जात असतात. २ त्याचप्रमाणें लक्षणेनें कांहीं लोक अज्ञानानें दुसऱ्यांवर, किंवा पूर्वी होऊन गेलेल्या लोकांच्या शहाणपणावर विश्वसून त्यांचें विचार केल्याशिवाय अनुकरण करतात त्या प्रकारासहि म्हणतात; गतानुगतिक लोक. अंधपरंपरान्याय पहा.

❀ **अंधळा अंधळयाचा वाटाड्या, अंधळा अंधळयाला नेऊं शकत नाहीं**—दोन अंधळे मनुष्य जर एकत्र आले तर त्या दोघांपैकीं कोणालाहि वाट दाखवितां येत नाहीं. त्या कामाला डोळसच मनुष्य लागतो. एक अडाणी मनुष्य दुसऱ्या अडाणी मनुष्याला युक्ति सांगूं शकत नाहीं; त्या कामास बुद्धिवान मनुष्यच पाहिजे. ' अंधासि अंध पथिं घालिती अंधकूपीं ' –वामन. ' अंधासवें फिरति अंध जसे कुवाटे ।' –वामन.

अंधळा गुरु बहिरा चेला—गुरूस दिसत नाहीं व शिष्यास ऐकूं येत नाहीं, अशी जोडी जमली म्हणजे घोटाळा होण्यास काय उशीर.

अंधळा डोळा काजळानें साजरा—अंधळया मनुष्याच्या डोळ्यांत काजळ घालून तें वैगुण्य झांकण्याचा प्रयत्न करण्यांत येतो, त्याप्रमाणें वरवर झकपक करून, सारवासारव करून एखादा दोष झांकून ठेवण्याचा प्रकार होत असतां ही म्हण वापरतात.

अंधळा दोन डोळे मागत नाहीं—अंधळयास एका डोळयानें दिसूं लागलें तरी त्याचें काम भागतें. ज्याजवळ मुळींच नसतें तो पुष्कळाची अपेक्षा करीत नाहीं. त्याच्या कामापुरतें मिळालें तरी तो संतुष्ट असतो. (गो.) आंधळो दोन डोळ मागना.

अंधळा पाहतां चांद होय मोठा आनंद—अंधळया मनुष्याला मुळींच दिसत नसतें पण त्याला जर चंद्र दिसला म्हणजे किंचित्‌हि दृष्टि आली तरी त्याला अत्यंत आनंद होणें सहाजिक आहे. निराश मनुष्याला एकहि आशेचा किरण दिसला तरी त्यास अत्यानंद होतो.

अंधळा मळी रेडा खाई—'अंधळें दळतें कुत्रें पीठ खातें' याच अर्थी पहा.

अंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन (डोळे)—अंधळयास एक डोळयानें दिसूं लागलें तरी त्याचा कार्यभाग होऊं शकतो. मग त्याच्या दोन्ही डोळयांस दृष्टि आली तर त्यास विशेष आनंद होईल यांत नवल काय? तसेंच केव्हां केव्हां आपल्या अपेक्षेपेक्षांहि अधिक आपल्याला एखाद्या कार्यांत लाभ होतो तेव्हां आपणांस फारच आनंद होतो, अशा वेळीं ही म्हण योजतात. (गो.) अंधळा मागता एक डोळो देव दितो दोन डोळे. ।

अंधळा म्हणतो आग लागली बहिरा म्हणतो ढोल वाजतो—आग लागली म्हणजे ओरड होते ती अंधळ्यास ऐकूं येते पण प्रत्यक्ष आग लागलेली दिसत नाहीं. बहिऱ्यास आग दिसूं शकते पण आवाज कसला होतो तें कळत नाहीं; म्हणून त्याच्या कानीं आलेला गोंगाट त्यास ढोलाच्या आवाजासारखा वाटतो. मिळून दोघांचाहि घोंटाळा होतो.

अंधळा म्हणतो भिंत बहिरा म्हणतो नाहीं मशीद—अंधळयास दिसत नाहीं व बहिऱ्यास ऐकूं येत नाहीं; त्यामुळें दोघांचाहि नेहमीं घोटाळा होतो. एक अंधळा व एक बहिरा दोघे फिरत असतां त्यांस वाटेंत एक इमारत लागली. अंधळयानें चाचपून पाहिलें तों त्याच्या हातास भिंत लागली तेव्हां तो म्हणाला, वाटेंत भिंत आहे. बहिऱ्यास तो काय म्हणत होता तें ऐकूं येत नव्हतें. पण त्यास समोर मशीद दिसत होती. म्हणून तो म्हणाला, मशीद लागली. याप्रमाणें दोघेहि एकाच गोष्टीचा निर्देश निरनिराळया तऱ्हेनें करीत होते पण परस्परांचें परस्परांस कळत नव्हतें; त्यामुळें त्यांचा घोटाळा होत होता.

अंधळा रोजगार आणि भिंधा संसार—ज्या धंद्यामध्यें

व्यवस्थितपणा नाहीं, नफा होतो किंवा तोटा होतो हें समजत नाहीं, त्या धंद्यापासून हित होत नाहीं व त्याची शाश्वतीहि नसते. त्याचप्रमाणें जो संसार दुसऱ्याच्या कृपेवर अवलंबून आहे व जो चालविण्याकरितां हरघडी दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावें लागतें व स्वतः कोणताहि खर्च करण्याची स्वतंत्रता किंवा सत्ता नसते त्या संसारापासून सुख होणें शक्य नसतें.

अंधळा लिही थोटा दिवा धरी—अशक्य गोष्ट दर्शविण्याकरितां योजतात. कारण अंधळयाला लिहितां येणें शक्य नाहीं व थोट्याला दिवा हातांत धरणें शक्य नाहीं.

अंधळा व्यभिचारी स्वतःचें घर मारी—१ अंधळा मनुष्य व्यभिचारी निघाल्यास त्यास कोणीहि येऊन नागवून जाणें शक्य आहे. २ अंधळा जर दुसऱ्यांच्या बायकांशीं व्यभिचार करूं लागला तर दुसरे त्याच्या बायकोला सहज बिघडवितील. त्याला दिसत नसल्यानें घरांतला व्यभिचार कळणार नाहीं.

अंधळा सांगे गोष्टी बहिरा गाढव पिटी, अंधळा सांगे गोष्टी बहिरा गाडी, मांडी, टीरी, टाळी पिटी—अंधळा मनुष्य आपल्यापुढें कोणी बसलें आहे किंवा नाहीं व आपल्या गोष्टी कोणी ऐकतो आहे किंवा नाहीं या गोष्टीकडे, त्याला दिसत नसल्यामुळें, लक्ष्य न देतां बोलतच राहतो व बहिरा मनुष्य आपल्याला ऐकूं येत नाहीं व त्यामुळें बोललेलें समजत नाहीं ही गोष्ट लपविण्याकरितां कांहीं तरी एकच गोष्ट सारखी करीत राहतो किंवा आपल्याला समजलें असें दाखविण्याकरितां टाळ्या वगैरे मधून मधून पिटतो. यावरून परस्पर गैरसमज, घोटाळा वगैरे व्यक्त होतो. तु०—अंधळ्याच्या मनीं सोमवार बहिरा म्हणतो माझी बायको गर्भार.

[बहुधा या म्हणींत गाढव, गाडी हा शब्द मुळचा नसून दुसरा एखादा कदाचित् अश्लील शब्द असावा व त्याच्या जागीं ध्वनिसादृश्यामुळें गाढव वगैरे शब्द आला असावा.]

अंधळी पाण्याला गेली घागर फोडून घरीं आली—अंधळया स्त्रीस जर विहिरीवर पाणी आणण्याकरितां पाठविलें तर तिला पाणी तर आणतां यावयाचें नाहींच पण वाट न दिसल्यामुळें ती वाटेंत पडून घागर मात्र फुटावयाची. ज्या मनुष्यास एखाद्या गोष्टीचें मुळींच ज्ञान नाहीं त्यास जर ती गोष्ट करावयास सांगितली तर ती गोष्ट होण्याचें बाजूसच राहून कांहीं तरी भलताच बखेडा मात्र होण्याचा संभव फार.

अंधळी महारीण दोन्हीं खळीं चुकली—महार किंवा महारीण मळणीच्या दिवशीं खळ्यावर दाणे आणण्याकरितां किंवा दाणे नेल्यावर जो अवशेष राहतो तो आणण्याकरितां जाण्याची पद्धति आहे. एका अंधळया महारणीस दोन ठिकाणीं खळ्यांवर मळणी चालली होती तेथें जावयाचें होतें; पण तिचा रस्ता चुकल्यामुळें व कोठें जावयाचें तें माहित नसल्यामुळें तिला एकाहि खळयावर नेमकें जातां आलें नाहीं. याप्रमाणें दोहींकडून फसगत झाली.

अंधळें दळतें व कुत्रें पीठ खातें, अंधळयानें दळावें कुत्र्यानें पीठ खावें—अंधळें मनुष्य दळीत असलें व पडणारें पीठ कुत्रें खात असलें तर त्याचें निवारण करणें अंधळयास शक्य नसतें व अंधळयाचे श्रम फुकट जातात व त्याचा फायदा कुत्र्यास मिळतो. याप्रमाणें जेथें एक परिश्रम करीत असतो व भलताच मनुष्य त्याचा फायदा घेत असतो व या गोष्टीवर नियंत्रण ठेवणारा कोणी नसतो अशी अंदाधुंदी जेथें चालते, त्या प्रकाराबद्दल ही म्हण वापरतात.

अंधळें धांवे कुडावेरीं—अंधळया मनुष्यास दिसत नसल्यामुळें फारसें दूर जाणें शक्य नसतें. तें धांवूं लागलें तरी पहिल्याच आड येणाऱ्या वस्तूशीं थांबतें. तेव्हां एखाद्या जागेंतून पळून जाण्याचा प्रयत्न त्यानें केला तरी पहिल्याच कुडाशीं त्याला प्रतिबंध होतो. यावरून एखादा मनुष्य आपल्या सामर्थ्याच्या पलीकडे कोणतीहि गोष्ट करूं शकत नाही. तु०—अंधळयाची धाव कुडापर्यंत.

अंधळें नगर चौपट राजा टका शेर भाजी टका शेर खाजा—'अंधेर नगरी' पहा.

अंधळें मुला उपयोगी नातरी आई बाप डोळे चांगले तरी—लहान मुलास आईबाप चांगला मार्ग दाखवीत असतात त्याचा त्यानें जरी फायदा घेतला नाहीं तरी आईबाप हीं अंधळया मुलास ज्याप्रमाणें डोळे त्याप्रमाणें मुलास मार्गदर्शक आहेत.

अंधळें म्हणते पाला पाला बहिरें म्हणतें शेताचा मालक आला—अंधळा व बहिरा असे एका मळयांत गेले. तेथें अंधळयाच्या हाताला फक्त पाला लागला म्हणून तो पाला पाला म्हणाला पण बहिऱ्यास वाटलें कीं, मळयाचा मालक आला म्हणून तो भ्याला. वरच्याप्रमाणें अंधळा काय म्हणतो तें बहिऱ्यास कळत नाहीं व तो कांहींतरीच समजतो.

अंधळो दोन डोळे मागता—अंधळो मागता एक डोळो देव दितो दोन डोळे—वर अंधळा पहा.

अंधळया कारण दीपाचें न पडे जाण—अंधळया मनुष्यास कांहींच दिसत नसल्यामुळें त्यास काळोखहि सारखाच व उजेडहि सारखाच. तेव्हां त्याला काळोखांतहि दिव्याचा कांहीं उपयोग नाहीं. 'अंधळया हातीं दिवा। देऊनि काय करावा।'—ज्ञा १३. किमिष्टमन्नं खरसूकराणां किं रत्नहारो

मृगपक्षिणांच । अन्धस्य दीपो बधिरस्य गीतं मूर्खस्य किं शास्त्रकथाप्रसंगः ॥ —सुर. १७३.८६१

अंधळया गायींत लंगडी गाय प्रधान—जेथें सर्व अंधळया गायी आहेत तेथें एकहि डोळस गाय, मग ती लंगडी असो, तीच अधिक शाहणी ठरणार. कारण बाकीच्यांना कांहींच दिसत नसल्यामुळें त्यांजवळ पूर्ण अज्ञान असतें. तेव्हां व्यंग असूनहि अल्प ज्ञानी जरी एखादा मनुष्य असला तरी तो अडाणी लोकांत पंडितासारखा मानला जातो.

अंधळया पांगळयाला सहाय्य हो चांगला—आंधळे पांगळे यांसारखे जे व्यंग, दीन, दुर्बल असतील त्यांस चांगली मदत करीत असावें. तु०—मुके आंधळे पांगळे आणि थोटे । अशा दुर्बलांना करा साह्य मोठें । जरी त्यांस हांसाल होतील तोटे । तुम्हालागीं होतां पुढें जाल कोठें ।

अंधळया बहिऱ्याची गांठ—अंधळयाला दिसत नाहीं म्हणून व बहिऱ्याला ऐकूं येत नाहीं म्हणून अंधळयानें किती ओरडून सांगितलें किंवा बहिऱ्यानें कितीहि हावभाव करून दाखविले तरी त्याचा परस्परांस कांहीं उपयोग होत नाहीं; त्यामुळें अशा प्रकारें परस्परांस आपला हेतु कळवितां येत नाहीं. असे लोक एकत्र येऊन कांहीं उपयोग नाहीं. तेव्हां ज्या गोष्टी एकत्र आल्यानें कांहीं एक कार्य होऊं शकत नाहीं त्यांचा एकत्र येऊन काय उपयोग? एक दुबळा दुसऱ्या दुबळयाला मदत करूं शकत नाहीं. उलट घोटाळाच होतो.

अंधळया मनीं आयतवार (सोमवार) बहिरा (किंवा पांगळा) म्हणतो माझी बायको गर्भार—कांहीं ठिकाणीं अंधळयांना ठराविक वारीं भिक्षा घालण्याची पद्धत आहे. अंधळया मनुष्यास दिवस रात्र बरोबर समजत नसल्यामुळें व पाहण्याचें साधन नसल्यामुळें नेहमींच वाराची निश्चित आठवण राहणें शक्य नसतें; पण त्यास भिक्षा मिळणाऱ्या वाराची मात्र आठवण वरचेवर येते व भलत्याच वारीं तोच वार असल्याचा भास होतो. तसेंच पांगळया मनुष्याला मुलाची कितीहि हौस असली तरी त्याची बायको गरोदर राहणें कठिणच; त्याला उत्कट इच्छा असल्यामुळें तसा त्याला नेहमीं भास होत राहतो. आपल्या मनांत जी उत्कट इच्छा असते तशीच वस्तुस्थिति आहे असा भास मनुष्यास होणें स्वाभाविक आहे.

अंधळया मनुष्याला रंगाची पारख नसते—ज्या मनुष्याला दिसत नाहीं त्याला सर्व रंग सारखेच. त्याप्रमाणें ज्या मनुष्याला एखाद्या गोष्टीचें मर्म जाणण्याची पात्रता नसते त्याला त्या गोष्टीसंबंधीं विशेष कांहींच वाटत नाहीं.

अंधळयामागून अंधळा रस्ता न दिसे कोणाला—एका अंधळया मनुष्याच्या मागोमाग जर दुसरा आंधळा गेला तर त्या दोघांसहि मार्ग सांपडावयाचा नाहीं. तेव्हां ज्या मनुष्यास एखाद्या गोष्टीचें ज्ञान नाहीं त्याच्या तंत्रानें त्या बाबतींत कार्य करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. एका अडाणी मनुष्याचें दुसऱ्या अडाणी मनुष्यानें अनुकरण करण्यापासून कांहीं उपयोग नाहीं. त्यापेक्षां जाणत्या मनुष्याच्या मागें गेल्यास कांहींतरी फायदा होईल. पण पुष्कळ लोक विचार न करतां अज्ञ मनुष्याचेंच अनुकरण करतात, त्यांच्या बाबतींत ही म्हण लागू पडते. अंधपरंपरा न्याय पहा. तु०—Blind leading the blind.

अंधळयासारखा धीट दुसरा नाहीं देख—अंधळया मनुष्याला पुढें काय आहे तें दिसत नसल्यामुळें तो बेदरकार पुढें जातो. एखाद्या तुटलेल्या कड्याजवळ डोळस मनुष्य गेला तर तो पुढें पाऊल टाकण्यास बऱ्याच दूर पासूनच घाबरूं लागेल पण अंधळया मनुष्यास पुढच्या भयाचें ज्ञान नसल्यामुळें तो सरळ पुढें जाऊं लागेल. तेव्हां ज्याला आगामी संकटाचें ज्ञान नाहीं त्याला त्याबद्दल भीतिहि वाटत नाही.

अंधळया सासऱ्याची लाज ती काइयाची?—सासरा अंधळा असला म्हणजे त्याच्यापुढें सून व मुलगा यांनीं केलेल्या शृंगारचेष्टा त्यास दिसत नसल्यामुळें त्याच्यापुढें लाजण्याचें त्यांना कांहीं कारण राहात नाहीं. जो निरुपद्रवी प्राणी आहे त्याची पर्वा कोण करतो?

अंधळयाक आयकूंक आयतें पण हाडूक कळना—अंधळयाला ऐकूं येतें, पण आणितां येत नाहीं म्हणजे अंधळयाच्या हातून कार्य पूर्ण होत नाहीं.

अंधळयाचा हात उपस्थावर, अंधळयाचा हात ताटावर, अंधळयाचा हात उपस्थानावर नेमका जातो—अंधळया मनुष्याला कांहीं दिसत नसतां त्यानें सहज हात पुढें करावा व तो जेवण्याच्या ताटावर पडावा हा योगायोगच होय. तेव्हां एखाद्या मनुष्यास कांहीं पात्रता नसतां किंवा स्वतः एखादी गोष्ट मिळविण्याइतकी योग्यता नसतां सहजच तिची प्राप्ति झाली असतां ही म्हण योजतात. किंवा प्रत्येकाला आपआपला स्वार्थ कळतो, याअर्थी योजतात. गो. ह.–फडके माझी तीर्थयात्रा भाग ४ पान ४१९.

अंधळयाची धांव कुडापर्यंत—अंधळया मनुष्यानें कितीहि पळण्याचा प्रयत्न केला तरी खोलींतून तो भिंतीपर्यंत जाऊं शकतो; त्याला दार किंवा पुढील रस्ता दिसत नसल्यामुळें त्याची प्रगति तेथेंच खुंटते. त्याप्रमाणें एखाद्या अप्रबुद्ध मनुष्याची प्रगतिहि मर्यादित असणार. वर पहा.

अंधळयाचे खीला चट्टीपट्टी हवी कशाला, अंधळयाच्या

बायकोस नट्टयापट्टयाची गरज नाहीं—एखाद्या अंधळया मनुष्याच्या स्त्रीनें कितीहि शृंगार केला तरी तिचा नवरा अंधळा असल्यामुळें त्या शृंगारा पासून त्याला आनंद होणें शक्य नाहीं व तिच्या श्रमाचेंहि चीज होणें शक्य नाहीं. तेव्हां ज्या गोष्टीचें श्रेय मिळण्याची मुळींच शक्यता नाहीं ती गोष्ट करण्याच्या कामीं व्यर्थ परिश्रम करून काय लाभ ?

अंधळयाच्या गाई देव राखी-राखतो--अंधळया मनुष्यास स्वतःच्या गाई राखतां येणें शक्य नाहीं; पण दुर्बलांस नेहमीं परमेश्वर साहाय्य करतो त्याप्रमाणें अंधळयांवरहि परमेश्वराची कृपादृष्टि असते व त्याचें कार्यहि कसेंतरी होतेंच. सारांश दुर्बलांस कोणी साहाय्यक नसला तरी परमेश्वर त्यांचें अडूं देत नाहीं.

अंधळयांत काणा राजा—ज्या लोकांस कांहींच दिसत नाहीं त्यांच्यामध्यें थोडी दृष्टि असणारा किंवा एका डोळयानें दिसणाराहि श्रेष्ठ ठरतो. जेथें सर्वच लोक अडाणी असतात तेथें अल्पज्ञहि विद्वान ठरतो व त्यांचा पुढारी होऊं शकतो. तु०-In a country of blind people, the one eyed man is king (Spanish)

अंधळयानें पांगळा वाहिला आणि पांगळयानें मार्ग दाखविला--एकदां एक अंधळा मनुष्य वाटेनें चालला होता ती वाट विकट असल्यामुळें व त्याला दिसत नसल्यामुळें त्याला त्या वाटेनें पुढें जातां येईना. इतक्यांत त्याच वाटेनें जात असलेल्या एका पांगळया मनुष्यानें त्यास पाहिलें. पंगुत्वामुळें त्यास वाटेनें जाणें अशक्य होतें. तेव्हां पांगळया मनुष्यानें अंधळया मनुष्यास सांगितलें कीं 'मला जर तूं खांद्यावर वाहून नेशील तर मी तुला वाट दाखवीन.' ही गोष्ट अंधळयास पटून त्यानें पांगळयास आपल्या खांद्यावर घेतलें व पांगळया मनुष्यानें त्यास नीट वाट दाखवून दोघेहि त्या बिकट मार्गाच्या पलीकडे गेले. याप्रमाणें परस्परांनीं जर परस्परांस आपल्या गुणांचा किंवा शक्तीचा उपयोग करून दिला तर परस्परांचा कार्यभाग सुलभतेनें होतो.

अंधळयापुढं आरशी बहिऱ्यापुढं कहाणी—[आरशी=आरसा] बर पहा. निरर्थक परिश्रम करणाऱ्याच्या बाबतींत योजतात.

अंधळयापुढें नाच बहिऱ्यापुढें गायन, (गो) अंधळया सरी नाजून आनी बहिऱ्यासरी गावन उपयोग किते--अंधळया मनुष्यास दिसत नसल्यामुळें त्याच्यापुढें केलेलें नृत्य तसेंच बहिऱ्यापुढें केलेलें गायन व्यर्थ होय. यावरून एखादी निष्फळ गोष्ट करण्यांत श्रम मात्र फुकट होतात. तिचा कांहीं उपयोग होत नाहीं. अंधस्यनृत्यं बधिरस्य, गीतम् वर पहा.

अंधळयापुढें रडावें व आपले डोळे गमवावे—अंधळयापुढें पुष्कळ रडलें तरी त्यास दिसत नसल्यामुळें तें व्यर्थच. आपल्या डोळयांस मात्र इजा व्हावयाची. तेव्हां ज्या परिश्रमांचें फल मिळावयाचें नाहीं किंवा जेथें याचना करून कांहीं प्राप्ति व्हावयाची नाहीं तेथें निष्फळ श्रम करण्यांत कांहीं अर्थ नाही.

अंधळयापुढें लाविला दिवा आणि बहिऱ्यापुढें गाइलें गीत—अंधळयापुढें दिवा लावला तर त्याच्या उजेडाचा अंधळयाला कांहीं उपयोग होत नाहीं तसेंच कितीहि सुंदर गाणें असलें तरी तें बहिऱ्याला सुख देऊं शकत नाहीं. ज्याला एखाद्या गोष्टीचा उपभोग घेतां येत नाहीं त्याला ती मिळून कांहीं लाभ नाहीं. 'अन्धस्य दीपं बधिरस्य गीतम्' पहा.

अंधळयाला माशी लागत नाहीं—जेवतांना अन्नांत माशी गेली तर अन्न ओकून पडतें. अंधळया मनुष्यास दिसत नसतें त्यामुळें त्याच्या पोटांत माशी जाणें सहज शक्य असतें पण तसें बहुधा घडल्याचें दिसत नाहीं. याचें कारण परमेश्वर अशा लोकांची काळजी घेतो व सहसा अंधळयाच्या पोटांत माशी जात नाहीं. अपंग लोकांची काळजी देव घेत असतो. सुदृढ माणसास माल जपून वागावें लागतें.

अंधळयाशीं जन सारेंची अंधळें, अंधळयास सारेच अंधळे—अंधळया मनुष्यास स्वतः दिसत नसल्यामुळें सर्व जगांतले लोक अंधळेच आहेत असें वाटतें. आपणांप्रमाणेंच सर्व जगांतील लोकांची स्थिति आहे अशी कांहीं लोकांची समजूत असते त्यांच्या बाबतींत ही म्हण योजतात. 'अंधळयासी जन अवघेचि आंधळे। आपणासी डोळे दृष्टि नाहीं ॥' —तुगा १६२

अंधळयास अंधळा वाट दाखवितो—अंधळया मनुष्यास स्वतःसच रस्ता दिसत नाहीं मग तो दुसऱ्यास काय वाट दाखविणार ? त्याप्रमाणें एखाद्या मनुष्यास स्वतःसच एखाद्या विषयाचें मुळींच ज्ञान नसेल तर तो मनुष्य दुसऱ्याला त्या विषयाची माहिती कशी देऊं शकेल ? तथापि अशा तऱ्हेचा विचित्र प्रकार कांहीं लोक करतांना दिसले म्हणजे त्यांच्या बाबतींत ही म्हण लागू पडते.

अंधळयास आमंत्रण दोघे येतात—'अंधा देतां आमंत्रण' पहा.

अंधळयास रात्र काय आणि दिवस काय—अंधळया मनुष्यास दिसत नसल्यामुळें त्याला दिवसाच्या उजेडाचा उपयोग होत नाहीं किंवा रात्रीच्या काळोखापासून त्रास होत नाहीं.

त्याला दोन्हीहि सारखींच. त्याप्रमाणेंच ज्याचा एखाद्या गोष्टीशीं मुळींच संबंध नाहीं ती चांगली असली काय किंवा वाईट असली काय त्याला त्याचा विधिनिषेध कांहींच नसतो.

अधम——अधमाची कृती गरज शिकविती—अनेक वेळा मनुष्य आपल्या गरजेकरितां किंवा निकडीची वेळ आली म्हणजे अधम कृति करावयास तयार होतो. त्याची स्वाभाविक प्रवृत्ति वाईट असते असें नव्हे तर प्रसंगानें मनुष्य कुमार्गाकडे प्रवृत्त होतो.

अधमाला हातांनीं भरवावें त्याच्या तोंडीं लागूं नये—नीच मनुष्याला थोडें फार देऊन दूर ठेवावें; त्याच्याशीं फारशी सलगी करूं नये.

अधमाशीं संग प्राणाशीं गांठ—'असंगाशीं संग प्राणाशीं गांठ' पहा.

अधर्म——अधर्मानें ये मूर्खता वेडेपणा धर्मनिंदा करतां—अधर्मानें वागलें किंवा धर्माची निंदा केली तर मूर्खपणा व वेडेपणा पदरीं येतो. –सवि ३१६५. Superstition renders a man fool and scepticism makes him mad याचा वरील अनुवाद आहे. तेव्हां 'अधर्मानें' बद्दल 'धर्मानें' पाहिजे असें वाटतें.

अधर्मी——अधर्म्याचें अडीच दिवस—कुमार्गानें चालणाऱ्या मनुष्याची जरी काहीं दिवस चलती असली तरी ती फार दिवस चालणें शक्य नाहीं. त्याची भरभराट अल्पकालच टिकावयाची.

अधलंड——अधलंड मधलंड—अधचा मधचा; कोठचा तरी; धड ना इकडचा ना तिकडचा असा.

अधवा——अधव्याचा जोडला आणि पिढीचा मोडला बरोबर होत नाहीं—एखाद्या मनुष्याशीं आपला तात्पुरता संबंध जडल्यामुळें त्याच्या ठिकाणीं आपल्याबद्दल कितीहि प्रेम किंवा आपलेपणा उत्पन्न झाला तरी ज्यांच्याशीं आपले पिढ्यानू पिढ्या संबंध आहेत त्यांचा संबंध तोडलेला असला तरी त्यांमध्यें जो आपणाबद्दल आपलेपणा शिल्लक राहिला असेल त्याची बरोबरी या नवीन संबंधामुळें होऊं शकणार नाहीं. आपले जे परंपरागत पिढ्यानुपिढ्या संबंध व लागेबांधे जुळलेले असतात व परस्परांबद्दल जें ममत्व उत्पन्न झालेलें असतें तें तो संबंध तुटला असला तरी एकदम नाहींसें होत नाहीं व आपला हा संबंध इतर कोणत्याहि तात्पुरत्या संबंधापेक्षां अधिक घनिष्ट असतो. तु०—पाण्यापेक्षां रक्त दाट असतें.

अधांत्रीं——अधांत्रीं दोर कापणें—एखादा मनुष्य दोर धरून उतरतांना मध्येंच तो दोर. तोडला असतां त्याचा जसा एकदम आधार तुटल्यासारखा होतो, त्याप्रमाणें एखाद्याचें काम अर्धवट झालें असतां त्याचा आधार काढून घेतल्यानें त्याची केविलवाणी स्थिति होते. यावरून अर्ध्या मार्गांत सोडणें; अर्ध्यापर्यंत मदत करून एकदम बंद करणें; एखाद्याचा आधार तोडणें. तु०—आडांत सोडून दोर कापणें.

अंधार—अंधेर——अंधारीं उजाडीं—काळोखांत व उजेडांत; दिवसरात्रीं; एकसारखें; कोणत्याहि वेळीं; गुप्तपणें किंवा उघडपणें; खासगी रीतीनें किंवा चारचौघांत; अनेक मार्गांनीं व रीतींनीं. अंधेर पहा.

अंधेर नगरी—जेथें अंधेर आहे, म्हणजे न्यायान्यायाचा विचार नाहीं, अन्याय्य वर्तणूक खपली जाते असा प्रदेश; बेबंदशाही राज्य. 'बाळाजीपंतास आतां वाटलें कीं, या अंधेर नगरींत व छोटिंग पाच्छाईंत आतां राहून उपयोगी नाहीं.'–बाजीराव.

❀ **अंधार हा चोरास पथ्य**—चोराला अंधार पथ्यावर पडतो. अंधारांत चोरी पकडणें कठीण जातें. तु०—अंधारांत चोरास बळ पहा.

अंधारांत केलें पण उजेडांत आलें, अंधेरांत केलेलें उजेडांत येतें—१ एखादि गोष्ट अगदीं कितीहि गुप्तपणें केली तरी ती कांहीं कालानें उघडकीस आल्याशिवाय रहात नाहीं. २ स्त्रीपुरुषांनीं एकांतांत व गुप्तपणें व्यवहार केला तरी गर्भरूपानें तो प्रकाशांत आल्याशिवाय राहात नाहीं.

अंधारांत गूळ खाल्ला तरी तो गोडच—गूळ उजेडांत खाल्ला काय किंवा अंधारांत खाल्ला काय, तो गोडच लागणार. अंधाराचा परिणाम कांहीं गुळाच्या गोडीवर प्रतिकूल होत नाहीं. चांगली गोष्ट कोणत्याहि परिस्थितींत केली तरी तिचा परिणाम चांगलाच होतो.

अंधारांत खाल्लें म्हणून झुरळ तर नाहींना नाकांत जात—मांजर झुरळें खातें व तें बहुतेक अंधारांत नेऊन खातें. पण तेथें अंधार असला तरी तो त्याच्या झुरळ खाण्याआड येत नाहीं. कोणीं अंधारांत जरी खाल्लें तरी अन्न सरळ त्याच्या तोंडांत जातें. खाणाऱ्या मनुष्यास आपण कोणता पदार्थ खातों तेंहि कळतें व घास नेमका तोंडांतच जातो. अंधार असला म्हणून कोणी झुरळ तोंडांत घालीत नाहीं व अन्न तोंडाऐवजीं नाकाकडेहि जात नाहीं. कशीहि परिस्थिति असली तरी मनुष्य आपल्याला अनुकूल अशीच गोष्ट शक्यतों करून घेतो; सहसा प्रतिकूल

गोष्ट त्याच्या हातून होत नाहीं.

अंधारांत चोरास बळ—चोरास चोरी करावयास साहजिकच अंधारी रात्र ही अधिक उपकारक असते. तेव्हां योग्य परिस्थिति ही कोणत्याहि गोष्टीस उपकारकच असते. तु०—अंधार हा चोरास पथ्य.

अंधारांत जाराची मौज—अंधार हा अर्थातच जारकर्मास अनुकूल असतो; जारास उघडकीस येण्याची भीति नसते. वरील प्रमाणेंच अनुकूल परिस्थिति असली म्हणजे कार्य करणें सुखाचें व सुलभ असतें.

अंधारांत धांवतो तो खचित ठोकर खातो—जो मनुष्य अंधारांत दिवा घेतल्याशिवाय जाईल त्याला ठेंचा खाण्याची वेळ येणारच. त्याप्रमाणें जो मनुष्य कोणत्याहि गोष्टीचें पूर्ण ज्ञान करून घेतल्याशिवाय ती करण्यास धजेल त्याला नुकसान पोंचल्यावांचून राहणार नाहीं.

अंधारांत मांजरी येती साऱ्या सारख्या दिसती—अंधारांत जर आपणासमोर मांजरें आणलीं तर त्यांचा रंग न ओळखतां आल्यामुळें तीं सर्व सारखींच वाटतील. त्याप्रमाणें एखाद्या गोष्टींतील सर्व खांचाखोंचा समजल्याशिवाय तिचें पूर्ण ज्ञान होणार नाहीं व भलताच गैरसमज होण्याचा संभव असतो व एकीबद्दल भलतीच गोष्ट समजण्यांत येण्याची शक्यता उत्पन्न होईल. तु०—When candles are out all cats are grey.

अंधारांत सर्व रंग सारखेच—अंधारांत आपणास नीटपणें रंग ओळखतां येत नाहींत. सर्व रंगांच्या वस्तु सारख्याच दिसतात. त्याप्रमाणें कांहीं गोष्टींचें विशेष ज्ञान होण्याचें साधन असल्याशिवाय त्यांतील खांचाखोचा कळत नाहींत. अडाणी मनुष्याला सामान्यतः सारख्या दिसणाऱ्या गोष्टींची नीट पारख करतां येत नाहीं. अंधारांत काळें गोरें सारखेंच.

अंधारीं आहार आणि मार्जाराचा अवतार—मांजर बहुतेक एखादी जिन्नस चोरून नेऊन अंधारांत बसून खातें. यावरून चोरून व अंधारांत खाणारास ही उपमा देतात.

अंधेर नगरी झोटिंग पातशाही—१ जेथें कोणतेहि नियम कायदे वगैरे नाहींत व कोणातरी स्वैर अरेरावाच्या हातीं सत्ता आहे असें गांव. अशा ठिकाणीं वसती केल्यास त्रास झाल्याशिवाय रहात नाहीं. २ अंदाधुंदी कारभार. ३ स्वैरवर्तणूक.

अंधेर नगरी बेबंद राजा, अंधेर नगरी बेबंद (बेबूझ) राजा टकाशेर भाजी और टका शेर खाजा—एक गांव होता. तेथील राजा अगदीं अनिर्बंध वर्तन करीत असे. त्याच्या राज्यांत न्याय-अन्यायाकडे कांहीं दृष्टि नसे. अशा गांवांत एक साधु व एक शिष्य असे आले तेव्हां त्यांस तेथें ही स्थिति आढळून आली व बाजारांत पाहूं गेले तों भाजी व मिठाई दोन्ही जिनसा टकाशेर-पैशाला शेर भावानें विकत होत्या. तेव्हां त्या साधूनें ओळखलें कीं येथें बेबंदशाही असल्यामुळें राहणें योग्य नाहीं. तसें त्यानें आपल्या शिष्यास सांगितलें. परंतु शिष्यास तेथील स्वस्ताई फार पटून त्यानें तेथें राहण्याचें ठरविलें व गुरु त्या गांवांतून निघून गेला.

पुढें त्या गांवांत एक चोरी झाली व ती करणाऱ्या चोराला फांशी देण्याचा हुकूम झाला. पण फांस उंचावर टांगलेला असून तो चोर ठेंगणा होता. तेव्हां त्याच्या ऐवजीं चांगल्या उंच व धिप्पाड मनुष्याला फांशी द्यावा असा हुकूम झाला व राजाच्या शिपायांनीं त्या शिष्यास फांशी देण्याकरितां धरून नेलें. त्यावेळीं त्याला आपल्या गुरूच्या भाषणाची आठवण झाली? अशाच तऱ्हेची खऱ्या अपराध्यास सोडून भलत्यालाच सुळीं देण्याची गोष्टहि प्रचलित आहे. ही म्हण बहुतेक हिंदी, गुजराथी वगैरे सर्व भाषांत प्रचलित आहे.—गांगा २१२. —विक्षिप्त १·११०

अधिक——अधिक प्रसंग—अयोग्य वर्तन; वाजवीपेक्षां जास्त बोलाचाली; गैरवर्तन; भांडणतंटा; उद्धटपणाचें वर्तन; अमर्यादा; रीत सोडून वागणें.

***अधिक उणें ताणूं नये ताणल्यानें पडतें फाटफाट**—रबर जर आपण वाजवीपेक्षां जास्त ताणला तर तो तुटणारच. त्याप्रमाणें कोणतीहि गोष्ट वाजवीपेक्षां फार ओढून धरली तर त्या कामाचा शेवटीं बिघाड व्हावयाचा. तेव्हां कोणत्याहि बाबतींत वाजवीपेक्षां अधिक अडून बसूं नये किंवा कोणाचाहि अंत पाहण्याचा प्रयत्न करूं नये.

अधिक जिवंत राहणें अधिक तमाशे पाहणें—एखाद्या मनुष्याची हीन स्थिति झाली असतां त्याला आयुष्य कंठणें कठिण होत जातें. प्रत्येक घडणाऱ्या गोष्टीपासून त्यास दुःख प्राप्त होतें. अशा स्थितींत आयुष्य अधिक वाढण्यापेक्षां लवकर मृत्यु येणें चांगलें. किंवा जितकें आयुष्य जास्त तितक्या अधिक गोष्टी पहावयास सांपडतात. [Those who live longest will see most याचा सवि. नें केलेला वरील अनुवाद आहे.]

अधिक भक्ति विशेष फलश्रुति—जितकी भक्ति दृढ असेल त्या मानानें फलप्राप्ति होते. जितकें मन लावून काम करावें तितकें तें चांगलें होतें. तु० इं. The more worship,

the more cost —सवि ३४६५.

अधिक लोभातें धरितो वारंवार हारीस येतो—जों जों एखादा मनुष्य अधिक अधिक एखाद्या गोष्टीचा लोभ करतो तों तों त्याचें अधिकाधिक नुकसान होतें. तेव्हां कोणत्याहि गोष्टीचा वाजवीपेक्षां अधिक हव्यास करूं नये.

अधिक सून पाहुण्यापुढें—पाहुणें हा शब्द कोंकणांत उखळास वापरतात. हें बहुधा घराच्या पडवींत असतें. तेव्हां ज्या सुनांचे नवरे घरीं असतील त्या सुना आपापल्या नवऱ्याच्या खोलींत निजतात पण जिचा नवरा घरीं नाहीं तिच्यावर पडवींत निजावयाची पाळी यावयाचीच. यावरून ज्या वस्तूला योग्य स्थळ नाहीं किंवा जिची निगा ठेवणारें कोणी नाहीं ती अस्थानीं पडल्यावांचून राहात नाहीं.

अधिकस्य अधिकं फलम्—अधिक कार्य केलें तर अधिक फलप्राप्ति होते; अधिक साधनें वापरलीं तर फल लवकर मिळण्याचा संभव असतो; तेव्हां अधिक असलेलें वाईट नाहीं. 'दुधांत साखर' पडल्याप्रमाणें त्याचें फल आहे. 'लेखनी सर्ववर्णेषु विधिना निर्मिता पुरा। नवांगुलप्रमाणेन अधिकस्याधिकं फलम् ॥'

"अशी सुभगसम्पदाच असता राज्ञी रायाची। काय जरूरी वैदिक 'शान्ती' आदि उपायांची ?। हाच भाव जरि खेळत राही जनहृत्कासारीं। परि 'अधिकस्याधिकम् फलम्' हा न्यायच व्यवहारी!"—काव्यकिरीट पृ. ४२—पामो ५६५.

अधिकांत अधिक लोकांचें अधिकांत अधिक हित—बहुहितवाद; ज्या गोष्टीपासून सर्वांत अधिक लोकांचें सर्वांत अधिक हित होत असेल ती गोष्ट करावी. थोड्यांचें पुष्कळ हित व बाकीच्यांचें नुकसान किंवा थोड्यांचें नुकसान व बाकीच्यांचें पुष्कळ हित होत असेल तर हे मार्ग गौण समजावे. तु०—Greatest good of the greatest number. —केसरी १६-३-३४.

अधिकार——अधिकाराचें उदक सोडणें—अधिकार त्याग करणें; आपल्या हातांतील सत्ता दुसऱ्याच्या हातांत देणें. 'पुणें शहर कॉंग्रेस समितीनें नगर पालिकेंतील कॉंग्रेस पक्षावर आपलें नियंत्रण चाललें पाहिजे असा आग्रह धरला होता. परंतु नियंत्रक मंडळांतील कॉंग्रेस नेते आपल्या अधिकाराचें उदक त्यांचे हातावर सोडण्यास तयार झाले नाहींत.' —केसरी ५-७-४०.

❀ **अधिकार आल्यावरती मूळ स्वभाव प्रकट करिती**—जोंपर्यंत एखाद्या मनुष्याच्या हातांत सत्ता नसते तोंपर्यंत तो सर्वांशीं गोड वागतो व वरून वरून चांगला दिसतो परंतु हातांत अधिकार प्राप्त झाल्याबरोबर त्याचा खरा स्वभाव दिसूं लागतो.

अधिकार व अहंकार हे एकमेकांपासून फारसे दूर नसतात—मनुष्यास अधिकार प्राप्त झाला म्हणजे गर्व चढतोच. अधिकाराच्या मागोमाग अभिमान उत्पन्न होतो. —केसरी १७-६-३०.

अधिकाराचा दोष आहे माणसाचा नव्हे—अनेक प्रसंगीं मनुष्य स्वतः स्वाभाविकपणेंच चांगल्या प्रवृत्तीचा असूनहि हातांत सत्ता आली म्हणजे तिचा जो मद उत्पन्न होतो त्यामुळें तो वाईट गोष्टी करावयास प्रवृत्त होतो. —टि ३.३४५.

अधिकाराची सिद्धि म्हणजे अब्रूची वृद्धि—नवीन नवीन अधिकार प्राप्त होत गेला तर आपली प्रतिष्ठा वाढत जाते व कीर्ति पसरते.

अर्धी—आर्धी पहा.

अधीर——अधीर आणि अज्ञानी कपटी असती फार मनीं—जो मनुष्य एखाद्या गोष्टीबद्दल फार उतावीळपणा दाखवितो किंवा अज्ञान पांघरतो तो मनांतून बहुधा लबाड असतो व उतावीळपणाचें किंवा अडाणीपणाचें नुसतें ढोंग करीत असतो. त्याच्या मनांतून गडबडीनें आपल्या हातून कांहीं तरी साधून घ्यावयाचें असतें. तु०—Weak men and cowards are commonly wily याचा अनुवाद —स. वि. ३९९२

अधिऱ्याचें घेऊन कर्जबाजाऱ्याला देऊं नये—जो मनुष्य कर्जबाजारी असतो त्यास घेतलेली रक्कम वेळेवर परत करणें बहुधा शक्य होत नाहीं. तेव्हां जो मनुष्य अधीर असेल व आपली रक्कम केव्हां मागेल याचा नेम नसेल त्याची रक्कम घेऊन कर्जबाजारी मनुष्यास देणें योग्य होणार नाहीं. ज्या गोष्टीची शाश्वती नाहीं त्या गोष्टीवर विसंबून राहून एखाद्या उतावळ्या मनुष्याचें काम अंगावर घेऊं नये.

अधेला——अधेल्याच्या मनांत आदितवार—अधेला हा सामान्यतः निर्विष साप असून त्यास फक्त रविवारीं विष असतें अशी समजूत आहे. त्यामुळें त्यास नेहमीं रविवार असावा अशी इच्छा असते. प्रत्येकास आपल्या फायद्याच्या दृष्टीनें दिसत असतें. तुलना—अंधळ्याच्या मनांत आदितवार (सोमवार), इत्यादि.

अधेल्यावर काठी कोणीहि घालावी—अधेल्यावर धोंडा (धोपटा) कोणी तरी टाकील—अधेला हा निर्विष सर्प असल्यामुळें त्याला कोणी धोंडा मारला किंवा धोपटा घातला तरी तो इतर सविष सर्पाप्रमाणें

इक धरून चावावयास येत नाहीं. तेव्हां त्याच्या वाटेस कोणीहि जाणें शक्य असतें. त्याप्रमाणें ज्याला प्रतिकार करतां येत नाहीं अशा गरीब मनुष्याची कोणीहि खोडी काढतें; कारण त्यापासून अपाय होण्याची भीति नसते.

अधोपरी——अधोपरी आलं राज कोंबडी मागते जानवाज—अकस्मात् सत्ता प्राप्त झाली असतां मनुष्य वाटेल त्या गोष्टीची अपेक्षा करूं लागतो. श्रम केल्याशिवाय किंवा पात्रता असल्याशिवाय अधिकार मिळाल्यास त्याचा दुरुपयोग होण्याचाच संभव असतो.

अधोपरी आलें राज्य कुठें घालूं खाटवाज—वरप्रमाणेंच.

अधोपरी जोडलें आणि पिढीजात तोडलें—'अधव्याचें जोडलें आणि पिढीचें तोडलें' पहा.

अधोरें——अधोरें उपाशी अन् जीव टोपल्यापाशीं—एखादा अतिशय अधीर किंवा उतावळा मनुष्य असला तर त्याच्यानें जेवल्याशिवाय कांहीं काम होत नाहीं. कारण त्याच्या मनांत सारखे जेवणाचेच विचार येत असल्यामुळें त्याचें कामाकडे लक्ष लागत नाहीं.

अधोऱ्याचा रीण अवकळ्याची चाकरी कधीं करूं नये—अधीर किंवा उतावळ्या मनुष्याचें कधींहि रीण काढूं नये. कारण त्याला मुळींच धीर निघत नाहीं व तो वरचेवर मागणी करून फार त्रास देतो. त्याप्रमाणें बलहीन मनुष्याची चाकरी कधीं करूं नये. त्याची नेहमीं कुरकुर चालावयाची. त्याला स्वतःला कोणतीहि गोष्ट करतां येत नाहीं व दुसऱ्यानें केलेली पटत नाहीं म्हणून तो नेहमीं चिरचीर करीत राहतो. —मसाप २.३.६०.

अनंत——अनंतपारं किल शब्दशास्त्रं—शब्दांचें शास्त्र फार अफाट आहे. त्याला मर्यादाच नाहीं. शब्दसंख्या अगणित असते. 'अनंतपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः। सारं ततो ग्राह्यमपास्य फल्गु हंसो यथा क्षीरमिवाम्बुमध्यात्॥ पंचतंत्र—कथामुख.

अनंत शास्त्रं बहुलाश्च विद्या, अल्पश्च कालो बहु विघ्नताच—शास्त्रीय ज्ञान अपार आहे; तसेंच अनेक विद्यांचा अभ्यास करावयाचा तर त्याही फार आहेत. पण मनुष्याला वेळ थोडा असतो व त्यांतहि अनेक अडचणी असतात. याकरितां हंसक्षीरन्यायानें त्यांतील सार तेवढें घ्यावें. आयुष्य थोडें विद्या फार. (इं.) Life is short art is long. लॅ—Ars longa vita brevis. 'शास्त्रें फार अपार जीवित तुझें अत्यल्प कीं मानवा। तेंही विघ्नशताभिभूतचि असे नाहीचरे वानवा'। 'अनेकशास्त्रं बहुवेदितव्यमल्पश्च कालो बहवश्च विघ्नाः। यत्सारभूतं तदुपासितव्यं हंसो यथाक्षीरमिवाम्बुमध्यात्'॥ —सुर. १७३.८७८

अनभ्यास——अनभ्यासे विषं शास्त्रमजीर्णे भोजनं विषं—ज्यानें कधीं अभ्यास केला नाहीं त्यास शास्त्र हें विषाप्रमाणें वाटते व ज्यास अजीर्ण आधींच झालें आहे त्याला जेवण हें विषाप्रमाणें वाटतें. कोणत्याहि विषयाची गोडी असल्याशिवाय त्यांत मन रमणें शक्य नाहीं. 'अनभ्यासे विषं शास्त्रं अजीर्णे भोजनं विषम्। मूर्खस्य च विषं गोष्ठी वृद्धस्य तरुणी विषम्॥' 'दुरधीतो विषं विद्या अजीर्णे भोजनं विषम्। विषं गोष्ठी दरिद्रस्य वृद्धस्य तरुणी विषम्॥'—सुर १६२.४१३.

अनवाणी——अनवाणी काशीकर—पायांत कांहीं न घालतां काशीयात्रा केली अशी बढाई मारणारा; लबाड; भामटा; सोदा; लुच्चा.

अनक्षर——अनक्षर शहाणे असती, कधीं साक्षर मूर्ख ठरती—कांहीं कांहीं वेळेस अडाणी मनुष्य शहाणा ठरतो व विद्वानाच्या पदरीं मूर्खपणा येतो. कांहीं गोष्टी सुशिक्षित लोकांपेक्षां अशिक्षित लोकांसच बरोबर माहीत असतात.

अनागोंदी——अनागोंदी कारभार—सर्व अव्यवस्थित स्थिति. अनागोंदी हें गांव तुंगभद्रा नदीच्या कांठीं डाव्या तीरावर विजयानगरच्या विरुद्ध दिशेस आहे. येथें विजयानगरची स्थापना होण्यापूर्वी राजधानी होती. राज्य लहानच होतें पण पोकळ बडेजाव मोठा. 'अनागोंदी जमाखर्च' पहा.

अनागोंदी जमाखर्च—अनागोंदी या प्राचीन राजधानींतील राजा आपलें वैभव दाखविण्यासाठीं पृथ्वीवरील सर्व देशांचा जमाखर्च आपला म्हणून मांडीत असे, म्हणजे सर्व देशांचें उत्पन्न आपल्या खजिन्यांत जमा म्हणून दाखवून पुन्हा त्या त्या देशांच्या नांवें टाकीत असे. यावरून पोकळ जमाखर्च; गोंधळाचा जमाखर्च.

अनागोंदीचा राजा—(विजयानगरच्या जवळीलच प्राचीन राजधानीचा राजा) मागितलेली वस्तु विचार न करतां देऊन टाकणारा भोळा सांब; गबाळी, अव्यवस्थित मनुष्य.

अनाजीपंत——अनाजीपंताचा धारा—शिवाजीचा सचीव अनाजी दत्तो प्रभुणीकर यानें जमाबंदी करून सारा बसविला होता तो. दादाजी कोंडदेवानंतर गांवजमाबंदींत सुधारणा करणारा अण्णाजी दत्तोच.—रा. २१·७९

अनाथ——अनाथाचें रक्षण ईश्वराधीन—ज्याला कोणी त्राता नाहीं त्याचें रक्षण ईश्वर करतो. निराधार मनुष्यां-

ची काळजी ईश्वर घेतो. तु०–अनाथांचा वाली परमेश्वर. 'अरक्षित' पहा.

अनाथाला गांवचा कैवार—ज्या मनुष्याला स्वतःचें रक्षण करतां येत नाहीं त्यानें गांवाचा कैवार घ्यावा ही गोष्ट हास्यास्पद आहे.

अनाथावर कृपा करावी हा मार्ग सोपा—अनाथावर दया दाखविण्यांत कधीं कसूर करूं नये. तु०–'Withhold not thine hand from showing mercy to the poor'– या हिब्रू म्हणीचा अनुवाद –सवि ४२४१.

अनायास——अनायासें व्हावा काळ ऐसें मागें वेळोवेळ—मनुष्य वृध्द झाला असतां त्रास झाल्याशिवाय, अंथरुणावर खितपत पडल्याशिवाय सहज सुलभ मरण यावें अशी त्याची इच्छा असते. 'अनायासेन मरणम्। विना दैन्येन जीवनम् ॥' पहा.

अनायासेन मरणं विना दैन्येन जीवनम्—कष्टाशिवाय सहजासहजीं मरण येणें व तोंड वेंगाडल्याशिवाय योगक्षेम चालणें या दोन गोष्टी माणसाला हव्या असतात. यांत महत्त्वाकांक्षा नाहीं व भाग्यवान् गरीबालाहि या मिळूं शकतात. भीष्मानें (?) हा वर कृष्णाजवळ मागितला होता म्हणतात.

अनास नकळां पनास दादा मागता ×××—(गो.) अविचाराची गोष्ट.

अनीन——(घोड्याच्या) अनीना उचलणें—लढाईला निघणें, तयार होणें. 'असें एकदिलाचें भाषण ऐकतांच श्रीमंतांनीं सांगितलें कीं, आतां घोड्याच्या अनीना उचला. त्यासमयीं पंधराशें स्वारांची मांड एकदांच उठली!' –मेच ६५.

अनीनीस अनीन लागणें—सैन्याची इतकी गर्दी होणें कीं, अनीनी शेजारीं चिकटून अनीनी येणें, घोड्याशीं घोडा लागणें. यावरून, गर्दी होणें; दाटी होणें. 'ज्यावेळीं अनीनीस अनीनी लागेल त्यावेळीं येतील तितके ठेवून घेऊं.'–रा. १२·३४. २ काम घाईस येणें.

अनुकूल——अनुकूल साधनीं कार्य साधावें वाहत्या गंगेंत हात धुवावे—जेव्हां अनुकूल परिस्थिति असेल तेव्हां आपलें इष्टकार्य साधून घ्यावें; जसें गंगेंत पाणी वहात असेल तेव्हां हात धुवून घ्यावे, मागून पाणी आटल्यावर काय उपयोग. मिळालेल्या योग्य संधीचा नेहमीं फायदा घेत असावें.

अनुचित——अनुचित कर्माची प्राप्ति तीच शरीरास विकृति—भलतेंच काम करण्याचा प्रसंग आला म्हणजे त्यापासून शरीरास हानि ही पोंचावयाचीच. अनैतिक सुखाचें फल म्हणजेच दुःख.

६

अनुताप——अनुताप अंगीं अग्निचिया ज्वाळा। नाहीं मृगजळा विझों येत ॥—ज्याप्रमाणें मृगजळानें अग्नि विझवितां येत नाही त्याप्रमाणें पश्चात्ताप झाला असतां त्याची बाधा कोणत्याहि उपायानें शांत होत नाहीं.

अनुत्तर——अनुत्तरमेव उत्तरं—ज्या गोष्टीला उत्तर देण्यांत कांहीं अर्थ नाहीं त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणेंच चांगलें व अशा बाबतींत मौन धरणें हेंच योग्य उत्तर होय.

अनुपकार——अनुपकारासारखा दुसरा नाहीं फटका—एखाद्या मनुष्यानें केलेल्या, उपकाराची आठवण न ठेवणें यासारखी आपणाला हानिकारक गोष्ट नाहीं. कृतघ्नता ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. तु०–No cut like unkindness.

अनुभव——अनुभव आणि लीनता वागवी भय मर्यादशीलता—जगाचा अनुभव आणि लीनता हीं नम्रता व अनृताबद्दल भीति शिकवितात.

अनुभव आपला आपण घ्यावा त्यापेक्षां दुसऱ्याचा पाहून शिकावा—प्रत्येक गोष्टीचा स्वतः अनुभव घेऊन पहाण्यापेक्षां आजपर्यंत अनेकांना जे विविध अनुभव आले आहेत त्यांच्यापासून बोध घेतल्यास तो अधिक श्रेयस्कर होय. कारण प्रत्येक गोष्टीचा स्वतः अनुभव घेणें शक्यहि नाहीं व अनेकदां तें फार महाग पडतें. तेव्हां जगांतील लोकांच्या अनुभवानें आपण शहाणें व्हावें हेंच चांगलें.

अनुभव नसतांची जाण व्यर्थ पुस्तकी ज्ञान—पुस्तकी ज्ञान पुष्कळ असलें पण प्रत्यक्ष प्रचीति नसली म्हणजे त्या ज्ञानाचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. कारण तें केवळ वरवरचें ज्ञान असतें व त्यांतील खांचाखोंचा तितक्या अवगत नसतात. पण अनुभवानें तें पक्कें मनांत ठसतें. तु०– पुस्तकस्था तु या विद्या परहस्तगतं धनम्। कार्यकाले समुत्पन्ने न सा विद्या न तद्धनम् ॥ –सुर १६२.४१३

अनुभव पडे आणि संशय फिटे—प्रत्यक्ष अनुभवच आला म्हणजे मग मनांत कांहीं संशयास जागा रहात नाहीं. नुसत्या सांगण्यानें मनुष्यास एखादी गोष्ट पटत नाहीं पण प्रत्यक्ष अनुभवच आला म्हणजे बोलायला कांहीं जागा राहात नाहीं.

अनुभव मूर्खा शिकवी ज्ञान न शिके तो शतमूर्ख जाण—अनुभवानें मूर्ख मनुष्यसुद्धां शहाणा होतो, परंतु जो अनुभव घेऊनहि योग्य तो बोध घेत नाहीं तो मूर्खांच्याहि पलीकडे शतमूर्ख आहे, असेंच म्हटलें पाहिजे.

अनुभवाअंतीं ज्ञान—जगांतील सर्व ज्ञान हें कोणाच्या ना कोणाच्या तरी अनुभवावरून प्राप्त झालेलें आहे. जेव्हां एखाद्या गोष्टीचा अनुभव घेऊन पहावा तेव्हां तीबद्दल यथार्थ कल्पना येते.

अनुभवाखेरीज ब्रह्मज्ञान नाहीं—ब्रह्मज्ञानाची प्रत्यक्ष प्रतीति झाल्याशिवाय तें मनावर ठसत नाहीं. वरवर कितीहि गोष्टी सांगितल्या तरी अनुभवाशिवाय त्यांचा मनावर कांहीं परिणाम होत नाहीं.

अनुभवाची साउली तीच विद्येची माउली—अनुभवापासूनच ज्ञान प्राप्त होतें.

अनुभवानुसार चातुर्य तें वाढतें फार—मनुष्याला जितका अनुभव जास्त, तितका तो अधिकाधिक चतुर किंवा शहाणा होतो.

अनुभवावांचून कळत नाहीं चावल्यावांचून गिळत (वळत) नाहीं—कोणताहि पदार्थ चावून चावून गिळल्याशिवाय तो पचत नाहीं व अंगीं लागत नाहीं; त्याप्रमाणें वरवर कितीहि ज्ञान असलें तरी त्यास जर अनुभवाची जोड नसली तर तें मनांत पक्कें बिंबत नाहीं. अनुभव आला म्हणजे मनाची पक्की खात्री पटते.

अनुभवाविण करणें तीं मूर्खाचीं लक्षणें—एखाद्या गोष्टीचा मुळींच अनुभव नसतां ती करावयास धजणें हें मूर्खपणाचें चिन्ह आहे.

अनुभवासारखा शिक्षक नाहीं—ज्या गोष्टीचा मनुष्यास स्वतः प्रत्यक्ष अनुभव येतो ती जशी कधीं विसरत नाहीं व ती जितकी मनांत ठासून बसते तितकी वरवरच्या शिकवणीनें बसत नाहीं. त्यामुळें अनुभवासारखा पक्कें मनावर बिंबवणारा दुसरा शिक्षक नाहीं. इतर मार्गांनीं झालेलें ज्ञान इतकें पक्कें नसतें. पाठभेद—अनुभवासारखा गुरु नाहीं पण त्याची फीहि तशीच जबर असते.

अनुष्टुप——अनुष्टुप छंद—अनुष्टुप छंदाचा पाद आठ अक्षरी म्हणजे सर्वांत लहान आहे; यावरून अल्पता, तूप वगैरेंचा अभाव.

अनुष्ठान——यथा अनुष्ठान तथा सिद्धि—कर्मासारखें फळ. ज्याप्रमाणें आपण परमेश्वराची भक्ति करावी त्याप्रमाणें आपणाला फळ मिळतें. तसेंच ज्या प्रमाणांत आपण परिश्रम करावे, त्याप्रमाणांत आपल्या कार्यांत आपणांस यश येतें.

अनृणी——अनृणी अप्रवासी तो सुखी—' अऋणी अप्रवासी ' इ. मागें पहा.

अनेक——अनेक कल्पना मनीं करी त्याचें एकहि सत्य न घडे तरी—जो मनामध्यें एकहि गोष्ट निश्चित न करतां केवळ अनेक कल्पना करतो त्याचे हातून एकहि गोष्ट घड होत नाहीं.

अनेक लहान होतीं महान्—लहान लहान अशा वस्तु जर अनेक एकत्र केल्या तर त्यांचा सामुदायिक परिणाम अथवा परिमाणहि फार मोठें होतें. तु०—थेंबें थेंबें तळें सांचे. Many littles make a mickle.—French

अनोखा——अनोखिके हाथ कटोरी पाणी पीपी मुही पदोरी—न मिळती गोष्ट मिळाली असतां माणूस ती बेसुमार ताबडतो; तिची हानि करतो.

अनोळखी——अनोळखी उपाध्या आणि नऊपट होम—नेहमींचा उपाध्याय असला म्हणजे त्यास यजमानाकडे वरचेवर यावयाचें असल्यामुळें तो प्रत्येक विधि करतांना जरूर तेवढेच विधि करावयाची काळजी घेतो व यजमानासहि साधारणतः कोणत्या विधीस काय लागतें याची कल्पना असते. पण अनोळखी उपाध्याय असला म्हणजे त्याला एकाच वेळीं शक्य तेवढें यजमानाकडून उकळावयाचें असतें म्हणून तो अनेक गोष्टी घुसडून देऊन यजमानाकडून बरेच जिन्नस व दक्षिणा उपटतो व यामुळें बाजवीपेक्षां अधिकच खर्च यजमानास पडतो. तेव्हां अपरिचिताशीं व्यवहार केल्यास त्यापासून स्वतःस अधिक घसच लागण्याचा संभव असतो.

अनोळख्याला भाकरी द्यावी पण ओसरी देऊं नये—ज्या मनुष्याची ओळख देख नाहीं त्यास जरूर तर खाण्यापिण्यास द्यावें पण घरीं आश्रय देऊं नये. अपरिचिताशीं संबंध दुरून दुरूनच ठेवावा, फारशी लगट करूं नये. नाहींतर पश्चात्तापास कारण व्हावयाचें.

अन्न——अन्न अंगीं लागणें—अन्न पचणें; अन्नाचें योग्य तऱ्हेनें पचन होऊन शरीराची वाढ होणें.

अन्न अन्न करणें, अन्न अन्न करीत फिरणें—अन्नाकरितां दारोदार भिक्षा मागण्याची पाळी येणें; अन्न मिळण्याची अत्यंत अडचण होणें; फारच कष्टदशा प्राप्त होणें. ' तुकयाची ज्येष्ठ कांता । मेली अन्न अन्न करतां । ' ' अन्नाकरितां दाही दिशा । आम्हा फिरविशी जगदीशा । ' —देवीदास व्यंकतो.

अन्न आणि (नि) खोबरें बरोबर होणें—१ साधें अन्नसुद्धां खोबऱ्याइतकें महाग होणें; अन्न दुर्मिळ होणें; अत्यंत महागाई होणें. २ अत्यंत दारिद्र्य येणें.

अन्न कडेकांठास ठेवणें—जेवावयास बसल्यावर जरूर लागल्यास घेतां यावें म्हणून कांहीं पदार्थ जवळ घेऊन ठेवणें.

अन्न चारणें—जेऊं घालणें.

अन्न जाणें—भूक लागणें; जठराग्नि योग्य वेळीं प्रदीप्त होणें व अन्नाचें पचन होणें; अन्न अंगीं लागणें.

अन्न तुटणें—एखाद्या मनुष्याची अन्नावरची वासना कमी होणें; अन्न पचत नाहींसें होणें; जेवण जात नाहींसें होणें.

अन्न परब्रम्ह—अन्न हें प्रत्यक्ष परमेश्वररूप आहे. तु०—परमेष्ठीवा एषः यदोदनः –तैसं. त्रिसुपर्ण.

अन्नपाणी तुटणें—राहणें—अन्नावर वासना नसणें; क्षुधा न लागणें; तोंडास रुचि नसणें; अन्न किंवा पाणी कांहीं पोटांत न जाणें.

अन्नपाणी सोडणें—अन्न वर्ज करणें; अन्न न खाणें; उपवास करणें; प्रायोपवेशन करणें.

अन्नसत्र (छत्र) घालणें—मुक्तद्वार ठेवणें; आल्या गेल्यास जेवण देणें; पूर्ण मुभा देणें.

अन्नाआड येणें—एखाद्याच्या तोंडचा घांस काढणें; एखाद्याचें उपजीविकेचें साधन नाहींसें करणें; एखाद्याच्या उपजीविकेच्या मार्गांत अडथळा आणणें.

अन्नाचा—अन्नानें पोसलेला, वाढलेला; एखाद्याकडून पोषण झालेला; दुसऱ्याच्या अन्नावर वाढलेला. 'दास म्हणे तुझ्या अन्नाचा वाढलों साचा।' –दावि १७.

अन्नाचा किडा—१ खादाड; अधाशी. २ नुसता खाण्यास काळ; कांहीं उद्योग वगैरे न करितां केवळ दुसऱ्यावर अन्नाकरितां अवलंबून असणारा.

अन्नाचा पिंड—१ योग्य रीतीनें पोषण झालेला मनुष्य प्राणी वगैरे. २ अन्न बंद झालें असतां ताबडतोब मरणारा (लहान मूल, वृद्ध मनुष्य वगैरे).

अन्नाची क्रिया—१ अन्नाची शपथ, आण, भाक. २ एखाद्याचें अन्न खाल्ल्यामुळें झालेले उपकार व त्याबद्दलचें उतराई होण्याचें कर्तव्य.

अन्नाची लाज धरणें—एखाद्यानें आपलें पोषण केलें असेल तर, आपणांस आश्रय दिला असेल तर त्याबद्दल त्याचें ऋणी असणें, किंवा उतराई होणें.

अन्नाचें खोबरें होणें—अन्न खोबऱ्याप्रमाणें दुर्मिळ होणें; अन्नाची वाण भासणें; दुष्काळ पडणें. 'अन्न आणि खोबरें बरोबर होणें' पहा. 'मनुष्यास अन्नाचें खोबरें झालें. दिवसामध्यें मनुष्यास अर्ध पाव भाकर मिळेनाशी झाली.' –भाव १०३.

अन्नाचें पाणी करणें–होणें—अन्नाची चव बिघडवून टाकणें; अन्न बेचव, निःसत्त्व करणें; कांहींतरी अनिष्ट गोष्ट करून जेवणावरचें मन उडवून लावणें; अन्नास गोडी लागणार नाहीं अशी मनःस्थिति उत्पन्न करणें.

अन्नाच्या गारगोट्या—निवालेलें, थंडगार झालेलें अन्न.

अन्नाच्या पाठीस लागणें—पोटास मिळविण्याकरितां परिश्रम करणें; उदरनिर्वाहाकरितां दूरवर जाणें, प्रवास करणें.

अन्नांत माती घालणें–कालविणें—एखाद्याच्या निर्वाहाच्या साधनाचा नाश करणें; एखाद्याच्या उपजीविकेच्या आड येणें.

अन्नांत माशी पडणें—अन्नांत माशी पडली तर अन्न ओकून पडतें. यावरून एखादी गोष्ट अगदीं सिद्ध होण्याच्या बेतांत आली असतां मध्यंतरीं विघ्न येणें; फलप्राप्तीच्या वेळीं कार्यांत बिघाड होणें. 'त्यागमति असी कोठुनि आली या भोजनांत हे माशी!' –मोआश्रम ३.२९.

अन्नानुसार बुद्धि—ज्याचें अन्न खावें त्याच्यासारखें वागावें असें वाटूं लागतें; विशेषतः दुष्ट मनुष्याचा आश्रय केल्यास आपलीहि बुद्धि त्यासारखी होण्याचा संभव असतो. तु०–मधुरापिहि मूर्च्छयति विषविटपिसमाश्रिता वल्ली। –वेणीसंहार.

अन्नामुळें वाळणें—पुरेसें अन्न न मिळाल्यामुळें कृश होणें.

अन्नावर उठणें—एखाद्याच्या उपजीविकेच्या मार्गांत विघ्न आणणें; एखाद्याचें उदरनिर्वाहाचें साधन नाहींसें करणें.

अन्नावर वाढणें—एखाद्याच्या आश्रयानें पुढें येणें; एखाद्याकडून भरणपोषण होणें. 'पेशव्यांच्या अन्नावर वाढलेलीं व पेशव्यांमुळें नांवारूपास आलेलीं शेकडों घराणीं जेथें हयात आहेत तेथें पेशव्यांचा शेवटला वंश बंडखोर ठरतो तरी आम्हांस बिलकुल पर्वा नाहीं.' –टि ४.१७९.

अन्नास जागणें—उपकार स्मरणें; कृतज्ञताबुध्दि बाळगणें, दाखविणें; उपकार फेडणें; इमान राखणें; एकनिष्ठ असणें.

अन्नास महाग–मोताद होणें—पुरेसें अन्नहि मिळत नाहीं अशी स्थिति होणें; कंगालावस्था प्राप्त होणें; दारिद्र्य येणें.

अन्नास लावणें, अन्न लावणें—एखाद्यास निर्वाहाचें साधन मिळवून देणें; एखाद्यास काम, उद्योगधंदा, उपजीविकेचें साधन उपलब्ध करून देणें.

अन्नोदक ऋणानुबंध—एखाद्याचें अन्न वगैरे खाल्ल्यानें त्याबद्दची आपल्या मनांत उत्पन्न झालेली भावना. परस्परांकडे अन्नोदक व्यवहार होत गेल्यामुळें परस्परांमध्यें उत्पन्न झालेला सलोखा. मनुष्याचे पूर्वसंचिताप्रमाणें अन्नोदकादि व्यवहार नियमित केलेले असतात. म्हणजे अमुक ठिकाणीं अमुक दिवशीं अमुक

मनुष्यास जेवावयास मिळेल अशी जणुं काय विधीची पूर्व घटनाच असते व त्याप्रमाणें तो मनुष्य त्या ठिकाणीं व त्या वेळीं क्रिया करतो अशी समजूत आहे. त्यावरून संचित व क्रियमाणाप्रमाणें परस्परांमधील जडत जाणारे संबंध. विशेषतः विवाहादि जडणाऱ्या संबंधाबद्दलहि हा शब्द प्रयोग वापरण्यांत येतो.

* **अन्न आच्छादन। हें तों प्रारब्धा अधीन ॥**—अन्नवस्त्र मिळणें हें परमेश्वराधीन आहे.–तुगा ३६२०.

अन्न कमी बहु मुलें सुख देऊन दुःख आणिलें—घरांत पुरेसें खावयास नसतां जर फार मुलें झालीं तर सुखाचा जीव दुःखांत टाकल्यासारखा होतो.

अन्न घातलें तर मानेचा कांटा मोडतो व डांग घातली तर उभा राहतो—ज्या मनुष्यास आपण खाऊं घालतो तो उपकारानें दबला जातो पण ज्यास आपण अपकार करतों (काठीनें मारतों) तो आपला द्वेष करूं लागून प्रतिकार करण्यास सज्ज होतो. तेव्हां शिक्षेपेक्षां उपकारानें शत्रूस नरम आणणें अधिक श्रेयस्कर. तु०—अन्नाचा मारलेला खालीं पाही तरवारीनें मारलेला वर पाही.

अन्नछत्रांतील स्वयंपाक आणि वेश्येचें सौंदर्य पाहिजे त्यानें लुटावें—ज्याप्रमाणें अन्नछत्रांत कोणीं जेवावें याबद्दल निर्बंध नसतो त्याप्रमाणें वेश्येकडे कोणीं जावें याबद्दलहि निर्बंध नसतो. एखादी गोष्ट कोणी करावी याबद्दल मुळींच धरबंध नसल्यास म्हणतात.

अन्नछत्रीं जेवणें आणि धर्मशाळेंत निजणें—१ अन्नसत्रांत जेवण्यास ज्याप्रमाणें कोणाची परवानगी लागत नाहीं त्याप्रमाणें धर्मशाळेंत निजण्यासहि कोणाची परवानगी लागत नाहीं. २ एखाद्या मनुष्यास घरदार, धंदा वगैरे कांहीं नसल्यास व कांहीं आगापिच्छा नसल्यास, अन्नछत्रांत जेवणें व धर्मशाळेंत निजणें, अशा तऱ्हेचा ज्याचा आयुष्यक्रम आहे त्यास म्हणतात.

अन्नछत्रीं (सत्रीं) जेवणें व मिरपुड मागणें—अन्नसत्रांत जर जेवावयाचें तर जें अन्न असेल तें निमूटपणें खाल्लें पाहिजे. आपल्या आवडी निवडी, मिजास वगैरे बाजूस ठेवलीं पाहिजेत. परंतु फुकट तर जेवावयाचें व पुन्हा मिजास दाखवावयाची, अशा फुकट्या मिजासखोरांसंबंधीं ही म्हण वापरतात.

अन्नछत्रीं जेवला समाधान नाहीं मनाला—दुसऱ्यानें घातलेल्या अन्नसत्रांत जेवणें म्हणजे दुसऱ्याचे उपकार घेणें होय; म्हणून स्वाभिमानी लोक अन्नसत्रांत जेवीत नाहींत व कधीं प्रसंग आला तर त्यांस तेथें जेवणें प्रशस्त वाटत नाहीं. तसेंच अन्नसत्रांतलें जेवण कितीहि चांगलें असलें तरी तें घरच्या जेवणाची बरोबरी करूं शकणार नाहीं. म्हणून घरच्या जेवणानें जी तृप्ति व्हावयाची ती अन्नसत्रांतील जेवण कितीहि चांगलें असलें तरी त्यानें मिळणें शक्य नाहीं.

अन्न जळ अंधारांत घेऊं नये—अन्न खाणें तें व पाणी पिणें तें नीट पाहून खावें प्यावें. अंधारांत किंवा नीट न बघतां कांहीं खाल्लें प्यालें तर त्यापासून अपाय होण्याचा संभव असतो.

अन्न ज्याचें खावें त्याचें उणें काढावें—ज्याच्या आश्रयावर एखादा मनुष्य वाढला असेल त्यानें त्याचे दोष काढणें कृतघ्नपणाचें आहे.

अन्न तारी अन्न मारी अन्नासारखा नाहीं वैरी—अन्नापासून शरीराचें पोषण होतें; पण तेंच जर भरमसाटपणें खाल्लें तर तें बाधून शरीरास अपाय करतें. तेव्हां अन्न हें जसें तारणारें आहे तसेंच तें अयोग्य उपयोग केल्यास मरणारेंहि आहे व त्यामुळें तें जसें मित्र आहे तसेंच कट्टर शत्रूहि आहे.

अन्नदाता सुखी भव—एक आशीर्वाद. आपण दुसऱ्याचें अन्न खाल्लें असतां त्यास सुख चिंतावें. 'अन्नदातेचि दिसती सर्व। कवणा म्हणावें सुखी भव।'—दावि ७.२.३३७.

अन्न पाठीवर ठेवणें त्यापेक्षां बरवें खाणें—पोटांत भूक असतां अन्न नुसतें पाठीवर ओझ्याप्रमाणें बांधून ठेवणें त्यापेक्षां खाऊन टाकणें बरें. एखाद्या गोष्टीचा उपयोग होणें शक्य व जरूर असतां तिचा उपयोग न करतां केवळ जपून ठेवणें हा मूर्खपणा आहे.

अन्नपाणी त्यजी शेराचीं भजीं—अन्नपाणी जात नाहीं म्हणावयाचें पण पुष्कळ भजीं मात्र चापावयाचीं; म्हणजे रोगाचें ढोंग करणें.

अन्नमय प्राण प्राणमय शक्ति शक्तीमय पराक्रम, अन्नमय प्राण प्राणमय पराक्रम—मनुष्यानें अन्न खाल्लें तरच त्याच्या अंगांत त्राण, जीव राहील व त्यास शक्ति येईल व शक्ति असेल तरच तो पराक्रम करूं शकेल. याप्रमाणें या सर्व गोष्टी अन्नावर अवलंबून आहेत.

अन्न मिळवितां येतें पण जिरवितां कठीण पडतें—पुष्कळदां अन्न मिळविणें सोपें जातें पण प्रकृति बरोबर नसेल तर तें पचविणें मनुष्याच्या हातांत नसतें. एखादी गोष्ट प्राप्त झाली तरी तिचा योग्य उपयोग करून घेतां आला तरच ठीक; नाहींतर तीपासून कांहीं फायदा नाहीं.

अन्न वस्त्र आणि पत उद्योगानें होय प्राप्त—उद्योग केला तरच मनुष्यास अन्नवस्त्र मिळतें व त्याची पत किंवा योग्यता वाढते.

अन्न सारें धन सोनें नाणें तीनपाव धन आणि ढोर गुरूं फुकट धन—प्रत्यक्ष अन्न हें खावयास उपयोगी असल्यामुळें तें केव्हांहि पूर्णपणें उपयोगांत येतें; सोनें नाणें जवळ असलें तरी वेळेवर तें विकावयास काढल्यास त्याची पाऊणपटच किंमत आपल्या पदरांत येते. गुरूं ढोर मात्र वेळेवर जवळ जवळ निरुपयोगीच ठरतें, कारण त्याची फारशी किंमत येत नाहीं. ब्राह्मणानें गाय वगैरे विकूं नये असाहि एक निर्बंध मानण्यांत येत असे, त्यामुळें गायढोर काढून टाकावयाचें झाल्यास फुकटच देऊन टाकावें लागे किंवा गायढोर जवळ असलें तरी त्यास खावयास घालण्यास जवळचा पैसा खर्च केल्याशिवाय त्यापासून लाभ होत नाहीं, म्हणून तें असून नसून सारखेंच. वेळेवर हमखास कांहीं उपयोगी पडूं शकत नाहीं. धान्य पहा.

अन्न हें जीविताचा आधार आहे—मनुष्यमात्रास जगावयास अन्न हें अत्यंत आवश्यक आहे. अन्नाशिवाय मनुष्य जिवंत राहूं शकत नाहीं. ‘ अन्नमय प्राण ’ पहा.

अन्नाचा मारलेला खालीं पाही तरवारीचा मारलेला वर पाही—एखाद्यावर आपण उपकार केलेले असले तर तो आपला मिंधा असतो; त्याची आपल्याकडे तोंड वर करून पाहण्याची छाती नसते. पण एखाद्यावर आपण अपकार केले असले तर तो नेहमीं आपला द्वेष करीत असतो, त्याचें उट्टें काढण्याची संधी पहात असतो. वर पहा.

अन्नाची वाण शरीराची घाण—शरीरास जर पुरेसें अन्न मिळालें नाहीं तर विकृति उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं तेव्हां शरीर नीट रहावयास पाहिजे असेल तर त्याच्या योग्य पोषणाची तजवीज केली पाहिजे.

अन्नानें देह जगतो पण मन जिवंत ठेवण्यास विचाराचा खुराक हवा—अन्न हें केवळ शरीराचें पोषण करतें पण मनाचा विकास व्हावयाचा असल्यास त्यास चांगल्या विचारांचें, वाचन, चर्चा, श्रवण वगैरेंच्या साहाय्यानें खाद्य पुरविलें पाहिजे नाहीं तर तें खुरटून जातें.

अन्नावर अन्न वस्त्रावर वस्त्र—एकसारखें खात असणें, वरचेवर खाणें व पुन्हा पुन्हा एकावर एक कपडे घालणें केव्हांहि अहितकारकच होय. मितसेवन हेंच परिणामीं हितकर होय.

अन्नासारखा लाभ (नाहीं) मरणासारखी हानि (नाहीं)—मनुष्यास अन्न हें अत्यंत आवश्यक असल्यामुळें वेळेवर अन्न मिळणें ही फार मोठी गोष्ट होय. तसेंच मरणानें झालेली मनुष्याची हानि कधींहि भरून येत नसल्यामुळें (इतर नुकसान वेळेनुसार भरून येऊं शकतें) ती हानि सर्वांत भयंकर होय.

अन्य——अन्य गोष्ट नाहीं समजली तोंवरी पहिली चांगली—जोंपर्यंत आपल्याला माहीत असलेल्या गोष्टीपेक्षां दुसरी अधिक चांगली दृष्टीस पडत नाहीं तोंपर्यंत तीच आपणाला फार उत्तम वाटते.

अन्यक्षेत्रे कृतं पापं पुण्यक्षेत्रे विनश्यति—जें क्षेत्र अत्यंत पवित्र आहे त्या ठिकाणीं इतर क्षेत्रांत केलेलें पातक नाहींसें होतें. परंतु पुण्यक्षेत्रांत केलेलें पातक कधींहि नष्ट होत नाहीं. ‘ अन्यक्षेत्रे कृतं पापं पुण्यक्षेत्रे विनश्यति । पुण्यक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यति ॥ ’

अन्यत्——अन्यत् किंचित् भविष्यति—यापेक्षां आणखी अधिक काय व्हावयाचें राहिलें आहे. ‘ जन्मप्रभृति दारिद्र्यं दशवर्षाणि बन्धनम् । समुद्रतीरे मरणमन्यत्किंचिद्भविष्यति ॥ ’

अन्यथा——अन्यथा करणें—हरकत करणें; खोटें पाडणें; विरुद्धाचरण करणें. ‘ यासी अन्यथा करूं अथवा पुढें कोणी आपले वंशपरंपरेचा होऊन अन्यथा करील त्यास श्रीची व कुलस्वामीची व आपल्या पूर्वजांची व गोब्राह्मणाची आण असे. ’—सनदापत्रें पृ. ११३.

अन्याय——अन्याय सांचले बोट ठेंचलें, अन्याय सांचेल बोट ठेंचेल—एका मागोमाग बऱ्याच अन्यायाच्या गोष्टी करीत गेल्यास प्रथम जरी त्याचें फळ मिळालें नाहीं तरी केव्हां तरी त्याबद्दल अद्दल घडतेच. कांहीं अन्यायाच्या गोष्टी पचल्या तरी अशा बऱ्याच गोष्टी घडल्या तर केव्हां तरी प्रायश्चित मिळाल्याशिवाय राहात नाहीं.

अन्यायाक कुन्यायु—(गो.) जशास तसें.

अन्यायोपार्जित तें (धन) सत्वर नासुनि सुखा लया नेतें—अन्याय्य मार्गानें मिळविलेली संपत्ति लवकरच नष्ट होते व ती आपणाबरोबर सुखहि घेऊन जाते. अन्यायानें मिळालेल्या पैशानें सुख प्राप्त न होतां दुःख मात्र अखेरीस अनुभवास येतें. —मोरो.

अपकार——अपकारीं उपकार करणें—दुसऱ्यानें जरी आपणांस अपकार केला तरी त्याचा बदला न घेतां त्यावर उपकार करावे हें सज्जनाचें काम आहे. ‘ उपकारिषु यः साधुः साधुत्वे

तस्य को गुणः। अपकारिषु यः साधुः स साधुः सद्भिरुच्यते॥'
–सुर ४६.४०

❀ **अपकार विसरावे उपकार स्मरावे**—दुसऱ्यानें आपणांस केलेले अन्याय विसरून जावे परंतु आपल्यावर कोणीहि उपकार केले तर ते मात्र विसरूं नये; यांतच मनाचा मोठेपणा आहे. तु०–Write injuries in dust, but kindness in marble.

अपकारास उपाय काय अपकार विसरून जाय—अपकाराचा प्रतिकार करण्याचा उत्तम उपाय म्हणजे तिकडे मुळींच लक्ष्य न देणें व त्याची उपेक्षा करणें हा होय.

अपकारीं देतां उत्तेजन तेणें होय दुजें नुकसान—एखाद्याला अपकार करण्यास उत्तेजन दिलें असतां दुहेरी नुकसान होतें. कोणाला तरी तो अपकार करतो त्याचें नुकसान होतें व यास अपकार करण्याची संवय लागते म्हणून त्याचेंहि नुकसान होतें.

अपकीर्ति——अपकीर्ति झाली असतां कठीण पडती सुधारतां—एखाद्या मनुष्याची एकदां बेअब्रू झाली म्हणजे त्याची स्थिति सुधारणें फार कठिण असतें. अब्रू ही कांचेसारखी आहे. जशी एकदां कांच फुटली म्हणजे पुन्हा सांधत नाहीं त्याप्रमाणें एकदां अब्रू गेली म्हणजे पुन्हा पत बसत नाहीं.

अपकीर्ति झाली जनीं तो अर्धा मेला मनीं—ज्या मनुष्याची लोकांत बेअब्रू होते तो मनांतल्या मनांत अर्धा मेल्यासारखा होतो; तो अत्यंत खजिल होऊन त्यास बाहेर तोंड दाखवावें असें वाटत नाहींसें होतें.

अपकीर्ति ही अमर असते—एकदां एखाद्या मनुष्याची दुष्कीर्ति झाली म्हणजे त्याच्या नांवावरील तो कलंक कधींहि पुसला जात नाहीं. त्या दुष्कीर्तीची विस्मृति लोकांस कधींहि होत नाहीं किंवा कितीहि मागाहून चांगलीं कृत्यें केलीं तरी मळलेली कीर्ति पुन्हा उजळ होत नाहीं.

अपकीर्तीतें भिणें अपकार न करणें—अपकीर्ति न होण्याबद्दल जपावें व कोणास कधीं दुखवूं नये; बाकी सारें करावें.

अपकीर्तीनें वांचणें याहून बरें मरणें—अपकीर्ति होऊन जगण्यापेक्षां मरण बरें. तु०–'न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः। विशुद्धस्य हि मे मृत्युः पुत्रजन्म समः किल॥ न भी तसा मी मरणासि देवा। या पाशबंधासहि वासुदेवा॥ न भी सुरांच्या जयवाद्य नादा। भीतों जसा मी अपकीर्ति वादा॥'—वामनपंडित—वामनावतार.

अपघात——अपघात करून धन मिळे पण उत्तम मान गळे—भलत्याच मार्गानेंहि संपत्ति मिळणें शक्य आहे पण अशा मार्गानें संपत्ति मिळविली तर आपणाविषयींचा आदर जनांत राहणें शक्य नाहीं.

अपटणें——लठ अपटणें—आपल्या शत्रूवर सूड उगविण्याच्या बुद्धीनें हातांतील काठी, सोटा वगैरे आपटून आपला क्रोध प्रगट करणें; शत्रूवर दांत ओठ खाणें; आदळ आपट करणें.

❀ **कोणी अपटला पोर कोणी अपटला भोपळा**—एकानें मूर्खपणाची गोष्ट केली म्हणून दुसऱ्यानेंहि त्यापेक्षां वरचढ मूर्खपणाची गोष्ट करणें. एका स्त्रीला बरींच मुलें होतीं परंतु तिच्या शेजारणीला मूल नसल्यामुळें तिचा तिला फार हेवा वाटत असे. एके दिवशीं पुत्रवती स्त्रीनें रागानें आपल्या मुलास खालीं आपटलें तेव्हां शेजारणीनें मूल नसल्यामुळें तिचें अनुकरण करण्याकरितां भोपळाच आपटला.

अपटी——अपटी देणें—गोत्यांत आणणें; अडचणींत घालणें; खालीं पाडणें; तोंडघशीं पाडणें. 'कठिण काळ मज प्राप्त जाहला, कपटी हरिनें अपटी दिधली'—अमृत ३८.

अपतिव्रता——अपतिव्रता मुसळ देवता—'अति पतिव्रता' पहा.

अपनष्ट—— अपनष्टपती आनि बाईल नासिल्ल्याक भुरगीं कितीं—(गो) जेथें बायकोच नाहीं तेथें मुलें कोठून होणार. यावरून, साधन नसतां कार्यसिद्धि इच्छिणें.

अपमान——अपमान गिळणें—मानहानि झाली असतांहि प्रतिकार न करतां अपमान सहन करणें. 'सायमनसत्कापुढें व त्याच्या अपमानगिळू सहकाऱ्यापुढें कोणीहि स्वाभिमानी मनुष्य पुरावा देणार नाहीं.'—अभ्युदय (३१–१०–१९२८)

❀ **अपमान अपकीर्ति हे उघड ठकाचे सोबती**—ठक मनुष्यास अपमान व अपकीर्ति हीं नेहमीं भोगावीं लागतात.

अपमानाची पोळी सर्वांग जाळी—अपमान करून एखाद्यानें खावयास घातलें असतां त्या अन्नानें शरीरास समाधान वाटावयाच्या ऐवजीं अतिशय संताप होत असतो. दुसऱ्यावर अवलंबून असणाऱ्या मनुष्यास केवळ जेवणाकरितां मानहानि पदोपदीं पतकरावी लागते; त्यापेक्षां तें जेवण नको असें होतें.

अपमानाची मोळी सर्वांगाची होळी—मनुष्याचा अपमान झाला असतां त्याच्या सर्व अंगाचा संताप झाल्याशिवाय राहात नाहीं.

अपमानाच्या पोटीं होती स्वातंत्र्याच्या भेटी—एखाद्या मनुष्याचा एखाद्या प्रसंगीं जेव्हां अपमान होतो तेव्हां त्यामुळें त्याला जी चीड येते तीमुळेंच तो प्रयत्न करण्यास प्रवृत्त होऊन अपमानाचें मूळ जें पारतंत्र्य तें झुगारून देतो. यामुळें स्वातंत्र्याची प्राप्ति होण्याचें मूळ कारण परतंत्रतेमुळें होणाऱ्या अपमानाची जाणीव हें होय. चाणक्याचा अपमान झाल्याबरोबर जसा त्यानें नंद राजांचा उच्छेद केला किंवा शिवाजीनें मुजरा करावयाचें टाळण्याकरितां स्वतंत्र राज्य स्थापलें त्याप्रमाणें अपमानाची चीड आलेला मनुष्य स्वातंत्र्याची आराधना करूं लागतो.

अपमानापासून धिक्कार धिक्कारापासून नाहीं विसर—आपला अपमान झाल्यास आपणास धिक्कार वाटूं लागतो व हें अपमानाचें शल्य मनांतून कधींहि जात नाहीं.

अपमृत्यु——**अपमृत्यूचा एखाद वेळ महामृत्यू होतो**—एखादा अपघात झाला असतां जर योग्य काळजी घेतली गेली नाहीं तर मरण ओढवतें.

अपयश——**अपयशाचें खापर फुटणें**—एखाद्याच्या चुकीबद्दल दुसऱ्यालाच प्रायश्चित्त भोगावयास लागणें, किंवा वाईटपणा येणें; दोषारोप येणें; अपयशाचें वांटेकरी होणें; अपयशाची जबाबदारी येणें; अपयश येण्याला निमित्तमात्र समजलें जाणें.

❀ **अपयशानें जगणें त्याहून बरवें मरणें**—अपयश आल्यानंतर जगावें असें वाटत नाहीं. अपेशी आयुष्य कंठण्यापेक्षां मृत्यु बरा असें वाटतें. 'अपकीर्तीनें वांचणें' इ. पहा. अपेश पहा.

अपराध——**अपराध पोटांत घालणें**—अपराध गिळणें; अपराधाची क्षमा करणें. 'अपराध सर्व माझे घाली पोटांत जोड मज दे ही।'—मोसभा ७.२; मो.अनंतव्रत ६७.

❀ **अपराध आणि वयोमिती सर्व थोडीच सांगती**—आपण केलेला अपराध तसेंच आपलें स्वतःचें वय कोणी स्वतः होऊन सांगत नाही.

अपराध कबूल केला म्हणून अर्धा दोष गेला—केलेला अपराध कबूल केला असतां त्यापासून लागणाऱ्या दोषापैकीं अर्ध्या दोषाचें निराकरण होतें. अपराध करून सवरून तो कबूल न करणें हें फार वाईट. पश्चात्तापेन शुद्ध्यति।

अपराध केला शिष्यानें आणि गुरूला आलें धरणें—शिष्यानें चूक केली तरी तीबद्दल गुरूस दंड केला पाहिजे; कारण गुरूनें जर शिष्यास नीट शिस्त लाविली तर त्याच्या हातून अपराध होणार नाहीं. तु०—१ शिष्यापराधे गुरुर्दण्ड्यः। २ राज्ञश्चामात्यजा दोषाः पत्नीदोषास्तु भर्तरि। तथाशिष्यार्जितं पापं गुरुः प्राप्नोति निश्चितम्॥

अपराध नसतां कांहीं क्षमेचें कारण नाहीं—जर अपराधच केलेला नसेल तर क्षमा मागण्याचें कारण नाहीं, किंवा क्षमा मागण्याची पाळीहि यावयाची नाहीं.

अपराधाची क्षमा करी मनांतलें न जाय तरी—जरी एखाद्यानें वरून अपराधाची क्षमा केली तरी त्याच्या मनांतलें किल्मिष कांहीं अजीबात दूर होत नाहीं.

अपराधाच्या ओळी नाहीं दिसत कपाळीं—एखाद्या मनुष्यानें अपराध केला असला तरी तो कांहीं त्याच्या कपाळाच्या रेघांत दिसत नाहीं. नुसत्या चेहऱ्यावरून कांहीं मनुष्य अपराधी आहे किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं.

अपराधीं सूड न घेणें त्वरित क्षमा करणें—अपराधाचा सूड घेण्यापेक्षां त्याबद्दल ताबडतोब क्षमा करणें हा थोरपणा आहे.

अपराध्यांची मंडळी तीच रक्षणीक टोळी—गुन्हेगारांची संख्या मोठी असली म्हणजे गुन्हेगार सांपडणें कठीण जातें. मोठ्या संघामुळें त्यांचें रक्षण होतें.

अपराध्यास नाहीं शासन हेंच त्यास आश्वासन—अपराध्याला योग्य शासन केलें नाहीं तर त्यास अधिक अपराध करण्यास उत्तेजन दिल्यासारखेंच होतें.

अपराध्यास शासन हेंच दुसऱ्यास शिक्षण—अपराधी मनुष्यास अपराधाबद्दल योग्य शिक्षा केली म्हणजे दुसऱ्यांस त्या उदाहरणावरून सहजच बोध मिळतो.

अपरीक्षित——**अपरीक्षिताला सर्व सोपें वाटतें**—ज्याला एखाद्या कार्याची मुळींच कल्पना नसते त्याला तें किती कठीण आहे याची कल्पना येणें शक्य नसतें.

अपहार——**अपहार बुद्धि ती लोभाची वृद्धि**—दुसऱ्याची वस्तु घेण्याची एकदां प्रवृत्ति झाली म्हणजे मनुष्याचा लोभ वाढत जातो. प्रथमतःच जर दुसऱ्याची वस्तु घेण्याची बुद्धि होऊं दिली नाहीं म्हणजे स्वाभाविकच लोभास आळा पडतो.

अपात्र——**अपात्रीं आदर मान टिकतांना कठीण**—ज्या मनुष्याची मुळांत योग्यता नाहीं अशा मनुष्याबद्दल आदर किंवा मान फार दिवस टिकून राहणें शक्य नाहीं.

अपात्रीं बक्षीस करणें अनुपकार करून घेणें—भलत्याच मनुष्याला बक्षीस दिलें असतां त्याला त्याची जर किंमत कळत नसेल तर त्याला त्याबद्दल उपकार तर वाटणार नाहींच पण तो आपल्यावर उलटेलहि.

अपाप——अपापाचा साल गपापा (जायचाच)—अयोग्य रीतीनें धन मिळविल्यास त्याचा अपव्यय होणें स्वाभाविक असतें. श्रम केल्याशिवाय वस्तु मिळाली म्हणजे तिची किंमत कळत नाहीं व ती फुकट जाण्याचा संभव असतो.

अपाय——अपाय करून घेणें मग उपाय शोधणें—आधीं संकट ओढवून घ्यावयाचें व मग त्यांतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करावयाचा, हा उपद्व्याप करण्यापेक्षां प्रथमच सावध राहून अडचणींत न सांपडणेंच बरें नव्हे काय ?

अपायीं उपाय करावा त्यापेक्षां तो होऊं न द्यावा—अपाय झाल्यावर मग त्यास उपाय करण्यापेक्षां प्रथम तो न होईल अशी काळजी घेणेंच जास्त श्रेयस्कर. संकट निवारण करण्यापेक्षां संकटास प्रतिबंध करणेंच अधिक चांगलें. तु०—Prevention is better than cure. प्रक्षालनाद्धि पंकस्य दूरादस्पर्शनं वरम् ।

अपुत्र—— अपुत्रस्य गृहं शून्यं— ज्या मनुष्याला पुत्र नाहीं त्याचें घर शून्य, ओसाड वाटतें. घरामध्यें लहान मुलासारखी आनंददायक वस्तु नाहीं. म्हणून बालकास गृहरत्न असें संबोधतात.

> अपुत्रस्य गृहं शून्यं दिशः शून्यास्त्वबांधवाः ।
> मूर्खस्य हृदयं शून्यं सर्वशून्या दरिद्रता ॥ ?

अपुत्रिकाचें अन्न खाऊं नये— निपुत्रिक असणें हें पूर्वजन्मींच्या पातकाचें फळ समजण्यांत येतें; याकरितां अशा मनुष्याच्या घरीं अन्न सेवन केलें असतां त्या पातकाचा संसर्ग आपणांस लागण्याचा संभव असतो. ह्मणून अशा गृहस्थाच्या घरीं अन्न घेऊं नये.

अपुरता——अपुरता घडा झोले खाई—भांडें अपुरतें भरलें म्हणजे तें डचमळतें. जो अर्धवट विद्वान असतो तो फार बडबड करतो. तु०—उथळ पाण्यास खळखळ फार. संपूर्णकुम्भो न करोति शब्दमर्धो घटो घोषमुपैति नूनम् । विद्वान्कुलीनो न करोति गर्वं जल्पन्तु मूढास्तु गुणैर्विहीनाः ॥ —सुर १७३'८७०. अधजल घघरी छलकत जाय ?

अपूर्ण——अपूर्ण घागरीस डबडब फार—विद्या थोडी असली म्हणजे बडबड फार असते. तु०—उथळ पाण्यास खळखळ फार. वर पहा.

अपूर्व——अपूर्व वस्तु घरीं ठेवतां कठीण भारी—एखादी अपूर्व वस्तु आपल्याजवळ असली तरी ती आपल्याजवळून कोण केव्हां नेईल यासंबंधीं आपल्याला फार काळजी असते व त्यामुळें ती फार जपून ठेवावी लागते.

अपेश——अपेश पावणें—अयशस्वी होणें; पराजित होणें; कार्याचा नाश होणें. ‘ज्याचें निष्ठेंत भंग नाहीं तो अपेश पावणार नाहीं.’ —पया २४६. अपयश पहा.

अपेशाचें खापर-टोपलें-मोटकुळें—कोणत्याहि कार्यांत अपयश आलें असतां त्याबद्दलचा दोष, जबाबदारी वगैरेस लक्षणेनें म्हणतात.

अपेशाचें खापर डोक्यावर फुटणें—अयशस्वी होणें; पदरीं अपयश घेणें; एखादी गोष्ट बिघडण्यास कारण होण्याचें निमित्त येणें.

अप्पलपोट्या—— अप्पलपोट्या गंगाळ उपट्या—केवळ स्वार्थ पाहणाऱ्या मनुष्याबद्दल योजतात.

अप्पे——अप्पे खंबका कीं फोंड मेज्जुका ?—(गो.) अप्पे (पुऱ्याप्रमाणें पक्वान्न, अनरसे) खाणार कीं कढईंतील फोंड (अप्यांचे साचे,) मोजणार ? [अप्पेबद्दल ‘हेलापे’ असाहि शब्द योजतात.]

अप्रिय——अप्रियस्यच पथ्यस्य श्रोता वक्ताच दुर्लभः, अप्रियस्यहि पथ्यस्य वक्ता श्रोताच दुर्लभः—१ तोंडापुरतें गोड बोलणारे मिळतात पण हितकर पण कडू लागणारें भाषण, उपदेश कोणी करीत नाहीं व ऐकतहि नाहीं. अशीं माणसें क्वचितच. १ सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियम् । अप्रियस्यच पथ्यस्य श्रोता वक्ताच दुर्लभः॥ २ सुलभाः पुरुषा राजन् सततं प्रियवादिनः। अप्रि......॥ ३ अप्रियस्यापिपथ्यस्य परिणामः सुखावहः । वक्ताश्रोताच यत्रास्ति रमन्ते तत्र संपदः ॥ —सुर १६४'४९७. ‘अप्रिय परि पथ्य असें वक्ता श्रोताहि दुर्लभ स्पष्ट । बहु सुलभ प्रियंवद जे वाढविती चुकविती न ते कष्ट ॥’—मोसभा ४'४२.

अफीण——अफीण भुताटकी गांजा बेदरकार आणि दारु मागे जुते पैजार—अफूचें सेवन केलें असतां भुताचा संचार झाल्याप्रमाणें मनुष्याची वागणूक होते, गांजा ओढला असतां मनुष्य बेपर्वाईनें वागूं व बोलूं लागतो आणि मद्य सेवन केलें असतां भांडणतंटा होऊन जोडाजोडीपर्यंत पाळी येते.

अफू——अफूची गुटी (घुटी) अंधळयाची मिठी—ज्याप्रमाणें एकदां अफूची गोळी घ्यावयाची संवय झाली म्हणजे ती कायमची राहते सुटत नाहीं त्याप्रमाणें अंधळया मनुष्यानें मिठी मारली म्हणजे ती सुटत नाहीं. अंधळया मनुष्यास कांहीं दिसत नसल्यामुळें एकदां मिळालेला आधार तो कांहीं झालें तरी सोडण्यास तयार होत नाहीं. कारण हा सुटल्यास दुसरा मिळेल अशी त्याची खात्री नसते. ‘अंधळयाची मिठी’ पहा.

अब——अबतो पत्थरके नीचे हात दबा है—एखादी

जबाबदारी अंगावर येऊन पडणें; एखाद्या कामांत अर्धवट गुंतणें; एखादा मनुष्य अडचणींत सांपडला असतां योजतात. दगडाखालीं हात सांपडणें.

अंबट—— **अंबट तोंड करणें**— मनुष्याची एखाद्या गोष्टींत निराशा झाली म्हणजे साहाजिकच त्यास विषाद वाटून त्याच्या चेहऱ्यावर विषण्णता येते, तेव्हां म्हणतात. यावरून निराश होणें; नाराज होणें; चेहरा उतरणें. 'महात्मा गांधींच्या स्वातंत्र्यकुचाच्या बातम्या ..... नोकरशाहीला अंबट तोंड करून वाचाव्या लागतात.'—केसरी २५.३.३०.

अंबट तोंड होणें-होऊन येणें-पडणें—निरुत्साह होणें; अपयशानें चेहरा म्लान होणें; चेहरा उतरणें; हताश होणें.

अंबट मागणें—अंबट खाल्ल्यानें चेहरा थोडासा उतरल्यासारखा किंवा शहारे आल्यासारखा दिसतो; तेव्हां आपण होऊन आपल्यावर अशा तऱ्हेचा चेहरा करून घेण्याची पाळी आणणें म्हणजे स्वतःच एखाद्या अपयशी गोष्टीस विनाकारण हात घालणें; आपल्या मागें नसतें कुलंगडें लावून घेणें; दुसऱ्याचें भांडण स्वतःवर ओढून घेणें, वगैरे.

अंबट मिसींग लावप—(गो.) तिखट मीठ लावणें; खुलवून सांगणें.

वई (हीं) वरून अंबट होणें—विवाहामध्यें बोहोल्याभोंवतीं मडक्यांच्या चार उतरंडी असतात त्यांस वही म्हणतात. विवाहानंतर त्यांतील दोन वराकडे व दोन वधूकडे रहावयाच्या असतात. तेव्हां सर्व विवाह समारंभ यथास्थित पार पडून वहीचीं मडकीं वांटून घेतांना वितुष्ट येणें. म्हणजे क्षुल्लक गोष्टीवरून वांकडें येणें.

*अंबट खाल्ल्याचश तांळयाकडेन जळता; आंबुस खाल्ल्यालें गळयांत कचरता—(गो.) अंबट खाल्ल्यावर घशांत जळतळतें. खाई त्याला खवखवें या अर्थी.

अंबटी-आमटी——**अंबटी नाटक मंडळी**—पौराणिक नाटक मंडळयांत अंबटी हा जेवणांतील विशेष प्रकार असे. त्यावरून तुच्छतादर्शक अशी वरील संज्ञा त्यांना मिळे. अशा मंडळयांतील नट बहुधा जेवणावारी काम करणारे असत.

अंबणें——**अंबत टाकणें**—दिरंगाईवर टाकणें; 'अंबत पडणें' पहा.

अंबत पडणें—एखादा पदार्थ करावयाच्या पूर्वीं त्याचें पीठ किंवा एखाद्या वस्तूचा मसाला मुद्दाम अंबत ठेवावा लागतो व त्यास पुष्कळ काळ किंवा दिनावधि लागतो. यावरून दीर्घसूत्रीपणानें चालणें; रेंगाळणें; भिजत पडणें वगैरे.

अंबलेला—१ हौस नसलेला; म्हाताऱ्याप्रमाणें असलेला. २ खिन्न; असंतुष्ट.

अबब——**अबब! केवढाहो नदीस पूर आला**—लटकें अश्रु गाळणें; खोटेंच दुःख प्रदर्शन करणें. तु०—Crocodile's Tears.

अंबर——**अंबर लुटणें**—अंबर म्हणजे धान्याचें कोठार. अंबर लुटणें म्हणजे पुढील काळाकरितां केलेली तरतूद सुद्धां नाहींशी करणें; उधळपट्टी करणें.

अबला——**अबला यत्र प्रबला**—ज्या ठिकाणीं स्त्रियांचें प्राबल्य असतें तेथें कारभार वाईट, अंदाधुंदीचा असतो. बाईलबुद्धया माणसाबद्दल म्हणतात. 'अबला यत्र प्रबला बालो राजा (शिशुरवनीतो) निरक्षरो मन्त्री। नहि नहि तत्र धनाशा जीवित आशापि दुर्लभा भवति॥'—सुर. १७०.७४७.-छच ३.

अंबाडी——**केसांची अंबाडी होणें-दिसूं लागणें**—अंबाडीचा वाख पांढरा असतो त्यावरून, केंस पिकल्यामुळें अंबाडी सारखे पांढरे दिसूं लागणें; केंस तेल वगैरे न लावल्यामुळें रुक्ष दिसूं लागणें.

अंबाडो——**अंबाडो म्हळयारि गिंबाडो म्हणता**—अंबाडा म्हटल्यावर गिंबाडा म्हणतो.

अंबारी——**अंबारींत बसणें**—अंबारी ही हत्तीवर ठेवतात व हत्ती बाळगणें हें उच्च वैभवाचें चिन्ह आहे. यावरून, वैभवास चढणें; मानसन्मान, अधिकार प्राप्त होणें.

(उलट्या) अंबारींत बसणें; उलट्या अंबारीनें राज्य करणें; उलटी अंबारी हातांत येणें—भिकेची झोळी ही उलट्या अंबारीसारखी दिसते; यावरून झोळी हातांत येणें, भीक मागावयास लागणें.

***अंबारींत बसे तो सर्वांस दिसे**—जो उच्चस्थानीं व प्रसिद्ध ठिकाणीं बसतो, तो सर्वांस दिसतो; त्याच्याकडे सर्व लोक कुतुहलानें पाहतात. वैभवास चढलेल्या मनुष्याकडे सर्व लोक कौतुकानें पाहतात.

अंबोण——**अंबोण दाखविणें**—गाय किंवा म्हैस वगैरेचें दूध काढावयाचें झाल्यास तिनें पान्हवावें म्हणून प्रथम तीपुढें अंबोण ठेवावें लागतें. त्याप्रमाणें एखाद्या मनुष्याकडून काम करून घ्यावयाचें म्हणजे त्यास प्रथम खूष करावें लागतें, त्याचा हात ओला करावा लागतो. यावरून लांच देणें; हात ओला करणें. 'साहेबांची भेट घ्यायची म्हणजे चपराशाला अंबोण दाखवावें लागतें.'

अबोलका——**अबोलका दिसतो तो खोल घातक**

असतो—जो मनुष्य पुष्कळ बोलणारा असतो तो मनांत कांहीं न ठेवतां सर्व बोलून मोकळा होतो; परंतु जो मनुष्य घुम्या असतो, फारसें बोलत नाहीं त्याच्या मनांत काय आहे तें कळत नाहीं, त्यामुळें तो आंतल्या गांठीचा असून वेळीं घात करण्यास कारण होण्याचा संभव असतो. तु०–Still water runs deep.

अब्रू——अब्रू घेणें—१ एखाद्याचा मान, प्रतिष्ठा हिरावून घेणें; अप्रतिष्ठा करणें. २ बलात्कार करणें; पातिव्रत्य भंग करणें.

अब्रू जाणें—नापत होणें; इज्जत जाणें; अप्रतिष्ठा होणें.

अब्रू गाड्यावरून जाणें––चालणें—लबाड्याविषयीं सर्वत्र कुप्रसिद्धि होणें, सर्वत्र बोभाटा होणें.—बाळ २·११.

अब्रूचे कांकडे—ज्याप्रमाणें एखाद्या वस्त्राचा कांकडा केला म्हणजे तो पेटविला कीं तें वस्त्र जळून जाऊन त्याचा नाश होतो त्याप्रमाणें जसें कांहीं अब्रूस आग लावणें म्हणजे अब्रूचा नाश करणें होय.—स्वप २८३.

ॐअब्रू गेल्यावरी परवा न धरी—मनुष्याला जोपर्यंत अब्रू आहे किंवा त्याला अब्रूची चाड आहे तोपर्यंत तो इतरांची परवा ठेवतो; पण एकदां अब्रू गेली म्हणजे तो बेफिकीर होऊन त्यास कोणाचीहि परवा धरण्याचें कारण राहत नाहीं.

अब्रू घेऊन जातें, तें प्राणावर येतें––ज्या गोष्टीमुळें अब्रू जाण्याचा संभव असतो ती गोष्ट प्राणघातकच समजली पाहिजे.

अब्रूनुकसानीच्या खटल्यांत आणखी अब्रू जाते––एखाद्या गोष्टीमुळें, किंवा कांहीं मजकूर प्रसिद्ध केल्यामुळें आपली अब्रूनुकसानी झाली म्हणून जर आपण फिर्याद केली तर पूर्वी जी गोष्ट फारशा लोकांस ठाऊक नसते ती खटल्यामुळें सर्व लोकांस जाहीर होते व अधिक तपशीलवारपणें लोकांस ठाऊक होते; यामुळें उलट आपली अधिक अप्रतिष्ठा लोकांत पसरते. याकरितां अशा गोष्टीचा बोभाटा करणें फारसें हितकर नाहीं.

अब्रूची चाड सर्वांस आहे—प्रत्येक मनुष्य आपली अब्रू सांभाळण्याचा प्रयत्न करीत असतो.

अभागी——अभागी धैर्यवान क्वचित् होतो—दुर्दैवी मनुष्यास आत्मविश्वास नसल्यामुळें त्याच्यानें वेळेवर धीटपणें वागणूक होण्याचा फारसा संभव नसतो. तो मनानेंच प्रथम कमकुवत झालेला असल्यामुळें त्याचा धीर खचून गेलेला असतो.

अभाग्य——अभाग्य सासळीतें गळीं मांस सदा मिळतें—जे मासे दुर्भागी असतात त्यांना गळाचें मांसच नेमकें दिसतें व त्यामुळें ते मांस खाण्यास गेले म्हणजे गळांत अडकतात. दैवहीन प्राण्यामागें संकटें लागलेलीं असतात.

अभाग्या हें काय करतोस? म्हणे कपाळ बडवून घेतों—जो मनुष्य दुर्दैवी असेल त्याच्या बाबतींत कपाळावर हात मारून घेण्यापेक्षां त्याचा कांहीं इलाज चालत नाहीं. दुर्दैवी मनुष्यानें कितीहि खटपट केली तरी शेवटीं अपयशच येतें.

अभाग्याचा द्रोण फाटका—ज्याप्रमाणें फाटक्या द्रोणांत कोणताहि पदार्थ ओतला तरी तो सांडून जातो, द्रोणांत कांहीं राहात नाहीं त्याप्रमाणें दुर्दैवी मनुष्यास कितीहि साहाय्य केलें तरी त्याचा त्याला कांहीं उपयोग होत नाहीं. तो नेहमीं विपत्तींतच राहतो.

अभाव——अभावाचें पोतें सव्वा हात रितें—(अभाव=मिथ्या कल्पना, केवळ अंदाज) एखाद्या गोष्टीबद्दल आपणांस मोठी चांगली कल्पना असावी पण प्रत्यक्ष पहावयास जावें तों आपला अंदाज अगदीं चुकीचा असल्याचें आढळतें. एखाद्याबद्दल उगीच खोटी आशा बाळगूं नये; नाहींतर आयत्यावेळीं फसगत होण्याचा संभव असतो.

अभावे ब्रह्मचर्य—ज्याला स्त्रीच नाहीं म्हणजे ज्याचें लग्नच झालेलें नसतें तो अर्थातच ब्रह्मचारी राहतो. त्यांत त्याचा ब्रह्मचर्य व्रत घेण्याचा हेतु असतो असें नव्हे, तर बायको मिळत नाही म्हणून ब्रह्मचर्य त्यावर लादलेलेंच असतें. तु०–तुरग–ब्रह्मचर्य. यावरून जी वस्तु मिळत नाहीं तद्बिद्दल निरिच्छपणा दाखविण्यांत कांहीं मोठेपणा नाहीं.

अभाळ——अभाळ कोसळणें—अभाळ सर्व गोष्टींवर छत्रासारखें आहे; तें खालीं आलें तर सर्व गोष्टींचा चुराडा होणार हें निश्चित. यावरून एखादी भयंकर आपत्ति येणें; दुर्दैव ओढवणें.

अभाळ खराळणें—अभाळांत जोराचा गडगडाट होणें, हें पावसाचें पूर्वचिन्ह आहे. यावरून, कांहींतरी मोठी गडबड होणें; घोटाळा होणें; मोठी कलागत वगैरे लागणें.

अभाळ डोक्याला लागणें—दोन बोटें उरणें–ठसठसा लागणें–ठेंगणें दिसणें–ठेंगणें होणें–टेंकणें—एखाद्या मनुष्यास वैभव वगैरे प्राप्त झालें म्हणजे आपण फार उच्च पदास चढलों, जणूं कांहीं उंच झालों असें त्यास वाटूं लागतें व त्यामुळें अभाळ हें सर्वांत उंच असूनहि त्याला आपण त्यापेक्षांहि उंच झालों असें वाटूं लागतें. यावरून अतिशय ताठा वाटणें;

फुगणें; अभिमानानें गर्विष्ठ होणें व इतर जगास तुच्छ लेखणें.

अभाळ फाटणें—मोठें अरिष्ट गुदरणें; सर्व बाजूंनीं एकदम संकटें येणें. तु०—अभाळ कोसळणें.

अभाळ येणें—सूर्यप्रकाश स्वच्छ पडला असतां जर आकाशांत ढग आले तर एकदम काळोख पडून कांहीं दिसेनासें होतें व चालू व्यवहारास अडथळा होतो व पाऊस येईल असें वाटूं लागतें. यावरून एखादें संकट येणें; एखादी आपत्ति गुजरणें.

अभाळाखालीं-तळीं—पृथ्वीच्या पाठीवर; सर्व जगांत कोठेंहि.

अभाळाचा गंड—ढगांची दाटी, गर्दी; मेघडंबर.

अभाळाचा गाळ—ढग; मेघ; अभ्र; मळभ.

अभाळाची सावली—[अभाळ = अभ्र, मेघ, ढग.] उन्हाच्या वेळीं आकाशांत ढग आले म्हणजे त्यांची खालीं सावली पडते; पण ढग हे क्वचितच स्थिर असतात, वाऱ्याच्या झुळकीबरोबर ते वाहून जातात व त्यामुळें खालची सावलीहि निघून जाते. यावरून अनिश्चित, क्षणिक टिकणारी गोष्ट; पाण्यावरील बुडबुडा; अभ्रछाया. 'अभ्रछाया खलप्रीतिर्नवसस्यानि योषितः । किंचित्कालोपभोग्यानि यौवनानि धनानिच ॥'—सुर-१५६·१५१. 'अभ्रच्छाया तृणाग्निश्च खले प्रीतिः स्थले जलम् । वेश्यासक्तिः कुमित्रं च पडेते बुद्बुदोपमाः ॥'—सुर १६०.३२.

अभाळावर अभाळ येणें—आपत्तीमागून आपत्ति येणें; एकामागून एक संकटें येणें.

अभाळावर चढणें—१ आढ्यतेखोर होणें; अतिशय गर्विष्ठ होणें; अरेराव बनणें. २ भलताच हट्ट धरणें; चढेलपणा करणें; वरचढपणें भलत्याच अधिकाधिक मागण्या करीत राहणें.

अभाळावर थुंकणें—अभाळाकडे तोंड करून थुंकलें असतां ती थुंकी आपल्याच अंगावर पडण्याचा संभव असतो. यावरून १ बाजू उलटेल असें कृत्य करणें; सूर्यावर थुंकणें; व्यर्थ खटपट करणें. २ मोठ्या मनुष्यास दूषण देऊन आपलें हंसें करून घेणें.

अभाळाशीं भांडणें—१ अभाळाशीं स्पर्धा करणें; अतिशय उंच वाढणें, होणें; गगनचुंबित असणें. २ निष्कारण कलह करणें; वाऱ्याबरोबर भांडणें.

अभाळास भोंक पडणें—मुसळधार पाऊस पडणें; अतिवृष्टि होणें.

❀**अभाळ गडगडण्याला भीत नाहीं तो सूप फडफडण्याला काय भिणार ?**—मोठमोठ्या आपत्ति किंवा संकटें आलीं तरी जो डगमगत नाहीं तो बारीक सारीक अडचणींची काय परवा करतो ?

अभाळ फाटलें तर ठिगळ कशाचें लावणार? कोण लावील? अभाळ फाटलें तर ठिगळास काय द्यावें?—एकदम फार मोठी आपत्ति आली तर तिचें निवारण करतां येणें शक्य नसतें. 'अभाळ फाटलें तेथें ठिगळ कोठवर लावावें ?'—भाव ११८.

अभाळाला अंत नाहीं, वेश्येला धनी नाहीं—अभाळ हें जसें अमर्याद पसरलेलें आहे, त्याला निश्चित मर्यादा आढळत नाहीत, त्याप्रमाणें वेश्येचा निश्चित मालक आढळत नाहीं; तो वरचेवर बदलत असतो. या दोन्हीहि गोष्टी अनिश्चित किंवा अमर्याद असणार.

अभाळावर थुंके तो आपल्या तोंडावर थुंके—अभाळाकडे तोंड वर करून थुंकलें असतां ती थुंकी आपल्याच तोंडावर पडते; यावरून आपल्या योग्यतेहून श्रेष्ठ अशा किंवा फार पूज्य अशा व्यक्तीची निंदा केल्यास तीपासून आपलाच क्षुद्रपणा मात्र व्यक्त होतो. तु०—आकाशका थूका मुंहमे आता है.

अभिमान——अभिमानाखालीं जाणें—गर्वामुळें नुकसान सोसावें लागणें; कोणतीहि गोष्ट गर्विष्ठपणानें करूं जाणें; आपल्या अंगीं असलेल्या सत्तेच्या वगैरे मदानें धुंद होऊन एखादें कृत्य करण्यास पुढें होणें व कदाचित् शेवटीं स्वतःची हानि करून घेणें.

अभिमानानें मरणें—गर्वामुळें अतिशय नुकसान होणें; गर्वामुळें मृत्यु ओढविणें. मनुष्य एकदां अभिमानास पेटला म्हणजे स्वतःचें नुकसान होत असलेलें दिसत असतांहि एखाद्या कृत्यापासून निवृत्त होत नाहीं व कोणाचें ऐकण्याच्याहि स्थितींत तो नसतो व यामुळें हळूहळू नाश होण्याच्या मार्गास लागतो.

अभिमानास पेटणें-पडणें—ईर्षेस चढणें; ईरेस पडणें; गर्वामुळें एखाद्या गोष्टीबद्दल हट्टास पेटणें.

❀**अभिमान आणि अज्ञान, तरुणपणीं नासाडी जाण**—मनुष्य तरुण असतो तेव्हां त्याच्या ठिकाणीं तारुण्यसुलभ असा एक प्रकारचा गर्व असतो व त्यास फारसा जगाचा अनुभव नसल्यामुळें विशेष शहाणपणाहि आलेला नसतो. अशा स्थितींत त्याचें नुकसान होणें साहजिक आहे. जो निगर्वी व शहाणा असेल त्याचें नुकसान होणार नाहीं.

अभिमान कार्याकारितां धरितो वारंवार नम्रता—आपलें कार्य साधण्याकरितां अभिमानी मनुष्यहि योग्य प्रसंगीं लीनता

धारण करतो.

अभिमान देवाला साजे, मनुष्याचे फुकट गाजेवाजे—परमेश्वर हा सर्वसत्ताधारी असल्यामुळें त्याला अभिमान शोभून दिसेल पण मनुष्यानें वृथा अभिमान बाळगण्यांत काय अर्थ? त्याला आपल्या हातीं सत्ता आहे असें वाटलें तरी ती क्षणभंगुर असते, चिरकालिक नसते; तेव्हां त्यानें तीबद्दल अभिमान बाळगणें हा व्यर्थ गाजावाजा आहे.

अभिमान वैरी वाढवी, मित्रजना दूर करवी—मनुष्याला फार गर्व झाला म्हणजे तो आपल्या मित्रांशीं भांडण करतो व निष्कारण शत्रु उत्पन्न करतो.

अभिमान स्वदोष लपवितो, दुजयाचा प्रकट करितो--अभिमानी मनुष्याला स्वतःचे दोष दिसत नाहींत पण दुसऱ्याचें उणें काढण्याची मात्र प्रवृत्ति फार होते.

अभिमानाची दीड कानाची—दीड कान म्हणजे एक कान लांब व दुसरा आंखुड असणें; हें कांहीं सौंदर्याचें लक्षण नव्हे. पण एखाद्या स्त्रीला खरोखर तितकें सौंदर्य नसूनहि आपल्या सौंदर्याचा फार गर्व असतो अशा स्त्रीस अनुलक्षून ही म्हण वापरतात. मुळांत कारण नसतां व्यर्थ गर्व बाळगणाऱ्यास ही म्हण लागू पडते.

अभिमानाचें घर खालीं--गर्विष्ठ मनुष्यास नुकसान सोसावें लागतें; गर्विष्ठ मनुष्याचा केव्हां तरी पाणउतारा होतोच.

अभिमानाचें पारणें स्वर्गांत सुटतें—एखाद्या मनुष्यास सामर्थ्याबद्दल वगैरे फार गर्व वाटूं लागला म्हणजे तो मरणापर्यंत बहुधा सुटत नाहीं; ती गर्विष्ठ वृत्ति त्याच्या अंगीं आमरण राहते. मरणोत्तरच तीपासून त्याची सुटका व्हावयाची.

अभिमानाचे मागोमाग, द्वेष करतो पाठलाग—मनुष्याला गर्व झाला म्हणजे तो इतरांचा द्वेष करूं लागतो.

अभिमानें संकटें येती, दिमाखानें आशा भंग होती—मनुष्य गर्विष्ठ असला म्हणजे स्वतःवर संकटें ओढवून घेतो. फार आढ्यता दाखवावयास गेलें म्हणजे पुष्कळदां मनोरथ सिद्धि न होतां निराशा पदरांत पडण्याचा संभव असतो.

अभ्यंग——अभ्यंगस्थानीं पूजिला, गाढव पळे रस्त्याला—गाढवाला जरी अभ्यंगस्नान घातलें तरी तें लागलेंच रस्त्यावर धुळींत लोळतें. घाणेरड्या मनुष्याच्या गलिच्छ संवयी जन्मभर जात नाहींत. तु०—हस्तीतें धुतलें जळीं बसविलें मालिन्य हि नासलें। तेणें तें पहिलें स्वकर्म वहिलें तीरींच आरंभिलें। शुंडाग्रें धरिलें धुळीस भरलें सर्वांगहि आपुलें। प्रायश्चित्त दिलें तथापि न भलें ज्याचें मन क्षोभलें॥

अभ्यास——अभ्यासाखालीं पडणें—सरावाचें होणें; नेहमींच्या संवयीचें होणें—असणें; एखाद्या गोष्टीची संवय होणें; ती गोष्ट परिचित होणें.

❀अभ्यास करील त्याची विद्या, जपेल त्याची लक्ष्मी, खपेल त्याचें शेत व मारील त्याची तलवार—विद्या ही अभ्यासानेंच प्राप्त होते, द्रव्यसंचय हा योग्य तऱ्हेची पैशाची काळजी घेतली तरच होतो, कष्ट केले तरच शेतांत पीक येतें व लढाई केल्यानेंच शौर्य प्राप्त होतें.

अभ्याससारिणी विद्या--अभ्यास केला तरच विद्या प्राप्त होते. 'सत्यानुसारिणी लक्ष्मीः कीर्तिस्त्यागानुसारिणी। अभ्याससारिणीविद्या बुद्धिःकर्मानुसारिणी '॥ – सुर १५७.१८८.

अभ्यासें अभ्यास वाढतो, आळसानें आळस वाढतो—काम करण्याची किंवा कष्ट करण्याची संवय केली म्हणजे काम करण्याचा सरावहि वाढतो व कष्ट वाटतनासे होतात. उलट आळसानें ऐदीपणाची संवय मात्र वाढत जाते.

अभ्र——अभ्रच्छाया—अभाळाची सावली ही क्षणभंगुर असते व सूर्याच्या किंवा वाऱ्याच्या गतीनें वरचेवर बदलते. ती प्रमाणें क्षणिक टिकणारी गोष्ट. अभाळ पहा.

अमर——अमरपट्टा घेणें—[पट्टा=दस्तऐवज, करारपत्र, खत. अमरपट्टा=मरण नाहीं अशाबद्दलचें (देवाचें) आश्वासनपत्र हें कधीं मिळत नसतें. यावरून] मरण हें येणारच, चुकणार नाहीं. 'परमेश्वराकडून कोणी अमरपट्टा घेऊन आला नाहीं.'

❀ **अमर वाचल्यारि पंडितु जायना**-(गो.)केवळ अमरकोश वाचल्यानें पंडित होत नाहीं.

अमरसिंग तो मरगये भीक मागे धनपाळ। लक्ष्मी तो गोंवऱ्या वेंची भलेंबिचारे ठणठणपाळ॥—'लछमी तो गोबर वेचे भीक मागे धनपाळ। अमरसिंग तो मरगये भला बिचारा ठंठपाळ॥' असाहि पाठ आहे. एका मनुष्याचें नांव ठणठणपाळ असें होतें म्हणून त्यास फार वाईट वाटत असे. एके दिवशीं तो प्रवासास निघाला असतां एका गांवीं गेला. तेथें वाटेंत त्यास एक स्त्री भेटली. तिचें नांव विचारतां तिनें लक्ष्मी असें सांगितलें. पण ती प्रत्यक्ष शेण विकीत चालली होती (किंवा गोंवऱ्या वेंचीत होती) तेव्हां त्यास आश्चर्य वाटलें. कांहींसा पुढें गेल्यावर त्यास एक मनुष्य भीक मागतांना आढळला; तेव्हां त्याचें नांव विचारतां त्यानें धनपाळ असें सांगितलें. पुढें कांहीं अंतर गेल्यावर त्यास समोरून एक प्रेतयात्रा येतांना दिसली. चौकशी करतां मृताचें नांव अमरसिंग

असल्याचें कळलें. याप्रमाणें सर्व नांवाच्या उलट प्रकार पाहून त्यास आपल्या नांवाबद्दल विषाद वाटत नाहींसा झाला. यावरून चांगलें नांव असून परिस्थिति उलट असण्यापेक्षां नुसतें नांवच वाईट असलें म्हणून काय झालें ? तेव्हां नुसत्या नांवांत कांहीं अर्थ नाहीं.

अमर्याद——**अमर्यादेनें मौजा मारिती, होय पापाची भरती**--जो मनुष्य योग्य मर्यादेच्या बाहेर चैन करतो त्याच्या हातून पापाचरण घडल्याशिवाय रहात नाहीं.

अमल——**अमल करणें, अमलपाणी करणें**—मादक पदार्थ खाऊन त्याच्या कैफांत गुंग असणें; अमली पदार्थांचें सेवन करण्याची संवय असणें; व्यसन असणें.

अमल गाजविणें—अधिकार चालविणें; सत्तेचा उपयोग करणें.

अमलांत आणणें—१ (निवाडा, ठराव, हुकूम वगैरेची) तामिली करणें; लागू करणें; उपयोगांत आणणें; चालू करणें. २ (गांव, प्रदेश वगैरे) ताब्यांत घेणें; सत्तेखालीं आणणें.

अमित——**अमित इच्छा न धराव्या, आपुले अंगीं जिरवाव्या**—मनुष्यानें अनेक गोष्टींची हांव धरूं नये, कारण मनुष्याच्या सर्वच इच्छा सफळ होतात असें नाहीं. तेव्हां कांहीं इच्छा मनांतच दाबून ठेवाव्या हें चांगलें.

अमृत——**अमृतसिद्धि योग**—१ हस्त, श्रवण (मृग), अश्विनी, अनुराधा, पुष्य, रेवती व रोहिणी या नक्षत्रांचा क्रमानें रविवार, सोमवार मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार व शनिवार या वाराशीं योग. हा शुभ मानतात. ' आदित्य हस्ते गुरुपुष्ययोगे बुधानुराधा शनि रोहिणीच । सोमेच श्रवणम् (सौम्यं=मृग) भृगुरेवतीच भौमाश्विनीचामृतसिद्धियोगः ॥' २ (ल.) शुभकाल.

अमृत घ्यावया निरोग दिवस नलगेचि—अमृत हें सर्वच रोगांचा नाश करतें; तेव्हां अमृत घ्यावयाचें असलें व अंगांत रोग असला तर तो अमृत घेतल्यानें बरा होईलच. तो बरा होण्याची वाट पहात राहून अमृत घेण्याचें दिवसगतीवर टाकण्यांत अर्थ नाहीं.–दावि ७.२.३३७.

अमृतं शिशिरे वन्हिः—थंडीच्या दिवसांत विस्तव शेकावयास मिळणें ही गोष्ट अमृत खाण्याइतकीच आल्हाददायक आहे. १ अमृतं शिशिरे वह्निरमृतं बालभाषणम् । अमृतं स्वप्रिया भार्या ह्यमृतं स्वामिगौरवम् ॥ २ अमृतं शिशिरे वन्हिरमृतं प्रियदर्शनम्। अमृतं राजसंमानममृतं क्षीरभोजनम् ॥ – सुर १६४.७०८.

अमृतं क्षीरभोजनं—खिरीचें जेवण हें अमृत खाण्यासारखें आहे. खीर किंवा दूध हें मनुष्याच्या शरीरास अत्यंत आरोग्यदायक असें खाद्य आहे. वर पहा.

अमृताचें जेवण आणि मुताचें आंचवण—आरंभीं अतिशय उत्तम गोष्ट करून शेवट वाईट करणें. आरंभाला फार मोठेपणा पण शेवटीं क्षुद्रपणा.

अमृतकळा——**अमृतकळा बसणें**—[अमृतकळा = गालफड] गालफडें बसणें; तोंडावरील तेज नाहींसें होणें; प्रेतकळा येणें; मृत्यूची वेळ समीप येणें.

अमोल——**अमोल काया जाईल वाया**—मनुष्याचें शरीर हें अतिशय मौल्यवान असूनहि क्षणभंगुर आहे. याकरितां जोंवर देह सुदृढ आहे तोंपर्यंत कोणतेंहि कार्य करावें. ' अमोल काया जाईल वाया जशी कांच की फुटे पटकन् '–अमृतराय.

अम्ल——**अम्लपंचक**—१ कोल, २ डाळिंब, ३ चिंच (वृक्षाम्ल), ४ आंचोती (चुक्रिका), ५ अम्लवेतस.

अयना——**अयनाचे बैना आणि घेतल्यावांचून जाईना** – ऐना पहा.

अयुक्त——**अयुक्तवाणी धनवंताची वंदिती, निंदिती पंडिताची**—श्रीमंत मनुष्यानें अयोग्य भाषण केलें तरी लोक त्याची वाहावा करतात. परंतु एखाद्या पंडितानें जर अयोग्य भाषण केलें तर त्याची मात्र निंदा झाल्यावांचून रहात नाहीं, एवढेंच नव्हे तर कधीं कधीं त्याच्या योग्य भाषणासहि लोक नांवें ठेवतात. धनवानाचें कांहींहि चालतें. तु०- अयुक्तं स्वामिनोयुक्तं युक्तं नीचस्य दूषणम् । खालीं पहा.

अयुक्तं स्वामिनो युक्तं युक्तं नीचस्य दूषणम् । —श्रीमंत जरी वाईट बोलला तरी तें चांगलेंच. धन्यानें अयोग्य भाषण केलें तरी योग्यच मानलें जातें. परंतु गरीब मनुष्यानें योग्य भाषण केलें तरी तें वाईट लागतें. श्रीमंतांस कांहींहि शोभतें व गरीबास योग्य वस्तुहि दूषणप्रद होते. राहूला अमृत प्राशनामुळें मृत्यु आला व विष हें शंकराच्या ठिकाणीं कंठांतील नीलिम्यामुळें भूषणास्पद मानलें जाऊं लागलें. अयुक्तं स्वामिनो युक्तं युक्तं नीचस्य दूषणम् । अमृतं राहवे मृत्युर्विषं रुद्रस्य भूषणम् ॥ –सुर १५८.२२८.

अयोग्य——**अयोग्यतेनें प्रतिष्ठा मिळविली ती अपराधाविना जाती**—योग्यता नसतां जर एखाद्या मनुष्यास प्रतिष्ठा मिळाली तर ती त्याच्या हातून कांहीं चूक झाली नाहीं तरीसुद्धां आपोआपच जाते.

अय्या——अय्या सव्वाशेर लिंग धडाभर—लिंगायत लोकांस सामान्यतः अय्या या नांवानें संबोधतात. लिंगायत लोक गळ्यांत शिवलिंग चांदीच्या करंड्यांत वगैरे घालून वापरतात. असें लिंग वापरणाऱ्याच्या शरीराच्या मानानें फार मोठें असेल तर तें विशोभित दिसतें. यावरून मुख्य गोष्टीपेक्षां गौण गोष्ट जर आकारानें वगैरे मोठी असेल तर तें विशोभित होतें. तु०-अंगापेक्षां बोंगा. -केसरी १४.३.३९.

अय्ये——अय्ये तेरावो मोणुयी जालो, घारी खेल्ली मोणुयी जाली—(गो.) आजीचा तेरावा म्हणून झाला व घारी खाल्ल्या म्हणूनहि झालें. आजीचा तेरावा (और्ध्वदैहिकांतील) केल्याचें व त्याबरोबरच घारी (घार पक्वान्न) खाल्ल्याचेंहि समाधान एकदम मिळणें. तु०-एका दगडानें दोन पक्षी मारणें; जांवई न्हाला वाफा शिंपला.

अय्यो——अय्यो म्हळ्यारी अघोर पातक—(गो.) अरेरे! म्हटलें तर अघोर पातक. तु०-हैक्कू म्हणतां ब्रह्महत्त्या.

अरड——अरड काढणें-घेणें—१ एखाद्याची हजेरी घेणें, खरवड काढणें. २ खूप तासडपट्टी करणें. ३ अतिशय त्रास देणें; हाडें घुसळणें; फार कष्ट देणें.

अरड निघणें—अतिशय दमणें थकणें; जोर गमावणें; गळणें; सत्त्वहीन होणें; श्रांत होणें.

जीव अरडींदरडीं घालणें-पाडणें—साहस करणें; अतिशय कष्ट करणें; संकट ओढवून घेणें; त्रास सहन करणें.

जीव अरडींदरडीं पडणें—संकटांत सांपडणें; पेंचांत येणें; अडचणींत सांपडणें.

अरण्य——अरण्यपंडित—जेथें मुळींच मनुष्यवस्ती नाहीं अशा ठिकाणीं ज्याची विद्वत्ता दिसते असा मूर्ख मनुष्य. "असे अरण्यपंडित इंग्लंडांत गेल्यावर 'एरंडोपि द्रुमायते' या न्यायानें तेथें मान पावतात."-नि.

अरण्यरुदन-रुदित-रोदन— (अरण्यांत रडलें तर कोण ऐकतो! यावरून) निष्फळ ओरड; व्यर्थ खटाटोप. 'अशा अल्पमति लोकांना ताळ्यावर आणण्याची खटपट करणें म्हणजे अरण्यरोदनवत् आहे.' -निबंधचंद्रिका.

अरण्यरुदन करणें—भलत्याच ठिकाणीं गाऱ्हाणीं सांगणें; निष्फळ ओरड.

अरण्यरोदन न्याय—अरण्यांत रडलेलें ओरडलेलें कोणाला ऐकूं जाणार? तें निष्फळ होतें. यावरून निष्फल गोष्ट करणें.

अरण्यसेवन करणें—पळून जाणें; दशदिशा होणें; परागंदा होणें. 'अरण्य सेविलें त्यांचे मागे लागलें असतां आपलें थोरपण महत्त्व तें काय?' -शिवदिग्विजय ५९.

***अरण्यहंसिणीचे पोटीं, पिलें होत नाहींत गांवठी—**जशी भूमि असेल तसें पीक येईल. रानहंसीला पिलें व्हावयाचीं तीं तिच्याप्रमाणेंच होणार. तीं गांवठी हंसीच्या पिलांसारखीं कशीं होतील? जसें बीज तसा अंकुर.

अरत्र——अरत्र ना परत्र—धड इकडे ना तिकडे; धरसोडीची स्थिति. 'तेथें अरत्र ना परत्र। कांहींच नाहीं॥' —दा ५.३.४

अरबा——अरबा पिऊन जाणें-पिणें-सोसणें—१ तोफांचा भडिमार सहन करून आंत घुसणें, पुढें जाणें, चाल करणें. तोफांच्या माऱ्यास न जुमानतां हल्ला करणें. २ त्वेष, राग, आवेश सहन करणें, सोसणें.

अरबाणा——अरबाण्यांत असणें-चालणें-राहणें-वागणें—आज्ञेंत, कह्यांत असणें; निर्बंधांत असणें.

अरबाण्यांत नसणें, अरबाण्यांतून जाणें—आज्ञेंत नसणें; आटोक्याबाहेर जाणें.

अरबी——अरबी तगादा—अरबी शिपायांकडून केलेला, लावलेला तगादा; अत्यंत निकडीची सक्तीची, जोराची मागणी. पेशवाईमध्यें विशेष सक्तीचा तगादा करावयाचा असल्यास अरब पाठविण्याची पद्धति असे. अरब हे परकीय असून सर्वस्वी मालकावर अवलंबून असल्यामुळें त्यांस इतरांची भीड मुरवत नसे व तगाद्याप्रमाणें काम केल्याशिवाय ते परत येत नसत.

अरसिक——अरसिकेषु कवित्व निवेदनं—ज्याला ज्याची गोडी नाहीं त्याच्या पुढें तें सांगावयास लावणें म्हणजे मोठी शिक्षाच आहे. गाढवा पुढें गीता वाचल्याप्रमाणें तें होतें. 'इतर कर्मफलानि यदृच्छया विलिख तानि सहे चतुरानन। अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मालिख मालिख मालिख॥' हे ब्रह्मदेवा! माझ्या पापांबद्दल वाटेल ती शिक्षा कर पण अरसिकाच्या पुढें काव्य निरूपण करण्याची तेवढी शिक्षा देऊं नकोस, असा आशय.

अरिष्ट——अरिष्ट आलियावरी तत्क्षणीं प्रगट करी—एखादें संकट किंवा आपत्ति आली असतां ती ताबडतोब उघडपणें सांगणें चांगलें; म्हणजे कांहींतरी त्वरित उपाय तरी करतां येतो. नाहींतर ती चोरून ठेवल्यास उशीर होऊन उपाय करण्याची वेळहि निघून जाण्याचा संभव असतो. तु०-Never conceal an accident.

अरिष्टांत पडणें मग बुडणें किंवा तरणें—आपण होऊन एकदां एखादी जबाबदारी पतकरली किंवा संकट ओढवून

घेतलें, मग त्याचा काय बरा वाईट परिणाम होईल, यश किंवा अपेश येईल तें भोगावयास सिद्ध झालेंच पाहिजे. तु०—In for a penny, in for a pound.

अरिष्टांतून पार पडणें, तोचि जिवाचा लाभ होणें—एखाद्या जीवावर बेतलेल्या संकटांतून सहीसलामत सुटणें म्हणजे पुनर्जन्म होण्यासारखेंच आहे.

अरुंधती——अरुंधतीदर्शन न्याय—अरुंधती ही सप्तर्षी-जवळ एक तारका आहे. ती फार लहान असल्यामुळें तिच्या अगदीं निकट असलेला वसिष्ठ हा तारा प्रथम दाखवून नंतर अरुंधतीची तारका त्याच्या अनुरोधानें दाखविण्यांत येते. यावरून एखाद्या मोठ्या गोष्टीवरून तिच्याशीं संलग्न लहान गोष्टीचा बोध करून देणें. तु०—शाखाचंद्रन्याय.

अरे——अरे अरे करणें—एखादी गोष्ट करूं नको म्हणून सांगणें; मना करणें; ताकीद देणें.

अरे जारे बोलणें-म्हणणें-चालणें-मांडणें—उद्धटपणा, उर्मटपणा वगैरे दाखविणें; एकेरीनें बोलणें.

अरेतुरे—एकेरी; हमरीतुमरी; अमर्यादपणाची भाषा, वर्तन वगैरे.

अरेतुरेनें—अहमहमिकेनें; स्पर्धेनें; ईर्ष्येनें. 'योग्य मनुष्यास उमेद चढून दुसऱ्यानें अरेतुरेनें कामें करीत असावें.' —स्वप २७१.

अरेतुरेवर येणें—एकेरीवर येणें; भांडणतंटा करणें; हमरी-तुमरीवर येणें. 'बाईसाहेब, असें अरेतुरेवर एकदम येऊं नका.' —इंप १०१.

%अरे तर कारे, अहो तर कांहो (कायहो)—जसें उत्तर तसें प्रत्युत्तर. आपण जर दुसऱ्याचा अनादर केला, त्यास अरे तुरे असें संबोधलें तर तोहि आपला अनादर करणें साहाजिकच आहे. तोहि आपणांस एकेरी बोलीनेंच संबोधणार. उलट आपण जर त्यास अहोजाहो म्हटलें, त्याबद्दल आदर दाखविला तर तोहि आपणाबद्दल आदर बाळगील. तु०—जशास तसें. पेरावें तसें कापावें.

अरे बाळा घरची शाळा—लहान मुलाला जसें घरीं वळण लावावें तसें लागतें.

अरे बिबी भूक लगी, रोटियां पकाव! ठिकरी तो फुट गई, बेटा टालिया बजाव—अहो बाई भूक लागली, भाकरी तर करा—काय करूं बेटा चूल तर फुटली तेव्हां आतां टाळ्या वाजवीत बस. भूक लागली असतां टाळ्या वाजवून भागत नाहीं.

अरे माझ्या कर्मा, कोठें गेला धर्मा—मनुष्य जसें कर्म करतो तसें त्यास फळ भोगावयास लागतें; आपल्या दुष्कृतीचें जर आपणांस वाईट फळ भोगावयास लागलें तर त्यावेळीं मनुष्य स्वतःस दोष न देता आपल्या नशीबास दोष देतो किंवा जगांत धर्म, न्याय नाहीं असें म्हणूं लागतो. तेव्हां अशा वेळीं कर्माच्या किंवा धर्माच्या नांवानें हांका मारण्यांत काय अर्थ आहे.

अरे माझ्या भूषणा, कोठें कांहीं दिसेना—एखाद्याला आपल्या अंगच्या थोड्याशा गुणाचा, प्राप्त झालेल्या थोड्या उच्च स्थितीचा फाजील अभिमान वाटत असतो. पण प्रत्यक्ष त्या अभिमानाला योग्य असें कारण आढळून येत नाहीं. आश्चर्याची गोष्ट कीं त्याला तर स्वतःचा मोठा अभिमान वाटतो पण तशी योग्यता वास्तविक त्याचे ठायीं आढळत नाहीं.

अरे माझ्या भूषणा, तुला कोणी पुसेना—स्वतःला जी भूषणाची गोष्ट वाटते ती दुसऱ्यास वाटत नाहीं तेव्हां म्हण-तात. व्यर्थ प्रौढी मारणाऱ्या मनुष्याबद्दल म्हणतात.

अरे माझ्या मागल्या, पाप न जाई बोंबलल्या—पूर्वी पापाचरण हातून घडलेला व आतां पश्चात्ताप करणारा मनुष्य त्या पापाला उद्देशून म्हणतो; 'अरे माझ्यामागें लागलेल्या, पाठीस लागलेल्या पापा, आतां मी तुझ्याबद्दल कितीहि बोंबललों, रडून आक्रोश केला, तरी तुझें कटु फल भोगल्या-खेरीज माझी सुटका होणें नाहीं.' पापाचा क्षय भोगावाचून होत नाहीं हें तत्त्व या म्हणींत गोवलें आहे.

अरे म्हटलें तरी तोंड वासतें आणि अहो म्हटलें तरी तोंड वासतें—दुसऱ्यास हांक मारावयाची झाली असतां अरे म्हणावयास जितके श्रम लागतात तितकेच अहो म्हणावयास लागतात. मग अहो म्हणून शिष्टाचार पाळण्याऐवजीं अरे म्हणून उद्दामवृत्ति कां दाखवावी?

अरेराव——अरेराव—१ लोकांस सदा हुकमतींत ठेव-णारा; जुलुमी. २ अहंमन्य; गर्विष्ठ; मातलेला. 'राष्ट्रीयसभा पूर्णपणें राष्ट्रहित साधणारी व्हावी, तिचें काम जनतेच्या बहुमतानें व जाहीररीतीनें व्हावें, तें एखाद्या अरेरावाच्या खोलींत खासगी रीतीनें होऊं नये असें आमचें म्हणणें आहे.'—टिळ्या.

अर्घ्य——अर्घ्य घेणें-घेऊन उभे-तयार असणें-राहणें—नाश करण्यासाठीं टपून बसणें, सज्ज असणें; दुसऱ्याचें वाईट केव्हां होतें याची सारखी वाट पहात असणें. ज्याप्रमाणें एखादी गोष्ट टाकून द्यावयाची म्हणजे तीवर पाणी सोडावयाचें त्याप्रमाणें हातांत उदक घेऊन जणूं एखाद्या गोष्टीचा संबंध तोडण्यास उत्सुक असणें.

अर्जुन——अर्जुनवाद्य—शंख; बोंब. अर्जुनाचें एक नांव फाल्गुन असें आहे व फाल्गुनांत शंखनाद करतात, त्यावरून. 'अर्जुनवाद्यें केलीं '— ख १९३०

❀ **अर्जुनसंन्याशी ढोंगी कीं रावणसंन्याशी ?**—अर्जुन व रावण या दोघांनींहि साधुवेषानें येऊन स्त्रियांस पळविलें. तेव्हां त्यांत ढोंगी कोणास म्हणावें ? सारखीच कृति करणारांमध्यें बरें-वाईट कसें ठरवावें ?

अर्थ——अर्थाला मरणें—स्वतःच्या फायद्यासाठीं धडपड करणें, झटणें, उतावीळ होणें.

अर्थाविणें पोल गाणें—अर्थाशिवाय गाणें व्यर्थ. लाभाशिवाय दुसऱ्याची स्तुती करणें व्यर्थ होय.

❀ **अर्थं वा साधयेत् देहं वा पातयेत्**—इच्छित कार्यांत यश तरी मिळवावें किंवा मरण तरी पतकरावें; मरण येईपर्यंतहि इच्छित ध्येयापासून च्युत होऊं नये. —पामो ३४७.

अर्थस्य पुरुषो दासः—द्रव्यानें कोणताहि मनुष्य वश होतो. तु०— Every man has his price. 'अर्थस्य पुरुषो दासः दासस्त्वर्थो न कस्यचित् । इति सत्यं महाराज बद्धोऽस्म्यर्थेन कौरवैः' —।।महा. ६.४३.४१. "दुष्टांच्या प्रभावळींत सज्जनांना 'अर्थस्य पुरुषोदासः ' या म्हणीप्रमाणें गप्प बसावें लागतें."—विक्षित ३.१९५ "द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळीं ' अर्थस्य पुरुषो दासः ' असें म्हणून भीष्मादिकांना गप्प बसणें उचित नव्हतें." —टि ४.४४८. 'अर्थाचा दास पुरुष अर्थ नव्हे, पुरुषदास बा पाहे । '—मोरोपंत

अर्थाचा अनर्थ व पापाचा परमेश्वर; अर्थाचा अनर्थ व पादाचा परमार्थ (परमेश्वर)—भलतीच समजूत करून घेऊन कांहींतरी घोटाळा उडवून दिला असतां म्हणतात.

अर्थाचे तुकडे भागवताच्या चिंध्या—एखाद्या श्लोकाचा अर्थ लावतांना मूळ पदांची वगैरे इतकी ओढाताण व कोटिक्रम करावयाचा कीं मूळ अर्थ बाजूलाच राहतो. यावरून ओढून ताणून केलेलें स्पष्टीकरण, विवरण वगैरे.

अर्थातुराणां न पिता न बंधुः; अर्थातुराणां न गुरुर्न बंधुः—पैशाच्या पाठीमागें लागलेल्या मनुष्यास आपपर, लहान-मोठा, नातेंगोतें वगैरे कोणतेहि संबंध लक्ष्यांत येत नाहींत; तो सर्वांना एकसारखेंच वागवतो. तु०— अर्थातुराणां न गुरुर्नबंधुः कामातुराणा न भयं न लज्जा । विद्यातुराणा न सुखं न निद्रा क्षुधातुराणां न रुचिर्न वेला ।। —मुर १७३.८४५.—गांगा १५८.

अर्थी दान महापुण्य; सत्पात्रीं दान महापुण्य—योग्य सत्पात्र मनुष्य पाहून दान केलें असतां तें अधिक पुण्यकारक होय. ज्याला जरूर आहे व जो लायक आहे त्यासच दया दाखविली तर त्याचा उपयोग होतो. नाहींतर त्या दानाचा दुरुपयोग होण्याचा संभव असतो. दान पहा.

अर्ध (र्द)——अर्धचंद्र—गचांडी; हकालपट्टी; मानेला गचांडी देतांना हाताचा आकार अर्धचंद्रासारखा होतो यावरून. "भाषा सुधारण्याचें व लोकांत ज्ञानप्रसार करण्याचें काम जरी हातीं घेतलें, तरी तें सिद्धीस नेण्यास 'याची गचांडी धर, त्याची गचांडी धर' याप्रमाणें वारंवार अर्धचंद्रप्रयोग करण्याचें कांहीं विशेष कारण दिसत नाहीं."—निबंधमाला. 'अर्धचंद्रेण राघवः '

अर्धवाटे पाऊण मराठे—१ धेडगुजरी; पंचमेळ; खिचडी. २ बारभाई; बजबजपुरी; गोंधळाची स्थिति. ३ उच्छृंखलपणाची वागणूक.

अर्धा जीव होणें—१ आजार, त्रास, काळजी वगैरेनीं अशक्त, क्षीण होणें. २ उतावीळ होणें; अधीर होणें.

अर्धाबोबडा करणें—अर्धवट चावणें, खाणें, इ. 'वृक्षांवरची लाल, सुंदर आणि मधुर फळें खाऊन, आणि कांहीं आपल्या चोंचांनीं अर्धी बोबडीं करून ते भराऱ्या मारीत आहेत. '—पामो ७१.

अर्धी मांडणी शिरस्ता—निम्मेनिम उत्पन्न व निम्मेनिम सारा कुळानें व मालकानें वांटून घ्यावयाची खंडाची पद्धति.

अर्धे (र्ध्या) वचनांत असणें—अतिशय आज्ञाधारक असणें; शब्द झेलीत असणें. 'माझे मित्र मला साह्य करण्यास तयार आहेत. सर्व सुखदायक वस्तू माझ्या अर्ध्या वचनांत आहेत, तरी दुःख नाहीं असे सुखाचे दिवस निव्वळ सुखाचे दिवस सगळे चौदा भरतात. '—ओक.

अर्धे हळकुंडांत पिवळा; अर्ध्या हळकुंडानें पिंवळा होणें—थोडी प्राप्ति झाल्याबरोबर हुरळून जाणें; गर्व होणें; अतिशय उतावीळ असणें. 'लॉर्ड बीव्हरब्रुकचें डेली एक्सप्रेस पत्र म्हणजे विजयाच्या अर्ध्या हळकुंडानें पिवळें होणारें पत्र' —केसरी ३०—४—४०.

अर्ध्या जीवाचा—अर्धमेला; अशक्त, दुर्बल; कमजोर.

अर्ध्या विहिरींत दोर कापणें—अर्धवट काम सोडून देणें; विश्वासघात करणें. —शाब १.४६.

अर्ध्या हळकुंडानें लग्न मोडणें—अगदीं क्षुल्लक गोष्टीकरतां एखाद्या मोठ्या कार्याचा नाश होणें.

॥अर्द्कुडो कळसो हायसुळता; अर्धकुटो कळसो कचक्चता, भरल्लो कळसो कचकचना --(गो.) अर्धा भरलेला हंडा मोठा आवाज काढतो. तु०-संपूर्णकुंभो न करोति शब्दमर्धो घटो घोषमुपैति नूनम्। विद्वान् कुलीनो न करोति गर्वं जल्पन्ति मूढास्तुगुणैर्विहीनाः॥-सुर १८३.८७०.

अर्ध घडिये दुवादशि—(गो.) अर्ध घटकेला द्वादशी.

अर्द हांव जाण, अर्द शेजारचो रवळु जाण—अर्धे (निम्मे) मला माहीत आहे, अर्धे शेजारच्या रवळूला माहीत आहे. पुरें ज्ञान नसणें.

अर्या माडार चढून हात सोडचें न्हयत—(गो.) अर्धवट झाडावर चढून हात सोडतां कामा नये. (ल.) अर्धे काम केल्यानंतर धीर सोडूं नका.

अर्धबाट सोंवळें दाट—जो मनुष्य संकरज असतो तो आपला हीनपणा लपविण्याकरितां, सोंवळ्याओंवळ्याचा अथवा विधिनियम, व्रतवैकल्यें वगैरे धार्मिक गोष्टींचा फार बोभाटा करीत असतो. बाट्या मनुष्यच आचाराचें ढोंग फार करतो.

अर्धा शामल, अर्धे आंग्रे, तिसरे राजश्री कोण?—अर्धा भाग आंग्र्यांचा, अर्धा इंग्रजांचा याप्रमाणें मुलखाची वांटणी करावयाची मग तिसरे पेशवे यांस या भानगडींत घेण्याचें कारण काय व त्यांस महत्त्व कशास द्यावयाचें? उगीच दुसऱ्याचा मध्यें संबंध काय, या अर्थी योजतात. "तडजोड करण्याची हुलकावणी मात्र तुळाजी आंग्रे दाखवीत, प्रत्यक्ष तडजोडीला येईनात. एवढेंच नव्हे तर सिद्दीशीं स्नेह जोडण्याची त्यांची खटपट चालू झाली आणि 'अर्धा शामल, अर्धे आंग्रे, तिसरे राजश्री कोण' अशा प्रकारची पेशव्यांना उडवून देण्याची भाषा निघूं लागली."—केसरी १२-७-४०.

अर्धी अर्धीनें रुपया होतो—अर्धी म्हणजे एक पै, अशा पुष्कळ पया जर एकत्र करीत गेलें तर हळूहळू त्यांचा रुपया होतो. लहान लहान प्रमाणांत जरी एखादें कार्य करीत गेलें तरी परिणामीं फार मोठें कार्य होतें. तु०-थेंबें थेंबें तळें सांचें. तु०-Take care of the pennies and the pound will take care of itself. अल्पानामपि वस्तूनां संहतिः कार्यसाधिका। तृणैर्गुणत्वमापन्नैर्बध्यन्ते मत्तदन्तिनः॥-सुर ८३.२.

अर्धी टाकून सगळीचे मागें लागूं नये; अर्धी सोडून सगळ्यास हात घालूं नये; अर्धी सोडून सगळीच्या मागें जाऊं नये; अर्धी टाकून सगळीला धांवूं नये—आपल्याला जर थोडी प्राप्ति हटकून होत असेल तर हांवभरी पडून अधिक मिळविण्याच्या आशेनें मिळत असेल तेंहि गमावणें हा मूर्खपणा आहे. हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागूं नये. तु०-A bird in hand is worth two in the bush.

अर्धीत गर्दी—जवळ एक अर्धी म्हणजे अर्धा पैसा किंवा पै असतां तीवर कितीहि चैन केली तरी ती किती होणार?

अर्धे आयु सरल्याअंतीं, त्याची किंमत माहीत होती—मनुष्याला आयुष्याचा बराच भाग खर्च होण्यापूर्वी त्याची किंमत कळत नाहीं. तरुणपणीं मनुष्य आयुष्याचे अनेक दिवस व्यर्थ आळसांत वगैरे खर्च करतो व मागाहून त्याला त्याची किंमत कळते.

अर्धें कच्चें खाल्लें, तेंच शेवटीं बाधलें—मनुष्यानें कसेंतरी अर्धवट शिजलेलें अन्न खाल्लें तर त्याचा प्रकृतीवर वाईट परिणाम होणारच. त्याचप्रमाणें एखादें कार्य अर्धवट केलें तर त्याचें फल तसेंच पुढें मिळणार.

अलतड——अलतडच्या पितरांनू, पलतडच्या पितरांनू— एक कोल्हा—कोल्ही होती. कोल्हीनें श्राद्ध करण्याचें ठरवून वड्यांच्या तयारीस ती लागली व कोल्ह्यास पितरांना बोलावण्यासाठीं पाठविलें. कोल्हा गेला व नदीच्या अलीकडे उभा राहून म्हणतोः "अलीकडच्या पितरांनों! पलीकडच्या पितरांनों! पाण्यांत पाय बुडवूं नका, गंधाची टिकली लावूं नका, आमच्या घरीं येऊं नका!" पितर आले नाहींत. तेव्हां कोल्ही त्यांना बोलावण्यास गेली. इकडे कोल्हा सर्व वडे घेऊन माळ्यावर गेला व खात बसला. कोल्ही पितरांना घेऊन आली व पहाते तों वडे नाहींत व कोल्हा नाहीं. माळ्यावर कोल्हा दिसला. तेव्हां कोलीत घेऊन त्याच्या शेपटाला लाविलें. तो ओरडत पळाला. यावरून खरें बोलावणें न करणें व मग येत नाहींत म्हणून बतावणी करणें. तु०-शपथेला मोकळे होणें.

अलाडली——अला (रा) डली बाई पला (रा) डलीले सांग, नवरदेवाचें बाशिंग नीट बांध—(व.) लग्नाच्या गर्दीमध्यें एखादें काम करावयाचें असलें म्हणजे एक मनुष्य दुसऱ्यास सांगतो, तो तिसऱ्याला सांगतो याप्रमाणें एकमेकांवर काम ढकललें जातें; पण सहज होण्यासारखें असूनहि तें कोणी करून टाकीत नाहीं. निवळ नवरदेवाचें बाशिंग नीट बांधण्याचा प्रश्न, पण तेंच कोणी स्वतः न करतां एक बाई दुसरीला सांगते. —बशाप ५१.८.२४५.

अलाय——अलाय बलाय घेणें—जणुं काय दुसऱ्याची इडापीडा आपल्या अंगावर ओढून घेणें; आपल्या प्रिय माणसास, मुलास वगैरे एखादी वाईट आपत्ति येण्यापेक्षां

ती आपणावर यावी अशी इच्छा व्यक्त करणें. 'दोन्ही हात (माझ्या) डोक्यावर फिरवून माझ्या कानशिलावर तिनें आपलीं बोटें मोडलीं.'–विज्ञावि. ९.१०.२११. 'तुका म्हणे वर्णू काय। घेतो अलायाबलाया॥'

अलिप्त——करणी करून अलिप्त—कोणतीहि गोष्ट करून सवरून पुन्हा नामानिराळा राहणाऱ्या मनुष्यास म्हणतात.

अलीकडला-कडे—अलीकडला कुडव, पलीकडली खंडी, मामंजी गेले उफराटे गांडी—एका सुनेस कुडव कोणता खंडी कोणती हें कळत नव्हतें; तेव्हां सासऱ्यानें तीस याबद्दल सांगितलें असतां ही भानगड न समजून ती रागानें म्हणते कीं, कुडव किंवा खंडी अलीकडली कीं पलीकडली मला कांहीं माहीत नाहीं व मामंजी मसणांत गेले तरी मला त्याची पर्वा नाहीं! त्रासून बेपर्वाईचें उद्गार.

अलीकडे नय, पलीकडे बय, म्हणून नाहीं सोय—इकडे नदी तिकडे कुंपण, त्यामुळें कोणत्याहि बाजूनें निघून जाण्याची सोय नाहीं. तु०– इकडे आड तिकडे विहीर.

अलीजा——अलीजा दरबार (कारखाना), अलिजाही कारखाना—१ अवाढव्य थाटमाटाचा दरबार, कारखाना इ. २ (ल.) अंदाधुंदीचा कारभार. "जुन्या लोकांच्या तोंडून ....मोंगलाईची तारीफ कधींकधीं ऐकू येते ती काय-तर अंदाधुंद कारभार! अलीजाही कारखाना!' –चिपळूणकर लेखसंग्रह.

अलो——अलोपेक्षां निश्चितपणा बरा—तुसतें आलों म्हणून सांगून प्रत्यक्ष न येण्यापेक्षां कांहींतरी निश्चितपणें येतों किंवा येत नाहीं असें सांगणें जास्त चांगलें.

अल्प——अल्प अपराध करी, शासन होय त्य. परी—जेवढा अपराध केला असेल त्याप्रमाणें शिक्षा होणार; कर्माप्रमाणें फळ प्राप्ति व्हावयाची.

अल्प अपराध जरी घडे, केल्या चाकरीवर पाणी पडे—नोकरी करण्यामध्यें थोडी जरी चूक झाली तरी कितीहि दिवस इमानें इतबारें चाकरी केली असेल ती मनावर न घेतां शासन केलें जातें. अल्प चुकीनेंहि पूर्वीच्या करामतीचें श्रेय जातें.

अल्प असतां मोठें दिसे, सूक्ष्मदर्शक यंत्रीं जसें, (तसे कीर्तिमाजीं असें, जाणा तुम्ही स्पष्ट हो)—सूक्ष्मदर्शक यंत्रामध्यें वस्तु ज्याप्रमाणें प्रत्यक्ष लहान असली तरी मोठी दिसते त्याप्रमाणें कीर्ति अल्प असली तरी ती पसरल्यावांचून रहात नाहीं. तु०– Fame is a magnifying glass. –स वि १०२०.

अल्प काम नाहीं होत, मोठे कामीं घाली हात—स्वतःच्या अंगांत एखादें लहानसें कामहि करण्याचें सामर्थ्य नसतां मोठें काम अंगावर घेतलें तर अपयश पदरीं येणारच.

अल्प कारण, खटला मोठा—लहानशा कारणावरून फार मोठे प्रसंग घडतात. क्षुल्लक गोष्टीवरून मोठाल्या घटना होतात. तु०– Great events spring from little causes.

अल्प कार्यीं मारी हाका, मोठे कार्यीं राहे मुका—लहानसेंच काम करीत असतां एखादा मनुष्य खूप आरडाओरड गाजावाजा करीत असतो; पण एखादें मोठें काम समोर दिसलें म्हणजे उगाच आपणास करावें लागून त्रास होईल म्हणून अशावेळीं बाजूला राहतो.

अल्प खाणेंपिणें करी, मग जाणे नलगे वैद्या घरीं—मित आहार व मित पान केल्यास आजारी पडण्याचें कारण नाहीं व वैद्याची गरज लागत नाहीं.

अल्प गुन्हा अल्प चोरी, करूं दिल्या मोठ्या करी—एखाद्याचा लहानसा गुन्हा, किंवा लहानशी चोरी पचली किंवा त्याच्याकडे डोळेझांक केली म्हणजे साहजिकच त्याची मोठमोठे गुन्हे व चोऱ्या करण्याकडे प्रवृत्ति होते. एका मुलानें एके दिवशीं एक पेरू चोरून आणला व आईजवळ दिला. आईनें त्यास शिक्षा करण्याऐवजीं शाबासकी देऊन, तो पेरू खावयास दिला. पुढें तो मुलगा मोठमोठ्या चोऱ्या करूं लागला. अखेरीस एका मोठ्या दरोड्यांत तो सांपडून त्यास फांशीची शिक्षा झाली. फांसावर जाण्यापूर्वीं त्यानें आपणांस एक वेळ आईस भेटावयाचें आहे अशी इच्छा प्रदर्शित केली. तेव्हां त्याच्या आईस त्याचेजवळ आणण्यांत आलें. त्यावेळीं त्यानें आईच्या गळ्यास मिठी मारून तिला भेटतांना तिच्या गालाचा कडकडून चावा घेतला. तेव्हां सर्व लोक त्याला फार दूषण देऊं लागले कीं, पहा हो! हा मरणाच्या वेळींहि आईस दुःख देत आहे! तेव्हां त्यानें सर्व लोकांस ओरडून आपली हकीगत सांगितली व म्हटलें कीं, पहिल्यानें मीं ज्यावेळीं पेरू चोरून आणला त्यावेळीं जर मला आईनें शिक्षा केली असती तर आजवर हा प्रसंग आला नसता.

अल्प डामर लागतां, पीप न घालवी आलें हातां—थोड्याशा खर्चाला भिऊन मोठा लाभ हातचा घालवूं नये. तु०– Never loose a tub for a half penny worth of tar. –Scotch. —सवि २४२८.

अल्प दुःखी मोठा खेद, मोठीं दुःखें होतीं बंद—आपणास थोडेफार दुःख झालें तर आपण त्याबद्दल बराच

शोक करतों; पण एखादी फारच मोठी आपत्ति कोसळली असतां बहुधा वाचाच मुळीं बंद होते व तोंडातून शब्दहि निघत नाही. अशा वेळीं दुःखाच्या भारामुळें आपण अगदीं दिग्मूढ होऊन आपणांस रडणेंहि सुचत नाहीं. ज्यांना लहान दुःखें आहेत तेच मोठा गवगवा करतात पण मोठालीं दुःखें असणारे बहुधा गप्प असतात.

अल्प देणगी देणें, तेवढा उपकार घेणें--थोडीशी तरी देणगी द्यावी व निदान तेवढा तरी उपकार केल्याचें श्रेय घ्यावें. जेवढी देणगी थोडी तेवढेच उपकार थोडे.

अल्प दोष न सोडिती, क्रमें मोठेहि करिती—ज्या मुलांस किंवा मनुष्यांस बारीक सारीक चुकांपासून योग्य कालीं परावृत्त केलें जात नाही, किंवा त्याबद्दल अद्दल घडत नाहीं तीं पुढें मोठमोठ्या चुका केल्याशिवाय राहात नाहींत. वर पहा.

अल्प धन थोर मन, नाश न होय स्वहित जाण— स्वतःजवळ संपत्ति थोडी असली तरी मनाचा जर मोठेपणा असेल, जर दुसऱ्याला आपण प्रत्यक्ष द्रव्यसाहाय्य न करतांहि उदार मनानें वागविलें तर आपल्या हिताच्या आड कोणी येत नाहीं. 'अल्प धन थोर मन, नाश होय स्वहित जाण' Great minds and small means ruin many men असें मुळांत आहे. --सवि १२७१.

अल्प धन बहु योजना, करतां बुडती जाणा—गांठीशीं पुरेसें द्रव्य नसतां जर मोठमोठ्या योजना हातीं घेतल्या तर त्या सिद्धीस जाणें शक्य नाहीं हें उघड आहे.

अल्प न्याय करतो, तो मोठा सोडून देतो—जो बारीक सारीक गोष्टींत फार लक्ष्य घालतो त्याला मोठ्या गोष्टींकडे पुरेसें लक्ष्य देतां येत नाहीं; त्यामुळें बारीक सारीक चुका जरी त्याला काढतां आल्या तरी पुष्कळदां मोठमोठ्या चुका त्याच्या लक्ष्यांतून निसटून जातात. तु०- Laws catch flies, but hornets go free.

अल्प पीडा मनीं आली तरी न मानी--आपणांस थोडे फार दुःख झालें तर त्याकडे लक्ष्य न दिल्यास त्याबद्दल कांहीं वाटत नाहींसें होतें.

अल्प बुद्धि मोठ्या मसलती, अर्थात् करणारे फसती-- स्वतःला फारशी बुद्धि नसतां मोठमोठीं कारस्थानें करावयास गेल्यास तीं अर्थात फसणारच.

अल्प भाग्य अभिमान, त्याच गर्वें त्याचें मरण—जवळ प्रत्यक्ष वैभव किंवा संपत्ति थोडी असूनहि जो वाजवीपेक्षां जास्त अभिमान बाळगतो त्याचा त्या अभिमानाच्या पायींच शेवटीं नाश होतो.

अल्प भुकी तो सदा सुखी—नेहमीं थोडी भूक ठेवून जेवावें. जो मिताहारी असतो तो निरोगी असल्यामुळें सुखी होतो.

अल्प मनुष्य कोपे, लहान भांडें लौकर तापे--ज्याप्रमाणें लहानसें भांडें लवकर तापतें त्याप्रमाणें नीच किंवा हलक्या दर्जाचा मनुष्य लवकर रागावतो. तु०-A Little pot is soon hot.

अल्पमोली बहु गुणी--किंमत थोडी पण गुण फार, अशी वस्तु मिळणें बहुधां असंभाव्य असतें.

अल्पमोली बहु दुधी—किंमत तर थोडी असावी पण दूध तर पुष्कळ देणारी, अशी गाय मिळणें कठीण.

अल्प यत्नानें थोर काम होत नाहीं—थोड्या परिश्रमानें मोठीं कामें होऊं शकत नाहींत. मोठीं कामें करावयाचीं तर परिश्रमहि पुष्कळ करावे लागतात.

अल्प लोभ दाविती, म्हातारे ते न ठकती—जे फार लाभाची आशा करीत नाहींत असे अनुभवी लोक ते व्यवहारांत बहुधा फसत नाहींत.

अल्पविद्या बहु (महा) गर्वी-गर्व--विद्वत्ता थोडी असून तिचा वाजवीपेक्षां जास्त अभिमान बाळगणाऱ्यास म्हणतात. 'अल्पतोयं चलत्कुम्भा अल्पदुग्धं च धेनवः। अल्पविद्या महागर्वी कुरूपी बहुचेष्टितः॥'

अल्प संतोष हेंच धन, जगीं तोच एक जन-थोड्यांत संतोष मानणें हीच एक प्रकारची संपत्ति आहे. पुष्कळ संपत्ति असून तींतहि समाधान न वाटण्यापेक्षां थोडी संपत्ति असूनहि जर समाधानी वृत्ति असेल तर ती अधिक हितकारी आहे व असा मनुष्य श्रेष्ठ होय.

अल्प साधारण खाणें, नित्य आयुष्य वाढे तेणें--थोडें व सामान्यतः सहज पचेल असें फार स्निग्ध व जड नाहीं असें अन्न खाल्लें असतां मनुष्य निरोगी राहून त्याचें आयुष्य वाढतें.

अल्प ज्ञानी, मूर्खांत मोठा मानी--सर्वच मूर्ख बसले असतां त्यांत ज्याला थोडेसेंहि ज्ञान असतें तोच विद्वान समजला जातो. तु०-वासरांत लंगडी गाय शहाणी; निरस्त-पादपे देशे एरंडोपि द्रुमायते।

अल्प ज्ञानें अति हानि—अर्धवट किंवा थोडें ज्ञान असेल, पुरतें ज्ञान नसेल तर त्यापासून फायदा व्हावयाच्या ऐवजीं नुकसान मात्र होतें. तु०- Little knowledge is a dangerous thing.

अल्पाकरितां मित्रांसवें, तंटा न करणें बरवें—आपले जे मित्र असतील त्यांच्याबरोबर अल्पस्वल्प गोष्टींकरितां कलह

करणें योग्य नव्हे.

अल्पांत बरा सल्ला, मोठा वाईट हल्ला--मोठा वाईट हल्ला टाळण्यासाठीं थोडक्यांतच सल्ला केलेला बरा. भांडण विकोपास नेऊन युद्ध सुरू करण्यापेक्षां तें थोडक्यांतच मिटवून टाकणें बरें.

अल्पायुष्याक आणि रांडेक गांठ पडता--(गो.) ज्या स्त्रीच्या नशीबांत वैधव्य आहे, तिचीच गांठ अल्पायुषी मनुष्याशीं पडते. नशीबानेंच सर्व योगायोग जुळून येतात व दैवाप्रमाणेंच सर्व गोष्टी घडतात.

अल्पास अधिकार प्राप्ति--नीच मनुष्यास श्रेष्ठ स्थान प्राप्त होणें; कमी दर्जाच्या मनुष्याच्या हातीं सत्ता येणें. 'अल्पास अधिकार प्राप्त झाला असतां दुसरा लहान मनुष्य अगर थोर योग्य प्रसंग करून गेला तरी त्याची अवगणनाच करावी हा त्याचा धर्म.'-शिवदिग्विजय १२७.

अल्ला——अल्लाची गाय--गाय हें मुळांत गरीब जनांवर व त्यांतून ती देवाची असल्यावर किती गरीब व सात्त्विक असेल? यावरून अतिशय गरीब, निरुपद्रवी माणूस.

***अल्ला अल्ला करो खैर मांगो**—परमेश्वराचें नांव घ्यावें व त्याजपाशीं क्षेम, कल्याण मागावें.

अल्ला का दिया शिरपर—जें परमेश्वरानें दिलें असेल तें शिरसावंद्य मानावें; परमेश्वरानें ज्या स्थितींत आपणांस ठेवलें असेल तींत समाधान मानावें.

अल्ला जाला पीर मेला काढ कुडव, पीर जाला अल्ला मेला काढ कुडव-(गो.) कांहीं का होईना, कोणी मेला आणि कोणी झाला तरी, माझें देणें दिलेंच पाहिजे. कांहीं झालें तरी माझें देणें आहेच.

अल्ला दोमेंसे एक देवे तो कबूल है—आपण दोन वर मागितले असतां परमेश्वरानें त्यांतील एक दिला तरी राजी होणें; किंवा दोन्ही डोळे नसलेल्या मनुष्यास परमेश्वरानें एका डोळ्यास दृष्टि दिली तरी त्याला मान्य असतें.

अल्ला यार है बेडा पार है—परमेश्वर साह्यकर्ता असल्यावर कोणतीहि गोष्ट साध्य होते. कोणत्याहि अडचणींतून पार पडतां येतें.

अवकाश——अवकाश नाहीं मला, निमित्त हें सांगण्याला—एखादी गोष्ट करावयाचें मनांत नसलें म्हणजे मला वेळ नाहीं ही सबब पुढें करण्यांत येते.

अवगणना——अवगणना करणें—अपमान करणें; अप्रतिष्ठा करणें. 'आपल्यास अधिकार प्राप्त झाला असतां दुसरा लहान मनुष्य अगर थोर योग्य प्रसंग करून गेला तरी त्याची अवगणनाच करावी हा त्याचा धर्म.'-शिदि १२७.

अवगुणी——अवगुणी जरी झालें तें ओंगळ। करावा सांभाळ लागे त्याचा-आपलें स्वतःचें मूल कितीहि दुर्गुणी निघालें व घाणेरडें असलें तरी त्याचा प्रतिपाल मातेस करावाच लागतो. मातेचें प्रेम इतकें असतें कीं, तिचें मूल कितीहि वाईट असलें तरी त्याचा त्याग करावासा तिला वाटत नाहीं.

अवघड——अवघड कामीं धांवतो तो संकटांत पडतो—जो मनुष्य आपल्या शक्तीबाहेरचें काम अंगावर घेतो तो आपल्यावर संकट ओढवून घेतो.

अवघड जागीं गळूं, सासरा वैद्य; अवघड जागीं दुःख आणि जांवई वैद्य—गुह्य भागीं दुखणें झालें व जांवई वैद्य असला म्हणजे दुखणें तर असतें पण जांवयास दाखविण्यास संकोच वाटतो, अशी मोठी चमत्कारिक स्थिति होते. पाठभेद—अवघड जागीं दुखणें आणि जांवयाच्या कपाळीं औषध देणें.

अवघड ठिकाणचा घाव, न दाखवितां न मिरवितां--अवघड ठिकाणीं झालेली जखम धड दाखवितां येत नाहीं व तीबद्दल प्रौढी मारतां येत नाहीं. –तु० A skeleton in the cupboard.

अवघा——अवघा गल्ला दाणा, नसे कोंड्यावांचून--सर्व धान्याला लागून कोंडा हा असावयाचाच; कोंड्यावांचून कोणतेंच धान्य होत नाहीं. त्याप्रमाणें चांगल्या वस्तूंतहि एखादा दोष असावयाचाच; अगदीं निर्दोष अशी वस्तु मिळणें अशक्य.

अवघा नाश झाल्यावरी, मग उपाय काय करी—जोपर्यंत कांहीं आशा आहे, तोपर्यंत मदत केल्यास उपयोग. सर्वनाश झाल्यावर मग त्यावर कांहीं उपाय करतां येत नाहीं.

अवघी गोष्ट ऐकल्यावरी, मनुष्याची परीक्षा करी--कोणताहि मनुष्य दोषी आहे किंवा नाहीं हें सर्व हकीकत समजल्यानंतर ठरवावें. सर्व माहिती मिळण्यापूर्वीं एखाद्या मनुष्याबद्दल कोणतेंहि मत बनविणें योग्य नव्हे.

अवघें एक स्थानीं, ठेवूं नये कदां मानी—सर्व संपत्ति अथवा कोणताहि जिन्नस सर्व एकाच ठिकाणीं ठेवल्यास गेल्यास सर्वच जातो, मागें कांहीं रहात नाहीं. याकरितां सर्व एका ठिकाणीं न ठेवतां निरनिराळ्या ठिकाणीं वांटून ठेवल्यास कांहीं तरी हातास लागण्याचा संभव असतो. पूर्वीं संपत्ति पुरून ठेवण्याची चाल होती तेव्हां आपलें गुप्त स्थळ कोणास माहीत झाल्यास सर्वच ठेवा जाण्याचा संभव असे. तसेंच एकाच पेढीवर अगर बँकेंत सर्व पैसा ठेवल्यास ती बुडाल्यास एकदम सर्व नाश व्हावयाचा. तु०—Venture not all in one bottom.

अवघे कामांत थोडें जाणितो, बहुधा तो उपयोगी नसतो--

ज्याला एकाहि कामाची पूर्ण माहिती नसून अनेक गोष्टींची अर्धवट माहिती असते तो मनुष्य निरुपयोगी असतो. तु०-A rolling stone gathers no moss.

अवघे जोडे सर्वांपायीं सारखे बसत नाहींत—प्रत्येक मनुष्याच्या पायाचा आकार निरनिराळा असल्यामुळें एकमेकांचे जोडे एकमेकांच्या पायांत येत नाहींत. सर्व माणसें कांहीं सारखीं नसतात. प्रत्येकांत थोडा फार तरी फरक असतोच. तु०-Every shoe fits not every foot.

अवघें पोटासाठीं सोंग। तेथें कैंचा पांडुरंग।—भोंदू लोक वरवर साधुत्वाचें सोंग आणतात पण त्यांच्या मनांत परमेश्वराबद्दलचे विचार क्वचितच येत असतात. –तुगा २८८३.

अवघें मुसळ केरांत—केरामध्यें बारीक वस्तु जाणें शक्य आहे पण सर्व मुसळ केरांत जाणें म्हणजे अगदींच दुर्लक्षाची परमावधि दिसते. तेव्हां एखादी मोठी व महत्त्वाची गोष्टच जेव्हां लक्ष्यांतून अजीबात निसटते तेव्हां ही म्हण वापरतात.

अवघें रक्षावें तें वाईट, सारें खर्चावें हें नसे नीट—मुळींच खर्च न करतां सगळेंच राखून ठेवावें हें वाईट; तसेंच मुळींच मागें पुढें न पाहतां, कांहीं राखून न ठेवतां, सगळेंच खर्च करून टाकावें हेंहि वाईट. तेव्हां यापैकीं मध्यम मार्ग म्हणजे कांहीं राखून ठेवावें व कांहीं खर्च करावें, हा चांगला.

अवघें सोपें उद्योगानें, सर्व कठीण आळसानें—उद्योग केला, परिश्रम केला म्हणजे कठिण वाटणारी गोष्टहि सुसाध्य होते पण उद्योगच केला नाहीं, केवळ आळशासारखें बसलें तर प्रत्येक गोष्ट कठीण वाटते व कांहींच साध्य होत नाहीं.

अवघ्यांची मति, एकसारखी नसती—सर्व मनुष्यांची बुद्धि कांहीं सारखी नसते; प्रत्येक जण आपापल्या बुद्धीप्रमाणें निरनिराळ्या गोष्टींकडे पहातो. तसेंच प्रत्येक मनुष्य आपआपल्या बुद्धीप्रमाणें कार्य करतो. पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना कुण्डे कुण्डे नवं पयः। जातौ जातौ नवाचारा नवावाणी मुखे मुखे।–सुर १५९·२६५·

अवचित-अवचित आदितवार-मंगळवार—अनाहूत असें एखाद्याकडे पूर्वीं सूचना न देतां एखाद्या रविवारीं किंवा मंगळवारीं जेवावयास जाण्याचा नेम किंवा नवस करणें.

अवचित कवचित—क्वचित्; केव्हां तरी.

अवचित फळ—मूल होण्याकरितां स्त्रिया एक व्रत करतात तें. मकर संक्रांतीच्या दिवशीं ब्राह्मणाच्या घरांत कोणास न कळतां भांड्यांत वगैरे एक नारळ टाकितात, त्यास म्हणतात.

अवडंबर——अवडंबर दावी मोठें, अंगीं सामर्थ्य खोटें—स्वतःच्या अंगांत सामर्थ्य नसतां एखादा मनुष्य उगीच मोठा आव आणतो तेव्हां त्यास म्हणतात.

अवतण——अवतण टाकून भीक मागणें—[अवतण= आमंत्रण] जेवावयास आलेल्या आमंत्रणाचा स्वीकार करावयाचा नाहीं व मग जेवणाच्या वेळीं भीक मागत फिरावयाचें, असला आचरट व मूर्खपणाचा प्रकार.

अवतार——अवतार आटोपणें-संपणें-होणें-खपणें—१ उत्कर्षदशा संपून निकृष्टावस्थेस आरंभ होणें; शून्यत्व पावणें; सद्दी सरणें; संपुष्टांत येणें. २ मरणें, "पति गेल्यावर आटपला श्वशुराचाही अवतार।"–विक १५. ३ शेवट होणें, करणें.

अवतार घेणें-धरणें—एखादें काम अतिशय उच्छृंखलपणें अव्यवस्थितपणें, वेडगळपणानें करणें; एखाद्या संचार झालेल्या माणसाप्रमाणें करूं लागणें.

अवतार संपविणें—मरणें.

अवदसा——अवदसा आठवणें—१ आपला नाश करून घेण्याच्या मार्गास लागणें, तशी बुद्धि होणें. २ भलते सलते घातक विचार मनांत येणें. "अहह! आठवली मज ही अशी। अवदसा; वद साह्य करी कशी॥"—ल. ग. लेले.

अवदसेची फेरी येणें—कष्टदशा प्राप्त होणें; दुर्दैव ओढवणें; आपत्ति येणें. अक्काबाईचा फेरा पहा.

अवदसेचें बाळ—दुर्दैवी, अभागी मनुष्य.

अवदान——गृहस्थास अवदान, भिक्षुकास शय्यादान; कारकुनास अवदान, भटास कुदान-महादान—एखाद्या गृहस्थास कोठें तरी आडमार्गानें मोठी प्राप्ति झाल्याशिवाय, व भटास एखादें शय्यादान, किंवा मृतासंबंधीं महादान वगैरे सारखें कुदान मिळाल्याशिवाय तो कांहीं एकदम श्रीमंत होत नाहीं. एकदम श्रीमंत होणारा कारकून लांचखाऊ असतो व भिक्षुक कुदान घेणारा असतो.

अवदिस——अवदिशीं पुऱ्या आणि सणीं घुगऱ्या—[अवादिशीं= आडदिवशीं, भलत्याच दिवशीं; अशुभ दिवशीं] पुढें सण असतां भलत्याच दिवशीं पुऱ्या वगैरेचें सुग्रास जेवण करून जेवावयाचें व पुढची कांहीं काळजी करावयाची नाहीं व प्रत्यक्ष सणाच्या दिवशीं कांहीं शिल्लक नाहीं म्हणून केवळ घुगऱ्यासारखें कांहींतरी खाऊन रहावयाचें, हा प्रकार आचरटपणाचा आहे. यापेक्षां योग्य वेळीं योग्य गोष्ट म्हणजे आडवारीं घुगऱ्या खाऊन निर्वाह करणें व सणाच्या दिवशीं पुऱ्या वगैरे मिष्टान्न खाणें, हें योग्य होय. भलत्याच वेळीं जवळ असलेली पुंजी उडवून टाकून योग्य वेळीं दीनपणा पतकरणें, हें

तारतम्याचा आभार दाखविते.

अवधणा——खाजवून अवधणा आणणें--अंगावर एखाद्या ठिकाणीं विनाकारण खाजविलें असतां तेथें दुःख होऊन त्याचा अवधणा येतो. बळेंच कुरापत काढून भांडण उपस्थित करणें; स्वतःवर मुद्दाम संकट ओढवून घेणें.

अवलक्षण——हात दाखवून अवलक्षण करणें—स्वतःचा हात सामुद्रिकास दाखवून एखादी अशुभ गोष्ट समजावून घेणें व मग मनास चुटपुट लागणें. आपण होऊन एखादी आपत्ति ओढवून घेणें.

अवलाद——अवलादीचें शिंगरूं अवलादीवरच जातें.—बीज तसा अंकुर; जें जातिवान् घोड्याचें शिंगरूं असेल तें जातीवानच असावयाचें, तें दुर्गुणी निघणार नाहीं.

अवशी——अवशी खाई तूप, आणि सकाळीं पाही रूप—तूप खाल्ल्यानें रूप चांगलें होतें म्हणून रात्रीं निजतांना तूप खाऊन सकाळीं उठल्याबरोबर आपल्या रूपांत काय फरक झाला हें आरशांत पहावयास जाणें, मूर्खपणाचें आहे. फलाबद्दल अतिशय उतावीळपणा दाखविणें अधीरतेचें लक्षण आहे. कार्याची फलप्राप्ति व्हावयास योग्य अवधि हा गेलाच पाहिजे.

अवस——अवसे पुनवेस येणें-घडणें—केव्हांतरी, कधीं तरी, प्रसंगवशात् एखादी गोष्ट होणें; अनिश्चितपणें होणें, येणें,

॥अवसबाई इकडे पुनवबाई तिकडे—दोघींचीं तोंडें दोन दिशांना. कधीं पटावयाचें नाहीं अशी स्थिति.

अवसबाई तुझ्याकडे, पुनवबाई तुझ्याकडे—[अवस=अमावास्या. पुनव=पौर्णिमा] अमावास्या व पौर्णिमा या विरुद्ध गुणधर्माच्या तिथी आहेत. त्या दोन विरुद्ध पक्षांच्या दोन नेत्या आहेत असें समजून दोघींनाहि राजी राखण्याकरितां एकजण म्हणते: ‘ अवसबाई, मी तुझ्या पक्षाची.’ पुढें पुनवबाईची गांठ पडतांच ती म्हणते, ‘ पुनवबाई, मी तुझ्या पक्षाची. ’ दोन्ही विरुद्ध पक्षांना ही आपल्याच पक्षाची अभिमानी व्यक्ति आहे असें आपल्या कारवाईनें भासविणाऱ्या व्यक्तीसंबंधीं म्हण आहे.

अवसेच्या भेटीस पुनव आली—अमावास्या आणि पौर्णिमा या एका दिवशीं कधीं येणें शक्य नाहीं. तेव्हां ज्या गोष्टी कधीं एकत्र येऊं शकत नाहींत त्या आल्या, किंवा अशक्य गोष्टी शक्य झाल्या तर काय वाटेल तें होईल. सामान्यतः अशक्य वाटणारी गोष्ट घडल्यास म्हणतात.

अवसान——अवसान तुटणें-सुटणें--धीर खचणें. ‘हीं बातमी ऐकून सर्व मराठ्यांचें अर्धे अवसान तुटलें.’ — स्वप२७.

अवसानांत येणें असणें--आटोक्यांत येणें; आहारांत येणें, असणें.

अवसानांतून जाणें--आटोक्याबाहेर जाणें; शक्तीपलीकडे असणें; मर्यादेबाहेर जाणें.

॥अवसान घातकी, महापातकी—एखाद्या मनुष्यानें एखादें काम अगदीं यशस्वी होण्याच्या बेतांत आलें असतां अगदीं ऐनवेळीं दगा दिल्यास म्हणतात. अगदीं ऐनवेळीं धीर सुटणारा प्रसंग आला असतां घाबरणारा.

अवसान सोडूं नये--मनुष्यानें कधींहि धीर सोडूं नये; धीर धरून नेटानें कार्य केल्यास लवकर नाहीं तरी निदान कांहीं कालानें तरी फलनिष्पत्ति झाल्याशिवाय रहात नाहीं.

अवस्था——अवस्थाचतुष्टय--(अ)१ बाल्य २ पौगंड ३ तारुण्य ४ वार्धक्य; (आ) १ बाल्य २ तारुण्य ३ मध्य ४ वार्धक्य.

अवस्थात्रय--(अ)१जागृति २स्वप्न ३ सुषुप्ति; (आ)१सात्त्विक २ राजस ३ तामस. ‘किंबहुना अवस्थात्रया। हें अधिष्ठान धनंजया’। —ज्ञा १८·३२०.

अवस्थाद्वय--(अ) १ पूर्वावस्था (बाल्य, यौवन) २ उत्तरावस्था (तारुण्य, वार्धक्य); (आ) १ जागृति २ सुषुप्ति;(इ) १ सुख २ दुःख.

अवस्थाभेद—जाग्रदवस्था, स्वप्नावस्था, सुषुप्त्यवस्था.

अवळा——अवळा देऊन कोहळा (बेल) काढणें—थोड्या गोष्टीचा लोभ दाखवून महत्त्वाचें कार्य साधून घेणें; थोडी किंमत देऊन फार मोलाची गोष्ट घडवून आणणें.

अवळे उघडणें—मोठा राग काढणें; डोळे वटारणें; डोळे फाडून पाहणें.

अवळे शिजणें—अवळे शिजले म्हणजे ते अत्यंत नरम होतात यावरून घाबरणें; पांचावर धारण बसणें; अगदीं मळूल होणें; नरम पडणें.

अवळ्याएवढें शून्य—अवळा वाटोळा शून्यासारखा असतो यावरून पूर्णअभाव; शून्य; भोपळ्याएवढें शून्य असेंहि म्हणतात.

अवळ्यांची मोट--एकत्र बांधतां न येण्यासारख्या, कोणत्याही बंधनानें एकत्र न ठेवतां येण्यासारख्या, भिन्न प्रकृतीच्या लोकांचा, वस्तूंचा समुदाय.

अवळ्यांची मोट बांधणें--अवळे गुळगुळीत असल्यामुळें त्यांची गाठोडी बांधणें कठिण जातें. त्याप्रमाणें अनेक भिन्न प्रकृतीच्या वस्तू एकत्र ठेवणें दुष्कर असतें. यावरून एखादी दुःसाध्य गोष्ट करूं पाहणें.

॥अवळा पिकायचा नाहीं, समुद्र सुकायचा नाहीं--झाडावर अवळा पिकलेला क्वचितच सांपडतो; बहुधा तो पिकण्यापूर्वीच

गळून पडतो. त्याप्रमाणेंच समुद्र कधींहि आटत नाहीं. तेव्हां या गोष्टी अशक्य असल्यामुळें अशा तऱ्हेची अट पूर्ण झाल्यावर एखादी गोष्ट व्हावयाची म्हणून कोणी सांगितल्यास ती कधींहि घडणार नाहीं हें उघड होतें.

अवळा मंडे विकिले दुडडु खोज्जुंखवना--(गो.) अवळे विकून आलेले पैसे कांहीं वोचत नाहींत. अवळे आंबट तुरट असतात, पण पैसे केव्हांहि गोडच. (ल.) कोणताहि प्रामाणिक व्यवसाय हा कमी प्रतीचा समजूं नये.

अवा---**अवा उतरणें**--[कुंभाराच्या मडक्यांच्या भट्टीस अवा म्हणतात.] १ भट्टी नीट भाजून निघणें; भट्टींतील सर्व मडकीं अर्धीकच्चीं न राहतां पूर्णपणें भाजून व न फुटतां सगळीं निघणें. २ स्वतःचीं सर्व मुलें जगून मोठीं होणें. ३ उपाय सफल होणें.

अवा लुटणें--मकरसंक्रांतीस स्त्रिया मडक्यांची रास तिची पूजा करून सुवासिनींस दान करतात तो विधि.

***ज्यानें न पाहिला अवा त्यानें पाहिला दिवा**--कुंभाराची भट्टी पेटली म्हणजे मोठा जाळ होतो. परंतु तोहि ज्यास दिसत नाहीं त्यानें लहानसा दिव्याचा उजेड पाहिला, असें सांगणें हें कांहीं तरीच दिसतें. यावरून भलतीच अशक्य गोष्ट सांगणें. महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलेलें स्पष्ट दिसत असतां लहान सहान गोष्टींबद्दल माहिती सांगणें.

अवा---**अवाचे सवा**--एकाच्या जागीं सवा. भरमसाट, मनस्वी, जबर इ. ' बाजारांत माल थोडा आणि मागणी फार; अशी स्थिति पहातांच व्यापाऱ्यांनीं कापसाचा भाव अवाचे सवा वाढविला. '

अवाई---**अवाई पडणें**--बातमी उठणें, पसरणें; भुमका उठणें. ' मोठें बक्षिस मिळेल अशी अवाई पडल्यावर बक्षिसाचे लालचीनें जिकडून तिकडून तमाशेवाले आले. '-नि १४८.

***तवाई पुरवते पण अवाई पुरवत नाहीं.**--[अवाई=वार्ता, कंडी. फा. तबाही=नाश] प्रत्यक्ष संकटाला तोंड देतां येतें पण केवळ त्याच्या बातमीमुळें जी साशंक व अनिश्चित स्थिति उत्पन्न होते तीपासून अधिक त्रास होतो.

अवाक्षर---**अवाक्षर बोलणें**--[अवाक्षर=भलतें अक्षर, शब्द] एक ब्रहि तोंडावाटे (न) काढणें. ' तूं दुसऱ्या कोणाजवळ अवाक्षर बोललास, तर ठार मेलास म्हणून समजच. ' -उषःकाल.

अविचार---**अविचारें ओझें घेणें, शांतपणें तें साहणें**--आपण जर अविचारानें एखादें संकट आपणावर ओढवून घेतलें, किंवा एखादी जबाबदारी पतकरली तर ती निमूटपणें सोसणें किंवा त्यांतून पार पडणें हेंच योग्य, मग त्याबद्दल कुरकुर करून काय फायदा ?

अविचारें नको मानूं, हट्टें नको अपमानूं--पूर्ण विचार केल्याशिवाय एखाद्याच्या शब्दावर विश्वास ठेवूं नये किंवा त्यास मान देऊं नये; तसेंच हट्टानें एखाद्याचें म्हणणें अमान्यहि करूं नये, किंवा एखाद्याचा अपमान करूं नये. पूर्ण विचार केल्याशिवाय कोणतीहि गोष्ट करूं नये.

अविचारें न्याय करी, पश्चात्ताप पावे तरी--पूर्ण विचार केल्याशिवाय जर एखाद्या गोष्टीचा निर्णय केला तर पश्चात्ताप करण्याची पाळी येते.

अविद्वान्---**अविद्वानाचे हातीं, शहाणे शिकूनिया जाती**--एखाद्या अडाणी मनुष्यापासून बुद्धिवान् मनुष्यास पुष्कळ ज्ञानप्राप्ति होते. वरून अडाणी दिसणाऱ्या मनुष्यापासूनहि कांहीं गोष्टी घेण्यासारख्या असतात किंवा त्याच्या अनुभवांपासून आपण शहाणे होऊं शकतों.

अविश्वास---**अविश्वास हें नव्हे ज्ञान, सर्व परी मूर्खत्व मान**--प्रत्येक गोष्टीबद्दल अविश्वास बाळगणें हा कांहीं शहाणपणा नसून उलट मूर्खपणाच आहे. अश्रद्धा हा कांहीं गुण नव्हे.

अविश्वासानें बचाव, विश्वासानें पस्ताव--प्रत्येक गोष्टीवर अंधपणें विश्वास ठेवला तर पश्चात्ताप करण्याची पाळी येते. परंतु आपण जर साशंक वृत्ति ठेवली व खात्री झाल्याशिवाय विश्वास ठेवला नाहीं तर आपलें हानीपासून रक्षण होतें. 'न संशयमनारुह्य नरो भद्राणि पश्यति । संशयं पुनरारुह्य यदि जीवति पश्यति' ॥- सुर १६३-४३४.

अविश्वासें व्यवहार साधे, विश्वासें परमार्थ लाधे--व्यवहारांत मनुष्यानें साशंक वृत्ति धारण केली तर फायदा होतो; पण पारमार्थिक बाबतींत शंकेखोरपणा केला तर परमार्थप्राप्ति होत नाहीं. तेथें श्रद्धेचाच आश्रय करणें योग्य.

अव्यवस्थित---**अव्यवस्थितचित्तानां प्रसादोऽपि भयंकरः**--एखाद्या अव्यवस्थित (चंचल बुद्धीच्या) मनुष्याची कृपाहि परिणामीं भयंकर होण्याचा संभव असतो. (१) क्षणे तुष्टाः क्षणे रुष्टास्तुष्टा रुष्टाः क्षणे क्षणे । अव्य०...॥ (२) व्यवस्थितः प्रशान्तात्मा कुपितोऽप्यभयंकरः । अव्यवस्थितचित्तस्य प्रसादोऽपि भयंकरः ॥

अव्यापार---**अव्यापारेषु व्यापार**--भलतीच गोष्ट, जिचा आपला कांहीं संबंध नाहीं अशी भानगड करणें. पंचतंत्रां-

तील खुंटी उपटणाऱ्या वानराची अशी गोष्ट सांगतातः

एका रानांत सुतार लांकूड कापीत होते. जेवणाची वेळ झाली तेव्हां कापलेल्या लांकडांत एक खुंटी बसवून ते गेले. मागें एक वानर येऊन त्या लांकडावर बसला व उगीच खुंटी उपटूं लागला. प्रयत्नानें खुंटी निघाली पण लांकडाच्या फटींत जी त्याची शेपटी लोंबत होती ती चिमटून बसली व त्या वेदनेने तो वानर मेला. नसत्या कारभाराचें हें फळ. अव्यारेपु व्यापारं यो नरः कर्तुमिच्छति। स तत्र निधनं याति कीलोत्पाटीववानरः॥

“सरकारी शाळांची कशी काय व्यवस्था असते व तेथील विद्याभ्यासाच्या मानानें कोणत्या तऱ्हेचीं पुस्तकें तेथें चालणें जरूर आहे याविषयीं या पुस्तकांत उठाठेव करणें म्हणजे 'अव्यापा०–'.होणार.” –नि.

अव्हाटा——अव्हाटे भरणें––[अव्हाटा=आडमार्ग] आडमार्गाला जाणें, लागणें. 'मदांध मी ये भरलों अव्हाटे। तूं लावि आतां मज नीट वाटे॥'–सारुह १·७.

अशक्त——अशक्त असतांना, काम न होय जाणा— आपल्या अंगीं जर सामर्थ्य नसेल तर आपल्या हातून कांहीं कार्य व्हावयाचें नाहीं.

अशक्त जातो कुडा पावेतों––अशक्त मनुष्य फार दूर जाऊं शकत नाहीं. तो गेला तरी कुडापर्यंत जाईतोंच थकतो. तु०–सरड्याची धांव कुंपणापर्यंत.

अशक्त, दुर्जन, गांडू आणि कुर्रा—अशक्त, दुर्जन इ. दोष असतांना ताठा धरावयाचा हा अगदीं मूर्खपणा आहे. आपलें व्यंग ओळखून माणसानें नम्रता धरली पाहिजे.

अशक्तं, दुर्जनं, गांडयं पण तोंडयं––अशक्त, दुर्जन, आणि भित्रा, अशा स्थितींत गप्प बसावयाचें तें सोडून तोंडाळपणा करावयाचा. अंगांत सामर्थ्य नसतां अरेरावी करणें.

अशक्ताचे शत, बळियाचा एक हात.—अशक्त मनुष्यानें शंभर ठोसे मारले व सशक्तानें एक ठोसा मारला तरी परिणाम सारखाच. तु०–सो सोनारके और एक लोहारका.

अशाश्वत——अशाश्वत मनुष्यांनीं, शाश्वत क्रोध न ठेवणें मनीं––मनुष्य स्वतःच अशाश्वत असल्यामुळें त्यानें कोणाबद्दलहि कायमचा राग मनांत बाळगणें ठीक नव्हे. आपणच केव्हां इहलोकची यात्रा संपवूं याचा जर नेम नाहीं तर दुसऱ्याशीं कायमचें वैर कशाला करावें?

अशोक——अशोकवनिका न्याय––रावणानें सीतेस अशोक वनांतच कां ठेवली? तर कोठें तरी ठेवावयाची ती अशोक वनांत ठेवली इतकेंच; त्याला कांहीं विशिष्ट कारण नव्हतें. त्याप्रमाणें एखादी गोष्ट करण्याचे अनेक मार्ग असतां त्यांपैकीं कोणत्या तरी एखाद्या मार्गानें ती केली असतां त्याच विशिष्ट मार्गानें कां केली, इतर अन्य मार्गानें कां केली नाहीं, यास कांहीं विशिष्ट कारण नसतें. प्रत्यक्ष त्या मार्गानें केली एवढेंच. इतरहि मार्गानें होणें शक्य होतें. तेव्हां अमुकच मार्ग कां स्वीकारला असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नसतो.

अश्रु——अश्रु पटपट गळून पडणें––रडणें.–मोशांति ३·७.

अश्व——अश्वासी खारिका हळाहळ—खारका जरी गोड व पौष्टिक असल्या तरी घोड्याला त्यापासून अपाय होतो. एखादी गोष्ट जरी मुळांत चांगली असली तरी तिचा योग्य ठिकाणींच विनियोग केला तर ठीक; नाहीं तर तिचा भलत्याच ठिकाणीं उपयोग केल्यास अपाय मात्र होतो.

अष्ट——अष्ट कुलाचल––१ नील २ निषध ३ विंध्याचल ४ माल्यवान् ५ मलय ६ गंधमादन ७ हेमकूट ८ हिमालय.

अष्टगंध—आठ सुगंधी द्रव्यें: १ चंदन २ अगरु ३ देवदार ४ कोष्ट कोळिंजन ५ कुसुम ६ शैलज ७ जटामांसी ८ सुरगोरोचन.

अष्टगुण— (अ) ब्राह्मणाचे आठ गुण—१ दया २ क्षांति ३ अनसूया ४ शौच ५ अनायास ६ मंगल ७ अकार्पण्य ८ अस्पृहा. (आ) बुद्धीचे आठ गुण—१ शुश्रूषा २ श्रवण ३ ग्रहण ४ धारण ५ चिंतन ६ ऊहापोह ७ अर्थविज्ञान ८ तत्त्वज्ञान.

अष्ट दर्शन––(अ) १ गुरु, २ भाग्यवान, ३ दाता, ४ कामधेनू, ५ आरसा, ६ प्रभु, ७ सूर्य, ८ ईश्वर. (आ) १ दही, २ तूप, ३ आरसा, ४ मोहऱ्या, ५ बैल, ६ गोरोचन, ७ सुवर्ण, ८ पुष्पमाला.

अष्ट दानें—और्ध्वदेहिकांत द्यावयाचीं दानें: १ आमान्न २ उदकुंभ, ३ भूमि, ४ गोदान, ५ शय्या, ६ वस्त्र, ७ छत्र, ८ आसन.

अष्ट दिक्पाल—१ पूर्व–इंद्र २ आग्नेयी–अग्नि ३ दक्षिण–यम ४ नैर्ऋत्य–नैर्ऋत ५ पश्चिम–वरुण ६ वायव्य–मारुत ७ उत्तर–कुबेर (सोम) ८ ईशान्य–ईश.

अष्ट दिग्गज—१ ऐरावत २ पुंडरीक ३ वामन ४ कुमुद ५ अंजन ६ पुष्पदंत ७ सार्वभौम ८ सुमतिक.

अष्टदिशा—१ पूर्व २ आग्नेय ३ दक्षिण ४ नैर्ऋत्य ५ पश्चिम ६ वायव्य ७ उत्तर ८ ईशान्य.

अष्टदेह—देहाचे ८ प्रकार (पहिले चार पिंडीं व पुढील चार ब्रह्मांडीं): १ स्थूल २ सूक्ष्म ३ कारण ४ महाकारण ५ विराट ६ हिरण्य ७ अव्याकृत ८ मूलप्रकृति.–दा ८·७·४०.

अष्ट धातु—१ सोनें, २ रुपें, ३ तांबें, ४ कथील, ५ शिसें, ६ पितळ, ७ लोखंड, ८ तिखें (किंवा पारा).

अष्टधा मूर्ति—आठ प्रकारच्या मूर्ति–१ शैली २ दारुमयी ३ लौही ४ लेप्या ५ लेख्या ६ सैकती ७ मनोमयी ८ मणिमयी.–एभा २७.९८–१०३.

अष्ट नाग—आठ जातीचे सर्पः १ अनंत २ वासुकी ३ तक्षक ४ कर्कोटक ५ शंख ६ कुलिक ७ पद्म ८ महापद्म.

अष्ट नायका— १ श्रीकृष्णाच्या मुख्य ८ स्त्रिया–१ रुक्मिणी २ सत्यभामा ३ जांबवंती ४ कालिंदी (सूर्यकन्या) ५ मित्रवृंदा (अवंतीराजसुता) ६ याज्ञजिती (यज्ञजितकन्या) ७ भद्रा (कैकेयनृपकन्या) ८ लक्ष्मणा (महेंद्रनाथकन्या).

२ इंद्राच्या आठ नायका— १ ऊर्वशी २ मेनका ३ रंभा ४ पूर्वचिती ५ स्वयंप्रभा ६ भिन्नकेशी ७ जनवल्लभा ८ घृताची (तिलोत्तमा).

३ साहित्यांतील आठ नायका—१ वासकसज्जा २ विरहोत्कंठिता ३ स्वाधीनभर्तृका ४ कलहांतरिता ५ खंडिता ६ विप्रलब्धा ७ प्रोषितभर्तृका ८ अभिसारिका.

अष्टपैलू—१ आठ बाजू असलेला. २ अनेक विषयांत पारंगत; सर्वत्र हुशार, व्यवहारकुशल.

अष्टपैलूपणा—एखादा आठ पृष्ठभाग असलेला खांब जसा सर्व बाजूंनीं सारखा दिसतो किंवा एखादा आठ सारख्या बाजू असलेला हिरा कोणत्याहि बाजूकडून पाहिला तरी तेजःपुंज दिसतो, त्याप्रमाणें ज्याची विद्वत्ता अनेकांगी असते किंवा ज्यास अनेक विषय ज्ञात असतात अशा मनुष्यास हा वाक्प्रचार लावतात. 'राज्यभार अष्टपैलूपणास उचित'–पया ३२१.

अष्ट (देह) प्रकृति—१ पृथ्वी, २ पाणी, आप, ३ अग्नि, ४ वायु, ५ आकाश, ६ मन, ७ बुद्धि ८ अहंकार.–गीर ७१५.

अष्ट प्रधान—(अ) १ प्रधान २ अमात्य ३ सचीव ४ मंत्री ५ डबीर ६ न्यायाधीश ७ न्यायशास्त्री ८ सेनापति. प्रधान अमात्य सचीव मंत्री। डबीर न्यायाधिश न्यायशास्त्री। सेनापति त्यांत असे सुजाणा। अष्टप्रधानीं नृप मुख्य जाणा॥ (आ) १ वैद्य २ उपाध्याय ३ सचीव ४ मंत्री ५ प्रतिनिधी ६ राजाज्ञा ७ प्रधान ८ अमात्य.

अष्ट भाव—(अ) १ स्तंभ २ स्वेद ३ रोमांच ४ स्वरभंग (वैस्वर्य) ५ कंप किंवा वेपथु ६ वैवर्ण्य ७ अश्रुपात ८ प्रलय. (आ) १ कंप २ रोमांच ३ स्फुरण ४ प्रेमाश्रु ५ स्वेद ६ हास्य ७ लास्य ८ गायन.

९

अष्ट भैरव—आठ शिवगणः १ असितांग २ संहार ३ रुरु ४ काल ५ क्रोध ६ ताम्रचूड ७ चंद्रचूड ८ महा. इतर कांहीं नावें:– कपाल, रुद्र, भीषण उन्मत्त, कुपति.

अष्ट भोग— १ अन्न २ उदक ३ तांबूल ४ पुष्प ५ चंदन ६ वसन ७ शय्या ८ अलंकार.

अष्ट मंगल—आठ मंगलदायक वस्तू: (अ) १ ब्राह्मण २ अग्नि ३ गाय ४ सुवर्ण ५ घृत ६ सूर्य ७ जल ८ राजा. (आ) १ सिंह २ वृषभ ३ गज ४ पूर्णोदक कुंभ ५ व्यंजन ६ निशाण ७ वाद्य ८ दीप.

अष्ट मंगल घृत—१ वेखंड २ कोष्ट ३ ब्राह्मी ४ मोहऱ्या ५ उपळसरी ६ सैंधव ७ पिंपळी ८ तूप.

अष्ट मर्यादागिरी—१ हिमालय २ हेमकूट ३ निषध ४ गंधमादन ५ नील ६ श्वेत ७ शृंगवार ८ माल्यवान.

अष्ट महारोग— १ वातव्याधि २ अश्मरी ३ कृछ्र (कुष्ट) ४ मेह ५ उदक ६ भगंदर ७ अर्श ८ संग्रहणी.

अष्ट महासिद्धि—(अ) १ अणिमा २ महिमा ३ लघिमा ४ प्राप्ति ५ प्राकाश्य ६ ईशिता ७ वशिता ८ प्राकाम्य. (आ) १ अणिमा २ महिमा ३ लघिमा ४ गरिमा ५ प्राप्ति ६ प्राकाम्य ७ ईशिता ८ वशिता.

अष्ट मातृका—१ ब्राह्मी २ माहेश्वरी ३ कौमारी ४ वैष्णवी ५ वाराही ६ इंद्राणी ७ कौबेरी ८ चामुंडा.

अष्ट मुद्रा—१ सुरभी २ ध्यान ४ योनी ५ कूर्म ६ पंकज ७ लिंग ८ निर्याण.

अष्ट मूर्ति—१ पृथ्वी २ जल ३ तेज ४ वायु ५ आकाश ६ सूर्य ७ चंद्र ८ ऋत्विज्.

अष्ट योगिनी—पार्वतीच्या सख्याः (अ) १ मंगला २ पिंगला ३ धन्या ४ भ्रामरी ५ भद्रिका ६ उल्का ७ सिद्धा ८ संकटा. (आ) १ मार्जनी २ कर्पुरतिलका ३ मलयगंधिनी ४ कौमुदिका ५ भेरूंडा ६ माताली ७ नायकी ८ जया (शुभाचारा). कधीं कधीं सुलक्षणा, सुनंदा हीं नांवें अंतर्भूत करतात.

अष्ट लवण—१ पादेलोण २ ओवा ३ आमसुलें ४ आम्लवेतस ५ दालचिनी ६ वेलदोडे ७ मिऱ्यें.

अष्ट लोह—पंचलोह (५) + १ कांत, २ मुंडक, ३ तीक्ष्णक लोह = ८ लोह.

अष्ट वर्ग—आठ औषधींचा समुदायः १ ऋषभ २ जीवक ३ मेद ४ महामेद ५ ऋद्धि ६ वृद्धि ७ काकोली ८ क्षीरकाकोली. जीवकर्षभकौ मेदौ काकोल्यावृद्धिवृद्धिकी।

अष्ट वसु—प्रति मन्वंतरांत आठ वसु असतात. चालू मन्वंतरांतील धर्मऋषि व दक्षकन्या वसु यांचे पुत्र–(अ) १ धर २ ध्रुव ३ सोम ४ आप ५ अनिल ६ अनल ७ प्रत्यूष ८ प्रभास. (आ)१ द्रोण २प्राण ३ध्रुव ४ अर्क ५अग्नि ६दोष ७ वसु ८ विभावसु.

अष्ट वायन—दान करावयाच्या आठ वस्तू: १ हळकुंड २ सुपारी ३ दक्षिणा ४ खण ५ सूप ६ कंकण ७ कांचमणी ८ धान्य.

अष्टविध समाधि—समाधियोगाचे आठ प्रकार—१ यम २ नियम ३ आसन ४ प्राणायाम ५ प्रत्याहार ६ धारणा ७ ध्यान ८ समाधि.

अष्ट विनायक—१ मोरेश्वर गणनाथ(मोरगांवीं–जि. पुणें) २ बल्लाळेश्वर (मूळ मुरूड–जंजिरा; हल्लीं पाली–जि. कुलाबा) ३ विनायक (मढ–कर्जतनजीक, जि. कुलाबा) ४ चिंतामणी (थेऊर लोणीनजीक, जि. पुणें) ५ गिरिजात्मक (लेण्याद्रि जुन्नरजवळ, जि. पुणें) ६ विघ्नेश्वर (ओझर जुन्नरजवळ, जि. पुणें) ७ गणपति (रांजणगांव, पुणें-नगरसडकेवर) ८ गजमुख (सिद्धटेक दौंडनजीक, जि. नगर).

अष्ट विवाह—१ ब्राह्म २ दैव ३ आर्ष ४ गांधर्व ५ राक्षस ६ प्राजापत्य ७ आसुर ८ पैशाच.

अष्ट सिद्धि—(अ) १ अणिमा, २ महिमा, ३ गरिम ४ लघिमा, ५ प्राप्ति ६ प्राकाम्य, ७ ईशित्व, ८ वशित्व (आ) १ अणिमा २ महिमा ३ लघिमा ४ प्राप्ति ५ प्राकाश्य ६ ईशिता ७ वशिता ८ प्राकाम्य. अष्टमहासिद्धि पहा.

अष्टांग—शरीराचीं आठ अंगें: (अ)१-२ हात,३ उर,४ कपाल ५–६ नेत्र, ७ ग्रीवा, ८ कटि. (आ) १–२ हात, ३ उर, ४ भाल ५–६ पाय ७–८ गुडघे. (इ) १–२ हात ३–४ पाय ५–६ गुडघे ७ वाचा ८ मन. (ई) १ हात २ पाय ३ गुडघे ४ छाति ५ मस्तक ६ दृष्टि ७ मन ८ वाणी.

वैद्यकशास्त्राचीं अष्टांगें—१ शल्य २ शालाक्य ३ काय चिकित्सा ४ भूतविद्या ५ कौमारभृत्य ६ अगदतंत्र ७ रसायनतंत्र ८ वाजीकरणतंत्र.

स्मृतीचीं अष्टांगें—धर्मशास्त्र-१ कायदा २ न्यायाधीश ३ पंच ४ लेखक ५ ज्योतिष ६ सोनें ७ अग्नि ८ पाणि.

पूजेचीं अष्टांगें—१ पाणी २ दूध ३ तूप ४ दहीं ५ दर्भ ६ तांदूळ ७ जव ८ सर्षप.

मैथुनाचीं-अष्टांगें—१ स्मरण २ कीर्तन ३ क्रीडा ४ दर्शन ५ गुह्य भाषण ६ चिंतन ७ निश्चय ८ संयोग.

बुद्धीचीं अष्टांगें—१ शुश्रूषा २ श्रवण ३ ग्रहण ४ धारणा ५ चिंतन ६ ऊहापोह ७ अर्थविज्ञान ८ तत्त्वज्ञान.

नमनास लागणारीं अष्टांगें—१ हात २ पाय ३ गुडघे ४ वक्षस्थल ५ मस्तक ६ दृष्टि ७ मन ८ वाणी.

योगाचीं अष्टांगें—१ यम, २ नियम, ३ आसन, ४ प्राणायाम, ५ प्रत्याहार, ६ धारणा, ७ ध्यान, ८ समाधि.

अष्टादश पदें—गयाक्षेत्रीं विष्णुपदाजवळ ज्या अठरा पदांवर पिंडदान करावें लागतें तीं: १ कश्यप २ अगस्ति ३ क्रौंच ४ मतंग ५ कण्व ४ दधीच ७ गणेश ८ कार्तिकेय ९ ब्रह्मा १० रुद्र ११ इंद्र १२ सूर्य १३ चंद्र १४ आहवनीय १५ दक्षिण १६ गार्हपत्य १७ सभ्य १८ आवसथ्य.

अष्टाधिकार—(अ) १ जलाधिकार २ स्थलाधिकार ३ ग्रामाधिकार ४ कुललेखन ५ ब्रह्मासन ६ दंडविनियोग ७ पौरोहित्य ८ ज्योतिष. (आ) १ कोळीपण २ पाटिलकी ३ देशमुखी किंवा महाजनकी ४ कुळकरण ५ वर्तकी ६ धर्माधिकार ७ उपाद्धिकभटपणा ८ जोसकी–जोशीपणा. (इ) १ स्नान २ शौच ३ भोजन ४ निद्रा वगैरे. 'एका खणाचे खोलींत सगळे अष्टाधिकार करू म्हणतां, पण ते होतील कसे ?'

अष्टाक्षरी मंत्र—'कसें करूं काय करूं' हा आठ अक्षरांचा मंत्र. अनिश्चित मनाची स्थिति.

अष्टोपद्वीपें—१ स्वर्णप्रस्थ, २ चंद्राशुक्ल, ३ आवर्तन, ४ रमणक, ५ मंदरहरिण, ६ पांचजन्य, ७ सिंहल, ८ लंका.

***अष्टपुत्री मेहुणी कुत्री**—थट्टेनें विवाहप्रसंगीं कुरवंडीच्या वेळीं नवरामुलगा मेहुणीस आशीर्वाद देतांना म्हणतो.

असंग——असंगाशीं संग प्राणाशीं गांठ—भलत्याच मनुष्याशीं, दुर्जनाशीं सहवास केला असतां प्रसंगीं प्राणावरहि बेतण्याची वेळ येते.–छच ८१. असत्संगाद् गुणज्ञोपि विषयासक्तमानसः । अकस्मात्प्रलयं याति गीतरक्तो यथा मृगः ॥–सुर ८७-७.

असणें——असतां उघडें मागील दार, होती चोरी आणि परद्वार—आपण पुढें पुष्कळ बंदोबस्त ठेवला व पण मागील दार उघडें ठेवलें तर चोर व व्यभिचारी लोक घरांत शिरण्याचा संभव असतो. घरांतील स्त्रीवर आपला योग्य दरारा नसेल तर घरांतील द्रव्यहि जाण्याचा संभव असतो व तीहि व्यभिचारी होण्याचा संभव असतो. तेव्हां घरांतील सर्व व्यक्तींवर योग्य तो दाब पाहिजे. घरांतील शत्रु परवडत नाहीं.

असतां उद्योगी जन, त्यास कधीं न चैन—खटपटी माणसें नेहमीं कांहीं उद्योग किंवा ढवळाढवळ करीत असतात. एरवीं त्यांना चैनच पडत नाहीं.

असतां एक प्राणी, बहु कल्पना मनीं—मनुष्य एकटाच

पण त्याच्या डोक्यांत मात्र अनेक विचार घोळत असतात. तु०- One head and a thousand anxieties.

असतां काळी कोंबडी, घालितसे श्वेत अंडीं—कोंबडी जरी काळी असली तरी तिचीं अंडीं पांढरींच असतात. रंगावर कांहीं अवलंबून नसतें. कारणाच्या ठिकाणीं इतर गोष्टी असल्या तरी कधीं कधीं कार्य चांगलेंच होत असतें.

असतां कोणी ठक, न म्हणे मी आहे देख—जो स्वतः ठक असतो तो कांहीं मी ठक आहें असें सांगत फिरत नाहीं. लबाड मनुष्याला आपण ओळखून काढावें लागतें. तो कांहीं आपली लबाडी उघड करणार नाहीं. तेव्हां मनुष्य पाहून, पारखून त्याच्याशीं व्यवहार केला पाहिजे.

असतां खरी स्तुति, समूळ विस्तारती—एखादा मनुष्य स्तुतीस पात्र असेल व त्याची योग्य स्तुति होईल तर ती वाढीस लागेल. योग्यता नसतां स्तुति केली तर तिला कोणी मानणार नाहीं.

असतां खालीं हात, मनुष्याचें नाहीं चालत—मनुष्य विपत्तींत सांपडला म्हणजे अगतिक होतो. त्याला कोणत्याहि गोष्टींत प्रगति करतां येत नाहीं. जवळ पैसा नसला म्हणजे कांहीं एक करूं शकत नाहीं.

असतां चतुष्कर्णी, गुह्य न राहे जनीं—एखादी गोष्ट चतुष्कर्णी झाली म्हणजे ती गुप्त राहूं शकत नाहीं. गोष्ट गुप्त ठेवावयाची असल्यास ती कोणालाच सांगतां कामा नये. मूळ सवि. मधील म्हण–असतां चतुष्कर्णीं, गुह्य राहे जाणीं–No secrets but between two अशी आहे. षट्कर्णी होऊं नये.

असतां चांगला हुन्नरी, सर्व ठिकाणीं पोटभरी—ज्या मनुष्याच्या अंगांत कलाकौशल्य आहे, तो कोठें गेला तरी पोट भरूं शकतो. अंगांत विद्या असेल तर उपाशी राहणार नाहीं. तुलना–नरा हरहुन्नरा.

असतां चांगली आघाडी, होती बरवी पिछाडी—पुढील बाजू जर चांगली असेल तर मागील बाजूहि चांगली होण्याचा संभव असतो. कार्याचा आरंभ जर चांगला केला तर शेवटहि चांगला होतो. पुढील सैन्य लढलें तर मागीलहि लढतें.

असतां चांगली दोस्ती, अभिमानानें बिघडती–उत्तम मैत्री असली तरी त्यांतील एखाद्यानें खोटाच अभिमान बाळगला तर ती मैत्री बिघडते. मित्राशीं गर्विष्ठपणाचें वर्तन केल्यास मैत्री कितीहि दृढ असली तरी टिकणें शक्य नाहीं.

असतां तरुण कोंबडें, तया नावडे कोंडवाडे—कोंबडें तरुण असतें तोंपर्यंत त्यास कोंडून राहणें आवडत नाहीं. जोंपर्यंत अंगांत संचार करण्याचें सामर्थ्य असतें तोंपर्यंत एकाच जागीं खिळून राहणें आवडत नाहीं. तरुणांना स्वातंत्र्य फार प्रिय असतें. –सवि ४३१९.

असतां तारुण्याचा भर, काळव्यय उत्तम कर—तारुण्याचा जोम अंगांत असतां जर आयुष्य चांगल्या प्रकारें घालविलें तर पुढें पश्चात्ताप करण्याची पाळी येत नाहीं.

असतां थंड प्रकृती, भावना चांगली राहती—मनुष्य जर शांत वृत्तीचा असेल तर त्याच्या मनांत वाईट वासना सहसा येत नाहींत. तो शांतपणें सर्व गोष्टींचा विचार करून आपली मनःप्रवृत्ति बनवितो.

असतां दिवसाची चलती, सर्व कामें चांगलीं होतीं—अनुकूल काळ असला म्हणजे सर्व गोष्टी चांगल्या प्रकारें जुळून येतात.

असतांना दैव बरें, बुडवितांही न मरे—दैव अनुकूल असलें म्हणजे पाण्यांत बुडवून सुध्दां माणूस मरत नाहीं. म्हणजे आपत्ति आली तर तींतूनहि यशस्वीपणें पार पडतो; त्याचें नुकसान करावयाचें म्हटलें तरी होत नाहीं.

असतांना निर्धनी, थोर इच्छा धरी मनीं—जवळ तर द्रव्य नाहीं परंतु आकांक्षा थोर; तर त्याचा उपयोग काय ?

असतां पतिव्रता सुंदरी, तिचा प्रकाश घरीं दारीं—घरांत स्त्री सुंदर आणि पतिव्रता असेल तर तिचें तेज सर्वांवर पडतें व कुटुंब सुखी राहातें.

असतां पूर्वी ताकीद, राहवें सदां सावध—कोणत्याहि संकटाची आगाऊ सूचना मिळाली असली म्हणजें प्रतिकाराची तजवीज करून ठेवून सावध राहातां येतें. तु०- Forewarned is fore-armed.

असतां पैशाची पूर्णता, नसे मित्रांची न्यूनता—जवळ पुष्कळ संपत्ति असली म्हणजे मित्रांची वाण नसते; ते वाटेल तितके भोंवती गोळा होतात.

असतां मांजर अंध, उंदीर होतो धुंद—मांजराला दिसत नाहींसें झालें म्हणजे उंदराचें फावतें. घरांतील कर्तबगार व्यक्तीचा दरारा नसला, कोणी अडपता दडपता नसला म्हणजे लुंग्या सुंग्या लोकांची चंगळ उडते.

असतां यजमान सुस्त, सेवक होतो खाऊन मस्त—यजमान ढिला असला म्हणजे चाकर उन्मतपणें वागूं लागतात.

असतां लहान घट, दिसती जाड कांठ–मडकें लहान असलें म्हणजे त्याच्या मानानें त्याचे कांठ जाड दिसूं लागतात. मुख्य गोष्ट जर तितकी महत्त्वाची नसेल तर आनुषंगिक

गोष्टींना साहजिकच जास्त महत्त्व येतें.

असतां लहान, थोरा अडवी जाण—एखादी लहान गोष्ट सुद्धां जेव्हां एखाद्या मोठ्या गोष्टीचा प्रतिकार करते तेव्हां म्हणतात. तुलना – हत्तीला अंकुश केवढा लागतो.

असतां वय लहान, बोल मोठे जाण—१ एखादा मुलगा लहान असून त्याच्या मानानें फार शहाणपणाचें किंवा प्रौढास शोभणारें भाषण करूं लागला म्हणजे म्हणतात. तु०– लहान मूर्ति पण थोर कीर्ति. २ एखादा मुलगा आपलें वय न ओळखून मोठ्या माणसास प्रत्युत्तर देऊं लागला तर म्हणतात. तु०–लहान तोंडीं मोठा घांस घेणें.

असतां संपत्ति लीन व्हावें, विपत्ति काळीं धैर्य धरावें—वैभव प्राप्त झालें असतां नम्रता धारण करावी व आपत्काळ प्राप्त झाला असतां धीर सोडूं नये. विपत्काळीं धैर्य प्रभुपाणिं सहिष्णुत्व बरवें।

असतां सर्व गुणसंपन्न, एक तरी राहतो दुर्गुण—मनुष्यामध्यें कितीहि सद्गुण असले तरी एखादा तरी दोष असण्याचा संभव असतोच. केवळ निर्दोष अशी वस्तु जगांत सांपडणें अशक्य.

असतां सळई इतकें भोंक, बरमा जाईल देख—[बरमा= लांकडास भोंक पाडण्याचें हत्यार; गिरमिट] लहानसें जरी छिद्र सांपडलें तरी त्यांतून गिरमिट जाउन तें मोठें करतां येतें. किंचित् दोष जरी सांपडला तरी त्याच्या आधारानें मोठे दोषहि मनुष्याच्या अंगीं चिकटूं शकतात. किंवा दुर्गुण आरंभीं लहान असला तरी पुढें तो वाढण्याचा संभव असतो. तुलना– (१) छिद्रेष्वनर्था बहुली भवंति। (२) चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः।

असतां सूर्याचें तेज, दीपापुढें निस्तेज—सूर्य जरी अत्यंत तेजस्वी असला तरी त्याचें तेज दिव्यापुढें चालत नाहीं. दिवा आपण रात्रीं लावतो व त्यावेळीं सूर्य नसतो; त्यामुळें सूर्याला आपलें तेज दिव्यापुढें दाखवितां येत नाहीं. यावरून अत्यंत पराक्रमी मनुष्य असला तरी अयोग्य वेळीं त्याच्या पराक्रमाचा कांहीं उपयोग होत नाहीं.

असति अभागी आणि अशक्त, त्यांची हेळणा करणें न उक्त—दुर्दैवी व दुर्बल लोकांची हेटाळणी करणें योग्य नव्हे.

असतीं मुलें लहान, परी त्यांचे तीक्ष्ण कान—मुलें जरी आपल्याला लहान दिसत असलीं व त्यांना कांहीं समजत नाहीं अशी जरी आपली समजूत असली तरी त्यांना सुद्धां पुष्कळ गोष्टी समजतात. तेव्हां मोठ्या माणसांनीं त्यांच्यासमोर जपून बोलावें. त्यांना समजूं नये अशी इच्छा असेल अशा गोष्टी त्यांचे देखत बोलूं नयेत.

असतील फळें, तर होतील बिळें—घरांत फळें असतील तर तीं नेऊन ठेवण्याकरितां उंदीर घरांत बिळें करतील पण तीं नसतील तर घरांत बिळें होण्याचेंहि कारण नाहीं. कारणावांचून कांहीं कार्य घडत नाहीं.

असतील बाळ, तर फेडतील काळ—एखाद्यास मुलें असल्यास तीं त्याच्या म्हातारपणीं तरी त्याची विपन्नावस्था दूर करण्यास समर्थ होतात.

असतील मुली, तर पेटतील चुली—मुलांसारखें मुलींचेंहि महत्त्व आहे ही गोष्ट पटविण्याकरितां ही म्हण योजितात. मुलींचें काम स्वयंपाकाचें असतें, मुलांचें नसतें, मुली असल्या तरच त्या मुलांबरोबर लग्नें करून नवीन संसार थाटण्याचा संभव व गृहस्थाश्रम पुढें चालण्याचा संभव. केवळ मुलगे असून कांहीं संसाराचें गाडें पुढें धकत नाहीं. तेव्हां सृष्टिक्रम चालण्याकरितां मुलींचीहि आवश्यकता आहे.

असतील शितें, तर मिळतील भुतें—शितें असलीं म्हणजे तीं खाण्याच्या आशेनें भुतें गोळा होतात. तीं नसलीं तर कोणीहि येत नाहीं. त्याचप्रमाणें आपणांजवळ माया असेल, कांहीं लभ्यांश होण्याची आशा असेल तर इष्टमित्र, नातेवाईक वगैरे मंडळी भोंवतीं जमतात. तीच जर कांहीं आशा नसेल तर बोलाविलें तरीहि कोणी येत नाहीं. तुलना— १ संपदा बहु आलियावरी, सोयरे जमा होती त्या घरीं। गेलियास ती रुष्ट होउनी, बंधु सोयरे जाति सोडुनी॥ २ शितें तोंवरतीं भुतें भोंवतीं — अमृतराय कटाव.

असते कडू मात्रा जरी, बहू चांगले गुण करी—औषध जरी घ्यावयास कडू लागलें तरी परिणामीं तें हितकर असतें म्हणून सहन केलें पाहिजे.

असल्याचा बाप, नसल्याची आई—जो मुलगा मिळवता असतो तो बापाला आवडतो; पण आई जो विशेषतः असमर्थ आहे अशा मुलाचीच जास्त काळजी घेते.

असल्याचे विकार, नसल्याचे घोरंकार—ज्याच्याजवळ कांहीं असेल त्याला काळजी. ज्याजवळ कांहीं नसतेंच त्याला कसलीच काळजी नसते.

असले नसले न गणी, तो एक सुखी प्राणी—असलेल्यांत जो सुख मानतो व नसलेल्याबद्दल दुःख करीत नाहीं तो सुखी.

असलें म्हणजे शिरीं बसतें नसलें म्हणजे स्वप्नीं दिसतें—एखाद्याचें मूल जवळ असलें तर तें त्याच्या आज्ञेंत न वागतां

त्याच्या डोक्यावर बसायला लागतें व नकोसें होतें; पण जवळ नसलें म्हणजे पुन्हा हवेसें वाटतें व त्याबद्दलच स्वप्नें पडावयास लागतात. तेव्हां अशा मनुष्याची मोठी चमत्कारिक स्थिति होते. तसेंच ज्या मनुष्याला मूल नसतें त्याला तें हवें हवेंसें वाटतें पण ज्याला असतें त्याला पुष्कळदां नकोसें होतें.

असलो चलो जावचेपरस हांटींक फातर पडल्यार आदाव आसिल्लो—(गो.) असला मुलगा जाण्यापेक्षां ओटींत दगडच असलेला काय वाईट ?

असल्या दाटी नि नसल्या खोळंबा—असून अडचण नसून खोळंबा. एखादी वस्तु जवळ असली म्हणजे नकोशी होते व तीपासून अडचण वाटूं लागते पण नसली म्हणजे मात्र तीवांचून अडून राहतें.

असल्या (असेल त्या) दिवशीं दिवाळीं, नाहीं तेव्हां (नसेल त्या दिवशीं) शिमगा; आहे ते दिवस दिवाळी नाहीं ते दिवस शिमगा—(दिवाळींत माणूस चैनींत राहातो व शिमग्यांत बोंब मारतो. यावरून एकदां उधळपट्टी तर दुसऱ्यांदा उपासमार.) एखादा मनुष्य पुढील काळाची काळजी न करतां जेव्हां जवळ कांहीं असेल तेव्हां सर्व उधळून टाकतो व नसलें म्हणजे त्यावर उपासमार काढण्याची पाळी येते. “ जो मनुष्य ‘ आहे ते दिवस दिवाळी, नाहीं ते दिवस शिमगा, ’ या न्यायानें वागणारा आहे त्याच्या घरादारावरून नांगर फिरून त्याच्या हातांत लवकरच नारळाची आई येण्याचा संभव आहे. ” —निचं.

असशील बेताल तर धर भजनांत टाळ—जर तुझी वागणूक योग्य निर्बंध पाळून होत नसेल, तुझ्या वागणुकींत शिथिलपणा असेल व नीतिनियमांस अनुसरून तुझें वर्तन होत नसेल तर त्या अपराधाचें परिमार्जन करण्यासाठीं निदान देवाचें नांव घेऊन भक्ति तरी कर; म्हणजे परमेश्वर तुला क्षमा करील.

असुनी द्रव्य आपले घरीं, गाढवापरी भोग करी—स्वतः सधन असून व सामर्थ असून जो कृपणाप्रमाणें ओंगळ आचरण करतो तो ओझ्याच्या गाढवाप्रमाणें नव्हे काय ? ‘साखरेच्या गोण्या बैलाचिये पाठीं ।’ याप्रमाणें त्याची स्थिति.

असूं दे माझें चोरटें, घरदार राखतें—स्वतःचें मूल, बाळगलेलें जनावर चोरटें असलें तरी तें आईबापाला, धन्याला नकोसें होत नाहीं. त्यानें जरी घरांत चोरी केली तरी निदान दुसऱ्यापासून घराचें रक्षण करतें व दुसऱ्याचा घरांत प्रवेश होऊं देत नाहीं, या दृष्टीनें तें उपयुक्त ठरतें. कांहीं कांहीं मांजरें चोरून कांहीं जिन्नस खातात किंवा दूध वगैरे पितात. तरीहि तीं उंदरांपासून घराचें रक्षण करतात या दृष्टीनें तरी त्यांचा उपयोग असतोच. म्हणून अशा बाबतींत ही म्हण वापरतात. यावरून ज्याच्या अंगीं कांहीं सद्गुण आहेत त्याच्या अंगीं जरी एखादा दुर्गुण असला तरी तो क्षम्य मानला जातो.

असून अडथळा, नसून खोळंबा—एखादी गोष्ट अशी असते कीं, तिचा नेहमीं उपयोग नसतो. पण जेव्हां जरूर लागेल तेव्हां मात्र तिची इतकी निकड असते कीं, तीवांचून सर्व काम अडून राहतें. तेवढ्याकरितां ती नेहमीं बाळगावी तर तिची अडचण सारखी सोसावी लागते पण टाकून देण्यासहि धीर होत नाहीं. कारण वेळेवर ती अत्यंत उपयोगी असते. अशा प्रकारच्या चमत्कारिक परिस्थितींत ही म्हण वापरतात.

असून गांठीं, न खाय पुरतें पोटीं—जवळ पैसा व सर्व गोष्टी अनुकूल असतां जो स्वतः पोटभर खातहि नाहीं व आपल्या द्रव्याचा उपभोग घेत नाहीं, अशा कंजुष मनुष्याबद्दल ही म्हण वापरतात.

असे अंमलाचा जोर, म्हणून जाळूं नये उन्हापाण्यानें घर—हातांत सत्ता असली तरी तिचा उपयोग लोकांचा छळ करण्याकरितां करूं नये.

असे जी प्रशस्त रीति, तिजला सोडवण असती—जी योग्य प्रथा असते ती बहुधा अशी असते कीं, ती सर्वतोपरी अनुसरतां आली नाहीं तरी तींत कांहीं पर्याय असून तिचा थोडा फार त्याग केला तरी आपला मार्ग तींतून काढतां येतो. ती अगदीं निरपवादक अशी नसते. नाहीं तर त्या पध्दतीस कोणी प्रशस्त मानणार नाहीं. तु०—There is no general rule without an exception.

असेल अंगावर मांस, तोंवर घेतील घांस-वास—जोंवर मनुष्य जीवंत असतो तोंपर्यंत त्याला शरीरपोषण कसें तरी करावेंच लागतें. जोंवर एखाद्याच्या शरीरावर मांस असेल तोंपर्यंत त्याचे लचके तोडणें शक्य असतें. जोंपर्यंत एखाद्याजवळ कांहीं माया असेल तोंपर्यंत त्याला हळूहळू नागविणें शक्य असतें व तोंपर्यंत त्याचें शोषण चालू असतें. त्याच्या जवळची माया संपली म्हणजे त्याला टाकून देण्यांत येतें; कारण त्याजवळून कांहीं मिळेनासें होतें.

असेल आई तर मिळेल साई—आई जर जीवंत असेल तर ती आपल्या मुलाला दुधावरची साय खायला देईल. ती नसेल तर त्या मुलाची कोण परवा करणार ? आईची जी माया आहे तिची बरोबरी दुसरे कोणी करूं शकणार नाहीं. व आई नसेल तर आपली कोणी काळजी घेणार नाहीं, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवली पाहिजे.

असेल आवड, तर भर दुसऱ्याचें घरीं कावड— आपल्याला एखाद्या गोष्टीची जरूर असली किंवा एखादी विद्या शिकावयाची असली तर ती ज्याच्याजवळ असेल त्याची मर्जी प्रसन्न करून घेऊन आपला हेतु साध्य केला पाहिजे. याकरितां त्याची सेवा केली पाहिजे. पूर्वी कोणतीहि विद्या शिकण्याकरितां गुरूची सेवाहि करावी लागत असे.

असेल ठीक तर बोलेल नीट— जोंपर्यंत मनुष्याचें यथास्थित चाललें असेल किंवा त्याचे संबंध सलोख्याचे असतील तोंपर्यंत त्याला वांकडें बोलण्याचें कारण पडत नाहीं; तोंपर्यंत त्याची वागणूक वगैरे सरळच असते.

असेल तें विटवा (लोटवा), नसेल तें भेटवा—जवळ आहे त्याचा वीट मानावयाचा व नसेल त्याबद्दल इच्छा धरीत असावयाचें, या अनुदार वृत्तीबद्दल म्हणतात. आहे तें मात्र टाकून द्यावयाचें व निराळें कांहीं मागत बसावयाचें. जवळ असेल त्याचा योग्य उपयोग न करतां अमुक नाहीं, तमुक नाहीं, म्हणून विनाकारण कुरकुर करणाऱ्या बद्दल म्हणतात.

असेल तेव्हां तेल-तवा, नसेल तेव्हां कोरडे जेवा; असेल तेव्हां सोहळे, नाहींतर ओसरीवर लोळे; असेल त्या दिवशीं दिवाळी, नसेल त्या दिवशीं शिमगा—जोंपर्यंत कांहीं जवळ असेल तोंपर्यंत चंगळ करावयाची, सर्व उडवून टाकावयाचें व मग जें मिळेल त्याचेवर कसाबसा निर्वाह करावयाचा. असा बेशिस्त कारभार.

असेल दाम तर उचललें (उरकलें) काम—जवळ पैसा असेल तर आपलें काम करून घेतां येतें; तो नसेल तर कांहीं होत नाहीं. तुलना—दाम करी काम.

असेल माझा हरि, तर देईल बाजेवरी-खाटल्यावरी— परमेश्वर सर्व प्राण्यांच्या सुखदुःखाकडे लक्ष्य देत असतो व त्यामुळें तो कोणास उपाशी मरूं देत नाहीं. तेव्हां जर आपला कैवारी परमेश्वर असेल तर खाटल्यावर बसून राहिलें, कांहीं हालचाल केली नाहीं तरी योगक्षेम चालला पाहिजे. जे केवळ दैवावर हवाला ठेवून वागणारे असतात, त्यांची ही वृत्ति असते.

असेल मालक शेतीं तर शेती, नाहींतर माती—स्वतः श्रम केल्याशिवाय शेती करण्यांत फायदा होत नाहीं. दुसऱ्याकडून शेती केल्यास पदरांत तोटा पडतो.

असेल शेती काशीला, तर नाशील पैशाला—शेतीपासून मालक जर दूर राहात असेल तर त्या शेतीपासून फायदा व्हावयाच्या ऐवजीं पदराला खार मात्र लागावयाचा. तु०—धनी नाहीं पास तर शेतीं होईल धननाश.

असा-अशी-असें— असा—तसा—कोणी क्षुल्लक, साधारण प्रतीचा ' आजचा दरबार कोणी होता असा तसाच. '

अशांत जीव नाहीं— असल्या या साऱ्या गोष्टींत कांहीं अर्थ नाहीं.—गांवगाडा. ' राम नसणें ' पहा.

अशी आहे तशी आहे—एखाद्या गोष्टींचें वर्णन करूं लागल्यास म्हणतात.-विज्ञावि ८'३'५०.

अशी राहणें—विधवेनें केशवपन न करतां सकेशाच असणें. ' ही चांडाळीण अशी राहिली आहे, म्हणून मला घरांतील किती तरी कामें करावीं लागतात. '—सदानंद.

अशी होणें; असें होणें—विधवा होणें. ' तिकडच्या मरणानें मी अशी झालें ना ! '—अस्तंभा १५८.

***असा कुणबी हाऱ्या, तर वाटेवर लावी काट्या**—एखाद्या शेतकऱ्याच्या शेतांतून वाट असली व त्याच्या मनांत लोकांनीं जाऊं नये असे असेल तर तो हट्टानें वाटेवर कांटे लावून ठेवतो व लोकांनीं पुन्हा पुन्हा काढले तरी पुन्हा पुन्हा लावतो. हट्टी मनुष्याबद्दल सामान्यपणें वापरतात

असा देव पारखी कीं, दोन्हीं रत्नें सारखीं—जेथें नवरा बायको अगदीं परस्परांच्या स्वभावास अनुसरून असतात तेव्हां म्हणतात. मात्र ही म्हण सुस्वभावी दंपतीच्या ऐवजीं वाईट स्वभावाच्या जोडप्यास अनुलक्षूनच वापरण्यांत येते. तुलना— म्हसोबास सटवाई.

असा लेक (मुलगा) द्याणा तर घरोघर (माझ्या) सुना—एखाद्या मनुष्याचा मुलगा व्यभिचारी निघाला म्हणजे त्यास म्हणतात.

असा साधा अर्थ कीं ज्यांत घडे परमार्थ— मनुष्यानें स्वतःचें हित तर केलेंच पाहिजे; परंतु तें करतांना अशी दृष्टि ठेवली पाहिजे कीं, आपल्या हिताबरोबर दुसऱ्यांचेंहि कांहीं हित व्हावें. केवळ आपलाच स्वार्थ साधूं नये किंवा दुसऱ्याचें नुकसान करून आपलें हित करूं नये. ' एते सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थान्परित्यज्य ये । सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थाविरोधेन ये ॥ तेमी मानुषराक्षसाः परहितं स्वार्थाय निघ्नन्ति ये । ये तु घ्नन्ति निरर्थकं परहितं ते केन जानीमहे ' ॥

अशी कर काट कीं त्यांत बने तुझा थाट—असें काम करावें कीं, जें मनुष्यास भूषणावह होईल. अशी काटकसर करावी कीं जेणें करून आपली प्रतिष्ठा राहून प्रशंसा होईल.

अशी कर कृती कीं फुकट न जाय एक रती—असें काम करावें कीं, ज्यामुळें रतीभारही नुकसान होणार नाहीं. अल्पाहि घस लागणार नाहीं, व्यर्थ जाणार नाहीं अशी गोष्ट करीत असावें,

अशी कर नक्कल कीं त्यांत न चाले कुणाची अक्कल—अशी गोष्ट करावी कीं लोकांनीं आपलें कौतुक करीत राहावें. सर्वांस चकित करून सोडणारी कृति करावी.

अशी कां धुसफूस, दोन पैशाचे तीन ऊंस—एक स्त्री आपल्या नवऱ्यास लवकर कांहीं तरी जेवावयास घालून कामावर पाठवीत असे व नंतर आपण चैन करीत असे. त्या नवऱ्यास कांहीं दिवसांनीं ही गोष्ट कळली. तेव्हां एके दिवशीं तो बाहेर कामावर जाण्याचें निमित्त करून बाहेर पडला पण हळूच परत येऊन माळ्यावर लपून बसला. इकडे स्त्रीनें चांगलें ताटभर दहीभाताचें जेवण करून नंतर दोन पैशास तीन ऊंस घेऊन खाल्ले. पुढें नवरा हळूच बाहेर जाऊन रोजच्याप्रमाणें सायंकाळीं कामावरून घरीं परत आला त्यावेळीं स्त्रीनें विचारलें कीं, 'कशी काय खबरबात ?' तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं, 'ताटभर दहीं-भात !' तेव्हां ती मनांत चरकली—पण तिनें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. पुढें नवरा सारखी धुसफूस करूं लागला तेव्हां तिनें पुन्हा विचारलें कीं, 'अशी कां धुसफूस ?' तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं, 'दोन पैशाचे तीन ऊंस ?' तेव्हां तिनें विचारलें कीं, 'खाल्ले कुणीं ?' तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं, 'आमच्या राणीसाहेबांनीं.' याप्रमाणें तिला आपलें बिंग फुटल्याचें कळून आलें व पुढें ती नीट वागूं लागली व चोरून खावयाचें तिनें सोडून दिलें.

अशी काय प्रभुची लीला, कीं मांजर काळी डोळा पिवळा:—मांजराचा रंग काळा असला तरी डोळा पिवळा किंवा घारा असतो. या गोष्टी निसर्गनिर्मित आहेत. यांस कोणतेंहि कारण सांगतां येत नाहीं. तेव्हां ज्या गोष्टी नैसर्गिक असून त्यांची कारणपरंपरा सांगता येत नाहीं, अशा बाबतींत ही म्हण वापरतात.

अशी कोण भोळी कीं, दुसऱ्याचे नवऱ्याकरितां स्वतःच्या बांगड्या पिचवील ?—दुसऱ्या स्त्रीचा नवरा मेला असतां स्वतः वैधव्य पत्करण्याइतकी मूर्ख स्त्री आढळणें शक्य नाहीं. दुसऱ्याचें दुःख आपणांवर ओढवून घेणारा प्राणी विरळाच.

अशी मुलगी जाणी, तर पट्टीला पैका आणी—चवचाल मुलीबद्दल म्हणतात.

अशी मुलगी फटाकडी कीं नवऱ्याला गाभण करील—नवऱ्यापेक्षां शिरजोर स्त्रीबद्दल म्हणतात.

अशी लेक हवाई तर घरोघर जांवई:—[हवई=चंद्रज्योत] मुलगी इतकी उच्छृंखल कीं, तिच्याबद्दल घरोघर बोभाटा.

असें कळतें मग छप्पर कां गळतें:—वेळेवर जर कौलांची शाकारणी केली किंवा छप्पर दुरुस्त केलें तर गळणार नाहीं. पण पुढील गोष्ट लक्ष्यांत घेऊन आरंभीं तरतूद करणारे लोक फार थोडे असतात.

असेंच म्हणगे म्हातारे, घर घेतलें मेल्यानें—नाना फडणिसाच्या वेळची गोष्ट सांगतातः चोरीचा अगदीं बंदोबस्त व्हावा म्हणून रात्रीं वेशीचीं दारें लावलीं जात व कडक पहारे असत. कांहीं चोरांनीं एका म्हातारीला लुबाडून तिला तिरडीवर आवळली व प्रेताप्रमाणें घेऊन चालले. ती ओरडते आहे, "घर घेतलें मेल्यानें !" तर हे त्याला साथ देतातः "असेंच म्हणगे म्हातारे !" झालें. लोकांना व रखवालदारांना वाटलें कीं प्रेत नेतांना कांहीं तोंडानें म्हणत आहेत. चोर या युक्तीनें पसार झाले.

असेंच म्हणचें न्हंय, तसेंच म्हणचें न्हंय; दिवाळेचे दिवे रे पुता—(गो.) दिवाळीच्या दिव्याप्रमाणें धड उजेड नाहीं, धड अंधार नाहीं, असें अनिश्चित बोलणें. धड असेंहि म्हणावयाचें नाहीं, धड तसेंहि म्हणावयाचें नाहीं.

असें बसावें, कोणी न म्हणे ऊठ—मनुष्यानें आपल्याला योग्य असें स्थळ पाहून तेथें बसल्यास त्याच्यावर तेथून उठण्याची पाळी येत नाहीं. तेंच जर आपल्या योग्यतेपेक्षां अधिक उच्च स्थानावर बसलें तर त्या स्थानास योग्य अशी व्यक्ति आल्यास आपणांस तें स्थळ खालीं करून द्यावें लागतें. तेव्हां आपली पायरी पाहून वर्तणूक करावी.

असें लग्न लागुंक, व्हांक्के जालें हागुंक—(गो.) असें लग्न लागावयाचें कीं त्यावेळीं नवरीला परसाकडेस व्हावयाचें !

असाध्य——**असाध्य असलयावरी, कार्यीं प्रयत्न न करी**—एखादें कार्य होणें जर अशक्य असेल तर तें कार्य करण्याचे व्यर्थ परिश्रम करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

असिधारा——**असिधाराव्रत**—स्त्रीपुरुषांनीं एकत्र निजूनहि संयोग होऊं नये म्हणून दोघांच्यामध्यें नागवी तरवार ठेवून निजण्याचें व्रत. यावरून लक्षणेनें अत्यंत कडक व्रत. तरवारीच्या धारेसारखें अत्यंत तीक्ष्ण व पाळण्यास कठिण असें व्रत. 'मृष्टान्नं प्रियमेकत्र शयनं भार्यया सह । निर्विकारं मनः कुर्यात् असिधाराव्रतं विदुः' ॥

अस्तनी——**अस्तनींतला निखारा-अग्नि-आग-साप**—गुप्तशत्रु; घरचाच दावेदार; गृहकलह माजविणारा.

अस्तमान——**अस्तमान होय तोंवरी, न कळे काय होईल तरी**—भविष्य काळांत काय आहे हें कोणासहि सांगतां येत नाहीं. चालू काळापर्यंत जरी सर्व यथास्थित चाललें असलें तरी पुढील घटकेंत काय होणार आहे हें कांहीं आपल्याला

कळत नाहीं. तेव्हां प्रत्यक्ष दिवस संपेपर्यंत त्या दिवसांत काय गोष्टी घडणार हें कांहीं निश्चितपणें सांगतां येणार नाहीं.

अस्त्युत्तर—[=प्रत्युत्तर, उलट बोलणें] उलट उत्तर देऊन नाकबूल करणारा; तोंडास तोंड देणारा; कृतघ्न. 'अस्त्युत्तर भानचोद' अशी शिवी रूढ आहे.

अस्मान——अस्मान जमिनीची तफावत—जमीन व आकाश यांमध्यें जसें अंतर आहे त्याप्रमाणें महदंतर; अत्यंत मोठें असें अंतर.

अस्मान ठेंगणें होणें—स्वर्ग दोन बोटें उरणें; अतिशय गर्व होणें; ताठा येणें. 'नवऱ्याच्या पगारामुळें तर तिला अगदीं अस्मान ठेंगणें, झालें होतें.'—पकोघे. अभाळ पहा.

अस्मान तारा तुटणें—१ उल्कापात होणें; आकाशांतील तारा एकदम तुटून पडणें. २ निरर्थक बडबड करणें. आकाशांतील तारे ज्याप्रमाणें मधून मधून तुटून पडतात; त्यांकडे कोणाचें लक्ष्य जात नाहीं व ते केव्हां पडतात हें कोणास कळतहि नाहीं, त्याप्रमाणें जी गोष्ट कोणी ऐकत नाहीं किंवा ज्या भाषणाकडे कोणाचें लक्ष्य नाहीं, तें करीत राहणें व्यर्थ होय. ३ अकस्मात संकट कोसळणें.

अस्मान फाडून येणें—इतर माणसांपेक्षां कांहीं वेगळा असणें; अतिमानुषता अंगीं असणें. 'तुमचा शहाजहान बादशहा म्हणजे कांहीं अस्मान फाडून आलेला नाहीं!'—शिसं २·२.

अस्मानाची गांड फाडणें—स्वर्गांतून खालीं उतरणें; दैवी किंवा अतिमानुष गुण अंगीं असणें. 'दुराणी केवळ अस्मानाची गांड फाडून आला नाहीं. आम्ही उगेच व्यर्थ पळतों. अद्यापि दुराणीचें तोंड आम्हीं पाहिलें नाहीं.'—भाब ७९.

अस्मानी सुलतानी—[अस्मान=आकाश. सुलतान=बादशहा] दैवी किंवा राजकीय आपत्ति; नैसर्गिक किंवा राजानें आणलेलीं संकटें, केलेला जुलूम. 'जेथें अस्मानी सुलतानी एकदम येऊन कोसळतात तेथें बिचारा माणूस काय करणार?' 'अस्मानी म्हणतात ती हीच?'—उग्र १·१.

&अस्मानकीं थूंक आपनेही मूहपर—आकाशांत थुंकले असतां ती थुंकी आपल्याच तोंडावर येऊन पडते. तुलना—सूर्यावर थुंकणें; अभाळावर थुंकणें.

अस्वल——अस्वला आधीं आरोळी—किंकाळी; अस्वलीच्या आधीं किंक फोडावी; अस्वलाआधीं कीक फोडावी, पाण्याआधीं वळण बांधावें—अशी समजूत आहे कीं, अस्वल आपणांवर चालून येतांना एक मोठी आरोळी मारतें व ती आरोळी मारल्यामुळें त्याची कानठळी बसून त्याला मग कांहीं ऐकूं येत नाहीं. तेव्हां आपली आरोळी त्याला ऐकूं जावयास पाहिजे असेल तर त्यानें आरोळी मारण्यापूर्वींच आपण मारावी; म्हणजे कदाचित् आपली आरोळी ऐकून तो पळून जाण्याचा संभव असतो. दुसऱ्यानें तक्रार करण्यापूर्वी आपणच तक्रार केली असतां दुसऱ्याच्या तक्रारीमुळें उत्पन्न होणारा पूर्वग्रह तरी निदान होत नाहीं. तेव्हां आपणाबद्दल दुसरा तक्रार करण्यापूर्वीं त्यानें आपली आगळीक केली असल्यास आपण प्रथम तक्रार करणें बरें. म्हणजे लोकांची एकतर्फी समजूत तरी होणार नाहीं. 'युद्धसमितीचें काम सुव्यवस्थित व नमुनेदार होण्यासाठीं त्या समितीच्या सर्व सूचनांना सरकारनें पूर्ण पाठिंबा दिला पाहिजे. जनतेला सूचना अशी कीं, त्यांतल्या कित्येक गोष्टी अस्वलाआधीं आरोळी अशा स्वरूपाच्या असतात, पण तेवढ्यानें घाबरून जाऊन जनतेनें स्वतःचें आणि पर्यायानें समाजाचें नुकसान करूं नये.'—केसरी २–७–४०.

अस्वलाच्या अंगास (गांडीस) केसांचा (शष्पांचा—शेटांचा) दुष्काळ; अस्वलाच्या रानांत केसांचा दुष्काळ—एखादी गोष्ट ज्या ठिकाणीं हटकून असावयाचीच त्याच ठिकाणीं तिचा अभाव असणें किंवा मागमूस नसणें. अस्वलाच्या सर्व अंगावर भयंकर केंस असतात पण गुदद्वारावर मात्र नसतात.

अस्वलीचा कान दरवेशाच्या हातांत—प्रत्येकाला कोणी तरी योग्य नियंता असतो. अस्वल इतरांना कितीहि भयंकर वाटली तरी दरवेशापुढें तिचें कांहीं चालत नाहीं. तुलना—चेलीचा (शेळीचा) कान गोसाव्याच्या हातीं.

अस्सल——अस्सल आपलया अस्सलपणावर गेला, कमस्सल म्हणतो मला भ्याला—एखादा थोर मनुष्य आपली कोणी कुचाळी केली तरी स्वतःच्या थोरपणाकडे लक्ष्य देऊन व त्याचा हलकटपणा मनांत आणून तिकडे लक्ष्य न देतां स्वस्थ बसतो, उगाच त्याच्या नादीं लागत नाहीं. पण तो हलकट मनुष्य समजतो कीं, आपली त्याला भीति वाटते म्हणून तो गप बसतो.

अस्सल आसल्यारि वाडि आस; वाडि आशेनें अस्सल बुडयिलें—(गो.) अस्सल असल्यावर वाढीची आशा. वाढीच्या, व्याजाच्या आशेनें मुद्दल (अस्सल) बुडविणें.

अस्सल तें अस्सल आणि नक्कल ती नक्कल—जी गोष्ट अस्सल असेल ती कितीहि वाईट असली तरी तिच्या नकलेपेक्षां खात्रीनें अधिक चांगली असणार व नक्कल कितीहि हुबेहूब असली तिला अस्सलाची बरोबरी करतां येणार नाहीं. त्या दोहोंत कांहींतरी अंतर हें असणारच. अनुकरण कितीहि हुबेहूब करण्याचा प्रयत्न केला तरी मुळाबरोबर तंतोतंत जमणें शक्य

नसतें. त्यांत थोडा फार तरी कमीपणा राहतोच. कृत्रिम गोष्टीस खऱ्याची बरोबरी कधींहि करतां येणार नाहीं. तुलना– काचः काचो मणिर्मणिः ।

अस्सल नाग असेल तो चावत नाहीं, कम-अस्सल असेल तो चावतो—सर्प जरी असला तरी त्यांतल्या त्यांत जो थोर जातीचा अस्सल नाग असेल तो विनाकारण आपण त्याच्या वाटेस गेलें नसल्यास चावत नाहीं. पण कमअस्सल असेल, क्षुद्र बुद्धीचा असेल, तो अपकार न केल्यासहि चावतो. थोर लोक स्वतः होऊन अपकार करीत नाहींत. परंतु क्षुद्र लोकांची स्वभावतः प्रवृत्तिच अपकार करण्याकडे असते.

अस्सलपेक्षांहि नकल जादा—मूळ खऱ्या गोष्टीपेक्षा त्याची प्रतिकृति चांगली दिसणें. "तथापि प्रसंगीं 'अस्सल०' या न्यायानें सरस वठणाऱ्या 'सरकसा' चें कांहीं स्तोम माजवावें असें वाटणार नाहीं."–छ च १०९.

अस्सी——अस्सीकी आदा, चौरसीका खर्च—ऐशीं उत्पन्न आणि चौऱ्याशीं खर्च. प्राप्तीपेक्षां खर्च अधिक केल्यास त्यापासून नुकसान हें व्हावयाचेंच.

अहंकार——अहंकार अज्ञानापेक्षां सज्ञानाचें नरडें धरतो–अभिमान अजाण माणसापेक्षां सुजाण माणसाचा गळा चांगला दाबतो. कारण त्याच्या हातून अनेक गोष्टी अभिमान असल्यानें अन्यायाच्या होतात. अडाणी माणसापेक्षां बुद्धिमान माणसासच गर्व होण्याचा संभव असतो.

अहंकाराचे मुळें, ज्ञान्यास लागे खुळें—मनुष्याला आपल्या ज्ञानाचा गर्व झाला म्हणजे त्या ज्ञानाचा योग्य उपयोग होण्याऐवजीं दुरुपयोग होण्याचा संभव असतो. गर्वामुळें मनुष्य विचाराऐवजीं विकाराच्या आधीन होतो.

अहंकारें करणें पण, हें मूर्खाचें लक्षण—आपल्या अंगांत सामर्थ्य नसतां पोकळ बढाया मारणें, गर्वानें भलतीच प्रतिज्ञा करणें, हा मूर्खपणा आहे.

अहंता——थोर ते गळाली पाहिजे अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ॥—मनुष्याचा प्रथम अहंभाव नष्ट झाल्याशिवाय त्याच्या ठिकाणीं कोणतीहि योग्यता येत नाहीं. जे अहंकारानें भरलेले असतात त्यांना उपदेशापासून कांहीं सुख होत नसतें. त्यांना उपदेश व्यर्थ होय.–तुगा ३६३६.

अहद——अहद दर्या तहद सूर्य—समुद्रापासून सूर्यापर्यंत; या टोकापासून त्या टोकापर्यंत; सर्वत्र.

अहंभाव——अहंभाव मनीं धरती, पोकळपणा घेऊन उडती—जे लोक व्यर्थ अभिमान बाळगतात त्यांची वेळेवर फजिती होऊन त्यांच्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें उघडकीस आल्यावांचून रहात नाहीं.

अहमक——अहमकसे पडी बात, काडो जुता तोडो दांत–मूर्खाशीं गांठ पडल्यावर जोडा काढून त्याचे दांत पाडल्याशिवाय गत्यंतर नसतें.

अहमद——अहमदकी पगडी महमदके शिरपर—सर्व घोंटाळा; एकाची पगडी घेऊन भलत्याच्याच डोक्यावर ठेवावयाची; कशास कांहीं संबंध नाहीं अशी गैरव्यवस्था; गडबडगुंडा; सावळा गोंधळ; याची टोपी त्याच्या डोक्यावर व याची याच्या डोक्यावर असा प्रकार.

अहाळणी——अहाळणी-अहाळण्या कहाळण्या टाकणें-देणें–द्वेष, राग इत्यादि मनोविकारांना वाव देणें; दुःखोद्गार, शोकोद्गार काढणें.

अहिनकुल——अहिनकुल न्याय–ज्याप्रमाणें सर्प व मुंगुस यांचें जन्मजात वैर असतें त्याप्रमाणें परस्परांचा द्वेष करणें; हाडवैर.

अहिरी——लोटा घडतां येईना आणि अहिरीचा भार–[अहिरी म्हणजे लग्नांत बोहल्याभोवतीं ज्या मडक्यांच्या उतरंडी रचतात तीं मडकीं.] ज्यास एकहि मडकें तयार करतां येत नाहीं त्यानें सर्व बोहल्याच्या उतरंडीं तयार करून द्यावयाचें कबूल करणें हा मूर्खपणा आहे. जी गोष्ट करण्याची आपल्या अंगीं मुळींच पात्रता नाहीं ती करावयास उद्युक्त होणें.

अही खाऊं कीं मही खाऊं करणें—दहीं खाऊं कीं मही खाऊं, असा पाठभेद आहे; तोच अधिक सयुक्तिक आहे. [महीं=ताक] दहीं खाऊं कीं ताक खाऊं याप्रमाणें उतावीळ होणें. ताक होईपर्यंतहि धीर न निघणें. केव्हां एकदां खाऊन टाकतो असें होणें. स्वार्थ साधण्याच्या कामीं फार उतावीळ होणें; अधीर होणें.

अहेर——अहेर चोळीचा (नारळाचा), आणि गजर वाजंत्र्याचा—लहानशा गोष्टीचा खूप गाजावाजा करणें.

अहेव——अहेव लागे रंडकीच्या पायीं, मजसारखी होग बाई—सधवा स्त्री जर विधवेच्या पायीं लागली तर ती माझ्यासारखी हो असाच आशीर्वाद देणार. एखादा सज्जन मनुष्य जर दुर्जनाच्या नादीं लागला तर त्याच्या कुसंगतीचा परिणाम त्याच्यावर झाल्यावांचून राहाणार नाहीं.

अहेवेचा मेला, खेळायला गेला—जी स्त्री सौभाग्यवती आहे म्हणजे जिचा नवरा जिवंत आहे, तिचा एखादा जरी

मुलगा मेला तरी तिला पुन्हा पुत्र होण्याचा संभव असल्यामुळें त्या मुलाचा वियोग फारसा भासत नाहीं.

अहो——**अहो तर काहो, अरे तर कारे**—'अरे तर कारे,' पहा.

अहो बाई मला न्हाऊ घाला आणि माझ्या विहिणीला चोथाळून काढा—[चोथाळून काढणें=न्हाण्याच्या चोखणीच्या चोथ्यानें न्हाऊं घालणें] दुसऱ्याला एक काम सांगतांनाच दुसरेंहि करावयास सांगणें; एखाद्यानें मोठी मदत करावयाची इच्छा दर्शविली कीं, त्याच्याकडून यथेष्ट उपटण्याची इच्छा करणें.

अहो बुद्धीचे योगानें, नम्र क्रोधास करणें—मनुष्यानें बुद्धीनें, विवेकानें क्रोधास आपल्या ताब्यांत ठेवावें.

अहो म्हणे बाईल करांना, तर म्हणे तुम्हीच व्हा ना?—एका स्त्रीनें एका पुरुषास विवाहाचें वय चाललें तरी लग्न कां करीत नाहीं, म्हणून विचारलें असतां त्यानें तुम्हीच बाईल व्हा, असें सांगितलें? एखाद्याबद्दल थोडीशी सहानुभूति दाखविल्याबरोबर त्यानें डोक्यावर बसूं पाहणें. चांगुलपणाचा गैरवाजवी फायदा घेऊं पाहणें. तु० —भटो लग्न कां कराना, तर तुम्हीच कां बाईल व्हाना!

अहो रूपमहो ध्वनिः—मुळींच योग्यता नसतां जेव्हां कांहीं लोक परस्परांची प्रशंसा करूं लागतात तेव्हां म्हणतात. उष्ट्राणांच विवाहेषु गीतं गायन्ति गर्दभाः। (उष्ट्राणांच गृहे लग्नं गर्दभाः शांतिपाठकाः)। परस्परं प्रशंसंति अहो रूपमहो ध्वनिः॥

अळणी——**अळणी लागणें**—गोडी न वाटणें.—मो नामरसा २०.

❀ **नावडतीचें मीठ अळणी**—प्रत्यक्ष मीठ अळणी लागणें शक्य नाहीं; परंतु नावडत्या माणसानें केलेली कोणतीच गोष्ट ज्यास आवडत नाहीं, तो अशा प्रत्येक वस्तूस विनाकारण नावें ठेवतो.

अळणी ओंडा, तिखटमीठ लावून कांडा—ज्या पदार्थास स्वतःच्या अंगची मुळींच चव नाहीं, त्यास बाहेरून कितीहि मसाला घातला तरी तो बेचवच लागतो. त्याप्रमाणें ज्या माणसाच्या अंगीं स्वतःची बुद्धि नाहीं, त्याला ती कितीहि शिकविली तरी उपयोग होत नाहीं.

अळणी खाती आणि फोडणी मागती—प्रत्यक्ष पदार्थांत मीठ तिखट वगैरे कांहीं नसतां फोडणीची मागणी करणें; स्वतःजवळ कांहीं नसतां, स्वतःची योग्यता नसतां दुसऱ्याकडून मोठेपणा मिळण्याची अपेक्षा करणें वाजवी नाहीं.

अळवणी——**अळवणी आलें आणि तळवणी घेऊन गेलें**—वास्तविक 'वळवणी आलें आणि तळवणी घेऊन गेलें' असा पाठ पाहिजे. उन्हाळ्यांत, बहुतेक अखेरीस नदींतील पाणी आटून जातें व कोठें खळग्यांमध्यें थोडें फार सांचून राहिलेलें असतें; पण वळिवाचा पाऊस आला म्हणजे थोडासा पूर येऊन तें सांचलेलें तळचें पाणीहि वाहून जातें व मुळींच पाणी नाहींसें होतें. याप्रमाणें अधिक मिळण्याचा संभव दिसत असतां जवळचेंच थोडेंफार असलेलें जाण्याचा प्रसंग आला म्हणजे म्हणतात.

अळशीक——**अळशिके फाट करप**—(गो.) घाणीकडे पाठ फिरविणें.

अळाशीचीं मापलं, धक्का लागून फुटलं—(व.) [अळाशी हा आळशीचा अपभ्रंश. अळशी=ऐदी स्त्री. मापुल=बोळकें. मापलें त्याचें अनेकवचन.] एखाद्या ऐदी मुलीनें आपलीं खेळांतील बोळकीं खेळणें आटोपतांच एकीकडे उचलून न ठेवतां तशींच अव्यवस्थितपणें पसरून ठेविलीं तर त्याचा परिणाम असा होतो कीं कोणाचा तरी सहज धक्का लागून तीं फुटतात. ऐदी माणसाची व्यवस्था कोणाच्या हातून सहज भंग पावते व त्याच्या मनाला झटका बसतो.

अळीमिळी——**अळीमिळी गूपचिळी**—'अळीमिळी गूपचिळी, आधीं बोलेल तो लेंडूक खाई (गिळी), मागून बोलेल तो तूपसाखर खाई,' अशी शपथ मुलें एकमेकांस घालतात. यावरून मौन धारण करणें; गप्प बसणें; कांहीं एक न बोलणें; हूं कीं चूं न करणें. गुपचूप केलेली गोष्ट; गुप्तकर्म. 'यावेळीं अळी० हें वेदसूत्र आठवतें ना? यावेळीं आधीं बोलेल त्यानें भांडीं घासावीं.'—हाच मुलाचा बाप.

अळूं——**अळवावर आंचविणें**—अळवावर पाणी पडलें असतां तें पानावर न राहतां सर्व बाजूला घरंगळून जातें; त्या पाण्याचा त्याच्या मुळांस कांहीं उपयोग होत नाहीं. यावरून ज्यास उपकाराची जाणीव नाहीं अशावर उपकार करणें; ज्याच्या अंगीं लागणार नाहीं अशास खाऊं घालणें; निरर्थक, निष्फळ गोष्ट करणें.

अळवावरचें पाणी—अळवावर पाणी टाकलें तर तें ठरत नाहीं. यावरून क्षणभंगुर गोष्ट. 'त्यांच्या उपदेशाचा परिणाम अद्यापपर्यंत अळवावरील पाण्यासारखाच झाला आहे.'—केसरी.

❀ **अळवाची खाज अळवास ठाऊक**—ज्याची चिंता त्यासच, दुसऱ्यास तिची बरोबर कल्पना नसते. पुढची म्हण पहा.

अळवाची खाज हाताला माहीत—अळवाची भाजी

करावयाची म्हणजे त्याच्या देव्यांचे दोर काढणें, तें चिरणें वगैरे कामें हातानें करावीं लागतात. तेव्हां हातांस कंड लागते. तशी कंड शरीराच्या इतर भागांस लागणें शक्य नाहीं व त्या कंडूपासून होणाऱ्या त्रासाची कल्पनाहि शरीराच्या इतर भागांस येणें शक्य नाहीं. तेव्हां ज्यास दुःख होतें त्यासच त्याच्या वेदना कळतात. इतरांस त्यांची कल्पना येणें शक्य नाहीं.

अळें——अळये रूप ना आनी फळये रूप ना——(गो.) अळयाला रूप नाहीं आणि फळीलाहि रूप नाहीं.

अक्षत——अक्षत काढणें-निघणें-फिरविणें——एखाद्या समारंभाचें निमंत्रण देवादिकांस देण्याकरितां मिरवणुकीनें, थाटानें निघणें.

अक्षत (ता) घेणें—आमंत्रण स्वीकारणें. विवाहादि समारंभाचें आमंत्रण देतांना कुंकुमाक्षता देण्याची वहिवाट आहे. त्या घेतल्या म्हणजे आमंत्रण स्वीकारलें असा अर्थ होतो. तु०—सुपारी घेणें.

अक्षत टाकणें—१ एखाद्या घरावर अक्षता (तांदूळ) टाकून कानोसा घेऊन आंतील लोक जें कांहीं बोलत असतील तें ऐकून घेऊन त्यावरून आपल्या मनांतील गोष्ट होईल कीं नाहीं, यासंबंधीं शकुन पहाणें. २ पुजेकरितां आवाहन केलेल्या देवतेचे अक्षत टाकून विसर्जन करणें. ३ एखाद्या गोष्टीवरील आपलें स्वत्व सोडून देणें. ४ विवाहप्रसंगीं वधूवरांवर मांगल्यदर्शक अक्षता टाकणें; पर्यायानें विवाह लावणें. ' अक्षत टाकिली जैसी । मांदियेवरी ॥ '—ज्ञा १८·७२३.

अक्षत (ता) देणें—आमंत्रण करणें. लग्नकार्याच्या प्रसंगीं बोलावणें करतांना कुंकुममिश्रित अक्षता वाटींत घेऊन त्या ज्याला बोलवावयाचें त्याला देतात.

(वर)--अक्षत (ता) पडणें—विवाह लागणें, होणें. विवाहाच्या प्रसंगीं वधूवरावर जमलेली मंडळी अक्षता टाकतात.

तोंडावर अक्षत पडणें—१ मनसोक्त, वाटेल तसें, भलभलतें बोलण्याची संवय असणें. २ गप्प बसणें; मौन स्वीकारणें. चुलीवर अक्षता टाकणें-पडणें, पहा.

अक्षत भरणें—शेंस भरणें; कपाळावर कुंकू लावून त्यावर अक्षता चिकटविणें. ' अक्षत भरिली भाणा । '-दा ३-३-१०.

(चुलीस) अक्षत लावणें—घरांतील सर्व मंडळीस जेवणाचें आमंत्रण देणें; असें आमंत्रण आल्यामुळें चूल न पेटविणें.

(वेशीस) अक्षत लावणें--सर्व गांवास जेवावयाचें आमंत्रण देणें.

वाटाण्याच्या अक्षता लावणें—वाटाणे जर कपाळास लावले तर त्यांतील एकहि दाणा कपाळास चिकटून रहात नाहीं. यावरून—साफ नकार देणें; नाहीं म्हणणें.

❀ **या माझ्या कपाळावरच्या अक्षता पहा**—दुसऱ्याला विनाकारण हांक मारणाऱ्या किंवा बोलावणाऱ्या मनुष्याबद्दल योजतात. ज्याचा कांहीं अर्थाअर्थीं संबंध नाहीं व ज्याजवळ कांहीं काम नाहीं अशा मनुष्यास विनाकारण बोलावून आणणें.

वरतीं अक्षता, मध्यें गोपीचंदन, खालीं रक्षा—तोंडाशीं हिरवा, मध्यें गोपीचंदनासारखा मऊ गिचगिचीत व तळाशीं करपून गेलेला, असा भात झाला म्हणजे वापरतात. वैष्णवी भात.

अक्षय——अक्षय भोग कुडयाचीं फुलें——इतर झाडांचीं फुलें सुवासिक किंवा सुंदर असल्यामुळें लोक वास घेण्यास किंवा देवावर वाहण्यास काढून नेतात; पण कुड्याचीं फुलें झाडावर तशींच राहातात. तीं कोणी काढून नेत नाहींत; तीं सुंदरहि नसतात व त्यांस वासहि नसतो; तीं अगदीं साधीं असतात. तसाच आपला पोषाख, अंगावर घेण्याच्या वस्तु वगैरे जर साध्या असतील तर त्या नेहमीं अंगावर राहतील. सुंदर वस्त्र किंवा मौल्यवान दागिना आपण कांहीं एकसारखा अंगावर ठेवूं शकत नाहीं. तेव्हां साधी वस्तूच जास्त टिकाऊ व कायमची असते. सुंदर वस्तूंचा उपभोग तात्पुरता असतो.

अक्षर——अक्षरमुष्टिकाकथन——मनांत कोणतें अक्षर धरलें आहे तें सांगणें; मुठींत कोणता पदार्थ धरला आहे तें सांगणें; अशी विद्या.

अक्षरशत्रु—अक्षर हें ज्याचा शत्रु आहे असा, म्हणजे निरक्षर, अशिक्षित. ' शिवाजी अक्षरशत्रु होते असें पुष्कळांनीं म्हटलें आहे. पण तें खरें नाहीं. '

❀ **जो अक्षरशत्रु, त्याला पुष्कळच शत्रु**——ज्याला लिहितां वाचतां येत नाहीं त्याच्या अज्ञानाचा फायदा अनेक लोक घेतात. सर्व लोक त्यास लुबाडावयास पाहतात.

अक्षी——अक्षीवक्षीच्या वाती-(कर्ना.)—ज्या स्त्रीस भावंडें असतात ती तुलसी विवाहाच्या दिवशीं वाती करून देवापुढें लावते; त्या वातींस म्हणतात.

अज्ञान——अज्ञान लोभास घाली, पडूं नको त्याच्या ख्यालीं—अडाणी माणसाच्या लोभी मसलतींत पडूं नका; त्याचा मोह दूर सारा.

अज्ञान सर्व दुःखाचें मूळ—अडाणीपणामुळें मनुष्यावर अनेक आपत्ती येतात. त्या टाळावयाच्या असल्यास मनुष्यानें

अज्ञानास दूर केलें पाहिजे. स्वत: शहाणें झाल्यास आपत्तीस तोंड देतां येणें शक्य होतें.

अज्ञानस्य मनुष्यस्य वर्त्म तद्दृष्टितः शुभं—अडाणी मनुष्याला आपण क्रमीत असलेला मार्गच चांगला वाटतो. अडाणी मनुष्याला ज्ञान नसल्यामुळें तो जी गोष्ट करतो तीच त्याला बरोबर वाटते.

अज्ञानाचा त्याग करी, तीच ज्ञानाची पायरी—जोंपर्यंत एखादा मनुष्य अज्ञानाला कवटाळून बसेल तोंपर्यंत त्याला ज्ञानप्राप्ति कधींच व्हावयाची नाहीं. आपण अज्ञानी आहों ही गोष्ट कळून, अज्ञान टाकून ज्ञानप्राप्ति झाली पाहिजे असें जेव्हां त्याला वाटूं लागेल अज्ञानाची जाणीव होऊन त्याच्या ठिकाणीं जिज्ञासा उत्पन्न होईल तेव्हांच त्याला ज्ञान होण्याची शक्यता उत्पन्न होईल व ही जाणीव हीच त्याच्या ज्ञानप्राप्तीच्या मार्गांतील पहिलें पाऊल होईल.

अज्ञानानें क्रोध येतो, पुढें पश्चात्तापानें जातो—अडाणी मनुष्य लवकर रागावतो पण त्याची चूक त्याला कळून येऊन नंतर त्यास पश्चात्ताप झाला म्हणजे त्याचा राग शांत होतो.

अज्ञानामुळें, पीडा वेळोवेळे—अज्ञानामुळें अनेक प्रकारचा नेहमीं त्रास होतो.

अज्ञानास दोष नाहीं—एखाद्या गोष्टीचें ज्ञान नसतां ती चुकून आपणांकडून घडली तर तिचा दोष लागत नाहीं.

अज्ञानास न प्रकाश, भ्रांति दावी त्याचा वेष—अज्ञानी मनुष्यास कोणत्याहि गोष्टीचा लवकर उलगडा होत नाहीं. उलट प्रत्येक गोष्ट जणूं कांहीं त्यास अधिकाधिक घोटाळ्यांत घालते.

अज्ञानास न होय प्राप्ती, करितांही खरी भक्ती—अडाणी मनुष्यानें कितीहि उत्कटतेनें भक्ति केली तरी ती ज्ञानाच्या आभवीं योग्य मार्गानें न झाल्यानें त्याला सिद्धि प्राप्त होत नाहीं.

अज्ञानी ते पशूवत, भिन्न काय ते आकृतींत—अडाणी मनुष्य आणि पशू यांच्यामध्यें फक्त बाह्य आकारांत काय तो भेद; बाकी ते दोन्हीहि सारखेच. तु०— साहित्यसंगीतकलाविहीनः साक्षात् पशुः पुच्छविषाणहीनः। तृणं न खादन्नपि जीवमानस्तद्भागधेयं परमं पशूनाम ॥

आ

आ——आ करणें—तोंड उघडणें, वासणें. ‘तूं जेवीं देवकीला भेटासि तैसाचि भेट आतेला। आम्हाहुनि तूंचि अधिक धृत सोडूनि कोण करिल आ तेला ॥’— मो उद्योग. ‘रक्षिल न शक्र याचा जारिबा, आजाहि करील आ पणजा ॥’—मो द्रोण २३·५६;—मो शांति ५·१०.

आ पसरणें—तोंड वासणें; तोंड पसरणें. ‘पसरिल न जग गिळाया रुद्रप्रिय भूत कोण ‘आ’ मयसा ॥’—मो द्रोण ३·६४. ‘मृतमारण नचोचित होते पसरीत कीं पदर आहे।’—मो द्रोण २३·४९.

आ पसरून बसणें—ज्याप्रमाणें एखादा प्राणि एखादी वस्तु आपल्या तोंडांत पडावी म्हणून तोंड उघडें ठेवून बसतो त्याप्रमाणें बसणें. यावरून प्रतीक्षा करीत बसणें; वाट पहात राहणें; उत्कंठेनें अपेक्षा करीत बसणें.

आ फाडणें—आ पसरणें. ‘अशा प्रकारें बटोनें शामभट्टाची खातरी केल्यावर त्यानें आपला आ फाडला व तो कुत्र्यासारखें भोंकूं लागला.’—शाच २·२३२.

आ वासणें—१ तोंड पसरणें, २ मदतीसाठीं याचना करणें; तोंड पसरणें पहा. —मोद्रोण ३·६७.

आ वासून-पसरून बसणें—आशा धरून, उत्कंठेनें, मार्ग प्रतीक्षा करीत बसणें. वर पहा.

***आ कॅहुँ तॉण, हांसुंकय् जाता, रडूंकय जाता—(गो.)** आ केलेलें तोंड (तोंड वासलें तर) हंसल्यासारखेंहि होतें, रडल्यासारखेंहि होतें. कांहींहि समजावें.

नाक दाबलें म्हणजे आ वासतो—नाक दाबून धरलें म्हणजे श्वास बंद होऊन तोंड पसरतें. मनुष्यास अनन्यगतिक केलें म्हणजे तो आपसूखच वळणावर येतो, व आपल्याला अनुकूल अशा गोष्टीस राजी होतो.

आइता—आयता पहा.

आइती——आइती गुरवीण होईन, नैवेद्य खाईन—गुरविणीला कधीं स्वयंपाक करण्याचें कारण पडत नाहीं. लोक सर्व पदार्थ तयार करून देवास नैवेद्य दाखवितात व तो आयताच गुरविणीस मिळतो. यावरून स्वतः श्रम न करतां दुसऱ्याच्या श्रमांचें फळ घेण्याची संवय असलेला; आळशी ऐदी मनुष्य; आयतोबा; दुसऱ्याच्या श्रमावर जगणारा. आयता पहा.

आई——**आई काळी**—शेत जमीन; काळें शेत. काळी जमीन ही शेतीला उत्तम म्हणून ती वहित करतात.

आई पांढर = गांवठाण; जी जमीन पांढरी असून शेतीच्या निरुपयोगी पण घरें बांधण्याच्या उपयोगी असते तींत गांवाची वसती करतात. यावरून गांवची वस्ती; ग्रामभूमि.

आई पोरका—आई मेलेला; जो आईवांचून पोरका झाला आहे असा.

आईमाई करणें—मनधरणी करणें; गयावया करणें; खुषामत करणें. तु० -बाबापुता करणें.

एका आईचीं लेंकरें—ज्यांची एकमेकांवर सख्ख्या भावंडाप्रमाणें प्रीति आहे अशांस लक्षणेनें म्हणतात.

आईचें दूध मणगटीं खेळविणें—ज्या मनुष्यास लहानपणी आईचें दूध भरपूर मिळालेलें असतें त्याचें पोषण चांगलें होऊन तो धडधाकट व दणकट बनतो व सशक्त असतो. त्याच्या मणगटांत चांगली शक्ति असते. परंतु ज्याचें पोषण तो पोरका असल्यामुळें वर दुधावर झालेलें असतें त्याची आबाळ होऊन तो दुर्बल बनतो.

आईच्या कासोट्याला हात घालणें—मातृगमन करणें. आईशीं व्यभिचार करणें; अत्यंत नीच कृत्य करणें. तु०– जन्मस्थानीं लघुशंका करणें.

आईच्या पोटास रोग येणें—जो मनुष्य जन्मास येऊन कोणताहि पराक्रम करीत नाहीं, किंवा उलट एखादें दुष्कृत्य करतो त्याच्या जन्मास येण्यानें कोणताहि कार्य भाग साधत नाहीं. तो जन्मास येणें हें आईला पोटांत एखादा रोग होऊन तो बाहेर पडण्यासारखें आहे. त्यानें आपल्या मातेची कूस व्यर्थ शिणाविली असें मानण्यांत येतें.'युद्धीं परमार्थ मिळे निश्चित मिळणें पलायनें तोटा। हें जाणोनि पळे तो मातेच्या रोग पातला पोटा ॥'–मो कर्ण ३१'३६.

❀ **आई आई बाबा आले, आले तुला खेळवायला अन् मला लोळवायला**——बाप आला म्हणजे मुलाचे लाड करतो पण आईला त्याच्या तरतुदीसाठीं श्रम करावे लागतात. यावरून एकच गोष्ट एकाला आनंददायक तर दुसऱ्याला पिडादायक होते, अशा वेळीं म्हणतात.

लहानपणीं आई आई, थोरपणीं बायलाबाई—मनुष्य लहानपणीं एकसारखा आईच्या पाठीमागें असतो. त्याला सारखा आईचा लळा असतो. पण तोच मोठा झाला म्हणजे आईपेक्षां त्याचें बायकोवर अधिक प्रेम जडतें व तिचा सहवास त्यास आईपेक्षां अधिक आवडतो.

आई एली, बाप तेली आणि मुलगा शेख चिली—एखाद्या कुटुंबांतील व्यक्ती अगदीं एकमेकांपासून भिन्न स्वभावाच्या व विसदृश असल्या म्हणजे म्हणतात.

आई गाते अंगाई, मूल झोंपी जाई—मूल झोंपी जावें म्हणून आई गाणें गात असते व तिचें गाणें चालू असतांच मूल झोंपी जातें. त्या मुलास आई आपल्यासाठीं गाणें म्हणण्याचे कष्ट करीत आहे, या गोष्टीची जाणीवहि नसते. यावरून ज्याला एखाद्याच्या कष्टाचें फळ मिळतें त्याला त्या कष्ट करणाऱ्याच्या श्रमाची जाणीव नसल्यास ही म्हण वापरतात.

आई गेली देवाला, देव आला घराला—आईनें देवाच्या दर्शनाकरितां देवळांत जावें तों इकडे देवानें तिच्या घरीं येऊन जावें. व दोघांची चुकामूक पडून तिला दर्शन मात्र होऊं नये. याप्रमाणें एखादें कार्य करण्याबद्दल आपण परिश्रम करावे परंतु तें कार्य होण्याची संधि मध्यंतरीं येऊन कार्य मात्र होऊं नये व ती संधि आपणांस साधतां येऊं नये, अशी स्थिति झाली म्हणजे ही म्हण योजतात.

आई गेली म्हणजे बाप पाहुणा—एकत्र कुटुंबामध्यें ज्या गृहस्थाची स्त्री जिवंत आहे त्याच्या मुलांची योग्य तऱ्हेनें जोपासना होते व त्या पुरुषालाहि लागणाऱ्या गोष्टी वेळचे वेळेवर मिळतात व त्यास आपल्या बायकोस सांगून सर्व गोष्टी करून घेतां येतात. पण तीच त्याची स्त्री मेली म्हणजे घरांतील इतर स्त्रियांशीं त्यास संकोचानें वागावें लागतें व त्यामुळें त्याची व त्याच्या मुलांचीहि हेळसांड होते. त्याच्या बोलण्याकडे अगत्यपूर्वक लक्ष्य देणारें कोणी माणूस नसतें. आईच्या मागें बापाचें लक्ष मुलांकडे विशेष नसतें, हें दाखविण्यासाठीं योजतात.

आई गोड कीं खाई गोड——(बायकी) १ मुलाला आईप्रमाणें खाऊ फार आवडतो व जो तो त्यास देईल त्याजवळ मूल राहातें. २ आई असली म्हणजे मुलाला गोड खावयास मिळतें.

आई जेऊं घालीना, बाप भीक मागूं देईना—घरांत आईनें जेवावयास घातलें नाहीं म्हणून मुलानें बाहेर भीक मागून खावयाचें मनांत आणलें तर त्या गोष्टीस बापाची मनाई. याप्रमाणें दोहोंकडून अडचणींत सांपडलेल्या मुलाची स्थिति मोठी केविलवाणी होते. कोणी दोन अडचणींत सांपडला असतां म्हणतात. तु०-इकडे आड तिकडे विहीर.

आई जेवली, म्हाळसा पावली—आईला जेवणखाण वगैरे घालून तृप्त करणें हें कडक देवीला तृप्त करण्यासारखें आहे. एखाद्या अवघड गोष्टीच्या समाप्तीनंतर कृतकृत्य झाल्यासारखें वाटून म्हणतात.

आई तशी बाई, मंगळ कोण गाई—आईला जर मंगळगान येत नसेल तर जमलेल्या बायाहि तिच्या सारख्याच असणार. तेव्हां गाणें कोणीं म्हणायचें? तें जाणणारी बाईच पाहिजे.

कोणतेंहि काम करावयाचें तर तें केलेलें मनुष्य असल्यास उपयोग होतो.

आई तेली, बाप माळी, बेटे निकले सुजानअली—तेली, माळी व मुसलमान यांचा कांहीं एक संबंध नाहीं. त्याप्रमाणें जेथें आई, बाप व लेक यांचा स्वभाव, गुण, आचरण यांचा परस्परांशीं मुळींच मेळ नसतो, अशा वेळीं म्हणतात. मिश्र विवाहाची अनिष्टता दाखवितांना योजतात.

आई देवळांत व नायटे गांवांत—देवीचा एखाद्या गांवावर कोप झाला तर ती आपली देवळांत तशीच असते. पण तिच्या कोपाचा परिणाम म्हणून गांवांत मात्र नायटे बोकाळतात. त्याप्रमाणें एखादा मनुष्य एखादें कृत्य करून स्वतः मात्र नामानिराळा राहतो पण त्याच्या कृतीचे परिणाम इतरांस भोगावे लागतात, तेव्हां म्हणतात. तु०—खलः करोति दुर्वृत्तं नूनं फलति साधुषु। दशाननोऽहरत्सीतां बन्धनं च महोदधेः॥—सुर ५५·५४. लंकेश्वरो हरति दाशरथेः कलत्रं प्राप्नोति बंधनमसौ किल सिंधुराजः।—सुर. ८८·१२.

आई ना बाई, मंगळ कोण गाई—मागें 'आई तशी.' पहा.

आई नसो, पण मावशी असो—आईच्या अभावीं मावशी तिच्या मुलांची जोपासना करते व ती असल्यास मुलांस आईची आठवण होत नाहीं. तु०—माय मरो पण मावशी जगो.

आई निघुनिया जाते, करडूं मागें लागतें—आई चरावयाला रानांत जाते ती स्वतः स्वतंत्रतेनें फिरते; पण करडास मात्र तिच्यावांचून गत्यंतर नसल्यामुळें तें तिच्या पाठीमागें पाठीमागें जाण्याचा प्रयत्न करीत असतें. तु०—पत्रावळी मागें द्रोण लागे.

आई बघते पोटाकडे, आणि बायको बघते पाठीकडे—बाहेरून प्रवास करून किंवा एखादें काम करून एखादा मनुष्य घरीं आला व त्याची आई त्यास पाहावयास बाहेर आली तर त्याला पाहून तिच्या मनांत प्रथम तो भुकेला आहे किंवा काय याचा विचार येतो. उलट बायको त्याचेकडे पाहतांना तो बरोबर काय घेऊन आला असेल, त्यानें काय कमाई केली असेल या गोष्टीचा विचार करते. आईचें मुलाबद्दल वात्सल्य त्याच्या कमाईवर अवलंबून नसतें, पण स्त्रीचें पतीवर प्रेम तितकें निःस्वार्थी नसून त्याच्या वैभवाकडे तिचें लक्ष्य अधिक असतें.

आई भेरी, बाप पडघम आणि संबळ भाऊ—[भेरी=लांब, सरळ, मोठें कण्र्योसारखें वाद्य. पडघम=लहान नौबतीसारखें वाद्य. संबळ=धूम आणि टिमकी या नांवाचीं दोन लहान मोठीं वाद्यें एकत्र बांधून तयार होणारें वाजंत्र्यांचें वाद्य] हा सर्व सनईचा गोतावळा आहे. ज्या कुटुंबांत संगीत प्रिय असतें त्या कुटुंबांत सर्व संगीतमय असतें. प्रत्येकास कोणत्याना कोणत्या तरी संगीत कलेच्या अंगाचें ज्ञान असतें.

आई मरावी, मावशी उरावी—माय मरो, मावशी जगो. वर 'आई नसो.' पहा.

आई, मला बाळंत व्हावयाचे (कोनीं निघावयाचे) वेळेस जागी कर, बाई तूं मुलखास जागें करशील—एक मुलगी आपल्या आईस सांगते कीं, मी रात्रीं कदाचित् झोंपेंत बाळंत होईन व मला कळणार नाहीं. याकरितां मला त्याप्रसंगीं मुद्दाम जागी कर. तेव्हां आई सांगते कीं, त्यावेळीं तूं स्वतःच जागी राहशील, एवढेंच नव्हे तर तुझ्या ओरडण्यानें सर्व जग जागें होईल. जी गोष्ट अतिशय गाजावाजा होऊन व्हावयाची हें निश्चित असतें व सर्व जगास कळून येण्यासारखी परिस्थिति असते तीबद्दल एखाद्यानें मला कदाचित् कळणार नाहीं, ध्यानांत येणार नाहीं असा संभव असल्याचें दर्शविलें तर त्यास उत्तर देण्याकरितां म्हणून ही म्हण वापरण्यांत येते.

आई माझी डोंबाळी आणि अवसे पुनवे ओंबाळी—जी स्त्री अंगांत आणते, मांत्रिकपणा करते तीबद्दल म्हणतात. तिच्या अंगांत अवसे पुनवेस येतें.

आई ! मी ढेप आणतों, तर मुंगळ्या बाबा ! तुझी कंबरच सांगते आहे—जो तो आपल्या कुवतीप्रमाणें काम करूं शकतो. एखाद्यानें कितीहि पराक्रम करण्याचा आव आणला तरी त्याच्या शरीराच्या व शक्तीच्या मानानेंच त्याच्याकडून काम होणार.

आई मुलाची तहान भूक जाणती, त्यापेक्षां मुलाला अधिक माहिती—आईला नेहमीं आपलें मूल तहानेलें किंवा भुकेलें आहे असें वाटतें व ती वरचेवर त्यासंबंधीं त्यास विचारते किंवा खाण्यापिण्याचा आग्रह करते. पण मुलास खरोखर तशी एकसारखी तहानभूक असणें शक्य नाहीं व तो खाणेंपिणें नको म्हणतो. तरी आईच्या वेडया मायेनें तें तिला खरें वाटत नाहीं. मनुष्य मायेनें वेडें झालें म्हणजे तें आपल्या प्रिय माणसास केव्हां केव्हां काल्पनिक गोष्टींपासूनहि त्रास होत असेल असें मानतें किंवा त्याची वाजवीपेक्षां अधिक जोगवण करण्याचा प्रयत्न करतें.

आई मेल्यावर बाप मावसा—मुलाची आई जिवंत असतां बापाचें जितकें त्यावर प्रेम असतें तितकें ती मेल्यावर नसतें व केव्हां केव्हां तर तो तिच्या धाकटया बहिणीशींच लग्न लावतो व त्यामुळें खरोखरच तो त्या मुलाच्या मावशीचा नवरा होऊन

मावसा होतो व तितक्या मानानें त्याची मुलावरची माया दुरावते.

आई व्याली, पोर पिसा, जांवई मिळाला तोहि तसा—आईस पोरें झालीं तीं वेडीं झालीं व जांवई मिळाला तोही वेडा मिळाला. सर्वच कुटुंबांत वेडगळ भ्रमिष्ट मंडळी असल्यास म्हणतात.

आई सोसणार नि बाप पोसणार—मुलाला दुखणें-बाहणें वगैरे झालें, कांहीं कमीजास्त झालें तर त्यासंबंधीं कष्ट काढ ण्याचें काम आईच करते. बाप त्यास खाण्यापिण्यास, कपडा लत्यास, शिक्षणास वगैरे कोणत्याहि बाबतींत कमतरता नाहीं-एवढेंच पाहतो.

आईचा काळ, बायकोचा मवाळ—एखादा बायकोला मात्र भिऊन वागतो व तिच्यापुढें त्याचें कांहीं चालत नाहीं. पण आईशीं मात्र अरेरावीचें वर्तन करून तिला उर्मटपणानें वागून त्रास देतो त्यास म्हणतात.

आईचा जीव बाईपाशीं, बाईचा सान्या गांवापाशीं—एखादा मनुष्य दुसऱ्यावर अवलंबून असतो किंवा त्याबद्दल फार आस्था दाखवितो. पण त्याला त्याची पर्वाच नसते. तो आपल्या इतर भानगडींत दंग असतो. अशा वेळीं म्हणतात.

आईचा निवाडा, लहान मुलाला पांगुळगाडा—बरींच मुलें असलीं व पांगुळगाडा एक असला आणि आईकडे तो कोणास मिळावा हा प्रश्न सोंपविला तर साहजिकच ती जें मूल सर्वांत लहान असेल त्यासच तो पांगुळगाडा मिळाला पाहिजे, असा निर्णय देईल. यावरून ज्यास सर्वांत जास्त गरज आहे, त्यासच सर्वांत अधिक मदत मिळावी अशी इच्छा असते व त्यामुळें जें दुर्बल, व्यंग असें मूल असेल त्यावर आई अधिक ममता करते, असा अनुभव आहे.

आईचा हात नि नारीचा दहिंभात (सारखाच)—आईचें करणें अगदीं साधें असलें तरी त्यांत मोठी गोडी असते; ती बायकोच्या वागण्यांत नसते.

आईचा हात, शिळा गोड भात—भात जरी शिळा असला तरी तो आईनें भरवला किंवा वाढला तर तो गोड लागतो. ज्या मनुष्यावर आपलें प्रेम असतें किंवा ज्याची आपल्यावर माया असते, त्याची कृति कशीहि असली तरी आपणांस नेहमीं चांगलीच वाटते.

आईची माया अन् पोर जाईल वाया—आईनें जर मायेनें मुलाचे फार लाड केले तर त्यास योग्य शिस्त न लागून तें बिघडण्याचा संभव असतो.

आईचें तसें बाईचें, तिसरें माझ्या सईचें—लग्न वगैरे समारंभांत कपड्यांचा नेहमीं गोंधळ होतो व कोणाची कोणात दाद नसते. अशावेळीं एका आप्पलपोट्या स्त्रीनें तीन लुगडीं उपटलीं तीं अशीं : त्यापैकीं एक माझ्या आईचें म्हणून, दुसरें आपल्या बहिणीचें म्हणून व तिसरें आपल्या मुलीचें म्हणून. यावरून कोणाच्या ना कोणाच्या तरी नांवानें आपला स्वार्थ साधावयाचा व समोरच्या वस्तु लाटावयाच्या, अशा वृत्तीच्या माणसाबद्दल म्हणतात.

आईचें दूध कीं गायीचें दूध—गायीचें दूध हें जवळ जवळ आईच्या दुधाचें काम करतें. आईचें दूध नसेल तेव्हां त्याऐवजीं गाईचें दूध देणें हितावह समजतात. मुलाला हीं दोन्हीं जवळ जवळ सारखींच उपकारक असतात.

आईचें मन मुलाला राखतें आणि बापाचें मन बाहेर फिरतें—आईला फक्त घराची व मुलांलेंकरांची काळजी घ्यावयाची असते, त्यामुळें तिचें सर्व लक्ष्य मुलांची जोपासना करण्याकडे असतें. उलट बापाला आपला घराबाहेरील व्यवसाय सांभाळावयाचा असतो, तेव्हा साहजिकच त्याचें लक्ष्य आपल्या व्यवसाय धंद्याकडे अधिक असून मुलांकडे लक्ष्य द्यावयास त्यास फारसा वेळ नसतो.

आईचें लग्न, बापाची मुंज, एकांत एक उरकून घेणें—अनेक परस्परांशीं विसंगत अशा गोष्टी एकदम करूं पाहणें.

आईचे स्तन, लेकराचें अन्न—मुलाचें मुख्य अन्न आईचें दूध आहे.

आईच्या लाडामुळें, मूल होई खुळें—आईनें मुलाचे फार लाड केले, त्यास योग्य तें शिक्षण दिलें नाहीं तर तें मूल अडाणी होणारच.

आईच्या लुगड्याला बारागांठी, बायकोला पितांबर धटी—आईकडे दुर्लक्ष व बायकोचे लाड.

आईजवळ गेले तर लेकरूंच होईल—आई ही केव्हांहि मोठी, तिच्यापुढें आपला मान अभिमान कसचा? तिच्यापुढें आपण लेंकरासारखे. तेव्हां तिच्याकडे जाण्यांत, तिला शरण येण्यांत कांहीं एक कमीपणा नाहीं.

आईनें ओटी भरली, पोर सासरीं निघालीं—आईनें मोठ्या प्रेमानें, शुभेच्छेनें मुलीची ओटी भरली पण त्याबरोबरच मुलीची सासरीं जाण्याची, स्वजनांस सोडून जाण्याची वेळ अगदीं नजीक येऊन ठेपली व मुलीचा स्वजनांपासून वियोग होणें प्राप्त झालें.

आईनें टाकलें म्हणून देव टाकीत नाहीं—परमेश्वराची मनुष्यमात्रावर आईपेक्षांहि अधिक मायाळू दृष्टि असते. तो सर्व अपंगांस सुद्धां साहाय्य करीत असतो, त्यामुळें एखाद्या अप-

त्याची स्वतः आईनें काळजी घेतली नाहीं तरी परमेश्वर त्याचा पाठीराखा असतो व त्याच्या जोपासनेची कांहीं तरी योजना करतो.

आईनें मळवट भरला, पोर दिली जांवयाला—आई मुलीचा शुभदायक म्हणून विवाहप्रसंगीं मळवट भरते; पण त्याचा परिणाम मुलगी तिला कायमची अंतरण्यांत होतो. एखादी गोष्ट जरी बऱ्याकरितां केली तरी तिचा क्वचित् अप्रत्यक्ष रीतीनें एखादी अनिष्ट गोष्ट होण्याकडे परिपाक होतो.

आईबरोबर जेवला काय, बापाबरोबर जेवला काय, सारखेंच—कोणीकडून तरी मुलाचें पोट भरलें म्हणजे झालें; मग तें आईबरोबर जेवल्यानें भरलें काय किंवा बापाबरोबर जेवल्यानें भरलें काय, सारखेंच. एखादें काम नीटपणें झालें म्हणजे संपलें मग तें कोणाच्या हातून कां होईना.

आईला सुख तर गर्भाला सुख—गरोदर स्त्रीचें जर भरणपोषण चांगलें झालें व तिच्या जिवाला चैन असलें तरच गर्भाची वाढ योग्य तऱ्हेनें होणें शक्य असतें. मूळ गोष्ट जर चांगली असेल तरच तिच्यावर अवलंबून असणारी गोष्ट ठीक होईल.

आईसारखी माया, निंबाची छाया—ज्याप्रमाणें कडुनिंबाची छाया गार असून आरोग्यदायक असते व त्याची सर दुसऱ्या कोणत्याहि झाडास येत नाहीं त्याप्रमाणें आईची माया, किंवा प्रेम हें निर्व्याज व अत्यंत सुखदायक असतें; त्याची सर दुसऱ्या कोणाच्याहि प्रेमास येणार नाहीं.

आईजी——आईजी राणी, बाईजी राणी, तोंड धुवायला कोण देणार पाणी; (पाटाचें पाणी कोण आणी)—एखाद्या ठिकाणीं पुष्कळ बायका जमल्या व सर्व आईजी, बाईजी आपणांस राणीप्रमाणें थोर समजूं लागल्या व प्रत्येकीनें आपणांस कोणीं तरी दासीनें तोंड धुवावयास पाणी आणून दिलें पाहिजे अशी अपेक्षा केली तर सर्वच आपणांस राणीप्रमाणें मानीत असल्यानें दासीपणा कोणीच पतकरणार नाहीं व कोणी पाणीहि आणून देणार नाहीं. तेव्हां समाजांत आपण जमलों म्हणजे कोणी कांहीं कोणी कांहीं असें काम केल्याशिवाय कोणतेंच कार्य होणार नाहीं. सर्वच माणसें मानापमानाच्या कल्पना घेऊन बसलीं तर सर्व काम जागच्या जागीं राहील. याकरितां समाजांत सर्वांचें काम करीत असतां लहान थोर हा भेदभाव लक्ष्यांत न घेतां, पडेल तें काम केलें तरच कोणतेंहि कार्य तडीस जातें. तु०—तुमची तांडेल; हमची तांडेल, तो धमत कोण सांडेल.

आईजीच्या जीवावर (दोंदावर) बाईजी उदार, दिवसा दिवा रात्रीचा अंधार; आईजीच्या जिवावर बाईजी उदार, आणि सासवेच्या दोंदावर जांवई उदार—जेव्हां एखादा मनुष्य दुसऱ्याचा पैसा वाटेल तसा उधळतो व मोठेपणा दाखवितो त्यावेळीं वापरतात.

आईबाई——देई घेई ती आइबाई, न देई ती मसणांत जाई—जी नेहमीं देंत घेत असेल ती आईसारखी वाटते व जी याप्रमाणें संबंध ठेवीत नसेल ती मेली तरी तिच्याबद्दल कांहीं वाईट वाटावयाचें नाहीं.

आईबाई नडवली न पानबाळी घडिवली—[आईबाई=साधी भोळी बाई. पानबाळी=एक कर्णभूषण] साध्या भोळ्या बाईबापडीला एखाद्यानें लुच्चेगिरीनें फसवून तिच्यापासून पैसे उटून आपला तळीराम गार केला तर त्याच्याबद्दल असें म्हणतात. भोळ्या लोकांस फसवून स्वार्थ साधला असा अर्थ. "त्यानें काय मोठे प्रामाणिकपणानें पैसे मिळविले आहेत ? नाहीं. त्यानें देखील 'आईबाई नडविली न् पानबाळी घडविली;' पगारावर नाहीं इष्टेट झाली."

परीट नागविला तर आयाबाया नागविल्या—परटाच्या घरीं चोरी झाली तर त्याच्या येथें त्याचे स्वतःचे कपडे नसून इतर गांवांतील लोकांचेच असतात. तेव्हां ते जर चोरीस गेले तर त्यांत त्याचें कांहीं नुकसान होत नसून परभारें गांवांतील लोकांचें मात्र नुकसान होतें. ज्याला स्वतःला एखाद्या कामांत घस लागण्याचा मुळींच संभव नसतो तो मनुष्य तें काम अंगावर घेऊन करूं लागला म्हणजे म्हणतात.

आईबाप——आईबापावरून पावणें; आईबाप उद्धरणें—आईबापावरून गालिप्रदान करणें; वेड्यावांकड्या अभद्र शिव्या देणें; मातापिता उद्धरणें.

आईबाप मेले आणि पोर उघडें पडलें—मुलाचा आईबापांचा आधार सुटला म्हणजे जगांत त्यास दुसऱ्या कोणाचाहि आधार नाहींसा होतो.

आईबापा मारी लाता, बाईलीला घेई माथा—आईबापांकडे दुर्लक्ष करून बायकोचे लाड पुरविणारा.

आईबापाची कीर्ती, मुलाचे उपयोगी न पडती—मनुष्य वास्तविक आपल्या कर्तबगारीनें पुढें येतो. त्याचे आईबाप कितीहि मोठे असले तरी त्यांच्या मोठेपणाचा त्यास फारसा उपयोग पुढील आयुष्यांत होत नाहीं. त्याला स्वतःच्या योग्यतेप्रमाणें जगांत स्थान मिळतें.

आईबापाची केली भक्ती, तुला केली दगडाची—आईबापाची जन्मभर मोठ्या डौलानें भक्ति केली असें दाखवावयाचें व त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्याबद्दल जें तुलादान करावयाचें तें मात्र कोणत्याहि मौल्यवान धातूचें न करतां केवळ दगडांचें केलें तर त्या भक्तीचा काय उपयोग ? तें नुसतें ढोंग होतें असेंच

लोक मानणार.

आईबापाची लाडकी, महाजनांची (महादेवाची) बोडकी—एखादी विधवा स्त्री आईबापांची कितीहि लाडकी असली व ते तिला कितीहि चांगल्या नांवानें संबोधीत असले तरी व्यवहारांत लोक तिला एक विधवा एवढेंच मानणार. त्यापेक्षां व्यवहारांत तिला कोणी अधिक महत्त्व देणार नाहीं. आपल्या ठिकाणीं मनुष्यानें आपल्या एखाद्या वस्तूची किंमत कितीहि अधिक मानली तरी बाजारांत तिची जी योग्य किंमत असेल तीच तिला येणार. तुमच्या मानण्यावर तिचें मोल कांहीं अवलंबून असणार नाहीं.

आईबापांनीं केला पोर, गांवकऱ्यांनीं केला कुडव—[कुडावा–संरक्षण] एखाद्या मुलाच्या बाबतींत आईबाप हे केवळ जन्मदाते असून त्याची त्यांनीं कांहींच काळजी घेतली नाहीं तर गांवकरी त्याचें कसें तरी रक्षण करतात व त्यास लहानाचा मोठा करतात. अशा तऱ्हेनें पोरक्या मुलांचें संरक्षण गांवानें करण्याची प्रथा पूर्वीं अनेक ठिकाणीं असे. अशा वेळीं आईबापा इतकेच गांवकऱ्यांचेहि उपकार त्या मनुष्यावर असतात. तेव्हां आपला गांव हा आपणास आईबापाप्रमाणेंच किंबहुना अधिक प्रिय असला पाहिजे. स्वग्रामाबद्दलचा अभिमान व्यक्त करण्याकरितां ही म्हण योजतात.

आईबापें जन्माचे मात्र सोबती पण कर्माचे सोबती नाहींत— आईबापांच्या हातीं जन्म देणें एवढें आहे. पुढें जगांत जो आपणास मार्ग आक्रमावयाचा तो आपल्याच कृतीनुसार व आपल्या योग्यतेनुसार असणार. आईबाप कांहीं जन्मास पुरत नाहींत. मनुष्याचें जगांतील स्थान त्याच्या स्वतःच्या कर्तबगारीवरच अवलंबून असतें.

आऊ——**आऊचा काऊ, तो ह्मणे माझा मावसभाऊ**—अत्यंत दूरचें नातें. जें नातें सहज वर्णन करून सांगतां येत नाहीं असें; कांहींतरी दूरान्वय करून सांगितलेलें नातें.

आऊत——**आऊत सोडून राऊत होणें**—शेतकऱ्याचा घोडेस्वार होणें; शेतकऱ्याच्या हातांत आऊत असतें, तो सैन्यांत शिरून सरदार झाला व महत्त्वास चढला म्हणजे त्यास राऊत म्हणतात. यावरून प्रथम हलका धंदा करीत असलेला मनुष्य पुढें वैभवास चढला म्हणजे त्यास म्हणतात. तुलना–प्याद्याचा फर्जी होणें; वाघ्याचा पाग्या होणें.

आंकडा——**आंकडा बसणें–मोडणें**—गर्भाची बरीच वाढ होऊन विण्याच्या अगोदर जनावराच्या ढुंगणाच्या दोन्ही बाजू खोल जाणें.

आंकडा वळणें—थंडीनें किंवा भीतीनें अंग आंखडणें. आंकडा वांकडा असतो त्याप्रमाणें शरीर वांकडें होणें.

आंकडयास येणें, आंकडया लोंबणें–लवणें—पीक अगदीं भरून येऊन कणसें लोंबावयास लागणें. 'कितेक भारें आंकडया लवती।' –सप्र १२.४३.

आकर्षण——**आकर्षणें**—पांच आहेत : १ गुरुत्वाकर्षण २ केशाकर्षण, ३ चुंबकाकर्षण, ४ विद्युदाकर्षण, ५ रसायनाकर्षण.

आंकलेकर——**आंकल्यांकारानीं पातक केल्यार कुमठेंकारांक दंड कित्याक?** —(गो.) आंकलेकरांनीं पातक केल्यास कुमठेकरांना दंड कशाला? सोम्याचा दंड गोम्यास काय म्हणून? आंकलेकर, कुमठेकर, हीं गांवकऱ्यांचीं नांवें आहेत.

आका—का——**आका गळयाक भांग्रा सरि, भयिणी गळयाक सुंबा दोरी; आकेच्या गळयांत सरपळी, धाकट्या जावेनें घातली सुंभाची दोरी, आकेची घसघसतां आणि जावेची कसकसतां**—(गो.) [आका=नणंद; सरपळी=सांखळी] नणंदेच्या गळ्यांत सोन्याची सांखळी होती म्हणून धाकट्या जावेनें घातली सुंभाची दोरी; पण तिची घसघशीत दिसते व हिची खुपत असते. एकानें कांहीं केलें म्हणून दुसऱ्यानें भलतेंच करणें.

आकाबाई——**आकाबाई आठवणें**—भलतीच इच्छा होणें; अवदशा येईल अशाप्रकारच्या प्रवृत्ति होणें; भलत्याच गोष्टी करण्याकडे मन झुकणें. अक्काबाई पहा.

आकाबाईचा फेरा—'अक्काबाईचा फेरा' पहा. 'त्यांच्यावर ह्या प्रसंगीं सहजच आकाबाईचा फेरा यावा त्याप्रमाणेंच तो आला.'—छच २७.

*** आकाबाई दोहोंदारीं फुगडया घालते**—अत्यंत दुर्दैव, दारिद्र्य वगैरे कष्टदशा दाखवितें.

आकाबाईचा फेरा अन् मनुष्याला दरारा—मनुष्यावर दुर्दैव ओढवलें म्हणजे त्याला प्रत्येक गोष्टीपासून भय उत्पन्न होतें. मनुष्यास वाईट दशा आली म्हणजे त्याचें मनहि कमकुवत होतें.

आकार——**आकार दाखविणें**—ढोंग करणें; बहाणा करणें; वरवर दाखविणें; मिष करणें.

आकारांत जाणें—व्यर्थ जाणें; फुकट जाणें; फलप्राप्ति न होणें.

आकारास येणें—१ मार्गास लागणें; कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंत प्रगति होणें; कोणतेंहि काम होण्याच्या दिशेनें कांहीं गोष्टी जुळून येणें; रंगरूपास येणें; मूर्तस्वरूप प्राप्त होणें. 'कर्म आलें हो

आकारा।'–विष्णूची सूपाळी. 'त्यांची अवस्था तीच तुमची पुढें येईल आकारास।'–ऐपो ३०६. २ अवतार घेणें; जन्मणें.

॥ आकारे रंगती चेष्टा—मनुष्याच्या बाह्य रूपावरूनच साधारण त्याची किंमत, त्याचें सामर्थ्य व त्याच्या हातून घडणाऱ्या कृतीचा अंदाज करतां येतो. मूळ संस्कृत श्लोक-आकारैरिंगितैर्गत्या चेष्टया भाषणेन च। नेत्रवक्त्रविकाराभ्यां ज्ञायतेऽन्तर्गतं मनः॥ –सुर १४७.२२६. या श्लोकाच्या पहिल्या शब्दांच्या अपभ्रंशानें वरील म्हण बनली आहे. 'आकारेंचि परेंगित कळतें बोलोनि कायहो कळतें।'–मोवन १.१२. 'आकारेणैव चतुरास्तर्कयन्ति परेंगितम्। गर्भस्थं केतकीपुष्पमामोदेनेव षट्पदाः॥ –सुर १५८.२३३. २ भावी गोष्टींचीं चिन्हें अगोदर दिसतात.

आकाश——आकाश कोसळून पडणें—भयंकर आपत्ति येणें; महत्संकट प्राप्त होणें; दुःखाचा डोंगर कोसळणें.

आकाश पाताळ एक करणें—हलकल्लोळ करणें; आरडा ओरड करणें; उच्छाद मांडणें; भयंकर रागावून कांहीं तरी अचाट गोष्ट करणें. 'माझ्याकरितां आकाश पाताळ एक करायचं झालं नसतं का?'—एकच प्याला ३'४. 'ऐष आरामाच्या जिनसा शहरांत दिसल्या नाहींत कीं आकाश पाताळ एक करून देईल.'–विज्ञावि ८.११.२०७.

आकाश पाताळ एक होणें—१ अतिशय गर्व करणें; चढून जाणें; अभिमान बाळगणें. २ अतिशय पाऊस पडणें. ३ हलकल्लोळ उडणें. 'बंदुकांच्या बारांनीं, घोड्यांच्या टापांनीं व खेंकाळण्यानें दशदिशा दणाणून नेल्या; आकाश पाताळ एक झालें.' –संभाजी. 'बटो गर्भगलित झाला व त्याला आकाश आणि पाताळ एकच झाल्यासारखें वाटूं लागलें.'–ज्ञाब २'२२८.

आकाश पाताळाचा भेद—जमीन अस्मानचें अंतर; दोन वस्तूंमधील महदंतर. 'आत्मा आणि बुद्धि हीं तूं जर एक समजत असलास, तर आकाश पाताळाचा भेदच तूं नाहींसा केलास असें म्हटलें पाहिजे.'

आकाश फाटणें—सर्व बाजूंनीं एकदम संकटें येणें; आकाश कोसळून पडणें; निराधार स्थिति होणें. 'आकाश फाटलें त्याला, लावावें ठिगळ कुठोनी।'—संग्रामगीतें.

आकाशमुष्टिहननन्याय—आकाशाला बुक्क्या मारणें म्हणजे निष्फल खटाटोप करणें. असंभाव्य गोष्टीला हात घालणें.

आकाशाची कुऱ्हाड कोसळणें—भयंकर दैवी आपत्ति येणें; निसर्गाचा प्रकोप होणें; अत्यंत मोठी हानि होणें. विशेषतः एखादा निकटचा आप्त मरून निराश्रित होणें. 'चिटणीस, तुमच्यावर आज आकाशाची कुऱ्हाड कोसळली आहे.'—स्वप ४४६. 'महायुद्धाच्या संकटाचें निवारण करण्याकरतां सरकारासच हिंदुस्थानांत लष्करवाढीची अत्यंत गरज भासत असतां, एकाएकीं आकाशाची कुऱ्हाड कोसळावी त्याप्रमाणें संघ, व्यायाम-कवायत, लाठीहल्ला, व गणवेश इत्यादि निरुपद्रवी कार्यक्रमावर बेकायदेशीरपणाची गदा हाणली गेली.'–केसरी ९–८–४०.

आकाशाची चौघडी करणें—अशक्य गोष्ट करणें; न घडणारी गोष्ट होणें. 'आकाशाची करवेल चौघडी। परी मनाच्या ओढी अनिवार।'.

आकाशाची दोरी तुटणें—अभाळ अंगावर येणें; भयंकर आपत्ति येणें; अंगावर आकाश कोसळणें. 'तों एकाएकींच आकाशाची दोरी तुटते तैशी गोळी येऊन......उजवे बरगडींत लागली.' —भाव ८१.

आकाशाची साल काढणें—निष्फळ प्रयत्न करणें; आकाशाला कवची नसल्यामुळें ती काढण्याचा प्रयत्न करणें व्यर्थ होय. 'तेणें साली काढावी आकाशाची।'–अमृ ६'४७.

आकाशांतून उतरणें-पडणें—अघटित घटना करून दाखविणें; अचाट कृत्य करणें; अमानुष गोष्ट करणें; चमत्कार करून दाखविणें; **अस्मान फाडून येणें** पहा.

आकाशाला गवसणी घालणें—अशक्य गोष्ट करावयास धजणें; आवांक्या बाहेरची जबाबदारी घेणें. 'जोंपर्यंत लोक गोमांस खातात तोंपर्यंत गोरक्षणाचे प्रयत्न करणें म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यापैकीं होय.'

आकाशाला वेरा घालणें-देणें—अचाट कृत्य करणें; अशक्य गोष्टीस हात घालणें.

आकाशाला झेंडे लावणें—एखादें महत्कृत्य करणें; फार मोठा पराक्रम करणें. 'उडविन बाविस टोप्या झेंडे नेऊन लाविन आकाशाला'–विज्ञावि ४'८'८०.

आकाशाला शिड्या लावणें—आकाश अतिशय उंच असल्यामुळें त्याला कोणतीहि शिडी पोंचणें अशक्य आहे. यावरून अचाट, मानवी शक्तीबाहेरचें काम करणें.

आकाशास ठिगळ लावणें—आकाश फाटलें तर तें ठिगळ लावून सांधणें अशक्य आहे. यावरून व्यर्थ, निष्फल प्रयत्न करणें.

आकाशीं राहणें—आढ्याखालीं, माळ्यावर राहणें; पोटमाळ्यांत राहणें; सर्वांत वरच्या माळ्यावर गैरसोयीनें राहणें.

॥ **आकाश कोसळल्यावर धिगि कोण लायतलो?**—(गो.) आकाश कोसळल्यावर टेकू कोण देईल?

आकाश खालीं येते तर पक्षी हातीं येते—पक्षी आकाशांत वर उडत असतात तेव्हां आकाशच जर ठेंगणें झालें तर पक्षीहि

आपणाला सहज हातानें धरतां येतील. परंतु पहिली गोष्ट अशक्य असल्यानें दुसरीहि गोष्ट शक्य नाहीं. यावरून एक गोष्ट अशक्य असली म्हणजे तीवर अवलंबून असणाऱ्या सर्व गोष्टी अशक्यच असतात.

आकाश गडगडे, पाणी पडे—१ आकाशांत मेघांचा गडगडाट होतो पण पृथ्वीवर पाऊस पडतो. एखादी गोष्ट एका ठिकाणीं घडते पण तिचे अकल्पित परिणाम दुसरीकडे झाले म्हणजे म्हणतात. तु०— अहो खलभुजंगस्य विचित्रोयं वधक्रमः। एकस्य दशति श्रोत्रे अन्यः प्राणैर्विमुच्यते ॥ दुष्ट मनुष्य एकाच्या कानाचा चावा घेतो पण दुसराच मनुष्य मरण पावतो. २ घरांतील मुख्य माणूस रागावून बोलला कीं, रडूं आलेंच (मॅनवेरिंगचा अर्थ).

आकाशाक निसाणि लायल्यारी खड्थांड चड येत ?—(गो.) आकाशाला शिडी लावल्यास (लागल्यास) कसेंहि चढतां येईल.

आकाशाची कुऱ्हाड कोल्ह्याचे दांतावर—निरपराध, गरीब व्यक्तीवर संकट कोसळलें असतां म्हणतात. कोल्ह्याचे दांत पुढें असल्यानें त्यावरच धाड येते. पुढाऱ्यावर नेहेमीं प्रथम संकट येते.

आकाशांत वारा, खालीं वावटळीचा पसारा—वारा आकाशांत वर वाहात असतो पण त्याचा परिणाम खालीं कांहीं गोष्टी अस्ताव्यस्तपणें उडून जाण्यांत होतो. एकीकडे गोष्ट घडते पण तिचे परिणाम इतरत्र होतात.

आकाशांत वीज, घरांत स्त्री, वनांत मोर, मुखीं तांबूल यांची शोभा काय वर्णन करावी—या सर्व गोष्टी जेथल्यातेथे शोभून दिसतात.

आकाशांतली धार, करिते बेजार—जोराचा पाऊस सुरू झाला म्हणजे त्याला कांहीं उपाय करतां येत नाहीं. त्यापासून होणारा त्रास निमूटपणें सहन केला पाहिजे.

आकाशांतले तारेहि मोजावयाचे आणि वाटहि चालावयाची—आकाशाकडे पाहात पाहात वरील ताऱ्यांकडे लक्ष्य देत चाललें तर खालील वाट न दिसल्यामुळें ठेंचाळण्याचा संभव असतो; निदान जलद चालणें तरी शक्य होत नाहीं. यावरून एकसमयावच्छेदेंकरून दोन गोष्टी करतां येत नाहींत. –साहित्य आणि संसार –ना. सी. फडके.

आकाशांतून पडला आणि धरणीवर सांवरला; आकाशांतून पडलां आणि भुईवर सांवरलां; आकाशानें टाकलें आणि पृथ्वीनें झेललें—ज्या गोष्टीला आगापिच्छा नाहीं, ज्या मनुष्याचें, गोत्र, मूळ ठावठिकाणा, पूर्वचरित्र वगैरे ठाऊक नाहीं, अशा मनुष्याबद्दल योजतात.

आकाशाला कांहीं टेका आहे ?—आकाश एवढें अफाट आहे कीं त्याला कोठें टेका देणें शक्य नाहीं. यावरून एखादी अनाढ्य गोष्ट असली व तिला कांहीं आगा पिच्छा नसला म्हणजे तीबद्दल वापरतात.

आकाशीं धोत्रें आणि कांखेशीं कुत्रें—१ ज्या धोतरांतून आकाश दिसतें म्हणजे जें ठिकठिकाणीं फाटलें आहे असें धोतर नेसलेला व कांखेंत कुत्रें घेतलेला; म्हणजे दरिद्री व गलिच्छ मनुष्यास उद्देशून ही म्हण योजतात. पोशाख स्वच्छ पण जवळ कुत्रें म्हणजे वागणूक गलिच्छ.

आकाशीं वाळते आणि पाताळीं लोळते—ज्या गोष्टीबद्दल विशेष माहिती नाहीं, जिचा ठावठिकाणा माहीत नाहीं त्या गोष्टीची कोणी परवा करीत नाहीं किंवा काळजी करीत नाहीं. तीबद्दल वापरतात.

आकाशीचें फूल, त्याचें कुणा एवढें खूळ—दुष्प्राप्य गोष्टीबद्दल कोणी हपापलेला नसणार.

आकुळ——आकुळ्ळेलि गायि आप्पा भट्टाक दान—(गो.) व्याकूळ झालेली गाय आप्पाभटला दान. मरणोन्मुख गाय भटाला दान देऊन पुण्य संपादन करण्याची व खर्च टाळण्याची लोभी वृत्ति. तु०—भटाला किडकी सुपारी.

आकृति——आकृतिरेव गुणावगुणान् कथयति ।—मनुष्याच्या स्वरूपावरूनच प्रथम त्याच्या गुणावगुणांची, स्वभावाची वगैरे परीक्षा करतां येते. बोलण्या चालण्यावरून माणसाची तेव्हांच पारख होते.–शाकुंतल.

आकै——आकैचें काजळ, बाकैचो शेंदूर—(गो.) आकै गांवांतून काजळ व बाकै गांवांतून शेंदूर (आणून शृंगार करणें). (ल.) कुठून तरी कांहीं आणून साजरें करणें.

आंख——आंख काढणें—(कु.) हरकत घेणें; शक काढणें; अंदेशा घेणें. ' त्यानें आंख काढल्यामुळें रामरावाचें मुंबईस जाणें राहिलें. '

आंख घालणें—ज्याप्रमाणें कपड्यावर किंमतीचा आंकडा घालावा त्याप्रमाणें एखाद्या गोष्टीचा अंदाज बांधणें; सामान्यतः बरोबर तर्क करणें. ' तुम्ही तर नापासाचा आंख घालून ठेविला आहे '

आंख मोडणें—१ डोकेंदुखी थांबण्यासाठीं कानशिलावर बिब्याच्या फुल्या घालणें. २ आंकडा मोडणें पहा.

***खाण्यास अन्न नाहीं, पांघरण्यास आंख नाहीं**—

[आंख = वस्त्र, कापडाचा तागा.] ज्यास खाण्यापिण्यास किंवा पांघरण्यास वस्त्र नाहीं असा निराधार कंगाल मनुष्य.

आंख——आँखका अंधा, और गांठका पुरा—[आँख= डोळा.] मूर्ख उधळ्या माणसाबद्दल म्हणतात.

आँखे होते चार, दिलमे आया पियार—दोघांचे मिळून चार डोळे एकत्र होतांच मनांत प्रेम उत्पन्न झालें. प्रथमदर्शन होतां क्षणींच ज्या स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं उत्कट प्रेमभावना उत्पन्न होते त्यांच्या बाबतींत योजतात. तारकामैत्री.

ऑखोंमे खाक डाल आये—डोळ्यांत धूळ टाकून आले. एखाद्याला फसविलें असतां म्हणतात.

आखला——आखला सुटला तर उकीरडा उकरील, पर्वताशीं थोडीच टक्कर घेणार आहे?—[आखला=न बडविलेला बैल; सांड; पोळ.] एखाद्या मस्तवान पोळाला मोकळें सोडलें तरी तो कांहीं एकदम पर्वताशीं टक्कर घ्यावयास धांवणार नाहीं; तर उकिरड्यामध्येंच डोकें खुपसून माती उकरण्याचा प्रयत्न करील. मनुष्य कितीहि मोठा झाला तरी त्याच्या आंवांक्याप्रमाणेंच तो कार्य अंगावर घेणार; त्याच्या आंवांक्याबाहेरच्या गोष्टी करण्याचें त्याच्या मनांतहि येणार नाहीं. जो तो आपल्या कुवतीप्रमाणेंच उडी मारतो.

आखाड——आखाड सासरा—लग्न झाल्यानंतर नव्या सुनेनें सख्ख्या सासऱ्याचें पहिल्या आषाढांत तोंड पाहावयाचें नसतें म्हणून तिला कांहीं दिवस दुसऱ्याकडे ठेवतात. तेथला कोणी माणूस सासऱ्याप्रमाणेंच तिला बोलूं लागला, दबकाऊं लागला म्हणजे म्हणतात. तो आखाड़ापुरताच सासरा असतो. (ल.) दुसऱ्यावर विनाधिकार करडा अमल चालविणारा माणूस.

आखाडसासु—'आखाड सासरा' पहा. अशीच करडा अंमल चालविणारी स्त्री. याखेरीज नणंद विशेषतः वडील नणंद अथवा नवऱ्याची अक्का घरांत असली म्हणजे तिचा भावजयीवर वरचष्मा बराच चालतो; यावरून तीस आक्कडसासु म्हणतात व याच शब्दाचें पुढें रूपांतर आखाडसासु या शब्दांत होतें.

❀ आखाडांत तट्टू, भाद्व्यांत भट्टू—आषाढ महिन्यांत नवीन झालेलें गवत भरपूर खावयास मिळाल्यामुळें घोडे मस्त होतात; त्याचप्रमाणें भाद्रपद महिन्यांतील पितृपक्षामध्यें पक्षश्राद्धांचें वगैरे जेवण भरपूर मिळाल्यामुळें भिक्षुक लोकांचीहि खूप चंगळ होते.

आखाडा——आखाड्यांत उतरणें—मल्ल लोक कुस्ती खेळण्यासाठीं चड्डी घालून आखाड्यांत उतरतात. यावरून लढण्यासाठीं सज्ज होणें, वादाविवादास सिद्ध, तयार होणें.

आंखुड——आंखुड शिंगी, बहु दुधी, अल्प मोली—एका मनुष्यास गाय पाहिजे होती. ती कशी हवी म्हणून विचारतां त्यानें सांगितलें कीं, तिचीं शिंगें आंखूड असावीं म्हणजे तीं लागण्याची धास्ती नाहीं व तिचें वयहि अल्प असावें, तसेंच तिला पुष्कळ दूध असावें; परंतु तिची किंमत मात्र फार थोडी असावी. याप्रमाणें सर्व चांगलीं लक्षणें असून किंमतहि थोडी असणारी वस्तु कशी मिळणार? हें घडणें शक्य नाहीं. चांगल्या वस्तूस किंमतहि चांगलीच पडणार. यावरून थोडक्यांत बराच फायदा मिळवूं इच्छिणाऱ्याच्या बाबतींत ही म्हण वापरतात.

आखोटा——आखोटा भरणें—[आखोटा=आंख, टोंक, धस.] एखाद्या लांकडाचा धस, खिळा, कशाचें तरी टोंक वगैरे लागून वस्त्र फाटणें.—खेख १११.

आग——आग असणें—एखाद्या गोष्टीची फार हौस, उत्कंठा तीव्र इच्छा असणें.

आग उठणें-पडणें—खा, खा उठणें; अतिशय भूक लागणें; क्षुधेनें पीडित होणें.

आग ओतणें-झाडणें—आग पाखडणें पहा. १ कहर करणें; संकट आणणें. 'अन्यायानें लोकांवर आग ओतली गेली आहे.'—विक्षिप्त १.२०. २ अतिशय रागावणें, संतापणें. 'जीवर नित्य करीं अनुराग। तिजवर झाडितसे मी आग।'—उत्तरराम (गोडबोले) पद ७८.

आग घालणें—जाळणें; आग लावणें; पेटाविणें; शिलगावणें. 'निजामल्लीनें पुण्यास वेढा देऊन आग घातली.'—विवि ८.६. १०९.

आग पाखडणें—एखाद्यावर अतिशय रागावणें; त्यावर दोषारोप करणें; त्याची तीव्र शब्दांत निंदा करणें; कठोरपणानें बोलणें. 'नाहक सख्या आग मजवर पाखडलीरे।'—प्रला १८७.

आग पिणें—तोफेचा मारा सहन करणें. 'इतुकी आग पिऊन मराठे फौजेनें दम धरिला.'—पोर्तुगीझ व मराठे भाग ४.

तळव्याची आग मस्तकास जाणें—अतिशय रागावणें; फार संतापणें; रागानें लाल होणें. 'तळव्याची चढली आग, मस्तकास जाऊन भिडली।'—संगी ५८.

आग मारणें—यंत्रांत, बॉयलरांत कोळसा घालणें.

आग रिघणें—सती जाणें; अग्निप्रवेश करणें; अग्निकाष्ठें भक्षण करणें.

आग लागो!—नाश होवो; जळो; भस्म होवो. 'मी, माझें हें घातक; लागो या आग आणि मोहाला।'—मोद्रोण १५४०.

आग लावणें— कलह लावणें; भांडणतंटा उपस्थित करणें. 'या कारटीनें आग लावून दिली असेल. ही मोठी चोमडी

आहे असें आजोबांच्या तोंडचे शब्द कानीं पडले. '-पकोघे.

आग वरसणें—१ अतिशय होणें; प्राचुर्य होणें; वैपुल्य होणें; रेलचेल होणें. २ तोफांचा, दारुगोळ्यांचा वर्षाव करणें; बंदुका, तोफा वगैरेंचा भडिमार करणें. ३ अतिशय रागावणें; संतापानें तीव्र शब्द बोलणें. ' आग पाखडणें ' पहा.

आगीचा पुतळा—अति तापट, कडक मनुष्य; रागीट मनुष्य; संतापी.

आगीचा लोळ—कल्लोळ—१ आगीचा डोंब, झोत; अग्नीच्या ज्वाला, लोट. २ (ल.) संतापी मनुष्य; अतिशय रागीट मनुष्य.

आगींत उडी घालणें-घेणें-टाकणें—१ संकट ओढवून घेणें; एखादी आपत्ति अंगावर घेणें. २ एखाद्या धोक्याच्या कामांत धाडसानें शिरणें.

आगींत तूप शिंपडणें—आग अधिक भडकवणें; कलहांत भर घालणें; भांडण वाढविणें. तु०-' परि कोण प्राणि सदय शिंपील बळें दवानळीं आज्य । '-मो संशयरत्न २७.

आगींत (आगीवर) तेल ओतणें-घालणें—आग अधिक भडकवणें; कोणतीहि गोष्ट अधिक विकोपास नेणें; भांडण तंटा चालला असतां तो अधिक वाढविणें.-मोउद्योग ४-९.

आगींत तावून काढणें—पक्की कसोटी लावून परीक्षा घेणें. सोन्याची परीक्षा करावयाची झाल्यास तें प्रथम आगींत तापवून पाहातात. यावरून कठीण कसोटी लावून पाहणें.

आगी दुगी पहाणें-काढणें-उकरणें—१ चहाडी, चोंबडे-पणा करणें; वर्म काढणें. २ उठाठेव, भानगड, पंचाईत करणें.

आगी दुगींत नसणें—दुसऱ्याच्या कोणत्याहि कृत्याशीं वगैरे संबंध नसणें; अलिप्त असणें; प्रत्यक्ष संबंध नसणें; दूर असणें. कोणाच्या भानगडींत नसणें; पंचायतींत न पडणें.

आगीं भागीं पडणें—धोक्याच्या किंवा दगदगीच्या धंद्यांत पडणें; गोत्यांत सांपडणें; भानगडींत पडणें.

आगी वाऱ्याचे दिवस—ज्या दिवसांत ऊन अतिशय तापतें व वाराहि फार सुटतो असे दिवस; ग्रीष्म ऋतूचे दिवस; कडक उन्हाळ्याचे दिवस.

आगी वाऱ्याचें भय—कोणत्याहि संकटापासून भीति; दैवी मानुषी आपत्ति; रोगराई, जरीमरी वगैरेचें भय.

आगीस पडणें—(व.) हट्टास पेटणें; ईर्षेस चढणें; आवेशानें काम करणें; इरेस पेटणें.

* **आग खाईल तो कोळसे ओकेल** जो निखारे खाईल त्याच्या तोंडांतून कोळसे बाहेर येणारच. जो अन्यायानें पैशाचा अपहार करील त्याला त्याचें प्रायश्चित्त मिळून तें द्रव्य तर ओकावें लागेलच पण त्याबरोबर त्याची अपकीर्तीहि होणारच. पापाचें प्रायश्चित्त आज ना उद्यां मिळावयाचेंच.

आग पाणी अवश्यक, नाहीं मित्राहून अधिक—पाणी आणि विस्तव या गोष्टी अत्यावश्यक असल्या तरी मित्र त्यांहून अधिक आवश्यक असतात.

आग पानीको हाडवैर है; आग पानीको वैर है—अग्नि व पाणी यांचें शत्रुत्व प्रसिद्धच आहे.

कोरडी आग पुरवते पण ओली पुरवत नाहीं—१ प्रत्यक्ष आगीपेक्षां भुकेची व्यथा कठीण असते. अंतकाळापेक्षां मध्यान्हकाळ कठीण. २ आगीनें झालेली हानि पुरवते, त्यांतून कांहीं तरी बचावतां येतें पण महापुरानें झालेली हानि अधिक भयंकर असते. कारण त्यांत घरदार चीजवस्त एवढेंच नव्हे तर प्राणहि जाण्याचा संभव असतो.

आग रामेश्वरीं, बंब सोमेश्वरीं—[रामेश्वर व सोमेश्वर हीं देवस्थानें पुण्यास एकमेकांपासून दूर आहेत.] एकीकडे दुखणें व दुसरीकडे उपचार.

आग लगते झोंपडा, जो निकलेसो सार-लाभ—घराला आग लागली असतां आंतील सर्वच माल जळून जावयाचा हें ठरलेलेंच. तेव्हां त्यांतील जेवढा हातीं लागेल तेवढाच मिळाला म्हणावयाचा. तु०— सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः । जळत्या घराचा पोळता वासा.

आग लगाये तमाशा देखे—स्वतःच आग लावून गंमत पाहणें; आपणच वैर, भांडण लावून देऊन गंमत पहात बसणें.

आग लगाये, पानीको दोडती—स्वतःच आग लावून ती विझविण्याकरितां पाणी आणावयास धांवणें; आपण होऊन एखादी आपत्ति ओढवून घ्यावयाची व मग तिचें निवारण करण्याकरितां धांवाधांव करावयाची. स्वतः भांडण लावून देऊन मग समजूत करण्याचा प्रयत्न करावयाचा.

आग लगेपर कुवा खोदना—आग लागल्यावर विहीर खोदणें; काम बिघडून गेल्यावर उपाय शोधूं पाहणें. संकट येईल म्हणून त्याची आगाऊ तरतूद न करतां तें प्रत्यक्ष आल्यानंतर उपायाची योजना करावयाची, त्यापेक्षां आधींच काळजी घेतली तर चांगलें नव्हे काय ? तु०—'संदीप्ते भवने तु कूपखननं प्रत्युद्यमः कीदृशः ।

आग लावील आणि विझली कीं नाहीं जाऊन पाहील:—जो मनुष्य स्वतःच दुसऱ्यांमध्यें भांडण लावून देतो व तें कसें

मिटेल याची बाह्यात्कारी काळजी वाहतो असें दाखवितो, अशा मनुष्यास म्हणतात.

आग लाव्या आणि बोंब माऱ्या—स्वतः आग लावून बोंब मारणारा; आपणच एखादें भांडण लावून किंवा आपत्ति ओढवून घेऊन नंतर तीबद्दल ओरड करणारा.

कोणीं आग व्हावें, कोणीं पाणी व्हावें— भिन्न भिन्न प्रकृतीचीं माणसें असलीं म्हणजे म्हणतात. कोणी तंटा लावतात, तर कोणी मिटविण्याचा प्रयत्न करतात. कोणी तापट असतात, तर कोणी शांत असतात. अशीं भिन्न प्रकृतीचीं माणसें असलीं तरच सर्व सुरळीत चालतें.

आग हातीं धरवेल पण हा हातीं धरवणार नाहीं—अति विलक्षण तामसी, एककल्ली, हट्टी मनुष्याबद्दल वापरतात.

आगींतून निघालें व फुफाट्यांत पडलें; आगींतून निघावें फुफाट्यांत पडावें; आगींतून निघून फोफाट्यांत पडणें-, जाणें—आगीमुळें एखादी वस्तु भाजत असतां ती उचलून ऊन राखेंत टाकली तरी तिला जरा कमी आंच लागेल एवढेंच; पण उष्णतेपासूनच तिचा कांहीं बचाव व्हावयाचा नाहीं. तेव्हां एका मोठ्या संकटांतून सुटून दुसऱ्या लहान संकटांत पडलें असतां म्हणतात. तु०-Out of the frying-pan into the fire.

आगीवांचून कढ नाहीं व मायेवांचून रडें-रड नाहीं—पाणी किंवा कोणताहि द्रव पदार्थ उकळावयाचा असेल तर त्यास आंच द्यावी लागते; इतर वरवर उपाय करून चालत नाहीं. त्याप्रमाणें एखाद्याबद्दल विशेष सहानुभूति वाटण्यास त्याबद्दल आपलेपणा वाटावयास पाहिजे. तो जर नसेल तर वरवर शोकाचें प्रदर्शन होईल; खरा जिव्हाळा दिसून येणार नाहीं.

आगीवांचून धूर येत (निघत) नाहीं—जेथें धूर असेल तेथें आग असलीच पाहिजे. आग नसेल तेथें धूर निघणें अशक्य. तेव्हां आग हें कारण असून धूर हें कार्य आहे. यावरून कांहीं तरी कारण असल्याशिवाय कार्य घडून येत नाहीं. तु०-यत्र यत्र धूमस्तत्र तत्र वन्हिः।

आगटी——**आगटी पेटविणें**—(ल.) भांडण लावणें; कलह, तंटा उपस्थित करणें.

आगटी विझवून टाकणें—१ आग विझविणें. २ एखाद्याच्या घरची चूल बंद होणें; एखाद्या कुटुंबाचा समूळ उच्छेद करणें, नायनाट करून टाकणें.

* **सोनाराचें पाहाणें आगटींत**—सोनारसोनें आटतांना किंवा घडवितांना बारीकसारीक तुकडे, रज वगैरे आपल्या आगटींत टाकीत असतो. त्यामुळें त्याचें निधान जणूं काय सर्व आगटींत असतें व तिकडेच त्याचें नेहमीं लक्ष्य असतें. मनुष्य नेहमीं आपल्याला ज्या बाबतींत बारीकसारीक कांहीं लाभ होत असेल त्याच बाबतींत लक्ष्य घालतो.

आगंतुक——**आगंतुकास मान मिळत नसतो**—जो मनुष्य आमंत्रणावांचून एखाद्या समारंभाच्या ठिकाणीं वगैरे जातो तेथें त्याला कोणी विचारीत नाहीं.

आगपाई——**आगपाई करणें-साधणें**—अव्वल साधणें; आघाडी मारणें; पुढें असणें; पुढाकार घेणें.

आगर——**आगरांत गेला आणि पांगारा आणला**—[आगर = कोंकणांतील घरासभोंवतालची नारळ पोफळी वगैरेंची बाग] ही म्हण मूळ ' अंगाऱ्याला गेला आणि पांगारा घेऊन आला ' या म्हणीचा अर्थ बरोबर न कळल्यामुळें तीवरून शब्दविपर्यासानें बनली असावी. या म्हणीचा अर्थ-बागेंत गेला त्याला दुसरी कोणतीहि महत्त्वाची वस्तु आढळली नाहीं तर पांगारा हीच वस्तु त्यास आणावीशी वाटली. यावरून पुष्कळ सुंदर, उपयुक्त वस्तु मिळण्यासारख्या असतां एखादा मनुष्य एखाद्या क्षुल्लक गोष्टीवरच संतुष्ट होतो; किंवा अनेक प्रकारचीं मोठीं कार्यें करण्याची संधि आली असतां एखादी क्षुल्लक गोष्टच घडवून आणतो, त्यास उद्देशून ही म्हण वापरतात.

आगरावर जा कीं डोंगरावर जा, पळसाला पानें तीनच—पळस पहा.

आगला-ली-लें——**आगला गिरे पिछला हुशार; आगला पडला तर मागला हुशार**—' पुढच्यास ठेंच मागचा शाहणा ' पहा. —शाब २·२४५.

आगलीचा असा तसा, मागलीचा गुलाम जसा—मनुष्याची पहिली लग्नाची बायको असते तिच्याशीं त्याची नेहमीं बेपर्वाईची वागणूक असते; तिला तो फारसा विचारीत नाहीं. पण तीच दुसरी बायको असली म्हणजे तिच्या अगदीं अर्ध्या वचनांत असतो.

आगलीला मिळेना चोळकें, मागलीला उकरी बोळकें—एखादा मनुष्य प्रथम पत्नीला धड चोळीसुद्धां घालवयास न देण्याइतकें तिच्याकडे दुर्लक्ष करतो पण तोच दुसरीची हांजी हांजी करतो व तिचे हट्ट पुरविण्याकरितां पुरून ठेवलेलें द्रव्यहि उकरून काढतो. तिला खूष करण्याकरितां जिवाभावानें राखून ठेवलेलें द्रव्यहि खर्च करण्यास मागेंपुढें पाहात नाहीं.

आगलें झालें मागलें, बोडकें नाचूं लागलें—आधीं आलेला माणूस मागें पडून मागाहून येणाराच धुडगूस घालूं लागतो. नवीन मूल झालें म्हणजे पहिल्या मुलाचें कौतुक

कमी होतें. नवीन सून आली म्हणजे पहिल्या सुनेच्या अंगावरचे दागिने काढून नवीन सुनेवर घालतात. याप्रमाणें नवीन मनुष्य आला म्हणजे त्याचें सर्व कौतुक करतात व जुन्याकडे कोणी पाहात नाहीं.

आगसणें—— आगसतो तो मागसतो; आगसला तो मागसला—जो प्रथम फार पुढें पुढें जाण्याचा प्रयत्न करतो त्यास शेवटपर्यंत दम न धरतां आल्यानें शेवटीं तो सर्वांच्या मागें पडतो. ससा आणि कांसव यांची गोष्ट हा एक याचा दाखला आहे.

आगसली ती मागसली, मागसली ती कापुसली (मागून आली ती गरोदर झाली)— [कापुसणें=लठ्ठ होणें, गरोदर होणें] प्रथम सून गरोदर न राहतां ती मागें पडून तिच्या मागून आलेली धाकटी सून अगोदर गरोदर राहिल्यास म्हणतात. ज्या कार्यापासून किंवा व्यक्तीपासून लवकर फल मिळेल अशी अपेक्षा असते ती सफळ न होतां उशीरा झालेल्या गोष्टीपासून फळ मिळालें तर ही म्हण योजतात.

आगस्ताळी——आगस्ताळी, गांव जाळी— एखाद्या कळलाव्या स्त्रीला म्हणतात. भांडणतंटा लावणारी, नसते बखेडे उत्पन्न करणारी, कलागती स्त्री.

आगळ——आगळानें गळो कापचो—[आगळ=अगवळ, केंस] (गो.) केसानें गळा कापणें.

आगळ——आगळ बुध वाणिया, पाछळ बुध बामणिया—(गो.) वाण्यांना आधीं अक्कल सुचते तर ब्राह्मणांना कार्य झाल्यावर मागाहून सुचते. वाण्यांची दूर दृष्टि ब्राह्मणांना नसते. " विद्येसंबंधीं प्रत्येक गोष्टींत दक्षिणी लोकांचें पाऊल पुढें असून इतरांचें मागें असे, ती स्थिति बदलून आमचे गुजराथी बंधू ' आगळ बुध० ' ही म्हण खरी करूं पाहत आहेत."
—निबंधचंद्रिका.

आगळी—— जवा आगळी काशी—काशीपेक्षां जवभर मोठें. काशी हें नगर पूर्वी सर्वांत मोठें मानलें जात असे. तेव्हां काशीपेक्षां मोठें म्हणजे सर्वांत मोठें.

आगा——आगा काढणें—त्रास, तकलीफ सोसणें. 'घरांत सहा लहान मुलें व चार मोठीं माणसें आहेत, त्या सर्वांचा आगा एकटी ही बाई काढते.'

आगाजा——आगाजा उठणें-होणें—बोभाटा होणें; फार गाजावाजा होणें; सर्वत्र लोकांच्या तोंडीं होणें.

आगांडा——आगांडा वचूनु मागांडा जाल्लो—(गो.) आगांडा जाऊन मागांडा झालेला; प्रथम पुढें असून नंतर मागें पडलेला.

आगापिछा—[आगा = पुढला भाग; पिछा = पिछाडीचा भाग] यावरून शेंडाबुडखा. १ वडील माणसें व मुलेंबाळें किंवा कुटुंब, प्रपंच. ' श्रीधरपंताला आतां आगापिछा कांहीं नाहीं, मग त्यांनीं आपली संपत्ति एखाद्या धर्मकार्याला कां देऊन टाकूं नये ? ' २ पूर्वपीठिका; मागील इतिहास. ' त्याचा आगापिछा माहीत असल्याशिवाय तो हातीं कसा लागणार.'

आगा ना पिच्छा—१ शेंडाबुडखा कांहीं नसणें. मूळ न सांपडणें किंवा शेवटहि न लागणें. २ ' न भूतो भविष्यति ' या अर्थी. ' या मुलखांत शहाजी भोंसल्यानें जी धामधूम उठवली आहे तिला आगा ना पिच्छा ! '—शिसं १·३.

आगाडा——आगाडयापरक्षीं बिगाडी व्हड, शेंजारी येवून कान वळ—(गो.) चांगलें होण्यापेक्षां बिघडणें जास्त, व त्यामुळें दुसऱ्याकडून दूषण येणें.

आगे——आगे आगे, गोरख जागे—मच्छिन्द्रनाथाचा शिष्य गोरख हा फार गुरुभक्त होता. तो मच्छिन्द्रनाथ निजला असतां जागा राहून पाहरा करीत असे व केव्हांहि रात्रीं उठून पाहिलें तरी गोरक्षनाथ हा आपला जागा असलेला दिसे. यामुळें केव्हांहि त्यांचेवर संकट येत नसे, तें पुढें जात असे. यावरून नेहमीं जागृत असणारा मनुष्य; सावध मनुष्य.

आगे काम, पीछे दाम—कामानंतर पैसा, मोबदला.

आगे काम, पीछे राम—प्रथम काम करून घ्यावयाचें व मागाहून देवाची आठवण करावयाची. काम करून घेत असतां दया माया देवधर्म वगैरे कोणत्याहि गोष्टीकडे लक्ष्य न देतां सक्तीनें व निष्ठुरपणें काम करून घेणाऱ्या कठोर धन्याबद्दल योजतात. ' आगे काम पीछे राम ! हें त्या जातीच्या जमादारांचें ब्रीद असतें. म्हणजे काम ' चोपून ' घेण्यांत दयेमायेचा धार्मिक प्रश्नच त्यांच्यापुढें नसतो. '—काळें पाणी २८९.

आगे दौड, पीछे चौड—एकानें पुढें काम करीत जावयाचें व एकानें मागून बिघडवून टाकावयाचें, अशी स्थिति.

आगे दोड, पिछे छोड—पुढें पाठ मागें सपाट. एखादें सैन्य पुढें पुढें दौडत व त्यांच्या समजुतीनें नवीन प्रदेश जिंकीत जात असावें व पिच्छाडीकडून शत्रूचा मारा येऊन त्यांनीं घेतलेला मुलूख जाऊन त्यांची पिछाडी नेहमीं हैराण होत असावी, अशी स्थिती असतां ही म्हण वापरतात. नवीन नवीन गोष्टी करीत रहावयाचें व मागील केलेल्या गोष्टी मोडत जात असावयाच्या, अशी स्थिति.

आगे फडकत गोली, पीछे होत आरोली—बंदूक उडवली असतां आधीं गोळी निघून जाते व मग आवाज होतो. प्रका-

शापेक्षां ध्वनीची गति मंद असल्यामुळें बंदूक पेटलेली आधीं दिसते व मागाहून आवाज ऐकूं येतो. प्रथम कार्य होऊन जातें व त्याचे परिणाम मागाहून दृष्टीस पडतात. ज्यावेळीं छत्रसाल राजानें पहिल्या बाजीरावास साहाय्यास बोलाविलें त्यावेळचें पुढील कवन प्रसिद्ध आहे: 'जो गत ग्राह गजेंद्रकीऽसो गत भइ हय आज। बाजी जात बुंदेलनकी, राखो बाजी लाज॥ हा कहे लछमी, ती कहे गजराज। आगे फडकत गोली, पीछे होय आवाज॥'

आगे बुद्धि बनिया, पीछे बुद्धि बामनिया—वर आगळ० पहा.

आगे लंड, पीछे गांड–लंड—ज्यास आगा पिच्छा कांहीं नाहीं अशाबद्दल वापरतात. कफल्लक, फटिंग माणूस.

आगे लाथ, पीछे बात—एखाद्या कामचुकार माणसाकडून काम करून घ्यावयाचें असलें म्हणजे गोडीगुलाबीनें वागून तें होत नाहीं. तर त्यास चांगला धाक दाखवावा लागतो. तेव्हां प्रथम लाथ मारून मग त्याच्या जवळ बोलायला सुरुवात केली पाहिजे.

आगे——आगे कधीं शिकशील, तर ठकेन तेव्हां शिकेन—[आगे = अगे] मनुष्याला ठेंच लागल्याशिवाय शहाणपणा येत नाहीं. चांगली अद्दल घडली म्हणजे मनुष्य सावध होतो. अनुभव हाच चांगला शिक्षक आहे. पण अर्थात् तो महाग आहे.

आगें मागें——आगें मागें, बाळ रांगूं लागे—मूल प्रथम लहान असलें तरी कांहीं दिवसांनीं थोड्या फार कमी जास्ती दिवसांनीं तें रांगूं लागतेंच. त्याप्रमाणें एखादी गोष्ट आरंभीं लहान असली तरी ती कांहीं दिवसांनीं वाढीस लागून आपला प्रभाव दाखवूं लागते.

आग्या——आग्या वेताळ—एक पिशाच्च जात. याचें सर्व शरीर अग्निरूप असतें. याचा मंत्र जपला असतां वाटेल त्या वस्तूला आग लावितां येते. (ल.) अतिशय जाज्वल्य, कडक स्वभावाचा माणूस. 'रामकृष्णपंतदादा म्हणजे नुसते आग्या वेताळ आहेत. त्यांना मुलाचे हे चाळे खपावयाचे नाहींत?'

❀ **आग्या वेताळाचें रूप धरी, आणि आरडा ओरड करी**—एखादा मनुष्य अतिशय संतापून आरडा ओरडा करूं लागतो, तेव्हां त्यास म्हणतात.

❀ **आग्रह——आग्रहास पेटणें**—कोणत्याहि गोष्टीबद्दल विशेष हट्ट दाखविणें; आग्रह धरणें; ताणून धरणें; हट्टास पेटणें.

आग्रह स्वर्गांतला आणि पत्ता नाहीं ताकाला—आग्रह मोठा बादशाही पद्धतीचा करावयाचा, पण वाढावयाला पुरतें ताक सुद्धां नसावयाचें! पोकळ आग्रह; वरवरचा आग्रह.

आघाडी——आघाडी साधणें—१ आधींच ओळखणें; पूर्वींच तरतूद करून ठेवणें; दूर दृष्टीनें पुढील काळाची तजवीज आधींच करून ठेवणें. २ अगोदर येणें; अगोदरची वेळ साधणें; प्रथम येणें.

आंघोळ——आंघोळ करणें—एखादा मनुष्य मेला म्हणजे त्याचें सुतक वगैरे स्नान करून दूर करतात; त्याच्या नांवानें स्नान करून मोकळे होतात. यावरून एखाद्याचा कायमचा संबंध तोडून टाकणें. 'देशाशीं, राष्ट्राशीं आणि इतर जातीशीं असलेल्या नात्यांची आंघोळ करून असले संघ काढले जात नाहींत.'—चित्पावन मासिक.

आंच——आंच बसणें–लागणें—१ पोळणें; चटका बसणें; भाजणें. २ नुकसान पोंचणें; कोणत्याहि गोष्टीपासून त्रास होणें; चट्टा लागणें; अंगावर शेकणें; बोटें भाजणें.

आंचींत असणें—धाकांत, दराऱ्यांत असणें; भीति वाटत असणें; धास्ती वाटणें.

आचरणें——आचरतां दांभिक भक्ती, दोहींकडून खरी नसती—जो मनुष्य वरवर भक्ति दाखवितो तो दोन प्रकारांनीं खोटेपणा करतो. Hypocritical piety is double iniquity.—सवि १७१०.

आंचवणें——अंचवणें पहा.

आचार——आचार खरा पण विचार नाहीं—एखादा मनुष्य परंपरागत आचार केवळ चालत आला म्हणून चालवितो; त्यांतील तत्त्व समजून घेण्याचा प्रयत्न करीत नाहीं, किंवा त्याबाबत विचारहि करीत नाहीं, तेव्हां त्याबद्दल योजितात. श्रद्धेनें केवळ अंधानुकरण करणाऱ्या माणसास म्हणतात.

दोन प्रहर आचार, नंतर अनाचार—१ दोन प्रहराच्या आंत धर्मकृत्यें केली असतां तीं फलदायक होतात; मागाहून केल्यास तीं अकालीं म्हणून व्यर्थ होत. २ पूर्वभागांत धर्मनिष्ठ वागणूक करावयाची व नंतर स्वैर वर्तन करावयाचें.

आचार भ्रष्टी, सदा कष्टी—जो मनुष्य स्वधर्माप्रमाणें आपली वागणूक ठेवीत नाहीं त्यास नेहमीं त्रास होतो; मनुष्यानें सदाचार पाळला नाहीं, धार्मिक विधिविधानांप्रमाणें वर्तन केलें नाहीं, तर त्याच्या मनास कधीं शांतता मिळत नाहीं. "या घाणेरड्या पाण्यानें मी जास्त आजारी पडेन. ती ह्मणे, 'नाहीं रे बाबू! तीर्थांनें स्नान केल्याशिवाय यात्रेचें पुण्य नाहीं. स्नानानें कांहीं होणार नाहीं.' हा वाद तेथेंच आटपणार नाहीं असें पाहून तेथेंहि तीर्थांत हात बुचकळून कसे तरी दोन थेंब उडविल्यासारखें करून मार्जनविधि करूं लागलों. शेवटीं,

'आचार भ्रष्टी सदा कष्टी' हा मंत्र उच्चारून ती स्नानाला उतरली." --माझी भूमिका ८६.

आचार शुद्ध, विचार अप्रबुद्ध--वरून दिसावयास सोंवळें ओवळें, स्नानसंध्यादि नित्य नैमित्तिक कर्मे वेळचे वेळीं करणारा पण त्यांचा मनावर कांहीं एक परिणाम न होऊं देतां विचार अगदीं मूढासारखे असलेला असा मनुष्य. दिसावयास मोठा कर्मठ पण मनानें क्षुद्र मनुष्य.

आचारी---आचारी बामनाचा, अन्न फराळ चोमनाचा--१ ब्राह्मणाचे घरीं कितीहि अन्न असलें तरी त्याचा आचारी कुणबी लोकांस पोटभर वाढीत नाहीं अशी त्यांची तक्रार आहे. कारण ब्राह्मण लोक सामान्यतः कमी जेवतात व तेवढेंच वाढण्याची आचाऱ्यास संवय असते; त्याच्या हातून त्यापेक्षां अधिक वाढलें जात नाहीं. किंवा ब्राह्मण आचारी असला म्हणजे कुणब्यास पाहिजे ते पदार्थ मिळत नाहींत; म्हणून त्यांचें पोट भरत नाहीं. २ कधीं ब्राह्मणेतरांच्या समारंभांत सोंवळेपणा राहावा म्हणून ब्राह्मण आचारी लावतात; पण जेवणारे निषिद्ध पदार्थ खाण्याचें सोडीत नाहींत. ढोंगी सोंवळेपणास उद्देशून म्हण.

आज----आज उद्यां करणें--पुढें ढकलणें; लांचणीवर टाकणें; दिरंगाई लावणें; अळंटळं करणें; कांकू करणें.

आजकाल--सांप्रत; सध्या; चालू काळांत; आजच्या परिस्थितींत; वर्तमान काळांत.

आजतंव; आजतागाइत-यत; आजपर्यंत--या दिवसापर्यंत; आतां पावेतों; हा वेळपर्यंत.

आजदिन-दिवशीं--आतांपर्यंत; आजतागायत; हा कालपर्यंत; अद्यावधि.

आज दिवशीं--१ पूर्वीच्या वर्षांतील या तारखेस. २ आज; आजच्या दिवशीं.

ॐ **आज अंबारी तर उद्यां झोळी**--कधीं वैभवांत दिवस काढावयाचे तर कधीं दैन्यांत काढावयाचे.

आज अमीर तर उद्यां फकीर--वैभव हें क्षणभंगुर असतें; जो आज वैभवसंपन्न असतो तोच उद्यां भिकारी होण्याचा संभव असतो; सध्या श्रीमंती भोगणारेहि पुढें दरिद्री होण्याचा संभव असतो. चालता काळ आहे तों वैभव असतें, दिवस पालटले म्हणजे दारिद्र्य येतें.

आज आहे सुवर्णकांती, उद्यां होय तिची माती--मनुष्याचें शरीर हें क्षणभंगुर आहे. जोंपर्यंत देहांत जीव आहे तोंपर्यंत तो कितीहि तेजःपुंज व सौंदर्यसंपन्न दिसला तरी त्यास लवकरच नाश आहे व मरणोत्तर त्याची मातीच होणार, हें निश्चित आहे.

आज उपोषण, उद्यां उद्यापन--आज एखादें व्रत, उपवास वगैरे करावयाचा व लागलीच दुसऱ्या दिवशीं त्या व्रताची सांगता, पारणें वगैरे करावयाचें. यावरून लवकर आटोपून घेतलेला कारभार; एखादी गोष्ट लवकर उरकून घ्यावयाची असल्यास म्हणतात.

आज उलयलें फाल्या पोल झालें--(गो.) आज बोललें आणि उद्यां खोटें (फोल) झालें.

आज करणें तें उद्यांवर न टाकणें--जी गोष्ट आज करण्यासारखी असेल ती उद्यांवर टाकूं नये. कोणत्याहि कामांत दिरंगाई करणें चांगलें नव्हे. 'न कश्चिदपि जानाति किं तस्य श्वो भविष्यति । अतः श्वः करणीयानि कुर्यादद्यैव बुद्धिमान् ॥'--सुर १५४-४०. तुलना-- Do not put off till tomorrow what you can do today.

आज खाई तूप, उद्यां पाही रूप--मागें पहा.

आज घोवा, फाल्या रांड--(गो.) आज लग्न करणें व उद्यां तो नवरा मरणें.

आज चांगलें करील, तर उद्यां कामास येईल--आज जर आपण एखादें सत्कृत्य केलें तर तें पुढें मागें आपल्या उपयोगी पडतें. पेरावें तसें भरावें.

आज मरा, उद्यां धर्म करा--१ आपणांस जें सत्कृत्य करावयाचें असेल तें आपल्या हातून होईल तितक्या लवकर करणें चांगलें व आपल्यासमोर झालेलें चांगलें. आपल्या मृत्यूनंतर अमुक गोष्ट करावी असें म्हटल्यानें ती होईल अशी शाश्वती नसते व ती कशी होईल तें आपणांस पाहतां येत नाहीं. विशेषतः एखादें धर्मकृत्य करावयाचें असेल तर तें मरणोत्तर करण्याच्या ऐवजीं जीवंत असेपर्यंत केलें तर आपल्या मनास अधिक समाधान मिळेल. तुलना--तुरुतदान महापुण्य. २ भिकारी म्हणतात--आम्हीं आज भुकेनें मरतों आहों व तुम्ही उद्यां धर्म करणार असला, तर त्याचा आम्हांला काय उपयोग ?--मॅन १८०९. त्वरित इलाज इष्ट असतो, अशा अर्थी वापरतात.

आज मला, तर उद्यां तुला; आज माझा, उद्या तुझा--चालू घडी आहे तों काम करून टाकावें, उद्यांची स्थिति कोणी पाहिली आहे. चालू काळ हा आपला असतो; पुढल्यावर आपली सत्ता नसते; उद्यां काय होईल याचा नेम कोणी सांगावा.

आज मोर खंय, स्वर्ण पिकतां थंय--(गो.) आज मोर कोठें तर सोनें पिकतें तेथें !

आज म्होर खैं खैं, स्वर्ण पिक्ता थैं थैं--(गो.) आज मोहरा (सोन्याचे नाणें, गिनी वगैरे) कुठें तर सोनें पिकतें तेथें.

आज वाटी, उद्यां नरोटी—क्षणभंगुर सुख; जगाचा अनिश्चित क्रम. " 'आज०' बनणाऱ्या आमच्या तकलादू संतति संपत्तीचा आम्हांस संग घडणार कोठून? मूळ असेल तर माती ओढून धरणार. "–मुमुक्षु, सप्टें. १९२५ पृ. ३९.

आज संपादून घ्यावें, उद्याचें कोणीं पहावें—आहे घडी ही आपली, उद्याचें कोणीं पाहिलें आहे? तेव्हां जें करणें, उरकणें, उपभोगणें तें त्वरित करावें.

आज है सो कल नहीं—जी गोष्ट आज शक्य आहे ती उद्यां शक्य असतेच असें नाहीं. तेव्हां आजची घडी उद्यां यावयाची नाहीं. आजची सर उद्यांस नाहीं. तेव्हां शक्य तें आज आटोपून घ्यावें.

आजचे अरिष्टा उपाय, उद्यां केल्यानें न होय—आज आलेल्या संकटाचें निवारण आजच केलें पाहिजे; तें पुढें ढकलून काय उपयोग? आगामी संकटाची तरतूद योग्य वेळींच करून ठेवणें श्रेयस्कर होय; त्यांत चालढकल केल्यास अधिक हानि होण्याचा संभव असतो.

आजचें कामकाज, उरकून घ्यावें आज—आजचें काम उद्यांवर टाकू नये. तुलना–आज करणें तें उद्यांवर न टाकणें. वर पहा.

आजचें मरण उद्यावर ढकलणें—आलेल्या संकटाचें तात्पुरतें निवारण करणें; आपणांस अप्रिय असलेली गोष्ट करण्याचें दिरंगाईवर टाकणें; कोणत्याहि अडचणींतून तात्पुरता मार्ग काढणें. तु०–अशुभस्य कालहरणम्।

आजि आपइल्यारि फाइ ओ म्हणता--(गो.) आज बोलाविल्यावर (हांक मारल्यावर), उद्यां ओ म्हणतो. दिरंगाई लावणारा; दीर्घसूत्री.

आजा——आजा देवीक घोवू नाशिलो, वेताळाक बाईल नाशिलि--(गो.) आजा देवीला नवरा नव्हता, वेताळाला बायको नव्हती. समानांचें सख्य. सटवाई पहा.

आजा मेला नातू झाला; आजा मेला नातू झाला, खुंटाला खुंट उभा केला (जमा खर्च सारखा झाला)—जुनीं माणसें हळू हळू नाहींशीं व्हावयाचींच व त्यांची जागा नवीन माणसांनीं घ्यावयाची; याप्रमाणें हा विश्वाचा क्रम चालूच राहणार. त्यामध्यें फारसा फरक किंवा कमतरता पडत नाहीं. एक गेला तर त्याची जागा दुसरा घेतो याप्रमाणें क्रम चालतो.

आजा मेला नातू झाला, घरांत माणसें सारखींच—वरील प्रमाणेंच. एक माणूस कमी होतें आहे तोंच एक वाढलें; हिशेब बरोबर झाला. सृष्टिक्रमाप्रमाणें वृद्ध माणसें मरावयाचींच व नवीन नवीन उत्पन्न व्हावयाचींच. यांत विशेष कांहीं नाहीं. हा निसर्गाचा नियमच आहे. त्यामुळें जगांत कांहीं विशेष फरक पडत नाहीं. तु०–(गु.) डोसी मुई, गेरी आवी.

आजानें वयिलो रूकु, म्हणु गळपासु घालुनु धेवंचो वे?—(गो.) आजोबांनीं लावलेला वृक्ष, म्हणून त्याला गळफांस कां लावून घ्यायचा? तु०–सोन्याची सुरी म्हणून उरी कां घालून घ्यावयाची आहे?

आजापणजांचे पोवाडे गाण्यापेक्षां स्वतःची योग्यता लक्षांत आणा—पूर्वजांच्या पराक्रमावर लौकिक मिळविण्यापेक्षां स्वतः पराक्रम करून दाखवावा.

आजापेक्षां नातू शहाणा-- पुढील म्हण पहा.

आजाला नातू शिकवितो--लहान तोंडीं मोठा घांस घेणें; वृद्ध अनुभवी गृहस्थास एखादा तरुण मनुष्य शहाणपणाच्या गोष्टी सांगूं लागला म्हणजे वापरतात. (गो.) अज्याक नातु शिकयता.

आजालें कोरकें नातवानें निपाथिलें—(गो.) आजानें करावें, नातवानें निस्तरावें.

आजेलीं नात्रं, बाळंतेलिं बोत्रं, म्हाळांतुलिं पित्रं, हांकां लेकचि ना--(गो.) आजीचीं नातवंडें, बाळंतिणींचीं लगतरें (फाटकी वस्त्रें), महालयांतील पितरें (पितृ पंधरावडयांतील) यांची गणतीच नसते.

आजो गेलो, माचो रितो जालो—(गो.) आजा गेल्यावर त्याची खाट रिकामीच; म्हणजे अनुभवी जुना माणूस मेल्यावर त्याची जागा भरून काढण्यास कोणी नसतो.

आजी——आजीचें काम सरेना आणि कंबर उभी राहीना—आजीला म्हातारपणीं पोंक आलेलें असलें तरी ती वांकून वांकून घरांतील काम कांहींना कांहीं तरी एकसारखें करीतच असते. तिला काम करीत राहिल्याशिवाय चैन पडत नाहीं. त्यामुळें तिला सरळ उभें राहून विश्रांति घेण्यासहि वेळ मिळत नाहीं. त्यामुळें तिची कंबर कायमची वांकलेलीच राहते.

ऑज्य——ऑज्यार बिजें--(गो.) ओझ्यावर ओझें.

आट——आट आय, नव व्यय, मागिरी कोणाचेइ धरि पाय—(गो.) आठ उत्पन्न, नऊ खर्च करावयाचे, मग कोणाचेहि पाय धरावयाचे. आयापेक्षां जास्त खर्च करण्यानें दुसऱ्याची लाचारी पत्करावी लागते.

आट धान्याकड कडबोळयाला खंचे धान्यारुचि?—(गो.) आठ धान्यांच्या कडबोळयाला कोणच्या धान्याची रुची असणार?

आटखोर——आटखोर आटकरी, आवडता मार्ग धरी—जो मनुष्य अडखोर असतो तो हट्टानें आपल्या मनासा-

रख्या गोष्टी घडवून आणतो. तो कोणाचें ऐकत नाहीं व आपला हट्ट सोडीत नाहीं.

आटणें——**आटलें सोनें कमी नसे, मैत्रिकीचें लक्षण तसें**—शुद्ध सोनें जरी आटवून पातळ केलें तरी तें वजनांत उणें होत नाहीं; त्याचें वजन पहिल्या इतकेंच राहतें. जर हीणकस असेल तर मळ जळून कमी होतें. तशीच खरी मैत्री जेथें असेल तेथें ती कोणत्याहि कारणानें कमी होत नाहीं; ती जरी पातळ झाली असें वरवर आपणांस वाटत असलें तरी अंतर्यामीं ती पहिल्या इतकीच कायम असते.

आटप——**आटप असणें**—उरक असणें; काम लवकर करण्याची हातोटी असणें; रेंगाळत न बसतां झटपट काम उरकून टाकण्याची संवय असणें.

आटा——**आटा तोल, ठिकरी जलती है**—शेकोटी पेटविल्यानंतर स्वयंपाक करण्याकरितां पीठ विकत आणावयास गेलेला मनुष्य वाण्यास घाईनें पीठ तोलून देण्यास सांगत आहे. आशय हा कीं, विस्तव फुकट जात आहे; तेव्हां लवकर पीठ तोलून दे. जोंपर्यंत संधि आहे तों शक्य तितक्या लवकर काम साधून घ्यावें. तुलना—तापल्या तव्यावर भाकरी भाजून घेणें. Make hay while the sun shines.

आटापाणी——**आटापाणी बंद करणें**—सावकाराच्या किंवा सरकारच्या तगादेदारानें दारांत बसून ऋणकोस किंवा कुळास खावयास, किंवा स्वयंपाक करावयास देखील सवड न मिळेल असा त्यास त्रास देणें. सक्त तगादा करणें; पिच्छा पुरवणें.

आटापिटा——**आटापिटा पाडणें**—अतिशय त्रास देणें; मेटाकुटीस आणणें; अगदीं रडकुंडीस आणणें. 'त्या विहिणीचा बया किती आटापिटा पाडील तें एक देव जाणे'—फाटक नाट्यछटा १.

❀ **आटापिटा पुरण वाटा**—अतिशय त्रास घेऊन पुरण वाटावयाचें. मोठ्या सणाला पुष्कळ कुटुंबांत पुरण घालण्याची चाल आहे. पुरणपोळीसाठीं पुरण शिजवून वाटण्याचाच मोठा त्रास असतो. यावरून अतिशय खटपट, दगदग.

आठ——**आठ पुरभय्ये आणि नऊ चौके—चुली; आठ परदेशी नऊ चुली; आठ पटेल, नऊ चौधरी**—भय्ये लोक दुसऱ्याच्या हातचें खात नाहींत. ते स्वतःच स्वतंत्र स्वयंपाक करतात. तेव्हां प्रत्येकाला वेगळी चूल (चौका) लागते व सर्वांस विस्तव घेण्याकरितां एक अधिक लागते. यावरून प्रत्येकाची वेगळी तऱ्हा व वेगळा पक्ष असणाऱ्या लहानशा मंडळीच्या साटाला उद्देशून वापरतात. वाजवीपेक्षां अधिक पसारा.

आठ हात काकडी, नऊ हात बी; आठ हात लांकूड व नऊ हात ढलपी—आठ हात काकडीची नऊ हात बी किंवा आठ हात लांकडाची नऊ हात ढलपी निघणें शक्य नाहीं. यावरून असंभाव्य, अतिशयोक्तीची गोष्ट. "गेल्या तीस शतकांत आम्हीं एवढें मात्र केलें कीं, 'आठ हात लांकूड व नऊ हात ढलपी' अशा मासल्याचीं—अकटोविकट पुराणें रचून ठेविलीं!"—निमा.

आठशें आड आणि नऊशें चहाड—जितके आड तितकीं घरें धरलीं तरी दर घरास एकापेक्षांहि अधिक चहाड माणसें असणें. ज्या गांवांत अतिशय चुगलखोर व भांडखोर लोक असतात अशा गांवास म्हणतात. [मॅनवेरिंगनें आड = अडथळा, असा अर्थ घेतला आहे.]

आठशें लष्कर आणि नऊशें न्हावी—जेथें थोडया माणसांचें काम, तेथें पुष्कळशीं माणसें लावणें. अनावश्यक गर्दी.

आठीं जेवणं मठीं निद्रा—आठजणांकडून भिक्षा मागून आणणें व धर्मशाळेंत निजणें. ज्याला घरदार नाहीं, अशा मनुष्यास म्हणतात. तु०—घर ना दार देवळीं बिऱ्हाड.

आठव——**आठव देणें**—स्मरण करणें; आठवण करून देणें. 'उद्धवा तूं जाय मथुरापुरा। आठव देईं यादवेंद्रा।'—ह २१.१९१.

आठवडा——**आठवडी कौल**—देवाजवळ कौल लावून आठ दिवसांचा गुण मागून घेणें.

आठवण——**आठवणीचा धड—आटोकाट—खबरदार—बहाद्दुर**—ज्याची स्मरणशक्ति चांगली आहे असा; जो एखादी गोष्ट विसरत नाहीं असा.

❀ **आठवणीला गोमेसारखे शंभर पाय असतात**—चांगल्या गोष्टीची आठवण बुजत नाहीं. 'रम्य आठवण विसरेल तो मनुष्य काय? आणि कृतज्ञतेमुळेंहि मला इंग्लंडची आठवण विसरूं म्हटलें तर विसरणार नाहीं. ह्याच आहे कीं, आठवणीला गोमेसारखे शंभर पाय असतात. एखादा तुटल्यानें तिचें कांहीं कमी होत नाहीं.'—कावळा आणि ढापी.

आड——**आड करणें—दडणें**—आश्रय घेणें; मागें लपणें; एखाद्यास पुढें करून आपण त्याच्या मागें राहणें.

आड घालणें—१ मध्यें आणणें; रक्षण करण्यासाठीं मध्यें घालणें. २ मध्यें पडणें; दुसऱ्यास वांचविण्याकरितां स्वतः पुढें होणें. 'तंव आड घातले आणिकीं वीरीं'—उषा ६१६.

आड जाणें—भलत्या मार्गास लागणें; आड वाटेस लागणें; वांकडी वाट करणें; कुमार्गास लागणें.

आड पडणें—नमस्कार घालणें; दंडवत घालणें. 'आड पडे म्हणे घरा । बीजें कीजो ॥'–ज्ञा १३·३७५.

आडपडदा न ठेवणें—कांहीं गुप्त न ठेवणें; मनमोकळेपणानें वागणें, सांगणें. 'आडपडदा न ठेवतां मनांतले सगळे विचार सांगणाऱ्या कमळाचें बोलणें तर चंद्रानें मोकळेपणीं उधळलेल्या धवल चंद्रिकेहूनहि तिला आनंददायक वाटलें.'–दौलत २७६.

आड लावून घेणें—आडवस्त्र नेसणें; सोवळ्यांतून ओवळ्यांत किंवा त्याचें उलट जावयाचें असतां मध्यंतरीं एक लहानसें वस्त्र नेसणें; पडदणी नेसणें.

आडून गोळी मारणार; आडून गोळी मारणें—१ स्वतः पुढाकार न घेतां कोणाकडून तरी काम करविणें; मागून सूत्रें हालविणें; परभारें काम करून घेणें. २ पुढें येण्याची छाती नसल्यानें आडून, मागून हल्ला करणें; असें करणारा भ्याड; स्वतः पुढें न येतां दुसऱ्यास पुढें करून आपला मतलब साधणें.

आडया वॅल्यान्न तॉंड घालाप्‌—(गो.) मध्यें विनाकारण तोंड घालणें; कांहीं तरी निमित्त काढून भांडण करणें.

※ **आडेचो संग, करडाची धग**—(गो.) वरवरचा मित्र आणि गवताची धग नेहमीं उपयोगी पडत नाहीं.

आड—आड विहीर करून घेणें; आड विहीर जवळ करून घेणें—जीव देणें. 'असा भ्रष्टाकार करणाऱ्या लोकांत श्यामभटाचा जन्म झाला असतां तर त्यानें आपल्याला कदाचित आड विहिर करून घेतलें असतें.–शाच ३·२१.

आडविहीर होणें—इकडे आड व तिकडे विहीर अशा कातरींत सांपडणें; शृंगापत्तींत सांपडणें; दोन अडचणींत सांपडणें. 'त्याजवरून त्यांस आड विहीर झाली. आपण जावें तर भाऊसाहेब रागास येतील. न जावें तर पांढरे केसांस बोल लागेल.–भाब १०५.

अर्ध्या आडांत सोडणें—संकटांत सोडून निघून जाणें. **आडांत सोडून (घालून) दोर कापणें**—विश्वासघात करणें; संकटांत नेऊन सोडणें; एखाद्या प्रसंगांत अंगावर घेतली असतां मध्येंच सोडून निघून जाणें. 'त्वां दोर कापिला कीं आम्हा घालूनि अंधकूपांत.।'—मोकर्ण ४०.५२.

※ **आडांत कडू तर पोहऱ्यांत कुठलं गोड; आडांत नाहीं तर पोहऱ्यांत कोठून येईल; आडांतच पाणी नसेल तर पोहऱ्यांत कोठून येणार; आडांत पाणी खारें तर पोहऱ्यांत गोड कोठून येणार**—विहिरींत पाणी कडू किंवा खारें असल्यावर पोहऱ्यांत कडू किंवा खारेंच पाणी येणार, गोड येणें शक्य नाहीं. जशी भूमि असेल तसें फळ येणार. मुळांतच जर एखादी गोष्ट बिघडली असली तर मध्यंतरींच ती सुधारतां येणें शक्य नसतें.

आडांतला बेडूक, आणि समुद्राच्या गोष्टी सांगतो—कूपमंडूक; अल्प ज्ञान असून मोठमोठ्या विद्वत्तेच्या गोष्टी सांगणारा. तु०-चैसोनी थिल्लरीं, बेडूक सागरा धिक्कारी।–तुगा २८९४.

आडाला अडकाठी, नद्या वाहती वाळवंटीं—कांहीं नद्या अगदीं कोरड्या असतात पण त्या ऐसपैस वाळवंट व्यापून पसरलेल्या असतात. परंतु आडांत पाणी असून तें मात्र कोंडून ठेवलेलें असतें. त्याला वाहावयास मात्र मुळींच जागा, सवड नसते. त्याप्रमाणें कांहीं लोकांच्या ठिकाणीं मुळींच ज्ञान किंवा पात्रता नसून ते मोठी अधिकाराची जागा किंवा एखादें मोठें कार्यक्षेत्र निरर्थक अडवून बसतात व ज्याच्या ठिकाणीं खरोखर ज्ञान किंवा पात्रता असते त्याला मुळींच संधि किंवा अवसर सांपडत नाहीं.

आडका—अडका पहा.

आडजीभ—आडजिभेनें पाहिलें, पडजिभेनें वास घेतला—खाऊन मन तृप्त झालें नाहीं म्हणजे म्हणतात. पदार्थ फार थोडा असल्यामुळें जिभेला त्याची पुरती रुची लागली नाहीं; आडजिभेला केवळ त्याचा स्पर्श झाला व पडजिभेस तर केवळ त्याचा वासच मिळाला. (ल.) अगदीं फार थोड्यांना कळलेली गोष्ट.

आडफांटा-मार्ग—आडफांटा भरणें; आडमार्गानें जाणें—भलत्याच मार्गास लागणें; कुमार्गानें जाणें. 'अहंकार मद्य पिऊनी । भ्रमती माया घोर विपिनीं । आपली शुद्धि विसरोनि । आडफांटा भरले हो ॥'–ह ७.२२८.

आडभाऊ—आडभावाचे साडभाऊ, येरे कुड्या कण्या खाऊं—कोठून तरी दूरान्वित संबंध लावून एखाद्या लाभदायक गोष्टीमध्यें आपलाहि फायदा करून घेणाऱ्यास म्हणतात.

आडभीत—आडभीतची पडभीत, पडभीतचा पोपडा, तेल लावून चोपडा—(व.) [आडभीत = अलीकडची भिंत; आडोसा म्हणून उभारलेली जुजबी भिंत. पडभीत = पलीकडची भिंत, कूड. पोपडा = पापुद्रा.] आडभीत पडभीत यांचा वास्तविक एकमेकींसीं कांहीं संबंध नाहीं. त्या पडभिंतीचा पोपडा जर निघून पडला तर त्या पोपड्याला तेल लावून चोपडण्याची खटपट कोणीहि शाहाणा मनुष्य करणार नाहीं. अत्यंत दूरचा सुद्धां संबंध ज्या वस्तूशीं नाहीं तिच्याबद्दल शाहणा माणूस फारशी फिकीर करणार नाहीं.

आडभींत—आडभिंतीची पडभींत, पडभिंतीचा वांसा (पोपडा); आडभिंतीची पडभिंत, पडभिंतीचा पोपडा, आणि त्यांतून निघाला खेंकडा—फारच दूरान्वयाचा संबंध दाखविण्याकरितां ही म्हण योजतात. बादरायण संबंध, एखाद्याचें नातें

फार दूरचें असलें म्हणजे त्याची निरर्थकता दाखविण्यासाठीं योजतात.

आडमाप——**आडमाप पैसा खर्च**—बेहिशेबी उधळमाधळ; अवाढव्य खर्च; मोजमाप न करतां केलेला खर्च.

आडरान——**आडरान घेणें**—मुद्दाम वांकड्यांत शिरणें; सरळ समजूत न घेतां मुद्याला सोडून बोलणें. 'ऐसा श्रोतयांचा अनुमान। श्रोतीं घेतलें आडरान।'–दा ९.३.७. 'सगळं जिथल्या तिथं आहे, मग उगीच कां असं आडरान घ्यायचं?' –एकच प्याला ३.१.

आडरानांत शिरणें-भरणें—जाणून बुजून अज्ञान दाखविणें: मुद्याला सोडून जाणें; वेड पांघरणें. 'तर ते त्याचा अर्थवाद करून आडरानांत शिरतील काय'?-टि ४.६३.

आडवा-वें——**आडवा करवत घालणें**— अडथळा आणणें; मार्गांत अडचण उपस्थित करणें; मुद्दाम मध्येंच हरकत, विघ्न उपस्थित करणें.

आडवें उभें--कुटील कृती; कुवेडें; मसलती.

आडवें घेणें—१ वांकडे घेणें; शंका घेणें. २ खरडपट्टी काढणें. ३ मुलाला मांडीवर घेऊन पाजणें.

आडवें जाणें—हरकत करणें; अडथळा करणें.

आडवें पडणें--१ तडजोड करण्यास लागणें; भांडण तोडणें. २ आड येणें; विघ्न करणें. 'कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें',–मोसंशय ३.

आडवें पाणी--विहीर, नदी, तळें इ चें पाणी. पावसाचें नव्हे.

आडवें बोलणें--१ मुद्दा सोडून बोलणें. २ वांकडें बोलणें; विरुद्ध बोलणें. 'म्हणोनि घडलें बोलणें। आडवें॥'–दावि१३५.

आडवें येणें--१ गर्भांतलि बालक सरळ बाहेर न येणें; आंत अडकणें. 'लोक म्हणती आडवें आलें। खांडून काढा॥' –दा. ३·१·४०. २ (ल.) प्रतिबंध करणें; आड येणें. 'हा आडवा येइल कोण पाहो।'–सारुह ८.२९.

आडवें लावणें--वांकडें लावणें; कुत्सित दृष्टीनें पाहाणें.

आडवें होणें--निजणें; पसरणें. 'विजय असा हर्पे, तों दुर्योधन होय आडवा राया'–मोद्रोण १०·६२.

आडव्या अंगाचा—बांध्याचा-हाडाचा-काठीचा–लठ्ठ; आडवा वाढलेला; ठेंगू व स्थूल शरीराचा; जाडगेला.

आडव्या जिभेचा—भांडखोर; वेडेंवांकडें भाषण करणारा.

आडव्या सुडक्याची बायको-रांड--अत्यंत दीन, दुर्बल स्त्री. 'तूं लहान झालास तरी पुरुष आणि मी मोठी झाल्यें तरी आडव्या सुडक्याची बायको, माझे हातून काय दरबारांत, बोलवेल?"

आडव्या हातानें घेणें—खरडपट्टी काढणें.

आडव्या हातानें देणें—लांच देणें.

आडव्यांत शिरणें—१ वाममार्गाचा अवलंब करणें. २ वांकडें बोलणें. ३ विषयांतर करणें.

※ **आडवी पहार, उभी सुई**—पहार आडवी धरली तर तिचा कांहीं उपयोग होणार नाहीं. तिचें काम खणण्याचें, तेव्हां ती उभी करून जमिनीवर मारावयास हवी. तसेंच सुई आडवी करून कापडांत टोंचली तरच ती काय करणार? यावरून काम करण्याचीं साधनें योग्य प्रकारें वापरलीं तरच त्यांचा उपयोग, अयोग्य प्रकारें वापरल्यास तीं असून नसून सारखींच.

आडवें आलें असतां कापून काढावें—प्रसूतिसमयीं मूल आडवें आलें असतां तें जर नीटपणें बाहेर येत नसेल तर त्याच्या जिवाची आशा सोडून त्यास कापून बाळंतिणीस मोकळी करणें हाच उत्तम उपाय. आपल्या मार्गांत जर एखादी गोष्ट येत असेल व ती सहजगत्या बाजूस होत नसेल तर प्रथम तिची वाट लावावी व आपला मार्ग मोकळा करून घ्यावा; असें करतांना त्या गोष्टीचा नाश झाला तरी पर्वा करूं नये. 'लोक म्हणती आडवें आलें। खांडून काढा॥'–दा ३·१·४०.

आडवें आलें म्हणजे पोटचें देखील कापून काढलें पाहिजे--वर पहा.

आडवे गात ना उभे गात, रस्त्यानें चालला गाणें गात; आड गात ना उभे गात, वाटेनें चालला गीत गात; आडव्यांत न उभ्यांत, वाटेनें चालली गीत गात—१ तऱ्हेवाईक मनुष्य; विलक्षण; शंकेखोर; विनाकारण विरोध करणारा. २ काळ वेळ न समजणारा.

आडवें बोट घातल्याशिवाय लोणी (तूप) निघत नसतें—लोण्यानें किंवा तुपानें भरलेल्या भांड्यांत सरळ बोट घालून काढलें तर त्यास मुळींच लोणी किंवा तूप लागत नाहीं. परंतु तेंच जर आंत गेल्यावर वांकडें केलें तर बाहेर येतांना बरोबर लोणी किंवा तूप घेऊन बाहेर येतें. यावरून सर्वच प्रसंगीं व सर्वच ठिकाणीं सरळ वागणूक ठेवून कार्यभाग होत नाहीं; तर वेळ प्रसंग पाहून थोडा फार आपल्या वागण्यांत वक्रपणा आणावा लागतो. सर्वदाच सरळ व्यवहार लाभदायक होत नाहीं, तर केव्हां केव्हां प्रतिपक्षी पाहून आडवे तिडवे पेंच टाकावे लागतात.

आडसर——**आडसरासारखा निजणें-पसरणें**—अव्यवस्थितपणें वाटेंत वगैरे पडणें, निजणें, लोळणें.

आडांगी——आडांग्याचें मडें पादत, धुम्याचें मडें गाजत—(गो.) आडदांड जातो पादत आणि धुम्या जातो गाजत. धुमे घराण्यांत प्रेत उगीचच्या उगीच वाजत गाजत नेतात तर वात्रट माणसाचें मढें पादतच जातें. यावरून रूढी विरुद्ध कोणी कांहीं करूं नये, तें हास्यास्पद होतें, असा अर्थ.

आंडाळ—— आंडाळे धुंडाळे काढण—(गो.) इकडे तिकडे फिरणें.

आंडू——आंडू पांडू टिप्पल दांडू—कशास कांहीं मेळ नाहीं अशी गोष्ट; असंबद्ध गोष्ट.

आडो——आडो माडो, समुद्रासारखा वाढो—(चायकी) मुलाला न्हाऊं घालतांना दीर्घायुत्वाकरितां म्हणतात.

आढें——एका आढ्या खालचा—एका घरांतील, कुटुंबांतील; एकत्र राहणारा.

आढ्याचें ताक—ज्यांत घराचें आढें दिसेल असें, अतिशय पातळ ताक.

आढ्याला पाय लावून निजणें-झोंप घेणें—अत्यंत बेफिकीरपणें निजणें, असणें; खुशाल स्वस्थ झोंप घेणें.

❀ **आढ्याला पाय, पिढ्याला (कुडाला) डोकें**—[पिढें= पाट. कूड=काटक्यांची भिंत. आढें=घराची पाठाळू; छपराखालील सर्वांत वरचें आडवें लांकूड.] पिढें हें बसण्याकरतां असतां तेथें डोकें ठेवून आढ्याकडे पाय करणारा मनुष्य विपरीत कृति करीत असतो. तेव्हां योग्य गोष्ट न करतां जो मनुष्य त्याच्या उलट कृति करीत असतो त्याबद्दल ही म्हण योजतात.

आढेवेढे——आढेवेढे घेणें—कांकूं करणें; सबबी सांगणें; अळंटळं करणें; नसल्याच अडचणी पुढें मांडणें. एखादी गोष्ट मनांतून करावयाची नसल्यास ती टाळण्याकरितां कोणत्या तरी वास्तविक अगर काल्पनिक अडचणी, सबबी वगैरे पुढें मांडणें.

आण——आण घालणें—शपथेवर करावयास सांगणें;शपथ घालणें. 'धाडी चळें वृकाच्या घालुनि हरिणीस आण गेहाला।' —मोविराट १.५३;—नो मुक्तांजलि १०९.

आण वाहाणें—शपथ घेणें; प्रतिज्ञा करणें.

❀ **आण केली वाहायला, भाकर केली खायला**—जरी भाकरीची शपथ घेतली असली तरी तिचा परस्पराशीं काय संबंध ? शपथ ही नुसती घेण्यापुरती, तेव्हां ती भाकरी खाण्याच्या आड थोडीच येते ? परस्पर विसंगत भाषण व वर्तन करणाऱ्याबद्दल योजतात.

आणणें——आण पायली, करूं दे वायली—घरांत बायका भांडूं लागल्या म्हणजे त्यांस वेगळें करणें चांगलें. एक दम एक घाव कीं दोन तुकडे करून टाकून एकदां संबंध तोडला म्हणजे पुन्हा पुन्हा भानगडी उपस्थित होण्याचें कारण नाहीं.

आण मण, करूं दे सण—उधळ्या माणसाबद्दल ही म्हण वापरतात.

आणितो उसनवारी आणि मिरवितो जमादारी—स्वतः जवळ कांहीं नसतां उसनीच ऐट आणून फुशारकी मारणारास म्हणतात. ऋण काढून सण करणाराबद्दलहि योजतात.

आत——त्या——आत तशी भाची, खाण तशी माती—ज्या कुळांत मनुष्य जन्मतें त्या कुळाचे वंशपरंपराप्राप्त असे कांहीं गुण त्याच्या अंगांत आल्याशिवाय रहात नाहींत.

आत्याबाईला मिशा असत्या तर काकाच (मामंजी) म्हटलें असतें—जी गोष्ट होणें माणसाच्या हातीं नाहीं ती झाली असती तर बरें, असें म्हणणाऱ्याला वरील उत्तरानें गप्प बसवितात. न होणाऱ्या गोष्टीबद्दल विचिकित्सा करण्यांत काय अर्थ ?

आंत, आंतला, आंतील——आंत पाय ओढणें—एखाद्यास एखाद्या साहस कर्मापासून, अगर इतर कोणत्याहि कार्यापासून परावृत्त करूं पाहणें; मागें ओढणें; मार्गांत अडथळा आणणें; व्यत्यय आणणें.

आंत बाहेर करणें-पाहणें—१ मागचा पुढचा विचार करणें; नीट चवकशी करणें. २ अळंटळं करणें; कांकूं करणें.

आंत येणें—खालावणें; ऱ्हास पावणें; निकृष्ट दशेस जाणें.

आंतला आवाज—आत्मसाक्षात्कार; मनोदेवतेची सांगणी. ई. Inner voice " हा आत्मसाक्षात्कार म्हणजेच हृदयस्थ जनार्दनाचा संदेश ! हाच ' आंतला आवाज ! ' हीच ईश्वरी प्रेरणा ! ती पाप्यांना स्फुरत नाहीं ! "—गजेंद्रमोक्ष १. १८१.

आंतील आंख—व्यापारी लोक मालावर गुप्त किंमतीचा आंकडा घालतात तो.

आंतील भोंक—गृहच्छिद्र; गुप्त गोष्ट; गुह्य; व्यंग.

आंतल्या गांठीचा—कुढ्या स्वभावाचा; अबोलका; खोल मनाचा; आपल्या मनांतील विचारांचा थांग लागूं न देणारा.

❀ **आंत असे जसें, बाहेर पडे तसें**—जर आंत चांगलें असलें तरच बाहेर चांगलें येईल. आडांत असेल तेंच पोहऱ्यांत येणार; मनांत असेल तेंच उद्गारांत उमटणार.

आंतडीं——आंतडीं कुंपणावर घालणें—अतिशय त्रास देणें; अत्यंत छळ करणें; हालहाल करणें; अत्यंत पीडा देणें.

आंतड्या कातड्याचीं माणसें—एकाच रक्तमांसाचीं, निकटसंबंधाचीं, नात्याचीं, जिव्हाळ्याचीं माणसें.

आंतड्याला पीळ पडणें-बसणें— खरी कळकळ, काळजी वाटणें; एखाद्याबद्दल अत्यंत कळवळा येणें; मनापासून एखाद्या बद्दलची काळजी वाटणें.

आंतबट्टा——**आंतबट्ट्याचा व्यापार**—नुकसान सोसून केलेला धंदा; ज्यांत खोट येते असा व्यवसाय. 'हिराचंदाच्या बाहेरच्या भपक्यामुळें त्याची पत व्यापारी लोकांत अद्याप कायम होती. पण असला आंतबट्ट्याचा व्यापार किती दिवस चालणार? लवकरच भ्रमाचा भोपळा फुटला!'

आतां——आतां उगेच चावत गिळा; **आतां उगीच चावीत चावीत गिळा**—योग्य वेळीं काळजी घेतली नाहीं म्हणजे मागाहून एखाद्या गोष्टीबद्दल कुरकुर करण्यापासून कांहीं फायदा नसतो, मग जी गोष्ट वांट्याला येईल ती सहन केली पाहिजे.

आतां मीं जेवलें, हातींपायीं रेवलें—(व.) प्रथम जेवणाची अट घालावयाची व नंतर जेवण जास्त झालें म्हणून काम न करतां निजावयाचें!

आतेका——**आतेका नांव सहजा, जातेका नांव मुक्का**——आलेलें संकट मुकाट्यानें सहन करावें व तें गेलें म्हणजे सुटलों असें म्हणावें. कुरकूर करून जर फायदा नाहीं मग करा कां?

आत्मा——**आत्मा गारीगार होणें**—मन संतुष्ट होणें; मन प्रसन्न होणें; संतोष वाटणें. 'वतनदारानें हासडून शिव्या दिल्यावाचून महाराजाचा आत्मा गारीगार होत नसेल.' —विक्षिप्त ३.१.६६.

आत्माराम गार करणें—स्वतःचें मन संतुष्ट करून घेणें; मनाची इच्छा पूर्णपणें तृप्त करून घेणें. 'आत्माराम करूनि गार बसतो पुष्पोद्भवीं पंजरीं।'—पारखीशास्त्री पृ. ८८.

* **आत्मा परीक्षा करी, ती औषधापरी**—आपण जर स्वतःचे गुणदोष नीट तपासून पाहिले तर आपल्या वागणुकींत सुधारणा करण्याचा मार्ग आपणांस सांपडल्यावांचून राहणार नाहीं व योग्य तो उपाय आपण सहज करूं शकूं.

आत्मबुद्धी असे, तेथें प्रीति न ठसे——जेथें स्वार्थी वृत्ति असेल तेथें इतरांबद्दल विशेषसें प्रेम वाटणें शक्य नाहीं. अप्पलपोट्या मनुष्याला इतरांबद्दल कांहीं वाटत नाहीं. स्वार्थी मनुष्य दुसऱ्यावर प्रेम करूं शकत नाहीं. प्रेम हें त्यागावर आधारलेलें असतें.

आत्मवत् सर्व भूतानि—ज्ञानी मनुष्य सर्व भूतमात्रांवर आपणां स्वतः इतकेंच प्रेम करतो. आपणांवरून जग ओळखावें, मनुष्यानें सर्व जगांतील प्राणी आपणासारखे मानावे. मातृवत्परदाराणि परद्रव्याणि लोष्टवत्। आत्मवत्सर्वभूतानि यःपश्यति स पश्यति॥—सुर १५९.२५४.

आत्मस्तुती, ही द्वेषाची हो जाती—स्वतःच स्वतःची स्तुति करणें म्हणजे अप्रत्यक्ष रीतीनें दुसऱ्याची निंदा अथवा द्वेष करण्यासारखेंच आहे.

आत्मस्तुतीचा बांका, नको फुंकूं फुका—आत्मप्रौढी अथवा स्वतःची फुशारकी मारणें हें निरर्थक होय. आपली स्तुति दुसऱ्यानें करण्यांत भूषण आहे. स्वतःच करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

आत्महित हा धर्म, आत्मनाश हा अधर्म—मनुष्यधर्म किंवा प्रकृति ही स्वतःचें हित साधणें अशीच दिसते. याच्या उलट वागेल तो अधर्म समजावा.

आत्महितातें पाहती, तंटा उत्पन्न करिती—जो तो स्वार्थाकडे पाहूं लागला म्हणजे भांडण झाल्यावांचून राहात नाहीं. अनेकांचें सहकार्य व्हावें अशी इच्छा असल्यास केवळ स्वहिताकडेच पाहून चालत नाहीं. तर सर्वांच्या हिताकडेच नजर द्यावी लागते. नाहींतर कलह लागल्यावांचून राहात नाहीं.

आधीं आत्मज्ञान, मग ब्रह्मज्ञान—स्वतःबद्दल योग्य ज्ञान झाल्याशिवाय ब्रह्मज्ञान होत नाहीं. 'आधीं स्वार्थ मग परमार्थ' याप्रमाणें.

आत्म एव आत्मनः शत्रुः—मनुष्याचें हितानहित त्याच्याच हातांत असतें. आपल्या बऱ्यावाईटाची जबाबदारी आपल्यावरच असते. 'उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्। आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः॥'—गीता ६.५.

आत्मानं सततं रक्षेत् दारैरपि धनैरपि—इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां प्रथम स्वतःचें रक्षण केलें पाहिजे. बायको, धन, पुत्र इत्यादि पुनः मिळूं शकतील, पण आपण मेलों तर पुन्हां परत येणें शक्य नाहीं. 'आपदर्थं धनं रक्षेत् दारान् रक्षेत् धनैरपि। आत्मानं०॥—सुर १६१.३४८. आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि। पुनर्दाराः पुनर्वित्तं न शरीरं पुनः पुनः॥

आत्मु राकुनु धर्मु—(गो.) आत्मा राखून धर्म करावा.

आत्याबाई—आत पहा.

आंथरूण—अंथरूण पहा.

आथी——**आथी गेली नि पोथी गेली**—हेंहि गेलें नि तेंहि गेलें.

आदगति——**आदगति शिवाय सद्गति ना**—(गो.) सौजन्याशिवाय सद्गति नाहीं.

आदमी——**आदमी आदमी अंतर, कोय हीरा कोय**

कंकर--मनुष्यामनुष्यामध्यें फरक असावयाचाच. कोणी बहुमोल तर कोणी कुचकामाचा, कोणी हिरा तर कोणी दगड. कांहीं लोक चांगले तर कांहीं वाईट, असे प्रकार असावयाचेच. पांची बोटें सारखीं नसतात. तु०—शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे । साधवो नहि सर्वत्र चंदनं न वने वने ।–सुर १५७.१८३.

आदमीका सैतान आदमी है—मनुष्य जातीचा शत्रु मनुष्यच.

आदर——आदर न करी त्याच्या करिंचें भोजन कशाला--जो मनुष्य आपला अपमान करतो त्याच्या घरचें अन्न आपणांस गोड लागत नाहीं. तेव्हां त्याच्या घरीं न जेवणें बरें.–हरिकवि (नवनीत. ४५१).

आदराशीं प्रत्यादर, शठ देखोन शाठ्य कर--मनुष्यानें जशास तशी वर्तणूक करावी. ठोशास ठोसा. तु०–(अ) कृते प्रतिकृतिं कुर्याद्धिंसिते प्रति हिंसितम् । न तत्र दोषं पश्यामि दुष्टे दुष्टं समाचरेत् (शठे शाठ्यं समाचरेत्) ।– सुर १६५.५४६. (आ) दाक्षिण्यं स्वजने दया परजने शाठ्यं सदा दुर्जने । –नीति १८. (इ) शठं प्रति शठं ब्रूयादादरं प्रति चादरम् । तत्र दोषो न भवति दुष्टे दुष्टं समाचरेत् ॥–जम ६३. (ई) शठं प्रति शाठ्यम् ।

आदळणें——आदळले कडेचि (बोट) आद्ळचें चड-- (गो.) (बोट) ठेंचल्या ठिकाणींच परत ठेंचलें जाण्याचा संभव जास्त.

आदळून जेवण, किळचून दान—ताट आपटून वाढलेलें जेवण आणि अंगावर ओरडून दिलेलें दान समाधानकारक होत नाहीं.

आदवेची——आदवेची पदवी, नीं कोंबड्याक गादी– [आदवेची=अपरिचित, प्रथमची] (कों.) कोंबड्याला गादी-वर एकदम बसविलें म्हणजे त्याला जसें सर्व अपूर्व, अपरिचित वाटून गोंधळ होतो, त्याप्रमाणें नवीन, प्रथमच मानसन्मान मिळाला म्हणजे होणें साहाजिक आहे.

आदा——आदां देव चोरां प्रसन्न--[आदा=अर्धा, अर्ध-वट, खोटा] (गो.) चोराला प्रसन्न होणारा देव खोटाच असणार ?

आदवांचें पातक संततिच भोगुंक जाय—(गो.) जोडलेलें पातक संततीला भोगलें पाहिजे.

आदा——आदा कमी केला, धंद्यांत फायदा झाला-- [अदा = खर्च] खर्चाची बाजू कमी केल्यास धंद्यामध्यें तेवढा फायदा झाल्यावांचून राहात नाहीं. काटकसरीनें वागल्यास फायदा होतो.

आदा थोडा (आद्यापेक्षा) खर्च मोठा, त्याचा होईल सदा तोटा–[आदा=प्राप्ति]प्राप्तीपेक्षां अधिक खर्च करणारा मनुष्य शेवटीं आपत्तींत यावयाचाच. तुलना–अंथरूण पाहून पाय पसरावे.

आदाय थोडा (आद्यापेक्षां) खर्च मोठा, मग लाथांस काय तोटा—प्राप्तीहूनहि अधिक खर्च केल्यास शेवटीं नुकसान होऊन जगांत छीः थूः व्हावयाचीच.

आदाय (आ.दा) पाहून खर्च करावा—प्राप्तीच्या मानानें खर्च करीत जाणें हें सुज्ञपणाचें लक्षण आहे.

आदावाबगर बुडकुलो फोड्चा--(गो.) फायद्याच्या अपे-क्षेशिवाय कोणी खर्चाला तयार होत नसतो. (लाभाशिवाय कोणी बुडकुलें फोडीत नाहीं.)

आदित्य——१२ (द्वादश) आदित्य--१; विवस्वान्, २ अर्यमा, ३ पूषा, ४ त्वष्टा, ५ सविता, ६ भग, ७ धाता, ८ विधाता, ९ वरुण, १० मित्र ११ शक्र, १२ उरुक्रम.

* **आदित्यवारीं लग्न, सोमवारीं या**--कार्य होऊन गेल्या-वर आमंत्रण करणें. (ल.) आस्था अगत्य, नसणें.

आदीबिदी——आदींचें बिदीं; आदींबिदीं--सर्वांच्या आधीं, अगोदर; लवकर; प्रथम.

आदौ——आदौ वेश्या ततो दासी पश्चात् भवति कुट्टिनी (कुंटिणि) (आणि नंतर वैदीण)--प्रथम तरुणपणीं वेश्या व्यव-साय करून तो चालत नाहींसा झाल्यावर दासीपणा करावयाचा; नंतर कुंटिणगिरी करावयाची. तीहि होत नाहींशी झाल्यावर वैद्यकी करूं लागावयाचें. म्हणजे जन्मभर अनीतिमय मार्ग आचरण्यांत काल व्यतीत करणाऱ्या स्त्रीबद्दल म्हणतात. आदौ वेश्या ततो दासी पश्चात् भवति कुट्टिनी । सर्वोपाय परिक्षीणा वृद्धा नारी पतिव्रता ॥ अर्थ वरील प्रमाणेंच, पण वृद्धपणीं पति-व्रतेचा आव आणणाऱ्या स्त्रीला अनुलक्षून योजतात.

आधण—जीवावरचें आधण उतरणें--आलेलें मोठें संकट दरम्यान नाहींसें होणें, टळणें; मोठ्या आपत्तींतून पार पडणें.

आधण निववणें--मकरसंक्रांतीच्या दिवशीं करावयाचें एक व्रत. या दिवशीं सुवासिनी स्त्रीनें ब्राह्मणाच्या घरीं जाऊन त्याच्या चुलीवर आधण ठेवून त्यांत सोन्याचा किंवा रुप्याचा तुकडा घातलेले तांदूळ ओयरावयाचे असतात.

* **आधणांतले रडतात व सुपांतले हांसतात**—भाताक-रितां ओयरावयास घेतलेल्या तांदुळांपैकीं प्रथम जे आधणांत पडतात त्यांचेकडे पाहून बाकीचे सुपांतील तांदूळ त्यांच्या विवळण्यापासून हसूं लागले तर तें ठीक नव्हे. कारण लवकरच सुपांतील तांदूळहि आधणांत पडावयाचे असतात व त्यांनाहि तीच दशा प्राप्त व्हावयाची असते. तेव्हां एकाच परिस्थितीं-तील लोकांपैकीं एखादा मनुष्य संकटांत सांपडला म्हणजे त्या संकटाबाहेर असणाऱ्या माणसानें त्याची चेष्टा करणें चांगले नाहीं. कारण त्याचीहि वेळ लवकरच यावयाची असते. तेव्हां

त्याची हेटाळणी न करतां त्यास सहानुभूति दाखविणें हें योग्य. आज जे सुखांत आहेत त्यांना दुसऱ्याच्या दुःखाची कल्पना येत नाहीं. पण भविष्यकाळीं त्यांच्यावरहि दुःखाचा प्रसंग येण्याचा संभव असतो, ही त्यांस कल्पना नसते.

आधला——आधल्या घरचे मधल्या घरीं, आणि भिंतीवरून कारभार करी—कांहीं तरी कसा तरी अव्यवस्थित रीतीनें चाललेला कारभार; सांवळा गोंधळ.

आधवा—आधव्याचें आलें राज, डोक्याला सुटली खाज—(व.) [आधव्याचें=अधव्याचें, हक्क नसतां अकल्पित लाभलेलें] अकल्पित लाभलेलें राजवैभव ज्याला प्राप्त होतें तो इतका गर्विष्ठ व ऐदी बनतो कीं, स्वतःच्या डोक्याला खाज सुटली तर इतरांप्रमाणें स्वतःच्या हातांनीं तें न खाजवितां तो लोकांना अधिकाराच्या जोरावर फर्मावितो कीं, माझें डोकें खाजवून द्या. तेंच परंपरागत राजवैभव ज्याला असतें त्याला असा फाजील मद चढतच नाहीं.

आधार——आधार लावणें—आश्रय देणें; पाठपुरावा करणें; टेंकू देणें.

आधारास पंथ—एखादी गोष्ट समजण्यासाठीं, सिद्ध करण्यासाठीं लागणारी कारणपरंपरा.

आधारास लागणें—एखाद्या गोष्टीचा मूळापर्यंत तपास लागणें; मूळाचा शोध लागणें; ज्याप्रमाणें एखादी विहीर खोदावयाची झाली म्हणजे खालीं पक्का दगड आधाराकरितां लागेपर्यंत खोदतात त्याप्रमाणें.

आधारास लावणें—एखाद्या गोष्टीचा मूळापर्यंत छडा, तपास, शोध लावणें.

❀ **म्हातारा नवरा कुंकवाला आधार**—स्त्रियांचें सौभाग्य हें एक भूषण मानलें जातें. याकरितां नवरा म्हातारा व कोणतेंहि कार्य करण्यास असमर्थ असला तरी सौभाग्याचा धनि म्हणून त्याला महत्त्व आहेच. एखाद्या गोष्टीचा प्रत्यक्ष उपयोग नसला तरी अप्रत्यक्षतः जर तिचें महत्त्व कायम असलें तर तिला अगदीं टाकाऊ मानूं नये.

आधार नाहीं गे नारी आणि फिरते दारोदारीं—निराधार स्त्रीबद्दल म्हणतात.

आधाराला मधार; आधाराला मदार, म्हातारा नवरा कुंकवाला आधार—[‘मधार’ हा शब्द मूळ ‘मदार’ असावा. तसा धरून अर्थः] उंटाच्या पाठीवरची मदार कशाला नाहीं तर धरून बसण्यास उपयोगी पडते; त्याप्रमाणें म्हातारा नवरा कशाला नाहीं तर कुंकु लावण्यास तरी उपयोगी पडतोना! उपहासार्थी ही म्हण वापरतात. वर पहा.

आधारावांचुनि। काय सांगशील काहाणी॥——ज्याला आधार नाहीं अशा वायफळ गप्पा मारूं नये. उगाच निराधार विधान करूं नये. —तुगा २९३२.

आधीं——आधीं अननं मग तननं—[अननं = अन्न. तननं = गाणें] जेवण झाल्यानंतर गाणें सुचतें. प्रथम आत्मा संतुष्ट असेल तर इतर करमणूक वगैरे गोष्टीकडे लक्ष्य लागेल. पोटांत भूक असतां कोणतीहि गोष्ट सुचत नाहीं. याच म्हणीचा एखाद्या आळशी मनुष्यास अनुलक्षूनहि उपयोग करतात. असा मनुष्य आधीं यथेच्छ पोट भरून खातो व मग ताणून निजतो.

आधीं असलो इष्ट, मागीर झालो वेय. मागीर किते?—(गो.) प्रथम होता मित्र, मागून झाला व्याही. नंतर काय?

आधीं आईची सून, मग सासूची सून—मुलीला प्रथम आईच्या घरीं वळण लागतें. याकरितां मुलगी जर प्रथम आईच्या घरीं सुनेसारखी नीट वागेल तर तिला सासरीं अडचण पडणार नाहीं. अधीं पहा.

आधीं आपलं घर भरावें, मग पाहिजे तेथें जावें—प्रथम स्वतःची व स्वतःच्या कुटुंबाची तरतूद करावी आणि नंतर मग कोठेंहि जाण्यास हरकत नाहीं. आधीं स्वतःवरची जबाबदारी पार पाडल्याशिवाय कोठेंहि जाण्यास मोकळीक नसते.

आधीं आत्मज्ञान, मग ब्रह्मज्ञान—प्रथम स्वतःला नीट ओळखावें व मग ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठीं खटपट करावी.

आधीं उंबरा सोन्याचा होऊं दे, मग ठेंच लागली तरी चालेल (मग ठचठचा लागूं दे)—सोन्याचा उंबरठा झाला व त्याची ठेंच लागली तरी दुःख होणारच. पण प्रथम सोन्याचा उंबरठा होण्याइतकें वैभव प्राप्त झाल्यावर मग त्याची ठेंच लागून होणाऱ्या दुःखाबद्दल फारशी कोणी तक्रार करणार नाहीं. वैभवाच्या आनंदांत तें सहज विसरून जाईल. उंबऱ्याच्या जागीं वांकून गेलें नाहीं तर ठेंच लागते. संपत्तीनें ताठा आलेल्या माणसास अशी ठेंच लागते. गरीबाला ‘तुला ताठा आला आहे बरं, वांकून चाल, ठेंच लागेल’ असें म्हटल्यास तो वरील उत्तर देईल.

आधीं कडू, मग गोड—मनुष्यानें व्यवहारांत प्रथम सर्व गोष्टी तावून सुलाखून पाहून घ्याव्या. त्यावेळीं कडू लागलें तरी स्पष्ट बोलावें म्हणजे मागाहून शेवट गोड होतो व पश्चात्तापास कारण होत नाहीं. प्रथम गोड गोड बोलून अर्धवट गोष्ट ठेवली तर मागाहून वाईटपणा येण्याचा संभव असतो. तसें होण्यापेक्षां आधींच थोडाफार वाईटपणा घेतलेला अधिक बरा.

आधीं करते (करी) सून सून, मग करते फुनफुन (फुण-फुण)—नवीन सून घरीं आली म्हणजे सासू प्रथम प्रथम तिचें कौतुक करते पण तीच थोडी मोठी होऊन थोडीशी स्वतंत्रपणें वागूं लागली कीं, तिच्याबद्दल कुरकुर करूं लागते. हा मनुष्य स्वभाव आहे.

आधीं करावा वाचे स्वीकार, मग कां करावा तिरस्कार—एकदां एखाद्याला आपलें म्हणून म्हटल्यानंतर मग त्याला दूर लोटूं नये. कोणतीहि गोष्ट एकदां कबूल केल्यावर मग तीपासून मागें फिरूं नये. आपलें वचन पाळलें पाहिजे. तु०—पदरीं पडलें पवित्र झालें.

आधीं करावा विचार, मग करावा संचार—पूर्णपणें विचार केल्याशिवाय कोणतीहि गोष्ट करूं नये. कोणतीहि गोष्ट आचारांत आणावयाची किंवा कोठेंहि जावयाचें असलें तरी प्रथम पूर्ण विचार करून नंतर पुढें पाऊल टाकावें.

आधीं करावी उधळपट्टी, मग पडावें संकटीं—प्रथम बेसुमार खर्च केला तर मागाहून अडचण यावयाचीच. याकरितां प्रथमपासून हात राखून खर्च केला असतां पश्चात्तापाची पाळी येत नाहीं.

आधीं कष्ट, मग फळ—प्रथम मेहनत करावी व मग तीपासून होणारी प्राप्ति मिळवावी. कष्टाशिवाय फळ मिळत नसतें. 'आधीं कष्ट मग फळ। कष्टाचि नाहीं तें निर्फळ॥'—तुगा.

आधीं कसोटी, मग सचोटी—कोणत्याहि मनुष्यावर विश्वास टाकण्यापूर्वीं त्याची परीक्षा घ्यावी. त्या परीक्षेस उतरला तरच त्यावर विश्वास टाकावा.

आधीं केलें, मग सांगितलें—कोणतीहि गोष्ट अशी करावी तशी करावी, असें सांगण्यापेक्षां प्रथम ती स्वतःच करून दाखविली व मग लोकांस उपदेश केला तर तो अधिक परिणामी होतो. जो मनुष्य स्वतःच्या आचरणानें धडा घालून देतो तो पोकळ उपदेश करणारापेक्षां अनेक पटीनें श्रेष्ठ होय.—दासबोध ?

आधीं खावें आणि मग राबावें—आपणास श्रम करावयाचे असल्यास आपणास शक्ति येण्याकरितां कांहीं तरी पोटाची तजवीज प्रथम करावी व नंतर हवे तेवढे श्रम करावे. उपाशी पोटीं श्रम केल्यास कामहि बरोबर होणार नाहीं व स्वतःच्या शरीरासहि क्लेश होतील. तेव्हां प्रथम स्वतःच्या अंगीं कोणतीहि गोष्ट करण्याचें सामर्थ्य आणावें. व मग ती गोष्ट करण्यास हात घालावा. तु०—आधीं अननं मग तननं. आधीं पोटोबा मग विठोबा.

आधीं खेळींमेळीं, मग गदारोळी—लहान मुलें वगैरे प्रथम मोठ्या सलगीनें वागत व खेळत असतात पण अखेरीस कांहीं तरी निमित्त उत्पन्न होऊन भांडाभांडी करूं लागतात, अशा वेळीं ही म्हण वापरतात. कांहीं लोकांचें प्रथम मोठें सूत जमतें पण मागाहून कडाक्याचें भांडण होतें.

आधीं गुंतूं नये, मग कुंथूं नये; आधीं गुंततोस कां, मग कुंथतोस कां—प्रथम एखादी जबाबदारी पतकरूं नये. एकदां पतकरली म्हणजे मग कितीहि श्रम पडले तरी त्याबद्दल कुरकुर करूं नये. तु०—आगमे सुखमाप्नोति निर्गमे प्राणसंकटम्।

आधींच आंधळी, वर झाली मांजोळी—(व.) [मांजोळी= रांजणवाडी] आंधळी असून आंधळ्या डोळ्यावर रांजणवाडी झाल्यानें विद्रूपता व दुःखाची तीव्रता विशेष वाढली. आंधळी असल्यामुळेंच मुळांत अपंग, त्यांत मांजोळी झाल्यानें तर ती अगदींच कुचकामाची झाली. तु०—गंडस्योपरि पिटिका संवृत्ता।

आधींच (बोंबलण्याचा) उल्हास, त्यांत (आला) फाल्गुनमास—शिमग्यांत बोंबलण्यावरच भर असतो. तेव्हां ज्याला त्याची हौस आहे तो जास्तच बोंबलणार ? म्हणजे उल्हासांत मोठी भर पडण्याची स्थिति. 'आधींच शंखाचा उल्हास०' पहा.

आधींच गाढव आणि त्यांत उकीरड्याचा शेजार—गाढवाला नेहमीं उकिरडा फुंकण्याची संवय असते व उकिरडाच जर शेजारीं असेल तर रात्रंदिवस तोच फुंकीत बसण्यांत गाढवास आनंदच होतो. एखाद्या मनुष्याला जात्याच एखादी खोडी किंवा व्यसन असतें; अशा मनुष्यास जर परिस्थिति तशीच मिळाली किंवा स्नेही व सहचर त्याच प्रकारचे मिळाले तर त्याच्या व्यसनास ऊत येणें स्वाभाविकच आहे.

आधींच तसलें अन् बैलावर (घोड्यावर) बसलें—स्वभावतः खोडकर मनुष्यास अधिक उत्तेजनकारक परिस्थिति मिळाल्यास म्हणतात.

आधींच तारें, त्यांत गेलें वारें; आधींच तारें त्यावर गेलें (शिरलें) वारें—तारवांत वारें शिरल्यावर तें जास्तच उडूं लागतें. एखादा मनुष्य आधींच अर्धवट वेडसर असला व वेडाच्या तारेंत बडबडत असला आणि तशांत त्याच्या अंगांत जर भूतसंचार झाला तर त्याच्या बडबडींत आणखी भरच पडणार यांत संशय नाहीं. तु०—आधींच उल्हास, त्यांत आला फाल्गुनमास. आधींच नाचरी, पायीं बांधली घागरी. आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला।

आधींच दुराचारी आणि स्त्रीराज्यांत कारभारी—दुराचारी मनुष्याला स्त्रीराज्याचा कारभारी नेमल्यावर त्याच्या दुराचरणाला सीमाच राहाणार नाहीं.

आधींच दूध, त्यांत साखर; दुधांत साखर— दूध हें जातीचेंच मधुर असतें; त्यांत आणखी साखर पडल्यावर त्याची

माधुरी अधिक वाढणारच. अनुकूल परिस्थितींत आणखी अधिक अनुकूल गोष्टी घडून येणें. तु०—अधिकस्याधिक फलम्.

आधींच नाचरी, त्यांत पायीं बांधली घागरी; आधींच बाई नाचरी, तिच्या पायीं बांधली घागरी—एखाद्या स्त्रीला स्वाभाविकच नाचावयाची हौस असली आणि त्यांत तिच्या पायास घुंघुरें बांधलीं तर तिला साहाजिकच नाचावयास अधिक स्फुरण येईल. मनुष्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीस अनुकूल परिस्थिति मिळतांच ती उसळी मारून बाहेर आल्याशिवाय राहात नाहीं.

आधींच पिचकें, त्यांत दांतविचकें—एखाद्या मनुष्याचे डोळे पिचके म्हणजे आकुंचित व खोडकर असले आणि तशांत त्यास दांत विचकण्याची संवय असली म्हणजे त्याच्या कुरूपतेंत आणखीच भर पडते. वरील म्हणीप्रमाणें परस्परपोषक अशा गुणदोषांची सांगड घालणाऱ्या अनेक म्हणी आहेत.

आधींच फाल्गुन मास, त्यांत बोंबेचा उल्हास—आधींच उल्हास० पहा.

आधींच बंड तसला, नि त्यांत बैलावर बसला—वरील म्हणीप्रमाणेंच. " चंदू व बंडू ज्या वातावरणांत वाढले त्याचें प्रतिबिंब त्यांच्या परस्पर वागणुकींत उमटलें. बंडूला तर त्याच्या वडिलांनीं मुद्दामच माझ्याशीं व चंदूशीं वाईट रीतीनें वागण्याचें वळण लावलें. मग काय विचारावें ? ' आधींच बंड तसला नि त्यांत बैलावर बसला ' अशी गत झाली. " —कुस्करलेलं हृदय, पृ. १२४.

आधींच बहुबावळी अन् बीच में खाई भंग—मनुष्य भांग प्याला म्हणजे बावळ्यासारखे चाळे करूं लागतो. तेव्हां स्वभावतः बावळ्या मनुष्यानें भांग घेतली तर त्याच्या चेष्टा किती वर्णाव्या. वर प्रमाणेंच.

आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला ।—'आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला । झाला तशांत मग वृश्चिकदंश त्याला । झाली तयास तदनंतर भूतबाधा । चेष्टा वदूं मग किती कपिच्या अगाधा ॥' एखाद्या माकडाला जर प्रथम दारू पाजली व त्यांत त्याला आणखी विंचू चावला व नंतर त्यास भूतबाधा झाली तर तो किती खोडया करील व कोणत्या प्रकारचा धिंगाणा घालील त्याचें वर्णनहि करतां येणें शक्य नाहीं. एखाद्या कुचेष्टेखोर अथवा खोडयाळ मनुष्याला जर अनुकूल संधि मिळाली तर त्याच्या चेष्टांस ऊत आल्याशिवाय राहात नाहीं. तु०—मर्कटस्य सुरापानं तस्य वृश्चिकदंशनम् । तन्मध्ये भूतसंचारो यद्वा-तद्वा भविष्यति ॥—सुर १५९.२६८.

आधींच रडे, तो घोडें काय चढे—अगोदरच नानू करणारा तो काम शेवटास कसें नेईल? तु०—रडत राऊत घोडयावर बसविणें.

आधींच शंखाचा उल्हास, त्यांत पातला फाल्गुनमास—प्रथमच शिमग्यांतलें कृत्य करण्याची हौस, मग फाल्गुनमास असल्यावर काय विचारावें ? सर्वच मोकळीक. स्वतःच्या अंगगत हौसेंत बाहेरची भर; तेव्हां साहाजिकं अधिक क्रिया होणार. (निंदार्थीं वापरतात). आधींच उल्हास० पहा.

आधींच सोन्याचे, त्यांत (वर) जडावाचें—दुधांत साखर या म्हणीप्रमाणें यांत सद्गुणाचा योग्य परिस्थितींत प्रकर्ष होतो असें दाखविलें आहे. सोन्याची वस्तु जर जडावाच्या कोंदणांत बसविली तर तिचें सौंदर्य अधिकच वाढतें.

आधींच हौस, त्यांत पडला पाऊस—ही म्हण अभावार्थक वापरतात. एखाद्या मनुष्यास एखादी गोष्ट करणें मनापासून आवडत नसतांना एकदम एखादी प्रतिकूल परिस्थिति उत्पन्न व्हावी म्हणजे तर तो जास्तच आढेवेढे घेऊं लागतो. एखाद्या मनुष्यास घराबाहेर जावयाचा कंटाळा असला आणि पाऊस पडत असला म्हणजे तर त्यास आणखी एक निमित्तच सांपडतें.

आधीं चोर, मग शिरजोर—एखादी वस्तु मनुष्यानें चोरून आणली असली म्हणजे प्रथम त्यास चोरीची धाकधुक मनांत असते. पण तीच एकदां पचली म्हणजे मग तो लागलाच शिरजोर बनतो. प्रथम मनुष्य हळूहळू आक्रमण करतो; तेव्हांच त्यास आळा घातला तर घालणें शक्य असतें, एकदां तो आक्रमित भूमि बळकावून बसला म्हणजे त्याचें तेथून उच्चाटन करणें कठिण जातें.

आधीं जाते बुद्धि, मग जातें भांडवल (लक्ष्मी)—मनुष्य प्रथम विवेकभ्रष्ट होतो व मग त्याचें नुकसान त्यास टाळतां येत नाहीं. जोंपर्यंत मनुष्य विचाराच्या ताब्यांत असतो तोंपर्यंत ठीक असतें, एकदां त्याची बुद्धि फिरली म्हणजे तो घसरगुंडीस लागतो व त्याला आवरतां येणें शक्य नसतें.

आधीं तेली आणि मग दुनिया झाली—प्रसूतिसमयीं तेलाचा उपयोग करावा लागतो यावरून, तेली हा आपणांस जगाच्याहि पूर्वीं उत्पन्न झाल्याचें मानतो व तेलाशिवाय जगांत कोणतीहि गोष्ट घडून येणें अशक्य, असें ध्वनित करतो.

आधीं दिवा घरीं ठेवा, मग मशिदींत दुसरा ठेवा—प्रथम आपल्या घरची नीट तरतूद करून मग दानधर्म वगैरे गोष्टींकडे लक्ष्य द्यावें. घरची आबाळ करून दानधर्म अगर परमार्थ यांच्या नादीं लागणें ठीक नव्हे. तु०—Charity begins at home.

आधीं दिवाळी मग शिमगा—वर्षांतील सणांच्या महिन्यांच्या अनुक्रमाप्रमाणें प्रथम दिवाळी येते व नंतर वर्षअखेर

शिमगा येतो. मनुष्य दिवाळींत चैन भोगतो. पण अखेर शिमग्याच्या वेळीं सर्व खडखडाट होतो. यावरून जेव्हां सुबत्ता असेल तेव्हां जर उधळमाधळ केली तर मागून अखेरीस हलाखी आल्याशिवाय राहणार नाहीं. याकरितां दिवाळीच्या वेळीं हात आंखडला तर शिमगाहि सुखाचा जाईल. त्वंपुरा करण्याची पाळी येणार नाहीं.

आधीं दुःख मग सुख—मनुष्यास आधीं दुःख भोगल्यानंतर सुख मिळालें तर त्यापासून आनंद होतो. व प्रथम कष्ट केल्याशिवाय सुखहि मिळत नाहीं. परंतु आधीं सुखांत दिवस घालविल्यानंतर जर दुःखाचे दिवस आले तर मनुष्याची स्थिति अत्यंत केविलवाणी होते व त्यास तें दुःख सहन करणें अत्यंत कठीण जातें. सुखंहि दुःखान्यनुभूय शोभते घनांधकारेष्विव दीपदर्शनम्। सुखात्तु यो याति नरो दरिद्रताम् धृतः शरीरेण मृतः स जीवति ॥–मृच्छ.

आधीं देव मग जेव—आधीं परमेश्वराचें पूजन करावें मग अन्नग्रहण करावें. कोणताहि भोग भोगण्यापूर्वी परमेश्वराची आठवण करावी. याच्या उलट 'आधीं पोटोबा मग विठोबा'.

आधीं द्यावें आणि मग घ्यावें—या जन्मीं जर दानधर्म केला तर पुढच्या जन्मीं त्याचें फल प्राप्त होतें अशी समजूत आहे. त्याप्रमाणें पेरल्याशिवाय पिकत नाहीं किंवा आपण दुसऱ्यावर उपकार केले तरच लोक वेळेवर आपल्या उपयोगी पडतील. याकरितां दुसऱ्याच्या प्रथम उपयोगी पडत असावें, दुसऱ्यास देत असावें म्हणजे पुढें घेतां येईल. तु०—सत्यं सत्यं मुनेर्वाक्यं नादत्तमुपतिष्ठते । अम्बुभिः पूरिता पृथ्वी चातकस्य मरुस्थली ॥

आधीं नर व्हा, मग नारायण कांहीं दूर नाहीं—प्रथम आपली कर्तबगारी दाखवावी व नंतर परमेश्वरावर विसंबून राहावें.

आधीं ना मधीं, तीळसंक्रांत कधीं—(व.) सर्व सण बहुधा नियमीत वेळीं येतात पण तिळसंक्रांत मात्र अनियमितपणें येते. अयोग्य वेळीं एकाएकीं एखादा आनंदाचा दिवस प्राप्त होणें, असा अर्थ. "दिवाळीला तुमच्या घरीं पाठविणें नीट दिसेल. असें, 'आधीं ना मधीं तीळसंक्रांत कधीं' याप्रमाणें मध्येंच कसे नेतां ?"

आधीं नागवला आणि मग सावध झाला—सर्व गेल्यावर मग सावध होऊन काय उपयोग ? प्रथमपासूनच माणसानें सावध असलें पाहिजे. तु०—बैल गेला आणि झोंपा केला.

आधीं नासाडी आणि मग पंचांगाची घडी—१ मनुष्यानें प्रथम जवळ असलेलें सर्व वैभव उधळून टाकलें म्हणजे मग हातांत पंचांग घेऊन भिक्षुकी करण्याखेरीज त्यास गत्यंतर उरत नाहीं. तीच आधीं उधळपट्टी केली नाहीं तर अशी दैन्याची पाळी यावयाची नाहीं. किंवा, २ आधीं सर्व उधळून टाकलें म्हणजे पुढें उपाशी राहण्याची पाळी येते व मग पोट खपाटास जाऊन सर्व अंग गलित होऊन अंगाची घडी होते.

आधीं पहावें बोलून, मग दाखवावें तोलून—प्रथम तोंडानें सांगून पहावें; तसें न पटलें तर पुराव्यानिशीं ती गोष्ट सिद्ध करून दाखवावी. प्रथम शब्दानेंच काम झालें तर पुरावा करण्याची आटाआट नको. याचे उलट–'आधीं पाहावें तोलून, मग दाखवावें बोलून.'

आधीं पाणी पिणें, मग जात पुसणें—'आधीं भात खाऊन मग जात विचारावी' पहा. याचा निषेधात्मक अर्थहि आहे.

आधीं पानगा केला, मग रोडगा केला—पानगा हा दुधांत पीठ भिजवून चुलीवर, तव्यावर वगैरे व्यवस्थित करतात व रोडगा साध्या पाण्यांत पीठ भिजवून केवळ निखाऱ्यांवर भाजतात. यावरून जोंपर्यंत अनुकूल स्थिति असेल तोंपर्यंत चांगलें चमचमीत अन्न खावें व प्रतिकूल स्थिति आल्यास जसें असेल त्यांत निर्वाह करावा. किंवा, पानगा पानावर करावयाचा असतो; तो करणें सोपें असतें. तेव्हां त्याचा प्रथम अभ्यास करून नंतर रोडगा हातावर करून भाजावयाचा असतो तो भाजावयास शिकावें.

आधीं पाहावें तोलून, मग दाखवावें बोलून--एखादा जिन्नस वजनांत कमी आहे असें म्हणण्यापूर्वीं त्याचें वजन करून आपली खात्री करून घेणें जरूर आहे. प्रत्येक शब्द किंवा वाक्य उच्चारण्यापूर्वीं प्रथम त्याचा पूर्ण विचार करावा व मगच तोंडांतून बाहेर काढावें. कारण एकदां उच्चारलेला शब्द परत घेतां येत नाहीं. याकरितां तो विचारपूर्वकच योजला पाहिजे. किंवा एखाद्या गोष्टीची पूर्ण शहानिशा करून घेतल्याशिवाय व मनाची पूर्ण खात्री झाल्याशिवाय तीबद्दल मत व्यक्त करूं नये. याचे उलट मागें पहा.

आधीं पिटोबा मग विठोबा--[विठोबा-अन्न याअर्थी] 'आधीं पोटोबा मग विठोबा' पहा.

आधीं पिसा, त्याचे हातीं दिलें कोलीत--वेड्या मनुष्याच्या हातांत कोलीत दिल्यावर तो आग लावीत सुटल्यास नवल काय ? तु०–आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला. माकडाच्या हातीं काकडा.

आधीं पोटोबा मग विठोबा--प्रथम पोटाची सोय पाहावी नंतर देवधर्म, परमार्थ करावा. आधीं स्वार्थ मग परमार्थ. "इतर कितीही चांगल्या सुधारणा झाल्या तरी आमच्या लोकांनीं

' आधीं पोटोबा मग विठोबा ' या म्हणीप्रमाणें अगोदर निर्वाहाची सोय पाहिली पाहिजे. "

आधीं फिरती रानोमाळ, मग घेतली जपमाळ—प्रथम तारुण्यांत भटकण्यांत वेळ घालवावयाचा व मग वृद्धपणीं ईश्वरभजनीं लागावयाचें, अशा वृत्तीच्या मनुष्यास म्हणतात. तु०—वृद्धा नारी पतिव्रता. करून करून भागली, देवपूजेला लागली.

आधीं बसला रट्टा, मग तोडतो तंटा—मनुष्याला चांगली ठेंच लागल्याशिवाय शहाणपणा सुचत नाहीं. नीटपणें एखाद्यास समजुतीच्या गोष्टी सांगून तंटा तोड म्हटलें तर तोडीत नाहीं; पण त्यास एक चांगला रट्टा देऊन आपलें सामर्थ्य दाखविलें म्हणजे तो समजुतीच्या गोष्टी ऐकण्यास तयार होतो. किंवा त्यास चांगली अद्दल घडली म्हणजे समजुतीच्या गोष्टी बोलूं लागतो.

आधीं बुद्धि जाते, मग वैभव (लक्ष्मी, भांडवल)—' आधीं जाते बुद्धि ' पहा.

आधीं भात खाऊन मग जात विचारावी—आपल्याला भूक लागली असली व कोणी भात आणून दिला तर त्याच्या जातीची वगैरे चौकशी न करतां प्रथम आपली भूक भागवून घ्यावी. क्षुधाशमन करणें हें प्रथम कार्य, तें झाल्यानंतर इतर गोष्टी; नाहींतर प्रथमच त्या माणसाची जात वगैरे विचारली व त्या जातीच्या हातचें अन्न आपणांस निषिद्ध असलें तर क्षुधाशमन होणार नाहीं. तेव्हां गौण गोष्टी बाजूला ठेवून प्रथम आपलें कार्य साधून घेण्याकडे दृष्टि ठेवावी.

आधीं भिजलें, मग वाळलें— १ भिजल्याशिवाय वाळलें असें म्हणतां येत नाहीं. हरभरे भरडण्यापूर्वी प्रथम ते भिजवावे लागतात व मग ते वाळवून भरडावे लागतात. याकरितां अनुक्रमें होणाऱ्या क्रियांपैकीं प्रथम पहिली क्रिया झाल्याशिवाय दुसरी होत नाहीं व दुसरी झाली असल्यास पहिली झाल्याचें गृहीतच धरलें जातें. २ एखादी वस्तु कोणी तिची काळजी घेणारा नाहीं अशाप्रकारें उघड्यावर पडली म्हणजे पाऊस पडला तर भिजते, मग ऊन पडलें तर वाळते; याप्रमाणें तिची अनास्था चालू असते. यावरून एखाद्या गोष्टीची अनास्था, हेळसांड व्यक्त होते.

आधीं मला वाढा, मग ओढीन कामाचा गाडा—१ एखाद्या मनुष्याला काम करावयास सांगावें तर तो उलट म्हणतो, आधीं प्रथम माझी तरतूद करा, मग पुढें तुमच्या कामाचें पाहूं. म्हणजे प्रथम आपलें काम बाजूस ठेवून त्याची तजवीज आधीं केली पाहिजे; नंतर आपल्या कामाची गोष्ट. तेव्हां आपलें काम बाजूस राहून प्रथम आधीं त्याचीच व्यवस्था करावयाची पाळी येते. २ एखाद्याला काम सांगावयाचें तर प्रथम त्यास कार्यक्षम केलें पाहिजे, तरच मग त्याचेकडून वाटेल तेवढें काम करून घेतां येईल. एकदां पोट भरल्यावर गाडाभर कामहि रेटेल पण उपाशी पोटीं कोणी कांहीं करूं शकत नाहीं. तेव्हां प्रथम जरूर ती त्याची तरतूद केली पाहिजे.

आधीं महार, मग सृष्टि होणार—सर्व गांवाची वसती होण्यापूर्वी प्रथम महाराची वसती असते. महाराष्ट्रांत महार हे अत्यंत प्राचीन कालापासून वसती करून राहिलेले लोक होत व त्यानंतर इतर जातीची म्हणजे आर्य वगैरे लोकांची वसती झाली. या गोष्टीस अनुलक्षून ही म्हण योजलेली आढळते. महारासच गांवाच्या सर्व हद्दी ठाऊक असतात व त्याला कांहीं विशिष्ट हक्क असतात. या गोष्टीवरूनहि हीच गोष्ट सिद्ध होते. तसेंच 'गांव तेथें महारवाडा' या म्हणींतहि वरील म्हणीचाच अनुवाद दिसतो. तु०—आधीं तेली०

आधीं माळी, मग सृष्टि झाली—माळी लोकहि आपणास श्रेष्ठ समजतात व सर्व सृष्टीच्या पूर्वीं आपली उत्पत्ति झाली असें मानतात. कारण सर्व झाडांची लागवड वगैरे करण्याचें काम माळ्याचें व तें झाल्याशिवाय वनस्पति सृष्टि कशी निर्माण होणार व ती नसल्यास मनुष्य तरी कसा जगणार? तेव्हां सर्व मानवजातीच्या आधीं माळीजातीची उत्पत्ति झाली असली पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे.

आधीं मोलकरीण, मग झाली यजमानीण—प्रथम नीच स्थानीं असून पुढें महत्त्व पावलेल्या व्यक्तीस म्हणतात. तु०—आधीं होती दासी, पट्टराणी केलें तिसी. कांहीं स्त्रिया प्रथम नोकरीस राहून पुढें यजमानाशीं लग्न करतात त्यांस उद्देशूनहि ही म्हण वापरण्यांत येते.

आधीं वाघ्या, मग पाग्या—पुढें 'आधीं होता वाघ्या' पहा.

आधीं वाचा जाते, मग जीव जातो—मनुष्य मरणोन्मुख झाला म्हणजे प्रथम त्याचीं सर्व गात्रें शक्तिहीन होतात त्याची वाचा बसते व नंतर त्याचा प्राण जातो. त्याचप्रमाणें मनुष्याचा नाश व्हावयाचा असला म्हणजे त्याची विचारशक्ति वगैरे सर्व मानसिक व शारीरिक शक्ति जणूं काय गलित होऊन अकार्यक्षम होतात व त्याला चांगली बुद्धि सुचेनाशी होते किंवा त्याची प्रतिकाराची शक्ति क्षीण होते; त्यास बोलणेंहि सुचत नाहीं व तो स्वतःच जणूं कांहीं नाशाकडे चालून जातो.

आधीं शहाणपण जातें, मग भांडवल जातें—मनुष्याची बुद्धि कार्य करीत नाहींशी झाली म्हणजे त्याचा कार्यनाश होतो किंवा मनुष्याचा नाश व्हावयाचा असला म्हणजे त्याला विपरीत बुद्धि सुचूं लागते. आधीं जाते बुद्धि० पहा.

आधीं शिदोरी, मग जेजुरी—जेजुरीस जाऊन खंडोबाचें म्हणजे देवाचें दर्शन घ्यावयास जावयाचें तर किंवा प्रवासास निघावयाचें तर प्रथम शिदोरीची तजवीज केली पाहिजे. तिची तरतूद केल्याशिवाय अपेक्षित स्थळीं पोंचणें शक्य नाहीं. कोणतेंहि कार्य करावयाचें झाल्यास त्यास लागणारीं सर्व साधनें प्रथम सिद्ध केलीं पाहिजेत. तु०—आधीं पोटोबा मग विठोबा.

आधीं संतसंग, मग पांडुरंग—पांडुरंगांची प्राप्ति व्हावयाची तर प्रथम संतांच्या संगतींत राहून योग्य मार्गाचें ज्ञान करून घेतलें पाहिजे; तरच इच्छित फल हातास येईल. मूळ—आधीं होतां संतसंग । तुका झाला पांडुरंग ॥ त्याचें भजन राहीना । मूळ स्वभाव जाईना ॥—तुगा.

आधीं संताप, मागून पश्चात्ताप—कोणतीहि गोष्ट करण्याच्या कामांत मनुष्य जर रागाच्या अथवा एखाद्या विकाराच्या आहारीं गेला तर तें काम बिघडण्याचाच संभव अधिक व त्यामुळें शेवटीं पश्चात्तापाची पाळी येते.

आधीं सूनसून, मग फूणफूण—आधीं करते सूनसून० पहा.

आधीं स्वतःची चूक दुरुस्त करा, मग दुसऱ्याची करा—दुसऱ्याचे दोष काढून ते दुरुस्त करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीं स्वतःचे दोष घालविणें अवश्य आहे. तु०—आपण हंसे लोकां शेंबूड आपल्या नाका. आपल्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाहीं पण दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ दिसतें.

आधीं होता (ग्राम) जोशी । मग झाला मोकाशी (राज्यपद आलें त्याशीं) ॥ त्याचें पंचांग राहिना । मूळ स्वभाव जाईना ॥—परिस्थिति बदलूनहि मनुष्याचा अंगस्वभाव जेव्हां बदलत नसतो, तेव्हां या म्हणीचा उपयोग करितात.-तुगा.

आधीं होता ठोंब्या, मग झाला बाब्या—प्रथम अगदीं नावडत्या असलेल्या मुलाचें पुढें आईबाप कौतुक करूं लागलीं असतां म्हणतात. एखादा प्रथम मठ्ठ वाटणारा मुलगा दैववशात् वैभवसंपन्न झाला म्हणजे आईबाप त्याला बाबापुता करूं लागतात.

आधीं होता मठ, त्याला घातला तट—जें स्थळ प्रथम मठाप्रमाणें म्हणजे मुक्तद्वार होतें, तें बळकावून बसून त्याला तट बांधून व आपली सत्ता स्थापन करून दुसऱ्यास मज्जाव करावयाचा ही वृत्ति अतिशय स्वार्थी व आक्रमणशील दिसते. "काँग्रेसच्या निवडणुकींत मतदानास पात्र होण्यास, सभासद एक वर्ष सभासद असला पाहिजे, ही दुरुस्ती 'आधीं होता मठ, त्याला घातला तट' अशा स्वरूपाची आहे.-केसरी २७-६-३९.

आधीं होता वाघ्या । मग (दैवयोगें) झाला पाग्या ॥ त्याचा येळकोट राहीना । मूळ स्वभाव जाईना ॥—मनुष्य नीच पदावरून कितीहि श्रेष्ठ पदावर गेला तरी त्याची स्वाभाविक प्रवृत्ति त्यास सोडून जात नाहीं. मधून मधून तिची उचल होऊन त्याचें खरें स्वरूप बाहेर पडतेंच.-शाव १.५५. याविषयीं तुकारामाचा अभंग पुढील आशयाचा आहे: मनुष्य प्रथम खंडोबाचा वाघ्या होता तेव्हां त्याला मल्हारी मार्तंडाचा येळकोट म्हणून ओरडण्याची संवय होती. कारण खंडोबाचे भक्त तळी भरण्याच्या वेळीं असे शब्द उच्चारतात. त्या मनुष्याला पागेवरचा मुख्याधिकारी म्हणजे घोडदळाचा मुख्य केलें तेव्हांहि रणगर्जनेच्या ऐवजीं तो येळकोट म्हणून ओरडूं लागला. याप्रमाणें त्याची मूळ वृत्ति उघडकीस आली.

आधीं होती त्याच मार्गी, मग झाली देवलंबी—(व.) [देवलंबी = देवपूजेचा दंभ माजविणारी.] आधीं म्हणजे पूर्व वयांतहि बाई असद्वर्तनी होती, पुढें ती वृद्ध झाल्यावर तिला कोणी विचारीना, तेव्हां ती देवपूजेचा दंभ माजवूं लागली; वास्तविक तिची मनोवृत्ति पालटली नाहीं. अनीतीनें वर्तून ज्यानें आधीं रगड द्रव्यसंचय केला व मग द्रव्यार्जनाची शक्ति कमी झाल्यावर ज्यानें साधुत्वाचा आव आणला त्याला उद्देशून ही म्हण आहे. तु०—वृद्धा नारी पतिव्रता. करून करून भागली नि देवपूजेला लागली.

आधीं होती पतिव्रता, मग झाली मुसळदेवता—१ एखादी स्त्री आरंभीं अत्यंत सरळ वागणुकीची असली व नंतर कांहीं कारणामुळें तिची वागणूक अगदींच उफराटी झाली म्हणजे ही म्हण योजतात. दोन कालांतील भिन्न भिन्न वागणूक किंवा अतिशय चमत्कारिक तऱ्हेचें स्वभावपरिवर्तन दाखविण्याकरितांहि योजतात. २ 'अतिपतिव्रता मुसळदेवता' पहा.

आधेला—अधेला पहा.

आनंद——आनंदचतुष्टय—विषयानंद, परमानंद, ब्रह्मानंद आणि धनानंद. 'एकादें मोठें पुस्तक हातीं घेऊन समग्र लक्षपूर्वक वाचून पाहिल्याशिवाय वाचनापासून विषयानंद, परमानंद, ब्रह्मानंद आणि धनानंद अशा एकावर एक चार आनंदाच्या चढत्या कोटया आहेत, त्यांपैकीं एकही आनंदाचा लाभ होत नाहीं.'—पामो ५७१.

आनंद ब्रह्मांडांत न मावणें—अत्यानंद होणें; हर्षातिरेक होणें; आनंदाची पराकाष्ठा होणें.

आनंद विरणें—आनंद लोपणें. 'तें एकतांच निर्मलेच्या चेहऱ्यावरचा आनंद जरा विरल्यासारखा झाला.'—दौलत पृ.१७.

आनंदाचें भरतें येणें—लोटणें—अतिशय आनंद होणें; आनंद पोटांत मावेनासा होणें; हर्षातिरेक होणें. 'आनंदाचें भरतें तेणें राजाला लोटलें।'—विक २७.

आनंदांत मन बुडणें—मनाला अत्यानंद होणें; मनाला बरें वाटणें.—मो. रुक्मिणी ८९.

आनंदानें टाळी पिटणें—अतिशय आनंद होणें; मनाला झालेला आनंद टाळ्या वाजवून व्यक्त करणें.

※ **आनंदमय वृत्ति, मैत्रीवांचूनहि राहती**—आपणाला कोणी खरा मित्र नसला तरीहि आपणांस स्वतःच्या ठिकाणीं आनंद मानून समाधानी वृत्ति ठेवतां येते; त्याला मित्राची अपेक्षाच असते असें नाहीं. उलट हा आनंद दुसऱ्या कोणावर अवलंबून नसल्यामुळें अधिक स्थिर स्वरूपाचाहि असूं शकतो. तु०—jollity often exists without a spark of friendship.—सावि २०४६.

आनंदाची घडी येती, न कळतां निघून जाती—सुखाचे दिवस फार लवकर निघून जातात असें वाटतें. मनुष्य आनंदांत असला म्हणजे केव्हां दिवस जातात तें लक्षांतहि येत नाहीं. उलट कष्टाचे दिवस फार कंटाळवाणे वाटतात. तु०—Pleasant hours fly fast.

आनंदाच्या वार्ता, तेथें सांगे रडकथा—जेथें सुखासमाधानाच्या गोष्टी चालल्या आहेत, सर्व लोक आनंदाचा उपभोग घेत आहेत अशा ठिकाणीं जर कोणी आपलें रडगाणें गाऊं लागला तर सर्वांचा विरस होतो व सर्वांच्या आनंदावर विरजण पडतें. याकरितां दुसऱ्याच्या सुखाचा विनाकारण भंग करूं नये. आपल्याला होणारें दुःख वेळ प्रसंग पाहून दुसऱ्याजवळ उघडें केल्यास त्याबद्दल सहानुभूति मिळून अपहार करण्याच्या कामीं साहाय्यहि मिळण्याचा संभव असतो. पण तीच गोष्ट भलत्याच वेळीं केल्यास आपल्या रडगाण्याकडे कोणी लक्षहि देत नाहीं व त्यांच्या मात्र आनंदांत मिठाचा खडा पडल्यासारखें होतें.

आनंदित मन ही खरी मेजवानी होय—खरें समाधान हें आपल्या मनावर अवलंबून आहे. बाह्य साधनांनीं मिळणारा आनंद हा तात्पुरता. उदाहरणार्थ, एखाद्या पदार्थाची गोडी तो खात असेपर्यंतच टिकते पण समाधन वृत्ति ही आपणांस चिरकालिक टिकवितां येते.

आनंदी—आनंदीबाई—राघोबादादाची स्त्री आनंदीबाई हिनें गृहकलह लावला म्हणून तिच्या दुर्लौकिकावरून दुष्ट, घरबुडव्या बाईला म्हणतात.

आननें (आणणें)—आनी ना मानी, रांध गे बाह्मनीनी, रसमस !—(व.) [पुष्कळ जातींतून ' ण ' ऐवजीं ' न ' वापरण्यांत येतो.] साहित्य आणून देणें ज्याला परवडत नाहीं पण ब्राह्मणाच्या बाईनें चमचमीत जेवण मात्र तयार केलें पाहिजे अशी ज्याची अपेक्षा असते, त्याची ती अपेक्षा पुरी कशी होणार ? साधनांशिवाय साध्याची अपेक्षा व्यर्थ होय.

आना—आनाचो भाव दादा—(गो.) अण्णाचा भाऊ दादा. जसा धाकटा भाऊ (कुचकामाचा) तसाच त्याचा वडील भाऊ. एकासारखे एक.

आना—आनो थंय शानो—(गो.) जेथें आणा (पैसा) असतो तो मनुष्य शहाणा. पैशानें शहाणपण येतें. ज्याच्याजवळ पैसा असतो त्याला सर्व शहाणा म्हणतात.

आनि—आनि पानी, तथा लोनी—[आनि = आणि याचा अपभ्रंश] ण च्या जागीं न म्हणणाऱ्या व्यक्तीस उपहासानें चिडविण्याकरितां योजतात.

आप—आप तरणें आणि जग तारणें, आप बुडणें व जग बुडविणें—स्वतः संकटांतून निभावून जाऊन इतरांसहि आपणाबरोबर निभावून नेणें आणि स्वतःचा नाश करून घेऊन त्याबरोबर इतरांचाहि नाश करणें, या परस्पर विरुद्ध दोन स्वभावनिदर्शक गोष्टी आहेत. ' कोणी आप तरावें आणि जग तारावें, कोणीं आप बुडावें व जग बुडवावें. '—भाच ५९.

आप राखून पर—स्वतःचा संसार सांभाळून दुसऱ्याच्या उपयोगी पडणें.

आप आपणा न वर्णावें, जनें आपणा स्तवावें—स्वतःची स्तुति स्वतःच करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. लोकांनीं जर आपली स्तुति केली तरच तींत स्वारस्य आहे.

आप करे सो काम, पल्लो होय सो दाम; आप करे सो काम, पदरीं होय सो दाम (हाथ लगै सो दाम)—स्वतःच केलें तर काम होतें व जवळ रोख पैसा असला तरच तो वेळेवर उपयोगी पडतो. दुसऱ्यावर एखादें काम सोंपविलें तर तें वेळेवर होईल अशी खात्री नसते व दुसऱ्याकडे आपला पैसा येणें असला तरी तो वेळेवर उपयोगी पडतो असें नाहीं.

आपकाज महाकाज—आपलें काम सर्वांत श्रेष्ठ, तेव्हां प्रथम त्याकडे लक्ष द्यावें. दुसऱ्याचें काम करण्याच्या आधीं स्वतःचें काम करावें.

आपकाया दुःखी, परकाया सुखी—१ मनुष्याला नेहमीं आपणास स्वतःसच फार कष्ट पडतात, दुसरे आपल्यापेक्षां सुखी असतात, असें वाटत असतें. वास्तविक सुखदुःख हें सर्वांच्या वांट्यास कमी अधिक प्रमाणांत येतच असतें; पण मनुष्य उगीच आपली समजूत अशी करून घेतो. २ स्वतःला कष्ट दिले तर दुसऱ्यास सुख देतां येतें. साधु लोक स्वतः झीज सोसून दुसऱ्यास सुखी करण्याचा प्रयत्न करतात.

आप घर कीं बाप घर—विवाहित स्त्रीस स्वतःच्या घरीं म्हणजे सासरच्या घरीं किंवा बापाच्या घरीं म्हणजे माहेरीं फक्त

राहतां येतें. इतर ठिकाणीं राहिल्यास तिला नांवें ठेविलीं जातात; तिची अनास्था होते. 'आपघर त्यागूनि बापघरीं केली वस्ती—' —सप्र ११.४९. तु०—पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने। पुत्रस्तु स्थविरे भावे नस्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥ मनु.—सुर १६६.५७५.

आप डुबा, तो जग डुबा—आपण स्वतः मेल्यास जग जगलें काय किंवा मेलें काय सारखेंच. आपण बुडाल्यावर दुसरा बुडाला किंवा तरला तरी आपणांस कांहीं उपयोग नाहीं. जगांतील सुखदुःख, बरेवाईट प्रसंग हे आपणांस आपण जगांत आहों तोंपर्यंत अनुभवावे लागतात. आपली येथील वसती संपल्यावर ते आपणांस संपल्यासारखेच असतात.तु०—आप मेला जग बुडाला.

आप दुःख भारी, परदुःख शीतळ—स्वतःला एखादी अडचण आली म्हणजे तीपासून खरोखर कसा त्रास होतो तें कळतें. तीच दुसऱ्यास अडचण आली तर आपण त्याबद्दल बेफिकिर असतों; आपणास त्याबद्दल कांहीं वाटत नाहीं. दुसऱ्याच्या दुःखाबद्दल काळजी करणारे क्वचित्. तु०—विरला जानन्ति गुणान् विरलाः कुर्वन्ति निर्धने स्नेहम् । विरलाः परकार्यरताः परदुःखेनापि दुःखिता विरला ॥—सुर १७०.७६१.

आप बचे, अस्सल खैर—[खैर=सुरक्षितता] आपला स्वतःचा जीव वांचविणें, आपल्या स्वतःवर कांहीं संकट न येऊं देणें हीच सर्वांत श्रेष्ठ सुरक्षितता होय. आपले प्राण वांचले कीं बस, इतर नुकसानी कितीहि झाली तरी हरकत नाहीं, इतरांचे प्राण वांचले अगर नाहीं हेंहि पहाण्याचें कारण नाहीं.

आप बुरा तो जग बुरा—'आप भला तर जग भला' याच्या उलट. आपण जर इतरांशीं वाईट वर्तणूक केली तर दुसरेहि आपणांशीं तसेंच वर्तन करणार.

आप भला तो जग भला—आपण जशी वागणूक दुसऱ्याशीं ठेवावी त्याप्रमाणें दुसरेहि आपणाशीं वर्तन करतात. आपण दुसऱ्याजवळ चांगुलपणानें वागल्यास दुसरेहि आपणाशीं नीट रीतीनें वागतात.

आप मुवा विना काई संरग जवाये ?—(गुज.) आपण मेल्याशिवाय कोठें स्वर्गास जातां येतें ? स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं.

आप मेला जग बुडाला; आप मेलें जग बुडालें—आपल्यामागें कांहीं का होईना ! त्याची पर्वा आपणास करण्याचें कारण नाहीं. आपण पहा. " 'आप मेला जग बुडाला.' ज्याचे दैवीं (जें) असेल तें घडेल. "—भाव १०३.

आप लिखिये और खुदा बाचे—स्वतः लिहावयाचें व परमेश्वरानें वाचावयाचें.ज्याचें अक्षर त्याला स्वतःला हि वाचतां येत नाहीं अशाबद्दल म्हणतात. तु०—वाचयति नान्यलिखितं लिखितमनेनापि वाचयति नान्यः । अयमपरोऽस्य विशेषः स्वयमपि लिखितं स्वयं न वाचयति ॥ —सुर ३६४.२६.

आप सांडुन पर धरी, त्याची मनसुबी देव करी—जो स्वजनांस सोडून परकीयांचा आश्रय करतो त्यास या जगांत जरी तात्पुरता लाभ झाला तरी परमेश्वर त्याचा योग्य न्याय करून त्याला शिक्षा केल्याशिवाय राहात नाहीं.

आप सुखी तर जग सुखी—आपण सुखी असलों म्हणजे सर्व जग सुखी असतें अशी कल्पना. आपणावरून जग ओळखावें. प्रत्येकानें आपल्या सुखासाठीं प्रथम झटावें. 'प्रत्याख्याने च दाने च सुखदुःखे प्रियाप्रिये । आत्मौपम्येन पुरुषः प्रमाणमधिगच्छति ॥—सुर १६३. ४३७.

आपस्वार्थी कारभार नसावा—मनुष्यानें केवळ आपल्याच हिताकडे पाहून व्यवहार करूं नये, आप्पलपोटेपणा हा गुण नव्हे. —कृष्णाजी जगन्नाथ.

आपकी असे तें खपकीं बसे, दुरिदुरी असे तें स्वपनीं दिसे—जवळचीं माणसें नकोशीं होतात, त्यांच्यापासून त्रास होतो. उलट दूरचीं माणसें मात्र स्वप्नांत दिसतात, म्हणजे तीं हवींशीं वाटतात. त्यांचा ध्यास लागतो. तु०—अति परिचय खोटा मान राहात नाहीं । प्रकट दिसत भानू तो जगीं तुच्छ पाही । हिमकर द्वितियेचा वंदिती सर्व भावें । म्हणउनि सखयारे दूर देशीं रहावें ॥

आपही मीया (भीक) मंगता, बहार खडे दरवेश—भिकाऱ्याच्या घरीं दरवेशी गेल्यास त्याला काय मिळणार; स्वतः भीक मागणारा दुसऱ्यास काय देणार ? तु०—एकादशीच्या घरीं शिवरात्र.

आपटणें——**आपटून पडे, दंडवत घडे**—(गो.) अनायासें कार्य घडून येणें. तु०—अटकळल्या देवास दंडवत. अपटणें पहा.

आपड——**आपड फेणी पापड फेणी सांडगा, मामाच्या घरीं जांवई आला भांडगा**—सासुरवाडीस जांवई आला म्हणजे त्याच्याकरितां कितीहि पदार्थ केले व त्याची कितीहि बडदास्त ठेवली तरी तो रुसल्यावाचून व भांडल्यावांचून राहात नाहीं.

आपण——**आपण माझे मायबाप आहांत**—एखाद्याला आपली असाहाय्य स्थिति सांगून आपण त्याचे कृपेवर सर्वस्वी अवलंबून आहोंत, असें दाखवावयाचें असल्यास हा वाक्प्रचार योजतात.

आपण होऊन—आपखुषीनें; स्वसंतोषानें; स्वतः होऊन; दुसरा सांगण्याची वाट न पाहतां; स्वयंस्फूर्तीनें.

आपण होऊन खोड्यांत पडणें—स्वतःवर संकट ओढवून घेणें.

आपणावर वर्तविणें–आणणें—कोणत्याहि केलेल्या गोष्टीचें यश किंवा श्रेय आपणच घेणें. 'सांगतो हळुहळूच अचाटें। आपणाच वरि वर्तवितो।'

आपणास म्हणविणें–आपण मोठ्या योग्यतेचे, हुषार वगैरे प्रौढी मिरविणें; स्वतःची थोरवी गाणें.

❀ आपण आपल्यास (आपलें) जपावें नि दुसऱ्यास यश द्यावें—('आपलें सांभाळावें व दुसऱ्यास यश द्यावें,' अशी मूळ म्हण आहे. तींत फेरबदल करून वरील म्हण बनविलेली दिसते.) आपण आपल्या प्रकृतीस जपावें; म्हणजे इतरांस आपणापासून त्रास होत नाहीं. तसेंच स्वतःच्या वस्तूंची स्वतः काळजी घेतल्यास त्या हरवत नाहींत व दुसऱ्यावर संशय येत नाहीं.

आपण आपल्यास वानी, पण जग देतें गाऱ्हाणीं–स्वतःच्या गुणांची स्वतःच तारीफ करीत असावयाचें; पण बाहेर पहावें तों सर्व जग त्याबद्दल तक्रारी करीत असतें अशा मनुष्याबद्दल म्हणतात. तु०–आवाजी आवाजी, आपलेच कुले नावाजी.

आपण आयला मागूंक, घालगे रांडे भीक—(गो.) भिक्षेकऱ्यानें नम्रपणेंच भीक मागीतली पाहिजे. रांडे! म्हणून भीक कोण वाढील? भिकारी असून बेमुर्वतपणानें वागणारा.

आपण कमवावें आणि वंशानें खावें—मनुष्यानें अशी संपत्ति मिळवून ठेवावी कीं, त्याच्या वंशजांसहि ददात पडूं नये व आपल्या मुलाबाळांची सोय योग्य झालेली पाहून संतोष मानावा व आपल्या श्रमांचें सार्थक झालें, असें समजावें.

आपण कमाऊन आणावें, सोयऱ्याचें घर भरावें—आपल्या आप्तेष्टास आपण जर कांहीं दिलें तर तें कधीं आपल्या उपयोगी पडत नाहीं. विशेषतः स्त्रीच्या नातेवाइकांकडे आपण पोंचविलेली रक्कम अगर वस्तु कधीं परत येण्याची आशा नसते. परंतु कांहीं लोक अशा तऱ्हेनें आपल्या सोयऱ्यांची भर करतात; त्यांस पुढें पश्चात्ताप करण्याची पाळी येते.

आपण करना, दुसऱ्यांक सोण्णा—(गो.) आपण स्वतः कांहीं करीत नाहीं, दुसऱ्याला करूं देत नाहीं.

आपण करावे अन्याय, देवा घरीं न्याय—आपण स्वतः अन्यायाचीं कृत्यें करावीं व त्यांचीं फळें भोगण्याची वेळ आली म्हणजे ईश्वरास दोष द्यावा, यांत काय अर्थ?

आपण करावें तें काम, हातीं (गांठीं) असेल तो दाम—'आप करेसो काम' पहा.

आपण करी चाळा, बोल ठेवी कपाळा—स्वतः दुर्वर्तन करून नशीबाला बोल लावणें.

आपण करूं एक, प्रारब्ध घडवी अनेक—मनुष्याच्या मनांत एखादी गोष्ट करावयाची असते पण दैवयोगेंकरून भलतेंच घडून येतें. मनसा चिंतितं कार्यम् दैवमन्यच्च चिंतयेत्।

आपण कामास लोटावें, कामानें आपणास लोटूं नये—आपण स्वतः होऊनच आपल्यावर अवलंबून असलेलीं कामें एक एक उरकून हाता वेगळीं करावीं, म्हणजे आपणांस आपल्या सोईनें पाहिजे तेव्हां व पाहिजे तशीं करतां येतात. अनेक कामांचा लकडा आपल्या मागें लावून घेऊं नये. नाहींतर तीं कशींबशीं करावीं लागतात व त्यामुळें आपणास अधिक त्रास पडतो व मनासारखींहि न होण्याचा संभव असतो.

आपण कुंटो, दुसऱ्याक म्हणता थोंटो—(गो.) स्वतः लंगडा, दुसऱ्याला म्हणतो लुळा.

आपण खातों अन्नासी, अन्न खातें आपणासी—आपण अन्न खातों ही गोष्ट खरी पण जें अन्न खातों त्याचा परिणाम आपणांवर झाल्याशिवाय राहात नाहीं. एक परिणाम प्रत्यक्ष शरीरावर होणारच, परंतु जर आपण अन्यायानें मिळविलेलें, दुष्टाकडचें वगैरे दूषित अन्न खाल्लें तर त्याचा आपल्या मनावरहि परिणाम होतो व आपली प्रवृत्तिहि अन्नाप्रमाणें बरी वाईट होऊं लागते. —दा ३·४·११.

आपण खायिना, दुसऱ्यांक दीना—(गो.) स्वतः खाणार नाहीं, दुसऱ्याला देणार नाहीं. गव्हाणींतल्या कुत्र्याप्रमाणें वृत्ति.

आपण गाढव जाल्यारि दुसऱ्यानि फाटिरी बसल्यारि इत्या कोपका?—आपण गाढव झाल्यावर, लोक जर आपल्या पाठीवर बसले तर कशाला रागवावें?

आपण चांगलें तर जग चांगलें—आपण दुसऱ्याशीं वागावें तसें जग आपल्याशीं वागतें. त्यांच्याशीं आपण चांगली वागणूक ठेवली तर लोकहि आपणाशीं भलेपणानें वागतात. याच्या उलट आपण दुसऱ्याशीं वांकडे झाल्यास तोहि आपणापाशीं तसाच वागणार. तु०–आप भला तर जग भला.

आपुण जायना, सवत साहिना—(गो.) आपण होत नाहीं, सवत साहवत नाहीं. 'आपण विईना०' पहा.

आपण झाला खोटा, कुटुंबाला लावला बट्टा—कुलामध्यें एकहि वाईट मनुष्य निघाला तरी सर्व कुलाला त्याचें लांछन लागल्यावांचून राहात नाहीं.

आपण तरी मरद, बाइलेक रांड करीद—(गो.) आपण मरेल व बायकोला रांड करील. आपलें नाक कापून दुसऱ्याला अपशकून करणें.

आपण दुसऱ्याला साहाय्य केलें तर दुसरा आपणाला करील—आपण दुसऱ्याच्या उपयोगी पडलों तरच दुसरा

आपल्या उपयोगी पडेल. मदत करणें हें परस्परांवर अवलंबून असतें.

आपण दोघे भाऊभाऊ, माझा कोंडा तुझे पोहे एके ठिकाणीं ठेऊं आणि फुंकून फुंकून खाऊं—स्वार्थी सहकारिता. दुसऱ्याचे पोहे उपटण्याकरितां आपला कोंडा त्यास देऊं करावयाचा.

आपण नागडी (गांडी उघडी) कान्ना बुगडी—(गो.) जुनें वस्त्र परिधान केलेली अशा तऱ्हेची पण कानांत बुगडी घातलेली अशी स्त्री.

आपण नागवी, (नी) म्हणे पाहणारे लबाड—आपण जगावेगळी गोष्ट करावयाची आणि तीस कोणी हंसले तर त्यांना नांवें ठेवावयाचीं, यांत काय अर्थ ?

आपण नामा निराळा, धोपटी विठोबाच्या गळा—मनुष्य आपल्या सर्व कर्मांचा भार ईश्वरावर टाकून स्वतः मोकळा राहूं इच्छितो व बऱ्यावाइटाबद्दल परमेश्वरास दोष देतो.

आपण बरो जाल्यारि जग बरें—(गो.) स्वतः जर चांगला तर जग चांगलें. आप भला तर जग भला.

आपण बुडता, दुसऱ्याक पोटाळता—(गो.) आपण बुडतो, दुसऱ्यालाहि पोटापाशीं धरतो. स्वतः खड्यांत पडावयाचें व दुसऱ्यालाहि आपल्याबरोबर ओढावयाचें, अशी अत्यंत हीन मनोवृत्ति. पुढील म्हण पहा.

आपण बुडून दुसऱ्यास बुडवितो—पाण्यांत पडल्यास दगड स्वतः बुडतो एवढेंच नव्हे तर आपल्याबरोबर दुसऱ्यासहि बुडवतो. जो दुष्ट मनुष्य असेल तो स्वतःचा अधःपात करून घेतो एवढेंच नव्हे तर स्वतःबरोबर इतरांचाहि करून घेतो. दगडाची नाव आधीच ते जड। ते काय दगड तारूं जाणे ॥ –तुगा २९०३.

आपण भला तो जग भला—आपण जसें इतरांशीं वागतों तसेंच दुसरे आपणांजवळ वागतात. स्वतःची वागणूक इतरांजवळ चांगली ठेवली तर तेहि आपणांशीं चांगल्या तऱ्हेनें वागतील. ‘ आप भला० ’ पहा.

आपण भिकारी, जीवु चोकारी—(गो.) आपण भिकारी असून जीवाचे चोचले करणारी.

आपण भीक मागतो तो दुसऱ्यास काय देतो—जो मनुष्य स्वतःच कफल्लक असेल तो दुसऱ्यास काय देणार ? तु०–एका दरीच्या घरीं शिवरात्र. आपही मंगता और बहार खडे दरवेश.

आपण मरबें स्वर्ग पहाचो—(गो.) आपण मरावें आणि स्वर्ग पाहावा.

आपण मेलें आणि (नी) जग बुडालें—स्वतः मेल्यानंतर जगाचें काय होईल याची काळजी बाळगण्यांत काय अर्थ आहे ? आपण इहलोक सोडून गेल्यावर जग राहिलें काय किंवा बुडालें काय, आपणास सारखेंच. ‘ आप मेलें० ’ पहा.

आपण मेल्यावांचून स्वर्ग दिसत नाहीं—आपण मेल्यावरच स्वर्गाला पोंचतों, एरवीं नाहीं. तेव्हां सुख पाहिजे असेल तर स्वतः श्रम केले पाहिजेत. (गो.) आपुण मेल्याबगर सर्ग दिसना. आप मुवे बगर० पहा.

आपण म्हणतों एक आणि होतें भलतेंच—मनुष्य एक गोष्ट करावयाची योजतो पण परमेश्वरी योजना निराळीच असल्यामुळें भलतीच गोष्ट होते. तु०—मनसा चिंतितं कार्यम् दैवमन्यच्च चिन्तयेत् । Man proposes and God disposes.

आपण यजमानाशीं वागावें तसें सेवकास शिकवावें—आपण ज्याप्रमाणें आपल्या वरिष्ठांशीं वागणूक ठेवतों ती पाहून त्याप्रमाणेंच आपले सेवक आपल्याशीं वर्तन करतील, ही गोष्ट लक्षांत बाळगावी.

आपण लोकांशीं, तसे लोक आपणाशीं—आपण जसें लोकांशीं वागूं तसे लोक आपल्याशीं वागतात. आपण चांगले तर लोक चांगले.

आपण विईना आणि सवत साहीना—एखाद्या स्त्रीला स्वतःला मूल होत नाहीं, त्यामुळें पुढें निर्वंश होण्याचा संभव. म्हणून नवऱ्यानें दुसरें लग्न करावयाचें मनांत आणलें तर तेंहि तिला आवडत नाहीं. याप्रमाणें कांहीं लोक स्वतः एखादी गोष्ट करूं शकत नाहींत किंवा स्वतः एखादें सुख उपभोगूं शकत नाहींत, पण ती गोष्ट दुसऱ्यांनीं केलेली त्यांस खपत नाहीं; किंवा जें आपणांस मिळत नाहीं तें सुख दुसऱ्यांनीं उपभोगिलेंहि त्यांस सहन होत नाहीं. पाठभेद—सवत साहीना आणि लेंकरूं होईना.

आपण व्हावें ऐसें म्हणतों, ईश्वर इच्छी तैसें करतो—आपल्या मनांत एखादी गोष्ट व्हावी असें असतें. पण परमेश्वराच्या मनांत दुसरीच कांहीं तरी योजना असून त्याप्रमाणें घडून येतें. मनुष्यानें कोणतेहि बेत केले तरी सर्व गोष्टी परमेश्वराधीन असून त्याच्या इच्छामात्रेंकरून सर्व गोष्टी घडून येतात. ईश्वरेच्छा बलीयसी । (अ) स्वयं महेशः श्वशुरो नगेशः सखा धनेशस्तनयो गणेशः । तथापि भिक्षाटनमेव शंभोर्बलीयसी केवलमीश्वरेच्छा ॥–सुर १२.५२. (आ) भ्रमन्वनान्ते नवमंजरीषु न षट्पदो गन्धफलीमजिघ्रत् । सा किं न रम्या स च किं न रन्ता बलीयसी केवलमीश्वरेच्छा ॥ –सुर १२.५९. ‘ आपण म्हणतों एक० ’ पहा.

आपण शाबूद तों दुनिया शाबूद—जर आपण जीवंत राहिलों तर या जगांतील गोष्टींचा उपभोग घेऊं शकूं. आपण मरत असल्यास दुनिया राहिली काय किंवा बुडाली काय, आपणास काय पर्वा आहे. तेव्हां आपल्या हयातीपुरती दुनियेची फिकीर करावी. पुढें आप मेला व जग बुडाला ! –भाव ८५.

आपण शेण खायचं नि दुसऱ्याचें तोंड हुंगायचं—आपण स्वतः एखादी वाईट गोष्ट करून ती दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करावयाचा, किंवा ती दुसऱ्यानें केली असावी असा संशय घ्यावयाचा.–संशयकल्लोळ १. ५.

आपण शेण खावुनु दुसऱ्या तोंडाक हातु पुसतो—(गो.) आपण शेण खायचं आणि दुसऱ्याच्या तोंडाला हात पुसायचा !

आपण सुखी, पसणें सुखी—(गो.) आपण सुखी तर जग सर्व सुखी.

आपण स्वस्थ बसणें, परक्या श्रम देणें—आपण स्वतः स्वस्थ बसावयाचें व दुसऱ्याला कष्ट द्यावयाचे, अशी कांहीं लोकांची आयतोबाची वृत्ति असते, तीस अनुलक्षून म्हणतात.

आपण हांसतों लोकाला, शेंबुड आपल्या नाकाला—पाठभेद–मी हंसें लोकाला नि शेंबुड माझ्या नाकाला. स्वतःच्या ठिकाणीं एखादा दुर्गुण असून तोच जर दुसऱ्यामध्यें दिसला तर आपण त्याला हंसतों. या हंसण्याला किंमत असत नाहीं. स्वतः शुद्ध राहून मग दुसऱ्यास नांवें ठेवावींत पाहिजे तर.

आपणा कळना, दुसऱ्यानें सांगिलें जायिना (साइना)–(गो.) स्वतःला कळत नाहीं, दुसऱ्यानें सांगितलेलें चालत (सहन होत) नाहीं.

आपणा जांगेवेली दोरी—(गो.) आपल्या मांडीवरील दोरी. (ल.) उघड न करतां येणारी गोष्ट.

आपणा पायांमुळांतु कुवाळें कुस्ता, दुसऱ्या पायांमुळांतु सास्त्रं सोत्ता—(गो.) आपल्या पायांखालीं कोहाळें कुजतें, आणि दुसऱ्याच्या पायांखालचीं शास्त्रें हुडकतों (पाहतों).

आपणा फाटि आपणें थापटा वांचि–(गो.) आपली पाठ आपणच थोपटावी. स्वयंप्रशंसा.

आपणाच्या पायाक बारा पोंती, दुसऱ्यांच्या किती ?—(गो.) मी हांसें लोकाला, आणि शेंबूड माझ्या नाकाला, याप्रमाणें.

आपणा लागे काम। वाण्या घरीं गूळ। त्याचें यातिकूळ। काय किजे ॥—आपल्या कामापुरतें आपण पाहावें. आपल्याला गूळ पाहिजे व तो वाण्याकडे आहे; तर त्या वाण्याची जातकुळी आपल्याला पाहाण्याचें कारण नाहीं, तो कसा कां असेना ! आपणाला त्यानें गुळ दिला म्हणजे झालें.– तुगा ३५८३.

आपणा म्हणवी जो शहाणा, तो पहिला मूर्ख जाणा—जो मनुष्य स्वतःच्या ज्ञानाची स्वतःच फुशारकी मारतो किंवा केवळ स्वतःलाच शाहाणा समजतो त्याची मूर्खांत गणना होते.

आपणाक नाक्का तीनि कास, उवाळुक जायि"स—(गो.) स्वतःला नकोत तीन पैसे पण ओवाळायाला पाहिजेत सहा. अप्रत्यक्षपणें स्वार्थ साधणें.

आपणालि प्रतिष्टा आपणें कर नये—(गो.) आपली प्रतिष्ठा आपण करूं नये. तु०–आपली आपण करी स्तुती। तो एक मूर्ख ॥–दा २.१.१२.

आपणावर पडलां म्हणजे बारा गाढवांचां बळ येतां—(कों.) एखादें काम आपलें असलें म्हणजे तें करण्यास आपण मोठ्या नेटानें लागतों. दुसऱ्याचें असलें म्हणजे टाळाटाळ करतों. जबाबदारी पडली म्हणजे शक्ति येते.

आपणावरून जग ओळखावें—आपणांस स्वतःस जशा निरनिराळ्या भावना वगैरे असतात, अडीअडचणी, सुखदुःखें वगैरे असतात तशाच इतर मनुष्यांसहि असतात, ही गोष्ट प्रत्येकानें लक्षांत ठेवावी. आत्मौपम्येन भूतेषु दयां कुर्वन्ति साधवः। वर आपण सुखी, आपण शाबूद० पहा.

आपणांस जें जें अनुकूल, तें तें करावें तात्काल—जी गोष्ट आपणांस हितकारक असेल ती त्वरित करावी. जें आपणाकडून होणें शक्य असेल तें तात्काल करून टाकावें.

आपणास झिजवावें, तेव्हां दुसऱ्यास रिझवावें—दुसऱ्यास संतोष द्यावयाचा म्हणजे स्वतःस कांहीं तरी झीज लागतेच. आपण दुसऱ्याकरितां श्रम घेतले व त्याच्या उपयोगी पडलों तरच त्यास आपल्याबद्दल कांहीं विशेष वाटणार, एरवीं नाहीं. वर पहा.

आपणासारिखे करिती तात्काळ—संत जे असतात ते आपल्याप्रमाणें दुसऱ्याला, त्यांच्या सहवासांत येणाऱ्याला साधुवृत्तीचे नीतिमान, व सात्त्विक करतात—असा मूळ अर्थ; पण व्याजोक्तीनें हें वचन वापरतात. दुर्जन, व्यसनी लोक दुसऱ्यास लवकरच आपल्याप्रमाणें वाईट बनवीत असतात. –तुगा.

आपणें मोरका स्वर्गु दिसका—(गो.) स्वर्ग पाहावयाला पाहिजे तर स्वतः मेलें पाहिजे. तु०–आपण मेल्याशिवाय०

आपत——**आपत आणि घातक**—[आपत=आप्त] १ आपल्याच आप्तइष्टांचा, नातलगांचा घात करणारा मनुष्य; माणुसकी नसलेला; कुलांगार. २ आपलेच दायाद आपणांस घातक होतात.

आपदा——**आपदि मित्रपरीक्षा।** —आपल्या मित्राला

आपल्याबद्दल मनापासून प्रेम वाटतें, किंवा वखर वाटतें याची कसोटी संकट काळींच लागते. जो आपणांस आपत्तींत साहाय्य करतो तोच खरा मित्र होय, बाकीचे सर्व तोंडपुजे होत. खऱ्या मित्राची परीक्षा संकट काळीं होते. जानीयात्संगरे भृत्यान्बांधवान्व्यसनागमे । आपत्कालेषु मित्राणि भार्यां च विभवक्षये --सुर १५५.९८. आपदि मित्रपरीक्षा शूरपरीक्षा रणांगणे भवति। विनये वंशपरीक्षा स्त्रियः परीक्षा तु निर्धने पुंसि ॥ -सुर १७०. ७५५.

आपना——**आपना घर दूरसे सुझता है**-आपलें स्वतःचे घर दुरूनहि ओळखूं येतें. म्हणजे आपण कोठेंहि असलों तरी घरची स्थिति पूर्ण माहीत असते. पाठभेद-आपना घर सौं कोससे दिखाई देता है.

आपना दाम खोटा, परखनेहारेको क्या बट्टा—आपलाच जर पैसा खोटा असेल तर त्यांत पारखणाऱ्याचा काय दोष. स्वतःचीच चूक असल्यामुळें जर आपलें नुकसान झालें तर त्याबाबत इतरांस दोष देण्यांत काय फायदा ? तु०-आपला दाम खोटा, वाण्याशीं झगडा.

आपना रख, पराया चख—आपलें स्वतःचें राखून ठेवावयाचें व दुसऱ्याची वस्तु लाटावयाची; आपलें राखावें, दुसऱ्याचें चाखावें ?

आपना वकर आपने हात है--[वकर=मान; प्रतिष्ठा; अब्रू.] आपला मान राखून घेणें आपल्याच हातांत असतें.

आपना वही जो आपने काम आवे—जो आपल्या उपयोगी पडतो तोच आपला समजावा.

आपनी आपनी तानमें चिडियाभी मस्तान—चिमण्या देखील स्वतःच्या गाण्यांत दंग असतात. जो तो आपल्या ठिकाणीं मस्त असतो.-पामो १२२. तु०-कुत्रा आपल्या गल्लींत शेर असतो.

आपनी और निभाय, बांकी वही जाने—आपण आपलें कार्य साधून घेतल्यावर बाकीच्या गोष्टींचें कांहीं का होईना; त्याची चौकशी आपणास कशाला.

आपने आपने ख्यालमें सबही मस्त है--जो तो आपल्याच विचारांत दंग आहे. 'आपनी आपनी तानमे०' पहा.

आपने गल्लीमे कुत्ताभी शेर है--आपल्या गल्लींत कुत्रा सुद्धां वाघाचें शौर्य आणतो. आपल्या योग्य स्थळीं असल्यावर एखादी दुर्बल व्यक्तीहि बराच पराक्रम करूं शकते. तु०- नक्रः स्वस्थानमासाद्य गजेन्द्रमपि कर्षति । स एव प्रच्युतः स्थानाच्छुनापि परिभूयते ॥ "जर्मनीला संभाळून घेण्याला इंग्लंडचा मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज हा मनांतून तयार होता. व प्रेसिडेंट विल्सननें तिऱ्हाईतपणें सुचविलेल्या नुसत्या चौदा मुद्यांत वस्तुतः जर्मनीला विशेष अपमानास्पद असें कांहीं नव्हतें. पण 'नक्रः स्वस्थानमासाद्य गजेंद्रमपि कर्षति' या न्यायानें म्हणा किंवा 'आपके गलीमे कुत्ता शेर' या न्यायानें म्हणा क्लेमॉंसोचा वरचढपणा गाजत होता."-केसरी २५-६-४०.

आपने छाचको कोयी खट्टा नहीं कहता—आपले स्वतःचे ताकाला कोणी आंबट म्हणत नाहीं. आपल्या गोष्टीला कोणी नांवें ठेवीत नाहीं.

आपने नयन गवांके दर दर मागे भीक--आपले डोळे मूर्खपणानें घालवून, अंधळा म्हणून भीक मागत हिंडावयाचें. आपले पैसे घालवून बसावयाचें व दारोदार भीक मागत फिरावयाचें.

आपने बछडयेके दांत कोसोंसे मालूम होते है—आपल्या वांसराचे दांत कोसावरून दिसतात. आपल्या घरचीं खटलीं आपणांस बाहेर असतांनाहि दिसत असतात. पाठभेद-आपने बछडेके दांत सब जानते है.

आपने रान खोले, आपही लाजू मरे—स्वतःचें अंग स्वतःच उघडें टाकावयाचें व आपणच लाजावयाचें, यांत काय अर्थ ? आपली अब्रू आपणच घालविणें. पाठभेद-आपनी टांग उघाडे आपही लाजों मरना.

आपला-ली-लें——**आपला, आपलासा म्हणणें-समजणें**-आत्मीय भाव ठेवणें; मित्रत्वाच्या भावनेनें वागविणें; स्वकीय वृत्ति प्रकट करणें.

आपला कान पिळून घेणें—एखादें काम करून तें फसलें म्हणजे पुन्हां तसें न करण्याचा निश्चय करणें; अद्दल घडणें; अनुभव ध्यानांत ठेवणें; मनांत पक्की खूण गांठ बांधणें; कानास खडा लावणें.

आपला तुपला—१ माझा व तुझा; स्वतःचा व परक्याचा; आपपर. २ आपला मालकीचा; स्वतःचा.

आपला पदर मोडून गुजराण करणें--स्वतःच्या खर्चानें राहणें; स्वतःवर अवलंबून असणें.

आपला बा गे ? आपला बा झों !--(अशिष्ट) आपलें काय जातें; त्यांत आपणांस पडण्याचें काय कारण, अशा अर्थी. कांहीं वेळां केवळ निरर्थक उद्गारवाचक म्हणूनहि वापरतात.

आपला भोग्या शिवणें--लंपडावांत आपण भोग्यास शिवलें म्हणजे आपणांवर डाव येत नाहीं. त्याप्रमाणें आपण

आपली जबाबदारी पार पडली किंवा आपल्या वांटणीचें काम केलें म्हणजे आपल्यावर दोष येत नाहीं.

आपला माणूस—प्रेमांतला माणूस; आप्तसंबंधी; स्वकीय.

आपला वेडगळ हेका पुढें ढकलणें, धरून बसणें—कोणत्याहि अयोग्य गोष्टीचा हट्ट धरून बसणें.

आपली तुंबडी भरणें—केवळ स्वार्थाकडें पाहणें; स्वतःचें हित साधणें.

आपली पोळी पिकाविणें—आपला मतलब तेवढा साधून घेणें; केवळ स्वार्थ साधणें.

आपली वाढवून खाणें—आपमतलबीपणानें आपलेंच घोडें पुढें दामटणें; केवळ आपल्याच हिताकडे पाहणें.

आपलीशी, आपलासा करणें—१ आपल्या वर्चस्वाखालीं आणणें; वश करून घेणें; आपणावणें. ' प्रपंच वैरी मारावा । अथवा आपलासा करावा । '—विपू ७·१४४. २ स्वतःचेंच घोडें पुढें दामटणें; पुन्हां पुन्हां मध्येंच बोलणें; स्वतःच्याच मनाप्रमाणें वागणें. ३ आपलें म्हणणें प्रस्थापित करणें; आपली सरशी करणें.

आपले गुण पाघळणें—स्वतःच एखादें दुष्कृत्य वगैरे करणें; आपल्या दुर्गुणांचें प्रदर्शन करणें; आपल्या मूर्खपणानें एखादें कार्य बिघडवून टाकणें.

आपलें घर भरणें—स्वतःची धन करून घेणें; स्वार्थ साधणें; अप्पलपोटेपणा करणें.

आपलें घोडें पुढें ढकलणें—आपलेंच काम तेवढें प्रथम घेणें; आपला स्वार्थ साधून घेणें. इतरांच्या पूर्वी आपला कार्यभाग साधून घेण्यास प्रवृत्त होणें; आपलेंच म्हणणें प्रथम पुढें मांडणें. ' जो तो आपलें घोडें पुढें ढकलून दुसऱ्याला हाणून पाडण्याचा यत्न करूं लागला. '—नामो. २८७. तु०— माझें घोडें जाऊं द्या पुढें !

आपलेंच घेऊन बसणें— नेहेमीं आपल्या मताप्रमाणें करणें; दुसऱ्याचें केव्हांहि न ऐकणें; दुसऱ्याच्या मताप्रमाणें केव्हांहि न करणें; आपला हट्ट चालविणें; हेकेखोरपणा करणें.

आपले पायांचा प्रताप—एखाद्यास आदरार्थी अथवा उपरोधात्मक योजावयाचा वाक्प्रचार. एखादी गोष्ट दुसऱ्याच्या साहाय्यानें किंवा त्याच्या प्रयत्नामुळें झाली असल्यास त्याचें श्रेय जें कांहीं बरेंवाईट असेल तें त्यास द्यावयाचें, याकरितां योजावयाचे शब्द. चांगलें झालें असल्यास त्याचे उपकार म्हणावयाचे, वाईट झालें असल्यास त्याचा पायगुण म्हणावयाचा.

आपल्या अंगीं बिऱ्हाड देणें—१ एखाद्या अनिष्ट गोष्टीस थारा देणें; दोषाचा वगैरे वांटेकरी होणें; अनिष्ट गोष्टीस प्रवेश देणें. २ एखादा रोग वगैरे बळावूं देणें. ' अंगीं बिऱ्हाड देणें ' पहा.

आपल्या आपण—स्वतः; आपसूक; स्वयंस्फूर्तीनें; दुसऱ्या कोणी न सांगतां.

आपल्या घरचा थोर-राजा—१ आपल्या घरीं जबरदस्तीनें व बाहेर नरमपणें वागणारा. २ दुसऱ्यावर विनाकारण वर्चस्व गाजवूं पाहणाऱ्यास म्हणतात. 'तो असेल आपल्या घरचा थोर, मला काय त्याचें. ३ हट्टी; हेकेखोर.

आपल्या जातीवर जायचाच—मनुष्याचा देहस्वभाव किंवा जातिगुण कधींहि बदलत नाहीं. कितीहि सुधारणा झाली तरी हा अंगीं चिरकालिक असतो, तो कधींहि पालटत नाहीं. तु०—आधीं होता वाघ्या इ.

आपल्या पागोट्याशीं भांडणें—प्रथम आपली चूक ओळखून मग दुसऱ्याला दोष लावावा.

आपल्या भोंवतीं दिवा ओवाळणें—वास्तविक दुसऱ्याच्या तोंडाभोंवतीं दिवे ओवाळावयाचे असतात; पण येथें स्वतःच स्वतःची प्रशंसा करणें, प्रौढी मिळविणें किंवा मानसन्मान घेणें. ' आपल्या भोंवती दिवा ओवाळणें हें मूर्खाचें काम आहे. म्हणून मी आपली प्रशंसा आपल्या मुखानें करीत नाहीं. '—शाब १·५७.

आपल्या सटीला जागणें—सटीच्या दिवशीं रात्रीं सटवी लहान मुलास झपाटून नेते म्हणून जागत बसण्याची चाल आहे. स्वतःची काळजी स्वतः घेणें.

आपल्या हातानें आपल्या पायावर धोंडा मारून घेणें—स्वतःच स्वतःचा नाश करून घेणें.

❀ **आपला अन्याय आपणांस दिसत नाहीं**—मनुष्याला दुसऱ्याची चूक चटकन लक्षांत येते तितकी स्वतःची येत नाहीं.

आपला अपराध चुकवावया, दुजावर घालूं नको वाया—स्वतःची चूक किंवा दोष लपविण्याकरितां तो दोष दुसऱ्यावर घालणें बरोबर नाहीं.

आपला अपराध वाटे, तर काळीज फाटे—(व.) आपलें करणें नेहमीं बिनचूकच असावयाचें असें आपणांस वाटतें. आपला अपराध झाला आहे असें खरोखर वाटतच नाहीं. कारण तसें वाटेल तर आपणांवर मोठी आपत्ति आल्यासारखें होईल व हिंमत खचेल. लोकांचे दोष तेव्हांच दिसतात, आपला मात्र कांहींहि नाहीं, असें प्रत्येकांस वाटतें. तसें न वाटेल तर मनुष्य सुधारेल.

आपला कोप परिहार, तोच रिपुसंहार—स्वतःचा राग

शांत करणें हाहि एक प्रकारचा शत्रूवर विजय मिळविण्यासारखा आहे. एखाद्यानें आपली आगळीक केली तर आपणांस फार राग येतो व आगळिक करणारा आपल्या शत्रूसारखा वाटावयास लागतो. परंतु आपण विवेकानें सर्व गोष्टींचा नीट विचार केला व मन शांत केलें तर आपली वृत्ति पालटल्याशिवाय राहात नाहीं व आगळीक करणाऱ्याबद्दल तितका संताप वाटत नाहीं. याप्रमाणें त्याबद्दल शत्रुत्वहि कमी होतें.

आपला गू आपणांस घाणत नाहीं—स्वतःचा दोष, स्वतः केलेली चूक स्वतःस दिसत नाहीं, किंवा त्याबद्दल कांहीं वाटतहि नाहीं. पण दुसऱ्यास तीपासून त्रास होण्याचा संभव असतो.

आपला तो कंठींचा दोरा, दुसऱ्याला म्हणावें पड खाड्यांत—मनुष्य आपल्या मुलाचे वगैरे लाड करतो, त्याला कंठांतल्या माळेप्रमाणें जपतो पण दुसऱ्याच्या मुलाची मुळींच पर्वा करीत नाहीं. त्याला संकटांत लोटावयास तयार असतो किंवा त्याकडे दुर्लक्ष करतो. 'आपला तो बाब्या ०' पहा

आपला तो बाळ्या (बाब्या) दुसऱ्याचें तें कारटें; आपला तो बाब्या लोकाचा तो भिकार डेंग; आपला तो माण्ला दुसऱ्याचा तो भिकार डेंग-मनुष्याला स्वतःच्या अपत्यासंबंधीं जें प्रेम वाटतें तसें दुसऱ्याच्याबद्दल वाटत नाहीं. मनुष्य स्वतःसंबंधी जी उदारबुद्धि व प्रेम ठेवतो, तें दुसऱ्यासंबंधी ठेवीत नाहीं. दुसऱ्याचें आपल्या सारखेंच असलें तरी तें वाईट दिसतें. उदाहरणार्थ, आपला स्वतःचा मुलगा असला म्हणजे त्याला बाब्या बाळ्या इत्यादि म्हणून त्याला लाडविण्यांत येतें, त्याच्या दोषांकडे किंवा अपराधांकडे काणाडोळा करण्यांत येतो. परंतु दुसऱ्याचा मुलगा तसेच अपराध करणारा असेल तर त्याला भिकारडेंग, भिकारडा इत्यादि अपशब्द बोलण्यांत येतात. तेव्हां ही पाहण्याची दृष्टि पक्षपाती असते.

आपला दाम कुडा, वाण्याशीं (कां करा) झगडा; आपला दाम खोटा, परक्याशीं झगडा मोठा—(कुडा = खोटा) स्वतः आणलेला पैसा जर खोटा असेल तर तो वाणी घेत नाहीं म्हणून त्याच्याशीं तंटा करण्यांत अर्थ नाहीं. 'कुडा आपुला दाम असतां पराशीं। वृथा भांडणें ख्यात हे गोष्ट कैशी ॥'—हरिराज मुद्गलाचार्यांचें भाषांतर ४७ (अकक).

आपला दोष आपणास वाटे, तर करणाराचें हृदय फाटे—'आपला अपराध वाटे०' पहा.

आपला दोष सोड, मग दुजाची खोड काढ—जो मनुष्य स्वतः दोषी असतो त्याला दुसऱ्याचे दोष काढण्याचा अधिकार नसतो, आधीं स्वतःची वागणूक सुधारावी आणि मग इतरांच्या ठिकाणीं असलेले दोष दाखविण्याचा खटाटोप करावा.

आपला नाश आपण न करावा—स्वतःच आपल्या पायावर धोंडा पाडून घेऊं नये.

आपला नाश संतोषानें कोणीच न करिती—कोणताहि मनुष्य स्वतःच्या नाशाची गोष्ट आनंदानें करीत नाहीं.

आपला भात, आंखडला हात—स्वतःची वस्तु असली म्हणजे मनुष्य बेतानें खर्च करतो. दुसऱ्याच्या बद्दल बेफिकीर असतो.

आपला स्वभाव आवरून धरी, नाहीं तर करील तुजवर स्वारी—आपण आपला स्वभाव आपल्या ताब्यांत ठेवला पाहिजे; म्हणजे आपले विकार आपल्या स्वाधीन पाहिजेत. नाहीं तर त्यांचा परिणाम आपणांस भोंवल्याशिवाय राहणार नाहीं.

आपला हात जगन्नाथ—१ पुरीस जगन्नाथाच्या देवळांत वाटेल तेवढा प्रसाद असतो व मिळतो. या वरून वस्तूची विपुलता व ती घेण्याचें स्वातंत्र्य या दोन गोष्टी दर्शवितात. स्वतःला घेणें स्वतःच्याचकडे असल्यावर कमी कोण घेईल. २ (कों.) संसार करण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणजे स्वावलंबन होय. 'आपला हात सोमनाथ' असाहि पाठभेद आहे.

आपली अब्रु, संभाळ गबरु—मनुष्यानें स्वतःची प्रतिष्ठा प्रथम स्वतःच सांभाळली पाहिजे.

आपली आपणास आगेना, दुसऱ्यास म्हणे नीट कां वागेना—स्वतःची बायको स्वतः नीट धाकांत ठेवतां येत नसतांना दुसऱ्याची बायको नीट वागत नाहीं म्हणून तक्रार करणें, हा मूर्खपणा आहे. आधीं स्वतःचें घर सांभाळावें व मग दुसऱ्याचे दोष काढावे.

आपली आवड, आपल्याला गोड—मनुष्याला स्वतःच्या आवडीनिवडी अगदीं समर्पक वाटतात (पण इतरांच्या तशा वाटत नाहींत.)

आपली इच्छा हुकमी धरी, ती ज्ञानवृद्धीपेक्षां बरी—पुष्कळ ज्ञान असून सुद्धां जर मनुष्य विकाराधीन होत असेल, त्याचा स्वतःच्या इच्छेवर ताबा नसेल तर त्यापेक्षां कमी ज्ञान असणारा पण आपल्या इच्छा आकांक्षा आपल्या ताब्यांत ठेवणारा मनुष्य अधिक चांगला.

आपली ओळख आपण धरतो, तो आपणाला तुच्छ मानतो—जो मनुष्य स्वतःला पूर्णपणें ओळखतो त्याचें स्वतःबद्दलचें मत स्वतःला श्रेष्ठ मानण्याकडे फारसें झुकत नाहीं.

आपली गाय, दूसऱ्याचे (परायाचे) वेल खाय—स्वतः दूध खाण्याकरितां गाय ठेवावयाची व ती शेजाऱ्याच्या वेली खावबून जगवावयाची किंवा पुष्ट करावयाची, हा आपमतलबी-

पणा चांगला नव्हे.

आपलींच नखें, आपणास विखें (होतात)—आपल्याच नखांनीं खाजवून आपणांस विखार होतो. त्याप्रमाणें पुष्कळदां आपलेच आतइष्ट वगैरे आपणांस त्रासदायक होतात, किंवा आपलींच कृत्यें आपणास बाधक होतात.

आपली चैन आणि दुसऱ्याचें भूस—मनुष्य स्वतःची चैन करून घेत असतां तीमुळें दुसऱ्याचें नुकसान होत असलें तरी तिकडे लक्ष देत नाहीं.

आपली जीब आपले दांत चावल्यारि कोपचें कोणाचेरि सांग ?—(गो.) आपल्या दांतांनीं आपली जीभ चावल्यावर रागवावें कोणावर? ‘आपलेच दांत, आपलेच ओठ’ पहा.

आपलीं तीं आपलीं, नाक कापलें तरीय आपलींच—(गो.) आपल्या माणसांनीं कितीही नुकसान केलें तरी तीं आपलींच होत.

आपलीं तीं पोरटीं, आणि दुसऱ्याचीं तीं कारटीं—‘आपला तो बाब्या० पहा.’

आपली देवता लंगडी पडली, तिथें काय इलाज—ज्याच्या आधारावर अवलंबून आपण एखादी मोठी गोष्ट करावयास लागावें तोच आधार जर दुर्बल ठरला तर आपणांस त्या कार्यांत यश कसें येणार ?– टि. १·४२५. तु०—आपलाच दाम खोटा०

आपली नुकसान कोणीं केली, तर ती न उगवावी ती चांगली—दुसऱ्यानें आपणांस अपकार केला तरी त्याबद्दल मनांत सूडबुद्धि न बाळगणें हें चांगलें. अपकाराची फेड अपकारानें करूं नये.

आपली पत घालवितो, तो जिवंत असून मेला दिसतो—मनुष्याला व्यवहारामध्यें प्रत्यक्ष पैशापेक्षांहि पतीचा अधिक उपयोग होतो. पण जो पत घालवितो त्याला कोणत्याहि प्रकारें जगांत व्यवहार करणें अशक्य होतें. तो पुढें जगून सुद्धां मेल्यासारखा होतो.

आपली पाठ आपणांस दिसत नाहीं—१ आपले स्वतःचे दोष आपल्यास दिसत नाहींत. २ आपल्यामागें लोक आपणाविषयीं काय म्हणतात तें कळत नाहीं.

आपली फाटि आपणाक दिसना—(गो.) वरीलप्रमाणें.

आपलीं पापें आणि कर्ज, मनीं अधिक समज—आपल्या वाईट गोष्टी आणि उसनवारी आपण समजतों त्यापेक्षां जास्त असतात. त्यांबद्दल आपणांस योग्य जाणीव असली पाहिजे.

आपली प्रतिष्ठा सांगावी, तीच अप्रतिष्ठा म्हणावी—मनुष्यास स्वतःची प्रतिष्ठा स्वतः सांगण्याची वेळ यावी या गोष्टींतच त्याची खरोखर अप्रतिष्ठता आहे. आत्मप्रशंसा करणें हा दोष आहे व तशी पाळी आपणांवर येणें ठीक नव्हे.

आपली फजिती आणि जगाला हंसें; आपली फजिती, दुसऱ्याचें हंसें—एखादी गोष्ट करतांना स्वतःची फसगत झाली असतां व ती आपल्याच मूर्खपणानें झाली असतां साहजिकच लोक हंसतात, कोणी सहानुभूति दाखवीत नाहीं. तेव्हां अशी वेळच येऊं देऊं नये हें चांगलें. तु०—आपली हानि जगाची मरमर.

आपली भाकरी पण आड करून खावी—आपण जरी आपलेंच अन्न खात असलों तरी तें लोकांसमोर खाण्यापेक्षां एका बाजूला बसून खाणें चांगलें. आपल्या वैभवाचें अगर आपली जी कोणती स्थिति असेल तिचें विनाकारण जगापुढें प्रदर्शन करण्यांत काय फायदा ? त्यामुळें मत्सर उत्पन्न होतो. तेव्हां नम्रपणें आपण आपल्या ठिकाणीं तिचा उपभोग यथेच्छ घ्यावा.

आपली मांडी उघडतां आपणांसच लाज वाटते; आपली मांडी उघडी केल्यास आपलीच लाज जाते—शब्दशः अर्थ स्पष्ट आहे. लाक्षणिक अर्थानें, आपण ज्या कुटुंबांत, संस्थेंत वावरत आहों, ज्या कार्यांत भाग घेत आहों, त्यांतील दोष परकीयांना दाखविण्यांत आपण संस्थेबरोबर स्वतःचीहि इभ्रत गमावीत असतों. कारण संस्थेबरोबरच तीं चालविणारे–तिच्यांत वावरणारेहि नालायक ठरत नाहीं काय ? तु०—आपने रान खोले, और आपही लाजू मरे.

आपली सांवली आपल्या पायांमुळा—(गो.) आपली सावली आपल्याच पायाखालीं ! आपण जेथें जाऊं तेथें आपल्या कृत्यांचे परिणाम ठेवलेलेच.

आपली हानि (हाण), जगाची मरमर—[मरमर = उपहास, टवाळी] आपलें नुकसान होतें तें होतेंच, पुन्हां इतर लोक आपली टवाळी करतात तें निराळेंच. म्हणजे दुहेरी संकट. वाईट कृत्यांत आपण जर बुडालों तर कोणाचीहि सहानुभूति आपणांस मिळत नाहीं. आपलें नुकसान होऊन उलट छीथू पत्करावी लागते.

आपली हानि व दुसऱ्याचें हसूं—वरील प्रमाणेंच.

आपलें अनहित करून, दुसऱ्याचें प्रसन्न न करी मन—स्वतःचें नुकसान करून दुसऱ्यास संतुष्ट करण्याचा प्रयत्न करूं नये.

आपलें अन्न खायचें आणि गांवच्या (दुसऱ्याच्या) उठाठेवी करावयाच्या—स्वतःचें अन्न खाऊन लष्करच्या भाकरी

भाजणें. स्वतःचें घरचें खाऊन इतर लोकांच्या भानगडींत गुंतून घेणें चांगलें नव्हे. त्यामुळें स्वतःला त्रस लागल्याशिवाय रहात नाहीं.

आपले अपराध स्मर, (तेणें) दुसऱ्याचे विसर--मनुष्यानें दुसऱ्याच्या दोषांपेक्षां स्वतःच्या दोषांकडे लक्ष्य ठेवणें अधिक श्रेयस्कर.

आपले आईला कोणीही डाकीण म्हणत नाहीं--मनुष्याला स्वतःची आई कितीहि कुरूप वगैरे असली तरी चांगलीच दिसते. तु०--कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति।

आपलें आपल्याला वाणी, जग देतें गाऱ्हाणीं--इतर मनुष्यांनीं कितीहि तक्रारी केल्या तरी मनुष्य स्वतःच्या मुलाची अगर आप्ताची स्तुतिच करीत असतो. स्वकीयाचे दोष जगाला दिसत असले तरी स्वतःला दिसत नाहींत. स्वतः आपल्या गुणांबद्दल तारीफ करीत असावयाचें पण बाहेर पहावें तों सर्व लोकांच्या कागाळ्या असावयाच्या.

आपले उकिरड्यावर कोंबड्याचा अभिमान--कोंबड्याला ज्याप्रमाणें आपल्या उकिरड्याबद्दल अभिमान वाटतो त्याप्रमाणें प्रत्येक मनुष्याला स्वतःच्या घराबद्दल वगैरे अभिमान वाटतो; मग तें कितीका भिकार घाणेरडें वगैरे असेना. Every cock is proud on his own dunghill--सवि ९३०.

आपलें काम आणि देवाचें नांव--देवाकरितां म्हणून एखादी गोष्ट बाह्यतः करीत असावयाचें पण खरा हेतु त्यांत आपला स्वार्थ साधावयाचा असतो. उदाहरणार्थ देवाकरितां गोड नैवेद्य करून देवाला दाखवून आपण खावयाचा कारण देव कांहीं खात नाहीं. देवाचा उत्सव, देवळाचा जीर्णोद्धार वगैरे निमित्तानें द्रव्य जमा करून आपलें घर सुधारून घ्यावयाचें; हे प्रकार नित्य चालू असतात.

आपलें काम आपण करणें, दुसऱ्यावर चित्त न देणें--स्वतःचें काम स्वतःच करावें हें बरें; दुसऱ्यावर अवलंबून राहाण्यांत अर्थ नाहीं. स्वावलंबन हा सर्वांत सरळ मार्ग आहे.

आपलें कार्य, आपल्याला प्रिय--ज्याचें काम त्याला फार आवडतें, व तेंच सर्वांत चांगलें असें तो मानतो.

आपलें खाऊन (जाऊन) आपण चोर; आपलें जावें, आपण चोर व्हावें--पुष्कळ वेळां आपलें सरळ कृत्यहि लोकांस अपकृत्य वाटूं लागतें, लोकांना आपल्या वागण्याचा विनाकारण संशय येतो, तेव्हां म्हणतात.

आपलें खाय, शेजाऱ्याचा धाक वाहाय; आपले खावें पण दुसऱ्यास भ्यावें--आपल्या पदरचें खाऊन दुसऱ्याची भीति बाळगणें. आपण जरी स्वतःच्या घरचेंच खात असलों तरी शेजाऱ्यापुढें आपल्या वैभवाचें प्रदर्शन करूं नये. त्यामुळें त्याला विनाकारण हिणविल्यासारखें होतें व त्याचा मत्सर जागृत होतो व पुढें मागें आपणांस तो बाधक झाल्याशिवाय रहात नाहीं. तु०--आपली भाकरी०पहा.

आपले खावे वाल, दुसऱ्याकडून तोडून (तोलून) घ्यावे गाल--स्वतःचें खाऊन विनाकारण दुसऱ्याकडून वाईटपणा घेण्यास कारण होऊं नये.

आपलें खुळें तर (रहावें) रडावें, दुसऱ्याचें खुळें तर हंसावें--मनुष्य आपलें मूल वेडें निघालें तर गप्प बसतो किंवा दुःख करीत बसतो, परंतु तेंच दुसऱ्याचें मूल वेडें असलें म्हणजे त्याचा उपहास करतो.

आपलें गमवूं नये, दुसऱ्यावर दोष ठेऊं नये--आपली वस्तु नीट सांभाळावी, ती हरवेल अशा तऱ्हेनें इकडे तिकडे टाकूं नये; म्हणजे दुसऱ्यावर विनाकारण अपहार केल्याचा वगैरे दोषारोप करण्याची वेळ येणार नाहीं. 'आपलें सांभाळावें व दुसऱ्याला यश द्यावें' पहा.

आपले गरजे, गाढव राजे--आपली नड असली म्हणजे गाढवाला सुद्धां आपण राजाप्रमाणें मोठेपणा द्यावयास तयार होतों. तु०--अडला नारायण गाढवाचे पाय धरी.

आपलें गुह्य ज्यास सांगतो, त्याचा दास होऊन बसतो--जो मनुष्य आपलें एखादें गुप्त व्यंग दुसऱ्यास सांगतो तो त्याच्या कायमचा आहारीं जातो. कारण तो तें गुह्य फोडील अशी त्याला कायमची भीति वाटूं लागते व त्याला खूष करण्याची धडपड करीत असतो.

आपलें घर आपल्याला दुरून दिसतें; आपलें घर बारा कोसांवरून दिसतें--स्वतःचें घर मनुष्याला इतकें परिचित असतें कीं तें दूर अंतरावरूनहि ओळखूं येते. याप्रमाणें आपल्याला प्रिय असलेल्या वस्तूचा परिचय दृढ असतो व तो अंतरानें कमी होत नाहीं. आपल्या घरची परिस्थिति मनुष्य कोठेंहि असला तरी विसरत नाहीं.

आपलें घर, हगून भर--आपलेंच आहे म्हणून आपल्या वस्तूची खराबी करणाराबद्दल ही म्हण वापरतात. स्वतःच्या मालकीची जागा, पदार्थ असला तरी तो नीट वापरला पाहिजे स्वच्छ ठेवला पाहिजे. आपली आपण काळजी घेतली पाहिजे.

आपलें घर हागून भर, दुसऱ्यांचें घर थुंकू जड--(गो.) आपल्या घरीं वाटेल तसा गोंधळ घातला तरी चालेल

पण दुसऱ्याच्या घरीं थुंकतांना सुद्धां सावधगिरी बाळगावी.

आपले घरचा खटला, दुरून कळतो मनाला--आपल्या घराबद्दलची हकीकत दुरूनहि कळते. आपलें घर बारा कोसांवरून दिसतें.

आपले घरापुरती, मूर्खाची समजुती—मूर्ख मनुष्याला आपल्या घराबाहेरचें कांहीं दिसत नाहीं, किंवा समजत नाहीं. त्याची दृष्टि फार आकुंचित असते.

आपलेच दांत, आणि आपलेच ओंठ--आपलींच माणसें व आपणच शिक्षा करणार! आपल्याच घरांतलीं कुलंगडीं आपल्याला बाहेर दाखवून शिक्षा करतां येत नाहीं. ' आपुली जिव्हा आपुले दांतीं। रगडिली होय अवचिती। तया कोपाची अति प्राप्ति। कोणाप्रती करावी ॥'– एभा २३'७७८.

आपलेच दांत, आपलेच घशांत (पडतात)—स्वतःच्या कृत्यांचा परिणाम स्वतःसच भोगावा लागतो.

आपलें चेडुं नक्षत्तर, पेल्यालें म्हारापोर—(गो.) आपली मुलगी नक्षत्रासारखी, पलिकडची (शेजाऱ्याची) महार-मांगाच्या मुलीसारखी ! 'आपला तो बाब्या० ' पहा.

आपलें जावें, आपण चोर व्हावें—आपली वस्तु हरवली असतां ती हरवली असा बोभाटा करणेंहि एखादे वेळीं अप्रशस्त व चुकीचें ठरतें. भोंवतालचे लोक त्याचा विपर्यास करून आपणालाच लबाड ठरवितात. अशा वेळीं चोरीबद्दल कांहीं न बोलतां कांहीं झालें नाहीं असें दाखविणेंच शहाणपणाचें ठरतें.

आपले जिवाहूनी, वस्तु अधिक मानी—कांहीं लोक एखादी वस्तु आपल्या प्राणापेक्षांहि प्रिय मानतात. त्यांस ती खरोखर प्रिय असते किंवा ते कृपण असतात. तु०—चमडी देएंगा पण दमडी नही देएंगा.

आपलें ठेवायचें झांकून, दुसऱ्याचें पाहायचें वांकून—आपलीं गुह्यें गुप्त ठेवून दुसऱ्याचीं जाणण्याची खटपट करावयाची. आपलीं बिंगें लपवून दुसऱ्याचीं बाहेर काढण्याचा प्रयत्न करावयाचा. आपलें व्यंग दुसऱ्यापासून चोरून ठेवून दुसऱ्याचें मात्र पाहाण्याची खटपट करावयाची, हा स्वभाव फार वाईट. जसें आपल्याला वाटतें तसेंच दुसऱ्यालाहि वाटतें, ही भावना ठेवून दुसऱ्याशीं वागावयास पाहिजे.

आपलें ताक जाल्लें तरी दुसऱ्या माडया मुळांतु (बागलांतु) पीवु नयें—(गो.) आपलें स्वतःचें ताक झालें तरी दुसऱ्याच्या माडाखालीं (दारांत) पीऊं नये. आपलेंच खावें पण गुपचूप खावें.

आपलें तें गोजिरवाणें, लोकाचें तें लाजिरवाणें—मनुष्यास स्वतःचें मूल गोजिरवाणें दिसतें. पण इतरांचें घाणेरडें वाटतें. स्वतःच्या मुलाबद्दल प्रेम व दुसऱ्याच्या मुलाबद्दल तिरस्कार, हा प्रकार सर्वत्र दिसून येतो. 'आपला तो बाब्या' इ० पहा. तु०—Every man thinks his geese swans.

आपलें तें न राखवे, दुसऱ्याचें तें न देखवे—एखादा मनुष्य स्वतःची संपत्ति सर्व उधळून टाकतो व इतरांच्या वैभवाबद्दल त्याला हेवा वाटतो.

आपलें तें बापडें, दुसऱ्याचें तें कातडें (कारटें)—वर 'आपलें चेडुं ' पहा.

आपलें तें मापलें, दुसऱ्याची पायली; आपलें तें मापलें, दुसऱ्याचें तें दुपायलें--[मापलें=बोळकें; पायली=चार शेरांचें मोठें मापाचें भांडें; दुपायलें=दोन पायलीचें माप, भांडें] आपली वस्तु ती दुसऱ्याच्या सारखीच असली तरी फार नाजूक दिसते व दुसऱ्याची बेडौल, भसांडी अशी वाटते. म्हणजे आपलें तें चांगलें दुसऱ्याचें तें वाईट असा दृष्टिकोन.

आपलें तें हा हा, दुसऱ्याचें तें हीः हीः--मनुष्य स्वकीयाला नावाजीत असतो व परक्याची थट्टा किंवा उपहास करीत असतो.

आपलें तोंड आपल्यास आरशावांचून दिसत नाहीं—आपले स्वतःचे दोष आपणांस दुसऱ्यानें दाखविल्याशिवाय लक्षांत येत नाहींत.

आपलें दुःख विघ्नासमान, दुसऱ्याचें दुःख लग्नासमान—'परदुःख शीतल' पहा.

आपले द्या आणि पांचांत न्या—आपलें खर्चून दुसऱ्याकडे तंटा घेऊन जाणें.

आपलें नकटें आणि लोकांचें चोखटें--कांहीं लोकांस स्वकीयांबद्दल नावड व परकीयांबद्दल प्रीति असते. कांहीं लोक स्वतःच्या मुलांना जवळ घेत नाहींत पण दुसऱ्याची खुशामत करण्याकरितां त्याच्या मुलांचे लाड करतात, अशावेळीं त्यांचेबद्दल ही म्हण वापरतात. विशेषतः स्त्रिया आपल्या पतीबद्दल असूया बाळगीत असल्यास व तो दुसऱ्या स्त्रीच्या मुलांशीं सलगी करीत असल्यास ही म्हण योजतात.

आपलें नकटें आणि लोकाचें चोखटें बरोबर आहे—आपलें मूल नकटें असलें तरी चांगलें दिसतें व दुसऱ्याचें सुंदर असलें तरी आपलें सरासरीच वाटतें.

आपलें नाक कापून दुसऱ्यास अपशकून—दुसऱ्याचें वाईट करण्यासाठीं प्रथम स्वतःचें वाईट करून घ्यावयाचें.

आपलें नाणें खोटें मग दुसऱ्याचा वांक कां काढावा—

एखाद्या गोष्टींत स्वतःचीच चूक असतांना दुसऱ्याला दोष देण्यांत अर्थ नाहीं. आपण जर पूर्णपणें निर्दोषी असूं तरच कोणत्याहि चुकीबद्दल दुसऱ्याला दोष देण्याचा आपणांस हक्क पोंचतो. स्वतःकडे जर दोषाचा वांटा येत असेल तर दुसऱ्याचा उणेपणा काढणें गैर आहे.

आपलें नासे, जग हांसे—'आपली हानि जगाची मर मर' पहा.

आपलें नाहीं धड आणि शेजाऱ्याला (चा) कढ—स्वतःचें घर नीट नसतां शेजाऱ्याला मदत करण्याकरितां धावणाऱ्यास म्हणतात. आधीं आपल्या येथील भांडणें वगैरे मिटवावीं, स्वतः नीटनीटकें राहावें व मग इतरांचा कैवार घेण्यास जावें.

आपले पंख चांगले, ऐसें म्हणती कावळे—कावळ्यांचे पंख काळे कुळकुळीत असले तरी त्यांना ते चांगलेच वाटतात. त्याप्रमाणें मनुष्यास स्वकीय गोष्ट कशीहि असली तरी ती उत्तमच वाटते.

आपले पदवीप्रमाणें, सर्व गुंतले असती क्रमानें—सर्व मनुष्यांस त्यांच्या त्यांच्या मानानें आपत्तींतून हें जावें लागतेंच. मोठयांचीं दुःखें मोठीं, लहानांचीं लहान, एवढेंच.

आपलें पागोटें कांखेंत मारून मग दुसऱ्याच्यास हात घालावा; आपलें पागोटें सांभाळणें—मनुष्यानें प्रथम स्वतःची काळजी घ्यावी, आपलें घर सांभाळावें व मग इतरांचें लुबाडण्याचा प्रयत्न करावा. नाहींतर दुसऱ्याचें मिळण्याचें दूरच राहून स्वतः जवळचें गमावण्याचीच वेळ यावयाची. पूर्वी डोक्यावरील पागोटें सांभाळणें हें एक कामच असे. त्यावेळीं पागोटें फार मोठें असून अंगाला जरा धक्का वगैरे लागला असतां खालीं पडून मोडलें जाई व पुन्हां बांधण्यास मोठा त्रास व खर्च पडे.

आपलें पान धरचें, आपणें जेवचें—(गो.) आपलें पान धरावें आणि आपण जेवावें.

आपले पान धुवचें, आपुन जेवचें—(गो.) आपलें पान धुवून आपण जेवावें; म्हणजे दुसऱ्याच्या उठाठेवी करूं नये, स्वतःपुरतें पाहावें. गोव्याकडे हिंदू माणूस आपलें जेवणाचें पात्र स्वतः धुतो, नंतर त्यावर त्याचें जेवण वाढलें जातें.

आपले पायांवरती, कुऱ्हाड मारून घेती—मनुष्यानें स्वतःचें नुकसान स्वतःच करून घेतलें म्हणजे म्हणतात.

(ज्याचें त्यानें) आपलें पाहावें—ज्यानें त्यानें स्वतःची काळजी घ्यावी. इतरांच्या भानगडींत पडूं नये व स्वतःचा भार दुसऱ्यावर टाकूं नये.

आपले बळें घालावी कांस, कोणाची न धरावी आस—मनुष्यानें स्वतःच्याच बलावर अवलंबून असावें व स्वतःचें रक्षण स्वतःच करण्याचा प्रयत्न करावा; दुसऱ्याच्या मदतीवर अवलंबून असूं नये. विशेषतः स्त्रियांनीं स्वतःचें मन खंबीर ठेवावें व स्वतःची अब्रू स्वतः सांभाळण्याचा निश्चय व प्रयत्न करावा; दुसऱ्याच्या साहाय्याची अपेक्षा करूं नये.—भाच ११४.

आपलें बाळगून ठेवावें, दुजाजवळ न मागावें—आपल्या वस्तू आपण नीट जतन करून ठेवल्या म्हणजे वेळेवर उपयोगी पडतात, व दुसऱ्याजवळ मागण्याची पाळी येत नाहीं.

आपले बेतानें राहणें, पुढील प्राप्तीवर न जाणें—जें आपणाजवळ असेल त्यांत हांत राखून खर्च करावा हें चांगलें. पुढें आपणांस पुष्कळ प्राप्ति होणार आहे या आशेवर उधळ माधळ करूं नये.

आपलें मत विचारल्याविना देऊं नये—कोणीहि आपल्याला विचारल्याशिवाय त्यास आपली बुद्धि देऊं नये अगर सल्ला सांगूं नये. नाहींतर तिची किंमत राहात नाहीं व अवगणना होण्याचा संभव असतो. तु०—नापृष्टः कस्यचिद्ब्रूयान्नचान्यायेन पृच्छतः। जानन्नपिहि मेधावी जडवल्लोक आचरेत् ॥—सुर १६७·६१०.

आपलें मन जिंकी, तो धन्य म्हणावा लोकीं—जो मनुष्य स्वतःचें मन ताब्यांत ठेवतो तो जगांत धन्यता पावतो.

आपलें मन स्वाधीन नाहीं, बंधनीं तो कदां न राही—ज्याचें मन त्याच्या ताब्यांत नाहीं, तो कोणतेहि निर्बंध पाळणें शक्य नाहीं. त्याचें वर्तन स्वैर व्हावयाचें हें निश्चित. पाठभेद—' आपले मन स्वाधीन नाहीं, बंधनीं तो सदा राही. '—सवि २४८८.

आपले मनाचा जो धनी, तोच धनी खरा जनीं—ज्यानें आपल्या मनावर विजय मिळविला तोच खरोखर जगांत श्रेष्ठत्व पावतो.

आपले मनांतील गोष्ट, करूं नको सर्वां प्रगट—आपल्या मनांतील गुप्त गोष्ट बाहेर फोडूं नये.

आपले मांडी (गांडी) खालचें गेलें, मग त्यावर एक बसोत कीं दोन बसोत—आपण आपलें घोडें विकून टाकल्यावर, आपल्या हातचें तें गेल्यावर मागून त्याच्यावर एकजण बसेल कीं अनेक बसतील याची काळजी करण्यांत काय अर्थ. आपल्या हातांतून एखादी गोष्ट निघून गेल्यावर तिचें पुढें काय होईल याची चिंता करणें व्यर्थ होय.

आपले मालाचें वर्णन, करीत असती सर्वजन—जो तो आपल्या वस्तूची प्रशंसा करीत असतो. तु०—Every cook praises his own broth.

आपलें मूल आणि दुसऱ्याची बायको चांगलीं दिसतात—मनुष्यस्वभाव असा आहे कीं, त्याचें आपला मुलगा कसाहि असला तरी त्यावर प्रेम असतें पण तितकें प्रेम स्वतःच्या बायकोवरच्च कांहीं काळाच्या सहवासानंतर राहात नाहीं. अतिपरिचयामुळें स्वतःच्या बायकोचें सौंदर्य लक्ष्यांत न येतां शेजाऱ्याची किंवा दुसरी एखादी स्त्री अधिक सुंदर आहे असें वाटूं लागतें. अपत्यप्रेम हें स्थिर राहूं शकतें तितकें स्त्रीप्रेम राहात नाहीं.

आपलें म्हणायला कुणीच उरलें नाहीं--एखाद्या असहाय, निराश्रित, आप्तेष्ट नसलेल्या मनुष्याबद्दल योजतात.

आपलें म्हणटरिच दुसरें ना—(गो.) आपलें म्हटल्यावर दुसऱ्याचें नव्हे. स्वकीय मानल्यानंतर परकीपणा नाहीं.

आपलें वचन भंग करिती, तैसे लोक त्याशीं आचरती—जो मनुष्य स्वतःचें वचन पाळीत नाहीं त्याला दिलेलीं वचनें इतर लोकहि पाळीत नाहींत. लोक जशास तसें वर्तन करतात.

आपलें वांगें भाजण्यासाठीं दुसऱ्याचें घर जाळणें--आपलें वांगें भाजावयाचें आहे, त्यासाठीं विस्तव हवा नि तेवढ्यासाठीं दुसऱ्याचें घर जाळून त्या आगींत वांगें भाजणें. तात्पर्य, आपल्या अल्प फायद्यासाठीं, सोईसाठीं इतरांचें अपरिमित नुकसान करणें, ही नीचवृत्ति.

आपलें वासरूं दुसऱ्याचे गाईस प्यालें तर प्यालें--स्वतःच्या वस्तूबद्दल जागरूक पण दुसऱ्याच्या वस्तूबद्दल बेफिकीर अशा वृत्तीच्या माणसास अनुलक्षून ही म्हण योजतात. तु०—आपली गाय परायाचे वेल खाय.

आपलें व्यंग लोकांस सांगणें, हेंच शत्रूस आनंद करणें--आपलें व्यंग दुसऱ्यास सांगण्यापासून आपल्या शत्रूस मात्र फायदा मिळतो.

आपले शत्रूपासून, राहावें राजानें भिऊन—राजानें नेहमीं आपला शत्रु मग तो लहान असो कीं मोठा असो त्याला भिऊन वागावें. शत्रु लहान म्हणून त्याची उपेक्षा करूं नये. कारण लहानाचेंच हळू हळू मोठे होण्याचा संभव असतो. वरील म्हण पुरी नाहीं. सबंध अशीः—' आपले शत्रूपासूनी, राहावें राजानें भिऊन, सदा सावध राहावें, भिऊन आर्जव्या पाळावें.' म्हणजे राजानें आपल्या शत्रूप्रमाणेंच खुषमस्कऱ्या मित्रांनाहि भ्यालें पाहिजे. —सवि २२७.

आपले सत्यानें, सदा भिऊन वागणें— आपल्या मनाशीं आपण योग्य तेंच करीत आहों अशी खातरी करून घेऊन मनुष्यानें आचरण ठेवावें.

आपलें सांभाळावें व दुसऱ्यास यश द्यावें—दुसऱ्यांच्या घरीं किंवा त्यांच्या सहवासांत आपण गैरशिस्त व अव्यवस्थित वागल्यावर आपलें जें नुकसान होतें त्याचा दोष दुसऱ्यावर येत असतो. हा त्यांना वास्तविक अन्याय होतो. तेव्हां आपणच आपली चीजवस्तु सांभाळून ठेवली तर सर्वांसच बरें.

आपले सांवळेक आपुण भियेता—(गो.) आपल्याच सावलीला भिणें. फार भिणें चांगलें नव्हे याअर्थीं. एखादा मनुष्य अतिशय भितरा असतो. तो इतका कीं, स्वतःच्या सावलीलाच तो भिऊं लागतो. अशा मनुष्याबद्दल ही म्हण योजतात.

आपले सामर्थ्यावरी उडी मारूं नको—मनुष्यानें आपल्या शक्तीची फार घमेंड बाळगूं नये. पाठभेद—' आपलें सामर्थ्यावर, उडूं नको कधीं तर '—सवि ३०१०.

आपले स्तुतीचा डंका, आपला आपण वाजवूं नका—मनुष्यानें स्वतःची स्तुति स्वतःच करूं नये. 'आपण आपली स्तुती करी तो मूर्ख।'—दा २.१.१२.

आपले हातानें आपले पायावर दगड पाडून घेणें; आपले हातानें आपला नाश करणें—स्वतःच स्वतःचें नुकसान करून घेणें. मागें पहा.

आपले हातीं, धुळीस मिळती—वरीलप्रमाणें.

आपले हातीं माखतो, दुसऱ्यास पुसायास सांगतो—स्वतः घाण करावयाची व दुसऱ्यास निस्तरण्यास सांगावयाची, असा प्रकार दाखविण्यास ही म्हण योजतात.

आपलें हित करावें, दुसऱ्याचें केलें म्हणावें—आपलें हित साधून दुसऱ्याचें थोडें तरी हित करीत असावें. तु०—Two words for yourself and one for another याचा अनुवाद.—सवि ३८८२. सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थाविरोधेन ये। —नीति ६४.

आपले हितातें पाहतो, तो आर्जवी असतो—१ ज्या मनुष्याला आपला मतलब साधावयाचा असतो तो बोलतांना अत्यंत नम्रपणा धारण करतो. २ आत्मगौरवामुळें मनुष्य आत्मश्लाघेला बळी पडतो. तु०—Self love is the greatest flatterer in the world.—सवि २९९२.

आपलो कोयतो दातार बसल्यार नाल्लाक कित्याक गाळी—(गो.) नारळ फोडतांना आपलाच कोयता आपल्या दातावर बसल्यास नारळाला शिव्या कां? आपल्या निष्काळजीपणाचा दोष आपल्याकडेच.

आपलो पाय आपल्या माथ्यार—(गो.) स्वतःचा पाय स्वतःच्या डोक्यावर चढणें; हाताखालच्या हलक्या माणसांनीं वर-

चढ होणें. तु०-धन्याचें नांव गण्या, चाकराचें नांव रुद्राजीबुवा

आपलो भेस सुण्याक दिवन सुण्याचो भेस आपणें घेतल्यार जाता ?—(गो.) आपला पोषाख कुत्र्याला घालून कुत्र्याचा आपण घातला तर तो हास्यास्पद होणार नाहीं का ? स्वतःचा दर्जा सोडून हलक्या लोकांप्रमाणें वागूं नये.

आपलो वरु (दुड्डु) खोटो जाल्यारि चिनवाराक इत्यारड का ?—(गो.) आपला पैसा खोटा झाल्यावर नशिबाला कशाला रडावें ? तु०-आपलाच दाम खोटा...

आप्लॅं पाया बगले किर्तें ज्यूटा तँ खबरना—(गो.) आपल्या पांयाखालीं काय जळतें तें माहीत नाहीं. स्वतःचे दोष स्वतःस दिसत नाहींत.

आपल्या अधिकारीं, करावी उपासनेची थोरी—आपण आपल्या योग्यतेप्रमाणें आपल्या उपास्यदेवतेचें श्रेष्ठत्व स्थापन करावें.

आपल्या अन्नांत आपण माती कालविणें—स्वतःच स्वतःच्या नाशास कारण होणें.

आपल्या अळवाची खाज आपणांस ठाऊक—आपलें व्यंग आपणच नीट जाणून असतों, तेव्हां तें लक्ष्यांत घेऊन वागलें पाहिजे.

आपल्या आत्म्याचें तारण, ईश्वरानें केलें आपल्या स्वाधीन—स्वतःची उन्नति करून घेणें स्वतःच्याच हातांत असतें. 'उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् । आत्मैवह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥ —गीता ६.५.

आपल्या कानांत बोटें घातलीं असतां धडधड असा आवाज होतो तो कसला ? तर रावण जळत आहे त्याचा—रावणाची पूर्वीं एवढी भीति पडली होती कीं, तो लोकांच्या प्रत्येक व्यवहारांत दिसत होता. " हा ओढा कीचकाचे वधामुळें त्याच्या हृदयांतून रक्त निघालें त्याचा अद्यापपर्यंत वाहत आहे, असें सांगतात. ' आपल्या कानांत०-ही जशी म्हण पडली आहे तसेंच हें. "-माझी तीर्थयात्रा भाग ४ पान २०६.

आपल्या कानीं सात बाळ्या—कानांत सात बाळ्या घात त्यावर कानाचें भोंक बंद होऊन ऐकूं येत नाहीं. यावरून एखाद्या वाईट कृत्यांत आपलें मुळींच अंग नाहीं असें दाखविण्यासाठीं योजतात. लहान मुलें बहुधा एखाद्या गोष्टीशीं आपला मुळींच संबंध नाहीं असें दाखविण्यासाठीं म्हणतात. ' आपल्या कानीं सात बाळ्या । खंडोबाच्या कानीं आरोळ्या.'

आपल्या खाजें फळतीं, धन्याला दुभतें करतीं—गाय किंवा म्हैस फळते ती स्वतःच्या कामवासनेमुळें फळते; ती कांहीं धन्याच्या फायद्याकरितां ती गोष्ट करीत नाहीं. पण अप्रत्यक्षपणें त्या गोष्टीपासून धन्याला दूधदुभतें मिळतें. म्हणजे वरवर दिसणाऱ्या परोपकारांतहि स्वार्थ असतोच.

आपल्या खालचें घोडें गेलें, मग त्यावर महार बसो कीं मांग बसो—वर ' आपले मांडीखालचें गेलें० ' पहा.

आपल्याखालीं जळत आहे अन् दुसऱ्याचें विझवण्यास पळत आहे—स्वतःच्या पदरीं असलेला दोष घालविण्याचा प्रयत्न न करतां दुसऱ्याचा घालविण्याचीं खटपट करणाऱ्या मनुष्यास म्हणतात.

आपल्या खेटरावर माया असते ती लोकांच्या लेंकरावर नसते; आपल्या खेटरावर माय ती दुसऱ्याच्या पोरावर नसते—स्वतःची एखादी क्षुल्लक वस्तूहि जितकी स्वतःस प्रिय असते तितकें दुसऱ्याचें मूलहि प्रिय नसतें.

आपल्या गरजे, गाढव राजे—मागें 'आपले गरजे' पहा.

आपल्या गॅलें जेवचें आनि लॉका गॅलें घेवचें, कसली गरज ?—(गो.) आपल्या घरचें जेवावें आणि लोकांचें बोलून घ्यावें, कशाकरितां ?

आपल्या गॅलॅं मरण विघ्नसमान, आनी दुसऱ्या गॅलॅं मरण वाड्डीके समान—(गो.) आपल्या घरांतला मृत्यु हें मोठें विघ्न व दुसऱ्याच्या घरांतला मृत्यु हा लग्नसमारंभ असें मानणें. परदुःख शीतळ.

आपल्या गॅल्या सावळेक् आपणें भिवूच्या जाय—(गो.) आपल्या सावलीला आपणच भिणें.

आपल्या गांडिपोंद्चे घोडे गेले काबार जाले, कोणय बसतात ? (गो.) आपल्या (ढुंगणा) खालचें घोडें गेलें ना. मग त्यावर कोणीहि बसोत ? वर पहा.

आपल्या गांवचा राजा बळी—जो तो आपल्या ठिकाणीं बलवान असतो. तु०-नक्रः स्वस्थानमासाद्य गजेन्द्रमपि कर्षति । स एव प्रच्युतः स्थानाच्छुनापि परिभूयते । -सुर ८६.२.

आपल्या गांवांत बळी, परगांवीं गाढवें वळी—एखाद्या मनुष्याची त्याच्या गांवांत मोठी प्रतिष्ठा असते पण अंगांत कांहीं पराक्रम किंवा चातुर्य नसल्यामुळें तोच मनुष्य दुसरीकडे गेला म्हणजे कुचकामाचा ठरतो. तु०-आपल्या गल्लींत कुत्रा शेर असतो.

आपल्या गुणें, घोडा खाई दाणे—घोड्याला जे दाणे मिळतात ते त्याच्या अंगच्या गुणांमुळें मिळतात. निरुपयोगी घोड्यास कोणी दाणा घालीत नाहीं. मनुष्यास जो मान मिळतो तो त्याच्या अंगच्या गुणांमुळें मिळतो.

आपल्या गुमींत असतो, तसें लोकांस समजतो—एखादा

मनुष्य गर्विष्ठ असून नेहमीं आपल्याच तोऱ्यांत असतो व इतर सर्व लोकहि तसेच असावेत असें समजत असतो. मनुष्य स्वतः-वरून इतरांची परीक्षा करतो.

आपल्या घरचा खायचा शेर आणि दुसऱ्याच्या घरचा काढायचा केर—आपल्या घरचें अन्न खाऊन दुसऱ्याच्या घरच्या उठाठेवी करावयाच्या.

आपल्या घरचा चोर राजा—जो तो आपल्या घरचा धनी असतो. मनुष्याला स्वतःच्या घरांत पूर्ण स्वातंत्र्य असतें. तु०—Cock of one's own walk.

आपल्याच पायावर आपला धोंडा—स्वतःच स्वतःचा नाश करून घेणें.

आपल्याच हातानें आपली करिती आरती—स्वतःभोंवतीं स्वतःच दिवे ओंवाळून घेणारा; स्वतःची स्तुती स्वतःच गाणारा मनुष्य.

आपल्या चडें, पासली पडे—एखादी व्यभिचारी स्त्री कामासक्त झाल्यामुळें वाटेल त्याच्याजवळ व्यभिचार करण्यास प्रवृत्त होते; त्यांत तिचा हेतु स्वतःचा काम भागवून घेण्याचा असतो, त्याला सुख देण्याचा नसतो व त्यामुळें पुढील परिणामासहि त्या पुरुषाच्या ऐवजीं ती स्त्रीच जबाबदार असते. तु०—'आपल्या खाजें फळती०' पहा.

आपल्याची लाथ, परक्याची खेव—आपल्यास प्रिय असलेल्या मनुष्याच्या लत्तास्पर्शानेंहि जें सुख होतें तें परकीयाच्या आलिंगनानेंहि होत नाहीं.

आपल्या चेप्या दुसऱ्या फुला—एखादा जिन्नस आपणास घ्यावयाचा असला म्हणजे माप दाबून भरावयाचें व दुसऱ्यास द्यावयाचा असला म्हणजे पोकळ भरावयाचें. स्वतःच्या मात्र फायद्याकडे पहावयाचें व दुसऱ्याचा तोटा करण्याची इच्छा बाळगावयाची. पाठभेद—आपल्याला चेप्या, दुसऱ्याला फुल्या.

आपल्याजवळ नाहीं म्हणजे जगांत नाहीं—एखादी गोष्ट आपणाजवळ नसली म्हणजे ती जगांत असून नसून सारखीच; दुसऱ्याजवळ असलेली वस्तु स्वतःच्या जवळ असलेल्या वस्तूसारखी वेळेवर कामास येत नाहीं व आपणाजवळ नसल्यामुळें वेळेवर कोणाजवळ मागावयास गेलें तर ती कोणी देत नाहीं, कोणी हजार सबबी सांगतो वगैरे. पण प्रसंगास ती आपल्या उपयोगी पडत नाहीं ही गोष्ट खरी. एखाद्या वेळीं स्वतःजवळ वस्तु नसली म्हणजे कोणाकडे मागावयास गेल्यास त्याचेकडेहि मिळत नाहीं व आपली फार गैरसोय होते. याकरितां स्वतःच नीट तजवीज करीत असावें. तु०—पदरीं असेल तो दाम. एक घर उणें तर दस घर सुणें.

आपल्या टोंगळ्यांशीं आधीं न्याय तोडावा, मग दुसऱ्याच्या—[टोंगळा=ढोंपर] आपलें घर प्रथम नीट करावें मग दुसऱ्याची चवकशी करावी. स्वतःशींच प्रथम विचार करावा, आपला स्वतःचा प्रथम दोष आहे किंवा नाहीं तें पहावें, मग दुसऱ्याचे दोष काढावे.

आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं त्याला दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें—माणसाला दुसऱ्याचे लहान सहान दोषहि चटकन् दिसतात, पण स्वतःचे फार मोठेहि दिसत नाहींत.-उग्र ४.४. समानार्थक गोंव्याकडील म्हण—आपल्या डोळ्यांतले कांडण दिसना, दुसऱ्या डोळ्यांतले किस्कुट दिसता. आपल्या पायां मुळां कुवाळें कुस्तां...

आपल्या डोळ्यांतील मुसळ काढून मग दुसऱ्याचे डोळ्यांतलें कुसळ काढावें—प्रथम आपले ढोबळ दोष सुधारावेत व मग दुसऱ्याचे किरकोळ दोष काढण्यास लागावें.

आपल्या तोंडाभोंवतीं आपणच दिवा ओवाळून घेणें; आपल्या भोंवतीं आपणच दिवे ओवाळून घेणें—मागें 'आपल्याच हातानें...' पहा. स्वतःची स्वतःच स्तुति करणें.

आपल्या दुष्ट गुणें, आपल्याला करी उणें—स्वतःच्याच वाईट स्वभावामुळें एखाद्या मनुष्याचें नुकसान होणें.

आपल्या नाहीं तिळीं, त्याला द्यावें सुळीं—ज्याचा आपल्याला तिळाइतकाहि उपयोग नाहीं त्याची आपण पर्वा करीत नाहीं. त्याचा पूर्ण नाश झाला तरी आपण बेफिकीर असतों किंवा त्याच्या नाशास कारणीभूतहि होतों. आपलेपणाचा संबंध नसला म्हणजे मनुष्य बेफिकीर असतो.

आपल्या पायाखालीं जळतें आणि डोंगरचें विझवायला जायचें—जवळ आग लागलेली तशीच सोडून डोंगरास लागलेला वणवा विझवावयास जाणें म्हणजे निकट आलेल्या संकटास तोंड न देतां दूर असलेल्या संकटाबद्दलची काळजी करण्यासारखें आहे.

आपल्या पायांत घुपसली वाल, आनी हाव काढतां दुसऱ्याची चाल—(गो.) आपण हांसे लोकाला शेंबूड माझ्या नाकाला, याप्रमाणें.

आपल्या पायावर आपणच कुऱ्हाड (गोटा-धोंडा) मारून घेणें—स्वतःच स्वतःला पीडा उत्पन्न करून घेणें.

आपल्या पोळीवर तूप (डाळ) ओढणें—अप्पलपोटेपणाबद्दल निंदाव्यंजक वाक्प्रचार. स्वतःचाच सर्व फायदा बघणाऱ्याबद्दल वापरतात.

आपल्या पोळीवर निखारे कोण न ओढी--आपली पोळी भाजावी म्हणून मनुष्य आपल्या पोळीला पुरेशी उष्णता मिळेल याची काळजी घेतो. मनुष्याचें स्वतःच्या स्वार्थाकडे नेहमीं लक्ष्य असतें.

आपल्या बळें बांधावी (घालावी) कांस आणि कोणाचीहि करूं नये आस--मनुष्यानें स्वतःचें काम स्वतःच करण्याची हिंमत बाळगावी, दुसऱ्याच्या मदतीवर अवलंबून राहण्यांत अर्थ नाहीं. स्वावलंबन हा एक मोठा गुण आहे. वर 'आपलें बळें०' पहा.

आपल्या बिळांत नागोबा--मनुष्य स्वतःच्या घरीं बलवान असतो. तु०-कुत्रा आपल्या गल्लींत शेर असतो. नक्रः स्वस्थानमासाद्य. इ. वास्तविक 'आयत्या बिळांत नागोबा' ही म्हण मूळ असून तीवरून ही चुकीनें बनली आहे.

आपल्या बिळीं, नागोबा बळी--वरप्रमाणें.

आपल्या मालाची सर्व स्तुति करितात--स्वतःचा माल खपविण्याकरितां कोणीहि तो चांगला आहे असेंच म्हणणार.

आपल्या लग्नाक म्हालो ना, तो दुसऱ्या लग्नाक निमतां--(गो.) स्वतःच्या कार्यांत ज्यानें मन कधीं घातलें नाहीं तो दुसऱ्याचें काम करतो होय ?

आपल्या हातचें धुणें नि आईच्या हातचें खाणें--मनुष्यानें स्वतः कपडा धुतल्याशिवाय मनासारखा स्वच्छ निघत नाहीं व आईच्या हातचें खाण्यानें जें समाधान प्राप्त होतें तें इतरांकडून मिळालें असतां होत नाहीं.

आपल्या हातानें आपले कान थोडेच उपटले जातात--मनुष्य स्वतःचे कान कधीं स्वतः उपटीत नाहीं. म्हणजे मनुष्याला स्वतःचे दोष दिसत नाहींत व स्वतःची चुकी दिसत असली तरी त्याबद्दल मनुष्य स्वतःस तोषीस लावून घेण्यास बहुधा तयार नसतो. 'सोनारानें कान टोंचणें' पहा.

आपल्या हातीं जें करवे, तें ईश्वरीं न हवालावें--जी गोष्ट करणें केवळ आपल्याच हातांत आहे ती गोष्ट स्वतःच करून टाकणें श्रेयस्कर होय. त्या बाबतींत परमेश्वरावर हवाला ठेवून स्वस्थ बसणें हा वेडेपणा आहे.

आपल्याला जें प्राप्त न होय, त्याची आदावत करून काय--जी गोष्ट आपल्याला कधींहि प्राप्त होणें शक्य नाहीं त्या गोष्टीबद्दल व्यर्थ तंटा करण्यांत काय अर्थ आहे.

आपल्याला पायांमुळा कुंवाळें कुसलां, दुसऱ्यालीं सांसवा वेंचतां--(गो.) आपल्या पायांशीं नासका कोहळा पडला असतांना दुसऱ्याच्या पायापासली मोहरी कां वेचावी ? आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं पण दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें, याअर्थीं.

आपल्यावर उपकार, जाहल्या स्मरावा वारंवार--आपणांवर जर कोणी उपकार केला तर त्याबद्दल नेहमीं कृतज्ञ असावें.

आपल्यावरून जग ओळखावें--मनुष्याला जसे स्वतःस निरनिराळे विकार असतात, स्वतःचा फायदा व्हावा असें वाटतें तसें इतरांसहि स्वतःबद्दल वाटतें, ही गोष्ट प्रत्येकानें ध्यानांत ठेवावी.

आपल्यास आपलें करणें, ईश्वरास सर्वांस राखणें--मनुष्य कांहीं गोष्टी विशिष्ट रीतीनें घडल्या असतां परमेश्वरास दोष देतो, परंतु तसें करणें बरोबर नाहीं. कारण आपण फक्त आपल्यापुरतेंच पाहतों, विशिष्ट गोष्टीचा परिणाम आपल्यावर काय होईल याच दृष्टीनें आपण विचार करतों व त्या गोष्टीच्या बरेवाईटपणाबद्दल मत बनवितों. परंतु ईश्वरास अनेक गोष्टी पहावयाच्या असतात व सर्वच गोष्टींकडे लक्ष्य द्यावयाचें असतें व त्यास सर्वांचीच काळजी असते. तीस अनुसरून तो विशिष्ट गोष्टी घडवून आणतो. त्यांत कोणाचें वाईट तर कोणाचें बरें होतच असतें. तु०-Every one for himself and god for us all.

आपल्यास लाथ, परक्याची खेव--स्वतःच्या माणसांना तुच्छ व तिरस्कारपूर्वक लेखावयाचें पण परक्यांस मिठी मारावयाची अशी वृत्ति कांहीं माणसांत असते.

अपापा--आपापाचा माल गपापा--अपापा पहा.

आपुण--आपुण आपणाक, देव समस्तांक--(गो.) माणूस स्वतःकडे पाहतो पण देव सर्वांकडे पाहतो. वर पहा.

आपुण चुकलों आनी चरण पावले आकाशाक--(गो.) आपण चुकूनच्या चुकून पुन्हां प्रतिष्ठा मिरवावयाची.

आपुण चुक्कॉ, जगान् थुक्कॉ--(गो.) आपल्या चुकीमुळें जगाचें हंसें ओढवून घेणें.

आपुण बरो, तर सगलो संसार बरो--(गो.) आप भला तर जग भला, पहा.

आपुण मवन् आन दुसऱ्याकयू व्हरन्--(गो.) आपला नाश करून त्याचरोबर दुसऱ्याचा करावयाचा.

आपुण रांड शिनाळें जाल्यार भावाबायले पातयेना--(गो.) शिंदळरांड भावाच्या बायकोवर बारीक लक्ष ठेवीत असते. वाईट माणसांना दुसऱ्यांतलें वाईटच दिसतें. तु०-आंधळ्यासी जग सारेंची आंधळें.

आपुन सुखी जाल्यार जग सुखी—(गो.) आपण सुखी असलों म्हणजे जग सुखी होईल. आपणावरून जग ओळखावें.

आपुन करी तें काम, गांठीं असा तो दाम—(गो.) मागें आपण० पहा.

आपुन जावन शाप मारुने घोणीच्या तोंडांत दिवेक जायना—(गो.) आपण स्वतः वाईट गोष्ट करून ती नेहमीं तसल्या करणाऱ्याच्या माथीं मारणें. एखाद्याचें कानफाटया नांव पडलें कीं त्याच्यावरच सर्व आळ घातले जातात.

आपुन जेवी पोटभर, वोवाक वाडी दौलभर—(गो.) आपण पुष्कळ खाणें व इतरास थोडेसें देणें. आप्पलपोटया.

आपुन तंगडयो वासी, केन्नां घेतलो कासी ?—(गो.) आपण आजारी पडला आहे आणि काशीला केव्हां जाईन म्हणतो.

आपुन बाईल पोटारी, घोवार दोळे वटारी—(गो.) स्वतः बायको खादाड असून नवऱ्यावर डोळे वटारते. स्वतः-कडे दोष असतां तो दुसऱ्यावर ढकलण्याचा प्रयत्न करणें.

आपुलकी——**आपुलकी लावणें–दाखविणें–माज-विणें**--लगट करणें; मी तुम्हापैकींच आहे असें दाखविणें; संबंध, नातें वगैरे लावण्याचा प्रयत्न करणें.

आप्पा——**आप्पा भोळे, माप खोटें**—वाणी स्वतः मोठा भोळेपणाचा आव आणतो व स्वतः मोठा साळसूदपणा दाखवितो व माप खोटें वापरून त्या लबाडीचा दोष मापावर टाकूं पाहतो.

आप्पा सवाशेर, लिंग अडीच शेर (धडाभर)—'अप्पा०' पहा. लिंगायत वाण्याला आप्पा म्हणतात. आप्पा किडकिडीत असून त्याच्या दुप्पट वजनाचें लिंग तो गळ्यांत अडकवील तर उपहासास पात्र होईल. एकाद्या मनुष्यापेक्षां त्याच्या उपाधीच जास्त प्रचळ असें झाल्यास ही म्हण वापरतात.

आब——**आब लाभ ना नफा, आणि रिकामा धका**—कांहीं लाभ न होतां व्यर्थ येरझारा अथवा कष्ट पडल्यास म्हण-तात. कांहीं फायदा नसून रिकामा त्रास मात्र.

आब——**आब आयलो म्हुण रेडया पानो ओढलो तर दुध येता ?**—(गो.) [आब=मृतपिता] पितर किंवा मोठा पाहुणा आला म्हणून रेडयाला पान्हा कां फुटणार आहे ? जी गोष्ट अशक्य ती कोणत्याहि परिस्थितींत होणें नाहीं.

आब लासलो, धग तापलो—(गो.) बाप जळाला व शेक लागला. एका दगडानें दोन पक्षी मारणें.

आबई——**आबईचें झाड पासलें, सदा तोंड वासलें**—[पासलें=आडवें; उपडें] आबई ही एक वेल आहे; तिला शेंगा येतात त्यांची भाजी करतात; त्या शेंगा मोठ्या व लांब अस-ल्यामुळें त्या जड असतात म्हणून ती वेल कधीं फारशी वर चढत नाहीं, नेहमीं खालीं पडलेली असते.

आंबट——**आंबट चेहरा करणें**—नावड, निरुत्साह हे भाव चेहऱ्यावर व्यक्त होतात त्यावेळीं म्हणतात. 'अंबट०' पहा. 'आनंदराव जरासा आंबट चेहरा करून शून्य दृष्टीनें उभे होते.'–जादूगार ६०.

आंबणें——अंबणें पहा.

आंबलेला भात ताकानें गोड, नावडती बायको लेकानें गोड—शिळा किंवा विटलेला भात असला तर त्यावर ताक वगैरे घातलें, फोडणी वगैरे दिली म्हणजे तो गोड लागतो; मग तितका वाईट लागत नाहीं. त्याचप्रमाणें एखादी बायको नव-ऱ्याची नावडती असली तरी तिला जर मूल झालें तर तिच्याबद्दलची नावड कमी होते व मुलामुळें तिच्यावरहि नवरा प्रेम करूं लागतो.

आबा——**आबा बायल जा आनि भीक मागून खा**—(गो.) आबाची बायको हो आणि भीक मागून खा.

आंबा——**आंबा ओरपणें**—आंब्याचा काप खातांना आंतील गर ओरपून घेतों व साल टाकून देतों; यावरून फळां-तील गर, मगज तेवढा खाणें; चांगला भाग, सत्त्वांश तेवढा काढून घेणें.

आंबा शिंपणें—गृहप्रवेशाच्या आधीं वधूच्या मांडवांत वधू वराच्या मांडीवर पाय ठेवून आंब्याच्या झाडाला प्रोक्षण करिते. हा विधि करतांना त्यासंबंधीं एक गाणेंहि म्हणतात. 'आंबा शिंपावया गोरटी । कडे घेऊनि कृष्ण उठी । आइती केलीसे गोमटी । कुंकुमें वाटी परिपूर्ण ॥ '–एरुस्त्र १५.१४२.

आंब्याचा टाहाळा–डाहळा–ढाळा—१ आंब्याची फांदी. २ आंब्याचा टाहळा हा शुभ व अशुभ दोन्ही प्रसंगींहि लागतो. यावरून शुभाशुभ प्रसंगीं सारखेपणानें वागणारा मनुष्य.

***आंबा नाहीं ओलटाहि नाहीं**—ओलटयानें आंबा पाडा-वयास जावें तों तोच वर अडकून बसावा. अपेक्षित लाभ नाहीं तो नाहीं पण उलट नुकसान.

आंबा फुलला तर बिचारा खालीं वांकतो—आंब्यावर मोहोर आला तर त्या भारानें तो नम्र होतो. तसे सज्जन वैभ-वास चढले तर ते उद्दाम न होतां त्यांच्या ठिकाणीं अधिक विनय दिसून येतो. उलट दुर्जनांच्या हातीं थोडी फार सत्ता अगर संपत्ति आली तर ते मदोन्मत्त होतात. तु०–(अ.) नम्र होती फळभारें तरुवर सारे. (आ.) भवन्ति नम्रास्तरवः फलो-

द्रुमैर्नवांबुभिर्भूरिविलंबिनो घनाः। अनुद्धताः सत्पुरुषाः समृद्धिभिः स्वभाव एवैष परोपकारिणाम् ॥– नीति ६१.

आंबे आले पाडा, ते गेले गडा—१आंबे पिकण्याचा मोसम आला असतां खाणाऱ्या मनुष्यास दूर देशीं जाण्याचा प्रसंग आला, म्हणजे जेव्हां संधि येते तेव्हां तिचा फायदा घेतां येत नाहीं अशी अवस्था होते. अशा परिस्थितींत ही म्हण वापरतात. तु०—आंब्याला मोहोर अन् कावळ्याला मुखरोग. इ. २ (ल.) स्त्री भर ज्वानींत आली असतां तिचा पति दुसरीकडे गडावर किंवा लढाईवर असे अशा मराठेशाहींतील प्रसंगाची ही म्हण आहे. लावण्यांतून अशीं शृंगाराचा वहर वायां चालल्याचीं वर्णनें असतात.

आंबे आले पाडा, निंबुणी आल्या रसा—१ आंबे पिकावयास लागले म्हणून निंबुण्याहि पिकल्या तरी कोणी झालें तरी आंबे खाईल, निंबुण्या कांहीं खाणार नाहीं. कारण त्या कडू असतात. तेव्हां निंबुण्या कांहीं आंब्याची बरोबरी करूं शकत नाहींत. २ भरज्वानीचा काल. मागची म्हण पहा.

आंबे भो गोमटे जाले, ते सगळे माकडानि व्हेले—(गो.) आंबे फारच चांगले झाले, पण ते सगळे माकडें घेऊन गेलीं. वस्तु चांगली असून तिचा उपभोग न मिळाल्यास म्हणतात.

आंबे राखायचे, चाखायचे नाहींत—पदार्थाचें रक्षण मात्र करावयाचें, परंतु उपभोग घ्यावयाचा नाहीं. अशा वृत्तीचा कंजूष मनुष्य.

आंबो गोड म्हून, तुंबो गोड न्हय—(गो.) आंबा गोड म्हणून तुंबा गोड नव्हे. एकाची सर दुसऱ्यास येत नाहीं.

आंबो पणसांत न्हय, दुबळो मनशांत न्हय—(गो.) आंबा फणसाच्या सदरांत पडत नाहीं व गरीब माणूस सधन वर्गांत (मनुष्यांत) गणला जात नाहीं.

आंब्या झाडाक फात्तर मान्हचें चड—(गो.) आंब्याच्या झाडाला फार दगड मारणें. जो तो आंब्यावर दगड मारतो. चांगल्या वस्तूच्या मागें सर्व लागतात.

आंब्या राकडारि घालतचि बुद्धि येत्ता—(गो.) आंब्याच्या लाकडावर टाकतांच बुद्धि येते.

आंब्या रुकाक आंबाडे रुका सालि लागदवे ? (गो.) आंब्याच्या झाडाला आंबाडयाच्या झाडाची साल लागेल काय ? दोन विसदृश गोष्टींचा संयोग होऊं शकत नाहीं.

आंब्याची कोय तुरट लागे आणि रस गोड लागे—कोय आणि रस हीं एकाच आंब्यांत एकाच रसानें परिपोषण होऊन बनलेलीं असतात पण त्यांची चव भिन्न असते. त्याप्रमाणें एकाच आईबापांच्या पोटीं किंवा एकाच परिस्थितींत वाढलेलीं मुलें वगैरे भिन्न भिन्न स्वभावाचीं निघतात.

आंब्याची गरज, आमसुलानें नाहीं पुरवत—आंबा खाण्याची इच्छा झाली किंवा एखाद्या कार्यांत आंब्याचें प्रयोजन असलें तर त्याची जागा आमसूल जरी आंबट असलें तरी तें भरून काढूं शकत नाहीं. आंब्याचे गुण आमसुलांत येणें शक्य नाहीं. यावरून एखाद्या गोष्टीकरितां त्यापेक्षां कमी दर्जाचा प्रतिनिधि वापरून काम होत नाहीं. ज्याची सर त्यालाच येणार, ती इतरांस येऊं शकत नाहीं.

आंब्याच्या रुखाक पांगाऱ्याची साल लागता?—(गो.) आंब्याच्या झाडाला पांगाऱ्याची साल लागेल का ? पांगाऱ्याचें कलम आंब्याच्या झाडावर लागत नाहीं. यावरून कमी दर्जाच्या वस्तूचा मेळ अधिक दर्जाच्या वस्तूशीं होऊं शकत नाहीं. वर पहा.

आंब्याला मोहोर अन् कावळ्याला मुखरोग; आंब्याला आला पाड, कावळ्याला आला (झाला) मुखरोख—जेव्हां एखादा लाभ होण्याची संधि येते त्यावेळीं कांहीं आकस्मिक परिस्थितीमुळें तो लाभ पदरांत पाडून घेतां येत नाहीं, अशा स्थितींत ही म्हण वापरतात.

आंब्याला मोहर दाटला, नशीबानें येती फळें त्याला—आंब्याला मोहोर खूप दाट येतो परंतु त्या मानानें फळें फारच थोडीं धरतात. प्रत्येक फुलागणिक कांहीं फळ येत नाहीं. तु०—शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे। साधवो नहि सर्वत्र चन्दनं न वने वने ॥–सुर १५७.१८३.

आंब्यावर धोंडा मारून पाहूं, लागला तर लागला नाहीं तर नाहीं—आंबा पाडावयाचा झाला तर धोंडा मारून प्रयत्न करून पाहावा कदाचित् पडला तर आंबा मिळेल; नाहीं पडला तरी त्यांत कांहीं नुकसान नाहीं. मनुष्यानें योग्य ठिकाणीं प्रयत्न करून पाहावा. झाला तर कांहीं लाभ होण्याचा संभव असतो, नुकसान होण्यासारखें नसतें.

आंबाडा——आंबाडॅविणें म्हाळ अरचलॅलॉ—(गो.) आंबाडयावांचून पक्ष (पितृतिथी) खोळंबला. क्षुल्लक गोष्टीकरितां अडून बसणें.

आंबाडयानें आमसाणि ऊर्नु येत्त वे ?—(गो.) आंबाडयाला आंबटपणा सोडून येतां येईल काय ? कोणासहि स्वतःचे गुणधर्म सोडतां येत नाहींत.

आबु——आबुनें केलेलें आबु आंडारि आयिलें—(गो.) [आबु=क्ष मनुष्य] आबूनें केलेलें आबूच्या अंडावर आलें. ज्याचें फळ त्याला.

आंबेवर्णी— विशेष गौर नव्हे असा वर्ण, पिंगटवर्ण असणारी दहाजणी सारखी. 'कोठें पुरुष पार्टी चांगले तर स्त्रीपार्टी नाटकांत रंगले तरी आंबेवर्णी.'–खेस्व.

आंबेरी——आंबेरी व जिवाची भंबेरी—आंबेरी हा गांव मालवणपासून दहा मैलांवर आहे. हा गांव चोरटेपणें काजूची दारू गाळण्यांत प्रसिद्ध आहे. आबकारी खात्यास हे दारू गाळण्याचे कारखाने हुडकून काढण्यास बरेच सायास पडतात. म्हणून वरील गांवीं ही म्हण रूढ आहे.–दैनिक काळ २१–४–४१.

आभार——आभार मागणें, ओशाळींत पडणें——एखाद्या मनुष्याकडून उपकार करून घेतले तर आपण त्याचे कायमचे ओशाळे होतों.

आम——आमगेरि जेव नका, उपाशि राव नका—(गो.) आमच्या येथें जेऊं नको, पण उपाशी राहूं नको. दोन्हीकडून थप्पड.

आमचा–ची–चें——आमचा बाळ्या बारा पोळ्या खातो पण आणाव्या कोठल्या–कोठून? आमचा बाब्या बारा वडे खातो पण घालतो कोण?—कशास कांहीं ठिकाण नसतां उगाच फुशारक्या मारणाऱ्या माणसाबद्दल ही म्हण योजतात.

आमचा भात एकदांच शिजतो—भात एकदां शिजल्यावर तो पुन्हां शिजवतां येत नाहीं. त्याप्रमाणें एकदां सांगितलेली गोष्ट पुन्हां सांगावयाची नसल्यास, किंवा कोणतीहि एकदां केलेली गोष्ट पुन्हां करावयाची नसल्यास ही म्हण वापरतात.आम्ही कोणतीही गोष्ट एकदांच करतों. पुनरुक्ति किंवा पुनरावृत्ति करीत नाहीं.

आमची जात चांगली, अशी काकांचीहि बोली—एखाद्या मनुष्यानें आपली जात चांगली म्हणून तिची स्तुति करावयाची यांत आपणच आपणांस चांगले म्हणून घेण्याचा प्रकार होतो.कारण कावळेसुद्धां आपली जात सर्वांत चांगली मानतात. तु०–The crow thinks her own bird the fairest–सवि ३२९६.

आमची मती अधिक चालती, ऐसें सर्व मनांत आणिती—जो तो स्वतःला बुद्धिवान् समजतो.

आमचें ऐकतें कोण, कुत्रें?—परस्वाधीन जिणें असलेला मनुष्य, स्त्रिया, परावलंबी माणूस, ज्याला विशेष मान नाहीं असा मनुष्य वगैरे निराशेनें असे उद्गार, त्यांस कोणी विचारीत नाहींसे झालें म्हणजे काढतात.

आमचे घरी येऊं नका, आपले घरीं जेऊं नका, उपाशी पण राहूं नका—शिष्टाचारामुळें सर्व बाजूंनीं अडवणूक. एखाद्यानें आपल्याकडे मोठेपणा घेऊन दुसऱ्यास उपदेश करावयाचा पण मदत मात्र करावयास खुबीनें टाळावयाचें. लबाड कोल्ह्याची गोष्ट अशीच सांगतात. 'अलतडच्या पितरांनू' पहा.

आमचेच दांत व आमचेच ओठ—जेव्हां स्वकीयाचा अपराध स्वकीयानेंच केला असल्यामुळें दुसऱ्यास दोष देतां येत नाहीं अशी निरुपायाची स्थिति ही म्हण दाखविते.

आमचे यजमान शहाणे आणि त्यांच्यापेक्षां उपाध्ये शहाणे—स्वतःचें गुणवर्णन करण्याकरितां दुसऱ्यास श्रेष्ठपणा द्यावयाचा व त्यापेक्षां आपण श्रेष्ठ असें वर्णन करावयाचें.

आमचो म्हालो, चवघां सरशी (भेरशी) जालो—(गो.) आमचा न्हावी चवघांसारखा झाला.

आमच्या कानीं, दह्याचं पाणी—आमच्या कानावर हात; आम्हाला मुळींच ऐकायला आलें नाहीं असें समजा. तेव्हां आम्ही जबाबदार नाहीं.'आमच्या कानीं दह्याचं पाणीरे बोवा! तुम्ही कुलूप उघडतां पण कांही गेलं आलं तर आपल्याकडे कांहीं नाहीं.' पुढील म्हण पहा.

आमच्या कानीं सात बाळ्या—'आपल्या कानीं०' पहा.

आमट——आमटाण मिरसांग लावून सांगप—(गो.) तिखट मीठ लावून सांगणें. अंबट पहा.

आमंत्रण——आमंत्रण टाकून भीक मागणार—आलेलें आमंत्रण नाकारावयाचें व मग भूक लागल्यावर भीक मागत हिंडावयाचें. हातची आलेली संधि गमावून मग पश्चात्ताप करणें.

आमंत्रण दिलें सगळ्या गांवा, वादळ सुटलें घरीं जेवा—सगळ्या गांवाला जेवावयास आमंत्रण स्वतः देऊन आयत्या वेळीं वादळ सुटलें म्हणून जेवणाचा बेत रद्द करून, आपणच एकट्यानें घरीं जेवावयाचें व इतरांस आपापल्या घरीं जेवावयास सांगावयाचें. याप्रमाणें विनाकारण मोठेपणा दाखवून दुसऱ्याची फसवणूक करावयाची.

आमंत्रण लटिक्याचें जेविल्याविन्हा सत्य कदापि मानूं नये—लबाड मनुष्यानें आमंत्रण दिलें तरी तें प्रत्यक्ष पदरांत पडल्याशिवाय खरें मानूं नये. लबाड मनुष्यावर कोणत्याहि बाबतींत विश्वास ठेवण्यांत अर्थ नाहीं. 'लटिक्याचें आवतणें जेविलीया साचे। काय त्या विश्वास तोचि खरा।' –तुगा२८५९.

आमरण——आमरणान्त—सर्व हयातभर; मरेपर्यंत; जीवितावधि.

आमला——आमले कुडको आनि पेजे भुरको—(गो.) (मीठांत वाळविलेला) आंब्याचा तुकडा आणि पेजेचा भुरका. कदान्न; निकृष्टदशा.

आमशें——आमशें खालेलें ताळयांतु लासता—(गो.) 'अंबट खाल्लेलें०' पहा.

आमा——आमा लग्नाक मीठ बळ्ळोलो; आवैच्या लग्नाक मीठ वाडिल्लो—(गो.) आईच्या लग्नांत यानें मीठ वाढलें आहे. म्हणजे हा आईबापापेक्षां स्वतःला फार शहाणा समजतो, किंवा वयानें मोठा समजतो. तु०—बारशाला जेवलेला; सटीच्या घुगऱ्या खाल्लेला.

आमाडे——आमाडे ना जाल्यार म्हाळ खळना—(गो.) आंबाडे नसल्यास पक्ष राहात नाहीं. आंबाडा पहा.

आमी——आमीच ओझेली, आमकां खंयंच्यो भाडेली—(गो.) आम्हीच ओझेकरी, आम्हांला कुठल्या मजुरिणी. स्वतःचें काम स्वतःच करणें.

आमी तुमगेर जेंवक येतात, तुमी आमगेर आंबे धाडात—तुमच्याकडे आम्ही जेवावयाला येऊं व त्याची फेड म्हणून तुम्ही आमच्या घरीं आंबे धाडा म्हणजे झालें. दोन्ही बाजूंनीं स्वार्थीपणा दाखविण्याचा एक विशिष्ट प्रकार. तु०—तुमचे पोहे व आमचा कोंडा फुंकून फुंकून खाऊं. तुमचें तें आमचें व आमचें तें आमचेंच.

आमी तुमी अेका, तांदळानं (शितानं) केल्यात लोका—(गो.) तुम्ही आम्ही सर्व एकच आहोंत पण एकमेकाला जेऊं घालण्याचें होत नाहीं म्हणून आपण दूर आहोंत. स्वार्थ हा आपसांत भेद पाडतो. तु०—(अ) तुम्ही आम्ही एक कंठाळीला मेख. (आ) यूयं वयं वयं यूयं इत्यासीन्मतिरावयोः। किंजातमधुना येन यूयं यूयं वयं वयं ॥

आमेटी——आमेट्यांनीं व्याधि मरतात—(गो.) आंबेतीनें व्याधी मरतात. आंबेती हें एक औषधी झाड आहे; त्याचीं पानें काढून देठाला आलेला डिंक सुजलेल्या ठिकाणीं, अंग धरल्या ठिकाणीं काळ्या बिब्यासारखा लावतात.

आम्मा——आम्मा सवाशिणि आनु ब्राह्मणु—(गो.) आई सवाशीण, वडील ब्राह्मण. तु०—गुळाचा गणपति, गुळाचा नैवेद्य.

आम्मानें मेल्यारि अमास रावना, आन्नानें मेल्यारि पुनव रावना—(गो.) आई वारली तरी अमावास्या थांबत नाहीं, वडील वारले तरी पूर्णिमा थांबत नाहीं. कोणाकरितां अडत नाहीं. दिवस हे कसे तरी निघून जातात.

आम्र——आम्राश्च सिक्ताः पितरश्च तृप्ता एका क्रिया द्व्यर्थकरी बभूव।—पितरांचें तर्पण केलें असेंहि झालें आणि पाण्यानें आंब्याचें शिंपणें (पाणी घालणें) हि झालें. याप्रमाणें एकाच गोष्टीनें दोन कार्यें साधण्याचा प्रकार. तु०—जांवई न्हाला वाफा शिंपला. पहिल्या दोन ओळीः एको बद्दुर्दर्भकुशाग्रपाणिर्वने वने सिंचति बालचूतान्।

आम्ही——आम्ही आयलिं घारा, तुम्हिं भायर सरा—(गो.) आम्हीं घरी येऊन राहिलों, आतां तुम्ही बाहेर निघा.

आम्ही आलों सळा सळा, मामंजी तुम्ही पळा पळा—(व.) आश्लेषा नक्षत्रांतील पावसाच्या सरीला सुना असें म्हणतात. पुष्य नक्षत्रांत पाऊस थोडा थोडा पडत असतो त्याला म्हातारा म्हणतात. आश्लेषांत पावसाला जोर चढतो. त्या वेळच्या सरींच्या आवाजाला अनुरूप अशी ही म्हण रचली गेली आहे.

आम्ही खावें, आम्ही प्यावें, जमाखर्च तुमच्या नांवें—स्वतः चैन करून जबाबदारी दुसऱ्यावर टाकणाऱ्या आप्पलपोट्या मनुष्याबद्दल योजतात. तु०—खावें ल्यावें द्यावें। जमाखर्च तुझ्या नांवें।—तुगा १८३६. आळशी व चैनी मुलाबद्दल बाप व्याजोक्तीनें म्हणतो.

आम्ही गडकरी हांव, दांडयान पाणी बोच्यांक लाव—(गो.) ऐदी लब्ध प्रतिष्ठित माणसाबद्दल म्हणतात.

आम्ही तुम्ही एक व कंठाळीला मेख—१ (कंठाळी आवळून बंद करण्यासाठीं मेख असते.) आपण एक असें तोंडानें म्हणावयाचें पण कंठाळी मात्र बंद. ती मोकळी ठेवावयाची नाहीं, कारण दुसरा त्यांतलें घेईल; यावरून वरवर प्रेम, मैत्री. २ पूर्वीं धर्मशाळेंत यात्रेकरू उतरत तेथें खुंट्या वगैरे नसत. म्हणून गडशी किंवा घोड्यावरची कंठाळी वगैरे ठेवण्यास बरोबर मेखा बाळगीत असत. तशी मेख स्वतःजवळ नसली म्हणजे स्वतःची कंठाळी दुसऱ्याच्या मेखेवर ठेवण्याकरितां त्याच्याशीं कोठला तरी संबंध जोडून आप्तपणा दाखविण्याचा प्रयत्न करावयाचा. या प्रकाराबद्दल ही म्हण वापरतात.

आम्ही तुम्ही भाऊ, आमच्या कंठाळ्यास हात नका लावूं—तुम्ही आम्ही जरी भाऊ असलें व तें नातें आम्हाला मान्य असलें तरी आमच्या कंठाळीला तुम्ही हात लावूं नका. म्हणजे दुरून आपला संबंध आहे तेवढा पुरे, फारशी लगट करूं नका. वरवर प्रेम. 'आम्ही तुम्ही एक कंठाळीला मेख' पहा.

आम्ही तुम्ही भाऊ भाऊ, आमचा कोंडा तुमचे पोहे मिळून मिसळून फुंकून खाऊं—स्वतःचा कोंडा व दुसऱ्याचे पोहे एकत्र करून फुंकून खाल्यास आपला कोंडा त्याला जाईल व त्याचे पोहे आपणास मिळतील. कोंडा उडून जाईल व पोहे खाण्यांत येतील. याप्रमाणें आपल्याजवळील निरुपयोगी वस्तु दुसऱ्यास देऊन त्याची उपयुक्त वस्तु मिळविण्याचा स्वार्थी

प्रयत्न करणाऱ्याबद्दल योजतात.

आम्ही दोघी बहिणी, डोंगराच्या आड। पत्र खुशालीचें धाड।—(दादाराया इ०) [झोंपाळ्यावरची ओंवी] कोंकणांत प्रचलित असणाऱ्या झोंपाळ्यावरील गाण्यांतील ही एक ओंवी आहे. ही ओंवी लग्न झालेल्या मुली भावाला उद्देशून म्हणतात. बहिणी बहिणी लग्नापूर्वीं जरी एकत्र राहिल्या असल्या तरी लग्न झाल्यानंतर त्या दूर होतातच; तेव्हां निदान माहेरची खुशाली तरी त्यांना कळली पाहिजे. याकरितां ओंवी म्हणतांना बहिणी ती इच्छा भावाजवळ व्यक्त करीत आहेत.

आम्हा बायकांस विचारतो कोण?—आमचें ऐकतं कोण ? पहा.

आम्हा मेल्या बायकांना—स्त्रियांची असाहाय्य स्थिति वर्णन करणारा वाक्प्रचार.

आय (=आज)——आयूची व्हॉकॉल, फाल्या रांड—(गो.) आजची नवरी मुलगी उद्यां रांड.

आय (=आदा)——आय पळवुनु व्यय करका—(गो.) आदा पाहून खर्च करावा.

आय (=आई)——आय जायका, खाय जाय—(गो.) आई पाहिजे कां खाणें पाहिजे. (ल.) प्रेम पाहिजे कां द्रव्य पाहिजे.

आयजीच्या जिवावर बायजी उदार, ध्यां (दिवसां) दिवा रात्रीं अंधार—[ध्यां–दिहा–दिवसा] हलवायाच्या घरावर तुळशीपत्र याअर्थी. दुसऱ्याचें खर्च होत असेल तर वाटेल तशी उधळामाधळ करावयाची. मग दिवसा दिवे लावले व रात्रीं दिवे लावण्यास तेल नसलें तरी त्याची कोण पर्वा करतो. आइजी० पहा.

आय (=येणें)——आयरें वैरें, पोट सोयरें—(गो.) खादाडपणाचें निदर्शक.

आयली दिवाळी, आनी परबो आकारी—(गो.) [आयली= आली. परबो=सण.] दिवाळी तर आली आतां त्यानंतरचे सणाचे दिवस मोजूं या. सर्व आयुष्यभर ख्यालीखुशालींत राहाणाऱ्या माणसाबद्दल वापरतात.

आयली वाय, गेलि काय, ताजें गोडवें तुका काय ?—आला वारा गेली काया, त्याचे गोडवे तुला कशाला हवे ? बेपर्वाई दाखविण्यासाठीं योजतात.

आयले ल्हार, मारले भायर—आलेली लाट आपण नम्र होऊन तिला, अंगावरून जाऊं देणें.

आयलें वारें, गेलें वारें, ताजें कसलें चेरें चेरें—(गो.) आलें वारें, गेलें वारें, त्याचें कसलें टुणटुणें. 'आला वारा' पहा.

आयल्यार पावस, नाजाल्यार ओत—(गो.) आला तर पाऊस, नाहीं तर ऊन आहेच. हेंहि बरें ! तेंहि बरें ! असें म्हणणाऱ्या माणसाबद्दल वापरतात.

आयल्यारि आंबो, गेल्यारि फात्तरु—(गो.) आला तर आंबा, गेला तर दगड. कोठल्याहि स्थितींत समाधान मानणें. 'आंब्यावर दगड मारून पहावा' पहा.

आयतन——आयतनांतुलो दिवो—(गो.) भांड्यांतल्या दिव्याचा उजेड बाहेर पडत नाहीं. त्याप्रमाणें स्वतःच शहाणा व विद्वान् असलेला पण दुसऱ्यास आपल्या ज्ञानाचा फायदा करून न देणारा जो माणूस असतो, त्याला उद्देशून वापरतात.

आयता——आयत्या पिठावर रांगोळी घालणें—पूर्वी रांगोळी काढण्याकरितां एखाद्या पाटावर बारीक धूळ टाकून तयार करीत व त्यावर रेघा ओढीत. त्याप्रमाणें एखाद्यानें धूळ किंवा पीठ टाकून तयार केलेल्या पाटीवर रांगोळी काढणें म्हणजे दुसऱ्याच्या श्रमाचा फुकट फायदा घेणें होय.

आयत्या पिठावर रेघा ओढणें–गुटका मारणें—मागील म्हणीप्रमाणेंच. दुसऱ्याच्या मिळकतीवर आयती चैन करणें. 'बाहेर पैसा मिळवून घरास खजीना आणावा तो घरचा खजीना नेलियावर बाहेर खजीना काय मिळवावा ? आयत्या पिठावर रेघा कोणीही ओढील.'—भाव ८४.

आयत्यावर रायतें करणें—हातांशीं जें असेल तें खर्च करून चैन करणें.

*** आयत खाऊ नू लांडग्याचा भाऊ; आयते खाऊ आणि लांडग्याचा भाऊ**—(व.) ज्याला स्वतःला श्रम करून पोट भरावयास नको, आयतें लोकांनीं पोटाला घातलें पाहिजे असें ज्याला वाटतें तो आयत्या अन्नावर लांडग्यासारखा पुष्ट असतो. स्वतः श्रम केल्याशिवाय यथेच्छ भोजन करावयाचें आणि तेंहि लांडग्यासारख्या अधाशीपणानें. लांडगा हा फार खादाड समजला जातो. तेव्हां आयतें खाऊनहि थोडक्यावर तृप्त न होणाऱ्या अधाशी व आळशी माणसास म्हणतात.

आयतमार (माल) आणि खायाला तयार—आयत्या मिळालेल्या गोष्टीवर ताव मारणारा.

आयतमाऱ्या आणि ताटशृंगाऱ्या—(शिंगाऱ्या–शिनगाऱ्या) आयत्या मिळालेल्या जिनसा घेऊन चांगलें भोजन सिद्ध करणें; आयतें घेऊन प्रसंग साजरा करणें.

आयता गब्बू आणि पैसा ढब्बू; आयत गब्बू आणि पैसा ढब्बू—दुसऱ्याच्या पैशावर चैन करणाऱ्या मनुष्यास म्हणतात.

आयतें सेवूं नये, कष्टाविणें राहूं नये—मनुष्यानें स्वतःच्या

परिश्रमानें मिळविलेल्या गोष्टींवर निर्वाह करावा. दुसऱ्यानें परिश्रम करून मिळविलेल्या गोष्टी घेऊं नये.

आयत्या तापलेल्या तव्यावर पोळी भाजून घेणें—संधि साधणें; दुसऱ्यानें तयार करून आणलेल्या परिस्थितीचा फायदा घेणें. 'आयत्या बिळांत नागोबा' अशा अर्थी.

आयत्या द्रव्यावर लक्ष्मी नारायण—सहजासहजीं मिळालेल्या पैशावर झालेला श्रीमंत.

आयत्या धामांत (घरांत) नागोबा—कोणतीही खटपट न पडतां मिळालेल्या घरांत राहणारा.

आयत्या पिठावर नागोबा (बळी); आयत्या बिळांत नागोबा (वळवळी)—मुंग्यांनीं केलेल्या वारुळांत ज्याप्रमाणें आयता साप जाऊन राहतो त्याप्रमाणें दुसऱ्याच्या संपत्तीचा, श्रमाचा फायदा सहजासहजीं आपण घ्यावयाचा. गुज.–खोदवे उंदर, भोगवे भुजंग. Foxes dig not their own holes 'जर्मनीनें अनेक देश जिंकून दोस्तराष्ट्रांची यूरोपच्या पूर्व भागावरील पकड दूर केल्यावर आयत्या बिळांत नागोबा शिरावा त्याप्रमाणें रशिया इस्थोनिया, लॅट्विया वगैरे प्रांतांत शिरला.'– केसरी २–७–४०.

आयत्या वेळेस मित्र, तो मित्र—जो वेळेवर उपयोगी पडतो तोच खरा मित्र. संकट प्रसंगींच मित्राची खरी कसोटी होते आणि अशा वेळीं जो साहाय्य करतो त्यालाच खरा मित्र मानावें; बाकीचे केवळ वरवरची मैत्री दाखवितात असें समजावें. उत्सवे व्यसने चैव दुर्भिक्षे शत्रुविग्रहे । राजद्वारे स्मशाने च यस्तिष्ठति स बांधवः ॥ A friend in need is a friend indeed. आपदि मित्र परीक्षा० पहा.

आयत्यावर कोयता—१ आयत्या, श्रमावांचून मिळालेल्या वस्तूची बेलाशक नासाडी करणें. २ झाड बरेंचसें आयतें तुटत आलें म्हणजे मग पुढें होऊन तोडणें; म्हणजे फुकटचें श्रेय मिळविणें.

आयत्यावर पायथें आणि शिंक्यावर रायतें—[पायथें = अंथरुणाची पायगतची बाजू.] आयत्या अंथरुणावर निजावयाचें व शिंक्यावरील रायतें खावयाचें. एखाद्या मनुष्याला नेहमीं दुसऱ्याच्या श्रमाचें फळ भोगण्याची संवय असते व तेवढ्यावरहि तो संतुष्ट न राहतां त्याबरोबर आणखीहि कांहीं मिळावें अशी अपेक्षा करतो. आयतें खावयास मिळालें तर तें तर खावयाचेंच पण त्याबरोबर शिंक्यावरील लोणचें, रायतें तोंडी लावावयाचें. आळशी पण अधिक आशा करणाऱ्या माणसाबद्दल योजतात.

आयत्यावर रायतें, नागोबावर पोवतें—[पोवतें = कापसाची सुताची माळ, सुतपुतळी] नागपंचमीला नागोबावर वाहाण्यासाठीं जें पोवतें लागतें तें दुसऱ्याचें घेऊन वाहावयाचें. म्हणजे आयतें असेल तें घेऊन काम भागवावयाचें; स्वतः कष्ट करण्यास नको.

आयना——आयनाचे बयना, घेतल्याबिगर जाईना——[बय=बहीण ?] 'मी कांहीं तरी घेतल्याशिवाय जाणार नाहीं.' कोंकणांत शिमग्यामध्यें लहान मुलें वरील शब्दांनीं आरंभ होणारें गाणें तोंडानें म्हणत घरोघर फिरून नाचून, गाऊन पोस्त गोळा करतात. सर्व गाणें असें:–आयनाचे बायना। घेतल्याबिगर जायना। ह्ये ह्ये घराचा पोकळ वासा। त्यांत शिरला मलया मासा। कोल्ह्याची आय। कोळसे खाय। माळ्यावर पैसा दिसतोच (लिकलिकतो) हाय ॥ अर्थ–मला आई नाहीं किंवा बाई नाहीं (कोणी वडील बहीण वगैरे मोठी मायेची स्त्री नाहीं) म्हणून भिक्षा घेतल्याशिवाय जाणार नाहीं. या घराचा वासा पोकळ असून त्यांत मळ्या मासा (नदीच्या तळीं राहणारा एक चपटा मासा) बसला आहे. कोल्ह्याची आई कोळसे खाते. तुमच्या माळ्यावरचा पैसा चमकतो आहे किंवा मला दिसतो आहे; तेवढा द्या. यावरून एखाद्या हट्टी भिकाऱ्यास वगैरे म्हणतात. किंवा हट्टी मनुष्याबद्दलहि योजतात.

आयाबाया——आयबाय नागवली आणि पांचवी जागवली—आईबाई पहा. दुसऱ्याचें घेऊन सण साजरा करणें.

वृक्षामध्यें एक साया, वरकड साऱ्या आयाबाया—[साया = साग] सर्व वृक्षांमध्यें सागाचा वृक्ष हा अत्यंत महत्त्वाचा आहे; त्या मानानें इतर वृक्ष कःपदार्थ होत.

आया बाया नागौया, शिगम्या परब जोगौया—(गो.) बाया बापड्यांनां नाडून शिमगा सण साजरा करणें.

आयाबाया नाडा आणि बाळ्याबुगड्या घडा—गरीब गुरबांस नाडून आपली धन करणारास वैभवाचें प्रदर्शन करणारास म्हणतात.

आयाबायांनी दिधी भर, ऊठ म्हातारे नवरा कर—(अहि.) आयाबायांनीं येऊन म्हातारीस लग्न करण्याची भर देणें. कुणी तरी येऊन भलतीच गोष्ट करण्यास प्रवृत्त करणें.

आयाव——आयावचे गेला खेळूक, रांडेचे बाबडे गेलां जल्मजुगाक्—(गो.) [आयाव = अहेव; सुवासिनी] अविधवेचा मुलगा मेला तर तो खेळावयास गेल्यासारखाच आहे व विधवेचा गेला तर तो जन्माचाच गेला. 'अहेवेचा' पहा.

आयुः—आयुः कर्म च वित्तं च विद्या निधनमेव च ॥ पंचैतानि विसृज्यंते जन्मस्थस्यैव देहिनः ॥—मनुष्याच्या जन्माबरोबरच त्याचें आयुष्य, त्याला मिळणारें धन, त्याची विद्या व त्याचा मृत्यु ही पांच निश्चित केलीं जातात. त्याच्या स्वतःच्या हातांत या पांचांत कमी जास्ती करणें असत नाहीं, अशी समजूत आहे.

आयुरन्नं प्रयच्छति—जोंपर्यंत आयुष्य आहे तोंपर्यंत अन्न मिळतेंच. "म्हणताति 'आयुरन्नं प्रयच्छति' प्राज्ञ तेथ विश्वासः।"–मो आर्या केका ५७. तु०–दाणे दाणेपर लिखा है खानेवालेका नाम. आधीं चारा मग चोंच.

आयुष्य—आयुष्याची दोरी खबरदार-बळकट—ज्याची आयुमर्यादा मोठी असते, जो कठीण दुखण्यांतूनहि वांचतो, त्याबद्दल म्हणतात.

आयुष्याची राखरांगोळी करणें—आयुष्याचा अगदीं दुरूपयोग करणें; आयुष्य व्यर्थ घालविणें. 'या रौरवांत राबून अन्नाला मोताद होऊन, याच्या शिव्याशापांत जळून उभ्या आयुष्याची राखरांगोळी का करायची आहे तुला?'–एकच प्याला ३·४.

आयुष्याचें उणें करणें—आयुष्य फुकट दवडणें; निरर्थक कालक्षेप करणें; व्यर्थ काल घालविणें.

❀ **आयुष्य कांहीं कापसाचा तंतू नव्हे कीं, तोडूं म्हटल्या तुटेल**—जीवन किंवा मरण हें कांहीं आपल्या हातांत नाहीं. आपलें आयुष्य विधिघटनेप्रमाणें निश्चित आहे; तें सरेपर्यंत मरावयाचें म्हटलें तरी मृत्यु येणार नाहीं.

आयुष्य किंचित्, विद्या असे बहूत—आयुष्य थोडें आहे व शिकावयाच्या विद्या तर फार आहेत. तु०–(अ) शास्त्रें फार अपार जीवित तुझें अत्यल्प कीं मानवा। इ० (आ) Life is short, art is long (इ) लॅ.–ars longa vita brevis. (ई) अनेक शास्त्रं बहु वेदितव्यं अल्पश्चकालो बहवश्च विघ्नाः। यत्सारभूतं तदुपासितव्यं हंसो यथा क्षीरमिवांबुमध्यात् ॥ अनंतपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः। सारं ततो ग्राह्यमपास्य फल्गु हंसो यथा क्षीरमिवांबुमध्यात् ॥–सुर १७३. ८७८–९.

आयुष्य, वित्त, घर हीं तीन उघडकीला आणूं नयेत—स्वतःचें आयुष्य किती आहे, तसेंच स्वतःजवळ संपत्ति किति आहे व स्वतःचें घर कोठें आहे, या गोष्टी सहसा कोणास सांगूं नये.

आयुष्य हें परत्रेचे विचारांत काढावें—मनुष्यानें आपल्या जीवितामध्यें आपणास मरणोत्तर कोणती गति मिळेल, यासंबंधीं विचार मनांत बाळगावा. कांहीं तरी परमार्थ-साधन आयुष्य आहे तोंच करावें. केवळ ऐहिक गोष्टींच्याच विचारांत सर्व आयुष्य घालवूं नये.– इसं ८. 'यावज्जीवेन तत्कुर्यात् येनामुत्र सुखं वसेत्।'–हितो.

आयुष्याचा क्षण फुकट गेला, उणेपणा आला कार्याला—मनुष्यानें आयुष्यांतलि एकहि क्षण फुकट घालवितां कामा नये; कारण प्रत्येक फुकट जाणाऱ्या क्षणाबरोबर आपण करीत असलेल्या कार्याची कांहीं तरी हानि झाल्याशिवाय रहात नाहीं.

आयुष्याची घडी, व्यर्थ कदापि न दवडी—मनुष्यानें आपल्या आयुष्यांतील एकहि क्षण व्यर्थ दवडूं नये.

आयुष्याची शाश्वती थोडी, देहाची आशा सोडी—मनुष्याचें जीवित हें क्षणभंगुर आहे. तेव्हां मनुष्यानें या देहाबद्दल विशेष आस्था न बाळगतां जें काय आपल्याला करावयाचें तें शक्य तितक्या लवकर करावें.

आरडणें—आरडून दान, किंचाळून भोजन—समाधानानें व शांत वृत्तीनें या गोष्टी न केल्यामुळें त्यांतील चांगुलपणा जातो.

आरती—आरती ये आणि आपडूं नको—[आरती=अलीकडे. आपडणें=शिवणें] शब्दार्थ–अलीकडे ये, पण शिवूं नको. १ (कों–कुण.) कामाला बोलावणें पण त्या माणसाबद्दल परकेपणा बाळगणें. २ (कु.) एखादी गोष्ट जवळ असावी असें वाटतें; पण त्यापासून होणाऱ्या परिणामाला मात्र मनाची तयारी नसते. त्यापासून आपल्याला त्रास होईल ही भीति असते.

आरती—आरती होणें-करणें—पूजेच्या शेवटीं आरती करण्यांत येते; यावरून १ कार्याची समाप्ति होणें-करणें; इतिश्री. २ (उप.) प्रशंसा, स्तुति करणें; मान सन्मान देणें. 'लॉर्ड सॅंढर्स्ट यांचीहि आरती करण्याचा आमचा विचार आहे'–टि २.१०३.

❀ **आरती घेतल्यारि उष्ण, तीर्थ घेतल्यारि सैत्य**—(गो.) इतकी नाजूक प्रकृति कीं, आरतीच्या दिव्यापासून उष्ण होतें व तीर्थ प्याल्यानें थंडी होते. कानडींतून ही म्हण आली आहे व कारवारकडे रूढ आहे.

आरंभ—आरंभ झाला कलीला, कोणी पुसेना कोणाला—कलियुगामध्यें मनुष्य परस्परांबद्दल बेपरवा होतात. कोणी कोणाला विचारीत नाहीं.

आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः—दक्षिणी (महाराष्ट्रीय) लोक कोणतेंहि काम सुरू करण्यांत पटाईत पण पुढें मग त्याकडे लक्ष द्यावयाचे नाहींत किंवा तें तडीस नेण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असत नाहीं. व्यंकटाध्वरीचा विश्वगुणादर्श चंपू पहा,

आरंभीं आशेचें सुख, शेवटीं दुःख—मनुष्यानें एखाद्या गोष्टीची आशा केली म्हणजे प्रारंभीं जोंवर निराशा होत नाहीं तोंपर्यंत बरें वाटतें. पण शेवटीं निराशा झाल्यास दुःखच वांट्यास येणार. Hope is a good breakfast but a bad supper.

आरंभीं कज्जा करिती, निवारतां कष्टी होती—भांडण सुरू व्हावयास कांहीं फारसें निमित्त लागत नाहीं; पण तें मिटविण्यास फार कष्ट पडतात.

आरशी——आरशीचं बुटलं, थोडक्यांत फुटलं—कांचेचें भांडें फार लवकर फुटतें. याप्रमाणें अब्रू किंवा लौकिक फार थोड्या गोष्टीनें व एकदम जात असतो.

आरसा——आरशाची खोली, प्रतिबिंबें अनेक झालीं—आरसे महालांत एकाच वस्तूचीं अनेक प्रतिबिंबें दिसतात. त्याप्रमाणें एखादी गोष्ट चव्हाट्यावर झाली म्हणजे सर्वत्र पसरते.

आरशांत पाहणाराचे तीन प्रकारः नर, वीर आणि वानर—आरशामध्यें सामान्यतः तीन प्रकारचे लोक पाहतात. एक प्रकार पुरुषांचा; यांना श्मश्रू वगैरे करण्याच्या वेळीं आरसा पाहावाच लागतो. दुसरा वीर पुरुष आपला लष्करी पोशाख चिलखत, जिरेटोप, वगैरे बरोबर बसले आहेत किंवा नाहींत हें पाहण्याकरितां पाहतो. व तिसरें माकड; त्यानें आरशांत पाहिल्याबरोबर त्याचें प्रतिबिंब व त्यामुळें त्यानें केलेल्या चेष्टा दिसतात म्हणून तें पहातें. पूर्वीं आरसे फारसे प्रचारांत नसत. कुलीन स्त्रिया तर रात्रीं आरशांत कधींच पाहात नसत. कारण रात्रीं फक्त वेश्या आरशांत पाहतात अशी समजूत असे.

आरशांतलें धन खोटें, मन करारे ओखटें—आरशांत दिसणारें धन आपल्या हातांत येण्यासारखें नसतें; तें मिथ्या होय. तेव्हां त्याचा लोभ करण्यांत अर्थ नाहीं.

आरसे महालांत राहणें, तर दगड न उडवणें—१ कांचेच्या घरांत राहणारानें दुसऱ्यांशीं जपून वागलें पाहिजे. आपलें घर तर अगदीं नाशिवंत, तेव्हा दुसऱ्याची आगळीक केल्यास तो आपल्या घरावर दगड टाकील व आपलें घर ताबडतोब खालीं बसवील. यावरून आपलें उणें असणारानें दुसऱ्याचें उणें काढूं नये. २ मोठ्या पदवीवरच्या मनुष्यानें आपली वागणूक सावधगिरीची ठेवावी लागते; नाहीं तर अब्रूस धका लागण्याचा संभव असतो. People who live in glass houses, should never throw stones.

आरांजे——आरांजे व्हरप, मारांजे लावप—(गो.) या सुगीवर नेणें व दुसऱ्या सुगीवर लावणें. दिरंगाई.

आरोग्य——आरोग्य तें तरुणपण, अनृण तें धनीकपण—मनुष्य निरोगी असेल तर तो तरुणासारखाच असतो व ज्यास दुसऱ्याचें देणें नाहीं त्यास धनिक म्हणावयास हरकत नाहीं. रोगी असल्यास तारुण्य काय कामाचें व दुसऱ्याचें देणें असल्यास धनिकपणा काय कामाचा?

आर्जविक—आर्जविकाचें भाषण, गोड मधुतुल्य जाण—आर्जवी मनुष्य आपल्या गरजेकरितां नेहमीं मिष्टास बोलतो.

आर्जविकाचें लक्षण, घातक शत्रुप्रमाण—जो मनुष्य आपल्या गरजेकरितां आपलें आर्जव करतो त्यांत त्याचा स्वार्थ असतो; तेव्हां त्यावर विश्वास ठेवूं नये. त्याला शत्रूप्रमाणें मानावा.

आर्जविणें——आर्जवून न भुलवी, तो मित्र खरा भावी—जो गोड गोड बोलून आपणाला भुरळ घालीत नाहीं तोच खरा मित्र समजावा.

आर्जवी——आर्जवी एकत्र जमती, मनीं वाटे पोट भरती—खुषमस्करे एकत्र मिळाल्यावर कांहीं विचारावयास नको! आग लावून सोडतील. When flatterers meet devil goes to dinner.—सवि ४०९१

आर्जवी करी आर्जव, नाहीं यजमानास्तव—आर्जवी मनुष्य यजमानाचें आर्जव करतो तो स्वतःच्या फायद्याकरितां करतो, यजमानाकरितां नव्हे.

आर्जवी फुलवितो, तेणें यजमान नाचतो—एखादा खुषमस्कऱ्या मनुष्य आपल्या यजमानास चढवून देतो व तो गर्वानें फुगून त्याच्या तंत्रानें वाटेल तसा नाचूं लागतो.

आर्जवी मंडळींहून, आत्मप्रीति अधिक जाण—माणूस स्वतःला फार मोठा समजत असतो. तेव्हां तो सर्वांत मोठा खुषमस्कऱ्या समजावा. Of all flatterers, self-love is the greatest.—सवि २५६५.

आर्द्रा——आर्द्रा आणि पाडी गरदाडा (खबदाडा)—[गरदडा=खड्डा] आर्द्रा नक्षत्रामध्यें पाऊस अतिशय पडतो, त्यामुळें डोंगरास भगदाडें पडतात, जमीनींत खळगे होतात, धावें किंवा भिंती वगैरे कच्च्या असल्यास त्यांसहि भोकें पडण्याचा संभव असतो. पाठभेद–पडतील आर्द्रा तर पाडतील गरदडा.

आलत——आलत धोय धोय जाय, आदत क्यौं कर जाय—[आलत = अळिता = रंग. आदत = संवय] अळित्याचा रंग निदान पुन्हा पुन्हा धुतला तर जातो; पण एखादी संवय एकदां जडली म्हणजे ती सुटत नाहीं.

आलबिदा——आलबिदायो करीत येणें—(कर.)

हात हलवीत येणें; नकार मिळाला म्हणून सांगत येणें; रडगाणें गात येणें.

आलसी——आलस्याक दीसु सर्ना, मोठा कष्टतल्याक राति पुरि जाइना—(गो.) आळशाला दिवस संपत नाहीं, काम करणाऱ्याला रात्र पुरी पडत नाहीं.

आलस्याक बिकंडं भाजि म्हळयारि, हरियिं खाल्यारि गोड—(गो.) आळशाला आठळी भाज म्हटल्यावर, हिरवी खाणेंच गोड म्हणतो.

आलस्याक बोरं पिकल्यांति म्हळयारि; हागिले गांडीरि खावूं ?—(गो.) आळशाला बोरें पिकलीं म्हटल्यावर, ढुंगण न धुतां खाऊं म्हणतो.

आलस्य——आलस्य शरीर घटवितें, मनासही तें खातें—आळसानें केवळ शरीरासच पीडा होते असें नव्हे तर त्यामुळें मनहि दुर्बल बनत जातें.

आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महान् रिपुः—याची दुसरी ओळ–नास्त्युद्यमसमो बन्धुः कृत्वाऽयं नाऽवसीदति ॥ –सुर ८३'१५. आळस हा मनुष्याच्या शरीरांतील मोठा शत्रु आहे. उद्योगासारखा दुसरा पाठीराखा नसल्यानें त्याचीच कास धरणें योग्य आहे.

आला–ली–लें—— आला गेला–भला— १ येणारा जाणारा. २ पै पाहुणा. अतिथि अभ्यागत.

आली गेली—नफा नुकसान; जयापजय; यशापयश.

आलये लागुन खोली वचप—(गो.) आलेल्याच्या मागें खोलींत जाणें.

आल्या गेल्याचें घर—ज्या घरीं नेहमीं पाहुणे येतात असें घर; ज्या घरांत मनुष्याची वरदळ फार असते असें घर.

आल्या पायीं परतणें—तावडतोब, न थांबतां परत जाणें; आल्याबरोबर लागलीच परत जाणें.

*** आला आरोप खऱ्यावर तरी तो नाहीं भिणार**—जो मनुष्य खरा आहे त्यावर कोणताहि खोटा आरोप आला तरी तो डगमगत नाहीं. The truth may be blamed but not shamed. –सवि ३५७१.

आला उंदरांचा मारा, घरांत मातीचा पसारा—एकदां घरांत उंदरांनीं बिळें करावयास सुरुवात केली म्हणजे घरांत जिकडे तिकडे त्यांनीं उरकलेली माती पसरते. त्याप्रमाणें शत्रूनें एकदां आपलें घर पोखरावयास सुरुवात केली म्हणजे हळू हळू नाश होत जातो.

आला गेला, गोसावी दाढेला दिला—ज्या मनुष्याचा आगा पिच्छा नाहीं त्याला कोणाच्याहि तोंडीं द्यावयास हरकत नाहीं; कारण त्याला कोणी वाली नसतो. पण हा अन्याय आहे.

आला गेला, संन्याशाला सुळीं दिला—वर प्रमाणें.

आला तर चेव, नाहींतर हरहर महादेव—(हरहर महादेव=नकार; फजीती.) एखाद्या माणसाला एखाद्या वेळीं मोठा चेव येतो व त्यावेळीं तो वीरश्रीनें थरारतो. नाहींतर एरवीं अगदीं मेषपात्र ! वेळेवर त्याच्या अंगांत उत्साह असला तर त्याचा उपयोग होतो. नाहींतर तो अगदीं निरुपयोगी असतो.

आला दिवस गेला, अन्न जीव भरंवशावर मेला—(बायकी) आशेनें व्यर्थ डोळे लावून बसणें.

आला पाला खाल्ला आणि गोसावी धाला—गोसाव्याचें काय, कोणत्याहि झाडाचा पाला खाऊन पोट भरतें. ज्या मनुष्याला फारसा व्याप नाहीं त्याचें कसेंहि चालतें; तो कोठेंहि असेल त्यांत निभावून घेतो.

आला फुकट नरदेहीं, जरि सार्थक न केलें कांहीं—मनुष्यानें जर आपल्या देहाचें सार्थक केलें नाहीं तर या मनुष्यजन्मास येऊन फुकट. नरदेह हा दुर्लभ आहे, तेव्हां याची प्राप्ति झाली असतां परमार्थाचें साधन करून घेणें इष्ट आहे.

आला बायकोचा भाऊ, याहो आपण एका ताटीं जेवूं—मनुष्य आपल्या बायकोच्या भावाबद्दल फार प्रेम दाखवितो. म्हणजे जितकें आपल्या स्वतःच्या नातलगाबद्दल त्याला प्रेम वाटतें त्यापेक्षां स्त्रीच्या नातलगांबद्दल त्याला अधिक प्रेम वाटतें. बहुधा मनुष्य स्वतःचे आप्त दूर करतो व स्त्रीचे जवळ करतो.

आला भला, भावकाईला टोला—[भावकाई ही एक क्षुद्र देवता असून तिची प्रतिमा लांकडाच्या भावलीच्या रूपानें देवळांत उलटी टांगलेली असते. प्रत्येक दर्शनेच्छु मनुष्यानें प्रथम घंटा वाजविण्याप्रमाणें तिला टोला मारून नंतर देवीचें दर्शन घ्यावयाचें असतें. तिला दगड वाहाण्याचीहि चाल आहे. जो कोणी भक्त येतो तो तिच्यापुढें दगड टाकतो. यावरून] कोणीहि यावें व गरीबास कांहींहि बोलावें असा अर्थ.

आला भागासी तो काय करी वेवसाव— जो मनुष्य धंद्यांतील आपली वांटणी मागूं लागला, म्हणजे ज्याच्या मनांत एकदां द्वैतभाव आला त्याच्यानें पुढें व्यवहार कसा रेटावा ? त्याच्या भागींत पुढें व्यवहार करणें चांगलें नाहीं.

आला भेटीला, धरला वेठीला; आली भेटीला, धरली वेठीला; आलें भेटीला, तर धरतें वेठीला—एखाद्या मनुष्यास सहज कोणी मनुष्य भेटावयास आला तरी त्यास कांहीं तरी काम सांगण्याची संवय असते. अशा माणसानें सहज कोणा येणारा जाणारास काम सांगितलें म्हणजे म्हणतात.

आला मानकरी, चार खुंटांची जहागिरी—भिकारी मनुष्याची चौपदरी ही त्याची जहागीर व तेथील तो मानकरी. यावरून मानकरी आले, मानकरी आले म्हणून ओरड ऐकून जों पहावयास जावें तों आपल्या समोर भिकारी दिसावा, अशा परिस्थितींत योजतात. चार खुंटांची जहागीर म्हणजे चौपदरी भीक मागावयाची झोळी.

आला वारा गेला वारा, कोण कुणाचा सोयरा धायरा—१ वारा इकडून येतो व तिकडे निघून जातो; त्यापासून आपल्याला कांहीं कमी अधिक होत नाहीं किंवा त्याची कोणी दखलगिरी घेत नाहीं. त्याप्रमाणें ज्या गोष्टींचा आपल्याशीं कांहीं अर्थाअर्थी संबंध नाहीं किंवा ज्यांचा आपणावर कांहीं परिणाम होत नाहीं त्या घडून गेल्या तरी त्याची चौकशी करण्याचें आपणास कांहीं कारण नाहीं. २ (व.) पाद येतो व जातो, त्याचा कोणाशीं निकट संबंध घडत नाहीं. यास्तव त्याच्या आल्यागेल्याबद्दल हर्ष–विशाद मानण्याचें कारण नाहीं. थट्टेनें असें म्हणण्यांत येतें.

आला हाकारा, टाकला पसारा, घर तेरा न मेरा—मृत्यु आला म्हणजे तो कशाची वाट पहात नाहीं. माणसाला आपल्या आपल्या म्हणणाऱ्या माणसांना आणि वस्तूंना सोडून जावें लागतें. त्याच्याबरोबर कोणीच येत नाहीं. अतःकालीं कोणी कोणाच्या उपयोगी पडत नाहीं हा भावार्थ. तु०–जन हे सुखाचे। दिल्या घेतल्याचे । बा अंतकाळीचे । कोणी नाहीं—कोणी नाहीं ॥ —रामदास.

आली अखिति, झाली सणाची निचिति—[अखिति= अक्षय तृतीया] अक्षय तृतीया हा वर्षांतील शेवटचा सण मानण्यांत येतो. यावेळीं माहेरवासिणी माहेरीं येतात. नंतर पावसाळा सुरू होतो व पेरणीचा वगैरे हंगाम सुरू झाल्यामुळें पुढें आषाढ महिन्यापर्यंत सण नसतात व माहेरवासिनींना माहेरी येतां येत नाहीं. 'अकिति आणि सणाची निचिती' पहा.

आली अंगावर तर घेतली शिंगावर—'अंग' पहा.

आली उर्मी साहे । तुका म्हणे थोडें आहे ॥—आयुष्यांत मधून मधून जे आपणावर प्रसंग येतात त्यावेळीं मन घट्ट करून तेवढे निभावून नेले म्हणजे त्यापासून आपणास फारसा त्रास न होतां आपलें आयुष्य आपण पार पाडूं शकतो.

आली खाज, म्हणून सोडली लाज—मनुष्य विकाराच्या स्वाधीन झाला म्हणजे निर्लज्ज बनतो.

आली घडी ती तर धर, मिळणार नाहीं गेल्यावर—मनुष्यानें आलेली संधि गमावूं नये; तिचा पूर्ण फायदा घ्यावा. नाहीं तर एकदां संधि गेल्यावर पुन्हा मिळणार नाहीं. Take time when time is; for time will away—Scotch.–सवि ३१८४.

आली घडी संपादावी, उद्यांची चिंता न करावी—मनुष्यानें पुढें आलेला प्रसंग साजरा करावा. पुढील काळजी विनाकारण करूं नये.

आली तार, झाला ठार—(कर.) आपल्याकडे तारायंत्र नवीन सुरू झालें तेव्हां सामान्यतः एखादा मनुष्य अत्यवस्थ असला म्हणजेच त्याच्या नातेवाईकांस तार करण्याची पद्धती होती. त्यामुळें अशा प्रकारची एखाद्याची तार आली म्हणजे बहुतेक तो गमावला असेंच मानीत असत. खेड्यांतून अद्यापीहि तार आल्यास भितात.

आली ती लक्ष्मी, गेली ती बला; आली ती लक्ष्मी गेलें तें पाप—[बला=पीडा] मनुष्यानें स्वतः मिळविलेल्या धनापैकीं जें आपणाजवळ राहील त्यांत संतुष्ट असावें. जें गेलें त्याबद्दल वृथा मनाला लावून घेऊं नये. राहिलें तें लाभकारक व गेलें तें पापासारखें हानिकारक समजून त्याचा खेद करूं नये. तु०—वाहिली ती गंगा राहिलें तें तीर्थ.

आली धनत्रयोदशी, घरांत सर्व उपवासी—धनत्रयोदशीचा म्हणजे दिवाळीचा दिवस यावा आणि घरांत मुळींच अन्न नसावें अशा प्रकारची विपरीत स्थिति दाखविण्याकरितां ही म्हण योजतात.

आली धाड महारवाड्यावर—कोणीहि सरकारी कामदार गांवास आला असतां पहिल्यानें महाराच्या तपासासाठीं महारवाड्यांत माणूस धाडतो. गरीबांवर सर्वांची करडी दृष्टि असते. तु०–गरीबकी जोरू सबकी भाबी.

आली मेजवानीला, तर लावली कामाला—एखाद्या बाईला मोठ्या मेजवानीला म्हणून आदरानें बोलवावयाचें व ती आली म्हणजे तिला वाढावयास वगैरे लावावयाचें, अशा तऱ्हेच्या वागवणुकीस म्हणतात. तु०–आला भेटीला धरला वेठीला.

आलीया भोगासी असावें सादर—मनुष्याच्या नशीबानें जें जें त्याच्या वांट्यास येतें तें ते भोगण्यास त्यानें तयार असलें पाहिजे. तें कांहीं कधीं चुकत नाहीं. 'आलीया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूनियां ॥'–(जोग) तुगा १६३६.–पामो २०४,६०५.

आली शत्रूची स्वारी, सभा बसली राजद्वारीं—शत्रूचा प्रतिकार करण्याची पूर्वी कोणतीहि तयारी न करतां त्याची प्रत्यक्ष स्वारी आली म्हणजे राजवाड्यांत सभा भरवून काय उपाययोजना करावयाची याचा विचार करावयाचा, अशा दीर्घ-

सूत्री कारभाराबद्दल ही म्हण योजतात. तु०—आग लागल्यावर विहीर खणणें.

आली सुगी भरले गाल, गेली सुगी चापले गाल—(बायकी) खायला पुष्कळ आहे तोंपर्यंत लठ्ठ, पण नसेल तेव्हां कृश.

आली हिंमत, सदा मुफलस—[मुफलिस=दरिद्री] अति उदार तो सदा नादार.—सवि १४२. मूळ म्हण—'आली हिंमत सदा मुफसद' अशी असेल. [मुफसद=चंडखोर] त्याचा अर्थ, अंगांत सामर्थ्य असलें म्हणजे नेहमीं भांडखोरी वृत्ति धरावयाची.

आले आले रावजी ! गेले गेले रावजी !—रावजी नांवाचा बावळट दिसणारा परंतु महा बिलंदर माणूस एका खेडेगांवांत आला असतां तेथील ग्रामस्थांनीं त्याची गंमत करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्यास बायकोचें सोंग देऊन तमाशांत नाचण्यास लाविलें. बायकोचें सोंग घेण्याकरितां त्याच्या अंगावर उंची लुगडें व दागदागिने घातले. रावजी खेळ्यांची फळी फोडून बाईच्या वेषांत नाचत आला असतां सर्व खेळे व प्रेक्षक 'आले आले रावजी !' करूं लागले व तोहि वेडेंविद्रें नाचूं लागला. त्यानें लोकांना खूप हंसविलें व 'गेले गेले रावजी !' म्हणत एक एक पाऊल मागें घेतलें. खेळेहि तसेंच म्हणत मृदंग व टाळ वाजवूं लागले. व त्या गडबडींत रावजींनीं पळ काढला. त्या टाळ-मृदंगांच्या आवाजांत रावजी पळून गेल्याचें प्रथम समजलें नाहीं. पण समजल्यावर शोध करूनहि रावजी सांपडला नाहीं. अशा तऱ्हेनें ग्रामस्थ रावजीला बनवून करमणूक करण्यास गेले पण रावजीनेंच त्यांना बनवून दागिन्यांसह पळ काढला. यावरून एखादा दुसऱ्यास बनविण्यास गेला असतां स्वतःच बनला गेला तर वरील म्हण वापरतात.

आलें आलें रुखवत, कडाडला हांडा, उघडून पाहातात तों अर्धाच मांडा—रुखवत हें वरास वधूगृहीं विवाहाकरितां नेण्याच्या वेळीं त्यास फराळाकरितां आणतात. त्यावेळीं अनेक खाद्यपेय पदार्थ आणण्याची चाल आहे. परंतु मोठ्या कडाक्यानें वाजत गाजत रुखवत आलें, रुखवत आलें, असा गाजावाजा चालू असतां प्रत्यक्ष जाऊन पाहावें तों त्यांत अर्धाच मांडा ! हें पाहून अगदीं आशेची निराशा होते. यावरून मोठा लाभ होईल अशी आशा असतां कांहींच न मिळाल्यास किंवा अपेक्षा फोल झाल्यास म्हणतात. तु०—अहेर नारळाचा आणि गजर वाजंत्र्याचा.—केसरी ३०-११-३४.

आलें उरूस, चुकूं नये गुरूस—उरूसाच्या वेळीं गुरें मारलीं जातात. तेव्हां त्यावेळीं आपल्या गुरांना फार सांभाळलें पाहिजे. 'आलें उत्तर गुरूस चुकूं नये' अशी चुकीची म्हण पुस्तकांतून दिलेली आढळते.

आले घोड्यावर आणि गेले गाढवावर—वैभवानें याव-याचें व अपमान होऊन जावयाचें. येतांना बढाई मारीत याव-याचें व जातांना पराभूत होऊन जावयाचें, असा प्रकार वर्णन करण्याकरितां योजतात.

आलें तसें गेलें—कांहींच परिणाम न करणाऱ्या गोष्टीबद्दल योजतात.

आलें देवाजीच्या (भगवंताच्या) मना, तेथें कोणाचें चालेना—परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध कोणतीहि गोष्ट घडून येत नाहीं. 'आलें देवाजीच्या मना । तेथें कोणाचें चालेना ॥'—तुगा. ३२८३.—शाब १.१००; २.२१३.

आलें दैवीं सहन करणें, गेल्यावरी मुक्त होणें—आपली प्रारब्धेंकरून हीन दशा आल्यास ती निमूटपणें भोगण्यास तयार व्हावें व त्या आपत्तींतून पार पडावें व मग प्रयत्नास लागावें.

आले भाऊ, कोल्हे भाऊ—रिकामटेकडे येणारे लोक; ज्यांचा कांहीं संबंध नाहीं असे जाणारे येणारे लोक. प्राण्यांच्या गोष्टींतून वाघभाऊ, कोल्हेभाऊ असे प्रयोग येतात. त्यावरून जो येईल तो भाऊच.

आलें मी नांदायला, अन् मडकें नाहीं रांधायला—(बायकी) घरांत बायको करून आणली पण सामुग्री कोठें आहे ?—अशी विपन्न स्थिति.

आलें वारें, गेलें द्वारें (दारें-वारें), तें कोण आमचें सोयरें धायरें.—'आला वारा०' पहा.

आल्यागेल्याशिवाय सोयरेपण झुडतें—आल्यागेल्यानें आप्त-संबंध दृढ होतात. तेंच येणेंजाणें नसल्यास आप्तसंबंधहि तुटतात.

आल्या बाय कॉल्य शेंपडी—(गो.) आलेल्या बायांना कोल्ह्याची शेंपटी.

आल्याच्या सांगाती नि गेल्यांच्या बोळावा; आल्याचा सांगाती, जात्याचा बोळाऊ—सर्व ठिकाणीं आणि सर्व प्रसंगीं हजर राहणाऱ्या व्यक्तीचें वर्णन. येणाऱ्या मनुष्याचा आदर कर-णारा व जाणाऱ्या मनुष्यास पोंचविण्यास जाणारा. नवीन सत्ताधिकारी येईल त्याची खुशामत करून जाणाऱ्यास विसरून जावयाचें. Worshiper of the rising Sun.

आल्यावरी विपत्ती, कळे मैत्री आहे किती—खऱ्या मित्राची कसोटी संकटकाळींच होते. जो आपणांस विपत्तींत साहाय्य करतो तोच खरा मित्र. 'आपदि मित्र परीक्षा' पहा.

आलें धर्ना, सुपां धर्ना—(गो.) आलेलें धरत नाहीं, सुपांत धरत नाहीं.

आलारशी——आलारसी आणि खबरकसी—[अल्ला-रशी = गबाळ] एखाद्या गैबी, गबाळग्रंथी माणसाबद्दल योजतात.

आली——आलिये लागून खोलि वत्ता—(गो.) आळीला लागून पानहि जातें.

आली लागून ओलि गेलि—(गो.) आळीला लागून, ओलीहि गेली. वाळल्याबरोबर ओलें गेलें ?

आलेसा——आलेसा, ताणरे वोले, हांव तर भुरगो मुँगा; आलेसा, जेंवक योरे, हांव मानाय मुँगा—(गो.) अलेसा (Aleixo), वल्हीं माररे–तो म्हणतो, 'मी तर लहान आहे, माझ्याच्यानें होत नाहीं'. आलेसा, जेवाला येरे–तो म्हणतो, 'मी मोठा आहे, खूप जेवीन'. काम चुकवतील पण खाण्यास पहिल्या प्रथम, अशीं कांहीं माणसें असतात. तु०–खानेको हम लढनेको मेरा बडा भाई.

आव——आव धरणें—धैर्य दाखविणें; हुरूप, उत्साह दाखविणें. 'तेजस्वीहि धरी न आव रवी ।–मो द्रोण ४'१९.

आव सोडणें—धीर सोडणें; अवसान गाळणें; हिंमत सोडणें. 'मरतील सकृष्ण पांडव धीरहि ते सोडितील आवास । '–मो द्रोण ३.६७.

आव सोडून जाणें—धैर्य गळणें; धीर सुटणें; धीर खचणें; अवसान सुटणें. 'आहें संकोचें, परि सोडुनि गेला मघांचि आव मला ।–मो द्रोण ३.११४.

आव——आव जाव घर तुमारा—ज्या ठिकाणीं कोणासहि प्रतिबंध नसतो, कोणींहि यावें जावें असें ठिकाण. जेथें अप्रतिबंध संचार करतां येतो अशी जागा. बहुधां निंदार्थी वापरतात. घर मोकळें आहे, वाटेल त्यानें यावें, वाटेल तें करावें, दाद नाहीं, याअर्थी.

आवबे कुत्ते, पावसे लढ—'येरे कुत्र्या, खा माझा पाय' पहा. आपण होऊन एखादी भानगड गळ्यांत घेणें.

आवबे फत्तर, पडोबे पाव—ए दगडा, इकडे ये व माझ्या पायावर पड, माझ्या पायांना इजा कर. आपल्या हातानें मुद्दाम काहीं अनर्थ आपल्या अंगावर ओढून घेणाराच्या कृतीला ही म्हण लावतात.

आवबे लडके, विजापूरकी (बऱ्हाणपूरकी) खबर लाव—१ कोणाला तरी कांहीं तरी काम सांगणें; अधिकार नसतां निष्कारण कांहीं तरी भानगड करणें. कोणास तरी वेठीस धरणें. २ उंटावरून शेळया हांकणें.

आवी मळवा तो बेसाडी दळवा—(गु.) भेटायला आली तीस दळावयास बसवली. तु०–आली भेटीला धरली वेठीला.

आवजी–आवाजी——आवजी आवजी, आपणालाच नावाजी; आवाजी आवाजी, आपलेच कुले नावाजी—स्वतःची स्तुती स्वतःच करणाऱ्या व्यक्तीस म्हणतात.

आवड——आवड असली कीं सवड आपोआप होते—आवडत्या गोष्टीसाठीं माणूस वेळ काढतोच. तु०–Where there is will, there is a way.

आवड गोड आहे—जी वस्तु आपणास आवडते ती वस्तु गोड लागते. तेव्हां गोडी ही वस्तूंत नसून आपल्या आवडींत आहे.

आवडि आक्कालें बेकळ, सोदूदुन काळ्यारि दाकवनु दिवयेत—(गो.) [बेकळ=एक दागीना] आक्काचें बेकळ आवडतें पण हुडकून काढल्यावरच दाखवून देतां येतें ?

आवडीचा पाहुणा, दिवाळीचा सण—आपल्या अत्यंत प्रेमांतील मनुष्यानें आपल्याकडे पाहुणे म्हणून यावें व त्याच संधीस दिवाळीचा सण यावा, म्हणजे त्यावेळीं प्रत्येक गोष्टींत आपण सढळपणानें वागूं व प्रत्येक गोष्टीपासून आपणांस विशेष आनंद होईल व सर्वच गोष्टींत एकंदर बहार उडेल, यांत शंका नाहीं. तु०–दुधांत साखर.

आवडीनें केला नवरा, त्याच्या पायाला भोंवरा; आवडीनें केला पति, त्याला झाली रक्तपिती—एखाद्या मनुष्याशीं मोठया प्रेमानें एखाद्या स्त्रीनें विवाह करावा व त्याचा तर पाय केव्हांहि थाऱ्यावर नसावा, त्यानें एकसारखें बाहेर फिरत राहावें किंवा त्याला मोठा रोग व्हावा; अशी स्थिति झाली म्हणजे त्या स्त्रीची जी केविलवाणी अवस्था होते ती दाखविण्यासाठीं ही म्हण वापरतात. एखादी गोष्ट मोठया आवडीनें करावयास जावें तों अजीबात फसगत व्हावी.

आवडीनें केली नवरी, तिची गांवामध्यें नित्य फेरी—आपल्या आवडीची बायको करावी पण ती निघावी व्यभिचारी, म्हणजे हाल विचारूं नका.

आवडीनें केली पर, ती आली वर—[पर=प्रकार] मोठया हौसेनें एखादी गोष्ट करावी व तीपासून सुख व्हावयाच्या ऐवजीं त्रास व्हावा, अशी स्थिति झाली असतां ही म्हण वापरतात. [मोठया प्रेमानें एखाद्या नवीन प्रियकराबरोबर रुचिपालट म्हणून समागम करावा पण त्यापासून अंगावर रोगाचीं चिन्हें उठावीं–हा प्रकार]

आवडीला चाड नाहीं व प्रीतीला तोल नाहीं; आवडीला चव नाहीं, प्रीतीला बिटाळ नाहीं; आवडीला मोल नाहीं आणि प्रीतीला तोल नाहीं—आपल्याला जी वस्तु आवडते

तिची वास्तविक किंमत कितीहि असली तरी ती आपणांस बहुमोल वाटते व ज्या व्यक्तीबद्दल आपणांस प्रेम वाटतें तिची बरोबरी आपल्या मतें दुसरी कोणतीहि व्यक्ति करूं शकत नाहीं. तु०-(गु.) मन मान्युं त्यां जात शी जोवी. (इं.) Fair is not fair, but that which pleaseth.

आवडणें——**आवडे सोन्याची शृंखला, खुपे फुलाचीही माला**—सांखळी सोन्याची असली तरी ती खुपत नाहीं पण माळ फुलांचीहि असली तरी ती खुपते. एखाद्या श्रीमंतीला भुलणाऱ्या व साध्या गोष्टीला नाकें मुरडणाऱ्या व्यक्तीबद्दल योजतात.

आवडेल तें खाय, पण चोरून न जाय; आवडेल तें खाय परी, चोरून घेऊं नको तरी—आवडेल तें खात जा पण चोरी करून निघून जाऊं नको. खादाड परवडतो पण चोर परवडत नाहीं. माणूस विश्वासू पाहिजे.

आवडता-ती-तें——**आवडता विचार जरी,पाहूनियां आचरी**—आपल्याला एखादी गोष्ट करणें जरी फार आवडत असलें तरी ती करण्यापूर्वीं पूर्ण विचार करावा.

आवडतीचा शेंबूड गोड पण नावडतीचें मीठ आळणी—आपल्याला जें मनुष्य प्रिय असतें त्याच्या खोड्यां-दुर्गुणांकडेहि आपण प्रेमानें पाहून त्यांत आनंदच मानतो; पण अप्रिय मनुष्यानें केलेल्या चांगल्या गोष्टीहि आपणांस आवडत नाहींत.

आवडतिच्या सुपाऱ्या०—वरील प्रमाणेंच. सबंध कविता अशी-'क्षीर न खाय खळाची प्रभु विदुराच्यांचि जेवितोचि कण्या। आवडतिच्या सुपाऱ्या रोठ्या बरड्या नव्या जुन्या चिकण्या॥'

आवडतें व्हावें, तर भलें असावें—आपण जर अनेकांस प्रिय व्हावें अशी इच्छा असेल तर आपण त्यांच्याशीं चांगल्या प्रकारें वर्तन केलें पाहिजे.

आवडल्याक मसण गोड—(गो.) प्रीति असली म्हणजे मसणवट देखील गोड वाटते. प्रिय मनुष्याच्या संगतींत स्मशानांत देखील सुख वाटतें.

आवडत्याचा शेंबूड गोड—'आवडतीचा शेंबूड०' पहा.

आंवढा—आंवढा गिळणें—विकार दाबणें; संयमन करणें. 'अनावर विकारप्रवाह थोपविल्यासारखा आंवढा गिळून कांचननें विचारलें.'-दौलत पृ. १३५.

आवतन——**आवतन टाकून भीक मागणें**—आमंत्रण पहा.

आवतो—आवतो वडो तोंडां पळ्ळो—(गो.) आयता वडा तोंडांत पडला.

आवदी——**आवदियांस बरें संतेस कोंत्र**—(गो.) तपशील बरा, निकाल वाईट.

आवर्त——९ (नऊ) आवर्त—(पृथ्वीचे.): १ कुशावर्त, २ इलावर्त, ३ ब्रह्मावर्त, ४ मलयावर्त, ५ केत्वावर्त, ६ भद्रसेनावर्त, ७ इंद्रस्पृकावर्त, ८ विदर्भावर्त, ९ कीटकावर्त.

आवशी——**आवशीन कडी केली तर ती पचकवणी, नी बायलेन केली तर ती रुचकवणी**—[आवशी=आई] (कों.) बायकोच्या हातचें तेवढें गोड. आईच्या हातचें वाईट. आवै पहा.

आवळा——अवळा पहा.

आवांका——**आवांक्यापेक्षां उपक्रम व खाण्यापेक्षां मचमच किती**—कांहीं लोक आपल्याला उरकतां येणार नाहीं इतकीं कामें अंगावर घेतात; तसेंच कांहीं लोक प्रत्यक्ष खाण्यापेक्षां अमुक हवें तमुक हवें, अमुक असें तमुक तसें वगैरे बडबड करतात त्यांस अनुलक्षून ही म्हण वापरतात. यावरून आपल्या कुवतीप्रमाणें काम अंगावर घ्यावें व कोणत्याहि बाबतींत वृथा बडबड करूं नये.

आवाहन——**आवाहन विसर्जन एकफांतां (एकमुहुर्तांक) कर नये**—(गो.) आवाहन व विसर्जन एकाच वेळीं (एकाच मुहुर्तावर) करूं नयेत. पुढील म्हण पहा.

आवाहन विसर्जन बराबर—एखादी गोष्ट झटपट उरकून टाकावयाची असल्यास हा वाक्प्रचार योजतात. पूजा करण्याच्या वेळीं देवतेला आवाहन करतात व यथास्थित पूजा झाल्यावर देवतेचें विसर्जन करतात. तेव्हां आवाहन आणि विसर्जन यांच्यामध्यें सर्व षोडशोपचार असतात.

आवै, आवइ-य——**आवइ जेवण वाण्णा, बापइ मागु सोण्णा**—(गो.) आई वाढीना व बाप (भीक) मागूं देईना.

आवय पळयता पोट आनि बायल पळयता पाठ—(गो.) आई पाहते पोटाकडे आणि बायको पाहते पाठीकडे. आई पहा.

आवसूनें पळवुंचें पोट, बाइलेनें पळवुंचें मोट—आईनें पहावें पोट, बायकोनें पहावी मोट. वर पहा.

आवुस्सुं नात्तिलें चेर्डुं पोट्टारें; आवै नाथिलें चेड्डूं पोटारें—(गो.) आईवेगळें मूल खादाड असतें. कारण पुन्हां आपल्याला खाणें केव्हां मिळेल याची त्याला कल्पना येत नाहीं. म्हणून तें मिळेल तेव्हां खूप खाऊन घेतें.

आवै जाणता भुरग्याचो बाप, आनी देव जाणता पाप—(गो.) मुलाचा बाप खरोखर कोण तें आईच ओळखते व

मनुष्याचें पाप देवच जाणतोच. तु०–मन जाणे पापा व आई जाणे मुलाच्या बापा.

आवै नासिल्ल्याचें पोट व्हड; आवय नाशिल्ल्याचें पॉट व्हड, रान नाशिल्यालॉ कॉळसॉ व्हड–(गो.) आई नसलेल्याचें पोट मोठें, रान (जंगल) नसलेल्याचा कोळसा मोठा. ज्याला वाली नाहीं त्याबद्दल निंदा, बोभाटा साहाजिक होतो.

आवै–बापुय सोडूं येत, पुण शेजारी–सामारी सोडुं येता ?–(गो.) आईबाप सोडतां येतील पण शेजारी सोडतां येणार नाहींत. चांगल्या शेजाऱ्यावांचून राहाणें कठीण जातें.

आवै मरता धुवेकडेन, धूव मरता गांवच्या मिंडाकडेन; आवय मरे धुवेलागीं, आनी धुव मरे गांवच्या मिणालागीं; आवै रड धुवेखातीर आनी धूव रड गांवच्या मिंडा खातीर–(गो.) आई मरते मुलीसाठीं व मुलगी मरते आपल्या प्रियकरासाठीं. तु०–(अ) यां चिंतयामि सततं० (आ) आईचा जीव बाईपाशीं आणि बाईचा जीव गांवापाशीं.

आवै मरूं, मावशी उरूं–(गो.) माय मरो मावशी जगो.

आवै सोसीत, बापूस पोशीत–आई शुश्रुषा करते व बाप पसौ खर्च करतो, त्यांत इतरांस वैषम्य वाटण्याचें कारण काय? दुसऱ्यांचें काय जातें. 'आई सोसणार व बाप पोसणार' पहा.

आवैक नाका लेंकरूं, आजे कित्या जाय नातरूं ?–(गो.) आईला नको लेंकरूं, आजीला कशाला पाहिजेत नातवंडें?

आवैक पळौन धुवेक व्हर, दूद पळौन म्हशीक व्हर–(गो.) मुलीशीं लग्न करण्यापूर्वीं तिच्या आईकडे पाहा व म्हैस विकत घेण्यापूर्वीं तिच्या दुधाची परीक्षा करा. बाह्य देखाव्यावरून फसूं नये. तु०–आई तशी लेक; आत तशी भाची.

आवैची चोळी धुवेक जावळ लागली कीं आवैचो अवतार सांपलो–(गो.) आईची चोळी मुलीला होऊं लागली म्हणजे आईची पिढी संपली. तु०–प्राप्तेतु षोडशे वर्षे पुत्रमित्रसमाचरेत्।

आवैची भैण मावशी, ती म्हाका जीवशी–(गो.) आईची बहीण मावशी, ती मला जिव्हाळ्याची. तु०–माय मरो, मावशी जगो.

आवैचें मन कांतली, भुर्ग्यांचें मन करटी–(गो.) आईचें मन म्हणजे नारळाच्या आंतील गीर व मुलांचें मन म्हणजे नारळाच्या करटीप्रमाणें असतें. एकीकडे मातृवात्सल्य व दुसरीकडे मातेविषयीं निष्ठुरता दाखविते.

आवैन बापायन दिल्ली भरलेल्या गोठयाक, पुण कपाल फुटक्याक कोण कितें करतलो–(गो.) चांगल्या ठिकाणीं दिलेली मुलगी कमनशीबानें दारिद्र्यावस्थेंत सांपडली, त्याला कोण काय करणार ?

आशा–**आशेची निराशा होणें**–अपेक्षेप्रमाणें गोष्टी घडून न येणें; प्रथम एखादी गोष्ट होण्याची खात्री असतां प्रत्यक्ष ती घडून न येणें.

आशेस लावणें–आशा दाखविणें; खोटें आश्वासन देऊन गुंतविणें; लोभ दाखवून गुंतवून ठेवणें. "याप्रमाणें मसलत करून नित्यशः 'आज देतों उद्यां निशा करतों' म्हणोन आशेस लाविलें"–भाब ५३.

❀ **आशा अमर आहे**–मनुष्याची आशा मरेपर्यंत सुटत नाहीं. मनुष्य अखेरपर्यंत आशेवर जगत असतो.

आशा आशिल्या साधूक, भीक्षयो आशिल्या संन्याशाक नंब्रू नये–(गो.) आशा असलेल्या साधूला व भिक्षा असलेल्या संन्याशास वंदूं नये.

आशा कपाळ करंटी, लोक लागले पाठीं–मनुष्य आशेनें एकसारखा एखाद्या गोष्टीच्या पाठीमागें लागलेला असतो व कितीहि कालपर्यंत यश आलें नाहीं तरी तो आशा सोडीत नाहीं. पण अनेकदां आशा सफळ न झाल्याचींच उदाहरणें फार.

आशा चळयारि आयुष्य चडतवे ?–(गो.) आशा वाढली तर आयुष्य वाढतें का ?

आशा जनीं नसती, छाती फुटूनियां जाती–मनुष्याला जर आशा नसती तर दुःखानें तो कधींच उरीं फुटून मरता. मनुष्याला आयुष्यांत अनेकदां माघार घेण्याचे व कार्यनाश होण्याचे प्रसंग येतात; पण तो पुढें केव्हांतरी आपल्या यत्नास यश येईल किंवा दैव आपणांस साहाय्य होईल या आशेनें दिवस काढीत असतो.

आशा ठेवील, तो यश सेवील–जो आशावान् असेल त्यालाच यश मिळेल.

आशा–तृष्णा–कल्पना पापिणी, घात मांडला माझा यांनीं–निरनिराळ्या गोष्टींसंबंधीं आशा, इच्छा व वासना मनुष्याच्या नेहमीं पाठीमागें लागलेल्या असतात. हे विकार दुष्ट मानले आहेत व त्यामुळें मनुष्याचा वारंवार घात होत असतो.

आशा दुजाची करितो, खातापितां कष्टी होतो–विनाकारण एखाद्या भलत्याच गोष्टीची किंवा दुसऱ्या व्यक्तीच्या प्रेमाची, साहाय्याची अगर सहानुभूतीची मनुष्य आशा करीत असतो व आपलें खाऊन पिऊन सुखांत घालवावयाचें आयुष्य दुःखांत घालवीत असतो.

आशा देणें, निराशा करणें–एखाद्या मनुष्याला व्यर्थ आशा दाखविली असतां पुढें निराश करण्याचा प्रसंग येतो. त्यापेक्षां प्रथमच नाहीं म्हणणें बरें.

आशा धरावी परमेश्वराची, निराशा धरावी इतरा जनांची—मनुष्यानें फक्त परमेश्वरावर विश्वास ठेवावा व त्याच्याच साहाय्याची अपेक्षा करावी. इतर कोणी मनुष्य आपणांस साहाय्य करील अशी अपेक्षा कधीं करूं नये.

आशाधारी मरतो, निराश तो वांचतो—जो मनुष्य दुसऱ्याच्या साहाय्याची अपेक्षा करून त्यावर अवलंबून राहतो त्याची शेवटीं निराशा होते व जो कोणाची आशा करीत नाहीं, स्वतःवरच अवलंबून राहतो तो यशस्वी होतो.

आशा पतिव्रता भली, सारा मुलूख पालथा घाली—आशा ही प्रत्येक मनुष्याला अशी चिकटून असते कीं, त्याला जन्मभर सोडीत नाहीं. पण उलट कोणत्याहि मनुष्याला ती आपल्या झपाट्यांतून सोडीत नाहीं. याप्रमाणें सर्व जगावर तिचा प्रभाव चालतो.

आशा प्रीतीचें बंधारण, आहे मनाचे स्वाधीन—आशा आणि प्रेम हीं बंधनें मनाच्या ताब्यांत असतात. आपलें मन आपल्या स्वाधीन असेल तर आशा अथवा प्रेम हीं आपल्याला पीडा करूं शकत नाहींत. त्यांना योग्य दाबांत ठेवतां येतें.

आशाभंगें होतो दुःखी, आशा पुरतां बहु सुखी—प्रथम आशा असून मागून एखाद्या गोष्टींत निराशा झाली तर त्यापासून दुःख होतें; परंतु आशा सफळ झाली असतां फार आनंद होतो.

आशा मेल्यावरी, कांहीं न राहे माघारी—मनुष्याला या जगांत कोणतीहि आशा राहिली नाहीं तर त्याला आयुष्यांत कांहीं कर्तव्यच नाहींसें होतें व त्यामुळें त्याचें आयुष्य शून्यमय होतें. कारण कसल्या तरी आशेवर तो जगत असतो.

आशा वेडी असते—आशेमुळें मनुष्य फसला जातो व त्याचा विवेक नष्ट होतो. आशा हा मनोविकार बुद्धीला मांद्य आणतो व सारासार विचारहि पुष्कळदां आशेच्या भरांत मनुष्याला सुचत नाहीं. 'आशा वेडी राया जरि भीष्म द्रोण कर्णही खपला।' —मोरो.

आशा सुटेना, देव भेटेना—जोपर्यंत मनुष्याची ऐहिक गोष्टींवरील आशा अथवा आसक्ति सुटत नाहीं तोंपर्यंत त्याला परमेश्वराची प्राप्ति कधींहि होणार नाहीं.

आशायाः परमं दुःखं, निराशा परमं सुखं—आशेपासून शेवटीं दुःखाचीच प्राप्ति होते, कारण पुढें निराशा होण्याचा संभव असतो. पण ज्याला प्रथमपासूनच आशा नसते, जो मूळचाच निराश असतो, त्याचा आशाभंग होत नाहीं व तो कर्तव्यपरायण होऊन सुखी होतो.

आशेचें शेत शंभराला घेतलें काय, विकलें काय, सारखेंच—आशा कोणत्याहि गोष्टीबद्दल बाळगावी किंवा सोडावी. त्यामुळें इतर गोष्टींवर तादृश परिणाम होत नाहीं. नुसती आशा बाळगून केवळ कोणतीहि गोष्ट घडत नाहीं, तर प्रत्यक्ष प्रयत्नावर सर्व गोष्टी अवलंबून असतात.

आशेनें जाणें, निराशेनें येणें—प्रथम एखाद्या गोष्टीची आशा धरल्यावर मग आशाभंग झाला म्हणजे म्हणतात.

आशेसारखा रोग नाहीं—आशा हा एक प्रकारचा मानसिक रोग आहे व त्याची बरोबरी कोणताहि शारीरिक रोग करूं शकत नाहीं.

आशेसारखें दुःख नाहीं, निराशेसारखें सुख नाहीं—आशाभंग हा अतिशय खेदकारक असतो; तेव्हां व्यर्थ होणाऱ्या आशेपासून अलिप्त असणें हेंच सुखावह होय. वर पहा. (अ) आशायाः परमं दुःखं निराशा परमं सुखम्। (आ) आशा बलवती कष्टं नैराश्यं परमं सुखम्। आशा निराशाः कृत्वा तु सुखं स्वपिति पिंगला॥—सुर ७६.२२.

आशेसारखें सुख नाहीं आणि निराशेसारखें दुःख नाहीं—मनुष्य आशा बाळगून असला म्हणजे सुखी असतो. त्याची ती आशा वेडी का असेना तीपासून तो फार सुखी होतो यांत शंका नाहीं. पण एकदां निराशा का झाली कीं ती अतिशय तापदायक असते. निराश माणसाला कसलेंच सुख वाटत नाहीं.

आश्रम——आश्रमचतुष्टय— १ ब्रह्मचर्य, २ गार्हस्थ्य, ३ वानप्रस्थ, ४ संन्यास.

आश्रय——आश्रयाविना, हिंमत खरी जाणा—ज्याच्या अंगीं हिंमत म्हणजे खरें धैर्य अथवा ताकद आहे त्याला कोणाचेंहि साहाय्य लागत नाहीं. व खऱ्या धैर्याची परीक्षा जेव्हां कोणताहि आधार नसतो अशा वेळींच होते.

आश्वासन——आश्वासन देतो तो बद्धक होतो—एखाद्या मनुष्याला आपण साहाय्य करण्याचें वचन दिलें म्हणजे तें पुरें करणें आपल्यावर बंधनकारक असतें. याप्रमाणें आपण त्याला एक प्रकारें बांधले जातों व आपण संकटांत पडतों.

आषक——आषक अंधा होता है—प्रेम आंधळें असतें. म्हणून प्रेमी मनुष्य हा आंधळ्यासारखा वागतो.

आषकका घर नाशक, रंडीका घर पूना, जिसकू न मिले उन्ने, मालेगांव धुलिेकू जाना—प्रेमी मनुष्यानें नाशिकला जावें, वेश्याप्रिय मनुष्यानें पुण्याचा रस्ता धरावा व हीं दोन्हीहि ज्यास साधणार नाहींत त्यानें धुळें-मालेगांवीं जावें.

वरील गांवांबद्दलची एका काळची लोकांची समजूत वरील म्हणींत व्यक्त होते. प्रत्येक मोठ्या गांवाबद्दल एकेक म्हण असते. तिवरून त्या गांवचा इतिहास थोडाबहुत तरी अजमावतां येतो.

आषाढ——**आषाढी आणि सण हाकारी**—आषाढी एकादशीपासून चातुर्मास्यास आरंभ होतो व पुढें श्रावण, भाद्रपद, आश्विन वगैरे महिन्यांत वरचेवर बरेच सण असतात व अखेरीचा सण अक्षयतृतीया हा असतो. दिवाळीनंतर सण संपतात, कारण 'दिवाळी आणि सण निवारी' अशी जोडून म्हण आहेच. तु०-अखिति झाली सणाची निश्चिंति.

आषाढीं तट, श्रावणीं भट, भादवी कुणबट--आषाढ महिन्यांत खूप खावयास मिळाल्यामुळें तट्टें चांगलीं टणटणीत होतात. श्रावण महिन्यांत तिथिवार, सण वगैरे बरेच असल्यामुळें भटांची चंगळ उडते. तर पिकें वगैरे तयार होत आल्यामुळें भाद्रपद महिन्यांत कुणबी लोक मजेंत असतात. या म्हणीवरून सामाजिक स्थिति चांगली प्रतीत होते.

आस——**श्वास तों आस**—मागें पहा. आशा अमर आहे. मनुष्य मरेपर्यंत आशेच्या पाठीमागें लागून धडपड करीत असतो.

आसका बाप, निरासकी मा—जेव्हां अपत्याकडून कांहीं मिळण्याची, घडण्याची आशा असते तोंपर्यंत पिता पुत्रावर प्रेम करतो; परंतु माता मात्र कांहीं आशा नसतांहि केवळ निरिच्छ असें प्रेम करते. पुढील सबंध म्हण पहा.

आसका बाप, निरासकी मा, होतेकी बेहेन, न होतेका दोस्त, पैसा गांठ, जोरू साथ (जागे सो पावे, सोवे सो गमावे)—एक दोहरा. बापाला पुत्राकडून पुढें सुख मिळेल ही अपेक्षा असते म्हणून तो पुत्राला चाहतो; मातेला कोणतीहि अपेक्षा नसते व तिचें पुत्रप्रेम निरपेक्ष असतें व निराशेच्या वेळींच ती अधिक उपयोगी पडते; आपणाजवळ धन असेल तर आपली बहीण आपणावर प्रेम करील; मित्राचें प्रेमहि आपणांस जवळ कांहींहि नसतांना उपयोगी पडतें; पैसा मात्र जेवढा प्रत्यक्ष जवळ असेल तेवढाच वेळेवर उपयोगी पडतो व स्त्रीचें प्रेम हें सहवासापुरतेंच कायम टिकतें; तेव्हां आपण स्त्रीपासून दूर गेल्यास स्त्रीप्रेमाचा भरंवसा नाहीं. (जो जागृत राहील तो यशस्वी होईल जो निजेल तो गमावील.) सत्यविजय नाटकाचें कथानक हेंच आहे.

आसणें——**आशिळें नाशिळें ह्यजे गायरीं, ह्याका खेंची सोयरीं-धायरीं**—(गो.) मला मिळताहे तेंच मला पुरेसें नाहीं, तर मी सोयऱ्याधायऱ्यांचा विचार कसा करणार? साझें सर्व मला पाहिजे याअर्थी.

आसल्यार घोंगॉ, ना जाल्यार ऑगॉ—(गो.) असल्यावर या बसा म्हणणें, नसल्यावर अरेतुरे करणें.

आसल्यार सगळिं आसात ना जाल्यार कोण ना—(गो.) असल्यावर सगळीं आहेत, नसल्यावर कोणी नाहीं.

आसा तें वाढ माका, तुमिं मागीर रानून जेवात—(गो.) आहे तें मला वाढ, तुम्ही मग शिजवून जेवा. स्वार्थी वृत्ति.

आसा पांघरूं खाता शीं—(गो.) पांघरूण असलें तर थंडी वाजते.

आसा फुकटचो फोदो आनि झंवता दादो—(गो.) मराठी म्हण—फुकटचा फोदा आणि झंवरे दादा. फुकटचें कांहीं मिळाल्यावर त्याचा यथेच्छ उपभोग घेणें.

आस्तना ना केळें, मागीरि इत्याक हलाळें?—(गो.) असलेलें नाहींसें केलें, मग कशाला हंसावें?

आस्तना वत्ता पालकेरि, मर्तांचि वत्ता वाश्यारि—(गो.) जिवंत असतांना नेतात पालखीवरून, मेल्यानंतर नेतात तिरडीवरून.

आसन——**आसन ओळखणें**—घोड्यानें स्वाराचें पाणी जोखणें; घोडा आपणावर बसणारा कितपत हुशार आहे हें तावडतोब ओळखतो. यावरून एखाद्याचें अवसान अजमावणें; दुसऱ्याची ताकद, हिंमत वगैरेबद्दल योग्य अचूक अनुमान करणें. एखाद्या अधिकाऱ्याचा स्वभाव, त्याच्या हातांतील सत्ता वगैरेचा त्याच्या हाताखालील लोकांस बरोबर अंदाज लागणें.

आसन गवाळें फेकणें—(व.) चंबूगवाळें फेकणें; बळेंच आमंत्रण लावणें.

आसन गुंडाळणें—बिऱ्हाड उचलणें. मनुष्य जावयास लागला म्हणजे आपलें बसावयाचें आसन बांधूं लागतो. यावरून प्रयाणाची तयारी करणें; चालूं लागणें; गाशा गुंडाळणें; सर्व सामान सुमान आवरून निघून जाणें.

आसन घालणें-ठोकणें—मांडी ठोकून वगैरे बसणें, बैठक घालून बसणें; यावरून कांहीं काळापुरतें तरी स्थिर होणें; एखाद्या ठिकाणीं कांहीं काळ थांबण्याच्या दृष्टीनें बैठक मारणें; एखाद्या ठिकाणीं न हलण्याच्या इराद्यानें घट्ट बसून राहणें; हट्टानें एखाद्या ठिकाणीं बसून राहणें.

आसन जड होणें—१ घट्ट बसणें; एखाद्या ठिकाणीं सुस्थिर होणें; चांगला जम बसून महत्त्वास चढणें. २ चढून जाणें; गर्वानें फुगणें; अधिकारादि प्राप्तीमुळें स्वतःला फार महत्त्व आहे असें वाटूं लागणें.

आसन जमणें—१ चांगला जम बसणें; स्थिर होणें; कामधंदा वगैरे चांगला चालूं लागणें; सर्व व्यवस्था ठीक जमणें. २ आकाशांत ढग वगैरे जमून येणें; अभ्र जमून दाट काळोखी येणें; आकाश ढगांनीं वगैरे व्यापून टाकणें.

आसन जमविणें—आपला बस बसविणें; आपलें स्थान स्थिर करणें; सर्व व्यवस्था यथास्थितपणें लावून घेणें; यथास्थित बस्तान बसविणें.

आसन जोडणें—उकिडवें बसणें; दोन्ही पाय जोडून बसणें.

आसन ठरणें—१ स्थिर होणें; सुस्थित होणें; जम बसणें; एका ठिकाणीं कांहीं काळ तरी टिकाव धरून राहणें. २ घोड्याच्या पाठीवर बसण्याचा सराव होणें; आत्मविश्वासानें घोड्यावर स्वार होऊं लागणें.

आसन ठेवणें—१ घर करणें; स्थिर होणें; व्यापणें; आश्रय करणें; एखाद्या ठिकाणीं प्रवेश करून घेणें; २ घोड्यावर चढणें.

आसन डळमळणें—१ स्थान अस्थिर होणें; पाया हलूं लागणें; एखाद्या स्थानावरील वास्तव्य अनिश्चित असणें; एखादी जागा सोडावी लागण्याचा संभव उत्पन्न होणें. २ बसलेला जम विसकटूं लागणें; बसलेली व्यवस्था बिघडूं लागणें; बसलेली घडी विस्कटणें. ३ मन अस्वस्थ, चंचल होणें; स्वास्थ्याबद्दलची काळजी वाटूं लागणें.

आसन ढळणें—अस्थिरता येणें; एखादी जागा सोडावी लागणें; एखादा अधिकार हातांतून जाणें. महत्त्वाचें पद सोडावें लागणें.

आसन पडणें—१ जम बसणें; स्थिर होणें; स्थायिकता येणें; कायमपणा येणें. २ स्थानापन्न होणें; एखाद्या पदावर स्थिर होणें.

आसन बसणें—आसन ठरणें; कायमपणा येणें; जम बसणें.

आसन रुंदावणें—१ लठ्ठ होणें; बलवान् होणें. २ अधिकाधिक सत्ता हातांत येणें; अधिकारक्षेत्र वाढणें. ३ लवाजमा वाढणें; पसारा पसरणें; व्याप वाढणें. ४ महत्त्व वाढत जाणें.

आसन सोडणें—१ स्थान सोडणें; एखादें अधिकाराचें पद सोडून देणें; अधिकारन्यास किंवा पदन्यास करणें; हातांतील सत्ता जाणें. २ आपलें नेहमींचें ठिकाण, प्रांत, अधिकार वगैरेंचा त्याग करणें.

आसनीं खेळणें—१ आपल्या झाडामध्यें (भुतानें वगैरे) संचार करणें; अवसर येणें; अंगांत येणें. २ आपल्या जागेंत, आपल्या साधनांनीं खोडया, उपद्रव करणें. ३ आपल्या अधिकाराचा प्रभाव दाखविणें; आपल्या सत्तेची चुणूक दाखवून एखाद्यास त्रास देणें, छळणें.

आसनीं येणें—१ मूळ पदावर येणें; आपल्या मूळच्या ठिकाणीं परत येणें; कायमच्या जागेवर परत येणें. २ मूळ स्थितीवर येणें; पुन्हां 'येरे माझ्या मागल्या' प्रमाणें परत आपल्या जागीं येणें.

आसनें—**एक्या मांडीवर (टिरीवर) चौऱ्याशीं आसनें**—एकाच बैठकींत किंवा एकाच वेळीं अनेक कामें करणें; योगांत चौऱ्यायशीं आसनें असतात. त्यावरून वरील वाक्प्रचार.

आस-पास—**आस ना पास, सत्त्यानाश**—जवळपास अगदीं कांहीं नाहींसें होऊन सत्यानाश होणें. कांहीं अंशाहि जवळ न राहून अगदीं नाश होणें.

आसभास—**आसभास काय समजना**—भाषा चालीरीती कांहीं समजत नाहीं.

आसर—**आसर पाडणें**—(गु.) परिणाम करणें; प्रभाव दाखविणें; आपला गुण दाखविणें.

आसा—**आसा मरे, निरासा जीये**—मागें आशधारी मरतो पहा. मूळ हिंदी—आशाका मरे, निराशाका जिये.

आसुरी—**आसुरी-उपचार-उपाय-चिकित्सा**—भयंकर उपाय; कांहीं आशा नसतां केवळ निराश होऊन कांहीं तरी उपाय करावयाचा म्हणून केलेला एखादा तीव्र, जालीम, इलाज. डाग देणें वगैरे.

आस्तार—**आस्तार बाइलेक कास्तार घोवु**—(गो.) "आस्तार" बायकोला "कास्तार" नवरा.

आस्ते—**आस्ते उतार बहानचोद**—कोणा परोपकारी मनुष्यानें एका दीन व शरीरानें अपंग झालेल्या मनुष्याला चालवेना म्हणून आपल्या खांद्यावर घेऊन इष्ट स्थळापर्यंत नेलें. तेथें पोंचतांच उपकार न मानतां तो कृतघ्न अपंग उलट त्या उपकारकर्त्याला शिव्या देऊन आज्ञा करतो कीं, अबे बहानचोद, आस्ते उतार म्ह. मला जपून खालीं ठेव, नाहीं तर याद राख. कृतघ्न मनुष्याचें हें चित्र आहे. 'अस्त्युत्तर' पहा.

आस्लेशा—**आस्लशे पावसु, उदक थोडें गवजि चडि**—(गो.) आश्लेषा पावसाला पाणि थोडें, गर्जना जास्त.

आहार—**आहारीं असणें**—कह्यांत असणें; ताब्यांत असणें; वजनाखालीं असणें.

आहारीं आणणें, आहाराखालीं आणणें—कह्यांत, कबज्यांत, ताब्यांत वर्चस्वाखालीं आणणें.

⊛ **आहार खपता, निद्रा पड्डा, पीडें नांव कमळ उसैटा**—(गो.) जेवण जातें, झोंप लागते, या रोगाचें नांव, कमळ उमलतें.

आहारं द्विगुणं प्रोक्तं शय्याच (निद्राच) कुचमर्दनं। नास्ति मानापमानं च धश्वोटं पंचलक्षणं॥—(हा श्लोक नवीन बनविलेला दिसतो.) जो मनुष्य आडदांड असतो, ज्याला सभ्यतेचे नियम माहीत नसतात, जो धसमुसळेपणानें वागतो त्याचा आहार सामान्य मनुष्याच्या दुपटीनें असतो, तो अधाशासारखा फार खातो, वेळीं अवेळीं झोंपतो, स्त्रियांचें मागेंपुढें न पाहतां कुचमर्दन करतो, व तो मानापमानाबद्दल बेफिकीर असतो. अशीं या उडाणटप्पूचीं पांच लक्षणें असतात.

आहाराक आनी व्यवहाराक सोयरीक ना—(गो.) आहाराला आणि व्यवहाराला नातें नाहीं. तेव्हां त्यासंबंधीं भीड धरूं नये. पुढील पहा.

आहारीं व्यवहारीं कदापि लज्जा न धरी; आहारीं व्यवहारीं भीड नसावी—मनुष्यानें खाण्याच्या कामीं आणि व्यवहारांत कधींहि संकोच बाळगूं नये. ?

आहुति——आहुति घेऊन उभा असणें-राहणें—दुसऱ्याच्या नाशाची वाट पहात असणें. अमुकाचा नाश होवो असा मंत्र म्हणून यज्ञांत आहुति टाकतात या विधीवरून वरील वाक्प्रचार.

आहुती देणें—१ यज्ञामध्यें देवास तूप, वपा वगैरेचें अवदान देणें. २ एखाद्या देवतेस एखादा पशु वगैरे बलि देणें; देवास अर्पण करणें. ३ एखाद्याला संकटांत पाडणें; एखाद्याचा नाश करणें; एखाद्याचें बरें व्हावें म्हणून दुसऱ्याचा मधल्यामध्यें नाश करणें; गरीब बापड्या मनुष्यास प्राणान्त संकटांत घालणें.

आहे——आहे आहे, नाहीं नाहीं—आहे म्हटलें तर आहे, नाहीं म्हटलें तर नाहीं. असून नसल्यासारखें असणें; अल्प अस्तित्व किंवा व्यवहार असणें. ‘अशौचामध्यें स्नानसंध्या म्हणजे काय, आहे॰’

आहे जातीनें वाईट, तो कोणाशीं नसे नीट—ज्याचा देहस्वभावच वाईट तो कोणाशींहि चांगल्या प्रकारें वागूं शकत नाहीं.

आहे जें सामर्थ्य, त्याहून नको व्यर्थ—आपल्या शक्तीबाहेरचें काम घेणें म्हणजे व्यर्थ श्रम करण्यासारखें होतें.

आहे तितक्यांत चालवी, सुखी आपणांस म्हणवी—मनुष्यानें आपल्या प्राप्तीमध्येंच निर्वाह करावा म्हणजे शेवटीं सुख होतें.

आहे तीच स्थिति गोड वाटली कीं प्रगति खुंटली—प्राप्त स्थितींत समाधान मानून राहिलें म्हणजे पुढील उत्कर्षाची खटपट संपली व उत्कर्ष थांबला.

आहे तोंवर दिवाळी, नाहीं तोंवर शिमगा—एखादा मनुष्य त्यास कांहीं प्राप्ति झाली म्हणजे उधळमाधळ करून, चंगळ करून सर्व खर्चून टाकतो व जवळ कांहीं राहिलें नाहीं म्हणजे दैन्यावस्थेंत दिवस काढतो. पण जवळ असेल तेव्हां पुढील अडचणीसाठीं कांहीं तजवीज करून ठेवीत नाहीं. अशा मनुष्याबद्दल ही म्हण योजतात.

आहे त्यांतून थोडें द्यावें, शेष राही तें ठेवावें—आपली प्राप्ति असेल त्यांतून थोडें फार घेऊन खर्च करावा व कांहीं तरी मागें शिल्लक टाकीत असावें.

आहे फुळकवणी, पण लागताहे रुचकवणी—पदार्थ निकृष्ट पण थोडाफार चविष्ट असणें. दिसावयास पोकळ पण सुदृढ असणें. मनुष्य दिसावयास भिकार पण थोडा फार दमदार असणें.

आहे मृत्युपरी, पारतंत्र्याची दोरी—परतंत्रतेची शृंखला ही मृत्यूपेक्षांहि पिडाकारक आहे. तु०-‘फारचि बरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच।’ -मो.

आहे रतन, पण पाहिजे जतन—सुंदर स्त्री दरिद्र्याच्या घरीं पडून तिची आबाळ होत असली म्हणजे म्हणतात.

आहेत कर, मग कशाची डर—आपले हात शाबूत असले म्हणजे कशाची भीति वाटत नाहीं. आपणच आपली उन्नति करून घेतों.

आळ——एक आळ आणि एक महाजाळ; एक आळ आणि एक महाआळ—१ महाजाळ पुरवतो पण आळ पुरवत नाहीं. एखादा खोटा आरोप आल्यानें जो मनाला व शरीराला त्रास होतो तो प्रत्यक्ष दाहानें होणाऱ्या तापापेक्षांहि भयंकर असतो. तसेंच २ एखादा खोटा आरोप आला असतां तो निवारण करण्याकरितां व्यर्थ आटापीटा आणि धांवाधाव करावी लागते व त्यामुळें पदराला चांगलाच चट्टा बसतो. चिखल उडविला म्हणजे कांहीं तरी डकतोच. पडलेलें शेण माती घेतल्याशिवाय उठत नाहीं.

आळशी——आळशावर गंगापूर; आळशावर गंगा येणें; आळशावर गंगा लोटली—१ गंगेचें स्नान घडणें हें महत्पुण्य समजतात. व हें पुण्य मिळण्यास श्रम आणि पैसा लागतो. पण एखाद्याच्या नशिबानें गंगाच त्याच्याकडे चालून येण्याचें भाग्य लाभणें. ‘गंगा आली आळशावरी। आळशी देखूनि पळे दुरी॥’-तुकाराम. २ एखाद्या अपात्र मनुष्यास घरीं बसून लाभ होणें; एखादा मान अथवा अधिकार कांहीं श्रम न

करतां प्राप्त होणें; नालायक मनुष्यास सहजगत मोठा लाभ होणें. —शाच २.२५०.

आळशांचा मायबाप–राजा—अत्यंत आळशी मनुष्य; सर्व आळशांमध्यें श्रेष्ठ असा.

***आळशा 'भिकणां भाज' म्हण सांगली, आळशान सांगलें हरवीं खावया; आळशा, भिकणा भाजून खा, हरवीं खाल्यार गोड लागता;-आळशाक भिकणां भाज म्हळीं, तो म्हण्टा, हरवीं खाल्यार चड बरीं**—(गो.) आळशाला सांगितलें कीं, आठळ्या भाज; तर तो म्हणतो हिरव्याच बऱ्या लागतात! आळशाला काम नको असतें; तेव्हां तो असेल तें आवडून घेतो. 'आलसी' पहा.

आळशी आणि दिवाळखोर, त्यांचें सदा रडकें (रडे) पोर—आळशी मनुष्य मुलाकडे लक्ष देत नाहीं म्हणून व दिवाळखोराजवळ कांहीं नसतें म्हणून त्या दोघांच्याहि पोरांची आबाळ होते व तीं सारखीं रडत असतात.

आळशी उठूंक शिंबरें शिंकलें—(गो.) आळशी कामाला उठतो आहे तोंच नकटा शिंकला. काम न करण्याला आळशी निमित्त पाहातच असतो.

आळशी जिवंत असून काय, जन्मवरी मृत्युप्राय—आळशी मनुष्य कांहीं काम करीत नसल्यामुळें जिवंत असून मेल्यासारखाच निरुपयोगी असतो.

आळशी भिकारी, कुटुंबाचा घात करी—आळशी मनुष्य नेहमीं दरिद्री राहतो व त्यामुळें त्याच्यावर अवलंबून असलेल्या सर्व माणसांचा नाश होतो.

आळशी लोकांस फुरसत, पुष्कळ असतांहि किंचित्—आळशी मनुष्यास कांहीं कामच करावयाचें नसल्यामुळें किंवा करावयास वेळ फारच लागत असल्यामुळें त्याला कितीहि फुरसत मिळाली तरी ती पुरत नाहीं व थोडीच वाटते.

आळशी सांगत तें घाडयाच्या बापायच्यानं सांगूं नज—(गो.) [घाडी=मांत्रिक] आळशी जें सांगेल तें घाड्याच्या बापाच्यानेंहि सांगवणार नाहीं. आळशी लोक मोठमोठ्या बढाया, गप्पा मारतात. मांत्रिक लोक ज्याला बाधा झाली असेल त्याला किती भुताखेतांची पीडा आहे हें अनेक थापा मारून सांगतात पण त्यांच्यापेक्षांहि आळशी लोकांच्या गप्पांना कांहीं ताळतंत्रच नसतो.

आळशाचें तोंड मोठें पण हात मात्र कोते—आळशी मनुष्य फार खादाड असतो किंवा फार बडबड करीत असतो पण काम मात्र फारच थोडें करतो. आळशाला बसल्या बसल्या एकसारखें खावयास हवें असतें व त्याचें तोंड सारखें चालू असतें पण उठून काम करावयास नको असतें.

आळशामध्यें आळशी, सून आली घरासी—एखादी स्त्री स्वभावतःच आळशी असल्यास तिला कामाचा कंटाळाच असतो, त्यांतून तिच्या घरीं सून आल्यावर मग काय विचारतां? तिच्यावर सर्व काम टाकून हिला आणखीच स्वस्थ बसावयाला फावतें.

आळशाला ऊन पाणी—आळशी मनुष्य स्वतः कांहीं काम करीत नाहीं पण त्यास स्नानास मात्र दुसऱ्यानें तापवलेलें ऊन पाणी लागतें. तेव्हां स्वतः श्रम न करतां मिजास करणाऱ्या मनुष्यास म्हणतात.

आळशाला गंगा दूर व पाप्याला पंढरपूर (दूर)—आळशी मनुष्य गंगा कितीहि जवळ असली तरी तीवर जाऊन कधीं स्नान करणार नाहीं व पापी मनुष्य पंढरपूर कितीहि जवळ असलें तरी तेथें जाऊन कधीं पापाचें क्षालन करणार नाहीं. तेव्हां या दोघांस तीं कितीहि जवळ असलीं तरी दूरच असतात.

आळशाला विसांवा नाहीं व खादाडाला चव नाहीं—आळशी मनुष्याला कधींच श्रम करण्याचें ठाऊक नसल्यामुळें श्रमानंतरच्या विश्रांतीची काय किंमत असते तें कधींहि कळत नसतें व खादाड मनुष्याचें लक्ष्य केवळ पोटांत पदार्थ भरण्याकडे असल्यामुळें निरनिराळ्या पदार्थांच्या रुची कशा निरनिराळ्या असतात इकडे त्याचें कधीं लक्ष्य जात नाहीं व त्यामुळें त्याला पदार्थाची गोडी कधींच कळत नाहीं.

आळशावर गंगा आणि दुबळयावर कृपा (निरुपयोगी)—दोघांनाहि संधीचा फायदा करून घेतां येत नाहीं.

आळशास त्रैलोक्याचें ज्ञान—आळशी मनुष्य स्वतः कधीं ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करीत नाहीं, त्यामुळें त्याला जगांतील सर्व गोष्टींचें ज्ञान जेवढें त्याजवळ असतें तेवढेंच सर्व ज्ञान आहे अशी त्याची समजूत असते.

आळशास दुणें काम व लोभ्यास (कृपणास) दुणा (तिप्पट) खर्च—[(गो.) १ आळशाक दुणो (दोडो) वाव्र, किर्पिणाक दुणो (दोडो) खर्च. २ आळशाक दुपेट वाव्र.] आळशी मनुष्य कोणतेंहि काम बरोबर करीत नाहीं म्हणून तें त्यास पुन्हा करावें लागतें व लोभी मनुष्य कोणतेंहि काम करण्याच्या कामीं पुरेसा पैसा खर्च करीत नाहीं म्हणून तें प्रथम बिघडतें व पुन्हां मोडून प्रथमपासून करावें लागतें. याप्रमाणें दुप्पट खर्च करावा लागतो. तेंच प्रथम व्यवस्थित केल्यास ही यातायात पडत नाहीं. अडाणी पहा.

आळस——आळस आणि सुस्ती, लज्जा निराशा आणती—आळस आणि मंदपणा यामुळें मनुष्यावर लज्जास्पद व निराशेचे प्रसंग वारंवार येतात.

आळस कुटुंबाचा वैरी; आळस कुटुंबाचा वैरी, झोंप भुकेची सोयरी; आळस भिकारी, कुटुंबाचा घात (नाश) करी—आळशी मनुष्याच्या सर्व कुटुंबाचा नाश होतो, व एकसारखी झोंप घेत गेल्यास खावयासहि पुरेसें मिळत नाहीं. Indolence is the greatest enemy to economy.

आळस टाकावा आधीं, यत्न जोडावा बहुसंधी—मनुष्यानें प्रथम आळस टाकून देऊन अनेक प्रकारचे यत्न करण्यास लागावें.

आळस तितका किळस—आळस हा अगदीं वाईट. आळशी मनुष्य घाणेरडा राहातो.

आळस तो रोग जाण, तेणें जीवित्व होय क्षीण—आळस हा एक प्रकारचा रोग असून त्यामुळें आयुष्याचा नाश होतो.

आळस दारिद्र्याचें घर—आळशी मनुष्यानें कामधंदा न केल्यामुळें त्यास कांहीं प्राप्ति होणें शक्य नाहीं व त्याचा परिणाम त्यास दारिद्र्य येण्यांत होणार हें ठरलेलेंच.

आळस हेंच दुर्गुणाचें मूळ—आळशी मनुष्य बहुधा दुर्गुणी बनतो, कारण त्याचें मन कोणत्याहि व्यवसायांत गुंतुन राहात नसल्यामुळें साहजिकच त्याची दुर्गुणाकडे प्रवृत्ति होते. तु०—An idle man's mind is Satan's workshop.

आळसाची चाल इतकी मंद असते कीं, संकटें त्याला तेव्हांच गांठतात—आळशी मनुष्यावर वारंवार पुष्कळ संकटें ओढवतात. कारण त्याचीं प्रगतीच्या वाटेवरचीं पावलें मुंगीप्रमाणें फार हळू पडतात.

आळसाचें धारण तेंच दरिद्रास कारण—आळस अंगांत बाणूं दिल्यास पुढें दारिद्र्य येण्यास तें कारणीभूत होतें. Idleness clothes a man with rags.

आळसानें जो घेरतो तो मढ्यासारखा दिसतो—आळसानें व्यापलेला मनुष्य प्रेतासारखा दिसतो; त्याच्यांत जिवंतपणा, उत्साह नसतोच.

आळसानें शरीर हीन (क्षीण), गंजानें लोखंड क्षीण—ज्याप्रमाणें गंज लागलेलें लोखंड हळूहळू झिजून जातें त्याप्रमाणें आळसानें शरीर हळूहळू झिजून जातें.

आळसामुळें दुर्गुण जडतात आणि सद्गुण नाहींसे होतात—आळशी मनुष्याच्या अंगचे सद्गुण हळूहळू लोप पावतात व त्यांची जागा दुर्गुण घेतात.

आळसामुळें भिकेचे डोहाळे—आळसामुळें मनुष्य हळूहळू भिकेस लागतो. आळशी होणें हें भीक मागावयास लागण्याचें पूर्वचिन्ह आहे. Idleness is the key of beggary.

आळसाला वकील नाहीं पण मित्र हवे तितके—आळशाला त्याच्याचसारखे बरेच मित्र भेटतात पण हितकर्ता कोणी नसतो. त्याची कोणी तरफदारी करीत नाहीं.

आळसें काम नासतें—कोणत्याहि कामांत आळस केला असतां त्या कामाचा नाश होतो. 'आळसें काम नासतें। हें नों प्रत्ययास येतें।'—दा १८.७.४.

आळसें कार्यभाग नासतो, तो टाकल्यानें श्रीमंत होतो—आळसामुळें काम नीट होत नाहीं व त्यामुळें दारिद्र्य येतें परंतु तोच टाकून दिल्यास सर्व कामें योग्य प्रकारें होऊन धनप्राप्तीहि होते.

आळा——**आळा घालणें**—मर्यादा, नियम, बंधन घालणें; आटोक्यांत ठेवणें; योग्य मर्यादेंत ठेवणें; नियंत्रण करणें. 'घालील महाराष्ट्राला, निरभिलाष आळा कोण—यापुढें'—विक ९.

आळ्यांत असणें-वागणें-राहणें-चालणें— १ कह्यांत, ताब्यांत असणें; योग्य नियंत्रणाखालीं असणें. २ नियमांनीं बद्ध असणें; सुयंत्रित असणें. 'ती भाषा व्याकरणाच्या आळ्यांत राहण्यास विशेष योग्य असते.'—कृष्ण. चिप. मराठी व्याकरणावरील निबंध १०.

आळ्यांत आणणें—ताब्यांत आणणें; कह्यांत आणणें; नियमन, नियंत्रण करणें. 'जॉनसन यानें कोशरचना करून तीस (इंग्रजी भाषेस) आळ्यांत आणण्याचा प्रचंड उद्योग आरंभून तो एकट्यानें शेवटास नेला.'—नि ५५६.

आळाबांधा——**आळाबांधा कहाडप**—(गो.) १ एखादें काम उरकीत आणणें; आवांक्यांत आणणें; आटोक्यांत आणणें. २ पातळ पदार्थ घट्ट करीत आणणें; आटविणें.

आज्ञा——**आज्ञा देणें**—१ निरोप देणें; रजा देणें; जावयास परवानगी देणें. २ कामावरून दूर करणें; बडतर्फ करणें; नोकरीवरून काढून टाकणें.

आज्ञा मागणें—परवानगी घेणें; अनुज्ञा घेणें. २ निरोप घेणें; दूर जाण्यापूर्वीं भेट घेणें.

आज्ञा मानणें—आज्ञेप्रमाणें वागणें; आज्ञाधारक असणें; सांगितल्याप्रमाणें वर्तन करणें; सांगितलेलें काम करणें. 'निरंतर सानवृत्तीनें वडिलांची आज्ञा प्रसन्नतेनें मानावी.'

आज्ञा वंदणें-नमस्कारणें-पाळणें— आज्ञेप्रमाणें करणें; आज्ञा मानणें, शिरसा मान्य करणें; आज्ञेबरहुकूम वर्तन करणें. 'तयातें वोळखावया होंचि संज्ञ । जें जगें नमस्कारिजे आज्ञा ।'-ज्ञा १०.३११.

ॐ **आज्ञा पालन, तें नीतीचें जीवन**—नीतीचा पाया शिस्त व आज्ञाधारकपणा यांत आहे. Obedience is an essence of law.

आज्ञा पालन बरी, उपकार वाटती भारी—कोणाचे उपकार घेण्यापेक्षां त्याची आज्ञा पाळून त्यावर उपकार करून ठेवणें चांगलें.

आज्ञा प्रभूची मोडणें, हेंच प्राणास मुकणें—१ परमेश्वराची आज्ञा मोडण्यापासून नाश होतो. २ धन्याची, राजाची आज्ञा मोडली असतां जीवावर बेतण्याचा संभव असतो.

इ

इकडचा-ला—इकडचा डोंगर तिकडे (इकडे) करणें—डोंगर एका जागेवरून उचलून दुसऱ्या जागेवर ठेवणें हें किती अवाढव्य व श्रमाचें काम आहे याची सहज कल्पना येईल. यावरून एखादें प्रचंड व अवाढव्य काम करणें; अत्यंत परिश्रमाचें काम करणें; मोठें अवघड कार्य करणें, इत्यादि अर्थ होतात. 'जॉन्सननें एवढा इकडचा डोंगर इकडे केला पण पुनः हाता-तोंडाशीं गांठ आहे ती आहेच.'-निबंधमाला.

इकडचा(ला) तिकडचा(ला)—नाना ठिकाणचा; निरनिराळ्या ठिकाणचा; म्हणजे कोणी कोठला तरी. ज्याचा ठावाठिकाणा नक्की माहित नाहीं, किंवा जो एका ठिकाणीं निश्चितपणें कधीं आढळत नाहीं असा.

इकडला गड तिकडे नेऊन ठेवणें—'इकडचा डोंगर०' पहा.

ॐ **इकडला लुच्चा तिकडला चोर**-दोहींकडेहि नापत झालेला; सर्वकडे लबाडी करून अनेक लोकांस फसविणारा म्हणून माहीत झालेला मनुष्य.

इकडे——इकडे तिकडे—१ कोणीकडे तरी; या बाजूला नाहीं तर त्या बाजूला; कोठें तरी. २ कांहीं तरी; अनिश्चित व निरर्थक गोष्ट.

ॐ **इकडे आड, तिकडे विहीर**—एका बाजूला आड व दुसऱ्या बाजूला विहीर, म्हणजे दोन्ही बाजूलाहि संकटें आहेत, कोणत्याहि बाजूस जावयास रस्ता नाहीं अशी अडचणीची स्थिति; दोन सारख्याच संकटांत सांपडणें. शृंगापत्ति. तु०-दोन दरडीमध्यें सांपडणें. 'एकीकडून आड एकीकडून विहीर दुतर्फा मरण सारखेंच'-भाब ५.-शाब ३.२९.

इकडे आलें हंसूं आणि तिकडे गेलें उतूं—तरुण वधू नवऱ्याकडे पाहून गालांतल्या गालांत हंसत असतांना दुर्लक्ष होऊन चुलीवरचें दूध वर येऊन उतूं जातें किंवा इतर कांहीं अनिष्ट होतें, त्यावेळीं म्हणतात. एखाद्या गोष्टीबद्दल आनंद मानण्याच्या भरांत दुसरीकडे होणाऱ्या नुकसानीवर लक्ष्य नसणें.

इकडे नही, इकडे वही—[नही=नदी. वही=कुंपण] दोन्ही बाजूंनीं अडचणींत सांपडणें. 'इकडे आड तिकडे विहीर' पहा.

इकडे ना तिकडे, ठाव नाहीं कोणीकडे—ह्या बाजूस नाहीं, त्या बाजूस नाहीं किंवा कोठेंच ठिकाण लागत नाहीं, अशा वेळीं म्हणतात. निराधार स्थिति; मध्येंच लोंबकळत राहण्याची पाळी येणें.

इकडे बोलणें नाहीं, तिकडे चालणें नाहीं—दोन्ही गोष्टी सारख्याच समानगुण अशा अर्थानें वापरतात. एक मुका वर व पांगळी वधू यांचें लग्न एका मध्यस्थानें मोठ्या युक्तीनें लावून दिलें. दोन्ही पक्षांस 'इकडे बोलणें नाहीं व तिकडे चालणें नाहीं' असें त्यानें अगोदरच सांगितलें होतें, तेव्हां त्यावेळीं कोणाच्या लक्षांत शब्दार्थानें त्याचें म्हणणें आलें नाहीं. पुढें खरी गोष्ट उघडकीस आल्यावर चौकशीच्या वेळीं 'आपण प्रथमच खरें सांगून टाकिलें होतें,' असें या मध्यस्थानें बजावलें व तो सुटला.

इकडे ये, इकडे ये आणि माझ्या कपाळाचें गंध (कुंकु, कपाळच्या अक्षता) पहा—विनाकारण लोकांस बोलावून आणून आपलें वैभव दाखविणें व गर्दी करणें; कांहीं तरी निमित्तानें लोकांचें लक्ष्य आपल्याकडे वेधून घेणें.

इंगळ——इंगळाचें अंथरूण—अग्नीची शय्या म्हणजे एखादी अतिशय भयंकर, तापदायक गोष्ट किंवा अत्यंत भयंकर साहसाचा प्रसंग.

इंगळाच्या अंथरुणावर झोंप घेण्यासारखें—भयंकर संकटांत असून त्याविषयीं फिकीर न बाळगण्याप्रमाणें (वर्तन).

इंगळास वोंळंबे लागणें—[इंगळ=अग्नि, निखारा. वोंळंबा =वाळवी, तांबड्या मुंग्या] अग्नीला वाळवीनें खाणें. वास्तविक वाळवी अग्नीनें जाळून टाकतात पण येथें उलट स्थिति. मोठ्याचा लहानानें पराजय करणें; सूर्याला दिवटीच्या प्रकाशानें

झाकोळणें. अशक्य गोष्ट पण शक्य कोटींत येऊन वरीलप्रमाणें होणें. 'आजि इंगळासि वोळंबे निश्चितीं। लागले ऐसें वाटतें ॥' -कथासा २५. १४६. 'जेवीं बोळ हुंगेना माशी। कुढणें नये तेलपाशीं। वोळंबा न लगे अग्नीसी। तेवीं तो अर्थासी नातळे ॥' -एभा २३.३४७.

इंगळासारखा लाल होणें—निखाऱ्यासारखा लाल होणें; रागानें लाल होणें; अतिसंतप्त होणें.

इंगळासारखे डोळे—अग्नीचा वर्षाव होत आहे असे दिसणारे डोळे; भयंकर लाल डोळे.

❀ **इंगळ हातीं धरवेल पण हा हातीं धरवणार नाहीं**—एखाद्या अतिशय तापट स्वभावाच्या मनुष्याबद्दल योजतात. हातांत विस्तव घेणें सोपें पण रागीट मनुष्याशीं संबंध येणें नको.

इंगळे खावुनु केंड हगता—(गो.) धगधगीत निखारे खाऊन ठिणग्या हगतो. अतिशय जाज्वल्य.

इंगा——इंगा दाखविणें—[इंगा=चांभाराचें व्रादी वगैरे चामडयाची वस्तू साफ, सपाट करण्याचें पातळ पात्याचें एक हत्यार] इंगा वरून फिरविला म्हणजे कातडयाचा पृष्ठभाग साफ सपाट होतो. यावरून १ अगदीं नरम करणें; साफ करणें. २ खोड मोडणें; आपलें सामर्थ्य दाखविणें.

इंगा फिरणें—अडचणींत सांपडून अभिमान, ताठा जिरणें.

❀ **इंगा फिरला म्हणजे सर्व समजतें; इंगा फिरला कीं पिंगा सरला; इंगा फिरे, मुंगा जिरे**—मनुष्य चांगला पेंचांत सांपडला म्हणजे त्याला स्वपरबलाबलाची बरोबर कल्पना येते व ताठरपणा जातो; तोंपर्यंत तो स्वतःच्याच घमेंडींत असतो. एका मनुष्यास पहांटे उठून दूरच्या गांवास जावयाचें होतें. त्यानें चार घटका रात्रीस उठून आपली सर्व तयारी केली व घोडयावर खोगीर ठेवून तंग आवळावयास गेला तों तो तुटला. तेव्हां वाटेवरच चांभाराचें घर होतें त्याच्याकडे जाऊन त्याला उठवून तंगाकरितां त्यानें एक वादी मागितली. चांभारानें अर्धवट झोंपेंतच उठून घराच्या छपराच्या नीवापासून खालीं एक साप लोंबत होता त्यासच वादी समजून ओढून काढून त्यावरून साफ इंगा फिरविला व त्यास वादीसारखें सपाट करून त्या राउतास दिलें. लगेच राउतानें आपला तंग त्या वादीनें आवळून तो पुढें निघाला. वाटेनें जातांना त्या सापाचें डोकें त्याच्या रिकिबींतील पायाजवळच येत होतें. वाटेंत एका ठिकाणीं दुसरा साप बसला होता त्यानें या सापाचें डोकें त्या मनुष्याच्या इतकें पायाजवळ असून त्यास चावतां येत नाहीं अशा केविलवाण्या स्थितींत पाहून त्यास विचारलें कीं, अरे तूं या मनुष्यास चावत कां नाहींस. त्या वेळीं त्या सापानें उत्तर दिलें कीं, अद्यापि तुझ्यावरून इंगा फिरला नाहीं म्हणून असें बोलतोस; तो फिरला म्हणजे तुला सर्व समजेल.

इंग्रज——इंग्रजांच्या राज्यावर सूर्य कधींहि मावळत नाहीं—ब्रिटिश सरकारचें राज्य पृथ्वीवरील सर्व खंडांमध्यें असल्यामुळें त्यांतील कोणत्या ना कोणत्या तरी प्रदेशावर सूर्य नेहमीं प्रकाशत असतो. यावरून त्यांचें राज्य कसें त्रिखंडांत पसरलेलें आहे हें समजून सांगण्यासाठीं वापरतात.

इंग्रजी——इंग्रजी दारु—विलायती दारू फार जहाल असते, यावरून तापट, चिडका, संतापी मनुष्य.

❀ **इंग्रजी कायदा, पगाराचा वायदा**—इंग्रजी राज्यांतला सर्वांत मोठा फायदा असा लोकांना जो वाटूं लागला तो म्हणजे महिन्याच्या महिन्याला पहिल्या किंवा एका ठराविक तारखेला पगार मिळणें, होय. बिनसरकारी नोकरींत अशी व्यवस्था बहुधा असत नाहीं. यामुळें सरकारी नोकरी सर्वांत चांगली असा समज कायम होऊन बसला. पूर्वी पेशवाईंत पगार सालिना ठरविला असूनहि तो ज्या त्या सालीं पुरा मिळत नसे. बारा महिने नोकरी घेऊन अकरा महिन्यांचा पगार दिला जाई. इंग्रजी अमदानी आल्यापासून महिन्याच्या महिन्याला सर्व पगार व नोकरीनंतर पेनशन हे फायदे साहजिक डोळयांत भरले.

इच्छा——इच्छा अमर आहे—'आशा अमर आहे' पहा.

इच्छा आवरी, खर्च थोडा करी—मनुष्यानें आपल्या आवडी निवडी आपल्या ताब्यांत ठेवाव्या व मितव्ययी असावें; उधळमाधळ करूं नये. म्हणजे कधीं अडचण येत नाहीं.

इच्छा कमी ठेविती, अगत्य थोडी लागती—जे आपल्या इच्छा आपल्या ताब्यांत ठेवतात त्यांना फार थोडया वस्तूंची किंवा फारच क्वचित् दुसऱ्याच्या मदतीची जरूर लागते.

इच्छा करी पुत्राची, तों हानि झाली भर्त्याची—पुत्र मागावयास गेली तों नवरा गमावून आली. अधिकाची आशा करावी तों जवळ असलेलेंहि गमावतें. तु०-पूत मांगने गई सो पति खोके आयी, कसम खाके आयी.

इच्छा काय आणि झालें काय—इच्छेच्या अगदीं उलट झालें म्हणजे शोकानें वरील उद्गार निघतात.

इच्छा तसें फळ—जशी आपली वासना असते त्याप्रमाणें आपणास फळ मिळतें. सामान्यतः दुष्ट इच्छा करणाऱ्याचें वाईट झालें म्हणजे वापरतात. तु०-वासना तशीं फळें.

इच्छा तेथें मार्ग—कोणतीहि गोष्ट करावयाचें मनांत असलें म्हणजे कांहींतरी मार्ग सुचतो. काम करायचें नसलें म्हणजे

अनेक सबबी पुढें करतां येतात. पण माणसाला कोणतीच गोष्ट अशक्य नाहीं, त्याची इच्छा मात्र पाहिजे, हेंच यांत सूचित केलें आहे. Where there is a will, there is a way.

इच्छा बुद्धीविना आंधळी—कांहीं विचार, केल्याशिवाय नुसती माझी इच्छा म्हणून कोणी वागूं लागल्यास तो मूर्खपणा होईल. विचारशक्तीशिवाय इच्छा किंवा बुद्धि हितकर होत नाहीं. Will without reason is blind.

इच्छा सरळपणाची, सरळ वाट ती नीतीची—नेहमीं वासना चांगली ठेवावी म्हणजे सरळ मार्गानें चालून मनुष्य नीतिमान होतो.

इच्छेपुरतें खाणें, नियमित पिणें—मनुष्यानें आहाराच्या बाबतींत व पानाच्या बाबतींत नियमित असावें.

इच्छिणें——इच्छिलेलें जर घडतें तर भिक्षुकांचे राजे होते; इच्छिलेलें साधतें तर भिकारी कां भीक मागते—मनुष्य-मात्रानें इच्छा केल्याबरोबर जर त्या पूर्ण झाल्या असत्या तर कोणी भिक्षुक, गरीब, दरिद्री वगैरे राहिलेच नसते. सर्वांनीं राजे होण्याची इच्छा करून ते राजे बनले असते. If wishes were horses, beggars would ride.

इच्छिलेलं साधलें, गंगेंत घोडें न्हालें—मनुष्याची एखादी इच्छा तृप्त झाली म्हणजे त्यास गंगास्नानाइतका आनंद होतो. पूर्वी काशीस वगैरे जाऊन गंगेंत स्नानादि विधि करणें प्रवासाच्या गैरसोयीमुळें फार कष्टदायक असे व त्यामुळें ज्यास गंगास्नान घडेल त्यास फार आनंद होई व तितकाच आनंद जणूं काय इच्छापूर्तीमुळें मनुष्यास होतो.

इच्छिलेलें साधेल तर दरिद्र कां बाधेल—'इच्छिलेलें जर घडतें०' पहा.

इच्छी परा, येई घरा—आपण जर दुसऱ्याचें वाईट चिंतलें तर त्याचें प्रत्यक्ष कांहीं वाईट न होतां ती इच्छा आपणांसच बाधक होते व आपलेंच वाईट होतें. याकरितां मनुष्यानें वाईट विचार मनांतहि बाळगूं नये.

इच्छीना संसारीं तरण, न जाय गुरूशीं शरण—ज्याला संसारमुक्त होणें नाहीं, ज्याला त्यांत खितपतच पडावयाचें आहे त्याला गुरूचें, उपदेशाचें कांहींच कारण नाहीं.—सवि १५३८.

इजा——इजा, बिजा, तिजा; इजें, बिजें, तिजें—एका-मागून एक तीन वेळां. एकदां, दोनदां झालें म्हणजे तिस-ऱ्यांदा होणारच अशी समजूत.

इज्जत——इज्जत खाणें-घेणें—अप्रतिष्ठा करणें; मान-हानि करणें; दुलौंकिक करणें; बेअब्रू करणें.

इटेकरी——दहा पट्टेकरी, एक इटेकरी—पूर्वींच्या सैन्या-मध्यें पट्टेकरी व इटेकरी असे दोन सैनिकांचे प्रकार असत. (इटा, शब्दकोश पहा.) इटयाचा मारा जास्त लांब असल्यामुळें तो पट्टेकऱ्यापेक्षां अधिक वरचढ असे. यामुळें दहा पट्टेकऱ्यांचें काम एक इटेकरी करूं शके व एक इटेकरी दहा पट्टेकऱ्यांस भारी असे.

इडापिडा——इडापिडा जावो आणि बळीचें राज्य येवो—बळीनें एकदां सर्व पृथ्वीवर सुराज्य केलें होतें. यावरून लहान मुलास आशीर्वाद देतांना हा वाक्प्रचार योजतात. ब्राह्म-णेतर जातींत, शेतकऱ्यांत बळि राजावर फार भक्ति आहे.

इडापिडा टळो, अमंगळ (पाप) पळो—हाहि एक आशी-र्वादाचा प्रकार आहे.

इतका——इतके दिवस कठिण आले कीं, तोंडांत राळे सुकून गेले—दुष्काळामुळें कांहीं कांहीं वेळां इतकी वाईट स्थिति होते कीं मनुष्याच्या तोंडास अन्न व पाणी न मिळाल्या-मुळें पूर्णपणें कोरड पडते. ती इतकी कीं, राळ्याचे दाणे तोंडांत टाकले तर ते भिजण्याइतका ओलावाहि जिभेस राहात नाहीं. यावरून अत्यंत निकृष्ट दुष्काळाची स्थिति व्यक्त होते.

इतना——इतना पका की बासी थका—एखाद्या वेळीं पीक येऊन खूप समृद्धि होते. अशा वेळीं ताजें अन्न इतकें भरपूर खावयास मिळतें कीं, शिळें खाण्याची कोणास इच्छाच होत नाहीं व त्यामुळें बासी ठेवण्याचेंहि बंद पडतें. उत्तर हिंदुस्थानांत अनेक लोकांमध्यें थोडें तरी अन्न घरांत राखून ठेवण्याची चाल आहे. थोडा भात रात्रीं पाणी घालून ठेवून दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो खातात. अशा राखून ठेवलेल्या भातास बासी म्हण-तात. यांतील उद्देश घरांतील अन्न केव्हांहि पूर्णपणें नाहींसें होऊं नये व कोणी पाहुणा वगैरे रात्रीं अपरात्रीं आला तरी त्यास खाऊं घालतां यावें असा असतो. अशा तऱ्हेची बासी या लोकांच्या घरांत पिढयानुपिढया अखंड ठेवलेली असते व जितक्या जास्त पिढयांची बासी तितकी त्याची योग्यता समा-जांत जास्त मानली जाते.

इतर——इतर पितर काढणें—मातापित्यांवरून अपशब्द बोलणें; अतिशय शिव्या देणें; नातेवाइकांवरून शिव्या देणें; आईबाप उद्धरणें; पितर उद्धरणें.

* **इतरांचा गर्व पहावा, आपले अंगीं न धरावा**—दुस-ऱ्यांनीं अभिमान बाळगला तर तो लक्ष्यांत आणावा पण स्वतः व्यर्थ अभिमान बाळगूं नये. मूळ इंग्रजी म्हण उलट अर्थाची आहे. Pride is easily seen in others, but we can rarely see it in ourselves. दुसऱ्याच्या ठिकाणीं अस-

लेला गर्व लवकर दिसतो पण स्वतःच्या ठिकाणीं असलेला क्वचितच दिसतो.–सवि २८०८.

इतरांची बुद्धि ऐकावी, तशी लोकां सांगावी— एखादी गोष्ट करावयाची असतां आपण इतरांचा सल्ला जरूर घ्यावा व तसा आपणांसहि कोणी विचारल्यास द्यावा.

इतिश्री—इतिश्री करणें-होणें—एखाद्या पोथीचा अध्याय संपला किंवा ग्रंथ पूर्ण झाला म्हणजे शेवटीं 'इति श्री रेवाखंडे...' अशा प्रकारचें वाक्य असतें.त्यावरून १ शेवट; अखेर समाप्ति. २ मृत्यु; नाश. 'तूं आज कबूल झाला असतास म्हणजे बारभाईंची इतिश्रीच होती.'–इंप ४३.

इतिहास—इतिहासाची पुनरावृत्ति होते—एखादी गोष्ट, घटना पुन्हा पुन्हा होत असते तेव्हां इतिहासांतील दाखला देऊन म्हणतात. 'तीच ती घटना पुन्हा स्थूल रूपानें बनलेली दिसून येते. पण तीच ती घटना पुनः बनण्याचें खरें कारण त्याच त्या मनुष्य स्वभावाच्या दोषांची पुनरावृत्ति होते हेंच होय.' –केसरी २०–१–३९. तु०–History repeats itself.

इतो—इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः।—दोहीकडे थारा न मिळणें. दोन्हीकडे नुकसान होणें; धड इकडेहि नाहीं व तिकडेहि नाहीं अशी स्थिति होणें; दोहींकडचा आधार सुटणें. सबंध श्लोकः— 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः परमेकान्तिवेषभाक् । न संसारसुखं तस्य नैव मुक्तिसुखं भवेत् ॥' "असें केल्यामुळें रामभाऊंस बढती तर मिळाली नाहींच, पण मूळची नोकरी होती ती जाऊन वर आणखी साहेबांचें आणि यांचें वांकडें आलें ! 'इतो०' अशी त्यांची स्थिति झाली."

इत्या—इत्या पुता रडता, गोड्डाकास दितलो—(गो.) कशाला मुला रडतोस? हा गुळाचा खडा दिला ! लहान मुलाची समजूत करतात तशी थोडें फार देऊन समजूत करणें.

इथें—इथें काडी, तिथें काडी, मामोजीच्या सोळा दाढी—म्हातारपणीं मनुष्यास दांत कोरावयास काडी लागूं लागते; कारण हिरड्या वगैरे पोकळ होऊन त्यांत अन्नाचे कण राहूं लागतात. या दांत कोरावयाच्या काड्या इकडे तिकडे पडतात. त्यावरून एखाद्या मनुष्यास विसरभोळेपणानें आपल्या वस्तु इकडे तिकडे टाकावयाची संवय असली म्हणजे म्हणतात.

इदं—इदंच नास्ति परं न लभ्यते।—जवळचें टाकून दूरचें मिळविण्याचा प्रयत्न करतां हातचेंहि गमवावें व दूरचेंहि हातास न लागतां निसटून जावें, अशा प्रकारची दुहेरी फसगतीची स्थिति.–भाव ८.

इदर—इदरबी थप्पड, उधरबी थप्पड—मृदंगास ज्या प्रमाणें दोहोंकडून मारा होतो त्याप्रमाणें दोहों बाजूंनीं त्रस्त झालेला मनुष्य. दोन्ही पक्षांकडून तिरस्कार होणारी व्यक्ति.

इद्रे—इदरारि होगळू नये, माकशि बोगळू नये—(गो.) हातचें घालवूं नये, मागाहून हळहळूं नये.

इंद्र—इंद्र फिरतो पण इंद्राणी फिरत नाहीं; इंद्र बदलतो पण इंद्राणी बदलत नाहीं; इंद्र बदलतो पण इंद्राणी एकच असते—इंद्र जरी युगांयुगांमध्यें अनेक झाले तरी इंद्राणी एकच असते अशी पुराणकारांची आख्यायिका आहे. शची ही एक इंद्र बदलून दुसरा येते वेळीं आपणांस शुद्ध करून घेऊन नवीन इंद्राची पत्नी होते. बदलणाऱ्या गोष्टींमध्यें एखादी कायमची असल्यास तिजबद्दल म्हणतात. तु०–चौदा इंद्र झाले तरी इंद्राणी एकच.

इंद्रा माल्ल्यार चंद्राक लागता—(गो.) इंद्राला मारलें तर चंद्राला तें लागतें. एकाला शिक्षा केली असतां तीमुळें दुसऱ्यास धडा मिळतो. तु०–(अ) हुंद्राक माल्ल्यार गणेसाक लागता. (उंदराला मारलें तर गणपतीस लागतें.) (आ) लेकी बोले सुने लागे.

(कोठें) इंद्राचा ऐरावत आणि (कोठें) शामभटाची तटाणी—दोन अत्यंत परस्परविरुद्ध गोष्टींची तुलना. इन्द्राचा ऐरावत हा अत्यंत वैभवसंपन्न व भव्य असा प्राणी असून त्याची शामभटासारख्या दरिद्री ब्राह्मणाच्या मरतुकड्या घोड्याशीं तुलना करणें हास्यास्पद आहे. जमीन अस्मानाचें अंतर.

इंद्राय स्वाहा। तक्षकाय स्वाहा; इंद्राय तक्षकाय स्वाहा—जनमेजयाच्या सर्पसत्रांत नागाधिपति तक्षक याची आहुति देण्याचा प्रसंग आला असतां, तक्षक इंद्राची पाठ धरून बसला. तेव्हां 'इंद्राय तक्षकाय स्वाहा।' असा ब्राह्मणांनीं मंत्र म्हणून तक्षक आणि त्याचा आश्रयदाता इंद्र या दोघांनाहि खालीं आणलें. या कथेवरून मूळ (गुन्हेगार) माणूस व त्याचा पाठीराखा या दोघांनाहि शिक्षा करणें. "जॉनसनसारख्या रसिकांनीं...ज्यांस कवित्व सिंहासनावर आरूढ करवून सर्वांच्या अभिनंदनास पात्र करून ठेविलें होतें, त्यांस मेकॉले प्रभृति अर्वाचीन निबंधकारांनीं पदच्युत करून, 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' या न्यायानें जॉनसन प्रभृति मोर्चेलवाल्यांनाहि त्यांच्याबरोबरच खालीं ओढलें."–नि ८५७.

इंद्रिय—इंद्रिय हातीं धरणें—अति विषयासक्त असणें; कामलोलुप असणें.

* **इंद्रियें एकपट प्रबल तर आत्मा दसपट प्रबल**—सर्व इंद्रियांपेक्षां आत्म्याची शक्ति अधिक आहे व आत्मा सबल असेल तर तो सर्व इंद्रियांस ताब्यांत ठेवूं शकतो.

इधर——इधर तिधर—इकडे तिकडे; उडवाउडवीचें, ताळतंत्र नसणारें भाषण वगैरे. 'इकडे तिकडे' पहा.

इनामदारी——इनामदारीपेक्षां इमानदारीला मान मोठा—नुसती श्रीमंती असून मान मिळत नसतो. गरीब पण प्रामाणिक माणसाला त्यापेक्षां अधिक मान मिळतो.

इमान——इमान उजविणें—आणभाकेंतून मुक्त होणें. 'आमचे मतें यांजशीं वचनप्राण जाहलें आहे.... यांनीं लबाडी केली, नीट न देत, तर यांसि इमान उजवलें. आम्हांवर तर शब्द नाहीं.'—पया ३२६.

इमान करणें-देणें—वचन देणें; शपथ घेऊन सांगणें; कबूल करणें; शपथक्रिया करणें. 'घावी शेजेची बाईल पण इमान देऊं नये ।'—इपुस्त्रीपो ४२.

इमान गुंतणें—वचनबद्ध होणें; अभिवचन देणें; करार करणें; एखादी गोष्ट शपथेवर अंगीकारणें.

इमान धरणें; इमानास जागणें—सचोटी न सोडणें; वचन पाळणें; एकनिष्ठ राहणें. वचनभंग न करणें; सत्यास जागणें.

इमाम——इमाम दांडगा—दांडगेश्वर; धटिंगण; आडदांड मनुष्य.

इमारत——इमारत फळा येणें—बांधूं घातलेली इमारत बांधून पूर्ण होणें. (ल.) इच्छित कार्य सिद्धीस जाणें; मनोरथ पूर्ण होणें; अंगीकारलेलें कार्य संपूर्ण होणें. 'संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥'—च २२९.

इर; ईर——इरेनें दांतनिसकीस येणें—ईर्षेनें हट्टास पेटून आपत्ति आंगावर ओढवून घेणें. 'मल्हारराव यांचे इरेनें दांतनिसकीस येऊन मोठमोठे खेतांत येऊन जीवाधिक केली.'—भाब ११.

इरेस घालणें—बुद्धिबळाच्या खेळांत राजास शह लागूं नये म्हणून मध्यें दुसरें मोहरें किंवा एखादें प्यादें घालतात; अशा रीतीनें राजास बचावतात. तसेंच किल्ल्याचा दरवाजा धडकीनें फोडूं जाणाऱ्या हत्तीला दरवाजाचे खिळे लागूं नये म्हणून मध्यें उंट घालीत. यावरून १ एखाद्यावरचें संकट टाळण्यासाठीं दुसऱ्याला बळी देणें. २ स्वतःच्या बचावासाठीं दुसऱ्यास पुढें करणें. ३ भरीस घालणें; प्रोत्साहन देणें; उत्तेजन देणें; एखाद्या मनुष्याचा क्रोध, मत्सर, पराक्रम वगैरे जागृत करून त्यास एखादें काम करण्यासाठीं प्रवृत्त करणें. 'मल्हारराव यांनीं इरेस घातलें.'—भाब १४.

इरेस चढणें—चुरशीनें, ईर्षेनें पुढें सरसावणें. हट्टास पेटणें; आग्रही बनणें; जिद्दीस येणें.

इरेस पडणें—चुरशीनें संकटांत उडी घालणें; अभिमानाच्या भरीस पडून पुढें सरसावणें. 'मोहरे मोहरे इरेसी पडती ।'—सप्र २१.५१. 'यांसी तो मोहरा इरेस पडावा तैसें जाहलें.'—भाव १३. इरेस चढणें पहा.

इरेस सांपडणें—धोक्यांत, गोत्यांत, सांपडणें; ईर्षेनें एखादें संकट अंगावर ओढवून घेणें.

इराण——इराणी फर्लांग—१ एक अंतराचें माप; तीन पूर्णांक तीन सप्तमांश मैल. वास्तविक इंग्रजी फर्लांग हा मैलाचा अष्टमांश आहे; त्याच्या किती तरी पट इराणी फर्लांग आहे. यावरून २ फार मोठें अंतर; दूरचा टप्पा.

इलाही——इलाही गज—राजा तोडरमलचा गज; एक लांबीचें माप. अकबरानें सुरू केलेलें जमीनीचें माप.

इलाही सन—अकबरानें सुरू केलेला सन. इलाही सनांत १५५५–५६ मिळविले असतां इसवी सन निघतो.

इल्म——इल्म सिखा लेनेका, नही सिखा देनेका—घेण्याची विद्या येते, देण्याची नाहीं. घघाची विद्या येते, ददाची येत नाहीं.

इल्ला——इल्ला बिल्ला करणें-दाखविणें—(का. इल्ला = नाहीं) नकार देणें; नाहीं म्हणणें; कांकूं करणें. 'वळखुन ठेविलें तुला फाकडे, किती करशी इल्लेबिल्ले ।'—पला १०९.

इल्लां——इल्लां तिल्लां—(कु.) इवलें चिवलें; थोडें.

इषक; इष्क—इषक आंधळा आहे—प्रेम आंधळें असतें.

इष्क आणि कस्तुरी कधीं दडत नाहींत—कस्तुरीचा वास ज्याप्रमाणें कोंडून राहत नाहीं त्याप्रमाणें कामवासना किंवा एखाद्या व्यक्तीवरील प्रेम मनांतल्या मनांत दाबून ठेवूं म्हटलें तरी तें साधत नाहीं. केव्हां ना केव्हां तरी तें बाहेर येतें.

इष्क आणि खोकला, राहत नाहीं लोपला—प्रेम व खोकला, हीं दाबून ठेवून दबत नाहींत. तीं बाहेर पडतातच.

इष्क आणि धनीपणा जमत नाहींत—आपल्या येथें नोकर असलेल्या स्त्रीवर प्रेम केलें असतां तिच्याकडून योग्य प्रकारें चाकरी करून घेतां येत नाहीं. प्रणयी जनांचें व धन्या चाकराचें हीं नातीं एकत्र राहूं शकत नाहींत. प्रेमाच्या माणसावर बळजबरी, हुकूम करतां येत नाहीं. मुसलमानी कायद्याप्रमाणें गुलाम स्त्रीला जर धन्यापासून पुत्र झाला तर ती स्वतंत्र होते. Love and lordship like no fellowship. —सवि २२२७.

इष्क जैसा अंध, तैसा असे द्वेषहि अंध—प्रेम आणि द्वेष दोन्हीहि आंधळेच असतात. म्हणजे या विकारांचें प्राबल्य

झालें म्हणजे मनुष्यास सारासारविवेक वगैरे कांहीं दिसेनासें होतें.

इष्क जैसा समर्थास, तैसाच तो गरीबास—काम हा लहान थोर सर्व मनुष्यांच्या मागें लागलाच आहे.

इष्क स्वसंतोषें घडे, सांगण्यानें न जडे--प्रेम हें सांगून बसत नाहीं. तें स्वाभाविकपणेंच उत्पन्न होतें. ' व्यतिषजति पदार्थानान्तर कोपि हेतुः। न खलु बहिरुपाधीन्प्रीतयः संश्रयन्ते। विकसति हि पतंगस्योदये पुण्डरीकं। द्रवति च हिमरश्मावुद्गते चंद्रकांतः ॥-भवभूति उत्तरराम.

इष्ट——इष्टतर हा इष्टाचा शत्रु व इष्टतम हा इष्टतराचा शत्रु--मनांत आणलें तर, कोणत्याहि गोष्टीपेक्षां दुसरी गोष्ट अधिक चांगली, त्या दुसरीपेक्षां तिसरी तर उत्कृष्ट-सर्वांत चांगली, असें दाखवून केव्हांहि पहिल्या, दुसऱ्या गोष्टीचा उणेपणा काढतां येतो. Better is the enemy of the good. तु०-असेल तें विटवा, नसेल तें भेटवा.

इष्टं धर्मेण योजयेत्—जी वस्तु आपणाला अतिशय आवडत असेल तिचा संबंध धर्माशीं जोडावा. म्हणजे आपल्याला प्रिय गोष्ट केल्याचें समाधान मिळतें व धर्महि आचरल्याचें श्रेय मिळतें. संबंध श्लोकः (अ) सत्कुले योजयेत्कन्यां पुत्रं विद्यासु योजयेत्। व्यसने योजयेच्छत्रुमिष्टं धर्मेण योजयेत् ॥ (आ) उत्तमं प्रणिपातेन शूरं भेदेन योजयेत्। नीचमल्पप्रदानेन इष्टं धर्मेण योजयेत् ॥

इष्ट मित्र खरे, असतां दूर बरे--आपले इष्ट मित्र जोंवर आपणांपासून दूर आहेत तोंवर त्यांचा आपला संबंध नीट राहतो. फार निकट संबंध आला असतां तितकें प्रेम राहात नाहीं. ' अति परिचय खोटा मान राहात नाहीं। ' पहा. ' सोयऱ्यापासून दूर व पाण्यापासून जवळ. '

इस——इस गांव उस गांव, भिकाऱ्याला चाळीस गांव—१ आज हें गांव तर उद्यां तें याप्रमाणें भिकारी, भटक्या कोठेंहि जाऊं शकतो. सर्वंच गांवें व लोक त्याचे. २ विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर, याप्रमाणें एक जागीं नसणें.

इसयार——इसयार या उसपार--ही कड किंवा ती कड. नेहमीं कोणत्याहि गोष्टीचा एक या किंवा त्या प्रकारें शेवट लावावा. अर्धवट भिजत घोंगडें टेवूं नये.

इसळा——इसळा इसळला, शेजारी पिसाळला—शेजाऱ्यांमध्यें परस्परांबद्दल ईर्षा किंवा असूया उत्पन्न झाली म्हणजे त्यांचा बिघाड होणार हें निश्चित. मत्सरामुळें शेजारी आपले शत्रु बनतात.

इस्टेट——इस्टेटीच्या मागें, नफा नुकसान लागे--ज्याच्या मालकीची कांहीं मालमत्ता आहे त्याला केव्हां नफा केव्हां नुकसान होण्याचा संभव असतोच. ज्याला कांहींच नाहीं त्याला त्याची काळजी नसते.

इहपरत्र——इहपरत्र बुडविणें--स्वतःचें ऐहिक व पारमार्थिक नुकसान करून घेणें; आपलें कांहीं या आयुष्यांतील प्रत्यक्ष नुकसान करून घेऊन शिवाय एखाद्या पाप कर्माची जोड करून घेऊन परलोकींहि अपराधी ठरण्यासारखी गोष्ट करणें. 'हरामखोरीच्या भरांत बैद्यास येऊन आपलें इहपरत्र कां बुडवावें' —होकै.

इळा——इळा आणि भोपळा—भोपळ्याला विळा कापतो; यावरून परस्पर वैर, शत्रुत्व. अहिनकुलन्याय पहा.

इळा मोडून खिळा करणें—विळ्याची किंमत खिळ्यापेक्षां जास्त असते; तेव्हां खिळा करण्यास तो मोडणें हा शहाणपणा नव्हे. यावरून लहानशा फायद्यासाठीं मोठी वस्तु गमावणें. तु०-कनेकडाचें खापेकड करणें.

इळ्या भोपळ्याइतकें सूत--विरोधी भाव; शत्रुत्व; अमैत्री; हाडवैर; जन्मजात द्वेष. ' रामभाऊ आणि त्यांचे चिरंजीव यांचें इळ्या भोंपळ्याइतकें सूत आहे. ' वर पहा.

इळ्या वाळुकासीं गांठ--विळा व वाळुक एकत्र आल्यावर कोणी कोणावर पडलें तरी वाळूक हें विळ्याकडून कापलें जाणारच. तेव्हां त्यांची गांठ पडणें म्हणजे त्यांपैकीं एकाचा नाश होणें हें ठरलेलेंच. दोन परस्पर विरुद्ध गोष्टी एकत्र आल्यास त्यापैकीं एकीचा, दुर्बल वस्तूचा नाश होणारच. तु० -विळ्या भोपळ्याची मैत्री.

इळ्याचे घाई निळें कापणें--[निळें=हिरवें पीक] विळ्याची घाई झाली पण बिचारें निळें कापलें गेलें. समर्थांच्या भांडणांत दुर्बळांचा घात होत असतो.

इळाखिळा——अंगाचा-शरीराचा इळाखिळा करणें—अतिशय श्रम करणें; फार कष्ट करणें; अत्यंत मेहनत घेणें; अंग मोडेपर्यंत काम करणें.

ई

ईंट——ईंटका घर मट्टी करना—विटांचें घर मोडून त्याची माती करणें; क्षुल्लक गोष्टीसाठीं हातची अधिक महत्त्वाची गोष्ट गमावणें.

ईटके वास्ते मसजीद ढलाना--एका विटेकरितां सर्व मशीद पाडणें; थोडक्या लाभासाठीं मोठी हानि करून घेणें.

ईडें पाडें--चढाओढीनें; इर्षेनें; अहमहमिकेनें. 'दोही दळीचे ईडेपाडें । आकर मांडिला चढें चढें ।'–वेसीस्व ११.७२.

ईडेपिडे---ईडेपिडे घेणें--इडापिडा पहा. दृष्ट काढणें; अलाचला घेणें; दुसऱ्याची इडापिडा, ग्रहदशा वगैरे आपल्याला मागून घेणें. 'किती घेती ईडेपिडे ।'–वेसीस्व २.१४.

ईद---**ईद मग रोजा**--आधीं सण मग उपवास. ईद हा सणाचा दिवस असतो व रोजा हा उपवासाचा दिवस असतो. प्रथम चैन करून घ्यावयाची व मग उपास काढावयाचे. तु०–असेल तेव्हां दिवाळी नसेल त्या दिवशीं शिमगा.

ईन---**ईन मीन तीन; ईन मीन सव्वातीन–साडेतीन**--[ई=ही (बायको) + न् = आणि + मी + न् + स = तो (मुलगा) + वा = अथवा + ती=मुलगी. म्हणजे मी, माझी बायको व एखादें मूल. मिळून एकंदर घरांत तीनचार माणसें.] १ लहानसें सुटसुटीत कुटुंब. २ अल्प; संख्येनें अगदीं कमी.

ईरा—इरा पहा.

ईर्षा——**ईर्षा देणें**—उत्तेजन देणें; चेव आणणें, व भर देणें; भरीस घालणें.

❀ **ईर्षा झांकत नाहीं**—मनुष्याच्या मनांत एखाद्याबद्दल मत्सर वाटत असला म्हणजे तो फार दिवस गुप्त राहूं शकत नाहीं. केव्हां तरी कोणत्या तरी रूपानें बाहेर पडतो.

ईर्षा मनीं धरणें, मग हात वळविणें—कोणतेंहि काम चांगलें यावें अशी इच्छा असल्यास मनांत प्रथम ईर्षा धरावी व नंतर कामास लागावें. लिहिणें चांगलें येण्यासाठीं प्रथम मनांत ईर्षा धरून प्रयत्न करावा.–सवि ४३३७.

ईश---**ईश नसे ज्यास सहाय, त्याचे श्रम व्यर्थ जाय**—ज्या कार्यांत परमेश्वराचें साहाय्य नाहीं त्या कार्यांत कितीहि परिश्रम केले तरी ते निष्फळ होतात. सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परी तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ –रामदास.

ईश सर्वांकडे पाहे, असें म्हणून स्वस्थ राहे--परमेश्वराला सर्व गोष्टींची काळजी आहे म्हणून तो आपलीहि काळजी घेईल, असें जाणून निमूट राहावें. सूड, मत्सर, त्याग हे विकार टाकून द्यावे. तु०–तुका म्हणे स्वस्थ रहावे । जें जें होईल तें तें पहावें ॥

ईश्वर——**ईश्वरतनुचतुष्टय**—ब्रह्मांडाचीं चार अंगें--१ महामाया, २ अन्याकृति, ३ हिरण्यगर्भ, ४ विराट्.

ईश्वराचा–ईश्वराघरचा प्राणि–देवानेंच संभाळलेला प्राणि; असाहाय्य मनुष्य; ज्यास स्वतःच्या घरचे, स्वतःची काळजी घेईल असें कोणी नाहीं असा मनुष्य; ज्याचा भार केवळ देवावरच आहे असा मनुष्य.

ईश्वराचा लाल—१ देवाच्या मर्जींतला माणूस; हरीचा लाल; देवप्रिय; परमेश्वरास प्रिय असा मनुष्य. २ सज्जन; सात्त्विक मनुष्य.

❀ **ईश्वर अन्न पाठवितो, दुष्ट त्याचा नाश करितो**–माणसाला ईश्वराची देणगी नीट वापरतां येत नाहीं. 'दैव देतें कर्म नेतें' याप्रमाणें. तु०–God sends meat and the devil sends cooks. –सवि ११३७.

ईश्वर असे साही, तर दुःख होत नाहीं—[साही = साहाय्य देणारा] ईश्वर जर आपणांस अनुकूल किंवा साहाय्यकारी असेल तर आपणांस कधींहि दुःख होणार नाहीं.

ईश्वर आरोग्य देतो, वैद्य दस्तुरी घेतो—वास्तविक रोग होणें किंवा त्यांतून मुक्त होणें हें परमेश्वराधीन आहे. पण वैद्य उगाच मध्यें औषध देऊन दलाली म्हणून जणूं काय द्रव्य घेतो. औषधाचा गुण येणें न येणें हेंहि परमेश्वराधीन आहे, अशी अनेकांची समजूत असते; तीस अनुलक्षून ही म्हण योजलेली आहे.

ईश्वर इच्छेस जें आलें, त्याचा नियम कोणा न टळे—सर्व गोष्टी परमेश्वराच्या इच्छेप्रमाणें होतात व परमेश्वराच्या मनांत एखादी गोष्ट घडवावयाची असें आलें तर ती कोणीहि टाळूं शकत नाहीं.

ईश्वर उत्पन्न करतो, पोषाख शोभा देतो, द्रव्यानें मान मिळतो, ज्ञानानें थोरपणा वाढतो—सर्व प्राणिमात्र वगैरे उत्पन्न करणें हें ईश्वराधीन आहे. त्याप्रमाणें तो मनुष्यास रूप देतो, मनुष्य त्यावर चांगला पोषाख घालून त्या शरीरास शोभा आणतो, द्रव्यार्जन करून मानमरातब मिळवितो; परंतु खरें श्रेष्ठत्व त्यास ज्ञानानें प्राप्त होतें. मूळ इंग्रजी म्हणींत ज्ञानाऐवजीं द्रव्य शब्द आहे. God makes, and apparel shapes, but money makes the man.–सवि ११९३.

ईश्वर करणी अगाध आहे--ईश्वराची लीला अगम्य आहे. परमेश्वराच्या शक्तीचा कोणालाहि अंत लागावयाचा नाहीं.

ईश्वर कृपा करतो, तेव्हां वायूसवें पाऊस पाडतो—वास्तविक वारा आला म्हणजे पाऊस उडून जातो; कारण ढग दूर निघून जातात. परंतु जेव्हां परमेश्वराची कृपा असते तेव्हां उलट वाऱ्यानें ढग येऊन पाऊस पडतो.

ईश्वर कृपा ज्यावरी, त्याचें शत्रु काय करी—ज्याला

परमेश्वराचें साहाय्य आहे त्याचें शत्रु कोणत्याहि प्रकारें वांकडें करूं शकत नाहींत. तु०—देव तारी त्याला कोण मारी.

ईश्वर चराचरा तारक, पाठवून देऊन अन्नोदक—परमेश्वर हाच सर्व चराचर सृष्टीचें पालन करतो व तिच्या पोषणाकरितां अन्न उदक वगैरे निर्माण करतो.

ईश्वर जन्मास घालतो, त्याचे पदरीं शेर बांधतो—ईश्वर ज्या ज्या प्राण्यांस उत्पन्न करतो त्यांच्या त्यांच्या पोषणाची तजवीज आधींच करून ठेवतो. तु०—दाणे दाणे पर लिखा है खानेवालेका नाम. आधीं चारा मग चोंच.

ईश्वर तारी, त्यास कोण मारी—परमेश्वराच्या मनांत ज्याचें रक्षण करावयाचें आहे त्याचें कोणीहि वांकडें करूं शकत नाहीं. किंवा याचे उलटहि म्हण आहे, म्हणजे 'ईश्वर मारी त्यास कोण तारी.'

ईश्वर मात्र, असे पवित्र—मनुष्य मात्र कितीहि निष्पाप दिसला तरी त्याच्या पदरीं थोडा फार तरी पापाचा किंवा दोषाचा वांटा केव्हां तरी आलेला असतोच. या सृष्टीमध्यें पूर्णपणें निष्पाप व पवित्र असा फक्त परमेश्वरच असूं शकतो.

ईश्वर सत्वशील आहे, अनंत काळ दीर्घ राहे (पाहे)—ईश्वर हा अत्यंत सत्त्वगुणी आहे व काळ हा अनंत आहे. Good is god and long is eternity. -Welsh. सवि १२२२.

ईश्वर स्मरण ठेवावें आणि क्षेम मागावें—मनांत परमेश्वराचें चिंतन करीत असावें व त्यालाच आपलें कल्याण करण्याची प्रार्थना करावी.

ईश्वर होतां पाठमोरा, नसतीं विघ्नें येतीं घरा—परमेश्वराची अवकृपा झाली असतां अनेक संकटें उपस्थित होतात.

ईश्वराचा खरेपणा, पृथ्वीचा स्तंभ जाणा—ही सर्व जी सृष्टि आहे तिला आधार ईश्वराच्या सत्याचा आहे.

ईश्वराची करणी आणि नारळांत पाणी—परमेश्वराची कृति चमत्कारांनीं भरलेली आहे. त्याचे चमत्कार, लीला या साध्या गोष्टींतूनहि दिसून येतात.-शाब १.१२५.

ईश्वराची चिंता करणें, वाईट कोणाशीं न आचरणें—नेहमीं परमेश्वराचें मनांत चिंतन करीत असावें व कोणाशींहि वांकडें वर्तन करूं नये.

ईश्वराची प्रार्थना करावी भाग्यवेळीं, अनुकूल होईल विपत्तिकाळीं—जर आपणास वैभव काळीं परमेश्वराचें स्मरण राहील व त्याची आपण प्रार्थना करूं तर पुढें विपरीत काल प्राप्त झाला असतां तो आपणास साहाय्य करील.

ईश्वराचें भय, हाच ज्ञानाचा उदय—परमेश्वराबद्दल धाक वाटणें हीच गोष्ट आपण त्याच्या सामर्थ्यास ओळखतों याचें द्योतक आहे व हीच ज्ञानाची प्रथम पायरी आहे. परमेश्वराचें सामर्थ्य ओळखलें म्हणजे साहजिकच त्याजकडे आपलें लक्ष राहील व आपल्या मनांत त्याची भीति असल्यामुळें आपल्याकडून वाईट आचरण कधीं होणार नाहीं.

ईश्वराच्या नांवावर डोंगर तरतात—डोंगर पाण्यावर तरंगणें अशक्य; पण परमेश्वराचें नांव घेतलें व त्याची कृपा झाली तर पाषाणहि पाण्यावर तरंगतात. ही गोष्ट रामायण काळीं नळानें बांधलेल्या सेतूवरून स्पष्ट होतें.

ईश्वरानें दिला जोडा, एक अंधळा एक लंगडा—परमेश्वरानें कृपा केली व दोघांची संगति दिली. त्यांपैकीं एक अंधळा व एक लंगडा, म्हणजे दोघेहि निरूपयोगी. पण अंधळ्यानें लंगड्यास खांद्यावर घेऊन लंगड्यानें अंधळ्यास वाट दाखविली तर दोघेहि संकटाच्या पार होतात.

ईश्वरानें मनुष्या केलें सात्त्विक, स्वबुद्धीनें होतो अधार्मिक—मनुष्याचा स्वभाव जन्मतः सात्त्विकच असतो पण तो आपण होऊन अधार्मिक वृत्ति आपल्या ठिकाणीं उत्पन्न करून घेतो.

ईश्वरानें मरण द्यावें किंवा तापत्रयांतून सोडवावें—एखादा अत्यंत पीडलेला मनुष्य परमेश्वराची प्रार्थना करतो कीं, त्यानें आपली या पीडेंतून तरी मुक्तता करावी किंवा कायमची या जगांतून मृत्यूनें सुटका करावी.

ईश्वरानें मला न दिलें संतान, तर भावास कां द्यावें पुत्ररत्न (पुत्रदान)—एखादा मनुष्य स्वतःस पुत्र नसला व त्याच्या भावाला मुलगा झाला तर त्याबद्दल आपल्या वंशांत निदान एक तरी अंकुर उत्पन्न झाला याबद्दल समाधान न मानतां, उलट भावाला पुत्र झाल्याबद्दल त्याला विषादच वाटतो व तो त्याबद्दल परमेश्वरास दोष देतो.

ईश्वरापाशीं सख्य ठेवणें, तेणें आपलें काय उणें—परमेश्वराबद्दल आदर मनांत बाळगणें व त्याच्या ठिकाणीं चांगली वृत्ति ठेवणें यांत आपलें काय नुकसान आहे.

ईश्वरास ठकवूं पहातो तो आपला आपण फसला जातो—जो परमेश्वरास फसविण्याचा प्रयत्न करतो त्यास त्या कामांत यश तर येतच नाहीं; कारण परमेश्वर सर्वज्ञ आहे. पण तो आपली मात्र वंचना करून घेतो.

ईश्वरी कल्याणापासून, दुःख हरून होय भधन—परमेश्वराची कृपा झाल्यास सर्व दुःखांचें निरसन होऊन वैभवाची प्राप्ति होते.

ईश्वरी कृपा शाश्वत, मानवी ती अशाश्वत—परमेश्वराची कृपा ही चिरकाल टिकणारी आहे, मनुष्यानें दाखविलेली कृपा ही तात्पुरती होय.

ईश्वरी तंत्रास उपाय नाहीं--परमेश्वरानें जी योजना केलेली असेल ती फिरविण्याचें सामर्थ्य मनुष्यांत नसतें.-पया ३२१.

ईश्वरी देणें, वंदन करणें—परमेश्वरानें आपल्याला कोणतीहि गोष्ट दिली व ती कशीहि दिली तरी तीबद्दल त्याचे आभार मानणें अवश्य आहे. एखादें मूल कुरूप वगैरे असलें तें परमेश्वरानें दिलें म्हणून त्याबद्दल संतोषच मानला पाहिजे. तु.-(हिं.) अल्लाका दिया शीरपर.

ईश्वरी लीला अगाध—परमेश्वराच्या कृती अतर्क्य व असंवेद्य असतात. त्याच्या सामर्थ्याची आपणांस पूर्ण जाणीव होणें अशक्य आहे.

ईश्वरेच्छा बलीयसी—परमेश्वराच्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडून येतात. –पामो १८४. 'बलीयसी केवलमीश्वरेच्छा' पहा.

ईळ——इळान् इळ—[ईळ = वेळ] सारा दिवस; एक सारखा; सर्व वेळपर्यंत.

❀ **ईळ गेला इळाचा, माथा धुतें तिळाचा**—(व.) [ईळ = वेळ] सर्व वेळ व्यर्थ घालविल्यावर रात्रीं तेलाकरितां तीळ धुवीत बसावयाचें. दिवस व्यर्थ घालवून रात्रीं काम करणें.

उ

उं——उं म्हळयार काणि सोंपली—(गो.) हूं म्हटल्यावर कहाणी संपली. थोडक्यानें समाप्ति.

उकडा——उकुडे जेवल्यार हाग्ता आनि सुरै जेवूल्यार भाग्ता—(गो.) उकडे तांदुळाचा भात जेवल्यावर परसाकडे जातो आणि साध्या तांदुळाचा भात जेवल्यावर वाळतो [उकडे तांदुळ=भात उकडून वाळवून तांदुळ करतात ते. सुरै=नेहमीचा तांदुळ आपण खातो तो.] कांहीं सोसत नाहीं याअर्थी.

उकरणें——उकरून कज्जा काढणें—मुद्दाम होऊन भांडण उपस्थित करणें; आपण होऊन तंटा सुरू करणें; मिटलेलें भांडण पुन्हा सुरू करणें.

उकलासणें——उकलासून दवरप—(गो.) निराळा काढून ठेवणें.

उकसाबुकसी——उकसाबुकसी रडणें—मोठमोठ्यानें, हुंदके देऊन देऊन रडणें; अतिशय शोकावेग आल्यामुळें गळा रुद्ध होऊन शोकोद्गार काढीत विलाप करणें.

उकळी——उकळी फुटणें—ज्याप्रमाणें पाण्याला आधण आलें असतां आंतून जोरानें बुडबुडे वर येतात त्याप्रमाणें एखाद्या मनोविकाराचा जोरानें प्रादुर्भाव होणें. 'युवराजाचें दर्शन होतांच लोकांना आनंदाची उकळी फुटली.'

उकिरडा——उकिरडा फुंकणें—१ कांहीं मिळेल या आशेनें उकिरडयावरच्या वस्तू-केरकचरा इ० धुंडाळणें; अत्यंत हीन दशा प्राप्त होऊन कांहीं खावयास न मिळाल्यामुळें उकिरड्यावरचे पदार्थ शोधण्याची पाळी येणें; अतिशय दारिद्र्य दशा प्राप्त होणें. २ (ल.) वेश्यागमन, परद्वार करणें. 'बाहेर जाऊन दहा उकिरडे फुंकून येशील.' –बाय २.१.

उकिरडयाची धन-ण करणें—एखादी वस्तु निरूपयोगी झाली असतां ती उकिरड्यावर टाकून देतात. यावरून फेंकून देणें; व्यर्थ दवडणें; फुकट घालविणें; चांगल्या वस्तूहि व्यर्थ घालविणें, टाकून देणें.

उकिरडयावरचा शेणगोटा—ज्याप्रमाणें उष्ट्यास लावलेला शेणाचा गोळा निरुपयोगी म्हणून फेंकून दिलेला असतो त्याप्रमाणें कोणत्याहि कामास उपयोगी न पडणारा म्हणून मानलेला पदार्थ, मनुष्य वगैरे; निरुपयोगी, कुचकामाचा मनुष्य. 'आम्ही काय उकिरडयाचा शेणगोटा!' –इंप ६१.

उकिरडयासारखा वाढणें—ज्याप्रमाणें उकिरडयावरील घाण सारखी वाढत जाते, पण तिचा कांहीं उपयोग नसतो त्याप्रमाणें निरुद्योगी मनुष्य अथवा निरुपयोगी वस्तूंचा साठा वाढत गेला तरी त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. यावरून निरर्थक बेसुमार वाढ होणें.

❀ **उकिरडा घोळी तरी तो फुंकून पाणी पितो**—गाढव उकिरड्यावरची घाण फुंकून फुंकून खात असतें; पण त्यास पाणी प्यावयास मात्र स्वच्छ लागतें. तेव्हां इतर गोष्टींत कितीहि मूर्खपणा केला तरी एखाद्या गोष्टींत तरी काळजीपूर्वक वागणूक करावी, असा एखाद्या मूर्खास उपदेश करतांना ही म्हण वापरतात.

उकिरडयाची दैना बारा वर्षांनीं देखील फिटते—उकिरडयावरची घाण केव्हांतरी, दीर्घ काळानंतर कां होईना, पण काढली जाते व तो केव्हां तरी स्वच्छ केलाच जातो. त्याप्रमाणें एखाद्या गरीब मनुष्यास केव्हां तरी बरे दिवस येण्याचा संभव असतो व तशी त्याला आशा असते.

उकिरड्यावर निजते, लवंगा पुसते—कुश्चळ जागीं व्यवसाय करणाऱ्यांनीं चांगल्या पदार्थाची इच्छा करणें व्यर्थ आहे, असा भाव. तु०–अन्नछत्रीं जेवणें व मिरपूड मागणें.

उखळ—उखळ पांढरें होणें—उखळ रुपयांनीं भरणें. चांगला गबर होणें; स्वतःची चांगली भर करून घेणें; मोठा द्रव्यलाभ होणें. (निंदार्थी वापरतात.) तु०–Try to feather one's nest. [मूळ वाक्प्रचार 'खळें पांढरें होणें' असा असावा. कारण खळ्यावर धान्य येऊन पडलें म्हणजे त्याची रास पाहून मालकाच्या वैभवाची कल्पना येते. आणखी एक उपपत्ति अशी : श्रीमंताच्या घरीं उखळाला सारखें काम असतें तेव्हां तें नेहमीं पांढरें असणार. गरीबाच्या घरचें उखळ नेहेमीं रिकामें, तेव्हां काळेंच.] 'औंदा बाबा तुझं उखळ लई पांढरं दिसतया.' –शाब ३·५.

बेंबीचें उखळ होणें—स्थूल माणसांची बेंबी पोटाच्या भागांत खोल जाऊन उखळाप्रमाणें दिसते. चमचमीत खावयास मिळाल्यामुळें दोंद सुटणें व लठ्ठ होणें. 'हे कोण बायकोचे साले। तुपावेगळा घांस न गिळे। तांदुळ रांधियलें मोकळें। केलें बेंबीचें उखळ। बा तुझा चालता काळ। खायाला मिळती सकळ ॥'–अमृत (नवनीत ४४२).

उखळांत घातला असतां सतरा घाव चुकविणारा—अत्यंत लबाड मनुष्याबद्दल वापरतात. एखाद्या लबाड मनुष्याला शासन करावयाचें मनांत आणलें व कितीहि खटपटी केल्या व त्याला पेंचांत धरलें तरी त्यांतूनहि तो निसटून जातो

उखळांत घातला तर सात घाव चुकवील—कोणच्याहि कचाटींत न सांपडणाऱ्या मनुष्यास ह्मणतात. कितीहि अडचणींत किंवा पेंचांत सांपडला तरी जो दाद देत नाहीं अशा लबाड मनुष्यास ह्मणतात.

उखळांत डोकें असणें—अत्यंत भयंकर स्थितींत असणें. उखळांत असलेल्या वस्तूवर मुसळाचे घाव पडतात; त्याप्रमाणें संकटाच्या धास्तींत असल्या वेळीं म्हणतात.

उखळांत डोकें (शीर) घालणें-देणें—संकट ओढवून घेणें; एखादी आपत्ति स्वतःवर बळेंच आणणें.

उखळामुसळाची-शीं गांठ पडणें—उखळ आणि मुसळ यांची गांठ पडली म्हणजे दणदण आवाज होणारच. त्याप्रमाणें परस्पर विरुद्ध गोष्टी एकत्र आल्या म्हणजे त्यांतून विरोध, कलागत वगैरे गोष्टी उत्पन्न व्हावयाच्याच. विळा भोपळा० पहा.

ॐ उखळांत डोकें घातल्यावर मुसळास कोण भितो; उखलिमे सर दबातो धक्कोसे क्या डर—उखळामध्यें एकदां जाणून बुजून डोकें घातल्यावर त्यावर मुसळाचा घाव बसणार हें ठरलेलेंच असतें. तेव्हां अशा रीतीनें डोकें घालणारा मुसळाच्या घावाची पर्वा करीत नाहीं. त्याप्रमाणें जाणूनबुजून एखादें साहसाचें कृत्य अंगावर घेतल्यावर त्यांत येणाऱ्या विघ्नांची कोणी परवा करीत नाहीं. याचाच हिंदी पर्याय वर दिला आहे.

उखळांत डोकें, भीति हारपे—संकटें सोसावयाची मनाची तयारी केली ह्मणजे त्याबद्दल भीति वाटत नाहीं.

उखाणा—उखाणा घालणें—१ उखाद्या अनुप्रासयुक्त वाक्यांत एखादा प्रश्न विचारून त्याचें उत्तर अपेक्षिणें; विचारार्थ कूट प्रश्न मांडणें; कोडें सांगणें; एखादा बिकट प्रश्न विचारून त्याचें उत्तर मागणें. २ (ल.) एखादी बिकट परिस्थिति पुढें मांडून तीवर युक्ति विचारणें.

उखाणा घेणें—स्त्रिया शुभप्रसंगीं, हळदीकुंकवादि समारंभाच्या वेळीं आपल्या पतीचें नांव घेतांना त्यावेळीं तें योग्य शब्दांमध्यें बसवून घेतात. यावरून पतीचें नांव घेतांना त्यासभोवतीं अनुप्रासात्मक गोड शब्दांची सजावट करणें.

उखाणा सांगणें—१ एखादा कूट प्रश्न सोडविणें; उखाणा ओळखणें, जिंकणें. २ दुसऱ्या स्त्रीस पतीनें नांव घेण्याच्या वेळेस एखादी अनुप्रासयुक्त शब्दरचना करून देणें, सुचविणें. (हें काम बहुधा त्या स्त्रीची बहिण, समवयस्क मैत्रीण, अथवा करवली करतें.)

उखाळ्या—उखाळ्या पाखाळ्या काढणें—एकमेकांचीं व्यंगें, दुष्कृत्यें बोलून दाखविणें; दोषारोप करणें. 'उखाळ्या पाखाळ्या काढोनि भांडावें। वर्दळीस यावें काय त्यांनीं ॥'

उखी—उखी करणें—(व.) निंदा करणें; बोज उडविणें; अपमान करणें; चेष्टा करणें.

उखी होणें—थकणें; मरगळणें; श्रमानें दमणें; भागणें; श्रमी होणें.

उगवणें—उगवत्या मावळत्या सूर्याशीं बोलणें—प्रत्यक्ष कोणाला उद्देशून न बोलणें; आपल्याच मनाशीं बोलणें; अप्रत्यक्ष बोलणें.

उगवीत पागवीत—सवडीप्रमाणें; योग्य त्या सवलती देऊन; सोईसोईनें (पैसे उगविणें).

ॐ उगवतीं सूर्यकिरणें, न दिसतीं तारांगणें—सूर्य उगवल्याबरोबर नक्षत्रें दिसत नाहींशीं होतात. एखादा पराक्रमी पुरुष, किंवा विद्वान् मनुष्य सभेंत आल्याबरोबर त्याच्या तेजामुळें इतर लोक फिक्के पडतात.

उगवेल तो मावळेल—'चढेल तो पडेल' याप्रमाणें.

उगळणें——उगळलेला गडी—निःसत्त्व मनुष्य; ज्याच्या शरीरांतील जोम नाहींसा झाला आहे असा मनुष्य; ब्रह्मचर्यापासून च्युत झालेला मनुष्य.

❀ **उगळला तर परमेश्वर, खंटला तर शनैश्वर—** एखाद्या मनुष्याचा स्वभाव असा असतो कीं, तो जर आपल्यास अनुकूल झाला, त्याची जर आपणावर कृपा झाली तर, तो परमेश्वरासारखा आपलें कोणतेंहि प्रिय करावयास तयार होतो; परंतु जर का तो आपणास प्रतिकूल झाला अगर त्याची आपणावर इतराजी झाली तर तो शनीसारखा अत्यंत पीडादायक होतो.

उगाच, उगीच——उगाच काळ घालवूं नये, जिवा बहु श्रमहि देऊं नये—रिकामपणांत वेळ फुकट घालवूं नये, कांहीं तरी उपयुक्त गोष्ट करण्यांत वेळ खर्च करावा. पण अतिशय श्रमहि करूं नये व आपल्या शक्तीबाहेर काम करूं नये.

उगाचि शीण वाउगा, बळेंचि होतसे दगा—मनुष्य पुष्कळदां व्यर्थ श्रम करीत असतो व पसारा पसरीत असतो; पण त्यामुळें तो आपण होऊनच आपणांवर संकटें ओढवून घेतो.

उगीच भरभर, खालीं छप्पर वर घर— व्यर्थ खटपट; निरर्थक श्रम घेऊन एखादी गोष्ट अशी करावयाची कीं ती जगाच्या उलटी असेल व तिचा कांहीं उपयोग होणार नाहीं.

उगीच मौन धरणें तें मौर्ख्य—योग्य प्रसंगीं न बोलतां गप्प राहणें व आपली बाजू न मांडणें किंवा प्रतिकार न करणें, हा मूर्खपणा आहे.

उगाणा——उगाणा काढणें—धान्य कांडतांना किंवा कुटतांना उखळांत खालीं न कांडतां राहिलेला भाग वरखालीं करणें.

उगी——उगी करणें-राहणें-होणें—रडावयाचें थांबविणें; गप्प करणें; शांत होणें, करणें; शोकापासून परावृत्त करणें, होणें. 'काय झालें सुशिलेला ? असें म्हणून तिला त्यांनीं क्षणार्धांत उगी केलें.'—सुदे ७.

उगीदुगी——उगीदुगी करणें—१ मध्येंच तोंड घालणें; दोघांमध्यें पडणें. २ चहाडीचुगली करणें; भांडणतंटा लावणें.

उंघ——उंघ वेचिने, उजागरो लेवो—(गु.) झोंप विकून जागरण घेणें. म्हणजे फार श्रम करून थोडें काम उरकणें; व्यर्थ वेळ दवडणें. तु०—सारी रात्र जागणें, शेंगा वांगी रांधणें.

उघड——उघड करणें—१ स्पष्ट सांगणें; गुप्त न ठेवणें. अंतःकरणांतील भावना मोकळ्या करणें.

❀ **उघड मूठ फुकाची—**'झांकली मूठ सवा लाखाची' याच्या उलट. एखादी गोष्ट आचांत असते तोपर्यंत तिची किंमत असते. एकदां तिची वाच्यता झाली म्हणजे तींतील स्वारस्य निघून जातें.

उघड शत्रुत्व पुरवतें, गोंवरीची आग जाचते—उघडपणें शत्रुत्व करणारा मनुष्य चांगला. त्याचा प्रतिकार करणें शक्य असतें; पण गोंवरीप्रमाणें राखेखालीं धुमसत राहणाऱ्या विस्तवाप्रमाणें जो वरून शांत पण आंतून आपलें वैर करतो तो शत्रु अधिक भयंकर होय.

उघड शत्रु सावध करी, पण गोडबोल्या मित्र घात करी—जो मनुष्य समोरासमोर वैर करतो त्याचा प्रतिकार करतां येतो व त्याबद्दल सावध राहतां येतें; पण जो वरवर गोड बोलून आपला विश्वास संपादन करतो व मित्रपणा दाखवितो आणि आंतून आपला नाश करण्याचा प्रयत्न करतो त्याचेपासून सावध राहणें कठीण असतें व तो मात्र आपला घात सहज करूं शकतो.

उघडकी——उघडकीस येणें-आणणें—प्रकट होणें; स्पष्ट होणें; चार चौघांच्या नजरेस येणें, आणणें; परिस्फोट होणें, करणें.

उघडणें——उघड झोंपा देत गाई (गाय); उघड फाटक आणि दे गाय—हलवायाच्या घरावर तुळशीपत्र, याप्रमाणें दुसऱ्याचा माल उदारपणें देऊन टाकणें किंवा सढळ हातानें खर्च करणें.

उघडा उघडा खिडकी, नाकाला लागली चिरकी— [चिरकी म्हणजे चिळकांडी] खालीं पहा.

उघडा उघडा दार, नाकाला लागली धार—एक मनुष्य आपल्या बायकोशीं भांडून रानांत निघून गेला. तेथें त्यास रात्र झाल्यावर कोठें जावें याची पंचाईत पडली. अखेरीस तो एका झाडावर जाऊन बसला. थोड्या वेळानें तेथें कांहीं चोर येऊन त्यांनीं आणलेली लूट त्याच झाडाखालीं बसून वांटून घेऊं लागले. तेव्हां वरील मनुष्य घाबरून गेला व त्याची तपकिरीची डबी खालीं पडली. तेव्हां चोरांस वर कोणीतरी भूत आहे असा संशय येऊन ते घाबरून आपलें सर्व द्रव्य टाकून तसेच पळून गेले. मग त्या मनुष्यानें तें सर्व द्रव्य बांधून घेऊन डोक्यावर गाठोडें घेतलें व घरीं आला व बायकोस म्हणाला: उघडा उघडा दार, डोक्याला झाला भार. ही गोष्ट शेजारणीनें ऐकून आपल्या नवऱ्यासहि तसेंच बाहेर घालवून दिलें. तो त्या ठराविक झाडावर बसला व चोर खालीं आल्यावर त्यानें आपली तपकिरीची डबी मुद्दाम खालीं टाकली. तेव्हां त्या चोरांस ती गोष्ट पुनः घडल्यामुळें संशय आला व त्यांनीं वर चढून पाहिलें तेव्हां तो सांपडला. मग त्याचें नाक कापून त्यांनीं त्याला हांकून दिलें. तेव्हां द्रव्य मिळावयाच्या ऐवजीं नाकास धार लागून तो घरीं आला व बायकोस हांक मारून म्हणूं लागला कीं, उघडा

उघडा दार, नाकास लागली धार! याप्रमाणें भलत्याच गोष्टींत दुसऱ्याचें अनुकरण केलें असतां लाभ व्हावयाच्या ऐवजीं नुकसान होतें. तु०-अति पवित्रता० पहा.

उघडा--डी-डें--उघडा करणें--१निराश्रित करणें; आधार काढून घेणें. २ चव्हाटयावर आणणें; जाहीर करणें; उघडकीस आणणें.

उघडा नागडा-धोत-बंब-वाग (घ) ड (डा)-सोट-अंगावर कोणताहि कपडा नसलेला; वस्त्रहीन; नग्न.

एखाद्याला उघडा पाडणें; उघड्यावर आणणें—एखाद्याच्या दुष्कृत्यावरील आडपडदा बाजूस सारणें; चवाठयावर आणणें; जाहीर बोभाटा करणें; निंदेस, उपहासास पात्र करणें.

उघडा माथा——मोकळीक; स्वैर स्वातंत्र्य; कोणाचाहि ताबा नाहीं अशी स्थिति; ज्यास मर्यादा नाहीं असा. 'कसबिणीनें शिदळकी केली तर तिला कोण विचारतो? मूळचाच तिचा उघडा माथा.'

उघडा हिशोब—सरळ सरळ व्यवहार; चोख व्यवहार; सरळ, स्वच्छ, सहज पटणारा हिशोब, गोष्ट.

उघडा होणें—सर्वस्वी नाश होणें; निराधार, निराश्रित होणें.

उघडी मांडी करणें-टाकणें—निर्लज्जपणाचें आचरण करणें; आपलें गुह्य दुसऱ्यास दाखविणें; आपल्या उणेपणाचें प्रदर्शन करणें. लाज, अब्रू सोडणें.

उघडें परब्रह्म—स्पष्ट, उघड गोष्ट.

उघडे हिंडणें--अगदीं असाहाय्य दीन स्थितींत दिवस काढणें. 'एक तरुण ब्राह्मण मुलगी आपली अब्रू उराशीं धरून या संकटमय जगांत निराधार व उघडी हिंडत असावी हें मी म्हणतों साऱ्या हिंदु समाजाला लांछन आहे.'-दौलत पृ. २६४.

उघड्या डोळ्यांनीं—पाहून सवरून; जाणून बुजून; डोळ्यांदेखत; समक्ष; पहात असतां.

उघड्या डोळ्यांनीं मरण पाहणें—आपल्या देखत आपला नाश होत असलेला पाहणें.

उघड्या डोळ्यानें रात्र काढणें—आलोचन जागरण करणें; मुळींच डोळा मिटण्याइतकी देखील झोंप न घेणें.

उघड्या माथ्यानें—लाज, मिंधेपणा इ. न बाळगतां; राजरोस; उजळपणें; उघडपणें; कोणाची भीड मर्यादा न बाळगतां.

उघड्या माथ्यानें फिरणें—उजळ माथ्यानें फिरणें; कोणाचा धाक, भीति, वगैरे न बाळगतां मोकळेपणानें वागणें.

* **उघडा बोडका बाळसंतोष**—अगदीं नग्न; अंगावर चिंधी देखील नाहीं असा. बाळसंतोष ही एक भिक्षेकऱ्यांची जात असून ते जुने कपडे मागत फिरत असतात. व यामुळें त्यांच्या अंगावर अनेक लोकांनीं दिलेले जुने पण चित्रविचित्र रंगांचे व आकाराचे कपडे असतात. पण हा बाळसंतोष कपडे मागणारा भिकारी असून उघडा बोडका आहे. यावरून ज्याजवळ भिकेचा देखील एकहि कपडा नाहीं असा अगदीं निष्कांचन, निर्धन मनुष्य; पूर्णपणें दरिद्री निराश्रित मनुष्य.

उघड्या डोळ्यांनीं करावें आणि डोळे मिटून भरावें—प्रथम कोणतीहि गोष्ट करतांना डोळे नीट उघडे ठेवावे म्हणजे पूर्ण विचार करावा व एकदां कोणतीहि गोष्ट केल्यावर मात्र मग तिचें परिणाम निमूटपणें सोसण्यास तयार व्हावें.

उघड्या डोळ्यांनीं प्राण जात नाहीं—१ [उंदीर अनायासें पकडण्यासाठीं एका मांजरानें मेल्याचें सोंग घेतलें व पडून राहिलें. पण उंदीर दिसावें म्हणून डोळे मात्र उघडे ठेविले. एका शहाण्या उंदरानें तें पाहून आपल्या मंडळींस इशारा दिला कीं, हें मांजर मेलेलें तर नाहीं. कारण उघड्या डोळ्यांनीं प्राण जात नाहीं.] माणसाचें बिंग किती सावरलें तरी कसें तरी एखाद्या क्षुल्लक गोष्टीमुळेंहि बाहेर पडतें. २ डोळ्यांसमोर वाईट नुकसानीच्या गोष्टी माणसाला पाहावत नाहीं. तो निरर्थक का होईना पण शक्य तों प्रतिकार करीतच असतो.

उघड्या दरवाजावर धाड पडत नाहीं, व ओसाड माळावर चढाई होत नाहीं—ज्या घराचें दार नेहमीं उघडें पडलेलें असतें, म्हणजे ज्या घरांत वस्ती नसते त्या घरांत कांहीं नसल्यामुळें कोणी घरावर दरोडा घालीत नाहीं. त्याचप्रमाणें जेथें ओसाड माळरान आहे त्या जागेचा ताबा घेण्यासाठीं कोणी धडपड करीत नाहीं. जेथें कांहीं लभ्यांश होण्यासारखा नाहीं त्या कामाकडे कोणी ढुंकून पहात नाहीं; तर कांहीं लग्गा असेल तेथेंच कोणाची झाली तरी दृष्टि जाते.

उघड्यापाशीं नागडें गेलें, सारी रात्र थंडीनें (हिंवानें) मेलें; नागड्यापाशीं उघडें गेलें, सारी रात्र हिंवानें मेलें—ज्याच्याजवळ स्वतःच्या निर्वाहापुरतेंहि साधन नाहीं तो दुसऱ्यास काय मदत करूं शकणार? तु०-एकादशीच्या घरीं शिवरात्र. पाठभेद-उघड्याच्या घरीं नागवा गेला, रात्र सारी हिंवानें मेला.

उंच——**सात ताड उंच; तीन ताड उंच**--ताड हें झाड फार उंच असतें. अशा सात किंवा तीन ताडांची उंची पुष्कळच होते. यावरून अतिशय उंच; पराकाष्ठेचा उंच.

उंच कपाळ्या--नशीबवान; दैववान; भाग्यशाली.

उंच टांक करून चालणें--(व.) [टांक=टांच] आढय

तेनें चालणें. 'इतक्यांत लगे लागला टांक उंच करून चालायला. समजेल म्हणावं लौकरच.'

· उंच टांचा करून वागणें--गर्वानें वागणें; तोऱ्यांत असणें; गर्विष्ठपणानें मिरवणें; दुसऱ्या कोणाची परवा नाहीं असें दाखविणें.

उंच नाक करून--१ प्रतिष्ठेनें; आढ्यतेनें; गर्वानें. २ प्रौढीनें; ताठ्यानें. 'उंच नाकें श्वशुरागारीं । वागे न ऐसें करावें ॥'-जै १७.६५.

ꙮ उंच घरापेक्षां लौकिक थोर आहे--मनुष्याच्या संपत्तीपेक्षां त्याच्या नांवलौकिकाची, अब्रूची मातबरी अधिक आहे. श्रीमंतीपेक्षां मनुष्याची समाजांत जी प्रतिष्ठा असते तिला लोक अधिक मानतात. A high name is better than a high house.-Persian.

उंच देशावर, तुफानें वरचेवर--उंच प्रदेशावरच वारा फार जोरानें वाहतो; थोर लोकांसच अनेकांकडून उपद्रव होतो. मोठ्या लोकांच्याच मागें उपाधि फार असतात.

उंच रडे शिंप्यापाशीं अन् नीच रडे शिंक्यापाशीं--(वायदेशी) उंच माणूस असला म्हणजे शिंप्याला त्याचे कपडे नीट शिवतां येत नाहीं, तेव्हां तो शिंप्यापाशीं तक्रार करीत बसतो; व ठेंगू माणूस असला म्हणजे त्याला शिंक्यावरचें काढ त येत नाहीं; म्हणून तोहि तेथें धडपडत असतो. तेव्हां फार उंच किंवा ठेंगणें असणें दोन्ही वाईटच.

उंच वाढला एरंड--एरंड कितीहि उंच वाढला तरी त्याच्या रसांत उंसाच्या सारखी गोडी थोडीच येणार आहे? 'उंच वाढला एरंड । तरि का होइल इक्षुदंड ॥'-तुगा.-शाब १.५५.

उंच सखल जमीनीला चंदनाचा पाट--जर चंदनाच्या लांकडाचा मूल्यवान पाट असेल तर तो मांडावयास चांगली नितळ जमीन असेल तेथेंच तो मांडला तर त्याची शोभा. नाहींतर उखीर बाखीर व खडवडीत जमीनीवर तो मांडला तर तो मोडावयाचा संभव व त्याची शोभाहि दिसणार नाहीं. तेव्हां योग्य ठिकाणींच चांगल्या वस्तूची योजना करावी.

उंचारि चळ्ळेलो तग्गु येत्ता--(गो.) चढेल तो पडेल, पहा

उंचारि चोवुनु चमकल्यारि, फोंडांतु पायु पडताखातरि--(गो.) उंचावरून पाहून (पुढारीपणा घेऊन) चमकल्याव खड्यांत पाय खात्रीनें पडतो.

उंचावेलें उदाक उंचारि वचका, तग्गु उदाक तग्गु वचका--(गो.) वरचें पाणी वर जायला पाहिजे, खालचें खालीं जायला पाहिजे.

उंची पोषाख करी, बायका मुलें उपाशी मारी--स्वतः बाहेर मोठा भपका दाखवावयाचा व उंची पोषाख करून हिंडावयाचें; पण घरीं पोटभर अन्न मिळण्याचीहि भ्रांति असावयाची. अशा पोकळ दिमाख दाखविणाऱ्या मनुष्याबद्दल योजतात.

उंची वस्तु अल्प मोला, त्या राष्ट्रीं मोडती कळा--ज्या देशामध्यें बहुमोल वस्तु अगदीं अल्प किंमतीस विकल्या जातात त्या देशास अवनति प्राप्त झाली आहे असें समजावें.

उचकी——उचकी ये तोंवरी, मूर्ख हांसे परोपरी—मूर्खाला विनाकारण हंसूं येतें व एकदां तो हंसूं लागला म्हणजे तो एकसारखा हंसतच राहतो; त्याला तें दाबतां येत नाहीं. मूर्ख मनुष्य विनाकारण कांहीं तरी करीत असतो व त्याला आपण काय करतो हेंहि कळत नाहीं व त्याचा आपल्या मनावर अथवा व्यापारांवर ताबा असत नाहीं.

उचक्या नू जांभया--(व.) पोट अगदीं उपाशी असले म्हणजे उचक्या व जांभया यांचा सुळसुळाट होतो. व अन्न पोटांत गेल्यावर त्या बंद होतात. अन्नाचा अभाव दाखविण्यासाठीं योजतात.

उचंबळ——उचंबळ खाणें—उठून चळवळ करणें; हालचाल करणें. याच्याविरुद्ध 'पड खाणें'.

उचलणें——उचलला संसार—ज्या संसारांतील सर्व सामान सुमान सहज उचलून नेतां येऊन दुसरीकडे मांडतां येतें असा, घरदार वगैरे करून स्थाईक स्वरूपाचा झाला नसेल असा तुटपुंजा संसार.

उचलला हात—स्वेच्छेनें देण्यास पुढें केलेला हात; कोणतीहि गोष्ट देऊन टाकण्याकरितां दाखविलेली उत्सुकता.

उचललेलें काम—स्वखुषीनें पतकरलेलें काम; स्वतः होऊन ज्या कामाची जबाबदारी अंगावर घेतली आहे असें काम.

उचलून आपटणें—मोठ्या जोरानें फेकणें; आदळणें; वर चढवून पुन्हा खालीं टाकणें.

उचलून जाणें-येणें--१ वादाविषयीं आह्वान देणें; तयार होणें; आपण होऊन सिद्ध असणें. 'जे झुंजावया उचलोनि आले असती ।'-गीचं १.२२. २ विवाहास बाहेर गांवाहून येणें, जाणें; स्वतःचा गांव सोडून दुसऱ्या गांवीं जाणें, येणें.

उचलून देणें—१ शपथ घेणें; बेल भंडार, तुळशीपत्र वगैरे हातांत घेऊन प्रतिज्ञा करणें; देवावरचें फूल वगैरे प्रतिज्ञापूर्वक काढून देणें. २ उक्ती रकम देणें; ठराविक रकम विशिष्ट कामाकरतां देणें. ३ वेगळें काढून देणें; एखाद्या गोष्टीकरितां वेगळी तरतूद करून ठेवणें.

(एखाद्याला) उचलून धरणें--१सतावून सोडणें; अतिशय त्रास देणें; संताप आणणें. २ भारी अटी लादणें; पेचांत पकडणें. ३ पक्ष स्वीकारणें; आधार देणें; आश्रय देणें.

उचलून बोलणें-गोष्टी सांगणें—१ बढाई मारणें; बाता झोकणें; पोकळ आविर्भाव आणणें. २ ताठयानें बोलणें; प्रौढी मारणें. ३ आपला दर्जा न ओळखतां बोलणें; लहान तोंडीं मोठा घांस घेणें; आपल्या योग्यतेच्या बाहेर बोलणें.

*** उचल पत्रावळी, म्हणे जेवणार (जेवले) किती**--जें काम करावयाचें तें सोडून भलत्याच गोष्टीची उठाठेव करणें. पाठभेद-उष्टी काढ तर म्हणे जेवले किती.

उचलली कळ, दाल्ला घेऊन पळ--(व.) नसती कळ (भांडण, वाद) काढून एखादीला सळो कीं पळो केलें, इतकें कीं दाल्ला म्हणजे नवरा घेऊन पळण्याची पाळी तिजवर यावी, तर असें म्हणतात. किंवा आपला नवरा घेऊन समाईक कुटुंबापासून वेगळे राहाण्याचें एखाद्या सुनेच्या मनांत असल्यास ती सासू, सासरा, दीर, नणदा इत्यादिकांबरोबर कांहीं तरी भांडणाची कुरापत उकरून काढते. नसतें भांडणाचें निमित्त कोणी काढील तर त्यास अनुलक्षून ही म्हण वापरतात.

उचलली जीभ कीं, लावली टाळयाला—विचार केल्याशिवाय बोलणें; पुढचा मागचा संदर्भ अगर आपणावरील जबाबदारी न ओळखतां कांहीं तरी बोलणें; बोलणें सोपें पण करणें कठीण, म्हणून विचार केल्याशिवाय एकदम विधान करूं नये.

उचलली जीभ लावली टाळयाला, तेथें विचार कसला—नुसतें बोलणें सोपें असतें, त्याला श्रम पडत नाहींत किंवा विचार करावा लागत नाहीं; पण कार्य करते वेळीं विचार पडतो.

उचल बांगडी---**उचल बांगडी करणें-करून नेणें**—[बांगडी = पांगडी = कोळयाचे मासे धरण्याचें जाळें.] १ कोळी लोक जसें मोठें जाळें चोहोंकडून धरून उचलतात, त्याप्रमाणें हल्ली शाळेंत न जाणाऱ्या मुलास बाकीचीं मुलें हात पाय डोकें धरून घेऊन जातात. २ (ल.) हकालपट्टी, उच्चाटण करणें. 'मुधोजीची उचलबांगडी होण्याचा वेळ आला होता.' -वि वि. ८.६.१११.

उचले---**बाजार भरला नाहीं तोंच उचल्यांनीं कमरा बांधल्या**—बाजाराची गर्दी झाली म्हणजे उचले लोक आपलें कौशल्य दाखवून लोकांच्या वस्तू चोरतात पण गर्दी होण्यापूर्वींच त्यांनीं कमर बांधून तयार होणें म्हणजे फार उतावीळपणा दाखविणें होय. यावरून कशास कांहीं ठिकाण नसतां फार उतावळी दाखविणाऱ्या मनुष्याबद्दल ही म्हण वापरतात.

उचापत---**उचापत खाऊ**--उधारीवर राहणारा; दुसऱ्याचें कर्ज करून निर्वाह करणारा.

उचापत खाऊन राहणें--उधारीवर निर्वाह करणें; काढओढ करून दिवस काढणें.

उचापत खाणें— १ विकत भांडण घेणें; विनाकारण एखादी जबाबदारी आपल्या अंगावर ओढून घेणें. २ आशेवर चैन करणें; पुढें लाभ होईल या अंदाजानें आधींच उधळपट्टी करणें.

उचापतीचा रोजगार-व्यवहार--उधारीचा धंदा; परक्याचें कर्ज काढून चालविलेला व्यापार.

*** उचापतीचें पोतें, सवा हात रितें**—वाण्याकडून रोखीनें माल आणल्यास त्यास माप वगैरे बरोबर द्यावें लागतें; पण तोच उधारीनें माल आणल्यास तो मापांत लबाडी केल्याशिवाय राहात नाहीं व आपणांस मिंधेपणामुळें त्यास बोलतां येत नाहीं. 'उधारीचें पोतें०' पहा.

उच्यापतिनें किचापति जाता--(गो.) उचापतीनें भांडण होतें.

उचावचे---**उचावेल्यानें कुला परिक्षा, कमला वेल्यानें उदका परिक्षा**--(गो.) बोलण्या वरून कुलाची परीक्षा होते, व कमलावरून पाण्याची परिक्षा होते.

उचित---**उचितास येणें**--पसंत पडणें; योग्य असणें; अनुरूप असणें.

उच्च---**उच्चस्थाने वासः**--श्रेष्ठपदाची प्राप्ति.

उच्ची पट्टी--[उच्ची=(ना.) एखाद्यास प्रथम चढवून भग केलेली फजीती.] चांगली फजीती.

उच्चींत येणें--चढून जाणें; गर्व करणें; प्रौढी मारणें; ताठयानें वागणें.

उच्छाद---**उच्छाद आणणें**--फार त्रास देणें.

उच्छाद काढणें--त्रास सोसणें; गांजणूक सहन करणें.

(एखाद्याला) उच्छाद देणें--अतिशय त्रास देणें; छळणें; गांजणें.

उच्छाद येणें--त्रासणें; कंटाळणें; नको नकोसें होणें.

उच्छाल---**उच्छाल जाणें**— १ संतापणें; रागावून उठून जाणें. २ उडी मारणें (घोडा इ. नें).

उच्छिष्ट---**उच्छिष्ट खाणें, पुष्ट होणें**—दुसऱ्याचें उष्टें खाऊन लठ्ठ होणें. स्वतः कांहीं मिळविण्याची योग्यतां नसतां निलाजऱ्याप्रमाणें दुसऱ्यावर अवलंबून राहून त्यांच्या जिवावर चैन करणें.

उजवणें——दोहों अंगीं उजवणें—दोन्ही पक्षाकडील खर्च करून लग्न पार पाडणें.

उजवून घेणें—लग्न लावून घेणें; एखाद्याची मुलगी करून घेणें. 'कन्या नृपाची उजवून घ्यावी।'–सारुह ७.९१.

उजवा——उजवा स्तन उडणें—स्त्रियांच्या बाबतींत होणारा एक कामाचा सात्त्विक भाव; पतीसंबंधीं उत्सुकता वाटणें. 'दृष्टिपुढें रूप दिसें भेटीस्तव स्तन उजवा उडे। गांठ सुटे पाहा माझी सख्यांनों इतर मला नावडे॥'–प्रला २११.

उजवी घालणें—कोणत्याहि पूज्य वस्तूच्या बाजूनें जावयाचें असतां ती आपल्या नेहमीं उजव्या बाजूस राहील अशा रीतीनें जाण्याची प्रथा आहे. प्रदक्षिणा घालणें; प्रदक्षिणेच्या दिशेनें जाणें; मान देणें; सन्मान ठेवणें. 'विनयें पुसोनि उजवें घालुनि तैं त्या सुरापगा तनया।'–मोशांति ७.८१.

उजवी डावी देणें—१ देवतेच्या किंवा डोले इ० च्या मिरवणुकींत विशिष्ट प्रकारचा मान देणें. २ होय–नाहीं काय तें स्पष्ट म्हणणें; मनाचा कल काय आहे तो स्पष्ट कळविणें. कौल पहा.

उजवी देणें; उजवी गुढी देणें—संमति देणें; मान्य करणें. देवास कळा लावला असतां उजवा कळा सोडल्यास संमति असते यावरून. कौल पहा.

उजळ——उजळ माथा (तोंड) होणें—अपवादापासून मुक्त होणें; आलेलें संकट, कलंक दूर होणें. मिथ्यापवादापासून बचावणें.

उजळ माथ्यानें हिंडणें—राजरोसपणें वावरणें; न लाजतां वागणें; कोणतीहि भीड–मुरवत अथवा लाज–लज्जा न मानतां फिरणें.

उजळया वर्णाचें पाणी—धर्माप्रमाणें निषिद्ध नसणारें पाणी; उच्च जातीच्या हातचें पाणी. 'ज्याचें पाणी मला चालेल असा कोणी भेटला नाहीं. पण त्यांनीं हा भठ मला दाखविला. एथें उजळया वर्णाचें पाणी मिळेल असें ते म्हणाले.'–पामो १२९.

उजागर——उजागर दारव्हयाचा, नकटा कारंजाचा—(व.) [उजागर = वरून दिसावयास संभावित पण आंतून लबाड, ठक. दारव्हा आणि कारंजें हीं दोन गांवें आहेत.] उचलेपणाबद्दल नावाजलेले दारव्ह्याचे उचले आणि नकटेपणाबद्दल नांवाजलेले कारंजाचे नकटे एके काळीं प्रसिद्ध असावे. पहिल्या प्रतीचा उचल्या आणि भयंकर विद्रूप असा अर्थ.

उजागरी——उजागरीस आणणें—उघडकीस आणणें; प्रसिद्धीस आणणें; उघड करणें.

उजागरीस येणें—पुढें येणें; उघड होणें; प्रकट होणें.

उजाड——उजाड गांवांत डांगोरा पिटणें—एखादी निरर्थक निष्फळ गोष्ट करणें; ओसाड गांवांत दवंडी पिटल्यास ती ऐकण्यास तेथें कोणीहि मनुष्य मिळणार नाहीं; मग त्या दवंडी पिटण्याचा काय उपयोग?

उजाड गांवीं वड (वट) वृक्ष—१ एखाद्या ओसाड गांवांत ज्याप्रमाणें एखादा वट वृक्ष असला म्हणजे तो खूप वाढतो व सर्व जागा व्यापून टाकतो. त्याप्रमाणें ज्याला कोणी आडकाठी करावयास नाहीं अशा स्वैरवर्तनी मनुष्यास म्हणतात. २ 'गांवढ्या गांवांत गाढवी सवाशीण' याप्रमाणेंहि उपयोग करतात.

उजाडणें——उजाडणाऱ्या दिवसाप्रमाणें मृत्यु हा निश्चित आहे—ज्याप्रमाणें रात्र गेल्यावर सूर्य उगवावयाचा ही गोष्ट निश्चित आहे त्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यास केव्हां ना केव्हां तरी मृत्यु येणार, ही गोष्ट निश्चित आहे. मनुष्यो मर्त्यः।

उजाडलें पण सूर्य कोठें आहे?—एखादी गोष्ट घडण्याची मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहात असावें व ती गोष्ट घडली असेंहि ऐकूं यावें; पण प्रत्यक्ष पाहावयास जावें तों ती घडल्याचें विशेष चिन्ह वगैरे कांहींच दिसूं नये, अशा वेळीं ही म्हण योजतात. मॉंटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणांमुळें हिंदुस्थानास स्वराज्याचा मोठा हिस्सा मिळणार अशी पुष्कळांस आशा होती; पण त्या जाहीर झाल्यावर त्यांत अपेक्षेप्रमाणें कांहींच आढळून आलें नाहीं; त्यावेळीं लिहिलेल्या अग्रलेखावर हा मथळा केसरीनें घातला होता.

उजाडी——उजाडींतील नीळ—वस्ती नाहीं अशा ठिकाणीं राहणाऱ्या नीळ नांवाच्या प्राण्याप्रमाणें ज्याचें आचरण तो.

उजू——उजू पण इळया इतका वांकडा—दिसावयास सरळ पण प्रत्यक्ष कोयत्याप्रमाणें वांकडा. दिसावयास सुंदर पण विश्वास ठेवण्यास अपात्र; वरून दिसण्यास सरळ वर्तुणुकीचा पण अंतरंग अगदीं वक्र असा.

उजेड——उजेड पडणें–होणें—१ प्रकाश पडणें; तेज दिसणें. २ (उप.) अपकीर्ति होणें.

उजेड पाडणें–लावणें–करणें—१ शतकृत्य करणें. 'फ्रेंच शिकून आतां मोठा उजेड पाडणार आहेत, दिसतेंच आहे.' २ (उप.) अपकीर्तिरूप कृत्यें करणें.

उजो–ज्जो——उजो खावून इंगळें हागवप—(गो.) विस्तव खाऊन कोळसे हगणें. 'आग खाईल०' पहा.

उज्यांत तेल—आगींत तेल. तु०–'दीप्तालय विझवाया दाटुनि घालील कोण तेलातें?'–मोउद्योग.

* उज्जो मळ्ळारि आंग लासत्ता वै? उज्जो म्हळयार

आंग लासता व्हय ? —विस्तव शब्द उच्चारला म्हणजे काय अंग भाजतें ? नुसत्या बोलण्यानें कांहीं होत नाहीं.

उज्जो लायता आनी पाणयांक धांवता—१ (गो.) आग लावल्यानंतर पाणी आणण्याकरितां धांवतो. २ आग लावतो आणि पाण्याकरितां पळतो.

उज्जो लास्ताचि कळका, मनुष्यु मर्ताचि कळका—(गो.) अग्नीनें जळल्यावर कळतें, मनुष्य मेल्यावर समजतें.

उज्या भीनात्तिलो गोवरा भित्तवे?—(गो.) विस्तवाला न भिणारा राखेला भील काय? मोठ्या संकटाला तोंड देणारा लहान संकटास घाबरत नाहीं.

उज्या शिवाइ भाजना (शिजना), धगा शिवाइ करगना—(गो.) विस्तवाशिवाय भाजत (शिजत) नाहीं, उष्णतेशिवाय विरघळत नाहीं.

उज्याक गेल्यार कौलेक पातेयना—(गो.) घरची चूल पेटविण्यासाठीं शेजाऱ्याकडे विस्तव मागण्यास गेले असतां, विस्तव घेण्यासाठीं कौलाचा तुकडा शेजारी देत नाहीं.

उज्याक भिलेलि बाइल, थंडीक भिलेली घोवु, कित्या-कई नाका—(गो.) विस्तवाला भिणारी बायको आणि थंडीला भिणारा नवरा कांहीं कामाचे नाहींत.

उंट— —उंटाचें पिलूं—उंटाचें पिलूं प्रथम लहान असतें म्हणून घरांत घेतलें तर वाढल्यावर मोठें होतें व त्यास घरांत जागा पुरत नाहीं व आपणांस अडचण करते. म्हणून घराबाहेर काढावयास जावें तर उंच वाढल्यामुळें दरवाजांतून बाहेर निघणें शक्य नसतें. यामुळें आपण अधिकच पेंचांत पडतों. यावरून आरंभीं एखादी क्षुल्लक दिसणारी परंतु परिणामीं फार अहित-कर होण्याचा संभव असलेली गोष्ट. तु०—भटाला दिली ओसरी.

उंटावर खोगीर घालणें—उंटाच्या पाठीवर मदार अस-ल्यानें त्यावर खोगीर घालणें शक्य नसतें. यावरून अशक्य गोष्ट करूं बघणें.

उंटावर बसून दक्षिण दिशेस जाणें—एक अपशकून. ‘बेउनि उष्ट्रानीं बैसुनि दक्षिण दिशेसि जाताहे।’ —मोउद्योग १०.१७१.

उंटावर बसून शेळ्या राखणें-हांकणें-हांकलणें— एका गुराख्याला शेळ्या हांकण्यास-राखण्यास सांगितलें तेव्हां तो उंटावर बसून तें काम करूं लागला पण तें कांहीं जमेना. त्याला चालत जाऊन, शेळयामागें पळून हें काम करण्याचा तर आळस. यावरून स्वतः मेहनत न करतां टोलवाटोलवी करणें; दुसऱ्या-कडून कसें तरी काम करून घेणें. परावलंबी आळशी माणसा-बद्दल म्हणतात. —शाब ३.८.

उंटावर माल खेचणारा अरब—अरब लोक उंटावर त्यास वाहून नेण्यास कठिण पडेल इतकें ओझें लादतात आणि वर पुन्हां तें पडूं नये म्हणून इतकें आवळतात कीं, दोरी तुटते. यावरून अविचारानें न झेंपेल इतकें काम सांगितलें असतां तें फुकट जातें. तुटेपर्यंत ताणणें. ‘सरकारनें जकात उठवि-ण्याच्या बाबतींत इतकें ओढून धरलें होतें कीं, उंटावर माल खेंचणाऱ्या अरबांची आठवण होते.’ ‘बस् करो’ पहा.

उंटावरचा शहाणा—[एकदां एका पारड्याची मान रांज-णांत अडकून बसली. ती बाहेर निघेना. घरचा यजमान बाहेर गेला होता. तेव्हां रस्त्यावर उंटावर बसून एक माणूस चालला होता त्याला उपाय विचारला. त्यानें प्रथम उंटासकट आंत येण्यास घराचा दरवाजा पाडावयास लावला; मग पारड्याची मान तोडण्यास सांगितलें; नंतर डोकें रांजणांत अडकलें म्हणून शेवटीं रांजण फोडण्याचा सल्ला दिला !] महामूर्ख; भलतीच मसलत देणारा माणूस. ‘ तिसरे एक उंटावरील असें विचारतात.’ —टि ४.४१.

* **उंट उंच शेंपूट दुकें**—उंट उंच असतो पण त्याचें शेंपूट अगदीं आंखूड असतें. यावरून एखाद्या अत्यंत विशोभित दिसणाऱ्या गोष्टीबद्दल ही म्हण योजतात.

उंट कोण्या कानीं (कोनीं) बसेल कोण जाणें (त्याचा नेम नाहीं)—[एका उंटावर एका बाजूला भाजीपाला व दुसऱ्या बाजूस मडकीं घालून एक माळी व एक कुंभार चालले होते. वाटेंत उंट मधून मधून भाजीच्या बाजूस तोंड वळवून भाजी ओरबाडी व खाई. तें पाहून कुंभार पोट धरधरून हंसे; माळी बिचारा उगाच राही. पुढें एकदां विश्रांतीच्या जागीं उंट खालीं बसला व मडकीं होतीं त्या कुशीला कलंडला. तेव्हां साऱ्या मड-क्यांचा चुरा झाला. तें पाहून कुंभार फार कष्टी झाला. यावर माळी वरील वाक्य म्हणतो. म्हणजे आपल्या हातीं बरेंवाईट होण्याचें ठरलेंच आहे ?] दुसऱ्याचें नुकसान झालेलें पाहून आनंदूं नये. आपल्यावरहि कधीं तशी पाळी यावयाची; त्याचा नेम नाहीं.

उंट गाढव भेटले, दोघेहि हांसले—उंटाची आकृति बेढब व गाढवाचा आवाज बेसूर. यामुळें परस्परांची गांठ पडली असतां परस्परांच्या व्यंगामुळें त्यांस दोघांसहि हंसू येतें. पण त्यांच्या ही गोष्ट लक्षांत येत नाहीं कीं, आपण दुसऱ्यास हंसतों पण आपणांसहि व्यंग आहे. दोघांतहि उणेपणा असतां एकमेकांचा उणेपणा काढण्यांत काय अर्थ. तु०—आपण हंसे लोकां, शेंबूड आपल्या नाका.

उंट चढे तांभी कुत्ता काटे—एका मनुष्याच्या मागें कुत्रा लागला तेव्हां तो उंटावर चढून बसला. तरीहि त्यास कुत्रा

चावलाच. यावरून दैव प्रतिकूल असलें म्हणजे कितीहि उपाय योजले तरी संकट आल्याशिवाय राहात नाहीं. कोठें गेला तरी दैव मागें असतेंच. मूळ हिंदी म्हण पूर्ण अशी आहे: 'भा विधिना प्रतिकूल जबै, तब ऊट चढेपर कूकर काटे।'

उंट बडबडतेही लादते है--उंट बडबडूं लागला तरीहि त्याच्यावर ओझें लादलें जातेंच. काम करणाऱ्यानें कुरकुर केली तरी त्याच्या पाठीमागचें काम कांहीं चुकत नाहीं. गरीबाची दाद कोण घेणार?

उंट बुडतो, आणि शेळी ठाव विचारते—एका नदींमध्यें उंट पलीकडे जात असतां पाण्यांत बुडून मेला. त्याच वेळीं कांठावर असलेली शेळी पाणी किती खोल आहे म्हणून विचारीत होती. जेथें उंट बुडण्याइतकें खोल पाणी आहे तेथें शेळी बुडणारच. तेव्हां तिनें पाण्याचा ठाव विचारण्याचें कारणच नाहीं. जेथें मोठमोठया पराक्रमी वीरांचेंहि किंवा कर्तबगार माणसाचेंहि कांहीं चालत नाहीं अशा गोष्टींत एखाद्या फाटक्या तुटक्या माणसानें लक्ष्य घालण्यांत काय अर्थ आहे?

उंटाचें तोंड मारवाडाकडे; उंट कोठेंहि असला तरी अंतसमयीं मारवाडकडेच तोंड करतो—उंटाची भूमी मारवाड. तेव्हां मरतांना तो आपल्या भूमीची आठवण करून व तिकडेच तोंड करून मरणार. यावरून माणूस आपलें मूळचें स्थान सोडून कोठेंहि फिरला तरी शेवटीं त्याला आपली मातृभूमीच सर्वांत बरी वाटते.–बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचें चरित्र. तु०–जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।

उंटाचें सगळेंच अंग वांकडें—उंटाच्या अंगांत कोठेंच सरळपणा पाहावयास गेल्यास सांपडणार नाहीं. यावरून प्रत्येक व्यवहारांत कांहीं तरी लबाडी किंवा अप्रामाणिकपणा करणारा मनुष्य. किंवा ज्याला अनेक खोडी आहेत असा. पाठभेद–उंटा उंटा तुझी मान कां रे वाकडी? तर बाबा, माझें सरळ काय आहे?

उंटाच्या दाढेंत जिन्याचा स्वाद—उंट हा एवढा मोठा प्राणि आहे कीं, जिऱ्याचा एक दाणा त्याच्या दांतासहि लागणार नाहीं; मग तो चिरडून त्याचा स्वाद त्यास काय मिळणार. तेव्हां अतिशय मोठया वस्तूस अतिशय अल्प उपचार करावयास जाणें, याअर्थीं ही म्हण योजतात. तु०–डोंगरास दुखणें आणि शिंपींत औषध.

उंटाच्या लग्नाला उपाध्येपण गाढवाला—उंटाच्या घरीं लग्न व गाढव उपाध्याय! उंट दिसावयाला अगदीं कुरूप व गाढवाचा आवाज भसाडा व बेसूर; त्यामुळें त्यास मंगलाष्टकेंहि धड म्हणतां येत नाहीं. याप्रमाणें परस्परांत कांहीं तरी दोष असलेल्यांची संगति दाखविण्याकरितां ही म्हण योजतात. मूळ संस्कृत श्लोक–उष्ट्राणां च गृहे लग्नम् गर्दभाः शांतिपाठकाः। परस्परं प्रशंसंति अहो रूपमहो ध्वनिः॥

उंटावरची चोरी ओणव्यानें छपत नाहीं—उंटावर बसून चोरी करावयास गेलें तर त्याच्या पाठीवर जरी वांकून बसलें तरी स्वतः उंटच उंच असल्यामुळें इतरांच्या दृष्टीस पडणें टाळतां येत नाहीं. दिवसा ढवळ्या किंवा अनेकांसमक्ष केलेलें दुष्कृत्य कितीहि लपविण्याचा प्रयत्न केला तरी उघडकीस आल्यावांचून राहात नाहीं.

उंटावरून शेळया हांकल्या, त्या सर्व पळाल्या—उंटावरून शेळया हांकणें, पहा.

उटारेटा; उठारेठा; उठापेठा——उद्यम; खटपट; खटाटोप; उपद्व्याप; उठाठेव; नसती भानगड. 'लढाईस आपणांकडून कदापि उठापेठा न करावा. शत्रु अमर्यादेस प्रवर्तलिया हक्क आपला जाणून ईश्वरास साह्य समजून पराक्रम करावा.'–रया ४३८.

* **उटारेटा, कुंटण गेली हाटा**--(व.) [उटारेटा करणें = उपद्व्याप करणें] कुंटण म्हणजे कळ लावणारी बाई बाजारांत गेली असतां तेथें ज्या अर्थीं अनेक उलाढाली चालतात त्याअर्थीं उटारेटया करण्याला तिला पुष्कळ वाव सांपडतो. फजूल उपद्व्याप करणाराला अनुलक्षून ही म्हण आहे. 'मुद्दाम जाऊन तूं त्याच्या गांवाशिवाचा तेथें तपास काढलास. तुला नसती उठाठेव कशाला? पण नाहीं. उटारेटा कुंटण गेली हाटा.'

उटारेटा, पुरण वाटा—पुरण वाटण्याचें काम अवघड आहे. म्हणून त्याला कोणी फारसा तयार नसतो. यावरून नसती भानगड मागें लावून घेणें.

दिवस गेला उटारेटीं, मग दिव्यांत कापूस रेटी (दिवे लावून–चांदण्यांत कापूस वेटी)—[कापूस वेटणें = कापसांतून सरकी काढणें.] दिवसाचा वेळ नसत्या उठाठेवींत घालवून मग जागत राहून रात्रीं काम करीत बसावयाचें. भलत्या वेळीं भलतें काम करणें.

उटी——**उटी उतरणें**—नवऱ्या मुलास लग्नसोहळा चालू असतां हळदीची उटी अंगाला लावतात; ती सोहळा संपल्यावर उतरतात. तेव्हां लग्न सोहळा चालू असतां नवरदेवास महत्त्व असतें तें सोहळा संपल्यावर व उटी उतरल्यावर राहात नाहीं. मग इतर माणसांप्रमाणेंच तो एक समजला जातो. यावरून महत्पदापासून मुक्त होणें.

उट्टा——**उट्टा तो बुटा**--(गो.) उडतो तो बुडतो. उंच उडेल तो पडेल.

उट्टा तो बैल घोणी घॅता--(गो.) उठतो तोच बैल गोणी वाहतो.

उट्टें——**उट्टें काढणें-उगवणें**—जशास तसें वागणें; सूड उगविणें. 'आठधुन सगुण तिळतिळ काढीन उट्टें तें।' -प्रल्हा १५७.

उठणें——**उठतां बसतां-पडल्या; उठल्या बसल्या-सुटल्या**--१ हरघडी; एकसारखें. २ वेळ अवेळ, योग्य अयोग्य या गोष्टींचा विचार न करतां.

उठतां बसतां उपवास-निराहार-नवरात्र—नवरात्रांतील घटस्थापनेच्या दिवशीं व शेवटच्या दिवशीं उपवास.

उठबस करणें—(को.) आदरातिथ्य करणें; पाहुणचार करणें.

उठला ठाव देवबत नाहीं--उठून पानहि मांडतां येत नाहीं; कोणतेंहि काम करावयास नको अशी स्थिति. (आलस्य किंवा निर्बलता याचें द्योतक)

नित्य उठून; रोज उठून--१ दररोज नेमानें; नित्य नियमितपणें; प्रत्येक दिवशीं. २ हरघडी; जेव्हां तेव्हां.

उठून जाणें--१ आपण होऊन निघून जाणें. २ रागानें किंवा निषेध दर्शविण्यासाठीं निघून जाणें. ३ परपुरुषाबरोबर निघून जाणें. 'खरेंच का रूपमाया सेनापति उठून गेल्या.' -बाय ४.३. ४ विवाहाकरितां वधूवरांपैकीं कोणी तरी आपला गांव सोडून प्रतिपक्षाच्या गांवीं जाणें.

माणसांतून उठून जाणें--समाजाविरुद्ध एखादी गोष्ट करणें; माणुसकीस न शोभेल असें एखादें कृत्य करणें.

उठून दिसणें--स्पष्टपणें नजरेस येणें; प्रामुख्यानें पुढें येणें; विशेष खुलून दिसणें; अतिशय शोभायमान दिसणें.

ऊठ कीं पळ बाहेर; उठ पाय बाहेर—कधींहि घरांत न राहणाऱ्या, नेहमीं बाहेर भटकत राहणाऱ्या मुलास किंवा मोठ्या मनुष्यासहि म्हणतात.

*** उठणाराचें उठतें आणि कोठवळ्याचें पोट दुखतें**—खर्चणाराचें खर्चतें आणि कोटवळ्याचें पोट दुखतें, पहा.

उठतां लाथ, बसतां बुक्की—कांहीं केलें तरी एकसारखा मार, छळ. 'उठतां लाथ बसतां बुक्की दिली कीं, लगलेच ते आपल्या मर्यादेप्रमाणें वर्तूं लागतात.' -मधुमक्षिका.

उठतां लाथ बसतां बुक्की, तेव्हां होतो सुखी—कडक शिस्तीनेंच वळण लागतें असा भावार्थ. तु०-छडी लागे छमछम, विद्या येई घमघम.

उठल्या गांवची पाटिलकी—ज्या गांवांत वसती नाहीं त्या ओसाड गांवाच्या पाटिलकीचा मान मिळाला तरी काय उपयोग ?

उठा काका, तीन तुमचे आणि दोन माझे—एकदां एक चुलता व त्याचा पुतण्या असे गांवास गेले होते. तेथें त्यांनीं जेवण्याकारितां स्वयंपाक केला त्यांत लाडू किंवा मोदक केले; ते पांच झाले. तेव्हां जेवावयास बसतांना त्यांतील तीन कोणी घ्यावे व दोन कोणी घ्यावे याबद्दल त्यांच्यांत तंटा सुरू झाला. तेव्हां अखेरीस दोघेहि रुसून बसले व जो आधीं जेवावयास उठेल किंवा बोलेल त्यानें दोन घ्यावे व दुसऱ्यानें तीन घ्यावें, असें ठरलें. बराच वेळ दोघेहि स्वस्थ न बोलतां बसले. अखेरीस पुतण्यास भूक सहन होत नाहींशी झाली तेव्हां तो म्हणाला: चला उठा काका, आतां तीन तुमचे व दोन माझे! याप्रमाणें तो हरला. तेव्हां ज्याला जास्त गरज त्याला नेहमीं पडतें घ्यावें लागतें.

कोणाच्या म्हशी, कोणाला उठाबशी—एका मनुष्याच्या कामामुळें दुसऱ्या भलत्याच मनुष्यास उपसर्ग पोंचत असला म्हणजे योजतात. किंवा भलत्याचेंच काम अंगावर घेऊन एखादा मनुष्य यातायात करीत बसला म्हणजे त्यासहि म्हणतात. तु०-विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य. अक्काबाईच्या म्हशी आणि बक्काबाईला उठाबशी.

उठा म्हणवरेक बैसू नये, वच म्हणवरेक राबू नये—(गो.) दुसऱ्याकडे "उठा!" म्हणे तोंवर बसूं नये, "जा!" म्हणे तोंवर राहूं नये.

उठी तो कुटी—जो प्रथम उठतो तो दुसऱ्याला प्रथम मारूं शकतो. जो प्रथम प्रयत्न करतो त्याला यश येण्याचा संभव असतो. जो प्रयत्नच करणार नाहीं त्याच्या हातून कांहीं होणार नाहीं.

उठोनि वाटेचि लागावें--कोणतेंहि काम करावयास आरंभ करावा म्हणजे तें केव्हांतरी संपतें. चालूं लागल्यावर वाट केव्हांतरी संपतेच व इच्छित स्थळ येतें. यावरून नेहमीं प्रयत्न करीत असावें म्हणजे लवकर किंवा उशीरा पण कार्यसिद्धि होते.

ऊठ खापऱ्या, लाग कामाला--[खापऱ्या = १ दुर्दैवी, अभागी. २ (गो.) काफर माणूस, नीग्रो] अभागी माणसाला काम करण्यावांचून गत्यंतर नाहीं. सुख हें त्याच्या नशीबांत कोठचें ?

ऊठग कळी अन् बस माझ्या नळी--स्वतः कळ लावून, भांडण उपस्थित करून स्वतःस त्रास करून घेणें.

ऊठ, झोंपडी नमस्कार--एकच ठिकाण धरून बसणार

मनुष्य देवाचें स्मरण करून ठिकठिकाणीं भटकत फिरतो. रोज नवीन ठिकाणीं मुक्काम करणारा मनुष्य रात्रीं निजलेल्या ठिकाणास सकाळीं रामराम ठोकून पुढें चालूं लागतो.

ऊठरे चोटा, झव पाव्हण्या—अनिर्बंध वागणूक; ज्याला कांहीं ताळमेळ नाहीं, कांहीं नियम नाहीं अशी गोष्ट करणें; भलत्याच्याच पाठीमागें लागणें; ज्याचा कांहीं अर्थाअर्थी संबंध नाहीं अशा मनुष्यास त्रास देणें.

ऊठरे छंदा, एकच धंदा—मनुष्याला एखाद्या गोष्टीचा नाद लागला म्हणजे तो सारखा तीच करीत राहतो.

ऊठ सोट्या कूट (कुट्ट)—नेहमीं हाणामारीशीं गांठ घालणाराबद्दल म्हणतात.

ऊठ सोट्या तुझेंच राज्य—[एक लोककथा आहे. एका राजाला सात राण्या होत्या पण मूल नव्हतें. तेव्हां त्यानें आठवी केली. पण ती होती राक्षसीण. तिनें आपल्या सवतींवर कांहीं आळ घालून त्यांना ठार करण्याचा व्यूह रचला. पण त्या प्रधानाच्या युक्तीनें जिवंत राहिल्या. त्या अज्ञातवासांत असतां एकीला मुलगा झाला. हा मुलगा मोठा होऊन त्या राक्षसीण राणीला त्रास देऊं लागला. तेव्हां तिनें त्याचा नाश करण्यासाठीं राजाला देण्यास अगदीं अशक्य गोष्ट म्हणून इंद्रसभेच्या घोड्याची लीद मागितली. ती आणण्यास या मुलास पाठविलें. मुलानें मोठ्या हिकमतीनें एक अप्सरा वश करून घेतली व लीद मिळविली. वाटेंत एक राक्षस भेटला. त्याच्याजवळ असा एक सोटा होता कीं, तो सांगेल तें काम करीत असे. हा सोटा मिळवून मुलानें सर्वांचें कांडात काढलें व राज्य मिळविलें.—शं. ग. दातेकृत लोककथा] वाटेल तें काम करण्यास तयार अशी गोष्ट, घटना.

उठवण——**उठवण घेणें; उठवणीस येणें**—१ दुसऱ्यानें उठवावें अशी स्थिति येणें; अतिशय अशक्त होणें. ‘वैरणचारा महाग याजकरितां घोडीं व उंटें उठवणीस येऊन अस्थिचर्में जाहालीं.’—भाव ५६. २ दुःस्थिति प्राप्त होणें; हलाखीची स्थिति येणें.

उठवण मोडणें—१ शक्ति परत येणें; उठवणीस आलेलें गुरूं वगैरे पुन्हां हिंडूं फिरूं लागणें; अशक्तता नाहींशी होऊन पुन्हां कार्यक्षम होणें. २ दारिद्र्यापासून सुटका होणें; आपत्तीमधून निघून पुन्हां चांगले दिवस येणें; कष्टदशा संपणें.

उठवणें-उठविणें——**घरांतून उठविणें**—नादीं लावून पळविणें; नांदत्या घरांतून काढून फुस लावून नेणें. ‘ह्या स्वतंत्र बायका केव्हां कोणच्या म्हाताऱ्याला घरांतून उठवतील कांहीं नेम नाहीं.’—बाय २.१.

जन्मांतून उठविणें—आयुष्याचें मातेरें करणें; पातिव्रत्य भंग वगैरे करून अन्न घेणें; समाजांत बाहेर तोंड काढावयास जागा नाहीं असें करणें. ‘माझ्या पोरीला अशी जन्मांतनं उठवलीन्.’—निचं १२५.

❀ **निजलेल्याला कोणी उठवील, जाग्याला कोण उठवील?**—एखाद्या मनुष्यास खरोखर माहिती नसेल तर सांगतां येईल; पण जाणून बुजून एखाद्या गोष्टीचें अज्ञान पांघरणाऱ्याला कितीहि सांगितलें तरी काय उपयोग.

उठवळ——**उठवळ येणें-लागणें**—उच्चाटनाची वेळ येणें; अस्थिरता येणें; कोठेंहि कायमचा थारा न मिळणें; स्थायिकता न राहणें; सारखें स्थलांतर करण्याचा प्रसंग येणें. ‘फीमेल ट्रेनिंग कॉलेजला उठवळ आली आहे.’—केले १.५१.

✱ **उठवळ सासू, थोट जांवई**—[थोट=दांडगा, ठक.] सासू स्वतः उठवळ स्वभावाची व तिला जांवईहि आडमुठा मिळाल्यावर त्यांची जोडी जमलीच. मग त्यांच्या लीला काय वर्णन कराव्या ? दोन दुर्वृत्त मनुष्यांची गांठ पडल्यावर तेथें चांगल्या परिणामाची अपेक्षा करणें व्यर्थ.

उठाठेव——**गांवाची उठाठेव**—गांवांतील अनेक भानगडींमध्यें लक्ष्य घालणें; गांवच्या कारभारांत आपला अर्थाअर्थी संबंध नसतां व्यर्थ खटपटी करणें.

नसती उठाठेव—ज्या गोष्टींत आपला अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं अशा गोष्टींत निष्कारण लुडबुड करणें; भलत्याच भानगडी अंगावर घेणें.

❀ **विधवेला कुंकवाची उठाठेव कशाला पाहिजे**—विधवेला कुंकू वर्ज. तेव्हां त्याच्याशीं तिला कांहीं कर्तव्य नसणार. ज्या गोष्टीची आपणांस जरूर नाहीं त्या गोष्टीची चौकशी करण्यांत काय फायदा ?

उठाठेवा आणि बोडक्यावर दिवा—(उठून डोक्यावर दिवा घेणें-हा एक धर्माचार आहे.) लग्नांत वराकडील वडील आतांच्या डोक्यावर दिवे लावलेली झाल धरतात. त्याचा अर्थ मुलीची जबाबदारी त्यांनीं पत्करावी. यावरून जबाबदारी लादणें, घेणें असा अर्थ. निरर्थक भानगडी करून स्वतःच अडचणींत येणाऱ्या मनुष्यास म्हणतात.

उंड——**उंडाँ आनि कुंडाँ सारखाँच**—(गो.) उंडा आणि कोंडा सारखेच. एकाच मापानें मोजणें.

उडणें——**उडत उडत**—१ अनिश्चितपणें; अस्पष्टपणें (सांगणें, ऐकणें, बोलणें). २ कर्णोपकर्णीं आल्यावरून; विशेष आधार नसतां; ऐकीव. ३ संक्षेपानें; थोडक्यांत. ‘तिनें उठत उठत जबाब दिला.’—विवि ८.३.८२.

उडत जाणें—खिजगणतींत नसणें; महत्त्व न देणें. एखाद्याची परवा नाहीं असें दाखववायाचें असलें म्हणजे म्हणतात. ' नाहीं सांगितलेंस तर उडत गेलास ! '

उडत बातमी—ऐकीव वार्ता; लोकवार्ता; सांगोसांगी गोष्ट.

उडत्या पांखराचीं पिसें (पराशेटे) मोजणारा; (गो.) उडत्या पांखरांचीं शेटां मोजप—पांखरू उडत असतां त्याचीं पिसें मोजणें किती अवघड काम आहे ? पण हें जो करतो तो किती चाणाक्ष व हुषार असला पाहिजे ! फार हुषार, चलाख मनुष्य; पाताळयंत्री मनुष्य; अतिशय चाणाक्ष व एखादी गोष्ट अत्यंत जलद घडवून आणणारा.

उडून चरणें—(ल.) ऐष आरामांत, थाटामाटांत राहणें; वैभवांत दंग असणें.

※ **उडतें पांखरूं, पोटभरूं**—जें पांखरूं उडत राहील त्याचें पोट भरेल, जें उडणार नाहीं व जाग्यावर बसून राहील तें उपाशी मरेल. जो काम धंदा करील, चार ठिकाणीं फिरेल तो पोटाला मिळवील; जो आळसांत दिवस घालवील त्यास कांहीं मिळणार नाहीं.

उडतो तो बुडतो—' चढेल तो पडेल ' याअर्थी.

उडत्या पाखराचीं पिलें, चाऱ्या दिशेला धांवलीं—ज्यांस कांहीं कायमचा आधार, आश्रय नाहीं अशीं चार माणसें कांहीं कामापुरेशीं एकत्र झालीं म्हणजे तें काम झाल्याबरोबर जशीं पांगतात, किंवा ज्या मनुष्यास कायमचें घरदार नाहीं अशा मनुष्याचीं मुलें रोजगारा पाठीमागें लागून चार चारी दिशांना जातात त्याप्रमाणें. शाळूसोबती.

उडत्यांत वावडी, द्विपादांत शिडी व चतुष्पादांत घडवंची—उडणाऱ्या वस्तूंत वावडी श्रेष्ठ, द्विपाद वस्तूंत शिडी व चतुष्पादांत घडवंची उत्तम मानली जाते.

उडाला तो कावळा आणि बुडाला तो बेडूक; उडाला तर कावळा नि बुडाला तर बेडूक—१ एखादी गोष्ट कोणत्या स्वरूपाची आहे हें आपणास कळत नसेल तर थोडा वेळ वाट पाहिली असतां ती आपलें स्वरूप आपल्या गुणांवरून लवकरच प्रकट करते. एखादा प्राणि कोण आहे हें दुरून दिसलें नाहीं किंवा दोन प्राणी दुरून सारखे दिसले तरी त्यांतील जो उडेल तो कावळा व पाण्यांत उडी टाकील तो बेडूक, हें त्यांच्या स्वाभाविक वर्तनावरून लवकरच कळून येतें. २ परिणाम कांहींहि झाला तरी तो उपयुक्तच. 'गाजराची पुंगी०' याप्रमाणें.

उड्या बरा पण पड्या कठीण; उड्या पुरवेल पण पड्या पुरवत नाहीं—आळशी, मंद, दुर्बल मनुष्यापेक्षां धडपड करणारा, उपद्व्यापी मनुष्य पतकरतो. तो कांहीं तरी उद्योग करण्याचा संभव असतो पण दुर्बल मनुष्याचा भार पूर्णपणें अंगावर वाहावा लागतो.

उडविणें——**उडवला उडवळा**—(कों.) तुरळक; विरळ; इकडे तिकडे क्वचित्. ' आंबे बहुत करून आभाळानें गळाले; आतां कोठें उडवले उडवले आहेत. '

उडवून देणें—१ झिडकारणें; न मानणें.–मो गोपीगोडवा २१. २ काढून टाकणें; हांकून लावणें. ' आपण स्वतः टोळीचा नायक होऊन तुम्हास उडवून देणार नाहीं. '–कोराकि २७८.

उडाऊ——उडाऊ छप्पी–प्पू– उडवून देणारा; टाळाटाळी करणारा.

※ **उडाऊ आणि व्याजखोर, उंदरास जसें मांजर**—उधळ्या मनुष्य आणि जबर व्याज घेणारा सावकार यांची एकत्र गांठ पडली म्हणजे, उंदरामांजरांची गांठ पडली असतां जसा उंदराला मांजर खाऊन टाकतें त्याप्रमाणें उधळ्या मनुष्यास व्याजखाऊ मनुष्य ग्रासून टाकतो.

उडाऊ रुप्याचे ताटीं जेवतो, शेवटीं बंदिशाळेंत जातो (मरतो)—उधळ्या मनुष्य प्रथम दिसावयास खूप चैन करतांना दिसतो पण अखेरीस त्याच्यावर चोरी करून तुरुंगांत जाण्याची वेळ येते.

उडाव्याचे हातीं, पैशाची माती—उधळ्या मनुष्याच्या हातीं कितीहि संपत्ति आली तरी तिची तो विल्हेवाट लावून टाकतो.

उडी——**उडी घालणें**—संकट निवारणार्थ धांवून जाणें. ' सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा । उडी घालितो संकटीं स्वामी तैसा । ' –राम.

उड्या पडणें—झटून, तुटून पडणें; गर्दी होणें; अहमहमिकेनें पुढें येणें. ' उंच वस्त तात्काळ विके । जाणत्या लोकांच्या कौतुकें । उड्या पडती ॥ ' –दा १२.७.२५.

उड्या मारणें—गर्व वाहणें; ऐट करणें; अभिमान दाखविणें.

※ **उडी घालण्यापूर्वी पाहावें**—कोणतेंहि साहसाचें कृत्य करतांना प्रथम पूर्ण विचार करावा.

उडी नाहीं तर बुडी—उत्कर्ष नाहीं झाला तर अपकर्ष; हें टोंक कीं तें टोंक.

उंडी——**उंडी–उंड्या उकळणें**—[उंडी = भाताचा गोळा] मधुकरी मनुष्य ज्याप्रमाणें निरनिराळ्या लोकांच्याकडून भाताचे गोळे जमा करतो त्यामध्यें भीक मागणें; आगंतुकी करणें.

उडीद्——उडदाचें घुटें अन् नाचण्याचीं रेटें; उडदाचें घुटें, बाजरीचीं रेटें अन् सांगूं नका कुठें—अगदीं निकृष्ट प्रकारचें अन्न खाऊन राहाणें पण बाहेर कांहीं न दाखविणें, अशी अवस्था.

उडदामाजीं काळेंगोरें काय(कोठवर) निवडावें निवडणारें— उडदाचे दाणे येथून तेथून सर्व सारखेच काळे; त्यांत निवड कशी करतां येणार; एका माळेचे मणी. चांगला वाईट असा भेद करतां येत नाहीं तेव्हां म्हणतात. –पामो ४११. 'जें वाईट तें झालेंच आहे–जन्मठेप काळें पाणी काय, मृत्यु काय ! उडदांत काळेगोरे ते काय निवडायचे ! '–काळें पाणी १३६. तु०–माषेषु तुल्यकृष्णेषु कः कृष्णः कस्ततोन्यथा।

उडिदु फुगल्यारि मादाळें जातवे ?— (गो.) उडीद फुगल्यावर मांदाळें होईल काय ? जेव्हांचें काम तेव्हांच करावें लागतें.

उडीद गेला वाळवंटीं, हातीं लागली करवंटी—उडीद सामान्यतः चांगल्या जमीनींत न पेरतां बरड जागेंत पेरतात व त्याचें पीकहि विशेष भरगच्च असें येत नाहीं. यावरून चांगली जमीन टाकून वाळवंटांत गेला तरी त्याच्या पिकांत वाढ न होतां उलटी खूटच आली. त्याप्रमाणें मनुष्य एका ठिकाणीं असंतुष्ट होऊन दुसरीकडे गेला तरी त्याची योग्यता वाढत नाहीं; उलट कमी होण्याचाच पुष्कळदां प्रसंग येतो. कारण योग्यता ही स्थळापेक्षां गुणावर अवलंबून असते. तु०–पळस गेला घाटा तीनच पानें देठा.

उडीद म्हणे मी कठीण, माझा दाणा काळा—उडदापेक्षां कठिणपणांत व काळेपणांत अधिक असलेल्या अनेक वस्तु आहेत; पण तिकडे लक्ष न देतां तो स्वतःचीच मोठी प्रौढी मारतो. मनुष्याला स्वतःच्या गुणांची फार प्रौढी वाटते. व तो स्वतःच त्याबद्दल फुशारकी मारीत असतो व आपल्यापेक्षां इतर कोणी अधिक गुणवान असतील याची चौकशी वगैरे करण्याच्या भानगडींत तो पडत नाहीं; तर स्वतःचीच स्तुति करण्यांत दंग असतो. वास्तविक काळेपणा व कठिणपणा हे दोष आहेत पण कांहीं लोकांस आपल्या दोषांबद्दलहि अभिमान वाटतो. व त्यांचीच ते फुशारकी मारूं लागतात.

उडुपी——उडुपि मठा पारपत्य—(गो.) उडपी मठाला शिक्षा. न्यायाधिशालाच दंड, याप्रमाणें.

उणा–णें——उणें आणणें—दोष लावणें; कमीपणा आणणें; मागें टाकणें; वरचढपणानें एखाद्यास कमी प्रतीचा भासविणें. 'वरी झळकती दिव्य कळस। उणें आणती उडुगणास।'

उणें उत्तर–भाषण—अपमानकारक, तिरस्कारव्यंजक भाषण; कमीपणा आणणारें भाषण. 'तें गुडघ्याएवढें पोर, पण चुलत्याला उणीं उत्तरें करतें ! हा काय त्यांच्या घरचा मोळा तरी !'

उणें काढणें–पाहणें—दोष काढणें, पाहणें; व्यंग तेवढें शोधून काढणें; कोणत्याहि कार्यांत अपूर्णता कोठें असेल तिकडेच तेवढें लक्ष्य देणें.

उणें घेणें—आपल्या उणिवेबद्दल मनास लावून घेणें; आपल्या उणेपणाची खंती बाळगणें.

उणें पाहाणें—दोष काढणें; कमीपणा आणण्याचा प्रयत्न करणें; असूया बाळगणें; मत्सर करणें.

❀ **उणें अधिक दंडण, हें पक्षपाताचें लक्षण—**अयोग्य दया दाखविणें किंवा कडक शासन करणें हीं दोन्ही पक्षपाताचीं लक्षणें होत.– सवि २१४३.

उणें असे मनीं खसे, नकटं असे नाकपर वसे; उणी असे ती मनीं खसे अन् नकटी असे ती नाक खपसे— खाई त्यास खवखवे, या म्हणीप्रमाणें ज्याच्या ठिकाणीं एखादा दोष असतो तो त्या दोषाला अनुलक्षून असलेली गोष्ट आपणांस लावून घेतो. पहिली म्हण वऱ्हाडी व दुसरी वायदेशी आहे.

उणें जपतें खुणेला, अंधळें जपतें डोळ्याला—ज्याच्या अंगीं कांहीं व्यंग असेल तें तो झांकण्याचा प्रयत्न करतो व अंधळा मनुष्य आपले डोळे न दिसूं देण्याचा प्रयत्न करतो.

उणें द्या, दुणें घ्या—कमी देऊन अधिक काढण्याचा प्रयत्न. आवळा देऊन कोहळा काढणें. देताचें माप लहान, घेता वेळचें माप अधिक.

उण्या कडच्यानें दुणें घेवंचें—(गो.) हलकटाकडून बोलून घ्यावें. 'चिखलांत दगड टाकणें' पहा.

उण्या कामा दुणे दाम, आळशी माणसाला दुप्पट काम—जें काम अर्धवट केलें असेल किंवा करतांना कंजुषपणा केला असेल तें पुन्हा करावें लागून दुप्पट खर्च करावा लागतो व आळशी मनुष्य कोणतेंहि काम नीट करीत नाहीं म्हणून त्यासहि तें पुन्हा करावें लागून दुप्पट श्रम पडतात. 'अडाणी कुणबी दुप्पट राबे' पहा.

उणॆंबराबर मांडल्यो सारी, दोनय् हारी आपल्याचेर— (गो.) हलकटाबरोबर खेळावयास बसले तर दोनही बाजूंचे नुकसान आपल्यावर बसतें.

उण्या माणसा दुणें काम—जो मनुष्य अर्धवट असतो त्याला कोणतेंहि काम बरोबर करतां येत नसल्यामुळें पुन्हा पुन्हा करावें लागतें. यामुळें दुप्पट काम पडतें.

उण्याक बाट, सुण्याक फाट--(गो.) हलकट माणसाच्या वाटेस जाऊं नये व कुत्र्यापासून दूर राहावें.

उण्याचे अंगीं मंगळवार (शनिवार-आदितवार)--मंगळवारीं सामान्यतः नवीन व्यवहाराबद्दल वगैरे बोलत नाहींत; तो अशुभ वार मानतात. तेव्हां ज्या मनुष्याच्या अंगीं नाकर्तेपणा असतो, कोणतेंहि काम करण्याची धमक नसते, तो मंगळवाराची सबब पुढें करतो. कोणीकडून तरी एखादें फुसकें कारण पुढें करून आपला कमीपणा झांकण्याचा प्रयत्न करणें. या वाक्प्रचारांत मंगळवाराच्या ऐवजीं शनिवार किंवा आदितवार असेंहि शब्द घालतात. तेहि वार काम न करण्याचेच मानतात. [उण्याच्या अंगीं मंगळवार, बुवा म्हणतो माझी बायको गर्भार--अशी वऱ्हाडी म्हण आहे.]

उण्याला चुना झोंबतो--जखम किंवा व्रण असलेल्या जागीं चुना लावला तर आग होते त्याप्रमाणें ज्याचे अंगीं दोष आहे त्यास तो दाखविला असतां राग येतो.

उतणें--उतूं जाणें-चालणें--१ ज्याप्रमाणें दूध उतूं गेलें असतां तें फुकट जातें त्याप्रमाणें खर्च होणें; नुकसान होणें. 'माझें काय त्यावांचून उतूं जात आहे.'

उतूं येणें--१ ज्याप्रमाणें दूध उतूं जातांना वर येऊन भांड्यामधून सांडूं लागतें त्याप्रमाणें वर येणें; फुगून दिसणें; अधिक होणें; व्यर्थ जाणें. २ (ल.) रहस्य असणें; अतिशय प्रेम असणें; प्रेम मनांत न मावून बाहेर दिसूं लागणें; प्रेमाविष्कार होणें.

❀ **उतूं गेलें दुधाला, हात लावी कपाळाला**--दूध उतूं गेल्यावर त्याबद्दल खंत बाळगून काय उपयोग ? नशीबास दोष देऊन गप्प बसावें. एखादी गोष्ट सुधारतां न येण्यासारखी बिघडली तर तिचा नाद सोडून द्यावा. तीबद्दल खंत करीत बसण्यांत काय अर्थ ? तु०--Why worry over split milk.

उतरंड--उतरंडी उतरणें--दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करणें; ज्या कामांत आपला संबंध नाहीं त्यांत व्यर्थ खटपट करणें.

उतरंडीचा वाघ--घरांत शौर्य दाखविणारा भेकड मनुष्य. एक मनुष्य आपल्या स्त्रीला आपलें शौर्य दाखविण्याकरितां उतरंडीवरच्या मडक्यांची शिकार करून दाखवीत असे त्यावरून.

उतरंडीशीं पट्टा खेळणें--घरांत शौर्य दाखविणें पण बाहेर भेकडपणा दाखविणें. वर 'उतरंडीचा वाघ' पहा.

❀ **उतरंडीला नसावी केळी व घरांत नसावी नणंद खेळी**--केळी म्हणजे मातीची कळशी. हिचें बूड वाटोळें असतें त्यामुळें अशा कळशीवर भांड्यांची उतरंड रचली तर ती राहणें शक्य नाहीं; ती गडगडावयाचीच. त्याचप्रमाणें घरांत कळलावी नणंद असली म्हणजे ती गडबड केल्याशिवाय, कलागती लावल्याशिवाय राहणें शक्य नाहीं.

उतरंडीला नसेना दाणा, पण दादला असावा पाटील राणा--गांवगाड्यांत पाटलाचा मान सर्वांत मोठा. तेव्हां त्याची बायको होण्यांत केवढें भूषण आहे. घरांत खावयास नसलें तरी हरकत नाहीं पण बाहेर मानमरातब मोठा असावा, याअर्थी.

उतरण--चढणीस घोडा, उतरणीस रेडा--डोंगर वगैरे चढावयाच्या कामीं घोडा हें जनावर चांगलें व उतरण्याच्या कामीं रेड्याचे पाय घसरत नाहींत म्हणून तो चांगला.

उतरणें--चेहरा, तोंड वगैरे उतरणें--म्लान होणें; खिन्न होणें; निस्तेज होणें; अपमान, लज्जा वगैरेमुळें ओशाळें होणें. 'उतरलें पाहोनि सच्छिष्य वक्त्र।'--दावि २६०.

न उतरणें--एखाद्या जनावरानें पूर्ण पान्हा न सोडणें. --खेस्व १७१.

उतरून टाकणें--१ साज काढणें; तबल्यावरील चामडें वाद्या वगैरे काढून ठेवणें. २ अंगावरून ओवाळून टाकणें; भूत प्रेतादिकांच्या शांत्यर्थ्य एखाद्या आजारी मनुष्यावरून अन्नादि पदार्थ काढून टाकणें. २ खालीं काढणें; वरून खालीं घेऊन जमीनीवर वगैरे ठेवणें.

उतरता-ती--उतरता पाया--अवनत स्थिति; अधोगति; हीनावस्था; निकृष्ट अवस्था.

चढती उतरती कमान--उत्कर्षावस्था व निकृष्टावस्था; वैभवसंपन्नता व विपन्नावस्था; सुस्थिति व दुःस्थिति.

उतरती कळा-दशा-पायरी--विपन्नावस्था; निकृष्ट अवस्था; खालावलेली स्थिति. 'उच्चावस्था प्राप्त झाली कीं, त्याबरोबरच उतरती कळा लागावयाची.'--विवि ८.९.१६१.

उतरत्या पायरीस लागणें--ऱ्हास होत जाणें; हीनावस्थेस पोंचणें; निकृष्ट दशेप्रत जाणें; उतरती कळा लागणें.

उतराई--उतराई होणें--उपकार फेडणें; ऋणांतून मुक्त होणें; कृतज्ञता व्यक्त करणें; एखाद्यानें आपणावर केलेल्या उपकाराबद्दल त्याच्या उपयोगी पडून त्याच्या उपकारांची फेड करणें. 'कर्णाचा उतराई व्हाया वधितों, रिपूसि यापरता।'--मोकर्ण ४९.६७.

उताणा--उताणा चालणें--१ ऐट करणें; प्रौढी मिरविणें. २ गर्वानें फुगणें. 'तैसा विद्यावयसा माजे। उताणा चाले॥'--ज्ञा १३.७१५.

उताणा पडणें—१ तोंडघशीं पडणें; खालीं येणें. २ एखाद्या कामांत अपयश येणें; पराभव होणें. ३ एखादें काम अंगावर घेतलें असतां त्यांत नुकसान पोंचणें. ४ दारिद्र्य येणें; हीनदशा येणें; निकृष्टावस्था प्राप्त होणें. ५ आजारी पडणें; अंथरूण धरणें. ६ निरुपयोगी होणें; बेकार होणें; निरुद्योगी बनणें.

उताणा पाताणा—खालींवर; उलथापालथा.

꙳ उताण्यापेक्षां उपडा हात चांगला—उताणा हात घेण्याची क्रिया दाखवितो व उपडा हात देण्याची क्रिया दाखवितो. यावरून वरचेवर लोकांकडे याचना करण्याची पाळी येण्यापेक्षां आपणाजवळ समृद्धि असून वरचेवर दुसऱ्यांस देण्याची संधि आपणांस येणें अधिक चांगलें. भिकारी वृत्तीपेक्षां उदार वृत्ति चांगली.

उतापती—उतापती काटेमारी—लांडगेतोड; कत्तल; मारझोड; मारामारी.

उतार—उताराखालीं असणें-पडणें—ज्याप्रमाणें एखादी वस्तु उतरणीस लागली म्हणजे सारखी घरंगळत जाते त्याप्रमाणें अपकर्षास लागणें; उतरंडीस लागणें; हळूहळू निकृष्ट दशेस जाणें; उतरती कळा लागणें; ओहोटी लागणें; मंदीकडे झुकणें.

उताराखालीं चालणें—गति कमी करणें; मंदगतीनें चालणें; भरभराट कमी होणें.

꙳ उतार वय हें दुसरें बाळपणच होय—ज्याप्रमाणें मनुष्य लहानपणीं परावलंबी असतो तसाच तो वृद्धपणींहि परावलंबी होतो.

उतारू—उतारू होणें—(माळवी) उपयुक्त होणें; तयार होणें.

उतावळा—उतावळा तो बावळा-रा; उतावळा सो बावळा, धीर सो गंभीर—जो मनुष्य कोणत्याहि गोष्टींत घाई, उतावळी करतो तो फसतो; जो प्रत्येक गोष्ट धीर धरून सावकाश करतो त्यास ती करण्यापूर्वी पूर्ण विचार करण्यास अवसर मिळतो व तो ती विचारपूर्वक करतो. त्यामुळें त्यांत त्यास यश येतें. गडबडीनें करणारास तें साधत नाहीं.

उतावळा नवरा, गुडघ्याला बाशिंग—लग्नाच्या वेळीं बाशिंग डोक्याला बांधतात, पण घाई सुटलेल्या नवरदेवानें तें गुडघ्याला जसें बांधावें तसें. बेसुमार घाई; उतावळेपणा. —पामो ४१५. —शाब १.७४.

उतावळी नवरी, झाली लग्नापायीं बावरी—एखादी मुलगी लग्नाला फार उतावळी झाली म्हणजे लग्नाशिवाय तिला दुसरें सुचेनासें होतें.

उतावळी बावरी (बाहुली), म्हाताऱ्याची नवरी—एखादी उपवर मुलगी लग्नाला फार उतावळी झाली तर म्हाताऱ्या नवऱ्याच्या गळ्यांत पडण्याचा संभव असतो.

उतावळीनें कबूल करणारे ते विलंबानें सिद्धीस नेणारे—जे एकदम कबूल होतात ते त्याप्रमाणें वागण्यास फार दिरंगाई लावतात.

उतावळीनें घडे तें कधीं यश न चढे—जी गोष्ट घाईघाईनें करावयास घ्यावी ती क्वचितच सिद्धीस जाते.

उतावळीनें धरती, नसावें तें ये हातीं—घाईघाईनें एखादी गोष्ट करूं गेल्यास तिचा भलताच परिणाम होण्याचा संभव असतो.

उत्तम—उत्तम खर्गावर येणें—(व.) निकरावर येणें; वर्दळीवर येणें; हातघाईवर येणें.

꙳ उत्तम फळा उत्तम ज्ञान, न ये विद्येवांचून—ज्ञान व कला यांत प्रावीण्य विद्याभ्यासावांचून प्राप्त होत नाहीं.

उत्तम कीर्ति सुशोभित, सर्वा ठायीं प्रकाशित—जो उत्तम नांव मिळवतो त्याचें तेज सर्व ठिकाणीं पडतें; त्यास कोठेंहि मान मिळतो.

उत्तम तें मत द्यावें, पण पुढाईत न व्हावें—दुसऱ्याच्या कामीं आपल्याला जो योग्य वाटेल तो सल्ला द्यावा, पण स्वतः कोणत्याहि कामाची जबाबदारी घेऊं नये.

उत्तम देह मनोवृत्ती, त्यांना प्रीति बिघडविती—एखाद्या मुलाचें शरीर व मन दोन्हीहि चांगलीं असतात. पण तीं प्रेमानें अथवा लाडानें पुढें बिघडण्याचा संभव असतो.

उत्तम पाहतां फळ, मन धांवतें तात्काळ—झाडावर उत्तम फळ पाहिलें म्हणजे कोणाच्याहि मनांत तें घ्यावेसें वाटतें. चांगली वस्तु पाहिल्यावर ती कोणासहि हवीशी वाटते.

उत्तम बी, उत्तम पीक—उत्तम बी पेरल्यास पीक उत्तम येतें. म्हणजे चांगल्याचें फळ चांगलें. तु०—जसें पेरावें तसें भरावें (कापावें).

उत्तम बोलावें, बरवें ऐकावें—आपण नेहमीं दुसऱ्याशीं चांगलें भाषण करावें व चांगला सल्ला मिळेल तर जरूर ऐकावा किंवा आपण दुसऱ्याशीं नीट बोलल्यास दुसराहि आपणाशीं गोड बोलतो. मूळ म्हण वेगळीच आहे: That is well spoken that is well taken. जें दुसऱ्यास रुचतें तेंच बोलणें उत्तम. —सवि ३२८.

उत्तम मुलाची इच्छा करी, तिजसारखी बुद्ध नसे दुसरी—प्रत्येक स्त्रीला आपलीं मुलें उत्तम असावींत असें वाट-

तच असते. जिला वाटत नाहीं तिच्यासारखी दुष्ट कोणी नाहीं. –सवि २४९४.

उत्तम शेती पण धनी असावा खेतीं—वास्तविक शेतीचा धंदा उत्तम; पण तो शेतकऱ्यानें स्वतः केला पाहिजे. दुसऱ्यावर अवलंबून राहतां उपयोगी नाहीं.

उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ चाकरी—नोकरी—सर्व व्यवसायांमध्यें शेतीचा व्यवसाय उत्तम. त्यापेक्षां व्यापार हा कमी प्रतीचा व चाकरी हा कनिष्ठ धंदा होय.

उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ट चाकरी, निदान भीक, न मिळे भीक तर (नाहीं तर) वैद्यकी (वैद्यगिरी) शीक—वर प्रमाणेंच अर्थ; पण चाकरीहि नाहीं मिळाली तर भीक मागावी व तीहि मिळाली नाहीं तर वैद्यकीचा धंदा करावा. यांत वैद्यकीचा धंदा हा भीक मागण्यापेक्षांहि वाईट असें दाखविलें आहे. कारण पूर्वी वैद्य लोक स्वतः होऊन तपासण्याचें अगर औषधाचे पैसे मागत नसत व लोकहि स्वतः समजून त्यांस द्यावे ते देत नसत. त्यामुळें त्यांची फार हलाखीची स्थिति असे.

उत्तमस्य उत्तमं फलं—उत्तम कृतीचें फल नेहमीं उत्तमच मिळावयाचें.

उत्तमस्यं क्षणं कोपः—श्रेष्ठ मनुष्याला राग आला तरी तो एक क्षणापेक्षां अधिक टिकत नाहीं; कारण ते विचारानें संयम करतात. मूळ श्लोक असा आहेः उत्तमे तु क्षणं कोपो मध्यमे घटिकाद्वयम् । अधमे स्यादहोरात्रं चाण्डाले मरणान्तिकः ॥

उत्तर——उत्तरेकडील ढांग—सदाशिवराव भाऊचा तोतया. –खरे १०२६.

उत्तरपंथ——उत्तरपंथास लागणें—उत्तरपंथ म्हणजे परलोकचा रस्ता; यावरून मृत्युपंथास लागणें; मरण जवळ येणें.

उत्तरपंथी सरदार— शिंदे होळकर — हे उत्तर हिंदुस्थानांतले म्हणून. –ख ३२४१.

उत्पद्यन्ते——उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः ।—दरिद्री मनुष्याच्या मनांत कितीहि गोष्टी आल्या तरी त्या व्यर्थ होतात. कारण जवळ द्रव्य नसल्यामुळें त्याला कांहीं करतां येत नाहीं. संबंध श्लोकः– उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः । बाल्ये वैधव्यदग्धानां कुलस्त्रीणां कुचाविव ॥

उत्पन्न——उत्पन्नास येणें—फलदायक होणें; लाभकारक होणें; ज्यापासून कांहीं लाभ होईल अशा स्वरूपास येणें.

***उत्पन्न घटे आणि कर्ज वाढतें**—मनुष्याची प्राप्ति कमी होत चालली व कर्ज वाढत चाललें तर कांहीं दिवसांनीं त्याचा नाश व्हावयाचा.

उत्पन्न भक्षी, मध्यान्ह दरिद्री—उत्पन्न भक्षी (= रोजच्या रोज मिळवून खाणारा) अशा मनुष्याच्या संग्रहीं कांहीं एक नसतें. तो मध्यान्हीं दरिद्रीच. हाता तोंडाशीं गांठ असलेला.

उथळ——उथळ बुडाचा—ज्याचें बूड उथळ आहे असें भांडें स्थिर राहात नाहीं. यावरून, एकदम हुरळून जाणारा; भोळसट; अत्यंत उतावळा; थोडक्यांत संतुष्ट होणारा. ‘ आमच्यांतहि उथळ बुडाची कांहीं मंडळी आहे. ’ –टि १ ३९७.

***उथळ पाण्याला खळखळ फार**—ज्या ओढ्यामध्यें पाणी थोडें असतें त्याच्या प्रवाहाचा आवाज फार होत असतो. उलट खोल पाणी संथ वाहतें, त्याला खळाळी नसते; यावरून, जेथें थोडेंच असतें तेथें गर्जना–गर्व फार. अल्प ज्ञान पण ताठा फार. Shallow water makes a great roar.

उथळ पाण्याला खळाळी फार, खोल नदीची गति मंदधार—वर प्रमाणेंच. उथळ प्रवाहास खळाळी फार असते व खोल पाणी संथपणें वाहतें.

उथळ पाण्याला खळाळी फार व दुबळें माणसास बढाई फार—वरप्रमाणेंच. अशक्त मनुष्य तोंडानें वटवट फार करतो; बलवान मनुष्य गंभीर व शांत असतो.

उथळ माथ्यानें वावरावें आणि खरें बोलावें—नेहमीं मनमोकळेपणानें बोलत चालत असावें. मनांत खोलवर कांहीं विचार ठेवूं नये व जें सत्य असेल तें बोलावें म्हणजे आपणाशीं सर्व सरळपणानें वागतात व आपणास कोणाचें मिंधें असावें लागत नाहीं. ‘ उजळ ’ बद्दल उथळ शब्द पडला असेल काय ?

उदक——उदक घेउन वचप—(गो.) निघून जाणें; सर्व सोडून देउन जाणें; सर्व गोष्टींवर पाणी सोडून परागंदा होणें.

उदक न्हावय—(गो.) अंघोळ करणें.

(डोळ्यांत, नेत्रांत, नयनांत) उदक येणें— अश्रू येणें; डोळ्यांत पाणी येणें. (ल.) वाईट वाटणें; दुःख होणें. ‘दर्भनिर्मित तया शयनातें। देखतां उदक ये नयनांतें।’

उदक सोडणें–देणें— ब्राम्हणाच्या हातावर उदक सोडलें म्हणजे संकटांत ज्याचा उच्चार केला असेल तें दिलें असें होतें. त्यावरून १ दान करणें; मालकी सोडणें. २ आशा सोडून देणें; टाकून देणें.

उदक हातावर घालणें—हातावर दक्षिणा देऊन वर पाणी सोडतात. उदक घातल्यानें पूर्णता येतें ही कल्पना. दान करणें; अर्पण करणें; देऊन टाकणें.

उद्का पाण्यानें करून टाकणें--अत्यंत थोडया खर्चात करणें; केवळ पाण्यानेंच जणूं काम करणें; फारसा गाजावाजा न करतां व फारसा खर्च न करतां कसेंबसें एखादें कार्य विशेषतः उत्तरक्रिया वगैरे उरकून घेणें.

उद्काक वचप--(गो.) पाणी आणावयास जाणें.

उद्काकई पाताळ--(गो.) पाण्यापेक्षां पातळ.

उद्काकडे वचप--(गो.) परसाकडे जाणें.

उदुकांतलो कोब्रू; उद्कांतलो कब्रू--(गो.) पाण्यांतला ऊंस-हा दिसण्याला मोठा सुरेख असतो पण इतर उंसाप्रमाणें याला गोडी नसते; तो पाणचट असतो.

उद्कांतु उजो घडोंचो-- (गो.) पाण्यांत विस्तव पेटविणें अशक्य गोष्ट करूं पाहाणें.

उद्कांतु होमु करचो-- (गो.) पाण्यांत होम करणें. अशक्य गोष्ट करूं पाहणें.

*** उद्क धुता सगल्याक, उद्काक कोण धुतलो ?**-- (गो.) पाण्यानें सर्व धुतां येतें, पण पाण्याला कोण धुवील ?

उद्दाक नातिल्या गावांतु शीस मारचि--(गो.) पाणी नसलेल्या गांवांत डोकें मारावें. संतापानें दिलेली शिवी.

उद्का हागीलें उपेल्या बगर रावता ?--(गो.) पाण्यांत हगल्यावर तें वर आल्याखेरीज राहील ? विशिष्ट परिस्थितींत केलेली गोष्ट छपून राहात नाहीं.

उद्काचे दुडू उद्काक-- (गो.) पाण्याचा पैसा पाण्याला.

उद्काच्या बळार सुंगट उटा-- (गो.) सुंगट (झिंगा) मासा पाण्याच्या जोरामुळें उडतो. पैसा वगैरेच्या बळावर माणूस जग तुच्छ लेखतो.

उद्कांतली मांडकी उद्क पियेल्याबगर रावता ? उद्कांतुलो मांडुक्कू उद्दाक पीनास्ताना राबना--(गो.) पाण्यांतली बेडकी पाणी प्याल्याखेरीज राहते थोडीच ! तु० - तळें राखी तो पाणी चाखी.

उद्कांतलें तेल पोंवता, बुदवंतु आशिलो उंचारि येता-- (गो.) पाण्यांतलें तेल वर तरंगतें, बुद्धिवान माणूस पुढें येतो

उद्कांतुं रावूनूं मांसळ्यांकडे वैर कर नये--(गो.) पाण्यांत राहून माशांशीं वैर धरूं नये.

उद्कांतु हागिलें उंच येत्तां--(गो.) उद्का हागिलें० पहा.

उद्कारि बड्डि मारल्यारि, उद्दाक एक बड्डि बिंगडि-- (गो.) पाण्यावर काठी मारली तर सारें पाणी एक आणि काठी मात्र वेगळी दिसते. पाण्यांत फूट पडत नाहीं.

उद्कारि बरायिलें बरप--पाण्यावर लिहिलेलें लिखाण. नश्वर गोष्ट.

उदंड--**उदंड खाल्ला मेवा, तर येईना अर्धी भाकरीचा येवा**--मेवामिठाई पुष्कळ खाल्ली तरी भाकरीनें जें क्षुधाशमन होतें व जें समाधान मिळतें तें मिठाईनें मिळत नाहीं.

उदंड जाहलें पाणी। स्नानसंध्या करावया॥-- रामदास स्वामींच्या 'आनंदवनभुवना' च्या वर्णनांतील ही ओंवी आहे. "'उदंड' म्हणजे ऐहिक-पारलौकिक सुखाची प्राप्ति या आनंदवनभुवनास आली."-गजेंद्रमोक्ष १-७९.

उदंड झाला कहर, तरी सोडूं नये शहर--कांहींहि झालें तरी शहरच राहण्यास चांगलें. शहराचें महत्त्व सांगणारी म्हण.

उदमी--**उदम्याची अक्कल थोडी, म्हणे म्हैस विकून घेतली घोडी**-- म्हैस ही दूध देते तसा घोडीपासून प्रत्यक्ष कांहीं फायदा होत नाहीं. तेव्हां म्हैस देऊन घोडी घेणें हा व्यापार बुद्धीचें चातुर्य न दाखवितां जडत्वच दाखवितो.

उदय--**उदयास येणें**--१ प्रसिद्धीस येणें; उत्कर्षास चढणें. २ वर येणें; दिसूं लागणें. ३ उत्पन्न होणें.

उदयिलें--**उदयिल्यानें केळी पान हाडका**--(गो.) चोललेल्यानें केळीचें पान आणायला पाहिजे ? एक अट.

उदर--**उदराची खांच**--पोटाची खळगी; पोट. 'आपुली खांच उदराची ।' -संग्रामगीतें १३३.

उदरीं येणें-- १ एखादा ग्रह जन्मराशीस येणें. २ यथेच्छ खाण्यापिण्यास मिळणें; भरभराट होणें; उत्कर्ष होणें.

उदरीं शनि येणें--शनि जन्मराशीस येणें. तो आला असतां मोठा लाभ होतो. यावरून चांगली दशा प्राप्त होणें; भरभराट होणें. 'वृत्तपत्रांच्या उदरीं शनि आला आहे.' -के १७.६.३०, पृ. ७.

*** उदरीं आलेल्या शनीनें पदरीं निसटण्याची निशा करणें**--अगोदर पुष्कळ संपत्ती मिळून चंगळ चालली असतां पुन्हा दरिद्री होण्याचीं लक्षणें दिसणें.

उंदर--उंदीर पहा.

उंद्ऱ्या मांजऱ्या--विशाखा व अनुराधा हीं नक्षत्रें. या नक्षत्रांत सूर्य असतां पाऊस पडला तर त्यासंबंधीं हा शब्दप्रयोग वापरतात. विशाखा नक्षत्राचा पाऊस पडल्यास उंदीर किंवा पिकास उपद्रवकारक कीटकादि प्राणी फार होतात व अनुराधा नक्षत्राचा पाऊस पडल्यास ते नाहींसे होतात, अशी समजूत आहे.

उदव——उदव करणें–लावणें—[उदव = उदो, उदय] उजेड पाडणें; पराक्रम करणें; प्रभाव दाखविणें; एखादें महत्कृत्य करणें. याचा उलट अर्थी औपरोधिक उपयोग करतात.

उदान——उदान लागणें—[उदान = कंठस्थानचा वायु] फार खाल्ल्यामुळें, रोगामुळें श्वासोश्वास मोकळेपणानें करतां न येणें; ऊर भरून येणें; दम कोंडणें; ऊर्ध्व लागणें.

उदार——उदार कर्ण—१ अत्यंत उदार; दानशूर. कर्ण हा अतिशय दानशूर म्हणून प्रसिद्ध होता; त्यावरून एखाद्या दानशूर मनुष्यास म्हणतात. २ (उप.) कृपण; कंजूष; कधींहि कांहीं न देणारा.

उदाराचें पोतें—१ जो मनुष्य भलत्याच मनुष्याची मालमत्ता उधळून टाकतो किंवा मन मानेल तशी देऊन टाकतो अशा मनुष्यास म्हणतात. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवणारा; परभारें दातृत्वाची फुशारकी मारणारा. २ ‘ उधारीचें पोतें० ’ पहा.

* **आईजीच्या जिवावर बाईजी उदार**— आईजी पहा. दुसऱ्याची वस्तु अगर धनदौलत सढळ हातानें खर्च करणें, किंवा मोठ्या दानशूराचा आव आणून देऊन टाकणें; हलवायाच्या घरावर तुळशीपत्र, पहा.

उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम्।—जे खरेच उदार असतात ते आपलें औदार्य आपपर भाव न ठेवितां सर्वत्र दाखवितात. – छच ५१. सबंध श्लोक–अयं निजः परो वेत्ति गणना लघुचेतसाम्। उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम् ॥

उदार तो श्रीमंत, कृपण तो दरिद्री—पैशाच्या श्रीमंतीपेक्षां ज्याजवळ मनाची श्रीमंती आहे, तो उदारपणें खर्च करतो; तो खरा श्रीमंत. ज्याजवळ पुष्कळ धन आहे पण तो मुळींच खर्च करीत नाहीं, कंजूषपणें राहतो, त्याच्या संपत्तीचा त्याला स्वतःला व इतरांनाहि कांहीं उपयोग नसतो; ती असून नसून सारखीच, याकरितां तोच खरा दरिद्री होय.

उदार मन ठेव संपत्तिकाळीं, स्थीर असावें विपत्तिवेळीं—जेव्हां वैभव प्राप्त होतें तेव्हां एक उदार वृत्ति ठेवावी व त्याचा सढळ हातानें उपभोग घ्यावा. तसेंच निकृष्ट दशा आली असतां धैर्य न सोडतां मन शांत ठेवून व्यवहार करावा.

उदार मनाचा वाटे कर्ण, कवडीसाठीं वेंची प्राण—उदार मनाचा असून कर्णासारखा दाता आहे असें ज्यास आपण मानितों तोच कवडीकरितां प्राण देतो. वरून दिसावयास उदार, किंवा उदारपणाची प्रौढी मारणारा पण मनांतून कृपण.

उदरांत कृपण, जाब देतो झट्कन—कृपण मनुष्य हा उदार मनुष्यापेक्षांहि एका प्रकारें श्रेष्ठ होय. कारण उदार मनुष्य आपणांस कदाचित् साहाय्य करतो पण अनेक वेळीं दीर्घकाल लावतो किंवा विचार करावयास वगैरे वेळ घेतो व अनेकदां हेलपाटे देतो. पण कृपण मनुष्य ताबडतोच नाहीं म्हणून सांगून आपला मुळींच वेळ न मोडतां आपल्याला ताबडतोच मोकळा करतो. खेपा मारावयास तरी लावीत नाहीं.

उदाऱ्याचा पुधार, खाटल्याखालीं अंधार—(व.) कोणी औदार्याच्या मोठमोठ्या पोकळ बाता मारीत असला म्हणजे म्हणतात. देण्यासंबंधीं मोठमोठ्या गप्पा मारावयाच्या पण स्वतः जवळ प्रत्यक्ष कांहीं नसल्यामुळें कांहींहि द्यावयाचें नाहीं अशी स्थिति.

उदाहरण——उदाहरणानें शिकतो तसा उपदेशानें शिकत नाहीं— मनुष्याला स्वतःस अनुभव आल्यानें किंवा दुसऱ्याचा अनुभव पाहून एखादी गोष्ट जितकी पटते तितकी नुसती सांगून शिकवून पटत नाहीं. प्रत्यक्ष ठेंच लागल्याशिवाय शहाणपणा येत नाहीं. तु०—Example is better than precept.

उदाहरणेन स्पष्टं भवति—प्रत्यक्ष दाखला दिल्यानें कोणतीहि गोष्ट अगदीं स्पष्ट होतें. एखादा दृष्टान्त किंवा दाखला देण्यापूर्वीं म्हणतात.

उदी——उदी देणें—शब्दशः अर्थ उदाची धुरी देणें, धूप देणें. हवेंतील रोगबीजें उदाच्या धुपानें मरतात. त्यावरून उदी देणें म्हणजे विलयास नेणें; नाशाप्रत नेणें; नुकसान करणें; घालविणें; व्यर्थ घालविणें. ‘दोनशें रुपयांची उदी दिली मला तुमच्या भावानें.’

उदीम——उदीम आणि खर्च मित, श्रीचा डावा उजवा हात—व्यापार करून मिळविणें व हात राखून खर्च करणें या दोन गोष्टी संपत्ति मिळविण्याच्या कामीं महत्त्वाच्या आहेत.

उदीम करतां सोळा बारा, शेत करतां डोईवर भारा—[सोळा बारा = सोळा खर्चून बारा मिळतात] व्यापार केला तर त्यांत कधीं कधीं नुकसान होण्याचा संभव असतो व शेती केली तर स्वतः श्रम करावे लागतात, त्याशिवाय द्रव्यप्राप्ति होत नाहीं.

उदीम व्यापाराचे अंतीं, रजावंतीनें ठकले जाती—[रजावंतीनें = आपखुशीनें] व्यापार उदीम म्हणजे आपखुशीनें, सर्वांच्या संमतीनें केलेली सार्वजनिक ठकबणूक आहे. Trade and commerce are universal cheating by general consent.—सवि ३८४१.

उंदीर——उंदरांनीं बोक्यांचें मत घेणें— आपल्या

शत्रूकडे सल्ला घ्यावयास जाणें हें आपणास घातकच होणार. 'कॉलेजच्या प्रिन्सिपालांचें राजकीय बाबतींत मत घेणें म्हणजे उंदरांनीं बोक्यांचें मत घेण्यासारखें आहे.'—टि ३.२९.

उंदरांनी शेपट्या बडवप—(गो.) उंदरांसुद्धां खावयास न मिळाल्यामुळें शेपट्या आपटण्याची पाळी आली आहे, असें दरिद्री घर. ज्या घरांत खावयास एक धान्याचा कणहि नाहीं असें घर.

उंदरांमांजरां प्रमाणें—उंदीर आणि मांजर यांचें नैसर्गिक शत्रुत्व आहे, यावरून अहिनकुलवत्; हाडवैर.

डोंगर पोखरून उंदीर काढणें; डोंगर व्याला, उंदीर झाला—१ अतिशय परिश्रम करूनहि अल्प फळ हातीं येणें. मोठें अवडंबर माजवून एखादें अत्यल्प कार्य करणें. एकदां एका डोंगरांतून मोठा आवाज येऊं लागला म्हणून लोक भोंवतीं गोळा झाले व त्यांनीं आंत काय आहे म्हणून खणून पाहिलें तों एक उंदराचें बिटुकलें हळूच बाहेर पडलें. २ इसाप नीतींत एक गोष्ट आहे. एकदां एका डोंगरास प्रसूतिवेदना होऊं लागल्यामुळें तो मोठमोठ्यानें ओरडूं लागला. तेव्हां सभोंवतालचे सर्व लोक तो चमत्कार पाहण्यासाठीं गोळा झाले व डोंगराच्या पोटांतून केवढें अजस्र मूल बाहेर पडतें याची उत्सुकतेनें वाट पाहूं लागले. अखेरीस हळूच एक उंदराचें पिलूं बाहेर पडलें! याप्रमाणें अल्प गोष्टीकरितां भयंकर गाजावाजा झाला म्हणजे म्हणतात.

उंदीर गेला लुटी, आणल्या दोन मुठी—प्रत्येक मनुष्य त्याच्या कुवतीप्रमाणें कार्य करूं शकतो, त्याच्या सामर्थ्याबाहेर त्याच्यानें कांहीं होत नाहीं. हिमटा, सढळ हात नसलेल्या माणसाबद्दल योजतात. पाठभेद–माकड गेलें लुटी०

उंदीर नाहीं मावत बिळांत आणि शेंपटाशीं बोरकाट्या; उंदीर मावेना बिळीं, त्याचे पुच्छीं तृणपुली—[तृणपुली = गवताची पेंढी] उंदीर पुरता जाण्याइतकेंहि बीळ मोठें नसतां त्याच्या शेपटीला बांधलेल्या बोरीच्या कांट्या कशा आंत शिरणार? मुळांतच एखादी गोष्ट लहान असतां तीपासून मोठें कार्य घडून येण्याची अपेक्षा करणें व्यर्थ आहे.

उंदीर बडयतां शेंपडी, घर रिकामें—(गो.) उंदीर शेपटी आपटतो आणि घर रिकामें? वर पहा.

उंदर बीलाडीनो मेल—(गु.) परस्पर ज्यांचें नैसर्गिक शत्रुत्व आहे त्यांची मैत्री कधीं होणें शक्य नाहीं. उंदरा मांजराचें सख्य, इळा आणि भोपळा यांचें सख्य या गोष्टी अशक्य आहेत.

उंदीर भाजुंक मीठ ना—(गो.) उंदराला भाजण्याला मीठ नाहीं.

उंदीर मस्कतास गेला पण सावकार नाहीं झाला—मस्कतचा व्यापार पूर्वी फार मोठा असे. एक उंदीर एका मोठ्या गलबतांत राहात असे तें गलबत सफरीकरितां मस्कतास जाऊन आलें. त्याबरोबर तो उंदीरहि मस्कतास जाऊन आला पण तो होता तसाच राहिला; त्याला कांहीं लाभ–हानि झाली नाहीं. उंदीर कितीहि दूर गेला तरी आपल्या सामर्थ्याप्रमाणेंच कोणतीहि जिन्नस आणूं शकतो. त्याला कितीहि प्राप्ति झाली तरी मर्यादितच. त्याप्रमाणें एखाद्या मनुष्यानें कितीहि देशपर्यटण केलें तरी त्याच्या बुद्धिसामर्थ्याप्रमाणेंच त्याला लाभ व्हावयाचा. तो त्यापेक्षां जास्त कांहींहि करूं शकत नाहीं.

उंदीर मांजरा घराहून, येतो उपवाशी परतून—उंदराला मांजराच्या घरीं पाठविला तर तेथें जेवून येण्याइतकें धैर्य त्याच्या अंगीं कोठून असणार. विरुद्ध किंवा प्रतिकूल परिस्थिति असतां कार्य घडून येण्याची अपेक्षा करूं नये.

उंदीर श्वास घेती, पळूनियां जाती—उंदीर हा फार भित्रा प्राणि आहे. तो प्रत्येक गोष्ट हुंगून पाहतो व तीपासून पळून जातो. भित्रा मनुष्य प्रत्येक गोष्टींकडे फार धास्तीनें पाहतो व त्याला प्रत्येक गोष्टीची भीति वाटत असते.

उंदीर सापळयांत पडे, लक्ष त्याचें मृत्यूकडे—उंदीर एकदां सांपळ्यांत सांपडला म्हणजे त्याला मृत्यूशिवाय दुसरी गति नाहीं. मनुष्य अनिवार्य संकटांत सांपडलें असतां त्याची सुटकेबद्दल पूर्ण निराशा होते.

उंदीर हागेल शेण थापेल; (गो.) उंदीर हागतलो किते नी शेणी थापतालो किते—उंदीर तो केवढें शेण घालणार व त्याच्या गोंवऱ्या त्या काय होणार. अल्प वस्तू पाहून महत्कार्य घडण्याची आशा व्यर्थ होय. मुंगळा गुळाची ढेप काय आणणार हें त्याची कमरच सांगते. अंधळ्याची धांव कुडावेरीं.

उंदूर घरांतु बाल्लां बोडयितातिं—(गो.) उंदीर घरांत शेंपट्या आपटतात. वर पहा.

उंदूरु गिळातल्याक बाल जडवे—(गो.) उंदीर गिळणाऱ्याला शेपटी जड आहे का? जो मोठें काम करील तो त्याहून लहान असणारें करीलच करील.

उंदरा एक बिळी वाट, असतां मिळती झटपट—राहण्यास एकच बीळ असेल तर उंदीर झटकन् सांपडतो. यावरून एकदेशी माणूस फसण्याचा फार संभव असतो.

उंदरा माल्यार गणेशा लागता—(गो.) उंदराला मारल्यावर गणेशाला लागतें. उंदीर गणपतीचें वाहन असल्यानें उंदराला मारलें तर गणपतीला साहाजिकज राग यावयाचा.

उंदरां रागान खीं कॉणें घरा उजॉ लायिलॉ; उंदराक

मारून घराक उजो घालचो; उंदरा रागान घरा उजो लांवचो.––(गो.) उंदराच्या रागानें घराला आग लावणें अविचाराचें कृत्य आहे.

उंदराक बिळां घालुनु उंचारि मात्ति लेंपाचि—(गो.) उंदराला बिळांत घालून वर माती लोटण्यासारखें निष्फळ कृत्य.

उंदराक मारलेलो बाणु गणपतिक लागलो––(गो.) उंदराला मारलेला बाण गणपतीला लागला.

उंदराचा जीव जातो, मांजराचा खेळ होतो––मांजरानें उंदीर पकडला म्हणजे तें त्याच्याजवळ खेळत असतें पण एकीकडे उंदराचे हाल होत असतात. पुष्कळदां वरिष्ठांच्या लीला गरीबांना तापदायक होतात.

उंदराचा दांत आणि हत्तीदातांची (हस्तीदंताची) आशा—जवळ अत्यंत अल्प वस्तु असतां फार मोठी वस्तु मिळण्याची आशा करणें.

उंदराचा सांपळा, न ठेवी रक्तानें माखला—उंदराच्या सांपळ्याला त्याचें लागलेलें रक्त तसेंच ठेवलें तर त्यांत आणखी उंदीर येत नाहींत म्हणून तो स्वच्छ धुवावा लागतो. आपल्या बेताचा मागमूस मागें ठेवूं नये.

उंदरांची दाटी, तितक्यांत आली भाटी––उंदरांची गर्दी जमली असतां तेथें जर मांजर आलें तर क्षणांत त्यांची दाणादाण उडते.

उंदरांच्या चिवचिवीपेक्षां पक्ष्यांचा किलकिलाट बरा—गजबजलेल्या व अडगळ असणाऱ्या शहरी भागापेक्षां रान पर्वताचा भाग फार आल्हादकारक. शहरांत राहून उंदरांची चिवचिव ऐकावयाची, त्यापेक्षां रानांत पक्ष्यांचे ध्वनी मंजुळ लागतात.

उंदराच्या पोरानें लोखंडाशीं खेळूं नये; (गो.) उंदरा पोराक लोखंडा खेळ कित्याक; उंदराक लोखंडा व्यारु इत्याक––उंदराचें पिलूं जर लोखंडाच्या कांबीशीं खेळूं लागले तर त्याचे दांत पडतील. यावरून मनुष्यानें आपली ताकद पाहून कारभार करावा; भलत्याच आपल्या आवांक्याच्या बाहेरच्या गोष्टींत हात घालूं नये. इसापनीतींतील उंदीर आणि कानस यांची गोष्ट.

उंदरानें केलें बीळ, सर्पानें केलें बिराड—(गो.) उंदरानें केलेल्या बिळांत साप खुशाल राहातो. 'आयत्या बिळांत नागोबा' पहा.

उंदराला माऊ, बायकोला जाऊ—उंदराचा शत्रु मांजर व स्त्रीचा स्वाभाविक शत्रु तिची जाऊ. या जोड्यांचें कधीं पटावयाचें नाहीं.

उंदराला (स) मांजर साक्ष—मांजरानें उंदराच्या बाजूनें साक्ष देणें त्याच्या हिताचें असतें, कारण उपकाराचा मोबदला तो उंदराला गट्ट करून घेणार. यावरून ज्याचा हितसंबंध एखाद्या गोष्टींत आहे त्याला त्याबद्दल विचारणें हें न्यायाचें व फायदेशीर नाहीं.

उंदराला मारायला गेलों अन् गणपतीला लागलें––एक गोष्ट करीत असतां भलतीच विपरीत गोष्ट हातून घडते. उंदीर हें गणपतीचें वाहन. तेव्हां तो लपून गणपतीजवळ बसला असल्यास त्याला मारतांना गणपतीला लागण्याची भीति असते. तु०–सांबाच्या पिंडीवरचा विंचू. (गो.) उंदरा माल्यार गणेसा लागता.

उंदरास दाखवावया भीति, लावूं नकोस घरास बत्ती—उंदरांस भीति दाखविण्याकरितां घरास बत्ती (आग) लावून देणें हा मूर्खपणा आहे. बारीक सारीक गोष्टींचा त्रास चुकविण्याकरितां मोठी आपत्ति ओढवून घेऊं नये. तु०–(गो.) उंदराक मारूक घराक उजो घालचो.

उंदरास बोललें गजाननास लागलें; उंदराला बोललेलें गणपतीस लागलें.—उंदीर हें गणपतीचें वाहन असल्यानें त्याला जर वाईट केलें किंवा बोललें तर तो गणपतीचा अपराध केल्याप्रमाणें होतें. यावरून मोठ्याशीं संबंध असलेल्याच्या वाटेस जाऊं नये.

उंदरास लोखंडाचें वावर—सामर्थ्याबाहेरचें काम.

उंदरीण आपले घरीं धनीण म्हणविती––उंदरीण ही कितीहि क्षुद्र असली तरी तीहि आपल्या घरीं पूर्ण मालकीण असते. जो तो आपल्या घरचा राजा. तु०–'शेणामध्यें वाडे बांधुनि राहति शेणकिडे!'–सावरकर.

उदेय––**उदेयांचा विधि**—प्रातर्विधि; सकाळच्या प्रहरीं करावयाचे शौचमुखमार्जनादि विधि. 'उदेयांचा विधि सारोनि' –शिशु २३०.

उदेलें––**उदेलेंय सारखें, अस्तमानलेंय सारखें**—(गो.) उजाडलें सारखेंच आणि मावळलेंहि सारखेंच.

उदो––**उदो उदो करणें; उधे उधे करणें**—देवीचे भक्त तिच्यापुढें उदव (उदयोस्तु = जय असो) अंबाबाई, असें म्हणतात. हा स्तुतिवाचक शब्द आहे. टिमकी वाजविणें; एखाद्याला मोठेपणा देणें; त्याची जाहिरात करणें; एखाद्याची खूप स्तुति करणें; त्याचे पोवाडे गाणें.

उद्धरणें––**पितर उद्धरणें**––वाडवडिलांस शिव्या देणें; मातापितरांवरून अपशब्द बोलणें.

उद्धव---उद्धवाचें घेणें काय व माधवाचें देणें काय ?--उद्धव आणि कृष्ण यांचे संबंध इतके निकटचे होते कीं त्यांत भेदभाव नव्हताच. तेव्हां श्रीकृष्णानें उद्धवास कांहीं दिलें काय व उद्धवानें कृष्णापासून घेतलें काय, तिऱ्हाइतास दोन्ही सारखीच. दुसऱ्यांनीं त्यांत लक्ष घालण्याचें कारणच नव्हतें. हिंदी म्हण अशी आहे: 'उधोका लेना न माधोका देना।' यावरून, कोणाच्या भानगडींत न पडणें; आपणांस काय करावयाचें आहे अशी वृत्ति ठेवणें. २ कोणाचें देणें नाहीं कीं घेणें नाहीं; अगदीं मोकळा, फटिंग.

उद्धार---**उद्धारीची पोणु थू करप; उद्धारोच पडून थू करप**--(गो.) उताणें पडून थुंकणें--म्हणजे स्वतःची थुंकी स्वतःच्या अंगावरच पडते. आपल्याच कृत्यामुळें आपत्ति ओढवून घेणें. सूर्यावर थुंकणें.

उद्यम---**उद्यमो रचिने उजागरो लेवो**--खटपटी करून वैभव प्राप्त करून घ्यावें.

उद्या----**उद्याच्या आदितवारीं**--उद्यां हा भविष्यकाल वाचक आहे, ह्याचा कधींहि वर्तमानकाल होऊं शकत नाहीं. त्यामुळें उद्यांचा आदितवार कधीं येत नाहीं, यामुळें केव्हांहि नाहीं, कधींहि नाहीं असा अर्थ. पांढऱ्या बुधवारीं.

❀ **उद्यांचें आज, करावें काज**--उद्यां जें काम करावयाचें तें आज करावें. तु०-श्वः कार्यमद्य कुर्वीत पूर्वाह्णे चापराह्णिकम्। पुढें पहा.

उद्यांवर काम, न लोटावें हें उत्तम--आज करतां येण्यासारखी गोष्ट कधींहि उद्यांवर टाकूं नये. आज होण्यासारखें काम ताबडतोब उरकून टाकावें. तु०-Do not put off till tomorrow what you can do today.

उद्योग---**उद्योग चालविणें-करणें**--कामधंदा करणें; उदीम व्यवसाय करणें; खटपट करणें.

उद्योग वेळ-वेळा--दिवस आणि रात्र यांच्या ३० घटिकांचे जे आठ भाग पाडिलेले असतात. त्यापैकीं एक. हा प्रत्येक भाग ३॥ घटकांचा असतो. अमृत, उद्योग, काळ (मृत्यु), चंचळ (चोर), रोग, लाभ, शुभ आणि स्थिर या आठ वेळा आहेत.

❀ **उद्योग इष्काचा वैरी, तो इच्छेचे विरुद्ध करी**--उद्योगी माणसाला प्रेम किंवा कांहीं तरी कल्पना, वासना असतच नाहींत. तो नेहेमीं आपल्या कामांत गढलेला असतो.

उद्योग उघडा करूं जातां, त्यांत लपून विघ्नें राहतीं--एखाद्या वेळीं एखादा व्यवहार सरळ म्हणून करावयास जावें तों त्यांत मागून विघ्नें उत्पन्न होतात.

उद्योग उशाला आणि दैव गप्पेला--आपण सारखें उद्योग करीत राहिल्यास दैवाबद्दल बेफिकीर असण्यास हरकत नाहीं. दैवाबद्दलचीं सर्व बोलणीं गप्पा म्हणून समजावीं व त्यांवर विश्वास ठेवूं नये. ज्याला उद्योग करावयाचा नसतो तो दैवाबद्दल गप्पा मारतो.

उद्योग उशाशीं आणि देणें पायथ्याशीं (पायाशीं)--उद्योगी असलें म्हणजे कर्ज राहात नाहीं.

उद्योग करतां, फळें येतीं हातां--उद्योग केल्यास त्याचें फळ मिळतें.

उद्योग करिती ते थोरी मिळविती--उद्योग करणारा मनुष्य श्रेष्ठपणास पावतो.

उद्योग करी श्रमानें, त्यास सर्व मिळे क्रमानें--जो कोणतेंहि कार्य परिश्रमपूर्वक करतो त्यास योग्य कालीं त्याचें फल मिळाल्यावांचून राहात नाहीं.

उद्योग कर्ज वारतो, निरुद्योग कर्ज वाढवितो--उद्योगामुळें असलेलें कर्ज फिटतें पण आळशीपणानें तें आणखी वाढतच जातें, कधीं कमी होत नाहीं.

उद्योगः खलु कर्तव्यः।--माणसानें उद्योग हा केला पाहिजे म्हणजे कांहीं उणें पडत नाहीं. मांजराला जवळ गाय नाहीं तरी जन्मापासून गाईचें दूध रोज पिण्यासाठीं मिळतेंच कीं नाहीं. सबंध श्लोकः- उद्योगः खलु कर्तव्यः फलं मार्जारवद्भवेत्। जन्मप्रभृति गौर्नास्ति पयः पिबति नित्यशः॥

उद्योगं पुरुष लक्षणं।--'उद्योगः पुरुष लक्षणम्' असा शुद्ध पाठ. पुरुषाचें वैशिष्ट्य किंवा कार्य म्हणजे उद्योग होय. सबंध श्लोकः-अश्वस्य लक्षणं वेगो मत्तं मातङ्गलक्षणम्। चातुर्यं लक्षणं नार्या उद्योगः पुरुषलक्षणम्॥

उद्योग हीच किमया बरी, धातुमात्राचें सोनें करी--उद्योग हीच खरी किमया आहे; कारण किमयेनें तांबें किंवा लोखंड याचेंच फार तर सोनें करतां येईल. पण उद्योगानें वाटेल त्या धातूचें सोनें करतां येईल व द्रव्यप्राप्ति करून घेतां येईल.

ये उद्योगा आणि बैस माझ्या खांद्यावर--विनाकारण आपणामागें एखादें काम लावून घेऊन खस्ता खाणें. तु०-उपटसूळ घे खांद्यावर.

उद्योगाचा त्रास, करतो सदा आळस--आळशी मनुष्याला उद्योग करणें त्रासदायक वाटतें.

उद्योगाची कास धरा, चाकरीवर चिरा घाला--[चिरा घालणें = नाश करणें.] दुसऱ्याची चाकरी करण्यापेक्षां स्वतःचाच कांहीं तरी उद्योग करणें म्हणजे स्वावलंबी बनणें चांगलें.

उद्योगाची कास, वाढविते त्रास—एकसारखें उद्योग करीत राहिलें म्हणजे मनुष्य महत्त्वाकांक्षी होतो. जसजसें त्यास यश मिळत जाईल तसतसा त्यास नवीन नवीन उद्योग करण्यास हुरूप येतो.

उद्योगाचीं गुढ्या तोरणें, आळसाचीं अधोवदनें—उद्योगी मनुष्य वैभवास चढतो व आळशी मनुष्य विपत्तींत येऊन त्यास अपमानाचे प्रसंग येतात.

उद्योगाचे अंतीं, (द्रव्य) भूषण आणि कीर्ति—मनुष्य उद्योग करीत राहिल्यास त्यास शेवटीं द्रव्य, प्रतिष्ठा व कीर्ति यांचा लाभ होतो.

उद्योगाचे घरीं, ईश्वर साहाय करी—उद्योगी मनुष्यास परमेश्वर साहाय्य करतो. तु०- God helps those who help themselves.

उद्योगाचे घरीं, ऋद्धि सिद्धि पाणी भरी—जो मनुष्य उद्योग करतो तो सर्व दृष्टींनीं समृद्ध होतो.

उद्योगाचे घरीं, सुखें येतीं सामोरीं—उद्योग करणाऱ्या मनुष्यास सहजच सुख प्राप्त होतें व सर्व प्रकारचे भोग भोगावयास मिळतात.

उद्योगाचें निशाण भगवंताचे हातीं, निर्बळाला रात्रंदिवस खंती—जो मनुष्य उद्योग करतो त्याला परमेश्वर साहाय्य करून योग्य मार्गानें नेतो व त्याचा सर्वत्र जयजयकार होतो. जो स्वतःलाच अपात्र समजून उद्योग करीत नाहीं त्याला रात्रंदिवस सर्व प्रकारची काळजी करावी लागते.

उद्योगानें मन स्वच्छ राहतें, आळसानें मन खातें—मनुष्याचें मन उद्योगांत रमत राहिलें म्हणजे तें निष्पाप व ज्ञानानें तळपत असतें. उलट जो मनुष्य आळशी असतो त्याचें मन नेहमीं बुरसटलेलें असतें. त्याची प्रगति खुंटते.

उद्योगानें सर्व सोपें, आळसानें सर्व कठीण—उद्योग केला असतां सर्व कांहीं सुलभ वाटतें. पण आळशी मनुष्याच्या मार्गांत अनेक अडचणी असतात.

उद्योगानें सुख, रिकामपणीं दुःख—उद्योगी मनुष्य सुखी असतो व रिकामटेकडा मनुष्य नेहमीं कसल्यातरी काळजींत अगर दुःखांत असतो.

उद्योगाला धरण आणि आळसाला मरण—उद्योगी मनुष्याला संकटांतून पार होतां येतें, पण आळशी जो असतो तो मात्र पार बुडतो.

उद्योगु नातिल्लो आचारि चेलवां गांडि ताश्ता; उद्योगु नातिल्लो कुंबारु मात्तें थापटायिता—(गो.) रिकामा सुतार मुलांचीं ढुंगणें तासतो, किंवा रिकामा कुंभार डोकीं थापटतो. ' रिकामा न्हावी० ' पहा.

उद्योगे नास्ति दारिद्र्यं—उद्योगी मनुष्यास कधीं दारिद्र्य पीडा देऊं शकत नाहीं. सबंध श्लोकः- उद्योगे नास्ति दारिद्र्यं जपतो नास्ति पातकम् । मौनिनः कलहो नास्ति न भयं चास्ति जाग्रतः ॥ (मौनें च कलहो नास्ति नास्ति जागरतो भयम् ॥)

उद्योगें पैसा वाढतो, बसून खातां खुंटतो—उद्योग केला असतां आपल्या संपत्तींत भर पडते. निरुद्योगी बसून खाल्लें असतां जवळचा पैसा खर्च होऊन संपत्तीस ओहोटी लागते.

उद्योगी——उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः—उद्योगी पुरुष हा सिंहासारखा पराक्रमी व श्रेष्ठ असतो व त्यामुळें संपत्ति त्याच्याकडे चालून येते. सबंध श्लोकः— उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीर्दैवं हि दैवमिति कापुरुषा वदंति । दैवं निहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः ॥ -पंचतंत्र १.३६१. कृष्णमिश्र-सु. ?

उद्योगी मनुष्य भागे, गाढ मूढ निद्रा लागे—जो मनुष्य उद्योगांत गढलेला असतो त्यास दिवसभर श्रम पडतात म्हणून त्यास रात्रीं चांगली झोंप लागते.

उद्योगी यासी मिळे अवकाश, आळसा न मिळेचि खास—उद्योगी मनुष्यास काम केल्यानंतर फुरसत मिळते पण आळशाला कांहीं उद्योगच नसल्यामुळें अमुक वेळ फुरसतीचा असा त्याजवळ नसतोच, तो नेहमीं आपल्या सुस्तींतच असतो.

उद्योग्याची सद्दी जोरावर, आळशाला मंदी जन्मभर—उद्योगी माणसाची सारखी चलती असते तर आळशी नेहमीं हलाखींत दिवस काढतो.

उद्योग्याचें घर, सोडिती कोतवाल नाझर—उद्योगी वाईट चालीचा किंवा रिणको नसतो, म्हणून त्याजवर दिवाणी फौजदारी होण्याचा प्रसंग कधीं येत नाहीं.

उद्योग्याचे घरीं, लक्ष्मी नांदे परोपरी—उद्योगी मनुष्यास अनेक प्रकारचें वैभव प्राप्त होतें.

उद्योग्याचे घरीं, क्षुधा प्रवेश न करी—उद्योगी मनुष्याला उपाशी राहण्याची वेळ येत नाहीं.

उद्योग्याशीं ज्ञान, केवळ त्यास भूषण—मनुष्य उद्योगी असून जर शाहणा असेल तर त्याची योग्यता अधिक वाढते.

उद्योग्यास रिकामपण, वाटे ओझ्याप्रमाण—उद्योगी मनुष्यास रिकामें बसणें त्रासदायक वाटतें.

उधक——उधकापरसीं पात्तळ करप; उदकापरस पातळ करप—(गो.) पाण्यापेक्षां पातळ करणें. असंभाव्य गोष्ट. उदक पहा. पाणी पहा.

उधकारी माळ्यारी दोनी जत्तवे; उदकार माळ्यार दोन जातात व्हव ?—(गो.) पाण्यावर मारलें तर तें दुभंगतें काय ? पाणी काठीनें दुभंगणें अशक्य आहे. जलताडण व्यर्थ होय.

उधड——**उधड-डें घेणें**—ठेक्यानें घेणें; मक्ता घेणें; ठराविक रकमेस व ठराविक वेळांत एखादें काम करून देण्याचा करार करणें.

उधड माप—(व.) उक्तें माप; प्रत्यक्ष मापानें मापून न ठरवतां केवळ नजरेनें पाहून ठरविलेलें माप, प्रमाण.

उधरागति——**उधरागती जाणें**—मोक्षास जाणें; उद्धरणें; मुक्ति प्राप्त होणें. 'नरदेही येऊन सकळ । उधरागति पावले केवळ । येथें संशयाचें मूळ । खंडोन गेलें ॥'—दा १.१०.२०.

उधळ——**उधळपट्टी काढणें**—(चुकीनें) चांगली स्पष्टपणें, उघडपणें हजिरी घेणें (खरडपट्टी याच्या ऐवजीं उपयोग).

उधळपट्टी चालविणें—संपत्तीचा अपव्यय करणें; बेसुमार खर्च करणें; जवळचें द्रव्य हवें तसें बेहिशोबी खर्च करून टाकणें; अकारण व्यय करणें; वारेमाप खर्च करणें.

उधळभवानी-मावशी—खर्चिक स्त्री; लागेल तसा पैसा खर्च करणारी; वारेमाप पैसा खर्च करणारी; चैनीमध्यें द्रव्य वेंचणारी स्त्री.

ॐ **उधळ माधळ घाल गोंधळ; उधळ माधळ दिवसा गोंधळ; उधळ माधळ दिवस्यांचा गोंधळ**—अतिशय उधळपट्टी करणें; बेसुमार खर्च करणें व शेवटीं गोंधळांत पडणें. अव्यवस्थित कारभार असला म्हणजे म्हणतात.

उधळेपणाचा जन्म चमत्कार, भिकारी होऊन मरणार—उधळेपणाचा प्रथम चमत्कार वाटतो पण त्याचा शेवट भिक्षांदेहींतच होतो.

उधळेपणानें घालवी, तें काटकसरीनें जमवी—उधळेपणा करून जें घालविलें असेल तें काटकसर करून पुन्हां संपादावें.

उधळा——**उधळा घालणें**—१ उड्या मारणें; हैदोस घालणें; अतिशय दंगा करणें; धूडगूस घालणें. २ पळवून लावणें; मंत्रतंत्र वगैरेनें एखाद्याच्या अंगांतील पिशाच्चास घालवून देणें, अंगांतील काढणें.

उधान——**उधानाचें पाणी**—दररोज चंद्रोदय व चंद्रास्त यावेळीं भरती येते ती सामान्य असते पण पौर्णिमा व अमावास्या या दिवशीं जी भरती येते ती फार मोठ्या प्रमाणांत असून तिचें पाणी किनाऱ्यावर फार दूरवर पसरतें व किनाऱ्यावरील शेतांत किंवा बागांतहि कधीं कधीं जातें.

उधार——**उधार पाधार**—१ उधारीचा व्यवहार. २ उचापत; काढओढ; कर्जवाम वगैरे.

उधार बोलणें—वरवर बोलणें; तोंडदेखलें बोलणें; अंतःकरणापासून नव्हे तर केवळ औपचारिक बोलणें. 'कांहीं कल्पिसी संदेहो । उधार बोलणें कृतिम स्नेहो ॥'—मुरंशु १२९.

ॐ **उधार आणि अंधार; (व.) उधाऱ्याचा पुधार, खाटल्याखालीं अंधार**—उधारीनें जिन्नस आणावयाचा म्हणजे तो डोळे मिटून घ्यावा लागतो; तो मिंधेपणामुळें नीट पारखून घेतां येत नाहीं व दरदामाचीहि कसून चौकशी करतां येत नाहीं. यामुळें पुष्कळदां वाईट जिन्नस पदरांत पडून शिवाय मापामध्येंहि कमी भरण्याचा संभव असतो.

उधार घेणें व नीट तोल म्हणणें—वाण्याकडून रोख माल घेतला तरच तो बरोबर माल देतो. माल उधार द्यावयाचा असला म्हणजे तो भावांत थोडीफार कसर करतोच व उधार मागणारानें तोल बरोबर मागणें हें त्याला पटत नाहीं व संकोचामुळें तो मागतहि नाहीं व वाणीहि कधीं बरोबर देत नाहीं. तेव्हां अशा वेळीं बरोबर तोल मिळणें अशक्य असतें. तु०—उधारीचें पोतें सवाहात रितें.

उधार तेल खंवट—उधार आणलेलें तेल खंवटच असणार. चांगला माल पाहिजे तर रोख पैसे खर्चले पाहिजेत. वरीलप्रमाणें.

उधारीचा धंदा, तेथें कवडीचा फायदा—उधारीवर धंदा केल्यास आपणास भाव अधिक पडून सर्व फायदा मूळ मालधन्याला जातो व त्याचा अल्प वांटा धंदा करणाऱ्याच्या पदरीं पडतो. हें आपण माल उधार आणल्यास झालें. पण आपण जर उधारीनें गिऱ्हाइकास माल दिला तर वसुलीला कालगत लागून पुष्कळशी वसुली बुडते; त्यामुळें बहुतेक फायदा होत नाहीं.

उधारीचें खातें (पोतें), सव्वा हात रितें—उधार घेतलेला जिन्नस नेहेमीं गांवांत कमी व महाग पडणारच. उधार घेतल्या मालाचें पोतें भरून कधीं मिळावयाचें नाहीं. तेव्हां उधारी करूं नये, असा अर्थ.

उधारीनें हत्ती बांधवेल पण बकरी बांधवत नाहीं—हत्ती व बकरी हीं दोन्हीहि झाडांचा पाला खाऊन राहतात; पण हत्ती वाढलेल्या मोठमोठ्या झाडांचा पाला खातो त्यामुळें झाडें वाढण्यास फारशी हरकत होत नाहीं. पण बकरी झाडांस फुटणारे कोंवळे कोंवळे अंकुरच खाऊन टाकते; त्यामुळें कोणतेंहि झाड वाढूंच शकत नाहीं. याप्रमाणें बकरीची खादहि हत्तीपेक्षांहि विनाशक आहे म्हणून ती पुरवत नाहीं. त्यामुळें कांहीं दिवस हत्ती सांभाळवेल पण बकरी सांभाळवणार नाहीं. याप्रमाणेंच मोठ्या माणसाला खाऊं घालणें परवडतें पण लहान मुलाला पोसणें परवडत नाहीं.

उधारे मुतलें, तोंडा आयलें—(गो.) उताणे होऊन मुतलेलें तोंडांत आलें. आपल्या चुकीचें आपल्यास प्रायश्चित्त.

उधेल——**उधेल तोंड**—[उधेल = खवले, वण असलेलें] देवीचे वण असलेलें तोंड.

उनाड——**उनाड बाहुला**—भटक्या; स्वैर; स्वच्छंदी.

उनाड मैना—स्वैरिणी; भटकणारी, जिच्यावर कोणाचें दडपण नाहीं अशी स्त्री; अमर्याद स्त्री; जीस बाप, नवरा वगैरे कोणी आवरता नाहीं अशी स्त्री.

उन्मत्त——**उन्मत फो ×× लुगड्याक काळ**—(गो.) निरुपयोगी, गर्विष्ठ माणसाबद्दल म्हणतात.

उन्ह—'ऊन' मध्यें पहा.

उन्हुनीत असतांनाच कायतें करावें—लोखंड तापलें असतांच तें ठोकलें तर त्यास इष्ट तो आकार देतां येतो. त्याप्रमाणें संधि आली असतां त्याक्षणींच तिचा फायदा घ्यावा. तापल्या तव्यावर पोळी भाजून घेणें.

उन्हाळा——**घरादाराचा उन्हाळा करणें**—सर्व नाश करणें; सर्व उध्वस्त करणें; सर्व गोष्टींचा नायनाट करणें. 'मी म्हणतें नुसते दागिने नेले असते तरी बरें. पण घराचा उन्हाळा केला.' —नामदेव नाटक ७६.

⁂**उन्हाळा आच्छादन करी, पावसाळा प्रगट करी**—उन्हाळ्यांत जें जतन करून ठेविलेलें असेल तें पावसाळ्यांत बाहेर काढावयास सांपडतें. Winter finds out what summer lays up.

उन्हाळा जोगी, पावसाळा रोगी, हिंवाळा भोगी—निरोगी—उन्हाळ्यांत अंगावर कांहीं कपडे लागत नाहींत; माणूस जोग्याप्रमाणें उघडा असतो. पावसाळ्यांत रोगराई उद्भवते पण थंडींत माणूस निरोगी असतो व त्यावेळीं भूक चांगली लागते; पुष्कळ व उबदार कपडे घालून, उन्हउन्ह खाऊन ताजातवाना असतो. याप्रमाणें तीन ऋतूंमध्यें तीन विविध अवस्था असतात.

उपकार——**उपकार ठेवणें**—उपकार न फेडणें; दुसऱ्याचे उपकार न फेडतां त्याचें ऋण वाहात असणें; उपकाराची परतफेड न करणें.

उपकार बाळगणें-मानणें-न विसरणें-स्मरणें—कृतज्ञ असणें; उपकारांची जाणीव ठेवणें; केलेले उपकार स्मरणें. 'तेल आणुनि द्यावें घरां। तुमच्या उपकारा न विसरूं॥'

उपकाराक अपकारु करचो—(गो.) उपकाराबद्दल अपकार करणें; कृतघ्न होणें.

उपकारांनीं बांधणें—ऋणी करून ठेवणें; एखाद्याच्या वेळेवर उपयोगी पडून त्यास आपला मिंधा करून ठेवणें.

उपकारांनीं मारणें—१ अतिशय उपकार करणें; एखाद्यावर त्याला फेडतां येणार नाहींत इतके उपकार करणें; एखाद्याच्या अत्यंत उपयोगी पडून त्यास ऋणाईत करून ठेवणें. २ एखाद्यास आपल्या उपकारांनीं मिंधा करून ठेवणें. ३ एखाद्यावर उपकार करून त्याला आपल्या लगामीं पूर्णपणें लावून घेणें.

⁂ **उपकार उधार राहतो, पण अपकार जमेंत पडतो**—एखाद्यावर आपण उपकार केला तर तो लागलाच प्रत्युपकार करतो असें नाहीं; पण एखाद्यास अपकार केला तर तो मात्र त्याचा सूड शक्य तितक्या लवकर घेण्याचा प्रयत्न करतो व त्याचें फळ आपणांस लवकरच मिळाल्याशिवाय राहात नाहीं.

उपकार करणें, त्याची बढाई न सांगणें—आपण एखाद्यावर उपकार केला असतां त्याची वाच्यता करणें किंवा बढाई सांगणें हें उथळ मनाचें लक्षण आहे.

उपकार करावा हा धर्म, कोणाचा न घ्यावा तो उत्तम—आपण दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याचा प्रयत्न करावा पण दुसऱ्याचे मिंधे राहूं नये, दुसऱ्याकडून उपकार करून घेऊं नये.

उपकार केला आणि वाऱ्यानें गेला; उपकार केला, वायां गेला—आपण दुसऱ्यावर उपकार केला तर त्याची त्याला आठवण राहीलच असें नाहीं. बहुधां आपण ज्यावर उपकार करतों तो ते फेडतोच असें नाहीं. म्हणून उपकाराबद्दल प्रत्युपकाराची अपेक्षा करूं नये.

उपकार फेडतां वाटतो जड, त्याची हळू हळू करावी फेड—एखाद्याचा उपकार फेडतांना जरी आपणास फार कष्ट पडले तरी हळू हळू आपण त्याच्या ऋणांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करावा. Kindness will creep when it can not run—Scotch.

उपकार मागले, ठेवा मनीं चांगले—एखाद्यानें आपणावर उपकार केला असतां त्याला किती काल लोटला तरी त्याचा विसर पडूं देऊं नये. त्याबद्दल नेहमीं कृतज्ञ असावें.

उपकार विसरतो, पण अपकार स्मरतो—मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं, त्याच्यावर दुसऱ्यानें केलेल्या उपकारांची त्याला आठवण राहात नाहीं पण दुसऱ्यानें त्याचा अपराध केला असल्यास त्याची त्याला कधीं विस्मृति पडत नाहीं व त्याचें उट्टें काढण्याकरितां तो नेहमीं मनांत विचार करीत असतो.

उपकार स्मरतां मैत्री चालती, त्यावरून दुसरी जडली

जाती—आपल्या उपकारकर्त्याबद्दल आपण कृतज्ञ राहिलों असतां त्याचा आपला लोभ कायम राहतो, एवढेंच नव्हे तर त्यामुळें इतरहि आपणांशीं मैत्री करूं चाहतात. कृतघ्न माणसाशीं कोणी संबंध ठेवूं इच्छित नाहीं.

उपकाराची भागूबाई, दाल्ला विकून खोबरं खाई—(व.) नवऱ्याला विकून त्या पैशानें खोबरें खाणारी म्हणजे चैन उडविणारी भागूबाई (जहांबाज बायको) मोठी उपकारीच म्हणावयाची! अनुपकारी, आप्पलपोटी स्त्रीबद्दल व्याजोक्तीनें म्हणतात.

उपकाराची भागूबाई, बोट ठेवायला जागा नाहीं—भागूबाई ही दुसऱ्याला बोट ठेवण्यापुरती अल्प जागासुद्धां आपल्या घरांत कधीं द्यावयाची नाहीं. मग अडचणींत सांपडलेल्या प्रवाशाला तात्पुरती मुक्कामाला जागा ती देण्यास कबूल होईल हें अशक्यच. इतकी ती अनुपकारी, अनुदार वृत्तीची असते.

उपकारानें अपकार फेडावा—दुसऱ्यानें आपणास जरी अपकार केला तरी त्याबद्दल आपण राग न मानतां त्याचेवर उपकारच केल्यास तो अधिक शरमिंधा होतो व सूड घेण्यापेक्षांहि आपणास अधिक आनंद होतो.

उपकारानें उपकार फेडावा—उपकाराची फेड प्रत्युपकार करून करावी.

उपकारापेक्षां अपकार, ध्यानीं ठेविती फार—'उपकार विसरतो०' पहा.

उपकारी सांगेल तें खरं मानणें—आपल्या उपकारकर्त्यावर विश्वास ठेवावा.

उपकारीया लाभ होय, अपकारीया घडे अपाय—दुसऱ्यावर उपकार करणारा मनुष्य जगांत यशस्वी व वैभवसंपन्न होतो व दुसऱ्यास अपकार करणारा मनुष्य संकटांत सांपडतो.

उपकारीयांस देणें, हें व्याजाप्रमाणें—उपकार स्मरणाऱ्याला, कृतज्ञ असणाऱ्याला आपण साहाय्य केल्यास, याच्या उपकाराची फेड आपणांकडून कधींच होत नाहीं ही बुद्धि त्याच्या मनांत कायमच राहते व तो थोडथोडी फेड करीत राहातो. तेव्हां त्याची फेड आपल्या उपकारांवरच्या व्याजासारखी होते. जणूं काय आपण त्याच्याकडे उपकार व्याजींच लावले आहेत व तो व्याज देत आहे.

उपकारू केल्यारि अपकारू—(गो.) उपकार केला तर अपकार होतो.

उपजणें——उपजत रांगणें—उपजल्याबरोबर रांगावयास लागणें. एखादी गोष्ट उत्पन्न झाली नाहीं तोंच तिचा गाजावाजा करणें. एखादी गोष्ट उद्भवली नाहीं तोंच तिच्याबद्दल आपलें मत प्रगट करून तिच्याबद्दलची महती, पराक्रम इत्यादि बद्दल बढाई मारणें. २ एखाद्या वस्तूची भारी किंमत सांगणें; एखाद्या लहानशा गोष्टीस फार महत्त्व देणें; एखाद्या क्षुल्लक गोष्टीची फार तारीफ करणें. ३ एखाद्या अडचणीस तोंड देण्याची आपली लायकी हमखास सांगणें.

* **उपजल्या प्राण्यास मरण हें लागलेलेंच आहे**—या सृष्टीमध्यें उत्पन्न होणाऱ्या प्रत्येक प्राण्यास केव्हांना केव्हां तरी मृत्यु यावयाचा, ही गोष्ट ठरलेलीच आहे. जातस्यहि ध्रुवो मृत्यु र्ध्रुवं जन्म मृतस्य च। तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि॥ –गीता २.२७.

उपजरा——उपजऱ्यास येणें—अंग धरणें; पुष्ट होणें. 'पागेंत नेहमीं घोड्यांचे पायास आजार होऊन घोडीं जायाबंदी होतात. घोडीं उपजऱ्यास येत नाहींत.'–आडिवऱ्याची महाकाली पृ. ११४. उचजरा पहा.

उपट——उपट खाणें—१ उलटणें; एखाद्या रोगानें पुन्हा जोर धरणें. २ एखाद्या शत्रूनें, शिकारीच्या पशूनें पळून उलट हल्ला करणें. ३ चेंडू उसळणें; उशी खाणें. ४ प्रतिक्रिया होणें.

उपट घेणें-जेवणें—ओ येईतों खाणें; अधाशीपणानें खाणें.

उपटसुंभ—१ उपऱ्या; तोतया; अगांतुक; हक्क नसतां स्थानावर येणारा. 'नुकतेच परलोकवासी झालेले सातारचे जंगलीमहाराज यांना सरकार ५०० रुपये माहेवारी पेनशन देत होतें तेव्हां तर ते उपटसुंभ नव्हते ना?'–केसरी. २ लटपट्या; गुंड; उनाडटप्पू; रिकामटेकडा. ३ अलबत्या गलबत्या; उपरि; तात्पुरता; तात्कालिक.

उपटसूळ—अलबत्या गलबत्या; उपटसुंभ पहा. 'मरतेवेळीं एखाद्या उपटसुळास विनाकारण आपली दौलतहि त्यास देतां येणार नाहीं.'–टि ४.२७.

उपटणें——उपट सूळ खांद्यावर घेणें; उपटून सूळ खांद्यावर घेणें; उपट सूळ (की) घे खांद्यावर—एक मनुष्य एका शहरांतून चालला असतां त्यास वाटेंत एका ठिकाणीं एक सूळ पुरलेला आढळला. त्यानें तो उपटून खांद्यावर घेतला व तो पुढें चालूं लागला. सुळीं द्यावयाच्या मनुष्यासच त्याचा सूळ खांद्यावर घेऊन न्यावा लागत असे. तेव्हां राजदूतांनीं त्यास सुळीं देण्याची शिक्षा झालेला मनुष्य समजून नेऊन सुळीं दिला. यावरून, विनाकारण एखादें शुष्ककाष्ठ मागें लावून घेणें; रिकामा उद्योग लावून घेणें; आपण होऊन एखादी भानगड आपणावर ओढून घेणें; आपण होऊन एखादें लचांड मागें लावून घेणें.

उपडा——उपड्या घड्यावर पाणी व बहिऱ्याजवळ कहाणी (मूर्खाजवळ कहाणी); उपड्या घागरीवर पाणी—

व्यर्थ खटाटोप करणें; कारण घागर उपडी असतांना तिच्यावर कितीहि पाणी ओतलें तरी आंत एकहि थेंब जाणार नाहीं. 'पालथे घागरीं रिचवितां जळ। तुका म्हणे खळ तैसे कथे।' –तुगा २४२३. (गो.) उमथी कोळश्यारी उधाक रक्कप घालचे (उमथ्या कळशार उदक रकौप).

उपदेश——उपदेश ऐकणें, शिकवण घेणें—या दोन्ही गोष्टी फार हितकारक असतात.

उपदेश देणें व्यर्थ, मनीं नाहीं भावार्थ—ज्याच्या मनांत श्रद्धा किंवा विश्वास नाहीं त्याला उपदेश करून काय फायदा?

उपदेश देतां येतो, पण बुद्धि देतां येत नाहीं—एखाद्या मनुष्यास चांगला वाईट सल्ला देतां येतो पण त्याच्या मूळच्या बुद्धींत वाढ करतां येत नाहीं; ती ईश्वरी देणगी आहे.

उपदेश मोठ्याला, बागुलबोवा लहानग्याला—मोठ्या मनुष्यास एखाद्या गोष्टीपासून परावृत्त करावयाचें असल्यास त्यास नीट सांगून त्याची समजूत पटवून देणें चांगलें; लहान मुलासारखी बागुलबोवाची भीति दाखवून कांहीं उपयोग नाहीं, व उलट लहान मुलास उपदेश करून कळावयाचा नाहीं. तेव्हां योग्य–अयोग्य विचार करून उपाय योजना वगैरे करावी.

उपदेश म्हाताऱ्यास, जेवीं औषध मेल्यास—एखादा मनुष्य वृद्ध झाल्यावर त्याला त्याचा स्वभाव पालटण्याकरितां उपदेश करणें व्यर्थ आहे; कारण वृद्ध वयांत मनुष्याला आपला स्वभाव बदलणें शक्य नाहीं. ज्याप्रमाणें मेलेल्या मनुष्यास औषध पाजून कांहीं उपयोग नाहीं त्याप्रमाणें वरील खटाटोप व्यर्थ होय.

उपदेश येतो देतां, आचरण दुजे हातां—एखाद्या मनुष्यास चांगलें वाईट कसें वागावें तें सांगतां येतें पण प्रत्यक्ष वागणूक करणें हें त्याच्या हातांत असतें. तेव्हां आपण दिलेला सल्ला उपयोगांत आणणें त्याच्या मर्जीवर अवलंबून असतें.

उपदेशानें मार्ग लागतो, दृष्टांतानें समज होतो—उपदेश करून एखाद्या मनुष्यास चांगला मार्ग दाखवितां येतो पण तो उपदेश नीट ठसण्यास त्याला जर दाखला किंवा प्रत्यक्ष उदाहरण दिलें किंवा दाखविलें तर तो मनावर पक्का बिंबतो. नाहींतर नुसत्या सांगण्यानें त्याच्या मनावर तितका परिणाम होत नाहीं.

उपदेशिलें परोपरींनीं, पालथ्या घागरीवर पाणी—कितीहि उपदेश केला तरी ज्याला तो ऐकावयाचाच नाहीं किंवा ज्याच्या मनावर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं, त्याला त्याचा काय उपयोग? तो उपड्या घागरीवर ओतलेल्या पाण्याप्रमाणें फुकटच जावयाचा.

उपधातु——सात उपधातु—(अ) १ स्वर्ण माक्षिक, २ तार माक्षिक, ३ मोरचूत, ४ कांसें, ५ पितळ, ६ शेंदूर, ७ शिलाजित (आ) शरीरांतील गौण स्राव, उत्सर्गः—१ स्तन्य (दूध), २ रज, ३ वसा, ४ स्वेद, ५ दंत, ६ केश, ७ औजस्य (लसिका). –आपटे कोश

उपधान्यें—हीं १८ आहेत. (अ) १ सजगुरू, २ भादली, ३ वरी, ४ नाचणी, ५ वरग, ६ कांग, ७ खपले गहूं, ८ मका, ९ करडई, १० राजगिरा, ११ मटकी, १२ पावटा, १३ मूग, १४ वाल, १५ काराळा, १६ देवभात, १७ सातू, १८ अंबाडी. (आ) १ सजगुरा, २ नाचणी, ३ वरी, ४ मका, ५ मटकी, ६ राजगिरा, ७ शिरस, ८ पांढरफळी, ९ जिरा, १० मेथी, ११ वेणूबीज, १२ देवभात, १३ कमल बीज, १४ पाकड, १५ अंबाडी, १६ मेंडीबीज, १७ गोवारी, १८ कुडयाचें बीज.

उपनयन——उपनयनाच्या मांडवांत तिरडीचें साहित्य आणणें—मंगलकार्यांत अप्रासंगिक व अशुभ गोष्ट करणें.

उपपत्ति——उपपत्ति येणें—प्रतीति येणें; अनुभव येणें; पटणें; दाखला मिळणें. 'मज नये हे उपपत्ति। याचि लागीं।' –ज्ञा २.४९.

उपपुराणें——हीं अठरा आहेत. १ लघुकालिका, २ बृहत्कालिका, ३ पराशर, ४ सिंह, ५ नारद, ६ सनत्कुमार, ७ सौर, ८ दुर्वास, ९ कपिल, १० मानव, ११ विष्णुधर्मोतर, १२ शैवधर्म, १३ माहेश्वर, १४ नंदी, १५ कुमार, १६ औशनस, १७ देवी, १८ वरुण. या नांवांचे आणखी बरेच पाठभेद आहेत. अठरा पहा.

उपभोग——उपभोग घेणें हें ईश्वरी देणें—मनुष्याला पुष्कळ संपत्ति मिळाली तरी तिचा उपभोग घेणें नशीबांत पाहिजे. तु०–(हिं.) शौकदार इलाही है.

उपभोग घेतो त्याचा माल, संपादन करी तो धनपाल—जो मनुष्य संपत्ति मिळवतो तो केवळ तिचा रखवालदार असतो. तिचा उपयोग खरोखर जो उपभोग घेतो त्यालाच होतो.

उपभोग घेतो त्याची लक्ष्मी, संग्रहीं ठेवतां न पडे कामीं—वर पहा.

उपयोग——उपयोगी आणि सुंदर, त्यांचें काम निरंतर—जी गोष्ट दिसावयास सुंदर असूनहि उपयुक्त असते तिचा उपयोग वारंवार होतो. जी केवळ दिसावयास सुबक पण कोणत्याहि कामास येत नाहीं त्या वस्तूचा काय उपयोग.

उपयोगी पडत नाहीं आई, इतकी उपयोगी पडते शेजीबाई—आपले शेजारी–पाजारी केव्हां केव्हां आपणांस आपल्या निकटच्या आप्तांपेक्षांहि अधिक उपयोगी पडतात.

उपर——उपर खूप बने अंदरकी राम जाने; उपरकी खूब बनी, अंदरकी राम जानी—वरच्या देखाव्यावरून आंतली गोष्ट समजणार नाहीं. ती अगदीं निराळीच असेल. ती फक्त परमेश्वरालाच कळणार.

तेरा उपर मेरा—तुझ्यावर माझा; अहमहमिका; चढाओढ स्पर्धा. मनुष्य नेहमीं दुसऱ्यावर कडी करावयास पाहतो.

उपरका घडभाई; और नीचेको अल खुदाई—वरून दिसावयास सुंदर पण आंतून खराब अशा वस्तूबद्दल ही म्हण योजतात.

उपरकी टामटीम, अंदरकी राम जाने—वरून तर छान दिसतें पण आंतून कसें असेल कोणास ठाऊक ! बाह्य देखाव्याप्रमाणें आंत नसतें तेव्हां म्हणतात.

उपरणें—उपरणें झाडून निघणें—१ मोकळें होणें; संबंध सोडणें; एखाद्या गोष्टींतून अंग काढून घेणें. २ रागानें निघून जाणें; एखाद्या सभेंतून वगैरे मतभेद झाला असतां मध्येंच उठून जाणें.

उपरदवडा——उपरदवडा खांद्यावर लवडा—जो जबरदस्त मनुष्य असतो तो आपल्या मताप्रमाणें सर्व गोष्टी करतो व आपलाच हेका चालवतो; वरचढपणा करणारा नेहमीं आपली मिजास चालवतो. तु०—जबरदस्ताचे खांद्यावर.

उपरवळ्या——उपरवळ्या अंबट मागणें—[उपरवळ्या = वरून. अंबट मागणें = स्वतःवर ओढून घेणें (भांडण इ.)] एखादी भानगड उगाच आपल्या अंगावर घेणें. उपटसूळ घेणें, पहा.

उपरवांयां——उपरवांयां अंबट घेणें—एखादें लचांड विनाकारण आपल्यामागें लावून घेणें. विनाकारण भांडण तंटा उकरून काढणें; दुसऱ्याचें भांडण आपणावर ओढून घेणें.

उपराळणें——उपराळून येणें-भरणें-चालणें—(नदी वगैरे) भरून वाहणें; नदीचें पात्र दुथडी पुरानें भरून वाहणें.

उपराळा——उपराळा घेवप—(गो.) १नांव ठेवणें; आळ घेणें. २ एखाद्याचा कड घेणें; एखाद्याचा पक्ष घेऊन भांडणें.

उपरे——उपरे आले आणि धनि झाले—आगापिछा नसलेला एखादा मनुष्य येऊन मालक बनतो तेव्हां म्हणतात.

उपल——उपल प्रक्षेप—भारदस्त भाषेंतील प्रयोग. १ धोंडमार; दगड फेंकणें. २ आळ घेणें; शिवीगाळ करणें.

उपलाणा——उपलाणा-णी बसणें—घोड्यावर खोगीर घातल्याशिवाय बसणें. 'एक उपलाणी बैसले। पायबंद सोडूं विसरले।'—जै ७६.६०.

उपवर——उपवर मुलगी ही बापाच्या उरावरील शेगडी—बापाला उपवर मुलीच्या लग्नाची मोठी काळजी लागून राहिलेली असते. 'झाली ज्याची उपवर दुहिता। चैन नसे त्या तापवि चिंता॥'—शारदा.

उपवासी——उपवासी मरणें—भुकेनें व्याकुळ होणें; अतिशय क्षुधेनें पीडित होणें; अन्नान्न करीत असणें. 'मनांत म्हणे घरीं चाळें रोकडीं। उपवासी मरतील॥'—ह २९.६१.

* उपवासी निजावें, पण कर्जभरी न व्हावें (कर्जभरीत न उठावें)—खावयास नसल्यास उपाशी राहावें पण कोणाचें कर्ज काढूं नये. उपाशी राहण्यापासून होणाऱ्या दुःखापेक्षां कर्जापासून पुढें होणारें दुःख अधिक तीव्र असतें.

उपवेद——उपवेद—१ आयुर्वेद; २ धनुर्वेद; ३ गांधर्ववेद; ४ स्थापत्यवेद (किंवा अर्थशास्त्र).

उपशम——उपशमापेक्षां प्रतिबंध बरा—रोग प्रथम होऊं देऊन नंतर त्यावर उपाययोजना करण्यापेक्षां प्रथमच तो न होईल अशी काळजी घेणें हें अधिक चांगलें. तु०—Prevention is better than cure. प्रक्षालनाद्धि पंकस्य दूरादस्पर्शनं वरम्।—सुर १६३.४६२.

उपस्थित——उपस्थित होणें—हजर असणें; एखाद्या प्रसंगीं, समारंभास वगैरे स्वतः प्रत्यक्ष असणें.

उपहास——उपहास धुणें—फजिती टाळणें; झालेल्या थट्टेचें निरसन करणें; अपमानाचा निरास करणें. 'म्हणुनि व्यूह भेदुनि बा ! स्वयशें तूंचि मदुपहासा धू।'—मोद्रोण ३.१८.

उपाई——उपाई (यी) येणें—१ घोड्यानें पुढील पाय वर करणें; स्वार बसूं लागला असतां मस्ती करणें. 'इतकें बोलणें झाल्यावर बिजली पुढच्या पायांवर उपाइ येऊन गरकन् माघारी फिरली.'—पामो १०१.—छच ८०. २ निकरावर येणें; दुसऱ्यावर आवेशानें तुटून पडणें; जिकीरीस येणें.

उपाधि——उपाधीपासून राहे दूर, पापापासून रक्षी ईश्वर—जर आपण आपल्यामागें नसतें व्याप लावून घेतले नाहींत तर परमेश्वर आपल्या हातून पातक घडूं देत नाहीं.

उपाध्या——उपाध्या भेटणें—[उपाध्या = भामट्या] एखादी वस्तु चोरीस जाणें; कोणीतरी लांबविणें; पळविणें; कोणाच्या तरी हातीं लागून नाहीशी होणें.

* उपाध्या होण्यास, नलगे सायास—अध्ययनावांचूनहि भिक्षुकी करतां येते तेव्हां भिक्षुकीपेषा म्हणजे खरी विद्वत्ता नव्हे. मूळ इंग्रजी म्हण अशी : The habit does not make the priest.—सवि ३३८५.

उपाध्येपणाचें काम ब्राह्मणाला, लढाईचें काम क्षत्रि-

याला—ब्राह्मणाचें काम पौरोहित्य करणें व क्षत्रियाचें काम लढाई करणें हें आहे. तु०-(अ.) जेनूं काम तेनूं ठाय. (आ.) सिद्धं ह्येतद् वाचिवीर्यं द्विजानां बाह्वोवीर्यं यत्तुतत्क्षत्रियाणाम्। -उत्तरराम.

नवरा मरो कीं नवरी मरो, उपाध्याला दक्षिणेशीं (चें) कारण—केवळ आपलाच फायदा पाहणें; मध्यस्थ मनुष्य पुष्कळदां दोन्ही बाजूंच्या हितानहिताचा विचार न करतां केवळ आपल्या दलालीकडे पाहतो; पुढें मागें त्या व्यवहारापासून कोणाचें नफा-नुकसान होईल याची तो पर्वा करीत नाहीं.

उपाध्यास्तव करणें, आशा न धरणें—म्हणजे श्रमाचा कांहीं उपयोग न होणें, श्रम व्यर्थ जाणें. कारण उपाध्यायापासून मोबदला मिळण्याची आशाच नको. To work for the Bishop.-Spanish.-सवि ३८३२.

उपाय——उपाय चतुष्टय—१ साम, २ दाम, ३ दंड, ४ भेद.

उपाशी——उपाशी अन आटेगळ—उपवास पडण्या इतकें दारिद्य असूनहि आढ्यतेनें वागणारा.

उपाशी असलेल्याक उष्ट्याचो कंटाळो ना—(गो.) ज्याला मुळींच खावयास मिळत नाहीं तो उष्टें माष्टें कांहीं न पाहतां जें मिळेल त्यावर निर्वाह करतो.

उपाशी झोंपी जातो, तो सारी रात्र तळमळतो—पोट उपाशी असल्यास मनुष्यास स्वस्थ झोंप लागत नाहीं.

ब्राह्मणाला उपाशी ठेऊं नये आणि मुसलमानाला जेवायाला घालूं नये—ब्राह्मणाला प्रथम लाभ झाल्याशिवाय तो काम करीत नाहीं व मुसुलमान आधींच लाभ झाल्यास ते मागाहून काम करीत नाहींत. याकरितां ब्राह्मणाला काम करण्यापूर्वीं संतुष्ट केलें पाहिजे व मुसलमानाला मागाहून संतुष्ट करावें.

उपाशी मागती भाकर शिळी, देव देतो साखर पोळी—उपाशी मनुष्य शिळी भाकरहि खावयाला राजी असतो पण त्याला जर देवानें साखरपोळी दिली तर त्याला अधिकच आनंद होणार हें उघड आहे. अपेक्षेपेक्षां अधिक लाभ होणें. तु०-अंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन.

उपाशागेर शेळें खंचें?;-उपाशागेर कोण खीं शेळें सोद्तालो—(गो.) उपाशी राहणाऱ्याच्या येथें शिळें कुठलें? तेव्हां तेथें शिळें शोधणार तरी कोण?

उपाशा घरीं शिळें आणि मागावयास जाईल तें दुधखुळें—ज्याला स्वतःलाच पोटभर खावयास न मिळाल्यामुळें उपाशी रहावयाची पाळी आली असेल त्याचेकडे शिळें अन्न कोठून असणार? त्याला पुरेल तरच ना उरून शिळें होणार. तेव्हां ज्याच्याकडे त्यालाच पुरेसें नाहीं तो दुसऱ्याची गरज काय भागवूं शकेल. तु०-एकादशीच्या घरीं शिवरात्र. उघड्यापाशीं नागडें गेलें० इ.

उपाशाचे घरीं ढेंकणाचा सुकाळ—आधींच खावयास न मिळाल्यामुळें उपाशी पोटीं झोंप येत नाहीं, त्यांत ढेंकूण खूप असून ते चावूं लागल्यास अंगांत असलेलें रक्तहि शोषून घेतात व झोंपहि मुळींच मिळूं देत नाहीं. मिळून अतिशय दैना होते. दारिद्र्यांत आणखी आपत्ति. गरीबांना चोहोंकडून हालअपेष्टा भोगाव्या लागतात.

उपास——उपासतान काढणें—अन्नपाण्याशिवाय हालांत दिवस कंठणें.

उपासतान पाहणें—एखाद्याच्या स्वास्थ्याकडे नजर देणें.

उपासाची चूल करणें—प्रथम खरकटा स्वयंपाक झालेला असल्यास चूल धुऊन पुसून साफ करून निरशनाचे जिन्नस तयार करण्यास योग्य करणें.

*** उपास केला (आणि) दोन रुपये फराळाला**—तोंडानें उपवास केला असें म्हणावयाचें व फराळाकरितां दोन रुपये खर्च करावयाचे. म्हणजे जेवणापेक्षांहि अधिक खर्च करून व खाऊन पुन्हां उपाशी म्हणावयाचें. बाजवीपेक्षां जास्त घेऊनहि असमाधान दाखविणाऱ्यास म्हणतात.

उपास तापास बरा, नको हा संसाराचा पसारा—संसाराची दगदग करून पोटभर जेवण्यापेक्षां थोडे कमी श्रम करून अर्धपोटीं राहिलेलें पतकरलें. अशी वृत्ति संसारास कंटाळलेल्या लोकांची असते.

उपासांनीं देव मिळे तर दुष्काळांत गेलें काय थोडें?—उपासतापास करून देव पावत असेल तर दुष्काळांत कितीतरी उपाशी असतात, त्यांना कां देव भेटत नाहीं? व ते कां मरतात?

उपासामागें पारणें आणि पारण्यामागें उपास—प्रथम उपवास केल्यानंतर तो सोडावयाचा म्हणून पारणें केलेंच पाहिजे व तें करतांना अजीर्ण झालें म्हणून पुन्हां उपवास केला पाहिजे; याप्रमाणें हें रहाट-गाडगें चालतच राहावयाचें.

उपासाला केळें, अन् वनवासाला सिताफळें—उपवास करणाऱ्यास केळीं खाणें चांगलें; कारण त्यांनीं चांगली भूक धरतें व तसेंच रानांत मिळणाऱ्या फळांमध्यें सीताफळासारखीं उत्तम फळें नाहींत. म्हणजे ज्या त्या परिस्थितींत प्राप्त साधनेंच उपयुक्त असतात.

उपासी——उपासी अनासी-तापासी-कराडी-पोटी—उपाशी पहा. १ अन्नाशिवाय, भुकेला; अन्न न मिळालेला, २

उपवास केलेला; निरशनाचें व्रत असणारा.

उपासीतापासी बसणें—कांहीं न खातां राहणें; हाल करून घेणें; त्रागा करून उपाशी राहणें.

उपासी पोटीं अन्न ठेवणें—आपण उपाशी राहून दुसऱ्यास अन्न ठेवणें. (शुद्ध सेवेचा एक प्रकार).

उपासी मरणें—भुकेनें व्याकूळ होणें; अन्नान्न दशा होणें; अन्नावांचून तरफडणें.

उपेगा——उपेगा येणें—उपयोगी पडणें; कामास येणें. 'येथें येता न भागा त्वरित हरजगा तीर्थ आलें उपेगा।'—ब ६८७. उपयोग पहा.

उफराटा-टी-टें——उफराटी गंगा—(उलट दिशेनें वाहणारी गंगा) संसार रहाटी; माया. संसारास नेहमीं उलट दिशेनें वाहणाऱ्या नदीची उपमा देतात. 'उफराटी गंगा पाहतां मिळणें। सकळांस तेथें॥'—दा ११.७.११.

उफराटी दुनिया—उलटें जग; अव्यवस्थित कारभार; बेबंदशाही; अंदाधुंदी; कशास कांहीं मेळ नाहीं अशी स्थिति.

उफराटें भांडण—कृतघ्नतेचें भांडण; स्वतःची चूक असतां ती दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करण्याच्या इच्छेनें केलेला तंटा.

उफराटें शहाणपण—मूर्खपणा; अति शहाणपणा; शहाणपणाच्या उलट गोष्ट.

उफराट्या काळजाचा—उलट्या काळजाचा; साहसकर्मी; अत्यंत निष्ठुर मनुष्य.

* उफराटा न्याय, गालगुंडे खाय—ज्याची तक्रार असते त्याला न्याय मिळण्याच्या ऐवजीं त्यासच शिक्षा होणें.

उफराटें करतो, तो मूर्ख दिसतो—जो मनुष्य जगाच्या राहाटीच्याविरुद्ध वर्तन करतो त्याला सर्व लोक नांवें ठेवतात.

उफाडा——उफाड्याची जमीन, उफाड्याचें शेत—सुपीक जमीन; अत्यंत जोरदार पीक येणारी जमीन; जीमध्यें पीक फार जोरानें वाढतें असें शेत.

उफाड्याचें हाड—ज्या मनुष्याची वयाच्या मानानें वाढ अधिक झालेली दिसते अशा मनुष्याबद्दल योजतात. सशक्त, जोरानें वाढणारें शरीर.

उफाड्यानें वाढणें-वाढीस येणें—जोरानें वाढणें; वयाच्या मानानें अधिक गतीनें वाढणें; वयाच्या मानानें फार मोठें दिसणें.

उफार——उफार शेट्या—कृतघ्न; उफराटें वागणारा; मित्रावरच उलटणारा; उलट वागणूक करणारा.

उबजणें——उबजल्लेकडे एकादशी, दिल्लेकडे शिवरात्री—(गो.) जन्मलेल्या ठिकाणीं (माहेरीं) एकादशी, दिलेल्या ठिकाणीं (सासरीं) शिवरात्र.

उबजरा——उबजऱ्यास येणें—पुनरुज्जीवन होणें; पुन्हां टवटवीत होणें; ताजेतवानें होणें. उपजरा पहा.

उबणें——उबत ठेवणें—१ पिकण्यासाठीं उबेंत ठेवणें; वाफ देणें; ऊब देणें. २ एखादी गोष्ट दिरंगाईवर टाकणें; एखादी गोष्ट योग्य संधि येण्याची वाट पाहण्याकरितां स्थगित ठेवणें.

उंबर——उंबराचें फूल—उंबराचें फूल आंत असल्यामुळें दिसत नाहीं. त्यावरून तें नसतें असेंच समजतात. दुर्मिळ वस्तु, कधीं न दिसणारी, न घडणारी, नसणारी अशी. 'आतांशा अगदीं उंबराचंच फूल झालं आहे.'—सागोप्र ३.१.

उंबरास फुलें येणें—अशक्य गोष्ट. वर पहा. 'मुंबई, संयुक्त प्रांत, बिहार इत्यादि प्रांतांत कॉंग्रेसचेंच ठणठणीत बहुमत आहे. त्या प्रांतांत विरोधी पक्षांची मोट बांधण्याचा व मंत्रिमंडळ उभें करण्याचा त्या त्या गव्हर्नरांनी प्रयत्न केला तरी त्यांस यश येणें सध्याच्या स्थितींत तरी पश्चिमेस सूर्य उगवणें किंवा उंबरास फुलें येण्याइतकें अशक्य आहे'.—केसरी ३-११-३९.

उंबरें फोडून कॅबरें काढणें—उंबर फोडलें म्हणजे आंत नुसतीं कॅबरें (जंतू) निघतात. लहानशा गोष्टीसाठीं मोठयाचा नाश करणें.

* भरलें पोटा उंबर कडु—[उंबर = एक गोड पक्वान्न] पोट भरलें असल्यावर गोड पक्वान्नहि नकोसें होतें.

उंबर पिकलें आणि नडगीचे डोळे आले; उंबरें पिकलीं ऽ स्वलांचे डोळे आले—ज्याच्या नशीबांत सुख भोगावयाचें नाहीं त्याला वैभव मिळालें तरी किंवा संधि आली तरी त्याचा योग्य उपयोग करून घेणें कांहीं तरी कारणामुळें अशक्य होतें. तु०—निंबाला आल्या निंबोण्या आणि कावळयाला झाला मुखरोग.

भटो तुमचें पोट हो कां वांकडें: तर म्हणाला, उंबर राहिलें म्हणजे झालें—पोट हें अन्न सांठवण्याचें साधन आहे; तें काम त्यानें केल्यावर त्याच्या आकाराकडे लक्ष्य देण्याचें कारण नाहीं. मुख्याची गोष्ट बरोबर असल्यावर आनुषंगिक गोष्टीकडे लक्ष्य देण्याचें कारण नाहीं.

उंबराचे फुलाची आणि तुझी भेट सारखीच—क्वचित् काळीं घडणारी गोष्ट.

उंबरांतील प्राण्यास उंबरच ब्रह्मांड—कूपमंडूक वृत्ति.

उंबरघाट——उंबरघाट—घराचा उंबरठा.

उंबरघाट ओलांडणें-सुटणें—घरांतून बाहेर पडणें (नोकरी, धंदा, काम इ. साठीं); कोणत्याहि कारणासाठीं घर सोडून बाहेर जाण्याची पाळी येणें.

उंबरघाट सुटणें महा (कर्म) कठिण—मनुष्याला आपलें घर सोडून जाणें फार जिवावर येतें.

उंबरघाट सुटेना नि कुटुंबकर्ज फिटेना—(क.) बाहेर पडल्याशिवाय घराचें कर्ज फिटत नसतें. घरीं बसून उद्योग काय मिळणार व पैसे काय मिळविणार.

उंबरठा——**उंबरठा चढणें**—उंबरा चढणें; प्रवेश करणें; आंत येणें. 'चांगला सुतारसुद्धां तुमच्या शाळेचा उंबरठा न चढतां वीस पंचवीस रुपये सहज मिळवितो.'—आगरकर.

उंबरठे झिजविणें-पूजणें—हेलपाटे घालणें; खेपा करणें; एकसारखी ये जा करणें. 'त्यांचेही उंबरठे झिजवून झिजवून दमलों !'—उग्र १.३.—शाब ३.४९.

उंबरा——**उंबरा चढणें**—शिरणें; प्रवेश करणें; येणें. उंबरठा चढणें पहा.

उंबऱ्याची साल काढणें, उंबऱ्याला माती राहूं न देणें—वरचेवर खेपा घालणें; एखादें काम करून घेण्यासाठीं वारंवार हेलपाटे घालणें. 'उंबरा झिजविणें' पहा.

उबारा——(द्रव्याचा वगैरे) **उबारा असणें**—जवळ विपुल द्रव्यादि असणें; भरपूर पैका असल्यामुळें निश्चितता असणें; समृद्धि असणें. (गो.) उबाऱ्यापर आसन.

उबो——**उबो आस मेरेन लाखाचो, मरत कूच फुकाचो**—(गो.) माणूस जिवंत आहे तों त्याची किंमत लाख रुपये, मेल्यावरोबर शून्य.

उभय——**उभयपक्षीं अडचणी येती, उपाय कांहीं न सुचती**—सर्व बाजूंनीं अडचणी येऊं लागल्या म्हणजे कांहीं सुचेनासें होतें.

उभा-उभी-उभें——**उभा असणें**—१साहाय्यक असणें; पाठीशीं असणें. २ तयार असणें; उत्सुक असणें; सिद्ध असणें.

उभा इंद्र करणें—पुन्हां आरंभ, सुरुवात करणें (काम धंदा इ. स).

उभा करणें—१ थांबविणें; बंद करणें; गति रुद्ध करणें. २ रचणें; उभारणें; तयार करणें; बांधणें. ३ उत्पन्न करणें; आणणें; यावयास लावणें. 'शिवाजी महाराजांच्या नेत्रांतून देखील अश्रू उभे केले'—ईप. १०६.४ कांहीं काळ थोपवून धरणें; स्थगित करणें.

उभा जाळणें—अतिशय जाच करणें; अत्यंत हाल करणें; अतिशय छळणें.

उभा ठाकणें—समोर येणें; पुढें येऊन उभे राहणें; प्रत्यक्ष होणें. 'संगतीच्या लोकांचा भोग। उभा ठेला॥'—दा १२-९-२४.

उभा दावा; उभें वैर—हाडवैर; न मिटणारें भांडण; सारखें सतत चाललेलें भांडण. 'जावा जावा उभा दावा'.

उभा धरणें—छळणें; त्रास देणें; विश्रांति मिळूं न देणें.

उभा नासणें—सर्व नाश होणें; अगदीं सर्व नासून जाणें; सर्व फुकट जाणें. 'जे शब्दीं वदोनि उभा। संसार नासी॥'—दा १-२-९.

उभा नाहणें—घाम वगैरेमुळें सर्वांग ओलें चिंब होणें; पाझरणें, निथळणें (सर्वांग घाम इ नीं)

उभा पहारा—१ खडा पहारा; न बसतां सारखें उभे राहून सतत ठेवलेला पहारा; विश्रांति न घेतां एकसारखी नजर ठेवणें. २ एकसारखी सेवा चाकरी, शुश्रूषा. ३ विश्रांति न घेतां केलेले कष्ट.

उभा पाऊस—१ लंब रेषेंत ज्याच्या धारा पडतात असा पाऊस. याच्या उलट 'वांकडा पाऊस'. २ एकसारखा पडत असलेला पाऊस; भर पाऊस.

उभा बाजार—या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सर्व बाजार; सर्व बाजार पेठ; हमरस्ता.

उभ्या बाजारांत—चार चौघांत; जाहीरपणें; सर्वांदेखत. 'उभ्या बाजारांत कथा। हें तों नावडे पंढरिनाथा॥'

उभा मार्ग—१ राजरस्ता; हमरस्ता; गांवांतील मुख्य रस्ता. २ सरळ रस्ता; वळणें नसलेला थेट रस्ता ३ चोख व्यवहार; शहाजोग व्यवहार. ४ या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सर्व रस्ता; कोणतेंहि घर न वगळतां एखाद्या रस्त्यावरील सर्व घरें, जागा वगैरे.

उभा राहणें—१ मिळणें; प्राप्त होणें. २ घडणें. ३ (संकट) उपस्थित होणें. ४ आड येणें. ५ अनुकूल असणें. 'उभे राहिलें भाग्य बिभीषणाचें।'—राक १.७१. ६ साहाय्य करणें; मदतीस तयार असणें. 'बहुत जन वास पाहे। वेळेसी तत्काळ उभा राहे।'—दा १९-४-११.

उभाशिवार टाकून जाणें-पळणें—एखादी परचक्र वगैरे सारखी मोठी आपत्ति आली असतां शेतांतील पीक, चीजवस्त वगैरे जशीच्या तशी टाकून पळ काढणें, परांगदा होणें; बरोबर कांहीं न घेतां देशांतर करणें.

उभा होणें—थांबणें; बंद होणें; स्थगित होणें; तात्पुरतें बंद पडणें.

उभी चतुर्थी-चौथ—कृष्ण पक्ष्यांतील चतुर्थी. यांत सूर्योदयापासून चंद्रोदयापर्यंत उभें रहाण्याचें व्रत कांहींजण पाळतात.

उभें काम—१ निकडीचें काम; अगत्याचें, अत्यंत जरूरीचें

काम; जिकडे लक्ष्य देणें अत्यंत जरूर आहे असें काम. २ चालू काम; अर्धवट होऊन थांबलेलें पण लागलीच चालू करावयाचें काम.

उभें खाणें--समूळ नाहींसें करणें; सर्व गिळंकृत करणें; सर्वांचा स्वाहा करणें. 'लोह उभें खाय माती ।'-ज्ञा १८.१४०७.

उभें दुखणें--अंथरुणास न खिळविणारें दुखणें; ज्यामध्यें निजून राहणें आवश्यक होत नाहीं असा आजार. सामान्यतः चाल चलाऊ कामें करतां येतात असा आजार.

उभे दोन प्रहर—उभी दुपार; भर दोन प्रहर; माध्यान्ह; ऐन दुपारची वेळ.

उभें नेसणें-घेणें-लावणें-लावून येणें--१ लुगडें, धोतर इ. अंगामोंवतीं अर्धवट गुंडाळणें. २ पडदणी नेसणें; तात्पुरतें कसेंबसें वस्त्र नेसणें.

उभें पळणें—न थांबतां एकसारखें पळणें.

उभें पीक--शेतांत तयार झालेलें पण न कापलेलें पीक.

उभें वारें--१ गडबड; गोंधळ; घांदल; धांवपळ. २ उदासीनता; तटस्थता.

उभें वारें सुटणें--अस्वस्थ वाटणें; चैन पडेनासें होणें; मन अस्थिर होणें; चलबिचल होणें.

उभें वैर; उभा दावा--सतत चालणारें भांडण; न मिटणारें वैर; दीर्घकालपर्यंत चालणारा तंटा.

उभें सुकणें--१ झाड उभें असतांच सुकणें. २ काळजीनें कृश होणें; चिंतेनें वाळणें. 'लेंकरूं वांचेनि दुःखें । जेंवि माउली उभी सुके ।'-ऋ ४६.

उभ्या उंटावर शिडी लावून चढणें--उंटाला उभा करून त्याला शिडी लावून चढण्याची यातायात करण्यापेक्षां त्याला खालीं बसवून त्यावर बसणें सोपें नव्हे काय? विनाकारण एखादी गोष्ट कठिण करून करणें, किंवा वांकड्या मार्गानें वळसा घेऊन जाणें. तु०-द्राविडी प्राणायाम.

उभ्यां घाई--१ अत्यंत उतावीळपणानें, घाईघाईनें, उत्कटतेनें (एखादी गोष्ट करणें). २ अतिशय आग्रहानें, कळकळीनें (विनवणें, प्रार्थना करणें, धांवणें वगैरे).

उभ्या जन्मांत--सर्व आयुष्यांत; सर्व हयातींत. 'धृतराष्ट्रानें ही करामत उभ्या जन्मांत एकदांच केली.'-भा ३९.

उभ्या पायानें—विश्रांति न घेतां; सतत उभें राहून; फार तत्परतेनें; फार कष्ट घेऊन. 'शंकरजी व परशुराम हे दोन महत्त्वाकांक्षी ब्राह्मण नेहमीं बाईसाहेबांच्या तैनातींत उभ्या पायानें असतात.'-स्वप १३१.

उभ्या मार्गानें जाणें-येणें—१ सरळ मार्गानें, न थांबतां जाणें; वाटेंत मुक्काम न करतां थेट उद्दिष्ट ठिकाणीं जाऊन पोंचणें; पेणें न करतां जाणें. २ सरळ, राजरोस वर्तन करणें; उघडा व्यवहार करणें; चोख, उघड कारभार करणें.

उभ्या मालाची पाहाणी--शेतांतील पिकाचा अंदाज; शेत कापण्यापूर्वी पीक उभें असतांच उत्पन्नाचा केलेला अंदाज.

❀ **उभा इंद्र नागवा**—१ एकटा इंद्र जर असाहाय असेल, त्याजबरोबर त्याचा परिवार नसेल तर त्याची कांहीं किंमत नाहीं. इंद्राचें ऐश्वर्य त्याच्या व्यक्तींत नसून त्याच्या मानाच्या स्थानांत आहे. इंद्रपदामुळें इंद्राला महत्त्व आहे. २ गौतमाच्या शापानें इंद्राला सर्व अंगावर भगेंद्रें पडलीं होतीं. तेव्हां कोणतेंहि अंग बाहेर असलें तर तो नागवा असल्याप्रमाणेंच होई. यावरून सबंधच्या सबंध नागवेपण.

जावा जावा, उभा दावा--दोन जावांचें कधीं पटत नाहीं, त्यांचें नेहमीं सारखें भांडण होत असतें.

उभा रेट नी मुसळ भट--ज्या माणसाच्या ठिकाणीं अगदीं लीनता नाहीं अशाबद्दल म्हणतात. आडदांड गडी.

उभें कुसळ व आडवें मुसळ--कुसळ उभें असतां घातुक असतें व मुसळ आडवें मारलें तर अपायकारक असतें; तेव्हां त्या स्थितींत तें टाळावें. इतर स्थितींत तें निरुपद्रवी असतें.

उभ्या कुळंब्याचा संसार, पडल्या श्रीमंतापेक्षां थोर--एखाद्या गरीब उद्योगी शेतकऱ्याचा संसार, डबघाईस आलेल्या श्रीमंत मनुष्याच्या संसारापेक्षां अधिक सुखाचा असतो.

उभ्या श्रम भारी, देणगी थोडी, हरदासाची आशा मोडी—हरदासास सारखें उभें राहून कथा करावी लागते. त्यामानानें जर त्यास बिदागी मिळाली नाहीं तर तो पुन्हां त्याठिकाणीं कीर्तनास येणार नाहीं. श्रमाच्या मानानें जर मोबदला मिळाला नाहीं तर निराशा होते.

उभ्यानें मुतावें आणि उपाध्यास पुसावें; उभ्यानें मुतायचें मग गुरूस काय पुसायचें (विचारायचें)--स्वतः होऊन गैर गोष्ट करावयाची आणि नंतर ती योग्य कीं अयोग्य याबद्दल चौकशी करीत बसावयाचें, हा मूर्खपणा आहे.

उभ्यानें यावें, ओणव्यानें जावें—येतांना ताठ्यांत, डौलांत आलों तरी जातांना नम्रता ठेवून जावें. नेहेमींच ताठा ठेवूं नये. प्रसंग पडेल तसें वागावें.

उभाउभी---उभाउभी--त्वरेनें, ताबडतोब; उभ्या उभ्या; बसण्याइतकी सुद्धां फुरसत नसतां; तात्काल. 'उभाउभी फळ । अंगीं मंत्राचिया बळ ॥'-तुगा २४.७२.

उभाउभी भेटणें--अगदीं थोडा वेळ, घाईत भेट होणें. -मो. आर्याकेका ४६.

उभाउभी येणें--घाईघाईनें येऊन जाणें; एखाद्याच्या घरीं जावयाचें परंतु तेथें न थांबतां, न बसतां तसेंच लगोलग परत यावयाचें.

उभारणें--उभारणीस येणें--फळ येण्याच्या बेतास एखादें कार्य पोंचणें; एखादें काम शेवटास जाणें; सिद्ध होण्याच्या बेतास येणें.

❀ उभारले राजवाडे, तेथें आले मनकवडे-श्रीमंत मनुष्याच्या भोंवतीं त्याच्या मनांतलें ओळखून त्याप्रमाणें वागणारे लोक, खुषमस्करे वगैरे जमतात.

उभाल्लॅलॉ फार दोवोन्नाा जावप--(गो.) उगारलेला वाव (प्रहार) घातल्याशिवाय न राहाणें.

उभारा--उभारा धरणें--तयार होणें; सिद्ध असणें; पुढाकार घेणें; उद्युक्त होणें. 'परित्राणाय साधूच्या उभारा, धरी निवटाया सर्व भूमिधारा।'-देवनाथ-कृष्णजन्म ३८.

उमज--उमज समज--वरवरचें ज्ञान; तात्पुरती समजूत; उथळ ज्ञान.

उमजणें--उमजला तर भिल्ल, नाहीं तर कुत्रीचें पिल--अडाणी माणसास एखादी गोष्ट नीट समजावून सांगितली व एकदां त्याला ती पटली म्हणजे तो ती जिवाची पर्वा न करतांहि करील; पण त्याला नीट समजली नाहीं तर तो कुत्र्याच्या पिल्लाप्रमाणें व्यर्थच केकाटत राहील; त्याचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं; उगाच ओरड मात्र करील.

उमठा--उमठ्यार रावण काडप--(गो.) 'अंगठ्यावरून दशासुर निर्माण करणें' पहा.

उमठ्यार रावण, पांरवाचो पारवो--(गो.) पराचा कावळा, याप्रमाणें.

उमथी--उमथी जालारीय नाक उधारी; उमथी जाल्यारूप नाख उदारे--(गो.) पालथी पडली तरी म्हणते कीं माझें नाक जमीनीला लागलें नाहीं! पराभव कबूल न करणें. उताणा पडला तरी माझें नाक वरच.

उमथ्या कळ्यार उदक--(गो.) उपड्या घड्यावर पाणी.

उमदा--उमदे माणसास हलकें काम व हलके माणसास उमदें काम, सहसा न सांगावें--(निजाम उल्मुल्क) ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें काम द्यावें.

उमर--उमर पत्तराला असते, फुलाला नसते--दगडाला आयुष्य अखंड पण फूल थोडेच दिवस टिकतें. यावरून चांगल्या वस्तूला दीर्घायुष्य नसतें.

उमस--उमस-उमास खाणें--विश्रांति घेणें; दम टाकणें.

उमळ--उमळ-उमाळ-उमाळा पडणें--अतिशय पाऊस पडल्यानें पीक कुजावयास लागणें.

उमळणें--उमळयाक पाड आनी जेंवक वाड--(गो.) [उमळणें = कपडे धुणें, खळबळणें] कपडे मात्र धुतां येत नाहींत आणि म्हणे जेवावयास वाढ. आळशी माणूस उद्योग न करतां दुसऱ्याचे फुकट खातो.

उमाठा--उमाठ्यास येणें--पडणें; होणें; स्पष्ट, ठळक दिसूं लागणें. 'उमाठ्यावरी येतसे सूर्य जेव्हां, पळाली निशा चंद्र निस्तेज तेव्हां।'

उमाप--उमाप लगीन सावधान--द्रव्याची उधळपट्टी; भरमसाट, वाटेल तसा व वाटेल त्या कामीं केलेला खर्च.

उमाळीं--उमाळीं-उमाळीस-उमाळ्यास पडणें-येणें-उघडकीस येणें; बभ्रा होणें; माहीत होणें; स्पष्ट होणें.

उमेद--उमेदीस येणें--१ वयांत येणें; स्त्री तारुण्यांत येणें; पणांत येणें. २ भरभराटणें; जोमांत येणें; बरकतीस येणें. ३ बहर येणें; मोसम येणें.

उरक--उरक उरकणें--१ पार पाडणें; पुरें करणें; तडीस लावणें. २ दुसऱ्याच्या कामांत मध्येंच पडणें; ढवळाढवळ करणें.

उरक पडणें--संपविण्याची जबाबदारी अंगावर घेणें, पडणें; एखादें काम अंगावर पडून तें तडीस न्यावें लागणें.

उरणें--उरता करणें--बाकी ठेवणें; कांहीं अंश मागें ठेवून करणें; पुरतेपणीं न संपवतां थोडेसें शिलक ठेवणें; उरवणें.

❀ उरला पदार्थ वांचवी, पुढले साहित्या लावी--काटकसर करून निर्वाह करणें.

उरले (लोक) त्यांनीं मोडलें तेंच घडावें--एखादें काम करीत असतांना तें अपूर्ण राहिलें असतांच कांहीं लोकांची वाताहत झाली किंवा कांहीं मेले तर उरलेल्यांनीं तें काम अर्धवट न सोडतां नेट धरून तें पूर्ण केलें पाहिजे.-रा ६.५१५. -नारायण व्यवहार शिक्षा (रा ४).

उरता--उरता न धरणें--[उरता = भीड मर्यादा] भीड न धरणें; कोणाची मुरवत न ठेवणें; आस्था नसणें; मान न ठेवणें.

उरवठा--उरवठ्यास पुरवठा; उरोठ्याला पुरोटा--१ उणें पडेल तें पुरें करणें. २ दुष्काळांत तेरावा महिना.-केसरी २५-१-३८.

उरस्फोड, उराड--ऊर पहा.

उरें बुरें——उरें बुरें बोलणें—उणें दुणें काढणें; घालून पाडून बोलणें. 'आज माझ्या आनंदाचा मुद्दाम विरस करण्याकरतां एकाद्या सवतीसारखें उरें बुरें कां बोलते आहेस?' –उग्र ५.२.

उलग——उलग वारणें–वारून टाकणें—वेठ वारणें; आपल्या बांट्याचें काम कसें तरी करून टाकणें.

उलट——उलट घेणें—हरकत घेणें; प्रतिबंध करणें; प्रतिकार करणें.

उलट ढाल, उलटी ढाल—१ सैन्याचा मोर्चा माघारी वळविणें. २ फितूर होणें; परपक्षास मिळणें.

उलटणें——उलटून गोष्टी सांगणें—प्रत्युत्तर देणें; उद्धटपणानें जाबसाल करणें; लहान तोंडीं मोठा घांस घेणें; बयाद सांगणें.

उलटून बोलणें—१ पुन्हां बोलणें; परत सांगणें; पुनरुच्चार करणें. २ प्रत्युत्तर करणें; उद्धटपणानें उत्तर देणें.

❀ **उलटून पडली खरी, म्हणती सूर्यास दंडवत करी**—वास्तविक पडलें असतां सूर्यास नमस्कार केला म्हणून सावरासावरी करावयाची; आपली फजीती झाली असतां दुसऱ्या बहाण्याखालीं ती झांकून टाकण्याचा प्रयत्न करावयाचा.

उलटा–टी–टें——उलटा नांगर फिरणें--(गांवावरून). लोकाचाराविरुद्ध चाली असणें; गांवाच्या विरुद्ध वागणूक असणें.

उलटा पहारा—विपरीत काळ; ग्रहदशा फिरणें. 'कलियुगाचा उलटा पहारा जाहल्या या चाली।' –पामो १०२.

उलटी अंबारी—हत्तीची अंबारी उलटी केली म्हणजे भिक्षेच्या झोळीसारखी होते. त्यावरून भिक्षेची झोळी, दारिद्र्य. 'माझी कातड्याची पेटी व फराळाचें आणि चार धोतरें एवढें मात्र बचावलें. नाहीं तर आजच उलट्या अंबारीच्या राज्याचा उपभोग घ्यावा लागला असता.' – रंगराव. अंबारी पहा.

उलटी पूजा करणें—१ खरडपट्टी काढणें; हजेरी घेणें. २ अपमान, उपहास, मानखंडना करणें.

उलटी बुकी–लाथ–चापट--खूप हग्यामार या अर्थी.

उलटी सुलटी हजामत--न्हावी एकदां वरून खालीं असें केंस काढून झाल्यावर पुन्हां खालून वर वस्त्रा फिरवून डोकें अगदीं तुळतुळीत करतो. यावरून पूर्ण खरडपट्टी, भोसडपट्टी; ताशेरा.

उलटें शहाणपण (शिकविणें)--भलताच सल्ला; मूर्खपणाचा उपदेश; शहाणपणाच्या गोष्टीविरुद्ध वागण्याची फूस देणें.

उलट्या अंबारींत बसणें--भिकेस लागणें; दरिद्री होणें. उलटी अंबारी पहा. 'घरचा सुखी होतों पण नशिबानें उलट्या अंबारींत बसविलें.'

उलट्या गांवची पाटिलकी--ओसाड गांवची पाटिलकी पहा. ज्या गांवांत वसती नाहीं त्या गांवच्या पाटिलकीचा मान मिळून कांहीं फायदा नाहीं. लटकाच अधिकार; पोकळ मान.

उलट्या बाहुल्याचा--डोळ्यांतील बाहुली उलटी असली तर नीट दिसत नाहीं. यावरून दृष्टि दोष असणारा; सर्व गोष्टींकडे विपरीत दृष्टीनें पाहणारा.

❀ **उलट सुलट बोलणें, नाहीं तसें समजवणें**—वितंडवाद करणें; भलते सलते सांगणें व मुद्दाम गैरसमज करून घेणें. To make a cock and bull story.

उलटा चोर, कोतवालको डाँटे–(हिं.) चोरानेंच कोतवालास दम देणें. तु०–चोर तो चोर, पुन्हां शिरजोर.–केसरी ३०-४-४०. पुढील म्हण पहा.

उलटा चोर, कोतवालास दंडी--कोतवालानें वास्तविक चोरास शिक्षा करावयाची ती बाजूलाच राहून चोर उलट कोतवालास शिक्षा देतो. विपरीत प्रकार; उलटा न्याय.

उलटी घोडी, मान मोडी—[घोडी = शिक्षेसाठीं टांगणें (खालीं डोकें करून)] १ उलट्या घोडीचा शिक्षेचा प्रकार फार दुःखप्रद असतो. २ आपल्या खालची घोडी सुलटी आहे तों ठीक, उलटल्यास आपली मान मोडते.

उलट्या चोराच्या बोंबा--'चोराच्या उलट्या बोंबा' पहा.

उलथणें——उलथून जाणें—मरणें; नाश पावणें. 'त्याचे म्हातारडे आईबाप तिकडे उलथून गेले.' –नामना ११४.

उलथा——उलथा पसा, पालथा पसा, माकडा तुझा संसार कसा--[उलथा पसा = भिक्षा मागण्यासाठीं केलेला हात. पालथा = या उलट] माकडाजवळ कधींहि संग्रह असत नाहीं. त्याप्रमाणें कधीं उलथा पसा कधीं पालथा याप्रमाणें खुट्टू रुट्टू कसाबसा चाललेला संसार. आला दिवस कसाबसा साजरा करण्याची निकृष्ट स्थिति. अक्षयी ओढगस्त माणसास म्हणतात.

उलफा——उलफ्याची कणिक वाऱ्यानें गेली–नेली—[उलफा म्हणजे शिधा; ब्राह्मण, फकीर वगैरेस मिळालेलें धान्य, आटा वगैरे.] पत्रावळीवर शिधा काढून ठेवीत असतां त्यांत घालावयाची कणिक अनेकदां कारकून घालीतच नाहीं व वाऱ्यानें उडून गेली असें सांगतो. किंवा एखादे वेळीं खरोखर ती उडून जाते. याप्रमाणें भिक्षेची वस्तु व्यवस्थित असत नाहीं. यावरून विनाआयास मिळालेली गोष्ट लाभत नाहीं. फुकट मिळालेली वस्तु तशीच फुकट जाते.

उल (ळ) यिलें——**उलयिलें उरता, केलेलें सरता**—(गो.) बोललेलें राहतें, केलेलें मात्र नाहींसें होतें.

उलवंच्याक उत्रकुमारू, करच्याक मात्र आंगचोरू—(गो.) बोलण्यांत पटाईत मुलगा, कृति करण्यांत मात्र अंगचोर

उलाचाक कळलेलो उत्रांमोल जाण—(गो.) बोलतां येणाऱ्याला शब्दाची, उत्तराची किंमत समजते.

उलौक कळना जाल्यार तोंड धांपचें—(गो.) बोलतां येत नसेल तर तोंड झांकावें (गप्प बसावें). मूर्खपणें बोलण्यापेक्षां गप्प बसणें चांगलें. तु०—(अ) आत्मनो मुखदोषेण बध्यन्ते शुकसारिका। बकास्तत्र न बध्यन्ते मौनं सर्वार्थसाधनम्॥ (आ) स्वायत्तमेकान्तगुणं विधात्रा विनिर्मितं छादनमज्ञतायाः। विशेषतः सर्वविदां समाजे विभूषणं मौनमपण्डितानाम्॥

उलाढाल——**उलाढाली डिकेमाली**—भलतीच उलाढाल केली असतां आजारी पडून डिकेमाली घेण्याची वेळ येते.

उल्लू——**उल्लू मशालजी**—उतावीळ, अविचारी माणूस. 'परिषदेस जाण्याकरतां हपापलेल्या उल्लू-मशालजींना नाचवून भागावयाचें नाहीं.'—के १९.७.१९३०.

उल्लुके भाई मशालजी—घुबडाचा भाऊ मशालजी. १ घुबड व मशालजी हे दोघे एकत्र येणें शक्य नाहीं. घुबडाला उजेड नको असतो मग मशालजीची संगत कशी? २ [उल्लू=मूर्ख, बेवकूब] मूर्खांचा भाऊ मशालजीच निघणार. तो काय शहाणा व्हावयाचा आहे.

उल्हास——**उल्हास आणि उदासपण, अंतःकरणीं समान**—ज्याला हर्षामर्ष बाधूं शकत नाहीं असा; स्थिर प्रकृतीचा; स्थितप्रज्ञ.

आधींच उल्हास, त्यांत फाल्गुनमास—'आधींच उल्हास०' पहा.

उल्हास मनीं, औषधावाणी—मनाचा उत्साह हा औषधापेक्षांहि गुणकारक असतो.

उल्हासीं ओंवी, संतापीं शिवी—मन प्रसन्न असल्यास मनुष्य गोड बोलतो व तेंच अप्रसन्न असल्यास त्याच्या तोंडून वांकडे शब्द बाहेर पडतात.

उवार——**उवारा पाणी, आयलॅ गॅलॅ**—(गो.) पुराचें पाणी आलें गेलें. तांतडीनें घडून येणाऱ्या गोष्टीबद्दल म्हणतात.

उवाराक हूळनु आयल्याक मोलना—(गो.) पुरांतून वाहून आलेल्याला किंमत नाहीं.

उवारी——**उवारीस येणें, उवाऱ्यास येणें**—उरणें; पुरून राहणें; सर्वांस पुरून प्रत्येकाच्या वांट्यास येणें; वारीस येणें.

उशीर——**उशीर धरणें**—थांबणें; वाट पहाणें; अवकाश असणें; योग्य वेळेच्या पलीकडे सुरू करणें; दिरंगाईनें करणें.

उशीरावर येणें-धरणें—दिरंगाई करणें; विलंब लावणें; ताटकळत ठेवणें; वाजवीपेक्षां अधिक वेळ तिष्ठत ठेवणें; प्रमाणाबाहेर वेळ लावणें.

❀ **उशीर लावूं नये कधीं, धर्म करावा आधीं**—दानधर्म करणें कधींहि लांबणीवर टाकूं नये; कारण देहाचा भरवंसा नाहीं, किंवा मन बदलण्याचीहि शक्यता असते. तु०—अजरामरवत् प्राज्ञो विद्यामर्थंच कारयेत्। गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत्॥—हितोपदेश.

उशीरानें उठतो, आपल्या कामास मुकतो—वरप्रमाणें. उशीरानें उठणाऱ्यास आपलें काम आवरतां येत नाहीं.

उशीरानें उठे, काम साठे—जो मनुष्य उशीरा उठतो त्याचें काम खोळंबून राहतें. लवकर उठल्यास काम लवकर आवरतें. उशीरानें उठल्यामुळें प्रत्येक गोष्ट दिरंगाईवर पडते.

उष्टा-ष्टी-ष्टें——**उष्टा नवरा**—बिजवर.

उष्टा बिटाळ—उष्ट्यामुळें येणारी अशुद्धता.

उष्टा होणें—घाईघाईनें थोडें कांहीं खाणें; पोटभर न जेवणें; पोटभर जेवण नव्हे पण निरशन नव्हे अशी स्थिति. इंग्रजी Break fast.

उष्टीं काढपाक येवप—(गो.) जेवावयास येणाऱ्या स्त्रीनें जेवणें वगैरे आटोपल्यावर उष्टीं काढण्याच्या वेळीं येणें. काम झाल्यावर हजर होणें. वराती मागून घोडें.

उष्टी पत्रावळ—अनेकांनीं उपभोगिलेली स्त्री; व्यभिचारी स्त्री; वेश्या.

उष्टें खरकटें करणें—जेवणानंतरचें उष्टीं काढणें वगैरे काम करणें.

उष्ट्या फोंडावेलिं सूणिं—(गो.) उकीरड्यावरील कुत्रीं.

उष्ट्या हातानें कावळा न मारणें—कावळ्याला मारण्यासाठीं उष्टा हात उगारला तर शितें सांडतील व नुकसान होईल म्हणून तसें न करणें. अत्यंत कद्रु, कृपण असणें. (गो.) उष्ट्या हातान कावळो आपुडमा.

❀ **उष्टीं काडतल्याक राजपाट मेळो, कैर काडतल्याक प्रधानि मेळो**—(गो.) उष्टीं काढणाऱ्याला राजपद मिळूं दे, केर काढणाऱ्याला प्रधानपद मिळूं दे. श्रमगौरवार्थं म्हणतात.

उष्टीं काढ, म्हणे जेवले किती—उष्टीं काढ म्हणून ज्या मनुष्यास सांगितलें असेल त्यानें सरळ तें काम करण्याच्या-

ऐवजीं किती मनुष्यें जेवलीं वगैरे भलत्याच चौकशा करण्याचें कारण नाहीं. यावरून ज्या गोष्टीशीं आपला संबंध नाहीं त्या बाबतींत चौकशी करणाऱ्या व सांगितलेलें काम सरळपणानें न करणाऱ्या मनुष्याच्या बाबतींत ही म्हण वापरतात.

उष्टें खायचें तर वाटीभर तूप तरी हवें; उष्टें खावें चोपडाचे आशेस्तव--कांहीं फायदा असल्यासच माणूस अप्रतिष्ठेचें, हलकें काम करण्यास तयार होतो. पैशाच्या लालचीनें नीच कृत्य करण्यास कांहीं लोक धजतात. पुढील म्हण पहा.

उष्टें खावें तर तें तुपासाठीं (तुपाचे लालचीनें)—मनुष्य कांहीं तरी लाभ होईल याच आशेनें एखादें हीन कामहि करण्याचें पतकरतो. विशेष लाभ असेल तरच कोणी हलकी सलकी गोष्ट करावयास तयार होईल. 'ज्या संसाराला मी अजून आरंभ केला नाहीं त्याचा मला वीट आला असें मी प्रामाणिकपणें कसें म्हणेन? मी हवी तेव्हा ही दीक्षा टाकून संसारांत पडावयाला तयार आहें. पण उष्टें खावें तर तें तुपासाठीं, अशी म्हणच नाहीं का? त्याप्रमाणें मनाजोगें स्त्रीरत्न लाभलें तर लग्न करावें. नाहींतर वैराग्याचें ऐश्वर्य हातचें गेलें आणि संसाराचें ऐश्वर्य मनासारखें लाभलें नाहीं.'–कावळा आणि ढापी.

उष्टे तोंडानें अबद्ध (अवाच्य) उलवंचें, दुसऱ्या कडच्यानें उत्तर घेवंचे--(गो.) अवाच्य बोलावें, आणि दुसऱ्याकडून तसेंच उत्तर घ्यावें. तु०–चिखलांत धोंडा टाकून चिखल अंगावर उडवून घेणें.

उष्टे हातान कावळयाक आंबुणा--(गो.) उष्ट्या हातानें कावळा हांकणार नाहीं. खालीं पहा.

उष्टे हातान कावळयाक आबुडतलो; उष्टे हतान कैळाक आंबुडतलो--(गो.) उष्ट्या हातानें कावळ्यास हांकलले तर हाताचीं शितें पडून उलट कावळे जवळ येतात. म्हणजे वाईट करतां चांगलें होणें.

उष्ट्या पत्रावळिशी लोळता, गावुं भरि बिरुता—(गो.) भिकाऱ्याप्रमाणें वागणें.

उष्ट्या फोंडावेल्या पत्रावळीक सुणें झगडतातिं--(गो.) उकीरड्यावरील पत्रावळीसाठीं कुत्रीं भांडतात.

उष्ट्या हातानें कावळा हांकणार नाहीं; (गो.) उष्ट्या हातान् कावळो हाबडप; उष्ट्या हातान कावळो आमडिना—अतिकंजुष मनुष्य; दुसऱ्याच्या मुळींच उपयोगी न पडणारा मनुष्य. हातचीं शितें पडून फुकट जातील म्हणून उष्ट्या हातानें कावळासुद्धां न हांकणारा. तु०–कापल्या करंगळीवर मुतायचा देखील नाहीं.

उष्ट्या हातानें मारला नाहीं कावळा, मग कां जावें देवळा—जन्मभर कधीं चांगली गोष्ट केली नाहीं मग देवळास जाऊन देवाची प्रार्थना करण्यांत काय अर्थ आहे.

उष्ट्र——उष्ट्रलगुडन्याय—उंटाला मारावयाची काठी तो स्वतःच वाहून नेत असतो. यावरून ज्याचें त्याच्याच हातानें शासन करविणें.

उष्ट्राणांच गृहे लग्नं गर्दभाः शांतिपाठकाः। परस्परं प्रशंसंति अहो रूपं अहो ध्वनिः॥—उंटांच्या घरीं लग्न होतें तेथें मंगलाष्टकें म्हणावयास गाढवें आलीं. तेव्हां गाढवें म्हणूं लागलीं : कायहो या उंटांचें सुंदर रूप! उंट म्हणूं लागले : कायहो यांचा सुंदर आवाज! याप्रमाणें ते परस्परांची स्तुति करून सुख मानते झाले. याप्रमाणें कांहीं लोक परस्परांची स्तुति करून संतोष मानीत असतात. या श्लोकांतील 'अहोरूपमहोध्वनिः' एवढा वाक्प्रचार विशेष रूढ आहे.

उष्ट्रासि जेसीं रंभाफळें; उष्ट्रासि न पचे कर्दळी फळें—उंटाला केळीं आवडत नाहींत, त्यांची गोडी समजत नाहीं. 'कटुवर भासली विषई कामनी। उष्ट्रासि जैसी रंभाफळें।' –दावि २९.२३९;७.५. तु०–गाढवाला गुळाची चव काय.

उष्ण——उष्णं उष्णेन (शाम्यते)--उष्णानें उष्णाचें शमन होतें. कांट्यानें कांटा काढावा त्याप्रमाणें. तु०–चोराचीं पावलें चोर ओळखतो.

उसकी——उसकी टांग उसकी गलेमें--'ज्याच्या तंगड्या त्याच्याच गळ्यांत,' पहा.

उसण—— उसण उतरणें--१ मंत्र वगैरे टाकून पाठींत भरलेली लचक काढणें. २ (ल.) एखाद्याचा दिमाख उतरणें; एखाद्याची ऐट जिरवणें; खोटीच बढाई मारणाऱ्यास तोंडघशीं पाडणें.

उसनें——उश्णीं वायना--(गो.) आलेला अहेर परत करणें.

उसनी गोष्ट सांगणें--१ उगीचच मोठेपणा घेऊन सल्ला मसलत देणें; काडीनें मलम लावणें; लांबून उपदेश करणें. २ आपल्याला जी गोष्ट करतां येते ती दुसऱ्याला करावयास सांगणें.

उसनें फेडणें-घेणें-उगविणें--सूड घेणें; उट्टें काढणें; अपकाराची परतफेड करणें. 'उसनें संभाजीचें घ्यावें।'–ऐपो १८.

उसणें वायण--(गो.) उसणवट आणून सण करणें.

उसनें वाण--१ प्रत्युपकार; परतफेड; एखाद्यानें आपणावर केलेला उपकार परत फेडणें. २ सूड; बदला; अपकाराचें उट्टें काढणें; प्रतिक्रिया.

❀ उश्णी वायणां फेडुंक जाय—(गो.) आलेला अहेर परत केला पाहिजे; उसनें फेडलें पाहिजे.

उश्णे दिवन दुबळो भिकारी जालो, उत्तर दिवन लखपति भिकारी जालो—(गो.) गरीब माणूस उसने देण्यानें भिकारी झाला तर लक्षाधीश वचनें देऊन झाला.

उश्ण्यांक मरण ना—(गो.) उसन्याला मरण नाहीं.

उसण्यानें मसणांतु वचा—(गो.) उसणें आणणें, मसणांत जाणें.

उसनवारीची बाकी, उगीच धक्काबुक्की—एखाद्याकडून आपण एखादी वस्तु अगर पैसे उसने आणले असतां एकसारखा त्याच्या तगाद्याचा त्रास सहन करावा लागतो. त्यापेक्षां उसनें न काढतां प्रथमच त्रास सहन केलेला बरा.

उसने देऊन घालवितो, मैत्रिकीं तोडतो—मित्राला उसनें दिलें म्हणजे मैत्रींत वितुष्ट येतें. कारण तें परत मागावयास गेलें तर परत कदाचित् लवकर मिळत नाहीं म्हणून आपणास राग येतो. मिळून दोहोकडूनहि गैरसमज होऊन मित्र अंतरतो.

उसन्या पायीं फासण्या—उसनें काढण्यापासून होणारा त्रास; दुसऱ्याचें उसनें काढलें असतां तो वरचेवर मागावयास येतो त्यापासून होणारा त्रास.

उसर—उसर करणें—वाळवणें; कृश करणें; क्षीण करणें; एखाद्यास अत्यंत त्रास देणें.

उसवणें—उसवल्याला दोरा घालावा, निसवल्याला काय करावें; उसवलेल्यास शिवील पण निसवलेल्यास काय करील; उसवल्या (ला) दोरा, निसवल्या (ला) वारा; उसवल्यास दोरा आणि निसवल्यास कोंडमारा—जेथें नुसती शिवण उसवली असेल त्या कपड्यास पुन्हां शिवतां येतें पण वस्त्र फाटल्यावर त्याला काय करावयाचें. जोंपर्यंत नीट होण्यासारखें किंवा जोडण्यासारखें असेल तोंपर्यंत जोडतां येतें पण अगदींच तुटल्यासारखें झाल्यास तें नीट करण्यांत अर्थ नाहीं. तें टाकूनच देणें बरें. जो ऐकणारा असेल त्यास सांगतां येईल पण निःसंगाचा संबंधच सोडून देणें चांगलें.

उसासा—उसासा असासा टाकणें—जोराचा सुस्कारा; दमल्यानंतर जोरानें सोडलेला श्वास; थकल्यावर जोरानें दम टाकणें.

❀ उसासा आला आणि कंठ फुटला—श्वास टाकतांना घसा फुटणें; थोड्याशा निमित्तानें मोठें कार्य बिघडणें.

उसें—मांडीचें उसें करणें—एखाद्याच्या मांडीवर डोकें ठेवून निर्धास्तपणें झोंप घेणें; आपल्या संरक्षणासंबंधीं एखाद्यावर पूर्ण विश्वास टाकणें; एखाद्यावर पूर्ण भरंवसा ठेवून आपण निर्धास्त राहणें.

उशापायतीं असणें-उभा राहणें-बसणें-लागणें; उशापायथ्यास लागून असणें—१ नेहमीं जवळ असणें; सन्निध असणें. 'त्यांचे मनसबे दौडावे, वेत्यास पडावे, तमाशे पहावे, असे जन जे आहेत ते उशापायथ्यास लागून आहेत. '-ऐटि १.१३. २ संरक्षण करणें; मदत करणें; साहाय्य करणें; सेवा करणें. ३ त्रास देणें; उपद्रव देणें; आड येणें; मध्यें लुडबुड करणें.

उशापायतीं रडणें—एकसारखी कटकट करणें; पिरपिर लावणें; किरकिर करणें; पिच्छा पुरवणें.

❀ उशाची भाकरी केव्हांहि मोडून खातां येते—जवळच्या वस्तूचा उपयोग केव्हांहि करतां येतो.-चोकीलकृत वळीवांचे पाऊस.

उशाशीं ताट, पिण्याला माठ, काय काय पुसता थाट—सर्व जेथच्या तेथें असून श्रम न करतां खावयास मिळण्याची स्थिति. ऐषआराम.

उस्ताद—उस्ताद बैठे पास, काम आवे रास—गुरु जवळ असला म्हणजे शिष्याकडून खूप काम होतें. तसेंच मालक समोर असला म्हणजे नोकर कामाचा भारा उचलतात; नाहीं तर टंगळमंगळ करतात.

ऊ

ऊ—ऊ टिचणें—ऊ मारणें (ऊ मारतांना टच् असा शब्द होतो त्यावरून).

❀ ऊ विईल काय आणि लीख पिईल काय; ऊ विते काय आणि लीख पिते काय ?—ऊ हा इतका लहान प्राणी आहे कीं तिच्या पोरास तिच्यापासून दूध वगैरे मिळणें शक्य नाहीं. वास्तविक ऊ ही अंडीं घालते त्यांस लिखा म्हणतात. कोणाच्या हातून कोणती गोष्ट घडणार याचा अंदाज त्याच्या आकारावरूनच होतो.

ऊ व्हिली ना आनि लिख जाली ना—(गो.) ऊ व्याली नाहीं आणि लिख झाली नाहीं. कशाला कांहीं ठिकाण नाहीं.

ऊठ—उठणें पहा.

ऊत——ऊत-ऊब जिरविणें--१ पहिला कड जाऊं देणें; २ (ल.) एखाद्याचा जो प्रारंभीं उत्साह असतो त्याच्या आड न येतां त्यास कमी होण्यास वेळ देणें; पहिली उसळी थांबेपर्यंत वाट पाहणें.

ऊत मारणें--दूध उतूं जाऊं लागलें असतां त्यावर पाणी ओतून त्याचा फुगवटा कमी करतात. यावरून एखाद्याचा उत्साह भंग करणें; एखाद्याला अवसान आलें असतां त्याचा तेजोभंग करणें.

ऊत येणें--[ऊत = पूर, उचंबळा.] दूध फार तापलें म्हणजे तें वर वर येऊं लागतें, त्याला उतूं येणें, ऊत येणें म्हणतात. वाहून जाण्याइतकें वाढणें; उचंबळणें; अतिरेक होणें. 'रुसो-जपानी युद्धाचे वेळीं जपानांतल्या आबालवृद्धांच्या देशाभिमानाला खरोखरीच ऊत आलेला दिसला.'-केसरी.

ऊन, ऊन्ह—— ऊन ऊन आग—उन्ह पहा. १ जळजळीत; कडक; अतिशय ऊष्ण; तप्त. २ अतिशय कढत; ताजें; गरम; नवीनच बनविलेलें.

ऊन्हउन्हीत--गरम गरम; उनून; अगदीं ताजें. 'गिरिजाबाई नवऱ्यास म्हणाली कीं ताजें उन्हउन्हीत थालीपीट तयार आहे तें देऊं का ?'-कोराकि ६७.

ऊन खाणें—उन्हांत बसणें; थंडीचें निवारण होण्याकरितां सूर्य प्रकाशांत बसणें.

ऊन तहान न म्हणणें-पहाणें-मानणें--पर्वा न करणें; कोणत्याहि अडचणींचा विचार न करतां कामास प्रवृत्त होणें; कष्ट सोसण्याची मनाची तयारी करणें.

ऊन तापणें-तावणें—१ ऊन कडक होणें; दिवस बराच वर येणें; मध्यान्हाचा समय होणें. २ उन्हाळ्याचे दिवस येणें.

ऊन पाण्यानें घर जाळणें—खोटया आरोपांनीं एखाद्याचें नुकसान करणें; एखाद्या विरुद्ध उगाच बोटें मोडीत असणें; एखाद्याची त्याच्या मागें व्यर्थ निंदा करणें.

ऊन पारखा—ज्याला कधीं अडचणीचे दिवस आले नाहींत असा; ज्याला कधीं दुःखाची झळ लागली नाहीं असा.

ऊन वारा न सोसणें-लागणें—अडीअडचणी न येणें; कधीं कष्ट करावयाची पाळी न येणें; सर्व दिवस संपन्नदशेंत जाणें.

ऊन वारा सोसणें-लागणें--सर्व संकटांस तोंड देणें; कष्ट करण्याची तयारी असणें; अडचणीचे दिवस काढणें.

उन्हाचा कढ—भर दोन प्रहरचें उन्ह; अत्यंत प्रखर ऊन; ग्रीष्म ऋतूंतील दुपारचें ऊन्ह; सूर्याची प्रखर उष्णता.

उन्हातानाचा--भर दोन प्रहरीं; भर दुपारीं; कडक ऊन पडलें असतांना. 'एव्हां उन्हातान्हाचा जाऊं नको. अंमळ शिळोपा पडला म्हणजे जा'.

उन्हांतील पाला होणें—कोमेजणें; सुकणें; म्लान होणें. 'मृदुलत्व म्लानत्व स्वीकारुनि जाहलासि कां पाला।'-मोविराट. 'जाहला उन्हांतील पाला।'-संग्रामगीतें ११८.

उन्हानें म्हातारे होणें--नाजूक असणें; ऊन लागल्याबरोबर कोमेजून जाणें.

उन्हाला पाठ देऊन बसणें—संकटाचा प्रतिकार करणें.

उन्हाळ भावई-ळी; उन्हाळ भावी—(व.) वैशाख वद्य ३०.

उन्हूं देणें—कढत होऊं देणें; तापूं देणें; गरम करणें.

* **ऊन उकिरड्यावर पडलें म्हणून सूर्यास बाधत नाहीं**—सूर्य स्वःत प्रकाश देत असतो; तो चांगल्या ठिकाणीं पडो अगर उकिरड्यावर पडो त्याचा सूर्यावर कांहीं परिणाम होत नाहीं. एखाद्या मनुष्यानें दुसऱ्यावर उपकार केला तर तो सज्जनावर केला काय किंवा अपात्र मनुष्यावर केला काय त्याचा दोष उपकार कर्त्याकडे नसून उपकार घेणाऱ्याकडे असतो.

ऊन खाण्यानें तोंड जळतें, थंड करून खा--ऊन ऊन पदार्थ खाल्ला असतां तोंड भाजतें याकरितां तो निवेपर्यंत थांबावें; कोणतेंहि काम सावकाश करावें; उतावीळपणानें कोणतीहि गोष्ट करू नये, दमानें घेत जावें.

ऊन दुधाचें पोळणें, ताक फुंकून पिणें--एखाद्या मनुष्याचें दूध पितांना तें गरम असल्यामुळें तोंड भाजलें म्हणजे तो ताकसुद्धां फुंकून पिऊं लागतो. एकदां एखाद्या मनुष्यास अद्दल घडली म्हणजे तो जपून वागूं लागतो.

ऊन पडलें असतां वाळवण घातलें पाहिजे--संधि आहे तों काम करून घ्यावें. तु०-तवा तापला आहे तों पोळी भाजून घ्यावी; लोखंड तापलें आहे तों घडावें-टिसू ९२. Make hay while the sun shines.

ऊन पाण्यानें घरें जळत नाहींत—पाणी कितीहि तापविलें तरी त्याची उष्णता ती किती असणार ? ती कांहीं घरास आग लावण्याइतकी प्रखर असूं शकत नाहीं. तेव्हां एखादा मनुष्य अंगांत पराक्रम असल्याशिवाय पुष्कळ रागावला तरी त्याच्या हातून कांहीं दुसऱ्यास विशेष अपाय होऊं शकत नाहीं. तोंडानें कितीहि बडबडलें तरी जोंपर्यंत अंगांत सामर्थ्य नाहीं किंवा सत्ता नाहीं तोंपर्यंत त्या बडबडीचा कांहीं उपयोग नाहीं. विनाकारण शिव्याशाप देऊन कोणाचें वांकडें होत नाहीं.

ऊन पाण्यानें हात भाजतील म्हणोन काय आग लागेल ?—पाणी कितीहि ऊन असलें तरी त्याच्या उष्णतेस

व शक्तीस कांहीं मर्यादा आहेच. त्यानें अंग भाजेल पण आग लागणार नाहीं. प्रत्येक वस्तूची शक्ति मर्यादित असते; त्या मर्यादेबाहेर तीस कांहीं करतां येत नाहीं.

ऊन पाण्यास चवी नाहीं—पाणी तापविलें म्हणजे तें बेचव होतें. एखाद्या धंद्यांत फसल्यावर पुनः तोच करण्यांत फायदा नाहीं.

ऊन पोळत नाहीं, तितकी वाळू पोळते—उन्हानें पाय भाजत नाहींत इतके त्यानें तापलेल्या वाळूनें भाजतात. तात्पुरता अधिकार मिळालेला मनुष्य तो अधिक गाजवितो. तु०—(अ) रविरपि न दहति तादृक् यावद्दहति वालुकानिकरः ॥ (आ) अन्यस्माल्लब्धपदो नीचः प्रायेण दुःसहो भवति ।

उन्हांत गेल्याशिवाय सावलीचें सुख कळत नाहीं—श्रम केल्याशिवाय विश्रांतीच्या सुखाची कल्पना येत नाहीं. विपत्ति भोगल्याशिवाय संपत्तीचें सुख कळत नाहीं. सुखं हि दुःखान्यनुभूय शोभते घनांधकारेष्विव दीपदर्शनम् । सुखात्तुयो याति नरो दरिद्रताम् धृतः शरीरेण मृतः सजीवति ॥ –मृच्छकटिक.

उन्हांतून करून येतो सुरापान, त्याचें क्रोधाचें नाहीं प्रमाण—आधींच उन्हानें तप्त झालेल्या मनुष्यानें मद्यपान केल्यावर त्याचा क्रोध किती भडकेल याचा कांहीं नेम नाहीं. तु०–आगींत तेल ओतणें. आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला । इ. That anger is not warrantable that has seen two suns.

उन्हानंतर सावली, भुकेनंतर भाकरी—श्रम केल्यानंतर जशी विश्रांति अधिक सुखावह वाटते तसेंच चांगली भूक लागली म्हणजे खाल्लेली भाकरी अधिक गोड लागते.

ऊर——ऊर काढून चालणें—मोठ्या दिमाखानें, रागानें जाणें; बेपर्वाईनें वागणें.

ऊर दबणें–वासणें–उलणें—भीतीनें गडबड उडणें; भांबावून जाणें; गांगरणें; घाबरणें.

ऊर दाटणें–भरणें—दुःख, शोक, प्रेम, प्रीति इत्यादि विकारांचा जोर होऊन गहिंवरून येणें; छातीमध्यें दम कोंडल्याप्रमाणें होणें; श्वासोच्छ्वासास मनाच्या आवेगामुळें अडथळा येणें.

ऊर पिकणें—१ कफ दाटणें; दम कोंडणें; श्वासोच्छ्वास होण्यास त्रास वाटणें. १ (ल.) त्रास, छळ होणें; जीव कंटाळणें; अत्यंत कष्ट होणें.

ऊर पिकविणें—छळणें; त्रास देणें. 'पदोपदीं येउनि शीकवीला । तथापि तेणें उर पीकवीला ॥'–सारुह ३.१४.

ऊर फाटणें—१ भीतिग्रस्त होणें; अत्यंत भयभीत होणें; अवसान गाळणें. २ अतिशय दुःख होणें; शोक होणें. 'फाटे उर शोकानें बहु निंद्य क्षत्रधर्म त्या वाटे ।'–मो अश्व ४.३९.

ऊर फुटणें—१ स्तन उगवणें; स्त्रीनें यौवनांत प्रवेश करणें. २ हृदयविकार होणें; छाती फुटून एखादें जनावर, मनुष्य निकामी होणें. ३ उरीं फुटणें; अत्यंत भयंकर धक्का बसून मरणप्राय स्थिति होणें; अत्यंत हर्ष–शोकाचा मोठा आवेग येणें. ४ हिंमत चालणें; धैर्य टिकणें; अवसान कायम राहणें.

ऊर फोडणें—१ फार श्रम करून घेणें; अत्यंत कष्ट करणें. २ शक्तीपलीकडे काम करून अत्यंत थकणें, दमणें.

ऊर बडवणें—शोक करणें; दुःखानें हृदय पिटून घेणें; अतिशय शोकाचें प्रदर्शन करणें.

ऊर भाता (त्या?) सारखा दडपणें—भीति, दुःख इ. नें मन कचरणें; धाक वाटणें; निरुत्साही होणें.

ऊर व कपाळ बडवून घेणें—अत्यंत दुःख होणें. –मो भीष्म १.१८.

उरस्फोड करणें—अतिशय श्रम करणें; अत्यंत कष्ट सोसणें. 'उरस्फोड कपाळ झोड'.

उरस्फोड करून घेणें—जीव तोडून सांगणें; अत्यंत कळकळीनें एखादी गोष्ट मनावर ठसविण्याचा प्रयत्न करणें.

उराचा तक्ता—भरदार छाती; रुंद व बळकट छाती.

उराचा पांजरा–पिंजरा—छातीचा सांपळा; हाडें निघालेली छाती.

उराची शिंप–शिंपी—खोल छाती; छातीच्या ठिकाणीं खळगा असण्याची स्थिति; अशक्ततेचें चिन्ह.

उरांत धडधडणें—धडकी भरणें.–मो स्त्री ५.१७.

उरापोटीं करणें–धरणें; उरापोटावर उचलणें—अति श्रम करणें; अत्यंत कष्ट करून एखादी गोष्ट करणें. 'सिंधूः–अहो, उरापोटीं करीन कसं तरी झालं !'–एकच प्याला ४.२.

उरावर असणें—१ भारभूत झालेला असणें. २ अंमल चालविणारा अधिकार गाजविणारा मनुष्य असणें; वरचढ असणें. ३ जबाबदारी असणें; आवश्यक असें काम शिरावर असणें. ४ समक्ष असणें; समोर हजर असणें.

उरावर घालणें—अनिच्छेनें देणें; एखाद्यास देणें भाग पडणें; कष्टानें स्वाधीन करणें; मनाविरुद्ध देणें.

उरावर घेणें—१ अंगावर घेणें; जबाबदारी पतकरणें; स्वीकार करणें. २ संभोग देणें; स्त्रीनें एखाद्याशीं गमन करणें; व्यभिचार करणें.

उरावर धोंडा घेणें--फार मोठी जबाबदारी पतकरणें.

उरावर धोंडा ठेवणें--१ एखाद्यावर फार मोठी जबाबदारी टाकणें; एखाद्यास त्याच्या शक्तीबाहेरचें काम सांगणें. १ स्वतः-वर एखादें सक्त नियंत्रण घालून घेणें.

उरावर बसणें--१ आवश्यक होणें; भाग पडणें. २ कैचींत धरणें; चिमटयांत पकडणें; सक्तीनें एखादी गोष्ट करावयास लावणें. ३ संभोग करणें; अब्रू घेणें. ४ अवघड गोष्ट करणें प्राप्त झाल्यानें असाहाय्यता येणें. मनाविरुद्ध एखादी गोष्ट करावी लागणें.

उरावर शेगडी--अत्यंत कष्टदशा; अतिशय दुःखदायक अवस्था; अतिशय दुःख, विवंचना, त्रास.

उरावर हात ठेवणें-लावणें; उरावर हात ठेवून सांगणें-बोलणें; उराला हात लावणें--वचन देणें; भाक देणें; प्रतिज्ञा करणें; मोठया दिमाखानें सांगणें; प्रौढी मिरविणें.

उरावरचा गोहो-धगड--१ उरावरील दडपण; भीतिदायक वस्तु; ज्याबद्दल अत्यंत भय वाटतें असा मनुष्य; ज्याची आपणावर आपल्या इच्छेविरुद्ध सत्ता चालते अशी व्यक्ति. २ नवरा; जार.

उराशीं कवळून धरणें--घट्ट मिठी मारून धरणें.-मो. मंत्रभाग १०.८५९.

उराशीं घट्ट धरणें--मिठी मारून धरणें.-मोमंत्रभाग १०.९९५.

उराशीं धरणें--१ नम्रपणें प्रार्थना करणें; विनवणें; प्रेमानें सांगणें. २ प्रेमानें कवटाळणें; आलिंगन देणें. ३ सतत स्मरणांत ठेवणें; मनांत दृढ संकल्प करणें. ४ स्वीकारणें; जबाबदारी पतकरणें.

उरास ऊर लावणें; उरीं पोटीं धरणें--दादाबाबा करणें; प्रेमानें मन वळविण्याचा प्रयत्न करणें.

उरीं डोंगर घेणें--१ कठिण काम स्वीकारणें; एखादी मोठी जबाबदारी पतकरणें. २ फार श्रम करणें; अत्यंत कष्टाचें काम करणें. 'उरीं डोंगर नि शिरीं कांटे' अशी म्हण आहे.

उरीं डोंगर पुरीं काठ्या (काडया) घेणें--छातीवर डोंगर घेणें व नदीच्या पुरांतून काटया वाहून आणणें. अतिशय काबाडकष्ट करणें; अत्यंत श्रमाचीं कष्टाचीं कामें करणें.

उरीं पोटीं करणें--१ कष्टानें करणें; अत्यंत त्रास सोसून करणें. २ दादाबाबा करणें; विनविणें; प्रेमानें समजूत घालणें.

उरीं फुटणें--ऊर फुटणें; छातींत धडकी भरणें; मनास एखादा मोठा धक्का बसून अपघात होणें. 'कुळवाडयांच्या बायका चांगल्या धडधाकड, पण त्यादेखील उरीं फुटतात, अन् तुमच्यानं अर्धपोटीं कसं व्हावं तें?'-एकच प्याला ४.२.

उरीं भरणें--१ दमणें; थकणें; श्रांत होणें. 'उरीं भरली उरपोट। केली चळवळ झाली घाबरी।'-नला २. २ स्तनोद्गम होणें; यौवनावस्था प्राप्त होणें.

❀ **उराचें खुराडें आणि चुलीचें तुणतुणें**--एखाद्याचें दारिद्र्य दाखविण्यासाठीं योजतात. खावयास न मिळाल्यामुळें उराच्या सर्व बरगडया साफ दिसूं लागणें व पोट खपाटीस गेलेलें असणें आणि चुलींत विस्तव घालावयाचा प्रसंग न आल्यामुळें तिचें तुणतुणें होणें.

उरीं कंस, माथां टक्कल--अस्थानीं गोष्ट. डोक्यावर केंस असावयास पाहिजेत तेथें नसून उरावर जरूर नाहीं तेथें असणें. जसें पाहिजे तसें न होणें; भलतेंच घडणें.

उरीं रीण, दारीं पेंव--ज्याला कर्ज असतें त्याच्या दारीं देणेकरी सारखे बसून शिव्या देत असतात. तेव्हां तो नरक-वासांत राहिल्याप्रमाणें काळ कंठितो.

ऊर्ध्व----**ऊर्ध्वायै दिशे ब्रम्हणे नमः**--संध्या करतांना ऊर्ध्व दिशेस नमस्कार करते वेळीं हात वर करून खाका मोकळ्या कराव्या लागतात; यावरून खाका वर असलेला कफल्लक मनुष्य; जवळ कांहीं नसलेला.

ऊंस----**उंसात जाऊन वाढें आणणें-शोधणें**--चांगली गोष्ट करण्यासाठीं जाऊन भलतीच हलकी गोष्ट करणें. अनेक चांगल्या गोष्टींतून फक्त वाईट तेवढीच घेणें.

उंसांतलें वाढ--उंसाचा शेंडा; हा बियाला उपयोगी असतो. यावरून होतकरू मूल; वंशवृद्धीस कारण असलेला मुलगा.

❀ **ऊंस खातांना एरंडाचा स्वाद पाहणें**--चांगली गोष्ट भोगणें नशीबांत आलें असतां हीन आकांक्षा मनांत बाळगणें; सुखांत असतां दारिद्र्याची वांछा करणें.

ऊंस गोड कां संग (सांगात) गोड--(गो.) उंसापेक्षांहि संगत गोड असते.

ऊंस गोड झाला म्हणून मुळ्यांसकट खाऊं नये--उंसाच्या मुळ्या खाणें वाईट; मूळ खाण्याला वाईट लागतें; तें कडक असल्यामुळें दांतांस त्रास होतो हें एक; दुसरें मूळ खाल्यास पुन्हां त्यापासून ऊंस येणें नाहीं. चांगली गोष्ट झाली म्हणून ती फार उपभोगूं नये. चांगल्या माणसाचा फार फायदा घेऊं नये; त्याची गोडी शिल्लक ठेवावी.

ऊंस गोड झाला म्हणून काय जाळ्या-मुळ्यांसुद्धां खावा?--वरप्रमाणेंच. 'ऊंस गोड झाला म्हणून काय मुळां-सहित खावा?'-एकनाथ भारुड.

ऊंस गोड, मुळ्या सोड—' ऊंस गोड लागला म्हणून मुळ्यांसकट खाऊं नये ' याप्रमाणेंच अर्थ.

ऊंस दिसती वांकुडे । परी अंतरीं रसाळ ॥—बाह्य स्वरुपावरून अंतरंगाची परीक्षा करूं नये.–मुकुंदराज. ' ऊंस डोंगा परि रस नोहे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥ '–चोखा मेळा.

ऊंस बाहेर दिसतो काळा, आंत रसाचा आगळा—१ एखादा मनुष्य बाहेरून जरी वाईट दिसतो तरी अंतर्यामीं गुणी असतो. २ एखादा पदार्थ बाहेरून वाईट परंतु आंतून चांगला, अशास ही म्हण योजितात.

उंसाचा कोंब, खाण्याची बोंब—ऊंस लाविल्यामुळें धान्याची पेरणी व्हावी तितकी होत नाहीं. त्यामुळें खाण्याची रड होते.

उंसाचा गाळ, माशा फिरती रानोमाळ—उंसाचें गुऱ्हाळ चालू असतें तेथें माशा घोंगावतात. जेथें कांहीं थोडा तरी लभ्यांश असेल तेथें आशाळ लोक जमतात.

उंसाचा घाणा आणि एरंडाचें गुऱ्हाळ—उंसाच्या चरकाचा एरंड पिळण्याकडे उपयोग करणें म्हणजे चांगल्या वस्तूचा भलत्याच कामीं उपयोग. एरंडाच्या रसापासून कांहीं फायदा नाहीं.

उंसाच्या पोटीं काऊस—(व.) ऊंस गोड असतो पण त्याच्यापासून उत्पन्न होणारा त्याचा शेंड्याचा भाग म्हणजे वरचा तुरा अगदीं निरुपयोगी असतो; त्याप्रमाणें एखाद्या सद्गुणी मनुष्याच्या पोटीं दुर्गुणी संतती उत्पन्न झाल्यास असें म्हणतात. ' तुमचं नांव केवढं आणि तुमचे हे चिरंजीव तुमच्या अगदीं उलट. उंसाच्या पोटीं काऊस. '

उंसांत घुसून (धसून) पानोळीं अंगाला लागूं न देणें—(व.) ऊंस मोठा वाढला व त्यांतून जाण्याचा कोणी साध्या माणसानें प्रयत्न केला तर उंसाचीं पानें त्याच्या सहजच अंगाला खरचटतात, किंबहुना अंगाला त्यांच्या धारा लागून इजाहि होते. उंसांत धसून त्याच्या पानोळ्यानें अंग खरचटूं न देणारा इसम मोठा युक्तिबाज असावा लागतो. त्यावरून एखादा अपराध करूनहि युक्तिबाज वर्तनानें त्यांत आपलें बिलकूल अंग नाहीं असें लोकांस दाखविणें. ' घडयाळ चोरूनहि तो आतां उंसांत धसून पानोळींहि अंगाला लागूं देत नाहीं. '

उंसाबरोबर एरंडाला पाणी—चांगल्याबरोबर एखाद्या प्रसंगीं वाईटासहि लाभ होतो. गाडयाबरोबर नळयाची यात्रा.

ऋ

ऋण——ऋणत्रय—१ देवऋण, २ पितृऋण, ३ ऋषिऋण. ' मी ऋणत्रयापासून त्रिशुद्धि । मुक्त झालों भगवंता ॥ '

ऋणायत स्वरूपी—१ ऋणकरी. ' उगीच ऋणायत स्वरूप्यासारखे डोक्याला हात टेकून चार चौघे येतात तेथें बसूं नका. '–मोर ४. २ निरुपयोगी; दुसऱ्याला जड असणारा माणूस.

❀ ऋणकर्ता पिता शत्रुः—कर्ज करून ठेवणारा बाप शत्रूप्रमाणें असतो. कारण त्याचें कर्ज मुलांना फेडावें लागतें. सबंध श्लोक पुढीलप्रमाणें: ऋणकर्ता पिता शत्रुर्माताच व्यभिचारिणी । भार्या रूपवती शत्रुः पुत्रः शत्रुरपण्डितः ॥ म्हणजे ऋणकरी बाप, व्यभिचारी माता, रूपवती स्त्री व मूर्ख पुत्र हीं शत्रूप्रमाणें पीडाकारक होतात.

ऋण काढून सण–लग्न करणें—सण किंवा लग्न करण्यासाठीं लोकाचे पैसे उसने घेणें. ही प्रथा फार वाईट. जवळ पैसे नसतील तर सणवार करूं नयेत. ऋण काढून सण करावा ही गोष्ट वाईट आहे. केवळ वर्तमान कालाकडे पाहूं नये; पुढील गोष्टींची तरतूदहि केली पाहिजे.–पामो ३७९.

ऋणं कृत्वा घृतं पिब (पिबेत्)—यावज्जीवं सुखं जीवेत्, ऋणं कृत्वा घृतं पिबेत् । भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥ हा श्लोक व यांतील विचारसरणी चार्वाक या प्रसिद्ध नास्तिक पंडिताची समजतात. तो म्हणतो, जीवमान आहे तोंपर्यंत कर्ज काढूनहि चैन करावी. कारण मरणानंतर सर्व संपतें.

ऋण दिल्यावांचून फिटत नाहीं, आणि मरण आल्यावांचून सुटत नाहीं—कर्ज हें केव्हांतरी फेडावेंच लागतें व मनुष्याला मृत्यु हा केव्हांतरी येतोच.

ऋण फिटेल पण हीण फिटत नाहीं—एखाद्याचें कर्ज फेडतां येतें पण अपमानाचें शल्य कधीं काढून टाकतां येत नाहीं.

ऋण, हत्या आणि वैर चुकत नाहींत—कर्ज, खून व शत्रुत्व आपल्या मागचीं कधीं सुटत नाहींत व लपून राहात नाहींत. त्याबद्दल आपल्याला केव्हांना केव्हांतरी भरपाई करावी लागते.

ऋणको——ऋणको धनकोचा दास—ऋणाईत मनुष्य हा सर्वस्वी सावकाराच्या ताब्यांत असतो.

ऋणको धनकोची बायको--कर्ज असणाऱ्या मनुष्यास सावकार सांगेल तें बायकोप्रमाणें निमूटपणें ऐकणें भाग पडतें.

ऋणी——ऋणी बंदा सावकाराचा, जामीन बंदा दोघांचा--ऋणको फक्त सावकारालाच बांधला जातो पण जामीन राहणाराची दोघांशींहि सांगड पडते.

ऋतु——ऋतुत्रय—१ उन्हाळा, २ पावसाळा, ३ हिंवाळा. 'पैं ऋतुत्रय आकाशीं। धरूनियाही जैसें॥'—ज्ञा १४.२९१.

ऋतु (षट्)—१ वसंत, २ ग्रीष्म, ३ वर्षा, ४ शरत्, ५ हेमंत, ६ शिशिर.

ऋतु संपादणें--ऋतुकालीं संभोग देणें, करणें. 'दिवस पांचवा ऋतु संपादून मग जा गुणराशी।'—पला ९२.

※ **ऋतु प्राप्त झाल्यावरी पतीची इच्छा लागे**—स्त्रीस ऋतु प्राप्त झाल्यावर कामवासना उत्पन्न होते. योग्य समयीं मनुष्याचे विकार जागृत होतात.

ऋतूंत ऋतू, वसंत ऋतू--सर्व ऋतूंत वसंत हा श्रेष्ठ आहे. 'ऋतूनां कुसुमाकरः।'—गीता. 'ऋतूमध्यें हा पहिला वसंत। वाटे जनांला बहुधा पसंत। कीं बोलती हाचि सदा असावा। असें न कोणी म्हणती नसावा॥'

ऋषि——ऋषेश्वराचा कारभार—१ भोळा कारभार २ दिरंगाईचा कारभार.

※ **ऋषींचें कूळ आणि गंगेचें मूळ पुसूं नये; नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ विचारूं नये**--बहुतेक ऋषींचा मार्ग शोध करीत गेल्यास त्यांचा वंश हीन कुलापासूनच निघालेला आढळतो व नद्यांचा उगमहि नाल्यांपासूनच होतो. तेव्हां तिकडे लक्ष न देतां त्यांच्या स्वतःच्या योग्यतेकडे पाहावें. मार्गे जाण्यांत अर्थ नसतो.

ऋषींचें कूळ आणि हरळीचें मूळ--ऋषींचें कूळ पाहाणें व हरळीचें मूळ शोधणें म्हणजे फार खोल शिरावें लागतें.

ऋषीला नाहीं मूळ, राजाला नाहीं कूळ—अमक्याच कुळांत उत्पन्न झाला असतां तोच राजा होतो व ऋषीची उत्पत्ति ऋषीपासूनच होते, असा नियम नाहीं.

ए

एक——एक असणें-पडणें-होणें—एकमतानें असणें; एकत्र असणें; एकसमूहानें असणें; एकजूट करणें, होणें.

एक आईचीं लेंकरें—सख्खीं भावंडें; अगदीं जवळचा किंवा रक्ताचा संबंध असलेले लोक. 'एक आईचीं लेंकरें, संदेह टाकले म्हणजे स्वच्छताच आहे. नवे जडावे लागत नाहीं.'—पया १८५.

एक करतां बेक होणें—मनांतून एखादी गोष्ट करावयाची असतां ती न होतां भलतीच होणें; मनांत योजलेल्या गोष्टींच्या अगदीं विरुद्ध परिणाम घडून येणें.

एकछत्री राज्य—१ एकाच छत्राखालीं व सत्तेखालीं असणारें राज्य; सार्वभौम सत्तेखालीं असणारा मुलूख. 'हें भरतखंड इंग्लिश लोकांच्या एकछत्री राज्याखालीं आहे.'—केसरी. २ एकतंत्री, स्वतंत्र कारभार.

एक जीव जाणें, एक जीव येणें--अंतकाल समीप येणें; मरणोन्मुख अवस्थेंत असणें: अगदीं जगतो कीं मरतो अशा स्थितींत असणें.

एक डोळा—एकुलता मुलगा. म्ह०-'एक डोळा तो का डोळा म्हणावा?'

एक तोंड करणें—१ तोंड देणें; समोर होणें. २ रुजवात करणें; समोरासमोर आणणें; एकासमोर एक मांडणें; प्रत्यक्ष करणें.

एक धरून बसणें--हेका चालविणें; आपलेंच म्हणणें खरें करण्याचा प्रयत्न करणें; हट्ट धरून बसणें.

एक नंबरचा—अगदीं उत्तम; अव्वल दर्जाचा. २ प्रथम प्रतीचा, अट्टल (विद्वान्, शहाणा, मूर्ख, लबाड इ.).

एक नाहीं, दोन नाहीं—तोंडांतून कोणताहि शब्द न काढणें; कोणाच्या अध्यामध्यांत नसणें; मौन स्वीकारणें; तटस्थ-वृत्ति धरणें.

एकनिष्ठ काशीकर—काशीकर हा गुंड, लुच्च्या म्हणून प्रसिद्ध असे. अगदीं लबाड, फसव्या; पक्का ठक.

एकमुठी चालणें—एकमतानें वागणें.

एक म्हणविणें--प्रामुख्य दाखविणें; सर्वांचे पुढें असण्याची प्रौढी मारणें; सर्वांत श्रेष्ठ, उत्तम असल्याची शेखी मिरविणें; स्वतःबद्दलचा अभिमान किंवा मोठेपणा राखणें, प्रस्थापित करणें; आपण कोणी मोठे आहोंत असें मानणें.

एक शीर फाल्त--१ एखाद्या अर्धवट किंवा माथेफिरू माणसाबद्दल बोलतांना जसें इंग्रजींत हाफ् मॅड् म्हणतात, तसाच जवळ जवळ वरील म्हणीचा प्रयोग करतात. मेंदूच्या बुद्धिमत्ता-दर्शक शिरांपैकीं अमुक माणसाला एखादी शीर फाल्त म्हणजे कमी आहे, म्हणजे अमुक माणूस जवळ जवळ माथेफिरू आहे. २ शीघ्रकोपी माणूस.

एकसोस धरणें--[एकसोस = एक श्वास] कंठ दाटणें; गहिंवरणें; श्वास दाटणें; गळा भरून येणें.

एका करोडीची (लाखाची) गोष्ट—अगदीं महत्त्वाची, बहुमोल घटना. 'प्रस्तुत तीर्थरूप राजश्री दादासाहेब व आम्ही एक झालों हीच गोष्ट एका करोडीची जाहली.'–ऐले १.९१.

एका काठीनें हांकणें—समानतेनें वागविणें; सर्वांस सारखेंच लेखणें; एकाच योग्यतेनें वागविणें.

एका केंसास धक्का लागणार नाहीं--अगदीं किंचितहि इजा न करतां कोणतीहि गोष्ट करणें; पूर्ण सुरक्षिततेची हमी देणें.

एका खड्यावर बारा भिंती रचणें—सुतावरून स्वर्गाला जाणें, याप्रमाणें.

एका दगडानें दोन पक्षी मारणें--एका कामांत दोन कामें साधणें; एका उपायानें दोन कार्यें साधणें. तु०–एक पंथ दो काज. To kill two birds with one stone.

एका दिव्याखालीं दहाजण नांदणें--अनेक माणसांच्या एकत्र कुटुंबानें सलोख्यानें राहणें. –गांगा २०४.

एका देवळांतलें तेल चोरून दुसऱ्या देवळांत दिवा लावणें—एका ठिकाणीं चोरी करून दुसरीकडे पुण्यकर्म करावयास जाणें; एकाचें घेऊन दुसऱ्यास देणें; एकाची आगळीक करून दुसऱ्यावर उपकार करणें.

एका नावेंत बसणें—एका नावेंत असणाऱ्या उतारूंवर सारखेंच संकट येत असतें. कोणावर कमी, कोणावर जास्त असें होत नाहीं. यावरून एकाच परिस्थितींत सर्वजण असणें. 'हिंदु आणि मुसलमान–आपण सगळे–सध्यां एका नावेंत आहों–आपले हितसंबंध एक आहेत. मग आपण सख्ख्या भावांप्रमाणें प्रेमानें व एकदिलानें कां वागूं नये ?' तु०–To be in the same boat.

एका पायावर तयार असणें—एका पायानेंहि जाण्याची तयारी असणें, म्हणजे अगदीं उत्कंठित, उतावळा असणें; अतिशय उत्सुक असणें.

एका पिसानें मोर होणें—अल्प गोष्टीवरून फार संतोष मानणें किंवा मोठ्या फलाची अपेक्षा करणें; थोडक्या वैभवानें हुरळून जाणें व गर्विष्ठ होणें. तु०–अर्ध्या हळकुंडानें पिवळें होणें. One swallow does not make a summer.

एका पेण्यान घर शिवप—(गो.) एका पेंढीनें घर शिवणें. म्हणजे १ थोड्याशा साधनांनीं काम करूं बघणें; जवळ फारशी पुंजी नसतां मोठें कार्य अंगावर घेणें. २ एका सपाट्यांत काम संपविणें.

एकाच जिभेनें साखर खाणें किंवा विष्टा खाणें--एकदां एक बोलून मागाहून त्याच्या विरुद्ध बोलूं लागणें; दिलेल्या शब्दाच्या विरुद्ध वागणूक करणें; वचन मोडणें.

एकाचे एकवीस पांचाचे पंचवीस करणें--अतिशय वाढवून सांगणें; अतिशयोक्ति करणें; तिखट मीठ लावून सांगणें; थोडक्या गोष्टीचा मोठा बाऊ करणें.

एकाचे दोन करणें—फुगवून सांगणें; वाढवून सांगणें; अतिशयोक्ति करणें. तु०–पराचा कावळा करणें; राईचा पर्वत करणें.

एकाचे दोन लावणें–(व.) फुगवून सांगणें; साध्या गोष्टीला महत्त्वाचें स्वरूप देणें. 'तिनें नवऱ्याजवळ एकाचे दोन लावले व त्याला भावांतून वेगळे काढले.'

एकाला दहा उत्तरें देणें--कोणी आपणास एक अपशब्द बोलल्यास त्याची फेड दहा दुरुत्तरें बोलून करावयाची. अपकाराची सव्याज फेड करणें; बाकी न ठेवणें; उत्तरास प्रत्युत्तर देणें.

एकावर एक अकरा होणें—(गाडी इ.) उलथणें, पडणें.

एक्या मांडीचे—एकदां घोड्यावर मांड चढविली कीं काम झाल्याखेरीज ती मोडावयाची नाहीं, अशा ताकदीचे (लोक). अतिशय काटक व शूर. 'आम्ही आज पन्नास साठ हजार स्वार एका मांडीचे आहोंत. इतक्या फौजेनिशीं सारा मोंगल बुडवूं.' –पेच १४८.

※ **एक अंगाशीं तर एक खांद्याशीं**--लवकर लवकर मुलें होणाऱ्या स्त्रीस अनुलक्षून ही म्हण वापरतात. एक मूल जों खांद्यावरच आहे अजून चालवयास लागलें नाहीं तों दुसरें होणें.

एक अंगासीं व एक जांगासीं—एक मूल अंगावर व एक मांडीवर. वरप्रमाणें.

एक अणी चुकली कीं बारा वर्षांचा वायदा—[अणी=ऐन वेळ, संधी] १ एकदां आलेली संधि गमावली तर पुन्हां ती लवकर मिळण्याचा संभव नसतो. २ एखाद्या मोठ्या संकटांतून जर एक वेळ बाहेर पडलें तर पुन्हां दीर्घकाळ शांतता मिळते. (हिं.) 'एक आणी चूकी तो बारा बरसकी हयात.' –भाव ९४.

एक अपराध करी, दुसऱ्यावरी रागें भरी--अपराध एकाचा असून भलत्यासच शिक्षा मिळणें, चोरास सोडून संन्याशास सुळीं

देणें. They whip the cat if the mistress does not spin.—Spanish.—सवि ३६८२.

एक अपशब्द बोलावा, तसा दुसऱ्याचा घ्यावा—आपण जर दुसऱ्यास अपशब्द बोललों तर तोहि उलटून आपणांस अपशब्दांचा अहेर करणारच. याकरितां आपणच अपशब्द बोलण्याचें टाळावें, हा उत्तम मार्ग.

एक अरिष्ट निवारितां, दुजें न आणी आपले माथां—एका संकटापासून निवारण होण्याकरितां उपाय योजना करतांना हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, त्यामुळें दुसरेंच संकट आपणांवर येणार नाहीं.

एक असतां बळी, शंभराचे कान पिळी—एक मनुष्य जबरदस्त असला म्हणजे तो अनेकांस धाकांत ठेवूं शकतो. नाहींतर निर्नायकी होते.

एक असतां हातीं पक्षी, झाडीं दोहोंचा लाभ लक्षी—प्रत्यक्ष हातांत असलेला एक पक्षी झाडावरील पक्ष्यांपेक्षां अधिक आहे. भविष्यकाळीं मिळणाऱ्या किंवा दूर असलेल्या वस्तूपेक्षां जवळ असलेल्या अल्प वस्तूचीहि किंमत अधिक असते; कारण, तिचा उपयोग ताबडतोब करतां येतो. तु०—A bird in hand is worth two in the bush.

एक आग झाला तर दुसऱ्यानें पाणी व्हावें—एकानें कलह करण्याचें योजलें तर दुसऱ्यानें तो शांत करण्याचा प्रयत्न करावा; वाढूं देऊं नये. एकानें आग लावली तर दुसऱ्यानें ती पाणी टाकून विझवावी. वेगवेगळ्या स्वभावाचीं माणसें कुटुंबांत, संस्थेंत लागतात ती याचकरितां.

एक आळ आणि एक महाजाळ—'आळ' पहा.

एक इटेकरी व दहा पट्टेकरी (बरोबर)—इटेकरी पहा.

एक इष्काच्या अंतीं, अनेक विघ्नें येतीं—(अनावर) कामवासनेपासून अनेक संकटें येण्याचा संभव असतो. इष्क पहा.

एक उंदीर दोघी मांजरी, नांदत नाहीं एका घरीं—उंदीर व मांजर यांचें हाडवैर प्रसिद्धच आहे. त्यांत दोन मांजरी मिळून जर एकच उंदीर असेल तर त्यांचा आणखी कलह लागावयाचाच. तेव्हां जे जन्मजात शत्रु आहेत व कलहशील आहेत त्यांचें एकत्र वास्तव्य अशक्य आहे. तु०—एका म्यानांत दोन सुऱ्या.

एक उद्यां म्हणे, तर दिवस दुणे—एखादी गोष्ट एकदां उद्यावर टाकली म्हणजे ती अधिकच लांबणीवर पडते.

एक एक बात, नऊ नऊ हात; एक एक बात, सव्वा सव्वा हात—असंभाव्य व लांबलांब गप्पा मारणाऱ्या मनुष्याबद्दल योजतात.

एक एक मुस्किलके, हजार हजार आसान रखे है—(हिं.) एक गोष्ट अवघड तर हजार सुघड. जगामध्यें कठिण गोष्टीच तेवढ्या आपल्या नजरेस येतात व त्याबरोबर अनेक गोष्टी सुलभतेनें होण्यासारख्या असतात तिकडे आपलें लक्ष्य जात नाहीं व कठिण गोष्टींबद्दल मात्र आपण कुरकुर करतों.

एक एकां साह्य करूं। अवघे धरूं सुपंथ॥—परस्परांस साहाय्य केलें असतां सर्वांचाच कार्यभाग होतो व सर्वच चांगल्या मार्गाला लागतात.—तुगा ३२७८.

तुम्ही आम्ही एक, कंठाळीला मेख—'आम्ही तुम्ही एक०' पहा.

एक कमावतो, दुसरा खातो—कांहीं माणसें श्रम करतात तर कांहीं आळशी असून ऐतखाऊ असतात.

एक करी अपराध, दुज्या लाविती बाध—एक चुकी करतो व त्याचें प्रायश्चित्त भलत्यालाच मिळतें. तु०—चोर सोडून संन्याशाला सुळीं देणें, पहा.

एक कर्माकडे ओढी, एक संन्यासाकडे ओढी—कांहीं कांहीं वेळीं मनुष्याची द्विधा वृत्ति होते. एकदां वाटतें सर्व गोष्टींचा त्याग करावा; पण एखाद्या गोष्टीबद्दलची माया सुटत नाहीं. स्त्री व गुरु यांचें म्हणणें ऐकलें तर स्त्री संसारांत गुरफटवूं पाहते तर गुरु सर्वसंगपरित्याग करावा, असें सांगतो.

एक कहे लोहेको चुवा खाये, दुसरा बोले लडका ले गये चील—(हिं.) एक म्हणतो उंदरानें लोखंड खाल्लें तर दुसरा म्हणतो घारीनें मूल नेलें. गोष्ट—एका व्यापाऱ्यानें एकाजवळ लोखंडाचा तराजू ठेवावयास दिला व गांवास गेला. पुढें तो परत आल्यावर आपला तराजू मागूं लागला. तेव्हां ज्याजवळ दिला होता तो म्हणाला कीं, उंदरानें तुझा तराजू खाऊन टाकिला! त्यावर दुसऱ्यानें त्याचें मूल नदीवर स्नानासाठीं जातांना सोबतीस नेऊन तेथें लपवून ठेविलें व शोध करण्यास आला असतां सांगितलें कीं, मूल घारीनें नेलें! त्यावर मुलाच्या बापानें फिर्याद करतां त्याचें तराजूचा अपहार केल्याचें कपट बाहेर आलें व मग त्यानें तराजू परत देऊन मुलास परत आणलें. तुलां लोहसहस्रस्य खादन्ति यत्र मूषकाः। गजं तत्र हरेच्छ्येन्ते बालके कोऽत्र विस्मयः॥—पंचतंत्र १.४६४. तोडीस तोड; शेरास सव्वाशेर.

एक कान सहेरा न् एक बहेरा—(व.) एक कान चांगला तर एक कान बहिरा. कोणी आपल्या कानावर तक्रारी घालूं लागला तर त्यापैकीं कांहीं ऐकाव्यात व कांहीं ऐकूं नयेत.

एक काम एके वेळीं, दोन्ही नाहीं त्याच काळीं—एका वेळीं एकच काम करावें; अनेक गोष्टींत लक्ष घालूं नये. एकाच

वेळीं अनेक कामें करावयास घेतल्यास एकहि धडपणें होत नाहीं. One thing at a time.

एक काम, दोन काज—१ भिन्नभिन्न कारणांपासूनहि एखाद्या वेळीं एकच परिणाम झाल्याचें दिसून येतें. २ एक काम केल्यानें दोन कामें साधणें; एकाच कामांत दोन कामें उरकणें. तु०–एका धोंडयानें दोन पक्षी मारणें. एक पंथ दो काज, पहा.

एक कामीं बहुजण, लागतां करिती घाण—बाजवीपेक्षां जास्त माणसें एखाद्या कामांत पडलीं म्हणजे तें नीट न होतां बिघडण्याचाच संभव अधिक. तु०-Too many cooks spoil the broth.

एक कोल्हें, सतरा ठिकाणीं व्यालें—ज्याप्रमाणें मांजर व्याली असतां बोक्याच्या भीतीनें आपलीं पोरें अनेक ठिकाणीं हलवते त्याप्रमाणें कोल्ही आपल्या पिलांची जागा वारंवार बदलते. एकाच गोष्टीपासून अनेक प्रकारचा व अनेक ठिकाणीं उपद्रव झाला असतां योजतात. कोल्हा पहा.

एक खवळ्या मेंढा होतो, कळपीं रोग पसरतो—एखाद्या समूहामध्यें एक दोषी असला तरी तो बाकीच्या सर्वांस बिघडवितो. एक मूल दुर्गुणी निघाल्यास सर्व मुलांस बिघडवितें.

एक खांड दोघे खातात—(व.) इतकी मैत्री आहे कीं, सुपारी खावयाची झाली तरी दोघे मिळून खातात. एखाद्या गोष्टीचा दोघे मिळून उपभोग घेतात. अतिमैत्रीचें लक्षण.

एक गहू, प्रकार बहू—गहू हें धान्य जरी एकाच प्रकारचें दिसलें तरी त्याच्याहि अनेक जाती असतात. किंवा एकाच गव्हाच्या कणकेपासून अनेक प्रकारचे खाद्य पदार्थ तयार करतां येतात. मनुष्य जात जरी एकच असली तरी तींत अनेक निरनिराळ्या स्वभावाच्या व्यक्ति आढळून येतात. ' एक गहूं करिती अनेक प्रकार। सांजा दिवसीं क्षीर घुगरिया।'–तुगा ३१८४. ' गव्हांचिया होती परी। फकेवरी खाऊं नये।'–तुगा २७८१.

एक गेली वेळा, तर वर्सा गेली सोळा—(कों.) कोणतेंहि कामाला एक उत्कर्ष वेळा असते. ती एकदां गेली, तिचा फायदा करून घेतला नाहीं म्हणजे फिरून तशी वेळ येण्याला फार वर्षें वाट पाहावी लागते.

एक गोरी, बहात्तर (हजार) खोडी चोरी—स्त्रीचा रंग गौर असला म्हणजे तो वर्ण तिच्या अनेक खोडया झांकून टाकतो. स्त्रीच्या वर्णाचा प्रथम मनुष्यावर परिणाम होतो व तो अनुकूल झाला म्हणजे इतर गोष्टी त्याच्या फारशा लक्ष्यांत येत नाहींत. तोच वर्ण काळा असला म्हणजे प्रथमच प्रतिकूल ग्रह होऊन मनुष्याची दृष्टि इतर दोषांकडेहि जाते.

एक घटका निद्रा पूर्वरात्रीं, दोन घटका उत्तररात्रीं (उत्तर निशापरी)—मध्यान्ह रात्रीच्या पूर्वीं जर एक घटका झोंप मिळाली तर ती मध्यान्ह रात्रीनंतरच्या दोन घटका झोंपेप्रमाणें असते. मनुष्याला पूर्व रात्रीं जितकी गाढ झोंप लागते व तीमुळें जितकी विश्रांति मिळते तितकी उत्तर रात्रीं मिळत नाहीं. One hour's sleep before midnight is worth two hours after.–सवि २६१८.

एक घर उणें, तर दस घर पुणें––१ एकदां एका घराचा आधार सुटला म्हणजे मनुष्य मग स्वैर होतो; मग त्यास एकाच ठिकाणीं स्थिर राहण्याचें कारण उरत नाहीं. तो दहा घरें हिंडावयास कमी करीत नाहीं. त्याला सर्व दुनिया मोकळीच असते. २ मोठया शहरांत एखादी गोष्ट एका घरीं मिळाली नाहीं म्हणून कांहीं तीवांचून अडत नाहीं. शहरांत कांहीं एकच घर नसतें; तेव्हां दहा घरें फिरलें असतां कोठें तरी ती मिळतेच. तु०–(हिं.) एक घर सून तर दस घर पून.

एक घर उणें, तर दस घर सुणें––आपल्या घरांत जर एखादी वस्तु नसेल तर, ती मागावयास जर आपण दहा घरीं हिंडलों तरी ती मिळत नाहीं. तेव्हां आपणांस पाहिजे असलेली वस्तु आपणच बाळगली तर ती वेळेवर उपयोगी पडते. दुसऱ्यावर अवलंबून राहून केव्हांहि काम होत नाहीं. तु०–आपल्याजवळ नाहीं म्हणजे जगांत नाहीं.

एक घाव आणि दोन रुंडें (खंडें–तुकडे)—एका घावांत दोन तुकडे; झटपट, तावडतोब निकाल.–पामो १९२.

एक घाव दोन तुकडे, काम करावें रोकडें––वरप्रमाणें. तावडतोब निकाल होईल अशा तऱ्हेनें काम उरकावें. घोळ घालून बसूं नये.

एक घोडें, सतरा लोढें—१ एक घोडें प्रवाशास मिळेल तर त्यापासून जें सुख होतें तें पायानें चालल्यानंतर सतरा लोढांशीं टेंकून बसल्यानें होत नाहीं. २ घोडें एक झालें पण त्यासाठीं अनेक गोष्टी कराव्या, जुळवाव्या लागतात.

एकच कांकण, धन्याला राखण—(व.) सर्व बांगडया फुटून जाऊन एकच बांगडी एकाद्या बाईची न फुटतां राहिली म्हणजे असें म्हणतात. ती एक बांगडी म्हणजे धन्याला, नवऱ्याला रक्षण म्हणूनच राहिली समजावयाची. तेवढयानें तिचें सौभाग्य चिन्ह राहिलें.

एकच फोड दुखता, सगले आंगाक फोड जाल्यार खंय दुखता ?––(गो.) अंगावर एकाच ठिकाणीं फोड झाला असतां तो दुखतो म्हणून आपणांस वाटतें व त्याबद्दल आपण खंत करतों; पण सर्वांगालाच फोड झाले असतां त्याचें दुःख किती

करणार ? एखादीच आपत्ति आली असतां दुःख वाटतें पण सर्वच बाजूंनीं आपत्ती कोसळल्यावर दुःख करणेंहि सुचत नाहींसें होतें. तु०—अति झालें, हंसू आलें.

एकचारिणी नारी, पुरुषार्थ साधी चारी—जी स्त्री पतिव्रता असते व एकाच पतीशीं एकनिष्ठ असते तिला चारी पुरुषार्थांचा लाभ होतो. उलट जी स्वैरिणी असते तिला एकाहि पुरुषार्थाचा नीट लाभ होत नाहीं.

एक चेडवाक् कझर करूक बारा जुती झराउक जाय—(गो.) एका मुलीचें लग्न जमविण्यासाठीं बारा जोड्यांचे जोड फाडावे लागतात.

एक चोरी करतो, शंभरावर आळ येतो—चोरी करणारा मनुष्य एकच असतो पण त्याच्यामुळें ज्याची वस्तु चोरीस जाते त्याला अनेक लोकांचा संशय येतो. एकाचा अपराध अनेकांस भोंवतो.

एक जीव सदाशिव—(गो.) ज्या मनुष्याला बायको वगैरे परिवार नसेल त्यानें निरुपाधिकपणें एखादें चांगलें काम केलें पण बोलणाऱ्यास त्या कामाची पर्वा नसली किंवा त्या इसमाबद्दल हेवा असला म्हणजे असूयाबुद्धीनें बोलणारा वरील म्हणीचा प्रयोग करतो. ज्यास उद्देशून प्रयोग करावयाचा तो स्वतः परिवाररहित असा एकटा असल्यामुळें स्मशानवासी सदाशिवाप्रमाणें तो स्वच्छंदानें वाटेल तें करूं शकेल. अर्थात् परिवारादि उपाधि नसतां केलेल्या कामाचें महत्त्व नाहीं असा भावार्थ.

एक जूट, त्यांना कधीं न तूट—जुटीनें राहिल्यास, काम केल्यास कांहीं कमी पडत नाहीं. Union is strength.

एक झऱ्या उदाक मिटशेंनी गोडशें जाईत कशी ?—(गो.) एका झऱ्याचें पाणी खारट व गोडें कसें असेल ? विरुद्ध गोष्टी, भाव एकाच ठिकाणीं असूं शकणार नाहींत.

एक टांचा समयीं मारल्यानें नऊ टांचे वांचवितो—एखादें वस्त्र फाटावयास आरंभ होतांच जर एक दोन टांके तावडतोब घातले तर तें आणखी फाटत नाहीं व अधिक शिवावें लागत नाहीं. याप्रमाणें एखादें विघ्न येण्याच्या सुमारासच जर त्याचा योग्य बंदोबस्त केला, रोगाचा वगैरे प्रादुर्भाव होतांच उपशम केला तर पुढची पुष्कळच दगदग वांचते. तु०—One stitch in time saves nine.

एक टोळा, राम बोला—एका घावानें यमसदनास पाठविणें. 'राम बोला, भाई राम !' हा मृत्युसूचक वाक्प्रचार आहे.

एक ठेंच खाई तो बावन बीर होईल, बावन ठेंचा खाई तो गद्धा होईल—जो मनुष्य एकदां अनुभव आल्यानें त्यापासून शहाणपणा शिकतो तो पराक्रमी होतो; पण ज्याला अनेक ठेंचा खाव्या लागतात म्हणजे अनेकदां अनुभव येऊनहि शहाणपणा शिकतां येत नाहीं तो मूर्ख ठरतो.

एक ठेंचेनें न फिरे, तर दुसराहि पाय चिरे—एकदां ठेंच लागल्यावर माणूस परत फिरला नाहीं तर दुसराहि पाय जाया होतो. एकदां अनुभव आला कीं पुन्हां तशी गोष्ट करूं नये.

एक ठोका लोखंडावर, दोन मारी ऐरणीवर—१ एखाद्या मनुष्यास व्यवस्थित काम करण्याची संवयच नसते. तो एक काम बरोबर करतो तर दोन कामें चुकवितो व बिघडवतो. अशा तऱ्हेच्या अर्धवट माणसाबद्दल ही म्हण वापरतात. २ लोखंडावर एक ठोका जोरानें व बरोबर मारावयाचा झाल्यास दोन ठोके प्रथम नुसतेंच ऐरणीवर मारतात. कामचुकार माणसाबद्दल म्हणतात.

एक डोसी ने सो जोशी—(गु.) [डोसी = म्हातारी. जोसी = ज्योतिषी] अनेक ज्योतिषांच्या सल्ल्यापेक्षां एका वृद्ध बाईचा सल्ला अधिक हितकारक असतो. भविष्य वर्तवणाऱ्या मनुष्यापेक्षां अनुभविक मनुष्यावर विश्वास ठेवणें अधिक चांगलें.

एक डोळा तो का डोळा म्हणावा—मनुष्याला एकच डोळा असला म्हणजे त्याला फार जपावें लागतें. तो गेला कीं माणूस पुरा अंधळाच. त्याप्रमाणेंच मनुष्याला एकच मुलगा असला म्हणजे तो केव्हां दगावेल याची त्यास धास्ती असते, म्हणून तो गेला तर त्याच्या जागीं एक तरी दुसरा मुलगा असावा अशी त्याची इच्छा असते. तोपर्यंत तो निपुत्रिकांप्रमाणेंच दुःखी असतो.

एक ढेंकूण चावतो, शंभरांचा काळ होतो—अंथरुणामध्यें अनेक ढेंकूण असतां त्यांतील एक जर उतावळेपणानें निजणाऱ्या मनुष्यास चावला तर तो लागलाच जागा होऊन सर्व ढेंकणांस शोधून काढून मारून टाकतो. एका मनुष्याचा दोष अनेकांच्या नाशास कारण होतो. (गु.) एकने पापे सोनी होडी डुबे.

एक तंगडें न् शंभर घोंगडें—(वांयदेशी) एका स्त्रीची ऊब शंभर घोंगड्याबरोबर आहे.

एक तवेकी रोटी, क्या छोटी क्या मोठी—एकाच तव्यावर भाजलेल्या भाकरी, त्यांत लहान मोठी काय पाहावयाची. तव्याचा आकार ठराविक असल्यामुळें त्याच अंदाजाच्या सर्व भाकरी व्हावयाच्या. एकासारख्या दहा वस्तू असतां त्यांत लहान मोठी निवड करणें व्यर्थ होय. एकाच आईचीं मुलें असतां त्यांत चांगलें वाईट काय पाहावयाचें. कांहीं गुण सर्वांस सामान्य असावयाचेच, व थोडा फार फरकहि असावयाचाच.

एक तारीं जेवणें आणि घांस मोजणें—एकीकडे एका ताटांत जेवण्याइतकें प्रेम दाखवावयाचें व एकीकडे दुसरा कांहीं अधिक खातो कीं काय याकडे लक्ष ठेवावयाचें. म्हणजे वरून प्रेम दाखवावयाचें व आंतून अविश्वास बाळगावयाचा, असा अर्थ. तु०—तुम्ही आम्ही एक आणि कंठाळीला मेख.

एक तिडीक दे आणि घरची धनीण हो—ज्या स्त्रीस मूल होईल तिला इतर स्त्रियांपेक्षां मान अधिक मिळतो व ती घराची मालकीण मानली जाते. याकरितां तिनें प्रसूतीच्या वेदना सहन केल्याच पाहिजेत. श्रम केल्याशिवाय फळ मिळत नाहीं.

एक तीळ सात ठिकाणीं; एक तीळ सात भावांनीं वांटून घ्यावा—एकत्र कुटुंबांत असलेल्या भावांनीं कोणासहि कांहीं अल्पहि लाभ झाला तरी त्याचा वांटा सर्व भावांस देऊन सर्वांचें समाधान राखावें; म्हणजे सर्वांचीं मनें मिळून वितुष्ट येणार नाहीं. –पामो ४९.

एक दर बंदा, हजार दर खुले–(हिं.) एक दरवाजा बंद असला तर दुसरे हजार मोकळे आहेत. एका मार्गानें काम होत नसेल तर दुसरे मार्ग पाहावे. कोणत्या तरी मार्गानें तें होतेंच. तु०—Where there's a will, there's a way. एक घर उणें तर दस घर पुणें.

एक दाणा दोन फोडी, खाणाराची खोड मोडी—हा उखाणा आहे; याचें उत्तर हरभरा असें आहे. कांहीं ठिकाणीं जेपाळ असेंहि उत्तर देतात. जेपाळाच्या दाण्यासहि दोन फोडी असतात व तो भयंकर रेचक असतो. म्हणच आहे : जेपाळाची मात्रा आणि स्वर्गाची यात्रा.

एक दिलें घर ना जाल्यार नाल्लें घर—(गो.) ही म्हण कुलीन स्त्रियांचे बाबतींत लागू आहे. स्त्रियांनीं लग्न करून दिलेल्या घरीं (सासरीं) अथवा जन्मलेल्या घरीं (माहेरीं) राहणें योग्य. तु०—आप घर कीं बाप घर.

एक दिवस पाहुणा, दुसरे दिवशीं पै, तिसरे दिवशीं अक्कल नाहीं; एक दिवस पाहुणा, दुसऱ्या दिवशीं पै, तिसऱ्या दिवशीं राही त्याची अक्कल जाई; (हिं.) एक दिन मेहमान, दो दिन मेहमान, तिसरे दिन यहान—पाहुणा मनुष्य आला तर त्याचा पहिल्या दिवशीं विशेष आदर होतो, दुसऱ्या दिवशीं साधारण होतो; पण तिसऱ्या दिवशीं राहिल्यास अनादर होण्याचा संभव असतो. तेव्हां शाहण्या मनुष्यानें फार दिवस पाहुणचाराची अपेक्षा करूं नये.

एक दिस मांयलो, एक दिस सुनेलो; एक काळ मांयचो जाल्यार एक काळ सुनेचो—(गो.) एक दिवस सासूचा व एक दिवस सुनेचा (वर्चस्व असण्याचा). प्रत्येकाची सद्दी कांहीं दिवसच चालते. तु०—चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे.

एक दीस मेल्यार कोण तरी रडतलो, सदा मेल्यावर कोण रडतां ?—(गो.) नेहमींच दुखणाईत असलेल्याची कोण पर्वा करतो ? जो मनुष्य नेहमींच कुरकुर करीत असतो त्याच्या तक्रारीकडे कोणी लक्ष्य देत नाहीं. नित्य मरे त्यास कोण रडे.

एक दुदावतो पांखरें, दुजा जाउनीयां धरे—[दुदावणें = पिटाळून लावणें] एक पांखरांस उठवितो तर दुसरा आयते त्यांस धरतो. एक श्रम करतो व त्याचें फळ दुसरा घेतो. आयता पहा.

एक देवमणी बाहात्तर खोडी लपवितो—घोड्याला देवमणी हें शुभ चिन्ह असल्यास इतर अनेक अशुभ चिन्हांचें फळ नाहींसें होतें. एक चांगला गुण असतां तो अनेक लहान सहान दुर्गुणांवर पांघरूण घालूं शकतो. तु०—एक गोरी बाहात्तर खोड्या चोरी. ‘ तुका म्हणे खोडी । देवमणीने देती दडी । ’—तुगा ३१८७. ‘ बाहात्तर खोडी परी देवमण कंठी । तैसा मी जगजेठी म्हणे तुका । ’—तुगा १६७५.

एकदेशी, पडतो फशी—जो मनुष्य अगदीं एकमार्गी असतो, इकडचा तिकडचा कांहीं विचार करीत नाहीं त्याची शेवटीं फसगत होते.

एकदोन दिवस पाहुणा, तिसरे दिवशीं लाजिरवाणा—वर पहा. एक दिवस पाहुणा० पहा.

एक धड ना (एक ना धड), भाराभर चिंध्या—एकहि जर वस्त्र धड नसेल तर अनेक भाराभर चिंध्यांचा नेसण्याच्या कामीं काय उपयोग ? एकहि चांगली धड गोष्ट नाहीं तर फुटकळ तुकड्या ताकड्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. ‘ एक धड ना भाराभर त्या चिंध्या काशाला ॥ ’-हरिकवि-नवनीत. “कांहीं दिवस हा अभ्यास कर, कांहीं दिवस तो कर, पुढें तिसराच हातीं घे... असें होतां होतां ‘ एक ना धड० ’ असा प्रकार होतो. ”

एक धनुष्यास दोन दोऱ्या, उपयोगी पडती बऱ्या—धनुष्याची एक दोरी तुटली तर दुसरी लावण्याला संग्रहीं असली तर वेळेवर उपयोगी पडते. कार्यास जरूर त्यापेक्षां अधिक सामुग्री व तयारी ठेवल्यास वेळेवर धांदल होत नाहीं. तु०—To provide two strings to a bow.

एक धोत्री, महाक्षेत्री—१ क्षेत्राच्या ठिकाणीं राहणाऱ्याला एका धोतराशिवाय कांहीं लागत नाहीं. जवळ फक्त एक धोतराशिवाय कांहींएक न बाळगतां सर्व तीर्थक्षेत्रांची यात्रा करणारा. २ ज्याला अगदीं आगापिच्छा नाहीं असा. ३ एक धोत्री फार सबाड, तो बारा गांवचें पाणी प्यालेला असतो त्यामुळें त्याला पुष्कळ गोष्टी साध्य असतात.

एक धोसानें (बल्यानें) होडि बुडता, एक किटिनें घर जळता—(गो.) एका वल्ह्यानें होडी बुडते, व एका ठिणगीनें घर जळतें. नाशाला लहानसें कारण पुरतें.

एक नकार छत्तीस विघ्नं वारी—एक नकार दिला म्हणजे पुढली सर्व ब्याद टळते. होय म्हटलें म्हणजे मग लचांडें उत्पन्न होतात. तेव्हां नकार देण्याचा निर्भीडपणा धरला पाहिजे. पुढें पहा.

एक नन्ना म्हणती, आलें दुःख निवारती; एक नन्ना सर्व साधी—एक नाहीं म्हटल्यानें अनेक अडचणी येण्याचें टळतें. एखाद्याच्या भिडेनें एखाद्या गोष्टींत होकार दिला म्हणजे मागाहून अनेक गोष्टी आपल्यास कराव्या लागून त्यापासून फार त्रास होतो; त्यापेक्षां प्रथमच एकदां थोडें मन घट्ट करून नकार भरला म्हणजे पुढील सर्व यातायात वांचते. (हिं.) एक नन्ना सौ दुःख हरे. (गु.) एक नन्ना सो दुःखने टाले.

एक नळी अन् शंभर पोळी—(वांयदेशी-कुण.) बकऱ्याची एक नळी (हाड) जेवणांत असली म्हणजे शंभर पोळ्या खाऊन जी ताकद येईल तेवढी येईल. म्हणजे या मांसाहाराचें महत्त्व फार आहे.

एक नाम केशव—अनेक देवांची भक्ति करण्यापेक्षां एका देवाची एकनिष्ठेनें भक्ति करावी. मनुष्यानें परमेश्वराची एकनिष्ठेनें भक्ति केल्यास फलप्राप्ति होते. त्याप्रमाणें एक निश्चय करून त्या मार्गानें गेल्यास यश येतें. एको देवः केशवो वा शिवो वा एकं मित्रं भूपतिर्वा यतिर्वा । एका भार्या सुंदरी वा दरी वा एको वासः पत्तने वा वने वा ॥

एक नाहीं (कीं) दोन नाहीं—१ मौन स्वीकारणें; कांहीं हालचाल न करणें; ' बाळा ! तुला लाडू देऊं कीं करंजी हवी, असें त्याला शंभर वेळां विचारलें असेल; पण त्याचेकडून एक नाहीं दोन नाहीं. '-करमणूक. २ कोणाच्या अध्यामध्यांत न पडणें; तटस्थता स्वीकारणें.

एक नाहीं धड, गुबड्यापासून जड—[गुबडें = कंबरडें.] एकहि अवयय ज्याचा अव्यंग नाहीं, शिवाय ज्याच्या कंबरड्याखालचा भाग जड आहे म्हणून ज्याच्या सर्व क्रिया अति मंदपणें होतात असा अगदीं कुचकामाचा मनुष्य. अगदीं टाकाऊ, निरूपयोगी माणूस.

एक नाहीं मन, व्यर्थ कुबेराचें धन—चंचलबुद्धी श्रीमंताचा कांहीं उपयोग नाहीं.

एक निजेन (न्हिदेन) फाल्या जायना—(गो.) एका झोंपेनें उजाडत नाहीं, एकदां निजल्यावर उजाडत नाहीं; मध्यें केव्हांतरी जागे व्हावे लागतें. त्याप्रमाणें एका दमांत, घटकेंत सारीं कामें उरकतात असें थोडेंच आहे.

एक नूर अदमी, ने दस नूर कपडा (हजार नूर घरेणां, ने लाख नूर नखरा)—(गु.) मनुष्याच्या रूपापासून त्याला एकपट शोभा येते तर वस्त्रापासून दसपट येते. दागिने वगैरेमुळें हजारपट तर हावभाव-पानपोकींपासून लाखपटीनें त्याचें सौंदर्य वाढतें. God makes and apparel shapes.

एकपट रूप व दुप्पट पोषाख—रूपाची शोभा असते तिच्या दुप्पट पोषाखानें येते. ' एक नूर अदमी० ' पहा.

एकपट लष्कर, सातपट कतवार—[कतवार = बाजारबुणगे] लष्करापेक्षां बाजारबुणगे फार. मुख्य गोष्टीपेक्षां आनुषंगिक गोष्टींचा बाजार असतां वापरतात.

एकपट विद्या, दसपट गर्व—एखाद्या मनुष्याजवळ फार थोडी विद्वत्ता असते पण तीबद्दल त्याला अभिमान फार असतो.

एक पंथ (और) दो काज—एक गोष्ट केल्यानें दोन कामें आपोआप होणें. ' एका धावांत दोन बळी ' याप्रमाणें. तु०-एका धोंड्यानें दोन पक्षी मारणें. To kill two birds with one stone. ' एक पंथ दो काज, असें ध्यानांत आणून मान्य केलें. ' -भाव ३६. " शहाण्या लोकांस म्हणतांना मीं ऐकिलें आहे कीं, ' एक पंथ दो काज ' हा मार्ग एक पंथ एकच काज यापेक्षां जास्त सोयकर आहे. "-शाब. १.४३;१.१७७.

एक पाणी, नरकवाणी—एकाच ठिकाणचें पाणी पिण्यास, स्नान करण्यास, धुण्यास, भांडीं घासण्यास वगैरे प्रकारें वापरल्यास तें अतिशय घाणेरडें होऊन त्यापासून रोगराई होण्याचा संभव असतो. पाण्याचें एकच साधन पण तें सुद्धां अगदीं वाईट, म्हणजे हाल काय विचारावे. एकुलता पण अतिवाईट निघालेल्या मुलाबद्दल म्हणतात.

एक पाय तळ्यांत नि एक पाय मळ्यांत—दोन दगडीवर हात ठेवणें; दुटप्पी वर्तन अंगिकारणाऱ्या माणसाबद्दल म्हणतात. अनिश्चित स्वरूपाची स्थिति. ' पंडित नेहरू यांची स्थिति एक पाय तळ्यांत, एक पाय मळ्यांत अशी स्थिति आहे. ' -केसरी २७-६-३९. ' एक पाय तळ्यांत नि एक पाय मळ्यांत अशा स्थितींत आज मुसोलिनी उभा आहे. त्यामुळें ब्रिटन फ्रान्स हीं दोस्त राष्ट्रें आणि जर्मनी आपापल्या परीनें त्याला आपल्या बाजूला वळवून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. ' -केसरी ३०-४-१९४०. [लहान मुलांचा सुसर-तळ्याचा खेळ आहे; त्यांत एका अंगणांत एक मोठा मळा आहे असें समजून खडूनें वर्तुळ काढतात. त्या वर्तुळांत ज्यावर राज्य आलें असेल त्यानें सुसर म्हणून उमें राहावयाचें व सर्व बाजूंनीं इतर मुलांनीं

तळ्यांत पाय देऊन जावयाचें. तळ्यांत पाय असतांना सुसरीनें पकडल्यास राज्य जावयाचें. अशा वेळीं मुलें सुसरीच्या सर्व बाजूंनीं पण तिला चुकवून एक पाय तळ्यात व एक मळ्यांत अशीं मधून मधून उभीं राहतात व हें अथवा 'सुसरीणबाई तुझी पाठ मऊ' अशा प्रकारचें गाणें गातात.]

एक पाय वेश्या घरीं, दुसरा पाय वैद्याचे घरीं—जो मनुष्य वेश्यागमन करतो त्याला रोग झाल्याशिवाय राहात नाहीं. तेव्हां त्याला लागलेंच वैद्याचें घर पाहावें लागतें.

एक पायरी चुकणें, खालीं येऊन पडणें—जिना उतरतांना जर मध्येंच एक पायरी सोडली तर एकदम खालीं पडण्याचा संभव असतो. त्याप्रमाणें प्रत्येक गोष्ट योग्य क्रमानें करीत गेलें तर साधतें; नाहींतर बिघडण्याचा संभव असतो. एक गोष्ट चुकली म्हणजे सर्वच्या सर्व बिघडतें.

एक (एका) पावसाक एक सात्तें पिंदु नयें— (गो.) एका पावसाळ्यांत एक छत्री फाटूं नये. कांहीं टिकाऊपणा पाहिजे. अगदीं क्षणभंगुर स्थिति उपयोगी नाहीं.

एक पाहुणा म्हणजे घरदार पाहुणे; एक पाहुणा तर घर पाहुणे—१ पाहुण्याकरितां एखादा गोडधोड जिन्नस केला तर तो एकट्यापुरता न करतां घरांतील सर्व माणसांना पुरेसा करावा लागतो. पण त्यामुळें खर्च वाढतो. २ एक पाहुणा घरीं असला म्हणजे घरांतल्या सर्वांनाच संकोचल्यासारखें होतें, व त्यांना मोकळें वाटत नाहीं, अडचण सोसावी लागते.

एक पुती रडती, दुपुती रडती, सातपुती रडती आणि निपुती रडती—ज्या स्त्रीला एकच पुत्र आहे ती तो केवळ एकटाच आहे, तो गेल्यास निपुत्रिक होण्याची भीति म्हणून शोक करते; जीस दोन आहेत तीहि एक गेला तर एकच राहतो म्हणून रडते; जीस सात पुत्र आहेत ती अष्टपुत्रा० या आशीर्वादांतील भाग्यास एक कमी म्हणून कष्टी असते; व जीस मुलेंच नाहीं ती तर निपुत्रिक म्हणून दुःख करीत असतेच. म्हणजे सर्वच असंतुष्ट; कोणासहि समाधान नाहीं.

एक पुती रडे, सातपुती रडे, रात्रीं पाट लावला तीपण रडे—वर प्रमाणेंच. शिवाय जिनें नुकतेंच लग्न केलें आहे तीसुद्धां आपणांस केव्हां एकदां पुत्र होतो या विवंचनेनें झुरत असते. (पाटाचें लग्न रात्रीं व तेंहि अमावास्येस लागतें.)

एक पुती रडे, सातपुती डोळा नुघडे; एक पुती रडे व सातपुती रडे—वरच्या प्रमाणेंच.–शाब २.२८०.

एक पेरतो आणि दुसरा कापतो—एकाच्या श्रमाचें भल- त्यालाच फळ मिळालें म्हणजे ही म्हण योजतात.

एक पैसा असला म्हणजे बाजारांत पाहिजे तो जिन्नस मिळतो—पैशामुळें वाटेल ती गोष्ट साध्य होते. तो असला म्हणजे अडचण पडत नाहीं.–शाब २.२६९. तु०–द्रव्येण सर्वे वशाः ।

एक पैशा म्हालु व्हावंचाक दोन पैशा कूलि—(गो.) एक पैशाचा माल वाहण्याला दोन पैशाचा मजूर! पुढील म्हण पहा.

एक पैशाचे तेल, दोन पैशाचा हेल—क्षुल्लक गोष्टीसाठीं भारी खर्च करणें. 'अडक्याची भवानी०' पहा.

एक प्रीति लागती, दुजी विसरती—मनुष्याला एका मनुष्याचा लळा लागला म्हणजे तो दुसऱ्यास विसरतो. पुढें आणखी एखाद्याचा लागल्यास पहिल्यास विसरतो.–सवि २६२३.

एक फुलाने माळा जाईना, एक झाडानें रान जाइना—(गो.) एका फुलानें (हार) होत नाहीं, एका झाडानें रान होत नाहीं. One swallow does not make a summer.

एक बगलांट खरे कसूंक धा बगलाटा कसूंक जाय—(गो) [बगलांट=खोटें भाषण] एक खोटें बोललें म्हणजे तें खरें ठरविण्यास पुष्कळ खोटें बोलावें लागतें. One trick needs a good many more to make it good.

एक बळी, हजार छळी—एक मनुष्य अरेराव असला म्हणजे तो अनेकांस त्रास देतो.

एक बाईनें नहि दिया आटा, तों उपट गया झाट?—एका बाईनें भिक्षा घातली नाहीं म्हणून तिची काय पर्वा करावयाची. आणखी दहा घरें भीक मागितली म्हणजे झालें. कोणीतरी देतोच. तु०–एक घर उणें तर दस घर पुणें.

एक बाजी और सब् पाजी—पहिल्या बाजीरावाच्या वेळीं ही म्हण प्रचारांत आली. एक बाजीराव सोडला तर त्याच्याशीं तुलना करण्यासारखा अखिल महाराष्ट्रांत एकहि दुसरा मनुष्य नव्हता. याच्या जोडीनें 'एक निझाम और सब् हजाम.' पुढें पहा.

एक बाजी सब् पाजी, एक निजाम सब् हजाम—ज्याप्रमाणें बाजीरावाशीं तुलना करण्यासारखा दुसरा मनुष्य पेशवाईंत नव्हता त्याप्रमाणें निजामाशीं तुलना करण्यासारखा मनुष्य निजामशाहींत नव्हता. "नबाब बोलतात, 'एक बाजी सब् पाजी.' हें श्रीमंतांनीं ऐकून श्रीमंत नबाबांस बोलले, 'एक निजाम, सब् हजाम.'"–पेब २४.

एक बायकोची पाठ, पासोड्या तीनशें साठ—स्त्रीच्या सान्निध्यांत निजलें असतां जें शीतनिवारण होतें तें कितीहि पांघरूणें घेतलीं तरी होत नाहीं.

एक बाळंतीण आणि बारा सुईणी—बाळंतीण एकच स्त्री व्हावयाची असते पण तिच्या भोंवतीं अनेक स्त्रिया जमून गोंधळ करतात. अनेक अडाणी माणसें एकत्र जमलीं असतां काम नीट होण्याच्या ऐवजीं बिघडण्याचा मात्र संभव असतो त्यापेक्षां एक तज्ज्ञ चांगला.तु०-Too many cooks spoil the broth.

एक बोलेना बंदर, तर काय ओस पडेल जुन्नर—एकानें बंदराचा पत्ता सांगितला नाहीं म्हणून कांहीं जुन्नर ओस पडलें नाहीं. एखाद्या मनुष्यानें एखादें काम करावयाचें नाकारलें किंवा एखादी माहिती दिली नाहीं म्हणून कांहीं तो अडून राहात नाहीं किंवा ती मिळावयाची राहात नाहीं. गांवांतील कोणा तरी दुसऱ्याकडून तें काम करून घेतां येतें. जुन्नर ही एक पूर्वीं फार मोठी पेठ होती; तेथून देशावरचा माल नाणे घाटांतून कोकणांत जात असे व तिकडून बाहेर देशचा बंदरांत येणारा माल देशावर येत असे. तेव्हां जुन्नरवरून बंदरावर जाण्याची वाट होती. [मॅनवरिंगनें 'बांदर' (माकड) असा पाठ दिला आहे पण त्यावरून नीट अर्थबोध होत नाहीं.]

एक भय दोन जागा असतें—एकदां मनानें भय घेतलें म्हणजे त्याची व्याप्ति वाढत जाते. मनानें कच खाल्ली म्हणजे त्याचा परिणाम दूरवर होतो. -खरे २६२१.

एक भाकरी, सोळा नारी—१ सोळा स्त्रिया मिळून जर एक भाकरी करतील तर ती नीट होणार नाहीं. २ सोळा स्त्रियांमध्यें जर एक भाकरी वाटावयाची असेल तर सर्वच उपाशी राहातील.

एकभुकी सदा सुखी—[एकभुक्ती असा पाठ बरा] मनुष्यानें दिवसांतून एकदांच जेवण्याचा परिपाठ ठेवल्यास तो निरोगी राहतो. कारण बहुतेक रोगांची उत्पत्ति अजीर्णापासून होते. तसेंच जो थोडी भूक ठेवून जेवतो तोहि निरोगी असतो. भुकी तो सुखी, पहा. तु०- टाका आगळें लिहावें आणि घांसा आगळें जेवावें.

एक मच्छली सारी झीलको गंदाती है—[मच्छली = मासळी. झील = झरा.] एक मासा (मेलेला) सर्व झऱ्याला घाणेरा करतो. दुधांत मिठाच्या खड्याप्रमाणें एखादी लहान गोष्टहि सर्व नाशाला कारण होऊं शकते.

एक मताचे होऊन, करावें दुष्टांस शासन—जर एखाद्या दुष्ट मनुष्यापासून आपणांस त्रास होत असेल तर सर्वांनीं एकमत करून त्याचें पारिपत्य करावें.-सवि २१६५.

एक मानें नै दिया आटा, तो क्या भुका मरेगा बेटा—(हिं.) गोसावी आपल्या शिष्यास सांगत आहे कीं, एखाद्या घरच्या स्त्रीनें भिक्षा घातली नाहीं म्हणून काय आपण उपाशी मरूं कीं काय ? कधींहि नाहीं. कारण आपणास ती दुसऱ्या घरीं मागितली असतां कोठेंतरी मिळेलच. तु०-भिक्षा मागणारास दहा घरें.

एक मारी उंडे, एक मारी मांडे—उंडे हे तांदूळ आणि उडीद यांच्या पिठाचे 'केक' प्रमाणें तयार केलेला एक पदार्थ असून गोंव्यांत, कर्नाटकांत सकाळीं पावाप्रमाणें खातात. हा पदार्थ जड असतो. मांडे हे कणकेचे फार पातळ पापड्या असलेले पोळ्यांसारखे तयार केलेले असतात. एखाद्याकडे उंडा फेकला तर तो त्याला लागल्यास उंडा फुटणार नाहीं व लागणाऱ्यास कांहीं तरी इजा करील. पण मांडा फेंकल्यास त्याचा चुरा होऊन जाईल व ज्याकडे फेंकला त्यास नीट लागणारहि नाहीं. याकरितां एखाद्यानें आपणाकडे उंडा फेकला तर त्याचा प्रतिकार मांडा फेंकून करण्यापेक्षां धोंडा फेंकून पाहिजे तर करावा; मांडा फेंकून कांहीं होणार नाहीं. एखाद्यानें आपणास अपकार केल्यास त्याचा योग्य मार्गानें प्रतिकार करावा; उगाच कांहीं तरी दुर्बल अनुकरण करूं नये.

एक मार्गीं मिळविणें, दुजे मार्गीं घालविणें—एकीकडे मिळवावयाचें व दुसरीकडे खर्चावयाचें; मिळून शिलक बरोबरच, म्हणजे कांहीं लाभ नाहीं.-सवि ४०२५.

एक मूर्ख आपले परी, बहू लोकांतें करी—एक मनुष्य मूर्ख असला म्हणजे तो आपल्या नादानें अनेकांस मूर्ख बनवतो.

एक मेंढा पुढें चालतो, त्या मागें दुजा जातो—मेंढ्यामागून मेंढरूं जातें. कांहीं लोकांस अंधानुकरण करण्याची संवय असते तीस उद्देशून ही म्हण वापरतात. पुढील मेंढरूं जर खड्डयांत पडलें तर मागील मेंढरेंहि विचार न करतां पुढच्याप्रमाणें खड्डयांत पडतात.-सवि २६४२. One sheep follows another.

एक मेली चेडी, तर काय वसाड पडली वाडी—(गो.) कोणावांचून अडून राहात नाहीं.

एक मेहनत करतो, दुजा फळ घेतो—एक श्रम करतो व त्याचें फळ दुसऱ्यास मिळतें. मागें पहा.

एक म्हजें काल्वं, खैंचे तवलेंत घाल्वं ?—(गो.) मजजवळ एक कालव आहे, त्याला कोणच्या तवलींत घालूं ? कांहीं जण आपल्या जिन्नसाचें किंवा माणसाचें अति कौतुक, सोपस्कार करतात, त्याला उद्देशून म्हण.

एक म्हणती आंबा, तर एक म्हणतो चिंच—(व.) आंबा आणि चिंच हे दोन मोठे वृक्ष दोन पक्षांच्या नेत्यांचे प्रतिनिधिभूत मानले. एका मनुष्यानें एक ठराव पुढें मांडला कीं दुसऱ्यानें विरुद्ध जाऊन विरोधी ठराव आणणें; अशा तऱ्हेची प्रवृत्ति, ऐक्याभाव या म्हणीनें सुचविला जातो.

एक रात्र राहणें, गांव कांगे लहान—मनुष्यानें आपल्या

पुरतें पाहावें, जास्त भानगडींत पडूं नये. ज्याला एकच रात्र एखाद्या ठिकाणीं घालवावयाची, त्यानें त्या गांवाच्या लांबीरुंदीची किंवा वस्तीची चौकशी कशाला करावी? फारसा अनुभव घेतल्यावांचून उगाच मत देणें हा मूर्खपणा होय.

एक रुईचा चीक तर दुसरा शेराचा चीक, दोघे सारखेच—एकाच माळेचे मणी. उडदामाजीं काळेगोरे पहा.

एकलज्जां परित्यज्य सर्वत्र विजयी भवेत्—मनुष्यानें एक लाज सोडली म्हणजे त्याला कोठेंहि धरबंद राहात नाहीं.

एक लट्ट्या अन् बारा बिट्ट्या—(वायदेशी) पुष्कळ अशक्त लहान मुलें असण्यापेक्षां एक चांगला दणदाकट मुलगा पत्करतो. तु०—एकोऽपि गुणवान्पुत्रो निर्गुणैः किं शतेन तैः।

एक लबाडीच्या योगें, बहु येती तिच्या मागें—मनुष्यानें एक लबाडी केली म्हणजे ती पचविण्यासाठीं हजार लबाड्या कराव्या लागतात.—सवि २६२२. One lie makes many.

एक लिखा और सो (सब्) बका—(हिं.) तोंडी पुरावे हजार असले तरी ते एका लेखी पुराव्यापुढें रद्द होत. हजार तोंडी पुराव्यांस एका लेखी पुराव्याची सर येत नाहीं.—गांगा १२४. (गु.) एक लख्युं ते सो भख्युं.

एक लेंड्या दोन कुडके, एक घाणटा आनी एक परमळटा; एकाच लेंडाचे कुडके, एक परमाळता नी एक घाणता—(गो.) [लेंड = डुकराच्या विष्टेचे गोळे. कुडकें=तुकडे] एकाच घाणींतील दोन भाग घेतले तर त्यांतील एकाचा गोड वास व दुसऱ्याची घाण, असें कधीं होतें का? दोन्ही सारखेच घाण. दोन्ही एकाच वस्तूचे घटक असल्यानें परिणामदृष्टीनें सारखेच आहेत. एका गृहस्थाचे दोघे मुलगे कमी जास्त प्रमाणांत दुर्गुणी असले आणि त्यांची लायकी एका वाक्यांत सांगावयाची असली म्हणजे या म्हणीचा उपयोग करतात. तु०—उडदामाजीं काळे गोरे। काय निवडावे निवडणारें॥

एक वर्ष दाईपणा, बहुवर्षे अशक्तपणा (जाणा)—स्त्रीला मूल झालें म्हणजे एक वर्षपर्यंत त्या मुलाची तिला जोपासना करण्याचा भार तिजवर पडतो; पण त्यामुळें बरींच वर्षे तिला अशक्तताहि येते.

एक वाईट आचरतो, पाहून दुसरा करितो—एक दुर्गुणी मनुष्य अनेकांस बिघडविण्यास कारण होतो.

एकवृंतगत फलद्वय न्याय—एक देंठावर ज्याप्रमाणें दोन फळें असतात त्याप्रमाणें एक कामांत अनेक कामें साधणें. एका धोंड्यानें दोन पक्षी मारणें.

एक वेळ गुवा माथें मारच्या पैलीं, मागीर तावूं दोन असात?—(गो.) एकदां विष्टेची एक टोपली डोकीवर घेतल्यानंतर दुसरी घेण्यास उणेपणा कसला? एखाद्या माणसानें एक वेळ हीनपणाचें काम प्रसंगानुसार केल्यानंतर पुनः तसाच प्रसंग आल्यास ओशाळपणानें मागें हटत असल्यास उत्तेजन देण्यासाठीं वरील म्हणीचा प्रयोग करतात. एकदां कमीपणा पतकरल्यानंतर त्याच कामास कचरणें व्यर्थ आहे.

एक वेळ चट लागती, ती प्रथा पडती—एकदां एखादी सवय लागली म्हणजे ती कायमची होते. Once a use and ever a custom.

एक वेळ थुकी वडयली ती परतून गिळतात?—(गो.) एकदां थुंकून टाकलेली थुंकी पुन्हां गिळणें शक्य आहे काय? एकदां तोंडांतून गेलेला शब्द पुन्हां मागें घेणें योग्य नाहीं.

एक वेळ परद्वार, घडल्या करी निरंतर—एकदां मनुष्यास परस्त्रीगमनाची चटक लागली म्हणजे ती कायमची लागते.

एक वेळ पाय घसरतरीच घसरतवता—एक वेळ राडेंत पाय निसरला म्हणजे वेगामुळें तसाच निसरतो; यासाठीं अगोदर जपून पाय ठेवणें अवश्य आहे. अविचारामुळें एक वेळ माणूस चुकलें म्हणजे तदनुरोधानें पुढें तसेंच चुकत जाण्याचा संभव असतो. म्हणून अगोदरच चुकूं न देणें अवश्य आहे. तु०—बुडल्याचा पाय खोलांत. विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः।

एक वेळ मूल पोळे परी, अग्नीची भीति धरी—विस्तवामुळें जरी एकदां मूल भाजलें तरी मग त्याला कायमची भीति बसल्यामुळें पुन्हां तें विस्तवाशीं खेळत नाहीं. अनुभवासारखा शिक्षक नाहीं.

एक वेळीं दुःख होणें, दुजे समयीं सुख जाणें—एकदां मनुष्यास एखाद्या गोष्टीमुळें जरी दुःख भोगावें लागलें तरी त्या अनुभवामुळें अखेरीस त्यास सुखाचीच प्राप्ति होते. मूळ म्हण—To cry with one eye and laugh with the other.—सवि ३७४८.

एक शहाणा असतां, दुजा कज्जा न चालविता—दोन भांडण करणाऱ्यामध्यें जर एक शाहणा असेल तर दुसऱ्यास तें भांडण पुढें चालवितां येत नाहीं. शाहणा मनुष्य त्याचा निकाल लावतो व एका हातानें टाळी वाजत नाहीं.

एक शीख सध्या लाख—एक शीख लाख सदिया फकिरांबरोबर आहे.

एक शेजारी, बारा वैरी—(गो.) माणसाला कितीहि वैरी असले तरी शेजारी वैरी असूं नये. कारण त्याला आपली

अनेक वर्में कळलेलीं असल्यामुळें तो केव्हां कसा घात करील हें कळत नाहीं. म्हणून बारा वैरी पुरविले पण शेजाऱ्याशीं मात्र वैर करूं नये,

एकशें बारा आणि एकाला नाहीं थारा—आपले सोयरे-धायरे पुष्कळ असतात पण वेळेवर एकहि उपयोगास येत नाहीं.

एक शेर विद्या आली जरी, दहा शेर अक्कल लागे वरी—मनुष्यानें कितीहि विद्या प्राप्त करून घेतली तरी तिचा सदुपयोग करून घेण्याची अक्कल त्यास असली तरच ती उपयोगी पडते. विद्येपेक्षां बुद्धि श्रेष्ठ असते. अक्कल असल्याशिवाय विद्येचा कांहीं उपयोग नाहीं. तु०-अक्कलेपेक्षां विद्या जास्ती ओझ्याप्रमाणें वाढती.

एक श्रमी द्रव्यास्तव, दुजा इच्छी कीर्ति वैभव—कांहीं लोक संपत्ति मिळण्याकरितां श्रम करतात तर कांहीं कीर्तिकरितां करतात.

एक साधे सब् सधे—एक गोष्ट साधली तर मग अनेक साधतात.

एक सालचें तन, सात सालचें गमावें धन—शेतामध्यें जर तन एक वर्ष राहूं दिलें तर त्यामुळें जमीन खराब होऊन पुढें सात वर्षे पीक मिळत नाहींसें होतें. शेतांतील तनाची बिलकुल उपेक्षा करतां कामा नये; नाहींतर तें सर्व शेत खाऊन टाकतें.

एक सोनार व एक झारेकरी—[झारेकरी = सोनाराच्या राखेंतून सोन्याचे कण निवडून त्यावर धंदा करणारा.] सिद्ध आणे साधक यास म्हणतात. सोनार हा घडावयास दिलेल्या दागिन्यांतून कांहीं सोनें संधि सांपडली म्हणजे चोरतो. तशी संधि न सांपडल्यास निदान मूस उपडी करून अगर फुंकून वगैरे सोनें शेगडींत सांडतो व तें राखेंतून झारेकरी काढतो. याप्रमाणें ते दोघेहि मिळून गिऱ्हाइकास नागवतात. 'सकळ याती मध्यें ठक हा सोनार। त्या घरीं व्यापार झारियाचा॥' –तुगा ३३९०.

एक हमाममे, सब् नंगे—स्नानगृहांत सर्व नग्न असतात. वस्त्रा आड जग नागवें. सर्वांनाच सारखीं संकटें, अडचणी असतात.

एक हात दुधां, एक हात धयां—(गो.) एक हात दुधांत व दुसरा दह्यांत, म्हणजे मिष्ट पदार्थ सेवनांत दंग असलेला खुशालचेंडू. एखादा माणूस भोंवतालची परिस्थिति न पाहतां जेवण्याखाण्यांत चैन करणारा असा असला अथवा खरोखरच खाऊन पिऊन सुखी असला म्हणजे त्याच्या सुखाचें वर्णन थोडक्यांत करण्यासाठीं वरील म्हण वापरतात.

एक हाथ जिकर पर, एक हात फिकर पर—सर्व बाजूंनीं काळजी लागली असतां म्हणतात.

एक हिंगाला, एक धुपाला, आणि एक सत्यनारायणाला—निरनिराळीं कारणें दाखवून पैसे काढणें.

एकसे दो भले—एकट्यानें एखादें काम करण्यापेक्षां एकाच्या ठिकाणीं दोन असले तर तें काम अधिक सुलभ होतें. मदतनीस असल्यास काम सोपें होतें.

एका आईचीं मुलें पण भेटीची सुराणी होते—[सुराणी = शिराणि, पंचाइत, मुष्किल.] सख्खीं भावंडें असलीं तरी लग्न वगैरेमुळें किंवा भिन्न व्यवसायामुळें तीं पांगली म्हणजे वरचेवर भेटी होणें कठिण होतें.

एका आधणानें तुरी शिजत नाहींत—पाण्यास एकदां उकळी आल्याबरोबर कांहीं तुरी शिजत नाहींत, तर त्या शिजण्यास बराच वेळ लागतो. त्याप्रमाणें एकाएकी कोणतीहि गोष्ट होत नाहीं. तिला योग्य तेवढा वेळ लागावयाच. एका मारानें मुलें वठणीवर येत नाहींत.

एका आंब्यांतुलिं आयदानं, एक वत्ता दुद्दाक, एक वत्ता झळक्याक—कुंभाराच्या भांडयांचा आवा, भट्टी पक्की होऊन भांडीं वापरण्या योग्य भाजून तयार झाल्यावर त्याचा उपयोग करणाऱ्या इसमाचे योग्यतेप्रमाणें होत असतो. त्या भांडयांपैकीं एक भांडें एखादा इसम दुधाला नेईल तर दुसरा मासळी किंवा मांस शिजविण्यास नेईल; म्हणजे एखाद्यानें एखाद्या वस्तूचा दुरूपयोग केला म्हणून त्यामुळें त्याच वस्तूचा सदुपयोग करणारा दुसरा इसम आक्षेपार्ह होत नाहीं. कारण योजकस्तत्र दुर्लभः। प्रमाणें वस्तूचा उपयोग अथवा किंमत होते ती त्या वस्तूवर अवलंबून नसून उपयोग करणाऱ्यावर अवलंबून असते.

एका एक ना, शिंबऱ्याक नांक ना—(गो.) [शिंबरा = नकटा] एखाद्या स्वयंपाकी वगैरे काम करणाऱ्या इसमास पाहिजे तें सर्व सामान जवळ नसलें म्हणजे एकंदर अव्यस्थेमुळें त्याचें काम बरोबर न होणें भागच आहे. सारी अव्यवस्था, गोंधळ.

एका एकवीस, पांचा पंचीस—(गो.) ही म्हण देवाची प्रार्थना करतांना अथवा एखाद्या पूज्य व्यक्तीनें लहानास आशीर्वाद देतांना उपयोगांत आणीत असतात. एक इसम असल्यास त्याचे एकवीस प्रमाणानें किंवा पांचांचे पंचवीस पटीनें संतति वगैरेची अभिवृद्धि होवो. संतति–संपत्ति वगैरेच्या पूर्ण अभिवृद्धीचें द्योतक म्हणून एकवीस व पंचवीस शब्द आहेत.

एकाएकी विश्वासतो, तो पश्चात्तापास पावतो—जो मनुष्य दुसऱ्यावर एकदम विश्वास टाकतो त्याला पश्चात्ताप करण्याची पाळी येते.

एका कानाजवळ पगडी घाल पण चालीनें चाल—मनुष्यानें पोषाख वगैरे कसाहि केला तरी तो जर सुवर्तनी असेल तर त्याला कोणी नांवें ठेवणार नाहीं.

एका काननें ऐकावें, दुसऱ्या कानानें सोडून द्यावें; एका कानीं ऐकणें, दुसऱ्या कानीं सोडणें—एखादी गोष्ट मुकाट्यानें ऐकणें व तीप्रमाणें वर्तन न करणें. जसें ऐकलें तसें सोडून देणें. 'नळी फुंकली सोनारें इकडून तिकडे गेलें वारें' याप्रमाणें करणें

एका कानावर पगडी, घरीं रांड (बाईल) उघडी—पुरुषानें वरवर खूप भपका केला व घरीं पुरेसें खाण्यापिण्यास नसलें तर बाहेरच्या भपक्याचा काय उपयोग ?

एका कोटग्यांतुल्या गोरवांक शिंगा शींग आदळता; एका गोठ्यां आस्तकीर शिंगा शिंग आदरा—(गो.) एकाच गोठ्यांतील गुरांचीं शिंगें एकमेकांवर आदळतात. भांड्यांवर भांडीं आदळावयाचींच. माणसें एकत्र असतांना त्यांच्यांत मतभेद हे व्हावयाचेच; ते सोसले पाहिजेत.

एका कोयित्याक दोनि हिंडियो—(गो.) एकाच कोयत्याला दोन मुठी. दोन प्रकारें उपयोग.

एका खांबावर द्वारका—श्रीकृष्णानें समुद्रांत द्वारका नगर एकाच खांबावर रचिलें यावरून एकाच मनुष्यावर अनेक कार्यें अथवा मनुष्यें अवलंबून असलीं म्हणजे योजतात. एका मनुष्याच्या आधारावर मोठमोठे व्यूह रचणें.

एका गव्हाच्या कणसावर, दों चिमण्याचा न साहे भार—एका गव्हाच्या कणसावर दोन चिमण्या बसल्या तर त्या भांडल्याशिवाय राहणार नाहींत. 'एका म्यानांत दोन सुऱ्या' याप्रमाणें. 'एक उंदीर, दोघी मांजरी०' पहा.—सवि ३८८०.

एका गांडीक दोन सूळ कित्याक ?—(गो.) जुन्या काळीं गुन्हेगार माणसाला सुळावर देण्याची शिक्षा सुनावण्याचा कायदा असे. तेव्हां एखाद्यानें भयंकर गुन्हा केल्यामुळें न्यायाधीशास फारच संताप आला तरी गुन्हेगाराला दोन सुळावर द्या म्हणणें जसें शक्य नाहीं, तसें एखाद्या इसमाकडून एक काम सुद्धां पुरें होणें शक्य नाहीं त्यानें आशेनें आणखी काम पाहाण्याची धडपड करणें कशाला ? हातीं घेतलेलें एकच काम चिकाटीनें पुरें केल्याशिवाय पुष्कळ धंदे उभारूं नयेत. एक ना धड भाराभर चिंध्या, याप्रमाणें.

एका गांडिक दोन सूळ नात—(गो.) चांगल्याप्रमाणें वाईट सुद्धां एखादे वेळीं भोगणें अवश्य आहे, अशा समजुतीनें माणूस स्वतःचा धिम्मेपणा वरील म्हणीनें व्यक्त करतो. बिकट परिस्थितीला समाधानानें तोंड देणें चांगलें.

एका गू एक—(गो.) एखादें जरूरीचें काम एखाद्या नोकर वगैरे इसमास करण्यास सांगितलें असून त्याकडून कदाचित् काम बरोबर न होईल म्हणून दुसऱ्यास तज्ज्ञ म्हणून त्यावर देखरेख ठेवण्यास सांगून सुद्धां पहिल्यापेक्षां दुसऱ्यामुळें कामाची ज्यास्तच घाण झाली म्हणजे वरील म्हणीचा उपयोग करतात.

एका घराचीं सात घरें, काऱ्यानाऱ्याचें झालें बरें—(व.) एक मोठें कुटुंब एका घरांत गुण्यागोविंदानें राहात असे. पण पुढें त्या कुटुंबांत कळ लावून आपला मतलब साधून घेणाऱ्या इतर लोकांनीं भांडणें लावल्यामुळें कुटुंब विभक्त होऊन त्यांचीं अनेक घरें झालीं. पूर्वीचा एकोपा गेला त्यामुळें कुटुंबाचा तोटा झाला. पण जे भांडण लावणारे कारूनारू लोक होते त्यांना दहा घरांपासून निरनिराळीं बलुतें वगैरे मिळूं लागल्यामुळें त्यांचा मात्र थोडाबहुत स्वार्थ साधला.

एका घरीं विनाई, साता घरीं नायटे—नायटे हा एक त्वचारोग आहे. विनाई देवीच्या अवकृपेनें ते शरीरावर उठतात, तिची कृपा झाली म्हणजे ते जातात असे धर्मभोळे लोक समजतात. विनाई तर एकाच जागीं आपल्या मंदिरांत असते. पण तिचा प्रभाव सर्व लोकांवर पडतो. उपद्रवजनक कांहीं पदार्थ एका जागीं राहून त्याचा उपसर्ग सर्वत्र पसरतो. तु०—देवी (भवानी) देवळांत नायटे गांवांत.

एका घायें एकचि मरे, लेख सर्वां वंशीं पुरे—एखाद्यावर एक घाव घातला तर एकच मनुष्य मरतो पण एखाद्याकडून जर एखादा भलताच लेख लिहून घेतला तर तो मात्र अनेक पिढ्यांचें नुकसान करूं शकतो.

एका घावीं दोन तुकडे—एक घाव दोन रुंडें (तुकडे) पहा.

एका घोवानें म्हातारी होत नाहीं—ज्या जातींत पाट लावण्याची चाल आहे त्या जातींत ही म्हण आहे. एका नवऱ्याच्या घरींच सर्व आयुष्य जातें असें नाहीं. किंवा एक नवरा मेला म्हणून कांहीं आयुष्यांतली इतिकर्तव्यता संपली असें होत नाहीं. पुन्हां संसार करण्याची उमेद स्त्रीनें बाळगण्यास हरकत नाहीं. तु०—एका जत्रेनें देव जुना होत नाहीं. एका लुगड्यानें म्हातारी होत नाहीं.

एकाच प्रकारचे पक्षी एकत्र कळप करून राहतात—समानस्वभावाच्या लोकांची मैत्री लवकर जुळते. तु०—समानशीले व्यसनेषु सख्यम्। Birds of the same feather flock together.

एकाच माळिकेचे मणि—'एका माळेचे मणी' पहा. —पामो ४९२.

एकाच हाताचीं बोटें, पण सारीं सारखीं नसतात—एकाच कुलांतील, परिस्थितींतील किंवा एकाच दर्जाचीं माणसें एकसारखीं नसतात. त्यांच्यांत डावा उजवा, लहान मोठा इ. भेद असतातच.

एका चुकी मागें, दुसरी लागे—एक चुकी केली असतां ती सांवरण्यास जावें तों दुसऱ्या अनेक चुक्या हातून होतात.

एका चुकिनें गावुं लासता, एक मारानें जीवु वता—(गो.) एका चुकीनें गांवहि जळतो, एका तडाख्यानें जीवहि जातो.

एका जत्रेनें देव जुना होत नाहीं—देवाची जत्रा दरवर्षी होते; तेव्हां एका जत्रेंत एखादी गोष्ट करावयाची राहिली तरी ती मागें पडत नाहीं. पुढील वर्षी करतां येते. काल अनंत आहे तेव्हां एखाद्या गोष्टीबद्दल घाई करण्याचें कारण नाहीं. एखाद्यानें एक वेळ आपल्याशी लबाडी केली तर तो पुन्हां कधीं आपल्याकडे येईलच. त्यावेळीं पाहातां येईल.

एका जिभेन सगलो संसार आप करयता—(गो.) केवळ गोड बोलण्यानेंच सगळ्या गोष्टी होणें शक्य नाहीं. नुसती थापेबाजी व्यर्थ आहे. बोलण्याप्रमाणें साजेशी कृति कांहीं तरी घडली पाहिजे, तरच त्या बोलण्याचा उपयोग आहे.

एका जिभेनें साखर खाणें किंवा विष्टा खाणें—दुतोंडया माणसाबद्दल म्हणतात.

एका झऱ्यांतून पाणी, न येत खारें गोडवणी—एकाच झऱ्यांतून कांहीं खारें व कांहीं गोडें असे दोन्ही प्रकारचें पाणी बाहेर येत नाहीं. तसा एकच मनुष्य सज्जन व दुर्जन दोन्हीहि असूं शकत नाहीं.

एका ठायीं जडलें मन, दुजे ठायीं फिरतां कठीण—एकदां एका व्यक्तीवर प्रेम जडलें म्हणजे तें तेथून उठून दुसऱ्या व्यक्तीवर जडणें कठीण.

एका ठायीं नाहीं भाव, देवा मला पाव—'मनीं नाहीं भाव देवा मला पाव' असा पाठभेद. कोणत्याहि देवाच्या ठिकाणीं एकनिष्ठा, भक्ति नसली तर देव कसा पावणार ?

एका ठायीं बसूं जाणे, त्यास ऊठ कोण म्हणे—जो मनुष्य आपल्या योग्यतेप्रमाणें जागा पाहून बसतो व मग उठवळपणा करीत नाहीं त्याला कोणी त्या जागेवरून उठवूं पाहात नाहीं. समाजामध्यें आपल्या योग्यतेप्रमाणें वर्तन ठेवल्यास अपमानाचा प्रसंग येत नाहीं. पाठभेद–बसूं जाणे त्यास ऊठ कोण म्हणे.

एका ठायीं राहणें, त्याशीं वैर न करणें—ज्या व्यक्तीबरोबर आपणास एकत्र दिवस काढावयाचे आहेत त्या व्यक्तीशीं वैर करूं नये. जळांत राहून माशाशीं वैर उपयोगी नाहीं.

एका ठिणगीनें घर जळतें—आगीची एक ठिणगीहि पडली तरी सर्व घर जळून खाक होऊं शकतें. अत्यंत क्षुल्लक कारणापासूनहि मोठमोठे अनर्थ घडून येतात.

एका ठेचेनें न फिरे, तर दूसराहि पाय चिरे—पहिलीच ठेंच लागल्याबरोबर जर माघारें फिरलें नाहीं तर दुसऱ्या पायासहि ठेंच लागल्यावांचून राहात नाहीं. एका गोष्टींत आलेल्या अनुभवावरून जर शहाणपणा घेतला नाहीं तर पुन्हां नुकसान सोसण्याचा प्रसंग आल्याशिवाय राहात नाहीं.

एका डोळयानें अंधळा (काणा) असलेला हजारांत शहाणा—एकडोळ्या किंवा काणा माणूस फार धूर्त असतो. तु०—क्वचित् काणो भवेत् साधुः।

एका तागडीचीं पारडीं—एका तराजूचीं दोन्ही पारडीं सारख्या वजनाचीं असावीं लागतात. त्यांत कमजास्तपणा असल्यास पासंग येतो. त्याप्रमाणें सारख्या स्वभावाचीं माणसें. चोर, डाकू इ. समगुणी माणसें (वाईट अर्थी वापरतात). तु०—एका माळेचे मणी.

एके दिवशीं तुप पोळया चळचळीत, एके दिवशीं बसला कण्याच गिळीत; एके दिवशीं हत्तीवर अंबारी, एके दिवशीं पायीं निघाली स्वारी—एकदां एक परिस्थिति व दुसऱ्या वेळीं अगदीं उलट स्थिति. खरा जीवन्मुक्त सिद्ध जो असतो त्याची अवस्था याप्रमाणेंच असते. तो कोठल्याहि परिस्थितींत अगदीं बेफिकीर, स्थितप्रज्ञ असा वागतो. अशाच वृत्तीच्या माणसाबद्दल म्हण लावतात.

एका दिवसाचें सुख, त्याचें दुणं होय दुःख—जें सुख क्षणिक व तात्पुरतें आहे तें उपभोगल्यास मागाहून दुप्पट दुःख जाणवतें. एकदां चांगले दिवस जर थोडा काळ पाहावयास मिळाले तर विपत्कालीं त्यापासून अधिक वाईट वाटूं लागतें. तु०--सुखं हि दुःखान्यनुभूय शोभते। मूळ म्हणः-One day of pleasure is worth two of sorrow.–सवि २६०३.

एका दिवसांत घर बांधून होत नसतें—कोणतेंहि काम चुटकीसरसें होत नाहीं. प्रत्येक कामास कांहीं दिनावधि लागतोच, तेवढा दम धरावाच लागतो. Rome is not built in a day.

एका देवळांतलें तेल चोरून दुसऱ्या देवळांत दिवा लावावयाचा—सोम्याला नागवून गोम्याची भर करणें. Robbing Peter to pay Paul.

एका देवा केशवा, दूसरा देव नसावा—(व.) एकावरच निस्सीम भक्ति ठेवावी. एका देवाविषयीं अव्यभिचारिणी भक्ति काम देतें. एको देवः केशवो वा शिवो वा। पहा.

एका दोन चांगले—एकसे दो भले, पहा.

एका धातूनें सर्वां निर्माण केलें, पण एका सांच्यांत नाहीं ओतिलें—एका धातूच्या जरी अनेक वस्तू निर्माण केल्या, तरी त्यांचा आकार त्यांच्या सांच्याप्रमाणें निरनिराळा असतो. एकाच ठिकाणाहून उत्पन्न होणाऱ्या वस्तूहि सारख्या नसतात. सर्व मनुष्यें जरी वरवर सारखीं दिसलीं तरी प्रत्येकांत फरक असतो.

एका नाकपुडींत हरिकीर्तन—अगदीं लहानशा जागेंत मोठा व्यवहार असला म्हणजे म्हणतात.

एका नाकपुडींतून दोन शिंका, सहदेव म्हणे शकून निका—(शिंकाशकुन पोथींत सहदेव भाडळीला सांगतो आहे, असें वर्णन आढळतें.) एक शिंक आली तर अपशकून मानतात, पण एकच मनुष्य दोनदां शिंकल्यास तें शुभ मानतात. एक दुश्चिन्ह दुसऱ्या दुश्चिन्हाचें निवारण करतें.

एका पांकान मोर जायना—(गो.) एका पिसानें मोर होत नाहीं. एका गुणानें कांहीं सर्व गुणसंपन्नता येत नाहीं.

एका पुरुषाच्या दोन बायका, घरांत किरकिर करूं नका—एखाद्या मनुष्यानें दोन बायका केल्यावर त्या घरांत भांडणार नाहींत अशी अपेक्षा करणें व्यर्थ होय.

एका पुष्पाचा हार, न होय तें सार—एका फुलापासून कांहीं हार करतां येत नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे. एकाच्या हातून सर्व कामें रेटणें शक्य नसतें.

एका पूजेनें देव म्हातारा होत नाहीं—'एका जत्रेनें देव जुना होत नाहीं' पहा.

एकापेक्षां बहुमत, फार उपयोगी पडत—आपल्याच मतानें, किंवा एकाच माणसाचा सल्ला घेऊन एखादी गोष्ट करण्यापेक्षां अनेक लोकांचा सल्ला घेऊन केलेली चांगली.

एका पैशाची खरेदी, दोन पैशांचा काढा—[काढा = उसनवारी] वाण्याकडून एक पैशाचा जिन्नस विकत घ्यावयाचा व दोन पैशाची उसनवारी मागावयाची, ती वाणी कशी देणार. त्याचें त्यांत नुकसानच आहे. तु०-आंवळा देऊन कोहळा काढणें.

एका पैशाची चोरी, करील रुपयांची तरी—तु०-काडी चोर तो माडी चोर.

एका पैशाचें तेल, दोन पैसे हेल—थोडक्याशा कामाकरितां प्रमाणाबाहेर खर्च. तु०-अडक्याची कोंबडी आणि टका फळणावळ. अडक्याची भवानी आणि सापिक्याचा शेंदूर.

एका फारान दोन पक्षी मेले—(गो.) [फार=fire बार] एका बंदुकीच्या गोळीनें दोन पक्षी मेले म्हणजे एका कारणानें दोन कार्यें होण्याच्या प्रसंगीं या म्हणीचा उपयोग करतात. आम्राश्च सिक्ताः पितरश्च तृप्ताः। प्रमाणें. एका गोळीनें (दगडानें) दोन पक्षी मारणें.

एका फारान सतरा वाग—(गो.) एका गोळीनें सतरा वाघ मारणें. आपल्या पराक्रमाच्या भरमसाट गप्पा.

एका बापाचे मुलगे, कधीं न निघती सारखे—एकाच बापाचीं मुलें असलीं तरी त्यांचे स्वभाव कधीं जुळत नाहींत. तर तीं अगदीं परस्परविरुद्ध असण्याचा संभव असतो. तु०-हाताचीं बोटें सारखीं नसतात.

एका भार्या सुंदरी वा दरी वा—भार्या सुंदर असेल तर तिच्याबरोबर संसार करण्यांत आनंद आहे. नाहीं तर त्यापेक्षां वैराग्य धारण करून दरींत राहणें चांगलें. सबंध श्लोकः—एको देवः केशवो वा शिवो वा एकं मित्रं भूपतिर्वा यतिर्वा। एका भार्या (नारी) सुंदरी वा दरी वा एको वासः पत्तने वा वने वा॥

एका मांडीवर चौऱ्याऐशीं आसनें—योगासनांत नुसती मांडीची बदलाबदल करून अनेक आसनें करतां येतात. यावरून एकाच बैठकींत अनेक कामें उरकून टाकणें; एकाच साधनावर पुष्कळशीं कार्यें करून घेणें.

एका मापानें सगळें मेजता—(गो.) एका मापानें सर्व मोजतो. समान धंदा किंवा जात असल्यामुळें किंवा अशा तऱ्हेच्या एखाद्याच कारणावर नजर देऊन विद्या, सद्गुण वगैरेमुळें असलेला एखाद्या आदरणीय व्यक्तीचा मोठेपणा न ओळखतां धंदा वगैरे सामान्य कारणावरूनच त्या व्यक्तीला सामान्य मनुष्याप्रमाणें मानणाऱ्यास उद्देशून वरील म्हण आहे. एका काठीनें हांकणें पहा.

एका माळेचे मणी; एका दांडीचीं पारडीं; एके पासोडीचीं पाटगीं—माळेंतील सर्व मणी, तागडीचीं दोन पारडीं किंवा पासोडीचीं पाटगीं हीं एकसारखींच असतात. त्यावरून, सगळे सारखेच, कोणी कमी जास्त नाहीं असा अर्थ. (गु.) एक वासनां बोहीयां, ने सब सरीखां होइयां.

एका माळेचे मणी, एकसारखें एक गणी; एका माळेचे मणी, ओवायला नाहीं कोणी—वर प्रमाणें.

एका मेघापासून, सूर्य जाय अच्छादून—एक मेघसुद्धां सूर्याला आच्छादून टाकतो. लहान व्यक्ति देखील मोठ्याला भारी होऊं शकते. त्याप्रमाणें एक कलंकहि आपली कीर्ति डागळूं शकतो.—सवि २६००.

एका मोत्यानें कंठा होत नसतो—मागें पहा. अल्प साधनांनीं पूर्णतेचें समाधान मिळत नाहीं. 'एका पुष्पाचा हार न होय तें सार' पहा. One swallow does not make a summer.

एका म्यानांत दोन सुऱ्या, (ठेवूं नको वाईट बऱ्या); एका म्यानांत दोन सुऱ्या राहात नाहींत—दोन सुऱ्या एका म्यानांत जशा राहूं शकत नाहींत, तशा दोन सवती एके जागीं नांदूं शकत नाहींत. एकाच पेशाचीं किंवा दर्जाचीं दोन माणसें एकत्र आलीं कीं त्यांच्यांत भांडणें सुरू होतात. (गु.) एक मीनमां बे तलवार नहि माय, ने एक मुलकमां बे बादशहा नहि समाय.

एका लग्नाक बारा विघ्नं--(गो.) एखादें महत्त्वाचें काम व्हावयाचें असलें तर त्याला अनेक अडचणी असावयाच्याच.

एका लुगडयानें म्हातारी होत नाहीं--जन्मभर कांहीं एकच लुगडें पुरत नाहीं. तीं दरवर्षी नवीन घ्यावींच लागतात. तु०—एका धोंवानें म्हातारी होत नाहीं. एका निदेन फाल्या जायना.

एका वन्न आणि एका तन्न--(गो.) जेवणाचे पंक्तींत एकाला चांगला पदार्थ वाढून दुसऱ्याला कमी प्रतीचा वाढणें अयोग्य आहे. पंक्तिप्रपंच करणें.

एका वाटेनें जातो पळणारा आणि बारा वाटेनें जातो शोधणारा--पळणारा मनुष्य त्याला वाटेल त्या एकाच वाटेनें पळत सुटतो. पण मागें लागणाऱ्यास वाटा फुटल्या म्हणजे प्रत्येक वेळीं तो कोणत्या वाटेनें गेला असेल याचा संशय येतो व सर्व वाटा तपासाव्या लागतात. तु०—पळणाऱ्यास एक वाट शोधणाऱ्यास बारा वाटा, पहा.

एका वालिचीं फळां, एक कोडू आनि एक गोड जाता?—(गो.) एकाच झाडाच्या फळांत एखादें फळ कडू व एखादें गोड असें होणें शक्य आहे काय? दुर्गुणी मनुष्याच्या संततींत चांगला वाईट असा भेद कोठून असणार?

एका व्यसनास लागे, दोघांचें पोट भागे--एक व्यसन भागविण्यासाठीं जो खर्च लागतो त्यांत दोघांचें पोट भरूं शकतें. म्हणजे व्यसन इतकें महाग पडतें.—सवि ४०३०.

एका शितावरून (शितानें) भाताची परीक्षा—थोडयाशा नमुन्यावरून सर्व राशीची परीक्षा करतां येतें. 'नाहीं घाटावें लागत। एका सितें कळे भात॥'—तुगा ६२०. स्थालीपुलाक न्याय पहा.

एका सुंठीच्या कुडयानें गांधी होत नसतो—[गांधी = औषधें विकणारा] 'एका फुलानें हार होत नाहीं' पहा.

एका हातांत दोन कलिंगडें राहात नाहींत—एकाच वेळीं एका माणसास दोन कामें करतां येत नाहींत. One thing at a time.

एका हातानें टाळी, कधीं न वाजे कोण्या काळीं--पुढें पहा.

एका हातानें टाळी वाजत नाहीं—टाळी वाजण्यास दोन हात पाहिजेतच. तेव्हां दोघांच्या भांडणांत दोष दोघांकडेस असतो, नुसता एकाकडेसच नसतो. 'एके हातें टाळी। कोठें वाजते निराळी।'—तुगा. 'एक्या हातें कधिंतरि मुली वाजते काय टाळी।'—सासरची पाठवणी. यथैकेन न हस्तेन तालिकः संप्रपद्यते। तथोद्यमपरित्यक्तं न फलं कर्मणः स्मृतम्॥—पंचतंत्र २-१३८.

एका हातानें तालि पेटना, दोगां शिवाइ लडायि जायिना—(गो.) एका हातानें टाळी वाजत नाहीं व दोघांशिवाय भांडण होत नाहीं.

एकाकई एक होड, मात्याकइ नांक होड--(गो.) एकापेक्षां एक मोठें, डोक्यापेक्षां नाक मोठें.

एकाचा उद्योग आणि दुसऱ्याचें शहाणपण—एक उद्योगी व एक बुद्धिवान अशीं दोन माणसें एकत्र असल्यास त्यांस फार मोठें कार्य करतां येतें.

एकाचा नाश होतो, दुजा संतोष पावतो—या सृष्टीमध्यें असें दिसून येतें कीं, एकाची हानि झाली तर तोच दुसऱ्यास लाभ होतो व एकाचा नाश झाल्यास दुसऱ्यास आनंद होतो.

एकाचा पायपोस एकाच्या पायांत नाहीं—पादत्राणें एके जागीं असल्यास गर्दीच्या वेळीं तीं बदलतात, एक दुसऱ्याचा पायपोस घालतो; याप्रमाणें, सर्वत्र अंदाधुंदी; गैरव्यवस्था; कोणाची कोणास दाद नाहीं. —पामो २२२.

एकाचा रोग अवघ्यांचा भोग--घरांत एक मनुष्य आजारी असलें म्हणजे त्यापासून घरांतील सर्व माणसांस त्रास सोसावा लागतो.

एकाची जळते दाढी, दुसरा म्हणतो माझी पेटवूं द्या विडी; एकाची जळते दाढी, दुसरा त्यावर पेटवूं पहातो विडी--दुसऱ्याच्या संकटाचा मुळींच विचार न करतां, त्यापासून स्वतःचा अल्पस्वल्प सुद्धां फायदा करून घेणें. क्षुद्र वृत्ति. "दामू आण्णा, माझी धान्याचीं पोतीं भिजत असतां तुमची अंघोळ होईपर्यंत नळ बंद करावयाचा माहीं हें तुमचें म्हणणें म्हणजे, 'एकाची जळती दाढी०' अशांतला प्रकार होय."

एकाची टाळी, दुसऱ्याची टवाळी—[टाळी = स्तुति] एकाची स्तुति व दुसऱ्याची निंदा करावयाची.

एकाची तूट, दुसऱ्याची लूट—कांहीं कांहीं वेळां एकाच्या हानीपासून दुसऱ्याचा लाभ होतो.

एकाची पसंती, दुसऱ्याची नापसंती--जी गोष्ट एकाला आवडेल ती सर्वांसच आवडेल असें नाहीं; कांहींना ती नापसंत असेल. तु०—भिन्नरुचिर्हि लोकः।

एकाची हो करितां स्तुति, अभिमानी जळे चित्तीं—कोणी मनुष्य एखाद्या सज्जन मनुष्याची स्तुति करूं लागल्यास

कांहीं गर्विष्ठ माणसांस मनांतून फार वाईट वाटूं लागतें; त्यांस त्याबद्दल मत्सर वाटूं लागतो.-सवि ४०५१.

एकाची होळी तर दुसऱ्याची दिवाळी—कांहीं लोक वैभवांत असतात तर कांहीं विपत्तींत असतात. तु०-क्वचिद्विद्वद्गोष्ठी क्वचिदपि सुरामत्तकलहः । क्वचिद्वीणावादः क्वचिदपि च हाहेति रुदितम् । क्वचिद्रम्यारामा क्वचिदपि जराजर्जरतनु । नें जाने संसारः किममृतमयः किं विषमयः ॥ -सुर ८९.५.

एकाचें एकवीस होवो, नि वेल मांडवाला जावो—ही शुभ आशीर्वादादाखल म्हण आहे. वेलाची चांगली वाढ झाली म्हणजे त्याची पुढें वाढ होऊन गुंतागुंत होऊं नये म्हणून पुढील वाढीसाठीं त्याला मांडवावर चढवितात. अतएव जशी वेलाची होते तशी तुमची अभिवृद्धि उत्तरोत्तर होवो, असा भाव.

एकाचें खावें आणि एकाला गावें--एका जवळून साहाय्य घेऊन दुसऱ्याची स्तुति करणें हें ठीक नव्हे. 'एकाचें खाय एकासि गाये ।'-ज्ञा अभंग-वऱ्हाड.

एकाचें घ्यावें, दुसऱ्यास द्यावें--एकाचें काढून दुसऱ्यास देण्यांत काय फायदा? एका जवळचें घेऊन दुसऱ्यास दिल्यास त्यांत आपणांस कांहीं महत्त्व येत नाहीं. कारण आपण एकाचा फायदा करण्याकरितां दुसऱ्याचें नुकसान करतों.

एकाचें जें अन्न होय, तें दुसऱ्याचें विषप्राय--जो पदार्थ एका प्राण्यास पोषक होतो तोच कांहीं प्राण्यांस मारक होतो. तु०-One man's food is another man' poison. -सवि २६२६.

एकाचें जें जडभारी, दुजा जाणत नसे तरी--ज्याचेवर एखाद्या गोष्टीची जबाबदारी पडते तिचें महत्त्व त्याला कळतें. दुसऱ्यास त्याची कांहीं कल्पना येत नाहीं. ज्याचें दुःख त्याला माहीत. 'ज्याचें जळे त्याला कळे,' पहा.-सवि २५२७.

एकाचें पाहून दुसरा करतो--लोक अनुकरणशील असल्यामुळें एखाद्यानें कांहीं गोष्ट केल्यास दुसरेहि विचार न करतां तसें करूं लागतात. तु०-एकस्य कर्म संवीक्ष्य करोत्यन्योऽपि गर्हितम् । गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः ॥

एकाचें बारसें तर दुसऱ्याचें बारावें (साजरें करणें)--एकाचें अभिनंदन तर दुसऱ्याकरितां दुःखप्रदर्शन.

एकाचे हातीं घोडें, आणि एकाचे हातीं लगाम—एक कारभार दो हातीं असला म्हणजे तो धड चालत नाहीं. एकसूत्री कारभार पाहिजे, याअर्थीं.

एकाच्या युक्तीवर सर्वांच्या उड्या—एखादा मनुष्य आपली बुद्धि चालवून कांहीं योजना करतो पण तिचा लाभ मात्र अनेक लोक घेतात.

एकाच्या युक्तीवर सर्वांच्या युक्त्या—एकानें कांहीं कल्पना काढली कीं तिला धरून इतर लोक आपल्या कल्पना लढवितात.

एकान दांड्यान मारले म्होन दूसऱ्यान गुंड्यान मारुंक जायना—(गो.) एकानें काठीनें मारलें म्हणून दुसऱ्यानें धोंड्यानें मारूं नये. तु०-दुसऱ्यानें वासरूं मारलें म्हणून आपण गाय मारूं नये. अविचारानें सूड घेऊं नये.

एकानी एकानी, बोवा महा दुकानीं--(व.) आमचे यजमान दुकानीं गेले आहेत, ते मागून येतील असें दर एकानें म्हणणें. एक एक मनुष्य जेवावयास वगैरे आला असतां त्रास पडतो. प्रत्येक वेळीं त्याच्या पुरती सर्व व्यवस्था करावी लागते. त्यापेक्षां सर्वजण एकदम एका पंक्तीनें येणें सोयीचें पडतें.

एकानें करायचें, साऱ्यांनीं भरायचें—एकाच मनुष्याच्या दुष्कृतीपासून अनेकांस त्रास होण्याचा संभव असतो.

एकानें गाय मारली म्हणून दुसऱ्यानें वासरूं मारूं नये—एकानें एक वाईट गोष्ट किंवा आपली आगळिक केली म्हणून आपण तशीच किंवा लहान गोष्ट उलट करणें हें सज्जनपणाचें नाहीं. सूडाच्या सबबीवर वाईट गोष्ट करणें चांगलें नव्हे. 'टिळकांनीं गाय मारली म्हणून आपण वासरूं मारूं नये या बुद्धीनें आपण त्यावेळीं तो श्लोक प्रसिद्ध केला नाहीं.'-केसरी २६.७.४०. (गो.) एकल्याने गाइ मारल्यारि, आनेकल्याने बैलु मार नये.

एकानें दांडा उचलला म्हणून दुसऱ्यानें धोंडा उचलूं नये--'एकान दांड्यान मारले०' पहा. वरील प्रमाणेंच.

एकापासून संतति, विभागी सारखे होती--एका बापापासून जरी सर्व पुत्र उत्पन्न झाले असले तरी ते त्याच्या संपत्तीचे तितके वांटे होण्यास कारण होतात.

एकापुढें दुसऱ्याचें स्तवन, हें स्वार्थाचें लक्षण—मनुष्य आपल्या मतलबाशिवाय एखाद्या माणसाची दुसऱ्याजवळ स्तुति करीत नाहीं. कोणी शेजाऱ्याची प्रशंसा करूं लागला म्हणजे समजावें कीं, यांत कांहीं स्वार्थ आहे.-सवि ४०४५.

एकाला चुचकारा, दुसऱ्याला फटकारा--एकाला जवळ करून दुसऱ्याला झिडकारावयाचें. दोन सारख्याच व्यक्तींस भिन्न वागणूक द्यावयाची; एकावर लोभ दाखवावयाचा व एकाचा तिटकारा करावयाचा. पक्षपात करणें.

एकाला पळ म्हणून दुसऱ्याला छू करणें-सोडणें--एकाला पळण्यास लावून त्याच्यामागें कुत्रें सोडावयाचें व तमाशा पहावयाचा ही वृत्ति. दोघांमध्यें कलह लावणें.

एकाशीं स्नेह तर एकाशीं बिघाड, एकदांच सर्वांशीं कज्जा करूं नये--एकाच वेळीं अनेकांशीं शत्रुत्व केल्यास

आपणास आवरत नाहीं. याकरितां एकेक शत्रूस वेगवेगळा गांठून त्यांशीं सामना द्यावा. –पया ३४५.

एकास झांकावें, दुसऱ्यास काढावें—अगदीं तंतोतंत साम्य. दोन अगदीं सारख्या माणसांबद्दल, वस्तूंबद्दल म्हणतात.

एकास पळ म्हणणार, दुसऱ्यास पाठीस लावणार; एकास पळ म्हणावें, एकास पाठीस लाग म्हणावें—एकाला पळ व दुसऱ्याला छू म्हणणें; लावालावी करणें; कलागत लावणें. "नबाब आसफजाचा विचार दगाबाजीचा 'एकास०' हा त्याचा विचार तुम्ही जाणतच आहां."–पेशव्यांचें रामचंद्र बाबा यास पत्र (१७४७).

एकाहून एक चढी, कोणाले घेऊं कडीं––(व.)[चढी= वरचढ, वरच्या दर्ज्याचा. कडीं=कडेवर] एकाहून एक वरचढ व्यक्ति दृष्टिपथांत येऊं लागल्यावर त्यांपैकीं कोणाला प्राधान्य द्यावें, पसंत करावें, असा मनुष्याला मोठा प्रश्न पडतो. अनेक खोडकर मुलें एक जागीं खेळतांना पाहून मनुष्य म्हणतोः 'एकाहून एक चढी, कोणाला घेऊं कडीं. हीं मुलें तर एका पेक्षां एक ज्यास्त खोडकर दिसतात. तेव्हां यांपैकीं कोणाला चांगलें म्हणावें व कोणाला वाईट म्हणावें ?'

एकीकडे आड, एकीकडे (दुसरीकडे) विहीर—दोहों- बाजूंनीं अडचणीची स्थिति येणें; पेचांत सांपडणें. 'इकडे आड तिकडे विहीर' पहा.–टिले. ४.५१८. 'शिपाई लोकांस एकीकडे आड, एकीकडे विहीर, ऐसा प्रकार झाला.' –भाब १०६.

एकीकडे आरडाओरड नि दुसरीकडे बोंब–सर्वत्र हलकल्लोळ; आरडा ओरड, सर्वत्र घोंटाळा; बोंबाबोंब.

एकीकडे यमाई, एकीकडे तुकाई––[यमाई व तुकाई या देवी होत. त्या मूर्ति पूज्य असल्यामुळें एकीलाहि धक्का लावून अवमान करतां येत नाहीं.] एका बाजूनें जाऊं म्हटलें तर एका वस्तूला धक्का लागण्याची भीति, व दुसऱ्या बाजूनें जाऊं म्हट- ल्यास दुसऱ्या वस्तूला धक्का लागण्याची भीति, याप्रमाणें कोणीकडूनहि जाऊं म्हटल्यास सुरक्षितपणा नाहीं, अशी परिस्थिति असल्यास ही म्हण वापरतात. 'त्याच्या घरांत असा पसारा पडला आहे कीं, रिकामी जागा फिरकण्याला मुळींच नाहीं; एकीकडे यमाई तर एकीकडे तुकाई आहे.'

एकीनें घातली सरी, म्हणून दुसरीनें घातली दोरी— श्रीमंत बाईनें गळ्यांत सरी घातली म्हणून तिची बरोबरी करण्याच्या दृष्टीनें जर एखाद्या गरीब बाईनें आपल्या गळ्यांत दोरी घातली तर तिचें हंसूं होतें. आपल्यापेक्षां श्रेष्ठ असलेल्या मनुष्याशीं व्यर्थ स्पर्धा केल्यास आपलें हंसूं झाल्याशिवाय राहात नाहीं. (गो.) आका गळ्याक भांग्रा सरि, भयिणी गळ्याक सुंबा दोरी, पहा.

एके दिवशीं ताशे हवाया झडती, एके दिवशीं घरांत नाहीं बत्ती—दोन दिवस चैनींत घालवावयाचे तर दोन दिवस हालांत काढावयाचे. असेल त्या दिवशीं दिवाळी, नसेल त्या दिवशीं शिमगा.

एके पासोडीचीं पाटगीं—'एका माळेचे मणी' पहा.

एके वेळीं वाईट बरी, मनुष्य परीक्षा न करी—एकाच वेळच्या अनुभवावरून मनुष्यानें आपलें बरें वाईट मत बनवूं नये.

एके ज्ञानेंचि सार्थक, सर्व कर्म निरर्थक—फक्त ज्ञानाच्याच योगानें साफल्य येते. तें नसल्यास सगळीं कर्में फुकट होत.

एकेका मनुष्या मति, भिन्न भिन्न असती—प्रत्येक मनु- ष्याची बुद्धि स्वतंत्र असते. निरनिराळ्या लोकांचीं मतें निर- निराळीं असतात. मूर्ति तितक्या प्रकृति. तु०–(अ) पिंडे पिंडे मति भिन्ना । (आ) भिन्नरुचिर्हि लोकः । Many men, many minds. –सवि ३०८२.

एको देवः केशवो वा शिवो वा—कोणता तरी एक देव असावा; मग तो शंकर किंवा विष्णु असो. एक पक्ष धरावा. निष्ठा एके ठिकाणीं ठेवावी. संबंध श्लोक—एको देवः केशवो वा शिवो वा, एकं मित्रं भूपतिर्वा यतिर्वा । एका नारी सुंदरी वा दरी वा, एको वासः पत्तने वा वने वा ॥–सुर १७२.८१४.

एकोपि गुणवान् पुत्रो निर्गुणैश्च शतैरपि—शंभर मूर्ख पुत्रांपेक्षां एक गुणवान् पुत्र अधिक चांगला. एकोऽपि गुणवान् पुत्रो निर्गुणैः किं शतैरपि । एकश्चन्द्रो जगच्चक्षुर्नक्षत्रैः किं प्रयोजनम् ॥–सुर ९०.१. एकोपि गुणवान् पुत्रो न च मूर्ख- शतान्यपि । एकश्चंद्रस्तमो हन्ति न च तारागणोपि च ॥

एकोहि दोषो गुणसंनिपाते—एखाद्याच्या ठिकाणीं अनेक गुण असतील तर एखादा बारीक सारीक दोष त्यांत सहजः लपून जातो. 'एकोहि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दो किरणेष्विवांकः ।' पण या विधानाच्या उलटहि अशाच प्रथम चरणाचा श्लोक आहे. संबंध श्लोकः–एकोहि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दोरिति यो बभाषे । न तेन दृष्टं कविना समस्तं दारिद्र्यमेकं गुणकोटिहारि ॥ म्हणजे दारिद्र्य हा एक दोषहि कोटिगुणांना मारक असा होतो.

एक्क उत्रानें मोळ्ळेलें मन, धा उत्राने समजाइना—(गो.) एका उत्तरानें (शब्दानें) कलुषित झालेलें मन दहा उत्तरांनीं देखील समजावलें जात नाहीं. तेव्हां बोलतांना दुसरा न दुखेल असें बोलण्याची काळजी घ्यावी. तुटलें मन सांधत नाहीं.

एक खतखत्यानें कुळितु शिजना—एका कढानें हुलगे शिजत नाहींत. कोणत्याहि गोष्टीच्या सिद्धीला योग्य वेळ हा दिलाच पाहिजे.

एक तोंडानें जेवतात, एक गांडीनें हागताति—(गो.) एकाच तोंडानें जेवतात, एकाच गांडीनें हगतात. अगदीं गाढ मैत्रीचें द्योतक.

एक देवळांतुलें तेल चोरुनु, आनेक देवळांतु नंदादीपु—(गो.) एका देवळांतलें तेल चोरून, अनेक देवळांत नंदादीप लावणें. सोम्याला नागवून गोम्याची भर. मागें पहा.

एक दोळ्याक काजळ, आनेकाक चुनो—(गो.) एका डोळ्याला काजळ, दुसऱ्याला चुना. एकावर प्रेम दुजाचा द्वेष.

एका भात्ताक एकु तांदुळु; एक भात्ताक एकु तांदुळु, हें तत्व कळना जाल्यारि गोंदळु—(गो.) एका भाताला एकच प्रकारचा तांदुळ लागतो हें तत्त्व कळत नसल्यास गोंधळ होतो. एकाच जातीचीं, मताचीं माणसें नसल्यास अंदाधुंदी माजते.

एक्या जातीचे प्राणी, भितऱ्या बढाईखोरा वाणी—भितरा आणि बढाईखोर हे दोघेहि सारखेच.—सवि ४०.

एकटा——एकटा जीव सदाशीव—मनुष्य एकटा असला म्हणजे त्याला मागची पुढची कांहीं काळजी नसते. तो खुशाल आपल्या मनाप्रमाणें वागतो. ' एक जीव सदाशिव ' पहा.

एकटाच वीर उरला, कोणी नये सामन्याला—ज्याला जोड नाहीं अशा अद्वितीय पराक्रमी पुरुषाबद्दल योजतात. किंवा ज्या ठिकाणीं एकच कुस्ती खेळणारा मनुष्य असेल व दुसरा कोणी नसलाच तर सामन्याला कोणीच नसल्यामुळें तोच वीर ठरतो. निर्वीरमुर्वीतलम् ।

एकल्याची एक वाट; एकल्याची एक वाट—१ एकटा मनुष्य असला म्हणजे तो एकमार्गी असतो. त्याला लागाबांधा कांहीं नसल्यामुळें तो स्वतःला वाटेल तसें वागूं शकतो. इतर गोष्टींचा त्याला विचार करावा लागत नाहींत. व त्याला इतर कोणतेहि पाश ओढूं शकत नाहीं. तो एखाद्या ठिकाणीं गेला कीं तिकडेच त्याचा वेळ जातो; त्याला परत येण्याचें भान राहात नाहीं. २ एका मनुष्याला अनेक गोष्टींकडे पाहावयास सांपडत नाहीं. तो एका वाटेनें गेला म्हणजे बाकीच्या वाटांवर त्याची देखरेख राहात नाहीं.

एकडे गांटावचें भितरि आनेकडे थुंटता—(गो.) एके ठिकाणीं गांठ मारण्यापूर्वीं अनेक ठिकाणीं दुसरीकडे तुटतें. काम साधण्यापूर्वीं अनेक अडचणी उत्पन्न होतात.

एकतत्त्व——एकतत्त्वी फौज एकदिल—ज्या सैन्यांत एकाच जातीचे अगर एकाच तत्त्वानें बांधलेले सैनिक असतील त्यांत एकजूट राहूं शकते. भेसळ किंवा खिचडी असल्यास सैन्याचा एकोपा राहाणें कठिण असतें.

एकतीस——एकतीस पाव—=पावणे आठ. (ल.) नपुंसक; बुळा. [ज्याप्रमाणें अकरमासा म्हणजे अकराच मासे फक्त, बारा मासे नव्हे असा; त्याप्रमाणें पावणे आठ म्हणजे आठ गुंजा (एक मासा) नव्हे तर पाव गुंज कमी असा; अपुरा.]

एकदम——एकदम अवघे सांगूं नका, अवघे एकदम करूं नका—एखादी गोष्ट सर्व एकदम सांगून टाकण्यापेक्षां हळूहळू सांगितल्यास ती परिणामकारक होते व कामहि पायरी पायरीनें हळूहळू केल्यास चांगलें होतें. एका दमांत सर्व केल्यास कच्चें राहण्याचा संभव असतो. आपल्याला माहीत असलेलें सर्व एकदम एका वेळीं सांगूं नये; तसेंच, करावयाचें तें सर्व एकदम करूं नये.

एकदम काम सारें, दिवसांत न होय पुरें—सगळींच कामें कांहीं एका दमांत किंवा दिवसांत पूर्ण होत नाहींत. त्याला जरूर लागणारा वेळ दिलाच पाहिजे.

एकदम शहाणपण, दाखवितां मूर्खपण—जरूर नाहीं तेथें, विचार केल्याशिवाय शहाणपणाच्या गोष्टी सांगूं लागल्यास त्या अनाठायीं होऊन मूर्खपणा पदरीं येण्याचा संभव असतो. —सवि १४१६.

एकदां——एकदां कानफाट्या नांव पडलें कीं पडलें—[कानफाटे ही एक गोसाव्याची जात आहे. हे कानाचा खालचा भाग चिरून त्यांत मोठमोठीं कुंडलें घालतात. यांच्या कांहीं वर्तनांमुळें यांच्याबद्दल लोक नेहेमीं साशंक असतात. यावरून म्हण.] एकदां एखाद्याचें वाईट नांव झालें कीं कांहीं केल्या तें जात नाहीं. लोक अशाच माणसाचा नेहेमीं संशय घेतात. म्हणून पहिल्यापासूनच चांगलें नांव कमावण्याचा प्रयत्न करावा असा ध्वनित अर्थ.

एकदां खावें, पण शहरांत राहावें—खेड्यांत राहून जरी पोटभर खावयास मिळालें तरी तेथील जीवन भिकार असतें. त्यापेक्षां एकवेळ उपाशी राहूनच दिवस काढावे लागले तरी शहरांत राहावें. तेथील राहणी अधिक सुखाची व सोयीची असते. खेड्याविरुद्ध शहराची तरफदारी करणारी एक म्हण.

एकदां दैव वांकडें, दुजे वेळीं फांकडें—नशीब कांहीं नेहेमीं सारखें नसतें. कधीं प्रतिकूल तर कधीं अनुकूल असतें. —सवि ३६०८.

एकदां विटलें, मन तुटलें; एकदां विटलें तें तुटलें—एकदां एखाद्या मनुष्याबद्दल मनापासून तिटकारा वाटूं लागला कीं तो ग्रह कधींहि पालटत नाहीं.

एकदिल——एकदिल असणें-होणें–एकमताचे असणें; ऐक्य असणें; बेबनाव नसणें; दुही नसणें. ‘ आम्ही एकदिल असलों तर सरदार सुद्धां लढण्यास भीत नाहीं. ’–इ. सं. ऐति. टिपणें ४.२१ ‘ सारी फौज एकदिल होऊन बसल्यास धनि काय करणार ? ’–हब २७.

एकनिष्ठ——एकनिष्ठेचा बाणा––एकनिष्ठतेचें व्रत. ‘ ज्याचे घराण्यांत एकनिष्ठेचे बाणे चालत आले त्याच्या चित्तांत दुसऱ्याचे छायेस पोट भरूं हीं अक्षरेंच येणार नाहींत.’ –पया २४८.

एकमेक——एकमेकावर कोलणें––कामाची टोलवा-टोलवी करणें; दुसऱ्यावर ढकलणें; टाळाटाळ करणें.

एकमेकावर घसटणें––परस्परांचे दोष काढणें; परस्परांच्या उखाळ्यापाखाळ्या काढणें.

***एकमेकां साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ**––मनुष्यांनीं परस्परास साहाय्य केलें तर त्यांची चांगली उन्नति होते व ते सर्व सन्मार्गास लागतात. मूळ तुकारामाचा अभंग–एकएकां साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ॥–तुगा ३२७८. तु०––संहतिः कार्यसाधिका । –गांगा २५८.

एकलकोंडा——एकलकोंडा आणि गर्वाचा मांडा–जो मनुष्य नेहमीं एकटा एकटा राहतो तो बहुधा गर्विष्ठ होतो.

एकलकोंड्या, बारा रांड्या––[बारा रांड्या=रंडीबाज माणूस] स्वतः समाजापासून तुटून राहावयाचें पण नैतिक दृष्ट्या मात्र स्वैर वर्तन करावयाचें, अशा मनुष्यास म्हणतात.

एकला——एकलो घोंटेरांतली काढता जात्यार, दुसरो व्होटींतलीं काढता—(गो.) [घोंटेरांतलीं=घरट्यां-तील. व्होटींतलीं=ओटींतील] एकानें घरांतून घेतलें तर दुसरा ओटींतून घेतो. लबाड, ठक अशा लोकांशीं गांठ पडली तर अगोदर पासूनच सावध राहणें जरूर आहे. नाहीं तर एकानें केलेली नुकसानी आपण क्षुद्र ह्मणून उपेक्षा केल्याचें दुसऱ्यास समजतांच या नरमपणाचा फायदा भरपूर घेण्यास दुसरा टपलेलाच असतो.

एकल्या गेली फळद म्हळ्या खपता, पुण दुसऱ्या गेली हळद म्हळ्या खपना–(गो.) एकानें फळद असें म्हणून विकलें तरी खपतें पण दुसऱ्यानें हळद म्हणून विकलें तरी खपत नाहीं. एकच वस्तु मालकाच्या पत वगैरे योग्य गुणांचे अभावीं खपत नाहीं व ते गुण असलेल्याची खपते. एखाद्या दैववान् किंवा गुणी माणसाच्या विद्या वगैरेमुळें त्याची मानमान्यता होते व दैव व गुण यांच्या अभावीं विद्या व कला वगैरे असली तरी व्यर्थ होते. तु०–बोलणाऱ्याचे जोंधळे खपतात, न बोलणाऱ्याचे गहूं खपत नाहींत.

एकल्याचें चौगांनीं जेंव येत, पुण चौगांचें एकल्याच्यान जेंव नज—(गो.) एक माणसाचें अन्न चार माणसें खाऊं शकतील; पण चार माणसांचें अन्न एकटा खाऊं शकणार नाहीं.

एकळाक मायें दिवस, मागेरि सुने दिवस—(गो.) अगोदर दिवस सासूचे, नंतर सुनेचे.

एकवचन—एकवचनांत बोलणें–अरेतुरे करणें; अनादर-पूर्वक बोलणें; एकेरीवर येणें.

एकव्रत——एकव्रतचारिणी नारी, पुरुषार्थ साधी चारी—पतिव्रता स्त्री धर्म–अर्थ–काम–मोक्ष हे चार पुरुषार्थ सहजीं संपादते. तिला निराळीं व्रतें, धर्म वगैरे करावीं लागत नाहींत. एकपहा.

एकांगी——एकांगीस येणें—[एकांगी = द्वंद्व युद्ध] द्वंद्व युद्धासाठीं पुढें होणें. एका बाजूस होणें; वेगळें होणें; दूर होणें. ‘ आपली फौज सोडून एकांगीस यावें याजप्रमाणें बाहेर आले. ’ –भाच १०५.

एकाटणें——एकाटून येणें—(व.) एकवटून येणें; दम कोंडून येणें; कंठ दाटून येणें; जीव कासावीस होणें.

एकांत——एकांत करणें––१ हितगुज करणें; गुजगोष्टी करणें. २ गुप्त खलबत करणें. ३ गुप्तपणें संभाषण करणें. ‘ नलें तुजशीं एकांत काय केला ? ’ –नल ११७. ४ अगदीं सलगीनें वागणें; एखाद्याजवळ एकांतीं राहाणें. ‘ सुशिलेनें भावाशीं एकान्त केला व तेथें ती त्याच्या अगदीं जवळ बसली. ’ –सुदे २३०.

एकादश––एकादश रुद्र––१ वीरभद्र, २ शंभु, ३ गिरीश, ४ अजैकपात्, ५ अहिर्बुध्न्य, ६ पिनाकी, ७ अपराजित, ८ भुवनाधीश्वर, ९ कपाली, १० स्थाणु, ११ भव. अकरा पहा.

एकादश स्थानीं असणें—जीवश्च कंठश्च असणें. अकरावा पहा.

*** एकादशी घरा शिवरात्र आली, तिकाय उपास हिकाय उपास**––(गो.) एकादशीचे घरीं शिवरात्र आली तिलाहि (एका-दशीला) उपास व हिलाहि (शिवरात्रीलाहि) उपास ! एका दरिद्री माणसाचा दुसऱ्या दरिद्री माणसाला काय उपयोग? कारण दोघेहि सारखेच गरजू. ‘ एकादशीचे घरीं शिवरात्र ’ पहा.

एकादशी दुप्पट खाशी--एकादशीला वास्तविक उपास करून किंवा थोडें खाऊन राहावयास पाहिजे; पण होतें उलट. त्या दिवशीं उपासाचे अनेक प्रकार करून रोजच्यापेक्षां दुप्पट खाणें खातात.

एकादशीचे घरीं शिवरात्र (पाहुणी)--एकादशीस उपोषण असतें व शिवरात्रीसहि उपोषण असतें. तेव्हां दोन अकिंचन माणसांची गांठ पडली असतां ते एकमेकांस कोणतीहि मदत करूं शकत नाहींत. तु०--उघड्यापाशीं नागडें गेलें, सारी रात्र हिंवानें मेलें.

एकादशीला खरवड आणि द्वादशीला भजे पापड—१ एकादशीच्या दिवशीं प्रत्यक्ष दूध न मिळतां दुधाची खरवडच खाण्याची पाळी असावी म्हणजे पक्का उपास पडावा व द्वादशीच्या दिवशींहि उपास सोडण्यास अन्न न मिळतां पापडच भाजून खाऊन पारणें सोडण्याची वेळ यावी, याप्रमाणें अगदीं निकृष्टावस्था दाखविण्याकरितां ही म्हण योजतात. २ एखाद्या दिवशीं खाण्याला कांहीं नाहीं तर दुसऱ्या दिवशीं चारहि ठाव जेवण; अशी अनिश्चित स्थिति. ३ केव्हांहि सात्त्विक आहार नसणें. खरवड काय किंवा भजीं पापड काय, चांगला आहार नव्हे.

एकार——**एकार जाणें–होणें–कलणें**--एकीकडे खचणें; खालीं येणें; एका बाजूस जड होणें (जनावराच्या पाठीवरील ओझें, गलबत, होडी इ.).

एकार बसणें--१ कलून, रेलून बसणें; एका बाजूला जड होणें. २ (ल.) अलग राहणें; दूर बाजूस बसणें, सर्वांशीं न मिळतां पृथकपणें वागणें, राहणें.

एकाक्ष——**एकाक्षा राज्यांतु, एकुदोळो धांकूनु वचका**--(गो.) एकाक्ष लोकांत (राज्यांत) एक डोळा झांकून जायला पाहिजे. तु०--देश तसा वेश.

एकी——**एकीला जाणें**--लघवीला जाणें. शाळेंत लघवीची परवानगी मागण्यासाठीं लहान मुलें बाकीचीं बोटें मिटून करंगळी उचलून दाखवितात; यावरून वाक्प्रचार.

एकींत जय, बेकींत क्षय--एकमतानें वागलें असतां कार्यांत यश येतें, तेंच आपसांत वैर केल्यास नाश होतो.

एकीबेकी——**एकीबेकी न्यायें होतसे प्रचित । तेणें लोक समस्त भुलताती ॥**--लहान मुलें एकीबेकीचा खेळ खेळत असतां केव्हां एकी म्हणून सांगतात तर केव्हां बेकी म्हणून सांगतात. कांहीं वेळां उत्तर बरोबर जमतें तर कांहीं वेळां जमत नाहीं. कोणतेंहि उत्तर दिलें तरी शेंकडा पन्नास टक्के बरोबर येण्याचा संभव असतो. याप्रमाणें भविष्य सांगणारे वगैरे लोक कांहीं तरी उत्तरें देतात. त्यांतील कांहीं पटतात, कांहीं पटत नाहींत. पण जीं पटतात त्यावरून कांहीं लोक फसतात. –तुगा २८४२.

एकूण—**एकूण क्षेत्रफळ सारखेंच**--लांबी-रुंदीचा गुणाकार करून क्षेत्रफळ निघतें; तेव्हां लांबीनें रुंदीला गुणिलें काय किंवा रुंदीनें लांबीला गुणिलें काय सारखेंच. लांबींत थोडें कमी झालें पण रुंदींत तेवढेंच अधिक भरून निघालें तरी क्षेत्रफळ तितकेंच येतें. यावरून एकीकडे कमतरता तर दुसरीकडे तितकीच वाढ होऊन बरोबरी होणें. तु०--आजा मेला नातू झाला, घरचीं माणसें बरोबर.

एकेरी——**एकेरीवर येणें**—१ अरेतुरे म्हणणें; हमरीतुमरीवर येणें; अनादरयुक्त वागणें, बोलणें. २ चिडणें; चिरडीस जाणें; चिडून भांडण करावयास सिद्ध होणें.

एखादा——**एखाद्याचे घरीं पाय लागणें**--भेटीचा मोठेपणा दाखविणें; मोठ्या माणसानें घरीं येणें.

एखाद्यावर अग्नीचा पाऊस पाडणें—एखाद्यावर अतिशय रागावणें; त्याचा नाश करण्याला उद्युक्त होणें.

⁂ एखादें संकट पाहिल्यानंतर तें अर्धें टाळण्यासारखें आहे--संकट जोंपर्यंत दूर आहे किंवा अज्ञात आहे तोंपर्यंत त्याची जितकी भीति वाटते तितकी त्याची प्रत्यक्ष कल्पना आल्यावर वाटत नाहीं.

एखाद्या असत्याचा पुनः पुनः पुकार केला म्हणजे त्याला कांहीं दिवसांनीं सत्याची शाश्वती मिळूं लागते--एखादें असत्य विधान जर एकसारखें करीत गेलें तर कांहीं दिवसांनीं तें वरचेवर ऐकण्याच्या संवयीनें खरें असावें असें वाटूं लागतें. तु०-To tell a lie and stick to it.–केसरी ३–११–३९.

एथें—येथें पहा.

एरंड——**एरंडाचें गुऱ्हाळ**--उंसाप्रमाणें एरंडाचें गुऱ्हाळ लावलें तर गोड रस जसा निघणार नाहीं त्याप्रमाणें वायफळ बडीबडीपासून कांहीं निष्पत्ति नाहीं. व्यर्थ बडबड, खटपट, श्रम.

⁂ उंच (थोर) वाढला एरंड, तरी काय होईल इक्षुदंड—मागें पहा. उंच पहा.

ओसाड गांवीं एरंड बळी--ज्या गांवांत मुळींच झाडें होत नाहींत त्या गांवांत एखादा एरंड उंच वाढला तरी त्यास मोठ्या वृक्षाचें महत्त्व येतें. ज्या गांवांत सर्वच लोक मूर्ख असतात तेथें एखाद्या अर्धवट शहाण्यासहि फार महत्त्व चढतें. तु० —निरस्तपादपे देशे एरंडोपि द्रुमायते ।. गांवढ्या गांवांत गांवढी सवाशीण. आंधळ्यांत काणा राजा. वासरांत लंगडी गाय शहाणी.

एरंड वाढलो म्हूण मदेरा शिरा पडपां—(गो.) [मादैरा पोर्च्युगीज शब्दाचा अपभ्रंश मदेर=इमारती लांकूड] एरंडाचें झाड फार वाढलें म्हणून (तरी) त्याचा उपयोग मदेराला (इमारतीच्या उपयोगी लांकडा ऐवजीं) होत नाहीं. एखादा मनुष्य विवक्षित बाबतींत मोठा ठरला म्हणून अतिशय भिन्न अशा कामांत महत्त्वाला पात्र होणें शक्य नाहीं. तु०--उंच वाढला एरंड तरी का होईल इक्षुदंड.

निरस्तपादपे देशे एरंडोपि द्रुमायते—ज्या प्रदेशांत झाडें मुळींच नसतात तेथें एरंड हें झाडच समजलें जातें. 'ओसाड गांवीं एरंड बळी,' पहा. सबंध श्लोक असा:-यत्र विद्वज्जनो नास्ति श्लाध्यस्तत्राल्पधीरपि । निरस्तपादपे देशे एरण्डोऽपि द्रुमायते ॥-हितोपदेश १.६९.

एरंडोल——**एरंडोली न्याय**--(खा.) [एरंडोल हे खानदेशांतील एक गांव आहे] तडजोडीचें धोरण.

एरवां-वीं, एरव्हां-व्हीं——**एरवां (व्हीं) करिष्ये**-- [एरवां=तेरवांच्या पुढचा दिवस] परवाच्या नंतर करीन, म्हणजे केव्हांहि करणार नाहीं. व्यर्थ यातायात, श्रम.

एरवीं मनुष्या न विचारती, लांछन लागल्या पाहती-- एखाद्या मनुष्याची सामान्यतः कोणी चवकशीहि करीत नाहीं पण त्याचें एखादें व्यंग उघडकीस आल्यास सर्वांचे डोळे त्याच्याकडे लागतात. अशा तऱ्हेचे लोक काकदृष्टि असतात. त्यांस मनुष्याचे दोष तेवढे चटकन् दिसून येतात.

एल—एलाले बेलें, पळताले फुलें, घोंगडीवाल्याचे नाक-कान कापून नेले—(व.) वेलाला बेलफळें येत नाहींत. बेलाच्या झाडाला येतात. वेलाचीं बेलें, पळसाचीं फुलें व घोंगडिवाल्याचे नाक कापून नेलें. म्हणजे या गोष्टींचा एकमेकांशीं अर्थाअर्थीं कांहींच संबंध नाहीं. याप्रमाणें असंबद्ध गोष्टींचा एकमेकींशीं कांहीं-तरी संबंध जबरदस्तीनें जुळवून देणें; संबंध नसतां संबंध कल्पून त्यावर विसंबून वाटेल तशीं भरमसाट विधानें करणें.

एवढा——**एवढ्याचें एवढें करून सांगणें**--तिखट मीठ लावून सांगणें; पराचा कावळा करणें; अतिशयोक्ति करणें.

एवढ्याश्या तेवढ्याश्यावरून—अगदीं क्षुल्लक कारणावरून (कधीं कधीं मोठे तंटे लागतात).

*** एवढा झाला गर्व कीं, दोन बोटें स्वर्ग**—एखाद्याला अतिशय गर्व झाला असतां म्हणतात. 'दोन बोटें स्वर्ग उरला' पहा.

एवढा समुद्र पण टिटवीला भ्याला—एका टिटवीनें समुद्रकांठीं घरटें करून त्यांत अंडीं ठेविलीं होतीं. एकदां भरती येऊन अंडीं पाण्यांत वाहून गेलीं. टिटवी यावरून समुद्राचा सूड घेण्याच्या तयारीस लागली. तिनें एवढा खटाटोप केला कीं, समुद्रानें हार खाऊन तिचीं अंडीं परत दिलीं. क्षुद्र व्यक्ति देखील प्रसंगानें मोठा पराक्रम करून दाखविते. 'कीं टिटिभू चांचुवरी । मापसुये सागरीं ।'—ज्ञा १.६८. पंचतंत्र १.

एवढीशी थट्टा, भलभल्याला लावती बट्टा—थट्टेपासून कधीं कधीं मोठे अनर्थ होतात. तु०-थट्टेची होते मस्करी, मस्करीची होते कुस्करी. 'अशी कशी थट्टा, भल्याभल्यासि लावला बट्टा ।'—अमृतराय.

एवढेसे दाणे, थोडेसें गाणें—भिकारणीला थोडेच दाणे घातले तर ती लहानसेंच गाणें म्हणेल. जसें देणें तसें काम. देणावळ तशी धुणावळ.

एवढ्याशा पुरणाला वाटावें किती, आणि नकट्या नाकानें नटावें किती ?—लहान, क्षुद्र गोष्टीचा मोठा बडेजाव करणें हें चांगलें नव्हे. ज्याच्या त्याच्या मानानें त्याची राहाणी पाहिजे.

एवीं तेवीं——**एवीं तेवीं, भरों देवी**—'एवीं तेवीं भर गो ! देवी' असा मूळ पाठ. अर्थ-हे देवी, कसेंहि करून माझी कामना पुरी कर. कसें तरी करून एखादें काम पार पडलें म्हणजे झालें. बहुधा नवरा बायकोला उद्देशून म्हणतो.

एसू——**एसू ! पाठ घासली तर घासूं, पण दहा मणाचा तोटा कुठवर सोसूं**—(वायदेशी) एसू व केसू हे दोघे गडी एका शेतावरून चालले होते व त्या शेतातील पिकाच्या अंदाजाबद्दल त्यांच्यांत पैज लागली व भांडण सुरू झालें. एसूनें केसूला खालीं पाडून आपलें म्हणणें कबूल करण्याबद्दल सांगूं लागला; तेव्हां केसू वरील वाक्य म्हणतो. तो काल्पनिक तोटाहि सोसावयास तयार नसतो. चमडी गेली तर जाऊंदे पण दमडी कुठें दत बसणार, याअर्थीं. शिवाय रिकामी उठाठेव व त्रास करणारांबद्दल म्हणतात.

एळकोट——**एळकोट**—खंडोबाचे भक्त तळी उचलतांना 'एळकोट' असें ओरडतात. १ जुटीचा प्रयत्न. २ गोंधळ; अव्यवस्था. 'आधीं होता वाघ्या०' पहा.

एळकोट मल्हार—वरील प्रकारावरूनच कांटा काढणें; उच्चाटन. 'मी इकडे जयवंतरावाचा एळकोट मल्हार करतों.' -चंद्रग्रहण ६१.

ऐ

ऐकणें——**ऐकलें तर बाळ, नाहीं तर काळ**—एखादा मुलगा कधीं नीट वागतो व ऐकतो पण कधीं अगदीं त्रास देतो; अशा वेळीं म्हणतात. तु०—असेल तेव्हां सूत नाहींतर भूत.

ऐकलेलें चाटून येतें काय ?—ऐकींव गोष्टीवर विश्वास ठेवूं नये. ऐकलेली गोष्ट प्रत्यक्ष नसते, ती कांहीं चाटून तिची चव घेतां येत नाहीं.

ऐका सदैवपणाचें लक्षण, वायां जाऊं नेदी क्षण—भाग्याची गोष्ट कधीं हातची दवडूं नये. एक क्षणहि फुकट घालवूं नये किंवा आलेली संधि कधींहि गमावूं नये, म्हणजे भाग्य येतें. जो मनुष्य एकहि क्षण व्यर्थ दवडीत नाहीं, नेहमीं कार्यक्षम असतो तो दैववान होतो.

ऐकावें जनाचें, करावें मनाचें—प्रथम अनेक लोकांचें मत पाहिजे तर घ्यावें पण शेवटीं आपल्या मनाशीं निश्चय करून त्याप्रमाणें वागावें.

ऐकींव गोष्टीची कहाणी, खरी मानिली कोणी—ऐकींव गोष्टीवर विश्वास ठेवूं नये.

ऐकून घेत नाहीं, त्याला सांगूं नये कांहीं—जो आपण सांगितलेलें ऐकत नाहीं व मनास आणीत नाहीं त्याला व्यर्थ सांगण्याचे श्रम घेऊं नये.

ऐकून पुंगी, संतोष वाटे नागीं—नागाला पुंगीचा मधुर स्वर ऐकून मनांत संतोष वाटतो. त्याप्रमाणें आपली स्तुति ऐकून कोणीहि संतुष्ट होतो.

ऐकोनिया गोड गाणें, मनुष्यें नांदतीं सुखानें—सुस्वर संगीत ऐकावयास मिळाल्यास मनुष्यास आनंद होतो.

ऐक्य——**ऐक्यास येणें**—एकत्र होणें; संघटन होणें. ' कीं वेदांत शास्त्रींच्या श्रुती । ऐक्यास येती परस्परें ॥ '

ऐट——**ऐट करणें**—बढाई मारणें.

※ **ऐट बादशहाची, धंदा भडबुंज्याचा**—घरांत दारिद्य पण मिजास मोठी.

ऐतखाऊ——**ऐतखाऊ, लांडग्याचा भाऊ**—आयतें खाण्यास सवकलेला व अधाशी मनुष्य. ज्या मनुष्यास श्रम केल्याशिवाय खावयाची संवय असते तो जेथें मिळेल तेथें हात मारून घेतो; कारण पुन्हां केव्हां मिळेल त्याचा नेम नसतो. त्याकरितां संधि येईल तेव्हां तो अधाशासारखें भरून घेतो.

ऐदी——**ऐदीनें खाणें, मैदानीं निजणें**—श्रम केल्याशिवाय आळशासारखें खाऊन कोठें तरी मोकळ्या जागीं निजून दिवस काढणें. आळसांत दिवस घालविणें.

ऐन——**ऐनाला नाहीं ठिकाण, व्याजांत घालतो दुकान**—मूळ भांडवलाचाच पत्ता नाहीं तों त्याच्या व्याजांत दुकान घालण्याच्या गप्पा मारावयाच्या. कशास कांहीं ठिकाण नसतां उगीच मनोराज्यें करणें किंवा वायफळ गप्पा मारणें.

व्याजास सोकला, ऐनास मुकला—जबर व्याजाच्या आशेनें जो रकम कर्जाऊ देतो त्याचें भांडवल सुद्धां बुडतें.

ऐरावत——**ऐरावती लक्ष्मी**—ऐरावत हें इंद्राच्या हत्तीचें नांव आहे. गजांत लक्ष्मी; ऐरावत (हत्ती) बाळगण्याचें सामर्थ्य. ' मदमत्त झालेल्या द्वीपेंद्रानें एखादे वेळीं क्वचित् प्राणनाश केला म्हणून...ऐरावती लक्ष्मीचा अनादर करणें योग्य नाहीं '—विष्णुशास्त्री चिपळूणकर (किरकोळ लेखसंग्रह).

※ **कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तट्टाणी**—ऐरावत हा वाहनांमध्यें सर्व श्रेष्ठ, चवदाव्या रत्नांपैकीं एक, त्याच्यापुढें हरदासी तट्टाची काय कथा ! दोन अगदीं परस्परविरुद्ध लहानमोठया गोष्टींची तुलना करणें.

ऐरावती रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ॥—ऐरावत हा इंद्राचा हत्ती, चवदा रत्नांपैकीं एक असूनहि तो सुद्धां मारातून सुटत नाहीं; त्याला अंकुश टोंचला जातोच. तेव्हां लहान असणेंच बरें. ' लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा । ऐरावती रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ॥ '—तुकाराम.

ऐशीं——**ऐशीं तेथें पंचायशीं; ऐशीं तेथें पंचायशीं, कर गे रांडे पुरणपोळया**—थोडें जास्त असल्यास हरकत नाहीं या अर्थी. अतिशय सढळ हातानें खर्च करणें; खर्चाबद्दल बेफिकिरी दाखविणें; उधळपट्टी करणें. (हिं.) जहां सो, वहां सवासो. (गु.) एकनी जगो बेसो खरचवा.

ऐश्वर्य—**ऐश्वर्याचा प्राणी**—नशीबवान; संपत्तिमान; श्रीमंत.

※**ऐश्वर्य आल्यावरी, मनीं लीनता धरी**—मनुष्यास वैभव प्राप्त झालें असतां त्यानें नम्रता धारण केल्यास त्यास श्रेष्ठपणा मिळतो.

ऐष आराम——**ऐष आराम केव्हां, सावकार धीर धरेल तेव्हां**—कर्ज काढून ऐषआराम करणाऱ्याच्या मागें नेहमीं सावकाराची धास्ती असते.

ऐसर——ऐसरसे भेटा नही, दारदसे बिगाड-(हिं.) श्रीमंती तर मिळत नाहीं पण गरीबींत असमाधानी, हें उपयोगी नाहीं. माणसानें आहे त्या स्थितींत समाधान मानून राहिलें पाहिजे. —सवि १४१०.

ऐसा-शी——ऐसे जगेपर बैठना की कोई न बोले ऊठ, और ऐशी बात बोलना की कोई न बोले झूट-(हिं.) अशा ठिकाणीं बसावें कीं कोणी ऊठ म्हणणार नाहीं व अशी गोष्ट बोलावी कीं कोणी खोटी म्हणणार नाहीं. आपल्या योग्यतेप्रमाणें जागा पाहून बसावें व नेहमीं सत्य भाषण करावें.

ऐशी मानसपूजा करावी मूर्ति धरावी अंतरीं— अंतःकरणांत ध्यानमूर्ति उभी असेल तरच मानसपूजेचा उपयोग. मनांत मानसपूजेच्या वेळीं भलतेच विचार असतील तर ती मानसपूजा होत नाहीं.

ओ

ओ——ओ कां ठो; ओ चें ठो—(हें अक्षर 'ओ' आहे कीं 'ठो' आहे हें सुद्धां). कांहीं देखील (येत नाहीं); मुळींच; अगदीं. 'वाचायला येण्याच्या नांवानें ओ चं ठो म्हटलें तरी चालेल !—' पकोघे.

ओ कां ठो करतां न येणें——कांहींहि न येणें; अक्षरशत्रु असणें. 'संस्कृतामध्यें ओ कां ठो करतां येत नसतांही हिंदुधर्माविषयीं सव्वा हात गप्पा झोंकणारे...कोणीं पाहिले नाहींत ?'—निबंध. 'ओ म्हणतां ठो येइना' पहा.

ओच ओळखणें—फक्त ओ अक्षर माहीत असणें; महामूर्ख, रेम्याडोक्या असणें.

ओ म्हणतां ठो येईना—'ओनामासीधं' मधील पहिलें अक्षर देखील येईना. लिहिण्यास शिकवितांना प्रथम वरील अक्षरें काढण्यास सांगतात. 'ठो' हें 'ओ' च्या जोडीला प्रासासाठीं घातलें आहे. मूर्ख, अक्षरशत्रु माणसाबद्दल योजतात.

ओच्या नांवानें पूज्य; ओच्या नांवानें शून्य काढतां येत नाहीं; ओची गांड (गांठ) फोडतां येत नाहीं——अगदीं अक्षरशत्रु, ठोंब्या.

ओ——(**चोरांनीं, भुतांनीं, वाघांनीं**) **ओ देणें**—[ओ= हांकेला उत्तर] सुळसुळाट होणें; अतिशय चोर इ. चें खुळ माजणें. दैवानें-कर्मानें-प्रारब्धानें ओ देणें—दैव उदयास येणें; प्रारब्ध अनुकूल होणें; दैव साहाय्य होणें.

ओ म्हणणें—(ल.) सेवेंत तत्पर असणें. ताबडतोब येतों असें उत्तर देणें; साहाय्यार्थ धांवून येणें. 'स्वप्नांत म्हणत होती दिक्पांची ओ पितामहाला भा।'—मोभीष्म १.२३; मोप्रिपक २.१६.

ओ——ओ येईपर्यंत—[ओ=ओकारी] ओकारी येईपर्यंत; अगदीं नकोसें होईपावेतों.

ओं——ओं ना बों, शेणाचा पोह—ॐ म्हणण्यास सांगितलें असतां बोंब सुद्धां मारितां येत नाहीं असा निखळ शेणाच्या गोळ्याप्रमाणें असणाऱ्याबद्दल म्हणतात.

ओं म्हणतां बों येईना—ॐ म्हणण्यास सांगितलें असता बोंब सुद्धां मारितां येत नाहीं असा महामूर्ख.

ओंकारेश्वर——ओंकारेश्वरावर गोंवऱ्या जाणें—पुणें येथें ब्राह्मण मनुष्य मेलें असतां त्यास मुठा नदीकांठच्या ओंकारेश्वर महादेवाच्या देवळाजवळ असलेल्या स्मशानभूमींत जाळतात. यावरून वय होणें; मृत्यु नजीक येणें. 'गोखले काय आणि टिळक काय, दोघांच्याहि गोवऱ्या आतां बहुतेक ओंकारेश्वरावर गेल्या आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.'—टि ३.३०१.

ओघ——ओघाओघाखालीं—चालू प्रवाहांत; रोजच्या क्रमांत; अनुक्रमानें; योग्यवेळीं.

ओघाओघाचा—पध्दतीचा; क्रम असलेला.

ओघांत पडणें; ओघास येणें—मार्गांत येणें; क्रमप्राप्त होणें. 'तिचा नाश करणें ओघास आलें तर ती गोष्ट निराळी.'—विवि १०.५-७.१२३.

ओघाबरोबर जाणें-वहात जाणें—प्रवाहाप्रमाणें जाणें; प्रवाहपतित होणें; सृष्टिक्रमाप्रमाणें, किंवा परंपरेप्रमाणें चालणें. 'तथापि ओघाबरोबरच जाणारे लोक अधिक असतात.'—टि २.४५०.

ओछा——ओछेकी पीत, वालूकी भीत—[ओछा= हलका; कमी दर्ज्याचा.] हलक्या मनुष्याचें प्रेम हें वाळूच्या भिंतीप्रमाणें अस्थिर असतें. —सवि ३३५६.

ओछेसे खुदा काम न डाले—हलक्या, नीच मनुष्याशीं परमेश्वरानें प्रसंग आणूं नये. —सवि ११८०.

ओंजळ——(दुसऱ्याच्या) **ओंजळीनें पाणी पिणें**—दुसरा पाजील तेवढेंच पाणी पिणें. दुसऱ्याच्या अगदीं मुठींत असणें; तो म्हणेल त्याप्रमाणें निमूटपणें करणें. 'परंतु मला

मागलांच्या ओंजळीनें पाणी प्यायचें नाहीं; आणि माझ्या कारभारांत मला तुमच्या भिनतवारीचीही जरूर नाहीं.' –शिसं २.२.

ओझें——ओज्यार बिजें; ओज्यार अवखांदो–(गो.) ओझ्यावर आणखी वजन घालणें. संकटांत भर पडणें. तु०–आभाळावर आभाळ येणें. गंडस्योपरि पीटिका संवृत्ता ।

ओझें आहे म्हणून वांटून घ्यावें—आपणाला जड असलेलें काम वांटून घेतल्यानें हलकें होतें.

ओझें उचल, तर म्हणे बाजीराव कोठें—नसत्या चवकशा करणें. तु०—उष्टीं काढ म्हणे जेवले किती ? पाय धू म्हणे सांखळ्या केवढ्याच्या.

ओझें नाहीं वानरीशीं, पोर बिलगतें उराशीं––१ वानरीला डोक्यावर ओझें बाळगावें लागत नाहीं पण पोटाशीं पोराचें ओझें बाळगावें लागतें. याप्रमाणें प्रत्येकाच्या पाठीमागें कोण त्याना कोणत्या प्रकारचें तरी ओझें लागलेलेंच असतें. २ वानरीला पोर घ्यावें लागत नाहीं, तेंच तिच्या पोटाला घट्ट पकडून राहतें; म्हणजे कांहीं व्याद, अडथळा नाहीं.

ओटा——ओट्यावर बसते नि आल्यागेल्याला आमंत्रण पुसते—आळशी व निरुद्योगी माणसें स्वतः तर कांहींच करीत नाहींत तर उलट जे कार्यांत गढलेले आहेत त्यांच्याशीं निव्वळ चकाट्या मारून त्यांचा निष्कारण वेळ घेतात.

ओटी——ओटी करणें––गाय वगैरेची कांस गरोदरपणीं पुष्ट दिसूं लागणें.

ओटी पसरणें––पदर पसरणें; याचना करणें. ' असेत माझ्या अपराध कोटी । तथापि मागें पसरून वोंटी ॥ '––सारुह १.१३.

ओटी भरणें––सौभाग्य देणें; कल्याण करणें, चिंतणें. ' वैद्यबोवा माझ्या मुलाला बरें करून माझी ओंटी भरा. '

ओटी येणें––(व.) नवीन ऋतु प्राप्त होणें; नहाण येणें.

ओटींत घालणें–देणें––१ दत्तक देणें. २ पदरांत घालणें. ३ स्वाधीन करणें.

ओटींत घेणें––१ दत्तक घेणें; मांडीवर घेणें. २ एखाद्याच्या पालनपोषणाची जबाबदारी घेणें. ३ पतकरणें; स्वीकारणें; एखाद्या कामाची जबाबदारी घेणें.

ओटींत–ओट्यांत देणें––१ दत्तक देणें; मांडीवर देणें. २ एखाद्या मुलास पूर्णपणें दुसऱ्याच्या स्वाधीन करणें.

भरल्या ओटीनें––१ प्रसूतीनंतर मुलासह; ओटींत मुलगा घेऊन. २ सवाष्णपणीं; ओटी भरलेल्या स्थितींत. सामान्यतः सुवासिनी स्त्री कोठें जाऊं लागली म्हणजे तिची ओटी भरून रवानगी करण्याची चाल आहे त्यावरून, सौभाग्यासह.

* ओटी जड, पाहुणा गोड––पाहुणी येणाऱ्या स्त्रीची जर ओटी जड असेल म्हणजे ती जर बरोबर कांहीं घेऊन येत असेल तर ती आल्याबद्दल यजमानिणीला आनंद होतो व ती तिच्याशीं चांगल्याप्रकारें वागते. जर पाहुणा बरोबर कांहीं आणणार नाहीं तर तो नकोसा होतो. प्रत्येक मनुष्य ज्यापासून त्याचा फायदा होण्याचा संभव असेल त्याच्याशीं गोड वागतो व तसें नसेल तर त्याबद्दल बेफिकीर असतो.

ओट्यांत रोट्या, काष्टांत तुराट्या—१ काबाडकष्ट करून, शेती करून उपजीविका करणाऱ्या लोकांस पुरती भाकरी खाण्यासहि वेळ नसतो, याकरितां ओटींत भाकरी घेऊन ती एकीकडे काम करीत असतांच खावी लागते व एकीकडे कपड्यामध्यें केर कचरा वगैरे जात असतो व तूर कापून राहिलेले ठोंब वगैरे वस्त्रास टोंचत असतात. अशी गरीब शेतकऱ्यांची अवस्था असते. २ तुराट्या (तुरीच्या काट्या) विस्तव पेटविण्यास उपयोगी पडतात. इतकी विपन्नावस्था कीं अन्न ओटींत (अंगावरच्या वस्त्रांत) व इंधन कमरेशीं बाळगावें लागतें.

ओठ–– ओठ करपणें––फजीति होणें; उपहास होणें. 'कुरुगुरुसवें झगडतां त्या सुरगुरूचेहि ओठ करपावे।'–मोविराट६.९०.

ओठ चावणें––त्वेष येणें; अतिशय क्रोध येणें; रागानें ओठ खाऊं लागणें; चावूं कीं गिळूं असें होणें. ' त्याउपरि ओठ चावुनि शकुनि प्रेपी कराल करवाल । '–मोशल्य ४-२९.

ओठ निपटणें––स्त्री बाळंत झाल्यावर लहान मुलाच्या ओठावरून मालीस करणें. उद्देश हा कीं, ओठ सारखा दिसावा, ओठाचा भाग उंच सखल दिसूं नये. ' दुर्गा–मला वाटतें सुइणीनें तिचे ओठ नीट निपटले नसतील. ' –खेस्व ६०.

ओठ पिळला तर दूध निघणें—लहान, अज्ञ असणें; ओठावरचा जार न वाळणें; आईचें दूध जणूं अद्यापि ओठांत असणें. अप्रगल्भता दाखविण्यासाठीं योजतात. ' ओठ पिळला असता तर खरंच दूध निघालं असतं. ' –तोबं २०.

ओठाचा जार न वाळणें––बाल्य न संपणें; ओठांत अद्यापि आईचें दूध असणें; अज्ञ, अप्रगल्भ असणें. ' ओठाच्या वरचाहि जार अजुनी नाहीं तुझ्या वाळला । ' –कुशलवाख्यान ४१.

ओठांतून कीं पोटांतून––ओठापासून उच्चारलेले शब्द हे वरवर असतात. पोटांतून येणारे शब्द हे मनापासूनचे, अंतःकरणांतील असतात. तेव्हां वरवर कीं मनापासून.

ओठानें खाणें—पदार्थ ओठानें खाण्यासारखा अत्यंत मृदु

असणें, नाजुक असणें (पानें वगैरे). 'पानें इतकीं कोवळीं आहेत कीं ओठानें खावींत.'

ओठापर्यंत येणें—१ बोलून दाखविण्याच्या बेतांत असणें. शब्द ज्याप्रमाणें उच्चार होण्यापूर्वी ओठाशीं येतात त्याप्रमाणें. २ सिद्धीस जाण्याची वेळ येणें; एखादें पेय पात्रांत घेऊन ज्याप्रमाणें आपण पिण्याकरितां ओठाशीं नेतों त्याप्रमाणें अगदीं फळ मिळण्याच्या स्थितींत येणें.

ओठाबाहेर काढणें—बोलून दाखविणें; शब्द बाहेर पडणें; मनांतील कल्पना, राग, द्वेष वगैरे शब्दांनीं व्यक्त करणें.

ओठावरचें दूध वाळणें—लहानाचा मोठा होणें. मागें पहा.

* **ओठ पिळल्यार दुध येत**—(गो.) ओठ पिळल्यावर दुध येईल. अल्लड—अपक्व मनुष्यानें फाजील शहाणपणानें उद्धट भाषण वगैरे केल्यास त्याला उद्देशून असें म्हणतात. ओठ पिळल्यावर दूध निघण्याइतका लहानपणा अंगांत आहे. अजून जाणतेपणा आलेला नाहीं या अर्थी.

ओठ फुटो (तुटो) किंवा खोकाळ (खोकाळी) फुटो—[खोकाळ = टाळू, डोकें] कसेंहि करून; कोणत्याहि विघ्नास न जुमानतां; अतिशय श्रम करून; परिणामाकडे कांहींहि लक्ष न देतां; कितीहि श्रम पडले तरी चिकाटी न सोडतां. तु०-शेंडी तुटो कीं पारंबी तुटो.

ओठा जाळ (काळ), पोटा काळ—पोटास पुरेसें नसून विनाकारण ओठाला त्रास; केवळ चव पाहण्यापुरतें पण पोटभर नसलेलें तरी खावयास कठिण. कडक उंसाप्रमाणें.

ओठाचें बोलणें फिकें आणि देंठाचें बोलणें निकें—'ओठांतून कीं पोटांतून' पहा. वरवरचें बोलणें औपचारिक असतें; अंतःकरणापासून आलेले शब्द खरे असतात.

ओठांत एक आणि पोटांत एक—मनांत एक असून बाहेर निराळेंच बोलणें. दुटप्पी वर्तन. तु०-मनांत एक आणि जनांत एक.

ओठापर्यंत आला, जिभेला भ्याला—एखादा शब्द अगदीं बोलण्याच्या बेतांत यावें पण तितक्यांत नियमन करावें त्याप्रमाणें.

ओठापर्यंत आलें पण पोटांत गेलें नाहीं—कार्य सिद्धीच्या जवळ जवळ येऊन बिघडणें; श्रमाचें फळ अगदीं मिळण्याच्या स्थितींत येऊन हातास न लागणें; एखाद्या पेयाचा प्याला अगदीं ओठापर्यंत नेला असतां पोटांत जाण्यापूर्वी उपडा होणें; वगैरे. Many things fall out betwixt the cup and the lip.

ओठाबाहेर तें कोटाबाहेर; ओठाबाहेर गेलें तें पोटाबाहेर गेलें—मनुष्य एकदां एखादी गुप्त गोष्ट बोलून गेलें म्हणजे त्याची सर्वत्र वाच्यता होते; मग ती गांवाबाहेरहि पसरल्यावांचून राहात नाहीं. गोष्ट दुसऱ्यास एकदां कळली म्हणजे ती गुप्त ठेवणें आपल्या हातांत नसतें.

ओठाला नाहीं पुरेसें, पोटाचें आंतडें वासे; ओठाला नाहीं पुरें, पोट झालें कावरें—ओठ भिजण्यापुरतें जेथें नाहीं तेथें पोटाला काय मिळणार.

ओठावरचें जांभूळ तोंडांत पडण्याची इच्छा—स्वतःच्या ओठावर पडलेलें जांभूळहि स्वतः तोंडांत घेण्याइतकेहि श्रम न करणारा; अत्यंत आळशी मनुष्याला उद्देशून योजतात.

ओठीं ओरड नाहीं, पोटीं धैर्य नाहीं—मनाचा पक्का निर्धार नसला किंवा अंगीं पुरेसें धैर्य नसलें व तोंडांतहि आरडाओरड, तक्रार करण्याचें सामर्थ्य नसलें म्हणजे निमूटपणें दुःख सोसण्यावांचून गत्यंतर नसतें.

ओडंबर——**ओडंबरीचें लेणें**—१ जादूचा अलंकार; मायेनें उत्पन्न केलेली वस्तु; जादूगारानें जादूनें उत्पन्न करून दाखविलेला दागिना. २ तकलुपी वस्तु; दिखाऊ वस्तु.

ओडी——**ओडी वाइट्ट मोणु दकिट्टी केली, तिज्जे पय्याक तीनी**—(गो.) पहिली बायको वाईट म्हणून दुसरी केली, पण ही तर जास्त वाईट निघाली (शब्दशः अर्थ—तिच्या पायांत तीन खोडी). शेवटीं पहिलेंच बरें म्हणून ठरतें. तु०-येरे माझ्या मागल्या.

ओढ——**एक ओढ;एका ओढीनें**—एका हिसक्यासरशीं; एकाच दमांत; एकदां श्रम करून; एकदां नेट धरून.

ओढ काढणें—संकटांत दिवस काढणें; अत्यंत कष्टानें, त्रासानें दिवस लोटणें.

ओढीं ओढ असणें; ओढींत ओढ—संकटावर संकट; अडचणींत अधिक अडचण उत्पन्न होणें.

ओढणें——**एखाद्याला गुवाबरून ओढणें**—एखाद्याचा उपहास करणें; फजीति करणें; फार रागें भरणें; रेवडी उडविणें.

कर्ज ओढणें—कर्जावर कर्ज काढणें; अधिकाधिक कर्ज काढणें.

जीव ओढणें—१ उत्साहहीन होणें; धैर्य गळणें; हतवीर्य होणें. २ ओढा असणें; मनाचा कल असणें; प्रेमानें आकर्षिलें जाणें.

देवी गोवर ओढणें—वाळणें; देवीचे फोड वगैरे हळूहळू दिसेनासे होणें; देवी गोवर वगैरेंचे फोड सुकूं लागणें.

मृत्यु-मरणकाळ ओढणें—मृत्यु वगैरे प्राप्त होणें, जवळ येणें, समीप येणें; मरणोन्मुख होणें.

ओढून आणणें—१ गर्वानें किंवा रागानें ताठून बसणें; बळेंच अवसान आणणें; रुसून बसणें. २ कांकूं करीत

मागें राहाणें; आढेवेढे घेणें; हरकत घेणें; बळेंच नाहीं नाहीं म्हणणें.

ओढून काढणें—युक्तीनें बाहेर काढणें; कसें तरी करून हस्तगत करणें; कसें तरी जवळ आणणें.

ओढून घेणें—१ बळेंच ओढून घेणें; आपण होऊन पतकरणें; स्वतः पुढें होऊन स्वीकारणें. 'भरतानें रामासारखाच वनवास ओढून घेतला.' २ आपल्या बाजूचें करणें; आपल्या पक्षांत घेणें. 'हींच मुलें आपल्याकडे ओढून घ्यावयाचीं आहेत.' –इंप ४२. ३ गंजिफांच्या खेळांत घेणीच्या हुकुमाबरोबर एखाद्या फालतू पानाचा हात करून घेणें.

ओढून चंद्रबळ आणणें—[चंद्रबल = एखाद्या राशीस चंद्राची अनुकूलता, इष्टता.] लाजेनें अनिच्छा दाखविणें; मनांतून हवें असलें तरी बाहेरून नको असल्याचा बाहाणा करणें. 'मला कोणी पहावयाला आलें होतें...आजीनं मला हाका मारल्या. मी बराच वेळ ऊंऊं करून ओढून चंद्रबळ आणिलें... शेवटीं दुर्गीनें मला ओढून नेलें.' –पकोघे. 'तशांत विरंगुळयाला मूल ना बाळ. म्हणून बाहेरून ओढून चंद्रबळ आणावें लागतें. दुःखाचे कढ किती तरी दाबून धरावे ?' –पामो ४४३.

ओढून टाकणें—झुगारून देणें; रागानें फेकून देणें; दांडगाईनें टाकून, ढकलून देणें.

वरून ओढून टाकणें-ताणणें—वरवरचें ज्ञान असणें; एखाद्या शास्त्राचें, विद्येचें केवळ ओरबाडल्याप्रमाणें ज्ञान असणें.

ओढून धरणें—१ अडवूं पाहाणें; शक्य तों आपल्या अटी मान्य करावयास लावणें; आपलेंच म्हणणें खरें करूं पाहणें; नसत्याच अडचणी उत्पन्न करणें. २ हेका चालविणें; हट्ट धरणें; आपलें म्हणणें न सोडणें.

ओढून पाहाणें—घासाघीस घालणें; शक्यतों आपल्या मर्जीप्रमाणें करूं पाहणें; आपला हेतु शक्यतों सिद्धीस जाण्याचा प्रयत्न करणें.

ओढून बळकट करणें—ज्याप्रमाणें दोरीचीं टोंकें ओढलीं असतां गांठ अधिक बळकट बसते त्याप्रमाणें हट्टानें अधिक बिकट करून घेणें; फाजील शहाणपणा दाखवून आपणास अधिक बिकट परिस्थितींत घालून घेणें. 'चावून चिकट ओढून बळकट.'

ओढून बोलणें—लांब हेल काढून बोलणें; एकेक शब्द दीर्घ कालानें उच्चारून बोलण्यास फार वेळ लावणें.

ओढून येणें—१ तोंड पडणें (गळूं इ. स); गळवांत पू वगैरे सांचल्यामुळें बाजूच्या भागास ओढ लागणें, आवळल्यासारखें वाटणें. २ ओढवणें; अकस्मात् प्राप्त होणें; एखादें संकट, आपत्ति वगैरे पूर्व चिन्हें नसतां एकाएकीं येऊन कोसळणें.

ओढून विकणें—१ जबर किंमत घेऊन विकणें. अतिशय हेका धरून आपलीच अट मान्य करावयास लावून सौदा करणें. २ स्वतःची किंमत फार मोठी समजणें; स्वतःबद्दल वाजवीपेक्षां अधिक प्रतिष्ठा वाटणें.

ओढता——ओढता घेणें—१ अडवून घेणें; ताणून धरणें; घासाघीस करणें; हेका चालविणें. २ एखाद्या गोष्टींतून अंग काढून घेणें; मागें पाय घेणें; दूर होणें.

ओढताधरणें— १ अडचणी, अडथळे आणणें; मार्ग बिकट करणें; आडवें येणें. २ हेका चालविणें; हट्ट धरणें; आपलेसें करण्याचा प्रयत्न करणें. ३ आपलें म्हणणें, आपल्या अटी वगैरे न सोडणें; आपल्याच म्हणण्यास चिकटून बसणें.

ओढमाणकी——ओढमाणक्या घेणें—ओढून धरणें; आपलाच हट्ट, हेका चालविणें; मध्येंच बांधा घालणें.

ओढा——ओढा ओढणें—एखाद्याविषयीं भीति बाळगणें; आकर्षिलें जाणें; अंतःकरण ओढणें.

ओढ्यांत ओढा वारणें—एक जरूरीची गोष्ट करीत असतांना त्यांतच दुसरी करून टाकणें; अडचणींत अडचण काढणें; कसेंबसें नडींत नड काढून करून टाकणें.

ओढा—ओढा तरून जाणें आल्यास (असल्यास) समुद्रपार पाडणारे भोपळे असावे—करावयाचें काम लहान असलें तरी जवळ मोठया कामाची तयारी असावी; अल्प काम असलें तरी साधनें भरपूर असावीं. तु०–कोल्ह्याच्या शिकारीस वाघाच्या शिकारीची तयारी असावी.

ओढाळ—ओढाळ गुरूं ओढाळ (ओशाळ) बायको—[ओशाळ = निर्लज्ज] ओढाळ गुरूं आवरून आवरत नाहीं व नाठाळ किंवा निलाजऱ्या बायकोला कितीहि धाकांत ठेवण्याचा प्रयत्न केला तरी ती राहात नाहीं.

ओढाळ गुराला, लोढणें गळयाला—गुरूं ओढाळ असल्यास त्याच्या गळयांत लोढणें अडकवतात. द्वाड मनुष्यास शिक्षा होते.

ओणवा——ओणव्यानें केलेली चोरी लपत नाहीं—कितीहि काळजी घेतली तरी चोरी उघडकीस आल्यावांचून राहात नाहीं. मग उभ्यानें चोरी केली काय किंवा ओणव्यानें केली काय, सारखेंच.

ओतणें——ओत्तुनु गेलेलें दूद कृष्णार्पण—(गो.) उतू गेलेलें दूध कृष्णार्पण. इच्छेविरुद्ध झालेल्या गोष्टीला औदार्याचें किंवा इतर भारदस्त स्वरूप देणें. तु०–सहज पडे, दंडवत घडे.

ओनामा——ओनामा—' ओं नमः सिद्धम्। ' याचें अपभ्रष्ट रूप. मुलांस लिहिण्यास शिकवितांना प्रथम ' ओ, ना, मा, सी, धं ' हीं अक्षरें काढून घेतात. यावरून पहिला धडा; प्राथमिक पाठ, तयारी. ' लिहितां कशास ओनामा। जनहो, ध्या हरिच्या नामा ॥ ' ' परशुरामभाऊंना चवदावें वर्ष लागतें न लागतें तोंच त्यांनीं लढाईचा ओनामा पूर्णपणें शिकून परीक्षा दिली. आणि सर्वांना थक्क करून सोडलें. '

ओम्——ओम् फस; ओम् फस होणें—नळी फुटून भरलेली हवा फस्‌कन बाहेर निघावी त्याप्रमाणें होणें. १ निष्फळ होणें; विफल होणें; फसणें; फुकट जाणें. २ लयास जाणें; नाहींसें होणें; नाश होणें. ' मोठ्या थाटानें एखादें अवडंबर रचावें व लवकरच सगळें ओंफस व्हावें अशा प्रकारचीं उदाहरणें... अर्वाचीन इतिहासांतून सुद्धां आढळत नाहींत असें नाहीं.'

ओम् भवति; ओम् भवति पक्ष—ब्रह्मचारी बटू किंवा दुसरा कोणीहि ब्राह्मण भिक्षा मागावयास गेला असतां ' ओम् भवति भिक्षां देहि । ' असा मंत्र म्हणतो. त्यावरून भिक्षा मागणें; भीक मागणें; भिक्षाटन. ' ब्राह्मणाची मुख्य दीक्षा। मागितली पाहिजे भिक्षा। ओम् भवति या पक्षा। रक्षिलें पाहिजे ॥ '–दा १४.२.१. " ब्राह्मणांस विद्या शिकण्यास जाण्यापूर्वीं ' ॐ भवति (किंवा) भवान् भिक्षां देहि ' हा मंत्र आणि त्याच्या तंत्राचें केवळ नाटक मात्र अगदीं उत्तम प्रकारें शिकविलेलें असतें."–छच १९.

ओम——ओम जिंकणें—(व.) [ओम=तेज, पाणी, सामर्थ्य.] पाणी जोखणें. ' बायकोनें एकदा का नवऱ्याची ओम जिंकली कीं मग ती त्याला मुळींच जुमानीत नाहीं. '

ओमंडोमं—(व.) मोठ्या हौसेनें; उत्साहपूर्वक.

ओयरा——निराळा ओयरा, कोण कोणाचा सोयरा—[ओयरा=शिधा] ज्या लोकांचा शिधा निरनिराळा असतो म्हणजे ज्यांचा स्वयंपाक वेगळा होतो त्यांचा परस्परांशीं संबंध राहात नाहीं. एकदां भाउभाऊ वेगळे होऊन निरनिराळा स्वयंपाक करूं लागले म्हणजे हळूहळू ते एकमेकांस दुरावतात. मग त्यांचा तसा अर्थाअर्थी संबंध राहात नाहीं. यावरून फाटाफूट; एकी नसणें; वेगळेपणा.

जों जवळ ओयरा, तों जग सोयरा—जोंवर आपल्या जवळ कांहीं द्यावयास आहे तोंवर सर्वजण भोंवतीं जमतात. जवळ नाहीं म्हणजे कोणी नाहीं. तु०–असतील शितें तर मिळतील भुतें.

ओरवा——ओरवा करणें—एखाद्या बंदरांत जहाज नांगरून मुक्काम करणें; वस्तीस राहणें.

ओल——ओल धरणें—जमीन ओली असतां नांगरणें; पीक काढल्यानंतर जमीन वाळण्यापूर्वीं नांगरणें (यावेळीं जमीन ओली असल्यामुळें नरम असते.)

ओलीला ओल मिळणें—जमीन सुकण्यापूर्वीं पुन्हां पाऊस पडणें; जमीनींत ओलावा आहे तोंच पुन्हां पाऊस पडून जमीन भिजणें. काम चालू राहणें; खंड न पडणें.

❀ **ओल आहे कीं पोल आहे ? ओल ना पोल; ओल कीं पोल (फोल)**—कांहीं लभ्यांश आहे का ? फायद्याची गोष्ट वगैरे आहे किंवा नाहीं? कां केवळ कोरडाच कारभार.

ओलटा——पडला तर आंबा, नाहीं तर ओलटा—[ओलटा=(ओलें काष्ठ) हिरवी फांदी] झाडावर दगड वगैरे मारून पहावा; नीट लागला तर आंबा तरी पडेल, नाहीं तर निदान एखादी ओली फांदी तरी पडेल. मिळून कांहीं तरी फायदा आहेच. तेव्हां प्रयत्न करून पहावा, कांहीं तरी लभ्यांश होतोच.

ओलती——ओलतीका पानी बुलंदी नही जाता—पागोळ्यांचें पाणी आढ्याला जात नाहीं. सृष्टिक्रमाविरुद्ध कोणतीहि गोष्ट होत नाहीं. असंभाव्य गोष्ट कधीं घडून येत नसते. तु०–वळचणीचें पाणी आढ्याला जात नाहीं.–सवि ३५८२.

ओला–ली–लें——ओला दुकाळ—अतिवृष्टीमुळें पडणारा दुष्काळ; पाऊस वाजवीपेक्षां जास्त पडला असतां पिकांचें नुकसान होऊन कांहीं धान्य पिकत नाहीं, त्यामुळें दुष्काळ पडतोच.

ओली आग—अतिवृष्टि; ओला दुकाळ. ' कोरडी आग पुरवेल, ओली आग पुरवणार नाहीं. ' आग पहा.

ओली काडी—हिरवें पीक; ओला चारा.

ओली कोरडी भाकर—मिळेल तसें बरें वाईट अन्न; रुक्ष अन्न. ' प्रामाणिकपणानें मिळविलेल्या ओल्या कोरड्या भाकरीला जी रुचि असते ती दुसऱ्याचें मिंधें होउन मिळविलेल्या पक्वान्नाला नसते. '

ओली भांग—कोरडीपेक्षां ओली भांग जास्त अमली असते. अति तामसी, स्वच्छंदी मनुष्य.

ओली भिक्षा—शिजविलेल्या अन्नाची भिक्षा; मधुकरी; धान्य, दाणे वगैरे ही कोरडी भिक्षा होय.

ओली सवाशीण—न्हाती धुती; जीस नहाण येऊन गर्भाधान संस्कार वगैरे झालेले आहेत अशी; हिला देवधर्माचा अधिकार असतो. कोरडी म्हणजे नहाण न आलेली.

ओली सुकी करणें—चितपट करणें; लहान मुलें खेळावयास आरंभ करतांना पहिला डाव कोणाचा हें ठरविण्या-

करितां एक चपटा दगड अथवा खापरी घेऊन तीवर एका बाजूस थूंकी लावून ती वर फेकतात व एक बाजू ओली व एक बाजू सुकी मागून घेऊन जी बाजू वर पडेल त्या बाजूचा डाव पहिला असें ठरवितात. त्यावरून खेळाची पहिली पाळी ठरवणें; चकणें. उन्हाळी पावसाळी पहा.

ओलें कोरडें पाहाणें—१ चव घेत बसणें; जेवणांत चोखंदळपणा करणें. २ बऱ्या वाइटाची परीक्षा करणें.

ओलें जाळणें—वणवा भयंकर पेटला किंवा फार मोठी आग लागली म्हणजे कोरड्या लांकडांबरोबर ओलीं लाकडें किंवा उभीं झाडेंहि जळतात. यावरून (ल.) फार जुलूम जबरदस्ती करणें; अतिशय हैराण करणें.

❀ **हात ओला, तर मैत्र भला**—जोंपर्यंत आपल्यापासून कांहीं लाभ होण्याचा संभव असतो, तोंपर्यंत सर्व मित्र आपल्या भोंवतीं गोळा होतात.

कोरडी आग पुरवेल, ओली आग पुरवणार नाहीं—आग लागली असतां तींतून कांहींतरी सामान बचावून काढतां येतें व ती इतकी सार्वत्रिक नसते. पण पूर आला असतां फार मोठ्या प्रदेशावर पसरतो व सर्व कांहीं वाहून नेतो. त्यापासून जीवांचा बचाव करणेंच कठीण असतें, तर मालाचा कोठून होणार.

ओलेंचिलें (ओलें पालें-फोलें) शेतचें, नि थोटेंमोटें पोटचें—आपल्या शेतांतील धान्य किंवा पीक कसेंहि असलें, तसेंच आपलें मूल कितीहि अपंग किंवा वाईट असलें तरी तें आपणांस गोड. आपलें तें चांगलें म्हणून पाहाणें, व समाधानानें राहाणें.

ओलें जळतें आणि वाळलेंहि जळतें; ओल्याबरोबर वाळलें पण जळतें—(गो.) ऑलँ सुके बराबर. वाईटाबरोबर कधीं कधीं चांगल्या मनुष्याचेंहि नुकसान होतें.

ओलें झाड जसें लववावें तसें लवतें—ओल्या मातीस पाहिजे तो आकार देतां येतो; तसेंच कोंवळें झाड वाटेल तसें वांकवितां येतें. त्याप्रमाणेंच लहान मुलाचे बुद्धीस शिक्षण देऊन ती जिकडे वळवावी तिकडे वळते. ' बाळपणीं बाळांची कोमल तरुतुल्य बुद्धि वांकेल । घेईल ज्या गुणाला तो गुण मति वेष्टुनीहि फांकेल ॥ '

ओलें मूळ भेदी खडकाचें अंग।—या पुढील ओळी-अभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥ दोरें चिरा कापे पडिला कांचणी । अभ्यास सेवनीं विष पडे ॥ —तुगा ३३९४. वृक्षाचें जिवंत मूळ जसजसें जोरावतें तसतसें तें खडकाचें भेदन करतें. दोराच्या घर्षणानें मोठा दगड देखील कापला जातो व संवयीनें विषाचें सेवन देखील पचतें. यावरून लहान गोष्टीनेंहि मोठें कार्य होऊं शकतें.

ओल्या मडक्याचा कांठ लववावा तसा लवतो; ओल्या रांजणाचा कांठ वळवाल तसा वळतो—ओल्या मातीस जो पाहिजे तो आकार देतां येतो. त्याप्रमाणें मुलास लहानपणीं लावावें तसें वळण लागतें. ' ओलें झाड० ' पहा.

ओल्या मातीचा भरवंसा, काय धरिसी माणसा—मनुष्याच्या शरीरास वेदांती नेहमीं मातीची उपमा देतात व ती माती केव्हांहि मातींत मिळते. यावरून देह हा क्षणभंगुर आहे व या दृष्टीनें व्यवहार करीत असावें.

ओल्ले शेणा उज्जो लागल्यावरी; ओल्या शेणाक उजो लागल्यावरी—(गो.) ताजें, ओलें शेण जळतें त्याप्रमाणें. म्हणजे वाळलेलें शेण (गोरी) जळतें त्याप्रमाणें ओलें जळत नाहीं. आळशी, बथ्थड माणसाच्या निरुपयोगी कामास लावतात.

ओल्ली—**ओल्लि नाचता म्हुण सुप नाचता**—(गो.) रोळी (तांदूळ धुण्याची) नाचते म्हणून सूपहि नाचतें. एखादा मालक बरोबरीच्या इसमास कांहीं उणे शब्द बोलत असलेले ऐकून नोकर वगैरे माणसें तसलेच शब्द बोलत असलीं तर वरील म्हणीचा प्रयोग करतात. ज्यानें त्यानें आपल्या पायरीनें वागावें.

ओल्लें तय धरना, सुपलंय धरना—(गो.) [ओल्ली=रोळी] एखादा माणूस अप्रबुद्धावस्थेंत भरभराटीस आला म्हणजे ताठ्यानें, उद्धटपणानें वागूं लागून कुणाचीहि पर्वा न धरतां स्वैर बनल्यावर त्याची शिरजोरी कुठेंहि मावेनाशी होते. तेव्हां तशा इसमाला उद्देशून वरील म्हणीचा उपयोग करतात.

ओवा—**ज्याचें पोट दुखेल, तो ओवा मागेल**—ओवा हें पोटदुखीवर प्रसिद्ध व घरगुती औषध आहे. पोट दुखत असलेला माणूस प्रथम ओवा पाहातो. यावरून ज्याला गरज पडेल तो जरुर तें काम, खटपट, इलाज इ. करील; त्याला सांगण्याचें कारणच पडणार नाहीं.

ओवा म्हणतो मी आहें गुणी, पण माझ्यावर पितात पाणी—ओवा हें पोटदुखीवर व त्याचप्रमाणें अनेक रोगांवर एक चांगलें औषध आहे पण तो गरम पाण्याबरोबर घेतला तर त्याचा गुण येतो; थंड पाण्याबरोबर घेतल्यास तितका गुण येत नाहीं. कोणतीहि गोष्ट योग्य अनुपानासह केल्यास चांगली. योग्य परिस्थितींत केलेलें कार्य फलदायक होतें. विपरीत परिस्थितींत निष्फळ होतें. [ओवा मधांत घेतला तरीहि चालतो; पण ओव्यावर पाणी घेणें सोपें म्हणून तेंच तेवढें घेतात. म्हणजे हलकें अनुपान वापरतात अशी तक्रार ?]

ओवाळणी—**ओवाळणी काढणें**—उतरून टाकणें; एखाद्याच्या अंगावरून ओवाळून टाकून देणें. ' असल्या पैशाची ओवाळणी काढावी माझ्या बाळावरनं ! '—झांमू.

ओवाळणें—**दिवा ओवाळणें**—१ (आरती करून)

पूज्यभाव दाखविणें. २ (विपरीत लक्षणेनें) निंदा, तिरस्कार या अर्थी योजतात. 'अहाहा ! दिवे ओवाळावे त्या प्रीतीवर.'-त्राटिका.

ओवाळून टाकणें--एखाद्यावरून उतरून टाकणें; तुच्छतेनें फेंकून देणें, क्षुद्र समजणें. 'काय देउं उपमा तुळणेस दिसेना कांहीं । ओवाळुन काय टाकावी वाटे लवलाहीं ॥ '-प्रला ९२.

ओवी—ओंव्या गाणें--१ स्तुति करणें. विशेषतः अप्रयोजक स्तुति करण्यास म्हणतात. २ (उप.) शिव्या देणें.

ओशाळ—ओढाळ गुरूं आणि ओशाळ बायको-आढाळ पहा.

ओशाळा आदितवाराला भितो--आदितवारीं माणसें घरीं भेटतात म्हणून तगादेदार त्या दिवशीं हटकून वसुलीसाठीं येतात. तेव्हां एखाद्या गोष्टीचा वायदा पुरा करतां येत नसला म्हणजे उपकारबद्ध ऋणाईत मनुष्यास लज्जा, भीति वाटते.

ओष्ठ—ओष्ठ आस्वादणें--चुंबन घेणें. 'कोणी ओष्ठहि नाचतां मुखमुखीं घालूनि आस्वादिले ।'

ओसंग—ओसंगीं असणें-पडणें-राहणें-निघणें--आश्रय करणें; आधारानें राहणें. 'तुका म्हणे पांडुरंगा । तुझ्या निघालों ओसंगा ॥ '-तुगा.

ओसंगीं घालणें-देणें--हवालीं करणें; पदरांत घालणें; मांडीवर देणें; स्वाधीन करणें.

ओसरी—भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी—थोडासा आधार दिल्याबरोबर हळूहळू आपली मागणी अधिक वाढविणाराबद्दल योजतात. तु०--चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः ।

ओसाड—ओसाड गांवीं एरंड बळी--एरंड पहा.

ओसाड गांवीं गाढवी सुवासिनी—ज्या गांवांत मनुष्यवस्तीच नाहीं त्या गांवांत सुवासिनी तरी मनुष्य जातीची कोठून मिळणार. तेथें सर्वत्र गाढवांचाच सुकाळ असावयाचा. तेव्हां सुवासिनी सुद्धां गाढवीच असणार. कदाचित् ही म्हण, गांवढ्या गांवांत गांवढी सवाशीण (पहा.) या म्हणीचा अपभ्रंश होऊन बनली असावी.

ओसाड गांवीं राहूं नये आणि जात पुसल्यावांचून पाणी पिऊं नये—ज्या गांवांत वस्ती नसेल अशा ठिकाणीं मुक्काम करणें भयदायक असतें व भलत्याच्याच हातचें पाणी प्याल्यास जात बाटण्याचा संभव असतो.

ओसाडी—ओसाडीचा लांडगा-अराक्षित ठिकाणचा नाशास टपलेला माणूस.एकाकी असतांना चालून येणारा क्रूरकर्मा.

ओहट—ओहट भरती समान व्यवहार, सांभाळी द्रव्य भरती आल्यावर--आयुष्यामध्यें चढउतार हे असावयाचे; तेव्हां वैभव येईल त्याकाळीं पुढील विचार करून वागावें. सुस्थितींत व दुस्थितींत नेहमीं सारखेंच गंभीरपणें वागावें. एकदां हुरळून जाऊं नये किंवा दुसऱ्यांदा निराश होऊं नये. पुढील म्हणीचा चुकीचा अनुवाद--There is a tide in the affairs of man, which taken at the flood, leads on to fortune.-सवि ३६२३.

ओहोटीमागें भरती, भरतीमागें ओहोटी--चक्रनेमिक्रम. आयुष्यांत चढउतार हा होतोच. कांहीं दिवस सुखाचे तर कांहीं दुःखाचे यावयाचेच.

ओहळ—ओहळ उडून राऊत होणें--१ लहानशा ओढ्यावरून उडी मारून दाखवून आपण फार शूर घोडेस्वार झालों अशी फुशारकी मारणें; थोड्याच गोष्टीनें फुगून जाणें. २ संकटांतून पार झाल्यावर कृतघ्न बनणें.

ओहळीं खोबळीं शिरणें—[ओहळ खोबळ=ओढेनाले; खांचखळगे] मुख्य मुद्दा सोडणें; आडमार्गीला जाणें.

❀ **ओहोळ उडाला, कौल बुडाला**—[ओहोळ = नाला; प्रवाह. कौल = मक्ता, खंड] एका गृहस्थानें एक शेत खंडानें दिलें होतें. त्या शेताच्या बाजूला एक नाला होता. त्या नाल्याचें पाणी त्या शेतास मिळत असे व त्या पाण्यावर तें शेत पिकत असे. पुढें जमीनीच्या मालकानें तो नाला वर अडवून तें पाणी फिरविलें. त्यामुळें तो नाला जवळ जवळ नाहींसा झाला; त्यामुळें तें शेत पिकलें नाहीं. पुढें त्या खंडकऱ्याजवळ मालक खंड मागावयास गेला असतां त्या खंडकऱ्यानें वरीलप्रमाणें उत्तर दिलें. जोंपर्यंत ओहोळ होता तोंपर्यंत खंड देत होतों; ओहोळ गेल्याबरोबर खंडाहि गेला.

ओहोळाला खळगा जामीन—जेथें ओहोळ किंवा नाला असतो तेथें जमीन खोल असल्यामुळें खळगा असतो. तेव्हां खळगा नसेल तेथें ओहोळ असणें शक्य नाहीं व खळगा असेल तेथें ओहोळ असण्याची शक्यता असते. तेव्हां या दोघांचे परस्पर संबंध आहेत. यावरून सिद्धसाधक याअर्थी.

ओळ—ओळीस येणें—१ ओघास येणें; क्रमप्राप्त होणें. २ पाळी येणें.

ओळख—ओळख ही सोन्याची खूण—मनुष्याची ओळख प्रत्यक्ष असणें हें इतर अनेक ओळखीच्या खुणांपेक्षां अधिक आहे.

ओळखीचा गडी, कधीं ना सोडी-पुढें 'ओळखीचा चोर' पहा.

ओळखीचा चोर, जीवें मारी (न सोडी)—ओळखीच्या चोरानें आपल्याला तसेंच सोडून दिलें तर आपण, त्याची सर्व

माहिती असल्यानें, त्याला पकडून देऊन शिक्षा करवूं म्हणून तो आपल्याला, त्याच्या ओळखीच्या माणसाला ठार करतो व पुरावा नाहींसा करतो. तेव्हां ओळखीचा गुन्हेगार फार वाईट; तो जास्त नाशाला कारण होतो. 'अंतरंगीचा हा ओळखीचा चोर जीवें न सोडी अशापैकीं करून सोडतो.'–भाव १७.

औ

औट——**औट घटकांचा आनंद**—अल्पकाळ टिकणारा आनंद.

औट घटकेचें राज्य; औट घटी (डी) चें राज्य—[किरीटी रामराजानें आपल्या अबदागिऱ्याला साडेतीन घटका राज्य दिल्याची गोष्ट आहे. तशीच शिराळशेटाची आहे. हुमायुनासंबंधी भिस्त्याची चुकीची गोष्ट–मुन्यकोश.] शिराळशेटी राज्य; थोडा वेळ टिकणारें ऐश्वर्य; क्षणभंगुर सुख, वैभव इ.

औट पीठ—½ कोल्हापूरची महालक्ष्मी, १ तुळजापूरची भवानी, १ मातापूरची रेणुका, १ जोगाईचे आंब्याची योगेश्वरी.

❀ **औट हात तुझा जागा । येर सिणसी वाउगा ॥**—मनुष्य मेल्यावर त्यास जाळावयास किंवा पुरावयास फक्त साडे तीन हात लांबीची जागा लागते पण तो जन्मभर व्यर्थ अधिकाधिक मिळविण्याची खटपट करीत असतो.–तुगा २६९२.

औत——**औत घेणें**—१ आहुति घेणें; मरणें; मृत्यूस कारण होणें. 'बाळंतपणानें औत घेतली.' २ अति श्रम हाणें.

औतणें——**औतून कटकट–कज्जा आणणें–करणें**—[औतणें = आंवतणें; आमंत्रण देणें.] भांडण उकरून काढणें; मुद्दाम तंटा माजविणें.

और——**और तर भुर्र**—एका राजाला गोष्टी ऐकण्याचा फार नाद होता. त्याला कितीहि लांब गोष्ट सांगितली तरी ती संपल्यावर तो पुढें विचारावयाचा और (आणखी पुढें काय ?). तेव्हां गोष्टी सांगणारा कंटाळावयाचा व गोष्ट संपली म्हणून राजा त्यास कांहीं न देतां घालवून द्यावयाचा. अखेरीस त्यानें दौंडी पिटविल्यावरून कधीं न संपणारी गोष्ट सांगण्याची प्रतिज्ञा केलेला एक गोष्टी सांगणारा आला. त्यानें अशी गोष्ट सांगितली:—एका राज्यांत वरचेवर दुष्काळ पडत असे, त्यामुळें लोक फार कंटाळले होते. तेव्हां त्या राजानें एक अत्यंत मोठें कोठार बांधून कितीहि मोठा दुष्काळ पडला तरी त्यांतील धान्य संपणार नाहीं अशा तजवीजीनें त्यांत धान्य सांठवून ठेवलें. त्या कोठारास एक लहानसें छिद्र होतें; त्या छिद्रांतून एका वेळीं फक्त एकच चिमणी आंत जाऊं शकत असे. त्या ठिकाणीं कांहीं चिमण्या आल्या; त्यांतील एक चिमणी आंत गेली व एक दाणा घेऊन भुर्रकन उडाली. दुसरी चिमणी आंत गेली; एक दाणा घेऊन भुर्रकन उडाली. तिसरी चिमणी गेली; एक दाणा घेऊन भुर्रकन उडाली...याप्रमाणें तो सारखें सांगूं लागला. तेव्हां त्या राजानें मधून मधून विचारावें और ? यानें म्हणावें भुर्र ! याप्रमाणें त्याची गोष्ट कधींच संपावयाची नाहीं असें पाहून राजानें त्यास बक्षिस देऊन वाटेला लाविलें. यावरून जशास तसें; कसें तरी टाळाटाळीचें उत्तर.

और तो लगाव, पीछे बतायेंगें; मेरे गल्लीमें तो आव—भेकड मनुष्यानें आणलेला खोटा आवेश.

औरकी फुली देखते, आपना टिंटर नहिं देखते—दुसऱ्याच्या डोळ्यांतलें फूल (कुसळ) दिसतें पण आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं.

औरत——**औरत मरद राजी, तो क्या करेंगा काजी**—वर व वधू जर लग्नास राजी असतील तर काजीनें विरोध करण्यांत काय फायदा ? ज्यांचा प्रत्यक्ष संबंध आहे तीं जर एखाद्या व्यवहाराबद्दल संतुष्ट असतील तर भलत्यांनीं त्यांत पडण्यांत कांहीं अर्थ नसतो. पाठभेद–मियाबिबी राजी तो क्या करे काजी.

औषध——**औषधाला नसणें**—औषधाला एखादी वस्तु फारच थोडी लागते; पण तीदेखील जवळ नसणें. आत्यंतिक अभाव; मुळींच, चिमूटभर सुद्धां नसणें. 'तुमच्या चंचींत थोडासा कात असला तर द्या बरें ! छेः हो, अगदीं औषधाला नाहीं.'

❀ **औषध खावें म्यां आणि पथ्य करावें त्वां**—एकानें कृत्य करावें व त्याचें फळ दुसऱ्यानें भोगावें.

औषधं जान्हवी तोयं—औषध कसेंहि कडू, धर्मबाह्य-पदार्थमिश्रित इ., असलें तरी तें गंगोदकाप्रमाणें स्वीकार्य व हितकर असतें, म्हणून घेणें अवश्य आहे, असा अर्थ. किंवा गंगोदक हें सर्व रोगांवर उत्तम औषध आहे. संबंध श्लोक– शरीरे जर्जरीभूते व्याधिग्रस्ते कलेवरे । औषधं जान्हवीतोयं वैद्यो नारायणो हरिः ॥

औषध नाहीं, मृत्यूस कांहीं—सर्व रोगांवर औषध देतां येतें पण मृत्यूवर कांहीं औषध चालत नाहीं. मरण कांहीं टळत नाहीं.

औषधावांचून खरूज मेली (गेली); औषधावांचून खोकला गेला—एखादें विघ्न परभारें, आपणास कांहीं उपाय योजावा न लागतां, टळलें म्हणजे म्हणतात.

क

क——**क सुकलें, व भागलें**—अक्षरशत्रु मनुष्याची स्थिति.

कईं——**कईं भोज्य नानापरी । कईं कोरड्या भाकरी ॥** कधीं खाण्यास तऱ्हेतऱ्हेचीं पक्वान्नें, तर कधीं नुसत्या भाकरी. सर्व दिवस सारखे नसतात. कधीं सुकाल असतो तेव्हां ऐश्वर्य भोगावयास मिळतें; कधीं विपत्ति आल्यास कष्टांत दिवस काढावे लागतात. ' कईं वहावें जीवना । कईं पलंगीं शयना । जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे । कईं भोज्य नानापरी । कईं कोरड्या भाकरी ॥ '-तुगा २७१७. तु०-कधीं तुपाशीं तर कधीं उपाशीं.

कंकण——**कंकण हातांत बांधणें**—ज्याप्रमाणें सभेमध्यें ठेवलेला पैजेचा विडा उचलून एखादें काम अंगावर घेण्याची प्रतिज्ञा करण्यांत येत असे त्याप्रमाणें एखादें काम करण्याची प्रतिज्ञा करतांना त्या गोष्टीची आठवण म्हणून हातांत कंकण बांधण्याची पद्धति होती. यज्ञ वगैरे सारखें मोठें कार्य अंगावर घेतल्यास यजमानाच्या हातांत यज्ञ कंकण बांधीत असत. यावरून १ एखादें काम करण्याचें प्रतिज्ञापूर्वक अंगावर घेणें; एखादी जबाबदारी पतकरणें; एखाद्या मोठ्या कार्यास हात घालणें. ' तें यज्ञकंकण करांबुजिं राघवातें । शत्रुघ्न ते भरत बांधिति नीज हातें ' ॥-आनंद यज्ञरक्षण. २ एखाद्या गोष्टीचा अभिमान बाळगणें; एखाद्याचा कैवार घेणें; एखादा बाणा बाळगणें.

कंकास——**कंकासाचें तोंड काळें**—[कंकास = भांडणतंटा.] भांडणतंट्याचें तोंड पाहूं नये. भांडणतंट्यापासून दोन पावलें दूर राहाणें.

कंकासानें विहीरसुद्धां आटते—विहीरीवर पाण्यासंबंधीं तंटा वगैरे एकसारखा करीत राहिल्यास ती सुद्धां आपली या कटकटींतून सुटका व्हावी म्हणून कोरडी होऊन जाईल. कटकटीचा सर्वांसच अतिशय त्रास वाटतो. निर्जीव वस्तूंस सुद्धां वाटतो तर जिवंत मनुष्यास वाटणारच. पाण्यावरून भांडण करीत राहिल्यास विहीरसुद्धां आपणांस हा त्रास नको म्हणून आपलें पाणी आटवून टाकील. इतका एकसारख्या कटकटीचा सर्वांस कंटाळा वाटतो.

कक्को——**कक्को म्हणून बसणें**—अतिशय खाखावणें; अतिशय भूक लागली म्हणून ओरडत राहणें; पोटांत कावळे ओरडणें; भुकेनें कावकाव करणें.

कंगाल——**कंगाल पोतें**—१ भिक्षेची झोळी; भिकाऱ्याची पिशवी. २ अतिशय सैल अंगरखा, तुमान वगैरे; घंघाळ पोतें.

ॐ **कंगालाच्या घरीं कंगाल गेला**—एका दरिद्र्याच्या घरीं दुसरा दरिद्री गेला तर त्यास काय मिळणार ? दोघेहि दरिद्रीच. तेव्हां ते एकमेकांस कांहीं साहाय्य करूं शकत नाहींत. तु०-उपाशा घरीं शिळ्यासाठीं जाणें. एकादशीच्या घरीं शिवरात्र. उघड्यापाशीं नागडें गेलें. इ.

कचपाश——**कचपाश घालणें**—केसानें गळा कापणें; विश्वासघात करणें.

कचाटा-टी——**कचाटींत--कचाट्यांत सांपडणें**—एखाद्याच्या तावडींत सांपडणें; पेचांत पडणें; अडचणींत येणें; हातांत सांपडणें.

कच्च——**कच्च जावप**--(गो.) दचकणें; पोटांस धस्स होणें.

कच्चा——**कच्ची कोंबी करणें**--(क.) एखाद्याचें भजन करणें.

कच्चं दील—भितरें मन; भीरु हृदय; भीतीनें लवकर खचणारें कोंवळें मन हृदय. ' आंह्माकडील अर्धीच गनीम यांचें कच्चं दील; गाडहत्यारी निढवले तरि, झाडास बांधले तरि झाड घेऊन जातील. '-भाव ९.

कच्च्या गुरूचा चेला--अर्धवट शिक्षकापासून ज्ञान मिळविलेला. ज्याचें स्वतःचें ज्ञान अथवा चातुर्य परिपक्व नाहीं अशा मनुष्याजवळून विद्या घेतल्यास ती अपूर्णच असणार. यावरून अर्धवट माहिती मिळवलेला; अपुरें ज्ञान असलेला.

कच्च्या घड्यानें पाणी वाहाणें—अर्धवट भाजलेला कच्चा घडा पाणी वाहतांना फार पाझरतो व त्यामुळें पाणी लवकर भरून होत नाहीं. एखादी गोष्ट आपणाकडून न झाल्यास किंवा आपलें म्हणणें खोटें ठरल्यास मी त्याबद्दल अमुक प्रायश्चित्त घेईन अशी प्रतिज्ञा करतेवेळीं, ' कच्च्या घड्यानें पाणी वाहीन ' अशीहि एक प्रतिज्ञा करतात. यावरून वाटेल तें श्रमाचें किंवा अत्यंत कष्टसाध्य असें काम करणें; कितीहि श्रमाची कष्टाची चाकरी करणें, असा बोध होतो. ' घडेल तरी मी कच्च्या घड्यानें वाहिन पाणी, वाहिली शपथ साची'-राला । ६२.

※ **कच्च्या घडांतलें लिंबलोण व साऱ्या घरास सारवण**—कच्च्या मडक्यांत लिंबाचें लोणचें घातल्यास तें पाझरून सर्व घरभर होतें व सर्व घर सारवण्याची पाळी येते. लिंबाचें लोणचें बहुधा लाखलोट्यांत घालतात. यावरून अव्यवस्थित कारभार.

कच्च्या धाग्याचें बंधन सैल, कैसा आकळे दांडगा बैल—कच्च्या दोऱ्यानें दांडगा बैल बांधूं गेल्यास तो कसा बांधला जाईल ? अपुऱ्या किंवा अर्धवट साधनांनीं कठिण गोष्ट सिद्ध होऊं शकत नाहीं. ज्या प्रकारचें काम असेल तशीच तयारी केली पाहिजे.

कच्च्या पायावर बांधलेली इमारत किती दिवस टिकणार ?—इमारतीचा पायाच कच्चा असल्यावर त्यावर रचलेली इमारत ढांसळणार हें निश्चित. तेव्हां अपुऱ्या आधारावर कोणताहि व्यूह रचणें, मसलत करणें, किंवा कोणतेंहि कार्य करूं पाहणें व्यर्थ होय.

कच्छप——**कच्छपीं लागणें**——[कच्छप=कांसोटा. सोमयज्ञामध्यें बहिष्पवमानाच्या वेळीं एक ऋत्विज दुसऱ्या ऋत्विजाच्या कासोट्यास धरून आहवनीयाकडे जातो;यावरून]१ आश्रय करणें; एखाद्याच्या मार्गे मार्गे असणें; दुसऱ्याच्या तंत्रानें चालणें; एखाद्याच्या नादीं लागणें. २ पाठ पुरविणें; पाठ न सोडणें; त्रास देणें.

कज्जा——**कज्जा खांदून-खोदून काढणें**—भांडण उकरून काढणें; मुद्दाम तंटा उपस्थित करणें; एखादें भांडण आपल्या अंगावर ओढवून घेणें.

कज्जाचें तोंड काळें—भांडण तंटा करण्याचें शक्य तों टाळावें. भांडणाचें तोंड पाहूं नये. त्यापासून दूर असावें. नेहमीं तंटा टाळीत असावें. ' कंकासाचें तोंड काळें ' पहा.

कट——**कटास (कट्यास) हात लावणें**—एक प्रकारचें दिव्य करणें; ईश्वरास स्मरून शपथ घेणें. देवळाची पायरी, अथवा उंबरठा यावर हात ठेवून एखाद्या निश्चयापासून परावृत्त न होण्याबद्दल, एकनिष्ठेबद्दल वगैरे शपथ करण्याचा हा प्रकार आहे. बेलभंडार घेणें पहा.

कटक——**कटक उलगणें**——[कटक=सैन्य. उलगणें=विसर्जन पावणें] (कर.) सैन्याचा तळ उठणें; कोणतेंहि कार्य पार पडणें. लढाई आटोपल्यावर ज्याप्रमाणें सैन्यांतील शिपाई तळ उठवून घरोघर निघून जातात त्याप्रमाणें एखादें लग्न वगैरे सारखें मोठें कार्य पूर्णपणें पार पडल्यावर पाहुणे मंडळी घरोघर निघून जातात.

※ **कटकास गुळवणी**——चुकीचा पाठ. 'कंठकास गुळवणी,' पहा.

कटकाची हंडी कटकींच फोडावी—कोणत्याहि गोष्टीचा तेथल्या तेथेंच निकाल लावावा. तु०—तुरीची काठी तुरीवर झाडावी.

कंटक——**कंटकत्रय**——१ वांगी (बृहती), २ अग्निधमनी (वेळू ?) व ३ दुःस्पर्शा (?).

कटकट——**कटकट करणें**—भांडणतंटा, मारामारी करणें; कलह, आरडा ओरड करणें. ' भुलले ते संशप्तक; केली बहु आपणांत कटकट कीं।' —मो द्रोण २.१८.

कढणें——**कढून करणें**—झटून काम करणें; नेटानें करणें.

कढून मरणें—अखेरपर्यंत लढाई करून शेवटीं लढाईंत कापलें जाणें; मरेपर्यंत लढणें; लढाईंत मारामारी करीत असतां मृत्यु येणें. ' कटून मरावें खरें असा धर्म क्षत्रियाचा । कसें रहा म्हणतीस घरीं डाग लागेल जन्माचा ॥ '—होला १६७.

कढून लढणें—जीवावर उदार होऊन लढणें; अनेकांना मारीत मारीत मोठ्या शौर्यानें व हिंमतीनें लढणें; कसून युद्ध करणें.

कटतें——**कटतें व्याज**——कटमितीचें व्याज; मूळ कर्जास कोणतीहि मुदत ठरली असली तरी त्या ठराविक मुदतीचें व्याज न आकारतां प्रत्यक्ष जितक्या दिवस पैसा वापरला असेल तितक्याच दिवसांचें व्याज आकारणें; जितक्या मुदलाची फेड होईल तितक्या मुदलावर त्या दिवसापासून व्याजाची आकारणी बंद करणें.

कटाप——**कटाप चलप ना**-(गो.) उपाय चालत नाहीं.

कटासन——**कटासन घालून बसणें**——गवताचें, दर्भाचें वगैरे आसन घेऊन त्यावर बसणें; यावरून १ तपश्चर्येस बसणें; कोणतेंहि जपजाप्यादि व्रत घेऊन तें आचरीत बसणें. २ (उप.) कर्मठपणाचें ढोंग करणें; जपजाप्यादि करण्याचा आव आणणें.

कटाळा——**कटाळा त्याचा वानवळा**—एखादें फळ वगैरे बागेंत नवीन झाल्यास तें मोठ्या हौसेनें सर्वांस वानवळा म्हणून खावयास देतात व इष्टमित्रांसहि वांटतात व तें सर्व खातात. परंतु ज्याला एखादी गोष्ट मुळींच आवडत नसेल त्यास ती वानवळ्यास म्हणून मुद्दाम देण्यांत काय फायदा ? तीपासून त्यास संतोष होण्याऐवजीं त्रास मात्र व्हावयाचा.

कटिशूल——**कटिशूलाची व्यथा**—वेश्यागमनाची संवय; बाहेरख्यालीपणा; परदारागमनाचें व्यसन.

कट्टा——**कट्ट्याचा दगड कट्ट्यांत बसविणें**——[कट्टा = ओटा] एखाद्याचें महत्त्व कमी होऊन स्थानच्युत होण्याचा प्रसंग ठेपला असेल तर त्याचें अस्तित्व कायम राखणें, त्यास योग्य त्या जागीं कायम करणें; स्वस्थानीं बसविणें; एखाद्याची मूळ स्थिति, योग्यता, त्यास प्राप्त करून देणें.

कट्टी——**कट्टीं- कटीं धरणें-बसणें,- गांठणें**— सोंगट्यांच्या खेळांत सोंगटी ज्याप्रमाणें कटावर (× केलेल्या घरांत) बसली असतां मरत नाहीं म्हणून निर्भय असते त्याप्रमाणें निर्भय ठिकाणीं असणें; सुरक्षित ठिकाणीं राहणें; दुर्गाचा आश्रय करणें.

कट्टी——**कट्टी खायरो**—(गो.) [कट्टी = करटी] करटी खाणारा; यावरून दरिद्री. भिकारी.

कट्टींत फातर घालून बसप—(गो.) करटींत खडे घेऊन मोजीत बसणें; दिवस मोजीत राहणें; ठरलेली मुदत केव्हां संपते याची एकसारखी वाट पाहात राहणें.

कट्टेंत नाक बुडवप—(गो.) करटींत नाक बुडविणें; थोड्याकरितां अन्न घालविणें.

&कट्टिभर मास कांयू ना जावप-(गो.) करटीभरसुद्धां मांस भरणार नाहीं. शरीरपोषणाला निरुपयोगी असा पदार्थ कितीहि खाल्ला तरी त्यामुळें आपल्या शरीरांत नरोटीभर देखील मांस जमणार नाहीं. एखादें कार्य आपण जिवापाड श्रम घेऊन करावें आणि त्याचें फल अल्पांशानें सुद्धां पदरांत पडूं नये; मग काय उपयोग त्याचा ?

कट्टें नाक बुडोंवू नयें, बुडैल्या समुद्रां बुडौचें—(गो.) करटींत नाक बुडवूं नये, बुडवायचेंच असेल तर समुद्रांत बुडवावें. एखादी गोष्ट करावयाची झाल्यास अर्धवट करूं नये चांगली घसघशीत करावी.

कट्टें नातिल्या भुतानें भोवंताचि आसचें(गो.)-डोकें नसलेल्या भुतानें फिरतच असावें. म्हणजे मूर्ख माणसाला कधीं यश नसतें.

कट्यार, कटार——**कट्यार उरावर-जीवावर टाकणें-टांगणें-धरणें-राहणें**—नेहमीं येणाऱ्या संकटाच्या काळजींत सांपडणें; डोक्यावर तरवार टांगलेली असणें; अडचणींत सांपडलेलें असणें. ' इंग्रजांचे उरावर कट्यार राहील. ' –पया २५६.

कट्यार जिवाला असणें-लागणें—मनाला अतिशय टोंचणी लागलेली असणें; कटयारीप्रमाणें काळजी मनाला एकसारखी टोंचीत राहणें; नेहमीं चिंतेंत मग्न असणें.

कट्यार लावणें—खोंचून बोलणें; जिव्हारीं लागतील असे शब्द बोलणें; शब्दांचे टोमणे मारणें.

कंठ——**कंठचामीकर न्याय**—स्वतःच्याच गळ्यांत सोन्याचा एखादा दागिना असून तो हरवला आहे अशा समजुतीनें सर्वत्र धुंडाळणें, शोध करणें. तु०-काखेंत कळसा गांवाला वळसा. आपलीच मांडी चोरटी दुसऱ्याला म्हणते कारटी. मांडीखालीं आरी, ब चांभार पोर मारी.

कंठ दाटणें-भरून येणें-सद्गदित होणें-एकाएकीं अतिशय दुःख किंवा आनंद याचा उमाळा आला असतां कंठ अवरुद्ध होऊन त्यांतून शब्द बाहेर पडत नाहीं, अशी अवस्था होणें; गळा दाटून येणें; गहिंवरून येणें. ' सांगूं जातां मुखानें । तों कंठ आला भरून । '–नव २२.४५. ' दासाकडे हनुमंत पाहे । तों गहिंवरें कंठ दाटला हे । '–संवि २.८५.

कंठनाळ चिरणें—गळा कापणें; ठार मारणें; मान कापणें.

कंठ फुटणें—१ आवाज चिरका येऊं लागणें; घसा फुटणें; आवाजांतील माधुरी जाऊन तो कर्कष वाटूं लागणें. २ पोपट इत्यादिकांस चांगला आवाज काढतां येऊं लागणें; पोपटास वगैरे बोलतां येऊं लागणें. ३ खणखणीत आवाज निघूं लागणें; लहान मुलास वगैरे नुकतेंच बोलतां येऊं लागणें; स्पष्ट उच्चार होऊं लागणें. ४ (ल.) वयांत येणें; प्रौढ अवस्था प्राप्त होणें; तारुण्यांत येणें; जोमांत येणें.

कंठ बसणें—घसा बसणें; आवाज घोगरा येऊं लागणें; घशांतून स्पष्ट आवाज निघत नाहीं अशी अवस्था होणें. ' म्हणती कंठ बैसले आतां । नये गातां कीर्तनीं ॥ ' –संवि २२.१२२.

कंठ मोकळा करून रडणें—धाय मोकलून रडणें; मनसोक्त दुःख व्यक्त करणें; रडून रडून दुःख हलकें करणें. ' मोकळा करुनि कंठ तेधवां। आठवूनि मनिं जानकीधवा । '–वामन भरतभाव १४.

कंठरवानें, कंठरवें करून—१ मोठमोठ्यानें;ओरडून; घसा फोडून; कंठशोष करून (एखाद्या गोष्टीबद्दल तक्रार करणें, सूचना देणें, बजावून सांगणें). २ मुद्दाम; निश्चयानें; स्पष्टपणें.

कंठशोष करणें— ओरडून ओरडून, अतिशय तक्रार करून घसा कोरडा करणें; एखाद्या अन्यायाबद्दल अतिशय ओरड करणें; एकसारखी मोठमोठ्यानें तक्रार करीत असणें. ' वादी प्रतिवादीकडून अतोनात कंठशोष होत असतांहि '–टि ४.१३१.

कंठस्नान घालणें—एखाद्याचा गळा कापला असतां त्यांतून निघणाऱ्या रक्तानें त्यास स्नान घडतें; यावरून एखाद्याचा गळा कापणें; ठार मारणें (विशेषतः युद्धांत वगैरे). ' धोंडी वाघासारख्या काळपुरुषास ज्यानें कंठस्नान घातलें, त्या बापू गोखल्याच्या पराक्रमाचें वर्णन काय करावें ? '

कंठास-कंठीं प्राण येणें--अतिशय दुःख होणें; भीतीनें, दुःखानें मरणोन्मुख होणें. ' प्रतिवचन प्रसंगीं प्राण कंठास आला'-सारुह२.१०३. २ दुःखानें, भीतीनें,भुकेनें व्याकुळ होणें.

कंठास लावणें--मिठी मारणें; आलिंगन देणें. ' कंठास त्यास लावून ' -संग्रामगीतें १५.

कंठास हात लावणें--गळ्याची शपथ वाहाणें; इमान प्रमाण करणें; स्वतःची शपथ घेणें.

कंठीं धारण करणें--१ अलंकार, माळ वगैरे गळ्यांत घालणें. २ एखाद्यास अलंकाराप्रमाणें फार जपणें. ३ एखादी व्यक्ति अतिशय प्रिय असल्यामुळें तिच्यावर फार लोभ दाखविणें.

कंठीं प्राण उरणें--मरणोन्मुख अवस्था होणें. तु०-नाकाशीं सूत धरणें. नाकीं नव येणें.

कंठीं प्राण ठेवणें-धरणें-राहणें--एखादी अखेरची इच्छा पूर्ण झाल्यानंतर किंवा एखाद्याची भेट झाल्यानंतर मरण यावें अशा आशेनें कांहीं वेळ जीव धरून राहणें. ' अस्थिशिरा दिसती नयनीं । प्राण कंठीं धरिले त्यांनीं । ' --संवि २०.७७. -ह २१.७२. ' तुम्हाविण कंठीं प्राण राहिला असे ॥ '-रत्न४.३.

※ कंठीं प्राण आणि मात्रा लहान--प्राण जातो अशी वेळ आहे तरी मात्रा मोठी नाहीं, औषध पुरेशा प्रमाणांत नाहीं.

कंठक---**कंठकास गुळवणी**--जो मनुष्य सोशिक असतो, कसेंहि भागवून घेतो, तक्रार करीत नाहीं त्याला गुळाचें पाणी देऊन त्याची कशीबशी संभावना करतात त्याला कोणी पक्वान्न देत नाहीं. पण जो अडून बसतो त्याचा हट्ट पुरा करण्यांत येतो. तु०--All lay a load on the willing horse.

कठाण---**कठाणीं ठेवणें**--१ एखादी जमीन खरीपाच्या हंगामांत न पेरतां कडधान्यासाठीं, रब्बीच्या पिकासाठीं राखून ठेवणें. २ उपाशी ठेवणें; खावयास न घालतां तसेंच ठेवणें; हाल करणें.

कंढाळ---**कंठाळ लादणें**--एखाद्यावर एखादें काम जबरदस्तीनें टाकणें. एखाद्यास बळेंच एखादें काम त्याच्या इच्छेविरुद्धहि करावयास लावणें.

※ तुम्ही आम्ही एक, कंठाळीला मेख; तुम्ही आम्ही एक पण कंठाळीस हात लावूं नका--' आम्ही तुम्ही एक. ' पहा. कामापुरता स्नेह जोडणें; स्वार्थी स्नेह; वरवरची मैत्री अथवा नातें. ' कंठाळीस हात लाउं नये हें तुझे मनांतील वर्म गडे। ' --होला ६१.८९.

कठिण---**कठिण वाटणें**--एखादी मनाविरुद्ध गोष्ट करावी लागली असतां ती करणें अतिशय जड जातें व त्यावेळीं मनाला फार खेद होतो, अशा वेळीं हा वाक्प्रचार योजतात. अवघड वाटणें; मनाला खेद होणें; वाईट वाटणें.

※ कठिण नारळाचें अंग बाहेर, भीतरीचें चांग--नारळाचें बाहेरचें अंग म्हणजे करटी ही कठिण असते पण आंतील खोबरें गोड असतें. यावरून बाहेरून दिसावयास उग्र पण आंतून चांगला, किंवा बाहेरून दिसावयास निष्ठुर व कडक पण आंतून दयाळु, अशास ही म्हण योजितात.

कठिण समय येतां कोण कामासि येतो--आपल्यावर एखादा दुर्घट प्रसंग आल्यास त्यावेळीं आपले मित्र अथवा आप्त वगैरे कोणीहि आपल्या मदतीस धांवून येत नाहींत. ' तादितर खग भेणें वेगळाले पळाले । उपवनजलकेली जे कराया मिळाले । स्वजन गवसला जो त्याजपाशीं नसे तो । कठिण समय० ॥'- नल.

कड---**कड ओढणें-घेणें-धरणें**--एखाद्याचा पक्ष घेणें; एखाद्याची बाजू घेणें; एखाद्याची तरफदारी करणें.

कड करणें--(व.) शेवटपर्यंत टिकाव धरणें; अखेरीपर्यंत नेटानें चिकाटी धरून राहणें; शेवटास नेणें; सीमा गांठणें.

कड काढणें (कामाची वगैरे)--एका दमांत आरंभापासून अखेरीपर्यंत जाणें, संपविणें; आटोपून टाकणें; पुरें करणें.

कड परतणें--एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळणें; दुखण्यांतून बरें होण्याच्या मार्गास लागणें.

कड लावणें--तडीस नेणें; शेवटास नेणें. ' कडे लावूं आपुला काळ । सोडोनि तळमळ चित्ताची ॥ '-भवि५०.१४०.

कडचा पोहणारा--१ नदीच्या तीराजवळच्या उथळ पाण्यांत पोहणारा. २ (ल.) अतिशय सावधगिरी बाळगून व्यवहार करणारा. ३ दुरून दुरून साहाय्य करणारा; प्रत्यक्ष जोखीम घेण्याचें टाळून मदत करणारा.

कडचा रविवार--अगदीं शेवटचा आदितवार; ज्याच्यापुढें आणखी आदितवार येणार नाहीं असा आदितवार; जगाच्या अखेरचा दिवस.

कडेच्या रविवारीं-आदितवारीं--अगदीं अखेरच्या दिवशीं, म्हणजे कधींच नाहीं. कारण तो दिवस पाहण्यास आजचा कोणीच हयात असणार नाहीं.

कड-ढ---**कड काढून रडणें**--(राजा.) ओक्साबोक्शीं रडणें; दुःखाचे पुन्हां पुन्हां आवेग येऊन रडणें; मोठमोठ्यानें रडणें.

ॐ आपलें नाहीं धड, शेजाऱ्याला (चा) कड—आपले पहा.

कड——**कडावर ठेवणें**—[कड=कट=वरणाचें पाणी] (ना.) केवळ धान्य शिजविलेल्या पाण्यावर, कटावर ठेवणें; पेजेवर ठेवणें. म्हणजे उपाशीं ठेवणें; दुर्लक्ष करणें.

कड——**कडेवर घेतलें, खांद्यावर घेतलें, तरी लेंकरूं लोकाचें**—[कड=कंबर] दुसऱ्याच्या मुलाचें कितीहि कौतुक केलें तरी त्याचा काय उपयोग ? तें आपलें होणें किंवा त्याचा आपल्याकडे ओढा असणें अशक्य आहे. परकीय वस्तूबद्दल कितीहि आपलेपणा दाखविला तरी शेवटीं ती दुसऱ्याचीच ठरणार.

कडेवर बसला तर लेंकरूं आणि चुतीवर बसला तर पांखरूं—(अशिष्ट) स्त्रियांच्या बाबतींत उपभोग्य स्थानांच्या भिन्नत्वामुळें त्यांचें नातेंहि भिन्न होतें.

कडक——**कडक बिजली**—१ कडक वीज; अत्यंत तीव्र तेजाची विद्युल्लता. २ तल्लख, तापट, चपळ स्त्री, घोडी वगैरे. ३ त्वरेनें मारा करणारी तोफ; अत्यंत प्रचंड व फार त्वरेनें व दूरवर मारा करणारी तोफ. महांकाली, कडक बिजली अशीं तोफांचीं नांवें असत.

कडक लक्ष्मी—देवीचें सोंग घेऊन भिक्षा मागणारा भिक्षेकरी; यांच्या हातांत लांब आसूड असून ते त्याचा कडकड असा मोठा आवाज करतात.

कडक सावित्री—तापट, तडफदार, तल्लख स्त्री.

कडकडतले——**कडकतल्या गेलो हातु भळभळतल्यानें धरलो**——(गो.) भोवळ आलेल्या माणसानें आधारासाठीं कांपणाऱ्या माणसाचा हात धरला तर काय उपयोग ?

कडकडां——**कडकडां दांत खाणें**——अतिशय रागावणें, संतापणें; अतिशय क्रोधानें दांत ओठ खाणें.

कडकडां भेटणें—जोरानें घट्ट मिठी मारणें; कडकडून भेटणें, आलिंगन देणें.

कडकडून चावणें—फार संतापानें चावा घेणें; जोरानें चावणें. ' पुच्छ रगडितां नागें धांवावें कडकडोनि चावावें । ' —मोकर्ण १४.३.

कडकणें——**कडकून सांगणें-बोलणें**—मोठ्यानें, जोराने सांगणें, बोलणें; रागानें, शिरा ताणून बोलणें.

कंडका——**कंडका पाडणें**—(क.) १ तुकडा पाडणें; तोडून टाकणें. २ भानगड मिटविणें; तुकडा पाडून टाकणें; संबंध तोडणें; विभक्त करणें; अलग करणें.

कडप——**कडप वळणें-बसणें-होणें**——[कडप=वाळलेली तुराटी; वाळलेलें हरभऱ्याचें झाड वगैरे] अशक्त, रोड, कृश होणें; वाळणें.

कडबा——**कडब्याची पेंडी कडब्यानें बांधणें**——(व.) ज्या योग्यतेचें आपण असूं त्यापेक्षां कमी योग्यतेच्या मनुष्याशीं सोयरसंबंध न जोडतां समान योग्यतेच्या घराण्याशीं जोडणें. दर्जा राखणें.

कडमडणें——**कडमडून येणें**—अंग धरणें; अंगांत कस-कस येणें; ताप येण्याचीं पूर्व चिन्हें होणें; हिंवाची शिरशिरी येणें.

कडवा——**कडवें झाड, फळें बहुत**——सामान्यतः कडू फळाच्या झाडालाच फार पीक असतें; व तीं फळें वायां जातात. म्हणजे जे निरुपयोगी त्यांचाच भरणा फार. ' कडवे झाडाला बहु बाज. ' कडू पहा.

कडसणी——**कडसणी घालणें; कडसणींत धरणें**—— अडचणींत घालणें; पेचांत आणणें; घोटाळ्यांत पाडणें; अडवून धरणें; कचाटींत पकडणें.

कडसणी देणें——(व.) पखवाज, तबला यांची वादी आवळून बांधणें; मृदंग, पखवाज वगैरेंच्या तोंडावरील कातडें वादीनें आंवळून कसून बांधणें.

कडसणीस लागणें——उतरती कळा लागणें; अखेरीस येणें; समाप्ति जवळ येणें; उतरणीस लागणें.

कडसरी——**कडसरीस येणें**—[कडसरी=कडेची अखेरची सरी, टोपलीची वगैरे] एखादें अवघड कार्य करीत असतां अगदीं शक्तीच्या शेवटच्या मर्यादेपर्यंत येणें; मेटाकुटीस येणें; अगदीं अखेरीस पोंचणें; सामर्थ्याचा अंत जवळ येणें.

कडळ——**कडळ काढणें**—करड काढणें. व्यवस्थितपणें न करतां कसें तरी एखादें काम उरकून टाकणें.

कडा—— **कडेलोट होणें; (गोष्ट) कडेलोटावर येऊन ठेपणें**—पूर्वी अगदीं मोठी शिक्षा म्हणजे कड्यावरून लोटून देणें. यावरून सीमा होणें; अगदीं शिकस्त होणें; मर्यादा संपणें; संकटाच्या गर्तेंत पडण्यापर्यंत अवस्था येणें. ' ही (जॉनसनची) भ्रमावस्था स्थाईक होऊन मुळींच आपला बुद्धिभ्रंश होईल कीं काय याची त्यास अतिशयित भीति वाटे पण या कडेलोटावर गोष्ट येऊन ठेपली नाहीं. '—नि ७०२.

ॐ **माळाचा कडा अन् गरिबाचा बोडा, फार पिकतो**—माळ जमीनीच्या शेवटीं जो डोंगर तुटल्यासारखा भाग असतो किंवा नाल्याजवळचा भाग असतो त्या भागांत पीक चांगलें येतें; तसेंच गरीब मनुष्यास मुलें फार होतात.

कडी——**कडी कुलूप करणें**—१ बंदोबस्तांत ठेवणें; सुरक्षित ठेवणें. २ कोंडून ठेवणें; बंदींत घालणें. ' तींत (अंधार कोठडींत) शुद्ध मेंढराप्रमाणें कोंबून भरिलें आणि दरवाजा लावून घेऊन कडी कुलूप केलें. '—हिंक १४०.

कंडी——कंडी पिकविणें—१ हूल उठविणें; भुमका पसरणें. २ एखादें कुभांड रचणें; खोटा अपवाद पसरणें (एखाद्या मनुष्याबद्दल).

कडू——कडू कारलें—(ल.) वाईट, कधींहि न बदलणारा असा स्वभाव; या स्वभावाचा माणूस. ' बाळू, तूं विठूची एवढी मनधरणी करूं नकोस. तो अगदीं कडू कारलें आहे. '

कडू काळ—वाईट दिवस; दुष्काळ, सांथ इ. चा काळ.

कडू दोडका-भोपळा—१ दासीपुत्र; लेंकवळा. २ पंक्तिबाह्य; अकुलीन माणूस.

कडू निंबाच्या झाडाखालून उठून आलेला—(कऱ्हे पठारी) भणंग; ज्याजवळ कांहीं नाहीं असा; कफल्लक. कडू निंबाच्या झाडाखालीं बसल्यास कडू निंबोण्याशिवाय कांहीं हातास लागणार नाहीं; तेंच एखाद्या चांगल्या फळ झाडाखालीं बसल्यास एखादें खाण्यासारखें फळ तरी हातास लागण्याचा संभव असतो.

कडू पाणी—१ कडु निंबाचे अथवा निर्गुंडीचे टहाळे घालून उकळलेलें पाणी. यानें आजारी मनुष्य, बाळंतीण वगैरेस स्नान घालतात. २ मृताशौच, रजस्वलादि विटाळ घालविण्याकरितां प्रथम स्नान करावयास घेतलेलें पाणी. ३ भाजी पाला वगैरे शिजविलेलें टाकून द्यावयाचें पाणी.

कडू **पाणी काढणें**—विटाळ दवडण्याकरितां प्रथम स्नान केल्यानंतर पुन्हां चांगल्या पाण्यानें स्नान करणें.

कडू **विटाळ**—१ मृताशौच; सुतक. २ बाळंतपणाचा विटाळ; जननाशौच.

❀ कडू **कारलें तुपांत तळलें व साखरेंत घोळलें तरी कडू तें कडूच**—कारल्याचा कडूपणा कशानेंहि जात नाहीं. (ल.) कांहींहि उपाय करून सुधारणा होत नाहीं; मूळ प्रकृति बदलत नाहीं. ' लकुच कटुचि अमृतकराकरवींहि शर्करेंत घोळविला । ' —मोआदि ३१.३०. (गु.) कडवो लीम, सो मण शाकर नाखे तोपण मिठो नही थांय. Can the fig tree bear berries or vine fig?

कडू **कारल्याची उपाधी गोडीनेंहि जात नाहीं**—वर प्रमाणेंच.

कडु **खावुनु गोड खांवका**—(गो.) कडू खाल्यानंतर गोड खायला पाहिजे. अगोदर कडू मागून गोड.

कडू झाडाला पानें फार, दुर्भाग्याला बोलणें फार—जगामध्यें उपयुक्त किंवा चांगल्या वस्तूंपेक्षां निरुपयोगी व सटरफटर वस्तूंची गर्दी अधिक आढळून येते. त्याचप्रमाणें विचारपूर्वक बोलणाऱ्यांपेक्षां भरमसाट बोलणारेच अधिक असतात. अर्थात् त्यांच्या बोलण्यापासून त्यांनाहि कांहीं लाभ होत नाहीं. कडवा पहा.

कडू बोलून दान दिल्यापेक्षां गोड बोलून नकार दिलेला बरा—तोंड गोड पाहिजे; नाहीं तर चांगली कृतीहि निष्फळ ठरते. तु०-याच्ञामोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा । —मेघदूत ६.

कडवे झाडाला बहू बाज, आणि म्हाताऱ्या माणसाला फार खाज—'कडू झाडाला०'पहा. म्हातारीं माणसें विषयापासून परावृत्त झालेलीं नसतात हें उत्तरार्धांत सांगितलें आहे. यावरून निष्फळ होणारे प्रयत्न अनेकदां करावे लागतात व कितीदां केले तरी ते निष्फळच होतात.

कडव्या झाडाला फळ बहू आणि उण्या माणसाला बोल बहू—' कडू झाडाला पानें फार. ' पहा. भिकार व टाकाऊ फळांचीं झाडें फळांनीं लादलेलीं दिसतात पण इरसाल झाडावर मोजकीं फळें येतात व थोडीं आलीं तरच तीं मोठीं व रसदार होतात. त्याप्रमाणेंच जो सर्वगुणसंपन्न मनुष्य आहे तो मोजकेंच बोलतो व आपलें काम करून घेतो; पण अर्धवट मनुष्य वायफळ बडबड करतो.

कडव्या झाडास बहु वाढ (बाज)—वर पहा. कडू फळें असलेल्या झाडास फळें फार येतात. निरुपयोगी झाडेंच फार वाढतात. म्हणजे चांगल्या गोष्टी थोड्याच असतात, वाईटच अतिशय.

कंडू——कंडू **जिरणें**—१ इच्छा नाहींशी होणें; हौस फिटणें. २ मस्ती जाणें; अद्दल घडणें; जबरदस्त मनुष्याकडून रग जिरणें.

कंडू **शमनार्थ चेटिका गमनं**—स्त्री ही वंशवृद्धीसाठीं पण कामविकाराची शांति होण्याकरितां वेश्यागमन आहे.—असें एक विधान. याबद्दल सबंध सुभाषित असें:—सुरतं तदेव सुरतं यत्नाल्लब्धं यदन्यनारीषु। सन्तत्यै दाररतिः कण्डूशमनार्थं चेटिकागमनम् ॥ मराठींत असाच एक ग्राम्य कोटीबाज श्लोक आहे त्याचा एक चरणः कंडू शमनार्थं रंडि राखावी। (कंडू शमनार्थं रंडिरा खावी ।) [रंडिरा=खडीसाखर]

कडोसरी——कडोसरीचा पैसा—केव्हांहि उपयोगांत आणतां येण्यासारखी वस्तु.

कडोसरीस **खोवणें-खुपसणें**—चटकन् आपल्या ताब्यांत घेणें; हस्तगत करणें.

कडोसरीस येणें—कडसरीस येणें पहा. अगदीं जेरीस येणें; मट्टयास येणें; अगदीं अखेरीस येणें.

कड्डा——कड्डां पोणोस घालप—(गो.) संदिग्ध बोलणें.

कंड्या——कंड्या लामण दिवो कसो दिसता—(गो.) करंडे आडना .. एक गृहस्थ गोमंतकांत होते व त्यांच्या घरीं

एक खूप मोठा लामणदिवा होता. त्याच्या वर्तुळांत २६ वातींची जागा होती. हा दिवा तूर्त मंगेश देवस्थानांत असून तो पेटवला कीं त्याची शोभा मोठी अवर्णनीय अशी दिसे. एखादा माणूस अंगापिंडानें भरघोस असा दिसला कीं, त्याला उद्देशून या म्हणीचा उपयोग करतात.

कड्याळ——**कड्याळ दांतीं धरणें**–[कड्याळ=जोंधळा, बाजरी वगैरेचें ताट]. १ शरण जाणें. २ दैन्य प्रदर्शित करणें. ' दांतीं तृण धरणें ' पहा.

कढ——**कढ ओढून घेणें**—परस्पर चाललेल्या भांडणाचा संबंध आपणाकडे ओढून घेणें; परभारें भांडण आपणावर ओढून घेणें. दुसऱ्याचा राग आपणावर ओढून घेणें.

कढ जिरविणें—१ दुसऱ्याचा राग शांत करणें; एखाद्याचा क्रोध शमविणें; समजूत करणें. २ रग जिरवणें; गर्व नाहींसा करणें; खोड मोडणें.

ॐ आगीवांचून (जाळावांचून) कढ नाहीं, मायेवांचून रड नाहीं—ज्याप्रमाणें पाण्याखालीं विस्तव लागल्याशिवाय तें उकळूं लागत नाहीं त्याप्रमाणें एखाद्याबद्दल प्रत्यक्ष प्रेम वाटत असल्याशिवाय त्याला दुःख झालें असतां आपल्या डोळ्यांत अश्रू येणार नाहींत.

कढण——**कढण निघणें**—मेटाकुटीस येणें; जीव मेटाकुटीस येणें.

कढी——**कढीखाऊ; कढीचट; कढीभुरक्या; कढीभातखाऊ; कढीभात खाणारा**—१ ब्राह्मण ब्राह्मण केवळ कढीभात खातात म्हणून त्यांच्या अंगीं ताकद नसते अशी समजूत आहे. तीवरून त्यांस कढीखाऊ इ. विशेषणानें अशक्त समजतात. ' कढीभातखाऊ म्हणती ब्राह्मणा जगांत। तयांनींच करणी केली प्रसंगीं अचाट।'–विक७. २ (ल) नामर्द; भ्याड; शेळपट.

कढी पातळ होणें—[पातळ परसाकडेस होणें यावरून ?] १ आजारामुळें अतिशय क्षीण होणें, अशक्त होणें, दुर्बल होणें; अगदीं कृश, रोड होणें. २ घाबरणें; भीतीनें गांगरणें; घाबरगुंडी उडणें.

कढी भात वरण घाटणें—स्वयंपाक करणें; स्वयंपाकासारखें हलकें काम करणें; सेवा करणें. ' तुज लाविलें स्वतेजें म्यांच कढी भात वरण घाटाया ।'–मो गदा ३३२.

कढीची पाळ—लहान मुलांचा एक खेळ. या खेळांत लहान मुलाच्या हाताचीं एक एक बोटें क्रमानें इथें भात, इथें भाजी, इथें वरण वगैरे म्हणून मिटतात व शेवटीं करंगळीवर कढी म्हणून कढीची पाळ पातळ होऊन वहात जाऊन खाकेपर्यंत गेली असें दाखवून तेथें गुदगुल्या करून त्यास हंसवितात. गुदगुल्या करणें.

ॐ कढी तव्यावर आणि भाकरी पातेल्यावर—कढी पातेल्यांत आणि भाकरी तव्यावर टाकण्याऐवजीं उलट कृति करणें; भलतीच गोष्ट करणें; एखादी कृति उलट सुलट करणें; सर्व कामाचा घोटाळा करणें.

कण——**कणाकणानें पाळ बनते व थेंबाथेंबानें तळें सांचतें**—धुळीचे कण एकावर एक एकसारखे बसत गेले तर कांहीं दिवसांनीं त्यांचा बांध तयार होतो व पाण्याचे थेंब सांठत गेले तर त्यांचें हळूहळू तळें बनतें. थोडें थोडें काम जरी एकसारखें करीत राहिलें तर कांहीं दिवसांनीं आपल्या हातून महत्कार्य घडून येतें. तु०–थेंबें थेंबें तळें सांचे. कणशः क्षणशश्चैव विद्यामर्थंच साधयेत्।

कणावेल्यानें शित्ता परिक्षा—(गो.) शितावरून भाताची परीक्षा.

कणे कणे जमे गिरी, वर्ष पळे पळांतरीं—डोंगर मातीच्या कणा कणांचाच बनलेला असतो, व वर्षाइतका दीर्घ कालहि अनेक पळांचा बनलेला असतो. तेव्हां लहान लहान गोष्टींपासूनच मोठमोठीं कार्यें होतात व क्षण क्षण जर मिळवले व ते फुकट घालविलें नाहींत तर दीर्घ कालानें मोठें कार्य बनतें. तुलना–कणाकणानें पाळ.

कणक——**कणकांची आग, चेडवांची जाग**—कणक, (एक कंद=कणगर) जसा लवकर भाजला जात नाहीं त्याप्रमाणें लहानमुलें लवकर जागीं होत नाहींत.

कणकी——**कणकींतसून काड, भोबो नाका**—(गो.) [कणकी=कळकीचें बेट; बांबू] मला खाऊ वगैरे कांहीं नको, एकदांचा मला या बांबूच्या बेटांतून काढ. मला तुझें कांहीं नको, पण संकटांतून मला मुक्त कर. तु०–भीक नको पण कुत्रा आवर.

कणगी——**कणगींत गहूं तर खाणार बहू**—जसें उत्पन्न तसा खर्च. एकाद्याचे घरीं पुष्कळसें धान्य असतें, पण तितकींच कुटुंबांतील माणसें असतात. तेव्हां त्या मानानेंच त्याचें मोजमाप करावें.

कणिक——**कणिक तिंबणें; कणकीसारखा तिंबणें; कणिक मऊ करणें**—पोळी करण्यासाठीं कणिक जितकी मळावी तितकी चांगली व अशी खूप तिंबल्यावर ती नरम होऊन पोळी चांगली होते. यावरून एखाद्यास खूप मार झोड करणें; चेंदामेंदा करणें; अशा तऱ्हेनें मारून वठणीस आणणें.

'तुझी कणीक चांगली तिंबून काढीन.'–गुप्तमंजूष. 'थांब तुझी कणीक आणखी मऊ करायला पाहिजे.'––शिसं ३.३.

कणिक मऊ होणें—हाल, त्रास होणें; मार बसणें. 'त्यांच्या घोड्याच्या धक्क्यानें दुसरीं एकदोन घोडीं खालीं पडून वरच्या बसणारांची कणीक बरीच मऊ झाली.'—पामो २२७.

कणिकेचा गरा—गव्हाचा रवा.

कणिकेंत मीठ—पोळीच्या कणकेंत थोडें मीठ घातलें असतां तें सामावतें व पोळीस चांगली रुची येऊन मिठाचा खारटपणा मात्र पूर्णपणें झांकला जातो. यावरून ओळखूं येणार नाहीं अशा प्रमाणांत दुसऱ्याच्या संपत्तीचा अपहार केला असतां तो पचतो व उघडकीस येत नाहीं.

* **कणिक आणि कुणबी तिंबल्या खेरीज मऊ येत नाहीं**—कणकेची पोळी चांगली नरम व्हावी अशी इच्छा असल्यास ती चांगली मळावी लागते; त्याप्रमाणें चाकर माणसांकडून अगर कुणब्याकडून काम करून घ्यावयाचें असल्यास त्यांस धाकांत ठेवल्याशिवाय चालत नाहीं. तु०—इक्षुदंडास्तिलाः शूद्राः कामिनी हेम मेदिनी। दधिचन्दनतांबूले मर्दनं गुणवर्धनम् ॥ –सुरं १६०.३२७.

कणकींत पडलेलें पाणी कांहीं वाया जात नाहीं––कणिक नाहींतरी पोळी करण्याकरितां भिजवावयाची असतेच; तेव्हां तींत पडलेलें पाणी उपयोगास येतेंच. त्याप्रमाणें एकमेकांस उपकारक अशा गोष्टींचा चुकून किंवा यदृच्छा मिलाफ झाला तरीहि त्यापासून नुकसान न होतां लाभच होतो.

कणिंग——**कणिंग गेली तळा आणि बारीक निरीक्ष्ळा**—कणगींतील धान्य संपत आल्यानंतर तें बारीक चांगलें दळण्यास सांगण्यांत कांहीं फायदा नाहीं. कोठारांतलें धान्य संपत आल्यानंतर त्याची विशेष काळजी घेण्यापासून काय फायदा? वेळेवर न जपतां उशीरानें एखाद्या गोष्टीची काळजी घेऊं गेलें तर तीपासून कांहीं फायदा होत नाहीं.

कणी——**कण्या कण्या करणें**––१ दीनपणें याचना करणें; हीनपणा स्वीकारून भिक्षा मागणें. 'कण्या कण्या केलं तरी कुणीहि दाद घेत नाहींत असा कटु अनुभव आला.' २ लाचारपणानें क्षमेची याचना करणें; दीनपणा दाखविणें; अतिशय नम्रता स्वीकारून आर्जवें करणें.

दातांच्या कण्या करणें—इतक्या वेळां विनंति करणें कीं, दांतहि झिजून बारीक होतील. वारंवार सांगणें; पुन्हां पुन्हां ऐकत नसतांहि उपदेशाच्या गोष्टी सांगणें.

कण्या खाऊन मिशांस तूप लावणें—पुरेसें खावयास नसतांहि बाहेरून पोकळ ऐट करणें; बाह्यतः खोटा दिमाख दाखविणें.

कण्या टाकून कोंबडी झुंजविणें––परस्पर कलागत लावणें; पदरास खार लावूनहि दुसऱ्यांमध्यें भांडण लावून आपण गंमत पाहात राहणें.

कणयो वेंचल्यो म्हूण संसार जायना––(गो.) कण्या जमवून कांहीं संसार होत नसतो.

कणेकड——**कणेकडाचें खापेकड करणें**––कणेकड हा रहाटगाडग्याचा आंस असून भलें मोठें लांकूड असतें व खापेकड ही माळेस पोहरा बांधण्याकरितां दोरखंडांत अडकविलेली वीतभर लांबीची बारीक काठी असते. एकानें कणेकड तासून टाकून त्याचें खापेकड केलें यावरून एखाद्या मोठ्या गोष्टीचा नाश करून लहानशी गोष्ट करणें. लहानसें कार्य घडवून आणण्याकरितां वाजवीपेक्षां जास्त पैसा श्रम वगैरे व्यर्थ खर्च करणें.

कण्व——**कण्व कांटा, आश्वलायन दाता आणि माध्यंदिन खोटा**––कण्व व माध्यंदिन या शुक्ल यजुर्वेदाच्या दोन शाखा असून आश्वलायन ही ऋग्वेदाची एक शाखा आहे. या शाखांच्या अनुयायी ब्राह्मणांची परस्परांबद्दलची समजूत या म्हणींत व्यक्त केली आहे. बहुधा ही म्हण आश्वलायन शाखीय ब्राह्मणानें रचली असावी.

कण्हणें——**कण्हतो, कुंथतो पण मलीद्याला उठतो**—काम करावयाच्या वेळीं किंवा एरव्हींहि नेहमीं कुरकुर करावयाची पण खावयाच्या वेळीं मात्र तयार असावयाचें, अशी वृत्ति असलेल्या मनुष्याबद्दल ही म्हण योजतात. पाठभेद—कण्हावयाचें, कुंथावयाचें, मलीद्यास उठावयाचें.

कण्हेरी––––**कण्हेरी गाणें**—कण्हण्याच्या आवाजांत सारखें रडगाणें लावणें; पिरपिर करणें. 'कन्हारी गाणें' पहा.

कतवार—**एकपट लष्कर, सातपट कतवार**—लढाऊ सैन्य थोडें पण बाजार बुणगें फार अशी स्थिति. काम करणारीं माणसें थोडीं पण उगाच मध्यें लुडबुड करणारीं, पाहात राहणारीं अशीं माणसें फार जमलीं म्हणजे म्हणतात. एक पहा.

कत्तल——**कत्तल करणें**—ठार मारणें; साफ नाश करणें यावरून (ल.) परीक्षेंत नालायक ठरविणें; उत्तीर्ण न करणें. 'आमचे परीक्षकही आतां आमची अशीच कत्तल करणार, नाहीं?'–दौलत पृ. ३४.

कत्तल होणें—मारला जाणें; कापला जाणें; लढाईंत मरणें. 'नानापाशीं कत्तल झाला'—ऐपो १२०.

कत्तलची रात्र—१ मोहरमच्या दहाव्या तारखेची रात्र. या रात्रीं लढाई होऊन तींत महमदाचा जांवई अली याचा पुत्र हुसेन याचा वध झाला. यावरून लक्षणेनें २ ऐन आणि–

बाणीची वेळ; हातघाईची, गर्दीची वेळ; अत्यंत गडबडीची वेळ. ३ काटाकाटी; भयंकर कापाकापी; मारामारी; लढाईची टिपरघाई.

कथणें——कथून ठेवणें; अगोदर कथणें–कथून ठेवणें—एखाद्या गोष्टीबद्दल भाकित करणें; एखादी गोष्ट होईल असें पूर्वी भविष्य वर्तवून ठेवणें; एखादी गोष्ट घडण्यापूर्वी तिचा अंदाज करणें.

कथली——कथली खरूज—१ ओली खरूज. २ त्रासदायक गोष्ट; पीडा. ३ अति द्वाड माणूस.

कथली व्याध–व्याधी–पीडा—१ वाहात असलेला उपदंशादि रोग. २ रोगाची सांथ वगैरे. ३ (ल.) खोडकर, त्रासदायक मनुष्य.

कथा——कथा काय ?—अगदीं क्षुल्लक गोष्ट असणें; कांहींहि महत्त्व नसणें; कःपदार्थ असणें; खिजगणती नसणें; पर्वा नसणें. ' आज्ञा झाली असतां मोठया काळाच्या तोंडांत देखील जाऊन सरकारचें पुण्यप्रतापें करून त्याचा बंदोबस्त करून येऊं. तेथें मोंगलांची कथा काय? '–पेब१९.

कथा बांधणें—एखाद्या ग्रंथाची, आख्यानाची रचना करणें; एखाद्या प्रसंगावर काव्यरचना करणें. ' तथापि बांधिन कथा विचित्रा । '–सारुह १. ३०.

कथा होणें—गत इतिहासांत जमा होणें; केवळ स्मृतिरूपानें शिल्लक उरणें; केवळ लोकांच्या तोंडीं ऐकूं येणें; प्रत्यक्षांत नसणें.

❀ **कथा ऐकून किटले कान, पण नाहीं झालें ज्ञान**—अनेक वेळां कथा ऐकून कांहीं बोध झाला नाहीं. पुष्कळ उपदेश केला तरी त्याचा ज्यावर परिणाम होत नाहीं, कितीहि सांगितलें तरी ज्यास समजत नाहीं, अशा मनुष्याबद्दल योजतात. तु०–मूर्खाला सांगितली कहाणी उपड्या घड्यावर पाणी.

कथेंतील कांदे कथेंत—एका हरदासानें कीर्तन करीत असतां कांदे खाऊं नये असें सांगितलें; पण घरीं आल्यावर कांद्याची भर्जी खाल्ली. तेव्हां त्यास असें विरुद्ध आचरण कसें करतां ? असें विचारल्यावर त्यानें वरील उत्तर दिलें. उपदेश करतांना जी गोष्ट सांगितली तिचा स्वतःच्या मनावर मुळींच परिणाम न होऊन ती आचरणांत न आणणारे कांहीं लोक असतात. बोलतांना मोठा नीतीचा व धर्माचा आव आणावयाचा, पण करतांना उलट कृति करावयाची अशा लोकांसंबंधीं ही म्हण वापरतात. तु०–पुराणांतील वांगीं पुराणांत.

कथेंतूनहि गेला आणि झोंपेंतूनहि गेला—धड कथाहि ऐकावयाची नाहीं, मधून मधून डुलक्या घ्यावयाच्या व धड घरीं जाऊन झोंपहि घ्यावयाची नाहीं. अर्धवट कृति करणारा मनुष्य. धड ना इकडे ना तिकडे.

कंथा——कंथा, माळा घातल्यानें फकीर होत नाहीं—केवळ बाह्य पोषाख साधूसारखा केला तरी अंगीं कांहीं साधुत्व येत नाहीं. केवळ बाह्यरूपावरून मनुष्याच्या अंतरंगाची ओळख होत नाहीं. तु०–It is not the cowl that makes the friar.—Scotch.

कथील——कथील कुटणें—एखाद्या गोष्टीबद्दल व्यर्थ चर्चा करणें; काथ्याकूट करणें; व्यर्थ बडबडणें; वंध्यामैथुन.

कद——कद जिरविणें–मोडणें—एखाद्याचा ताठा, अहंकार, गर्व उतरणें; अभिमान सोडावयास लावणें; खालीं आणणें.

कद पाहाणें—बल, ताकद अजमावून पाहणें; परीक्षा करणें; कस पाहणें; किंमत करणें; पारखणें.

कंद——कंदावांचून कमळ, कलहावांचून ग्रामसंबंध, विश्वासु सोनार आणि निर्लोभ गणिका, हीं सांपडणें कठिण—निरनिराळ्या गोष्टींचे गुण वर्णन केले आहेत. व त्या वस्तु आणि त्यांचे गुण यांचें कायमचें साहचर्य दाखविलें आहे. –मृच्छ पृ. ४८.

कदर——कदर काढणें–सोसणें—त्रास सहन करणें; मर्जी, तब्येत सांभाळणें; एखाद्याच्या जाचांत दिवस काढणें; जाच सोसणें.

कदर——कदरं भायर घालूनु कुत्तरि बांदिली—(गो.) लोंब्या बाहेरच्या बाजूला करून उडवें रचणें. उडवें रचण्याची पद्धति अशी असते कीं, लोंब्या आंतल्या बाजूला घेऊन मुळाचा भाग बाहेर घ्यायचा. त्यामुळें दाणे आंतल्या बाजूला सुरक्षित राहून बाहेरच्या बाजून फक्त गवत तेवढें दिसतें. याच्या उलट जर केलें तर भाताच्या लोंब्या गुरेंढोरें खाऊन जातील व गवत तेवढें मालकाच्या हातीं लागेल. क्षुद्र वस्तूला कडीकुलपांत ठेवून जपायचें आणि महत्त्वाची वस्तु वाऱ्यावर टाकायची त्यांतलाच हा प्रकार.

कदा——कदाकाळाचा; कदाकाळीचा—अतिशय जुन्या काळांतील; प्राचीन; फार पुरातन.

कदाकाळीं; कदानूकाळीं—१ फार प्राचीनकाळीं; पूर्वी; फार मागें; २ क्वचित्; केव्हांतरी; दीर्घकालाच्या अंतरानें. 'नित्यशःयेणारापेक्षां कदाकाळीं येणाराचा आदर अधिक होतो.'

*** कदा कृपणाचे वऱ्हाडी न व्हावें**—कृपण मनुष्याच्या घरच्या लग्नामध्यें वऱ्हाडी झाल्यास पोटभर जेवावयास सुद्धां मिळणार नाहीं.—रादा १.१८.९४.

कद्दू——कद्दू दाखविणें—(ना.) [कद्दू = भोपळा] निराश करणें; अंगठा दाखविणें; वाटाण्याच्या अक्षता लावणें; साफ नाहीं म्हणणें; नकार देणें.

कधीं—कधींकधीं; कधींमधीं—केव्हांकेव्हां; मधूनमधून एखाद्या वेळीं.

कधीं काळीं—केव्हां तरी; कोणत्या तरी वेळीं; फार दिवसांनीं; क्वचित् प्रसंगीं.

कधीं नवत-नव्हत—सामान्यतः न होणारें, घडणारें; पूर्वी कधींहि घडलें नसतांना; फार क्वचित् प्रसंगीं अपवादात्मक म्हणून; कधीं काळीं.

कधीं न होतेला; कधीं नव्हतेला--पूर्वी कधींच न घडलेला; अति क्वचित् घडणारा; अविद्यमानपूर्व.

कधींबधीं; कधींमधीं; कधीं ना कधीं; कधीं नाहीं कधीं; कधीं तरी—१ केव्हां केव्हां; प्रसंगोपात्त; अधूनमधून; अंतराअंतरानें. 'देशावर पाऊस कोंकणासारखा पडत नाहीं, कधींबधीं पडतो.' २ विरळा; क्वचित्.

*** कधीं उजवा, कधीं डावा**—उजवा या शब्दानें कार्यसिद्धि व डावा या शब्दानें कार्यहानि ध्वनित होते. तसेंच देवास कौल लावला असतां उजवा होकारार्थी व डावा नकारार्थी मानण्यांत येतो. यावरून कधीं जय तर कधीं पराजय, कधीं लाभ तर कधीं हानि हीं आयुष्यांत आहेतच.

कधींतरी मरणें आहेच, त्यांत आज काय आणि उद्यां काय—मनुष्याला केव्हां तरी मरण येणारच; मग तें लवकर आलें काय अथवा थोड्या दिवसांनीं आलें काय, तें टळूं शकत नाहींच. एखाद्या गोष्टीचा परिणाम जर ठरलेला असेल तर तो निकाल जितक्या लवकर लागेल तितका चांगला. उगाच दिरंगाई होण्यांत कांहीं फायदा नसतो. कारण जितक्या लवकर तो घडून येईल तितक्या लवकर त्यावर उपाययोजना करतां येते.

कधीं तुपाशीं, कधीं उपाशीं—ज्यावेळीं चांगले दिवस असतील तेव्हां चमचमीत जेवण जेवावयाचें व कष्टाचे दिवस आल्यास उपासहि काढावयाचा. याप्रमाणें बरी वाईट स्थिति ही आलटून पालटून येत असतां म्हणतात.

कधीं न काल, भलतीच चाल—(व.) कधीं न दिसणारी कृति एखादे वेळीं दिसून आल्यास म्हणतात.

कधीं न घडे तें अवसे पुनवे(पौर्णिमेला) घडे—अमावास्या व पूर्णिमा या साधारण अशुभतिथी मानल्या जातात. एखादी गोष्ट फार क्वचित् घडून येते; पण जेव्हां घडते तेव्हां अगदीं आपणांस नको अशा वेळीं, भलत्याच वेळीं घडून येते.

कधीं नवत, कोंबडीला गवत—कधीं कोणतेंहि काम न करणारानें एखाद्या वेळीं काम करावयाचें मनांत आणून काय केलें ? तर कोंबडीस चारा घातला ! पण कोंबडी दाणे खाते गवत खात नाहीं. यावरून क्वचित् एखादे वेळीं कामाची लहर लागणाऱ्याबद्दल म्हणतात. त्याचें त्यावेळचें काम असेंच चमत्कारिक व निरुपयोगी असावयाचें.

कधीं नाहीं धड, अवसे पुनवेला रड—कधींहि मनाजोगें नसावयाचें व त्यामुळें नेहमीं रड असावयाचीच. पण अवस-पुनव (अमावास्या-पौर्णिमा) या दिवशीं रडूं नये; तरी त्या दिवशीं देखील रडणें व्हावयाचेंच. नेहमीं किरकिर.

कधीं नाहीं पाहिला डोळां, आणि येऊन पडला गळां—एखादा अगदीं परकी मनुष्य कधींहि पूर्वी न पाहिलेला आपलें नातें सांगून अगदीं जवळचा संबंध दाखवूं लागला म्हणजे जी विचित्र अवस्था होते, ती या म्हणीनें व्यक्त होते. असा माणूस ठकहि असूं शकतो.

कधीं नाहीं वग, डोळे उघडून बघ—[वग=ओळखदेख], वरीलप्रमाणेंच.

कधीं होईल दिवाळसें, कधीं मोडीन कणसें--(व.) [दिवाळसें=दिवाळीचा सण] दिवाळी कधीं होऊन जाईल आणि कणसें मोडावयास म्हणजे जवारीची कापणी करावयास केव्हां सांपडेल. इतकी एखाद्याला फाजील घाई सुटली असतां ही म्हण लावतात.

कनक——कनक नारायण—अति श्रीमान् मनुष्य; धनाढ्य मनुष्य.

*** कनक आणि कांता (अनिष्टास कारण)**—द्रव्य आणि स्त्री हीं अनेकदां कलहास कारण होतात व त्यांपासून आपत्ति येण्याचा संभव असतो.

कनक आणि कांता ठेवण्यास विश्वासाची जागा मिळत नाहीं—सर्व गोष्टीस जागा मिळते पण यांना मिळत

नाहीं. कारण दुसऱ्याचें धन व स्त्री हीं नीटपणें अपहार न करतां संभाळणें हें फारच थोडयांच्या हातून घडणें शक्य असतें. तेव्हां आपलें द्रव्य किंवा स्त्री कोणाजवळ ठेवावी ही पंचाईतच कधीं कधीं येऊन पडते. –पामो. २६४.

कन (ण) वट——कनवट सैल करणें—कणवटीला पैसे खोंवण्याची पद्धत आहे. तेव्हां खर्चास पैसे काढण्यासाठीं कणवटीचें धोतर सैल करावें लागतें. यावरून द्रव्य खर्च करणें.

कनवटीं नाहीं पैसा आणि लोकांना म्हणतो या बसा—जवळ कांहीं साधन नसतां उगाच दुसऱ्यांस आग्रह करून आदर सत्कार करणाऱ्याच्या बाबतींत ही म्हण योजतात. आपणाजवळ जर द्रव्य नाहीं तर दुसऱ्यास आग्रह कशास करावा ?

कनी——कनी खाणें—(व.) कच खाणें; हिंमत सोडणें; धीर सुटणें.

कनौडी——कनौडी बिल्ली, चुहेके कान कतरवावे—[हिं. कनौडी = लाजाळू, भित्री] मांजरी जर उंदरांना भिऊं लागली तर तिचे कान ते कातरतील. नोकराचा यजमान ओशाळा असला तर नोकर त्याला वरचढ होतात.

कन्नये——कन्नये तें कर्तकी, घण्णये तें घट्टा—(गो.) करूं नये तें केलें म्हणजे घडूं नये तें घडतें.

कन्ना——कन्ना काटणें—[कन्ना=जेथें दोरी बांधतात तो पतंगाचा भाग] पतंगाच्या काटाकाटींत ऐन वेळीं दुसऱ्याच्या पतंगाचा दोरा मुळाशीं काटून आपला पतंग बचावणें. यावरून प्रसंग निभावून नेणें; आणीबाणीची वेळ टाळून नेणें.

कन्या——कन्या आणि मेले मासे, ठेवतां माल नासे—ज्याप्रमाणें मारलेली मासळी फार वेळ टिकूं शकत नाहीं ती लवकर कुजूं लागते, त्याप्रमाणें मुलगी उपवर झाली म्हणजे ती फार दिवस ठेवतां येत नाहीं; तिचें लग्न लवकर करून टाकलें पाहिजे.

कन्या कूळ, पैक्याला मूळ—मुलगी झाली म्हणजे खर्चाला कारण उत्पन्न झालें असें मानण्यांत येतें.

कन्या कूळ, भांडणाचें मूळ—पुष्कळदां मुलगी आणि कूळ यांवरून भांडण उत्पन्न होतें. मुलीला देऊन भांडण पदरांत घ्यावयाचें.

कन्या जाय सासरीं, मागें पाहे भिरभिरीं—मुलगी सासरीं जाऊं लागली म्हणजे तिला माहेरची माया सुटत नाहीं व वरचेवर आठवण होऊन ती मागें परतून पाहात पाहात सासरीं निघून जाते. तु०–‘ कन्या सासुराशीं जाये । मागें परतोनि पाहे । ’–तुगा ८४३.

कन्या देऊन मग कूळ विचारणें—ज्या ठिकाणीं कन्या द्यावयाची त्या गृहस्थाच्या जातीची, घराण्याची वगैरे चौकशी करावयाची ती अगोदर केली पाहिजे. एकदां कन्यादान करून लग्न लावल्यावर मग ही चौकशी केली तरी ती निष्फळ होय. कोणतेंहि कार्य करावयाचें त्यास हात घालण्यापूर्वीं नीट चौकशी करावी; नाहींतर योग्य वेळ निघून गेल्यावर केलेल्या चौकशीचा कांहीं फायदा नाहीं. ‘ कन्या देऊनियां कूळ । मग काय विचारावें ॥ ’–देविदास, व्यंस्तो. –शाब २·२२२.

कन्येला फाटकें, सुनेला नेटकें—मुलगी ही दुसऱ्याच्या घरीं जावयाची असते म्हणून तिला कशींबशीं वस्त्रें पुरवावयाचीं व सून घरांत राहावयाची असते म्हणून तिला नीटनेटके कपडे घ्यावयाचे, ही वृत्ति सासूमध्यें आढळते.

कन्हारी-(एखाद्याच्या) नांवानें कन्हारी गाणें—एखाद्याबद्दल तक्रार करणें; रडगाणें गाणें. कण्हेरी गाणें.

कपट——कपट आपलें आपण, करतें विषप्राशन—कपटी मनुष्याचा त्याच्याच कृतीनें केव्हां तरी नाश होतो. तु०–ज्याचें कुडें त्याचे पुढें.

कपट गुप्तपणें राहातें, सत्य उघडें वागतें—जो व्यवहार सचोटीचा असतो तो उघडपणें करतां येतो; परंतु ज्या व्यवहारांत कपट असतें तो व्यवहार गुप्तपणें करावा लागतो.

कपट नसेल तुझ्या मनांत, तर सांग माझ्या कानांत—दोन मनुष्यें भेटल्यावर त्यांचा जर परस्परांवर विश्वास असेल तर एकाच्या मनांतील कोणतीहि गोष्ट दुसऱ्यास सांगण्यास हरकत नसते. ‘ काय तुझ्या मनांत, सांग माझ्या कानांत ’ असा दुसरा पाठ आहे.

कपटाचा सल्ला घातक, लढाई नाहीं इतकी बाधक—कपटी मनुष्याचा उपदेश ऐकून वागलें असतां जितकें नुकसान होतें तितकें प्रत्यक्ष युद्ध केल्यानेंहि होत नाहीं.

कपटानें द्रव्य मिळतें, अवघें कुकर्मानें जातें—लबाडीनें, कुमार्गानें मिळाविलेलें द्रव्य कुमार्गाच्या आचरणांतच खर्च होतें. हपापाचा माल गपापा.

कपटेन शत्रुः।—शत्रूला जिंकावयाचें असल्यास कपट आचरण्यास हरकत नाहीं. शत्रूला कपटानें जिंकावें. मूळ श्लोक–भावेन देवं कलया नरेंद्रं इ०.

कपटी——कपटी बोलून फसवी, त्या समयीं हुषारी ठेवी--कपटी मनुष्य जेव्हां मायावी बोलणें करून तुम्हांस फसवूं पाहील त्यावेळीं सावध असा.

कपटी मित्राचें मन, अधिक दुष्ट सर्पाहून--कपटी मित्राचें मन हें सर्पापेक्षांहि घातक आहे.

कपडा——कपडे करणें—१ पोषाख करणें; अंगावर वस्त्रें धारण करणें; विशेषतः बाहेर जाण्याकरितां कपडे अंगावर घालणें. 'चंद्रशेखरानें कपडे केले.' –निचं ५३. २ नवीन कपडे शिंप्याकडून बनविणें.

*** कपडा पेने जग भुलता, खाना खाये मन खुलता**—सुंदर कपड्यांमुळें लोकांना आनंद होतो व सुग्रास अन्न खाल्ल्यानें मनाला आनंद होतो. लोकांना बरें वाटेल तें करण्यापेक्षां स्वतःला आनंद होईल असें करावें.

कपड्याची ओज आपण राखिली तर आपली ओज कपडे राखतात—कपडे नीट, स्वच्छ व व्यवस्थित असले तर त्यामुळें आपला आब वाढतो. आपण त्यांना जपलें तर ते आपणांस फायदा देतात.

कपाट——कपाट देणें—दार लावून घेणें; दरवाजा बंद करणें. 'तों पार्वतीनें दिधलीं कपाटें ।'–उमाविलास ९.

कपाल-ळ——कपाळ उठणें-चढणें—डोकें दुखणें; त्रास, कटकट, पीडा वगैरे होणें. 'उगा करिती कोल्हाळ । माझें उठलें कपाळ ।'–रामदास.

कपाळ काढणें—नशीब काढणें; ऐश्वर्य प्राप्त होणें; नशीबवान् निघणें; उत्कर्ष होणें; वैभवास चढणें.

कपाळ खुलणें—दैव उदयास येणें; नशिबाची रेषा उमटणें; भाग्यशाली बनणें.

कपाळ छिनत चालल— (ऐति.) मेटाकुटीस आलों या अर्थी, 'शिलेदारांचे पायां पडतां पडतां कपाळ छिनत चाललें.'–भ्रप ३९.

कपाळ जाणें—दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडणें; दैव फिरणें; भाग्य नाहीसें होणें.

(एखाद्यावर) कपाळ टेकणें--एखाद्यावर विश्वास टाकून असणें; एखाद्याचा आधार, आश्रय घेणें.

कपाळ ठरणें—दैवांत असेल त्याप्रमाणें एखादी गोष्ट घडून येणें, नशीबांत असणें. 'हें यांचें कपाळ ठरलेलेंच.'–आगर.

कपाळ धुवून पाहणें--नशीबांत काय आहे तें पाहणें; दैव पाहाणें; दैवाची परीक्षा पाहणें.

कपाळ पिटणें--दुःखातिशयानें डोकें जमिनीवर आपटणें; डोकें फोडून घेणें; शीर बडविणें; डोकेंफोड करणें.

कपाळ फुटणें--१ दुर्दैव ओढवणें; नशीब उलटें फिरणें; दैव प्रतिकूल होणें; दुर्दैवाचा फेरा येणें; दैव उलटणें. 'कीं एकदांचि फुटलें त्वत्पतिपंचककपाळ पापानें ।'–मोसभा ६.४. २ वैधव्य येणें; भयंकर आपत्ति येणें. 'मी गरीब कितीहि असलें । जरि कपाळ माझें फुटलें ।' गोविंदाग्रज–राजहंस.

कपाळ फोडणें—अतिशय शोक करणें; दुःखातिवेगानें डोकें आपटून घेणें. 'कुंतल तोडी कपाळ फोडी, करी थोर आकांत'–विक ५३.

कपाळ बडविणें—दुःखातिशयानें किंवा क्रोधानें डोकेंफोड करणें; कपाळावर हात मारून घेणें. 'कळतां वृत्त क्रोधें घे बडवूनि तो कपाळाला ।'–मोवन ४.८३.

कपाळमोक्ष करणें—प्रेत जळतांना डोक्याची कवटी ताडकन फुटते त्याला कपाळमोक्ष म्हणतात. १ एखाद्याचा सर्वस्वीं नाश करणें. २ भयंकर मारणें; ठार मारणें.

कपाळमोक्ष होणें—मरणें; नाश पावणें. 'खरी वेळ आली म्हणजे या भीमाच्याच लत्ताप्रहारानें त्या धर्मभ्रष्टाचा कपाळमोक्ष होणार हें पक्कें दिसतें आहे.'–कीचकवध.

कपालाक मिरी लावप-लागप—(गो.) कपाळाला मिरीं लावणें; थोडेसेंसुद्धां आजारी होणें.

कपालाक लावप—(गो.) कुंकूं लावणें.

कपाळाची रेघ-रेषा उमटणें-उघडणें--आकस्मिक रीतीनें सुदैव प्राप्त होणें; एकदम मोठें वैभव, ऐश्वर्य प्राप्त होणें.

कपाळाचें कातडें जाणें—नुकसान होणें; आपत्ति ओढवणें.

कपाळाचें कातडें नेणें—१ नुकसान करणें; भाग्यहीन करणें; एखाद्यास आपत्तींत लोटणें; नागविणें; लुबाडणें; बुचाडणें. २ नशीब नेणें; संचितांत भागीदार होणें; भोक्तृत्वांत सहभागी होणें. 'तो माझ्या काय कपाळाचें कातडें नेणार आहे ?'

कपालाच्यो किडी--(गो.) कपाळाच्या किडी; मद; भ्रम.

कपाळांत तिडीक उठणें—१ डोकें दुखणें; शिरोवेदना होऊं लागणें; डोकेंदुखी उठणें. २ भयंकर त्रासणें; अतिशय रागावणें; तळपायाची आग मस्तकास जाणें. 'आठमुठ्यांच्या घराचें नांव काढलें कीं, यशवंतरावांच्या कपाळास तिडीक उठे.'–यशवंतराव खरे.

कपाळांतले तीन फातर—(गो.) [ढोमले, थोड्यारें म्हणून एक मासळी आहे तिच्या डोक्यांत तीन पांढरे दगड असतात. यावरून] नशीबाचा योग; दैवाचा फेरा; ललाटरेषा.

कपाळाला आठ्या घालणें-चढणें—रागावणें; अतिशय त्रासणें; मनाविरुद्ध गोष्ट घडल्यामुळें त्रस्त होणें. 'उलट कपाळाला आठ्या घालून म्हटलें-तुला काय त्याची चौकशी!' —उषःकाल.

कपाळाला-कपाळावर केंस उगवणें—कपाळावर सामान्यतः केंस उगवत नाहींत; यावरून एखादी असंभाव्य गोष्ट घडणें; अनपेक्षित, सामान्यतः अशक्य अशी गोष्ट घडून येणें.

कपाळाला लावणें—स्त्रियांनीं कुंकू, पुरुषांनीं गंध कपाळाला लावणें. (गो.) कपाळाक लावप.

कपाळाला हात लावून बसणें—नशीबास दोष देणें. —गांगा २६८.

कपाळावर (कपाळाला, कपाळीं) हात मारणें-लावणें—१ नशीबास दोष देणें; हतभागी म्हणून स्वस्थ बसणें. २ दुःख, काळजी, आश्चर्य वगैरेमुळें हताश होऊन स्वस्थ बसणें. 'तुम्ही दोघेहि सदोदित कपाळाला हात लावून रडत बसत असतां.' —हामुबा ८२.

कपाळाशीं कपाळ घांसणें—१ स्वतःच्या नशीबांत नसलें तरी दुसऱ्या एखाद्याच्या नशीबानें तरी आपलें चांगलें व्हावें म्हणून एखाद्या भाग्यवानाच्या संगतींत असणें, त्याशीं साहचर्य संपादणें. २ एखाद्याच्या कच्छपीं लागणें; एखाद्याच्या मागेंमागें असणें; अनुकरण करणें.

कपाळास अपकीर्ति (अपयश, दारिद्र्य, आपत्ति) येणें—अपमान, गरिबी, दुर्लौकिक इत्यादि प्राप्त होणें; बेअब्रू होणें.

कपाळास-ला (कपाळीं) येणें—भोगावें लागणें; वांट्यास येणें; नशीबीं येणें. 'जरि आलें पतन या कपाळाला।' —मोआदि १०.८२. —मोमंत्रभा १०.११९.

कपाळीं कांटी घेऊन जाणें—अजीबात निघून जाणें; चालतें होणें; तोंड काळें करणें; परागंदा होणें.

कपाळीं कांटी लावणें—एखाद्यास परागंदा करणें; निघून जावयास लावणें; देशोधडीस लावणें.

कपाळीं डाग लागणें—अप्रतिष्ठा होणें; बेअब्रू होणें; कलंक लागणें.

कपाळीं भद्रा असणें—प्रतिकूल ग्रह असल्यामुळें नेहमीं कष्टप्रद स्थितींत असणें; अत्यंत हालांत असणें; कमनशिबी असणें; दुर्दैवाच्या फेऱ्यांत असणें.

कपाळीं लिहिलेलें असणें—विधिलिखित; प्राक्तनांत असणें; वांट्यास येणें; योगायोग असणें; नशिबांत असणें. 'माझ्या कपाळीं आपली सेवा एवढीच लिहिली होती.' —एक १२२. 'पण तसा सुसंयोग कपाळीं लिहिला नव्हता.' —विवि ८.१.२.

❀ **कपाळ न पासरी (बरोबर)**—प्रत्येकाचें नशीब व त्याचें अन्नोदक हें नियुक्त असतें. तो कोठेंहि गेला तरी त्याचें प्राक्तन त्यास फिरवितां येत नाहीं किंवा त्याचा जो अन्नोदक ऋणानुबंध असतो तो त्यास चुकवितां येत नाहीं. न टळणारें भवितव्य-कर्मदशा. 'कोठेंहि गेला तरी कपाळ पांसरी बरोबर.' —झांमू ६५.

कपाळ पलौन कट्टी—(गो.) कपाळाप्रमाणें करवंटी. नशीबाप्रमाणें सर्व गोष्टींचा योग असतो, सर्व गोष्टी जुळून येतात, घडतात.

कपाळ फुटकें, करी लटकें—एखादा कर्मनशिबी मनुष्य असला म्हणजे त्यानें कितीहि खटपट केली तरी त्यास नेहमीं अपयशच येतें.

कपाळ फोडून घेऊन कुठें नशीब उघडलें आहे?—केवळ नशिबाला दोष देऊन कांहीं आपली स्थिति सुधारत नाहीं. त्याकरितां प्रयत्नच केला पाहिजे.

कपाळभर कुंकूं व हातभर बांगड्या—१ सुवासिनीपणाची स्थिति; सौभाग्यालंकार. २ (ल.) नवऱ्याला जी केवळ कुंकवाचा धनी म्हणून मानते, त्याची योग्य काळजी वगैरे घेत नाहीं, अशा स्त्रीबद्दल वापरतात.

कपाळाचा त्रास चुकत नाहीं—जें नशीबांत असतें तें कधीं टळत नाहीं. एखादी कटकट सारखी मागें लागून राहिली असल्यास ही म्हण योजतात.

कपाळाच्या मानानें टिळा—जेवढें कपाळ असेल त्या मानानें लहान मोठा टिळा लावल्यास तो नीट दिसतो. यावरून जशी ज्याची योग्यता असेल त्याप्रमाणें त्यास मान, सन्मान, वैभव वगैरे प्राप्त होतें.

कपलांतलें ब्रह्मदेवाच्यान सुद्धां काढुं न जो—(गो.) नशीबीं असेल तें कोणालाहि फिरवितां येणार नाहीं.

कपलांतु नात्तिल्लाक कोंकनु गाझारी बोक्कुतु बत्ता; कपाळांत नाथिल्ल्याक कोंकून घाल्यावर ओकून

बेता--(गो.) कपाळांत जें नाहीं तें तेथें बळेनें ठोकलें तरी ओकून बाहेर पडणारच. दैवांत असेल तेंच घडतें; इतर प्रयत्न केला तरी घडणार नाहीं.

कपाळाला आठी, आणि तोंडाला मिठी--दुर्मुखलेल्या आणि अबोल्या अशा माणसाबद्दल म्हणतात. अशाशीं कोणास संबंध ठेवावासा वाटेल ?

कपाळाला कपाळ घासल्यानें दैव येत नाहीं--एखाद्या दैववान् मनुष्याची जरी आपण कितीहि संगत ठेवली तरी त्यामुळें आपल्या नशीबांत कांहीं फरक पडत नाहीं. आपल्या नशीबांत कांहीं दुसऱ्याच्या नशीबानें फरक पडत नाहीं. (गु.) कपाल कुटवे नसीब नहि सुधरे.

कपाळाला कान चिकटले म्हणून कापले आहेत ?—कपाळामध्यें ब्रह्मलिखित लिहिलेलें असतें अशी समजूत आहे व तें जाणून घेण्यासाठीं कान कपाळाला चिकटले. तेव्हां त्यांस तें कळूं नये म्हणून त्यांस कापून कपाळापासून दूर करण्यांत आले व मध्यें मोठी फट राखून ठेवण्यांत आली. आपल्या दैवांत काय आहे हें समजून घेण्याचा कोणी प्रयत्न करूं नये; तें त्यास कधीं कळत नाहीं.

कपाळाला गंध आणि पोटांत मंद; कपाळीं गंध, पोटांत संद--जेवावयास आलेल्याच्या कपाळाला खूप मोठें गंध लावावयाचें पण जेवण मात्र भरपूर नसावयाचें. वर दिसणारे उपचार खूप करावयाचे पण मुद्याच्या गोष्टीच्या बाबतींत तुटपुंजेपणा करावयाचा.

कपास——कपास करप—(गो.)[कपास=कापूस] मऊ करणें; बैलास बडविणें; बैलास किंवा घोड्यास खच्ची करणें.

कंपास——कंपास घालणें-मारणें-- कंपासानें आंखणी करणें; वर्तुळ काढून अंदाज ठरविणें.

कपिला षष्ठी——कपिला षष्ठीचा योग; कपिलसट—भाद्रपद वद्य षष्ठीच्या दिवशीं मंगळवार, रोहिणी नक्षत्र, व्यतीपात योग व सूर्यनक्षत्र हस्त इतक्यांचा योग झाल्यास तिला कपिला षष्ठी असें म्हणतात. असा योग क्वचित्, सुमारें साठ वर्षांनीं एकदां येतो. यावरून १ अत्यंत दुर्मिळ अशी संधी; क्वचित् साधणारा योगायोग; जवळ जवळ अशक्यप्राय घटना. २ असंभाव्य, क्वचित् घडणारी गोष्ट.

कपोता——कपोता वळणें—वाळणें; कृश होणें; रोड होणें.

कफन--कफन खायरा—(गो.) प्रेतावरील वस्त्र देखील घेऊन विकून खाणारा. अतिशय नीच मनुष्य; ज्याच्या हृदयाला भीति, लाज वगैरे कोणत्याच विकाराचा स्पर्श होत नाहीं असा.

कफनी——गळ्यांत कफनी घालणें--१ विरक्त होणें; बैरागी होणें; साधु बनणें. २ भिक्षा मागणें; भिकेस लागणें.

कफल्लक——कफल्लक बनणें-होणें; कफल्लक होऊन बसणें--[कफल्लक म्हणजे गोसावी, नंगा बैरागी. कफल्ल नांवाचा एक आदिचोर होता अशी आख्यायिका आहे.] अगदीं दरिद्री, भिकारी होणें; जवळ कांहींहि नसणें. ' आतां प्रत्येक मनुष्यास असा अधिकार मिळाल्यानें, एकाजवळ लाखों रुपयांची इस्टेट व दुसरा अगदीं कफल्लक अशी स्थिति होते. ' –टि ४·२४.

कबज——कबज करणें—ताब्यांत घेणें; एखाद्या प्रदेशावर अंमल बसविणें, जिंकणें.

कबजा धरणें--पेंचांत धरणें; मुठींत पकडणें; अडचणींत गांठणें.

कबंध——कबंध नाचणें—लढाईंत एक लाख सैनिक मेले म्हणजे एक कबंध उठून नाचूं लागतें अशी समजूत आहे. यावरून, एखाद्या लढाईंत भयंकर कापाकापी, मनुष्यहानि होणें; भयंकर रक्तपात होणें. २ धडापासून शीर वेगळें झालें तरी धडानेंच लढत राहणें. ' शिरच्छेद झाला तरी कबंध नाचतें. '–भाब ९.

कंबर——कमर पहा.

कबाब——कबाब होणें—[कबाब=मांस भाजून केलेलें एक खाद्य.] १ (ब.) जळून राख होणें; २ दरिद्री होणें; ३ शुष्क होणें; वाळणें; रोड होणें. ' रोगानें जळून कबाब झाला. '

कबूतर——कबूतर व कबूतर, बाझ व बाझ—कबुतराचा कबूतराशीं व ससाण्याचा ससाण्याशीं योग, जुळतो. समानशीले व्यसनेषु सुख्यम् । –विवि १०·५–७·१२४.

कबूल——कबूल अपराध नाहीं केला, तर तो दुप्पट दोषी झाला—जो अपराध करतो त्यानें जर तो नाकबूल केला तर नाकबुली हा एक आणखी गुन्हा केल्यासारखें होतें. A fault once denied is twice committed.

कबूल करून तें न देणें, हें मूर्खांचें संतोष पावणें—दुसऱ्याचें देणें कबूल करावयाचें व तें नंतर बुडवावयाचें किंवा देण्याचें टाळावयाचें ही गोष्ट शहाणा पसंत करणार नाहीं, असली गोष्ट मूर्खांसच आवडेल.

कब्बु——कब्बु गोड्डु म्हुण बालिंग थाथि खावंचें वे ?—(गो.) उंस गोड म्हणून बाळिंगसुद्धां खायचें का ?

कभी——कभी दिन बडे, कभी रात घडी—केव्हां दिवस मोठा असतो तर कधीं रात्र मोठी असते. सर्व दिवस सारखे नसतात. आयुष्यांत चढउतार, यशापयश हीं आलटून पालटून यावयाचींच. तु०—कधीं उन्हाळा तर कधीं पावसाळा.

कम——कम खाना गम खाना, तो टिके जेलखाना हीं म्हण कारागृहांत रूढ आहे. कैदखान्यांत कमी आहार घेण्याचा व गमखाण्याचा सराव असला तरच कैदी माणूस, जेलखान्यांत टिकूं शकेल.

कमअस्सल——कमअस्सल आपला कमअस्सलपणा टाकीत नाहीं, तर अस्सलानें अस्सलपणा कां टाकावा—नीच मनुष्य जसा आपला स्वभाव सोडीत नाहीं, तसाच थोर मनुष्यानेंहि आपला थोरपणा टाकूं नये.

कमकुवत——कमकुवत, घुसा बहुत—अशक्त मनुष्यें बहुधा चिडखोर असतात व त्यांस राग फार लवकर येतो.

कमकुवत, भुसाची भोत—अशक्त मनुष्य हा शरीरानें मोठा दिसला तरी भुशाच्या पोत्याप्रमाणें पोकळ असतो. त्यांत जोर किंवा कठीणपणा मुळींच नसतो.

कमजोर——कमजोर पण राग फार-अशक्त मनुष्य बहुधा रागीट व चिडखोर असतो.

कमदिल——कमदिलाचा एकांडया व गांडयाबरोबर—ज्या मनुष्याच्या अंगांत हिंमत नाहीं, ज्याचा धीर वेळेवर सुटतो, असला एकाकी वीर अगदीं निरुपयोगी. त्यास भितरी भागुबाईच म्हटलें पाहिजे.

कमर——कमर कसणें—तयार होणें; सिद्ध होणें. [काम करण्याला लागण्यापूर्वी कमर बांधण्याचा प्रघात असे. अद्यापहि शिपाई, दरबारी इ. कमर बांधतात] 'संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्यास या उभयतां महाराजांच्या विद्यमान वंशजांनीं कंबर कसली पाहिजे.'—सासं २.१८०.

कमर खचणें—१ कमर निर्जीव होणें; कमरेंत जोर नाहींसा होणें. २ धीर सुटणें; उत्साह, जोम नाहींसा होणें.

कमर ताठणें—आजारामुळें किंवा अशक्तपणामुळें कमर हलविण्याची ताकद न राहणें; कमर धरणें; कमरेंत उसण भरणें.

कमर धरणें—कमर हलवेनाशी होणें; कमरेंत उसण भरणें.

कमर बसणें—कमर खचणें; धीर सुटणें; भीतीनें घाबरून जाणें. 'भाऊसाहेब व विश्वासराव गेल्यामुळें त्या शोकानें नानासाहेब यांची कंबर बसली.'—पेब ६२.

कमरबस्ती करणें—सिद्धता, तयारी करणें. "फौजेची कमरबस्ती करण्याची आमची आज्ञा आतांचे आतां सेनापतींना कळीव."—गजेंद्रमोक्ष २.९६.

कमर बांधणें—सिद्ध होणें; तयार होणें; 'कमर कसणें' पहा. 'बाजार भरला नाहीं तों उचल्यांनीं कंबरा बांधल्या.' 'पुढें वंशवृद्धी होण्यास्तव कंबर बांधा'—प्रला १३१. 'तेव्हां अजून जोंवर हें संकट अनिवार्य झालें नाहीं तोंवरच कैवाऱ्यांस कंबर बांधण्यास अवकाश आहे.'—नि ६.

कमर भरणें—१ कमर धरणें; कमर दुखणें. २ (चांभार काम) टांच व टाळा यामधील भागांत भर घालणें.

कमर मोडणें—१ कमर खचणें; अवसान नाहींसें होणें. २ ठुमकत, मुरडत चालणें; नखरेपणानें चालणें. 'चालतां कमर ठुमकत, चमकत मोडिते ।'—प्रला १५७.

कमर वांकणें—१ कुबड निघणें; पोंक येणें. २ अशक्त होणें; ढिलें होणें.

कमर सोडणें—१ कमरेचा कमरबंद सोडणें. २ पोशाख उतरणें (विशेषतः लष्करी). 'सोडीना कंबर कधीं काढीना पायजमा ।' प्रला ६४. ३ (ल.) जामानिमा उतरणें; काम आटोपून विश्रांति घेणें.

कमरेचे टाके ढिले होणें—अतिशय थकणें; दमणें; अत्यंत श्रमित होणें. 'साऱ्या नोकरांच्या कमरेचे टाके पांच सहा तासांत ढिले होऊन जातात.'—आगर ३. ४५.

❀ **कमरेला सोनसळा आणि भेटतो वाघाला**—वाघाची शिकार करावयाला जावयाचें त्यावेळीं अंगांत चिलखत घालावयाच्या ऐवजीं जर कोणी रेशमी वस्त्र नेसेल तर त्याची गणना मूर्खांतच होईल.

कमरेवर कळसा, गांवभर वळसा—पाठभेद—कांखेत कळसा नि गांवाला वळसा. १ आपल्याजवळच एखादी वस्तु असून ती शोधीत सर्व गांवभर फिरण्याचे फुकट श्रम घ्यावयाचे. तु०—मांडी खालीं आरी नि चांभार पोर मारी. २ पाणी आणण्याचें निमित्त करून सर्व गांवभर भटकावयाचें. भटक्या स्वभावाच्या बाईविषयीं म्हणतात.

कमरेवर पोर आणि जिवाला घोर—वर पहा.

कमरका——कमरका मारणें—शत्रूवर बगलेकडून हल्ला करणें.

कमलिनी——कमलिनीवरचा बिंदु—कमळाच्या पानावर पाण्याचा थेंब पडला असतां तो त्यावर न राहतां लागलाच घरंगळत खालीं पडतो; यावरून अस्थिर, क्षण-

भंगुर गोष्ट. वैभव, आयुष्य, संसार हीं सर्व क्षणभंगुर आहेत असें दाखविण्याकरितां योजतात. तु०—अळवावरचें पाणी. नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वद् जीवितमतिशयचपलम् ।

कमवेतन——कमवेतन राहावें, कमकायदा राहूं नये—पाहिजे तर आपल्या श्रमाचा मोबदला कमी घ्यावा पण आपला कोणताहि हक्क केव्हांहि सोडूं नये. तु०—कान द्यावा पण कानू न द्यावा.

कमाई——कमाईचा हीन—दैवहीन; भाग्यहीन; कमनशिबी. ' मीतर कमाईचा हीन । यास्तव जीवीं वाटतो शीण । '.

❀ **कमाईची पोटपूजा, फुकटाची देवपूजा**——मनुष्य जें मिळवून आणतो तें सर्व स्वतःचा उपभोगाकडे खर्च करतो आणि देवाच्या पूजेच्या कामीं मात्र अतिशय काटकसर करतो व शक्यतों ती बिनखर्चानें व्हावी अशी इच्छा करतो. मनुष्याचें परमेश्वरापेक्षां स्वतःकडे अधिक लक्ष्य असतें.

कमान——कमान वर चढणें——फार प्रतिष्ठा, बडेजाव होणें, वाढणें. 'कोणत्याही कारणानें शिकण्यांत अडथळा येऊं नये म्हणून आजी जें म्हणेल तें ते ऐकत. त्यामुळें आजीची कमान बरीच वर चढली. '—आजोच ३०.

कमाल——कमाल करणें——पराकोटीला जाणें; सीमा गांठणें; कल्पनातीत वागणें; कोणत्याहि गोष्टीची अंतिम मर्यादा गांठणें. ' जेथें शूरपणा अनंत समरीं शत्रुप्रती दीपवी । तेथें भीरुपणा कमाल करुनी देशास या लाजवी । ' —भांडाअ ३०३.

कमाल होणें——पराकोटीस पोंचणें; कळस होणें; हद्द होणें; कोणतीहि गोष्ट अतिशय होणें. ' आतां मात्र कमाल झाली म्हणायची.'—फाटक, नाट्यछटा.

कमालखान——कमालखानी हार व पंचवीस लडे तुरा——कमालखान या नांवाचा जो एक मनुष्य होऊन गेला त्यानें प्रचारांत आणलेला एक हाराचा प्रकार. या हारास अनेक पदर असतात व तो गुडघ्यापर्यंत लांब असतो. यावरून खूप मोठा हार वगैरे घालणें; बरीच शोभा करणें; दागिने कपडे वगैरे घालून नटविणें असा अर्थ होतो.

कमी——कमी घेणें——स्वतःला कमी लेखणें; स्वतःची चूक, उणेपणा कबूल करणें; पडतें घेणें.

❀ **कमी आलें, जास्त गेलें**——कारूनारूंना बलुत्यादाखल शेताचा माल दिल्यामुळें शेतकरी बलुतें जास्त गेलें म्हणून ओरडतो व शेतचा माल कमी आला म्हणजे कारूनारू बलुतें कमी आलें म्हणून ओरडतात.

कयणें——कये न वये, चालना धुये—(अहि.) कळत नाहीं वळत नाहीं तरी चलना धुळयाला. पूर्वी धुळयालाच फक्त कोर्ट असे, तेव्हां तेथें मिरविण्याची प्रत्येकाला हौस असे.

कयीळो——कयीळो न्हारी डोंक जता वे ? कावळो न्हाल्यार ढोंक जाता व्हय ?—(गो.) कावळा न्हायला म्हणून तो बगळा थोडाच होणार ? कावळयाला किती धुतलें तरी तो काळा तो काळाच. कोळसा उगाळावा तितका काळाच. दुष्ट मनुष्य सुष्ट कधींहि होणें नाहीं.

कर——कर चोळणें—अतिशय राग येणें. याला मारून टाकूं का, अशा तऱ्हेनें हात शिवशिवणें. ' क्रोधें चोळी रिपुप्रणाशकर कर ।'—मोप्रल्हादविजय १·३०.—मोपंचशतीरा २८० —मो कर्ण २१·१३.

कर जोडणें–जोडून उभे रहाणें——हात जोडणें; अभिवादन करणें; नम्र होणें; नमस्कार करणें; सेवेस सादर असणें. ' भूत भविष्य वर्तमान ज्ञान । हें ज्यापुढें उभें कर जोडून । ' —ह ३१·१०.—मो अश्व १·७५.

कर धरणें; करीं धरणें—पाणीग्रहण करणें; लग्न लावणें. ' एके घडीसचि धरी सकळां करीं तो, आत्माचि जो जडजिवा सकळां करी तो । '—वामन द्वारकाविजय १.२.

(करास) कर मिळविणें—हातावर हात देणें; वचन देणें. ' मेळउनी करास कर । '—नव १३.१४.

कर वळविणें——नमस्कार करणें.—मोआदि ३५.१६.

❀ **करीं कंकण, नको आरसा**——हातच्या कांकणाला आरसा कशास पाहिजे.—राला ३४.

कर——करांचा सुकाळ आणि अन्नाच्छादनाचा दुष्काळ——जबर कर असून लोकांस अन्नवस्त्र मिळत नाहीं अशी स्थिति.—पामो ६४९.

करकर——करकर दांत खाणें—अतिशय रागावणें क्रोधानें संतप्त होणें; रागानें दांत चावूं लागणें.—मोशल्य २.८३.

करकर दांत चावणें——अतिशय राग येणें; खाऊं कीं गिळूं असें होणें. ' चावी दांत करकर, क्रोधें चोळी रिपुप्रणाशकर कर ॥—मोप्रल्हादविजय १.३०.

करकरीत——करकरीत तिनिसांजा—सूर्य मावळल्यानंतर अंधार पडतो या दरम्यानचा संधिप्रकाश काल;

फुटक्यातिनिसांजा. ही वेळ सामान्यतः बाहेर जाण्यास अशुभ मानतात. 'वेळ करकरीत तिनिसांजाची होती.'–अस्तंभा ६३.

करकरून——**करकरून धरणें**—घट्ट, भक्कम, मजबूत धरणें; गच्च आंवळणें. 'कर श्रीकांताचा करकरुनि माता धरि करें।'–वामन मृत्तिकाभक्षण ४.–मो हरिवंश १७.१३.

करकरून बांधणें––घट्ट, आंवळून बांधणें; पक्कें बांधणें. –मो हरिश्चंद्र २.८१.

करकऱ्या——**करकऱ्या तुजि मान कित्या वांकडी**––(गो.) असमाधानी नेहमीं दुर्मुखलेला असावयाचा.

करकोचा——**करकोच धाड**––करकोचा पक्ष्यांचा शेतांतील उभे असलेल्या पिकांवर टोळधाडीप्रमाणें होणारा हल्ला.

करं(रां)गळी——**करांगुळी मोडणें**–बोटें मोडणें; रागावून शिव्याशाप देणें; हात चोळींत बसणें. 'शोकध्यान-परायण अश्वत्थामा करांगुळी मोडी॥'–मोद्रोण २३·१०२.

करांगुलीवर न मुतणें—कोणाच्याहि यत्किंचितहि उपयोगी न पडणें.

करंगळीवर नाचविणें—पूर्णपणें आपल्या तंत्रानें चालावयास लावणें; पूर्णपणें आपल्या कह्यांत आणणें; मुठींत ठेवणें. 'स्वारीला मी करंगळीवर नाचवीन.'–अस्तंभा ११८.

❀ **करंगळी कितीहि फुगली तरी मनगटाची बरोबरी करीत नाहीं; करंगळी (करांगुळी) सुजली म्हणून ती डोंगराएवढी होईल काय ?**—असंभाव्य गोष्ट. "इंग्रज केवढे, आम्ही केवढे ! चालले त्यांच्याशीं बरोबरी लावायला ! करं०"–केसरी ३१·१२·४०. अंगठा पहा.

करंगळीची कळ, अंगठ्याला येत नाहीं—एक बोट दुखत असलें तर त्याचें दुःख दुसऱ्या बोटास जाणवत नाहीं. गरीबांचीं दुःखें इतरांना कळत नाहींत.

करगोटा–––**करगोटे बांधणें–वाटणें**—(बायकी) मुलगा पांच महिन्यांचा झाल्यावर त्यास प्रथम करगोटा बांधतेवेळीं समवयस्क अशा चार मुलांस एक एक चांदीचा अगर रेशमाचा करगोटा साखर भरलेल्या चांदीच्या अगर खोबऱ्याच्या वाटीसह देण्याचा विधी.

करट——**करट तसो पूं**––(गो.) जेवढें गळूं मोठें तेवढा त्यांत पूं असणार.

करंटा——**करंट्या कपाळाचा–हाडाचा**––दैवहीन; अत्यंत दुर्दैवी, कमनशिबी; भाग्यहीन; फुटक्या नशीबाचा.

❀ **करंट्याला बोल फार, चिकण मातीला ओल फार**––ज्याप्रमाणें चिकणमातीची जमीन पावसाळ्यांत बहुतकरून वाळत नाहीं, ती नेहमी ओलीच राहते; कारण तींत पाणी अधिक जिरतें व जरा वाळूं लागते तो पुन्हा पाऊस वगैरे पडून ती पाणी खाऊन ओली होते. त्याप्रमाणें दैवहीन मनुष्याला नेहमीं अनेकांचीं बोलणीं खावीं लागतात. त्याला सर्वच लोक नेहमीं दूषण देत असतात.

करटी–टें——**करटी–करवंटी–करोटी हातांत येणें**––भिक्षा मागण्यास हातांत करटी घेतात यावरून भिकेस लागणें; अत्यंत हीन दशेस प्राप्त होणें.

करवंटी हातीं देणें––भिक्षेस लावणें; भीक मागण्याची पाळी आणणें.

❀ **पोरास जेवूं सांगे वाटींत, तों पोर जेवी करटींत; (गो.) जेवरे पुता वाटींत माका गोड करटींतु**––एखाद्याच्या नशिबीं ऐश्वर्य भोगावयाचें नसलें म्हणजे त्यास भिकारचाळे सुचतात व चालून आलेल्या भाग्याचाहि उपभोग घेतां येत नाहीं.

करटें कांतल्यारि सोयि मेळतवे; करटें कांतून हाता वांट––[सोयि=चोथा. वांट=वात, कळ] (गो.) करवंटी किसल्यावर काय मिळणार ? चोथा ! व्यर्थ हातास श्रम !

कट्टयांतु उधाक मुय्येक समुद्रु; कट्टेंतलें उदक मुयेक समुद्र—(गो.) करटींतलें (कटोरींतील) पाणी म्हणजे मुंगीला समुद्रच. तु०–मुंगीला मुताचा पूर.

करट——**करटें खाणें**—कदन्न; रुक्ष, भिकार अन्न.

करड——**करड करणें**––[करड = सुकें गवत. गोव्यांत नाटकांतून वीरभद्र इ. वीररस प्रधान पात्र रंग-भूमीवर आणण्याच्या वेळीं करड लासतात (जाळतात) म्हणजे त्या नटास स्फुरण चढतें.] (गो.) इरबऱ्याच्या झाडावर चढविणें.

करड काढणें––कसें तरी, गडबडीनें, अव्यवस्थितपणें काम उरकून टाकणें.

करड भाजणी––(क.) जाचणूक; छळणूक.

❀ **करडांतु पणसु कोचचायल्लि संगति**–(गो.) गवतात झांकून गेलेल्या फणसावर अंदाजानें घाव घालणें. अनिश्चित, अधांतरी बोलणाऱ्याबद्दल या म्हणीचा उपयोग करतात.

करडई, करडी——**करडीला किडा नाहीं, करडाला मरण नाहीं**––(व.) करडईच्या बियाला त्याच्या

अंगच्या विशिष्ट गुणामुळें किडा खात नाहीं व तें घाण्यांत गाळलें जातें. त्याप्रमाणें दुर्दैवी मनुष्याला त्याचें भोक्तृत्व भोगावयाचें असल्यामुळें लवकर मरण येत नाहीं.

करडीला नाहीं किडा, बोडकीला नाहीं पिडा— करडीला ज्याप्रमाणें किडयापासून इजा पोंचूं शकत नाहीं त्याप्रमाणें विधवा स्त्रीला नवरा नसल्यामुळें तिच्यावर कोणी अंमल गाजवूं शकत नाहीं; ती स्वतंत्र असते.

करडा——करडा अंमल--१ कडक सत्ता, अधिकार. २ तीव्र उन्माद; जोराचा कैफ; धुंदी.

करडा हात करणें—पराक्रम करणें; शूर, आवेशाचें कृत्य, पराक्रमाचें कृत्य करणें; पराक्रम गाजवणें; शौर्य दाखविणें. ‘ लहान पराई होउनि शूरानें करडा हात केला । ’–ऐपो ८९.

करडी कमान—१ भुवयांचें आकुंचन; भ्रूवक्रता; कपाळाची आठी. २ वक्रदृष्टि; क्रूरदृष्टि.

करडी नजर--१ सक्त देखरेख; कडक पाहरा. २ अवकृपा; वक्रदृष्टि.

करडी मर्जी--१ इतराजी; गैरमर्जी. २ निष्ठुरता; ताठरता.

करडूं-डें——करडे भीनात्तिलो कांबळीक भित्तवे ?--(गो.) करडूला भीत नसलेला घोंगडीला भील काय ?

करडेक कांबळ पांग्रवचि लागना—(गो.) शेळीला (थंडीसाठीं) घोंगडी पांघरावी लागत नाहीं.

करडेक केंस रोम एकचि—(गो.) शेळीला लहानमोठे केंस एकच असतात. भेद नाहीं.

करणी——करणी करणें—जादूटोणा करणें; चेटूक करणें. ‘ कसें नक्षत्रासारखें पोर होतें, पण कोणीं चांडाळणीनें करणी करून मारून टाकिलें !’ ‘ते पतिवंचका निर्धारी । सर्वकाळ करणी करि । ’–कथा ४.२.४८.

करणीचा आंबा— निसर्गजन्य नव्हे तर मानवी कृतीचा, संस्कार झालेला आंबा; जादूनें तयार केलेला खोटा आंबा. २ कलमी आंबा (झाड व फळ).

करणीचा कुत्रा-घोडा-वाघ--कुत्रा, घोडा, वाघ वगैरेचें सोंग, रूप घेतलेला व तशी कृति करणारा मनुष्य; मंत्रातंत्रानें कुत्रा, घोडा, वाघ वगैरेचें रूप धारण करणारा मनुष्य.

करणीचा रोग; करणीची बाधा--मंत्रतंत्र, जादुटोणा वगैरेपासून होणारी पीडा.

करणीचें पागोटें--स्वतःच्या पायावर किंवा डोक्यावर बांधलेलें नसून पगडबंदानें ठोकळ्यावर बांधलेलें पागोटें.

करणीचें फूल--नैसर्गिक नव्हे तर कृत्रिम फूल; कागदाचें, कापडाचें, भेंडाचें फूल.

❀ **करणी करतां टीर कांपे**--कोणतीहि गोष्ट बोलतांना सोपी वाटते पण प्रत्यक्ष करून दाखवितांना नाकीं नऊ येतात. ‘ बोल बोलतां वाटे सोपें । करणी करितां टीर कांपे ॥ ’ –तुगा २३२४.

करणी करतां न दिसे कुणा, मागुन दिसतो केंविलवाणा--प्रथम एखादें कर्म, उत्कृष्ट गुपचिप उरकतो, पण पुढें त्याचा परिणाम भोगतांना दीनवाणा होतो. ‘ करणी करतां न भिये कुणा ’ असाहि पाठभेद आहे.

करणी करावी तशी भरणी भरावी—आपण जशी कृति करतों तशीं आपणांस फळें प्राप्त होतात. तु०–करावें तसें भरावें.

नर करणी करे तो नरका नारायण होगा--मनुष्याच्या अंगीं अचाट सामर्थ्य आहे, फक्त त्यानें कार्याला लागलें पाहिजे. मनुष्यानें योग्य कृति केल्यास त्यास परमेश्वरासारखाहि मान मिळतो. ‘ पशुका होत कन्हैय्या नरका कछ नाहीं होता, नर करणी करे तो नरका नारायण होगा । ’

करणी कसाबाची व बोलणीं मानभावाचीं--१ बोलावयाचें तें अगदीं मान खालीं घालून, हळू, मृदु आवाजानें, कोणाला न लागेल असें बोलावयाचें पण प्रत्यक्ष आचरण मात्र एखाद्या पाषाणहृदयी खाटकाप्रमाणें क्रूर असावयाचें, अशा मनुष्यास ही म्हण लावतात. २ कोणी मानभाव (महानुभाव) जातीशीं या म्हणीचा संबंध लावतात. त्यांच्याप्रमाणें व्यवहार.

ज्याची करणी त्याला--प्रत्येक मनुष्याला आपल्या कृतीस अनुसरून फळ मिळतें.

करणी न धरणी, आणि बोलण्याची सुरणी--प्रत्यक्ष हातानें कोणतीहि कृति न करतां नुसत्या तोंडानें गप्पा मारावयाच्या, अशा वृत्तीच्या मनुष्यासंबंधीं वापरतात.

करणी ना धरणी, रिकामी चात पुरवणी—(व.) हातून कांहीं कार्य तर होत नाहीं पण जो रिकामी किरकिर लावून देतो, त्याच्याबद्दल असें म्हणतात.

ईश्वराची करणी, नारळांत पाणी—ईश्वराची लीला अगाध आहे. नारळासभोंवतीं टणक करवंटी असतां आंत

पाणी कसें तयार होतें, हें जसें आपणास कळत नाहीं त्याप्रमाणें ईश्वराच्या अनेक कृतींचा उलगडा आपणास करतां येत नाहीं.

करणी भीमाची, वागणी धर्माची--(कऱ्हाड) प्रखर पराक्रमाचा पण तितकाच शांत व धीराचा, धिम्या वृत्तीचा गृहस्थ.

करणीची बळें, अमृत फळें--कार्य करीत राहिल्यास त्यास मधुर फल आल्याशिवाय राहात नाहीं.

करणि परस किचमणा चड--(गो.) कामापेक्षां कटकट जास्त.

करणीसार फळ--जशी कृति करावी तसें फळ मिळतें.

करणें——करणेंकरणीपणा; करणेकऱ्याचा वसा--'करनकरत्याचा वसा' याचा हा विपर्यास आहे. 'काँग्रेस वर्किंग कमिटीला करणेकरणीपणाची बाधा आज पुष्कळ दिवसांपासून झाली आहे.'—सासं २.२६४.

करनकऱ्याचा-करत्याचा वसा—जी गोष्ट करावयास सांगितली असेल ती करावयाची नाहीं व जी करूं नको म्हणून सांगितली असेल ती हटकून करावयाची, असा ज्याचा स्वभाव आहे असा मनुष्य किंवा असें वागण्याची रीत, व्रत. (गो.) करनकरिवरु. " आयर्लंड जिंकल्यापासून आजपर्यंत इंग्लंडनें तेथें नुसता 'करनकऱ्याचा वसा' चालविला आहे." --आयर्लंडचा इतिहास.

करून घेणें—१ एखाद्याच्या द्वारें काम उरकून घेणें; कसेंतरी, एखाद्या मार्गानें मिळविणें, संपादणें. २ सोयरेसंबंध जोडणें; सून करून घेणें; विवाहसंबंध करणें.

करून चुकणें-टाकणें—(एखादें काम) संपाविणें; उरकणें; पार पाडून टाकणें; आटोपणें.

केलें केलें, न केलें न केलेंसें करणें; केलें न केलेंसें करणें—निष्काळजीपणानें करणें; कसेंतरी तडीस लावणें; आपल्यावरील जबाबदारी कशीतरी केल्याचें निमित्त करून पार पाडणें.

केलेला पुरुष-माणूस--ज्यानें कार्य करून दाखविलें आहे, कर्तबगारी सिद्ध केली आहे असा माणूस; अनुभवी माणूस. 'कोल्हापूर घेणें कठिण काय म्हणतात. परंतु पाटील-बावा केलेला पुरुश यैसी हजारो कामें केलीं करीतच आलेत.' —साइसंम-ऐले २.४५.

केल्या कर्मांचें फळ--आपण जीं कृत्यें करतों त्याचें बरें वाईट फळ अपणांस मिळाल्याशिवाय राहात नाहीं.

⁂ करणें अशाश्वत, चिरकाल नाहीं राहत--कोणतीहि गोष्ट निश्चितपणें न केल्यास व कशी तरी उरकून टाकल्यास ती फार वेळ टिकत नाहीं. काम पक्कें केल्याशिवाय टिकाऊ होत नाहीं.

करणें एकपट, खाणें दुप्पट (चौपट)--काम थोडें करावयाचें पण जेवतांना मात्र सर्वांच्या दुप्पट खावयाचें, अशा मनुष्याबद्दल योजतात.

करणें कसाबाचें, बोलणें मानभावाचें--करणी पहा.

करणें कुच, बोलणें उंच;(गो.) करणें थोडें उलवणें चड; करणें थोडें, बोलणें-बडबड-बलबल-मचमच-वचवच फार—(गो.) प्रत्यक्ष हातानें काम थोडेंच करावयाचें पण तोंडानें गप्पा मात्र फार मारावयाच्या; कृति थोडी पण बडबड फार करणाऱ्या मनुष्याबद्दल योजतात. निवळ तोंडपाटिलकी करणें; हातानें फारसें न घडणें; उगाच प्रौढी मारून प्रत्यक्ष फारसें न करणें.—आजोच २०४.

करणें माणसाचें, निवारणें देवाचें--मनुष्य आपल्या कृतीनें आपणावर किंवा दुसऱ्यावर संकट ओढवून घेतो. परंतु त्याचें निवारण परमेश्वर करतो. दुसऱ्याचें वाईट करणें मनुष्याच्या हातीं असतें पण बरें करणें त्याच्या हातीं नसतें. तें ईश्वराच्या हातीं असतें.

कर गया दाढीवाला, पकडा गया मुछीवाला—दाढीवाल्यानें केलें आणि मिशीवाल्यास पकडण्यांत आलें; म्हणजे एकाच्या कृत्याचें भलत्यालाच प्रायश्चित्त मिळणें. सोम्याचा दंड गोम्याला. तु०-घटी पिबती पानीयं ताडणं झल्लरी यथा ।

करनकऱ्याचा वसा, घरांत आली अवदसा--जी गोष्ट करावयाची ती न केली व न करावयाची ती केली असतां नेहमीं व्यवहारांत हानि होऊन दारिद्य दशा यावयाची, हा सिद्धान्त ठरलेलाच आहे.

करनखरीचा बोभाटा अन् झिपरी मारी झपाटा--'चट्टीपट्टीचा बोभाटा०' पहा.

कर नाहीं, त्यास डर नाहीं; कर नाहीं त्यास डर कशाला—ज्या मनुष्यानें एखादा अपराध केलेला नसेल त्याला त्याबद्दलची भीति वाटण्याचें कारण नाहीं. ज्याच्या अंगीं दोष नसतो तो उजळ माथ्यानें फिरतो. जो अपराधी असतो त्याला नेहमीं धास्ती वाटत असते.

करचें तसें भरचें--(गो.) 'करावें तसें भरावें' पहा.

करणाराला आटघाट, जेवणाराला (खाणाराला) मीठ भात; करणारीचा हाटघाट आणि जेवणाऱ्याचा

मीठभात--[आटघाट हाटघाट = आटापीटा, उरस्फोड] साधा स्वयंपाक करावयाचा झाला तरी करणाराला कितीतरी खटपट पडते. पण आयत्या जेवणाराला त्याची कांहींच कल्पना नसते. तो नुसता मीठभातच मिळाला म्हणून उलट असंतुष्ट असतो. तु०-शेळी जाते जिवानिशीं खाणारा म्हणतो वातड.

करतलो चड उलयना, उलयतलो चड करना; उलयतलो करतां थोडें, करतलो उलयिता थोडें; सांगका थोडें, करका चड—(गो.) कार्य करणारा ज्यास्त बोलत नाहीं, व बडबड करणारा फार करीत नाहीं; बोलणारा करील थोडें, करणारा बोलेल थोडें; म्हणजे सांगावें थोडें, करावें फार.

करतल्याक धा वाटो, करचें नातिल्याक एकी मेळना; करतल्या धा दीक उघडे, ना म्हणतल्याक बंद सगळे—(गो.) करणाऱ्याला दहा मार्ग सुचतात, पण करावयाचें नसलेल्याला एकहि मिळत नाहीं. करणाऱ्याला दहा दिशा मोकळ्या, पण नाहीं म्हणणाऱ्याला सर्व बंद. तु०-Where there is a will, there is a way.

करतां करावें, होणार तें होतें--आपण आपल्याकडून नेहमीं कांहीं तरी कार्य करीत असावें; भविष्य काळाचा विचार करीत व्यर्थ वेळ घालवूं नये. पुढें जें काय होणार असेल तसें घडून येईलच, पण आपण मात्र आपल्या बुद्धीप्रमाणें योग्य तसें वागत असावें.

करतां दुर्भाषण, वाईट मनाचें लक्षण—ज्या मनुष्याचें मन क्षुद्र असतें तोच दुसऱ्यास कटु भाषण करतो. तोंडांतल्या भाषेवरून माणसाच्या शीलाची परीक्षा होते.

करतां नये काम, ठेवी हत्यारां दूषण—ज्याला एखादें काम करतां येत नसेल तो साधनांना नांवें ठेवीत असतो. तु०-A bad workman quarrels with his tools. नाचतां येईना अंगण वांकडं, रांधतां येईना ओलीं लांकडं.

करतां नये व्यवहार, त्यानें न करावा व्यापार—ज्याला व्यवहाराचें ज्ञान नाहीं त्यानें व्यापार करण्याच्या भानगडींत पडूं नये.

करतां पुरवेल पण सांगतां पुरवत नाहीं—दुसऱ्याला विशेषतः एखाद्या अडाणी मनुष्याला सांगून सांगून त्याजकडून काम करून घेण्यापेक्षां स्वतः काम करणें परवडतें.

करतां रोख व्यवहार, सधन होती सावकार--रोखीचा व्यवहार केल्यास त्यांत फायदा होतो; उधारीचा धंदा केल्यास त्यांत नुकसान येतें.

करतो एक आणि भरतो एक—एकाच्या कृतींचें दुसऱ्याला प्रायश्चित्त मिळतें. वर पहा.

करनातिलें केल्यारि जायिनातिलें जाता—(गो.) जें करूं नये तें केलें तर जें होऊं नये तें होतें.

करनु भीव नये, उलवनु फाटि सर नये--(गो.) करून भिऊं नये, बोलून मागें सरूं नये. आपण कोणतेंहि कृत्य केलें तर त्याची जबाबदारी धैर्यानें अंगावर घ्यावी, तसेंच एकदां शब्द गेल्यावर मग माघार घेऊं नये.

एकानें करायचें, साऱ्यांनीं झुरायचें—एका व्यक्तीच्या दुष्कृत्यानें सर्वांस कमीपणा येतो.

करायला गेला गणपति, झालें केलटें (केलडें)—[(कों.) केलडें = माकड] एक मनुष्य गणपति करूं लागला असतां सोंड पुढें लावावयाच्या ऐवजीं मागें लावली गेल्यामुळें माकड बनलें. एक गोष्ट करावयास जातां भलतीच घडून आली म्हणजे म्हणतात. तु०-विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम्।

करायला गेली काय, वरती झाले पाय—एखादी मनांत योजलेली किंवा भलतीच गोष्ट करूं लागलें असतां ती अंगलटीस आली म्हणजे म्हणतात. ' करूं गेलों काय ' असा पाठभेद आहे.-शाब. ३.१५२.

करायला गेली पर, तवई आली वर—[पर=प्रकार; तवई = तवा.] खाण्याचा एखादा नवीनच प्रकारचा पदार्थ करावयास निघालें असतां तवाच उपडा व्हावा किंवा असा कांहीं भलताच प्रकार व्हावा अशी गत. एक करतां एक होणें. ' तवई ' बद्दल ' तिवई ' शब्दहि येतो.

करायला जावें बरें नि व्हावें बुरें--एखाद्याच्या कल्याणाची गोष्ट म्हणून करावयास जावें तों ती त्यालाच त्रासदायक होऊन बसते. तु०-ज्याचें करायला जावें बरें तो म्हणतो माझेंच खरें.

करायला मागें, खायला पुढें—काम करावयाच्या वेळेस चुकारपणा करावयाचा व खाण्याच्या वेळीं मात्र पुढें व्हावयाचें, असा प्रकार.

करायास जावें एक व होतें एक-भलतेंच—एखादी इष्ट गोष्ट करूं जातां अगदीं विपरीत गोष्ट केव्हां केव्हां घडून येते, अशा वेळीं योजतात. ' करावयास गेलों एक आणि जाहलें एक. ' –भाब १०७.

कराल तें थोडें आहे; कराल तें थोडें आणि धराल तें घोडें--एखाद्याच्या बेफाट कृत्याबद्दल किंवा चाळ्याबद्दल निंदार्थीं वापरतात.

करावा जसा आदर, तसा मिळे प्रत्यादर—ज्या प्रमाणांत आपण दुसऱ्याचा मान ठेवूं त्याच प्रमाणांत दुसरे आपला मान ठेवतील. 'जशास तसें' हा जगाचा न्याय आहे.

करावा विचार एकांतीं, धर्माची व्याख्या कोणती—खरा धर्म कोणता याचा आपल्या मनाशीं नीट विचार करावा आणि त्याप्रमाणें वर्तन करावें.

करावें तसें पावावें, रांधावें तसें जेवावें--ज्याप्रमाणें आपण कच्चा पक्का जसा स्वयंपाक केला असेल तसा तो आपणास खावा लागतो; त्याप्रमाणें जशी आपण कृति करावी तसें आपणास फळ मिळतें.

करावें तसें भरावें—बरेंवाईट केलेल्या कृत्याचा परिणाम बरावाईटच होतो. चांगल्या कृत्याचें फल चांगलें व वाइटाचें वाईट फळ मिळत असतें.

करिनाशिल्लथान केल्यार जायनाशिल्लें जाता—(गो.) ज्यानें कधीं कांहींच केलें नाहीं त्यानें कांहींतरी करण्याचा प्रयत्न केला म्हणजे कधीं अशक्य कोटींतलें घडून येतें, म्हणजे तो यशस्वी होतो. किंवा ज्यानें एखादी गोष्ट कधीं केली नाहीं, त्यानें करावयास घेतली असतां कधीं कोणीं केलें नाहीं असें कांहीं तरी होतें म्हणजे भलतेंच होतें.

करी गुळाचा गणपति, माशा येऊनियां खाती—गुळाचा गणपती केल्यास त्यावर माशा येऊन बसणारच; जवळ पैसा असल्यावर माणसांना काय तोटा ! गुळाला मुंग्या चिकटणें. Make yourself all honey, and the flies will devour you.—Italian.

करी (करे) चोरी, और शिरजोरी—चोरी करून पुन्हा उजागरीनें हिंडणारा. चोर तो चोर. पहा.

करी भूमी उत्पन्न, तेणें राजा रंकाचें पोषण—परमेश्वरानें जी ही पृथ्वी निर्माण केली आहे ती अशी आहे कीं, तिच्यापासून राजापर्यंत सर्वांचें पोषण होतें.

करी मला, होई तुला—एखाद्या मनुष्याला त्रास देण्याकरितां केलेल्या कृतीमुळें स्वतःलाच उपसर्ग पोंचला म्हणजे म्हणतात. तु०-(गो.) केलें तुका झालें माका.

करी हिताचें शिक्षण, खरें मित्रत्व लक्षण—जो आपल्याला लाभदायक अशी सल्ला देतो किंवा उपदेश करतो तोच खरा मित्र होय.

करी ज्ञानाचा अभ्यास, होय सुखोपभोग त्यास—ज्याला ज्ञानप्राप्ति करून घेण्याचें व्यसन लागलें त्याला त्यांतच आनंद वाटूं लागतो. इतर सुखें त्याला तुच्छ वाटतात.

करील ती पूर्वदिशा—एखाद्याच्या हातीं अप्रतिबंध सत्ता असणें. तो ज्या दिशेला पूर्व म्हणेल तिला बाकीचे सर्वांनीं मान्य करणें. आपल्याच तंत्रानें एखादा माणूस कोणीहि हरकत न करतां करीत असला म्हणजे म्हणतात. निंदार्थी प्रयोग. 'राजा करील ती पूर्वदिशा व भट करील ती अमावास्या' अशी कोंकणी म्हण आहे. 'दरबार भरविणें, आटोपणें त्यांच्या मर्जीवर. करतील ती पूर्वदिशा.'-उदयास्त.

करील तें कारण आणि बांधील तें तोरण—वरीलप्रमाणेंच. अप्रतिबंधसत्तादर्शक म्हण. "हबश्यांच्या राज्यांत 'करील तें कारण आणि बांधील तें तोरण' असा न्याय होता."—बाजीराव.

करील तो भरील—प्रत्येकास आपल्या कृतीचें बरेंवाईट फळ मिळतें. तु०—करावें तसें भरावें.

करील तोंवर शेती, नाहींतर माती—शेती हा असा धंदा आहे कीं, जो स्वतः खपेल त्यासच त्यापासून फायदा होतो. स्वतः मेहनत केली नाहीं तर तें शेत म्हणजे निवळ मातीच होय. त्यापासून कांहीं फायदा उत्पन्न होणार नाहीं. तु०-करील त्याची शेती, मारील त्याची तलवार.

करील त्याचा कारभार, मारील त्याची तलवार—ज्याला आटोप आहे त्यालाच एखादा अधिकार चालवितां येतो व ज्याच्या अंगांत पराक्रम आहे, त्यालाच तरवारीच्या जोरावर देश जिंकतां येतात.

करील त्याचें काम—जो प्रत्यक्ष कार्य करणारा आहे त्याच्याच हातून कांहींतरी कृति घडण्याचा संभव असतो. निष्क्रिय माणसाच्या हातून कांहींच घडत नाहीं.

करूं गेलों तुज व झालें मज—'करी मला, होई तुला' पहा.

करूं जातां अतिचेष्टा, स्नेहांत पडे फांटा--मित्राची झाली तरी मर्यादेबाहेर मस्करी करूं नये; नाहींतर स्नेहांत बिघाड होण्याचा संभव असतो. केव्हां केव्हां मस्करीची कुस्करी होते.

करूं जातां एक, घडें-घडून येतें विपरीत—एखादी चांगली गोष्ट करावयास जावें तों केव्हां केव्हां अगदीं त्याच्या उलट प्रकार घडून येतो. 'करावयास गेलों एक व झालें भलतेंच.' वर पहा.

करूं जातां एक, प्रारब्ध घडवी अनेक—आपल्या मतानें एखादी गोष्ट करूं जावें तों दैवयोगानें भलतेंच घडून येतें. तु०—मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्तु चिंतयेत् ।

करूं जावें एक आणि होतें भलतेंच—मनानें एक योजावें तों भलतेंच होतें. वर पहा.

करूं जावें एक, झालें बेक—१ एक करावयास जावें तों भलतेंच होतें. २ एकी करावयास जावें तों बेकी होते.

करूं जावें दुसऱ्यास, समयीं भोंवतें आपल्यास—दुसऱ्यास उद्देशून केलेल्या कुचेष्टेनें समयीं आपलाच घात होतो. दुसऱ्याचें वाईट करण्याच्या उद्देशानें केलेली गोष्ट कधीं कधीं स्वतःसच भोंवते. तु०—केलें तुला झालें मला.

करूं नये कोणाची बरोबरी, नीट शोधावें अंतरीं—आपली स्वतःची शक्ति नीट अजमावून पाहून कोणतीहि गोष्ट करण्यास धजावें. उगाच एखाद्याशीं भलत्याच गोष्टींत स्पर्धा करूं नये.

करून उपयोग नाहीं, न करून चालत नाहीं—काम तर करावें लागतें, पण केलेलें काम उपयोगी येत नाहीं, अशी चमत्कारिक स्थिति. आपल्या मनाच्या विरुद्ध एखादी गोष्ट कर्तव्य म्हणून अगर सक्तीनें करावी लागणें. तु०—असून अडचण नसून खोळंबा.

करून करून भागलें आणि आतां पाठीं लागलें—जन्मभर जीं दुष्कृत्यें केलीं असतील त्यांचें फळ शेवटीं भोगावें लागतें. तारुण्यांत केलेल्या गोष्टींचा उपद्रव वार्धक्यांत जाणवूं लागतो.

करून करून भागला (भागले), देवध्यानीं (पूजे) लागला (लागले)—जन्मभर दुष्कृत्यें करावयाचीं व वृद्धपणीं देवाची भक्ति करण्याचें स्तोम माजवावयाचें, अशा वृत्तीच्या माणसाबद्दल योजतात.

करून करून भागली, देवपुजेला लागली—जन्मभर पापाचरण करून वृद्धपणीं देवभक्ति करणाऱ्या स्त्रीबद्दल योजतात. तु०—आदौ वेश्या...वृद्धा नारी पतिव्रता ॥

करून दाखवावें, बोलून दाखवूं नये—यंव करीन त्यंव करीन, अशी नुसती पोकळ बडबड करण्यापेक्षां हातानें कांहीं कृति केल्यास तिची किंमत अधिक आहे. आश्वासनापेक्षां प्रत्यक्ष कृति श्रेष्ठ. जो केवळ बढाई मारतो त्याच्या हातून कांहीं होत नाहीं. तु०—A barking dog seldom bites.

करून सवरून उजागर तो उजागर—एखादें दुष्कृत्य करून तें पचवून पुन्हां साळसूद म्हणून मिरविणारा.

करे न शेती, पडे न फंद, घरघर नाचे मुसळकंद—शेतीभाती करूं नको व भलत्या फंदांत पडूं नको, नाहींतर घरोघरीं आहे त्याप्रमाणें तमाशा होईल.

कर्वा गयो आस, अने लिधी फांस—एकाद्या गोष्टीच्या किंवा लाभाच्या आशेनें एखादें कृत्य करावयास जावें तों गळ्यास फांस लावून घ्यावा. आशेमुळें प्राणसंकटांत पडणें. तु०—आशैव राक्षसी पुंसामाशैव विषमंजरी । आशैव जीर्णा मदिरा धिगाशा सर्वदोषभूः ॥—सुर ७६.१३.

केला निश्चय मानसीं, चिंता पडे देवासी—एखादी गोष्ट करावयाची असा मनांत जर आपण पक्का निश्चय केला व तो निर्धारानें पाळला, तर परमेश्वरसुद्धां काळजी लागून आपणांस साहाय्य होतो व आपला निश्चय पार पाडण्याच्या कामांत आपणांस मदत करून आपलें कार्य सिद्धीस नेतो.

केला हात करी मात, यातायात विसाव्याची बात—निकरानें काम केल्यानेंच कोणत्याहि गोष्टींत यश येतें आणि परिश्रम केल्यानंतरच विश्रांतीचें सुख मिळतें.

केली उधळपट्टी, हातीं आली नरोटी—उधळेपणानें खर्च केला असतां दारिद्र्य येतें.

केली मारामारी, झाली एकी दुरी—भांडणतंटा केला असतां ऐक्य राहणें शक्य नाहीं.

केली रिकामी चौकशी, आपण राहिला उपवाशी—प्रयत्न करूनच्या करून कांहीं पदरांत पाडून न घेणाऱ्याबद्दल म्हणतात. भलत्याच कामांत लुडबुड केल्यास फायदा होत नाहीं.

केलें नाहीं तंववर जड व खाल्लें नाहीं तंववर गोड—कोणतेंहि काम प्रत्यक्ष करावयास लागण्यापूर्वी जितकें कठीण वाटतें तितकें तें प्रत्यक्ष करीत असतांना वाटत नाहीं. त्याच प्रमाणें एखादा पदार्थ जोंपर्यंत खावयास मिळाला नाहीं तोंपर्यंत जी त्याची अपूर्वाई वाटते तितकी तो प्रत्यक्ष खाल्ला असतां वाटत नाहीं.

केलेलें खावंका, आयिल्लें भोगका—(गो.) केलेलें (रांधलेलें) खाल्लें पाहिजे, आलेलें भोगलें पाहिजे.

केलेल्या गेलें पाप सांगिल्या गेल्या तोंडांतु—(गो.) करणाऱ्याचें पाप सांगणाऱ्याच्या तोंडांत. पापी मनुष्याप्रमाणेंच तें सांगणाराहि दोषी असतो.

केल्याविण कांहींच नाहीं, जग देतें ग्वाही—कोणतीहि गोष्ट केल्याशिवाय होत नाहीं हें सर्व जगास ठाऊक आहे. तु०—केल्यानें होत आहेरे । आधीं केलेंच पाहिजे ।

केल्हीं कर्मां, ह्याच जल्मां—(गो.) आपल्या दुष्कृत्याचीं फळें याच जन्मीं भोगावीं लागतात. तु०—याच देहीं याच डोळां.

केळे फळ भोगतलो—(गो.) केळ्याचें फळ भोगलें.

करतल——करतल भिक्षा तरुतल वास—चर्पट पंजरींतील हा चरण आहे. ज्याच्याजवळ स्वतःचें असें कांहीं नाहीं, जो कोणत्याहि प्रकारचा संग्रह करीत नाहीं, भिक्षा मागून हातावर पडेल तें खातो व झाडाखालीं निजतो, अशा प्रकारच्या अगदीं निरिच्छ व निष्कांचन मनुष्याबद्दल योजतात. "गोपाळराव 'करतल भिक्षा, तरुतलीं वास' असें करीत करीत ब्रह्मदेश, चीन, जपान, सयाम व अमेरिका, इतक्या ठिकाणीं फिरले."–आजोच ३११.

करतलामल; करतलामलक; करतलामलकवत्—[कर+ तल+आमलक+वत्=हाताच्या तळव्यांतील आंवळ्या प्रमाणें] १ हातांत प्रत्यक्ष असलेला आंवळा जसा सर्व बाजूंनीं पाहिजे तसा पाहतां येतो त्याप्रमाणें, ज्याचें सर्व बाजूंनीं स्पष्ट ज्ञान झालें आहे असा; ज्यास दुसऱ्या बाह्य प्रमाणाची जरूर नाहीं असा. 'वेदशास्त्राचा मथितार्थ। झाला करतलामलकवत्।'–एभा ११·१०४९. २ पूर्णपणें अवगत असलेली; अगदीं हातचा मळ बनलेली; अत्यंत सुलभ (विद्या, कला, शास्त्र वगैरे). 'चतुर्दशविद्या चौसष्ट कला। करतळामळ जयासी सकळा।'–ह ३१.८. 'महाराष्ट्र व संस्कृत या दोन्ही भाषा मोरोपंताला करतलामल होत्या.'– नि ७६५.

करतूक——करतुकीचा कांदा—कर्तृत्ववान; कार्य करण्याचें सामर्थ्य असलेला. 'करतुकीचा कांदा तिनदां येतो अंगावरी'–पला ८१. वाच्यार्थानें व उपहासार्थी, उलट व्यंग्यार्थानें दोन्हीहि तऱ्हेनें योजतात.

करदोडा——करदोडा तोडणारा—तंबाखू ओढल्यावर सामान्यतः एक प्रकारचा ठसका लागतो व जेव्हां तंबाखू अतिशय कडक असेल, तेव्हां हा ठसका फार जोराचा येतो व क्वचित् खोकून कमरेचा करदोडा तुटण्याचा संभव असतो. अशा तऱ्हेच्या भयंकर ठसका लावणाऱ्या तंबाखूस म्हणतात.

करवणें——करवेल तितके घ्यावें (करावें) बाकी सोडून द्यावें— जेवढें आपल्या हातून उरकेल तेवढेंच काम करण्याची जबाबदारी पत्करावी. आपल्या शक्तीपलीकडे काम करण्याचें अंगावर घेऊं नये.

करवत——आडवा करवत घालणें—एखाद्या कार्यांत विघ्न आणणें, अडथळा करणें.

जिवाला करवत लागणें-असणें—चुटपुट लागणें; अतिशय काळजी लागणें; हुरहुर वाटणें.

करवतीखालीं धरणें; करवतीं घालणें—जणूंकांहीं चिरावयास काढणें; अतिशय जाचणें; छळणें; जुलूम करणें.

❀ **करवत करकरूं लागली कीं, ओंडक्याचें भरलें म्हणून समजावें**—एकाचें स्फुरण तें दुसऱ्याचें मरण.

करवताची धार पुढें सरली तरी कापते, मागें सरली तरी कापते—करवतीला दोहींकडून धार असते त्यामुळें ती पुढें व मागें होतांनां दोन्ही वेळां खालच्या लाकडास कापते. यावरून दोन्ही बाजूंनीं पेंचांत सांपडलेल्या मनुष्यास म्हणतात. [वास्तविक करवतीच्या दांत्यास एकाच बाजूनें धार असते. कांहीं पुढें जातांना कापीत जातात तर कांहीं मागें ओढतांना कापतात. जसा दांत्यांस आकार द्यावा त्याप्रमाणें ही क्रिया होते. पण दांत्यांचीं टोकें अणकुचीदार असल्यामुळें दोन्ही वेळां टोंचतात.]

करवा——करवा पडणें—[करवा=उंसाचा तुकडा, गंडेरी] १ (एखादा अवयव) साफ मोडणें; तुकडा पडणें. २ (ल.) अतिशय दमणें; थकणें; गात्र विकल होणें. ३ एखाद्या गोष्टीचा मागला पुढला संबंध तोडून खंड पडणें; तुकडा तोडणें.

करळ——करळ चालणें—आडवें जाणें; आडवें, तिरपें चालणें; वांकडा निघणें. याच्याविरुद्ध शेव चालणें, जाणें म्हणजे सरळ जाणें.

करळ जाणें-होणें-जूं, धुरी, तराजू वगैरे एका अंगाला कलणें; एका बाजूकडे झुकणें.

करळ धरणें-नांगर वगैरे कलता, तिरपा धरणें; आडवा धरणें.

करारी——करारी शब्द एक, फुकट असती अनेक—पुष्कळशा बोलण्यामध्यें मुद्याचा शब्द एखादाच असतो, बाकीचे सर्व निरर्थक असतात. जो मनुष्य करारी असतो त्याच्या एका शब्दाला जी किंमत आहे, ती भरमसाटपणें बोलणाऱ्याच्या अनेक शब्दांस नसते, ते सर्व निरर्थक असतात.

करियो——करियो, कदरीयो, नदी न्हावा जाय, परमेश्वरे काळा कीधा गोरा क्यां थी थाय ?—काळा कावळा नदीवर न्हायला गेला त्यास परमेश्वरानेंच काळा केला तो गोरा कोठून होणार ? प्राणी आपलें नैसर्गिक रूप कधीं बदलूं शकत नाहीं. प्राप्तस्थितींत समाधान मानावें. फाजील महत्त्वाकांक्षा धरूं नये.

करुणा——करुणा भाकणें—दयेची, कृपेची याचना करणें. 'देखोनिया अंतसमया। करुणा भाकिती भोगीतनया।'–ह ११.१४१.

करुणा कहाणी ऐकिली, पत्नीला मूर्च्छा आली--पतीबद्दल दुःखद गोष्ट ऐकली असतां पत्नीस मूर्च्छा येणें साहजिक आहे.

करोट——करोट होणें—करोटी म्हणजे माणसाची कपाळाची कवटी. त्यावरून मरणें; स्मशानभूमिगत होणें.

करोटी——करोटी हातांत घेणें-येणें—करटी, करवंटी पहा. भीक मागणें; दारिद्य येणें.

कर्कटिका——कर्कटिकेसि तिचे सुत खांडिति--किरव्याचीं पोरें आईची पाठ फोडून बाहेर येतात. कृतघ्नपणा दाखविण्यासाठीं योजतात. 'कर्कटिकेसि तिचे सुत खांडिति ।'—मोभीष्म ११.१०६.

कर्कशा——कर्कशेला कलह गोड, पद्मिनीला प्रीति गोड--जी खाष्ट स्त्री असते तिला भांडणतंटा आवडतो व जी गुणवान् स्त्री असते तिला प्रेमळपणा आवडतो.

कर्ज——डोईवरून पाणी जाई इतकें कर्ज असणें—कर्जांत पूर्णपणें बुडणें; अतिशय कर्ज असणें.

कर्ज लागणें—देणें लागणें; ऋणकरी असणें.

❀ कर्ज काढून करणें सण, हें दुःखाचें कारण--रीण काढून सण करूं लागल्यास कर्ज वाढून त्यापासून पुढें त्रास व्हावयाचाच. तु०-रीण (ऋण) काढून सण करणें, पहा.

कर्ज केल्यामागें, खोटें बोलावें लागे.--एकदां मनुष्य कर्जबाजारी झाला म्हणजे त्याला वरचेवर वायदे करावे लागतात व ते वायदे वेळचेवेळीं वारतां येत नाहींत व त्यामुळें त्यास वरचेवर खोटें बोलण्याचा प्रसंग येतो.

कर्ज घेऊन आपण विसरतो, पण सावकार सदां स्मरतो—ऋणकरी मनुष्यास आपण घेतलेल्या कर्जाची एखाद्यावेळीं आठवण राहणार नाहीं पण सावकाराला त्याची कधीं विस्मृति होत नाहीं. कारण त्याचें हित त्यांत असतें व तो त्याप्रमाणें वेळेवर तगादा केल्याशिवाय राहात नाहीं. जो तो आपल्या हितास जपतो.

कर्ज घेतां वाटे हौस, देतांना फाल्गुन मास—कर्ज काढतांना सोपें वाटतें पण तें फेडतांना कठिण जातें. तु०-A loan should come laughing home.

कर्ज देऊन हरणें, हें मूर्खाचें खेळणें--दुसऱ्याला कर्ज देऊन तें बुडवून बसणें हा मूर्खपणा आहे.

कर्ज फार त्याला लाज नाहीं, उवा फार त्याला खाज नाहीं—अति ऊ त्याला खाज नाहीं आणि अति ऋण त्याला लाज नाहीं, पहा.

कर्ज मागतांच देतो, तो सरळ असून सुज्ञ नसतो--जेव्हां पूर्ण चौकशी किंवा विचार केल्याशिवाय एखाद्यास कर्ज दिलें जातें तेव्हां त्या व्यवहाराला तो सरळ व्यवहार दिसला तरी तसें कोणी म्हणत नाहींत. तर त्यास मूर्खपणाचा व्यवहार समजतात.

कर्जाचिये पाठीवरी, असे असत्याची स्वारी; कर्जाच्या पाठीवर असत्याची स्वारी—ऋणकरी मनुष्यास खोटें बोलावयाची पाळी आल्याशिवाय राहात नाहीं. वर पहा. "गरीबीमध्यें कोणत्याही कामासाठीं कर्ज करूं नये. कारण, 'कर्जा०' अशी म्हण आहे, आणि असत्य हें सर्व दुःखाचें मूळ आहे."—मधुमक्षिका.

कर्जाची वाढ, आगा पिच्छा झाला द्वाड--एकदां कर्जाची बेसुमार वाढ झाली म्हणजे तिला अगदीं शेंडा बुडखा नाहींसा होतो व ती अनावर होते.

कर्जामुळें झालें, कुळाचें वाटोळें—एकदां एखाद्याच्या घरांत कर्जाचें पिलूं शिरलें म्हणजे त्या कुलाचा नाश केल्याशिवाय राहात नाहीं.

कर्जासारखी दुसरी वाईट गोष्ट नाहीं--कर्जाला दुसऱ्या कोणत्याहि वाईट गोष्टीची योग्य उपमा देतां येणार नाहीं. ती सर्वांत अनिष्ट गोष्ट आहे.

कर्डा---कर्डा काकडा--अतिशय कडक, कठोर. 'हम वडे कर्डे काकडे शिपाई है,'—रासक्रीडा १०.

कर्ण——(कान) कर्ण ओढणें-ओढविणें--लक्ष्यपूर्वक कान देणें किंवा कान द्यावयास लावणें; लक्ष ओढणें. 'जो माया नियंता। तो वसिष्ठापुढें वोढवी कर्ण।'

कर्णपिशाच—१ मंत्रानें साध्य होणारें व गुप्त माहिती सांगणारें एक पिशाच. एक सिद्धि. 'कर्णपिशाच भगलिनी। उछिष्ठ चांडाळी रानसटवी जखणी!-'ह १३.६. २ हेर; गुप्तबातमी, माहिती देणारा.

कर्णमैथुन—१चुगली; चहाडी. २कानगोष्टी; कानमंत्र.

कर्णोपकर्णी ऐकणें-एकानें दुसऱ्यास, दुसऱ्यानें तिसऱ्यास याप्रमाणें ऐकीव बातमी आपल्या कानापर्यंत येणें; सांगीवांगीवरून एखादी गोष्ट समजणें; स्वतः न पाहतां केवळ लोकवार्तेनें एखादी माहिती मिळणें.

❀ कर्णौ स्पृष्टे कटिं चालयति--१ कानाला हात लावला असतां कमर हलवितो; म्हणजे एक गोष्ट सांगितली असतां भलतीच करणारा; मद्दड, ठोंब्या मनुष्यास म्हणतात. २ कान धरवून ढुंगण घाशीत (खरडत) चालवितो. हा एक

शिक्षेचा प्रकार असे. ढोपरांतून हात घालून कान धरविणें व पुढें सरकण्यास सांगणें.

कर्ण——कर्णाचा अवतार—१ अत्यंत दानशील गृहस्थ. [कुंतीपुत्र कर्ण हा सत्यवचनी व दातृत्वाविषयीं प्रख्यात होता. आपली जन्मागत कवचकुंडलें त्याचें महत्त्व माहीत असूनहि त्यानें ब्राह्मणवेशानें आलेल्या इंद्राला दिलीं व अरक्षित मरण पत्करलें.] २ (उपरोधानें) कृपण; कंजुष 'उदारामध्यें होतसे तीच कर्ण । कधीं देइना वाळलें एक पर्ण ॥' —कृ. ना. आठल्ये.

कर्णाचा पहारा—सूर्योदयापासून पहिल्या तीन तासांचा काल; ही वेळ अतिशय पवित्र मानतात; रामपहारा, रामप्रहर.

❀ **कर्णाची मातबरी आणि अर्जुनाची सावधगिरि**—कर्ण हा अत्यंत शूर व पराक्रमी असा योद्धा होता व अर्जुन हा अत्यंत सावधगिरीनें युद्ध करणारा होता. या दोघां-चेहि गुण म्हणजे सामर्थ्य व समयज्ञता हे ज्याच्या अंगीं आहेत अशा मनुष्यास हा वाक्प्रचार योजतात.

कर्णुसो उदार, मागिल्हे मात्र मिळेना--(गो.) कर्णासारखा उदार, पण मागितलेलें मात्र मिळत नाहीं. नांवाचा मात्र कर्ण.

कर्णा——कर्णा करणें--(क.) कर्णा (वाद्य) वाजविणें. कर्णा वाजवून सर्व गांवांस आमंत्रण देणें. 'करणा' पहा.

कर्णा फुंकणें--(क.) शिंग फुंकून गांवांतील सर्व व्यक्तींस जेवणाचें जाहीर आमंत्रण देणें; वेशीस टिळा लावणें.

❀ **कर्ण्यापुढें पुंगीच्या आवाजाची काय मातबरी**—कर्ण्याच्या मोठ्या आवाजापुढें पुंगीचा बारीक आवाज कोणास ऐकूं येणार. जेथें मोठमोठे लोक असतील तेथें क्षुल्लक मनुष्याची दाद कशी लागणार. तु०—नगाऱ्याची घाई तेथें टिमकीचें काई ?

कर्तव्य——कर्तव्यमूढ प्राणी, पदरीं घेतो यशोहानी--ज्या मनुष्याला वेळेवर आपलें योग्य कर्तव्य कळत नाहीं त्याला आपल्या कामांत नेहमीं अपयश येतें.

कर्तव्यो महदाश्रयः--मोठ्यांचें पाठबळ असावें; कोणातरी मोठ्या मनुष्याचा आधार घेतल्यास कार्यसिद्धि होते. सबंध श्लोकः—हीनसेवा न कर्तव्या कर्तव्यो महदाश्रयः । पयोऽपि शौण्डिनी हस्ते वारुणीत्यभिधीयते॥सुर१६४.४९७.

कर्ता——कर्त्याची (करील त्याची) पाटिलकी आणि भोगील त्याची संपदा--जो काम करूं शकेल किंवा ज्याची काम करण्याची पाळी असेल त्यालाच पाटिल-कीचा मान मिळतो व ज्यास आपल्या संपत्तीचा योग्य उप-भोग घेतां येतो त्यासच तिचा फायदा मिळतो. ज्याला काम करण्याची अक्कल नाहीं तो वतनदार असला तरी त्याचेकडे पाटिलकीचे अधिकार कोणी देत नाहीं व जो संपत्तीचा उपभोग घेत नाहीं त्याची संपत्ति असून नसून सारखीच. कृपणाच्या द्रव्याप्रमाणें तो मेल्यावर ती सर्व दुसऱ्याच्या हातांत जावयाची. —गांगा २२३.

कर्तुः संयोगजं कर्म—कर्त्याच्या संयोगानेंच कर्म घडून येतें. —मन्वंतर, सप्टेंबर १९४०.

कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं (शक्ति)--(कर्तुं + अकर्तुं + अन्यथा + कर्तुं) करण्याची, न करण्याची, अन्यथा कर-ण्याची शक्ति; सर्वशक्ति; वाटेल तें करण्याचें परमेश्वरी सामर्थ्य. 'कर्तुमकर्तुं शक्तः सकलं जगदेदतन्यथाकर्तुम् । यस्तं विहाय रामं कामं मा धेहि मानसान्यास्मिन् ॥' 'म्हणसि समर्थोहं कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं । दीनावनाविर्णे क्षण देईल दयिता दया कशी वर्तुं ॥' —मो संशय-रत्नमाला. 'आज मराठेशाहींत कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं शक्ति जर कोणाची असेल तर ती संताजी धोरपडे आणि धनाजी जाधव या दोघांचीच होय.' —स्वप २१०.

कर्नाटक——कर्नाटक ओस पडणें—(कानाला थट्टेनें करनाटक म्हटलें आहे) बहिरें होणें; कान फुटणें.

कर्नाटक कलह—क्षुल्लक कारणावरून भांडणास प्रवृत्त होणें. कानडे लोक मोठे भांडखोर असतात अशी समजूत आहे त्यावरून ही म्हण पडली आहे. —वामनशास्त्री इस्लाम-पुरकर कृत 'चारुदत्त आणि वसंतसेना,' पान१३९टीप पहा.

कर्म——कर्म आड येणें-ठाकणें—एखादी गोष्ट आपल्याला अनुकूल अशी होण्याची वेळ येत आहे तों मध्येंच आपल्या कमनशीबानें कांहींतरी विघ्न येणें; एखादी मध्येंच आपत्ति ओढवून आपणाला होणारा लाभ दुरावणें. 'अन्न घेवोनि जों निघाली । तों कर्म आड ठाकलें ।' —ह १६.१३०.

कर्म ओढवणें; कर्मानें ओढणें-ओढवणें—नशी-बाच्या तडाक्यांत सांपडणें; दैवाच्या फेऱ्यांत पडणें; कर्मा-प्रमाणें प्रवाहपतित होणें. 'बहुवय सरलें, उरलें थोडें, तों काय कर्म ओढवलें !' —मोद्रोण २२२०.

कर्मकथा-कहाणी—१ दुर्दैवामुळें भोगाव्या लागलेल्य

आपत्तीसंबंधीं हकीकत. २ रिकामटेकडें भाषण; गप्पागोष्टी. ३ एखाद्या प्रसंगाची इत्थंभूत माहिती. ४ कंटाळवाणी निरर्थक बडबड; वटवट.

कर्म केरसुणी--कर्मापासून सोडविणारी शक्ति.कर्म झाडणारी. 'तेव्हां तेचि श्रद्धा होये। कर्म केरसुणी।'–ज्ञा १७.६४.

कर्मधर्मसंयोगानें–चमत्कारिक रीतीनें; अनेक गोष्टींचा अकल्पित मेळ होऊन; दैववशात्; योगायोगानें. 'कर्मधर्मसंयोगानें तुमची गांठ पडली आहे, तर गोड बोलून काळ लोटावा.' 'कर्मधर्मसंयोगानें मी अगदीं सहज बाहेर गेलों तों माझी नजर तिच्याकडे गेली.'–मायेचा बाजार.

केल्या कर्माचें फळ--आपणच केलेल्या बऱ्यावाईट कृत्याचा परिणाम (आपणास भोगावा लागतो). 'केल्या कर्माचें फळ बापा। ऐश्वर्य तुज देतील।'-अमृत(नवनीत४४३)

कर्मानें जागें होणें--दैव अनुकूल होणें; अनुकूल ग्रहदशा प्राप्त होणें; काल अनुकूल येणें.

कर्मानें धांव घेणें--नशीव आड येणें; एखादा लाभ होण्याच्या मार्गांत दुर्दैव आडवें येणें.

कर्मानें पाठ पुरविणें-उभें राहणें—दैवानें मोडता, अडथळा आणणें; दुर्दैव आडवें येणें. अनेक प्रयत्न केले तरी मध्येंच कांहीं तरी विघ्न येऊन कार्यनाश होणें.

कर्मानें मागें घेणें-सरणें—एखादी गोष्ट अगदीं घडून येण्याच्या वेळीं दैवानें साहाय्य न करणें, नशीबानें हात न देणें; ऐनवेळीं दैव प्रतिकूल होणें.

❁ **कर्म अभिमानें वर्ण अभिमानें नाडले ब्राह्मण कलियुगीं**—कलियुगामध्यें ब्राह्मणांच्या ठिकाणीं आपल्या कर्मठपणाचा व उच्च जातीसंबंधीं अवास्तव अभिमान उत्पन्न झालेला आहे. त्यामुळें त्यांची हानि होत आहे.

कर्म दोन पाऊलें पुढें—आपण आपल्या नशीबाची दशा चुकविण्याकरितां जरी स्थानत्याग करून एखाद्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं गेलों तरी आपल्या नशीबीं असलेली गोष्ट चुकत नाहीं. तुमचें कर्म (प्राक्तन, प्रारब्ध) तुमच्या आधींच तेथें जणुं काय पोंचलेलें असतें. तु०–कोठें जाशी भोगा तुझ्यापुढें उभा.

नव्हे कर्म ना धर्म ना योग कांहीं।—मनुष्याच्या हातून कांहीं यज्ञयागादि वैदिक कर्म किंवा मोठा दानधर्म किंवा योगसाधन वगैरे सारखी गोष्ट बहुधा होत नाहीं–राम.

कर्म म्हणजेच धर्म--कर्तव्य करण्यानेंच धर्मपालन होतें.

कर्म सोण्णु मेळयिलें ज्ञान, रांदयि नातिल्या शिता जेवण--(गो.) कृतीवांचून मिळविलेलें ज्ञान हें चूल नसलेल्याला जसें शिताचें जेवण मिळतें तसें आहे. कोरडें ज्ञान निरुपयोगी असतें.

कर्मणो गहना गतिः।—प्रारब्धाचे खेळ आपणांस कळणें शक्य नाहीं; दैवाची लीला अगाध आहे. अकल्पितरीतीनें एखादी वाईट गोष्ट घडली असतां म्हणतात. सबंध श्लोकः विपत्तौ किं विषादेन संपत्तौ हर्षणेन किम्। भवितव्यं भवत्येव कर्मणो गहना गतिः॥–समपद्य. खालीं कर्माची० पहा.

कर्माची कहाणी, ऐकायला नाहीं कुणी--आपल्या दुर्दैवाची कथा कोणाजवळ सांगावी? ती दुसऱ्यास सांगण्यापासून कांहीं उपयोग नाहीं. आपल्या नशीबांत असेल तें आपणच भोगले पाहिजे.

कर्माची गति कळत नाहीं आणि जीवाला चैन नाहीं—पुढें आपल्या नशीबांत काय आहे तें जाणण्याचें सामर्थ्य तर आपल्यांत नसतें पण त्याबद्दलची हुरहुर मात्र एकसारखी लागलेली असते. विशेषतः विपत्ति काळांत मनुष्याचा धीर सुटून तो भविष्यकाळाबद्दल विशेष चिंतातुर होतो.

कर्माची गति गहना, जें होईल तें तें चुकेना—प्रारब्धामध्यें काय लिहिलें आहे तें गूढ असून तें कोणाला कळत नाहीं व तें कोणी टाळूंहि शकत नाहीं. तु० कर्मणो गहना गतिः! 'कर्माची गति गहना, संसारीं बहुत हाचि पथ वाहे!'–मोरवर्ग.

कर्माची रेघ टळे ना टळे—प्रारब्धांत जें असेल तें कधींहि टळत नाहीं. आपल्या आयुष्यांत आपणावर जे प्रसंग येणार आहेत त्या सर्व गोष्टी आपल्या कपाळांतील हाडाच्या कवचीवर ब्रह्मदेवानें लिहून ठेवलेल्या असतात. व त्याप्रमाणें घडून येतें अशी समजूत आहे.

कर्माची वरात व म्हातारी घरांत--मोठ्या हौसेनें जों वरातीबरोबर नूतन परिणीत पतीच्या घरीं जावें तों समोर म्हातारी सासु किंवा आजे सासु दृष्टीस पडावी म्हणजे तिच्या कुरकुरीपुढें सर्व संसाराची माती होणार असें वाटूं लागतें. म्हाताऱ्या माणसांची नेहमीं कांहींना कांहीं तरी किरकिर चालू असते व ती तरुणांना असह्य होते. कर्म असलें खतरुड व त्यांतून घरांत म्हातारीची अडगळ.

कर्माच्या गती, सांगाव्या किती--नशीबामध्यें काय लिहिलें आहे हें कोणाला सांगतां येत नाहीं. तेव्हां कर्म कटकट सांगण्यात कांहीं अर्थ नाहीं. (गु.) करमनी काहणी, ते कोईए नहि जाणी.

कर्माच्या भोगा आणि तीन डोळे दोघां--दोघां मिळून तीन डोळे असणें म्हणजे धड एखाद्यासहि दोन डोळ्यांची पूर्ण दृष्टि नसणें. याचा अर्थ दोघेहि अर्धवट-अशा रीतीनें नशीबानें व्यंग ठेवलें म्हणजे त्याचें फळ विपत्ति ही यावयाचीच.

कर्मा तकित धर्मु करता, त्राणा तकित वजें व्हावंता--(गो.) कर्माप्रमाणें धर्म करतो, व शक्तीप्रमाणें ओझें वाहतो.

कर्मांतु बरइले जन्मांतू सुट्टना--(गो.) नशिबी लिहिलेलें जन्मांतहि चुकत नाहीं.

कर्मान वेष्टिलो आनि कणंगा कान्निक गंवसलो—(गो.) दैव उदयाला आलें आणि अंधळा धान्याच्या कणगीला जाउन आदळला. एखादे वेळीं असेंहि अनुभवाला येतें कीं, दरीद्री माणसाला सहज जातां जातां एखादा मोका मिळतो आणि तो भिक्षाधीशाचा लक्षाधीश बनतो. तु०-अंधेके हात बटेर.

कर्मी आचमन करावें, तेथें माषमात्र जळ घ्यावें--धार्मिक विधी करतांना प्रथम जें आचमन करावयाचें तें शरीरशुद्ध्यर्थ अवश्य असून त्याकरितां प्रत्येक वेळीं उडीद बुडेल इतकें पाणी हातांत घ्यावयाचें असतें.

कर्मी फळ आणि तपीं राज्य--कोणतेंहि कर्म केल्याशिवाय म्हणजे कष्ट केल्याशिवाय फळ मिळत नाहीं व तप केल्याशिवाय म्हणजे विशेष व सतत परिश्रम केल्याशिवाय राज्याची प्राप्ति होत नाहीं. पाठभेद-कष्टीं फळ तपीं राज्य.

कर्मठ——कर्मठपणा केला, देव दुरावला—नुसतें स्नानसंध्या करण्याचें ढोंग केलें व मनामध्यें भक्ति नसली तर देवाची प्राप्ति होणें कठिण जातें.

कर्मेंद्रिय——कर्मेंद्रिय पंचक-पांच कर्मेंद्रियें-१ हात, २ पाय, ३ वाणी, ४ शिश्न, ५ गुद.

कऱ्याचा दिवा——कऱ्हा दिव्याचा मान—विवाहादि समारंभांत कऱ्हा दिवा किंवा शोभणी धरणाऱ्या स्त्रीस मानाबद्दल जीं वस्त्रें, नारळ पानसुपारी वगैरे द्यावयाचीं असतात तीं वस्त्रें व तीं देण्याची क्रिया किंवा विधि.

कल——कल खाणें-पडणें—बाजूस झुकणें; विशिष्ट दिशेस वळणें; तोल जाणें. 'तराजूची दांडी जशी एकाच बाजूस कल खातें,'-नि ४३९. 'कांहीं कालापूर्वी जें मान दिसत होतें, त्यास आतां कल पडून लोकांच्या मनानें उलट खाल्ल्याचीं चिन्हें दृष्टीस पडूं लागलीं आहेत.'-नि ४९०.

कल पाहून वागणें--१ एखाद्याच्या मर्जीप्रमाणें वर्तन करणें; एखाद्याची तब्येत, लहर संभाळणें; एखाद्याची खुशामत करणें. 'मर्जीचा कल पाहून बोलतों आम्ही आपुल्या परि भिऊन ।'-पारिजात, जुनें गाणें. २ प्रसंग पाहून योग्य तें वर्तन करणें.

कल संभाळणें--मर्जी, लहर संभाळणें; मर्जी खप्पा न होईल असें वर्तन करणें.

कल——कलका बनिया आजका शेट--१ प्रथम जो सामान्य वाणी असतो तोच पुढें हळूहळू व्यापार करून मोठा शेट बनतो. अशा तऱ्हेनें ज्याला श्रीमंती प्राप्त झाली असेल, तो आपण पूर्वी लहान होतों ही गोष्ट लक्ष्यांत क्वचितच बाळगतो. २ थोड्या कालांत महत्त्व प्राप्त होणें.

कलकी बात राम जाने--आजचा काळ आपल्याला दिसूं शकतो पण उद्यांची गोष्ट जाणणें मनुष्याच्या आटोक्याबाहेरचें आहे. तें फक्त परमेश्वरासच माहीत. तेव्हां मनुष्यानें वर्तमान काळासंबंधींच विचार करावा व पुढील गोष्टींचा भार परमेश्वरावर टाकावा.

कलती——कलती देणें--फसविणें; ठकविणें. 'धूर्त अहा तूर्त नका देऊं कलती ।'-प्रला १०३.२१८.

कलम——कलम करणें--तोडणें; छाटणें; कापणें. 'हें (गणपत कृष्णाजीचें) पंचाग वर्तविणारे (शिंपी जातीचे) ज्योतिषी व त्यांचे पुरस्कर्ते यांचे आमच्या कर्मठ राजांचे कारकीर्दीत खचित हात कलम केले असते.'-विवि.

कलमकसाई—आपल्या लेखणीच्या जोरावर दुसऱ्याचा निर्दयपणें घात करणारा कारकून, लेखक, इ.

कलमजारी करणें—सैन्य जमाविण्यासाठीं, सैन्यभरतीसाठीं हुकूम करणें. 'श्रीमंतांनीं नवी फौज चाकरीस ठेवण्याविषयीं कलमजारी केली.'-पेब २२.

कलमबंद करणें--लेखी घेणें; लिहून घेणें.

❀ **कलमकसईपेक्षां जातकसई बरा**—लेखणी चालवून म्हणजे एखाद्या विरुद्ध कारस्थानें करून त्याचा नाश करणारापेक्षां प्रत्यक्ष वध करणारा जातीचा खाटीक अधिक दयाळू मानला पाहिजे; कारण खाटिक फक्त एकाचा व एकदम प्राण घेतो; पण कारस्थानी लेखक अनेकांचा विध्वंस करूं शकतो.

कलम बरे जमिनींतून घेणें, कन्या चांगले कुळांतून करणें—ज्या झाडाचें कलम करावयाचें तें झाड चांगल्या भूमींतून पारखून घ्यावें व ज्या कुलांतील कन्या करून घ्यावयाची तें कूल चांगलें असल्याची खात्री करावी.

कलसर——कलसरेपर बडी आफत है—दुर्गुणी माणसावर आपत्ति एकसारख्या कोसळतात.–सवि २३४६.

कलह——कलह उकरून काढणें--भांडणतंटा उपस्थित करणें; भांडण लावणें. 'खिजवुनि सभेंत काढित होता उकरुनि पुनः पुन्हा कलह।'–मोगदा ५.१०.

कलहास अक्षता लावणें--भांडणतंटा कायमचा मिटविणें.

❀ **कलहवृद्धि न करावी हा थोरांचा संप्रदाय आहे**—थोर लोक असतात ते परस्परांत वैमनस्याची वाढ न होईल अशी काळजी घेतात. 'दाटून अगदीं घ्यावयासाठीं कलहवृद्धि न करावी हा थोरांचा संप्रदाय आहे.' –पया ३४१.

कला——कलेसाठीं कला—कलेशीं एकनिष्ठ राहाणें; कलाभिवृद्धि हाच एक हेतु धरून वागणें. कलावंतानें कलाकृति करतांना आपल्या कलेचे नियम आपण पाळतों किंवा नाहीं आणि आपली कृति सुंदर होते किंवा नाहीं यांकडेच मुख्यतः लक्ष देणें व इतर गोष्टींची पर्वा न करणें.

❀ **कलाकौशल्य ज्याचे हातीं, त्याची होई जगीं ख्याती**—ज्याच्या अंगांत एखादी कला आहे त्यास प्रसिद्धी मिळाल्याशिवाय राहात नाहीं.

कला ही प्रकृतीपेक्षां मोठी आहे—निसर्ग अथवा प्रकृति ही काहीं सुंदर गोष्टी स्वाभाविकपणें उत्पन्न करते; परंतु कला ही नैसर्गिक सुंदर वस्तूंचें सौंदर्य वाढविते व आपल्या चातुर्यानें अनेक प्रकारच्या नवीन नवीन वस्तु नैसर्गिक वस्तूंस अनेक आकार देऊन निर्माण करते. तेव्हां निसर्गापेक्षांहि कला श्रेष्ठ आहे.

कलावंत——कलावंताची प्रीत—(गो.) वरकांती प्रेम; लटकें प्रेम; वरवर दाखविलें जाणारें प्रेम. वेश्येचें प्रेम.

❀ **कलवंत पळौंचें मागून, आनी बायल् पळौंची हागून**—(गो.) कलावंतिणीची परीक्षा तिच्याकडे एखादी वस्तु मागून करावी, आणि बायकोची पारख हगून करावी. कलावंतीण गोड बोलते एवढ्यावरून तिचें आपणावर प्रेम आहे असें समजूं नये. एखादी वस्तु तिच्याकडे मागावी आणि ती जर तिनें दिली तरच खरें. बायकोची पारख करायची असली तर तिच्या सेवावृत्तीचा कस लावावा.

कलवंत नाचतां देवळांत, म्होण गावडी (भावीण) नाचतां घरांत—(गो.) [गावडी = गावडे जातीची स्त्री.] कळवंतीण देवळांत नाचते म्हणून गावडी घरांत नाचते. ज्यांत आपणास कांहीं गम्य नाहीं अशा गोष्टींत मूर्खपणानें एखाद्या गोष्टीचें अनुकरण करणें. तु०–मोर नाचतो म्हणून लांडोर नाचते.

कलावंताचें भाग्य आणि तिरड्याचें राज्य तीनच दीस; कलावंताचें भाग्य तारुण्य असेंपर्यंत व तेरड्याचें राज्य रंग टिकेपर्यंत—कलावंत मनुष्याचें वैभव हें त्याच्या अंगच्या कलेवर व त्या कलेचें चीज करणाऱ्यावर अवलंबून असतें व कला ही मनुष्याच्या अंगीं फार दिवस टिकत नाहीं व तिच्या भोक्त्याची लहरीहि लवकर फिरण्याचा संभव असतो. म्हणून कलेपासून प्राप्त होणाऱ्या ऐश्वर्याची शाश्वती नाहीं. त्याप्रमाणें तेरड्याच्या फुलाचा रंग तीन दिवसांपेक्षां अधिक टिकत नाहीं.

कलावान्——कलावानाची कोरणी आणि लेखकाची लेखणी—उत्तम कलावन्ताची कोरणी जशी सुंदर चित्रें निर्माण करते, तशी लेखकाची लेखणी उत्तम प्रकारचें वाङ्मय निर्माण करते.

कलि——कलियुगाचा ब्रह्मा—कल्पक व चतुर पुरुष; बुद्धिवान् मनुष्य.

कलिवर्ज्यांतलें प्रकरण—कांहीं विधि कलियुगांत पाळावयाचे नसतात, असें धर्मशास्त्रांतून सांगितलें असतें. त्याचप्रमाणें कांहीं गोष्टी कलियुगांत प्रत्यंतरास येत नाहींत. तेव्हां त्याबद्दल विचार करण्याचें कारण नाहीं. 'गाणें ऐकवून हरणें मोहित करण्याची कला कलियुगांत नष्ट झाली आहे. हें कलिवर्ज्यांतलें प्रकरण आमच्या काय उपयोगाचें?' –उग्र १.२.

कलि संचरणें--अंगांत कलि शिरला असला म्हणजे दुर्वर्तन घडूं लागतें असा समज. यावरून राग येणें; मनांत किल्मिष येणें; दुर्बुद्धि सुचणें.

कलीचा पहारा--अतिशय निर्दयता; राक्षसी निष्ठुरपणा.

❀ **कलीं खोटी, दुनिया उफराटी**--(वांय.) कलियुगांत सत्ययुगाच्या उलट सर्व आहे. जग हें असत्यानें भरलें आहे.

कल्पतरु-वृक्ष——कल्पतरु तोडून केला कूप शेता—कल्पवृक्ष तोडून शेतास कुंपण केलें; मोठी गोष्ट मोडून तिची क्षुल्लक वस्तु बनविणें; आंतबट्ट्याचा कारभार. तु०-कणेकडाचें खापेकड करणें. विळा मोडून खिळा करणें.

कल्पवृक्षाखालीं बसून झोळीला गांठी कां द्याव्या?—कल्पवृक्षाच्या छायेंत बसल्यावर दरिद्री आकांक्षा कशास

धराव्या ? चांगली संधि प्राप्त झाली असतां मनाचा क्षुद्रपणा टाकून तिचा चांगला फायदा करून घ्यावा.

कल्पा——कल्पे झाडणें—(व.) मारणें; झोडणें.

कल्पांत——कल्पांत करणें—[कल्पांत = कल्पाचा शेवट; ब्रह्मदेवाचा एक दिवस संपणें. (ल.) प्रलय.] मोठा आकांत मांडणें. ‘ नऊ नाहीं वाजले तोंच भूक लागली म्हणून मुलांनीं कल्पांत करून सोडला. ’

कल्पित——कल्पित कादंबरी—१ मनःकल्पित गोष्ट; खरी नसलेली, स्वतः रचलेली, अवास्तविक कथा. २ कांहीं तरी रचून सांगितलेली गोष्ट; थाप; गप्पा; बात.

कल्याण——कल्याणार्थ सुनेनें सासूचें जेविंतेविं सोसावें ॥—सासू कितीहि खाष्ट असली व ती रागें भरीत असली तरी तिचें निमूटपणें ऐकून घेणें, यांत सुनेचें कल्याण आहे; अशा उपदेशाचा वरील चरण आहे. ‘ ज्या प्रेमें स्वापत्या त्या प्रेमें ब्राह्मणांसि पोसावें । कल्याणार्थ सुनेनें सासूचें जेविंतेविं सोसावें ॥ ’

कल्हई——कल्हई करप—(गो.) सारवासारव करणें. ज्याप्रमाणें कल्हई केली म्हणजे भांड्याचा स्वाभाविक पृष्ठभाग दिसेनासा होऊन सर्व लखलखीत दिसूं लागतें, त्याप्रमाणें दोषावर पांघरूण घालून तो न दिसूं देण्याचा प्रयत्न करणें.

कव——कव घालणें—१ मिठी मारणें; झडप घालणें. ‘ कर्ण धराया धांवे त्या अरिला घालुनि कव चप ळाला । ’ —मोकर्ण १४. ६५. २ चिकटून बसणें; आसक्ति ठेवणें. ‘ रुक्मिणी अति सत्वर पातली । चरण सन्नमनीं कव घातली ॥’ —किंसुदा २८.

कवच——कवच टाकणें—१ साप कात टाकतो त्या प्रमाणें कात टाकून नवीन स्वरूप धारण करणें. ‘ नातरी सर्पें कवच सांडिलें । ’ —ज्ञा ८. ६६. २ जीर्णोद्धार होणें; पुनरुज्जीवन होणें; नवीन उत्साह प्राप्त होणें; आजारांतून उठून पुन्हा ताजेतवाने होणें. ३ मूर्तीवरील शेंदुराचा वगैरे लेप कोसळून पडून, निघून जाऊन आंतील मूर्ति दिसूं लागणें.

कंवट——कंवट गाळणें—अंडें गाळणें; गर्भगळित होणें; भयानें गांगरणें; भीतीनें घाबरगुंडी उडणें.

कंवट भावलें—पिशाचबाधा काढून टाकण्यासाठीं पिठाचें बाहुलें, कोंबड्याचें अंडें व एक पिठाचा दिवा अंगावरून ओवाळून बाहेर नेऊन टाकतात तें.

कवठ——कवठ बाहेरून चांगलें दिसतें—कवठ हें जितकें बाहेरून चांगलें दिसतें तितकें फोडल्यावर आंतून दिसत नाहीं व तितकें स्वादिष्टहि नसतें. यावरून वरून सुंदर दिसणाऱ्या सर्वच वस्तू अंतर्यामीं चांगल्या असतात असें नाहीं. तु०—जें सर्व चकाकतें तें सोनें नसतें.

कवड——कवडेंतु हाणु कोळसो घेत्तप; कवडेंत हाडून कळसो फोडप—(गो.) कळशी (पाण्याची घागर) कवाडांत (दारांत) आल्यावर फुटणें. अगदीं अखेरच्या वेळीं सर्व श्रम फुकट जाणें. फळ हातांत येण्याच्या वेळीं कांहींतरी विघ्न येऊन सर्व बिघडणें.

कवडा——कवडा भिठास जातो—(कों.) पावसाळ्याच्या आरंभीं कवडा हा पक्षी कोंकणांत ओरडतांना ऐकूं येतो. कवडा ओरडूं लागला म्हणजे पर्जन्य लवकर येण्याचें चिन्ह दिसूं लागतें. तसेंच, पाऊस सुरू होण्यापूर्वीं कवडा पावसाळ्याच्या बेगमीचें मीठ आणावयास जातो; तेव्हां तो गेला म्हणजे समजावें कीं, लवकरच पाऊस सुरू होणार. अशी कोंकणांत समजूत आहे. ‘कोंका मिठास गेला’ असेंहि म्हणतात.

कश्यप——कश्यपावर असणें—[कश्यप=कच्छप याचा अपभ्रंश] कच्छपीं असणें; मागें असणें. ‘ रा. गंगाधरपंत तात्या व रा. नारो शंकर यांचें वर्तमान पेशजी लिहिलें होतें त्यास हे त्या कश्यपावरच आहेतच. ’ —रा ३.१३८.

कश्यपीं लागणें—कच्छपीं लागणें, पहा.

कष्ट——कष्ट करतां बहू प्राप्ति, आळसानें गरीबी येती—मनुष्यानें श्रम केल्यास त्याला पुष्कळ कमाई करतां येते; परंतु आळसांत दिवस घालविल्यास उलट दरिद्र येतें.

कष्ट केलेल्याशिवाइ इष्ट मेळना—(गो.) कष्ट केल्याशिवाय ईप्सित लाभत नाहीं.

कवडा——कवडा मिरविणें—देवीचा भुत्या किंवा आराधी देवीचा अलंकार म्हणून आपल्या गळ्यांत कवड्यांची माळ घालतो; त्यावरून कोणत्याहि गोष्टीचें वैभव मिरविणें. ‘आपल्या कवित्वाचा कवडा । मिरवी सधन सभेपुढें ।’

कवडी——कवडी उलटी पडणें—सोंगट्यांच्या खेळांत कवड्यांनीं दान टाकावयाचें असतें त्यावेळीं एक कवडी अधिक उलटी पडली तर भलतेंच दान होतें. उदाहरणार्थ एकीच्या ऐवजीं दोन कवड्या उताण्या पडल्या तर दहाच्या ऐवजीं दोन होतात. यावरून फांसा किंवा डाव आपल्याला पाहिजे तसा न पडतां भलताच पडणें; बाजू अंगावर येणें; डाव शेकणें.

कवडी कवडी सांठविणें—अत्यंत कृपणपणें धनसंचय करणें. तु०–कवडी कवडी माया जोडी०

कवडी किंमतीचा, कवडीमोल—कुचकामाचा; निरुपयोगी; अत्यंत अल्प किंमतीचा; तृणप्राय.

कवडीचुंबक–टंक–पूत–अतिशय कृपण; कंजूष. 'दोघेहि गुलाम कवडीचुंबक.'–विवि ८.११.२०७.

कवडीहि न फेडणें—मुळींच परत न देणें; अगदीं अल्पहि परतफेड न करणें.–मोसंशय १६.

कवडीचा माल—१ अगदीं कमी किंमतीचा माल; ज्यास कांहीं विशेष मोल यावयाचें नाहीं असा हलका पदार्थ. २ तुच्छ पदार्थ; कुचकामाची वस्तु; निरुपयोगी गोष्ट.

कवड्या रेवड्या करून (पैसे) घेणें—एखाद्यास बरीच मोठी रक्कम उसनी दिल्यावर ती परत करतांना तो एकदम किंवा मोठ्या हप्त्यांनीं न देतां, अगदीं थोडथोडी व तीहि केव्हां तरी जेव्हां देतो तेव्हां या किरकोळ फेडीचा सावकाराला किंवा कर्ज देणाराला नीट; फायदेशीर असा उपयोग होत नसतो; अशा वेळीं म्हणतात.

❀ **कवडी कवडी माया जोडी**—कवडी कवडी करून धनसंचय करणें; कृपणपणानें द्रव्य सांठवणें. 'कवडी कवडी मायाजोडी रुपिया लाख करोड। नारायण घरकी चिठी आवे चलो लंगोटा खोल। एकदिन जाना रे भाई। सबसे रामभजन करलेना।

हातांत कवडी, विद्या दवडी—(बाल.) कवड्या खेळण्याचा नाद बरा नाहीं, त्यामुळें विद्येवर पाणी पडतें.

कवडीची कमाई नाहीं व घडीची फुरसत नाहीं—एकसारखा फुकट राबत राहिलेल्या मनुष्यास म्हणतात. अत्यंत परिश्रम करूनहि कांहीं प्राप्ति होत नसली म्हणजे वापरतात. सार्वजनिक कार्यकर्त्यासहि लागू आहे.

कवडीची सत्ता आणि लाखाची मत्ता, बरोबर आहे (नाहीं)—संपत्तीपेक्षां अधिकाराची थोरवी अधिक आहे.–कारण हातांत अधिकार असेल तर वाटेल तेवढी संपत्ति मिळवितां येईल.

कवडीचें तेल, कवडीची वात, दिवा जळो सारी रात—अत्यंत थोड्या खर्चांत पुष्कळ लाभ होण्याची इच्छा करणें.

कवडीपासून कमवावें (जोडावें) आणि लाखापासून खर्चावें—संपत्ति मिळवीत असतां अगदीं अल्प लाभ होत असला तरी तिकडे दुर्लक्ष्य करूं नये व अशा रीतीनें मिळवितांना जरी कणाकणापासून संपत्ति मिळविली असली तरी योग्य ठिकाणीं खर्च करावयाचा प्रसंग आला असतां, कितीहि मोठी रक्कम खर्च करावी लागली तरी मनांत कचरूं नये.

कवडीस कवी, गोवरीस गोसावी—कवी आणि गोसावी यांची अत्यंत समृद्धि या म्हणीनें व्यक्त होते. कवडीला कवि राजी होतो व एक गोवरी दिल्यानें गोसावी तृप्त होतो.–गांगा १३२.

कवड्यांचें दान वांटलें, गांवांत नगारे वाजले—अगदीं क्षुल्लक गोष्टीचा भयंकर गाजावाजा करणें. तु०–अहेर चोळीचा, आणि गजर वाजंत्र्याचा.

कवल——कवला महादेव पावला—१ [कवल, कौल = देवास कळे वगैरे लावून त्याची अनुज्ञा, आशीर्वाद वगैरे घेणें] महादेवाला कौल लावला त्याप्रमाणें देवानें संमति दिली किंवा आशीर्वाद दिला. एखादें काम सफळ झालें, एखाद्याचा अनुग्रह झाला, एखाद्याची संमति मिळाली म्हणजे म्हणतात. २ [कवळासणें = विसर्जन करणें] महादेव पावला, आतां त्याचें विसर्जन करा, असें हरताळकेच्या दुसऱ्या दिवशीं पहांटे वृद्ध बायका सांगतात.

कवल——कवल उतरणें—आईन, किंजळ वगैरे झाडांचा छाट शेतांत नेऊन ठेवणें.

कवळ फोडणें—कवळाचे गठ्ठ शेतांत पसरून टाकणें.

कवळी——कवळी करणें—(व.) रवंथ करणें; एकदां खाल्लेला चारा गुरें पुन्हा बारीक चावून गिळतात त्यास म्हणतात.

कवाईत——कवाईत करणें—१ युक्ति लढवणें; लटपट करणें; कांहींतरी कारस्थान, कपट करणें. 'हरएकविशीं वजिराशीं कवाइत करून हा मजकूर राहता करावा.'–भाब ३९. २ नुसतें तंत्र करणें (संध्या इ. विधींत).

कवि——जें न देखे रवि, तें देखे कवि; जें देखलें नाहीं रवीनें, तें देखलें कवीनें—जें प्रत्यक्ष सूर्याला सुद्धां दिसूं शकत नाहीं तें कवीला आपल्या कल्पनाशक्तीनें कळूं शकतें. कवीची कल्पनाशक्ति ही इतर सर्व शक्तींपेक्षां श्रेष्ठ आहे. तु०-कवयः किं न पश्यन्ति किं न भक्ष्यन्ति वायसाः। मद्यपाः किं न जल्पन्ति किं न कुर्वन्ति योषितः॥ –सुर १६०.३०४.

कवीस गुरु आहे पण उपज अंगस्वभाव—अभ्यासानें जरी काव्य करतां आलें तरी खरी कवित्वशक्ति

ही उपजतच असावी लागते. कवीची प्रतिभा ही निसर्गजात आहे. तु०–लॅटीन–Poeta nascitur non fit.

कव्वा——कव्वा हंसकैसी चाल शिकता था, आपनीभी चाल भूल गई—कावळा हंसासारखी चाल शिकूं लागला तों त्याला हंसाची चाल तर आली नाहींच पण स्वतःची चालहि विसरला. जो मनुष्य भलत्याच गोष्टीची हांव धरतो तो जवळ असेल तेंहि गमावतो.

कव्वेके कोसे ढोर नही मरते—कावळयाच्या कावकावीनें ढोरें मरत नसतात. तु०–कावळयाच्या शापानें गुरें मरत नाहींत.

कष्ट——कष्ट गोड लागती तर होय बहू प्राप्ति—श्रम करण्यांत आनंद वाटूं लागला तर अशा श्रमांपासून पुष्कळ लाभ होतो.

आधीं कष्ट मग फळ । कष्टचि नाहीं तें निष्फळ ॥ —कष्टानंतरच त्याचें फळ मिळत असतें. कष्ट नाहींत तर फळ नाहीं. श्रमाचें महत्त्व यांत दाखविलें आहे.

कष्टावांचून सिताफळें येत नाहींत—झाडाच्या टोंकाला लागलेलीं फळें वर चढून परिश्रम केल्याशिवाय हातीं येत नाहींत. किंवा श्रम केल्याशिवाय शिताफळें (भाताचीं शितें) खावयास मिळत नाहींत–म्हणजे श्रम केल्याशिवाय अन्न मिळत नाहीं.

कष्टाविना फल नाहीं—श्रम केल्याशिवाय कोणतीहि वस्तु प्राप्त होत नाहीं.

कष्टीं फळ, तपीं राज्य—कष्ट केल्यास फलप्राप्ति होते व सतत श्रम केल्यास म्हणजे तप केल्यास राज्यप्राप्ति होते. तु०–कर्मीं फल तपीं राज्य.

कष्टेंवीण फळ नाहीं, कष्टेंवीण राज्य नाहीं—वर पहा.

कष्टाळू——कष्टाळू उंटाला वाळवंटांतील दौड आणि लबाड मांजराला घरांतील दूध—" ज्याला काम करण्याची हौस असते त्याच्यावरच मग सर्व कामाचा बोजा पडूं लागतो, हा दुनियेंतला न्यायच आहे. ' कष्टाळू उंटाला वाळवंटांतील दौड आणि लबाड मांजराला घरांतील दूध' अशा अर्थाची आरबी भाषेंत एक म्हणच आहे." –इंदू काळे व सरला भोळे.

कस——कसास लागणें–उतरणें—सोन्याची परीक्षा कसावरून होते, त्याप्रमाणें परीक्षा होणें. ' जरी उतरेल माझ्या कसीं । '–मुक्त. ' तुजविणें दुसरें दिसतें न ज्या । जन कसा न कसा उतरे तुझ्या । ' –लेलेशास्त्री.

कसचा——कसचें काय आणि कसचें काय—कशाचा कशास संबंध नाहीं, मुळांतच कांहीं नाहीं अशी स्थिति. कांहीं नाहीं, कांहीं विशेष नाहीं, असें उडवून लावण्यासाठीं म्हणतात. उडवाउडवीचें उत्तर.

कसणी——कसणी ढिली करणें—[कसणी = कसा पैशाचा] पैसा खर्च करणें.

कसणें——कसे हाडा, पण न बुजे खाडा—पोटाचा खळगा इतका मोठा आहे कीं, कितीहि श्रम केले तरी तो भरत नाहीं. मनुष्य जन्मभर पोटाकरितां श्रम करीत असतो.

कसतलो कसता, मेरेवेलो पवेता—(गो.) कष्ट करणारा मुकाट्यानें काम करीत राहिला आहे आणि कडेला स्वस्थ बसून राहिलेला मात्र कुरकुर करतो. कांहीं माणसें बिनबोभाट आपलें स्वीकृत कार्य करीत राहातात; पण असेहि कांहीं लोक असतात, कीं कांहींहि न करतां केल्याचा बोभाटा मात्र करायचा आणि जग आपलें कौतुक करीत नाहीं म्हणून कुरकुरत राहायचें.

कसतल्या पेज आनी मेरेवेल्या शीत ?—(गो.) शेतांत कष्ट करणाऱ्याला पेज आणि शेताच्या कडेला नुसतें बसून रहाणाऱ्याला मात्र भात वाढायचा, हा उलटा न्याय नाहीं का ?

कसबी——कसब्याला कसबी शत्रूप्रमाणें पाहतो—एकाद्या गोष्टींत कुशल असलेला मनुष्य आपल्या प्रतिस्पर्ध्याला शत्रूप्रमाणें लेखतो. कलावान लोकांत परस्परांबद्दल मत्सर वाटत असतो.

कसबीण——कसबिणीच्या पोरास दिवसास बाप नाहीं व रात्रीस आई नाहीं—वेश्येच्या मुलास दिवसा कोणी बाप नसतो, कारण तिच्याकडे येणारे पुरुष सर्व रात्रीं येतात व रात्रीं ती आपल्या व्यवसायांत दंग असल्यामुळें तिला आपल्या मुलाकडे पहावयास वेळ होत नाहीं. त्यामुळें त्यास रात्रीं आईचें सुख मिळत नाहीं.

कसर——कसर करणें—१ काटकसर करणें; थोडक्यांत आटोपावयास पाहणें; कमतरता करणें. २ज्वरांश येणें; थोडा ताप येणें; चोरटा ताप येणें.

कसर काढणें—१ एखाद्या गोष्टींत झालेला तोटा दुसरीकडे भरून काढणें; एका गोष्टींतील न्यून दुसरीनें पुरें करणें. २ एखाद्या कामांत थोडा फार लाभ करून घेणें.

कसरकुसर; कुसरात—न्यून; उणेंपणा; कमीपणा; कमताई.

कसरदिढी—जो मनुष्य पैशाऐवजीं ऐन जिनसामध्यें धारा भरतो त्यास धान्य वगैरेच्या कसरीबद्दल म्हणून ऐन धान्याच्या दीडपट धारा द्यावयास लागणें.

कसर येणें—अंगावर ज्वराचा कांटा येणें; हींव येणें; बारीक ताप येणें. (गो.) कसरचें.

❀ **कसर करील तो पोट भरील**—जो काटकसर करतो त्याला कधीं अन्नाची ददात पडत नाहीं.

कसर——कसर लागणें—एखादा लोंकरीचा कपडा कसरीच्या किड्यानें खाणें.

कसरत——कसरत करी तो पोट भरी--जो कष्ट करतो तो पोट भरून खातो. कष्ट पहा.

कराल करसत, जाल घसरत—करणें पहा.

कसाई——कसाईके घरमें दयाका खोज—कसायाच्या घरीं दयेचा तपास करणें. कसायाच्या घरीं दयेचा लवलेशहि सांपडणें शक्य नाहीं.

कसायाच्या घरीं कल्लोड आणि अकर्मी वाजवी ढोल—१ कसायाच्या घरीं जर कालवड गेली तर ती कापावयास त्यास कोणतीहि वेळ, वार किंवा विधि लागत नाहीं. किंवा २ कसायाच्या घरीं कालवडीस पोंचवून कुकर्मी मनुष्य त्यांत आनंद मानूं लागतो. किंवा ३ कसायाच्या घरीं गुरूं चालून जातें पण क्रियाहीन माणूस मात्र नुसता शंख करीत राहतो. (!)

कसायाच्या घरीं सण आणि शेळ्या मेंढ्यांचें मरण—कसायाच्या घरीं सण असला म्हणजे अर्थात् शेळ्यामेंढ्यांची कत्तल व्हावयाचीच. त्याप्रमाणें मोठ्या लोकांकडे कांहीं कार्यप्रस्थ असलें म्हणजे त्यांच्या आश्रितांची तारांबळ उडाल्याशिवाय राहात नाहीं, त्यास दुप्पट राबावें लागतें. तु० --राजाच्या घरीं लग्न, मशालजीचा घातवार.

कसायाला गाय धारजिणी--गाय इतरांना लाथा मारील पण कसायापुढें अगदीं गरीब होते. त्याचप्रमाणें करड्या मालकांचीं कामें नोकरलोक अचूक करतात, पण गरीब दयाळू मालकाच्या कामाची टाळाटाळ करतात.

कसाब——कसाई पहा. कसाबाची जात--पाषाणहृदयी; खाटीक. "शुद्ध कसावाच्या जातीचे असतात म्हणे नास ! कमल दांत-ओठ खात उद्गारली. "-दौलत पृ. ३६.

कसालत——कसालत काढणें-सोसणें--हाल काढणें; त्रास, ओझें सोसणें; जाच काढणें.

कसूर——कसूर कोताई—उणेपणा; कमीपणा; न्यून; तूट; व्यंग.

कसा-कसी-कसें——कशास कांहीं ठिकाण नसणें--मुळांत कोणताहि आधार नसणें; अगदीं निराधार स्थिति असणें; कांहीं नसणें. 'कशास कांहीं ठिकाण नसतांहि आपल्या अंगची योग्यता लोकांस अधिक वाटते'-नि ३२०.

कसेंबसें—मोठ्या कष्टानें; जेमतेम. 'करुनिया चित्त स्थिर कसेंबसें ।'-लेलेशास्त्री.

कसेसेंच होणें-वाटणें—(बायकी) बेचैन होणें; मनाला हुरहुर वाटणें; चमत्कारिक वाटणें. 'तुला कां बरें आज कसेंसेंच वाटतें ?'-खरा रजपूत वीर.

कसेंहि करून; कसें करून—येन केन प्रकारेण; कोणत्याहि प्रकारें; कोणतीहि युक्ति योजून; कोणत्याहि मार्गाचा अवलंब करून.

❀ **कशांत काय आणि फाटक्यांत पाय**—जेथें कांहीं शेंडा बुडखा नाहीं, कोणत्याहि गोष्टीस कांहीं आधार नाहीं, सर्वच अव्यवस्थित व घोटाळ्याची स्थिति असेल अशा वेळीं वापरतात.

कशाला कांहीं घडे, सासूसाठीं जांवाई रडे; कशासाठीं काय घडे, सासूसाठीं जांवई रडे—१ सासूसाठीं जांवयानें रडणें अस्वाभाविक आहे आणि जांवई तसें कांहीं करीत आहे असें दिसल्यास त्यांत त्याचा स्वार्थ आहे, असें अनुमान काढावें. २ अर्थाअर्थी दोन गोष्टींचा कांहीं संबंध नसतां त्यांचा अकल्पित रीतीनें संबंध जोडला जातो, तेव्हां म्हणतात.

कशास ठिकाणा नाहीं आणि बुधवारीं लग्न; कशास नाहीं ठिकाण बुधवारचें लग्न; कशांत कांहीं नाहीं, बुधवारचें लग्न—[कशास=कोणत्याहि गोष्टीस. कसा=रुपयांची पिशवी.] कांहीं तयारी नाहीं, जवळ पैसा नाहीं व लग्न तर जवळ येऊन ठेपलें. यावरून रिकाम्या, व्यर्थ वल्गना.

कशी काय खबरबात, ताटभर दहीभात—'अशी कां धूसफूस०' पहा.

कशीगे सुने ? घरासारखी—सुनेला जें वळण लागतें तें ज्या घरीं ती राहते त्याच घरचें लागतें. याकरितां तिला दोष देण्यापेक्षां घरांतील पद्धति सुधारावी. जशी जेथें परिस्थिति असेल तशीच तेथील लोक वागणूक ठेवतात.

कशी मागावी भीक, तर तंबाकू खायाला शीक—तंबाखू वगैरे खाण्याचें, किंवा विडी ओढण्याचें अशा प्रकारचें ज्याला व्यसन असतें, त्याला त्याची तलफ भाग-

विण्याकरितां केव्हांतरी दुसऱ्याजवळ मागण्याचा प्रसंग येतो व त्याबद्दल त्याला कांहीं कमीपणाहि वाटत नाहींसा होतो. पाठभेद–मागतां नये भीक तर तंबाकू खायला शीक.

कसें करूं, काय करूं—अनिश्चितता; दोलाचल स्थिति. "लॉर्ड मोइरा (ग. ज.) साहेब 'कसें करूं, काय करूं' हा जप करीत बसतील कीं काय एवढी भीति वाटते.' –एल्फिन्स्टन चरित्र १.२१४.

कसें झालें तरी वाघाचें पिलूं—पराक्रमी मनुष्याची वृत्ति छपून राहात नाहीं, ती कोणत्याहि स्थितींत बाहेर पडते. [एकदां एका वाघानें एका कोल्हीस मारलें तेव्हां तिचें लहान पिलूं होतें तें आणून वाघिणीजवळ दिलें. तिनें त्यास आपलें दूध पाजून इतर पिलांबरोबर वाढविलें. पुढें तिच्या इतर पिलांबरोबर हा कोल्हा एकदां रानांत गेला असतां त्या पिलांनीं एका हत्तीवर चाल केली. हें पाहून कोल्हा घाबरला व घरीं पळून आला. तेव्हां वाघाच्या पिलांनीं त्यास भित्रा म्हणून चिडविलें. मग कोल्ह्यानें वाघिणीस विचारतां तिनें सांगितलें, कीं तूं कोल्हा आहेस व तीं कशीं झालीं तरी वाघाचीं पिलें आहेत. हें ऐकून कोल्ह्यास भीति वाटून तो रानांत पळून गेला.] तु०–शूरोसि कृतविद्योसि दर्शनीयोसि पुत्रक। कुले तस्मिन् प्रजातोसि गजो यत्र न हन्यते।–पंचतंत्र.

कसेंहि तरी वाघाचें कातडें—वरीलप्रमाणें.

कसू——कसू व्हेल्यारि गाइ, कोटग्यांतु व्हेल्यारि बैलु––(गो.) दोरीनें नेल्यावर गाय, तसराळ्यांतून नेल्यावर बैल. चालरीतीवरून ज्ञान होणें.

कसोटी——कसोटी कसणें–– १ परीक्षा करणें. २ पेंच घालणें. ३ रतिप्रसंगीं सुखक्रीडा करणें. 'शांत होईल जीव जरा, फिरून मग मला कसोटी कसा। नवीन नवतीचा बहर नूतन जी बोली आली रसा॥' –होला ८४.

कसोटीस उतरणें––परीक्षेंत पूर्णपणें उत्तीर्ण होणें; पसंतीस येणें; मान्य होणें. 'स्वभावें सत्त्वाचें तदुपरि कसोटीस उतरे।'–सारुह ५.७६.

कसोसी——कसोसींत आणणें—कष्टसाध्य करणें; जेरदस्तींत आणणें.–पाब १६.

कस्तुरी——कस्तूरि धांपल्यारि परमळु धांपत वे? (गो.) कस्तुरि झांकून ठेविली तरी तिचा सुवास झांकतो का?

कस्तुरीचा वास लपत नाहीं—ज्या वस्तूच्या अंगीं चांगला गुण आहे तो आपला प्रभाव दाखविल्याशिवाय राहात नाहीं.

कस्ते——कस्ते घेणें—१ एका बाजूस होणें; अंग चोरून, बाजूस होऊन दुसऱ्यास वाट करून देणें. २ माघार घेणें; अंग काढून घेणें; नमतें घेणें.

कस्पट——कस्पटासमान मानणें–मोजणें–लेखणें–गणणें–धरणें—अतिशय क्षुल्लक समजणें; मुळींच पर्वा न करणें.

कहना——कहूं तो मा मारी जाय, न कहूं तो बाप कुत्ता खाय—(हिं.) बोललें तर आईस मार मिळतो, न बोललें तर बापास कुत्रा खावा लागतो. [एका मनुष्यानें एक दिवशीं सागोतीकरितां एक बकऱ्याचें पोर आपल्या बायकोजवळ आणून दिलें. ती स्त्री व्यभिचारी असल्यानें तिनें तें आपल्या जारास शिजवून घातलें. किंवा तिच्या निष्काळजीपणानें तें मांजरानें नेलें. नवऱ्यास तर सागोती घातली पाहिजे म्हणून तिनें कुत्र्याचें पोर मारून त्याचें मांस शिजवून ठेवलें. ही सर्व गोष्ट तिच्या (सावत्र) मुलानें पाहिली. सायंकाळीं बाप येऊन जेवावयास बसल्यावर त्या मुलास ही गोष्ट बापास सांगावी किंवा नाहीं असें मोठें कोडें पडलें; कारण सांगितलें तर आईस मार मिळण्याची भीति, न सांगितली तर बाप निषिद्ध असें कुत्र्याचें मांस खाणार! याप्रमाणें त्याची द्विधा स्थिति झाली] इकडे आड व तिकडे विहीर अशी स्थिति होणें.

कहे जमीनकी, सुने असमानकी—(हिं.) जमीनीबद्दल सांगतां आकाशाबद्दल ऐकणें. एक सांगितलें असतां भलतेंच ऐकणें.

कहर——कहर–कहार मांडणें—(बायकी) अतिशय त्रास देणें; उच्छाद आणणें; अतिशय गडबड करणें; भंडावून सोडणें.

कहां——कहां बुढीया, कहां राजकन्या—कोठें म्हातारी व कोठें राजकन्या. ज्या गोष्टींची तुलना होऊं शकत नाहीं अशांची बरोबरी करणें. तु०–कोठें इंद्राचा ऐरावत व कोठें शामभटाची तट्टाणी.

कहां भोजराजा, कहां गंगु (गंगा) तेली—कोठें भोजराजा व कोठें गंगातेली (गंगराज तैलप). येथें मुंजराजालाच चुकीनें भोज संबोधून म्हण रचिली आहे. मुंजाचें राज्य तैलपानें घेतलें तेव्हांची त्यांची तुलना केली आहे.

भोजराजा उदार तर गंगराज तैलप त्या मानानें कांहींच नाहीं. तु०– गते मुंजे यशःपुंजे निरालंबा सरस्वती ।

कहाती——कहातीस येणें—विकारवश होणें; कुलुलीस येणें; क्रोधाविष्ट होणें.

कह्या——कह्यांत नसणें--ताब्यांत, आज्ञेंत, हुकमांत नसणें; आटोक्यांत, आवांक्यांत नसणें.

कळ——कळ लावणें--चिथावून देणें; भांडण उत्पन्न करणें. ‘ तिनें घरांतल्या घरांत बारीक कळ लावण्यास अगोदरच प्रारंभ केला होता. ’ –रंगराव.

कळीचा नारदमुनि—भांडण लावणारा; कलह उपस्थित करणारा; नारद हा सर्वत्र भांडणें लावण्याबद्दल पुराणांत प्रसिद्ध आहे.

कळीवांचून कांटा निघणें--भांडणतंटा, कलागत वगैरे कोणत्याहि प्रकारचा त्रास केल्याशिवाय एखादी अनिष्ट गोष्ट नाहींशी होणें; औषधावांचून खोकला जाणें.

❀ **बोलतां कळ, धुतां मळ**–उत्तर प्रत्युत्तरानें भांडण उत्पन्न होतें व वाढतें. मुळींच बोललें नाहीं तर भांडण होण्याचें कारण नाहीं. त्याप्रमाणेंच धुवावयास लागल्यावर कपड्यांतून मळ बाहेर पडतांना दिसतो; जितकें धुवावें तितका मळ येतच असतो. पाण्यांत कपडा घातलाच नाहीं तर त्यांतून मळ बाहेर पडणार नाहीं. तेव्हां प्रथम कोणतेंतरी लहान निमित्त आपण दिलें तरच कलागत लागते; नाहींतर लागण्याचें कांहीं कारण नाहीं.

कळ नाहीं कुठें, झाडाला झटे—दुसऱ्या कोणाबरोबर भांडावयास न मिळाल्यास झाडाबरोबर भांडणारा; अत्यंत भांडखोर; आपण होऊन भांडण उकरून काढणारा.

कळीचा कांटा आणि बोरीचा पेठा–बोरीच्या कांट्यांच्या गड्ड्याप्रमाणें टोंचणारा व भांडण लावणारा.

कळ——कळ पडणें—(नकारात्मक प्रयोग) स्वस्थता मिळवून देणें; चैन पडूं देणें. ‘ सुजना जेंवि खळ कळ क्षणहि पडो दे नरा न देवा त्या । ’– मोकर्ण ११.५४. ‘ न कळ पडे सकळ पडे व्यसनीं पाहे सुयोध न हित रणीं ।–द्रोण २१.१६१.

कळ——कळ दाबणें—मर्मस्थानीं हात घालणें; वध होईल असें करणें; पेंचांत धरणें.

कळक——कळकी नारायण—कळकासारखा अतिशय उंच मनुष्य.

कळक्क——कळक्कांतुलो पेट्ट; कळखांतलो पेट—(गो.) काळोखांत बसलेला मार, गुप्तशासन.

कळण——कळणांतली भांगरा—आरशांतलें धन; प्रतिबिंबांत दिसणारें सोनें; प्रत्यक्ष नव्हे पण भासणारी वस्तु.

कळणें——कळत न कळत--१ न समजून; चुकीनें; दुर्लक्षामुळें; अज्ञानतः. २ अगदीं अल्प; न समजण्यासारखा, स्पष्टपणें कळत नाहीं असा. ‘ ताप कळत न कळत येतो. ’ ३ चुकून; गफलतीनें; प्रमादामुळें; अजाणता. ‘अपराध कळत न कळत केला असल्यास क्षमा करावी. ’

कळे न कळे इतका—अत्यंत अल्प; किंचित्; लक्ष्यांत न येण्याजोगा.

❀ **कळतें पण वळत नाहीं**—एखादी गोष्ट मनाला पटते पण तशी कृति हातून होत नाहीं, अशा वेळीं म्हणतात. समजतें पण उमजत नाहीं.–शाब २.१९८.

कळे ती कळमळे—जीस दुःख वेदना समजतात, तिचाच जीव कासावीस होतो.

कळेना वळेना, भाजी भाकर गिळेना (मिळेना)--स्वतःला कांहीं अक्कल नसतां, जो मनुष्य स्वस्थ बसून न राहतां कांहीं तरी व्यर्थ गडबड करीत असतो त्यास म्हणतात. पाठभेद-कळेना वळेना, दीड भाकर गिळेना.

कळप——कळपांतलें गुरूं--ज्याप्रमाणें गोठ्यांतल्या गुरांपेक्षां रानांतील नवीनच आलेलें कळपांतलें गुरूं कमी माणसाळलेलें असून थोडें फार स्वैर वागतें, त्याप्रमाणें रीतभात न लागलेला, खेडवळ, असंस्कृत मनुष्य; रानदांडगा झोंड मनुष्य.

कळंबचें——कळंबलेल्या वाटयांतु ताकशीत वाकेले गादी–(गो.) कळकलेल्या वाटींत ताकभात वाढावा त्याप्रमाणें. ताकभात हा चांगला खरा; पण तोच कळकट भांड्यांत घातला तर त्याचें विष बनतें. दात्यानें जें दान करायचें तें सदिच्छा मनांत धरून करावें असा सांगण्याचा हेतु.

कळस——कळस ढळणें--मोडणें; पडणें; नष्ट होणें. ‘ कळस जरि तुझे ये कल्पनेचा ढळावा । त्वरित गुरुकृपेचा सोहळा आढळावा ॥ ’ –सारुह ४.९४.

(मानेचा) कळस ढळणें—मान मोडून पडणें; मरणोन्मुख होणें.

कळस होणें--१ज्याप्रमाणें देवळाचा कळस बांधून झाला म्हणजे तें पूर्णतेस येतें त्याप्रमाणें, पूर्णतेस येणें; अत्यंत उच्च मर्यादा गांठणें; शिखरास चढणें. हा वाक्प्रचार चांगल्या व

वाईट दोही अर्थी वापरतात. 'माझ्या वैभवाचा किंवा दुःखाचा अगदीं कळस झाला.' 'अवरंगजेबाच्या वेळीं मोंगल सत्तेचा कळस झाला होता.' २ शर्थ होणें.

कळसास येणें—१ ज्याप्रमाणें देवळाचा कळस बांधून झाला म्हणजे देऊळ पूर्ण बांधून होतें, त्याप्रमाणें एखादें काम पूर्ण होणें; तयार होणें; शेवटास जाणें. 'कळसा आला प्रबंधु।'—ऋ १०३. २ उत्कर्षाच्या शिखरावर असणें. 'राज्य कळसास आलें. दौलतीचाही कळस झाला.'—पेब १५७.

❀ **कळसावांचून शिखराची पूर्तता नाहीं आणि भैरवीवांचून गाण्याचा शेवट नाहीं**—कळसाची रचना झाल्याशिवाय मंदिर पूर्ण होत नाहीं व भैरवी गाऊन झाल्याशिवाय गाण्याची बैठक आटपत नाहीं.—विविधवृत्त ३०-६-४०.

कळसवणी——१ वधूवरांच्या डोक्यावर ओतावयाचें अभिमंत्रित कलशांतील पाणी. २ वधूवर न्हात असतां वराच्या अंगावरील पाणी वधूच्या अंगावर पडतें तें; वराचें स्नानाचें उष्टें पाणी. 'पुढें न्हाणें, कळसवणी, आंबा शिंपणें वगैरे होऊन वधूवर चौकावर न बसतां ओटीवर बैठकीवर बसून राहतात.'—मसाप ४.४.२५६.

कळसूत्र——**कळसूत्रीं बाहुलें**--जुन्या बाहुल्यांच्या खेळांत बाहुल्या सूत्रधाराला वाटेल तशा नाचवितां येत; कारण बाहुल्यांच्या अंगांतून दोऱ्या नेलेल्या असत. (ल.) दुसऱ्याच्या म्हणण्याप्रमाणें वागणरा माणूस. स्वतःची बुद्धि नसलेला माणूस. 'बाजीरावाचें कळसूत्री बाहुलें आपले हातीं बरें सांपडलें असें बाळोबास वाटलें.'—अस्तंभा १९.

कळा——**कळाखाऊ**—१ कळाहीन; घाणेरडा. २ अब्रू घालविणारा; काळिमा आणणारा. 'घरीं कळाखाऊ अबला नसावी अशी।'—पला ८०.

कळा जाणें--(व.) अवकळा येणें; तेज, तजेला, सुस्थिति नाहींशीं होणें; अवनत दशेस येणें. 'त्याच्या अठरा कारखान्यांच्या गेल्या कळा।'—ऐपो १४२.

❀ **कळा ना कथा, चव ना चोथा**--कोणतेंहि रंग, रूप वगैरे नसणें.

कळा नाहीं कांति नाहीं, युक्ति बुद्धि कैसी त्याच्या ठायीं--ज्याच्या तोंडावर कांहीं तेज दिसत नाहीं त्याच्या अंगीं बुद्धि, चातुर्य कोठून असणार.

कळाकळा——**कळाकळा करणें**--कंटाळा येईल अशा रीतीनें पुनः पुनः सांगणें; हेकेखोरपणा करणें, कटकट लावणें; भिकेची टकळी लावणें; किरकिर लावणें; पिरपिर लावणें.

कळांतर——**कळांतराचे आशे, मुद्दल नाशे**--अधिक व्याजाची आशा केली म्हणजे मुद्दलहि बुडण्याची वेळ येते.

कळाशी——**कळाशी बसणें-बसविणें**—बंद, कायम होणें, करणें. 'यदुपतिविरहाची बैसवीली कळासी॥'—सारुह ३.११०.

कळी——**कळी उमलणें-खुलणें**—१ फूल विकसणें; पुष्पविकास होणें; फूल फुलणें. २ मन, चेहरा प्रसन्न होणें, प्रफुल्लित होणें. (रुसवा वगैरे जाऊन). ३ अबोलक्या माणसानें मन मोकळेपणानें बोलावयास लागणें.

कळी——**कळी उमलणें**—कलि उद्‌भवणें; भांडणतंटा सुरू होणें; कलह लागणें; स्पर्धा लागणें.

कळी विकत घेणें--मुद्दाम भांडण ओढवून घेणें. 'विकत कळि जयानें घेतली आजि मोलें।'—सारुह ३.७८.

कळीत——**कळीत करप**--(गो.) कळविणें; समज देणें; सूचना देणें.

कळेर——**कळेर धमणें फोट्टा**--(गो.) मध्येंच अवसानघात करणें.

कक्षा——**कक्षापति-कक्षाधीश**--काखा वर करून दाखविणारा मनुष्य; ज्या जवळ कवडीहि नाहीं असा अत्यंत दरिद्री मनुष्य.

❀ **कक्षापति कीं लक्षापति**—ज्यानें काखा वर केल्या आहेत त्याला कोणाची पर्वा नसते. तो लक्षाधीशाइतकाच इतरांबद्दल बेपर्वा असतो. तो कोणाचीहि भीड मुरवत ठेवीत नाहीं.

कां——**कांग कांग म्हशी, दूर नेशी**—'अग अग म्हशी मला कां नेशी' पहा.

कांग जिभे लवशी, आपली आपल्याच भोंवशी—(व.) आपण आपल्या तोंडानें आपल्याबद्दल अमंगल किंवा अशुभ बोलूं नये. कारण आपल्यालाच तें भोंवण्याचा संभव आहे. नेहमीं शुभ बोलावें.

कांग बाई अशी तशी, तर माझी आज एकादशी--एखाद्या स्त्रीस कृश कां असा प्रश्न विचारल्यास खरें उत्तर देण्याचें टाळून ती एकादशीच्या उपोषणाची सबब सांगते. यावरून वास्तविक गोष्ट लपवून भलतेंच कारण दाखविणाऱ्याच्या बाबतींत ही म्हण वापरतात.

कांग बाई अशी, शिकलें तुझ्यापाशीं--एखाद्या गैरवर्तणूक करणाऱ्या स्त्रीस तिच्या वागणुकीबद्दल विचारावयास जावें तों ती आपल्यावरच तसा आळ घेऊं लागली असतां म्हणतात. स्वतःस दोष देण्यास जागीं असल्यास दुसऱ्याचे दोष काढण्याच्या फंदांत पडूं नये. गुरूची विद्या गुरूस फळते.

कांग बाई उभीं, घरांत दोघी तिघी--घरांत माणसें काम करण्यास असल्यावर आळसांत दिवस घालविणें. किंवा घरांत दोघी तीघी जावा किंवा सुना असून ही बाई उभीच्या उभी, म्हणजे सर्व काम हिच्यावरच पडतें.

कांग बाई कुथती, तर बसली जागा रुतती--श्रीमंत आयतखाऊ माणसाला आपल्याला काहींतरी होत आहे अशी भावना असते. सर्व असून उगीच कुरकुर.

कांग बाई दुबळी, तर म्हणे निघालें वेगळी--एकत्र कुटुंबांतून वेगळे निघाल्यावर जबाबदारी अंगावर पडते, काम व काळजी फार असते त्यामुळें शरीर दुबळें राहातें. समाईक कुटुंबाच्या बाजूची ही म्हण आहे.

कां ग बाई धांवती, काल निघाली सवती--वरप्रमाणेंच. एखाद्या बाईस तुझी धांवाधांव कां असें विचारतां ती सांगते कीं, कालच वेगळी निघालें आहें म्हणून. याप्रमाणें वेगळें निघाल्यावर स्वतःच सर्व कामें करावीं लागतात, घरांत कोणाची मदत मिळत नाहीं, तेव्हां धांदल होते.

कां ग बाई रोड, (तर म्हणे) गांवाची ओढ--[ओढ=काळजी] पुढील म्हण पहा.

कांग बाई रोडकी, तर गांवाची दसाभर थोडकी--एका बाईला रोड कां झालीस म्हणून विचारतां सर्व गांवाची खटपट फार पडल्यामुळें मी रोड झालें, असें ती सांगते. यावरून नसत्या उठाठेवी करून स्वतःला त्रास करून घेणें.

कांग बाई लाल, घरीं चौघांचा माल--एखादी बाई फार श्रीमंतीची ऐट आणूं लागली पण त्याचें खरें कारण तिच्या घरीं अनेकांची मालमत्ता गडप झाली होती हें होय. अनेकांस लुबाडून घर भरल्यावर आपल्या वैभवाचा दिमाख दाखविणारांस उद्देशून ही म्हण आहे.

कांग म्हारणी उताणी, शींगट भरलें नाचण्यांनीं (दाण्यांनीं)--थोडे दाणे जवळ असले म्हणजे खालच्या जातीचे लोक फार शेफारून जातात. जोंपर्यंत जवळ थोडें फार खावयास आहे तोंपर्यंत काम म्हणून करावयाचें नाहीं. सर्व वेळ आळसांत घालवायाचा अशी कांहीं लोकांची वृत्ति असते, तीस अनुलक्षून ही म्हण वापरतात.

कांग म्हारणे गांवांत, तर नाचण्या तुझ्या पेवांत--महारणीस गांवांत येण्याचें कारण विचारतां माझ्या बलुत्याच्या नाचण्या मागावयास आल्यें आहें किंवा त्या नसल्या तर निदान माझ्या घरांत कांहीं नाहीं, तेव्हां निदान भीक म्हणून तरी नाचण्या दे, असें तिनें उत्तर दिलें. जोंपर्यंत घरांत नाचण्या शिल्लक आहेत तोंपर्यंत महारीण घराच्या बाहेर पडावयाची नाहीं व गांवांत दिसावयाची नाहीं व त्या सरल्या तरच ती गांवांत यावयाची. वरप्रमाणेंच.

कारे कुंथतोस, म्हणे बसल्या जागीं करमेना--पुढील म्हण पहा.

कारे पाहुण्या कुंथतोस, म्हणे बसला जागा रुततो--सर्व यथास्थित असून एखाद्या मनुष्यास कुरकुर करावयाची संवय असली म्हणजे तो कांहींतरी निमित्त काढून कुरकुर करीत असतो.

कां रे बोक्या येरझारी, भाग्य आलें आमुच्या घरीं--आपल्या वैभवाची टिमकी वाजविण्याची खोड कांहींना असते, तिला उद्देशून म्हणतात.

कारे भाता थोडा, तर कोंडयांनीं घातला वेढा--१ भाताच्या दाण्यास वर तूस असतें तें जवळजवळ तांदुळाइतकेंच असतें. त्यामुळें पुष्कळ भात कांडलें तरी तूस जाऊन तांदूळ थोडेच होतात. २ भात कांडून त्याचे तांदूळ करतांना कांहीं कोंडा निघतो पण तो बाजवी तितकेंच भात कांडलें तर योग्य प्रमाणांत निघतो; पण जर भात फार कांडलें तर तांदूळहि कुटले जाऊन त्यांचा कोंडा होतो व तांदूळ योग्य प्रमाणापेक्षां कमी होतात. तेव्हां कोणतीहि गोष्ट प्रमाणांत न केली तर तीपासून थोडी फार घस लागल्याशिवाय राहात नाहीं, हें दाखविण्याकरितां ही म्हण योजतात. पूर्वी भात कांडण्याची मजूरी म्हणून कोंडा देत असत, म्हणून कांडपिणी तांदूळ अधिक कांडून कोंडा जास्त करीत असत.

कारे महारा उताणा, तर म्हणे हातीं दीड आणा--जोंपर्यंत जवळ कांहीं तरी आहे, निदान एकवेळचें जेवण भागविण्यापुरतें तरी साधन आहे तोंपर्यंत काम म्हणून करावयाचें नाहीं. केवळ आळसांत वेळ घालवावयाचा, अशी कांहीं लोकांची, विशेषतः मजूरवर्गाची वृत्ति असते तीस अनुलक्षून ही म्हण योजतात. तु०--कांगे म्हारणी उताणी तर शिंगट भरलें नाचण्यांनीं.

काव पोरी ऊन, मिळाल्याचे गुण--(व.) मुली, एवढी गरम कां होतेस ? रागावतेस कां ? या मुलीच्या रागाचें

कारण शोधूं जातां असें आढळून येतें कीं, जरूरी भासलेल्या पदार्थांची मागणी करतांच तिला तो पालकाकडून मिळतो. आयतें मिळणारा मनुष्य इतरांबद्दल बेपर्वा असतो.

कां——कां केलेल्या तोंडानें कर्र करचें--(गो.) " कां " केलेल्या तोंडानें " कर्र " करणें.

कां करतलो कायळो ना, शीं करतलो शिरलो ना-- (गो.) ' कां ' (काव !) करणारा कावळा नाहीं, ' शीं ' करणारा सरडा नाहीं. तु०-All that glitters is not gold.

काईम——काईमदाईम; काएम दाएम--निरंतरचा; कायमचा; सतत चालणारा. कायम पहा.

काईल-काहील——काइलींतला खडा--उंसाच्या रसाच्या काइलींत जर एखादा खडा राहिला व तो रस उकळून गूळ होईपर्यंत राहिला, तर तो बराच कणखर असला पाहिजे तरच तो टिकून राहील. त्याप्रमाणें एखादा मनुष्य तावून सुलाखून निघालेला कसोटीस उतरलेला असला म्हणजे त्यास म्हणतात.

काऊ——पक्ष्यांत काऊ व माणसांत न्हाऊ-- पक्ष्यांमध्यें कावळा हा फार धूर्त समजला जातो त्याप्रमाणें माणसांत न्हावी हा धूर्त मानतात. तु०—नराणां नापितो धूर्तः पक्षिणां चैव वायसः । दंष्ट्रिणां च शृगालस्तु श्वेतभिक्षुस्तपस्विनाम् ॥ -पंचतंत्र ३.७३.

काऊस——उंसाच्या पोटीं काऊस (जन्मला)— उंसाच्या शेवटीं गवतासारखा तुरा असतो त्याचा कांहीं उपयोग नसतो, त्याप्रमाणें श्रेष्ठ मनुष्याच्या कुलांतहि हीन मनुष्याची कधीं कधीं उत्पत्ति होते. तु०—हिऱ्याच्या पोटीं गारगोटी.

काक——काकतालीय न्याय; कागटाळी न्याय- मूळ संस्कृतमध्यें कावळा ताडाच्या झाडाजवळ येणें व त्याचवेळीं ताडाचें फल त्याच्या डोक्यांत पडणें किंवा प्रहार होणें; याप्रमाणें यदृच्छेनें आकस्मिक लाभ किंवा हानि घडणें या अर्थी योजतात. मराठीमध्येंहि एखादी गोष्ट आकस्मिकपणें घडणें याच अर्थी ही म्हण योजतात; पण ती आकस्मिक लाभहानि होणें या अर्थी नसून सामान्यतः दोन गोष्टी एकाच वेळीं यदृच्छेनें घडणें; मग त्या इष्ट किंवा अनिष्ट कशाहि असोत अशा अर्थी योजतात. केवळ कर्मधर्मसंयोगानें, यदृच्छेनें, दैवगतीनें एखादी गोष्ट घडून येणें. 'ऐसी कर्माची गति गहन । एथें काकतालीय न्यायें जाण । अवचटें लाभे माणूसपण । भवाब्धितारण महातारूं ॥'–एभा. २०.१७३. 'प्रस्तुत पुस्तक लिहिण्यास काकतालीय न्यायानें आम्ही कारण झालों.'–टि ४.१८१. ' पावलों हा देह कागटाळी न्यायें । न घडे उपायें घडों आलें । '–तुगा १६१६. ' या नाटकांत स्वामी आले आहेत तें कल्पित पात्र आहे. लोक त्यांना श्रीरामदास स्वामी समजतात ! समर्थांशीं जर कोणाला या स्वामींचें साम्य दिसत असेल तर तो काक० होय.' –शिवसंभव (प्रस्तावना).

काकदंतपरीक्षा--कावळ्यांचे दांत तपासणें. कावळ्याला दांतच नसतात, तेव्हां एखाद्या गोष्टीची व्यर्थ खोल चिकित्सा करणें, निष्फळ काथ्याकूट करणें.

काकवंध्या--कावळीस आयुष्यांत एकदांच पिलूं होतें. यावरून केवळ एकदांच प्रसूत झालेली स्त्री.

काकशंका--कावळा ज्याप्रमाणें नेहमीं साशंकपणें बसतो त्याप्रमाणें कोणत्याहि गोष्टींत आशंका बाळगणें. 'संकोचें अंग खाणें असुखद बसणें काकशंकाप्रमाणें ।'–किंसु ८३.

काकस्नान--कावळ्यासारखें उडत उडत, अर्धवट केलेलें स्नान; मुसळस्नान.

काकाक्षिगोलकन्याय--कावळ्याला जरी दोन डोळे असले तरी बुबुळ एकच असून त्या बुबुळाच्या योगानें त्यास तें दोन्ही डोळ्यांत फिरवून पाहतां येतें अशी समजूत आहे. यावरून एकाच शब्दाचे दोन अर्थ करून एखादी गोष्ट साध्य करून घेणें; एकाच वस्तूचा दोन कामीं उपयोग एकाच वेळीं करून घेणें, अशा अर्थी या न्यायाचा उपयोग करतात.

*** काकः काकः पिकः पिकः ।--**कावळा तो कावळा व कोकिळ तो कोकिळ. कावळ्याला कधींहि कोकिळाची सर येणार नाहीं. हीन मनुष्यानें कितीहि खटपट केली तरी त्याला श्रेष्ठ मनुष्याची बरोबरी करतां येत नाहीं. सबंध श्लोकः-- काकः कृष्णः पिकः कृष्णः को भेदः पिककाकयोः । वसन्तसमये प्राप्ते काकः काकः पिकः पिकः ॥

काकदृष्टीनें पाहावें, पण स्वतःच्या दोषांकडे--माणसानें आपले दोष बघण्याकडे व ते काढून टाकण्याकडे फक्त अतिशय लक्ष द्यावें. दुसऱ्याच्या बाबतींत काकदृष्टि ठेवूं नये.

काकमैथुन पाहावें, तर सहा महिन्यांत स्मशानांत (मसणांत) जावें--मनुष्यास काकमैथुन दिसलें तर तो सहा महिन्यांत मृत्यु पावतो अशी समजूत आहे. याकरितां आपल्या मृत्यूची खोटीच बातमी पसरविण्याचीहि पद्धति आहे.

काकोपि जीवति चिरं च बलिं च भुंक्ते ।--ज्या मनुष्याचा जगामध्यें दुसऱ्या कोणासहि उपयोग होत नाहीं,

त्याच्या जगण्यापासून कांहीं एक फायदा नाहीं. काकबलीवर पुष्कळ काळ जगणाऱ्या कावळ्याप्रमाणें त्याचा जन्म निरर्थक होय. सबंध सुभाषित असेः--(अ) यो नात्मनो न च गुरौ न च भृत्युवर्गे, दीने दयां न कुरुते न च बन्धुवर्गे । किं तस्य जीवितफलेन मनुष्यलोके, काकोपि जीवति चिरं च बलिं च भुंक्ते ॥–हितोपदेश. (आ) यज्जीव्यते क्षणमपि प्रथितं मनुष्यैः विज्ञानशौर्यविभवार्यगुणैः समेतम् । तत्तेषु जीवितफलं प्रवदन्ति तज्ज्ञाः काकोपि जीवति चिरंच बलिंच भुंक्ते ॥ –पंचतंत्र १.२०-२१.

काकडी——आठ हात काकडी, नऊ हात बी-- अतिशयोक्तिपूर्ण गप्पा; मोठ मोठ्या लंब्याचवड्या बाता.

काकडीची चोरी, बुक्याचा मार-- क्षुल्लक अपराधास शिक्षाहि त्याच प्रकारची असली पाहिजे. काकडी पहा.

कोल्हें काकडीस राजी-- आपला कांहीं हक्क नसतां फुकट जें थोडें मिळेल त्यावर खूष असणाऱ्या माणसाबद्दल म्हणतात.

कांकण——(हातांत) कांकण घालणें-भरणें-- कंकण पहा. हातांत बांगड्या भरणें; स्त्रीप्रमाणें वर्तन करणें. भ्याड पुरुषास म्हणतात. ‘ कांकणें आम्हासम हातीं । भरलेलीं कां हो होतीं ।’ –संग्रामगीतें ४२. तु०–पुरुषा-हातीं कंकण चुडा । नवल दोडा वृत्ति या । –तुगा ९७७.

कांकण फोडणें-- (गो.) १ वैधव्य आणणें; एखाद्या स्त्रीच्या पतीस ठार मारणें. २ कडक शिक्षा करणें; ठार मारणें.

कांकणभर अधिक-जास्त-- थोडेसें जास्त, अधिक; किंचित् अधिक. दोन जवळ जवळ सारख्या वस्तूंची तुलना करून तींत एक थोडी सरस होती असें दाखविण्याकरितां हा वाक्प्रचार योजतात. ‘ नानापेक्षां बापू कांकणभर अधिक शहाणे होते; पण एककल्लीपणाच्या वागणुकीमुळें, त्यांच्या शहाणपणाचा उपयोग स्वराज्यास फारसा झाला नाहीं. ’ ‘ पुरुषाइतकीच किंवा कांकणभर जास्तच बुद्धिमत्ता असून कित्येक शतकें आम्हीं विचार करावयाचें सोडून दिलें. ’ –विविधवृत्त (खास अंक १९२८).

कांकण वाढणें-वाढविणें-- हातांतील बांगडी वगैरे पिचणें, फुटणें. सौभाग्यवती स्त्रीचें कुंकू, बांगड्या वगैरे नष्ट झाल्यास पुसणें, फुटणें या क्रियापदांच्या ऐवजीं वाढणें, वाढविणें या विरुद्ध अर्थाच्या क्रियापदाचा अनिष्ट सूचनेच्या निराकरणार्थ उपयोग करतात.

काकरता——काकरता घेणें-- कच खाणें; हिंमत खचणें; माघार घेणें; मागें पाय काढणें; निसटणें.

काका——काका मामा करणें-- बाबा पुता करणें; विनवणें; मनधरणी करणें; दया भाकणें; दादा बाबा करणें.

❀ नाय निर्गुड माका आणि सर्व औषधाचा काका-- नाय, निर्गुड आणि माका या वनस्पती अत्यंत उत्तम औषधी आहेत. यांचें जो सेवन करील त्याला दुसरें कोणतेंहि औषध घेण्याचा प्रसंग येणार नाहीं.

बापाला बाप म्हणेना, तो चुलत्याला काका कोठून म्हणेल-- ज्याला स्वतःच्या बापाबद्दल आदर वाटत नाहीं तो चुलत्याची कशाची पर्वा करतो. बाप पहा. तु०–बापासि बाप न म्हणे ऐशाला काय होय आजोबा । –मोवन १. ६५.

तूं (तो) नाहीं तुझा (त्याचा) काका दुसरा-- तूं (किंवा तो) नसलास तर नसला, तुझ्या (किंवा त्याच्या) सारखा दुसरा कोणी. अडून राहणार थोडेंच ! एखाद्यावांचून अडणार नाहीं असें दाखविण्यासाठीं तुच्छतेनें योजतात.

काका मामा गा, घरांत असेल तें खा; काका मामा म्हणावें, गांठीं असेल तें द्यावें; काका मामा केहेवाना, ने गांठे होय तो खावाना; काका मामा केहेवाना, गांठन रोटला खावाना– काका मामा म्हणावयाचें व जवळ असेल तें खाऊं घालावयाचें. उगाच सभोंवतीं गोत गोळा करावयाचें व पदरचें खर्चावयाचें, यांत कांहीं लाभ नाहीं. जवळ पैसा आहे तो सर्व सगे सोयरे.

काको, बाबशेणयि घारा जेवलो-- (गो .) काका, बाबाशेणय आज घरीं जेवला. दुसऱ्याच्या घरीं उंड्या उकळण्याची त्याला सवय; असें असतां तो एक दिवस स्वतःच्या घरीं जेवला. (तेवढ्या प्रमाणांत पदरचे पैसे खर्च केले) हेंच एक आश्चर्य.

काकुटा———काकुटे गॅल्यार बिर्मत फुट्टा-- (गो.) दया दाखवायला जावें तर धोंगडें गळ्यांत येतें.

काकुळत-काकळुत——काकुळती करणें-- १ दया येणें; हृदयास द्रव येणें; दयेचा पाझर फुटणें; अंतःकरण द्रवणें. २ अति दीनवाणें मागणें; दीनपणें याचना करणें; अति नम्रपणें, लीनपणें विनंति करणें.

काकुळतीस येणें; काकुळतां करणें; काकुळती येणें-- दयेची याचना करणें; अंतःकरणास पाझर फुटेल अशा रीतीनें गयावया करणें. ‘ किती देवा येऊं तुम्हां काकुळती । काय या संचीतीं लिहिलें माझ्या ॥ ’ –नामदेव.

कांकूं——कांकूं करणें--कुचराई, अळंटळं करणें; नानू करणें; आढेवेढे घेणें. ' सारें एक पंचमांश आयुष्य देखील लोकहिताकडे देण्यांत लोकांनीं कांकूं करावी ना ? ' –टि ४. १४८.

काख——काखा वर करणें--काखेंत कांहीं नाहीं हें दाखविण्याकरितां दोन्ही हात वर उचलून दाखविणें; अगदीं कफल्लक आहों असें दाखाविणें; दिवाळखोर बनणें; आपण खंक झालों आहों असें जाहीर करणें. तु०–ऊर्ध्वांयै दिशे ब्रह्मणेनमः ।

काखा वाजविणें--अतिशय आनंद झाला असतां त्याचे भरांत दंड बगलेवर मारून आवाज काढणें; टिऱ्या पिटणें; अत्यानंदाचें प्रदर्शन करणें.

काखेंतला काढून बाजारांत मांडणें; काखेतून नाहीं नाहीं तसल्या बातम्या उठविणें--एखादी स्वतःच्याच कल्पनेंतील गोष्ट चारचौघांपुढें खरी म्हणून मांडणें; थाप बाजी करणें; बाता झोंकणें; कंडी उठविणें; गप्प झोंकून देणें.

काखेस मारणें--'बगलेंत मारणें' पहा. १ एखाद्यास आपल्या आश्रयाखालीं घेणें; आपलेसें करणें; आधार देणें; साहाय्य करणें; एखाद्यास आपला अनुयायी, आपल्या मताचा बनविणें. २ एखादी वस्तु उपटून निघून जाणें; एखादा पदार्थ घेऊन पळ काढणें; गुंडाळणें.

❀ **काखेंत कळसा, गांवांत(स) वळसा**--स्वतःची वस्तु स्वतः जवळच असतां उगाच धुंडाळीत बसणें. तु०–मांडीखालीं आरी चांभार पोर मारी. खालीं पहा. या म्हणीचा दुसराहि अर्थ करतात--पाण्याच्या निमित्तानें बाहेर पडून गांवांत उगीच फेरफटका करणें. भटक्या वृत्तीच्या स्त्रीबद्दल म्हणतात.

काखेंत धाकटें, माहारवाडा शोधी; काखेंत पोर आणि गांवांत डांगोरा; कांखेंत पोर गांवाला घोर; कांखेंत मूल आणि गांवभर शोध--स्वतःची वस्तु स्वतःजवळच असतां विनाकारण गांवभर शोध करीत फिरावयाचें. वर पहा.

आपलें पागोटें काखेंत मारून मग दुसऱ्याच्यास हात घालावा—आधीं स्वतःच्या वस्तू नीट राखण्याची खबरदारी घ्यावी आणि मग इतरांच्या लुबाडण्याचा प्रयत्न करावा. डोक्यावर घातलेलें पागोटें मारामारी वगैरे करण्याचा प्रसंग आल्यास पडण्याचा संभव असतो, तेव्हां तें प्रथमच सांभाळलें पाहिजे.

ब्राह्मण भोळा, काखेंत सोंवळा—ब्राह्मणांची रीत म्हटली म्हणजे नेहमीं सोंवळें जवळ बाळगावयाचें. ब्राह्मणाला नेहमीं सोंवळ्याओवळ्याशिवाय व जेवणाशिवाय कांहीं दुसरें दिसत नाहीं.

काखेस भोपळा, नी देश मोकळा—एकदां जोगी बनल्यावर कोठेंहि स्वतंत्रपणें फिरण्यास हरकत नाहीं.

काग——कागटाळी न्याय—काकतालीय न्याय पहा.

नाग साग काग—सर्प, सागाचा वृक्ष व कावळा यांचें आयुष्य फार मोठें असतें, यांस हजार वर्षें आयुष्य आहे अशी समजूत आहे. पुढची म्हण पहा.

शंभर वर्षें कागा, हजार वर्षें नागा—कावळ्यास आयुष्य शंभर वर्षें तर सर्पास आयुष्य हजार वर्षें असतें, असें म्हणतात. साप कात टाकून पुन्हां तरुण होतो अशी समजूत आहे.

कागद——कागद भेटविणें—पत्र देणें; चिठी नेऊन देणें; निरोप चिठ्ठी वगैरे पोंचविणें. ' शहराबाहेर मुक्काम करूनि कागद भेटविला । '–पला ८८.

कागदाचा घोडा—कर्जरोखा; हस्तरोखा; कबुलीपत्र वगैरे कागदी दस्तऐवज.

कागदाचीं तारवें करून पोहविणें—एक पोरखेळ. पाऊस पडला असतां मुलें कागदाच्या नावा करून पाण्यांत सोडतात. त्यावरून लहानशा गोष्टीवरून आनंद मानणें; थोड्याशा लाभानें हुरळून जाणें. –नि३०.

कागदावर बसणें—लहान मुलानें धुळाक्षरें संपवून खडें काढावयास आरंभ करणें; मुळाक्षरांच्या पुढें प्रगति होणें.

कागदावर बसविणें-घालणें—लहान मुलाकडून मुळाक्षरांनंतर खडें लिहावयास आरंभ करविणें; खडें लिहावयास शिकाविणें.

कागदी घोडे नाचविणें--प्रत्यक्ष कार्य न करतां केवळ पत्र व्यवहाराचें अवडंबर माजविणें; केवळ पत्रापत्री करणें; कागदोपत्रीं व्यवहार करण्यांत व्यर्थ कालक्षेप करणें. ' कोणतीही नवीन घटना करावयाची जबाबदारी व अधिकार सर्व इंग्रज मंत्रिमंडळाकडेच असल्यानें आयरिश लोकांना संघटनेचे कागदी घोडे नाचवून तरीं काय उपयोग ? '–आयर्लंडचा इतिहास.

कागदी जवान—किडकिडीत अशक्त मनुष्य; काडी पहिलवान; कागदासारखा पातळ हडकुळा मनुष्य.

*कागजकी बनगई नाव, आज न डुबे कल डुबे—कागदाची नाव केली तर ती आज नाहीं उद्या बुडणारच. मुळांतच भक्कम नसलेली गोष्ट फार वेळ टिकूं शकत नाहीं.

जमाखर्चीं न पडे ताळा, पंतीं कागद केला काळा—कितीहि लिहिलें तरी जमाखर्चाची बरोबर तोंड-मिळवणी होईना. म्हणजे अनेक खटपटी केल्या तरी कार्यसिद्धि होत नसल्यास म्हणतात.

कागद ना पत्र, कुशल सर्वत्र—कांहीं कागदपत्र न आल्यास खुशाल म्हणून समजावें. कारण कांहीं बरें वाईट झाल्यास तावडतोब कळतेंच.

कागदाची गोणी, खिळ्याचें ओझें—गोणी जर कागदाची केली व तीवर खिळ्यांचें ओझें लादलें, तर ती फाटल्याशिवाय राहणार नाहीं. कमजोर वस्तूवर अधिक भार घालतां येत नाहीं. ताकद पाहून ओझें लादावें व कुवत पाहून काम सांगावें.

कागदाची हंडी फार तर एकदां चुलीवर चढेल—कागदाच्या हंडींत फार तर एकदां पदार्थ तयार करतां येईल. कमजोर वस्तूपासून अल्प कार्यच करून घेतां येणें शक्य आहे.

कागदाच्या होडीनें समुद्र का पैलपार होणार आहे ?—कागदी होडी कांहीं समुद्रांत टिकाव धरूं शकत नाहीं. अर्धकच्च्या सामुग्रीनें भरीव कामगिरी होऊं शकत नाहीं. अपुऱ्या किंवा अधु साधनांनीं मोठें कार्य घडूं शकत नाहीं.

कागदांत (कागदीं) मेळ, हातांत (हातीं) केळ—जमाखर्चांत पुष्कळ पैसा दिसणें पण प्रत्यक्ष रोख जमा मुळींच नसणें.

कागदी घोडे नाचविणें आणि शहाणपणा मिरविणें—प्रत्यक्ष कार्य न करतां नुसती लिखापढी करून, इतरांस हुकूम पाठवून आपण यंव केलें त्यंव केलें अशी फुशारकी मारणें; विशेषतः स्वतः स्वाऱ्या-शिकाऱ्या न करतां केवळ राजधानींत राहून शहाणपणाच्या गोष्टी सांगणें व प्रत्यक्ष स्वारी शिकारी करणाऱ्या सरदारांस दोष देणें.

कागदी नोटा, दाम खोटा—कागदी नोटा म्हणजे कांहीं रोख पैसा नव्हे. जोंपर्यंत त्या काढणाऱ्याची सत्ता चालू आहे तोंपर्यंतच त्या चालावयाच्या.

कांगावा——कांगावा करणें—थोडेसें नुकसान किंवा दुःख झालें असतां त्याचा मोठा गाजावाजा करणें. जास्त भासविणें. विनाकारण आरडा ओरड करणें. ' तिनें जो एक रट्टा सुंदरीचे पाठींत दिला, त्यानें ती पोर कळवळली, पण तें लक्षांत न घेतां ती आपल्या डोक्याला लागल्याबद्दलच कांगावा करूं लागली. ' –पकोधे.

कागाळी——कागाळी नेणें—तक्रार करणें; फिर्याद आणें.–मो शांति ५.३६.

काच——काचेचें भांडें—एखादी सहज नाश पावणारी व त्याकरितां अगदीं जपून वापरावयास पाहिजे अशी वस्तु; मनुष्याची अब्रू; स्त्रीचें पातिव्रत्य वगैरे.

*काचः काचो मणिर्मणिः ।—काच ती काच व रत्न तें रत्न. काच आणि रत्न जरी वरून सारखीं दिसलीं तरी तीं एकत्र ठेवलीं असतां काच कोणती व रत्न कोणतें हें कोणीहि सांगू शकतो. हलका मनुष्य थोराची बरोबरी कधींहि करूं शकत नाहीं. सबंध श्लोकः–मणि वहन्ति पादाग्रे काचः शिरसि धार्यते । क्रयविक्रयवेलायां काचः काचो मणिर्मणिः॥

कांचणी——गहूं घालावा दाटणीं, बायको घालावी कांचणीं—(व.) गव्हाची कणिक खूप मळल्याशिवाय तिची पोळी चांगली होत नाहीं व बायकोला धाकांत ठेवल्याशिवाय ती चांगली वागत नाहीं. इक्षुदंडास्तिला शूद्राः कामिनी हेममेदिनी । दधिचंदनतांबूले मर्दनं गुणवर्धनम् ॥ तु०–डाळ घालावीं दाटणीं आणि बायको घालावी आटणीं.

कांचनभट—देवलांच्या शारदा नाटकांतील एक पात्र. द्रव्याच्या लोभानें हा भट आपली मुलगी शारदा एका म्हाताऱ्या श्रीमंताला देऊं करतो. यावरून १ पैशासाठीं म्हाताऱ्यास मुलगी देणारा, निष्ठुर लोभी बाप. २ हा अतिशय कृपण होता म्हणून कृपण, कंजूष मनुष्यासहि म्हणतात.

काचवा——काचवा घेणें—(व.) पळसाच्या दोरांनीं वळचणीचे वेळू वगैरे बांधणें; बंधन घालणें.

काचा——काचा भिडणें-भिडविणें—१ लंगोट कसून कुस्तीस तयार होणें, कुस्तीस आव्हान देणें. २ युद्धास, मारामारीस उद्युक्त होणें; भांडणास सज्ज होणें.

काज——काजमार्ग हाच राजमार्ग—विद्या, वैभव इ. मिळवावयाचें झाल्यास तें कष्ट करून, साधकानें स्वतः खपूनच मिळविलें पाहिजे. तें एकदम, सुखासुखीं मिळत नसतें.

काजरा——काजऱ्याला फळें, दुर्बळाला बाळें; काजऱ्यास फळें आणि दरिद्र्यास पोरें—काजरा (कुचला) वृक्षाला फळें फार धरतात (हीं फळें कडू असतात) तशीं गरीबाला मुलें फार होतात. त्यांस खावयास

घालावयाला कांहीं नसतें. दोन्हीहि गोष्टी अयोग्यच. तु०–कडव्या झाडास बहु बाज.

काजवा——काजवे चमकणें–डोळ्यांपुढें अंधारी येणें

काजव्याचा उजेड——ज्याप्रमाणें काजव्याच्या उजेडाची चमक क्षणिक असते त्याप्रमाणें एखाद्या क्षणभंगुर गोष्टीस म्हणतात; अशाश्वतता; पाण्यावरचा बुडबुडा.

*** सूर्यापुढें काजवा**—सूर्याचें तेज कुठें व काजव्याचें कुठें, या दोघांची तुलना होणें शक्य नाहीं. ' खद्योतें फुलविलें रविपुढें ढुंग । साक्षी तव जग उभयतां ॥' –तुगा ३०६७. तु०–कुठें इंद्राचा ऐरावत.

काजवे उडले, चिखल सुकला—पावसाळ्यांत काजवे चमकत असतात ते चमकण्याचे बंद झाले म्हणजे पावसाळ सरला असें समजावें व पावसाळा संपला म्हणजे रस्त्यांतहि चिखल राहत नाहींसा होतो. तु०–सरितः कुर्वती गाधाः पथश्चाश्यान कर्दमात् । यात्रायै चोदयामास तं शक्तेः प्रथमं शरद् ॥ –रघु ४.२४.

काजव्याचा उजेड काजव्याच्या भोंवतीं; काजव्याचा उजेड गांडीपुरता; काजव्याचा उजेड त्याचे अंगाभोंवतीं—काजवा किती लकलकला तरी त्याचा उजेड त्याच्या अंगाभोंवतींच पडतो, तो फार दूर पसरणें शक्य नाहीं. कोणीहि मनुष्य झाला तरी तो आपल्या शक्तीप्रमाणेंच काम करणार. त्याच्या पलीकडे काम करण्याची त्यानें घमेंड बाळगूं नये. त्याला इतरास मदत करणें शक्यच नसतें. तु०–डोंगळा किती गूळ आणणार तें त्याची कमरच सांगते. माकड गेले लुटी आणल्या दोन मुठी. सरड्याची धांव कुंपणापर्यंत, आंधळ्याची धांव कुडावेरी.

काजळ——काजळतीज—(व.) भाद्रपद शुद्ध तृतीया; हरितालिका व्रत करण्याचा दिवस.

काजळाचा डोंगर—अत्यंत काळा कुळकुळीत मनुष्य.

काजळाची कोठडी—सरकारी खजिना; एखाद्या मोठ्या सावकाराची पेढी. अशा तऱ्हेच्या भांडारामध्यें रुपये असतात व ते रुपये मोजतांना मोजणाराचे हात मात्र काळे होतात. मोजणारास त्यांतील रुपयांची कांहीं प्राप्ति होत नाहीं पण रोज हात मात्र काळे करून घेण्याचा प्रसंग येतो. यावरून म्हणतात. ' काजळाच्या कोठडींत गेलें तर तोंड काळें, मोजले तर हात काळे. '

*** दीपा पोटीं काजळ**—दिवा स्वतः तेजयुक्त असतो पण त्यांतून काळें काजळ बाहेर येतें. यावरून स्वतः पराक्रमी असणाऱ्या मनुष्याच्या पोटीं अगदीं उलट वृत्तीचा पुत्र झाला तर त्यास म्हणतात. तु०–तुळशीच्या पोटीं भांग.

काजळाच्या कोठडींत गेलें तर तोंड काळें, मोजले तर हात काळे—' काजळाची कोठडी' पहा.

फुटका डोळा काजळानें साजरा—वरच्यावर दिखाऊ उपकरणांनीं एखादें व्यंग झाकण्याचा प्रयत्न करणें.

काजी——काजी फोंड—(गो.) मसणवट.

काजी—काजि आशिलो पाजि जात्ता, पाजि आशिलो काजि जात्ता—(गो.) 'काजी' असलेला 'पाजी' होतो, ' पाजी ' असलेला ' काजी ' होतो.

काजीजी, दुबले क्यौं ? शहरका अंदेशा; काजीजी दुबले क्यौं ? तो दुनियाकी फिकीर लगी है; काहो काजी दुबळे तर म्हणे गांवाची काळजी—आपला ज्या गोष्टीशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं त्या गोष्टीबद्दल फिकिर बाळगण्याचें किंवा तींत लुडबुड करण्याचें आपणास कांहीं कारण नाहीं. तु०–कांग बाई रोड तर म्हणे गांवाची ओढ.

राजा बोले दळ हाले, काजी बोले दाढी हाले; काजी बोले दाढी हाले, सत्तेवांचून कोण चाले—राजानें आज्ञा केली तर सर्व सैन्य ती ऐकावयास तयार असतें, पण काजीचा हुकूम कोणावरच चालत नाहीं; तेव्हां त्यानें व्यर्थ सत्तेची फुशारकी मारण्यांत कांहीं अर्थ नाहीं. राजकीय सत्ता ही धार्मिक सत्तेपेक्षां श्रेष्ठ आहे व जी सत्ता परिणामकारक होऊं शकते. ती जवळ असेल तर उपयोग; नाहींतर केवळ नांवाचा मोठा अधिकार असून कांहीं उपयोग नाहीं.

काजीसाहेब क्या करना, हिंदूसे उलटा चलना—काजीसाहेब काय करायचें ? हिंदूंच्या उलट चालायचें. एखाद्या काजीला स्वतःच्या धर्माचें धर्मशास्त्र वगैरे ठाऊक नसलें म्हणजे तो कोणी विचारावयास आल्यास हिंदूंच्या उलट वागावें एवढेंच सांगतो. कारण त्याला आपला धर्म म्हणजे हिंदूंच्या विरुद्ध आहे एवढीच गोष्ट ठाऊक असते. तेव्हां ज्याला स्वतःचें ज्ञान नसतें तो आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या केवळ विरुद्ध वागून आपलें हसें करून घेतो.

कांजी——शेजी नांदे, कांजी लाभे—जर आपल्या शेजारीं एखादें नांदतें कुटुंब असेल तर वेळेनुसार कांजी वगैरे मिळण्याचा संभव असतो. आसपास कुणी आपल्याबद्दल आपलेपणा बाळगणारा असेल, तर वेळेवर उपयोगी पडतो.

त्याच्याशीं जर नीटपणें वागलें नाहीं तर वेळेवर कोणी उपयोगी पडणार नाहीं. दक्षिण कोंकणांत सकाळीं चहाप्रमाणें कांजी घेण्याचा प्रघात आहे त्यास अनुसरून ही म्हण योजली आहे.

काजु——काजु बोंड्या बजी, सांगल्यारि मात्र खरजूता (कडु)—(गो.) काजूच्या बोंड्याचीं भजीं आहेत असें सांगितल्यावर मात्र खाजतात (कडू लागतात). तोंपर्यंत कांहीं कळत नाहींत; चांगलींच लागतात. तु०—Ignorance is bliss.

काजुलो——काजुलो (केलदें) आपलेच गांडीक तोखेता; काजुळो आपले गांडी मानवता—(गो.) [काजुलो = काजवा. केलदें = माकड] काजवा (किंवा माकड) आपल्याच गांडीचें कौतुक करतो. आपला स्वतःचाच बडेजाव करून घेणें. तु०—माकड म्हणतें माझी गांड लाल. काजवा पहा.

काजुल्या गांडीकडेन झिगझिगता—(गो.) काजव्याचा प्रकाश त्याच्या ढुंगणाशीं. पुढें पहा.

काजुळ्या उजवाडु काजुळ्या पुरतेंचि—(गो.) काजव्यांचा प्रकाश काजव्यांपुरताच; दुसऱ्याला कांहीं एक फायदा नाहीं.

काजुळ्या भिर्ति फालें जातवे ?—(गो.) काजूच्या भीतीनें उजाडेल काय ?

काट——काटांत जाणें—[काट = मसण.] १ मसणांत जाणें. २ एखाद्याबद्दल बेफिकीरी दाखवितांना योजतात. उदा०—कांहो रामभाऊ कोठें गेले ? गेले काटांत ?

काट——काटा तोरि ना, तोरिक कादु ना—(गो.) कटाला (शिजवून काढलेलें पाणी) तूर नाहीं आणि तुरीला कट नाहीं. सगळ्या बाजूंनीं अभाव असा अर्थ.

काट——काट देणें-मारणें—१ लिहिलेला मजकूर खोडून टाकणें; एखाद्याचें यादींतील नांव काढून टाकणें, कमी करणें; एखादी गोष्ट रद्द करणें. २ एखाद्याचा अपमान करणें.

काटकसर——काटकसरीवांचून द्रव्य संग्रहीं राहात नाहीं—कितीहि पैसा मिळाला तरी उधळेपणाची संवय असल्यास कांहीं शिल्लक राहणार नाहीं. त्याला काटकसरीची संवय पाहिजे. थोडा थोडा संचय करीत गेल्यास हळू हळू जवळ पुंजी जमते.

कांटा——धारवाडी कांटा—अगदीं बरोबर तोल दाखविणारा तराजू.

कांटा उपटणें—१ त्रासदायक प्राणि, शत्रु, वगैरे नाहींसा करणें, होणें. २ समूळ काढून टाकणें; नाहींसें करणें.

कांटा काढणें-फेडणें—१ आपल्या मार्गांत आलेली अडचण, व्यक्ति, शत्रु वगैरे दूर करणें. 'कांटाचि काढिला तो जाणों तव शत्रुच्या मनामधला ।'—मोकर्ण ४.१५. —मोगदा १. ११६. 'फेडीन असुरांचा कांटा ।' —उषा ९५.७४. २ दुःखाचें मूळ नाहींसें करणें. 'धर्माच्या हृदयांतिल काढितसें मी समूळ कांटा हो ।'—मोरोपंत.

कांटा मारणें—१ तराजूनें वजन करणें; वजन करून माप घेणें. २ तापाची कसर येणें; अंग कचकचणें. ३ शहारें येणें.

कांटा मोडणें—१ (व.) विंचू चावणें. २ थोडें गरम होणें (पाणी).

कांटा (अंगावर) येणें—शहारें येणें.—मो कर्ण १८.१.

कांटेकाळजी—अगदीं कांटाहि न बोंचेल अशा रीतीची काळजी; फार जपणूक. 'नवीन गव्हर्नर हे काट्याकाळजीनें व निःपक्षपातबुद्धीनें आपलें काम करतील.'—टि १.४३३.

कांटे मोडणावळ—१ शेताची पाहणी करतांना मामलेदाराच्या पायास कांटा मोडला असतां घरटीं वसूल करावयाचा दंडरूपी कर. २ पाहणी करण्यास सुलभ जावें म्हणून हद्दीवरील वगैरे कांटेरी झाडें तोडून टाकण्याकरितां घ्यावयाचा कर.

कांटोमें फूल—(हिं.) भांगेंत तुळस.

कांट्या माणायेरि बसिलें वारि—(गो.) कांट्यांच्या पाटावर बसल्यासारखें.

कांट्याचा नायटा होणें-करणें—पायांत वगैरे कांटा मोडला आणि तो ताबडतोब काढून टाकून त्या जागीं योग्य तो इलाज केला नाहीं म्हणजे मग मोठी जखम वगैरे होते. त्याप्रमाणें एखाद्या गोष्टीवर वेळींच इलाज केला नाहीं, तर त्याचे परिणाम पुढें अधिक हानिकारक होतात.

कांट्याचें कोल्हें करणें—एवढ्याचें एवढें करणें; क्षुद्र गोष्टीला महत्त्व देणें. 'काट्यासंबंधीं अनादर दर्शविण्यांत मनुष्यानें काट्याचें कोल्हें केलें आहे असें नाहीं. काटा खरोखरीच उपद्रवी आहे. जरा चुकून त्याच्यावर पाऊल पडण्याचा अवकाश, आपल्याला लाथ लागून उपमर्द झाला अशा खोट्यासमजुतीनें तो दाभणाप्रमाणें आपलें टोक तळव्याच्या मांसल भागांत खुपसतो.'—मनोहर मासिक, नोव्हेंबर १९४१.

कांट्यानें कांटा काढणें—एका अप्रिय वस्तूकडून दुसऱ्या अप्रिय वस्तूचा त्रास नाहींसा करणें; एखाद्या शत्रूची परभारें दुसऱ्या शत्रूकडून वासलात लावणें. 'बापा कांट्यानेंच प्राज्ञ सुखें काढितात कांटा कीं।'—मो आदि ३१.३०. तु०—शत्रुमुन्मूलयेत् प्राज्ञस्तीक्ष्णं तीक्ष्णेण शत्रुणा। व्यथाकरं सुखार्थाय कंटकेनैव कंटकम्॥—पंचतंत्र ४.१९.

कांट्याप्रमाणें सलणें—ज्याप्रमाणें पायांत कांटा मोडला असतां त्याचें टोंक वारंवार वोंचत असतें, त्याप्रमाणें १ सारखी पीडा करीत राहणें; नेहमीं त्रास होत असणें. २ एखाद्या-बद्दल सारखा मत्सर, हेवा, द्वेष करणें.

कांट्यावर-वरून ओढणें—वस्त्र कांट्यावरून ओढलें असतां फाटतें; यावरून वाभाडे काढणें; तासडपट्टी काढणें; त्रास देणें; दुःख देणें; छळणें; पीडा करणें.

कांट्यावर घालणें—दुःखांत टाकणें; लोटणें, संकटांत पाडणें; विपत्तींत ढकलून देणें. 'त्यांत मरेनचि शिरतां कांट्यावरि घालितां चिरे पटकीं।'—मोविराट ३. ४१.

कांट्यावर येणें—बैलगाडीमध्यें आंसाच्या दोन्ही बाजूंस समतोल होईल अशा रीतीनें ओझें भरणें.

❀ **बाभळीचा कांटा, पुढें तिखट मागें पोंचट**—बाभळीचा कांटा जरी अणकुचीदार असला तरी तो मजबूत नसल्यामुळें फार खोल जाऊं शकत नाहीं व लवकर मोडतो. त्याचप्रमाणें एखादी गोष्ट पुढें किंवा वरवर दिसावयास बळकट असली तरी आंतून पोकळ असल्यास म्हणतात. आरंभीं शूर पण मागाहून भिऊन पळणाऱ्या व्यक्तीसहि म्हणतात.

कांटा मोडला, नायटा झाला—आरंभीं क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टींचा पुढें फार त्रासदायक परिणाम होणें; क्षुल्लक शत्रु पुढें अतिशय बलवान होणें. 'कांट्याचा नायटा होणें,' पहा.

दुधाला गेलीं तेथें कांटे खायला राहिली—महत्त्वाच्या कामाकरितां जावयाचें पण भलत्याच क्षुल्लक कामांत वेळ घालवावयाचा, अशा प्रकारास म्हणतात.

बाहेरून कांटे, पण आंत गोड साटें—फणसाच्या अंगाला वरून कांटे असतात पण आंत मधुर रसयुक्त असे गरे असतात. एखादी गोष्ट वरून दिसावयास अत्यंत कठिण व त्रासदायक दिसते पण अंतरंगीं किंवा प्रत्यक्ष विशेष सुखदायक असते, अशावेळीं ही म्हण योजतात. तु०—उपरि संकटक सांचे परंतु साचे जयांत सुरसाचे। घोस असे फणसांचे षण्मासांचे कितेक वरसांचे॥—र-नल.

सासरीं जातां कुचकुच कांटे, माहेरीं येतां हरीख वाटे—(मुलींच्या गाण्यांतील चरण) सासरीं जातांना मुलीस कांटे टोंचल्याप्रमाणें दुःख होत असतें; परंतु माहेरीं येतांना आनंद होत असतो.

कांटे वइल्यानि रिते पायानि चमकूं नये—(गो.) कांट्यांवरून अनवाणी पायांनीं चालूं नये. संकटाला सावध.

गुलाबाला वास, पण कांटे शरीरास—गुलाबाच्या फुलाला वास असतो पण झाडास कांटे असतात. त्याप्रमाणें एखादी वस्तु सुंदर दिसते पण ती मिळविण्याच्या कामीं फार प्रयास पडतात. ती सहज साध्य नसते. आकर्षक वस्तूंच्या-भोंवतीं त्रासदायक गोष्टींहि असतात.

कांटो काण्णु खुंटा घाल्लो—(गो.) कांटा काढून खुंट घातला. लहान संकटाच्या जागीं मोठें संकट.

कांट्याचा नायटा आणि क्षुल्लक गोष्ट विकोपाला—ज्याप्रमाणें केवळ कांटा टोंचल्याचें निमित्त प्रथम होऊन त्याचा पुढें नायटा होतो, त्याप्रमाणें आरंभीं एखादी अगदीं क्षुल्लक गोष्टहि पुढें अत्यंत त्रासदायक होते. याकरितां अशा-वेळीं प्रथमच खबरदारी घेणें चांगलें.

कांट्यांत खुंटा निघाला—निरुपयोगी किंवा त्रासदायक गोष्टींतहि क्वचित् उपयुक्त वस्तु आढळणें; दुर्जनांच्या टोळींत क्वचित् सज्जन सांपडणें. तु०—भांगेंत तुळस.

कांट्यानें कांटा काढणें नि पिळानें पीळ काढणें—ज्याप्रमाणें एका कांट्याच्या टोंकानें पायांत मोडलेला कांटा काढतां येतो त्याचप्रमाणें दोरीला पडलेला एका बाजूचा पीळ टोंकास धरून उलट दिशेस पीळ दिला असतां निघतो. यावरून एका अनिष्ट गोष्टीची निष्कृति करण्यास तिच्याविरुद्ध असणाऱ्या दुसऱ्या तसल्याच गोष्टीची योजना करावी.

कांट्यानें वच्याक खुटो नाका—(गो.) कांट्यांत जाण्यास काठी नको. तु०—नांगटानें बोच्याक खोरें इत्याक!

कांट्यावर-कांट्यास लाथ मारली तर तो रुतल्या-शिवाय राहणार नाहीं—आपण होऊन संकटांत उडी घेतली तर त्रास झाल्याशिवाय राहात नाहीं; विघ्नें ओढवून घेणें.

कांटियेरी-कांटेरी——कांटियेरि पळ्-ळेलो पदरा हळूचि सोडवंका—(गो.) काटेरी झुडुपावर पडलेला पदर हळूच सोडवला पाहिजे. तेथें घसफस कामाची नाहीं.

कांटी——कांटी (कांट्या) आपल्या पोटावर ओढणें—पोटांत कांटे भरावयास तयार होणें; अति अधाशी स्वार्थी बनणें; हपापल्यासारखें करणें.

कांटी लागणें—एखादें आवार बंद करावयाचें अस-

त्यास त्या सभोंवतीं व त्याच्या प्रवेशद्वारीं आंत कोणी जाऊं नये म्हणून कांटी लावतात त्यावरून, ओस पडणें; निर्मनुष्य असणें; वसती उठलेली असणें; कायमचें बंद होणें.

कांटी लावणें—घर, संसार वगैरे मोडणें; नाश करणें; विध्वंस करणें. 'आपल्या संसारासि लावोनि कांटी । आमचे पाठी लागलास कां ।'

कांटीशीं कांट्या घांसणें—कांटीशीं दुसरी कांटी घांसल्यास कांटे एकमेकांत अडकून गुंतागुत होते व लवकर सुटत नाहीं. (व.) १त्रास देणें; गांजणें; बेजार करणें. २एकसारखा कलह करणें; भांडणकज्जा करीत राहणें.

गांवकुसूं पाडून कांट्या लावणारा—गांवाभोंवतीं बांधलेली पक्की भिंत पाडून ती ऐवजीं कांटीचें आवार घालणारा. अधिक उपयुक्त व महत्त्वाची गोष्ट हातची घालवून क्षुद्र लाभावर संतोष मानणारा. तु० कणेकडाचें खांपेकड करणें.

कांट्याचें कोल्हें करणें—शेतांत असलेली कांटी दुरून कोल्ह्यासारखी भासते. एखाद्या क्षुल्लक गोष्टीचा मोठा बाऊ करणें; पराचा कावळा करणें. कांटा पहा.

❀ कांटीनें कांटी झाडावी—कांट्यानें कांटा काढावा; एका शत्रूकडून परभारें दुसऱ्या शत्रूचा नाश करावा. 'काटियां कांटीं झाडावी'–शिशु ४९४. 'कांटीनें कांटी झाडावी।'–दा १९.९.१२.

असा कुणबी हाट्या, वाटेवर लावी कांट्या—एखादा मनुष्य असा हट्टी असतो, कीं तो ज्याच्या त्याच्या मार्गांत विघ्नें उत्पन्न करून प्रत्येक गोष्टींत अडथळे आणतो. त्याची तुलना रहदारीच्या रस्त्यावर कांटी लावणाऱ्या शेतकऱ्याशीं केली आहे.

दुरून डोंगर साजरा, जवळ गेलें कीं कांट्याकुट्या (जवळ जातांना काजरा)—डोंगर दुरून सुंदर दिसतो पण जवळ जाऊन पाहिलें असतां सर्व कांटेरी झुडुपांनीं आच्छादिलेला असतो किंवा त्यावर कुचल्याचीं झाडें वाढलेलीं दिसतात. यावरून एखाद्या गोष्टीचें बहिरंग जरी दुरून सुंदर दिसत असलें, तरी त्यावरून तिच्या अंतरंगाची परीक्षा करूं नये. नाहींतर अनेक वेळां फसगतच होण्याचा संभव असतो. दूरस्थाः पर्वता रम्या वेश्या च मुखमंडने । युद्धस्य वार्ता रम्या च त्रीणि रम्याणि दूरतः ॥

धर्माची गाय कांट्या खाय—ज्या गायीवर कोणाचीच मालकी नाहीं, केवळ धर्मार्थ मोकळी सोडली आहे तिला खावयास कोण घालणार? तेव्हां तिला अखेरीस गवत वगैरे कांहीं न मिळाल्यामुळें पोटाकरितां कांटे खाण्याची पाळी येते. त्याप्रमाणें ज्या मनुष्याला कोणी आप्तसंबंधी नाहीं त्यास उपाशीं मरण्याची पाळी येते; त्याची काळजी कोणी घेत नाहीं.

काटेबाड——काटेबाड नाम तलवारका—तलवारीसच काटेबाड हें दुसरें नांव आहे. नांव तरवारीचें पण व्हावयास जावें तों कांटे तोडावयाचा विळा.

काटो——काटोनोटो—(गो.) मासळीचा तुकडा व भाताचें शीत, म्हणजे मीठभाकर; अगदीं हलकें अन्न.

कांठ——कांठकोणा मोजणें—कांठ व कोन वगैरे सर्वांची नीट पाहणी करणें; सूक्ष्मपणें तपासणें; बारकाईनें पाहणें.

कांठमोरा गळ्यांत अडकणें—एक मांजर एका मडक्याजवळून जात असतां त्या मडक्यांत दूध आहे असें समजून त्यानें त्या मडक्यांत तोंड घातलें; परंतु त्या मडक्यांतील दूध त्यास प्यावयास न मिळतां तोंड बाहेर काढतांना त्या मडक्याचा कांठ त्याच्या गळ्यांत अडकला. यावरून एखादी भलतीच गोष्ट करूं गेलें किंवा आड मार्गांत शिरलें तर एखादें भलतेंच लचांड मागें लागण्याचा संभव असतो. 'जेवीं नीचाचा कांठमोरा । गळा अडकल्या मांजरा । ते रिघोनि शुचीचिया घरा । नाना रसपात्रां विटाळी ॥'–एभा २६. २०६.

कांठा बांधणें—भांड्यांत शिजत असलेल्या पदार्थांची वाफ बाहेर जाऊं नये म्हणून भांड्यावर झांकण ठेवून त्याच्या कांठाभोंवतीं ओली कणिक लावून बंद करणें.

कांठावर बसणें—तबल्याच्या कांठावर थाप बसली असतां योग्य आवाज निघण्याच्या ऐवजीं बद्द आवाज निघतो. यावरून बिघडणें, नासणें, धंदा वगैरेचा योग्य जम न बसणें; योजलेले उपाय नीट लागू न होणें; अपुऱ्या साधनामुळें अथवा योग्य शक्तीच्या अभावीं किंवा नेमका लाग न साधल्यामुळें काम बिघडणें.

कांठावर मारणें—योग्य ठिकाणीं आघात न करतां भलत्याच ठिकाणीं केल्यामुळें केलेला प्रयत्न फुकट जाणें; अर्धवट होणें; बिघडणें; नासणें. वर पहा.

कांठावर येणें—अगदीं जिवावर येणें; नकोसें असणें; एखादी गोष्ट करणें अप्रिय असणें; निरुपाय होणें; हद्द होणें.

❀ बालेघाट आणि सोन्याचा कांठ—बालेघांट हा प्रांत अत्यंत सघन असून तेथें सुलभतेनें द्रव्यप्राप्ति होते.

मडक्याचा कांठ ओला आहे तो वळेल—मडक्याची माती जोंपर्यंत ओली आहे तोंपर्यंत त्याच्या कांठास वगैरे वाटेल तो आकार देतां येतो. एकदां वाळल्यावर मग कांहीं करतां येत नाहीं. त्याप्रमाणें मनुष्यास लहानपणीं पाहिजे तसें वळण लावतां येत व त्याचा स्वभाव बनवितां येतो. मोठा झाल्यावर कांहीं करतां येत नाहीं.

ताटाबरोबर कांठहि जातो—ताटाचा कांठ ताटाला लागलेला असल्यामुळें ताट चोरीस गेल्यास त्याचा कांठहि जाणार ही गोष्ट उघड आहे. त्याप्रमाणें मुख्य गोष्टीमध्यें तिच्या आनुषंगिक गोष्टींचाहि अंतर्भाव होतो हें स्पष्ट आहे.

काठी——काठी टाकणें—काठी ही महाराच्या अधिकाराची द्योतक असते. सरकारी महारानें आपली चाकरीची पाळी दुसऱ्यास देणें.

काठी वाजणें—(नाविक) डोलकाठी पिंजल्यामुळें किंवा फुटल्यामुळें आवाज करूं लागणें.

काठी शिखरास लागणें—१ कान्होबाच्या मढीस जी जत्रा भरते त्या जत्रेमध्यें निरनिराळे मानकरी आपल्या निशाणाच्या काठ्या देवळाच्या शिखरास लावतात, म्हणजे त्यांची जत्रा पूर्ण होते. यावरून कृतकृत्य होणें; केल्या कर्माचें, आपल्या जन्माचें वगैरे सार्थक होणें. 'माझ्या काठ्या शिखरास लागल्या.' —मसाप १.१.६. २ इतिकर्तव्यता संपणें; आयुष्यांतील कार्य पुरें होणें; सर्व गोष्टी करून पुढे कांहीं करावयाचें शिल्लक न उरणें; जीवितकार्य पार पडणें ३ वृद्धावस्था येणें.

काठीचें कोल्हें कोलणें—ज्याप्रमाणें शेतांत काठीवर गवत बांधून कोल्ह्यासारखें बुजगावणें उभें करून पांखरास भिवावतात त्याप्रमाणें लटकाच भीति दाखविणें; व्यर्थ भिवविणें; खोटेंच भेडसावणें. 'नका काठीचे कोल्हे कोलूं।' —होला १२८.१६३. 'कांट्याचें कोल्हें करणें' पहा.

काठीनें पाणी शिंपणें-शेंदणें—हातांनीं पाणी न घालतां काठीनें उडविणें. स्वतः काम न करतां दुसऱ्याकडून करवून घेणें.

काठीनें हांकणें—ज्याप्रमाणें सर्व गुरांस एकाच काठीनें वळतात, त्यांत लहानमोठे हा फरक करीत नाहींत, त्याप्रमाणें भेदाभेद न करतां सर्वांना एकाच प्रकारची वागणूक देणें; सब घोडे बारा टक्के या न्यायानें वागविणें. एक पहा.

काठीला सोनें बांधून चालावें—कोणी काठीला सोनें बांधून उघडपणें गेला तरी त्याचें सोनें कोणी हिरावून घेत नाहीं. याचा अर्थ पूर्ण सुरक्षितपणा, बंदोबस्त, व्यवस्था असणें. इंग्रजांचा अंमल प्रथम बसला तेव्हां या राज्यांतील सुरक्षिततेबद्दलची अशी लोकांची कल्पना होती. 'इंग्रजांच्या राज्यांत काठीला सोनें बांधून जावें.' —गांगा १३२.

काठीसारखें पडणें—साष्टांग नमस्कार घालणें; आडवें पडणें; लोटांगण घालणें. 'लोटिजे कां काठी। पडली जैसी॥' —ज्ञा १७.२०४.

काठ्या लावणें—(ना.) चिडविणें; विनाकारण त्रास देणें; डवचणें.

※ तुरीची काठी (कांटी) तुरीवर झाडावी—१ तुरीचीं पानें झाडण्याकरितां तिचीच एक तुराटी घेऊन तीवर मारावी म्हणजे पानें झडतात. कांट्यानें कांटा काढावा या म्हणीप्रमाणें. २ एखाद्या गोष्टीचा परभाराच निकाल लावणें.

काठी मारल्यानें पाणी वेगळें होत नाहीं; काठीनें पाणी हाणलें तर दोन ठिकाणीं होत नाहीं—प्रवाहांतील पाणी काठीनें वेगळें करूं गेलें असतां होऊं शकत नाहीं. जेथें मूळचा संबंध दृढ व घनिष्ठ आहे, चांगलें ऐक्य आहे त्या ठिकाणीं आनुषंगिक गोष्टींनीं भेद पडत नाहीं, व ऐक्याचा बिघाड होऊं शकत नाहीं. जलताडन.

छाटीवर काठी व संन्याश्याची लोटी—संन्याशाचें सर्व वैभव किंवा मालमत्ता म्हणजे काय ती त्याची छाटी, काठी व एक लोटी एवढीच असते. कफल्लक मनुष्याजवळ काय असणार ?

काठेवाड—काठेवाडी भिकार—काठेवाडी लोक उंच पण सडपातळ असतात, यावरून रोडक्या मनुष्यास तुच्छतादर्शक हा वाक्प्रचार योजतात. तसेंच काठेवाड हा प्रदेश रुक्ष असल्यामुळें तेथील बरेच लोक धंद्याकरितां बाहेर जातात.

काड—काडभिकारी—काडीसुद्धां वायां जाऊं न देणारा, किंवा काडीची सुद्धां भिक्षा मागणारा, अत्यंत कवडीचुंबक मनुष्य.

कांड—कांड काढणें—मिठागरामध्यें किंवा खारीमध्यें ज्या पाट्या किंवा अळीं पाडलेलीं असतात त्यांच्या बांधावर मातीची भर टाकणें.

कांडण—कांडण कैरातु वतवे, हस्ति कोटग्यांतु निपतवे—(गो.) कांडण करांत होईल काय ? हत्ति वाडग्यांत निपजेल काय ?

कांडणें—कांडा दळा भरडा—एकसारखें घरकाम

करण्यांत सर्व वेळ जाणें; घरांतील कावाडकष्ट करणें; उसाभर करणें.

❀ **कांडल्याबगर फोव न्हय, नी मारल्याबगर घोव न्हय**--(गो.) कांडल्याशिवाय ज्याप्रमाणें पोहे होत नाहींत त्याप्रमाणें नवरा बायकोला केव्हांतरी मारल्याशिवाय राहात नाहीं. तेव्हां नवऱ्यानें मारले तरी ती गोष्ट विशेष मनावर घेऊं नये अशी बायकांना शिकवण.

कांडिन म्हळ्यार वान न्हय, आसडि म्हळ्यार सूप न्हय--(गो.) कांडीन म्हटलें तर उखळ नाहीं, पाखडीन म्हटलें तर सूप नाहीं. दोहोकडून कुचंबणा.

कांडप—कांडप काढणें—(कु.) चांगलें मारणें, झोडणें. २ शक्तीबाहेर काम देणें; कांडात काढणें.

कांडपा——कांडपाक कोंब फुटणें—(गो.) मुसळास अकुर येणें; अशक्य गोष्ट घडणें; अतिशय दुष्ट मनुष्यास दयेचा पाझर फुटणें.

काडवाती——सूर्यापुढें काडवाती—दोन अतिलहान व मोठया गोष्टींची तुलना; परस्पर विरुद्ध दोन टोंकांच्या गोष्टींची बरोबरी करूं लागणें. सूर्यापुढें काजवा, खद्योत.

कांडात——कांडात काढणें—बेदम मारणें; यथेच्छ चोपणें; ठोकून ठोकून मऊ करणें. 'आई मरायच्या आधींच मी तुझें कांडात काढीन.'—विवि २७३.

काडी——आडवी उमी काडी ओढणें—(निषेधपर). आडव्या उभ्या रेघा काढावयासहि न येणें; अक्षरशत्रु असणें; मुळींच लिहितां न येणें.

काडीमहाल—गवताची झोंपडी.

काडीमाया—(व.) रोड; कृश; किरकोळ अंगाचा.

काडी मोडणें–मोडून देणें—घटस्फोट संस्काराच्या वेळीं एक गवताची काडी घेऊन ती मोडतात. यावरून घटस्फोट करणें; विवाहसंबंध तोडून टाकणें; पतीचा अथवा पत्नीचा त्याग करणें. 'कृष्णे ! काडी मोडी, काय तुला दीन मानलें शवसें ।'—मोसभा ७·१०. 'पण आतां म्हातारे झालांत तेव्हां तिनें तुम्हाला अगदीं काडीच मोडून दिली वाटतें !'—उग्र २. ६

काडी लागणें—आगीची, विस्तवाची जळती काडी कोठें लागली असतां आग लागते, यावरून आग लागणें; नाश होणें; सर्वस्वी नष्ट होणें; राख होणें. 'नमुताईच्या संसारास काडी लागली.'—हाकांध २५.

काडी लावणें—१ आग लावणें; राखरांगोळी करणें; सत्यानाश करणें. २ कलह लावणें.

काडीचा–काडीभर–काडीमात्र--(बहुधा अकरणरूपी प्रयोग) यत्किंचितहि; अगदीं थोडासाच; अल्पहि. 'नाटकवाल्यांत काडीचा देखील गुण नसतो.'—विकारविलसित. 'तुम्हांला कोणी काडीभरहि उपद्रव करणार नाहीं.'—विवि ८.३.५३. 'अन् त्यास्नी गरिबाची काडीभर बी मुरवत नाहीं.'—दौलत पृ. ४४.

काडीची आग माडीस लागणें—मोठ्या माणसास क्षुल्लक व्यक्तीकडून त्रास होणें; क्षुल्लक कारणापासून मोठा उपद्रव होणें.

काडीनें औषध लावणें—एखाद्याच्या जखमेवर वगैरे बोटानें औषध लावण्याच्या ऐवजीं काडीनें औषध लावणें. (ल.) दुरून दुरून काम करणें; झटून अंग मोडून काम न करतां वरवर करणें.

❀ **काडीआड गेला, तो पर्वताआड गेला**—एखादी गोष्ट आपल्या दृष्टीच्या टप्प्यापलीकडे गेली म्हणजे ती आपल्याला दुरावलीच असें समजावें; एकदां दोन गोष्टींत अंतर पडलें म्हणजे तें पडलेंच, तें वाढतच जातें.

काडीआड डोंगर—वरप्रमाणेंच. दोन गोष्टींमध्यें काडीचें अंतर असलें तरी डोंगराएवढें समजावें.

काडीआड मर्यादा—अज्ञातवासांत द्रौपदीनें जयद्रथाशीं बोलतांना मर्यादा राखण्यासाठीं काडी आड धरली होती, असें वर्णन आहे. तेव्हां एखादी गोष्ट दुसऱ्याच्या दृष्टीसमोर करावयाची नसली, तर आपल्या व त्याच्यामध्यें जरी एक काडी धरली तरी तिनेंहि मर्यादा राहते. मनांत दुसऱ्याचा आदर राखावयाचा, विनय पाळावयाचा असला म्हणजे तो थोडक्यांतच सहज राखतां येतो. तु०—काडीआड डोंगर. काडीआड गेला तो डोंगराआड गेला.

काडीचोर, तो पाडीचोर—जो काडी चोरतो तो पाडी (वासरूं) चोरणारच, अशा तर्कानें एखादी लहान चोरी करणाऱ्यावर मोठ्या चोरीचा साहाजिक आळ येतो.

डोळा तर फुटूं नये आणि काडी तर मोडूं नये; काडी न मोडे व डोळा न फुटे—(डोळ्यांत बारीक काडीनें औषध वगैरे घालण्याच्या क्रियेवरून) एखादी गोष्ट अत्यंत कुशलतेनें करावयाची असल्यास म्हणतात. कोणासहि अल्पहि न दुखवतां एखादें कार्य साधावयाचें असलें म्हणजे ही म्हण योजतात.

काडी मोडून दोन तुकडे—काडीचे जसे वेळ न लागतां पटकन तुकडे होतात तसे कोणत्याहि गोष्टीचा तावडतोब तडकाफडकी निकाल लावावा.

काड्डि जाल्ले तरी दांतांतु घालू येत्ता—(गो.) काडी झाली तरी दांतांत घालतां येते.

काडीचा चोर फांशीची शिक्षा—लहान अपराधास मोठी शिक्षा. 'काकडीची चोरी०' पहा.

काडीचा शिरकाव, तेथें मुसळाची धांव—जेथें एकदां काडीचा शिरकाव झाला तेथें मुसळीचाहि शिरकाव लवकरच होऊं शकतो. एकदां फूट पडली म्हणजे ती वाढतच जाते. एकदां एखाद्या गोष्टींत बोट शिरकलें म्हणजे तेथें पूर्ण प्रवेश होण्यास वेळ लागत नाहीं. तु० चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः ।

काडीची आग माडीस लागती—मोठी माडी जाळावयासहि एक काडी पुरेशी होते. क्षुल्लक कारणावरूनहि मोठमोठे अनर्थ घडून येतात. 'काडीची आग माडीस लागणें' पहा.

काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता (हीं बरोबर होत नाहींत)—संपत्तीपेक्षा अधिकार हा श्रेष्ठ आहे. अल्प अधिकारानेंहि मोठें काम होतें व वाटेल तितकी संपत्ति मिळवितां येते.

काडीनें जोडावें आणि लाखानें मोडावें—संपत्ति मिळवितांना ती अल्प अल्प कां होईना पण तिचा संग्रह करावा. द्रव्यार्जन करतांना कितीहि क्षुल्लक लाभ असला तरी तो हातचा जाऊं देऊं नये व योग्य कार्याकरितां कितीहि खर्च करण्याचा प्रसंग आला तरी माघार घेऊं नये. कवडीनें जोडावें इ० असाहि पाठ आहे—पहा.

काडीमात्र अकलेचें तोल, भाराभर विद्येचें मोल (सारखेंच)—बुद्धि नसेल तर अनेक विद्या संपादन करूनहि कांहीं लाभ नाहीं. बुद्धि किंवा युक्ति थोडीशी असली तरी ती वेळेवर जी उपयोगी पडते तशी भाराभर पुस्तकी विद्या पडत नाहीं. वरं बुद्धिर्न सा विद्या विद्यातो बुद्धिरुत्तमा । बुद्धिहीना विनश्यन्ति यथाते सिंहकारका ॥—पंचतंत्र ५.३१. आपल्या विद्येचें फल पाहण्याकरितां रानांत सांपडलेल्या सिंहाच्या सांगाड्यापासून तीन ब्राह्मणांनीं आपल्या विद्येच्या सामर्थ्यानें सिंह तयार केला. चवथा बुद्धिवान् होता तो सिंह जिवंत होण्यापूर्वी झाडावर जाऊन बसला. तेवढा वांचला, बाकीच्या तिघांस सिंहानें खाल्लें. याप्रमाणें पंचतंत्रांत गोष्ट आहे.

काडिया घरांक आंगटे (चिंदी) माड—(गो.) काड्यांच्या (काटक्यांच्या) घराला चिंध्यांचें शाकारणें. ज्याच्या त्याच्या दर्जाप्रमाणें वागणूक.

कांडी——कांडीकर्मेल एक जालें, आंवाळो गडगडलों—(गो.) अळवाची देठी आणि तिचा खाजरेपणा नाहींसा करणारें कर्मेल नांवाचें फळ हीं दोन्ही एक (शिजून एकजीव) झालीं आणि आंवळा मात्र बाजूला गडगडून गेला. आपापसांत भांडणारे नातेवाईक कालांतरानें एक होतात. आणि त्यांची बाजू घेऊन भांडणारा किंवा कलागत लावणारा तिऱ्हाईत इसम तोंडघशीं पडतो.

कांडी——(जादूची) कांडी फिरगाळणें-फिरवणें—जादुगार आपली जादूची कांडी आपल्या डाव्या हाताभोंवतीं वगैरे फिरवतो. त्यावरून जादू करणें; कांहींतरी छांछू मंत्रतंत्र, जादूटोणा करणें; चमत्कार दाखविणें. पुढें पहा.

(यक्षिणीची) कांडी फिरविणें—(हा वाक्प्रचार पाश्चात्य आहे. आपल्याकडे यक्ष-यक्षिणींजवळ 'कांडी' नसे) चमत्कार घडवून आणणें; एखादी अतर्क्य गोष्ट घडवून आणणें. कांहीं अजब युक्ति करून पूर्वी घडलेल्या बनावाच्या अगदीं उलट बनाव घडवून आणणें.

काड्डू——काड्डू हो काय नी सशाची पोरी करूंक जाय—(गो.) [काड्डू=गांडूळ] गांडुळानें सशाच्या मुलीस बायको करूं बघणें, यासारखी हास्यास्पद असंभाव्य गोष्ट.

कांडें——कांडें चिरणें—आट्यापाट्यांच्या खेळांत सूर धरणारानें चांभार पाटीवर गड्यास टाळी देऊन पहिल्या पाटीस पाय लावून येऊन पुन्हां चांभार पाटीस पाय लावून टाळी देणें. खेळास सुरुवात करणें.—केसरी २२-६-३४.

अडचा-अडीच कांड्यावर येणें—गव्हाच्या ताटास ओंबी येते तेव्हां अडीच पेरें असतात. यावरून फुटून बाहेर पडण्याच्या बेतास येणें; कोणतीहि गोष्ट शेवटास पोंचण्याच्या बेतास येणें; परमावधीस पोंचणें; चिडण्याच्या, रागावण्याच्या बेतास येणें.

काडेचिराईत——काडेचिराईत ही कडू वनस्पति हिंवतापावरील काढ्यांत वापरतात. यावरून कडू, नको असलेला, नावडता मनुष्य.

कांडेपेरें——कांडेपेरें पाहून—(गाय, बैल वगैरे विकत घेतांना) शरीरयष्टि वगैरे नीट पाहून; अंगकाठी, हाडपेर वगैरे मजबूत आहे किंवा नाहीं याची नीट पारख करून.

कांडेपेरें मिळणें-कमजास्त होणें—वरीलप्रमाणें मोजमाप बरोबर जुळणें किंवा न जुळणें.

कांडेपेरें लावणें-लावून पाहाणें—मोजमाप ताडून पाहाणें; वहिमी मनुष्याच्या पायाशीं चोराच्या वगैरे पायाचें माप इत्यादि ताडून पहाणें.

काढणें——आभाळ-पाऊस काढणें—वाऱ्यानें ढगें येणें; ढगांनीं आकाश भरून येणें.

कज्जा काढणें—भांडण उकरून काढणें; तंटा उपस्थित करणें; वाद आरंभणें.

काढा काढणें—१ अधिक उपटणें; लाटणें; वर्तोळा घेणें. २ लोभी बनणें; अतिशय हांव धरणें. ३ पाठलाग करणें. 'तें देखोनि शैल्यांच्या सावळीं । काढाओ काढिला।' –शिशु ९५६. ४ कर्ज काढणें; उसनें घेणें.

काम काढणें—१ मुद्दाम काम लांबविणें; दिरंगाई करणें. २ (व.) कांडात काढणें; मारणें; ठोकणें; नाश करणें; ठार करणें. ३ रतिसमागम करणें व त्यांत दमविणें.

केश काढणें—श्मश्रु करणें; वपन करणें.

घोडी काढणें—घोडीस घोडा दाखविणें; वळू देणें.

तोड काढणें—उपाय सुचविणें; अडचणींतून सुटण्याची युक्ति करणें; मार्ग दर्शविणें.

तोंड बाहेर काढणें—बिनधोक, मोकळेपणानें किंवा अब्रूनें बाहेर पडणें; भीति, शरम न वाटणें.

दाणा-पीक काढणें—शेतांतून पीक गोळा करणें; धान्यादि पिकविणें; पिकाची कापणी, वेंचणी, सोंगणी इत्यादि करणें.

दुखणें काढणें—१ आजारांतून उठणें; दुखण्यांतील कष्ट सहन करणें. २ आजारी मनुष्याची शुश्रूषा करणें; आजाऱ्याची खस्ता खाणें.

दैव-प्रारब्ध-नशीब काढणें—भाग्य उदयास येणें; ऐश्वर्यास चढणें; दैव उघडणें; उत्कर्ष होणें.

रडें काढणें—रडावयास आरंभ करणें; भोकाड पसरणें; आ वासणें; ओरडूं लागणें.

शेत-घनजर-नवें रान काढणें—झाडेंझुडपें काढून जमीन साफ करून ती पेरणीयोग्य करणें; नवीन जमीन लागवडीस आणणें; नवीन जमीन वहित करणें.

काढते घेणें—भांडण, तंटा वगैरेंतून पाय मागें घेणें; स्वतःला सोडवून घेणें; दूर सरणें.

काढल्या कामाचा-रेघेचा—सांगकाम्या; जेवढें बजावून सांगितलें तेवढेंच करणारा.

काढून वचप—(गो.) घरांतून निघून जाणें.

❀ काढ भटणी, पिठा रोस—(गो.) स्वयंपाकाला नारळाच्या रसाची अवश्यकता होती. पण प्रयत्न करूनहि नारळ आयत्यावेळीं न मिळाल्यामुळें तो म्हणतो, 'भटीण बाई आतां रसाच्या ऐवजी पीठच पातळ करून घाला.' हवी असलेली वस्तु न मिळाल्यामुळें तत्सदृश अशा दुसऱ्या पदार्थानें गरज भागवून घेणें.

काढा तुमचा देव्हारा, पुजूं द्या माझा लांडा बैल—देवाचा देव्हारा बाजूला करून लांडा बैल प्रथम पुजण्याची तयारी करणें; महत्त्वाची गोष्ट बाजूला टाकून क्षुल्लक गोष्टीस गैरवाजवी महत्त्व देणें; आपलाच भलताच हेका, हट्ट गैरवाजवी असतांहि चालविणें.

काढिल्लॉ वडॉ ब्राह्मणा माथ्यार—(गो.) कढईंतून तळून काढलेला एकूण एक वडा भटजीच्या डोंबल्यावर घातला. एखादी आवडती, अपूर्व वस्तु आपण मोठ्या परिश्रमानें मिळवावी आणि तिचा उपयोग कुटुंबांतल्या माणसांना किंवा स्वतःला न होतां ती सगळीच्या सगळी परक्या व अप्रिय अशा व्यक्तीला देऊन टाकण्याचा प्रसंग यावा, अशा वेळीं उपयोजितात.

काढा——काढा ओढीचा धनी—कर्जबाजारी मनुष्य; अतिशय देणें झालेला मनुष्य; अनेकांचा रिणको.

काढा काढणें; काढ्यावर-काढ्यानें काढणें—१ उसने दिलेल्या पैशावरचें व्याज धान्य, पैसे इ. रूपानें घेणें. २ अशा तऱ्हेचा व्यवहार करणें.

काढा घेणें—खरेदी करतांना योग्य मालाखेरीज आणखी वर (वर्तावळा) मिळविणें.

❀ एका पैशाची खरेदी, दोन पैशांचा काढा—खरेदी थोडी करून वर्तावळा मात्र तीपेक्षां जास्त मिळविण्याचा अयोग्य व्यवहार.

काढा——काढ्यांत कोळणें—१ काढ्यांत दुसरें औषध मिसळून देणें. २ दुःखानें क्षीण होणें; अतिशय रंजीस होणें; दुःख कष्टानें सहन करणें. 'पाहुन मनाचा खंबीर दुःखें पहा काढी कोळतें।' –प्रला १०२.

काणा——काण्या डोळ्यानें पाहाणें—नेत्रकटाक्ष मारणें; नेत्रसंकेत करणें; डोळे मारणें.

❀ **डोळा काणा असावा, पण मुलुख काणा नसावा**--काणा मनुष्य सामान्यतः लबाड, धूर्त असतो अशी समजूत आहे. त्यावरून डोळ्यानें काणे किंवा व्यंग असलें तरी चालेल पण मुलुखकाणे म्हणजे साऱ्या मुलखांत लबाड म्हणून प्रसिद्ध नसावें. असा मॅनवेरिंगनें अर्थ दिला आहे व त्यास तुलनेसाठीं Panci monoculi sunt honesti ही लॅटिन म्हण दिली आहे पण या म्हणीचा वास्तविक अर्थ डोळ्यांत एखादें व्यंग चालेल पण देश धान्यादिकांनीं परिपूर्ण असावा, असा आहे. काणीपेठ पहा. [काणादेश = समृद्ध, सोयीचा नसलेला देश.]

काणा कैपती (कैफती) व अंधळा हिकमती—सामान्यतः तिरवें पहाणारा मनुष्य लबाड असतो व अंधळा मनुष्य नेहमीं कांहीं तरी भानगडी करीत असतो. तिरवें पाहणाऱ्या मनुष्यास एकाकडे पाहत असतां दुसऱ्याजवळ बोलत आहे असें दिसतें. त्यामुळें तो एकाजवळ बोलत असतां दुसऱ्यास कांहीं नेत्रसंकेत करीत आहे असें दिसतें. त्याचप्रमाणें अंधळा मनुष्य परस्वाधीन असल्यामुळें व त्यास लोक काय करतात हें दिसत नसल्यामुळें नेहमीं संशयी असतो व आपला उद्देश सरळ रीतीनें साधणार नाहीं असें मानून कांहीं तरी हळूच भानगडी करीत असतो. तसेंच त्याचे कान फार तीक्ष्ण असल्यामुळें लोक काय बोलतात तें त्यास ऐकावयास येतें व अनेकांच्या भानगडी कळतात; त्यांचा तो फायदा घेतो.

कचित् काणा भवेत् साधु—एका डोळ्यानें अंधळा असणारा मनुष्य बहुधा सरळ वागणुकीचा नसतो; त्याला अनेक लोकांबद्दल ते आपल्या व्यंगास हिणवितील म्हणून संशय किंवा एक प्रकारचा द्वेष वाटतो व त्यामुळें तो नेहमीं फार धूर्ततेनें वागतो. तु०-लॅटिन-panci monoculi sunt honesti. सबंध श्लोक असा-क्वचिद्दन्तालको मूर्खः क्वचिद्दानवती सती । क्वचित्काणो भवेत्साधुः खल्वाटो निर्धनः क्वचित् ॥

अंधळ्यांत काणा राजा--जेथें सर्व अंधळे लोक असतील तेथें एका डोळ्यानें दिसणारास त्यांचें प्रमुखत्व सहजच प्राप्त होतें. तु०-वासरांत लंगडी गाय शहाणी.

काणि——काणि सांग म्हटल्यानं उं म्हुणुक जाय—(गो.) जो कहाणी सांग असें म्हणतो त्यानें 'हं ! हं !' असा हुंकार दिलाच पाहिजे. अमुक एक कार्य कर म्हणून एखाद्याला भरीस पाडावयाचें आणि आपण मात्र त्याच्यापासून अलिप्त राहावयाचें, ही गोष्ट बरी नव्हे.

क्वचित् काणी पतिव्रता—काणी स्त्री बहुतकरून शीलवान नसते. वास्तविक क्वचित् गानी (म्हणजे गाणारी) पतिव्रता । असा पाठ आहे. तेव्हां यावरून चुकीनें ही म्हण प्रचारांत आली असावी. मॅनवेरिंगनें ही म्हण दिली आहे.

काणीपेठ—ज्या पेठेंत स्थानिक धान्याचा सांठा फारसा नसल्यामुळें जी दुसऱ्या पेठेवर अवलंबून असते व जेथें भावामध्यें वारंवार बदल होत असल्यामुळें स्थिरता नसते व त्यामुळें व्यापाऱ्यांस लबाडी करावयास सांपडते अशी पेठ. सचोटीची नव्हे अशी पेठ.

काण्ण——काण्णा कॉम् फूटप—(गो.) मुसळाला अंकुर फुटणें. ज्याच्या जगण्याची आशा सर्वांनीं सोडली आहे असा ऐखादा रोगी त्यांतून बचावल्यास 'मुसळाला अंकुर फुटले' असें म्हणतात. अशक्य गोष्ट घडणें.

कात——कात टाकणें—सर्प जीर्ण झाल्यास आपल्या अंगावरची कात टाकून पुन्हां तकतकीत होतो त्याप्रमाणें पुन्हां ताजेतवाने होणें; पुनरुज्जीवन होणें, नवजीवन धारण करणें.

कातीला येणें--१ सर्पाची अवस्था कात टाकण्याच्या स्थितीस येणें. २ क्षीण होणें; जीर्ण होणें; वृद्धावस्था प्राप्त होणें.

कात भागत् पुण जात भागना—(गो.) चामडी (देह) झिजेल पण स्वभावधर्म नष्ट होणार नाहीं. 'सुंभ जळेल पण पीळ जळत नाहीं' या अर्थानें.

कात——कात खावून पावणेआठ आणि तूप खावून सवा आठ, काय कामाचे?—(कातानें वीर्य पातळ होतें व तो फार खाल्लयास पुरुष क्षीण होतो; याच्या उलट तूप खाल्लयानें सशक्त बनतो.) थोडेसें निमित्त झाल्याबरोबर ज्याच्या प्रकृतीवर परिणाम होतो अशीं माणसें कामाच्या उपयोगी नाहींत.

कातडें-डी——डोळ्यावर कातडें ओढणें--डोळेझांक करणें; लक्ष न देणें; दुर्लक्ष करणें.

कातडें-कातडी पांघरणें--गाढवानें आपलें रूप झांकण्याकरितां सिंहाचें कातडें पांघरलें होतें; त्याप्रमाणें मनांतील आशय बाहेर न दिसूं देणें; ढोंग करणें; खोटी बतावणी करणें. 'परंतु दोघांचा न्याय चालत असतां अनाहुत मध्येंच तोंड घालून व्यवस्थाचें कातडें पांघरून कांहीं घोटाळा करणें

अगदीं रास्त नाहीं.' –टि.४-१२८. ['सिंहाचें कातडें पांघरणारा गाढव' अशी एक इसापनीतील गोष्ट आहे. त्याप्रमाणें पंचतंत्रांत वाघाचें कातडें पांघरून चरणाऱ्या एका गाढवानें गाढवीस पाहून मोठा शब्द केल्यानें आपला नाश करून घेतल्याची गोष्ट आहे. 'व्याघ्रचर्मप्रतिच्छन्नो वाक्कृते रासभो हत: ।'–पंचतंत्र ४.५३.]

सिंहाचें कातडें पांघरणें––लटकेंच अवसान आणणें; शौर्याची बतावणी करणें.

❀**कातड्यासारखी पोळी, पचण्याला महाग झाली**– १ पोळी जर कातड्यासारखी चामट झाली तर ती खाऊन पचविणें भयंकर त्रासदायक होणार. त्यापेक्षां न खाणें बरें, असें स्वाभाविकपणेंच वाटतें. २ कातड्यासारखी पातळ पोळी असूनहि जिरत नाहीं अशी प्रकृति.

कातणें——कातून पिंजणें–काढणें—फार काळजीपूर्वक एखादी गोष्ट करणें; पुष्कळ श्रम घेऊन तयार करणें; नांवारूपास आणणें.

कातबोळ——घोडकीला कुंकू व वांझेला कातबोळ––विधवा कुंकू लावीत नाहींत व कातबोळ हा बाळंतिणीस लागतो. तेव्हां ज्या गोष्टीची आपणांस जरूर नाहीं त्या गोष्टीची व्यर्थ चौकशी करण्यांत काय फायदा. अशा अर्थाच्या बऱ्याच म्हणी आहेत. तुलना–'गमन नसे ज्या गांवीं । तेथील वाट कशास पुसावी ॥'–अमृत (नवनीत ४४२.)

संन्याशास सूळ व वांझेस कातबोळ—वरीलप्रमाणेंच. संन्याशी सामान्यतः सूळावर देण्याइतकी शिक्षा असलेला गुन्हा करणार नाहीं, तेव्हां त्यास सुळाची गरज नाहीं; किंवा संन्याशाला शूलासारखें शस्त्र कशाला पाहिजे ! तसेंच वांझेला बाळंतिणीसाठीं लागणारा कातबोळ कशास पाहिजे ! भलतें भलत्याला.

वांझेस कातबोळ कशास—कातबोळ हा बाळंतिणीस दूध यावें म्हणून पहिल्या दहा दिवसांत देतात. ज्या स्त्रीस कधीं मूल झालें नाहीं तीस कातबोळाची जरूर नाहीं.

पोराचें पोर गेलें नि कातबोळाचें मागणें आलें–– मुलास पाजण्याकरितां दूध यावें म्हणून कातबोळ वाण्याकडून आणवून घेतला; पण तितक्यांत मूल गेलें. परंतु वाण्याचा मात्र तगादा सुरू झाला. एक मूल गेल्याचें दुःख आहेच व त्याच्याकरितां केलेली खटपट फुकट जाऊन पुन्हां त्याबद्दलचें ऋण फेडण्याची जबाबदारी अंगावर पडली. कार्य तर साधलें नाहींच; पण उलट दुप्पट ओझें मात्र अंगावर पडलें.

कातबोळाला गेला आणि बारशाला आला––बाई बाळंतीण झाल्यावर कातबोळ आणण्यासाठीं जो गेला तो दहा दिवसांनंतर बारशाला परत आला. कातबोळ दूध येण्यासाठीं दहा दिवसांतच देतात तेव्हां पुढें त्याचा काय उपयोग ? अक्षम्य दिरंगाई.

कातर, कातरी, कात्री——कातर-कातरी चालविणें–लावणें—कातरीनें कागद वगैरे कापतात त्याप्रमाणें खर्चांत कपात करणें. काटकसर करणें; खर्चांत वगैरे छाटाछाट करणें.

कातऱ्या चोर—खिसेकातरू; लोकांचे कातरीनें खिसे कापून चोरी करणारा.

कात्रींत धरणें—कात्रीच्या दोन पात्यांत वस्तु धरतात त्याप्रमाणें अडचणींत आणणें; पेंचांत धरणें; दोहीं बाजूंनीं न सुटका होईल असें अडकाविणें.

कात्रींत सांपडणें—दोन संकटांत अडकणें. हा मार्ग धरावा तरी अडचण व दुसरा धरावा तरी अडचण, अशी स्थिति. 'बाहेर बेअब्रू अन् घरांत हिचा जांच ! अशा दुहेरी कात्रींत सांपडले आहेत !'–जादुगार पृ. ७४.

❀ **हातावर साखर आणि मानेवर कातर**—बोलावयाला गोड परंतु आंतून नुकसान करणाऱ्या मनुष्यास म्हणतात; वरपांगी चांगला पण आंतून दुष्ट मनुष्य.

कातरखटाव——कातरखटाव, दादल्यापेक्षां बायको शिटाव—(वांय.) कातरखटाव गांवच्या बायकांविषयीं ही म्हण आहे. तेथील बायका पुरुषांपेक्षां बिलंदर असतात अशी प्रसिद्धी दिसते.

कातरवेळ——ऐन तिनिसांज. 'मग काय करतां इथें बसून ? कातरवेळ झालीना ?'–स्वप ३४.

कातल–ली——कातलि गोडि म्हणु कर्टि चाबचिवे ?––(गो.) खोबरें गोड म्हणून करवंटी चावावी काय ?

कातलेन खावचो फोव, नशीबांत भोगचो घोव; कातलेनें खावंचो फोवुं, अदृष्टानें मेळचो धोवुं—(गो.) ओल्या खोबऱ्याच्या तुकड्याबरोबर पोहे खावे आणि भाग्यानें चांगला नवरा मिळवावा. खोबऱ्याचा तुकडा आणि पोहे यांची साथ उत्तम व चवदार अशी जमते. मुलीच्या स्वभावधर्माशीं मिळता जुळता आणि संसाराला गोडी आणणारा असा नवरा मुलीचें भाग्य असलें तरच लाभायचा.

काती——कातीला वात लावून येणें––(व.) काटीला वात लावून येणें असें पूर्वीचें रूप असावें. [काटी=

काटकी, लहान काडी.] काडवात काटकीच्या टोंकाला कापूस गुंडाळून तयार केलेली असते. अंधार पडला असतां उजेडासाठीं काडवात पेटलेली घेऊन येणें. (ल.) योग्य वेळीं हजर न होतां रगड उशीर करून हजर होणें. 'आतां आलास कातीला वात लावून ?'

कात्या——कात्याचा पाऊस–कृत्तिका नक्षत्राचा पाऊस.

काथवट——काथवट हंसते कुंडयाला आणि म्हणते, बाळा मी अकद व तुझें तोंड रुंद––[काथवट= मातीची परात, पसरट भांडें. अकद=आकार नसलेला.] काथवट आणि कुंडा दोन्हीहि मातीचींच भांडीं असतात, आकार मात्र निराळा. तेव्हां त्यांनीं एकमेकांस नांवें ठेवण्याचें कांहीं कारण नाहीं; दोन्हीहि सारख्याच योग्यतेचीं, त्यांत श्रेष्ठ कनिष्ठ कांहीं नाहीं. वास्तविक काथवटीचेंच तोंड कुंडापेक्षां रुंद असतें. परस्परांस नांवें ठेवणें.

काथा-थ्या——काथ्या कुटणें; काथ्याकूट करणें ––नारळाचा काथ्या कितीहि कुटला तरी त्यांतून कांहीं निघत नाहीं. त्याप्रमाणें ज्यापासून कांहीं बोध होत नाहीं असा निष्फळ, निरर्थक वादविवाद; व्यर्थ श्रम करणें; वंध्यामैथुन.

❀ **काथानी दोरडी बळे पण वळ नही सुके**— सुंभ जळलें तरी पीळ जात नाहीं. सुंभ जळाला पण पीळ तसाच.

कांदा——कांदा आणि मर्दाचा बांधा––कांदा खाल्ल्यानें मनुष्य सशक्त होतो. त्याचें शरीर सुदृढ होतें.

कांदा कापायला बकऱ्याच्या वेळचा मंत्र कशाला–– मुसलमान लोकांत बकरा मारण्याच्या पूर्वी एक प्रार्थना म्हणण्याचा रिवाज आहे. साधी गोष्ट करावयाची त्यास मोठें अवडंबर कशाला माजवावयास हवें. तु०–कांद्याला बिसमिल्ला कशास ?

कांदा खावा आणि दुर्गंध विकत घ्यावा—कांदा खाल्ला असतां मुखास दुर्गंधी यावयाचीच; ती टाळतां येत नाहीं. तेव्हां तो न खाल्ला तर चांगलें–असें कांदा निषिद्ध मानणाऱ्यांचें मत.

दुखणें आलें जोरावर, कांदाभाकर उरावर— अडाणी लोकांची दुखणें बरें करण्याची रीत. जों जों दुखण्याचा जोर वाढत जाईल तों तों अधिक अधिक कांदाभाकरी खात जावी. या म्हणीचा दुसरा पाठ–दुखणें आलें जोरावर, पथ्य गेलें शेरावर.

तुळशीचे मुळांत कांदा लावूं नये—तुळस ही पवित्र मानतात व कांदा अपवित्र मानतात. तेव्हां दोन परस्परविरुद्ध गोष्टींची सांगड घालूं नये. पवित्र वस्तूचें पावित्र्य दुसरी अपवित्र वस्तु जवळ आणून बिघडवूं नये. अन्य पाठ–तुळस उपटणें, भांग लावणें.

लमाणभाऊ आणि कांदेखाऊ—लमाण लोक हे बरेच कांदे खातात. कांदे खाण्याकरितां ते प्रसिद्ध आहेत.

कांद्याचे कोरडयास, मानभावाची बायको व गाढवाचें जित्राप यांना श्रम व खर्च नाहीं—कांद्याचें तोंडीलावणें तो नुसता कापला असतां होतें; मानभावाची बायको (ही स्वतःझोळी फिरवून भीक मागून आणते) व गाढव हें जनावर (हें उकिरड्यावर चरून येतें) या गोष्टी करण्यास किंवा जवळ बाळगणारास त्यांच्याकरितां कांहीं श्रम करावयास नको व यांच्याकरितां कांहीं खर्चीहि लागत नाहीं.

कांद्याला बिस्मिल्ला कशाला—बकरें मारावयाचें असलें म्हणजे मंत्र म्हणावा लागतो तो कांदा कापण्याच्या वेळीं म्हणण्याचें कारण नाहीं. क्षुल्लक गोष्टीचें विनाकारण स्तोम कशाकरितां माजवावयाचें. 'फुंकरानें उडवून देतील, कांद्याला बिस्मिल्ला कशाला !'–खरादे २०६.

कांद्यावर कस्तुरी आणि शालिग्रामावर शेण— कांदा दुर्गंधी असल्यामुळें त्यावर कस्तुरीचा लेप करणें व्यर्थ, व शालिग्रामासारख्या पूज्य वस्तूवर शेण्या घालणें हा मूर्खपणा. भलतीच गोष्ट भलत्याच ठिकाणीं ठेवणें; एखाद्या वस्तूचा भलताच उपयोग करणें.

कान——कान उघडणें—एखाद्या गोष्टीबद्दल पूर्वी झालेली चुकीची समजूत बदलून खऱ्या गोष्टीबद्दलची खात्री होणें किंवा करणें. एखाद्याची समजूत पाडणें; स्वतःची चूक समजून येणें; डोळे उघडणें; गैरसमज झालेला दूर होणें किंवा करणें.

कान उघडून सांगणें—स्पष्ट बजावणें; चांगलें बजावून सांगणें; स्पष्टपणें सूचना देणें.

कानउघ(घा)डणी करणें—चांगली हजेरी घेणें; स्पष्ट बजावून सांगणें; चुकीबद्दल इशारा देणें, ताकीद देणें.

कान उपटणें–धरणें–पिळणें–पिरगळणें—चुकीबद्दल शिक्षा करणें; प्रायश्चित्त देणें; चांगलें शासन करणें. 'त्याला जिंकून जिवंत पकडून त्याचे कान उपटल्या शिवाय आम्ही राहाणार नाहीं.'–बाय २.२.

कान कापणें–कापून हातावर देणें—एखाद्यावर मात

करणें; एखाद्यावर कडी करणें; एखाद्यास शिक्षा लावणें; वरताण करणें; फसविणें; बनविणें. ‘मी तुमच्यासमक्ष याचे कान कापीन.’–नि १४९.

कान किटणें—एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा ऐकून कंटाळा येणें.

कान किटविणें—अशा प्रकारें कंटाळा आणणें. एकसारखें रडगाणें लावणें; किरकिर करणें.

कान कुशिले सूणेंशें भोवचें—(गो.) कान सडलेल्या कुत्र्यासारखें फिरणें.

कानकोंडी वाटणें—संकोच वाटणें; लाजणें; शरमिंधे होणें.

कानखडा-डी लावणें—मनावर ठसविणें; मनावर बिंबवणें; स्पष्ट, बजावून सांगणें.

कानखडी लावून घेणें–स्वतःला अद्दल घडली असतां तीपासून बोध घेणें; स्वतःस शिक्षा झाली असें मानून अनुभव मनांत ठसवून घेणें.

कान झाडणें; कान झाडून मोकळें होणें—१ स्पष्ट नाकारणें; संबंध नाहीं असे दाखवून मोकळे होणें; संबंध सोडणें. ‘भवविषयीं कानझाडी ।’–ज्ञा १३.६१७. २ उपदेश नाकारणें; लक्ष न देणें.

कान टवकारणें; कान टवकारून–पसरून ऐकणें (पाहाणें)—अतिशय लक्ष्य लावून काळजीपूर्वक ऐकणें. ‘भाषण करणार म्हटल्याबरोबर त्यांनीं कान टवकारून पहावें.’–के ३१–५–३०.

कान टोचणें—१ कानाच्या पाळीला भोंक पाडणें. २ कानउघाडणी करणें; खरडपट्टी काढणें; केलेल्या चुकीबद्दल खरमरीत टीका करून दोष देणें. ३ फूस देणें; चिथावणें; चढविणें; भर देणें; कानांत भराविणें.

सोनारानें कान टोचणें—१ परभारें तिऱ्हाइतानें कानउघाडणी करणें; खरडपट्टी काढणें; दोष देणें. २ योग्य मनुष्याकडून कानउघाडणी करणें.

कानठाळ्या बसणें—अतिशय मोठ्या आवाजामुळें कानांतील इंद्रिय बधिर होणें; त्यामुळें कांहीं ऐकूं न येणें; कानांत दडे बसणें.–मोविराट ४.८१.

कान देणें—लक्ष्य देणें; लक्ष्य देऊन ऐकणें. ‘देवोत सादरें मम विनतिकडे ग्रंथकार ते कान ॥’–मोगरे.

कान धरणें—कान धरणें व पिळणें हा एक शिक्षेचा प्रकार आहे. यावरून सामान्यपणें शिक्षा करणें; शिक्षा लावणें; शासन करणें.

कान धरली शेळी असणें—अगदीं ताब्यांत असणें. ‘आम्ही कान धरली शेळी आहों, हुकुमी आहों.’–रा ३.१३७. तु०–शेळीचे कान गोसाव्याच्या हातीं.

कान धरून–पिळून घेणें—जबरदस्तीनें, आपल्या अंगच्या बळानें एखादी विवाद्य वस्तु हिरावून घेणें, ताब्यांत घेणें; आपल्या मनाप्रमाणें एखादी गोष्ट करून घेणें.

कान निवणें; कान थंड होणें—एखादी सुवार्ता ऐकून आनंद होणें; एखाद्या गोष्टीबद्दल उत्कंठा लागली असतां तिच्या बद्दलची चांगली बातमी ऐकून मनाला संतोष होणें.

कान पाडणें—१ धैर्य सुटणें; निराश होणें. २ गरीब बनणें; माघार घेणें; आपला अभिमान जिरला असें वाटून मऊ बनणें. कुत्रा भ्याला म्हणजे कान खालीं करतो यावरून. ‘कान पाडुनि बसे धरणीसी ।’–किंगवि २.२०. ३ काणाडोळा करणें; ऐकलें न ऐकलेलें करणें; दुर्लक्ष करणें. ‘मी ह्याविषयीं कान पाडणार नाहीं.’–बाळ २.१५.

कानपिचक्या करणें–देणें—खरडपट्टी काढणें; कान पकडणें; कानउघाडणी करणें; शिक्षा करणें.

कान पिळून घेणें—स्वतःची चूक कळून आल्यामुळें कबूल करणें व तसें पुन्हां न करण्याबद्दल निश्चय करणें; कानास खडा लावून घेणें; पश्चात्ताप करणें.

कानपूर ओस करून बसणें—ऐकूं येत नाहीं असें भासविणें; दुर्लक्ष करणें; ऐकलें न ऐकलेसें करणें.

कानपूर ओस पडणें—ऐकूं न येणें; बहिरें होणें.

कान फुंकणें—१ कानांत मंत्र सांगणें; गुरुपदेश देणें. २ चुगली करणें; कानगोष्ट सांगणें; मनांत भरविणें; चहाडी, लावालावी करणें.

कान फुटणें—बहिरें होणें; ऐकूं येईनासें होणें.

कान भरणें–भारणें—कान फुंकणें; चाहाडी करणें; एखाद्या गोष्टीबद्दल कांहींतरी सांगून पूर्वग्रह उत्पन्न करणें; चिथविणें.

कान भरवून देणें—चुगली करणें. ‘श्रीमंतांचे कान विसुभाऊंनीं भरवून दिले.’–अस्तंभा ९४.

कान मान हालवप—(गो.) एखादी गोष्ट करण्यासाठीं उत्सुकता दाखविणें.

कान येणें—ऐकूं येऊं लागणें.

कान लांबणें—१ वयानें जसजसे मोठें होत जाईल तसतशी अवयवांची वाढ होत जाते पण त्या मानानें बुद्धीची

वाढ न होतां मनुष्य थोडा फार स्वैरवर्तनी बनूं लागला म्हणजे म्हणतात. ज्याप्रमाणें गाढवाची कितीहि वाढ झाली व त्या मानानें कानांची लांबी कितीहि वाढली तरी त्याची अक्कल वाढत नाहीं त्याप्रमाणें. २ गाढवाप्रमाणें कानांची लांबी वाढणें; मूर्ख होत जाणें.

कानशिलांत देणें; कानशिल रंगविणें—[कानशिला= कानफड] तोंडांत मारणें; गालावर चपराक देणें.

कान होणें—सर्व इंद्रियांची शक्ति जणूं कानांत आणून ऐकणें; अत्यंत लक्ष्यपूर्वक ऐकणें.

कानाआड–कानामागें–कानावरून–कानाऊन जाणें–उपदेश, बोध, ताकीद वगैरेचा योग्य उपयोग न होणें; कानीं पडूनहि व्यर्थ जाणें.

कानाकोपऱ्याचें भाषण—खासगी गुप्त भाषण;कुजबूज; हळूच गुप्तपणें चाललेलें भाषण.

कानागाडा करणें; कानाडोळा–काणाडोळा करणें—दुर्लक्ष करणें; कळलें नाहीं, पाहिलें नाहीं असें दाखविणें. 'स्नानाच्या वेळीं ही बातमी समजली असतांना आपण कानागाडा केला याची बाजीरावसाहेबांना चटपट लागली.' –V. S. २.३७.

पितळेच्या कानाचा—हलक्या कानाचा; दुसऱ्याच्या चहाड्या ऐकणारा.

कानाचा आदळ—ज्याच्या जवळ कोणतीहि गोष्ट गुप्त राहूं शकत नाहीं असा; हलक्या कानाचा.

कानाचा कोन–कोपरा—कोणीहि; कांहींहि. 'ही गोष्ट कानाच्या कोनाला (कोपराला) कळूं दिली नाहीं.' 'तो कानाचा कोन समजला नाहीं.' 'ही गोष्ट कानच्या कोपऱ्यास कळूं देऊं नकोस; नाहींतर पहा, तुझी गर्दनच उडवीन असें राजपुत्रानें बजावून सांगितलें.'–आ. भा. सु. गोष्टी.

कानाचा चावा घेणें—१ कान फुंकणें; कान भरणें; चाहाडी करून मन कलुषित करणें. २ कानांत सांगणें.

कानाचा जड—अर्धवट बहिरा; ज्यास नीट ऐकूं येत नाहीं असा.

कानाचा टप्पा—१ हांकेचें अंतर; सहज हांक मारलेली ऐकूं जाईल इतकें अंतर. २ मनुष्याला ज्या अंतरावरून साधारण ऐकूं येतें इतकें अंतर.

कानाचा तिखट--कान तीक्ष्ण असलेला; ज्यास हळू बोललेलेंहि ऐकूं येतें असा.

कानाचा हलका--कोणीहि खरेंखोटें कांहीं सांगितलें तरी त्यावर सहज विश्वास ठेवणारा;चहाडखोरांचें खरें मानणारा.

कानाची कोन न होणें--कोणालाहि न कळणें. 'कानाचा कोन' पहा.

कानाचे कानवले होणें--कान (पिळवटून पिळवटून) वांकडे होणें; वारंवार उपदेश करूनहि उपयोग न होणें.

कानाचे किडे झाडणें—१ एखाद्यानें चहाडी करून मनांत भरविलेलें किल्मिष काढून टाकणें; मनांतील गैरसमज, अढी वगैरे दूर करणें. २ चांगली खरमरीत कानउघाडणी करणें; झणझणीत उपदेश करणें; चांगली खरमरीत ताकीद देणें.

कानांत खुंट्या ठोकणें—बहिरें होणें; ऐकूं न येणें. 'इतकं अगदीं ऐकूं न यायला मी का कानांत खुंट्या ठोकल्या आहेत.'–नाछ.

कानांत खुंट्या मारणें—१ बहिरें होणें, करणें. २ कानांत खुंट्या मारण्याची शिक्षा करणें. 'कानीं खुंट्या आदळती। अपानीं मेखा मारिती।'–दा ३.७.७३.

कानांत जपणें—कानमंत्र देणें; चुगली करणें; हळूच सुचविणें; एकसारखें सांगत रोहाणें.

कानांत तुळशी (पत्र) घालणें–घालून बसणें—[ऐहिक गोष्टी कानांत शिरूं नयेत व कान शुद्ध पवित्र राहावेत म्हणून कानांत तुळशीचीं पानें घालतात. यावरून] १ ऐकूं येत नाहीं असें भासविणें; ऐकलें न ऐकलेंसें करणें; दुर्लक्ष करणें. २ उपरति झाल्यासारखें दाखविणें; विरक्तीचें सोंग आणणें. 'कर्नल बार यांनीं कानांत तुळशीपत्र घालून इंदोरचा कारभार सब ठीक है म्हणणें शोभत नाहीं.'–विक्षिप्त ३.२३५. –मोर प्रहसन १२. –गांगा.

कानांत तेल घालणें; (गो.) कानां भिंडॅल घाल—[भिंडेल=कोकमतेल] कानांत तेल घातल्यावर कानाचे दडे बसतात, ऐकूं येत नाहीं यावरून कानावर हात ठेवणें; पूर्ण दुर्लक्ष करणें.

कानांत तेल घालून निजणें—कानांत तेल सोडल्यावर कानाचे दडे बसतात. व कांहीं ऐकूं येत नाहीं असें होतें. यावरून पूर्णपणें दुर्लक्ष करणें; उदासीन असणें.

कानांत बोटें घालणें--ऐकूं येऊं नये म्हणून कानाचीं भोंकें बोटें वर ठेवून बंद करणें. आपण ऐकत नाहीं असें दाखविणें. 'खोटें हें म्हणतिल शिव शिव कर्णीं घालतील बुध बोटें॥'–मोस्त्री ४.३६.

कानांत भरणें--१ 'कान भरणें' पहा; चुगली करणें.२ नीट ऐकूं येणें; लक्ष पुरविणें.

कानांत भेंड घालणें--(व.) बहिरेपणाचें सोंग घेणें; ऐकलें न ऐकलेसें करणें; दुर्लक्ष करणें.

कानांत-कानामध्यें मंत्र सांगणें-फुंकणें--चुगली करणें; चिथविणें; चेतविणें; भर देणें.

कानांत वारें भरणें--उच्छृंखल होणें; हुरळून जाणें; उधळणें; बहकणें. 'ही गरीब गाय कानांत वारें भरल्यामुळें उधळली आणि सैरावैरा धांवून अखेर चिखलांत रुतली.' --सु ६१.

कानांत विष ओतणें--मन कलुषित करणें; विरुद्ध चिथावणी देणें. 'मुसलमानांच्या कानांत हिंदूंविषयीं जालीम विष ओतलें गेलें.'--केसरी १०-६ ३० पृ. ८.

कानांतून काढून नाकांत घालणें--कानाचा दागिना नाकांत घालणें म्हणजे नुसतें इकडचें इकडे करणें; मुळांत कांहीं पालट न करणें.

या कानानें ऐकणें व त्या कानानें सोडणें--मनांत न ठेवणें; कोणतीहि गोष्ट समजली तरी तिकडे दुर्लक्ष करणें. तु०--नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडे गेलें वारें.

कानापाठीमागें टाकणें--दुर्लक्ष करणें; ऐकलें न ऐकलें असें करणें. 'त्यांचा निरोप कानापाठीमागें टाकणार नसाल तर सांगतों.'--सुदे १०५.

कानाबाहेर-कानावेगळा करणें--दुर्लक्ष करणें. उदासीन राहणें.

कानामागें टाकणें--१ दुर्लक्ष करणें. 'घरचीं भांडणें तूर्त कानामागें टाकलीं पाहिजेत.'--बाजीराव. २ न ऐकणें.

कानाला खडा लावणें--कानाच्या पाळीमागें खडा लावून दाबून धरण्याचा पूर्वी एक शिक्षेचा प्रकार होता त्यावरून स्वतःला अद्दल घडल्यामुळें पुन्हा एखादी मूर्खपणाची गोष्ट न करण्याबद्दल निश्चय करणें. 'एकएकदां माणसाला ठेंच लागते. पुनः कानाला खडा लावून घेईन !' --पकोघे.

कानावर घालणें--निवेदन करणें; सांगणें; नजरेस आणणें. 'तुमच्या निमंत्रणाचा स्वीकार केल्याचें तुमच्या यजमानांच्या कानावर घाला.'--विवि. ८.११.२०५.

कानावर पडणें--१ ऐकूं येणें. २ परिचय होणें.

(उजव्या, डाव्या) कानावर पडणें-निजणें-लटणें--एका कुशीवर निजणें.

कानावर मान ठेवणें--ऐदीपणानें, निष्काळजीपणानें बसणें.

कानावर येणें--ऐकणें; श्रुत होणें; कळणें; समजणें. 'येणार पुढें पुष्कळ आलें आतांचि काय काना तें।' --मोभीष्म ७.६.

कानावर लेखणी ठेवणारा-बाळगणारा--हुशार, वाकबगार कारकून; लिहिण्यांत तत्पर व तरबेज.

कानावर हात ठेवणें; कानांत बोटें घालणें; कान झांकणें--१ एखाद्या गोष्टीसंबंधीं आपणांस बिलकूल माहिती नाहीं, आपला मुळींच संबंध नाहीं असें दाखविणें. 'जरि ठेविता कर श्रुतिवरि, करिती वैर हें कशाला हो।'--मोद्रोण १९.१०. २ एखादी मनाविरुद्ध गोष्ट ऐकवत नाहीं म्हणून कान झांकणें. 'कर श्रवणिं ठेविते नुघडि नेत्र घे भीतिला।' --मोकेका १०.

कानावरून जाणें--कानाजवळून बंदुकीची गोळी गेली म्हणजे जसा थोडा धक्का बसतो त्याप्रमाणें, १ कान चाटून जाणें; जवळ जवळ अंगावर शेकणें. २ (ल.) किंचित् धस लागणें; थोडाफार चट्टा बसणें. ३ ऐकलेलें असणें; कळलेलें असणें; माहीत असणें.

कानाशीं कान लावणें--गुप्तपणें चर्चा करणें; खलबत करणें; गुप्त मसलत करणें.

कानाशीं लागणें--चुगली करणें; कानांत सांगणें; चहाड्या करणें.

कानास कोन न कळूं-न लागूं देणें--अतिशय गुप्तता राखणें; फार सावधगिरी बाळगणें. 'झाल्यावर सुद्धां कानास कोन लागूं नये ही तर खबरदारी घेतलीच पाहिजे.' --सु १०८.

कानास खडा-डी लावणें--१ स्पष्टपणें बजावणें; खात्री करणें; मनास पटेल असें सांगणें. २ पुढील वाक्प्रचार पहा.

कानास खडा-डी लावून घेणें--झालेल्या चुकीपासून बोध घेणें; सावध होणें; पुन्हां चुकी न करण्याबद्दल निश्चय करणें.

कानास दट्टे-दडे बसणें--१ ऐकूं न येणें; दुर्लक्ष करणें. २ बहिरा होणें.

कानीं कपाळीं रडणें-ओरडणें--सदोदित नेहमीं बुद्धिवाद करीत असणें; नेहमीं पुन्हां पुन्हां सांगणें.

कानीं कवाडे पडणें--कानाचीं दारें बंद होणें; ऐकूं न येणें. 'कानीं पडलीं कवाडें'--चोभा उषा ५०.

कानीं कोचीं बसणें-लागणें--चोरून ऐकण्यासाठीं आड, सांदीकोंदींत बसणें; दडून कानोसा घेणें.

कानींमनीं नसणें--कल्पना नसणें; कधींच ऐकलेलें नसणें; मनांत नसलेलें ऐकणें; ध्यानींमनीं नसणें.

कानीं येणें--ऐकूं येणें. 'माझ्या कानीं नाहीं बाई असें आलें.'-मोरप्रहसन १५.

कानीं सात बाळ्या असणें--(लहान मुलांच्या भाषेंत) आपणांस ऐकूं येत नाहीं, आपण ऐकत नाहीं, लक्ष्यांत घेत नाहीं असें सांगणें. 'आपल्या कानीं सात बाळ्या, खंडोबाच्या आरोळ्या' अशा तऱ्हेचे कांहीं मुलें म्हणतात.

❀ **असतीं मुलें लहान, परी तिखट त्यांचे कान**--आपल्याला मुलें जरी लहान वाटलीं तरी त्यांचे कान फार तीक्ष्ण असतात व तीं जें कांहीं त्यांच्या कानावर पडेल तें सर्व लक्ष्यांत ठेवतात व त्यांना आपणास वाटतें त्यापेक्षां पुष्कळच अधिक कळतें. तु०-Little pitchers have great ears.

घराच्या भयानें घेतलें रान, वाटेवर भेटला मुसलमान, त्यानें घेतले नाक कान--[एक स्त्री नवऱ्याच्या जाचास कंटाळून एका दिवशीं सर्व चीजवस्त घेऊन घर सोडून बाहेर पडली. ती गांवाबाहेर जाऊन एका रानांत शिरली तों तेथें तिला एक मुसलमान भेटला. त्यानें तिच्या जवळची सर्व चीजवस्त घेऊन वर तिचें नाक व कान कापलें याप्रमाणें थोड्या दुःखास कंटाळून घर सोडून ती अधिक आपत्तींत पडली.] घरीं राहण्यास भीति वाटूं लागली, त्रास होऊं लागला, म्हणून रानांत जावें तों अधिकच आपत्ति ओढवावी. एका आपत्तींतून सुटका करून घेण्याचा प्रयत्न करावयास जावें तों भलत्याच आपत्तींत पडण्याचा संभव असतो. तेव्हां पहिल्या आपत्तीसच सरळ तोंड देणें चांगलें.

कान आणि डोळे यांत चार बोटांचें अंतर--प्रत्यक्ष कान आणि डोळे यांत अंतर असतेंच. पाहाणें व ऐकणें यांत तसाच फरक आहे. तेव्हां ऐकण्यापेक्षां प्रत्यक्ष पाहून ठरविणें केव्हांहि श्रेयस्कर. ऐकलेल्या गोष्टीपेक्षां प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवणें रास्त असतें. कारण ऐकलेल्या गोष्टींत व पाहिलेल्या गोष्टींत तफावत असण्याचा संभव असतो.

कान आणि दोहीं जिवांची ताणताण--कोणीं चुगली केली म्हणजे तीपासून दोघांहि व्यक्तींस त्रास होतो; ती ऐकणारा व ती ज्याबद्दल असते तो.

कान उपटले तेव्हां ताळयावर आला--एखाद्याची जेव्हां चांगली खरडपट्टी काढावी तेव्हां तो आपल्या मनाप्रमाणें वागूं लागतो; चांगली शिक्षा केल्याशिवाय मनुष्य वठणीस येत नाहीं.

कान कुरकुटी तेल मीठ मागे, न दे त्याच्या कानास लागे--चुगलखोर लोक नेहमीं दुसऱ्याच्या भानगडींत पडून आपला स्वार्थ साधीत असतात व त्यांस जर संतुष्ट केलें नाहीं तर चहाड्या करून त्रास देतात.

शेळीचें कान खाटकाहातीं--कापावयाची शेळी ही पूर्णपणें खाटकाच्या ताब्यांत असते.

कान खाता तें भांगर कानांत घालचें न्हय--(गो.) कानास खाणारा दागिना कानांत घालूं नये. अहितकर वस्तु सुरेख असली तरी ती त्याज्यच.

कान खावचें भांगार नाका, मान वळ कुबंचो मुंडासु नाका--(गो.) कानाला खाज सुटते म्हणून दागिने नको, मानेला रग लागते म्हणून रुमाल नको. कांहीं एक नको.

चेलीचे कान गुरूच्या हातीं--शिष्यीण ही सर्वस्वी गुरूच्या अधीन असते.

शेळीचे कान गोसाव्या (च्या) हातीं--ही म्हण 'चेलीचे कान गुरूच्या हातीं' या म्हणीचा विपर्यास होऊन बनली आहे व गोसावी शेळी बाळगतात या समजुतीमुळें ती दृढमूल झाली आहे. शेळीचा मालक गोसावी असतो व तो तिला कान धरून पाहिजे तिकडे नेतो. त्यामुळें ती त्याच्या पूर्णपणें अंकित असते. त्याप्रमाणें नोकर लोक हे स्वतः अगतिक असून मालकाच्या पूर्णपणें मर्जीप्रमाणें त्यांस वागावें लागतें. 'आम्ही कान धरिली शेळी आहों, हुकुमी आहों.' -रा ३.१२३.

सोनाराकडून कान टोंचला म्हणजे दुखत नाहीं--मुलाच्या जन्माच्या बाराव्या दिवशीं हिंदुमात्र त्याचे कान टोंचून घेतात. हें कान टोंचण्याचें काम आई करूं लागल्यास तिला तें नीट साधत नाहीं व मूल मात्र फार रडतें पण तेंच सोनार लोक सरावामुळें शिताफीनें करतात व मूल मुळींच रडत नाहीं. यावरून योग्य मनुष्याकडून शासन मिळाल्याशिवाय मनुष्य ताळयावर येत नाहीं व त्या शिक्षेबद्दल त्याला कुरकुरहि करतां येत नाहीं.

कुडास कान, ठेवी ध्यान--मनुष्यानें आपल्याला जें गुप्तपणीं बोलावयाचें तें फार जपून बोलावें. कुडास किंवा भिंतीसहि कान असतात म्हणजे कुडाच्या किंवा भिंतीच्या आड कोणीतरी असण्याचा संभव असतो व त्याच्या कानीं

आपलें बोलणें पडण्याचा संभव असतो. याकरितां नीट सर्व दिशांस पाहून खात्री करून घ्यावी व मग गुप्त खलबतें करावीं.

ज्या सोन्यानें कान तुटतो तें कशाला--ज्या सोन्याच्या दागिन्यानें कान फाटण्याचा संभव असेल तो दागिना कशास वापरावा. आपल्याला जी जबाबदारी पार पाडतां येत नसेल ती केवळ मानाकरितां अंगावर घेण्यांत अर्थ नाहीं. वर पहा.

कान दोळे सुजौने खडयार सुंट फुल्ल्या--(गो.) कान डोळे सुजविल्यावर खडकावर सुंठ फुलून आली. अनेक आपत्ति भोगल्यानंतर जेव्हां यश मिळतें तेव्हां म्हणतात.

कान (कान्न) दोळ्यां सोयरीक--(गो.) कान व डोळे यांची सोयरीक.

कान दोळ्यांक चारि बोटां अन्तर, तरी तांकाना उत्तर—कान आणि डोळे यांमध्यें फक्त चार बोटांचें अन्तर आहे, तरी त्यांचें भाषण नाहीं.

कान द्यावा पण कानु न द्यावा; कान द्यावा पण कानु देऊं नये--आपला एखाद्यानें कान उपटला तरी उपटूं द्यावा पण आपला कोणताहि हक्क गमावूं नये.

कान द्यावा पण कोन देऊं नये—वर प्रमाणेंच, पण शब्दाचा फरक. घराचा किंवा जमीनीचा कोंपराहि देऊ नये ज्याला हक्क नाहीं, त्याला मुळींच थारा देऊं नये.

कान निरुपयोगी झाले तर उपयोगी डोळे--ज्या मनुष्याचे कान बहिरे असतात त्याचे डोळे तीक्ष्ण असतात व तो दुसऱ्याच्या ओंठाकडे पाहूनहि त्याचें म्हणणें समजतो. The eyes serve for ears to the deaf. –साचि ३३३०.

कुंभारणीनें कुंभारणीशीं (कुंभाराशीं) कज्जा केला आणि गाढवाचा कान पिळला--दोन कुंभारणींचें किंवा कुंभार व कुंभारीण यांचें झालें मांडण पण गाढवावर राग निघून त्याला मात्र मार बसला. दोघांचें भांडण चालतें पण त्याचा प्रसाद मात्र कधीं भलत्यालाच मिळाल्याशिवाय राहात नाहीं. कारण वेळेवर दोघांचाहि राग भलत्याच तिसऱ्या व्यक्तीवर निघण्याचा संभव असतो. कुंभार पहा.

बळी तो कान पिळी--जो जबरदस्त मनुष्य असतो तो इतर सर्वांस आपल्या म्हणण्याप्रमाणें करावयास लावतो. तु०–Might is right.

कान फूक म्हळ्यार वायन फुकता—(गो.) कानांत फुंकर घाल म्हटलें तर उखळांत फुंकतो; सांगितलेली गोष्ट न करतां भलतीच गोष्ट करणें.

भटाचें नांव कानभट—भटाला नुसतें भट म्हणा कीं कांहीं विशिष्ट नांव म्हणून कानभट म्हणा सारखेंच; बोध व्हावयाचा तोच होणार. [कान = कान्हा ?]

कानमें तेल डाल बैठे है—'कानांत तेल घालून बसणें' पहा.

काना थावुनु डोळ्यांइतलें लागि—(गो.) कानापासून डोळ्यांएवढें जवळ. कानाडोळ्यांचें अंतर.

कानाचा पोळा (कानाची पाळी) आणि पोटाची चिरी, वोढता तितली वाढता--कानाच्या पाळींतील भोंक किंवा कानाची पाळी जर रोज ओढीत गेले तर ती सारखी वाढत जाते. त्याचप्रमाणें मनुष्याचा आहार संवयीनें जितका वाढवावा तितका वाढत जातो. उलट मिताहारी राहिलें तरी पोट भरतें व तितकें पोषणास पुरेसें असतें. मनुष्याच्या गरजा वाढवाव्या तितक्या वाढत जातात.

कानाचा हलकट व तोंडाचा बोलकट--एखादा मनुष्य अतिशय हलक्या कानाचा म्हणजे कोणी कांहींहि सांगितलें तरी त्यावर विश्वास ठेवणारा व तोंडास येईल तें बडबडत सुटणारा असतो अशास म्हणतात. अविवेकी व अनिर्बंध मनुष्य.

कानाची गोष्ट जीभ फोडते—आपल्या कानीं जी गोष्ट येते ती आपण जिभेनें दुसऱ्याजवळ बोलून टाकतों.

मुढथा कानाची पण अभिमानाची--[मुढा=दुमडलेला, विकृत] अंगांत दोष असूनहि अभिमानी. शरीरानें व्यंगी. म्हणजे कान वांकडे किंवा शरीरास जोडलेले असले तरी मोठ्या तोऱ्यानें वागणारी. तु०–अभिमानाची आणि दीडा कानाची.

डोळ्याचें तें खरें, कानाचें तें खोटें--प्रत्यक्ष पाहिलेली गोष्ट खरी मानावयास हरकत नाहीं पण ऐकीव गोष्टीवर विश्वास ठेवूं नये. गोव्याकडील एक म्हण अशी आहेः–कानांति आयकलें खरें न्हयं, डोळ्यांनीं पळयिलें खरें न्हयं.

कानांत बुगडी, गावांत फुगडी–एखाद्या स्त्रीला आपल्या वैभवाचें प्रदर्शन करण्याची फार हौस असते, अशा स्त्रीस उद्देशून ही म्हण वापरतात.

कानांत व डोळ्यांत चार बोटांचें अंतर—कानानें ऐकिलेली माहिती डोळ्यांनीं पाहिलेल्या इतकी विश्वसनीय नसते.

कानामागून आली नी तिखट झाली; कानामागून

आलें शिंगट, तें झालें तिखट—शिंगें हीं मागाहून फुटतात; कान हे उपजत असतात पण मागाहून येणारीं शिंगें कानांपेक्षां तीक्ष्ण टोंकदार असून टोंचतात. यावरून मागाहून येणाऱ्या पण वरचढपणानें वागणाऱ्या व्यक्तीला म्हणतात '' हे कानामागुनि आले । झाहणे फारची झाले । उघडितीं तयांचें डोळे । '–संग्रामगीतें ४८.—रेंदाळकर कविता, खंड १. चुकीचा पाठभेद—पानामागून आली, तिखट झाली (मिरची).

कानामागून आलें व तिखट झालें; कानामागून शिंगें आलीं, तीं तिखट झालीं—शिंगें हीं कानानंतर फुटतात पण तीं तीक्ष्ण असून टोंचतात. यावरून मागाहून येऊन वरचढपणा दाखविणाऱ्या व्यक्तीस उद्देशून ही म्हण वापरतात.

कानामागून आलें, महालिंग झालें—मागून आलेला किंवा वयानें लहान मनुष्य वरचढ झाल्यास म्हणतात.

कानाला कोंपर जडेना, सासू मेली जांवई रडेना—कोंपर कधीं कानाला लागत नाहीं त्याप्रमाणें दूरचा संबंध जोडून तितका जोडला जात नाहीं. जेथें रक्ताचा संबंध नाहीं तेथें तितका आपलेपणा उत्पन्न होत नाहीं व त्यामुळें सासू मेली तरी त्याचें दुःख जांवयास तितकें वाटत नाहीं; तिच्या मुलीस मात्र वाटेल, कारण ती तिची आई असते पण जांवई त्या मानानें दूरचा असतो. तेव्हां रक्तामांसाचा संबंध असल्याशिवाय माया उत्पन्न होत नाहीं.

कानाला ठणका व नाकाला औषध—दुःख एका जागीं व उपाय भलतीकडेच. एका प्रकारचें संकट असतां भलताच उपाय करूं पाहाणें. कशाचा कशास मेळ नसणें.

एका कानावर पगडी, घरीं रांड उघडी; कानावर पगडी, घरीं रांड उघडी—बाहेर खूप ऐट दाखवावयाची व घरीं अगदीं दैन्य असावयाचें, स्त्रीला नेसण्यास वस्त्रहि असावयाचें नाहीं, अशा मनुष्यास म्हणतात.

कानावेलो प्रसादु—(गो.) कानावरचा प्रसाद. गोमांतकांत भाविक लोक देवाला कौल लावीत असतात त्याची पद्धत पुढीलप्रमाणें असते. पिटकुळीच्या कळ्या किंवा आंब्याच्या पानांचे तुकडे पाण्यांत बुडवून ते देवाच्या पायांपासून तो डोक्यापर्यंतच्या प्रत्येक अवयव विभागावर चिकटवतात. त्या तुकड्यांना 'प्रसाद' असें नांव आहे. प्रत्येक अवयवावर चिकटवलेल्या प्रसादांना निरनिराळा अर्थ असतो. त्यांतहि आणखी डावा उजवा हा प्रकार असतो. जी कळी झडेल ती कुटल्या अवयवावरची तें पाहून देवऋषि त्याचा अर्थ सांगतो. कानावरचा प्रसाद झडला तर देव मागल्या भक्ताचें इच्छित कार्य करण्यास राजी नाहीं असा त्याचा अर्थ होतो. त्यावरून एखाद्या माणसानें आपलें काम करण्याचें साफ नाकारलें तर 'कानावरचा प्रसाद' दिला असें म्हणतात.

कानावैर तक्की मारूं जाय—(गो.) कानाच्यावर डोकें उडवणें. एखाद्याला विनोदानें कांहीं शिक्षा सांगायची झाली तर 'तुझ्या या गुन्ह्याला कानाच्या वर डोकें उडवण्याची शिक्षा दिली पाहिजे,' असें म्हणतात.

कानीं आयिलें, केशीं गेलें—(गो.) कानावर आलें होतें तें केसावर निभावलें. 'जिवावरचें बोटावर गेलें' म्हणतात तसें.

एका कानीं ऐकणें, दुसऱ्या कानीं सोडणें—कोणी कांहीं सांगितलें तरी मनावर न घेणें, ऐकलें न ऐकलेंसें करणें; दुसऱ्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करणें; दुसऱ्याच्या बोलण्यावर विश्वास न ठेवणें.

उंट कोण्या कानीं बसेल याचा नेम नाहीं—उंट पहा.

टोणग्याचें कानीं वाजविली किनरी, तो म्हणे माझी टोंयच बरी—ज्याला एखाद्या गोष्टीची अभिरुचि कळत नाहीं, ज्याला एखाद्या पदार्थाचा स्वाद समजत नाहीं त्याला तो देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. एखाद्या गोष्टीचा भलत्याच ठिकाणीं विनियोग करणें म्हणजे अपव्यय होय. तु०—गाढवापुढें वाचली गीता (तो म्हणे), रातचा गोंधळ बरा होता.

कानकोंडी—कानकोंडी-डा वाटणें—शरमिंधें होणें, वाटणें.

कानडी—कानडेंतुलि (सोपानातुलि) गांटि—(गो.) आरशांतला (स्वप्नांतला) द्रव्यनिधि.

कानडी—कानडीनें केला मराठा भ्रतार—कानडीनें केला मऱ्हाठा भ्रतार । एकाचें उत्तर एका नये ॥ तिनें पाचारिलें इल बा म्हणून । येरु पळे आण झाली आतां ॥–तुकाराम. जोगतुगा ६२. एका कानडी स्त्रीनें मराठा नवरा केला; त्यांचें बोलणें परस्परांस कळत नसे. तिनें इल बा म्हणजे इकडे या असें म्हटलें तेव्हां तो मराठी नवरा त्याचा अर्थ

भलताच समजला. म्हणजे तिनें आपणांस बाबा म्हटलें ही तिनें शपथच घेतली असें समजून तो तिजपासून पळूं लागला. म्हणजे विसदृश गोष्टींची सांगड घातली असतां सुख लागत नाहीं. अनुरूप वस्तूंचा संबंध असणेंच योग्य.

कानडीनें केला मराठी भ्रतार । सुखाचा विचार तेथें कैचा ॥--वरील प्रमाणेंच.

कानफटा——कानफटा-फटया-फाटया नांव पडणें—कानफाट्या लोकांच्या वर्तनाबद्दल लोक फार साशंक असतात. यावरून एखाद्या मनुष्याच्या वर्तनाबद्दल एकदां शंका उत्पन्न झाली म्हणजे ती कधीं जात नाहीं, यावरून म्हण. एकदां का कानफाट्या नांव पडलें म्हणजे तें जन्मभर तसेंच राहातें.

कानवला——कानवला देणें--कान पिरगळणें. (धम्मकलाडू, चापटपोळ्या यांप्रमाणें शब्दांवर कोटी.)

हातापायांचा कानवला होणें--कानवला हें हरभऱ्याच्या डाळीचें पुरण भरून केलेल्या करंज्यासारखें पक्वान्न आहे. करंज्या वांकड्या असतात त्यावरून कानवल्याप्रमाणें हात-पाय आखडणें.

काना—काना मोको न भाय, नही काने बीनसे होय—काना (न्हा) मला आवडत नाहीं व कान्या (न्हा) शिवाय गमत नाहीं, वेळ जात नाहीं. कान्ह्याशीं जमत नाहीं व कान्ह्याशिवाय गमत नाहीं. तु०—शेजीशीं पटेना आणि शेजीवांचून गमेना. पाठभेद—काना मुझको भाय नही, काने बिन व्यौसाय नही.

कानाकोपरा——कानेकोपरे धुंडाळिले, तेथें केरांचे पुंजके सांपडले—(कानाकोपरा=कोनकोपरा) बारीकसारीक गोष्टींत लक्ष्य घालूं लागले म्हणजे कांहीं तरी अप्रिय गोष्टी नजरेस पडल्यावांचून राहात नाहींत.

कानी——कानीको काना प्यारा, और रानीको राना प्यारा—काण्या स्त्रीला काणा नवरा आवडतो, राणीला राजा आवडतो. ज्याचें त्याला प्रिय असतें.

कानीबानी नगरदिवाणी—काण्या बाईला गांवांतील सर्व लोक वेडी समजतात.

कानीची शिंदळकी, जमातीस दंड--(कों.) काण्या स्त्रीच्या शिंदळकीकरतां सर्व जातीस दंड. एकाच्या अपराधा-करितां भलत्याच अनेक लोकांस शिक्षा होणें हा विचित्र प्रकार आहे.

कानू——कान द्यावा पण कानू देऊं नये—कान पहा.

काप——काप गेले (पण) भोकें राहिलीं--श्रीमंती असतांना कानांत काप असतात; पण पुढें ते गेल्यावर नुसती भोकेंच उरतात. त्याप्रमाणें पूर्वीच्या गोष्टींचे नुसते अवशेष आठवणीसाठीं राहणें.

कापटे——कापटे काढणें--(व.) खूप मारणें; बडविणें; ठोकणें.

कापड——कापडें लावणें--पोषाख करणें.

*** कापडं विकिले गांवांतु लाकडं विकूं नये**--(गो.) कापड विकलेल्या गांवांत लांकडें विकूं नयेत. जेथें मानसन्मा-नानें आपण राहिलों त्या ठिकाणीं हलका धंदा करूं नये, कमी दर्जानें राहूं नये.

कापणी——कापणी करुन वार विचारता—(गो.) हजामत करविल्यावर वार विचारणें. कांहीं वारीं हजामत करणें निषिद्ध मानतात. कार्याची वेळ निघून गेल्यावर (कार्य होऊन गेल्यावर) त्याच्या प्रयोजकतेची चौकशी करणें व्यर्थ आहे.

कापणें——कापलें तरी आपलें—आपण शिक्षा केली तरी तें आपलेंच मूल. त्याची काळजी आपल्यालाच घ्यावी लागते.

कापल्या करंगुळीवर देखील मुतायचा नाहीं; कापल्या करंगळीवर मुतायला सांगितलें, तर म्हणेल बारा वर्षें आटलें आहे!—जो मनुष्य दुसऱ्याच्या मुळीं सुद्धां उपयोगी पडत नाहीं अशा मनुष्याबद्दल म्हणतात. करंगळी पहा.

कापूर——चोळला कापूर नासतो—कोणतीहि गोष्ट अति झाली म्हणजे बिघडते.

कापसासारखा हलका आणि वाऱ्यासारखा पळका—कापूर नुसता ठेवला तरी उडून जातो इतका हलका असतो. जो मनुष्य मुळींच हातांत सांपडत नाहीं, कांहीं केलें तरी निसटून जातो अशाबद्दल योजतात.

कापरासारखें तूप, त्याची गोडी अमूप—जें तूप कापरासारखें पांढरें स्वच्छ असतें तें अत्यंत मधुर लागतें.

काप्राक उजो लागिल्ली संगति—(गो.) वास्तविक कापूर आगीपासून दूर असला पाहिजे; पण त्याला आग-लाव्याची संगत असल्यावर नाश हा ठरलेलाच.

कापूस——कापूस महाग करणें; (गो.) कापूस म्हारग करणें-(लठ्ठ माणूस कापसाच्या पोत्याप्रमाणें किंवा राशीप्रमाणें दिसतो; यावरून) कृश होणें; रोड होणें. याच्या उलट **कापूस सवंग करणें**—लठ्ठ होणें.

कापूस वठणें-वेटणें—कापसांतील सरकी काढणें. 'दिवस गेला उटारेटी, चांदण्यारात्रीं कापूस वेटी.' दिवस पहा.

कापसाची मोट—लठ्ठ, स्थूल मनुष्य.

❀ कापूस केव्हडया, चिकट लेवडया—(गो.) घ्यावयाचें थोडें असून केवळ भाव विचारून त्रास देणा त्यास म्हणतात.

कापूस खाल्ले चोटान, बैल खाल्ले बैलान—(गो.) कापूस विकून पैसे आले ते चैनींत उडविले व कापूस वाहून आणणारे बैल पोसण्यास बैल विकले. अविचारानें पैसे घालवून कफल्लक बनणाऱ्याबद्दल वापरतात.

कापूस जोक्ता थीं मूस उपाशीं—(गो.) कापसाच्या बाजारांत माशी उपाशीं; कारण लोणी इत्यादि पदार्थांप्रमाणें कापूस हें कांहीं माशीचें खाद्य नव्हे.

पडतील स्वाती तर पिकतील माणिकमोतीं, कापूस न मिळे वाती—स्वाती नक्षत्राचा पाऊस पडला असतां धान्य अतिशय पिकतें. पण कापूस मात्र या पावसामुळें पूर्णपणें दगावतो.

कांबटी——कांबटीच्या तरवारीनें कधीं वाघ मारला आहे काय?—अयोग्य साधनें वापरून काम होत नाहीं. वाघास मारावयाचें तर त्यास पोलादी तलवारच पाहिजे. ज्या प्रकारचें काम असेल तशीं साधनें वापरलीं पाहिजेत.

कांबळें——भिजत कांबळें जड होणें—कांबळें भिजविलें म्हणजे त्यांत पाणी शिरून तें जड होतें यावरून १ एखाद्या संकटाची उपेक्षा केल्यानें तें जास्तच वाढत जाणें. २ एखादें काम फार लांबत जाणें व त्यामुळें अधिक अवघड होणें. घोंगडें पहा.

कांबळें भिजत पडणें—कांबळें वापरण्याच्या पूर्वी प्रथम भिजवून मळावें लागतें व तें लवकर वाळत नाहीं. यावरून एखादें काम लांबणीवर, दिरंगाईवर पडणें; घोंगडें भिजत पडणें असेंहि म्हणतात.

कांबळ्याची दशी आणि पासोडया ऐशीं—कांबळ्याच्या एका दशीला जी ऊब असते ती कितीहि कापसाच्या पासोड्या पांघरून येऊं शकत नाहीं. लोंकरीचा कपडा हा कापसाच्या कपड्यापेक्षां अनेक पटीनें उबदार असतो; मात्र कापसाचा कपडा मऊ असतो व घोंगडी अंगाला टोंचते.

कांबळ्यावर नकशी, धुळीवर लिंपण—कांबळें काळें असल्यामुळें व तें जाडेंभरडें असल्यामुळें त्यावर काढलेली नक्षी नीट दिसणारहि नाहीं व चांगली येणारहि नाहीं. त्याचप्रमाणें धुळीवर सारवण घातल्यास तें टिकणार नाहीं. यावरून भलत्याच ठिकाणीं केलेले परिश्रम व्यर्थ होतात.

कांबी——कांबी तासप—(गो.) पळून जाणें.

काबूल——काबूलकी लढाई और उपरिकोटकी चढाई, जो जिंकील तो शूर—(ऐति.) उत्तरकाशीला जाण्याकरितां उपरिकोटची चढण चढून जावें लागतें. ही फार कठीण आहे; म्हणून तिची काबूलच्या लढाईबरोबर तुलना केली आहे.– कालेलकर, हिमालयांतील प्रवास १७६.

काबूलची कणीक जवसाशिवाय नाहीं आणि पेशावरची बायको याराशिवाय नाहीं—काबूलच्या बाजूस गहूं व जवस एकत्र पेरले जातात, तेव्हां साहाजिकच कणकेंत जवसाचें पीठ मिसळलेलें आढळतें. त्याचप्रमाणें पेशावरकडील बायकांचें पातिव्रत्य संशयित असतें.

काम——(खांदा देऊन) काम करणें—झटून, मनःपूर्वक काम करणें; कामामध्यें कसून श्रम करणें; अंगावर जबाबदारी घेऊन काम करणें; पूर्ण सहकार्य करून काम करणें.

काम करत्या बैलाला मारणें—(क.) जो काम करतो त्यालाच पुन्हां पुन्हां काम सांगणें व जो करीत नाहीं त्यास मुळींच न सांगणें. जो कुरकुर करीत नाहीं त्यावर अधिक ओझें लादलें जातें. तु०—A willing horse is always saddled.

काम काढणें—१ सपाटून त्रास देणें; सतावणें; छळणें. 'सन १८७३ सालीं होन्याकोळ्यानें बंड केलें व मारवाड्यांचें काम काढलें.'—गुजा ५९.२ (ल.) खोड मोडणें; कुंठित करणें; खरडपट्टी काढणें; जेरीस आणणें; कुट्टा काढणें. ३ ठार मारणें; नाहींसें करणें; शेवट लावणें.

काम कारागर होणें—काम यशस्वी होणें; कामांत यश मिळणें; लाभ होणें; काम तडीस जाणें; कामाचा शेवट फलदायी होणें. 'प्रस्तुत तुम्ही आलियानें काम कारागर होत नाहीं; माघारें जावें.'—भाब ४४.

काम केल्यार दाम दिवप—(गो.) काम केल्यावर दाम देणें; काम झाल्यानंतर त्याबद्दलची मजुरी देणें.

काम चिघळणें—कामांत दीर्घसूत्रीपणा येणें; काम दिरंगाईवर पडणें; कामामध्यें अडचणी उपस्थित होऊन तें लांबणीवर पडणें.

काम चोरणें—अंग राखून कुचराईनें काम करणें;

आपल्या अंगची पूर्ण शक्ति अगर गुण यांचा उपयोग न करतां काम करणें.

काम नसणें--निरुपयोगी, निष्फळ होणें; गरज नसणें; उपयोग न होणें; जरूर न लागणें.

काम बजावणें—पार पाडणें; तडीस नेणें; सिद्धीस नेणें; यशस्वी तऱ्हेनें करून येणें.

काम मनावर घेणें—१ महत्वाचें समजणें; किंमत देणें; अंगावर घेणें; कामाकडे लक्ष्य देणें. २ करण्याविषयीं उद्युक्त होणें; कळकळीनें झटणें; मनापासून झटून करणें.

काम साधणें—१ कसेंहि करून काम पुरें करणें; तडीस नेणें; यशस्वी होणें; शेवटास नेणें; संपादणी करणें. २ फायदा करून घेणें; स्वार्थ साधणें.

कामा नये—१ कामास येत नाहीं; उपयोगी नाहीं; कामास अनुकूल होणार नाहीं. २ चालणार नाहीं; पसंत पडणार नाहीं. ' मना वासना दुष्ट कामा नयेरे । '–राम.

कामा येणें—१ लाभदायक होणें; फलदायक होणें. २ उपयोगी असणें, पडणें; साहाय्यकारी होणें. 'तुला कामा येतील वेव्हाळे ।'– नल १२.

कामाचा गाडा—१ पडेल तें काम करणारा; मेहनतीनें काम करणारा मनुष्य; कसेंहि करून काम रेटणारा, काम चालू ठेवणारा मनुष्य. २ भरपूर काम; गाडाभर काम; अतिशय काम.

कामाचा जड—आळशी, मंद; धीम्मा; काम जलद न करणारा; कोणतेंहि काम अगदीं हळू हळू करणारा.

कामांत काम करून घेणें-उरकणें—मोठें काम चाललें असतें त्यांतच त्याच साधनांनीं एखादें लहानसें कार्य साधून घेणें. ' कामांत काम, भज मना राम '.

कामांत पडणें--१ एखाद्या धंद्यात, व्यवसायांत भाग घेणें, पतकरणें; एखाद्या कार्यांत मन घालणें; काम अंगावर घेणें. २ पराभूत होणें; अयशस्वी होणें; माघार घेणें; पड खावी लागणें.

कामांत पाणी शिरणें—ज्याप्रमाणें पावसाचें वगैरे पाणी घरांत, कोठारांत शिरलें म्हणजे मालाचा नाश होऊन नुकसान होतें, त्याप्रमाणें व्यवहारांत, धंद्यांत बूड येणें; तोटा होणें; नुकसान लागणें.

कामांत भट पडणें—भटाच्या हातीं काम सोंपविलें म्हणजे तो त्यांत घोटाळा केल्याशिवाय राहात नाहीं व त्यामुळें काम बिघडतें. यावरून कामाचा नाश होणें; कामाचा खेळखंडोबा होणें. उत्तर पेशवाईंत भटभिक्षुकांकडे पुढाकार देऊन कामें करून घेण्याची पद्धत पडली होती. कांहीं भट आपला स्वार्थ साधण्यासाठीं हातच्या कामाचा नास करीत. यावरून ' तुझ्या कामांत भट पडो ' ही म्हण रूढ झाली.

कामांतून जाणें—निरुपयोगी होणें; निकामी होणें; कोणत्याहि कामीं येणार नाहीं अशी अवस्था होणें.

कामाला येणें; कामास येणें—१ पतकरणें; चालणें; सहन करणें. ' ही गोष्ट माझ्या मुळींच कामाला येणार नाहीं. ' २ उपयोगी पडणें. ' कठिण समय येतां कोण कामास येतो ॥'–नल १०. ३ लढाईंत पडणें; युद्धांत मरणें. ' त्या गर्दीत बाळाजी महादेव भानू व शंकाजी भोसले, असे लढाईंत कामास आले. '–पेब. १३. ' त्याचा पुत्र हणमंतराव शिंदे. तेहि कामास आले. '–भाव ४६.

कामावर पडणें—१ उपयोगी होणें; साहाय्य होणें; जुळणें; पाहिजे तसें असणें. २ योग्य होणें; बरोबर असणें.

कामीं असणें—१ (व.) कामावर असणें; काम करीत असणें. २ नोकर असणें; काम, चाकरी करीत असणें; पदरीं असणें; आश्रित असणें.

कामीं येणें—१ कामास, उपयोगी येणें. २ लढाईंत मरणें. ' कामाला येणें ' पहा. ' गोखल्यांच्या निशाणाभोंवतीं पांचशें वीर कामीं आले. '–विवि १०. १०. २२९.

कामीं लावणें—१ उपयोग करणें; योजणें; फायदा करून घेणें. २ वेठीस धरणें; काम करून घेणें.

*** काम करणें तें उत्तम, गौरवणें तें मध्यम**—दुसऱ्याला चांगलें बोलून वाटेस लावावयाचें हा मध्यम पक्ष आहे. परंतु त्याचें काम करून देणें हा पक्ष उत्तम होय. Say well is good but do well is better. –सवि २९६७.

काम करतल्याक, तलवार मारतल्याक, विद्या शिकतल्याक—(गो.) करणाऱ्याला काम येतें, लढणाऱ्याला तलवार गाजवितां येते व शिकणाऱ्याला विद्या येते.

काम करतल्याची फाट आनी जेवतल्याचें तोंड पळौं नाका—(गो.) काम करणाऱ्याची पाठ व जेवणाराचें तोंड पाहूं नये. दोन्ही दिसण्याला वाईट दिसतात.

काम करते मनुष्याला, मुशारा असावा चांगला—जो मनुष्य चांगलें काम करतो, त्याला त्याबद्दल मोबदलाहि चांगला देणें योग्य होय.

काम करते मनुष्यावरी, जबरदस्ती न करी—जो

मनुष्य खुषीनें काम करतो त्याच्याच पाठीमागें कामाचा लकडा लावून त्यास त्रास देणें चांगलें नाहीं.

काम करील तो पोट भरील—जो मनुष्य काम करावयास तयार असतो तो कोठेंहि उपाशी मरत नाहीं. त्याला भरपूर खावयास मिळतें.

काम काडीचें नाहीं, फुरसत घडीची नाहीं—कांहीं कांहीं वेळीं किरकोळ कामें करण्यांत सारा वेळ जातो. तीं कामें फारशीं महत्त्वाचीं नसल्यामुळें धड सांगतांहि येत नाहींत पण तीं करावीं तर लागतात व सर्व वेळ खाऊन टाकतात आणि विश्रांति घ्यावयासहि फुरसद मिळत नाहीं. विशेषतः घरांतील स्त्रियांचीं संसारासंबंधीं कामें अशा प्रकारचीं असतात.

काम कामाचा गुरु—काम करीत गेल्यानें तें करण्याची संवय होते व हळूहळू त्यामध्यें प्रावीण्यहि येतें. कामास आरंभ केल्यास तें कसें करावयाचें हें सुचत जातें.—गांगा २७३. तु०—गादी काम शिकवते.

काम कांहीं सरेना, फुरसत कांहीं मिळेना—वर पहा. जो मनुष्य काम करणारा असतो त्यास रिकामें बसणें आवडत नाहीं. नेहमीं तो कांहींना कांहीं तरी काम करीत असतो व काम करणाऱ्याच्या मागेंच कामें लागतात, त्यामुळें त्यास विश्रांति मिळत नाहीं. किंवा जो चेंगट मनुष्य असतो त्याचे हातीं घेतलेलें काम सरतां सरत नाहीं व त्यामुळें त्यास काम आटोपून विश्रांति घेतां येत नाहीं.

काम केल्यारि दाम मेळता; कामाशिवाइ दाम ना—(गो.) काम केल्यावर पैसा मिळतो; कामाशिवाय दाम नाहीं.

काम चांगलें आरंभलें म्हणजे समजा अर्धें झालें—कोणत्याहि कामाचा आरंभ चांगला झाला म्हणजे तें अर्धें झाल्यासारखेंच होतें. आरंभींच जर कांहीं चूक झाली तर ती निस्तरतांना पुरेंपुरेसें होतें व काम कधींच सरत नाहीं. याकरितां कोणत्याहि कामाचा आरंभ करतांनाच पूर्ण विचार करावा. तु०—Well begun is half done.

काम चुकलेल्या नोकराची पदोपदीं परीक्षा—एखादें काम करीत असतां एखादी चूक झाली म्हणजे ती प्रत्येक वेळीं जाचक होते व काम मुळींच सुचत नाहींसें होतें. ज्या मनुष्यास नीट काम करतां येत नाहीं त्यास पावलोंपावलीं अडचण येते व त्याची नालायकी प्रतिक्षणीं दिसून येते.

काम जाऊं, वैद्य मरूं—(गो.) 'गरज सरो, वैद्य मरो,' पहा.

काम झालें पाहिजे तर स्वतः जा, नको तर पाठीव दुजा—स्वतः केल्याशिवाय कोणतेंहि काम नीट होत नाहीं व दुसऱ्यावर अवलंबून राहिल्यास तें बहुतकरून होतच नाहीं. तु०—जो दुसऱ्यावरि विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।

काम थोडें, बोभाट मोठा—कांहीं लोकांस थोड्या कामाचाहि फार बोभाटा करण्याची संवय असते, अशा लोकांस उद्देशून ही म्हण वापरतात.

काम नसतां उदास, बहु कामानें न आयास—काम मुळींच नसल्यानें जो त्रास होतो, त्यापेक्षां काम फार असल्यानें कमी होतो.—सवि ३६३०.

काम ना धंदा (आणि) हरी गोविंदा—रिकामटेकड्या मनुष्याला ही म्हण लावतात.

काम ना धंदो, उद्योग ना व्यापार—(गो.) अगदीं रिकामपण, बेकारी.

काम ना धाम—रिकामटेकडा; ज्याला कांहीं कामधंदा नाहीं असा.

काम नाहीं काडीचें, फुरसत नाहीं घडीची—'काम काडीचें नाहीं०' पहा.

काम नाहीं घरीं, सांडून भरीं—आपल्या घरीं काम नसलें तरी कांहीं तरी काम काढावें. मग तें निरर्थक, उदाहरणार्थ, धान्य सांडून भरण्याचें कां असेना, पण तें घरीं करीत बसावें. काम नाहीं म्हणून आपलें घर सोडून दुसऱ्याकडे जाऊं नये.

काम निर्लज्जेचें करावें, तसें ऐकून घ्यावें—काम जर निलाजऱ्यासारखें केलें तर त्याबद्दल येणारा दोष निमूटपणें सहन करावा, त्याबद्दल कुरकुर करूं नये; पण असें होत नाहीं. निर्लज्जपणाचें काम करणारेहि तसें ऐकलें म्हणजे ओशाळे होतात.—सवि २३२९.

काम पडल्या पुसती, झाल्यावरी विसरती—मनुष्य आपल्या गरजेपुरती दुसऱ्याची चौकशी करतो, परंतु आपलें काम झाल्याबरोबर विसरून जातो. मागून ओळखहि ठेवीत नाहीं. 'कामापुरता मामा' पहा.

दाम करी काम, बिबी करी सलाम—पैशानें कोणतेंहि काम साधतें व कोणतीहि स्त्री वश करतां येते.

आळशास दुण काम, लोभ्यास दुणा खर्च—आळशी पहा.

काम वगीनें करावें किंवा रगीनें करावें—(क.)

कामांत यश मिळवावयाचें असल्यास एक वशिला तरी शोधावा किंवा अधिकार, आत्मविश्वास तरी ठेवावा.

काम वहिवाटल्या अंतीं, मनुष्याची परीक्षा होती—मनुष्याची खरी परीक्षा त्याचें काम आपल्या हातून होऊन गेल्यावर तो आपली ओळख ठेवतो किंवा नाहीं यावरून होते. जोंपर्यंत आपली त्याला गरज आहे तोंपर्यंत आपल्या पुढेंपुढें करणें व आपल्याबद्दल नेहमीं चांगलेंच बोलणें स्वाभाविकच आहे. एखाद्यानें एखादें केलेलें काम चांगलें झालें किंवा वाईट झालें हें त्याचा कांहीं दिवस उपयोग केल्याशिवाय, वहिवाटल्याशिवाय बरोबर कळत नाहीं.

गादी काम शिकवते--मनुष्याला एखादा अधिकार प्राप्त झाला म्हणजे तो कसा वापरावा हें आपोआपच कळूं लागतें. काम करीत गेलें म्हणजे त्याचा सराव होतो व तें कठीण वाटत नाहीं.

काम सरकार निसबत, दावा खुद निसबत—सरकारी काम करीत असतां सरकारचें काम म्हणून आपल्या शत्रूवर सूड उगवून घ्यावयाचा.

काम सरो, वैद मरो—आपल्याला रोग आहे तोंपर्यंत वैद्याची आठवण होते. रोग बरा झाल्यावर रोगी वैद्याची पर्वा करीत नाहीं. गरज सरो वैद मरो. उपाध्यायश्च वैद्यश्च ऋतुकाले वरस्त्रियः । सूतिका दूतिका नौका कार्यान्ते ते च शष्पवत् ॥–सुर १५७.१८९.

काम होऊन जातें, शब्द राहतो—मनुष्यानें कोणाबद्दलहि एखादा (अप–) शब्द एकदां उच्चारला म्हणजे तो परत घेतां येत नाहीं. तो कायमचा राहतो, पण त्याची जी अडचण असते ती कांहीं कायमची राहात नाहीं. वेळ कशीहि निभावून जाते. एखाद्या कामासाठीं एखाद्याजवळ शब्द टाकला व त्यानें अमान्य केला तर काम कांहीं अडून राहात नाहीं; पण आपल्या शब्दाचा मान राहिला नाहीं ही गोष्ट मात्र मागें राहाते.

अगत्याचें काम स्वतः करावें—जें काम निकडीचें असेल तें स्वतः करावें. तें दुसऱ्यावर अवलंबून ठेवूं नये. नाहींतर तें वेळेवर होत नाहीं.

कामका न काजका, शेरभर अनाजका—एखादा मनुष्य निरुपयोगी असून केवळ खावयास भार असला म्हणजे त्याबद्दल योजतात.

कामा चोर, मुशाऱ्या हजर—कामाच्या वेळीं चुकारपणा करावयाचा पण पगाराच्या वेळीं मात्र पुढें हजर, अशा अप्रामाणिक नोकराबद्दल म्हणतात.

कामा तकीद दाम, घोळतल्या आंगा धूम—(गो.) काम करणाऱ्याला पैसा व श्रम करणाऱ्याला घाम.

कामा लागे लौकर, शेती वाढे भराभर—वेळेवर काम करण्यानें उत्कर्ष होतो.

सारा गांव मामाचा आणि एक नाहीं कामाचा—म्हणावयास गांवांतील सर्व लोक आप्त किंवा मामाच्या ओळखीचे किंवा अधिकारांतील; पण वेळेवर एकहि उपयोगी पडणार नाहीं असे. बाहेरून दिसावयास सर्व लोक गोड वागतात पण वेळेवर कोणी पुढें होत नाहीं. प्रसंगीं ज्याचें त्यालाच काम करावें लागतें. कोणीहि आप्तसंबंधामुळें किंवा भिडेनें मदत करीत नाहीं.

कामाचा कंटाळा, अन्नाची वासना, सांगेरे वैद्या दुखण्याची भावना—काम करावयाचा मात्र आळस, पण भूक वगैरे सपाटून लागते. अशा मनुष्यास कांहींहि रोग झालेला नसतो. तेव्हां वैद्य त्याचा रोग कसा सांगणार. तो केवळ आळशी व कामचुकार असतो.

कामाचा वेध, हाच आमचा वेद—वेदाविषयीं जेवढी आस्था व पूज्य बुद्धि त्याहून अधिक कामासंबंधीं असणें. काम करणें हाच धर्म ज्यांचा झाला आहे अशा लोकांचें ब्रीदवाक्य.

कामाचा सुकाळ आणि माणसांचा दुष्काळ—कामें पुष्कळ व मनुष्यबळ कमी असतां योजतात.

कामाची कसूं, पोंचाची सासू—जी स्त्री नेहमीं झटून काम करते ती सर्वांस आवडते. पुढें पहा.

कामाची कसूं, साऱ्या गांवाची सासू--जी स्त्री नेहमीं काम करावयास तयार असते ती सर्वांस सासूसारखी प्रिय असते किंवा ती सासूसारखी गांवांतील सर्व बायकांवर अधिकार गाजवूं शकते. कारण तिची सर्वांना गरज लागते.

कामाची घाई, हळू हळू जाई--काम जरी किती असलें तरी हळूहळू करीत गेल्यास तें सर्व आटोपतें. किंवा काम घाईचें आहे तरी आपला हळू हळू चालला आहे !

बातांची बरकत, कामाची हरकत---काम न करतां गप्पा गोष्टींत वेळ घालविणाऱ्या मनुष्याबद्दल योजतात.

कामांत काम, जपा रामनाम; कामामध्यें काम, भज मना राम—काम करीत असतां तोंडानें एकीकडे रामनामाचा जप करीत गेल्यास स्वार्थ व परमार्थ दोन्ही

साधतात. तु०—अहो येतां जातां बसत उठतां कार्य करतां, सदा देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळतां । घरीं दारीं शय्येवरि रतिसुखाचे अवसरीं, समस्तांची लज्जा त्यजुनि भगवश्चिंतन करी ॥

कामांत चूर दिसती, कांहीं करीत नसती—कांहीं लोक नेहमीं कामांत, गडबडींत असलेले दिसतात पण प्रत्यक्ष त्यांच्या हातून कांहीं झालें असें दिसत नाहीं, अशा मनुष्यांबद्दल योजतात.

कामांत दंग, त्याच्याच कामाला रंग—हातीं घेतल्या कामांत पूर्णपणें तल्लीन झाल्याखेरीज त्या कामाचा चांगला उठाव होत नसतो.

कामांत मग्न, त्याला कसलें विघ्न—जो मनुष्य नेहमीं आपलें सर्व लक्ष्य आपलें काम करण्याकडे देतो, त्याला कोणतीहि अडचण पडत नाहीं.

घेऊन पळण्याच्या कामांत ससाणा—दुसऱ्याला लुबाडण्याच्या कामीं पटाईत मनुष्याबद्दल योजतात. ससाणा हा पक्षी आपल्या भक्ष्यावर एकदम झडप घालून त्यास पकडून उडत घेऊन जातो यावरून.

कामापुरता मामा आणि घरीं सदा रिकामा—एखादें काम करावयाची वेळ आली म्हणजे मी घरांतील मामा आहे म्हणून टाळावयाचें. पण इतर वेळींहि कोणतीहि जबाबदारी न घेतां स्वस्थ आळसांत वेळ काढावयाचा, अशा वृत्तीच्या माणसास म्हणतात.

कामा पुरता मामा, ताकापुती आजीबाई-आत्याबाई—काम साधून घेण्यापुरतें गोड गोड बोलणें; मामा, आत्याबाई इ. नातीं लावणें, पण पुढें मात्र संबंध न ठेवणें. गरज सरो वैद्य मरो.

कामापुरतें बोलावें, शहाणे व्हावे—जो मनुष्य केवळ जरूर तेवढेंच बोलतो व सामान्यतः मितभाषी असतो त्याबद्दल सर्वांस आदर वाटतो. निदान भलतेंच बोलून आपलें हंसें करून घेण्याचा प्रसंग त्यावर कधींहि येत नाहीं.

कामाला ओझरता, खाण्याला पुरता—जो मनुष्य खावयाच्या वेळीं नेमका हजर असतो व भरपूर खातो पण काम करण्याच्या बाबतींत चुकारपणा करतो त्याबद्दल योजतात.

कामाला नडी आणि रिकामपणाला घोडी—कोणतेंहि काम करण्यास सांगितलें असतां हजार सबबी सांगणारी परंतु रिकामपणाच्या वेळी मात्र घोडीप्रमाणें धुडगुस घालणारी मुलगी किंवा स्त्री. किंवा रिकामपणीं घोडीवर बसून उगीच फेरफटका मारणारा मुलगा-पुरुष यांबद्दल वापरतात.

कामाला बाट नाहीं; कामाला हात बाटत नाहीं—काम केल्यानें कांहीं माणूस बाटत नाहीं; म्हणजे काम करण्यांत कोणत्याहि प्रकारचा कमीपणा मानण्याचें कारण नाहीं. –गांगा २३३.

खावयास आधीं, निजावयास मधीं, कामास कधीं कधीं—खावयाच्या वेळीं सर्वांच्या पुढें असणारा, निजावयाच्या वेळीं मध्यें निजणारा (म्हणजे सुरक्षितता) पण कामाच्या वेळीं मात्र चुकारपणा करणारा. आपल्या सर्व सुखसोयी नीट पहावयाच्या पण काम मात्र करावयाचें नाहीं अशा वृत्तीच्या माणसाबद्दल योजतात.

कामास कांपतो, पण घाम येईतों खातो—काम करावयाच्या वेळीं हिंव भरल्याचें निमित्त करून कांपूं लागतो म्हणजे टाळाटाळ करतो; पण खावयाच्या वेळीं मात्र रगडून खातो. अशा स्वार्थी, आळशी, लबाड मनुष्यास म्हणतात.

कामास पुढें नि मानास मागें—कांहीं सज्जन माणसें मुकाट्यानें काम उरकीत असतात, कामाचा कधीं कंटाळा करीत नाहींत. असें असूनहि ते मानासाठीं मुळींच हपापलेले नसतात. पण अशीं माणसें क्वचित्.–केसरी ३१·१२·४०.

आपण कामास लोटावें, कामानें आपणास लोटूं नये—नेहमीं आपण काम आवरीत असलें म्हणजे तें आपल्या आटोक्यांत असतें. तेंच जर साचूं दिलें तर मग आपणास कांहीं तें उरकत नाहीं व उलट आपणच त्याच्या आहारीं जातो. तेव्हां आपण आपलें काम नेहमीं आवाक्यांत ठेवावें.

काम——कामक्रोधादि जिंकावें, स्वस्थ संसारीं असावें—कामक्रोधादि षड्रिपु अथवा मनाचे विकार हे आपल्या पूर्णपणें ताब्यांत ठेवले असतां आपणास संसारांत सुख मिळतें.

कामातुराणां न भयं न लज्जा ।—मनुष्य कामाधीन झाला म्हणजे तो निलाजरा होतो व तो कोणासहि भीत नाहींसा होतो. मूळ श्लोक-अर्थातुराणां न गुरुर्न बंधुः कामातुराणां न भयं न लज्जा। क्षुधातुराणां न रुचिर्न बेला विद्यातुराणां न सुखं न निद्रा ॥

कामदार——कामदाराची घडी, आणि वतनदाराची पिढी—काम करणाऱ्या मनुष्याला घडीची (घट-

केची, वेळेची) किंमत फार असते व वतनदार मनुष्याला वंशजाची (पुत्र, पौत्र वगैरेची) किंमत फार असते.

कामाविणें——कामावें तें सामावें--कामसू मनुष्य कोठेंहि खपतो; त्याबद्दल कोणी कुरकुर करीत नाहीं. –श्यामची आई.

कामीण——कामीण लासप—(गो.) कावीळ बरी होण्यासाठीं मनगट इत्यादि विशिष्ट ठिकाणीं डाग देणें.

*** कामिण जाल्याक सगळेंच हळडुवें दिसता**—(गो.) कावीळ झाल्यास सगळेंच पिवळें दिसतें. पुढें पहा.

कामीन जयाच्या जाहाली नेत्रासी । देखे तो चंद्रासी पीतवर्ण ॥–तुगा ३११०. ज्याच्या डोळ्याला कावीळ झालेली असते त्याला चंद्रहि पिवळा दिसतो.ज्याला कावीळ झालेली असते त्यास सर्व पिवळें दिसतें. मनुष्याच्या मनाचा एकदां पूर्वग्रह वाईट झाला किंवा त्याची दृष्टि बिघडली म्हणजे तो सर्व गोष्टींकडे दूषित दृष्टीनें पाहूं लागतो व मग त्याला सर्व गोष्टी वाईट दिसूं लागतात. निजदोषावृतमनसा मतिसुंदरमेव भाति विपरीतम् । पश्यति पीतोपहतः शशिशुभ्रं शंखमपि पीतम् ॥–सुर १७१.८०१.

कामु——कामु आवयूचॉ सवती भाव (सवती भैण)—(गो.) कामूच्या आईचा सावत्र भाऊ–बहीण. दूरचें नातें किंवा बादरायण संबंधाला उद्देशून वापरतात.

काय——काय करूं, कसें करूं—हा अष्टाक्षरी मंत्र. ज्या मनुष्यास कोणतेंहि काम सुचत नाहीं तो मनुष्य या प्रमाणें म्हणत असतो. ज्याचें मन व्यग्र झालेलें असतें व ज्यास नीट विचार करतां येत नाहीं त्याची नेहमीं गोंधळल्यासारखी स्थिति होते. कसें करूं० पहा.

काय जाणे ?—कोणास ठाऊक; कोण जाणे; मला कांहीं माहीत नाहीं. कोणी सांगावें. कानावर हात ठेवणें.

काय जाळावें ? काय जाळायचें आहे ?—निरुपयोगी, कुचकामाच्या वस्तूस अनुलक्षून तुच्छतेनें म्हणतात. ' काय जाळावें नेऊनि। '– दावि २१०.

काय तो !—अगदीं कुचकामाचा मनुष्य; कःपदार्थ; यःकश्चित्.

कायनुं घायनुं—कांहीं तरी; क्षुद्रता–तुच्छतादर्शक शब्द.

काय माय--(कु.) कांहीं नाहीं; कांहीं तरी.

काय म्हणून; कायम्हून; काहून--कशाकरितां; कोणत्या कारणासाठीं; किं प्रयोजनार्थ.

काय येक नोहे !—काय होणार नाहीं ! कोणतीहि गोष्ट साध्य होणें शक्य आहे. 'सद्गुरु संगें काय येक नोहे' –सप्र ८-१२.२.५२.

काय होय ?—काय पर्वा आहे ! काय उपयोग ! काय करावयाचें आहे ? एखाद्या वस्तूबद्दल औदासिन्य, तुच्छताबुद्धि किंवा त्या वस्तूची किंमत ओळखण्याची अपात्रता, त्या वस्तूचा उपभोग घेण्याची नालायकी वगैरे दाखविण्याकरितां योजतात. ' आंधळयाला बगीच्या काय होय ? '–नि ५१०.

*** काय असे रंगावर, केवळ गुणग्रहण कर**—वरवरच्या देखाव्याला कांहीं किंमत नसते. नुसत्या बाह्यरूपावरून कोणत्याहि गोष्टी टाळण्यांत अर्थ नहीं. तर तिच्या गुणाकडे पाहिलें पाहिजे व गुणांवरूनच कोणत्याहि गोष्टीची योग्यता ठरविली पाहिजे.

काय करशी देवा, तर अडला तयार पाय ठेवीन—(कों.) देव आळशाला मदत करीत नाहीं, तर ज्याचें काम अडलें असेल त्याला नेहमीं मदतीला तयार असतो. तु०— God helps those who help themselves.

काय करावें शक्ति नाहीं, नाहीं तर रांडलेकांचे तुकडे केले असते--एखाद्या दुर्बल मनुष्यानें आपणांस अन्याय झाला असता स्वतःच्या अंगांत प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नसलें म्हणजे काढावयाचे उद्गार.

काय काढशील उण्या, तर ठाव भर कण्या--ज्याच्याजवळ कांहींच नाहीं त्याशीं वैर करून त्यास लुटलें तर त्याचें काय जावयाचें ? फार तर भांडेंभर कण्या. त्याची त्याला काय एवढी पर्वा. जो मनुष्य फटिंग असतो तो बेपर्वा असतो. ज्याजवळ काहीं जाण्यासारखें नसतें तो निःस्पृह असतो.

काय केली ईश्वरा, तुझ्या घरीं चोरी--कोणाची चोरी केल्यास तो त्याबद्दल साहाजिक शासन करतो. तेव्हां ज्या अर्थीं माणसास शासन झालें आहे त्या अर्थीं आपण परमेश्वराचा गुन्हा केला असलाच पाहिजे असें मानून जेव्हां मनुष्यावर अर्थाअर्थीं कांहीं संबंध नसतां एखादी आपत्ति ओढवते तेव्हां तो अशा अर्थाचे उद्गार काढतो. ' काय केली ईश्वरा तुझ्या घरीं चोरी । रत्न तुज ऐसें कसें दुरावलें संसारीं । –प्रला ६० पृ. १६४.

काय केली विटंबण । मोतीं नासिकावाचून ॥--नथीची नाकाशिवाय काय शोभा ? त्याप्रमाणें चांगल्या शरीरावांचून अलंकाराचा काय उपयोग. जेथें मुळांत एखादी

गोष्ट चांगली नसते तेथें वरवरच्या उपचारांचा कांहीं उपयोग होत नाहीं.–तुगा २९९९.

काय केल्यार काय आस, न्याय केल्यार अर्द आस–(गो.) आपण कांहीं कराल तर कांहीं मिळेल; कोर्टांत तर अर्धें मुर्धें तरी मिळण्याचा संभव, एरवीं नाहीं. प्रयत्नासारखा उपाय नाहीं.

काय गळतें, तर तोंड गळतें––मुखरस पाघळणें. एक मनुष्य एका गांवीं गेला असतां त्यास तेथें दोनप्रहरीं जेवावें कोठें याची पंचाईत पडली. कोठें सोय होईना. अखेरीस त्यानें थोडे तांदूळ विकत घेतले, पण ते शिजवावे कोठें व कसें याची त्यास पंचाईत पडली. शेवटीं फिरतां फिरतां एका वृद्ध बाईनें ते शिजवून द्यावयाचें कबूल केलें. त्या बाईचें घर एक लहान झोंपडेंवजा होतें व त्याचें दार फार ठेंगणें व अरुंद होतें. भात शिजत असतां त्या घरांत एक भला उंच धिप्पाड असा मनुष्य त्यानें येतांना पाहिला. तेव्हां त्या मनुष्याचें शरीर पाहून त्यास जरा विस्मय वाटला व त्यास थोडेसें हंसू आलें. तेव्हां त्या बाईनें त्यास हंसण्याचें कारण विचारलें. तेव्हां त्यानें सांगितलें, कीं हा मनुष्य जो घरांत गेला तो जर मेला तर त्यास या दारांतून बाहेर कसें काढतां येईल याबद्दल मला अचंबा वाटला. तो मनुष्य त्या बाईचा मुलगा होता. तेव्हां ते शब्द ऐकून त्या बाईस फार राग आला व ‘ मेल्या माझ्या मुलाबद्दल असें अभद्र बोलतोस होय ! ’ असें म्हणून तिनें चुलीवर शिजत असलेलें भांडें तसेंच आणून त्याच्या अंगवस्त्रांत ओतलें. तेव्हां तो तसेंच तें अंगवस्त्र भातासुद्धां हातांत धरून रस्त्यानें चालला असतां त्यांतून थेंब थेंब पाणी गळत चाललें. तें पाहून एका मनुष्यानें विचारलें कीं, अहो ! उपरण्यांतून काय गळतें ? तेव्हां त्यानें सांगितलें कीं, तोंड गळतें ! याप्रमाणें मनुष्याचें तोंड भलत्या वेळीं भलतेंच बोलून घाण करतें.

काय गृहस्थाश्रमीं देव नसे, मग वना कां धांवताती पिसे––अरण्यवास पत्करला तरच काय देवाची प्राप्ति होते, प्रपंचांत होत नाहीं काय ?–होते. परमेश्वराची प्राप्ति केवळ अरण्यांतच गेल्यानें, अथवा सर्वसंग परित्याग केल्यानेंच होते असें नव्हे; तर गृहस्थाश्रमाचीं कर्तव्येंहि यथाविहित आचरिलीं असतां मनुष्यास या जगांत परमार्थसाधन करतां येतें.

काय गेलें तळतीचें, काय गेलें वळतीचें—एखाद्या समारंभामध्यें शेजारणी वगैरे स्त्रिया स्वयंपाकांत मदत करण्याकरितां येतात, परंतु त्यांच्या हातून पुष्कळदां नासधूस होते; कारण या अशा आलेल्या स्त्रियांस कांहीं यजमानाचें नुकसान झाल्याची पर्वा नसते, त्या केवळ तात्पुरत्या आलेल्या असतात. तळणारीनें तळतांना तेल चुलींत सांडलें, किंवा लाडू वळणारीनें लाडूचें पीठ नासलें किंवा करपवेलें तरी त्यांना त्याची कांहीं पर्वा नसते. त्याचें कांहीं नुकसान होत नसतें.

काय ढोरापुढें घालूनि मिष्टान्न ।—एखाद्या जनावरास मिष्टान्न खावयास घालून काय उपयोग, अथवा गाढवास चंदनाचा लेप दिल्यास त्याची त्याला काय किंमत ? या सर्व गोष्टी निष्फळ होत. कारण त्या प्राण्यांना त्यांची कांहीं किंमत कळत नसते. यावरून अनाठायीं श्रम केल्यास ते व्यर्थ होतात. ‘ काय ढोरापुढें घालूनि मिष्टान्न । खरा विलेपन चंदनाचें ॥ ’–तुगा ३०९३.

काय त्याच्या डोळ्यावर भात बांधला आहे ?—काय तो अंधळा आहे या अर्थी. –पांगारकर, चरित्रचंद्र.

काय पण थाट, अन् पाण्याला फुटका माठ—(बायकी) दिमाख मोठा पण घरांत पाहावें तो सर्व दारिद्रीपणा. एकीकडे पाहावें तो थाट, ऐश्वर्य पण दुसरीकडे कंगालपणा, अशी स्थिति.

काय प्रभो माया तुझी, काय तुझा खेळ, चिंचुंद्रीच्या डोक्याला चमेलीचें तेल—अतर्क्य घटना. [चिंचुंद्रीच्या तोंडाला कस्तुरीचा वास येतो हें प्रसिद्ध आहे.]

काय बाई तऱ्हा, कोंबडी म्हणे बिलवर भरा, मांजर म्हणतें हजामत करा !—ज्याला एखाद्या वस्तूचा उपयोग नाहीं, एखाद्या वस्तूची किंमत कळत नाहीं त्यानें त्या वस्तूची मागणी करणें हें आश्चर्य आहे. भलत्यालाच एखादी चांगली वस्तू देऊन काय फायदा. अशा नीं गोष्ट किंवा मागणी केली असतां म्हणतात. पाठभेद–एकाची एक तऱ्हा, कोंबडी म्हणते०

काय बोलावें भाटाला, बडबड्या डंटाला––विनाकारण बडबड करणाऱ्या मनुष्याच्या नादीं लागण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्याच्या बडबडीकडे लक्ष्य न देणेंच चांगलें.

कायरे शनि, तर माकड केलें कुणीं ?–कांहींतरी प्रश्न.

काय——काय दिस सुनेचे, काय दिस मायचे––(गो.) [काय=कांहीं] कांहीं दिवस सुनेचे, कांहीं दिवस सासूचे. चार दिवस सुनेचे चार दिवस सासूचे, पहा. Every dog has his own day.

कायदा——मन माने तो कायदा—मनःपूतं समाचरेत्। स्वतःला वाटेल त्याप्रमाणें वर्तन करावयाचें; स्वैर वर्तणूक.

इंग्रजी कायदा, पगाराचा वायदा--इंग्रजी राज्य हें कायद्यानें निगडित असून सर्व काम नियमाप्रमाणें चालतें व पगार अगदीं नियमितपणें मिळतो. पूर्वींच्या राजवटींत पगार वेळच्या वेळीं मिळत नसे. परंतु इंग्रजी राज्याबद्दल लोकांच्या नजरेस जर कोणती गोष्ट विशेष प्रामुख्यानें आली असेल, तर ती पगार अगदीं दर महिन्याच्या पहिल्या तारखेस मिळतो ही होय.

कायदा हा गाढव आहे--कायद्याचा अर्थ जसा लावावा तसा लागतो. स्वतः त्याला कांहीं अर्थ नसतो. मूळ इंग्रजी म्हण Law is an ass याचें वरील भाषांतर आहे. कायद्याला अंतःकरण नाहीं असें म्हणतात, तें यावरूनच. 'कायद्याचा मूळ हेतू लक्ष्यांत न घेतां अधिकाऱ्यांच्या हातून कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणानें केली जाते, व निरपराधी माणसाला विनाकारण भुर्दंड भरावा लागतो.'—केसरी १३-१-३९; २१-३-४१.

कायदे बहूत, न्याय थोडक्यांत--हल्लीं आपणांस व्यवहारांत अनेक प्रकारचे कायदे आढळून येतात. प्रत्येक गोष्टीमध्यें अनेक प्रकारची कायद्यांची गुंतागुंत झालेली आढळते; परंतु त्या मानानें न्याय मात्र तितका काटेकोरपणानें मिळतो असें नाहीं.

कायदे सदा फिरती, आजचे उद्यां नसती--कायदे हे वारंवार परिस्थितीप्रमाणें बदलत असतात. जशी परिस्थिति आढळून येईल त्याप्रमाणें नवीन नवीन कायदे तयार होतात व जुने रद्द होत जातात.

कायद्याचा कडाका, जुलमाचा तडाखा--जेथें कायदे फार कडक असतात, तेथें त्यांची अंमलबजावणी लोकांस फार दुःसह होते व त्यामुळें ते जुलमी आहेत असें वाटूं लागतें.

कायद्याविरुद्ध करणें, राजभय ये तेणें--कायद्याविरुद्ध वागणूक केली असतां राजाकडून शासन होण्याची भीति असते.

कायल——कायले वेल्या पोळ्याक कायला तोचि जाई--(गो.) तव्यावरील धिरड्याला उलथनेंच पाहिजे.

कायले——कायल्ये त म्हने मायल्ये--(अहि.) कशाला, तर तुझ्या मायला ! विचारणारानें सहज कशाला म्हणून विचारलें तर त्याला शिवीनें प्रत्युत्तर ! ('तुझ्या मायला मी × ×' याचा संक्षेप मायल्ये).

कायळे——कायळे काणि सांगतीद, आयकले कान धापतीद--कावळे कहाणी (गोष्टी) सांगतील, ऐकणाऱ्याचे कान बंद होतील. कावळ्याची गोष्ट कधीं सुखकर झाली आहे ? तो काव ! काव!नें आपले कान फोडणार !

कायळ्या गळयाक चीटि बांदिली संगति--(गो.) निरोप किंवा निमंत्रण जातीनें करण्याऐवजीं एखाद्या अलबत्या गलबत्या मार्फत करणें याला 'कावळ्याच्या गळयांत चिठ्ठी बांधणें' असें म्हणतात. कावळा हा काकबलीसाठीं अथवा उष्ट्या शितांसाठीं सगळीकडे जात असतो ही मूलभूत कल्पना.

कायळ्या शापानें म्हाशि मरना--(गो.) कावळ्याच्या शापानें म्हशी मरत नाहींत.

कायळ्यां हिंडांतु कोगिला--(गो.) कावळ्यांच्या समूहांत कोकिळा. भागेंत तुळस याप्रमाणें.

कायळ्याक आपलि पिलं गोमटिं दिसतात--(गो.) कावळ्याला आपलीं पिलें गोरीं दिसतात. ज्याचें माणूस त्याला चांगलें वाटतें.

कायळ्याक तवशारि दोळो--(गो.) कावळ्याचा काकडीवर डोळा. फायद्यावर दृष्टि. कावळा पहा.

कायळ्याक धणु दाकयिल्ले वारि---(गो.) कावळ्याला धनुष्य दाखवावें त्याप्रमाणें.

कायळ्याक यजमानत्व दिल्यारि जगलि भरि पीष्ट--(गो.)कावळयाला जर एखाद्या धर्मकृत्याचा यजमानपणा दिला तर ओसराभर पीठच पीठ पडेल (म्हणजे सर्व साहित्य तो विसकटून टाकील). धसमुसळ्या किंवा अविचारी माणसाच्या हातीं जर एखादें महत्त्वाचें कार्य सोपवून दिलें तर त्याचा नाश झाल्यावांचून राहात नाहीं.

कायळ्यानें हागनाशिलें झाड ना, सुण्यानें मुतिनाशिलो खुंट्ट ना—कावळ्यानें आपली विष्टा ज्यावर टाकली नाहीं असें झाड नाहीं व कुत्रा ज्यावर मुतला नाहीं असा खुंट नाहीं. हे दोन्ही प्राणी जिकडे तिकडे घाण करून ठेवतात.

काया——काया दाखविणें-दिसणें-पाहणें; काया-उघडी टाकणें-पाहणें—सामान्यतः शरीराचा गुह्य समजला जाणारा भाग, रोग्यानें वैद्यास, पत्नीनें पतीस वगैरे दाखविणें इ.

काया पडणें—मृत्यु येणें; अंत होणें; शरीर अचेतन होणें.

काया पालटणें-फिरणें-बदलणें-आजारांतून उठल्या-

नंतर शरीर पुन्हां तजेलेदार होणें; नवीन तजेला धारण करणें; कायाकल्प होणें.

काया वाचा मनेंकरून--शारीरिक, वाचिक व मानसिक सर्व शक्ती एकत्र करून; अगदीं मनापासून.

काया विकणें--द्रव्याकरितां परपुरुषगमन करणें; स्वतःच्या देहाचा विक्रय करणें; तनुविक्रय करणें. 'मला माझी काया विकायला सांगतां!'-अस्तंभा ६९.

❀ **काया कोमल, कर्म कठीण**--एखादा मनुष्य विशेषतः स्त्री दिसावयास मोठी नाजूक दिसते, परंतु तिचीं कृत्यें फार भयंकर असतात अशा स्त्रीस उद्देशून म्हणतात. सर्वच गोष्टी जशा वरून दिसतात तशा नसतात. वरून सुंदर व नाजुक दिसणाऱ्या स्त्रीचें अंतःकरण कठोर असतें.

अमोल काया, जाईल वायां--मानव शरीर हें अत्यंत दुर्मिळ आहे, तेव्हां मनुष्य जन्मांत आपण असें कांहीं तरी करावें कीं ज्यामुळें या देहाचें सार्थक होईल. नाहींतर नरदेह मिळून फुकट. मानवदेह हा क्षणभंगुर परंतु बहुमोल आहे त्याचा भरंवसा नाहीं; करितां तात्काळ त्याचें सार्थक करावें. 'अमोल काया जाईल वायां जशी कांच की फुटे फटकन्।'

आप काया दुःखी, पर काया सुखी--मनुष्यानं दुसऱ्यास सुख देण्यासाठीं जर आपणांस थोडेसे कष्ट सहन करावे लागले तर ते केले पाहिजेत. स्वतःची गैरसोय होत असतां तीमुळें जर दुसऱ्याची सोय होत असेल तर ती अवश्य करावी. दुसऱ्याच्या सुखाकरितां स्वतःस होणारें थोडें फार दुःख सहन करावें.

काया भ्रष्ट,क्रिया नष्ट-शरीर अपवित्र व करणीहि वाईट.

कारकून——**कारकुनी कावा-मत**--सामान्यतः कारकून लोकांत आढळणारा धूर्तपणा, त्यांचे डावपेंच वगैरे; लबाडी; कपट,

कारकुनी घट्टा-चिन्ह—कारकुनास लिहिण्याकरितां नेहमीं मांडी मोडून बसावें लागल्यामुळें डाव्या पायाच्या घोट्यास जो घट्टा पडतो तो.

कारकुनाची मेहुणी—(ल.) कागद कातरावयाची कातरी. (कातर कोठें तरी पडलेली असते, लवकर सांपडत नाहीं यावरून.)

❀ **कारकून हिशेबाला मुकला, नुकसान आलें मालकाला**—कारकुनानें जर हिशेब नीट ठेविला नाहीं तर मालकाला नुकसान सोसावें लागतें.

कारकूनाचें कसब कारकून जाणें--ज्याच्या खुब्या त्यालाच कळतात. चोरच चोराचें वर्म जाणतो. चोराचीं पावलें चोर ओळखतो त्याप्रमाणें एखाद्या मनुष्याच्या कृतींतील डावपेंच त्याच्या वर्गांतील मनुष्यालाच बरोबर कळतात.

कारकुनाचें लिहिणें, उंदराची खाद—कारकून लोक इतके लपेटीदार लिहितात कीं तें उंदरानें कुरतडलेल्या पदार्थाप्रमाणें वांकडें तिकडें दिसतें. तें कधीं सरळ असावयाचें नाहीं.

कारकुनाला बेरी अन् धन्याला धाक—'धन्याला धत्तुरा आणि चाकराला मलीदा' याप्रमाणें. कारभारी पहा.

कारकुनास अवदान व भटास महादान; कारकुनास अवदान व भटास कुदान--एखादा कारकून जर आपणांस श्रीमंत झालेला दिसत असेल तर त्यानें कोठें तरी मोठा डल्ला मारला असला पाहिजे; एखाद्या कामांत खूप लांच खाल्ली असली पाहिजे हें निश्चित समजावें. त्याचप्रमाणें एखादा भट श्रीमंत झालेला दिसेल तर त्यानें एखादें मोठेसें मृतासंबंधीं शय्यादानासारखें कुदान घेतलें असलें पाहिजे असें समजावें. अशा गोष्टींशिवाय हे श्रीमंत होणें शक्य नाहीं.

कारखाना——**कारखाने**-१८ अठरा कारखाने पहा.

कारटें——**आपलें तें बापडें दुसऱ्याचें तें कारटें**-आपलें पहा.

कारटे पोरटे, सदा चोरटे--हलक्या कुळांतील मुलें नेहमीं चोरटीं असतात.

कारण——**कारणपरत्वें**--जरूर पडल्यास; कारण लागल्यास; वेळ पडल्यास; जशी परिस्थिति येईल त्याप्रमाणें, तेवढ्यापुरतें. 'कोंडोभटाबरोबर मात्र ती कारणपरत्वें बोलत होती.'-स्वप २१४.

कारणीं लावणें—१ उपयोग करणें; कामांत आणणें. 'कारणीं लावोनि करील सार्थक।'-दावि ३९१. २ उत्तरक्रियेकरतां उपयोग करणें; क्रियेस लावणें; एखाद्यानें एखादी वस्तु चोरून नेली असतां ती आपल्या कारणीं लावावयास नेली अशी त्याबद्दल शापोक्ति वापरतात.

❀ **नवरा मरो कीं नवरी मरो, उपाध्यास दक्षिणेचें कारण**--उपाध्या पहा.

कारणाव्यतिरिक्त बोलूं नये, दुसऱ्याचा वेळ घेऊं नये--कामाशिवाय विनाकारण बोलतांना आपला व दुसऱ्याचा कालापव्यय होतो.याकरितां फक्त कामापुरतें बोलण्याचा परिपाठ ठेवावा.

कारभाऊ——**कारभाऊ नारभाऊ**—खेड्यांतील कारू व नारू परस्परांस संबोधतांना म्हणतात.-गांगा १३.

कारभार——कारभार नहीं तर करभार नाहीं— राज्यकारभारात जर लोकाचा भाग नसेल तर लोकांनीं कर कशासाठीं द्यावयाचा ? अमेरिकन लोकांनीं याच मुद्यावर इंग्लंडशीं भांडून स्वातंत्र्य मिळविलें. तु०—No taxation without representation.

करील त्याचा कारभार, मारील त्याची तलवार, राबेल त्याचें घर व खपेल त्याचें शेत—स्वतःच्या कष्टावर, प्रयत्नावर, कर्तबगारीवर संपत्ति इ. अवलंबून असते. ऐदी माणसाला कांहीं प्राप्ति किंवा सत्ता नसते.

कारभार योग्य करी, निंदेचा संतोष धरी—आपण स्वतःस योग्य दिसेल त्याप्रमाणें वर्तणूक ठेवावी व आपल्या अधिकाराचा सदुपयोग करावा. त्याबद्दल आपली कोणीं निंदा केली तरी तिकडे लक्ष्य देऊ नये.

कारभारांत गुह्यपण, हेंच त्याचें साधन—आपण करीत असलेल्या कामाची विनाकारण वाच्यता करूं नये म्हणजे त्यांत विघ्नें येत नाहींत. विनाकारण बभ्रा केल्यास अडचणी उत्पन्न होण्याचा संभव असतो. उलट गुप्तता राखल्यास आपलें काम पूर्ण होईपर्यंत कोणास त्याची दादहि लागत नाहीं व कोणी विरोधहि करीत नाहीं व आपलें कार्य सहज साध्य होतें.

कारभाऱ्याला लोणी, गड्याला ताक, कारकुनाला बेरी धन्याला धाक—धन्याला मात्र कांहीं मिळत नाहीं; त्याच्या मागें संसार चालावण्याची काळजी तेवढी असते. बाकीचे सर्व ज्याला जसें सांपडेल तसें यथेच्छ चावीत असतात. तु०—धन्याला धत्तूरा चाकराला मलीदा.

कारलें——कडू कारलें तुपांत तळलें आणि साखरेंत घोळलें, तरी कडू तें कडूच—कारल्याचा कडूपणा घालविण्याला कांहींहि उपाय केला, तरी तो जसा जात नाहीं त्याप्रमाणें मनुष्याचा मूळ स्वभाव बदलत नाहीं. वाईट स्वभावाच्या माणसाबद्दल योजतात. तु०—कडू वृंदावन साखरेचें आळें ।

कार्लीच्या वेलाचा नेम—कारलीच्या मांडवाखालून जावयाचें नाहीं. अशा प्रकारचा निर्बंध कहाण्यांतून आढळतो. यावरून कांहींतरी, अर्थाअर्थी संबंध नाहीं पण मोडल्यास त्रासदायक अशा अटी. 'बारा वर्षांची चिमुरडी पोर पण तिचा मलीचा म्हण भावल्याच्या लग्नांत कार्लीच्या वेलाचा नेम.'—नाछ.

कारागीर——कारागीर होणें—लागू पडणें; उपयोगी येणें; यशस्वी होणें. 'देरेकर याचे हातींची वीट काना मार्गें लागली ती हत्तीला कारागीर झाली. त्याणें हत्ती माघारा फिरला.'—पेब ७४.

❀ **कारागिराची माहिती, कामावरून होती**——मनुष्याची किंमत त्याच्या कृतीवरून ओळखूं येते तसें कारागिराचें कौशल्य त्यानें केलेल्या वस्तूंवरूनच कळून येण्यासारखें आहे.

कारातें——कारातें साकरेंतु भाजिल्लें तरिकई कडूचि——(गो.) कारलीं साखरेंत जरी भाजलीं तरी कडू तीं कडूच. कारलें पहा.

कारांद——कारांद गेली मारांदेगेर, कारांदेकूय् कांटे मारांदेकूय् कांटे——करवंदीचें झाड मारांदीच्या झाडाकडे गेलें. पण उपयोग काय ? यालाहि कांटे न् त्यालाहि कांटे ! 'एकादशीच्या घरीं शिवरात्र' या अर्थानें.

काराय——काराय शॅत झिदावा म्हारग——(गो.) पडीत शेत फाळ्याला महाग. शेत जर लागलेंच नाहीं, तर फायदा कांहीं नाहींच पण फाळासुद्धां पदरचा भरावा लागतो. काय उपयोग त्याचा ?

कारें——काऱ्या रुकाक बोरं जात्ताति वे ?——(गो.) काऱ्याच्या झाडाला बोरें कधीं तरी लागतील कां ? दुष्ट स्वभाव कधीं सुष्ट होत नसतो.

कार्तिक——कार्तिक पळे, मार्गशीर्ष वळे——कार्तिक महिना गेल्यानंतर मार्गशीर्ष महिना येतो.

कार्तिक महिन्यांत कुणबी शहाणा——कार्तिक महिन्यांत नवीन पीक आलेलें असून कुणब्याच्या घरांत जरा समृद्धि असते, त्यामुळें तो गरजू नसतो. म्हणून त्याला कोणी अक्कल शिकवावी लागत नाहीं. पण कांहीं दिवसांनीं त्याला एखादी नड आली म्हणजे तो गरजू बनतो व प्रत्येक जण त्याला अक्कल शिकवूं लागतो; कारण गरजवंताला अक्कल नसते.

कार्तिकस्वामी——कार्तिकस्वामीचा हिमायती; कार्तिकस्वामीच्या भिडेचा——केवळ ब्राह्मण जातींत उत्पन्न झालेला, पण स्नान संध्यादि कर्में न करणारा ब्राह्मण. कार्तिकस्वामीचें दर्शन झालें म्हणजे सात जन्म ब्राह्मण जातींत मिळतो. तेव्हां अशा पुण्याईमुळेंच मनुष्य जन्मास केवळ आलेला; बाकी अकलेच्या नांवानें केवळ पशु, ठोंग्या. सप्तजन्म भवेद्विप्रो धनाढ्यो वेदपारगः । या वचनानुसार कार्तिक स्वामीचें दर्शन कार्तिक शुद्ध पौर्णिमेस घेण्याचें महात्म्य आहे. याकरितां दुसरा बाजीराव दोनदां मुद्दाम सोंडूर येथें दर्शनास गेला होता.

कार्य——कार्य उठणें--काम पार पडणें. 'असें झालें असतां'''किती कार्यें उठणारीं आहेत पहा!'-नि४४०.

कार्य उरकणें--१ काम पार पाडणें; सिद्धीस जाणें; काम आटोपणें. २ (ल.) रतिसंभोग करणें.

कार्य साधणें--अचूक, योग्य संधि गांठणें; योग्य काळीं एखादी गोष्ट घडवून आणणें; आपला हेतु तडीस नेणें.

कार्यावर दृष्टि ठेवणें--इतर गोष्टींचा विचार न करतां केवळ आपला उद्देश साध्य होईल इकडे पाहणें; आपलें काम साधणें.

कार्यास लावणें--योग्य कामीं उपयोग करणें; उपयोगांत आणणें; कारणीं लावणें; सदुपयोग करणें.

॥ **कार्य करून पाहावें आणि घर बांधून पाहावें**— 'लग्न करून पाहावें०' पहा.

कार्य कर्तले कमी, कलह सोत्तले जड--(गो.) कार्य करणारे कमी, कलह करणारे ज्यास्त.

कार्य गुप्त ठेविती, त्यांत संशय उद्भवती--जो मनुष्य आपलें काम सरळपणें सांगत नाहीं त्याबद्दल काम चांगलें असलें तरी दुसऱ्यास संशय उत्पन्न होतो.

कार्य तडीस न नेणें, हें मोठें लाजिरवाणें--एखादें काम अंगावर घेऊन तें पूर्ण न करणें ही गोष्ट कमीपणाची आहे. अनारंभोहि कार्याणां प्रथमं बुद्धिलक्षणम् । प्रारब्धस्यान्तगमनं द्वितीयं बुद्धिलक्षणम् ॥

कार्यांत मुलांचे आणि गुरांचे हाल---लग्नादि कार्यांच्या गडबडींत मुलें आणि गुरें यांच्याकडे पहाण्यास कोणास सवड होत नाहीं, त्यामुळें त्यांचे साहाजिक हाल होतात.

कार्यानें कार्य करका, उत्तानें न्हयिं--(गो.) कार्याला उत्तर कार्यानें द्यावें, बोलण्यानें नव्हे.

कार्यापुरती मैत्री, कारणापुरते आर्जव--आपलें काम असलें म्हणजे मित्र म्हणून एखाद्याकडे जावयाचें, एरवीं नाहीं. तसेंच आपल्या कामासाठीं एखाद्याचे आर्जव, मनधरणी करावयाची, नाहींतर जरूर नाहीं; याप्रमाणें बेपर्वाईनें वागावयाचें.

कार्यासमयीं खर्चावें, एरवीं संभाळून ठेवावें-- मनुष्यानें योग्य प्रसंगीं जो वाजवी असेल तो खर्च करण्यास मागें पुढें पाहूं नये; परंतु नेहमीं मात्र संचय करीत असावें व आपल्या संपत्तीस नीट जतन करावें.

कार्यां संकटें जरी आलीं, तरी कार्यें न टाकावीं आपुलीं--एकदां आपण कोणत्याहि कार्यास हात घातला म्हणजे मार्गांत कितीहि विघ्नें आलीं तरी नियोजित कार्य पूर्ण केल्याशिवाय राहूं नये. विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः । प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥

काल——कालदेश तारतम्य करणें; कालदेश पाहून वर्तणें-करणें—देशकाल, भोंवतालची परिस्थिति वगैरे सर्व साधकबाधक गोष्टी लक्ष्यांत घेऊन वागणें.

काल साधणें—योग्य वेळ गांठणें; संधि साधणें; अनुकूल वेळेचा उपयोग करून घेणें.

॥ **कालज्वर अंगीं बाणे, तो शीतोष्णता नेणें**— मृत्यूची वेळ जवळ आली असतां जो मनुष्याच्या अंगांत ज्वर उत्पन्न होतो तो उष्णता किंवा थंडी यांवर अवलंबून नसतो. तो असाध्य असून त्यापासून मृत्यु यावयाचा हें निश्चित असतें व त्यावर कोणताहि उपचार लागू पडत नाहीं.

कालाची गति, कोणा नावरती—कालाची गति कोणाच्या आटोक्यांत नसते. सृष्टिक्रमाप्रमाणें ज्या गोष्टी घडावयाच्या त्या कोणास थांबवतां येत नाहींत.

कालाबरोबर चालल्याविना कोणाचें चालत नाहीं— जसा काल येईल त्याप्रमाणें माणसाला वागावेंच लागतें.

कालेंकरून येतें, समयपरत्वें जातें--मनुष्यास केव्हां केव्हां त्याचें दैव अनुकूल असेल अशा वेळीं वैभव प्राप्त होतें व केव्हां केव्हां त्याची सद्दी संपली म्हणजे वैभव सोडून जातें.

कालें द्वेष थंडावतो, शोक शमतो--द्वेष आणि शोक यांची तीव्रता कांहीं कालानें आपोआप कमी होते. कालानें सर्व गोष्टी मनुष्य हळूहळू विसरतो. Time is the best healer.

काल——काल पेरलें, आज उगलें अन् उद्यां उमाप फोफावलें, असें कधीं झालें आहे ?—कांहीं गोष्टींना योग्य वेळ हा द्यावाच लागतो. झटपट वाढ, निकाल होत नसतो. तेव्हां दम धरणें हें शहाणपणाचें आहे. तु०— Rome was not built in a day.

काल मेला आणि आज पितर झाला—१ हातांत थोडासा अधिकार प्राप्त होतो न होतो तोच त्याचा गैरवाजवी उपयोग करणें; हातांत सत्ता मिळाल्याबरोबर ती गाजवूं लागणें; थोडासा अधिकार मिळतांच त्याचा तोरा दाखवूं लागणें. २ अंगीं योग्यता नसतां मोठेपणाचा आव आणणें; पात्रता नसतां एखाद्या मोठ्या गोष्टीचें श्रेय घेण्याचा प्रयत्न करणें.—केसरी १६-२-४०.

कालचा जोगी व मांडभर जटा--जो मनुष्य नुकतेंच वैराग्य धारण करतो तो प्रथम प्रथम फार उत्साही, विरक्तपणाचें स्तोम माजवणारा असतो. तसेंच नुकताच अधिकार प्राप्त झालेला मनुष्यहि त्याचें फार प्रस्थ माजवून आपल्या सत्तेचें प्रदर्शन करीत असतो.

कालनेमि——कालनेमीची मूर्ति--कालनेमि हा एक कपटी राक्षस होता. तो ब्राह्मणाचें सोंग घेऊन मारुतीस विघ्न आणण्याकरितां द्रोणागिरीच्या मार्गांत बसला होता; त्यावरून कपटी मनुष्य.

कालवाकालव——कालवाकालव होणें--मनांत अस्वस्थता, खळबळ उत्पन्न होणें, चलबिचल उडणें. 'रोम शहर जुलमी पोपाच्या व फ्रेंच राजाच्या ताब्यांत गेलेलें पाहून जोसेफ् ग्यारिबाल्डीचे मनांत कालवाकालव होऊन जात असे.'-केळकरकृत ग्यारि० चरित्र.

कालविणें——जीव-प्राण-मन कालविणें--जीव घाबरा होणें, कासावीस होणें; अगदीं घाबरें होणें; गर्भगळित होणें. 'भ्रमांत मन कालवें, प्रखर तेजही मालवें।'

विटाळ कालविणें--विटाळ झाला असतां तसेंच सर्वत्र वावरून शिवाशिव करणें.

काली——काली बादली डरावनी, धोला बरसन हार--काळे ढग भय दाखवितात पण पांढरे पाणी देतात. काळीं कुट्ट ढगें घेऊन पावसाचें मोठें आंडबर माजलें तरी केव्हां केव्हां एकहि थेंब पडत नाहीं व एखादे वेळीं पांढरे ढग येऊनहि पाऊस पडून जातो. पोकळ गोष्टीचा कितीहि डोलारा माजला तरी कार्य मुळींच होत नाहीं; तेंच एकाद्या साध्या गोष्टीनें सहज होऊन जातें. तु० -केचिद् वृष्टिभिरार्द्रयन्ति धरणीं गर्जंति केचिद् वृथा।

कालें——काल्यासारखा गार पडला, ठाव नसे आशेला--मनुष्य मृत्युसमयीं काल्याप्रमाणें थंडगार पडतो व अंगांत मुळींच उष्णता राहात नाहीं. अशा वेळीं त्याची आशा सोडावी.

कावड——कावड काढणें--फजिती उडविणें.

कावड पोंचविणें--तीर्थयात्रेला निघालेलीं माणसें एका तीर्थस्थानाचें पाणी दुसऱ्या तीर्थस्थानीं पोंचवितात, त्याला म्हणतात.-केसरी २७-१२-४०.

कावरणें——कावरली गाय, कांटे खाय--गाय रागानें बेफाम झाली, वेडीपिशी झाली म्हणजे त्या भरांत कांटे खायला कमी करीत नाहीं. पण त्यामुळें दुसऱ्याचा तोटा होण्याऐवजीं तिचे मात्र हाल होतात. माणसाचेंहि तसेंच. रागाचें भरांत सदसद्विवेकबुद्धि नष्ट होते व सूडाचे भावनेंत वाहात जाऊन माणूस अविचारानें स्वतःचेंच नुकसान करून घेतो.

कावरें——अंगांत कावरें आणणें—[कावरें=वेड] १ एखादें काम करण्यासाठीं (मनांत नसतांहि) मुद्दाम वरपांगी आव आणणें. २ अवसान, वेड आणणें, येणें. 'लाविलें कावरें। प्रल्हादासी म्हैसासुरें।'-तुगा २८१.

कावल——कावलाक दिवप—(गो.) मोडतोडीला देणें.

कावलाक येवप—निरुपयोगी होऊं लागणें; बिघडत जाणें.

कावळा——पराचा कावळा--एखादी लहानशी गोष्ट अतिशय फुगवून सांगणें. अगदीं क्षुल्लक गोष्टीवरून एखादें मोठें अवडंबर माजविणें. अतिशयोक्ति.

कावळा शिवणें—१ मृताच्या दहाव्या दिवशीं त्याच्या उत्तरक्रियेंत केलेल्या त्याच्या नांवाच्या भाताच्या पिंडास कावळ्यानें स्पर्श करणें. अशा स्पर्शावरून मृताची मागें कांहीं इच्छा राहिली नाहीं असें मानतात. २ स्त्री अस्पर्श झाली असतां लहान मुलास सांगतांना 'पांढरा कावळा शिवला' असें म्हणतात.

पांढरे कावळे असतील तिकडे जाणें—पांढरे कावळे कोठेंच नसतात यावरून याचा अर्थ अज्ञात ठिकाणीं जाणें; देशत्याग करणें; परागंदा होणें; कायमचें निघून जाणें.

पोटांत कावळे कोकलणें-ओरडणें--क्षुधेनें व्याकूळ होणें; फार भूक लागणें.

कावळे म्हातारे जावप—(गो.) कावळे म्हातारे होणें; अनेक वर्षें लोटणें; दीर्घकाल होणें; कारण कावळ्याला दीर्घकाल आयुष्य असल्यामुळें तो म्हातारा होण्यासहि फार काळ लोटावा लागतो. तु०-काग, नाग, साग.

कावळ्याचें आयुष्य असणें--कावळा शंभर वर्षें वांचतो अशी समजूत आहे; यावरून दीर्घ आयुष्य असणें.

कावळ्याचें गोत—एक कावळा आला असतां तो क्षणांत काव काव करून अनेक कावळ्यांस गोळा करतो. यावरून अनेक नात्यागोत्यांच्या माणसांची गर्दी, झुंड; मोठा जमाव; समूह. तु०-काक आह्वयते काकान् याचको न तु याचकान्।

कावळ्यानें गू उष्टावप; कावळ्यान गू उष्टावपैली—(गो.) कावळा दिवस उगवल्याबरोबर घरट्यांतून बाहेर पडतो.

याकरितां कावळ्यानें गू उष्टावण्यापूर्वी म्हणजे कावळाहि घरट्याबाहेर पडण्यापूर्वी म्हणजे फार लवकर; पहांटेस.

❀ **कावळा उडावयास–बसावयास व खांदी मोडावयास; कावळा उडण्यास–बसण्यास आणि ढांक मोडण्यास** (एकच गांठ); **कावळा आणि ढापी**– [ढांक = जुनाट झाड]. प्रसंगवशात् एका खांदीवर बसलेला कावळा उडून जाण्यास किंवा त्या खांदीवर येऊन बसण्यास व ती खांदी खालीं मोडून पडण्यास एकच गांठ पडली. यावरून कोणी आपली समजूत अशी करून घेईल कीं, कावळ्यानें उडतांना–बसतांना जोर दिल्यामुळें खांदी मोडली; तर ती खरी नव्हे. तो केवळ आकस्मिक प्रसंग, योगायोग होय. काकतालीय न्याय पहा.

कावळा करकरला आणि पिंगळा बडबडला-- एखादें काम करतांना कावळा ओरडलेला ऐकलें तर तो अशुभ शकून मानतात. तसेंच पिंगळा नांवाचा एक घुबडासारखा अशुभ पक्षी आहे. त्याचें ओरडणें ऐकूं येणें अशुभ मानतात. हा पहांटेच्या सुमारास ओरडतो. कावळ्याच्या ओरडीला किंवा पिंगळ्याच्या ओरडण्याला (हीं दोन्ही अशुभ असलीं तरी) काय किंमत ? ज्या गोष्टी नेमानेमानें व्हावयाच्या त्या चुकत नाहींत. केवळ शकुनांवर विश्वास ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

कावळा करकरला म्हणून पिंपळ मरत नाहीं— कावळ्याच्या ओरडीमुळें पिंपळाच्या झाडावर कांहीं एक परिणाम होत नाहीं. कावळा ओरडणें हा अशुभ शकून मानतात. पण जे धीर पुरुष आहेत त्यांचा असल्या शकुनांवर विश्वास नसतो व ते आपलें कार्य अनेक अशुभ शकून झाले किंवा अनेक विघ्नें आलीं तरी हातचें टाकीत नाहींत व आपल्या प्रयत्नानें पार पाडतात.

कावळा करते कोय कोय, तूं माही होय होय— (व.) कोय कोय अथवा काव काव शब्द करून हा कावळाहि आपल्या समागमाला अनुमति प्रदर्शित करीत आहे. त्या अर्थी, हे स्त्रिये, तूं या वेळीं माझी हो, मजसीं विवाह कर. समोरच्या घटनेचा ओढून ताणून आपल्या गोष्टीला अनुकूल असा अर्थ बसवून त्याच्या आधारावर नातें जोडूं पाहणाराला अनुलक्षून ही म्हण आहे.

कावळा जगाचें उष्टें खातो, कावळ्याचें कोण खातो– जगांत सर्वांचें उष्टें खाणारा असा कावळा हा नीच प्राणि आहे; पण त्याचेंहि उष्टें खाणारा एखादा नीच प्राणि जगांत असल्यास त्याला काय नांव द्यावें ? जगांत नीचापेक्षांहि नीच प्राणि असतात, त्यांस उपमा द्यावयासारखा जगांत दुसरा नीच प्राणीच नसतो. ते अगदीं अतुलनीय असतात. तु०– ये तु घ्नन्ति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे ।–भर्तृनीति.

कावळा बसला, फांदी तुटली; कावळा बसायास व खांदी (ढापी) मोडावयास गांठ एक—बोलाफुलास गांठ; काकतालीय न्याय. वर पहा.

कावळां मोत्या (सोन्या) पोवळ्यांचा चारा काय उपयोगी—कावळ्याला मोतींपोवळीं खावयास घातलीं तर तीं त्याला खातां यावयाचीं नाहींत व त्यांचा त्याला कांहीं उपयोग नाहीं. तींच हंसास घातलीं तर तो खाईल. गाढवास गुळाची चव काय ?

कावळा साऱ्यांचा गू खाईल पण कावळ्याचा कोण खाईल—अतिशय ओंगळ, घाणेरड्या, नीच, हलकट माणसाबद्दल ही म्हण वापरतात. तिच्यापेक्षां वाईट, घाणेरडी गोष्ट आढळावयाची नाहीं अशी गोष्ट. वर पहा.

उष्ट्या हातानें कावळा हांकणार नाहीं--'उष्टा' पहा.

बाहेरच्या देवांना टिळेगोळे आणि घरच्या देवांवर हगती कावळे—कांहीं मनुष्यांचा स्वभाव असा असतो कीं, त्यांस स्वकीयांबद्दल फारसा आदर वाटत नाहीं व त्यांची ते उपेक्षा करतात व परकीयांची खुशामत करीत असतात. कांहीं पुरुष घरच्या स्त्रीची अवहेलना करून परस्त्रीच्या घरीं लाचारपणें लाळ घोटीत असतात. अशा लोकांसहि उद्देशून ही म्हण वापरतात.

कावळे दावो गेलो आणि उजवो गेलो सारखेंच— (गो.) कावळा डावा गेला काय, उजवा गेला काय सारखेंच. त्याचें अस्तित्वच मुळीं अशुभ.

कावळ्या दोळो तवश्या पिपरेर (निडयेर)— (गो.) कावळ्याचा डोळा तवशाच्या पिंपरावर. कावळ्याचें लक्ष नेहमीं कोंवळ्या काकडीवर. कांहीं लोक नेहमीं आपल्या फायद्याची संधी पाहात असतात.

कावळ्यांकडे दिला कारभार, त्यानें हगून भरला दरबार--कावळ्याच्या अंगजात संवयीप्रमाणें तो कोठेंहि हगणारच. यावरून अगदीं हलक्या माणसाकडे मोठें जबाबदारीचें काम सोंपविलें तर तो त्याचीं घाणच करून टाकणार !

स्मशानांत गेलें तरी कावळ्यांचा उपद्रव--कावळे हे स्मशानामध्यें बहुतकरून असतातच; कारण तेथें मृत जनावरें, वगैरे प्राणि व मृतांचे पिंड खावयास मिळतात. तेव्हां वास्तविक स्मशानांत पूर्ण शांतता असावयाची पण तें स्मशान-

सुद्धां यांच्या त्रासापासून मुक्त नाहीं. त्याप्रमाणें जगामध्यें दुर्जनांचा त्रास चुकविणें अशक्य आहे. कोठेंहि गेला तरी तुम्हांस तेथें दुर्जन त्रास दिल्याशिवाय राहत नाहींत.

कावळ्याचें खाणें निंबोळ्याचें आणि पोपटाचें खाणें दाळिंबाचें—प्रत्येक मनुष्यास त्याच्या योग्यतेप्रमाणें फळ मिळतें. कावळा निंबोळ्या खातो व पोपट डाळिंबाचे दाणे खातो. हंस मोतीं खातो.

कावळ्याचे गळ्यांत माणिकरत्न–अयोग्य मनुष्याला एखादें उच्चपद अथवा एखाद्या अमोल वस्तूची प्राप्ति होणें.

कावळ्याचें धरूं नये प्रमाण व जुगाऱ्याचें धरूं नये सत्यवचन—कावळ्यासारखा चंचल धरसोड वृत्तीचा माणूस व जुगारी यांवर विश्वास ठेवूं नये.

कावळ्याचें होतें हंसणें, बेडकाचा जातो जीव--कावळ्यानें बेडूक उचलून नेला असतां तो त्याबरोबर खेळत असतो व त्याला टोंचीत असतो; पण इकडे बेडकाचा जीव जात असतो.

कावळ्याच्या गळ्यांत कंकोत्री—कावळ्याबरोबर आमंत्रण पाठविणें. कबुतरें त्यांच्या गळ्यांत चिठ्ठी बांधली असतां शिकविल्याप्रमाणें योग्य स्थळीं ती पोंचती करतात; पण ती विद्या कावळ्यास येत नसल्यामुळें किंवा त्याच्या अंगीं तो गुण नसल्यामुळें, त्याच्या गळ्यांत बांधलेली चिठ्ठी इष्ट स्थानीं पोंचणें शक्य नाहीं. यावरून भलत्याच गोष्टीचे साहाय्यानें इष्ट साध्य करूं पाहिल्यास तें साधत नाहीं. एखाद्यास खरोखर आमंत्रण द्यावयाचें नसलें किंवा मनापासून एखादी गोष्ट करावयाची नसली, पण ती न केल्याचा दोष मात्र येऊं द्यावयाचा नसला, म्हणजे निमित्ताकरितां कशीतरी करून टाकून अंगावेगळी करणें.

कावळ्याच्या घरांत कोकिला—कोकिला आपलीं अंडीं कावळीकडून उबवते; तेव्हां कावळ्यांच्या घरट्यांत कोकिळा वाढते. त्याप्रमाणें कांहीं सुंदर स्त्रिया नीच कुलामध्यें जन्म पावतात. म्हणून सुभाषितकार ‘ स्त्रीरत्नं दुष्कुलादपि ’ असें म्हणून नीच कुलांतीलहि सुंदर स्त्री स्वीकारावी असें सांगतात.

कावळ्याच्या घरीं वाढला, कोणी शिकविलें पोपटाला—पोपट जरी कावळ्याच्या पिलांबरोबर वाढला तरी तो कावळ्याच्या पोरांप्रमाणें कर्कश आवाज काढीत नाहीं तर तो त्याच्या स्वभावधर्माप्रमाणें मधुर स्वर काढूं लागतो व वयांत आला म्हणजे माणसांप्रमाणें बोलूं लागतो. यावरून कोणत्याहि परिस्थितींत थोर मनुष्य वाढला तरी तो आपलें श्रेष्ठपद प्राप्त करून घेतल्याशिवाय राहात नाहीं. तो त्या परिस्थितींत गुरफटत जाऊन नीच स्थानींच कायम राहत नाहीं.

कावळ्याच्या शापानें गाई (ढोरें, गुरें) मरत नाहींत—हलक्या, निर्बल माणसांनीं मोठ्यांचें कितीहि वाईट चिंतिलें म्हणून त्यांचें वाईट कधींच होत नसतें.–उग्र ४४.

कावळ्यांत बगळा आणि तोसुद्धां झाला कावळा--कावळ्यांमध्यें जर एखादा बगळा सांपडला तर तोहि कावळ्याप्रमाणेंच वागूं लागतो. एखादा साधु दुर्जनांमध्यें सांपडला तर तोहि संगतीमुळें दुर्जन बनतो. तु०–संगतीसंगदोषेण सतां च मतिविभ्रमा ।–संक ५.३.८७.

कावळ्यापेक्षां त्याचें पोर अधिक शहाणें—मुलानें बापास अक्कल शिकविणें. बापापेक्षां मुलगा अधिक शहाणा दिसल्यास म्हणतात.–कावळा आणि ढापी ४३.

आंब्याला आला पाड, कावळ्याला आला मुखरोग; निंबाला आल्या निंबोळ्या आणि कावळ्याला आल्या गळचोट्या—वसंत ऋतूमध्यें कावळ्याला कंठरोग होतो त्यामुळें त्यास कांहीं खातां येत नाहीं व फळांस तर बहर आलेला असतो. कांहीं लोक असे दुर्दैवी असतात कीं त्यांच्या आयुष्यांत चालून आलेल्या उत्तम संधीचा त्यांना फायदा घेतां येत नाहीं. –ज्ञा १८. ६८२.

कावळ्याला केलें कारभारी, कचरा (गू) आणिला दरबारीं—कावळ्याला नेहमीं कचरा उकरण्याची संवय असल्यामुळें, तो कचराच जमवावयाचा. त्याप्रमाणें नीच मनुष्याच्या हातांत अधिकार दिला असतां तो नीच कृत्यें करण्याकडेच त्याचा उपयोग करतो. ‘ कावळ्याकडे दिला कारभार ’ पहा.

घरांत नाहीं शीत, कावळ्यास आमंत्रण; गांडींत नाहीं गू नि कावळ्यास आमंत्रण--अंगांत सामर्थ्य नसतां उगीच बडेजावीच्या गोष्टी बोलणें, करणें.

कावळ्यासारखा छिद्रान्वेषी, प्रौढी दावी जगाशीं—कावळा हा पक्षी कोणत्याहि प्राणाच्या अंगावर क्षत दिसलें कीं तेथें बसून टोंचण्याच्या कामीं प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणें या जगांत कांहीं लोक कोणाचा कांहीं न्यूनपणा दिसला कीं, त्याचें प्रदर्शन करून त्यास हिणविण्याच्या कामांत पटाईत असतात. अशा छिद्रान्वेषी मनुष्यास उद्देशून ही म्हण योजतात.

कावा——लोक म्हणती बुवा बुवा । न कळे गुलामाचा कावा ॥—ढोंगी बुवाबद्दल हें साधुवचन आहे. बोवाबाजी ही सर्वकाळीं आहेच. –तुगा.

बायकोचा कावा, न कळे ब्रह्मदेवा—स्त्रियांची लीला अगाध आहे. (अ) भूपस्य चित्तं कृपणस्य वित्तं मनोरथं मानुषदुर्जनस्य । स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं । देवो न जानाति कुतो मनुष्यः । (आ) यदि स्यात्पावकः शीतः प्रोष्णोषा शशलाञ्छनः । स्त्रीणां च तत् सतीत्वं स्याद्यदि वा दुर्जनो हितः ॥–पंचतंत्र ३. २०४.

काविळ——काविळ झालेल्यास सर्व पिंवळें दिसतें—काविळ हा एक पित्तापासून होणारा रोग आहे. तो झाला असतां मनुष्यास सर्व वस्तू पिवळ्या दिसूं लागतात. त्याप्रमाणें मनुष्यानें एकदां आपल्या मनाचा ग्रह एखाद्या व्यक्तीबद्दल अनुकूल अगर प्रतिकूल करून घेतला म्हणजे त्यास त्या व्यक्तीच्या बाबतींत प्रत्येक गोष्ट तशीच दिसूं लागते. 'कामीण' पहा. 'काविळ झालेल्या मनुष्यास सर्व पिंवळें दिसतें, किंवा रंगाच्या भिंगांतून पाहिलें असतां तद्रूप दृष्टि होते, त्याप्रमाणें ज्ञान दृष्टि ज्या ज्या विकारांतून बाहेर पडते त्या त्या विकाराचें स्वरूप पाहिलेल्या पदार्थांस दिसूं लागतें.' –शाब १४१.

काव्य——काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ।—दुसरी ओळः–इतरेषां तु (व्यसनेनच) मूर्खाणां निद्रया कलहेन वा ॥ शहाणे बुद्धिमान् लोक आपला वेळ काव्य, शास्त्रें इ. वाङ्मयीन करमणुकींत घालवितात तर इतर मूर्ख लोक झोपेंत किंवा भांडणांत वेळ दवडतात.

काशा——काशा-काशिया-कासाड भरडणें—बडबडणें; शिव्या देणें; बरळणें.

काशी——काशी असणें—(व.) आश्रय असणें.

काशी——काशीकर—१ काशीचा रहिवाशी. २ काशीयात्रा केलेला. ३ अत्यंत लबाड मनुष्य; काशीचा गुंड. पण यापेक्षांहि नाशिककर अधिक लबाड असतो, अशी समजूत आहे. 'शंभर काशीकर, एक नाशिककर.'

काशीरामेश्वराचें अंतर—काशी व रामेश्वर यांत अंतर फार आहे यावरून फार दूर असणें; दोन ध्रुवांइतकें अंतर; अतिशय मोठा फरक, भेद.

काशीचा सोदा—अट्टल लबाड, शठ मनुष्य. 'अशा वेशधारी गुरूबरोबर जे चेले असतात, तेहि काशीचे सोदे असतात.'–व्यनि ५०.

काशीची वाट दाखविणें—लहान मुलास दोन्ही कानांशीं हातानें दाबून धरून, किंवा कान धरून वर उंच उचलणें; सूर्याचीं पिल्लें दाखविणें.

काशींतुलों गयवाळु—(गो.) काशीचा गयावळ. गयावळ पहा.

काशीस गंगा नेणें—काशीसच गंगा आहे तेव्हां तेथें गंगेचें पाणी घेऊन नेणें मूर्खपणा आहे. जेथें एखादी गोष्ट विपुल आहे तेथें ती बाहेरून आणण्यांत काय अर्थ? गंगेच्या पाण्यानेंच गंगेस तर्पण करणें; निरुपयोगी गोष्ट करणें. तु०–To Carry coals to New-castle.

काशी केली वाराणशी केली, कर्माची (कपाळाची) कटकट नाहीं गेली—घरांतील कटकटीस कंटाळून वैतागानें एखाद्या मनुष्यानें घर सोडून अनेक तीर्थयात्रा केल्या तरी खरोखर मनांतून वैराग्य उत्पन्न झाल्याशिवाय व घरासंबंधीं आसक्ति सुटल्याशिवाय त्याच्या मनास शांतता मिळणें शक्य नाहीं. 'एक ब्राह्मणाची बाई काशीस जाऊन गंगेवरचा सर्व विधि आटोपून आपल्या घरीं परत आली. पुण्यकर्म केल्यावरहि तिला मनोविकारानें सोडलें नाहीं; असें पाहून तिनें रागानें व दुःखानें अशा प्रकारें म्हटलें. सदर्हु बाईची गोष्ट जगभर पसरल्यावर तिनें काढलेले वरील उद्गार जगाला कित्ता लावण्यासाठीं सर्वतोमुखीं झालें.'–शाब २.२११.

काशीरामेश्वर केलें, तें नाहीं फळा आलें—पुष्कळ तीर्थयात्रा केल्या तरी त्याचा मनावर योग्य परिणाम झाला नाहीं तर ते श्रम व्यर्थ होत. मनावर योग्य संस्कार झाल्याशिवाय बाह्य उपाय करून कांहीं फायदा होत नाहीं.

काशी लुटून वाराणशीला अन्नछत्र घालणें—एकाचें लुबाडून दुसऱ्यास देणें. ही म्हण तितकी बरोबर नाहीं, कारण काशी व वाराणशी हीं दोन्हीहि एकाच क्षेत्राचीं नांवें आहेत. तु०–नागेश्वराला नागवून सोमेश्वराला वात लावणें. To rob Peter to pay Paul.

काशी विद्येचें आगर आहे—काशी येथें अनेक पंडितांची वसती असून तेथें अनेक विद्यांचा अभ्यास करण्याचीहि उत्कृष्ट सोय आहे, अशी फार दीर्घकालापासून प्रसिद्धि आहे. तेथील पंडितांची परंपरा फार जुनी आहे.

काशींत मल्हारी महात्म्य—काशींत विश्वेश्वराचें महात्म्य सांगण्याऐवजीं मल्हारीचें महात्म्य सांगणें म्हणजे अनाठायीं वक्तव्य करणें. उदा०–'म्हैसूर विद्यापीठाचा पदवीदान समारंभ ता. ४–१०–४१ रोजीं म्हैसूर

येथें साजरा झाला. या समारंभासाठीं ईस्टर्न ग्रुप कौन्सिलचे एक ऑस्ट्रेलियन सभासद सर बट्रॉम स्टीव्हेन्स यांनीं विद्यापीठाच्या स्नातकांना उपदेश केला. युद्धाच्या पर्वणींत राष्ट्रांतील उद्योगधंद्यांची वाढ मोठ्या प्रमाणांत चालू असल्यानें ईस्टर्न ग्रुपमध्यें मोडणाऱ्या घटकांनीं एकमेकांच्या सहकार्यानें साम्राज्य सरकारास विजय मिळवून द्यावा वगैरेसारखें प्रवचन विद्यार्थ्यांपुढें त्यांनीं झोडलें. केवळ यदृच्छेनें जसे दोन ओढे एकत्र येतात व पुनः फुटून दुसरीकडे जातात, तद्वत् महायुद्धाचा वणवा संपला म्हणजे "यूयं यूयं वयं वयं" असा जप होण्यास जेथें सुरवात होणार तेथें भलतेंच पांडित्य विद्यार्थ्यांपुढें मांडून त्यांतून कांहीं लभ्यांश होईल असें आम्हांस वाटत नाहीं.'–केसरी १४-१० ४१.

काशींतु कासाक घोडे—(गो.) काशींत पैशाला घोडा. 'लंकेंत सोन्याच्या विटा' याप्रमाणें.

काशीपासून तों रामेश्वरापर्यंत काठीला सोनें बांधून अंधळ्यानें जावें—इतकी सुरक्षितता, निर्भयता. इंग्रजी राज्य या प्रकारचें आबादानीचें आहे असें दाखविण्यासाठीं योजतात.–शाब २.१०९. काठी पहा.

काशीस गेला काशीदास, मथुरेस गेला मथुरादास—ज्या ठिकाणीं जसा रिवाज असेल तसा वागणारा. परिस्थिति पाहून आपलें वर्तन जुळवून घेणारा. वारा वाहील तशी पाठ करणारा. तु०–गंगा गये गंगादास, जमुना गये जमुनादास.

काशीस गेल्याचें आपण सांगतो पण मांजर मारल्याचें सांगत नाहीं—काशीयात्रा करणें हें पुण्यकृत्य समजलें जातें; पण आपल्या हातून मांजर मेल्यास काशीस जाणें हें प्रायश्चित्त म्हणून मानण्यांत येतें. तेव्हां अशा तऱ्हेनें केलेल्या पापाचें क्षालन करण्याकरितां केलेल्या पुण्यकृत्यास विशेष महत्त्व नाहीं; पण मनुष्य आपल्या सत्कृत्याची तेवढी प्रौढी मिरवतो; पण आपण केलेलीं दुष्कृत्यें लपवून ठेवण्याचा प्रयत्न करतो.

काशीस जावें, नित्य वदावें— चांगली गोष्ट करण्याची नेहमीं इच्छा मनांत बाळगीत असावें; म्हणजे केव्हां ना केव्हां तरी योग्य प्रसंग येऊन ती घडण्याचा संभव असतो. 'काशीस जावें नित्य वदावें असा निदिध्यास मुमुक्षूंनीं धरावा.'–आगर ३.९. अहं काश्यां गमिष्यामि तत्रैव निवसाम्यहम्। इति ब्रुवाणः सततं काशीवासफलं लभेत् ॥–प्रातःस्मरण.

काशीसाकुन पंढरपुर दूर आसा—(गो.) काशीपासून पंढरपूर दूर आहे. एका गोष्टीचा दाखला दुसऱ्यास लागू पडत नाहीं या अर्थीं.

काश्यान्तु मरणान्मुक्तिः।— काशीस केवळ मरण आलें असतांहि मनुष्य मोक्षास जातो – संबंध श्लोक –काश्यांतु मरणान्मुक्तिर्जननात्कमलालये । दर्शनादभ्रसरसो स्मरणादरुणाचले ॥ 'काश्यान्तु स्मरणान्मुक्तिः।' असाहि पाठ आहे. –गांगा २७९.

काष्टा——काष्ट्याचा बळकट—जो संयमनशील असतो असा मनुष्य; अव्यभिचारी; एकपत्नीव्रतस्थ.

काष्ट्याची-कासोट्याची बळकट—शुद्ध पतिव्रता; पतिनिष्ठ स्त्री.

काष्टि——काष्टि नासिल्ल्याक आंगवस्तर पाटोळें—(गो.) ज्याला नेसायला लंगोटीहि नाहीं त्याला मोठासा पंचासुद्धां पितांबरासारखा वाटतो.

काष्टी भिजैल्याबगर थिगूर मेयूणा—(गो.) लंगोटी भिजवल्यावांचून थिगूर नांवाचा मासा सांपडत नाहीं. (थिगूर पकडायचा तर कंबरेइतक्या पाण्यांत जावें लागतें.) मोठी व बहुमोल वस्तु मिळवावयची तर त्यासाठीं साहसहि तसेंच करावें लागतें.

काष्टे संसार; संन्याशा काष्टि—(गो.) संन्याशाची लंगोटी. संन्यासी पहा.

काष्टेंतु मूत तडवना—(गो.) लंगोटींत मूत सामावत नाहीं. एखाद्या मस्तवाल आणि येतां जातां दुसऱ्यास विनाकारण पीडा देणाऱ्या माणसाला उद्देशून वापरतात.

काष्ठ——काष्ठघंटाविटंबना।—वाईटाची संगत हानिकारक होते. 'ओढाळ गुरांच्या संगतीनें गरीब गाईच्या गळ्यांत काष्ठघंटा नुसती बांधली जातें.'–शाब २.१९६. संबंध श्लोक—असंङ्गसङ्गदोषेण सत्यश्च मतिविभ्रमः। एकरात्रप्रसंगेन काष्ठघंटाविटम्बना ॥ एक पहा.

काष्ठ वळणें–कृश, रोड होणें; वाळून लाकडासारखें होणें.

काष्ठें खाणें—१ स्वतःस जाळून घेणें; चिताप्रवेश करणें; अग्निकाष्ठें भक्षण करणें; चितेंत उडी घेऊन मरणें. २ सहगमन करणें; सती जाणें. 'तुजसारखा असतां पिता। आम्हा वैधव्य आलें आतां। तरी काष्ठें खाऊं आतां। तुज देखतां ॥' –कथा २.२.४९.

***काष्ठ नाहीं तेथें अग्नि नाहीं, चहाड नाहीं तेथें तंटा नाहीं**—ज्याप्रमाणें अग्नीस इंधन मिळालें नाहीं तर तो पेट घेत नाहीं त्याप्रमाणें चहाडखोर मनुष्यांनीं जर लावालावी

केली नाहीं तर भांडण तंटा सहसा होत नाहीं. चुगलखोर लोकच बहुधा भांडणें उत्पन्न करतात. तेव्हां त्यापासून सावध राहावें.

कास——[कास=ओटी] **कास घालणें**—ओटी करणें; गाय, म्हैस वगैरेंची प्रसूतीपूर्वी ओटी दिसूं लागणें.

कास——**कास कसणें-घालणें-बांधणें**—१ कासोटा घालणें; कासोटा मारणें. 'घालील न शरणागत कार्या तो कास काय संवर्त।' -मोद्रोण ४.७४. 'मी कशितोंचि तथापि कास हा सीते!'-मोहरि ४९-७९. -मोविराट ७.१०. २ काम करण्यास तयार होणें; कंबर बांधून तयार असणें; उद्युक्त होणें. 'कास घालोनि बळकट। झालों कलिकाळावरी नीट।' -तुगा ३३९. -मोभीष्म ५.३६.

कास धरणें—एखाद्या बलिष्ठ माणसाची मदत घेणें, त्याच्या आश्रयास जाणें. 'तरी आम्हीं तुझी धरियेली कास।' -तुगा १६०७. -मो आश्रम २.७१.

कासेस लागणें—कास धरणें; आश्रय करणें. 'होतें सद्धर्माच्या कासेला लागतां सदाशिव हो।'-मोवन १३.२७.

कासे-कासेस लावणें—आश्रय देणें; आधार देणें. 'कासें लाविलें जनार्दनीं।' -एरुस्व १६.१६५. 'स्वप्नीं दर्शन दे प्रभु; कीं तो कासेस लाविला पार्थ।' -मोद्रोण ८.६०. 'जगद्‌गुरु तूं मज लावि कासे।'-सारुह १-३.

कांसपात्र——**कांसपात्राला नादच मोठा**—कांश्याच्या भांड्याला नाद फार असतो. कांहीं लोकांचा स्वभावच असा असतो कीं, त्यांच्या कानीं एखादी गोष्ट गेली किंवा त्यांचा संबंध ज्या गोष्टीशीं आला तिचा सर्वत्र बोभाटा करावयाचा. अशा वृत्तीस अनुसरून ही म्हण वापरतात. तु०-A vessel of bell-metal gives a large sound.

कासरा——**कासराभर देव-सूर्य वर येणें-राहणें**—क्षितिजापासून एक कासऱ्याच्या अंतराइतका सकाळीं सूर्य वर येणें किंवा सायंकाळीं वर आकाशांत राहणें; दोन घटका दिवस उगवून होणें, किंवा बाकी राहणें.

कासव——**कासवाचें तूप**--कासवीण दूध देत नाहीं- ती आपल्या पिलांस इतरांप्रमाणें पाजीत नाहीं; तर तीं केवळ तिच्या प्रेमदृष्टीनेंच तृप्त होतात अशी समजूत आहे. तेव्हां तिचें तूप निघणें अशक्य. सशाच्या शिंगाप्रमाणें दुष्प्राप्य गोष्ट; असंभवनीय गोष्ट. कूर्मदृष्टि पहा. तु०—कूर्मीचिया पिलियां। दिठी पान्हा ये धनंजया।-ज्ञा १८.१३४३.

❀ **कासवा मामान गात्रां आंबुळलीं**--(गो.) कासवानें गात्रें (हातपाय) आखडलीं; कासव भ्यालें असतां आपले हातपाय आखडून आंत घेतें यावरून १ भयभीत होणें. २ सर्व कारभार आटोपणें; आवळून धरणें.

कासवाक कोंबो जामीन—(गो.) कासवाला कोंबडा जामीन राहणें; कासव पाण्यांत राहतें व कोंबडा जमीनीवर. तेव्हां त्यांची गांठभेट होत नाहीं. यावरून एकाद्या मनुष्याबद्दल त्याच्या अगदीं विपरीत स्थितींत असणाऱ्या मनुष्यानें हमी घेणें.

कासवाचीं पिलें, दृष्टीनेंच धाले—कासवीण ही आपल्या पिल्लांना दूध पाजीत नाहीं तर तिनें त्यांच्याकडे दृष्टि लावली म्हणजेच त्यांची तृप्ति होते अशी समजूत आहे. या वरून कांहीं मनुष्याच्या केवळ दृष्टीनेंच कार्य घडून येतें. कूर्मदृष्टि पहा.-ज्ञा १८. १३४३.

कासवाचें घर पाठीवर—'विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर' याप्रमाणें. कासवाचे घरासारखें कवच त्याच्या पाठीवरच नेहमीं असतें. त्यांत तें वाटेल तेव्हां जातें,बाहेर येतें. त्याप्रमाणें आटपशीर बिऱ्हाड, सामानसुमान असणें (वाटेल तेव्हां चटकन हालवितां येईल असें.)

कासवाच्या पिलाला पोहायला शिकवावें लागत नाहीं—कासव पाण्यांतच राहत असल्यामुळें त्याला पोहण्याची कला ही उपजतच अवगत असते. तो त्याचा स्वभावधर्मच आहे. त्याप्रमाणें कांहीं गोष्टी कांहीं लोकांमध्यें जन्मजातच असतात. त्यांचें बाहेरून आरोपण करण्याची आवश्यकता नसते.

कासवालागुनु बोंडुळ गेलें—(गो.) कासव मिळवण्याच्या आशेनें गळाला लावलेलें आमिष गेलें. कासव हा प्राणी मोठा व वजनदार असल्यामुळें तो जरी गळाला लागला तरी त्याला उचलणें शक्य नसतें. तो मात्र गळाच्या टोकांचें मांस खाऊन सुटून जातो. अपुऱ्या आणि अल्पजीवि साधनाच्या द्वारें दुष्प्राप्य वस्तूची हांव धरणें बरें नव्हे. ती वस्तु तर मिळत नाहींच, उलट आपल्या जवळ जें असेल तें मात्र नाहींसें होतें.

कासवीचें तूप, तैसें संसाराचें रूप--कासव दूधच देत नाहीं तर त्याचें तूप कोठून होणार ? तेव्हां कासवीचें तूप जसें खरें नव्हे तसेंच संसाराचें रूप देखील खरें नव्हे. मागें पहा. -ज्ञा १५.२२१.

कासवीण—**कासविणीचे पाय कासविणीस जड नाहींत**—'म्हशीचीं शिंगें म्हशीला जड नाहींत,' पहा.

कासा—कासावयलें भूत--(गो.) ' पिंपळावरचा मुंजा ' याप्रमाणें काजऱ्यावरील भूत.

कासार—कासाराचा माल, बांगड्याचें हाल—कासाराजवळ सामान काय असणार ? तर बांगड्या. तेव्हां त्याची उस्तराउस्तर केल्यास बांगड्या मात्र फुटावयाच्या.

कासु—कासु दिवंचाक वरु मोडियिलो--(गो.) दिडकी देण्यासाठीं वरा मोडला. क्षुल्लक कामासाठीं महत्त्वाच्या वस्तूची मोडतोड अथवा नाश करणें या अर्थी

कासु दिवनु लासु घेवप--(गो.) कास देऊन लास (डाग) घेणें; पैसे देऊन आपत्ति विकत घेणें. विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करणें.

कासा गेलेलि मर्या वरु दिल्यारि मेळना--(गो.) एका दिडकीसाठीं गेलेली अब्रू 'वरा' (एक सोन्याचें नाणें) देऊनहि परत मिळत नाहीं.

कासा भाज्जेक दुग्गाणि फण्ग—(गो.) दिडकीच्या भाजीला दुगाणीची फोडणी. एखाद्या क्षुद्र वस्तूची तसल्याच क्षुद्र वस्तूनें केलेली संभावना याअर्थी.

कासूनि कासु एकडे केल्यारि वरु जात्ता--(गो.) पैसा पैसा सांठवला तर वरा (सोन्याचें एक नाणें) होतो. म्हणजे थेंबें थेंबें तळें साचें.

कांसें——कांसें करा कीं पितळ करा--कांसें व पितळ या धातु कांहीं खाणींतून निघत नाहींत. तर इतर कांहीं धातु विशिष्ट प्रमाणांत मिश्रण करण्यानें त्या तयार होतात. व त्यांतील घटकहि एकच असतात. यावरून एकाच साधनापासून बरीवाईट गोष्ट करणें कर्त्यावर अवलंबून असतें. ही सामुग्री तुम्हांस दिली आहे; यापासून कांसें तयार करूं शकाल किंवा पितळहि; तुमच्या इच्छेची ती गोष्ट आहे असा भाव. ' ही रकम तुमच्या हातीं दिली आहे. आतां तिचें कांसें करा कीं पितळ करा, मला पर्वा नाहीं. '

कासोटा——कासोटा होणें—मागें लागणें; पाठ न सोडणें; कच्छपीं लागणें.

कासोट्याचा खबरदार-बळकट; कासोट्याचें पाणी प्यावया जोगा--अव्यभिचारी; एकपत्नीव्रतस्थ, सदाचारी; पवित्र.

कासोट्याचा हलका—विषयी; व्यभिचारी. काष्टा पहा.

कासोट्याची खबरदार-बळकट—पतिव्रता; पतिनिष्ठ स्त्री.

कासोट्याचें पाणी घेणें—एखाद्या अत्यंत पवित्र ब्रह्मचर्य किंवा पातिव्रत्य नियमानें राहणाऱ्या माणसाबद्दल हा वाक्प्रचार योजतात. असा मनुष्य कधींहि अपवित्र राहावयाचा नाहीं. त्याचें कधींहि रेतस्खलन व्हावयाचें नाहीं अशा खात्रीचें निदर्शक.–संशय कल्लोळ १-५-२१.

कांहीं——कांहीं एक—१ कित्येक. ' कांहीं एक माणसें. २ मुळींच; यत्किंचित्हि; थोडें सुद्धां; तिळभरहि. 'मी त्याचें कांहीं एक चालूं देणार नाहीं. '

कांहीं एक न लागणें—कोणत्याहि प्रकारें ओशाळा नसणें; ऋण न लागणें; कोणत्याहि प्रकारें मिंधा नसणें. ' मी तुमचें कांहीं एक लागत नाहीं.–अस्तंभा २०.

कांहीं कांहीं—अल्प स्वल्प; थोडें फार.

कांहीं न होतेला-नव्हतेला—जणूं कांहीं कांहींच घडलें नाहीं अशा अर्थानें.

कांहीं बाहीं--अल्पसें; थोडेंसें. किंचित्. ' आलु आला तो गेलिया । कांहीं बाहीं जें उरे । '–ज्ञा १८.४१२.

कांहीं बोलों नये ऐसें—१ बोलण्यांत अर्थ नाहीं असें. २ बोलण्यास जागा नाहीं असें; बोलण्यास तोंड नाहीं अशी स्थिति. ' कांहीं समर्थेसी बोलों नये ऐसें जालें. '–सप्र ८.२.

कांहींचे बाहीं, कांहींच्या बाही—भलतेंच; अवास्तव; बेताल; अमर्याद; कोठच्या कोठें जाणारें. ' एकदां जें आमचें भांडण जुंपलें तें कांहींच्या बाहींच. '–पकोघे.

❀ **कांहीं असती शहाणे, कांहीं वागती मूर्खपणें**—ज्याप्रमाणें कांहीं लोक शहाणे असतात त्याप्रमाणें कांहीं मूर्ख लोकहि जगांत असणारच. जगामध्यें सर्व प्रकारचीं माणसें असतात.

कांहीं आपाचें बळ, कांहीं बापाचें बळ—प्रत्येक गोष्ट आपण एकट्यानेंच करूं म्हटलें तर जमत नाहीं. प्रसंगीं थोडेसें स्वतांचें बळ नि थोडीशी दुसऱ्याची मदत घेऊन काम करावें लागतें. संहतिः कार्यसाधिका ।

कांहीं दिवस सासूचे, कांहीं दिवस सुनेचे—कांहीं काळ सासू आपला अधिकार गाजविते, पुढें सून अधिकारावर येऊन ती अंमल चालविते, असा परिपाठ संसारांत असतो. प्रत्येक मनुष्यास कांहीं दिवस सद्दीचे असतात. काय दिवस इ. पहा. तु०–Every dog has his day.

कांहीं नसण्यापेक्षां अर्धी बरी--मुळींच अभावापेक्षां जेवढें असेल तेवढ्यांत समाधान मानणें. तु०–Something is better than nothing.

कांहीं नसो पण पाटील दादला असो--नवऱ्याजवळ संपत्ति नसली तरी हरकत नाहीं पण तो पाटील असल्यास त्याला गांवांत महत्त्व असून त्याच्या हातीं कांहींतरी अधिकार असतो. इतर कांहीं गोष्टी नसल्या तरी चालतील पण मनुष्याच्या हातांत कांहीं तरी सत्ता असली पाहिजे, म्हणजे त्या सत्तेनें वाटेल तें मिळवितां येतें. तु०-कणगींत नसेना दाणा पण नवरा असावा पाटिलराणा.

कांहीं ना टपाल, म्हणजे सगळे खुशाल-- कागद ना पत्र, पहा.

कांहीं नाहीं फसली, दोन्हीच तसलीं--स्त्रीचा दुसऱ्या मनुष्याशीं संबंध आला व त्यांत ती फसली तर ती जर स्वभावानेंच अशीतशी असेल तर तिच्याबद्दल कोणास सहानुभूति वाटणार नाहीं. दोघां लबाडांत जर एकाचें नुकसान झालें तर त्याबद्दल कोणास वाईट वाटत नाहीं. जी नीतीनें ढिली आहे तिच्याशीं कोणी अतिप्रसंग केल्यास तिच्याबद्दल कोणास कांहीं वाटण्याचें कारण नाहीं.

कांहीं पडेल देणं, तर नाहीं घडायचं येणं--(वांय) जर फुकट असेल तर येतों. पुढें पहा.

कांहीं प्राप्त होईना ज्यास, तो म्हणे मला आधींच त्रास--एखादी गोष्ट मिळण्याची आशा नसली म्हणजे माणूस त्याबद्दल नावड दाखवितो. तु०-द्राक्षें आंबट. -सवि २३३०.

कांहीं बोलल्यावांचून काम होत नाहीं—मनुष्य गप्प बसला तर त्याचें काम कसें होणार? त्यानें आपलें काम करून घेण्याकरितां चार चौघां जवळ चौकशी केली पाहिजे,खटपट केली पाहिजे. तरच कांहीं काम होण्याचा संभव असतो.

कांहीं मेळवी, मग जेवी--रोज कांहीं तरी संपादन केल्याशिवाय अन्न घेऊं नये. कांहीं तरी श्रम करीत असावें व नवीन संपत्ति मिळवित असावें. सांचलेली संपत्ति फार दिवस पुरत नाहीं.

कांहीं सोन्याचा गुण, कांहीं सवागीचा गुण-सवागी हा पदार्थ सोनें आटवतांना पातळ करण्याच्या कामीं लागतो. तेव्हां सोनें जर चांगलें उजळलें गेलें असेल तर त्याचें कांहीं श्रेय सवागीलाहि द्यावें लागतें. यावरून प्रत्येकाचें थोडें बहुत साहाय्य होत असतें, हातभार लागलेला असतो.

काळ——(**एखाद्याचा**) **काळ**--[काळ = शत्रु; मृत्यु] मारक; नाश, घात करणारा. ‘ अग्निहोत्राचा सुकाळ वडपिंपळासी काळ ॥’ -एकनाथ.

काळजिभि—अशुभ बोलणारी.

काळ भेटणें--मरण येणें; मृत्यु येणें; मरण पावणें. ‘काळ न भेटे कैसा ? तद्वदनीं पुत्रकायसम जावूं !’-मोद्रोण ४.२.

काळाचा काकडा—काळास दाद देणार नाहीं असा बळकट म्हातारा; निरोगी वृद्ध मनुष्य; धट्टा कट्टा म्हातारा मनुष्य.

काळाचा काळ—मृत्यूलाहि भीत नाहीं असा; बेडर; अत्यंत धीट, निर्भय मनुष्य.

काळाचा फेरा—मृत्यूची भेट; कांहीं तरी भयंकर अनर्थ; रोगाची साथ वगैरे.

काळाच्या तोंडीं घालणें-देणें-जाणें-पडणें-येणें-सांपडणें; काळाच्या दाढेंत जाणें-देणें—भयंकर संकटांत धोक्यांत घालणें, देणें वगैरे. मृत्यूच्या जबड्यांत घालणें, देणें वगैरे. मरणप्राय स्थितींत जाऊन पडणें, घालणें, सांपडणें वगैरे.

काळांतून ओढलेला—दुष्काळांत कसा तरी वांचलेला; मरणप्राय स्थितींतून बाहेर पडलेला; अतिशय कृश; अशक्त; रोड.

काळानें ओढणें-बोलावणें—नशिबानें संकटांत, मृत्युमुखीं पडणें; मृत्यूचें आमंत्रण येणें; मरण येणें.

काळानें घेरणें—मृत्युमुखीं पडणें; मरण येणें. ‘चिमणाबापूस लौकरच काळानें घेरलें.’ -विवि ८.७.१२८.

काळापुढें तीन दीस झालो—(गो.) अत्यंत दुष्ट मनुष्य.

❀ **कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ**—कुऱ्हाडीचा दांडा हा लांकडाचा केलेला असतो व त्या कुऱ्हाडीनें लांकूडतोड्या सर्व लांकडें तोडून टाकतो. यावरून एखादा मनुष्य स्वजनास घातक झाल्यास त्याबद्दल ही म्हण योजतात.

मारत्याचा गुलाम, पळत्याचा काळ--जो मनुष्य जबरदस्त मनुष्याशीं अत्यंत नम्रपणें वागतो परंतु दुर्बल मनुष्याशीं अरेरावीचें वर्तन करतो अशा मनुष्यास अनुलक्षून ही म्हण वापरतात.

काळ आला होता पण वेळ आली नव्हती—नाशाची परिस्थिति जमून आली होती पण नाश होण्याचें राहिलें. अगदीं जवळ जवळ जिवावर बेतण्याचा प्रसंग आला असतां त्यांतून निभावल्यास म्हणतात. (प्रत्येकाच्या मृत्यूची ठराविक वेळ असते असा समज).

काळज्वर अंगीं बाणे, तो शीतोष्णता नेणे--जो मृत्यूच्याच दारीं बसला आहे त्याला लहान सहान दुखण्याचें भानच नसतें.

काळ प्राण हरण करतो पण वैद्य प्राण आणि वित्त नेतो--मृत्यु हा फक्त प्राण हरण करतो पण वैद्य हा प्राण तर राखूं शकत नाहीं पण त्याबरोबर आपली बिदागी म्हणून द्रव्यहि घेऊन जातो. वैद्यराज नमस्तुभ्यं यमराज सहोदर। यमस्तुहरते प्राणान् वैद्यः (त्वं तु) प्राणान्धनानि च ॥ -सुर ४४.१.

खाण्याला (खायाला) काळ, भुईला भार--केवळ खाऊन पिऊन आळसांत वेळ घालविणाऱ्या मनुष्याबद्दल म्हणतात. 'खाया काळ भुईस भार जगला पापां कराया धणि।' -रामशास्त्री (राघोबास उद्देशून).

काळवेळ सांगुन यता ?—(गो.) काळवेळ सांगून येत नसते.

काळ (= वेळ)——चालतां काळ—भरभराटीचें दिवस; अनुकूल स्थिति; वैभवसंपन्नता; यशस्वी काल. ' बा तुझा चालतां काळ। खायाला मिळती सकळ।'-अमृत ११८

काळ अनुकूल होणें—दैव उदयास येणें; लाभदायक परिस्थिति उत्पन्न होणें; आपणांस पाहिजे तशा गोष्टी घडून येणें.

काळ कंठणें—वेळ व्यर्थ घालविणें; दिवस घालविणें. कसेंतरी दिवस काढणें; अत्यंत कष्टानें आयुष्याचें दिवस घालविणें. ' जसातसा केवळ काळ कंठी।'-सारुह ४.२४.

काळ विन्मुख होणें-फिरणें; काळानें वेढा घालणें-घेरणें—दैव वांकडे होणें; प्रतिकूल परिस्थिति उत्पन्न होणें; मनाविरुद्ध गोष्टी घडत जाणें; दैव फिरणें; नशीबानें उलट खाणें.

काळाची गांड मारणें---कसातरी वेळ घालविणें; रिकामपणीं वेळ दवडणें; कसें तरी दिवस घालविणें; व्यर्थ आळसांत काळ कंठणें.

काळांतरीं--थोडे दिवस गेल्यावर, कांहीं काळानें; कांहीं दिवसांनीं.

काळांतरीं (न)—केव्हांहि नाहीं; कितीहि काळ लोटला तरी. ' ही गोष्ट काळांतरीहि व्हावयाची नाहीं.'

काळानें मागें पाहाणें--दिवस प्रतिकूल येणें; नशीबानें उलट खाणें.

काळानें हातीं धरणें—दैव अनुकूल असणें; लाभदायक परिस्थिति उत्पन्न होणें.

काळावर दृष्टि ठेवणें-देणें---नशिबावर हवाला ठेवणें; जशी परिस्थिति येईल तसें वागणें; कालास अनुरून वर्तन ठेवणें.

काळीं काळीं—योग्य वेळीं; अनुकूल कालीं; काले काले; समयानुसार. ' पर्जन्य तोहि परोपकारार्थ। काळीं काळीं वृष्टि करीत।' -निमा १.९८.

काळें करून—थोड्या दिवसांनीं; कांहीं काल गेल्यावर; कांहीं अवधीनंतर. 'काळें करूनि सुख जीवरि होय लेखीं। हें बोलणें खग मनीं उभयार्थ लेखी '। -नल.

काळेंचि—तात्काळ; तावडतोब. तत्क्षणीं. ' जें विटोनि विकारी होत। तें अपुनीत काळेंचि। '-एभा २१.११७.

काळोकाळ--१ प्राचीन काळापासून. २ पुन्हां पुन्हां; वारंवार.

❀ **काळ आणि ओहटभरती, नाहीं कोणाचे हातीं**—ज्याप्रमाणें समुद्राला ओहटी भरती येणें हें कोणाहि मनुष्याच्या हातांत नाहीं त्याप्रमाणें कोणत्या वेळेस काय होईल तें सांगणें, हें मनुष्याच्या हातांत नाहीं. तु०-Time and tide wait for no man.

काळ आला उफराटा, न करी कोणाशीं तंटा--विपरीत दशा आली असतां कोणाशींहि भांडणतंटा किंवा विरोध करण्याचें शक्य तितकें टाळावें.

काळ करित तें कोणाच्यान कर न जो--(गो.) काळ हा सर्वसमर्थ आहे. तो जें करील तें कोणास करतां येणें नाहीं.

काळ जातो क्षणक्षणा। मूळ येईल मरणा ॥-(रामदास-अभंग) जसजसा एक एक क्षण निघून जातो तसतसा मृत्यु जवळ जवळ येतो.-नवनीत १४७.

काळा ना वेळ आणि गाढवाचा खेळ—भलत्यावेळीं भलतें कांहीं करीत बसणें; तारतम्य न बघणें.

काळाअंतीं अरबटचरबट—दुष्काळामध्यें मनुष्य अरबटचरबट वाटेल तें अन्न खातो त्यावरून अडचणींत मनुष्य सांपडला म्हणजे वाटेल तें हलकेंसलकें कामहि करावयास तयार होतो.

काळाची करणी कडू असते—काळाची कृति फार अनिष्ट, दुष्ट वाटते.

काळाचे ओढे, यमाचे आकोडे—(व.) एकाद्याच्या मागें कामाची खूप धांवपळ असल्यास असें म्हणतात. ज्याला कामाची विशेष तकलीफ हमेष सहन करावी लागते; परलोकीं

यम जसा लोखंडी आकड्यांनीं ओढणार तसा कामाचा ओढा जास्त असतो. "माझ्या पाठीमागें हजार कामें! अन्न खायला तर फुरसत नाहीं; माझ्यामागें 'काळाचे ओढे नी यमाचे आकोडे' आहेत; जन्मभर असेंच चालणार."

कालोकाल भविष्यति; कालेकाले भविष्यति—केव्हां तरी घडून येतें; एखादी गोष्ट केव्हां घडून येईल त्याचा नेम नाहीं; केव्हां तरी घडून म्हणजे तिची वेळ आली म्हणजे होते.

काळका——**काळ्का देवतेक नाशिल्लि घोव आणि बेताळा नाशिल्लि बायल**—(गो.) हडळीला नाहीं नवरा आणि वेताळाला नाहीं बायको.

काळजी——**काळजीचा कांटा**—चिंतेची हुरहुर; काळजीची व्यथा.

काळजीचा धगड—[धगड=नवरा; वरचढ माणूस] अत्यंत बेफिकीर, निष्काळजी.

❀ **काळजीसारखा दुसरा रोग नाहीं**--काळजीनें मनुष्य इतर रोगांपेक्षांहि जास्त लवकर खंगत जातो. चिंतासमं नास्ति शरीरशोषणम् ।

काळंतर--**काळंतरा आशे मुद्दल नाशे**—(गो.) [काळंतर=कलांतर, व्याज] व्याजाच्या आशेनें मुद्दल जातें.

काळभैरव--**काळभैरवाचा सोटा**--कोतवालाचें काम. काळभैरव हा काशीचा कोतवाल आहे यावरून. 'तुझें माझें रक्षण करण्याकरितां काळभैरवाचा सोटा कोणाच्या हातीं आला आहे.'–भाऊ २२.

❀ **काळभैरवाची धायी, किडा मुंगी आपल्या ठायीं**—[धायी=धात्रीपणा, रक्षण] रात्रीं निजतांना जेवतांना किंवा कांहीं काम करतांना किडा मुंगी मरूं नये त्यांनीं आपआपल्या ठिकाणीं स्वस्थ बसावें इकडे तिकडे फिरूं नये म्हणून त्यांस काळभैरवाची शपथ घालण्यासाठीं म्हणतात.

काळा--**काळा उन्हाळा**--१ अत्यंत कडकडीत उन्हाळा; यांत मनुष्य काळा पडतो. २ कठीण, टंचाईची वेळ

काळे करणें--१ कोठें निघून जाणें; फरारी होणें; परागंदा होणें. २ समोर न दिसणें; तोंड लपविणें. 'जा कर काळे!'–कमं २.

काळें पाणी--१हद्दपारी. २ हद्दपारीची शिक्षा दिलेल्या कैद्यास ठेवण्याची जागा. (ही जागा कोठेंतरी दूर व वाईट हवेच्या ठिकाणीं असते; म्हणून हा शब्दप्रयोग.)

पाढऱ्याचे काळे होणें--म्हातारपणीं केंस पांढरे होतात, परंतु अशा वयांत काळ्या केंसांच्या म्हणजे तरूण मनुष्याप्रमाणें वर्तन करूं लागणें; वृद्धपणीं तारुण्याचे चाळे सुचणें.

काळ्या डोईचें मनुष्य--मनुष्यप्राणि. (इतर प्राण्याहून मनुष्यप्राण्याची अद्भुत शक्ति वर्णावयाच्या वेळीं वापरतात.)

काळ्या दगडावरची रेघ—१ कधीं पुसलें जाणार नाहीं असें लिखाण; चिरंजीव लेख. २ (ल.) अक्षय गोष्ट; अबाधित गोष्ट, उक्ति; न फिरणारें वचन, भाषण, शब्द; दृढनिश्चय. 'ही आपली माझी काळ्या दगडावरची रेघ.'–तोबं १७९. 'हे भोंसल्याशीं लढायचे नाहींत! अगदीं काळ्या दगडावरची रेघ!'–शिसं २.३. 'जुलमाचें जोखड आपल्या मानेवरून काढून टाकण्याला त्या लोकांना कित्येक वर्षें लागोत, पण तसा प्रयत्न केल्याशिवाय ते कधींहि राहणार नाहींत, ही काळ्या, दगडावरची रेघ समजावी.'–केसरी १६.७.४०.

काळ्या निशाणांची मिरवणूक—काळीं निशाणें. दाखविणें. निषेध व्यक्त करण्याचा एक पाश्चात्य मार्ग. 'सायमनकमिशन निमित्त काळ्या निशाणांची मिरवणूक निघाली.'–केसरी १७.६.३०.

काळ्याचे पांढरे होणें—वृद्धावस्थेमुळें काळ्या केंसांचे पांढरे केंस होणें; म्हातारपण येणें; वृद्ध होणें.

❀ **काळा काळा ढुस्स, त्याला उंदीर करी फुस्स**--काळ्या मनुष्यास चिडविण्यासाठीं मुलें म्हणतात. उंदरापेक्षांहि काळा; उंदीरहि तिरस्कार करील इतका काळा.

काळा कोळसा दुधें धुतला तरी फळ काय । रंग त्याचा काळा नच जाय ।–होला ६०.८८.८९. कोळशाचा रंग कधीं बदलत नाहीं; त्याप्रमाणें मनुष्याचा स्वभाव कधीं पालटत नाहीं. कोळसा पहा.

काळा ब्राह्मण गोरा शूद्र, त्यास पाहून कांपे रुद्र—काळा ब्राह्मण व गोरा शुद्र हे बहुधा भयंकर असतात. ब्राह्मण काळा असणें व शूद्र गोरा असणें या गोष्टी अस्वाभाविक असतात; त्यामुळें त्यांच्या मुळाशीं कांहीतरी भयंकर गूढ असलें पाहिजे अशी समजूत.

काळा हमाल, गोरा ढमाल—गरीबींत मनुष्य सामान्यतः काळा असतो व अशा काळ्या मनुष्याला नेहमीं कष्टाचें, हमालीचें काम करावें लागतें. उन्हातान्हांतील श्रमांमुळें तो अधिक काळा होतो व सुस्थितींतील मनुष्य बहुधा गोरा असतो व त्याला कांहीं काम न पडल्यामुळें तो लठ्ठ लठ्ठ होत जातो.

काळी कस्तुरी साठ रुपये तोळा—खरी कस्तुरी काळी कुळकुळीत असून तिचें मोलहि भारी असतें. तेव्हां नुसत्या वर्णावर न जातां खरी पारख करून वस्तु घ्यावी लागते असा आशय. "असा गुरूचा प्रताप वर्णन करणाऱ्या आमच्या इकडील, म्हणजे पूर्वेतील उज्वल सूर्य किरणांनीं विशुद्ध झालेल्या, काळ्या लोकांच्या, 'काळी कस्तुरी साठ रुपये तोळा' ह्या न्यायाच्या बहुमोल पद्धतीचें सात्त्विक सामर्थ्य आणि गौरव कुठलें येणार?"—छच ६१.

काळी काळी उंदर, तिचा सैंपाक सुंदर—(व.) काळ्या स्त्रीस खुलविण्यासाठीं योजतात.

काळी जाली, कुड्डि जाली, आवय ती आवय—(गो.) काळी असो, अंधळी असो, आई ती आई.

काळी बायूल् घोंवाची, गोरी बायूल् जगाची—(गो.) काळी बायको ती नवऱ्याची, गोरी असते ती सर्व जगाची! काळ्या स्त्रीवर कोणाचें मन जात नाहीं व तीच गोरी व सुंदर असल्यास सर्वजण तिच्या प्राप्तीची आशा करणार.

काळीची सफेदी झाली, पण अक्कल नाहीं आली—ज्ञान हें वयावर अवलंबून नसतें हें खरें, पण जेव्हां वृद्ध अगर मोठीं माणसें स्वतःच्या अनुभवावरून बोध घेत नाहींत, तेव्हां 'अक्कल शून्यच राहिलांत' ह्या अर्थानें ही म्हण वापरतात

काळें खोटें नाश पावतें, खरें सिद्ध होतें—जें असत्य व अन्याय यांवर उभारलेलें असतें तें टिकत नाहीं व शेवटीं सत्याचाच विजय होतो.

काळे राळे, गोरे राळे, राळ्यांत राळे मिसळले—राळे एकत्र केले म्हणजे त्यांतले काळे व गोरे वेगळे काढणें कठिण असतें, त्याप्रमाणें एकाच स्वभावाचीं भिन्नभिन्न माणसें एकत्र आलीं म्हणजे तीं पूर्णपणें समरस होतात; त्यांतील फरक शोधून काढणें शक्य नसतें. हें वाक्य मुलांना गंमतीनें भरभर पण शुद्ध म्हणावयास सांगतात. कारण तसें म्हणतांना शब्दव्यत्यास व विपर्यास होतो व म्हणणाराचा गोंधळ उडतो.

काळ्या खडकांत पाण्याचा थेंब नाहीं—काळा खडक हा अतिशय कठिण असल्यामुळें त्यांत पाणी झिरपून जाऊं शकत नाहीं व त्यामुळें एकदां विहिरीस काळा खडक लागला कीं, बहुधा पाणी लागत नाहीं. त्याप्रमाणें ज्या मनुष्याच्या अंतःकरणास केव्हांहि द्रव येत नाहीं, अशा मनुष्याबद्दल योजतात.

काळ्या शीस गोऱ्याक, गोऱ्या शीस काळ्याक—(गो.) काळ्याचें डोकें गोऱ्याला आणि गोऱ्याचें डोकें काळ्याला. वस्तूंची अनुचित गफलत किंवा अदलाबदल या अर्थी.

काळ्यांतु गोरसांवळो गोमटो—(गो.) काळ्यांत निमगोरा चांगला वाटतो. तु०—वासरांत लंगडी गाय.

काळी——ज्याचे घरीं काळी, त्याची सदा दिवाळी—[काळी=म्हैस] घरांत म्हैस असली म्हणजे दूधदुभत्याची चांगली चंगळ असते. तेव्हां नेहमीं दिवाळीप्रमाणेंच खाण्यापिण्याची चैन. श्यामा मन्थरगामिन्यः पीनोन्नतपयोधराः। महिष्यश्च महिष्यश्च सन्ति पुण्यवतां गृहे ॥—सुर१६०.३१०. काळी म्हणजे शेत असाहि अर्थ करून म्हण लावतां येईल.

काळी पिकली तर पांढरी वांचली—काळी म्हणजे शेत जमीन व पांढरी म्हणजे गांवच्या वस्तीची जमीन. तेव्हां शेती जर पिकली तर गांवचें रक्षण होणार. यावरून शेतकऱ्यांजवळ जर समृद्धि असेल तरच इतर लोकांचें पोषण होऊं शकेल. तो उपाशीं मेल्यास बाकीच्यांसहि उपाशीं राहण्याची पाळी येणार.

काळीवर नाहीं शेत, पांढरीवर नाहीं माती (घर)—ज्या मनुष्याजवळ एकहि सत्तेचें शेत नाहीं, किंवा गांवामध्यें मालकीची जमीन किंवा घर नाहीं, अशा उपऱ्या फटिंग मनुष्याबद्दल ही म्हण योजतात.

काळीज——काळीज उडून जाणें-कांपणें-थरथरणें-थरारणें-धडकणें—भीति, दुःख वगैरेमुळें घाबरणें, कांपू लागणें; मनानें भयंकर धास्ती घेणें; भीतीनें छाती धडधडूं लागणें.

काळीज काढून टाकणें-पुढें ठेवणें—अंतःकरण उघडें करणें; मनांतील सर्व गोष्टी मोकळेपणानें पुढें मांडणें; हृदय जणूं कांहीं उघडें करून दाखविणें. 'त्याच्यापुढें काळीज काढून टाकलें, तरी त्याला द्रव येणार नाहीं.'

काळीज काढून टाकलें तरी विश्वास न येणें—अविश्वासाची परमावधि; कांहीं केलें तरी खरें न मानणाऱ्या मनुष्याबद्दल म्हणतात; मनापासून सर्व सत्य सांगितलें तरी तें खरें न वाटणें.

काळीज काढून देणें—काळीज हें अगदीं मर्मस्थानीं असतें व त्यास प्राणि फार जपतो, यावरून आपल्याला अत्यंत प्रिय असलेली वस्तु देणें; मन स्वाधीन करणें; अंतःकरण देणें.

काळीज खाणें-फोडणें—१ छळणें; गांजणें; बेजार करणें; मर्मभेदक बोलणें; मनास अत्यंत त्रास देणें; मनावर भयंकर आघात करणें; मनास तीव्र वेदना होतील असें दुःख देणें. २ पश्चात्तापास, दुःखास कारण होणें; हुरहुर लावणें; काळजी लावणें; मनस्ताप होणें.

काळीज चिरणें--हृदय दुभंगणें; दुःखानें हृदय फाटणें; उरीं फुटणें; दुःखाचा अत्यंत तीव्र चटका बसणें. ' चिरतें काळिज कानीं कन्येचें करुण वच जसें शिरतें । '-मोस्त्री ५.२३.

काळीज ठिकाणीं नसणें—मन थाऱ्यावर नसणें; अतिशय अस्वस्थ, चिंताग्रस्त असणें; कांहीं सुचत नाहीसें होणें. 'काळीज नाहीं ठिकाणीं वाटतें असून जिवंतच मी मेलें। डोंगर दुःखाचे उदेले । '-होला ८८.१०४.

काळीज तडकणें—हृदय फुटणें; अत्यंत भीतीनें हृदयाचे तुकडे होणें; हृदयास चीर पडणें. ' गमला रुद्रकोदर धाकें काळीज तडकलें कांहीं । '-मोद्रोण १६. ४४.

काळीज धडधड उडणें--उरांत धडकी भरणें; भीतीनें हृदयाचे ठोके मोठ्यानें पडूं लागणें; छातींत धडकी भरून श्वास जोर जोरानें करावा लागणें.-मोविराट १.१७८.

काळीज पाठीमागें असणें-टाकणें—निर्भय, बेफिकीर असणें; कोणत्याहि प्रकारची काळजी नसणें; पूर्णपणें निर्धास्त असणें.

काळीज फाटणें; काळिज दो जागा होणें; काळजाचें पाणी होणें—भयानें, दुःखानें विव्हल होणें; अतिशय भेदरून जाणें; भीतीनें गर्भगलित होणें.

काळीज फुटणें—धीर सुटणें; अतिशय घाबरणें; धास्तीनें बेहोष होणें.

काळीज भेदून जाणें—हृदयविदारण करणें; हृदयास मोठी जखम करणें; मनावर फार भयंकर आघात करणें; मनास तीव्र दुःख करणें. ' भेदूनि काळजाला गेला लोकापवादशर, यानें ।'-मोवन १०.७१.

काळजा कँस फूटप—(गो.) काळजाला केंस फुटणें. अतिशय निष्ठुर.

इफराळ्या-उलट्या काळजाचा—अत्यंत भयंकर, साहसी मनुष्य; ज्याला हृदय नाहीं असा मनुष्य; कोणत्याहि गोष्टीनें ज्याच्या मनावर परिणाम होत नाहीं, असा मनुष्य; कठोर अंतःकरणाचा.

काळजाचा घड—जिवाचा कलिजा; प्राणासारखा प्रिय; अत्यंत लाडका, आवडता मनुष्य; ज्याला आपण काळजासारखा जपतों असा मनुष्य.

काळजाचा बोका—काळजाचा गड्डा; काळीज; काळजाचें मांस; यकृत.

काळजानें ठाव सोडणें—धीर खचणें. 'आपल्या दुखण्यामुळें अगोदरच गोपाळरावांच्या काळजानें ठाव सोडला आहे; आणि तशांत मी जर कण्हलें, तर त्यांची कशी स्थिति होईल.'-आजोच ३९६.

काळजाला घरें पाडणें—अंतःकरणाला लागेल असें बोलणें; मर्मभेदक वाक्ताडण करणें. 'कोळया माळ्याच्या तोंडीं येणार नाहींत अशा शब्दांनीं या मात्रागमनी नीचानें तिच्या काळजाला घरं पाडून मारली !'-एकच प्याला ५.४.

काळजाला चरका बसणें—मनास तीव्र वेदना होणें; मनास, हृदयास झोंबणें.-मोशांति २.२३.

काळजास फेस येणें—अतिशय परिश्रम करून थकणें; अत्यंत कष्ट केल्यानें हृदयाचा धीर सुटणें; अतिशय अधीर मनानें एखादी गोष्ट करणें.

काळजास भोंक-घर पाडणें—हृदयाला भयंकर आघात होणें; मनास अत्यंत दुःख होणें; काळजास जखम होणें; हृदय घायाळ होणें; भयानें, आश्चर्यानें, दुःखानें धाबें दणाणणें; भयंकर धक्का बसणें; हृदयाला झोंबणें.

काळजीं कांटा करणें-धरणें; साता काळजांच्या पलीकडे ठेवणें—अतिशय जपून ठेवणें; अत्यंत काळजी घेणें; प्राणापलीकडे जपणें; अतिशय प्रीय मानून अत्यंत तत्परतेनें सांभाळ करणें.-नामना ११२.

काळजीं घाव घालणें—मर्मावर आघात करणें; अत्यंत जिव्हारीं लागेल अशी गोष्ट करणें.

काळजीं-काळजाला लागणें--अंतःकरणास झोंबणें; मर्मावर आघात होणें; जिव्हारीं लागणें.

ꕥ काळजाच्या पाठीं राजा, सुखदुःखें भोगी प्रजा—राजाला कोणत्याहि प्रकारची काळजी नसते; सर्व विवंचना कायत्या प्रजेच्या पाठीमागें लागलेल्या असतात. राजा केवळ सुखानें ऐश्वर्याचा उपभोग घेत असतो, प्रजेस कष्ट करावे लागतात. ही समजूत या म्हणीनें व्यक्त होते.

काळोख——काळोख नेऊन दिवसास वाळत घालणें—एखादी असंभाव्य गोष्ट करण्याचा प्रयत्न करणें. काळोख उजेडांत किंवा दिवसास टिकत नाहीं यावरून.

काळोखांत तोंड लपविणें—तोंड काळें करणें; देशत्याग करणें; आपला मागमूस न राहील अशा रीतीनें स्थानत्याग करणें. 'मी आज काळोखांत तोंड लपवून अधिकाराचा त्याग करून निघून जात आहे. '-अस्तंभा ७.

काळोखांत मूटकावप—(गो.) अंधारांत चोप देणें.

***काळोकु सुप्पां भरनु उड्डइल्यारि खरचतवे ?**—(गो.) अंधार सुपें भरभरून बाहेरून टाकला तरी तो संपेल का ?

काळोखांत केलेलें केव्हांतरी उजेडांत येतें—१ एखादें दुष्कृत्य आपण कितीहि गुप्त रीतीनें केलें तरी त्याचा केव्हां तरी स्फोट झाल्याशिवाय राहात नाहीं. पाप केलेलें फार दिवस झांकून राहात नाहीं. पापास वाचा केव्हां तरी फुटते. २ स्त्रीनें गुप्त रीतीनें केलेला व्यभिचार गर्भ रूपानें प्रत्ययास येतो.

काळोख्या रात्रींत सारीं मांजरें एकाच रंगाचीं असतात—अंधारामध्यें सर्व सारखेंच दिसतें.–केसरी २२–९–३९.

किं——किंगण नाम संवत्सरे—जीर्णपणाची कमाल मर्यादा; कोणत्या वर्षी तें स्मरण नाहीं अशा काळीं.

किंचित्——किंचित् करणें, फार दाखविणें—थोडेंसें काम करावयाचें पण त्याचा गवगवा फार करावयाचा. तु०–Much ado about nothing.

किंचित् वाऱ्यासंयुक्त, अग्नि मोठा होय प्रदीप्त—थोडा जरी वारा वाहात असला तरी त्यामुळें पेटलेली आग अधिक भडकते.

किटकी——किटकिंतुल्यानें भाइर घालेंलो बागलांतुल्यानें भित्तरि येना वे ?—(गो.) खिडकींतून बाहेर घालवलेला दरवाजांतून आंत येऊं शकणार नाहीं का ? एखादा वाईट अथवा दुःखदायक विचार एका बाजूनें मनांतून काढून टाकला, तरी दुसऱ्या बाजूनें कुठून तरी तो मनांत प्रवेश करतोच, अशा अर्थी.

किटणें——कान किटणें—वारंवार तीच तीच गोष्ट ऐकून कंटाळा येणें; त्रास येणें.

दांत किटणें—अनेकवार तीच तीच गोष्ट बोलून किंवा तेच तेच शब्द उच्चारून रंजीस येणें, जिकीरीस येणें.

किडा——किडा मुंगी खाणें—१ किरकोळ खाद्य, कोरडें खाणें, वगैरे कांहीं तरी खाणें. २ किडा, मुंगी वगैरे प्राण्यांनीं घरांतील वगैरे दाणागोटा, धान्य इत्यादि खाणें.

किडयांचा पुंजा—रोगग्रस्त मनुष्य; ज्याच्या शरीरांत अनेक रोगांचे जंतू झालेले आहेत असा.

* **किडा विवेकें पाय टाकी, मग मनुष्यानें कां व्हावें अविवेकी**—लहानसा किडा सुद्धां चालतांना प्रत्येक पाऊल पुढें पाहून व नीट निरखून टाकतो; मग मनुष्यानेंहि तसेंच कां वागूं नये ? त्यानें अविचारानें पुढें पाऊल कां टाकावें.

किडे (कीड) मुंगी खाई, तर तारूं सलामत जाई—गलबतांत असलेल्या धान्यांपैकीं कांहीं जरी किडे मुंग्या वगैरेनीं खाल्ले तरी तिकडे लक्ष्य देऊं नये. त्यांच्या आशीर्वादानें तरी गलबताचा प्रवास सुरक्षित होण्याचा संभव असतो. वैभवसंपन्न मनुष्यानें उदार बुद्धि ठेवून गोरगरीबांस मदत करीत असावें. म्हणजे ते जो दुवा देतात त्यामुळें तरी त्याचें वैभव कायम राहण्याचा संभव असतो. त्यांस मदत न केल्यास त्यांच्या तळतळाटानें तें वैभव जाण्याचा संभव असतो.

किडयाक किंवणाचें सुख—(गो.) किड्याला घाणच बरी वाटते.

कितला——कित्‌लेंय केल्यार फोंडा माती फोंडाकूच्—(गो.) किती केलें तरी खड्ड्याची माती खड्ड्यालाच ! वळचणीचें पाणी वळचणीलाच जावयाचें.

कितलेंय जोडले तरि लुगटां बांदुन मरूंक जाय—(गो.) [लुगट = मेणकापड] कितीहि मिळविलें तरी शेवटीं मेणकापड गुंडाळूनच मरावयाचें ना ! माणूस बरोबर कांहीं नेत नाहीं.

कितलेंय शिकल्यार तितकेंच—(गो.) किती शिकलें तरी तितकेंच म्हणजे शिकून व्यवहारज्ञान येत नाहीं.

कितल्या कापण्यांक रावतॉलॉ ?—(गो.) [कापणी = हजामत] किती कापण्यांनां राहाणार आहेस ? वस्तुतः न्हाव्याला उद्देशून हा प्रश्न आहे. दहा पांच खेड्यांना मिळून एक न्हावी असायचा आणि त्यानें जेवढीं खेडीं पत्करलेलीं असतील, त्या प्रत्येक खेड्यांत पंधरा वीस दिवसांनीं आपली फेरी करायची. कामाच्या मानानें एक दोन दिवस मुक्काम करून मग पुढच्या गांवीं जायचें असा शिरस्ता. तेव्हां गांवांत न्हावी आला कीं, लोकांनीं विचारायचें :' किती दिवस मुक्काम आहे ? ' त्याच पद्धतीनें याच्या येथें चार दिवस, त्याच्या येथें दोन, असा पाहुणचार झोडीत भटकणारा आगंतुक गांवांत आला, तर एखादा गृहस्थ त्याला ' किती दिवस मुक्काम ? ' असा प्रश्न विचारतांना वरील म्हण वापरील.

किती——किती केलें तरी—१ कोणताहि उपाय योजला तरी; पराकाष्ठा केली तरी. २ कसेंहि म्हटलें तरी; खरें पाहतां; वास्तविक. ' किती केलें तरी तो स्वभावतःच खोटा. '

❀ **किती खाल्ला मेवा, तरी येणार नाहीं भाकरीचा हेवा**—गोड पदार्थ कितीहि खाल्ला तरी भाकरीपासून जें क्षुधातृप्तीचें समाधान मिळतें, तसें त्यापासून मिळत नाहीं. तसेंच फार काळ मिष्टान्न खाल्लें, तर त्याचा वीट येतो; पण भाकरीचा वीट कधीं येत नाहीं.

किती चाललें भराभर, तरी दोन पावलें बरोबर; किती चालसी झराझर, तरी दोन्ही पाय बराबर—मनुष्य कितीहि भराभर चालला, तरी त्याच्या दोन पायांतील अंतर कायमच राहतें. एखादा मनुष्य खूप धडपड करतो तरी शेवटीं त्याच्या उत्पन्न व खर्चाची जेमतेम तोंड मिळवणी होते. अशा वेळीं ही म्हण वापरतात.

कित्ता——कित्ता घालून देणें—स्वतःकरून पुढें मांडणें; उदाहरण घालून देणें; अमुक गोष्ट अमुक प्रकारें करावी असें स्वाचरणानें दाखविणें. तु०–आधीं केलें मग सांगितलें.

कित्ता वळवणें–गिरविणें—१ अनुकरण करणें; नक्कल करणें. 'कर वळविला अजें जें विष्णुधृत स्त्रीस्वरूप कित्ता तें।' –मोआदि ३३. १६. २ एखाद्याचें वर्तन पाहून त्याप्रमाणें वागणें.

कित्त्यावर घालणें—प्रथमच लिहावयास शिकविणें; लेखनास आरंभ करणें. 'आपल्या इकडे मुलाला कित्त्यावर घालतात.' –केळकर (ग्यारिबाल्डी).

किंमत——किंमत कापणें—मालाची किंमत उतरवून सांगणें; भाव बिघडविणें; कमी किंमत सांगून मालाची किंमत उतरविणें.

किंमत चुकविणें—पैसे चुकते करणें; मोल देऊन टाकणें; दाम देणें.

❀ **किंमत घड्याळीं चालीवर, तशी मानवी पराक्रमावर**––घड्याळाची किंमत ज्याप्रमाणें तें कसें काय चालतें यावर अवलंबून असते, त्याप्रमाणें मनुष्याची किंमत त्याच्या सामर्थ्यावर, पराक्रमावर अवलंबून असते.

किंमत पैक्याची जाणणें, तर कर्ज मागून पाहणें—पैशाची खरी किंमत आपणांस तो दुसऱ्याजवळ मागावयाची वेळ आली म्हणजे कळते.

किमूस——किमसा मासाक वस मेळना—(गो.) चिलटाच्या मांसाला चरबी कुठून मिळायची? अकिंचन माणसाकडून काय लभ्यांश? किंवा दुबळा माणूस काय पराक्रम गाजवणार? या अर्थी.

किर——किर खाणें—१ टेकीस येणें; जिकीरीस येणें; अगदीं मट्टयास येणें. २ पराभव कबूल करणें; हार खाणें.

किरट——किरटिनें खिच्चें मोगाक न्हयिं, रगताक—(गो.) गोचिड डसते ती प्रेमाकरितां नव्हे, तर रक्तासाठीं.

किरण——किरण साधणें—देऊळ बांधण्याच्या वेळीं त्याच्या गाभाऱ्याचें दार अशा बेतानें ठेवतात कीं, सूर्य बरोबर पूर्वेस उगवेल तेव्हां त्याचे किरण देवावर पडावेत. याला प्राची साधणें म्हणतात. यावरून (कों.) बरोबर नेमकी उडी मारणें; बरोबर नेम मारणें.

किल्ला——किल्ला नेसविणें––किल्ल्याभोंवतालचें रान जाळून टाकणें; किल्ल्याच्या सभोंवतीं वाढलेलीं झुडपें वगैरे जाळून टाकून सर्व जागा साफ करून ठेवणें.

किल्ल्यावर चढविणें––डोंगरी किल्ल्यांत कैदेंत ठेवणें. 'किल्ल्यावर चढवा आनंदीबाईला।'–ऐपो १६५.

❀ **किल्ला घ्यावा पण कोणाचें नांव न घ्यावें**––एखाद्याचा किल्ला घेतला असतांहि, जें त्याचें नुकसान व्हावयाचें नाहीं, तें त्याच्यावर एखाद्या कृत्याचा आरोप केल्यानें होण्याचा संभव असतो. एखाद्याविरुद्ध चुगली करण्यापेक्षां त्याची एखादी महत्त्वाची मालमत्ता घेतली, तरी ती गोष्ट अधिक श्रेयस्कर किंवा क्षम्य होईल.

किल्ली——किल्ली फिरविणें–गुप्तपणें कांहींतरी सांगून, एखादी युक्ति काढून एखाद्याचें मन उलट दिशेस वळविणें; गुप्तपणें एखादी गोष्ट न होईल असा बंदोबस्त करून ठेवणें. कळ फिरविणें पहा.

किंवडा——किंवड्यापुढें गाऊन काय आणि अंधळ्यापुढें नाचून काय—[किंवडा=बहिरा] बहिऱ्यापुढें गाणें आणि अंधळ्यापुढें नाच हीं निरुपयोगी होत. तु०–अंधस्य नृत्यं बधिरस्य गीतम् । अंधळा पहा.

किस——किस गल्लीमें कित्ता पानी—(व.) शब्दशः अर्थ कोणत्या गल्लींत किती पाणी असावें. गल्लींत पावसाचें पाणी साचलें तर असें किती सांचेल? तें नदीच्या पुराची थोडीच बरोबरी करूं शकणार आहे. पुराच्या पाण्यापुढें गल्लींतल्या पाण्याचा काय हिशोब?

किसका हात चले, किसकी जबान चले; किसिका मुह चले, किसिका हाथ चले—'कोणाचें तोंड चालतें कोणाचा हात चालतो' पहा. दुर्बळ माणूस नुसत्या शिव्या देत राहातो तर सामर्थ्यवान् शत्रूला हात दाखवितो.

किसणें——किसून दळणें--१ बारीक दळणें. २ प्रथम किसणें मग दळणें. पुन्हां पुन्हां चर्वितचर्वण करणें.

किसमत——किसमतके लिखेको, कोयी मिट नहीं सक्ता—दैवीं लिहिलें कदापि न टळे. तु०-(अ) लिखितमिह ललाटे प्रोज्झितुं कः समर्थः।-सुर ९३.८३. (आ) ललाटलिखितारेखा न शक्या परिमार्जितुम्।-सु ७.१५. (इ) यद्देवेन ललाटपत्रलिखितं तत्प्रोज्झितुं कः क्षमः।-सुर ९५.१२२.

कीकी——कीकीरे कीकी, तो यकवार सीकी—(गु.) एकदांच शिकावयाचें असतें. शहाणा माणूस दोनदां फसत नाहीं. A wise man is never decieved twice.

कीड——कीड लागणें—१ एखादें धान्य किडीनें खाणें. २ (ल.) उतरती दशा येणें; ऱ्हास पावणें; ऱ्हास होत जाणें. 'देशाचा विचार करणारीं माणसें निपजलीं नव्हतीं तोंपर्यंत देशास कोठें कीड लागली आहे, हें समजणें कठीण होतें.'-टिव्या. किडा पहा.

❀ **कीड मुंगी खाई, तर तारूं सलामत जाई**—किडा मुंगी पहा. सर्वांच्या योगक्षेमाची जो काळजी घेतो त्याची बढती होत जाते.

कीर——किराजाती बेमान--(गो.) [कीर=पोपट] पोपटाची जात बेइमान असते.

किराक बुद्धि, सांगिली वारि—(गो.) पोपटाची बुद्धि उपजत नव्हे. सांगकाम्या. 'सांगितली बुद्धि बांधिली शिदोरी' प्रमाणें.

किराक बुद्धि सांगूनु सांगूनु, संधि मेळयारि वता पळूनु—(गो.) पोपटाला बुद्धि (बोलणें) शिकवून तयार करावें, पण संधी मिळाल्यावर तो जातो पळून. 'किराजाती बेमान' अशी म्हणच आहे.

कीर——कीर करणें--(व.) एखाद्यास त्रासून सोडणें; जिकीर करणें.

कीर——कीर फाडणें--(व.) रेघ ओढणें.

कीर्तन——कीर्तनापेक्षां रात्रीचा गोंधळ बरा—गांवढ्या(गाढवा)पुढें वाचली गीता कालचा गोंधळ बरा होता, पहा; अडाणी पहा.

कीर्तनीं संत, उभा भगवंत—कीर्तन करावयास संत उभा राहिला असतां, तेथें परमेश्वरहि उभा राहतो. कीर्तनाच्या ठिकाणीं परमेश्वराचें अधिष्ठान अवश्यमेव असतें. कीर्तन करावयास उभा राहिलेल्या संतास परमेश्वराप्रमाणें मान द्यावा.

कीर्ति——कीर्ति ही समुद्राच्या लाटासारखी आहे—एक लाट उठली कीं, ती दुसऱ्या लाटेला उठविते; दुसरी तिसरीला. तशी प्रसंगीं निर्भय धीरोदात्त वृत्ति ठेवणें. यामुळें होणारी कीर्ति क्रमाक्रमानें वाढणारी आहे.-न. चिं. केळकर, झंकार ४·८·४०.

कीर्तीनें मानवलोक भरला। धर्मे परलोक वश केला॥--मनुष्यानें कितीहि कीर्ति संपादन केली, तरी कीर्ति ही मृत्युलोकांतच चालते; पण धर्मामुळें परलोकीं सुख, मुक्ति मिळते.

कीर्द——कीर्द खतावणी। लिहिणाऱ्याच्या सख्या बहिणी। शिल्लक ही सावत्र माता। आळस करतां प्रवर्तते घाता॥--कीर्द व खतावणी या जर रोजच्या रोज लिहिल्या तर हिशोब व्यवस्थित राहून तो वेळेवर उपयोगी पडतो. नाहीं तर, हिशोब व्यवस्थित नसले तर शिलकेस मेळ जमत नाहीं व ती सावत्र आईसारखी रुष्ट होऊन केलेला आळस घातास कारण होतो. याकरितां रोजचे हिशोब व्यवस्थित ठेवून शिलकेचा मेळ घालीत गेलें पाहिजे.

कीर्दीला मेळ, हाताला केळ--जमाखर्चाच्या कागदामध्यें सर्व हिशोब बरोबर असून बरीच शिल्लक दिसत असतां प्रत्यक्ष जवळ पैसा मुळींच नसला, म्हणजे ही म्हण वापरतात. एखादी गोष्ट दिसावयास फायदेशीर पण प्रत्यक्ष व्यवहारांत नुकसानकारक झाली असतांहि वापरतात. तु०-कागदी मेळ हातांत केळ.

कील——कीलोत्पाटीव वानरः।--एका सुतारानें लांकूड कापीत असतां, कांहीं वेळ काम थांबवून जेथवर कापलें तेथें एक पाचर घालून ठेविली व निघून गेला. मागें एक वानर येऊन उगीच ती पाचर हलवीत बसलें. त्याचें शेंपूट (वृषण) त्या फटींत लोंबत होतें. पाचर उपटण्याचें काम पूर्ण होतांच वानराचें शेंपूट (वृषण) फटींत दाबलें गेलें व तें बाहेर निघेना व अशामुळें तो प्राणास मुकला. -पंचतंत्र १.२१. सबंध श्लोकः-अव्यापारेषु व्यापारं यो नरः कर्तुमिच्छति। स भूमौ निहतः शेते कीलोत्पाटीव वानरः॥

कींव——कींव करणें-येणें--एखाद्याबद्दल दया, सहानुभूति वाटणें.

कींवची कानू—एखाद्यावर एखाद्या प्रसंगीं दया दाखवून त्याला कांहीं मदत केली असतां, तोच जणूं कांहीं नियम समजून सतत मदतीची अपेक्षा करणें.

*ज्याची करावी कींव, तो घेतो जीव—पुष्कळदां असें होतें कीं, आपण एखाद्यावर उपकार करायला जावें, तों तोच आपल्याला त्रासदायक होऊन बसतो; व कोठून याच्यावर दया केली असें होऊन जातें.

कीस——कीस काढणें-काढीत बसणें—एखाद्या गोष्टीची फार बारकाईनें चर्चा करणें; चिकित्सा करणें; फिरून फिरून त्याच त्याच गोष्टीची वाटाघाट करणें. 'झाली एवढी चर्चा पुरे आहे, अधिक कीस काढण्यांत काय अर्थ आहे!'

कुई——कुई कुई करणें—१ गलबला करणें; आरडा ओरड करणें. २ लहान मुलांनीं गोंगाट करणें; ओरडणें.

कुई होणें--[कुई = कोल्ह्याचा शब्द, हुकी.] आरडा-ओरड होणें; गलबला, गोंधळ होणें. 'गनीम आला रे आला' अशी एकच कुई होऊन जो तो घाबरेपणानें आपलीं हत्यारें व पोषाख गोळा करूं लागला.'–पटवर्धनांचे पराक्रम.

कुंकडा——कुंकडा घोडें करप—(गो.) कोंबड्याला घोडा करणें. पराचा कावळा!

कुंकडा दोळ्याक सायि आयिले वारि--(गो.) कोंबड्याच्या डोळ्यावर सायटें आल्याप्रमाणें. कोंबड्याचा डोळा केवढासा! आणि त्याच्यावर सायटें येईल तें तरी कितीसें असणार? एखाद्या वस्तूची अत्यल्पता दाखवण्याच्या कामीं वापरतात.

कुंकडा पायाक गागऱ्यो बांधल्यारि कैरु केदरूप नास्तना रावद वे?--(गो.) कोंबड्याच्या पायाला घागऱ्या बांधल्यावर केर केव्हांहि नाहीं असें होईल काय?

कुंकडा पीला उस्तुच्याक शिकौपाक नाका: कुंकडा पिला म्हण उस्तूं शिकौच्या जाय?—(गो.) कोंबडीच्या पिलाला उकीरडा उकरण्याचें शिकवावयास लागत नाहीं; तो त्याचा स्वभावधर्मच आहे.

कुंकडा बोडारि वाऱ्या घडि—(गो.) कोंबड्याच्या डोक्यावर ओल्या कापडाची घडी.

कुंकडाक जोइशि इत्याक, मांकडाक भट्टु इत्याक?—(गो.) कोंबड्याला जोशी कशाला, माकडाला भट (ब्राह्मण) कशाला?

कुंकडाक सोपन पळयार, तांदळा दाणो मोतिं जाइतवे?—(गो.) कोंबड्याला स्वप्न पडल्यावर, तांदुळाचा दाणा मोती होईल काय?

कुंकडाचें घोडें करता, घोड्याचें कुंकड करता--(गो.) कोंबड्याचें घोडें व घोड्याचें कोंबडें करतो.

कुंकडानें गिळलेलो फात्तरु—(गो.) कोंबड्यानें गिळलेला दगड.

कुकर्म——कुकर्मानें करी प्राप्ति, ती राहत नाहीं हातीं—कपटानें पैसा मिळविला असतां तो जवळ राहात नाहीं. तु०–आपापाचा माल गपापा.

कुकर्मानें बाप फसला, तें पाहून मुलगा सुधारला—पित्यानें दुष्ट आचरण केल्यानें त्यास कुदशा प्राप्त झालेली पाहिल्यानें, मुलानें त्यापासून बोध घेऊन आपली वागणूक सुधारली.

कुंकू—कुंकू अधिक होणें-वाढणें-कुंकू पुसलें जाणें; कुंकू कमी होणें. २ वैधव्य येणें. कुंकू हें सौभाग्यचिन्ह असल्यानें सवाष्ण बायका हें पुसलें न म्हणतां अधिक झालें, वाढलें, सौभाग्यवृद्धि झाली अशा समृद्धिपर वाक्प्रचारानें ध्वनित करतील.

कुंकूगोपचंदन--१ मिश्रविवाहाची संतति. २ गोळा भात; गजगचीत, मऊ झालेला भात.

कुंकू जाणें—१ वैधव्य येणें. २ व्यापार, धंदा वगैरेस ओहोटी लागणें; अपकर्ष होणें.

कुंकू पुसून शेण लावणें--१ सधवेनें पहिल्या नवऱ्यास सोडचिठ्ठी देऊन दुसऱ्याशीं लग्न लावणें. २ विधवेनें पाट लावणें.

कुंकू बळकट होणें—पतीस दीर्घायुष्य प्राप्त होणें; दीर्घकाल सौभाग्य टिकणें; नवऱ्यावरचा अपघात वगैरे टळणें.

कुंकू लावणें—(खा.) वधू पाहून तिला साखरपुडा करणें; वाङ्निश्चय करणें.

कुंकू सरसें होणें-करणें—सौभाग्य कायम राहाणें, टिकणें; पतीचें जीवित सुरक्षित असणें; पतीला धोक्याच्या स्थितींतून पार पडण्यांत यश येणें.

कुंकू संरक्षणें-संरक्षण करणें—सौभाग्याची काळजी घेणें, त्यास जपणें, वगैरे.

कुंकवाचा (ला) धनी—(उप.) केवळ नांवाचा पति; नामधारी, सत्त्वहीन, पराक्रमशून्य असा नवरा; केवळ सौभाग्याची खूण म्हणून असणारा पति. 'इंदू मला कुंकवाला धनी पाहिजे.' –भा ९०.

*बोडकीला कुंकू नि वांझेला कातबोळ, कशाला पाहिजे—ज्या गोष्टीची आपणांस जरूर नाहीं तिची चौकशी करण्यांत काय फायदा. तु०–विधवेस कुंकवाची उठाठेव कशास?

विधवेला-बोडकीस कुंकवाची उठाठेव कशाला— विधवेला कुंकू लावावयाचें नसल्यामुळें तिला कुंकवाची चौकशी करण्याचें कारण नाहीं. ज्या गोष्टीची आपणास जरूर नाहीं तीबद्दल विचारपूस करण्याची जरूर नाहीं. 'कुंकवाची उठाठेव। बोडक्या देवी काशाला।-तुगा २९८६. तु०-गमन नसे ज्या गांवीं तेथिल वाट कशास पुसावी?

कुकळ्ळी——कुकळ्ळे गावांतु कायळ्या शकुनु ना--(गो.) एखाद्या ठिकाणीं एखादा शास्त्रनियम अपवाद आहे अशा अर्थी. कुंकळ्ळी या गांवीं कावळ्याचा अशुभ शकुन मानीत नाहींत.

कुकूचकू करणें--अगदीं गप्प राहाणें; हूं कीं चूं न करणें. 'दहा हजार असलों, तरी पोलिसानें दस्त्याचें नांव काढतांच मुलूख वैराण करून घराचीं दारें लावून, अडसर, कडी, कुलूप घालून, कुकूचकू करणारे आपण अशा खुनी मनुष्याबरोबर जाऊं कीं कसें, हें आपलें आपल्याला माहित.'-V.S.२.१०. मुलींच्या खेळांतील वाक्प्रचार.

कुक्कुट——कुक्कुटाग्नि--कोंबड्याचा जठराग्नि फार प्रदीप्त असतो. कोंबडा चुनखडीचे खडे खाऊन पचवतो. जें तो खाईल त्याचा चुना होतो. म्हणून अतिशय खादाड माणसाला म्हणतात.

कुग्रह——अनिष्ट ग्रह; रवि, मंगळ, शनि, राहु, केतु हे पापग्रह.

कुग्राम——कुग्रामवास (वस्ति), कुलहीन सेवा—वाईट गांवांत राहाणें नको व अकुलीन माणसांची चाकरी नको. हीं दोन्ही तापदायक असतात. कुग्रामवासः कुलहीनसेवा कुभोजनं क्रोधमुखी च भार्या। मूर्खश्च पुत्रो विधवा च कन्या विनाग्निना संदहते शरीरम्॥

कुच——कुच बी करना और लडका बनाना--कसेंहि करून पण पुत्र उत्पन्न केला पाहिजे. वाटेल तें करून आपलें कार्य साध्य करून घ्यावयाचें.-टि ३.१७.

कुच रोटी, कुच लंगोटी—कांहीं तरी अन्न, कांहीं तरी वस्त्र यायोगें निर्वाह. कसातरी योगक्षेम. "खरा मार्ग म्हटला म्हणजे भलत्यासलत्या कल्पना टाकून 'कुच०' या रीतीनें कसातरी पोराबाळांचा गुजारा करून राहाणें होय."-केसरी.

कुचका——कुचक्या डेंगण्याला सडका फोदा—(अशिष्ट) जशास तसें.

कुचकुचणें——कुचकुचता एककडेन आणि खरपिता एककडेन—(गो.) एकीकडे कुचकुचतो आहे व एकीकडे खरडतो आहे. तु०-उंदीर फुंकर घालून पाय कुरतडतो.

कुचला——कुचल्याचीं फळें मधुर कोठून असतील--काजऱ्याचीं फळें कडूच असावयाचीं. कोणीहि आपला निसर्गजात स्वभाव टाकू शकत नाहीं. 'कुचलियाचीं वृक्षफळें मधुर कोठून असतील।'-व्यंस्तो.

कुचा——कुचे मारणें--वादविवादांत टोमणे मारणें; लावून बोलणें; कोपरखळी देणें.

कुचिंद——कुचिंदपाल नि ओलें धोत्र--[कुचिंद =वेडावांकडा आकार असलेलें भूत. अशा कुचिंदानें पछाडलेला तो कुचिंदपात्र.] शुद्धीवर असलेला सामान्य मनुष्य सामान्यतः सुके कपडे वापरतो पण कुचिंदानें पछाडलेला, भूतबाधा झालेला मनुष्य असल्यास तो ओलीं धोत्रें, ओले कपडेहि वापरण्यास मागेंपुढें पाहात नाहीं.

कुची-च्ची——कुची-च्ची भरणें--(व.) खूप ठोकणें; मारणें; पिटणें.

कुच्या ढिल्या करणें--यथेच्छ कुटणें, मारणें.

कुचेष्टा——कुचेष्टेवांचून प्रतिष्ठा वाढत नाहीं—लौकिक, प्रसिद्धी मिळवावयाची असेल तर कांहीं तरी अलौकिक, असामान्य (विचित्र) गोष्ट केली पाहिजे, अशी कल्पना मूर्ख लोकांची असते. 'कुचेष्टेनं सर्वत्र प्रतिष्ठा वाढतेच असं नाहीं बरं का!'-एकच प्याला ४.४. तु०-घटं भिंद्यात् पटं छिंद्यात् इ०

कुचोद्य——कुचोद्याचें पाखरूं—कुचेष्टेखोर मनुष्य.

कुटका——कुटका तोडून देणें--स्पष्ट नाहीं म्हणून सांगणें; निक्षून नाकारणें; तुकडा तोडणें.

कुटण——कुटण करवली, डौलांत मिरवली—[कुटण=कळलावी, कळकुटी.] ही बाई कुटण असून सुद्धां आज ती करवली. म्हणून जरी थाटानें मिरवत आहे, तरी तिची खरी योग्यता लोक जाणून आहेत. अयोग्य व्यक्ति मोठ्या मानाच्या जागेवर जाऊन बसली तरी तिनें लक्ष्यांत ठेवावें कीं, आपली खरी किंमत लोक ओळखतात.

कुटणें——कुटून खातील नि उठून जातील—जांवयासंबंधानें बायकांत रूढ असलेली म्हण. नतद्रष्ट.

कुंटा——कुंटे बैलाक कुशिलें करड—(गो.) लंगड्या बैलाला कुजलेलें गवत. जशास तसें.

कुंट्याक कुटी त्राण, कुडर्याक जिब्बेतु—(गो.) लंगड्याला काठींत जीव, अंधळयाला जिभेंत.

कुंट्याक धा चेष्टा, कुडर्याक वीस—(गो.) लंगड्याला दहा चेष्टा (सहन कराव्या लागतात), अंधळयाला वीस.

कुटी——कुटीचें बोट—निंदेचा डाग; अपयशाची काळोखी; गालबोट. ' रूपसा उदयलें कुष्ट । भावितां कुटीचें बोट । '–ज्ञा १६.१७८.

कुंटीण——कुटिणी जारिणीचा वाढा—(क.) अनीतीनें मिळविलेलें द्रव्य, उत्कर्ष इ.

कुठला——कुठल्या झाडाचा पाला—कःपदार्थ; यःकश्चित् मनुष्य,ज्यास मुळींच महत्त्व नाहीं असा-पामो ४४३.

❀ कुठलें कुठें अन् उठें इठें भेटे—ज्याची कांहीं फारशी ओळख नाहीं किंवा ज्याचा आपला जवळचा आप्तसंबंध नाहीं, त्यास किंवा त्यानें वास्तविक उठून उभें राहून भेटण्याचें कारण नाहीं. पण तसें करूं लागल्यास ती आश्चर्याचीच किंवा कांहीं मतलबाची गोष्ट होय. कोणाचें कोण, पण बडदास्त केवढी. यांत कांहीं तरी हेतु असला पाहिजे.

कुठें—कुठें जाती कळी, म्हणे भागूबाईची आळी— १ भित्र्या मनुष्याच्याकडून कांहीं भांडणाचा निकाल लागूं शकत नाहीं. भांडणाला भित्र्या माणसाची आळी उपयोगी. भांडणतंटा मिटवावयाचा असेल तर जबरदस्त मनुष्य पाहिजे. बलवान् मनुष्य असला म्हणजे कळीचें कांहीं चालत नाहीं; ती फक्त दुर्बलाला घातक असते. २ [भागूबाई = (व) जहांबाजबाई] जहांबाज बायका असल्या म्हणजे भांडणाला काय तोटा !

कुठें जाती खेडयापाडया, कळ आली आपल्या वाडया—खेड्यापाड्यामध्यें नेहमीं भाऊबंदकीचे वगैरे तंटे चाललेले असतात तेव्हां अशा खेड्यांत जाण्यांत काय अर्थ आहे.

कुठें जाशी दैवा (भोगा), तर तुझ्यापुढें (पाठीशीं) उभा—मनुष्य कोठेंहि गेला तरी त्याचें नशीब त्याच्याबरोबर असतें. एक मनुष्य फार दुर्दैवी होता. तेव्हां ज्या गांवीं तो राहात होता त्या गांवास कंटाळून दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं गेल्यास आपलें नशीब पालटेल, अशा समजुतीनें तो आपला गांव सोडून दुसऱ्या गांवास जाण्यास निघाला. गांवाबाहेर गेल्यावर पुढें पाहतो तों एक मनुष्य त्याच्यापुढें बाहेरगांवीं जाण्याची तयारी करून वहाणांस तेल लावून उभा असलेला त्यास दिसला. तेव्हां त्यानें त्यास कोण,कुठें जातां असें विचारतां तुझ्याबरोबर जाण्यासाठीं तुझ्यापुढें उभा आहे व मी तुझें नशीब आहे असें त्यानें सांगितलें. तेव्हां पहिला मनुष्य आपला गांव सोडून जावयाचा बेत रहित करून गांवांतच राहिला.

कुठें बाभळ, कुठें चंदन—चंदन व बाभूळ यांची बरोबरी होणें शक्य नाहीं. त्याप्रमाणें सज्जन व दुर्जन यांची बरोबरी होणें शक्य नाहीं.

कुठें मोगरा, कुठें निवडुंग—वरप्रमाणेंच.

कुठें लंका, कुठें लाहोर—लंका व लाहोर हीं हिंदुस्थानच्या दक्षिणोत्तर दोन टोकांस आहेत व त्यांत फार मोठें अंतर आहे. यावरून दोन गोष्टींत फार मोठा भेद असल्यास तो दाखविणारा हा वाक्प्रचार योजतात. तु०-काशीरामेश्वराचें अंतर.

कुठें हा श्यामकर्ण, आणि कुठें हा लंबकर्ण—दोघांमध्यें महदंतर असल्यास म्हणतात.

कुठेंहि गेलें तरी पळसाला पानें तीनच—स्थानत्याग केल्यानें कांहीं नशीब पालटत नाहीं किंवा सृष्टिक्रमाच्या विरुद्ध गोष्ट घडत नाहीं. पळसाचें झाड कोठेंहि असलें तरी त्यास तीनच पानें असतात. तु०-पळस गेला घाटा तीनच पानें देठा. पळस कोकणांत गेला तरी देठाला पानें तीनच. पळस पहा. कोठें पहा.

कुडताळें——कुडताळ्यांत येणें—[कुडताळें = अरुंद जागा] संपुष्टांत येणें.

कुडव——कुडव भरणें—१ माप भरणें; पूर्ण होणें. २ (ल.) मृत्यु ओढवणें; शंभर वर्षें भरणें.

❀ मेल्या म्हशीस कुडवभर दूध—मेलेल्याचे गुण गाणें; मेल्यावर एखाद्यास चांगलें म्हणणें. ' म ' मध्यें पहा.

कुडा——कुडयाचें कुडें, त्याचें पुढें—[कुडें = कपट; कुढा = कपटी, वांकडा] ज्याचें कपट त्याच्याच गळ्यांत येणें; दुसऱ्याच्या नाशार्थ केलेल्या कपटी कारस्थानांत स्वतःच सांपडून नाश होणें. पाठभेद-ज्याचें कुडें त्याचेंच पुढें. कुडें पहा.

कुंडा——कुंडयापाष्ट करप—(गो.) कोंड्याहूनहि तुच्छ लेखणें. कोंडा पहा.

कुंडो खातल्याक वयार चड—(गो.) ज्याला नेहमीं कोंडा खावा लागतो त्याला जर कण्या मिळाल्या तर त्याच त्याला अधिक.

कुडी——कुडींत जीव धरून राहणें—१ मरणोन्मुख अवस्थेंत असणें. २ कसें तरी जिवंत राहणें; कठीण अवस्थेंत कसें तरी जीवन कंठणें.

❀ कुडी तशी पुडी; कुडी पाहून पुडी—शरीर तसा आहार; ज्या मानानें देहाचा आकार असेल त्या मानानें खाणें लागतें. तु० -संभ्रमः स्नेहमाख्याति वपुराख्याति भोजनम् । विनयो वंशमाख्याति देशमाख्याति भाषितम् । –सुर १५७.१९९.

कुडीस पुडी--अन्नमय प्राण किंवा शरीर; शरीरास अन्न हें आवश्यक आहे.

कुडें----ज्यांचें कुडें, त्याचेंच पुढें--स्वतःच्या कपटी आचरणाचा परिणाम स्वतःसच भोगावा लागणें. एखाद्यानें केलेलें कपट उघडकीस आणून त्याचेपुढेंच मांडणें; एखाद्यानें केलेल्या कारस्थानांत त्यासच गुंतवणें. 'नाकीं चुना लाउन जात आहे। ज्याचें कुडें त्याजपुढेंच आहे॥' -सारुह ८.४८.

कुंडो----कुंडो खातल्याक उंडयाची रूच किते; कुंडो खातल्याक उंडया परीक्षा इतें गोतु?--(गो.) कोंड्यावर राहणाऱ्याला उंडे गोड लागत नाहींत. कोंडा खाणाऱ्याला उंड्याची चव काय? सुख भोगण्याला तरी संवय, मूळ संस्कृति लागते.

कुड्डो----कुड्डयाक चाळीसपत्र कित्याक--(गो.) [कुड्डो=अंधळा.] अंधळ्याला आरशी लागत नाहीं. तु०-वांझेस कातबोळ.

कुणबी----कुणबी इळ्या (विळ्या) इतका उजू (वांकडा)--कुणब्याचें हत्यार जें विळा तें जितकें सरळ म्हणजे वांकडें असतें, तितकेंच कुणब्याचें वर्तन वांकडें असतें.

कुणबी गांठावा उपाशीं नि बामण गांठावा पोटाशीं--न्याहरीच्या पूर्वी कुणब्याला गांठला म्हणजे काम हटकून होतें. कारण त्याला न्याहरीची घाई असते. तो फार वेळ मोडूं शकत नाहीं. ब्राह्मण जेवला म्हणजे स्वस्थ मनानें बोलतो; जेवणापूर्वी त्याचें लक्ष येणाऱ्या माणसाकडे नीट लागत नाहीं. सावकार-कुळ या व्यवहारांतली ही म्हण आहे. कुणब्याला जेवल्यानंतर काम होत नाहीं; त्यास सुस्ती येते व ब्राह्मणाला जेवल्याशिवाय कांहीं सुचत नाहीं.

कुणबी दिवाळीस शहाणा होतो--दिपवाळीस बहुतेक प्रकारच्या पिकांचा निकाल होतो. तेव्हां कुणबी असे उद्गार काढितो कीं, अमुक शेतांत अमुक धान्य पेरलें असतें तर बरें झालें असतें. त्यावेळीं त्याला शहाणपण सुचतें. कार्तिक पहा.

अडाणी कुणबी दुप्पट राबे--अडाणी पहा.

चैत्र गळे आणि कुणबी पळे--चैत्र महिन्यांत कुणब्यास नांगरणी, वखरणी वगैरे शेतीचीं कामें करावयाचीं असतात. त्यावेळीं जर पाऊस पडला तर त्याला तीं कामें करतां येत नाहींत; त्यामुळें शेताची मशागत होत नाहीं व अकाळीं पाऊस पडल्यामुळें पुढें पेरणीच्या वेळीं पाऊस लांबतो; त्यामुळें शेतीचें नुकसान होतें व कुणब्याचीहि हानि होते.

कुणबी माजला, मराठा झाला--(पुण्याकडे ही म्हण प्रसिद्ध आहे.) चांगला ऐपतदार कुणबी व मराठा एकच अशी समजूत. गरीब मराठा व श्रीमंत कुणबी यांच्यांत सोयरीक होते. कुणबी श्रीमंत झाला म्हणजे तो हळू हळू मराठ्यांत मोडूं लागतो.-ज्ञाको. (क) ५३९.

कुणबी मेला भुतानें, ब्राह्मण मेला वातानें (आणि सोनार मेला पित्तानें)--कुणबी मेला असतां त्याला एखाद्या भुतानें झपाटलें असलें पाहिजे अशी त्याच्या आप्तइष्टांची समजूत असते व तो आजारी असतां अशाच प्रकारचे अंगारा, धुपारा, कौल, भगत वगैरे उपचार तो करीत असतो. ब्राह्मण मेला असतां त्यास कोणता तरी रोग वात वगैरे झाला असला पाहिजे अशी त्याच्या आप्तेष्टांची समजूत असते व त्यासहि फार खाल्ल्यामुळें अजीर्ण होण्याचा संभव असतो. सोनार सारखा शेगडीशीं बसून उशीरपर्यंत काम करीत राहिल्यानें त्यास पित्त होण्याचा नेहमीं संभव असतो.

असा कुणबी हाव्या, वाटेवर लावी कांव्या असा पहा.

कुणब्या हातांत जवाद दिली, आंबिली बांगडा भाजून खाली--(गो.) कुणब्याला कस्तुरीचें अंडें दिलें तर तो आंबिलीबरोबर भाजून खाईल. तु०-गाढवास गुळाची चव काय!

कुणब्याचा बेटा, गांडींत (ढुंगांत) लंगोटा, पण धर्माचा मोठा--कुणबी गरीब असतो पण तो धार्मिक व सच्छील असतो. तो इमानी असतो व कधीं लबाडी करीत नाहीं.

कुणब्याची आई, कुणब्यास व्याली--कुणब्यास मूल झालें तर तें कुणबीच होणार. तु०-बाप तसा बेटा, कुंभार तसा लोटा.

कुणब्याची जात विळ्याएवढी वांकडी--कुणबी विळ्याइतका उजू, पहा.

कुणब्याची जात (कुणबी जात) विळ्या इतकी वांकडी, पण ठोकून होती नेटकी--कुणबी कधीं सरळपणें वागत नाहीं, त्याला दुसऱ्या बद्दल नेहमीं संशय असतो; म्हणून तो सरळ व्यवहार न करतां आडमार्गानें जाण्याचा प्रयत्न करतो. पण त्याला कडक रीतीनें वागविलें, शिक्षा केली म्हणजे मात्र सरळ होतो.

चालते तिफणी बारागळ आणि कुणब्याची तारांबळ--बारा धारांची तिफणी जेव्हां चालूं लागते तेव्हां कुणब्याची तारांबळ उडते. शेतीचीं कामें विशेषतः पेरणी

एकदां जोरांत सुरू झाली म्हणजे कुणब्यास घडीचीहि उसंत मिळत नाहीं.

कुणब्याची बेटी आणि गव्हाची रोटी; कुणब्याची बेटी गव्हाची रोटी, मळल्यानें तिला चव येती—ज्या प्रमाणें कणिक चांगली मळल्याशिवाय तिची पोळी चांगली होत नाहीं, त्याप्रमाणें कुणब्याची मुलगी चांगली धाकांत ठेवल्याशिवाय नीट वागत नाहीं. तु०—इक्षुदंडास्तिलाः शूद्राः कामिनी हेममेदिनी । दधिचंदनतांबूले मर्दनं गुण वर्धनम् ॥—सुर १६०.३२७.

कुणब्याचें गेलें, गुराख्याचें आलें—कुणब्याची संपत्ति टिकत नाहीं कारण त्याला बलुत्यांस वगैरे अनेकांस द्यावें लागतें; पण गुराख्यास कोणास कांहीं द्यावें लागत नाहीं त्यामुळें त्यास जो मिळकत होते ती घरांत राहते. कुणब्याच्या संपत्तीचा आरंभ गुरेंराखणीपासून होतो.

कुणब्याचें पोर शहाणें झालें तर गोंधळ्याचीच कथा गाईल—कुणब्याच्या मुलानें कितीहि विद्या केली तरी तिला मर्यादा आहे. तो कांहीं हरिदासासारखा कीर्तनकार होणार नाहीं; तर गोंधळ्याची कथा ऐकून फार तर गोंधळी होईल. त्याला त्यापेक्षां अधिक विद्या करण्याची संधि मिळत नाहीं. प्रत्येक मनुष्य आपल्या आवांक्याप्रमाणेंच विद्यार्जन वगैरे करूं शकतो. त्यापलीकडे त्याच्यानें कांहीं होत नाहीं.

कुणब्याचें बोलणें, मुळाभर इकडे का मुळाभर तिकडे—कुणब्याचें बोलणें फारसें मुद्देसूद असूं शकत नाहीं. त्यामध्यें पद्धत नसते; साधारण अंदाजानें थोडेफार कमी-जास्ती करून तो कोणतीहि हकीकत सांगतो.

कुणब्याच्या घरीं दाणं, मांगाच्या घरीं गाणं, आणि बामणांच्या घरीं लिव्हणं—कुणब्याच्या घरीं दाण्यांची, मांगाच्या घरीं गाण्याची व ब्राह्मणाच्या घरीं लिहिण्याची गर्दी असते. त्यांच्याकडे याच गोष्टी फार.

कुणब्याच्या जातीला आडवें ना उभें—कुणबी मनुष्य अडाणी असतो. त्याला आडवी बाजू कोणती व उभी बाजू कोणती हेंहि धड कळत नाहीं.

कुणब्याला अक्कल तोकडी, गाई वोपुनी घेतली घोडी—वास्तविक शेतकरी कुणब्याला घोडीपेक्षां गाईचाच उपयोग जास्त. पण चैनीसाठीं त्यानें गाय विकून घोडी घेणें हा मूर्खपणा होय.

कुणब्याला जो म्हणेल आप, त्याचा गाढव बाप—कुणबी मनुष्याच्या ठिकाणीं फारशी आपलेपणाची आशा करणें व्यर्थ होय. तो आपल्या कामापुरेसा गोड बोलेल व काम झाल्याबरोबर नामानिराळा होईल. कुणब्याशीं जो सलगी करील किंवा आप्तपणा करील, त्याच्या पदरीं गाढवपणा येईल.

कुणब्यासारखा दाता नाहीं, कुटल्यावांचून-ठोकल्याबिगर देत नाहीं; कुणबीसरीखा दाता नहीं, मारे बिगर देता नहीं—कुणब्याची वृत्ति खरोखर दानशील असते पण तो सहजासहजीं देत नाहीं. त्याला धाक दाखविल्याशिवाय त्याच्या हातून कांहीं सुटत नाहीं. तु०—इक्षुदण्डास्तिलाः शूद्रा० कुणब्याची बेटी पहा.

कुणबीक——कुणबीक जोरावर खरी, पण एक नागर नाहीं घरीं—कुणब्याच्या घरीं शेतजमीन पुष्कळ असते पण त्याच्याजवळ नेहमीं साधनसामुग्री तटपुंजी असते. इकडे म्हणावयाचें माझी येवढी शेती आहे वगैरे, पण पाहूं बोलें तर एकहि नांगर जागेवर नसावयाचा.

कुणी——कुणाची कोण, हंसे बिळांतली घोण—आपण उगीच कोणाच्या तरी टीकेला भिऊन वागतों.

कुणाला कशाचें, तर बलुत्याला पशाचें--जो तो आपआपल्या फायद्याच्या गोष्टीची काळजी करतो. बलुत्याला शेतकऱ्याकडून पसाभर धान्य मिळावयाचें असतें; पण त्याबद्दलसुद्धां त्याला काळजी लागलेली असते.

कुणीकडे इंद्राचा ऐरावत आणि कुणीकडे शामभटाची तटाणी—कोठें पहा.—उग्रमंगल २.६.

कुंतगळू——घर कुंतगळू, कणगीला पडलें डुळू [कुंतगळूं=दुर्बळ, अशक्त. डुळूं = भोंक] घरांतील माणसें अशक्त आहेत पण कणगींत धान्य राहात नाहीं, म्हणजे खाण्यांत बहाद्दर आहेत.

कुतडा——कुतडा-डें भरणें—चुकारतट्टूपणा करणें.

कुतडा येणें—(करण्याचें) जिवावर येणें; कंटाळा येणें.

कुत्ता——कुत्ता जाणे, चमडा जाणे; (हिं.) कुत्ता जाने, चमडा जाने—१ कुत्रा चामडें खाऊं लागतो परंतु तें लोचट असल्यामुळें त्यास लवकर खातां येत नाहीं. तेव्हां त्याची जी त्या चामड्याबरोबर झटापट चालते ती त्याची त्यालाच माहीत. २ एकमेक परस्पर पाहून घेतील या अर्थानें. "'कुत्ता जाने चमडा जाने' ह्या कबीराच्या प्रसिद्ध गोष्टीप्रमाणें त्यांचा देह रोगाच्या आधीन असला तरी त्यांचा अंतरात्मा आनंदी असे."—चरित्रचंद्र ३१.

कुत्ता धोबीका, न घरका न घाटका—धोब्याच्या कुत्र्याला घाटावर व घरीं दोन्ही ठिकाणीं त्याच्या कपड्यांची राखण करावयाची असते. परंतु त्यामुळें त्याला दोन्हीहि ठिकाणीं तें नीट साधत नाहीं व तो कोणत्या वेळीं कोठें असेल तेंहि निश्चित नसतें. प्रवाशी माणसाची अशी स्थिति होते.

कुत्ता मूह देनेसे सर चढे—कुत्र्याला तोंडाशीं घेतला तर तो डोक्यावर चढतो. एखाद्याचे लाड करावयास लागले कीं तो डोक्यावर बसतो.

कुत्तेकू खीर और गद्धेकू चपाती–त्या (नहीं पचती)—एखाद्या गोष्टीची भलत्याच ठिकाणीं योजना करणें. कुत्र्याला जशी खीर पचणार नाहीं त्याचप्रमाणें गाढवाला चपात्या मानवणार नाहींत. कुत्रा पहा.

कुत्तेकू मूतना सिकाना—कुत्र्याला मुतण्यास शिकवावें लागत नाहीं, तें आपोआप येतें. स्वाभाविक होणाऱ्या गोष्टी-बद्दल कष्ट घेणें.

कुत्रा——कुत्रा हाल खाईना—दुर्दशा होणें; अत्यंत वाईट स्थिति येणें. (कुत्रा अतिशय घाणेरडी वस्तु सुद्धां खातो, पण तोहि याकडे बघेना.) कुत्रा म्हणजे कोणीहि माणूस या अर्थी.

कुत्रा, कुत्रें होऊन राहणें–पडणें—आर्जवानें, खुशा-मतीनें नोकरी करणें. कुत्र्यासारखा अगदीं दीन स्थितींत राहणें.

कुत्रा शिवणें—(माण. बायकी) स्त्री विटाळशी होणें; पांढरा कावळा शिवणें.

कुत्रीं मारीत फिरणें–हिंडणें—रिकामटेकडें भटकणें; निरुद्योगीपणानें भटकत राहणें.

कुत्री वाफेला येणें—(माण.) कुत्री माजावर येणें; कुत्रीस संभोगेच्छा उत्पन्न होणें.

कुत्रीसारखी होणें—(व.) रोड होणें; कृश होणें.

धर्माचें द्वारीं कुत्रें आडवें येणें—धर्माच्या कामांत नीच मनुष्यानें विघ्न आणणें.

कुत्रेहाल होणें—कुत्र्याचे मरतांना हाल होतात त्या-प्रमाणें अतिशय हाल होणें.

कुत्र्याचा पाय—रानतेरड्याचें फूल.

कुत्र्याची चार—एकप्रकारचें गवत.

कुत्र्याची झोंप—अत्यंत सावध झोंप; जरा हालचाल झाली असतां, कुत्रा तावडतोब जागा होतो.

कुत्र्याची वळवळ—कुत्र्यासारखी चळवळ, हालचाल; कुत्रा कधीं स्वस्थ बसत नाहीं, निदान शेपूट तरी हालवीत असतो.

कुत्र्याचें कुवकुवणें—कुत्र्याचें गुरगुरणें, भुंकणें; कुत्र्याची ओरड.

कुत्र्याचें खळें–छत्र—भुईछत्री; अळंबें; अत्यंत वाईट स्वभावाचा माणूस. कुत्र्याचें मूत पहा.

कुत्र्याचें जिणें—दैन्यावस्था; अत्यंत लाजिरवाणें आयुष्य.

कुत्र्याचें झाड—एक कांटेरी झुडुप.

कुत्र्याचें तोंड—(ल.) फटकळ मनुष्य; कुत्र्यासारखा एकसारखा भुंकत राहणारा मनुष्य.

कुत्र्याचें दांत—(बालभाषा) दुध्या भोंपळयाच्या बिया.

कुत्र्याचे पाय मांजराचे पाय; कुत्र्या मांजराचे पाय—चिडविडित अक्षर; नीट न लागणारें, फराटे अस-लेलें अक्षर.

कुत्र्याचे पाय मांजरावर आणि मांजराचे पाय कुत्र्यावर—१ भलत्याच गोष्टी करणें; आपलें काम साध-ण्यासाठीं अगर केवळ गमतीनें कांहींतरी लटपटी करणें; कांहीं तरी गडबड, गोंधळ करणें. 'आपल्या बुद्धीचा, मांजराचे पाय कुत्र्यावर व कुत्र्याचे पाय मांजरावर घालण्यांत व्यय न करितां तिचा चांगला व्यय करावा.'—आजोच ३०९. २ अक्षर गिचमिड, वाईट, दुर्बोध असल्यास म्हणतात.

कुत्र्याचे भोकभर–भोकावर—कुत्र्याचें भुंकणें ऐकूं जाईल इतक्या अंतरावर.

कुत्र्याचें मूत—१ भुइछत्री; अळंबें. २ एककल्ली, तुसडा, चिडचिडा मनुष्य; वसकन् अंगावर येणारा मनुष्य.

कुत्र्याचें शेपूट; कुत्र्याची शेपटी—कुत्र्याचें शेपूट नेहमीं वांकडें असतें. कितीहि प्रयत्न केला तरी न सुधारणारा; आपल्याच वळणावर जाणारा मनुष्य.

कुत्र्याच्या मोतीनें मरणें—कुत्र्यासारखें मरण येणें; हालअपेष्टांत मृत्यु येणें; हालहाल होऊन मरणें.

कुत्र्याला खीर—खीर हा गोड व पौष्टिक अतएव चांगला पदार्थ खरा; पण तो कुत्र्याच्या पोटांत गेल्यास त्याला तो न पचतां ओकून पडतो. त्याप्रमाणें दुर्दैवी मनुष्याला चांगल्या वस्तूचा लाभ यदाकदाचित् झाला तरी त्याचा उपभोग त्याला दीर्घ काळ लाभत नाहीं, असें हा शब्दप्रयोग दर्शवितो. 'कुत्र्याला खीर आणि गाढवाला चपात्या' पहा.

कुत्र्यासारखें फिरणें–हिंडणें—रिकामटेकडें भटकणें; वणवण हिंडणें; विनाकारण इकडे तिकडे फिरत असणें.

❀ **कुत्रा आपल्या ओकावर परत येतो तसा मूर्ख स्वभावावर जातो**—कुत्रा ओकला असतां आपलीच ओक चाटण्यास पुन्हां परत येतो, त्याप्रमाणें मूर्ख मनुष्यास कितीहि सुधारण्याचा प्रयत्न केला तरी तो आपला मूर्खपणा सोडीत नाहीं.

भीक नको पण कुत्रा आंवर—एखादा भिकारी भीक मागावयास आला असतां त्यावर मालकानें कुत्रा सोडल्यास तो इतका घाबरून जातो कीं, त्यास भीक मागण्याचें बाजूस राहून आपण या कुत्र्याच्या तडाक्यांतून कसें सुटूं असें होऊन जातें. यावरून एखाद्या मनुष्याशीं एखाद्या वेळीं असा प्रसंग येतो कीं, त्यास आपणास मदत देऊं नकोस निदान पीडा तरी थांबीव म्हणून विनंति करण्याची पाळी येते. अशा वेळीं ही म्हण वापरतात.

कुत्रा झाला तरी तो आपल्या गल्लींतला सिंहच असतो—जो तो आपल्या स्थानीं बलिष्ठच असणार. तु०—नक्रः स्वस्थानमासाद्य गजेन्द्रमपि कर्षति ।

कुत्रा मुका, पाणी गंभीर, यांचा विश्वास नश्वर—भुंकणाऱ्या कुत्र्यापेक्षां न भुंकणाऱ्या कुत्र्याबद्दल अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे; कारण भुंकणारा कुत्रा क्वचितच चावतो; पण न भुंकणारा मात्र चावण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें न खळखळणाऱ्या ओढ्यांतील पाणी गंभीर असतें व तें अधिक खोल असण्याचा संभव असतो. तेव्हां असें पाणी असणाऱ्या ओढ्यांतून जातांना अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे. तु०—भुंकणारा कुत्रा क्वचितच डसतो. A barking dog seldom bites. उथळ पाण्याला खळखळ फार.

कुत्रा संग बाळगणें, त्याचें पोषण करणें—जर आपल्याबरोबर कुत्रा बाळगावयाचा असेल तर त्याला खायला घालण्याची जबाबदारी आपण पत्करली पाहिजे. आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांची काळजी आपण घेतली पाहिजे.

कुत्रीं भुंकभुंक भुकतीं, डौलानें चाले हत्ती—कुत्र्यासारख्या क्षुद्र प्राण्याचा विरोध हत्तीसारख्या थोर जीवाला कसा बाधणार ? हाथी चलत है अपनी गतमो, कुतर भुकत वाको भुकवा दे ।—कबीर.

कुत्रीला पिल्लायचें, कोल्ह्याला पोसायचें—एकाचें घेऊन भलत्यालाच द्यावयाचें. तु०—To rob Peter to pay Paul.

कुत्रें आपल्याला डसलें म्हणून काय आपण त्याला डसावें ?—एखाद्यानें आपणास अपशब्द वापरले तरी उलट आपण त्यास अपशब्दानें बोलणें ठीक नाहीं; शिवराळ मनुष्याच्या तोंडीं लागूं नये.

कुत्रें काशीला गेलें तरी विष्टा खाणार—कुत्र्यानें कितीहि पवित्रपणाचा आव आणला, तरी त्याच्या घाणेरड्या संवयी जाणें शक्य नाहीं. कोणीहि आपला देहस्वभाव सोडूं शकत नाहीं.

कुत्रें तर एका दिवसांत काशीला जाईल, पण जातभाईच नडतात—कुत्रें आपण होऊन चालूं लागेल तर पुष्कळ पल्ला गाठूं शकेल, पण वाटेंत दुसरा कुत्रा भेटला कीं ते दोघे एकमेकांच्या अंगावर गुरगुरूं लागतात व त्यामुळें त्याचें मार्गआक्रमण थांबतें. त्याचा हा स्वजातीवर भुंकण्याचा धर्म कुत्रा कधींहि टाकूं शकत नाहीं व त्यामुळें त्याला काशीचा पल्ला कधीं गांठतां येत नाहीं. कांहीं माणसास आपलें काम निष्ठेनें किंवा सारखें मन लावून करण्याची संवय नसते, तर मध्येंच अनेक भानगडी उपस्थित करून त्यांत वेळ घालविण्याची खोड असते. अशा लोकांकडून कोणतेंहि काम बहुधा वेळेवर तडीस जात नाहीं.

कुत्रें दीड दिवसांत काशीला जातें—जाईल, पण तंगडी उंच—वर केली नाहीं तर—कुत्र्याला तंगडी उंच करून वारंवार मुतण्याची संवय असते त्यामुळें त्याला कोठेंहि जावयाचें असल्यास फार विलंब लागतो. त्यास ही संवय नसती तर त्यास थोड्या वेळांत लांबचा पल्ला गांठतां आला असता. एखाद्या मनुष्यास एखादी गोष्ट नीट सरळपणें करण्याच्या ऐवजीं आंत फांटे फोडण्याची संवय असते. तसेंच कांहीं माणसांत एका कामासाठीं जातांना मध्यें अनेक गोष्टी उरकून घेण्याची, वाटेंत भेटेल त्याशीं बोलण्याची खोड असते; त्यांना उद्देशून ही म्हण वापरतात.

कुत्रे दुरून भुंकती, ते कदापि न डसती—जे कुत्रे दूर दूर राहून नुसते मोठमोठ्यानें भुंकत राहतात ते भित्रे असून बहुधा जवळ येत नाहींत व चावण्याच्या भानगडींतहि पडत नाहींत; यावरून कांहीं दुर्बल लोक नुसती आरडाओरड करतात. त्यांच्या अंगीं प्रत्यक्ष आपणास कांहीं अपकार करण्याचें सामर्थ्य नसतें. अशा लोकांस उद्देशून ही म्हण वापरतात. तु०—A barking dog seldom bites.

कुत्रें भुंकलें म्हणून देऊळ विटाळत नाहीं—पवित्र गोष्ट लहानश्या कारणानें वाईट होत नाहीं.

कुत्रें हाडुक मारल्यानें मरत नाहीं—कुत्रीं हाडकें चघळतात. तेव्हां कुत्र्यास मारावयाचें असल्यास त्याच्या अंगावर हाडूक फेकून कांहीं उपयोग नाहीं; त्यानें त्यास अपकार होण्याऐवजीं तें उलट चघळूं लागेल. त्यास मारावयाचें झाल्यास कांहींतरी शस्त्र वगैरेचा उपयोग केला पाहिजे. आपल्याला जें कार्य करावयाचें त्यास योग्य साधन वापरलें पाहिजे.

ये रे कुत्र्या, खा माझा पाय—कुत्र्यास आपला पाय खाण्यास आमंत्रण करणें म्हणजे स्वतः होऊन स्वतःवर आपत्ति ओढवून घेण्यासारखें आहे.

कुत्र्यामांजरा घरांत रीघ, नी घरच्या माणसा बाहेर नीघ--कुत्रींमांजरीं घरांत पाळून घरांतल्या माणसांना अडचण करावयाची. (ल.) संबंध नसलेल्यांना पोशीत बसावयाचे व जवळच्यांना दूर लोटावयाचें.

कुत्र्याक पालखेंत बैसलों तरी हाडुक देखून कुत्रे उडी मारतां—(गो.) कुत्र्याला पालखींत बसवलेलें असलें तरी हाडूक पाहिल्याबरोबर तें पालखींतूनहि उडी टाकून तें हाडूक खावयास धांवतें. त्या कुत्र्याला पालखींत बसण्यापेक्षां हाडूक चघळणें अधिक आवडतें. यावरून ज्या मनुष्यास एखाद्या उंची वस्तूचा उपभोग घेण्याची संवय, बुद्धि नाहीं त्यास ती वस्तू देऊन काय उपयोग ? तात्पर्य, मूळ स्वभाव जाईना. तु०–आधीं होता वाघ्या०

कुत्र्याची मैत्री, लाडांत आलें तर तोंड चाटणार व रागावलें तर लचका भरणार—कुत्र्यांच्या मैत्रीचा नेम नसतो. क्षणांत तें प्रेमळपणा दाखवील तर दुसऱ्या क्षणीं लचका तोडतील याप्रमाणें कांहीं लोकांचा स्वभाव अनिश्चित असतो. क्षणांत मित्रत्व दाखवून गळ्यांत गळा घालतील तर दुसऱ्याच क्षणीं तुमच्या नाशास प्रवृत्त होतील. अशा लोकांवर विसंबून राहतां कामा नये.

कुत्र्याचें गोत आणि कोळ्याचें सूत—कुत्र्याचें गोत व कोळ्याचें सूत सरतां सरत नाहीं. एखाद्या जागीं कुत्रीं जमूं लागलीं म्हणजे त्यांस मर्यादा राहात नाहीं; लवकरच अनेक कुत्रीं एकत्र येतात. त्याचप्रमाणें कोळी एकदां आपल्या अंगांतून धागा काढूं लागला म्हणजे वाटेल तितका काढूं शकतो. यावरून कांहीं गोष्टी अमर्यादपणें वाढतात, त्यांस अनुलक्षून ही म्हण वापरतात.

कुत्र्याचें जिणें, फजितीला काय उणें—कुत्र्याचें जीवित हें अत्यंत लाजिरवाणें असतें. त्यास नेहमीं धन्याची मर्जी प्रसन्न राखण्यासाठीं धडपड करावी लागते.

कुत्र्याचें तोंड गाढवानें चाटलें व गाढवाचें तोंड कुत्र्यानें चाटलें म्हणोन बाटतें कीं काय—कुत्रा आणि गाढव हे दोन्हीहि प्राणी अपवित्र मानले जातात. तेव्हां कोणींहि कोणाचें तोंड चाटलें तरी एकामुळें दुसरा बाटला असें कांहीं होत नाहीं. दोन अपवित्र वस्तूंचा परस्परांस संसर्ग झाला तरी त्यांत विधिनिषेध कांहीं नाहीं.

कुत्र्याचे पाय मांजरावर व मांजराचे पाय उंदरावर; कुत्र्याचा पाय मांजरावर आणि मांजराचा पाय कुत्र्यावर—कुत्रें मांजराचे पाठीस लागतें व मांजर उंदराचे पाठीस लागतें; त्याप्रमाणें जेथें नेहमीं भांडणतंटे, वैर, दावा वगैरे चालतो अशा मनुष्यांच्या जमावास अगर स्थानास म्हणतात.–गांगा १३६

कुत्र्याचे मुर्वतीनें मरण; कुत्र्याच्या मौतेनें मरणें—कुत्र्यासारखे हालहाल होऊन मरणें; अत्यंत विपत्तींत, हीनावस्थेंत मृत्यु येणें; अत्यंत लाजिरवाण्या स्थितींत मरणें. 'आपल्याला कुत्र्याच्या मौतेनें मरावें लागेल.'–इंप ५६७.

कुत्र्याचें मूत, सड्यास ना सारवणास—कुत्र्याच्या मुताचा कांहीं उपयोग नसतो. यावरून एखादी पूर्णपणें निरुपयोगी वस्तु दर्शविण्यास ही म्हण वापरतात.

कुत्र्याचें शेंपूट कितीहि दिवस नळकांड्यांत घातलें तरी अखेरीस वांकडें तें वांकडें; कुत्र्याचें शेंपूट नळींत घातलें तरी वांकडें—जातिस्वभाव बदलत नाहीं. वांकडी गोष्ट वांकडीच राहाणार. 'नीतींत तसें खळमन, जेंवि नळींत श्वपुच्छ सामास।'–मोउद्योग ३.३२.

कुत्र्याचें शेंपूट, मांजराचे कान आणि दोहों जिवांची ताणाताण—निरर्थक घोंटाळा, गडबड वगैरे दाखविण्यासाठीं ही म्हण वापरतात. विनाकारण यातायात, धडपड.

कुत्र्याच्या शेंपटीवर पाय देऊं नका—कुत्र्याच्या शेंपटीवर पाय दिला असतां विनाकारण तो भुंकावयाचा किंवा वेळेवर चावावयाचाहि. तेव्हां चिडखोर किंवा क्षुद्र मनुष्याच्या विनाकारण वाटेस जाऊं नये. पाठभेद—सापाच्या शेंपटीवर पाय देऊं नये.

कुत्र्यानें शेंपटी हालविली नाहीं तर शेपटीनेंच कुत्रें हालविलें—क्षुल्लक गोष्टीचा परिणाम महत्त्वाच्या गोष्टीवर होणें.

कुत्र्याला खीर व गाढवाला चपात्या; कुत्र्याला खीर व मुऱ्याला पासोड्या--जें ज्याला योग्य तेंच त्याला दिलें पाहिजे. चांगली गोष्ट प्रत्येकालाच मानवते असें नाहीं. कुत्र्याला खीर किंवा गाढवाला चपात्या पचणार नाहींत.

तसेंच अंथरुणांत मुतणाऱ्याला चांगलीं पांघरुणें काय कामाचीं ?

कुत्र्याला तोंडीं लावला तर डोक्यावरच चढतो—(व.) हलकट मनुष्याशीं स्नेह ठेवला तर तो डोईजड बनतो.

कुत्र्याला मिळे सोन्याची सांखळी, देवाला न मिळे फुलाची पाकळी–कांहीं लोकांस योग्य पारख नसते व ते अनेक गोष्टींचा भलताच उपयोग करतात व विशेषतः योग्य मनुष्यास मान द्यावयाचा त्यास न देतां, हलकट मनुष्यास डोकीवर बसवतात. अशांस उद्देशून ही म्हण वापरतात.

कुत्र्याला हाड म्हटलें म्हणजे हाडुक टाकतें—निगर गट्ट, कोडग्या माणसाबद्दल वापरतात.

कुत्रा——कुत्रेक उजो घालुनु ल्हायो भाजच्यो—भाताच्या उडव्याला आग लावून त्यावर लाह्या भाजणें. उडव्यामध्यें खंडीच्या मापानें भात असतें. लाह्या फोडण्यासाठीं विस्तव हवा म्हणून तें उडवें पेटवून देणें हें महामूर्खपणाचें लक्षण होय. क्षुद्र कार्याच्या सिद्धीसाठीं मोलाच्या वस्तूचा विध्वंस करणें या अर्थानें वापरतात.

कुथणें——कुंथून कुंथून केळीं खाणें—आजाऱ्याचें सोंग घेऊन केळीं खाणें; रडून रडून आपल्या मनासारखी गोष्ट घडवून आणणें.

कुथून कुथून बोकड खाणें--वर प्रमाणेंच.

❀ कुथतीस कां, तर तुम्हाला बरें वाटावें म्हणून—नवऱ्याचा जोर फार आहे हें दाखवून दिलें असतां त्याला बरें वाटेल, म्हणून संभोगाच्या वेळीं बळेंच विव्हळत राहावयाचें.

कुदळ——कुदळभारती—(व.) ऐदी; आळशी.

कुंदा-दी——कुंदा-दी काढणें--१ शेतांतील हरळी वगैरे मुळासकट खणून काढणें. २ (ल.) ठोकणें; मारणें; चेंदून काढणें. 'नंतर लागलीच बटोला सोडून देऊन त्यानें शामभट्टाची कुंदी काढण्याल आरंभ केला.'–शाब २·१९१.

कुंदीपाक--ठोकाठोकी; ठोसाठोसी; बुक्काबुक्की.

कुदावून——कुदावून भरणें—(व.) गच्च भरणें; दाबून भरणें; ठासून भरणें.

कुधान्य--हरीक, उडीद, मसूर लाख, चवळी, बाजरी, कांग इ.

कुंधा——कुंधा काढणें—'कुंदा काढणें' पहा.

कुंपण——कुंपणानें शेत खाल्लें--कुंपण शेत राखण्यासाठीं असतें; पण त्यानेंच फसविलें. जो रक्षणकर्ता तोच उलटला म्हणजे म्हणतात.

सरडयाची धांव कुंपणापर्यंत—प्रत्येक मनुष्य आपल्या कुवतीप्रमाणें काम करूं शकतो. त्याच्या पलीकडे त्याला कांहीं साधत नाहीं.

कुपात्र——कुपात्रीं धर्म घडे, पदरीं पाप पडे—अपात्र मनुष्यास दान केलें असतां पुण्य लागण्याच्या ऐवजीं पाप लागतें. तु०—कुपात्रदानाच्च भवेद्दरिद्रो दारिद्र्यदोषेण करोति पापम्। पापप्रभावान्नरकं प्रयाति पुनर्दरिद्रः पुनरेव पापी ॥–सुर १७३.८५०.

कुपी——कुपींतली गोष्ट—गुप्त गोष्ट; गुह्य गोष्ट; गौप्य.

कुपुत्र——कुपुत्राची अडचण होती सहन, त्याला दुःख होतां वाटे कठीण—स्वतःचा मुलगा जरी वाईट निघाला तरी व त्यापासून जरी त्रास होत असला तरी मनुष्य सहन करतो व त्याला दुःख झालें असतां पित्याच्या किंवा मातेच्या मनास दुःख झाल्याशिवाय राहात नाहीं. पुत्र कसाहि असला तरी मातापित्यास तो प्रियच असतो. अपत्यप्रेम हें तोडतां येत नाहीं. पुढें पहा.

कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति।--मुलगा जरी कितीहि वाईट व आईला कष्ट देणारा असला तरी आईचें प्रेम त्यावर जसेंच्या तसें असतें. तो कुपुत्र झाला तरी ती कुमाता होणार नाहीं. सबंध श्लोक—जगन्मातर्मातस्तव चरणसेवा न रचिता, न वा दत्तं देवि द्रविणमपि भूयस्तव मया। तथापि त्वं स्नेहं मयि निरुपमं यत्प्रकुरुषे, कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ॥

कुबडी—कुबडी काढणें—कांहीं वांकडेपणा, व्यंग काढण.

कुंबिया—कुंबियारि जानवे—(गो.) कुंभ्या नांवाच्या झाडावर जानवें अडकवणें. वस्तुतः तिथें त्याचा उपयोगहि नाहीं आणि शोभाहि नाहीं. म्हणजे अयोग्य ठिकाणीं वस्तूचें दान.

कुबेर--कुबेर होणें—गबर होणें; श्रीमंत होणें; धनवान होणें. 'लुटीनें पेंढारी व लष्कर कुबेर जाहले.' –भाव ३३.

कुबेराला भीक मागायला लावणें—कितीहि अफाट संपत्ति असली तरी ती लवकरच धुळीला मिळवून पुन्हां दरिद्री करणें. 'कुबेराला भीक मागायला लावते ती दारू !' –एकचप्याला ५.४.

❀ कुबेराचा माल कुबेराला, काय व्हावा मनु-

घ्याला—कुबेराजवळ पुष्कळ संपत्ति असली तरी तिचा आपल्याला काय उपयोग. दुसऱ्याच्या संपत्तीचा आपल्याला कांहीं उपयोग नसतो. जें आपलें असेल तेंच खरें. तेंच आपणास वेळेवर उपयोगी पडतें.

कुबेरालें द्रव्य कुबेरा कडेच वता—(गो.) कुबेराचें द्रव्य कुबेराकडेच जातें. पैशाकडे पैसा जातो.

कुबेरालें धन, वेंकटरमणालें रीण, केदनाइ सरना—(गो.) कुबेराचें धन, व्यंकटरमणाचें रीण, केव्हांच संपत नाहीं.

कुंभकर्ण——कुंभकर्णाची जांभई—कुंभकर्ण हा अत्यंत आळशी म्हणून प्रसिद्ध आहे. त्यानें जांभई देण्याकरितां तोंड उघडलें तर तें मिटण्याकरितांहि त्यास दीर्घ काल लागत असे, अशी समजूत आहे. यावरून एखादी दीर्घ काल घणारी, लांबण लागणारी गोष्ट.

कुंभकर्णाची झोंप-महानिद्रा—कुंभकर्ण एकदां निजला कीं सहा सहा महिने उठत नसे, अशी आख्यायिका आहे. यावरून फार काल, अवधि. ‘ एकंदरींत, षण्मासींचा वायदा नव्हे तर ही रावणाचीच जांभई अथवा कुंभकर्णाची महानिद्राच होत चालली होती ! ’ –छच ८०.

कुंभकर्णाली सेवा—(गो.) कुंभकर्णाची सेवा. अतिशय झोंपाळू माणसाबद्दल म्हणतात.

कुंभफळ——कुंभफळ गळयास लागणें—(कु.) संकटांत सांपडणें; अडचणींत सांपडणें.

कुभर्ता——कुभर्ता जायेत क्वचिदपि कुजाया न भवति।—बायकांना छळणारे नवरे सांपडतात पण नवऱ्यांना त्रास देणाऱ्या अप्रतिव्रता बायका बहुधा सांपडणार नाहींत.

कुभांड——कुभांड रचणें—बनावट गोष्ट रचणें; आळ, आरोप आणणें. ‘ त्यानें निराळेंच कुभांड रचून बादशहाचें मनांत भरवून दिलें. ’ –उषःकाल.

कुभांडी——कुभांडी तो जंगली पशू, आर्जवी तो पाळीव वसू—जो मनुष्य आपणावर आळ घेतो, बालंट घेतो तो जंगलांतील पशूप्रमाणें क्रूर समजून दूर ठेवावा व जो आपणाशीं आर्जवानें, लीनपणानें वागतो तो पाळीव पशूप्रमाणें खुषमस्कऱ्या असतो.

कुंभार——कुंभाराक जवाहीर—(गो.) अनाठायीं वस्तूचा उपयोग; अस्थानीं उपयोग.

कुंभाराच्या देवी-माता—टोंचून काढलेल्या देवी; गोस्तन देवी. स्वाभाविक आलेल्या नव्हत अशा. पूर्वी कुंभार लोक देवी काढीत असत.

कुंबारू आपल्या मडक्यां शिफारस करता—(गो.) कुंभार आपल्या मडक्यांची शिफारस करतो.

कुंभार कुंभारीण सुखी असेल तर मडक्याला काय तोटा—नवरा बायको सुखी असतील तर मुलांना काय तोटा ? नवरा बायको निरोगी व सुखी असतील तर मुलें होतील. तु०–शीर सलामत तों पगड्या पचास.

❀ **कुंभार कुंभारणीचें भांडण, गाढवाचें कांडण**—कुंभार कुंभारणीचें भांडण झालें असतां मध्यें लुडबुडणाऱ्या गाढवास दोघाकडूनहि प्रसाद मिळतो. दोन मनुष्यांचा तंटा चालला असतां मध्यें पडणाऱ्या मध्यस्थास दोघाकडून वाईटपणा मिळून उपसर्ग नसता झाल्यावांचूनहि राहात नाहीं.

कुंभार तसा लोटा आणि बाप तसा बेटा—कुंभारामध्यें ज्या मानानें कौशल्य असेल त्या मानानें तो सुबक लोटा घडील. त्याप्रमाणेंच मुलगा हा बापा सारखाच होतो. बीज तसा अंकूर.

कुंभार, नाहीं सुमार; (गो.) कुंभार त्यांका नाय सुमार—कुंभार हा साधारणतः वागणूकींत अव्यवस्थित असतो. ही केवळ यमक साधून म्हण केलेली आहे.

कुंबारा गेल्या आव्यांतु तांब्याचेंबु सोदचो—(गो.) कुंभाराच्या आव्यांत तांब्याचा तांब्या हुडकणें. कुंभाराकडे सर्व मातीचींच भांडीं, धातूचीं कोठून असणार ? किंवा धगधगलेल्या आव्यांत तांब्याचा तांब्या कसा दिसणार?

कुंभाराची सून मडाकें विकूक रस्त्यारि येतलीच—(गो.) कुंभाराची सून मडकीं विकावयाला रस्त्यावर येणारच. पुढें पहा.

कुंभाराक मडकीं धड ना—(गो.) कुंभार स्वतः मडकीं घडतो पण चांगलीं धड मडकीं, तो दुसऱ्यास विकून टाकतो व कुठें कांठ फुटकीं, वांकडीं तिकडीं अशीं गिऱ्हाइकास न पटणारीं मडकीं तो स्वतः वापरतो. वाणी स्वतःच्या दुकानांतील गूळ खात नाहीं त्याप्रमाणें. (ल.) दुसऱ्यासाठीं आयुष्य वेंचणाऱ्याला स्वतःला सुख लावून घेतां येत नाहीं. तु०–वैद्याचीं पोरें गालगुंडानें मेलीं.

कुंभाराची सून उद्यां (कधींतरीं) उकीरड्यावर येईल; कुंभाराची सून आज ना उद्यां उकिरड्यावर येणार; कुंभाराची सून उकीरड्यावर आल्याशिवाय राहणार नाहीं—कुंभाराची सून मडक्याच्या भट्टीकरितां कचरा जमविण्यासाठीं उकिरड्यावर येते. तें तिचें कामच

असल्यामुळें ती नवीन असली तरी लवकरच तिला तें करावें लागून लोकांच्या नजरेस ती पडल्याशिवाय राहात नाहीं. कोणतीहि गोष्ट लपवून ठेवण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी योग्य प्रसंग येतांच यथाक्रम ती उघड झाल्याशिवाय राहात नाहीं. तेव्हां विशेष आतुरता कशाला दाखवावी ?

कुंभाराची सून तुरतुर चाले आणि उकिरडा घोळे—कुंभाराच्या सुनेनें कितीहि ऐट आणली किंवा नखरा केला तरी उकिरड्यावरचा केर कचरा भरण्याचें तिचें काम कांहीं तिला सुटत नाहीं. मनुष्यानें कितीहि बाह्य देखावा करून आपली योग्यता वाजवीपेक्षां जास्त दाखविण्याचा प्रयत्न केला तरी कालांतरानें त्याची खरी योग्यता लोकांस कळल्याशिवाय राहात नाहीं.

कुंभाराचें पोर घडक्या हंडींत शिजवणार आहे?—कुंभार घडकीं मडकीं विकून फुटकीं मडकीं घरीं वापरावयास ठेवतो यावरून. कुंभाराक मडकीं धड ना, पहा.

कुंभारापेक्षा गाढव शहाणें—मालकापेक्षां नोकर शहाणा असणें.

कुंभारास मडकें धड नाहीं—मागें पहा.

कुंभारीण——कुंभारीण निजूं देईना म्हणून गाढवीचे कान पिरगळूं नयेत—(कुंभारणीवरचा राग कुंभार गाढवावर काढतो.) एक आपल्या मनासारखा वागला नाहीं म्हणून भलत्यावर राग काढण्यांत काय फायदा ?

कुंभारणीच्या सुनेला उकिरड्याचा वाशिला; कुंभारणीची सून तुरतुर चाले आणि उकिरडा घोळे—कुंभार पहा.

कुंभारणीनें कुंभारणीशीं कज्जा केला, गाढवाचा कान पिळला—दोघांचें भांडण चाललें असतां मध्यें पडणारास विनाकारण प्रसाद मिळतो. मागें पहा.

कुंभारीण——कुंभारणीच्या घरांत किडा जाईल तर तो कुंभारीणच होईल—कुंभारीण नांवाचा एक पंखयुक्त किडा असतो तो मातीचें घर करून त्यांत किडे आणून ठेवतो व त्यांचे पुढें कुंभारणींत रूपांतर होतें. यावरून एखाद्या टोळींत नवखा मनुष्य सांपडला म्हणजे तो तसाच होतो. तु०—आपणासारिखे करिती तत्काळ ।

कुमारी——कुमारी कन्या, तिला शंभर वर व शंभर घरें—जोपर्यंत मुलीचें लग्न झालें नाहीं तोपर्यंत तिला कोणीहि मनुष्य वर म्हणून सुचविण्यांत येतो व कोणाचीहि ती सून होईल असें सहजगत्या म्हणण्यांत येतें. एकदां लग्न झालें कीं तिचा वर व सासर हीं निश्चित होतात. त्याप्रमाणें जोंपर्यंत एखादी गोष्ट निश्चित झाली नाहीं तोंपर्यंत तिच्याबद्दल हजारों योजना आंखतां येतात पण एकदां निश्चित झाल्यावर एकच मार्ग अनुसरण्यांत येतो. (गु.) कुंवारीं कन्याने सो वर ने सो घर.

कुमार्ग——कुमार्गीं जाणें, बट्टा लागणें—आडमार्गास गेलें असतां आपल्या नांवास कमीपणा येण्याचा संभव असतो.

कुरघोडी——कुरघोडी करणें—मुलांच्या खेळांत कुरघोडी म्हणजे एकानें दुसऱ्याच्या पाठीवर स्वार होणें. (ल.) दुसऱ्यावर अधिकार गाजविणें; मात करणें. ‘ स्वार्थ साधण्याकरतां ते दोघे एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या विचारांत होते ’—स्वप ४.

कुरमुरे——कुरमुरे खाणें—चरफडणें; एखाद्या गोष्टीबद्दल राग येऊन, कांहीं करतां येण्यासारखें नसतें म्हणून नुसतें मनांत चडफडणें.

कुरडो——कुरडो नि थोटो एकमेकां सहाय—(गो.) अंधळा व लंगडा एकमेकांना साहाय्यकारी होतात.

कुरड्या इत्याक कनडक, भेऱ्या इत्याक किन्नरी ?—(गो.) अंधळ्याला चष्मा कशाला व बहिऱ्याला किनरी कशाला ?

कुरड्या दोळ्याक काजळ इत्याक ?—(गो.) अंधळ्याच्या डोळ्याला काजळ कशाला ?

कुरड्या मुसाक खीरी नि अळशीक एकीच—(गो.) अंधळ्या माशीला खीर व घाण सारखीच.

कुरड्या हातांतुलो दिवो; कुड्ड्या हातांतलो दिवो—(गो.) अंधळ्याच्या हातांत दिवा. त्याला त्याचा काय उपयोग. तु०—किमिष्टमन्नं खरसूकराणां किं रत्नहारो मृगपक्षिणां च । अंधस्य दीपो बधिरस्य गीतं मूर्खस्य किं शास्त्रकथाप्रसंगः ॥—सुर १७३.८६१.

कुरड्या हात्तांतुलो वड्डो—अंधळ्याच्या हातांतला बडगा. वरील प्रमाणेंच.

कुरड्या होराण—(गो.) अंधळ्यांची वरात.

कुरड्याक कणसो रायु; कुड्ड्यांक काणो राय—(गो.) अंधळ्यांमध्यें काणा राजा. तु०—वासरांत लंगडी गाय शहाणी.

कुरड्याक दीसु इतें राति इतें ?—(गो.) अंधळ्याला दिवस काय आणि रात्र काय, सारखेंच.

कुरड्यानें मागचे दोन्ही डोळे—(गो.) अंधळ्यानें मागायचे दोनच डोळे.

कुरलें——कुर्ल्या डांग माळ्ळेलें वारि—(गो.) खेकड्याची नांगी मोडल्यासारखें.

कुराड——कुराड घेवन गेलो राना, कितें हाडलें म्हळ्यार कांय ना—(गो.) कुऱ्हाड घेऊन रानांत गेला किती आणलें तर म्हणे कांहीं नाहीं. कर्तबगारीचा नुसता आव.

कुराडि मारतकी दांडि मारता ?—(गो.) कुऱ्हाड मारतेस कीं दांडा ?

कुरापत——बातकी बात, कुराकी कुरापत—बोलण्यानें बोलणें वाढतें व भांडणानें भांडण वाढतें.

कुरापत काढली, भांडत बसली—आपण होऊन भांडणतंटा उकरून काढून वादविवाद करीत बसणें. तु०–खाजवून खरूज काढणं.

कुरूप——कुरूप स्त्री, साकडें घर, निभावतीं निरंतर—आपली स्त्री कुरूप असली म्हणजे तिच्याकडे कोणाचें लक्ष्य जात नाहीं. त्याचप्रमाणें आपलें घर अरुंद ओबडधोबड असलें म्हणजे त्याबद्दल कोणाला हेवा वाटत नाहीं व अभिलाषा उत्पन्न होत नाहीं. त्यामुळें तीं आपणांस लखलाभ होतात तु०–घर साकडं, बाईल माकड.

कुरूपी——कुरूपी बहुचेष्टिकः।—जो मनुष्य कुरूप असतो त्याचं सहज वागणें चेष्टा केल्यासारखें व हास्योत्पादक असतें.

कुऱ्हाड——आकाशाची कुऱ्हाड—महत्संकट; दैवी आपत्ति; अस्मानी.

❀ **आकाशाची कुऱ्हाड कोल्ह्याचे दांतावर**—एखादी सहजगत्या घडलेली गोष्ट परंतु तीमध्यें एखाद्या निरपराधी मनुष्यावर आपत्ति येणें.

कुऱ्हाडीचा घाय, तेथें बघतोस काय—कुऱ्हाडीचा घाव घातला तर मोठी जखम होणारच, त्याबद्दल संशय कसचा. एखादी मोठी आपत्ति कोसळली म्हणजे तीपासून बरीच पीडा व्हावयाची हें स्वाभाविकच आहे.

कुऱ्हाडीचा घाव खोट्याचे कपाळीं—जो दुसऱ्याला फसवूं पाहतो तो शेवटीं स्वतःच फशीं पडतो. कपटी मनुष्याला त्याच्या कपटाचें फळ मिळाल्याशिवाय राहात नाहीं.

कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ—कुऱ्हाडीचा दांडा लाकडाचा केलेला असतो पण तोच आपल्या जातभाईंना–लाकडांना कापण्यास, फोडण्यास तयार होतो. (ल.) निमकहराम; घरबुडव्या; कुलशत्रु. "त्या शूराच्या (धनाजीच्या) पोटीं हा मंगलनिधि चंद्रसेन उत्पन्न झाला आणि स्वराज्याशीं निमकहरामीपणा करून 'कुऱ्हाडी०' झाला."–बाजी० "जो बाटतो तो 'कुऱ्हाडीचा०'असें होऊन आपल्या जातीबांधवांना पाहिजे तसें बोलतो, नांवें ठेवितो, व त्यांचीं वर्मेकर्मे बाहेर काढतो."–आजोच १७२. तु०–नष्टनय कसा झाला दितिसुतचंदनवनांत हा बाळ। कंटकतरु, व्हायाला तच्छेदक विष्णुपरशुला नाळ ॥ –मो मंत्रभागवत ७.४५.

कुऱ्हाडीला नाहीं म्यान, आणि कुणब्याला नाहीं ग्यान—ज्याप्रमाणें कुऱ्हाडीला कोणी म्यानांत ठेवीत नाहीं त्याप्रमाणें कुणबी हा अडाणी असावयाचाच, ही ठरलेली गोष्ट आहे. याला कांहीं अपवाद असावयाचा नाहीं.

कुलगोत्र——कुलगोत्राक कम्मि जालें तरी, मलमूत्राक काम्मे ना—(गो.) कुलगोत्राला कमी झालें तरी, मलमूत्राला कमी नाहीं !

कुलपर्वत——कुलपर्वत, कुलाचल—सप्तपर्वत पहा.

कुल्ला-ला——कुला बाहेर पडणें—गुदभ्रंश होणें.

कुल्ले थोपटणें—आनंदानें टिऱ्या बडविणें; अतिशय आनंद व्यक्त करणें; आनंदानें बेहोष होणें.

कुल्याला पाय लावणें—जोरानें पळतांना ढुंगणाजवळ पाय येतात यावरून. पळून जाणें; सूं बाल्या करणें. (ल.) कृतघ्न होणें.

कुल्ल्यावर कुल्ला येणें—लठ्ठ होणें; अतिशय स्थूल होणें.

❀ **मोठे कुल्ले, जग भुले**—श्रीमंत मनुष्याची सर्व लोक हांजी हांजी करतात. द्रव्यवानाची खुशामत करावयास सर्व लोक तयार होतात, गरीबाची दाद कोणी घेत नाहीं. एखाद्या समारंभाच्या ठिकाणीं वगैरे एखादी श्रीमंत स्त्री आल्यास तिची उठाबस करण्यांत यजमानीण वगैरे सर्व स्त्रियांची धांदल उडते, पण एखादी गरीब स्त्री आल्यास तिच्याकडे कोणाचें लक्ष्यहि जात नाहीं.

रिकामा सुतार, कुले तासी—रिकामपणीं कांही तरी भलताच उद्योग करणाऱ्या मनुष्याबद्दल योजतात. तु०–रिकामा न्हावी कुडाला तुंबड्या लावी.

मातीचे कुल्ले लावल्यानें कोठें लागतात; मातीचे कुल्ले चिकटवून थोडेच राहणार—निसर्गदत्त वस्तूप्रमाणें कृत्रिम वस्तु टिकत नाहीं. जेथें स्वाभाविक आप्तपणा नाहीं तेथें दूरान्वित संबंध जोडून आप्तपणा येत नाहीं. दूरच्या

बळेंच जोडलेल्या नात्याचा कांहीं उपयोग होत नाहीं, त्यामुळें कांहीं आपलेपणा उत्पन्न होत नाहीं.–गणपतराव चरित्र ६२.

कुलीन——कुलीन असून शक्तिहीन, तो भिकाऱ्याहून दीन—जो मनुष्य मोठ्या कुलांतील असतो पण ज्याच्या ठिकाणीं पराक्रम नसतो त्याची दशा फार वाईट होते. कारण कुलीनत्वामुळें त्याला हलकेंसलकें काम वगैरे करतां येत नाहीं व मोठी जबाबदारी अंगावर घेण्याची तर शक्ति नसते.

कुलीन पुरुषांचें शील गरिबाची उपजीविका करिते—जे मोठ्या कुलांतील व शीलवान पुरुष असतात ते आपल्या आश्रयाखालीं असलेल्या गरीबगुरीब लोकांचा योग्य तो परामर्ष घेतात, त्यांस कधीं अंतर देत नाहींत व त्यामुळें त्यांचें ठीक चालतें.

कुलीन मनीं वाहे थोरी, अकुलीन अंतरीं खेद करी—जो कुलीन मनुष्य असतो तो आपला थोरपणा सोडीत नाहीं व येईल त्या परिस्थितीशीं स्वाभिमान न सोडतां टक्कर देतो व समाधानी वृत्ति ठेवतो. उलट हलक्या कुळांतील मनुष्याची वृत्ति नेहमीं असमाधानी असते व तो मोठ्या लोकांचा हेवा करीत व मनांत कुढत असतो.

कुल्ली——कुल्ली वचू पुण हात सुटू म्हण; कुल्लो वचूं पुण हात येऊं—(गो.) एका मनुष्यानें एकदां एक खेकडा धरला तेव्हां त्या खेंकड्यानें त्याच्या हाताचीं बोटें आपल्या आंकड्यांत घट्ट धरलीं व चावूं लागला. तेव्हां त्याला खेंकडा जावूं दे पण माझा हात केव्हां मोकळा होतो असें झालें. एखादी गोष्ट करतांना ती आपल्या गळ्यांत आली म्हणजे अशी अवस्था होते. तु०–भीक नको पण कुत्रा आंवर.

कुवा——कुवा टळे पण रजपूत न टळे—एखाद्या वेळीं विहीर आपली जागा सोडील पण रजपूत आपला शब्द बदलणार नाहीं. रजपूत लोक हे वचनाचे अगदीं सच्चे असतात.

कुवाडे——कुवाडे पोवाडे सांगणें—चहाड्या, चुगल्या सांगणें; कागाळी करणें.

कुंवाळो——कुंवाळेक कुंवषळो जड न्हंयं—(गो.) [कुंवाळो=कोहळा] म्हशीचीं शिंगें म्हशीला जड नाहींत याप्रमाणें.

कुवाळ्या कुडक्या भित्तरि अष्टाविधान—(गो.) कोहोळ्याच्या एका तुकड्यांत सगळें अष्टविधान (एक प्रकारचें याज्ञिक) आटोपलें. थोड्या खर्चांत मोठें कृत्य उरकून घेण्याच्या कामीं वापरतात.

कुशिलें-ल्लें——कुशिलें कुवाळें कुष्ट शेणइक—(गो.) कुजलेला कोहाळा कुष्ट रोगी शेणव्याला. जशास तसें.

कुशिल्या कापडाक चिरो चड—(गो.) मळक्या कापडाला चिरा फार.

कुशिल्ल्या शिताक करपल्लें ओंट; कुस्साल्ल्या शिताक करपल्ली ओटी—(गो.) नासल्या तांदुळाला भाजकें ओटंब (ओंट फळाची आंबट साल–कोकंब प्रमाणें.) एकामाळेचे मणी या अर्थी. जशास तसें.

कुशिल्ल्यांतु सुणें हागलें—(गो.) कुजलेल्या जिन्नसांत कुत्रें हागलें. वाईट गोष्ट जास्तच वाईट होणें. तु०–गंडस्योपरि पीटिका संवृत्ता ।

कुष्ट——कुष्ट उभें करणें—लचांड, खेंकटें, ब्याद मागें लावणें. ' आम्ही निघा म्हणू याकरतां वाड्यांत राहून कांहींतरी कुष्ट उभे करीत. '–बापूगोप १३९.

कुसका——कुसकी साळ—(गो.) गचाळ, घाणेरडा, ओंगळ मनुष्य.

कुसक्या काष्टीचा कुणबी—घाणेरडा कुणबी; ओंगळ; कुणबी. कुणब्यास उपहासानें म्हणतात.

*** कुसक्या गांडीस (फोद्यास) नासका लवडा (बोडा)**—(अशिष्ट) जशास तसें.

कुसंग—कुसंगाशीं संग, प्राणाचा भंग—असंगाशीं संग आणि प्राणाशीं गांठ० पहा.

कुसचें——कुसलें थंय कातरचें—(गो.) सडलें असेल तें कापून टाकावें.

कुसंतान——कुसंतानापेक्षां निसंतान बरें (चांगलें)–वाईट मुलें होण्यापेक्षां मुळींच मूल न झालेलें बरें. तु०-वंधत्व लिहो भाळीं विधिचें कदपत्य न करंकज लिहो ।–मोआश्रम २.५३. अजातमृतमूर्खेभ्यो मृताजातौ सुतौवरम् । यतस्तौ स्वल्पदुःखाय यावज्जीवं जडो दहेत् ॥ –पंच १४.

कुसळ——दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें पण आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं—मनुष्यास दुसऱ्याचे क्षुल्लक दोषहि सहज दिसतात, पण स्वतःचे मोठमोठे दोषहि लक्षांत येत नाहींत.

कुसळप्रवेशो मुसळ प्रवेशः। ; कुसलप्रवेशं मुसल प्रवेशः।—आरंभीं लहानशा दिसणाऱ्या शत्रूपासून अथवा संकटापासून पुढें अनर्थ होण्याचा संभव असतो. प्रथम कुसळ जाण्याइतकी जागा दिली म्हणजे हळूहळू तेथें मुसळ जाण्या इतकी जागा होते. आपल्या एकजुटींत कुठें लहानशीहि फट एकदां पडली म्हणजे तीच वाढत जाऊन पुढें अनर्थकारक होते. तु०—चंचुप्रवेशात् मुसलप्रवेशः। उंटाचें पिलूं घरांत घेणें.

कुस्ती——कुस्ती बलवानाशीं, हातीं येतें बत्तीसी—मोठ्या बालिष्ठ माणसाशीं झुंज केल्यास दांत पडण्याचा म्हणजे मोठी हानि होण्याचा संभव असतो. तेव्हां आपल्या बरोबरीच्याशीं भांडणतंटा केल्यास किंवा स्पर्धा केल्यास हरकत नाहीं पण ज्याची आपली बरोबरी नाहीं त्याशीं वैर, स्पर्धा वगैरे करूं नये. केल्यास त्यांत आपलेंच नुकसान झाल्याशिवाय राहात नाहीं.

कुहिट——कुहिट खोबरें—१ खवट खोबरें; कुजकें खोबरें. २ (ल.) कुढ्या, खुनशी माणूस.

कुळकर्णी——सोनार शिंपी कुळकर्णी आप्पा, यांची संगत नकोरे बाप्पा—सोनार, शिंपी व कुलकर्णी हे लबाड असतात, अशी समजूत आहे. तेव्हां या तिघांशीं संबंध ठेवूं नये असा उपदेश.

कुळंबी——कुळंब्या आंबिल भुरें—(गो.)कुळंब्याला आंबिल फार आवडते. ती मिळाली म्हणजे झालें !

कुळंब्याक जवादी मिळाली, त्याणें खाल्ली आंबलीबरोबर; कुळंब्या जवाद दिली, आमील बराबर भुर्रे केली—(गो.) कुणब्याला कस्तुरी दिली तर ती त्यानें आंबिली बरोबर खाल्ली. अनधिकाऱ्याला अधिकार दिला तर त्याचा दुरुपयोग होतो. कुणबी पहा.

कुळभरण——कुळभरण करणें—वसाहत करणें. —केसरी १२-११-३७.

कुळवाडी——कुळवाड समाजविशी-समजूत—अगदीं अडाणी माणसासहि सहज समजेल अशा अगदीं सोप्या पद्धतीनें केलेली मांडणी.

❀ कुळवाडी भाई, ऐकायचा नाहीं—कुळवाडी मनुष्याची कितीहि समजूत घालण्याचा प्रयत्न केला तरी एकदां त्याच्या डोक्यानें एखादी गोष्ट घेतली म्हणजे ती त्याच्या डोक्यांतून काढणें अगदीं शक्य होत नाहीं. त्याची समजूत लवकर पटतच नाहीं.

कुळवाडी भाई, वांकडा तिकडा जाई—कुळवाडी मनुष्यास इतर लोकांचा संशय असतो म्हणून तो नेहमीं बावरत बावरत वागत असतो व त्यामुळें तो कोणतीहि गोष्ट सहज सरळपणें सांगत नाहीं व करीतहि नाहीं. त्यास नेहमीं वळणावळणानें जावयाची संवय असते तेव्हां त्यास मोठ्या सोयीसोयीनें मार्गावर आणावें लागतें.

कुळीथ——कळीदना होय मांडा, तर रडत्या कां रांडा; कुळीदना होयत मांडा, ते कां रडत रांडा—कुळथाचे जर मांडे होते तर बायका कां रडत्या. निकृष्ट प्रकारच्या साधनांनीं जर उत्कृष्ट प्रकारचीं कार्यें होऊं लागलीं तर काय सर्वत्र आनंदी आनंद होईल. पण तसें व्यवहारांत घडत नाहीं म्हणून तर सर्व अडचण.

कूच——कूच दरकूच-बकूच--मजल दर मजल; एकसारख्या मजला मारीत; मुक्काम न करतां. ‘आम्ही आपले दोस्तीवर नजर देऊन कूच-बकूच खाना होऊन गेलों असों.’—पया ४८६.

कुचाचा नगारा वाजविणें--नगारा वाजवून सैन्यास निघून जाण्याचा हुकूम करणें; पाय काढणें; पळून जाणें; कूच करण्याचा हुकूम देणें.

कूट——कूट काढणें—कुटणें; बडवणें; ठोकणें; मारणें; यथेच्छ बडविणें.

कूट खाणें—निंदा, चुगली करणें; चहाडी करणें; कागाळ्या सांगणें. ‘कूट खाती मागेंपुढें। जाती नित्य गांवापुढें।’—तुगा ९९९.

कूड——कुडास कान असणें—कोणी चोरून ऐकत असणें. हळू बोलण्याचा इशारा करतांना म्हणतात.

❀ रिकामा न्हावी, कुडाला तुंबडी लावी--पूर्वी न्हावी हे शस्त्रक्रियादि साधनांनीं रोग्यास उपचार करीत असत. तुंबडी लावणें हेंहि एक त्यांच्या कामापैकीं एक असे. मनुष्य निरुद्योगी असला म्हणजे भलतेच उद्योग करण्याकडे त्याची प्रवृत्ति होते. तु०—रिकामा सुतार कुले तासी.

कुडास कान, ठेवी ध्यान—कोणी कुडाच्या भिंतीमागें दडून ऐकतात तेव्हां सावध असावें. भिंतीलाहि कान असतात.

कूप——कूपमंडूक न्याय—[कूप=विहीर] विहिरींतील बेडकास ज्याप्रमाणें त्याची विहीर एवढेंच काय तें जग वाटतें व बाहेरच्या जगाची मुळींच कल्पना नसते त्याप्रमाणें जो मनुष्य आपलें गांव, देश वगैरे कधींहि सोडून जात नाहीं त्याची दृष्टि व वृत्ति अतिशय संकुचित बनते. ‘असें प्रतिपादन करणें म्हणजे हिंदुधर्माच्या व्यापक स्वरूपा-

बद्दल कूपमंडूक न्यायानें आपलें अज्ञान प्रदर्शित करणें होय.' –टि ४.३८८.

कूपयंत्रघटिका न्याय—रहाटगडग्याचे पोहरे किंवा लोटे ज्याप्रमाणें क्रमानें वर जाऊन पुन्हा खालीं येतात व पुन्हां वर जातात त्याप्रमाणें सुस्थितीनंतर, दुःस्थिति व पुन्हां सुस्थिति; याप्रमाणें बऱ्यावाइटाची परंपरा किंवा क्रम; चक्रनेमिक्रम. तु०–सुखंहि दुःखान्यनुभूय शोभते, घनांधकारेष्विव दीपदर्शनम्। सुखाच्च यो याति नरो दरिद्रतां, धृतः शरीरेण मृतः सजीवति ॥–मृच्छ.

कूपांत घालून दोर कापणें— विहीरींत दोरानें उतरवून दोर कापून टाकणें; आधार काढून घेणें; संकटांत लोटून सोडून देणें. –मोकर्ण ४०.५२.

कूप——कूप जर शेत खाऊं लागला तर मालधनी काय करील ?—कूप म्हणजे कुंपण हें शेत राखण्याकरितां घातलेलें असतें. त्यानेंच जर शेत व्यापलें म्हणजे राखण करणाऱ्यानेंच जर जो माल राखावयाचा त्याचा अपहार केला तर मालकाचा त्याला काय उपायः! जो रक्षक ठेवला तोच जर भक्षक ठरला तर नाइलाज होतो. तु०–कुंपणानेंच शेत खाल्लें.

कूर्म——कूर्मदृष्टि ठेवणें; कूर्मदृष्टीनें सांभाळणें—कासव आपल्या पिल्लांस पाजून वाढवीत नाहीं तर नुसत्या नजरेनेंच त्यांचें पालनपोषण करतें. यावरून कृपा ठेवणें.

कूर्मावलोकन करणें—कृपादृष्टि ठेवणें. 'तेणेप्र॥ कूर्मावलोकन करून सेनापतीचे ठाई अपराध असेल तो दूर करून···'–पेद १२.५.

❀कूर्माची ग्रीवा आंत जाती बाहेर जाती, तद्वत नीच पुरुषाचें वचन—ज्याप्रमाणें कासव आपली मान क्षणांत बाहेर काढते, क्षणांत आंत ओढून घेतें त्याप्रमाणें नीच मनुष्य एकदां एक बोलतो, पुन्हां आपले शब्द माघारे घेतो, याप्रमाणें त्याच्या शब्दावर मुळींच विश्वास ठेवतां येत नाहीं. –शिवदिग्विजय ३६५.

कूस—कुशीस होणें—एका बाजूवर निजणें.

कुस निकुरणीचा-निखवणा-धुणीचा-धुवणा-धुणा—अखेरचा मुलगा; शेवटचें अपत्य.

कुस निवविणें—बाळंतिणीच्या दहाव्या दिवशीं सोन्याची अंगठी दूधतुपांत बुचकळून त्या अंगठीनें बाळंतिणीची कूस चोळण्याचा प्रघात कोठें कोठें आहे. 'दुध तुप घेऊनि बाळंतिणिची कुस निववीती।'–वसा ३३.

कुस फुटप—(गो.) मुलें व्हावयास सुरवात होणें; कूस फळास येणें.

कूस भरणें—एखाद्या पदार्थानें पोट भरणें.

❀मांजर करी एकादशी, उंदीर मारून भरी कुशी—मांजर लबाड प्राणि आहे, एकीकडे एकादशीचा उपवास असल्याचा आव आणतो व कोणाचें लक्ष्य नाहीं असें पाहून हळूच उंदीर मारून खातो. याप्रमाणें वरवर साधुत्वाचें ढोंग असणाऱ्या मनुष्यावर विश्वास ठेवूं नये. पंचतंत्रांतील गोष्ट पहा.

कूस——कूस घालणें—[कूस = वेढा; प्राकार; Compound.] (कु.) खेळांतील नियम मोडल्याबद्दल खेळगड्यास बाहेर टाकणें. कुसूं घालणें पहा.

कूळ——कूळ झालें नादार, त्यापासून काय मिळणार—एखादें कूळ नादार झाल्यावर त्यापासून वसूली होणें शक्य नसतें. त्याप्रमाणें जो मनुष्य निःसंग झाला आहे, ज्याला आपल्या अब्रूची चाड नाहीं त्याशीं व्यवहार करण्यांत किंवा त्यापासून भलेपणाची अपेक्षा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

कूळ——कूळ उद्धरणें—१ कुळाची कीर्ति वाढविणें. २ (ल. उप.) नातलगांवरून शिव्या देणें, अपशब्द बोलणें.

कुळाला कांटी होणें—(गो.) कुलकलंक निपजणें; कुळाला बट्टा लावणें. 'कुळाला कांटी जशी म्हणतात, तशी ती आमची आनंदीबया, स्त्रियांच्या कुळाला कांटी होऊन गेली.' –आजोच १०.

कुळाला डाग लावणें—कुळास कमीपणा येईल असें कृत्य करणें.

❀कूळ पळवूनु चाडि हाडका, थळि पळवूनु गाइ हाडका—(गो.) कूळ पाहून मुलगी आणायला पाहिजे, आचोळ (सड) पाहून गाय आणायला पाहिजे.

कुळारी थायकिळी किल्लेली; कुळारा तायखिळो किल्लो—(गो.) ज्या ठिकाणीं कुटुंब राहात होतें त्या जागेंत रान माजलें आहे. आत्यंतिक दारिद्र्यावस्था.

कुळास कोड-खोड, संतानास वेड (नसावें)—कुष्ट हा रोग भयंकर व वंशपरंपराचा आहे. तसाच वेड हाहि रोग आनुवंशिक मानतात. तेव्हां आपल्या कुळांत कोणी कुष्टी किंवा वेडा असूं नये. कोड या ऐवजीं खोड म्हणजे कोणतेंहि आनुवंशिक व्यंग असाहि अर्थ घेण्यास हरकत नाहीं.

कुळीं असतां लांछन, ठेविती सर्व दूषण—एकदां आपल्या कुळाला बट्टा लागला म्हणजे सर्वत्र आपली अपकीर्ति होते.कोणीहि आपणाशीं व्यवहार करण्यास तयार नसतो.

कृतकर्म——कृतकर्माचीं पापें, न जातीं तीर्थांचिया बापें—मनुष्यानें केलेल्या कृत्यांचीं विशेषतः दुष्कृत्यांचीं फळें त्याला भोगावींच लागतात. तीं कोणत्याहि तीर्थस्नाना-चुकत नाहींत.

कृतकृत्य——कृतकृतश्च भारत—गीतेच्या पंध-राव्या अध्यायाच्या शेवटील श्लोकांतील शेवटचे शब्द. या अध्यायांत सर्वांत महत्त्वाचा असा पुरुषोत्तम योग अर्जु-नास सांगितला आहे व हा जाणल्यानें सर्व श्रेय प्राप्त होतें, असें सांगितलें आहे. यावरून कोणत्याहि गोष्टीचें सार्थक होणें; एखादी गोष्ट तडीस जाणें; पूर्ण होणें या अर्थी हा वाक्प्रचार वापरतात. इतिगुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ। एतद् बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात् कृतकृत्यश्च भारत॥-गीता१५.२०.

कृतघ्न——कृतघ्नतेच्या संगतीं, निर्लज्जहि असती—जो मनुष्य कृतघ्न असतो तो निलाजराहि असतो.

कृतज्ञता——कृतज्ञता तें सदाचरण, कृतघ्नता तें दुराचरण—कृतज्ञतेस सदाचार व कृतघ्नतेस दुरा-चार मानतात.

कृति——कृति मजुराची, बात मारतो लढाईची—स्वतःच्या अंगांत मजुरी करण्यापलीकडे कोणतेंहि काम करण्याचा पराक्रम नसतां लढाई केल्याची बढाई मारा-वयाची. पोकळ बाता; बढाईखोरांच्या गप्पा या अर्थी.

कृतीनंतर उपदेश वायां आहे—प्रत्यक्ष गोष्ट होऊन गेल्यावर ती करावी किंवा न करावी यासंबंधीं उपदेश कर ण्यांत काय फायदा? वेळ निघून गेल्यावर केलेल्या गोष्टीचा कांहीं उपयोग नाहीं.

कृतीला योग्य होईल असें बोलणें पाहिजे—बोलणें व कृति यांत मेळ पाहिजे. जें प्रत्यक्ष करतां येणार नाहीं किंवा घडणार नाहीं असें बोलून कांहीं फायदा नाहीं.

कृपण——कृपण कुबेर झाला आणि दानाधिपति भिकारी झाला—१ कृपण मनुष्यानें कितीहि चिक्कूपणानें संपत्ति राखून ठेवली तरी त्याला कुबेराची बरोबरी करणें शक्य नाहीं व जो राजाच्या घरीं दानाधिकारी आहे तो कांहीं पदरचें देत नाहीं; तेव्हां त्याच्या हातून कितीहि दान-धर्म झाला तरी तो राजाच्या जामदारखान्यांतून होत अस-ल्यामुळें त्याला त्याची कांहीं तोषीस लागत नाहीं व तो स्वतः भिकारी होणें कधीं शक्य नाहीं. तेव्हां या दोन्ही गोष्टी झालेल्या कधीं कोणीं ऐकल्या आहेत काय? त्या अशक्य आहेत. २ असंभाव्य दिसणाऱ्या गोष्टी घडून आल्या असतां म्हणतात.

कृपण गेली पंढरपुरा। वेशीपासून येई घरा॥—एखादी बाई पंढरपुरास विठ्ठलाचें दर्शन घेण्यास निघाली. पंढर-पूरच्या वेशीपर्यंत पोहोंचली पण आतांपर्यंतच्या खर्चांत पंढरपुराला कराव्या लागणाऱ्या खर्चाची भर पडणार हें पाहून खर्चाच्या धाकानें वेशीपासून ती परतली. येथपर्यंतचे तिचे कष्ट व पैसा निष्फळ गेला. तद्वत् एखादी कामगिरी डोक्यावर घेऊन अनेक कष्ट सोसून ती पूर्णतेच्या जवळ आणावी पण मग थोड्याशा कष्टाला भिवून ती मध्येंच सोडून देणें, हा अवसानघातकीपणा होय. अशा कमकुवत मनोवृत्तीच्या माणसाला उद्देशून ही म्हण वापरतात.

कृपण चमडी देईल पण दमडी देणार नाहीं—कृपण मनुष्य आपलें धन रक्षण करण्याकरितां वाटेल ते हाल सोशील पण अल्पहि धन जाऊं देणार नाहीं. तु०—चमडी देगा पण दमडी न देगा.

कृपण धन रक्षण करी, उदार त्याचें स्वरूप करी—कृपण मनुष्य केवळ द्रव्याचें रक्षण करतो पण उदार मनुष्य त्याचा योग्य उपयोग करतो.

कृपणाचा पैका गांठीं, देतां प्राण येतो कंठीं——कृपण मनुष्यास जवळचा पैसा देणें म्हणजे प्राणसंकटासारखें वाटतें.

कृपणाचें उष्टें शीत, कावळ्याच्या नाहीं नशिबांत—कृपण मनुष्य कधीं उष्ट्या हातानें कावळासुद्धां हांकीत नाहीं; कारण एखादें शीत पडून फुकट जावयाचें व त्यामुळें काव-ळ्याला त्याच्या हातचें शीत कधीं मिळण्याचा संभव नसतो. तु०—उष्ट्या हातानें कावळा हांकणें.

कृपणाचे दागिने जमीनींत आणि उधळ्याचे दागिने बाजारांत—कृपण मनुष्याजवळ कितीहि दागिने असले तरी तो ते जमीनींत चोरीच्या भीतीनें पुरून ठेवतो व उधळ्या मनुष्यास ते विकावयाची पाळी येते. याप्रमाणें दोघांनाहि त्या दागिन्यांचा अंगावर घालण्याच्या कामीं कांहीं उपयोग होत नाहीं.

कृपणाचें धन प्रायश्चित्तास—कृपणास त्याच्या धनाचा कधीं सरळ उपभोग मिळावयाचा नाहीं. त्याला जेव्हां एखादी अद्दल घडेल किंवा त्याच्या हातून एखादें पातक होईल तेव्हां प्रायश्चित्त घेण्याच्या कामींच त्याच्या धनाचा उपयोग व्हाव-याचा. कृपणाच्या घरचें धन इतकें पापमूलक असतें कीं तें घेतलें तर कधीं लाभदायक होत नाहीं, तर उलट त्यापासून आपल्या माथीं कांहीं पातक बसून त्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याची पाळीच यावयाची.

कृपणास दुप्पट खर्च—कृपण मनुष्य कोणतीहि गोष्ट

करावयाची झाली तरी प्रथम पुरेसा पैसा खर्च करून नीटपणीं करावयाची तशी करीत नाहीं व ती अर्धवट झाल्यामुळें बरोबर होत नाहीं व त्यास पुन्हां करावी लागून दुप्पट खर्च लागतो. (गो.) कृपणाक दुणो खर्च. तु०–आळशास दुणें काम व लोभ्यास दुणा खर्च.

कृपा——कृपा पातळ होणें—माया, प्रेम कमी होणें. 'तुझी कृपा पातळ फार झाली। तेणें दशा हे मज आजि आली ॥'–छारुह ४.१६.

कृपेची पाखर घालणें—दयाळूपणें वागविणें; कृपेनें आश्रय देणें. 'ऐसा तूं माझा दातार। भक्तासी घालसी कृपेची पाखर।'–व्यंस्तो १००.–दावि ७.२.३१६.

कृष्ण——कृष्ण करणें—काळें करणें; नाहीसें होणें; तोंड लपविणें.

कृष्णकारस्थान--कपटीव्यूह; कपटाचरणानें एखाद्यास फसविण्याचा डाव.

कृष्णग्रंथी--बळकट गांठ; गुंतागुंत; सोडवण्यास कठीण असें कोडें. कृष्णानें एका गवळ्याच्या दाढीची व त्याच्या स्त्रीच्या वेणीची गांठ बांधली होती व ती कोणासहि सोडतां येईना अशी कथा आहे तीवरून.

कृष्णवर्ण होणें--काळें होणें; मृत्यु येणें; नायनाट होणें. 'त्या गुलामाचें जेव्हां कृष्णवर्ण होईल तेव्हां मी येईन.'

***कृष्ण काळा, शंकर निळा आणि राम उजळा**--कृष्णाचा रंग काळासांवळा होता, शंकराचा गळा हालाहल विषामुळें निळा पडला आहे, म्हणून त्यास नीलकंठ म्हणतात व राम हा मात्र उजळ आहे.

कृष्णा——कृष्णास्नान, तुंगापान—कृष्णेच्या पाण्यानें स्नान करावें आणि तुंगभद्रेच्या पाण्यानें तृषा भागवावी असें या दोन नद्यांच्या पाण्याचें महत्त्व आहे. पाठभेद--१ गंगास्नान, तुंगापान. २ गंगास्नान, प्रवरापान, इ.

केजें——केज्यास कापूर होणें--मौल्यवान् पदार्थ हलक्या किंमतीस विकला जाणें. तु०–आदरासी मोल नये लावूं केजें।–तुगा ३४०४.

केणी——केण्या कुरडूची, केण्या कुंजऱ्याची भाजी--केणी, कुरडू व कुंजरा या रानभाज्या आहेत. या परसांत आपोआप उगवतात· यावरून भिकार अन्न. 'केण्या कुंजिऱ्याची भाजी भोगे।'–दावि २९. 'घागरी–मडक्यांत कांहीं दाणे पहा, दळून त्याची भाकरी कर, केणी कुरडूची भाजी कर.'–कहाणी.

केंद्र——चार केंद्रें-(ज्यो.)पतन केंद्र, द्वितीय केंद्र, शीघ्र केंद्र, मंद केंद्र.

केपी——केप्या इद्रारि (कान्नालागि) किन्नरि वाजैलि—(गो.) बहिऱ्याच्या कानाजवळ किनरी वाजवली. मूर्खाला सदुपदेश केला तरी त्याचा काय उपयोग!

केर——केर फिटणें—केराप्रमाणें उडून जाणें; पूर्ण नाश होणें. 'तेथ भेडांची कवण मातु। कांचया केर फिटतु।'–ज्ञा १.१३४.

केर फेडणें—नाश करणें.

केरवारा करणें—घरांतील निरनिराळीं कामें करणें.

केरवारा करून टाकणें—१ कामाचा बिघाड करणें. २ एखादी गोष्ट तिरस्कारानें झिडकारून टाकणें; कसपटाप्रमाणें लेखणें.

***केर डोळयांत, फुंकर घालावयाचा कानांत**—एका जागीं दुखणें व दुसऱ्या जागीं औषध याप्रमाणें विपरीत योजना.

सगळे मुसळ केरांत—सर्व केलेलें व्यर्थ जाणें (अमुक गोष्ट न केल्यास). मुसळ पहा.

केरसुणी——केरसुणी पाहून जाते अन् दिवा पाहून येते—तिन्हीसांजच्या वेळीं दिवा लावून तो देवास, तुळशीस व सर्व घरांत फिरविण्याची चाल आहे. असें केलें असतां लक्ष्मी घरांत येते; उलट त्या वेळीं केर काढल्यास लक्ष्मी बाहेर जाते अशी समजूत आहे.

जेथें केरसुणी फिरे, तेथें लक्ष्मी ठरे—स्वच्छतेचें महत्त्व लोकांच्या मनावर बिंबवण्यासाठीं ही म्हण प्रचारांत आली असावी.

केरसुणीच्या काडया मोडून फळ नाहीं—केरसुणी सर्व काड्यांचीच केलेली असते. तेव्हां एखादी काडी टोंचली म्हणून ती मोडून टाकण्यांत काय फायदा? सर्व केरसुणींत काड्याच असणार, तेव्हां ती मोडून टाकली तरी दुसऱ्या वेळीं दुसरी टोंचण्याचा संभव आहेच. तेव्हां भलत्याच गोष्टीवर राग काढण्यापेक्षां आपणच स्वतः जपून वागणें अधिच चांगलें.

केरसुणीला किनखापाची गवसणी—हलक्या गोष्टीचा मोठा बडेजाव करणें.–पामो १७८.

केलडें, केळडें——करायला गेला गणपति तों झालें केलडें—(गो.) [केलडें = माकड] एक करावयास गेला तों भलतेंच झालें. 'विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम्।

वाघ पडला बावी, केळडें गांड दावी—(गो.) मोठीं माणसें संकटांत पडलीं असतां क्षुद्र हलकीं माणसें त्यांना हिणवितात. तु०–पिंजऱ्यामध्यें वाघ सांपडे। बायकांमुळें मारिती खडे ॥

केलसें——केलस्याक पळेल्यारि गाडव खाको उकळता—(गो.) न्हाव्याला पाहून गाढव खांका वर करतें. एखाद्या वस्तूची मोठीशी आवश्यकता नहीं, तिच्यावांचून कांहीं अडतहि नाहीं, पण ती जर सहजासहजीं मिळत असेल तर कोणीहि तिच्यासाठीं हात पुढें करतो.

केव्हां——केव्हां केव्हां वाईट गोष्टींतून चांगली गोष्ट निघते—जें होतें तें बऱ्याकरितांच होतें; या न्यायानें वाईट गोष्टहि सर्वस्वीं वाईट नसते; तींतून कांहीं चांगलें निर्माण होतें असा पुष्कळदां अनुभव येतो.

केव्हांहि उन्माद न धरीं, कायदा असे सर्वां शिरीं·मनुष्यानें केव्हांहि उन्मत्तपणें वागूं नये. तसें वागून कोणाची आगळीक केल्यास त्याबद्दल कायद्यानें दंड झाल्याशिवाय राहणार नाहीं.

केश-स——केस पांढरे होणें—१ बराच काळ जाणें. काळ्याचे केस पांढरे होईतों दीर्घ काळ व्यतीत होणें. 'किस्मदाबादच्या नबाबांच्या तैनातींत त्याचे केस पांढरे झाले होते.'–जादुगार पृ.१९.२ वृद्ध होणें; वार्धक्य येणें.

मनगटाला (हाताला) केस येणें–उगवणें—(नकारात्मक प्रयोग) असमर्थ, दुर्बल होणें.

केस वांकडा न होणें—मुळींच इजा न होणें; किंचितहि अपाय न होणें.–मो महद्विश्व ७७.

केसांच्या अंबाड्या होणें—म्हातारपणीं केस अंबाडीप्रमाणें भुरे होतात. त्यावरून म्हातारपण येणें; वृद्ध होणें. 'आमच्या केसांच्या अंबाड्या होत चालल्या, आतां आम्हाला इंग्रजी शिकून काय करावयाचें आहे!'

केसानें गळा कापणारा–काप्या—कापणें–वरून गोड बोलून आंतून हळूच विश्वासघात करणारा. केंस हें घातक शस्त्र नव्हे, पण अशाच नाजुक रीतीनें मित्र म्हणविणाऱ्यानें फसविणें.

केसानें चरण झाडणें—अत्यंत हलकी देखील सेवा करणें. 'चरण झाडीन केशीं।'–रामदास.

केसास ढका लागणें—थोडा देखील उपद्रव, त्रास पोंचणें. 'तेव्हां केशास ढका लागल्यास प्राण देऊं अशा प्रतिज्ञा.'–नानाफडणीस–आत्मचरित्र.

केसास ढका–धक्का लागूं न देणें—अत्यंत काळजीपूर्वक संरक्षण करणें. 'तुझिया ढका न लागो साधुपिपीलिक चमू गुडाकेशा।'–मोकर्ण ५०.३.

***केश(स) उपटल्यानें का मढें हलकें होतें**—किरकोळ उपायांनीं मोठें कार्य साधत नाहीं.

हजार बोडक्या आणि एक केसकरीण––१ हजार विधवा स्त्रिया एका सौभाग्यवती स्त्रीची बरोबरी करूं शकत नाहींत. २ निराधार अनेक, त्यांमध्यें एखादाच थोडा सधन.

ज्यानें केसकरणी गिळल्या त्यास बोडकीचा काय पाड?––जो सौभाग्यवती स्त्रियांसहि सहज फसवूं शकतो, त्याच्यापुढें निराधार विधवांचें काय चालणार? जो जबरदस्तासहि फसवूं शकतो, तो अनाथास लुबाडल्यावांचून कसा राहील?

केसकाराचो पार ना तर बोडकांक कोण विचारतो—(गो.) वरील प्रमाणें. जेथें मोठमोठ्यांची दाद लागत नाहीं तेथें गरीबांची कथा काय!

केस ना मेस, बोडकीच बेस—विधवा स्त्रीला केसांची जोपासना करावयाची नसते किंवा तिला कांहीं विशेष लागत नाहीं; तेव्हां तीच बरी. बोडकीस केस वगैरे कांहीं नसतात, अगदीं स्वच्छ, तेव्हां तीच बरी! विधवेच्या प्रशंसापर.

सुटलेले केस पाठीस शरण—अन्यन्यगतिक स्थिति. प्राप्त परिस्थितींत राहाणें.

केसभर गजरा आणि गांवभर नजरा––एखाद्या नखरेबाज छानछोकी करणाऱ्या व सामान्यतः शिथिल नीतीच्या स्त्रीबद्दल म्हणतात.

केसाएवढें बारीक व मुसळाएवढें जाड—एखादी गोष्ट बघावयास गेलें तर क्षुल्लक असते. पण प्रसंगीं फार अवघड वाटते, अशा वेळीं ही म्हण वापरतात. संसारांत काटकसर, व्यवहार इ. दृष्टि ठेवून वागावें लागतें हें दाखविण्यासाठींहि योजतात.

केशा——केशाचा अपराध आणि नाऱ्यास दंड; केशाचें प्रायश्चित्त नाऱ्याला—एकाची चूक असतां भलत्यालाच शिक्षा मिळाली असतां वापरतात. तु०–चोर सोडून संन्याशास सुळीं.

केळी——उतरंडीला नसावी केळी व घरांत नसावा नणंद खेळी—'उतरंड' पहा.

केळीवर नारळी, घर चंद्रमौळी—[केळी=मातीची लहान घागर.] मातीच्या लहान मडक्यावर एक नरोटी व

घर असें कीं ज्यांतून आंत चांदणें येतें. याप्रमाणें दारिद्र्यावस्था वर्णन करण्याकरितां योजतात.

केळें——केळें खाणें—(ल.) खोटें बोलणारा, मूर्खासारखी बडबड करणारा, याबद्दल औपरोधिक शब्दयोजना. झक मारणें; साखर खाणें; शेण खाणें.

(हात) केळीं खाण्यास जाणें-खाण्यांत गुंतणें—असमर्थ असणें; प्रतिकाराचें सामर्थ्य नसणें. हात पहा.

केळींवर नारळी चढणें--लहानाचा आश्रय थोरांना घ्यावा लागतो, तेव्हां म्हणतात.

※ केळें म्हणून एखादे वेळीं गाजर विकलें जातें—हिणकस वस्तु कधीं कधीं महत्पदास पोंचते. पण तें पद फार काळ टिकत नाहीं.—गणपतराव चरित्र १७१.

केळीं खातल्याक तोंड दुकतवे ?—(गो.) केळीं खाणाऱ्याचें तोंड दुखेल काय ! काय अवघड, जड आहे या अर्थी.

केळीं खातां हरखलें, हिशेब देतां टरकलें--पैसे खर्च करून केळीं खातांना आनंद होतो, पण त्या पैशांचा हिशोब देतांना भीति वाटते. चैन करतांना सुख होतें पण निस्तरतांना दुःख होतें.

केळीं खातांना गाल कांहीं फाटत नाहीं—'केळीं खातल्याक तोंड दुकतवे' पहा.

केळीं खालेलीं फालस, मांड्रीरि मुत्तिलें बद--(गो.) केळीं खाल्लीं तें खोटें, चटईवर लघवी केली तें खरें.

केळीं गोड म्हूण साल्यो खावंच्यो वे ?--(गो.) केळीं गोड म्हणून साली खाव्यात काय ?

केळीं सोलवंचे ससार कीं खावंचें ससार ?--(गो.) केळीं सोलावयाचीं सोपीं कीं खावयाचीं सोपीं ?

कैंगटी——(जीव) कैंगटीला येणें--(कु.) मेटाकुटीस येणें; त्रासणें.

कैंचा-ची——कैंची चिका दुधचवी । जरी दावी पांढरे ॥—चीक व दूध हीं दोन्ही जरी पांढरीं असलीं तरी चिकाला दुधाची चव कधीं येणार नाहीं. वरून दोन वस्तु जरी सारख्या दिसल्या तरी त्यांची योग्यता त्यावरून सारखीच असते असें नाहीं.—तुगा ३४७५.

कैची——कैचींत धरणें—पेंचांत धरणें; अडचणींत गांठणें; कचाट्यांत पकडणें.

कैफियत——कैफियत द्यावयास येणें, पण कबुली जबाब देऊन जाणें--प्रथम तक्रार करावयाच्या बुद्धीनें यावयाचें, पण शेवटीं प्रतिपक्षाच्या सर्व गोष्टींस मान्यता द्यावयाची, अशा भोळ्या व्यवहारास म्हणतात—न. चिं. केळकर.

कैमुतिक——कैमुतिकन्याय--[सं. किम् + उत = कितीतरी अधिक] जो मोठी गोष्ट, कृत्य करतो तो लहान करीलच करील. उदा०—तो पैलवानाला पाडतो तर तुला रोग्याला चुटकीसारखा पाडील. कुऱ्हाडीनें लांकूड तुटतें तर गवत सहज तोडतां येईल.

कैलास——कैलास येणें--मिळणें-उतरणें--प्राप्त होणें--कांहींतरी मोठा लाभ होणें.

कैलासवासी--परलोकवासी; मृत (विशेषतः मृत माणूस शिवभक्त असल्यास योजतात.)

कैलासाला डोकें लागणें-- अस्मान ठेंगणें होणें.

※कैलास कंटाळे तो गाणें, कान फोटस्तुर लेणें—एखाद्या मनुष्याला एखाद्या गोष्टीचा अतिशय सोस असतो, अशा मनुष्यास अनुलक्षून योजतात. पुढें पहा.

कैलास विटपर्यंत कथा करप; कैलास विटसर कथा कर नये--(गो.) कैलासाला देखील कंटाळा येईपर्यंत कथा करणें, गाणें. कोणतीहि गोष्ट फार ताणण्यांत अर्थ नाहीं.

कैवल्य——कैवल्यपद प्राप्त होणें-मिळणें-येणें--अलभ्य लाभ होणें; अत्युत्तम गोष्टीची प्राप्ति होणें.

कैवल्य वाटणें—(व.) कौतुक वाटणें.

कोंकण——बैल कोंकणांत जाणें—कोंकणांत गेल्यावर देशासारखें पौष्टिक खाणें न मिळाल्यामुळें मनुष्य दुर्बल होतो. १ शक्तिहीन होणें; निर्बल होणें; दुबळें होणें. २ वयपरत्वें दुर्बल होणें; क्षीण होणें. ३ नपुंसक होणें; वीर्यहीन होणें.

माझे हात का कोंकणांत गेले ?—मी काय मारावयास असमर्थ आहे ? पाठभेद—माझे हात काय केळीं खावयास गेले आहेत काय ?

※ कोंकणांत नारळ फुकट मिळतात (परंतु खर्च फार)—एखादी वस्तु जेथें पिकते तेथें ती स्वस्त मिळाली म्हणून तशी सर्वत्र मिळते असें नाहीं व ती मिळविण्यास बाहेरच्या मनुष्यास जो त्रास पडतो तो किंमतीपेक्षांहि अधिक असतो. तु०—लंकेंत सोन्याच्या विटा. एका मनुष्यास नारळ पाहिजे होता म्हणून तो बाजारांत गेला. तेथें दुकानदारास किंमत विचारतां त्यानें चार पैसे सांगितले. तेव्हां त्यानें तीन पैशास नाहीं का देत म्हणून विचारलें. तेव्हां वाण्यानें सांगितलें कीं पुढच्या गांवास तीन पैशास मिळतात. तेथें गेल्यावर त्यानें दोन पैशांस नारळ मागितला. तेव्हां तेथील वाण्यानें आणखी पुढील

गांवास दोन पैशास मिळतात असें सांगितलें. तेव्हां त्या गांवास गेल्यावर त्यानें एक पैशास मागतांच त्या वाण्यानें आणखी पुढें जावयास सांगितलें. तेथें गेल्यावर त्यानें नारळ फुकट कोठें मिळतात असें विचारतांच, वाण्यानें कोंकणांत मिळतात असें सांगितलें. त्याप्रमाणें तो कोंकणांत गेला. तेथें नारळांच्या बागा होत्या. तेथें एकानें त्यास झाडावर चढून नारळ काढून नेण्यास सांगितलें. तेव्हां तो झाडावर चढून जों नारळ तोडावयास जातो तों त्याचे झाडाचे पाय सुटले व तो नारळ हातांत धरून लटकत राहिला व अखेरीस खालीं असलेल्या विहिरींत पडला!

कोंकणांत मीठ आणि देशावर मिरच्या—कोंकणांत मीठ स्वस्त मिळतें तर देशावर मिरच्या स्वस्त मिळतात जेथील वस्तु तेथें स्वस्त असतात.

कोंकणांतल्या मिरच्या घाटावर विकणें आणि घाटावरचें मीठ कोंकणांत विकणें—मिरच्या घाटावरून कोंकणांत जातात व मीठ कोंकणांतून घाटावर येतें. याच्या उलट करणें म्हणजे भलत्याच गोष्टींत इकडचें तिकडे करणें; फुकट येरझारा घालणें; व्यर्थ हेलपाटे घालणें. तु०–To carry coals to Newcastle.

कोंकणांतून देशावर गेला तरी पळसाळा पानें तीनच—पळशाळा वाटलें कीं आपल्या देठास तीनच पानें आहेत तीं अधिक व्हावींत. तेव्हां देश हा सुपीक आहे तेव्हां तिकडे गेल्यास आपल्या देठास अधिक पानें येतील असें वाटून तो कोंकणांतून देशावर आला; पण त्यानें पाहिलें तों त्याच्या देठास तीनच पानें येऊं लागलीं, चवथें कांहीं येईना. म्हणजे कोठेंहि जा, एकच तऱ्हा. तु०–पळस गेला घाटा तीनच पानें देठा.

कोंकणी देव मोठे कडक आहेत—कोंकणांतील देवस्थानें मोठीं जागृत व जाज्वल्य असतात अशी समजूत आहे. तसेंच कोंकणस्थ लोक रागीट असतात अशीहि समजूत आहे; तीस अनुलक्षून ही म्हण पडली आहे.

कोंकणी भूत, चावल कूट—कोंकणांतील लोकांचे नेसूं कपडे तोटके असतात म्हणून ते भुतासारखे दिसतात व केवळ भात खाऊन राहातात. कोंकण्यांना हिणविण्यासाठीं म्हणतात.

कोंकणी रेड्याला भक्कम दांडकें पाहिजे—कोंकणांत शेतीच्या कामाला रेडे वापरतात व ते मस्त असल्यामुळें त्यांस मारावयास बारीकसारीक काठी घेतली तर ती मोडून जाते. तेव्हां चांगलें जाड दांडकें घ्यावें लागतें. कोंकणस्थाशीं वागावयाचें म्हणजे चांगली तयारी केली पाहिजे; तरच ते वठणीवर यावयाचे.

कोंकणे आणि भातभोंकणे–बोकणे; कोंकण्ये आणि भातभोंकण्ये–मागें पहा. कोंकणस्थ लोक नुसता भात खातात.

कोंकणे घाइलेक कानडो घोवु—(गो.) कोंकण्या नवरीला कानडी नवरा. विजोड दांपत्य. 'कानडीनें केला मराठा भ्रतार' पहा.

कोंकणो व्हावुनु मेलो, शेणइ खावुनु मेलो—(गो.) कुळवाडी ओझीं वाहून, मजुरी करकरून मेला व शेणवी माणूस खाऊन खाऊन मेला. दोघांचे विशेष सांगितले आहेत. दोघांचा शेवट एकच.

कोंकण्यांल्या भटापाइट—(गो.) [कोंकणे=ख्रिस्तीतर] हिंदूंतील भटापेक्षां वाईट. ही ख्रिस्ती म्हण आहे.

कोंकणस्थ——**कोंकणस्थ, भात (भो)बोकणस्थ**—वर पहा. कोंकणस्थ लोक कोंकणांत केवळ भात खाऊन राहतात. पोळी, भाकरी वगैरे कांहीं खात नाहींत. व त्यांस भात अवश्य लागतो. या गोष्टीस अनुलक्षून ही म्हण वापरतात. तु०–देशस्थ दांडगा भाकरीवर सांडगा.

कोकणें——**कोकून घाल्यार ओकून पडतो**—न पचेसें खाल्लें तर ओकून पडतें; यावरून आपल्या सामर्थ्याबाहेर एखादी गोष्ट करूं लागलें तर ती साधत नाहीं. जी गोष्ट स्वभावतः आपणास जमणार नाहीं ती गोष्ट करावयाची शिकविली तरी वेळेवर लक्ष्यांत न राहून साधत नाहीं.

कोकंब——**कोकंब पिकणें–लाल होणें**—रागावल्यामुळें अगर उन्हांतून आल्यामुळें गाल लाल होणें.

कोका——**कोक्यानें म्होवु काळ्यारि आयदान भरतवे ?**—(गो.) आंकडीनें मध काढला तर भांडें भरतें का? योग्य साधनच पाहिजे.

को कालः——**को कालो फलदायकः ।**—[कःकालः फलदायकः] कोणतीहि गोष्ट केव्हांतरी उपयोगी पडतेच. प्रत्येकाला केव्हांतरी महत्त्व असतें.

कोको——**कोको नाका भोम्भो नाका, माळ्यावेलो दवरयल्यारि पुरो**—(गो.) जेवण नको, खायला नको, माडीवरून खालीं उतरवलें कीं पुरें.

कोक्या ना ठाव पेम्यांक खंच्चो रडुलो ?—(गो.) डाळभात मिळायची मुष्कील, तिथें मासळीसाठीं रडून काय उपयोग!

कोगूळ——कोगिले हिंडातु कायाळे—(गो.) कोकिळांच्या समूहांत कावळा. चांगल्यांत वाईट.

कोट——कोटस्य कीटायते; कोटश्च कीटाय—कोठल्या झाडाचा पाला, या अर्थी. रे रे वानर को भवानहमरे त्वत्सूनुहन्ताहवे, दूतोहं खरखण्डनस्य जगतां कोदंड दीक्षागुरोः । मद्दोर्दण्डकठोरताडनविधौ को वा त्रिकूटाचलः, को मेरुः क्वच रावणस्य गणना कोटिस्तु कीटायते ॥

कोटगा—**कोटग्यांतु निद्दल्याक कामधेनु सोपनवे ?**—(गो.) कोनाड्यांत निजणाऱ्याला (झोंपणाऱ्याला) कामधेनू सांपडेल काय ? प्रयत्नांतीं परमेश्वर.

कोटि-टी—**कोटी उभविणें**—ध्वज उभारणें; पराक्रम करणें; झेंडा फडकविणें. 'तरी यशाची उभऊनि कोटी।'—नव १९.१७७.

कोटिध्वज उभारणें-लावणें—कोट्याधीश होणें.

कोटिक्रम—**कोटिक्रम लढविणें**--१ बोलण्यांत शब्दांवर कोटी करून प्रतिपक्षाचा पराभव करणें. २ उपाय शोधून काढणें; तोड काढणें; युक्ति योजणें. ३ कोटी करणें.

कोठला—**कोठल्या झाडाचा पाला**—कःपदार्थ; क्षुल्लक वस्तु, व्यक्ति इ.

❀ **कोठल्या कोठें तिसऱ्या घरीं, कमळी आकांत करी**—(व.) आईबापांचे आणि नवऱ्याचे या दोन घरीं मुलीचा संबंध पोंचतो. पण तिसऱ्या घरीं जाऊन तिनें आक्रोश चालविणें कांहीं कामाचें नाहीं. तिसऱ्या घरीं तिला सहानुभूति मिळणें नाहीं. 'तिचा आमचा फार दूरचा संबंध आहे; शिवाय आम्ही इतक्या दूर अंतरावर येऊन राहिलों तरी ती आम्हांला येथेंहि तोषीस देते. वास्तविक कांहीं सबंध नाहीं. कोठल्या कोठें तिसऱ्या घरीं कमळी आकांत करी.'

कोठल्या कोठें न् तुळजापुरा जातें—(व.) तुळजापूर अगदीं एकीकडे कितीतरी दूर पडलें, त्या गांवाशीं संबंध तरी काय ? दूरचा सुद्धां नात्याचा अगर कसलाहि संबंध या व्यक्तीशीं नाहीं असें दर्शवायचें असल्यास ही म्हण योजतात.

कोठी——कोठी थट्टी पागा, पोट भरण्याच्या जागा--[थट्टी=गोशाळा] कोठी, थट्टी आणि पागा यांवर जे अधिकारी असतात त्यांस स्वतःचा तळीराम गार करण्याची व गबर होण्याची फार छान संधि असते. या ठिकाणीं आडमार्गानें बराच पैसा मिळतो.

कोठें——कोठच्या कोठें—भलतीकडेच कोठेंतरी; कुठल्याकुठें.

कोठें कोठें; कोठें मोठें—कांहीं कांहीं ठिकाणीं.

❀ **कोठें इंद्राचा ऐरावत, कोठें शामभटाची तट्टाणी**—एक अतिशय थोर व दुसरा अतिशय क्षुद्र, यांमध्यें विरोध दाखविण्यासाठीं योजतात. अशा परस्परविरुद्ध गोष्टींची बरोबरी किंवा तुलना होणें शक्य नाहीं. तु०—कहां भोज राजा कहां गंग तेली.

कोठें काई कोठें काई, म्हातारीला न्हाण येई—(बायकी) १ धांदलींत कांहीं तरी विचित्र प्रकार घडणें. २ नगाऱ्याची घाई तेथें टिमकीचे काई अशा अर्थानेंहि वापरतात.

कोठें कांहीं कोठें कांहीं, एक अहे एक नाहीं—कोठेंहि पाहिलें तरी अगदीं सर्व गोष्टी पूर्णांशानें अनुकूल अशा आढळणें शक्य नाहीं. एखाद्या तरी बाबतींत व्यंग वगैरे उणाअधिक प्रकार आढळतोच.

कोठें जातो अडका, तर तोडायला आप्तसखा; कोठें जातोस अडक्या ? तर मित्र तोडायला !—आपल्या आप्तस्वकीयास अगर मित्रास पैसे उसने दिले म्हणजे वितुष्ट येण्याचा संभव असतो. तु०—Neither a borrower nor a lender be, for loan oft loseth both itself and friend.

कोठें जाशी भोगा (दैवा), तर तुजपुढें उभा—पाठभेद—कोठें जातोस भोगा तर तुझ्यापुढें उभा. कुठें पहा.

कोठें राजा, कोठें पोतराजा—[पोतराजा = कडकलक्ष्मी] राजाची व भिकाऱ्याची तुलना होऊं शकत नाहीं. तु०—कोठें इंद्राचा ऐरावत व कोठें शामभटाची तट्टाणी.

कोठें श्यामकर्ण वारू आणि कोठें शामभटाची तट्टाणी—'कोठें इंद्राचा ऐरावत०' पहा. —पामो १३३.

कोठें होईल ईश्वरकृपा, तें सांगवत नाहीं बापा—परमेश्वर केव्हां, कोणावर व कशी कृपा करील तें कांहीं सांगतां येत नाहीं. परमेश्वराची लीला अगाध आहे व तो सर्व जगास कृपाळूपणें वागवीत असतो. आपणांस मात्र सर्व गोष्टी जाणतां येत नाहींत.

कोठेंहि गेलें तरी पळसाला पानें तीन—कोंकण पहा.

कोठेंहि गेलें तरी मृत्यु चुकत नाहीं—प्रत्येक जात-

मात्र मनुष्याला मृत्यु हा लागलेलाच आहे, तो कांहीं कोणाला चुकत नाहीं.

कोड——कोड पुरविणें—कौतुक करणें; कौतुकानें हौस पुरविणें.

कोंड——कोंड पडणें—संकट येणें; कोंडलें जाणें; अडचणींत सांपडणें.

कोडंग——कोडंगि संगति बाइलवेसानें नांचचें—(गो.) विदुषकाबरोबर स्त्रीवेषानें नृत्य करणें.

कोडगा——कोडग्या कोडग्या लाज नाहीं, कालचें बोलणें आज नाहीं; कोडग्या कोडग्या लाज नाहीं, आजचें बोलणें उद्यां नाहीं—कोडग्या मनुष्याला कितीहि बोललें तरी तो पक्का निगरगट्ट असल्यामुळें त्याला त्याची कांहीं पर्वा वाटत नाहीं.

लतकोडग्याची बलाय दूर, खाता पायपोस जादा नूर—[बलाय = पीडा. नूर = तेज] कोडग्या मनुष्याची पीडा नेहमीं दूरच असते, त्याला कधीं बोललें तरी त्याची मुळींच खंत वाटत नाहीं; एवढेंच नव्हे तर त्यास कोणीं जोडयानें मारलें तरी तो आणखी वर तोंड करून अधिकच निलाजरेपणाचें प्रदर्शन केल्याशिवाय राहात नाहीं.

कोडग्याला दुःख नाहीं, कृपणाला सुख नाहीं—कोडग्या मनुष्याच्या मनाला कोणत्याहि गोष्टीपासून कधीं टोंचणी लागत नसल्यामुळें, त्याला कधीं वाईट वाटत नाहीं व दुःख होत नाहीं. त्याप्रमाणें कृपण मनुष्याला नेहमीं आपला पैका खर्च होईल ही धास्ती असल्यामुळें त्याला आपल्या पैशापासून कधीं सुखाचा उपभोग घेतां येत नाहीं.

कोंडणें——कोंडलेली हवा आणि अडविलेलें पाणी (जशीं नासतात)—हवा जर खेळली नाहीं तर बिघडते, त्याचप्रमाणें सांचविलेलें पाणी कांहीं दिवसांनीं नासून जातें. —टिसू २२५.

कोडत——कोडत आणि सोडत एकच—कोर्टांत जाऊन नेहमीं न्याय मिळतो असें नाहीं. कोर्टांत जाऊन कज्जा लढणें आणि सोडतींत पैसे घालणें सारखेंच आहे.

कोंडा——कोंडा कांडणें—कोंडा कितीहि कांडला तरी त्यांतून धान्य थोडेंच बाहेर पडणार आहे. निष्फळ खटपट; काथ्याकूट. 'कां कोंडा कांडितां सुभटा। कण जोडे॥' —ज्ञानदेवी (अध्याय ९).

कोंड्याचा मांडा करणें—१ साध्या गोष्टींच्या साधनानें साहाय्यानेंहि चांगल्या गोष्टी करणें. २ समाधानी असणें; जें जवळ असेल त्यांतच आनंद मानून राहणें.

❀ कोंडयाचा मांडा करून खावा—जें मिळेल त्यांत समाधान मानून घ्यावें.

कोडी——कोडयाची कोडी होईल न होईल, पांच डाग तरी घेऊन उठेल—कुष्ठी मनुष्याशीं संग केला तर सर्व अंग जरी कुष्टानें भरलें नाहीं तरी निदान पांच डाग तरी अंगावर उठण्याचा संभव आहे. दुष्ट मनुष्याशीं संगती धरल्यास दुष्टपणा अंगीं थोडा तरी येणारच. कोळसा हातांत धरल्यास काळें लागल्याशिवाय राहात नाहीं.

कोंडी——कोंडी फोडणें—वाट मोकळी करणें; प्रवेश, सुरुवात करून देणें.

कोडें——कोडें उलगडणें—कूट प्रश्न सोडविणें; शंकानिरसन करणें. 'तुम्हांस कोडें हें उलगडलें तर बरेंच काम झालें.' —टि ४.५७.—दौलत २५.

कोण——कोण जाणे—कोणास ठाऊक; आपणास न कळे बुवा! कोणाला माहीत असलें तरी आपणास माहीत नाहीं.

कोण पदार्थ—यःकश्चित्; क्षुद्र; अतिशय कमी महत्त्वाचा. 'कोण पदार्थ स्त्रियांच्या जातीं, अपवित्रा दुष्टिणी। पति असतां व्यभिचारिणी।' —पला ४३.

कोणाचा कोण—बळेनें संबंध जोडलेला; फार दूरचा; फारसा संबंध नसलेला. म्ह०—'कोणाचा कोण, पितळेचा होन.

कोण्या झाडाचा पाला—काय महत्त्व, दर्जा! अगदीं क्षुल्लक वस्तु. 'सुभेदार! हंः सुभेदार म्हणजे कोण्या झाडाचा पाला! तें आम्ही ओळखीत नाहीं असें जाऊन सांग जा. —नाट्यकथार्णव.

❀ कोण कोठून मी आलों, कोठें जाया निघालों, आतां करितों काय, विचार निरंतर करीत जाय—मनुष्यानें नेहमीं आपण आलों कोठून, जायचें कोठें व करतों काय याचा विचार करीत असलें पाहिजे. म्हणजे आपलें कूळ, आपलें ध्येय व आपलें कार्य यांचेकडे ध्यान सतत ठेवलें पाहिजे; तु०—कस्त्वं इ. चर्पटपंजरीचा श्लोक.

कोण कोणाचा गुरु, कोणकोणाचा चेला—जो तो स्वतंत्र आहे, कोणी कोणापासून शिकलेला नाहीं किंवा कोणीं कोणाला शिकविलें नाहीं.

कोण चाललें पुढें, तर कितक्याचें घोडें—विनाकारण चौकशी; ज्यांत आपला कांहीं संबंध नाहीं अशा गोष्टींत पडणें; एका प्रश्नास भलतेंच उत्तर देणें.—संक ३.१.४२.

कोण जाणे खरें खोटें, जग चाले उफराटें—सर्व जग खऱ्याखोट्याची चवकशी न करतां व त्याची पारख न करतां, आडमार्गानें आपलें गतानुगतिकाप्रमाणें चाललेलें असतें.

कोण तर म्हणे कोपरा—कांहीं तरी कोटीबाज पण असंबद्ध उत्तर. कोण नव्हे कोपरा; कोण नव्हे केळीचा द्रोण; कोण तर तुम्ही विचारणार कोण ? इ. (विदूषकी कोटया)

कोण दिवस येईल कैसा, नाहीं देहाचा भरंवसा—मनुष्याचा देह हा क्षणभंगुर आहे, कोणत्या वेळीं त्याचें काय होईल याचा बिलकुल नियम नाहीं. याकरितां मनुष्यानें नेहमीं जपून चालावें. तु० गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत्।

कोण पादलो ? फटेकार पादलो— (गो.) कोण पादला तर म्हणे कांबळीवाला (गरीब मनुष्य) पादला. कोणतीहि वाईट गोष्ट झाली म्हणजे ती गरीबावर लादावी.

कोण भितो कर्जाला, कर गे रांडे पुरणपोळ्या—एकदां मनुष्य ऋणकरी होऊन जगाची पर्वा करीत नाहींसा झाला म्हणजे तो खर्चाला मागेंपुढें पाहात नाहीं; खुशाल चैन करतो व त्याकरितां कर्ज वाढलें तरी त्याची त्याला फिकीर नसते. तु०—ऐशीं तैशीं पंचायशीं करगे रांडे पुरणपोळ्या ! यावज्जीवं सुखं जीवेत् ऋणं कृत्वा घृतं पिबेत । भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुत: ॥—चार्वाक.

कोणा एकांतीं छेडणें, पोटीं राग न ठेवणें—एखाद्या मनुष्याची जर कानउघाडणी करावयाची असेल, तर ती चारचौघांसमक्ष न करतां त्याला एकीकडे भेटून करावी व कोणत्याहि गोष्टीबद्दल मनांत राग न बाळगतां, त्या गोष्टीचा याप्रमाणें एकांतीं चर्चा करून निकाल लावावा. म्हणजे परस्पर गैरसमज वाढत नाहीं, दुसऱ्याचें मन दुखावत नाहीं.

कॉणा खीं खाडा उजॉ पेटिल्लॉ आनि ताका म्हणटलॉ खीं कोण—' आगा,आगा, माच्छि विडि पेटैता'—(गो.) एकाची दाढी पेटते आणि दुसरा म्हणतो, 'थांब जरा, विझवूं नको. आधीं माझी विडी तेवढी पेटवून घेतों.'

कॉणा गेल्या पोरसांत नाशिल्लें जालें—(गो.) कोणाच्याहि परसूंपरड्यांत नसलेलें उगवलें.एखादी अश्रुतपूर्व आणि आश्चर्यकारक गोष्ट घडून येणें.

कॉणा भिना पण थपथण्या मात् भिवा—(गो.) कोणालाहि भीत नाहीं पण झाडावरून पडणाऱ्या थेंबांना मात्र भितो. वदतो व्याघाताचाच हा एक प्रकार.

कोणाक कोणना, उंचारी वतल्याक सांगातु ना—(गो.) कोणाचें कोणी नाहीं, वर जाणाऱ्याला सोबत नाहीं.

कोणाचा आब जाऊं देऊं नये—कोणाचें स्वरूप उघडें करून दाखवूं नये. कोणाचेंहि व्यंग बाहेर काढूं नये; दुसऱ्याची अप्रतिष्ठा करूं नये.

कोणाचा कोण आणि पितळेचा होन—ज्याचा कांहीं अर्थाअर्थीं संबंध नाहीं व जो अगदीं कुचकामाचा मनुष्य आहे, अशासंबंधीं म्हणतात. होन हा सोन्याचा असतो तेव्हां पितळेच्या होनाला कांहीं किंमत नसते.

कोणाचा कोण, पितळेचा होन, सांपडला तर शोधतो कोण ?—(सांपडला याऐवजीं सांडला शब्द असावा.) ज्याचा कांहीं अर्थाअर्थीं संबंध नाहीं अशा क्षुल्लक मनुष्याबद्दल चवकशी कोण करतो ? कारण पितळेचा होन सांपडला तर त्याची किंमत अगदीं अल्प असल्यामुळें तो कोणाचा असेल याबद्दल कोणी चौकशी करीत नाहीं किंवा सांडला तरी त्याबद्दल कोणी फिकीर करीत नाहीं.

कोणाचा तिरस्कार करूं नये, कोणाची निंदा करूं नये—कोणाचा तिरस्कार अथवा निंदा केल्यास तो आपला विनाकारण शत्रु होतो.

कोणाचा पायपोस—मोचा कोणाच्या पायांत नाहीं—फार गर्दी असली म्हणजे जोडे वगैरेचा ढीग पडतो व कोणी कोणाचा तरी पायपोस घालतो. यावरून अव्यवस्था, गोंधळ.

कोणाचा हिरा, न माहा काठोटयाच बरा—(व.) परक्याचा मुलगा मोठा, म्हणजे हिऱ्यासारखा बहुमोल गुणांनीं युक्त असला तरी त्याच्यापासून मला काय फायदा ? माझा स्वतःचा काठोटया म्हणजे ठोंब्या जरी मुलगा असला तरी तोच मला प्रिय वाटतो. दुसऱ्याच्या गुणवंत वस्तूपेक्षां आपल्या स्वतःची रद्दी वस्तूहि आपणास जास्त प्रिय वाटते असा भाव.

कोणाची मुलगी आणि कोण करतो सलगी—भलत्याच्या मुलीशीं घसट ठेवणें अनीतिकारक आहे.

कोणाचें काढूं नये ऋण आणि कोणाची होऊं नये सून—देणेकऱ्याला व सासुरवाशिणीला अपमानाचे फार प्रसंग येतात व हालहि सोसावे लागतात.

कोणाचे कोण, तुम्हास कां उठाठेव—ज्या गोष्टीशीं आपला अर्थाअर्थीं संबंध नाहीं, त्या बाबतींत विनाकारण चौकशा कशाकरितां कराव्या !

कोणाचे कोणी मरतात, भटांचीं श्राद्धें वाढतात—प्रत्येकाला साधारणपणें आप्त असतातच. तेव्हां कोणी मेला तर त्याचे जे कोणी नातेवाईक असतात ते त्याचें श्राद्ध करतात. तेव्हां वाढत्या मरणांमुळें भटांची चंगळ होते.

कोणाचें घोडें, खासदार उडे—घोडा मालकाचा असतो पण त्याबद्दल खासदार फुशारकी मारतो. स्वतःची योग्यता कांहीं नसतां भलत्याच्याच जिवावर उड्या मारणाऱ्याबद्दल म्हणतात. तु०-पाटलाचा घोडा, महाराला भूषण.

कोणाचें तोंड चालतें, कोणाचा हात चालतो—दुसऱ्याकडून काम करून घेतांना कांहींच्या तोंडाचा पट्टा चालतो म्हणजे ते एकसारखें बोलत असतात, तर कांहीं आपला हात चालवतात; म्हणजे मार देत असतात. मिळून दोघेहि सारखेच त्रासदायक. किंवा कांहीं लोक दुसऱ्यास सांगून हुकूम देऊन काम करून घेतात; कोणी आपल्या हातानेंच काम करतात. किंवा कोणी नुसतेच बोलके असतात तर कोणी कामसू असतात. 'किसका मुह चले, किसिका हाथ चले,' पहा.

कोणाचे दहा, कोणाचे वीस, परंतु बंध्याचे साडेबत्तीस—दुसराकोणी कांहीं बोलला तरी त्यापेक्षां माझें थोडें अधिकच. बढाईखोर मनुष्य; सर्वांचे वर ताण करणारा. तु०-तुम झाडोझाड तो हम् पानोपान.

कोणाचें पागोटें कोणाच्या डोक्यावर नाहीं—गडबड; गोंधळ; अंदाधुंदी; अव्यवस्था.

कोणाचे पोटावर पाय देऊं नये—कोणाचा वृत्तिच्छेद करूं नये; कोणाच्या अन्नाच्या आड येऊं नये; दुसऱ्यास पोटास मिळत असलेलें न मिळून, त्याची अन्नान्न दशा येईल अशी कोणतीहि गोष्ट करूं नये.

कोणाचें वर्म काढूं नये—कोणाचाहि उणेपणा अथवा व्यंग उघडकीस आणून त्याची मानहानि करूं नये; कोणाची गुप्त गोष्ट बाहेर फोडूं नये.

कोणाचेंहि जळो, (बाळ) ओसरी खेळो—कोणाचेंहि का तेल जळेना, पण ओसरीवर मुलांबाळांस खेळावयास मिळालें म्हणजे झालें.

कोणाचे होऊं नये चाकर आणि कोणाची होऊं नये बायको (व्हावें तर प्रसंग येईल तसें वागावें); कोणाची होऊं नये बायको (बाईल) आणि कोणाचे होऊं नये चाकर—या दोघांना परतंत्रपणें वागावें लागतें. प्रथम कोणाची चाकरी पतकरूं नये किंवा लग्न करूं नये. पण एकदां का परतंत्रता स्वीकारल्यावर मग कुरकुर करूं नये; जशी वेळ येईल तसें वागावें.

कोणाच्या एकांत नाहीं व कोणाच्या दोहींत नाहीं—कोणाच्याहि भानगडींत नसणें; नसत्या उठाठेवी करण्यापासून अलिप्त असणें.

कोणाच्या खाडाक पेटलो उजो नी (कोण म्हण्टा मात्ताशि) विडी पेटैता—(गो.) एकाच्या दाढीला आग लागली नी दुसरा कोणी म्हणे माझी तेवढी विडी पेटवूं द्या! दुसऱ्याच्या मोठ्या नुकसानीकडेहि दुर्लक्ष करून स्वतांच्या अल्प फायद्याकडे तेवढें लक्ष्य द्यावयाचें.

कोणाच्या गाईम्हशी आणि कोणाला उठाबशी; कोणाच्या म्हशी नी कोण काढी उठाबशी—'अक्काबाईच्या म्हशी बक्काबाईला उठाबशी' पहा. एखाद्या मनुष्याचा भलत्यालाच उपसर्ग पोंचत असला म्हणजे म्हणतात.

कोणाच्या व्हराडा, कोण सुरडा?-[व्हराड=वऱ्हाड] (गो.) आपला ज्याशीं संबंध नाहीं त्यासाठीं उगाच कष्ट कां घ्या? तु०-कोणाची म्हैस कोणाला ऊठबैस.

कोणाच्या संगतीन् काशी अन् कोणाच्या संगतीन् फांशी—(वांय.) संगतीमुळें माणसाला बरावाईट प्रसंग येतो.

कोणाच्यानेंहि दोन धन्यांची चाकरी करवत नाहीं—दोन धनी असले म्हणजे एकाचें काम करूं लागलें असतां, दुसरा नाराज होतो व कोणासहि संतुष्ट करतां येत नाहीं.

कोणाला कशाचें, बलुत्याला पशाचें—कसा, पसा पहा.

कोणाला कशाचें व बोडकीला केसाचें—कसा पहा. कोणाला कशाचें महत्त्व वाटतें, तर विधवेस केसांचेंच महत्त्व अधिक वाटतें.

कोणाला कशाचें वाण्याला लसणाचें—वरप्रमाणें.

कोणाला झाली सीता, आणि कोणाला पडली चिंता—भलत्यानें भलत्याचीच काळजी करणें.

कोणाला विद्या राजसत्ता, कोणाला नुसती दरिद्रता—सर्व मनुष्यांस सारखे दिवस येत नाहींत. कोणी विद्वान् होतो तर कोणी राजा होतो, तर कोणी अगदीं दरिद्री होतो. जगांत अशी विषमता नेहमीं आढळून येते.

कोणावरहि जो प्रीति न करी, त्यावर कोणी लोभ न धरी—जो मनुष्य स्वतः कोणावर प्रेम करीत नाहीं, त्याबद्दल दुसऱ्या कोणासहि प्रेम वाटत नाहीं.

कोणास काय बोलावें, हें मनन करून ठेवावें—कोणालाहि कांहीं बोलावयाचें म्हणजे प्रथम विचार करून बोलावें

कोणास कोणी हंसूं नये—कोणाचा उपहास करूं नये. मनुष्याचा केव्हां ना केव्हां तरी उणेपणा दृष्टीस पडण्याचा प्रसंग येतो, त्या अर्थी स्वतःवरहि केव्हां तरी ती पाळी येईल ही गोष्ट मनांत बाळगून, दुसऱ्याची अवहेलना करूं नये.

कोणत्या—**कोणत्या झाडाचा पाला**—कःपदार्थ;

क्षुल्लक. कोण पहा. 'नवरा म्हणजे कोणत्या झाडाचा पाला ?' -सुदे ३५. 'कमाल०-बोललों म्हणजे ? रायबा म्हणजे कोणत्या झाडाचा पाला ?'-शिसं ३.४.

कोणत्या तोंडानें-नाकानें—काय धैर्य आहे ? काय तोंड लागलें आहे ? उजळ माथ्यानें; उघडपणें. 'तो या गांवचा देणेंदार आहे तेव्हां तो कोणत्या तोंडानें येथें येईल ?'

❀**कोणतीहि गोष्ट दैवानें द्यावी**—सर्व गोष्टी दैवाधीन आहेत हें लक्षांत आणून प्रारब्धावर हवाला ठेवून असावें. (पण प्रयत्न केल्याशिवाय राहूं नये.)

कोणतीहि चोरी करी, तरी पाप बसे शिरीं—कितीहि क्षुल्लक पदार्थाची चोरी केली तरी ती चोरीच होते; मग चोरलेल्या मालाची किंमत कितीहि का कमी असेना.

कोणतेंहि काम वगेनें होतें किंवा रगेनें होतें-(वग= वशिला. रग=जोर; प्रयत्न.) आपल्याजवळ पुरेसा वशिला असला किंवा स्वतःच्या अंगांत सामर्थ्य असलें तर आपलें कोणतेंहि काम होतें. काम पहा.

कोणत्याहि कामांत भट पडूं नये—भटाच्यामुळें काम हटकून बिघडतें, असा पेशवाईपासून लोकांचा ग्रह झालेला आहे, त्यास अनुलक्षून म्हण. 'म्हणतात ती गोष्ट खोटी नाहीं कीं, कोणत्याहि कामांत भट पडूं नये.'-आजोच २२.

कोणी—कोणी म्हणतां कोणी देखील—कोणीहि; कोणीसुद्धां; एकसुद्धां नाहीं.

❀ **कोणी अन्नाचा भुकेला, कुणी मानाचा भुकेला**—कुणाला अन्न फार प्रिय असतें; त्यापलीकडे त्यांची दृष्टि जात नाहीं व त्याकरितां ते श्रम करीत असतात; पण कांहीं लोकांस इतर सर्व गोष्टींपेक्षां मान अधिक प्रिय असतो व मान मिळविण्याकरितांच ते सर्व धडपड करीत असतात.

कोणी अमरपट्टा घेऊन आला नाहीं—प्रत्येक मनुष्यास केव्हांतरी मृत्यु यावयाचा असतोच; कोणीहि अमर नसतो. Man is mortal.

कोणी आग व्हावें, कोणी पाणी व्हावें—कांहीं माणसें स्वभावानें अतिशय रागीट असतात. तीं नेहमीं तंटे उत्पन्न करीत असतात, तर कांहीं माणसें स्वभावानें अगदीं शांत असतात व तीं कलह मिटविण्याचा प्रयत्न करीत असतात. तेव्हां संसारांत, संस्थेंत अशा दोन प्रकारचीं माणसें एके ठिकाणीं असल्यास भांडणें माजत नाहींत.

कोणीं आपटला पोर, कोणीं आपटला भोंपळा—अपटणें पहा. भलत्याच गोष्टींत अनुकरण किंवा बरोबरी करणें.

कोणी आपले दोष न छेडी, त्याचें पुन्हां आचरण करी—दुसऱ्यांनीं आपले दोष दाखविले नाहींत तर आपल्या हातून वारंवार त्याच चुका झाल्यावांचून राहात नाहींत.

कोणी कोणाचा गुरु होत नाहीं—ज्याचें त्याला कळतें; कोणी शिकवावें लागत नाहीं.

कोणी कोणाचें नशीब घेत नाहीं—प्रत्येक मनुष्याचें प्रारब्ध त्याच्या स्वाधीन असतें; तें कोणा दुसऱ्यावर अवलंबून नसतें किंवा त्यांत कोणास फरक करतां येत नाहीं.

कोणीं खर्चले वीस, तिचा निघाला कीस; कोणीं खर्चले शंभर, तिची मोडली कंबर—(वांय.) आहाराबाहेर खर्च केल्यानें माणूस मट्ट्यास येतो.

कोणीं घातली सरी, कोणीं घातली दोरी—एकीनें गळ्यांत सोन्याची सरी घातली म्हणून दुसरीनें जवळ सरी नाहीं म्हणून दोरी गळ्यांत घातली तर तिचें हंसूं झाल्याशिवाय कसें राहील ? भलत्याच गोष्टींत व भलत्याच रीतीनें अनुकरण करूं गेल्यास तें हास्यास्पद होतें. तु०-शेजीनें घातली सरी म्हणून हिनें घातली दोरी.

कोणी घालीना भीक तर पंतोजीपणा शीक—शिक्षकाचा धंदा हा भिकाऱ्यापेक्षांहि कमी प्राप्तीचा आहे. पूर्वीं शिक्षक ठराविक वेतन किंवा फी घेत नसत, तर मुलांस शिकविण्याचें काम मात्र करीत. मुलांचे आईबाप पालक त्यांचा योगक्षेम चालवीत. पण अनेक वेळां त्यांच्या सर्व गरजा नियमितपणें भागविल्या जात असें नाहीं व अशा वेळीं त्यास भिकाऱ्याप्रमाणें पाहिजे असेल तें मागूनहि घेतां येत नसे व प्रत्यक्ष तर मिळत नसे, अशी केविलवाणी स्थिति होत असे.

कोणी चाखून रांधीत नसतो—मनुष्य स्वयंपाक करतो तो कांहीं प्रथम प्रत्येक पदार्थाची चव घेऊन नंतर पदार्थ तयार करीत नाहीं. मनुष्य जो कार्य करतो त्याचे सर्व परिणाम त्यास कांहीं अगोदर दिसत नाहींत; तो आपल्या बुद्धीनें शक्य तितकें करीत असतो.

कोणी देतां मोठी आशा, त्याची धरावी निराशा—कोणी फार मोठया गोष्टीची आशा दाखविली म्हणजे बहुधा ती सफल होणार नाहीं अशीच खूणगांठ मनांत बांधावी.

कोणी धनी ना गोसावी—निराधार वस्तु; बेवारसी गोष्ट; निर्नायकी.

कोणी नव्हे (नाहीं) कोणाचे—मनुष्यानें आपल्याला कोणाची मदत होईल अशी फारशी आशा करूं नये. जो

तो स्वतःपुरता असतो. ' नाहीं कुणी कुणाचा सखा । मारतील हाका । '

कोणी नाहीं कुणाचा गुरु, कोणी नाहीं कोणाचा चेला (आणि भलताच धमकावी त्याला)--परस्परांचा कांहीं संबंध नसणारे लोक. जो तो स्वयंसिद्ध आहे.

कोणी निंदा कोणी वंदा, आमुचा स्वहिताचा धंदा--आपण आपल्या मार्गानें सरळ जात असावें व आपल्या इच्छित वस्तूची प्राप्ति करून घेण्याच्या मार्गास लागावें. मग आपल्याबद्दल जग काय बोलतें याची कधीं पर्वा करूं नये. 'कोणी निंदा कोणी वंदा । आम्हां स्वहिताचा धंदा ॥'–तुगा ४२४६. तु०–(अ) वानोत निंदोत सुनीतिवंत । (आ) निंदंतु नीतिनिपुणा यदि वास्तुवन्तु ।–भर्तृहरि नीति.

कोणीं नुकसान केली ती तत्क्षणीं विसरावी--कोणीं आपली हानि केली तरी त्याबद्दल त्या व्यक्तीविषयीं मनांत द्वेष ठेवूं नये. झाली गोष्ट विसरून जाण्याचा प्रयत्न करावा. सूडाची भावना मनांत बाळगूं नये.

कोणी पाण्यांत पाहती, कोणी आरशांत पाहती—कोणी मत्सरी असतात तर कोणी स्वतःच्या ऐटींत असतात. मिळून दोघेहि आपणास निरुपयोगीच.

कोणी मारिती धोंड्यानें, कोणी मारिती डंड्यानें–कोणी दुसऱ्यास कष्ट देतात, कोणी दुसऱ्यावर उपकार करतात. असे भिन्न प्रकृतींचे लोक जगांत असतात. तु०–एक मारी उंडे, एक मारी मांडे.

कोणी लुटतात, कोणी फुटतात (एकच)--१ आपल्या जमावांत कोणी आपली लूटमार करतात तर कोणी त्यांतून फुटून बाहेर पडतात. दोघेहि विघातकच. २ कढईतील लाह्या कांहीं गरंगळत खालीं येतात व कांहीं तींत फुटतात. पण दोघांचेंहि नशीब एकच. तु०–जात्यांतले रडतात, सुपांतले हंसतात.

कोणी वंदा, कोणी निंदा, आम्हां स्वहिताचा धंदा–मागें कोणी निंदा० पहा.

कोणी वंदिती, कोणी निंदिती, त्यांची न धरावी खंती—वर पहा. आपली कोणी निंदा किंवा स्तुति केली तरी त्याची पर्वा करूं नये. आपणास योग्य दिसेल त्याप्रमाणें वागणूक ठेवावी.

कोतवाल——कोतवाली घोडा—लग्नांत शोभेसाठीं म्हणून एका घोड्यावर साज घालून मिरवणुकीच्या अग्रभागीं चालवितात. पूर्वीं हा घोडा कोतवालाकडून भाड्यानें मिळे. यावरून नुसती दिखाऊ, शोभेची वस्तु. नुसती डामडौल करून राहणारी (पण कामाला निरुपयोगी) व्यक्ति, स्त्री.

कोतवाली पिंजरा—कैदखाना; तुरुंग. 'कोणास बेशुद्ध होईपर्यंत मार देण्यांत आला व कोतवाली पिंजऱ्यांत भरती करण्यांत आली. '–विक्षिप्त १.७३.

कोतवालीचा पोषाख—उंची पोषाख; सणावारीं मिरवणुकीसाठीं घालावयाचा पोषाख.

***कोतवाल चावडेरि दरोडो**–(गो.) कोतवाल चावडीवर दरोडा. ज्यानें संरक्षण करावयाचें त्याच्यावरच हल्ला येतो अशी दुर्बलता, अंदाधुंदी.

कोतवालपुत्र निभावून, जातो सर्व अरिष्टांतून—कोतवालाचा मुलगा जरी एखाद्या गुन्ह्यांत सांपडला तरी गुन्ह्याची चौकशी करण्याचें काम त्याच्या बापाच्याच हातीं असल्यामुळें तो त्याला वांचवूं शकतो. ज्याच्या हातांत सत्ता असते त्याच्या आप्तेष्टांस तिचा फायदा झाल्यावांचून राहात नाहीं. सत्ताधिकाऱ्यानें किंवा त्याच्या आश्रितानें कांहींहि केलें तरी त्यास दंड होत नाहीं. इतरांस मात्र दंड होतो.

कोतवाला आधीं चोरा बोंब—(गो.) कांगावखोर मनुष्याबद्दल म्हणतात. तु०–चोराच्या उलट्या बोंबा.

उलटा चोर कोतवालाला दंडी—चोर जबरदस्त असेल, तर त्याला कोतवालाकडून शिक्षा व्हावयाच्या ऐवजीं तोच कोतवालाचा समाचार घेतो. एखादी गोष्ट आपल्या आटोक्याबाहेर जाऊन आपणच तिच्या आहारीं जाऊन आपल्या अंगावर घेतली म्हणजे म्हणतात. उलटा पहा.

कोता——कोता है गरदन, तंग पेशानी, हरामजादेकी यही निशानी--(हिं.) ज्याची मान आंखूड असते व डोकें लहान असतें तो हरामजादा म्हणजे कुकर्मी असतो, असें म्हणतात.–अन्योक्ति कल्पद्रुम ६४८.

कोथिंबीर——कोथिंबीर, आलें, शाकभाजी, जेवणाला रुचि आली ताजी—योग्य मसाला वगैरे मिळाला म्हणजे जेवण रुचकर होतें; त्याप्रमाणें योग्य साधनें मिळालीं म्हणजे काम चांगलें साधतें.

कोदवणें——कोदवाक घाल तर लोंबता काय ?–(गो.) ढुंगणावर पाणी घाल सांगितलें तर विचारतो, लोंबताय काय ! नसती चवकशी. तु०–उष्टीं काढ तर जेवले किती ?

कोन——कोन निघणें-होणें-येणें; कोनीं निघणें–

होणें; (तंजा.) कोन्नीं घेणें-जाणें—बाळंत होणें; प्रसूत होणें. 'मग ते गरोदर होऊनि कोनीं निघाली.'-पंचा ४३. 'ज्या द्विसीं मज जाहला कोनु ।'-उषा २०.

कोनाचा केर जाणें—अत्यंत अल्प असें नुकसान होणें; ज्याचेबद्दल कांहींएक विषाद वाटणार नाहीं अशी थोडीफार झीज लागणें.

कोनांत बसणें--रजस्वला होणें.-मो अश्व १.९३.

कोन्या कोपऱ्याचा—१ सांधी कोंदींतला; २ क्षुद्र; हलका.

❀**कोन निघावयाची घाई आणि शष्पोत्पाटणाची घाई एकच**—(अशिष्ट) बाळंत होण्याच्या वेळींच शष्पें काढण्याची गडबड. महत्त्वाच्या कामाची गडबड चालली असतां जें क्षुल्लक काम आधीं कधींच करून टाकावयाचें त्याची आयत्या वेळीं घाई लावावयाची. मोठ्या कामांत क्षुल्लक कामाची लुडबुड, अडचण.

कोनाडा——कोनाड्यांत शेणाच्या पणत्या ठेवणें व खाका वर करणें—दिवाळखोरी प्रकट करणें. 'जर्मनी कडून दंड वसूली थांबलीच. पण ज्या इतर राष्ट्रांनीं अमेरिकेचीं कर्जें काढलीं होतीं त्यांनीं आपापल्या कोनाड्यांत शेणाच्या पणत्या ठेवून, खाका वर करून आपली दिवाळखोरी प्रकट केली.'-केसरी १६-७-४०.

कोप——कोपास चढणें—रागावणें; क्रुद्ध होणें; अतिशय कोप येणें. 'गांगेय कोपा चढला कसेंरें ।'-भीष्म प्रतिज्ञा १०.

कोपानें तोंड सोडनलो दोळे सोडना—(गो.) रागानें तोंड सोडणारा डोळे सोडत नाहीं. म्हणजे रागानें माणूस अंधळा बनतो; त्याला विचार राहात नाहीं.

कोपर——कोपराढोपरानें करणें--(बायकी) कसें तरी करून, कष्टानें, सायासानें करणें. मारून मुटकून मोठ्या नाखुषीनें किंवा फारच खटपट करून करणें.

कोपराढोपरानें चालणें-जाणें—कसेंबसें काम पुरें पाडणें; अतिशय श्रम, कष्ट सायास करून तडीस नेणें, जाणें; मोठ्या अडचणीनें पार पडणें.

कोपरापासून नमस्कार—१ अति लीनतेनें विनंति करणें; अत्यंत आदर दाखविणें; मान्यता देणें. २ (उप.) संबंध सोडून देणें; संबंध नको असें वाटणें; तिरस्कार दाखविणें. 'असल्या नाटक्यांना कोपरापासून नमस्कार असो!'-विकार० पुढें पहा.

कोपरापासून हात जोडणें—१ अति कळवळ्यानें विनवणें. २ संबंध नको अशी इच्छा करणें.

❀ **मऊ सांपडलें म्हणून कोपरानें खणूं नये; मऊ किंवा नरम लागलें म्हणून कोपरानें खणणें**---एखाद्याच्या औदार्याचा किंवा चांगुलपणाचा फार फायदा घेऊं नये. मनुष्यानें कोणत्याहि गोष्टीचा अति हव्यास धरूं नये.

कोपरा——कोपरा धरणें—१ रुसणें. २ विटाळशी बसणें. कोन पहा.

कोंबडा——दाणे टाकून कोंबडे झुंजविणें--मुद्दाम पदरचे पैसे खर्च करून भांडणतंटे लावणें.

कोंबडी अंड्यावर बसल्यासारखी कुरकुर करणें—कोंबडी अंडीं उबवीत बसली असतां तोंडानें कांहीं शब्द करते. त्याला कांहीं अर्थ नसतो.त्याप्रमाणें कुरकुर चालविणें.

दाणे टाकून कोंबडीं झुंजविणें—दाणा पहा.

कोंबडे रात-रात्र--पहाटे कोंबडा आरवण्याची वेळ; पहाटे चार वाजण्याची वेळ; जवळ जवळ प्रहर रात्र शेष राहण्याची वेळ.

कोंबड्यानें बांग देणें—मशीदींत ज्याप्रमाणें बांग ओरडून सूचना देतात त्याप्रमाणें पहाटे कोंबडा आरवणें. -पामो ३०४.

कोंबड्यापुढें माणिक—ज्याला ज्याची किंमत नाहीं त्याला ती वस्तु देणें, मिळणें.

❀ **कोंबडा आरवला आणि आरंभ झाला कामाला**—पहाटेपासून कामाची गर्दी होणें.रोज सकाळ झाली कीं सर्व लोक कामाला लागतात. सृष्टीचें हें चक्रासारखें चालू आहे.

कोंबडा कोंबडीला दाणा टाकून तमाशा पाहतो--दुसऱ्यांचें भांडण लावून आपण दुरून मजा पाहणारास म्हणतात.

म्हातारीनें, शेजारणीनें, शेजीनें कोंबडा झांकला म्हणून उजाडावयाचें (तांबडें फुटावयाचें) राहात नाहीं; कोंबडा नेला डोंगरा म्हणून का दिवस उगवत नाहीं?--एखाद्या क्षुल्लक मनुष्यानें कितीहि अडथळे आणले तरी मोठीं कार्यें त्याच्यावांचून अडून राहात नाहींत. सृष्टिक्रम हा अबाधित चालू रहावयाचाच. एखाद्या मनुष्याच्या कृतीवर तो अवलंबून नसतो. पुढें पहा

कोंबडीं झुंजविलीं आणि मंडळी गोळा केली—परभारें भांडण लावून तमाशा पहात राहणें.

कोंबडी मेली (गेली), पिलें दाणादाण—कुटुंबांत एखादा आवर करणारा मनुष्य गेला म्हणजे त्याचें कार्य, कुटुंब सर्व विसकटून जातें. आश्रयदाता गेला म्हणजे त्याच्या आश्रयानें राहणारे सर्व लोक एकदम उघडे पडून त्यांची वाताहत होते. मुरगी मरी बचे दाणादाण, पहा.

कोंबडी लावगारली, म्हैस ओवाळली—[लाव=एका जातीचें स्त्री पिशाच] कोंबडीला भुताटकी झाली म्हणून तिच्यावरून म्हैस ओवाळून टाकणें. क्षुल्लक कारणाकरितां मोठी गोष्ट नासून टाकणें; थोड्या लाभाकरितां मोठें नुकसान करून घेणें.

कोंबडीचा खून तिरुका—[तिरुका = १ पैसा] एखाद्या क्षुल्लक चुकीला दंडहि क्षुल्लकच असणार.

कोंबडें झाकलें म्हणून तांबडें फुटायाचें राहात नाहीं—[तांबडें फुटणें = सूर्य उगवणें, उजाडणें.] योग्य वेळीं ती ती गोष्ट व्हावयाचीच, त्याला प्रतिबंध करतांच येत नाहीं. सृष्टिक्रम हा अबाधित चालतो. तो कोणी बदलूं शकत नाहीं. कोंबड्याला ओरडूं दिला नाहीं म्हणून सूर्य थोडाच उगवावयाचा राहणार ! मागें पहा. –संशयकल्लोळ १.५.१९.

कोंबडयाक विचारुं मसांलो वाटतात वे?—(गो.) कोंबड्याला विचारून मसाला कुटतात काय ?

कोंबिआ, कोंबो——कोंबिये गळ्याकडेन पावतरीच उदक जाता--(गो.) कोंबडीच्या घशांत पोंचला कीं दाणा विरघळून जातो. बलिष्ठाशीं संबंध आला कीं सगळे नरम होतात.

कोंबिये पिलाक उस्तुंक शिकौंक नाका--(गो.) कोंबडीच्या पिल्लाला उकीरडा चिवडण्यास शिकवायचें कारण नाहीं, तें आपोआप येतें.

कोंबॉ खाता एक आनी एकल्या धन बडैतात--(गो.) कोंबडा खाल्ला एकानें आणि त्याबद्दल मार बसला दुसऱ्यालाच. चोराला सोडून संन्याश्याला सुळीं देणें या अर्थी.

कोंबो गेलो तारवार, कोंबी जाली गुरवार--(गो.) कोंबडा प्रवासाला गेला व इकडे कोंबडी गर्भार राहिली. छिनालपणाचें, व्यभिचाराचें दर्शक.

कोंब्याच्या बळार कोंबी उट्टा, घोवाच्या बळार बायल उट्टा—(गो.) कोंबड्याच्या बळावर कोंबडी शिरजोर होते त्याप्रमाणें बायको नवऱ्याच्या बळावर तोरा गाजविते.

कोमटी——कोमटिगा गेलो न्यायु--(गो.) कोमट्याच्या घरचा न्याय.

कोमल——कोमल शब्दें हृदय द्रवें, जैसें बर्फ उष्णासवें--जसें बर्फास ऊब लागली म्हणजे त्याचें पाणी होतें तसें मृदु शब्द उच्चारल्यानें मनुष्याच्या मनास पाझर फुटतो.

कोमार——कोमार काडप--[कोमार = कौमार्य; बालपण; तारुण्य.] (गो.कु) हौस उत्पन्न करणें; तारुण्य आणणें; बालपण आणणें. कोणत्याहि गोष्टीस प्रवृत्त करणें; कोणत्याहि गोष्टीबद्दल उत्साह उत्पन्न करणें.

कोमार येणें—(कु.) तारुण्यांत येणें; जोमांत येणें; वयांत येणें.

कोया——कोया कोया करणें-करीत हिंडणें—१ कींव येण्यायोगी याचना, विनवणी करणें; गयावया करणें. २ दरिद्री होऊन भटकणें; दीनावस्थेस पोंचणें; देशोधडीस लागणें.

कोयी——कोयी तोलों कम, कोयी मोलों कम—(हिं.) कांहीं वजनांत कमी, कांहीं किंमतींत कमी मिळून एकच.

कोर——कोर धरणें--कपाळावरील केस चंद्राच्या कोरीप्रमाणें ठेवणें.

कोर——कोर धरणें--द्वेष करणें. 'मानकऱ्यानें कोर धरली।'–ऐपो २८७.

कोरड——कोरड वळणें-वाळणें—१ घसा कोरडा पडणें; घसा सुकणें; घशास कोरड पडणें. २ क्षुधेनें व्याकूळ होणें; भुकेनें म्लान होणें, अत्यंत पीडित होणें.

कोरडा-डी-डें——कोरडी किटाळ उठविणें-घालणें-घेणें--खोटी तोहमत, खोटा आरोप, आळ घेणें.

कोरडी खाकरी देणें-काढणें--नुसतेंच खाकरणें; कोरडी ओकारी येणें, होणें.

कोरडी सवाशीण--जेवावयास न घालतां कोरडा शिधा देण्याकरितां बोलावलेली सवाशीण. ब्राह्मणेतरांकडे ब्राह्मण बाईस बोलाविलें असतां कोरडा शिधा देतात.

कोरडे खाणें—१ हाल करून घेणें; नडणें. २ अडणें; अडून राहणें; खोळंबा होणें. 'मी काय त्याच्यावांचून कोरडें खातों.'

कोरडें-बोलणें भाषण—वरकांती बोलणें; वरवरचें भाषण.

❀ **कोरडी आग पुरवते पण ओली आग पुरवत नाहीं**--१ अग्नीनें नुकसान झालेलें पुरवतें पण जलप्रलयानें झालेलें नुकसान अधिक भयंकर असतें; पाठीवर मारालेलें चालतें पण

उपासमार झालेली सोसवत नाहीं. २[ओली आग=भूक]अग्नीचा दाह सहन करवेल पण भुकेचा दाह सहन करवणार नाहीं.

कोरडी आवा आणि कडकडा चावा--आईच्या अंगावर दूध नसलें म्हणजे मूल नुसतेंच स्तन चावतें त्यामुळे आईला त्रास होतो व मुलाचेंहि समाधान होत नाहीं. निर्धन स्त्री आपल्यापासून कांहीं एक फायदा नाहीं हें सांगतांना म्हणते.

कोरडया अंगीं तिडका--१ गर्भ नसतां प्रसूति वेदना होत आहेत असें भासविणें. २ ढोंग; भोंदूपणा.

कोरडया अंगीं तिडका, बोडक्या डोई लिखा-- गरोदर नसतां खऱ्या वेदना होत नाहींत व डोकीवर केंस नसल्यास लिखाहि होत नाहींत. मुळांत कांहीं नसतां विना कारण अवडंबर माजविणें.

कोरडया टांकाचा हिशोब--जो तपासतांना टांक शाईंत बुडवावा लागत नाहीं असा अगदीं बिनचूक लिहिलेला हिशोब.

कोरडयाबरोबर ओलें पण जळतें--बऱ्याचशा कोरड्या लांकडांबरोबर एखादें ओले लांकूड सहज जळून जातें. तसेंच अनेक अपराध्यांबरोबर एखादा निरपराधीहि शिक्षा पावतो.

कोरडया भिक्षेबरोबर ओली भिक्षा बरी--चुकी असेल तीबद्दल शिक्षा करावी पण पोटाची काळजी घ्यावी. कोणाला उपाशी मरूं देऊं नये. पाठीवर मारावें पण पोटावर मारूं नये.

कोरडा——**कोरडा बसला आणि (पण) संशय फिटला**--एकदां एक भिकारी थंडीच्या दिवसांत एका ठिकाणीं भीक मागण्याकरितां उभा राहिला असतां त्या रस्त्यानें एक गृहस्थ घोड्यावर बसून जात होता. त्यानें यास पाहिल्याबरोबर दया येऊन एकदम त्यास आपल्या अंगावरील शाल दिली. तेव्हां त्या भिकाऱ्यास असें वाटलें कीं, आपण न मागतां जर त्यानें आपणांस एवढें दिलें तर मागितलें असतां आपला घोडाहि देईल व मग आपणांस पायीं चालण्याचे श्रम करावे लागणार नाहींत. तेव्हां त्या मनुष्यास मागावें किंवा नाहीं असा विचार करीत तो थोडा वेळ उभा राहिला, पण शेवटीं मनाचा संशय फेडण्याकरितां म्हणून तो त्याच्या पाठीमागें पळत गेला व दूर अंतरावर असतांच ओरडून हांक मारून त्यानें त्यास उभा केला, तेव्हां तो मनुष्य उभा राहून यास हांक मारण्याचें कारण विचारतांच भिकाऱ्यानें आपणास घोडा पाहिजे म्हणून सांगितलें. तेव्हां त्याच्या आधाशीपणाचा त्यास राग येऊन त्या घोड्यावरील मनुष्यानें त्याच्या पाठीवर एक कोरड्याचा फटकारा ओढला व घोड्यास टांच देऊन तो निघून गेला. इकडे त्या भिकाऱ्याच्या पाठीवर त्या कोरड्याचा चांगला वळ उठला, तेव्हां त्याच्याकडे पाहून तो म्हणाला, कोरडा बसला पण संशय फिटला. यावरून चांगली अद्दल घडली म्हणजे मनांत शंका राहात नाहीं. अनुभवानें शहाणपण येतें. वळ उठला पण संशय फिटला असाहि पाठ आहे.

कोरड्यास——**कोरडयास-ला; कोरडेशास-ला; कोरडयाशास-ला**--कालवण; तोंडीं लावणें.

कोरणें——**दांत कोरून पोट भरणें**--अतिशय कंजूषपणा करणें.

❀ **दांत कोरून पोट भरत नाहीं**--कितीहि काटकसर केली तरी मुळांतच पुंजी थोडी असली तर ती पुरवठ्यास येत नाहीं.

कोरलई——**कोरलईचें बोर नि हेटचें पोर**-- कोरलई येथील बोरें आंबट असतात व खालाटीचीं पोरें लबाड असतात; मिळून दोघेहि खटच असतात.

कोरा-री——**कोरा चेक देणें**--चेकवर रकमेचा आंकडा न घालतां नुसती सही करून दिल्यावर चेक घेणाराला वाटेल तो आंकडा घालण्याची मुभा असते. यावरून न विचारतां वाटेल तें केलें, ठरविलें तरी परवानगी असणें. 'आम्ही मुसलमानांना कोरा चेक देऊन ऐक्य करूं व मग आम्ही इंग्रजांना घालवून देऊं.' —के १४-९-३७.

कोरी सवाशीण—(हबसाणी) विवाहित परंतु ऋतु प्राप्त न झालेली सुवासिनी. याच्याविरुद्ध ओली सवाशीण पहा. —मसाप १.११.

❀ **कोरा कागद काळी शाई, हे करती कमाई**--विद्या असली म्हणजे इतर भांडवल नसतांहि द्रव्यप्राप्ति होते.

कोरी घागर सदा रिकामीं--कोऱ्या घागरींतून पाणी पाझरून जातें व त्यामुळें कितीहि पाणी भरलें तरी तींत राहात नाहीं. यावरून नवशिक्या मनुष्यास कांहीं सांगितलें तरी त्याच्या लक्षांत राहात नाहीं.

कोरोचें——**कोरोंचें तें कोरोंचें, नों तें नों**--(गो.) कर म्हटलें तें करायचें आणि नको म्हटलें असेल त्याच्या वाटेला जायचें नाहीं. सांगकाम्या माणसाला उद्देशून वापरतात.

कोलणें——कोलून मारणें--१ लाथेनें झुगारून देणें, उडवून देणें; उचकणें; कशानें तरी उचलून फेंकणें. २ एका अंगावरून दुसऱ्या अंगावर वळविणें; पलटी देणें; उलटविणें.

कोलीत, कोलती——कोलती (कोलीत) लावणें--१ आग लावणें. २ कलागत लावणें; भांडण लावणें. 'लावूनि कोलित ! माझा करितील घात । '–तुगा १००७.

❀**पिशाचाच्या हातीं कोलीत**--भूत हें आधींच पीडाकारक असतें. त्यांत त्याच्या हातांत पेटतें लांकूड दिल्यास तें सर्वत्र आग लावल्याशिवाय राहणार नाहीं. यावरून भयंकर व क्रूर मनुष्याच्या हातीं सत्ता आली असतां तो अनर्थ केल्याशिवाय राहात नाहीं. तु०-आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला.

कोलती मोल काल कांत कलता--(गो.) पेटलेल्या लांकडाची किंमत काळोखांत समजते. सावलीचें महत्त्व ऊन्हांतून आल्यावर कळतें.

कोला-लो——कोलो शिंकप--(गो.) कोल्हा शिंकणें. कोल्ह्याची शिंक अशुभ मानतात. एखादें काम करण्यासाठीं जोरानें पुढें सरसावलेल्या आळशी माणसानें यःकश्चित् अडथळ्याला घाऊ करून कच खाणें. अशा प्रसंगीं 'त्याच्या कामांत कोल्हा शिंकला' असें म्हणतात.

कोल्या तोंड पळवुंचें--(गो.) कोल्ह्याचें तोंड पाहणें. शुभ शकुन. कोल्हा पहा.

कोल्या बुद--(गो.) कोल्ह्याची बुद्धि, शहाणपण, चातुर्य. कोल्हा फार बुद्धिमान, शहाणा असतो.

❀ **कोलो उशेलांत पडलो (गो.)**--उंसाच्या मळ्यांत कोल्हा पडला. इष्टापत्ति; घबाड मिळणें.

कोलो म्हळ्यार फाटल्यान लागता—(गो.) कोल्हा म्हटलें तर पाठीमागें लागतो. एखाद्या धूर्त माणसाची आपण प्रशंसा करावी आणि त्यानें धूर्ततेचे व लुचेगिरीचे प्रयोग आपल्यावरच करायला सुरवात करावी, म्हणजे असें वाटतें कीं कुठून याची प्रशंसा करायची दुर्बुद्धि झाली आपणाला !

कोल्याक शिदाव फारीग करचो लागना--(गो.) कोल्ह्याला कर भरावा लागत नाहीं.

कोल्हा-ल्हें——कोल्हा कोल्हीचें लग्न--ऊन आणि पाऊस एकदम पडला असतांना म्हणतात.

कोल्हें टेंकणीस येणें--१ कोल्ह्याची शक्ति क्षीण झाली असतां तें असें बसतें. यावरून अशक्त होणें. २ सूर्य मावळण्यास येणें; सायंकाळ होणें. कोल्हा मागल्या पायावर बसला असतां जमिनीपासून जितक्या उंचीवर असतो तितक्या उंचीवर क्षितिजापासून सूर्य असला म्हणजे म्हणतात.

कोल्हें टेंकण्यास बसणें--कोल्ह्याप्रमाणें दबकून बसणें; पुढचे पाय उभे करून मागें ढुंगण टेकून बसणें.

कोल्ह्याचें तोंड बघणें; नागवें कोल्हें भेटणें—शुभ शकून घडणें; अकल्पित मोठा लाभ होणें.

कोल्ह्याचें शिंग--सशाच्या शिंगाप्रमाणें अप्राप्य वस्तु; वाळूचें तेल; दुर्भिळ वस्तु; अशक्य गोष्ट.

❀ **कोल्हा आणि बुद्धीला भला**--कोल्हा फार हुषार असतो. त्यानें सिंह, वाघ इ. मोठ्या प्राण्यांनाहि फसविल्याच्या गोष्टी आहेत. 'मीच कोलो बुद्धीन् भोळो' अशी एक गोष्ट आहे.–लोककथा.

कोल्हा काकडीस राजी--क्षुद्र माणूस क्षुद्र मोबदल्यानें संतुष्ट होतो. एकदां एक कोल्हा एका मळ्यांत गेला. तेथें त्यानें द्राक्षें वगैरे अनेक फळें पाहिलीं पण तीं सर्व मांडवावर उंच असल्यामुळें त्याच्या आटोक्यांत नव्हतीं; तेव्हां त्यांची त्यास आशा सोडून द्यावी लागली. अखेरीस एका वेलावर एक काकडी होती व ती जड असल्यामुळें जमीनीवर आडवी पडली होती. तेव्हां आपणांस तेवढीच पुरे म्हणून मनांत आनंद पावून त्यानें तीवर आपली भूक भागविली. जेव्हां आपणामध्यें मोठा पराक्रम करून मोठा लाभ करून घेण्याची शक्ति नसते तेव्हां आपल्या आटोक्यांत जेवढें असेल तेवढ्यावरच संतोष मानून राहाणें चांगलें.

कोल्हा पांडित्य सांगू लागला, तर जपावें आपल्या हंसाला—कोल्हा जर आपणाजवळ फार गोड गोड व उपदेशाच्या गोष्टी करूं लागला, तर त्याच्या मनांत कांहीं तरी डाव साधावयाचा आहे. आपल्या ताब्यांतील हंस त्याला लुबाडून घ्यावयाचा आहे हें मनांत ओळखून असावें.

कोल्हा मोठा हिकमती, धरी त्यास तो त्याहून जास्ती--कोल्हा हा फार धूर्त प्राणि आहे. त्याला कोणी धरलें तरी तो त्याहून जास्त हिकमती ठरणार.-सवि ३३५२.

अडलें कोल्हें मंगल गाय—कोल्हा अडचणींत सांपडला म्हणजे चांगलें गोड बोलूं लागतो. मनुष्य अडला म्हणजे नरम येऊन आर्जवें करूं लागतो. 'अडलें कोल्हें०' पहा.

एक कोल्हें सतरा ठिकाणीं व्यालें--कोल्ही वितांना एका जागेवर राहात नाहीं, त्यामुळें तिचीं पिलें पुष्कळ

जागीं पडतात. एकाच गोष्टीपासून अनेक ठिकाणीं उपद्रव जाणवूं लागला असतां म्हणतात.

कीं कोल्हेया चांदणी। आवडी उपजे ? ॥ –ज्ञा ४.२०–२५. कोल्ह्यास चांदणें अप्रिय तेव्हां तें चांदण्यारात्रीं ओरडूं लागतें. देहबुद्धीच्या माणसाला उज्ज्वल बुद्धियोग रुचत नाहीं, हें सांगण्यासाठीं ज्ञानेश्वरींत वरील उदाहरण घेतलें आहे. तु०–चंद्र देखोनि जळे पोटीं । कोल्हा जैसा ॥ –ज्ञा १६.२३८.

कोल्ह्याचें पडलें काम, डोंगरावर घेई आराम—कोल्हा आपलें काम तसेंच टाकून विश्रांति घेत राहतो. कोल्ह्याची जरूर लागल्यास डोंगरावर जाऊन शांतपणें बसलें पाहिजे तरच तें दिसतें.

कोल्ह्याचे शिकारीस वाघाचा सरंजाम घ्यावा; कोल्ह्याच्या शिकारीला वाघाच्या शिकारीची तयारी करावी लागते––आपल्याला एखादें अल्प कार्य करावयाचें असलें तरी भरपूर साधनें घेतल्याशिवाय आरंभ करूं नये. नाहींतर मध्यंतरीं कांहीं अडचण उत्पन्न झाली असतां ती निवारण करणें कठिण होतें. –माझी तीर्थयात्रा (फडके) ४.८.

कोल्ह्यासारखा लबाड, घरीं आणलें घबाड––कोल्हा हा धूर्त असल्यामुळें नेहमीं कोठें तरी मोठा लाग साधीत असतो.

कोल्हाटी——कोल्हाट्याचें शूरत्व––कोल्हाटी ज्याप्रमाणें शक्तीचा खूप आव आणतो, तो केवळ त्याच्या कसरती पुरताच असतो; त्याचा रणांगणावर कांहीं उपयोग होत नाहीं. त्याप्रमाणें केवळ उसना धीटपणाचा आव; वरवर दिसणारें शौर्य.

कोल्हापूर——कोल्हापुरी माप––कोल्हापुरी माप मोठें असतें. यावरून अतिशय मोठा जिन्नस (वहाण, जोडा वगैरे पायतण.)

※कोल्हापूर, सोन्याचा धूर—पूर्वी कोल्हापूर श्रीमंतीविषयीं फार प्रसिद्ध असे. कोल्हापुरास सराफी मोठी असे.

कोल्हापुरा गेलो ना, कथा आयकलि ना––(गो.) कोल्हापुरास गेली नाहीं, कथा ऐकली नाहीं.

कोल्हार——कोल्हारी वेताळ–पांखरांस भिवविण्याकरितां शेतांत केलेलें वेताळाच्या आकाराचें पेंढ्यांचें बाहुलें; कुंभारानें केलेली भुताची प्रतिमा; शेतांतील बुजगावणें. ‘ आतां कोल्हारीचे वेताळ । तैसे निर्जीव हे आहाती । ’ –ज्ञा ११.४६६.

कोंवळा——कोंवळा किरळा—लहान व नाजूक.

कोंवळी दुपार––मध्यान्हाच्या पूर्वीचा थोडा वेळ; दोन प्रहर.

※ कोंवळें झाड वांकवावें तसें वांकतें––झाडाच्या फांद्या जोंपर्यंत कोंवळ्या असतात तोंपर्यंत त्यांस द्यावें तसें वळण देतां येतें. त्याप्रमाणें लहान मुलांच्या बुद्धीस लावावें तसें वळण लावतां येतें. ‘ बाळपणीं बाळांची कोमल तरुतुल्य बुद्धि वांकेल । ’–कृ. चि. विद्याप्रशंसा.

कोश——कोश पिणें––शपथ घेणें. ‘ शरीर वाचा मानस । पियाली कृतनिश्चयाचा कोश ।’–ज्ञा १३.६०४.

कोष्टी——कोष्ट्याचे पाहुणे—कोणतेंहि निश्चित काम न करतां लग्नघरांत वेगवेगळ्या ठिकाणीं जमून फक्त वाटाघाट करणारीं माणसें.

※कोष्ट्याच्या काखेंत दीड ताणा, कोष्टी चाले उताणा-(व.) [ताणा=कापड विणण्याचें सुताचें बंडल.] कोष्ट्याजवळ दीड ताणा, थोडेसें सूत असलें कीं बस; तेवढ्यानें आपण श्रीमंत झालों असें वाटून तो उताणा चालूं लागतो, म्हणजे गर्विष्ठपणानें वागतो. थोडक्यानें ताठा अंगीं आणणारास ही म्हण लागते. तु०–कांगे म्हारणी उताणी शिंगट भरलें नाचण्यांनीं. कांरे महारा उताणा खिशांत दीडआणा.

कोहळा——आंवळा देऊन कोहळा काढणें—मागें आवळा पहा.

कोळ——वाळून कोळ होणें—अगदीं वाळून शुष्क होणें; वठणें; रुक्ष होणें.

कोळ——कोळ्याक उजो घेतचि बावि खणचि––(गो.) घराला आग लागतांच विहिर खणायची.

कोळकांदा——कोळकांदो गोडु जाल्यारि कोल्हो सोडता वे ?—(गो.) [कोळकांदा = एक जंगली कंद] कोळकांदा गोड असता तर कोल्ह्यानें टाकला असता का ? धूर्त माणूस कोणतीहि गोष्ट, ती जर फायद्याची असेल तर कधींच सोडणार नाहीं.

कोळणें——कोळून पिणें––एखादा खाद्य पदार्थ किंवा औषध ज्याप्रमाणें पाण्यांत किंवा रसांत कोळून पितात त्याप्रमाणें उपयोगास येणें. ‘ त्याची ती बी. ए. ची डिग्री काय कोळून प्यायची आहे या कामांत ! ’ –जादुगार पृ. ५७.

कोळवें——कोळव्याचा वांसा घडी घडी लागे––घराचें पांखें ठेंगणें असलें म्हणजे त्याचा वांसा नेहमीं डोक्यास लागतो. पण घरांत राहावयाचें म्हणजे तो त्रास

पतकरावा लागतो. त्याप्रमाणें घरांत एखादा वाईट मनुष्य असला म्हणजे त्याचा वरचेवर उपद्रव झाल्याशिवाय राहात नाहीं. तसेंच ज्याच्याशीं आपला रोजचा संबंध असेल त्यापासून होणारा त्रास सहन करावा लागतो.

कोळसा——कोळशांतील माणिक-अंतरसाल—अतिशय काळा मनुष्य; काळाकुट्ट मनुष्य. गलिवृ २·२४.

❀**कोळसा उगाळावा तितका काळा; कोळसा किती उगाळला तरी काळाच; कोळसा घासला तरी आंत काळें; कोळसा वर आणि आंत काळाच**—वरील सर्व म्हणी एकाच अर्थाच्या आहेत. एखादी गोष्ट मुळांतच वाईट असली तर वरवर कितीहि उपचार केले तरी ती सुधारत नाहीं. तिचें स्वरूप कांहीं केलें तरी पालटतां येत नाहीं. दुष्ट कृत्याचें कितीहि समर्थन करूं गेलें तरी होत नाहीं. किंवा त्यांवर कितीहि चर्चा केली तरी त्याचें स्वरूप बदलत नाहीं. कोळसा अधिक उगळल्यानें (उजळल्यानें) कमी काळा होत नाहीं.–टि ३.३५९.–पामो १९२.तु०–हा कोळसा कराया शुद्ध धुतां व्यर्थ पाणितळ मळलें । –मो द्रोण १.२१. तरि वरि तसाचि आंतहि उगाळितां कोळसा प्रयास करा ॥ –मोसंशय २४.

कोळसे खरे पण ते खैराचे--खैराचे कोळसे कणखर असतात. तेव्हां एखादी गोष्ट जरी दिसावयास वाईट दिसली तरी तिच्या उपयोगाच्या दृष्टीनें ती उत्तम असूं शकते.

कोळशांक् दर आइली म्हण् घरा उजॉ लायिज्जॉ खीं कॉण्; कोळश्यांक दर आयली म्हुण घर जळचें ?--(गो.) कोळशाला भाव आला म्हणून घर जाळून त्याचे कोळसे करायचे काय ? तु०–सोन्याची सुरी झाली म्हणून उरांत खुपसून घ्यावयाची काय ?

कोळशाची दलाली आणि हाताचीं मुळें काळीं—कोळशामध्यें दलालीचा व्यापार केला तरी वरचेवर त्यास हात लावावा लागतोच व हात काळा होतोच. त्याप्रमाणें एखाद्या गोष्टीशीं वरचेवर संबंध आला म्हणजे मग तो कितीहि दूरचा असला तरी त्यापासून उपसर्ग झाल्याशिवाय राहात नाहीं. (गु.) कोलसानी दलालीना हाथ काला. He that handles pitch will be defiled.

कोळशाचे व्यापारांत हात काळेच व्हावयाचे--वाईट कामांत हात घातला असतां थोडा तरी वाईटपणा पदरीं आल्याशिवाय राहात नाहीं.

कोळशाच्या दलालींत हात काळे—कोळशाच्या दलालींत कितीसा फायदा पडणार ? एखादे वेळीं कोळसा मोजतांना हात काळे होतील तेवढीच काय ती दलाली. कामाच्या मानानें मुळींच फायदा न मिळणें. पण एखादे वेळीं स्वतःच थोड्या फार खर्चांत उतरणें. सार्वजनिक कार्यांत असा पुष्कळ वेळां अनुभव येतो.

कोळी——कोळ्याचें शरीर गुंजभर आणि हातपाय शेरभर--कोळ्याचे हातपाय त्याच्या शरीराच्या मानानें फार अवाढव्य असतात.–केसरी १५-११-३५.

कोळ्याच्या सुतानें कापड जात वे ?--(गो.)कोळ्याच्या सुतानें कापड होईल काय ?

कोळी——कोळी कोतवाल, होलार हवालदार--मासे धरणाऱ्या कोळ्यास कोतवाल व महारास हवालदार केलें तर शहराचा बंदोबस्त त्यांच्या हातून होणें शक्य नाहीं. भलत्याच लोकांच्या हातांत अधिकार दिल्यास सर्व गोंधळ माजल्याशिवाय राहणार नाहीं. तु०–गाढव्यास गुरूं आणि गुराख्यास तारूं.

कोळीण——कोळीण नाचते म्हणून जोगीण नाचते—एक करते, म्हणून दुसरी करते पण आपला दर्जा पाहात नाहीं.

कोळणिल्या घराक झळक्या (मासळे) तोरण—(गो.) [झळक्या = अंग चमकणारा मासा.] कोळणीच्या घराला मासळीचें तोरण. जें ज्याच्या जवळ त्यानेंच तो शृंगारणार.

कौडी——कौडी नहीं गांठमें, चली बागके सैर—(गो.) गांठीस कवडी नाहीं आणि बागेंत हवा खावयास चालली. तु०—हातीं नाहीं अडका, बाजारांत जाय धडका. कवडी पहा.

कौतुक——कौतुकाचें धिरडें व खाऊं कशाशीं कोरडें--फार कौतुक झालें असतां ही म्हण व्याजोक्तीनें वापरतात. कोठल्याहि गोष्टीचें जास्त कौतुक झालें कीं वीटच येतो.–मसाप १.२.११.

कौल——घरावर कौल राहूं न देणें--कुटुंबाचा घात करणें; सर्वस्वाचा नाश करणें.

कौलास येणें--शरण येणें; अभय मागण्याकरितां विनंति करूं लागणें. 'झाले मोंगल बेजार मरूं लागले आले कौलाला । '–ऐपो २३६.

❀ **घरावर नाहीं कौल, रिकामा डौल**--घरांत कांहीं नसतांना श्रीमंतीची ऐट आणून वागावयाचें. पोकळ श्रीमंती. White jacket and empty pocket.

क्यौं——क्यौं काजी दुबळे, शहरका अंदेशा कायकू होना--काजी पहा.

क्यौं मिया रोते, सुरतच वैसी--(हिं.) मियांसाहेब, कांहो रडतां ? (शेजारचा सांगतो) चेहऱ्याची ठेवणच तशी! रडतोंड्या माणसाबद्दल म्हणतात.

क्रिया——क्रिया करणें--और्ध्वदेहिक कर्म करणें; उत्तरक्रिया करणें. 'करुनि क्रिया पित्याची गेला तो श्रित-भवाब्धि सेतुकडे ।'—मोवन १०.८३.

क्रिया जागणें-धरणें--एखाद्याच्या कृत्याची आठवण ठेवणें; एखाद्याचे उपकार जाणणें, आठवणें.

क्रिया टाकणें-सांडणें-सोडणें-विसरणें--एखाद्याचे उपकार न स्मरणें; कृतघ्न होणें.

क्रिया शाबूत असणें--वचन सत्य असणें; वचनाप्रमाणें कृति असणें; एकनिष्ठ असणें; बेइमानी न करणें. 'तो त्याची क्रिया शाबूद.' —भाब १८.

❀ क्रियेवांचून ज्ञान पंगू--नुसतें ज्ञान डोक्यांत पुष्कळ असलें व हातून कांहीं कार्य झालें नाहीं, तर त्या ज्ञानाचा काय उपयोग.

क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।—निष्फळ बडबड करून हातांनीं कांहीं न केलें तर त्याचा कांहीं उपयोग नाहीं. —राम ११४. तु०—क्रियेवीण नानापरी बालिजेते । परी चीत दुश्चीत तें लाजवीतें ।—राम १०४. क्रियेयीण वाचाळता ते निवारी ।—राम १०८.

क्रूर——क्रूरकर्मे आचरती, त्यांस भीति उत्पन्न होती—जे दुष्ट कृत्यें करतात त्यांस नेहमीं त्यांचे परिणाम भोगावे लागतील ही भीति वाटत असते.

क्रूर दृष्टीनें पाहे, अंतरीं दया वाहे—एखादा मनुष्य दिसावयास उग्र असतो परंतु दयाळू अंतःकरणाचा असतो, विशेषतः अपराधी मनुष्याकडे तो किंवा परमेश्वर रागानें पाहातो पण शेवटीं त्यास क्षमा करतो.

क्रोध——क्रोधाग्निशिखा टाकणें--संतापानें बोलणें; अतिशय रागावणें.

❀ क्रोध आणि शांति, आहे एकाच्या हातीं--आपल्याच हातांत वास्तविक क्रोध दाखविणें किंवा शांत राहणें हें आहे; क्रोध आणि शांति या दोन्हीहि गोष्टी परमेश्वराजवळ आहेत.

क्रोध ज्याचा त्याला आवडतो, इतराला शत्रु वाटतो—आपण स्वतः रागावलों असतां त्याचें आपणांस स्वतःस कांहीं वाटत नाहीं, पण इतर लोकांस त्यापासून त्रास होतो. आपला राग आपणास आवडत असला तरी इतरांस मात्र आवडत नाहीं.

क्रोध मत्सर जीवित्वनाश, चिंता आणी वृद्धदशेस--राग आणि द्वेष यांमुळें केव्हां केव्हां मरणहि ओढवतें व काळजीमुळें अकालीं वृद्धत्व येतें.

क्रोध हा वेडेपणाची लहर आहे--राग ही एक वेडाचीच लहर आहे. ज्यावेळीं मनुष्य रागावलेला असतो त्यावेळीं त्याची विवेकशक्ति नष्ट झालेली असते.

क्वचित्——क्वचित् काणा भवेत् साधुः ।—काणा माणूस फार लबाड असतो; त्यांतला चांगला चुकून एखादा आढळेल. संबंध श्लोक असा—क्वचिद्दन्तालको मूर्खःक्वचिद्वानवती सती । क्वचित्काणो भवेत्साधुः खल्वाटो निर्धनः क्वचित् ॥

क्वचित् काणी पतिव्रता--पुढील म्हणीकरितां ही म्हण चुकीनें मॅनवेरिंगनें दिली आहे.

क्वचित् गानी पतिव्रता--गाणारी स्त्री बहुधा अनीतिमय आचरणाची असते. 'क्वचित् काणा०' पहा.

ख

खंकाल——खंकाळ भवानी—कर्कशा; भांडखोर स्त्री; अवदसा; कजाग स्त्री; जहांबाज बायको. 'आलीच ही खंकाळभवानी !'—सु २१.

खग्रास——खग्रास करणें होणें—ज्याप्रमाणें सूर्यास किंवा चंद्रास खग्रास ग्रहण लागलें म्हणजे त्याच्या बिंबाचा सर्व भाग दिसेनासा होऊन नाहींसा झाल्यासारखा वाटतो, त्याप्रमाणें एखादी गोष्ट होती कीं नव्हती असें होणें; खलास होणें; रोग, व्यथा, जाळपोळ वगैरेमुळें साफ नाहींसें करणें; निःशेष करणें, होणें.

खचणें——खचता पाया—१ खालीं जाणारा पाया; कमजोर, भुसभुशीत आधार; कमकुवत आधार. २ पिच्छेहाट; माघार; उतरतीकळा; ऱ्हास; अपकर्ष.

खच्ची——खच्ची करणें—१ कापणें; तोडणें; छाटणें; आंखूड करणें. २ (पशूस) बडवणें; वृषणच्छेद करणें; प्रजो-

त्पादनास अक्षम बनविणें. ३ कमकुवत करणें; शक्तिहीन करणें; बल कमी होईल असें करणें; पौरुषहीन करणें. 'राष्ट्रास परकी भाषेंत शिक्षण देणें म्हणजे त्यास खच्ची करण्यासारखेंच आहे.'–टिव्या २७.

खंजरीट——खंजरीटनयना––खंजरीट नांवाची एक काळी चिमणी असते, ती सारखी शेंपूट हलवीत असते. खंजरीट पक्ष्याच्या डोळ्याप्रमाणें जिचे डोळे आहेत अशी स्त्री; सुंदर नेत्र असलेली स्त्री. स्त्रीला मृगनयना, हरिणाक्षी वगैरेहि विशेषणें लावतात. 'काम कुरंगी खंजरीट–नयना ये उभी राहे ।'–देप ८५.

खजानपूर——जवळ विपुल द्रव्य आहे असा. नेहमीं खजिना भरलेला आहे असा; मातबर; द्रव्य असलेला. 'शिंदे केवल खजानपूर सरदार द्रव्यदृष्टि होते.'–भाव ५६.

खजूर——खजुरी बोऱ्या—[बोऱ्या = गोणपाट, बारदान, अस्तर. (ल.) कंगाल, द्रव्यहीन] खजूर ज्या झाडाच्या पात्यांच्याच बोऱ्यांतून येतो त्या गठ्ठयांतील खजूर खपला म्हणजे जो बोऱ्या राहतो त्यांत खजूर मुळींच नसतो, केवळ तें गठ्ठयाचें आवरण असतें. त्याप्रमाणें आंत कांहीं नसलेला पोकळ डोलारा. ज्या जवळची माया संपली आहे असा; निर्धन; कंगाल.

खजूरी बोऱ्या उडणें—फजिती होणें. बोऱ्या उडणें पहा. 'परंतु, त्यांचा तेथें कसा खजूरी बोऱ्या उडाला, ह्याची ज्यांना माहिती होती, ते लोक कांहीं फिरून कोणा गुणी हिंदु माणसास यूरोपची यात्रा करण्यास सांगतील, असा संभवच नव्हता.'–छच १२७.

❀ **खज्जुरु पिकल्ल वेळेरी कयीळाक तोण्णांतु रुंब; खजूर पिकिल्या वेळार कावळ्या–तोंडांत रूं**—(गो.) खजूर पिकला तेव्हां कावळ्याच्या तोंडांत फोड. वसंत ऋतूंत कावळ्यास मुखरोग होतो. ज्यावेळेस माणूस उपभोगाला अयोग्य होतो त्यावेळेस त्याचें नशीब उघडणें. कधीं न लाभणाऱ्या सुसंधीच्या वेळीं माणूस त्या संधीचा फायदा घेण्यास असमर्थ होणें. निंबाला आल्या निंबोण्या आणि कावळ्याला झाल्या गळचोप्या. कावळा पहा.

खट——खट काढणें–टाकणें—(घाण काढणें) १ अंगांतील लबाडी, दोष काढून टाकण्याकरितां सपाटून जोरानें मारणें; शिक्षा करणें; खोड मोडणें. २ तासडपट्टी काढणें; खरडपट्टी काढणें; ताशेरा झाडणें.

खटींखापरीं लागणें–जाणें–मिळणें––१ आजारामुळें अंग घाणेरडें, खरबरीत होणें; रुग्णावस्थेंत अंग रुक्ष होणें, त्याचा नरमपणा जाणें. २ (ल.) संपुष्टांत येणें; नष्ट होणें; नाहींसें होणें; उधळणें; धुळीस मिळणें (धनदौलत वगैरे). ३ इमारत वगैरे जमीनदोस्त होणें; पार नाहींसें करणें.

खटींखापरीं लावणें–मिळविणें—नासधूस करणें; धूळधाण करणें; सत्यानास करणें.

खट——खट गाय खाटकाचें घरीं (बरी)—गाय नीटपणें घरीं राहून नांदत नसली तर तिला योग्य ठिकाण म्हणजे खाटकाचें घर हेंच होय. त्याचप्रमाणें एखाद्या आडदांड मनुष्याला नीट रीतीनें वागवून घ्यावयाचें म्हणजे तशाच प्रकारच्या एखाद्या जबरदस्त मनुष्याच्याच हवालीं केलें पाहिजे.

खट नट, त्याला गिऱ्हाईक भट—जी गोष्ट आपल्या स्वतःला चालत नाहीं, आपल्याला आवडत नसून निरुपयोगी आहे अशी वस्तु भटास देऊन टाकल्यानें दानधर्म केल्याचेंहि पुण्य मिळतें व घरांतील अडगळहि कमी होते. टाकाऊ वस्तु दानधर्म म्हणून देऊन टाकाव्या अशी कांहीं लोकांची समजूत असते. तीस उद्देशून ही म्हण वापरतात. वाईट सुपाऱ्या देवापुढें ठेवावयास घेतात व त्यांस भटाच्या सुपाऱ्या म्हणतात.

खट नट, विठ्ठलभट—मागल्या प्रमाणेंच.

खटास खट भेटे, जिवाचें पारणें फिटे––जबरदस्त माणसाची दुसऱ्या एखाद्या चांगल्या जबरदस्त माणसाशीं गांठ पडली म्हणजे त्याची चांगली खोड मोडते. इतरांस तो त्रासदायक होतो पण त्याला तोडीस तोड दुसरा मिळाला म्हणजे त्याच्याशीं निमूटपणें सरळ वागावयास लागतो. तु० –घटासी आणावा घट । उद्धटासी उद्धट । खटनटासी खटनट । आणूनि ठेवी ॥–दा १९.९.३०.

खटासी व्हावें खट, उद्धटासी उद्धट—शठंप्रति शाठ्यम्; जशास तसें वागलें पाहिजे. वर पहा.

खटका——खटका उडणें—भांडण होणें; तंटा होणें; तोंड वाजणें; मतभेद उत्पन्न होऊन वादविवाद होणें.

खटंगळी——खटंगळ्या खाणें—(व.) खोडी काढणें; वाटेस जाणें; कुरापत काढणें; तंटा उत्पन्न करणें. 'माझ्याशीं तो अशा खटंगळ्या खातो म्हणून तर त्याचें माझें जमत नाहीं.'

खटपट——खटपट करतां, सारीपाट खेळतां––एखादा मनुष्य वेळच्यावेळीं कामहि करतो व काम नसेल तेव्हां मजेंत खेळण्यांत वेळ घालवितो अशा मनुष्याबद्दल ही

म्हण योजतात. कामाच्यावेळीं काम केलें म्हणजे मागून विश्रांति हक्कानेंच घेतां येते. तु०-Work while you work and play while you play.

खटपट करी तोच पोट भरी—जो काम करतो त्यालाच खावयाला मिळतें. आळशाला कांहीं प्राप्ति होत नाहीं.

खटपटीवीण प्रतिष्ठा जाण—आपण जर आपल्या अधिकारास योग्य असें कार्य केलें नाहीं, जरूर ते श्रम घेतले नाहींत तर आपली योग्यता कायम राहणार नाहीं व आपला मानहि राहणार नाहीं.

खटपटी——खटपटयाचे कान लांब—जो मनुष्य नेहमीं खटपट धडपड करीत असतो, इकडेतिकडे हिंडतो त्याच्या कानीं अनेक गोष्टी येतात व सर्व गोष्टी त्याला कळल्याशिवाय राहात नाहीं.

खटला-लें——खटला ओढणें—संसार व्यवस्थित रीतीनें चालविणें; गृहप्रपंचाचा भार योग्यप्रकारें स्वीकारून आपली जबाबदारी पार पाडणें; संसाराचें ओझें वाहणें.

खटला तुटणें—संबंध तुटणें; धागादोरा नाहींसा होणें.

खटलें गळ्यांत येणें—अंगावर जबाबदारी येणें;स्वतःच्या अंगावर भार पडणें. 'तेव्हां या दोहो हातांतील एकादा माझा हात मोडला तर सारें खटलें माझ्या गळ्यांत येऊन खेळ खेळावयास रिकामपण होणार नाहीं.'-पेब १२९.

खटाई——खटाई काढणें—(व. ना.) खोड मोडणें; खरडपट्टी काढणें; चांगली हजेरी घेणें; ताशेरा झाडणें.

खटाटोप——खटाटोपो भयंकरः—व्यर्थ खटाटोप; उगाच निष्फळ धडपड; थोड्या कामाला मोठें अवडंबर. सबंध श्लोक—(अ) निर्विषेणापि सर्वेण कर्तव्या महती फणा। विषं भवतु मा वास्तु फटाटोपो भयंकरः ॥ -पंचतंत्र ३.८३. (आ) निर्विषोपि यथा सर्पः फटाटोपैर्भयंकरः। तथा डंबरवान्राजा न परैः परिभूयते ॥-सुर १४९.३१०.

खट्टा——खट्टे करणें—नाराज, नाखूष करणें; मर्जी-विरुद्ध वागणें. 'खावंदाला खट्टे केल्यांत जीव नाहीं.'

खड्याळ——खड्याळे गाईस दूध किंचित्, परी लत्ताप्रहार होत बहुत—खोडकर गाय दूध कमी देते पण दूध काढणाऱ्यास तिच्या लाथा मात्र खाण्याचा फार प्रसंग येतो. निरर्थक धडपड करणाऱ्या लोकांकडून प्रत्यक्ष काम फार थोडें होतें, पण त्यांचा उलट उपसर्ग मात्र फार होतो. तु०-खडण गुरां दूध बहु.

खट्वा——खट्वा मरण—खाटेवर आलेलें मरण; मरणापूर्वी मनुष्यास खाटेवरून घोंगडीवर उतरण्याची चाल आहे. तीप्रमाणें घोंगडीवर न उतरतां एखाद्यास खाटेवरच मरण आलें तर तें निषिद्ध मानतात. व त्याबद्दल प्रायश्चित्त द्यावयाचें असतें.

खंड——खंडीं खंडीं पंडित—सर्व विषयांचें पण अर्धवट ज्ञान असणाऱ्यास म्हणतात. तु०-A rolling stone gathers no moss. खंडित पहा.

खंड——खंडें खंडें-खंड विखंड करून टाकणें-मोडतोड करणें; खांडोळीं करणें; खांडे पाडणें; तुकडे तुकडे करणें; फाडणें, तोडणें वगैरे.

खडक——खडक लागणें—विहीर खणीत असतां मध्यें जर खडक लागला तर त्यापुढें पाणी लागण्याचा संभव बहुधा नसतो. यावरून लाभाची आशा व्यर्थ होणें; निष्फळ होणें.

खडकावर पोट भरणें—कोठेंहि पोटास मिळावण; प्रतिकूल स्थितींतहि निर्वाह करणें; काळीची (शेत)जमीन करून पोट भरणें सोपें पण खडकावर लागवड करून उदर-निर्वाह करणें कठीण जातें. तरीहि अशा प्रतिकूल परिस्थितींत कर्तबगारीवर पोटास मिळविणें.

खडकावरचा गाडा—गाडा खडकावरून चालतांना खडखडाट करतो पण लगेच सपाट जमिनीवरून संथ जातो; त्याप्रमाणें वेळेस भडाभडा बोलणारा पण पुढें विस-रून जाणारा, मनांत न ठेवणारा; भडभड्या.

*खडकावर पेरलें, व्यर्थ गेलें—खडकावर धान्य पेरलें असतां तें उगवत नाहीं,फुकट जातें;यावरून निष्फळ परिश्रम.

खडका——खडका उडणें—खटका उडणें; भांडण होणें.

खडका घेणें-काढणें—जवळ येणाऱ्या मनुष्याचा, वस्तूचा कानोसा घेणें; ध्वनीवरून वगैरे अंदाज बांधणें.

खडका धडका—बाचाबाची; हमरीतुमरी; भांडाभांडी; खडाजंगी; कलागत.

खडखडणें—खडखडून उठणें-बोलणें-सांगणें-जाब देणें—रागानें, आवेशानें, स्पष्टपणें, बेधडक बोलणें वगैरे; साफ सांगून देणें; चक्क सांगणें; भीड मुरवत न धरतां स्पष्टपणें बोलून टाकणें, उत्तर देणें.

खडण, खडाण——खडण गुरां दूध बहू, उण्या माणसाला बोल बहू—एखादें गुरूं फार खोडकर असतें,

पण त्याला दूध पुष्कळ असतें; म्हणून त्याच्या खोड्या सहन कराव्या लागतात. तसेंच एखाद्या मनुष्याला कांहीं व्यंग असलें तर बहुतेक त्याला खूप बोलण्याची संवय असते, त्याची सर्व शक्ति तोंडांत असते. सामान्यतः लबाड मनुष्यें धूर्त असून काम पुष्कळ करतात. 'खडणा गाय दुभती। वैरी तेची मित्र होती।' 'खडाणे आला पान्हा।'–ज्ञा १३.२०४. 'खडाणा गाई न वळती।'–ह १३.१६.

खडतर——खडतर अमावास्या—या दिवशीं चोऱ्या करण्यास मुहूर्त चांगला असतो अशी समजूत आहे. व म्हणूनच प्रापंचिकांना ती अनिष्ट आहे. यावरून अतिशय भीतिदायक दिवस. या अमावास्या वर्षांतून ३ वेळां येतात. फाल्गुन ३०, आश्विन ३०, व पौष ३०.

खडप——खडपार पडलें बीं कोंबेना—(गो.) खडकावर पेरलेलें बी रुजत नाहीं.

खडबड——खडबड खुंटा—रिकाम्या भांड्यांत पळा वगैरे घातली असतां नुसता खडबड असा आवाज होतो. यावरून अत्यंत अभाव, रिक्तता, फडशा, फन्ना वगैरे; विहीर, फडताळ, कोठार वगैरे रिकामें असणें. नकार घंटा.

खडा——खडा उडणें—गुडगुडी किंवा चिलीम ओढतांना आंतील तंबाखु सरत आली म्हणजे तींतील खडा उडूं लागतो. यावरून एखादी वस्तु अथवा द्रव्य संपणें, खर्च होणें; पुरतें संपणें; खलास होणें; बुडास जाणें; तळास जाणें.

खडा टाकून ठाव घेणें—पाण्याची खोली पाहण्यासाठीं खडा टाकून ठाव घेतात. यावरून एखाद्या मनुष्याचा कल पाहावयाचा असतां एखादा शब्द बोलून त्याचा मानस जाणून घेणें, अजमास घेणें; अंदाज पाहाणें.

खडा टाकून पाहाणें—वरीलप्रमाणें.

खडा न् खडा माहिती असणें—एखाद्या कामांतील बारीक सारीक सुद्धां सर्व गोष्टीची माहिती असणें; सर्व तपशीलवार माहिती असणें; आमूलाग्र माहीत असणें.

खडा फुटणें—नदीच्या पात्रांतील वगैरे खडक फुटून पाण्याचा लोंढा जोरानें बाहेर येणें; झरा वगैरे पुढील अडथळा दूर करून वाहूं लागणें.

खडे खाणें—कष्ट करणें; खस्ता खाणें; अतिशय त्रास सहन करून काम करणें; कष्टानें दिवस काढणें.

खडे खावविणें-चारणें—१ त्रास देणें; सतावणें; बेजार करणें; दमविणें; थकविणें. २ फसविणें; दाद न देणें; पुरून उरणें. ३; शरण आणणें; नम्र करणें; वांकविणें. 'दिल्लीपतीला सुद्धां डोईजड होऊन बसलेला जो दक्षिणचा निजाम त्याला सुद्धां मराठ्यांनीं खडे चारले मग इतरांची काय कथा?'

खडे घांसणें-फोडणें—खूप कष्ट करणें; दगदग करणें.

नांवानें खडे घांसणें-फोडणें—एखाद्याची खूप निंदा करणें; एखाद्याबद्दल तक्रार करणें; दूषण देणें. 'आईना जर कांहीं सांगेन म्हटलें तर त्या माझ्या नांवानं खडे फोडतील.'—रंगराव.

खड्या खड्यांनीं डोकें फुटणें—अनेक बारीक सारीक गोष्टींमुळें नुकसानींत येणें; भिकेस लागणें, दिवाळखोर बनणें; हळू हळू उतरती दशा लागणें; थोडें थोडें नुकसान होत जाणें.

खड्यांनीं डोकें फोडणें—एखाद्या मनुष्यानें दगडांनीं गाईचा वध केल्यास प्रायश्चित्त म्हणून त्याचा दगडांनीं डोकें फोडून वध करणें. घाशीराम कोतवालानें कांहीं तेलंगी ब्राह्मणांस उपाशीं कोंडून ठेवलें होतें. तेव्हां त्यास ब्राह्मणांच्या स्वाधीन करण्यांत आलें. त्यांनीं धोंडेमार करून त्यास चेंचून मारलें.

खड्यासारखा निवडणें—१ ज्याप्रमाणें आपण धान्यांतून खडा निवडून वेगळा काढून टाकतों त्याप्रमाणें एखाद्यास कुचकामाचा म्हणून बाजूस सारणें; निरुपयोगी ठरविणें. २ चटकन् वेगळा काढणें; ओळखून बाजूला काढणें; वेंचून काढणें; टिचून काढणें; निराळा म्हणून बाजूला ठेवणें. 'त्यांस मोलें यांनीं शत्रू म्हणून खड्यासारखें निवडून काढलें आहे.'–टिव्या ५.

खड्यासारखा बाजूला पडणें—ज्याप्रमाणें निवडतांना धान्यांतील खडा बाजूला काढला जातो त्याप्रमाणें त्रासदायक म्हणून वगळणें, निरुपयोगी म्हणून बाजूला राहणें.

खड्यासारखा बाहेर पडणें—परकीय म्हणून वेगळा काढणें; न सामावण्यासारखा म्हणून बाजूस पडणें; निरुपयोगी म्हणून बाहेर टाकला जाणें.

❀ **खडा टाकून अंत पहावा**—एखाद्या विहिरींत, तळ्यांत वगैरे पाणी किती खोल आहे हें पाहावयाचें असल्यास त्यांत एक खडा टाकून पाहातात व तो तळीं गेला म्हणजे बुडबुडे किती वेळानें वर येतात त्यावरून खोलीचा अंदाज करतात. त्याप्रमाणें एखाद्या गोष्टीबद्दल एखाद्याचें मत अजमावावयाचें असल्यास त्यास एखादा सूचक प्रश्न विचारून अंदाज काढतात.

खडा-डी——खडा पहारा--सारखा पहारा; देखरेख; चांगला बंदोबस्त.

खडी ताजीम--सन्मानार्थ उत्थापन; सत्कार; स्वागत; "तेव्हां तेथें असलेल्या गांवकऱ्यांनीं उठून त्याला 'खडी ताजीम' दिली होती."-श ब २.२७७.

हुंडी खडी राखणें—हुंडीचा स्वीकार न करतां किंवा ती न नाकारतां आगळ राखणें; हुंडीची रक्कम तावडतोब न देतां कांहीं खुलाशाकरितां पुढें ढकलणें.

खडे दोन प्रहर—भर दुपार; ऐन दुपार; माध्यान्हीची वेळ; सूर्य डोईवर येण्याची वेळ.

❀ **खडे खाट, खिसेमें इयाट, और गांवभर बोभाट**--आगापिच्छा नसलेला; सडेसोट; जवळ कांहीं नाहीं व ज्याबद्दल सर्व गांवाची ओरड असते अशा मनुष्यास म्हणतात.

खडाजंगी——खडाजंगी मचणें—(व.) जोराचें भांडण जुंपणें; मोठा तंटा होणें.

खडावा——पायाला खडावा असणें—मनुष्याच्या तळपायाचा चवडा व टांच यांमधील भाग जमीनीस न टेकतां मध्यें पोकळ असणें. हें शुभचिन्ह मानतात.

खडाष्टक——[सं. षडाष्टक] एकाच्या राशीपासून दुसऱ्याची रास आठवी असणें, व दुसऱ्याच्या राशीपासून पहिल्याची सहावी असणें. प्रीति आणि वैर (मृत्यु) अशीं दोन षडाष्टकें असतात. यापैकीं पहिलें शुभ व दुसरें अशुभ मानतात व तसें असलें तर विवाह करीत नाहींत. सामान्यतः याचा अर्थ परस्पर शत्रु व, वैर असा होतो.

खडाळ——शेत खडाळ, बायको तोंडाळ—ज्या शेतांत फार खडे असतात तें शेत त्रासदायक असतें त्याच प्रमाणें जी बायको अतिशय बोलते तीपासूनाहि फार त्रास होतो.

खंडित——खंडित पांडित्य—तुटपुंजी विद्वत्ता; अपुरतें ज्ञान; कोणत्याहि विषयाचें पूर्ण असें ज्ञान नव्हे; खंडींखंडी पांडित्य पहा.

खंडी——खंडीगणती, खंडोगणती-१ खंडी खंडीनें; खंडांनें मोजतां येण्याजोगें. २ (ल.) अतिशय; पुष्कळ.

खंडीभर मीठ खावर--(गो.) खंडीभर मीठ खाणें. अशक्य गोष्ट करण्याचा आव घालणें.

खंडीभर लेंकरें--खंडी म्हणजे वीस यावरून पुष्कळ मुलेंबाळें; फार संतति.

खंडीभर वरणांत मुतणारा—आपल्या मूर्खपणानें एखादें मोठें काम बिघडविणारा; एखादी जिन्नस नासून टाकणारा; नासाड्या.

खंडीमध्यें पावरती—[रती=हिरे, मोतीं इ. मोजण्याचें एक लहान प्रमाण.] एखाद्या मोठ्या वस्तूंत अतिशय अल्प प्रमाण; लक्ष्यांत न घेण्यासारखा अंश; खंडीस नवटके पहा. 'खंडीमध्यें तूं एक पावरती।'—लावणी.

खंडीवर पेंढी होणें—१ खंडी म्हणजे वीस त्यावर एक म्हणजे २१ वें मूल होणें. २ अतिवैपुल्य असणें, अतोनात होणें.

खंडी लावणें—१ जेवतांना भातांत भातकण किंवा भाकरींत जर सबंध जोंधळा निघाला तर तो काढून दुसऱ्यास दाखवून त्यावर एक खंडी लावली असें मुलें म्हणतात. तशाच रीतीनें ही खंडी फेडावी लागते. २ मुली सागरगोटे खेळतांना प्रतिस्पर्ध्यावर डाव लावतात त्यास खंडी लावणें म्हणतात. त्यावरून एखाद्यावर डाव करणें, मात करणें. ३ फसविणें; ठकविणें; बरचढ युक्ति करणें.

खंडीस नवटके-नवटाक—नवटांक म्हणजे एक अष्टमांस शेर-खंडीमध्यें शेराचा आठवा हिस्सा म्हणजे फारच अल्प प्रमाण. यावरून कोणत्याहि गोष्टीचा अतिशय अल्प अंश.

❀ **खंडींत नवटकें आणि कटकांत चवटकें कोणें पाहावें?**—[नवटकें=पावशेर. चवटकें=एक वाद्य] मोठ्या खटल्यांत लहान गोष्टीकडे कोणी लक्ष देत नाहीं. तु०—नगाऱ्याची घाई तेथें टिमकी तुझें कायी.

खंडीस एकोणीस कडो फोल—(व.) वीस कुडव म्हणजे खंडी. वीसकुडवापैकीं १९ कुडव फोल निघणें म्हणजे सर्व पोकळ असणें, यावरून पोकळ गप्पा, बाता, थापा व त्या मारणारा थापाड्या इसमाबद्दल योजतात. फारच थोडा तथ्यांश असणें.

खंडीस दहा मणाचें भोळें—वीस मणांची खंडी. खंडीभर धान्यांत दहा मण म्हणजे निम्में धान्य जर पोल-पोकळ निघालें तर हें प्रमाण फार बेसुमार आहे. यावरून निकृष्टतेचें गैरवाजवी प्रमाण; निरुपयोगी भागाचें फारच मोठें प्रमाण.

खंडीभर कात आणि गाडीभर चुना—पान खावयास इतर पदार्थांच्या मानानें कात व चुना फार थोडा

लागतो. तो खंडीभर आणणें म्हणजे प्रमाणाबाहेर अतिशय वस्तु, पदार्थ; बाजवीपेक्षां अतिशय अधिक.

खांडयेक एकवीस कुडव पोल--एका खंडीला एक वीस कुडव फोलपट. वास्तविक वीस कुडव = १ खंडी. वीस कुडव धान्यांत एकवीस कुडव पोकळ धान्य. यावरून खोटें, असत्य विधान. वर पहा.

खडीसाखर——तोंडांत खडीसाखर असणें—खडीसाखर धरून बोलणें—अति गोड बोलणें; गोड बोलेपणा करणें. हा बहुधा कृत्रिमपणा असतो. -नर्स सुंद्रा बाई ११.

खडीसाखरी भाषण—वायफळ पण गोड बोलणें; अतिशय मधुर पण ज्यापासून कांहीं फायदा नाहीं असें भाषण; गुळचट थापा. 'लॉर्ड कर्झन यांचीं खडीसाखरीं भाषणें त्यांच्या कृतीच्या विरुद्ध असतात.-टिग्या २.५३.

खंडे करणें——(क.) वेडावणें; वाकुल्या दाखविणें; चिडविणें.

खंडेराव——खंडेराव करणें—खंडेराव घोड्यावर बसलेला असतो. यावरून घोड्यावर बसविणें, चढविणें; एखाद्या कार्यास वगैरे प्रवृत्त करणें; एखाद्यास हुरळून देणें; चढविणें; हरभऱ्याच्या झाडावर चढविणें.

खंडोबा——सोळा-अठरा गुणांचा खंडोबा—अतिशय खोडकर, दुर्गुणी मनुष्य, पशु वगैरे.

खंडोबा करणें; गांडींत काठ्या घालून खंडोबा करणें--खंडेराव करणें पहा.

खंडोबाचा कुत्रा-कुत्रें--१ खंडोबा देवाला कुत्रें प्रिय आहे. तेव्हां त्याला कोणीं मारलें किंवा अनादरलें तर देवाला राग येईल ही भीति. तु०-समर्थाघरचें श्वान०। २ खंडोबास वाहिलेला, त्याचा उपासक; वाघ्या. -एल्फिस्टन चरित्र १.१४३.

खड्डा——खड्ड्याची आणि गड्ड्याची गांठ घालणें—(व.) परस्परविरुद्ध गोष्टींचा एकमेकांशीं मेळ बसवून मोकळें होणें; अनिष्ट वस्तूंचा परस्पर संक्षेप उडवणें.

खणपट——खणपटीस बसणें,-येणें,-लागणें—धरणें धरून बसणें; एकसारखा तगादा लावणें; पिच्छा पुरवणें; हट्ट वगैरे शेवटास नेणें.

खत——खत फाडणें—ज्याप्रमाणें एखाद्या रिणकोनें सर्व फेड केल्यानंतर (किंवा त्यास कर्ज माफ केल्यास) त्याचें खत फाडून टाकून जुन्या देण्याघेण्याची वासलात लावतात त्याप्रमाणें संबंध तोडणें. 'जन्ममरणांचें उठवी धरणें। खत फाडणें विषयांचें ॥'-एभा ११.१४९२.

*** खत करील तें गोत करणार नाहीं**—एका दस्तऐवजानें जें काम होतें तें सर्व गोतानें साक्ष दिली तरी होणार नाहीं. तु०-एक लिखा और सो बका.

खंत——खंत घेणें—१ वियोगामुळें झुरणें; एकसारखी आठवण होणें. 'लेंकरानें आईची फार खंत घेतली.' २ (एखादी वस्तू) आवडेनाशी होणें; वीट येणें; शिसारी येणें.

खतमूत——खतमूत एक असणें--एकाच कुळांतील वंशांतील असणें; एकापासूनच पैदास असणें (गाय, बैल, वगैरेंची).

खतमूत ओळखणें—दुधावरून वगैरे गाई म्हैशीची परीक्षा करणें, तिचा वंश ओळखणें.

खतावणी——खतावणीवर घालणें—रोजकीर्दीतील निरनिराळ्या रकमा त्या त्या खात्यांत मांडण्याचें काम कठीण व जिकीरीचें असतें. यावरून (कारकुनां) कठिण कामाला लावणें.

खदखदां——खदखदां हंसणें--१ अगदीं मनापासून, मोठ्यानें हंसणें. 'एक खदखदां हांसती। सावकास।' -दा १८.९.१३. २ हिणविण्यासारखें हंसणें. 'ज्या शेवटवरिहि शकुनिमामा ढाळूनि खदखदां हासे।'-मोद्राण १५.९५.

खंदा——खंद्यारी बेस्सुनु कानु खावप; खांद्यार बसून कान खावप—(गो.) [खंदा = खांदा] खांद्यावर बसून कान तोडणें. वरून मैत्री दाखवीत आंतून गळा कापणें.

खद्योत——खद्योतीं फुलविलें रविपुढें ढुंग-काजव्यानें आपल्या उजेडानें सूर्यापुढें चमकण्याचा प्रयत्न करण्याप्रमाणें हास्यास्पद गोष्ट. 'खद्योतें फुलविलें रविपुढें ढुंग। साक्षी तर जग उभयतां ॥'-तुगा ३०६७. तु०-'येऱ्हवीं काय भानुतेजीं खद्योतां। शोभा आथी।'-ज्ञा १.६७. काजवा पहा.

खप——खप आहे त्याचा पुरवठा नाहीं—जी गोष्ट सर्वांस हवीशी वाटते ती दुर्मिळ असते. चांगल्या वस्तु रानोमाळ आढळत नाहींत. त्या क्वचितच आढळतात.

खपणें——खपे तो खाई, खाई तो वाही--जो काम करतो त्याला पोटभर खावयास मिळतें व ज्याला पोटभर खावयास मिळतें त्याला ओझें वाहण्याचें सामर्थ्यहि येतें. यावरून श्रम केले तर त्यावर सर्व पुढच्या गोष्टी अव

लंबून असतात. याकरितां आळस टाकून श्रम करीत असावें. जो जमीनीची मशागत करतो त्यास तिचें उत्पन्न खावयास मिळतें व जो तें उत्पन्न खातो तोच ती जमीन वाहतो.

खपे त्याला धोपे (धक्के) नि ×× त्याला सागोती—(कों.) काम करणाऱ्याबद्दल निष्काळजी, हेळसांड पण चैन करणाऱ्याचा मात्र बडजाव. तु०—फाडी तिला साडी व टिकवी तिला लक्तरें.

खपेल त्याचें शेत, जपेल त्याची लक्ष्मी व मारील त्याची तलवार—जो मेहनत करतो त्याची शेती चांगली पिकते, जो जपून खर्च करतो त्याचा पैसा वांचतो व जो शौर्य गाजवतो त्याला रणांत यश येतें. यावरून या सर्व गोष्टी मनुष्यांच्या कृति करण्यावर अवलंबून आहेत.

खपली——खपली (खरवडून) काढणें——फोड बरा होत आल्यावेळीं खपली धरते. पण ती जर उकरून काढली तर पुन्हां फोड वगैरे दुखणें होतें. (ल.) जुनें भांडण, वाद उकरून काढणें.—मो अनंतव्रत १९. 'येऊन जाऊन त्याची खपली काढून त्याला जरा वाक्प्रहार करण्याची हौस इंदुमतीला होती.'—जादूगार पृ. ३६.

खपाटा——खपाटा घेणें; खपाटीस बसणें-लागणें—खनपटास बसणें; पिच्छा पुरवणें; हट्ट घेणें; पाठीस लागणें; गळ घालणें; तगादा लावणें; जिकीर करणें.

खप्पड——खप्पड झाले गाल, आतां विठ्ठलवाडीस चाल—पाठभेद—खप्पड झाले गाल, आतां विठ्ठलवारीस चाल. आतां म्हातारपण आलें तर पंढरीची वारी कर (संसारांतून लक्ष काढ). मनुष्य वृद्ध झाला म्हणजे त्यानें परमेश्वर भजनाकडे लक्ष्य लावावें.

खप्पी——खप्पी मंडळी—फार पक्की, खमंग, वस्ताद माणसें. आपलाच निव्वळ फायदा करून घेण्यांत तरबेज असी. 'कांहीं अशी खप्पी मंडळी भेटते कीं स्वतः दुसऱ्याचे उपयोगी तर कधीं पडायचें नाहीं, पण दुसऱ्याचें मात्र आपल्या हक्काचें समजून स्वायत्त करतील.'

खबर——खबर घेणें——(उप.) समाचार घेणें; सूड घेणें; शिक्षा लावणें.

***खबर असल्यास गोंयें, ना झाल्यावर पोंये**—(गो.) ठाऊक असल्यावर गोवें शहर बरें, नाहींतर पोंयें म्हणजे फुकट त्रास.

खबसंची झाली दाटी, आनी कामाक झाली काटी—(गो.) गप्पागोष्टींत निष्कारण वेळ घालवून काम न करणें.

खंबायत——खंबायतची खिचडी आणि घोडयाचें तूप—(गु.) खंबायत येथील लोक चांगली खिचडी तयार करतात व त्यावर घोडबंदर येथील तूप फार चांगलें लागतें. यावरून अनुरूप गोष्टींचा मेळ; उत्तम जोड.

खबालणें——गोष्टी-बाता खबालणें—बाता मारणें; गप्पा मारणें; रिकाम्या गप्पागोष्टी करणें; बाता छाटणें; गप्पा सप्पा मारणें.

खमाटणें——खमाटून जेवणें-खाणें—सपाटून ओ येईपर्यंत जेवणें; रगडून सपाटून खाणें; अधाशासारखें करणें; आकंठ जेवणें.

खमाटून धरणें—घट्ट, जोरानें धरणें; दाबून पकडणें; दृढ पकडणें.

खँय, खंइं——खंइं (जंइं) पिकता, थइं विकता—(गो.) जिथें पिकतें, तिथें विकतें. मराठींत याच्या उलट म्हण आहे: जेथें पिकतें तेथें विकत नाहीं.

खयंथ गेल्यावर चुलीक फातर तीन——(गो.) कोठेंहि गेलें तरी चुलीला तीनच धोंडे. पळसाला पानें तीनच, याप्रमाणें.

खयंथ गेल्यार फळसाक पानां तीन——(गो.) कोठेंहि गेलें तरी पळसाला पानें तीन.

खयंथ गेल्यार सांगटाक कांटे तीन—(गो.) वरीलप्रमाणेंच.

खंचे घरांतु पळैलें तरी मातयेचो रांदण्यो—(गो.) कोणत्याहि घरांत पाहिल्या तरी मातीच्याच चुली. तु०—घरोघरीं मातीच्याच चुली.

खंचो पायु निसलें तरी गांडीं पेट्टु—(गो.) कोणताहि पाय घसरला तरी ढुंगण आपटतें.

खयिं महाशेष, खयिं गायंडळु?—(गो.) कोठें महाशेष कोठें गांडूळ. तु०—कोठें इंद्राचा ऐरावत.

खर——खर गेलें देवापाशीं, देवानें लावल्या उठाबशी——गाढव जरी कोठेंहि गेलें तरी त्याच्या नशीबीं असलेले कष्ट कांहीं चुकावयाचे नाहींत. मनुष्यास जें जन्मजात स्थान किंवा प्रारब्ध मिळतें तें त्याला कांहींहि केलें तरी बदलतां येत नाहीं.

खर——खर लागणें--१ जमीन वगैरे कठीण लागणें; टणक लागणें. २ उभा चढ लागणें.

खरकटें——खरकटें सावडणें—उष्टीं वगैरे गोळा करणें; खरकटें काढून टाकणें; उष्टेंशेण करणें; जेवणानंतर जमीन साफ करणें.

खरकटया हातानें कावळ्या न हांकणें—उष्टया हातानं कावळयास हांकललें तर हाताचें कांहीं अन्न फुकट जाईल व तें कावळयास मिळेल म्हणून काळजी घेणें; कोणत्याहि प्रकारें दुसऱ्यास मदत न करणें. कंजूष माणसास म्हणतात. उष्टया हातानें कावळा हांकणें पहा.

खरकबाण——खरकबाण मेहेरबान—अकिंचन; कफल्लक माणसाबद्दल उपहासानें म्हणतात.

खरका——खरका देणें--खडसावणें; ताकीद देणें; ताशेरा झाडणें; खरडपट्टी काढणें.

खरका मारणें—(हिशेब वगैरेमध्यें लबाडीनें) फसविणें; ठकविणें; गोता देणें; धोका देणें.

खरखट——खरखट, मरमर, धगधग--धडपड; खटपट; उरस्फोड.

खरजुवप——खरजुता एक ठय, खरपिता एक ठय —(गो.) खाजतें एके जागीं तर खाजवितो दुसऱ्या जागीं. खरपणें पहा.

खरड——खर्डावेलें रूं—(गो.) डोक्यावरचें गळूं. डोक्यावरच्या गळवाला भोंवतालच्या केंसामुळें औषधसुद्धां धडपणें लावायला मिळत नाहीं. एखाद्या अप्रिय गोष्टीच्या प्रतिकाराची युक्ति माहित असूनहि तिचा अवलंब करणें अशक्य झाल्यास ही म्हण वापरतात.

खरडपट्टी——खरडपट्टी काढणें—ताशेरा झाडणें; फार रागावून बोलणें; भोसडपट्टी करणें.

खरडा——खरडघाशा; खरडेघाशा--१ केवळ लिहिण्याचें काम करणारा; निवळ कारकून; ज्यास धंद्याची माहिती नसून केवळ सांगितलेलें लिहून ठेवण्याचें तेवढें कळतें असा. २ काबाडकष्ट करणारा; त्रासाचें काम करणारा.

खरडयाजा मोतीं; खरडयाचें मोतीं--खडबडीत मोतीं; हलकें मोतीं; गोळीबंद नव्हे असें वेड्यावाकड्या आकाराचें मोतीं.

खरतड——खरतड बोहणी--(ना.) लाभदायक बोहणी; ज्यांत बराच फायदा झाला आहे असा दिवसाच्या प्रारंभीचाच व्यवहार.

खरपणें——खरपुता एकीकडेन, खरपिता एकीकडेन--(गो.)खरजुवप पहा.

खरपून खरपून खरजु कराचि—(गो.) खाजवून खाजवून खरूज होऊं देणें. खाजवून खरुज पहा.

खरपून खाज काढता आनि चावून चिकट करता —(गो.) खाजवून खाज आणणें व चावून चिकट करणें.

खरपूस——खरपूस ताकीद देणें—सक्त, निक्षून, बजावून सांगणें; साफ सांगणें.

खरपूस तापविणें-भाजणें-तळणें—लाल होईपर्यंत, सपाटून तापविणें.

खरपूस बोलणें-सांगणें—सडकून बोलणें; निक्षून सांगणें.

खरपूस समाचार घेणें—१ चांगलें पारिपत्य करणें; उट्टें काढणें. २ बेदम ठोकणें; मारणें; बदडणें; यथेच्छ कांडात काढणें.

खरबडा——अळीना वळीचा आणि खरबडथा डोईचा—(अळीना वळीचा = आळींतील नव्हे; शेजारचा नव्हे; दूरचा) कोणीतरी असाच; अलबत्या गलबत्या; ज्याचा कांहीं संबंध नाहीं, टाव ठिकाणा नाहीं असा.

खरबूज——खरबुजी चेहरा—देवीचे वण पडलेले आहेत असा चेहरा; ओबड धोबड कुरूप तोंडाचा.

खरबूज रोगाचें ठिकाण--खरबुजें खाल्लीं असतां तीं बहुतेक बाधतात व त्यांपासून रोग उत्पन्न होतात.

खरमरा——राऊत असे खरमरा, तर घोडा चाले तरतरा--घोड्यावर बसणारा पटाईत असला म्हणजे घोडा चांगला चालूं लागतो. काम करून घेणारा हुषार असेल, वागवणारा वाकब असेल तर हाताखालील काम करणारीं माणसें बरोबर काम करतात; नाहींतर टंगळमंगळ करतात. तु०–घोडा राऊत ओळखतो.

खरवड——घराची खरवड— खराब; मोडकेंतोडकें; गैरसोइचें घर; दिसावयास अगदीं वाईट घर.

खरवड काढणें--खरडपट्टी काढणें. 'ह्याची म्यां भली खरवड काढली.'

कामाला मरावें, खरवडीला जपावें--१ कामांत चुकारपणा करावयाचा पण खायला अखेरीपर्यंत राहावयाचें. २ काम खूप करावें पण त्याबरोबर काटकसर करावी.

अइनीला मरावें, खरवडीला झुरावें--अईन पहा.

खरवस——खरवस-खरस तोंडीं येणें—तोंडाला

कोरड पडून शब्द घोगरा येऊं लागणें; अतिशय श्रमांनीं, किंवा फार ओरडून घशास कोरड पडून शब्द नीट उमजत नाहींसा होणें. ' भाऊसाहेब यांचे तोंडास हाणा, हाणा हेंच करीत असतां खरस आली. '-भाब १५१.

खरा——खरा करून देणें—प्रत्यंतर देणें; पुराव्यानें सिद्ध करणें; शाबीत करणें; खरा व अस्सल आहे म्हणून सिद्ध करून देणें; चांगलेपणा पटवून देणें, स्थापित करणें.

खरा स्वभाव दाखविणें--अंतरंग बाहेर पडणें; मूळची जी स्वाभाविक वृत्ति असेल तीस अनुसरून हातून कृति होणें. मनुष्याचें खरें स्वरूप उघडें होणें.

खऱ्याचें खंड--नेहमीं असत्य भाषण करणारा मनुष्य.

❀ खरा धंदा करी, चाले वारशापरी—जो मनुष्य सचोटीनें धंदा रोजगार करतो त्याचा धंदा पिढ्यानपिढ्या चालतो.

खरा बोल, तो त्रिभुवनीं बिनमोल--सत्यभाषण कोठेंहि महत्त्वाचें व मान्य ठरतें. त्याची किंमत सर्वत्र होते.

खरा मित्र बाळगती असे थोडे—ज्यांना खरोखर एकनिष्ठ मित्र मिळतात असे भाग्यवान लोक फार थोडे असतात.

खरी थट्टा करिती, अपराध्याच्या मनीं बिंबती—एखादें वाक्य आपण जरी सहज थट्टेनें बोललों तरी जर त्यांत एखाद्याच्या अपराधाचा उल्लेख असला व त्यानें खरोखर केला असला, तर त्याला तें वाक्य मनांत झोंबल्याशिवाय राहात नाहीं. तु०-खाई त्याला खवखवे. If the cap fits wear it.

खरी सचोटी, संकटें दूर लोटी--जर आपण खरोखर प्रामाणिकपणें वागलों तर आपणावर कधीं संकट येत नाहीं.

खरी सासू धरती कान, तर आखाड सासू मागती मान--जी खरोखर नात्याची सासू, सख्खी सासू असते तिनें शिक्षा केली तर ती केवळ कान पकडते, म्हणजे सौम्य प्रकारची शिक्षा करते; कारण कांहीं झालें तरी तिचा जिव्हाळ्याचा, रक्ताचा संबंध असतो. पण आखाड सासूला तसें कांहीं मनापासून प्रेम वाटावयाचें कारण नसतें, ती परकीय असते; तेव्हां तिला शिक्षा करावयाची असते तेव्हां ती एकदम मान तोडावयास सुद्धां कमी करीत नाहीं म्हणजे तिची वागणूक अधिक जाचक असते ज्याच्या हातांत खरा अधिकार आहे त्यापेक्षां ज्याच्या हातांत तो तात्पुरता किंवा उसना असतो तोच अधिक गाजवूं पाहतो. येथें आखाड सासू म्हणजे अक्कड सासू अथवा थोरली नणंद असा अर्थ नसून आखाड सासऱ्याची बायको असा अर्थ स्पष्ट दिसतो. आखाड सासरा शब्दकोश पहा.

खरें खरें सभ्य असावें, सोंग कां धरावें—मनुष्यानें वरवर सभ्यता दाखविण्यापेक्षां किंवा पोकळ सभ्यता धारण करण्यापेक्षां खरोखर मनापासून सभ्यतेनें वागावें.

खरें खोटें ईश्वर जाणे आणि जोशाचे ठोवताळे—वास्तविक काय आहे व काय व्हावयाचें आहे ही गोष्ट फक्त परमेश्वरासच कळूं शकते; पण भविष्यवादी मात्र आपलें भविष्य खरें झालें, किंवा खरें होणार म्हणून व्यर्थ प्रौढी मारीत असतो.

खरें तें खरेंच—जें खरें असेल तें खोटें होणें शक्य नाहीं. तें कधीं फार काळ दडपून किंवा झांकून राहावयाचें नाहीं. सत्याचा नेहमीं जयच असतो. (गु.) खरांनु खरूंज छे.

खरें बोलणाराला शपथेची गरज नाहीं—जो मनुष्य नेहमीं खरें बोलतो त्याच्या बोलण्यावर सर्व लोक विश्वास ठेवतात. तेव्हां त्याला शपथ वाहून सांगण्याची जरूर पडत नाहीं.

खरें बोलावें तर बापाला राग येतो—खरें बोललेलें रोखठोक व स्पष्ट असतें पण तसें बोललेलें विशेषतः एखाद्याच्या दोषाबद्दल बोलणें कोणाला आवडत नाहीं किंबहुना स्वतःच्या बापालाहि तें प्रिय नसतें. अप्रियस्य च पथ्यस्य श्रोता वक्ता च दुर्लभः । पहा.

खरें बोलेल तो उपाशी मरेल--खरें बोलणारा मनुष्य फटकळ गणला जातो व बहुधा अप्रिय होतो, म्हणून त्याला कोणी जवळ करीत नाहीं व त्याला उपाशीं मरण्याची पाळी येते.

खऱ्याखोट्याचा निवाडा, न्यायी करती रोकडा—जे न्यायी असतात त्यांच्या खरें कोणतें व खोटें कोणतें हें ताबडतोब लक्षांत येतें.

खऱ्या खोट्यामध्यें चार बोटांचें अंतर—जें आपण डोळ्यांनीं पाहतों तें खरें व कानांनीं ऐकतों तें खोटें व कान आणि डोळे यांमध्यें चार बोटांचें अंतर असतें. यावरून ही म्हण पडली आहे.

खऱ्या धर्मात्म्याची त्याच्या देशांत कदर नसते--जो खरोखर सालस, सत्यप्रिय मनुष्य असतो तो आपल्या भोंवतीच्या लोकांत अप्रिय होतो. (पण इतरांस त्याच्या सत्याप्रयत्नामुळें वंद्य होतो.)

खऱ्या मनुष्याची वाणी, दस्तऐवजासमान— जो सचोटीचा प्रामाणिक मनुष्य आहे, जो सत्यवचनी आहे त्याच्या शब्दाला लेखाइतकी किंमत असते. कारण तो कधींहि स्वतःच्या वचनापासून ढळत नाहीं.

खऱ्याचा दास नी खोट्याचा वस्ताद—सत्याची कास धरणारा व असत्याला चिरडणारा असा.

खऱ्याची दुनिया नाहीं--खरें वागणारा वैतागानें हे उद्गार काढतो. जगांत बहुधा खोटेंनाटें करणारांचीच चलती असते, असा अनुभव येतो.

खऱ्याच्या गांडींत मेख मारणें--खरें बोलणाऱ्या मनुष्याला बहुधा त्रास सोसावा लागतो. खरें कोणास नको असतें कारण तें बहुधा अप्रिय असतें. म्हणून त्याचें निष्कासन करण्याचा जो तो प्रयत्न करीत असतो.

खऱ्याला कांहीं भय नाहीं--खऱ्या गोष्टीला कोणापासूनहि भीति नसते; तें अढळ असतें.

खऱ्याला (कधीं) मरण नाहीं--सत्य अमर आहे. वर पहा. तु०-सत्य न मरतें दलभारें ।-यशवंत.

खराटा——खराटा फिरणें—साफ होणें; नाहींसें होणें; सर्वनाश होणें; विध्वस होणें. ' परंतु माणसांचा एकदम स्वयंपाक करावा लागल्यामुळें कांहीं साठवणांवरून खराटा फिरला. '-शाव २ २८८.

खराटा फिरविणें--झाडून साफ करणें; नांगर फिरविणें; सत्यानाश करणें; विध्वंस करणें.

खराब——खराबींत आला तरी तोरा नाहीं गेला--एखादा मनुष्य अतिशय अरेराव व कुर्रेबाज असतो. या त्याच्या वागणुकामुळें पुष्कळदां त्याचें नुकसान होतें तरी तो आपली वर्तणूक कांहीं सुधारीत नाहीं व पोकळ घमेंड टाकून देत नाहीं. व्यर्थ पोकळ ऐट मारणाराबद्दल ते जेव्हां डबघाईस येतात तेव्हां म्हणतात.

खरारा——गाढवाचा खरारा--मूर्ख मनुष्य.

खरारा खाजवीत, नगारा वाजवीत—कांहींतरी करीत; भलतीशीच गोष्ट करीत (येणें, फिरणें). पुढें पहा.

❀ **खरारा खाजवी, नगारा वाजवी**--१ कांहींतरी भलतच करणाऱ्या मनुष्याला म्हणतात. २ रिकामटेकडे बसून घरचेंच उत्पन्न खात असावयाचें व कसातरी वेळ घालवावयाचा व तेंहि जवळ जवळ दारिद्र्यांत राहावयाचें अशा मनुष्यास म्हणतात. मॅनवेरिंगनें Everything has its proper use. असा अर्थ दिला आहे तो चुकीचा दिसतो. मॅन. १८२४.

खरूज——कांडळून-खाजवून खरूज काढणें-- खाजवलें असतां खरूज उत्पन्न होते व असली तर वाढते; यावरून आपण होऊन स्वतःवर संकट अनर्थ ओढवून घेणें.

खरूजवाल्याक लज ना आणि गरजवंताक अक्कल ना—(गो.) खरूज झालेल्यास लाज नाहीं व गरजवंताला अक्कल नाहीं. खरजेला माणूस खाज सुटली म्हणजे काय करतो ? ती जागा समोर कोणीहि असलें तरी खाजवितोच कीं नाहीं ? त्याचप्रमाणें गरजू माणूस मूर्खपणा पदरी घेऊन याचना करतो.

❀ **खरजेला भांडवल कांडवल**— खाजवल्यानें, कांडुळण्यानें खरूज उत्पन्न होते व वाढते. कांडूळून खरूज काढणें.

खर्च——खर्चास शेंडी फुटणें -अपेक्षेबाहेर खर्च होणें; ठरविलेल्या अदाजाबाहेर खर्च होणं; खर्च वाढणें.

खर्चीं घालणें-पाडणें—खर्च करून टाकणें; खर्च झालेला दाखविणें; जमाखर्चांत नांवेच्या बाजूस लिहिणें.

खर्चीं पाडणें—कोणेकास आपण स इष्ट किंवा अनुकूल अशा रीतीनें बोलावयास किंवा करावयास लावणें. एखाद्या मनुष्याचा आपल्या कामासाठीं उपयोग करून घेणें.

❀ **खर्च केला नाहीं कवडीचा, आणि प्रेतावर वाहे पूर रेवडीचा**--जीवत असतां एखाद्या मनुष्याच्या बाबतींत पूर्ण उपेक्षा करावयाची, त्याच्याकरितां मुळींच खर्च करावयाचा नाहीं (त्यानें स्वतः अथवा इतर कोणीहि)आणि तो मेला म्हणजे मात्र त्याचें प्रेत गेवड्या उडवीत मोठ्या थाटामाटानें वाजत गाजत न्यावयाचें. तु०- जगा तुझी रीत सदा उफराटी ।-यशवंत. जित्या न मिळे अन्न । मेल्या करी पिंडदान ॥

खर्च लागे निरंतर त्यांत नाहीं अंतर, मिळकत अशाश्वत विचार करी सतत--प्राप्तीचें साधन अनिश्चित असतां एकसारखा खर्च करीत जाणें चांगलें नव्हे. नीट विचार करून आपली परिस्थिति पाहून खर्च करीत जावा.

खर्च लागे निरंतर, मिळकतीस नाहीं आधार— एखाद्या मनुष्याला प्राप्तीचें कांहीं साधन नसतां तो एकसारखा खर्च करूं लागला असतां म्हणतात. बेकार उधळ्या.

खर्चणारा——खर्चणाराचें खर्चतें, पण (आणि) कोठावळ्याचें पोट दुखतें— मध्यस्थ लोक किंवा यजमानाचे आश्रित नेहमीं चांगल्या कामीं होणाऱ्या खर्चाच्या आड येतात. यजमानाला खर्चाचें कांहीं वाटत नाहीं. पण मध्येंच त्याचा कारकूनच कांहीं तरी खो घालतो. (ल.) स्वतःच्या

पदरचें द्यावयाचें तर नाहीं, उलट दुसरा देत असला तर आड यावयाचें. –गांगा १९६.

खर्ची——खर्ची सुटे आणि मैत्री तुटे--जोंपर्यंत आपण एखाद्यास मदत करीत असतों तोंपर्यंत त्याची आपली मैत्री असते. त्याची मदत बंद झाली कीं, तो आपणास विचारीत नाहींसा होतो.

खर्डा——खर्डाचा खर्डा—(ना.) लांबच लांब; दीर्घसूत्री.

खलक——खलककी जबान, खुदाका नगारा—(हिं) [खल्क=लोक; जनता] सर्व लोकांचें म्हणणें हें ईश्वरवाणीसारखें आहे. तु० -जनताजनार्दन. पांचामुखीं परमेश्वर.

खलाशी——खलाशी लोकांचें घर प्रत्येक बंदरांत असतें—(इंग्रजी म्हण) बंदर आलें कीं उतरून खलाशी चैन व बाहेरख्यालीपणा करतात. त्यांना अशीं सुखें बोटीवर मिळत नाहींत.-ज्ञानप्रकाश २१–६–४०. The sailor has wife at every port.

खल्क——खल्क खुदाका, मुल्ख बादशाहाका——विश्व हें परमेश्वराचें, आणि मुलुख राजाचा. खल्क खुदाका, मुलक बादशहाका, अंमल इंग्रेज सरकारका अशी इंग्रजांची द्वाही असे.–केसरी ११–९–३६.

खल्लय——खल्लय-उंचय नात्तिल्लो; खालाय उंचाय नाथिल्ल—(गो.) खालींवर कांहीं नसलेला, मागें पुढें कांहीं नसलेला; आगापिच्छा नसलेला; बीनबुडाचा, क्षुद्र माणूस; निराधार.

खल्वाट——खल्वाटो निर्धनः क्वचित्—साधारणतः टकल पडलेला मनुष्य श्रीमंत असतो अशी समजूत आहे. पुढील श्लोक पहा—क्वचिद्दन्तालको मूर्खः क्वचिद्रानवती सती। क्वचित्काणो भवेत्साधुः खल्वाटो निर्धनः क्वचित् ॥ याच्या उलट गमतीनें टकल्या दरिद्री असतो असेंहि म्हणतात व त्याकरितां वरील श्लोकांत 'खल्वाटो निर्धनः खचित्' असा बदल करतात.

खवखवणें——खाई त्याला खवखवे–'खाणें' पहा.

खंवट——खंवट खोबरें—१ (ल) चिडका, तुसडा माणूस; क्षुद्र मनाचा, कुचकामाचा माणूस.

***खंवट खोबरें आणि मसाल्याची घाण**—एका खंवट खोबऱ्यानें सारा मसाला बिघडतो. याप्रमाणें एक वाईट माणूस एकंदर मंडळीला कमीपणा आणतो.

खंवट खोबरें, जिगट (चिकट) गूळ—[जिगट=चिघळलेला, चिकी] खंवट खोबऱ्याबरोबर चिघळलेला गूळच देणें योग्य. जशास तसें भेटणें.

खवडा——खवडा उडणें-उडविणें—हजामत करतांना खवडासुद्धां कापून तासून टाकणें; तासडपट्टी करणें; फजिती करणें; टर उडणें, उडविणें; खरड काढणें.

खवडा करणें-करून टाकणें—१ नासणें; बिघडविणें; निष्फळ करणें. २ फजिती करणें; टर उडविणें; अपमान करणें.

खवडा जिरविणें—ताठा उतरविणें; रग मोडणें.

खवळणी——खवळणीचें पाणी देणें—(व.) एखाद्यास उत्तेजित करणें; चेतविणें; खवळवणें.

खॅस——खॅस मारणें—दम देणें; जोरानें बोलणें.

खसखस——खसखस पिकणें—हंशा उडणें; मोठ्यानें पुष्कळ हंसणें; खदखदा हंसणें. [(ध्व.) हंसतांना खसखस यासारखा आवाज होतो यावरून.]

खस(सा)लत——खस(सा)लत काढणें-भोगणें-सोसणें--अतिशय त्रास, जांच सहन करणें; अतिशय कष्टांत दिवस काढणें.

खसाला——खसाल्यांतून मसाला होऊन निघणें–अतिशय श्रम, कष्ट केल्यामुळें माणसाच्या अंगीं चांगले गुण येतात व त्याची योग्यता वाढते.

खस्त——मरून खस्त होणें—लढाई इत्यादींमध्यें मरून मातीस मिसळून जाणें; मातीस मिळणें; पार नाहींसें होणें. 'मरून खस्त होईन पण दास होणार नाहीं.'–सूर्यग्र १८६.

खस्ता——खस्ता खाणें—त्रास सोसणें; सेवा, चाकरी करणें. 'त्याला तिच्या फार खस्ता खाव्या लागत.'–चंद्र ८.

खस्सणें——खस्से हाडा पर न खस्से खाडा—कितीहि हाडें खस्त केलीं तरी खाडा भरत नाहीं. कितीहि कष्ट केले तरी पोटाची खळगी भरत नाहीं. अत्यंत कष्ट करूनहि संसाराचा गाडा रेटत नाहीं.

खळ——परटाची खळ, न ब्राह्मणाची खळ (बायको) लागलीच आहे—परटाचें कधीं खळीवांचून चालावयाचें नाहीं. प्रत्येक कपड्याला ती लावावीच लागते व ब्राह्मणाचें प्रत्येक कृत्य त्याच्या बायकोवांचून होत नाहीं. याप्रमाणें यांचा हा नित्य संबंध आहे. अग्निहोत्र्याची बायको मृत झाल्यास त्याचें अग्निहोत्र बंद पडतें व त्याचा अग्नि व सर्व उपकरणें तिच्याबरोबर जाऊन दहन होतात.

खळखळ——खळखळ करणें—अडणें; हटून बसणें; कुरकुर करणें; आढेवेढे घेणें; कांकूं करणें; न करण्याचा हट्ट घेणें. ' यशवंतरावानें एखाद्या गोष्टीबद्दल खळखळ केली तर तिला कसेंकसेंच होऊन. '–यशख.

खळखळ करून--फार खटपट करून; अतिशय जिकीर करून.

❀ दगडाचें पेव घालतांना खळखळ, काढतांना खळखळ—१ दाणे जर पेवांत भरावयाचे झाले तर आवाज न होतां भरतां येतात किंवा काढतांहि येतात. परंतु तेच जर दगड पेवामध्यें भरावयाचे झाल्यास ते वाजल्याशिवाय राहात नाहींत व काढतांनाहि वाजल्याशिवाय बाहेर काढतां येत नाहींत. भांडखोर मनुष्याशीं संबंध आला म्हणजे एकसारखें तोंड वाजल्याशिवाय राहात नाहीं. २ पेंव मातींत बांधलें असलें तर दाणे घालतां काढतांना आवाज होत नाहीं पण दगडी बांधल्यास दाणे त्यावर वाजतात.

खळखळां——खळखळां रडणें—ढसढसां, फार जिव्हारीं लागून रडणें. ' स्मरला विदुरकविवचन शतदां तो रडुनियां खळखळां तें । '–मोशल्य ४.२६.

खळखळाट——उथळ नदीस (पाण्यास) खळखळाट (खळखळी, खळाळी) फार—ज्या मनुष्याजवळ थोडीशीच ज्ञानाची वगैरे पुंजी असते,तो तिची प्रौढी अधिक मिरवीत असतो व गाजावाजा करीत असतो. उलट गाढा विद्वान् खोल नदींतील पाण्याप्रमाणें शांत असतो. Shallow water makes a great roar.

खळगा——खळगा लावणें—खळगा चिकणमातीनें सारावणें.

❀ ओहोळाला खळगा जामीन—ओहोळ पहा.

खळी——खळी खणणें—पूर्वी भिक्षेकरी किंवा धनको हे ज्याकडे पैसे मागावयास जात, त्याच्या अंगणांत बसून राहात व त्यानें पैसे दिले नाहींत तर त्याच्या अंगणांत खळ्या खणीत बसत. यावरून अडून बसणें; हट्ट धरणें; तीव्र तगादा करणें.

खळ्या खणीत बसणें—निरुपयोगी असें कांहींतरी करीत बसणें.

खळ्या खांदीत बसणें—डोईफोडे किंवा इतर भिकारी नंदीबैलवाले वगैरे भिक्षा न दिल्यास किंवा विलंब लावल्यास अंगणांत खळ्या खणीत बसतात; त्यावरून हटवादीपणा करणें; खनपटीस बसणें.

खळी——खळीस येणें—इरेस पडणें; त्वेष चढणें. ' डुक्कर खळीस येतो तैसे इरेस पडून मारामारी केली. ' –भाब ४२.

खळें——खळें खुरवतणें—(माण.) खळ्यांत पाणी शिंपडून बैल तिवड्यास जुंपून त्यांच्याकडून खळ्यांतील जमीन घट्ट बसविणें; खळें चोपून वगैरे साफ करून ठेवणें.

खळें तळवें—१ मळणी करावयाची जागा (खळें) आणि धान्य सांठवावयाची जागा (तळवें). २ (ल.) खळ्यावर इकडे तिकडे पडलेलें व तळव्यावर पडलेलें धान्य. ' खळें तळवें सगळें अर्धेल्यास देऊं नये, अर्धें आपण घ्यावें व अर्धें त्यास द्यावें. '

खळेंभट; खळभट—१ खळ्यावर मिळणाऱ्या धान्यावर उदरनिर्वाह करणारा. २ खळ्यावर येऊन धान्य मागणारा व मिळेपर्यंत बसून राहणारा. ३ (ल.) अतिशय लोचट; तेलंगी ब्राह्मण. ४ निरक्षर ब्राह्मण; ग्रामपंडित. [या वाक्प्रचारांत खळें व खळ (खळ) या दोन्ही शब्दांचे ध्वनि उमटतात.]

खाई——खाईंत खायींत उडी टाकणें—खड्ड्यांत उडी टाकणें; स्वतःवर आपण होऊन संकट ओढवून घेणें.

खाऊ——खाऊची गोष्ट—प्राप्तीची गोष्ट; उत्पन्नाची बाब; लाभाची बाब; सुदैव; फायदेशीर धंदा; उद्योग वगैरे.

खाक—खाका वर-वरतीं करणें—आपले खिसे चांचपून पाहाण्याची परवानगी देतांना खाका वर करतात, व दुसऱ्याला सर्व खिसे वगैरे पाहूं देतात; यावरून आपल्याजवळ कांहीं नाहीं असें दाखविणें, सांगणें. 'उर्ध्वायै दिशे०'पहा. ' त्यांनींच सरतेशेवटीं आपल्या खाका वरतीं केल्या: '–शाब २.१७५.

खाका वाजविणें—आनंद झाला असतां दंड कुशीवर आपटून आवाज काढतात किंवा हातानें खाका थांपटतात; यावरून, अत्यानंद होणें; हर्षित होणें.

खाकेंतून काढून बाजारांत मांडणें—१ साळसूदपणें आपला खोटेपणा लपविणें; आपल्या लबाडीवर सारवण घालणें. २ स्वतःच खोटी गप्प उठविणें; आपल्याच डोक्यांतून एखादी अवई काढून गांवांत पसरविणें.

खाकेस मारणें; खाकोटीस मारणें—१ आपल्याजवळ घेणें. २ एखादी वस्तु पळवून नेणें; आपलीच आहे असें दाखवून घेऊन जाणें; अपहार करणें; दाबणें.

❀ **खाकेंत कळसा, गांवाला वळसा; खाकेंत पोर नि गांवांत डांगोरा**—स्वतःची वस्तु अथवा मूल स्वतःजवळच असतां सर्व गांव धुंडाळीत व आरडाओरड करीत फिरणें. तु०–मांडीखालीं आरी आणि चांभार पोर मारी. या अर्थाच्या अनेक म्हणी आहेत. कळसा पहा.

खाकेंत खवला अन् महादेव पावला—सदोदित मूल कडेवर घेऊन फिरणाऱ्या व मुलींच काम न करणाऱ्या स्त्रीस म्हणतात. आपल्याच मुलाचें कौतुक करीत बसणाऱ्या स्त्रीस ही म्हण वापरतात. ' कवला महादेव पावला ' याचा अर्थ वेगळा आहे. ' कवला ' पहा.

खांक——खांकिने पादु विसरैलो—(गो.) खोकल्यानें पाद विसरायला लावलं. खोकल्यानें पाद जिरविणें, पहा.

खांकीपेक्षां पादा अन्न चढ—(गो.) खोकल्यापेक्षां पादाला महत्त्व अधिक. चांगल्या वस्तूपेक्षां निकृष्ट वस्तूला जेव्हां अधिक दर्जा मिळतो तेव्हां म्हणतात.

खांकून खांकून गांवकार जाता—(गो.) खोकून खोकून ग्रामाधिकारी बनणें. खऱ्या गुणानें पुढें न येतां कांहीं लबाडी, ढोंग करून पुढें येणें.

खाकरणें——खाकरणें—१ एखाद्यास पाहून मुद्दाम खाकरणें म्हणजे, त्याच्याबद्दल अनादर व्यक्त करणें; त्याची हेटाळणी करणें. २ त्याचें लक्ष वेधणें; कांहीं संकेत देणें.

खाखर——खाखरनी खिलोडी, दराखनो (शाकरनो) स्वाद शुं जाणे ?—(गु.) गाखर खाणारीला द्राक्षाचा, साखरेचा स्वाद काय माहीत ? गाढवाला गुळाची चव काय ?

खाज——खाज जिरवणें—आग, कंडू शमविणें; खोड मोडणें; रग, खुमखुमी जिरविणें.

खाजविणें——खाजवीत बसणें—१ (ढुंगण) खाजवीत बसणें; कांहीं न करतां रिकामें बसणें. २ निराशेनें बसणें.

खाजवून अवधान आणणें—अंग खाजविलें असतां तेथील त्वचेस त्रास होऊन सुजण्याचा संभव असतो व त्याचा अवधणा येतो. यावरून स्वतःहोऊन स्वतःच्या जीवाला त्रास करून घेणें.

खाजवून खरूज काढणें—खरूज बरी होत असतां खाजविलें असतां लस लागून ती वाढते. यावरून मिटलेलीं भांडणें पुन्हां उकरून काढणें. फोडाला खपली पडली असतां खाजविलें तर पुन्हां खरूज चिघळते. ' खपली काढणें ' पहा.

खाजवून पान्हा आणणें—एखादी गाय म्हैस पान्हवत नसली तर तिला चोळून, खाजवून पान्हवतात. यावरून एखाद्यास उत्तेजन देऊन एखाद्या कामास प्रवृत्त करणें; एखाद्यास हुरळावयास लावणें.

❀ **खाजवयाला तुऱ्हाटी नाहीं अन् कावळ्याला आवतण**—[तुऱ्हाटी = तुरकाठी, तुरीची काटकी] जवळ कांहींहि नसतां उगाच बडेजाव मिरवणें.

खाजवील त्याची खरूज, चिडेल त्याचा कज्जा—खरूज खाजविली असतां वाढते व चिडण्यानें भांडणतंटा वाढतो.

खाजवील त्याची खरूज, भांडेल त्याचा कज्जा—ज्याला एकसारखें खाजविण्याची संवय असते त्याला खरूज होते व ती एकसारख्या खाजवण्यानें अधिकाधिक वाढतच जाते; कधीं बरी होत नाहीं. त्याचप्रमाणें जो भांडखोर असतो त्याचा सर्वांशीं कज्जा होतो व तो त्याच्या भांडखोरपणामुळें कधीं संपत नाहीं.

खाजवील त्याला खरूज, भोगील त्याला संपदा—ज्याला अंग खाजविण्याची संवय असते त्याला खरूज होण्याचा संभव असतो हें जसें खरें, तसेंच ज्याच्याजवळ पैसा आहे त्यानें त्याचा उपभोग घेतला तरच त्यापासून त्याला फायदा; नाहींतर त्याला असून नसून सारखाच.

खाट——खाटपसारा मांडणें-घालणें—गोंधळ, अस्ताव्यस्तपणा करणें; फापटपसारा करणें.

खाटेवर चढणें-जाणें—[सं. तल्पग याप्रमाणें] निकट आप्त स्त्री, गुरुपत्नी इ.च्या संभोगाची इच्छा करणारा जसा करतो त्याप्रमाणें वागणें. पूज्य माणसाविरुद्ध उलटणें; कृतघ्न बनणें; मात्रागमनीपणा करणें. 'तो आईच्या खाटल्यावर चढला' अशी शिवी आहे.

खाटलें——खाटलें टाकणें—आजारी पडणें.

खाटलेंबाजलें—१ सप्तर्षि तारकापुंज. सप्तर्षींच्या सात तारकांपैकीं चार खाटेच्या चार खुरांप्रमाणें दिसतात. यावरून वास्तविक खाटलें व नांगर अशी म्हण आहे. कारण चार खाटल्यासारख्या व तीन नांगरासारख्या तारका दिसतात. २ बायकांच्या लुगड्यांवरील एक लहानमोठ्या चौकटीची नकशी.

खाटलेंबाईक; **खाटलें कुजवणारा**—खाटलें धरून बसणारा; अंथरुणाला खिळलेला; नेहमीं आजारी असणारा.

खाटल्याला लाथ मारून उठणें--(ना.) आजारांतून उठणें; आजार टाकून देणें; बरें होणें.

खाटल्यावर जाणें-मातृगमन करणें. 'खाटेवर चढणें' पहा.

खाटी——खाटी मेजवानी—सामिष भोजन; मांस युक्त पदार्थांची मेजवानी.

खाटीक——खाटकी माल--मांस; सागोती; बाजार.

***खाटकाला शेळी (गाय) धारजिणी**--एखाद्या मनुष्याला दुसरा जबरदस्त भेटला म्हणजे त्याचेपुढें त्याचें कांहीं चालत नाहीं; तो अगदीं त्यापुढें गोगलगाईसारखा मऊ होतो. नाहींतर एरवीं गडबड करीत असतो. त्याप्रमाणें शेळी खाटकाजवळ मुळींच गडबड करीत नाहीं.-गांगा १७८. पर्याय-कसायास गाय धारजिणी. कसाई पहा.

खाटकाला शेळी धार्जिण, कसायाला गाय धार्जिण-खाटिक शेळीला मारतो पण ती त्याच्याजवळ अगदीं गडबड न करतां नरमपणानें असते. तशीच गाय तिला मारणाऱ्या कसायाजवळ गडबड करीत नाहीं. जबरदस्ताशीं गांठ पडली म्हणजे सर्व नरम येतात. आपला शत्रु पुढें दिसला म्हणजे सर्व प्राणि घाबरून जातात व धैर्य टाकतात. विंचू पालीपुढें नांगी टाकतो अशीहि समजूत आहे.

खाड——खाड आसल्यारि जांबुवतु जालो वे—दाढी असल्यावर जांबुवत होतो काय! शहाणपण दाढींत नसतें.

खाड मिशांच्या चॉ पार ना, रांडेच्या चॉ खैंचो पार?—(गो.) मोठमोठ्यांची जेथें दाद लागत नाहीं, तेथें असल्या क्षुद्र व्यक्तीला कोंण विचारतो.

खाडाक उजो लागल वेळेरी अरलो वज्जूंक वत्ता; खाडाक उजो लागल्या वेळार अपलो भाजूंक वेता—(गो.) [अपलो=चणे मीठ घालून केलेला एक पदार्थ.] जेव्हां एकाची दाढी जळते आहे तेव्हां दुसरा तीवर आपला 'अरलो' भाजून घेतो. दुसरा संकटांत असतांना त्यावेळीं आपला फायदा करून घेण्याची क्षुद्र वृत्ति दाखविणें. तु०-दुसऱ्याच्या घरास आग लागली असतां आपली विडी पेटवून घेणें. एकाची जळते दाढी दुसरा तीवर आपली पेटवून घेतो विडी.

खाडाक उजो लागिल्यावेळारि वीडी लावंच्याक आयिलो--(गो.) दाढीला आग लागली असतांना विडी पेटवायला आला.

खाडाच्याने केलें, मिशाच्याक मारलें—(गो.) दाढी असलेल्यानें केलें, मिशा असणाऱ्याला मारलें. तु०-वड्याचें तेल वांग्यावर.

खाडारि घाल्ला मांटवू द्राक्ष पिकताचि खावुं—(गो.) दाढीवर घातला मांडव, द्राक्षें पिकल्यावर खावीं! अशक्य गोष्ट.

खाडास वेगळें, बोडास वेगळें, कोण देतों; खाडास वेगळें घाव्लास वेगळें—[खाड=दाढी. बोड=डोक्याची हजामत.] दाढी करण्याचे पैसे वेगळे व डोक्याची हजामत करण्याचे वेगळे पैसे कोण देईल? पूर्वी सर्व हजामत एकदमच करीत. केवळ दाढी करण्याची चाल नव्हती. तेव्हां हजामतीच्या पैशांतच सर्व डोकें, दाढी वगैरेची हजामत येत असे. दाढी करण्याकरितां वेगळे पैसे कोणी देत नसत. अलीकडे केंस कापण्याची पद्धति निघाल्यापासून नुसती दाढी करणें, दाढी व हजामत करणें, दाढी व केंस कापणें असे निरनिराळे दर असतात. यावरून मोठ्या कामांतच लहान कामाचा अंतर्भाव होतो; तें काम कोणी वेगळें मानीत नाहीं व त्याकरितां वेगळे दाम देत नाहीं. बारीकसारीक गोष्टींत कोणी विशेष लक्ष्य घालीत नाहीं. किरकोळ भेद कोण करीत बसतो. दाढी पहा.

खांडगळी——खांडग(गा)ळी शिवी--सवाष्ण बाईला रांडे, बोडके अशा प्रकारची शिवी; अभद्र भाषण; अपशब्द.

खांडणें——सडा खांडणें—वासरूं, करडूं वगैरेंनीं दूध पितांना आचूळ चावणें, कुरतडणें; थान चावणें.

***आडवें आलें तें खांडून काढावें**—मूल आडवें आलें असतां त्याची आशा सोडून बाळंतिणीस वांचविण्याकरितां मुलाचे तुकडे करून कापून काढावें. एखादें मोठें कार्य करीत असतां मार्गांत येणारे अडथळे कठोरपणें कोणतीहि साधनें वापरून दूर करावे.

खांडफासोळी—(व.) इतर फांसळ्याच्या मानानें बरीच आंखूड असलेली फासळी; एका बाजूस फासळी कमी असलेलें जनावर.

खांडवा——खांडवा तोडणें--दोन अलग भाग करणें; दुभंगणें; मध्यें खिंड पाडणें; दोन वेगळे तुकडे करणें. 'मग शिंदे होळकर यांणीं मध्यें घोडीं घालून अगदींच खांडवा तोडिला.'-भाव १०९.

खाडवें——अडव्यास खाडवें बोलणें--खाडवें म्हणजे झाडावर चढावयाच्या वेळीं दोरीचा पायंडा वापरतात

तो. वास्तविक आडव्या झाडावर चढण्याकरितां खाडवें लागत नाहीं तरी मुद्दामच वापरावयाचें; यावरून. (ल.) चांगल्याचा मोबदला वाईट बोलण्यानें देणें; आदराबद्दल अनादर दाखविणें.

खाडा——(पैशास, दागिन्यास, गहाणास) **खाड्यात घालणें**--गिळंकृत करणें; लबाडीनें अपहार करणें; नाहींसें करणें; लांबवणें; लुबाडून घेणें.

(माणसास) खाड्यांत घालणें-पाडणें-टाकणें--नुकसानींत आणणें; हलाखींत टाकणें; अडचणींत टाकणें; दुःखांत लोटणें.

खाड्यांत पडणें--घस लागणें; आपत्ति येणें; नुकसान येणें; तोटा होणें.

खांडा——**खांडे सुलतानी**--(व.) १ अरेरावी; बेबंदशाही; जुलूम. २ ठेंगेमारू फत्तेकरू करणारा इसम.

खाड्याधारेरी चमकवुंचें—(गो.) तलवारीच्या धारेवर चालणें.

खाण———**चार खाणी**—१ जारज, २ अंडज, ३ स्वेदज, ४ उद्भिज.

खाणीचा, खानदानीचा--कुलीन; उच्च कुळातील; चांगल्या वंशातील; ज्याची परंपरा श्रेष्ठ आहे असा.

❀ **खाण तशी माती**--जशी भूमि असेल तसें त्यांतून बाहेर पडेल; बीज तसा अंकुर; जसें मूळ तसें फळ. जसें आईबाप असतात तशीं मुलें निघतात. 'जीचें उदरीं तव उत्पत्ती। तिची निवडली ऐशी जाती। म्हणोनि खाण तैशी माती। आहाणा लोकीं प्रसिद्ध ॥'–मुक्तेश्वर

खाण तशी माती, आणि आत तशी भाची; खाण तशी माती, जाती तशी पोती (जात तशी पुत)--जशी जन्मभूमी असेल तसेंच फळ उपजेल व ज्या कुळांत जन्म होईल त्या कुळाचे गुणावगुण मनुष्यामध्यें उतरतील. किंवा ज्या जातीमध्यें जन्म होतो त्या जातीचे गुण मुलीला लागतात.

खाण तशी माती, गहूं तशी रोटी—(व.) पांढऱ्या मातीची खाण असेल तर तींतून पांढरीच माती निघेल. लाल मातीच्या खाणींतून लालच माती निघेल. तसेंच गहूं चांगले असतील जर त्यांची रोटी चांगली होईल, पण तेच वाईट असतील तर रोटी वाईट होईल. कारण जसा संग्रह असेल तशा प्रकारचें कार्य बनेल. यथा बीजं तथांकुरः।

खाण तशी माती, नी आवै तशी धुती (पुती)--(गो.) खाण तशी माती आणि आईसारखी लेक. वरीलप्रमाणेंच.

खाणें——**जिवाला खाणें**—हुरहुर लागणें; चुटपुट लागणें; मनाला लागून राहाणें; झोंबणें.

जीव-प्राण खाणें--दुसऱ्याला फार त्रास देणें; अत्यंत जाच करणें; जीव नकोसा करणें.

दांत ओठ खाणें—अतिशय रागावणें; जळफळणें; चरफडणें.

खा खा करणें—खाण्यासाठीं हपापलेला असणें; नेहमीं भुकेल्यासारखें करणें.

खा खा सुटणें—वरप्रमाणेंच. 'जोंपर्यंत त्यांच्या तलवारी रक्तानें भिजलेल्या असतात तोंपर्यंत त्यांच्या धारेला खा खा सुटलेली असते.' –V. S. २.१७७.

खाईन खाईन करणें—अधाशीपणा करणें; नेहमीं खाण्याकरितां उत्सुक असणें; किती खाल्लें तरी तृप्त न होणें.

खाऊं कीं गिळूं करणें—काय करूं, काय नाहीं अशा त्वेषानें एखाद्याशीं वागणें; अतिशय रागावून शिक्षा करण्यास उद्युक्त होणें. 'भटजीला सर्वजण खाऊं कीं गिळूं करीत होते.'–इंप ८७.

खाऊं गिळूं; खाऊ डाऊ—एकसारखी सतत जाचणी, गांजणूक.

खाऊन खाऊन गोबर करणें—(ना.) [गोबर=शेण] सर्व गोष्टींचा फडशा पाडणें; सर्व खर्च करून टाकणें; उधळपट्टी करणें.

खाऊन टाकणें—नाहींसें करणें; संपविणें; फडशा पाडणें; पार पाडणें; सफा उडविणें. 'हे हितशत्रु पेशवाई लवकरच खाऊन टाकणार.'–अस्तंभा २८.

खाऊन ढेकर देणें--पूर्णपणें गिळंकृत करणें; अपहार करणें; सर्व गट्ट करून बसणें; पूर्णपणें स्वाहा करणें.

खाऊन पिऊन दोन पैसे बाळगून असणें--बऱ्यापैकीं श्रीमंत असणें; साधारणतः प्रपंच योग्य तऱ्हेनें भागेल इतकी संपत्ति जवळ असणें.

खाऊन पिऊन सुखी--सुखवस्तु; खाण्यापिण्याची ददात नसलेला साधारण श्रीमंत; गर्भ श्रीमंत.

खाण्यामुळें हीनशक्त होणें--खाण्याची आबाळ झाल्यामुळें अशक्त होणें; पुरेसें खाण्यास न मिळाल्यामुळें खंगणें; रोड होणें; अन्नाभावीं कृश होणें.

खाण्या तुटणें—अन्न कमी जाणें; पचनशक्ति कमी होणें; अन्नपचन नाहींसें होणें.

खातांजेवतां-खातांपितां मरणें--ऐष आरामांत, सुखांत मृत्यु येणें; विपन्नदशा न येतां सुखांत मरणें; भरभराटींत आयुष्य घालविणें.

खातीपिती होणें--(व.) वयांत येणें; न्हाण येणें; तारुण्यांत येणें.

खात्या नारीचें दैव--चांगली स्थिति; सौभाग्य; सुखी स्त्रीचें भाग्य; स्त्रियांस आशीर्वाद देण्याची एक शब्दयोजना.

खायला उठणें--गहजब करणें; हल्ला करणें; रागावणें; आवेशानें चाल करणें.

खायाप्यायाचे-खाण्यापिण्याचे दिवस—ऐन तारुण्याचे,उमेदीचे दिवस; ज्यावेळीं खाल्लें प्यालें तर अंगीं लागेल असे दिवस; उपभोग घेण्याचे दिवस.

खाल्लया घरचे वासे मोजणें—घर विकण्यास निघालें तर किती किंमत येईल या दृष्टीनें मोजदाद आधींच करणें. म्हणजे वाईट चिंतणें. कृतघ्नपणा करणें; केलेले उपकार विसरणें. 'तथापि आपल्या परमोदार प्रथम आश्रयदात्यासहि सोडणें किंवा त्याची यत्किंचितही अप्रसन्नता होण्याचा प्रसंग येऊं देणें, हेंही केवळ खाल्लया घरचे वासे मोजण्यासारखें, अगदीं कृतघ्नपणाचेंच काम झालें असतें.'—छच ९८.

खाल्लया पानावर हगणें—कृतघ्न माणसाबद्दल म्हणतात.

❀ **खाई त्यास खवखवे**—जो खाजाळू इ. खाजरा पदार्थ खातो त्याचाच घसा खवखवणार. त्याप्रमाणें जो एखादें कर्म करतो त्यालाच त्यासंबंधींचा उल्लेख वाईट लागतो. तु०—चोराच्या मनांत चांदणें.

खाई शेर दाणा; खाई शेर शेर दाणा, चालतांना ठणाणा—एखाद्या घोड्यास खावयास खूप दाणा लागतो पण भरधांव चालतां मात्र येत नाहीं. त्याप्रमाणें एखादा मनुष्य केवळ ऐत खाऊ असतो, कांहीं काम वगैरे करीत नाहीं अशा आयतगब्बू मनुष्यास म्हणतात. तु०—तट्टू आमचा रतन घोस, मागें जाई कोस कोस । खाई शेर शेर दाणा, चालतां करी ठणाणा ॥ —त्राटिका.

खाईन तर तुपाशीं, नाहीं तर उपाशीं—तूप असलें तरच खाईन असा हट्ट; तडजोडीनें, समजुतीनें न घेण्याची वृत्ति. आपलाच हट्ट चालविणाऱ्या हेकेखोर माणसाबद्दल म्हणतात.

माने खाईना—आपलें नीट करून घेत नाहीं, व्यर्थ धुसफूस करून दुसऱ्यास त्रास देतो अशा मनुष्याबद्दल म्हणतात. आपटे—मी.

खाईना तो करंटा-भिकारी—१ चांगलें खावयास मिळत असतां जो त्याचा त्याग करून जातो त्याच्या नशीबांतच नाहीं असें समजावें. एखाद्याला पुष्कळ वैभव मिळून त्याचा उपभोग घेण्याचें त्याच्या नशीबांत नसतें. २ एखाद्या गोष्टीचें अतिशय वैपुल्य, समृद्धि असतांना म्हणतात.

खाईल तर पिईल—कांहीं खावयास मिळालें तर पाणी पिण्याचा उपयोग, खावयासच न मिळालें तर पाणी पिण्याचाहि कांहीं उपयोग नाहीं. One necessity goes with the other.

खाईल तो गाईल—१ जो एखाद्याचें अन्न खातो तो त्याची स्तुति करतो. तु०—ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी. २ पोट भरलेलें व मन प्रसन्न असल्याशिवाय कोणाला गाणें सुचत नाहीं. खाण्यावांचून माणसाला गाणें काम वगैरे कांहीं सुचत नाहीं. He who eats will sing. No one is chearful when hungry.

खाईल तो वाहील--१ जो एखाद्याचें अन्न खातो त्याला त्याचें काम करावें लागतें. २ जो एखाद्या शेताचें उत्पन्न खातो त्यानेंच त्या शेताची लागवड केली पाहिजे. ३ जो पोटभर जेवील तोच काम करील.

खाईल तोटा, तो होईल मोठा--जो व्यवहार करतो त्याला त्यांत तोटा येण्याचाहि केव्हां केव्हां संभव असतो. परंतु याप्रमाणें जो टक्के टोणपे खाऊन तयार होतो, तोटा सोसून अनुभव मिळवतो तोच पुढें धंद्यांत यशस्वी होऊन वैभवसंपन्न होतो.

खाईल त्याचे घशाशीं जळजळे--जो एखादा खाजणारा वगैरे पदार्थ खाईल त्याच्याच घशाशीं जळजळ होण्याचा संभव; इतरास त्यापासून भीति नाहीं. जो अपराधी असतो त्याला त्यासंबंधीचें बोलणें लागतें. तु०—खाई त्यास खवखवे.

खाऊं जाणे, तो पचवूं जाणे--ज्याला पचवावयाची शक्ति असते तोच खातो. ज्याला लांच घेतला असतां जिरविण्याची संवय असते तोच पैसे खाऊं शकतो.

खाऊन खग्रास, हागून घाण--ज्याच्या खाण्यापासून कांहीं एक उपयोग नाहीं, जो केवळ जगण्यासाठींच खातो. अशा कुचकामी, ऐदी, चैनी माणसाबद्दल म्हणतात.

खाऊन दिवस न काढावे, नांव रूप करून दाखवावें--केवळ खाऊन पिऊन आळसांत दिवस घालवूं नये, तर कांहीं तरी आपली कीर्ति होईल असें कार्य करून दाखवावें Live not to eat but eat to live.

खाऊन निंदूं नये--एकाद्याच्या घरीं खाऊन पिऊन त्याबद्दल वाईट बोलूं नये. एखाद्याचे उपकार घेऊन त्याला नांवें ठवूं नये. तु०-ज्याचें खावें अन्न त्याचें पाहूं नये उणें.

खाऊन पिऊन ओढळ, सदा तोंड धुवून निढळ—खूप खाऊन पिऊन पुन्हां कामाला वेळेवर हट्ट करणारा व खाल्ल्यावरहि पुन्हां तोंड पुसून वगैरे न खाल्लें असें दाखविणारा.

खाऊन पिऊन कंटाळ व तोंड धुवून विटाळ—खाण्यापिण्यानें कंटाळा घालविणें व केवळ तोंड धुण्यानें विटाळ घालविणें. खाण्यापिण्याशिवाय दुसरी कोणतीहि गोष्ट न करणारा; आळशी. खायला काळ भुईला भार.

खाऊन माजावें, टाकून माजूं नये—अन्नाची नासाडी करूं नये. तें पाहिजे तितकें शरीर पोषणाला लावावें, वाटेल तितकें खावें व लठ्ठ व्हावें पण उकीरड्यावर टाकून देण्या-इतके माजोरी होऊं नये.

खाण जेवण कसेंय आसूं, अर्थ अपुर्बाय बरी—(गो.) खाणें जेवणें, किंवा देणेंघेणें कसेंहि का असेना पण बोलणें वगैरे प्रेमाचें असावें. आदरसत्कार तरी चांगला करावा मग जें जवळ असेल तें खावयास द्यावें. त्यांत कांहीं विशेष नसलें तरी चालतें.

खाणें खाण्यासारखें व दुखणें पहिल्यासारखें--एखादा मनुष्य वरपांगी आजारी असल्यासारखें दाखवितो, गुण आल्याचें कधींच म्हणत नाहीं, पण यथेच्छ खातो पितो अशा माणसाबद्दल म्हणतात.

खाणें थोडें आणि मिचमिच बहूत; खाणें थोडें मचमच फार--थोडें खावयाचें पण सारखा तोंडाचा आवाज करीत असावयाचें. काम थोडें करावयाचें पण त्याबद्दल सारखी बडबड करीत, बढाई मारीत असावयाचें, अशाबद्दल म्हणतात. (गो.) खाणापरस मचमच चड.

खाणें थोडें कचकच फार--खावयाचें थोडेंच पण त्यासंबंधीं काथ्याकूट फार करावयाची. तु०-खाणें थोडे मचमच फार.

खाणें ना पिणें, फुकट धिंगाणे--एखादें ढोर नीट पणें चारा खात नाहीं, पाणी पीत नाहीं, उगाच धिंगाणा घालीत असतें. त्याप्रमाणें एखादा मनुष्य कांहीं एक सोयीनें काम न करतां उगाच गडबड करीत असतो, अशाला उद्देशून ही म्हण वापरतात.

खाणें बोकडाचें आणि वाळणें लाकडाचें—बोकडा-सारखें खूप खावयाचें पण त्याच्याप्रमाणें लठ्ठ न होतां शुष्क लाकडाप्रमाणें कृश व्हावयाचें. खूप खाऊन पिऊन सुद्धां अंग न धरणाऱ्या बद्दल म्हणतात.

खाणें लोखंडाचें आणि दांत मेणाचे—काम तर कठीण करावयाचें पण तें करण्यास साधनें तर दुर्बळ, अशी स्थिति असेल तेव्हां योजतात.

खाणावेळेरी मेणा-दोळे, खेळीच्या वेळेरी मनुष्य-दोळे; खाणा-वेळार मेणा-दोळे, खेळा-वेळार मनशा-दोळे--(गो.) खाण्याच्या वेळीं मेणाप्रमाणें अगदीं मृदु असे डोळे करावयाचे, व खेळण्याच्या (काम करण्याच्या?) वेळीं ते कठोर करावयाचे! कृपा संपादन करतांना माणूस अगदीं दीनाप्रमाणें बघतो पण तिचा मोबदला मागीतला तर डोळे मोठाले करतो.

खाण्याची मटमट, बोलण्याची बटबट—एखादा मनुष्य नेहमीं सारखा खात असतो व बडबड करीत असतो, कांहीं काम करीत नाहीं तेव्हां त्यास उद्देशून म्हणतात.

खाण्यानें तरला, भुकेनें उरला--मनुष्य अन्नानें जगतो ही गोष्ट खरी असली तरी त्याला दीर्घायुष्य प्राप्त व्हावें अशी इच्छा असेल तर त्यानें थोडी भूक राखून खावें, म्हणजे मिताहारी व्हावें.

खाण्यापिण्याची टंचाई, नमो नारायणाची घसई-(घस्मर)—नुसता वरवरचा आदर; नमस्कार वगैरे वरचे उपचार पुष्कळ पण प्रत्यक्ष खाण्यापिण्यास देण्याच्या नांवानें शून्य.

खाण्याला मिळेना आणि काम सरेना—काम सडकून करतो पण त्यांतून पोटाला मात्र मिळत नाहीं. निष्फळ, रिकामकें काम.

खाण्यावांचून ढोर (पोर) बापुडें, मिठावांचून पक्वान्न रडें—मुलाला किंवा जनावराला खाणें घातलें नाहीं तर तें रोड होतें व पक्वान्नांत मीठ घातलें नाहींतर तें अळणी, बेचव लागतें.

खातपीत निबाला, सुख नाहीं जिवाला—खाऊन पिऊन मोठमोठ्या कमाया करून जो शांत झाला तोच

स्वस्थ बसण्याऐवजीं आणखी मिळविण्याची हांव करूं लागला तर त्याच्या जिवास सुख मिळत नाहीं.

खातना सुटता तोंडाउदाक, दिनना येता दोळयां उदाक—(गो.) खातांना तोंडाला पाणी सुटतें व देतांना डोळ्यांना पाणी सुटतें. ऋण काढून चैन करणें.

खातां खातां जन्म गेला आणि वांकडीं फळें कशाचीं——कांकड्या वांकड्या असतात त्या नेहमीं खाण्याच्या सरावांत असतांनासुद्धां त्यांच्या नांवाची चौकशी करावयाची. जी गोष्ट नेहमींच्या सरावांतील असेल तीबद्दलहि अज्ञान दाखविणें हा ढोंगीपणा.

खातां खादाड, बोलतां लबाड——एखादा मनुष्य खाण्यास बसला असतां खूप अधाशीपणें खातो व असें बोलतो कीं त्यावर कोणाचा विश्वास बसूं नये.

खाता पिता देव दिता—(गो.) साखरेचें खाणार त्याला देव देणार; जो मनुष्य मिळवलेल्या संपत्तीचा उपभोग घेतो त्याला आणखी मिळतच जाते, कधीं उणें पडत नाहीं.

खातां मधु गोड लागतो, पण मक्षिकांचा डंश होतो——मधमाशीच्या पोळ्यांतील मध खावयास गोड लागतो पण तो काढतांना हातांस माशा चावतात. एखाद्या गोष्टीचा अखेरचा परिणाम सुखावह असला तरी करावयास लागणारे श्रम आपल्या लक्षांत येत नाहींत.

खातांना खातलीं नि वर मंगलां गातलीं——(कों.) [मंगल गाणें = चरफडणें] खातांना खावयाचें व मागून तरफडावयाचें, अशी वृत्ति.

खातीचे गाल व न्हातीचे बाल, छपत (झाकत) नाहीं——ज्या स्त्रीला खावयास चांगलें मिळतें तिचे गाल वर आल्याशिवाय राहात नाहींत व जी नेहमीं न्हात असेल तिच्या केसांचा तजेला लपत नाहीं. सुखाचा सुपरिणाम दिसून येतोच.

खाते दाणा,करते तनाना——गुरांढोरांस दाणा खावयास मिळाला म्हणजे तें मस्ती करूं लागतें, माजास येतें. खावयाला मिळतें म्हणून मगरूरी आठवते. खावयास भरपूर मिळत असलें, कधीं टंचाई भासत नसली म्हणजे मस्ती सुचते.

खातो धन्याचें, नांव सांगतो गन्याचें——आपल्या मालकाचें खाऊन दुसऱ्याची स्तुति करणारा, परधार्जिणा मनुष्य; जो खावयास देतो त्याचे उपकार न स्मरतां भलत्याच्याच नादीं लागणारा मनुष्य.

खात्याक आस्ता भोव, न्हात्याक चिखोल भोव; खायत तितली भूक भोव, न्हायत तितलो म्हेळ भोव—(गो.) जों जों खावें तों तों भूक वाढते व जों जों न्हावें तों तों अंग अधिक मलीन दिसूं लागतें. म्हणज माणूस फार चोखंदळ बनतो. तेव्हां समाधान, संयमन यासारखें सुख नाहीं.

खात्याला खातें पाहूं शकत नाहीं—सुस्थितींत असलेल्याला दुसरा सुस्थितींत असलेला पाहवत नाहीं. अर्थात् त्याच्या ठिकाणीं मत्सरभाव उत्पन्न होतो.

खात्याला न खाता देखूं शकत नाहीं—एखाद्या मनुष्याला खावयास मिळालें म्हणजे ज्यास मिळत नसतें तो त्याचा हेवा करूं लागतो. ज्यास वैभव प्राप्त होतें त्याचा इतर मत्सर करूं लागतात.

खादल्याची गोडी देखिल्याशीं नाहीं—खाण्याची चव पाहून येत नसते. अनुभव पाहिजे.

खाना पीना भरना पेट, चमडी जाने नाना शंकरशेट—खाऊन पिऊन मजा करावी, मग व्हायचें असेल तें होईल.

खाना वहा खावो, तो हात यहां धोबो—तेथें जेवत असाल तर येथें हात धुण्यास या! एखाद्यास अगदीं घाईनें बोलवावयाचें असल्यास म्हणतात.

खानेकू (पीनेकू) मैं, और लढनेकू मेरा बडा भाई——खाण्याला मी व लढण्याला माझा मोठा भाऊ! कष्टास इतर माणसें उभीं करून आपण त्याचें फळ तेवढें घ्यावयाचें अशी वृत्ति.

खानेके दांत और, देखनेके और—खाण्याचे दांत व बोलण्याचे दांत वेगळे. बोलणें एक करणें एक. बोलण्यांत व कृतींत मेळ नसणें.

खाय किसीका, और गाय किसीका—एकाचें खावयाचें व दुसऱ्याची स्तुति करावयाची.

खाय खाय, मसणांत जाय——अति खाणें मसणांत जाणें; अधाशीपणानें फार खाल्लें तर रोग होऊन मृत्युहि येतो. अचाट खाणें मसणांत जाणें, पहा.

खायगा बंग, तो उठायेगा तंग—(हिं.) जो भरभक्कम व पौष्टिक अन्न खाईल तो तसेंच मोठें कामहि करील.

खायगा घेटा, तो उठायेगा लोटा !——जर खाण्यास भरपूर मिळेल तरच मनुष्याच्या हातून काम होईल. ' खाईल तो वाहील. '

खायप्यायला नसो, पण शिपाई नवरा असो—शिपायाला पगार कमी असला तरी जो एक अधिकार असतो तो इतर श्रीमंत माणसांना नसतो. पूर्वी मराठेशाहींत शिपायाची स्थिति बरी असे; तेव्हां त्याच्या बायकोला मान व सुख मिळत असलें पाहिजे. त्यावरून वरील आकांक्षा व्यक्त होते.

खायची गडबड, आणि हगायचा तडफडाट—ओ येईपर्यंत जेवावयाच, तें सुद्धां इतकें कीं, शौचास जाण्याची घाई व्हावयाची. एकीकडे खावयाचें व लागलेच शौचास जावयाचें. धड पचण्यासहि वेळ नाहीं अशा रीतीचें खाणें. भस्मरोगी मनुष्याबद्दल म्हणतात. हा खाऊन पिऊन रोडच असतो.

खायला अगडबंब आणि ह्मणायला मूकस्तंभ—[म्हणणें=वेदपठन] खाण्या पिण्याच्या बाबतींत अघळपघळ पण विद्येच्या नांवानें पूज्य, अशा ब्राह्मणाबद्दल म्हणतात. —नि १२५७.

खायला आजी, करायला शेजी—आपल्यास खावयास हवें असलें म्हणजे आजीची आठवण होते पण कामाच्या वेळीं शेजारच्या घरीं जाऊन बसावयाचें. आयतखाऊ, कामचुकार माणसाबद्दल म्हणतात.

खायला आधीं, कामाला दंदी न् निजायला संधी—(व.) ज्याला खायला सर्वांच्या आधीं पाहिजे, काम करण्यात जो दंदी अथवा दंडेल-कुचर, तसेंच निजायला मध्यें, निर्भय जागीं पाहिजे असा आपमतलबी मनुष्य.

खायला आधीं, निजायला मधीं, कामास कधीं मधीं—वरील प्रमाणेंच. सर्व प्रकारें स्वतःचें यथास्थित करून घ्यावयाचें पण काम करण्याच्या वेळीं टाळा द्यावयाचा अशा स्वार्थी मनुष्यास म्हणतात. दोघामध्यें निजलें म्हणजे सुरक्षितपणा असतो.

खायला काळ व भुईला भार—अगदीं निरुपयोगी, कोणालाहि जड वाटणारा माणूस. ‘खाया काळ’ पहा. ‘जो घोडा, आपला धनी वर बसला असतां, चार पावलें ही सुध्या रीतीनें टाकीत नसल्यानें, केवळ कवडी मोलाचा, खायला काळ आणि भुईला भार, असा झाला होता.’—छच९३.

खायला न खरवडायला, मशालजी रगडायला—मोठ्यांच्या घरीं विशेषतः गुजराथेंत मशालजी हा रात्रीं धन्याचें अंग रगडतो. रिकामी मिजास.

खायला न प्यायला, फुलेल तेल न्हायला—वरील प्रमाणेंच. घरांत खावयास नसतां न्हायला वासाचें तेल वापरावयाचें. उपाशीं मरावयाचें पण वरून ऐट करावयाची, अशा वृत्तीच्या मनुष्यास म्हणतात.

खायला नाहीं खापर, राहायला नाहीं छप्पर—अन्न खाण्याकरितां मातीचें भांडें सुद्धां जवळ नाहीं व राहावयास छपरहि नाहीं. अगदीं अकिंचन स्थिति. तु०— केळीवर नारळी घर चंद्रमौळी.

खायला फुकाचें आणि काम नको काडीचें—नुसतें खावयाला पाहिजे पण काम करण्याचा कंटाळा करणाऱ्या ऐदी मनुष्याबद्दल म्हणतात. खादाड पण आळशी मनुष्य.

खायला मिळेना आणि काम सरेना—अतिशय कष्ट करूनहि पुरेसें पोटाला मिळत नाहीं अशी कष्टप्रद स्थिति. ‘खाण्याला०’ पहा.

खाया काळ, भुईस भार—वर पहा. पापी मनुष्य, केवळ खाऊन पिऊन जमिनीला भार होणारा; आळशी, निरुपयोगी मनुष्य. “माता कष्टविली वृथा, निज पिता तैसा स्वसंरक्षणीं, खाया काळ भुईस भार जगला, पापा कराया घणी।—रामशास्त्री यांनीं राघोबास सांगितलेलें प्रायश्चित्त (पुष्पवटिका—ना. दा. ओक).

खाया पिया भरो पेट, झक मारे नगरशेट—आपलें खाणें पिणें यथेच्छ झाल्यावर तें ज्यापासून मिळाल त्याची पर्वा करावयाची नाहीं. स्वार्थी व कृतघ्नपणाची वृत्ति.

खाया प्यायास मी, लढावयास कुबडा भाई—ही मॅनवेरींगनें ‘खानेको हम और लढनेको बडा भाई’ यावरून म्हण दिली आहे. म्हणजे शब्द तोडण्याचें न कळल्यामुळें नवीनच म्हण उत्पन्न केली आहे!

खायाचा खाऊन नकटीची आण वहावयाची—खाऊन पिऊन उपकार विसरावयाचे.

खायाचे दांत निराळे (निखालस) व दाखवायाचे निराळे (निखालस)—हत्तीला आंतले (खायचे) व बाहेरचे असे दोन प्रकारचे दांत असतात. बोलण्यांत व कृतींत मेळ नसणें; वरून एक व आंतून एक. ढोंगी दुटप्पी माणूस; मागें पहा.

खालें अन्न अंगीं लागत नाहीं—खाल्लेलें पचत नाहीं व पुष्टिदायक होत नाहीं, अशी शारीरिक अगर मानसिक स्थिति. रुग्णावस्था किंवा चिंताग्रस्त स्थिति.

खालें तर बाधतें, न खावें तर लंघतें—खालें तर सोसत नाहीं व न खावें तर शक्ति राहात नाहीं, अशी स्थिति. खावें तर बाधतें, टाकावें तर शापतें, पहा.

खाळें पिळें, ढुंगणाला हात पुसले--केवळ खाण्यापुरतें पाहणारा, खावयाच्या वेळीं हजर पण पुढें कोणत्याहि कामाची काळजी न करणारा; केवळ खावयापुरता येऊन इतर वेळीं बेपर्वाईनें वागणारा.

खाल्लया अन्नाची विस्मृती, लौकर पडती--केलेलें उपकार मनुष्य लवकरच विसरतो.

खाल्लेल्या अन्नाला आणि मिळालेल्या बायकोला किंमत नाहीं—अन्न खाऊन संपल्यावर त्याचें महत्त्व वाटत नाहीं. जेव्हां अन्न मिळत नाहीं, खूप भूक लागलेली असते तेव्हां अन्नाची खरी मातबरी कळते; त्याप्रमाणेंच विवाह होण्यापूर्वी जें स्त्रीबद्दल आकर्षण वाटतें तें विवाह झाल्यानंतर वाटत नाहीं. एखादी वस्तु प्राप्त होण्यापूर्वी जितकी तीबद्दल उत्सुकता असते तितकी तिची प्राप्ति झाल्यानंतर राहात नाहीं.

खाल्ल्यास खावेंसें वाटतें--कोणताहि पदार्थ वरचेवर खावयास मिळूं लागला म्हणजे तो पुन्हां पुन्हां खावासा वाटतो. खाण्याची एकदां संवय लागली म्हणजे सुटत नाहीं. आधीं श्रीमंती उपभोगलेल्या व्यक्तीबद्दल म्हणतात.

खांवक-जेंवक आसल्यार सोयरे खूब--(गो.) खायला प्यायला असलें म्हणजे सोयऱ्यांचा मोठा भरणा. तु०--सोयरेधायरे संपत्तीचे लोक। असतील शितें तर मिळतील भुतें.

खांवूक मी जाणा, दिंवूक मझॉ बाबा जाणा--(गो.) खाणें माझ्याकडे व देणें बापाकडे. 'खानेकू हम०' पहा.

खांवचें घोवाचें आनी घेंवचें मिंडाचें--(गो.) नवऱ्याचें खाऊन प्रियकराचीं बोलणीं ऐकून घ्यावयाचीं. तु०-कसायाला गाय धारजिणी.

खावयास आधीं, निजावयास मधीं, कामास कधीं मधीं--मागें पहा.

खाववेना तर खाववेना, लोटून कां देववेना--स्वतः खावयाचें नाहीं पण दुसऱ्यास द्यावयाचें नाहीं किंवा त्याची कांहीं व्यवस्थाहि लावावयाची नाहीं. इतकी पूर्णपणे बेफिकिरीची, बेपर्वाईची वृत्ति.

खावें काय पुरुषानें ? उत्तर-दम--पुरुषानें नेहमीं स्थिर, शांतचित्त असावें. कोणत्याहि बाबतींत उतावळेपणा करूं नये. तु०-खानेमें खाना गम खाना.

खावें जातीचें किंवा खावें हातीचें--आपल्या जातीच्या इसमानें केलेलें अन्न तरी खावें किंवा स्वतः तरी करून खावें. इतराच्या हातचें खाऊं नये. खाण्याच्या बाबतींत जातिनिर्बंध फार सक्त असतात.

खावें तर बाधतें, टाकावें तर शापतें—पोट भरल्यावर, किंवा आपणांस नकोसेसा पदार्थ पानावर पडला तर तो खाल्ला असतां आजारी पडण्याची भीति व टाकला तर अन्न शापतें ही भीति. अशा प्रकारची शृंगापत्ति. एखादी गोष्ट केली तरी एक प्रकारचा दोष येतो, न केली तर न केल्याचा दोष येतो; अशा वेळीं जी द्विधा मनोवृत्ति होते ती या म्हणींत व्यक्त केली आहे.

खावे तत्ता पीवे, उस्का रोग घरघर रोवे--(हिं.)जो खूब खातो पितो त्याला कधीं आजारी पडण्याची पाळी येत नाहीं. मागें पहा.

खावें म्हशींनीं कीं खावें दासींनीं--म्हशी व दासी (गडीमाणसें) यांना खाण्यास फार लागतें व वाटेल तें चालतें.

खावो पिवो निकल जावो, गेहूंका दाम तुम देवो--खायला सारे तयार होतात पण पैसे द्यायचे वेळीं मात्र सारे पसार !-चलतीच्या काळाचे सोबती असतात सारे; पण 'कठिण समय येतां' स्वतःलाच तोंड द्यावें लागतें.

खातर—खातर करणें—प्रत्यय आणून देणें; अनुभव दाखविणें, पटविणें; आश्वासन देणें; समाधान करणें.

खातर पटणें—१ समाधान होणें; निश्चय होणें; खात्री पटणें; २ आवडणें; पसंत होणें.

खातरेस येणें—पसंत पडणें; मनाचें समाधान होणें; मनास येणें. खातरी, खात्री पहा.

खातें—खातें ठेवणें—(पैसे, माल, इ.) देणें-घेणें सुरू करणें; व्यवहार चालू करणें, ठेवणें, राहणें.

खातेंपोतें बरोबर—[खातें=हिशेब. पोतें=खजीना] जमा व खर्च सारखाच असणें; उत्पन्न आणि खर्च यांची बरोबर तोंडमिळवणी होणें. रमारमी.

खात्री—खातरी, खात्री घालणें—(व.) आंथरूण घालणें; आजारी पडणें.

खाद—खादीचें शरीर—ज्यास यथेष्ट खावयास मिळतें अशा मनुष्याचें घट्टपुष्ट शरीर; पुष्ट, भरदार शरीर.

खादीरभाई—नुसतें फुकटचें जेवण जेवून भटकणारा; केवळ खाण्याशिवाय दुसरें कांहीं न करणारा.

खादूनंदन--खादाड मनुष्य; अधाशी; खूप खाणारा.

*** कारकुनाचें लिहिणें, उंदराची खाद—१ कार-**

कुनाचें लिहिणें उंदरानें कुरतडल्याप्रमाणें वांकडेतिकडें असतें. तें त्याचें त्यालाच वाचावयास येतें, इतरांस समजत नाहीं. २ कारकून आपल्या लिहिण्यामध्यें प्रत्येक कामांत उंदीर जसा कुरतडतो त्याप्रमाणें कांहींतरी कसर काढतोच. 'कारकून' पहा.

खाद आहे तर लाद (लाध) आहे—१ खाव याला मिळालें तरच कांहीं काम होणें शक्य आहे. २ जेथें खावयास आहे तेथें लोक जमतात.

खाद तशी लात—ज्या मानानें एखाद्याचें खाणें असतें त्या मानानें त्यामध्यें शक्ति असते. वर पहा.

खाद हरी व्याध—मनुष्यानें चांगलें अन्न योग्य तेवढें खाल्लें असतां त्यास रोग होण्याची भीति नसते.

खादल्याची गोडी देखल्याला नाहीं--एखादा पदार्थ नुसता पाहून समाधान होत नाहीं. तो प्रत्यक्ष खाऊन पाहिल्यासच त्याची खरी गोडी कळते. नुसत्या दुरून दुरून कोणत्याहि गोष्टीचें खरें स्वरूप कळत नाहीं; प्रत्यक्ष अनुभवानेंच यथातथ्य ज्ञान होतें.

खांद——खांद चोरणें--कामचुकारपणा करणें; कामास मागें घेणें; अंगचुकारपणा करणें.

खांद पाडणें—बैलास वरचेवर गाडीस किंवा आउतास जुंपलें असतां त्याच्या खांद्यास घट्टा पडतो त्याप्रमाणें वरघटणें; संवय लावणें; परिचयाचें होणें.

(एखाद्याशीं) खांद बांधणें-करणें—होड लावणें; बरोबरी करणें; टक्कर देणें; स्पर्धा चालविणें.

खांदा——खांदा टाकणें--(बे.) जुंवास जोडलेल्या बैलानें खांद्यावर जोखड न घेतां खांदा बाहेर काढणें; खाली बसणें; कामचुकारपणा करणें; काम करण्याचें टाळणें.

खांदा देणें--१ प्रेत वाहण्याकरितां प्रेताची तिरडी खांद्यावर घेणें; प्रेत वाहण्यास लागणें, मदत करणें. २ साहाय्य, मदत करणें; हातभार लावणें.

खांदा येणें--ओझें ओढून खांद्यास इजा होणें; फार काम केल्यानें बैलाचा खांदा सुजणें.

खांदारि बैसूनु हुव्हुळावंचें--(गो.) खांद्यावर बसून गुदगुल्या करणें.

खांद्याखालीं पदर--स्वैरिणीच्या बाबतींत ही शब्दयोजना योजतात. पूर्वी कुलीन स्त्रियांनीं रस्त्यांतून जातांना खांद्यावरून डोकीवर पदर घेण्याची चाल असे. तेव्हां खांद्याखालीं पदर येणें हें अगदींच निर्लज्जपणाचें मानलें जाई.

खांद्याचा बैल--ओझें वाहणारा बैल; नांगरास, गाडीस वगैरे जुंपावयाचा, असें काम करण्याची संवय असलेला बैल.

खांद्यावर भाला घालणें--लढाईला सज्ज होऊन निघणें. शत्रूविरुद्ध उठावणी करणें; सशस्त्र स्वारीशिकारी करणें. 'खांद्यावर भाला घालून तमाम मुलुख उलथा पालथा घालूं.'-ख १७४८.

खांद्यावर मेखा-गाठोडें देणें; मेखा खांदाडास देणें--पूर्वी वसतीस राहतांना गाठोडें लावण्याकरितां बरोबर मेखा बाळगीत. त्या भिंतींत ठोकून त्यावर गाठोडें लावीत. तेव्हां ज्यास हांकून द्यावयाचें त्याच्या मेखा उपटून, गांठोडें व त्या मेखा त्याच्या स्वाधीन करून त्यास घालवून देत. यावरून चंबूगबाळें घेऊन जावयास लावणें; कामावरून दूर करणें.

डोईवरचें खांद्यावर येणें--डोक्यावरील ओझें खांद्यावर घेणें; कर्ज इत्यादींचें दुःसह झालेलें ओझें थोडें हलकें होणें; थोडा भार हलका होणें; थोडा अवसर मिळणें.

खांद्यावर सूळ--ज्याला सुळीं देत त्याच्याच खांद्यावर सूळ स्मशानांत नेण्याकरितां देत असत. यावरून मरणाची शिक्षा देणें. उपटसूळ पहा.'देवापुढें नेली खांद्यावरी सूळ ।'-सप्र २.१४२ ओ २२.

खांद्यास लागणें--१ प्रेत वाहून नेण्यास हात लावणें, मदत करणें; तिरडीस खांदा देणें. २ जवळ जवळ बरोबरीचें होणें; खांद्याशीं येईल इतकें उंच होणें.

*** खांद्यावर भाला आणि जेवायला घाला**--पूर्वी भालाईत लोक कोठेंहि जाऊन जबरदस्तीनें खाण्यापिण्यास मिळवीत. त्यांना सामान्य लोक भीत असत. जबरदस्त मनुष्य; बळजोरीनें आपलें काम करून घेणाऱ्या मनुष्याबद्दल योजतात.

खादाड——खादाड कुरकुला-भावसा-मावसा—अतिशय खाणारा; अधाशी.

***खादाडाला चव नाहीं व उठवळाला विसावा नाहीं**—ज्या मनुष्याला पुष्कळ खावयास पाहिजे असतें तो पदार्थांची विचक्षणा करीत नाहीं. त्याचप्रमाणें जो मनुष्य एका ठिकाणीं कधीं स्थिर राहूं शकत नाहीं, त्याला इकडे तिकडे सारखें फिरत राहिल्यानें विश्रांति मिळत नाहीं.

खांदाडी——खांदाडी घालून नेणें-खांद्यावर वाहून नेणें; उचलून नेणें.

खांदाडीभर ओझें--खांद्यावर वाहून नेतां येईल इतकें ओझें.

खांदाडीस बसणें--१ दुसऱ्याच्या खांद्यावर बसणें; दुसऱ्यावर भार टाकणें; एखाद्याच्या राशीस बसणें; एखाद्याच्या पाठीस तगादा लावून एखादें काम करून घेणें. २ (कों.) झाडाच्या खांदीवर बसणें; उंच फांदीवर बसणें.

खांदाडीस मेखा देऊन काम करणें--अंग मोडून झटून काम करणें; अतिशय नेट लावून, मागें कांहीं आधार नाहीं असें समजून काम करणें.

खांदाडीस मेखा देणें--घालवून देणें; चंबूगबाळें आटोपणें. 'खांद्यावर मेखा देणें' पहा.

खांदी——खांदी देणें-घेणें--एखादें जनावर विशेषतः बैल किंवा रेडा वाहण्याकरितां भाड्यानें देणें. खांद अथवा भाडें धान्याच्या रूपानें घेतात.

खांदी मारप--[(गो.) खांदी=चोरी] (गो)चोरी करणें; खांद्यावर मारून नेणें.

*** खांदी मेळ्ळी म्होण झाड हुमटुंक जायना**--(गो.) [खांदी = फांदी] झाडाची फांदी मिळाली म्हणून झाड उपटण्याचा प्रयत्न करूं नये. बोट शिरकलें म्हणून हात घालण्याचा प्रयत्न करूं नये; थोडें फार सांपडलें म्हणून मुळासकट उपटण्याचा प्रयत्न करूं नये.

खानदेश——खानदेशांतील कपाशी, खाऊं घालते तुपाशीं--खानदेशांत कपाशी पुष्कळ पिकते व तीपासून लोकांस पुष्कळ पैसा मिळतो; त्यामुळें ते खाऊन पिऊन सुखी असतात.

खानदेशे आणि डाळनासे--खानदेशांत डाळ टिकत नाहीं.

खापर——खापर डोक्यावर येणें--संकटांत सांपडणें; दोष येणें; आरोप येणें; भार पडणें.

डोक्यावर खापर फुटणें--विनाकारण दोष येणें; दोषाचे धनी होणें; चुकी माथीं बसणें.

डोक्यावर (डोईवर, शिरावर) खापर फोडण--एखाद्यावर विनाकारण दोषारोप करणें; दोष लावणें; अंगीं अपराध लावणें; चुकी माथीं मारणें.

खापऱ्या काळजाचा--(गो.) चांडाळ वृत्तीचा; दुष्ट अंतःकरणाचा; ज्याचें हृदय खापरासारखें काळें आहे असा.

खापऱ्या चोर--१ अट्टल चोर; बिलंदर चोर. २ बारीकसारीक किरकोळ वस्तु चोरणारा, उचल्या.

*** खापरांत मुतून तोंड पहा**--फजीति झाली असतांहि फुशारकी मारणारास म्हणतात. ज्यास कांहीं तोंड काढण्यास जागा नाहीं, अशा इसमास म्हणतात.

खांब——खांबाला डीक पाहणें--झाडाला डीक येतो, खांबाला येत नाहीं; पण खांबालाहि कदाचित् डीक सांपडेल या आशेनें पाहणें; अशक्य गोष्टीची अपेक्षा करणें; कंजूष मनुष्यापासून द्रव्याची अपेक्षा करणें.

खामोश——खामोश करणें--शांत राहणें; शांति राखणें; स्तब्ध बसणें. 'ते समयीं बाजीराव यांनीं खामोश करून आपले खासगत डेऱ्यांत गेले.'-होके ३.

खायी——खायींत उडी टाकणें--संकटांत उडी घेणें; अंगावर आपत्ति ओढवून घेणें.

खार——खार खाणें--(ना.) द्वेष करणें; पाण्यांत पाहणें; वैर मांडणें; शत्रुत्व करणें.

खार लागणें-पडणें-लावून घेणें--[खार = एक प्रकारचा क्षार. यानें कपडा जळतो.] १ नुकसान येणें; चट्टा बसणें; तोटा होणें; चाट लागणें. 'आपल्या या शहाणपणामुळें आज आमच्या खिशाला चांगलाच खार लागला.' -त्राटिका. २ काळिमा येणें; शिंतोडा उडणें; आरोप येणें. ३ अद्दल घडणें.

खार लावणें-नुकसान करणें; चट्टा लावणें; भुरदंड पाडणें.

खारवी——खारवी गेला पोंय, आंबा वाटून थय-(गो.) अंगास खरजेनें वगैरे खाज सुटत असली तर आंबा भाजून त्याचा गर अंगास लावतात. पण खाऱ्या पाण्यान खरूज बरी होते (खारें पहा) व खारवी तर रोज खाऱ्या पाण्यांत जाणार. तर त्याच्या अंगाला आंबा लावण्याची काय जरूर ? भलत्याच गोष्टीचा भलत्याच ठिकाणीं उपयोग करण्यांत अर्थ नाहीं. [पोंय=शेतांतल खाऱ्या पाण्याचें खळें.]

खारव्यांक गोरवां, शिद्यांक तारवां--(गो.) खारव्यास गुरें व शिद्याला तारवें काय उपयोगी ? कोळ्याला गुरें वळतां येणार नाहींत व सिद्द्याला नाव हाकारतां येणार नाहीं. तु०-जेनूं काम तेनूं थाय. गावत्याला गुरूं व गुराख्यास तारूं.

खारी——आभाळाला आली खारी नि ओहोळ म्हणते मी कामाची झाली--(व.) आकाशांत मेघ

आले म्हणजे ओहोळांत पाणी येण्याचा संभव असतो एखाद्या कामांत यश येण्याचीं चिन्हें दिसूं लागणें.

खारें——खाऱ्या पाण्याचे लोक--कोंकणचे लोक. ‘ असेच कुतर्क आपले खाऱ्या पाण्याचे लोक घेऊन बसायचे.’—मोरप्रहसन १७.

❀ खारें पाणी आडांत, गोड कोठून पोहऱ्यांत-- आडांतच खारें तर पोहऱ्यांत गोडें कोठून येणार ! आड पहा.

खाऱ्या पाण्यानें खरूज बरी होते--खारें पाणी खरजेस झोंबतें पण त्यानें खरूज बरी होते. कोणत्याहि दुखण्यास कडक औषध दिलें म्हणजे तें बरें होतें. शिक्षा केली म्हणजे खोडी, दोष नाहींसे होतात.

खाऱ्या पाण्यानें (पाण्यांत) तोंड धुवून ये— नकार दाखविणें; अशक्यता दाखविणें; नाहीं म्हणण्याचाच एक पर्याय; कधीं मिळावयाचें नाहीं हा अर्थ. पाठभेद— नागझरीवरून तोंड धुवून ये.

खालचा-ची——खालची माती वर करणें—(व.) कमालीची खटपट करणें; अंगाचा आटापिटा करणें.

खालच्या मानेचा—१ विनयशील; नम्र. २ खालीं मान घालून बसणारा; लबाड मनुष्य. तु०—खालीं मुंडी, पाताळ धुंडी.

खालच्या मानेनें चालणें-पाहणें—नम्र, विनयशील, मर्यादेनें वागणें; लाजेनें खालीं मान घालून चालणें.

❀ खालची सोडली सैल, तर वरती वाटेल तितके लेईल—व्यभिचार केल्यास, अनीतीनें वागल्यास हवा तेवढा पैसा मिळतो.

खालचें झांक अन् मग कर वर नाक—प्रथम आपले दोष काढून टाकावेत, आपली राहाणी निर्मळ ठेवावी व मग तोरा मिरवावा. आपल्या पायाशीं काय जळतें आहे, हें आधीं पाहावें.

खालच्यानें (खालचीनें) कुंथावें तो वरलाच कुंथतो—ज्याच्यावर खरोखर कामाचा भार पडतो तो कुरकुर करीत नाहीं पण जवळपास असणारे, थोडीफार मदत करणारेच उगाच गवगवा करतात. ज्याच्यावर खरी जबाबदारी असते तो ती निमूटपणें पार पाडतो, पण इतर लोक स्वतः कांहीं न करतां उगाचच ओरड करीत सुटतात.

खालाटी——खालाटी वेलाटी—उताराचा व चढावाचा प्रदेश.

खालीं——एकाखालीं एक—एकाखालीं दुसरें; खालोखाल; सरसकट; एकाबरोबर दुसरें याप्रमाणें. ‘ हीं दहा ठाणें एकाखालीं एक सगळीं देऊन टाकलीं. ’

खालीं पडणें—१ संवयींत येणें; पायाखालीं पडणें; रावत्यांत येणें; रोजच्या क्रमांत असणें. २ रद्द होणें; निरुपयोगी होणें. ३ (जीव) शांत होणें; मनास शांति मिळणें. ४ एकदाची जबाबदारी अंगावरून दूर होणें.

खालीं येणें—कमी होणें; उतरणें. ‘ चांदीचा भाव खालीं आला. ’—के १०-६-३०.

खालीं राहणें—शिल्लक राहणें; उरणें; बाकी राहणें; अवशेष राहणें.

खालींवर दृष्टि (नजर) ठेवणें-करणें-पहाणें— सभोंवतीं न्याहाळून, बारकाईनें, चौकस बुद्धीनें लक्ष्य देणें; नीट बारीक नजरेनें पाहून, पूर्ण लक्ष्य घालून कोणतीहि गोष्ट करणें.

खालींवर पाय पडणें—पाऊल अडखळत पडणें; धडपडणें.

खालींवर मन होणें—मन डळमळीत होणें; धरसोड करणें; मनाचा निश्चय न होणें; मन संदिग्ध होणें; दुग्ध्यांत पडणें.

(जीव) खालींवर होणें—अतिशय काळजी लागणें; जिवास हुरहुर लागणें; मनास रुखरुख लागणें.

❀ खालीं घाली घोण, तिला शिनळ म्हणे कोण-- जी खालीं तोंड करून इकडे तिकडे न पाहतां चालते किंवा कोणी आलें तर खालीं मान घालून बसते, तिला कोणी शिनळ म्हणत नाहीं. तिच्याबद्दल संशय कसा घ्यावयाचा ? पुढें पहा.

खालीं मुंडी, पाताळ धुंडी—गोगलगाय नि पोटांत पाय; रस्त्यानें चालतांना खालीं मान घालावयाची, पण सर्व गांवभर भटकत फिरावयाचें. दिसावयास विनयशील पण गुप्तपणें अनाचार करणारी.

खालीं लवावें तर कांहीं मिळावें—आपला कमीपणा करून घ्यावयाचा तर तो कांहीं फायद्यासाठीं तरी पाहिजे. तु०—उष्टें खावें तर तें तुपासाठीं.

खाली——खाली करणें—रिकामें करणें; आंतील वस्तु काढून मोकळें करणें.

खाली मैदान होणें—प्रांत अरक्षित मोकळा होणें; कोणाचा अडथळा नाहींसा होणें; पूर्ण मोकळीक मिळणें. —पया २१२.

खासडे——**खासडे मार**—[खासडा = जोडा.] फाल्गुन वद्य प्रतिपदेची (धुळवडीची) जोडाजोडी, खेटराखेटरी.

खासा——**खाशां पंक्तीक सुंठीपिठो**—(गो.) मोठ्याच्या सहवासापासून कांहीं लभ्यांश न होणें; मोठ्यांच्या नांवाचा कांहींच फायदा न मिळणें. [एक मोठा श्रीमान मनुष्य होता. त्याच्या घरीं नेहमीं पुष्कळ पाहुणे असत व त्यांच्या अनेक पंक्ती होत. एके दिवशीं एक पाहुणा आला. त्याला तेथील नोकरांनीं 'आपण कोणत्या पंक्तीस जेवणार किंवा खाशांबरोबर जेवणास थांबणार' असें विचारलें. तेव्हां त्यानें आधींच्या पंक्तीस काय जेवावयास असतें म्हणून विचारतां निरनिराळ्या पंक्तींस कोणते निरनिराळे पदार्थ असतात उदाहरणार्थ निरशनाचे पदार्थ, धान्य फराळाचे पदार्थ, पूर्ण जेवणाचे पदार्थ वगैरे सांगितलें. तेव्हां पाहुण्यास वाटलें कीं खाशांबरोबर कांहीं विशेष असेल म्हणून तो म्हणाला कीं मीं खाशांबरोबरच जेवीन. पुढें एक एक पंगत उठतांना त्यानें पाहिलें तों सर्व व्यवस्था फार उत्तम दिसली व त्याच्या तोंडास अगदीं पाणी सुटलें. अखेरीस सर्वांच्या शेवटीं खाशांच्या पंक्तीची तयारी झाली. जाऊन पहातो तों पाटपाणी केलेलें असून पुढें फक्त केळीचें पान मांडलेलें होतें. वर पदार्थ कांहीं बराच वेळ येईनात. अखेरीस खाशांची स्वारी आली. त्यांस त्या दिवशीं उपवास असल्यामुळें त्यांनीं फक्त सुंठवड्याच्या दोनतीन फक्या मारून वर लोटाभर पाणी घेतलें. तेव्हां पाहुण्यासहि सुंठवड्याची फकी मारून दिवस काढावा लागला.]

खास्त——**खास्तीस लागणें-पेटणें**—त्रास देणें; पिच्छा पुरवणें; पाठीस लागणें; आकसानें सारखें पाठीस लागणें.

खिचडी——**खिचडी उडणें**—गल्लत होणें; गोंधळ उडणें. 'सगळ्यांची माझ्या मनांत एकच खिचडी उडाली आहे.'—दौलत ४४.

खिचडी काढणें—रेवडी उडविणें; फजीती करणें; ताशेरा झाडणें.

खिजरी——**खिजरी येणें**—(व.) चिडणें; खिजणें; रागावणें; रुसणें.

खिटी——**खिटी घालणें**—मध्यें अडथळा आणणें; आटकाठी करणें; कामांत व्यत्यय आणणें.

खिंड——**खिंडींत गांठणें**—अडचणींत पकडणें; पेंचांत धरणें; कचाटींत पकडणें.

खिडकी——**खिडकींत उभी राहे, जन तिजकडे पाहे**—जी स्त्री खिडकींत उभी राहील तिच्याकडे लोक साहजिकच पाहात राहतील. आपण जर एखादी गोष्ट चव्हाट्यावर मांडली तर लोक तिच्यावर टीका करणारच.

खिरापत——**खिरापत काढणें**—(ना.) हकालपट्टी करणें; पाठीस लागणें; पिच्छा पुरवणें; सळो का पळो करून सोडणें.

खिरापत होणें—किरकोळ उडणें; कांहीं उपयोगाला न येतां कसातरी संपणें (पैसा वगैरे).

खिरी——**खिरींतु होण बुडवुंचि**—(गो.) खिरींत जोडा बुडविणें. खीर पहा.

❀**खिरी गोडसाणि दवल्याक इत्तें गोत्तु ?**—(गो.) खिरीची चव पळीला काय माहीत ?

खिसा——**खिसा कातरणें**—भामटेगिरी करणें; उचलेपणा करणें; लुबाडणें फसविणें; एखादा जिन्नस खिशांतून लांबवणें; चोरणें.

खिसा गरम करणें—खूप फायदा करून घेणें; खूप पैसे मिळविणें; धनसंपन्न होणें.

खिसा भरणें—खिसा गरम करणें; पैसे, लांच देणें; पैसे चारणें. 'वकिलाचा खिसा भरावा लागत नव्हता.' —शाब २.२४६.

खिसाभरित—खूप; खिसा भरून; पुष्कळ; विपुल. 'वरी खिसे भरित होन त्यांसि अर्पितसे'—अमृत भ्रु. १५.

खिशांत टाकणें—लांबविणें; अपहार करणें; गिळंकृत करणें; लाटणें.

खिशांतील गप—निवळ थाप; बात; आपणच उठवलेली कंडी.

❀**खिशांत नाहीं अडका आणि बाजारांत चालला (घ्यायाला जातो) धडका**—जवळ कांहीं नसता व्यापार करावयास जावयाचें. अडका पहा.

खिशांत नाहीं पै, मनांत गमजा लई—जवळ पैसा नसून मनोराज्य करावयाचें.

खिसा——**खिसा खोकला**—[खिसा = भांडण.] १ भांडण तंटा; कज्जा; वादविवाद. २ उपसर्ग.

खिळा——**खिळेपट्टी करणें**—दुसऱ्याच्या घरीं जेवलें असतां तांबड्या गंधाच्या दोन रेघा लावून मध्यें अक्षतेचा काळा ठिपका देत असत. असें गंध लावलेल्या मनुष्यास कोठें खिळेपट्टी केली म्हणून विचारीत. त्यावरून लोकांच्या घरीं जेवणें; परान्न भक्षण करणें.

❀ **खिळे खातांना गोड वाटतात, पण हगतांना समजेल**—एखादी गोष्ट करतांना प्रथम सुख होतें पण तिचे परिणाम भयंकर होण्याचा संभव असतो व मग त्यांपासून फार त्रास होतो. तु०-विषये नवगर्भेच ऋणे कुक्कुरसंगमे। आगमे सुखमाप्नोति निर्गमे प्राणसंकटम् ॥

खिळ्यासाठीं नाल गेला, नालासाठीं घोडा गेला, घोड्यासाठीं स्वार गेला, एवढा अनर्थ खिळ्यानें केला—एका घोडेस्वारानें निघण्यापूर्वी घोड्याच्या नालाचा खिळा निघाला होता तो बसविला नाहीं त्यामुळें प्रथम नाल गळून पडला; त्यामुळें घोड्याच्या पायाला जखम होऊन तो आजारी पडून मेला व अखेरीस स्वारहि पायीं चालावें लागल्यामुळें मेला. याप्रमाणें खिळा न घातल्यामुळें एकापुढें एक सर्व आपत्ति आल्या. लहानशा हयगयीचा घोर परिणाम.-शाब १.१६०. For want of a nail the shoe is lost; for want of a shoe the horse is lost; for want of a horse the rider is lost.

खीर——**खिरतुपडी खाणें**-[खिरतुपडी=(खीर+तूप) सोंगट्याच्या खेळांतील तुप्पी] एक सोंगटी मारली असतां पुन्हां एकदां खेळावयास मिळतें. यावरून अधिक लाभ होणें.

खिरींत तूप पडणें—दोन चांगल्या गोष्टींचा योग येणें; खीर आधींच गोड लागते मग तींत तूप घातल्यास ती अधिकच गोड होणार. दुधांत साखर; अधिकस्याधिकं फलम्।

खिरींत सराटा—चांगल्या गोष्टींत लहानशी वाईट गोष्ट. रंगाचा बेरंग करणारा माणूस. 'दामूला तुम्हीं आपल्यांत घेतलें हें वाईट केलें. तो म्हणजे खिरींत सराटा आहे.'

खिरींत हिंग—हिंग कोणत्याहि पदार्थांत घातला तरी त्याचा वास सर्व पदार्थांस लागतो व खिरींत तर नकोसा होतो. यावरून, चांगल्या वस्तूंच्या समूहांत वाईट वस्तु.

❀ **खीर उतरा आणि टेर शेकूं द्या**—दुसऱ्याचें महत्त्वाचें काम असलें तरी तें बाजूला ठेवून आपला स्वार्थ बघणें.

जेथें खीर खाल्ली तेथें राख खावी काय—चांगल्या वैभवांत जेथें दिवस काढले तेथें आपत्तींत दिवस काढण्याची वेळ येणें; जेथें फुलें वेंचलीं तेथें गोंवऱ्या वेंचाव्या काय? जेथें विशेष मान उपभोगिला तेथें अपमानांत दिवस काढावे लागणें.

पोर पोटांत, खीर ताटांत—मूल होण्यापूर्वीच त्याच्या उष्टावणाची तयारी करणें; यावरून अतिशय उतावळेपणा दाखविणें.

खिरींत सराटा आणि ब्राह्मणांत मराठा—ज्याप्रमाणें खिरींत पडलेला सराटा टोंचतो व त्रासदायक होतो तसा सर्व ब्राह्मणांत एक मराठा विशोभित दिसतो, यावरून विशोभित दिसणारी गोष्ट.

खीळ——**खीळ फोडणें**—गाय, म्हैस व्याली असतां तिच्या स्तनांतून दुधाच्या चार धारा काढणें; पहिली अडचण दूर करून मार्गास लावणें.

खीळ बसणें-घालणें—थांबविणें; अडथळा आणणें; प्रतिबंध करणें.

❀ **चालत्या गाडीस-गाड्यास खीळ**—काम चालू असतां त्यांत व्यत्यय आणणें.

खुजा——**खुजाला हंसूं नको, खुजा होशील**—कोणाहि व्यंग मनुष्याचा व्यंगाबद्दल उपहास करूं नये. खुजा मनुष्याला वेडवून दाखविण्याकरितां वांकून पोक काढून चालूं लागलें असतां तशीच संवय लागण्याचा संभव असतो.

खुंट——**खुंट होणें**—[खुंट = खोखोच्या डावांतील एकजागीं बसून राहाणारे गडी.] (हट्ट धरून) स्तब्ध बसणें; स्थिर राहणें; न हालणें.

खुंटा उपड्या—आगापिछा नसलेला; खुंटावरचा कावळा.

खुंटावरचा कावळा सडा फटिंग; घरदार नसलेला; वाटल तेथें राहणारा.

खुंटास खुंट उभा राहणें-हाण—एक जातो तोंच त्याच्या जागीं दुसरा येणें; एकाच्या ठिकाणीं दुसरा हजर असणें; एकास एक कायम राहणें. 'आजा मेला, नातू झाला; खुंटास खुंट उभा राहिला.'

खुंटास खुंट घेणें—जशास तसें करणें; मोबदला घेणें; उट्टें फेडणें; उसनें फेडणें; सूड घेणें.

खुंटासारखा उभा राहणें-असणें-खुंटणें—खुंटाप्रमाणें ताठ उभा राहणें; जागचा न हालणें; हट्टून बसणें; जागेवरून न ढळणें; आपला हेका न सोडणें.

❀ **आजा मेला नातू झाला, खुंटास खुंट उभा राहिला**—आजा मेला व नातु जन्मला याप्रमाणें कुटुंबांतील एक व्यक्ति कमी झाली तर तिच्या जागीं दुसरी आली. मिळून कुटुंबांत संख्या बरोबरच राहिली. आजा पहा.

खुंटा——**खुंटा गाडणें**—पाय रोवणें; आसन स्थिर करणें; पक्की बैठक मारणें; जम बसविणें.

खुंटा बळकट-खबरदार असणें—चांगला बलिष्ठ भरभक्कम आधार असणें; चांगला, समर्थ, आश्रयदाता असणें; मजबूत पायावर इमारत रचणें.

खुंटा हलवून बळकट करणें--१ आपल्या विरुद्ध झालेला प्रतिकूल निकाल पुन्हां पक्का करून घेणें; आपली विरुद्ध बाजू डळमळीत असतां पुन्हां तीस आपल्या कृतीनें जोर आणणें. २ एखादी गोष्ट अगदीं ठाम निश्चित करून घेणें; अर्धवट असलेली गोष्ट पुन्हां कायम करणें. ' हालवुनी खुंट । आधीं करावा बळकट । '-तुगा ३६३४.

खुंट्याच्या जोरानें दावें ओढणें-उडया मारणें—आपला आधार भरभक्कम आहे अशा समजुतीनें बेपरवाईनें वागणें; दुसऱ्याच्या भक्कम आधारावर फुशारकी मारणें; तिऱ्हाइताच्या साहाय्यानें घमेंड मारणें.

❀ **खुंटा धरला म्हणजे ओंवी येते**—जात्यावर बसलें म्हणजे ओंवी सुचते. जातें पहा.

खुंटारा——खुंटाऱ्याखालीं घालणें–नवीन गाडीस, घाण्यास, रहाटास वगैरे लावावयाच्या बैलास प्रथम खुंटाऱ्यास जुंपीत असत व शिकवीत असत. त्यावरून विद्या शिकण्यासाठीं पंतोजीच्या हवालीं करणें.

खुंटी——खुंटी उपटणें—काढून टाकणें; घालवून देणें; पदच्युत करणें; आधार नाहींसा करणें; निराश्रित करणें.

(आंत) खुंटी ठेवणें-मारणें-राखणें—थांबाविणें; अटकाविणें; प्रतिबंध करणें; मख्खी राखून ठेवणें; हातांत कळ ठेवणें.

खुंटी पिरगाळणें-पिळणें-पिळवटणें—लावलेल्या विण्याची खुंटी पुन्हां कोणीं पिरगळली तर तो बदसूर होतो. १ अडथळा आणणें; बेत हाणून पाडणें; प्रतिबंध करणें; अडचण उपस्थित करणें; विघ्न आणणें. २ चिडाविणें; भांडण लावणें; कळ लावणें; भांडणास उद्युक्त करणें. ३ विरोधाबद्दल अगोदरच सावधगिरी घेऊन ठेवणें; आपल्या हातीं कांहीं तरी सत्ता किंवा किल्ली राखून ठेवणें; आगामी संकटाची तजवीज आधींच करून ठेवणें. ४ एखादा मनुष्य दुसऱ्याकडे कागाळी नेण्यापूर्वीच तेथें आपण आधीं पोंचून त्याच्या मनाची आपणास अनुकूल वृत्ति बनवून ठेवणें. किंवा प्रतिपक्षाबद्दल माहिती देऊन त्याचे प्रयत्न निष्फळ होतील अशी तजवीज करणें.

खुंटी मारणें--वर ३ व ४ पहा.

खुटीक चेपें दवरप—(गो.) आपण उपस्थित असल्याची खूण म्हणून खुंटीला चेपें [पागोटें, टोपी]लावून ठेवणें.

खुंटीनें हार गिळणें—असंभाव्य गोष्ट होणें; अस्वाभाविक गोष्ट घडून येणें. शनिमहात्म्यामध्यें विक्रमराजा सावकाराच्या घरीं पाहुणा असतां सावकाराच्या स्त्रीचा रत्नहार खुंटीवर ठेवलेला होता. तो चित्रांतील हंसानें गिळला व विक्रमावर चोरीचा आळ आला. या गोष्टीवरून दैव प्रतिकूल असतां अघटित गोष्टीहि घडून येतात. २ एखादी वस्तु अतर्कित रीतीनें नाहींशी होणें.

खुंटीवरचा-खुंट्यावरचा कावळा—(प्र.) खुंटावरचा कावळा पहा. १ उपऱ्या; उतारू; वाटसरू. २ कोणीतरी, अनोळखी मनुष्य. ३ लाक्षणिक गोष्ट; पाण्यावरचा बुडबडा.

खुंटीस अडकणें--ज्याप्रमाणें गांठोडें खुंटीस ठेवणें हें मुक्काम करण्याचें निदर्शक आहे, त्याप्रमाणें एखादें काम थांबणें, राहणें; तहकूब होणें; भिजत पडणें.

खुंटीस गाठोडें-गबाळें लागणें—१ वादविषयक मालमत्ता न्यायसभानिविष्ट होऊन न्याय लांबणीवर पडणें. २प्रवेश होणें; बोट शिरकणें. ३ व्यवस्था होण्याच्या तयारींत असणें. ४ पडशी खुंटीवर असणें; केवळ उतारकरूंसारखें असणें; ५ अधिकार तात्पुरता असणें, कायम झालेला नसणें; बदली-बडतरफीचा संभव असणें.

❀ **खुंटीकरतां घर पाडावयाचें**—थोड्या लाभासाठीं मोठें नुकसान करून घ्यावयाचें.

खुंटीवरच्या हाराला, मोलकरीण घाली गळ्याला--ज्या हारास कोणी नीट जपून ठेवीत नाहीं, खुंटीवर ठेवलेला असतो त्याचा उपयोग वाटेल त्याला करतां येतो; म्हणून मोलकरीणहि तो गळ्यांत घालूं शकते. उघड्यावरती टाकलेल्या वस्तूचा उपभोग कोणीहि घेतो. तु०—माळावरची माती.

खुंद——खुंदु नत्तिल्ले वोयी मंधप; खुंट नाशिल्ली वाय बांदप—(गो.) खांब (खुंटा) न पुरतांच कुंपण घालणें. खांबाशिवाय कुंपण टिकणार नाहीं; यावरून आवश्यक गोष्टी केल्याशिवाय एखादें काम उरकणें.

खुदा——खुदा देखा नहीं, अक्कलसे पहच्याना—(हिं.) देव कोणी पाहिला नाहीं, तो अकलेनें आपण जाणतो. तु०—अक्कलसे खुदा पछानना.

खुदा मेहेरबान, तो कुल मेहेरबान—(हिं.) ईश्वराची कृपा असल्यावर सर्व अनुकूल असतें.

खुदा हरामजादेको नाखून न दे--(हिं.) ईश्वरानें नीच मनुष्याला नखसुद्धां देऊं नये. कारण असा मनुष्य आपल्या बलाचा, अधिकाराचा दुरुपयोग करतो.

खुदाकी बात खुदाही जाने—(हिं.) परमेश्वराची लीला परमेश्वरासच माहीत, मनुष्यास ती आकलतां येणार नाहीं.

खुदाके गहजबसे डरते रहीये—(हिं.) परमेश्वराच्या कोपाची नेहमीं भीति बाळगीत असावें.

खुदाके घरसे फिर आये है—(हिं.) परमेश्वराच्या घरीं जाऊन पुन्हां आलेला असा कोणीहि असूं शकत नाहीं. तेव्हां असें सांगणारा माणूस लबाड समजतात.

खुदाके वास्ते बिल्लीभी चुव्हां नहि मारते—(हिं.) मांजर देखील देवासाठीं उंदीर धरीत नाहीं. जो तो आपल्या स्वार्थासाठीं करीत असतो.

खुरचा——खुरचा पाडणें—तुकडे तुकडे करणें; खांडणें; खुरदा उडविणें; खुरदा पाडणें.

खुरपें——खुरपें लावणें—फार पैसा मिळविणें; खुरप्यानें माती सहज उकरावी त्याप्रमाणें थोड्या श्रमांत अतिशय द्रव्य मिळविणें.

खुरमुंडी——खुरमुंडी करणें-करून टाकणें—जेरीस आणणें; हतबल करणें; दमविणें; थकविणें.

खुरमुंडीस येणें, खुरमुंडी घालून बसणें—जेरीस येणें; पराजीत होणें; हताश होणें; क्षीण होणें; दमून, थकून बसणें.

❀ **खुराक पचवावी म्हशीनें, धन पचवावें बामनानें**-पौष्टिक पदार्थाचें अतिशय सेवन झालें तर सामान्यतः अपचन होतें. पण म्हशीला मात्र खुराक कितीहि घातला तरी ती पचवूं शकते. तसेंच ब्राह्मणाला अथवा शाहण्याला कितीहि मोठा धनलाभ झाला तरी त्यापासून ताठा अंगीं न येऊं देतां तो तें पचवूं शकतो. पण इतरास थोडेंसें तरी धन प्राप्त झालें तरी त्यास ताठा चढतो.

खुश——खुश दिल ज्याचें असे, मुख त्याचें फुलें दिसे—ज्याचें मन आनंदित असेल त्याचा चेहरा प्रफुल्लित दिसतो.

खुशामत——खुशामत, खोटें धन, स्वीकारतां खिन्न मन—एखाद्या मनुष्यानें आपली तोंडदेखली स्तुति केली, तर ती खोट्या नाण्याप्रमाणें असते. तर तिचा स्वीकार करतांना मनास आनंद वाटण्याऐवजीं उदासीनताच वाटते.

खुशालचंद——खुशालचंद-टेकडा—कांहीं काळजी घोर नसणारा; चैनी; विलासी.

खुशी——खुशीचा सौदा—मन मानेल तर करावें, नाहींतर न करावें अशापैकीं काम. आपल्या इच्छेवर अवलंबून असलेली गोष्ट. ‘ त्याला जास्त देऊं किंवा कमी देऊं, तो आमच्या खुशीचा सौदा आहे. ’

खुशींत गाजरें खाणें—मूर्खपणानें आनंद मानणें. हा आनंद टिकणारा नसतो. ‘ तुम्ही असेंच खुषींत गाजरें खात मरायचे ! ’—शिसं ३.३

खुषीनें करणें, तें सोपें वाटणें—जें काम मनुष्य आनंदानें करतो तें त्यास सोपें वाटतें.

खुसपट – खुसपट रचणें-मांडणें—भांडण उकरून काढण्यासाठीं एखाद्याचे नकळत झालेले लहान सहान अपराध, चुक्या वगैरे पुढें मांडणें; कुरापत काढणें; भांडणास निमित्त काढणें.

खुळा——खुळ्या बाळाला बायको मिळाली, अक्का म्हणूं कां बाई म्हणूं ?—एखाद्या वेड्या मनुष्यानें लग्न केलें तर बायकोस काय म्हणावें हेंहि समजत नाहीं. ज्यास एखाद्या गोष्टीची योग्य किंमत कळत नाहीं त्यास तिची प्राप्ति झाली असतां तिचा तो योग्य उपयोग कसा करावा हेंहि जाणत नसल्यामुळें निरुपयोगी होते.

खूट——खूट आहे पैशाची, गरज नाहीं पिशवीची—जेथें पैसाच मुळांत नाहीं तेथें तो ठेवायचा कशांत या गोष्टीचा विचार करणें व्यर्थ. पैसा असल्यावर तो कशांत ठेवावा याची काळजी करावी लागत नाहीं. पैसा ही मुख्य वस्तु आहे, पिशवी ही गौण आहे. मुख्य वस्तु आपल्या हातीं लागल्यावर गौण वस्तूवांचून आडून राहात नाहीं; पण मुख्य वस्तु नसल्यास गौण वस्तूचा कांहीं उपयोग नाहीं.

खूण——खूण गांठ मारणें—एखादी गोष्ट लक्ष्यांत राहावी म्हणून खुणेसाठीं वस्त्राला गांठ मारतात, यावरून पक्कें ध्यानांत ठेवणें.

खूण धरणें—ध्यानांत ठेवणें; लक्ष्यांत ठेवणें; मनांत नक्की निश्चित करून ठेवणें.

खूण पाळणें—आज्ञा पाळणें; मनोगताप्रमाणें वागणें; सांगेल तसें करणें; आज्ञांकित असणें. ‘ नव्हे तयाची खूण पाळिली । ’—ज्ञा १८·९१४.

खूण मारणें—संकेत करणें; इशारा देणें; खूण करणें; खुणविणें.

❀ **विश्वास कीं खूणगांठ**—ज्याच्यावर आपला विश्वास असेल त्याच्यावर सर्वस्वी विसंबून राहण्यास हरकत नाहीं.

दादाची खूण वहिनी जाणे—एखाद्याचें मर्म त्याच्या जवळच्या विश्वासांतल्या माणसास माहीत असतें.

खून——**खून चढणें**—मनुष्यवधामुळें उन्माद चढणें; भयंकर आवेश येणें, भयंकर साहसास प्रवृत्त होणें.

खुनाला वाचा फुटणें—कोणतेंहि दुष्कृत्य छपून राहात नाहीं; तें केव्हांना केव्हां उजाडांत येतें.

❀**खून छपत नाहीं**—खून केलेला केव्हां तरी उघडकीस आल्यावांचून रहात नाहीं. तु०—खुनाला वाचा फुटते.

खुनाला तोंड नसलें तरी भलत्याप्रकारानें त्याला वाचा फुटते—खून कोणत्यातरी मार्गानें उघडकीस आल्या वांचून राहात नाहीं.

खूब——**खूब खाय वाल, तर होतील मोठे गाल**—खूप अन्न खाल्लें तर गाल वर आल्याशिवाय राहात नाहींत. चांगलें भरपूर खावयास मिळालें तर मनुष्य लठ्ठ होतो.

खूर——**जेथें गाय व्याली तेथेंच खूर खांडावे**—जेथें एखादें कार्य, संकट उत्पन्न होईल तेथेंच त्याचा निकाल लावावा. विनाकारण दिरंगाई करूं नये. वासरूं जन्मल्या बरोबर त्याचे खूर मऊ असतात पण ओबड धोबड असतात. ते मऊ असतांनाच कापून सारखे करावे. विलंब लागल्यास ते घट्ट होतात व मग चांगले कापतां येत नाहींत.

खूळ——**खूळ पिकणें**—बंड, दंगा, वेडगळ प्रकार इ. वाढत जाणें; एखादा बखेडा उत्पन्न होणें.

खूळ सोडविणें—खूळ लावणें; वेडें करणें. 'मुलानें रडून रडून माझें खूळ सोडविलें.'

❀ **खूळ उभें केलें आणि पोराला धरून नेलें**—कांहीं तरी भानगड उपस्थित करून एखाद्याला संकटांत घालणें.

खूळ भांडतें व्रजाबरोबर—(कों.)१

खेंक——**खेंका धावणें**—(व.) खेंकणें; अंगावर धांवून येणें; धाक, भीति दाखविणें.

खेंकटा——**खेंकट्यास मेकटें**—(वाईट, निंदाव्यंजक अर्थानें वापरतात) जशास तसें; शठास शठ. तु०—वांकड्या मेढीला वांकडे नेम.

खेंकट्यास मेकटें महादेवा, उठ गो नकट्या लाव दिवा—जशाला तसा भेटला म्हणजे त्याचेपुढें कांहीं चालत नाहीं. जबरदस्त भेटला म्हणजे मनुष्य निमूटपणें काम करतो.

खेचणें——**खेचो ! अबी खेचो ! तुटे, बस करो**—१ तुटेपर्यंत ओढून धरावयाचें; तूटेपर्यंत ताणणें. २ उगीचच चढवून द्यावयाचें; कलागत लावून स्वस्थ मजा पाहात बसावयाची वृत्ति.

खेचर——**खेचरें आपले पूर्वज घोडे असल्याची निरर्थक बढाई मारतात**—स्वतःमध्यें करामत नसली म्हणजे आपल्या पूर्वजाबद्दल कितीहि बढाई मारली तरी तिचा उपयोग होत नाहीं. —पुरुषार्थ, आगष्ट १९३९ पान ५०. तु०—सांगे वडिलाची कीर्ति । तो एक पढत मूर्ख ॥ Mules make a great fuss about their ancestors being horses.

खेटर——**खेटर तुटो-जळो**—पूर्ण बेपर्वाई दाखविणें; अगदीं पर्वा नाहीं असें सांगणें.

वडिलांचीं खेटरें घेऊन पळणारा—अतिशय लबाड; स्वतःच्या बापासहि लुबाडणारा, नागवणारा अत्यंत धूर्त, फसव्या मनुष्य.

खेटरानें पाणी पाजणें—अत्यंत अपमान करणें; मानखंडना करणें; मुळींच न जुमानणें.

खेटरांनीं पूजा करणें-बांधणें—खेटरणें; खरडपट्टी काढणें; यथेच्छ निंदा करणें. 'या देवांची नित्यनेमानं खेटरांनीं पूजा करायला हवी !'—एकच प्याला ४.२; २.१.

❀ **माझं खेट्टर अडलाय !**—(बायकी) मला पर्वा नाहीं, मी करणार नाहीं या अर्थी बेपर्वाईचे उद्गार.

चांभाराच्या देवास खेटराची पूजा—हलक्या लोकांच्या देवतांचीं उपासना साधनें तशीच तुच्छ, क्षुद्र असावयाचीं. यावरून जशास तसें; शठं प्रति शाठ्यम्. ।

आपल्या खेटरावर माया, ती दुसऱ्याच्या पोरावर नाहीं—स्वतःच्या क्षुल्लक वस्तूबद्दलहि मनुष्यास प्रेम वाटतें तें दुसऱ्याच्या बहुमोल वस्तूबद्दलहि वाटत नाहीं. स्वतःचें स्वतःस सर्वच प्रिय असतें तसें दुसऱ्याचें नसतें.

खेटा——**खेटा घालणें**—वांधा काढणें; अडथळा करणें (व्यवहार, देणे घेणें इ. मध्यें).

खेटे——**खेटे-खेट्या घालणें**—येरझारा करणें; पुन्हां पुन्हां जाणें, येणें; आपल्या कामाकरितां एखाद्याचा उंबरा झिजविणें.

खेडूत——**खेडूत थकली म्हणून जमीन थकली आहे काय ?**—कुळ दमलें म्हणून जमीन दमत नाहीं. कुळानें जमीन टाकली म्हणून जमीन कांहीं निरुपयोगी होत नाहीं व मालक ती टाकून देत नाहीं.

खेडें——खेडें आणि वेडें; खेडें तेथून वेडें— खेड्यांत बहुधा वेडगळ लोक असतात. फारसे शहाणे लोक खेड्यांत आढळत नाहींत. तेथें अडाणी लोकांचा भरणा असतो. –गांगा १५०.

खेडयांत भोळेपणा, शहरांत नागवेपणा— खेड्यांतील लोक भोळे असतात व शहरांतील लोक बेछूट असतात. ते कोणाची परवा करीत नाहींत. वेळेनुसार अब्रूचीहि त्यांस चाड नसते.

खेडयांतली वस्ती, नमो नारायण स्वस्ति— (व.) नारायणाला नमन असो व सर्वांचें कल्याण असो इतकेच शब्द संस्कृत वाणीनें म्हणणारा म्हणजे कांहीं विशेष विद्वान नसणारा मनुष्य असला तरी खेड्यांत तोच मोठा विद्वान समजला जाऊन त्याची मानमान्यता होते. ‘ खेड्यांत कुणबी धानबीच राहतात. तेथें ब्राह्मणांसारखीं धर्मकृत्यें कोठून चालतील ! खेड्यांत साधें काम. खेडयांतली वस्ती०’

खत——खेत राहणें— [खेत = रणक्षेत्र] लढाईत पडणें; ठार होणें. ‘हुजुरातपैकीं तीन हजार स्वार खेत राहिला.’–दाभाडे हकीगत ९ (कासं.)

खेतास पडणें-येणें--लढाईत मरणें; कामास येणें. ‘कित्येक गारदी खेतास आले.’–भाब १५.

खेत्र——खेत्र करप— [खेत्र = क्षेत्र] देवतेस बकरी इ. बळी देणें.

खेम——खेमवेंगेस येणें— [खेम = मिठी. वेंग = मिठी] एखाद्याच्या कबज्यांत येणें; एखाद्याच्या तडाक्यांत सांपडणें; एखाद्याच्या हातांत सांपडणें.

***खेम घेतले, हड्डे सुकले, सांगसी दवरूक जागो ना—** खेम घेतलें (खुशाली विचारली) पण हड्डे सुकले (छाती धडधडली) कारण पाहुणा जेवावयास येण्याचा संभव म्हणून सांगितलें, कीं घरांत सांगशी (करंडी) ठेवावयासहि जागा नाहीं. वरवरचा आदर, पुसतपास; वरवरचें बोलणें.

खेमा——खेमेठोक— (व.) [खेमा=तंबू] तंबू ठोकून बसणार; जबरदस्त (माणूस); अगदीं ठाण देऊन बसणारा; हट्टी; न हलणारा.

खेळ——खेळ करणें— पैसा वगैरे बेपर्वाईनें खर्च करणें; उधळपट्टी करणें; घोटाळा, अव्यवस्था करणें; नासणें; बिघडाविणें.

खेळ करणें-मांडणें--चांगला खेळ किंवा काम करणें; एखादी हुशारीची चातुर्याची गोष्ट करणें, साधणें; पराक्रम गाजविणें.

खेळखंडोबा— सर्वस्वीं बिघाड, नाश; अव्यवस्थित स्थिति; धूळधाण.

खेळ मांडणें-लावणें— एखादा व्यूह रचणें; एखाद्या कटाचा, दुष्ट मसलतीचा पाया घालणें.

खेळणें——खेळतें वारें— पिशाचाचा वगैरे संचार; अवसर; अंगांत येणें.

खेळणारापेक्षां पाहाणारे फार— जेथें एखादा खेळ चाललेला असतो तेथें खेळ करणारे थोडेच असतात, पण पाहाणारांची मात्र गर्दी असते. नेहमीं काम करणारे थोडेच असतात इतर बघ्यांची गर्दी पुष्कळ असते. तमासगिरांची गर्दी नेहमीं फार असते.

खेळणारे जुवेकरी फार दिवस टिकत नाहींत-- जे मनुष्य सट्टेबाजी करतात, जुवा खेळतात ते फार दिवस एकत्र रहात नाहींत.

खेळता घोडा जिंकणें, अथवा जीन हरवणें--एक जय तरी मिळवावा किंवा अगदीं नागवून घेऊन परत यावें. Either win the horse or lose the sadle. –सवि ८९७.

खेळांत ठकवितो, तो व्यवहारीं भला नसतो— जो खेळांतसुद्धां लबाडी करतो तो खरोखरीच्या व्यवहारांत केल्याशिवाय राहणार नाहीं.

खेळेल तो पोळेल--जो काम करतो त्याला प्रसंगीं नुकसान येण्याचा संभव असतो.

खैं——खैं गा वेता ? खोरजुव्यां, म्हजेंय खोरजुलें (गो.) [खोरजुवें = गोव्यांतील एक बेट] यांत शब्दावर कोटी आहे. कुठें रे गेला होतास ? खोरजुव्याला. मलासुद्धां खाज आली आहे !

खैं गेल्लो ? खैं ना ! कितें हाडलें ? काय ना !-- (गो.) कोठें गेला होतास ? कोठें नाहीं. काय आणलेंस कांहीं नाहीं. कांहींतरी करणें; रिकामटेकडे भटकणें.

खैर——खैराचें झाड व म्हाताऱ्याचें हाड; खैराचें साड व म्हाताऱ्याचें हाड— खैराचें झाड विशेषतः त्यांतील गाभा फार बळकट असतो; तसेंच म्हातारा मनुष्यहि हाडाचा फार बळकट असतो.

खैरात——खैरातकी टुकरी और बजारमें डकार--भिक्षेवर कसाबसा उदरनिर्वाह करावयाचा पण बाजारांत ढेकर देत जावयाचें. मिशाला तूप लावणें याप्रमाणें. -सवि १४०१.

खैस——खैस गेला न् पैसा झाला--(व.) खविसापुढें मनुष्याचा कांहीं इलाज चालत नाहीं; खवीस जागा अडवून बसतो, त्याला हाकलून लावण्याची सोय नसते. पण पुढें तो आपोआपच गेला म्हणजे मग पैसा मिळतो. त्याप्रमाणें कोणा डोईजड माणसानें कारभारांतून आपला हात काढून घेतल्यामुळें त्यांत ढवळाढवळ करण्यास इतरांस वाव मिळाला असा अर्थ.

खो——खो घालणें-देणें--१ एखाद्या कामावरून वगैरे घालवून देणें. २ मर्जीतून वगैरे उच्चाटन करणें ३ काम वगैरे बिघडविणें; अडथळा आणणें. 'बाबांच्या मनांत आलं तर धाडतील, पण माईसाहेबांनीं मात्र खो घालूं नये म्हणजे झालं.' -पकोघे.

खोकडी——खोकडी गुंगविणें--१ तोंडांत भडकाविणें. २ घोंटाळा करून सोडणें; घात करणें.

खोकला——खोकला विकत घेणें—नसतें लचांड अंगावर घेणें.

खोकल्यानें पाद जिरविणें—(कों.) वाईट गोष्टीवर पांघरूण घालणें. मागें पहा.

❀ गळा कापला, खोकला मिटला-वारला—खोकला घालविण्यासाठीं मान कापून टाकणें; थोडीशी अडचण दूर करण्यासाठीं मोठें नुकसान करून घेणें.

खोगीर——खोगीरभरती—पूर्वी सरंजामदारांना घोड्यांच्या संख्येवरून खर्च देत. तेव्हां घोड्यांची ठराविक भरती करण्यासाठीं लबाडीनें रिकामीं खोगीरें दाखवींत व घोडे बाहेर गेले आहेत असें सांगत. यावरून निरुपयोगी, कुचकामाच्या वस्तूंचा माणसांचा संग्रह. (खोगीर मऊ व फुगीर व्हावें म्हणून आंत चिंध्या व इतर रद्दी भरीत; त्यावरूनहि वाक्प्रयोग असेल.) 'निजामाच्या फौजेंत चांगले लढवय्ये असे थोडे होते, खोगीरभरतीच फार होती.'

खोगीर लादणें—वर्चस्व, ताबा चालविणें; अंकित करणें. 'शहाजी :—आपल्या फायद्यासाठीं मोंगलानीं बिचाऱ्या निजामशहावर हें ताबेदारीचें खोगीर लादलें आहे.' -शिसं१.२.

खोगीर वर लादणें-चढविणें-ठेवणें—१ घोड्यावर जीन चढविणें; जाण्याची तयारी करणें. २ (ल.) एखाद्यावर दोषारोप करणें; ठपका देणें. ३ (ल.) पोशाख चढविणें.

खोंच——खोंच मारणें—मर्मभेदक टीका करणें. 'मोठमोठ्या इंग्रजी ग्रंथकारांची कोणास खोंचा मारण्याची रीत किती संभावितपणाची व रामबाण असते हें ठाऊक असेलच.' -नि ९.

खोंचणें——खोंचुन घेवप—(गो.) अंगांत देवाचा संचार झाला असतां अंगावर जखमा करून घेणें.

खोंचून बोलणें—टोंचून छद्मी बोलणें; लावून बोलणें; मर्मभेदी भाषण करणें. 'आनंदीबाई पुन्हां खोंचून बोलल्या.' -इंप ५०.

❀खोंचून उलवंच्याकइ वेंचून उलवच ससार-(गो.) लागेल असें बोलण्यापेक्षां वेंचक (नेमकें)बोलणें सोपें.

खोट——खोट खाणें—तोटा होणें; घस लागणें.

खोटा-खोटी-खोटें——खोटा तरी गांठचा, वेडा तरी पोटचा--आपल्या पदरचा मनुष्य खोटें बोलला तरी त्याची जबाबदारी आपल्यावर असते; त्याला अंगाबाहेर टाकतां येत नाहीं. तसेंच आपला स्वतःचाच मुलगा वेडा असला तरी त्यालाहि आपणापासून दूर करतां येत नाहीं; त्यापासून होणारा त्रास सहन केलाच पाहिजे. तु०-चिंबचळें शेतचें आणि थोटें पांगळें पोटचें.

खोटा तो खोटा आणि वर फुकाचा ताठा--खोटें बोलून आणखी वर फुशारकी मारणाऱ्या मनुष्यास म्हणतात.

खोटा पैसा गांठका और नकटा बेटा पेटका—आपल्याजवळ खोटें नाणें असलें तर जगांत तें कोणी घेत नाहीं. त्याला आपल्या शिलकेंतच जमा करून ठेवावें लागतें. तसेंच आपलें मूल विद्रूप असलें तरी पोटचा गोळा असल्यामुळें त्याचा प्रतिपाळ करावा लागतो. तसेंच आपल्या हातून घडलेल्या चुकांचा परिणाम आपल्याला सहन करावा लागतो. नुकसानींत कुणींच भागीदार होत नाहीं.

खोटेंच बोलायचें मग थोडें कां? भुईवर निजायचें मग संकोच कां?--(क.) खोटें बोलणें झालेंच तर मग थोडें काय नि फार काय सारखेंच. त्यानें फायदा होत असेल तर जास्त कां न बोला! त्याप्रमाणेंच निकृष्टावस्था आल्यावर मग लाज बाळगून काय करावयाचें. खुशाल वेळ पडेल तसें वागावें अशी एक विचारसरणी आहे.

खोटें नाणें चमके फार, गांडू भडव्याच्या बाता जोरदार—ज्याप्रमाणें खोटें नाणें दिसावयास खऱ्या नाण्यापेक्षांहि

अधिक चकाकीत दिसतें त्याचप्रमाणें ज्या मनुष्याच्या अंगांत बळ नाहीं त्याची तोंडाची वटवट फार चालते.

खोटें नाणें व अकर्मी पोर, कुचकामाचें——ज्याप्रमाणें खोटें नाणें चालत नाहीं, त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं त्याप्रमाणें निष्क्रिय किंवा कुमार्गी मुलाचाहि कांहीं उपयोग नसतो.

खोटें नारळ होळीमध्यें—१ खोटा नारळ होळीमध्यें टाकण्यास योग्य असतो. तसा खोटें काम करणारा मनुष्य संकटांत लोटण्यास योग्य असतो. २ भटाला कुचकी सुपारी, नारळ याप्रमाणें.

खोटें बोलण्याची आदत, जन्मभर नाहीं जात.— मनुष्यास एकदां खोटें बोलण्याची संवय लागली म्हणजे ती जन्मभर सुटत नाहीं.

खोटें बोलतां कष्ट होती, खरें बोलतां श्रम हरती — एकदां मनुष्य खोटें बोलला म्हणजे त्यास चिकटून राहाण्यांत त्याला फार त्रास होतो; कारण खरें कव्हांना केव्हां तरी बाहेर पडल्याशिवाय राहात नाहीं, पण खरें बोललें असतां सर्व पीडा टळते.

खोटें बोलेल तर जीभ झडेल——एक शपथेचा प्रकार.

खोटें बोलेल तो तीनदां जेवील——सध्याच्या जगांत अप्रामाणिक मनुष्यास प्रामाणिक मनुष्यापेक्षां ऐहिक लाभ अधिक झालेला दिसतो.

खोटे लोकांना साक्षी फार मिळतात—लबाड मनुष्यास पुष्कळ साक्षीदार मिळवितां येतात व तो त्यांस आपल्या लबाडीनें मिळविलेल्या लाभांत वांटेकरी करून सहज वश करून आपल्या बाजूनें बोलावयास तयार करूं शकतो; पण खऱ्याला तसा कोणाचा आधार मिळत नाहीं.

खोटया नाण्याक झगझग चड—(गो.) खोट्या नाण्याला उजळा जास्त. 'खोटें नाणें चमके फार०' पहा.

खोटया मित्रांपेक्षां प्रसिद्ध शत्रू बरा—एखाद्या लबाड वरून साळसूद दिसणाऱ्या पण आंतून कपट करणाऱ्या मित्रापेक्षां उघड शत्रु पुरवतो. याचें कपट लवकर कळत नाहीं व त्याचा बंदोबस्त करतां येत नाहीं; पण उघड शत्रूपासून निदान सावध राहतां येतें.

खोटया शपथेचा भार, कपटाला आधार—एखादें कपटी कृत्य केलें म्हणजे त्याचें समर्थन करण्यासाठीं खोटी शपथ वाहण्याची पाळी येते. पाठभेद—खोट्या शपथेचा भार, कपाळाला आधार.

खोट्याक प्राण नाय, निसत्याक मरण नाय—(गो.) खोटें टिकत नाहीं व खरें झाकत नाहीं.

खोट्याचे कपाळीं कुऱ्हाडीचा घाव—खोटें काम केलें असतां कव्हां ना केव्हां तरी तें उघडकीस येऊन त्याचें फळ मिळाल्याशिवाय राहात नाहीं.

खोट्याचे कपाळीं गोटा—वर प्रमाणेंच. "आपला मतलब साधेल असें त्यास वाटत होतें पण 'खोट्याच्या कपाळीं गोटा' या म्हणीप्रमाणें सर्व बेत फसला."—विक्षिप्त ३ १८०.

खोट्याचे नांवाची होय माती, खऱ्याची वाढे कीर्ति—खोटीं कृत्यें करणाराची शेवटीं धूळधाण होते व सत्याचा विजय होऊन त्याची कीर्ति दिगंत पसरते.

खोट्याचें मढें तीन शेज पडे, त्याला कोण रडे ?— खोट्या माणसाच्या नाशाबद्दल कोणी हळहळत नाहीं.

खोट्टो——खोट्टो पोटशेल्लो (कुशिल्लो) सूणें भुकेल्लें—(गो.) खाट्टा (उडदाच्या डाळीचें उकडून केलेलें पक्वान्न) कुजला होता आणि कुत्रा भुकेलेला होता. कुजला म्हणूनच बाईनें तो बाहेर टाकून दिला आणि कुत्र्याला भूक लागली होती म्हणूनच तो त्यानें खाल्ला. एकाला जी वस्तु त्याज्य तीच दुसऱ्याला दुर्दैववशात् ग्राह्य मानावी लागते.

खोड——खोड काढणें—१ खिजाविणें; चेतविणें; दोष वगैरे बाहेर काढणें; कुचाळी करणें. २ दोष वगैरे काढून टाकणें; वाईट संवय टाकून देणें.

खोड ठेवणें——दोष काढणें; दोष लावणें; नांवें ठेवणें.

खोड मोडणें—१ ताठा, गर्व कमी करणें; खोडकी जिराविणें. अद्दल घडविणें; शिक्षा करणें. २ जडलेली वाईट संवय घालविणें.

खोडकी मोडणें-जिरविणें—रग जिरवणें; चांगली शिक्षा करून ताठा कमी करणें; अद्दल घडविणें. 'बाजीराव साहेबांनीं निजामाची खोडकी जिरवली.'—इंप ५२.

***खोड जडली बाळपणीं, सुटत नाहीं मोठेपणीं**— लहानपणीं एखादी वाईट संवय लागली म्हणजे ती मोठें झाल्यावरहि सुटत नाहीं तु०—बाळपणीं बाळांची कोमल तरुतुल्य बुद्धि वांकेल। घेईल ज्या गुणाला तो गुण मति वेष्टुनीहि फांकेल ॥

जी खोड बाळा, ती जन्मकाळा—लहानपणीं लागलेली वाईट संवय जन्मभर सुटत नाहीं.

जित्याची खोड मेल्यावांचून जात नाहीं—एकदां वाईट संवय लागली म्हणजे ती आमरणांत सुटत नाहीं.

एक गोरी, बहात्तर खोडी चोरी--गोऱ्या मुलींत इतर कांहीं व्यंगें असलीं तरी तीं झांकून जाऊन ती गोरेपणामुळेंच एकदम मनांत भरते. एक पहा.

खोडणें——हातपाय खोडणें--हातपाय पाखडणें; मरणसमयीं हातपाय झाडणें. 'विरंची बहुत हात पाय खोडी' -महिकथा २.१४८.

जीव जाईना म्हणून हातपाय खोडावे--पोट भरण्यासाठीं जोराची धडपड करणें.

खोडा——चालला तर गाडा, नाहींतर खोडा--एखादी गोष्ट जोंपर्यंत सुरळीतपणें चाललेली असते तोंपर्यंत ठीक असते; पण एकदां का तींत कांहीं बिघाड झाला म्हणजे तीपासून एकसारखा फार त्रास होऊं लागतो, अशा गोष्टीबद्दल म्हणतात.

खोड्यांत पाय घालावयास येतो, पण काढावयास जड जातो; खोड्यांत पाय घालावयास येतो पण काढावयास परवानगी लागते--एखाद्या अडचणींत जाणें सोपें असतें पण बाहेर पडणें कठिण असतें.

खोदणें——खोद खोदून विचारणें-पुसणें—बारकाईनें, सूक्ष्मपणें युक्तिप्रयुक्तीनें विचारणें; अगदीं बारीकसारीक तपशील विचारून माहिती काढून घेणें.

❀ खोदे उंदर, भोगवे भुजंग—उंदीर बीळ खोदतो पण त्यांत साप रहातो. आयत्या बिळीं नागोबा बळी.

खोबरें——खोबरें होणें—१ नाश होणें; अजीबात जाणें. 'आज माझ्या झोंपेचें खोबरें झालें.' २ दुर्मिळ होणें; दुष्काळ पडणें. 'मनुष्यास अन्नाचें खोबरें झालें.'—भाव १३०.

खोबऱ्याचा वाळा—खोबऱ्याचा कीस.

खोबऱ्याची आई—करवंटीच्या आंत खोबरें असतें यावरून नरोटी; करवंटी.

खोबऱ्याचो बैल चलता बरो—खोबऱ्याची गोणी बैलावर लादली असतां तो नीट चालतो (त्याला खोबरें मिळण्याची आशा असते).

खोरणी——खोरणी लावणें--१ पैशाचा तगादा लावणें; पैशाकरितां सारखा नेट लावणें; पिच्छा पुरविणें; एकसारखा पैसा ओढणें. २ पावड्यानें पैसा ओढणें; खोऱ्यानें पैसा ओढणें; खूप पैसा मिळविणें.

खोरी——खोरीं-खोरीस येणें-पडणें; खोरी होणें—१ नुकसानींत येणें; तोटा होणें; कंगाल होणें. २ क्षीण होणें; रोडावण (शरीरानें); कृष होणें; खंगणें. ३ नामोशी होणें; अपकीर्ति होणें; नांव जाणें. ४ मति कुंठित होणें; मागें पाय येणें; अपजय येणें; पराभूत होणें. 'केले टाणेटोणे सारी। पाहिले करून झाले खोरी।'—पला ९०.

खोरें——खोरें लावणें—१ खोऱ्यानें पैसा ओढणें; खूप द्रव्य मिळविणें; लवकर व अलोट धन प्राप्त करून घेणें. २ तगादा लावणें; पाठीस लागणें; पैशाची मागणी एकसारखी करीत राहणें.

खोऱ्यानें पैसा ओढणें—अतिशय संपत्ति मिळविणें; जलद व खूप पैसा मिळविणें.

खोऱ्यानें माती आपल्याकडे उपसणें--खोऱ्यानें माती ओढली असतां ती आपल्याचकडे येते, पलीकडे जात नाहीं. यावरून आपलाच फायदा करून घेणें; आपला स्वार्थ साधणें.

❀ खोरें आपणा दिकाने ताणता; खोरें आपलेवशीन माती ओट्टा—(गो.) खोरें आपल्या बाजूला माती ओढतें. मनुष्य नेहमीं आपली सोय प्रथम पाहातो. मनुष्य करतो ती गोष्ट बहुधा आपल्या फायद्यासाठींच करतो. वरील म्हण पहा. तु०—आपल्या पोळीवर तूप ओढणें.

खोरें माती आपल्याकडे उपसतें-ओढतें-वरीलप्रमाणें.

खोर्जुवाळो——खोर्जुवाळ्याक लज ना आनी गरजवंताक अक्कल ना--(गो.) खर्जुव्यास लाज नाहीं व गरजवंतास अक्कल नाहीं. खरूज पहा.

खोल——खोल पाण्यांत शिरणें--जास्त तपशील पाहणें; फार बारकाईनें शोध घेणें. 'याकरितां तुम्ही खोल पाण्यांत न शिराल तितकें बरें आहे.'—शाब ३.२०.

❀ खोल आड, टुका दोर—विहीर तर खोल असली व दोर तर तोकडा असला, म्हणजे काम मोठें व साधनें अपुरीं असलीं म्हणजे कार्य कसें साधावयाचें!

खोलणें——खोलून खोलून विचारणें--खोदखोदून प्रश्न करणें.

खोलो——खोलये वेल्यान् मीठ मागप--(गो.) अगदीं निमित्ताला टेकणें.

ख्याति——ख्याति करणें-लावणें--कीर्ति करून ठेवणें; जग वाखाणणी करीत राहील असें महत्कृत्य करणें; मोठा पराक्रम करणें; बहादुरी करणें. 'ख्याती केली। सांगायासी ऐकायासी गोष्टी जाली।'—सप्र ८.११. २ ओ ४२; 'चैद्यादिक पक्षपाती। त्यासी रणीं लावीन ख्याती।'—एरुस्व ५.४.



ख्याल——ख्यालीं असणें-पडणें-लागणें--१ निरंतर विचारांत, छंदांत असणें; नादांत असणें. २ आसक्तिपूर्वक पाठीस लागणें; मागें असणें; नादीं लागणें.

❀ **ख्यालीखुशाली केली ज्यांनीं, धन शक्ति अब्रूची केली हानि**--जे लोक केवळ ख्यालीखुशालींत आपलें आयुष्य घालवितात ते आपल्या द्रव्याची, शक्तीची व अब्रूची नासाडी करतात.

ग

ग——गची बाधा-पीडा—[ग = गर्व] गर्वाचा ताठा; अभिमान; वृथा प्रौढी; स्वतःबद्दलची वाटणारी घमेंड; दिमाख. ‘ श्रीची प्राप्ति झाली म्हणजे गची बाधा व्हावयाचीच ! ’-गुमं.

गची व्यथा असणें—गर्वानें ताठलेलें असणें; फार अभिमानी, गर्विष्ठ असणें; घमेंडींत असणें.

गगन——गगन कांपणें-थरारणें—एखाद्या क्रूर, भयंकर कृत्यामुळें आकाशालाहि जणूं कंप सुटणें, सर्वत्र भीतीचें वातावरण उत्पन्न होणें; एखाद्याच्या भयंकर कृत्यामुळें सर्वत्र थरकांप उत्पन्न होणें.

गगनांत भरणें—आकाशांत भरारी मारणें; घराबाहेर उडून जाणें; उंच उडून जाणें. ‘ दुसरा गरुड उपजतां भरला गगनीं न मंदिरीं राहो। ’-मोआदि ४.३४.

गगनाशीं गांठ बांधणें-लावणें-घालणें—१ उंच उडणें; भरारी मारणें; उंच चढणें. २ महत्कृत्य करणें; एखादा अचाट पराक्रम करणें; फार मोठी कामगिरी करणें. (गु.) गोदरे गांठ नहि वलाय.

गगनाशीं भांडणें—आकाशाशीं स्पर्धा करूं पाहणें; आकाशाची उंचीमध्यें बरोबरी करूं पाहणें; खूप उंच वाढणें. एखादा वृक्ष किंवा गर्विष्ठ मनुष्य यांच्या बाबतींत योजतात.

दिवस गगनाशीं भांडणें—उत्तरायणांत दिवस मोठा होतो त्यावरून, १ दिवस फार मोठा होणें; उन्हाळ्यांत दिवस लांबणें. २ दिवस वाढून नंतर कमी कमी होण्यास प्रारंभ होणें.

गगनीं दिवा लावणें—दिगंतीं कीर्ति पसरणें; अतिशय प्रख्यात होणें; खूप प्रसिद्धी मिळविणें; फार मोठें शतकृत्य करणें.

गगनींची वीज कोसळणें—आकाशाची कुऱ्हाड पडणें; एखादी भयंकर दैवी आपत्ति येणें; आकस्मिक भयंकर प्रसंग ओढवणें. ‘ गगनींची वीज जाणों कोसळली त्यावर। ’-विक २०.

❀ **गगनासारखी मैत्री, तिळा बरोबर नातें (बरोबर होत नाहीं)**—मोठा मित्र कितीहि जिवाचा असला तरी त्याचें प्रेम हें वरवरचें असतें, पुष्कळदां कामापुरतें असतें. पण नात्याचें मनुष्य आहे त्याचा रक्ताचा संबंध असतो; तो कधींहि तुटत नाहीं. तेव्हां या दोन संबंधांची बरोबरी कधींहि होऊं शकत नाहीं. तु०- Blood is thicker than water.

गगनबावडा——गगनबावडा दाखविणें-(कोल्हापूर प्रांतीं गगनबावडा गांव आहे. तें डोंगरावर वसलें आहे.) उंच चढल्यानें मनुष्य थकतो यावरून, दमविणें; थकावणें.

गंगा——गंगा घेणें-उचलणें—गंगा हातांत घेऊन शपथ करणें; गंगेच्या उदकाची शपथ घेणें.

गंगाजमनी—गंगेचें पाणी पांढरें व यमुनेचें काळें यांचा संगम झाला तरी तो भिन्नरंगी दिसून पडतो. १ दोन रंगांचा; एका कांठास एक रंगी व दुसऱ्या कांठास भिन्नरंगी रेशमी किनारी असलेलें (वस्त्र). २ परस्पर भिन्न अशा स्वरूपाचा एकत्र मिलाफ.

गंगाजमनी जोडपें—एकमेकांस विसंगत असें दांपत्य.

गंगाभागीरथी—वृद्ध विधवा स्त्री ही गंगा किंवा भागीरथीप्रमाणें पवित्र मानतात यावरून, वृद्ध विधवा स्त्रीबद्दल ही शब्दयोजना करतात. तिच्या नांवामागें पत्रव्यवहारातून गंगाभागीरथी असा मायना लिहितात.

गंगा मनाला घालणें—(कऱ्हाड) केलेला अपराध कबूल करून मनाची रुखरुख घालवून टाकणें; मन निर्मळ करणें.

गंगायमुना थोपवून धरणें—रडें बंद करणें. पुढील पहा. ‘ इकडच्या तिकडच्या गोष्टींचा धरणं बांधून इतका वेळ मीं या गंगायमुना थोपवून धरल्या होत्या. ’-एकच प्याला १.१.

गंगायमुना वाहणें—दोन्ही डोळ्यांतून अश्रुधारा येऊन त्यांचा नाकाशीं संगम होणें; या दोन धारांस अनुक्रमें गंगा व यमुना म्हणतात; यावरून रडें येणें; डोळ्यांतून अश्रू वाहूं लागणें.

आळशावर गंगा लोटणें—स्वतः कांहीं हालचाल न करतां घरीं संपत्ति चालून येणें; स्वतः श्रम न करतां मोठा लग्गा साधणें; आपोआप लाभ होण्याची संधि प्राप्त होणें. आळशी पहा.

(सौख्याची) गंगा वाहाणें-वाहवणें—भरपूर सौख्य प्राप्त होणें; अतिशय सुख मिळणें; सुखांत निमग्न होणें. 'सौख्याची आनंदांत नाहीं गंगा वाव्हली । मन तुझिया पावलीं । सय होते जेवतांना दिसे ताटीं वाव्हली ।'–प्रला ९९, पृ. १७६.

गंगेंत उभें राहून तुलसीदल हातांत घेणें—गंगेच्या पाण्याची व तुळशीच्या पानाची शपथ वाहणें. गंगोदक व तुलसीदल या दोन पवित्र वस्तूंची शपथ घेणें.–विक्षिप्त ३.१६५.

गंगेंत-गंगेला-गंगेस घोडें नहाणें—या वाक्प्रचारांत मराठी साम्राज्याचा इतिहास सांठविला आहे. पेशवाईंत भीमथडी तट्टांना गंगेचें पाणी पिण्यास–नाहाण्यास मिळालें. पेशव्यांनीं मोठा पराक्रम करून उत्तर हिंदुस्थानांत अमल बसविला. यावरून दक्षिणचीं घोडीं उत्तरेच्या गंगेंत धुणें म्हणजे त्याप्रमाणें मोठा पराक्रम करणें; एखादें मोठें पराक्रमाचें कार्य पार पाडणें; एखादी अचाट कामगिरी पूर्ण करणें. आरंभिलेलें महत्कार्य तडीस जाणें. 'जिजी कधीं इथें यायची नव्हे, ती मीं मोठीं आर्जवें करून बोलावून आणली, त्यासारखी ती धडपणें आपल्या नवऱ्याच्या घरीं परत पोंचली म्हणजे गंगेला घोडे न्हाले !'–शिसं २.४.

वाहत्या गंगेंत हात धुणें—ज्याप्रमाणें पाण्याचा प्रवाह वाहात असतां त्यांत हात धुणें सोपें असतें त्याप्रमाणें एखादें मोठें काम चालू असतां त्यांत एखादें लहान काम सहज उरकतें. कामांत काम साधून घेणें; चलती तेजी आहे, तों आपला मतलब साधणें. परभारें दुसऱ्याच्या खर्चांत आपलें काम उरकून घेणें; सद्दी आहे तों फायदा करून घेणें. 'कर वचनाचा धुऊन घे हात भरली गंगा वाहाती ।'–होला ६१.९०.

गंगेंतील पाणी गंगेंत सोडणें—ज्याचें घेतलें असेल त्याचेंच त्याला परत करणें; जेथून आलें तेथें परत नेऊन देणें; केलेल्या उपकाराची फेड करणें.

❀ **वाहती गंगा आणि चालता धर्म**—गंगा वाहात असतां त्यांत हात धुवून घ्यावा व पुण्यकृत्य करण्याची संधि आली असतां तिचा फायदा घ्यावा. गंगेचा प्रवाह कोणाकरितां थांबत नाहीं, तसाच धर्म कोणाची वाट बघत नाहीं (धर्मस्य त्वरिता गतिः). याकरितां आपणाला जेव्हां जेव्हां संधि मिळेल तेव्हां तेव्हां ती साधून घ्यावी, दिरंगाई करूं नये.

गंगा आली आळशावरी, आळशी पाहुनि पळे-होई-दुरी—एखाद्याला मोठा लाभ आयता होत असतां केवळ आळसामुळें तो घालवणें; आळसामुळें आलेली लाभाची संधि न साधतां फुकट दवडणें. –फडके–माझी तीर्थयात्रा १.३६. 'लोह परिसा रूसलें । सोनेपणासीं मूकलें ॥ येथें कोणाचें काय गेलें । ज्याचें त्यानें अहित केलें ॥ गंगा आली आळशावरी । आळशी देखुनी पळे दुरी ॥'–तुगा ४५४२.

गंगा गये गंगादास, जमना गये जमनादास; गंगा गये गंगादास, मथुरा गये मथुरादास—जशी परिस्थिति असेल तसें वागण्याची पद्धति. तु०–When you are at Rome do as Rome does.

घटकेंत सौभाग्यवती, घटकेंत गंगाभागीरथी—एका वेळीं फार लाड करावयाचे तर दुसऱ्या वेळीं शिव्या द्यावयाच्या, असा एखाद्याचा स्वभाव असला म्हणजे म्हणतात.

वाहिली ती गंगा, राहिलें तें तीर्थ—पाणी वाहून गेलें तर ती गंगा वाहाते व सांचून राहिलें तर तें तीर्थ होतें. दोन्हीहि अवस्थेंत पवित्र व उपयुक्तच. तसें पैसा खर्चला तो दानधर्म व राहिला तो चांगल्या कामासाठीं उपयोगी. तेव्हां एखादी गोष्ट सर्व प्रकारांनीं उपयोगी असल्यास वरील म्हण वापरतात. किंवा आपल्याला एखादा मोठा लाभ होत असतां त्याचा पूर्ण फायदा न मिळतां, आपणांस कांहीं अंशच मिळाला तरी त्यांतच समाधान मानणें.

गंगास्नान व तुंगापान—१ गंगेमध्यें स्नान करण्याचें महत्त्व फार मानतात. गंगेचें स्नान अत्यंत पुण्यदायक तसेंच आरोग्यकारक आहे; त्याचप्रमाणें तुंगभद्रेचें पाणी पिण्याचें महत्त्व फार मानण्यांत येतें. गंगेचें पाणी स्नानास स्वच्छ व आरोग्यकारक आणि तुंगेचें पाणी पिण्यास गोड. २ कोठेंहि खाणें, पिणें, राहाणें. संन्याशाप्रमाणें वृत्ति; आज येथें तर उद्यां भलतीकडेच फार दूर, याप्रमाणें फिरणें.

गंगास्नान व प्रवरापान—वरीलप्रमाणें तुंगाऐवजीं प्रवरा प्रवरेचें पाणी हलकें असून पाचक आहे.–पांगारकर, चरित्रचंद्र.

गंगेंत न्हालें, यमुनेंत न्हाल, अंगीं नाहीं पुण्य आलें—मनुष्याचा स्वभाव जर चांगला नसेल अथवा भक्ति नसेल तर त्यानें कितीहि धार्मिक कृत्यें केलीं तरी त्याचा त्याच्या मनावर कांहींएक परिणाम होणार नाहीं. श्रद्धेशिवाय केलेलीं

कर्मे निष्फळ होतात. वरवरच्या धार्मिक कृत्यांपेक्षां प्रत्यक्ष आचरणानें मनुष्य पुण्यवान् किंवा पापी ठरतो.

गंगाळ——गंगाळीं घालणें—(व.) एखादा जिन्नस इतका विपुल असणें कीं त्याची वाटेल तशी उधळपट्टी केली तरी सांठा सरावयाचा नाहीं. एखादा जिन्नस वर आल्या सारखा असणें; जिन्नस थोडा असला म्हणजे तो लहान लहान भांड्यांतून भरतात. त्याची विपुलता असली तर गंगाळा सारख्या मोठ्या भांड्यांतून भरतात. 'आम्हांला आपला संसार आहे कीं नाहीं? तुमच्यासाठीं आम्हीं किती खर्च सोसायचा? आमच्या घरीं कांहीं गंगाळीं घातलं नाहीं. आपलें जितक्यास तितकेंच दिलें आहे देवानें!'

गचकळ्या——(बोलण्यांत) गचकळ्या खाणें—चांचरत, अडखळत बोलणें; तोतरें बोलणें; बोलतांना लागणें.

गचक्या——गचक्या उतार—मधून मधून गचके बसतील असा, मध्येंच कमीजास्त खोल असलेला नदीचा उतार. 'कर्णोल येथें यमुनेस गचक्या उतार होता.'—भाव१२४.

गचांडी——गचांडी देणें—अर्धचंद्र देणें; धक्के मारून घालवून देणें; मान धरून लोटून घालविणें.

गचाबोचा——गचाबोचा एक असणें—(ढुंगण व मान एक होणें) अंग अतिशय सुटणें; अतिशय लठ्ठ असणें; गबदुल होणें; खूप लठ्ठ होणें. 'काम न करतां खूप खावयास मिळाल्यास गचाबोचा एक होणारच.'

गच्चाबुच्चा——गच्चाबुच्चा बोलणें करणें--अळंटळं करीत, चाचपडत, अडखळत करणें.

गच्छ——गच्छन्ती करणें—[सं गम्–गच्छ=जाणें] पळून जाणं; तोंड काळें करणें. 'तो आला इतकें ऐकतांच त्यानें गच्छन्ती केली.'

गच्छंती होणें—१ मृत्यु येणें; समाप्ति होणें. 'इंग्लंडांत तर दोघांची गच्छंती झाल्याचें वर्तमानसुद्धां पत्रांतून जाहीर झालें होतें.'—नि ७३३. २ पराभव होणें; नेस्तनाबूद होणें.

गज——गजदांत दाखविणें—हत्तीचे बाहेर दिसणारे दांत व खावयाचे दांत निरनिराळे असतात. यावरून बाहेर एक, आंत एक असें बोलणें.—इसं. जोध. राज. ३८.

गजस्कंधीं बसणें—हत्ती हें वैभवाचें चिन्ह समजलें जातें; तेव्हां जो हत्तीच्या खांद्यावर बसतो तो ऐश्वर्यवान् असतो. अशा प्रकारें नवीन प्राप्त झालेल्या ऐश्वर्यांत पहिली ओळख विसरणें; ऐश्वर्यानें मदोन्मत्त होणें; ऐश्वर्याचा गर्व चढणें.

गजस्नान—हत्तीला स्नान घातलें तरी तो पाण्यांतून बाहेर आल्याबरोबर पुन्हां आपलें शरीर धुळीनें माखतो. यावरून निष्फळ प्रयत्न; व्यर्थ खटाटोप. तु०—(अ) हस्तीतें धुतलें जळीं बसविलें मालिन्यहि नासलें। तेणें तें पहिलें स्वकर्म वहिलें तीरींच आरंभिलें। शुंडाग्रें धरिलें धुळीस भरलें सर्वांगहि आपुलें। प्रायश्चित्त दिलें तथापि न भलें ज्याचें मन क्षोभलें॥ (आ) रवितप्तो गजः पद्मास्न्द् गृह्यान्बाधितुं ध्रुवम्। सरो विशति न स्नातुं गजस्नानं हि निष्फलम्॥—सुर२३१.६०.

गजान्तलक्ष्मी—१ दाराशीं हत्ती झुलण्याइतकें ऐश्वर्य; अतिशय मोठें वैभव; संपन्नता. २ (उप.) अतिशय दारिद्र्य; धोतर विकत घेण्यास पैसा नसल्यामुळें गजा (पंचा) विकत घेण्याची पाळी येणें. ३ (विनोदानें व उपरोधिक) अंगावरील गजकर्ण; नायटे.

❀ **गजाचे दांत आले ते माघारीं जात नाहींत**—हत्तीचे दांत ज्याप्रमाणें एकदां बाहेर आले कीं पुन्हां आंत जात नाहींत, त्याप्रमाणें थोर पुरुषानें एकदां शब्द तोंडावाटे बाहेर काढला म्हणजे तो पुन्हां परत घेत नाहीं, त्याप्रमाणें वागतो. 'गजाचे दंत बाहेर आले ते माघारीं जात नाहींत असें मोठे पुरुषानें एकवचनी असावें.'—शिवदिग्विजय३६५.

गंज——गंजाखालीं पाणीदार पोलाद—पोलादी शस्त्र गंजलें म्हणजे त्याची धार निरुपयोगी होते. याप्रमाणें प्रतिकूल परिस्थितीनें कर्तृत्वमान् मनुष्याचे गुण झांकले जातात.—गांगा २७७.

गजबजणें —गजबजून उठणें—दचकून घाबऱ्या घाबऱ्या उठणें; भीतीनें दचका बसून उठणें; मध्येंच झोंपमोड होऊन धस्ती खाऊन उठणें.

गजर——गजर वाजंत्र्याचा, अहेर चिंध्यांचा—प्रत्यक्ष पाहावयास गेलें तर एखादी भिकार गोष्ट असावयाची, पण बाहेर मात्र तिचा फार बडेजाव करावयाचा अशी वागणूक; क्षुल्लक गोष्टीकरितां फार गाजावाजा केला असतां म्हणतात. अहेर पहा.

गजाली——गजालीन घोव खाल्ले—(कों.) गप्पागोष्टींनीं नवरा खाल्ला. एखादी स्त्री नवरा आजारी असतां त्याची काळजी घ्यावयाच्या ऐवजीं गप्पागोष्टींत वेळ घालविते व अनास्थेमुळें नवरा मात्र दगावतो. अशा रीतीनें क्षुल्लक गोष्टींत वेळ दवडून हातचा लाभ घालवावयाचा अशी परिस्थिति असतांना म्हणतात. किंवा सर्व रात्र गप्पागोष्टींत घालवून पतीजवळ जाण्यापूर्वीं उजाडावें त्याप्रमाणें.

गंजिफा——गंजिफा खेळणें—(उप.) एखाद्या समारंभामध्यें जेवणाची पंगत उठल्यानंतर पत्रावळी काढणें.

गंजी——**गंजीवरचा कुत्रा**-इसावच्या गोष्टींत पुढील गोष्ट आहे. एक कुत्रा एका गवताच्या गंजीवर बसला होता. कोणी गाय, म्हैस वगैरे जनावर त्या गंजींतील गवत खावयास आलें असतां तो कुत्रा त्याच्या अंगावर भोंकून भोंकून त्यास दूर घालवीत असे. त्या गवताचा कुत्र्याला खाण्याच्या कामीं कांहीं उपयोग नव्हता. कारण कुत्रे गवत खात नाहींत. पण तो स्वतःस उपयोग नसला तरी दुसऱ्यासहि खाऊं देत नव्हता. यावरून जो मनुष्य एखाद्या गोष्टीचा स्वतः उपभोग घेऊं शकत नसतांहि, दुसऱ्यास घेऊं देत नाहीं अशा मनुष्याच्या बाबतींत ही म्हण वापरतात. A dog in manger policy.

गज्जी——**गज्जी असणें**-गबर असणें; संपन्न असणें.

गटार——**गटारबातमी**--अफवा; वदंता; उडत बातमी; भुमका; अवाई.

गटारयंत्र—१ निराधार, खोटया बातम्या उठविणारा; गप्पा मारणारा; अवाई उठवणारा. २ गांवांतील कुटाळ लेकांची चकाट्या पिटण्याची चव्हाट्यावरील जागा. पूर्वी पुण्यांत सायंकाळच्या वेळीं बुधवारांतील गटारांवरील फरशांवर बसून रिकामटेकडे लोक गप्पा मारीत असत. भांग्यामारुती व सोमेश्वराच्या देवळांजवळहि गटारांवर बसून आचारी, पाणक्ये गांवातील लोकांच्या कुटाळ्या करीत असत, त्यावरून हा वाक्प्रचार पडला. 'एकदोन वृत्तपत्रकारांनीं या महाराजांचें जें इतिवृत्त दिलें आहे, तें वाचलें असतां गटारयंत्रावरील... भटांस जितकी त्यांच्या व्यवसायाखेरीज माहिती असते, तशीच माहिती या लेखकांना असावी असें दिसतें.'-विवि.

गट्ट——**गट्ट करणें; गटकाविणें**-१ परद्रव्याचा अपहार करणें; हजम करणें; दुसऱ्याचा माल खाऊन जिरवणें; स्वाहा करणें. २ उधळपट्टीनें उडावणें; भरमसाटपणें खर्च करणें. ३ मटकावणें; गिळून टाकणें. 'सद्दर्शनाचि सुदर्शन करि गट चट कटक अंतरायाचें।'-मोआदि १०.८५. -मोशल्य २.७७.

❀ **गट गोळा, वरते डोळा**-एकीकडे पाहावयाचें व एकीकडे स्वाहा करावयाचें. गुपचूप स्वार्थ साधावयाचा.

गठडी——**गठडी उचलणें-उपटणें-पार करणें-लांबविणें**—दुसऱ्याची मालमत्ता घेऊन पळून जाणें; परस्वाचा अपहार करणें; दुसऱ्याची वस्तू लांबविणें.

हातापायांची गठडी करणें-बांधणें--आजारी असतांना किंवा थंडीन गारठून हातपाय आंखडून निजणें. १ हातपाय पोटाशीं घेऊन पडणें, पाडणें. २ एखाद्याची मोट बांधणें, हातपाय एकत्र बांधणें; आंवळून बांधणें; मोट वळणें. 'त्याची गठडी करून शिंद्याचे लोक त्याला घेऊन गेले.'-अस्तंभा १४४. ३ मंत्रानें एखाद्याच्या हातांतील शस्त्रें गळून पडून त्यास हतबल करणें; शक्तिहीन करणें; वीर्यहीन करून हालचाल बंद पाडणें. ४ गोंधळविणें; निरुत्तर करणें; कुंठित करणें; गप बसविणें; निरुपाय करणें.

गठडी पुरणें—द्रव्य वगैरे पुरून ठेवणें; जवळची मालमत्ता जमिनींत गाडून ठेवणें; धनसंग्रह गुप्त ठिकाणीं ठेवणें.

गठडी होणें-वळणें-१ गुंडाळलें जाऊन गठ्ठा होणें; हातपाय एकत्र होऊन बांधलें जाणें; चलनवलन बंद पडणें; हालचाल करतां येईनासें होणें. २ हतबल, शक्तिहीन, निराश्रित होणें; लोळागोळा होऊन पडणें; कुजत पडणें; अगदीं पराधीन होणें; अंगांतील पराक्रम पूर्णपणें नाहींसा होणें. ३ मरणें.

गठण——**गठण गांठणें; गठणास आणणें**-आपल्या उद्देशांशीं अथवा विचारांशीं मिळतें करणें, जमाविणें; मन वळविणें; आपल्या मनासारखें वागावयास लावणें; मनधरणी करून किंवा अन्य उपायांनीं आपल्या मतानुवर्ती बनाविणें.

गठणास येणें—उद्देश, विचार, परिणाम यांच्याशीं मेळ बसणें; जमणें; पटणें; जुळणें.

गठ्ठा——**गठ्ठा गरम होणें**—(व.) मतलब साधणें; स्वार्थ साधणें; लाभ मिळणें.

गठ्ठ्या——**गठ्ठ्यागोंधळ**—१ (अशिष्ट) अनिर्बंध आचरण; बदफैली प्रकार; व्यभिचार; अनाचार; अनियमित वर्तन. २ गोंधळ; घोंटाळा; सबगोलंकार; अव्यवस्थित कारभार; अंदाधुदी.

गड——**गड घेववेल पण बायको घेववत नाहीं**—एखाद्या किल्ल्याची व्यवस्था पाहाण्याचें काम बायकोला चांगल्या रीतीनें वागवून घेण्यापेक्षां सोपें आहे. स्त्रीस वश करून घेणें हें किल्ला सर करण्यापेक्षां कठिण आहे. किल्ला सांभाळणें सोपें, पण बायकोची मर्जी सांभाळणें कठिण.

गड बांका नसावा पण गडपति बांका असावा—किल्ला लढविणें हें त्याच्या मजबुतीपेक्षां किल्लेदाराच्या हिंमतीवर अधिक अवलंबून आहे. प्रत्यक्ष किल्ला विशेष मजबूत नसला तरी वरचा अधिकारी जर हिंमती, पराक्रमी व शूर असेल, तर तो कोणत्याहि शत्रूपुढें टिकाव धरूं शकेल. मनुष्याजवळ साधनें जरी बेताचीं असलीं तरी तीं योग्य तऱ्हेनें वापरण्याचें कौशल्य व आत्मविश्वास जर अंगीं असेल, तर त्या साधनांच्या साहाय्यानेंहि तो कार्य यशस्वी करूं शकतो.

गडमें गड चितोडगड और सब गढैया है, तालमें ताल भोपालताल और सब तलैया है—सर्व गडांमध्यें गड या नांवाला खरोखर पात्र असा फक्त चितोडगड आहे, बाकीचे गड म्हणजे केवळ गढया आहेत. तसेंच सर्व तलावांमध्यें तलाव या नांवास योग्य असा तलाव फक्त भोपाळ येथील आहे. बाकीचीं सर्व तळीं, डबकीं आहेत. चितोड गडाची व भोपाळच्या तलावाची भव्यता या म्हणींत व्यक्त केली आहे.

गडाच्च सास्वडं; गडं च सास्वडं चैव, सास्वडं च गडस्तथा—सबंध श्लोक असा—गडाच्च सास्वडं यामि, सास्वडाच्च पुनर्गडम् । गडसास्वडयोर्मध्ये द्राविडो लुडबुडाम्यहम् ॥ सवाई माधवराव पेशवे लहान असतां त्यांचा मुक्काम पुरंदर गडावर असे व पायथ्याशीं सासवड येथें कारभारी नानाफडणीस राहात असत व ते वरचेवर पुरंदरावर जाऊन येत. अशा वेळीं एक तेलंगी ब्राह्मण दक्षिणा मिळावी म्हणून आला असतां तो पुरंदरावर गेला म्हणजे कारभारी सासवड येथें आहेत तेथें जा, असें सांगण्यांत येई; व सासवड येथें गेला म्हणजे ते गेले गडावर तेथें जा असें सांगण्यांत येई. याप्रमाणें त्यास गड व सासवड यांमध्यें अनेक हेलपाटे पडले. ही गोष्ट त्यानें वरील श्लोकांत व्यक्त केली आहे. यावरून कांहीं कार्य न होतां इकडून तिकडे व तिकडून इकडे असे व्यर्थ हेलपाटे पडणें असा अर्थ व्यक्त होतो. टोलवाटोलवी.

गडगंच——गडगंच-गडगच्च आभाळ भरणें-अंधार पडणें—ढगांची गर्दी होणें; पूर्ण अंधारी येणें; काळोख पडणें; अभ्रांची दाटी होणें; पाऊस भरून येणें.

गडद्रू——उरावर गडद्रू रचून ठेवणें—एखादें भयंकर संकट उपस्थित करून ठेवणें; छातीवर दडपण देणें.

गडन्त——गडन्त फिर चखन्त फिर भिडन्त—[गडन्त=भंगप्राशन (भांग पिणें) (सं. गड्=मद्य काढणें). चखन्त=मिठाई-सेवन (सं. चष्=चाखणें). भिडन्त = खंत] प्रथम भांग प्राशन करून व नंतर खूप मिठाई खाल्ली म्हणजे मग कसली फिकीर राहात नाहीं. 'आधीं गडन्त मागुनी चखन्त, कसलीच खंत मग नाहीं । मागुनि मगरमोह्यामधें कलावंत चपलजघनाहीं ॥'—माधव ज्यूलीयनकृत नकुलालंकार, पान ९.

गडप——गडप करणें—दडपून टाकणें; दाबणें; गिळंकृत करणें; अपहार करणें. 'कां पाठवितों ? कळतें जरि करिल व्यूहनद गडप यातें ।'—मोद्रोण ११.५६.

गडबडगुंडा—— गडबडगुंडा करणें—१ महानुभावपंथांत गडबडगुंडा हा एक लग्नविधी आहे असें म्हणतात. महानुभाव ज्या स्त्रीशीं संबंध करावयाचा असेल, तिच्या झोळीवर आपली झोळी अडकवितो व रात्रीं तिच्याकडे गडबडत लोळत जातो, अशी समजूत आहे. यावरून शब्दप्रयोग. 'झोळीची झोळी लावून गडबडगुंडा केला । बाई महानुभाव झाला ॥'—एकनाथ भारुड. २ कसेंतरी काम उरकणें; वेळ मारून नेणें. 'भाव आणि भक्तीचा गडबडगुंडा केला । एका जनार्दनपायीं मानभाव झाला ॥'—एकनाथ. ३ व्यभिचारात्मक घोंटाळा करणें. 'याणें केला गडबडगुंडा ।'—राला७४.

गंडा——गंडा घालणें-चढविणें—मांत्रिक लोक बाधा घालविण्यासाठीं रोग्याच्या हातांत गळ्यांत दोरा (गंडा) बांधतात व पुष्कळदां पैसे उकळतात. १ भारणें; भुलविणें; मोह, भुरळ घालणें. २ ठकविणें; फसविणें; लुबाडणें; लुटणें; पैसा काढून घेणें.

गंडा बांधणें—१ वस्ताद (गायनादि कलेचे गुरु) आपल्या चेल्याच्या हातांत आरंभीं गंडा बांधतात यावरून, १ दीक्षा देणें; शिष्य करणें. २ शिष्य होणें; गुरुत्व पतकरणें.

गंडांतर——गंडांतर येणें-टळणें-गंड व अतिगंड असे कुयोग आहेत; त्यावरून फलज्योतिषांत गडांतर, गंडांतर, हा एक कुयोग-अपमृत्युकारक योग आहे. मृत्यूचें संकट येणें, टळणें. 'विविधज्ञानविस्ताराच्या दैवदुर्विपाकामुळें त्याच्यावर अनेक गंडांतरें आलीं.'—विवि. 'तंव द्वादशवर्षीं मृत्युचिन्हें।गंडांतर थोर होतें ।'-शिली ११.१५७.

गडी——गडी फू करणें—लहान मुलें मैत्री तोडण्यासाठीं मधलें बोट व तर्जनी यांची पोकळी करून तींत 'फू' 'फू' अशी फुंकर घालतात; यावरून मैत्री तोडणें; संबंध सोडणें. 'आतां गडि फू दादाशीं । तर मग गट्टी कोणाशीं ?' —बालकवि.

गड्यासारखें राबावें, धन्यासारखें चाबावें—नोकराप्रमाणें काम केल्यानंतर मालकाप्रमाणें खूप व चांगलें चांगलें खावें.

गड्डा——गड्ड्याला हात घालणें—मर्मस्थान पकडणें; मुख्य मुद्दा घेणें. 'त्यांनीं आर्यधर्माच्या ऐन गड्ड्याला हात घातला आहे.'—एकच प्याला २.३.

गढिया——गढीयाके पानीसें मुह धू आव--नाहीं म्हणावयाचा एक पर्याय. खाऱ्या पाण्यानें,नागझरीवरून तोंड धुऊन ये याप्रमाणें.

गण—गणचौथ पूजणें--(ना.) मारणें; चोपणें; ठोक देणें. गणेशचतुर्थीच्या दिवशीं चंद्र पाहिला असतां चोरीचा आळ येतो; पण कोणाच्या तरी शिव्या खाल्ल्या म्हणजे त्याचा दोष जातो, अशी समजूत आहे. म्हणून त्या दिवशीं मुद्दाम दुसऱ्याची खोडी काढून, त्यास मारून वगैरे त्याच्या शिव्या घेण्याचा प्रकार करतात. त्याकरितां एखाद्याची खोडी काढणें, त्यास बेदम मारणें वगैरे.

गण देणें-पूजणें—१ (व.) मारणें; ठोकणें; चोप देणें. २ खेळांतील डाव देणें; हार खाल्ली असतां पुन्हां खेळणें. ३ पहिलें दान गणेशास देणें.

गण नमणें—तमाशाच्या, गोंधळाच्या वगैरे आरंभीं गणास नमन करतात. कोणतेंहि कार्य आरंभ करण्याच्या पूर्वी गणेशादिकांची स्तुति करतात, यावरून १ गणपतीची स्तुति करणें. २ धंद्यास प्रारंभ करणें; सुरुवात करणें.

गण्यारावण्याचे प्रसंग—तंटाबखेड्याचे प्रसंग. एकानें दुसऱ्यास गण्या म्हणावयाचें त्यानें उलट रावण्या म्हणावयाचें, याप्रमाणें एकेरीवर येऊन वाद करणें.

गणती——गणतीस लागणें—नोंद होणें; येऊन मिळणें; जमा होणें; सामील होणें; सैन्यांत दाखल होणें. ' नित्य नवे गणतीस लागती एकांडे देशावरले ।'–ऐपो २१६.

गणपति——(उप.) लठ्ठ पोटाचा व बसल्या जागेवरून न हालणारा मनुष्य; लठ्ठंभारती.

गणपतिपूजन--(विनो.) गरोदरपणाची स्थिति.

गणपतीचें करणें--गणपतीचें पोट मोठें असतें यावरून गरोदर राहणें. ' गणपतीचें केलें ', ' गणपतीचें झालें ' स्त्री गरोदर राहिली या अर्थी हे प्रयोग आढळतात.

गणपतीचें नांव घेणें—कार्यारंभीं श्रीगणेशायनमः म्हणून गणपतीची स्तुति करतात; यावरून प्रारंभ करणें; सुरुवात करणें; आरंभणें.

***गणपति करावयास गेला तों माकड झालें**— एक मनुष्य मातीची गणपतीची मूर्ति करूं लागला. ती करीत असतां सोंड नाकावर लावावयाची त्याऐवजीं त्यानें पाठीमागें लावल्यामुळें सोंडेच्या ऐवजीं शेपटी लागून तें वानरासारखें दिसूं लागलें. यावरून एखादें चांगलें काम करावयाचें म्हणून आरंभ करावा तों त्यांतून भलतेंच कांहींतरी निघून विघ्न उपस्थित व्हावयाचें अशी परिस्थिति. विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम् । केलडें पहा.

गणपतिगेलि होर्डिक; गणपति होर्डिकेक फाल्या मुहूर्त--(गो.) गणपतीचें लग्न; गणपतीच्या लग्नाला उद्यां मुहूर्त.

गणपति (गणेश) गेलो पाणया, झ्याट (वाट) धर वाणया—(कों. गो.) गणपति पाण्यांत बुडविल्यावर वाण्याला धत्तुरा ! गरज सरो वैद्य मरो.

गुळाचा गणपति व गुळाचाच नैवेद्य--गूळ पहा.

गणपति हातांतुलें लिंग—(गो.) गणपतीच्या हातांतलें लिंग. रावण कैलासाहून शंकराचें लिंग घेऊन लंकेंत चालला होता. सगळ्या देवांच्या मनांत रावणाला शिवलिंग लंकेंत नेऊं द्यायचें नव्हतें. त्यांनीं त्या कामीं गणपतीची योजना केली. गणपति गुराख्याचें सोंग घेऊन रावणाच्या वाटेंत येऊन राहिला. रावणाला लघुशंका करावयाची होती. पण तें लिंग जमिनीवर ठेवणें शक्य नव्हतें. कारण जमिनीवर ठेवलें तर तें जागच्या जागीं घट्ट होईल असें शंकरानें सांगितलें होतें. गुराखी झालेल्या गणपतीला पाहून रावणानें लिंग त्याच्या हातांत दिलें आणि तो दूर जाऊन लघुशंकेला बसला. गणपतीनें कराराप्रमाणें त्याला तीन हांका मारल्या व तो उठत नाहीं असें पाहून लिंग जमिनीवर ठेवलें, अशी पुराणांतरीं कथा आहे. तिच्यावरून ही म्हण निघाली. एखादा माणूस ' घे, नाहींतर टाकतों ' अशी अडवणूक करायला लागला की म्हणतात.

गणपतीची गांड चिमटून (उगाळून) गणपतीक निवेद करप--(गो.) ज्याचें घेऊन त्यासच अर्पण करणें. तु०–गुळाचाच गणपती गुळाचाच नैवेद्य.

गणपतीची गांड झरवून गणपतींकच तिळो करप; गणेसा गाण झरौन गणेसा तिषॉ कॅलॉ—(गो.) गणपतीला उगाळून त्यालाच गंधाचा टिळा लावणें. एकाद्याचें घेऊन त्यालाच अर्पण करणें. गणपतीस तांबडें गंध लागतें व गणपतीची मूर्ति रक्तचंदनाची असली म्हणजे गणपतीला लागणारें तांबडें गंध ती मूर्ति उगाळून घेण्याची प्रवृत्ति असते. सामान्यतः रक्तचंदनाचीं खोडें बाहुलीच्या आकाराचीं असतात.

गणपतीचें राज्य देड दिसाचें--(गो.) गणपतीचें राज्य दीड दिवसाचें. गणपति बसल्याच्या दुसऱ्या दिवशीं जातो; म्हणजे शिराळशेटी, क्षणभंगूर कारभार.

गणपतीच्या पूजनाला कुचका नारळ; गणेश पूजेक फुटकों नाल्ल-(गो.) १ देवाला जी वस्तु अर्पण करावयाची ती भटास किंवा पुजाऱ्यास जावयाची असते. म्हणून साधारण लहान खराब वस्तु अशा कामास वापरावयाची अशी कांहीं लोकांची हलकट वृत्ति असते तीस अनुलक्षून ही म्हण योजतात. तु०—खट नट त्यास गिऱ्हाईक भट. २ गणपतीपूजन हें कोणत्याहि कार्याच्या आरंभीं करावयाचें असतें. त्यावेळीं देवापुढें ठेवावयाचा नारळ जर कुचका निघाला तर तो प्रारंभींच अपशकून झाला असें मानतात; कार्यारंभींच विघ्न, अपशकून. तु०-प्रथमग्रासे मक्षिकापातः।

उंदराला बोललेलें गणपतीस लागतें—उंदीर हें गणपतीचें वाहन असतें तेव्हां त्यास अनुलक्षून किंवा त्यास ऐकूं जाईलसें बोललें असतां तें गणपतीच्या कानांवर सहजच जातें व त्यास समजतें. याप्रमाणें वरपांगी एकाला बोलावयाचें पण तें दुसऱ्यास अनुलक्षून असावयाचें. अशा रीतीनें प्रत्यक्ष एकास पण भलत्यासच उद्देशून वाक्यें योजलीं असतां ही म्हण योजतात. तु०-लेकी बोले सुने लागे.

गणवार्ता——गणवार्ता करणें--गप्पाष्टकें झोडणें; गप्पा मारणें.

गणेश——गणपति पहा. **गणेशटोपी घालणें**--मागून हळूच येऊन एखाद्याच्या तोंडावर वस्त्र टाकून आवळणें व मग त्याला बुकलणें. हा खेळ वांईस खेळतात. काशीसहि नवीन विद्यार्थी संस्कृत शिकावयास आला असतां त्याचा चिडखोरपणा काढून टाकण्याकरितां व सर्वांशीं समरस करून घेण्याकरितां एकदां त्याची कानटोपी त्याच्या डोळयावरून खालीं ओढून त्यास दिसेनासें झालें म्हणजे खूप बुकलीत असत व या दिव्यांतून तो बाहेर पडला म्हणजे त्यास आपल्या संगतींत घेत असत. १ मूढ बनविणें; चेष्टा करणें. २ फसविणें; लुबाडणें.

❀ **गणेशाचे हाले दोंद, चंडिकेचा जातो प्राण**—चंडिकेची मूर्ति गणपतीच्या पायांखालीं असते तेव्हां त्याचें पोट हाललें म्हणजे तीस त्रास होतो. यावरून एकाचा खेळ होतो पण दुसऱ्यास त्रास होतो, अशा अर्थानें ही म्हण योजतात. तु०-तुमचा खेळ होतो पण आमचा जीव जातो.

गणेशवाडी——गणेशवाडी, ताकपीठ रगडी--गणेशवाडी गांवांत ताकपिठावांचून दुसरें काय मिळावयाचें आहे ! भिकार गांव याअर्थी.

गतम्——गतं न शोकं; गतं न शोच्यम्— जें आपण गमावलें असेल त्याचा व्यर्थ शोक करण्यांत कांहीं अर्थ नाहीं; जें गेलें त्याबद्दल हळहळ मानण्यांत अर्थ नाहीं. गेल्याचा शोक वृथा न करावा वित्त सर्व जायाचें। वित्ताची काय कथा शाश्वत टिकणें नसेंच कायाचें ॥ तु०—(अ) गतशोको न कर्तव्यो भविष्यं नैव चिंतयेत्। वर्तमानेषु कार्येषु वर्तयन्ति विचक्षणाः ॥ (आ) कृतस्य करणं नास्ति मृतस्य मरणं तथा। गतस्य शोचनं नास्ति ह्येतद्वेदविदां मतम्।-सुर १६०.३००.

गतानुगतिक——गतानुगतिकन्याय—विचार न करतां एखाद्याच्या मागून जाणें. अंधपरंपरान्याय पहा.

❀ **गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः**।—दुसरा चरण असा-वालुका लिंगमात्रेण गतं मे ताम्रभाजनम् ॥ [स्नानास नदींत उतरण्यापूर्वीं एकानें आपली पंचपात्री वाळूंत पुरून खुणेसाठीं त्यावरून लिंगाकृति करून ठेवली. मागाहून येणाऱ्याला त्याचा अर्थ न कळून त्यानें तसेंच नुसतें लिंग करून ठेवलें. याप्रमाणें अनेकांनीं नदीतीरावर लिंगें केलीं. पुढें पहिला गृहस्थ स्नानाहून परत आला व पाहातो तों जिकडे तिकडे लिंगेंच लिंगें! त्याची खूण कांहीं सांपडेना. याप्रमाणें त्याची पंचपात्री गेली.] लोक स्वतः कांहीं विचार न करतां दुसऱ्याचें अनुकरण करतात. पुढील दोन श्लोक पहा—(अ) एकस्य कर्म संवीक्ष्य करोत्यन्योपि गर्हितम्। गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः ॥ (आ) गतानुगतिको लोकः कुट्टिनीमुपदेशिनीम्। प्रमाणयति नो धर्मे यथा गोघ्नमिति द्विजम् ॥

गति——गति मिळणें—मुक्त होणें; मोक्षास जाणें; उद्धार होणें; मृत्यूनंतर चांगलें स्थान प्राप्त होणें.

गति होणें—प्रवेश-ज्ञान होणें; माहिती होणें; कळूं लागणें. 'पहिल्यानेंच गति होऊन इंग्रजींतील सुरस ग्रंथांची आपले लोकांस चटक लागूं लागली.'-नि ९.

गतीवर घातलेला-पडलेला—मृत्युपंथास लागलेला; आसन्नमरण.

गतीस-गतीवर येणें—ताळ्यावर येणें; सुधारणें.

❀ **गति आशिल्याक मति ना, मति आशिल्याक गति ना**—(गो.) रीत (व्यवहार) असलेल्याला बुद्धि नाहीं, व बुद्धि असणाऱ्याला रीत नाहीं. एक आहे तर एक नाहीं.

कर्माच्या गती, सांगाव्या किती—[गती=प्रकार] दैवाची गति विचित्र आहे, तिचें वर्णन करतां येण्यासारखें नाहीं.

गदा—गदा पडताळणें—गदा फिरवणें; गदा परजणें; गदा मारण्याकरितां उगारणें, फिरविणें. 'भूप गदा पडताळुनि सिंह गजांवरि जसा तसा तूर्ण।'-मोद्रोण १२.१५.

गद्धा——गद्धेमल्हार--मल्हार नांवाचा एक राग

आहे. १ गाढवासारखा मल्हार गाणें; (ल.) अगदीं कर्कश गाणें. गाढवासारखें ओरडणें. २ गद्धा, मूर्ख माणूस.

❀ **गद्धा क्या जाने आदेका सवाद**—गाढवाला आल्याची चव काय कळणार ? 'गाढवाला गुळाची चव काय ?' पहा.

गद्धा पिटे, तेजी नही बनता--गाढवाला खूप मारलें तरी त्याचा कांहीं घोडा होऊं शकत नाहीं. रासभ धुतला महातीर्थामाजीं। नव्हे जैसा तेजी शामकर्ण ॥ –तुगा ३१११.

गद्धीसे प्रीत जडी तो पद्मीन क्या है इयाट—गाढवीवर जर प्रेम जडलें तर तिच्यापुढें पद्मिनीची किंमत काय ! प्रेम हें अंधळें आहे. प्रियकर प्रियतमेच्या ठिकाणचे गुणदोष पाहात नाहीं.

गद्धेकु जाफरान—गाढवाला केशर. गाढवाला केशराची चव समजत नसल्यामुळें, त्याला तें देणें व्यर्थ होय. भलत्याच ठिकाणीं खर्च; अपव्यय. (गु.) गद्धा क्या जाने जाफरानकी बात ?

गद्धेनें खेत खाया, पाप ना पुन; गद्धयानें खाल्लें पाप ना पुण्य--गाढवानें शेत खाल्लें तर पाप ना पुण्य. गाढवानें खूप शेत खाऊन तें माजलें तरी दूध देण्याच्या उपयोगी नाहीं व अपात्रतेमुळें शेताच्या मालकाच्या पुण्यहि पदरांत पडत नाहीं. तु०–वाळूंत मुतलें, फेंस ना पाणी. यद्धरिणी यवमत्ति न पोषाय धनायाति। शूद्रा यदर्यजारा स्यात् न पुष्टं पशु मन्यते।–वासयनेयी संहिता, अश्वमेधप्रकरण.

गद्धेभी जवानीमें, भले मालूम देते है—गाढवसुद्धां तरुणपणीं चांगलें खुबसुरत दिसतें. गाढवाचें पिलूं मोठें गोजिरवाणें असतें. तु०–प्राप्ते तु षोडशे वर्षे गर्दभी अप्सरा भवेत्।

गंध--गंध न उरणें—वासहि न राहणें; मुळींच अवशेषहि न राहणें; पूर्णपणें नाहींसें होणें. 'आला प्रकाश नेत्रीं अंधत्वाचा वेरें नुरे गंध।'–मोवन १३.९३.

गंध नसणें—ज्ञान नसणें; वासहि नसणें; मुळींच ठाऊक नसणें; अगदीं अंशहि नसणें. 'तिच्या माहेरीं इंग्रजीचा कीं नवीन कसला गंध देखील नाहीं.'--पकोघे.

गंधफूल करणें–वाहाणें—१ पूजा करणें; सर्व उपचार अर्पण करणें; मानसन्मान देणें. २ (उप.) फजिती करणें; उपहास करणें; रेवडी उडविणें.

गंधाः पान्तु—पूजेंत गंध वाहतांना हा मंत्र म्हणतात, यावरून उपरोधानें (व.) मारणें; ठोकणें.

गंधाक्षतवर्जन--सभेमध्यें पानसुपारी देण्यापूर्वीं गंध लावण्याची, अक्षत लावण्याची पूर्वीं चाल होती. एखाद्यास गंधाक्षता लावणें बंद करणें म्हणजे त्याचा संबंध सोडणें, वाळींत टाकणें; परस्परसंबंधाचा अभाव; दळणवळणास प्रतिबंध. तु०–हुक्कापाणी बंद करणें.

❀ **गंध उगाळितां कष्टी, आवडीनें भांग घोटी**—एखाद्या माणसास देवपूजा करण्याकरितां गंध उगाळणें आवडत नाहीं, पण भांग घोटणें फार आवडतें. कांहीं लोकांची प्रवृत्ति सत्कृत्यापेक्षां दुष्कृत्याकडेच अधिक असते. –तुकाराम.

गंधटिळे नायकाचे, घरीं हाल बायकोचे—बाहेरून दिसावयास एखाद्या नायकाप्रमाणें टिळेटोपी इ. थाटमाट, पण घरीं सर्व माणसांस त्रास. घरांत सर्व गोष्टींची वाण, पण बाहेरून श्रीमंतीचा डौल.

या आणि माझ्या कपाळच्या गंधाक्षता पहा—विनाकारण एखाद्या गोष्टीबद्दल बभ्रा करणें; आपणच आपला मोठेपणा दाखविणें. कपाळ पहा.

गंधर्व——गंधर्वाचा करणें—(ब्राह्मणेतर जातींत) दुसरा नवरा करणें. 'मी मग गंधर्व करीन; त्यानंतर तुमचा माझेवर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं.'—वर्तमानपत्री नोटीस.

गंधी——गंध्याची तोंडांत खावी, पण लोणाराचे पायां पडून घेऊं नये–मोठया माणसाकडून शिक्षा झालेली पतकरेल पण हलक्याचा दास्यत्व संबंधहि नको. गंध्याची तोंडांत खाल्ली तर अंगाला सुवास तरी लागेल, पण लोणारी जर आपल्या पायां पडला तर काळें मात्र लागावयाचें. तेव्हां संबंध–मग तो कसा का असेना–मोठयाशीं जोडावा.

गंधे गाडा——(व.) गर्दी; घोटाळा.

गंध्या काढणें——(व.) मारणें; ठोकणें; पिटणें; बेदम झोडणें.

गनीम——गनिमीकावा–लढाई--१ आडमार्गांनीं शत्रूला जेरीस आणणें; वृकयुद्ध; अगोदर शत्रूला भ्यालोंसें दाखवून त्याला पाठलाग करूं द्यावयाचा व मग त्याला अडचणीच्या जागेंत गांठून परतून त्यावर हल्ले चढवावयाचे. लपून छपून लढाई; समोरासमोरची नव्हे. ही लढाईची पद्धत मराठयांची असे. 'दक्षिणी लोक पळून जाऊन माघारी येऊन लढाई घेतात.' –इसं. जोध. राज. ३६. 'आम्ही गनिमी काव्यानें राहातों.' –भाव ५८. 'तो गनिमी काव्यानें लढ-

णारा मर्द गडी आहे.'–उग्र २.१. २ लपंडाव; लटपटी; कपटी प्रयोग. तु०–Guerrila warfare.

गप——गप-प्प करणें––१ गट्ट करणें; स्वाहा करणें; खाणें; गिळंकृत करणें. २ गडप करणें; नाहींसें करणें; खाऊन टाकणें; लाटणें.

गप–प्पा छाटणें–तासणें–झोकणें–१ रिकाम्या अफवा पसरणें; बाता झोकणें. २ गोष्टी करणें; बाता मारणें; गप्पा-गोष्टी करणें. 'आम्ही कवी, नवीना रीति नव्हे, छाटितोंचि लाख गप्पा ॥'–मोनामसुधा ६८.

गप्पगर् मट्टमाया होणें––खाऊन फस्त करणें; संपविणें; नाहींसें करणें.

***अपापाचा माल गपापां**––अन्यायानें मिळविलेलें द्रव्य अनाठायीं खर्च होतें, व्यर्थ जातें. अपापा पहा.

गप——गप बसण्याचें काय घेशील–एखादा मनुष्य विनाकारण गडबड करून उपद्रव देत असतो. तो कांहीं न करतां नुसता शांत राहिला तरी पुष्कळ कार्यभाग होतो, अशा वेळीं त्यास म्हणतात. –गांगा २७७.

गप्पा——गप्पा आणि लबाडी, जाते तोंडोतोंडीं—एखादी गप्प मारली म्हणजे ती सांगोसांगीं पसरत जाते; तसेंच एखाद्याची लबाडी उघडकीस आली म्हणजे त्याबद्दल सर्वत्र बोभाटा होतो. Gossiping and lying go hand in hand.

गप्पागोष्टी सांगतो, शिळ्या कढीला ऊत आणतो––जो मनुष्य नुसत्या वायफळ गप्पा मारतो तो बहुतेक विझलेलीं भांडणें पुन्हां उकरून काढतो.

गप्पागोष्टींची कथा, लोकरंजनाचा तमाशा—गप्पागोष्टी मारण्यानें लोकांची करमणूक होण्यापेक्षां अधिक फायदा कांहीं होत नाहीं. त्यांत कांहीं बोधपर भाग असेल तर उपयोग.

गबाळ्या——गबाळ्याची करणी, होते दुणी––जो मनुष्य धांदरटपणानें एखादें काम करतो, तें नीट न झाल्यामुळें त्याला पुन्हां करावें लागतें. तु०–अडाणी कुणबी दुप्पट राबे. उण्यास दुणें काम.

गम——गम खाणें––१ धीर धरणें; दम खाणें. म्हण–खानेमें खाना, गम खाना. २ सोसणें; क्षमा करणें; सहन करणें. 'त्यानें एवढे अन्याय केले तथापि आम्ही आज पावेतों गमच खात आलों.'

गमजा——गमजा करणें––१ दिमाख दाखविणें; गर्व करणें; प्रौढी मिरवणें. २ (माण.) मजेंत असणें; चैनींत असणें. ३ उच्छृंखलपणानें वागणें; चाळे करणें. 'गमजा करितां मनिं उमजाना, हें सुख न पुढें पडेल वजा।'–राला ८५.

गमजा चालणें––अमर्याद वर्तन खपणें; कांहीं केलें तरी त्यास प्रतिबंध न होणें; स्वैर वागणुकीस मुभा असणें.

गमजा(जे) चालविणें—अमर्याद वर्तन, चेष्टा, पोरखेळ करणें. 'सज्ज्ञानी सत्करुणेवांचुनि मतिचे न चालती गमजे ॥'–मोविराट ६.१२०.

गमजा न चालणें–न चालूं देणें—चाळ्यांना अवसर न देणें; नियंत्रण असणें; मर्यादेंत राखणें; आटोक्यांत ठेवणें, राहणें.

गम्य——गम्य असणें—ज्ञान, माहिती, परिचय असणें (कला इ.त); समजणें; गति असणें.

गया——गया वखत फेर हाथ आता नहीं, सदा ऐश दौरा दिखाता नहीं–––गेली वेळ पुन्हां येत नाहीं, सदासर्वदा एकच स्थिति राहात ना‍.

गयावया——गयावया करणें—विनवणी, प्रार्थना करणें; करुणा भाकणें; कळवळून सांगणें. 'असें म्हणून व पुष्कळ गयावया करून मीं त्याचा राग शांत केला.'–पकोघे.

गयावळ——बुवा गयावळ आणि बाई चंद्रावळ–नवरा बावळट व बायको खुपसुरत, देखणी नखरेबाज असली म्हणजे म्हणतात. परस्परविरुद्ध, विजोड दंपती.

गरक——गरक करणें—खाणें; गिळणें; अपहार करणें.

गरगरणें—**गरगरून येणें; गरगरायास लागणें**—पोटांत ढवळणें; फिरणें; घेरी येणें; भोंवळ येणें; चक्कर येणें.

गरगरीत——गरगरीत वाटोळें—पुरा नाश, हानि. 'जाधवः–बायकांचें राजकारण फार सोपें! आपला सरळ धोपट रस्ता! होतां होईलतों जांवयाचें घर भरायचें आणि त्याचें कल्याण करायचें! मग त्यांत आपल्या घराचें गरगरीत वाटोळें झालें तरी चिंता नाहीं!'–शिसं १.२.

गरज——गरज करणें—१ चालवून घेणें; भागवून घेणें; गुजराण करणें. २ हेळसांड, चालढकल करणें; कसेंतरी चालवणें. ३ एखाद्याची अपेक्षा, निकड, उणीव पुरविणें; जरूर त्या गोष्टी देणें; साहाय्य करणें. ४ हात राखून खर्चणें; मितव्ययी असणें; भागवून घेणें.

गरज चालविण–पुरविणें—एखाद्याची नड भागविणें; अडचण दूर करणें; मदत करणें; साहाय्य करणें; कमी असेल तें देणें.

गरज पडणें—जरूरी असणें; आवश्यकता वाटणें. 'इतका पडताळा जमल्यावर मग मिळविण्याची गरज ती काय पडणार !'–विवि ८.१.४.

गरज होणें—अडचण निभणें, भागणें; नड निघून जाणें.

***गरज पडली म्हणजे अक्कल सुचते**—एखादी गोष्ट करतांना मध्यें अडचण आली म्हणजे तीमधून बाहेर पडण्याचा मार्ग मनुष्य शोधून काढतो; नाहींतर आपल्या बुद्धीला एवढे कष्ट देण्याचें त्याला कारण पडत नाहीं. तु०—Necessity is the mother of invention.

गरज लागती, लज्जा दूर होती—मनुष्य अडचणींत सांपडला म्हणजे सर्व लाजलज्जा दूर करून पडेल त्या प्रसंगाला तोंड देतो.

गरज लागे त्या वेळे, मित्राची परीक्षा कळे—आपला मित्र किती आपल्याबद्दल प्रेम बाळगतो हें प्रसंग पडल्याशिवाय कळून येत नाहीं. प्रसंगानेंच मित्राची परीक्षा होते. तु०—जानीयात्संगरे भृत्या बांधवान् व्यसनागमे । आपत्कालेषु मित्राणि भार्यां च विभवक्षये ॥–सुर १५५.९८.

गरज सरो, वैद्य मरो—वैद्याची जरूरी असते तोंपर्यंत त्याच्याकडे खेपा; पण एकदां रोग बरा झाल्यावर त्याच्याकडे जाणें किंवा भेट घेणें अजीबात बंद. कारणच तेवढें असतें. यावरून गरजेपुरता संबंध ठेवणें. खरी आपुलकी, प्रेम नसणें. 'गरज सरतांचि वैद्या त्यजिती; होती गळां प्रथम हार । आपण होउनि तृप्त, त्यजिती अतृप्त स्त्रियांसही जार॥' –मोमंत्र १०.५९८. उपाध्यायश्च वैद्यश्च ऋतुकाले वरस्त्रियः । सूतिका दूतिका नौका कार्यान्ते ते च शष्पवत् ।–सुर १५७.१५. (गु.) गरज सरो, वैद मरो; गरज सरी के वैद (देव) वैरी.

गरजवंत——गरजवंत तो दरदवंत–[दरदवंत = १ दयाळु, सहानुभूति ठेवणारा. २ दुःखी, पीडित] जो अडचणींत सांपडलेला असतो, त्यालाच दुसऱ्याविषयीं सहानुभूति असते, व तो दुसऱ्याच्या अडचणी जाणतो. A needy man is careful.–मॅन ५९३.

गरजवंताची गधडी, लंकेचें भाडें—मनुष्य अडलेला असला म्हणजे वाटेल ती गोष्ट करण्याचें कबूल करतो. लंका फार दूर असल्यामुळें तेथें जाण्याचें भाडें कोण पतकरणार ! पण नडलेल्या मनुष्याच्या गाढवाला लंकेचें भाडें मिळालें तरी तें पत्करावें लागतें. तु०—गरजवंतास अक्कल नसते.

गरजवंताला अक्कल नसते–नाहीं—गरजू माणूस वाटेल तें दूषण लावून घेण्यास व बोलणीं ऐकण्यास साहाजिक तयार असतो. तो अगतिक बनतो व शहाणा असून मूर्ख ठरतो. (गो.) गरजेक अक्कल ना. "प्रवासांत शिष्य तोच चाकर, तोच वाटाड्या, तोच स्नेही, सर्व तोच असला म्हणजे संग्राह्य अयोग्य अशा मनुष्याचे अपराधसुद्धां पोटांत घालून 'गरजवंतास अक्कल नाहीं' ही म्हण खरी करून दाखवावी अशी बुद्धि होते."–शाब १.१७.

गरजीवंता अक्कल ना, आनी खोजरीवाळाक लज ना !—(गो.) गरजवंताला अक्कल नाहीं व खरजुड्यास लाज नाहीं. गरजू माणसाला आपली अक्कल बाजूला ठेवावी लागते, त्याप्रमाणेंच खरूज खाजूं लागली कीं लाज सोडून खरजुडा ती खाजवूं लागतो.

गरजवंतास अक्कल थोडी—जो मनुष्य अडचणींत सांपडलेला असतो त्याला सर्व लोक बुद्धि शिकवीत असतात व त्याला आपल्या पदरांत वेडेपणा बांधून घ्यावा लागतो.

गरजवंतास अक्कल नाहीं व हौसेला मोल नाहीं—मनुष्य अडचणींत असला म्हणजे जसा निरुपाय होतो तसेंच एखादी गोष्ट घेण्याची आपली हौसच असली म्हणजे ती भागविण्याकरितां वाटेल तितके दाम देण्याची तयारी करावी लागते.

आपले गरजे, गाढव राजे—आपल्याला गरज असली म्हणजे गाढवाला सुद्धां राजा म्हणण्याची पाळी येते. तु०—अडला नारायण गाढवाचे पाय धरी. (गु.) गरजे गधेडाने माटी करवो पडे (अथवा बाप केहवो पडे).

गरजेपुढें अक्कल अंधळी—गरजवंतास अक्कल नाहीं, पहा. (गु.) गरजवंत ने आंधलो बराबर.

गरजणें——बोलेल तो करील काय, गरजेल तो पडेल–वर्षेल काय—जो फार बडबड करतो त्याच्या हातून क्वचितच कृति होते. ज्या ढगांची नुसती गर्जना ऐकूं येते त्यांपासून बहुधा पाऊस मिळत नाहीं. तु०—केचिद् दृष्टिभिराद्रयंति धरणीं गर्जंति केचिद् वृथा । (गु.) गाजता मेह वरसे नहि, ने भसता कुत्ता काटे नहि. Barking dogs seldom bite.

गरदणें——गरदून जाणें—गांगरणें; भयभीत होणें; गडबडणें.

गरदन, गर्दन——गर्दन मारणें—ठार करणें; मान कापणें; जीव घेणें.

गरवशी——गरवशीचें पोट आणि नवऱ्याला

आळा—स्त्री गरोदर झाली म्हणजे नवऱ्याला संभोगाची बंदी होते.

गरवशीचें पोट व रिकाम्याचा चोट, वरचेवर वाढतो—(अशिष्ट) अर्थ स्पष्ट आहे.

गरळ्या——जेवूं घालून गरळ्या आणणें—[गरळी = घशाशीं येणारें अन्न] अति खाऊं घालून ओकाऱ्या द्यावयास लावणें; अति आग्रह करणें; खूप खाऊं घालणें.

गरीब——गरीब गाय नाडणें—गरीबास, अनाथास त्रास देणें; पीडणें.–इंप १८.

गरीबाच्या पोटावर पाय आणणें-येणें—गरीब माणसाचें उदरनिर्वाहाचें साधन काढून घेणें, काढलें जाणें. असें करणें, होणें फार निर्घृणपणाचें आहे. पोट पहा.

❀ **गरीब असावें, पण दुबळे नसावें**—१ पैशानें गरिबी असली तरी चालते पण शरीर व मन दुबळें नसावें, तें खंबीर पाहिजे. २ गरिबी सोसावी पण अपमान सोसूं नये. गरीबींत देखील स्वाभिमान पाहिजे.

गरीब कष्ट करिती, तालेवार उपभोग घेती—गरीब लोक श्रम करतात, पण त्यांच्या श्रमांचा फायदा श्रीमंत लोक घेतात.

गरीब खरें बोलती, सभेंत खोटें मानिती—गरीब मनुष्यानें जरी खरें सांगितलें तरी लोक त्याच्या गरीबीमुळें त्यावर विश्वास ठेवायला तयार होत नाहींत व त्यालाच खोटें पडण्याची पाळी येते.

गरीब गडी, गव्हाची वरव—गरीब मनुष्याला एकसारखा गहूं खाऊन राहाणें परवडणार नाहीं. त्याला जोंधळा इ. स्वस्त धान्याचीच वरव पाहिजे.

गरीब गर्वी, लोभी धनी, पाहतां दुःख वाटे मनीं—गरीब मनुष्य (चाकर) मानी असला व श्रीमंत मनुष्य (धनी) कृपण असला म्हणजे त्यांचिकडे पाहून कींव येते. कारण दोघांचें जगांत चालणार कसें ! It is a miserable sight to see a poor man proud, and a rich man avaricious.–Italian.–सवि १९४१.

गरीब गाई, दांत कांगे नाहीं—सर्व तऱ्हेनें दुर्बळ. गरीब गाय असली म्हणजे तिला आपल्या दांतांचाहि उपयोग करतां येत नाहीं. गरीबाजवळ शक्ति असली तरी तिचा त्यास उपयोग करतां येत नाहीं व तो गरीबीमुळें सर्वस्वी लाचार बनतो. पाठभेद—धर्माचे गाई, दांत कांगे नाहीं.

गरीब गाय, आणि पोटांत पाय—एखादा मनुष्य वरून दिसावयास अगदीं शांत व दयाळू दिसतो पण अंतःकरणांतून लबाड, घातक असतो अशाबद्दल म्हणतात. वास्तविक गोगलगाय आणि पोटांत पाय असा पाठभेद आहे. कारण गोगलगाईचे पाय दिसत नाहींत.

गरीब गाय, गळ्यांत पाय—१ गरीब गाईस खाण्यास न मिळाल्यामुळें तिची मान खालीं पायांत येईपर्यंत वांकलेली असते. २ माणूस गरीब दिसतो पण दुसऱ्याच्या गळ्यांत हळूच तंगड्या अडकवितो.

गरीब गायीच्या पाठीवर कोणीहि थाप मारावी, चावऱ्या कुत्र्याच्या वाटेस कोण जाणार?—गरीबाच्या वाटेस कोणीहि जातो, जबरदस्ताच्या जात नाहीं.–केले १.२५४.

गरीब गायीनें मोडला गोठा आणि गुलाम गायीचा अस्करा मोठा—जी गाय खोडकर असते तिच्या कोणी वाटेस जात नाहीं, तिनें दांडगाई करून गोठ्याची नासधूस केली तरी त्याचा आळ गरीब गाईवर येतो. गरीबांचा वाली कोणी नसतो व जबरदस्तास सर्व वचकून असतात. तु०–कोण पादलो तर फटेकार पादलो.

गरीब घेर छिंकणी, राजघेर हुक्को, साधारण घेर बिडी, ने बेठा बेठा फुंको—(गु.) गरीब मनुष्य आपली तंबाकूची तलफ तपकीर हुंगून भागवितो, जो श्रीमंत राजवैभव भोगीत असतो तो हुक्क्याचा शोक करतो, सामान्य मनुष्य आपला विडी घेऊन बसल्या बसल्या फुंकीत असतो.

गरीब पाहती, त्यास सर्व दाबती—गरीबाच्या पाठीमागें सर्व लागतात व त्यास त्रास देतात.

गरीब बोले, दाढी हाले, राजा बोले, दळ हाले—गरिबाचा शब्द कोणी मानीत नाहीं, पण राजाची आज्ञा सर्व सैन्य मानतें. पाठभेद–काजी बोले दाढी हाले, राजा बोले दळ हाले. काजी पहा.

गरीब माणूस शिष्यासमान—ज्याप्रमाणें गुरु आपल्या शिष्यास कोणतीहि आज्ञा करतो किंवा त्याकडून वाटेल तें काम करून घेतो, त्याप्रमाणें गरीबाला कोणीहि आज्ञा करावी व काम सांगावें.

गरीब सर्वांचा गुन्हेगार—गरीब मनुष्यास सर्व लोक दोष देतात. कोणीहि चूक केली तरी ती गरीबावर लादण्यांत येते. (गु.) गरीब सौनो गुनेहगार, ने गरीब सौनो दुशमन.

गरीबकी जोरू, सबकी भाबी; गरीबकी लुगाई, सबकी भोजाई—[भाबी, भोजाई=वहिनी. जोरू, लुगाई=

बायको] (हिं.) गरीबाची बायको सर्वांची वहिनी. म्हणजे गरीबाच्या बायकोस कोणीहि वहिनी म्हणून हक्कानें काम सांगावें.

गरीबा सदाचरणीं भूषण, श्रीमंता दुराचरणीं अपमान—गरीब जर सद्वृत्त असेल तर तें त्याला मान मिळतो व श्रीमंत जर दुराचारी झाला तर त्याचा अपमान होण्याचा प्रसंग येतोच येतो. Vice is infamous though in a prince and virtue honourable though in a peasant. –सवि ३९३५.

गरिबांचा काळ आणि मोठ्यांचा (थोरांचा) प्रतिपाळ; गरीबाचा काळ अन् थोराशीं लडिवाळ—दुबळ्या लोकांना त्रास देणारा व श्रीमंतांच्या लाथा खाणारा, त्यांची हांजी करणारा. कांहीं लोक मोठ्या लोकांशीं चांगले वागतात व गरीब लोकांस त्रास देतात, त्यांस उद्देशून ही म्हण वापरतात.

गरीबाचा काळ नाहीं; आजकाल गरिबाची दुनिया नाहीं—सामान्यतः गरीब मनुष्यास या जगांत दिवस काढणें कठिणच असतें. त्याचा कोणी वाली नाहीं व त्याला न्याय मिळत नाहीं.

गरीबाचा कैवारी, राजाचा वैरी--जो गरीबांचा पक्ष स्वीकारतो त्याला राजाशींहि सामना करण्याचा प्रसंग येतो व तेव्हां साहजिकच तो राजाच्या मर्जीतून उतरतो. आज जे समाजवादी लोक आहेत त्यांची स्थिति अशीच आहे.

गरीबाचा दुवा, श्रीमंताला हवा—श्रीमंत मनुष्यानें जर गरीब लोकांस चांगलें वागवून त्यांचा आशीर्वाद मिळवला, त्यांना आपलेसें करून घेतलें तर त्याचें ऐश्वर्य टिकण्याचा संभव अधिक असतो.

गरीबाचा देव वाली (साह्यकारी); गरीबाचा वाली परमेश्वर—गरीब माणसाचा वाली प्रत्यक्ष देव असतो तेव्हां त्यानें निराश होण्याचें कारण नाहीं. –शाब२.२०४. (गु.) गरीबनो वाली खोदा. (सं.) अनाथो देवरक्षकः ।

गरीबाची अक्कल, जैसा वनीं राजमहाल--गरीबा जवळ जरी पुष्कळ बुद्धि असली तरी ज्याप्रमाणें अरण्यांत बांधलेले राजमहाल कोणाच्या राहण्याच्या उपयोगी पडत नाहींत, त्याप्रमाणें त्याच्या बुद्धीस कोणीहि विचारीत नाहीं, की त्याचें म्हणणें कोणी ऐकत नाहीं.

गरीबाची गरीबी, हरीफीची हरिफी—गरीबाची गरीबी जशी जन्माची लागलेली असते कधीं सुटत नाहीं, तसें शत्रूचें शत्रुत्व कधींहि सुटत नाहीं. एकदां एखादा मनुष्य शत्रु झाला म्हणजे तो कायमचाच.

गरीबाची गाय आणि तोंडाकडे पाह्य--गरीबाची गाय नेहमीं उपाशी असल्यामुळें, आल्यागेल्याच्या तोंडाकडे आशेनें पाहात असते.

गरीबाची घोंगडी, त्यास ती शालजोडी--गरीबाची जरि घोंगडी असली तरी ती त्याला शालजोडीइतकीच मौल्यवान् असते.

गरीबाची तपकीर, अमीराचा हुक्का--गरीब मनुष्य आपलें तंबाकूचें व्यसन तपकीर ओढून भागवितो, कारण ती स्वस्त असते व श्रीमंत मनुष्य हुक्का ओढून आपली तलफ भागवतो. हुक्का हें फार खर्चाचें व श्रीमंती व्यसन आहे. मागें पहा.

गरीबाची प्राप्ति थोडी, श्रीमंतांच्या भानगडी-- गरीब मनुष्य आपला सरळ व्यवहार करीत असल्यामुळें, त्याला प्राप्ति बेताचीच होते; पण श्रीमंत मनुष्य अनेक कुलंगडीं करून द्रव्यसाधन करीत असतो.

गरीबाची बायकू, गांवाची काकू--गरीबकी जोरू सबकी भाबी, याप्रमाणें.

गरीबाची मरूं नये बायको नि श्रीमंताचें जळूं नये घर--गरीबाची बायको मेली म्हणजे त्याचा संसार उघडा पडतो व त्याच्या पोरांबाळांची आबाळ होते, त्याचें पुन्हां लग्नहि होऊं शकत नाहीं; तसेंच श्रीमंताचें घर जळलें असतां त्याला आपल्या संवयीप्रमाणें थाटानें दुसरीकडे राहावयास सांपडत नाहीं, त्याचे हालच होतात.

गरीबाचें गेलें घोंगडें, गरीब पडलें उघडें; गरीबाचें गेलें घोंगडें, गरीब झालें नागडें-उघडें—गरीबाची घोंगडी जरी कमी मोलाची असली तरी ती गेल्यानें त्याचें फार नुकसान होतें; कारण शीतनिवारणार्थ त्याजजवळ दुसरें कांहीं साधनच नसतें. गरीब मनुष्याचें अल्पहि नुकसान झालें तरी तें त्याला फार जाचतें.

गरिबाचे घरीं खावयाला जावें, श्रीमंताच्या घरीं पाहावयाला जावें–गरीबाच्या घरीं जेवावयास गेल्यास आपणांस संकोच वाटत नाहीं व तोहि मोठ्या आदरानें व आग्रहानें वाढून पोटभर यथेच्छ जेवण होईल असें करतो; उलट श्रीमंत मनुष्याकडे केवळ औपचारिक गोष्टीच फार, तेथें सर्व थाटमाट व्यवस्थित असेल. श्रीमंत लोक पंक्तींत फार थोडे खातात व त्यांच्या बरोबर जेवण्यांत पाहुण्यास संकोच उत्पन्न होतो यामुळें नीट जेवण होत नाहीं. त्याचप्रमाणें चांगल्या वस्तू पाहावयाच्या असल्यास त्या श्रीमंताकडे जाऊन पाहाव्या; किंवा एखादा

समारंभ पाहावयाचा झाल्यास तो श्रीमंतामार्फत पाहाण्यास मिळतो. श्रीमंतांच्या घरीं खरें वैभव पाहावयास सांपडतें.

गरीबाचे दाणे पसाभर, श्रीमंताचे मोती घरभर— गरीब मनुष्याची कोणीहि हेटाळणी करतो व श्रीमंताची खुशामत करूं पाहतो. गरीबाच्या घरीं धान्य, तें कितीहि असलें तरी त्याचें वर्णन पसाभर म्हणून करावयाच व श्रीमंताच्या येथें मोतींसुद्धां अगदीं घरभर असतात म्हणून म्हणावयाचें. किंवा गरीबी आणि श्रीमंती यांत तुलना.

गरीबाच्या ज्वारीला रत्नाचें मोल—गरीबाच्या घरची ज्वारी झाली तरी ती त्याला रत्नासारखीच मौल्यवान् वाटते.

गरीबाच्या मध्यस्थीला, उदासीनतेनें ठाव दिला— गरीब जर कोणाबद्दल मध्यस्थी करूं लागला तर त्याच्या बोलण्याकडे कोणी लक्ष देत नाहीं; त्याच्याकडे अगदीं उदासीनतेनें पाहतात. (उलट श्रीमंतानें कोणाची सहज शिफारस केल्यास त्याच्या शब्दास तात्काल मान मिळतो.)

गरीबाच्या लवडयाला शेटांचें झांकण—(ग्राम्य) गरीब माणूस अगदीं निराश्रित, दैन्यवाणा असतो.

गरीबाच्या संगतीनें जेवावयास जाणें, श्रीमंताच्या संगतीन बघावयास जाणें—गरीबाच्या बरोबर जर जेवावयास गेलें तर तेथें संकोच न बाळगतां पोटभर खातां येतें. श्रीमंत लोक जर कोठें जेवावयास गेले तर ते मोठ्या शिष्टपणानें नाममात्र खाऊन उठतात (मग घरीं यथेच्छ जेवतात, किंवा घरून जेवूनच जातात.) तेव्हां पोटभर जेवावयाचें असेल तर गरीबाबरोबर जाणें चांगलें. उलट एखादा समारंभ वगैरे पाहावयाचा असेल तर श्रीमंतास पुढें व ऐसपैस जागा मिळते व त्या ठिकाणाहून सर्व समारंभ चांगला दिसतो. पण गरीबास एखाद्या कोपऱ्यांत मागें जागा मिळते व तेथून कांहींहि दिसत नाहीं. याकरितां नुसती शोभा वगैरे पाहावयाची असेल तर श्रीमंताबरोबर जाणें चांगलें. मागें पहा.

गरीबाजवळ नसतां धन, दैव कसें करील हरण— जो आधींच गरीब असून निष्कांचन आहे त्याचें नशीब जरी फिरलें तरी त्याच्यापासून द्रव्य थोडेंच घेऊन जाणार आहे? मुळांतच नसल्यावर जाण्याची भीति कशाला? A poor man has not many marks for fortune to shoot at. –सवि २१९.

गुरिबान गू खाल्यार पोटा खालो, समर्थान खाल्यार वखता खालो—(गो.) गरीबानें गू खाल्ला तर भुकेसाठीं खाल्ला आणि तोच जर श्रीमंतानें खाल्ला तर औषधासाठीं, असें लोक समजतात. जें कृत्य गरीबानें केलें तर निंदास्पद होतें, तेंच जर श्रीमंतानें केलें तर त्याचें कौतुक होतें. पुढें पहा.

गरीबानें खाल्लें तर पोटाकरितां, पण श्रीमंतानें खाल्लें तर औषधाकरितां—गरीब मनुष्याबद्दल लोक नेहमीं अनादरानेंच बोलतात. एखादा वाईट पदार्थ कदन्न, कोंडा, इ. गरीबानें खाल्ला तर लोक म्हणतात त्याला खावयास कांहीं नसल्यामुळें तो वाटेल तें खातो व त्यामुळेंच त्यानें तो पदार्थ खाल्ला असला पाहिजे; पण तोच पदार्थ श्रीमंतानें खाल्ला तर लोक म्हणतात कीं, त्याला काय कमी आहे, पण त्यानें मुद्दाम औषधाकरितां म्हणून तो पदार्थ खाल्ला असला पाहिजे. गरीबानें शेण खाल्लें तर तें पोटाकरितां व श्रीमंतानें खाल्लें तर तें औषधाकरितां असाहि पाठ आहे. तुलना— नेपाळेश्वरभाललग्नचिखला कस्तूरिका मानिती । (गु.) गरीबनो छोकरो चणा खाय तो के भुखे मरेछ, तवंगरनो दीकरो खाय तो के लाड करेछ.

गरीबाला अल्प येतां तोटा, त्याचा होय मोठा (तोटा)—गरीबाचें जरी थोडेंसेंहि नुकसान झालें तरी त्याला तें फार जाणवतें; कारण त्याची पुंजीच फार थोडी असते.

गरीबाला अळणीचें, श्रीमंताला मळणीचें(तळणीचें)— गरीबाला जेवावयास घालावयाचें असलें म्हणजे कसेंहि अळणी वगैरे पदार्थ असले तरी चालतात पण श्रीमंतास जेवावयाचें असल्यास सर्व पदार्थ नीट मळून, तळून वगैरे उत्तम व्यवस्थेशीर असले पाहिजेत, अशी रीत आहे.

गरीबाला कर्ज जरी, होतो बोभाट लोकांतरीं—गरीब मनुष्यास थोडेंसें जरी रीण झालें तरी त्याच्या नांवाचा बोभाटा ताबडतोब होतो.

गरिबाला गोत नाहीं—गरीब मनुष्यास त्याचे आप्तइष्ट वगैरे कोणी विचारीत नाहींत. गरिबाचा कैवारी कोणी नाहीं.

गरीबाला गोत्र नाहीं—वरीलप्रमाणेंच.–कोल्हटकरांचा लेखसंग्रह. गोत्र शब्दानें व्यापकता वाढली.

गरीबाला द्यायचें किती नि फाटलेल्याला शिवायचें किती—गरीबाला कितीहि दिलें तरी पुरत नाहीं, कारण त्याचा दरिद्रीपणा तसाच मोठा असतो. तसेंच फाटलेल्या कपड्याला शिवून नीट करतां येत नसतें. आभाळ फाटलें तर त्याला ठिगळ लावणें कुणाला शक्य आहे? तसेंच चोहींकडून पडता काळ आलेला, अशा वेळीं कोणाची मदत पुरी पड-

णार ! मदत करणाऱ्याला स्वतःच्या सर्व नाशाचीच तयारी करावी लागेल.

गरीबाला नऊ मण चर्बी--गरीब मनुष्याबद्दल काय वाटेल तें बोलावें. मॅनवेरिंगनें या म्हणीचा अर्थ गरीब मनुष्य उद्धट असतो व तो अधिक खाल्ल्यासारखा बोलतो असा दिला आहे !

गरीबाला पडला दंड, तर न्यायाधिशाचा गेला लंड-गरीब मनुष्यास न्यायाधीशहि जबर शिक्षा करतो, त्याच्याकडे कनवाळू दृष्टीनें पाहात नाहीं. किंबहुना त्याचा खटला पूर्णपणें लक्ष देऊन न चालवितां त्याला शिक्षा झाली तरी बेफिकीर असतो. (उलट श्रीमंताच्या बाबतींत शक्य तर तो सुटून जाईल अशी काळजी घेतो.) असा नेहमींचा अनुभव आहे.

गरीबाला बहु मुलें होतीं, त्याची चिंता ईश्वराला असती--गरीबांना पुष्कळ मुलें होतात तरी परमेश्वर त्यांच्या पोषणाची काळजी घेतो. परमेश्वर कोणालाहि उपाशीं मरूं देत नाहीं इतका तो दयाळू आहे. आधुनिक अर्थशास्त्रज्ञांना गरिबांच्या बेसुमार संततीची फार काळजी येऊन पडते. तु०-आधीं चारा मग चोंच. बाहेर निघतां मातेचे स्तनिं पय केलें निर्माण । रामा तूं माझा यजमान ॥-मध्व.

गरीबाला भाकर, श्रीमंताला तूपसाखर--गरीबाला कोणतेंहि अन्न चालतें; श्रीमंत मनुष्याचें मात्र सुग्रास अन्नाशिवाय चालत नाहीं व जगहि त्याचें तसेंच चालवितें.

गरीबाला विद्या धन, द्रव्यवानाला भूषण--गरीब मनुष्यास विद्या हीच धनाच्या जागीं आहे. विद्येवरच त्याची उपजीविका अवलंबून असते. परंतु श्रीमंत मनुष्यानें विद्या प्राप्त करून घेतली तर त्याला कांहीं तिच्यावर अवलंबून राहावयाचें नसतें; पण तीमुळें त्याला अधिक मान मिळतो. ती त्याला एखाद्या अलंकाराप्रमाणें शोभून दिसते.

गरीबाला सोन्यारुप्याचा विटाळ--[विटाळ = अगदीं अभाव, अलिप्तता] गरीब मनुष्याजवळ क्वचितच सोनेंरुपें असण्याचा योग येतो, तें जणूं काय त्याच्यापासून दूर असतें. मॅनवेरिंगनें गरीब मनुष्यापासून सोनें रुपें दूर ठेवतात, जणूं काय त्याच्या स्पर्शानें तें बाटेल असा अर्थ दिला आहे तो पटत नाहीं.

गरिबाला हिसका आणि श्रीमंताला पैका--गरीब मनुष्य एखादा उद्योग करूं लागला कीं त्यांत त्याला बहुतेक धक्काच बसतो, नुकसान येतें. पण श्रीमंतानें तोच व्यवहार केल्यास त्याला मात्र फायदा होतो; किंवा एखाद्या गरिबाला श्रम मात्र पडतात व फायदा होतो श्रीमंताला. तु०-पैशापाशीं पैसा जातो.

गरीबास पोरें आणि काजऱ्यास फळें--गरीबाला पुष्कळ संतति होते आणि काजऱ्याच्या (Nux vomica) झाडाला फळें (बिया) पुष्कळ येतात.

गरीबास सुसंतति, तीच त्याची संपत्ति--गरीबाचीं मुलें चांगलीं कर्तीं निघालीं तर तीच त्याची खरी संपत्ति होय. कारण गरीबांस बहुधा मुलें पुष्कळ असतात. तीं जर चांगलीं निघालीं तर त्यांचे पांग फेडतात, पण वाईट निघालीं तर अधिक संकटांत घालतात.

गरीबी पत्करली पण ऋण नको--अडचणींत दिवस काढावे लागले तरी हरकत नाहीं पण दिखाऊ श्रीमंत राहणीनें वागून जर कर्ज होत असेल, तर कर्जाशिवाय दारिद्र्यांत दिवस घालविणें पतकरलें.

गरीबी प्रवेश करिती, तेथें प्रीति सोडून जाती--मनुष्य निर्धन झाला म्हणजे त्याचे सर्व मित्र त्याला सोडून जातात. निर्द्रव्या पुरुषा न बंधु भजती त्या मान कोठें नसे । -मृच्छ.

गरिबी येते, लाज जाते—मनुष्य निर्धन झाला म्हणजे तो हळू हळू निलाजरा बनत जातो. त्याला हळू हळू बऱ्याच गोष्टींची लाज वाटत नाहींशी होते.

गरिबी ही अट्टल बादशाही आहे--गरीब मनुष्य खरोखर बादशहापेक्षां अधिक आहे; कारण त्याला कोणाची पर्वा नसते. तो अगदीं स्वतंत्र असतो.

गरीबींत मीपणा, तर होय विटंबना--मनुष्य गरीब म्हणजे निर्धन असूनहि जर तो मानी असेल, तर त्याला अतिशय त्रास सहन करावा लागतो. कारण गरीबीमुळें त्यावर अपमानाचे प्रसंग वरचेवर येतात.

गरुड——गरुड करणें--(कु.) बनाविणें; फसविणें; ठकाविणें; चकाविणें; चढाविणें.

❀ **गरुडापुढें मशक**--ज्यांची परस्परांशीं तुलना होऊं शकत नाहीं अशा-एक अतिशय मोठी व दुसरी क्षुद्र अशा वस्तु समोरासमोर आणणें, त्यांची तुलना करणें. तु०--सूर्यापुढें काजवा.

गरे——गरे गावणें--पडणें.

कापे गरे गावणें—कोरड्या जागीं पडणें.

बरके गरे गावणें--ओल्या अगर चिखलाच्या जागीं पडणें. फणसामध्यें कापा व बरका असे दोन भेद आहेत.

‘रामाला आज गरे गावले; पण कापे कीं बरके हें समजलें नाहीं’ (म्हणजे रामा आज पडला पण कोरड्या जागीं कीं चिखलांत हें समजलें नाहीं.)

गरे गरे मालकाला आणि शेंडे बुडखे रेडकाला—फणस फोडला म्हणजे त्यांतील गरे मालक खातो व चारखंडे रेडकास घालतो. कोणत्याहि वस्तूंतील चांगला भाग मालक घेतो व निरुपयोगी, टाकाऊ भाग नोकरचाकर वगैरेंच्या स्वाधीन करतो.

गर्क——गर्क होणें—१ सामान्यतः निमग्न होणें; गढून जाणें. २ नष्ट होणें; मरण पावणें. ‘पूर्वी भाऊसाहेब विश्वासरावसाहेब, पानिपतास लढाईत गर्क झाले तें वर्तमान ऐकून गिलच्यांचे पारिपत्यास तीर्थस्वरूप दादासाहेब गेले.’—पाब ८०.

गर्ग——गर्गाचार्यांचा मुहूर्त—[गर्ग हा एक प्राचीन ज्योतिषग्रंथकार होऊन गेला. त्याची ‘गर्गसंहिता’ विख्यात आहे. गर्गाला मुहूर्त सांगण्याच्या कामांत प्रमाण मानतात.] सूर्योदयाच्या पूर्वीचा ५ व्या घटकेपासून तिसऱ्या घटकेपर्यंतचा काळ. (सामा.) सूर्योदयापूर्वीची वेळ ही फार शुभ मानतात. ‘गर्गेमुहूर्तें प्रयाण रामा श्रुतिवर्गानें गाइन मी।’—आप ७२.

गर्जणें——गर्जून बोलूं नये घरीं, राग न झाडी चाकरावरी—घरांत फार मोठ्यानें बोलूं नये व चाकरावर इतर गोष्टींतला बाहेरचा राग काढूं नये.

गर्जेल तो पडेल (वर्षेल) काय, बोलेल तो करील काय—ज्याचा गडगडाट होतो तो मेघ पाऊस देत नाहीं, तो कोरडाच जातो. त्याचप्रमाणें जो शेखी मिरवितो, बडबड करतो, त्याच्या हातून काम होत नसतें.—शाब १.५५ ‘गरजणें’ पहा.

गर्द——गर्द होणें—[गर्द=धूळ.] नष्ट होणें; धुळीस मिळणें; नाहींसे होणें; गडप होणें. गर्क होणें पहा.

गर्दीस नेणें—नाश करणें. ‘आम्ही त्याचें निमक पूर्वी खाल्लें आहे त्याअर्थीं यास गर्दीस नेऊन मुलांची स्थापना करावी हें युक्त आहे.’—मराचिशिच २४.

गर्देस मिळविणें—धुळीस मिळविणें; सत्यानाश करणें. ‘उपेक्षा केलियानें अन्यायाची बुद्धि होणार असे होते त्यांस मारून गर्देस मिळविले.’—मराआ ५. ‘चौकीस इस्माईलखान होता तो मारून गर्देस मेळऊन दस्त करून राजश्री छत्रपती स्वामीपासी नेला.’—भाग्न १६.३.

गर्दन——गर्दन सुरी आयती, दिली आहे तुझ्या हातीं—एखाद्या मनुष्यावर पूर्णपणें विसंबून असणें; आपलें सर्वस्व अस्तित्व सुद्धां पूर्णपणें दुसऱ्याच्या स्वाधीन करून त्याच्यावर पूर्णपणें विश्वास टाकून असणें.

गर्दभ——गर्दभापुढें गायन करणें—गाढवाला गाण्यांतलें काय कळणार? त्याप्रमाणें अनधिकारी, अज्ञानी माणसाला एखादी गोष्ट सांगणें, त्याला समजावणें अगदीं व्यर्थ होतें. ‘फलज्योतिषाची केवढी थोरवी आहे ती मीं तुला सांगणें म्हणजे गर्दभापुढें गायन करण्यासारखें आहे.’—शाब १.१७.

गर्दी——गर्दी करणें—गैरकायदा दंगल, बळजोरी, जुलूम करणें; दंगा करणें; गडबड, गोंधळ करणें.

गर्भ——गर्भगलित होणें—एकदम भीति, धसका बसल्यानें गरोदर स्त्रीचा गर्भ बाहेर येतो, गर्भपात होतो. यावरून अतिशय घाबरणें. ‘त्या नजरेमध्यें इतका दरारा होता कीं, शिपाई लोक गर्भगलित होऊन लागलेच मागें हटले.’—पामो ६०.

गर्भगाळ कोसळणें—गर्भ गळित होणें; अतिशय घाबरणें; अगदीं घाबरगुंडी उडणें; धीर अजीबात सुटणें. ‘गर्भ गाळ कोसळला।’—ऐपो ५८.

गर्भश्रीमंत—वाडवडिलांची श्रीमंती असलेला; त्या श्रीमंतींत वाढलेला.

गर्भ संभवणें-समावणें-राहणें—गरोदर होणें; गर्भधारणा होणें.

गर्भाचें करणें-होणें—चैनीनें जेवणें; पोटपूजा करणें; आपला अर्थ साधणें; स्वार्थ करून घेणें.

गर्भीं राज्य-रोग-वैराग्य—पोटांत असतांपासून, गर्भावस्थेपासून श्रीमंत, जन्मापासून रोगी वगैरे असणें; जन्मादारभ्य संपत्ति, रोग अगर विरक्ति असणें.

❀ **गर्भाच्या आणि मेघाच्या भरंवशावर कोणी राहूं नये; गर्भाचा नी मेघाचा भाकीत होत नाहीं**—गर्भांतून काय निघेल तसेंच मेघांतून पाऊस पडेल हें कोणाला नक्की सांगतां येत नाहीं; याबद्दल कोणी ग्वाही देऊं नये.

गर्व——गर्वानें फुगणें—गर्वामुळें उन्मत्त होणें; माजणें; गर्विष्ठपणामुळें बेदरकारपणें वागणें.—मोऐषिक ३.१९.

❀ **गर्वदृष्टीचें लक्षण, दिसतें तोंडावरून**—एखादा मनुष्य गर्विष्ठ असेल तर त्या गर्वाचा ताठा त्याच्या तोंडावर

स्पष्टपणें दृष्टीस पडतो. त्यामुळें त्याच्याविषयीं प्रथमपासूनच अनुकूल ग्रह असत नाहीं.

गर्व हरणें, त्यासीं संबंध न ठेवणें—ज्याचा आपण एकदां गर्व हरण केला, ज्याचा ताठा जिरवला असेल त्याच्याशीं पुढें संबंध ठेवूं नये; कारण तो आपला कायमचा शत्रु बनतो.

गर्वाचें घर खालीं—गर्विष्ठ माणसाची मानहानि व विपन्नावस्था होण्याचें राहात नाहीं. गर्वाचा परिणाम वाईट. जो मनुष्य फार गर्व करतो त्याचा नक्षा उतरतो; जो मनुष्य फार ऐट करतो त्यास बहुधा खालीं पाहण्याची पाळी येते. 'तों गर्वाचें घर खालीं. ईश्वरास साहेना.' –भाव ८२. 'गर्वाचें घर खालीं या तत्त्वाचें ऐतिहासिक उदाहरण द्याव याचें आहे, तर तें १८१५, १८७०, १९१९ व १९४० या सालीं झालेल्या फ्रेंच व जर्मन राष्ट्रांच्या वर्तनावरून मात्र उलट सुलट रीतीनें, देतां येईल.'–केसरी २५–६–४०.

गल——गल बायदादाद करणें—गळा दाबून प्राण घेणें; कंठ कोंडून मारणें; गळ्यास नख लावणें.

गलश्च कंठश्च—जीवश्च कंठश्च पहा. अतिशय प्रेमांतला मित्र; गळ्यांत गळा असणारा मित्र. 'आज गलश्य कंठश्य' –पेद ६.२

गलबत——गलबताची भरती होईल पण पोटाची भरती होणार नाहीं—गलबत एकदांच भरावयाचें असतें, पण पोटाची खांच रोज भरावी लागते; यामुळें गलबतांपेक्षांहि पोटांत अन्न अधिक जातें. पोट कधीं पाठीमागचें सुटत नाहीं.

गल्ला——गल्ला वाढविणें—[गल्ला=दुकानांतील रोजच्या रोख विक्रीचें नाणें.] दुकान बंद झाल्यानंतर विक्री करणें.

गव——गव लावणें--(व.) १ फायद्याची वस्तु सांपडणें. २ गुप्त निधि सांपडणें.

गव--काहून पेरले जव, तर ज्याची त्याला गव–[गव = महत्त्व] (व.) जवापेक्षां गहूं हें धान्य चांगलें व खाण्याच्या पाठांतलें असतां गहूं न पेरतां जव पेरणें हें वेडे-पणाचें वाटेल; पण ज्याला ज्या गोष्टींचें महत्त्व वाटतें तो तीच करतो अथवा तिकडे लक्ष्य देतो, मग ती इतरांच्या मानानें क्षुल्लक का असेना. एकाला क्षुल्लक वाटणारी गोष्ट दुसऱ्यास महत्त्वाची वाटते. वस्तूचें महत्त्व ज्याच्या त्याच्या गरजेवर वगैरे अवलंबून असतें.

गवई——गवयाचें पोर रडलें तरी सुरावरच रडणार; गवयाचें पोर सुरावर रडे—जन्मल्यापासून गाण्याचे सूर कानावर पडल्याकारणानें गवयाचा मुलगा गाणें सहजीं जाणणारच.तेव्हां त्याचें रडणेंहि सुरेल असावयाचें! आनुवंशिक व सांसर्गिक संस्कारांचा परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. घरांतल्या विद्येची, कलेची थोरवी अशी आहे. ती घरांतल्या सर्व माणसांना सहज येते.

गवठ्या——गवठ्या महाजन—मठ्ठ; मूर्ख; मद्ड मनुष्य; गांवढा.

गवतानें अग्नि झांकणें—निष्फळ असा प्रयत्न करणें; न दडपण्यासारखी गोष्ट दडपून ठेवणें. 'पदरची मंडळी अग्नी गवतानें झाकितात हें आश्चर्य वाटतें.'-सनदापत्रें,पृ.१४९.

गवत्या गोमाजी—गवत कापणारांतील मुख्य. अल-बत्या गलबत्या मनुष्य. कोणीतरी टिकोजी

***गवत गोंडाळ, शेत धोंडाळ, बायको तोंडाळ नसावी**—ज्या गवताला पुढें गोंडा असतो तें गवत गुरें खात नाहींत म्हणून तें निरुपयोगी असतें; तसेंच ज्या शेतांत अतिशय धोंडे असतील तेथें पीक चांगलें येत नाहीं व जी बायको नेहमीं बडबड करीत असते, भांडखोर असते, तिच्या-पासून सुख मिळत नाहीं.

गवताची गंजी, चोराची शेजी—आपल्या घरांत जर गवताची गंजी असेल आणि शेजारींच चोर असेल तर आप-णास फार जपून वागलें पाहिजे, व कितीहि जपलें तरी त्यांतलें कांहींतरी गवत चोरीला गेल्याशिवाय राहावयाचें नाहीं. २ आपली गवताची गंजी असणें किंवा चोर शेजारीं असणें ही गोष्ट सतत काळजी, ताप देणारी यांत शंका नाहीं. कारण गंजीला कधीं आग लागेल याचा नेम नाहीं, तसेंच शेजारचा चोर कधीं आपल्याला लुंगवील याचाहि नेम नसतो.

गवत्या बसला जेवाया आणि ताकासंगें शेवाया—गोबर, अनाडी माणसाला कसें जेवावयाचें हें सुद्धां माहीत नसतें. वास्तविक शेवाया दुधाबरोबर खातात तर हा ताका-बरोबरच चापतो. गाढवाला गुळाची चव काय?

गवऱ्या——गवऱ्या मसणांत जाणें--मनुष्य मेलें म्हणजे त्याचें प्रेत स्मशानांत नेण्यापूर्वी तेथें गवऱ्या नेऊन टाकण्यास सांगतात. यावरून मृत्युकाल समीप येणें; वृद्धा-वस्था प्राप्त होणें. 'गोवऱ्या ओंकारेश्वरीं जाणें' पहा.

गवस——गवस गाढव--टोणपा, मूर्ख मनुष्य; निर्बुद्ध; अडाणी.

गवसणी——गवसणी करणें--एखाद्या गोष्टीस आवाक्यांत ठेवणें; आवरणें; आटोक्यांत आणणें.

गवसणी घालणें—१ झांकण घालणें; आच्छादणें. 'घालितु आला लोहाची गवसनी ।'–शिशु ९७९. २ आवरणें; कह्यांत ठेवणें; ताब्यांत, आटोक्यांत ठेवणें.

गगनाला गवसणी घालणें––असंभाव्य, अशक्यप्राय गोष्ट करूं बघणें.

गवळण——गवळण चाले पुढें, तिचें लक्ष घागरीकडे—गवळण जरी वाटेनें पुढें चालली असली व तिचे डोळे जरी वाटेकडे समोर पाहात आहेत असें दिसलें तरी तिचें सारें लक्ष डोक्यावरील दुधाच्या घागरीकडे असतें. त्याप्रमाणें मनुष्य कोणतीहि गोष्ट करीत असला तरी त्याचें लक्ष त्यांतून आपणांस काय लाभ होणार या गोष्टीकडे असतें.

गवळी——गवाळ्याचा रेडा, नी गुजराचा स्वामी—दोघेहि चैनींत राहून अगडबंब.

गवळ्यानें छांळूं केलें, पाण्याचें दूध झालें—गवळी हा कांहींतरी युक्ति करून दुधांत पाणी घालून फायदा मिळवितो, याला अनुलक्षून म्हण.

गवाळें——गवाळें आटोपणें—(प्र.) चंबू गवाळें आटोपणें. १ पळ काढणें; निसटणें; निघून जाणें. २ पदच्युत होणें; स्थानभ्रष्ट होणें; हातांतील अधिकार जाणें. ३ मरणें.

गवाळ्यांत घालणें-टाकणें—ताब्यांत घेणें, ठेवणें; आवरणें.

गव्हार——गव्हारके शिरमें अक्कल—मूर्ख मनुष्याच्या डोक्यांत अक्कल कोठून असणार ?

गस्त——गस्त येणें—(व.) भोंवळ येणें; चक्कर, घेरी येणें.

गहन——कर्मणो गहना गतिः ।–प्रारब्धाची, दैवाची लीला अगाध आहे. कोणाच्या नशिबांत काय आहे हें कोणालाहि सांगतां येणार नाहीं. विपत्तौ किं विषादेन संपत्तौ हर्षणेन किम् । भवितव्यं भवत्येव कर्मणो गहना गतिः (कर्मणामीदृशी गतिः) ॥—शार्ङ्गधर.

गहनो कर्मणो गती, कोंब्यान गिळ्ळो हत्ती—(गो.) कोंबड्यानें हत्ती गिळण्यासारखी विचित्र गोष्ट नशीबाच्या फेऱ्यानें घडते. विपरीत गोष्ट घडून येणें. दैव अनुकूल प्रतिकूल असेल त्याप्रमाणें विचित्र घटना घडून येतात. कर्म पहा.

गहिगट——गहिगट काढणें—जबर मार देणें; चेंचणें; ठोकणें; चेंदामेंदा करणें.

गहिगट जमणें––दृढ मैत्री जमणें; गट्टी जमणें; मेतकूट जमणें.

गहूं——गव्हाची कणिक करणें—श्रम कमी करण्याच्या प्रयत्नांत दुप्पट करून घेणें.

गव्हाची कणिक होण्याइतकें काम—गहूं सुद्धां कामाखालीं चिरडून त्याचें पीठ होईल इतकें काम. अतिशय काम.

***गहूं कहे मेरा मोटा पेट, और मुझको खावे नगरका शेट**––गहूं हें धान्य फार महत्त्वाचें असतें व त्यास सर्व मोठमोठे खातात म्हणून फार गर्व वाटतो.

गहूं तेव्हां पोळ्या––गहूं असतील तर पोळ्या मिळतील. धान्य असेल तर त्याचा पदार्थ बनवितां येईल. मूळजिनसाचा ठिकाण असेल तरच त्याचे प्रकार बनवितां येतील. मूळासच ठिकाण नसल्यास त्यानंतरच्या कृती होऊं शकणार नाहींत.

एक गहूं, प्रकार बहू—एक पहा.

गव्हाइतकें सुख, पायली इतकें दुःख—लहानसें सुख हें मोठ्या दुःखाबरोबर आहे. A penny-worth of mirth is worth a pound of sorrow.

कुणब्याची बेटी, गव्हाची रोटी, मळल्यानें तिला चव येते––कुणबी पहा.

गव्हाचे रोटहि होतात, मांडेहि होतात—गव्हाचे जाडेभरडे, रुक्ष रोटासारखें खाद्यहि तयार करतां येतें व मांड्यासारखा पातळ व नाजूक पदार्थहि करतां येतो. हें सर्व करणाऱ्याच्या कौशल्यावर अवलंबून आहे. त्याप्रमाणें साधनें एकच असलीं तरी त्यांचा योग्य उपयोग करून त्यांपासून कांहींतरी घटना घडवून आणावयाची; ती घटना किती सुंदर किंवा क्षुद्र असेल हें कार्यकर्त्याच्या अंगच्या गुणांवर अवलंबून राहील.

गव्हाबरोबर(सरसे) किडे रगडले जातात—गहूं जर किडले असले व ते जात्यांत भरडावयास घातले तर गव्हांबरोबर त्यांतील किडेहि जात्यांत सांपडून चिरडल्याशिवाय राहात नाहीं. त्याप्रमाणें मुख्य गोष्टींवर एखादी क्रिया केली असतां तिचा परिणाम तदाश्रित गोष्टींवर झाल्याशिवाय राहात नाहीं. मुख्य अपराध्याबरोबर त्याचे साथीदार मग ते प्रत्यक्ष दोषी असोत वा नसोत त्यास शिक्षा झाल्याशिवाय राहात नाहीं. तु०–तुरीबरोबर बरड चिरडले जातात. वरीबरोबर बरग भरडले जातात.

गळ——गळ घालणें—१ भीड घालणें; आग्रह करणें; वशीला लावणें; वगीनें काम करून घेणें. 'नानाला आमची मुलगी करा म्हणून राघोपंत भारीच गळ घालीत आहेत.' २ जबरदस्ती करणें; बळेंच करावयास लावणें; आग्रहानें लादणें.

गळ टाकून पाहाणें—प्रयत्न करणें; ठाव घेणें; खडा मारून पाहणें.

गळीं जाणें—[गळ=फांस] फांशी जाणें; मृत्यूची शिक्षा होणें; फांसावर लटकणें.

गळीं देणें—१ फांशीं देणें; मृत्यूची शिक्षा देणें. २ मोठ्या संकटांत लोटणें; मरणाच्या दारीं नेऊन सोडणें.

गळीं लागणें—कोंडमारा होणें; फांस लागणें; प्राण जाण्याच्या बेतांत येणें. २ यातनेंत पडणें, गुंतणें; फासांत अडकणें; अत्यंत भयंकर संकटांत सांपडणें; जीवावरच्या संकटांत सांपडणें. ३ दुरावस्था पावणें; संकटांत अडचणींत येणें.

गळसरी——गळसरी बांधणें—मंगळसूत्र बांधणें. (ल.) लग्न लावणें; विवाह करणें. 'कीं माझा पिता दिनकर। तो हा जाणे विवाह विचार। त्याचे विचारें गळसर। बांधीन तुमचा॥' —कथा ५.१३.१५७.

गळा——गळश्च कंठश्च; गळस्य कंठस्य—दृढ मैत्री. जीवश्च कंठश्च. गल पहा.

गळा अट(ड)कणें—गळा गुंतणें पहा.

गळा उगविणें—कर्जमुक्त होणें; संकटांतून पार पडणें; सुटका होणें; फांसांतून सुटणें; अडचणींतून बाहेर पडणें.

गळां ओरडून पडणें—मोठ्यानें शोक करून कंठास मिठी मारणें; अत्यंत दुःखानें एखाद्याच्या गळीं पडणें; एखाद्याचा संकटसमयीं आश्रय घेणें.

गळा काढणें—मोठ्यानें रडणें; ओरडणें; आरडणें; मोठमोठ्यानें आक्रंदन करणें; रुदन करणें; भोकाड पसरणें. —मो श्रीरामायण ३७.

गळा कापणें—१ फसविणें; ठकविणें; घात करणें; संकटांत घालणें. २ उमेद खचवून नाश करणें; संकट समयीं सोडून जाणें; मध्येंच त्याग करणें. ३ (शिंपीकाम) गळ्याचा काट घेणें, बेतणें.

केंसानें गळा कापणें—वरून मैत्री दाखवून आंतून विश्वासघात करून नुकसान करणें; आरंभीं वचन देऊन मागाहून फसविणें; प्रथम धीर देऊन मग कपटानें घात करणें.

गळा गुंतणें,—एखाद्या अडचणींत सांपडणें; संकटांत सांपडणें; भयंकर आपत्तींत सांपडणें.

गळा गोवणें—१ अडकाविणें; मर्जीविरुद्ध एखादा भार अंगावर देणें; वचन वगैरे घेऊन एखाद्या पक्षांत किंवा कार्यांत सामिल करून घेणें. २ गुंतविणें; संकटांत घालणें; अडचणींत आणून सोडणें; फसवून एखादी ब्याद गळ्यांत बांधणें. 'पुण्यांतल्या सगळ्या तरुणांचे गळे गोंवले गेले असते.' —इंप ४६.

गळा तांगडून बोलणें—खरडून बोलणें; मोठमोठ्यानें बोलणें; ओरडून सांगणें.

गळा ताणणें–टांगणें—गळ्यापेक्षां फार उंच स्वरानें गाणें; उच्च स्वरानें गायल्यामुळें घशास ताण बसणें; तार स्वरानें गाऊन त्रास होणें.

गळा तापणें–सुटणें—गळा मोकळा होणें; गळा साफ होऊन गाण्यासाठीं चांगला लागणें; आवाज स्पष्ट व खणखणीत येऊं लागणें.

गळा दाटणें—गहिंवरणें; गळा रुद्ध होणें; कोणत्याहि आवेगानें घसा दाटून येणें; आवेशानें गळा भरून येणें. 'तथ्यप्रभूक्त परिसुनि धर्माचा गहिंवरें गळा दाटे।'—मोशांति ६.४२. —मोशल्य ३.६०.

गळा धरणें—१ घसा बसणें; आवाज घोगरा येऊं लागणें; आवाज निघेनासा होणें. 'त्वद्गुणकीर्तन करितां लज्जा हे पापिणी धरू न गळा।'—आर्याकेका ५८.२. थांबविणें; खोटी करणें; अडकवून ठेवणें. ३ वाचा बसणें; आवाज निघेनासा होणें. ४ ताब्यांत घेणें; पकडणें.

गळा निवळणें—आवाज साफ होणें; घसा मोकळा होणें; आवाज स्पष्ट व खणखणित येऊं लागणें.

गळां–गळीं पडणें—१ मिठी मारणें; आलिंगन देणें. 'गेलों गृहासि माता धांवुनियां माझिया गळां पडली।' —मोअनु ६.६८. म्ह०—लावशील लळा तर पडेल गळां. २ गळ घालणें; आग्रह करणें. ३ अंगावर तुटून पडणें; हल्ला करणें. 'प्राणाची आशा न धरितां तुम्ही बेशक त्यांचे गळां जाऊन पडला.'— विवि ८.३.५६. ४ भीड घालणें; वजन खर्च करणें; वशीला लावणें. ५ खोड लागणें; संवय होणें; चट लागणें. ६ आळ घेणें; आरोप करणें; अंगीं लावण्याचा प्रयत्न करणें. 'गळां मोतीं असोन निवाडें। लोकांचिया गळां पडे।' —ह २१.२२९. 'गळां पडति ज्यांचिया तव गुणैकदेशभ्रमें।' —मोकेका ३२.

गळा पडणें-फुटणें-बसणें—आवाज घोगरा होणें; घसा बसणें; आवाज स्पष्ट निघेनासा होणें; आवाज चिरकणें.

गळा पिंजणें—आवाज चिरकणें; घसा फुटणें.

(भांड्याचा) गळा बसणें—भांडें मानेंत थवकट होणें; तोंडाजवळचा कांठ खालीं बसणें.

गळां-गळीं बांधणें—१ सक्ती करणें; घेण्यास भाग पाडणें; लादणें; अंगावर टाकून देणें. २ आळ घेणें; कलंक लावणें; अंगीं लावणें, चिकटवणें (दोष वगैरे). ३ गोंवणें; गुंतविणें.

गळा भरणें-भरून येणें—गहिंवरणें; घसा दाटून येणें; शोक, दुःखादि विकारांनीं शब्द फुटत नाहींसा होणें. ' असुहृद्दुरुसीनाचे भरले भरतील न अन्य काय गळे । ' –मोभीष्म ११.११९.

गळा मोकळा करणें—स्वतः संकटांतून मोकळें होणें; सुटका करणें; सोडविणें; आपत्तींतून मुक्त करणें; दोषारोपांतून सोडविणें. ' त्या गरीबानें ती रक्कम लगेच कर्ज काढून आणून भरली व आपला गळा मोकळा केला. '–विक्षिप्त ३.९४.

गळा मोठा करून रडणें—भोकाड पसरणें; मोठ्यानें रडणें; तारस्वरानें रुदन करणें.

गळा लागणें— गवयाच्या गळ्यांतून उत्तम स्वर निघणें; आवाज लागणें; आवाज स्पष्ट व खणखणीत येऊं लागणें.

गळा सोडविणें—१ (खाटिक) धडापासून मान वेगळी करणें; मान कापणें. ' केली हल्ला मधीं शिरला सोडवी गळा कानड्याचा । '–ऐपो ३९२. २ एखाद्यास पेंचांतून मुक्त करणें; संकटांतून पार पाडणें; बचाव करणें; आपत्तींतून सुटका करणें.

गळीं उतरणें—पटणें; समजणें; पक्कें मनांत ठसणें; पूर्णपणें ध्यानीं येणें; मनावर बिंबणें.

गळीं लागणें—१ पाठ पुरविणें; आळी घेणें; सक्त निकड लावणें, तगादा करणें. २ घसा फाडून सांगणें; मोठ्यानें ओरडणें; डरकणें; ओरडून सांगणें. 'गळीं कशाला लागतोस. हळूं बोल की!' ३ भार होणें; जड जाणें; अवघड पडणें. ४ अगदीं जीवावर येणें; कष्टप्रद वाटणें.

गळ्याखालीं उतरणें—१ गट्ट करणें; स्वाहा करणें; गडप करणें; हजम करणें; पचविणें. २ स्वाधीन होणें; पदरांत पडणें; ताब्यांत येणें.

गळ्याचा-गळ्यांतला ताईत-तन्मणी—ज्याप्रमाणें आपण गळ्यांतील ताइतास फार जपतों, त्यास कधींहि विसंबत नाहीं त्याप्रमाणें आपण ज्यास अत्यंत लडिवाळपणें, प्रेमानें वागवतों, कधींहि सोडून जात नाहीं असा मनुष्य. ' तूं नवऱ्याच्या गळ्यांतला ताईत '–विवि ८.२.३०. ' कालिदास, भवभूति, बाणभट्ट यांच्यासारखे प्रतिभावान कवि सरस्वतीदेवीच्या गळ्यांतले ताईत होत. ' –नि. चं.

गळ्याचा लाखोटा होणें—घसा बंद होणें; घसा कोंदणें; गुदमरणें; श्वास कोंडणें; घसा दाटणें.

गळ्याची आण-शपथ; गळ्याचेन-ण—गळ्याची शपथ वाहून; स्वतःची जीवाची शपथ घेऊन.

गळ्याची फुंकणी होणें—घसा घोगरा होणें; घशांतून आवाज न निघतां नुसता वारा बाहेर येणें; फार गायल्यामुळें, ओरडल्यामुळें, श्रमामुळें आवाज बाहेर फुटत नाहींसा होणें.

गळ्यांत असणें—भार पडणें; जोखीम असणें; जबाबदारी असणें, अवलंबून असणें.

गळ्यांत गळा घालणें—१ दुःखानें दुसऱ्याच्या कंठास मिठी मारणें; गळ्यांत पडणें; दुःखानें दुसऱ्याचा आश्रय करणें. २ दाटमैत्री ठेवणें; अत्यंत स्नेह ठेवणें; मनापासून प्रेम करणें. ३ आलिंगन देणें; मिठी मारणें.

गळ्यांत गोणी येणें—एखादा बैल पाठीवरील गोणी टाकून देण्याचा प्रयत्न करीत असतां ती उलट गळ्यांत येऊन अडकते, त्याप्रमाणें १ अधिकच अडचणींत येणें; एखादी आपत्ति येणें; अधिकच संकट ओढवून घेणें. २ नुकसानी, तूट, बूड अंगावर ओढून घेणें; स्वतःचें नुकसान स्वतःच करून घेणें.

गळ्यांत धोंगडें-लचांड येणें—डोक्यावरचें धोंगडें घसरत गळ्यांत येऊन त्यामुळें जीव गुदमरणें. नसतें संकट गुदरणें; आपल्याच कामांतून, भाषणांतून अचानक एखादें लचांड उत्पन्न होणें. ' ताई ! आलें धोंगडें गळ्यांत ! आतां आपण होऊन आपली फजिती करून घेण्यांत काय शहाणपण आहे ! '–त्राटिका.

गळ्यांत घोरपड अडकविणें—एखादें लचांड मागें लावणें; एखादें विघ्न उपस्थित करणें. ' गांधीजीच्या गळ्यांत खटल्याची घोरपड अडकवली.' –सासं १४०.

गळ्यांत तंगड्या-पाय येणें—वरून पडलें असतां अंगाची मोट होऊन तंगड्या गळ्यांत येतात, यावरून. सुटण्यास कठिण अशा अडचणींत जास्त गुरफटलें जाणें संकटांत गुरफटणें; स्वतःचे पाय स्वतःच्या गळ्यांत येणें

म्हणजे आपणच केलेलें कृत्य अंगास येणें; आपलीच युक्ति आपल्यावर उलटणें.

गळ्यांत दाली बांधणें—शिपाईगिरीच्या प्रतिष्ठेस चढविणें. दाली बांधणें पहा. 'घन्याशीं कपट करून जांवयाला आणि मुलीला संभाळून घ्यावें असें जरी तुमच्या मनांत आलें असलें तरी बादशहांनीं तुमच्या गळ्यांत दाली बांधली आहे तिची कांहीं तरी शरम राखा.' –शिसं ४.२.

गळ्यांत धनुष्य घालणें--पूर्वीं शत्रूला जिंकल्यावर त्याचेंच धनुष्य त्याच्या गळ्यांत अडकवून ओढीत नेत. यावरून, पभराव करणें, पराजीत करणें; युद्धांत जिंकणें. 'घालुनि धनुष्य कंठीं धरिला धरि गारुडी जसा अहितें।' –मोकर्ण १४.६७.

गळ्यांत धोतर घालणें--आपल्या धोतरानें दुसऱ्याच्या गळ्यास वेढा देणें; जबरदस्तीनें आपलें म्हणणें कबूल करावयास लावणें, कसें तरी पदरीं बांधणें, अंगावर टाकणें.

गळ्यांत पडणें—एखाद्या कामाची, एखाद्याच्या पोषणाची; संरक्षणाची वगैरे जबाबदारी अंगावर येणें; भार पडणें; शिरावर पडणें, येणें.

गळ्यांत बांधणें—१ आग्रहानें देणें; माथीं मारणें; अंगावर टाकून जाणें; स्वीकारावयास लावणें. २ एखादी जबाबदारी अडकविणें, लादणें.

गळ्यांत मशिद येणें--प्रार्थना करावयास जावें तों मशीदच अंगावर कोसळणें; चांगली गोष्ट करावयास जावें तों एखादी आपत्ति ओढवणें. न टळणारी आपत्ति येणें. (गु.) गले तोक ऑलवावी.

गळ्यांत माळ–माळखंड घालणें--१ काम सोंपविणें, हवालीं करणें; अंगावर टाकणें; लादणें. २ वरणें; वर किंवा वधू पसंत करणें.

गळ्यांत येणें--अंगावर बेतणें; एखाद्या आपणच केलेल्या गोष्टीपासून घस लागणें; चट्टा बसणें; नुकसानीस कारणीभूत होणें.

गळ्यांत लोढणें–धोंड बांधणें—नाखुषीनें अडचणींत आणणें; एखादी जबाबदारी बळेंच लादणें; भार घालणें. 'राष्ट्रीयपक्ष हा कांहीं जुन्या पक्षाच्या गळ्यांत लोढणें बांधण्यासाठीं निर्माण झालेला नाहीं.'

गळ्यांत हात घालणें--१ आलिंगन देणें; मिठी मारणें; प्रेमानें भेटणें. २ मन अनुकूल करणें, वळविणें; विनवणी करणें; प्रार्थना करणें.

गळ्यापर्यंत येणें—पाण्यांतून जातांना पाणी गळ्यापर्यंत लागलें असतां बुडून जाण्याचें संकट प्राप्त होतें. सहनशक्तीची परमावधी होणें; अगदीं शक्तीची पराकाष्ठा करून सहन करणें; संकटाची सीमा होणें.

गळ्याभोंवतीं दास्याची दोरी घट्ट करणें—गुलामगिरींत अडकविणें, पक्के करणें; परवशतेंत पक्कें रुतवणें. –टि३.१८.

गळ्याला दोरी–फांस–रसायण–तांत लागणें—संकटांत पडणें; प्राणांतिक संकटांत सांपडणें; जीव जातो किंवा राहतो अशी अवस्था होणें; प्राणांतिक अरिष्ट ओढवणें.

गळ्याला तांत–दोरी–फांस लावणें—प्राणांतिक संकटांत घालणें; मृत्यूच्या तोंडांत देणें. 'आग्रह करूनि लावूं कोणेकाच्या गळ्या कशी तात।'–मोआकेका (पंतपराडकर अर्जी ८).

गळ्याला नख लावणें—विशेषतः लहान मुलाच्या नाजूक गळ्यास नख लावून त्याचा प्राण घेणें. यावरून, खून करणें; ठार मारणें. 'नारायणरावांच्या गळ्याला नख कशाला लावलेत ?'–इंप ११२.

गळ्याला–शीं लागणें—विवाहास मोठी होणें; विवाहाचा योग्य काल निघून जाणें. 'पोर तर आतां गळ्याशीं लागली.' –मोरप्र १४. 'पोरगी गळ्याला लागली.'–झांमू ८१.

गळ्यावर–गळ्यांत गाणें—मधुर गाणें; कानाला गोड लागेल असें गाणें; सुरावर गाणें; सुरेलपणें, शास्त्रीय पद्धतीनें गाणें.

गळ्यावर बोलणें—सहज बोलणें; अविचारीपणाचें भाषण करणें; कपटयुक्त बोलणें.

गळ्यावर सुरी ठेवणें—गळ्यास नख लावणें पहा. प्राणावर बेतविणें; भयंकर संकटांत घालणें; प्राणघात करणें.

गळ्याशीं गळा मिळविणें—१ सुरांत सूर मिळविणें. २ गळ्यांत गळा घालणें; मिठी मारणें.

गळ्याशीं येणें; गळ्याशीं पाणी लागणें—१ नुकसानकारक होणें; अंगावर बेतणें; चट्टा बसणें. २ अगदीं पराकाष्ठा होणें (कर्ज, रोग, इ. ची); शेवटची घटका येणें; मरणोन्मुख अवस्था होणें. ३ परिसीमा गांठणें.

गळ्याशीं लागणें—१ गळ्याशीं येणें पहा. २ मिठी मारणें; अलिंगन देणें. 'पाहोन गळ्यासी लागली येवोन।'–सप्र २.११६. ओ ९.

❀ **लावशील लळा, तर पडेल गळां**—जशी आपण माया करावी तशी दुसऱ्याची लागते. लहान मुलांवर जर आपण प्रेम केलें तर तीं आपणावर उलट प्रेम दाखवितात. म्हणजे प्रेम हें प्रतियोगी आहे.

माझा गळा आणि कांदा मुळा—माझा गळा काय कांद्या मुळ्याप्रमाणें सहज चिरण्यासारखा आहे. एखाद्या मनुष्याची कांहींच किंमत होत नसली, त्याला अगदीं निर्माल्यवत् वागवण्यांत येत असलें; कोणीहि त्याला त्रास द्यावयास समर्थ असलें म्हणजे तो अशाप्रकारें उद्गार काढतो. पुढें पहा.

गळा कापला, खोकला मिटला (वारला गेला)—लहानशा गोष्टीस उपाय करण्याकरितां मोठी आपत्ति ओढवून घेणें, मोठें नुकसान करून घेणें. नाकावरची माशी उडविण्यासाठीं नाकावर कुऱ्हाड चालविण्याप्रमाणें मूर्ख, अविचारी कृत्य. खोकला पहा.

गळा कापला तरी मुळा कापला असें म्हणणारच--कितीहि जीव तोडून प्रामाणिकपणें व्यवहार केला तरी त्याची किंमत केली जात नाहीं. तु०—शेळी जाते जिवानिशी व खाणारा म्हणतो वातड.

गाणाराचा गळा, नाचणाराचा चाळा—ज्या मनुष्यास गातां येतें तो कधीं स्वस्थ बसावयाचा नाहीं. तो नेहमी कांहीं तरी गुणगुणत असतो. व ज्यास नाचतां येतें त्याचे पाय कधीं स्वस्थ राहात नाहींत. त्याच्या पायांचा नेहमीं चाळा चाललेला असतो. जो ज्याचा देहस्वभाव बनला तो त्याच्या प्रत्येक गोष्टींत दिसून येतो. मनुष्याचा व्यवसाय त्याच्या सामान्य कृतीवरून ओळखतां येतो. (गु.) गानारनी जीभ, ने नाचनारनो पग, सखनो नहि रहे.

गळां नाहीं सरी, सुखीं निद्रा करी—ज्या स्त्रीच्या गळ्यांत सरी वगैरे कांहीं दागिना नसतो तिला चोरापासून भय नसल्यामुळें सुखानें झोंप येते. ज्याच्याजवळ कांहीं धन नसतें त्याला सुखानें झोंप येते, पण ज्याजवळ संपत्ति असते त्याला चोरापासून भीति असते व इतरहि अनेक प्रकारची काळजी त्याच्या पाठीमागें लागलेली असल्यामुळें त्याला शांत झोप येत नाहीं.

गळ्यापडू काम, तेथें खर्चें पदरचा दाम; गळीं पडे काम, तर खर्ची पदरचा दाम—जें काम आपल्या गळ्यांत पडतें त्यापासून आपणास घस लागल्याशिवाय राहात नाहीं. याकरितां ज्यांत आपला संबंध नाहीं अशा बाबतींत कोणतीहि जबाबदारी पतकरण्यानें नुकसानीची मात्र पाळी येते.

त्याचा गळा व माझा नळा जेव्हां एकत्र होईल तेव्हां हें काम उरकेल—(गळ्यांत गळा व तंगड्यांत तंगड्या अडकविल्या म्हणजे) खणपटीस बसल्याशिवाय काम होणार नाहीं.

गातां गळा, शिंपतां मळा—गाणाऱ्या मनुष्यानें जर नेहमीं गाण्याचा अभ्यास चालू ठेवला तर त्याचा सुरेल राहतो. नाहींतर आवाज बिघडतो. तसेंच मळ्यास जर वरचेवर पाणी दिलें तरच तो चांगला राहतो; नाहींतर सुकून जातो.

गळ्यांत गरसोळी आणि गांवांत बोंब—स्वतःची वस्तु स्वतःजवळ असतां हरवली म्हणून उगाच गांवांत बोभाट करावयाचा. तु०—कांखेंत कळसा गांवाला वळसा. मांडीखालीं आरी चांभार पोर मारी.

गळ्यांत गळा, नळ्यांत नळा—(गळ्यांत गळा अडकवलेला व तंगड्यांत तंगड्या घातलेल्या) निकट मैत्री; अत्यंत स्नेह.

गळ्यांतु आसल्यारि व्हॉंटींतु पडता--गळ्यांत असलें तर ओटींत पडेल. बाईच्या गळ्यांत एखादा दागिना असला तर तो एखादे वेळीं तुटून ओंटींत पडण्याचा संभव, नसलाच तर कुठून पडणार ? ' विहिरींत असेल तरच पोहऱ्यांत येईल ' या म्हणीच्या अर्थानें ही म्हणतात.

गळ्यांत गळेसर नको पण खालीं अडसर पाहिजे--(अशिष्ट) श्रीमंती एकवेळ नसली तर नसो पण नवरा हा पाहिजेच. जी गोष्ट आवश्यक ती प्रथम हवी.

गळ्यांत नसावी सरी, पण घरांत असावी मोरी—घरांत मोरी असणें किती सोयीचें हें यावरून दिसून येतें.

गळ्यांत बांधला मणी, न् जिवाचा झाला धनी—(व.) लग्न लागून एकदां गळ्यांत मणी, मंगळसूत्र ज्याच्या नांवानें बांधलें जातें, तो अधिक कांहीं न करतांहि बायकोच्या जीवाचा मालक बनतो. थोडक्यानें नवऱ्याचा हक्क प्राप्त झाला म्हणजे बायकोला तो वाटेल तसें वागवितो.

गळ्यांत माळ, गरीबाचा काळ--गळ्यांत तुळशीची माळ घालून गरीबांस नाडणारा; वरून धार्मिकपणाचा आव आणून गरीब मनुष्यास नाडणाऱ्या दांभिक मनुष्याबद्दल विशेषतः माळकरी सावकाराबद्दल ही म्हण योजतात. तु०—बोलणीं मानभावाचीं करणी कसाबाची.

गळ्यांत माळा, पोटांत काळा—वरीलप्रमाणेंच. वरून धार्मिकपणाचा आव आणणारा पण अंतर्यामीं दुष्ट मनुष्य.

गळ्यांत शेराची सरी आणि रिकामीच ओसरी——अंगावर दागीने खूप घालावयाचे, घरांत खूप श्रीमंती आहे असें दाखवावयाचें पण प्रत्यक्ष पाहावें तों घरांत कांहीं सामुग्री, दाणेसुद्धां नसावयाचे.

गळ्यांतलें तुटलें, व्होंटथेंत पडलें——(गो.) बाईच्या गळ्यांतला दागिना तुटला आणि ओंटींत पडला. नव ऱ्याला मिळायचें होतें तें बायकोला मिळालें म्हणून त्यांत हळहळण्यासारखें काय आहे. खालीं पहा.

गळ्यांतलें तुटलें, ओटींत पडलें——वर प्रमाणेंच. स्वतः च्या गळ्यांतला दागिना तुटून ओटींत पडला तरी तो आपल्याजवळच राहतो. त्यांत कांहीं नफा नुकसान नाहीं. तु०—ताटांत सांडलें काय नि वाटींत सांडलें काय एकच.

गा——गागी गूगे धनिष्ठा करूं लागणें-म्हणणें——अवकहडा चक्रामध्यें नक्षत्र नामांचीं आद्याक्षरें चूचेचोला अश्विनी, लीलूलेलो भरणी, आइउए कृत्तिका, गागीगूगे धनिष्ठा अशीं नक्षत्रवार दिलेलीं असतात. तीं म्हणत असतांना इतरांस त्यापासून कांहीं बोध होत नाहीं. ज्योतिषी कुंडली पाहातांना असें कांहीं बडबडत राहातो, त्यावरून १ कांहीं अस्पष्ट, दुर्बोध बोलणें. २ गोंधळणें; गांगरणें.

गाई——गाय पहा.

गांगरणें——गांगरल्या चोरास झाडाचा राऊत—एखादा चोर मनामध्यें घाबरून पळत सुटला असला म्हणजे दूरच्या एखाद्या झाडाचीहि आकृति त्याला एखाद्या घोडेस्वारासारखी दिसूं लागते व आपणांस धरणें आलें आहे असें समजून तो अधिकच घाबरतो. तु०—भित्यापाठीं ब्रह्मराक्षस. शब्द पडसाद उठला । म्हणे, कोणरे बोलला ॥ —रामदास.

गागाभट्ट——गागाभट्टी——१ गागाभट्टानें लिहिलेला धर्मशास्त्रावरील ग्रंथ. २ (उप.) विद्येचें आडंबर. अकटोविकट पांडित्य; विद्येचा पोकळ डौल.

गाजर——गाजर पारखी-ख्या—गाजरें पारखणारा. गाजरांची पारख करण्यास मुळींच अक्कल लागत नाहीं. ती कोणालाहि करतां येते. यावरून कांहीं एक पारख करतां न येणारा; दीड शहाणा. 'आम्हां पुरुषांची जात अशी गाजरपारखी आहे.—कीचकवध.

गाजरासारखा होणें—१ रागानें लाल होणें; संतापानें तांबडालाल होणें; अतिशय रागावणें. २ चांगला सशक्त लालबुंद होणें.

*** गाजर खाऊन पाणी पिऊन सासरीं जावें-तोंड कडू होतें**—गाजर खाल्ल्यावर पाणी प्याल्यास तें गोड लागत नाहीं व तोंड कडू होतें; त्याप्रमाणें सासरीं जावयाचें झालें म्हणजे तोंड कडू होतें. सासरीं जाण्यास लहान मुली नाखूष असतात. याचे उलट—आंवळा खाऊन पाणी पिऊन माहेरीं जावें—तोंड गोड होतें.

गाजरभर अलीकडे काय आणि मुळाभर पलीकडे काय ?—एखादी गोष्ट केवळ अंदाजीनें सांगणें म्हणजे तो अंदाज अलीकडे किंवा पलीकडे थोडा फार चुकला तरी त्याबद्दल बेफिकिरी दाखविणें, अचूक विधान न करणें.

गाजराची चोरी व फांशीची शिक्षा—थोड्या चुकीला वाजवीपेक्षां अधिक कठोर प्रायश्चित्त. (गु.) गाजरी चोरीमां फासीनी सजा.

गाजराची तुला व विमानाची वाट—एखाद्या पर्वाच्या वेळीं एक धार्मिक कृत्य म्हणून आपली तुला सुवर्ण, रौप्य वगैरेबरोबर करून तें सोनें, किंवा रुपें ब्राह्मणांस दान देण्याची पद्धति आहे व असें दान दिल्यानें दाता स्वर्गास जातो अशी समजूत आहे. हें पाहून एखाद्यानें आपली तुला गाजरांनीं म्हणजे अगदीं कमी किंमतीच्या वस्तूंनीं करून तें दान केल्यास सोन्यारुप्याच्या तुलेच्या पुण्याची अपेक्षा करून स्वर्गांत नेण्यास विमान येईल म्हणून वाट पाहात बसणें, हास्यास्पद आहे.

गाजराची पुंगी वाजली तर (तोंवर) वाजली नाहीं तर मोडून खाल्ली——गाजराची पुंगी करतांना ती वाजलीच पाहिजे अशी मोठी अपेक्षा नसते. कारण न वाजली तर ती खाऊन टाकतां येते, नुकसान कांहींच नाहीं. एखादी गोष्ट करीत असतां ती साधल्यास फायदा नाहीं तोटा तर बिलकूलच नाहीं; अशा वेळीं प्रयत्न करून पाहण्यास हरकत नसते. (गु.) गाजरनी पीपी, वागी त्या सुधी, ने वागी नहि तो करडी खाधी.

जेव्हां येते वेळ, तेव्हां होतें गाजराचें केळ——योग्य प्रसंग प्राप्त झाला असतां गाजरालाहि केळ्याइतकें महत्त्व येतें. एखाद्या वेळीं अगदीं क्षुल्लक वस्तूसहि फार महत्त्व येतें. कांहीं नसलें म्हणजे गाजरें केळ्याइतकीं महाग होतात.

गाजवणें——गाजवून वाजवून करणें——उघडपणें, प्रसिद्धपणें करणें; गाजावाजा करून करणें; एखाद्या गोष्टीचा फार बोभाटा करणें.

गाजी——गाजीचा पाजी बनणें—मोठ्या पदावरून खालीं येणें. 'रामसिंगजी, मनुष्यानें एकदां आत्मविश्वास गमावला म्हणजे कसा तो गाजीचा पाजी बनतो पहा!'—उग्र २.३.

***क्षणामध्यें गाजीचा पाजी, पाजीचा गाजी होतो**—वेळप्रसंग पडला म्हणचे थोर मनुष्यासहि विपन्नावस्था येते व अगदीं क्षुल्लक मनुष्यहि थोरपदास चढतो.

गांजेवाला——गांजेवाला बहकेल कुठें, दारूवाला ओकेल कुठें, तंबाखूवाला थुंकेल कुठें, याचा नेम नाहीं—(वांय.) या तीघांना मुळीं विवेक नसतो. ते व्यसनाधीन झाल्यामुळें त्यांचा शरीरावर किंवा मनावर ताबा राहात नाहीं.

गांठ——जन्माची गांठ—विवाहसमयीं वधूवरांच्या वस्त्रांस गांठ मारतात. यावरून विवाहसंबंध; मरणापर्यंत सुटत नाहीं असा संबंध; लग्नाची गांठ.

गांठ घालणें—१ भेटणें; एकत्र येणें; समोरासमोर येणें; दृष्टादृष्ट होणें; नजरेस पडणें. २ चढाई करून जाणें; तोंड देणें; सामना करणें; झुंज करणें. 'घालीन गांठि त्यातें, मी कीं मारील तो मला आजी।'—मोकर्ण २०.२१.

गांठ घालणें-ठेवणें—नजर ठेवणें; मनांत बाळगणें; मनांतून योजीत असणें; लक्ष्य देणें; दृष्टि पुरवणें; मनावर घेणें. मतलबाशीं नेहमीं गांठ घालणें.

गांठ घेणें—भेटणें; मिळणें; एकत्र येणें.

गांठदाम; गांठसोडावण—लग्नांत वधूवरांच्या वस्त्रांच्या पदरांची गांठ मारतात ती सोडविण्यासाठीं वधूच्या बहिणीस दिलेलें बक्षिस; करवलीचा मान.

गांठ पडणें—१ सवड सांपडणें. 'समयीं स्वामीसमीप तुम्हांस यावया गांठ पडणार नाहीं.'—ऐतिहासिक पत्रव्यवहार पत्र २. २ भेट होणें; एकत्र येणें; एका ठिकाणीं प्राप्त होणें; समोरासमोर येणें; सामना होणें. 'गांठी पडली ठका ठका। त्याचें वर्म जाणे तुका॥'—तुगा ३१७१.

गांठ लागप—(गो.) इच्छा होणें; जवळ असावेंसें वाटणें; जरूर भासणें.

गांठचा वाहणें—पदरचा खर्च करणें; जवळ असलेला मोडणें; शिलकेंतला बाहेर काढून खर्च करणें; पदरास खार लावणें. 'जामीन रहा नि गांठचे वहा.'

सात गांठी देऊन ठेवणें; सात गांठीपलीकडे ठेवणें—अणदीं खर्च करावयाचा नाहीं अशा रीतीनें जपून ठेवणें; अत्यंत काळजीपूर्वक रक्षण करणें व कधीं बाहेर न काढणें. कंजूष मनुष्य आपलें द्रव्य ठेवतो त्याप्रमाणें.

गांठीस असणें—१ ताब्यांत असणें; जवळ असणें; हुकमी असणें; पदरीं असणें. 'ऐसें गांठीस असतां शस्त्र। तुज भय नाहीं जे।' २ शिलकेंस असणें; संग्रहीं असणें.

गांठीस करणें—सांठविणें; शिलक ठेवणें; जवळ ठेवणें; प्राप्त करून घेणें.

*** गांठ गिरासे मद पिवे, लोग कहे मतवाल।**—गांठचा पडलेला मद्य खातो आणि लोक म्हणतात मोठा माजोरा आहे म्हणून. उलटा न्याय.

गांठ पडली ठकाठका। त्याचें वर्म जाणें तुका॥—दोन सारख्याच लवाड मनुष्यांची गांठ एकत्र पडली म्हणजे ते परस्परांस ओळखून असतात व कोणी कोणास बनविण्याचा प्रयत्न करीत नाहीं. मूळ अभंग असा—वाघें उपदेशिला कोल्हा। सुखें खाऊं द्यावें मला। अंतीं मरसी तें न चुके। मजही मारितोसी भुकें। येरू म्हणे भला भला। निवाड तुझ्या तोंडें झाला। देह तों जाणार। घडेल हा पर उपकार। येरू म्हणे मनीं। ऐसें जावें समजोनी। गांठी पडली ठका ठका। त्याचें वर्म जाणें तुका॥—तुगा ३१७१

खोटा तरी गांठचा, वेडा तरी पोटचा—आपल्या पदरचा पैसा असला म्हणजे तो खोटा असला तरी आपणांस टाकून द्यावासा वाटत नाहीं त्याचप्रमाणें स्वतःचा मुलगा वेडा असला तरी त्याचा त्याग करवत नाहीं. त्यावर आईबाप माया केल्याशिवाय राहात नाहींत. तु०—चिंबचळें शेतचं नि थोटं पागळं पोटचं. खोटा पहा.

गांठचे खर्चून दुसऱ्याचे उचौप—(गो.) घरचें खाऊन दुसऱ्याच्या उठाठेवी करणें.

गांठचें खाऊन शेटची चाकरी करणें—पदरचें खाऊन धन्याची चाकरी करणें; निष्फळ एखाद्या मोठ्या माणसाकरितां राबणें; जो आपले उपकारहि मानणार नाहीं अशाकरितां व्यर्थ श्रम करणें. (गु.) गांठनी खीचडी, ने शेटनी चाकरी.

गांठचें द्यावें पण जामीन न व्हावें—एखाद्या मनुष्यास प्रत्यक्ष पैसे देऊन पाहिजे तर मदत करावी पण त्याच्याकरितां जामिनकी कधींहि पतकरूं नये. (गु.) गांठनुं आपवो पण जामीन ना थता.

जामीन रहा आणि गांठचें वहा—एखाद्याला जामीन राहिलें म्हणजे केव्हां ना केव्हां तरी पदराला खार लागल्याशिवाय राहात नाहीं.

आपण करील तें काम, गांठीं असेल तो दाम--स्वतः होऊन जेवढें आपणांस करतां येईल तितकेंच काम प्रत्यक्ष होण्याची खात्री बाळगावी व जो पैसा रोख जवळ असेल तेवढाच वेळेवर उपयोगी पडतो ही गोष्ट लक्षांत ठेवावी.

गांठीचा एक बाहेरच्या शंभराबरोबर--प्रत्यक्ष जवळ असलेल्या एक पैशाची किंमत दुसऱ्यानें कबूल केलेल्या शंभराच्या बरोबर आहे. स्वतःजवळच्यावर जितकें तुम्हांस अवलंबून राहतां येईल तितकें दुसऱ्यावर कधींहि अवलंबून राहून चालावयाचें नाहीं. कारण दुसऱ्याकडील पैसा कधींहि वेळेवर उपयोगी पडत नाहीं.

गांठो——गांठो शेंडलो, कान मुंडलो--(गो.) कानांतला दागिनाहि गेला आणि भोंकहि बुजलें. कापहि गेले आणि भोकेंहि बुजलीं.

गाठोडें——गांठोडें आटोपणें-गुंडाळणें-बांधणें-१ एखादा व्यापार, धंदा वगैरे आटोपणें; व्यवहार आवरणें; बंद करणें; हळूहळू कमी करीत आणणें. २ जवळ असेल नसेल ते घेऊन पळून जाणें; निघून जाणें; जवळचें सर्व आवरून घेऊन पलायन करणें. ३ मरणें; सर्व व्यापार बंद होणें. गाशा गुंडाळणें पहा.

गांठोडें जमणें-होणें—जवळ कांहीं माया जमणें; थोडा फार पैसा संग्रहीं राहणें; श्रीमान होणें; धनसंचय होणें; लाभ होणें.

गाठोडें बगलेंत मारणें—आवरा आवर करून एखादें गांव सोडून जाणें; चंबू गवाळें आटोपून निघून जाणें. ‘ देशहिताकरितां भानूनें गाठोडें बगलेंत मारून पुण्यांतून पळ काढला.’ –अस्तंभा ३.

गांठोडें सुटणें-सोडणें—(गर्भारशीचें मोठें पोट गाठोड्यासारखें असतें तें सुटणें) बाळंतीण होणें.

गांड——गांड खाजवायला फुरसत नसणें--अगदीं, एकसारखें काम असणें; मुळींच, क्षणभर सुद्धां फुरसत न मिळणें.

गांडगुडघी—शब्दशः गांडीवर गुडघ्याचा मार देणें. पूर्वी मोगलाई वगैरे अमलांत अधिकारी स्वारी शिकारीवर निघाले असतां अंमलदारांची किंवा लष्कराची सरभराई गांवचे पाटील वगैरे अधिकाऱ्यांस करावी लागे. ती नीट झाली नाहीं तर त्यांस नेहमीं अधिकाऱ्यांकडून गांडगुडघी खावी लागे. याकरितां त्यांस समजाविशी म्हणून कांहीं जमीन वतनादाखल दिलेली असे. अशा प्रकारच्या वतनासहि गांडगुडघी हाच शब्द रूढ झाला.

गांड गुडाखू होणें--१ अगदीं घाबरून जाणें; भीतीनें गर्भगाळित होणें; भयंकर धास्ती घेणें; भीतीनें दबून बसणें. २ थंडी, पेटके वगैरेनीं आंखडलें जाणें; हात पाय आंखडणें; चलन वलन बंद होणें.

गांडगुलामी--अतिशय हीन दर्जाचें दास्यत्व; एखादी अगदीं हलकी सुद्धां सेवा करणें. (इं.) Abject slavery.

गांड जड होणें--गर्विष्ठ बनणें; बूड जड होणें; जवळ कांहीं पैसा गांठीस जमला म्हणजे त्याचा अभिमान उत्पन्न होणें, ताठा चढणें.

गांड तोंड हातीं धरणें--ताळतंत्र सोडणें; जनाची लाज भीड सोडणें व स्वैरपणें वागूं लागणें; कोणतेहि लौकिक निर्बंध न पाळतां यथेच्छ वर्तन करणें. बाहेरख्यालीस, खाबूपणास प्रवृत्त होणें, सोकावणें; बदफैलीपणा व लबाडी या दोन्ही गोष्टी करणें.

गांड धुवून कढी करणें--अतिशय कंजूषपणा करणें. (गु.) गांड धोईने कढी करे, ने वधे तेनी वडी करे.

गांड फाटणें--भीतीनें गांगरणें; अतिशय घाबरणें; गर्भगळित होणें; धास्ती खाणें.

गांड फाडणें—हबेलंडी उडविणें; दुर्दशा करणें. ‘तुका म्हणे सांडा देखींचा दिमाख। मोडशीचें दुःख गांड फाडी ॥’–तुगा ३२०७.

गांड मारणें— १ गुदमैथुन करणें; अस्वाभाविक अत्याचार करणें. २ (ल.) शिक्षा करणें; सूड घेणें. ३ शिवी.

गांड वळणें--मागें घेणें; मागें सरणें; नाकबूल करणें; पाठ दाखवून पळून जाणें; निसटून जावयास पाहणें.

गांडीखालचें घोडें—राउताला घोडें हेंच सर्वस्व व धंद्याचें भांडवल. यावरून उपजीविकेचें साधन; ज्यावर सर्व अवलंबून आहे अशी गोष्ट; संसारांतील आधार.

गांडीचें गरगटें होणें—अतिशय हाल होणें; अत्यंत कष्ट सोसावे लागणें.

गांडीचे रुद्राक्ष होणें—कृशता येणें; अगदीं रोड होणें; वाळून हाडें दिसूं लागणें.

गांडीचें सोडून डोक्यास-ला गुंडाळणें--नेसतें वस्त्र सोडून डोक्यास बांधणें; सर्व लाज, अब्रू सोडून स्वैर वर्तन करणें; पूर्णपणें निर्लज्ज बनणें; जगाची मर्यादा सोडणें.

गांडींत मिरची (तिखट) फुंकणें--छळ करण्याचा एक प्रकार. अतिशय छळ करणें; त्रास देणें; जुलूम करणें; अत्याचार करणें.

गांडींत शेपूट घालणें--आपल्यापेक्षां दुसरा जबरदस्त कुत्रा पाहिला म्हणजे कुत्रें आपलें शेपूट खालीं करून दोन्ही तंगड्यांत घालतें; जोंपर्यंत जोर असतो तोंपर्यंत वर ठेवतें पण भ्यालें म्हणजे खालीं करून पळ काढतें. त्यावरून पलायन करणें; माघार घेणें; पळून जाणें; तोंड लपवून निघून जाणें. ‘गाजुदीखानांनीं गांडींत शेपूट घातलें.’–रा ३.३७२. ‘अरे, हे गुलाम कुत्ते गांडींत शेंपटें घालून इकडे चालले बघा !’–पामो २१०.

गांडींत सुंठ फुंकणें; गांडींत काड्या घालणें—१ एखाद्यास उत्तेजन देणें; फूस देणें; चिथविणें; बळेंच एखादी गोष्ट करावयास उद्युक्त करणें. २ शिक्षा करणें; फजिती करणें; पराजय करून अपमान करणें. ३ त्रास देणें; छळ करणें.

गांडींतली रेघ उमटणें—अधोरेखा उमटणें. (फल ज्योतिष) हातावरील धनरेषा बलवान नसतां भाग्योदय झाल्यास दुसरी कोठली तरी रेषा कारण असेल असें समजतात. अकस्मात् दैव उघडणे; अचानकपणें संपत्ति प्राप्त होणें.

गांडीर भिकण बांधप—(गो.) पुन्हां पुन्हां परसाकडे होणें; वरचेवर शौचास जावें लागणें.

गांडीला घाम नसणें--१ श्रम, थकवा इ. न वाटणें. २ न घाबरणें.

गांडीवर घाव घेणें--शत्रूंस पाठ दाखविली असतां, पळून जातांना शत्रू पाठीमागून घाव मारतो तो पाठीमागें बसतो. यावरून पराजय कबूल करणें; पाठ दाखविणें; मागें घेणें; पाय काढणें; कामकाजांत फजित होणें.

गांडीवर रेघ ओढणें--१ डाग देणें; शिक्षा लावणें; आठवण राहील असें शासन करणें. २ मागें घेणें; भागूबाई प्रमाणें कचरणें. गांड वळणें पहा.

गांडीस हात पोंचणें—(स्वतःचे कुले स्वतःस धुतां येण्यासारखी स्थिति होणें.) कृतार्थ झाल्याची स्थिति. या वेळीं कोणाची गरज लागत नाहीं असा ध्वन्यर्थ. स्वतः समर्थ होणें; स्वैरपणें वागण्यास मोकळे होणें.

गांडेपाइकी--गांडूपणा; भ्याडपणा; भित्रेपणा.–रा २०.४१९.

***गांड देई अरती, थान देई परती**--(अशिष्ट) अगदीं बेहद्द व्यभिचारी स्त्रीबद्दल म्हणतात.

गांड धुवायाला गेला, तेथें अंड हातीं लागला-आला--दुसऱ्याची खुशामत करावयास गेलें म्हणजे त्यांत अपमान होतो. क्षुद्र सेवेचें हीन फल.

गांड नसती तर पीर झालों असतों—देवादिकांना मलमूत्राची उपाधी नसते अशी कल्पना सर्व धर्मांतून आहे. एखादा दोष नसता तर अतिशय महत्त्व प्राप्त झालें असतें. आपल्या उत्कर्षांच्या मार्गांत एखादी अडचण आहे असें दाखविणें पण वास्तविक स्वाभाविकच गुणच कमी असणें; खरी लायकी नसणें म्हणून उगीचच एखादें निमित्त पुढें करणें.

गांड पळौन म्हाणायो, तोंड पळौन पोळयो--(गो.) ढुंगण पाहून बसावयास पाट देतात पण तोंड पाहून, योग्यता पाहून पोळया वाढतात. तु०–ढुंगण पाहून आसन आणि तोंड पाहून जेवण.

गांड पाहून पाट, तोंड पाहून टिळा-टिका—जितकी बैठक असेल त्या मानानें पाट व कपाळास शोभेसा टिळा लावणें. म्हणजे जितकी योग्यता असेल तितकाच मान देणें.

गांड फाटे पण कपडा-धबला न फाटे—एखादें वस्त्र अतिशय मजबूत असतें. कितीहि वापरलें तरी फाटत नाहीं अशाबद्दल म्हणतात. किंवा एखादा मनुष्य शरीरापेक्षांहि कपड्याला जास्त जपतो अशाबद्दलहि म्हणतात.

गांड भरे आणि देवपूजा वाढे--१ एकीकडे पापें करीत राहावयाचें व त्यांचें क्षालन व्हावें म्हणून अधिकाधिक देवाची भक्ति करावयाची. किंवा २ पोट यथास्थित भरलेलें असलें म्हणजे मग खूप वेळ देवपूजा करण्यास हरकत नाहीं. तेंच पोट रिकामें असलें म्हणजे मग पूजा झटपट उरकण्याकडे लक्ष असतें.

गांड वऱ्हाडाला गेली--[वऱ्हाड = वर हाड.] शौचास वारंवार गेल्यानें अशक्तता येते, त्याला अनुलक्षून म्हणतात.

गांडीक ना गांडपोतें, नी कौतुकान व्हाकोल हाडली खातली कितें ?—(गो) स्वतःच्या ढुंगणाला गुंडाळावयास वस्त्र नाहीं; तर कौतुकानें नवरी आणली ती खाणार काय ? दरिद्र्यानें आपलें कौतुक करून भागत नाहीं.

गांडीक ना फाळी, गांड मागतां कायलोळी--(गो.) ढुंगणाला चिंधी देखील नाहीं, पण कायलोळी (धिरडें) खाण्याची इच्छा.

गांडीक पडलो घाव, वैज जालो माव--(गो.) ढुंगणाला गळू व सासरा वैद्य ! तु०–अवघड जागीं दुखणें व जांवई वैद्य.

गांडीखालीं आरी आणि चांभार पोर मारी—स्वतः-

च्या बैठकीखालींच आपलें हत्यार असून तें न सांपडल्या-मुळें पोरानें नेलें असें समजून त्यास चांभार बडवितो; त्या-वेळीं आपला मूर्खपणा त्यास कळत नाहीं. जवळ असून शोधणें. तु०–काखेंत कळसा गांवाला वळसा. मांडीखालीं आरी० असाहि पाठ आहे.

गांडीचा घाव, न दाखविता न मिरविता—एखादें कृत्य करीत असतां तें फसून पाठीमागें गुह्य जागीं जखम झाली असतां ती दाखवितांहि येत नाहीं; निमूटपणें तिचें दुःख सहन करावें लागतें. त्याप्रमाणें एखादें बरें वाईट कृत्य आचरतांना एखादें उघडपणें न सांगतां येण्यासारखें दुःख झालें असतां तें कोणाजवळ बोलून हलकें करतां येत नाहीं किंवा एखादा उघड उपायहि करतां येत नाहीं; निमूटपणें भोगावें लागतें. किंवा एखाद्या आपल्या प्रिय माणसानेंच आपणास त्रास दिला असतां, त्याबद्दल उघडपणें तक्रारहि करतां येत नाहीं; व प्रतिकारहि करतां येत नाहीं आणि न बोलतां सोसावें लागतें. कारण त्यांत आपलीच बेअब्रू होण्याचा संभव असतो.

गांडीचें गोखलें वासून दाखवितां येत नाहीं—[गोखला-लें=झरोका, भोंक.] घरांतील गुप्त गोष्ट फोडून सांगतां येत नाहीं. आपलें गुह्य विशेषतः लोकांत वाईट दिसणारें उघड करतां येत नाहीं. तु०-अवघड जागीं दुखणें आणि जांवई वैद्य. गांडीवरचा घाव दाखवितां नये.

गां.ींत घर करून पादाक अळशीकचे न्हंय—(गो.) गांडींत वस्ती केल्यावर पादाची घाण कां ! ती सोसलीच पाहिजे. जाणूनबुजून वाईट मार्ग स्वीकारल्यावर त्यांतील हालअपेष्टेबद्दल तक्रार करतां येत नाहीं.

गांडींत नाहीं गू, कावळ्याला करी कू कू (कावळ्याला आमंत्रण)—स्वतःजवळ कांहीं नसतां उगाच गोतावळा जमविणें; विनाकारण आपल्यामध्यें सामर्थ्य नसतां, एखादें लचांड लावून घेणें; कुवत नसतां एखादी जबाबदारी पतकरणें.

गांडींत बोट घालूं नये, घातलें तर हुंगूं नये, हुंगलें तर सांगूं नये, सांगितलें तर तेथें राहूं नये--प्रथम एखादी वाईट गोष्ट करूं नये पण एकदां एक वाईट गोष्ट केली म्हणजे मग तिचे होणारे एका पाठीमागून एक सर्व परिणाम टाळण्याचा प्रयत्न करावा; यांत शहाणपणा आहे. जास्त जास्त मूर्खपणा करीत जाऊं नये.

गांडीला नाहीं लंगोटी, गांवांत प्रतिष्ठा मोठी--जवळ कांहीं एक नसतां विनाकारण फुकटची लब्धप्रतिष्ठा गांवांत मिरवणें; पोकळ बढाई मारणें; दिखाऊ मोठेपणा दाखविणें.

गांडीला पाझर, तोंडाला गुडदी--१गुप्त ठिकाणच्या दुःखाबद्दल, काहीं गोष्टींबद्दल उघड बोलतां येत नाहीं. २ हागवण, अतिसार इत्यादि झाला असतां खाण्याचें बंद केलें पाहिजे. ३ एका ठिकाणीं रोग असतां भलत्याच ठिकाणीं उपाय करणें; रोग एक आणि औषध भलतेंच. योग्य ती तरतूद न करतां भलतेंच कांहींतरी करणें.

गांडीवर पाणी घाल, तर म्हणे खालीं काय लोंबतें ?–नसत्या चवकशा करणें; ज्याच्याशीं आपला संबंध नाहीं त्या गोष्टींत विनाकारण लक्ष घालणें. मनुष्याचा अप्रयोजकपणा.

गांडीवरचा घाव झांकतां नये आणि दाखवितां नये--मागें पहा.

गांडीस नाहीं खेंडा, पण दिमाखाचा झेंडा--[खेंडा=जाडेंभरडें वस्त्र. झेंडा=निशाण] नेसावयास जाडें-भरडेंहि वस्त्र नसतांना रिकामी ऐट मारावयाची; पोकळ दिमाख; वरवरची दिखाऊ प्रतिष्ठा मिरवणें.

गाडगें——गाडगें धुवून कढी करणार—[गांड या अशिष्ट शब्दाबद्दल गाडगें शब्द वापरला आहे] गांड धुवून कढी करणें, पहा. ताकाचें गाडगें ताक खपल्यावर धुवून तें पाणी टाकून न देतां त्याची कढी करणें; म्हणजे चिक्कू-पणाची कमाल करणें.

गाडग्याशीं गाडगें भांडतें--एका घरांत माणसें राहात असलीं म्हणजे त्यांची केव्हां तरी बोलाचाली व्हावयाचीच; ती मनावर घेतां कामा नये. तु०–मडक्यास मडकें किंवा भांड्यास भांडें लागावयाचेंच.

ताकास जाउन मग गाडगें लपवूं नये—एखाद्या कामाकरितां गेल्यास तें आपलें काम उघड करून स्पष्टपणें बोलावयास भिऊं नये. काम करतांना विनाकारण लाज बाळगूं नये. आपणास मदत पाहिजे असेल तर आपली परि-स्थिति सर्व उघडपणें पुढें मांडावी.

गाडणें——गाडून उभे राहणें--न भितां एका जागीं ठाम स्थिर राहणें; कांहीं झालें तरी जागा न सोडणें; पक्के पाय रोवून ठेवणें; ठिकाणा न सोडणें. 'अपेश मरणाहून वोखटें. यांत मरतांच उत्तम, म्हणून गाडून उभे राहिले.'–भाव ६४.

गाडा——संसाराचा गाडा--आयुष्यांतील व्याद; खटाटोप; संसाराचा पसारा; एकदर प्रपंचांतील पसारा; सर्व घडामोडी.

गाडा खुंटणें--अडणें; थांबणें; चालू काम बंद पडणें; खेंड पडणें. (गु.) गाडु अटकी पडवुं.

गाडाभर अब्रू वाहणें—बेअब्रू होणें; मुळींच पत नसणें; कोणीहि किंमत ठेवीत नाहीं अशी स्थिति. अब्रू अजीबात नसणें; अब्रू नाहींशी होणें.

चालत्या गाड्याला खीळ घालणें--गाडा चांगला चालता असतांना जर त्याच्या चाकांत खीळ ठोकली, तर गाडा बंद पडेल. यावरून चालू काम बंद पाडणें. कदाचित् चालत्या गाड्याची खीळ काढणें असाहि पूर्वी पाठ असेल. गाड्याच्या आंसास दोन्ही बाजूंस चाकांच्या बाहेरच्या अंगास खिळी असतात. गाडा चालत असतांना जर त्यांतील एखादी खीळ काढली तर चाक बाहेर निघून येईल व गाडा बंद पडेल, म्हणजे आपलें जाणें पुढें होणार नाहीं व काम बंद पडेल. त्याचप्रमाणें चालत्या गाड्यास खीळ ठोकून चाक फिरण्याचें बंद केलें तरीहि गाडा थांबून काम अडेल.

गाड्याला जुंपलेला—नेहमीं कामांत गुंतलेला; ज्याप्रमाणें एखादा बैल गाड्याला जुंपला म्हणजे त्यास सारखें चालत असावें लागतें, त्यास कोणी स्वस्थ बसूं देत नाहीं, थांबल्यास मार मिळतो; त्याप्रमाणें ज्या मनुष्यास एका क्षणाचीहि विश्रांति न घेतां काम करावें लागतें अशा मनुष्यास म्हणतात.

❀**गाड्यावर नाव, नावेवर गाडा**–नाव तयार केल्यावर ती नदीपर्यंत गाड्यावर घालून न्यावी लागते. पुढें नदीला पाणी आल्यावर त्याच नावेवर गाडा घालून पली कडे नेण्याचाहि प्रसंग येतो. यावरून १ कामाची आंलटापालट; चक्रनेमिक्रम; उलटापालटीचे योग. २ दैवाची उलटापालट; कधीं चांगले दिवस येतात तर कधीं वाईट दिवस येतात.

चालला तर गाडा, नाहींतर खोडा—पायांनीं चालावयाच्या ऐवजीं आपण गाडींत बसून जाऊं लागलों असतां तो नीटपणें चालत असेल तर ठीक, नाहींतर एकदां का त्यांत कांहीं बिघाड होऊन तो चालेनासा झाला, तर आपणास तो आणखीच अडचणींत पाडतो. कारण गाडा नीट झाल्याखेरीज तो आपणास तसाच टाकून जातां येत नाहीं. तेव्हां आपलें काम बाजूस ठेवून आधीं त्याची दुरुस्ती करण्याकडे लक्ष्य द्यावें लागतें व त्यामुळें आपल्या कामाचा खोळंबा होतो. विशेषतः हल्लींच्या मोटारींच्या बाबतींत हा अनुभव नित्याचाच आहे. एखाद्यावेळीं भलत्याच ठिकाणीं खोळंबा होऊन थांबण्याची वेळ येते. कोणतीहि गोष्ट सुरळीतपणें चालली आहे तों ठीक असते, नाहींतर तिच्यापासून मदत मिळण्याऐवजीं उलट अडथळा मात्र उत्पन्न होतो.

गाड्याबरोबर नळ्याची-नळकांड्याची यात्रा--गाडा जेथें जाईल तेथें चाकाला तेल, वंगण देण्याचा नळा बरोबर असणारच. त्याला सहजीं यात्रा घडते. यावरून मोठ्याबरोबर लहानालाहि अनायासें फायदा मिळतो. दोन अगदीं संबद्ध वस्तूंची स्थिति एकसारखीच होते. " अल्स्टर प्रांत इंग्लंडचा हस्तक आहे आणि बाकीचा आयर प्रांत हा जवळ जवळ स्वतंत्र आहे. अर्थातच 'गाड्याबरोबर नळ्याची यात्रा,' ह्या म्हणीप्रमाणें इंग्लंडबरोबर अल्स्टर प्रांत जर्मनी विरुद्ध युद्धांत सामील झाला आहे. "—केसरी १६-७-४०.

भरल्या गाड्यास सूप जड नाहीं—गाडा भरून जर त्यावर ओझें लादलेलें असेल, तर आणखी एक सूप ठेवलें तर त्या ओझ्यांत कांहीं विशेष वाढ होत नाहीं. एखादें मोठें काम चाललें असतां त्यांतच एखादें लहानसें काम सहज उरकून घेतां येतें; त्यामुळें कांहीं मोठ्या कामांत फारसा अडथळा येत नाहीं.

गांडा——गांडी गुजरात आगे (आगुसे) लात, और पीछे (पीछुसे) बात—(गु.) [गांडी = वेडी; अडाणी] गुजराथी लोक अडाणी किंवा बेरड असतात; त्यांस धाक दाखविल्याशिवाय ते तुमचें कांहींएक ऐकत नाहींत. [ही म्हण फार जुनी असून या म्हणीचें भाषांतर इ. स. १८०८ मधील डॉ. ड्रमंडच्या पुस्तकांत (ग्रॅमॅटिकल पार्ट्स ऑफ गुजराती, मराठी अँड इंग्लिश लँग्वेजेस) पुढीलप्रमाणें आहे–' The Guzerattees are scoundrels, and should be kicked before they are begged. ' तु०—For a mischievous dog a heavy clog.

गाडी——गाडी घालणें--(व.) उंसाच्या बुंध्यावर मातीची भर घालणें.

गाडी सुटणें—ज्याप्रमाणें एकदां गाडी भरधांव चालूं लागली म्हणजे ती थांबत नाहीं, त्याप्रमाणें सपाट्यानें न चुकतां व न थांबतां पाठ म्हणत जाणें; न अडखळतां एखादें काम करीत जाणें; न थांबतां सारखें चालू ठेवणें.

गाडीचें चाक—हें उलट सुलट फिरवितां येतें. यावरून दोन दगडींवर हात ठेवणारा; उलट सुलट दोन्ही बाजूंनीं बोलणारा; कसेंहि केलें तरी दोष काढण्याच्या दृष्टीनें उलट सुलट बोलणारा.

गाडीला वंगण घालणें--गाडीला वंगण घातलें असतां चाकें सुलभपणें फिरूं लागतात व बैलांस ओढावयास सुलभ जातें, चाकांची कुरकुर बंद होते. त्याप्रमाणें एखादें काम हलकें करणें, सुलभ करणें.

❀ **गाडीची वाट फासडीनें (फैंसाटीनें) मोडावी**—[फासडें=एक शेतकी हत्यार (ढेंकळे फोडण्याचें). फैंसाटी = कुळव, दांताळें (कांट्यांचें); कांटेरी झाडाची फांदी; कांटीचा फांस] शेतांतून गाडीची वाट पडली असेल तर ती एखादें शेतकी आऊतच घेऊन बुजवून टाकावी. किंवा तीवर कांट्यांची फांसाटी फिरविली असतां चाकोरी मोडते. जवळ किंवा हातांत असेल त्या साधनानेंच एखादी गोष्ट करावी.

गांडू——मन पातशाही, दैव गांडू—एखाद्याचें मन मोठें व उदार असून काय उपयोग? त्याला दैव तर अनुकूल पाहिजे. तो जर हतभागी असेल तर त्याच्या गुणाचा कांहीं कदर नसतो.

गाडें——गाडें पुढें ढकलणें--आपलाच उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न करणें; आपलेंच म्हणणें पुढें मांडणें; आपला मतलब, स्वार्थ प्रथम साधण्याची खटपट करणें. 'जो तो आपलें गाडें पुढें ढकलतो.'-विक्षिप्त ३.३८.

गाडें रस्त्याला लागणें—आडमार्गावरून नीट मार्गावर येणें. नीट, सुरळीत मार्गाला लागणें; ताळ्यावर येणें; सुधारणा होणें. 'जरा धीरानं घ्या म्हणजे आपोआपच गाडं रस्त्याला लागेल.'-एकचप्याला ४.३.

गाडेकरी——गाडेकरी बसला गाड्यावर व बायको दिली भाड्यावर—जो मनुष्य गाडी भाड्याचा धंदा करतो त्याला भाड्याकरितां नेहमीं घराबाहेर दिवसां किंवा रात्रींहि राहावें लागतें. त्यामुळें पाठीमागें त्यास आपल्या स्त्रीकडे लक्ष्य देण्यास सवड नसते; तेव्हां ती व्यभिचारी निघण्याचा संभव असतो.

गाड्या——गाड्याची वाट आणि गाडल्याची वाट एकच—[गाड्या = पुरणारा] पुरणाराची स्थिति मोठी चांगली असते किंवा होते असें नाहीं. तो म्हणजे जणूं पुरलेल्या सारखाच असतो. तेव्हां पुरणारा आणि पुरलेला दोघेहि सारखेच. पुरणारास पुढें पुरलें जाण्याची पाळी यावयाची असतेच. सर्व मनुष्य प्राण्यांस शेवटीं एकाच वाटेनें जावयाचें आहे. तु०-जात्यांतले रडतात, सुपांतले हंसतात.

गाढव——गाढवाचा खरारा—निर्बुद्ध; मूर्ख; टोणपा; अगदीं मद्दड, दगड मनुष्य.

गाढवाचा गौरव—अनाधिकारी मनुष्यास महत्त्व देणें; अपात्रीं सत्कार करणें.

गाढवाचा घोडा बनविणें—कांहीं केलें तरी गाढवाचें घोडें बनणें शक्य नाहीं. यावरून अशक्य गोष्ट घडवूं पाहाणें. ' रासभ धुतला महा तीर्थामाजीं । नव्हे जैसा तेजी श्यामकर्ण । '-तुगा ३१११. ' जाली गाढवी दुधाळ । महिमा गाईची पावला।'-तुगा ४४०८. याला तुकारामानेंच एक अपवाद केला आहे. तो म्हणजे संत सज्जन आहेत, ते काय वाटेल तें करूं शकतात, असें मत व्यक्त करण्यांत झाला आहे. ' गाढवाचें घोडें । आम्ही करूं दृष्टीपुढें ॥ चघळी वाहाणा । माघारिया बांडासुणा ॥ सोंग संपादणी । तरी करूं शुद्धवाणी ॥ तुका म्हणे खळ । करूं समयीं निर्मळ ॥ -तुगा २०१७. येथें आम्ही दुष्टांसहि सुष्ट करूं, वाईटास चांगलें करूं असें सांगितलें आहे तें लक्षणेनें घ्यावयाचें आहे.

गाढवाचा नांगर फिरविणें—जुना शिक्षेचा प्रकार. जिंकलेल्या गांवावरून किंवा गुन्हेगाराच्या घरावरून तें पाडून गाढवाचा नांगर प्रत्यक्ष फिरवून जागा ओसाड करून टाकीत. यावरून गांव, घरदार जमीनदोस्त करणें; एखाद्याचा मागमूस नाहींसा करणें; एखाद्याची अप्रतिष्ठा करून सूड घेणें; अगदीं उध्वस्त करून टाकणें. ' पांढरीवर गाढवाचा नागर फिरविला. ' -भाइ, शके १८३५ पृ. ३८२.

गाढवाच्या लेका—एक अपशब्द, शिवी.

गाढवावरची गोमाशी—गाढवावर बसलेली गोमाशी जिकडे गाढव जाईल तिकडे त्याबरोबर जाते. नीचाचा आश्रय केल्यास त्याच्याबरोबर नीचपणा येतो.

गाढवी दगड-धोंडा—ओबड धोबड दगड; ज्यास कोणताहि नीटसा आकार नाहीं असा धोंडा; अनघड दगड.

❀ **ज्याचें त्याला, गाढव ओझ्याला**—ज्याचें काम त्याच्याकडून करुन घ्यावें. प्रत्येकाला त्याच्या योग्यतेनुरूप काम मिळतें. गाढवाच्या वांट्यास ओझें वाहण्याचेंच काम यावयाचें.

गाढव ओतार्‍याचें आणि बाईल म्हातार्‍याची—ओतारी नेहमीं आपल्या भट्टीवर बसलेला असतो त्यामुळें त्याचें गाढव मोकाट फिरत असतें. त्याचा त्याला फारसा उपयोग होत नाहीं व वृद्ध मनुष्याच्या धाकांत त्याची बायको राहात नाहीं. तीहि बहुधा स्वैर वर्तनाची बनते. किंवा या दोघांकडे दुर्लक्ष होते व तीं सुखी नसतात.

गाढव गंगेसी न्हाणिलें । जाऊनि उकरड्यावरि

लोळे ॥–तुगा ३१४९. गाढवाला कितीहि स्वच्छ केलें तथापि पुन्हां तो उकिरड्यावर लोळून घाणेरडा व्हावयाचा. तसें मनाची शुद्धता किंवा उपरति झाली नाहीं तर माणसानें कितीहि बाह्योपचार केले किंवा प्रायश्चित्तें घेतलीं तरी त्याचें वर्तन पूर्ववत् होणारच. तु०–हत्तीतें धुतलें–इ० श्लोक.

गाढव गूळ हगतें तर डोंबारी–लोणारी–कुंभार कां भीक मागते; गाढवीण गूळ हागती तर डोंबारीण कां भीक मागती; गाढवी गूळ हगतात मग कुणबी भीक कां मागतात—या जातींजवळ गाढवें असतात तेव्हां त्यांना सहज घरबसल्या लाभ होता. विनायासें जर द्रव्य मिळतें तर लोक श्रम कशाला करतील. (गो.) गाढवां जर गूळ हागतीत, तर भोरपीं कित्या भीक मागतीत ?

गाढव जसा मुगुटधारी, तसा राजा निरक्षरी—एखादा राजा जर अशिक्षित असेल तर त्याच्या डोक्यावर मुकुट असला काय किंवा गाढवाच्या डोक्यावर असला काय, सारखाच.

गाढव ना ब्रह्मचारी—अगदीं अज्ञ, निर्विकार नाहीं कीं साधूहि नाहीं;अर्धवट.'गाढवहि गेलें आणि ब्रह्मचर्यहि गेलें'पहा.

गाढव भार वाहतो, सिंह हिंसा करतो—सिंह जरी मोठा प्राणी तरी त्या हिंस्त्रपशूपेक्षां ओझ्याचा गाढव फार बरा.–सवि ३८७.

गाढव माजला कीं तो अखेर आपलेंच मूत पितो—गाढवाप्रमाणें अज्ञ प्राणी फार मोठा मदोन्मत्त झाल्यास स्वत:च्या हातानेंच विटंबना करून घेत असतो. दुसऱ्यानें त्याची फजीती करावीच लागत नाहीं.–विविधवृत्त ११-५ –४१. पान ६.

गाढव मारतो लाथा, बैल मारतो शिंग—ज्याजवळ जें शस्त्र असेल त्याचा तो स्वरंक्षणार्थ उपयोग करतो.

गाढव म्हणे माझी हरळी मऊ—गाढव हरळीवर लोळतें; त्याला गादी वगैरेच्या मऊपणाची काय कल्पना ! तें आपलें हरळीच्या मऊपणावरच खूष असतें. प्रत्येक मनुष्य आपल्या बुद्धीच्या आवांक्याप्रमाणें आपल्या ऐश्वर्य वगैरेची कल्पना करतो.

गाढव लाथ झाडी तर काठीनें झोडी, पायानें मारशील तर दुसरी लाथ झाडील—वर बसलें असतां गाढव जर लाथ मारूं लागलें तर त्यास चांगलें छीमटीनें झोडलें पाहिजे. सहज पायानें डंवचलें तर तें न ऐकतां आणखी लाथा झाडूं लागेल. ज्याला समज द्यावयाची किंवा शिक्षा लावावयाची त्याला त्याच्या मगदुराप्रमाणें ती लाविली पाहिजे. त्यांत कमी जास्ती केल्यास उलट आपणासच त्रास होतो. तु०–लकडीशिवाय मकडी वळत नाहीं. शहाण्यास मार शब्दाचा मूर्खास टोणप्याचा.गाढवास टोणपा, तेजीस इषारा.

गाढव स्वारीस गेलें, घोडा होऊन नाहीं आलें—गाढवाला कांहीं केलें तरी त्याचा घोडा होऊं शकत नाहीं. कोणी आपला देहस्वभाव व नैसर्गिक गुण टाकून देऊं शकत नाहीं. –सवि १७५२. गद्धा पहा.

गाढवहि गेलें आणि ब्रह्मचर्यहि गेलें—भलतीच गोष्ट करूं गेलें असतां धड स्वार्थ ना परमार्थ अशी स्थिति होऊन फजिती मात्र पदरांत पडते. पुढील अभंग पहा—एक ब्रह्मचारी गाढवा झोंबतां । हाणोनिया लाता पळालें तें ॥ गाढवहि गेलें ब्रह्मचर्य गेलें । तोंड काळें झालें जगामाजी ॥ हें ना तैसें झालें हें ना तैसें झालें । तुका म्हणे गेलें वायाचि तें ॥ –तुगा२९८५.

गाडवाक वगाति केल्यारि घोडो जायिद वे ?—(गो.) गाढवाला खरारा केला म्हणून तो घोडा होईल का !

गाढवांचा गोंधळ व लाथांचा सुकाळ—गाढवें एकत्र जमलीं म्हणजे एकमेकांस लाथा देतात. त्यांच्या जमण्यापासून चांगली गोष्ट कांहीं होत नसते. यावरून मूर्ख, क्षुद्र माणसांकडून चांगलीं कामें कधींहि होत नाहींत. ते परस्परांना व दुसऱ्यांना शिवीगाळच करणार व नांवें ठेवणार. (गु.) गधेडांनो विवाह, ते पाटुऐ रलीआत.

गाढवाचें ओरडणें आणि उंटाचें अंग लाजिरवाणें—उंटाचें रूप जसें पाहण्यास ओंगळ वाटतें तसाच गाढवाचा शब्द ऐकण्यास कर्कश. लागतो. दोन्हीहि सारखीच त्रासदायक.

गाढवाचे केले सोहळे आणि गाढव उकिरड्यावर लोळे—गाढवाला कितीहि सोपस्कार केले तरी त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. पुन्हां त्याला उकिरड्यावर लोळल्याशिवाय चैन पडत नाहीं ! कोणीहि आपला नैसर्गिक स्वभाव टाकून देऊं शकत नाहीं. तु०–हस्तीतें धुतलें०

गाढवाचे गोणीस खंडीचें भोलें; गाढवाच्या गोणीस खंडीभर तूट—[भोलें=नजरचूक; हिशेबांत तूट.] गाढवाच्या भर ओझ्यांत तूट आली तर किती येईल ! खंडीभर

खास येणार नाहीं. गोणीच मुळीं तेवढी नसते. बेसुमार नास, लबाडी झाली असतां म्हणतात. तु०-खंडीच्या ओझ्यास०

गाढवाचें नांव गोपाळशेट—भलत्यालाच भलतें नांव देणें. एखाद्यास उणेपणा द्यावयाचा असला म्हणजे त्याचें नांव एखाद्या हीन प्राण्यास किंवा वस्तूस देणें. किंवा एखाद्या क्षुद्र प्राण्यास कितीहि महत्त्व दिलें तरी त्याची क्षुद्रता कमी होत नाहीं व योग्यता वाढत नाहीं.

गाढवाचें मैथुन, गांव गरजल्यावांचून कोठून ?–(अशिष्ट) गाढवाला मैथुनासारखी गुप्तपणें करावयाची गोष्टहि मोठा गाजावाजा केल्यावांचून करतां येत नाहीं. नाजूक गोष्टींतहि मोठा बभ्रा करणें.

गाढवाच्या पाठीवर साखरेची गोणी—गाढवाच्या बद्दल बैल शब्द सामान्यतः येतो. 'साकरेची गोणी बैला-चिये पाठीं । तयासी शेवटीं करबाडें ।'–तुगा ३०१८. गाढ-वाला पाठीवर असलेल्या साखरेचा कांहींहि उपयोग नाहीं. त्या साखरेचा उपयोग करणारा दुसराच व त्याला स्वतः-शेवटीं कडबाच खावा लागतो. आपल्या जवळच्या चांगल्या गोष्टीचा आपल्याला उपयोग न होणें; आपण नुसते भार-वाहक किंवा रक्षक असणें.

गाढवाच्या लेंड्यांचे जर पापड बनते, तर उडीद कशाला होते—भिकार गोष्टीपासून जर चांगल्या वस्तु निर्माण होऊं शकल्या असत्या तर चांगल्या वस्तूंचें महत्त्व राहिलें नसतें. योग्य ठिकाणीं योग्यच वस्तूचा उपयोग होतो व म्हणूनच तिचें महत्त्व राहतें. हलकट लोकांकडून जर मह-त्वाचीं कामें होऊं शकतीं तर थोर लोकांस कोणी मान दिला नसता.

गाढवाच्या शेपटाशीं खेळ कां, अन् दांत पडले म्हणून ओरडा कां ?—(वांय.) नसता उपद्व्याप करून नुकसान कां करून घ्यावें ?

गाढवानें (शेत) खाल्लें पाप ना पुण्य—गाढवाला शेत किंवा कांहीं खाऊं दिल्यानें पाप लागत नसलें तरी पुण्यहि लागत नाहीं. त्याचें फळ कांहींच नाहीं. यावरून एखाद्यावर उपकार केल्यानें आपल्याला कांहीं फायदा नसतो अशावेळीं योजतात.–गांगा १८९. (गु.) गद्धेने खाया खेत, नहि पुण के पाप.

गाढवानें धूल उठविली, घोड्यानें किंकाळी फोडली–भलत्याच मनुष्यानें सांगितलेलें ऐकून एखाद्या गोष्टीस प्रवृत्त होणें. भलत्यावर विश्वास ठेवून एखाद्या गोष्टीस हात घालणें मग त्यांतून कांहीं निष्पन्न न होतां व्यर्थ श्रम होणें.

गाढवापरी व्हावें, तर बोलतील तें ऐकावें—जर गाढवासारखें निर्बुद्ध वागलें तर सगळ्यांनीं दिलेला दोष पत्करावयाची पाळी येते व सर्वांचीं बोलणीं खावीं लागतात. तीं नको असतील तर चांगलें वागलें पाहिजे.–सवि १५०४.

गाढवापुढें वाचली गीता, कालचा-रात्रीचा गोंधळ बरा होता; गाढवापुढें वाचली इसापनीति, तें म्हणतें मला पाय किती ?––मूर्ख अडाणी माणसाला उत्कृष्ट उप-देश केला तरी त्याच्यावर कांहीं परिणाम होत नाहीं. गाढव या ऐवजीं 'गांवढा' हा पाठभेद घेतला तर अर्थ चांगला लागतो. गांवढ्या माणसाला गीतेपेक्षां तमाशा, गोंधळच जास्त आवडणार.

गाढवाला केला शृंगार, तरी तो मातींत लोळणार–मागें पहा.

गाढवाला दिला मान, फिरे रानोमाळ––गाढवाचा कितीहि सन्मान केला तरी त्याला काय उपयोग. तो उलटा त्या गोष्टीनें फुगून जाऊन त्याची रानोमाळ हिंडण्याची क्रिया अधिक जोरानें चालूं होते.

गाढवाला शृंगारलें, सगळ्या गांवभर झालें—गाढ-वाला शृंगार केला तर तें गांवभर भटकून आल्याशिवाय राहात नाहीं व याप्रमाणें आपल्या मूर्खपणाची सर्व गांवभर ख्याति झाल्याशिवाय राहात नाहीं. कोणतीहि गोष्ट योग्या-योग्यता पाहून केल्यास त्यापासून आपलीच अप्रतिष्ठा होण्याचा संभव असतो.

गाढवाला ज्ञान नाहीं व कोयत्याला म्यान नाहीं—गाढवाला ज्याप्रमाणें कांहीं समजत नसल्यामुळें तें गांवभर भटकतें, वाटेल तें करतें; त्याप्रमाणें कोयत्याला म्यान नस-ल्यामुळें तो वाटेल त्यावर घातला जातो. मनुष्याला कोण-ताहि निर्बंध नसला म्हणजे त्याच्या वर्तनाला आळा बसत नाहीं व तो स्वैरपणें वागून आपली किंमत कमी करून घेतो. शस्त्राला आवरण जसें म्यान तसें प्राण्याला ज्ञान असलें पाहिजे, म्हणजे त्यापासून त्रास पोहोंचत नाहीं.

गाढवावर साटणीचें जीन—चांगल्या वस्तूचा अयोग्य ठिकाणीं उपयोग. साटणीचें जीन मोठ्या सरदार लोकांच्या तेजदार घोड्यावर घातलेलें असे.

गाढवास गुळाची चव काय ?—गाढवाला गुळाची गोडी त्याच्या तृणखाद्याहून विशेष अशी नसणार. त्याला गवत व गूळ सारखेच. अतज्ञ, मूर्ख, गाजरपारखी माण-साच्या हातीं चांगल्या, सुंदर गोष्टी देण्यानें त्याचें मुळींच चीज होत नाहीं. –V. S. २. ९२. "पण, 'गाढवास

गुळाची चव काय ?' ह्याप्रमाणेंच स्थिति होऊन त्याला फुकट शीणावांचून कांहीं एक लभ्यांश होत नसे. ''–छच १२९. (गु.) गद्धा क्या जाणे जाफरानकी बात ?

गाढवास टोणपा, तेजीस इशारा—गाढवाला समजूत द्यावयाची असल्यास चांगलें काठीनें बडवावें लागतें; पण घोड्यास नुसती खूण करतांच तें समजतें. याप्रमाणें अडाणी मनुष्यास शिक्षा करून समजवावें लागतें व शाहण्या माणसास नुसती ताकीद दिली तरी पुरतें किंवा सूचनेनें काम भागतें. तु०–तेजा इशारती।तट्टा फोकावरी घेती।–तुगा३७४८.

गाढवास दिला मान, गाढवानें केले उंच कान; गाढवाला दिला मान, गाढव करतें वरती कान—मूर्खांचा थोडासा आदर केला असतां तो लागलीच अभिमानानें फुगतो.

गाढवास हाडें, कुत्र्यास वाढें—भलत्याच गोष्टीचा भलत्याच ठिकाणीं उपयोग; अगदीं सर्वस्वीं चुकीची व उलटी योजना. गाढवाला हाडांचा कांहीं उपयोग नाहीं व कुत्र्यास वाढें घालून उपयोग नाहीं. तींच उलट गाढवास वाढें व कुत्र्यास हाडें घातलीं तर दोहोंचाहि योग्य उपयोग होईल.

गाढवी——गाढवी गंगेंत न्हाली म्हणून कधीं पवित्र होणार आहे काय ?––गाढव हें जन्मजात अपवित्र आहे. त्याच्या ठिकाणची अपवित्रता कधींहि जाऊं शकत नाहीं. कोणत्याहि गोष्टीचा नैसर्गिक गुण किंवा स्वभाव जन्मांत बदलत नाहीं. तु० -गाढव गंगेसि न्हाणिलें.

गाण——गाणावाणा—गाणें व वानणें; स्तुतिगान; गानवर्णन; प्रशंसा. 'घेऊनि गीतार्थ उगाणा । ज्ञानिये जे विचक्षणा । ठाकिती ते गाणावाणा । गीतेचा तो लाहे ।' –ज्ञा १८.१५२७.

गाणें——गाणें गाणें––१ शास्त्रीय गाणें म्हणणें; २ गाणीं, पदें म्हणणें. ३ रड गाणें; पिरपिर लावणें. 'जें प्रथम गात होता गाणें अद्यापि तेचि खळ गातो ।'–मोशल्य ३.७४.

गाणेंबजावणें––गायन वादन वगैरेची बैठक; गायन वादनाचा रंग, जलसा; गायन वादन समारंभ.

गाणें म्हणणें—सामान्य पद वगैरे म्हणणें; एखादें पद्य, गीत, ओवी वगैरे म्हणून दाखविणें; सामान्यतः स्त्रियांनीं एखादें गीत गाऊन दाखविणें.

गाणें लावणें—भुणभुण लावणें; तगादा करणें.

❀ **गाईल त्याचा गळा, शिंपील त्याचा मळा**—गाणाऱ्या मनुष्यानें सारखा अभ्यास ठेवल्याशिवाय त्याचा गळा नीट राहूं शकत नाहीं व मळ्याला नियमितपणें पाणी मिळाल्याशिवाय तो जिवंत राहून फळें, फुलें वगैरे देणार नाहीं.

गाणाराचा गळा आणि नाचणाराचा चाळा, झांकत नाहीं—गाणारा मनुष्य स्वाभाविकपणेंच नेहमीं कांहींतरी म्हणत, निदान गुणगुणत असतो. तसेंच नाचणाऱ्याचे हातपाय कांहींतरी चाळे करीत असतात. ते कधींहि थांबणें शक्य नाहीं. एकदां कोणतीहि संवय लागली म्हणजे ती मरेपर्यंत सुटत नाहीं. (गु.) गानारनी जीभ, नाचनारनो पग, सखनो नहि रहे.

कैलास कंटाळे तों गाणें, आणि कान फाटेतों लेणें—कैलासावर शंकर राहतात. त्यांना गाणें अतिशय प्रिय आहे. रावणासारखेहि तेथें गात बसतात. अशा कैलासाला देखील ज्या गाण्याचा कंटाळा येतो असें गाऊं नये. तसेंच कानाची पाळी फाटेपर्यंत दागीनेहि घालूं नयेत. अतिरेक नसावा. कोणतीहि गोष्ट अतिशयेंकरून वाजवीपेक्षां जास्त करणें.

गाण्याक आनि तल्लकेक पडना––(गो.) चैनी करण्याची संवय लागलेल्याकडून नियमित उद्योगाचें काम होत नाहीं.

गातां गळा, शिंपतां मळा व लिहितां हातवळा––गाणाराचा गळा त्यानें सारखें म्हणण्याचा अभ्यास ठेवला तरच चांगला राहतो, तसेंच मळ्यांतील भाजीपाला किंवा झाडें वगैरे वरचेवर पाणी घातलें तरच जिवंत राहतील आणि लेखनाचें वळण नेहमीं लिहिण्याचा सराव ठेवला तरच टिकतें. या व अशा प्रकारच्या गोष्टी अभ्यासानेंच सुसाध्य होतात, त्यांत खळ पडतां उपयोगी नाहीं. –शाव २.२०२.

गात्तां गात्तां गांवकारु जात्तां––(गो.) गातां गातां गांवकार होतो. चिकाटीनें प्रयत्न करीत राहिलें तर कधींना कधीं तरी त्याचें फल मिळतेंच.

गात——आडवें गात न उभें गात—अनिश्चित व असंबद्ध कृत्य, भाषण, वर्तन. आडवें पहा.

गाथागोवा-वी—१ घोंटाळा; घालमेल; गुंतागुंत; अडचण; गोंधळ; अव्यवस्था. २ धांदल; तारांबळ; विनाकारण अडथळा; मध्येंच होणारा कामामध्यें प्रतिबंध. ' जन्म हेंचि अकारण । गाथागोवी ॥ ' –दा ३.१.४.

गादी——गादी हुजूर—राजासमोर; सरकारसमक्ष; सरकारच्या नजरेखालीं, त्यांच्यापुढें, प्रत्यक्ष.

गादीचा चाकर—आदरार्थी, दरबारी पद्धतीचें भाषण करतांना वापरतात. संस्थानचा नोकर; सरकारचा सेवक.

गादीची चाकरी—राज्याची सेवा; सरकार चाकरी; राजसेवा.

गादीची दौलत--राज्याचा खजीना; सरकारी भांडार; राज्याची संपत्ति, वैभव.

गादीला पाय लागणें—सरकारची, वरिष्ठाची अमर्यादा होणें. ‘ रागाच्या भरांत एकादें उत्तर तोंडांतून निघून गेलें तर धन्याच्या गादीला पाय लागल्यासारखें होईल. ’ —पामो ३२३.

गादीला पाय लावणें—१ राजाविरुद्ध बंड करणें; राजाविरुद्ध उठणें; राजाचा अपमान करणें, हुकूम न मानणें; सरकार हुकमाचा अव्हेर करणें. २ पूज्य व वरिष्ठ यांचा उपमर्द करणें; श्रेष्ठांचा अपमान करणें; मानार्ह व पूज्य व्यक्तींचा अनादर करणें.

गादीवर गोष्टी सांगणें—गर्विष्ठपणें भाषण करणें; उर्मटपणें बोलणें; उद्धटपणें उत्तरें देणें; चढाईच्या गोष्टी सांगणें; चढेलपणाची वर्तणूक करणें.

गादीवरून खादीवर—नेहमीं गादीवर बसलेलें असावयाचें, कोणतेंहि काम करावयाचें नाहीं, फक्त खावयास तेवढें उठावयाचें व पुन्हां येऊन गादीवर बसावयाचें असा दिनक्रम. सर्वथैव सुखांत, नुसतें बसून, झोंपून व चैनीनें खाऊन राहावयाचें.

❀ **गादी काम शिकवते**—मनुष्याला अधिकार प्राप्त झाला म्हणजे तो कसा वापरावा हें आपोआप कळूं लागतें; त्यास कोणी सांगावें लागत नाहीं. मनुष्यावर जबाबदारी पडली म्हणजे तींतून कसें पार पडावें याचा तो विचार स्वतःच करूं लागतो व त्याप्रमाणें पारहि पडतो.

गादी लागे मऊ मऊ आणि ढेंकूण करिती चाऊ चाऊ—निजावयास गादी तर चांगली लागते पण ढेंकणांची पीडा तर सुटत नाहीं. गुलाबाला जसे कांटे असतात, तसे वैभवाशीं चिंता, कष्ट वगैरे निगडित असतात.

गादीवरून उतरला कोतवाल, झाला कवडीचा माल—अधिकारी अधिकारावरून कमी झाला असतां त्याची योग्यता अगदीं कमी होते. एकदां हातची सत्ता गेली म्हणजे मनुष्य कवडीमोल होतो, त्यास कोणी विचारीत नाहीं.

गांधीण——**उगाच गांधीण चाळविणें**—गांधील माशा उठविल्या म्हणजे त्या फार अपायकारक होतात. विनाकारण आपत्ति ओढवून घेणें.

गानी——**क्वचित् गानी पतिव्रता**—पतिव्रता स्त्रीनें गाण्यासारखा शोक करूं नये अशी जुनी कल्पना. क्वचित् काणो भवेत् साधुः क्वचित् गानी पतिव्रता । क्वचिद्दंतालको मूर्खः खल्वाटो निर्धनः क्वचित् ॥ काणा पहा.

गाफिल——**गाफिलका माल, आकिलका खुराक**—गाफीलाचा माल आणि शहाण्याचा खुराक. गाफीलाची मालमत्ता कोणीहि शहाण्या मनुष्यानें लुबाडावी. जो बेसावध असतो त्याला धूर्त लोक नागवल्याशिवाय राहात नाहींत.

गावती——**गावत्यास गुरूं, गुराख्यास तारूं**—गावती म्हणजे कोळी, कीं ज्याचा धंदा नावेवर राहावयाचा आहे, त्याला गुरें चारावयास लावणें व गुराख्यास नौकेचा अधिकारी नेमणें म्हणजे योग्यतेच्या अगदीं उलट काम देण्यासारखें आहे.

गाभ——**गाभ सांडणें-मांडणें**—१ अकालीं गर्भपात होणें; गर्भ टाकणें; पूर्ण दिवस भरण्यापूर्वीच प्रसूत होणें. २ विणें; प्रसूत होणें. ३ भीतीनें वगैरे गर्भपात होणें; एखाद्या महाप्रळयांत भयंकर प्रसंगांत स्त्रिया सांपडल्या असतां त्यांचा अकालीं गर्भपात होतो. यावरून अशी एखादी भयंकर आपत्ति येणें.

गाभास जाणें--१ गर्भ धारण करणें; गरोदर होणें. २ विणें; प्रसवणें.

गाभण-णी-णें——(**एखाद्यापुढें**) **गाभणी गाभ टाकील**—उग्र, भयंकर, जाज्वल्य पुरुषाबद्दल योजतात. स्त्रियांस अतिशय भीति वाटली तर त्यांचा गर्भपात होतो यावरून.

गाभणें ठेवण—गर्भ जोंपर्यंत पोटांत आहे तोंपर्यंत तो मुलाचा पिंड आहे कीं मुलीचा हें कळत नाहीं, यावरून मोघम ठेवणें; स्पष्ट न करणें.

गामडा——**गामडे भेंस ने घेर मूल**--(गु.) गांवढ्यावर म्हैस आणि घरीं बसून तिचें मोल करावयाचें. तुलना—पाण्यांत म्हैस आणि बाहेर मोल. (हिं.) घरघोडा बजार मोल. घरांत घोडा आणि बाजारांत मोल.

गाय——**अल्लाची गाय**—देवाला वाहिलेली गाय. अतिशय गरीब मनुष्य; कोणालाहि ज्यापासून उपद्रव होत नाहीं असा मनुष्य अल्ला. पहा.

एखाद्यापुढें गाय असणें—गुलामाप्रमाणें अगदीं निष्प्रभ, निरुपद्रवी असणें; गरीब होणें; निष्प्रभ होणें; मलूल होणें; भेकड, भ्याड असणें; हतवीर्य होणें. ‘ हे त्यापुढें नृपति केवळ जाण गाई ॥–सारुह ८.११६.

गायगायवाना करणें--(व.) काकळूत करणें; गयावया करणें; अत्यंत लीनतेनें विनवणी करणें; नम्रतेनें प्रार्थना करणें

गाय गोवणें—स्त्री जात ही गाईसारखी गरीब, अगतिक, परतंत्र; तिला जेथें बांधावी तेथें ती निमुटपणें हाल सोसीत राहाणार. त्याप्रमाणें अयोग्य स्थळीं मुलगी देणें; मुलीचें लग्न कसेंबसें उरकून तिला कोणाच्या तरी विशेषतः तिला अनुरूप नसलेल्या पतीच्या गळ्यांत बांधणें.

गाय चिखलांत अडकणें—एखाद्या दुर्बल व्यक्तीनें विशेषतः स्त्रीनें कोणाच्यातरी कचाट्यांत सांपडणें; अडचणींत पेंचांत सांपडणें; संकटांत येणें; आपत्तींत गुंतणें.

गाय धुवून कुत्र्यास पाजणें—सज्जनापासून कांहीं घेऊन तें दुर्जनास खाऊं घालणें.

गाय माय सारखी—गाय व आई दोन्हीहि मुलाचें पोषण आपल्या दुधानें करतात म्हणून गाय ही आईसारखी मानावी. गाईस आईसारखें पूज्य मानावें.

गाय होणें—अगदीं दीन होणें; अगदीं गरीब होणें; दुबळें होणें; अगदीं हतबल होणें. 'झालें मी गाय।' –प्रभाकर पदें.

गायी पाण्यावर आणणें--डोळ्यांतून अश्रुरूपानें पाणी वाहूं लागणें; गाल फुगवून रडणें; गंगायमुना वाहणें पहा.

गायी वासराची ताडातोड करणें—नातेवाइकांत भेद करणें; मायलेकरांची ताटातूट करणें.

गायी वासराची भेट करणें--आप्त नातेवाईकांस भेटविणें; मायलेकरांस एकत्र आणणें.

गायीचा गोऱ्हा--[गोऱ्हा=बैल.] १ (ल) मूर्ख; नंदी; शुंभ; अडाणी मनुष्य; बैलासारखा अडाणी. २ गांगरलेला; वेडा. 'गाईचें गोरें जालें!'–भाब १२३.

गायीचा पुत्र; गायीचे बाळ-मूल; गायीचा बाप-बैल; (ल.) टोणपा; मूर्ख.

गायीनें गिळलेलें माणिक—गाईनें जर एखादें मौल्यवान रत्न गिळलें, तर त्या रत्नाचा तर लोभ सुटत नाहीं पण त्याकरितां गाईचें पोट चिरावें तर गोहत्येचें पातक लागतें; याप्रमाणें दोहींकडून अडचणीची स्थिति. तु०–माशानें गिळलेलें माणीक. (गु.) गाये गल्युं रतन. A cow may catch a hare.

गायीनें माणिक गिळणें--वरीलप्रमाणेंच. जेथें फार मोठा तोटा सोसल्यावांचून किंवा पाप केल्यावांचून बूड भरून येत नाहीं तेथें योजतात.

गायीसारखा हंबरडा फोडणें--मोठ्यानें कळवळून आक्रोश करणें.

❀ **गाय अपवित्र आणि शेपूट पवित्र; सर्व गाय अपवित्र पण शेपूट मात्र पवित्र**--गाईचें शरीर विशेषतः तोंड अपवित्र मानण्यांत येतें. कारण ती विष्ठा वगैरे मध्यें तोंड घालते. परंतु तिचें शेपूट पवित्र असतें अशी समजूत आहे. एखाद्या गोष्टीचा बहुतेक भाग निरुपयोगी असला तरी थोडासा भाग जरी उपयोगी असला तरी तेवढ्याचाच उपयोग करून घ्यावा. (गु.) गाय ओखड खाय छे, पण तेना पुछडांने (अथवा दुधने) मान्य छे.

गाय आपल्या पोटाकरितां चारा खाते, धन्याच्या दुधाकरितां नाहीं खात--गाय ज्याप्रमाणें पोटाकरितां चारा खाते पण त्यामुळें धन्याला दूध मिळतें, त्याप्रमाणें एखादा नोकर जो काम करीत असतो त्याच्या मनांत कांहीं धन्याला फायदा व्हावा अशी बुद्धि नसते; तो स्वतः-च्या उदरनिर्वाहाकरितांच काम करीत असतो; पण धन्याला त्याचा अर्थातच फायदा मिळतो. यांत चाकराकडे मोठेपणा कांहीं नाहीं. तु०–म्हैस धन्याला दूध देण्याकरितां फळत नाहीं, तर आपल्या खाजेकरितां फळते.

गाय कसायापेक्षां कलमकसाई खोटा; गाय कसाई बरा पण कलमकसाई खोटा--प्रत्यक्ष गाईला सुरा घेऊन कापणारा कसाई दुष्ट खरा पण त्यापेक्षांहि जो मनुष्य आपल्या लेखणीनें खोटेंनाटें लिहून एखाद्याचा घात करतो तो अधिक अनर्थावह असून तो मनुष्य खाटकापेक्षांहि फार वाईट. गायकसाई एका गाईचाच वध करील पण लेखणीनें अनेक लोकांचा एकदम नाश करतां येतो.

धर्माची गाय, कांट्या खाय–जी गाय धर्मार्थ मोकळी सोडलेली असते तिला खावयास कोणी घालीत नाहीं; त्यामुळें तिला कांटेकुटे खाऊन उदरनिर्वाह करावा लागतो.

कसायास गाय धारजिणी; गाय खाटकाला धारजिणी--खाटीक गाईचा जीव घेतो; असें असून ती खाटकाच्याच सांगण्याप्रमाणें वागते; दुसरा कोणी तिच्या बऱ्यासाठीं कांहीं करूं लागला तरी ती त्याला अनुकूल राहत नाहीं, हा गाईचा स्वभावच; त्याला उपाय नाहीं. त्याप्रमाणें कल्याणकर्त्याला अनुकूल न राहतां एखादा मनुष्य मुद्दाम अकल्याणकर्त्यालाच अनुकूल असल्यास ही वापरतात. खाटीक पहा. जबरदस्तापुढें सर्व नांगी टाकतात, बलिष्ठापुढें कोणाचें चालत नाहीं, मनुष्य निमूटपणें त्याच्या आज्ञेत

वागतो. पण तेंच सोईनें एखाद्यानें सांगितलें तर त्याचें मात्र ऐकत नाहीं. तु०-सोनारानेंच कान टोंचले म्हणजे ठीक.

गाय गायत्री, म्हैस सावित्री, बैल नन्दी, रेडा पापी—गाय, म्हैस व बैल यांना पावित्र्य आहे, रेड्याला नाहीं. लहानमुलें ही म्हण नेहमीं म्हणत असतात व गाईस वंदन करतात.

गाय घोरे गोठा भरे, बैल घोरे धनी मरे—गाईचें घोरणें शुभ व बैलाचें घोरणें अशुभ अशी समजूत आहे.

गाय तर विकावयास पाहीं, दुधावांचून सरत नाहीं—गाय विकावी असें तर मनांत येतें पण इकडे दुधावांचून तर अडून राहतें. एखादी गोष्ट करावी अशी इच्छा असून तीमुळें होणारी गैरसोय सोसण्याची मनाची तयारी नसली म्हणजे म्हणतात. गाय हवी व पैसाहि हवा, या दोन्ही गोष्टी कशा साधणार ?-सवि १७१६.

गाय तेथें गोठा, बाप तेथें बेटा—ज्या घरीं गाय असेल त्या घरीं गोठा असतोच व जेथें बाप हयात आहे तेथें मुलगा होण्याचा संभव असतो; अमुक असलें तर तेथें अमुकच असलें पाहिजे अशा अर्थी ही म्हण आहे.

जेथें गाय तेथें वासरूं; गायीचें वासरूं गाईच्या मागें—एक असल्यावर दुसरें त्याबरोबर असणारच. सुईमागें दोरा. (गु.) गाय पछवाडे वाछरडूं.

अडकली गाय, फटके खाय—गाय अडचणींत सांपडली म्हणजे तिला पळून जाऊन मारहि चुकवितां येत नाहीं व सुटका करून घेतां येत नाहीं. त्याप्रमाणें मनुष्य अडचणींत सांपडला म्हणजे त्याला अनेक प्रकारचा त्रास निमूटपणें सहन करावा लागतो.

गाय माय, तिची सेवा करीत जाय—गाय ही मातेसारखी मानावी व तिची सेवा करीत असावें. प्रत्येक हिंदुमात्र हा गायीस आईप्रमाणें मान देतो.

गाय मारकी असती, तिचीं शिंगें लांब नसतीं—ज्या गाईचीं शिंगें लांबलचक असतात ती फारशी मारकी नसते किंवा तिच्या शिंगापासून एवढी दुखापत होत नाहीं; तर जिचीं शिंगें आंखूड असतात तीच फार मारकी असून तिच्या शिंगांपासून अधिक इजा होते. जे फार बडबड करतात त्यांपेक्षां जे कमी बोलतात ते अधिक भयंकर असतात. [मॅनवेरिंगनें मारक्या गाईचीं शिंगें धनी लांब ठेवणार नाहीं, तीं कापून टाकील; म्हणून लांब शिंगांची गाय मारकी नसते असें स्पष्टीकरण दिलें आहे तें पटत नाहीं. उलट लांब शिंगांनीं गाईस मारावयास येत नाहीं, तीं बाजूला वगैरे अडकतात. उलट आंखूड शिंगें चांगलीं मारतां येतात.]

एकानें गाय मारली तरी दुसऱ्यानें वासरूं मारूं नये—एकानें एक चूक केली म्हणून दुसऱ्यानें त्यापेक्षांहि मोठी चूक करणें बरोबर होणार नाहीं. एक चूक दुसऱ्या चुकीचें क्षालन करूं शकत नाहीं. गुन्ह्याच्या बाबतींत जशास तसें हें तत्त्व लावून चालणार नाहीं.

गाय रुतली चिखलामाजीं, तिची न घे कुणी काळजी--चिखलांतील रुतलेल्या गरीब गायीकडे कोणीहि बघत नाहीं. अडचणींत सांपडलेल्या मनुष्याला कोणी मदत करीत नाहीं.

गाय व्याली, शिंगी झाली--[शिंगी=घोड्याचें पोर, शिंगरूं] असंभाव्य गोष्ट. तु०-बैल गाभना, नववा महिना.

गाय स्वघरीं, सिंह बाहेरी--घरीं गाईसारखा व बाहेर सिंहासारखा. एखादा मनुष्य घरीं अगदीं गोगलगाईसारखा गरीब व पूर्णपणें बायकोच्या धाकांत असतो, पण तोच घराबाहेर फार अवसान आणतो व मोठमोठ्यानें गप्पा व फुशारकी मारीत असतो.

गायका बछडा मरगया, खलरा देख पनाय--गाईचें वासरूं मेलें तरी कातड्याकडे पाहून ती पान्हावते. प्रेमानें माणूस फसतें.

गायिक विंवुंचो वेळु, पाडथाक तिक्का बायल कोरचो वेळु; गायचो वियेंवचो वेळ, पाडथाक तिका बायल करचो वेळ--(गो.) गायीची व्यायची वेळ व तीच बैलाची तिला बायको करण्याची म्हणजे तिच्याशीं संभोग करण्याची वेळ ! अत्यंत स्वार्थलंपटता.

गायी आल्या काय व गाढवें गेलीं काय सारखेंच—(फार्शी म्हण) जी गोष्ट घडल्यामुळें इतर गोष्टींत कांहीं फरक पडत नाहीं अशी गोष्ट-" मि. ग्रिफिथ्स म्हणाले, शेंकडों हिंदी लोक युद्धांत मरत आहेत व इकडे कॉंग्रेस पक्ष सौदा करण्याच्या खटाटोपांत आहे. युद्धांत कोण जिंकतो याविषयीं कॉंग्रेस पक्ष बेफिकिर आहे, हें खरें आहे काय ? मि. अबदुल कयूमः-होय, फार्शी म्हण आहे कीं ' गाई आल्या काय व गाढवें गेलीं काय सारखेंच ! "-केसरी १५-११-४०.

गायी वळी तो गोवारी—जो गुरें वळतो तो गोवारी. ज्याच्या अंगीं जसा गुण असतो तसें काम तो करतो. त्याअर्थी गुरें राखणाऱ्यांच्या अंगीं गुराख्याइतकीच अक्कल किंवा कर्तबगारी असणार. (गु.) गाय वाले ते गोवाल.

गायीं वासरें ज्याचे दारा, रोग न येई त्याचे घरा—ज्याच्यापाशीं गुरें असतात त्याच्या घरीं दुभत्याची चंगळ असते व त्यामुळें घरांत आरोग्य राहतें.

गायीचा खूर तिखट—गायीच्या लाथेमध्यें खूप जोर असतो. परमेश्वर प्रत्येक प्राण्याला कोणत्या तरी प्रकारें स्वसंरक्षण करण्याचें सामर्थ्य देत असतो. गायीची शक्ति तिच्या खुरांत असते.

गायीचे गेळीं आणि म्हशीचे वेळीं (दूध काढावें, दुःख काढावें)—१ गाय रानांतून चरून आल्याबरोबर तिचें दूध काढावें व म्हशीचें दूध तिच्या ठरलेल्या व नियमित वेळीं काढावें म्हणजे ती अधिकांत अधिक दूध देते. २ गायीच्या गेळांत जर दुःख झालें असेल तर त्यावर ताबडतोब इलाज करावा. कारण ती नीटपणें चरत असली म्हणजे बहुतेक निरोगी असते. पण म्हशीला मात्र कांहींहि दुखणें झालें तरी ताबडतोब इलाज करावा, नाहींतर तिचें दुखणें आटोक्याबाहेर जाण्याचा संभव असतो. (१)

गायीचे चाम गाह्मोलो वागु; गायचे चाम घाल्लो वाग—(गो.) गायीचें कातडें पांघरलेला वाघ. ढोंगी मनुष्य; गरीबाचें सोंग आणणारा धूर्त मनुष्य.

गायीचो पाडो खंय तरी वाढो—मूल कोठें तरी सुखरूप असूं दे, या अर्थी.

गायीच्या तोंडांतून घांस काढावयाचा आणि बैलाच्या तोंडांत घालावयाचा—चांगल्याकडून काढून वाइटाला घालावयाचें. गरीबाच्या हक्काचा माल कोणा हरामाला देऊन टाकावयाचा. (गु.) गायने मोहडेथी काहडी गोधाने मोहडे भरवुं.

दुभत्या गायीच्या लाथा गोड—ज्या मनुष्याकडून आपणास लाभ होत असेल त्या मनुष्याकडून जरी थोडा फार त्रास होत असला, अपमान झाला तरी तो आपण सहन करतों.

अंधळ्या गायींत लंगडी गाय प्रधान—जेथें सर्व लोक पूर्णपणें अडाणी असतात तेथें अल्प ज्ञानीहि शहाणा ठरतो. पाठभेद-वासरांत लंगडी गाय शहाणी.

गायीनें गाय फळत नाहीं—एक असमर्थ, क्षुद्र व्यक्ति तशाच प्रकारच्या दुसऱ्याला मदत करूं शकत नाहीं. कोणतेंहि कार्य घडवून आणण्यास योग्य तीं साधनें लागतात. त्यांच्या अभावीं कांहीं कार्य होत नाहीं.

गायीपासून उत्पन्न होतें, तें सर्व लोणी नसतें—एखादी गोष्ट कितीहि चांगली असली तरी ती सर्वांशीं चांगलीच असूं शकत नाहीं. तींत कांहींतरी हिणकस भाग असावयाचाच. All is not butter that comes from ths cow. –सवि ३६१.

गायीला गोऱ्हा झाला, आला शेतीच्या कामाला—गायीला गाय न होतां गोऱ्हा झाला तरी तो शेतीच्या कामाला उपयोगी पडतोच. आपल्या घरांतील मनुष्यानें थोडें फार, त्याच्या कुवतीप्रमाणें व वेळेवर आवडीप्रमाणें जरी काम केलें तरी तें संसाराच्या कामीं कांहीं तरी उपयोगी पडतेंच. तें अमुकच प्रकारचें नाहीं म्हणून त्याबद्दल विषाद न मानतां त्याचा योग्य उपयोग करून घेतला म्हणजे झालें.

गायीला दावें, घराला म्हातारें व्हावें—ज्याप्रमाणें गायीला दाव्याचा निर्बंध असतो, तें असलें म्हणजे तिला स्वैरपणें भटकतां येत नाहीं, त्याप्रमाणें घरामध्यें एखादें वयोवृद्ध मनुष्य असलें म्हणजे त्याचा सर्व घरांतील माणसांस वचक असतो व त्याच्या धाकानें कोणी अनिर्बंध वर्तणूक करीत नाहीं.

गायीला मारलें, दूध तूप उणें झालें—गायीला जर त्रास दिला तर ती रोजच्याप्रमाणें दूध न देतां पान्हा चोरते व कमी दूध मिळून आपलाच तोटा होतो. तेव्हां ज्याचेकडून आपणास काम करून घ्यावयाचें असेल त्याला त्रास देऊन उपयोगी नाहीं.

गायीला वासराचें व बायकोला पोराचें मीस—गाय दूध देते ती वासराकरितां व स्त्री मुलाकरितां. गाय घरीं येते ती वासराकरितां म्हणून व स्त्री घरांत राहते ती मुलांचा सांभाळ करण्याकरितां म्हणून, तिला मुलांचें प्रेम असतें म्हणून. गाय फळते ती वासरूं इवें म्हणून व स्त्री पुरुषाचा संग करते ती मूल व्हावें म्हणून, यांत दोघांचाहि स्वार्थ असतो. कोणीहि आपल्या स्वार्थाशिवाय कोणतीहि गोष्ट करीत नाहीं. [मॅनवेरिंगनें गाय आपल्या वासरास मारीत नाहीं व आई आपल्या पोरास मारीत नाहीं असें स्पष्टीकरण दिलें आहे तें पटत नाहीं. मिष म्हणजे निमित्त तेव्हां वासराकरितां, त्याच्या निमित्तानें म्हणून गाय कांहीं तरी करते व बायको पोराच्या निमित्तानें पण कांहीं तरी काम करते, असा स्पष्ट ध्वनि या म्हणींत आहे.]

गायीला वासरी झाली, दुधाची पांग फिटली—गायीला वासरी झाली याचा आनंद गायीला होणारच, पण धन्याला मात्र गाय व्याल्यामुळें दूध मिळूं लागल्यामुळें त्याची अडचण निभावल्याचा त्याला आनंद होतो. एकाचें

वरें होण्यांत दुसऱ्याचाहि सहजगत्या फायदा झाला म्हणजे ही म्हण योजतात.

गायीस नाहीं चारा, शेतांत नाहीं भारा; गायीस नाहीं चारा व शेतामध्यें भारा—या म्हणींपैकीं दुसरी म्हण अधिक सयुक्तिक दिसते. शेतामध्यें गडगंच गवत असून घरीं गाय मात्र उपाशीं मरत असते. म्हणजे जवळ वस्तु असून तिचा योग्य कामीं उपयोग होत नाहीं अशी स्थिति. पहिली म्हण अगदीं निकृष्ट अवस्था दाखविते.

गायीसारखा गरीब, घरीं दुधाचा रतीब--गाय जशी दिसावयास अगदीं गरीब दिसते पण घरीं दुधाची रेल चेल करते; त्याप्रमाणें एखादा मनुष्य दिसावयास बाहेरून दीनवाणा दिसतो पण खरोखर घरचा समृद्ध असतो अशाबद्दल म्हणतात.

गार——गारगार करवंद-करवत-थंड; गार करवंद-टणक--अत्यंत थंड (पाणी, हवा वगैरे). हात लावला असतां झोंबेल इतकें थंड.

गारगार विंचू—हात लावल्याबरोबर विंचू चावल्याप्रमाणें झिणझिण्या याव्या इतकें भयंकर थंड.

गार बसणें—शांत व थंड होणें (सूड उगविल्यानंतर किंवा वाईट गोष्ट केल्यानंतर).

गार होणें—१ संतुष्ट होणें; तृप्त होणें (उद्दिष्ट साध्य झाल्यावर). २ निरुपायास्तव स्वस्थ राहणें. ३ थक्क होणें; स्तंभित होणें; कुंठित होणें. ४ मरणें. 'वास्तविक काल रात्रींच तळिराम गार व्हायचा!'–एकच प्याला ५.२.

गार——हिरा तो हिरा, गार ती गार—गार आणि हिरा जरी सारखीं दिसलीं तरी परीक्षेअंतीं गार ती गार ठरते व हिरा तो हिराच ठरतो व त्यांच्या मोलांमध्यें अतिशय अंतर आहे ही गोष्ट प्रत्ययास येते. वरून दोन माणसें जरी दिसावयास सारखीं दिसलीं तरी सहवासानें त्यांतील श्रेष्ठ कोण व नीच कोण याची पारख होते व कोणीहि मग त्यांच्या वरील रूपांवरून फसत नाहीं. तु०–मणिं वहन्ति पादाग्रे काचः शिरसि धार्यते। क्रयविक्रयवेलायां काचः काचो मणिर्मणिः॥ म्हणजे रत्न जरी पायांत घातलें आणि काच शिरावर धारण केली, तरी जेव्हां किंमत करण्याची वेळ येते, तेव्हां काचेची किंमत काचेप्रमाणें व रत्नाची किंमत रत्नाप्रमाणेंच होते.

गारत-द——गारद करणें—नष्ट करणें; बुडविणें. 'तैमूर याची पातशाही गारद आबदालीनें केली'–ऐटि भा. २ ले. ३३.

गारद होणें--ठार मरणें. 'जनकोजी शिंदे गारद झाले.'–इमं २९६.

गाल——गाल घडणें--थोबाडींत मारणें; अद्दल घडविणें; उद्धटपणाबद्दल शिक्षा करणें.

गाल निपटणें--गाल बसणें; गाल खोल जाणें; कृश होणें.

गाल फुगणें—१ राग येणें; रुसणें. २ गर्विष्ठ होणें; गर्वानें फुगून जाणें. 'न तुजपुढेंचि पराचें गर्वभरें गाल वा लवहि फुगती।'–मोशल्य १.६३.

गाल फुगविणें—१ रागावणें; फुरंगटणें; रुसून बसणें. 'लागाल प्रभुकंठीं घालूं, फुगवील कीं रमा गाल॥'–मोनामरसायन १०९. २ बढाई मारणें; शेखी मिरविणें; ऐट मारणें; प्रौढी मिरविणें. 'आपण सर्वज्ञ म्हणुनि; पर गर्वें फुगविनात कां गाल?॥'–मोद्रोण २४.८.

गाल बसणें--कृश होणें; तोंड सुकणें; गालफडें बसणें.

गाल रंगविणें; गालांत बसविणें--थोबाडींत मारणें; शिक्षा करणें.

गालाचा ढोपर—पुढें आलेलें गालाचें हाड.

गालाचा ढोपर काढलेला—काटकुळा; रोड; गालफडें वर आलेला.

गालांत बसणें—थोबाडींत मिळणें; चांगली अद्दल घडणें; शिक्षा मिळणें.

गालांत-गालीं-गालींगालीं-गालावर हंसणें--मंदस्मित करणें; गालांतल्या गालांत हंसणें; प्रत्यक्ष न हंसतां तोंडावर स्मित दाखविणें; मिशांत हंसणें. 'साळू गालांत हंसत उभी राहते.'–मोरप्र १५.

गालावर गाल चढणें-येणें--चेहरा गुबगुबीत होणें; गोंडस होणें; अंगावर मांस येणें.

***खातीचे गाल व न्हातीचे बाल (झांकत नाहींत)**--खाणें पहा.

एका गालांत मारली तर दुसरा पुढें करावा—(खिस्ताची अशी शिकवण आहे.) अत्यंत नम्रतेनें वागावें; कोणत्याहि तऱ्हेनें दुष्टासहि प्रतिकार न करावा. 'एका गालांत मारली असतां दुसरा गाल पुढें करण्याचे आतां दिवस उरले नाहींत.'–टि १.५१०.

गालगुंड——वैद्याचीं पोरें गालगुंडानें मेलीं—घरचे उपचार उपयोगी पडत नाहींत. गालगुंड हा वास्तविक

अगदीं साधा सुसाध्य रोग आहे; पण त्याची परीक्षा व चिकित्सा वैद्याला स्वतःच्या घरचा रोगी म्हणून भांबावल्यामुळें नीट करतां न आल्यामुळें त्याचीं मुलें दगावलीं. वैद्य इतर रोग्यांची काळजी घेतो, पण घरच्या रोग्यांकडे पाहण्यास त्यास सवड नसते.

गालिचा——गालिच्याचा बूट—गालिच्यावर ज्याप्रमाणें शोभेकरितां नक्षी काढलेली असते तसा केवळ देखणा, छानलोक पण कामास निरुपयोगी मनुष्य.

गांव——गांवकुसूं पाडून कांट्या लावणारा—गांवकुसूं म्हणजे गांवाभोंवतीं असलेली भिंत किंवा तट. तो चांगला मजबूत असतो तो पाडून टाकून त्या भिंतीच्या जागीं कांट्यांचें कुंपण लावणारा मनुष्य अगदीं बेअकली असला पाहिजे. अधिक महत्त्वाची गोष्ट मोडून टाकून तिची एखादी क्षुल्लक वस्तु बनविणारा. आंतबट्ट्याचा व्यवहार करणारा. मागें पहा.–तु०–कनेकडाचे खापेकड करणें.

गांवगाय–गाईप्रमाणें गांवांत भटकणारी स्त्री; आळशी, गप्पिष्ट स्त्री; गांवभवानी.

गांवगुंड—१ गारुड्यास त्याच्याच विद्येंत जिंकणारा. 'जैवी गारुडीयाचें चेटक उदंड। क्षणें निवारीत गांवगुंड।' –जै २४.९. २ गांवांतील रिकाम्या उठाठेवी करणारा; लबाड; अस्सल मवाली माणूस. ३ वस्ताद; फार हुषार; कधीं न फसणारा. ४ गांवांतील प्रमुख; गांवचा प्रतिनिधि.

गांवगौर–गांवांत भटकणारी स्त्री; स्वैरिणी; गांवभवानी. 'पोरीबाळीसुद्धां हिणवून पुरेसें करतील कीं, या गांवगौरीला हें भिकेचें वाण कुणीं वाहिलें म्हणून !'–पुण्यप्रभाव.

गांव मारणें—गांव लुटणें; गांवावर खंडणी बसविणें. 'दौड करून गांव मारूं लागले.'–पया १८८.

गांव म्हारवडा एक करणें—सबगोलंकार करणें; सर्वत्र गोंधळ, अव्यवस्था, घोंटाळा माजविणें.

गांव हंसलें म्हणजे म्हारवडा हंसणें—एकदां मनुष्याची अप्रतिष्ठा झाली म्हणजे नीच लोकहि त्याची टवाळी केल्याशिवाय राहात नाहींत.

गांवचा गोंधळ–गडबड; घोंटाळा; धांदपळ; गर्दी; घोळका.

गांवचा डोळा—वेसकर; महार; जागल्या. यांचें काम पहारा करण्याचें असतें म्हणून.

त्या गांवचा नसणें—एखाद्या गोष्टीशीं आपला अर्थाअर्थीं संबंध नाहीं असें दाखविणें; कानावर हात ठेवणें.

गांवचा(चे) लोक——गांवांतील कोणीतरी व्यक्ति; परकी; अनोळखी.

गांवभर पोळ सुटणें—स्वैर वर्तन करीत असणें; कोणाचा धाक नसणें; धरबंद नसणें.

गांवमामा––गांवांतील शहाणा माणूस; गांवकऱ्यांवर चरितार्थ चालणारा; सर्वांशीं मिळूनमिसळून असणारा मनुष्य.

गांवमावशी––गांवांतील कुंटीण; वयस्क स्वैरिणी स्त्री; अघळपघळ वर्तनाची स्त्री.

गांवमेव्हणी—गांवांतील वेश्या; अनिर्बंध वर्तन असणारी स्त्री.

गांवसवाशीण-सवाष्ण–१ पाटील किंवा चौगुला याच्या बायकोस म्हणतात (गोंधळ, पाट इ. प्रसंगीं). २ वेश्या.

गांवाची खरवड—गांवास त्रास देणारा, द्वाड मनुष्य.

गांवांतील ढ—गांव या शब्दांतील गा आणि व या अक्षरांमध्यें ढ हें अक्षर लिहिलें असतां गाढव शब्द होतो. यावरून गांवांतील निर्बुद्ध प्राणी.

गांवानांवाची हरकी देणें-सांगणें––कोठून आलांत वगैरे विचारणें; सर्व इत्थंभूत माहिती देणें, सांगणें; सर्व चौकशी करणें.

गांवानें-देशानें ओंवाळलेला––द्वाड म्हणून गांवानें दूर केलेला; कुप्रसिद्ध; गांवाची खरूज.

गांवाबाहेरचा; गांवाभायला––महार; परवारी; ज्याची वसती गांवाबाहेर असते असा; महारवाड्यांतील.

गांवाला जाणें––१ जवळ नसणें; दूर असणें. २ निरुपयोगी असणें. 'लंघावया पहासी गांवाला कायरे मदसि गेला ! ॥'–मो उद्योग १३.३३.

गांवावरून ओवाळून टाकणें––पूर्णपणें त्याग करणें; टाकून देणें; निरुपयोगी म्हणून कायमचें सोडणें.

गांवीं नसणें––१ पूर्ण अभाव असणें; अज्ञानी असणें. २ लक्ष्यांत नसणें; बेपर्वा असणें. ३ माहीत नसणें; पूर्णपणें अज्ञान असणें.

गांवीं न वसणें—गांवीं नसणें, पहा. 'एका घटकेंत तुझी दाणादाण होऊन तुला सैरावैरा पळत सुटावें लागेल हें भय तुझ्या गांवींही वसत नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे.'–उग्र ४.४.

* **गावुं आशिल्लेकडे लावुं आस**––(गो.) गांव असेल तिथें हडळ असायचीच. तु०–गांव तेथें म्हारवडा.

गांव करी ते राव न करी—सगळया गांवकऱ्यांची एकजूट झाल्यावर प्रत्यक्ष राजाला सुद्धां जें अशक्य, तें काम सहज होतें; गांवाच्या एकीचें एवढें बळ असतें.–गांगा २६१.

गांव गेले गांवढे, वाट पळैतत लवंडे--(गो.) गांवाला गेले गांवढे (यजमान) आणि घराकडे वाट पाहातात लवंडे (गुलाम).

गांव गेलें, नांव राहिलें; गांव वाहून गेलें, नांव राहून गेलें—गांव जरी प्रत्यक्ष वाहून गेलें व त्या गांवाचा घरें वगैरेचा मागमूस राहिला नाहीं तरीहि त्या ठिकाणचें त्या गांवाचें नांव कायम राहातें. एखादी गोष्ट घडली म्हणजे त्या गोष्टीबरोबर तिची स्मृति नाहींशी होते असें नाहीं. गोष्ट गेली तरी तिची स्मृति कायम राहते. तु०–काप गेले, भोकें राहिलीं.

गांव चालवी तो गांवचा वैरी, संसार चालवी तो कुटुंबाचा वैरी—जो मनुष्य गांवाचा कारभार पाहतो त्याला अनेक लोकांस नाखूष करावयाची पाळी येते; म्हणून तो अनेकांचें शत्रुत्व संपादन करतो. तसेंच कुटुंबाचा भार वाहणारा मनुष्यहि कुटुंबांतील सर्व लोकांस नेहमीं खूष करूं शकत नसल्यामुळें, त्यालाहि सर्व कुटुंबांतील मंडळी शत्रूप्रमाणें मानतात. जो एखाद्या कामाची जबाबदारी पतकरून तें काम करूं लागतो त्याला अनेकांच्या मतांविरुद्ध वागावें लागून त्यांची नाराजी पतकरावी लागते. (गु.) गाम चलावे ते गामनो वेरी, ने घेर चलावे ते घेरनो वेरी.

गांव जळाला, मारुति (हनुमंत) गांवानिराळा; गांव जळतो तरी हनुमंत बाहेर—मारुतीचें देऊळ गांवाबाहेर असल्यामुळें, गांव जळाला तरी त्याचा त्याला कांहीं उपसर्ग पोंचत नाहीं. दुसऱ्यावर किंवा आपल्या भक्तावर, संबंध असलेल्यावर संकट आलें तरी त्याबद्दल बेफिकीर असणारा. वेळेवर उपयोगी न पडणारा; वेळेवर एखाद्या कामातून अंग काढून घेणारा.

गांव जळाला, मारुति पळाला; गांव जळे मारुति पळे—गांवाला आग लागल्याबरोबर गांवच्या मारुतीनें पलायन करणें म्हणजे ज्या गांवापासून नेहमीं पूजा वगैरे घ्यावयाची व जो आपलें वेळेवर रक्षण करील अशी ज्यांची श्रद्धा, त्या गांवकऱ्यांवर संकट आलें असतां त्याचा प्रतिकार कांहींएक न करतां, केवळ आपल्यापुरतें पाहावयाचें; म्हणजे प्रथम आधार दिल्यासारखें करून, शेवटीं आपण नामानिराळें राहावयाचें.

गांव जळे नि हनुमान बेंबी चोळे—१ रामायणांतील गोष्ट ! सीताशुद्धीसाठीं मारुति लंकेंत गेला. तेव्हां अशोक वनांतील झाडें तोडल्याबद्दल शिक्षा म्हणून रावणानें मारुतीच्या शेपटीला आग लावली. तेव्हां मारुतीनें आपली शेपटी शाबूत राखून सारी लंका नगरी पेटविली नि हाहाःकार उडवून दिला अशी कथा आहे. त्यावरूनच ही म्हण पडली. लंका जळत होती त्याचें हनुमंताला काय होय ! तो आपला आगीकडे शांतपणें पाहात होता नि गमतीनें बेंबी चोळीत होता. तसेंच इतरांचें कांहीं का नुकसान होईना, कितीका कठीण प्रसंग ओढवेना, कांहीं लोक शांतपणें नि तिऱ्हाईतवृत्तीनें त्यांच्याकडे पाहातात. २ मारुतीचें देवालय बहुतकरून गांवाच्या बाहेर असतें, त्यामुळें गांव जळाल्यास मारुतिराय सुखांत असतात. त्याप्रमाणेंच लोकांचें कांहीं का होईना, कांहीं राजेलोक आनंदांत, ऐषआरामांत पोटावर हात फिरवून किंवा रयतेवर हात फिरवून आपला काळ घालवितात.

हें गांवजेवण नव्हे, कीं घेतला थाळातांब्या नि चालला जेवायला--गांवजेवणांत कोणीहि येऊन जेवून जावें असें मुक्तद्वार असतें. तशी स्थिति नसून जेथें काम करणाऱ्यालाच त्या कामांतील यशाचा वांटा मिळावयाचा असेल, तेथें इतरेजनांस उद्देशून ही म्हण योजतात.

गांव तगारा आणि फुटका नगारा--[तगारा = मोठी लोखंडी टोपली]. १ ज्या वस्तूवर सर्व गांवाची मालकी असते तिची काळजी कोणीच घेत नसल्यामुळें, ती कधींच चांगल्या स्थितींत राहात नाहीं. बहुतेक ती मोडक्यातोडक्या स्थितींत असते. गांवाचा लौकिक तर बाहेर फार मोठा, पण प्रत्यक्ष जाऊन पाहावें तो कांहीं नाहीं. एक नगारा तोहि धड नाहीं, अशी स्थिति. पोकळ बडेजाव.

गांव तेथें धेडवाडा, नदी तेथें वोहळा—'गांव तेथें महारवडा' पहा. (गु.) गाम त्यां धेडवाडो, नदी त्यां ओवारो.

गांव (आहे) तेथें महारवाडा (आहे)—प्रत्येक गांवांत कोठें तरी एका ठिकाणीं महारांची वस्ती असते. ती अस्पृश्य मानली जात असल्यानें, तो गांवचा भाग त्याज्य समजला जातो. यावरून प्रत्येक चांगल्या गोष्टींत थोडा तरी वाईट भाग असणारच. –टि ४.१८८.

गांव तेथें महारवाडा, घर तेथें परवडा—ज्याप्रमाणें प्रत्येक गांवांत महारांची वसती अथवा गलिच्छ वसती कोठें तरी असतेच, त्याप्रमाणेंच प्रत्येक घरांत कोठें तरी अव्यवस्था, अडगळ वगैरे असावयाचीच. 'गांव तेथें महारवाडा, घर तेथें पोरवडा' असाहि पाठ आहे. त्याचा अर्थ घरामध्यें पोरांबाळांची गडबड ही असावयाचीच.

गांव तेथें लाव—(ठाकरी) [लाव = चेटकी] खेड्यांतून चेटकी, भुतें वगैरे घालवणाऱ्या बाया असतातच. तु०–गांव तेथें महारवाडा.

गांव ना पुसे इयाट, पण घरीं बायकोचा शेट— गांवांत मुळींच प्रतिष्ठा, मान नसला तरी घरीं बायकोनें फार मोठा असें मानलें पाहिजे. तु०–गांवचा गांड्या०

गांव नांचता म्होण गावडी नाचता—(गो.) इतर मोठ्या लोकांनीं एखादी गोष्ट केली म्हणजे ती आपणहि करणें; मूर्खपणाचें अनुकरण.

गांव नाहीं तो गांवकर—केवळ नांवाचा मोठा ' नांव सोनूबाई ' याप्रमाणें.

गांव निसबत दावा, आणि खुद निसबत अदावत —गांवकीच्या भांडणांत स्वतःचा हेवादावा उगवून घेणें. गांवच्या पंचायतींत कांहीं पंच आरोपीशीं असलेलें आपलें वैर साधून घेतात.

सगळा गांव मामाचा, एक नाहीं कामाचा—सगळ्या गांवांत मामांचीं (आप्तसोयऱ्यांचीं) घरें असूनहि वेळेवर कोणी उपयोगी पडत नाहीं अशी स्थिति; अनेक नातलग असले तरी आपल्यावर प्रसंग आला असतां, कोणीहि मदत करायला तयार होत नाहीं. तु०–सोयऱ्यांनीं भरला गांव आणि जेवायला नाहीं ठाव.

गावुं मारि, बोंब करि—(गो.) गांव मारतो आणि शंख करतो. सगळा गांवच जिथें आपल्यावर उलटला, तिथें आपण रडून आक्रंदून काय उपयोग?

गांवचा एक बाहेरच्या शंभराबरोबर—आपल्या गांवचा एक मनुष्य जितका आपल्या उपयोगी पडेल, तितके बाहेरचे शंभर लोकहि कामास येणार नाहींत. आपल्या जवळच्या संबंधी माणसास जितका आपणाबद्दल आपलेपणा वाटेल, त्याच्या शतांशहि परकीयांस वाटणार नाहीं. पूर्वींच्या काळीं विशेषतः गांवकऱ्यांची जूट चांगली असे व परगांवच्या लोकांशीं सामान्यतः मत्सर असे.

गांवचा गांड्या(रांड्या), पण घरचा–सासूचा –बायकोचा देशपांड्या—सर्व गांवांत अगदीं भागूबाई, रांडूबाई म्हणून प्रसिद्ध असला तरी घरीं तो शिरजोर असतोच. याचें उलटहि एक म्हण आहे–**गांवचा देशपांड्या पण बाईलचा गांड्या**—यांस गांवांत मोठेपणा असतो, पण त्याचें बायकोपुढें कांहीं चालत नाहीं.

गांवचा गांवढा, गांवीं बळी—गांवढा मनुष्य आपल्या गांवांत तेवढी शेखी मिरवतो, बाहेर त्याला कोणी विचारीत नाहीं. विशेषतः शहरांत त्याची हुर्रेवडी होते.

गांवचा गांवढ्या गांवीं बळी, परके गांवीं गाढवें बळी; गांवांत–गांवचा बळी, शेजीच्या गांवीं (परगांवीं) गाढवें वळी––गांवांत फुशारकी मारणारा गांवढळ मनुष्य इतर गांवीं कुचकामाचा ठरतो व गाढवें वळण्याच्या कामाशिवाय त्याची लायकी अधिक आढळून येत नाहीं.

गांवचा दिवाळखोर, पण परगांवचा सावकार— ज्याला स्वतःच्या गांवांत पत नाहीं, त्याला दुसऱ्या गांवांत कोण किंमत देणार ! एखाद्या मनुष्यास स्वतःच्या गांवीं बिलकूल पत नसते; पण इतर गांवीं तो नांवलौकिक मिळविण्याचा प्रयत्न करतो.

ज्या गांवच्या बोरी, त्याच गांवच्या बाभळी–– बोरी आणि बाभळी या दोहोंसहि कांटे असतात. त्याप्रमाणें धूर्त लोक परस्परांस भेटले म्हणजे ते एकमेकांस पुरे ओळखून कोणी कोणाच्या आहारीं जात नाहीं. तु०–गांठ पडली ठकाठका.

गांवच्याला मसणवाट आणि परगावच्याला गोंड ––[गोंड = उतार किंवा स्वागत.] गांवांतील मनुष्याची उपेक्षा करावयाची व परगांवच्या मनुष्याचा आदरसत्कार करावयाचा. जवळच्या मनुष्याची किंमत नसते. तु०–पिकतें तेथें विकत नाहीं.

गांवाचें नांव गिरवली आणि रडून शिंदळकी जिरवली––गिरवली गांव दुबळ्या लोकांकरितां व शिनळकीकरितां प्रसिद्ध असावा, असें या म्हणीवरून दिसतें.

गांवांत गाढवाची काय खोट ?–खेडेगांवांत गांढवांची कांहीं वाण नसते. गांवढ्या गांवांत अडाणी लोकांचा भरणा असावयाचाच.

गांवढ्या गांवांत गाढवी सवाशीण––[गाढवी हा 'गांवढी' चा व्यत्यास दिसतो. तेव्हां 'गांवढ्या गांवांत गांवढी सवाशीण ' असा पाठ बरोबर होईल.] खेडेगांवांत चांगली सवाष्ण कशी मिळणार ? ती अडाणी, गाढवी किंवा 'गांवढी'-च मिळणार. तेथें तिलाच महत्त्व आहे. हलक्या समाजांत हलक्या माणसासच पुढारीपण आपोआप मिळत असतें.

गांवांत गाय हगली अन् चुलीला आग लागली–– (उप.) अगदीं क्षुल्लक कारण.

गांवांत घर नाहीं, वेशीबाहेर शेत नाहीं—ज्या मनुष्याला आपलें असें म्हणावयास कांहीं ठिकाण नाहीं, अशा

निराधार मनुष्याबद्दल म्हणतात. तु०-पांढरीवर घर नाहीं, काळीवर शेत नाहीं. (गु.) गाममां रेहवाने घर नहि, ने सीममां खेतर नहि.

गांवांत दाखवी मिजाशी, घरांत उंदीर उपाशी—घरांत अन्नाचा दाणा नसून देखील बाहेर मिजाशीनें वागणाराबद्दल म्हणतात.

गांवांत म्हाळ, सुण्याक (कुत्र्यास) बोवाळ—(गो.) गांवांत महालय (श्राद्ध) पण कुत्र्याची तारांबळ. कांहीं संबंध नसतां धांवपळ, यातायात. गांवांत लगीन० पहा.

गांवांत राहून पाटलाशीं वैर--आपल्याला जर एखाद्या गांवांत राहावयाचें असेल तर तेथील अधिकाऱ्याशीं शत्रुत्व करून आपला निभाव लागणार नाहीं. ज्या गांवीं आपण असूं तेथील सत्ताधिकाऱ्यांशीं वैर करण्यांत आपलेंच नुकसान होण्याचा संभव असतो; याकरितां असे प्रसंग टाळावे. तु०-पाण्यांत राहून माशांशीं वैर.

गांवांत लगीन, कुत्र्यांना बोंबाळ—गावांत लग्न आल्याबरोबर कुत्र्यांची धांदल उडते; कारण त्यांना तेथें उष्टें माष्टें खाण्यास मिळतें. वास्तविक त्यांचा त्या लग्नाशीं अर्थाअर्थीं कांहीं संबंध नसतो; पण थोडाफार लाभ होईल या आशेनें तीं येतात. त्याप्रमाणें एखादें मोठें कार्य निघालें म्हणजे ज्यांचा कांहीं अर्थाअर्थी संबंध नाहीं असे लोक आशाळभूतपणें तेथें जमून गडबड करीत असतात.

गांवांत वऱ्हाड आणि कुत्रें मुऱ्हाड—[मुराड-१ मुराद = भरपूर] गावांत एखादें वऱ्हाड आलें म्हणजे लग्नकार्यादि निघालें म्हणजे उष्टेंमाष्टें रस्त्यांत पडतें व गांवांतील कुत्रीं तेथें गोळा होतात. थोडासा लाभ दिसला म्हणजे तो पदरांत पाडून घेण्याकरितां लोकांची गर्दी होते.

गांवांनीं गांव निजे, आळशिणीचें वरण शिजे--कांहीं गोष्टी आपोआप होत असतात व त्याचा फायदा नाकर्त्यालाहि मिळतो. किंवा सर्व गांवामागून याचें काम. (१)

गांवाबाहेर बोंबलण्यास पाटलाची परवानगी कशाला--पाटलाचा अधिकार कायतो गांवाच्या सीमेच्या आंत, त्या सीमेच्या बाहेर गेल्यावर त्याची सत्ता मानण्याचें कांहीं कारण नाहीं. प्रत्येकाचा अधिकार विशिष्ट क्षेत्रापुरता असतो; तेवढ्यांतच तो मानावा लागतो. त्या क्षेत्राबाहेर कांहीं त्याची सत्ता चालत नाहीं व तेथें जो तो स्वतंत्र असतो. पाठभेद-चावडीबाहेर बोंबलण्यास पाटलाची परवानगी कशाला.

गांवामागें घोडें व वरातीमागें वेडें-गांवांतील माणसें कोठें जाऊं लागलीं म्हणजे बाहेर चरणारें घोडेंहि त्यांच्यामागून जाऊं लागतें. त्याप्रमाणें वरात निघाली म्हणजे इतके लोक रस्त्यानें जातात म्हणून वेडा मनुष्यहि कांहीं कारण नसतां त्यांच्यामागून जाऊं लागतो. मूर्ख लोक कोणाहि मनुष्याचें विनाकारण अनुकरण करूं लागतात. यापेक्षां पुढील म्हण बरोबर दिसते.

गांवामागें वेडें व वरातीमागें घोडें---इतर लोकांनीं एखादी गोष्ट केली म्हणून सर्वांच्या पाठीमागून वेड्यानेंहि ती केली तर तिचा कांहीं उपयोग होत नाहीं. त्याप्रमाणें वरात घरीं आल्यावर मागाहून घोडें आलें तर त्याचा कांहीं उपयोग नाहीं. वेळ निघून गेल्यावर केलेल्या गोष्टी निष्फळ होतात.

गांवाला लागली आग, त्याचा काढती माग--सगळ्या गांवाला आग लागून जेथें डोंबाळा झालेला असतो, तेथें सूक्ष्मपणें ती कोठून लागली अशी चौकशी करीत बसणें मूर्खपणाचें आहे. प्रथम ती विझवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मोठ्या कार्याचा नाश होत असतां, तो थांबविण्याऐवजीं बारीकसारीक गोष्टींत लक्ष घालीत बसणें, हें अज्ञान आहे.

गांवावर आयिले घरावर आयल्याबगर रावाना--(गो.)गांवावर आलेलें संकट घरावर आल्याशिवाय राहात नाहीं. आश्रयदात्यावरची आपत्ति आश्रितावर असणारच.

गांवासारको भेस, गुरूसारको उपदेश—(गो.) जसा गांव तसा वेष व जसा गुरू तसा उपदेश.

(ज्या) गांवीं गेलें, (त्या) गांवचें झालें—मागची आठवण, शुद्धि नसणें. निंदार्थी वापरतात. (गु.) गाम गीया गमेर.

ज्या गांवीं जायचें नाहीं त्याची वाट कशास पुसावी—ज्या गांवीं जावयाचें नाहीं त्या गांवच्या वाटेची चौकशी करण्यांत काय फायदा ! नसत्या उठाठेवी करण्यांत कांहीं अर्थ नसतो. 'गमन नसे ज्या गांवीं। तेथील वाट कशास पुसावी।' -अमृतराय.

ज्या गांवीं भरेल (पोटाचा) दरा, तो गांव बरा—पाठभेद-जेथें भरेल दरा (पोटाचा) तो गांव बरा. ज्या गांवांत आपला योगक्षेम चालत असेल तोच गांव बरा म्हणावा. इतर गांव पुष्कळ समृद्ध असले तरी आपल्याला त्याचा काय उपयोग ? ज्यापासून आपल्याला लाभ होत असेल त्याचीच स्तुति करणें योग्य होय. -गांगा ३१५.

गांवठी——गांवठी वकील—मराठींतून कायद्याची परीक्षा दिलेला, इंग्रजी न जाणणारा वकील; परीक्षा न दिलेला मुखत्यार वकील. असे वकील पूर्वी फार असत.

गावडा——गावडयाक दिली जवाद, ताणें पेजे बरोबर खाली--(गो.) [गावडा = गोव्यांतील एक जात. जवाद = कस्तुरी] गावड्यास कस्तुरी दिली ती त्यानें पेजेबरोबर खाल्ली ! तु०-कोंबड्याला माणिक. कुळंब्याक दिली जवाद, पहा.

गाशा——गाशा गुंडाळणें--[गाशा = खोगीरावर टाकण्याचें सकलाती वस्त्र.] १ कूच करण्याचा हुकूम झाल्यावर सैनिक विश्रांतीसाठीं हांथरलेला गाशा गुंडाळतो व घोड्यावर घालून चालूं लागतो. त्यावरून,जाण्यासाठीं आवराआवर करणें. २ पळून जाणें; धूम ठोकणें; पळ काढणें; निसटून जाणें. ' पुण्यांतले लोक चांगले व्यवहारज्ञ आहेत, ते आपल्या नादीं लागणार नाहींत, अशी खात्री होतांच, स्वामींनीं तेथून आपला गाशा गुंडाळला. ' —नि. ३ मरणें; हें जग सोडून जाणें.

गाशा टाकणें—आसन ठोकणें; बैठक घालणें; अंथरूण पसरणें. ' इकडे स्वारांनींहि आपआपल्या भाकरी खाऊन ते गाशा टाकून विश्रांति घेत उघड्या पटांगणांत पडले होते. ' —स्वप ५५.

गासलापूर——गासलापूर करणें--(कांहीं चोरून उपटून) पळून जाणें.

गाहाण——सोनें गाहाण त्याला मामा जामीन कशास ?--जेथें आपला माल चांगला आहे तेथें तो खपविण्यास वशिला कशाला ? सरळ व्यवहार जेथें होत आहे तेथें वगवशील्याचें काम नसतें. आपली योग्यता असल्यावर दुसऱ्याचा आश्रय कशास घ्यावा.

गाही——गाही मासा, गाही तोला--[गाही=गावी, सोनाराचा चिमटा] सोनाराकडे सोनें नेलें म्हणजे तो प्रत्येक वेळीं गावीनें मासा, मासा करीत तोळाभरहि कापून टाकतो व शेवटीं कांहीं राहात नाहीं. सोनाराकडे दागिना घडावयास दिला म्हणजे त्यांतलें कांहीं तरी सोनें कमी होतें असा सार्वत्रिक समज आहे. तु०—आटता वाल, पिटता वाल, वाल वाल निसंतान.

गाळण——गाळण उडणें-होणें--भीतीनें गांगरून जाणें; भेदरणें; घाबरणें.

गाळणें——गाळीव मूर्ति-वस्तु--ज्याप्रमाणें मुशीमध्यें अनेक तुकडे टाकून ते आटवून मूर्ति बनवितात त्याप्रमाणें सर्व दुर्गुण एकत्र असलेला; अट्टल सोदा.

गिरगिट——गिरगटकी दौड, बदूरी तलक--सरड्याची धांव मडक्यापर्यंत. सरड्याची धांव कुंपणापर्यंत, याप्रमाणें.

गिरा——गिरा मोरा बामणाच्या पोरा, तिनदां जेव कुणब्याच्या पोरा--[गिरा = ग्रहण] उपवास, व्रतवैकल्यें करणाऱ्या, ब्राह्मण धर्मानें वागणाऱ्या पुरुषानें ग्रहणांत व त्याचे आधीं लागत असलेल्या वेधामध्यें कांहींहि खाऊं नये; व्रतस्थ असावें. पण कुंदा खणणाऱ्या, तिन्ही त्रिकाळ पाठीवर ऊन सोसणाऱ्या कुणबी तरुणानें खुशाल रोज तीनदां जेवावें; त्यास कसलीच हरकत नाहीं.—पुरुषार्थ, दिवाळी अंक १९३६.

गिरेस्त——गिरेस्तालो वाडो, न्हेसूंक मेळना फाडो--(गो.) [गिरेस्त = गृहस्थ.] नेसण्यास चिंधीदेखील नाहीं, तर मोठा वाडा राहावयास काय करावयाचा ! वाडा मात्र खूप मोठा पण नेसायला चिंधी सुद्धां नाहीं. तु०—बडा घर पोकळ वांसा. गृहस्थ पहा.

गिऱ्हाईक——गिऱ्हाईक मरणें—आपल्याकडे गिऱ्हाईक पटणें; सौदा जमणें; काम होणें.

गिऱ्हाईक मारणें--गिऱ्हाईक ओढून नेणें; दुसऱ्याकडून आपणाकडे ग्राहक वळवून घेणें.

जिवाचा-प्राणाचा गिऱ्हाईक होणें—जीव, प्राण ग्रहण करणारा होणें; प्राणावर संकट आणणें; जिवावर बेतणें.

गिऱ्हाइकाच्या हातीं दाढी धरविणें--दुकानदाराला वास्तविक आपला माल खपवावयाचा असतो. गिऱ्हाइकानें योग्य किंमत देऊन तो न्यावा अशी त्याची इच्छा असते. पण कधीं कधीं आपल्याला ती वस्तू विकावयाची नाहीं, निदान इतक्या थोड्या किंमतीला द्यावयाची नाहीं असें तो बाह्यतः म्हणतो व गरजू गिऱ्हाइकाकडून नाहक दाढी धरवितो म्हणजे मिंता घेतो. जेव्हां ओढून ताणून चंद्रबळ आणून पर्वा वाटत असूनहि आपणास त्या कामाची पर्वा नाहीं असें कोणी प्रदर्शन करतो तेव्हां ही म्हण वापरतात. ' जांवईबोवाला भूक सपाटून लागली होती, पण सासऱ्यानें बोलावतांच आखडले. गिऱ्हाइकाच्या हातीं नाहक दाढी धरविली तेव्हां दोन तासांनीं गेले !'

गिलचा——गिलच्यास पगडी नाहीं व घोडयास दुमची नाहीं—[दुमची=खोगिरास जोडलेला शेपटी खालून जाणारा पट्टा, लेंडी.] गिलचे लोक घोड्यांवर बसण्यांत पटाईत असत व नेहमीं घोड्यांवर बसण्याचा सराव

असल्यामुळें ते डोक्याला पागोटीं घालीत नसत व घोड्यांच्या खोगिरांस लेंडी लावीत नसत.–भाव ९.

गीत——गीत गाणें--१ दुसऱ्याजवळ आपली हकीगत सांगणें; रडगाणें लावणें. २ तेंच तेंच पुन्हा पुन्हा सांगणें; एकच गोष्ट धरून बसणें.

नांवानें गीत गाणें—कोणीं बरें केलें असतां त्याच्या अपरोक्ष त्याची स्तुति करणें; प्रशंसा करणें.

❀ **जात्यावर बसलें म्हणजे गीत आठवतें–ओवी सुचते**--दळावयास बसलें म्हणजे गाणें म्हणावें अशी पूर्वी समजूत असे. त्यामुळें श्रम हलके होत. काम करावयास सुरवात केली म्हणजे तें तडीस कसें न्यावें याची युक्ति आपोआप सुचूं लागते. तु०–गादी काम शिकवते.

गीता——गीतासप्तक--१ भगवद्गीता, २ रामगीता, ३ गणेशगीता, ४ शिवगीता, ५ देवगीता, ७ कपिलगीता, ७ अष्टावक्रगीता.

गीता संपूर्ण कानीं राहिली--सर्व गीता तोंडपाठ करणें.

❀ **गाढवापुढें वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता**--गाढवाऐवजीं गांवढा पाहिजे. गाढव पहा.

गुगळ——गुगळ काढणें—१ भदें काढणें. २ लग्नांत फुटक्या मडक्यांत विस्तव घालून नवऱ्या मुलाच्या व त्याच्या आईच्या डोक्यावर देऊन त्यांनीं नाचत देवास जाणें.

गुंगारा——गुंगारा देणें–मारणें—[गुंगारा=गोफणीचा गुं गुं आवाज.] फसवून पळून जाणें; नजर चुकवून निसटणें. 'शास्त्री:–शाबास, सुधाकर, चांगलाच गुंगारा दिलास !' –एकच प्याला, ४.३.

गुगुळ——घे गुग्गुळ दे प्रसाद—थोडें देऊन फार मिळण्याची अपेक्षा करणें; देवाला थोडेसें वाहून त्याजवळून मोठ्या लाभाची अपेक्षा करणें.

गुंज——गुंजभर सोन्यांत गाढव मढविणार—अल्प साधनांनीं मोठें कार्य साधूं पाहाणारांस म्हणतात.

❀ **जातो तेथ हत्ती जातो, नाहीं तर गुंजहि मारक होते**—एखाद्या वेळीं साधलें तर मोठें कार्य साधतें, नाहींतर अल्पहि कार्यांत मोठें विघ्न येतें. पचतो तेव्हां हत्तीहि पचतो, नाहींतर गुंजभर वस्तूहि प्राणघातक ठरते. कांहीं लोक कांहीं बाबतींत फार उदार असतात, पण एखाद्या बाबतींत अगदीं काटेकोरपणा करतात अशांबद्दलहिम्हणतात. तु०–जाईल तेथें हत्ती जाईल, नाहीं तेथें सुंगीहि शिरकणार नाहीं.

गुजर——गुजर गई गुजरान, कहां झोपडी कहां मैदान—मनुष्यानें कसाबसा एकदां आपला निभाव करून घेतल्यावर मग कांहीं दिवस झोंपडींत काढले काय किंवा कांहीं दिवस मैदानावर काढले काय एकदां दिवस निघून गेल्यावर त्यांची फिकीर कशाला करावी. आपलें कार्य निभावून नेण्याकडे दृष्टि ठेवावी.

गुजराची बेटी, सोन्याची पेटी—(गु.) गुजरनी बेटी, सोनानी पेटी. गुजराला आपली मुलगी फार मौल्यवान वाटते. ती त्याचें धनच होय. Children are the riches of ths poor.

गुजरात——गांडी गुजरात—[गांडी = वेडी] अडाणी गुजराथी लोक. गुजराथी लोकांचें वागणें वगैरे दक्षिणी लोकांना पटत नाहीं. यावरून निंदार्थी म्हण पडली आहे. गांडी पहा.

गुजरात कमावणें—(ऐति.) गुजराथ हा देश अतिशय संपन्न म्हणून प्रथमपासून प्रसिद्ध आहे. तेव्हां त्या देशावर स्वारी करून येणारा मनुष्य बरोबर अलोट संपत्ति घेऊन येणार यांत शंका नाहीं. यावरून अपार संपत्ति मिळविणें; विपुल धनसंचय करणें; खूप श्रीमंत होणें. पेशव्यांच्या ताब्यांत गुजरात होती त्यावेळची म्हण.

गुजरातची गांड, माळव्याचें तोंड—(ऐति.) गुजराथी लोक फार दुर्बल असतात व माळवी लोक फार बडबडे असतात, अशी पूर्वापार समजूत आहे.

गुजरी——गुजरीची वेळ—भाजी बाजाराची वेळ; सायंकाळ. 'सायंकाळ गुजरीचा समय.'–शिदि २५१.

गुटिका——गुटिका पात--चिठ्या टाकून नशीब पाहणें.

गुठ——गुठे घालणें--१ चुरडणें; फोडणें. २ तुडवून मळणें; चुरगळणें.

गुड——गुड दिये मरे, तो जहर काहेंको दिजिये—गूळ दिल्यानें जर मरतें तर विष कशास दिलें पाहिजे ? लहान गोष्टीनें काम होत असल्यावर मोठी कशाला ? गोड बोलून जर कार्य साधतें तर कठोर भाषा कशाला वापरावी. गूळ पहा.

गुडगुड——गुडगुडेन संतेस व्होगडावले—(गो.) चैनींत गुंग राहून मुख्य कार्याचा विचाड करणें.

गुडगुडी——गुडगुडी बंद करणें—जातीची सभा भरली म्हणजे जेवढे लोक जमले असतील ते सर्व एकाच

गुडगुडीनें धूम्रपान करतात पण बहिष्कृतांस ती गुडगुडी देत नाहींत. यावरून जातीबाहेर टाकणें; वाळींत टाकणें.

गुडघा——गुडघा देणारा—एखादें ओझें डोक्यावर घ्यावयाचें असलें म्हणजे मध्यें आधार घ्यावा लागतो. तो आधार आपला गुडघा पुढें करून देणारा. यावरून मदतगार; हातभार लावणारा; साहाय्य करणारा.

गुडघे टेकणें—क्षमेची याचना वगैरे करण्याकरितां नम्र-पणा दाखविण्याच्या हेतूनें वांकून जमिनीवर ढोंपरें टेंकून बसणें; लीनपणा धारण करणें; नम्र होणें.

गुडघे टेकणें; गुडघ्यावर हात देणें-येणें--१ वृद्धा-वस्थेमुळें वांकणें; गुडघ्यावर हात देऊन उठावें लागणें. २ दमणें; मटग्यास येणें. ३ हिंमत खचणें. (गु.) गुरा गगडी जवा.

गुडघे मेटी-मेटीवर येणें—मेटाकुटीस येणें; दमून गुडघ्यांवर चालण्याची पाळी येणें; दमणें; थकणें; गळून जाणें. 'संवाहक वर सांगितल्याप्रमाणें विचार करीत करीत गुडघे मिटीवर येऊन-उठावें न उठावें अशा विचारांत आहे.'-इस्लामपूरकरकृत चारुदत्त आणि वसंतसेना, पान ४०.

गुडघ्यांत मान घालणें—लज्जेनें खालीं पाहाणें; मस्तक अवनत करणें. 'घातली मान गुडघ्यांत'। -संग्रामगीतें ४३.

गुडघ्यांत मान घालणें-घालून बसणें—१ हताश, असणें; निराश होणें. २ दुःखी असणें; मान खालीं घालणें; अधोवदन होणें.

गुडघ्याला बाशिंग बांधणें--अतिशय उतावीळ होणें. 'उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग,' पहा.

गुंडा——गुंडाहि तिकडेच व गोफणहि तिकडेच—१ गोफणीनें धोंडा मारावयास जावें तों धोंड्याबरोबर गोफणहि जाणें; काम न साधतां जवळचेंच गमावून बसणें. गुंडा पहा. २ एकाबरोबर दुसराहि जाणें.

गुडाखू——गुडाखू काढणें—गुडाखू ही तमाखूंत अनेक सुवासिक पदार्थ घालून चांगली कुटून मळून तयार करावी लागते. यावरून चांगला मऊ करणें. (ना.) खर-डपट्टी काढणें.

गुंडाळणें——गुंडाळून ठेवणें—आपण एखादी वस्तू बाजूस ठेवावयाची असली, तिचें कांहीं काम नसलें म्हणजे ती कशांत तरी गुंडाळून एका बाजूस ठेवतों. यावरून न जुमा-नणें; बाजूला सारणें. 'प्रसंग पडला म्हणजे युक्तिवाद गुंडा-ळून ठेवणारी सुधारक मंडळी दृष्टीस पडते.'-टि ४.१३८.

गुडुप——गुडुप निजणें—(बालभाषा) डोळ्यांवरून पांघरूण घेऊन निजणें; अगदीं हालचाल न करतां व आपल्या अंगाचा कोणताहि भाग बाहेर न दिसेल अशा रीतीनें निजून राहणें.

गुड्डो——गुड्डो चडतांना खीरि भुर्किलेलों उगडासु जाल्लो—(गो.) डोंगर चढतांना दुपारीं खीर खाल्ली होती ती घशाशीं आली. संकटकालीं आधीं उपभोगलेले सुखाचे दिवस आठवले कीं मन हळहळतें.

गुडयारि आसति आंबे, समुद्रां आस मीठ, लोणचें करून वरणि हाडि—(गो.) डोंगरावर आंबे आहेत आणि समुद्रांत मीठ आहे. लोणचें घालायला वरणी घेऊन ये. मुलीचें लग्न व्हायच्या आधींच तिच्या मुलांसाठीं झबलीं शिवून ठेवा-यचीं अशासारखे जे प्रकार घडतात त्यांना उद्देशून म्हण-तात. तु०-बाजारांत तुरी०

गुढी——गुढी उंच उभवणें—गुढी उभारणें पहा. 'पतिप्रेमाची हे प्रकटच गुढी उंच उभवीं ॥'-सारुह७.४७.

गुढी उजवी देणें—[गुढी = कौल] विनंति मान्य करणें; संमति देणें; मान्यता देणें.

गुढी-गुढ्या उभारणें—विजयोत्सव करणें; जयजय-कार करणें; विजयाचें चिन्ह म्हणून निशाणें उभारून आनंद व्यक्त करणें. 'तुमच्या नांवाच्या आम्ही गुढ्या उभारूं.' -इंप ४३.

यशाची गुढी उभारणें—प्रसिद्धी पावणें; कीर्तिमान होणें; जयाचें चिन्ह म्हणून ध्वज उभारणें.

गुढी डावी देणें--विनंति अमान्य करणें; नापसंत करणें; नाहीं म्हणणें.

❋**गुढीचा पाडवा, नीट बोल गाढवा**—गुढीचा पाडवा हा वर्षारंभाचा दिवस आहे. या दिवशीं आपण ज्या गोष्टींस आरंभ करतों त्या गोष्टी वर्षभर करीत राहतों अशी समजूत आहे. याकरितां त्या दिवशीं तरी अपशब्द तोंडांतून काढूं नये. परंतु ज्याला जन्माची संवय आहे त्याची ती कधींहि जात नाहीं. त्याच्या तोंडांतून चांगले शब्द (जसें गाढवाच्या तोंडांतून चांगला सूर) निघणें शक्य नाहीं.

गुढें——गुढ्याचा पाडवा--[गुढें=कापणी] पिकें कापल्यानंतरचा दिवस. शब्दकोश पहा.

गुण——गुण आठविणें—मृत अथवा गैरहजर मनुष्यासंबंधीच्या चांगल्या गोष्टींचें स्मरण करणें.

गुण उधळणें-पसरणें-पाघळणें--स्वाभाविक वाईट दुष्ट स्वभाव बाहेर पडणें; वाईट गुणांचें आविष्करण करणें. 'हे आपल्या मातोश्रींनीं कसे गुण उधळले पहा !'—रंगराव.

गुण करणें—शहाणपण दर्शविणें; लहान मुलानें फार कौतुकास्पद गोष्टी करणें. 'मालती हल्लीं फारच गुण करती झाली. तिला कीं नाहीं लहान बांगड्या करून आणावयास पाहिजेत.' –विविधवृत्त १६-८-३६, पान १५.

गुण काढणें—१ दुर्गुण टाकून देणें; खोड्या करण्याची संवय सोडणें. २ यथेच्छ झोडपणें; चांगला खरपूस मार देऊन खरें स्वरूप उघड करावयास लावणें. 'बोलाचालीनंतर त्याचे गुण चांगलेच बाहेर काढले.'

गुण घेणें-देणें—पिशाचादि बाधा न व्हावी म्हणून देवादिकांपासून कौल घेणें, देणें.

गुण घेणें—१ एखाद्याच्या चांगल्या गुणांचें अनुकरण करणें; चांगल्याच्या सहवासानें सद्गुणी बनणें. २ गुण आठवणें.

गुणत्रय—सृष्टपदार्थांचे सत्व, रज, तम हे तीन गुण.

गुण दाखविणें; गुणावर येणें—खरा स्वभाव दाखविणें; खरें स्वरूप बाहेर येणें.

गुणपंचक—आधिभौतिक वस्तूंतील मूळभूत पांच गुणांचा समाहार-(अ) १ पृथ्वी, २ आप, ३ तेज, ४ वायु, ५ आकाश. किंवा (आ) १ शब्द, २ रूप, ३ रस ४ गंध, ५ स्पर्श.

गुण शिकविणें—मारून ठोकून शाहणा करणें. गुण काढणें पहा.

गुण सोडणें--विसरणें--सन्मार्ग सोडून वाईट मार्गास लागणें.

गुणा येणें--ईश्वरानें सगुणरूप धारण करणें. 'गुणा आला विटेवरी। पीतांबरधारी सुंदर जो ॥'–तुगा ७.

अठरा गुणांचा खंडोबा—१ अनेक रोगांचें आगर. २ सर्व प्रकारच्या लबाडींत तरबेज.

गुणाची खाण-खाणी-रास--अनेक प्रकारचे चांगले गुण अंगीं असणारा; सर्वगुणसंपन्न.

गुणाची चहा करणें-होणें--सद्गुणावर प्रीति करणें, असणें; चांगल्या गोष्टींचा सन्मान करणें.

गुणाची माती करणें--सद्गुणांचा, बुद्धीचा दुरुपयोग करणें; अंगच्या चांगल्या गोष्टी, बुद्धि नासणें.

गुणास येणें पडणें—१लागू होणें; फळणें; इष्ट परिणाम होणें; उपाय फलद्रूप होणें. २ चांगल्या रीतीनें वागणें; सद्वर्तनी निघणें.

गुण्यागोविंदानें—न भांडतां; फार शांततेनें, सुखानें, आनंदानें. 'पक्षीही लहान घरटीं बांधून। गुण्यागोविंदानें नांदताती ॥' 'गुण्यागोविंदें मला दहा वेळ पलंगावर पालवा।'–प्रला.

❀ **गुण गेला पण वाण राहिला**—गुणाचें अनुकरण न होतां चालीचें मात्र झालें. वाण पहा. "हल्लींची काशी मूळचें आनंदवन असल्यामुळें वनवासी लोकांच्या आचारांतील थोडा भाग अजूनहि तेथें दृष्टीस पडतो. 'गुण गेला पण वाण राहिला.' उदाहरणार्थ–मंगलप्रसंगीं देखील उघडेबोडकें फिरणें, भस्म हा अलंकार समजून तें नेहमीं लावणें, लग्नकार्यांत देखील मातीच्या भांड्यानें पाणी पिणें."–वझे, काशीचा संपूर्ण इतिहास ८. ढवळ्या शेजारीं० पहा.

जेथें गुण तेथें आदर—गुणवान् मनुष्यास सर्वच लोक मान देतात.

गुण पडचो जाल्यार भाजये पानान पडता—(गो.) रोग्याला गुण यायचा असला तर तो भाजीच्या पानानें सुद्धां येतो. नशीब असेल तर क्षुद्र वस्तूसुद्धां तारक ठरते.

ढवळ्याशेजारीं बांधला पोवळा, वाण नाहीं पण गुण लागला—एका शेतकऱ्याजवळ दोन बैल होते. त्यांपैकीं एक शुभ्र पांढऱ्या रंगाचा होता व दुसरा तांबडसर पोवळ्या रंगाचा होता. त्याला पांढरा रंग अधिक आवडत असे. त्यामुळें त्याला वाटलें कीं पोवळा बैल जर पांढऱ्याच्या शेजारीं बांधला तर त्याचाहि रंग हळूहळू पांढरा होईल. त्यानें तसें केलें. पण पांढरा बैल माजोरा, मस्ती करणारा होता व पोवळा बैल स्वभावानें गरीब होता. कांहीं दिवस गेल्यावर त्या शेतकऱ्यास असें आढळून आलें कीं, पोवळ्या बैलाचा रंग कांहीं पांढरा झाला नाहीं पण तो पांढऱ्या बैलाप्रमाणें हट्टी व मारकट मात्र झाला. त्याप्रमाणें संवगड्याचे चांगले गुण अंगीं लागण्याऐवजीं वाईट गुण मात्र लवकर लागतात असा अनुभव. याकरितां वाईट गुण असणारांची संगत पूर्णपणें वर्ज्य करावी.

गुण हे वयावर नसतात–मनुष्य वयानें वाढला म्हणजे त्याच्या अंगचे गुण वाढतात असें नाहीं. गुण हे स्वभावजात असतात. तु०–शहाणपण दाढीवर, वयावर नसतें.

गुणवानाचा मान राखी, तोच खरा पारखी—जो

मनुष्य गुणीजनांचा आदर करतो त्यालाच त्यांच्या अंगच्या गुणांची खरी परीक्षा असते. ज्याला ते गुण कळत नाहींत तोच गुणी जनांचा अनादर करतो.

गुणा गुणज्ञेषु गुणा भवन्ति।--एखादा मनुष्य गुणी असला तरी त्या गुणांचें चीज जो ते गुण जाणतो त्यालाच करतां येतें. इतरांस त्यांची जाणीवहि नसते. इतरांपुढें ते गुण असून नसून सारखेच; एवढेंच नव्हे तर दुर्गुणी मनुष्यामध्यें ते उलट दोषास्पद होतात. गुणा गुणज्ञेषु गुणी भवन्ति ते निर्गुणे प्राप्य भवन्ति दोषाः। सुस्वादुतोयाः प्रवहन्ति नद्यः समुद्रमासाद्य भवन्त्यपेयाः ॥-सुर ८२.४०.

गुणाः पूजास्थानम्-मनुष्यामध्यें त्याचे गुण हेच त्याला मान किंवा प्रतिष्ठा मिळण्यास कारण असतात. त्याचें वय अगर स्त्रीपुरुषत्व हें नसतें. संबंध श्लोक असा--शिशुर्वा शिष्या वा यदसि मम तत्तिष्ठतु तथा, विशुद्धेरुत्कर्षस्त्वयि तु मम भक्तिं द्रढयति। शिशुत्वं स्त्रैणं वा भवतु ननु वन्द्यासि जगति, गुणाः पूजास्थानं गुणिषु नच लिङ्गं न च वयः॥ -उत्तरामचरित्र ४.११.

गुणाः सर्वत्र पूज्यन्ते—गुणी मनुष्याची सर्वत्र वाहवा होते, त्याला सर्व आदर दाखवितात. (अ) गुणाः सर्वत्र पूज्यन्ते पितृवंशो निरर्थकः। वसुदेवं परित्यज्य वासुदेवमुपासते॥ (आ) गुणाः सर्वत्र पूज्यन्ते दूरेपि वसतां सताम्। केतकीगन्धमाघ्रातुं स्वयं गच्छन्ति षट्पदाः॥ (इ) गुणाः सर्वत्र पूज्यन्ते न महत्योऽपि संपदः। पूर्णेन्दुः किं तथा वन्द्यो निष्कलङ्को यथा कृशः॥

गुणापासून गुण उत्पन्न होतात—मनुष्याच्या अंगीं कांहीं चांगले गुण असले म्हणजे इतरहि आनुषंगिक गुण त्याच्या ठिकाणीं वृद्धि पावतात व त्याच्या अंगचे गुण इतर त्याच्याबरोबर सहवास करणाऱ्यांच्याहि अंगीं बाणतात.

गुंतणें——गुंतत बोलणें—अडखळत बोलणें; बोलतांना लागणें; तोतऱ्यासारखें बोलणें.

***गुंतला मनुष्य कुंथून काय (काम) करी**—१ एकदां अडचणींत सांपडल्यावर मग कुरकुर करून काय उपयोग! निमूटपणें येईल तो प्रसंग सहन करून त्यांतून सुटका करून घेतली पाहिजे. २ जो मनुष्य अडचणींत सांपडला आहे तो आपली सुटका करून घेण्याकरितां आपण सांगावें तें काम करतो; पण तें केव्हांहि मनापासून करीत नाहीं, तर मोठ्या नाखुषीनें कुरकुरत करतो.

गुंता——गुंता-गुंते पडणें—१ अडचण येणें. २ कष्ट, त्रास पडणें. 'कृष्णार्थ कृष्णास पडेत गुंते। कीं योगियांच्या हृदयांत गुंते॥'-सारुह ६.१००.

गुंती——गुंती पाडणें—अडचणींत टाकणें. 'मग बोले प्रभावती। स्वांचि मजसी पाडिली गुंती।'-कथा १.५.२१४.

गुदस्त——गुदस्त होणें--१ गत होणें; होऊन जाणें. २ मरण.-पया १८७.

गुन्हा——गुन्हा पदोपदीं आणि न्याय कधींमधीं—१ एखादा मनुष्य नेहमीं अन्याय करतो, पण न्यायाची गोष्ट प्रत्यक्ष क्वचितच त्याच्या हातून घडते. किंवा मनुष्य अनेक लहानमोठे अपराध करीत असतो, पण त्याला त्यांबद्दल एकदांच केव्हांतरी चांगली अद्दल घडते.

गुप्त——गुप्त चोरी, जाते राजद्वारीं—चोरी जरी गुप्तपण केली तरी तिचा बोंभाट सरकारदरबारपर्यंत पोंचल्याशिवाय राहात नाहीं.

गुप्त मन, उत्तम वाचा धरी, तो सुखें देशपर्यटन करी—जो आपले विचार मनांत ठेवतो, भाबड्यासारखे वाटेल तेथें बोलून टाकीत नाहीं; तसेंच जो नेहमीं वाचेनें बोलावयाचें तें चांगलेंच बोलतो, अपशब्द सहसा तोंडावाटे बाहेर काढीत नाहीं, तो सर्व देशभर हिंडला तरी त्याला कोठें त्रास होत नाहीं. याकरितां बडबड करूं नये व नेहमीं चांगलें बोलत जावें.

गुप्त मित्रापेक्षां उघड शत्रु बरा—वरून मित्रत्व दाखवून आंतून आपलें वैर करणारापेक्षां उघडपणें शत्रुत्व करणारापासून आपणांस पुष्कळ कमी त्रास होतो. कारण पहिल्यावर आपण विश्वास ठेवून गैरसावधपणें वागतों व दुसऱ्याबद्दल प्रथमपासूनच काळजी घेतों.

गुवाल्या——गुवाल्या काढणें—(व.) पिच्छा पुरविणें.

गुम——गुमची विद्या गुम्म जाणां, भुरगीं बावडी काय जाणां?—(गो.) आईबापांनीं काय व्यवहार गुपचुपपणें केले ते त्यांचे त्यांना ठाऊक. लहान मुलांना बिचाऱ्यांना आपण कसें झालों आणि कुठून आलों याची काय कल्पना असणार! दोन व्यक्तींनीं गुप्तपणें एखादी गोष्ट करावी आणि ती न कळून जिज्ञासा बुद्धीनें एकानें, काय म्हणून प्रश्न विचारावा, अशा वेळीं म्हणतात.

गुमान——गुमानांत ठेवणें-राखणें—मोघम, अनिश्चित ठेवणें, राखणें.

गुरव——गुरवाचे हातांत झांगट देणें—गांवभर पुकारा होणें; बोभाटा होणें; प्रसिद्ध होणें.

*** गुरव नाचतां थळांत, म्होण मडवळ नाचतां व्हाळांत**—(गो.) गुरवाच्या अंगांत आलें म्हणजे तो देवळांत नाचतो, तें पाहून धोबी ओहोळांत नाचूं लागतो. एक करतो म्हणून तीच गोष्ट दुसरा करतो. मूर्खपणानें केलेलें अनुकरण.

देवळाची गेली घांट तर गुरवाचें गेलें चऱ्हाट-झ्यांट-शेट—देवळांत गुरवाच्या चऱ्हाटाला बांधलेली घंटा चोरीस गेली तर गुरवाला ती घंटा चोरीस गेल्याबद्दल विशेष वाईट वाटत नाहीं; तर तीबरोबर त्याचें चऱ्हाट गेल्याबद्दल अधिक वाईट वाटतें. किंवा तो त्या घंटेच्या चोरीबद्दल त्याचें स्वतःचें कांहींएक नुकसान न झाल्यानें अगदीं उदासीन, बेफिकीर असतो. मनुष्य आपल्या मालकीच्या क्षुल्लक गोष्टीबद्दलहि जितकी काळजी करतो, तितकी देवळासारख्या सार्वजनिक मालकीच्या ठिकाणच्या मोठाल्या वस्तूंचीहि घेत नाहीं; त्यांचेबद्दल तो पूर्णपणें निष्काळजी असतो.

गुरवाचें चित्त बोण्यावर—गुरवाची दृष्टि देवापुढच्या नैवेद्याकडे असते; कारण तो त्याला मिळावयाचा असतो.

गुरवाचें चित्त नैवेद्यावर, गवयाचें चित्त तालासुरावर, वैद्याचें चित्त नाडीवर आणि ब्राह्मणाचें चित्त दक्षिणेवर—निरनिराळ्या लोकांचें लक्ष कोठें असतें, त्यांचा स्वार्थ कशांत असतो हें दाखविलें आहे. –शाब २.१८५. –पामो ३५९.

गुरवाचें चित्त (लक्ष) नैवेद्यावर, वेड्याचें चित्त फोद्यावर—(अशिष्ट) वरीलप्रमाणेंच. गुरवाचें लक्ष नेहमीं देवापुढें ठेवल्या जाणाऱ्या वस्तूंकडे असतें. कारण त्या त्याला मिळावयाच्या असतात. तसें वेड्याचें लक्ष त्याला कांहीं उद्योग नसल्यानें वेडेपणाच्या गोष्टीवर असतें. जो तो आपापल्यापरी आपल्या स्वार्थाकडे पाहतो.

गुरवाचें मागणें, ईश्वरी-देवाचें देणें—गुरवाचें काम देवाकडे मागणी मागण्याचें आहे, पण प्रत्यक्ष देणें हें काम ईश्वराच्या आधीन असतें.

गुरवीण——गुरविणीचीं शितें प्रसादावारी गेलीं—गुरविणीजवळ थोडा फार पदार्थ असला व ती दर्शनास आलेल्या लोकांस प्रसाद वाटूं लागली, तर तो केव्हांच संपून जाऊन कोणाच्याच वांट्यास फारसा येणार नाहीं. पदार्थ थोडा व मागणी फार अशी स्थिति असतां व कोणासहि निर्बंध घालतां येत नाहीं अशी स्थिति असतां म्हणतात. याचाच एक अश्लील पाठ ‘ गुरविणीचीं शेटें प्रसादावारी ’ असा आहे.

देऊळची फुटली घांट, तर गुरविणीचें गेलें झ्यांट—गुरव पहा. तेथें गुरवाबद्दल गुरवीण शब्द योजावा.

गुराखी——गुराख्यानें गुरें टाकलीं आणि मालकानें हांकून आणलीं—पुढें पहा.

गुराख्यानें गुरें टाकलीं पण धन्यास टाकतां येत नाहींत—गुराखी गुरें सोडून गेला तरी मालकाला तीं घरीं आणलींच पाहिजेत. ज्याचा माल त्याला जितकी त्यासंबंधीं कळकळ तितकी नोकरास नसते.

गुराख्याला गुरें चुकलीं म्हणून धन्याला चुकतील काय—गुराख्यानें रानांत गुरें चारावयास नेलीं तर तीं न चुकतां सर्व परत आणण्याची काळजी जितकी मालकाला असते तितकी गुराख्याला असणें शक्य नाहीं. धन्याला जितकी आपल्या मालासंबंधीं काळजी वाटते तितकी चाकराला वाटत नाहीं.

गुरु——मुका गुरू—न वाहणारा फोड.

गुरुकिल्ली—गुरूनें सांगितलेला उपदेश; त्यानें मोक्षाकरितां दिलेली साधना. यावरून, १ गूढ; मर्म; रहस्य. २ खुबी; युक्ति. ‘प्रकरण जरा जड आहे; पण तुझ्यापासून तिला नरम करण्याची गुरुकिल्ली आतां शिकलोंच आहे.’–त्राटिका.

गुरुमंत्र—शिकवण; सल्ला. (बहुधा वाईट अर्थानें उपयोग.)

गुरुस्मरण करणें—कार्यास आरंभ करणें. तु०–देवाचें नांव घेणें.

***गुरु गुरु विद्या, शिर शिर (सरसर) अक्कल**—प्रत्येक गुरूपाशीं असलेलें ज्ञान निरनिराळ्या प्रकारचें असतें. सर्वांना सारखीच विद्या अवगत असते असें नाहीं. त्याचप्रमाणें प्रत्येक मनुष्याची अक्कल निरनिराळ्या प्रकारें चालते. प्रत्येकाच्या बुद्धीस निरनिराळ्या प्रकारच्या युक्ती सुचतात. many men, many minds.

गुरुगेलि विद्या गुरु मात्यारि आइलि—(गो.) गुरूची विद्या गुरूस फळली, पहा.

गुरु तसा चेला—जसा गुरु असेल त्याचप्रमाणें तो आपला शिष्य निर्माण करील. कारण शिष्य त्याचीच विद्या शिकत असतो. (गु.) गुरु तेवा चेला.

गुरु लोभी चेला लालची—दोघेहि सारखेच. गुरु आशाळभूत असला म्हणजे शिष्यहि तसाच हावरट निघतो. –इसं. जोधराज. ३२.

गुरुवचनीं विश्वास, त्याचा तुटतो भवपाश—ज्याची आपल्या गुरूच्या उपदेशावर श्रद्धा असते तो या जीवनाच्या बंधापासून मुक्त होतो.

गुरूशिष्य गोसावडे, खायला पाहिजेत पेढे––गुरू व शिष्य दोघेहि वैराग्याचा आव आणतात. पण चमचमीत गोड पदार्थ खावयास मिळावेत अशी दोघांचीहि इच्छा असते; खरी विरक्ति कोणाच्याहि अंगीं बाणलेली नसते. भोंदू गुरुशिष्यांबद्दल म्हणतात.

गुरुशिष्याचा कैवारी—गुरु हा शिष्याच्या अपराधावर पांघरूण घालीत असतो.–शाब २.२२९.

गुरूचा चेला, म्हशीचा हेला––ज्याप्रमाणें रेड्याला कष्टाचें काम करावें लागतें व बहुधा अक्कल बेताचीच असते त्याप्रमाणें गुरूनें बाळगलेला शिष्य हा नुसता कामाचा गाडा ओढण्याकरितां असतो. त्याला गुरूची सेवा रेड्याप्रमाणें करावी लागते; पण ज्ञान मात्र मुळींच प्राप्त होत नाहीं.

गुरूची घरी नव्हे वाणी, माझ्या पेवांत गेलें पाणी–ज्याचें एखादें नुकसान होतें तो त्याचा दोष आपल्या गुरूच्या माथीं मारतो. वास्तविक गुरूपदेशाचा आणि पावसाचें पाणी पेवांत जाण्याचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. पण शिष्याची अपेक्षा आपली सर्व प्रकारची काळजी गुरूनें वाहावी अशी असते; पण ती व्यर्थ आहे.

गुरूची विद्या–अक्कल गुरूला फळली–भोंवली; गुरूची विद्या गुरूवर फिरली––दुसऱ्याचें वाईट करण्याचा उपदेश ज्यानें केला त्याच्यावरच त्या उपदेशाचा प्रयोग होणें. ज्याला शिकविलें तोच वाइटावर. [एका मनुष्यास दुसऱ्याचें कांहीं देणें होतें तेव्हां तो वकीलाकडे गेला. त्यानें त्यास वेड्याचें सोंग घेऊन नुसता 'बें' असा उच्चार करण्यास सांगितलें. तेव्हां कोर्टांत त्यानें प्रत्येक प्रश्नास बें ! असें उत्तर दिलें तेव्हां तो वेडा ठरून त्याचें देणें सुटलें. पुढें वकिलानें आपली फी मागितली. तेव्हां त्यानें त्यालाहि बें असेंच उत्तर दिलें व त्याची फी बुडविली. याप्रमाणें गुरूची विद्या गुरूला फळली.] 'शिष्य झाले मस्त गुरूची विद्या गुरूवर फिरली' –अफला पृ. ७०.१५.

गुरुपेक्षां चेला अधिक––गुरु एकपट (शहाणा लबाड, इ.) तर शिष्य सातपट. (गु.) गुरुथी चेला आगला.

गुरूला गचांडी, सरकारला कासंडी आणि भुताला दहीहंडी—गुरूला कधींहि संतुष्ट करतां यावयाचें नाहीं. याकरितां उत्तम उपाय म्हणजे त्याचा प्रवेश घरांत न होऊं देणें व तो आल्यास गचांडी मारून हांकून देणें हा आहे. सरकारचें जें देणें आहे तें दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं तेव्हां सरकारी अधिकारी आला म्हणजे त्याच्या स्वाधीन कासंडी (दुधाची वगैरे) केली पाहिजे व भुतानें पछाडलें असल्यास त्याची तृप्ति दहीहंडी देऊन करून त्यास घालविलें पाहिजे. या तीन गोष्टींवर हे तीन उपाय आहेत.

गुरुजी——गुरुजी पानतंबाखू मागे । शिष्य वाण्याचे घर सांगे ॥––गुरु आपली चैन चालविण्यासाठीं शिष्यास काम सांगतो तर शिष्य उलट उत्तर देतो.

गुरुजी या परिचे । शिष्ये हुषार (शिटाव) बंदरचे ॥ जसे गुरु तसे शिष्य. गुरुजी जर लबाड असतील तर शिष्य त्यापेक्षांहि लबाड असतात. जसा गुरु तसा चेला. गुरुजी या परिचे । या परिचे । शिष्ये छिटाऊ बंदरीचे ॥ गुरुजी भांगतमाखू मागे । शिष्या वाण्याचें घर सांगे ।

गुरुत्व——गुरुत्व नात्तिल्याक तिन्नीयकडे, गुरुत्व नाथिल्याक तिनीयकडेन—(गो.) गुरूची अवकृपा झाल्यावर तिन्हीकडे (सर्वत्र) नुकसान.

गुरूं——गुरानें रेटणें—ज्याप्रमाणें गुरूं मुसंडी मारून मागें रेटतें त्याप्रमाणें जोराचा धक्का देऊन मागें सारणें; जोराचा हल्ला करून मागें दाबणें. 'मग शिंदे यांजकडील फौजेनें गुरानें रेटावें तैसा मार देत देत (गिलचा) माघारा सारून त्याचे गोटांत घातला.'–भाव १०६.

❋ **गुरा गाताडी नि मुला म्हातारी**––गुरूं सांभाळावयाचें असलें किंवा त्यानें इकडेतिकडे फिरूं नये अशी इच्छा असली तर त्यास गाताडीस बांधून ठेवितात; त्याप्रमाणें मुलानें गडबड करूं नये, इकडे तिकडे धावूं नये याकरितां त्याला सांभाळण्याकरितां घरांतील म्हातारीच्या स्वाधीन करण्यांत येतें. ती म्हातारी त्याला घेऊन खेळवीत बसते. एवढाच तिचा उपयोग असतो.

गुरांना गोठाच आवडत असेल तर त्याला यजमान तरी काय करील––गुरांना बांधण्याची योग्य जागा गोठाच होय. तथापि एखाद्यानें त्यांना घरांत बांधावयास सुरुवात केली. पण त्या गुरांनाच जर घरापेक्षां गोठा अधिक पसंत असेल तर त्यास धनी काय करणार ? त्यांना गोठ्यांतच नेऊन बांधलीं पाहिजेत. तुमच्या जशा आकांक्षा अस-

तील त्याप्रमाणेंच तुम्हांला लाभ होईल; अधिकास तुम्ही अपात्र ठराल. -टिसू २२१.

लेंकरांगुरांनीं वाडा साजरा—एखादें घर खूप माणसांनीं व गोठा खूप गुरांनीं गजबजलेला असला म्हणजे असा संसार फार आल्हादकारक वाटतो, शोभिवंत दिसतो.

गुरूं काढतें भूक आणि मूल (पोर) काढतें दुःख—गुराला भूक लागली तरी खावयास मागतां येत नाहीं त्यामुळें तें क्षुधेची पीडा निमूटपणें सहन करतें व जेव्हां मालक घालील तेव्हां चारा खाऊन स्वस्थ राहातें त्याचप्रमाणें मुलाला दुखणें आलें असतां त्याला तें कांहीं बरोबर वर्णन करून सांगतां येत नाहीं. त्यामुळें त्याला तें सहन करावें लागतें व जें औषध मिळेल तें घेऊन जेव्हां खणें बरें होईल तेव्हां होईल, तोंपर्यंत दुःख काढावें लागतें.

गुरेंढोरें रवंथ करितीं, माणसाला नाहीं विश्रांति—गुरांढोरांना खाणें खाल्ल्यावर रवंथ करण्याला तरी फुरसद मिळते व तेवढी तरी त्यांना विश्रांति मिळते, पण मनुष्याच्या मागें सारखें काम लागलेलें असतें. त्याला जेवण झाल्यावर जरासुद्धां विश्रांति मिळत नाहीं. या दृष्टीनें कष्ट करणाऱ्या लोकांचें भाग्य गुरांढोरांपेक्षांहि खडतर असतें.

गुऱ्हाळ——गोष्टीचें गुऱ्हाळ, पायलीचा फराळ—एकीकडे गप्पा गोष्टी करीत मनुष्य खात बसला म्हणजे गोष्टी लवकर संपत नाहींत व एकीकडे तोंड तर सारखें चाललेलें असतें व पुष्कळ पदार्थ खाल्ला जातो.

गुऱ्हाळघर——गुऱ्हाळघर आणि लगीनघर बरोबर—ज्याप्रमाणें लग्नघरांत अनेक माणसें असून गडबड गोंधळ चाललेला असतो, त्याप्रमाणें गुऱ्हाळावरहि अनेक माणसें लागतात व त्याची गडबड सारखी चालू राहाते.

गुलगुल——गुलगुल गोष्टी—प्रेमाच्या कानगोष्टी. कानाला बऱ्या लागणाऱ्या व कानांतच सांगितल्या जाणाऱ्या गोष्टी; प्रेमाचें हितगुज; गुजगोष्टी. 'कोणी आपल्या घरीच बायकोशीं गुलगुल गोष्टी बोलण्यास······निघून गेले.'—सुदे ७५.

गुलदस्त——गुलदस्तांत ठेवणें—(गंजीफाच्या खेळांतील संज्ञा.) गंजीफांत पानें द्यावयाचीं असलीं म्हणजे तीं जशीं न पाहतां वाटलीं जातात तशींच चार चार प्रमाणें ठेवावीं लागतात. त्यास गुलदस्त म्हणतात. १ राखून ठेवणें २ लपवून ठेवणें. गुप्त राखणें—'पण तें सध्या गुलदस्तांतच राहूं देणें बरें.'—नपुक १८.

गुलहौशी——गुलहौशी प्राणी—एखादा आपले अतिशय चोज पुरवणारा मनुष्य; चैनी, ख्यालीखुशाली करणारा मनुष्य.

गुलाब——गुलाबाचें फूल—१ गुलाब झाडाचें फूल. हें फार नाजूक असतें यावरून, २ नाजूक स्त्री, मूल वगैरे. 'अशा उन्हांत आपली नाजूक काय करपेल. आपण आपलें हें गुलाबाचें फूल घरांत नेऊन जपून ठेवा.'—त्राटिका.

गुलाबी झोंप—पहांटेची थंड वेळेची झोंप; ही कांहींना फार सुखकर वाटते.

गुलाबी थंडी—(गुलाबाप्रमाणें सुखकर, मंद.) सौम्य प्रकारची, सुखावह थंड हवा; पहांटेची थंडी.

❀ **गुलाबाचा वास, मना दे उल्हास**—गुलाबाच्या फुलाचा वास फार आल्हादकारक असतो.

गुलाबाची मिळे शेज, जपावें कांट्यास रोज—गुलाबाच्या शय्येवर निजावयाचें असलें तर त्याच्या कांट्यास जपलें पाहिजे. एखादा लाभ करून घ्यावयाचा असला तर तदुनुषंगिक जे कष्ट भोगणें जरूर असेल तेवढे भोगण्याची तयारी असली पाहिजे किंवा जरूर ती काळजी घेतली पाहिजे.

गुलाबाचें फूल गेलें व कांटा राहिला—एखाद्या गोष्टींतील चांगला भाग तेवढा गमावून वाईट भाग, त्रासदायक अंश तेवढा आपल्या वांट्यास आला म्हणजे म्हणतात.

गुलाबाचें फूल सुवासी, कांटे असती त्याच्या अंगाशीं—गुलाबाच्या फुलाला वास फार चांगला येतो पण त्या झाडाच्या अंगाला सर्वत्र कांटे असतात. एखाद्या गोष्टीपासून पुष्कळ लाभ होईल असें वाटत असतें पण तो प्रत्यक्ष पदरांत पडण्याच्या मार्गांत कांहीं अडचणी असतात, त्या नजरे आड करतां कामा नये.

गुलाबास वास, पण कांटे शरीरास—वरप्रमाणें. सुख हें अगदीं पूर्णपणें निर्भेळ नसतें, तर तें दुःखमिश्रित असतें.

गुलाबी पुष्पाच्या योगानें, खुडून घेती कांटे—१ गुलाबाचीं फुलें तोडावयास लागलें असतां कांहीं कांटेहि त्याबरोबर तोडून घ्यावे लागतात. सुखाबरोबर कांहीं दुःखाचा अंशहि भोगावा लागतो. चांगल्याबरोबर कांहीं वाइटाचीहि प्राप्ति होते ती टाळून चालत नाहीं. २ जे कांटे गुलाबाच्या फुलाजवळ असतात ते त्याच्याबरोबर तोडले जातात. सहवासाचें सुखदुःख भोगावें लागतें. For rose the thorn is often plucked. —सवि १०९५.

गुलाम——गुलाम जरी झाला, तरी एका खाणींतला—गुलाम असला तरी तो आपल्यासारखा मनुष्यच असतो.

गुलाम ठोक्याशिवाय वठणीस येत नाहीं—गुलामास शिक्षा केल्याशिवाय तो बरोबर काम करीत नाहीं. त्याला नेहमीं धाकांत ठेवावा लागतो.

गुलामाला गुलाम झाल्याखेरीज संशय (समक्षा) फिटत नाहीं—लबाड मनुष्याशीं लबाडी केल्याशिवाय त्याला अद्दल घडत नाहीं. लबाडाशीं सरळ व्यवहार करून भागत नाहीं. शठे शाठ्यं समाचरेत्।

गुलाल——गुलालनी हौस डोस्कामा खवडा—(अहि.) गुलाल उधळण्याची तर मनांत हौस असते पण डोक्यांत खवडे असतात किंवा होतील त्याचें काय. डोक्यांत जर गुलालाचा मळ राहिला तर त्यापासून फोड होण्याचा किंवा असल्यास ते अधिक वाढण्याचा संभव असतो. एखादी गोष्ट करण्याची हौस असल्यास तिच्यापासून होणारे परिणाम टाळण्याची प्रथम तजवीज केली पाहिजे.

गुळेर——गुळेर दिवनुं वांयगण घेवप; गुळेर दिवन वांयगें घेवप—(गो.) [गुळेर = एक उत्कृष्ट प्रकारचें फळ] गुळेर देऊन त्याबदलीं वांगें घ्यावयाचें. भारी वस्तूबद्दल हलका मोबदला.

गुह्य——गुह्य कोठें सांगावें, ऐसें मना उमजावें—आपल्या मनांतील गुप्त गोष्ट सहसा कोणाजवळ सांगू नये. सांगावयाची झाल्यास ती नीटपणें विचार करून योग्य मनुष्यासच सांगावी.

गुह्य ठेवण्याची नाहीं युक्ति, तर राज्य चालविण्याची भ्रांति—ज्या मनुष्याला आपले विचार गुप्त ठेवतां येत नाहींत आपलीं मर्मस्थानें गुप्त राखतां येत नाहींत, त्याला राज्यकारभार कधींहि चालवितां यावयाचा नाहीं.

गुह्य बोलतेवेळीं, मागें पुढें न्याहाळी—मनांतील गुप्त गोष्ट सांगत असतां नीट आजूबाजूस पाहावें व ती कोणी भलताच मनुष्य ऐकत नसल्याबद्दल खात्री करून घ्यावी. भिंतीस कान असतात.

गुह्य मित्रास न सांगेल, तर प्रगट झाल्यावर फजीत पावेल—जो आपलें गुह्य मित्रास सांगून त्याचा योग्य तो सल्ला घेत नाहीं त्याला तें गुह्य फुटल्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी येते. कारण त्यावेळीं योग्य उपाय करण्याची वेळ बहुधा टळून गेलेली असते व मित्राच्या साहाय्याचा त्याला उपयोग होत नाहीं.

गुळगुळ——गुळगुळ थापडी, शेंडी कां मोकळी—पोकळ बाता मारणारास म्हणतात.

गुळगुळीत——गुळगुळीत करणें—उलटी सुलटी (हजामत) करणें; (ल) चांगली खरडपट्टी काढणें.

गुळणा——गुळणा धरणें—(मिठाची गुळणी धरणें). तोंडांत गुळणा असला म्हणजे तोंडांतून शब्द बाहेर पडत नाहीं. व मौन राखतां येतें यावरून. १ गुप्त ठेवणें. २ न बोलणें; तोंड दाबून धरणें.

गुळणा सोडणें—गुह्य फोडणें.

तूपदुधाच्या गुळण्या टाकणें—गुळणा करण्यास पाण्याऐवजीं तूप किंवा दूध वापरतां येईल एवढें ऐश्वर्य असणें; संपत्ति भरपूर असणें.

गुळमुळ——गुळमूळ पंचा बारोदरशें; गुळमुळपंचे बारोत्तरशें—(गो.) एखाद्याला कांहीं प्रश्न विचारला आणि तो जर उत्तर देतांना गुळमुळ करायला लागला, त्याला व्यवस्थित आणि समाधानकारक उत्तर देतां नाहीं आलें तर म्हणतात.

गुळें——गुळें उचलणें-काढणें—[गुळें=परागंदा लोकांचा समूह] परागंदा होणें; घराची वगैरे सर्व आवराआवर करून घर सोडून देशांतरास जाणें. पूर्वी भयंकर दुष्काळ किंवा आवर्षण पडल्यास लोक घरदार सोडून देशांतरास जात व कोठें तरी कसातरी निर्वाह करीत. हे लोक बहुधा एका समूहानें जात, त्यामुळें ज्या गांवीं जातील त्या गांवीं प्रसंग पडल्यास लुटालूटहि करीत. याकरितां तेथील लोकांस यांची कांहींतरी तजवीज करून त्यांस पुढें रवाना करणें भाग पडे.

गुळें येणें—पेंढार येणें; परागंदा झालेले लोक आपल्या गांवीं येणें. वर पहा.

गू——गूकाडी करणें—(काडीनें गू चिवडणें) १ एखाद्याचे दोष पुन्हां पुन्हां उच्चारणें. २ अतिशय त्रास देणें. ३ अतिशय अपकीर्ति करणें. ४ नासविणें; बिघडविणें; खराब करणें.

गू किवचणें-चिवडणें—गलिच्छ गोष्टी करूं लागणें; एखाद्यास वेड लागणें; खूळ लागणें.

अन्न सोडून गू खाणें—माणुसकी सोडणें; मनुष्यांतून उठणें; माणूसकीस न शोभेल अशी गोष्ट करणें.

गूघाण करणें—नासणें; बिघडविणें; पूर्णपणें नासाडी करणें; अगदीं अस्ताव्यस्त करून टाकणें.

गू चिवडणें—वेडें होणें; वेड लागणें.

गू जाळणें--१ अंगांतील पिशाच्च जाण्यासाठीं अंगांत येणाऱ्यापुढें विष्टा जाळतात तो प्रयोग. २ एखाद्याला भयंकर चिडविणारें, अपमानाचें कृत्य करणें.

गू जाळून धूर करणें--वाईट कृत्य करून त्याचा आनंद मानणें.

गू माणूस--किळसवाणा मनुष्य; घाणेरडा; अव्यवस्थित माणूस.

गुवांतील कवडी घेणारा; गुवांतील कवडी दांतांनीं काढणारा—अतिशय कंजूष; अत्यंत अल्प लाभाकरतांहि वाटेल ती घाणेरडी गोष्ट करणारा.

गुवावरून ओढणें--अतिशय फजिति, अपमान करणें; छीथू करणें.

❀ **गू देकिलें डुकरशें हासता**—(गो.) गू पाहिल्यावर डुकराला जसा हर्ष होतो तसा हंसतो. प्रिय वस्तूच्या प्राप्तीनें एखाद्याला हर्ष झाला कीं त्याला पाहून विनोदानें म्हणतात.

गू न्हय भट हागलो—(गो.) गू नव्हे भट हागला. एखादी वाईट गोष्ट मोठ्या नांवानें शोभविली तरी तिचा वाईटपणा झांकत नाहीं. पादला नाहीं तर वारा सरला.

गुवाचा भाऊ पाद, पादाचा भाऊ गू—दोघहि सारखेच घाणेरडे; दोघेहि सारखेच बदमाष, लुच्चे; दोघांमध्येंहि बरेवाईट निवडतां येणार नाहीं असे.

गुवाडींतल्यानं वचें पुण दिवाणांतल्यान वचूं नये—(गो.) जिथें माणसें मलविसर्जन करतात अशा जागेंतून एक वेळ गेलें तरी चालेल; पण कोर्टांत मात्र कधींच जाऊं नये.

गुवांत धोंडा टाकावा आणि शिंतोडा (उडवून) घ्यावा—आपण होऊन आपल्यावर एखादा अपवाद ओढवून घेणें; नसतेंच लचांड गळ्यांत अडकवून घेऊन आपली फजीती करून घेणें. चिखल पहा.

गूड——**गूड खाय घोडा, तेल खाय जोडा**—घोडा हा सारखा वाटूक, धान्याच्या पेंढ्या खात असतो, त्याचप्रमाणें जोडा कितीतरी तेल पितो. घालावें तितकें थोडेंच.

गूढ——**गूढ वाटणें-दिसणें-पडणें**--पेंच पडणें; कोडें पडणें; गोंधळांत पडणें.

गूढांत पडणें—पेंचांत सांपडणें; गोंधळणें; विचारांत पडणें.

गूळ——**गूळ करणें**—उपहास, निंदा करणें.

गूळ देणें; गूळ हातीं देणें; (हातावर-हातीं) गूळखोबरें देणें—लहान मुलाला गूळखोबरें देऊन त्याच्याकडून लागेल तें काम करून घेतां येतें. १ लालूच दाखविणें, लांच देणें. २ फसविणें; भुरळ घालणें; तोंडावर हात फिरविणें. 'गुळखोबरें विलोकुनि भलत्याहि जनासि बाळक वळावा।' –मोउद्योग ७.९.

गूळपुऱ्या वाटणें—हौस पुरविणें.

गुळापुरणाच्या करणें--गुळापुरणाच्या याच्या पुढें पोळ्या शब्दाचा अध्याहार समजावा. गुळाच्या पुरणाच्या पोळ्या करणें म्हणजे मनोराज्यांत गोड गोड सुखस्वप्नांची रेलचेल करणें असा अर्थ. 'त्यानें पाहिजे तशा गुळापुरणाच्या आपल्या जागीं केल्या, पण अखेर दहा रुपयांच्या नोकरीवर राहाण्याचें कबूल करावें लागलें'.

गुळाचा गणपति-गणेश—[गुळाचा गणपति जसा चिकटून राहातो त्याप्रमाणें जागा न सोडणारा पण धनीपणा न चालविणारा] १ आळशी; मंद; गलेलठ्ठ; अचलोजी. २ होयबा; बुळा.

गुळावरचा मुंगळा—नेहमीं गोड खावयास पाहिजे असणारा; गोड खाण्यास संवकलेला. Much given to eating sweet things.

गुळावरल्या माशा—गूळ आहे तोंपर्यंत चिकटून राहाणारे. स्वार्थासाठीं भोंवतीं जमलेलीं माणसें.

❀ **गुळखोबरें देतो, तो जाळें लावितो**—जो आपल्याला एखादी लालूच दाखवितो, तो आपल्याला एखाद्या पाशांत अडकविण्याचा प्रयत्न करीत असतो, ही गोष्ट मनांत समजून असावें. जो लाडीगोडी लावतो त्याच्या मनांत आपल्याला फसविण्याचा उद्देश असतो.

गूळ घातले तसे गोड; गूळ घातला तितका गाड--एखाद्या पदार्थांत जितका गूळ घालावा त्याप्रमाणें तो गोड होतो. आपण जितका चांगुलपणा दाखवावा तितका तो परिणामकारक होतो. (गु.) गोळ घाले एटलु गल्युं थाय. Plenty makes dainty.

गूळ चारणारापेक्षां निंब चारणारा बरा—गोड गोड बोलून आपणांस फसविणाऱ्या मनुष्यापेक्षां निंबाप्रमाणें कडू पण स्पष्टपणें बोलणारा मनुष्य अधिक चांगला. तु०–सुलभाः पुरुषा राजन् सततं प्रियवादिनः। अप्रियस्यपि पथ्यस्य श्रोता वक्ताच दुर्लभः ॥

गूळ चोरावं तो पाप, तूप चोरावं तो पाप—कोणताहि पदार्थ चोरला तरी पाप हें लागणारच मग चोरी गुळाची असो किं तुपाची असो मग करावयाचीच तर अधिक फायदा होण्यासारखी तरी करावी.

गूळ नसेल तर गुळासारखें गोड बोलावें—प्रत्यक्ष आपल्याला एखाद्याला मदत करतां येत नसेल तर निदान गोड तरी बोलावें.

गूळ नाहीं तर गुळसं बोलणंहि नाहीं—(व.) तुमच्या घरीं गूळ मिळत नाहीं, गुळासारखी पैसा लागणारी जिन्नस मिळत नाहीं तर नाहीं; निदान गोड बोलणें तरी ठेवा; त्याला तर पैसे लागत नाहीं.

गूळ नाहीं पण गुळशी वाचा तर पाहिजे—वर पहा.

गुळाचा गणपति आणि गुळाचाच नैवेद्य; गुळाचा गणपति, काकवीचा अभिषेक; गुळाचा गणपति खडीसाखरेचा नैवेद्य—१ दोन व्यक्ति एकाच हितसंबंधाच्या, किंवा एकमेकाशीं निकट संबद्ध असतात तेव्हां एकाविषयीं दुसऱ्याची कृति किंवा मत फारसें विचारांत घेण्याचें कारण नसतें. ते सिद्धसाधकाप्रमाणें असणारच. २ एकाच प्रकारच्या, सदृश वस्तु, व्यक्ति एकमेकांचा पाठपुरावा करण्यास पुढें आल्या असतां म्हणतात.

गुळाची गोडी कांहीं खाल्ल्यावांचून समजणार आहे ?—गुळाची चव चाखल्याशिवाय कशी कळणार. अनुभवावांचून कांहीं खरें ज्ञान होत नाहीं.

गाढवास गुळाची चव काय ?—कोंबड्यापुढें मोती. ज्याला एखाद्या गोष्टीचा कांहीं उपयोग नाहीं त्याला ती गोष्ट देणें.

गुळाची भेली, मुंगळ्यानें पार नेली—मुंगळे संख्येनें किती झाले तरी गुळाची सबंध ढेप त्यांना नाहींशी करणें शक्य नाहीं. यावरून एखादी अशक्य गोष्ट घडली असें सांगणें. विशेषतः अनेक क्षुद्र लोकांनीं मिळून एखाद्या बलाढ्य मनुष्याला पराजित केलें असें सांगणें.

गुळाचेंच पथ्य करावयाचें आणि गुलगुले खायाचे—गूळ खावयाचा नाहीं असा नियम करावयाचा व गुळाचेंच पदार्थ करून खावयाचे. जी गोष्ट करावयाची नाहीं तीच अप्रत्यक्षपणें हातून घडेल असें वर्तन ठेवावयाचें.

जो गुळानें मरतो त्यास विष कशास ? (गो.) गुळान मरतं त्यास चीख कशाला ?—गोड बोलल्यानें जेथें काम होण्यासारखें असेल तेथें कठोर शब्द वापरण्याचें कारणच काय ? सौम्य उपायानें कार्य होत असतांना कठोर उपाय वापरण्याचें कांहीं कारण नाहीं. तु०-जो सुईनें मरतो त्याला पारय (पहार) कशाला ! (गु.) गोळे मरे तेने जेहरे शुं काम मारवुं !

गृह——गृहच्छिद्र—१ कुटुंबांतील, खाजगी दोष, व्यंगें. ' श्रीमंतांच्या घरोघर दुराचार व गृहच्छिद्रें किती असतात हें जवळ जवळच्या लोकांस तरी पूर्णपणें विदित असते.' -नि २. २ घरांतील फूट, बेबनाव.

*** गृहिणी गृहमुच्यते; गृहं तु गृहिणीहीनं कान्तार**—घरांत स्त्री (पत्नी) असेल तरच तें घर म्हणावें. स्त्रीशिवाय घर हें अरण्यासारखें वाटतें. हा अनुभव सर्वांना आहेच. सबंध श्लोक असा—न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते । गृहं तु गृहिणीहीनं कान्तारमिति मन्यते (कान्तारादतिरिच्यते) ॥

गृहस्थ——गृहस्थी अक्षर—सुबोध, सुवाच्य वळणदार अक्षर. पूर्वी गृहस्थ लोक तेवढेच मोडी लिहीत असत व वळदणार अक्षर असणें हा त्यांचा बाणा असे. भिक्षुक बहुधा आशिक्षित असत व ते सर्व बाळबोधींत लेखन करीत. त्यामुळें त्यांस मोडी चांगलें लिहितां येत नसे.

गृहस्थी कावा—१ घरगुती खर्चाचा बेतबात; टापटीप. २ घराची पैशासंबंधीं वगैरे नीट व्यवस्था; मितव्यय.

गृहस्थी खर्च—मितव्यय; बेतबात.

गृहस्थी बाणा-बेत—१ कुटुंबवत्सलाची रीतभात; गृहस्थधर्म. २ टापटिपीची, व्यवस्थितपणाची वागणूक.

*** गृहस्थाला अवदान आणि भिक्षुकाला कुदान**—(शय्यादान)—अवदान पहा.

गिरॅस्तालॅ मुडॅ भायर सर्तापुसून दुर्बळ्यांलॅ चॅबॅ मॅल्लॅ—(गो.) श्रीमंताच्या घरचा तांदुळांचा मुडा बाहेर निघेपर्यंत इकडे भुकेलेल्या माणसाचा जीव जायचा. श्रीमंतानें देतों देतों अशीं आश्वासनें देत राहायचीं आणि त्याच्या देणगीची वाट पाहतां पाहतां गरीबाचे प्राण कंठाशीं यायचे अशा अर्थानें म्हणतात.

गृहस्थाश्रम झेपत नाहीं, संन्यास पाळत नाहीं—गृहस्थाश्रमाप्रमाणें वागावयास जावें तर प्रपंच चालविण्याची धमक नाहीं, पैसे मिळविण्याचें सामर्थ्य नाहीं व म्हणून घरदार सोडून संन्यास घ्यावा तर अंगीं वैराग्य बाणलेलें नाहीं, सुखाची आशा सुटत नाहीं. याप्रमाणें कोणतीहि गोष्ट परवडत नाहीं.

गृहिणी—गृह पहा.

गेठें——गेठें गेलीं (गलें), भोंकें राहिलीं—[गेठें = एक दागीना] काप गेले भोंकें राहिलीं, पहा. दागिना घालण्याकरितां म्हणून कानास भोंकें पाडावयाचीं पण तो दागिना गेल्यावर तीं नुसतींच भोंकें वाईट दिसतात. वैभव-काळीं केलेल्या अनेक गोष्टी वैभव गेल्यानंतर अनाठायीं व बेरूप दिसूं लागतात.

गेला——गेला बाजार (तरी)--(बाजार उठून गेल्यावर विकला तरी) किमानपक्षीं; कमींतकमी. जाणें पहा.

गेलेलें असणें—ऐकण्यांत आलेलें, माहितींत असणें; ठाऊक असणें; ज्ञान असणें.

*गेला तो मेला—गेलेलें पुन्हां भरून येत नाहीं; एकदां एखादी गोष्ट बदलून आली म्हणजे ती पुन्हा बदलत नाहीं.

गेला दिवस कांहीं पुन्हां येत नाहीं—एकदां वेळ गेली म्हणजे ती पुन्हां येत नाहीं. Yesterday cannot be recalled.

गेला मेला संपला-गतला--ज्या गोष्टीचा मागमूसहि राहात नाहीं अशा गोष्टीबद्दल म्हणतात.

गेली चाकाची मांडोळी, झाली गाडीची रांडोळी--खांडोळी—चाकाची धांव जर निसटली तर सर्व गाडी मोडल्याशिवाय राहात नाहीं. ज्या गोष्टीवर सर्व आनुषंगिक गोष्टी अवलंबून असतात अशी मुख्य आधारभूत गोष्ट नाहींशी झाली म्हणजे तिच्यावर आधारून असलेला सर्व डोलारा कोसळून पडतो.

गेली नाहीं तीर्था, नि फिटलीं नाहीं भ्रमणा—[भ्रमणा=भ्रम, वेडी समजूत.] तीर्थासंबंधी जी आपली भावना असते कीं, तेथील सर्व परिस्थिति, सर्व व्यवहार, सरळ व पुण्यप्रदच असतील, ती आपण प्रत्यक्ष त्या तीर्थास गेलों व तेथील लांडीलबाडी अवलोकन केली म्हणजे लयास जाते व इतर सामान्य स्थळापेक्षां तेथें कांहीं विशेष नाहीं असा प्रत्यय येतो. एखादे स्थळीं आपलें काम होईल. किंवा अमूक एक मनुष्य खास आपलें काम करील अशा समजावर आपण जातों, पण तेथें जातांच किंवा त्या मनुष्याविषयीं विपरीत अनुभव आपणास येतो. या अर्थाची ही म्हण आहे.

गेली पत येत नाहीं, फुटकी काच जडत नाहीं—ज्याप्रमाणें एकदां फुटलेली काच सांधतां येत नाहीं त्याप्रमाणें एकदां मनुष्याची नापत झाली म्हणजे पुन्हां त्यावर कोणी विश्वास ठेवीत नाहीं.

गेली वीरसरी । मग त्यास रांड मारी ॥—मनुष्याच्या अंगांतला पराक्रम नाहींसा झाला म्हणजे कोणीहि त्याला फजीत करावें.--तुगा ३२३२.

गेली वेळ (घडी) पुनः येत नाहीं—पुढें पहा. (गु.) गयो अवसर पाछो न आवे. Time lost can never be regained.

गेली वेळ पुन्हां येत नाहीं, सदां सुख मिळत नाहीं—एखादी संधि एकदां गमावली तर ती पुन्हां प्राप्त होत नाहीं. त्याप्रमाणेंच सुखाचे दिवस कायमचे टिकत नाहींत. तु०-गेली वेळा येईल पुन्हां असें कधींहि न वदावें।

गेलें गत फाटलें खत; गेलें तें गत फाटलें तें खत--मुदत संपल्यावर खत निरुपयोगी होणें. ज्याप्रमाणें एकदां खत फाटलें म्हणजे त्या गोष्टीचा संबंध सुटतो. तो व्यवहार पूर्णपणें बाद होतो. त्याप्रमाणें झाली गोष्ट पूर्णपणें विसरून जाणें, मागें पडणें, तिची पुन्हां आठवण न करणें.

गेलें घाटीं, झाली माती—कोकणांत दगड ठिसूळ असतात पण ते दगड ज्या स्थितींत असतात तसले दगड घाटावर दिसत नाहींत. येथें मुरमट दगड असतात. त्यांची लवकरच माती होते. आपला प्रांत सोडून दुसऱ्या प्रांतीं गेल्यास तेथें आपल्या प्रांतांत महत्त्व असतें तेंहि जातें व दुसऱ्या प्रांतांत अगदीं कवडीमोल होण्याची पाळी येते.

गेले जन्मीं करून ठेवलें तर या जन्मीं फळ येतें—पूर्वजन्मीं सुकृत आचरल्यास त्याचीं फळें या जन्मीं भोगावयास मिळतात.

गेलें तें गंगेला मिळालें !—गतं न शोच्यम्। या अर्थी. जें झालें तें झालें. तें भल्यासाठींच झालें असा प्रोत्साहक विचार. --एकच प्याला ४.२.

गेलें तें येत नाहीं व होणार तें चुकत नाहीं—जी गोष्ट एकदां होऊन गेली ती बदलतां येत नाहीं व जी गोष्ट भावी असेल ती टाळतां येत नाहीं. सर्व गोष्टी प्रारब्धाधीन आहेत अशी समजूत असणाऱ्यांचा हा सिद्धांत आहे. तु०-यदभावी न तद्भावी भावी चेन्न तदन्यथा। इति मत्वा नरो विद्वान् निश्चिंतो भवती ध्रुवम्।

गेलें नाहीं तंववर जड, खाल्लें नाहीं तंववर गोड—'केलें नाहीं तंववर जड०' पहा.

गेलें माणूस गुणाचें—मेलेल्या मनुष्याबद्दल बहुतेक सर्व लोक चांगलेच बोलतात. तो जिवंत असतांना मात्र कोणी त्याबद्दल इतकें गौरवानें बोलत नाहीं. तु०-मेल्या म्हशीस दहा शेर दूध.

गेलेला प्राण बाईच्या ओटींत सांपडला—एका बाईचा एक दागिना तिनें ओटींत ठेवला व तें लक्ष्यांत न राहिल्यामुळें तो हरवला म्हणून तिनें आरडाओरड केली व घाबरून जाऊन आतां जगते कीं मरते अशी तिची अवस्था झाली. अखेरीस सर्व शोधून पाहिल्यावर सहज ओटींत हात घालते तों तिचा दागिना सांपडला व तिचा जणूं गेलेला प्राण परत आला.

गेलेली वस्तु परत येत नसते—गतम् न शोच्यम् (पहा) या संस्कृत वचनाचा पर्याय. एकदां एखादी गोष्ट किंवा मनुष्य नष्ट झाला म्हणजे तो परत येत नाहीं. त्या करितां त्याबद्दल शोक करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तु०–गेल्याचा शोक वृथा न करावा, वित्त सर्व जायाचें । वित्ताची काय कथा, शाश्वत टिकणें नसेच कायाचें ॥

गेलेलो मानु परत येना, भेतिलें माणिक समजायना—(गो.) गेलेली अब्रू परत येत नाहीं आणि फुटलेलें माणिक पुन्हां जोडलें जात नाहीं.

गेल्याचें घर व मेल्याची बायको—ज्या घराचा मालक जागेवर नाहीं त्या घराची वज राहात नाहीं तें लवकरच मोडकळीस येतें. त्याप्रमाणें मेलेल्या मनुष्याची विधवा अनाथ होते, तिची दुर्दशा होते.

गोकटी——गोकटी धरणें--अडविणें, कुचंबविणें; दुःखद स्थितींत तिष्ठत ठेवणें.

गोकटीस बसणें मानगुटीस बसणें; पिच्छा पुरविणें; खनपटीस बसणें.

गोकटीस येणे--पीक पोटरीस येणें.

गोकर्ण ——गोकर्णांत येणें--संपुष्टांत येणें.

❀ **गोकर्ण केलश्या बोड; गोकर्णचें बोड**--(गो.) गोकर्णक्षत्रींच्या न्हाव्यानें केलेलें क्षौर. असें सांगतात कीं, गोकर्णांतलं न्हावी यात्रेकरू क्षौर करायला आलं कीं त्यांच्या डोक्याचा एकेक पाट काढून ठेवीत. एकानें डोक्याला वस्तरा लावून ठेवलेला असला, कीं दुसऱ्या न्हाव्यानें त्याची हजामत करावयाची नाहीं, हा न्हावी लोकांतला अलिखित कायदा असल्यामुळें जेवढ्यांचे म्हणून पाट काढले असतील तेवढ्या सगळ्या यात्रेकरूंना त्याच न्हाव्याजवळ तिष्ठत बसावें लागे एखाद्यानें कोणतेंहि काम अर्धवट करून सोडून दिलें कीं त्याबद्दल वरील म्हण वापरतात.

गोकुळ——गोकुळांत येणें—१ संपुष्टांत येणें; संपणें. २ आटोक्यांत येणें.

गोकुळासारखें घर--मुलांबाळांनीं, गुराबासरांनीं, सुखसंपत्तीनें भरलेलें घर.

गोगलगाय——अगदीं निरुपद्रवी, गरीब माणूस. 'कृष्णाजीपंत एवढे कर्दनकाळ ना? पण बायकोपुढें अगदीं गोगलगाय होतात'.

गोगलगाय बनवून टाचेखालीं चिरडणें—अगदीं जेरीस आणून, दीन बनवून नाश करणें, दीनवाणें करणें. –अस्तंभा ७.

❀**गोगलगाय, (अन्) पोटांत पाय**—गोगलगाय सरपटत जाते म्हणून तिला पाय नाहींत असें वाटतें. पण ते पोटाखालीं दडविलेले असतात अशी समजूत आहे वरून गरीब पण आंतून कारस्थानें करणारा, कपटी माणूस; पाताळयंत्री मनुष्य, कात्रिबाज मनुष्य.–शाव १.७४.–गांगा १७८.

गोचीड——गोचिडीची चरबी ती किती निघणार--अल्प वस्तूचा उपयोग किती मोठा होणार. तु०–मुंगळा किती गूळ आणणार तें त्याची कमरच सांगते. उंदीर हगेल काय आणि शेणी थापेल काय?

गोंजारणें——आपलें तें गोंजारणें, लोकाचें तें लाजिरवाणें—मनुष्य आपलें मूल कसेंहि असलें तरी त्याचे लाड करतो, त्याला गोंजारतो व दुसऱ्याच्या मुलाचा तिरस्कार करतो. आपलें पहा.

गोट——गोट काढणें--(भिल्ली) वाङ्‌निश्चय करणें; लग्न जुळविणें. 'गेले सालीं त्यानें माझा गोट काढला होता. याचा अर्थ मीं इच्छा दर्शविल्यावर पहाडजीनें माझ्याशीं लग्न करावयाचें.'–पाणकळा १९८.

गोट——गोट आवळणें—सैन्य लढाईसाठीं सज्ज राखणें. 'शूर मल्हारराव आपला गोट आवळून लढाईकरितां उभा राहिला'–V. S. २. ९१.

गोटांत घालणें--मागें हटविणें; छावणीपर्यंत मागें रेटणें. 'त्यास शिकस्त करून बरेवजेन गोटांत घातला.' –इमं २७३.

गोठण——गोठण घालून बसणें--सभेंत अस्ताव्यस्त बसणं; मांडा ठोकून बसणें.

❀ **गोठणचं गाईल आणि घरांतली बाईल, धाळ**

तितका मार खाईल--गाय आणि बायको या दोघी निमूटपणें आपण वागवूं तशा वागतात.-संक ५.३.८७.

गोठणीच्या गाई, माभळभट (बाळ्या) दान देई--भलत्याचा माल घेऊन तो उदारपणा दाखवून दुसऱ्यास देऊन टाकणें; हलवायाच्या घरावर तुळशीपत्र. आयजीच्या जीवावर बायजी उदार. कृष्णचरित्रांत माभळभटाची कथा आहे.

गोठाण्यावरच्या गाई, गवळी मारतो वढाई--जी गोष्ट आपली नाहीं तीबद्दल निष्कारण प्रौढी मारणें.

गोठा——गोठ्यांत गाई म्हशी, काय उणें दुधातुपाशीं—जवळ खूप साधन संपत्ति असली म्हणजे कोणत्याहि प्रकारें चैन करण्यास हरकत नाहीं.

गोठ्यांत गाताडी, घरांत म्हातारडी; गोठ्यांत गाताडी, घराला म्हातारी—[गाताडी = गव्हाणी] १ गोठ्यांतील गाताडी ही जशी नेहमीं कायम असते ती कोठें जात नाहीं तशी घरांतील म्हातारी ही एक स्थायी व्यक्ति आहे. ती कधीं घर सोडून जात नाहीं. २ त्याचप्रमाणें गाताडीला जसें गुरूं बांधून ठेवतां येतें त्याप्रमाणें घरांतील लहान मुलें संभाळण्याकरितां म्हातारीजवळ देतां येतात. मागें पहा. गाईला गाताडी

गोठ्यांत गेलें गोरूं शेण केल्याशिवाय रावना—(गो.) गोठ्यांत गेलेलें गुरूं तिथें मलविसर्जन केल्यावांचून राहात नाहीं. गुरांचा स्वभाव असा असतो कीं, रानांतून चरून आल्यावर त्यांना स्वच्छ अशा गोठ्यांत आणून बांधलें कीं तीं तावडतोब तिथें मल मूत्र-विसर्जन करतात. जणूं काय त्यांना तो वाळलेला स्वच्छ गोठा आवडतच नाहीं. हीन मनोवृत्तीच्या माणसांचा स्वभावहि असाच. तेहि अशीच चांगल्या वस्तूची खराबी करतात आणि बऱ्या गोष्टीलाहि विकृत रूप देतात.

गोठ्यांत जन्मणारा घोडा असूं शकत नाहीं—गाईच्या गोठ्यांत कधीं घोडा जन्मास येत नाहीं. जसें क्षेत्र असेल तसेंच फल तयार होतें. भलत्याच भूमींत भलतीच गोष्ट तयार होऊं शकत नाहीं.

गोठ्यांत ढोरें, घरांत पोरें—ज्याप्रमाणें गोठ्यामध्यें गुरें गडबड करतात त्याप्रमाणें घरांत पोरेंहि गडबड करावयाचींच. किंवा गोठ्यांत गुरांची समृद्धि असावी व घर मुलांनीं भरलेलें असावें, हें भाग्याचें आहे.

गोड——दिलंहें घेतलें गोड—मिळून मिसळून वागणें; देऊन घेऊन परस्पर स्नेह संपादन करणें.

गोड करून घेणें—कसेंहि असलें तरी चांगलें मानून घेणें; उदार मनानें स्वीकार करणें. (विनयानें पाहुण्यास म्हणण्याचा वाक्प्रचार). 'जें मिळेल तें विसूभाऊ गोड करून घेईल.'—अस्तंभा ७७. 'येईल तशी करतों सेवा गोड करुनि घ्यावी। पुण्यपदाची जोड वत्सला निजभक्तां द्यावी॥' —विनायक परापूजा.

गोडगोड गुळचट—अतिशय गोड (वस्तु व्यक्ति).

***गोड अंब्याची कोय, ती खायास अयोग्य**--जो अंबा गोड असतो त्याची कोय तुरट असते.

गोड करतां भाषण, मूर्ख होय हर्षायमान--थोडेसें गोड भाषण केलें कीं मूर्ख मनुष्य लागलाच फुशारून जातो. Fair words make fools fain.-सवि१०१०.

गोड करून खावें, मऊ करून निजावें--कोणताहि पदार्थ मिळाला असतां तो गोड मानून घ्यावा व कसलाहि बिछाना असला तरी तो मऊ मानून त्यावर निजावें. असेल त्या परिस्थितींत सुख मानून राहावें. विनाकारण कुरकुर करूं नये.

गोड खावचें पिशें, लोकांकडच्यानें हाशें--(गो.) ज्याला गोड खाण्याची चटक लागते त्याचें लोकांत हंसें होतें. जिभेचे चोचले पुरवण्यासाठीं पैशाची उधळपट्टी करणारा माणूस पुढें दिवाळखोर बनतो व जगांत हास्यास्पद होतो.

गोड गारा असत्या, तर कोल्ह्यापासून कां राहत्या—गारेचे खडे जर गोड लागले असते तर कोल्ह्यांनीं ते केव्हांच खाऊन टाकले असते. चांगल्या वस्तू कांहीं अशा वाटेवर पडलेल्या नसतात. चांगल्या वस्तू दुर्मिळ असतात.

गोड गोड पकान्नें पाहिल्याबर भूक वाढते—चांगली वस्तु पाहिली म्हणजे ती फार हवीशी वाटते.-टि ४.१८२.

गोड गोड बोलतो, लहान मोठ्या ठकवितो—एखादा मनुष्य गोड गोड बोलून अनेकांना फसवितो अशाबद्दल म्हणतात. तु०—बोलणीं मानभावाची करणी कसाबाची.

गोड ना जाल्यारि गोड उत्तर नाबे?; गोड ना जाल्यार गोडासारखें उतर ना?--(गो.) गूळ नाहीं पण गुळाची वाचा तरी असावी. मेवामिठाई नसली म्हणून काय झालें? गोड वाणी तरी आहे ना? आपणाकडे आलेल्या पाहुण्याला मेवामिठाई जरी आपण देऊं शकलों नाहीं, तरी गोड शब्दांनीं त्याचा संतोष करणें हें आपल्या हातीं असतें.

गोड गोड म्हणून खावें, वैद्यापाशीं जावें—फार गोड खाल्लें म्हणजे प्रकृति बिघडते व औषध घेण्याकरितां वैद्याकडे जाण्याची पाळी येते.

गोड दारूची खाटी, सहज होती—दारू जरी गोड असली तरी ती सहजासहजीं लवकरच अंबट होते व बिघडते. चांगला माणूसहि प्रसंगानें लवकरच वाईट बनतो.

गोड पाण्यांतला मासा तोंडाला गोड लागला कीं, पाण्याच्या एका कोंडींतून दुसऱ्या कोंडींत जायला मनुष्य उत्सुक होतो—मनुष्याला एकदां सुखाची चटक लागली कीं तो त्याच्या लालचीनें बंधनांत पडतो.–चित्रा ८-१०-३९.

गोड बोलणारे लोक नेहमींच मित्र असूं शकत नाहींत—जो मनुष्य नेहमीं आपणास प्रिय वाटेल असेंच बोलतो तो स्पष्टपणें आपलें मत देत नाहीं असें समजून चालावें. तो आपला खरा मित्र नव्हे, त्यामुळें तो योग्य सल्ला देत नाहीं असें समजावें व त्यापासून सावध राहावें. तु०–सुलभाः पुरुषाः राजन् सततंप्रियवादिनः। अप्रियस्यापि पथ्यस्य श्रोता वक्ताच दुर्लभः ॥

गोड बोलणें आणि भोंक पाडणें-साल काढणें—वरून गोड बोलावयाचें आणि आंतून नाश करण्याची संधि पाहावयाची.

गोड बोलणें सौजन्याचें, कडू बोलणें हट्टाचें—जो मनुष्य नम्र असतो तो गोड बोलतो व जो हट्टी असतो तो अप्रिय बोलण्यासहि कमी करीत नाहीं.

गोड बोलतां वाचें, तुझें काय वेंचे—मनुष्यास गोड बोलावयास कांहीं खर्च लागत नाहीं. वर पहा.

गोड बोलावें ओठांत, कपट ठेवावें पोटांत—(वांय.) तोंडानें गोडच बोलत असावें. कपट वगैरे असेल तें कधीं दाखवूं नये; झांकूनच ठेवावें.

गोडबोली, साखर झेली—तोंडानें अतिशय गोड बोलून आपलें काम साधून घेणारी स्त्री.

गोड बोल्या, ढोंपर (साल) सोल्या—गोड बोलून आपलें काम साधून घेणारा; गोड गोड बोलून उपटणारा.

गोड शब्द कोणा बोलतां, पोट मनाची न होय तृप्तता—नुसत्या गोडगोड बोलण्यानें पोट तर भरतच नाहीं पण पुष्कळदां मनालाहि बरें वाटत नाहीं. Fair words fill not the belly, nor mind always. –सवि १००९.

गोड शब्दानें होतें तें रागानें होत नाहीं—गोड बोलून जें कार्य होतें तें रागानें बोलून होत नाहीं.

गोड शब्दें करून, मूर्खाचें होय मनरंजन—अडाणी मनुष्याला दोन गोड शब्द बोलले म्हणजे त्याचें समाधान होतें.

गोडमें गोड गरज, और कडूमें कडू करज—गरजेच्या वेळीं माणूस अतिशय गोड बनतो व कर्ज देण्याघेण्याच्या वेळीं कडू होतो.

गोडा बाद्यारि मूस चढ—(गो.) गुळाच्या खड्यावर माशा अधिक. जिथें कांहीं लग्गा लागण्यासारखा असतो तिथें सगळे गोळा होतात. गुळाला मुंग्या.

गोडा शिपाइ मुयां धरूक पेटयिलो—(गो.) गुळाचा शिपाई मुंग्यांना धरायला पाठवणें. तसें केलें तर मुंग्याना ती इष्टापत्तिच होईल.

गोडवा——गोडवे गाणें—१ स्तुति, प्रशंसा करणें. २ (उप.) निंदा करणें.

गोंडा——गोंडा काढणें—(व.) फसविणें; घात करणें.

गोंडा घोळणें—कांहीं मिळेल या आशेनें पुढें पुढें नाचणें; खुशामत करणें.

गोंडा फुटणें—कढणाऱ्या रसावर साय येणें. रसावर त्यावेळीं बुडबुडे फुटतात.

गोंडा फोडणें—१ सूर्य पूर्णपणें उगवणें. २ ठळकपणें प्रख्यात होणें; पुढें येणें.

गोंडा हालणें-झुलणें—(कों.) सतत काम चालू ठेवणें.

गोंडा हालविणें—काम फत्ते करणें.

गोंडे हालैतना गोड, बायिले पोस्तना रड—(गो.) नवरदेव होऊन मुंडावळ्यांचे गोंडे हालवतांना बरें वाटतें; पण पुढें संसार करतांना टेंकीला येतो.

गोंडाळ——गवत गोंडाळ, शेत धोंडाळ, बायको तोंडाळ—गवत पहा.

गोडी——गोडी गुलाबी—१ मैत्री; रहस्य; भलेपणा. २ मौज; आनंद; खेळी मेळी. ३ सामोपचार; मनमिळाऊपणा.

गोडीस चढणें—गोड होत जाणें; पिकणें.

गोडीस पडणें–औषध, काम वगैरे पसंत पडणें, मानवणें.

गोडीस येणें—१ पुन्हा सख्य, मैत्री होणें. २ चटक लागणें; शौकी बनणें.

❀ **थोडक्यांत गोडी, फारांत लबाडी**—कोणतीहि

गोष्ट थोडी व मर्यादित असावी. ज्यास्त होत असेल तर तेथें कांहीं लबाडी आहे असें खास समजावें.

गोष्टींत गोड, मुलाचे बोबडे बोल—सर्व मधुर, सुखकर गोष्टींमध्यें लहान मुलाचें विशेषतः स्वतःच्या मुलाचें बोबडें बोलणें अतिशय गोड, आल्हाददायक असतें.

गोड्डु——गोड्डु म्हशी चाकरि—(गो.) वांझ म्हशीची चाकरी. अर्थात् ती निरुपयोगी.

गोण——गोण काळ्याचें आणि दूध गवळ्याचें (खराब)—पीळ नसलेल्या काळ्या सुताचा लोंकरीचा कपड जसा खराब त्याप्रमाणें गवळ्यानें कितीहि चांगलें म्हणून घातलेलें दूध खराब असतें. (?)

गोणी——गोणी गळ्यांत-मानेवर येणें—गळा पहा.

गोणी दंडावर; मनगटावर देणें—एखाद्याच्या इच्छेविरुद्ध त्याचेवर भार, संकट, काम वगैरे लादणें. 'मी धर्मस्थापनेसाठीं युगायुगाचे ठिकाणीं संभवत असतो अशा प्रकारचें विधान केलेंस, त्यावेळेस तें करण्याविषयीं तुझ्या दंडावर कोणीं गोणी दिली होती? '–काळ.

गोणी पाठीवर घालणें—एखाद्यावर ओझें, काम बळेंच लादणें; भार घालणें.

गोणी मणगटावर येणें-पडणें—जिकीरीचें काम इत्यादि एखाद्याच्या अंगावर येणें, पडणें.

❀ गाढवाचे गोणीस खंडीची तूट—गाढव पहा.

गोत——गोत मिळणें—१ एकत्र जुळणें; जथणें. २ मिसळणें; संयोग होणें; एकजीव होणें. ३ सख्य होणें. ४ पूर्वापर गोष्टींचा संबंध जुळणें.

गोताचा गुन्हेगार—स्वजनांचा द्रोह करणारा; आपल्याच जातीचा घात करणारा. 'जें राष्ट्र आपल्या हातीं आलेलें सोनें आर्थिक व्यवहाराच्या कामीं स्वतः उपयोगांत आणीत नाहीं किंवा इतर गरजवंत राष्ट्रास उपयोगांत आणू देत नाहीं त्या राष्ट्रास गोताचे गुन्हेगार असें म्हणतात. '–प्रो. काळे, केसरी ९-८-३०.

❀ गोत खाऊन जायचें, अन् खत देऊन जायचें—(वाय.) गोताचीं माणसें आलीं कीं, घरांतलें खाऊन फस्त करतात पण तेंच शेताला-मळ्याला खत घातलें कीं पीक भरपूर येतें. एकामुळें नुकसान तर दुसऱ्यामुळें फायदा.

गोतांची खाण, दोस्तांची वाण—एखाद्या मनुष्याभोंवतीं त्याचें बरें चाललें असतां नातेवाईक खूप जमतात पण त्यांत त्याचा जिवलग मित्र असा एकहि नसतो; बहुतेक सर्व स्वार्थसाधु असतात.

कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ—कुऱ्हाड पहा.

गोता——गोता खाणें—वर उडणारा पतंग ज्याप्रमाणें मध्येंच खालीं येतो त्याप्रमाणें मध्येंच माघार घेणें; तोटा, नुकसान, पराभव, निराशा, दंड इजा वगैरे होण्याचा प्रसंग उद्भवणें. 'उलट उलट माघारां प्राण्या! फिर गोते खाशी। भरला पुर मायेचा लोंढा वाहुनिया जाशी ॥'–मुक्ताबाई.

गोता बसणें—पतंग वर उडत जात असतां ज्याप्रमाणें मध्येंच उलट खाऊन खालीं येतो त्याप्रमाणें, नुकसान येणें; आपत्ति येणें; संकट ओढवणें.

गोत्यांत आणणें—संकटांत घालणें.

गोत्यांत येणें—संकटांत सांपडणें.

❀ जेनुं काम तेनुं ठाय, बिजा करे सो गोता खाय—(गु.) ज्याचें काम त्यालाच साधतें, भलत्यानें केल्यास त्यास गोता मिळतो.

गोत्र——गोत्र उतरणें-जमणें-येणें—लग्न जुळविण्याच्या वेळीं परस्पर घराण्यांतील गोत्रांचा मेळ बसणें; संबंधास अनुकूल असणें.

गोत्र मिळणें—१ जुळणें; जमणें. २ मिसळणें; एक होणें.

गोत्रीं लागणें—१ दत्तकानें एखाद्या कुटुंबांत जाणें. २ (ल.) एखाद्याच्या नादीं लागणें; चटावणें. ३ कक्षेंत आटोक्यांत येणें.

गोद——गोदमें लडका, शेरमें ढंडोरा—मांडीवर मूल असतां शहरांत दवंडी पिटणें. तु०—खाकेंत कळसा गांवाला वळसा. खाकेंत पोर आणि गांवांत डांगोरा. गांडीखालीं आरी, चांभार पोर मारी.

गोंधळ——गोंधळ घालणें—[लग्नादिकार्यानंतर कांहीं जातींत गोंधळी लोकांकडून देवीचा गोंधळ करवून घेण्याचा प्रघात आहे. हा गोंधळ फार अव्यस्थित कंटाळवाणा आरडा ओरडीचा होतो.] १ अव्यवस्थितपणें वागणें; वाटेल तसें वागणें. २ धुडगूस घालणें; गडबड करणें.

❀ गोंधळ केला माकडांनीं, त्यांत दारूची मेजवानी—माकडांस जर गोंधळ घालावयास बोलावलें व त्यांत त्यांस प्रथम दारूची मेजवानी देऊन नंतर गोंधळ घालण्यास सांगितलें तर जी गडबड, दंगा वगैरे होईल तो पुसूंच नका. तु०—आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला।

गाढवांचा गोंधळ, लाथांचा सुकाळ—गाढव पहा.

गोंधळ-गोधूल लग्न——गाई ज्या वेळीं रानांतून चरून परत घराकडे येतात ती सायंकाळची वेळ. त्यावेळीं गाईच्या पायांनीं गांवांत धुरळा उडतो, यावरून या वेळेस गोधूल म्हणतात. सूर्यबिंब अस्तास जाण्याची वेळ.

गोंधळी——गोंधळ्याचे पवाडे, झोळीमध्यें भरडे--गोंधळ्यानें कितीहि पोवाडे गायले तरी त्याचा मोबदला म्हणून त्याला थोडी फार एखाद्या धान्याची भरड मिळते. ज्या किमतीचें गाणें त्याच किमतीची बिदागी. (!)

गोफण——गोफण धोंडा-गुंडा तिकडेच--एक मनुष्य गोफणीनें धोंडा मारावयास गेला तों धोंड्याबरोबर गोफणच उडून गेली. एखादें काम करावयास जावयाचें तें काम न साधतां उलट जवळचेंच कांहीं तरी गमावून यावयाचें. गुंडा पहा.

गोबर——गोबर डोक्यावर उडवून घेवप—(गो.) डोक्यावर राख उडवून घेणें. वाईट मनुष्याची मुद्दाम खोडी काढून त्याच्याकडून आपला अपमान करून घेणें. चिखलांत धोंडा टाकणें.

गोबरु फुंकल्यारि डोळ्यां उसळतां--(गो.) राखेवर फुंकर मारली तर ती डोळ्यांत उडते. दुर्जनावर उपकार करायला गेल्यास तो आपल्यावर उलटतो या अर्थानें.

गोब्राह्मण——गोब्राह्मण प्रतिपालक तो पृथ्वीपति--हिंदूधर्माप्रमाणें राजा हा गायी आणि ब्राह्मण यांचा रक्षणकर्ता असावा लागतो. जो गाईब्राह्मणांचें रक्षण करतो तोच खरा राजा. बाकीचे नुसते नामधारी.

गोम—— गोमेस पाय बहुत, एक पाय मोडला तर उणें पडत नाहीं; गोमेचे दोन पाय कमी झाले म्हणून ती लंगडी होत नाहीं–गोमीला पुष्कळ पाय असतात व त्यांतील एखादा तुटला तरी तिला चालण्याची अडचण पडत नाहीं, त्याप्रमाणें एखाद्या मनुष्याजवळ मनुष्यबळ पुष्कळ असेल तर त्यांतील कांहीं कमी पडलें तरी त्याचें कार्य अडत नाहीं. किंवा एखाद्यास पुष्कळ युक्त्या माहीत असतील तर त्यांतील एखाददुसरी फसली तरी त्याचें अडत नाहीं. –भाब ८२. –पामो ४०.

गोमेची विद्या गोम जाणा, भुरगीं बापडीं काय जाणत--(गो.) गुप्त गोष्ट ज्याची तेच ओळखतात. इतरांना त्यांतलें मर्म काय समजणार.

गोमा——गोमाजी; गोमाजी कापशे; गोमाजी तिमाजी; गोमाजी बिन तिमाजी कापशे—खालीं 'गोमा गणेश पितळी दरवाजा ' पहा. कोणी तरी; ' क्ष.' ' गोमाजीनें उठून तिमाजीच्या घरावर दरवडा घालावा···' –नि. ' रायबा:–नाहीं मी जात! पाठवा दुसऱ्या कोणातरी गोमाजी तिमाजीला ! '–शिसं १.१

गोमा गणेश पितळी दरवाजा—[एका बादशहाची कारकीर्द फार अव्यवस्थित असे. एका धूर्त माणसानें गांवच्या एका पितळी दरवाजाच्या वेशीजवळ बसून प्रत्येक मालावर बादशहाच्या नांवानें तो ठराविक जकात घेत असे. लोकहि बादशाही कायदा असेल म्हणून मुकाट्यानें जकात देत. पावतीवर ' गोमा गणेश पितळी दरवाजा ' असा शिक्का तो मारी. पुढें ही अजब घटना बादशहाच्या नजरेस आली; पण त्याला ती बंद करतां येईना. त्यानें या ' गोमागणेशा '-च्या हुषारीबद्दल फार तारीफ केली व जकात सरकारी रीत्या चालू ठेवली. विद्यासेवकांत या गोमागणेशाची माहिती आहे.] कोणीतरी ' क्ष ' माणूस; गोमाजी कापसे.–गांगा २०८.

गोंय——गोंयांत व्हडीं, घाटार घोडीं—(गो.) गोव्यांत होड्या तर घाटावर घोडीं चालतात. प्रत्येक प्रांतांतील वाहनें निरनिराळीं असतात.प्रत्येक देशाचा प्रकार निराळा.

गोरस——गोरस गली गली फिरे, सुरा बैठला बिका—दूध विकावयास गल्लोगल्लीं फिरावें लागतें व दारू जागच्या जागीं खपते. लोकांस चांगल्या वस्तूपेक्षां अपायकारक असूनहि चटकदार पदार्थांची गोडी जास्त. मनुष्य सद्गुणापेक्षां दुर्गुणाकडे अधिक लवकर वळतो.

गोरा–री–रें——गोरीचें गोरेपण– खरी वस्तुस्थिति. ' सर्व गोरीचें गोरेपण जाणवलें. ' –रा ३.७

गोरें मोरें तोंड करणें—घाबरणें; तोंडावरचा तजेला जाणें; तोंड उतरणें. ' गोष्टी ऐकून रमा गोरें मोरें तोंड करून बसणारी नव्हती. ' –V. S. २.१०८.

***गोरा गोमटा, कपाळ करटा; गोरा गोमटा, नरहर देव करंटा**—दिसण्यांत सुंदर पण फुटक्या नशीबाचा; देखणा पण दुर्दैवी. ' दुर्गीचा नवरा लग्नांत गोरागोमटा पण पुढें असा कपाळ करंटा निघाला कीं, लाख रुपयांची मालमत्ता उधळून टाकून अन्नान्न दशेस लागला. ' –पकोघे. ' ह्या भाडोत्री गुरुशिष्य जोडीची ही पश्चिमेकडाल पद्धति–गोरी गोमटी आणि कपाळ करंटी !' –छच ६१.

गोरी जावची ना, काजळ घालची ना—(गो.) गोरी होणार नाहीं, डोळ्यांत काजळ घालणार नाहीं. गोऱ्या

माणसाला काजळ चांगलें शोभतें हें बाईला ठाऊक होतें. ती स्वतः काळी होती. आपण गोरी होणार आणि मग डोळ्यांत काजळ घालणार या कल्पनेनें ती गोरी होण्याची वाट पाहात राहिली होती. पण तें कसें शक्य व्हायचें ? भलतीच ईर्षा किंवा अयोग्य, असंभाव्य गोष्टीचा हट्ट धरणाराला उद्देशून म्हणतात.

एक गोरी आणि बत्तीस खोड्या चोरी—गोरी मुलगी लवकर पटते. तिच्यांतील इतर खोडी डोळ्यांवर येत नाहींत. गोरेपणाखालीं इतर अनिष्ट गोष्टींकडे दुर्लक्ष्य होतें. तु०–एक देवमण बाहात्तर खोड्या चोरी.

गोरी जातली केन्ना, आनी काळे सुयतली केन्ना—(गो.) गोरी होणार केव्हां आणि काळें वस्त्र नेसणार केव्हां ? अशक्य गोष्टीची वाट पाहणें.

गोरी सुरेख पतिव्रता, ईश्वरी कृत्याची पूर्णता—जी स्त्री वर्णानें गौर व रूपानें सुंदर असूनहि पतिव्रता असते ती परमेश्वराची पूर्ण देणगी समजावी. गोरी सुंदर स्त्री पतिव्रता असणें राहणें कठिण, हा भाव.

गोरीचें गोरेपण झांकत नाहीं—जी स्त्री विशेष गौर वर्णाची असते ती हजार मुलींत सहज लक्ष्यांत भरते. विशेष चांगुलपणा केव्हांहि नजरेस आल्यावांचून राहात नाहीं.

गोरू——गोरूं आनि चली दांवें पडतरींच गेली—(गो.) गुरूं आणि मुलगी दांवें गळ्यांत पडलें कीं न्यावें तिकडे जातात. मुलगी सासरीं जाते त्यावेळीं म्हणतात.

गोरूं आनि चेडुं परक्या हातांतु घालनये—(गो.) गुरूं आणि मुलगी हीं परक्याच्या हातीं देऊं नये. त्यांची आबाळ व्हायची हें ठरलेलेंच.

गोरूं विकतरीच दांव्यांक झगडें कसलें—(गो.) गुरूं विकल्यावर दांव्यासाठीं भांडण कशाला ? गुराच्या बरोबर दांवें हें जायचेच; त्याची कांहीं कोणी किंमत देत घेत नाहीं. तु०–विक्रीते करिणि किमंकुशे विवादः ।

गोरवा दांवें, मनशा उतर—(गो.) जनावराला दांवें आणि माणसाला शब्द हीं प्रतिबंधक होतात.

गोऱ्हा——गोऱ्हीं शेती व पोरीं संसार, कधींहि नसावा--शेतीला कसलेला बैल व संसाराला अनुभवी मनुष्य लागतो. हीं कामें अननुभवी तरुणांच्या हातून नीट होत नाहींत. गोऱ्ह्यांकडून शेती व पोरांकडून संसार होत नाहीं. –केसरी ११-७-३९.

गोऱ्ह्याच्यानें शेत आणि पोराच्यानें संसार होता तर मग काय—वर पहा.

गोला——गोल्यांतुलि गायि दान दिली—(गो.) गोठणीवरची गाय दान दिली. दुसऱ्याची वस्तु त्याला नकळत घ्यायची आणि ती तिसऱ्याला देऊन मोठेपणा मिळवायचा. असें करणारीं कांहीं माणसें असतात त्यांना उद्देशून वापरतात. गोठण पहा.

गोवंटे——गोवंटेच्या सबंतणेन जीब आस्सीलो; गोमटे भोंवतणी जीब आशिलो—(गो.) मानेभोंवतीं जीभ असणारा. बडबड्या; थापाड्या.

गोवंड——गोवंडास लागणें-येणें—सरळ रस्त्यास लागणें; चालीस लागणें.

गोंवर——गोंवर पोटीं पडणें–गोंवर बाहेर न येणें; पोटांतल्या पोटांत जिरणें. (हें वाईट लक्षण असतें).

गोवरी——गोवरीची आग—गोवरी जळली असतां वर राख दिसते परंतु आंत विस्तव असतो. यावरून गुप्त परंतु भयंकर वैर.

गोवऱ्या मसणांत जाणें—वृद्धपण येणें; मरण जवळ येणें. गवऱ्या पहा.

गोवर्धन——गाईच्या तोंडानें गोवर्धन निवडणें—पंचायत वगैरेमध्यें ज्याचा विषय त्याच्याच तोंडानें निवाडा करणें.

गोवाळी——गोवाळ्यानें गायीक पोसचें, तिजेखातिर कीं दुदाखातिर ?—(गो.) गवळी गाय बाळगतो ती तिच्यासाठीं नव्हे, तर दुधासाठीं. स्वार्थासाठीं माणूस झटतें; परोपकारासाठीं नव्हे.

गोविंदू——गोविंदू ! गोविंदू ! कपाळीं टिळा जसा वैदू—तोंडानें नेहमीं गोविंद नामाचा जप करीत असलेला, कपाळाला गंधाचा टिळा वगैरे व्यवस्थितपणें लावून साधूचें सोंग आणणारा भोंदू.

गोवें—गोवें सांपडणें–घबाड हातीं येणें; घोबें सांपडणें.

गोषमाल——गोषमाल देणें—आडून हल्ला चढविणें. 'मध्यें गनीम घालून जिकडे जिकडे गनीम जाई तिकडे तिकडे जागा जागा गनीमास गोषमाल देऊन तिकडूनही मारून काढिला.'–श्रीशिवछत्र. चरित्र १७८.

गोष्ट——गोष्ट काढणें—१ खोडी काढणें; वाटेस जाणें; अपाय करणें. २ बोलणें काढणें; प्रस्ताव करणें.

गोष्ट फोडणें—गुप्त गोष्ट प्रकट करणें; गुह्य प्रकट करणें.

गोष्टी करणें—बोलणें; संभाषण करणें. 'बाईसाहेब त्याजवळ बोलून चार गोष्टी करीत.'—अस्तंभा १३.

गोष्टी खापलणें—(व.) गप्पा छाटणें; बाता मारणें; बोलण्यांत वेळ घालविणें.

गोष्टी सांगणें—१ बोलणें; संभाषण करणें; गप्पा छाटणें; वार्ता करणें. 'ठाव्या आहेत मला सांगा गोष्टी यथेष्ट अन्या या।' —मोउद्योग १३.३७. २ सबबी सांगणें; बयाद लावणें; जाबसाल करणें.

एक्या गोष्टींत—एकदम; झटक्यास; सपाट्यास; चटकन; ताबडतोब.

❀ **गोष्टी खाप, विसरला मायबाप**—एखाद्या मनुष्यास गप्पा मारण्याची संवय इतकी लागलेली असते, कीं त्याला आपल्या आईबापाकडेहि पाहण्याची शुद्धि राहात नाहीं.

गोष्टीची घड नि कामाची रड—बोलघेवड्या माणसाकडून गप्पाशिवाय कोणतेंच काम होत नाहीं. याच अर्थाची दुसरी म्हण-'बोलेल तो करेल काय नि गर्जेल तो वरसेल काय !'

गोष्टीचें गुऱ्हाळ, पायलीचा फराळ—गुऱ्हाळ पहा.

गोसावी——गोसाव्याची जहागीर, मानभाव प्यादा—गोसाव्याला जहागीर दिली म्हणजे त्याचे शिपायीहि त्याच्याच पंथांतील मानभावासारखे असावयाचे. जसा मालक तसे चाकर.

गोसाव्याशीं झगडा, आणि राखाडीशीं भेट—गोसाव्याशीं भांडून काय मिळावयाचें आहे ! राख मात्र अंगावर उडावयाची !

गोळ——गोळ दिवप—(गो.) १ फांसावर चढविणें. २ मुलास घोडीवर चढविणें.

गोळक——गोळकाचें सोंवळें—गोळक हा शूद्र वर्णाचा मानला जात असल्यानें त्यानें कितीहि सोंवळें दाखविलें तरी तें धार्मिकांना मान्य होत नाहीं. खोटें सोवळें. पुढें पहा.

गोळकाचें सोंवळें, सारा वेळ ओंवळें—गोळकाचें सोवळें हें खरें नसतें; तें ओवळेंच.

गोळकाचें सोंवळें, सारा वेळ बिळबिळें—गोळकाला कधीं सोंवळें नेसण्याची संवय नसल्यामुळें कधीं काळीं सोंवळें नेसल्यास तें बिळबिळीत असतें व केव्हां सुटेल त्याचा नेम नसतो, म्हणून त्याला तें लक्तरीत कसेसेंच वाटत असतें.

गोळा——गोळा करणें—एकत्र करणें.

गोळा गिळणें—लांच खाणें.

गोळा टाकणें—गर्भपात करणें, होणें.

गोळा देणें—आत्मारामाला पिंड देणें; भुकेच्या वेळीं अन्न खाणें.

गोळा मारणें—गिळंकृत करणें.

गोळा वाजविणें—तोफ डागणें; तोफेचा मारा करणें- 'तेव्हां कोणास धीर न पुरे. गोळा वाजवितां नये. भयभीत होऊन पळूं लागले.' —श्रीशिवछत्र० चरित्र १७३.

गोळा होणें— एकत्रित होणें. 'जायासाठीं कंठीं शतवार प्राण जाहले गोळा ॥' —मोरोपंत.

गोळाक लावप—(गो.) हात बांधून टाकणें.

गोळार मारप—(गो.) फांशी देणें.

❀ **गोळे मारतां सुख, पण हिशेब देतां दुःख**—द्रव्याचा अपहार करतांना खातांना गोड वाटतें पण त्याचा हिशोब देतांना मग प्राणसंकट ओढवतें. कुकर्म करतांना सुख वाटतें पण परिणामीं दुःख भोगावें लागतें.

गोळया मागें गोळा, दुखतो माझा डोळा—एकीकडे काम करावयाच्या वेळीं आजारी असल्याचें सोंग करावयाचें व खाणें पिणें मात्र यथेच्छ चालावयाचें. खोटेंच निमित्त करून काम टाळून केवळ चैन करावयाची, अशा वृत्तीस अनुलक्षून ही म्हण योजतात.

गोळी——गोळी घालणें—बंदुकीनें गोळी मारून ठार करणें.

गोळी चढविणें—अफू वगैरे मादक पदार्थ खाणें.

आडून गोळी मारणें—१ दुसऱ्याकडून, स्वतः पुढें न होतां, इष्ट कार्य घडवून आणणें; अप्रत्यक्षतः कार्य करून घेणें. २ आडून बोलणें; अप्रत्यक्ष बोलणें. तु०—लेकी बोले सुने लागे.

गोळी लागणें—१ माशी लागल्यामुळें वांती होणें. २ कार्य नेमकें होणें; मात्रा लागू पडणें.

गोळी वाजविणें—१ लढाईस सिद्ध होणें. २ विरुद्ध लढणें; हरकत करणें. 'इंग्रजांचे दंग्यांत गोळी वाजविली याचे पारपत्य करून…' —पया २४१. ३ बंदूक झाडणें; लढाई करणें. 'भगवंतराव सिंदे यांसी येथून प॥ होतें. त्याणी नाझऱ्यास गोळी वाजऊन गुंतविला आहे.' —बापूगोप २५७.

गोळेगांव——गोळेगांवाला वेढा घालणें-पडणें—जेवावयास बसणें.

गौड——गौडबंगाल—पूर्वीं गौड किंवा बंगाल देशांत गारुडविद्या फार होती. १ जादुविद्या; गारुड. २ हिकमत; कारस्थान; कूट. 'निजाम एक ठक तर बाजीराव सात ठक होता. त्याच्यापुढें त्याचें गौडबंगाल कसचें चालतें!' –बाजीराव.

गौतम——गौतुमा गायि आप्पळ्या आंगारि पडता—(गो.) गौतमाची गाय हांकायला जावें तर अंगावर पडते. गौतम ऋषीनें दर्भाची काडी गायीवर मारली आणि ती तिथल्यातिथें मरून पडल्यामुळें त्याला गोहत्येचें पातक लागलें अशी जी पुराणांत कथा आहे तिच्यांतून या म्हणीचा उगम आहे. एखाद्या वस्तूला हात लावायला जावें आणि ती वस्तु एकाएकीं मोडून तोडून खराब व्हावी अशा वेळीं वापरतात.

गौर——गौरीचा पेंड—भाद्रपदांत शेताचे बांध घालण्यासाठीं खणलेली माती. ही फार चिकण असते.

गौरीचा हळवा—लवकर पिकणारी नाचणीची एक हळवी जात. ही गौरीगणपतीच्या वेळीं तयार होते.

गौरीचे डोहाळे—चैत्रांत पडणारी पावसाची बुरबुर.

❀ **गौर रुसली, सौभाग्य घेऊन बसली; गौरा रुठेगी तो अपना स्वहाग लेगी, भाग तो न लेगी**—गौर रुसली तर सौभाग्य घेऊन बसेल, नशीब तर कांहीं तिच्यानें पालटत नाहीं. आपणावर कोणाचाहि रोष झाला तरी जें आपल्या नशिबानें मिळावयाचें त्याच्या आड कोणी येऊं शकत नाहीं. आपलें भाग्य तर कोणी नेत नाहीं.

ग्रंथ——ग्रंथ—बत्तीस अक्षरांची संख्या. १ अनुष्टुभ. बत्तीस अक्षरांचें वृत्त, वृत्ताची ओळ. 'व्यासकृत महाभारत लक्षग्रंथ प्रसिद्ध हा भारी।'–मोआदि १.९. २ मोठा कट, योजना. 'बाळोबा आणि भाऊ हा सगळा एक ग्रंथ आहे.'–अस्तंभा ९६. ३ अकांडतांडव. 'मुलगा कां रडतो ! एवढें मीं विचारलें; पण त्यावर त्या बाईनें जो ग्रंथ केला तो कांहीं पुसूं नये !'

ग्रंथ आटोपणें—ज्याप्रमाणें पुराण सांगावयाचा ग्रंथ संपला म्हणजे पुराणिकास पुराण आटोपावें लागतें, त्याप्रमाणें १ काम संपणें. २ कार्यनाश होणें. ३ मनुष्य मरणें.

ग्रंथ उकलणें—एखाद्या कूट श्लोकाचा अर्थ लागणें; कोडें उलगडणें; स्पष्टीकरण होणें. 'नका बोलों कांहीं अकथित मला ग्रंथ उकले।'–सारुह ७.९९.

ग्रंथसमाप्ति—१ ग्रंथ-लेखन-वाचन आटोपणें. २ मरणें. स्वर्गाला जाणें.

(समग्र) ग्रंथ पाहिल्यावीण। उगाच ठेवी जो दूषण। तो एक मूर्ख—कोणत्याहि ग्रंथास वाचून पाहिल्याशिवाय जो नांवें ठेवतो तो मूर्ख समजावा. कोणतीहि गोष्ट नीट समजून घेतल्याशिवाय आपलें बरेंवाईट मत प्रदर्शित करणें, हा मूर्खपणा आहे.–दासबोध.

ग्रंथ लिहिणें, पश्चात्ताप करणें—आपण एखादा ग्रंथ लिहावा व तो कोणीहि वाचून पाहूं नये अशी स्थिति झाली असतां, त्याबद्दल आपणास वाईट वाटतें व उगाच श्रम केले असें वाटतें. अशा गोष्टीस उद्देशून ही म्हण आहे. ग्रंथ लिहून तो कोणी छापत नाहीं, विकत घेत नाहीं म्हणून पश्चात्ताप करण्यापेक्षां न लिहिणेंच बरें !

ग्रह——ग्रह फिरल्यारि मात्तें इं फिर—(गो.) ग्रह फिरले कीं माणसाचें डोकेंहि फिरतें. विपत्कालीं माणसाची बुद्धिहि अविवेकी बनते.

ग्रहण——ग्रहण लागणें—१ ज्याप्रमाणें ग्रहणसमयीं चंद्र, सूर्यबिंब अदृश्य होतें त्याप्रमाणें दृष्टिआड होणें. २ संकटग्रस्त होणें; संकटानें घेरलें जाणें.

ग्रहण सुटणें—ग्रहण सुटल्यावर ज्याप्रमाणें चंद्राचें किंवा सूर्याचें बिंब मोकळें होतें व पूर्णपणें दिसूं लागतें त्याप्रमाणें संकटावस्थतून मुक्त होणें.–टि २.९८.

ग्राम——ग्रामत्यागासारखें दुःख नाहीं—स्वतःचा गांव, आपली जन्मभूमि जी असेल तिचा त्याग करावा लागणें, हें फार दुःखदायक असतें.

ग्रास——तोंडचा ग्रास(घास)नेणें-काढणें—अगदीं तोंडात पडलेला घास काढणें; काम पुरें होत आलें असतां त्याचा नाश करणें, होणें; आयत्या वेळीं बिघडणें, बिघडविणें.

प्रथमग्रासे मक्षिकापातः।—जेवावयास बसलें असतां पहिल्याच घासास माशी लागली म्हणजे ज्याप्रमाणें सर्व जेवणाचा बिघाड होतो, त्याप्रमाणें कोणत्याहि कार्याच्या आरंभींच विघ्न उपस्थित झालें असतां कार्यहानि होते. प्रथम पहा.

घ

घ——घ म्हळ्यारि घप कर नयें—(गो.) सुतानें

घघा——घघाची विद्या-बाराखडी—दुसऱ्याकडून किंवा दुसऱ्याचें घेण्याची तेवढी वृत्ति; घेण्याचें तेवढें ज्ञान, देण्याचें नव्हे. स्वार्थी वृत्ति; लोभीपणा; हावरेपणा. तु०—घघाची बाराखडी टाऊक आहे पण ददाची नाहीं. घघाची विद्या येते पण ददाची विद्या गांवीं नाहीं.

घट——घट करणें—(ना.) तोंडपाठ करणें; घोकणें; घोकून घोकून पक्कें करणें.

घट——घटीं बसणें—१ आराध्यदेवता नवरात्रादिकांत घटावर अधिष्ठित होणें; यावरून देवतेची स्थापना होणें. २ घटस्थापना करणारा यजमान व्रतस्थ स्थितींत राहणें. ३ आजार, आळस वगैरेमुळें घरांत बसून राहणें. घराबाहेर पडतां येत नाहीं अशी स्थिति होणें. ४ स्त्री रजस्वला होणें. ५ कोणतेंहि काम कांहीं काल एकाच स्थितींत स्थगित होणें; प्रगति न होणें.

❀ **घटः पिबति पानीयं ताडनं झल्लरी यथा।**—घटका पाणी पिते व घड्याळ टोले खातें. वेळ दाखविण्याचें साधन म्हणून घटिकापात्र पाण्यांत टाकतात व तें भरलें म्हणजे तासावर टोले मारतात. एकाचा अपराध, दुसऱ्यास शिक्षा. सच्छिद्रनिकटे वासो न कर्तव्यः कदाचन । घटी पिबति पानीयं ताड्यते झल्लरी यथा ॥ —सुर १६७.६३२. घटका पहा.

घटका——घटका घातलेली असणें—(मुहूर्ताची घटिका पाहण्याकरितां घटिकापात्र घंगाळांत टाकतात त्यावरून) मरणोन्मुख अवस्था होणें; आतां मरतो कीं मग मरतो अशा अवस्थेंत असणें.

घटका घालणें—(मुहूर्ताची वेळ बरोबर समजण्यासाठीं पाण्यांत घटकापात्र घालतात) १ निश्चित वेळ ठरविणें; वेळ नक्की करणें. २ मरण्याच्या दारी असणें; घटकापळें मोजणें; आसन्नमरण असणें.

घटका भरणें—निश्चित वेळ भरली म्हणजे घटकापात्र भरतें त्याप्रमाणें. १ दिलेली, ठरलेली मुदत संपणें; ठरविलेली वेळा प्राप्त होणें. २ विनाशकाल जवळ येणें; घडा भरणें. 'इंग्लिशांच्या सत्तेची घटका आतां भरत आली आहे.'—के १०.६.३०.

घटकाभर पडणें—थोडा वेळ विश्रांति घेणें; अंग टाकणें; अल्प निद्रा घेणें; वामकुक्षि करणें.

(नांव घ्यावयास) एक घटका लागणें—(ना.) एखाद्या गोष्टीविषयीं प्रशंसोद्गार काढतांना तिचा मोठेपणा प्रगट करणें. 'अहो तो काळच गेला. पूर्वी त्याचा काय थाट होता ! त्याचें नांव घ्यायलाच एक घटका लागत असे.'

घटकेचा गुण—कालमाहात्म्य; वेळेचा गुण; समयाचें महत्त्व; प्रसंगमाहात्म्य.

घटकेचें घड्याळ—घटकाभर, थोडाच वेळ चालणारें घड्याळ; क्षणभंगुर जीवित; अल्प काळ टिकणारी वस्तु.

घटकेंत तोळा व घटकेंत मासा—फार नाजूक (प्रकृति, हवामान इ. स लावतात.)—आजोच २३३.३७४.

❀**घटका पाणी पिते आणि घड्याळ टोले खातें**—घटकापात्र पाण्यांत टाकलेलें असतें तें भरलें म्हणजे त्याप्रमाणें तासावर ठोके मारतात. यांत वास्तविक घटकापात्र पाणी पितें पण टोले बसतात तासाला ! यावरून अपराध एकानें केला असतां भलत्यालाच शिक्षा झाली म्हणजे म्हणतात. घटः पिबति पानीयं० घट पहा.

घटकेची फुरसद नाहीं, दमडीची मिळकत नाहीं—काम तर सारखें करीत राहावयाचें, विश्रांतीलाहि वेळ नसावयाचा पण प्राप्ति मुळींच होत नाहीं. अशा प्रकारच्या व्यर्थ श्रमास, रिकाम्या धडपडीस म्हणतात.

घट्टां घट्टां घडतं तें प्रमाण—(गो.) जें होईल तें खरें.

घटपट——घटपटादि खटपट—न्यायशास्त्रांत घट आणि पट या दोन शब्दावर बरेंच शास्त्रीय विवेचन असतें. त्यावरून रुक्षचर्चा, विवेचन; काथ्याकूट. "प्रस्तुत कवीनें (मोरोपंतानें) 'घटपटादि खटपटींत' न पडतां परमार्थसाधनास जेवढा व्युत्पत्तीचा भाग अवश्य तेवढाच संपादन केला.'—निबंधमाला. 'नलगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती।'—मोरोपंत. तु०—वदन्तु कतिचित् हटात् खफछठेति वर्णच्छटान्, घटःपट इतीतरे पटु रटन्तु वाक्पाटवात् । वयं बकुलमंजिरीगलदमन्दमाध्वीझरी धुरीणपदरीतिभिः भणतिभिः प्रमोदामहे ॥

घंटा——घंटा वाजणें-हलणें—एखादा पदार्थ संपणें; खलास होणें. 'घरांत वाजे नकारघंटा।'—सुदामचरित्र.

घटीगोत्र——घटीगोत्रीं जुळणें-जमणें-मिळणें-ठरणें—वधूवरांच्या पत्रिका जुळणें; नाडी, गोत्र, गण वगैरे पटणें.

घटोत्कच——घटोत्कचाचा बाजार—भीमाला हिडिंबा राक्षसीपासून झालेला मुलगा जो घटोत्कच यानें

वत्सला—अभिमन्यु यांच्या विवाहप्रसंगीं कौरवांना फसविण्यासाठीं एक मायावी बाजार निर्माण केला होता. जुनी वस्तु नवी कोरी वस्तु देऊन घ्यावयाची असा सौदा होता. पुढें ती नवी वस्तु मायावी असल्यानें अदृश्य होई. यावरून फसवेगिरी; कपट

घट्ट——घट्ट मैत्री ठेवणें, संगे संगे वागणें—दृढ मैत्री व निरंतर सहवास ठेवणें. To be in hand and glove.

घट्टी ताळ्यारि थुंटता, हगूर ताळ्यारि घुस्ता—(गो.) जोरानें ओढलें तर तुटतें, हळू ओढलें तर गुंततें दोन्हीकडून पंचाईत.

घड——घड सुजणें-सुजवून घेणें—उपदंशादि विकारानें जननेंद्रियास अपाय होणें, करून घेणें.

घडणें——घड मोड, सोनार घड—दागिन्यांची नेहमीं घडामोड केली, जुने मोडून नवे करीत गेले कीं, प्रत्येक वेळीं सोनाराला मात्र लाभ होतो व मालकाचें सोनें कमी कमी होत जातें.

घडतां महापाप, होतो मोठा पश्चात्ताप——आपल्या हातून एखादें मोठें पातक घडलें असतां मागाहून मोठा पश्चात्ताप करण्याची पाळी येते.

घडत्या पडत्यास गांठ पडली—योगायोग; कावळा बसायला आणि खांदी मोडायला एक गांठ. काकतालीयन्याय

घडून आल्यावरी, उपाय काय करी—एखादी गोष्ट होऊन गेल्यावर तिला उपाय कांहीं करतां येत नाहीं. तु०—गतं न शोच्यम् ।

घडून येणारी गोष्ट, छायेनें दिसती स्पष्ट— पुढें घडून येणाऱ्या बहुतेक गोष्टींची पूर्वीच पूर्वचिन्हें बहुधा दिसूं लागतात. प्रसादचिन्हानि पुरःफलानि । Coming events cast their shadows before.

घडविणें——घडवपेक्षां मढव बरी—प्रत्यक्ष एखादी वस्तु नवी घडविण्यापेक्षां ती नीट करणें बरें. किंवा प्रत्यक्ष कृतीपेक्षां तिच्या घटनेची संपादणी, मखलाशी करणें सोयीचें.

घडा——घडा फोडणें—१ गुप्त गोष्टीचा परिस्फोट करणें; एखादें गुह्य उघड करणें. २ दंभस्फोट करणें; कपट; उघडकीस आणणें.

घडा भरणें—[प्रत्येक मनुष्याच्या पापपुण्याचा एक घडा असतो व त्यांत प्रत्येक पातक झाल्याबरोबर एक खडा पडतो. याप्रमाणें तो भरला म्हणजे शासन किंवा फल मिळतें, अशी कल्पना] अपराधाची परमावधि होऊन शिक्षेस पात्र होणें. तु०—शंभर अपराध भरणें. शंभर वर्षें भरणें. घटका भरणें.

आयुष्याचा घडा भरणें—१ अंतकाळ जवळ येणें. २ अधिकाराची मुदत संपण्याच्या बेतांत येणें.

पापाचा घडा भरणें—दुष्कृत्यांचा कळस होऊन त्यांचें फळ भोगण्याची वेळ येणें. मागें पहा.

(कच्च्या) घड्यानें पाणी भरणें-वाहणें—(कच्चें मडकें पाझरतें, फुटतें व पाणी भरणें होत नाहीं यावरून) १ निष्फळ काबाडकष्ट करणें; निरर्थक मेहनत, उद्योग करणें. २ अतिशय हाल काढणें; कष्ट करणें.

❀ **पालथ्या घड्यावर पाणी**——घडा उपडा ठेवलेला असला व त्यावर कितीहि पाणी ओतलें तरी त्यांत पाण्याचा थेंबहि शिरावयाचा नाहीं. तेव्हां असला निष्फळ प्रयत्न करण्यांत काय फायदा. उपड्या घड्यावर० पहा.—टि ४.१९३.

घडाई——घडाई परीस मढई जास्त—[घडाई= घडविण्याचा म्हणजे वस्तु नवीन करण्याचा खर्च. मढाई= मढविण्याचा म्हणजे बाह्यतः सुशोभित करण्याचा खर्च.] वस्तु नवीन घडविण्यापेक्षां ती सुशोभित करण्यास किंवा दुरुस्त करण्यास जर जास्त खर्च येऊं लागला तर मग ती दुरुस्ती काय कामाची. वस्तु मग नवीन घेणेंच बरें, असा भावार्थ.

घडामोड——ईश्वराची-ब्रह्मदेवाची घडामोड—घडविणें व खालीं पाडणें, करणें-मोडणें इ. परमेश्वराचा व्यापार, खेळ. त्याच्या घरीं रोज सवालक्षांची घडामोड चालते अशी जुनी समजूत.

घडी——घडी घटकेचा गुण—(कार्यकारणभाव लावतां येत नसला म्हणजे म्हणतात) वेळेचा गुण; एखादी गोष्ट प्रसंगानुसार घडून येते तेव्हां म्हणतात; प्रसंग-माहात्म्य. घटका पहा.

घडी भरणें—१ घटका भरणें; आयुष्य संपणें; अंतकाळ येऊन ठेपणें. 'आला समजूं पिशाच आपण घडी भराया माझी ।'—विक ५५. २ शिक्षा भोगण्याची वेळ येणें; मुदत भरणें.

घडीचें घड्याळ-ळें—१ क्षणभंगुर जीवित. २ अनिश्चित स्थिति; उतावळा स्वभाव; केव्हां मन बदलेल याचा नेम नाहीं अशी स्थिति. 'पंतप्रतिनिधि यांचा दरबार थोर, घडीचें घड्याळ, विश्वास नाहीं, फिरावयासी उशीर नाहीं.' —रा ३.१२६.

❀ **घडी घडी, लांब दाढी**—दाढी पहा.

घडूँ भल्ल्याबगर वडूँ जायनात—(गो.) योग आल्यावांचून एखादी गोष्ट घडत नाहीं.

घडी——**वरघडी; घडीपदर**——वरचा दिखाऊ पदर; (ल.) वरवरची दिखाई.

बसलेली घडी बदलणें—पूर्वीची व्यवस्था, पद्धति जाऊन नवीन येणें. 'कोणतीही गोष्ट नव्यानें शिकावयाची म्हटली कीं मनाची बसलेली घडी बदलणें भाग असतें.' —दौलत पृ ७७.

घडी बसणें——१ समजूत पटणें. २ बस्तान-जम बसणें 'आतां मात्र मनाजोगती घडी बसली.'—विवि ८.९.१७४. ३ योजलेलें कार्य यथास्थित जुळणें.

घडी बसविणें——जम बसविणें: सुयंत्रित करणें. 'बुद्धिमतीनें स्वतः बसविली पातेराज्याची घडी।'—विक २८.

घडी बिघडणें——१ वितुष्ट येणें; बिनसणें; बिघाड होणें २ विस्कळितपणा येणें; ज्याप्रमाणें कोर्‍या कापडाची एकदां घातलेली घडी मोडली म्हणजे ती पुन्हां केली तरी पहिल्यासारखी बसत नाहीं, त्याप्रमाणें अव्यवस्थितपणा येणें 'पुण्याच्या राज्यकारभाराची घडी बिघडली होती.'—इप १३७.

घडी मोडणें—नवीन लुगडें वगैरे वस्त्र नेसावयास आरंभ करण्यापूर्वीं शुभ दिवस पाहून तें वस्त्र त्याची घडी उकलून त्यावर हळदकुंकू वगैरे घालून देवापुढें ठेवतात व गाय वगैरेंच्या पाठीवर टाकून बहुधा एखाद्या कुमारीस नेसावयास देतात हा विधि. यानंतर जिचें वस्त्र असेल ती स्त्री तें धारण करते.

❀घडी मोडली ती सुधारणें नाहीं—एखाद्या वस्त्राची एकदां कोरेपणीं असलेली घडी मोडली म्हणजे ती जशीच्या तशी पुन्हां बसत नाहीं. यावरून एकदां एखादें काम विस्कटलें किंवा बिघडलें म्हणजे तें नीट सुरळीतपणें रस्त्यावर आणणें कठीण जातें.

घडीत——**घडीत बुडवून घडणावळीकरितां तगादा; घडीत खाऊन घडणावळीकरितां भांडण**—एखादा दागिना करण्याकरितां सोनाराजवळ सोनें दिलें असतां तें आटण्यांत वगैरे नासून टाकून खाऊन बसावयाचें. दागिना तर घडावयाचा नाहीं. पण न घडलेल्या दागिन्याबद्दलहि मजुरीकरितां तगादा लावावयाचा व भांडण करावयाचें, असला उलटा न्याय.

घडेस्री——**घडेस्री काढणें**—(कु.) कानउघाडणी करणें.

घड्याळ——**घड्याळटिपरूं**—[घड्याळ=पितळेचा तास; एक वाटोळा जाडा पत्रा. टिपरूं=घड्याळावर मारण्याची मोगरी; काठी.] (ल.) भाकर व मिरची; अगदीं निकृष्ट, ठराविक अन्न.

घण——**घण्याघायीं**—घणाच्या आवाजांत; सारखी गडबड होत असतां, गोंगाट चालू असतां; अत्यंत घाईच्या वेळीं; गडबडीच्या वेळीं.

❀घणाचे घाव ऐरणच सोसूं जाणे——ज्याला नेहमीं कष्ट सहन करावयाची संवय असते, त्यासच कष्ट सहन करतां येतात व तोच खस्ता काढूं शकतो. जसें—मुलाचें दुःख आईच काढूं जाणे.

घणाचे घाव सोशील तो हिरा—जो घण मारले असतांहि न फुटतां त्या परीक्षेंतून बाहेर पडतो तो हिरा खरा ठरतो; खोटा खडा असल्यास फुटून जातो. त्याप्रमाणें सज्जन मनुष्य हा प्रखर कसोटींतून बाहेर पडल्यावरच त्याला लोक सज्जन म्हणून मान देऊं लागतात. वर पहा.

हिर्‍याची परीक्षा घणावांचून होत नाहीं—मौल्यवान वस्तूंची परीक्षाहि मोठी कडक व कठीण असते. हिर्‍याची परीक्षा होण्यास त्याला घणाचे घाव सहन करावे लागतात. त्याप्रमाणें उत्तम मनुष्याची योग्यता चांगल्या कठिण कसोटीशिवाय होत नाहीं. तु०—हिरा ठेवितां ऐरणी। वांचे मारितां जो घणीं। तोचि मोल पावे खरा। करणीचा होय चुरा॥ —तुगा २३०३. तुका म्हणे तोचि हिरा। घनघायें निवडे चुरा।—तुगा ३२६६.

घणस——**घणसाचें**—(राजा.) घोणसाचा दंश.

❀घणसापुढें गारुड चालत नाहीं—मांत्रिकाचा मंत्र घोणस किंवा फुरसें जातीच्या सापावर लागूं पडत नाहीं. जबरदस्तापुढें लबाडी वगैरे टिकत नाहीं. 'गुणियासि नागवें। कोडसें जैसें।'—ज्ञा १३.७२६.

घणा——**घणा असणें-नांदणें**—[घणा = मोठा घण, हातोडा] (नेहमीं दागिने घडविण्याची क्रिया चालू आहे) फार श्रीमंती असणें.

घनघोर——**घनघोर युद्ध होतें, तें लौकर सङ्ख्यावर येतें**—कडाकडीचें व प्रखर युद्ध झाल्यावर संधि करणें सुलभ जातें. कारण परस्पर दोन्ही पक्षांचें बळ एकमेकांस चांगलें कळून येतें व दोघांचीहि हानि चांगली होऊन दोघांसहि पुरेशी अद्दल घडलेली असते. रेंगाळत अनेक दिवस चालणारा चिकट तंटा मोडणें त्या मानानें कठिण असतें. The hotter war, the sooner peace.—सवि ३४०३.

घनचक्कर——**घनचक्कर असणें-उडणें**—१ अतिशय गर्दी उडणं. २ खूप रंग येणें (गाणें, खेळ इ. स). ३ हलकल्लोळ होणें (लढाई इ. प्रसंगीं).

घबाड——**घबाड मिळणें-साधणें**—[घबाड = ज्योतिषांतील एक शुभमुहूर्त] आकस्मिक, अल्पसायासें मोठा द्रव्यलाभ होणें. 'रशियाचा जय झाल्यानें हिंदुस्थानला कांहीं घबाड मिळणार आहे असें कोणालाच निश्चित सांगतां येणार नाहीं.'–केसरी १२-९-४१.

घमंडा——**घमंडानंदन**—[हिं. घमंड = गर्व] १ केवळ आपल्या पोटाची व्यवस्था पाहणारा; बेपर्वा, घमेंडी माणूस; गर्विष्ठ मनुष्य. 'आतां एखाद्या घमंडानंदनाचा साक्ष दिला पाहिजे.'–गुप्तमंजूष. २ बढाईखोर. 'पेनिलोप राणीच्या पाणिग्रहणार्थ जमलेल्या राजपुत्रांप्रमाणें घमंडानंदन आहेत.' –ब्राव ३.

घर——**घर आघाटणें**—घर जळून खाक होणें, घराची राखरांगोळी होणें; घर जळून भस्म होणें.

घर उघडणें—१ लग्न करून संसार थाटणें; बिऱ्हाड करणें; गृहस्थाश्रम स्वीकारणें. २ एखाद्याचें लग्न करून देऊन त्याचा संसार मांडून देणें.

घर उन्हांत बांधणें—लहान मुलांची समजूत करतांना म्हणतात. एखाद्यानें कांहीं चुकी, आगळीक केली तर त्याचें घर उन्हांत बांधावयाचें अशी त्यास शिक्षा करावयाची असें सांगण्यांत येतें. यांत मुलाची समजूत पडते; पण वास्तविक घर उन्हांत बांधलें काय किंवा सावलींत बांधलें काय घरांत राहणारास मुख्य घराचाच आश्रय असतो. बाहेरच्या सावलीचा नसतो; किंबहुना घर सावलींत न बांधतां उघड्यावरच बांधतात.–गांगा २४६. यावरून कांहींतरी सांगून समजूत करणें.

घर करणें—१ बिऱ्हाड करणें; संसार थाटणें; गृहस्थाश्रमास प्रारंभ करणें. २ त्रासदायक वस्तूंनीं ठाणें देणें; राहाणें, वास्तव्य करणें; आश्रय घेणें. 'माझ्या हृदयांत घर करून बसून त्यानें मला घायाळ केलें.'–ब्राय ३.३. ३ छिद्र पाडणें; रुतून बसणें; प्रवेश करून बसणें. 'काट्यानें माझ्या टांचेंत घर केलं.'

घरकुबेपणा—एकलकोंडेपणा; घरांतून कधींहि बाहेर पडावयाच नाहीं अशी संवय; केवळ घरांत बसून दिवस काढण्याची वृत्ति; माणसांत मिसळण्याचा तिटकारा.

घर खालीं करणें—घर सोडून जाणें; घर मोकळें करून जाणें; जागा रिकामी करून देणें; बिऱ्हाड हलविणें.

घर घालणें—एखाद्याच्या घराचा नाश करणें; समूळ नष्ट करणें.

घरघाली-घाल्या—१ घर बुडविणारी रा; अन्न घालविणारी. 'कशी घरघाली रांड बसली आम्हां गिळून ।'–राला ४६. २ सत्यानाश करणारी (व्यक्ति, स्थिति). 'भयानका क्षिति झाली, घरघाली, रुद्रविंशति जगिं फांकली ।'–ऐपो ३६८.

घर घेणें—१ लुबाडणें; लुटणें; नागविणें. 'मग रेणुकेनें बोलिलें । अहो जेऊनि कैसें घर घेतलें ।'–कालिकापुराण २३.४०. २ एखाद्याचा नाश करणें; नुकसान करणें; नष्ट करणें. 'म्हणती जन्मोनि द्रौपदीनें । आमचें घर घेतलें तिणें ।' –जै ७१.९९. ३ त्रासदायक वस्तु घर करून बसणें; आश्रय घेणें; प्रवेश करणें; ठाव घेऊन बसणें. घर करणें पहा.

घर चालविणें—प्रपंचाची, संसाराची जबाबदारी वाहणें; गृहस्थाश्रम चालविणें; घरबारी होणें. म्ह०--घर चालवी तो घराचा वैरी.

घर जळल्यावर बोंब मारणें—आगामी संकटाबद्दल कोणतीहि आगाऊ काळजी न घेतां, प्रत्यक्ष संकट ओढवल्यावर त्याबद्दल आरडाओरड करीत बसावयाचें.

घर जोडणें—इतर घराण्याशीं, जातीशीं, लोकांशीं वगैरे मैत्री, शरीरसंबंध घडवून आणणें; आप्तसंबंध जोडणें; नातें करणें; स्नेहसंबंध वगैरे उत्पन्न करणें. ' लक्ष्मीपतीचें घर थोर जोडे ।' –सारुह २.१.

घरटी आमंत्रण—गांवांतील प्रत्येक घरांतील एका व्यक्तीस दिलेलें आमंत्रण; घरागणिक आमंत्रण. याचे उलट सहकुटुंब सहपरिवार आमंत्रण, म्हणजे घरांतील सर्व व्यक्तींस किंबहुना पईपाहुण्यासुद्धां दिलेलें आमंत्रण.

घर डोईवर घेणें—आरडाओरड करून घर दणाणून सोडणें; अतिशय गडबड, गोंधळ करून त्रास देणें.

घर तुटणें—१ मैत्रीचा, नात्याचा संबंध सुटणें; एखाद्याच्या मृत्यूनें वगैरे आप्तसंबंध नाहींसा होणें. २ दोन घरांतील लोकांत वितुष्ट येणें; वैमनस्य येणें.

दुसऱ्याचें घर दाखविणें—१ आपल्या घरीं कोणी त्रासदायक मनुष्य आला असतां कांहीं युक्तीनें त्याला दुसऱ्याच्या घरीं लावून देऊन आपला त्रास चुकविणें; आपल्यामागची पीडा दुसरीकडे घालवून देणें; आपल्या मागचें लचांड दुसऱ्याच्या गळ्यांत घालणें. २ घालवून देणें; घराबाहेर काढणें; संबंध सोडणें.

घरदार करून राहणें—कायमची वस्ती करणें; स्थाईक होऊन राहणें; स्थिर होणें.

घरदार खाऊन वांसे तोंडीं लावणें—सर्व धनदौलत नासून फस्त करणें; सर्व संपत्तीचा नाश करणें; सर्वस्व गमावून बसणें.

घरदार विकणें—सर्व मालमत्ता चीजवस्त विकणें; सर्व वस्तूंचा विक्रय करणें.

घर धरणें—१ घरांत बसून राहणें; घराच्या बाहेर न पडणें; कोणतीहि आपत्ति आली तरी स्थानत्याग न करणें. कोणत्याहि प्रसंगीं घर सोडून न जाणें. २ रोग वगैरेनीं शरीरावर अंमल बसविणें; रोगादिकांनीं शरीरांत कायमचें ठाणें देणें. ३ चिकटून राहणें; स्थिर होणें. ४ सोंगटी वगैरे कटावर किंवा पोटघरीं वगैरे विशिष्ट घरीं ठेवून घर अडविणें.

घर धुणें-धुवून नेणें—१ एखाद्याचें असेल नसेल तें लबाडीनें गिळंकृत करणें; घरांतील सर्व सामान लांबविणें. २ नागविणें; लुबाडणें; लुटणें; सफा करणें; पूर्णपणें बुचाडून नेणें. ‘ शंभर वर्षांनीं घर धुवून नेल्यानंतर ही ओळख आम्हांस पटूं लागली आहे. ’ –टिव्या.

घर निघणें—नवऱ्यास सोडून दुसऱ्याच्या घरीं जाणें; आपलें घर सोडून परक्याचा आश्रय घेणें. ‘ माझें घर निघालीं. ’ –वाडमा २.२०९.

घर नेसविणें—घरावर गवत वगैरे घालून शाकारणें; घर शिवणें; घराच्या छपराची डागडुजी वगैरे करणें.

घर पाठीस लागणें—घरांत अगदीं ओको ओको होणें. ‘ आनंदीबाईंना आगबोटीवर बसवून गोपाळराव घरीं आल्यावर त्यांना घर आपल्या पाठीस लागलें आहे कीं काय असें वाटूं लागलें. ’ –आजोच १५२.

घरपाडो—(गो.) घरांतील अनेक स्त्रियांशीं (वेश्यांशीं) संबंध ठेवणारा.

घर पालथें घालणें—१ हरवलेली वस्तु शोधण्यासाठीं घराचा कानाकोपरा धुंडाळणें; सर्वत्र सूक्ष्मपणें शोध करणें. २ सर्व घरांत, गांवांत हिंडणें; भटकणें.

घर पाहाणें—१ एखाद्याच्या घराकडे वक्रदृष्टि करणें; घरावर सत्ता चालविणें; वरचढ होणें; अंमल चालविणें. म्ह० म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं पण काळ घर पाहतो. २ वधूवरासाठीं योग्य स्थळाची निवड करणें; स्थळ पसंत करणें.

घर पुजणें—१ आपलें काम करून घेण्यासाठीं एखाद्याच्या घरीं आर्जवें, खुशामत करण्यास वारंवार जाणें; दुसऱ्याच्या घराचा उंबरठा झिजविणें; सारख्या खेपा घालणें. २ आपला उद्योग न करतां दुसऱ्याच्या घरीं भटक्या मारणें.

घर फोडणें—१ संसार आटोपणें; आंवरणें. २ घरांतील माणसांत वितुष्ट आणणें; गृहछिद्र कळून घेऊन घरांतील माणसांत बेबनाव करणें; कलह लावणें. ३ घरास भोंक पाडून आंत शिरकाव करून घेणें; घरफोडी करणें.

घर बसणें—कर्ता मनुष्य नाहींसा झाल्यामुळें, दुर्दैवाच्या आघातामुळें कुटुंब विपन्नदशेस येणें; घरांतील माणसें निराधार होणें.

घर बसविणें—संसार थाटणें; स्थिर होणें; कायमचें वास्तव्य करणें; स्थाईक होणें.

घर बुडणें—१ कुटुंबाचा नाश होणें; दुर्दशा होणें; अत्यंत विपन्नावस्था येणें; संसाराची वाताहत होणें. २ वंशाचा लोप होणें; निर्वंश होणें; निर्मूल होणें.

घर बुडविणें—१ कुटुंबाचा नाश करणें; कुलक्षय करणें. ‘ रावणाचें घर बुडविलें सारें । त्याचीं रांडापोरें मारियेलीं ॥ ’ –तुकाराम. २ घरास काळिमा आणणें; दुर्लौकिक करणें.

घर भंगणें—कुटुंब विस्कळित होणें; घरांत फाटाफूट होणें; गृहकलह लागणें; कुटुंबांत वैमनस्य उत्पन्न होणें.

घर भरणें—१ दुसऱ्यास बुडवून आपण श्रीमंत होणें; दुसऱ्याचें लुबाडून स्वतःची भर करणें; दुसऱ्यास नागवून आपण संपन्न होणें. २ दुसऱ्याचें घर लुटणें; दुसऱ्यास बुडविणें व स्वतः गबर होणें.

घर भलें कीं आपण भला—लोकांच्या उठाठेवींत उचापतींत न पडतां आपल्या उद्योगांत गर्क असणारा; स्वतःचें घर सोडून फारसें कोठें न जाणारा; सहसा स्वतःच्या घराच्या बाहेर न पडणारा; इतर भानगडींपासून अलिप्त असणारा.

घर मांडणें-थाटणें—संसारोपयोगी वस्तूंनीं घर नीटनेटकें करणें; घराची सजावट करणें; गृहस्थाश्रम स्थापन करणें.

घर मारणें—घर लुटणें; दुसऱ्याच्या घरांतील द्रव्याचा अपहार करणें; एखाद्यास बुडविणें; त्याचा समूळ नाश करणें.

घर मोडून मांडव करणें—क्षुल्लक गोष्टीकरितां मोठें नुकसान करून घेणें. ‘ घर मोडोनि केले । मांडव पुढें । ’ –ज्ञा १३.

घर म्हणून ठेवणें—एखादी वस्तु वगैरे प्रसंगविशेषीं उपयोगी पडेल म्हणून थोडीफार राखून ठेवणें; सामान्यतः गृहस्थाश्रमी मनुष्यास प्रत्येक गोष्टीची केव्हांना केव्हां तरी

गरज लागते. याकरितां कोणतीहि वस्तु पूर्णपणें खर्च करून न टाकतां थोडीशी ठेवून देणें.

घर रिघणें--स्वतःचें घर सोडून दुसऱ्याच्या आश्रयास जाणें; घर निघणें, पहा. ' घर रिघे जाई उठोनि बाहेरी ।'

घर लागणें--घर भयाण भासणें; घरांत राहण्यास भीति वाटूं लागणें; घर अंगावर येतें कीं काय असें वाटूं लागणें.

घर लुटणें—घरावर तुळशीपत्र ठेवून आपण कांहींएक चीजवस्त न घेतां घराबाहेर पडणें व घरांतील सर्व मालमत्ता ब्राह्मणांस दान म्हणून देऊन लुटावयास सांगणें.

घर स्वच्छ आरशासारखें करणें--घर नीट लावणें; त्यांतील घाण वगैरे काढून सुदर व स्वच्छ असें करणें ' झाडून सारवून घर स्वच्छ आरशासारखं करून ठेविलं आहे ! ' -एकच प्याला ३.२.

आल्या घरचा—एखाद्या स्त्रीनें एकदां विवाह करून पुत्रप्राप्तीनंतर वैधव्य आल्यास दुसऱ्याशीं लग्न केलें तर पहिल्या नवऱ्याचा मुलगा तिच्याबरोबर दुसऱ्या घरीं जातो त्यास म्हणतात. विवाहाबरोबर पहिल्या घरचा आलेला. सहोढ पुत्र.

घरचा कारागीर-कसबी—आपल्याला जरूर तेवढे जिन्नस घरींच करणारा; स्वतः हरहुन्नर जाणणारा; स्वतःच्या गरजा स्वतःच भागविणारा.

घरचा दाणा--स्वतःच्या शेतांत पिकलेलें धान्य; घरचें धान्य.

घरचा ना घाटचा—'धोब्याचा कुत्रा घरचा ना घाटचा.' धोबी पहा. ज्याचा कोठें कांहीं संबंध नाहीं असा; कोणत्याहि प्रकारचा संबंध नसलेला; उपटसुंभ; उपऱ्या.

घरचा विद्वान्--स्वतःच्या कामापुरती विद्या घरींच शिकलेला; शाळेंत जाऊन अगर गुरुगृहीं राहून अध्ययन न करतां स्वतःच वाचून ज्ञान मिळावलेला; स्वतःस लागणाऱ्या सर्व विषयांची माहिती स्वतः होऊन मिळविलेला.

घरचा सुखी—खाऊन पिऊन सुखी; ज्यास प्रपंचा करितां घराबाहेर जाऊन उद्योगधंदा करावा लागत नाहीं असा; सुखवस्तु.

घरची उतरंड-कूड—(ना.) एक शिवी; अपशब्द.

घरची बाईल--लग्नाची बायको; विवाहित स्त्री.

घरची विद्या--कुटुंबांतील परंपरागत आलेलें ज्ञान; घराबाहेर कोठेंहि शिकावयास न जातां मिळविलेलें ज्ञान.

घरची सोबत--१ जवळच्या नातेवाइकाची सोबत; आपल्याच घरीं जाणाऱ्या व आपल्याशीं आप्तसंबंध असलेल्या मनुष्याची संगति. २ विशेषतः पतीचीच सोबत.

घरचें खाऊन लष्कराच्या भाकरी भाजणें—विनाकारण उठाठेवी करणें; पदरचें खाऊन गांवच्या चवकश्या करीत फिरणें. लष्कर पहा.

घरचें द्रव्य—कुटुंबांतील धन; बाहेर व्यापारधंदा करून न मिळविलेलें, घरच्याच व्यवसायांत प्राप्त झालेलें किंवा पूर्वार्जित द्रव्य.

घरच्या गाईचा गोऱ्हा--घरच्या गाईच्या गोऱ्ह्यास आपण ज्या कामीं लाविलें तें त्यास करणें भाग. त्याप्रमाणेंच कोणी आप्त मनुष्य असतो त्यास जसें सांगावें तसें तो ऐकतो.

घरच्या चिंचेनें दांत आंबणें—कांहीं मनुष्यांस स्वतःच्या घरच्या गोष्टी आवडत नाहींत; त्याच बाहेरच्या गोष्टी गोड वाटतात अशांस अनुलक्षून ही म्हण योजतात. घरच्या चिंचा आंबट व बाहेरच्या गोड लागणें.

घराचा उंबरठा चढणें—घरांत प्रवेश करणें,पाऊल टाकणें.

घराचा खांब; घराचा धारण; घराचें पाघळण—घरांतील कर्ता माणूस; ज्यावर सर्व घरांतील व्यक्ति अवलंबून असतात असा मनुष्य.

घराचा पायगुण—घरांतील मनुष्यांची वागणूक, रीतभात, शिस्त वगैरे; घराची पुण्याई किंवा पाप; कुटुंबाची परंपरागत कीर्ति, पद्धति वगैरे.

घराचा पायगुणच तसा; घरची खुंटी तशी--कुटुंबांतील माणसाची वागण्याची रीत असल त्याप्रमाणेंच सर्व गोष्टी होतात; एखाद्या कुटुंबांतील मनुष्यांचा स्वभाव त्यांच्या आनुवंशिक रीतीभातीस, वडील मनुष्यांच्या शिस्तीस अनुसरून बनतो त्यास म्हणतात.

घराचा वासा ओढणें—अडवणूक करणें; मुख्य आधार काढून घेणें; महत्त्वाचा अडथळा उत्पन्न करणें; महत्त्वाचें साधन किंवा मनुष्य दूर करणें.

घराचें घरकुल करणें; घरकुलें होणें--वाताहत होणें; निकृष्ट दशा येणें; वैभव जाऊन हीनदशा प्राप्त करून घेणें किंवा येणें.

खाल्ल्या घराचे वासे मोजणें—(घर विकावयाचें झालें तर वाशांची किंमत काय होईल याचा हिशेब करणें) कृतघ्न होणें; उपकार विसरून अपकार चिंतणें, करणें.

घरांत; घरीं; घरांतलें--(नवऱ्याचें किंवा बायकोचें नांव न घेण्याची पद्धत असल्यानें) पत्नीनें पतीस, पतीनें

पत्नीस उद्देशून वापरावयाची सांकेतिक भाषा. ‘ हा जिन्नस घरांत दाखवून आणतो ’. –विवि १०.५–७.१२७. ‘ आमच्या घरांतल्यांनीं दादासाहेबांना दारूचें व्यसन लावलें.’ –एकच प्याला.

घरांत पैशाचा–सोन्याचा धूर निघणें–निघत असणें — घरची अतिशय श्रीमंती असणें; विपुल द्रव्य, संपत्ति असणें; अमर्याद वैभव प्राप्त होणें.

घरांत समजणें — घरांतल्या घरांत तंटा मिटविणें; आपसांत समजूत करणें; तडजोड करणें.

घरांतील चोर— आपल्या आश्रयांतलिच गुप्त शत्रु; अस्तनींतील निखारा; आपसांतील मनुष्यच आपल्या विरुद्ध कट करीत असलेला. ‘घरांतील चोर मळमळीत झालिया (फितुर उघडकीस आल्यास) परतेल.’–पया ८२.

घरांतील मंडळी––पत्नी; बायको. घरांत पहा. ‘ पाहूं घरांतील मंडळीस कसाकाय पसंत पडतो तो.’–विवि ७.१०.१२७.

घराला घूस लागणें—घरांत गृहकलह किंवा अंतस्थ भेद उत्पन्न होणें. यामुळें घरांतील एकोपा बिघडून नाश होणें.

घराला पदर असणें—कांहीं तरी परजातीची कुलामध्यें भेसळ असणें; कुलामध्यें हीन जातीशीं केव्हां तरी लग्न संबंध झालेला असणें.

घराला राम राम ठोकणें— कायमचें घर सोडून जाणें; गृहत्याग करणें. ‘आज या घराला रामराम ठोकण्यापेक्षा घटकाभर जुलमाचा रामराम पत्करला.’—भा ९०.

घरावर काठ्या घालणें; घरावर गोवरी-निखारा ठेवणें—एखाद्या कुटुंबाची धूळधाण, बदनामी करणें; एखाद्याचा सत्यनाश करणें, वाताहात करणें.

घरावर कुत्रें चढविणें––[गोव्यांत घरावर कुत्रें चढविणें अशुभ मानतात व तन्निवारणार्थ कांहीं दिवस गृहत्याग करतात.] कोणाहि व्यक्तीचा कमालीचा दुष्टपणा वर्णन करण्यासाठीं या वाक्प्रचाराचा लाक्षणिक अर्थानें उपयोग करतात.–सह्याद्रीच्या पायथ्याशीं २९५. १ घरांत भांडणें, कलागती लावणें; तंटाबखेडा माजविणें; गृहकलह उत्पन्न करणें. २ दुष्टावा करणें; हेवा दावा करणें.

घरावर गवत रुजणें—घरामध्यें दीर्घकालपर्यंत वसती नसली म्हणजे छपरावर गवत उगवतें; त्यावरून घर ओसाड, उजाड पडणें; घरामध्यें बरेच दिवस वस्ती नसणें.

घरावर तुळशीपत्र ठेवणें— घरदार सर्व सोडून निघून जाणें. घरांतील सर्व चीजवस्तूसह घर दान म्हणून ब्राह्मणास देऊन टाकणें, लुटावयास सांगणें. (एखादी वस्तु दान करतांना तिच्यावर तुळशीपत्र ठेवतात यावरून) घर लुटणें पहा.

घरास आग लावणें— घराचा नाश करणें; घराचा विध्वंस करणें; गृहकलह वगैरे आपत्तींनीं घर अगदीं मोडकळीस आणणें.

घरास कांटी लागणें—(वाट बंद करण्यासाठीं कांटी लावतात.) घर उध्वस्त होणें; घराच्या वाटा बंद होणें; घरांत राहणें अशक्य होणें.

घरास कांटी लावणें— १ घराची वाट बंद करणें; घरांतील व्यवहार बंद करणें; घरांत राहणें अशक्य करणें. २ घर उध्वस्त करणें.

घरास राखण— १ सामान्यतः नेहमीं घरांत राहणारे माणूस, विशेषतः वृद्ध स्त्री वगैरे; जें मनुष्य सहसा घरांतून बाहेर पडत नाहीं असें. २ घरांतील संचयाचा अल्पांश; एखादी वस्तु घरांत अगदीं नाहींशी होऊं नये म्हणून राखून ठेवलेला थोडासा भाग.

घरास हाड बांधणें; घरावर टाहळा टाकणें—(घर वाळींत आहे हें दाखविण्यासाठीं या गोष्टी करीत.) जातिबहिष्कार घालणें; एखाद्या घराशीं व्यवहार बंद करण्यासाठीं तें अपवित्र करणें, विटाळणें; किंवा तें बहिष्कृत आहे असें दाखविण्यासाठीं त्यावर झाडाचा टाहळा वगैरे टाकून खूण करणें.

घरीं करणें––एखादें शेत, बाग, मळा वगैरे स्वतः वहिवाटींत आणणें; मक्त्यानें न देतां स्वतः लागवड करणें; घरीं कसणें.

एखाद्याच्या घरीं पाणी भरणें–१ सेवेंत तत्पर असणें; नेहमीं उपस्थित असणें; ज्याप्रमाणें पाणी भरणारा सेवक नेहमीं हजर असतो त्याप्रमाणें लागेल तेव्हां तयार असणें (एखादी विद्या, वस्तु वगैरे). ‘ते लढाईंत दहा दहा जखमा लागलेले राव आणि मोठमोठे बहादूर वीर यांच्याच घरीं पाणी भरायचे !’ –उग्र १.१. २ भरपूर असणें; विपुल असणें; एखाद्या गोष्टीची समृद्धि असणें. ‘ उद्योगाचे घरीं। ऋद्धिसिद्धि पाणी भरी ॥ ’

घरीं बसणें—बेकार असणें; कामधंदा नसल्यामुळें कोठें बाहेर न जातां घरींच बसून असणें.

घरीं बसविणें— १ कामावरून काढणें. २ निरुद्योगी, निरुपयोगी ठेवणें. २ बेकार बनविणें. ‘ सरबत, पन्हें, दूधसाखर, घोटा व थंडाई, यांस चहा, कॉफी, सोडावाटर, लेमोनेट आणि शांपेन दारूनें घरीं बसविलें. ’–शाब १.५०.

घरीं येणें—एखादी मुलगी विवाह झाल्यावर पतिगृहीं जाते. ती तेथेंच राहावयाची असते पण वैधव्य आल्यास ती पितृगृहीं परत येते; यावरून स्त्री विधवा होणें. 'कुटुंब मोठें, दोन बहिणी घरीं आलेल्या.' –मनोरंजन, आगरकर अंक.

❀ **घर अस्कड, बायल माकड, त्या दादल्याक ना सांकड**—(गो.) घर जर वस्तीला अयोग्य असें असेल व बायको जर माकडासारखी असेल तर नवऱ्याला तीं गमावतील अशी धास्ती वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. तु०–घर सांकड बाईल माकड.

बायकोवांचून घर, आणि पोरावांचून संसार—स्त्रीवांचून घर व पोरांवाचून संसार व्यर्थ होय. घराला स्त्रीनें शोभा येते व संसाराला मुलांबाळांनीं शोभा येते.

घर आये कुत्ते, कोभी नहिं निकालते--घरीं आलेल्या कुत्र्यालाहि कोणी हांकून काढीत नाहीं. आपल्या येथें आश्रयार्थ आलेल्या मनुष्यास कोणी बाहेर घालवून देत नाहीं. आश्रयार्थ आलेल्यास आश्रय द्यावा. शरणागतास अभय द्यावें.

घरकर्ता घराबरोबर बांकडा असतो—घरांतील जो संसार करणारा मनुष्य असतो त्याला घरांतील अनेक लोकांस वेळप्रसंगीं नाखूष करावें लागतें, म्हणून तो बहुतकरून घरांतील कोणास आवडत नाहीं. तु०–गांव चालवितो तो गांवचा वैरी, घर चालवितो तो घराचा वैरी. गांव पहा.

दिलें घर कीं उपजलें घर; आपघर कीं बापघर—नवऱ्याचें घर किंवा बापाचें घर अशा दोनच स्थळीं स्त्री सुरक्षित राहूं शकते. इतर ठिकाणीं तिनें राहाणें योग्य नाहीं. आपघर पहा.

घर केलें दार केलें, सगळें सावकारानें नेलें—घरदार वगैरे सर्व संसार नीटपणें केला पण तो करतांना इतकें कर्ज केलें कीं, तें सर्व सावकाराच्या ताब्यांत गेलें. असा अयशस्वी संसार करण्यांत काय फायदा.

घर केले म्हणजे भिंत बांधावी, आणि सून आली म्हणजे सत्ता चालवावी--घराबरोबर भिंत बांधण्याची पाळी येतेच; तसेंच सून आली म्हणजे सासूला सत्ता चालविण्यास एक हकाचें माणूस होतें.

घर खाऊन शौचकूप तोंडाला लावणें--सर्व गोष्टींची नासधूस करणें; उधळपट्टी करून जवळ असेल नसेल तें सर्व नाहींसें करून टाकणें.

घरघरमें वही पर, सबसे आपने घरकी सही—प्रत्येक घरांत भांडणतंटा रुसणें फुगणें वगैरे सर्व गोष्टी चालतातच. मग आपल्याच घराला दोष देण्यांत काय फायदा. आपल्याच घरची स्थिति सर्वांत बरी म्हणावी झालें. कारण कोठेंहि गेलें तरी तेंच. तु०–घरोघरीं मातीच्या चुली. घरोघरीं एकच परी.

घरघुशी आणि घरनाशी—एखादी स्त्री हळूहळू गोडगोड बोलून घरांत प्रवेश करते व सर्व घरांत कलह लावून कुटुंबाचा नाश करते. त्याप्रमाणें वरून गोड बोलून आंतून आपला नाश करणाऱ्यास उद्देशून वापरतात.

घर घेतलें जुव्यावारी आणि तराजूला पासंग नाहीं—जुगार खेळून खेळून सर्व घरांतील चीजवस्त हरण करून न्यावयाची आणि वरून सचोटीचा आव आणावयाचा.

घरघोडा बाजार मोल--घरांत घोडा असतां त्याचें मोल बाजारांत कसें करावयाचें.

घर चंद्रमौळी, आणि बायकोला साडीचोळी—घर असें असावयाचें कीं घरांत सर्व चांदणें स्वच्छपणें येईल, म्हणजे जवळजवळ छप्पर असून नसल्यासारखेंच. अशा स्थितींत बायकोला नवी साडी चोळी घेऊन सजवूं पाहावयाचें म्हणजे जवळ कांहीं नसतां रिकामा डौल मिरविणें होय.

घर चंद्रमौळी, केळीवर नारळी—केळी पहा.

घर चालवितो तो घराचा वैरी, गांव चालवितो तो गांवाचा वैरी—गांव पहा.

घर जळल्यावरी, पाण्याचा शोध करी—घराला प्रत्यक्ष आग लागल्यावर पाणी शोधीत फिरावयाचें म्हणजे आधीं कोणतीहि तजवीज न करतां आयत्यावेळीं उपाय शोधावयास पाहावयाचें. याप्रमाणें आगाऊ कोणतीहि काळजी न घेतां केवळ निष्काळजीपणानें असणें. तु०–संदीप्ते भवने तु कूपखननं प्रत्युद्यमः कीदृशः।–सुर १७८.१००७. चिन्तनीयाहि विपदामादावेव प्रतिक्रियाः । न कूपखननं युक्तं प्रदीप्ते वह्निना गृहे ।–सुर १५३.१७. येरवीं ऐसें घडे । जो जळत घरीं सांपडे । तो मग न पवाडे । कुंहा खणों ।–ज्ञा १३.५४९.

घर जातें खाण्यांत, वांसे जातात तोंडीं लावण्यांत—घर विकून खाण्याची वेळ येते तेव्हां वांसे विकून त्याचे आलेले पैसे किरकोळ खर्चावारी खलास होतात.

घरदार कुथांगळूं आणि कणगीला पडलं बिळूं—घरांतलीं सर्व माणसें आजारी आहेत, कण्हत कुथत दिवस काढीत आहेत, पण कणगींतलें धान्य मात्र भराभर संपत चाललें आहे ! तु०–नको नको, पायलीचें चाखो.

घरदार तुमारा, कोठीको हात मत लगाव—सर्व तुमच्या मालकांचें आहे असें सांगावयाचें, पण मुद्दे माल मात्र ताब्यांत द्यावयाचा नाहीं. उगाच दिखाऊ मोठेपणा द्यावयाचा; पोकळ बडेजाव करणें. तु०–तुम्ही आम्ही एक, मात्र कंठाळीला हात लावूं नका.

एक पाहुणा म्हणजे घरदार पाहुणे—आपल्याकडे एक जरी पाहुणा जेवावयास यावयाचा असला तरी त्याच्याकरितां आपण जो गोडधोड पदार्थ किंवा कमी अधिक जिन्नस करतों ते पंक्तीमध्यें सर्व घरांतील मंडळींस वाढावे लागतात. म्हणजे सर्व कुटुंबांतील माणसांस पाहुण्यांप्रमाणें वागवावें लागतें. केवळ त्यांच्याकरितांच एखादी गोष्ट करून चालत नाहीं.

घरदार भर्लां आनि खाल्लया तोंड थल्लां--(गो.) घरदार भरलेलें आहे पण खायला ताकद नाहीं. घरांतील जिनसांचा उपयोग घेण्यास असमर्थ असणें. तु०–निंबाला आल्या निंबोळ्या आणि कावळ्यास गळचं त्या. अंब्याला आला पाड आणि कावळ्यास मुखरोग.

घरदार माधूचें, आम्ही खंय निंदूचें—(गो.) घरदार महादूचें मग आम्ही कोठें निजावें ? सर्व घरदार एखाद्या माणसानें अडवून बसणें व इतरांची गैरसोय करणें.

घरादारां दूर झालीं, झाडांपेडां लागीं आयलीं—(गो.) घरदार दूर झालें व झाडपेड जवळ आलें. स्मशान जवळ येणें; आयुष्य थोडें शिल्लक राहणें.

घरधनी खडखडीत, बिऱ्हाडकरू हुशारीत-- घराचा मालक चांगला जागरूक व रोखठोक बोलणारा असला म्हणजे सर्व भाडकरू नीट काळजीपूर्वक वागतात. नाहींतर सर्व घरांत अव्यवस्था, घाण, गडबड वगैरे होण्याचा संभव असतो. तु०–राउत असे खरखरा, तर घोडा चाले तुरतुरा.

घरधन्याचे हाल आणि फुकट्याचे वर गाल-- मालकाची उपासमार होत असतां फुकट खाऊन चैन करीत असणें. ज्याच्यावर घर सांभाळण्याचा भार असतो त्याला खावयासहि फुरसुद नसते, पण त्याच्या श्रमावर इतर आयतखाऊ लोक मात्र चंगळ करीत असतात.

घर ना घरवार, मिया महलेदार--घरदार कांहीं नसतां उगाच रिकामी ऐट आणणारा.

घर ना दार, आणि देवळीं बिऱ्हाड--फटिंग; सडा. ज्याला घरदार नाहीं अशा भणंगास उद्देशून अथवा ज्याला वायकामुलांचा संसाराचा पाश नाहीं अशाला उद्देशून हा वाक्प्रचार योजतात.

घर फिरलें म्हणजे घराचे वासेहि फिरतात—कुटुंबांतील कर्त्या माणसांवर संकट आलें म्हणजे त्यांच्या आश्रयास असलेलीं जुनीं माणसें मुळींच उपयोगी पडत नाहींत तर कधीं कधीं उलटतातहि. सत्ताधिकाऱ्याच्या हातांतील सत्ता जाऊं लागली म्हणजे हाताखालचे लोकहि फितुर होतात.

घर फुंकना, तमाशा देखना—घराला आग लावून तमाशा पाहणें; थोडी गंमत करण्यासाठीं फार मोठें नुकसान करून घेणें.

लग्न करून पाहावें, आणि घर बांधून पाहावें-- लग्न करायास निघालें म्हणजे ज्याप्रमाणें अनेक प्रकारचा खर्च पुढें उभा राहतो, त्याप्रमाणें घर बांधावयास निघालें म्हणजे किती खर्च केला तरी पुरा पडत नाहीं.

आपलें घर बारा कोसांवरून दिसतें--आपल्या घरची परिस्थिति आपण कितीहि दूर असलों तरी आपल्याला उत्तम माहीत असते. मग डोळेझाक करून काय फायदा!

घर भरलें आणि तोंड धरलें—घरदार भर्ला, पहा.

घरभेदी लंकादहन—घरांत फूट पडली म्हणजे लंकादहनासारखी आपत्ति येते. घराचा वैरी, पहा.

घर भोन्न दार ऑत्ता—(गो.) घर भरून दार ओसंडतें. विपुल समृद्धि.

घर मोकळें, तेथें कुत्रें भोंकलें—जें घर मोकळें असेल, ज्याला कोणी मालक नसेल त्या घरांत कोणीहि घुसावें, तेथें कांहीं घरबंध नसतो.

घरमोगऱ्याक पोर्मोळु ना; घर-मोगऱ्याक पर्मळ ना—घरच्या मोगऱ्याला वास नाहीं. तु०–अतिपरिचयात् अवज्ञा।

घर म्हणतें बांधून पहा, लग्न म्हणतें करून पहा, व गुऱ्हाळ म्हणतें लावून पहा--मागें पहा.

घर लागलें जळूं, विहीर लागला खणूं—मागें पहा.

घर लासल्यारि शेतां रावचें, पोट लासल्यारि खयें रावचें ?—(गो) घर जळाल्यावर शेतांत राहता येईल, पोट जळाल्यावर कुठें राहायचें ?

घर विकत घेऊन राही, बांधण्यांत नफा नाहीं—घर स्वतः बांधूं लागलें तर फार खर्च येतो व बहुधा तो पूर्वयोजनेच्या व आवांक्याच्या बाहेर जातो. याकरितां स्वतः

१...५५

घर बांधण्यापेक्षां आयतें बांधलेलें घर विकत घेणें चांगलें; त्यांत नक्की अंदाज लागतो. Fools build houses and wisemen enjoy them (live in them).

घर सगळें तुमगेलें, सामना हात लाव नाका—(गो.) घर तुमचेंच आहे; पण सामानाला मात्र हात लावूं नका. पदराला खार लागूं न देतां अघळपघळ बोलणें. तु०–तुम्ही आम्ही एक, कंठाळीला मेख.

घर सांकड, बाईल माकड—१ अगदीं निकृष्ट स्थिति. घर कसेंबसें झोंपडीवजा असलेलें व गृहपत्नीहि बेडसर, अशा मनुष्याचा संसार कष्टप्रद, व दुर्दैवीच असणार. २ घर कसेंबसें मोडकळीस आलेलें असलें व बायको कुरूप असली म्हणजे त्यांच्याकडे दुसऱ्या कोणाचें लक्ष जात नाहीं.

घर सान जालें तरी मन होड आस का––(गो.) घर लहान असलें तरी त्यांत राहाणाऱ्यांचें मन मोठें असावें.

घर सारव तर म्हणे कोनाडे किती—घर सारवावयास सांगितल्यास कोनाड्यांची चौकशी करणें. नसत्या चौकशा करण्याची खोडी. ज्या बाबतींत आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं त्या बाबतींत निष्कारण लुडबुड करावयाची. तु०–उष्टीं काढ म्हणे जेवले किती !

घर सोडलें म्हणजे अंगण परकें-पारखें; घर सोडून अंगण परदेशी होणें; घर सोडलें, सर्वापरी नाडलें––एकदां आपला घराशीं असलेला संबंध सुटला म्हणजे मग त्यासंबंधीं सर्व गोष्टी आपणास दूरच्या होतात. त्यांच्याशीं आपला कोणताहि संबंध राहात नाहीं.

अंगणावरून घरस्थित जाणावी––घराच्या बाहेरच्या रंगरूपावरून व भोंवतीच्या जागेवरून अंतस्थिति कळून येते. कोणत्याहि वस्तूच्या बाह्यांगावरून अंतरंगाबद्दल अनुमान करतां येतें. तु०–घराची कळा अंगण सांगतें.

घरके जोगी जोगडा, बाहेरके जोगी सिद्ध––पिकतें तेथें विकत नाहीं, याप्रमाणें.–धनुर्धारी २५–१०–४१.

घराचाही गाडा ओंगणाबाचून चालत नाहीं––१ गाडी घरची झाली तरी तिला सुद्धां ओंगण द्यावेंच लागतें. आपलें मनुष्य झालें तरी त्यास खाण्यापिण्यास दिल्याशिवाय त्याच्याकडून काम होत नाहीं. २ घर चालावयाचें म्हणजे घरांतील मनुष्यास वेळोवेळीं उत्तेजन देऊन खूष ठेवल्याशिवाय संसार सुरळीत चालत नाहीं. भांडणतंटे झाल्यास ते मोडून वरचेवर शांतता केली तरच सर्व सुरळीत चालतें.

घरचा घरधनी टरका घोरे आणि शेजारी उजागरानें मरे—ज्या मनुष्यावर संकट आलेलें असतें तो त्याबद्दल अगदीं बिनघोर व बेफिकीर असतो; पण त्याच्या शेजाऱ्यालाच त्याबद्दल अतिशय चिंता लागून तो जाग्रण करीत असतो. ज्याची त्याला फिकीर नसून भलत्यालाच काळजी.

घरचाच सुभा आणि घरचाच मामला—सर्व आपआपसांतील व्यवहार. तु०–गुळाचा गणपति, गुळाचाच नैवेद्य.

घरचा चारा आणि रानचा वारा—जनावरास घरीं कितीहि खावयास घातलें, तरी त्याच्या तें अंगीं लागत नाहीं. त्यापेक्षां रानांत चरावयास सोडलें व तेथें त्यास जरी प्रत्यक्ष खावयास कांहीं न मिळतां केवळ मोकळी हवा खाऊन जरी तीं परत आलीं तरी उजगतात. –गांगा १७१.

घरचा चोर आणि बाहेरचा चहाड—घरांतीलच एखादें माणूस चोरटें निघालें व घराबाहेचा एखादा मनुष्य घरांतील माणसांविषयीं खोट्यानाट्या चाहड्या सांगूं लागला म्हणजे त्या घरांत शांति नांदणें व संसार नीट चालणें अशक्य आहे; तेव्हां यांचेबद्दल अतिशय काळजी घेतली पाहिजे. घरांत कोणास तशी संवय होऊं देऊं नये व बाहेरच्यांचें ऐकूं नये.

घरचा चोर आणि शेजारी शिंदळ—वरीलप्रमाणेंच पण येथें शेजारी वाईट चालीचा असला म्हणजे तो आपल्या घरांतील माणसांस बिघडविण्याचा संभव असतो. याकरितां यांचेपासून फार जपून वागलें पाहिजे व त्यांचा मुळांतच कांटा काढला पाहिजे. २ घरीं वाईट गुणाचा माणूस व त्यांतून शेजारीहि वाईट तेव्हां कसें होणार? ३ घरांत चोरटा माणूस व शेजारीं शिंदळकी करणारी व्यक्ति असूं नये.

घरचा झाला जागा आणि चोर आला रागा––चोर चोरी करावयास आला असतां घरधनी जागा झाला तर चोरास राग येतो. ज्याचें चोरीस जावयाचें त्याला राग येण्याबेवजीं चोरच रागावतो. म्हणजे चोर तो चोर व शिरजोर; किंवा दुसऱ्याचें घेण्यास जाऊन त्यावरच रागावणें, हा उलटा कारभार आहे.

घरचा थेंबा नि बाहेरचा तांब्या, बरोबर आहे––घरचें थेंबभर बाहेरच्या तांब्याभर पदार्थांच्या बरोबरीनें आहे. घरचें थोडें असलें तरी तें चांगलें व पुरवठ्याचें असतें.

घरचा धनी येईना व दारचा पाहुणा उठेना––घरचा मालक घरीं असल्याशिवाय उपटसुंभ लोकांचा कांटा निघत नाहीं.

घरचा पोऱ्या उपाशीं मरे, साला म्हणे माझें वऱ्हाड करा--घरीं मुलेंबाळें खाण्यावांचून उपवास काढीत आहेत, आणि बायकोचा भाऊ म्हणतो माझें लग्न करा.

घरचा भारा आणि शेताचा वारा—घरचा चारा व रानचा वारा, पहा. जनावरांस घरीं जरी भाराभर खावयास घातलें तरी शेतच्या वाऱ्यानें जी पुष्टि येते ती त्यानें येत नाहीं.

घरचा मारतो मुठा नि भाचा म्हणतो लग्न करा—स्वतःच्या मुलाचें लग्न न झाल्यामुळें त्याला मुष्टिमैथुनाची पाळी आली असतां भाच्यानें लग्न करण्याचा हट्ट घेणें म्हणजे मालकास कांहीं न मिळालें तरी उपऱ्यानें चैन करण्यासारखें आहे. घरच्या माणसांची तजवीज झाल्याशिवाय इतरांकडे पाहतां येत नाहीं. व इतरांनीं तशी अपेक्षा ठेवूंहि नये.

घरचा माळी अन् सहामासी पाणी घाली—घरचेंच असलें म्हणजे माणूस काळजी करीत नाहीं. तु०—वैद्याचीं पोरें गालगुंडानें मेलीं.

घरचा म्हाली, घर घाली--(व.) घरीं नेहमीं हजामतीला येणाऱ्या म्हाल्याला म्हणजे न्हाव्याला आपल्या घरांतील सर्व बित्तंबातमी असते. तो जर चोराला सामील झाला तर तो आपलें घर सर्वस्वीं घालवितो; आपल्या नुकसानीला कारणीभूत होतो. २ घरच्यापैकींच कोणी हजामत करणारा असला म्हणजे तो घरच्या पुरुषांच्या हजामती मोफत करतो. तितका त्याचा वेळ व मेहनत मिळकतीच्या दृष्टीनें फुकट जातात. घरची नुकसानी होते. बाहेरच्या लोकांच्या हजामती तो करता तर पैसे मिळविता व घराचा फायदा करता.

घरचा यजमान सुखी तर सर्व घर सुखी—घरांतील कर्ता मनुष्य जर सुखी असेल तर त्यावर अवलंबून असणाऱ्या सर्वांस सुख मिळतें.

घरचा वाघ आणि बाहेरची शेळी—एखादा मनुष्य घरीं मोठा शिरजोर असतो पण बाहेर मात्र दुबळ्यासारखा वागतो अशाबद्दल योजतात.

घरचा बैरी लंका ढाळे—रामायणांतील राम–बिभीषण–मैत्रीची कथा साऱ्यांना माहितच आहे. बिभीषण रावणाचा बंधु. पण रावणाच्या करणीची त्याला चीड आली. व तो रामचंद्राला जाऊन मिळाला. त्यानें रामाला लंकेसारख्या दुर्भेद्य राष्ट्राचा भेद सांगितला, एवढेंच नव्हे तर कालांतरानें रामाचा विजय झाल्यावर त्याला व त्याच्या सैन्याला लंकेतील संपत्तीहि दिली. यावरून ही म्हण प्रचारांत आली. घरभेदी माणसाला किंवा घरच्या लोकांवर उलटून परकीयांना साहाय्य करणाऱ्या व्यक्तीला उद्देशून ही म्हण योजितात. पाठभेद–घरभेदी लंकादहन.

घरचा शेतकरी आाण बाहेर मागतो मजूरी—घरीं शेती वगैरे भरपूर असतां तिच्याकडे लक्ष न देतां बाहेर मोलमजूरीनें पोट भरणें म्हणजे जें स्वतःचें व स्थायिक आहे त्यावर अवलंबून न राहतां एखाद्या तात्पुरत्या गोष्टीकडे किंवा फायद्याकडे लक्ष्य देण्यासारखें आहे. यापेक्षां शाश्वत बाबतींत श्रम करणें अधिक फायदेशीर व चिरफलदायक असतें.

घरची अर्धी दारच्या सगळीबरोबर आहे—घरीं राहून व घरांतच श्रम करून जरी अर्धपोटीं राहावयाची पाळी आली तरी घर सोडून जर दुप्पट लाभ होत असला तरी तसें करणें बरोबर नाहीं. कारण घरचें हें शाश्वत व स्थिर असतें; बाहेरची तितकी शाश्वती नसते व प्रसंगीं दोन्ही हातचीं जाण्याचा संभव असतो. तु०—हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागूं नये. हातांतील एक पक्षी झुडुपांतील दोघांबरोबर आहे. A bird in hand is worth two in the bush.

घरचीं छिद्रं भाईर सांगू नये, भायलिं घरां हाणचें—(गो.) घरांतील छिद्रें बाहेर लोकांना सांगूं नये, बाहेरचीं घरांत आणूं नये.

घरची पड ना भायलें भोजन ना--(गो.) घरांतलें पटत नाहीं व बाहेर जेवण मिळत नाहीं. इकडचेंहि नाहीं व तिकडचेंहि नाहीं.

घरचीं पोरें बोंबा मारतात आणि भाचा म्हणतो माझें लग्न करा--घरचा मारतो मुठा० पहा.

घरची म्हणते देवा देवा, बाहेरची म्हणते मला चोळी शिवा—स्वतःच्या स्त्रीस खावयासहि पुरेसें नसतें, पण बाहेरच्या स्त्रीची बडेजाव राखावयाची; हा मूर्खपणा आहे.

घरचीं मेंढरें वळायला घरचा धनगर उपयोगी पडत नाहीं—स्वकीयांवर नीट दाब ठेवणें कठीण असतें.–पामे।१८७.

घरचीचें तें मिठवणी आणि बाहेरचीचें मिठ्ठापाणी--स्वतःचें चांगलें दिसत नाहीं.–संक १.३.१४. घरचें गोड आमशें० पहा.

घरचें खा आणि माझें नांव घ्या—रिकामा खटाटोप; व्यर्थ खटपट.

घरचें खांवचें आनि भायलें करचें, कारण कितें--(गो.) घरचें खाऊन लष्करच्या भाकऱ्या कशासाठीं भाजायच्या?

घरचें गोड आमशें, शेजारची आमसाणि गोडि--

(गो.) घरचा गूळ अंबट आणि बाहेरची चिंच गोड. घरच्या माणसांनीं केलेले कांहींच मनाला यायचें नाहीं आणि परक्यांनीं अपमान केला तरी तो गोड वाटणें, असली पर घार्जिणी वृत्ति.

घरचे घरा, वाजंतरा--(गो.) एखादी गोष्ट लोकांना न कळूं देतां घरच्या घरीं उरकून घेणें.

घरचें झालें थोडें आणि व्याह्यानें धाडलें घोडें; घरचं झालें थोडें आणि व्याह्यानें धाडलें घोडें, तेंहि तीन पायांनीं लंगडें--घरीं पुष्कळ माणसें व गुरेंढोरें असून त्यांचीच व्यवस्था नीट होत नाहीं, अशी अवस्था असतांना त्यांत जर व्याह्याकडील एखादें घोडें आणखी राखणीस आलें तर असलेल्या आपत्तींत ती आणखी भर पडल्यासारखीच होते. कारण व्याह्याचें घोडें म्हणून नाकारतां येत नाहीं व त्यास खावयास घालावयास तर जवळ कांहीं नाहीं अशी चमत्कारिक स्थिति होते. यावरून उपस्थित झालेल्या संकटांत किंवा आपत्तींत आणखी भर पडणें, असा अर्थ होतो. -ज्ञाव २.२१८.

घरचें ताक व्होरून माडा मुळां पिवचें, सोरो म्हणून घेवचें--(गो.) घरचें ताक माडाच्या मुळांत जाऊन प्यालें तरी लोक म्हणणार 'हा गृहस्थ माडी प्याला.' अर्थात् लोकापवादाला कारणीभूत होईल अशी गोष्ट न करणें हें चांगलें.

घरचे देवाक पूजा ना, बाहेरचा देवाक नैवेद्यु--(गो). घरच्या माणसांची उपेक्षा करायची आणि परकांची मनधरणी करण्यासाठीं झटायचें.

घरचें पक्वान्न सोडलें आणि भिकेच्या मागें लागले--हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागणें. घरचें गोड मिष्टान्न टाकून दऊन बाहेर भीक मागून खाणें, म्हणजे जवळचें चांगल गमावून विनाकारण विपत्ति अंगावर ओढून घेण्यासारखें आहे. ही वृत्ति हीनपणाची आहे.

घरचें भोजन ना, भायलेंय आमंत्रण ना--(गो.) घरचें जेवण नाहीं आणि बाहेरचें आमंत्रण नाहीं. सर्व बाजूंनीं दुर्दैवी माणूस.

घरचें मूल तसेंच ठेऊन उपाध्या म्हणे माझें आधीं लग्न करा--घरचा पोऱ्या उपाशी मरे० पहा. (गु.) घरना छोकरा घटी चाटे० पहा.

घरचो घरकार, तिळ्या आधार--(गो.) नवरा जिवंत असला म्हणजे त्या सौभाग्यतिलकाच्या आधारावर एखाद्या चंचल स्त्रीला हवें तें करून सवरून आपलें पातिव्रत्य मिरवतां येतें.

घरचो (सोवु आशिलो) चोरु जिवानाशीं सोण्णा--(गो.) घरचा चोर जिवानिशीं मारी. चोर पहा.

घरचो दीवो म्हणु उम्मा घेवचिवे--(गो.) दिवा घरचा झाला म्हणून त्याचा मुका घेऊं नये. तसें केल्यास तोंड जळल्यावांचून राहाणार नाहीं. वस्तूस तिच्या योग्यतेप्रमाणें अथवा शक्तीप्रमाणें जवळ अथवा दूर ठेवावी.

घरचॉ भेदी भायलॉ चोर--(गो.) घरचा भेदी म्हणजे घरांत कुठें काय आहे तें सांगणारा आणि बाहेरचा चोर असे दोघे एक झाले कीं घराचें वाटोळें व्हायला कसला उशीर ?

घरच्या आईला डाकीण कोण म्हणणार ?--आपल्याच मनुष्याला आपण दोष द्यावयास सहसा तयार होत नाहीं.

घरच्या देवास नैवेद्य नको--सणावारीं कुलदेवता व इतर नैमित्तिक देवांना नैवेद्य घालण्यांत येत असतो. घरचे देवांना रोजच नैवेद्य असतो, तेव्हां त्या दिवशीं घातला नहीं तरी चालतो. यावरून प्रथम बाहेरच्या मंडळींचा आदरसत्कार व सरबराई झाल्यानंतर उरल्यास घरच्यांना, असा प्रघात. पाहुण्यांमध्यें घरचा माणूस बसला असला म्हणजे पदार्थ थोडा असेल तर त्याला वगळतात व त्यावेळीं ही म्हण वापरतात.

घरच्या भयानें घेतलें रान, वाटेवर भेटला मुसलमान, त्यानें कापलें नाक (आणि दोन्ही) कान--घरचा जाच होतो म्हणून घर सोडून बाहेर पडावें तों त्यापेक्षांहि खडतर दुःख भोगण्याची पाळी येणें. [एका स्त्रीनें घरीं जाच होतो म्हणून गृहत्याग करावयाचा ठरविलें व आपले सर्व डागडागिने घेऊन ती घर सोडून बाहेर पडली. पुढें वाटेनें जातांना रात्र पडली व ती एका जंगलांत येऊन पोंचली. तेथें तिला एक मुसलमान भेटला, त्यानें ती एकटी पाहून तिच्याजवळ होतें नव्हतें तेवढें हुबाडून घेतलें व वरतीं तिचें नाक व कान कापून तिला रडत ओरडत टाकून निघून गेला. याप्रमाणें तिला आपल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी आली व ती लहानशा आपत्तीला टाळण्याकरितां मोठ्या आपत्तींत येऊन पडली].-नर्स सुंद्राबाई २०७.

घरच्या भाकरी धर, दोन पैसे वर--पहिले दिलेले व आणखी वर कांहीं देणें. गेलेल्यांत आणखी भर.

घरच्या मताप्रमाणें पाहुण्यानें चालावें--पाहुण्या

मनुष्यानें तो ज्या घरीं असेल त्या घरच्या रीतीभातीप्रमाणें वर्तन करावें म्हणजे तो तेथें समरस होतो. नाहींतर यजमान व पाहुणा या दोघांसहि त्रास होतो. तु०—घरासारखा पाहुणा होतो, पाहुण्यासारखें घर होत नाहीं.

घरच्या म्हातारीचा काळ—बाहेर नरमपणें वागणारा व घरीं मात्र कर्दन काळासारखा त्रास देणारा मनुष्य. "मुसलमान अमदानींत सुद्धां जे धार्मिक समारंभ पूर्वकाळीं पार पाडले जात असत तेवढेहि या काळांत शांततेनें निर्धास्तपणें होऊं शकत नाहीं, ही गोष्ट लांच्छनास्पद आहे. असल्या गुंडगिरीचा बंदोबस्त करण्याऐवजीं 'घरच्या म्हातारीचा काळ बनावें,' त्याप्रमाणें सरकार असले निरुपद्रवी पण बलसंवर्धक संघ बंद पाडण्याच्या उपद्व्यापाला लागलें आहे." —केसरी ३० ८-४०.

घरच्यांचा बाऊ, बाहेरच्याच्या लाना खाऊ—घरच्या माणसाशीं मगरूरपणानें वागणारा पण बाहेर गोगलगायी-प्रमाणें मऊ होणारा मनुष्य.

घरच्यानें म्हटलें भांड, जनानें म्हणावें रांड—घरांतील माणसास आपण वाईट बोललों म्हणजे लोकहि त्याप्रमाणेंच त्यास बोलतात. आपल्या माणसाची बाहेर प्रतिष्ठा आपण ठेविली पाहिजे.

घरना छोकरा घंटी चाटे, ने उपाधीयाने आटो भावे-जोईये--(गु.) घरांतील मुलांना खावयास नसल्यामुळें जात्याचें पीठ चाटून खावयाची पाळी आलेली असतांना भटजीस रोज पीठ देणें हा व्यवहार मूर्खपणाचा आहे आधीं घरच्या माणसांची काळजी घ्यावी व नंतर दानधर्म, परमार्थ वगैरेकडे लक्ष्य द्यावें. तु०—Charity begins at home.

घरना छोकरा घंटी चाटे, अने परोना आवीने लोट खाय—घरचीं मुलें जात्याच्या पेढी चाटतात व दुसऱ्याचीं येऊन गेटी पीठ खातात. प्रथम स्वतःकडे पाहिलें पाहिजे या अर्थी.

घरमें घंटा और मिजाज बडी—घरांत कांहीं नसतां उगाच फुशारकी मारणें.

घरमें नही दाणा, अम्मा गई पिसनेकू--घरांत तर दाणा नाहीं आणि आई म्हणे दळावयास गेली. मुळांत कांहीं नसणें. अगदीं वाईट स्थिति.

घरमें नही बाम, और नाम दुर्गादास--घरीं पाहावें तर एक बाजूहि निशाणास नाहीं आणि नांव मात्र दुर्गेचा भक्त. [देवीचें निशाण लावण्यास एक काठी तरी देवीच्या दासाजवळ पाहिजे.] बडे घरका पोकळा बासा.

इच्छीं परा ते येई घरा—दुसऱ्याबद्दल वाईट इच्छा मनांत धरली तर आपलेंच वाईट होतें. याकरितां नेहमीं कोणाचेंहि बरें चिंतीत असावें.

घरा (भितरि) आयल्यारि वागु, भायर गेल्यारि कोल्हो—(गो.) घरांत आला म्हणजे वाघ आणि बाहेर गेला म्हणजे कोल्हा. घरांत कर्दनकाळ आणि बाहेर दीनवाणा पुरुष.

घरा आशिल्लॅ शाणॅ, बाजारां गेल्लॅ पिसॅ--(गो.) घरीं बसता तो शहाणा आणि बाजारांत जाईल तो मूर्ख. एखाद्यानें बाजारांतून कांहीं वस्तु आणावो आणि घरच्या माणसांनीं 'वस्तु महाग पडली' किंवा 'वाईट मिळाली' म्हणून त्याला मूर्खांत काढावें असा प्रकार पुष्कळदां पाहायला मिळतो.

घरां घाल्यारि पिकना, आंगडि व्हेल्यारि विकना--(गो) घरांत ठेवलें तर पिकत नाहीं; बाजारांत नेलें तर विकलें जात नाहीं.

घरां झगट्टा म्हण वेळेर व्होन्न दोन्नोल्ली, थिन्नंय दर्याकडेन 'मजें घस्स, तुजें फस्स' करून झगडूं लागली--(गो.) वाऱ्याशीं भांडणारी बोलभांड बाई.

घरा तकीत पाव्यो घालका—(गो.) घराप्रमाणें त्याचा पाया असावा.

घरां ना तीन तांदूळ, सान्नां उकडूं सोता रांडूळ—(गो.) दारिद्य असतांना मोठा दिमाख करणारी बाई.

घराची ओजकळा अंगण सांगतें—मागें पहा.

घरांत असतील तुरी, तर संसार करतील पोरी—घरांत साधन सामुग्री असेल तर सुग्रणपणा करून संसार करतां येईल. नसेल तर शहाणी बाई झाली तरी काय करणार ?

घरांत असावी भाकर, नवरा नसावा चाकर—घरीं संपन्नता असून नवऱ्यास नोकरी करण्याची जरूर नसेल तर त्या स्त्रीला चांगलें सुख मिळतें. कारण चाकर असलेला मनुष्य स्वतंत्रपणास मुकतो. म्हणून घरीं खाण्यास भरपूर असल्यावर स्त्रीच्या सर्व इच्छा पूर्ण होतात.

घरांत आली राणी आणि आईला विचारीना कोणी—घरांत बायको आल्यावर आईला पूर्वीप्रमाणें मानत नाहीं.

घरांत उष्टीं, बाहेर गोष्टी—घरांतील काम तसेंच करावयाचें टाकून बाहेर गप्पागोष्टी मारीत बसणाऱ्या अव्यवस्थित स्त्रीबद्दल म्हणतात.

घरांत घाण आणि बायको माझी गोरीपान--बायकोच्या सौंदर्यावद्दल वगैरे फुशारकी मारावयाची व घरची व्यवस्था पाहावयास गेल्यास सर्व अव्यवस्थित कारभार असावयाचा अशी स्थिति. नुसत्या रूपापेक्षां गृहव्यवस्था ठीक असणें हें स्त्रियांना भूषणावह आहे.

घरांत घूस, बायकोस फूस—सुनेस नवऱ्याची फूस असते, हें इतर माणसांस फारसें ठाऊक नसतें. नवरा हा घुशीप्रमाणें हळूच घरांतील स्थिति पाहून बायकोस मदत करीत असतो.

घरांत घेववत नाहीं, बाजारांत खपत नाहीं—वाण्याच्या दुकानीं न खपणारा माल असेल तरीसुद्धां त्याला तो घरांत खर्चवत नाहीं. अशी कातरींत सांपडलेली मनःस्थिति.

घरांत दांडगाई, बाहेर कोरडें खाई--घरांत शिरजोर पण बाहेर अगदीं दुर्बलाप्रमाणें वागणारा मनुष्य. तु०-गांवचा गांड्या पण बायकोचा देशपांड्या. मागें पहा.

घरांत दिवा, तर देवळांत दिवा--स्वतः घरीं जर स्वास्थ्य असेल तर देवाची काळजी घेतां येईल. घरीं स्वतःसच नसल्यास देवाला कोठून देणार.

घरांतु ना पेजेक सीट (वाट), भाइर वतना मिश्यांक तूप—(गो.) पैसा नसतांना बडेजाव करणें.

घरांत नाहीं अन्नकोजी आणि माझें नांव माणकोजी-घरांत खावयास दाणासुद्धां नसतां माणकोजी म्हणून फुशारकी मारणारा. रिकामा डौल दाखविणारा. तु०-नांव सोनूबाई हातीं कथलाचा वाळा.

घरांत नाहीं आनका, कुत्र्याचें नांव माणका-रिकामा बडेजाव करणारा.

घरांत नाहीं एक तीळ, पण मिशांना देतो पीळ—वरीलप्रमाणेंच.

घरांत नाहीं कवडी, घेऊं मागे शालजोडी--जवळ कांहीं नसतां पोकळ बडेजावी मारणें. तु०-घरांत नाहीं अडका बाजारांत जातो धडका.

घरांत नाहीं खाया आणि कुत्र्याचें नांव ठेवा राया--वर प्रमाणेंच.

घरांत नाहीं दाणा आणि मला पाटलीण म्हणा—जवळ कांहीं नसता फुकट तोरा मिरविणारी स्त्री.

घरांत नाहीं दाणा पण मला बाजीराव-हवालदार-श्रीमंत म्हणा—वर प्रमाणें.

घरांत नाहीं भाकरी आणि मानावारी चाकरी—घरीं कांहीं नसतांना बाहेर फुकटच्या लष्कराच्या भाकरी भाजणें. स्वतःचा कांहीं फायदा नसतां व तशी परिस्थिति नसतांहि व्यर्थ खटपटी करणें व रिकामा मोठेपणा मिळविणें.

घरांत नाहीं पिठाचा खडा, बाहेर दाखवितो पठाणी जोडा—जवळ कांहीं नसतां रिकामी फुशारकी मारणारा.

घरांत नाहीं मेहुणी आणि सासूची रांडोळी—घरांत मेहुणी असेल तर तिच्याशीं थट्टामस्करी करून जांवई करमणूक करून घेतो. मेहुणीशीं अतिसलगी ठेवण्याची रीत फार जुनी आहे. मेहुणी नसेल तर सासूवर जांवयाकडून थट्टा करून घेण्याची अनिष्ट पाळी येते.

घरांत नाहीं लोटा, दिमाख मोठा—पाणी पिण्यास घरीं मातीचें भांडें सुद्धां नाहीं. डौल मात्र मोठा आहे.

घरांत बेकारी, बाहेर ओकारी—घरांत कांहीं नाहीं व बाहेरहि कोठें किंमत नाहीं.

घरांत भय घरकराचो अन् रानांत भय वाघाचो-(कों.) दोन्हीकडे भय, त्रास. इकडे आड, तिकडे विहीर.

घरांत भांडण, नि बाहेर हलकल्लोळ—घरांत लोकांचें भांडण चाललें असतां उगाच बाहेर लोकांची आरडाओरड होत असतें. तु०-देवी देवळांत नायटे गांवांत.

घरांत मोतादी, पोशाख अमदाबादी—घरांत वागणें अगदीं बेताचें व बाहेर जातांना पोशाख मात्र झकपक.

घरांत येतें बाहेर जातें, सारीं कामं मीच करतें—छाकटीं व बडबडीं माणसें उगाच भटकण्यांत किंवा गप्पाष्टक मारण्यांत अगर आळसांत वेळ घालवितात नि आपण अत्यंत हुषार व कार्यपटू आहोंत अशी बढाई मारतात. त्यांना उद्देशून ही म्हण आहे.

घरांत वाघ, बाहेर कोल्हें—घरीं शिरजोर पण बाहेर गोगलगायीप्रमाणें गरीबीनें वागणारा.

घरांत वाजे नकारघंटा—अगदीं दारिद्य असणें; घरांत कांहीं नसणें. 'त्याचा प्रपंच हीन करंटा। घरांत वाजे नकारघंटा। मुलें भुकेनें करितीं तंटा॥'-अमृतराय सुदामचरित्र. "उद्योगी व प्रामाणिक माणसाला उदरनिर्वाहाची पंचाईत पडूं नये पण असें नसून 'घरांत वाजे नकारघंटा' अशी एखाद्या राष्ट्राची स्थिति असली'''''''तर तें राष्ट्र भिकारच म्हटलें पाहिजे."-नि.

घरांत शूर, बाहेर भागुबाई—मागें पहा.

घरांत सात हात वेळू फिरतो—वेळवाची सामान्यतः

लांबी सात हात असते. घरमालकाची स्थिति चांगली असली म्हणजे घरांत सामानसुमान चोहोंकडे ठेवलेलें असतें, व त्यामुळें घरांत फारच थोडी जागा अगदीं मोकळी सांपडते. सबंध सात हात वेळू घरांत मोकळा फिरतो याचा अर्थ असा कीं, घरांत सामानसुमानाचा अगदीं अभाव आहे. अर्थात् घरमालकाची दरिद्रावस्था आहे.

घरांत हलाखी आणि बाळ्या मागतो पालखी--घरांत जवळ कांहीं नसतां मुलांनीं भलत्याच गोष्टीचा हट्ट करणें. निष्कांचन असतांहि बाहेर फुशारकी मारणें.

घरांत हुंदीर; शेंपड्यो वडैतात (गो).--कांहींहि खावयास घरांत नसल्यानें उंदीर नुसते शेपट्या हापटीत राहिले आहेत. अतिशय दारिद्र्य, निर्धनता.

घरांतला तिडा आणि जोडयांतला खडा, दुसऱ्यास समजत नाहीं—आपल्या जोड्यांत असलेला खडा ज्याप्रमाणें आपणांस रुततो पण बाहेर दिसत नाहीं. त्याप्रमाणें घरांत असलेलें द्वैत आपणांस त्रासदायक होतें; पण बाहेर बोलून दाखवितां येत नाहीं. गृहकलह हा उघड्यावर मांडतां येत नाहीं.

घरांतला दांडगा व बाहेरचा कोडगा—घरांत खूप जोर जोरानें बोलणारा परंतु बाहेर निर्लज्जपणें सर्वांचीं बोलणीं ऐकून घेणारा.

घरांतले दाणे सारू-सरवूं नका, लेकरंबाळं मारूं नका—दाणे तर संपूं नयेत व मुलें तर उपाशीं राहूं नयेत, हें दोन्ही कसें साधणार ? कांहींतरी एक होईल.

घरांतील कथा, पोटांतली व्यथा, कोणा सांगून येना—(कों.) आपल्या घरांतील गृहच्छिद्र त्यापासून आपणास त्रास होत असला तरी उघड करतां येत नाहीं. त्याप्रमाणेंच पोटांत असलेलें दुःख उघडें करून दाखवितां येत नाहीं.

घरांतील चारा आणि बाहेरील वारा—मागें पहा.

घरापरी घर गेलें, बायकोपरी बायको गेली--दोन्हीकडून नागवण. तु०-बापा परी बाप गेला, बोंबलतांना हात गेला.

घरापेक्षां अंगणाचीच मिजास जास्त—वास्तविक पाहतां घरामुळेंच अंगणाचें अस्तित्व नि महत्त्व. परंतु केव्हां केव्हां घरापेक्षांहि अंगणाचीच सजावट, काळजी जास्त करण्यांत येते. त्यामुळें अंगणाला घराचें व घराला अंगणाचें स्वरूप प्राप्त होऊन अंगणाचेंच महत्त्व वाढतें. मालकाला नसेल इतका गर्व नोकरानें बाळगावा, मोठ्या मंडळींना नसेल इतका लहानांनीं मिजास दाखवावा हें अनुचित व अयोग्य आहे.

घरापेक्षां उंबरठा अवघड—घराचा उंबरठा सोडून जाणें कठीण असतें. गृहत्यागासारखें दुःख नाहीं. उंबरघाट ओलांडणें, पहा.

घराला दार आणि कुत्र्याला मार--घराला दरवाजा असल्याशिवाय तें सुरक्षित राहात नाहीं; कुत्र्याला मार दिल्याशिवाय तें नीट वागत नाहीं.

घराला नाहीं कौल, रिकामा-लटके डौल--पोकळ वडेजाव. मागें पहा. White jacket, empty pocket.

घराला पाया, राष्ट्राला बाया--घराला कच्च्या पायापासून भीति असते तशी राष्ट्राला स्त्रियांपासून भीति असते. हीं जर खंबीर असतील तर मग कोणतीहि भीति नाहीं.

घरावर नाहीं कौल पण पगडीचा कोण डौल—जवळ कांहीं नसतां पोकळ ऐट आणणें.

घरावर फिरला खराटा, सगळ्या वाटा मोकळ्या—एकदां घर नाहींसें झालें म्हणजे दाही दिशा जाण्यास मोकळ्या होतात. मग कोणताहि धरबंद राहात नाहीं.

घरावर माडी आणि दरडींत शिडी—ज्याप्रमाणें दरडींत उतरण्यास चढण्यास शिडी अवश्य असते, त्याप्रमाणें घराला माडीची जरूर असते.

घरासारखा गुण, सासू तशी सून—घरांतील माणसांस जशी रीत लावावी तशी लागते व वडील माणसांचेंच अनुकरण पुढें लहान माणसें करतात.

घरासारखा घराचार, कुळासारखा आचार—ज्या घरांत आपण राहत असतों त्याच्या रीतीप्रमाणें वागत असावें व ज्या कुळांत जन्मलों असूं त्यांतील परंपरेप्रमाणें आचार ठेवावा. पूर्वील परंपरा कुलाची अथवा घराण्याची सोडूं नये.

घरासारखा पाहुणा होतो, पाहुण्यासारखें घर होत नाहीं--पाहुण्यानें घरांतील रीतीप्रमाणें वागावयाचें असतें. पाहुण्याचें अनुकरण घरांतील माणसांनीं करावयाचें नसतें. पाहुण्याच्या मर्जीप्रमाणें घरांतील सर्व लोकांचें वर्तन होणें अशक्य असल्यामुळें त्यानेंच घरांतील पद्धतीप्रमाणें वागून समरस होणें जरूर असतें.

घरासारको सोयरो; घरासारखो सोयरो, सोयऱ्यासारखें घर जाता ?—(गो.) घरासारखा पाहुणा होतो, पहा.

घरीं आड बाहेर नदी--दोहीकडेहि अडचणीची स्थिति. तु०-इकडे नई, तिकडे वई. इकडे आड तिकडे विहीर.

घरीं आइल्या लक्ष्मीक लात इश्या मारका ?—(गो.) घरांत आलेल्या लक्ष्मीला लाथ कशाला मारतां ? घरांतील स्त्रीला, विशेषतः सुनेप्रमाणें बाहेरून आलेल्या, छळणें चांगलें नव्हे. ती लक्ष्मी आहे, तिला दुखवून कल्याण होणें नाहीं.

घरीं आला संन्याशी, बाईल झाली विटाळशी—(संन्यासी) बाहेर अनेक दिवस राहून बायकोस भेटावयास म्हणून घरीं येऊन जों पाहतों तों बायको विटाळशी बसलेली. यामुळें त्याच्या उत्कंठेचा विरस होऊन मन खट्टू होतें. एखाद्या मनुष्यानें मोठ्या आशेनें, एखादी गोष्ट मिळेल या अपेक्षेनें यावें तों तेथें निराशा व्हावी. या म्हणींत संन्याशी शब्द योग्य नाहीं. कारण संन्याशास बायको नसते हा सामान्य नियम आहे व असली तरी त्यास तिची भेट घेतां येत नाहीं. तेव्हां बहुधा परदेशी म्हणजे नेहमीं व्यापार धंद्यानिमित्त बाहेर राहाणारा मनुष्य, परागंदा झालेला इसम वगैरे उद्दिष्ट असावा. किंवा पाहुणा म्हणून संन्याशाला पुढील बोलवावें तो घरीं बायको विटाळशी असल्यामुळें स्वयंपाकाची अडचण व्हावी.

घरीं आली मावशी, त्या दिवशीं एकादशी—मावशी पाहुणी म्हणून आली, तिचा पाहुणचार करावयाचा तों त्या-दिवशीं एकादशीचा उपास असल्यामुळें कांहीं करतां येत नाहीं, अशी स्थिति. यावरून उत्साहभंग दिग्दर्शित होतो किंवा मावशीसाठीं कांहीं गोडधोड करावयास लागूं नये म्हणून एकादशी करावयाची.

घरीं उपवासी आणि बाहेर उल्हासी—बाहेर मोठा आनंदी चेहरा दाखवावयाचा पण घरीं उपवास काढण्याची पाळी असावयाची. बाहेरून भपका पण आंत पोकळ. तु०-बडा घर पोकळ वासा. दिखनेमें ढबू चलनेमें शिवराई. मिशीला तूप लावणें.

घरीं एकाचा स्वभाव वांकडा, कीं सर्व कुटुंबाचा वांकडा—कुटुंबामध्यें एक जरी मनुष्य तिरक्या स्वभावाचें असलें तरी तें कुटुंबाचें मनःस्वास्थ बिघडवितें.

घरीं करतो चोरी, आणि बाहेर करतो मारामारी—घरींहि त्रास देणाऱ्या व बाहेरहि उचापती करणाऱ्या मनुष्यास म्हणतात.

घरीं कामधेनु, पुढें ताक मागे; घरीं कामधेनु,ताक मागूं जाय ।—(रामदास-मुक्ताबाई) जवळ संपत्ति असतां ती माहीत नसल्यामुळें निकृष्ट स्थितींत राहणें; स्वतःजवळ असलेला ठेवा न सांपडल्यामुळें दारिद्र्यांत दिवस काढणें. परमेश्वर आपल्या हृदयांत असतां ती गोष्ट न जाणून परमेश्वर प्राप्तीकरितां अनेक प्रकारचे कष्ट करणें; आत्मज्ञानाची प्राप्ति करून न घेतां व्यर्थ जपतपादि खटपट करणें. 'देहींच देव असतां कां रे भ्रमतोसि व्यर्थ तूं रानीं । नाभिंत सुगंधि असतां कस्तुरि मृग जेविं तो फिरे रानीं ॥

घरीं तसा दारीं, देवळीं तसा बिऱ्हाडीं; घरीं दारीं सारखाच—जो मनुष्य घरांत व घराबाहेर कोठेंहि; स्वतःच्या घरीं किंवा सार्वजनिक ठिकाणीं सारखाच वागतो, फारसें तारतम्य राखीत नाहीं, योग्य मर्यादा सांभाळित नाहीं अशाबद्दल म्हणतात.

घरीं दरिद्र आलें आणि दैव बाहेर गेलें—मनुष्यास हीनदशा आली म्हणजे त्याचें नशीबहि त्याला प्रतिकूल होतें.

घरीं दरिद्र घोळी, बाहेर तूप पोळी—एखादा मनुष्य घरांत अत्यंत कंजूषपणें राहतो, स्वतःचेहि हाल करून घेतो व इतरांचेहि करतो; मात्र बाहेर चंगळ करतो. अशा मनुष्याबद्दल म्हणतात. हल्लीं घरीं फारसें न खातां हॉटेलमध्यें अनेक रूचकर, स्वादिष्ट, अभक्षादि पदार्थांवर ताव मारणारे पुष्कळ लोक आढळतात, त्यांतला प्रकार.

घरीं दारीं रुसलें, तेथें कोणाचें काय गेलें—एखादा मनुष्य घरांतील लोकांशीं तसेंच बाहेरील मित्रमंडळींशीं वगैरे रुसून अबोला धरून राहिला, तर त्यांत त्याचेंच नुकसान होतें. लोकांचा कांहीं हानिलाभ नसतो; त्याचेंच दुःख कोणासहि न कळल्यामुळें त्याबद्दल कोणाला कांहीं सहानुभूति दाखवितां येत नाहीं, अगर उपायहि करतां येत नाहीं.

घरीं नाहीं औरस, बाहेर मात्र चौरस--घरच्या स्त्रीला एकहि मूल नसावयाचें म्हणजे बहुतेक घरच्या स्त्रीची अनावड, आबाळ करावयाची व बाहेर मात्र बाहेरख्यालीपणा करावयाचा, अशा मनुष्याबद्दल योजतात.

घरीं नाहीं खाण्याला, आई गेली दळण्याला—घरांत जेवावयाची वेळ झाली असतां कांहींहि खाण्यास नसावयाचें व आई दळण वगैरे करावयास बाहेर गेलेली असावयाची. म्हणजे जवळ जवळ घरांत नकार घंटा असलेली स्थिति. तु०-घरमें नहीं दाणा अम्मा गई पिसनेकू.

घरीं नाहीं ज्वारी, आणि बाहेर उधारी—घरांत दाणाहि नसून बाहेर पुष्कळ उचापत केलेली असणें, म्हणजे बहुतेक दिवाळें वाजण्याची स्थिति.

घरीं नाहीं पिकला जोंधळा आणि जातो राउळ्याला—जवळ कांहीं नसतां उगाच बडेजाव दाखवावयाचा. त्या पोकळ बडेजावांत कांहीं अर्थ नाहीं.

घरीं नाहीं साळी, सासूशीं करे ढवाळी--(व.) [ढवाळी=टवाळी, थट्टा, विनोद.] बायकोच्या भावाला साळा व बहिणीला साळी म्हणतात. साळीची वाटेल तशी थट्टा करण्याचा जांवयाचा अधिकार समाजानें मान्य केला आहे. साळी घरांत नसली म्हणून काय त्या जांवयानें साळीऐवजीं सासूची तशीच थट्टा करावी ? सासूशीं असें वर्तन करणें अगदीं गैरशिस्त होय. नात्यानें थट्टेचा अधिकार नसलेल्या स्त्रीशीं अयोग्य थट्टा विनोद करतांना कोणी आढळला तर ही म्हण उपयोजतात. घरांत नाहीं मेहुणी ०पहा.

घरीं नाहींत तुटक्या बाजा, भाऊ माझा बडोद्याचा राजा--मागच्या अनेक म्हणींप्रमाणें.

घरीं निजलें आणि दारीं शिजलें—गुप्तपणें केलेली गोष्ट चव्हाट्यावर येणें.

घरीं रांड पोरें मरतीं उपवासी । सांगे लोकापाशीं थोरपण ॥--घरांत दारिद्र्य असून बायका पोरें उपाशीं मरत असतां बाहेर पोकळ बढाया मारीत फिरणाऱ्या मनुष्याबद्दल म्हणतात. –तुगा ३११६.

घरीं शिमगा, बाहेर दिवाळी—मागें पहा. घरांत दारिद्र्य व बाहेर चंगळ. उधळेपणा करणाराची स्थिति.

घरीं सुख तर बाहेर चैन--घर चांगलें समृद्ध असेल, सर्वांस सुख मिळत असेल तर मग बाहेर चैन करण्यास हरकत नाहीं. नाहींतर घरांत विवंचना असतांना बाहेर उधळेपणा करणें वाईट.

घरून निघाला आणि आकाबाईच्या फेऱ्यांत पडला--मनुष्य घरांत असतो तोंपर्यंत तो आवांत असतो. एकदां का त्यानें घर सोडलें म्हणजे तो बहुधा दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडतो. याकरितां शक्य तों मनुष्यानें घरदार सोडून जाऊं नये. घरीं राहूनच शक्य तों काळजीनें, काटकसरीनें प्रपंच करावा. पूर्वी घर सोडून जाण्याइतकी दुःखदायक दुसरी कोणतीहि गोष्ट मानण्यांत येत नसे. अलीकडे रोजगाराकरितां बाहेर पडणेंच अधिक धैर्याचें व हिंमतीचें मानण्यांत येतें.

घरोघर पिकलें मोतीं, तर त्याची किंमत काय होती; घरोघर पिकलें मोतीं तर त्याचें मोल काय होतें--एखादी गोष्ट अतिशय झाली म्हणजे तिचें महत्त्व राहात नाहीं. तु०–अतिपरिचयादवज्ञा।

घरोघरीं त्याच परी, त्याहून अधिक माझ्या घरीं--सर्व घरीं एक सारखेंच आहे. त्यापेक्षां माझे घरीं जास्त आहे.

घरोघरीं त्योच परी, भितर गेल्या मातये चुलीं--(गो.) घरोघरीं एकच तऱ्हा. पुढें पहा.

घरोंघरीं मातीच्या चुली—सर्व घरीं साधारण सारखीच स्थिति असते. कोणी कोणास नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. 'घरोघरीं मृण्मय जाण चूली।' –सारह ७.१६०. –पामो ३८०.

घरटी——**घरटी, घडथाळ, बायको नीट केल्यावीण राहूं नको**--धान्य दळणाचें जातें, वेळ दाखविणारें घड्याळ व घरकाम करणारी बायको यांचें एकदिवस जरी कांहीं बिघडलें तरी सर्व घडी विसकटून जाते. याकरितां हीं नेहमीं नीट व्यवस्थित असतील व चालतील अशी काळजी घेणें फार आवश्यक आहे.

घरा——**(हृदयास) घरें पडणें**—हृदयास इजा होणें; छिद्र पडणें; जखम होणें. (ल.) फार दुःख होणें. 'पडलें होते हृदया धर्मोक्तिं, धिरडियाचि जैवि, घरे ॥' –मो द्रोण २३.८७.

घरोबा——**घरोबा वाढणें**—फार येणें जाणें असणें; दाट परिचय होणें. 'त्याचा परस्पर घरोबा इतका वाढला होता कीं, शास्त्रीबुवाची उपवर मुलगी नमी कितीकदां मावशींकडे येऊन राही.'–जादुगार पृ. ३१.

***घरोबा नावाचा आणि फायदा नाहीं कवडीचा**—घरोबा फार व त्यापासून कांहीं उपयोग नाहीं अशी स्थिति. खरा घरोबा जेथें असतो तेथें मदतहि पुष्कळच दिली घेतली जाते.

घरोब्याला घर खा, हिशेबाला चोख रहा—घरोब्याच्या बाबतींत वाटेल तितका सढळपणा दाखविला तरी हिशेबास व्यवस्थित असावें.

घर्षण——**घर्षणानें चंदनांतूनहि ठिणग्या निघतात**—चंदनाचें लांकूड हें जरी थंड असलें तरी तें सुद्धां फार घांसलें तर त्यांत अग्नि उत्पन्न होतो. फार ताप दिला असतां शांत मनुष्यहि रागावल्याशिवाय व प्रतिकारोन्मुख झाल्याशिवाय राहात नाहीं. –टि ४.१८०.

घसट——घसटीखालीं पडणें; घसटीस पडणें—१ राबत असणें; सराव होणें; परिपाठ पडणें; परिचित होणें; अभ्यास होणें. २ परिचय असणें; माहीत होणें; ठाऊक असणें.

घसरणें——घसरलें तेथेंच विसरलें—एकदां एक चूक झाली म्हणजे तिचे परिणाम भोगावे लागतात. मग ती सुधारण्यांत फार त्रास होतो.

घसा——घसा कोरडा करणें—फार वेळ बोलणें; पुन्हां पुन्हां बोलणें; मोठमोठयानें सांगणें; अनेक वेळां सांगून पाहाणें.

घसा खाणें—घसा घुरघुरणें; घशास घरघर लागणें. 'घसर घसरूं घसा खाणें । घुम घुमोंचि घुमणें । योग्य नव्हे।।' —दा १४.४.४.

घसा पसरणें—आ करणें; तोंड उघडणें.

घसा फुटणें—मुलगा वयांत आल्यामुळें त्याचा आवाज चिरणें.

घसा बसणें—आवाज घोगरा होणें; आवाज बद निघूं लागणें; आवाजांतील माधुर्य नाहींसें होणें.

घसा वाजणें—घोरणें; घसा घरघर वाजणें.

घशाखालीं उतरणें—१ गिळला जाणें; गिळंकृत होणें; स्वाहा होणें. २ लांच खाल्लेला, लबाडीनें मिळविलेला पैसा पचणें, जिरणें. ३ कबजांत येणें; ताब्यांत येणें; स्वाधीन होणें. 'पण एतद्देशीय संस्थानें मात्र सरकारच्या घशाखालीं उतरविलीं.' —नि.

घशांत अडकणें—अन्न न गिळणें; दुःखानें अगर एखादी दुःखद स्मृति झाल्यामुळें घशाखालीं अन्नाचा घांस उतरत नाहीं अशी स्थिति येणें.

घशांत घालणें—बळकावणें; गिळंकृत करणें; अपहार करणें; दाबून टाकणें. 'दुसऱ्याचे देश घशांत घालण्याची असुरी लालसा टिकणार नाहीं.' —के १४-६-३०.

घशांत टाकणें—गिळंकृत करणें; लाटणें; स्वाहा करणें; अपहार करणें. 'सरकारचा विचार इंदूरची इस्टेट घशांत टाकण्याचा होता.' —विक्षिप्त ३.१६४.

घशांत पीक धरणें-अडकणें—पाऊस न पडल्यामुळें पिकांची, कणसांची वाढ खुंटणें; पीक पोटरीवर आलें असतां पावसाच्या अभावीं कणसें चांगलीं बाहेर न पडणें.

घशांतून काढणें—खाल्लेला, गिळंकृत केलेला पैसा, चोरलेला माल इत्यादि ओकावयास, परत द्यावयास भाग पाडणें; अपहार केलेलें वित्त पुन्हां परत द्यावयास लावणें.

घशाबाहेर पडणें—१ गिळंकृत केलेली वस्तु, पैसा बाहेर ओकून पडणें. २ पीक निसवणें; कणसें पोटरीच्या बाहेर येणें.

❀ **घशांत हात घातला, परंतु सुका**—प्रयत्न करूनहि फळ न मिळणें.

घसमट——घसमट गुळवणी, समुद्रास फोडणी—पातळ कालवण अगदीं बेचव झाल्यास म्हणतात.

घाई-ई——घाई भरणें—घाई होणें. 'इंग्रजांना जी घाई भरली होती ती थंडावली.' —V. S. २.१३१.

घाई घोडा फेंकणें—घाईनें घोड्यावरून भरधांव जाणें. अतिशय घाई करणें; उतावीळ करणें; अत्यंत त्वरा करणें.

घाईस येणें—(व.) जिकीरीस येणें; त्रासून जाणें; अगदीं चिडून जाऊन केव्हां एकदां एखादी गोष्ट होऊन जाते अशी मनःस्थिति होणें.

❀ **घाईघाईनें धरती, माशाबद्दल बेडूक हातीं**—घाई घाईनें जर मासे पकडावयास लागले तर माशांऐवजीं बेडूक हातीं येतात. उतावळीनें एखादी गोष्ट करूं लागलें तर इष्ट फळ हातीं न येतां भलताच परिणाम होतो.

घाईघाईनें नाश करतो, नाशानें तोटा आणतो, तोट्यानें घरीं तंटा लागतो, इतका खटला घाईनें होतो—कोणतीहि गोष्ट दमानें न करतां घाईघाईनें करूं गेलें असतां त्यांत नुकसान, भांडणतंटा वगैरे वांट्यास येण्याचा संभव असतो. याकरितां प्रत्येक गोष्ट नीट विचारपूर्वक धिम्मेपणानें केली पाहिजे. Haste makes waste, and waste makes want, and want makes strife, between the good man and his wife.

(जेथें) नगाऱ्याची घाई, तेथें टिमकीचें काई—[घाई = जलद आवाज] नगारा वाजवीत असतां शेवटीं शेवटीं खूब जलद जलद आघात करून आवाज काढतात त्यास घाई किंवा घाईची टिपरी म्हणतात. अशा वेळीं नगाऱ्याचाच मोठा आवाज जलद जलद निघत असतां टिमकीचा आवाज कोणास ऐकूं जाणार ? यावरून मोठ्या गोष्टींची जेथें दाद लागत नाहीं तेथें हलक्या सलक्या वस्तूची कोण पर्वा करतो. जेथें मोठमोठयांची गडबड उडालेली असते तेथें लहान लहान लोकांना कोण विचारतो.

घाईच्या कामाला नाकेदाराची पोटपूजा—एखादें काम लवकर उरकावयास म्हणून जावें तों दरवाजावरील मनुष्यानेंच प्रथम आडवें येऊन त्यालाच खूष करण्याची

पाळी येते. एखादी गोष्ट जलद करावयाची असल्यास आरंभींच खोटी होण्यास सुरवात होते असा पुष्कळदां अनुभव येतो.

घाईंत घाई, न्हाण आलें म्हातारे बाई—एखाद्या मोठ्या कामाची गडबड उडाली असतां व तें त्वरेनें करावयाचें असतां मध्यंतरीं अगदीं भलतेंच कधींहि अपेक्षित नसलेलें एखादें लचांड उभें राहातें.

घाईंत घाई, विंचू डसला ग बाई—एखादें काम घाई घाईनें उरकून घेत असतां मध्येंच एखादें अनपेक्षित विघ्न उभें राहाणें. –संशयकल्लोळ १.४.१५.

घाईनें लग्न करणें, पश्चात्ताप पावणें—लग्न करण्यापूर्वी नीट विचार व चौकशी करावी. नाहींतर पश्चात्ताप करण्याची पाळी येते. marry in haste, repent at leisure.

घाईनें वर चढतो, तो त्वरित खालीं येतो—जो मनुष्य कोणतीहि गोष्ट उतावळीनें करतो त्यास पुढें नुकसान सोसण्याची पाळी येते. फार जलद व अयोग्य मार्गानें वैभव मिळविल्यास तें शाश्वत राहात नाहीं.

घाईमध्यें गलबला, म्हातारी म्हणे हेल घाला—१ [हेल=एखादी खेप टाकण्याकरितां मजूरी] एखाद्या कामाची घाई चालली असतां मध्येंच एखाद्यानें आपली बारिकसारीक गोष्ट पुढें मांडून अडथळा करावयाचा. २ [हेल घालणें = मोठ्या घरीं मूल जन्मलें म्हणजे गांवांतल्या बायकांनीं, कुणबिणींनीं त्या घरीं पाणी दूध इ. नेणें किंवा यांचा सडा टाकणें.] गडबडीच्या वेळीं कांहीं तरी उदा०—म्हातारी प्रसूत होणें. वर पहा.

घागर——घागरगडचा सुभा; घागरगडची सुभेदारी—(उप.) पाणक्याचें काम.

घागरगडचा सुभेदार–घागर हाच गड व त्याचा सुभा म्हणजे अधिकारी. पाणक्यास विनोदी, विडंबनात्मक संज्ञा. पाणक्या; पाणी वाहण्याचा धंदा करणारा. 'पति तर माझे शुद्ध टोणपे घागरगडचे सुभेदार।'–लावणी.

❀ **पालथ्या घागरीवर पाणी**—घागर पालथी असली म्हणजे तीवर ओतलेलें पाणी आंत बिलकूल शिरत नसतें. निष्फळ प्रयत्न; व्यर्थ श्रम. 'मननाविण श्रवण करी। जैसी कां पालथी घागरी। पर्जन्यांत ठेविली जन्मवरी। परी अंतरीं बिंदु न जाय।'–ह २५.१८७. उपड्या घागरीवर पाणी,पहा.

घाट——घाट घालणें—बेत करणें; योजना करणें; व्यूह रचणें.

घाट——घाटांत अडवणें–धरणें–मारणें—खिंडींत गांठणें; अडचणीचा फायदा घेणें; पेंचांत धरणें.

घाटाजवळ दिवस मावळला—एखादें काम संपण्याच्या बेतास यावें तों मध्येंच एखादें विघ्न उभें राहावें. तु०–चोरांच्या रानांत दिवस मावळणें.

घाटार घोडे नी गोव्यांत व्होडे—(गो.) घाटावर प्रवास घोड्यावरून होतो, तर गोव्यांत होड्यांतून होतो. गोव्यांत ठिकठिकाणीं खाड्या आहेत.

घाटारि गेल्ले तरिकइ पळसाक तिन्नी पान्नं—(गो.) देशावर गेला तरी पळसाला पानें तीनच.

घांट; घांटी——घांटी (घांटे) खालीं उभें राहाणें–एक प्रकारची शपथक्रिया. देवळांत देवापुढें बांधलेल्या घंटेखालीं उभें राहून एखादी गोष्ट आपण केली किंवा न केली तें सांगणें; शपथ घेणें. दिव्याचा एक प्रकार. (गो.) घाटीपोंदा उभे रावप.

घाटणें——घाटून बाटून–१ घोटून व पीठ करून; चांगली रगडून, चिरडून, बारीक करून. २ छळून; सतावून; अत्यंत त्रास देऊन.

घांटी——घांटी खाऊन बोलणें—मोठ्यानें बोलणें; ओरडून खेंकसून बोलणें; जोरजोरानें बोलणें.

घांटी खाजवणें—(व.) घसा खवखवणें; घशामध्यें खाजल्यासारखें होणें.

घांटी चिप्प–चीप होणें—१ गळा, आवाज बसणें; घसा दाटणें; तोंडांतून आवाज निघत नाहींसा होणें. २ गळ्यांतील विकारामुळें गिळतां न येणें.

घांटी पडणें—(व.) आवाज बसणें.

घांटी फुटणें—१ आवाजांतील कोमलता नष्ट होणें; आवाज चिरकणें. २ आवाज घोगरा होणें.

घांटी फुटणें–बदलणें—१ मुलगा वयांत आल्यामुळें आवाज मोठा होणें. २ आवाज बसणें.

घांटी बसणें—गळ्यांतील विकारामुळें आवाज बिघडणें.

घांटी शेंदूर ओतणें—शेंदूर खावयास घालणें. शेंदूर खाण्यांत आल्यास घसा बसतो. त्यावरून आवाज बिघडविणें.

घांटीवर येणें—(व.) जिवावर येणें; प्राण जाण्याची वेळ येणें; जिवावर बेतणें; गळ्याशीं येणें.

घाडी——घाडी कुथप—(गो.) झोपेंच्या डुलक्या घेणें (घाडी म्हणून एक देवऋषींचा वर्ग आहे, तो प्रश्न इ. पहातांना डुलत असतो याबरून).

घाण–णी—घाण येणें—दुर्गंध सुटणें; दर्प येणें; अप्रिय वास येणें.

❀ घाणींतल्यान वचचें पोण्ण दिवाणांतल्यान वच नये—(गो.) क्षणभर घाणींतून गेलेलें बरें पण कोर्टाची पायरी चढूं नये.

घाणा-णी——घाणा करणें—१ वाटोळें फिरणें २ घाण्याप्रमाणें फिरवून, चिरडून वगैरे त्रास देणें. ३ छळणें; त्रास देणें. ४ विसकटून टाकणें.

घाण्यांत घालणें—संकटांत लोटणें; अडचणींत आणणें; पेंचांत टाकणें; कैचींत अडकाविणें.

घाण्यांतून पिळणें-काढणें—१ चेंगरणें; चिरडणें; पिळून काढणें. २ शक्तीबाहेरचें काम सांगून निर्बल बनविणें; भुसा पाडणें.

❀**घाण्या बैलाक घुंवचें काम**--(गो.) घाण्याच्या बैलाला वर्तुळांत फिरण्याचेंच काम.

घाण्या बैलानें कितलें भोंविलें तरी आशिले कडे आस?—(गो.) घाण्याचा बैल कितीहि वेळ चालत राहिला तरी तो आहे त्याच जागीं राहातो.

घाण्याच्या बैलाला गोठण काय जाय—घाण्याला जुंपलेला बैल नेहमीं घाण्याभोंवतीं फिरत राहतो. त्याला इकडे तिकडे हालतां येत नाहीं व त्याला बाहेर चरावयास सोडीत नाहींत. तेव्हां त्याला गोठण कोठून माहित असणार. त्याप्रमाणें जो मनुष्य नेहमीं कामाला जुंपलेला असून कधीं घराबाहेर पडावयास त्यास फुरसद नसते त्याला बाहेरच्या गोष्टींची माहिती कोठून होणार?

घाण्याचा सुटला, नि नांगराला जुंपला--घाण्याला जोडलेल्या बैलास घाण्यापासून सोडून नांगरास जुंपल्यास त्याला कांहीं विश्रांति मिळत नाहीं व त्याच्या कपाळचे कष्ट चुकत नाहींत; त्याच्या मानेवरील जोखड कायमच असतें त्याप्रमाणें एखाद्या मनुष्याला एका कामापासून सोडवून त्यावर दुसरें लादलें तरी त्याची कांहीं सुटका होत नाहीं. तु०-आगींतून निघून फुफाट्यांत पडणें.

घाण्यांतु हातु दिलेलि संगति—(गो.) घाण्यांत हात दिल्याप्रमाणें.

घाणीचे बैलाची फेरी, दिसते थोडी पण मजल पुरी—चुन्याच्या घाणीला जो बैल जुंपलेला असतो तो ठराविक वर्तुळांतच फिरत असतो, त्यामुळें मूळ ठिकाण सोडून दूर गेलेला दिसत नाहीं. पण एकंदर त्याची चाल मात्र पुष्कळच झालेली असते. तसें घरांत मनुष्य काम करतें तें काम दिवसभर पुरतें पण त्याची मोजदाद करतां येत नाहीं.

घात——घात घेणें—आणीबाणीच्या वेळीं नाश करणें; ऐनप्रसंगीं एखाद्यास मिळणारा लाभ घालविणें; एखाद्याची चांगली संधि अगदीं वेळेवर गमावणें; एखादें कार्य अगदीं फल मिळण्याच्या वेळीं बिघडविणें.

घातीं आलेलें शेत—पेरणीच्या ऐन मोसमाच्या वेळचें शेत; योग्य वेळीं पाऊस पडून नंतर ऊन पडून योग्य तेवढी जमीनींत ऊब व ओल असण्याच्या वेळचें शेत.

घातीचे दिवस--१ हंगामाचे दिवस; मोसम; अगदीं ऐन ऋतूचे दिवस. २ चलतीचा काळ; भरभराटीचे दिवस; उत्कर्षकाल.

घात——घात योजितल्याचो घात जाता—(गो.) जो दुसऱ्याचें वाईट चिंतील त्याचेंच वाईट होतें.

घाबरणें——घाबरणें हेंच अरिष्ट ओढवणें--प्रत्यक्ष संकट यण्यापासून जितका मनुष्यास त्रास होतो त्यापेक्षां अधिक त्रास त्या येणाऱ्या संकटाची जी भीति त्यास वाटते तीपासून होतो. याकरितां मनुष्यानें गंभीर वृत्तीनें न घाबरतां संकटास तोंड देत असावें.

घाबरा——घाबरा आणि अति क्रुद्ध, यांची मसलत न होय सिद्ध—जो मनुष्य घाबरलेला असतो व जो अतिशय रागावलेला असतो, त्याचा मेंदू शांत नसल्यामुळें नीट विचार करण्याइतकी त्याची मनःस्थिति नसते. त्यामुळें तो जी युक्ति काढतो किंवा बेत करतो तो यशस्वी होत नाहीं. नो संकटांतून पार पडण्यास उपयोगी पडत नाहीं. याकरितां शांततेनें नीट विचार करून मसलत योजावी.

घाम—घाम सुटणें—घाबरणें; बावरणें; भीति वाटणें; धास्तीनें अंगाला दरदरून घाम येणें. 'राघोबा दादांना हें भाषण ऐकतांच घाम सुटला.'-इंप ६७.

घामळभट——घामळभट भाबरला आणि नदी खांद्यावर टाकून धोतराच्या कांठीं धुवायला गेला!—'मामळभट घाबरला आणि धोतरें खांद्यावर टाकून नदीकांठीं धुवावयास गेला' असें मूळ असतां घाबरून वरील वाक्य उच्चारणें. एखादा मनुष्य अत्यंत भेदरून गेला म्हणजे त्याची बोबडी वळते, अशा त्याच्या स्थितीचें शब्दचित्र लहान मुलें काढतात.–केसरी ५-९-३९. घाबरोबा मामणला व नदीची घडी खांद्यावर टाकून धोतराच्या कडेनें पळत सुटला असाहि एक पाठ आहे. तु०-शिंपळगांवचा पिपी.

घाय——घायावर घाय घालणें; घायावर लिंबू पिळणें—दुःखावर डागण्या देणें; एका जखमेवर दुसरी

जखम होणें; आधींच दुःखी असलेल्या मनुष्यास अधिक गांजणें, छळणें. (गु.) घानीउपर नामक छाटवुं.

घायास येणें---संकटांत सांपडणें; अडचणींत येणें; पेचांत पडणें.

***घायु एकडे, वक्कद आनेकडे**--(गो.) जखम एकी-कडे, इलाज दुसरीकडे.

घायु पेकता, मांव उरता--(गो.) जखम भरते पण खूण राहाते.

घायाक मिठा खलु--(गो.) जखमेवर मीठ चोळणें.

घायकुती——घायकुतीस येणें—अतिशय घाई करणें; उतावळेपणा करणें; अतिशय घाई, गडबड करूं लागणें.

घार——घारमोर करणें--लहान मुलास पायाच्या धुरीवर घेऊन घारीप्रमाणें उंच करणें.

घारीसारखी वाट पाहणें—(घार झडप घालण्यासाटीं अगदीं टपून असते.) बारीक लक्ष देऊन टपून बसणें; संधि साधण्याची वाट नीट बारकाईनें पाहात बसणें.

***घार फिरे आकाशीं, तिचें चित्त (लक्ष्य) पिलापाशीं**—घार जरी आकाशांत कितीहि दूर गेली तरी तिचें लक्ष्य घरट्यांतील पिलांकडे असतें. त्याप्रमाणें आई कांहीं काम करीत असली तरी तिच्या मनांत नेहमीं मुलांबद्दल काळजी वाटत असते. तसेंच परमेश्वर जरी आपणांपासून दूर आहे असें वाटत असलें, तरी त्याची कृपादृष्टि सर्व प्राणिमात्रांवर असते.

घारी——घारी चाड, काळिंद्री पाड—घारे डोळे असणारी स्त्री चहाडखोर, लबाड असते व काळी स्त्री खोल असते, तिच्या मनांतील विचार, बेत लवकर कळत नाहीं.

घालण——घालणींस पडणें--उतावळेपणास बळी पडणें; इरेस चढून उतावळेपणानें काम करणें; भरीस पडणें; ईर्षेस पेटणें.

घालणें——घालकाढ्या--घालमेल करणारा; उपद्व्यापी; गडबड्या; उलाढाल्या.

घालपांड्या—१ आगलाव्या; घातकी; दुसऱ्याचा घात करणारा. २ वरून साधा पण आंतून कावेबाज असणारा.

घालफेडी करणें—वेदनामुळें घालमेल, तगमग होणें. 'घडिघडि करिते हे भीमकी घालफेडी । '—सारूह २.६५.

घालणें——कित्त्यावर घालणें--मुलाकडून प्रथम लेखनास प्रारंभ करविणें. कित्ता पहा.

घाव-धाड घालणें--हल्ला करणें. 'तरी दुष्टबुद्धि न राहे उगला । नानापरी घाव घालीतसे ॥ ' —तुकाराम. 'कीं कोणी न म्हणावें न कळत जाऊनि घातली धाडी ॥' —मो.

निशाणीं घाव घालणें—नगाऱ्यावर टिपरूं मारणें; डंका वाजविणें; नौबत वाजविणें. ' देवमुक्त घाव निशाणीं।' —दावि. २५. १९०. ' हरीभक्तिचा घाव घाली निशाणीं।' —रामदास.

पाखर घालणें—आश्रयास घेणें; आधार देणें; रक्षण करणें; आपल्या पंखाखाली घेणें. ' इतकें मनामधीं समजून उमजून घाल अम्हावरती पाखर।'—अफला २१. पृ. ७१.

घालघसरावर घालणें--टंगळमंगळ करणें; दिरंगाई लावणें. ' दिरिंग एक क्षणाचा न करणें. बहुत शिताबीनें जाणें. घाल घसरावर सर्वथा न घालणें. ' —ऐतिहासिक पत्रव्यवहार, ले. २३.

घालून घेणें—१ चाल करून जाणें; हल्ला करणें; चढाई करणें. ' धन्याचे लचके तोडून कांहीं मिळत नाहींसें पाहून धन्याच्या धन्यावर घालून घेतलें आहे. ' —अस्तंभा १३८. २ जमिनीवर अंग टाकणें; खालीं पडणें. ' हें वर्तमान मल्हारराव यांनीं ऐकतां क्षणींच अंबारींत घालून घेतलें.'—भाव ७४. 'नदी भरतां भरतां घालुनिया घेती।'—रामदासरामदासी १५.२६४. ' भूतळीं भरत घालुनि घेहो । '—वामन भरतभाव ५१.

घालून पाडून बोलणें—प्रत्यक्ष नांव न घेतां आडून बोलणें; टोमणा मारणें; अप्रत्यक्षपणें बोलणें; व्याजोक्तीनें बोलणें. ' आमच्या आजीनें आईला अगदीं लेंकीसारखें केलें. ...कधीं घालून पाडून बोलली नाहीं. ' —पकोघे.

*** घातला कणा मोडत नाहीं, भरली घागर डुचमळत नाहीं**—परिपूर्ण असल्याची स्थिति नेहेमीं सुखकर असते. कांहीं अर्धवट असेल तर मात्र त्रास, गवगवा, गहजब होतो.

घाल गे रांडे ! भीक--(गो.) भिकारी असून मुजोरी करणारा माणूस.

घाल पाणी आणि कर कालच्या वाणी—कांहीं तरी करणें; भरमसाटपणें एखादी गोष्ट करणें.

घाल पाणी, कर गुळवणी—वरीलप्रमाणेंच. कांहीं तरी, कसें तरी, विचार केल्याशिवाय एखादी गोष्ट करणें.

घालता जाल्यार घालगे रांडे भीक, हांव पेडणचो भिकारी—(गो.) घालायची असल्यास घाल रांडे भीक, मी पेडण्याचा भिकारी आहे. भिकारी शिव्या देऊन भीक मागतो आहे, कारण तो पेडण्याचा आहे ! [पेडणें हें उद्धटपणाविषयीं प्रसिद्ध आहे; तेथील भिकारीसुद्धां उद्धट असतात.]

घालता मी पण(व) काढता परमेश्वर—मनुष्य स्वतः वर संकट ओढवून घेतो पण परमेश्वर त्यास त्यांतून निभावून नेतो. मनुष्य दुसऱ्यावर संकट आणतो पण तें निवारण करण्याचें त्याच्या हातांत नसतें, तें परमेश्वराधीन असतें.

घाला——घाला करणें-घालणें-संकट आणणें; नाश करणें. 'कसा गुपित घाला केला रावसाहेबाला।'-ऐपो १६८.

घाला पडणें—१ हल्ला होणें; छापा पडणें. २ नष्ट होणें. 'तो भक्तिनें कां स्वमुखीं न घाला। पडेल दुःखावरि सद्य घाला ॥'—वामन वनसुधा १.३.

घाव——निशाणीं घाव घालणें—१ युद्धारंभीं दुंदुभी वाजवणें. 'घाव तेव्हां घातला निशाणीं। तेणें दुमदुमली अवनी।'—ह२२-२४. २ डंका वाजविणें; नौबत वाजविणें. घालणें पहा.

घाव देणें—युद्ध करणें; प्रहार करणें; हल्ला करणें. 'तिथे एक मारें देवोनिया घावो।'—महानु. भाइमं १०.३.

घाव लावणें-घालणें-१ आपटणें. २ थोडेसें कांडणें; अर्धवट कांडणें.

***एक घाव दोन तुकडे**—तडकाफडकीं,एकदम करून टाकणें, निकाल लावणें; एका क्षणांत उरकून टाकणें; सोक्षमोक्ष तावडतोब करून टाकणें.

घाशीराम——घाशीरामी—[घाशीराम नांवाचा सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत एक कोतवाल होऊन गेला. त्यानें कांहीं तेलंगी ब्राह्मणांस अन्नपाण्यावांचून लहान कोठडींत कोंडून घातल्यावरून पेशव्यांनीं त्याची धिंड काढली व ब्राह्मणांनीं त्याला दगडांनीं चेंचून मारिलें.] १ जुलमी कारकीर्द; मोंगलाई. 'चार दिवस घाशीरामी चालवून घेतलेल्या अर्वाच्य पंडित मंडळींची आमच्या देशासंबंधीं एक मोठी समजूत ही आहे कीं, आमचा देश केवळ आसन्न मरण झाला आहे.'—नि. २ कोंडमार; चेंगराचेंगरी.

घास——घास उतरणें-काढणें-चिरणें-मोडणें--इडापीडा टाळण्यासाठीं अन्नानें दृष्ट काढणें; एखाद्यावरून अन्न उतरून टाकणें; भात वगैरे ओंवाळून टाकणें.

घास करणें-भरणें--एखाद्यास छळणें; गांजणें; खाऊन टाकल्यासारखें करणें.

घास काढणें--जात्यानें धान्य दळलें असतां कांहीं दाणे मध्यभागीं न दळले जातां राहतात. त्यास घास म्हणतात. असे जात्यांत न दळले गेलेले दाणे काढणें.

एखाद्याच्या तोंडचा घास काढणें—एखाद्याचें उपजीविकेचें साधन नष्ट करणें; वृत्तिच्छेद करणें; अन्नास मोताद करणें.

घास देणें—१ नवीन वधूवरांनीं एकमेकांस घास देणें. विवाहप्रसंगीं उखाणा घेऊन वधूवर परस्परांच्या तोंडांत अन्नाचा घास देतात त्या रूढीस अनुसरून. २ भरवणें; लहान मुलास जेवूं घालणें.

घासापरत; घासापुढ--घासागणिक; प्रत्येक घासास; क्षणोक्षणीं; वेळोवेळां.

घासीं गूं खाणें—(आई जेवीत असतांनाहि मुलाचा हगण्याचा त्रास असतोच. तिला स्वच्छपणें व स्वस्थपणें मूल जेऊंहि देत नाहीं) अतिशय कष्ट सोसणें; खस्ता खाणें; एखाद्याचें पालनपोषण करीत असतां अतिशय दुःख, श्रम सोसणें.

***घासभर देणें आणि कोसभर नेणें**—थोडा मोबदला देऊन वाजवीपेक्षां अधिक काम करून घेणें.

घासणें——घासून घेणें--१ हात चोळणें; चरफडणें; दांतओठ खाणें. निराशेनें, संतापानें आपल्यापाशींच जळफळणें. २ सोसणें, सहन करणें;नुकसान खाणें; दुःख साहणें.

घासाघासी करणें--जिकीर करणें; घिसघीस घालणें. 'घासाघासि न करितां करिलाचि लक्ष्मीकरून धनदासीं।'—मोकर्ण ४०.६३.

*** घासतां दगड सतत, शेवाळ निर्माण न होत**--दगड नेहमीं घाशीत असल्यास त्यावर शेवाळ धरत नाहीं. नेहमीं स्वच्छता ठेवीत असल्यास घाण सांचत नाहीं. नेहमीं देखरेख केल्यास काम सांचत नाहीं व बिघडत नाहीं. तु०—A rolling stone gathers no moss.

घासून घ्यावें पण हांसून घेऊं नये--आपल्याला थोडीशी झीज सोसावी लागली तरी सोसावी पण उपहासास्पद वर्तन करूं नये.

घाळा——घाळा जाणें—(गो.) चुकणें; सांडणें.

घाळा पडणें--१ (गो.) सांडणें; गहाळ होणें; हरवणें. २ ढिलें पडणें; सैल होणें.

घिग्या——घिग्या लावणें--उटावणी देणें; चेतना देणें; चेव आणणें; एखादी गोष्ट करावयास टोंचून टोंचून तयार करणें; टोंचणी लावून प्रवृत्त करणें.

घिरट—घरटी पहा. **घिरट, घड्याळ आणि बायको, नीट केल्याविना राहूं नको**--घरट, घड्याळ० पहा.

घिरटीस आणि बायकोस वारंवार गरज लागते—घिरटीस नेहमीं दळणाचें धान्य पुरवावें लागतें व बायकोस

ती मागेल त्या वस्तु सारख्या पुरवाव्या लागतात. A mill and a woman are always want of somethings.—सवि १९८.

घिसाड——घिसाडघाई—लोखंड तापविलें असतां तें निवण्यापूर्वीं घणानें ठोकावें लागतें. यामुळें घिसाडी नेहमीं अशा वेळीं घाईघाईनें घण मारीत असतो. यावरून अतिशय घाई; भरमसाट घाई; फार त्वरा.

घी——घी खाना शक्करसे, दुनिया खाना मक्करसे-[मक्कारी=लबाडी] तूप साखरेंत घालून खावें व प्रदेश ताब्यांत आणून लबाडीनें लाटावा.

घी गेलें आणि ठामणेंहि गेलें; घी गेलें पण ठामणें तर राहिलें--तूप गेलें आणि तुपाचें भांडेंहि गेलें—राहिलें. पहिल्या म्हणींत संपूर्ण हानि दाखविली आहे तर दुसऱ्या म्हणींत अर्धी हानि दाखविली आहे.

घी जातें आणि चमडा पण जातो--वरीलप्रमाणेंच —शाब २.२४६.

घी देखे, लेकिन बडगा नहीं देखे; घी देखा पण बडगा नहीं देखा--मांजर दूध पिण्यासाठीं टपून बसतें, तेव्हां आपणांस कोणी मारण्यास टपलें आहे हें त्याच्या लक्ष्यांत येत नाहीं. यावरून मनुष्य केवळ फायद्याकडे पाहात असतो, त्यापासून तोटा किती होणार हें समजून घेत नाहीं. दुग्धं पश्यति मार्जारः परं न लगुडाहतिम् ।

घीनो दोडियो अने दोडियानु घी--लबाडीचा मारवाडी हिशेब. एका माणसानें मारवाड्याला प्रथम पैसा देऊन त्याचें तूप देण्यास सांगितलें. मारवाड्यानें तूप देऊन तो पुन्हां पैसा मागू लागला. तो म्हणाला, तूं पहिल्यानें पैसा दिलास तो तुपाचा; मी आतां तूप दिलें त्याचा पैसा कोठें आहे ! अशा तऱ्हेनें माणसाला बुचकळ्यांत पाडून फसविणें. लबाडीचा हिशेब.

घीणो पैसो और पैसोनी घी—वरप्रमाणेंच.—गांगा १५४.

घुगऱ्या——एखाद्याच्या सटीच्या घुगऱ्या खाणें-घुगऱ्या खाल्लेल्या असणें—सटीपूजनाच्या दिवशीं इष्टमित्र मंडळीस आमंत्रण देऊन त्यांस पानसुपारी व घुगऱ्या देण्याचा रिवाज आहे; तेव्हां ज्याच्या सटीपूजनास आपण हजर असतो तो आपल्यापेक्षां वयानें लहान असणारच. यावरून वयानें मोठा असणें.

अवदिशीं पुऱ्या, सणीं घुगऱ्या—अवदिस पहा.

घुटी——घुटी देणें--भुलविणें; मोहिनी घालणें.

घुटी बसणें--दिलेल्या गोळीचा अंमल दिसूं लागणें; औषध, उपाय लागू होणें.

घुणा——घुणा घालणें--अडथळा करणें; व्यत्यय आणणें; अडचण उपस्थित करणें.

घुणा घेणें—दोरीची अढी घेणें; विळखा घेणें; अट घालणें. दोर वगैरे बांधतांना फांस वगैरे घेणें.

घुणाक्षर——घुणाक्षर न्याय--किड्यानें कोरलेल्या आकृतींत एखाद्या अक्षराशीं साम्य दिसतें यावरून यदृच्छाघटित गोष्ट; असंकल्पित घटना. 'हा घुणाक्षर न्यायानें या कटकटींतून खरोखरच नांव विचारण्याचा कानडी प्रश्न उमटला कीं काय ?'—भा ६३.

घुबड——घुबडी घुबडी तळपशील, आपापले ओळखशील—जो तो आपल्या स्वजनांस जाणतो. . ज्याचें वर्म त्याला ठाऊक.

घुमा——घुमा धरून बसणें—न बोलतां दबा धरून बसणें; टपून, वाट पाहात, संधि पाहात गुपचूपपणें बसणें.

घुमा वाघ--१ गर्जना न करतां सावजावर झडप घालणारा वाघ. २ वाच्यता न करतां काम साधून घेणारा मनुष्य; बाहेर दिसूं न देतां गुप्तपणें कार्यभाग साधणारा. ३ आळशी मनुष्य; स्वस्थ बसणारा; कामधंदा न करतां बसून दिवस घालविणारा.

घुमें वेड—१ न बोलण्याचें वेड; मौन वेड. २ वेडाचें ढोंग; मुक्याचें सोंग आणणें.

घुसळणें——हाडें घुसळणें—दमविणें; राबविणें; अतिशय कष्ट देणें; त्रास देणें.

❀ **घुसळणाऱ्यापेक्षां उकळणाऱ्याची चैन**—लोणी काढण्याकरितां ताक घुसळावें लागतें व त्याचें तूप करण्याकरितां उकळावें लागतें. यांत घुसळणारास श्रम अधिक पडतात, उकळणारास कमी पडतात. म्हणजे जो अधिक काम करतो त्यापेक्षां कमी काम करणारासच अधिक फायदा होतो. कष्टाचें काम करणारापेक्षां वरती देखरेख करणारा अधिक फायदा करून घेतो.

घुसळीकरितां उसळी भारी; घुसळतीपेक्षां उकळतीच्या घरीं फार--वरीलप्रमाणें.

घुळघुळणें——घुळघुळत जाणें-येणें—गडबडत जाणें, येणें; घरंगळत जाणें, येणें; लोळत जाणें, येणें.

घूस——घुशीचा सांपळा--१ घूस पकडावयास केलेला पिंजरा. २ एखाद्यास पेंचांत धरण्याकरितां रचलेला

व्यूह; कट; डाव. 'हा घुशीचा सांपळा कसा तयार केला गेला हें गूढ उकलणें कठीण नाहीं.'—टिळक चरित्र ३.६.१०.

❀**घूस मागें पाहती, तर उरीं फुटून मरती**—घूस माती उकरते ती आपल्या पायांनीं आपल्या मागें लोटीत असते व पुढें उकरीत जातें. मागें मातीचा डोंगर होतो पण ती प्रत्येक वेळीं थोडी थोडी माती मागें लोटीत असल्यामुळें तिच्या लक्ष्यांत आपण किती उकरलें तें येत नाहीं. तें जर तिच्या लक्ष्यांत येतें तर तिला आपण केलेल्या श्रमाची कल्पना येऊन तिच्या हृदयास धक्का बसल्याशिवाय राहता ना. मनुष्य थोडे थोडे श्रम करीत असला म्हणजे, ते एकदम लक्ष्यांत भरत नाहींत, पण त्यांची गोळीबेरीज करून एकदम त्यांचेकडे पाहिल्यास ते अतिशय झालेले दिसतात. मनुष्यावर एकदम ओझें न पडतां हळू हळू लादलें म्हणजे तें त्याच्या लक्ष्यांत येत नाहीं.

घुशीच्या बिळापेक्षां पोपटाचें घरटें बरें—घरांत घुशीनें बीळ केलें तर तें अधिक नुकसानकारक असतें. तें जमीनींत असल्यामुळें दिसत नाहीं हें खरें. पण पोपटाचें घरटें वर दिसतें पण तें मुळींच अपायकारक नसतें.

घृत——घृतकुल्या मधुकुल्या—[कुल्या = पाट, प्रवाह] १ तुपाचा व मधाचा पाट; तूप साखरेची, म्हणजे गोड पदार्थांची चंगळ, रेलचेल. २ सुग्रास भोजन; मिष्टान्न. 'पुराणांचा शिमगा जेव्हांपासून सुरू झाला व भटांच्या घृतकुल्या मधुकुल्या देशांत प्रवृत्त झाल्या तेव्हांपासून ...... कौशल्य चट सारें पार वाहून गेलें.' —नि.

घृतकुंभ अग्नीजवळ, जातो तत्काळ पाघळून—विस्तवाजवळ तूप ठेवल्यास तें पातळ झाल्यावांचून राहात नाहीं. कोणताहि विषय इंद्रियासमोर आल्यास तो विकार केल्याशिवाय राहात नाहीं. तु०—घृतकुम्भसमानारी तप्तांगारसमः पुमान्। तस्माद्घृतं च वन्हिं च नैकत्र स्थापयेद् बुधः॥ —सुर १६२.४०८. Man is fire and woman tow; the devil comes and sets them in a blaze. -Spanish. सवि २२७०.

घेणें——घे म्हटल्या; घे म्हटल्यावर—सहसा; एकाएकीं; एकदम; विचार न करितां. 'तो घे म्हटल्या शिव्या देणार नाहीं.'

घे म्हणून असप—(गो.) पुष्कळ असणें.

घेऊन पळण्याच्या कामांत ससाणा—लबाड; धूर्त; स्वार्थसाधु.

घेतां देतां—प्रत्यक्ष देवघेवीच्या वेळीं; व्यवहार करतांना.

घेघमार; घेमार गर्दी—१ घनचक्कर; अतिशय गडबड. २ जोराची, हातघाईची लढाई.

घेवपत धंदा-व्यापार-व्यवहार-उदीम—नांवापुरतें भांडवल असून बहुतेक पतीवर चालविलेला धंदा, व्यापार वगैरे.

घेवाण देवाण—संक्रांत इत्यादि प्रसंगीं सुवासिनी परस्परांना वाणें वाटतात. १ देवघेव; घेण्यादेण्याचा व्यवहार. २ स्वीकार—परतफेड; क्रिया प्रतिक्रिया (अहेर, हल्ला, टीका, मार इ. ची). 'सार्वजनिक कृत्यांत पडल्यावर लोकांच्या टीकेला भिऊन कसें चालेल? तेथें घेवाण देवाण असें चालावयाचेंच.'

❀ **घे आपली नथ, मी नाहीं बाईल होत**—दागिन्यामुळेंच नवरेपणाचा हक्क प्राप्त होतो तर तुझा दागिना नको व नवरेपणा नको. पुढें पहा. संबंध सोडणें.

घे आपलें लुगडें फेडून आणि दे माझा म्होतूर काढून—जाचास, संकटास कंटाळलेली पाटाची स्त्री नवऱ्यास आपला हक्क तोडून देण्यास सांगते. संबंध सोडणें.

घे उदी नि होय सुदी—[उदी=उदाचा धूप. सुदी= दुरुस्त.] प्रकृति नादुरुस्त झाल्यामुळें लौकर गुण देणारा उपाय म्हणून उदाची धुरी दिली व त्यानें तिची प्रकृति अगदीं तावडतोब बरी झाली खरी; पण दरवेळीं असा झटपट करतां येणारा उपाय लागू पडेलच असें खात्रीनें सांगतां येत नाहीं. गुण झटपट आला पाहिजे असा उतावीळपणा उपयोगी नाहीं. तु०—पी हळद हो गोरी.

घे कुंचला कीं लाग फिरवायला—घाईघाईनें, कसें तरी करणें. "परिणामकारक चित्र काढूं इच्छिणाऱ्या प्रत्येकाला 'घे कुंचला कीं लाग फिरवायला' असें करून चालणार नाहीं."—मधुकर १९२२.

घे घोडा पी पाणी—उतावीळपणा. "स्नायुसंवर्धन थोड्या काळांत आपणांस करतां येणें शक्य आहे. पण उंची वाढविण्यास निदान दोनचार वर्षें तरी खटपट करणें भाग आहे असेंमला वाटतें. 'घे घोडा पी पाणी' असें करून निदान यांत तरी चालणार नाहीं."—केसरी १७-१-४१. तु०—पी हळद नि हो गोरी.

घे मणी डोरलें, तुझें माझें सरलें, कांहींच नाहीं उरलें—नवऱ्याचा संबंध तोडणें. वर पहा.

घे मूल, टाक माळ्यावर—अतिशय धांदल, गडबड.

घे मेरे पावणे पांच—कांहींतरी अव्यवस्थित बोलणें, करणें. कसल्याहि युक्तिवादानें ज्याची समजूत पटत नाहीं अशास उद्देशून त्रासानें म्हणणें.

घे सुरी घाल उरी; घेतली सुरी घातली उरी—एक घाव दोन तुकडे असें तावडतोब घाईनें एखादें कृत्य करणें.

घे हिसके आणि तोड दावें—जोर केला असतां सुटका होते. गायवासरूं असेंच करतें.

घेई देई ती आईबाई, न देई ती मसणाबाई—जी देते घेते तीबद्दल जिव्हाळा वाटतो; जी देत घेत नाहीं तिच्याबद्दल कोण फिकीर करतो. दिल्याघेतल्यानें आपलेपणा उत्पन्न होतो, नाहींतर उदासीनता राहते.

घेऊं जाणतो, देऊं जाणत नाहीं--केवळ स्वार्थी; आप्पलपोट्या; स्वतःचा फायदा तेवढाच पाहणारा. घघाची विद्या येते ददाची येत नाहीं.

घेग घोरपडी मान, तर म्हणे टाक माझ्या धांवेवर—अतिशय आळशी; स्वतःचा फायदा करून घेण्याकरितांहि मुळींच श्रम करण्याची इच्छा नसलेला; पूर्णपणें आयतोबा.

घेग रांडे वाइण, म्हळ्यारि घेत कोण!-- (गो.) दाता दान करीत असतां अपमानकारक शब्द बोलायला लागला तर तें कोण घेईल!

घेणें देणें आडमाप, आणि सावकाराला थाप--अव्यवस्थित व्यवहार; थापेबाजांचा व्यवहार.

घेणें दोषाचा अनुभव, हा मूर्खाचा स्वभाव—धडधडीत दोष दिसत असतां त्या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहाण्याचा प्रयत्न करणें हा मूर्खपणा आहे.

घेतला (तांब्या) थाळा, चालला जेवावयाला--कांहीं काम न करतां, जबाबदारी न पत्करतां आयते जेवणें. अगदीं आळशी, स्वार्थी माणूस.

घेतां दिपाळी, देतां शिमगा—घ्यायच्या वेळीं गोड, द्यायच्या वेळीं कडू; घेणें आवडतें पण देणें आवडत नाहीं. कर्ज काढतांना आनंद मानायचा आणि देतांना बोंब करायची.

घेते तेथून, पण पडते गुंतून--एखाद्याचे उपकार करून घेतले असतां आपण त्याचे मिंधे होतों.

घेतो खोटी शपथ, तो देवा नाहीं मानीत--ज्याला खोटी शपथ घेण्यास भीति वाटत नाहीं त्याला परमेश्वराची कसली भीति.

घेवंचाक सगळे येत्ताति, दिवंचाक कोणइ येनाति-(गो.) घ्यायला सर्वजण येतात द्यायला मात्र कोणीच येत नाहीं. सर्व स्वार्थी.

घेवंचें एक माप दिवंचें आनेक--(गो.) घेतांना एक माप, देतांना दुसरें. दुटप्पी, लबाडीची वागणूक.

घ्यावा दुसऱ्याचा सद्‌गुण, त्यागावा आपला दुर्गुण--दुसऱ्याच्या अंगीं दिसणारे गुण घेत असावे व आपल्या अंगचे दोष टाकीत असावे.

घेरणें——**घेरलें ज्याला विपत्तीनें, तो काम करतो दसपटीनें**--जो मनुष्य अडचणींत सांपडतो त्याला दसपट श्रम करावे लागतात.

घेलाशेट--१ स्थूल, अंग हलविण्यास जड असा मनुष्य; ढमाल्या. २ मोठा उलाढाल्या व्यापारी. ३ चिक्कू, फसव्या मारवाडी.

घेली——**घेली सासरे नई जाये, ने डाहीने सीखामण दे**—(गु)लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडा पाषाण.

घोकणें——**घोकंति विद्या, खोदंत पाणी**—घोकल्याशिवाय विद्या येत नाहीं (पाठ होत नाहीं—पूर्वी सर्व विद्या पाठ करून शिकत असत) व खोदल्याशिवाय पाणी लागत नाहीं. श्रम केल्याशिवाय फळ मिळत नाहीं.

घोंगडी——**घोंगडीवर उतरणें**—मृत्यु हंथरुणावर येऊं नये म्हणून अंतकाल आला असतां रोग्याला घोंगडीवर निजवितात; यावरून अगदीं आसन्नमरण असणें. 'बाळाची प्रकृति इतकी बिघडली आहे कीं, त्याला घोंगडीवर उतरला आहे म्हणून लिहितात.'—आजोच १४२.

❀ **घोंगडीला मीं सोडलें पण घोंगडी मला सोडीत नाहीं**—एखादें लचांड मागें लावून घेतलें म्हणजे त्यांतून सुटका होणें केव्हां केव्हां स्वतःच्या आवांक्याबाहेरचें असतें. तु०—To catch a Tartar.

घोंगडें——**घोंगडें गळ्यांत येणें-पडणें**—एखादें लचांड मागें लागणें; अंगावर घोरपड येणें. "यावरून दुसरी कांहीं कल्पना करावी तर पुन्हां 'घोंगडें आपल्या गळ्यांत येईल' असा विचार करून बटो उगीच राहिला."—शाब १.४६.

गळ्यांत घोंगडें घालणें—एखाद्यास कांहीं त्याला नको असलेले, उपद्रवकारक काम सांगणें.

घोंगडें भिजत पडणें—घोंगडी वापरण्यास घेण्यापूर्वी

ती चांगली मळावी लागते; कारण तिला चिंचोक्याची खळ लावलेली असल्यामुळें ती कडक असते. ती मळून खळ गेली म्हणजे नरम होते. याकरितां ती प्रथम भिजवावी लागते व तीस भिजण्यास व वाळण्यास फार वेळ लागतो. यावरून दिरंगाईवर पडणें; दीर्घकाल अनिर्णित स्वरूपांत असणें. 'अंदाजपत्रकाचें भिजत पडलेलें घोंगडें एकदाचें झटकून वाळत पडलें.'–केसरी ५-७-४०.

❀ **गरिबाचें गेलें घोंगडें, गरीब पडलें उघडें**—गरीबाजवळ काय थोडीफार पुंजी असते, तीच त्याला बहुमोल असते. त्याचें तेवढेंच नुकसान झालें तरी त्याला त्यापासून फार त्रास होतो. पण तेवढेंच नुकसान श्रीमंताचें झालें तर त्यास कांहीं वाटत नाहीं; तो कोनाचा केर गेला असें समजतो.

घोंगड्यांत पासोडा सरदार—घोंगड्यापेक्षां पासोड्याची किंमत जास्त असते. यावरून गांवढ्या गांवांत गाढवी सवाशीण.

घोगता—घोगत्या झंवे गांव, तुरेवाल्याचें नांव—(अशिष्ट) एखादें दुष्कर्म सर्वजण करीत असतांनाच एखाद्यालाच त्याबद्दल दोषी धरणें.

घोट——जिवाचा (नरडीचा) घोट घेणें–करणें–भरणें—प्राण घेणें; ठार मारणें; अतिशय छळणें. 'तै घोट भरूं धांवसी । देखतांचि घेसी जिवें त्यातें ।'–एभा ५.२.

घोडा——घोडा आडवा घालणें—घोडेस्वार भरधांव जात असतां दुसऱ्यानें आपला घोडा त्याच्या वाटेंत आणला तर पहिल्याला थांबावें लागतें. यावरून एखाद्या कार्यांत विघ्न, अडथळा आणणें; प्रतिबंध करणें; रोखणें. शत्रूच्या मार्गांत आडवें येणें. 'जर त्यांनीं आपल्यावर चालून घेतलें तर आम्ही आडवीं घोडीं घालतों.'–ख४२९७. 'आणि म्हणूनच तुम्ही घोडा आडवा घातला वाटतं ?'–चंद्रग्र ६८.

घोडा उभा करणें–बांधणें—थोडावेळ थांबणें; विश्रांति घेणें; दम टाकणें.

घोडा काढणें—१ घोडा हांकारणें; पिटाळणें; चालूं लागणें; आरंभ करणें. २ पळ काढणें; पोबारा करणें; पलायन करणें.

घोडा चालविणें—डोकें खाजविणें; युक्ति काढणें; योजना सुचविणें.

घोडा टाकणें—घोडा फेंकणें, चालविणें, अंगावर घालणें. 'आरेरे टाकौनि घोडा । भणती यांचिआं जठै उपडा ।'–शिशु १४१.

घोडामैदान जवळ असणें—घोडा कसा चालतो–पळतो हें पाहाण्यासाठीं त्याला मैदानांत न्यावें लागतें. तें मैदान जवळ असल्यावर लगेंच परीक्षा होणार व निकाल कळणार. कसोटीची वेळ जवळ येणें.

घोडा हांकणें—पळून जाणें; सुंबाल्या करणें; धूम ठोकणें.

घोडी काढणें–भरविणें—घोडीस घोडा दाखविणें; घोडी फळविणें; वळू दाखविणें.

घोडीं घालणें; घोड्यांच्या अनीना उचलणें—घोडदळानें शत्रुवर तुटून पडणें; एकदम हल्ला करणें; स्वारी करणें.

घोडी घेणें—एखाद्याशीं कटकट करणें.

घोडी फेरणें—घोड्यावर बसावयास शिकविण्याकरितां स्वारी करून फिरून येणें; घोड्यावर बसून रपेट करणें; घोड्यास शिकविण्याकारितां त्यास फिरवून आणणें.

घोडीला घोडा लावणें—(अशिष्ट) घोडी फळण्यासाठीं तिच्यापुढें घोडा दिला कीं झालें काम; पुढें ती फळून सबर राहते कीं नाहीं हें न पाहणें. म्हणजे अशा अपुऱ्या काम करण्याच्या वृत्तीस म्हणतात. नुसतीं साधनें उपलब्ध करून देणें, पण परिणामाकडे लक्ष न ठेवणें.

गांडीखालचें घोडें—निर्वाहाचें साधन; वृत्ति; कामधंदा; रोजगार.

घोडे अटकेला पाणी प्याले—(ऐति.) रांघोबादादा पेशवे यांनीं पुण्याहून निघून अटकेपर्यंतचा मुलूख पादाक्रांत करून तेथें आपलें ठाणें बसविलें व तेथील सिंधु नदीचें पाणी आपल्या गंगथडीच्या घोड्यांस पाजलें. यावरून पराक्रमाची पराकाष्ठा होणें. 'कृष्णाकांठचे घोडे अटकेला पाणी प्याले'–संग्रामगीतें १२७. अटक पहा.

घोडें उभें करणें—विघ्न उपस्थित करणें; प्रतिबंध करणें; अडथळा आणणें; काम थांबविणें.

(एखाद्याचें) घोडें थकणें—१ एखाद्यानें थकून जाणें; हतबल होणें; दमणें. २ कालपरिस्थितीप्रमाणें उद्योगधंदा बसणें; पूर्वीप्रमाणें उद्योगधंदा जोरांत नसणें; पूर्वीप्रमाणें प्राप्ति न होणें.

कागदी घोडे नाचविणें—प्रत्यक्ष फायदा कांहीं न मिळतां फक्त हिशेब (मोठ्या फायद्याचे) लिहिलेले असणें; केवळ पत्रव्यवहार करणें. कागद पहा.

घोडें पुढें दामटणें–ढकलणें–हांकणें–घालणें—१ इतरांच्या पूर्वी आपला कार्यभाग घाईघाईनें साधून

घेण्याचा प्रयत्न करणें; आपणच पुढें सरसावणें. 'ब्रिटिश वसाहतींनीं आपल्या हक्काचें घोडें पुढें दामटलें.' –सास १.४४६.२ दुसऱ्यांच्या संभाषणांत मध्यें तोंड घालणें.

घोडें मारणें—जलद प्रवासाचें साधन म्हणून पूर्वी घोडेच असत. तेव्हां एखाद्याचें घोडें मारलें म्हणजे त्याची मोठीच नुकसानी होई. यावरून नुकसान करणें. 'आपण नशिबाचें काय असें घोडें मारलें होतें कीं त्यानें आपणांस तुरुंगांत टाकावें.' –विकारविलसित.

घोडें वांग्यांत जाणें--(व.) वांग्याची वाडी लाविली म्हणजे तिचें रक्षण जागरूकतेनें करावें लागतें. एखादें मोकाट जनावर (जसें घोडें) त्या वाडींत शिरलें म्हणजे तें साऱ्या वाडीचा नाश करतें. यावरून घोडें वांग्यांत जाणें म्ह. काम बिघडणें, काम नासणें असा अर्थ. 'मी त्यावेळीं तेथें नव्हतों इतक्यानें तर सारें घोडें गेलें वांग्यांत.'

घोडो घेतलो–(गो.) फिरंगरोग (उपदंश) लावून घेतला.

घोडयाएवढी चूक--ढोबळ चूक; फार मोठी चूक. 'तुझ्या हातून अगदीं घोड्याएवढी चूक झाली.'–मोरप्र २०.

घोडयाच्या पाठीवरचा कोस—पायांनीं चालून कोसभर अंतर जाणें. हें मर्यादित असतें. तेवढ्या वेळांत घोडा बरेंच अंतर काटतो. यावरून दीर्घ, कंटाळवाणें अंतर.

घोडयानें पेंड (पेण) खाणें--'पेंड' हा शब्द 'पेण' (= प्रवासांतील टप्पा) याबद्दल चुकीचा वापरतात व खाण्याची पेंड असा अर्थ धरून या वाक्यप्रयोगाचा असा खुलासा करतातः घोडयानें पेंड खाल्ली म्हणजे तो सुस्त होतो व पुढें जात नाहीं. पण ही उपपत्ति चुकीची आहे लांबच्या प्रवासांत विश्रांतीचे निरनिराळे टप्पे (पेणे) ठेवलेले असतात. तेव्हां सरावाचे टप्पे आले कीं घोडे तेथें अडतात, म्हणजे घोडे तेथें पेण खातात. 'तुझें घोडें कुठें पेण खातें बाबा! तें आधीं कळूं दे.'

घोडयापुढें गाडी जुंपणें–(इंग्रजी वा.प्र.)विपरीत क्रिया करणें.'हिंदुस्थानांतील जमातींनीं प्रथम आपसांत एकमत करावें म्हणजे ब्रिटिश सरकार त्यांना राजकीय हक्काचें दान करील असें भारतमंत्र्यांनीं सांगणें म्हणजे घोडयापुढें गाडी जुंपण्याप्रमाणेंच आहे.'–केसरी २५–४–४१.

एखाद्याच्या घोडयापुढें धांवणें--नोकर मालकाच्या घोडयापुढें सारखा धांवत असतो. यावरून एखाद्याची कष्टाची सेवाचाकरी करणें.

घोडयावर असणें--मोठी प्रतिष्ठा असणें. त्यामुळें आढ्यता येणें; भाव वाढणें; चढून जाणें.

घोडयावर घोडा घालणें—चढाओढ करणें; स्पर्धा करणें; होड बांधणें.

घोडयावर चढणें—एखाद्याच्या खुशामतीच्या बोलण्यावर विश्वास ठेवून हुरळून जाणें;हरभऱ्याच्या झाडावर चढणें.

घोडयावर बसणें—अंमल करणें; निशा करणें; मादक पदार्थांचें सेवन करून गुंगींत येणें.

घोडयावर बसप—(गो.) फिरंग रोगानें पछाडणें. घोडो घेतलो पहा.

घोडयावर बसून येणें—घाईनें येणें; त्वरा करणें; शीघ्र आगमन किंवा गमन करणें.

❀ **घोडा आपले गुणावर दाणा वाढवितो**—प्रत्येक मनुष्याचा उत्कर्ष त्याच्या योग्यतेवर अवलंबून असतो. गुणी मनुष्याचा हटकून उत्कर्ष होतो. –गांगा २८५.

घोडा आपल्या गुणानें दाणा खातो–वरीलप्रमाणेंच. जो मनुष्य गुणवान् असतो त्याला त्या गुणांबद्दल बक्षिस मिळतें. घोडा चालीला चांगला असेल तरच त्याला पोटभर दाणा मिळेल.

(जो) घोडा खुशीनें भार घेतो त्यावर सर्व पडतो–जो मनुष्य अतिशय श्रम करतो त्याच्यावरच सर्व भार पडतो. खुषीनें काम करणाऱ्या माणसालाच सर्वजण काम सांगतात. A willing horse is always saddled.

घोडा चोरानें नेला, मग तबेला बंद केला—घोडा गेल्यावर तबेल्याचें काय काम. तु०–बैल गेला झांपा केला.

घोडा जेरबंदी, मनुष्य संबंधी (समजावा–जाणावा–ओळखावा)—घोडा जेरबंदाखालीं असला तरच तो नीट चालतो. तसा मनुष्याचा आपल्याशीं कांहीं संबंध असला, जर आपणाकडून कांहीं त्याचें काम व्हावयाचें असलें, तरच तो आपल्या उपयोगी पडतो. जेरबंध आवळतांना घोड्याचे गुणदोष व संबंध आल्यानें माणसाचे स्वभावविशेष कळून येतात.

घोडा धांवला तर कानाचें अंतर--रेसेसमधील घोडे कानाइतक्या अंतरानें विजयी किंवा पराभूत होतात. यावरून थोडें अंतर.--खेस्व.

घोडा पाहावा बसून, आणि सोनें पाहावें कसून--घोड्यावर बसल्याशिवाय त्याची चाल,गुणदोष कळत नाहींत. तसेंच सोनें कसोटीवर घांसून पाहिल्याशिवाय तें शुद्ध आहे कीं हीनकस आहे तें कळत नाहीं. प्रत्येकास योग्य कसोटी

लावून त्याची परीक्षा केल्याशिवाय त्याची खरी योग्यता कळत नाहीं.

घोडा पाहिला, पाय मोडला—सुखसोयी असल्यावर माणूस कष्ट करण्याचें टाळतो.

घोडा मरे भारें, शिंगरूं मरे येरझारें—घोडें ओझ्या खालीं व शिंगरूं हेलपाट्याखालीं मरणें. मुख्य व्यक्तीबरोबर आनुषंगिक व्यक्तींची उगाचच ओढाताण होत असते.

घोडा मेला म्हणून गाढवाला नाहीं सुतक येत--एकाचें दुःख त्याचा संबध नसलेल्या दुसऱ्यास जाणवत नाहीं.

घोडा मैदान पुढें आहे; घोडा मैदान जवळच आहे—आरंभीं वाक्प्रचार पहा.

घोडा स्वार-मांड ओळखतो—घोडा आपल्यावर बसलेल्या स्वाराची परीक्षा करतो. ज्याच्याजवळ प्रत्यक्ष काम करावयाचें असतें, तो मनुष्य एखाद्याची बरोबर किंमत ओळखतो.

घोडा स्वारीस देणें, अस्थिचर्म माघारें घेणें—घोडा भलत्याच मनुष्यास भाड्यानें किंवा वापरण्यास दिला असतां तो कशाला त्याची काळजी घेतो. तेव्हां तो उपाशीं मेल्यास नवल नाहीं. भाडोत्री जनावराची कोणी काळजी घेत नाहीं. मालकाप्रमाणें इतर कोणी तात्पुरता संबंध असलेला मनुष्य वस्तूंची काळजी घेत नाहीं.

घोडी मेली ओझ्यानें व शिंगरूं मेलें हेलपाट्यानें—शिंगरूं हें आपल्या आई (घोडी) बरोबर हेलपाटे घालते. त्यामुळें जितके घोडीचे चालण्याचे श्रम तितकेच शिंगराचे. तेव्हां घोडी जर ओझ्याच्या भारामुळें मेली तर शिंगरूंहि त्याच्या अल्पशक्तीप्रमाणें हेलपाट्यानेंच मरतें.

वरातीमागून घोडें--मिरवणुकीच्या पुढें घोडें असतें. पूर्वी वरात घोड्यावर बसून काढीत. तेव्हां ती निघून गेल्यावर घोड्याचें काय काम ? ज्यावेळीं एखादी गोष्ट करावयाची त्यावेळीं न करतां वेळ निघून गेल्यावर ती करण्याचा प्रयत्न करणें.

घोडें आपल्या गुणानें, झालें ताजेंतवानें—वर पहा.

घोडें कमावतें आणि गाढव खातें--विद्वान्, हुशार, मनुष्य मिळवतोच;त्याच्या श्रमावर ऐतखाऊ लोक चैन करतात.

घोडें खाई भाडें; घोडें खाई भाडें, जीन खांद्यावर—भाडें आलें तें घोड्याच्या खाण्याकरितां गेलें व भाडें करतांना तेंहि मेलें. म्हणून जीन खांद्यावर घेऊन येण्याची पाळी आली. दुहेरी नुकसान.

आपले गांडीखालचें घोडें गेलें मग त्यावर महार बसो कीं चांभार बसो—ज्या वस्तूचा आपल्याशीं असलेला संबंध तुटला त्याबद्दल काळजी करण्याचें कारण नाहीं.

घोडें घेतलें बाजारीं, त्याच्या पायाला उखरीं--[उखरी = एक रोग] बाजारांत वस्तू घ्यावयाची तर ती योग्य पारख करून घेतली पाहिजे.

माझें घोडें, जाऊं दे पुढें--आपलाच स्वार्थ पाहणारा मनुष्य.

घोडें फिरण्याला, गाढव ओझ्याला—जें ज्या कामास योग्य असतें, त्या कामास त्याचा उपयोग करतात.

घोडेकू तंग, और अदमीकू वंग—[वंग = वंग भस्म] घोड्याला तंग बांधला म्हणजे तो जसा जोरदार होतो, तसा मनुष्य वंग खाल्ल्यानें होतो.

घोडेपर हौदा, और हत्तीपर जीन। जान बचानेके लिये पळे वॉरन हेस्टिंग्स; घोडेपर हौदा, हथीपर जीन। जल्दीसे भाग गया वारन हेस्टिंग॥—चेतसिंगापासून काशी घेतांना उडालेली वॉरन हेस्टिंग्सची तिरपिट वर्णिली आहे ती इतकीं कीं, कोणा प्राण्यावर काय घालावें याचें त्याला भान राहिलें नाहीं. —केसरी ६-१०-३६. चेतसिंगाला कैद करण्याकरतां वॉरन हेस्टिंग यानें काशींतील रेसिडेंट मार्क हॅम यास चेतसिंगाला त्याच्या शिवालय घाटावरील राजवाड्यांत जाऊन कैद करण्याचा हुकूम केला. पण राजाच्या प्रजेस ती गोष्ट सहन न होऊन सर्व एकत्र होऊन कंपनीच्या फौजेवर चालून गेले व तिची काशींतल्या गल्लींतून भयंकर कत्तल केली. हें वर्तमान ऐकून हेस्टिंगनें त्याच्या मदतीकरतां मेजर पोफॅम यास आणखी फौज देऊन पाठविलें व स्वतः वॉरन हेस्टिंग रातोरात पळून गेला. या प्रसंगामुळें काशींत वरील म्हण पडली—पं. भाऊशास्त्री वझे, ‘ माझा चित्रपट व काशीचा संपूर्ण इतिहास ’ पान २८.

जाय रे घोडया, खाय रे हरळी--(व.) एखाद्या गोष्टीबद्दल पूर्णपणें बेफिकिरी दाखविणें.

घोडयाएवढें डोकें, गाढवाएवढी अक्कल--दिसावयास चांगलें पण गुणांच्या नांवानें पूज्य; मोठें डोकें पण बटाट्यांनीं भरलेलें.

घोडयागादि धावनु येवनु, किडयागादि हळू वता—(गो.) एखादें संकट अथवा आजार घोडदौडीनें येतो पण जातांना मात्र मुंगीच्या गतीनें जातो. ‘ घोड्याचें पायीं येणें० ’ पहा.

घोडयागेर कुंकड जालें म्हळ्यार देखुन खरें खाता—(गो.) असंभाव्य गोष्टींवरहि विश्वास ठेवणारा साधा भोळा माणूस.

सर घोडया पाणी खोल–पाणी पी—नदी उतरण्यास किंवा घोड्यास पाणी पाजावयास नेलें असतां, एखाद्या ठिकाणीं खोल पाणी असल्यास, तेथून बाजूस सरून जरा उथळ पाणी असेल तेथें जावें; याप्रमाणें मागें पुढें पाहून अंदाज घेऊन काम करावें; कोणतीहि गोष्ट जपून, पुढें पाहून करावी.

घोडयामाक्षि उबरू नये, राया इदरारि राबू नये—(गो.) घोड्याच्या मागें आणि राजाच्या समोर उभें राहूं नये.

घोडयाची टांच, कुत्र्याचा दांत, विश्वासतां डसे मारी लाथ—घोडा केव्हां लाथ मारील व कुत्रा केव्हां चावेल याचा नेम नाहीं. यावर विश्वास ठेऊन बिनघोर राहूं नये. Trust not a horse's heel nor dog's tooth.–Latin.

घोड्याची परीक्षा जिनावरून होत नाहीं—घोड्याच्या खोगीराकडे पाहण्यापेक्षां घोडयावर बसूनच त्याची परीक्षा केली पाहिजे. कोणाचीहि वरवर परीक्षा करून चालत नाहीं. त्याला योग्य कसोटी लावली पाहिजे.

घोडयाची शर्यत गाढवानें जिंकली—बुद्धिमान मनुष्यांवरहि अडाणी माणसानें मात करणें.

घोडयाचे (हत्तीच्या) पायीं येणें आणि मुंगीचे पायीं जाणें—संकट किंवा आजार येतांना अगदीं एकदम, अकस्मात् येऊन जणूं धाड घालतो व जातांना मात्र हळू हळू जातो.

घोडयाचे पुढचे पाय आणि गाढवाचे मागचे पाय, ते करिती लोकीं अपाय—घोडा पुढचे पाय उचलतो व गाढव मागच्या पायानें लाथ मारतें. घोडा बिथरला म्हणजे पुढचे पाय उचलून टांपा आपल्या डोक्यावर ठेवतो व गाढव मागच्या पायांनीं लाथा झाडतें.

घोडयाचें लग्न आणि तट्टाचें बारसें—कशाचा कशाशीं संबंध नाहीं अशी गोष्ट.

घोडयाला दाणापाणी, गाढवाला समाधानी—घोड्याला दाणापाणी दिलें असतां तें ताजेतवानें राहतें व गाढवावरून नुसता हात फिरवला तरी तें खूष असतें. कारण त्यास खावयास घालावें लागत नाहीं, तें उकिरडा फुंकून राहतें. कोणाचें समाधान नुसत्या शब्दांनीं करतां येतें तर कोणाला प्रत्यक्ष कांहीं देऊन वश करावें लागतें.

घोडयावर हौदा, हत्तीवर खोगीर—वस्तूचा भलत्याच ठिकाणीं उपयोग. भलत्याला भलतेंच. वर पहा.

घोडयावरील दोघांपैकीं एकजण मागें असावयाचाच—एका घोड्यावर जर दोन माणसें बसलीं तर त्यांत एक पुढें व एक मागें असें असावयाचेंच. दोन वस्तु घेतल्या तर त्यांत थोडाफार फरक असावयाचाच. तो लक्षांत घेण्याचें कारण नाहीं.

घोडयास आणि गाढवास बरोबरी (होत) नाहीं—दोन अगदीं परस्पर भिन्न वस्तूंची तुलना होऊं शकत नाहीं. मूर्ख व शहाणा यांस एका मापानें गणतां येत नाहीं.

घोण——घोण घालणें—१ मनाजोगें न झाल्यामुळें फुगटून बसणें; कुढत राहणें. 'ते भीमकी हे मग घोण घाली।'–सारुह २.६९. २ लांबणीवर टाकणें.

❀ घोणीचा एक पाय मोडला तर ती लंगडी होत नाहीं—ज्याजवळ अनेक साधनें आहेत त्याचीं कांहीं साधनें नष्ट झालीं, तरी त्यावर फारसा परिणाम होत नाहीं. गोम पहा.

घोन——घोन बागविणें—(व.) नाकाचा शेंडा वाकविणें; नम्र करणें, होणें; डोकें खालीं करणें.

घोरंकार——असत्याचे विकार, नसत्याचे घोरंकार—ज्याच्याजवळ कांहीं माया असते त्याला ती सांभाळण्याची काळजी असते; व ज्याजवळ कांहीं नसतें तो देखील पैशाच्या अभावीं मोठ्या फिकीरींत असतो. म्हणजे दोन्हीकडूनहि काळजीच. तु०–असून अडचण, नसून खोळंबा.

घोरणें——गाय घोरे गोठा भरे, बैल घोरे धनी मरे—गाय पहा.

घोरपड——घोरपड आणणें—संकटांत घालणें; एखादें लचांड गळ्यांत घालणें; एखादी भानगड उपस्थित करणें.

गळ्यांत घोरपड घालणें–पडणें—१ लचांड मागें लावणें, लागणें. 'माझ्या गळ्यांत ह्या कामाची घोरपड घालूं नकोस.' २ कजाग बायको मिळणें. 'ही घोरपड विश्वामित्राच्या गळ्यांत पडली.'–नाकु ३.९४.

घोरपड येणें—मोठें अरिष्ट, संकट कोसळणें; संकटांत सांपडणें. 'बाळकृष्णपंतावर कोणती घोरपड येणार हें पाहण्याकरितां टपून आहोंत.'–विक्षिप्त १.३७.

❀ घोरपडी बया! तुझी पाठण मऊ—वास्तावक घोरपडीची पाठ फार खडबडीत असते; पण तिच्यावर आपणांस बसावयाचें असलें तर तिला नांवें ठेवल्यास ती त्रास देईल;

म्हणून तिला खूष करण्यासाठीं मऊ म्हणावयाचें. काम करून घेण्यासाठीं खोटी स्तुति करणें. पाठभेद–सुसरीबाई, तुझी पाठ मऊ.

घोरपडीबाई तुझी पाठ कशी, तर म्हणे रेशमापेक्षां मऊ—एखाद्या मनुष्याकडून आपलें काम करून घ्यावयाचें असलें म्हणजे त्याला तितका वेळ खूष ठेवणें अगत्याचें असतें.

घोरासुर——घोरासुराचें आख्यान—घोरत घेतलेली झोंप; गाढझोंप; निभ्रांत झोंप.

घोव——घोवसांडा दिवस—उन्हाळ्याचा दिवस. उन्हाळ्यांत फार उकडतें, त्यामुळें स्त्रीस पतीजवळ निजणें शक्य नसतें व वेगळें निजावें लागतें, यावरून.

घोव चाललो झरत नी बायल चालली भरत—(कों.) नवरा अशक्त व बायको सुदृढ असल्यास म्हणतात. तु०–बिबी आली उमरींत तर मिया चालले कबरींत.

घोव जाता उडत, नी बायल येता रडत—(कों.) नवरा दिवाळखोर बनला कीं बायको दीनवाणी होते.

घोव बायलां येंशें, मधीं उलै ता तँ पिशें—(गो.) नवराबायको भांडलीं तरी थोड्या वेळानें एक होतात आणि मध्यें पडणारा मूर्ख ठरतो.

घोवु मेलेल्याकइ बोड ताशिलें दुःख होड—(गो.) नवरा मेल्याच्या दुःखापेक्षां मुंडणाचें दुःख मोठें.

घोवाक ना कुंडयापोळी, घेडयाक पात्तोळी—(गो.) नवऱ्यापेक्षां त्याच्या मित्राची बडदास्त राखणें.

घोवाक ना भाव, माका खंयची जाव--(गो.) माझ्या नवऱ्याला भाऊ नाहीं तेव्हां मला जाऊ कशी असणार?

घोवाक सांडून सोडले घर, पण मीण घालला फार—(गो.) प्राप्तस्थिति सोडून दुसरी धरली तरी ती पूर्वीपेक्षांहि वाईट.

घोवाच्या भयानं घेतला रान, थंय भेटलो मुसलमान, तेनी कापला नाककान—(कों.) चोराच्या भयानें इ० पहा. घर पहा.

घोवानं जोडलें, बायल्येनं संभाळलें, घर थरले--(गो.) नवऱ्यानें मिळविलें, बायकोनें संभाळलें म्हणून घर वर आलें.

घोवानं मारलें आनि पावसानं भिजयलें जाल्याद कोणाक सांगचें—(गो.) नवऱ्यानें मारलें आणि पावसानें भिजवलें तर फिर्याद कोणाकडे द्यायची?

घोवानं म्हटली रांड आनि जग म्हणतां सांड; घोवानं रांड म्हळ्यार कांकणकार सांड म्हणता—(गो.) आपण आपल्या माणसाला वाईट म्हणालों तर दुसऱ्याला तसें म्हणण्यास उत्तेजन येतें.

घोवापरस बायल मोठी, आनी काणण घेवन लागली फाटी—(गो.) नवऱ्यापेक्षां बायको ताकदवान् असली कीं नवऱ्याला नको जीव करते. नवरा पहा.

घोवास नाहीं घोवकी, बायको करी शिनळकी—(गो.) नवऱ्यांत पराक्रम नसला म्हणजे स्त्री व्यभिचारी निघते.

घोळ——घोळ घालणें—पसारा मांडणें; गोंधळांत पडणें. घोटाळा करणें. 'ही पोरगी लग्नाचा घोळ घालून बसली आहे.'–मोरप्र १६.

घोळणें—घोळ घोळून; घोळून घोळून–१ आलटून पालटून; आळीपाळीनें. २ वारंवार; पुन्हां पुन्हां.

घोळतल्याक उपास ना, बसतल्याक भूक ना--(गो.) जो फिरत राहातो तो कधींहि उपाशीं राहात नाहीं आणि जो बसून राहातो त्याला भूक लागत नाहीं.

च

च——चकार शब्द--१ 'च' असा ध्वनि, शब्द. हा असंमतिदर्शक, निषेधार्थी आहे. २ किंचितहि भाषण; अवाक्षर; उद्गार. 'याप्रमाणें तो दिवस गेला, आण्णासाहेबांनीं त्यासंबंधानें एक चकार शब्दहि काढला नाहीं.'–यशवंतराव खरे.

चकाकणें——चकाकतें तेवढें सोनेंच नसतें–All that glitters is not gold याचा अनुवाद. चांगल्या गोष्टीचा कांहीं गुण एखाद्यांत असला म्हणजे सर्व प्रकारें त्या गोष्टीप्रमाणेंच विशिष्ट वस्तु असते असें नव्हे.

चक्क——चक्क माल चांदवडी, नगद माल हलवाई--चक्क चांदवडी रुपया मोजला म्हणजे हलवाई ताबडतोब माल देतो; रोकठोक व्यवहार; ताबडतोब निकाल होणारें काम.

चक्कर——चक्कर फिरणें--१ (सुदर्शनचक्र परमेश्वराच्या भक्तांच्या सभोंवतीं फिरतें या कल्पनेवरून) ईश्वराच्या कृपाछत्राखालीं असणें; परमेश्वराची कृपा असणें; देवाचा

आधार असणें. २ दुःखें संकटें यांत गुरफटणें; घेरलें जाणें; सर्व बाजूंनीं आपत्तींनीं पीडिलें जाणें.

चक्कर मारणें-मारून येणें--फेरी घालून येणें; हेलपाटा मारून येणें; येरझारा घालणें; जाऊन परत येणें. 'किल्ल्यावरूच चक्कर मारून परत तुझ्या महालाकडे येतो.' -कोकि २९.

चक्रावर धरणें--१ घोडा शिकविण्याकरितां मंडलाकार फिरविणें; घोड्यास वाटोळा फिरवून निरनिराळ्या चाली शिकविणें. २ कचाटींत, जरबेंत धरणें; पेंचांत पकडणें; अडचणींत आणणें.

चक्र——चक्रकापत्ति-१एका वस्तूचा दुसरीस, दुसरीचा तिसरीस, व तिसरीचा पहिलीस असा परस्परांवर आधार असतो अशा स्थितीस म्हणतात. २ Vicious circle याला प्रतिशब्द.

चक्रनेमिक्रम--फिरणाऱ्या चाकाचा वरचा भाग खालीं व खालचा भाग वर असा एका मागून एक खालींवर होतो. त्याप्रमाणें परिस्थिति बदलण्याचा क्रम; उच्चनीच स्थित्यंतरें; चांगल्या मागून वाईट व वाईटामागून चांगलें येण्याचा क्रम. 'कस्यैकांतं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा। नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण।'-मेघदूत १०९.

चक्री——चक्री उडविणें--उपहास करणें; थट्टा करणें; फजिती करणें; टिंगल करणें; छीःथूः करणें.

चक्री करणें--१ उपहास करणें; थट्टा करणें; चेष्टा करणें. २ आपापसांत ओढाताण करणें; दांडगाई, धिंगामस्ती करणें.

चक्री गुंग करणें-गुंगविणें-उतरणें--भुलविणें—[चक्री = अक्कल] १ गोंधळांत पाडणें; फजीत करणें; घोंटाळा उडविणें. २ (ल.) एखाद्याचीं लांबलचक आढ्यतेचीं भाषणें फोल ठरविणें; नक्षा, तोरा उतरणें; ऐट जिरविणें. ३ खोड मोडणें; अद्दल घडविणें.

चक्री गुंग होणें-भुलणें-उतरणें—गोंधळणें; ओशाळे होणें; अक्कल गुंग होणें; मति कुंठित होणें; फजिति होणें; वेड्यासारखें होणें.

चक्री फिरविणें—[चक्री = पागोटें] १ पगडी फिरविणें; बाजू बदलणें; एक पक्ष सोडून दुसऱ्या पक्षास मिळणें. २ पागोटें वगैरे बांधून, कपडे सरसावून, लढण्यास सिद्ध होणें; कंबर कसून आव्हान स्वीकारणें.

❀ **चक्रं भ्रमति मस्तके।**—'अतिलोभो०' पहा.

चखना——चख्खे सो याद रख्खे—१ जो चाखून पाहील त्याला आठवण राहील. खाद्यपदार्थ विकणारे जें गाणें वगैरे म्हणतात, त्यांत हा चरण असतो. २ ज्याला अनुभव येईल त्याला कळेल.

चंग——चंग बांधणें--(पचंग बांधणें) १ कंबर बांधणें; तयार होणें; सरसावणें; पुढें होणें. २ पैज मारणें; फुशारकी मारणें; ठासून प्रतिज्ञा करणें. 'एखाद्या मर्त्यानें मी अमुक वर्षें जगेन असा चंग बांधणें हा केवळ मूर्खपणा होईल.'

चंग वाळगणें—बाणा बाळगणें; अभिमान असणें; प्रतिज्ञा करणें.

चंगळ——चंगळ उडणें--रेलचेल होणें; समृद्धि असणें; भरपूर असणें; पुरून उरणें.

चंगीभंगी——चंगीभंगी अन् छत्तीस रंगी--चंगीभंगी माणूस अनेक थेर करतो.

चघळ——चघळ वांईचा, मरळ गोईचा-वांईचा मनुष्य बडबड्या असतो, बातांचें चऱ्हाट लावतो व गोव्याचा मनुष्य मरगळ असतो. (?)

चंची——चंची पडणें-चचणें; मरणें; मृत्यु येणें. खिपु.

चंचु——चंचुप्रवेश करणें--किंचित् शिरकाव करणें; प्रवेश मिळविणें; थोडा हात शिरकवणें.

चंचुप्रवेशो मुसलप्रवेशः; चंचुप्रवेशान्मुसलप्रवेशः।—प्रथम अगदीं लहानशी चोंच आंत घालण्यापुरती जागा मिळाली, कीं पुढें मुसळ घालण्याइतकी जागा सहज करतां येते. आरंभ लहान असला तरी पुरेसा आहे; पुढें आपल्या मनाजोगें काम करून घेतां येतें.-ग्रामो ४०३. The thin end of the wedge.

चट——चट लागणें-- संवय लागणें; व्यसन लागणें; टेंव असणें.

चटे(टें)पुढें पैका, सोद्यापुढें बायका--[चट=व्यसन] एखाद्या मनुष्यास एखादें व्यसन लागलें म्हणजे त्या व्यसनापायीं कितीहि पैसा असला तरी तो खर्च होऊन जातो, टिकत नाहीं. त्याप्रमाणें व्यभिचारी मनुष्याच्या संगतींत स्त्रीचें पावित्र्य राहणें कठिण असतें.

चटका——चटका मटका तोंडाला, फाटकें धोतर गांडीला-खायाला मात्र चमचमीत हवें मग अंगावर फाटके कपडे असले तरी हरकत नाहीं, अशा वृत्तीच्या माणसाबद्दल वापरतात.

चटकी——चटक्यांचा मांडव--चुटका पहा. एका बाईनें आजारीपणांतून बरें होण्यासाठीं देवास नवस केला कीं

तुझ्या देवळापुढें एक मांडव घालीन. पुढें ती बरी झाली. जेव्हां नवस फेडावयाची वेळ आली तेव्हां मांडवाच्या खांबागणिक व सामानागणिक ती चुटक्या वाजवूं लागली व याप्रमाणें तिनें चुटक्यांचा मांडव घालून, नवस फेडून देवास फसविलें.

चुटक्यांचा मांडव होत नाहीं--नुसत्या बोलण्यानें कांहीं कामें होत नाहींत, त्याकरितां श्रम करावे लागतात.

चट्ट——चट्टनें मट्ट करप—(गो.) चट्टामट्टा करणें.

चट्टा——चट्टा बसणें—नुकसान होणें; तोशीस लागणें; झळ लागणें; तोटा येणें; खोट लागणें.

चट्टामट्टा——चट्टामट्टा उडविणें-करणें-- लहान मुलें भातुकलीचा वगैरे खेळ खेळत असलीं म्हणजे भातुकलीकरितां कांहीं तरी जिन्नस, पदार्थ घेतात व खेळ चालू असेपर्यंत तो पुरवितात, पण खेळ संपण्याच्या वेळीं तो सर्व एकदम खाऊन टाकतात, त्यास चट्टामट्टा म्हणतात. त्यावेळीं 'चट्टामट्टा बाळंभट्टा, बाळंभट्टाची शेंडी उपटा' असें गाणें म्हणतात. त्यावरून १ खाऊन फडशा पाडणें; सर्व खाऊन टाकून साफ करणें. २ नाश; नागवणूक करणें; पूर्णपणें लुबाडणें; लुटणें. ३ ठार मारणें, नाश करणें. 'मला खालीं पाडून माझा चट्टामट्टा करण्याची तुझी इच्छा आहे.' —के १०-६-३०.

चट्टीपट्टी——चट्टीपट्टी नगीना, मजकडे कोणी बघेना--एखादी स्त्री अतिशय नखरेबाज असते पण तितकी रूपानें सुंदर नसते. त्यामुळें खूप नटली, सजली तरी लोकांचें लक्ष्य तिच्याकडे जावें असें तिच्या मनांत असूनहि तसें घडत नाहीं. एखादा मनुष्य पुष्कळ पुढें पुढें करतो पण त्याकडे कोणी लक्ष्य देत नाहीं अशा वेळीं म्हणतात.

चट्टीपट्टीचा बोभाटा, झिपरी मारी झपाटा--खूप चापूनचोपून केस बसविले तरी केस भुरभुरत असणें. नटण्या मुरडण्यामध्यें खूप वेळ दवडूनहि जर तसें बरोबर साधत नसेल तर त्याचा काय उपयोग. एखाद्या गोष्टीचा खूप गवगवा करून ती अपेक्षेप्रमाणें झाली नाहीं म्हणजे म्हणतात. जी नटते थटते तिचा मात्र वाईट वर्तनाविषयीं बोभाटा होतो पण जी गबाळ राहाते ती आपलें काम नकळत साधून घेते.

चड——चड उडतां चड बुडतां—(गो.) जो अधिक चढेल तो अधिक जोरानें खालीं पडतो.

चड खाता ताका चड आशा--(गो.) ज्याला पोटभर मिळतें त्याला अधिक आशा सुटते.

चड खाल्यार हागता, थोडें खाल्यार भागता—(गो.) ज्यास्त खाल्लें तर रेच होतात आणि कमी खाल्लें तर शरीर कृश होतें. एखाद्या तोळा मासा प्रकृतीच्या माणसाला उद्देशून म्हणतात.

चड न्हाल्याक चिखोल चड--मोठ्या नाल्यांत चिखलहि पुष्कळ असतो. फार सावधगिरी राखणाऱ्याच्या चुकाहि पुष्कळ. मोठ्यांचें सर्वच मोठें.

चड बुद्वंता फात्रां शीत, चड शाण्याक फातरांचें शित—(गो.) अति शहाण्याला दगडाचें शीत. अति शहाणा तोंडघशीं पडतो. तु०—अति शहाणा त्याला बैल रिकामा.

चड वजिणी जातऽ कीर बांयूटी फोज्येत—(गो.) सुईणी जास्त जमल्या कीं बाळंतिणीची कुचंबणा. एखाद्या कार्यांत प्रत्येक जण आपलेंच शहाणपण चालवायला लागला कीं त्या कार्याचा चुथडा होतो.

चड शिरीं ताका चड किरी—(गो.) फार जपतो त्याला रोगहि फार लागतो.

चंडाळ——चंडाळ चौकडी—दुष्ट मनुष्यांची जूट; कुटाळखोरांचा कंपू; टवाळ लोकांचा गट; गुंड लोकांचा संच.

चंडोल——चंडोलाचा चौपट अंमल--चंडोल हा एक अफू घालून केलेला पदार्थ असतो. चंडोल हा इतर अंमली पदार्थांच्या मानानें चौपट अंमली असतो.

चढ——चढ देणें--१ उत्तेजन देणें; भर घालणें; भरीस चढविणें; हट्टास पेटवणें. 'भाऊसाहेबानें चढ दिला।' —पेपो १९०. २ लिलावांत वगैरे किंमत चढविणें.

चढ बसणें—वाढणें; अधिक होणें; फार होणें.

चढावर चढ देणें—जास्त जास्त चढविणें; वर वर जाणें; अधिकाधिक वाढविणें; फुगविणें.

चढास-चढी देणें—उत्तेजन देणें; भर देणें; भरीस घालणें, पाडणें.

चढीस भरणें; चढीस-चढीं लागणें—१ पाठीमागें लागणें; नेटानें पिच्छा पुरवणें; सतत करूं लागणें. २ किंमत वाढविणें; चढविणें. ३ इरेस पेटणें; हट्टास पेटणें; स्पर्धेस गुंतणें.

❀ **चढ पढ सर्वांस आहे**—प्रत्येकाच्या आयुष्यांत उत्कर्ष व अपकर्षाच्या वेळा मधून मधून येतच असतात; सर्वच दिवस कांहीं सारखे नसतात, कांहीं बरे तर कांहीं वाईट दिवस सर्वांसच अनुभवावे लागतात.

चढण——चढणीस घोडा आणि उतरणीस रेडा—डोंगरावर चढून जाण्यास घोडा उत्तम व उतरावयास

रेड्यावरून बसून उतरणें उत्तम; कारण रेडा वसरत नाहीं व घोडा चढणीस दमत नाहीं.

चढणें——चढणारी कमान–उत्तरोत्तर वाढत जाणारी गोष्ट; प्रगतिपर स्थिति; वाढती महत्त्वाकांक्षा. 'पेशवाईच्या अस्ताला त्या वेळच्या मुत्सद्यांच्या महत्त्वाकांक्षेची चढणारी कमान नडली.'–अस्तंभा ७.

चढे-चढया-चढत्या घोड्यानिशीं—एका दौडींत; न थांबता; एका पेण्यांत; लगोलग; ताबडतोब. 'नादिरशहा याची फौज चढत्या घोड्यानिशीं दिल्लीस पोहोंचली.'–भाव २३.

❀ **चढेल तो पडेल**—जो उमेदीनें, महत्त्वाकांक्षा धरून वर येण्याचा प्रयत्न करील तो एखादे वेळीं अपयश खाईलहि. त्यांत कमीपणा मुळींच नाहीं. जो प्रयत्नच करणार नाहीं त्यास अपयश येण्याचा संभव नाहीं. तुलना–'सांडितां ठाव पुढें सईल धरी हात। चढेल तो पडेल ऐसी ऐकारे मात॥'–तुगा १६३. Not failure but low aim is crime.

चढेल तो पडेल, पोहेल तो बुडेल––जो उत्कर्षासाठीं प्रयत्न करील त्याला कधीं अपयश आल्यास त्यांत वावगें कांहीं नाहीं. जो कधींच कांहींच हातपाय हालवीत नाहीं, त्याला कधीं अपयश येत नाहीं म्हणून भूषण नाहीं. तसेंच जो पोहणार असेल ज्याला पाण्यांत जाण्याची संवय असेल, त्याच्यावरच बुडण्याचा प्रसंग येण्याचा संभव असतो. जो भीतीनें कधींच पाण्यांत पाय टाकणार नाहीं तो कधीं बुडणार नाहीं. कार्यकर्त्यांच्या समाधानासाठीं, प्रोत्साहनासाठीं वापरतात.

चढता——चढता दिवस—चढती वेळ; सूर्य वर जात असतो अशी वेळ.

चढता पाया—सुधारत चाललेली अवस्था; प्रगति; उत्कर्ष; भरभराट.

चढती कमान—भरभराटीचे दिवस; उत्कर्ष काल; उर्जितावस्था; चढती कळा.

चढती कळा—१ शुक्लपक्ष; शुद्धपक्ष. या पंधरवड्यांत चंद्राची कला एक एक दिवसानें वाढत असते यावरून. २ (ल.) भाग्याचे दिवस; भरभराटीचे दिवस. 'विजेच्या चंद्रमाप्रमाणें चढते कळे राज्य करित असतां,'–भाव १. 'चढती कळा धन्याची जाणून वीर असे भिडती।'–ऐपो २६९.

चढती गोष्ट सांगणें—आढ्यतेनें, फुशारकीनें बोलणें; अरेरावीचें भाषण करणें; उद्दामपणानें बोलणें.

चढती दौलत—वाढती श्रीमंती; उत्कर्ष; भरभराट; वाढतें वैभव.

चढती पडती—चढउतार; उत्कर्षापकर्ष; यशापयश. 'चढती पडती वस्तुमात्राच्या मागें लागलीच आहे.'–इलासुंदरी १०७.

चढती पराई-पायरी—१ चढता पाया पहा. २ वाढतें वय; वृद्धावस्था.

चढती बाजू––१ (गंजिफाचे खेळ) पहिले पांच रंग. २ भरभराटीचे दिवस; उत्कर्षकाल; उर्जितावस्था.

चढती भावना––वाढता कल; चढत जाण्याची अवस्था; प्रगतीपर रोख.

चढती मुदत––वाढणारी मुदत; दीर्घकाल.

चढती मुदतीची हुंडी—नेहमींपेक्षां जास्त मुदतीची हुंडी; हुंडी पटविणें सुलभ व्हावें यासाठीं जरूर त्या मुदतीपेक्षांहि थोडी अधिक मुदत घालून लिहिलेली हुंडी.

चढती वाढती—सारखी वाढत जाणारी; प्रगतीपर; वर्धिष्णु. 'चढती वाढती गोडी। भगवद्‌भजनाची॥'–दा १४.३.२३.

चढती वेळ-वेळा—१ पूर्वाण्ह; सूर्य वरवर जात असतो असा काल; मध्यान्हापूर्वीची वेळ; सूर्योदयापासून दोन प्रहरपर्यंतची वेळ; सकाळचा काळ. २ उत्कर्षाचा काळ; भरभराटीचे दिवस; ऊर्जित दशा; प्रगतीचे दिवस.

चढती हळद––लग्नांत पायाकडून वर हळद लावीत जातात ती. हळद चढवितांना पायांकडून वर हळद लावीत जातात. मृत्यूनंतर याच्या उलट वरून खालीं अशी हळद लावतात. याचे उलट, हळद उतरणें पहा.

चढतें व्याज—चक्रवाढव्याज; सारखें व्याजानें व्याज वाढत जातें असें.

❀ **चढती पायरी, मूर्खाला आनंद भारी**––थोडासा उत्कर्ष झाल्याबरोबर मूर्ख मनुष्य अगदीं हुरळून जातो. Self-exaltation is the fool's paradise.

चढविणें——चढवून येणें––१ निशाणी करून येणें; अंमल करून येणें. २ रागावणें; संतप्त होणें; अतिशय क्रोधाविष्ट होऊन बोलणें.

चढाई——चढाईच्या गोष्टी--अरेरावीच्या, मगरूरीच्या गोष्टी; दिमाखाचीं बोलणीं; गुरकावणी; दटावणी.

चढाईचें-चढावाचें धोरण--प्रथम हल्ला करणें; प्रतिपक्षावर स्वतः हल्ला करून जाणें; याच्या उलट बचावाचें धोरण. 'चढावाचें धोरण स्वीकारून भारताचार्यांवर तुटून पडलों.' –नाकु ३.६७.

चढाओढ——चढाओढीशिवाय उत्साह नाहीं आणि स्पर्धेवांचून हुरूप नाहीं--आपणांस कांहींतरी प्रगति करावयाची आहे, कोणापेक्षां तरी अधिक करून दाखवावयाचें आहे अशी मनांत आकांक्षा असल्याशिवाय मनुष्य तितक्या उत्साहानें काम करीत नाहीं व कोणी तरी प्रतिस्पर्धी असल्याशिवाय काम करण्यास तितकें अवसान येत नाहीं.

चढोवढीं——चढोवढीनें--स्पर्धेनें; ईर्षेनें; इरेनें.

चणे——चणवणी मिठवणी—चण्यांचें पाणी व मिठाचें पाणी. गरिबीचें जेवण.

चणवणी मिठवणी पिऊन असणें--केवळ अन्नोदकावर राहण्याची पाळी येणें. हीन दशेंत दिवस काढणें; निकृष्ट अवस्था प्राप्त होणें.

चणे खावुनु हात धुवंचें--(गो.) चणे खाऊन हात धुवायास जाणें; फाजील स्वच्छता किंवा सोवळेपणा करणें.

एखाद्याचे चणेफुटाणे करणें--१ ज्याप्रमाणें चणे फुटाणे ताबडतोब संपून जातात त्याप्रमाणें असलेला पैसा त्वरित उडवून टाकणें; हातोहात खर्चून टाकणें; उधळपट्टी करणें. २ फजीती करणें; आब न राखणें.

चण्याच्या झाडावर चढणें-चढविणें--एखाद्यानें चढून जाणें; खोट्या स्तुतीनें फुगणें; एखाद्याची खूप खुशामत करणें; एखाद्यास थापा मारून बनविणें; चढवून देणें पर्याय-हरबऱ्याच्या झाडावर चढविणें.

❀ **चणे आहेत तर दांत नाहींत व दांत आहेत तर चणे नाहींत; चणे एकाजवळ व दांत दुसऱ्याजवळ**--ज्याजवळ संपत्ति, ऐश्वर्य असतें त्याला ती उपभोगण्याचें शारीरिक वगैरे सामर्थ्य नसतें व ज्याला उपभोग घेण्याचें सामर्थ्य असतें त्याला कांहीं मिळत नाहीं, तो बहुधा कफल्लक असतो. (गु.) चलियां छे त्यां चारो नहि, ने चारो छे त्यां चलियां नहि. भट आहे तर तीथ नाहीं.

चणे खावे लोखंडाचे । तैं ब्रह्मपदीं नाचे ॥--जेव्हां खूप कष्ट करावे तेव्हां थोरपणा प्राप्त होतो. कठिण तपश्चर्या केली तर ब्रह्मपदाची प्राप्ति होते. –तुगा. "एकंदरींत 'चणे खावे लोखंडाचे तरीच ब्रह्मपदीं नाचे' असें म्हणतात तेंच खरें !" –छच ६२.

चने चबाव, या शह्‌ना बजाव--चणे खा, नाहींतर सनई वाजव. कोणतेंतरी एक काम करणें. एकाच वेळीं दोन कामें होत नाहींत.

चण्या झाडा चणे काढूक निसणि इत्याक ?--(गो.) वाटाण्याच्या झाडाचे वाटाणे काढण्याकरितां शिडी कशाला ? लहान कामाला जास्त तयारी नको.

चतुर——चतुर साबाजी—[साबाजी अनंत चतुर या नांवाचा एक हुषार मुत्सद्दी शहाजीच्या वेळेस मुसलमानांच्या दरबारीं होता. त्यानें जमीनधारे ठरवून दिले व रयतेच्या कल्याणार्थ बरींच कामें केलीं. याच्या हुषारीच्या गोष्टी बिरबलाप्रमाणें प्रसिद्ध आहेत. 'महाराष्ट्र सारस्वतां'त हा पेशवाई अखेरचा एक कवि असेंहि म्हटलें आहे.](विपरीत लक्षणेनें) बेअकली, मूर्ख माणसास लावतात.

चतुर करणी चवाठथा जाई, पैशाविना पेढे खाई—एखादें चातुर्याचें काम केलें तर त्याची प्रसिद्धि ताबडतोब होते व तें करणाऱ्यास चांगला लाभ होतो.

चतुरपण ढळढळीत, नाकांत गट्टा वळवळीत--शहाणपणा स्पष्ट दिसणारा आहे, पण नाकाच्या ठिकाणीं कळंकाचा गोळा (किडा) वळवळ करीत आहे. तु०- आपण हंसे लोका, शेंबूड आपल्या नाका.

चतुर राहतो निजाधीन, मूर्ख असतो पराधीन—जो शाहणा मनुष्य असतो व तो स्वतंत्र, स्वावलंबी असतो व मूर्ख असतो तो दुसऱ्यावर अवलंबून असतो.

चतुरांत चितारी, मूर्खांत मोची—कुशल कारागिरांमध्यें चितारी हा सर्व श्रेष्ठ होय व मूर्ख कारागिरांत चांभार हा सर्वांत मूर्ख होय. (गु.) चतुरमां चितारो, ने मुरखमां मोची.

चतुराला चिंता फार, मूर्खा नाहीं लाज, सब घोडे बारा टक्के, पोट भरलें नाहीं काज—जो मनुष्य शहाणा असतो त्याला प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करावयाची असते. म्हणून त्याच्यामागें अनेक गोष्टींची काळजी असते, पण जो मूर्ख असतो तो अगदीं निर्लज्ज असल्यामुळें त्याला कशाचीहि पर्वा नसते. तो सर्व गोष्टी एकाच मापानें मोजतो व स्वतःचें पोट भरलें म्हणजे त्याला दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची फिकीर नसते.

चतुरंग दल-सेना——हत्ती, घोडे, रथ व पायदळ या चार अंगांनीं युक्त असें सैन्य.

चतुराई——चतुराई आणि उद्योगानें, थोर पदवीतें चढणें--शहाणपणा, बुद्धि व सतत परिश्रम यांमुळें मनुष्य मोठ्या योग्यतेस चढतो.

चतुराईचा द्वेष न कर, अहंकार द्वेषप्राय मान--कोणाहि मनुष्याचा त्याच्या बुद्धीबद्दल मत्सर करूं नको व स्वतःबद्दल वृथा अभिमान बाळगूं नको.

चतुराईनें दान करी, त्याची उदारता खरी--जो सत्पात्रीं, प्रसंग पाहून दान धर्म करतो त्यालाच खरा उदार म्हणावें. जो विचार न करतां आपली संपत्ति वांटून टाकतो त्यास उदार न म्हणतां उधळ्या म्हणावें. तु०—सुपात्र दानाच्च भवेद्धनाढयो, धनप्रभावेण करोति पुण्यम् । पुण्यप्रभावात्सुरलोकवासी पुनर्धनाढ्यो पुनरेव भोगी ॥

चतुराईनें वागे, तेथें पाहाणें नलगे—जो शहाणपणानें वागतो त्याच्या बाबतींत कधीं चौकशी करण्याचें कारण पडत नाहीं. तो सर्व गोष्टी योग्य त्या प्रकारें करतो.

चतुराईनें शहाणे आणि क्रोधानें मूर्ख वागती—शहाणे लोक वेळप्रसंगीं मोठ्या कुशलतेनें वागून प्रसंग निभावून नेतात. उलट मूर्ख लोक अशा प्रसंगीं रागाच्या आहारीं जाऊन आपलें नुकसान करून घेतात.

चतुराक्षरी——चतुराक्षरी मंत्र (वि-स-र-लों)—विसरलों हा चार अक्षरांचा शब्द आहे पण यामुळें कार्याची किती हानि होते.

चतुर्दश——चतुर्दश भुवनें-लोक--७ लोक व ७ पाताळें मिळून. १ भूः, २ भुवर्, ३ स्वर्, ४ महः, ५ जनः, ६ तपः, ७ सत्य, ८ अतळ, ९ वितळ, १० सुतळ, ११ रसातळ, १२ महातळ, १३ तळातळ, १४ पाताळ. ‘ तुजसाठीं जगजेठी भुवनें चतुर्दश शोधिलीं । ’—देप ७५.

चतुर्दश रत्नें--चौदा रत्नें पहा. लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा धन्वंतरिश्चंद्रमा । गावः कामदुधाः सुरेश्वरगजो रंभादिदेवांगनाः ॥ अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुः शंखोऽमृतं चांबुधे । रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्युः सदा मंगलम् ॥

चतुर्दश विद्या—चार वेद, सहा शास्त्रें, न्याय, मीमांसा, पुराण, धर्म. १ ऋग्वेद, २ यजुर्वेद, ३ सामवेद, ४ अथर्ववेद, ५ छंद, ६ निरुक्त, ७ व्याकरण, ८ ज्योतिष, ९ शिक्षा १० कल्प, ११ न्याय, १२ मीमांसा, १३ पुराण, १४धर्मशास्त्र. षडंगमिश्रिता वेदा धर्मशास्त्रं पुराणकं । मीमांसातर्कमपिच एता विद्याःचतुर्दश ॥ चौदा विद्या पहा.

चतुर्दशांग लोह—१ रास्ना, २ कापूर, ३ तालीस पत्र, ४ ब्राह्मी, ५ शिलाजित, ६ सुंठ, ७ मिरी, ८ पिंपळी, ९ हिरडा, १० बेहडा, ११ आंवळकाठी, १२ नागर मोथे, १३ वावडिंग, १४ चित्रकमूळ. हीं चौदा औषधें आणि लोह भस्म.

चतुर्भद्र—(अ) धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष या चार पुरुषार्थांचा समुदाय. (आ) सुंठ, अतिविष, मुस्तागवत व गुळवेल. या चोहों औषधींचा समूह.

चतुर्भुज——चतुर्भुज करणें—(चार हात करणें.) १ कैद करणें; मुसक्या बांधणें. कैद्याचे दोन हात व त्याच्या दंडांना बांधलेल्या दोन काढण्या किंवा पोलिसाचे दोन हात. २ लग्न करणें. (स्वतःचे व बायकोचे मिळून चार हात.)

चतुर्भुज होणें—१ कैद होणें. २ लग्न होणें. ‘ मात्र एक अक्षर कुठें बडबडलास तर असा चतुर्भुज होण्याऐवजीं तसा चतुर्भुज होशील. ’ —भा ५०.

चतुर्वर्ग—धर्म, अर्थ, काम व मोक्ष.

चतुर्विध——चतुर्विध अन्न—१ खाद्य (ओदनादि), २ चोष्य (पक्काम्रफलादि), ३ लेह्य (क्षिप्रादि) व ४ पेय (दुग्धादि). खाण्याचें, चोखण्याचें, चाटण्याचें व पिण्याचें अन्न. ‘ मद्यें नव्हे अधिक न्यून । पचवी अन्न चतुर्विध । ’ —एभा १०.६१८.

चतुर्विध जाति—स्त्रियांचे चार वर्ग—१ पद्मिनी, २ चित्रिणी, ३ शंखिणी, ४ हस्तिनी. पुरुषांचे चार वर्ग—१ मृग, २ वृष, ३ वाजी, ४ शशक.

चतुर्विध मुक्ति—१ सलोकता, २ समीपता, ३ सरूपता, ४ सायुज्यता.

चतुर्विध वाचा—१ परा, २ पश्यंती, ३ मध्यमा, ४ वैखरी. ‘ तूं चतुर्विध वाचेतें । प्रसवलासी निरुतें । ’—विपू१.७.

चतुर्व्याज—१ क्षेत्र,२ ज्ञान, ३ अज्ञान, आणि ४ ज्ञेय. ‘तैसें एकचि चतुर्व्याजें । कथिलें आम्हीं । ’—ज्ञा १३.९५०.

चतुर्व्यूह—१ वासुदेव, २ संकर्षण, ३ अनिरुद्ध, आणि ४ प्रद्युम्न. असे पृथ्वीस आधारभूत असलेले चार व्यूह.

चतुःशास्त्र—१ न्याय, २ व्याकरण, ३ पूर्व मीमांसा, आणि ४ उत्तर मीमांसा. या चार शास्त्रांत पारंगत तो चतुःशास्त्री.

चतुष्टय--(अ) अंतःकरण चतुष्टय—१ मन, २ बुद्धि, ३ अहंकार, ४ महान्. (आ) अनुबंध चतुष्टय—१ विषय, २ संबंध, ३ प्रयोजन, ४ अधिकारी. (इ) आश्रम चतुष्टय —१ ब्रह्मचर्य, २ गार्हस्थ, ३ वानप्रस्थ, ४ सन्यास. (ई)

पुरुषार्थ चतुष्टय–१ धर्म, २ अर्थ, ३ काम, ४ मोक्ष. (उ) अवस्था चतुष्टय–१ जागृति, २ सुषुप्ति, ३ स्वप्न, ४ तुरीया. (ऊ) उपाय चतुष्टय–१ साम, २ दाम, ३ दंड, ४ भेद. (ऋ) पद चतुष्टय. (ए) प्रमाण चतुष्टय–१ प्रत्यक्ष, २ अनुमान, ३ उपमान, ४ आत्मवाक्य. (ऐ) योनी चतुष्टय–१ जारज, २ स्वेदज, ३ अण्डज, ४ उद्भिज. (ओ) वर्ण चतुष्टय–१ ब्राह्मण, २ क्षत्रिय, ३ वैश्य, ४ शूद्र. (औ) वाक् चतुष्टय–१ परा, २ पश्यंति, ३ मध्यमा, ४ वैखरी. (अं) व्यूह चतुष्टय–१ वासुदेव, २ संकर्षण, ३ अनिरुद्ध, ४ प्रद्युम्न. (अः) समुद्र चतुष्टय–१ पूर्व, २ पश्चिम, ३ उत्तर, ४ दक्षिण. (क) साधन चतुष्टय. (ख) सेनांग चतुष्टय–१ गज, २ वाजी, ३ रथ, ४ पदाति.

चतुःसन——सनक, सनंदन, सनातन व सनत्कुमार.

चत्वार——**चत्वार गुण**—चार प्रकारचे गुणः—१ तमोगुण, २ रजोगुण, ३ सत्त्वगुण, ४ शुद्ध सत्त्वगुण. –दा १७.९.५.

चत्वार देह—१ स्थूल, २ सूक्ष्म, ३ कारण, ४ महाकारण. –दा १७.९.१.

चत्वार भूतग्राम—१ जारज, २ स्वेदज, ३ अंडज, ४ उद्भिज.

चत्वार भोग—१ स्थूळ भोग, २ प्रविक्त भोग, ३ आनंद भोग, ४ आनंदावभास भोग. –दा १८.९.३.

चत्वार मुक्ति—१ स्वलोकता, २ समीपता, ३ स्वरूपता, ४ सायुज्यता. –दा. ४.९.२९.

चत्वार वर्ण—१ ब्राह्मण, २ क्षत्रिय, ३ वैश्य, ४ शूद्र.

चत्वार शक्ति—१ क्रियाशक्ति, २ द्रव्य शक्ति, ३ इच्छाशक्ति, ४ ज्ञानशक्ति. –दा १७.९.६.

चत्वारि अनुबंध—१ विषय, २ संबंध, ३ प्रयोजन, ४ अधिकारी.

चंदन——**चंदन उडविणें–करणें**—(चंदनाचें खोड ज्याप्रमाणें उगाळून झिजून पार नाहींसें होतें त्याप्रमाणें.) १ नाश करणें; नाहींसें करणें; फडशा करणें; ठार मारणें. 'पेंढाऱ्यांनीं गांव लुटून चंदन केलें.' २ (व.) बरोबर नेम मारणें. [कंदन या शब्दाशीं साम्य धरून कदाचित नाश असा अर्थ निघाला असेल.]

चंदन काढणें—बडविणें; चोपणें; मारणें; ठोकणें.

❀ **चंदन कमी होतें आणि सोनें वाढतें**—घासल्यानें चंदन झिजून कमी होतें, पण सोनें ठोकल्यानें वाढतें, पसरतें. (ल.) गुणी परोपकारी माणसांना स्वार्थत्याग करावा लागतो पण श्रीमंत माणसें गबर होत जातात. तु०—चंदनाचें अंग झुरणीचें आणि सोन्याचें अंग करणीचें.

चंदन पडा चमार घर, नित उठ कूटै चाम, चंदन बिचारा क्या करे, परयो नीचसों काम—(हिं.) चंदन चांभाराच्या हातीं लागलें तें त्यानें चामडें कुटावयास घेतलें. त्याला त्या चंदनाचा दुसरा काय उपयोग? बिचारें चंदन तरी काय करणार, नीच्याच्या हातांत पडल्यामुळें चामडें कुटण्याचें नीच काम नित्य करीत राहिलें. चांगली वस्तु तिचा उपयोग ज्याला करतां येत नाहीं, अशाच्या हातीं पडल्यास तो तिचा भलत्याच कामीं, हलक्या कामीं उपयोग करतो. याकरितां योग्य मनुष्याच्या हातींच चांगली वस्तु दिली असतां तिचा उपयोग होतो.

चंदनबिना कैशी चांदणी, मोतीबिना कैचा हार—चंदनाशिवाय टिकला कसा लावतां येईल व मोत्यांशिवाय हार कसा होऊं शकतो. अवश्य त्या साधनांशिवाय कार्य होत नाहीं.

चंदन म्हणतो सहाणे बाई कम जाती, तुझ्यासंगें झाली देहाची माती—सहाण ही दगडाची, तेव्हां चंदनापेक्षां कमी प्रतीची; पण तिच्याशीं संबंध येऊन चंदन झिजून जातो. वाईट संगतीनें चांगल्या माणसाचा नाश होतो.

चंदनाची चहाडी पळसानें केली, मैलगिरी चंदनाचीं मुळें तळासी गेलीं—चंदनाच्या मुळांना फार वास असतो. मुळें पूर्वीं वर असत पण पळसाला मत्सर वाटून त्यानें चहाडी केल्यामुळें तीं खोल गेलीं व आतां सांपडण्यास फार श्रम पडतात. नीचांच्या संगतीनें सज्जनांचे हाल होतात.

चंदनाची झाडी आणि सापाची वस्ती—चंदन सुवासिक असतो परंतु त्याच्या वासामुळें चंदनाच्या झाडींत नेहमीं सापाची वसती असते. चंदनाच्या वासाला लोभून तेथें साप हटकून आढळतो. गुळालाच मुंगळे डसतात; गुलाबाला कांटे असतात.

चंदनाचें अंग झुरणीचें आणि सोन्याचें अंग करणीचें—चंदनाचा उपयोग घासण्याकडेच होतो व सोन्याचा उपयोग घडण्याकडे होतो. त्याप्रमाणेंच चंदन घासल्याशिवाय त्याचा सुगंध मिळत नाहीं किंवा त्याचा उपयोग करतां येत नाहीं. व सोन्याचे अलंकार केल्याशिवाय त्याला कांहीं शोभा नाहीं.

चंदनाच्या पेटीला लोखंडाचें कुलूप—अयोग्य जोड. चंदनासारख्या उत्तम सुगंधी व दिखाऊ पेटीला योग्य असें

चांदी वगैरेचें कुलूप शोभून दिसेल. लोखंडाचें कुलूप लावणें म्हणजे त्याची शोभा बिघडवणें आहे. तु०–शालजोडीला बोंगडीचें ठिगळ.

चंदनापरि झिजावें, उपकार लोकीं करावे—ज्याप्रमाणें चंदन आपलें अंग झिजवून लोकांस शीतल करतें त्याप्रमाणें मनुष्यानें दुसऱ्यावर उपकार करण्यांत आपलें शरीर वेंचावें. तु०–मना चंदनाचें परि त्वां झिजावें । परी अंतरीं सज्जनां नीववावें ॥ –रामदास मनोबोध.

चंदनाला सापाचा वेढा, गुणवंताला असती अवधडा—ज्याप्रमाणें चंदनाच्या वासाला लोभून त्यासभोंवतीं साप वेष्टन करीत असतो त्याप्रमाणें गुणी मनुष्याच्या भोंवतीं लोक जमतात.

चंदी——चंदी उडविणें––ज्याप्रमाणें घोडा सर्व चंदी खाऊन टाकतो त्याप्रमाणें फन्ना उडाविणें; सफा करणें; फस्त करणें; पार खाऊन टाकणें.

आपली चंदी वाढवून खाणें––घोडा जर चांगला व गुणी असेल तर मालक त्याला ज्यास्त दाणा देतो. आपल्या गुणांनीं वर येणें; स्वतःच्या लायकीनें, योग्यतेनें, उच्च पद प्राप्त करून घेणें. घोडा पहा.

चंदुलाल——चंदुलाल मर गये, चंदुलालके नोकर घर घर लग गये––दिवाण चंदुलाल हा निझामाचा दिवाण होता. तो अतिशय दानशूर, खर्चिक होता. त्यावरून अतिशय खर्चिक, उदार, उधळया माणसाला चंदुलाल म्हणतात. त्याचे नोकर त्याच्या हयातींत चैनींत होते पण तो मेल्याबरोबर त्यांची चैन संपली व ते दारोदार फिरूं लागले. तु० -मुरगी मरी बच्चे दाणादाण.

चंद्र——सुतानें चंद्र ओवाळणें––शुद्ध द्वितीयेच्या दिवशीं चंद्रास वस्त्राची दशी वाहतात. असें केल्यानें नवीं वस्त्रें मिळतात अशी समजूत आहे. ही फार जुनी असावी हें पुढील सुभाषितांवरून दिसून येतें. (अ) शंभुः श्वेतार्कपुष्पेण चंद्रमा वस्त्रतंतुना । अच्युतः स्मृतिमात्रेण साधवः करसंपुटैः ॥ –सुर १५८.२३९. (आ) चन्द्र त्वां वसनाञ्चलस्य दशया संभावयामः कथम् । –सुर २११.४६.

चंद्रचकोर न्याय—१ चंद्रापासून स्रवणारे अमृत बिंदु चकोर सेवन करतो; म्हणून या दोघांमधील प्रेमसंबंध, एकमेकामधील स्नेहसंबंध. २ चकोर पक्षी नेहमीं चांदण्याची वाट पाहात असतो यावरून दुसऱ्या एखाद्यावर आपलें जीवित किंवा एखादें मोठें कार्य अवलंबून असणें; अत्यंत उत्सुकतेनें एखाद्याची वाट पाहात असणें. 'वाट पाहती दिन रजनी । चंद्रचकोर न्यायेंसी ।' –ह २१.७२.

चंद्र पाहून कोल्ह्यानें जळणें––कोल्ह्याला चांदणें आवडत नाहीं. चांदणें पाहिलें कीं कोल्हीं ओरडूं लागतात. 'चंद्र देखोनि जळे पोटीं । कोल्हा जैसा ॥' –ज्ञा १६.

चंद्र पिकणें—पूर्ण चंद्रबिंबाचा प्रकाश पडणें; पौर्णिमेचें चांदणें पडणें. 'चंद्र पिकलासे अंबरीं । तें पिक घ्यावें कीं चकोरी ।'–कथा १.८.६२.

ओढून चंद्रबळ आणणें—१ एखादी गोष्ट इष्ट असतांहि वरून अनिच्छा दाखविणें; आढेवेढे घेणें. 'आजीनें मला हांका मारल्या. मी बराच वेळ ऊं ऊं करून ओढून चंद्रबळ आणलं......शेवटीं दुर्गीनें मला ओढून नेले.'–पकोघे. २ अंगीं प्रतिष्ठा नसतां बळेंच धारण करणें.

एकाद्यास चंद्रबळ देणें—उत्तेजन देणें; भर देणें; हुरेस घालणें. 'देउनिया वेच धाडी वाराणसी । नेदावें चोरासी चंद्रबळ ॥'–तुगा ३२५३.

चंद्रम् दिवटे दिवम् थाळी––चंद्र हा दिवट्याचें काम करतो व नागवेलीचें पान थाळीच्या कामीं येतें म्हणजे रात्रीं दिवा लावण्याचेंहि सामर्थ्य नसल्यामुळें चंद्राच्या प्रकाशांत काय तें काम करावयाचें व जेवणालाहि भांडें नसावयाचें म्हणून पानावर भागवावयाचें अशी अत्यंत दरिद्रावस्था; निकृष्टावस्था; विपन्नता.

चंद्र मोहरणें––(माणदेशी) चंद्र उगवणें; चांदणें पडणें.

चंद्रसमुद्रन्याय—चंद्र उगवला म्हणजे समुद्रास भरती येते; याप्रमाणें उत्साह येणें; भरतें येणें. 'जॉन्सन यास कोणीहि भाविक श्रोता मिळाला असतां चंद्रसमुद्रन्यायानें त्याच्या वाणीस मोठें भरतें येई.'–नि ६८६.

चंद्रानें कोंबडा करणें—चंद्राला खळें पडणें.

❀ केळीवर नारळी, घर चंद्रमौळी—केळी पहा.

चंद्र राहे दूर आकाशीं, वाट पाहे चकोर पक्षी—चंद्र दूर आकाशांत असतो तरी चकोर पक्षी तो उगवण्याची उत्कंठेनें वाट पाहात असतो. कारण त्यापासून त्याला अमृताची प्राप्ति होते व त्याचें जीवन त्यावर अवलंबून असतें. चंद्रचकोरन्याय पहा. तु०—चंद्रामृते तृप्ति पारणे चकोरा । भ्रमरासी चारा सुगंधाचा ॥—तुगा ३४४७. निशाचरोपि दीनोपि सकलंकोपि चंद्रमाः । चकोरीनयनद्वन्द्वमानंदयति सर्वदा ॥–सुर २०९.६.

चंद्राची प्रतिष्ठा सूर्य उगवला नाहीं तोंवर––सूर्य

उगवला म्हणजे चंद्राचें तेज फिकें पडतें त्याप्रमाणें एखादा फार थोर मनुष्य पुढें आला म्हणजे बाकीचे लोक त्याच्यापुढें निस्तेज भासूं लागतात. 'खद्योतो द्योतते तावद्यावन्नोदयते शशी। उदिते तु सहस्रांशौ न खद्योतो न चंद्रमाः ॥–सुर २०९.२.

चंद्राला पडे खळें आणि शेतकऱ्याच्या खळ्याचें वाटोळें—चंद्राला खळें पडलें म्हणजे बहुधा पाऊस पडत नाहीं, व पाऊस पडला नाहीं म्हणजे शेत पिकत नाहीं व शेतकऱ्याचें खळें रिकामें पडतें.

चंद्राला म्हणते उगवूं नको, अन् सूर्याला म्हणते मावळूं नको !—चंद्र आणि सूर्य तिच्यापुढें आपलें तेज पाडूं शकत नाहींत. सौंदर्यसंपन्न स्त्रीविषयीं म्हणतात. 'ती म्हणतात इतकी सुरेख आहे कीं, चंद्रा०'–बाजीराव मस्तानी.

चंद्रपूर——चंद्रपूरचा वडा, छत्तीसगडचा खेडा आणि हृदबनचा पेढा—[चंद्रपुर = चांदा. खेडा = एक फलविशेष; याची भाजी फार स्वादिष्ट असते.] कांहीं गांवच्या कांहीं वस्तु प्रसिद्ध असतात, अशा अर्थी.–चित्रमय जगत्, सप्टेंबर १९४१, पान ३७७.

चंद्री —— एखाद्याची चंद्री भुलणें–गुंग होणें–बावरणें, घाबरणें; मति गुंग होणें; निर्बुद्ध होणें. 'लोकांचीं घरें भडभडा चेत घेताहेत. पाहशील तर चंद्री गुंग होईल.'-बाळ२.१०४.

❀ **चंद्री व्यापली, शुद्धी गेली**—एखाद्या गोष्टींत मन अगदीं पूर्णपणें गुंग झालें म्हणजे इतर गोष्टींचें भान राहात नाहीं. तंद्री लागली असतां इतर गोष्टींचा विसर पडतो.

चपण——चपण शिकारी, दादला भिकारी—[चपण = चपळ ?] शिकारीचा नाद हा वाईट आहे. हा ज्यास लागेल त्याचें संसाराकडे लक्ष्य राहात नाहीं.

चंपा——चंपा तुजमें त्रण गुण, रंग रूप और बास–(गु.) चांफ्याच्या फुलाच्या अंगीं तीन गुण विशेष असतातः त्याचा आकार, रंग व सुवास. सबंध कवन–चंपा तुजमें त्रण गुण, रंग, रूप और बास । एक तुजमें अवगुण हए, भम्मर न आवे पास ॥

चंपी——चंपी उडविणें-करणें—१ फजिती करणें; भेंवरी उडविणें; उपहास करणें. २ खरडपट्टी काढणें; बोलावयास तोंड नाहींसें करणें. ३ अंग रगडणें.

चपेट——चपेट साधणें—व्यापार वगैरेमध्यें लाग साधणें; आकस्मिक मोठा लाभ होणें.

चंबू——चंबूगवाळें आटपणें–उचलणें—[चंबूगवाळें = सोंवळेंभांडें.] १ भांडींकुंडीं, चीजवस्तु, वस्त्रपात्र, सर्व संसाराचें सामान नेणें, हलविणें. २ बिऱ्हाड, बस्तान मोडून दुसरीकडे जाणें. मुक्काम हलविणें; आपली सर्व चीजवस्त घेऊन निघून जाणें. 'आपलें चंबूगवाळें आटोपून तो तुळापुरीं आला.'–स्वप ११. 'त्यांच्यांतील अक्कल आपलें चंबूगवाळें उचलून पार चालती होते.'–वाईकरभटजी. 'बाणेरें या गांवीं तमाशा झाल्यावर चित्रकारानें लागलीच तेथून आपलें चंबूगवाळें उचललें असें सांगितलेंच आहे.' –शाब ३.१४.

चंबूगवाळें फेंकणें—बळेंच आमंत्रण लावणें; प्रवेश मिळविणें; आपलें सोंवळें भांडें टाकणें; आगांतुकी करणें.

चंबू होणें—तोंडाचा चंबूसारखा आकार होणें; बोलतां न येणें; निरुत्तर होणें; स्तब्ध होणें; बोलावयास जागा न राहणें.

चमडा——चमडा जाने, और कुत्ता जाने—ज्याचें त्यालाच माहीत.–पामो ४३२. कुत्ता पहा.

चमडी——चमडी जावे पण दमडी न जावे–देवे; चमडी जाय पण दमडी न जाय; चमडी जावो पण दमडी न जावो; चमडी देईल पण दमडी देणार नाहीं; चमडी देएंगे पण दमडी नहि देएंगे—अतिशय कार्पण्य; कंजूषपणा; अंगाची चामडी गेली तरी बेहेत्तर पण दमडीहि जावूं न देणारा.

चमडी फाटे, वस्त्र न फाटे, चमडी फाटेल पण वस्त्र फाटणार नाहीं—अतिशय जाडेभरडें वस्त्र, इतकें टिकाऊ कीं तें अंग फाटलें तरी कधीं फाटायचें नाहीं. तु०–गांड फाटे पण धबला न फाटे.

चरक——चरकावर–चरकीं धरणें—१ भांडें वगैरे जिल्हई देण्यासाठीं चरकावर धरणें; लखलखीत करणें. २ (ल.) कचांत धरणें; सक्त मेहनत करविणें; पेंचांत पकडणें; अडचणींत गांठणें.

चरण——चरण चालीं–चालीनें–१ पायांनीं; पायीं. 'चरणचालीं दवडिले वनीं ।'–मुसभा १६.१३५. २ पाय उतार; वाहनावर न बसतां; जमिनीवरून. 'चरणचालीं सत्यजित । पुढती झुंजा मीनला ।'–मुआदि ३२.६५.

चरण धरणें; चरणीं लागणें—१ आश्रय करणें; आधार घेणें; अवलंबन करणें. २ पाया पडणें; वंदन करणें. 'सौमित्र चरणीं लागला । ते स्थळीं शंकर स्थापिला ।' ३ शरण जाणें; प्रार्थना करणें; विनवणी करणें; काकुळतीस येणें.

चरण लागणें—पाय लागणें; पायाची धूळ झाडणें;

भेट होणें; आगमन होणें. 'आपले चरण माझ्या वाड्यास लागावे अशी इच्छा धरून विनंती करितों.'--रत्न १६.

चरणसंपुष्ट—खडावा; जोडा;पादुका; पायतणें. 'चरण संपुष्टें दिधलीं तयासी ।'-सप्र २.९५.३१.

चरणारविंदीं मिलिंदायमान होणें—१ लीनतेनें पायीं लागणें. बायकोनें नवऱ्यास लिहावयाच्या पत्रांत हा प्रयोग योजीत. २ खुषमस्करी करणें; हांजीहांजी करणें.

चरणास-चरणीं लागणें—वंदन करणें; पायीं लागणें; नमन करणें. 'लागे चरणासी प्रेमभावें ।' –सप्र २.११.१.

चरणें——चरण्याला कुरण नाहीं, हरीण फिरते दिशा दाही—ज्याला एका जागीं खावयास मिळत नाहीं त्याला दूरदूर भटकावें लागतें. ज्याला जाग्यावर बसून प्राप्ति होत नाहीं त्याला वणवण फिरावें लागतें. तु०–अन्नासाठीं दाही दिशा । आम्हा फिरवीशी जगदीशा । –व्यंस्तो.

चरलें गाढव घोड्याची बरोबरी करीत नाहीं—गाढव कितीहि पुष्ट झाले तरी घोड्याची बरोबरी कशी करूं शकेल. नीच मनुष्य कितीहि वैभवास चढला तरी खऱ्या थोर पुरुषाची सर त्याला येऊं शकत नाहीं. गाढव पहा.

फिरे तो चरे—परिश्रम करणारा मनुष्य संपन्न होतो; जो अनेक ठिकाणीं जातो, प्रवास वगैरे करतो तो बहुश्रुत होऊन त्याची प्राप्ति वाढते. रिकामा बसणाऱ्यास कांहीं मिळत नाहीं.

चरपट——चरपट झोंबणें--(व.) उन्हाची झळ लागणें.

चर्पट——चर्पटपंजरी--चर्पटपंजरी या नांवाचें व 'भजगोविंदं०' असा आरंभ असलेलें शंकराचार्यांचें एक स्तोत्र आहे. तें कांहींना लांबलचक कंटाळवाणें वाटतें. त्यावरून चऱ्हाट; बडबड; कंटाळवाणें भाषण. 'भास्करभाऊची ती स्थिति पाहून सीतारामाला वाईट वाटलें. पण पंड्याजीची चर्पटपंजरी चाललीच होती.'–जग हें असें आहे.

चर्या——चर्या पालटणें-बदलणें—१ आजारीपणानंतर चेहऱ्यावर टवटवी, तजेला येणें. आजारांत जो चेहऱ्यावर फिकेपणा व निस्तेजता येते ती नाहींशी होऊन बरें होण्याच्या मार्गास लागणें, म्हणजे एकप्रकारची चेहऱ्यावर तेजाची कळा येणें. २ अपराधाच्या, भयाच्या वगैरे जाणिवेमुळें चेहरा काळवंडणें; भीतीनें वगैरे चेहरा निस्तेज होणें; पांढरा होणें.

चर्वित——चर्वितचर्वण करणें—गुरें ज्याप्रमाणें रवंथ करतात, चारा पुन्हां तोंडांत आणून पुन्हां पुन्हां तो चघळतात, त्याप्रमाणें. १ चघळलेलें पुन्हां चघळणें; बारीक चावून खाणें. २ काथ्याकूट करणें; पुन्हां पुन्हां तेंच तेंच भाषण करणें. 'तुच्छें चर्वितचर्वणोपमसुखें जीं तींच तीं भोगितां ।'–वामनस्फुट.

चऱ्हाट——चऱ्हाट वळणें—[चऱ्हाट = दोरखंड; लांब व जाड दोरी.] पाल्हाळ लावणें; लांबलचक बिनमुद्याचें भाषण करणें; कंटाळवाणी बडबड लावणें. 'त्यानें मूळ विषय सोडून लांबलचक आत्मस्तुतीचें चऱ्हाट वळलें.' –विक्षिप्त २.७८. 'गणकः–(त्रासून स्वगत) लागला पुन्हां चऱ्हाट वळायला !' उग्र २.४.

❀ **देवाची गेली घांट, तर गुरवाचें गेलें चऱ्हाट (इयाट)**—घांट पहा.

चलणें——चल तर चल, सोमा बोले चल तर गोपी बोले चल–दुसऱ्याच्या सांगण्याप्रमाणें वागणें; स्वतःचें स्वतंत्र असें मत नसणें.

चलतल्याची चाल कळटा, उलैतल्याचें उत्तर कळटा—(गो.) चालण्यावरून माणसाची चाल कळते व बोलण्यावरून बुद्धि कळते. नुसत्या निरीक्षणानें माणसाची पारख होते. तु०–आकारैरिंगितैर्गत्या चेष्टया भाषणेन च । नेत्रवक्त्रविकाराभ्यां ज्ञायतेऽन्तर्गतं मनः ॥

चल्ता तागॅलें हाल्ता—(गो.) संपन्न माणसाकडेच सगळ्यांचा ओढा असायचा.

चलतां त्याचे हालतां, बसतां त्याचे थिजतां—(गो.) चालतो त्याचें हालतें, बसतो त्याचें थिजतें. उद्योग करणाऱ्याला महत्त्व येतें, आळशाला जागच्या जागींच राहावें लागतें. तु०–शेते निपद्यमानस्य चराति चरतो भगः ।

चलते तिफणी बारागळ, कुणब्याची तारांबळ—एकदां शेतीचीं कामें सुरू झालीं व शेतांत पेरणी सुरू झाली म्हणजे शेतकऱ्याची अगदीं धांदल उडते, त्याला क्षणाचीहि फुरसद नसते. कुणबी पहा.

चलाचलीके राहमें, कुछ भलाभली करलो—जोंवर आपण जगांत आहोंत तोंवर कांहीं चांगलें भलेपणाचें कार्य करून घ्यावें. –सवि ४१५७. अन्योक्ति-कल्पद्रुम १०६२.

चलती——चलती तिकडे भलती—१ ज्याच्याजवळ भरपूर संपत्ति असते त्याला कोणतीहि गोष्ट करणें अथवा मिळविणें सुलभ असतें. त्याचें सर्व कांहीं सुलभतेनें होतें. २ ज्याचा चालता काळ असतो त्याच्या भोंवतीं सर्व लोक गोळा

होऊन त्याची खुशामत करीत असतात. तु०–बा तुझा चालता काळ, खायला मिळता सकळ । –अमृत.

चलि——चलि होडांगेरि दिवंका, सून गरिबां घराचि हाडका—(गो.) मुलगी श्रीमंताकडे द्यावी, सून गरीबा घरची आणावी. श्रीमंताची मुलगी सून केल्यास ती वरचढ होते, असा अनुभव.

चलियेक (चेर्डाक) आवुसु, बेळ्याक पावुसु—(गो.) मुलगी व्यवस्थितपणें वाढायची तर तिला आई हवी आणि शेत भरपूर पिकायचें तर पाऊस हवा.

चलियेक उलयिलें, सुनेक लागलें—(गो.) लेकी बोले सुने लागे.

चलियेक चोवंच्याक गेलेलो चलो, लग्न करनु घेवनु आयलो—(गो.) मुलीला बघावयाला गेलेला मुलगा लग्न करून घेऊन आला.

चलॅकार बांक, आनि चलयेकार थरकांप—(गो.) ज्याला मुलगा आहे तो दिमाख दाखवतो आणि ज्याला मुलगी आहे तो बिचारा त्रासतो.

चव——चव काढणें—चोखंदळपणा करणें; फार खाराखिरी करणें.

चव घेणें-पाहणें—१ स्वाद, गोडी पाहणें; चाखून पाहणें. २ अनुभवानें जाणणें; प्रतीति घेणें; प्रचीति पाहणें.

चवेस पडणें—पसंत पडणें; मानवणें; मान्य होणें; पटणें.

*** बधिरास काय गायनाची चव**—अंधळ्यापुढें नाच व बहिऱ्यापुढें गायन काय कामाचें. तु०–किमिष्टमन्नं खरसूकराणां किं रत्नहारो मृगपक्षिणांच । अन्धस्य दीपो बधिरस्य गीतं मूर्खस्य किं शास्त्रकथाप्रसंगः ॥–सुर १७३.८६१.

गाढवांस गुळाची चव काय—गाढव पहा.

चव चवडा, डोक्याला खवडा—एखादा मनुष्य दुसऱ्याच्या कामांत दोष काढण्याच्या कामीं मोठा चोखंदळ असतो, पण त्याला स्वतःचे दोष दिसत नाहींत.

चव ना चोथा—अगदीं बेचव वस्तु; अगदीं कुच कामाची, ज्यांत कांहीं राम नाहीं अशी गोष्ट.

चवनं न ढवनं, घोडस गावनं—(अहि.) घोडस गांवच्या वस्तूस कांहीं चव ढव नसते. घोडस गांवच्या वस्तु अगदीं बेडौल, बेचव असतात. त्याप्रमाणें असणें.

चव ना ढव, खादाडा पोटभर जेव—खादाड माणसाला अन्नाची चव कळत नसते. तो नुसतें पोट भरून घेतो.

चव ना ढव, दडपून जेव—एखादा मनुष्य पदार्थाची चव वगैरेकडे बिलकूल लक्ष न देतां खूप खाण्याच्या पाठीमागें असतो अशास म्हणतात. स्वयंपाकास चव नसते तरी पुष्कळ खाण्याचा आग्रह जेव्हां होतो तेव्हां म्हणतात.

तापल्या पाण्यास चव येत नाहीं—तापलेल्या पाण्यास गोडी नसते; पाणी एकदां तापविलें म्हणजे त्याची चव जाते व पुन्हां तें थंड केलें तरी त्यास चव येत नाहीं. याप्रमाणें एकदां स्नेह तुटला म्हणजे तो पुन्हां जडत नाहीं; एकदां एखाद्याबद्दल मनांत वितुष्ट आलें कीं तें पुन्हा कांहीं केलें तरी जात नाहीं.

चवीचा कधींच चिवडा होत नाहीं—रुचीबद्दल कधीं वाद माजत नाहीं; जी वस्तु खरोखर रुचकर असते ती कोणीहि खाल्ली तरी त्याला पसंत पडल्याशिवाय राहात नाहीं.

चवडा——चवड्यावर चालणें—अतिशय जलदीनें चालणें; फार घाईत असणें; पुरता सर्व पायहि न टेकतां भराभर जाणें.

चवड्यावर बसणें—पायांच्या बोटांवर टांचा न टेकतां बसणें.

चवणा——(ना.) मिजास करणें; हट्ट धरून बसणें.

चवणेखोर—(ना.) मिजासी; पत्राजखोर.

चवदा——चवदा—चौदा पहा. चतुर्दश पहा.

चवली——चवलीचा मामला—शेळ्या मेंढ्यावरच्या कराच्या मामलतीचा मक्ता.

चवल्यापावल्या—१ कच्चींबच्चीं; पोरेंसोरें; मुलेंबाळें. २ किरकोळ सटरफटर वस्तु.

*** चवलीची कोंबडी, आणि पावली फळणावळ**—क्षुल्लक गोष्टीकरितां भलताच खर्च; कमी महत्त्वाच्या गोष्टीकरितां वाजवीपेक्षां अधिक खर्च येणें. तु०–अडक्याची भवानी व टक्याचा शेंदूर.

चवळी——चवळी पेरणें—गवगवा करणें; बभ्रा करणें; बोभाटा करणें; कंडी पिकविणें.

चंवळ्यो मारप—(गो.) बाता मारणें.

*** चवळ्या (चवळी) कहे मेरी लंबी फळी, जैसी खेळी चंपाकी कळी । जो मुझको छे महिने खाय, उसके फूल गंगाजी जाय ॥**—चवळी म्हणते माझी शेंग लांब असून चाफ्याच्या कळीसारखी असते. जो मला सहा महिने खाईल त्याचीं फुलें गंगेवर जातील (तो मृत्यु पावेल).

चवाठा——चवाठ्या-चवाठ्यावर आणणें–उघडकीस आणण; जाहीर करणें; गुप्त गोष्टीचा बोभाटा करणें. गौप्यस्फोट करणें; चारचौघांत मांडणें.

चष्मा——अमुक चष्म्यांतून पाहणें—(इंग्रजी वाक्प्रचारावरून). विशिष्ट दृष्टीनें पाहणें; प्रथमच एखाद्या गोष्टीबद्दलचं विशिष्ट मत बनवून त्या मतानुरोधानें एखाद्या गोष्टीचें अवलोकन करणें.–के १७-४-३०.

चसणेपुर——चसणेपुरास जाणें—[चळणें=चवणें; मरणें.] मरणें.

चहा——चहाचा काढा—काढ्याप्रमाणें केलेला. फार वेळ उकळत ठेवलेलेला चहा. असा चहा प्रकृतीला फार अपायकारक असतो.

चहाच्या गर्मीनें व्याकुळली—अतिशय नाजुक स्त्रीचा नाजुकपणा वर्णन करतांना म्हणतात. चहाच्या गर्मीनें व्याकुळली। दरखणास मेहेरपा। काम काय सफा। गंजिफा दुपारभर खेळलें।'–प्रला १११.२२९. तु०–लवंगेचें उष्ण व वेलदोड्याची थंडी.

चहाच्या पेल्यांतील वादळ—(इंग्रजी वाप्र.) लहानसा, क्षुल्लक वाद, तंटा. "परंतु 'चहाच्या पेल्यांतलें वादळ' जसें चहा थंड झाल्याबरोबर थांबतें त्याप्रमाणें भाऊरावांच्या गाण्याच्या एकदां कर्णमधुर लकेऱ्या सुरू झाल्या म्हणजे पत्रांतले वाद जागच्या जागीं राहून नाटकगृहांत लोकांच्या उड्यावर उड्या पडत असत."—भाऊराव कोल्हटकर चरित्र आ. २. पृ. ५५.

चहाड——चहाडखोर, गुलाम हरामखोर–चुगली सांगणारा मनुष्य लबाड व विश्वासघातकी असतो.

चहाडखोरा न आदरी, विंचवापरी दूर करी—वरप्रमाणेंच.

चहाडखोराचा इतबार करूं नये—चुगलखोरावर कधींहि विश्वास ठेवूं नये. त्याचा भरंवसा बाळगूं नये.

चहाडखोराचा संशय धर, विश्वासूं नको त्याजवर—चहाडखोरापासून नेहमीं सावध राहावें व त्याच्या भाषणावर विश्वास टाकूं नये.

चहाड दुष्टाचे भाते, ते फुंकती तंट्यातें—दुष्ट चुगलखोर मनुष्याला लोहाराची उपमा देतां येईल. ते भाते होत व ते फुंकून फुंकून अग्नीप्रमाणें कलह पेटवितात. Slanderers are the devil's bellows, to blow up contention.–सवि ३०६७.

चहाड दूर करणें, तंटा मिटणें—चुगलखोरांपासून जर दूर राहिलें तर पुष्कळसे तटे वांचतील.

चहाडास काय मिळालें, टोपल्यांत शेण मिळालें—चहाड मनुष्याला चहाडी करून प्रत्यक्ष कांहीं लाभ होत नाहीं. बहुधा ती उघडकीस येऊन शेवटीं त्याला शेणमार म्हणजे फजीतीचा वांटा मिळतो.

चहाडणें——वाढल्यापेक्षां चहाडलें गोड—कांहीं लोकांस अन्नापेक्षांहि परक्याच्या चहाड्या अधिक आवडतात.

चहाडी——चहाडी जित्या टोंची, मेल्या पाप घेती—चहाडखोर जिवंत माणसाला छळतातच पण मेलेल्यांनाहि कमी करीत नाहींत.–सवि ३०६६.

चहाडी सांगणाराहून ऐकणारा वाईट—चहाडी करणारा मनुष्य वाईटच पण त्याच्या चहाडीवर विश्वास ठेवून त्याप्रमाणें वागणारा अधिक वाईट.

चहाळ——चहाळ घेणें—(व.) कानोसा घेणें; चाहूल, आवाज, शब्द ऐकणें; लक्ष्यपूर्वक कान देऊन एखादा आवाज ऐकणें.

चहूं——चहूं पायांनीं-दोहों पायांनीं उतरणें—वासरूं, शिंगरूं वगैरे जन्मतांना दोन पाय किंवा चार पाय प्रथम बाहेर येणें.

चहूंवाचा-वाणी—परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी या चार वाणी. 'ते अनिर्वाच्या निजगोडी। चहूं वाचामाजीं वाढी।'–एभा १.२१.

❀ **चहूंकडून विघ्नें येतीं, हुशारीनें न टळतीं**—सर्व बाजूंनीं परिस्थिति मनुष्याच्याविरुद्ध जाऊं लागली म्हणजे त्याची अक्कल कितीहि असली तरी अगदीं चालेनाशी होते व मति गुंग होते. तु०–छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति।

चळ——चळ भरणें—वेड लागणें; भ्रम होणें. 'द्रव्याच्या शोकें करून कितिकाला भरला चळ।'–ऐगो ३८८.

चळणवळण——चळणवळणावरून, स्त्री येते ओळखून—कोणत्याहि स्त्रियेची योग्यता, किंवा नीतिमत्ता तिच्या बोलण्या. चालण्यावरून कळून येते.–सवि३१०.तु०–आकृतिरेव गुणावगुणान् कथयति।

चळणें——चळो कां पळो करणें—अगदीं त्रासून सोडणें; भयंकर त्रास देणें; सतावून सोडण;चळो कां पळो करणें.

चळवळ—चळवळ अंगीं आहे, ध्यान स्वस्थ न राहे--जो मनुष्य चळवळ्या स्वभावाचा असतो, त्याला कधीं स्वस्थ बसून चैन पडत नाहीं. He has a worm in his brain. -Scotch.-सवि १३६१.

चक्षुः——चक्षुर्वै सत्यम्—डोळ्यानें पाहिलेलें, तेंच प्रमाण, ऐकलेलें नाहीं. 'अशी मोरोपंतांची आतां मात्र "चक्षुर्वै सत्यं" खात्री झाली.'-छच ८३.

चाक——चाक आवळणें—चाकावर नवीन धांव बसवणें.

चाक बुडणें—सूर्य मावळणें.

चाक वर येणें—१ चाकाची खालची बाजू फिरून वर येणें. २ अवनतीमागून उन्नति होणें; निकृष्ट स्थितींतून निघून चांगले दिवस येणें. 'आपल्या राष्ट्ररूपी गाडीचें चाक आतां वर आलें पाहिजे.'-टिव्या. चक्रनेमिक्रम पहा.

❀ **चाकावांचुन गाडा, तसा द्रव्यावांचून मनुष्य**-ज्याप्रमाणें गाडा चाकावांचून चालणें अशक्य. त्याप्रमाणें मनुष्याला द्रव्याशिवाय कोणतीहि गोष्ट करतां येणें शक्य नसतें.

चाक——चाक काढणें—दृष्ट काढणें; मीठ मोहऱ्या उतरून टाकणें.

चाक——चाक करणें—कापणें; फाडणें. 'उभयतांचें पोट चाक करावें म्हणोन आज्ञा केली आहे.'-दिमरा २.८२.

चाकर——कोणाची होऊं नये बाईल आणि कोणाचा होऊं नये चाकर—बायको आणि चाकर हीं सदैव पारतंत्र्यांत असतात. तेव्हां प्रथम पाहिजे तर नीट विचार करावा पण एकदां विवाह केला किंवा चाकरी पतकरली म्हणजे पति अगर धनि जसें वागवील तसें वागलें पाहिजे; मग कुरकुर करून उपयोगी नाहीं.

चाकर खाय चुरमा, ठाकर खाय ठिकरी—चाकर चुरम्याचे लाडू खातो व मालक करपलेली भाकरी खातो. धनि कसेबसे दिवस काढतो व चाकर चैन करतो. तु०-धन्याला धत्तुरा आणि चाकराला मलीदा.

चाकर चाकराला भाई, बटीक बटिकीला समजावी—चाकर दासी यांचें परस्परांशीं लवकरच मेतकूट जमतें. समान दर्जाचीं व व्यवसायाचीं माणसें एकमेकाला उपयोगी पडतात. समानशीलव्यसनेषु सख्यम् ।

चाकराला चुकर आणि बटकीला नफर—[नफर= हलका नोकर] चाकराला पडचाकर, पहा.

चाकराला पडचाकर—आपण एखाद्याला काम सांगितलें असतां तो तें आणखी कोणाला तरी सांगून मोकळा होतो. याप्रमाणें टोलवाटोलवीच्या प्रकारास म्हणतात.

धन्याला धत्तूरा आणि चाकराला मलिदा—धनि जसें मिळेल तसें खाऊन निर्वाह करतो व चाकर चैनींत असतो. धनी आपल्या मालमत्तेचा बेतानें जपून उपभोग घेतो व बेतानें राहतो पण चाकराला त्याची पर्वा नसते. तो मिळेल तेथें हात मारीत असतो. 'न्याय असा जगतीं, चाकरा मलीदा मिळे धन्याला धत्तूरा हातीं।'-मेळ्याचीं पदें.

चाकरास आणि बायकोस उजूर नाहीं--चाकर व बायको यांनीं धन्यानें कोणतीहि गोष्ट करावयास सांगितली तरी कोणतीहि सबब सांगतां कामा नये. न कुरकुरतां काम केलें पाहिजे. तु०-कोणाचा होऊं नये चाकर कोणाची होऊं नये बायको.

चाकरास भितो, तो चाकराहून कमी दिसतो--जो पूर्णपणें चाकराच्या कह्यांत जातो त्याची किंमत चाकराइतकीहि राहात नाहीं. याकरितां चाकरास मर्यादेनें ठेवावें.

चाकराहून धनी अधिक सूचक--चाकरापेक्षां धन्याचें अधिक लक्ष असतें. चाकर काय सांगकाम्या व पगारी. One eye of the master sees more than four of the servants.-Italian.

चाकरी——चाकरी आणि भाकरी; चाकरी करावी आणि भाकरी मागावी; चाकरी करावी, भाकरी खावी; चाकरीखेरीज भाकरी नाहीं; चाकरी तोंवर भाकरी--श्रम केल्याशिवाय फल प्राप्त होत नाहीं. योग्य प्रकारें चाकरी बजावल्याशिवाय मुशाहिरा मिळणार नाहीं.

चाकरी करणें लागती, त्यांत इतरांची मर्जी मोडती--एकदां कोणाचीहि चाकरी पतकरली म्हणजे ती बजावतांना इतरांस नाखूष करण्याचा प्रसंग येतो व तो आला तरी डगमगतां कामा नये.

चाकरी कॅल्यार भाकरी मॅळत्--(गो.) चाकरी केली तर भाकरी मिळते.

चाकू——चाकू मारणें--१ चाकूनें भोकसणें. २ धान्याचा नमुना पाहण्यासाठीं पोत्यास चाकूनें भोंक पाडणें.

चाखणें——चाखत माखत जेवणें—चव घेत घेत, चिकित्सा करीत भूक नसतांना नाकाओठावर जेवणें.

चाखत माखत बोलणें—अडखळत थांबत थांबत बोलणें.

चाखून रांधणें--१ अगोदर चाखून पदार्थ तयार करणें. २ अगोदर अनुभव घेऊन करणें. म्हण पहा.

❀ **चाखलें नाहीं, पण देखलें तर असेल**—एखाद्या गोष्टीचा स्वतःला अनुभव नसला, तरी दुसऱ्या कोणाच्या अनुभवाची तरी माहिती असणें स्वाभाविक असते. प्रत्येक गोष्टीचा कांहीं स्वतःच अनुभव घेऊन पाहणें शक्य नसतें, पण डोळे उघडे ठेवून जगाकडे पाहात राहिलें तर दुसऱ्यांच्या अनुभवावरूनहि आपणांस पुष्कळ शिकतां येण्यासारखें असतें, त्याचा फायदा घ्यावा.

चाखी नाग्या, नागवला तुक्या--एकाची हानि व दुसऱ्याचा लाभ.

तळें राखील तो पाणी चाखील—ज्याच्या हातांत सत्ता, अधिकार असतो तो त्याचा उपयोग स्वतःच्या फायद्याकरितां थोडाफार तरी केल्याशिवाय राहात नाहीं, ही गोष्ट प्रत्येकानें समजूनच चाललें पाहिजे.

चुकीविषयीं कोणीं चाखून रांधलें नाहीं--कोणी स्वयंपाक करतांना झालेला पदार्थ चाखून पाहात नाहीं, तेव्हां एखाद्यावेळीं वाईट होणारच. कोणालाहि आपल्या हातून चुकी होणार नाहीं अशी खात्री बाळगतां येणार नाहीं.

चाखवत——चाखवताची भाजी खाल्लीस कां? (बायकी सांकेतिक) लगीन झालेल्या मुलीला 'तुझा नवऱ्याशीं संबंध घडला का?' म्हणून विचारण्याची माहेरकरांची पद्धति.

चांग——चांगा वचूनु आंगा गू--(गो.) चांगलें करायला जाऊन अंगाला मात्र गू लागायचा.

चांगभला——चांगभला करणें--उदोउदो या अर्थाचा चांगभला हा शब्द असून तो भैरवाचे भक्त उच्चारतात. नमस्काराचा वाचकहि हा शब्द आहे. १ जयजयकार करणें. २ प्रशंसा, स्तुति करणें.

चांगला——चांगला अभ्यास आणि शिकवण, ध्यानीं राहे पुर्तेपणीं--एखाद्या गोष्टीचा चांगला सराव झाला किंवा ती पूर्णपणें मनावर ठसली असली म्हणजे ती कधीं विसरत नाहीं.

चांगला उपदेश मान्य होतो, मूर्खास त्याचा राग येतो—आपल्या भल्याची गोष्ट कोणींहि सांगितली तरी ती ऐकून घेतली पाहिजे. पण मूर्ख मनुष्यास चांगली बुद्धि सांगितली असतां तो ती ऐकण्यापेक्षां उगाचच रागावून मग पस्तावतो.

चांगला काळ झाला, तो संसारीं निभावला--ज्याचा शेवट गोड होतो त्यानेंच या जगांत चांगला संसार केला असें समजावें. तु०–शेवट गोड तें सर्व गोड.

चांगला घालीव दिवस, रात्रीं होईल उल्हास—दिवस चांगला गेला म्हणजे रात्र निश्चिंतपणें व उल्हासांत जाते. दिवस जर चांगला गेला नाहीं तर रात्रीं काळजी, चुटपूट लागते व नीट विश्रांति मिळत नाहीं. Spend the day well, and you will rejoice at night. –सवि ३१२२.

चांगला दाता, लागला हाता—एखादा चांगला आश्रयदाता मिळणें; एखाद्या समृद्ध मनुष्याशीं स्नेह, व्यवहार वगैरे घडून येणें; मोठा लाभ होणें.

चांगला दिसतो वरवर, वाईट असून अंतरीं—कांहीं मनुष्यें वरून चांगलीं दिसतात पण अंतरंगांत दुष्ट असतात. तु०–मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम् ।

चांगला माल लौकर खपतो–चांगल्या वस्तूला नेहमीं खूप मागणी असते.

चांगला वागे संसारीं, त्यास जरा नये लौकर--जो आपला सर्व आयुष्यक्रम व्यवस्थित रीतीनें घालवितो त्याला अकालवृद्धत्व येत नाहीं. त्याला फारशी काळजी करावी लागत नसल्यानें त्याची प्रकृति चांगली राहते.

चांगला विचार असावा, तर म्हाताऱ्यास पुसावा—आपल्याला जर चांगला सल्ला पाहिजे असेल तर जे वृद्ध अनुभविक लोक असतील त्यांचेकडे जावें. अनुभवावांचून ज्ञान नाहीं. If you wish good advice, consult an old man. –Portuguese. –सवि १८४४.

चांगला समागम, तो जाणा उत्तम–सत्संगति ही नेहमीं चांगली असते. (अ) सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानीं पडो । –केका. (आ) सतां सद्भिः संगः कथमपि हि पुण्येन भवति ।–उत्तरराम. (इ) सतां हि संगः सकलं प्रसूते । (ई) संगःसतां किमुत मंगलमातनोति ।

चांगला संसार असावा, तर सौदा उधार न घ्यावा--संसार नीटपणीं व्यवस्थितपणें पाहिजे असेल तर उधार माल आणण्याची संवय ठेवूं नये; तीमुळें तर खर्चास निर्बंध राहात नाहीं.

चांगला स्वभाव चतुराईवीण, दिसतो अज्ञान दशेप्रमाण--मनुष्य सुस्वभावी असेल पण, हुशार नसेल, पुरेसा धूर्त नसेल, तर त्याच्या पदरांत अडाणीपणा आल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणजे त्याला लोक फसविल्यावांचून राहणार नाहींत.

चांगली असतां संगत, जीव राहे सदा शांत—

सज्जनांचा सहवास केल्यास आपली वृत्ति नेहमीं शांत असते. कधीं उद्वेग येण्याचें कारण पडत नाहीं.

चांगली ऐकतां खबर, रक्त वाढे शेरभर--चांगली वार्ता कानीं पडल्याबरोबर मूठभर मांस वाढल्यासारखें वाटतें; एकदम उल्हसित वृत्ति होते. Good news sweetens the blood.

चांगली कीर्ति उपार्जित, द्रव्याहून वाटे पसंत--द्रव्य मिळविण्यापेक्षां सत्कीर्ति मिळविणें हें अधिक श्रेयस्कर आहे. कारण द्रव्य हें नाशवंत आहे पण कीर्ति अमर आहे. तु०--सूरतसे कीरत बडी बिनपंख उड जाय। सूरत तो जाती रहे कीरत कबहुं न जाय॥

चांगलीं कृत्यें करीं, होतीं यज्ञापरी--सत्कृत्यें हीं यज्ञ करण्याइतकींच पुण्याईचीं असतात; तेव्हां तीं करावींत.

चांगली बायको जनाची (जगाची) वकटी बायको मनाची--बायको चांगली असेल तर ती लोकांना आवडते व वाईट असेल तर आपण आवडून घ्यावी लागते. सुंदर बायको असेल तर तावर इतर लोक प्रेम करण्याचा व डोळा ठेवण्याचा संभव असतो; पण तीच जर कुरूप असेल तर तिच्याकडे दुसरा कोणी पाहणार नाहीं; मात्र आपण तिला गोड करून घेतली पाहिजे. तु०--घर सांकड बाईल माकड.

चांगली मसलत कोणाचीहि घ्यावी--चांगला सल्ला कोणीहि दिला तरी ऐकावा. तु०--बालादपि सुभाषितं ग्राह्यम्.

चांगली मस्करी, आवडते बरी--थट्टासुद्धां योग्य मर्यादेंत असेल तर तीपासून मनाला आनंद होतो.

चांगली वाचाशक्ति, देहाच्या खोडी झांकिती--मनुष्याची वाणी जर गोड असेल तर त्याला अनेक वैगुण्यें झांकता येतात. गोड बोलून आपलीं पुष्कळ कामें करून घेतां येतात. तु०--वाण्येका समलंकरोति पुरुषं या संस्कृता धार्यते। क्षीयते खलु भूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम्। Mental gifts often hide bodily defects. याचा अनुवाद.--सवि २३३६.

चांगली शिकवण, अज्ञाप्रमाण--योग्य शिक्षण हे अज्ञाइतकेंच आवश्यक असतें.

चांगली संगत चांगल्या संबधी जडविते--सत्संगतीपासून आयुष्यास चांगलें वळण लागतें. चांगला समागम पहा.

चांगलें आचरण, राज्य सुखासमान--मनुष्यानें चांगली वर्तणूक ठेवली तर त्याला राज्य करण्याइतका आनंद होतो.

चांगले आचरणावीण, ज्ञान तेंची हीण--मनुष्य पुष्कळ विद्वान् असला पण जर तो कुवर्तनी असला तर त्याच्या विद्वत्तेचा काय उपयोग? त्याच्या विद्वत्तेस त्याच्या दुर्वर्तनानें कमीपणा येतो.

चांगले उपदेश नाहीं मोल, जसा हिरा तो अमोल--सदुपदेश हा हिऱ्यासारखा मौल्यवान् असतो.

चांगलें करण्या भिऊं नका, वाईट करतां धरा शंका--कोणतीहि चांगली गोष्ट करावयाची असेल तर ती धैर्यानें करा. ती करतांना डगमगू नका पण वाईट गोष्ट करतांना मात्र नीट विचार करा.

चांगले करण्याला दोन पिढ्या, आणि वाईट करण्याला तीन पिढ्या--चांगल्या कृत्याचीं फळें फार तर दोन पिढ्यास भोगावयास सांपडतात. पण वाईट कृत्यांचीं फळें मात्र तीन पिढ्यास भोगावीं लागतात. लोक तीं लवकर विसरत नाहींत व तीं निस्तरण्यास दीर्घ काळ लागतो.

चांगलें करी, अशी सोय धरी--आपल्या हातून कांहीं तरी सत्कृत्य होईल अशा तजविजींत नेहमीं असावें.

चांगलें करी, त्याचें भय न धरी--सत्कृत्यापासून कोणासहि भय उत्पन्न होत नाहीं. सत्कृत्य करण्यास केव्हांहि डरूं नये.

चांगलें करी त्याला कोण बोल--सत्कृत्य करणारास कोणी नांवें ठेवीत नाहीं.

चांगले करीं देणेंघेणें, त्याचा नलगे जामीन घेणें--सज्जनाजवळ व्यवहार करीत असतां तिऱ्हाईत जामिनाची कांहीं जरूर नसते.

चांगले कर्मानें थोडा पैका, कुमार्गीं बहु देखा--सरळ वागणूक करीत गेलें असतां द्रव्याची प्राप्ति थोडी होते; वांकडा मार्ग आचरीत असतां अधिक धनप्राप्ति होण्याचा संभव असतो. सरळमार्गापेक्षां आडमार्गानें पैसा मिळविणारेच लोक फार दिसतात. तु०--कारकुनास (गृहस्थास) अवदान, भटास कुदान.

चांगलें काम येतां हातीं, हातापाया हुषारी येती--मनुष्याला एखादें सत्कृत्य करीत असतां दुप्पट बळ चढतें, मनास उल्हास वाटतो. दुष्कृत्य करीत असतां मन खात असतें. यामुळें मनांत उत्साह नसतो व हातापायास शक्ति वाटत नाहीं.

चांगलें केल्याचें स्मरण, गोड लागे मनीं--आपण केलेल्या सत्कृत्याची स्मृति नेहमीं आनंददायक असते.

चांगलं खातो पितो, तो काम चांगलें करतो--

ज्याचें खाणेंपिणें सकस, नियमित व आरोग्यकारक असतें, तो सुदृढ व निरोगी असल्यामुळें त्याच्या हातून चांगलें काम होतें.

चांगले गायीचें वेत, नाहीं चांगलें होत––गाय चांगली असली तरी तिची प्रजा चांगली होतेच असें नाहीं पुष्कळदां आपणांस चांगल्या मातेच्या पोटीं कुपुत्र झाल्याचें आढळतें. तु०–तुळशी पोटीं भांग. बाप कल्पवृक्ष, आई हळदओंडा, पोटीं पुत्र जन्मला तो काळतोंडा.–बिव्वा.

चांगले ग्रंथ सुशोभित, नव्हे त्याला मोल मिती–– उत्तम ग्रंथाची किंमत करतां येत नाहीं इतके ते मौल्यवान् असतात. [मूळ सवि. मधील म्हण ' चांगले ग्रंथ सुसंगती, नव्हे त्याची मोलमिती ' अशी असून Good books and good company are equally scare valuable याचा अनुवाद आहे. पण तारळेकर–देशपांडे संग्रहांत वरील चुकीनें उद्धृत केली आहे.]

चांगलें जग, हेंच जगाचें कल्याण––सज्जनांपासूनच जगाचें कल्याण होतें. तु०– जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ।–तुगा. Good men are a public good. –सवि १२२८.

चांगलें जें करणें, त्यास न कंटाळणें––सत्कृत्याचा कंटाळा कधीं करूं नये. न्याय्य मार्ग सोडून कधीं जाऊं नये. तु०–न्याय्यात् पथात् प्रविचलंति पदं न धीराः ।

चांगले थटेचा बकवा, जसा मेंढराचा चावा–– थट्टा चांगल्या प्रकारें व सरळ मनानें केली तर तिचा राग येत नाहीं. ती हृदयास बोंचत नाहीं. Good jests bite like lambs, not like dogs.–सवि १२२३.

चांगलें झालें तर सर्वांचें, वाईट झालें तर एकाचें––एखादी गोष्ट नीट झाली म्हणजे तिचें श्रेय घेण्यास पुष्कळ लोक पुढें येतात; पण जर बिघडली तर जो तो ती अंगाबाहेर टाकून जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करतो.

चांगलें थटेचें भाषण, वाईट नाहीं कठीण––वरील-प्रमाणेंच. योग्य मर्यादेंत थट्टामस्करी, विनोद केल्यास कोणास राग येत नाहीं. उलट आनंदच होतो; पण मर्यादेबाहेर गेल्यास मात्र राग येतो.

चांगले नरा राग येतो, क्षणमात्रें दूर होतो––सज्जन मनुष्य जरी क्रोधवश झाला तरी त्याचा राग क्षणिक असतो. तो लागलाच विवेक करून आपला राग आवरतो.

चांगले प्रकारच्या रीती, वाईट संगतीनें बिघडती– मुलाला चांगलें वळण लावलेलें असलें तरी जर त्याला वाईट संगती लागली, तर त्याची वागणूक बिघडण्याचा संभव असतो. तु –संगतीसंगदोषेण०

चांगले पुस्तकापरी, संग रम्य न भूवरी––चांगल्या पुस्तकाच्या सहवासाइतकें रमणीय पृथ्वीवर दुसरें कांहीं नाहीं. काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ।

चांगलें प्रमाण ठकास मानवत नाहीं––लबाड मनुष्यास त्याच्या लबाडीचा भक्कम पुरावा त्याच्या गळ्यांत घातला असतां राग येतो.

चांगलें फळ नासलेल्या फळाच्या संगतीनें नासतें–राशींत एक फळ नासलेलें असलें तर सर्व फळें नासून जातात. आढींतील कुजका अंबा सर्व आढीचा नाश करतो. कुसंगतीनें सज्जनहि बिघडतो.

चांगलें सनन, तेंच भाषणाचें जनन––विचारपूर्वक बोललें असतां तें भाषण योग्य असतें. याकरितां बोलण्यापूर्वी नीट विचार करून बोलावें.

चांगले मालास जाहिरात न लागे––माल चांगला असेल तर त्याला मागणी पुष्कळ असते; तो विकण्यास जाहिरात करावी लागत नाहीं. Good wine needs no bush.–Italian.

चांगलें म्हणावें मित्राचें, कांहीं न बोलावें शत्रूचें–– आपल्या मित्राची वाखाणणी करावी, पण शत्रूच्या बाबतींत कांहीं बोलूं नये, मौन स्वीकारावें. ज्याच्याबद्दल चांगलें बोलतां येईल, त्याबद्दलच भाषण करावें, वाईट कोणाबद्दल बोलूं नये.

चांगले वस्त्रानें जातो, त्यास मान मिळतो––आपण जर व्यवस्थित कपडे वगैरे करून कोठेंहि गेलों तर लोक आपला आदर करून या, बसा असें म्हणतील. तच जर गबाळपणें, अस्वच्छ व अव्यवस्थित कपडे घालून कोणाकडे गेलों तर लोक जवळ उभेहि करणार नाहींत. तु०–(हिं.)एकनूर आदमी दसनूर कपडा. (सं.) किं वाससा तत्र विचारणीयं, वासः प्रधानं खलु योग्यतायाः । पीतांबरं वीक्ष्य ददौ स्वकन्यां चर्मांबरं वीक्ष्य विषं समुद्रः ॥–सुर १७४.८८८. Good clothes open all doors.

चांगलें विद्येचें संपादन, हेंच सुखाचें साधन–– आपणांस सुखाची प्राप्ति करून घ्यावयाची असेल, तर प्रथम चांगली विद्या संपादन केली पाहिजे. विद्येनेंच संपत्ति व संपत्तीनेंच सुख मिळतें.

चांगलें सर्वांस पाहिजे–चांगली गोष्ट सर्वांसच आवडते.

चांगल्या कामाला उशीर नको--कोणतेंहि सत्कृत्य करावयाचें असल्यास, त्या कामीं दिरंगाई लावूं नये. शुभस्य शीघ्रम् । या संस्कृत सुभाषिताचें भाषांतर.

चांगल्या कृत्यांना आशीर्वाद मिळतात—आपण जर सत्कृत्यें केलीं तर लोक आपणांस दुवा देतात.

चांगल्या मनुष्यास पुत्र, होती वाईट विचित्र--आपणांस जगामध्यें सज्जन पितरांच्या पोटींहि दुष्ट पुत्र उत्पन्न झाल्याचें आढळून येतें. उदा०-तुळशीपोटीं भांग. सूर्यापोटीं शनैश्वर.

चांगल्या शरीरास खाजवून अवधाणें—खाजवून खरूज काढणें; आपण होऊन विघ्न उपस्थित करणें. निरोप्याबद्दल म्हणतात.

चांगी——चांगीचुंगी निरोप सांगी--(कों.) नुसत्या निरोप्या, सांगकाम्या माणसाबद्दल म्हणतात.

चाचरी——चांचरी चाचरी जेवणें—रेंगाळत, नखरे करीत, चोखंदळपणानें जेवणें.

चाटणें——चाटलें आणि वाटलेंसें होणें—सुखाच्या थोड्या सेवनाबद्दल सर्व शिक्षा अथवा प्रायश्चित्तें भोगणें अल्प कृतीनेंहि दोषांचा वांटा येतो. निमित्ताला कारण होणें.

चाटून पुसून खाणें—सर्व साफ खाऊन टाकणें; फन्ना उडविणें; सर्व चट्टामट्टा करणें.

चाटून पुसून जेवणें—१ पानांत कांहीं न टाकणें; पान स्वच्छ करणें. २ उदासीनपणें, चव न घेतां जेवणें; कसेंबसें जेवणें; जेवलें न जेवल्यासारखें करणें.

चाटून पुसून नेणें—सपशेल लुटणें; साफ धुऊन नेणें; सर्वस्वीं नागविणें.

चाटू——चाटूचा पऱ्या करणें—(ना.) उधळपट्टी करणें; उडविणें.

चाड——चाड धरणें—पर्वा ठेवणें; किंमत असणें; मान राखणें. ' वदला असेलचि, धरुनि तेजाची चाड, बा ! परे तरणी ॥ '–मो द्रोण २३.६०.

चाडीस अडणें—लोभास गुंतणें. ' तये चाडीस अडलें अज्ञान तें पैं ॥ '–सिसं ४.१५७.

❀ **रोग्यासी कुपथ्याची चाड**—रोग्याला नेहमीं वर्ज्य पदार्थच खावेसे वाटतात. रोगी मनुष्याला जें खावयास नको म्हणून सांगितलें असेल तेंच खावेंसें वाटतें. ' अपथ्य रुचि-रुग्ण तो कटुक ओखदें कोण पी ॥ ' –मोकेका.

ज्याची लागे चाड, तो उडे ताड माड—ज्याचें लोक ही फार अगत्य ठेवतात तो आपल्याच तोऱ्यांत असतो. आपणास एखाद्या मनुष्याची विशेष जरूर लागली म्हणजे त्याला फार मान चढतो. ज्याची विशेष आवश्यकता वाटेल त्याला फार अभिमान, ताठा येतो. गरजेनें किंमत वाढते.

चांडाल——चांडाळचौकडी--चंडाल पहा.

❀ **चांडाळचौकडी आणि धश्चोट अध्यक्ष**—बदमाष लोकांचा पुढारीहि पक्का बदमाषच असतो.

चाडें——चाड्यावर मूठ धरणें; चाडेंमूठ धरणें—हंगामाच्या आरंभीं क्षेत्र पेरण्यास आरंभ करणें; यावरून कोणत्याहि कार्यास आरंभ करणें.

चाणक्य—[एक विद्वान् राजकारस्थानी ब्राह्मण. हा अतिशय करारी, तेजस्वी व मुत्सद्दी असून यानें मगधदेशच्या नंद राजघराण्याचा निःपात करून चंद्रगुप्त मौर्याला गादी मिळवून दिली. यानें राज्यनीतीवर " अर्थशास्त्र " नांवाचा एक अप्रतिम ग्रंथ रचला. याचें दुसरें नांव कौटिल्य.] अतिशय बुद्धिमान्, पाताळयंत्री, कारस्थानी माणूस.

चाणाक्ष——चाणाक्ष घोड्याला, चालक पाहिजे भला—चलाख घोडा चालविण्याकरितां स्वारहि कुशल पाहिजे. योग्य मनुष्याच्या हातीं चांगली गोष्ट पडली तरच तिचा उपयोग होतो, नाहींतर ती व्यर्थ जाते.

चातुर्य——चातुर्यानें चातुर्य उमटे, अग्नीनें अग्नि पेटे—ज्याप्रमाणें अग्नीनें आग वाढत जाते, त्याप्रमाणें बुद्धि जशी चालवावी तशी तशी ती तीक्ष्ण होत जाते. प्रज्वालितो दीप इव प्रदीपात् । Wit catches of wit as fire of fire.

चांद——चांद बांधणें—भिंतीस पाऊस लागूं नये म्हणून आडोसा बांधणें; छपऱ्या बांधणें.

चांद——चांदाची वृद्धि असणें—शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें वाढणें; उत्कर्ष होणें; भरभराट होणें; ऊर्जितावस्थेस जाणें; वैभवाची वृद्धि होणें. ' चांदाची वृद्धि असो नांदा सानंद सानुगस्वस्थ । '–मोआदि ३५.७७.

चांदोबा दाखविणें—(एखाद्यास उताणा पाडून त्याच्या) कानशिलांत मारणें; थोबाडींत देणें.

❀ **चांद खपत नाहीं, काळोखहि खपत नाहीं; चांदणेंहि खपत नाहीं, काळोखहि खपत नाहीं**—कोणतीच बरी-वाईट गोष्ट ज्यास आवडत नाहीं अशा मनुष्याबद्दल म्हणतात.

चांदोबा चांदणी, पाटाची राणी--पाटाची बायको चांदोबास चांदणीप्रमाणें शोभादायक असते. दुसरी

बायको ही बहुधा अधिक नखरेबाज असते व ती अधिक आवडती असते अशी समजूत आहे. तीस अनुलक्षून ही म्हण वापरतात.

चांदण——चांदण अंधारें; चांदणी अंधारें— रातांधळें;दिवसां दिसत असून रात्रीं दिसत नाहीं अशी अवस्था.

चांदणी——चांदणी तरारणें—भीति, राग, क्षुधा वगैरेमुळें कावरीबावरी मुद्रा होणें; मनास उद्वेग वाटल्यामुळें डोळ्यांत एकप्रकारची चमक मारणें.

चांदणें——चोराच्या मनांत चांदणें—चोर पहा.

***चांदणें चोराला, ऊन घुबडाला**—ज्याप्रमाणें चोराला चांदणें रुचत नाहीं, तसें घुबडाला ऊन (दिवस) चालत नाहीं. चांगली गोष्टहि दुर्जनांस वर्ज्य वाटते. (अ) लुब्धानां याचकः शत्रुश्चोराणां चंद्रमा रिपुः। जारस्त्रीणां पतिः शत्रु मूर्खाणां बोधको रिपुः ॥-सुर. १५६.१५७. (आ) इंदुं निंदति तस्करो गृहपतिं जारो सुशीलं खलः।-सुर१७९.१०३६.

चांदण्यांत निजती आणि माडीची हवा पाहती— १ चांदण्यामध्यें उघड्यावर निजल्यावर माडीप्रमाणें आडोसा वगैरे कसा मिळणार. सर्वच गोष्टी आपल्या मनाप्रमाणें होऊं शकत नाहींत; कांहीं सोयी तर कांहीं गैरसोयी असणारच. मागें पहा. २ दरिद्री माणूस घर नसल्यानें उघड्यावर निजून मजल्याच्या हवेलीची आशा बाळगतो तेव्हां ही म्हण योजतात

चांदभाई——इसमें मेरा चांदभाई; बीचमें मेरा चांदभाई—आपलेंच घोडें पुढें दामटणें. भलत्याच गोष्टींत लुडबुड करणाऱ्याबद्दल म्हणतात. [दोघी बाया आपापल्या मुलाच्या हुशारीबद्दल बोलत असतां मध्येंच तिसरी बाई माझा चांदभाई असा आहे, तसा आहे, असे वारंवार सांगे. यावरून]-टिले १८३.

चांदरात——चांदरात झडणें-फुटणें—ज्या रात्रीं प्रथम चंद्रदर्शन होतें त्या रात्रीपासून मुसलमानी महिन्यास प्रारंभ होतो व त्या रात्रीं नोकरचाकर लोकांस पगार मिळतो; यावरून द्रव्यप्राप्ति होणें; खूप पैसा मिळणें; चैन होणें; चैनीचा दिवस उगवणें. 'अहा दारूबाजी। झडे चांदरात रोजीं ॥'-दारूचें पद. 'प्रसिद्ध गोपाळराव दाते हे सुमेर-सिंगाचें काम करतील' हीं जाहिरातीवर अक्षरें फडकलीं कीं, नाटक मंडळ्यांची चांदरात झडावयाची असा कित्येक दिवस प्रकार होत होता.'-महाराष्ट्र नाट्यकलेचा इतिहास ४८.

चांदी——चांदी आटणें—ज्याप्रमाणें चांदी आटली म्हणजे वितळून पातळ होते त्याप्रमाणें संकट ओढवणें; जिवावर बेतणें. 'कटकटींत सांपडलों तर चांदी आटल्याशिवाय राहायची नाहीं.'—तोबं १५८.

चांदी आटविणें—खरपूस समाचार घेणें; रग जिरविणें; खूप मार देणें; यथेच्छ झोडपणें.

चांदी उडणें—१ नाश होणें; अतोनात त्रास होणें 'परमुलुखांतील लोकांकरितां आमची चांदी आणखी किती दिवस उडणार.........'-टि.१.६३. २ त्रेधा उडणें; तारांबळ होणें. 'अलीकडे माझ्या पाठीमागें असे लोक लागले आहेत कीं त्यांच्यामुळें माझी चांदीच उडत आहे.' --विकारविलसित.

चांदी करणें—नाश करणें; खाक करणें; जाळून टाकणें.

चांदीचा चमचा चोखत जगांत प्रवेश करणें— श्रीमंत लोकांत मुलास दूध पाजण्यास चांदीचा चमचा अथवा बोंडलें वापरतात. यावरून श्रीमंतींत जन्मास येणें; वैभवसंपन्न अवस्थेंत जन्म मिळणें. 'चांदीचा चमचा चोखत जगांत प्रवेश करणाऱ्या राजेरजवाड्यांनीं सोनुशेटला मागणी घातली.'-सासे. पाआमा. पुणें ३. To be born with a silver spoon in mouth या इंग्रजी वाप्र. चें भाषांतर.

***तांब्याशिवाय चांदी नाद धरीत नाहीं**—चांदीला नाद असला तर तींत तांबें आहे असें समजावें. नुसत्या चांदीला तितका नाद नसतो, तींत तांबें मिसळलें असतां तिचा नाद अधिक कर्ण मधुर लागतो. यावरून थोडासा हीन अंशहि चांगल्या गोष्टीस पुष्कळदां शोभादायक अगर अधिक फलदायक होतो. उदाहरणार्थ, सुंदर गौर मुखावर काजळाचें गालबोट किंवा तीट त्याची शोभा वाढविते. चंद्राला कलंक त्याची शोभा वाढवितो याप्रमाणें.-गांगा१५५.

चांदीकी मेख और तमासा देख—चांदीची मेख मारली असतां चमत्कार घडून येतो. द्रव्यानें कोणीहि वश होतो. मनुष्यानें पैसा खर्च करावयाचें ठरविलें म्हणजे त्याला वाटेल त्याला वश करून घेतां येतें व वाटेल तें कार्य घडवून आणतां येतें. द्रव्येण सर्वे वशाः।

चांदीचा जोडा लोखंडास नरम करतो—चांदी (पैसा) लोखंडास (कठोर माणसाला) मऊ आणते. पैशानें कठीण-कडक माणूसहि वश होत असतो.

चाप——चाप लावणें—छळ करणें; त्रास देणें; गांजणें; हाल करणें.

चाप——चाप लावणें—(क.) रचून ठेवणें; ढीग करणें.

चाप——**चाप झाडणें**—बंदूक; पिस्तुल इ. उडविणें.

चापट——**चापट-ड पोळी देणें**—बुक्कालाडू प्रमाणे गोल व चापट ही पोळीप्रमाणें सपाट असते. म्हणून चापटीनें मारण्यास चापटपोळ्या म्हणतात. थपडा मारणें; चापट्या मारणें. धम्मकलाडू पहा.

चाबचें——**चाबचें गिळच्या आशेनें न्हंहिवे?**—(गो.) चावणें हें मिळण्याच्या आशेनें नव्हे का?

चाबचें दांत एक, हासचे आनेक—(गो.) खायचे आणि हंसायचे दांत वेगळे असतात.

चाबिले चाबडावंचें—(गो.) चावलेलेंच चघळायचें.

चाबूक——**चाबूक ओढणें**—चाबूक मारणें; फटका लागावणें; चाबकाचा फटकारा मारणें.

***चाबूक खंबिरा, तर तेजी चाले झरारा**—चाबकाचे फटके मारले म्हणजे घोडा भरधांव चालतो. कडक वागल्याशिवाय चांगलें काम करून घेतां येत नाहीं. वास्तविक राउत खरमरा तर तेजी चाले झरझरा, असा पाठ आहे. राऊत पहा.

चाबूक लगामाविना, घोडा न होय नीट जाणा—चाबूक आणि लगाम यांशिवाय घोडा नीट ताब्यांत राहात नाहीं. योग्य निर्बंध व जरूर ती शिक्षा दिल्याशिवाय मुलें किंवा हाताखालील लोक नीट वागत नाहींत.

चांभार——**चांभार चतुराई-चौकशी**—चांभाराची दृष्टि नेहमीं जाणाऱ्या येणाऱ्याच्या पायांतील पादत्राणांकडे असून तो नेहमीं त्यास एखादें ठिगळ लावावयाचें आहे काय? किंवा टांका घालावयाचा आहे काय? निदान एखादा खिळा मारावयाचा आहे काय? किंवा अलीकडे पॉलिश करावयाचें आहे असें विचारीत असतो. यावरून १ कशोशीनें, सूक्ष्मदृष्टीनें केलेली परीक्षा; अतिशय घासाघीस. २ नसती उठाठेव, पंचाईत; विनाकारण चौकशी. अर्थाअर्थी कांहीं संबंध नसतां कांहींतरी प्रश्न विचारणें. ३ भुरळ पाडणारें भाषण; घमट गुळवणी. ४ मध्येंच केलेली लुडबुड; विनाकारण केलेले प्रश्न; मध्येंच तोंड घालणें.

चांभारचालवणी—चांभारास नवीन जोडा करावयास सांगितला, किंवा एखादा दुरुस्त करावयास दिला असतां तो सांगितल्या वेळेवर कधींहि तयार करीत नाहीं व उद्यां या, चार दिवसांनीं या, अशाप्रकारें नेहमीं वायदे करून चालवण्या दाखवीत असतो; यावरून. टोलवाटोलव; दिरंगाई; प्रत्येक गोष्ट पुढें ढकलणें; वायदे करणें. विशेषतः पूर्वीं जेव्हां चांभार बलुतेदार म्हणून वर्षाकांठीं मोसमांत धान्य घेऊन पावसाळ्या आरंभीं सर्वांस जुतीं पुरवीत असे, त्यावेळीं एकाच वेळीं सर्वांस पायतणें पुरविणें त्यास अशक्य होत असल्यामुळें त्यास नेहमीं वायदे करून वेळ मारून न्यावी लागत असावी. अलीकडे पुष्कळसे कपडे शिवणारेहि असेच वायदे करीत असतात.

***चांभारां देवाक होणां पूजा**—(गो.) चांभाराच्या देवाला खेटरांची पूजा.

चांभाराचा जोडा फाटका—चांभार स्वतः जोडे करतो पण ते सर्व त्यास शक्यतों विकावयाचे असतात. त्यामुळें त्याला स्वतःला चांगला धड जोडा वापरावयास उरतच नाहीं. जो माल करतो त्याच्या घरांत त्या मालाची उणीव दिसून येते. कारण तो विकून पैसे करण्याकडे त्याचें सारें लक्ष असतें. तु०-कुंभाराक मडकें धड ना. The shoemaker's wife and the smith's mare are always worst shod.

चांभाराची उडी, जोडयाच्या सांच्याएवढी—प्रत्येक मनुष्य आपल्या मगदुराप्रमाणेंच गोष्टी बोलूं किंवा करूं शकतो. The cobbler should stick to his last याचा अनुवाद.-सवि ३२८०

चांभाराची नजर जोडयावर (पायांकडे)—चांभाराचें काम नेहमीं जोड्याशीं असल्यामुळें तो स्वाभाविकपणें प्रथम कोणाहि व्यक्तीच्या तोंडाकडे पाहण्यापेक्षां जोड्याकडेच पाहतो.

चांभाराची रंडी, सदां पायीं उघडी—चांभार जरी स्वतः जोडे करतो तरी ते विकण्याकडे त्याचें लक्ष्य अधिक असतें व जो जो जोडा होईल तो तो विकून टिकतो. त्यामुळें त्याला स्वतःला किंवा त्याच्या बायकोला वगैरे घालावयास त्याजजवळ जोडाच शिल्लक नसतो. 'चांभाराचा जोडा फाटका' पहा.

चांभाराचें मत जोडयाच्या साच्यापुरतें चालतें—चांभाराला फक्त जोडे करण्याइतकेंच ज्ञान असतें. त्यामुळें त्याचा सल्ला फक्त त्याच कामात घेण्याच्या उपयोगी असतो. इतर बाबतींत त्याच्या ज्ञानाचा कांहीं उपयोग नाहीं.

चाम्हाराचो आंड कसो भोंवता—(गो.) चांभार काम करतां करतां जसा आपल्याभोंवतीं फिरतो तसा त्याचा अंडहि त्याजबरोबर फिरतो. यावरून रिकामकें भटकणाऱ्यास चांभाराच्या अंडाप्रमाणें तो फिरतो आहे असें म्हणतात. दुसऱ्याच्या अनुषंगानें त्याच्या तंत्रानें काम करण्याकरितां फिरावें लागणें.

चांभाराच्या ढुंगणाखालीं अरी, सारा गांव शोधी— अरी हें चांभारकामाचें छिद्र पाडण्याचें एक हत्यार आहे. तें अनेक वेळां जवळच असून त्यास सांपडत नाहीं व तो इकडे तिकडे शोधीत असतो. त्याप्रमाणें आपली वस्तु स्वतः-जवळच असून ती हरवली असें समजून सर्व गांव धुंडाळा-वयाचा. कांखेंत कळसा आणि गांवाला वळसा. पाठभेद— ढुंगणाखालीं (मांडीखालीं) अरी, चांभार पोर मारी.

चांभाराच्या देवाला खेटरांची पूजा—ज्याचा जो उद्योगधंदा, त्याच्याच मालाचा उपहार तो देवाला नेणार. चांभार देवाला काय वाहणार तर त्यानें स्वतः मेहनतीनें तयार केलेले जोडे. तेव्हां साहजिकच त्याच्या देवाची पूजा खेटरांनींच होणार. विपरीत लक्षणेनें, जोडयानें मारणें, भोस-डणें, खरडपट्टी काटणें असा अर्थ. जशास तसें.

चांभारालो आंड अळयेर यना फळयेर यना—(गो.) एखादी व्यक्ति धड इकडेहि नाहीं धड तिकडेहि नाहीं अशी असणें.

चाम——चामाचे दाम चालविणें—चामडयाच्या तुकडयावर राजाचा शिक्का बसला म्हणजे तो नाण्याप्रमाणें चालतो. यावरून अधिकाराच्या जोरावर कातडीं नाणें सुरू करणें. वाटेल तसें करणें. सत्तेनें कोणतीहि गोष्ट घडवून आणणें; पक्षीं सत्तेचा दुरुपयोग करणें. ' राजा करी तैसे दाम । चाम तेहि चालती ।'—तुगा ३६६०.

॥एक आण्याचे तीस दाम,एक दामाचे तीस चाम— [चाम = कातडयाचा तुकडा, नाण्यांप्रमाणें प्रचारांत अस-लेला.] अगदीं क्षुल्लक गोष्ट. पूर्वी चामडयाचे तुकडे नाण्यां प्रमाणें चालत. त्यांची किंमत अगदीं अल्प असे. अगदीं लहान लहान भाग. क्षुद्रपणा दाखविण्यासाठीं योजतात.

चामठा——चामठा नदींत उतरणें—पावसाळ अखे-रीस ज्या खेंकडयांचा रंग काळा होतो त्यांना ' चामठा ' म्हणतात. यावरून चामठा नदींत उतरणें म्हणजे पावसाळा संपणें असा कोंकणांत शेतकरी लोकांत समज आहे. पाव-साळा चालू असेपर्यंत खेंकडे शेतांत राहतात; पण शेतांतील पाणी आटून जातें; याकरितां त्यांस नदीचा आश्रय करावा लागतो.—खेळगडी, जुलै १९३९. पान ८.

चामडी——चामडी रंगविणें—(व.) १ कातडें कमावणें; कातडयास रंग देणें. २ मारणें; झोडपणें; अंग काळेंनिळें पडेल इतका मार देणें; रक्तबंबाळ होईइतकें मारणें.

चामडी लोंबविणें-लोळविणें—बेदम मारणें; अंगाची चामडी सुटून लोंबूं लागेल इतकें मारणें; अत्यंत निर्दयपणें झोडपून काढणें.

चामडया फुटणें—कातडी सोलून निघणें; अंगापासून कातडी निघून येणें. 'शिवाय हातापायांच्याहि चामडया फुटल्या होत्या.'—स्वप १९५.

॥चामडि काळ्यारि दमडि सुटना—(गो.) चामडी देईल पण दमडी देणार नाहीं. इतका कृपण.

चामडया रुचि सुण्या गोत्तु—(गो.) चामड्याची रुचि कुत्र्याला कळते.

चामा——चामा आंबे, दूरथावनु गोमटें—(गो.) दुरून चांगला वाटणारा माणूस सहवासांत चांगला ठरेलच असें नाहीं.

चामीकर——कंठचामीकरन्याय—स्वतःच्या गळ्यांत दागिना असून एखाद्या स्त्रीनें तो शोधण्याकरितां चोंहीकडे तपास करणें. तु०—कांखेंत कळसा गांवाला वळसा.

चाय——चायो बोयो जावप—(गो.) दूध नासणें.

चार——चार अभिमानी—१ विश्व; २ तैजस; ३ प्राज्ञ; ४ प्रत्यगात्मा. हे शरीरांतील चार अवस्थांचे अभिमानी.

चार अवस्था—१ जागृति, २ स्वप्न, ३ सुषुप्ति, ४ तूर्या.

चार अक्षरें—थोडेंबहुत लिहितां वाचतां येणें. साक्षरता. ' ज्यास चार अक्षरें येतात त्यासच ठेवावें. '

चार आत्मे—१ जीवात्मा, २ शिवात्मा, ३ परमात्मा, ४ निर्मलात्मा.

चार खाणी—१ अंडज, २ जारज, ३ स्वेदज, ४ उद्भिज. —एभा ३.७७.

चार खुंट-खुंटांची जहागीर—पृथ्वीचे चार कोपरे व त्यांवरून भिक्षेच्या झोळीचीं चार टोकें म्हणजे चार खुंट. दारिद्र्यावस्था; भिक्षावृत्ति. —शाब २.२६२. ' चार खुंटांची जहागिरि असल्यावर कुणाची पर्वा राहील. '

चार खुंटपर्यंत कीर्ति होणें—देशांत जिकडे तिकडे, सर्वत्र कीर्ति पसरणें; चारी दिशांस कीर्ति होणें; दिगंत कीर्ति मिळणें. ' अशी कीर्ती दक्षणेची सर्व मुलुखांत चार खुंट पर्यंत झाली. '—पेब ५६.

चार गोष्टी लावणें-करणें—वेडेवांकडे आक्षेप काढणें; जाबसाल करणें; उत्तर प्रत्युत्तर करणें; सबबी सांगणें.

चार गोष्टी सांगणें—मन वळविण्याजोगें भाषण करणें; समजूत करणें; उपदेश करून मन वळविणें; बोध करणें.

चार घेणें, चार देणें—१ शेजारधर्मानें वागणें; देणें घेणें करणें; देवाण घेवाण करणें; देण्याघेण्याचा व्यवहार करणें. २ तोंडीस तोंड वर्तन करणें; दुसरा जसा वागेल तसें उलट वर्तन करणें; दुसऱ्यानें मारल्यास उलटून मारणें; मारामारी करणें; कलह करणें.

चार दिशा—१ पूर्व, २ दक्षिण, ३ पश्चिम, ४ उत्तर.

चार दिशा मोकळ्या होणें—स्वैरवर्तन करणें; अनिर्बंध वागणूक करणें; कोणत्याहि प्रकारचा दावा नसणें.

चार दोष—चार विकल्पविषयक दोष. १ आत्माश्रयता, २ अन्योन्याश्रयता, ३ चक्रकापत्ति, ४ अनवस्था.

चार धामें—१ केदारेश्वर, २ रामेश्वर, ३ जगन्नाथपुरी, ४ द्वारका.

चार पुरुषार्थ—१ धर्म, २ अर्थ, ३ काम, ४ मोक्ष.

चार भक्त—१ आर्त, २ जिज्ञासु, ३ अर्थी, ४ ज्ञानी.

चार मुक्ति—१ सलोकता, २ समीपता, ३ सरूपता, ४ सायुज्यता.

चार युगें—१ कृत, २ त्रेता, ३ द्वापार, ४ कलि.

चार लोक—१ स्वर्ग, २ मृत्यु, ३ पाताळ, ४ कैलास.

चार लोकांत खालीं पाहण्याचा प्रसंग--उघड, सर्वां देखत अपमान, मानभंग. 'आपल्या बंडखोर वागण्यानें आपण भय्यासाहेबांच्यावर चार लोकांत खालीं पाहण्याचा प्रसंग आणला.'–दौलत पृ. २४५.

चार वर्ण--१ ब्राह्मण, २ क्षत्रिय, ३ वैश्य, ४ शूद्र.

चार वाणी--१ परा, २ पश्यंती, ३ मध्यमा, ४ वैखरी.

चार स्थानें--१ नेत्र, २ कंठ, ३ हृदयं, ४ मूर्ध्नि.

चार हात होणें—१ लठ्ठालठ्ठी, मारामारी होणें; हातघाईवर येणें. २ विवाह होणें. ३ कैद होणें.चतुर्भुज होणें पहा.

चारहि ठाव जेवण; चारी ठावांचें जेवण--मोठ्या पानावर चारहि बाजू भरलेल्या आहेत असें जेवण. भात, वरण, भाजी, पोळी हे जेवणांतील मुख्य चार जिन्नस; चांगलें सुग्रास भरपूर सर्व पदार्थ असलेलें असें जेवण. –शाब ३.१५०.

चारहि दिशा (वाटा) मोकळ्या होणें--वाटेल तिकडे जाण्यास अगदीं मोकळीक स्वतंत्रता असणें; स्वैर वर्तन करण्यास मोकळीक असणें; अनिर्बंध वर्तन करण्यास सवड मिळणें; कोणताहि दाब नसणें.

चारीचे सहा होणें--चार हातांचे सहा हात एक मूल झालें म्हणजे होतात. लेंकुरवाळें होणें; पतिपत्नीस मूल होणें.

❀ **चार आण्याची कोंबडी आणि आठ आणे फळणावळ**--कमी महत्त्वाच्या गोष्टीकरतां अधिक महत्त्वाच्या गोष्टीचा व्यय करणें. अपव्यय. तु०-अडक्याची भवानी आणि टक्याचा शेंदूर.

चार घरां मागली, धा घरा मागली, भटालो सवाय शेर तो सवाय शेरच--(गो.) ब्राह्मण चार घरीं भिक्षा मागो अथवा दहा घरीं भिक्षा मागो, त्याच्या कपाळीं सव्वाशेर तो सव्वाशेरच.

चार जणांची आई, बाजेवर जीव जाई--एकाच कामांत चौघे पाहणार असल्यास ते एकमेकांच्या भरंवशावर राहतात व काम नासतें असा भावार्थ. चौघे मुलगे असून आईचा प्राण बाजेवरच गेला. कारण प्रत्येक जणानें दुसरा भाऊ उपचार करील असें मनांत आणून स्वतः वैद्य आणण्याचें किंवा औषध देण्याचें काम केलें नाहीं. यामुळें आईस मुळींच औषधोपचार पोंचला नाहीं, किंवा मरतांना तिला घोंगडीवर कोणीं काढलें नाहीं.

चार जणांची शेती, खापर आलें हातीं--भागीनें व्यवहार केल्यास कोणताच भागीदार त्यांत पूर्ण लक्ष्य घालीत नाहीं. जो तो दुसऱ्यावर अवलंबून राहतो व इतर वांटेकऱ्यांकरितां आपण श्रम कशास करा म्हणून स्वस्थ बसतो. याप्रमाणें कोणासच विशेष आस्था न वाटल्यामुळें ती शेती आंतबट्ट्याची होते व शेवटीं सर्वांसच नुकसान येतें. याकरितां भागीनें शेती सहसा करूं नये. तसाच भागीचा कोणताहि व्यवहार करूं नये.

चार दिनकी चांदणी, फिर अंधेरी रात--चांदणें कांहीं सर्व काळ टिकत नाहीं. शुक्लपक्षामागून कृष्णपक्ष येतो, त्याप्रमाणें नेहमींच चलतीचे दिवस राहात नाहींत. कांहीं चलतीचे तर कांहीं पडतीचे दिवस येतात. मागें पहा.

चार दिनकी चांदनी, फेर अंधयरा पाख--शुद्धपक्ष असेल तोंपर्यंत चांदणें असतें. पण पुढें वद्य पक्ष यावयाचाच असतो व त्यावेळीं चांदणें असत नाहीं, काळोख असतो. याप्रमाणें चांगल्या दिवसांमागून वाईट दिवस येतात. नेहमींच चांगली स्थिति टिकून राहात नाहीं. आयुष्यांत बरेवाईट दिवस एकामागून एक येतच असतात. सर्वच दिवस सारखे नसतात.

चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे—प्रथम सून लहान असते तेव्हां सासूचाच घरांत वरचष्मा असतो; पण पुढें ती मोठी होऊन तिला मुलेंबाळें झालीं म्हणजे ती सासूला मागें सारून आपण अधिकार गाजविते. यावरून

प्रत्येकाची पाळी येतेच; वाट मात्र पाहिली पाहिजे. Every dog has his day.

चार दीस मांयचे, चार दीस सुनेचे--(गो.) चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे.

चार पायां घॉडॉ चुक्ता, दोन पायां मनीस चुक्त्या चड ?--(गो.) चार पायांचा घोडा सुद्धां चुकतो. मग दोन पायांचा माणूस चुकला तर त्यांत नवल कसलें ?

चार महिने झोंपेचें व्रत केलें, गुण नाहीं दिला देवानें—चार महिने झोंप घेऊन पाहिली पण कांहीं फळ मिळालें नाहीं. तरी कांहीं न करतां आळसांत दिवस काढण्यास कोणता लाभ होणार आहे ? कांहीं होत नसतांना आजारीपणाचें ढोंग करीत असलेल्या आळशी व कुरकुर करणाऱ्या मनुष्याच्या तोंडचे उद्गार.

चार माणसांचा हात वैऱ्यावर पडूं नये—कोणाहि मनुष्याला अनेक शत्रु उत्पन्न झाले असतां त्याचा निभाव लागणें अशक्य असतें. संघबलानें वाटेल त्याचा नाश करतां येतो. दहांचा हात वैऱ्यावर पडूं नये, पहा.

चार हात लाकूड, सात हात ढलपा—अतिशयोक्ति. आठ हात काकडी नऊ हात बी, पहा.

चारि हाति कांडणांक, पांच हाति बळें—(गो.)चार हात लांबीच्या मुसळाला पांच हातांनीं उचलणें. ‘ तीन पुरभय्ये आणि चार चुली ’ अशा अर्थानें म्हणतात.

चारित्र्य——चारित्र्याखेरीज ज्ञान--मनुष्य कितीहि विद्वान् असला तरी त्याचें शील जर चांगलें नसेल तर त्याच्या ज्ञानाचा कांहीं उपयोग नाहीं. त्याला कोणी मान देणार नाहीं.

चारू——चारू तो वारू—ज्याला भरपूर खावयास मिळेल तो चलाख घोड्याप्रमाणें काम करील.

चार्वाक—१ आद्यनास्तिकमतप्रवर्तक ऋषि. ‘ यावज्जीवं सुखं जीवेत्, ऋणं कृत्वा घृतं पिबेत् । भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥’ हें चार्वाकाचें प्रापंचिक तत्त्वज्ञान होतें. २ अगदीं नास्तिक, धर्मलंड माणूस.

चाल——चाल करणें--हल्ला करणें; स्वारी करणें; अंगावर चालून येणें.

चाल पडणें—येजा असणें; मैत्री असणें. ‘ तुजजवळि पडे हे चालि नीचा जनांची । निपटच हळवारे वृत्ति तूझ्या मनाची ॥ ’—सारुह ६.१०४.

चालीवर घेणें—भागविणें; निर्वाह करणें; चालवून घेणें; कसेंतरी भागवून घेणें; प्राप्त स्थितींत गुजारा करणें; अडूं न देणें.

चालीस लागणें—चालू होणें; प्रगतिपथावर येणें; प्रगति होणें; उत्कर्षाप्रत जाणें.

चालीस लावणें—चालू करणें; सुरू करणें; आरंभ करून देणें. ‘स्वैंपाक चालीसी लावियला ।’—सप्र २.८१.३.

चालकबाऊ ——चालकबाऊचा मणी—एक काचेची अंगठी किंवा मणि मंत्रून पायाच्या घोट्यावर बांधतात. तीमुळें सांधे धरणारा रोग होत नाहीं, अशी समजूत आहे.

चालणें——चमकून चालणें—भीत भीत पाऊल टाकणें; हळू हळू सावधपणें पावलें टाकीत जाणें. ‘ चाले चुकावुनि पुढें चमकोनि घोषा ।’—आकं ३.

चालता काळ—चांगले समृद्धीचे, सुखाचे, भरभराटीचे दिवस; उत्कर्षाचा काळ. ‘ बा तुझा चालता काळ । खायाला मिळती सकळ ॥ ’—अमृत ११८.

चालता गाडा—सुरळीत चाललेला क्रम; चालू काम; परिपाठ; नियमितपणें होत असलेलें काम; न अडलेलें कार्य.

चालता घेणें—चालवून घेणें; निर्वाह करणें; भागविणें; अडून देतां चालू ठेवणें.

चालता घोडा—१ कामांत असलेला घोडा; स्वारीचा घोडा; रोजच्या वापरांत असलेला घोडा. २ नित्य उपयोगांत येणारी वस्तु; रोजच्या वापरांतील गोष्ट.

चालता बोलता—१ मूर्तिमंत; प्रत्यक्ष; साक्षात्. ‘ तो चालता बोलता ज्ञानकोश आहे. ’ २ ज्याला चालतां बोलतां येतें असें. ३ चालू; कार्यक्षम; उपयोगांत असलेला.

चालत बोलतां; चालत बोलत असतां—१ सहज; लवकर. ‘ हे आठ महिने राहिले ते चालतां बोलतां जातील. ’ २ अल्प काळांत; एकाएकीं.

चालता रुमाल; चालती तबलक; चालतें पुडकें—चालू कामाचे कागद; रोजच्या कामांतील कागदपत्र; चालू व्यवहारासंबंधीं कागदपत्र; चालू रुमाल.

चालता सैंपाक—साधा, सहज होण्यासारखा सैंपाक; ज्याकडे फारसें लक्ष्य द्यावें न लागतां करतां येईल असा स्वयंपाक; जो एकीकडे दुसरें काम करीत असतांहि तयार करतां येतो असा स्वयंपाक.

चालता होणें--निघून जाणें; रजा घेणें; निरोप घेणें; चालू लागणें. ‘ यशोदादेवीच्या दर्शनास किल्लेदार चालते झाले.’ —कोकि ३३.

चालती मजल, मजील; चालता कूच—न थांबतां, मुक्काम न करतां मार्गआक्रमण; एकसारखी चाल; टाकोटाक जाणें. तु०—चढेघोड्यानिशीं जाणें.

चालती वहिवाट—१ चालू असलेली व्यवस्था, मालकी इ. २ रोजचा क्रम; परंपरा; पद्धति.

चालतीस लावणें—सुरू करणें; चालू करणें; गति देणें; आरंभ करून देणें; वाटेस लावणें.

चालत्या गाडीस खीळ घालणें—एखादा गाडा सुरळीतपणें चालला असतां, त्याच्या आंसांत वगैरे खीळ घालून चाक पुढें न फिरेल असें करणें, म्हणजे त्याची गति कुंठित करणें होय. यावरून नीट सुरळीत चाललेल्या गोष्टीस अडथळा करणें; चालू प्रगतीस प्रतिबंध करणें; कोणत्याहि गोष्टींत अडवणूक करणें. 'चालत्या गाड्याची खीळ काढणें' असाहि कोठें कोठें पाठभेद आढळतो. आंसाच्या टोंकास चाकाच्या बाहेर एक खीळ असते. ही काढली असतां गाडा चालूं लागला तर चाक बाहेर येण्याचा संभव असतो; यामुळें गाडा थांबतो. गाडा पहा.

चालत्या घोड्यावरच्या गोमाशा—ज्याची भरभराट चालू असेल अशाची खुशामत करून आपला थोडाफार लाभ करून घेणारे लोक; ज्याची चलती असेल त्याचा आश्रय करणारे खुशालचेंडू.

चालत्या झाडाचा चीक—चालतें झाड म्हणजे मनुष्य, त्याचा चीक म्हणजे वीर्य किंवा रेत.

चालत्या पायीं—न थांबतां; विश्रांति न घेतां; टाकोटाक; एका दमांत.

चालत्या मुलाला उचलून कडेवर घेणें—जें मूल स्वतः चालूं शकतें त्यास कडेवर घेऊन नेणें निरर्थक होय. यावरून जें काम आपल्यावांचून होत असेल, त्यांत मध्येंच लुडबुड करणें; विनाकारण मध्यें पडणें. 'चालत्या मुलाला उचलून कडेवर घेण्याइतकें सरकार खास वेडें नाहीं.'–केले १.१३८.

काळ्या पाण्यावर चालविणें—हद्दपार करणें; दूर देशास पाठविणें; देशाबाहेर घालविणें.

चालूं न देणें—१ एखाद्याच्या इच्छेप्रमाणें त्याला करूं न देणें. २ न ऐकणें; न मानणें; न जुमानणें. 'चालों न देचि मत, करि मन तैशाचेंहि वश्य पाप तिचें ।'–मोमंभा ३.५२.

चालून जाणें—चढाई, हल्ला करणें; अंगावर चाल करणें. 'हिंदुस्थान सरकारचें लष्करी धोरण जरी रशियासंबंधानें बचावाचें असलें तथापि एकंदरीनें चालून जाण्याचेंच आहे.'–टि २.३५७.

❀ **चाल बैला चाल, हरळीवर माती घाल**—कांहीं तरी काम करणें; काम करण्याचें ढोंग करणें.

चालणारा तोंड वाशी, वाट जशाची तशी—एखादी अत्यंत कठिण, अगदीं उभी व दगडाळ वगैरे चढण असेल तर तिच्या त्या अवस्थेपासून तिला कांहींएक बाधा होत नाहीं; पण चालणाराचे, चढणाराचे मात्र कांटे ढिले होतात. बाभळीचे कांटे तिच्या अंगाला कांहीं बोंचत नाहींत इतरांस बोंचतात. त्याप्रमाणें दुष्ट मनुष्यास त्याच्या दुष्टपणापासून कांहीं उपद्रव होत नाहीं, पण ज्याचा संबंध त्याचेशीं येतो, त्याला मात्र उपसर्ग होतो.

चालण्याला जे पाय उपयोगी पडतात तेच बंधनाची वेळ आली म्हणजे पाश होतात—जी गोष्ट एका दृष्टीनें उपयुक्त असते, तीच दुसऱ्या दृष्टीनें नुकसानकारक होण्याचा संभव असतो. ही म्हण तितकीशी योग्य दिसत नाहीं; कारण बंधनांतून सुटून पळण्याच्या कामीं पायच उपयोगी पडतात. मूळगोष्ट एका सांबराची आहे. त्याचीं शिंगें डौलदार व पाय बेढव म्हणून त्यास विषाद वाटत असे; पण पारधी पाठीमागें लागल्यावर पळावयास पाय उपयोगी पडले पण शिंगें मात्र जाळींत अडकून त्यास बंधन प्राप्त होण्यास कारणीभूत झालीं.–कावळा आणि ढापी ३८.

चालतील बाह्या, तर पुसतील आयाबाया—आपले हातपाय चालत असतील, आपण कामधंदा करीत असूं, दुसऱ्याच्या उपयोगी वगैरे पडत असूं, तर आपणाला कोणी विचारील. जर आपण दुसऱ्याच्या उपयोगी पडलों नाहीं, तर आपली कोणी विचारपूसहि करणार नाहीं.–स्मृतिचित्रें २.२८.

चालते काळीं संग्रह करी, विपत्ति काळीं उपयोगी भारी—जेव्हां आपली चलती असेल, भरभराटीचे दिवस असतील, त्यावेळीं कांहीं संग्रह केल्यास तो अडचणीच्यावेळीं उपयोगी पडतो.

चालते घोड्यावर स्वारी, न करावी मरे तोंवरी—घोडा नीट चालला आहे तर त्यास टांच मारून किंवा इतर रीतीनें त्रास देऊं नये. कर्त्या माणसांवर बळजबरी करूं नये. Never ride a free horse to death-सवि२४३६.

चालते तिफणी घारागळ, आणि कुणब्याची तारांबळ—कुणबी पहा.

चालत्या गाड्याला अडखळणें कां—चालू असलेल्या कामांत विनाकारण विघ्न कशास आणावें.

चालत्या गाड्याला ओंगण कोणीहि घालील—ज्याचें यथास्थित चाललें आहे त्याला मदत करण्यास कोणीहि

तयार होतो. पण खरोखर ज्याची अडचण आहे, त्याच्या उपयोगी कोणी पडत नाहीं.

चालत्या गाडयाला खीळ घालणें, त्याचें फुकट जिणें—जो मनुष्य नीटपणें सुरळीत चाललेल्या कार्यांत विघ्नें आणतो तो व्यर्थ खटपटी होय.त्याचीं कृत्यें निरर्थक होत.

चालत्या घोडयास टांच, न मारावी साच—जो घोडा टांच मारल्याशिवाय नीट चालत आहे त्यास टांच मारून दुखविण्याचें, चिडविण्याचें कांहीं कारण नाहीं; विना कारण तो उधळावयाचा. त्याप्रमाणें जो मनुष्य स्वत: होऊन नीटपणें काम करीत आहे त्यास डंवचण्याचें, त्रास देण्याचें कारण नाहीं; त्यामुळें काम अधिक जलद होण्यापेक्षां तो चिडीस जाऊन काम बिघडण्याचा संभव मात्र अधिक. Do not spur a free horse. सवि ८४०. वर पहा.

चालत्या धंद्यास खो—सुरळीतपणें चाललेल्या कामांत विनाकारण अडथळा.

चालत्या बैलाला चारा टाकायचा—जें काम सुरळीत चाललें आहे, त्यांतच मदत करायला लागावयाचें. ज्याचा चालता काळ आहे त्याची कोणीहि खुशामत करतो. ज्याचे अडचणीचे दिवस असतात, त्याला कोणी मदत करीत नाहीं. वर पहा. चालत्या मुलाला कडेवर घेणें.

चालला तर गाडा, नाहीं तर खोडा—एखादी गोष्ट अशी असते कीं, ती व्यवस्थितपणें चाललेली असते तोंपर्यंत ठीक असते व तिची मदत होते; पण एकदां का ती बिघडली म्हणजे मूळ काम बाजूस राहून त्या आनुषंगिक उपस्थित झालेल्या अडचणीचें निवारण करण्यांत वेळ जावयाचा व तिच्यामुळें काम लवकर होण्याचें बाजूस राहून अधिक खोळंबाच व्हावयाचा. एखादा जुना गाडा असला म्हणजे तो नीट सरळ जात असेल तोंपर्यंत ठीक. एकदां का त्यांत कांहीं बिघाड झाला कीं तो नीट करण्यामध्येंच सारा वेळ जावयाचा व तो गाडा नसता घेतला तर बरें असें म्हणण्याची पाळी यावयाची. उदाहरणार्थ, एखाद्या वृद्ध मनुष्यास बरोबर घेऊन कोठें जावयाचें झालें तर त्याची मदत, त्याची प्रकृति वगैरे ठीक असेल तर होण्याचा संभव पण तीच जर वाटेंत बिघडली तर मूळ काम बाजूस राहून हें नसतेंच लचांड पाठीस लागलें असें म्हणावयाची वेळ यावयाची. गाडा पहा.

चालायला येण्यापूर्वी धांवण्याची हाव धरूं नये—प्रगति पायरीपायरीनें करावी; मधल्या पायऱ्या टाकून एकदम पुढें जाण्याचा प्रयत्न करूं नये.

चालू वाट, बिनबोभाट—मळलेल्या मार्गानें प्रवास बिनघोर असतो. तसें ठराविक गोष्टी ठराविक पद्धतीनें करीत गेल्यास कोणी कांहीं म्हणत नाहीं व त्यांत कांहीं विघ्न न येतां त्या पार पडतात. –पाआमा ५.६.

चालेना देवाचें, बडबडणें गुरवाचें--देवाचे उपचार यथास्थित होत असले तर त्याबद्दल देव कुरकुर करण्याऐवजीं गुरवच अधिक कुरकुर करीत असतो. पुष्कळदां मुख्य मनुष्याची बडदास्त नीट राहात नसली तर तो स्वतः कसेंतरी चालवून घेतो, कांहीं कुरकुर करीत नाहीं; पण त्याचे नोकरचाकरच अधिक तक्रार करीत असतात.

चाव-वा——चाव करी जिवाला, शिळें पाणी देवाला—स्वतः चैनं करीत असावयाचें, पण देवांकडे मात्र पूर्ण दुर्लक्ष.

चाव केला, डोळा गेला—विनाकारण आपला अधिकार किंवा वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न केला, तर त्यांत लाभ न होतां हानि होण्याचा संभव असतो.

चाव चादडीचे, आणि हाल गोधडीचे—वृद्ध माणूस वर्चस्व गाजवूं लागला तर त्याचें कोणी ऐकत नाहीं. त्याच्या जवळच्यांचे मात्र त्यामुळें अधिक हाल होतात.

चावा केला फार, दांत हिरवेगार--फार छानछोकी केली आहे, पण दांत घाणेरडेच.

चावचाव——चावचाव करणें—[चावचाव = च्यावच्याव, चिवचिव] त्रास देणें; बोलबोलून घेणें. ' चारचौघांनीं चहूंकडून चावचाव केल्यामुळें ते अगदीं चिडल्यासारखे झालेले ! '–एकच प्याला १.४.

चावडी——चावडीवर दरवडा--ज्या ठिकाणाहून लोकांचे दरवडे, चोऱ्या इ. पासून संरक्षण व्हावयाचें त्यावरच हल्ला होणें. म्हणजे तें अधिकारस्थान किती दुर्बल आहे हें समजतें. विपरीत प्रकार.

***चावडीबाहेर(वर) बोंब मारायला पाटलाची परवानगी नको**—मागें 'गांवाबाहेर०' पहा.

चावडीवर दरोडा आणि गांवांत आरडाओरडा—संकटाचें कारण एका ठिकाणीं पण त्याचा गवगवा किंवा उपसर्ग भलतीकडेच होत असला म्हणजे म्हणतात. तु०—देवी देवळांत नायटे गांवांत.

चावडीवर मार खाल्ला आणि समजे सगळया गांवाला--जी गोष्ट सार्वजनिक ठिकाणीं झाली तिचा बोभाटा सर्वत्र व्हावयाचा.

चावडीवर मारलें, घरीं सांगूं नका—एखाद्याला

जर भर चावडीवर मार बसला तर ती गोष्ट सर्व गांवाला तावडतोब कळणारच; ती गुप्त राहणें शक्य नाहीं. तेव्हां ती आपल्या माणसांपासून गुप्त ठेवण्याचा प्रयत्न करणें हा मूर्खपणा आहे. जें सर्व जगाला कळतें तें गुप्त राहूं शकत नाहीं.

चावणें——चावत बोलणें—दांत आंवळून बोलणें; दांत खात बोलणें; तोंड पूर्ण न उघडतां बोलणें.

चावूं कां गिळूं करणें-होणें—एखाद्याच्या नाशास उद्युक्त होणें; एखाद्यावर सूड घेण्यास उतावीळ होणें; एखाद्यास केव्हां शिक्षा करतों असें होणें. ' चुंबनासाठीं तोंडाला तोंड भिडविणारीं जोडपीं पुढं एकमेकांचीं तोंडं पहातांच चावूं कीं गिळूं असं करायला लागतात.'–एकच प्याला १.२ 'यावेळीं त्याला चावूं कीं गिळूं कीं तिळातिळा एवढाले तुकडे करूं असें मला झालें आहे.'–उग्र ३.४.

चावून घालणें--पुन्हां पुन्हां बोलून सांगणें; वरचेवर बजावून सांगणें; वारंवार पुन्हां पुन्हां सांगणें.

चावून चावून खरचणें—कृपणपणें, कंजूषपणानें उपयोग करणें; थोडाथोडा अंशाअंशानें खर्च करणें; हात राखून खर्चणें.

चावून चिकट—घासाघीस, कटकट करणारा (व्यवहाराच्या कामांत).

चावून चिकट करणें—१ लोचटपणामुळें काम बिघडवून घेणें; फार चिकित्सा करून एखाद्यास कंटाळा आणून व्यवहार नासणें; अतिशय घासाघीस करणें. २ कंटाळवाणी बडबड करणें; पुन्हां पुन्हां तेंच तेंच सांगणें; वारंवार बजावणें.

चावून चिवून ठेवणें—अतिशय काटकसरीनें संचय करणें; अगदीं थोडें थोडें जमवून, अगदीं हात राखून साठवून ठेवणें; फार काटकसर करून जमविणें.

चावून चिवून संसार करणें-घर चालविणें—काटकसरीनें संसार चालविणें; अगदीं हात राखून खर्च करून काम भागविणें; अगदीं नियमित व्यय करणें.

❀ **चावत नाहीं कांहीं, दांत दाखवून फळ नाहीं**—ज्या दांतांनीं चावतां येत नाहीं ते दांत दाखवून, असून नसून काय उपयोग. ज्या गोष्टीचा उपयोग नाहीं अशी दिखाऊ वस्तु असून नसून सारखीच.

चावल्याशिवाय गिळत नाहीं, अनुभवाशिवाय कळत नाहीं—ज्याप्रमाणें चावल्याशिवाय नीट गिळतां येत नाहीं, त्याप्रमाणें स्वतःस अनुभव आल्याशिवाय कोणतीहि गोष्ट पटत नाहीं. अनुभवानेंच एखादी गोष्ट पक्की मनावर ठसते.

चावून चिकट आणि ओढून बळकट--विनाकारण बारीकसारीक गोष्टींत लक्ष्य घालणें; चर्वितचर्वण करणें; दिरंगाई लावणें.

चावल——चावल कहे मैं सफेत धान, और आयागयाक राखूं मान—तांदूळ म्हणतो कीं, मी पांढरा-सफेत आहे व येणारा-जाणाराचा आदरसत्कार करतों. धान्यांमध्यें तांदुळाची श्रेष्ठता वर्णन करणारी म्हण.

चावा——चावा मारणें--लग्गा साधणें; हात मारणें; डल्ला मारणें; एखाद्या कामांत आपला फायदा करून घेणें.

चाहूल——चाहुली मारणें--चाहूल लागूं न देणें; अगदीं आवाज न करतां, कोणासहि सुगावा लागूं न देतां एखादी गोष्ट करणें; अत्यंत गुप्तपणें कार्य करणें; मागमूस न ठेवणें. ' गडी ठेवूनियां बाहेरी । चाहुली मारूनियां संचार करी । '–निगा ३६.

चाळक——चाळक भवानी--चटकचांदणी; नखरेबाज स्त्री; ढंग करणारी स्त्री.

चाळण——चाळणींत पाणी घालून जीव देणें--विनाकारण जिवावर उदार होणें; अत्यंत निराश होणें; अगदीं हताश होणें; अगतिक होणें. कर्तबगारी नसलेल्या माणसाबद्दल म्हणतात.

चाळणें——चाळून चाळून; चाळून पाळून--पुन्हां पुन्हां उचलून; फिरवून; अदलाबदल करून; फिरवाफिरव करून; उलटसुलट करून; बदलून.

चाळयितला——चाळयितल्या गेलें तोंड वांकडें--(गो.) वेडावणाऱ्याचें तोंड वांकडें. चांगल्या व्यक्तीला या वस्तूला नांवें ठेवणाराच हास्यास्पद ठरतो.

चाळा——चाळा लागणें—छंद लागणें; नाद लागणें; व्यसन लागणें; संवय होणें.

चाळा लावणें—नाद, छंद लावणें; लोभ लावणें; मन गुंतविणें; पूर्णपणें लक्ष वेधणें. ' चाळा लावूनि गोवितोसी !' –ज्ञानदेव.

चाळीशी——१ चाळीस वर्षांचें वयमान. २ या वयानंतर येणारें दृष्टिमांद्य, डोळ्यांचा अधुपणा. ३ हा अधुपणा घालविण्यासाठीं लावावयाचा चष्मा. ' चाळसी लागे प्राणिया । '–दा ३.६.४९.

❀ **चाळिशी लोटली, आशा खुंटली**—मनुष्याचें वय-

मान चाळीस झालें म्हणजे त्याला पुढील गोष्टींबद्दल, पुत्र वगैरे होण्याबद्दल उत्साह वाटत नाहीं. चाळीस वर्षें होईपर्यंत मनुष्य विशेष उमेदींत असतो, पुढें ती उमेद राहात नाहीं.

चिक——चिक् चिक् करणें—(व.) कुरकुर करणें; कटकट लावणें; कुरबुर करणें.

चिकटा——चिकटा पडणें—पिकावर पान उवा पडणें.

चिकण——चिकण मातीला ओल फार, करंट्या माणसाला बोल फार—चिकण माती लवकर वाळत नाहीं त्यामुळें तिचा चिकटपणा जात नाहीं, त्याप्रमाणें करंटा मनुष्य फार बडबड करून आपलें दैन्य उघड करीत असतो.

चिकणी सुपारी, खाऊं नये दुपारीं—चिकण्या सुपारींत कात असल्यानें ती रेतःस्खलन करणारी म्हणून दिवसा उपयोगी नाहीं. विटाळाचा स्राव नीट होत नसल्यास चिकण सुपारीचें पाणी देतात.

चिकणी सुपारी पिकलें पान, सोड म्हसोबा आमची आण—चांगली पानसुपारी तुला दिली आतां शपथ सोड अशी म्हसोबाला प्रार्थना. उत्तम मोबदला देऊन दुष्टाला वळविणें.

चिकशा——चिकशा येणें—वीट येणें; नकोसें होणें; शिसारी येणें; कंटाळा येणें.

चिक्या——चिक्या काढणें—तंबाकूच्या झाडास येणारा फुलांचा बार. तंबाखू चांगला जहाल व्हावा म्हणून खुडून टाकणें. यावरून एखाद्या गोष्टीचा कीस काढणें.

चिखल——चिखलांत धोंडा टाकणें—चिखलांत दगड टाकला असतां तो आपल्याच अंगावर उडतो व आपलेंच अंग किंवा कपडे खराब होतात. यावरून भलत्याच भानगडी स्वतःवर ओढून घेणें. अर्थाअर्थी संबंध नसतां उगाच उपद्व्याप करणें; एखादी भानगड मागें लावून घेणें; अंगावर आपत्ति ओढवून घेणें.

चिखलांत रुतलेली गाय—असाहाय्य मनुष्य, स्त्री; एखादा मनुष्य किंवा जनावर चिखलांत रुतलें असतां त्यास इतराच्या मदतीशिवाय बाहेर येतां येत नाहीं, उलट जों जों वर येण्याचा प्रयत्न करावा तों तों तो अधिकच आंत सरत जातो. यावरून दुसऱ्याच्या मदतीशिवाय कांहींहि करतां येत नाहीं अशा अवस्थेंत असलेला; अगतिक; निरुपायाच्या अवस्थेंतील व्यक्ति.

चिकलांतुलो खूंटु—(गो.) चिखलांतला खुंट. ज्याला भरीव आधार नाहीं असा माणूस कोणाकडूनहि सहज पराभूत होतो.

❀ **चिखल पाण्याला सोडत नाहीं व चिखलाला पाणी सोडत नाहीं**—ज्याप्रमाणें चिखलांतील पाणी वेगळें करतां येत नाहीं तें त्यांतच राहतें, त्याप्रमाणें जवळच्या नातेवाईकांत वितुष्ट आलें तरी तीं परस्परांपासून फारशीं दूर होऊं शकत नाहींत. त्यांचा मूळचा जिव्हाळ्याचा संबंध तुटत नाहीं. यावरून (व.) घरांत बापलेकांत किंवा मायलेकींत भांडण झालें तरी लवकरच तीं एक होतात, त्यांचें भांडण हें तात्पुरतें असतें.

चिकलांक फातोर वडयल्यार चिखोलच आंगार उसळता—(गो.) चिखलांत दगड टाकला तर चिखल अंगावर उडायचाच. दुर्जनाच्या फंदांत पडलें तर दुर्लौकिकच व्हायचा हें ठरलेलें.

चिखलाचे कुले उकत नाहींत—अंगाला चिखल लावला तर तो वाळल्यावरोबर सुटून पडतो. त्याप्रमाणें जे संबंध स्वाभाविक असतात तेच कायमचे टिकतात. अस्वाभाविक अगर तात्पुरते जोडलेले संबंध कायमचे टिकत नाहींत. तु०-अधव्याचा जोडला नि पिढीचा तोडला बरोबर होत नाहीं.

चिखलाच्या टिरी चिकटत नाहींत—वरीलप्रमाणेंच.

चिखलांत दगड टाकिला आणि अंगावर शिंतोडा घेतला—आपण होऊन एखादी आपत्ति आपणावर ओढवून घेणें.

चिखलांत धोंडा टाकला तर चिखल तोंडावर उडणारच—वर पहा.

चिखलांतली मेढ वाकवावी तिकडे वांकणार—चिखलांत पुरलेली मेढ तितकी पक्की बसलेली नसते; त्यामुळें तिला सहज हलविली तरी ती हलूं शकते. त्याप्रमाणें जी गोष्ट अस्थिर असून ठाम नसते तिला पाहिजे तसें वळण देतां येतें किंवा ज्यास पक्का आधार नाहीं अशा व्यक्तीस परिस्थितीप्रमाणें आपलें स्थान वगैरे बदलावें लागून सभोवतालच्या गोष्टीप्रमाणें वर्तन करावें लागतें.-निरभ्र चंद्र १४९.

चिंचुकली——चिंचुकली घेणें—चिमटा घेणें; विचकुरा काढणें; हळूच खोडी काढणें.

चिंचोका——चिंचोका लावून चिंच खायाची आशा नको—चिंचोका पेरून त्याचें झाड होऊन त्याला आलेल्या चिंचा खावयाची आशा करणें वेडगळपणा आहे. अत्यंत दीर्घकालानें मिळणाऱ्या फळाची आशा करणें व्यर्थ होय. अक्रोडाचीं फळें खाणें याप्रमाणें.

चिटक्या——चिटक्यांचे मांडव—चटक्यांचे मांडव पहा.

चिटणी——चिटणीस पडणें— मूल वांसरूं यांच्या निःशेष पिण्यानें क्षीण होत जाणें.

चिटपाखरूं——चिटपाखरूं नसणें--[चिटपाखरूं = लहान पांखरूं.] अगदीं पूर्णपणें शांतता असणें; कोणीहि जवळपास नसणें. 'यमुनेच्या विस्तीर्ण तीरावरील घाटावर मी एकटाच पडलों होतों. माझ्याशिवाय तेथें चिटपांखरूं सुद्धां कोणी नव्हतें.'—मासिक मनोरंजन.

चिट्ठी——चिठ्ठी उतरणें—१ (देवाकडून खालीं हुकूम येणें.) मरण्याची पाळी येणें; मृत्यूची वेळ येणें; यमराजाचें बोलावणें येणें. 'नारायण घरकी चिठ्ठि उतरे चलो लंगोटा छोड। एक दिन जानारे भाई॥'–दोहोरा. २ एखाद्याकडून पैशाची आकस्मिक मदत होणें; एखादी अभावितपणें पैशाची वरात यावी त्याप्रमाणें आकस्मिक धनलाभ होणें.

चिठ्ठी-ठ्या टाकणें—मनांतील प्रश्नांचीं उत्तरें लिहून चिठ्या टाकून त्यांतून कोणती तरी उचलून प्रश्नाचें उत्तर पाहाणें. पंच उकलण्यासाठीं याचा अवलंब करतात.

चिठ्ठी फिरविणें-माघारीं टाकणें—असाध्य दुखण्यांतून बरें होणें; जीवावरचें संकट टळणें; यमाचें बोलावणें परत करणें; मरणोन्मुख अवस्थेंतून पार पडणें.

चिंतणें——चिंती परा, तें येई घरा—दुसऱ्याचें वाईट व्हावें अशी इच्छा केली तर अनेक वेळीं आपणावरच आपत्ति येते. याकरितां कधींहि दुसऱ्याची हानि व्हावी असें मनांत आणूं नये.

चिंतन——चिंतन घडेना, पदरीं पडेना—बेत होत नाहींत व प्राप्ति घडत नाहीं.

चिंतनपुष्प मनाचें, शब्दफळ इच्छेचें—आपण मनांतल्या मनांत एखाद्या गोष्टीचा विचार करीत असतो, तो फुलासारखा असून तो मनांतच असल्यामुळें कोणास दिसत नाहीं व त्याचें प्रत्यक्षांत रूपांतर होत नाहीं. पण त्याच विचारास इच्छाशक्तीची जोड दिली म्हणजे ते शब्दरूपानें बाहेर पडतात व फळ त्याप्रमाणें प्रकट होतें. त्याप्रमाणें ते दुसऱ्यास ऐकून जाणतां येतात. Thoughts are the blossoms of the mind and words the fruit of desires. –सवि ३७१४.

चिता——चितेवर विडी पेटविणें—दुसऱ्याचें नुकसान होत आहे असें दिसत असतांहि त्याकडे दुर्लक्ष करून केवळ आपल्या फायद्याचा विचार करणें. 'चिता पेटली तरी आमची विडी त्यावर पेटली पाहिजे असें म्हणणारेहि असावयाचेच.'–टिसू २५१.

❀चितेचो उजो निवता, चिंतचो निवना—(गो.) चितेचा विस्तव विझतो (थंड होतो), चिंतेचा विझत नाहीं. चितेपेक्षांहि चिंता ही अधिक दाहक आहे. कारण चिताहि फक्त मेलेल्यालाच जाळते; पण चिंता ही सजीव माणसालाच जाळीत राहाते.

चितेपेक्षां चिंता कठिण--काळजी ही अत्यंत कष्टदायक आहे. मरणहि तीपेक्षां सुसह होतें. पण काळजीनें मनाला त्यांपेक्षां अधिक दुःख होतें.

चिंता——चिंता मांडणें—काळजी वाहाणें. 'ब्रह्मांड वरीची चिंता देवें मांडिली।'–सप्र ८.९.

चिंता वाहणें—काळजी करणें; मनास रुखरुख लावून घेणें; मनास टोंचणी लागणें.

❀ चिंता करी राग, तेव्हां आत्मा धरी जाग—मनुष्याला एखाद्या गोष्टीची काळजी लागली म्हणजे मनांत परमेश्वराची आठवण होते. जोंपर्यंत मनुष्याला कोणत्याहि प्रकारची काळजी नसते, सर्व व्यवस्थितपणें चाललेलें असतें तोंपर्यंत त्यास परमेश्वराचें स्मरण होत नाहीं. पण एखादें संकट आलें, अडचण उपस्थित झाली म्हणजे मग तो देवाची करुणा भाकूं लागतो.

चिंता न कर निचिंत रहे, देनेवाला समर्थ। जलमें रहे माछली कोण पुरवी गरथ॥–मनुष्यानें व्यर्थ काळजी करीत राहूं नये; परमेश्वर सर्वांची काळजी घेत असतो. मासे पाण्यांत राहतात पण त्यांचाहि जीवनक्रम यथास्थितपणें परमेश्वर चालवितोच कीं नाहीं.

चिंता वाहतां बहुत, कर्ज न फिटे निश्चित--केवळ काळजी केल्यानें कर्ज फिटत नाहीं; त्याकरितां परिश्रम केले पाहिजेत.

चिंता ही मनुष्यजीविताचें विष आहे—चिंता विषाप्रमाणें मनुष्यास घातक आहे. तु०–चिंता जरा मनुष्याणामनध्वा वाजिनां जरा। असंभोगो जरा स्त्रीणां वस्त्राणामातपो जरा॥ –सुर १५५.८२. चिंतासमं नास्ति शरीरशोषणम्।

चिंतासे चतुराई घटे, दुःखसे घटे शरीर। पापसे घटे लक्ष्मी, कहे दास कबीर॥—फार काळजी वाहात राहिल्यानें आपली बुद्धि क्षीण होते; दुःखानें शरीर क्षीण होतें; पातक केल्यानें संपत्तीचा नाश होतो असें कबीर सांगतो.

चिंतेच्या दगडावर दुःखाचा पर्वत कोसळला—

आधींच काळजींत असणाऱ्या मनुष्यावर आणखी एखादी आपत्ति येणें; गळवावर पुटकुळी. तु०-गंडस्योपरि पीटिका संवृत्ता ।

चिंतेपासून मनन उत्पन्न—प्रथम एखाद्या गोष्टीची काळजी वाटूं लागली म्हणजे तीबद्दलच मग एकसारखे विचार मनांत येऊं लागतात. Solitude is the parent of reflection. –सवि ३०८६.

चितारी——चितारी एक दिवसांत कारागीर बनत नाहीं—चित्रकलेमध्यें कौशल्य यावयास दीर्घ अभ्यास व प्रयत्न लागतात. ही विद्या झटपट साध्य होण्यासारखी नाहीं. Rome is not built in a day.

चित्त——चित्त उडून जाणें--१ घाबरणें; उदास होणें; खिन्न होणें; एखाद्या गोष्टींत मन रमेनासें होणें. 'तें ऐकून महाराजांचें चित्त उडून गेलें.'–चंद्र १३४. २ मन विटणें; एखाद्या गोष्टीचा कंटाळा येणें; एखाद्या गोष्टीपासून मनास आनंद न होतां दुःख होऊं लागणें.

चित्त गडबडणें—बावरणें. 'बहु पोटीं भडभडतें, गडबडतें चित्त जें विमळ मळतें।'–मोस्त्री ३.१५.

चित्तचतुष्टय--१ मन, २ बुद्धि, ३ चित्त, ४ अहंकार.

चित्त पुरविणें—लक्ष्य देणें; ध्यान देणें; मन लावणें.

चित्त बसणें—१ मन लागणें; करमणें. 'नरपति दुहितेला माय येतां दिसेना। तदुपरि मग तीचें चित्त कोठें बसेना॥'–सारुह ३.५९. २ मन गुंतणें; मनांत भरणें.

चित्ताची आर्द्रता—मनाचा कोंवळेपणा; मनाची मृदुता.

चित्तांत खाणें—मनास लागणें; हुरहुर वाटणें; एकसारखी एखादी गोष्ट मनांत येऊन अस्वस्थता उत्पन्न होणें; एखाद्या गोष्टीबद्दल पुन्हां पुन्हां मनास विषाद वाटणें.

❀ **चित्त एक देवाकडे, दुसरें भुताकडे**—परमेश्वराचें ध्यान एकाग्रतेनें करावयाचें तसें न करतां भलतेच विचार मनांत आणणें.

चित्त नाहीं थारीं, बावन तीर्थें करी—चित्तास समाधान नसतां अनेक तीर्थयात्रा केल्या तरी त्यापासून कांहीं लाभ होणार नाहीं; आधीं चित्तवृत्ति स्थिर केली पाहिजे.

चित्त नाहीं थारीं, रिकामी वेरझारी—जर मन ठिकाणावर नसेल तर कोणतीहि खटपट केली तरी ती व्यर्थ होय. कोणत्याहि कामांत लक्ष्य न लागल्यामुळें तें शेवटास जाणें शक्य नसतें.

चित्त बारगळ, सासरीं जाण्याचें फळ; चित्त बारगळ, सासरीं गेल्याचें काय फळ?—वधू प्रथम सासरीं गेली असतां तिचें मन बावरल्यासारखें होतें. पुढें संसारांत लक्ष्य लागल्यावर सर्व ठिकाणावर येतें.

चित्त मिळालें तर वित्त मिळेल—मन ठिकाणीं असेल, मनामध्यें समाधान असेल तर द्रव्यप्राप्ति सहज करून घेतां येते.

चित्त समाधान नाहीं, त्यास चैन कोठेंहि नाहीं—ज्याचे मनांत शांति नाहीं त्याचें कोणत्याहि गोष्टींत मन रमत नाहीं. तो अतिशय बेचैन असतो.

चित्तास समाधान राखणें हेंच योगाचें सार आहे—मनामध्यें पूर्ण शांति ठेवणें हेंच योगाचें मुख्य लक्षण आहे.

चित्र——चित्राचें बाहुलें—ज्यास बाहुल्यासारखें वागवितां येतें असा आश्रित मनुष्य. पूर्णपणें ताब्यांतील, हुकमांतील व्यक्ति.

चित्रासारखें चालणें-बोलणें-हंसणें—सुंदर, मधुर, मनोहर चालणें, बोलणें, हंसणें; रेखीव क्रिया करणें.

चित्रींचा लेख-लेप—१ भिंतीवर काढलेलें चित्र. 'चित्रींच्या लेपें उठीउठी। प्रळय चपला ग्रासिली॥' २ चित्रासारखी रेखलेली सुंदर स्त्री.

चित्रगुप्त——१ मनुष्यमात्राच्या पापपुण्याचा हिशोब ठेवणारा यमाच्या दरबारांतील फडणीस. २ कलमबहाद्दर; लेखणीचा बांका; फर्डा लेखक. ३ लोकांचीं बिंगें बाहेर काढण्यास टपलेला. गुप्त हेर (वाईट अर्थानें उपयोग).

चित्रा——पडतील चित्रा, तर भात न खाय कुत्रा—चित्रा नक्षत्राचा पाऊस पडला तर पीक इतकें येतें कीं कुत्र्यास सुद्धां भात खातां खातां वीट येतो.

चित्राच्या तापानें हरणाच्या पाठी काळ्या होतात—सूर्य चित्रा नक्षत्रीं असतां अतिशय कडक ऊन पडतें व त्या उन्हानें रानांत फिरणाऱ्या हरणांच्या पाठीवर काळसर रंग येतो अशी समजूत आहे.

चिंधी——चिंधड्या उडणें-उडून जाणें—तुकडे तुकडे होणें; नाश होणें; पूर्णपणें भंग पावणें; अगदीं मोडतोड होणें.

चिंधीचोळा करणें—नासधूस करणें; सत्यानाश करणें; उध्वस्त करणें. 'याप्रमाणें शहराचा चिंधीचोळा करीत, किल्ल्यास येऊन लागले.'—भाब २७.

❀ **चिंध्याचें बाव्हलें आणि धुळीचा नैवेद्य**—चिंध्यांची बाहुली केलेली असते तीस दाखवावयाचा नैवेद्यहि तसाच म्हणजे मातीचा पाहिजे. लुटुपटीचा देव असेल तर त्याचे उपचारहि लुटुपटीचेच असणार. जसा देव तशी पूजा. तु०—चांभाराच्या देवाला खेटराची पूजा.

चिन्ह——**चिन्हा चाळयाची, भोकरबाळयाची**—नखरेबाज, चवचाल स्त्री.

चिपणें——**चिपणें**--जोडणें; जुळणें.

घसा चिपणें--आवाज बसणें.

डोळे चिपणें—चिपडानें डोळे चिकटणें.

डोळे, नाक, हात चिपणें--डोळ्यांनीं, नाकावर बोट ठेवून हातांनीं वगैरे खुणा करणें.

तोंड चिपणें--तापांत ओठ चिकटणें.

पाय चिपणें—पाय जुळविणें.

फांसे चिपणें—फांशांवर विशिष्ट दान जुळून घेणें.

चिपळी——**चिपळींत धरणें**—मांड्यांच्या पकडींत कैचींत पकडणें.

चिपोटा—**चिपोटा होणें**—कृश होणें; चपटें होणें; वाळणें.

चिंबचळें——**चिंबचळें तरी शेतचें व थोटें पांगळें तरी पोटचें; चिंबपोळ शेताचें आणि नकटें फेपटें पोटचें**—वर पहा. आपल्या घरच्या शेतांत पिकलेलें धान्य मग तें सकसनिकस कसेंहि असलें तरी तें आपण आवडीनें खातों. त्याप्रमाणें आपल्या पोटीं आलेलें मूल मग तें कसेंहि व्यंग असलें तरी आपणास प्रिय असतें.

चिमटा——**चिमटा घेणें**--एखाद्यास बोंचेल झोंबेल अशी कृति करणें, बोलणें, लिहिणें; उपरोधिक बोलणें; आडून शब्द बोलणें.

चिमट्यांत धरणें—पेंचांत धरणें; अडचणींत पकडणें; खिंडींत गांठणें; अडकित्त्यांत धरणें.

चिमट्यांत सांपडणें—अडचणींत सांपडणें; पेंचांत येणें; संकटांत सांपडणें. अगतिक होणें.

चिमटी——**चिमटी चालविणें**—मंत्रप्रयोग करणें; जादूटोणा करणें; कुवेडें करणें; मूठ मारणें, वगैरे.

चिमटी टाकणें—विषारादीवर मंत्र टाकणें; तोडगा करणें.

चिमटी लावणें—युक्तीप्रयुक्तीनें एखाद्यास वश करणें; हळूहळू साध्य करणें.

❀ **चिमटी चिमटीनें लंका लुटली जाते**—थोडा थोडा नाश होत गेला व त्याला आळा घातला नाहीं तर कितीहि गडगंज संपत्ति असली तरी ती पुरत नाहीं. Constant dropping wears a stone.

चिमणी——**चिमणीच्या दांतानें फोडणें**—(चिमणीचे दांत कधीं दिसत नाहींत व लागत नाहींत.) एखादा पदार्थ वस्त्रांत गुंडाळून फोडणें (उष्टा होऊं नये म्हणून). लहान मुलें फळ वगैरे एखादा पदार्थ वांटून घ्यावयाचा असला म्हणजे तो उष्टा न होतां तुकडे पाडतां यावे म्हणून अशाप्रकारें त्याचे तुकडे करतात. पक्ष्यांनीं फळ चोंचीनें टोंचलें तरी त्यास दोष नसतो ही समजूत बरीच जुनी दिसते. तु०—नित्यमास्यं शुचि स्त्रीणां शकुनिः फलपातने। वत्सोपिस्तनपाने स्याच्छ्वा मृगग्रहणे शुचिः ॥—सुर १५६.१४४.

चिमणीसारखें तोंड करणें—चिमणीचें तोंड अगदीं लहान असतें. एवढेंसें तोंड करणें; चेहरा उतरणें (निराशा, दुःख अपमान इ. मुळें); खिन्न होणें; म्लानवदन करणें. 'पण पहा तो कसें चिमणीसारखें तोंड करून बसला आहे.' -गुप्तमंजूष.

चिमुट——**चिमुट लावणें**--चिमटी लावणें पहा. निकड लावणें. 'या पुस्तकाचें काम मजकडून अगदीं चिमुट लावून करवून घेतलें.'-आडिवऱ्याची महाकाली प्रस्ता.पा.१२.

❀ **चिमूटभर कथा व कंठाळभर नमन**—मुख्य गोष्टीकडे विशेष लक्ष्य न देतां प्रास्ताविक अगर आनुषंगिक गोष्टींचें अतिशय अवडंबर माजविणें.

चिरकांडी——**चिरकांडी लागणें**—जोरांत धार उडणें; रक्त, पाणी वगैरेची बारीक धार जोरानें उडणें.

चिरकाल——**चिरकाल भाजीभाकरी बरी, क्षणिक पक्वान्न न आदरी**--थोडे दिवस चैन करून मग अडचणींत येण्यापेक्षां जी राहणी नेहमीं कायम राखतां येईल अशा साध्या राहणीनेंच राहणें चांगलें.

चिरकी——**चिरकीस येणें**—१ थकणें; दमणें; श्रांत होणें. २ मेटाकुटीस येणें; जिकीरीस येणें; अगदीं त्रासून जाणें.

चिरगूट——**चिरगूट पांघरूण**—कपडेलत्ते; वस्त्र प्रावर्ण; जवळपासच्या वस्तू; सामानसुमान.

❀ **चिरगुटें घालोनि वाढविलें पोट। गरभार बोभाट जनामध्यें।**—वांझ स्त्रीनें पोटावर चिरगुटाच्या घड्या बांधून गरभारपणा दाखविणें. 'वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण। चिरगुटें घालून वाथयाला ॥' —तुगा २८७५.

चिरडी——**चिरडी खाणें**—चिडणें; चिडून संतप्त

होणें. ‘ त्यासीं भिडतां खालीं भले भले चिरडी ॥ ’ –मोकर्ण १२.९.

चिरडी नेसणें—(या ठिकाणीं चिरडी = साडी असा कोटिक्रम करून) चिरडीस येणें; चिडणें; रडकुंडीस येणें.

चिरडी मागणें—रागावणें; रुसणें; भांडणास प्रवृत्त होणें; चिडणें.

चिरणें——उभा चिरणें—१ लांबीच्या बाजूनें फाडणें, कापणें. २ पार चिरून टाकणें. ‘ महाकाळ उभा चिरीन बाणीं ।’

चिरल्या अंगोळीवर मुतणें—कापल्या करंगुळीवर मुतणें. करंगुळी पहा. एखाद्याची अंगुली चिरली, बोट चिरलें, अथवा थोडीशी इजा झाली व त्यावर मुताची धार सोडण्यानें, इतक्या क्षुल्लक उपायानें, तें दुःख दूर होईल अशी विनंति जर त्यानें केली तर जो मनुष्य तितकाहि परोपकार करण्यास तयार होत नाहीं, त्याला अनुलक्षून म्हणतात.

चिरा——चिरा उखळणें–उतरणें—१ कौमार्यभंग करणें; प्रथम संभोग करणें; पुढें वेश्येचा धंदा करणारीशीं विधिपूर्वक प्रथम गमन करणें. ‘ चिरा उखळा माझा राव नशा । घेऊन तुम्ही पलंगावर बसा । ’–पला ४.२५.

चिरा उलथणें—इमारतीचा दगड कोसळून पडावा त्याप्रमाणें मरून पडणें; मृत्यू येणें; मरून नाहींसें होणें; एकाएकीं मरण पावणें.

चिरा घालणें—एखादी गोष्ट गाडून टाकून त्यावर दगड बसवावा त्याप्रमाणें नष्ट करणें; नाहींसें करणें; पुरून टाकणें. ‘ तुका म्हणे घालूं जिवपणा चिरा । जाऊं त्या माहेरा निजाचिया ॥ ’–तुगा २५५४.

चिरा पडणें—१ धोंडा पडणें; नाश होणें; मोडणें; तुटणें. ‘ देवाची ते खूण आला ज्याच्या घरा । त्याचे पडे चिरा संसारासी ॥’ –तुगा ३७०७. २ एखादी क्रिया बंद पडणें; थांबणें. ‘ किंबहुना येरझारे । चिरा पडे ॥ ’–ज्ञा १२.१३६.

चिरेबंदी पाया घालणें—कोणत्याहि कार्याचा पक्केपणीं आरंभ करणें; मजबूत अशा गोष्टीवर आधारणें; पक्कें करणें.

चिऱ्यांचा पाया—१ दगडी पाया; मजबूत आधार; स्थिर आश्रय. २ केवळ पुरुषसंतती. मुली वगैरे तात्पुरत्या असून त्या दुसऱ्या कुळांत जातात; पण मुलगे त्याच कुटुंबांत स्थिर राहतात म्हणून ते कायमचे असतात यावरून. ३ स्थैर्य; भक्कमपणा; मजबुती.

चिऱ्यावरची रेघ—१ दगडावरील लेख; ज्याप्रमाणें दगडावर कोरलेली रेघ कायमची असते त्याप्रमाणें निरंतर टिकेल असा कायमचा लेख. २ अक्षर लेख; कधींहि पुसला जाणार नाहीं, बदलता येणार नाहीं असा लेख. ३ न मोडणारी चाल; नित्य परिपाठ; कधींहि बदलतां येणार नाहीं असा नियम. ४ इराणी लोकांचा एक कायदा.

चिराग——चिरागतेलें अंधियारा—दिव्याखालीं अंधार, पहा.

चिरिमिरि——चिरिमिरी घेणें–देणें—१ लांच घेणें; पानसुपारी घेणें; काम केल्याबद्दल गैरकायदा पैसा घेणें देणें. २ बक्षिस घेणें; काम केल्याबद्दल खूष होऊन कोणी दिलेली वस्तु, द्रव्य वगैरे घेणें; इनाम घेणें, देणें. ‘ साहेबाची भेट घ्यावयाची म्हणजे शिपायाला चिरिमिरी द्यावी. ’–के २६–७–३०.

चिलचिल——चिलचिल करणें—चिलबिल करणें; गोंगाट करणें; आवाज करणें.

चिलमी——चिलमी दानं, शत गो दानं, एक एक झुरका गंगास्नानं—(विनोदी) दुसऱ्यास चिलीम ओढावयास देणें यांत शंभर गाई दान दिल्याचें पुण्य आहे व चिलमीचा एक झुरका मारणें यांत गंगास्नानाचें पुण्य आहे. चिलमीचा शोक असणारानें सुभाषित केलेलें दिसतें.

चिल्लीं पिल्लीं——चिल्ल्या पिल्याची पाटी—(व.) मुलें बाळें असलेली स्त्री; कच्चीं बच्चीं असलेली स्त्री.

चिवचिव——चिवचिव करणें–करीत बसणें—आपणाशींच चरफडत, मुकाट्यानें बसणें; अगतिक होऊन बसणें. ‘ बाळोबाला चिवचिव करीत बसावें लागलें होतें. ’ –V.S २.७०.

चिवडणी——चिवडणी मांडणें–लावणें—चिडविणें; खिजविणें; एखाद्याच्या पाठीस लागून त्यास राग आणणें.

चीं; चींचीं——चीं म्हणणें—[चीं चीं हा पराभवाचा उद्गार] पराभव कबूल करणें; शरण जाणें; अगतिकत्व मान्य करणें.

चीक——चिकानें; चिकें बोळला—पक्क झालेला; तयार झालेला; खाण्यास योग्य अशा स्थितींत असलेला.

चीज——चीज न राखे आपनी, और चोरोंको गाली दे— स्वतःच्या वस्तू संभाळण्याची काळजी नाहीं व त्या चोरीस गेल्यास तीबद्दल चोरांस शिव्या द्यावयाच्या. त्यापेक्षां आपल्या वस्तूची आपण काळजी घेणें अधिक चांगलें.

चीत——चीत करणें—१ पराजित करणें; वठणीस आणणें; अंकित करणें. २ जमीनदोस्त करणें; ठार मारणें; नाहीसें करणें.

चीत होणें—१ थंड पडणें; पराभूत होणें. २ निरुत्तर होणें. 'पुढील उत्तरानें ब्राह्मण चीत झाला.'—अस्तंभा २६.

चीर——चीर जाणें—तडा, भेग पडणें; फाटणें; फुटणें; भंग पावणें.

चीवंटी——चीवंटीयोको मौत है, कारबला बस है—मुंगीला देखील मरणाच्या यातना होतात.—सवि ९२३.

चीळ——चीळ फुटणें—पान्हा फुटणें; स्तनांतून दूध येऊं लागणें.

चुकटी——चुकटी साधणें--येणें-बसणें—खुबी साधणें; हातोटी साधणें; सराव होणें; अभ्यास होणें; युक्ति साधणें.

चुकणें——चुकत चुकत; चुकत माकत; चुकत वांकत—चुकतां चुकतां; अडखळत; कसें तरी भरकटत. 'चुकत वांकत आठवलें । इतुकें संकलित बोलिलें ।' —दा १३.५.१९.

चुकला माकला; चुकला वांकला—वाट चुकलेला; भलतीकडे गेलेला; योग्य वेळीं योग्य ठिकाणीं नसलेला; राहिलेला; अवश्य तेव्हां उपस्थित नसलेला; गळलेला.

चुकल्या चुकल्यासारखें होणें--एखादी व्यक्ति किंवा वस्तु समोर न दिसल्यास त्याची सारखी आठवण होणें, त्यामुळें अस्वस्थ वाटणें; हुरहुर लागणें; मनास रुखरुख लागणें.

चुकून माकून; चुकून वांकून--नजर चुकीनें; दुर्लक्ष होऊन; अवधान न राहिल्यामुळें पूर्णपणें चौकशी न केल्यामुळें; हयगयीनें.

चुकूनसुद्धां—कधींहि न; केव्हांहि नाहीं; दुर्लक्ष होऊनसुद्धां नव्हे (नेहमीं अकरणरूपी प्रयोग होतो).

❀ **चुकला घाव ऐरणीवर-ऐरणीच्या माथीं**--ज्याप्रमाणें लोहाराच्या ऐरणीवर एखादी वस्तु घडत असतां व घणानें ठोकीत असतां एखादा घाव त्या वस्तूवर नीट न बसला तर सहजच ऐरणीवर पडतो व त्या ऐरणीस तो सहन करावा लागतो, त्याप्रमाणें एखाद्या कामाला मुख्यतः एक जबाबदार व्यक्ति असते, किंवा घरांत जी जबाबदार व्यक्ति असते तिच्यावर इतरांवर न पडणारी सर्व जबाबदारी पडते.

चुकला फकीर मशिदींत शोधावा-सांपडावयाचा; चुकला पीर-फकीर मशीदींत—मुसलमान फकिराचें वस्तीचें ठिकाण म्हणजे मशीद. तेव्हां गांवांत कोठें नसेल तर तो मशिदींत नेमका असावयाचा. एखाद्याची सांपडण्याची ठराविक जागा. 'खुदाबक्ष—सगळ्या बैठका, आखाडे, पायाखालीं घातले. चुकला फकीर मशिदींत सांपडायचा म्हणून सारे गुत्तेदेखील पालथे घातले !' —एकच प्याला ४.२.

चुकला भाई परळला सांपडावयाचा--वरील म्हणीवरून बनविलेली व अलीकडील समाजसत्तावादी तरुणांस लावण्यांत येणारी म्हण. मुंबईस परळ भागांत कामगारांची वसती असल्यामुळें समाजसत्तावादी लोकांनीं तेथें कामगारांच्या संस्था काढून आपलें कार्यक्षेत्र बनविलें आहे. त्यावरून बहुतेक समाजसत्तावादी लोक परळ भागांत कार्य करतांना आढळतात. —विविधवृत्त ३०-६-४०.

चुकलें गुरूं आखरास पाहावें-शोधावें--जें गुरूं सांपडत नाहीं तें बहुतकरून कोठें तरी चरावयास गेलेलें असावयाचें व रानांतून चरून आल्यावर घरीं न आलें तर गांवाच्या बाहेरच्या अंगास जी मोकळी जागा गुरें चरावयासाठीं ठेवलेली असते तेथेंच कोठेंतरी असावयाचें; तेव्हां तेथें शोधल्यास तें सांपडण्याचा संभव असतो.

चुकलें माकलें पदरांत घ्या, उरलेंसुरलें गुढीवर घ्या--(वांय.) आतांच्या वेळीं सांभाळून घ्या व जें कांहीं येणें देणें निघेल तें पुढें वसूल करून घ्या.

चुकल्याचें मन दाही दिशा—चुकलेल्या माणसाला काय करावें तें सुचत नाहीं; त्याला अनेक गोष्टी कराव्याशा वाटतात पण त्यांतील नक्की कोणती करावी हें समजत नाहीं.

चुकिल्लें गोरू धामापूरच्या तळ्यांत--(गो.) धामापूर म्हणून गोव्यांत सासष्टींत एक गांव आहे. तेथें मोठें तळें असल्यामुळें तेथें बहुतेक गुरें पाणी पिण्यास येतात तेव्हां तेथेंच एखादें चुकलेलें गुरूंहि पाणी प्यावयास आलेलें आढळावयाचें. कांहीं कुटुंबें आदरातिथ्याबद्दल फार प्रसिद्ध असतात. कोणीहि नवखा गांवांत येवो त्याला त्याच्याकडे पाहुणेर मिळावयाचाच. सरसकट सर्वांना नेहेमीं आदरातिथ्य मिळणाऱ्या कुटुंबाबद्दल योजतात.

चुकिल्या पदाक थन्नना घालचो--(गो.) चुकलेल्या पदाला 'थन्नाना' घालायचा. कशी तरी वेळ मारून नेणें.

चुकता——चुकता करणें-करून देणें--१ निःशेष करणें; बाकी न ठेवतां सर्व देऊन टाकणें; कर्ज, देणें वगैरेची सर्व फेड करणें. 'बाकी चुकती केली' 'सावकाराचा पैसा चुकता केला.' २ शिलकीचा, बाकी राहिलेला, द्यावयाचा राहिलेला सर्व देऊन टाकणें. 'चुकता पगार देऊन टाकला.'

चुकांडी——चुकांडी देणें—झुकांडी देणें; फसवून निसटून जाणें; चुकवून निघून जाणें; सोडून देऊन निघून जाणें; एखाद्यास न कळवितां व त्यास बरोबर घ्यावयाचें टाकून निघून जाणें.

चुकार——चुकार तट्टू—तट्टाप्रमाणें कामाची टाळाटाळ करणारा; कामचुकार; जबाबदारी टाळणारा.

चुकारी——चुकाऱ्या जाणें—चुकणें; नाहींसें होणें. 'चुकाऱ्या गेला राजा। चौघा जणांचा ॥ '—दा १५.५.२.

चुकी——चुकी ठेवणें—१ दोष लावणें; नांवें ठेवणें. २ वरचढपणा करून कमीपणा आणणें; कनिष्टपणा देणें. 'जें साहित्यानें वोजावी। अमृतानें चुकी ठेवी।' —ज्ञा १३.११५६.

❀ **चुकी झाली तर हरकत नाहीं पण चुकारपणा करूं नये**—चुकणें हा मनुष्यधर्मच आहे तेव्हां प्रामाणिक चुकीबद्दल कोणी दोष देणार नाहीं; पण काम टाळल्याबद्दल, कामांत चुकारपणा केल्याबद्दल मात्र शिक्षा करणें जरूर आहे.

चुकी मनुष्यापासून होती, शोधतांना कठीण पडती—मनुष्याच्या हातून एखादी चूक सहज होऊन जाते पण ती दुरुस्त करावयास मात्र फार यातायात करावी लागते.

चुकीक दोळे नात—चुकीला डोळे नसतात. जे चुका करतात ते जाणूनबुजून करीत नसतात. मनुष्याच्या हातून अजाणतां चुक्या होतात.

चुकीविषयीं कोणी चाखून रांधलें नाहीं—मनुष्याच्या हातून केव्हा ना केव्हां तरी चूक होतेच. कितीहि खबरदारी घेतली तरी एखादे वेळीं तरी मनुष्याच्या हातून प्रमाद घडतो. स्वयंपाक जो केला असतो तो चव पाहून केलेला नसतो. तेव्हां त्यांत कांहीं बिघाड झाला तर क्षम्य असतो. चाखणें पहा.

चुगली——चुगली खाणें—लावालावी करणें; चहाड्या सांगणें.

❀ **चुगली करणें हें अंधारांत मारण्यासारखें आहे**—एखाद्यावर नकळत हल्ला करणें हें जसें निंद्य आहे तसेंच एखाद्याची त्याच्या मागें चहाडी करणें हेंहि वाईट आहे.

चुटकी——चुटक्यांचा मांडव—एक स्त्री आजारी पडली असतां तिनें दुखण्यांतून बरें होण्यासाठीं देवास नवस केला, कीं मी बरी झाल्यास तुला चुटक्यांचे मांडव घालीन. पुढें ती बरी झाल्यावर तिनें देवळांत जाऊन प्रत्येक खांबागणिक चुटक्या वाजवून आपला मांडवाचा नवस पुरा केला. यावरून प्रत्यक्ष कार्य न करतां मोठमोठ्या बाता मारणें, पोकळ बढाई, पराक्रम. चटक्याचे मांडव पहा.

चुटक्यांचा मांडव, मुटक्यांच्या घुगऱ्या; चुटक्यांचा मांडव, पटक्यांच्या घुगऱ्या—घागऱ्या—वरप्रमाणें पोकळ बाता; वायफळ गप्पा; निरर्थक प्रौढी. चुटक्या वाजवून मांडव व टाळ्या (पटक) वाजवून घुगऱ्या किंवा घागऱ्या करणें, म्हणजे केवळ फसवणूक करणें होय. चुटक्यांचा मांडव पहा. 'चुटक्याचे मांडव वाजवून किल्ला हस्तगत करूं.'—सूज्ञ ७४.

चुटक्यांचा मांडव होत नाहीं—नुसत्या बाता मारून किंवा पराक्रमाचा आव आणून प्रत्यक्ष कार्य होत नाहीं.

चुटपुट——चुटपुट लागणें—मनाला तळमळ लागणें;मन खाणें; रुखरुख लागणें; मनाला टोंचणी लागणें; हुरहुर लागणें. 'कोण आले होते ते पक्केपणीं समजून येईपर्यंत मनाला मोठी चुटपुट लागावयाची.'—पकोघे.

चुट्टी——चुट्टी सोरोप करा—(गो.) पराचा कावळा करणें.

चुट्टेचो सोरोप—(गो.) दोरीला साप समजणें. विनाकारण भीति धरणें.

❀ **चुट्टे सर्पा कोण भिता?**—(गो.) बुजगावण्याला कोण भिईल.

चुडा——चुडा भरणें-लेणें—१ बांगड्या भरणें. 'जन्मसावित्री चुडा ल्याली.'—नामना ९२. २ (ल.) माघार घेणें; भागूबाईप्रमाणें भित्रेपणानें वागणें; घाबरून पुढें होण्याचें टाळणें; आव्हान न स्वीकारणें.

चुडेदान देणें—एखाद्या स्त्रीच्या पतीला प्राणसंकटांतून वांचविणें; तिचें सौभाग्य राखणें. "रखमा देवी म्हणे देई चुडेदान। संरक्षीरे प्राण भ्रताराचा ॥ "—तुगा.—मोसीता गीत १५३.

चुडेदान मागणें—१ सौभाग्य राहावें म्हणून प्रार्थना करणें; नवऱ्यास जीवदान मिळावें म्हणून याचना करणें. २ नवऱ्याचें आयुष्य वाढावें म्हणून परमेश्वराची प्रार्थना करणें.

चुडयावरची बांगडी—बांगड्या भरल्यानंतर फुकट दिली जाणारी बांगडी.

चुडी——चुडी पुनव—माघ शुद्ध पौर्णिमा; या दिवशीं चंद्र, गांवसीमेचा दगड, ग्रामदेवता यांभोंवतीं चुड्या ओंवाळतात.

चुना——चुना करणें—विध्वंस करणें; चुन्याप्रमाणें पिष्ट करणें; धुळीस मिळविणें; नायनाट करणें.

चुना पानाला न लागणें--एखादी गोष्ट अतिशय त्वरित पानाला चुना लावण्याइतका वेळहि न लावतां करणें. 'भलताच उडविल चुना न लागेल पानाला।'-अफला २१.७६.

नाकास चुना लावणें--एखाद्याची फजीती करण्यासाठीं त्याच्या नाकास चुना लावतात. फजीती करणें; पूर्ण उपहास करणें; चेष्टा करणें.

चुना होणें--नाश होणें; विध्वंस होणें.

चुबचुबीत——चुबचुबीत भिजणें—पाणी ठिबकेल अशा रीतीनें भिजणें; अगदीं पूर्णपणें ओलें होणें, ओलेंचिंब होणें.

चुंबा——चुंबा पडणें-बसणें-जमणें—मुंग्यांची, माशांची झुंड पडणें; अगदीं गर्दी जमणें; थवेच्या थवे येणें.

चुरचुर——चुरचुर चालणें—धुसफूस चालणें; कटकट लागणें; कुरबुर सुरू होणें.

चुरचुर लागणें--हुरहूर लागणें; रुखरुख लागणें; टोंचणी लागणें.

चुरमुरे——चुरमुरे खाणें-खात-बसणें-देत बसणें; चुरमुऱ्याचे लाडू खाणें--आशाभंगामुळें धुसफुसत बसणें; फजीती होऊन गप्प बसणें; कार्यनाश होऊन अपयश येणें; होणारा लाभ गमावून हात हलवीत बसणें; गप्प बसण्याची पाळी येणें. १ चुरमुरे खातांना आवाज होत नाहीं किंवा तोंडाची मोठीशी हालचाल होत नाहीं. यावरून २ मोठ्या पक्वान्नाच्या अभावीं चुरमुरे खाणें.

चुरमुरे खावयास लावणें—फसविणें; खुबाडणें; फलप्राप्ति व्हावयाच्या वेळीं लाभ होऊं न देणें; अपयश पदरांत बांधून गप्प बसावयास लावणें.-विक्षिप्त ३.१५७.

चुरमुऱ्यांचे लाडू खाणें--जेवण न मिळाल्यामुळें चुरमुरत बसणें; कांहीं लाभ न झाल्यामुळें स्वस्थ बसावें लागणें.

चुलता——चुलता मावसा मामा, कोणी न येती कामा--आपल्या नातेवाइकांवर विसंबून राहण्यांत अर्थ नसतो. वेळेवर कोणीहि आप्त उपयोगी पडत नाहीं.

चुवा——चुवा घालणें--पाऊस न पडल्यामुळें रोपांच्या बुडाशीं तांब्यातांब्यानें पाणी घालणें.

चुळका——चुळका भरणें—चूळ भरणें; गुळणा करणें.

चुळक्यांत पाणी घेऊन जीव देणें—अशक्य गोष्ट करूं पाहणें; चाळणींत पाणी घेऊन जीव देणें.

चुळचुळ——चुळचुळ लागणें—अधीर होणें; उतावीळ होणें; अतिशय उत्कंठित होणें.

चुळचुळ लावणें—घाई करणें; तगादा लावणें; पाठीमागें पिरपिर लावणें.

चुळचुळ (चुळबुळा) मुंगळा आणि पळीपळी तेल—मुलांच्या एका खेळाचें नांव.

चूं——चूं म्हणणें-करणें--सणसणणें; चूं चूं आवाज करणें; गोंगावणें.

चूक——चुकी पहा.

चूक झाली पदरीं घ्यावी, हुजत न करावी—आपली चूक असेल तर तीबद्दल वासाधीस न करतां ताबडतोब कबूल करावी.

चूक नव्हे, चुकीचा बाप—(बाप मुलापेक्षां मोठा असतो.) अतिशय मोठी चूक.

चूक पर्वताएवढी, शिक्षा टेकडीएवढी—मोठ्या चुकीस थोडी शिक्षा.

चूकभूल द्यावी घ्यावी—हिशोबामध्यें केव्हां केव्हां नजरचुकीनें भलताच आंकडा पडण्याचा संभव असतो. याकरितां हिशोबाच्या शेवटीं वरीलप्रमाणें शेरा मारून जर चूक असेल तर ती दुरुस्त करून वाजवी हिशोब असेल तो धरणें, अशी विनंति करण्याची पद्धति आहे.

चूक मनुष्यांत आहे, ईश्वरापाशीं क्षमा आहे—मनुष्य हा स्खलनशील आहे, परंतु परमेश्वर हा दयाळु असल्यामुळें तो मनुष्याचे अनेक अपराध माफ करतो. तु०—To err is human and to forgive divine.

चूड——चुडी पहा.

चूड-उचलणें-धरणें-लावणें—१ आग लावणें; कलह पेटविणें. २ (ल.) बालंट उभारणें; आळ घेणें; आरोप ठेवणें.

चूड फिरविणें—जाळणें; पोळणें; आग लावणें.

चूड लावून म्हारू घरां हाडप्—(गो.) चुडणीचा प्रकाश दाखवून समंध घरांत आणणें. आपण होऊन संकटास निमंत्रण देणें.

चूत——चूत, चुना, हुका आणि मुका (यांना बाट नाहीं); चूत, चमन(चुंबन) आणि चुना, कुठेंच विटाळ नाहीं यांना—या वरील वस्तु कोणापासूनहि घेण्यांत दोष नाहीं अशी समजूत आहे. तु०—नित्यमास्यं शुचि स्त्रीणाम्।

चून——चून कांतून आनी उतर चिंतुन पळौचें—(गो.) खोबरें काढलें म्हणजे नारळ कसा आहे तें सम-

जतें. माणसाची परीक्षा त्याच्या प्रश्नोत्तरांवरून, त्याला प्रश्न टाकून कळून येते.

चूर——चूर होऊन मरणें—मनांतल्या मनांत खेद करीत पण वरून शांतपणें बसणें. 'पण करावयाचें काय, आंतल्या आंत चूर होऊन मेलें पाहिजे. तोंडावाटें एक ब्र काढण्याची सोय नाहीं.'–विकारविलसित.

चूर होणें—१ विस्मयपावणें; चकित होणें. २ थिजणें. –मोशल्य ३.७८. 'आपणास्वतःहून अधिक बुद्धिमान् अशा स्त्रीशीं बोलत आहों ही खात्री पटून तो मनांत चूरच झाला.'–नवलपूरचा संस्थानिक.

चूल——चूल अडणें—एक वेळच्या स्वयंपाकापुरेसेंहि साहित्य नसणें; स्वयंपाकाचा खोळंबा होणें.

चूलखंड थंडावणें––वरीलप्रमाणेंच. 'घरांत चुलखंड थंडावलं आहे, तिथं माझीं हाडं लावूं कीं तुमचीं !'–एकच प्याला ३.२.

चूलपोतेरें करणें––खरकट्या चुलीला पुन्हां स्वयंपाक करण्यापूर्वी शेणामातीनें सारवितात. यावरून झाडसारवण करून स्वयंपाकाची तयारी करणें.

चूल भानवशा—चूलकोंबडा; नेहमीं स्वयंपाकघरांत बसून राहणारा; नेहमीं बायकांत बसणारा; घराबाहेर कधींहि न पडणारा; बायल्या; बायक्या.

चूल भानवस झाडली–सारवली–लिंपली–आटपली––स्वयंपाक तयार आहे या अर्थी.

चूल भुई––चूलपोतेरें; चूल सारवणें, जमीन सारवणें वगैरे स्वयंपाकघरांतील कामें.

चुलीजवळ शौर्य दाखविणें—घरकोंबडेपणा करणें; घरांतच तेवढ्या पराक्रमाच्या गोष्टी सांगणें; बाहेर भित्रेपणा पण घरांत बायकोजवळ शौर्याच्या गोष्टी सांगणें.

चुलींत घाल-ला !––जाळून टाक, नाश कर या अर्थी त्रासून, विटून म्हणतात. शापाचा उद्गार.'' 'चुलींत घाला या साऱ्या वाड्या अन् चाळी' त्रासिकपणें तो गृहस्थ उद्गारला.'' –दौलत ४३.

चुलींत जाणें–चुलींत घाल पहा. नाश होणें; नष्ट होणें; नाहींसें होणें; रागाचा, त्रासाचा उद्गार; शाप.

चुलींत–**चुलीशीं डोकें खुपसणें**––स्वयंपाकाची जिकीर सहन करणें.

चुलींत मांजरें व्यालेलीं असणें––(चूल वापरण्यांत नसल्यानें मांजरी त्या ठिकाणीं निर्धास्तपणें व्याली तर नवल नाहीं). १ विपन्नावस्था येणें; पूर्ण दारिद्र्य येणें. २ चूल बंद असणें; स्वयंपाक करण्यापुरतीहि घरांत सामग्री नसणें.

चुलींतून निघून वैलांत पडणें––एका संकटांतून बाहेर येऊन दुसऱ्यांत पडणें; आगींतून निघून फोफाट्यांत पडणें. –पामो ५४९. (गु.) चुहलामांथी निकली होलामां पडवुं.

चुलीला अक्षत देणें–लागणें––घरांत कोणी जेवावयाचें नसल्यास चूल थंड राहातें व तेवढ्या वेळपुरती तिला सुट्टी मिळाली असें होतें. धर्मकृत्य आटोपल्यावर यज्ञादि वस्तूवर ब्राह्मण अक्षता टाकतात व कार्य संपलेंसें दर्शवितात. १ स्वयंपाक बंद ठेवणें. २ सर्व घरांतील मंडळींनीं आपल्याकडे जेवण्यासाठीं यावें अशा हेतूनें 'मी ही तुमच्या चुलीला अक्षत देतों' असें सांगणें. जेवण्यास आमंत्रण करण्यासाठीं अक्षत देतात यावरून. 'अक्षत देणें' पहा.

चुलीला विरजण पडणें––चूल विझणें; स्वयंपाक वगैरे सर्व काम आटोपणें.

चुलीवर चढलेलें––शिजत असलेलें; तयार होत असलेलें. 'आपण फडनिविसास सोडून चुलीवर चढलेलें राजकारण पाहूं.'–अस्तंभा ७२.

❀ **चूल आणि मूल**—स्त्रियांचीं मुख्य कामें दोनः चूल आणि मूल सांभाळणें. या दोन कामाव्यतिरिक्त त्यांना दुसऱ्या गोष्टी करण्यास सवड होत नाहीं व हीं कामें फार महत्त्वाचीं असल्यानें स्त्रियांची योग्यता दिसून येते.

चूल लहान ठेवणें, तर घर वाढविणें––काटकसर करण्यानें संसार वाढतो व समृद्धि लाभते. The smallness of the kitchen makes the house the bigger.–सवि ३५४५.

घरोघर मातीच्या चुली—मनुष्याची वागणूक सर्व ठिकाणीं सारखीच असते. सर्व कुटुंबांत वागण्याची पद्धति सारखीच असते. घर पहा.

चुलीची फरफर, म्हताऱ्याची किरकिर; चुलीची फुरफुर, म्हातारीची कुरकुर––या गोष्टी कधीं थांबत नाहींत. चूल नेहमीं फुरफुरावयाची त्याचप्रमाणें म्हाताऱ्या माणसांचें तोंड नेहमीं चालूच असावयाचें.

चुलीचें लांकूड चुलींतच जळावें; चुलीचें लांकूड चुलींत बरें––ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याला स्थान अगर महत्त्व मिळतें किंवा त्या वस्तूचा उपयोग होतो. भलत्याच कामीं एखादी वस्तु लावल्यास त्यापासून हानि होते.

तु०–पायींची वहाण पायांतच बरी. (गु.) चुहलानुं लाकडुं चुहलांमां बलवानु.

चुलींतून निघाली, फुफाट्यांत पडली––एका विघ्नांतून निघून दुसऱ्या अरिष्टांत सांपडणें. 'आगींतून निघून फु०' असाहि पाठ आहे.

चुलीपाशीं जावें, पूर्वकर्मास रडावें––आपल्या नशीबांत स्वयंपाक करणें हेंच आलें, आपलें पूर्वकर्म वाईट आहे, असें दुःख करीत स्वयंपाक करीत राहणें. नशीबीं आलें तें निमूटपणें भोगणें.

चुलीपाशीं हगे आणि कपाळीं सांगे––स्वतः एखादी वाईट गोष्ट करावयाची आणि त्याचा आळ दैवावर घालावयाचा. माझ्या नशीबांतच होतें कीं मी असें करणार, असें म्हणून आपला बेवकूबपणा झांकावयाचा.

चुलीपुढें शिपाई नि दाराबाहेर भागूबाई—घरांत तेवढा शूर. तु०–गांवचा रांड्या व बायकोचा देशपांड्या.

बायकांचें शहाणपण चुलीपुरतें—स्त्रियांस फक्त आपल्या घरसंसाराच्या किंवा स्वयंपाक करण्याच्या बाबतींतच बुद्धि चालवितां येते, इतर बाबतींत त्यांना फारसें ज्ञान नसतें. त्यामुळें अशा बाबतींत त्यांचा सल्ला ऐकूं नये अशा प्रकारची थोडीशी हेटाळणीची वृत्ति या म्हणींत दिसून येते.

चुलीमध्यें मांजरें निजलीं (व्यालीं) आहेत––चूल थंड आहे; स्वयंपाक बंद आहे. वाक्प्रचार पहा.

चुलीला तीनच दगड––कोणीहि चूल घातली तरी तिला तीनच दगड लागतात. अशा प्रकारच्या गोष्टींत कोठेंहि सारखेपणाच दिसून येतो. कितीहि बुद्धिवान् झाला तरी सामान्य गोष्टींत तो इतर सर्व लोकांप्रमाणेंच वागतो, त्यांत त्याला कांहीं कमीजास्त करतां येत नाहीं. तु०–पळसाला पानें तीनच. घरोघर मातीच्या चुली.

सर्व सिद्ध आणि चुलीस पोतेरें–– तोंडानें म्हणावयाचें कीं, सर्व स्वयंपाक तयार आहे म्हणून पण प्रत्यक्ष पाहावयास जावें तों कोठें चूल सारवण्याचें काम चालू असून, विस्तव घालण्यापासून पुढच्या सर्व क्रिया व्हावयाच्याच असतात. एखादें कार्य पूर्ण झालें असें सांगत असतां प्रत्यक्ष कामास आरंभहि झालेला नसावयाचा अशी स्थिति.

चूळ——चूळ करणें––खाज सुटणें; कंड खाणें.

चें-चेंचें——चेंचें करणें––दीनवाणीनें विनंति करणें.

चेंचें करायला लावणें––दीन करणें; शरण येण्यास लावणें. 'स्वरचित काहुरांत गुंतवून कोणालाही चेंचें करायला लावणारा, परंतु शिंद्याच्या दराऱ्यानें चीत झाला.' –V.S.२.७१.

चेड——चेडवाकारांची मान सदांच खालती––(गो.) मुलींचे बाप नेहेमींच आपल्या माना लज्जेनें, कमीपणाच्या जाणिवेनें खालीं घालतात. मुलीच्या बापाचा पक्ष हा वरपक्षापेक्षां नेहमीं मानानें कमी समजण्याचा प्रघात आहे. वधूपक्षास नेहमीं वरपक्षाचा वरचष्मा सहन करावा लागतो.

चेडती——चेडती वाल मोंड नये––(गो.) चढणारा वेल मधेंच मोडून टाकूं नये. एखाद्याची आशा, उमेद खची करूं नये. प्रगति खुंटवूं नये.

चेडी——चेडी संथारी जाल्झारी पतिव्रता जत्ता?––(गो.) [चेडी=गौड सारस्वत समाजांत देवळांतून नाचगाण्यासाठीं या स्त्रिया असतात. देवदासीसारखा एक वर्ग] वेश्या म्हातारी झाली म्हणजे तिला पतिव्रता म्हणतां येईल काय?

चेडिये पोराक दीसा बापइ ना, राति आवइ ना—(गो.) वेश्येच्या पोराला दिवसा बाप असत नाहीं आणि रात्रीं आई असत नाहीं. अर्थ स्पष्ट आहे.

चेडियेक इत्या घोवु, चांडाळा इत्या देवु—(गो.) वेश्येला नवरा आणि चांडाळाला देव हे काय कामाचे?

चेडो——चेडो झाल्ल्याक्, माड लाइल्ल्याक् किता भेद?—(गो.) [चेडा = मुलगा] माडाचें झाड लावणें व मुलाला जन्म देणें यांत काय भेद? मुळींच नाहीं. दोघेहि म्हातारपणीं उपयोगी पडतात.

चेडो माडावरी, चेडूं केळीवरी––(गो.) मुलगा माडाप्रमाणें व मुलगी केळीप्रमाणें. नवरामुलगा चांगला बळकट व निरोगी असावा व नवरीमुलगी नाजूक व गोड स्वभावाची असावी म्हणजे हा जोडा उत्तम.

चेत——चेत घेणें––पेटणें; जळणें; आग लागणें.

चेत येणें––१ भडकणें; पेटणें; ज्वाला उठणें. २ चेतना येणें; जागृत होणें.

चेडुं——चेडवं सानपणांत्तु आवसुक पितातिं, होडं जातचि बापसुक पितातिं––(गो.) मुलें लहान असतां आईला पितात व मोठेपणीं बापाला पितात. मुलें लहानपणांत आईचें सुख अनुभवतात व मोठीं होतांच बापाचें सुख अनुभवतात. लहानपणीं आई व मोठेपणीं बाप मुलांना सांभाळतो.

चेल्डुं(डुं) हाल्डी(डीं)रि घालुनु गांवभरि सोच्चें—

(गो.) मूल कडेवर असतांना विसरभोळेपणानें त्याला गांवभर शोधायाचें. तु०–खाकेंत कळसा, गांवाला वळसा.

चेडींगेले हाल आवसुकडे थाइ––(गो.) आई असे तोंपर्यंतच मुलाची विचारपूस व्हायची.

चेला––चेल्याचे कान गुरूच्या हातीं––शिष्य हा गुरूच्या ताब्यांत असतो. शेळीचे कान गोसाव्याच्या हातीं पहा.

चेलीचे कान गुरूच्या–गोसाव्याच्या हातीं––शिष्यीण ही सर्व प्रकारें आपल्या गुरूच्या मताप्रमाणें वागते. शेळीचे कान असाहि पाठभेद आहे. गुरु, गोसावी पहा.

चेल्ली––चेल्ली चिन्हा, दोळे कुडें; चेली सुंदर, दोळे कुड्डे––(गो.) मुलगी सुंदर आहे पण डोळे गेले आहेत. मुख्य गोष्टीशिवाय सर्व चांगलें आहे!

चेष्टा––चेष्टा करणें––१ थट्टा करणें; मस्करी करणें; विनोद करणें. २ उपहास करणें; फजीती करणें.

चेष्टावणीचें भूत––१ उठविलेलें पिशाच; दुसऱ्यास पीडा करण्याकरितां केलेलें चेटूक. २ चिथविलेला मनुष्य; चिडवून रागास आणून एखाद्या गोष्टीस प्रवृत्त केलेला मनुष्य.

चेहरा––चेहरा करणें–बनविणें––दाढी वगैरे करणें; चेहरा साफ करणें.

चेहऱ्यावरून मनाची स्थिति कळते––मनुष्याच्या मनांतील विकारांचें व विचारांचें प्रतिबिंब त्याच्या चेहऱ्यावर पडतें व त्यावरून त्याच्या मनांत काय चाललें आहे हें ओळखतां येतें.

चैत्र––चैत्र शिंपणें––चैत्र महिन्यांत पडणारा भुरभुर पाऊस.

❀ **चैत्र गळे, कुणबी पळे**–चैत्रांत शेतकऱ्यास शेतीच्या मशागतीचीं कामें बरींच करावयाचीं असतात व त्यावेळीं कडक ऊन पडून जमीन तापल्यास ती सुपीक होते. परंतु जर त्यावेळीं पाऊस पडला तर त्यास शेतीचीं कामें करतां येत नाहींत व जमीन खराब होऊन त्याचें फार नुकसान होतें. कुणबी पहा.

चैन––चैन मारणें––मजा करणें; चंगळ करणें; छानछोकी करणें; उथळपट्टी करणें; ऐषआरामांत दंग असणें.

❀**चैनीच्या वस्तूंची खरेदी, खाण्याला आली उपाधी**––खाण्यापिण्याची आबाळ करून चैनीच्या वस्तु घेण्याकडे सर्व पैसा खर्च करण्याची कांहीं लोकांची प्रवृत्ति असते तीस अनुलक्षून ही म्हण वापरतात.

चोख––चोख व्यवहारीं मिळवावें, तें जपून खर्चावें––सर्व व्यवहार सचोटीनें व प्रामाणिकपणानें करावा व त्यांत जी प्राप्ति होईल तिचा योग्य तऱ्हेनें उपयोग करावा.

चोख सोन्यास डाकानें बट्टा–– सोनें स्वतः चांगलें शुद्ध असतां त्याचा दागिना करण्यासाठीं त्यास डाक लाविल्यानें त्याचा कस कमी होतो. त्याप्रमाणें एखादा मनुष्य स्वभावतः अत्यंत सज्जन व सचोटीचा असतां एखाद्या आगंतुक कारणानें त्याच्या चारित्र्यास डाग लागण्याचा संभव असतो.

चोखट––चोखटाईची भाजी––निर्लेप भाजी; खरकटी नसलेली भाजी.

❀**चोखट चिरा, दातीं कुरा**––(व.) वरून मात्र झकपक.

चोखटाईचा हिरा न् सात मण बुरा––(व.) जो मनुष्य स्वच्छतेबद्दल फाजील होट मारतो पण खरोखर पाहिलें असतां मूर्तिमंत अस्वच्छता किंवा घाण त्याच्यापाशीं असते त्याला ही म्हण लावतात. बुरा चढणें अस्वच्छतेचें द्योतक आहे; वरचेवर झाडलोट न केल्यास धूधा न केल्यास बुरा चढतो. "स्वच्छता तर मोठी दाखवितो; पण तोंड धुवायला तर रोज ठिकाण लागत नाहीं, कीं रोज स्नान होत नाहीं. 'चोखटाईचा हिरा न सातमण बुरा.'"

चोखाळा––चोखाळा घेणें––कसोशीनें झाडा घेणें.

चोंच––अगोदर चारा, मग चोंच––परमेश्वर जन्मास घालण्यापूर्वी प्रत्येक प्राण्याच्या अन्नपाण्याची तजवीज करून ठेवीत असतो. तु०–बाहेर निघतां मातेचे स्तनीं पय केलें निर्माण। रामा, तूं माझा यजमान॥

चोंच दिली त्यानें चारा दिलाच आहे––वरील-प्रमाणेंच. ज्या परमेश्वरानें खाण्याचें साधन (चोंच) दिलें आहे, तो खाणें हें देणारच. तेव्हां त्याची काळजी नको. जगांत परमेश्वर कोणाला उपाशी ठेवीत नाहीं.

चोंचा––चोंचा मारणें––त्रास देणें; पीडा करणें. 'सैन्य पैशाच्या अभावीं सांपडेल त्यास चोंचा मारूं लागलें.' –अस्तंभा १९.

चोज––जिवाचें चोज करणें––नखरे, चाळे करणें; स्वतःचेंच कौतुक करणें; स्वतःची हौस पुरी करून घेणें.

❀ **चोजाचें ओझें, ढुंगणाला थंडी वाजे**––आवडीनें दागिने वगैरे वरच्या अंगाला घालावयाचे पण नेसण्याला वस्त्र मात्र नीट नसावयाचें अशी स्थिति.

चोट——हातीं चोट असणें—(शिवी) कांहींहि हातीं नसणें. 'अंगीं घेऊनियां वारें दया देती । तया भक्तां हातीं चोट आहे ॥'–तुगा २८४२.

चोटली हातांत घेऊन फिरप–(गो.) व्यभिचारी मनुष्य.

चोटान शेळौणी घालप—(गो.) [शेळौणी = शीळ] व्यभिचारप्रवृत्त असणें.

❀चोटा चोटा, होडी लोटा !—(नाविक) एखादा मनुष्य होडीवर नुसताच बसून राहिलेला असतो; त्याला कांहीं काम सांगितलें तरी तो जागचा हालत नाहीं; नुसतें तोंडानें मात्र "तें मी करतोंच आहें. तुम्हीं जोर करा, म्हणजे जाईल होडी पुढें !" असें उत्तर देतो. अशाला त्यानें 'चोटा चोटा होडी लोटा !' चालवलें आहे असें म्हणतात.

चोंडकें——गोंधळ्याच्या मागें चोंडकें वाजविणारा असतोच—[चोंडकें = तुणतुणें] गोंधळ्यास बोलावलें असतां त्याबरोबर त्याचा तुणतुणें वाजविणारा ज्याप्रमाणें येतो, त्याप्रमाणें मुख्य गोष्टीबरोबर तदनुषंगिक गोष्टींचा अंतर्भाव होतो.

चोंदी——चोंदी घालणें–देणें–बसणें–बसवणें—दट्टया देणें; चिंध्यांचा वगैरे बोळा घालणें; तोंड, बीळ वगैरे बंद करणें.

चोंदी देऊन जाणें—फसवून जाणें; ठकवून जाणें; लबाडीनें नागवून निघून जाणें.

चोंदी देणें––तोंडांत बोळा देणें.

चोप——चोप धरणें—१ सपाट होऊन एका पातळींत येणें; सपाट होणें. २ ताळ्यावर येणें; ठिकाणावर यणें; जागृत होऊन नीट भानावर येणें; शांत होणें; नीट शुद्धीवर येणें.

❀ज्याची त्याला चोप नाहीं शेजारणीला–शेणपुंजीला झोंप नाहीं; ज्याचे त्याला नाहीं चोप आणि शेजाऱ्या येईना झोंप—[शेणपुंजी = हलकी स्त्री.] दुसऱ्या हलक्या स्त्रीला आपणाबद्दल जी काळजी ती सुद्धां स्वतःला नाहीं. मालक स्वतःच्या मालाविषयीं बेफिकीर, पण शेजाऱ्यांना मात्र त्याविषयीं काळजी वाटते व ते जपत असतात.

चोपट——चोपट करणें––पार सपाट करणें.

चोपडा——चोपडा चटचटीत––अगदीं गुळगुळीत.

चोपडा देवदार–(व.) वरपांगी भलेपणा दाखविणारा.

चोपड्या गोट्यावर हेपल्या मारणें—(अशिष्ट) निरर्थक, निष्फळ श्रम, मेहनत.

चोपडें——उष्टें खावें चोपडाचे आशेस्तव–[चोपडें= तूप, तेल वगैरे स्नेहयुक्त पदार्थ] तुपाकरितां उष्टें खाणें. कांहींतरी लाभ होईल या आशेनें एखादें अमंगळ काम करणें.

चोमडी——चोमडी चपाती, दमडीची उदबत्ती–वातट पोळी व हलकी उदबत्ती असें भिकार जेवण. (?)

चोर——चोरओटी भरणें––स्त्रीच्या प्रथम गर्भारपणांत तिसऱ्या किंवा चवथ्या महिन्यांत गरोदर स्त्रीस शिंक्याखालीं बसवून प्रसिद्धी न करतां ओटी भरणें. त्यावेळीं तिचें पोटहि विशेष दिसत नसतें, म्हणूनहि तीस चोरओटी म्हणतात.

चोरांची दावण देणें—अनेक चोरांस एकदम शिक्षा करणें. चोरांची माळ बांधून त्यांस एकदम फांशीं वगैरे देणें.

चोरांपोरीं; चोरांमोरीं; चोरींपोरीं––चोरांनीं, उनाड पोरांनीं किंवा कोणी तरी (वस्तू लांबविणें).

❀चोर आले घरीं मग मी गेलें माहेरीं–पळपुटा मनुष्य.

चोर उठून कोतवालाक धरता—(गो.) चोर उलट कोतवालासच धरतो. दुसऱ्यावर अपराध लोटणें. तु०–उलटा चोर कोतवालास दंडी.

चोर उडता, कोतवाल धरता––(गो.) चोर पळून जातो आणि कोतवाल पकडला जातो. उलटा न्याय.

चोरी करी चोरी आणि डागिणे सोनाराच्या घरीं––चोर चोरी करून दागिने आणतो पण ते स्वतःच्या घरीं त्याला भीतीमुळें ठेवतां येत नाहींत व ते मोडून गपचुप विकावयाचे असतात म्हणून त्याला ते सर्व सोनाराच्या स्वाधीन करावे लागतात. यावरून एकानें एखादें धाडस करावयाचें, पण त्यापासून होणारा लाभ मात्र त्यास न घेतां येऊन भलत्यालाच मिळावयाचा.

चोर गेला यात्रेला, वर्षाचा सांठा पुरा केला––यात्रा, मेळे अशा गर्दी होणाऱ्या ठिकाणीं चोऱ्या हटकूनच फार होतात. इतर माणसें पुण्यसंपादन करावें, देवधर्म करावा याकरितां यात्रेला जातात पण चोर जो यात्रेला जातो तो जाण्याला जरी यात्रेचें निमित्त असलें तरी वास्तविक तो चोरी करण्याच्या उद्देशानेंच जातो; व अशा वेळीं खूप चोऱ्या करून वर्षाची बेगमी करून ठेवतो. लबाड व धूर्त मनुष्य वरून एखादें चांगलें निमित्त दाखवून आपले दुष्ट बेत साधीत असतात.

चोर चोराक गवय––(गो.) [गवय=गवाह, साक्षीदार] एका चोरानें दुसऱ्या चोराला साक्षीदार होणें.

चोर चोरीसे गया, तो हेरी फेरीसे न गया--चोर जो चोरी करावयाच्या ठिकाणाहून जातो तो सहज एखाद्या क्षुल्लक कारणाकरितां किंवा कांहींतरी घेतल्याशिवाय जात नाहीं. सहज जातां जातां कांहींतरी हाताला लागेल तें बहुधा नेल्यावांचून तो राहात नाहीं. एखाद्या वाईट मनुष्याशीं प्रसंग आला म्हणजे कांहींतरी हानि झाल्याशिवाय राहात नाहीं. किंवा चोर चोरी करावयास आला असतां चोरी केल्याशिवाय परत गेला तर तो कांहींतरी विशेष कारण झाल्या वांचून गेला असेल असें समजूं नये. कांहीं तरी त्यास विशेष भीतिदायक गोष्ट झाली असल्यामुळेंच तो गेला असला पाहिजे, असें अनुमान काढावें.

चोर तो चोर आणि धन्याहून शिरजोर; चोर तो चोर आणि-आणखी शिरजोर; चोर तर चोर आणि वर शिरजोर—स्वतः चोर असून आणखी वर चढेलपणाच्या गोष्टी सांगणारा; स्वतः अपराधी असूनहि दुसऱ्यावरच तोंड सोडणारा; अपराधी पण उर्मट मनुष्य.

चोर धरावा मोटे, आणि शिंदळ धरावी खाटे; चोर पकडावा वाटेवर आणि शिंदळ पकडावी-वी खाटेवर--चोर धरावयाचा तो मुद्देमालासकट पकडल्यास उत्तम; तसेंच जारजारिणीस त्यांच्या दुष्कृत्यांतच पकडलें असतां संशय राहात नाहीं व त्यांस सबबी सांगण्यास जागा राहात नाहीं. -नर्स सुंद्राबाई ५९.

नुसता चोर पुरवतो, पण घरचा चोर पुरवत नाहीं—बाहेरचा चोर एखाद्याच वेळीं चोरी करतो व त्यावर पाळत वगैरे ठेवून त्याचा बंदोबस्त करतां येईल. पण स्वतःच्या घरांतीलच व्यक्ति चोरी करूं लागल्यास त्या गोष्टीचा बंदोबस्त करणें शक्य होत नाहीं. बाहेरच्या शत्रूवर इलाज करतां येतो पण घरचा शत्रु अतिशय नुकसानकारक असूनहि त्याचा बंदोबस्त करणें अधिक कठिण असतें. तु०-अस्तनींतील आग, निखारा.

चोर सुटला, हात फुटला--चोराला धरावयास गेलें असतां तो मारामारी करून निघून जातो व जातांना हातास दुखापत करून जातो व चोर तर सांपडत नाहींच पण चोरानें नेलेला जिन्नसहि मिळत नाहीं. याप्रमाणें एखादें संकट निवारण करावयास जावें तों त्याचें निराकरण तर होत नाहींच पण अधिक आपत्ति मात्र ओढवते अशा वेळीं ही म्हण वापरतात.

चोर सोडून कोतवालास दंड--वर पहा.

चोर सोडून संन्याशास सुळीं; चोरा सोडून संन्यासा सुळीं—(गो.) चोराला सोडून संन्याश्याला सुळीं देणें. खरा अपराधी सोडून निरपराध्याला शिक्षा करणें.

चोरके दिलमें चोरी वसे--चोराच्या मनांत नेहमीं आपण केलेल्या चोरीबद्दलचेच विचार असतात. त्याप्रमाणें पातकी मनुष्याच्या मनांत त्यानें केलेलीं पातकें डाचत असतात. चोर प्रत्येक गोष्टीकडे आपणास चोरी करण्याच्या कामीं तिचा कसा उपयोग होईल या दृष्टीनें पाहात असतो. तु०-चोराच्या मनांत चांदणें.

चोरको चोरही पहच्याने—चोराचीं पावलें चोरच ओळखतो.

चोराआधीं मोट उतावळी--चोरानें आपण येऊन मोट चोरून नेण्याऐवजीं मोटच जणूं कांहीं त्याकडे जावयास निघणें. म्हणजे दुसऱ्यानें आपलें नुकसान करावयाचें त्या ऐवजीं आपण होऊनच जणूं कांहीं त्याच्या हातांत आपल्या नाड्या देऊन आपल्या नुकसानीस आपणच साहाय्यभूत व्हावयाचें; अशी परिस्थिति असली म्हणजे ही म्हण योजतात.

चोरां आवय हडयांक घाय—(गो.) चोराची आई आंतल्या आंत मूक रुदन करीत असते. मुलाच्या दुर्वर्तनाबद्दल तिला वाईट वाटतें पण उघडपणें रडल्यास मुलाचा गुन्हा उघडकीस येऊन त्याला शिक्षा होईल, ही भीतिहि अपत्यप्रेमामुळें तिला वाटत असते. चोराची आई० पहा.

चोरा घुट्टु चोरा गोत्तु—(गो.) चोराचे मार्ग चोरालाच ठाऊक असायचे. चोराचीं पावलें० पहा.

चोरा भय चोराक, जारा जाळ चाराक—(गो.) चोराचें भय चोराला, जाराचा राग जाराला. तु०-याचकं याचको दृष्ट्वा।

चोरा मनां चान्नें; चोरा चान्नँ नसाय्—(गो.) चोराला चांदण्याचें वावडें. चोराला चांदण्याचा संशय. चोराच्या मनांत चांदणें.

चोरा रुचे निशी। देखोनियां विटे शशी ॥—चोरास रात्र आवडते पण त्यास चांदणें आवडत नाहीं. चांदणें पहा.-तुगा ३१४६. तु०-चोराणां चंद्रमा रिपुः।

चोरा सैल दोरी देणें, आपला घात करून घेणें--आपलें नुकसान करणारास आपण अधिक सवलती देण्यानें तो आपला आपण होऊन आत्मघात करून घेण्याप्रमाणें होतें. अपराध्यास आपला नाश करून घेण्यास पूर्ण वाव द्यावा.

Give a thief rope enough and he will hang himself.-सवि ११६१.

चॉरा हाता तल्लुक—(गो.) चोराच्या हातांत एखादी वस्तु दिली, कीं तिची आशा करायलाच नको.

चोरा हातांतु बिगाहातु—(गो.) चोराच्या हातांत किल्ली.

चोराक चांदण्याचो हुस्को--(गो.) चोराला चांदण्याची धास्ती. ज्याचे हेतु चांगले नसतात तो प्रसिद्धि टाळतो.

चोराक जीब घट्टि--(गो.) चोराची जीभ टणक. तो कधींहि आपला अपराध कबूल करायचा नाहीं.

चोराक विच्चु चाविल्ले वारि--(गो.) चोराला विंचू चावला तरी पकडले जाण्याच्या भीतीमुळें त्याला ओरडतां येत नाहीं. कांहीं कांहीं दुःखेंहि अशीं असतात कीं, तीं मूकपणें सोसावीं लागतात.

चोराचा माल चोरीस गेला तर हाक ना बोंब--चोराजवळच्या सर्वच वस्तू दुसऱ्याच्या चोरून आणलेल्या असतात, म्हणून त्या चोरीस गेल्या तर त्याला त्याबद्दल मुळींच ओरड करतां येत नाहीं. त्याप्रमाणें अन्यायानें वागणाऱ्या मनुष्यास अन्याय झाल्यास त्याला तक्रार करण्यास जागा नसते.

चोराचा लागतां तंटा, सावकाराला मिळतो गठ्ठा--चोर चोरी करून गेले म्हणजे पुष्कळ वेळां त्यांची आपसांत वांटणी करतांना बोलाचाली होऊन भांडण होतें व त्यामुळें चोरी उघडकीस येऊन ज्याचा माल चोरलेला असतो त्याचा मात्र त्यांत फायदा होतो. एखादें दुष्कृत्य करण्याचा कट फुटून त्यांचीं सर्वांचींच दुष्कृत्यें चव्हाट्यावर येतात.

चोराची आई आटोळे-खवले-ओहोळ ओहोळ रडे; चोराची आई मडक्यांत तोंड घालून रडे; चोराची माय हृदयीं रडे--चोराचा धंदा नेहमींच चोरी करण्याचा असल्यामुळें तो केव्हां सांपडेल याची धास्ती नेहमीं त्याच्या आईच्या मनास वाटत असते. व त्यामुळें ती नेहमीं दुःख करीत असते. दुष्कृत्यें करणारांच्या मनांत तीं उघडकीस येण्याची धास्ती सारखी असल्यामुळें त्यांस किंवा त्यांच्या आप्तेष्टास कधीं मानसिक शांति मिळणें शक्य नसतें. शिवाय अशा मनुष्यास उघडपणें दुःख करतां येत नाहीं, तर तें चोरून, गुपचुपपणें करावें लागतें.

चोराची गोष्ट, मूर्खा लागे मिष्ट--चोरानें सांगितलेली मसलत मूर्ख मनुष्यासच पटते व शेवटीं तो फसतो.

चोराची नाहीं, शिंदळाची आई--चोराची नव्हे तर शिंदळ माणसाची ती आई! म्हणजे सारखीच निंद्य, त्याज्य.

चोराचीं पाऊलें चोरच जाणें; चोराचीं पावलें-वाट चोराला माहीत-ठाऊक—एक चोर दुसऱ्या चोराला बरोबर ओळखतो, कारण तो स्वतः चोराच्या युक्त्या पूर्णपणें जाणतो व वागतोहि. (गु.) चोरना पगला चोर जाणें. A thief knows a thief, as a wolf knows a wolf. भुजंग एव जानीते भुजंगचरणं सखे।

चोराची मौज चार दिवस, छिनालीची आठवडा—चोरी केलेल्या द्रव्यावर फार तर चार दिवस चैन करतां येते. चोरीची संपत्ति कायमची चैन चालण्याइतकी नसते व जारकर्म केलें तर तें फार तर आठ दिवस गुप्त राहातें. नेहमीं बाहेरख्यालीपणा करणाराचा तो लवकरच उघडकीस आल्याशिवाय राहात नाहीं.

चोराची लंगोटी; चोराच्या हातची लंगोटी--चोरानें सर्व लुबाडून नेल्यावर निदान लंगोटी (नेसतें वस्त्र) राहिली तरी समाधान वाटतें. कारण ती जरी मिळाली तरी त्याचा चांगुलपणा किंवा आपलें भाग्य म्हणावयाचें. जेथें कांहींहि मिळण्याची आशा नाहीं तेथें अगदीं अल्प जरी मिळालें तरी तें फायद्याचेंच.

चोराची सुटका आणि सावाला फटका--चोर मोकळा सुटला म्हणजे त्याचा परिणाम एखाद्या साधु मनुष्याच्या घरीं चोरी होण्यांत होतो. याप्रमाणें दुष्ट मनुष्यांस दंड न झाला तर त्यांचें फावतें व त्यांचेपासून साधु मनुष्यास त्रास होतो. याकरितां त्यांस योग्य शासन दिलेंच पाहिजे. त्यांस मोकळें सोडून कधीं चालणार नाहीं.

चोराची हंडी शिंक्यास कशी चढेल?--चोऱ्या करून जमविलेला पैसा राहात नाहीं. (गु.) चोरनुं हाल्लुं सीके नहि चहडे.

चोराची हाय, वाटे वयलो खाय--(गो.) चोराची हाय (लपवून ठेवलेली लूट) वाटेवरचा दुसराच कोणी नेतो. तु०-चोरावर मोर.

चोराचे भाऊ गठेचोर--चोराचा भाऊ चोरच असणार. (गु.) चोरनो भाई घंटीचोर.

चोराचें रडें मुळूं मुळूं--चोराला चोरी करतांना दुखापत झाली, तरी ती त्याला उघडकीस आणून चालत नाहीं; त्याकरितां त्याला आपलें दुःख निमूटपणें सहन करावें लागतें.

चोराचे वाडे वसत-वसले नाहींत— चोरांनीं कितीहि

संपत्ति मिळविली तरी ती पापमार्गानें मिळविल्यामुळें त्या संपत्तीचा त्यांना उघडपणें उपभोग घेतां येत नाहीं. याप्रमाणें अन्यायानें मिळालेल्या संपत्तीचा सुखानें उपभोग घेतां येत नाहीं. पाठभेद—वाघाचे वाडे कधीं वसत नाहींत.

चोराच्या उलट्या बोंबा—एक चोर चोरी करून जात असतां कोणीं पाहून ते त्याच्यामागें लागले. हे लोक बोंबाबोंब करून आणखी लोक व शिपाई जमा करतील व आपणांस पकडतील, म्हणून तो चोरच 'चोर ! चोर !' म्हणत बोंबलत पळत सुटला; त्यामुळें लोकांना वाटलें चोर आणखी पुढेंच आहे ! अशा रीतीनें हा निसटला. स्वतः गुन्हा करून असे गुन्हे होतात, म्हणून आपणच ओरडा करावयाचा. 'निरपराधी लोकांवर झाडावरचीं पांखरें मारावीं त्याप्रमाणें गोळ्या झाडून पोरेंबाळेंहि हकनाहक मारलीं आणि त्यानंतर चोराच्या उलट्या बोंबा या न्यायानें शहरांत लष्करी कायदा सुरू केला.'—केसरी १७-५-३०.

चोराच्या गळ्यांत धुळ्याचें भांडवल ?—चोराला धनसंचय करतां येत नाहीं. चोराचे वाडे० पहा.

चोराच्या मनांत चांदणें—चोराला चांदण्याची भीति; तेव्हां चांदण नसलें तरी त्याला त्याचा भास होत असतो. त्याचें मन नेहमीं चोरीबद्दल खात असते व त्यामुळें ती एखादेवेळीं उघडकीस येते. 'चोरासि चांदणेसें तापचि देतें सुयोधना अरितें ।'—मोमंभा १०. ६३७. वर पहा. पाठभेद —चोराच्या मनांत चांदणें नी सावाच्या मनांत रांजणें.

चोराच्या वाटा चोरालाच ठाऊक—'चोराचें पाऊल चोर जाणें' पहा.

चोराच्या हातीं जामदारखान्याच्या किल्ल्या—चोराच्याच हातीं खजिना दिल्यावर तो जागेवर कसा राहणार. आपल्या शत्रूच्याच हातांत आपलें वर्म दिल्यास त्याचा परिणाम आपत्ति हाच होणार.

चोराणां चंद्रमा रिपुः ।—चोरांच्या मनांत चांदणें पहा. लुब्धानां याचकः शत्रूर्मूर्खाणां बोधको रिपुः । जारिणीनां पतिः शत्रुश्चोराणां चंद्रमा रिपुः ॥

चोरांनीं चोन्न व्हर्तें कीर कॉण खंय्‌दारां घट्ट कर्ता लॉ—(गो.) चोर चोरी करून गेल्यानंतर मग कड्या-कुलपें करण्याचा उपयोग काय ?

चोरापाशीं द्यावें पण पोरापाशीं देऊं नये—पोरापाशीं कांहीं जिन्नस दिल्यास तो कोठें नेईल व टाकील याचा नेम नाहीं. त्याला धड सांगतां येत नाहीं. चोरीचा पत्ता तरी लागण्याचा संभव असतो.

चोराय शष्पलाभाय—चोराला गवताची काडी जरी मिळाली तरी ती फुकटची मिळाल्यामुळें त्याला ती फाय-द्याचीच गोष्ट होते.

चोराला चोप आणि शेजाऱ्याला झोंप—चोराला एखाद्या वेळीं चांगला मार मिळून त्याला उठवेनासें झालें म्हणजे कांहीं दिवस तरी चोरी होणार नाहीं, म्हणून शेजारी निर्धास्त होऊन सुखानें झोंप घेऊं शकतात. दुष्टांचें निर्दा-लन केल्यास सुष्टांस शांतीचा लाभ होतो.

चोराला डसला विंचू, तो करीना हूं कीं चूं—चोराला चोरी करतांना विंचू चावला, तरी त्याला उघडकीस येण्याच्या भीतीमुळें त्या वेदना निमूटपणें सहन कराव्या लागतात. दुष्कर्में करणाऱ्यास त्या कामांत हानि झाली तरी ती उघडपणें बोलतां येत नाहीं.

चोराला धुंडण्याकरितां सारा गांव पालथा केला—चोराला शोधण्याकरितां जरी सारा गांव शोधला, तरी तो असा सहज थोडाच हातीं लागणार आहे. तो आपल्या संरक्षणाची आगाऊच तजवीज करून लपून बसलेला असतो.

चोराला मलीदा आणि धन्याला धत्तुरा—हीच म्हण 'चाकराला मलीदा व धन्याला धत्तुरा' अशीहि वापरतात. चाकर पहा. पुष्कळदां मालकाला आपल्या संपत्तीचा उपभोग घेतां येत नाहीं व भलतेच लोक त्याच्या संपत्तीवर चैन करून जातात.

चोराला मेसाई धार्जिणी—मेसाई ही चोरांची देवता असून तिच्या कृपाप्रसादामुळें चोरांस आपल्या धंद्यांत लाभ होतो अशी समजूत आहे.

चोराला सोडून संन्याशाला सूळ—खरा अपराधी सोडून भलत्यालाच शिक्षा देण्याचा विचित्र न्यायाचा मासला.

चोरावर मोर—एका चोराला लुबाडणारा दुसरा चोर. सवाईचोर; शेरास सव्वाशेर. 'तो आतां चोरावर मोर होण्याच्या विचारांत गढून गेला होता.'—स्वप २१३. (गु.) चोरपर मोर फरी गीयो, ने चोरने बारणे चोर पराणो. (हिं.) चोरके घर मोर.

चोरावर मोर आणि सरकाराला घोर—सवाई चोर निघाल्यास त्याला धरणें सरकाराला जड जातें.

चोराशिनळाक तोंड भावे—(कों.) चोर आणि शिंदळ हेच फार जोरानें आपला पक्ष मांडतात !

चोरासी चांदणें वेश्येसी सेजार । परिसेसी खापर काय होय ॥—तुकाराम. चोराला चांदणें आवडत नाहीं, वेश्येस एकांत पाहिजे असल्यामुळें शेजारीं मनुष्य नको असतें

व परिसाला लोखंड लावण्याऐवजीं खापर लावलें तर त्याचा काय उपयोग. चांगली वस्तु असली तरी तिचा योग्य जागीं उपयोग केला तरच त्यापासून फायदा होतो, नाहींतर ती फुकट जाते.

चोरटा——चोरटा ताप—बारीक ताप; फारसा न समजणारा, रात्रींचा किंवा केव्हांतरी येऊन जाणारा ताप.

चोरटा धंदा; चोरटी विद्या—१ गुप्त धंदा; दुसऱ्यापासून लपवून ठेवण्यासारखा धंदा; राजरोस न करतां येण्यासारखा व्यवसाय. २ खोट येणारा धंदा; आंतबुडीचा व्यापार.

चोरटी नजर—तिरपी नजर; कटाक्ष; अपांग वीक्षण. ' मी पोहत असतांना ज्या प्रेमाच्या चोरट्या नजरेनें तूं मजकडे पहात होतीस... ' –बाय ५.२.

चोरटे चाळे—चोरासारखी वागणूक; भीत भीत केलेली हालचाल.

चोरटें पीक—वरून भिकार दिसणारें पीक; ज्याचे दाणे फारसे वरून दिसत नाहींत असें पीक; ज्याचीं कणसें भरदार दिसत नाहींत असें पीक.

चोरट्यासारखें होणें—संकोच वाटणें; चुकल्या चुकल्यासारखें होणें; आपल्या हातून एखादी चुकी किंवा शिष्टाचाराचा भंग होत आहे किंवा काय असें वाटणें.

❀ **चोरटा हुशार, मेहनती दिलगीर**—जो मनुष्य कष्ट करतो त्याला कांहीं लाभ न होतां त्याच्या कष्टाचें फळ भलताच मनुष्य घेऊन जातो, अशा वेळीं योजतात.

चोरणें——चोरून मारून—गुप्तपणें; कोणाला कळूं न देतां; लपून छपून;

❀ **चोरतल्याक आनि भिक मागतल्याक खंय उणें**—(गो.) चोराला आणि भिकाऱ्याला कुठेंच कमी पडत नाहीं.

चोरून व्हेले नी मागीर दारघट्ट केलें—(गो.) चोरांनीं लुटून नेल्यावर दारें राखणें, बंदोबस्त करणें. तु०—बैल गेला नी झोपा केला.

चोरी—चोरी असणें-होणें—लपून छपून करावें लागणें; उघड करतां न येणें; कोणाला कळू न देणें. ' श्रीमंतांना जवळ पैसा व लत्ता कपडा असून त्यांचा उपभोग घेण्याची चोरी झाली होती. '–गुज० इतिहास.

❀ **शेताआड चोरी आणि दादल्याआड शिंदळकी**—शेतांत पीक उभें असतां तेथें चोरी केल्यास ती दिसत नाहीं. त्याचप्रमाणें नवरा जिवंत असतांना चोरून जारकर्म केलें असतां तें उघडकीस येत नाहीं. विधवा किंवा कुमारी यांचें जारकर्म छपत नाहीं.

चोरी करची आपल्या गांवांत, भीक मागची दुसऱ्याच्या गांवांत—(गो.) चोरी करावी आपल्या गांवांत पण भीक मागावी परगांवीं. आपल्या गांवाची माहिती असल्यानें चोरी साधते. परगांवीं भीक मागितल्यानें कोणाला न कळण्याचा संभव नसतो.

चोरी करंडा, तो उचलील हंडा—जो मनुष्य एकदां करंड्याची चोरी करून पचवूं शकतो, तो पुढेंमागें हंड्याची चोरी केल्याशिवाय राहात नाहीं. लहान लहान गुन्हे पचले म्हणजे मनुष्य मोठे गुन्हेहि करण्यास प्रवृत्त होतो. तु०—काडीचोर तो पाडीचोर.

चोरी करतांना धरिलें, खेटरासारखें तोंड केलें—प्रत्यक्ष मुद्देमालानिशीं चोरास धरलें असतां त्याला कांहीं बोलावयास जागा राहात नाहीं व त्याचें तोंड एकदम उतरतें.

चोरी करून श्रीमंत होतो, तो चोर असून साव दिसतो—प्रथम चोऱ्या करून पण एकदां मनुष्य श्रीमंत झाला म्हणजे तो पुढें चोऱ्या करीत नसला तरी त्याच्यावर चोरीचा आरोप करण्यास कोणी धजावत नाहीं. थोर लोकांचीं दुष्ट कृत्यें सहसा उघडकीस येत नाहींत. संभावितपणाच्या आवाखालीं तीं गुप्त राहतात.

चोरी केली बापानें, दरवडा पाडला पोरानें, खून केला नातवानें, कायद्यानें कमाई समाईक—निरनिराळ्या व्यक्तींनीं एखाद्या दुष्कृत्यांत भाग घेऊन निरनिराळीं कामें केलीं, तरी ते कायद्याच्या दृष्टीनें सर्व सारखेच गुन्हेगार ठरतात.

चोरी केली सासरीं, बायको खजील झाली अंतरीं—माहेरीं एखादी चुकी झाली व ती उघडकीस आली तरी त्याबद्दल इतकें वाईट वाटत नाहीं. तेथील लोकांची सहानुभूति असते. पण तीच गोष्ट सासरीं करून उघडकीस आल्यास मेल्यापेक्षां मेल्यासारखें होतें. कारण तेथें कोणाचीच सहानुभूति नसते.

चोरी, चहाडी, शिंदळकी (न करावी)—या तिन्ही गोष्टी फार वाईट आहेत व सारख्याच योग्यतेच्या आहेत.

चोरीं नेलें घोडें, एक बसो किंवा दोन बसोत—आपल्या हातांतून एखादी वस्तु गेल्यावर मग तिचें पुढें काय होईल यांबद्दल खंत बाळगून काय उपयोग. घोडें पहा.

चोरी मारी, देव त्याचें बरें करी—या जगांत पुष्क-

ळदां आपणांस लबाड व दुष्ट लोकांचीच चंगळ चालतांना व देव त्यांनाच साहाय्य करतांना पाहातों. पुढें पहा.

चोरीमारी होय, त्याचें तारूं सलामत जाय-(कों.) जहाजावर चोरी वगैरे झाल्यास पुढें तारवाला इष्टस्थळीं पोंचण्यास भीति नाहीं अशी समजूत. तु०—कीरमोर खाई, तारूं सलामत जाई.

चोरी मालकाची, झोंप नोकराची—नोकर झोंपी गेला व चोर आला तर तो माल मालकाचा नेतो. चाकराचें त्यांत कांहीं नुकसान नसतें. पण त्याच्या झोंपेंमुळें मालकास तोषीस लागते. आपल्या हाताखालच्या लोकांच्या चुकीचा भुर्दंड आपणास सोसावा लागतो.

चोरी मोरी, देव बरें करी—चोरी करून जो आपली अभिवृद्धि करून घेऊं इच्छितो, त्याला अनुलक्षून ही म्हण आहे. चोरी शब्दाशीं अनुप्रासार्थ मोरी शब्द आहे. 'शेजाऱ्याच्या गोवऱ्या गुपचुप आणून तूं आपल्या घरांत भरतोस; तुला वाटतें, चोरी मोरी देव बरें करी!'

चोरी होऊन माल जातो, त्याहून मेजवानींत जास्त खपतो—चोरी, वगैरे गोष्टींत जितका माल जातो त्यापेक्षां उधळपट्टी करणारा मनुष्य आपल्या चैनींत अधिक उडवतो. याकरितां चोरी पतकरली पण उधळेपणा त्यापेक्षां वाईट.

चोरिये मारये गॅलें--(गो.) चोरीचें धन या ना त्या प्रकारें नष्ट व्हायचें. तु०—चोराची हांडी शिंक्यास कशी चढेल!

चोरिये म्हालु चांडाळाने व्हेलो—(गो.) चोरीचा माल चांडाळानें नेला. अपहार करून मिळवलेली वस्तु सहसा आपल्याला पचत नाहीं.

चोरीचा मामला, हळूहळू बोंबला—शिमग्यांत चोरी करण्यास जातात व चोरी करून येतात, तेव्हां नेहमींप्रमाणें मोठ्यानें बोंबलत नाहींत. चोरी कळूं नये म्हणून बोंब हळू मारण्यास सांगतात. चोरी करतांना व तिचे वांटे वगैरे कामें करतांना सर्व गोष्टी शांतपणें कराव्या लागतात. त्यामध्यें जरी कांहीं आपत्ति आली तरी उघडपणें तिजबद्दल चर्चा करतां येत नाहीं, तर ती निमूटपणें सहन करावी लागते. कांहीं चोर चोरी करावयास गेले असतां भिंतीवरून उडी टाकीत असतां त्यांपैकीं एक चोर पडून मेला. तेव्हां बाकीचे चोर आरडाओरड व शोक करूं लागले; तेव्हां त्यांपैकीं एक म्हणतो, कीं आपण चोरीच्या कामांत आहोंत याकरितां शोकसुद्धां मोठ्यानें करतां कामा नये. तु०--चोराची आई० पहा.

चोरीचा माल घेतो तोहि चोरच—चोरीचा माल विकत घेणारा मनुष्य स्वतः चोरी करीत नसला तरी चोरास मदत करतो. याकरितां तो तितकाच दोषास पात्र आहे. स्वतः गुन्हा न करतां गुन्ह्यास मदत करणाराहि गुन्हेगारच ठरतो.

चोरीचे चौदा हात--चोरी करून आणलेला जिन्नस वाटेल तेवढ्या स्वस्त दरानें विकला जातो. चोरीचें कापड रुपयाला चौदा हातहि मिळतें.

चोरीचें धन कधीं झांकलें जाणार आहे--चोरी केलेली कधीं पचत नाहीं. ती आज ना उद्यां उघडकीस आल्यावांचून राहात नाहीं. चोरीचा माल आज ना उद्यां बाजारांत येतोच.

चोरीचें लक्षण जन्मभर जात नाहीं—एकदां चोरी करावयाची संवय लागली म्हणजे ती मरेपर्यंत सुटत नाहीं. याकरितां प्रारंभींच तीपासून जपलें पाहिजे.

चोरीस जाय असा नाहीं अर्थ, त्यास झोंप लागे स्वस्थ—ज्याच्याजवळ चोरीस जाईल असा जिन्नसच नसतो त्याला कसलीहि काळजी नसल्यामुळें शांत झोंप येते. ज्याच्याजवळ पैका असतो त्याला चोरीची धास्ती असल्यामुळें नीट झोंप येत नाहीं. तु०—गळां नाहीं सरी सुखें निद्रा करी.

चोवीस——चोवीस अवतार—१ मत्स्य, २ कच्छ ३ वराह, ४ नरसिंह, ५ वामन, ६ परशुराम, ७ राम, ८ कृष्ण, ९ बौद्ध, १० कलंकी, ११ नारायण, १२ शौनक, १३ नारद, १४ स्वायंभू, १५ कपिलमुनि, १६ दत्तात्रेय, १७ ऋषभदेव, १८ हंस, १९ हयग्रीव, २० पृथुराजा, २१ ध्रुव, २२ धन्वंतरी, २३ मोहिनी, २४ व्यास. —भागवत १.२.५-२६. 'भगवंताचे वर्णी पुरुषाद्यवतार सार चोवीस।' —मोमंभा १.३.

चोवीस अक्षरी मंत्र—तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि। धियो यो नः प्रचोदयात्। हा गायत्री मंत्र.

दत्ताचे चोवीस गुरू-(अ) भागवतांत एकादशस्कंधांत ७–९ अध्यायांत अवधूताच्या २४ गुरूंचें वर्णन आहे. पृथिवी वायुराकाशमापोऽग्निचंद्रमा रविः। कपोतोजगरः सिंधुः पतंगो मधुकृद्गजः ॥३३॥ मधुहा हरिणो मीनः पिंगला कुररोऽर्भके। कुमारी शरकृत्सर्प ऊर्णनाभिः सुपेशकृत्॥३४॥ (आ) गुरू सांगेन अशेष। संख्याप्रमाण चोवीस। त्यांचीं नांवें तूं परिस। सावकाश सांगेन ॥४६॥ पृथ्वी वायु आकाश। अग्नि आप शीतांश। सातवा तो चंडांश। कपोता परिस आठवा ॥४७॥ अजगर सिंधु पतंग। मधु मक्षिका गज भृंग। हरिण

मीन वेश्या चांग । नांवें सुभग पिंगला॥४८॥ टिटवी आणि लेंकरूं । कुमारी आणि शरकारु । सर्पकांतणी पेशस्करू । इतुकेन गुरू चोवीस ॥४९॥ (इ) महानुभावी एकादशस्कंधांत पुढील गुरु सांगितले आहेतः–पृथ्वी पवनुः आकाश जळ हुताशनुः कुमोद–बंधु भानुः कपोता अजगुरूः सींधु पतंगु मधुकरूः गजु मधु वा कृष्णसारूः मीनु पींगळा कुररुः बाळकु कुमारीः सेलारा फणिमौळीः उर्णनाभि झीह्लि । –उद्धवगीता २६६–६८. (ई) पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, चंद्र, सूर्य, कपोत, अजगर, सिंधु, पतंग, मधमाशी, गज, भृंग, हरिण, मीन, पिंगळा (वेश्या), टिटवी, लेंकरूं, कुमारी, शरकार, सर्प, ऊर्णनाभि, भिंगुरटी.

चोवीस मावळें—जुन्नर ते चाकण १२ मावळें:–१ शिवनेरी, २ जुन्नर, ३ भिमनेर, ४ घोडनेर, ५ भिननेर, ६ भामनेर, ७ जामनेर, ८ पिंपळनेर, ९ पारनेर, १० सिन्नर, ११ संगमनेर, १२ अकोळनेर. पुणें ते शिरवळ १२ मावळें:–१ अंदरमावळ, २ नाणेमावळ, ३ पवनमावळ, ४ घोटणमावळ, ५ पौडमावळ, ६ मोसेमावळ, ७ मुठेमावळ ८ गुंजणमावळ, ९ वेळवंडमावळ, १० भोरखोरें, ११ शिवतर खोरें, १२ हिरडसमावळ.

चोहोंचा——चोहोंचा आंकडा घालून बसणें—आसन मांडी घातल्यास, ४ प्रमाणें बैठक दिसते. प्रशस्त मांडी घालून बसणें. चार पहा.

चोळणी——चोळणींत येणें—खराब होणें. 'त्रिंबकराव नारायण यांजकडील महाल चोळणींत आले असतां.' –पया २४१.

चोळणें——चोळला कापूर नासतो––अति केलें म्हणजे बिघडतें. फार वाटाघाट, वाच्यता करूं नये.

चोळी——चोळी लुगडें नेसवणें—बक्षीस देणें; अहेर करणें; भेट देणें. 'चोळी लुगडें मी पण तुमच्या बायकोला नेसवीन..'–मोरप्र १८.

चौ——चौवर आढी; चौचा आंकडा–अंक घालून बसणें—प्रशस्त मांडी घालून बसणें.

चौक——चौक भरणें—चौक पासोडा करणें; रांगोळी घालून वर पाट मांडतात व त्यावर शालजोडी इ. आंथरून वर गहूं–तांदूळ यांचा चौकोन काढतात; अशा तऱ्हेचें आसन तयार करणें. 'चौक भरियेला आसनीं । पाचारिली कुळस्वामिनी । '–तुगा २८२.

सातव्या चौकांत बसणें—१ घराच्या अतिशय आंतल्या भागांत बसणें. २ भेट, दर्शन दुर्लभ होईल अशा रीतीनें राहणें.

चौकट——चौकटीचें मरण—मारका, जखीण, तळखंबा व समंध या चार भुतांनीं पछाडल्यामुळें आलेलें मरण.

चौकड——चौकडी भुलणें-गुंग होणें––मोहून, भुलून जाणें; भान नाहींसें होणें; गोंधळणें; गडबडून कांहीं सुचेनासें होणें; निर्बुद्ध होणें.

चौकशी——चौकशी करणें—शोध, तपास करणें; पत्ता लावणें. 'चौकशी करणें तर फारच सखतीनें खावंदगिरीनें करावी.'–पया ३३९.

चौकशी ठेवणें—१ देखरेख असणें; तपास करीत राहणें. २ काळजी घेणें; निगा ठेवणें.

❀ **चौकशीअंतीं चूक कळते**—कोणत्याहि गोष्टीची सूक्ष्म छाननी केली तरच तींतील दोष दिसून येतात. तसाच काणाडोळा केला तर कांहीं आढळत नाहीं.

चौका——चौकाबासन—स्वयंपाक करणें, भांडीं घासणें वगैरे काम.

चौकी——चौकी देणें—पहारा करणें; राखण करणें.

चौकींचे दांत—दुधाचे दांत; मुलास पहिले पुढचे चार दांत येतात त्यास म्हणतात. 'कर्णीं कुंडलें तळपतीं । लघुदंत चौकींचे झळकती । '–ह ४.१७२.

चौकोन——चौकोनी चिरा—१ चारी बाजूंनीं घडलेला दगड. २ अष्टपैलू मनुष्य; हरकसबी मनुष्य; चतुर मनुष्य.

चौखुंट——चौखुंट जहागीर—भिक्षावृत्ति; झोळीचे चार पदर हे चार खुंट समजून झोळीस म्हणतात. चार खुंट पहा.

चौखूर——चौखूर दूध काढणें—चारी सडांतील दूध काढणें.

चौघडा——चौघडा वाजणें––चौघडा वाजूं लागला म्हणजे त्याचा आवाज जसा सर्वत्र पसरतो त्याप्रमाणें एखाद्याची सर्वत्र दूरवर बदनामी होणें; एखाद्याबद्दल फार गवगवा होणें; सर्वत्र अपकीर्ति पसरणें.

चौघे——चौघांत बसणें––चार लोकांत बसणें, उठणें; समाजांत वावरणें; सभेमध्यें बैठकींत वगैरे जाणें येणें ठेवणें.

चौघावर ताण घेणें––लोकमत झुगारून देणें; लोकांची परवा न करणें; बेमुर्वतखोरपणानें वागणें.

❀ **चौघाऽआवय कोण रडता**––(गो.) चौघांच्या आईसाठीं कोण रडतो. एखाद्या गोष्टीशीं आपला अंशतःच

संबंध येत असला व इतरहि अनेक लोकांचा संबंध पोंचत असला तर तीबद्दल आपणास फारशी फिकीर वाटत नाहीं.

चौघांत चौघासारखें व्हावें,तेथें उगेंच न राहावें--ज्या समाजांत आपण वावरतो त्या समाजांत आपणांस वागावयाचें तर त्यांतील लोकांसारखीच वागणूक ठेवली पाहिजे; पण अशामध्यें विनाकारण आपला बहुमोल वेळ दवडूं नये. तु०-Be social but throw not your time away.-सवि ५१६.

चौघांत जावें, चौघासारखें व्हावें--वरप्रमाणें.

चौघांत मरण लग्नासमान--बरीच मंडळी भोंवतीं असल्यावर मरण येणें हें भाग्याचें. पुढें पहा.

चौघाबरोबर मरण वऱ्हाडासमान—भरलेल्या समाजांत मरण आलें असतां त्यांत विवाहासारखा आनंद मानला पाहिजे. कारण अनेक लोक आपल्या किंवा कुटुंबीयांच्या दुःखांत सहभागी होतात.

चौघे गेले करायला, एकटा गेला मरायला—अनेक लोकांशीं सहकार्य करून काम केलें असतां त्यांत यश येतें; एकट्यानेंच करण्यांत धोका येण्याचा संभव असतो. तु०—संहतिः कार्यसाधका । अकेला चना भाड नहि फोड सकता.

चौघे यावे चौदा आले थोरपणाची रीत, परके धाले पण घरवाले त्यांनीं गावें गीत—जेथें चार सोयरेधायरे किंवा पाहुणे यावयाचे तेथें चौदा आले तर जरी त्यांत वरवर मोठेपणा दिसला तरी त्यांना तृप्त करण्याच्या कामांत घरच्या मंडळीस टाळा मिळण्याचा संभव असतो.

चौथ——चौथीचा चंद्र पाहणें—गणपतीचें दोंद पाहून चंद्र हंसला, तेव्हां गणपतीनें त्याला शाप दिला, कीं माझ्या चतुर्थीला तुझें दर्शन घेणाऱ्यावर चोरीचा आळ येईल. यावरून कांहींतरी आळ येणें; खोटा आरोप येणें. 'चौथीचा चंद्र पाहिलात याचा हा परिणाम बरें का ! '-नामना ८६.

चौदा——चौदा इंद्र—१ यश, २ रोचन, ३ सत्यंजित, ४ त्रिशिरव, ५ विभु, ६ मंत्रद्रुम, ७ पुरंदर, ८ बलि, ९ अद्भुत, १० शंभु, ११ वैधृति, १२ ऋतधामा, १३ दिवस्पति, १४ शुचि.

चौदा गोत्रें—कोकणस्थांचीं—१ अत्रि, २ कपि, ३ काश्यप, ४ कौंडिण्य, ५ कौशिक, ६ गार्ग्य, ७ जामदग्न्य, ८ नित्युंदन, ९ बाभ्रव्य, १० भारद्वाज, ११ वत्स, १२ वासिष्ठ, १३ विष्णुवृद्ध, १४ शांडिल्य.

चौदा चौकड्यांचें राज्य--कृत, त्रेत, द्वापर व कलि या चार युगांची एक चौकडी. प्रत्येक मन्वंतरांत एक चौकडी होते. अशा चौदा चौकड्या होईपर्यंत टिकणारें राज्य. अतिशय दीर्घ काळचें राज्य. रावणाचें असें होतें म्हणतात. 'चौदा चौकडीचा लंकापति । त्याची कोण झाली गति ॥' -तुकाराम. 'आणि मी जुगारांचा सम्राट म्हणून चौदा चौकड्यांचें माझें राज्य. '-द्रौपदी. 'तुमच्या चौदा चौकड्यांच्या राज्यांत रौरवाची राणी होण्यापेक्षां दुर्दैवाची दासी होऊन दुःखांत दिवस कंठीत, मी या पायांजवळ अशी अष्टौप्रहर बसून राहीन. '-एकच प्याला ३.४.

चौदा तंतु वाद्यें--१ वीणा, २ बीन, ३ रुद्रवीणा ४ एकतारी, ५ सारंगी, ६ सतार, ७ सारमंडळ, ८ तुंबरी, तंबुरी, ९ सरोद, १० कोका, ११ रबब, १२ मदनमंडळ, १३ ताउस, १४ तुणतुणें.

चौदा नारू--अलुतेदार पहा.

चौदा ब्रह्में--१ शब्द, २ मीतिकाक्षर, ३ खं, ४ सर्व, ५ चैतन्य, ६ सत्ता, ७ साक्ष, ८ सगुण, ९ निर्गुण, १० वाच्य, ११ अनुभव, १२ आनंद, १३ तदाकार, १४ अनु(नि)र्वाच्य.-दा ७.३.५-९.

चौदा भुवनें--चौदा लोक पहा.

चौदा मनु—१ स्वायंभुव, २ स्वारोचिस, ३ औत्तमी, ४ तामस, ५ रैवत, ६ चाक्षुष, ७ वैवस्वत, ८ सावर्णिमनु, ९ दक्ष, १० ब्रह्म, ११ धर्म, १२ रुद्र, १३ देव, १४ इंद्रसावर्णि.

चौदा रत्नें--१ लक्ष्मी, २ कौस्तुभ, ३ पारिजातक, ४ सुरा, ५ धन्वंतरि, ६ चंद्रमा, ७ कामधेनु, ८ ऐरावत, ९ रंभा, १० उच्चैःश्रवा, ११ कालकूट, १२ शार्ङ्ग धनुष्य, १३ शंख, १४ अमृत. चतुर्दश पहा.

चौदा लोक--१ भूः, २ भुवर्, ३ स्वर्, ४ महर्, ५ जनः, ६ तपः, ७ सत्य, ८ अतल, ९ वितल, १० सुतल, ११ महातल, १२ तलातल १३ रसातल, १४ पातल.

चौदा विद्या—१ ऋग्वेद, २ यजुर्वेद, ३ सामवेद, ४ अथर्ववेद, ५ शिक्षा, ६ छंद, ७ व्याकरण, ८ निरुक्त, ९ ज्योतिष, १० कल्प, ११ न्याय, १२ मीमांसा, १३ पुराणें, १४ धर्मशास्त्र. चवदा पहा.

चौदा विद्या व चौसष्ट कला—सर्व ज्ञान व कला हस्तगत करण्याचा पुरुषार्थ. चौदा विद्या पहा. चौसष्ट कला पहा.

चौदा विद्या व चौसष्ट कला परिपूर्ण—सर्व ज्ञान व विद्या यांनीं युक्त असा सर्वगुणी मनुष्य.

चौदावें रत्न--चौदावें रत्न अमृत आहे. अमृतामुळें देवदैत्यांत युद्ध होऊन दैत्यांना मार बसला. त्यावरून चोप, मार असा अर्थ. कोणी याचा अर्थ चुकीनें 'चाबूक' असा करतात. शंखोऽमृतं चांबुधे-या श्लोक चरणांतील 'चांबुधे' चा चाबूक झाला! 'आम्ही इतके धीट आहों कीं चवदावें रत्न आमच्या दृष्टीस पडलें कीं पुरें, आम्ही आपले पाय लावून पळत सुटलोंच.' —आगरकर. 'आधीं चवदाव्या रत्नाची गांठ पडते, त्यांतून निभावल्यावर पुढें पंधराव्याची गोष्ट बोलायची.' —उग्र २.१.

चौदावें रत्न दाखविणें—चाबकानें मारणें; झोडणें; शिक्षा करणें; चोप देणें.

❀ **चौदा इंद्र झाले तरी इंद्राणी एकच**—आतांपर्यंत १४ निरनिराळे पुरुष इंद्रपदावर बसले तरी इंद्राची राणी ही एकच आहे. कांहीं घडामोडी वरचेवर होऊन लहान लहान गोष्टी बदलतात, तरी महत्त्वाच्या अशा कांहीं गोष्टी स्थिर स्वरूपाच्या असून त्या कधीं बदलत नाहींत.

चौदावें रत्न दाखविल्याशिवाय वठणीस येत नाहीं—शिक्षा केल्याशिवाय कोणी आपला गुन्हा कबूल करीत नाहीं किंवा नीट वळण लागत नाहीं.

चौपदरी——चौपदरी गळा काढणें—मोठ्यानें रडणें.

चौपदरी घेणें; चौपदरी हातीं घेणें-येणें—[चौपदर=झोळीचीं चार टोकें. चौपदरी=झोळी.] भीक मागणें.

चौपदरीचा जहागिरदार—भिकारी; हातांत झोळी घेतलेला.

चौपदरीचा जहागिरदार आणि मिजास बादशहाची—भिकाऱ्याला फार मिजास असली म्हणजे म्हणतात.

चौपायीं——चौपायीं उगवणें-उजवणें—१ घोडा सर्व लक्षणांत चांगला निघणें. २ सर्व लाज सोडणें; तरबेज बनणें.

चौपायीं उतरणें—१ वासरूं वगैरे चारी पांढऱ्या खुरांनीं जन्मास येणें. २ पायांत गोळे येणें.

चौपायीं काढणें—भरधांव सोडणें; मोठ्या वेगानें गमन करणें.

चौपायीं धांवणें-पळणें-उडणें-सुटणें-निघणें—भरधांव पळणें.

चौपुटी——चौपुटी घेणें—चौपदरी घेणें; भिक्षा मागणें.

चौफेर——चौफेर उडणें—१ चारी दिशांस उधळणें. २ भलतीकडे वाहवणें; अमर्यादपणें एखादी गोष्ट करणें.

चौफेर काढणें—भरधांव सोडणें; वेगानें पळविणें; घोड्यास जोरानें पळविणें.

चौफेर निघणें-उडणें-लागणें-जाणें--चोखूर पळूं लागणें; भरधांव निघणें; अतिशय वेगानें पळूं लागणें.

चौरंग——चौरंग होणें; हातापायांचा चौरंग होणें—चौरंगाप्रमाणें शरीराचा आकार होणें; शरीर आंखडणें; हातपाय अंगापासून वेगळे करतां न येणें.

चौऱ्यायशीं——एका टिरीवर चौऱ्यायशीं आसनें--एकाच बैठकींत अनेक कामें करणें. एकाच साधनानें अनेक गोष्टी साधणें. एका मांडीवर० पहा.

चौऱ्यायशीं लक्ष योनि—१ जारज, स्वेदज, अंडज, उद्भिज यांत प्रत्येकीं २१ लक्ष योनी. २वृक्षादि स्थावर योनी २०लक्ष; कीटकयोनी ११ लक्ष; जलचरयोनी ९ लक्ष; पक्षी १० लक्ष; पशु ३०लक्ष; मनुष्ययोनी ४ लक्ष मिळून ८४ लक्ष.

चौऱ्यायशीचा गरका-फेरा-८४लक्ष योनींतून जीवाला जावें लागतें तेव्हां कोठें मुक्ति मिळते. पुन्हां जन्म पुन्हां मरण असें जन्ममरणाचें (८४ लक्ष वेळा) चक्र. 'तुका म्हणे शहाणा होईरे गव्हारा। चौऱ्याशीचा फेरा फिरो नको॥'—तुगा ३०१८. ३ अत्यंत गुंतागुंत; घोटाळा; चक्रव्यूह.

❀ **चौऱ्यायशीच्या फेऱ्यांत पडणें, तर हाल काढणें**—एकदां एखाद्या गुंतागुंतीच्या भानगडींत पडलें म्हणजे त्यांतील सर्व सुखःदुखें भोगिल्याशिवाय गत्यंतर नसतें.

चौसष्ट कला—१ अभिधानकोश. २ अक्षरमुष्टिकाकथन. ३ आकारज्ञान. ४ आकर्षक क्रीडा. ५ आलेख्य. ६ उत्साहन. ७ उदकघात. ८ उदकवाद्य. ९ ऐन्द्रजाल. १० काव्यसमस्यापूरण. ११ कर्णपत्रभंग. १२ केशमार्जनकौशल. १३ क्रियाविकल्प. १४ क्रौंचमारणयोग. १५ गंधयुक्ति. १६ गीत. १७ चित्रयोग. १८ चित्रशाकापूपभुक्तविकारक्रिया. १९ छंदोज्ञान. २० छलितयोग. २१ तंदुलकुसुमबलिप्रकार. २२ तर्ककर्म. २३ तक्षण. २४ दशनवसनांगरोग. २५ दुर्वचकयोग. २६ देशभाषाज्ञान. २७ द्यूतविशेष. २८ धातुवाद. २९ नाटकाख्यायिकादर्शन. ३० नाट्य. ३१ नृत्य. ३२ नेपथ्ययोग. ३३ पत्रिकावेत्रवाणविकल्प. ३४ पानकरसरागासवयोजना. ३५ पुष्पवाटिका-

निमित्तज्ञान. ३६ पुष्पास्तरण. ३७ पुस्तकवाचन. ३८ प्रतिमाला. ३९ प्रहेलिकाकूटवाणीज्ञान. ४० बालक्रीडन. ४१ भूषणयोग. ४२ मणिभूमिकाकर्म. ४३ मणिरागज्ञान. ४४ मानसीकाव्यक्रिया. ४५ माल्यग्रथनविकल्प. ४६ मेष कुक्कुटलावकयुद्धविधि. ४७ म्लेंछितकविकल्प. ४८ यंत्र मातृकाधारणामातृकासंवाय. ४९ रौप्यरत्नपरीक्षा. ५० वस्त्र गोपन. ५१ वाद्य. ५२ वास्तु. ५३ विशेषकच्छेद्य. ५४ वीणाडमरूवाद्य. ५५ वृक्षायुर्वेदयोग. ५६ वैजयिकविद्याज्ञान. ५७ वैतालिकविद्याज्ञान. ५८ वैनायिकविद्यादान. ५९ शयनरचना. ६० शुकसारिकावलापन. ६१ शेखरापीडयोजना. ६२ सूचीवानकर्म. ६३ सूत्रक्रीडा, आणि ६४ हस्तलाघव. —श्रीमद्भागवत दशमस्कंध अध्याय ४५ श्लोक ३६ यावरील टीका आणि श्रीवात्स्यायनप्रणीत ‘कामसूत्र’ प्रथमाधिकरणें विद्यासमुद्देशे तृतीय अध्याय व शब्दकोश पहा.

चौसष्ट मूर्च्छना—स्वरभेदाचे ६४ प्रकार. ‘तेणें साही राग छत्तीस भार्या । चौसष्टी मूर्च्छना दावूनियां ।’—ह २५.११९.

चौसष्ट योगिनी—१ दिव्ययोगी, २ महायोगी, ३ सिद्धयोगी, ४ गणेश्वरी, ५ प्रेताक्षी, ६ डाकिनी, ७ काली, ८ कालरात्रि, ९ निशाचरी, १० झंकारी, ११ रौद्रवेताली, १२ भूतली, १३ भूतडांबरी, १४ ऊर्ध्वकेशी, १५ विरूपाक्षी, १६ शुष्कांगी, १७ नरभोजनी, १८ भट्टारी, १९ वीरभद्रा, २० धूम्राक्षी, २१ कलहप्रिया, २२ राक्षसी, २३ घोररक्ताक्षी, २४ विश्वरूपा, २५ भयंकरी, २३ चंडिका, २७ वीरकौमारी, २८ वाराही, २९ मुंडधारिणी, ३० रौद्रझंकारी, ३१ त्रिपुरांतका, ३२ भैरवी, ३३ ध्वंसिनी, ३४ क्रोधी, ३५ दुर्मुखी, ३६ प्रेतवाहिनी, ३७ खट्वांगी, ३८ दीर्घलंबोष्ठी, ३९ मालिनी, ४० मंत्रयोगिनी, ४१ कालाग्निग्रहणी, ४२ चक्री, ४३ कंकाली, ४४ भुवनेश्वरी, ४५ कटकी, ४६ कीटिनी, ४७ रौद्री, ४८ यमदूती, ४९ करालिनी, ५० घोराक्षी, ५१ कार्मुकी, ५२ काकदृष्टि, ५३ अधोमुखी, ५४ मुंडाग्रधारिणी, ५५ व्याघ्री, ५६ किंकिणी ५७ प्रभाषिणी, ५८ कालरूपा, ५९ कामाख्या, ६० उष्ट्रिणी, ६१ योगिपीटिका, ६२ महालक्ष्मी, ६३ एकवीरा, आणि ६४ पीटिका. या चौसष्ट देवतांची भाद्रपदाच्या अमावास्येचे दिवशीं पूजा करितात.

छ

छ——छ चावल, और नव पखाल पाणी—सहा तांदूळ शिजविण्यास नऊ पखाली पाणी. कांहींतरी भलत्याच प्रमाणाबाहेर गोष्टींचा संयोग व त्यामुळें कांहींतरी अघटित होणारा परिणाम.

छकडी——छकडीचें माप—सहाच्या गटानें केलेलें माप; अंबे वगैरे फळें सहा सहाच्या गटांनीं मोजतात त्यास फाडा म्हणतात व असे बावीस फाडे किंवा तीस बत्तीस फाडे म्हणजे पक्काशेंकडा धरतात. पुण्यास अंब्यांचा पक्का शेंकडा अशा छप्पन्न फाड्यांचा धरतात.

छकड——छकड थापडी—अंधळ्या कोशिंबीरीचा खेळ.

छक्का——छक्के पंजे—पंजाच्या ठिकाणीं छक्का किंवा छक्क्याच्या ठिकाणीं पंजा हातचलाखीनें आणावयाचा. यावरून पुढील अर्थ लक्षणेनें बनलेले आहेत. १ लबाडी; डावपेंच; कपट. २ (काव्य) कूट; श्लेष; कोडें. ३ बनावटपणा; नकलीपणा.

छक्केपंजे ओळखणें—डावपेंच, लबाड्या जाणणें; कपट ओळखणें. ‘तशांतून सदाशिव पडला गरीब. त्याला तुमचे छक्केपंजे कसे ओळखतां यावेत!’

छटाक——छटाकभर तोंड, आदपावमिशा—विजोड गोष्टी; एकमेकांस न शोभणाऱ्या अशा गोष्टींचा संयोग. मिया मूठभर व दाढी हातभर.

छट्टा——गोळीचा छट्टा; बाणाचा छट्टा—गोळी, बाण जाण्याचें अंतर, टप्पा, पल्ला; गतीची मर्यादा; माऱ्याचें अंतर.

छडी——छडी देई ज्ञान, तर गुरु कां फुंकी कान? छडी मारून जर विद्या येती तर गुरूला कान फुंकण्याचे म्हणजे शिकवण्याचे परिश्रम कशाला पडते. छडी ही आनुषंगिक गोष्ट आहे. आनुषंगिक गोष्टीनें जर कार्य साधतें तर मुख्य गोष्टीची जरूर राहणार नाहीं, पण तसें होत नाहीं.

छडी लागे चमचम (छमछम), विद्या येई घमघम, छडी कांहीं लागेना विद्या कांहीं येईना, छडीवर पडली सावली आम्हांस विद्या पावली—लहान मुलांस

छडी मारून वगैरे चांगली शिस्त लावल्याशिवाय त्यांच्या हातून अध्ययन बरोबर होत नाहीं. मुलांस शिस्त ही आवश्यक आहे. तसेंच चांगलें चोपल्याशिवाय मुलें शिकत नाहींत अशी पूर्वींची समजूत असे.

छत——छत बांधणें-भरणें--उत्तम गवई गात असतांना किंवा उत्तम वक्ता बोलत असतांना त्या कार्यक्रमास अतिशय शोभा आणणें; पराकाष्ठेची बहार करणें; अतिशय रंग आणणें; शोभा आणणें.

छत्तीस——छत्तीस भार्या—संगीतामध्यें रागांचें कौटुंबिक वर्गीकरण-आर्या, पुत्र, स्नुषा इ. केलेलें असतें. रागिणी या रागांच्या भार्या मानतात. सहा राग असून प्रत्येकाच्या ६ भार्या असें कांहीं मानतात. यावरून छत्तीस रागिणी. ‘ तेणें साही राग छत्तीस भार्या । चौसष्टी मूर्छना दावूनिया । अनेक उपरागांच्या क्रिया । गाइल्या तेव्हां रिसानें ।’-ह २५.११९.

छत्तीसाचा आंकडा—वांकडेपणा. ३६ या आंकड्यांत ६ व ३ यांचीं तोंडें एकमेकांच्या विरुद्ध दिशेला व परस्परांपासून दूर असतात. यावरून ज्यांचा अबोला आहे, जे एकमेकांचीं तोंडें पाहात नाहींत त्यांस म्हणतात. वितुष्ट; विरुद्धता. याच्या उलट त्रेसष्टाचा आंकडा. ‘मि. मोर्ले आणि ग्लॅडस्टन यांच्यांत धर्मसंबंधानें छत्तिसाचा आंकडा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.’-आगरकर.

छत्तिसाचा आंकडा पडणें—वितुष्ट येणें. ‘ त्याच्या वेळीं कर्त्या पुरुषांत छत्तिसाचे आंकडे पडले होते व ते इतके वाढत होते कीं, तक्तनशीन राजपुरुष अवतारी आहे असा बहुतेकांचा समज होता. ’ -V-S.२.२.

छत्र——छत्र धरणें—१ स्वारी चालली असतां राजा वगैरेवर छत्री धरणें; अबदागीर वगैरे सावली करतां धरणें. २ एखाद्याची गाढवावरून धिंड काढीत असतां त्यावर केरसुणीची छत्री धरणें. ‘ कैकेयीचें शिरोवपन करून । छत्र धरूत कोणीहि ॥’-रावि १०.१९७.

छत्रभंग; छत्र मोडणें—छत्र नाहींसें होणें; आधार तुटणें; पोशिंदा मरण पावणें. ‘ वैधव्ये नृपनाशे च छत्रभंगः प्रकीर्तितः । ’ -त्रिकांड शेष.

❀ **छत्र गेल्यावर कुत्रें सुद्धां विचारीत नाहीं**—जोंपर्यंत एखाद्याच्या हातांत अधिकार अथवा सत्ता असेल तोंपर्यंत त्याचा मान लोक ठेवतात. ती सत्ता गेली म्हणजे त्याला अगदीं नीच दर्जाचा मनुष्यहि विचारीत नाहींसा होतो.

छत्रपति कीं पत्रपति-पत्तरपति--डोक्यावर छत्र तरी असावें किंवा अगदीं कफल्लक असून पानावर जेवण्याची पाळी यावी. एक राजा किंवा भिकारी; मनुष्य वैभवसंपन्न असावा किंवा अगदीं दरिद्री तरी असावा. मध्यम स्थितींतील लोकांचे फार हाल असतात. त्यांस अन्नानें तर राहावें लागतें व पुरेसा पैसा नसला तर भीकहि मागतां येत नाहीं. (गु.) छत्रपति के पत्रपति.

छत्री—छत्रीखालीं बाप मरावा, पण रहाटाखालीं आई मरूं नये—छत्रीखालीं म्हणजे वैभवसंपन्न स्थितींत असतांना पिता मेल्याचें एवढें दुःख वाटत नाहीं, कारण बाकीच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा तरी चालण्याची सोय असते, पण जेथें उदरपोषणाकरितां काबाडकष्ट करावे लागतात, मुलांच्या आईला रहाटावर सूत काढून त्यांचें पोषण करण्याची आवश्यकता असते, अशा वेळीं रहाट फिरविण्याच्या परिश्रमामुळें आई मेल्यास मुलांचे हाल कुत्रा खाणार नाहीं अशी स्थिति होते.

छंद——छंदास लागणें-भरणें—नादीं लागणें; मोहून जाणें; भरीस पडणें; एखाद्या गोष्टीच्या विशेष मागें लागणें.

छंद फंद; छंद बिछंद—बाष्कळपणा; खोड्या; ढंग. ‘ अजुनि किती दाखविसील छंद फंदडे ।’ -होला ८९.

❀ **छंदी फंदी एक झाले, आकाश पाताळ एक केलें**—सगळच व्यसनी, चैनी वगैरे लोक एकत्र जमले म्हणजे तेथें सर्व गोंधळ माजणार, यांत शंका नाहीं.

छपणें——छपून जरी खून केला, तरी राहात नाहीं झांकला--मनुष्यानें एखादें दुष्कृत्य कितीहि गुप्तपणें केलें, तरी कालांतरानें तें उघडकीस आल्यावांचून राहात नाहीं. तु०-खुनास वाचा फुटते.

छपन्न——छपन्न दिवाळ्या--वरचेवर, सदोदित दिवाळें काढणारा; अनेकवार शेणाचे दिवे लावणारा.

छपन्न वेळ--[छपन्न = अनेक] अनेक वेळां; वरचेवर; पुन्हां पुन्हा; वारंवार. ‘ छपन्न देश अनुतापें । नाचताती तेधवां ॥ ’-ह ५.७८.

छपन्न हजार—अनेक; कित्येक; अगणित.

छपन्न देशचें पाणी प्याला आहे--अनेक देश पाहून व फार प्रवास करून आलेला मनुष्य. यास अनेक तऱ्हेचे अनुभव आलेले असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं चातुर्य उत्पन्न झालेलें असतें. तो सहसा कोणाकडून फसविला जात नाहीं

व पडेल त्या प्रसंगास तोंड देण्यास समर्थ असतो. तु०–बारा गांवचें पाणी प्यालेला.

छपन्न भाषा जाणतो—अनेक देश, भाषा, रिवाज वगैरे पाहून चतुरस्त्र झालेला मनुष्य.

❀**छपन्न वखारी भारी कुंची, हातीं न दिसे पण नजर उंची**—[कुंची = किल्ली] मोठमोठ्या उलाढाली, व्यापार करणारा असून नफा कांहीं नाहीं, पण मोठमोठ्या गोष्टी, विचार पाहून घ्यावेत. (गु.) छप्पन्न वखारी, ने भारो कुंची हाथमां न मले पण नजर उंची. Not failure but low aim is crime.

छप्पा——छप्पा वळणें––१ शत्रूवर जोराचा हल्ला करणें; चाल करणें; तुटून पडणें. २ पुष्कळ नाश होणें (रोगानें वगैरे).

छर्रा——छर्रे उडविणें––(ल.) जोराचें, आवेशाचें भाषण करणें; तटातट बोलणें; अस्खलित बोलणें.

छळ——छळीं असणें—त्रास देणें; गांजणें; जाचणूक करणें.

❀**छळती गरीबाला, अजापुत्र बळी दिला**–दुनियेमध्यें नेहमीं गरीब मनुष्याला त्रास पोंचतो. गरीबाचा वाली कोणी नाहीं. यज्ञामध्यें कोणी वाघ सिंहाला बळी देत नाहीं, तर गरीब बिचाऱ्या बोकडाला बळी देतात. तु०–अश्वं नैव गजं नैव व्याघ्रं नैव च नैव च। अजापुत्रं बलिं दद्यात् देवो दुर्बलघातकः॥

छाटी——छाटीवर काठी, संन्याशाची लोटी—संन्यासी मनुष्याची सर्व मालमत्ता काय ती नेसावयाची छाटी (एक कापडाचा तुकडा), टेकावयाची काठी व हातांतील कमंडलु एवढी असते. ज्याला कांहीं आगापिच्छा नाहीं, घरदार नाहीं, केवळ भणंग मनुष्य अशाबद्दल योजतात.

छाण——छाणमें ढेला डाले, आंगमें छिटे पडे––चिखलांत दगड टाकून अंगावर शिंतोडे उडवून घेणें. चिखल पहा.

छाती——छाती करणें–काढणें––धैर्य दाखविणें; धीर करणें; धाडस करणें; साहस करणें.

छाती तडकणें—भयभीत होणें. 'चोहोंकडून फौजांचे भार पहातांच छाती तडकली; तेव्हां माघारें कूच केलें.' –ऐले ७.२४६४.

छाती दडपून जाणें––भीति वाटणें; घाबरणें; धडकी भरणें; धास्ती घेणें. 'त्या प्रसंगानें तिची छाती दडपून गेली.–कोकि ४७५.

छाती धडधडणें––ऊर धडधडणें; छातींत भीतीनें धडकी भरणें; ऊर जोरानें उडूं लागणें; भीतीनें श्वास जोरानें चालू लागून छाती उडतांना दिसणें; छातीस कंप भरणें.

छाती पिटणें—अतिशय दुःखानें ऊर बडवून घेणें; छाती बडविणें; शोकानें छातीवर जोरानें हात मारून घेणें.

छाती फाटणें—अतिशय दुःखानें अंतःकरण विदीर्ण होणें; उरीं फुटणें; छातींत भयंकर धडकी भरणें; अतिशय धास्ती खाऊन बेहोष होणें.

छाती फाटून जाणें—मनाला भयंकर धक्का बसणें; अतिशय धास्ती वाटणें; उरीं फुटणें; छातींत धडकी भरणें; भयंकर धास्ती घेणें. 'आपली करणी पाहून माझी छाती फाटून गेली आहे.'–कोकि ४५.

छाती भरून येणें—हर्ष, शोक, वगैरे एखाद्या विकाराच्या प्राबल्यामुळें जोराचा उमाळा येणें; उरांत बांध बसल्यासारखें होणें; श्वासोछ्वासास अवरोध होणें.

छाती मोठी करणें—१ मन उदार करणें; मनाचें औदार्य दाखवून एखाद्याचें अपराध पोटांत घालणें. २ मोठ्या धैर्यानें एखाद्या संकटास तोंड देणें. धाडस करणें.

छाती वर करून–काढून चालणें––ऐटींत चालणें; आपल्या वैभवाचें प्रदर्शन करीत चालणें;उजळ माथ्यानें फिरणें.

छातीचा कोट—अतिशय धाडस; साहस; धैर्याचें विलक्षण प्रदर्शन; विलक्षण शक्तीचें कार्य.

छातीचा कोट करणें––मोठ्या शौर्यानें एखाद्याचें रक्षण करणें; हिंमत बांधणें; धैर्यानें तोंड देणें; पराक्रमाची शर्थ करून एखाद्या संकटास तोंड देणें. –गांगा २५४. 'बहुता प्रकारें त्यास झुंझावयाची गांठ घालितां छातीचा कोट करून चंडोलावर फौजा उडवल्या.'–रा १.२५८. 'त्या तरुण शूर ब्राह्मण कुमारानें छातीचा कोट करून तटाचा रस्ता धरला.'––V. S. २.४३.

छातीचा व्यापार––धाडसी व्यवहार; नफ्यासाठीं बरेच दिवस वाट पाहावी लागणारा व्यापार.

छातीचे बंद तुटणें––अंगरख्याचे बंद तुटणें; आवेश येणें; अत्यंत आवेशामुळें छाती भरून आली असतां ती फुगल्यामुळें कपड्याचे बंद तुटणें.–संग्रामगीतें ४३.

छातीला हात लावून म्हणणें-सांगणें—खात्रीपूर्वक,न कचरतां सांगणें; प्रतिज्ञेवर सांगण; निक्षून सांगणें; छातिठोक सांगणें. 'सारी रात्रभर असा निपचित पडला होता कीं, विलायतेंतल्या कसलेल्या परीक्षकालासुद्धां छातीवर हात लावून सांगतां आलं नसतं कीं हा तळिराम असा बेशुद्ध

पडला आहे तो मेल्यामुळं, झोंपेमुळं, कीं दारूमुळं.' –एकच प्याला ५. २.

छातीवर गुजारा करणें—हिंमतीनें कोणतेंहि कार्य करणें; धैर्यानें एखाद्या गोष्टीस तोंड देणें.

छातीवर दगड ठेवणें--संकटांत ढकलणें, पाडणें; एखाद्यावर आपत्ति आणणें; एखाद्यास अडचणींत लोटणें.

छातीवर दगड येणें—संकट ओढवणें. 'पुण्याचें नांव ऐकतांच त्या इंग्रज अधिकाऱ्याच्या छातीवर मोठा थोरला दगड येऊन पडल्यासारखें झालें.'–V. S. २.२९.

छातीवर बसणें—कुस्तींत प्रतिस्पर्ध्याला खालीं पाडून त्याच्या छातीवर दुसरा बसतो. म्हणजे त्याला वाटेल ते करावयास लावतो. यावरून जबरदस्तीनें, सक्त करडी नजर ठेवून काम करून घेणें.

छातीस माती लावणें—आखाड्यांत कुस्तीसाठीं जोडी उतरते तेव्हां हात घसरून जाऊन कुस्तींत पेंच बिघडूं नये म्हणून हाताला तशीच छातीला माती लावतात. त्यावरून सामन्यास उठण्याचें साहस करणें अथवा सामान्यतः साहस किंवा धाडस करणें. 'छातीस माती लावून रेलवेचा कॉन्ट्रॅक्ट घेतला तेव्हां पैसा मिळाला.'

छातीस लावणें--आलिंगिणें; मिठी मारणें; गळ्यांत गळा घालणें.

❀ छाती करील त्याचा व्यापार--व्यापारांत नेहमीं धाडस करावें लागतें. जो धाडस करतो त्यालाच व्यापारांत फायदा होतो.

छांदिष्ट--[छंदस् = वेद.] वेदांतील शब्दरूपें रूढ व्याकरणाला धरून नसतात म्हणून त्यांस आर्ष म्हणतात. यावरून अनियमित; स्वैर; लहरी; नादी.

छान——छान उतरणें-उडणें—चांगलें शोभिवंत होणें; रंग भरणें; मौज येणें. 'कालच्या गाण्याची मोठी छान उतरली.'

छान मारणें--१ थाटमाट करणें; शोभादायक होणें; तजेलेदार दिसणें. २ प्राविण्य दाखविणें; कौशल्य प्रत्ययास आणणें.

❀ छान छोक, पर मध्यें भोंक--वरून दिसावयास खूप डामडौल, थाटमाट वगैरे असावयाचा पण खरी वस्तुस्थिति अगदीं पोकळ असावयाची. केवळ दिखाऊ वैभव पण वास्तविक निकृष्ट स्थिति असतांना योजतात.

छानदारी बाहेर दाखवी, अंतरीं मूर्ख म्हणवी—एखादी स्त्री बाहेरून खूप झकापकी ऐट दाखविते पण वास्तविक तिचें ज्ञान फार अल्प असतें. You may know a foolish woman by her finery.—Italian. –सवि ४२९९.

छाप——छाप टाकणें—१ डामडौल करणें; ऐट दाखविणें; वैभव वगैरेचें प्रदर्शन करून डोळे दिपाविणें. २ प्रयत्न करणें; जोराचा नेट करणें. ३ अनुकूल ग्रह करणें; वजन ठेवणें; वर्चस्वाखालीं आणणें.

छाप देणें--थाप देणें; गप्पा मारणें; भलतेंच सांगून बनविणें; फसविणें.

छापाखालचा गृहस्थ--वर्चस्वाखालील मनुष्य; हाताखालील, दबेल मनुष्य; आपल्या तंत्रानें चालणारा; मर्जीप्रमाणें वागणारा मनुष्य.

छापी खोगीर--[छाप = बुरणूस] बुरणुसाचें खोगीर; घोड्याच्या पाठीस चामडें रुतूं नये म्हणून नमदा अथवा बुरणूस प्रथम घालून त्यावर चामड्याचा जीन घालीत. कोठें कोठें रू भरलेली पातळ गादी घालतात.

छापी सुलाखी--[सुलाख, सुराख=छिद्र] १ वर छाप व सुलाख असलेलें नाणें, रुपया खरा किंवा खोटा आहे हें पाहण्यासाठीं त्यावर योग्य तो ठसा आहे किंवा नाहीं व त्याची धातु हिणकस वगैरे आहे किंवा काय हें त्यास भोंक पाडून पाहण्याची पद्धति होती. त्यावरून छाप मारलेलें व सुलाख पाडलेलें नाणें म्हणजे खरें नाणें असा अर्थ होतो. २ अनेक ठसे व सुलाख असलेला म्हणजे अर्थात् कमी वजनाचा.

छापेखालीं असणें—वजनाखालीं, वर्चस्वाखालीं असणें; तंत्रानें चालणें; मर्जीनें अनुसंधान राखून वागणें.

छापखाना——छापखाना व भूतखाना—छापखान्यामध्यें अनेक लोकांच्या हातून छापण्याच्या क्रियेंतील अनेक कामें व्हावयाचीं असल्यामुळें त्यांत कोणाकडून तरी चूक होण्याचा संभव फार असतो. त्यामुळें कोणीं चूक केली तें नक्की कळतहि नाहीं. म्हणून जणूं काय भुतांचा व्यवहार त्यांत चालतो. इंग्लंडमध्यें छापखान्यांत जो हरकामी पोऱ्या असे त्यास सैतान (Devil) म्हणत. त्यावरून छापखानदाराचें भूत, सैतान (Printer's Devil) हा वाक्प्रचार उत्पन्न होऊन तो मराठीमध्येंहि आला आहे.

छाया——छाया धरणें—पावसाळ्यांत वगैरे ढगांनीं आकाश व्यापून काळोखी येणें; अभ्रच्छाया; मेघडंबर.

❀ छाया एटलां छापडां ने नळियां एटला घर, रांडी

रांडो एम कहे के कुंवारा एटला वर—(गु.) जेथें छाया दिसेल तें छप्पर, जेथें नळ दिसेल तें घर याप्रमाणें वावरणाऱ्या मुलीच्या बाबतींत जितके कुंवार मुलगे दिसतील तितके तिचे भावी वर. याप्रमाणें स्वैर वर्तनाच्या मुलीबद्दल योजतात.

छाया देहातें सोडीना, कृती कीर्तीतें मोडीना—ज्याप्रमाणें शरीरामागें छाया ही असतेच, ती शरीरास सोडून जात नाहीं, त्याप्रमाणें मनुष्यानें केलेल्या प्रत्येक कृतीचा त्याच्या कीर्तीवर बरा वाईट परिणाम होतोच.

छाया रोटी, धुवा रोटी—दोन कृपणांची गोष्ट. त्यांमध्यें अधिक कृपण कोण म्हणून चढाओढ लागली. तेव्हां त्यांनीं आपण काय करतों तें सांगितलें. त्यांपैकीं एक प्रत्यक्ष भाकरी न खातां ती पाण्यांत धुवी व तें पाणी पिई; तर दुसरा तर भाकरीची सावली पाण्यांत पाडून तें पाणी पिई!

छायेच्या पाठीं लागूं नका, व मूळ वस्तूस चुकूं नका—मूळ वस्तु सोडून भ्रमानें तिच्या छायेच्या पाठीस लागून फसूं नये. वास्तविक अंतरंग न ओळखतां केवळ एखाद्या वरपांगी चांगल्या दिसणाऱ्या देखाव्याकडे पाहून भुलूं नये. तु०—कुत्रा आणि त्याची पडछाया ही गोष्ट.

छास——छास नहीं तो दूधसे चलता है!—ताक नाहीं तर दूध चालेल! म्हणजे हलक्या गोष्टीच्या अभावीं भारी गोष्ट मागणें. पण ती कशी शक्य व्हावयाची?

छिंकणी——छिंकणी छिकामणी, ने लुगडा लाजामणी, तपकीर ताजो, ने जेना हाथमां छिंकणी ते छत्रपति राजो—(गु.) तपकीर शिंका आणते व वस्त्र खराब करते; तथापि ज्याच्या हातांत ताजी तपकीर असते त्याला आपण छत्रपति राजे आहों असें वाटतें. छेल पहा.

छिद्र——छिद्र पाडणें—प्रवेश-मार्ग शोधून काढणें, किंवा तयार करणें; हळूच प्रवेश करणें; किंचित् प्रवेश करणें. चंचुप्रवेश पहा.

छिद्र पाहणें—न्यून, व्यंग, उणेपणा पाहणें; दोष काढणें; नांवें ठेवणें; दोषैक दृष्टीनें पाहणें.

छिद्रांत निघणें—हलकें होणें; नमणें; क्षुल्लक दिसणें.

छिद्रान्वेषी—केवळ दोष तेवढेच पाहणारा; कमीपणा असेल तेवढाच काढणारा; गुह्य शोधून काढणारा.

❀ **छिद्र असे घरावरी, किरण पडे भीतरीं**—घराच्या छपरास भोंक असलें म्हणजे त्यांतून सूर्याचे किरण आंत येतात. आपल्या घरांत गृहछिद्र म्हणजे कांहीं कलह, व्यंग वगैरे असलें म्हणजे त्यामुळें घरांत परकीयांचा व त्यामुळें संकटांचा प्रवेश होतो.

छिद्र सांगे ज्यास, त्याचा होय दास—जो आपलें गृहछिद्र, किंवा गुह्य दुसऱ्यास सांगतो तो त्याच्या तावडींत सांपडतो.

छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति।—कोठें व्यंग असलें कीं त्यापासून अनर्थ परंपरा सुरू होते. एकदां संकटें यावयास लागलीं म्हणजे तीं अनेक व एकामागून एक येऊं लागतात. (अ) एकस्य कष्टस्य न यावदन्तं, गच्छाम्यहं पारमिवार्णवस्य। तावद्द्वितीयं समुपस्थितं मे, छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति॥ —पंचतंत्र २.१८८. (आ) क्षते प्रहारान् निपतन्त्यभीक्ष्णं, धनक्षये दीप्यति जाठराग्निः। आपत्सु वैराणि समुल्लसन्ति, छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति।—पंच २.१९४.

छिनाल——छिनाल रांडेला कुंटिणीची जरूर लागत नाहीं—जी स्वतःच वाईट चालीची आहे तिला कोणी साहाय्यक किंवा बिघडविणारी लागत नसते.

छी——छी म्हणणें—नको वाटणें; त्याज्य असणें. 'आणी आस्था याची या आचारें सखेद आह च्छी॥' —मो निरोष्ठरा ४३.

❀ **छी म्हणा थू म्हणा (छी सुण्या म्हळ्यारि) पोट भरून वाडि**—(गो.) छी! म्हणा, थू! म्हणा, पण पोट भरून वाढा. अन्नासाठीं लाजलज्जा सोडलेला माणूस.

छी सुण्या लाज ना, आजि म्हळ्ळेलें फायिना—(गो.) निर्लज्ज व कोडगा माणूस.

छुक——छुक छुक करणें-म्हणणें—[छुक्-शुक् असा उच्चार करून गप्प राहा असें दर्शवितात.] शांत राहण्यास सांगणें; स्तब्ध होण्यास सांगणें.

छू——छू करणें-म्हणणें—१ कुत्र्यास भुंकण्याचा इशारा करणें; कुत्र्यास एखाद्याच्या अंगावर जाण्याचा इशारा करणें; एखाद्याच्या पाठीस कुत्रें लावणें. २ भांडण करण्यास एखाद्यास उत्तेजन देणें. एकाला पळण्यास सांगून दुसऱ्यास छू म्हणणें; मुद्दाम भांडणें लावणें.

छू म्हणतांच कुत्र्याप्रमाणें पाठीस लागणें—एखाद्याच्या प्रोत्साहानें मागें लावणें, धांवणें, त्याला छळणें. 'वृषवचनें पांचाळांपाठीं लागति वधार्थ खल हे 'छू'। व्याधें म्हणतांचि जसे हरिणामागें श्वसंघ कलहेच्छू॥'—मोकर्ण ३७.१९.

छेडखानी——छेडखानी करणें—(ना.) त्रास देणें; खोडी काढणें; कुचेष्टा करणें; छेडणें.

छेडणें——छेडूं नये निकरानें, न करावें शासन घाईनें--कोणासहि अतिशय त्रास देऊं नये. तसें केल्यास तो अगदीं जिकीरीस येऊन शेवटीं आपल्यावर उलटण्याचा संभव असतो. तसेंच कोणाच्याहि अपराधाची पूर्ण चौकशी केल्याशिवाय कोणासहि घाईनें शिक्षा करूं नये. त्यांत अन्याय होण्याचा संभव असतो.

छेडी——छेडी जाणें—(ना.) त्रास वगैरे देणें; छळणें; जाचणें.

छेद——छेद पाडून लिहिणें—कागदाला योग्य ठिकाणीं घड्या पाडून व समास सोडून वगैरे लिहिणें.

छेल——छेल व्यसन छिंकणी, राजव्यसन हुक्को, गांडु व्यसन तमाखू, ने ठेरठेर (पचापच) थुंको--(गु.) अगदीं शेवटचें म्हणजे कमी प्रतीचे व्यसन तपकिरीचें, हुक्का हें राजास शोभण्यासारखें मोठें खानदानीचें व वैभवाचें व्यसन समजलें जातें, तर तमाखू खाणें हें सर्व दुर्बलांचें व्यसन असून त्यामुळें सर्व लोक तंबाखू खाऊन पचापच थुंकत असतात व घाण करतात.

छोटा——छोटा मूह बडी बात—तोंड लहान पण बाता मोठ्या. आपल्या कुवतीपलीकडे बढाया मारणें; आपल्या शक्तीपलीकडच्या गोष्टी सांगणें; ऐट मारणें. तु०—लहान तोंडीं मोठा घास. लहान मूर्ति पण थोर कीर्ती.

छोटीशी आगकाडी, पण जगाची रांगोळी करी—आगकाडी स्वतः लहान असते पण तिच्या ठिकाणीं सर्व जग भस्म करण्याची शक्ति असते. त्याप्रमाणें कलह वगैरेचें मूळ अल्प असतें, पण त्यामुळें मोठमोठे अनर्थ घडून येतात.

ज

ज; जचें—जेवण या शब्दांचा आरंभ ज वर्णापासून होतो यावरून जेवण.

जकात——जकातीचा धंदा, तेथें पाप वसे सदा—जकात वसूल करण्याच्या कामावर असलेला मनुष्य बहुतेक लांच घेतल्याशिवाय राहात नाहीं.

जखम——जखम भरणें—जखम भरून येणें, बरी होणें; घाव, व्रण नाहींसा होणें, बुजणें.

जखमेवर मीठ घालणें-चोळणें—जखमेवर मीठ म्हणजे वेदनांत भर. यावरून दुःखावर डाग देणें; आधींच त्रस्त असलेल्या मनुष्यास अधिक त्रास देणें; दुःखी मनुष्यास हिणविणें.

***जखम भरून येते, वण कायम राहतो**—शरीरावर जखम झाली असतां ती जरी भरून आली तरी मागाहून वण म्हणजे तिचें कातडीवरील चिन्ह कायम राहतें; तें पुसून जात नाहीं. त्याप्रमाणें एखादी गोष्ट होऊन गेली, एखादें संकट येऊन गेलें म्हणजे जरी ती परिस्थिति प्रत्यक्ष बदलली, तरी त्या काळांत झालेल्या गोष्टींची, भोगलेल्या दुःखांची स्मृति कांहीं अजीबात नष्ट होत नाहीं.

जखमेला बिबा, मुलाला अंबा—जखम झाली असतां तीवर बिब्बा घातला म्हणजे तीपासून होणारा त्रास चुकतो. त्याप्रमाणें लहान मुलास अंबा खावयास दिला असतां त्याची समजूत होते.

जग——जगांतून उठणें--१ लोकाचाराविरुद्ध वागणें; शिष्टाचाराविरुद्ध वर्तन करणें; स्वैर वर्तन करणें; मर्यादेबाहेर वागणें. २ वैधव्य किंवा एखाद्या भयंकर आपत्तीमुळें सर्वस्वी बुडणें; कोठेंहि थारा नाहीं असें होणें. 'आई काय सांगू ! तुझी वेणी जगांतून उठल्यासारखी झाली !'—रंगराव.

जगानिराळी-जगाबाहेरील चाल—लोकविलक्षण चाल; प्रचलित रूढीविरुद्ध, परंपरेविरुद्ध वागणूक.

जगामुलखानें सोडलेला — जातीवेगळा टाकलेला; दुनियेची खरवड; ज्याला कोणीहि आपला म्हणावयास तयार नाहीं असा परित्यक्त.

जगाला लाथ मारणें—जगाची पर्वा नसणें; लोकांची भीति वगैरे न वाटणें. 'प्रेम भीक मागायला शिकवतें, तर मदिरेच्या जोरावर सगळ्या जगाला लाथ मारतां येते.'—एकच प्याला १.२.

जगत्शेटीचा नातु—जगत्शेट म्हणजे सर्व जगांत श्रीमंत मनुष्य किंवा उपरोधानें अत्यंत दरिद्री मनुष्य. ज्याप्रमाणें नगरशेट हा नगरांतील सर्वांत श्रीमंत मनुष्य असतो त्याप्रमाणें जगत्शेट ही पदवी सर्व जगांत जो अतिशय श्रीमंत समजला जातो त्यास मिळते. त्यावरू उपरोधिकपणें निर्धन मनुष्यास म्हणतात. त्याचा नातु म्हणजेहि उपरोधानें निष्कांचन, दरिद्री मनुष्य.

***आपण भले तर जग भलें, आपण मेलों जग बुडालें**—जगांतील लोकांशीं आपण जर नीटपणें वागलों,

तर जग आपणांशीं चांगल्या तऱ्हेनें वर्तन करतें, व आपण नष्ट झाल्यावर जग राहिलें कीं गेलें याची पर्वा करण्याचें आपणांस कारण राहात नाहीं. आप पहा.

जग लोक खाती, पसरकारा तोंडां माती—(गो.) दुकानदार वस्तु मांडून बसतो आणि दुसरे लोक त्यांचा उपभोग घेतात. दुकानदारानें नुसतें पाहून समाधान मानायचें. तु०-चांभाराची रंडी, सदा पायीं उघडी. कुंभारास मडकें धड नाहीं.

जगाचा पसारा, देव झाला आसरा--सर्व जग हें अतिशय अवाढव्य पसरलेलें आहे, पण तें परमेश्वराच्या आश्रयानें असल्यामुळें नीट चाललें आहे.

जगाची पीडा वाळक्याच्या खांद्यावर—(कु.) जें जें कांहीं वाईट, दुःखद तें तें अमुक एकामुळें, अशी समजूत. तु०-धुरळा जगताचा माझिये अंगावरी।

जगाची रहाटी, देवाला विसरती—मनुष्य त्याचें जोंपर्यंत सर्व यथास्थित चाललें आहे तोंपर्यंत देवाचें स्मरण करीत नाहीं, अशी जगाचीच रीत आहे.

जगाची वाणी, तीच ईश्वरध्वनि—१ आपल्याबद्दल किंवा एखाद्याबद्दल सामान्यतः चार लोक म्हणजे जगांतील सर्व सामान्य लोक ज्याप्रकारें मत बनवितात, तेंच मत बहुतेक ईश्वरास मान्य असते. म्हणजे सामान्यतः तें सत्य असतें. २ चार लोक ज्या गोष्टींची ग्वाही देतात ती बहुधा खरी असते. तु०-पांचामुखीं परमेश्वर. जनता जनार्दन.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति।—जे खरे साधुपुरुष असतात ते या जगांत लोकांच्या कल्याणाकरितां उत्पन्न होतात व जगांत ते जे वावरतात त्यांचा व्यापारहि जगाच्या कल्याणाकरितांच चाललेला असतो. ते कोणतीहि गोष्ट केवळ स्वतःकरितां म्हणून करीत नाहींत.-शाब १.११६; २-२५८. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारें॥ भूतांचीं दया हें भांडवल संतां। आपुल्या ममता नाहीं देहीं॥ '-तुकाराम.

जगांत मेलेले लोक फार, जीवंत असे थोडे—सामान्यतः जे स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देतील, स्वतंत्रपणें विचार करतील, कांहींतरी करून आपलें नांव जगापुढें आणतील असे लोक जगांत फार थोडेच असतात. बहुतेक भरणा अशा लोकांचा असतो कीं,ते मेल्या गेल्याची कोणाला दादहि नसते; इतके ते विनामहत्त्वाचे असतात.

जगांतून उठला तो आकाशांत टांगला—जो मनुष्य जगाच्या रीतीवेगळें वर्तन करूं लागतो त्याला मग कोणताच आधार राहात नाहीं; त्याला कोणीहि आश्रय देत नाहीं. याकरितां जगामध्यें राहावयाचें त्यानें जगासारखें वागलें पाहिजे. माणसांतून उठून उपयोगी नाहीं.

जगाशीं झगडल्या शिवाय मनुष्यपण येत नाहीं--या जगांत जो कलह चाललेला आहे त्यांत सामील होऊन त्यांत यश मिळविल्याशिवाय मनुष्याला महत्त्व प्राप्त होत नाहीं. त्याला आपलें अस्तित्व जाणवून द्यावयाचें असेल तर त्यानें या जगांत दोन हात करून पुढें आलें पाहिजे.

जगास पुष्कळ डोळे आहेत—मनुष्यास आपणाकडे कोणी पाहात नाहीं असें वाटतें. परंतु जगांत अनेक लोक आहेत व ते अनेक प्रकारचे असल्यामुळें त्यांच्या कृत्याकडे कोणाचें ना कोणाचें तरी लक्ष्य गेल्यावांचून राहात नाहीं व त्यामुळें त्यानें गुप्तपणें म्हणून समजून केलेल्या गोष्टीहि उघडकीस आल्याचें त्याच्या प्रत्ययास येते.

जगीं सर्वसूखी असा कोण आहे। विचारी मना तूंचि शोधोनि पाहे॥—रामदास-मनाचे श्लोक ११. जगामध्यें पूर्णपणें सुखी असा कोणीहि मनुष्य आढळत नाहीं. प्रत्येक मनुष्याला कोणत्या तरी गोष्टीची उणीव अथवा विवंचना लागलेली असते.

जगीं सर्वसुखी कोण? तर विचारी—(वरील रामदासी श्लोकावरून निराळ्या अर्थानें) जगामध्यें जरी पूर्णपणें सुखी मनुष्य सामान्यतः आढळत नसला, तरी जो मनुष्य विवेकानें आपलें समाधान करून घेतो त्याला दुःखाची जाणीव होत नसल्यामुळें त्याला सुखी मानावयास कांहीं हरकत नाहीं.

जंग——जंग देणें—ज्याप्रमाणें एखादी वस्तु बरेच दिवस उपयोगांत न आणतां, एकाच जागेवर न हालवितां ठेवली तर तिला जंग चढतो, त्याप्रमाणें एखाद्या धंद्यांत किंवा कामांत एखादा मनुष्य किंवा वस्तु पुष्कळ दिवस टिकणें, राहणें; न बदलतां एखादा क्रम दीर्घकाळ चालू राहणें.

जंग——जंग जंग पछाडणें—[जंग = लढाई] सारखी लढाई करणें. (ल.) अतिशय श्रम करणें; कमालीचे प्रयत्न, कष्ट करणें. 'नार्मन लोकांनीं जंग जंग पछाडले, पण त्या रंगदार द्वीपस्थांनीं आपला गुण म्हणून सोडला नाहीं.' -केसरी.

जगणें——जगता पंथ लागणें-लावणें—१ आपत्तीं-

तून वर येणें; भयंकर दुखण्यांतून बरे होण्याच्या मार्गास लागणें; जिवावरच्या दुखण्यांतून उठणें. २ बूड आल्यानंतर पुन्हां धंदा वगैरे सावरावयास लागणें.

जगवून तगवून—काटकसरीनें; हात राखून; नीटपणें सांभाळून.

***जगण्यामरण्याची स्थिति, नाहीं मनुष्याच्या हातीं**—मनुष्याची आयुष्यमर्यादा त्याच्या हातांत नसून ती ईश्वराधीन आहे.

जगण्यांत जोंवर अर्थ आहे तोंवरच मरण्यांत मौज आहे—मरण हें अशावेळीं यावें कीं त्यावेळीं मनुष्याच्या हातून कांहीं विशेष कार्य होत असतें व त्याचें जीवन उपयुक्त असतें. पुष्कळ दिवस निरुपयोगी आयुष्य घालवून मरण्यांत कांहीं अर्थ नाहीं. -कोल्हटकरांचा लेखसंग्रह.

जगा नि जगूं द्या—Live and let live याचा अनुवाद. माणसानें स्वतः चांगलें राहून दुसऱ्याला तसें राहूं द्यावें. दुसऱ्याला त्रास देऊन स्वतःलाहि त्रास करून घेण्यांत काय सुख आहे ?

जगन्नाथ——आपला हात अन् जगन्नाथ—आपल्या हातांत सत्ता असली व आपणावर कोणाचें नियंत्रण नसलें म्हणजे जणूं सर्व जगाची मालकी आपणाकडे आहे असें वाटूं लागून वाटेल तें करण्याची मुभा असते. स्वार्थ साधून घेणाऱ्या माणसाबद्दल वापरतात.

जगन्नाथका भात, जगत् पसरे हात—जगन्नाथपुरी येथें गेलें असतां यात्रेकरूनें स्वतः स्वयंपाक करावयाचा नसतो; तर जगन्नाथास जो नैवेद्य दाखवतात त्यांतीलच प्रसाद म्हणून अन्न विकत मिळतें, तें घेऊन खावयाचें असतें. त्या प्रसादास स्पर्शास्पर्शाचा दोष मानण्यांत येत नाहीं. त्यामुळें तेथें सर्व जगांतील माणसें जणूं एकाच भूमिकेवर येतात.

जंगम——जंगम ढवळें—लिंगायतांतील गुरूंस जंगम म्हणतात. ते जातीभेद पाळीत नसून वाटेल त्याच्या हातचें अन्न खातात. यावरून एखाद्या विवाहादि समारंभांत किंवा उत्सवांत आढळून येणारी आचाराची, सोंवळेंओंवळें, स्पर्शास्पर्श वगैरेची शिथिलता, घोटाळा; सबगोलंकार.

जंगम शेटाई—(कों.) ओढून ताणून आणलेली प्रतिष्ठा. लिंगायत लोकांत जंगम हा बैरागी असतो; तो व्यापारी नसतो म्हणून त्याजवळ पैसाहि नसतो. असें असतां त्यानें एखाद्या मोठ्या शेटजीचें अवसान आणणें व शेटजीसारखी प्रतिष्ठा दाखविणें म्हणजे उसनी ऐट आणण्यासारखें आहे.

जंगमाच्या खांद्यावरचा—जंगमाच्या खांद्यावर शंख असतो त्यावरून शंख. (ल.) मूर्ख; अडाणी.

*** जंगमाच्या खांद्यावरील शंख वाजवावा तसा वाजतो**—सांगण्याप्रमाणें बोलणारा. परप्रत्ययनेयबुद्धि.

जंगल——जंगल फिरणें—(हिं.) (सांकेतिक) शौचास जाणें; टट्टी फेरणें.

***जंगलचा वारा, घरचा भारा**—जनावरास घरीं भारा-भर खावयास घातलें तरी त्याची तृप्ति होत नाहीं किंवा तें पुष्ट होत नाहीं. पण नुसतें मोकळें जंगलांत जाऊन जरी केवळ वारा खाऊन आलें तरी तें अधिक हुषार होतें.

जंगलमें मंगल—१ जेथें ओसाड अरण्य असेल तेथें सर्व सोयींनीं युक्त अशी घरादारादि व्यवस्था केल्यास म्हणतात. अगदीं निकृष्ट परिस्थितींतहि फार सुंदर व आल्हाददायक अशी व्यवस्था करणें. २ दुःखांत सुख. 'जंगलमें मंगल कर्ते हय।'—दावि ७.२.३४२.

जंगलांत नाहीं वावर, नि गांवांत नाहीं घर—गरीब स्थितींतील मनुष्य; कफल्लक; ज्यास घरदार कांहीं नाहीं असा सडा फटिंग मनुष्य. काळीवर नाहीं शेत, पांढरीवर नाहीं घर, पहा.

जघन्य——जघन्य करणें—(व.) बभ्रा करणें; बोभाटा करणें; जगभर करणें; जगजाहीर करणें.

जघन्यता होणें—प्रसिद्धी होणें; बभ्रा होणें. 'नामर्दुमीची जघन्यता होईल.'—भाव १०.

जघन्यांत होणें—(प्र.) जघन्यता होणें पहा. जगजाहीर होणें; सर्वत्र पसरणें; फैलावणें; प्रसिद्ध होणें. 'कीर्ति जघन्यांत झाली।'—अफला ५१.

जंजाल——जंजाल तोडणें—अतिशय त्रास कष्ट सोसणें; अडचणींतून मार्ग काढणें; बिकट अवस्थेंतून पार पडणें.

जंजाल पछाडणें—१ छळणें; त्रास देणें; जाच करणें. २ खूप जोराचा प्रयत्न करणें; नेटानें काम करणें; पिच्छा पुरवणें.

जंजीर——जंजीर तोडणें—जंजीर म्हणजे लोखंडाची सांखळी, ती तोडणें हें फार श्रमाचें व कष्टाचें काम आहे. यावरून अतिशय कष्ट सोसणें.

जड——जड दाबणें—[जड = मूळ] १ एखाद्या झाडाची फांदी वांकवून जमिनींत पुरली असतां तीस त्या ठिकाणीं मुळ्या फुटून कलम तयार होतें; या कृतीस म्हणतात. पन्हेरीचें कलम करणें. २ झाडास मुळांपासून पोषण होतें. याकरितां झाडाची जर एखादी मूळ दाबून ठेवून तींतून रस

वर येणार नाहीं असें केलें, तर त्या झाडाचें पोषण बंद होऊन तें पडेल. त्याप्रमाणें एखाद्याच्या मर्मावर आघात करून, किंवा मर्मस्थान ताब्यांत घेऊन त्यास नरम आणणें.

जड——जड धरणें—मोठा समजणें; महत्त्व मानणें; थोर समजणें; मोठेपणा देणें.

जड पारडें; जडब पारडें—तराजूचें रूपक. ज्या पारड्यांत जिन्नस असतो तें खालीं बसतें. यावरून १ सुबत्ता; भरभराट; उत्कर्ष. २ समृद्ध मनुष्य; श्रीमंत मनुष्य; वैभव संपन्न मनुष्य. ३ त्रासदायक काम; अडचणीची गोष्ट; कष्टकारक गोष्ट.

जड पारडें उचलणें-उरकणें-पाहणें—एखादें त्रासदायक, कष्टाचें काम करणें; अंगावर घेणें.

जडबुडाचा—श्रीमंत, वजनदार मनुष्य.

जडभरत—एका ऋषीचें नांव. हा फार मंद असल्यानें याला मजुरीचीं कामें देण्यांत येत. पुढें हा तत्त्वज्ञानी झाला. (ल.) फार आळशी, सुस्त माणूस.

जड वाटणें—कठिण, त्रासदायक वाटणें.

जड सांगणें—एखादा रोग किंवा संकट अधिकाधिक वाढत जाणें; दिवसेंदिवस कठिण, बिकट होत जाणें; कठिण होत जाणें.

बूड-गांड जड होणें—प्रतिष्ठा वाढल्यामुळें गर्व होणें.

❀केलें नाहीं तोंवर जड, खाल्लें नाहीं तोंवर गोड—जोंपर्यंत एखादी गोष्ट करावयास प्रत्यक्ष हात घातला नाहीं तोंपर्यंत ती कठिण वाटते पण प्रत्यक्ष करूं लागले असतां ती साध्य होते. त्याप्रमाणें एखाद्या गोष्टीची प्रत्यक्ष चव माहीत नसते तोंपर्यंत ती गोड असेल अशी कल्पना असते; पण प्रत्यक्ष खाऊन पाहिली असतां कित्येकदां निराळाच अनुभव येतो. यावरून अनुभवाशिवाय नुसत्या कल्पना पुष्कळदां भ्रामक असतात, तेव्हां त्यांवर अवलंबून न राहतां प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहणेंच अधिक इष्ट आहे.

जडी——जडी बुट्टी—[जडी = मुळी. बुट्टि = गुटिका, गोळी] १ औषधी गुण असलेलें झाडाचें मूळ; वनस्पतीचें मूळ; किंवा एखादी मात्रा, गोळी वगैरे. २ आपत्कालासाठीं सांठवून ठेवलेला पैसा; राखणीचें धन; (मुळीप्रमाणें खोल जमीनींत) पुरून ठेवलेला पैसा. ३ (ल.) अद्भुत रीतीनें कार्य घडवून आणणारी अशी वस्तु; ताईत, गंडादोरा वगैरे; मंत्रसिद्ध ताईत वगैरे; मंतरलेली मुळी, गुटिका वगैरे.

जड्या——जड्या भाऊ—१ लटपटी करून आपलें काम साधणारा; चिकटून बसणारा. २ उपऱ्या; कायमचा नव्हे असा; तात्पुरता कोठून तरी आलेला.

जण——जणांत मिसळून राहणें-असणें—लोकांत मिळून मिसळून असणें; लोकमतानुवर्ति होणें; सहसा लोकमताविरुद्ध वर्तन न करणें; चारचौघांप्रमाणें वर्तन ठेवणें.

❀जण हाराचें, जण चोराचें—कांहीं लोक धन्याच्या बाजूला तर कांहीं लोक चोराच्या बाजूला असतात; लोक दोन्ही बाजूंनीं बोलणारे असतात; दोन पक्ष पडले म्हणजे कांहीं विरुद्ध पक्षाला असे मिळतातच.

जणाचे हातीं दोन धोंडे—कशाहि रीतीनें वागलें तरी लोक खुषी होत नाहींत; जग हें कसेंहि वागलें तरी वाईट म्हणतें; लोकांची टीका ही कोणत्याहि गोष्टीवर होतच असते, व ती पुष्कळदां परस्पर विरुद्धहि असते.

जतन——जतन तेथें पतन—नुसतें सांठवून ठेवण्याकडेच लक्ष्य दिलें तर केव्हां तरी सांठवलेल्या वस्तूचा नाश होण्याचा संभव असतो. याकरितां कोणतीहि वस्तु केवळ सांठवून न ठेवतां तिचा योग्य वेळीं उपयोग करून घेणें चांगलें. कृपण आपलें द्रव्य केवळ सांठवून ठेवतो पण तें चोरीस जाण्याची भीति असते.

जत्या——जत्या म्हणणें—जैन यतीनें आपलीं स्तोत्रें वगैरे म्हणणें. 'त्यानें आम्हा देखतां साचार। जत्या केल्या पाठांतर।'

जत्या हाणणें-मारणें—गप्पा छाटणें; बाता मारणें; गोष्टी सांगणें.

जंत्र——जंत्रांतून ओढणें—१ कडक शिस्त लावणें; अगदीं धाकांत ठेवणें; कडक निर्बंधांत ठेवणें. २ कसोशीनें पाहणें; परीक्षा करणें; बारीक सारीक बाबतींतहि चौकशी करून पाहणें.

जंत्रांतून ओढलेला—अतिशय कृश झालेला; चरकांतून काढलेला; फार जाच झालेला; अतिशय कष्ट पडलेला; हालांत वागलेला.

जंत्रीं ओतलेला—बांधेसूद; साच्यांत ओतल्याप्रमाणें रेखीव.

जंत्रीं धरणें—कडक रीतीनें वागवून काम घेणें; अगदीं शिस्तींत ठेवणें; कडक निर्बंधांत ठेवणें.

जत्रा——जत्रा करणें—१ क्षुद्र देवतांना बकरें, कोंबडे वगैरे बळी देणें. २ (क.) भूतबाधा होऊं नये म्हणून कोंबडे वगैरे मारणें.

जंद्यो——जंद्यो गेल्यो खिणा उर्ल्यो—(गो.) सांखळ्या गेल्या खुणा राहिल्या. तोडे गेले पण घट्टे राहिले. तु०—काप गेले, भोंकें राहिलीं.

जन——जन जनार्दन; जनताजनार्दन; जनीं जनार्दन—सर्व लोक हे परमेश्वरस्वरूपी आहेत अशी समजूत. 'जनीं जनार्दन म्हणोनि जना । संतुष्ट करावें ।'–दा १८.४.३५. 'जनीं जनार्दन वसे । येथें दिसे तें शुद्ध ॥' –तुगा २७९१. खालीं पहा.

जनवाक्य जनार्दन—पांचामुखीं परमेश्वर; सर्व जनतेला जें बरोबर वाटतें तें परमेश्वरालाहि योग्य वाटेल अशी समजूत. जण पहा.

***जन गर्विष्ट नसतें, तर इतरा गर्विष्ट न म्हणतें**—लोक जर स्वतः गर्विष्ट नसते तर तो आरोप त्यांनीं कोणावर केला नसता. आपण जसे आहों तसेंच इतर लोक असतात अशी सर्वत्रांची समजूत असते. तु०–आपणावरून जग ओळखावें. आत्मौपम्येन पुरुषः प्रमाणमधिगच्छति ।–सुर १६३.४३७.

जन त्रिविध आहे—लोक अनेक प्रकारच्या स्वभावांचे असतात. कांहीं लोक असें बोलतात तर कांहीं तसें बोलतात. तेव्हां आपल्याला बरें दिसेल तें करावें. पुढें पहा.

तुका म्हणे जन दुतोंडी सावज ।–सांपडे सहज तिकडे घर ॥–तुकाराम. लोक दोन्हीहि प्रकारें उलट सुलट बोलतात. कोणी एखाद्या गोष्टीला चांगलें म्हणतात तर कोणी त्याच गोष्टीला वाईट म्हणतात. जसें ज्याच्या दृष्टीला दिसेल तसें म्हणतात.

जनलज्जा नाहीं आणि मनलज्जाहि नाहीं—कांहीं लोक आपल्याला इतर लोक नांवें ठेवतील या भीतीनें कांहीं गोष्टी करीत नाहींत; कांहीं स्वतःच्या मनालाच कांहीं गोष्टी प्रशस्त वाटत नाहींत म्हणून ते करीत नाहींत; पण कांहीं लोक इतके निर्लज्ज असतात, कीं त्यांच्या मनाच्या टोंचणीपासूनहि त्यांना कांहीं त्रास वाटत नाहीं किंवा इतर लोकांच्या बऱ्या-वाईट मताचीहि ते पर्वा करीत नाहींत व केवळ स्वैर वर्तन करतात.

जना फटौयेत मना फटौच्या जाता ?—(गो.) लोकांना फसवतां येईल पण मनाला फसवतां येत नाहीं.

जनामुखीं प्रगट कीर्ति, विरळा दोष देती—ज्या गोष्टीची वाखाणणी सर्व लोक करतात त्या गोष्टीला क्वचितच कोणी नांवें ठेवतो.

जनाची ऊ, सोडीना मारीना—ज्याप्रमाणें ऊ ही एकदां शरीरास डसली म्हणजे रक्त शोषण करते व मग कांहीं केल्या सोडीत नाहीं पण त्यापासून मरणहि येत नाहीं, त्याप्रमाणें लोकमत हें इतकें प्रभावी नसतें कीं त्यामुळें एखाद्याचा नाश व्हावा. पण तें त्याची निंदा करून त्याला त्रास दिल्याशिवाय राहात नाहीं.

ऐकावें जनाचें, करावें मनाचें—अनेक लोकांचा विचार घ्यावा, सल्ला अनेक लोकांकडून घ्यावा पण शेवटीं प्रत्यक्ष कृति करतांना सर्व गोष्टींचा विचार करून आपल्या मनाचा एक निश्चय करावा व त्याप्रमाणेंच वर्तन करावें. Give every man thy ear, but few thy voice.–Shakespeare.

जनाचे तोंडीं लागतां पुरवत नाहीं—लोक अनेक प्रकारांनीं निरनिराळें उलट सुलट बोलतात. तेव्हां सर्व लोकांच्या टीकेकडे लक्ष्य देऊन त्यांतून सुटावयाचें म्हटलें व सर्व लोकांस पसंत पडेल असें वागावयाचें म्हटलें किंवा त्यांच्या टीकेस उत्तर द्यावयाचें म्हटलें तर तें शक्य नसतें. तेव्हां सर्वांत उत्तम उपाय म्हणजे लोकांच्या टीकेकडे लक्ष्य न देतां आपणास योग्य वाटेल तसें वागावें हा होय. तु०–म्हातारा, त्याचा मुलगा व गाढव यांची गोष्ट.

जनाचे हातीं दोन धोंडे—जण पहा.

जनांत एक, मनांत एक—दुटप्पी वर्तनाचा मनुष्य. वर वर बोलावयाचें एक, मात्र मनांत त्याच्या उलट असावयाचें; अशी वृत्ति असणारा मनुष्य.

जनांत बुवा आणि मनांत कावा—बाहेर दिसावयास साधुत्वाचें ढोंग आणावयाचें व आंतून कपट करावयाचें. तु०–लोक म्हणती बुवा बुवा । न कळे गुलामाचा कावा ॥-तुगा.

जनाला गावें—लोकांच्या वागणुकीला दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. लोकांना नेहमीं चांगलेंच म्हणत असावें, पण आपली वागणूक मात्र आपल्या मनाला योग्य वाटेल तशी ठेवावी.

जनीं निंद्य तें सर्व सोडून द्यावें । जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ॥—रामदास मनाचे श्लोक. जी गोष्ट सर्व लोक गर्हणीय मानतात ती करूं नये व जी गोष्ट सर्वमान्य स्तुत्य असेल ती मात्र मनापासून करावी.

जनीं वीष खातां पुढें सौख्य कैचें—विष खाल्लयावर मनुष्याला सुख कसें लागणार. –मनाचे श्लोक ७४.

जनणें——जने ती जाणें, वांझोटी काय जाणें—जिला मूल होतें तिला प्रसववेदनांचें दुःख कळतें. वांझोटीला त्या दुःखाची काय कल्पना असणार. ज्यास ज्या कामाचा अनुभव असून तें काम करण्यास कशा प्रकारचीं दुःखें

सोसावीं लागतात, याचा अनुभव तें काम न करणाऱ्यांस कोठून असणार. ज्यास अनुभव त्यासच माहीत. तु०—विद्वानेव विजानाति विद्वज्जनपरिश्रमम् । न हि वंध्या विजानाति गुर्वी प्रसववेदनां ॥

जनन——**जनन-स्थिति-लय**—उत्पत्ति-स्थिति-नाश या तीन अवस्था.

※**जनन मरण सर्वांला आहे**—मनुष्य मात्राच्या पाठीमागें जन्ममृत्यु हा आहेच. भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणें पुनर्जन्म हा मान्य असल्यामुळें प्रत्येक प्राणि मुक्त होईपर्यंत अनेक योनींत पुन्हां पुन्हां जन्मास येतो.

जननी——**जननी जण तो भक्तजण, कां दाता कां शूर । नहितो रहिजे वांझणी, मत गमावे नूर** ॥—मातेनें पुत्रास जन्म द्यावयाचा तर तो भक्त, दाता किंवा शूर होणाऱ्या पुत्रासच जन्म द्यावा. नाहींपेक्षां पुत्रजन्मानें आपलें सौंदर्य घालविण्यापेक्षां वांझ राहिलेलें काय वाईट ?

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।—माता व जन्मभूमि या स्वर्गापेक्षांहि श्रेष्ठ होत. मातृदेश हा मातेप्रमाणेंच वंद्य आहे हें दाखविण्यासाठीं योजतात.–एकचप्याला १.१.

जननीभय मनीं कां मानिजे । व्याघ्र तो कीं ॥——आईचें भय मनांत कशास बाळगावयास पाहिजे. चिरपरिचित मनुष्याबद्दल भय वाटत नाहीसें होतें. तुलना०–No man is hero to his valet.

जनावर——**जनावर उखळणें**—(माण.) जनावराच्या पायाचें मूळ सुटणें, सांधा निखळणें.

जनावर ठिपणें—मारलेल्या दगडानें जनावराचा पाय जाया होणें.

जनावर तणकटणें——जनावर गवत खाऊन खूप फुगणें; लठ्ठ होणें; गुबगुबीत होणें.

जनावर बुरट असणें—जनावरानें अतिशय थोडें दूध देणें.

जनावर वांगरल्यासारखें दिसणें—जनावरास दुखणें आल्यासारखें दिसणें; मलूल दिसणें; अंग मोडून आल्यासारखें दिसणें.

जन्म——**जन्म घेणें**-जन्मास येणें; अस्तित्वांत येणें; उत्पन्न होणें. 'जन्म घेति ते कोणत्या कुळीं।'——शारदा.

जन्म जाणें——आयुष्य खर्च होणें; सर्व हयात निघून जाणें; जिंदगी खर्च होणें. 'गेलारे गेला जन्म वाया।'

जन्मजुगा सवाशीण——(गो.) जन्मवेरी सवाष्ण; अखंड सवाशीण.

जन्मठेप काळें पाणी——हद्दपारी; देशांतून बाहेर घालविणें; देशत्याग. शिक्षेचा एक प्रकार. 'एक आरोपीस जन्मठेप काळे पाण्याची शिक्षा दिली.'–केसरी १७-६-३०.

जन्म देखणें-पाहाणें-येणें—(ल.) ऋतुस्नात होणें; मुका मुलगा होणें.

जन्म देणें—प्रसवणें; प्रसूत होणें; जन्मास घालणें; उत्पन्न करणें.

जन्मस्थानीं लघुशंका करणें—मातृगमन करणें; आईच्या खाटेवर चढणें. २ अत्यंत नीच कृत्य करणें. 'नजीबखान रोहिला मात्रागमनी. जन्मस्थानीं लघुशंका करणार.' –भाब ३८. 'पुत्राला मात्रागमन्याप्रमाणें प्रत्यक्ष जन्मस्थानीं लघुशंका करायला लावते ती दारू!'–एकच प्याला ५.४.

नवा जन्म होणें; पुनर्जन्म होणें—एखाद्या भयंकर आपत्तींतून बाहेर पडणें; एखाद्या भयंकर रोगांतून मुक्त होणें; जीवावरच्या दुखण्यांतून बरें होणें.

जन्माचा करंटा——अतिशय दुर्दैवी; उभ्या जन्मांत ज्यास सुख मिळालें नाहीं असा.

जन्माचा पत्कर घेणें——एखाद्याच्या जन्मभर पालनपोषणाची जबाबदारी घेणें; सर्व हयातपर्यंतचा भार घेणें; सर्व जीविताची हमी घेणें.

जन्माचा पाटा वरवंटा घेणें–एखाद्यास जन्मभर पोसणें.

जन्माची आठवण राहणें—१ कधींहि विस्मृति न होण्यासारखी गोष्ट होणें; चिरस्मरणांत राहील असें होणें. २ चांगली अद्दल घडणें; पक्का अनुभव घेणें.

जन्माची गांठ—विवाहासारखा जन्मभर न तुटणारा संबंध; कायमचें नातें; न मोडणारा करार.

जन्माची जोड——१ जन्मभर पुरेल इतका साठा. २ पितापुत्र, पतिपत्नी यांसारखे जन्माचे संबंध.

जन्माची भाकरी-बेगमी—जन्मभर टिकणारें, पुरणारें पोटाचें साधन. सर्व हयातीची बेगमी; जीवितभर पुरेल अशी तजवीज.

जन्माची साट–जन्माची भाकरी; कायमची उपजीविका; आयुष्याची बेगमी.

जन्माचे कर्मीं-कर्मां; जन्मीं तें कर्मीं—जन्मांतून एकदां; सर्व हयातींत एकवेळ.

जन्माचें वाटोळें--सर्व आयुष्याचा नाश. पुन्हां आयुष्यांत सुख म्हणून नाहीं अशी स्थिति. 'तिच्या आईच्या जन्माचें वाटोळें झालेलें तिच्या दृष्टीला अहर्निश धडधडीत दिसत असतां'–जादूगार १२.

जन्माचें शल्य होऊन बसणें—चिरकाल बोंचत राहणें. 'देवी, तेंच आमच्या मनाला जन्माचें शल्य होऊन बसलें आहे!'–उग्र २.३.

जन्माचें सार्थक—जन्मांतील ध्येय, इतिकर्तव्यता वगैरे; जन्मांतील अत्यंत महत्त्वाचें कार्य.

जन्माच्या गांठी पडणें—विवाह होणें; कायमचा संबंध जुळून येणें. 'जन्माच्या गांठी पडण्याचा प्रसंग आला.'–निरभ्रचंद्र १०.

जन्मांतर आठविणें--१ पूर्व जन्मींची स्मृति होणें. २ लहानपणचे दिवस आठविणें; पूर्वीं गेलेल्या दिवसांची स्मृति होणें; दीर्घकाळामागची आठवण होणें. ३ देहभान विसरून जाणें.

जन्मांतर कथा–गोष्ट-हकीकत—मागील आयुष्यांतील प्रसंग; गत जन्मांतील प्रसंग; गतायुष्यांतील आठवणी वगैरे.

जन्मांतर काढणें--१ एखाद्या गोष्टीबद्दलचा अस्सल दस्तऐवज शोधून काढणें; फार मागील पुरावा शोधून काढणें. २ सर्व मूळ पूर्वपीठिकेचा शोध, तपास लावणें; फार मागील गोष्टीचा छडा लावणें.

जन्मांतर पाहणें–शोधणें–तपासणें—जन्मपत्रिका पाहणें; संसारांतील आयुःक्रम पाहणें; सर्व जन्मांतील घडामोडीबद्दल विचार करणें.

जन्मांतर फुटणें--नशीब फुटणें; दुर्दैव ओढविणें; मोठी आपत्ति येणें; अनर्थ गुदरणें.

जन्मांतर सांपडणें–मिळणें-हातास लागणें—एखाद्या गोष्टीबद्दलचा अस्सल दस्तऐवज सांपडणें, मिळणें, हातास लागणें; फार जुना पुरावा, जुनी पीठिका वगैरेची माहिती मिळणें.

जन्मांतरचें ज्ञान--पूर्वजन्मींचें ज्ञान; उपजतबुद्धि; सहजज्ञान; अभ्यास न करतां झालेलें ज्ञान.

जन्मांतरीं न घडणें–न होणें—कधींहि, अनेक जन्मांतहि न होणें; अशक्य; अदृष्ट.

जन्मांतरीचा वैरी–दुष्मन–दावेदार—गत जन्मांतील शत्रु; हाडवैरी; दीर्घकालीन दावेदार.

जन्मांतून जाणें—एखाद्याच्या आयुष्याचा नाश होणें; एखादा कायमचा निरुपयोगी होणें; व्यर्थ जाणें; फुकट जाणें; निष्फल होणें.

जन्मादारभ्य—जन्मल्यापासून; प्रथमपासून; आरंभापासून.

जन्मास घालणें—अस्तित्वांत आणणें; उत्पन्न करणें; जन्म देणें.

जन्मास घालणारास रडणें—जन्मदात्याच्या नांवानें खडे फोडणें; पित्यास दोष देणें; जन्म देणारास नांवें ठेवणें, शिव्याशाप देणें.

जन्मास येणें—अस्तित्वांत येणें; उत्पन्न होणें; प्रादुर्भूत होणें.

❀**जन्म आणि विवाह ह्या गोष्टी ब्रह्मदेवच ठरवितो**—मनुष्यास कोणत्या स्थितींत कोणत्या ठिकाणीं जन्म मिळावयाचा व त्याचा विवाह कोणत्या व्यक्तीशीं व्हावयाचा या गोष्टी परमेश्वराधीन असून त्याच्या सूत्राप्रमाणें त्या घडून येतात व मनुष्यास त्या बाबतींत कांहीं स्वातंत्र्य वगैरे नाहीं अशी एक समजूत आहे. –पुरुषार्थ, जून १९४०.

जन्मकाळ, मध्यान्हकाळ आणि अंतकाळ हे तीन काळ फार कठीण आहेत—प्रसूतीची वेळा, जेवण्याची वेळ व मृत्यूची वेळ, या वेळा नेहमीं कष्टदायक असतात. प्रसूतीच्या वेळीं मातेला व घरांतील सर्व मंडळीला काळजी असते, दोन प्रहरची वेळ कशी भागेल ही चिंता सर्वत्रांच्याच पाठीमागें लागलेली असते व मृत्यु तर सर्वांसच भयंकर वाटतो. –ग्रामो ३१४.

जन्मखोडीमुळें, घर झालें निराळें—एखाद्यास कधींहि न सुटणारें व्यसन अथवा वाईट खोड लागली किंवा एखादा मनुष्य कायमचा बिघडला असतां त्याला कोणी घरांत राहूं देण्यास तयार नसतो व यामुळें तो घरास कायमचा पारखा होतो.

जन्म जरा दुःखें, यांशीं होऊं नये पारखें—आपला ज्याच्याशीं जन्मानें संबंध जोडलेला आहे, जे वृद्ध झालेले आहेत व जे दुःखित आहेत त्यांचा त्याग सहसा करूं नये. मनुष्याला जन्म, वृद्धावस्था व आयुष्यांतील दुःखाचे प्रसंग हे सोसावेच लागतात, ते टाळून चालत नाहीं.

जन्म ज्याचा नीच उदरीं, त्यापासून सुखाची इच्छा धरी—जो मनुष्य नीच कुलांत उत्पन्न झालेला असतो त्यापासून कोणालाहि सुखाची किंवा चांगल्या गोष्टीची प्राप्ति होत नाहीं.—सवि ९९१.

जन्म दिला, पण कर्म नाहीं दिलें--आईबापाच्या हातीं फक्त जन्म देण्याचें असतें पण नशीब हें ज्याच्या त्याच्या

स्वाधीन असतें; तें कांहीं दुसरा कोणी बदलूं शकत नाहीं. वर पहा. 'मीं मुलाला जन्म दिला पण त्याचें कर्म माझ्यामुळें नाहीं.' (वाईट मुलाबद्दल बाप म्हणतो.)

जन्म देणें सोपें असतें, परंतु जोपासना करणें तितकें सोपें नसतें--एखाद्यास जन्म देणें ही एक वेळचीच गोष्ट आहे, म्हणून ती त्या मानानें सोपी आहे. पण पुढें मुलाचें किंवा एखाद्या संस्थेचें पालनपोषण करून त्यास योग्य कार्यक्षम करणें, दीर्घ कालची गोष्ट असून ती तितकी सुलभ नसते. त्यास दीर्घ काल परिश्रम करावे लागतात.

जन्म देवाधीन, चारित्र्य स्वाधीन--कोणत्याहि कुलांत जातींत, धर्मांत वगैरे जन्म होणें हें प्रारब्धावर अवलंबून असतें. पण मनुष्याचें शील व पराक्रम हीं त्याच्या स्वाधीन असतात. वर पहा. तु०-सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम्। दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम॥-वेणीसंहार.

जन्म क्षणभंगुर, मरण अमर--जन्म ही कांहीं काल टिकणारी गोष्ट आहे व तो काळ निश्चित नाहीं; पण मरण हें निश्चित आहे, तें कधीं टळत नाहीं. तु०-मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः।-रघु ८.८७.

जन्मा आला हेला, पाणी वाहतां (वाहतां) मेला--हेल्याकडून ज्याप्रमाणें सबंध आयुष्यांत पाणी वाहण्याखेरीज कांहीं दुसरें होत नाहीं, त्याप्रमाणें कांहीं निर्बुद्ध, हलकीं कामें करणारे लोक यांचा जन्म व्यर्थ असतो.

जन्मा उपर खालें पान, थुंकतां थुंकतां गेला प्राण-एखाद्यानें पान खाण्याची संवय नसतांना एखाद्या वेळीं कोठें पान खावें तों तोंडाला थुंकी सुटून थुंकतां थुंकतां जीव कासावीस व्हावा. त्याप्रमाणें उभ्या आयुष्यांत कधीं न केलेली गोष्ट एखाद्या वेळीं एखाद्याच्या आग्रहामुळें करावयास जावें तों तिचे दुष्परिणाम भोगतां भोगतां नाकीं नव यावे, अशी स्थिति झाली असतां ही म्हण वापरतात.

जन्माचा आरंभ, तोच मृत्यूचा प्रारंभ-जो जो प्राणि जन्मास आला त्याचा मृत्यु कधीं तरी होणार हें अगदीं निश्चित असतें. Our first breath is the begininng of death.-Scotch.-सवि २६७१.

जन्माचे अधिकारी आईबाप, कर्माचा ज्याचा तो-आईबापांच्या हातीं फक्त जन्म देण्याचें आहे, पण मनुष्याची कर्तबगारी त्याचे स्वतःवर अवलंबून आहे. जन्म दैवाधीन० पहा.

जन्मापासून मरणापर्यंत सर्व गोष्टी अनिश्चित असतात—मनुष्याचा सर्व आयुष्यक्रम हा अनिश्चित गोष्टींनीं भरलेला आहे. त्याच्या आयुष्यांतील सर्व गोष्टी त्याच्या प्राक्तनानुसार घडत असतात व त्यांवर त्याचा मुळींच ताबा नसतो अशी समजूत आहे, तीस अनुसरून ही म्हण योजतात.

जन्माला आई आणि पाजाला दाई-आई फक्त जन्म देण्याचें काम करते, पण दुग्धपानाची जबाबदारी आईवर नसून दाईवर असावयाची; म्हणजे एखाद्यानें एखाद्या कार्यास आरंभ मात्र करून द्यावयाचा पण तें पुढें चालवावयाचा भार पूर्णपणें दुसऱ्यावर टाकावयाचा; पण पुन्हां त्या कार्याच्या उत्पत्तीचें श्रेय मात्र घ्यावयाचें; अशी स्थिति असतां ही म्हण वापरतात.

जन्मीं नाहीं, तें कर्मीं पाही—जी गोष्ट कधीं ध्यानीं-मनीं नाहीं, कधीं ऐकिली पाहिली नाहीं, ती आपल्याच बाबतींत घडून आली म्हणजे वैतागानें असें म्हणण्याची वेळ येते. जें कधीं जन्मांत घडलें नाहीं तें भोगावयाचें नशिबांत येणें.-सवि ३२९९.

जन्मणें——जन्मतां मूर्ख झाला, उपाय नाहीं त्याला—जो मनुष्य जन्मजात मूर्ख असेल त्याला सुधारणें शक्य नाहीं.

जन्मतांना रडणें, वाढतां चिंता वाहणें, मरतां निराशी होणें—जन्म पावतांना रडत असणें, पुढें स्वतःची काळजी वाहांत राहाणें व शेवटीं निराश होऊन मरणें, हीं संसारांत माणसाचीं लक्षणें होत. We are born crying, live complaining and die disappointed. -सवि ३९६६.

जप——जप घेणें—निदिध्यास लागणें; पुन्हां पुन्हां आठवण करणें; उच्चारण करणें; वारंवार सांगणें; पुन्हां पुन्हां म्हणणें.

जपमाळ घेणें—जपमाळ घेऊन ज्याप्रमाणें ईश्वराचें नांव एकसारखें घेतात, त्याप्रमाणें पुन्हां पुन्हां एखाद्या गोष्टीचा उच्चार करणें, त्याचा निदिध्यास घेणें. 'आमच्याच देशांतल्या पंडितांनीं आपली कुळकथा विसरून जाऊन......आम्ही मूर्ख, आम्ही कोडगे अशी सतत हातांत जपमाळ घ्यावी, त्या बहादुरीस काय म्हणावें तें आम्हांस समजत नाहीं.'-नि.

जपणें——जपेल त्याची लक्ष्मी, खपेल त्याचें शेत-जो मनुष्य आपल्या संपत्तीची नीट काळजी घेतो, उधळून टाकीत नाहीं, त्याचीच संपत्ति टिकून राहते व जो आपल्या शेतीवर मेहनत घेतो, त्याची योग्य मशागत करतो, त्यालाच त्या शेतीपासून लाभ होतो.

जपेल त्याची संपत्ति, करील त्याची विद्या(व्युत्पत्ति), मारील त्याची तलवार आणि भजेल त्याचा ईश्वर— [व्युत्पत्ति = विद्या] जो आपल्या संपत्तीची योग्य काळजी घेतो, त्याची संपत्ति वाढीस लागते; जो काळजीपूर्वक अध्ययन करतो त्यालाच विद्येची प्राप्ति होते; ज्याच्या अंगीं धैर्य व शौर्य असेल तोच पराक्रम करूं शकतो व जो भक्ति करतो त्यालाच ईश्वराची प्राप्ति होते.

जब——जबतग जीना, तबतक सीना—जोंपर्यंत जगांत जिवंत राहावयाचें आहे, तोंपर्यंत शिवण्याचें काम केलेंच पाहिजे. आयुष्यांतील कर्में हीं मृत्यूपर्यंत सुटत नाहींत. तु०—दर्जीका बेटा, जबलग जीवे, तबलग सीवे.

जब दांत न थे तब दूध दियो, जब दांत दिये तब अन्न न दे (अब दांत दिये का अन्न न दे हैं)— (हिं.) जेव्हां दांत नव्हते तेव्हां परमेश्वरानें दूध दिलें, आतां दांत दिल्यावर अन्न देणार नाहीं, असें कसें होईल ?—शाब २.२५१.

जब बाप मरेंगें, तब बेल बटेंगे—बाप मेला म्हणजे बैलांची वांटणी करूं. बाप मेल्यावर त्याची मालमता आपल्या ताब्यांत येईल. अशा आशेनें तोंपर्यंत वाट पाहात राहाणें. To wait for a dead man's shoes.—सवि ३८२८.

जबलग सास, तबलग आस—मनुष्य जोंपर्यंत श्वासोच्छ्वास करीत आहे म्हणजे जिवंत आहे, तोंपर्यंत त्याची आशा कांहीं सुटत नाहीं. तु०—आशा अमर आहे.

जबरदस्त——जबरदस्ताचा खांद्यावर; जबरदस्तका ठेंगा शिरपर—जबरदस्ताचा बोडा खांद्यावर—अशी मूळ म्हण. जो मनुष्य दांडगा असतो तो आपल्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी करून घेतो व त्याचें सर्व चालतें, त्याला कोणी आडकाठी करीत नाहीं. तु०—धटाई खाई मिटाई.

जबरदस्ताचा सोटा, गरीबाच्या खांद्यावर—वर पहा. जो मनुष्य बलवान असतो, पराक्रमी असतो तो आपलीं कामें दुर्बलांकडून सहज करून घेतो व त्याचा उपसर्ग दुर्बलांस निमूटपणें सहन करावा लागतो.

जबान——जबान आगे खंदक नहीं—जिभेला कांहीं कोठें अडथळा नाहीं. मनुष्याचें तोंड कोणी धरूं शकत नाहीं. तु०—जिभेला हाड नसतें.

जबान तले जबान है—जिभेच्या खालीं जीभ आहे. म्हणजे दुटप्पी भाषण करून टकविणें.—सवि ३६६२.

जमदग्नि—१ एक अतिशय रागीट, तामसी वृत्तीचा ऋषि; परशुरामाचा पिता. २ शीघ्रकोपी, राग भयंकर असणारा माणूस.

जमदग्नीचा (दुसरा) अवतार—अत्यंत रागीट मनुष्य; शीघ्रकोपी. वर पहा. 'त्यांत आजोबा तर फारच कडकडीत ! जमदग्नीचाच अवतार !'—पकोघे.

जमा——जमेंत न खर्चांत—मुळींच महत्त्वाचें नाहीं असें. ज्याचा जमाखर्चहि करण्याचें कारण नाहीं असें; अगदीं क्षुल्लक; अत्यंत अल्प महत्त्वाचें.

जमाखर्च——जमाखर्च-जमाखर्चीं नसणें—जमेंत न खर्चांत पहा. महत्त्वाचें नसणें.

जमाखर्च बरोबर असणें—नफातोटा बरोबर असणें; शिल्लक बाकी पूज्य असणें; प्राप्तीएवढाच खर्च असणें.

जमाखर्चाची तोंडमिळवणी—प्राप्ति व खर्च यांची बरोबरी करणें; प्राप्तीमध्यें खर्च भागविणें.

जमाखर्चीं उगाविणें—१ जमाखर्चांत दाखल करणें; नोंद घेणें; दाखला ठेवणें. २ कोणत्याहि कामाला, नोकरीला योग्य करणें; नोंद घेण्याइतकें महत्त्व येणें; उपयोगी पडण्याइतकें तयार होणें.

❀**आजा मेला नातु झाला, जमाखर्च बरोबर**—मागें आजा पहा.

जमाखर्च स्त्रीचे हातीं, ठेवावा ही व्यासस्मृति—आयव्ययावर नेहमीं स्त्रियांची देखरेख असावी असें व्यासांचें म्हणणें आहे. स्त्रिया या सामान्यतः मितव्ययी असतात व त्यांच्या हातून सहसा उधळपट्टी होत नाहीं. याकरितां त्यांच्या हातीं हा कारभार सोंपविणें शहाणपणाचें आहे.

जमाखर्चीं न पडे ताळा, पंतीं कागद केला काळा—जमाखर्च लिहून लिहून कागद काळा केला तरी जमेचा व खर्चाचा ताळा पडेना; म्हणजे फार परिश्रम करूनहि काम पूर्ण होत नाहीं अशी स्थिति. अशा रीतीनें व्यर्थ श्रम करून कार्यसिद्धि न करणाऱ्या मनुष्याचा काय उपयोग.

जमात——जमात तो-जमातकी करामत—मूळ म्हण अजमत तेथें करामत अशी आहे. तीवरून ही चुकीनें बनली आहे. अजमत पहा. जेथें मनुष्यांची संघटना असेल तेथें तिच्या ठिकाणीं शक्ति असून ती कोणतेंहि कार्य पार पाडूं शकते. तु०—संहतिः कार्यसाधिका ।

जमाना——जमाना उलटा असणें—काळ विपरीत असणें; प्रतिकूल परिस्थिति उत्पन्न होणें; भलतीच पद्धति चालू होणें. 'उलटा जमाना आलारे ।'—अफला ६६.

जमाव——**जमाव पडणें**—धंदा, हुद्दा वगैरे कायम करून घेणें; बस्तान बसणें; कोणतीहि गोष्ट, व्यापार, धंदा वगैरे स्थिर स्वरूपास येणें; भरभराट होणें; उत्कर्षास चढणें.

जमीन——**जमीन अस्मान एक होणें**—१ सपाटून पाऊस पडणें; धुरळा, धुकें वगैरेमुळें सर्व दिशा धुंद होणें; जमीनीस आकाश येऊन मिळालें आहे असें भासणें; कांहीं दिसत नाहींसें होणें. २ (ल.) अतिशय गर्विष्ठ होणें; आकाश ठेंगणें होणें; स्वर्ग दोन बोटें उरणें; अतिशय डौल येणें; चढून जाणें; मद चढणें.

जमीन अस्मानाचें अंतर; जमीन अस्मानचा फरक—जमीन व आकाश यांत अतिशय अंतर आहे; यावरून फारच मोठें अंतर, तफावत; अतिशय विरुद्ध गोष्टी. 'वृद्ध तरुणांच्या आचाराविचारांत कालमानानें व शिक्षणभेदानें थोडाबहुत फरक होतो. पण त्यामुळें त्यांत जमीनअस्मानाचें अंतर पडतें असें नाहीं.'—आगरकर. 'देशस्थितींत जमीन-अस्मानाचा फरक आहे.'—नि ८३. 'औषध घेण्यापूर्वींच्या आणि औषध घेतल्यानंतरच्या रोग्याच्या स्थितींत तीन दिवसांत जमीनअस्मानाचं अंतर!'—एकच प्याला ४.४.

जमीन उकरणें—घोडा संकटग्रस्त किंवा भीतिग्रस्त झाला असतां, टापेनें जमीन उकरतो. तसें कांहीं न सुचून पायाच्या अंगठ्यानें भुई उकरीत उभें राहाणें. स्त्रियांचाहि कांहीं उत्तर द्यावयाचें नसल्यास, खालीं मान घालून नखांनीं पायाखालची जमीन उकरीत राहणें, हा एक चाळा आहे; मुग्धता स्वीकारणें. तु०—खालीं पाहे, पदनखदलें रेखि भूमी नतांगी।'—कवि चिमण, सखिस्मरण ३, मधुकर जाने. १९१९.

जमीन ओढणें—जमीन लागवडीस आणणें; वाहणें; जमीन शेतीस उपयोगी होण्याकरितां आंतील झुडपें, दगड वगैरे काढून साफ करणें.

जमीन धरणें—१ दुखण्यानें अंथरुणाला खिळून राहणें; हालचाल करतां येत नाहीं अशी स्थिति होणें. २ रागाला वश होणें; बेभान होणें; अत्यंत कोपिष्ट होऊन कांहीं सुचेनासें होणें.

जमीन मऊ लागली म्हणून कोपरानें खणणें—कोपर पहा. 'ते पुरुष मग नाकानें वांगीं सोलूं लागतात; जमीन मऊ लागली म्हणून कोपरानें आणि बुटांनीं खणूं लागतात!'—नर्स सुंद्राबाई ६१.

जमीन माडी ठेवणें—बागाईत पिकाकरितां जमीन राखून ठेवून एकच पीक काढणें.

जमीन वाफेला येणें—जमीन पेरण्यास योग्य अशा स्थितींत असणें; नांगरल्यानंतर पाऊस पडून गेल्यावर ऊन पडून जमीन पेरण्यास योग्य अशी मऊ व उबदार होणें; वाफसा धरणें; घातास येणें.

जमीन सोडणें—१ पीक वगैरे जमिनीच्या वर दिसूं लागणें; रोपें दिसूं लागणें. २ दुखणें, दारिद्र्य वगैरेंतून वर येणें; अंथरुणांतून उठून हिंडाफिरावयास लागणें.

जमिनीवर न मावणें—फार मोठी प्रतिष्ठा लाभणें; वाहवा होणें; स्वर्ग दोन बोटें उरणें; अतिशय मोठ्या पदवीवर चढणें. 'त्यास मराठा सरदार हें कर्म करितां तर जमिनीवर न माता! आम्ही स्वामीचे ब्राह्मण, आमची शिफारस कोण करणार?'—रा ३.१३७.

जमिनीवर पाय नसणें—१ घोडा वगैरे जनावर अतिशय चपळ असणें; जमिनीस टेकतो कीं नाहीं इतक्या जलद गतीनें पळणें. २ एखादा माणूस अतिशय गडबड्या असणें; अगदीं अस्थिर असणें; एका जागेवर मुळींच न राहणें.

जमिनीस पाठ लागणें; जमिनीवर पडणें—दुखण्यानें, किंवा अतिशय दारिद्र्यानें पीडलें जाणें; अंथरुणास खिळणें; मट्ट्यास येणें; जेरीस येणें; जिकीरीस येणें.

जमिनीस पाय लागणें—१ पुनर्जन्म होणें; भयंकर रोगांतून मुक्त होणें; जीवावरच्या दुखण्यांतून बरें होणें. २ स्थिर होणें; पुन्हां धंद्याचा जम बसणें.

जमिनीस मिळणें—सर्वस्वीं नाश होणें; जमीनदोस्त होणें; भयंकर खालावणें.

***जमीन पाहावी कसून, आणि मनुष्य पाहावें बसून**—जमीन नांगरून पाहिल्याशिवाय तिचा मगदूर कळत नाहीं; त्याप्रमाणें मनुष्याजवळ चार घटका बसून बोलणें, चालणें केल्याशिवाय त्याचा स्वभाव नीट कळत नाहीं.

जमीन बादशहाची, लेक मायबापाची—ज्याप्रमाणें सर्व जमिनीवर राजाची पूर्ण सत्ता असते, त्याप्रमाणें मुलीवर आईबापांची पूर्ण सत्ता असते. ते देतील त्या घरीं तिला निमूटपणें गेलें पाहिजे अशी आतांपर्यंत समजूत होती. आतां ती कोणी मानावयास तयार नाहीं.

जमिनींत कुजल्याशिवाय अंकुर फुटत नाहीं आणि

कष्ट करून घस सोसल्याशिवाय सुखप्राप्ति होत नाहीं —पेरल्याशिवाय पिकत नाहीं व श्रमांशिवाय कांहीं मिळत नाहीं. —पामो ५७१.

जमिनींतून पाऊस पडत नसतो—पाऊस आकाशांतून पडतो, तो जमिनींतून येईल ही अपेक्षा मूर्खपणाची आहे. त्याप्रमाणें भलत्याच गोष्टीपासून भलतीच अपेक्षा करणें हा मूर्खपणा आहे. Pigs do not fly.

जमिनीवरची आग पत्करते पण पाण्यावरची ओली आग पत्करत नाहीं—(ऐति.) मराठ्यांचे शत्रु मुसलमान हे जमिनीच्या मार्गानें आलेले होते व इंग्रज हे जलमार्गानें आलेले होते. त्यावरून नाना फडणवीस म्हणत कीं मुसलमान शत्रू पत्करतो पण इंग्रज शत्रू पत्करत नाहीं. मुसलमानांचे रीतरिवाज युद्धपद्धति त्यांस परिचित होती पण इंग्रजांची युद्धपद्धति त्यांस अगदीं नवीन होती.

जमीनदार——जमीनदारी मत—(ल.) लबाडीचें खोटें मत; आपमतलबीपणानें दिलेलें मत.

जमेदार——जमेदारकी नरमाई गरमाई उपयोगी नाहीं—मिंधेपणा असला म्हणजे बाणेदार वर्तन राहात नाहीं.—गांगा २२३.

जय——जय करणें—जिंकणें; यशस्वी होणें; यश मिळविणें; फत्ते करणें.

जयास जाणें—यत्न, उपाय, आयुष्य भरभराटीस येणें; उत्कर्ष होणें; चांगले दिवस येणें; वाढीस लागणें.

***जय कीं मृत्यु**—रणांगणामध्यें एक विजय तरी मिळवावा किंवा मरण तरी पत्करावें. पराभूत होऊन जिवंत राहणें नामर्दपणाचें आहे. तु०—हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।—गीता २.३७.

जय होणें, हें ईश्वरी देणें—कार्य करणें, त्याकरितां परिश्रम करणें हें आपल्या हातांत आहे, पण आपल्या कार्यांत यश येणें या गोष्टीस ईश्वराचें साहाय्य पाहिजे.

जयचंद——जयचंदी घोडचूक—जयचंद हा कनोजचा राजा होता. त्याचें व दिल्लीचा राजा पृथ्वीराज चव्हाण यांचें वितुष्ट आल्यावरून त्यानें महंमद घोरीस बोलावून आणून व फितुरी करून पृथ्वीराजाचा ठाणेश्वर येथें पराभव करविला पण लवकरच त्याच्यावरहि तीच पाळी येऊन त्याचें कनोजचें राज्यहि गेलें. यावरून, देशद्रोह, फितुरी यांस हा वाक्प्रचार योजतात.

जयटा——जयट्या उज्यार तेंल—(गो.) आगींत तेल ओतणें.

जयट्या घायार लिंबू पिळप—(गो.) जळणाऱ्या (आगआग होणाऱ्या) जखमेवर लिंबू पिळणें. दुःखावर डागण्या देणें.

जया——जया देव तारी । तया कोण मारी ॥—ज्यास परमेश्वर साहाय्य असतो त्याचा कोणीहि नाश करूं शकत नाहीं. तु०—देव तारी त्यास कोण मारी. अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितं । जो पहा.

जर——जर उतणें—ताप गेल्यावर, तोंडावर वगैरे पुरळ उठणें; तापामध्यें तोंड सुकून ओठावरची त्वचा सुकते ती बरी होण्यास थोडा वेळ लागतो त्यास म्हणतात. यास ताप मुतणें असेंहि म्हणतात.

वरून जर जाणें—दुखणें येणें; रोग होणें; एखादें गात्र ताप आल्यानंतर लुलें पडणें. 'तुझे हातावरून जर जावो.'

जर बांधणें—ताप जाण्यासाठीं मंतरलेला दोरा, गंडा, ताईत हातांत, मनगटांत बांधणें.

जर भरणें-होणें-१ अंगांत ताप भरणें; दुखणें येणें; रोग होणें. २ अशक्त, नालायक, अयोग्य होणें; उठवेनासें होणें.

जरो रडता टाकाक—(गो.) एखाद्यानें कसल्यातरी वस्तूसाठीं खोळंबून राहणें—तिच्यासाठीं हाय घेणें.

जर——जर कष्ट साहीं, तर सुख पाहीं—कष्ट सहन केल्याशिवाय सुख मिळत नाहीं.

जर खताचा सांठा, तर पैशाचा काय तोटा—शेतकऱ्यानें खत सांठवून योग्य वेळीं जर तें जमिनीस दिलें तर भरपूर पीक येऊन त्याला धनप्राप्ति झाल्याशिवाय राहणार नाहीं. शेतकऱ्याची सांपत्तिक स्थिति खताच्या सांठ्यावर अवलंबून असते. —ज्ञाको (ख) २५.

जर ती असती, तर घरभर पोरें होतीं—स्त्री जिवंत असेल तर मूल होण्याचा संभव. ती नाहीं मग उगाच आशा करण्यांत काय अर्थ ? जेथें मुख्य गोष्टीचा अभाव असेल तेथें ती असती तर अमुक झालें असतें व तमुक झालें असतें असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तु०—(गु.) जीवशे नर तो वसावशे घर.

जर मृग साधला, तर वान नाहीं पिकाला—मृग नक्षत्रांत जर पेरणी झाली तर भरपूर पीक येतें; ती वेळ जर चुकली तर तितकें येत नाहीं.

जर सगळे दिवस सारखे, तर मग कांहीं नाहीं

पारखें--सर्व दिवस जर सारखे असते म्हणजे मनुष्याचें जर नेहमीं चांगलें यथास्थित चालेल, तर त्याला हा जवळचा हा दूरचा असें वाटावयाचें कारण पडणार नाहीं. किंवा कांहींच कमी पडत नाहीं. पण अडचणींमुळेंच हा भेदाभेद उत्पन्न होतो.

जरी झाला सदाचारी, तरी भिक्षा न मागावी घरोघरीं—जरी आपण अगदीं प्रामाणिकपणें वागत असलों तरी आपला प्रपंच आपणच भागविला पाहिजे. केवळ प्रामाणिकपणानें आपणांस प्राप्ति होत नाहीं व लबाडी न केल्यामुळें आपलें चालत नाहीं असें म्हणून दुसऱ्यावर अवलंबून राहणें ठीक नाहीं.

जरडा——जरडा-जरंडा भरणें—ताप येणें; दुखणें येणें; रोग होणें. ' उन्हाळीं जरंडा पावसाळीं वीजा लवती।' –वसा २०.

जरदार——जरदारका सौदा है, बेजरका खुदा है—जे संपन्न असतील त्यांना वाटेल तें खरेदी करतां येतें. तरी पण गरीब मनुष्यहि कांहीं उपाशीं मरत नाहीं; त्याला ईश्वर साहाय्य करतोंच व पोटाला देतो; म्हणजे गरीबांचा पोशिंदा फक्त परमेश्वर.–सवि १४६३.

जरब——जरब खाणें—भीति वाटणें, बाळगणें; धास्ती घेणें; भय बाळगणें; धाक वाटणें; दरारा वाटणें. ' हा दांडगा कोणाची जरब खाणार नाहीं. ' ' चाबुकस्वारावांचून घोडा जरब खाणार नाहीं. '

जरब पिणें—भीति घेणें; धास्ती घेणें; भिऊन जाणें; दरारा वाटणें, बसणें.

जरीपटका--१ मराठ्यांचें निशाण. २ (ल.) मुख्य खूण; निशाणी. ' इन्स्पेक्टरसाहेबांचा जरीपटका पुढें आला आहे. स्वारी लवकरच येईल असें दिसतें. '

जरीपटका रुपया; जरीपटक्याचा रुपया—जरीपटक्याचें चिन्ह असलेला अंकुशी रुपया.

जर्ळा——जर्ळ्यानें मीशि रिगैलि—(गो.) झुरळानें (कपाटांत) आपली मिशी खुपसणें. झुरळाची मिशी एकदां एखाद्या अवघड जागीं गेली कीं मग त्याचें सगळें शरीर आंत जाण्याला अडचण पडत नाहीं असा संकेत मानलेला आहे. एकदां चंचुप्रवेश झाला कीं मग मुसलप्रवेश आपोआप होतो अशा अर्थानें म्हणतात.

जल——जलताडन—पाण्यावर काठीनें किंवा हातांनीं मारलें तरी तें दुभंगत नाहीं किंवा तेथें मारल्याचा मागमूसहि राहात नाहीं. तें पुन्हां लागलीच मिळून जातें. त्याप्रमाणें निष्फळ प्रयत्न; फुकट श्रम; बेफायदा कष्ट. ' ही बाब जलताडणासारखी व्यर्थ होती. ' –सासं २.९३.

जलबुद्‌बुद्--पाण्यावरचा बुडबुडा; अतिशय क्षणभंगुर गोष्ट. ज्याप्रमाणें पाण्यावर येणारे बुडबुडे फार थोडा वेळ टिकतात, त्याप्रमाणें क्षणिक गोष्ट; अस्थिर वस्तु. अभ्रच्छाया तृणाग्निश्च खले प्रीतिः स्थले जलम्। वेश्यासक्तिः कुमित्रं च षडेते बुद्बुदोपमाः ॥ –सुर १६०.३२४.

जलीं स्थलीं काष्ठीं पाषाणीं (असणारा)—१सर्वत्र, सर्वव्यापी (ईश्वर); स्थिरचरव्यापक. २ ज्या त्या गोष्टींत पडणारा; प्रत्येक गोष्टींत मन घालणारा. ३ जेथें तेथें भेटणारा; पिच्छा पुरवणारा; एकसारखा पाठीस लागलेला; जेथें जावें तेथें आढळणारा.

❀ **जल अग्नि उपयोगी, पण वाढवितां नाश करिती**--पाणि व अग्नि या दोन्हीहि वस्तु उपयोगी आहेत पण त्या ताब्यांत आहेत तोंपर्यंत. आटोक्याच्या बाहेर गेल्यावर पूर किंवा वणवा या दोहोंपासूनहि नाश होतो.

जल तुंबतां तडागीं फोडावा लागतो जसा पाट।--तुंबलेल्या गोष्टीला मार्ग करून द्यावा लागतो. ती फार वेळ तशी ठेवून चालत नाहीं. " ' जल० ' अथवा रेल्वेचें फाटक खुलें करून बंद पडलेली वाहातूक पुनश्च सुरू करून देणें जसें आवश्यक व युक्त, तसेंच राजकारणाचें असतें. "–के २५–७–१९४१.

जल देखी शुची उपजे, माला देखी राम। शास्त्र देखी ध्यान उपजे, नारी देखी काम॥—पाणी पाहिल्याबरोबर शौचमुखमार्जन, स्नान वगैरे शुद्धि करावी अशी इच्छा उत्पन्न होते, जपमाळ पाहिली कीं परमेश्वराचें नामस्मरण करावें असें वाटूं लागतें, शास्त्रग्रंथ पाहिल्याबरोबर ध्यानादि योगाभ्यास वगैरे करावा असें वाटूं लागतें व स्त्री पाहिल्याबरोबर मनांत काम जागृत होतो.

जलबिंदुनिपातेन क्रमशः पूर्यते घटः।—थेंबें थेंबें तळें सांचें; थोडथोडक्या गोष्टींनीं मोठीं कार्यें होतात. जलबिन्दुनिपातेन क्रमशः पूर्यते घटः। स हेतुः सर्वविद्यानां धर्मस्य च धनस्य च ॥–हितोपदेश २.

जल्म——जन्म पहा.

जल्माचें मातेरें—(बायकी) जन्माचें नुकसान; कायमची हानि; आयुष्यांत कधींहि भरून न येणारी हानि; आयु-

ध्याचा सत्यानाश. ' तुमच्यामुळें मीं माझ्या जन्माचें मातेरें करून घेतलें. ' –सु ५०.

जव——जवा आगळा—जवभर जास्त; थोडासा अधिक, ' तो कुबेर तर हा जवा आगळा कुबेर '

जंव——जंव चाले मोठा धंदा । तंव बहिण म्हणे दादा ॥–तुगा ३२५१. जोंपर्यंत काम धंदा कारभार चांगला चालत असून खाण्यास मिळतें, तोंपर्यंत आप्तजन आपल्याला मान देतात.

जंववर पाहिला नाहीं आवा, तंववर दिवा—(व.) [आवा = कुंभाराचीं मडकीं भाजावयाची भट्टी.] जोंपर्यंत प्रचंड प्रकाश पाडणारा कुंभाराचा आवा पाहिला नाहीं, तों पर्यंतच दिव्याच्या प्रकाशाची मनुष्याला मातब्बरी वाटते. प्रखर तेजस्वी किंवा अधिक बलाढ्य कोणी भेटला कीं, त्याच्या पुढें निर्बलाचें कांहीं तेज पडत नाहीं. आवा पहा.

जंववरि रे तंववरि मैत्रत्व संवाद । जंववरि अर्थेसीं संबंध पाहिला नाहीं बाप ।—अर्थ(पैसा) जोंपर्यंत मागितला नाहीं तोंपर्यंत सगळे द्यावयास तयार, परंतु एकदां का मागितला म्हणजे कोणी कोणाचें नातें लावून द्यावयास तयार नसतो.– –धनुर्धारी २८–९–४१.

जवळ——जवळ उभा करणें–(अकरणरूपी प्रयोग) आपल्या समोर येऊं देणें, राहूं देणें; सान्निध्यांत ठेवणें; संगतींत असूं देणें; संबंध ठेवणें.

जवळ करणें—१ आश्रय देणें; विश्वासांत घेणें; घरांतील माणसांत सामील करणें. ' नानांचा माणूस म्हणून आपण त्यास जवळ केलें. ' –अस्तंभा १४७. २ एखादी वस्तु निकट आणणें; स्वतः एखाद्या वस्तूजवळ जाणें. ' पाऊस आला गांव जवळ करा. '

नदी विहीर जवळ करणें—जीव देणें; नदींत, विहीरींत उडी टाकून आत्महत्या करणें; जिवाचें बरें वाईट करणें.

जवळ घेऊन—प्रेमानें; ममतेनें; प्रेमानें अंगावर वगैरे हात फिरवतात त्याप्रमाणें.

जवळ जाणें—(सं. उपगम्). १ समीप, संनिध जाणें. २ उपभोगणें; गमन करणें; संभोग करणें.

जवळ धरणें—जवळ करणें पहा. हाताशीं धरणें.

❀ जवळ असे तें कोपऱ्यांत बसे, लांबचें असे तें स्वप्नीं दिसे—जी गोष्ट किंवा व्यक्ति नेहमीं आपल्या सान्निध्यांत असते तिच्याबद्दल आपणाला कांहीं वाटत नाहीं. पण जी दूर असते तिची मात्र वरचेवर आठवण येते. तु०—अतिपरिचयादवज्ञा ।

जवळ नसून अर्थ, उगाच वाहे पुरुषार्थ—ज्याच्याजवळ कांहीं संपत्ति नाहीं त्यानें मोठी प्रौढी मारली तरी तिचा कांहीं उपयोग नाहीं. गरीबानें पोकळ बडबड करण्यांत कांहीं अर्थ नसतो.

जवळ नाहीं नाणें, आणि हवें तें करीन म्हणे—जवळ जर पैसा नसला तर आपणास पाहिजे तें करतां येत नाहीं. मग उगाच तोंडाची वाफ कशास दवडावी.

जवळचें विटवा नि दूरचें भेटवा—पाठभेद–असेल तें विटवा, नसेल तें भेटवा. नित्य परिचयांतील गोष्टीविषयीं कुतुहल वाटत नाहीं; तिची योग्यता कितीहि मोठी असली तरी सतत सान्निध्यामुळें वीट यायला लागतो. तर उलट लांब असलेल्या गोष्टीविषयीं कुतुहल असते नि ती वस्तु मिळावी, जवळ असावी अशी इच्छा होते.

जवान——जवानोको चलाचले, बुढीयाकों बीयाहकी पडे—तरुण मनुष्याच्या बाबतींत चालढकल व म्हातारीचें लग्न करण्याची घाई.–सवि ३६११.

जसा——जसातसा; जसतसा—कसाबसा; जसा येईल, होईल तसा; आपल्या मगदुराप्रमाणें; आपल्या योग्यतेप्रमाणें. 'करूं स्तव जसा तसा फळ नव्हे जना याच कां ?' –केका २८.

जसातसा; जसेंतसें करून; जसें जैसेंपरी—१ कसें तरी; कोणत्या तरी साधनांनीं. 'अबुद्ध वांकडें जैसें तैसें परी । वाचेनें तो हरि उच्चारणें ॥' २ कांहींतरी. ३ मोठ्या कष्टानें; अत्यंत श्रम करून; मोठ्या मुष्किलीनें; फार प्रयासांनीं.

जसाचे तसा—कांहीं फरक न झालेला; होता त्याच स्थितींत; पूर्वस्थितीमध्येंच.

जशास तसें–एकानें केलें त्याचप्रमाणें (दुसऱ्यानें वागणें). तु०–शठं प्रति शाठ्यम् । दुष्टेदुष्टं समाचरेत् । Tit for tat.

जशीतशी—अशी तशी; कोणीहि; वाटेल ती. 'जो द्वारकेची करि पातशाही । वरील तो काय जशातशाही ॥' –सारुह ४.३७.

❀ जसा गुरु, तसा चेला—मनुष्याची योग्यता त्यास मिळालेल्या शिक्षणावर अवलंबून असते व तें शिक्षण गुरूकडून त्यास मिळतें; त्यामुळें तो आपल्या गुरूप्रमाणेंच बनतो.

जसा चारा तशा (दुधाच्या) धारा—दुभत्या जनावराला जसें खावयास घालाल तसें तें दूध देईल.

जसा देश, तसा वेष—ज्या प्रदेशांत आपण राहात असूं त्या प्रदेशाला अनुरूप असा पोषाख आपण केला पाहिजे. म्हणजे सभोंवतालच्या परिस्थितीशीं आपण समरस होऊं. तु०—गंगा गये गंगादास, मथुरा गये मथुरादास. When you are in Rome be a Roman.

जसा बाप, तसा लेंक––बापाचे गुण मुलाच्या अंगीं आनुवंशिकपणानें येतात. त्यामुळें त्याचा स्वभाव बापाप्रमाणेंच बनतो. तु०—बाप तसा बेटा, कुंभार तसा लोटा.

जसा भाव, तसा देव—देवाची ज्याप्रमाणें भक्ति करावी त्याप्रमाणें तो फळ देतो. भावेन देवम्०।

जसा भाव, तसें फळ—वर पहा.

जसा भोग्या भेटेल तशी रात्र उजडायची–(अशिष्ट) जसा माणूस भेटेल त्याप्रमाणें वर्तन होणार. जसा स्त्रीला उपभोग घेणारा मिळेल त्याप्रमाणें तिची रात्र जावयाची.

जसा माल, तसें मोल––ज्या योग्यतेची वस्तु असेल तशी तिला किंमत येते.

जसा मालक, तसा सेवक––मालक ज्या पद्धतीनें नोकरास वागवतो त्याप्रमाणेंच नोकर त्याचें काम करतो. मालक चांगल्या स्वभावाचा असल्यास नोकरहि विश्वासू व काम मन लावून करणारा होतो, नाहींतर चुकार वागतो.

जसा राजा, तशी प्रजा—ज्याप्रमाणें राजाचें वर्तन असतें त्याप्रमाणें राज्यांत परिस्थिति उत्पन्न होते व तीस अनुसरून राज्यांतील प्रजेचें वर्तन होतें. तु०—राज्ञि धर्मिणि धर्मिष्ठा पापे पापाः समे समा: । लोकास्तमनुवर्तन्ते यथा राजा तथा प्रजाः ॥–सुर १४५. ११९.

जसा वस्ताद तसा शागीर्द–गुरु तसा चेला.–पामो १८.

जसा वारा वाजेल तसा तोल द्यावा––वारा ज्या प्रमाणांत वाहात असेल त्याप्रमाणें गलबताचें शीड वळवीत असलें म्हणजे वाऱ्याच्या जोराचा पूर्ण फायदा घेतां येतो व गलबत किंवा होडी उलटण्याची भीति नसते. तु०—वारा वाहील त्याप्रमाणें पाठ द्यावी.

जसा संत, तसा दत्त––जसें भक्ताचें देवाशीं वर्तन असेल तसेंच देवाचें त्याच्याशीं वर्तन असतें. वर पहा. जसा भाव तसा देव.

जसें आंत, तसें बाहेर––मनुष्याच्या मनांत ज्या प्रकारचे विचार चालले असतात, त्याप्रमाणें त्याच्या चेहऱ्यावर विकार दृष्टीस पडतात व त्याचें बाह्य वर्तनहि त्याप्रमाणेंच घडून येतें.

जसें आलें, तसें गेलें––ज्या मार्गानें आपण धन मिळवावें त्याच मार्गानें त्याचा व्यय होतो. कपटानें मिळविलेलें धन धार्जिणें न होतां एकाएकीं नाहींसें होतें. पण न्याय्य मार्गानें मिळविलेला पैसा लखलाभ होतो. तु०—अपापाचा माल गपापा.

जसें करावें, तसें भरावें––आपल्या कृतीप्रमाणें आपणास फळ मिळतें. 'न परापराध हा जें आपण केलें जसें तसें भरितो।'–मोआश्रम १.४८. करावें तसें भरावें, पहा. –उग्र २.६.

जसें काळचक्र फिरतें, तसें मनुष्य वागतें,—सामान्य मनुष्य हा परिस्थितीच्या पूर्णपणें अंकित असतो व जशी परिस्थिति बदलत जाईल तसा त्याच्या वर्तनांतहि फरक पडल्याशिवाय राहात नाहीं. तो कालास अनुसरून आपली वागणूक ठेवतो.

जसें जिणें, तसें मरणें––ज्या पद्धतीनें आपण आपलें आयुष्य घालविलें असेल त्याप्रमाणेंच आपणाला मरण प्राप्त होतें. ज्याचें आयुष्य नेहमीं शांतपणानें जातें, जो फारशा उलाढाली घालमेली करीत नाहीं, त्याला मृत्यूहि शांतपणेंच येतो; पण जो नेहमीं धाडसाच्या कामांत आपलें आयुष्य खर्च करतो त्याला अपघातानेंच मरण येण्याचा संभव असतो.

जसें ज्यांनीं द्यावें, तसें त्यांनीं घ्यावें––आपण जसें देतो त्याप्रमाणेंच आपणाला मिळणार, हें उघड आहे.–शाब १. ५५.

जसें झाड, तसें फळ-फूल—ज्या प्रकारचें झाड असेल त्यास अनुरूप असेंच फळ-फूल त्यास येणार, हें उघड आहे.

जसें तुमचें मरणें, तसें माझें सती जाणें—एक मनुष्य होता. तो आपल्या बायकोवर आपलें फार प्रेम आहे असें दाखवी. बायकोहि त्यावर आपलें अत्यंत प्रेम असून तो मेल्यास आपण क्षणभरहि प्राण ठेवणार नाहीं, लागलीच सती जाऊं असें त्यास सांगत असे. आपल्या पत्नीच्या प्रेमाची परीक्षा पाहावी असें एकदां त्याच्या मनांत आलें. तेव्हां एक दिवशीं तो आपल्या घरांतील अडगळीच्या व अगदीं लहान दार असलेल्या खोलींत मरणाचें सोंग घेऊन पडला. त्या खोलींतून त्यास सरळ बाहेर काढणें शक्य नव्हतें. तेव्हां त्याच्या मित्रांनीं जमून त्या खोलीची एक भिंत पाडावयाचें ठरविलें. हें ऐकून त्याच्या बायकोस भिंत पाडणें बरें न वाटून तिनें एक कोयता किंवा तलवार आणून दिली व त्या प्रेताचे तुकडे करून बाहेर काढावयास सांगितलें. जेव्हां हें त्या

नवऱ्यानें ऐकलें तेव्हां त्याच्यानें गप्प बसवलें नाहीं व तो उठून येऊन आपल्या बायकोवर खूप रागावला आणि अशीच कां तूं सती जाणार, म्हणून त्यानें तीस विचारलें. तेव्हां तिनें सांगितलें कीं, जसें तुमचें मरणें तसें माझें सती जाणें. तुम्ही जर खरोखर मेलां असतां तर मी सती गेलें असतें. याप्रमाणें जसा कारभार खोटा असेल तसा त्याचा परिणामहि खोटा असतो. तु०-गजोपि मिथ्या पलायनोपि मिथ्या ।

जसें दान, तसें पुण्य—ज्या योग्यतेचें दान द्यावें त्यामानानें पुण्याची प्राप्ति व्हावयाची.

जसें दिसावें, तसें असावें—मनुष्यानें आंत एक बाहेर एक असें दुटप्पी वर्तन ठेवूं नये. जसा बाह्यात्कारीं देखावा करावा तसेंच आपलें वर्तन ठेवावें.

जसें द्यावें, तसें घ्यावें—(अगर उलट). ज्याप्रमाणें आपण दुसऱ्यास देतों घेतों त्याप्रमाणेंच ते आपणास देतात-घेतात. जशास तसें हा न्याय.

जसें पिकेल, तसें विकेल—ज्या मानानें वस्तु उत्पन्न होते, त्यामानानेंच ती बाजारांत येते. किंवा ज्या स्वरूपांत एखादी वस्तु उत्पन्न होईल त्याच स्वरूपांत ती बाजारांत येणार, तिच्यामध्यें कांहीं कमीजास्त होणें शक्य नाहीं. या सर्व म्हणी जवळ जवळ एकाच प्रकारच्या, जशी कृति तसें फळ, या अर्थी आहेत.

जसें पेरावें, तसें उगवतें; जसें पेरावें, तसें कापावें—ज्या प्रकारची आपण कृति करावी त्या प्रकारचेंच फळ आपणांस प्राप्त होतें. जें धान्य पेरावें त्याचेंच रोप उगवेल व तेंच धान्य पुढें पिकेल. उडीद पेरून गहूं हातीं येणार नाहींत. Reap as you sow.

जसें बीज पेरावें, तसें फळ येतें—जें धान्य पेरावें तें पिकतें. जसें कर्म करावें तसें फळ मिळतें. 'पेरावें बीज जसें त्याचें प्राप्त फल तसें होतें । '—मोध्रुव.

जसे लोक, तसे गुरु—जसे भोंवतालचे लोक असतील तशाच प्रकारचे त्यांस गुरु मिळतात व त्यांच्या वागणुकीप्रमाणेंच त्यांचे गुरु वागणूक ठेवतात. गुरूप्रमाणेंच शिष्य किंवा शिष्याप्रमाणेंच गुरु; ही जोडी नेहमीं परस्परानुरूप असते.

जसें शिक्षण, तसें लक्षण—शिक्षणाप्रमाणें वागणूक बनते.

जसें सोंग, तशी संपादणी—ज्या मनुष्याचें सोंग नटानें धारण केलें असेल त्या मनुष्याप्रमाणें तो नट तात्पुरती वागणूक ठेवतो.

जसें स्वप्नसृष्टि क्षणिक, तसें भय सुख क्षणिक—ज्याप्रमाणें स्वप्नांत दिसणाऱ्या गोष्टी खऱ्या नसून त्यांचा भास मनाला क्षणमात्रच होतो व जागृतींत आल्याबरोबर त्यांचें अस्तित्व नष्ट होतें, त्याप्रमाणें सुख, भीति वगैरे भावना या मनावर तात्पुरता संस्कार करतात. त्याचें कारण नष्ट झालें म्हणजे त्या भावनाहि नाहींशा होतात. त्या कधींहि दीर्घकाल टिकत नाहींत.

जशास तसा भेटे, खोट्याचें खरें न वाटे—योग्य पारखी मनुष्य भेटला म्हणजे खोटी गोष्ट खरी म्हणून भासवतां येत नाहीं.

जशास तसा भेटे, मनींचा संशय फिटे—योग्य किंवा बरोबरीच्या, अथवा जबरदस्त मनुष्याशीं गांठ पडली म्हणजे मनांतील सर्व शंकाचें निरसन होतें. त्याच्यापुढें कोणतीहि शंका वाढण्याचें धैर्य होत नाहीं. त्याचें निमूटपणें ऐकावें लागतें.—शाब २.१८८.

जशी कामना, तशी भावना—जशी मनांत इच्छा असेल तसेंच आहे .असें वाटूं लागतें. जसा मनाचा कल असेल तसें वाटूं लागतें.

जशी काया, तशी छाया—शरीर असेल त्यामानानें त्याची सांवली पडेल. मुख्य गोष्टीप्रमाणेंच आनुषंगिक गोष्टी असतात.

जशी कुडी, तशी पुडी—शरीराच्या आकाराच्या मानानेंच आहार असतो. तु०-वपुराख्याति भोजनम् ।

जशी चाकरी, तशी भाकरी— किंवा उलट.ज्या मानानें चाकरी त्या मानानेंच वेतन किंवा जसें वेतन तशी चाकरी.

जशी चाकाची गति, तशी मनुष्याची स्थिति—ज्याप्रमाणें चाकाची गति नेहमीं वाटोळी असून खालचे आरे वर व वरचे खालीं क्रमानें होत जातात तशी मनुष्याची या जगामध्यें चांगली वाईट स्थिति क्रमाक्रमानें होत असते. या जगामध्यें नेहमीं खालींवर अशी उलाढाल चाललेली असते. तु०-नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ।

जशी जमीन असेल तसें नदीचें पात्र तयार होतें—ज्याप्रमाणें जमीन खालीं-वर, नरम-कठिण असेल त्याप्रमाणें नदी आपल्याला वाट करून घेते. तसे जगांतले व्यवहार परिस्थित्यनुरूप चालू असतात. तु०-A river makes its own bed,

जशी जशी वेळ पडे, तसतसें करणें(होणें) घडे—प्रसंग येईल त्याप्रमाणें वर्तन करावें लागतें. जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ॥

जशी जोड, तशी मोड—आद्याप्रमाणें खर्च.

जशी दक्षणा, तशी प्रदक्षिणा—जसा दाम तसें काम. तु०-पैसा दक्षणा लक्ष प्रदक्षिणा.

जशी दानत, तशी बरकत—ज्याप्रमाणें आपला व्यवहार सचोटीचा अगर लबाडीचा असेल त्याप्रमाणें आपली भरभराट अगर दुःस्थिति असेल.

जशी दिता, तशी घेता--(गो.) द्यावें तसें घ्यावें.

जशी देणावळ, तशी धुणावळ—जशी मजूरी द्यावी त्या मानानेंच काम होणार. हलकी मजूरी हलकें काम.

जशी दैवाची उजरी, तशी बुद्धि उपजे शरीरीं—ज्याप्रमाणें प्राक्तनांत भोगावयाचें असेल त्याप्रमाणें मनुष्यास वेळोवेळीं वर्तन करावयाची बुद्धि होते. दैवाच्या अनुकूलते-प्रतिकूलतेप्रमाणें चांगली वाईट बुद्धि सुचते. तु०-बुद्धिः कर्मानुसारिणी ।

जशी नदी असेल तसें नदीचें पात्र तयार होतें--जशी जमीन असेल० पहा. तु०-A river makes its own bed.

जशी नाणेवारी चालते, तशी जगीं खुशामत वाढते मनुष्याची ज्या मानानें श्रीमंती असेल, तो ज्याप्रमाणें दुसऱ्याला देत असेल, त्याप्रमाणें त्याची खुशामत करणारे लोक भेटतात.

जशी नियत, तशी बरकत--आपली बुद्धि, वागणूक जर चांगली असेल तर आपल्याला यश मिळतें, उत्कर्ष होतो. या उलट, दानत वाईट तर तसें वाईट फळ मिळतें. 'जशी नियत तशी त्यास बरकत.' –सनदापत्रें पृ. १४९. जशी दानत० पहा.

जशी प्रजा वाईट वागती, तसे कायदे निघती—ज्याप्रमाणें लोकांची वागण्याची रीत बरी वाईट असेल त्याप्रमाणें त्यांचेवर नियंत्रण ठेवण्यासाठीं बरे वाईट कायदे करावे लागतात.

जशी मैत्री वाढते, तशी दृढ होत जाते—जसजशी मैत्री जुनी होत जाते तसतशी ती दाट होते.

जशी शक्ति, तशी भक्ति—ज्यामानानें देव पराक्रमी असेल त्या मानानें त्याचे भक्त त्याच्याशीं वागतात. ज्या देवांची लोकांना अधिक भीति वाटते, त्यांना तृप्त करण्याची ते अधिक धडपड करतात व ज्यांच्यापासून त्यांना पीडा होण्याची भीति नसते त्यांस ते फारसे विचारीत नाहींत. आपण व्यवहारांत पाहातों कीं, म्हसोबा, काली, सटवाई, शीतळाई, वगैरे ज्या देवतांची लोकांना फार भीति वाटते व ज्यांपासून रोग वगैरे होतील अशी धास्ती वाटते त्यांस अडाणी लोक बकरे, कोंबडीं वगैरे वरचेवर देऊन संतुष्ट राखण्याची काळजी घेत असतात; पण इतर देवांचें त्या मानानें नामस्मरणहि करीत नाहींत.

जशी शाळा, तशी घाळा--ज्याप्रमाणें लहानपणीं मुलांस शिक्षण मिळेल अगर ज्या शिस्तींत तीं वाढतील त्याप्रमाणें त्यांस वळण लागतें.

जशी सृष्टि वाढते,तशीं मनुष्यें शहाणीं होत जातात--जगामध्यें ज्ञानांत नेहमीं भर पडत असते व त्यामुळें दिवसेंदिवस मनुष्याची ज्ञानामध्यें प्रगतीच होत चाललेली आपणांस दिसून येते.

जशी स्वप्नसृष्टि क्षणिक, तसें सुखदुःख क्षणिक—सुख दुःख हें मानून घेण्यावर आहे. त्यामुळें त्यांचा पगडा मनावर ज्याप्रमाणें स्वप्नांतील गोष्टींचा भास तात्पुरताच असतो त्याप्रमाणें तात्पुरताच राहात असतो.

जहर——**जहरी नारळ; जहरी खोबरें**—एक नारळाची जात, याचें खोबरें कडू असतें.

जहरी मोहरा; जहर मोहरा–१ एक गर्द हिरव्या रंगाचा दगड; हा सापाचें विष उतरणारा आहे अशी समजूत आहे. २ (ल.) जहाल, जलाल शिपाई वगैरे.

जहां——**जहां जाय भुका, तहां पडे सुखा**--ज्या ठिकाणीं भुकेलेला जातो त्या ठिकाणीं तहानेलाहि होऊन राहातो. भाग्यहीन मनुष्य कोठेंहि गेला तरी त्याचा भोग सुटत नाहीं. गांवांत खावयास मिळत नाहीं म्हणून दुसऱ्या मुलखांत गेला तर तेथेंहि अवर्षण पडतें. तु०-प्रायो गच्छति यत्र भाग्यरहितस्तत्रापि यान्त्यापदः ।

जहां राखे करतार, बाको बाल न बांको जाय--परमेश्वर ज्याचें रक्षण करतो त्याचा केंसहि वांकडा होत नाहीं. अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितम् ।

जहां राम, तहां अयोध्या—जेथें राम असेल तेथें अयोध्या. विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर. अयोध्येला रामामुळें महत्त्व आहे तें भूमींत नसून रामाच्या मूर्तीत आहे. तेव्हां जेथें राम असेल तेंच क्षेत्र. त्याप्रमाणें जेथें आपण तेथें आपलें बिऱ्हाड. गोगलगाईचें घर पाठीवर या अर्थी. "ह्या पुजाऱ्यास एक साल पंढ्र क्षेत्रास तर दुसरें साल जोशी मठांत नोकरी करावी लागते. मीं विचारलें, असा फिरतोस तर परिवाराचें कसें होतें ? तो म्हणाला, 'जहां राम तहां अयोध्या' "–केदार खंड यात्रा, पान ७८.

जहां सुई नही जाती, वहां मुसली चलाती है— जेथें सुई जाऊं शकत नाहीं तेथें मुसळ घालूं पाहाणें. जेथें अल्पहि कार्य होण्याचा संभव नाहीं तेथें कांहीं तरी मोठी गोष्ट घडून येईल अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे. जेथें मुंगीला रीघ नाहीं तेथें हत्ती कसा जाणार.

जहां सो, वहां सवास्सो—शंभर तेथें सवाशें; ऐशीं तेथें पंच्यायशीं, पहा.

जहांके मुरदे वहांही गाडते है--ज्या गांवचे मुद्दे त्याच गांवीं गाडले जातात. ज्या ठिकाणीं एखादी गोष्ट उत्पन्न होते त्याच ठिकाणीं तिचे परिणाम दिसून येतात किंवा तिचा शेवट होतो.

जहागीर——चार खुंट जहागीर--भिकेची झोळी. चार पहा.

जळ——जळमंडप—कळसुत्री बाहुल्यांचा खेळ. 'कीं जळमंडपियाचें नाचणें जाण । कळसूत्राधीन असे कीं । '–भवि ५७.२१३.

जळीं, स्थळीं, काष्टीं, पाषाणीं—सर्वत्र; सर्व स्थिरचर व्यापून. (असा परमेश्वर असतो). जल पहा.

***जळांत राहून कोरडें कमळ, गुरुत्यांत राहून अगदींच निर्मळ**—अजीबात संपर्क, संसर्ग लागूं न देणें. मोहाच्या ठिकाणीं असून देखील शुद्ध राहाणें.

जळांत राहून माशांशीं वैर करूं नये—पाण्यांत राहावयाचें तर मासे शत्रु करून चालणार नाहीं. ज्या ठिकाणीं आपल्याला नेहमीं राहावयाचें आहे तेथील माणसांशीं वांकडें होऊं नये. सलोख्यानेंच असणें चांगलें.

जळामध्यें मासा झोंप घेतो कैसा । जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ॥ --मनुष्य ज्या विशिष्ट परिस्थितींत असतो त्या परिस्थितींतील त्याचे अनुभव प्रत्यक्ष त्या परिस्थितींत गेल्याशिवाय यावयाचे नाहींत. पाणी पहा.

जळणें——जळत खांब खांद्यावर घेणें--(ल.) दुसऱ्याचें विनफायद्याचें काम अंगावर घेणें; विकत श्राद्ध घेणें; लष्करच्या भाकरी भाजणें; नसतें विघ्न घरांत आणणें.

जळत घर भाड्यानें घेणें--धोका प्रत्यक्ष दिसत असतांना तो पत्करणें. पुढें म्हण--जळतें घर० पहा.

जळता पाय जाळणारा—आपण नाश होत असतांहि हट्ट न सोडणारा; जाणून बुजून संकट ओढून घेणारा.

जळत्या घरा कोलु--(गो.) जळत असलेल्या घरावरील गवत (झाकार) काढणें. कांहीं तरी फायदा करून घेणें; मग तो कितीका लहान असेना. जळत्या घरचा पोळता वासा.

जळत्या घरांत वांगीं भाजून घेणें--दुसऱ्याचें एखादें मोठें नुकसान होत असलेलें धडधडीत दिसत असतांना त्यांतूनच आपला एखादा अल्पसा फायदा साधून घेणें. उदा० –दुसऱ्याच्या दाढीस आग लागली असतां विडी पेटवून घेणें.

जळत्यांत पेंढी टाकणें--आग लागली असतां ती अधिक भडकवून देणें. दोघांचा कलह लागला असतां तो अधिकच वाढेल अशी गोष्ट करणें. तु०–आगींत तेल ओतणें.

जळून भस्म होणें—पार नाहींसें होणें. 'जय डाकोरनाथ ! म्हणून घोष केला कीं सारीं ज्ञात–अज्ञात पापं जळून भस्म होतात. '–दौलत पृ. २७१.

***जळच्या उज्यारि तेल, कढच्या तेल्लारि उद्दाक**—(गो.) आगींत तेल ओतलें कीं ती अधिकच भडकते. आणि तापलेल्या तेलांत पाणी टाकलें कीं तेल फटफटतें.

जळत भाकर खावी, पळत हाटांत जावें—अतिशय जरूरीच्या वेळीं शक्य तितकी घाई करावी.

कोरड्याबरोबर ओलें जळतें--बरींच कोरडीं लाकडें जळूं लागलीं असतां त्यांत एखादें ओलें लांकूड असलें तरी तें जळतें. अपराधी मनुष्याबरोबर केव्हां केव्हां निरपराधी मनुष्यासहि शासन होतें.

जळतें घर भाड्यानें कोण घेतो--खालीं पहा.

जळतें घर भाड्यानें व जुने जोंधळे काढ्यानें (घेऊं नयेत)--प्रत्यक्ष आग लागलेलें घर भाड्यानें घेण्यांत काय फायदा ? तसेंच वाढीदिढीच्या बोलीनें जोंधळे घ्यावयाचे, ते पेरावयासाठीं घ्यावयाचें असतात. तर ते जुनें घेऊन काय उपयोग ? ते रुजणार नाहींत. याकरितां नवे घेतले पाहिजेत. वरच्या सारख्या नुकसानीच्या, निरुपयोगी गोष्टी पत्करणें हा मूर्खपणा आहे.

जळते घराचा पोळता वांसा; जळत्या घराचा पळता वांसा; जळतें घर, पळता वांसा--जळत असलेल्या घराचा अर्धवट जळलेला एक वासा जरी मिळाला तरी तेवढाच फायदा ! जेवढा मिळेल तेवढा फायदा. तु०–चोराच्या हातची लंगोटी.–गांगा २९३.

जळते घराची वांसोटी, चोराजवळची लंगोटी जळत्या घराचा वांसा, नादाराचा एक पैसा--जेथें सर्वच जावयाचें तेथें अल्पहि जें मिळेल तें पत्करावें.

जळला तुझा अडका, माझा मूलच लाडका--अडका पहा.

जळेल तसें तपेल--(व.) होईल तें होईल, त्याची फिकीर करणें कांहीं उपयोगी नाहीं.

जळलें तें कश्मल, उरलें तें कांचन—जें नष्ट झालें तें वाईटच होतें व जें उरलें तेवढाच भाग चांगला, अशी समजूत करून घेणें. "कवित्वाला संतपणाची जोड मिळाल्यामुळें त्यांच्या दुःखांना दैविक चमत्काराचें स्वरूप येऊन, तो एक कौतुकाचाच विषय होऊन बसला. चरित्रकारांनीं, 'जळलें तें कश्मल आणि उरलें तें कांचन' अशी त्यांच्या दुर्दैवाची उपपत्ति लाविली."–माडखोलकर, 'माझे आवडते लेखक' पान १५७. तु०--वाहिली ती गंगा, राहिलें तें तीर्थ.

जळै रे कोंब्या जळैता, गुवांत तकली लोळैता--(गो.) विनाकारण स्वतःला त्रास करून घेऊन घाणींत डोकें खुपसणें.

जळीत——जळीत जाणें--अन्यायानें त्रास देणें.

जळीपळी——जळीपळींचीं भांडणें--घरास आग लावणें, बायको वगैरे पळवून नेणें, अशा सारखीं भांडणें. –गांगा. ३३.

जळू——जळूसारखी चिकट—जळू एकदां चिकटून बसली म्हणजे रक्त पिऊन तृप्त झाल्याशिवाय अंग सोडीत नाहीं. तीप्रमाणें फार लोचट, चिकट.

जाऊ——जाऊ भाऊ नसणें—धाक दाखविणारा, ताब्यांत ठेवणारा नसणें; कोणी मोठा मनुष्य शिस्त लावणारा नसणें; वडीलधारीं माणसें नसणें.

❀जाउबाई ! जाऊबाई ! मला मूळ आलें, जा पूस नणंदेला—धाकट्या जावेला माहेरून बोलावणें आलें हें वडील जावेला खपत नाहीं; तेव्हां ती नणंदेकडे परवानगी मागण्यास सांगते. तेथें तर मिळणें कठीण. यावरून आपल्याला अप्रिय अशी गोष्ट करावयाची असली म्हणजे ती दुसऱ्यावर ढकलावयाची.

जावा जावा, उभा दावा--जावांचें कधीं एकमेकांशीं पटत नाहीं. दावा पहा.

जावा तेथें दावा, सवती तेथें हेवा--दोन जावा एकत्र आल्या कीं तेथें भांडण होतें व सवती परस्परांचा फार मत्सर करतात.

जागणें——जागती ज्योत—कांहीं देवस्थानांतून देवतेच्या अंगांतून ज्योत बाहेर पडते व अशा रीतीनें आपण जागृत आहों असें देवता दाखविते, असें भक्तांकडून मानण्यांत येत असते. कडक, जागृत देवता. सामर्थ्ययुक्त, तात्काल फल देणारी जागृत देवता, औषध, मंत्र इ. 'जागती ज्योती काढिली हनुमान रूपें।'—सप्र ३. ४२.

जागती झोंप-निद्रा—१ सावध झोंप; जरा कोठें आवाज वगैरे झाला असतां उघडणारी झोंप; मनांत कांहीं तरी अंदेशा असल्यामुळें अधवट जागृत अवस्थेत बिछान्यावर पडणें. २ डुलकी; पेंगण्याची स्थिति; कांहीं काम करीत असतां, किंवा कोणाची वाट पाहात असतां मध्येंच घेतलेला झोंपेचा चुटका.

जागती भाषा—चालू, जिवंत भाषा; जी भाषा लोकव्यवहारांत आहे अशी भाषा; समाजांत रूढ असलेली भाषा. याचे उलट प्रत्यक्ष व्यवहारांत नसलेली, केवळ ग्रंथांतरीं आढळणारी भाषा. हीस मृतभाषा म्हणतात. उदाहरणार्थ, ग्रीक, हाजिसी, असुरी भाषा.

❀ सारी रात्र जागली आणि शेंगावांगीं रांधलीं--पुष्कळ वेळ घालवून व श्रम करून फार थोडें काम करणें; किरकोळ गोष्टी करण्यामध्यें वेळेचा अपव्यय करणें; व्यर्थ श्रम करणें.

जागल्लेगेर चेडूं आनि निदल्लेगेर चेडो !—(गो.) जी जागृत राहिली तिला मुलगी झाली आणि जी निष्काळजीपणानें झोंपली तिला मुलगा झाला. कांहीं कांहीं वेळां आपला सावधपणा फोल ठरतो.ज्याच्या दैवांत आहे त्यालाच मिळतें, मग तो प्रयत्न करो अथवा न करो.

जागि आशिलो मेळ्ैत गेलो, निदल्लो निदवनु गेलो—(गो.) जो जागृत होता तो मिळवीत गेला आणि जो झोंपला होता तो त्या स्थितींतच राहिला. पुढें पहा.

जागेगा सो पायेगा, सोयेगा सो खोयेगा; जागे सो पावे, सोयेसो गमावे—(हिं.) जो जागृत राहतो त्याचा लाभ होतो, जो निजतो त्याचें नुकसान होतें. याकरितां आपल्या स्वहितास आपण नेहमीं जागृत असावें. आपल्या हितावर नेहमीं लक्ष्य देऊन वागावें. नाहींतर आलेली संधि गमावते.

जागे सो गाजे, सोवे सो रोवे—सावध तो पार पडे, आळस धरे तो रडे--सवि ३९५४.

जागेल त्याची पाडी, निजेल त्याचा टोणगा; जागेल त्याची वांठ आणि निजेल त्याचा टोणगा—जो आपल्या फायद्याला जाग्रत राहातो त्याला लाभ होतो. जो निजतो त्याचा तोटा होतो. म्हैस विण्यास बराच वेळ लागतो व तितका वेळ रात्रीसुद्धां जागत बसावें लागतें. त्या प्रमाणें दोन भावांपैकीं एक कामसू व एक आळशी असला तर जो जागा राहातो तो रेडी झाल्यास ती आपल्यास घेतो व रेडा झाल्यास दुसऱ्या श्रम न करणाऱ्या भावास देतो किंवा आपल्या म्हशीस झालेला रेडा त्याच्या म्हशीस झाला असें सांगून त्याच्या म्हैशीस झालेली रेडी आपल्या म्हैशी-खालीं आणून ठेवतो; याप्रमाणें जो आपल्या स्वहितास जागत नाहीं त्याचा तोटा होतो.

जाग्याला खूण, सासऱ्याला सून—जो मनुष्य जागा असेल त्याला खूण केली तर लक्ष्यांत येईल, निजलेल्याच्या लक्ष्यांत येणार नाहीं. त्याचप्रमाणें सासरा सुनेबद्दल फार जागरूक असता तिची हालचाल त्याच्या लगेच लक्ष्यांत येते.

जागर——जागर घालणें—(माण.) खंडोबाप्रीत्यर्थ वाघ्या मुरळ्या आणून त्यांची पूजा करून त्यांना जेवाव-यास घालून नाचविणें; नवसाप्रीत्यर्थ वाघे मुरळ्या यांच्या-कडून खंडोबाचा रात्रभर गोंधळ घालणें.

जागा——दोन जागा करणें-होणें—१ वांटप करणें; दोन भाग करणें, होणें; विभागणें; वेगळे करणें. २ पृथक् करणें; अलग करणें; विलग करणें.

जागा घेणें—रिकामी जागा स्वीकारणें; रिकामें असलेलें स्थान व्यापणें; एक वस्तू एका ठिकाणाहून गेली असतां तिच्याबद्दल दुसरी येणें; एका व्यक्तीबद्दल किंवा वस्तूबद्दल दुसरी आणून ठेवणें.

जागा भरणें—नेमणूक करणें; रिकाम्या असलेल्या जागीं नवीन मनुष्य नेमणें.

जागॉ पळोन हागूंक आनि मनीस पळौन मागूंक—(गो.) योग्य जागा पाहून वहिर्विधीला बसावें आणि माणसाची दानशक्ति पाहून त्याच्याकडे मागावें.

जांगील——जांगील मामाची टोपी—घटोत्कचाच्या मामाचें नांव जांगिल मामा असें होतें. घटोत्कच व त्याचा मामा हे फार मायावी राक्षस असत. ते वाटेल ते चमत्कार करीत असत; तेव्हां अशा जांगील मामाची टोपी डोक्या-वर चढवली म्हणजे मनुष्य अदृश्य होत असे व अशा स्थितींत गुप्तपणें त्यास वाटेल तेथें प्रवेश करतां येत असे किंवा वाटेल ती गोष्ट करतां येत असे. यावरून हवें तें करा-वयास मोकळीक; वाटेल ती गोष्ट घडवून आणण्याचें सामर्थ्य.

जांग-घ——जांग दाकवनु फालें करचें; जंगो दकोवनु फल्ले करप—(गो.) एक गृहस्थ एका रात्रीं वेश्येच्या घरीं गेले. ती मोठी वस्ताद होती. तिनें फक्त आपल्या मांड्या उघड्या करून त्याला दाखवल्या आणि तेवढ्यावरच झुलवीत झुलवीत सकाळ होईपर्यंत वेळ काढला. त्यामुळें त्या बिचाऱ्याच्या सगळ्या इच्छा अपुऱ्या राहून निराश मनानें तिच्या घरांतून बाहेर पडावें लागलें. थोडेसें आमिष दाखवून एखाद्याला बराच काळ झुलवीत ठेवावयाचें आणि अखेर निराश करावयाचें, अशा प्रसंगीं ही म्हण वापरतात.

जांगेरस लंवथड मोटें—(गो.) मांडीपेक्षां शीर मोठी. तु०—नाकापेक्षां मोतीं जड.

जांघाडीं दुःख, जांवई वैद्य—अडचणीच्या जागीं दुखणें व जावई वैद्य पहा.

जाडें——जाडें-जाडी प्रकरण—मोठा वजनदार, विद्वान् किंवा धनाढ्य माणूस; बडें धेंड. 'वरील दोघांहूनहि जाडी प्रकरण जे वरील महाविख्यात स्वामी त्यांच्याविषयीं कांहीं लिहून हा भाग आटपतों.'—नि ३३९.

जाण——म्हैस जाण असणें—जसजसें खाणें घालावें तसतसें कासेस अधिक दूध येत असणें; कांहीं म्हशी कितीहि खाणें घातलें तरी शरीरानें माजतात पण दूध अधिक वाढ-वीत नाहींत. उलट कांहीं म्हशी जसें खाणें घालावें तसें दूध वाढवितात. अशा प्रकारांपैकीं दुसऱ्या प्रकाराच्या म्हशीस म्हणतात.

जाणणें——जाणत जाणत—जाणून बुजून; बुद्ध्या समजून उमजून; नीट ठाऊक असतांना; पक्कें माहीत असतांना.

जाणती होणें—वयांत येणें; ऋतुमती होणें; तारुण्यांत येणें; बाईपणांत येणें; न्हातीधुती होणें.

जाणून बुजून आडांत उडी टाकणें—आपण होऊन, उघड्या डोळ्यांनीं आपणावर संकट ओढवून घेणें.

न जाणो—कोणास माहीत? कोण जाणे? कदाचित् असें असेल किंवा नसेलहि; तें नक्की कोण सांगूं शकणार, आपणास निश्चित माहीत नाहीं. कोणत्याहि गोष्टीची निश्चित माहिती नसतां केवळ तर्कानें विशिष्ट स्थिति असेल असा संभव दाखविणें. त्याप्रमाणें प्रत्यक्ष असेल किंवा नसेल याबद्दल खात्री देतां येत नाहीं अशा वेळीं वापरतात.

जाणोपरी—सज्ञानावस्थेपासून, कळावयास लागल्या-

पासून; माहीत असल्यापासून; ज्ञान येण्याच्या काळापासून. ‘माझ्या जाणोपरी त्याच्या घरीं लक्ष्मी पाणी भरीत होती.’

❀ **जाणणें नीतीचें, करणें सत्याचें**—योग्यायोग्य गोष्ट कोणती तें माहीत असावयास पाहिजे व जें सत्य असेल तें आचरणांत आणलें पाहिजे.

जाणतें लेकरूं । माता लागे दूरी धरूं ॥—मूल जों पूर्णपणें अज्ञान आहे तों आई मुलाची पूर्णपणें काळजी घेते; पण समज आलेल्या मुलास आई दूर करूं लागते; कारण त्या मुलाला तितकी तिची जरूर नसते, उलट अजाणत्या मुलाकडे तिला अधिक लक्ष्य द्यावयाचें असतें.—जोग-तुगा १७०५.

जाणतो तें सांगतो, त्याबरोबर खोटेंहि बकतो—एखादा मनुष्य त्याला जेवढें माहित असेल तेवढें सांगून त्याबरोबर थोडें फार तिखटमीठ लावण्यासाठीं कांहीं माहीत नसलेल्या गोष्टीहि दडपून देतो, अशाबद्दल म्हणतात.

जाणत्यांक गोयें, नेणत्यांक पोयें—(गो.) ज्ञानी माणसाला एखादें कोडें सहज उलगडतें आणि अज्ञानी माणूस त्यांत गुरफटतो.

जाणून अपराध करतो, त्याचा नाश रोकडा होतो—जो कळून सवरून चूक करतो त्याचा नाश निश्चयेंकरून होतो; समजून उमजून गुन्हा करणारास अवश्य शिक्षा होते किंवा अद्दल घडते.

जाणून अपराध करी, त्यास क्षमा न करी—जो मनुष्य जाणून बुजून, बुद्ध्या अपराध करतो त्याला कधींहि क्षमा करूं नये. अज्ञानानें केल्यास एक वेळ कींव, क्षमा केली तरी चालेल, पण समजून उमजून गुन्हा करणारास शिक्षा झालीच पाहिजे.

जाणे कैसें कूळ, तोच जाणा शाहणा मूल—ज्याला कुल-कुटुंबाची रीत कळते तोच शहाणा म्हणावा.

जाणें——जाजा, येये—निरर्थक हेलपाटे; येरझारा; व्यर्थ खेपा.

जा बाई मेलं !—(बायकी) अनिच्छा, नावड, प्रतिकार दाखविणारा वाक्प्रचार. इश्श ! ‘जा बाई मेलं ! कांहींच्या बाहीच साळू अक्का बोलते.’—मोरप्र १३.

❀ **जाईल तेथें हत्ती जाईल, नाहीं तर मुंगीला रिघाव मिळणार नाहीं; जाईल तेथें हत्ती, नाहीं तेथें मुंगी सुद्धां जाणार नाहीं**—कांहीं बाबतींत अतिशय खर्चिक, उदार तर कांहीं बाबतींत फार हिशेबी, चिक्कू असणें; समतोलपणाचा अभाव; तारतम्याचा अभाव. एखादा मनुष्य मोठमोठ्या गोष्टींत फारशी चौकशी न करतां बारीकसारीक गोष्टींत विशेष बारकाईनें लक्ष्य घालीत असला म्हणजे म्हणतात.

जाईल तेथें हत्ती, नाहीं तेथें सुई अडती; जाईल तेथें हत्ती, नाहीं तेथें माती—वरील प्रमाणेंच. Penny wise pound foolish.

जाईल बुधीं, तो येईल कधीं; जाशील बुधीं येशील कधीं ?—बुधवार हा प्रवास करण्यास निघण्यास अशुभ दिवस मानतात. जो बुधवारीं प्रवासास निघतो तो केव्हां परत येईल याचा नेम नसतो. विशेषतः गुजराथेमध्यें बुधवारीं बहुधा प्रवासास निघत नाहींत. माहेरवासिणींना माहेराहून बुधवारीं धाडीत नाहींत; वरील म्हणीचा त्यावेळीं दाखला देतात.

जाणाऱ्याचें जातें आणि कोठाऱ्याचें पोट दुखतें; जाणाऱ्याचें जाते, शेजाऱ्याचें पोट कां दुखतें ?—खर्चणाराचें खरचतें० पहा.

जाते घडी ही आपुली साधा, करा काय तें आतां करा—आपणास जें कांहीं करावयाचें असेल तें ताबडतोब करावें, तरच त्याचा उपयोग होतो वेळेवर केलेली गोष्ट हितावह असते. एकदां वेळ गेली म्हणजे कितीहि केलें तरी कांहीं उपयोग होत नाहीं.—मन्वंतर, सप्टेंबर १९४०.

जात्याची बोळाऊ आणि येत्याची पाठराखी—जाणाऱ्या मनुष्याला सन्मानानें पोंचवावयास जाणारी व येणाऱ्या मनुष्याबरोबर पाठराखणीप्रमाणें येणारी. म्हणजे सर्वांच मित्र; सर्वांच्या ओळखीची, तोंडपुजेपणा करणारी व विशेष लागट स्त्री. कांहीं निष्ठा, ध्येय इ. नसणारी व्यक्ति.

जाय रे घोड्या, खायरे हरळी—कांहीं जबाबदारी न पत्करतां परस्पर व्हावें अशी इच्छा करावयाची. “ संमेलनांत पास झालेल्या ठरावांचें स्थूल स्वरूप ‘ जायरे घोड्या खायरे हरळी, ’ अशा चालीचें झालें. अरे पण भल्या गृहस्थांनों, घोड्यानें जायचें कोठें व कसें, व हरळी तरी कशी खावयाची, इकडे एकाचें सुद्धां लक्ष्य नाहीं ना. ” —संजीवनी मासिक, आकाशवाणी, जानेवारी १९३५.

जायची आडवी रात, उद्याची कोणीं करावी बात—मध्यें सबंध रात्र जावयाची असतां उद्यां काय होईल त्याबद्दल नक्की कोणास सांगतां येणार आहे. तेव्हां कशाला पुढची काळजी ! केव्हां काय होईल त्याचा नेम नाहीं; भविष्यकाळ हा अज्ञात आहे. तु०—‘ आतां कशाला उद्याची बात ! ’—माणूस (सिनेमा).

येवा व्हावा, जावा न व्हावा; येवा बरा, जावा बाईट—आपल्या घरीं माणसें येत असावीं पण जात नसावीं. कारण नवीन मनुष्य आलें असतां आनंद होतो पण तें जाऊं लागलें असतां दुःख होतें.

जावें तेथें डोक्यावर दिवस—कोठेंहि गेलें तरी अडचणीची स्थिति.

जावें त्याच्या वंशा, तेव्हां कळे ।—प्रत्येक मनुष्याचें सुखदुःख त्याच्या स्थितीच्या अनुभवाशिवाय कळत नाहीं. 'पाण्यामध्यें मासा झोप घेतो कैसा । जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ॥'–तुकाराम.

जावें रगीनें, कीं जावें वगीनें—कोणाकडेहि आपणांस काम करून घेण्यास जावयाचें असेल तर आपल्या हातीं कांहीं अधिकार असला तर जावें किंवा आपला एखाद्यामार्फत वशीला असला तर जावें. नाहीं तर इतर प्रसंगीं जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. उलट अपमान होण्याची भीति असते.

जात——जीतीनिशीं जाया होणें—स्वतः जखमीं होणें; स्वतः पुढें होऊन अंगावर आपत्ति ओढवून घेणें. 'जातीनिशीं जायां होऊं नये, सरदारीनें काम करावें.'–रा १.२४९.

जातीनें हिंमत धरणें—स्वतः नेट धरणें; स्वतः कसोशीनें प्रयत्न करणें. 'जातीनें हिंमत धरून करावेंच करावें.'–पया.

आपले जातीवर करणें—१ स्वतःच्याच अकलेनें, शक्तीनें वगैरे करणें; कोणाचीहि मदत न घेतां एकट्यानें करणें; आपण पुढें होऊन समक्ष करणें.

जात-ति——जातीचें लेंकरूं—(ल.) लबाड मनुष्य; लुच्चा माणूस.

जातीवर जाणें-येणें—आपल्या जातीच्या, कुलाच्या मूळस्वभावाप्रमाणें कोणतीहि कृति करणें; आपल्या अंगच्या स्वाभाविक गुणांप्रमाणें वर्तन करणें; स्वतःची जन्मजात वृत्ति प्रकट करणें; आपला मूळस्वभाव प्रकट करणें.

जातीस-गोतास खराब करणें—स्वजनांशीं द्रोह करून त्यांचा परकीयांच्या साहाय्यानें नाश करणें; स्वजनांशीं विद्रोह करणें; आप्तांवर संकट आणणें. 'परकीयांस मिळून स्वजनांचा नाश इच्छावा, जातीस गोत्रास खराब करावें हें योग्य नाहीं. कुळास कलंक लागतो.'–जोध.राज ३०.

जातीस जात मिळणें—एका जातीचीं माणसें जातीच्या आपुलकीमुळें एकमेकांच्या फायद्यासाठीं उद्युक्त होणें. 'जातीस जात प्रमाण पडते.'–रा१२.६५. Blood is thicker than water.

* **जात कळते, पण मत कळत नाहीं**—मनुष्याची जात त्याच्या रंगरूपावरून, पेहरावावरून इतर बाह्य गोष्टींवरून ओळखतां येणें शक्य आहे, पण त्याच्या मनांत काय आहे तें कळणें कठीण असतें.

जात कैकाड्याची, मिजास पादशहाची—वागणूक, राहाणें अगदीं भिकार पण ऐट मात्र मोठी; स्वतः दरिद्री असून मोठा बडेजाव माजविणें.

जात खुदाकी बेअयब है–(हिं.) परमेश्वर निर्दोष असतो.

जात तशी बात, पैसा तसा हाट—मनुष्य आपल्या जातीचे जे संस्कार त्याच्या मनावर झालेले असतात त्याप्रमाणें भाषण करतो व ज्या मानानें आपणाजवळ पैसा असेल, त्या मानानें तो व्यापार उदीम किंवा क्रयविक्रय करूं शकतो.

जात बाटली म्हणून रीत बाटली नाहीं; जात बाटली परंतु हात बाटला नाहीं—मनुष्याच्या हातून एखादी गोष्ट अनिष्ट घडली म्हणून कांहीं तो सर्वथा त्याज्य होत नाहीं. याच्या उलट 'रीत बाटली म्हणून जात थोडीच बाटली.' एखाद्यानें रीत सोडली म्हणून त्याची जात थोडीच जाते, या अर्थी.

जात वंजाऱ्याची बरी, कधीं चोरी न करी–वंजारी जातीचा मनुष्य कांहीं झालें तरी कधीं चोरी करीत नाहीं.

जाती कोंकोणो, कर्म नस्राणी—(गो.) जात कोंकणी व कर्म खिस्त्याप्रमाणें. (गोव्यांत हिंदुलोक खिस्त्यांना कमी लेखतात).

जाती तशि पिती, खाण तशि माती—(गो.) जातीप्रमाणें जन्म आणि खाणीप्रमाणें माती. पुढें पहा.

जाती तशी पुती; जाती तशी पुती, खाण तशी माती; जाती तशी पुती, आत्ती तशी भाची—मनुष्य ज्या जातींत जन्मतो त्या जातीचे गुणदोष त्याच्या अंगीं येतात. ज्याप्रमाणें एका खाणींतील मातींत एकच गुणधर्म वास करतात, किंवा एका कुळींत जन्मलेल्या स्त्रियांचा स्वभाव एकसारखाच असतो त्याप्रमाणें प्रत्येक जातीचे विशिष्ट गुणदोष त्या जातींतील प्रत्येक व्यक्तींत वास करतात. "त्यावेळीं जे दोष त्या योजनेंत हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राजकीय पक्षांकडून दाखविले गेले ते 'जाति तशी पुती' अथवा 'माती तशी चूल' या न्यायानें आतां व्यवहारांत आलेल्या योजनेंतहि आहेत."–के २५-७-१९४१.

जातीची खावी लात, परजातीचा नको भात--आपल्या जातींत राहून आपला अपमान झाला तरी पतकरला पण आपली जात सोडून परजातींत गेल्यानें पोटभर खावयास मिळालें अगर मानसन्मान मिळाला तरी त्याचा स्वीकार करणें चांगलें नव्हे. तु०-स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।

जातीची शिंदळ तिला कुंटण कशाला—जी स्त्री स्वभावतःच व्यभिचारी असेल तिचें मन वळविण्यास आणखी कुंटिणीची जरूर लागत नाहीं. अनीतीच्या मार्गानें जाण्याचा स्वभाव असलेल्यास बाह्य निमित्तकारण लागत नाहीं. कुंटण पहा. पुढें पहा.

जातीची शिंदळी। तिला कोण कैसा वळी ॥—१ जी स्वभावानेंच व्यभिचारी आहे तिला ताळ्यावर कोण आणणार? स्वभावजात दुर्गुण टाकून देणें कठिण असतें. २ जी स्वभावतःच छिनाल तिची मनधरणी करण्याचें कारण नाहीं. –तुगा २९६५.

जाती जातीचें भांडण, रक्ताचा पूर—दोन जातींच्या लोकांचें भांडण सुरू झाल्यास रक्तपात झाल्याशिवाय राहात नाहीं.

तुका म्हणें एथें पाहिजे जातीचे। येरा गबाळाचें काम नाहीं ॥ –तुगा३५८७. ज्या मनुष्याच्या अंगांत कांहीं कर्तृत्व आहे, ज्यास त्या गोष्टीचा अभ्यास आहे त्याच्याच हातून कांहीं कार्य होतें, दुसरा तिसरा कोणी करूं लागल्यास साधत नाहीं व त्याचें हंसें होतें. तु०–जेनुं काम तेनुं थाय, बिजा करेसो गोता खाय.

जाती जातीच्या कलागती, रात्रंदिनीं आड येती—जातींच्या परस्परांतील कलहामुळें नेहमीं कटकटी होतात.

जातीनें हलके असती, ते हिमायत मोठी दाखविती—जे नीच जातीचे लोक असतात ते फार जोरावारी करतात. नीच प्रकृतीचे लोक उद्धट असतात; हलकट लोकच फार मगरूरी करतात. Little dogs have long tails.-Scotch.–सवि २२०२.

जातीमाजीं विद्वज्जन, जात भूषणाप्रमाण--एखाद्या जातीमध्यें जे विद्वान लोक असतात ते त्या जातीच्या अलंकाराप्रमाणें भूषणास्पद असतात.

जातीला जात ओढते—प्रत्येक जातींतील जे गृहस्थ असतात त्यांची परस्परांबद्दल सहानुभूति असते; एका जातीच्या लोकांचें मेतकूट ताबडतोब जमतें; एका जातीच्या लोकांचा मिलाफ लवकर होतो.

जातीला जात मारी, जातीला जात तारी--प्रत्येक जातींतील व्यक्तीवरच त्या जातीचें हित अनहित अवलंबून असतें व त्या जातींतील लोकच त्या जातीला पुढें आणूं शकतात किंवा तिला निकृष्ट दशेस नेऊं शकतात.

जातीस जात ओळखती, तसें चोरास चोर जाणती--ज्याप्रमाणें एखाद्या जातींतील व्यक्तीस आपल्या जातीचें स्वभाव व विशेष गुणधर्म ठाऊक असतात त्याप्रमाणें चोरास चोर लोकांचा स्वभाव व गुणदोष, त्यांच्या खुब्या, युक्त्या वगैरे ठाऊक असतात.

जातीसाठीं खाती माती—पुढें पहा. 'तुका म्हणे अस्सल जाती। जातीसाठीं खाती माती ॥'–तुगा २९६५.

जातीसाठीं-करितां खावी माती; जातीसाठीं माती खावी, जात कधीं न सोडावी--मनुष्यानें कांहीं झालें तरी आपल्या जातीशीं फटकून वागूं नये. जातीमध्यें राहण्यापासून जरी केव्हां केव्हां त्रास झाला तरी तो सोसावा पण जातीच्या विरुद्ध जाऊन जातीवेगळें राहूं नये. कारण वेळप्रसंगीं आपल्या जातीचेच लोक आपल्या उपयोगी पडतात. 'तुका म्हणे जाती। जातीसाठीं खावी माती॥'–तुगा४१९९.

जातिविति——**जातिवितेची दुक जातिविती जाणा**--(गो.) प्रसूतीच्या वेळच्या कळा जिला मूल आहे तिलाच कळायच्या. तु०–न हि वंध्या बिजानाति गुर्वीं प्रसववेदनाम्।

जातीण——**जातीण करणें**--(ठाणें) भात जातीणीवर भरडणें.

जातें——**जातें ओढणें**—जातें फिरविणें; दळणें; जात्यांत घालून दाणे भरडणें, पीठ करणें.

❀ **जातें झाडतें, तुम्हां वाढतें**--एका स्त्रीच्या पतीनें आपणास जेवावयास वाढावयास सांगितलें असतां, ती स्त्री वरील प्रकारचें उत्तर देते. या स्त्रीस अशी संवय होती कीं, पतीनें कोणतेंहि काम करावयास सांगितलें तर प्रथम आपल्या कामाची कांहीं तरी सबब सांगावयाची, कधींहि तें ताबडतोब करावयाचें नाहीं. ही गोष्ट तिच्या वरील उत्तरानें दर्शित होते. संथपणाची, दिरंगाईची खोड.

जातें फुटलें आणि नातें तुटलें—ज्याप्रमाणें जात्याची एक तळी फुटली असतां तिचा दुसऱ्या तळीशीं असलेला संबंध सुटतो, त्याप्रमाणें एका पक्षानें संबंध तोडून टाकला असतां नात्याचा संबंध राहात नाहीं.

जात्याची पुडी एकास तशीच दुसऱ्यास दिसे--

एकाला ज्याप्रमाणें एखादी गोष्ट दिसते त्याप्रमाणेंच ती दुसऱ्यालाहि दिसत असते. –सवि १७१५.

जात्यांतली चुरी, मोलकरीण नेते घरीं––जात्यामध्यें दळण दळलें असतां थोडा फार घास चुऱ्याच्या स्वरूपांत जात्यांत राहतो; तो घरीं नेण्याची संवय एका मोलकरणीस होती. पण अशा रीतीनें चुरा म्हणून ती बरेच दाणे घास म्हणून जात्यांत ठेवी व घरीं नेई. याप्रमाणें दिसावयास थोडें दिसलें तरी बरेंच धान्य ती घरीं घेऊन जाई. यावरून बारीक सारीक गोष्टी जाण्याकडे दुर्लक्ष्य करीत गेलें, तर बऱ्याच दिवसांनीं पाहिल्यास आपलें बरेंच नुकसान झाल्याचें आढळून येईल. याकरितां अशा किरकोळ दिसणाऱ्या गोष्टींकडेहि मालकानें दक्षतेनें लक्ष्य देणें जरूर आहे.

जात्यांतील रडती, सुपांतील हंसती; जात्यांतले रडतात, सुपांतले हंसतात—जात्यांत ओवरावयाचे दाणे जवळच सुपांत ठेवलेले असतात. जात्यांतले प्रत्यक्ष भरडले जात असतात व सुपांतल्यांची पाळी क्रमानें यावयाची असते. त्याप्रमाणें कांहीं लोक प्रत्यक्ष संकटांत सांपडलेले असतात व कांहींस त्याची प्रत्यक्ष बाधा झालेली नसली तरी ती पुढें लवकरच व्हावयाची असते. तेव्हां ज्यांचा क्रम नंतर आहे त्यांनीं प्रत्यक्ष संकटांत सांपडलेल्या लोकांचा उपहास करण्यांत किंवा आपल्यावर येणारें संकट दूर आहे म्हणून आनंद मानण्यांत अर्थ नाहीं. त्यांच्याहि पुढें लवकरच तेंच वाढलेलें असतें. "जात्यांतील रडती आणि सुपांतील हांसती. त्यांची गत तो या रीतीची जाली."–भाव ७०. तु०–आधणांतले रडतात–रोवळींतले सुपांतले हंसतात.

जात्यावर बसलें म्हणजे गीत–गाणें–ओंवी सुचतें; जात्यावर बसल्या गीत आठवतें—मनुष्य एखादें काम प्रत्यक्ष करावयास लागला म्हणजे त्यास तें कसें करावें हें सहज सुचून त्याच्या हातून तें पार पडतें; पण जर करावयास सुरवातच न करतां दूरदूर राहिलें तर तें कधीं हातून होण्याची शक्यता नसते. सामान्यतः दळीत असतां तोंडानें कांहीं तरी गाणें म्हणत असावें अशी जुनी समजूत आहे. याकरितां सहसा जुन्या बायका मुक्यानें दळीत नाहींत. ओवी किंवा गाणें आठवत नसलें तरी दळूं लागलें असतां सुचत जातें. गाण्यानें श्रमहि हलके होतात. तु०–गादी काम शिकवतें.

जात्यावरच्या गाण्यानें पीठ पडतें आणि वाऱ्यानें उडतें—एक श्रम करून कार्य करीत असतां व दुसरा त्यांत नसतें विघ्न आणीत असतो किंवा त्या त्या कार्याची हानि करीत असतो.

जान——जान कीं जमीन—खटपट करतांना प्राण तरी देईन किंवा जमीन तरी राखीन, अशी वृत्ति; शेंडी तुटो कीं पारंबी तुटो, याप्रमाणें. [मुळशी पेटा सत्याग्रहांत ही म्हण रूढ झाली].

जानवें——जानवें उतरणें—जानव्याच्या जागीं तरवारीचा वार करणें; उभा कापून काढणें. 'त्या गोंधळांतून तो भानावर येण्या पूर्वीच कातरीचा हात करून त्याचें जानवें उतरलें.' –गजेंद्रमोक्ष १.२३९.

जानवें तोडावयास उठणें–तोडून घेणें; जानव्यास हात घालणें—ब्राह्मणाचें मुख्य लक्षण शिखा व सूत्र; तेव्हां जानवें तोडणें हें धर्मबाह्य व अतिशय वाईट वर्तन असल्यानें तसें करण्यास ब्राह्मण अगदीं रागावून निकरावर आल्याखेरीज तयार होणार नाहीं. यावरून अतिशय रागावणें; चिडणें; भयंकर क्रोध येणें; संतापणें. उदा०-कर्णानें अश्वत्थाम्यास तो जातीनें ब्राह्मण असल्यामुळें अवध्य आहे असें म्हणतांच त्यानें जानवें तोडून जात टाकून दिली. –वेणीसंहार.

जानवें धोतर फाडणें–टाकणें—वरीलप्रमाणेंच. १ अतिशय रागावणें; संतापणें; क्रोधवश होणें. २ कंटाळून विरक्त होणें; संतापून संसाराचा त्याग करण्यास तयार होणें. ३ निर्लज्ज होणें; जनाची किंवा मनाची मर्यादा न बाळगणें; सर्व शिष्टाचारांस फांटा देणें; निःसंग होणें; बेफाम होणें.

जानवें पिवळें करणें—लग्नांत जानव्याला हळद लागून तें पिवळें होतें. यावरून लग्न करणें; विवाह करणें.

जानवें मोकळें करणें–उक्तें करणें—सुतकांत धार्मिक विधि बंद असतात. सुतक फिटल्यानंतर नवें जानवें घालतात. यावरून सुतकांतून मोकळें होणें; अशौचाचे दिवस निघून गेल्यावर जानवीं बदलणें व पूर्ववत् संध्यादि धर्मकृत्यें करूं लागणें.

जानवें सोडविणें—जानवें उतरणें पहा. जानवा हा एक जंबियाचा हात आहे. त्यांत जानव्याच्या जागीं वार करतात. यावरून जानव्याच्या जागीं तरवारीचा वार करणें; जानव्याप्रमाणें एका खांद्यापासून दुसऱ्या बरगडीपर्यंत वार करणें.

जानव्या धोतराची गांठ घालणें—१ अतिशय रागावणें; संतापणें; भयंकर क्रोधवश होणें. २ जानव्याच्या नाशाची धमकी देणें; जानवें तोडून, धोतर सोडून घरांतून निघून जाण्याची तयारी करणें; संन्यास घेण्याचा धाक घालणें; बैरागी होण्याचा आव आणणें.

जानव्याचा धनी—जानव्याचा अधिकार असलेला; ब्राह्मणादि त्रैवर्णिक; द्विज.

जानव्याची ब्रह्मगांठ—कायम अंगावर बाळगणें; न तुटणारा संबंध. 'बायकांच्या मंगळसूत्राचा मणि म्हणजे कांहीं जानव्याची ब्रह्मगांठ नव्हे, कीं ती गळ्यांत असलीच पाहिजे अगदीं!'–एकच प्याला १.२.

जानव्याची ब्रह्मगांठ दाखविणें—जानव्याच्या ब्रह्मगांठीला भिवून भुतेंखेतें पळतात अशी समजूत. 'जानव्याची ब्रह्मगांठ दाखविली म्हणजे तुमच्यासारखे ब्रह्मराक्षस मानगूट सोडून पळत सुटतात.'–एकच प्याला १.२.

जानव्याची लाज धरणें; जानव्यास लाजणें—जानवें सांभाळण्यासाठीं तरी दुराचार न करणें; धर्म राखणें; आपल्या जातीचा, धर्माचा, वृत्तीचा मुलाहिजा ठेवणें; आपल्या ज्ञातिधर्मास जाणणें व त्याकरितां अनाचारापासून निवृत्त होणें.

जानव्याला जानवें मिळणें—मिलाफ होणें; दोन ब्राह्मणांचें मेतकूट जमणें; दोन ब्राह्मणांचें संगनमत होणें. तु०–जातीला जात ओळखते.

जानव्यास वस्त्रा बांधणें—वादांत पराजय झाल्यास वस्तऱ्यानें जानवें तोडण्याची पद्धत असे. त्यावरून जिंकण्याची प्रतिज्ञा करणें; पराजय झाल्यास प्रतिपक्षानें जानवें तोडून टाकावें अशा आविर्भावानें वादास प्रवृत्त होणें; अगदीं निकराचा वाद घालणें.

जानव्यास सुरी बांधणें—जानव्यास वस्तरा बांधणें पहा. वादाकरितां केलेली एक प्रकारची प्रतिज्ञा. 'जानव्यासी सुरी बांधोनिया म्हणे। जिव्हा हे छेदणें।'–सम २.१५.

जानव्यास हात घालणें—अतिशय रागावून जानवें तोडण्यास सिद्ध होणें.

❀ **जानवें घातल्यानें ब्राह्मण होत नाहीं**—जानवें हें केवळ ब्राह्मणाचें बाह्य चिन्ह आहे. मुख्य ब्राह्मणाची खूण जी विद्या, धर्माचें ज्ञान, शुचिर्भूतपणाची राहणी या गोष्टी कांहीं सहज साध्य होत नाहींत, जानवें वाटेल त्यास सहज घालतां येईल, पण वरील गोष्टी सहज अंगीं आणतां येणार नाहींत. It is not the cowl that makes the friar.

जानवें वीतभर, कपडा मणभर—जानवें हें उपवस्त्र म्हणजे एक अंगावर घ्यावयाचें वस्त्र म्हणून मानण्यांत येतें. पण तें सगळे वीतभर असतें. त्या ऐवजीं जर वस्त्र वापरावयाचें झालें तर तें मात्र बरेंच मोठें लागतें. यावरून एखादी गोष्ट क्षुल्लक दिसली, तरी ती मोठ्या गोष्टीचें काम करते व ती जर काढून टाकावयाची असेल, तर तिच्या जागीं अधिक महत्त्वाची व खर्चाची गोष्ट आणून ठेवावी लागते.

जाना—**जाना आपने अखत्यार, आना परायबस**—(हिं.) जाणें आपल्या हातीं असतें पण येणें दुसऱ्याच्या हातीं असतें. जेथें आपण उतरतो तेथील माणसें सोडतील तेव्हां आपण येणार.

जाव बे लंवडे! बऱ्हाणपूरकी खबर लाव—एकारट्या, जा आणि बऱ्हाणपूरची बातमी आण. कांहीं तरी काम सांगणें; उगाच कांहीं तरी एखाद्यामागें काम लावणें; कोणताहि फायदा नसतां विनाकारण कांहीं तरी कामगिरी सांगणें. आव बे लडके विजापूरची खबर लाव, पहा.

जावेगा सो पावेगा, सोवेगा सो खोवेगा-गमावेगा—जो जाईल त्यास मिळेल जो निजेल तो गमावील. जो श्रम करील त्यास लाभ होईल पण जो आळस करील त्यास लाभ होणार नाहीं. तु०—खटपट करील तो पोट भरील. जागेगा सो पावेगा पहा.

जावे लाख, रहे साख—[साख=पत] लाखों रुपये गेले तरी हरकत नाहीं पण साख म्हणजे पत जातां कामा नये.

जाप—**जाप लावणें**—१ देवापाशीं मागणें करणें; विनंति करणें; प्रार्थना करून बोलणें, करणें. २ देवास प्रश्न विचारणें; कळे लावून वगैरे कौल घेणें.–न्यायप ४४९.

जाब—**जाब देणें**—उत्तर देणें; कृतीचें फळ देणें; पावणें. 'अति विमळ कुळीं ये भूत निर्माण होसी। शिव, शिव! भगवंता जाब हा काय देसी!॥'–सारुह ६.१०५.

❀ **जाब दिगर, सवाल दिगर**—बोलणें एक करणें एक; प्रश्न एक व उत्तर एक. एका प्रश्नास भलतेंच उत्तर. –ख ३५७४.

जांबुवंत—१ रामाच्या सैन्यांतील अतिशय वृद्ध व अनुभवी रीस. २ म्हातारा, अनुभवी, सुज्ञ माणूस; वृद्ध नायक. ३ (उप.) फार हजामत वाढलेला; अतिशय केस वाढलेला म्हातारा.

जांभई—**सहा महिन्यांची जांभई; रावणाची-कुंभकर्णाची जांभई**—कुंभकर्णानें एकदां जांभई देण्यास तोंड उघडलें म्हणजे तें मिटण्यास सहा महिने लागत किंवा सहा महिने निजून तो उठे, अशी समजूत आहे. यावरून दीर्घसूत्रीपणा; कोणत्याहि गोष्टीस वाजवीपेक्षां फारच अधिक उशीर लावणें; अत्यंत मंदपणा; लांबणीवर टाकणें.

जामगी—**जामगी लावणें**—[जामगी = बंदुकीचा

तोडा; दारूची वात.] १ बंदुकीस पेटलेला तोडा लावणें; बंदुक उडविणें. २ (ल.) भांडण लावून देणें; कलह लावणें; ठिणगी पेटविणें. ३ (ल.) त्रास देणें; छळ करणें; जांच करणें; आग लावणें.

जामग्यांनीं भाजणें—जांच करणें; अतिशय छळ करणें; त्रास देणें; डाग देणें; गांजणें.

जामाता——जामाता कृष्णसर्पश्च ।—जांवयावर कधींहि विश्वास ठेवूं नये; जांवई हा कृष्णसर्पाप्रमाणें दुष्ट समजावा. संबंध श्लोक–जामाता कृष्णसर्पश्च पावको दुर्जनस्तथा । विश्वासो नैव कर्तव्यः पञ्चमो भगिनीसुतः ॥

जामाता दशमो ग्रहः ।—जांवई हा आपणास परिचित असलेल्या नऊ ग्रहांव्यतिरिक्त जणूं काय एक दहावा ग्रह असून तो नेहमीं कन्याराशीस असतो व इतर क्रूर ग्रहाप्रमाणें आपणांस छळीत असतो, अशी समजूत आहे. जांवयाची दृष्टि नेहमीं सासऱ्याकडून कांहीं तरी मिळत असावें अशी असते. यासंबंधी श्लोक–(अ) भारतः पञ्चमो वेदः सुपुत्रः सप्तमो रसः । दाता पञ्चदशं रत्नं जामाता दशमो ग्रहः ॥ (आ) सदा वक्रः सदा रुष्टः सदा पूजामपेक्षते । कन्याराशिस्थितो नित्यं जामाता दशमो ग्रहः ॥ (इ) आदित्याद्या ग्रहाः सर्वे यथा तुष्यन्ति दानतः।सर्वस्वेपि न तुष्येत जामाता दशमो ग्रहः ॥

जामीन——जामीन न होईए गिराको दिजीये—कोणालाहि जामीन कधीं होऊं नये. गांठचें द्यावें पण जामीन राहूं नये.–सवि २८८०.

जामीन राहा आणि गांठचें वाहा—जामीन राहिलें असतां स्वतःचा कांहीं फायदा न होतां पदरचा पैसा भरीस घालण्याची मात्र पाळी येते. तेव्हां कोणास जामीन राहूं नये.

जामीन राय ताजें गांठचें जाय—(गो.) वरीलप्रमाणें.

जाय——जाय तें करतरिच, नाका तें भोगचें पड्ता—(गो.) हवें तें केलें कीं मग नको तें भोगावें लागतें.

जाय-जायाचें——जायलेणें--परत करावयाच्या बोलीनें आणलेले दागिने; उसनें लेणें; घालावयापुरता मागून आणलेला अलंकार.

जायाचा; जाया; जायास--प्रसंगविशेषीं उसना घेतलेला; तात्पुरता मागून आणलेला; परक्याची प्रसंगोपात्त आणलेली वस्तु.

जायाचा दागिना; जायाची वस्तु--१ उसना दागिना; प्रसंगापुरता घालावयास मागून आणलेला अलंकार. २ (ल.) मुलगी, कारण ती दुसऱ्यास द्यावयाची असते.

❀ **जायाचें मोतीं मुरडस किती, घटकाभरान् काढुन घेती**--दुसऱ्याचा दागिना उसना आणून घालून ऐट मिरवणाऱ्या स्त्रीस उद्देशून एक स्त्री म्हणते कीं, उसनी नथ घालून किती मुरडतेस ! घटकाभरानें ती काढून द्यावी लागेल, मग तुझी ऐट कोठें जाईल.

जायाचें लेणें आणि लाजिरवाणें--दुसऱ्याचे तात्पुरते मागून आणलेले दागिने घालणें ही गोष्ट लज्जास्पद आहे, कारण त्यामुळें जरी आपण तात्पुरते चांगले दिसलों किंवा मोठे वाटलों तरी तें कायमचें नव्हे. ' जायाचें अंगुलें लेतां नाहीं मान । शोभा नेदी जन हांसविलें ॥' –तुगा ३२१८.

जायां——जायां देणें--आंदण देणें; बक्षीस देणें; देऊन टाकणें.

जार——ओठाचा-तोंडाचा जार वाळलेला नसणें--प्रसूतीनंतर मातेचा गर्भ–जार जो अंगाला लागलेला असतो तो देखील गेलेला नसणें. म्हणजे इतकें बालपण असणें. बालबुद्धि असणें; अज्ञानदशा असणें; बालवय असणें. ' ओठाच्या वरचाहि जार अजुनी नाहीं तुझ्या वाळला ॥' –कुशलवाख्यान ४१.

जार——जार कर्मीं मौजा मारी, तो–ती उत्पत्तीची आशा न धरी—जो माणूस केवळ कामतृप्तीकरितां व्यभिचारादि कर्में करतो त्याला संततीची पर्वा नसते. वेश्यांना कोठें संतति होते ? Adultery desires no procreation but pleasures.

जार, जवाई, भानजा, ये तिन्हो नहीं आपना—(हिं.) पुढें पहा.

जार, जामात, भगिनीसुत, हे उपकार नाहीं आठवत--जार, जांवई व भाचा हे बहुधा कृतोपकार स्मरत नाहींत. त्यांस नेहमीं घेण्याची अपेक्षा असते व त्यांची वृत्ति कृतघ्नपणाची असते. तु०–जामाता कृष्णसर्पश्च० जामात पहा.

जारटलें——जारटलें वांगें—खुरटा, खुजा माणूस; पूर्ण वाढ न झालेला मनुष्य. ज्याप्रमाणें दाठरलेलें वांगें मोठें होत नाहीं त्याप्रमाणें वाढ खुंटलेला मनुष्य.

जारी——जारी करणें—सुरू, प्रचलित करणें; प्रसार करणें; प्रचारांत आणणें; अंमलांत आणणें. ' कंपनीच्या नांवाचा नवा रुपया हिंदुस्थानांत जारी करण्यांत आला. ' –सन १८५७, पृष्ठ १०६.

जारींत आणणें—प्रचारांत आणणें; सुरू करणें; प्रघात पाडणें; प्रचलित करणें.

जाळें——जाळ्या स्वभाव मेल्यागार वचून—(गो.) जन्मलेल्याचा स्वभाव मेल्यावांचून जायचा नाहीं. जन्मणें पहा.

जांवई——जांवई आग्रह—[सासुरवाडीं जांवयाला विशिष्ट तऱ्हेनें वागविलें जातें व तोहि वागतो. यावरून बरेच वाक्प्रचार पडलेले आहेत व गोष्टीहि आहेत.] अतिशय आग्रह; फार भीड घालून, आपलेपणानें केलेला आग्रह. २ वरवर आग्रह; केवळ शिष्टाचार म्हणून केलेला आग्रह.

जांवई जेवण—जांवयास सासुरवाडीस फार बेतानें वागावें लागतें व मित आहार, मित भाषण वगैरे करावें लागतें. यावरून नाजूकपणाचें जेवण; अगदीं हात राखून जेवणें.

जांवई डौल—जांवयानें सासुरवाडीस आणलेला मोठेपणाचा आव; फाजील ऐट, दिमाख; विनाकारण उसनी आणलेली ऐट.

जांवई पोषाख--अतिशय डामडौलाचा पोषाख; फार दिखाऊ पोषाख.

जांवई शोध--एका जांवयाला एक कविता लागेना. तेव्हां त्यानें तीच चुकली आहे म्हणून तींत कांहीं मूर्खपणाचा फेरफार केला. यावरून मूळचें बरोबर असतां त्यांत अडाणी माणसानें ज्ञानाच्या घमेंडीनें चुकीचा घातलेला शोध, केलेली दुरुस्ती.

जांवईण–जांवयाची बहीण; करवली; मेहुणी; वधूची नणंद.

जांवयाचा बेटा—जांवयाचा मुलगा हा दुसऱ्याच्या घरचा असल्यानें आजोळीं मोठ्या आळ्यतेनें व आळशीपणानें वागतो. यावरून निरुपयोगी व आपल्याच तोऱ्यांत असणारा मनुष्य. जांवयाचें पोर हरामखोर, अशी म्हणच आहे.

जांवयाची कीट-कीड—एक जांवई सासुरवाडीस गेला होता. तेथें जेवण वगैरे यथेच्छ झाल्यावर ओसरीवर जरा हातपाय पसरून निजला होता. तो चांगला जाडजूड असून त्यानें अंगावरून पांघरूण घेतलें होतें. सासू बाहेर जाऊं लागली तेव्हां ती त्याला अडखळून पडण्याच्या बेतांत आली. तेव्हां ती म्हणाली, 'अगोबाई, हा कोणगो निजलाय ताड्माडसा!' तेव्हां जवळ असलेल्या शेजारणीनें सांगितलें कीं ते जांवईबापू आहेत. तेव्हां ती सासू एकदम आपला अविर्भाव व आवाज बदलून म्हणाली, 'अगबाई, जांवयांची का ही कीड!' यावरून नाजूक मनुष्य; फारसा लठ्ठ नाहीं असा बेताच्या अंगाचा; किरकोळ मनुष्य.

जांवयाची पंगत – जांवयाच्या पंगतीला बरींच पक्वान्नें व जेवणाचा मोठा बेत असतो. श्रीमंतीची राहणी; भरपूर थाटमाटाचें जेवण; अगदीं यथेच्छ व नाना प्रकारचे पदार्थ असलेलें जेवण.

❀ **अशी लेक हवई, की घरोघर जांवई**—[हवई= चंद्रज्योत] अतिशय सुंदर पण व्यभिचारी मुलीबद्दल म्हणतात.

जावई आला माझा, अन् आयाबायांनों तुम्ही लाजा—(वांय.) स्वतः निर्लज्ज असणारी स्त्री दुसऱ्यास आपल्या माणसांची लाज धरा म्हणून सांगते.

सासवेचे दोंदावर, जांवई उदार—हलवयाच्या घरावर तुळशीपत्र या अर्थी. जांवई सासूच्या घरीं व तिच्या पैशानें औदार्य दाखविण्यास तयार असतो, कारण त्यांत त्याचें कांहीं खर्च होत नाहीं.

जांवई आले घरीं, म्हणून भोळी सासू गूळ मागें वाण्या घरीं--एक म्हातारी तिच्या घरीं जावई जेवावयास आला म्हणून वाण्याच्या घरीं गूळ मागून आणण्यास गेली. तो वाणी अर्थात् तिला पैशाशिवाय गूळ थोडाच देणार. तिचा जांवई जेवावयाचा असला तरी वाण्याला त्याचें काय होय. तिला आपल्या जांवयाचें मोठें कौतुक वाटत होतें म्हणून इतरांस तें थोडेंच वाटणार आहे. आपल्याप्रमाणें इतरांसहि आपल्या जांवयाबद्दल प्रेम वाटेल अशी तिची भोळी समजूत होती. ज्याला त्याला आपल्या गोष्टीबद्दल विशेष प्रेम, कौतुक वगैरे वाटतें पण इतरांस त्याचें काय?

जांवई आले घरीं, सासू निघाली माहेरीं--जांवई घरीं पाहुणचार घेण्याकरितां आले तों सासू आपल्या माहेरीं चाललेली; तिला त्याची मुळींच पर्वा वाटत नव्हती. किंवा आपल्याला जांवयाचा पाहुणचार करावा लागेल व फार खर्च करावा लागेल तो टाळण्याकरितां व त्या खर्चास भिऊन तिनें बाहेरगांवीं जाण्याची युक्ति काढली. जांवयाचा पाहुणचार करणें ही इतकी खर्चाची बाब असते कीं, सासू देखील घर टाकून दुसऱ्या गांवीं जावयास तयार होते.

जांवई नव्हे जांवयाचा भाऊ, फुकट रांडे नासलेस गहूं—एका बाईनें आपला जांवई पाहुणा आला असें सांगून शेजारणीकडून उसनें गहूं आणून जेवण केलें व पुढें शेजारणीला समजलें कीं, तो हिचा जांवई नसून त्याचा भाऊ होता. तेव्हां सासूला विनाकारण शेजारणीच्या शिव्या मात्र खाव्या

लागल्या. जांवयाकडील कोणीहि आला तरी सासूला अप्रूपच होतें.

जांवई न्हाला, वाफा पाणी प्याला--जांवयास न्हावयास पुष्कळ पाणी लागते तेव्हां तें फुकट कशासाठीं दवडावयाचें. म्हणून त्यास अशा ठिकाणीं न्हाऊं घालावयाचें कीं तें पाणी भाजीच्या वगैरे वाफ्यांत जावें, म्हणजे जांवयाचें नहाण पण होईल व वाफ्याचें शिंपण होईल. अशा रीतीनें एका कामांत दोन कामें साधावयाचीं. तु०—आम्राश्च सिक्ताः पितरश्च तृप्ताः ।

जांवई पाव्हणा आला म्हणून रेड्याची धार काढायची नसते—जांवई असला तर तो सासूसासऱ्याला मोठा; म्हणून अशक्य गोष्ट होईल कीं काय ?

जांवई माझा भला, लेक बाईलबुद्ध्या झाला— सासू ही आपल्या जांवयाबद्दल नेहमीं चांगलें बोलत असते व त्याचेबद्दल तिला नेहमीं कौतुक वाटत असते. जांवई आपल्या बायकोच्या तंत्रानें वागत असला म्हणजे सासूस फार आनंद होतो; कारण ती तिची लेक असते. पण तोच तिचा मुलगा जर आपल्या बायकोच्या तंत्रानें वागूं लागला, तर तो तिला बाईलबुद्ध्या वाटतो; कारण ती तिची सून असते.

कानाला कोपर जडेना, सासू मेली जांवई रडेना- मागें कान पहा.

अडचणीचे जागीं दुखणें आणि जांवई वैद्य-- मागें अवघड पहा.

बहीण भावया आणि सासू जांवया—बहीण ज्या प्रमाणें भावाचें कौतुक करते त्याप्रमाणें सासू जांवयाचें कौतुक करते.

व्याह्या जांवया तुपाचा प्याला, घरचा पाहुणा उपाशीं मेला—व्याही व जांवई हे पंक्तीस बसले म्हणजे त्यांच्या जेवणाची योग्य काळजी घेतली जाते, त्यांस तुपाकरितां स्वतंत्र प्याला दिला जातो व त्यांस हवें-नको सर्व नीट विचारपूस करून वाढण्यांत येतें. पण अशा वेळीं जो घरीं पाहुणा आलेला असतो त्याच्याकडे या गडबडीमुळें दुर्लक्ष्य होतें व त्यास पोटभर जेवणहि मिळालें आहे किंवा नाहीं याची कोणी काळजी करीत नाहीं. त्यास कसेंबसें अर्धपोटींहि उठावें लागतें.

जांवयांक दिल्लें, रेवेंतु मुत्तिलें सम--(गो.) जांवयाला दिलेलें, व वाळूंत मुतलेलें सारखें. यापासून कांहीं एक फळ नाहीं.

जांवयाचा पाहुणचार, फार करी बेजार--इतर कोणी पाहुणा पतकरतो पण जांवई पाहुणा आला म्हणजे फार त्रास होतो. कारण त्याला खूप करणें कठिण असतें व जांवयाचा पाहुणचार करणें ही फार खर्चाची बाब असते वर पहा

जांवयाचा बेटा, करंडयीचा पेटा--जांवयाचा मुलगा हा करंडयीच्या पेट्याप्रमाणें फार मोहक वाटतो जांवयाचा मुलगा हा आपल्या मुलीचा मुलगा असल्यामुळें व तो आपल्या घरीं तात्पुरता राहावयास आलेला असतो म्हणून फार आवडता असतो व त्याचे लाड अधिक केले जातात.

जांवयाची जात, न्हाणींतलें खात--न्हाणींतील खात ज्याप्रमाणें सारखें वाढत जातें व कितीदां काढलें तरी निघत नाहीं त्याप्रमाणें जांवयाचें मागणें कितीहि पुरवलें तरी सरत नाहीं. तें सारखें वाढतच जातें.

जांवयाची महती (गुण) लग्नांत गावी, अध्यक्षाची सभेंत गावी--जांवयाचा मोठेपणा इतर वेळीं दिसत नसला तरी तो लग्नांत दिसतो, तसेंच सभेचा अध्यक्ष सभेच्या वेळीं मोठा वाटतो. तेव्हां या दोघांची स्तुति त्या त्या प्रसंगीं करावयास हवी.

जांवयाचें पोर आणि हरामखोर--जांवयाच्या मुलास कितीहि चांगल्या रीतीनें वागविलें, त्याचे कितीहि लाड पुरविले तरी तो परक्याचा, दुसऱ्या घरीं जावयाचा असल्यामुळें त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं व तो जणूं कांहीं आपला आजोळावर हक्कच आहेअसें मानून, केलेले उपकार क्वचितच स्मरतो.

जांवयाबरोबर जेवावें, मुलाबरोबर शिकावें; जांवयाचे पंक्तीचें जेवण व लेकाबरोबर अध्ययन---कोणच्याहि घरीं राहिलें असतां त्याच्या जांवयाच्या पंक्तीस जेवावयास बसलें असतां उत्तम सुग्रास अन्न मिळतें; कारण जांवयाच्या जेवणाच्या बाबतींत नेहमीं विशेष खबरदारी घेण्यांत येते. त्याचप्रमाणें शिक्षण घ्यावयाचें झाल्यास मालकाच्या मुलांबरोबर घ्यावें. कारण त्यांस शिकविण्याकरितां शिक्षक वगैरे ठेवून विशेष काळजी घेतली जाते.

जावपें——जावपें पेजानें वांसरू पोसावयास देणें--पोसणें देणें; वांसरास जें प्रथम जावपें होईल तें पोसणारानें घ्यावें या करारावर वासरूं वाळगावयास देणें.

जावळें——जावळी भावळी संसार--भावाभावांचा एकत्र संसार. ‘ जावळी भावळी संसार असला म्हणजे प्रपंच करतां कामास नये ! ’

जास्ती-जाजती——जाजती-जास्ती जलाल—जुलूम; जबरदस्ती; त्रास; छळ. 'जास्ती जलाल'—ख ७.३७८४.

जाहलें——जाहलें तें गुदस्त—(ऐति.) झालें तें झालें; झालें तें होऊन गेलें. त्याचा विचार करूं नये. –पया १८७; २०५. Let bygones be bygone.

जाहिरात——जाहिरात करील तो माती विकील आणि ती न करील त्याचें सोनेंहि खपणार नाहीं—(न. चिं. केळकर यांची म्हण) हल्लीं जाहिरात करणाराचा माल वाईट असला तरी खपतो, पण जाहिरात न करणाराचा चांगला असला तरी पडून राहतो. "सांप्रतचें विसावें शतक म्हणजे प्रसिद्धी शास्त्राचें शतक आहे. 'जाहिरात करील तो माती विकील आणि ती न करील त्याचें सोनेंहि खपणार नाहीं.' या म्हणीमागील अतिशयोक्ति सोडून दिली तरी, त्यांतील गर्भित अर्थ अगदीं सत्य आहे."–जोत्स्ना, नोव्हेंबर १९३९ दिवाळी अंक. तु०–जो बोलेल त्याचे जोंधळे विकतील, जो बोलणार नाहीं त्याचे गहूंहि विकणार नाहींत.

जाळ——जाळ उठणें—१ हातपाय, डोळे जळजळीत होणें; लाल होणें. २ हातापायांची, डोळ्यांची वगैरे आग होणें.

❀ **जाळावीण(वांचून) कढ नाहीं, मायेवीण(वांचून) रड नाहीं**—ज्याप्रमाणें पाण्याखालीं विस्तव असल्याशिवाय तें उकळत नाहीं त्याप्रमाणें खरें प्रेम असल्याशिवाय दुसऱ्याबद्दल कळवळा येत नाहीं, दया वाटत नाहीं, किंवा दुःखहि होत नाहीं.

जाळणें——पाणी जाळणें—पाण्यास आग लागत नाहीं पण दैव अनुकूल असल्यास अशक्य गोष्टीहि घडून येतात अशी समजूत आहे. यावरून दैव अनुकूल असल्यामुळें मनास येतील त्या गोष्टी करणें; सृष्टिक्रमाविरुद्धहि गोष्ट घडून येणें; अशक्य वाटणारी गोष्टहि हातून होणें.

पोट जाळणें—कसातरी वेड्या वांकड्या उपायांनीं उदरनिर्वाह करणें; अत्यंत कष्टदायक किंवा मनाविरुद्ध गोष्टी करून उपजीविका करणें; कसें तरी पोट भरणें; अत्यंत हालांत दिवस काढणें.

जाळें——जाळ्यांत पकडणें—काबूत आणणें; आपल्या ताब्यांत आणणें; पूर्णपणें स्वाधीन करून घेणें; पाशांत अडकविणें; पेंचांत धरणें.

❀ **जाळ्यांतून निसटला, वणव्यांत सांपडला**—एका संकटांतून सुटतो आहे तोंच दुसऱ्या संकटांत सांपडणें. तु०—आगींतून निघून फुफाट्यांत पडणें.

जिकडे——जिकडे गेली बाला, तिकडे खासा खबळा—जिकडे जावें तिकडे संकटें पाठीस लागणें; कोठेंहि गेलें तरी मागची कटकट कांहीं सुटत नाहीं.

जिकडे गेली वांझ, तिकडे झाली सांज—वांझ स्त्रीला मुलें नसल्यामुळें लौकर घरीं येण्याची आवश्यकता भासत नाहीं. एकदा ती दुपारीं जेवून बाहेर पडली, कीं मागचा कांहीं ओढा नसल्यामुळें संध्याकाळपर्यंत परत घरीं येत नाहीं.

जिकडे घुगऱ्या, तिकडे उदेव उदेव—ज्याच्या घरीं खावयास मिळतें त्याच्या मोठेपणाची लोक स्तुति करीतच असतात. तु०–ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी.

जिकडे-जिकडची चलती, तिकडे-तिकडची भरती—ज्याची भरभराट चालू असेल त्याच्या भोंवतालींच सर्वजण गोळा होतात. पूर्वीं मुलुखगिरीच्या काळांत जो सरदार जोरावर असेल त्याच्या सैन्यांत भरती व्हावयास लोकांच्या झुंडीच्या झुंडी येत असल्या पाहिजेत व त्यावरून कदाचित ही म्हण प्रचारांत आली असावी.–बाजीराव मस्तानी.

जिकडे धर्म, तिकडे जय—जी बाजू न्यायाची असेल त्या बाजूचा अखेरीस जय व्हावयाचा ही गोष्ट निश्चित आहे, अशी आपली श्रद्धा आहे. पुढील संस्कृत उक्तीचें हें मराठी रूपांतर आहेः—'यतो धर्मस्ततो जयः ।'–भगवद्गीता. –मोगदा ८.२८.

जिकडे पुढा, तिकडे मुलुख थोडा—एकदां घर सोडून बाहेर निघाल्यावर आपण जिकडे तोंड फिरवावें तिकडे वाटेल तितक्या दूर जावयास आपणास मुभा असते. प्रश्न काय तो प्रथम बाहेर पाऊल टाकण्याचाच असतो.

जिकडे पोळी, तिकडे गोंडा घोळी—ज्या मनुष्याकडून कांहीं लाभ होत असतो त्याची खुशामत लोक करीत असतात.

जिकडे पोळी, तिकडे वळी—वरीलप्रमाणेंच.

जिकडे वाजवी, तिकडे परमेश्वर—सत्याचा जय होतो. सत्याचा वाली परमेश्वर. यतो धर्मस्ततो जयः । 'जरी तुम्ही हे गोष्टी चष्मपोशी करून दरगुजर कराल, तरी जिकडे वाजवी तिकडे परमेश्वर आहे.'–ऐटि. भा. १. ले. ३९.

जिकडे सुई, तिकडे दोरा—दोरा हा सुईंत ओंवलेला असल्यामुळें जिकडे सुई जाते तिकडे दोरा आपोआपच नेला जातो. त्याप्रमाणें जी व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीवर अवलंबून असते किंवा तिच्या दुय्यम दर्जाच्या ठिकाणीं असते तिला

त्या मुख्य व्यक्तीच्या कलानें वागावें लागतें व याप्रमाणें स्त्रीस आपल्या पतीच्या मनाप्रमाणें वर्तन करावें लागून तो जाईल तिकडे त्याच्या पाठीमागून निमूटपणें जावें लागतें. पतीच्या पाठीमागून पत्नीस जावे लागतें.

जिकडचें तिकडे वळे, कणकीचें गळूं गळूं पडे—ज्या मनुष्याचा कांहीं तरी संबंध असेल त्याच्याचकडे मन वळतें, त्याच्याच विषयीं मनुष्य पक्षपाती बनतो. तसा तिऱ्हाइताबद्दल पक्षपात करीत नाहीं. मनाचा स्वाभाविक ओढा आप्ताकडे असतो. कृत्रिमरीतीनें तसा ओढा दाखवूं म्हटल्यास तें सोंग टिकूं शकत नाहीं. जसें मूळचा नसलेला शरीरावयव कणकीचा करून लावूं म्हटल्यास तो गळून पडतो.

जिकडल्या भिंती, तिकडल्या मुळ्या—एखाद्या आवाराभोंवतीं भिंत घातली असतां किंवा विहीरीसभोंवतीं जी भींत घातलेली असते, तींत मुळ्या कोठून तरी येऊन बाहेर आलेल्या दिसतात. त्या अर्थात् ज्या दिशेच्या भिंतींतून बाहेर आलेल्या असतील त्याच दिशेकडील झाडांच्या त्या मुळ्या असल्या पाहिजेत. ज्या दिशेकडून एखादी अनिष्ट गोष्ट घडत असेल तिकडेच तिचें मूळ असलें पाहिजे.

जिंकणें——ऊप जिंकणें—भीड चेपणें; संवय होणें; संकोच वाटेनासा होणें; अभ्यास होणें; भीति वाटत नाहींशी होणें.

***जिंकण्याची आशा धरती, हरून मागें येती**—जिंकण्याच्या ईर्षेनें मनुष्य कार्य करतो पण पराजय झाला असतां माघार घ्यावी लागते.

जिंकतो तोच हंसतो—ज्याला विजय प्राप्त होतो त्यास हर्ष होतो, ज्याचा पराजय होतो तो दुःखी होतो.

जिकीर——जिकीरीस येणें—मेटाकुटीस येणें; हैराण होणें; त्रासणें; कंटाळून जाणें. –मराचिथोशा ६२.

जिकिरीपेक्षां फकिरी बरी—नेहमीं कोणत्या गोष्टीची काळजी करीत राहून या संसारांत गुरफटण्यापेक्षां सर्वसंग परित्याग करून संन्याशी होणें चांगलें. एखाद्या गोष्टीची उत्तराउत्तर, खटपट करण्यापेक्षां ती सोडून देणें बरें या अर्थी.

जित——जितांच्या डोक्यांत दगड—Woe to the conquered याचा अनुवाद. जित लोकांचे हक्क काहीं विचारावयास नकोत. –कोल्हटकरांचा लेखसंग्रह.

जितका——जितका वाणला तितका घाणला—स्तुति अंगलट आली. एखाद्याची खूप प्रशंसा करावयास जावें तों तो आपले गुण (अर्थात् दुर्गुण) प्रकट करतो.

नर्मदेंत जितके कंकर, तितके शंकर—जितना पहा.

जितके बोल बोलती, इतकें कार्य न करती—जे लोक तोंडानें फार बोलतात त्यांच्या हातून त्या मानानें फारशी कृति होत नाहीं. तु०—गर्जेल तो पडेल काय, बोलेल तो करील काय?

जितके मोठे, तितके खोटे—जे लोक दिसावयास थोर असतात, वैभवसंपन्न असतात ते अंतःकरणांतून सच्चे असतात असें नव्हे, तरी त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून उपयोग नाहीं. सत्याच्या मार्गानें वैभवास चढलेले लोक विरळा. बहुतेक लोक आडमार्गानें संपत्ति मिळवूनच श्रीमंत होतात. केवळ भपक्यावर जाऊं नये. 'मोठे तितके समदे खोटे, व्यर्थ जन्म आपुला.'–संभाजी नाटक.

जितणें——जितल्याचे पाठकरू—[पाठकरू= पाठिंबा देणारा, साह्यकर्ता] एखाद्या कार्यांत जो यश संपादन करतो, त्याला आम्ही तुझे या कामांत पाठिंबा देणारे होतो, यास्तव तुझ्या यशांत आम्हीहि सहभागी आहोंत असा जे अवास्तव टेंभा मिरवितात ते. 'जितल्याचें पाठकरू पुष्कळ पण खरे सहायकर्ते विरळाच.'

जितना——जितना ओढना, तितना पाव पसरना—ज्या मानानें पांघरूण लांब असेल त्या मानानें पाय पसरावे. आपली ऐपत किंवा उत्पन्न पाहून खर्च करावा. तु०—अंथरूण पाहून पाय पसरणें. Cut your coat according to your cloth.

जितना गूड डालेंगा, इतना मिठा होवेंगा—जितका गूळ घालावा तितकें गोड होतें. ज्याप्रमाणें मसाला घालावा त्याप्रमाणें माल तयार होतो. जितकें गोड बोलावें तितकें कार्य साधतें.

जितने कंकर, उतने शंकर—ही म्हण काशींत रूढ आहे. जितके दगड तितके देव. सर्व जग हें परमेश्वरानें व्यापलें आहे. परमेश्वर हा सर्वत्र भरून राहिला आहे.–गांगा १३२. –दैनिक काळ २७–३–४०.

जितरब——कांद्याचे कोरडयास, मानभावाची बायको आणि गाढवाचें जितरब यांत श्रम नाहीं—कांद्याचें तोंडी लावणें करावयास श्रम लागत नाहींत तो नुसता चिरून दिला म्हणजे झालें; त्याप्रमाणेंच महानुभावास आपली बायको पोसावयाचे श्रम पडत नाहींत; कारण याच्याप्रमाणें तीहि काम करून भिक्षा मागून आणून आपला निर्वाह करते. त्याचप्रमाणें गाढव घरीं बाळगलें तरी त्यास खावयास घालावयाची काळजी नसते, काम झाल्यावर त्यास मोकळें

खोडलें म्हणजे उकिरडा फुंकून वगैरे तें आपलें पोट भरतें. याप्रमाणें या तीन वस्तु बाळगण्यास अगदीं सुलभ असतात.

जिता——जिता कीं मेला--जिवंत आहे कीं मेला आहे हें समजण्यास कठिण अशा स्थितींत असलेला; मरणोन्मुख अवस्थेतील; मरणप्रायस्थितींतील.

जिता कीं मेला करून टाकणें--मरे मरेतों मारणें; जगतो कीं मरतो अशी अवस्था करणें.

जिती फट--(गो.) जिवंत थाप.

जित्या पंथास लागणें—जिवावरच्या दुखण्यांतून उठणें; मरण टळणें; भयंकर आजारांतून वांचणें; जगण्याची आशा उत्पन्न होणें.

***जिता रहे पूत तों गल्लीगल्लीमें चूत; जितो मेराभाई तों गल्लीगल्लीमें भोजाई**--(अशिष्ट) शिर सलामत तो पगडी पचास, या अर्थी.

जितेपणीं देईना पाणी, मग बसला तर्पणीं—(व.) आईबाप जिवंत होते तेव्हां त्यांचा मुळींच परामर्ष घेतला नाहीं आणि आतां ते मेल्यावर मोठ्या डौलानें त्यांच्या नांवें तर्पण करण्यास उद्युक्त झाला. योग्य वेळीं योग्य कृत्य न करतां मागाहून केवळ लोकोपचारार्थ कांहीं देखावा कोणी करूं लागल्यास असें म्हणतात. पुढें पहा.

जित्या देईना पाणी, मेल्या बसला पार्वणीं—(व.) [पार्वण = मेल्या पितरांच्या नांवानें तर्पण करणें; पाणी देणें.] वडील जेव्हां जिवंत होते पण जरेनें पीडल्यामुळें अगर आजारीपणामुळें जेव्हां पाण्यासाठीं तळमळत होते तेव्हां ज्यानें त्यांना पाणी पाजून तृप्त केलें नाहीं असा पुरुष, वडील मृत झाल्यावर जर त्यांच्या नांवानें रोज तर्पण करूं लागला तर त्या तर्पणाचा उपयोग काय ? जिवंतपणीं पितरांना आपल्या वर्तनानें संतोष देणें, हें ते मेल्यावर तर्पण करीत बसण्यापेक्षां अनंत पटीनें बरें.

जित्या न मिळे अन्न । मेल्यावरी पिंडदान॥ जित्या पितरां न मिळे अन्न, मेल्या करी पिंडदान--मनुष्य जिवंत असतांना त्याकडे ढुंकूनहि पाहावयाचें नाहीं, किंवा कोणी उपाशी तापाशी मनुष्य अन्न मागावयास आला असतां त्याला कांहीं न देतां उपाशीच हांकून लावावयाचा आणि मेलेल्या पितरांकरितां मात्र सुग्रास अन्न तयार करून पिंडदान-श्राद्ध करून त्यांस तृप्त करावयाचा प्रयत्न करावयाचा, अशी कांहीं कर्मठ लोकांची अश्लाघ्य प्रवृत्ति असते. हे भाताचे पिंड पितरांस पोंचतात किंवा नाहीं याची शंका असतां जित्या जिवास उपाशीं मारावयाचें ही निर्घृणता आहे. यांत कांहीं पुण्यप्राप्ति होणें शक्य नाहीं. वरील तुकारामाचा अभंग आहे.

जित्या नाहीं गोडी, मेल्या बंधनें तोडी—वरील प्रमाणेंच. नवऱ्याच्या जिवंतपणीं प्रेम नसावयाचें व तो मेल्यावर मणी मंगळसूत्र तोडावयाचें.

जित्या रोटी, मेल्या (मूठ) माती—१ जिवंत मनुष्यास भाकरी खावयास द्यावी व मेलेल्यास पुरून टाकावें हा धर्म आहे. किंवा २ माणूस जिवंत आहे तोंपर्यंत त्याची निगा, सोपस्कार राखावयाचे पण मरणानंतर त्याच्याकडे अजीबात दुर्लक्ष करावयाचे, अशी वृत्ति.

जित्या हुळहुळे, आणि मेल्या कानवले--वरील-प्रमाणेंच. जित्या मनुष्याला पोटाला न घालतां पितरांकरितां कानवल्यासारखे गोड पदार्थ तयार करावयाचे, हा उलटा धर्म आहे.

जित्याची खोड मेल्यावांचून जात नाहीं—एकदां जडलेली खोड आयुष्यांत कधींहि अजीबात जात नाहीं. Habit is second nature.

जिधर——जिधर उधा, उधर खुदा--(ऐति.) उदाजी पवार जें जें करूं लागे त्यास परमेश्वर साहाय्य करी. उदाजी पवाराची नेहमीं चलती असे. त्यावरून ही म्हण पडली आहे. उदाजी पवार शूर व मुत्सद्दी असल्यानें, त्याच्या शब्दाला मान असे.

जिधर मोला, उधर शहादौला--जेथें देव वास करतो तेथें सर्व कांहीं असतें. –सवि ४१२७.

जिन्नस——जिन्नस उडविणें—खर्चून टाकणें; संपविणें; खलास करणें.

एकजिनसी--१ एकाच जातीचा; निर्भेळ; अस्सल; भेसळीचा नव्हे असा. २ अगदीं एकसारखा; एकाच जातीचा; एकराशीचा.

जिनसी सामान--दारूगोळा; तोफखान्याचें सामान.

जिन्नसाची उपयोगाप्रमाणें किंमत--वस्तूची तिच्या उपयोगाप्रमाणें किंमत ठरणें. एखादी वस्तु स्वभावतः फार मौल्यवान असली तरी तिचा योग्य उपयोग करून घेणारा नसल्यास ती काडीमोल होते. प्रतिकूल परिस्थितींत उत्तम वस्तूचेंहि चीज होत नाहीं.

जिभली——जीभ पहा.

जिभली झडून पडणें-खोटें किंवा वाईट बोलल्याबद्दल

जीभ झडते अशी समजूत आहे, यावरून असा शाप देतात. वाचा बंद होणें. 'खोटें बोलणाऱ्याची जीभ झडून पडो.' –विक्षिप्त ३.३८.

जिभल्या चाटणें—तोंडाला पाणी सुटणें; आशा सुटणें; प्राप्तीची इच्छा होणें; हवेसें वाटणें.

※जिभलेन केलें नी फाटलेचेर आयले—(गो.) जिभेनें बोलतांना अयोग्य भाषा वापरली पण त्यामुळें मार बसला पाठीला. एकाच्या कृत्याबद्दल दुसऱ्याला शिक्षा. तोंड पहा.

जिम्मा——जिमेस करणें—स्वाधीन करणें; हवाली करणें; सुपूर्द करणें; ताब्यांत देणें. 'पन्नास हजार फौज व तीनशें तोफा तुझे जिमेस करितों.'–भाव ४२.

जिरणी——जिरणीस पडणें—कमी होणें; हलकें होणें; क्षय लागणें; उतरती कळा लागणें.

जिरणें——कंडू-खय-खुमखुम-मोडशी जिरणें—१ कमी होणें; दवणें; वसणें. २ खोड मोडणें; जोम नाहींसा होणें; उत्साह कमी होणें.

जिरमाणी——जिरमाणीं-जिरमाणीस पडणें—मानवणें; पचनीं पडणें.

जिरवणी——जिरवणीचा पाऊस—ज्याचें पाणी वाहून न जातां जमिनींत जिरतें असा पाऊस; भीज पाऊस; थोडा थोडा पडणारा पाऊस; झिमझिम पाऊस; बारीक बारीक पुष्कळ वेळ पडणारा पाऊस.

जिवंत——जिता पहा.

जिवंत नरकवास—अत्यंत त्रासदायक स्थिति; अतिशय घाणीची जागा; भयंकर कठीण अवस्था.

जिवंत समंध-पिशाच-अवदसा—अत्यंत त्रासदायक मनुष्य.

जिवंत हत्यार—तरवार भाला वगैरे; चालू हत्यार; राबत्यांत असणारें शस्त्र.

※जिवंत असतां उपकार करी, आठवती गत झाल्यावरी—एखाद्या मनुष्यानें जिवंत असतां आपणावर उपकार केले असतां त्याची आठवण तो जिवंत असेपर्यंत फारशी येत नाहीं, पण तो मेल्यावर मात्र आल्याशिवाय राहात नाहीं. मेलेल्या माणसासंबंधीं चांगल्या गोष्टी तेवढ्याच आपण लक्ष्यांत ठेवण्याचा प्रयत्न करतो व वाईट विसरण्याचा प्रयत्न करतों; त्यामुळें त्यानें केलेले अपकार विसरतो पण उपकार विसरत नाहीं.

जिवंतपणीं देव तो मेल्यावर महादेव—(वांय.) मेल्या म्हशीला पांच शेर दूध.

जिवलग——जिवलग-सखा मित्र झाला म्हणून काय बाइल मागावी!—अत्यंत घरोब्याचा स्नेही असला तरी त्याची बायको उपभोगार्थ मागणें निंद्य होईल. आपल्या कृतीला नेहमीं तारतम्य पाहिजे. अरे कृष्णा अरे कान्हा मनरंजन मोहना ॥ या एकनाथाच्या पदांतील चरण.

जिवसा——तांदुळ जिवसे, पाहुणा जिवसा; पाहुणा जिवसा तांदुळ जिवसे, कसें साधेल—एखाद्या मनुष्याच्या मनांत पाहुण्याला तर जेवावयास घालावें असें फार फार वाटत असतें; पण तांदूळ खर्च होऊं नये अशीहि मनांतून इच्छा असते. पण या दोन्ही गोष्टी कशा साधणार? तांदुळ तरी खर्च केले पाहिजेत नाहींतर पाहुण्याची तरी उपाशीपोटीं रवानगी केली पाहिजे. तु०–You cannot eat as well as keep the cake.

जिवा——जिवा तोंवर शिवा; होता जिवा म्हणून वांचला शिवा—[यांतील पहिल्या म्हणीचा अर्थ मॅनवेरिंगनें जोंपर्यंत आपण जिवंत असूं तोंपर्यंत शिवण्याची क्रिया करावीच लागते असा केला आहे; पण तो अगदीं चूक आहे. तशा अर्थाची एक हिंदी म्हण आहे ती पूर्वी दिली आहे. जबलग जीवे तबलग सीवे.] (ऐति.) शिवाजी जेव्हां अफजुलखानाच्या भेटीस गेला, त्यावेळीं त्याच्या बरोबर जिऊ महाला या नांवाचा सेवक होता; त्यानें त्यास अफझलखानाच्या वधाच्या कामीं मदत केली व अफझलखानाबरोबरचा सय्यद बंदा यास मारलें व अफजलखानाचें शीर कापून आणलें. त्याची जर मदत झाली नसती तर शिवाजी कदाचित् वांचला नसता, अशा समजुतीवरून ही म्हण पडली आहे.

जिव्हा——जिव्हा खाणें—रागानें जीभ चावणें; दांतओठ खाणें; दुसऱ्याबद्दल मनांत जळफळणें; चरफडणें.

जिव्हा वांकडी पडणें—१ गैरसावधपणानें बोलणें; भलतेच शब्द तोंडांतून निघणें; अयोग्य बोललें जाणें. २ अर्धांगवायूनें जिव्हा लटकी पडणें.

जिव्हा विटाळणें—१ जिव्हेचें रसज्ञान नष्ट होणें. २ अपशब्द बोलून जिव्हा बाटविणें; तोंडानें भलतेच शब्द उच्चारणें; अयोग्य, अभद्र भाषण करणें. ३ नालायक मनुष्याबद्दल भीड घालणें; भलत्याच कामीं बोलणें करणें; अयोग्य मनुष्याबद्दल भलावण करणें.

जिव्हा हातीं धरणें—१ अतिशय अपशब्द बोलणें; भलभलतें भाषण करणें. २ बरळणें; बडबड करणें; जिभेनें ताळतंत्र सोडणें. ३ अधाशीपणानें खाणें; भरमसाटपणें खाणें; वाटेल तें खाणें; कुपथ्य करणें.

जिव्हेचा जड—१ बोलण्यांत व्यंग असलेला; शब्दांचा उच्चार स्पष्ट करतां येत नाहीं असा. २ अबोल्या; मितभाषी.

जिव्हेला आढाओढा असणें—बोलण्यास आडकाठी असणें; अद्वातद्वा भाषण करणें; अमर्याद भाषण करणें; मर्यादा सोडून बोलणें; ताळतंत्र सोडून बोलणें.

❀ **जिव्हा अनर्थ करी; तरवार बहु बरी**—तरवारीनें म्हणजे प्रत्यक्ष शस्त्रानें जखम केल्यानें जितके अनर्थ होत नाहींत, तितके जिभेनें दुसऱ्यास कटु शब्द अगर मर्माघात केल्यानें होतात. तरवारीनें केलेली जखम बरी होते, पण शब्दानें झालेलें क्षत बरें होत नाहीं.

जिव्हा आणि लेखणी मनाचें विवरण करी—आपल्या मनांतील भावार्थ आपण शब्दांनीं किंवा लेखनानें व्यक्त करूं शकतो. The tongue and the pen are both interpreters of the mind.—सवि ३५६६.

जिव्हा कटो पण वचन (न) तुटो—[वचन तुटणें = वचनमुक्तता होणें] जीभ तुटली तरी चालेल पण आपण दिलेलें वचन किंवा बोललेला शब्द खोटा होतां कामा नये.

जिव्हा करी चहाडी आणि पायीं पडे बिडी—जीभ चुगली सांगते पण तिचा परिणाम पायांस बिडी पडून भोगावा लागतो. एकाच्या गुन्ह्याबद्दल दुसऱ्यास शिक्षा.

जिव्हा ठेवावी स्वाधीन, तरी देहा न बंधन—आपण जर आपली जीभ आपल्या स्वाधीन ठेवली तर आपणांस कधीं बंधन पडण्याचें कारण पडणार नाहीं. पुष्कळदां आपण अविचारानें उच्चारलेल्या शब्दांमुळें आपण संकटांत पडतों.

जिव्हा सर्वांच्या, नाहींत एक प्रकारच्या—निरनिराळे लोक एकच प्रकारच्या गोष्टीबद्दल निरनिराळ्या प्रकारांनीं बोलतात. सर्वच लोक एकाच गोष्टीकडे सारख्याच दृष्टीनें पाहात नाहींत व त्यांचें सर्वांचें त्या गोष्टीबद्दल एकाच प्रकारचें मत बनत नाहीं.

जिव्हार——**जिव्हारीं खोंचणें**—हृदयांत जखम होणें; मनाला फार लागणें. पुढें पहा. 'नरपतिरमणी ते खोंचलीसे जिव्हारीं।'—साढह ३.५७.

जिव्हाळी——**जिव्हाळीं-जिव्हाळीला लागणें**—मर्मभेद होणें; मनाला दुःखदायक होणें.

जिस——**जिस डगाली पर बैठे, उसीको काटे**—(हिं.) ज्या खांदीवर बसावयाचें तीच कापून टाकावयाची. ज्याचा आपणास आधार अथवा आश्रय असेल त्याच्यावरच उलटून तो नष्ट केल्यास त्याचा परिणाम खांदी तुटल्यावर आपण खालीं पडूं. याप्रमाणें केल्यास आत्मघातक झाल्यावांचून राहात नाहीं.

जिस तन लागे, वही जाने—ज्याला लागतें त्यालाच समजतें. ज्याला घस लागते तोच तक्रार करतो.

जिस बरतनमें खाना, उसमें छेद करना—ज्या भांड्यांत खावयाचें त्यांतच वाण (?) करावयाची. उपकारकर्त्यावरच अपकार करावयाचा; कृतघ्नपणा.

जिस मुखसे पान खावे, तिस मुखसे कोईल न-चाबे—ज्या तोंडानें पान खाल्लें असेल त्या तोंडानें कोळसा चावतां येत नाहीं. ज्या आपल्या तोंडानें स्तुति करावी त्यानें निंदा करूं नये.

जिस शहरमें फूल बेंचे, वहा धूळ न उडाव—ज्या गांवांत फुलें वेचलीं त्या गांवांत धूळ उडवूं नये. जेथें आपण चांगल्या स्थितींत दिवस काढले त्या गांवास नांवें ठेवूं नयेत. उपकारकर्त्यास अपकार करूं नये.

जिसका——**जिसका खावे, उसका गावे**—ज्याचें खावें त्याचें गावें. जो मनुष्य आपणास खाऊं घालतो त्याचें आपण गुणवर्णन करावें हें क्रमप्राप्त आहे. तु०—ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी.

जिसका चून, उसका पून—जो जेऊं घालील त्यालाच पुण्य लागेल. जो दाम देईल त्याचेंच काम लोक करतील.

जिसका राम धनी, उसको क्या कमी—ज्यावर रामाची, परमेश्वराची कृपा आहे त्यास कोणत्याहि गोष्टीची कमतरता नसते. तु०—शिरीं आहे रामराज।

जिसकी गोदमें बैठे, उसकी दाढी खिसोटे—ज्याच्या मांडीवर बसावयाचें त्याचीच दाढी ओढावयाची. उपकारकर्त्यावर अपकार करावयाचा.

जिसकी जावे, ओही चोर कहावे—ज्याची गोष्ट जाते तोच चोर ठरतो. उलटा व्यवहार.

जिसकी तेग, उसकी देग—[तेग = तरवार. देग = डेग; तपेलें] ज्याची तरवार त्याचें भांडें. पुढें पहा.

जिसकी लाठी, उसकी भैंस—[भैंस = म्हैस] ज्याच्या मनगटांत किंवा काठींत पराक्रम असेल त्याची म्हैस. तो म्हशीला आपल्याकडे नेतो. जबरदस्त मनुष्य आपली सत्ता कोणत्याहि गोष्टीवर स्थापन करतो व त्याच्यापुढें दुसऱ्या कोणाचें चालत नाहीं. तु०—मारील त्याची तलवार.

जिसको न दे मौला, उसको दे सुजाउद्दौला—(ऐति.) सुजाउद्दौल्याची दानशूरतेविषयीं फार ख्याती होती. तो रस्त्यांतील सुलक्षणी गरीबाला देखील अमीर करी. यावरून वरील म्हण पडली.—पामो ४०२.

जी——जी आवडे वरा, ती आवडे घरा——नवऱ्याला आवडणारी स्त्री घरांत सर्वांनाच आवडते; तिचा कोणी अवमान करीत नाहींत.

जी कहीं लागत नहीं, जब दिल कहीं लग जाय——एके ठिकाणीं मन बसल्यावर ते दुसऱ्या ठिकाणीं कधीं जाणार नाहीं.

जी कोमलांगी असेल तिला ओझरत्या मुद्रा, जी हेडंबा असेल तिला प्रशस्त मुद्रा—(वांय.) वैष्णव गुरु तप्तमुद्रा देतांना माणूस पाहून कमीजास्त त्रासाच्या मुद्रा वठवतात. गुरूच्या ठिकाणींहि पक्षपात असतोच.

जा खोड बाळा, ती (खोड) जन्मकाळा; जी खोड लागली बाळा, ती न सुटे जन्मकाळा—लहानपणीं जडलेली खोड जन्मभर तशीच राहाते, कधीं सुटत नाहीं.

जी बाळंत झाली, ती पोसूक भियेना—जिनें जन्म दिला ती त्याला बाळगण्याला भीत नाहीं. ज्याचें कृत्य त्याची जबाबदारी तो घेतो.

जी वस्तु उपयोगी, ती चांगली वाटते—ज्या वस्तूचा आपणास तात्काळ उपयोग असेल ती आपणास चांगली वाटणें साहजिकच आहे. जिचा आपणांस तादृश उपयोग नाहीं ती कितीहि मौल्यवान् असली तरी तिची आपणास किंमत नसते. कोंबड्यास रत्न सांपडलें तर तें त्यास न आवडतां त्यास जोंधळ्याचा दाणा अधिक प्रिय वाटतो.

जी संवय बाळा, ती जन्मकाळा—जी खोड बाळा० पहा.—शाव २.३०४.

जी स्त्री मूळची वाईट, जपून न होय नीट—जी स्त्री स्वभावतःच शीलभ्रष्ट आहे, तिच्यावर कितीहि पाळत ठेविली तरी ती सुधारणें शक्य नाहीं.

जिचा नवरा दांसट, तिचा संसार चोखट—ज्या स्त्रीचा नवरा खाष्ट असतो तिचें काम नेहमीं चोख असतें. कारण तसें नसल्यास तिला बोलणीं खावीं लागतात. जिचा नवरा कानाडोळा करतो ती थोडीफार तरी निष्काळजी झाल्याशिवाय राहात नाहीं. मॅनवेरिंगनें दासट याचा अर्थ दास असा केला आहे.

जिची सहज लीळा, तिला कशाला (पाहिजे) भांग टिळा—जी जातीची सुंदर असून कोणत्याहि प्रकारें शरीरप्रसाधन न करतां आपल्या सौंदर्यानें लोकांवर छाप पाडूं शकते, तिला नट्टापट्टा करण्याची मुळींच जरूर नाहीं. जातीच्या सुंदरांना कांहीहि चालतें । —(मराठी) शाकुंतल नाटक.

जिच्या कानांत आंबले, तिचे बोल चांगले—श्रीमंत माणसाचें कौतुक होतें; त्याचें भाषण प्रिय वाटतें.

जिच्या घरीं ताक, तिचें वरती (गेलें) नाक—ज्या बाईच्या घरीं ताक म्हणजे कांहीं वैभव असतें ती नेहमीं तोऱ्यांत असते. सामान्यतः ब्राह्मणाच्या जेवणांत विशेषतः कोंकणांत ताक ही एक आवश्यक वस्तु असते व ज्याच्या स्वतःच्या घरीं दुभतें नसतें त्याला दुसऱ्याकडून ज्याच्या घरीं असेल त्याच्याकडून तें मागून आणावें लागतें. पूर्वीं दूधदुभतें विकण्याची प्रथा सामान्यतः ब्राह्मणांत तरी खेडोपाडीं नव्हती. त्यामुळें स्वतःच्या घरीं नसल्यास विकतहि मिळत नसे व ज्याच्या घरीं अधिक दूधदुभतें असेल त्यांच्याकडे ताकें वांटून टाकण्याचीहि चाल असे. यामुळें ताक न्यावयास येणाऱ्या बायांपुढें अर्थातच देणारीस आपला तोरा मिरविण्याची संधि मिळत असे. ताकावरून अशा तऱ्हेच्या म्हणी कोंकणांत बऱ्याच प्रचलित आहेत. ताक पहा.

जिचे मोठे कुले, तिला जन (जग) भुले—जी स्त्री श्रीमंत असते तिला सर्व लोक प्रथम मान देतात. गरीबाकडे कोणी पाहात नाहीं.

जिच्या गळ्यांत सरी गांठलें, तिला बसायास पिढें पाटलें—वरीलप्रमाणेंच. जी स्त्री श्रीमंत असून जिच्या अंगावर खूप दागिने असतील तिची ऊठवस, आदरसत्कार वगैरे यथास्थित होतो. गरीबाकडे कोणी लक्ष्य देत नाहीं.

जिच्या हातांत गोठ, तिला लोडाशेजारीं लोट—वरीलप्रमाणेंच.

जिच्या हातीं नाहीं पाटली, तिला सतरंजीखालीं लोटली—गरीबाला कोणी मान देत नाहीं; सारा मान पैसेवाल्यास मिळत असतो.

जिच्या हातीं पाळण्याची दोरी, ती राष्ट्रातें उद्धरी—

मुलांचें शिक्षण किंवा मुलांस वळण लावणें हें मातेच्या हातीं असतें व ती जसें वळण लावील तशीं पुढें मुलें निघतात. याप्रमाणें महापुरुषांच्या अभ्युदयास त्यांच्या माता कारणीभूत होतात.

जीस बहु वर्षें कष्ट, ती पत तत्क्षणीं नष्ट—जी पत संपादण्याकरितां अनेक वर्षें कष्ट करावे लागतात ती एका क्षणांत नष्ट होते. आपली बाजारामध्यें पत बसविण्यास अनेक वर्षें सचोटीचा व्यवहार करावा लागतो तेव्हां ती गोष्ट साध्य होते; पण एखाद्याच व्यवहारांत अप्रामाणिकपणा केल्यास अनेक वर्षें बसविलेली पत एका क्षणांत नाहींशी होण्याचा संभव असतो.

जी जी——जी जी म्हणणें; जी जी करणें—१ नोकरानें मालकाला किंवा एखाद्या प्रतिष्ठित माणसाला ओ द्यावयाची म्हणजे 'जी' म्हणण्याची मराठ्यांत वहिवाट आहे. सेवेंत, आज्ञेंत तत्पर असणें. हां जी ! हां जी ! करणें. 'प्रत्यक्ष काळ जिला जी जी म्हणतो त्या काळजीचा प्रभाव काय सांगावा ?' --पामो ४३७.

जीत--जिता पहा.

जीत हाडांला खिळणें--जन्मभर चिकटून राहाणें; हाडींमासीं खिळणें.

❀ **जीत ना मेली, हरळीची मुळी**—दुर्वेचें मूळ जरी अगदीं सुकलेलें दिसलें व जिवंत आहे किंवा मेलेलें आहे हें कळत नसलें तरी तें पाणी मिळाल्याबरोबर पुन्हां फुटतें, तें अगदीं कधींहि मरत नाहीं. त्याप्रमाणें आपलें जें वडिलार्जित वतन एखादा धंदा वगैरे कितीहि अल्प असला तरी तोच वेळेवर आपल्या उपयोगी पडतो; त्यापासून थोडाबहुत फायदा होतोच.

जीति मखी नही निगली जाती—(जिवंत माशी गिळली जात नाहीं.) जाणूनबुजून कोणी विष खात नाहीं. डोळे उघडे ठेवून कोणी संकटांत उडी घेत नसतें. —सवि १५६. अन्योक्ति १५०५.

जीन——जीन घर, जीन तख्त—घोड्यावरील जीन हेंच घर व सिंहासन. नेहमीं सज्ज. गायकवाड घराण्याचें हें ब्रीदवाक्य आहे. "जाणता सकळ ब्रीदवाक्य तुमचें-'जीन घर जीन तक्त' साचें."—काव्यकिरीट, पृ. १०५.

जीन घाली दोहों घोड्यावर, एक थकतां दुसरा तयार—दोन घोड्यांवर नेहमीं जीन घालून तयार ठेवावें; म्हणजे एक थकला तर दुसऱ्यावर लगेंच बसतां येतें. नेहमीं कोणत्याहि कामाला दोन उपायांची दुहेरी योजना करून ठेवावी म्हणजे एक निष्फळ ठरला तर दुसरा तात्काल करतां येतो.

जीभ——जीभ ओठार पडप--(गो.) लाळ घोटणें.

जीभ काढणें--१ आश्चर्यानें, संकोचानें, भीतीनें जीभ बाहेर काढणें. २ पदार्थ खाण्यासाठीं आशाळभूतपणा करणें; जिभल्या चाटणें; तोंडाला पाणी सुटणें.

जीभ चावणें-चावलीशी करून बोलणें--बोलूं नये तें बोलून गेलों असें दाखविण्यासाठीं जिभेला शिक्षा म्हणून जीभ चावणें; भिऊन, संकोच धरून, दबत दबत बोलणें.

जीभ चुरचुर करणें-बोलणें--अप्रासंगिक, वेडेंवाकडें बोलणें; भलतेंच कांहींतरी बोलणें; व्यर्थ वटवट करणें.

जीभ जड असणें—१ स्पष्ट, अस्खलित बोलतां न येणें. २ लवकर पाठ करावयाला असमर्थ असणें.

जीभ जड होणें—१ चांगलें शुद्ध बोलतां न येणें; चांचरत उच्चार करणें. २ मंदबुद्धि होणें; लवकर उच्चार करतां न येणें.

जीभ झडणें—वाचा नाहींशी होणें; वाचा बसणें; तोंडांतून उच्चार करणें अशक्य होणें; वाचाशक्ति जाणें. एखाद्यास शाप द्यावयाचा असतां त्याची जीभ झडो असें म्हणतात.

जीभ नरकांत घालणें—जीभ विटाळणें. खोटें बोलणें; असत्य भाषण करणें; जिभेस असत्याचा विटाळ करणें.

जीभ पाघळणें—१ बोलण्याच्या ओघांत बोलावयाचें नाहीं तें बोलून जाणें; गुप्त गोष्ट फोडणें; गुह्य बाहेर पडणें. २ तोंडांतून भलतेच शब्द निघणें; अप्रासंगिक भाषण करणें; शुभ प्रसंगीं अशुभ बोलणें.

जीभ बधिर होणें—जीभ जड होणें; नीट उच्चार करतां न येणें.

जीभ मोकळी सोडणें—हवें तसें बोलणें; जिभेला आडपडदा नसणें; चुरुचुरु बोलणें; अद्वातद्वा भाषण करणें; अमर्यादपणें बोलणें.

जीभ मोडणें—शब्द न फुटणें; वाचा कुंठित होणें; वाचा बसणें.

जीभ लवलव करणें--चुरचुर बोलणें; अमर्यादपणें बोलणें; वेळप्रसंग न पाहतां मर्जीस येईल तसें बोलणें.

जीभ लांब करणें—फार, अमर्याद बोलणें. पुढें पहा.

'हरामजादा ! आज जीभ फार लांब केलीस ! पण तुला इथून जिवंत जाऊं देणार नाहीं !'–शिसं २.२.

जीभ लांब करून बोलणें—वडीलधाऱ्या किंवा वरिष्ठ माणसांशीं अघळपघळ बोलणें; अमर्यादपणें बोलणें; भीड-मर्यादा न पाळगतां बोलणें.

जीभ लांब होणें--वाटेल तें बोलण्यास प्रवृत्त होणें; अघळपघळ भाषण करणें; मर्यादा सोडून बोलणें; लहान तोंडीं मोठा घास घेणें.

जीभ लालचावणें—तोंडाला पाणी सुटणें; एखादा पदार्थ खाण्याची इच्छा होणें; एखादा पदार्थ खाण्याची चटक लागणें.

जीभ वळवळणें—१ बोलावयास लागणें; चुरुचुरु बोलणें; फार बोलणें. २ शिव्या देणें; अपशब्द बोलणें; भलतेंच बोलणें.

जीभ विटाळणें–बाटविणें—१ भलतेंच खाणें; अभक्ष्य भक्षण करणें. २ भलतेंच किंवा खोटें बोलणें; अनुचित भाषण करणें.

जीभ शिंदळ–निसरडी--स्वच्छंदी, फटकळ जीभ; अमर्याद, ताबा नसलेली जीभ. अयोग्य, अप्रासंगिक भाषण करणारी व्यक्ति.

जीभ सोकणें—१ चटक लागणें; वारंवार विशिष्ट पदार्थ खावेसें वाटूं लागणें; एखाद्या पदार्थाची संवय लागणें. २ चव येणें; लज्जतदार वाटूं लागणें; आवडूं लागणें (एकादा पदार्थ).

जीभ सोकावणें--तोंड चटावणें; पुन्हां पुन्हां खावेसें वाटूं लागणें; एखादा पदार्थ विशेष आवडूं लागून वारंवार खाण्याची इच्छा होणें.

जीभ हातीं धरणें—१ मन मानेल तसें बोलणें; अद्वा-तद्वा भाषण करणें; अमर्यादपणें बोलणें; अफाट भाषण करणें; बेफाम बोलणें. २ वाटेल तें खाणें; हवें तितकें खाणें; अम-र्यादपणें सेवन करणें.

जीभ हासडून प्राण देणें--आत्महत्या करणें; त्रागा करून देहत्याग करणें.

जिभा काढणें–चाटणें—आशाळभूत होऊन पाहाणें.

जिभेचा पट्टा सुरू करणें–चालू करणें–चालू ठेवणें–अद्वातद्वा बोलणें; अमर्याद भाषण, बेफाम भाषण करणें.

जिभेचा पालट—रोजरोज एकाच प्रकारचा पदार्थ खाऊन वीट आल्यामुळें करावयाचा खाण्यांत बदल; रुचि-पालट; निराळ्या प्रकारचा पदार्थ तयार करणें.

जिभेचा लोळ–ळा होणें—जीभ भाजणें; जीभ भाजून तिचा गोळा होणें; जीभ भाजल्यामुळें शब्द न उमटणें.

जिभेचें कोड पुरविणें–कौतुक करणें—अनेक निर-निराळ्या प्रकारचे चविष्ट पदार्थ खाणें; नवे नवे पदार्थ करून खाणें.

जिभेचे फुटाणे फुटणें–वक्तृत्वपूर्ण भाषण करणें; फाड-फाड बोलणें; अस्खलित बोलणें; एकसारखें आवेशानें बोलत राहणें.

लांब जिभेनें—फार बोलून; वाचाळपणें. जीभ लांब करणें पहा. 'तिची तारीफ मात्र रात्रंदिवस लांब जिभेनें करत असतो.'–जादूगार पृ. ६३.

एकाच जिभेनें साखर किंवा गू खाणें—१ एकाच वेळीं संमति असंमति देणें; बरेंवाईट म्हणणें; एकाच वेळीं चांगलें व वाईट भाषण करणें. २ दिलेला शब्द लागलीच परत घेणें.

जिभेला–स आडवा–वेढा नसणें—निरर्थक प्रलाप काढणें; अनिर्बंधपणें भाषण करणें; अद्वातद्वा बोलणें; भरम-साटपणें बोलणें.

जिभेला–स आवरून धरणें—१ निर्बंध घालणें; जीभ ताब्यांत ठेवणें; भाषणावर नियंत्रण घालणें. २ बोलण्यापासून परावृत्त होणें; बोलण्याच्या बेतांत आलें असतां गप्प बसणें; मौन धारण करणें; स्तब्ध बसणें.

जिभेला कांटा लावणें—एखादी गोष्ट गुप्त ठेवणें; मौनव्रत घेणें; गप्प राहणें; स्तब्ध राहणें; न बोलणें.

जिभेला चिमटा घेणें—(खाण्याबोलण्यापासून परा-वृत्त करण्यासाठीं चिमटा). बोलणें, खाणें यांपासून तोंड आवरणें; गप्प राहणें; स्तब्ध बसणें; मुक्याप्रमाणें बसणें.

(एखादा पदार्थ) जिभेला–स टांचा देऊन ठेवणें–आपण न खातां एखादा पदार्थ राखून ठेवणें; स्वतः न घेतां दुसऱ्याकरितां ठेवून देणें; खाण्याची इच्छा असतांहि न खातां राखून ठेवणें.

जिभेला डाग देणें--जीभ ताब्यांत ठेवणें; भाषणावर निर्बंध ठेवणें; भलतेंच बोललें जाऊं नये म्हणून किंवा बोलल्याबद्दल जिभेला शिक्षा लावणें.

जिभेला लगाम घालणें--जीभ ताब्यांत ठेवणें. ज्या-

प्रमाणें घोड्यास आवरण्यासाठीं लगाम हवा, त्याप्रमाणें. तु०— A bridle for the tongue is a necessary piece of furniture.

जिभेवर असणें—१ तोंडपाठ असणें; पूर्णपणें अवगत असणें; अगदीं करतलामलकवत् असणें. २ अगदीं ताज्या आठवणींत असणें; पूर्णपणें स्मरण असणें; केव्हांहिं वाटेल तेव्हां सांगतां येईल इतकें पक्कें स्मरण असणें. ३ बोलून टाकण्याच्या तयारींत असणें; अगदीं तोंडामध्यें शब्द आलेले असणें; अगदीं ओंठावर शब्द आलेले असणें; उच्चारण्याच्या तयारींत असणें.

जिभेस हाड नसणें—जीभ ताब्यांत नसणें; अमर्याद बोलणें; भरमसाटपणें बोलणें.

❀ **जीब आस म्हणु नाकाक लाव नये**—(गो.) जीभ आहे म्हणून ती नाकाला लावूं नये. चांगल्या वस्तूचा ती आपल्या हातीं आहे म्हणून वाईट कामीं उपयोग करूं नये.

जीब नत्तिल्लो केप्याक कीरु करता; जीब नाथिल्लो भेऱ्याक कीर करता—(गो.) जीभ नसलेल्यानें (मुक्यानें) बहिऱ्याची थट्टा करणें; स्वतःच्या व्यंग्याकडे दुर्लक्ष करून दुसऱ्याचें व्यंग काढणें.

जीभ खाई, पडजीभ वाट पाही---जिभेनें एखादा पदार्थ खाल्ला जात असतां पडजिभेला तो घशापर्यंत येईतों वाट पाहावी लागते. एकाच कामांत दोन सहकारी असले तरी एक पुढें व एक पाठीमागें असें करावेंच लागतें. तु०— एका घोड्यावर दोघेजण बसले असतां एक पुढें, एक मागें असें होणारच.

जीभ चहाटळ, आणि ते रोगाची वावटळ—जीभ ही फार चावट व चवचाल असल्यामुळें तिला भलतेसलते खाण्याची चटक असते; पण त्या तिच्या चटकेमुळें शरीरास रोग होण्याचा संभव असतो.

जीभ चोखारी, नशीब भिकारी--जिभेस अनेक प्रकार खावयाचे चोचले सुचतात; पण नशीबांत नसलें म्हणजे ते पुरे होत नाहींत.

उचलली जीभ लावली टाळ्याला—वाटेल तसें अविचारानें बोलणें; उतावीळपणें कांहींतरी भकणें; भरमसाट भाषण करणें.

जीभ शिंदळ, खांद्यावर कुदळ, कोठें जाती ? म्हणे पोर पुरावयाला—वाटेल तें अभद्र बोलणाऱ्याबद्दल म्हणतात. उदा०—खांद्यावर कुदळ असणाऱ्या स्त्रीस सहज विचारलें, कोठें जातेस ? तर ती फटकळपणें उत्तर देते पोर पुरावयास—असें अभद्र भाषण अशा लोकांकडून यावयाचें ठरलेलें !

जिबेक हाड ना--(गो.) अवाच्या सवा बाता मारणाऱ्याला किंवा वाटेल तसें अचकट विचकट किंवा अभद्र बोलणाऱ्यास म्हणतात.

जिभेची करून लेखणी,शाईत बुडवावी अंतःकरणीं-जे शब्द बोलावयाचे ते नीट अंतःकरणांत विचार करून मग बाहेर उच्चारावे.

जिभेचे पोत आनी चोटलेचे पोत, हातांत दवरीत तो ब्रह्मांड जिंतीत--(गो.) जो मनुष्य आपली जीभ व इंद्रिय ताब्यांत ठेवतो त्यास ब्रह्मांडहि जिंकतां येतें.

जिभेचेर सुण्या पेटे पडल्यात--(गो.) जिभेवर कुत्र्याचीं पिलें पडणें. ज्याच्या त्याच्यावर ओरडणारा माणूस.

जिभेंत चहाडी, पायांत बेडी—तोंडानें चुगली केली असतां पायांत खोडा पडतो. मागें पहा. तु०—जिव्हाग्रे बंधनप्राप्तिः जिव्हाग्रे मरणं ध्रुवम् ।

जिबेन केल्लें फाटीर आयलें--(गो.) तोंडानें कांहींतरी अवाच्य बोलल्यामुळें पाठीला त्रास भोगावा लागणें. तोंड पहा.

जिभेनें बांधली गांठ, न सुटे चाव्वितां दांत—जिभेनें मारलेली गांठ दांतांना सुद्धां सोडवत नाहीं. एकदां वचन गेल्यावर मग तें बदलणें शक्य नसतें.—सवि १३५१.

जिभेनें केलें-बोलें, तें ताळूवर आलें--तोंडानें भलतेंच बोलून गेलें असतां पुढें त्याचें प्रायश्चित्त कदाचित् डोकें देऊन घ्यावें लागतें.

जिभेला डोहळे फुटले, आणि घशानें अडून धरलें---मनांतून एखादी गोष्ट बोलून टाकावयाची असते, पण कांहीं कारणामुळें ती बोलतां येत नाहीं, अशा वेळीं ही म्हण वापरतात.

जिभेला नाहीं हाड, बोलण्यांत मोठी द्वाड--पुष्कळदां आपली जीभ आपल्याला आवरत नाहीं व नको असेल तें भलतेंच बोलून जातों. पण या जिभेच्या द्वाडपणाबद्दल आपणाला पुढें प्रायश्चित्त भोगावें लागतें. याकरितां जिभेला फारसें स्वातंत्र्य देणें चांगलें नाहीं.

जिभेला हाड नाहीं तरी दांत पाडते--जीभ जरी स्वतः मृदु असली व तिच्यामध्यें काठिण्य नसलें तरी ती असा एखादा शब्द बोलतें, कीं त्यामुळें सर्व दांतखिळी

बसण्याचा प्रसंग येतो. The tongue breaketh bone though itself have none.–सवि ३५६७.

जीर्ण——जीर्णानि वस्त्रानि यथा विहाय--मूळ श्लोक–वासांसि जीर्णानि यथा विहाय, नवानि गृण्हाति नरोऽपराणि। तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही। –गीता २.२२. ज्याप्रमाणें मनुष्यप्राणि जुनीं वस्त्रें टाकून नवीं घेतो त्याप्रमाणें आत्मा जुनें शरीर टाकून नवें धारण करतो.–नीतिशास्त्रप्रवेश २८५.

जील——जील देणें--उठावणी देणें; भर देणें; भरीस पाडणें; चेतविणें; प्रोत्साहन देणें; उत्तेजन देणें.

जीव——जीव अधांत्रीं उडणें—घाबरून जाणें; मनाचा तोल सुटणें; कांहीं सुचेनासें होणें; मन थाऱ्यावर नाहींसें होणें.

जीव अर्धा करणें--त्रास देणें; सतावणें; छळणें; गांजणें.

जीव अर्धा होणें--त्रासणें; दमणें; थकणें; कंटाळून जाणें; अर्धमेलें होणें.

जीव आटणें--१ अतिशय श्रम करणें; कष्ट करणें; कष्ट करून अगदीं मेटाकुटीस येणें. २ थकणें; दमणें; श्रमणें; अगदीं काळजी वगैरेमुळें खंगून जाणें.

जीव आडकणें–टांगणें–टांगला असणें--काळजी लागणें; हुरहुर लागणें; अस्वस्थता वाटणें.

जीव आंबणें—त्रासून जाणें; कंटाळणें; वीट येणें; उबगणें.

जीव उडणें--१ प्रेम नाहींसें होणें; मन विटणें; कंटाळा येणें. २ भीतिग्रस्त होणें; मन थाऱ्यावर नसणें; काळजी लागणें; सुचेनासें होणें.

जीव कंयगटीस येणें--१ मेटाकुटीस येणें, दमणें; थकणें; भागणें; श्रमित होणें. २ मरगळणें; हातपाय चालत नाहींसें होणें; अगदीं उठूं नये किंवा पाऊल पुढें टाकूं नये असें वाटूं लागणें.

जीव काढून ठेविणें--१ अगदीं काळजी, चिंता वाटणें. २ जीव टाकणें पहा. ३ अगदीं वाटेल ती हमी देणें; मान कापून ठेवणें पहा. 'मीं आपला जीव काढून ठेविला... तरी तुला माझें म्हणणें खरें वाटणार नाहीं.–शाब १.१३८.

जीव कालवणें—घाबरणें; गडबडणें; जीव खालींवर होणें; घाबरून भेदरून जाणें; अतिशय मनःक्षोभ होणें.

जीव कीं प्राण--आपल्या जिवाइतकेंच जपणें; अतिशय प्रेम करणें; प्राणापलीकडे जतन करणें. 'जीवर तो (जॉन्सन) जीव कीं प्राण करीत असे......ती त्याची आवडती बायको मरण पावून तो पुनः सडाचा सडाच राहिला. '–नि.

जीव कोंडाळणें—(ना.) गुदमरणें; श्वासोच्छ्वास करण्यास कठिण पडणें.

जीव कोरडा होणें–पडणें--घसा कोरडा होणें; थकणें; दमणें; अतिशय श्रम पडल्यामुळें घशास कोरड पडणें; तहान तहान होणें.

जीव खरडून बोलणें–सुकणें--मोठ्यानें सर्व शक्ति वेंचून बोलणें, आकांत करणें; मोटमोठ्यानें बोलणें, रडणें.

जीव खाऊन काम करणें—अतिशय मेहनत घेऊन, अगदीं मनापासून काम करणें; अत्यंत कष्ट करणें; फार श्रम करणें.

जीव खाणें–घेणें; जिवास खाणें--एखाद्याच्या जिवास त्रास देणें; एकसारखा पिच्छा पुरविणें; सारखा त्रास देत राहणें. २ मनास लागून राहणें; वरचेवर टोंचणी लागणें; सारखी हुरहुर लागणें.

जीव खालवर होणें—भीति वाटणें. 'खरं म्हणाल तर तुमच्याशीं बोलतांना माझा जीव अगदीं खालवर होत असतो. '–एकच प्याला १.३.

जीव खालीं पडणें—काळजी नाहींशी होणें; धीर येणें; मनाजोगें होणें; चिंता दूर होणें. 'इंग्रजी सैन्याचा जीव खालीं पडला. '–इंप १७२.

जीव गोळा होणें—मरणोन्मुख होणें; सर्व शक्ती जणूं एकवटून कंठाशीं येणें; आत्यंतिक अवस्था होणें. 'जों जों देखे देव कांखेंत बोळा। तों तों त्याचा होतसे जीव गोळा।' –आसु २६.

जीव घेऊन पळणें—जीव वांचविण्यासाठीं पळून जाणें; प्राणाच्या भयानें पलायन करणें; पळून जाऊन सुटका करून येणें. 'पळती जीव घेऊनिया।' 'जिकडे वाट फुटली तिकडे जीव घेऊन पळाला. '–विवि ८.७.१३३.

जीव घेऊन राहाणें—कसेंबसें दिवस काढणें; अत्यंत कष्टमय जीवित कंठित असणें; केवळ प्राणधारणा करणें. 'जे कुणबी घर धरून जीवमात्र घेऊन राहिले आहेत तेहि जाऊं लागतील. '–रा ८.२८.

एक जीव जाणें, एक जीव येणें--मरणाच्या दारीं असणें; आतां मरतो कीं क्षणानें मरतो अशा अवस्थेंत असणें; केवळ धुगधुगी असणें.

जीव जाळणें-मारणें--निग्रह करणें; दमन करणें; मनांतील विकार ताब्यांत ठेवणें; विकारावर नियंत्रण ठेवणें; कामादि इच्छा ताब्यांत ठेवणें.

जीव टाकणें—१ प्राण सोडणें; मृत्युवश होणें. २ निराश होणें; धीर सोडणें; सर्व आशा सोडून देणें. ३ फार उत्कंठा लागणें; अतिशय उत्सुक होणें; फार तीव्र आकांक्षा वाटणें. ४ हट्ट करणें; छंद घेणें. ५ जोराचा प्रयत्न करणें; नेटानें काम करूं लागणें.

रडून-हंसून-खणून जीव टाकणें--अतिशय जोरानें रडणें, हंसणें वगैरे.

जीव टाकून पळणें--धीर सुटून पळूं लागणें; भीतीनें गांगरून पळणें; अतिशय त्वरेनें घाबरून पळणें; जीवाची पर्वा न करतां पळणें; मृत्यूच्या भयानें पळ काढणें.

जीव टांगणीस लागणें—१ एखाद्या वस्तूवर प्रीति बसणें; अतिशय चटका लागणें, ध्यास लागणें; हव्यास लागणें; सुचेनासें होणें. २ चिंताग्रस्त होणें; अत्यंत हुरहुर लागणें; काळजी वाटूं लागणें.

जीव ठिकाणीं नसणें—अस्वस्थ होणें; चिंताग्रस्त होणें; बेचैन होणें; मनास शांतता नसणें.

जीव डहळणें-मळकणें—(ना.) मळमळणें; कळमळूं लागणें.

जीव तुटणें—१ अतिशय थकणें; दमणें; अंगांत अगदीं त्राण नाहींसें होणें. २ तळमळ लागणें; ध्यास लागणें; हुरहुर लागणें; बेचैन होणें. 'तिळ तीळ तुटे ग जीव सदा, चैन नच पडे ।' -सत्यविजय.

जीव तोडणें—दुःखानें सचिंत होणें; अतिशय काळजी करणें; चिंताग्रस्त होणें.

जीव तोडून करणें—अतिशय श्रम घेऊन करणें; मनापासून करणें; जीवास कष्ट सायास देऊन करणें.

जीव तोडून करणें-वागणें-सांगणें—अगदीं मनापासून एखादी गोष्ट करणें. वागणें, सांगणें वगैरे. अत्यंत काळजीपूर्वक काम करणें. 'आपण जीव तोडून काळजीनें वागतों तरीसुद्धां असा पाणउतारा.'-इंप ५१.

जीव थारीं असणें--स्वस्थपणा असणें; काळजीपासून मुक्त असणें; कोणत्याहि प्रकारचा मागें व्याप, नेट नसणें.

जीव थारीं-थाऱ्यावर नसणें--चैन नसणें; रुखरुख लागलेली असणें; मन अस्वस्थ असणें; कसल्यातरी चिंतेंत असणें.

जीव थोडा थोडा होणें--अतिशय काळजी लागणें; धाकधुक वाटणें; संशयादिकामुळें भीति वाटत असणें.

जीव देणें--१ आत्महत्त्या करणें; देहत्याग करणें; मृत्यु ओढवून घेणें. 'मुख दाखविशी वानरा । रिघोनि सागरीं जीव देईं ॥'-एकनाथ. २ लक्ष देणें; ध्यान देणें. ३ सर्व शक्ति खर्च करणें; अगदीं मनापासून करणें.

जीव धडधड करणें--काळजी वाटणें; हुरहुर लागणें; रुखरुख लागणें.

जीव धरणें—बाढीस लागणें; जोमांत येणें; स्थिरता प्राप्त होणें; ऊर्जितावस्थेस लागणें.

जीव धुकुटपुकुड करणें—(ना.) घाबरणें; काळजी वाटणें; धास्ती खाणें; मनांत रुखरुख वाटणें.

जीवपंचमूल—अभीरु (शतावरी), वीरा (केळ), जीवंती (गुळवेल), जीवक (आसणा), ऋषभ (बैलघाटी).

जीव पछाडणें--लाचारीनें नम्र होणें.

जीव पडणें--१ एखाद्या गोष्टीची गोडी लागणें; मन लागणें; आवडूं लागणें; एखादी गोष्ट प्रिय वाटूं लागणें; एखादी गोष्ट करावयास उद्युक्त होणें, तत्पर होणें.

जीव पाखडणें--१ अतिशय मेहनत करणें; कष्ट करणें; श्रम करणें; जीवापासून करणें. २ जळफळणें; रागावणें; मनापासून संतापून बोलणें; त्रागा करणें.

जीव पोळणें--१ दुःख होणें; आपत्ति येणें; संकट येणें. २ चट्टा बसणें; धडा मिळणें; अद्दल घडणें; वाईट अनुभव येऊन शहाणपणा शिकणें.

जीव प्यारा असणें--जीवाबद्दल अत्यंत आसक्ति असणें; जगण्याची तीव्र इच्छा असणें; आयुष्यांत गोडी वाटणें. 'प्रत्येकाला आपला जीव प्यारा असतो.'

जीव फुटणें--अतिशय उत्कंठा लागणें; जीव तळमळणें; तीव्र इच्छा होणें. 'तुझे भेटीसाठीं निशिदिवस माझा जिव फुटे ।'-सारुह ६.१५८.

जीव बसणें--१ मन बसणें; प्रेम करणें; अतिशय आवडणें. २ चटक लागणें; हवीशी वाटूं लागणें; व्यसन लागणें.

जीव भांड्यांत पडणें—हायसें वाटणें; स्वस्थ होणें; मनावरील दडपण दूर होऊन स्वस्थता वाटूं लागणें. 'आज संस्थानी प्रजेचा जीव थोडासा तरी भांड्यांत पडेल असें म्हणण्यास'-सासं २.१९५. 'माझा एक जीव भांड्यांत

पडला.'–निरभ्र चंद्र ४०. 'हा जो तह झाला त्यानें नाना व बापू याचे जीव थोडे दिवस भांड्यांत पडल्यासारखे झाले.' —V. S. २.१५६.–छच ८१. 'ज्या अँग्लोइंडियन वृत्तपत्रांनीं व गृहस्थांनीं मद्यपानबंदीविरुद्ध सारखा टाहो फोडला होता, त्यांचा जीव एकदाचा दारूच्या भांड्यांत पडला.' –केसरी २६–७–४०.

जीव मट्ट्यास येणें—मरगळणें; दमणें; थकणें; मेटाकुटीस येणें; अगदीं त्रासून जाणें.

जीव मुठींत धरणें––१ काळजीपूर्वक स्वतःचें संरक्षण करणें; जीवास जपणें; मोठ्या शर्थीनें प्राण वांचविणें. २ आत्मसंयमन करणें; कष्टानें मन आवरणें; स्वतःवर नियंत्रण घालणें.

जीव मोठा करणें; मोठा जीव करणें—१ जोराचा प्रयत्न करणें; नेटानें प्रयत्न करणें; धैर्यानें काम करणें; नेटानें करणें. २ उदार होणें; मन मोठें करणें; विशाल दृष्टि ठेवणें; मन संकुचित न करतां उदार बुद्धीनें पाहणें.

जीव येणें—उमेद येणें; उत्साह वाटणें. 'एक भाऊवांचून दुनिया दौलत व्यर्थ आहे. त्याचे हातचें पत्र पाहीन तेव्हां माझे बायकोस व मला जीव येईल.' –पु.द.भा. १ ले. ४००–१५.

जीव रखमेस (रकमेस) येणें—(कु.) कंटाळणें; दमणें; थकणें; मट्ट्यास येणें.

जीव राखणें—१ स्वतःचें संरक्षण करणें; जीव बचावणें. २ आळसानें काम करणें; पूर्ण शक्ति खर्च न करतां काम करणें; कसें बसें करणें.

जीव लावणें—माया लावणें; प्रेम संपादन करणें; लळा लावणें; मन आकर्षण करून घेणें.

जीव वारा पिणें—उदास भासणें; मन न रमणें; मनोवृत्ति बेफाम होणें; कोठेंहि मन भटकूं लागणें.

जीव सुकणें––अशक्त, व्याकूळ होणें: अतिशय श्रमांनीं थकून जाणें; घशास कोरड पडणें.

जीव सुचित नसणें––१ काळजींत असणें; हुरहुर वाटणें; मन अस्वस्थ असणें; बेचैन वाटणें. २ मन स्थिर नसणें; स्वस्थता न वाटणें.

जीव सोडणें––१ मरणें; मृत्यु पावणें. २ जीव धोक्यांत घालणें; प्राणाची पर्वा न करतां एखादी गोष्ट करणें; (एखाद्या कामीं) प्राणाहुति देणें. ३ अतिशय इच्छा दर्शविणें; उत्कंठा लागणें; जीव गुंतून राहणें. ४ आजारी मनुष्यावरून कोंबडें वगैरे ओंवाळून टाकणें; क्षुद्र देवतेस बलि वगैरे देणें.

एकजीव होऊन जाणें––एकत्र होणें; विलीन होणें; मिळून जाणें.

जिवा अगोचर–शक्तीच्या बाहेर; आटोक्याच्या पलीकडे.

जिवा आगळा—शक्तीबाहेर; प्राणापलीकडे; सामर्थ्यापलीकडे.

जिवाचा कलिजा–प्राणापेक्षांहि प्रिय; अत्यंत आवडता; जीव किं प्राण असा.

जिवाचा घात करणें––१ जिवापाड मेहनत करणें; अत्यंत कष्ट करणें; अतिशय श्रम, साहस करणें; जिवास अपाय होईल इतके श्रम करणें. २ अतिशय छळणें; जाचणें; गांजणें; जिवावर बेतेल इतका त्रास देणें; जीव जाईपर्यंत हाल करणें.

जिवाचा घोंट घेणें—१ अतिशय छळणें; जिवाचा घात करणें; मरेपर्यंत जाच करणें. २ प्राण घेणें; जीव घेणें; ठार मारणें.

जिवाचा धडा करणें—साहस करण्यास तयार होणें; मनाचा निश्चय करणें.

जिवाचा लोळ करणें—१ भयंकर त्रास देणें; छळ करणें. २ फार मेहनत घेणें; कष्ट करणें; अतिशय श्रम करणें.

जिवाचा सोबती—जन्माचा सोबती; जन्मभर संगति टिकेल असा पतीपत्नी इ. संबंध; एखादा कायमचा रोग, व्याधि वगैरे.

जिवाची कोयकोय करणें—अतिशय छळणें; गांजणें; कुत्र्याप्रमाणें ओरडावयास लावणें; अगदीं दीनवाणें करणें.

जिवा(वी)ची गोष्ट—१ अंतःकरणांतील गोष्ट; मनांतील हेतु; पोटांतील गुप्त गोष्ट. 'येरू सांगे जिवींची गोष्टी। त्यांची आवडी लागली पोटीं।'–भारा बाल २.१७.

जिवाची ग्वाही-पाखी देणें—खात्रीपूर्वक सांगणें; जिवाची शपथ घेऊन सांगणें; निश्चयपूर्वक बोलणें.

जिवाची जिंदगी पेटविणें––प्राणावर उदार होणें; शीरकमल हातांत घेऊन बाहेर पडणें.

जिवाची राळ–राळवण करणें––श्रम करून राळयाच्या काडीसारखें होणें; अतिशय कष्ट करून कृश होणें; फार मेहनतीनें वाळून जाणें; हाडें हाडें होणें.

जिवाची हुल्लड करणें––नेटाचा प्रयत्न करणें; अगदीं मनापासून सर्व शक्ती खर्च करून काम करणें.

जिवाचे चार चार करणें--थेर करणें; चाळे करणें; जिवाचे चोज पुरविणें; हवी तशी चैन करणें; वाटेल तसे भोग भोगणें; नाना तऱ्हेचे विलास करणें.

जिवाचें रान करणें--अतिशय कष्ट सोसणें; अगदीं हैराण होणें; फार परिश्रम करणें; जिवापाड मेहनत करणें. 'त्यावेळीं जिवाचें कितीहो रान करून घेतलें !'--उग्र २.३.

जिवाच्या गांठी बांधणें--१ ठसवून घेणें; पक्का बिंबविणें; पूर्णपणें ध्यानांत राहील असें करणें; मनावर पक्का ठसा उमटविणें. 'तरी हा अर्थू जिवाचिया गांठी। कां न बांधावा।'

जिवांत जीव आहे तोंपर्यंत—जिवंत असेपर्यंत; जन्मभर; तहह्यात. 'माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी तुला सोडून चार दिवस देखील रहाणार नाहीं.'—पकोधे.

जिवांत जीव घालणें—१ उत्तेजन देणें; सांत्वन करणें; धैर्य देणें. २ आपलें व दुसऱ्याचें मन एक करणें; एकजीव होणें; मनें मिळविणें.

जिवांत जीव नसणें—अतिशय अनिश्चित स्थितींत, काळजींत असणें; हुरहुर लागणें; बेचैन असणें; अस्वस्थ होणें. 'आबासाहेबांच्या जिवांत जीव नव्हता.'—विवि ८.९.१७०.

जिवांत जीव येणें—पुन्हां धीर येणें; मन थाऱ्यावर असणें.

जिवानिशीं—जिवासुद्धां; शीरसलामत; जिवंत राहून; कसाबसा जीव बचावून; प्राण वांचवून.

जिवानिशीं जाणें—मरणें; मृत्यु पावणें; जीव जाणें.

जिवाभावाची सोबतीण—अतिशय प्रेम, माया असणारी मैत्रीण. 'आमची सिंधूताई म्हणजे तिची जिवाभावाची सोबतीण.'—एकच प्याला १.३.

जिवाला करवत लागणें—अतिशय चिंता लागणें; काळजी लागणें; अंतःकरणास घोर लागणें; हुरहुर लागणें; रुखरुख लागणें.

जिवाला कांहींतरी करून घेणें—आत्महत्या करणें; प्राणावर उदार होणें; जीव देणें.

जिवाला खाणें—मनाला लागणें; झुरणें; हुरहुर लागणें.

जिवाला जीव देणें—अटोकाट मदत करणें; अतिशय स्नेह, प्रेम ठेवणें. 'फार झालं तर तुमच्या जिवाला जीव देऊं एवढंच !'—एकच प्याला ३.४.

दुसऱ्याच्या जिवावर आपलें पोट भरणें—दुसऱ्यावर अवलंबून उदरनिर्वाह करणें; दुसऱ्याच्या आश्रयानें राहणें; दुसऱ्याचे मिंधे असणें.

जिवावर उठणें—१ जीव घ्यावयास तयार होणें; नाश करूं पाहणें; ठार मारूं पाहणें; खून करण्यास जाणें.

जिवावर उड्या मारणें--दुसऱ्याच्या पैशावर, मदतीवर चैन, बढाई मारणें; दुसऱ्यावर अवलंबून असणें; दुसऱ्याच्या पराक्रमाची वगैरे प्रौढी मारणें. 'पण कुलक्षयाच्या भीतीनें जिवाचा धडा तरी मला केला पाहिजे.'—गुप्तमंजूष.

जिवावर उदार—जिवाची पर्वा न करणारा; हातांत शीर घेतलेला; प्राण देण्यास तयार असलेला; प्राण धोक्यांत घालण्यास तयार असलेला; मरणास सिद्ध असलेला. 'जिवावर उदार तो लाखाशीं झुंजार.'

जिवावर-जिवावरता धरणें—उत्कंठा लागणें; उत्सुक होणें; अधीर होणें.

जिवावर द्वारका करणें—एखाद्याच्या आधारावर, आश्रयावर चैन करणें; दुसऱ्याच्या जोरावर बढाई प्रौढी मारणें; भलत्याच्या पैशानें चैन करणें. 'तुमच्या जिवावर एवढी द्वारका, केलें घरदार दोमजलीं।'—पला ८५.

जिवावर बेतणें-येणें; जिवाशीं गांठ पडणें—१ जीव धोक्यांत येणें; प्राणावर गुजरणें; प्राण जाण्याचा प्रसंग येणें; मृत्यूच्या जवळ्यांत जाणें. २ दुष्कर वाटणें; अतिशय कष्टसाध्य असणें; प्राणावर संकट येईल इतकें कठिण असणें. ३ चिडणें; रागावणें; नाराज होणें; नाखुश होणें.

जिवावर लाल—दुसऱ्याच्या मदतीवर चैन करणारा; दुसऱ्याच्या धनावर उदार; भलत्याच्या द्रव्यावर भोग भोगणारा.

जिवावरचा खेळ करणें—तात्काल जीव धोक्यांत घालणें; जीव न बचावतां काम पार पाडणें. 'जिवावरचा खेळ करणें. आजचे उद्यावर कार्यास नये.'—पुरंदरे दप्तर १.२१.

जिवावरचा ताप-ज्वर-रोग--दुखणें—प्राणघातक ताप; जीव जाण्याचा संभव असलेला आजार; प्राणांतिक दुखणें.

जिवावरचा लाग-पाळी-गोष्ट-प्रसंग-खेळ-काम-जिवास धोका असणारा लाग वगैरे; प्राणावरचें संकट, धोका. वगैरे; अगदीं जिवाशीं बेतेल अशी गोष्ट.

जिवावरचें अधण उतरणें—कठिण प्रसंगांतून बचावणें; एकदाचा जीव खालीं पडणें; हायसें वाटणें; प्राणसंकटांतून बचावणें.

जिवाशीं-जिवीं धरणें-बांधणें--अतिशय प्रीति करणें; जीव किं प्राण करणें, प्राणासमान मानणें. 'काय हणें न धरावें अधनत्वें भूपजनवरा जीवीं।'—मोवन १३.१९.

जिवास कटार असणें—सारखी चिंता लागलेली असणें; रुखरुख वाटणें. जिवास करवत असणें पहा.

जिवास खाणें--जिवाला खाणें पहा. एखादी गोष्ट नेहमीं मनांत घोळून झुरणें; मनाला लागणें.

जिवास जहानगिरी करणें-होणें--जिवावर मोठें संकट येणें; जीव धोक्यांत पडणें; प्राणावर बेतणें; अतिशय मोठा धोका होणें.

जिवास जीव देणें—अतिशय प्रेम करणें; जीव की प्राण करणें; फार ममता करणें; स्वतःच्या जिवाप्रमाणें सांभाळणें, जपणें.

जिवास मुकणें--मरणें; मृत्यु पावणें; अंत होणें; प्राणार्पण करणें; प्राण सोडणें.

जिवीं धरणें-बांधणें--१ प्रिय मानणें. 'काय इणें न धरावें अधनत्वें भूपजनवरा जीवीं ।'–मोवन १३.१९. २ बाणाविणें; पक्कें ठसविणें.'मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें।'–राम

जिवीं लागणें--१आवडीचा असणें; प्रिय वाटणें; आवडणें. २ मर्मभेद होणें; मर्माघात होणें; मनास झोंबणें.

जिवें धुस जाणें—धस्स होणें; धास्ती वाटणें; घाबरणें; मनास धक्का बसणें. 'तुमतें एतां देखिलें । तेंचि माझां जीवें धुस गेलें ।'–शिशु १२५.

जिवें बांचणें—जिवावरचें संकट टळणें; प्राण बचावणें; सहीसलामत सुटणें. 'आणि आम्हां येथें राखियलें देवें । नाहीं तरी जिवें न वांचतों ॥'

❀ **जीवु आसल्यारि भीक मागुनु खावये**—(गो.) जीव जगवणें हें मुख्य. तो जगला तर भीक मागून तरी पोट भरतां येईल.

जीवु गोडु की गोड गोड; गोडाकइ जीवु गोडु—(गो.) इतर कोणत्याहि वस्तूपेक्षां जीव हा सर्वांना प्यारा असतो.

जीव जाईना म्हणून हातपाय खोडतो--स्वस्थ बसवत नाहीं म्हणून कांहींतरी धडपड करतो. जीव वचूना पहा.

जीव जावो पण जिलबी खावो—परिणाम वाटेल तो झाला तरी चालेल, पण हट्टी व अविचारी लोक क्षणभर देखील आपली वागणूक बदलीत नाहींत.

जीवतोड लेखणी, त्याची गांवगाडे वाचणी—१ जें लिखाण अंतःकरणापासून असतें तें सर्वत्र वाचलें जातें २ जो अतिशय लिहितो तो उत्तम वाचतो.

जीव द्यावा त्यापेक्षां जितरब गेलें तरि उत्तम—आपल्या जिवापेक्षां प्राणी, जनावरें कांहीं अधिक नाहींत. तेव्हां त्यांना प्रथम पुढें करणें उत्तम. मनुष्यांची हानि वांचविण्याकरितां घोडीं वगैरे गेलीं तरी जाऊं द्यावी. 'जीव द्यावा त्यापेक्षां जितरब गेलें तरि उत्तम. म्हणोन घोडीं सोडिलीं.' –भाव ७२.

ज्याचा त्याला जीव प्यारा—प्रत्येकाला आपला जीव आवडता असतो. कोणीहि विनाकारण दुसऱ्याकरितां प्राण द्यावयास तयार होत नाहीं. कोणीहि आपला जीव धोक्यांत घालावयास सहसा पुढें येत नाहीं.

जीव मरणाच्या चेष्टा, करतांना पावे अपेष्टा—ज्या गोष्टीमध्यें जिवावर बेतण्याचा संभव आहे अशा गोष्टी अंगावर घेतल्या असतां संकट येण्याचा संभव असतो. प्राणघातक गोष्टीशीं संबंध ठेवल्यास जिवास धोका येण्याचा संभव असतो. ज्या कृत्यांत प्राणास धोका येण्याचा संभव आहे अशीं कृत्यें केल्यास मरण येण्याची भीति असते.

जीव वचूना हातपाय धॉडायता-वडैता—(गो.) जीव जात नाहीं म्हणून हात पाय आपटतो, झाडतो आहे. एखाद्या कामांत यश मिळणें कठीण हें ठाऊक असूनहि पोटासाठीं कांहींतरी करीत राहाणें भाग आहे, अशा समजुतीनें धडपड करणाऱ्या माणसाला उद्देशून म्हणतात.

जिवा ठाईं जीव नसतो, प्रीत लागते तेथें असतो--जीव देहांत जिवाच्या जागीं नसतो, तर ज्यावर आपलें प्रेम असतें त्याच्या ठिकाणीं गुंतून राहतो. प्राण आपल्या देहांत खरोखर नसतो, तर जी वस्तु आपल्याला अत्यंत प्रिय तिच्यामध्यें गुंतलेला असतो.

जिवा सुख आणि पॉटा भूक--(गो.) पोटांत भुकेचा डोंबाळा उसळला असतां इतर सुखें तुच्छ वाटतात.

जिवाक शिवाक गांटि—(गो.) परस्परांवर प्रेम करणाऱ्या दोन व्यक्ति एकत्र येणें.

जिवाची केली लाही, त्याचें तुला कांहीं नाहीं--एखाद्या मनुष्यानें दुसऱ्याकरितां जीव तोडून श्रम करावे पण त्याला त्याची पर्वा नसावी, अशा वेळीं म्हणतात. पुढें पहा.

जिवानशी मरतल्याक कॅशीं सोडलो—(गो.) जीवच घ्यावयाचा पण केंसावर भागविले. तु०---जिवावरचें शेंपटावर गेलें.

शेळी जाते जिवानिशीं आणि खाणार म्हणतो वातट—एखाद्या मनुष्यानें खूप जीव तोडून एखादी गोष्ट दुसऱ्याला संतोष देण्याकरितां करावी पण त्याबद्दल त्याला

कांहींच वाटूं नये, अशा स्थितींत ही म्हण वापरतात. एका पाहुण्याला संतुष्ट करण्याकरितां एकानें आपली शेळी मारून त्यास मेजवानी केली, पण त्या पाहुण्यास ती आवडण्याच्या ऐवजीं त्यानें त्या पदार्थास वातड म्हणून नांवें ठेवलीं. यावरून केलेल्या गोष्टीबद्दल बिलकूल कृतज्ञता न वाटणें असा अर्थ होतो.

जिवावर उदार तो लाखाशीं झुंझार—जो मनुष्य जिवावर उदार होतो म्हणजे प्राणाचीहि पर्वा करीत नाहीं, तो लाख मनुष्यांशींहि लढण्यास मागेंपुढें पाहात नाहीं. जो मनुष्य प्राणाची तमा धरीत नाहीं तो वाटेल तें साहस करण्यास तयार होतो.

जिवावरचें शेंपटावर गेलें—अगदीं जीव जाण्यापर्यंत पाळी आली होती पण थोड्याशा नुकसानीनें निभावलें.

जीविं आइलें केशिं गेलें—(गो.) जिवावर आलें होतें तें केंसावर निभावलें. जिवावरचें शेंपटावर गेलें.

जिवँ मारतात् त्या गांवा नागौन सोड्ल्यार आनि विचार्ता?—(गो.) ज्या गांवीं जिवानिशीं मारतात त्या गांवीं नुसतें द्रव्य लुबाडून सोडून दिलें तर तेच उपकार समजले पाहिजेत.

जीवो जीवस्य घातकः।—एक प्राणी दुसऱ्या प्राण्याचा नाश करीत असतो. निरनिराळे प्राणि हेच दुसऱ्या अनेक प्राण्यांस मारून निर्वाह करतात.

जीवो जीवस्य जीवनम्।—जगामध्यें एक प्राणि दुसऱ्याला खातो, दुसरा तिसऱ्याला खातो असा व्यवहार सर्वत्र चालला आहे. मोठा प्राणि लहान प्राण्यास खातो, त्याला त्यापेक्षां मोठा प्राणि खातो. याप्रमाणेंच एक दुसऱ्यास लुबाडतो, तिसरा त्यास लुबाडतो, याप्रमाणें एकमेकांवर मात करीत जगांत लोकांचा व्यवहार चालत असतो.

जीवन——जीवन घालणें—जगविणें; आयुष्य देणें; पोषण करणें.

***जीवन यात्रेच्या शर्यती, जिंकणाराच्या करामती**—या आयुष्यामध्यें जो शेवटपर्यंत नीटपणें गेला त्यानें ही आयुष्याची शर्यत जिंकली असें म्हणतां येईल व यांतच त्याचें कौशल्य दिसून येतें.

जीवन हें ईश्वरी देणें, मरण हें घेणें—मनुष्याचें आयुष्य ही एक ईश्वराची देणगी आहे. त्याचें जीवन, जगणें हें ईश्वराचें घेतलेलें कर्ज असून, योग्य वेळीं ईश्वर आपलें कर्ज परत घेतो, म्हणजे मनुष्याच्या आयुष्याचा अंत होतो. To live is a gift, die is a debt.—सवि ३७८३. तु०—मरणं प्रकृतिः शरीरिणाम्।

जीवित——जीविताची सीमा थोडी, पण त्यांत आहे गोडी—मानवाचें आयुष्य हें जरी अल्प असलें, तरी तें फार सुखकर गोष्टींनीं भरलेलें आहे. त्यामुळें तें आपणांस प्रिय वाटतें. Life is short yet sweet.

जुतें——जुतीं-तें पैजार उडणें-होणें—जोडाजोडी; खेटराखेटरीं; जोड्यांनीं परस्पर मारामारी होणें; जोड्यांनीं एकमेकांस मारण्यापर्यंत भांडणाचा परिणाम होणें. 'सख्ख्या भावांत देखील जुतेपैजार होते.'—आगर ३.१८४.

जुना——जुना ठक अज्ञानी नसतो—जो मनुष्य अनेक दिवस दुसऱ्यांना फसविण्याचा धंदा करतो तो त्या विद्येंत पक्का तरबेज झालेला निढावलेला असतो; तो कांहीं अडाणी राहत नाहीं.

जुना मित्र आला घरीं, थाटाची श्रीखंडपुरी—आपला एखादा फार दिवसांनीं भेटलेला जुना मित्र घरीं आला तर त्याचें आपण विशेष आदरातिथ्य करतों. तितकें रोज भेटणाऱ्यांचें करीत नाहीं.

जुना स्वयंपाकी आळशी, नवा कामकरी शरमेशी—बरेच दिवस आपणाकडे चाकरीस असलेला इसम वरघटलेला असल्यामुळें आपल्या कामांत विशेष तत्पर नसतो, तो थोडाफार ढिला बनतो. परंतु नवीन ठेवलेल्या चाकरास रिकामें बसण्याची शरम वाटते, म्हणून तो आपण कामांत गढलों आहों असें तरी दाखविण्याचा प्रयत्न करतो. तु०—नव्याचे नऊ दिवस. Salt cooks bear blame, but fresh bear shame.—सवि २९६१.

जुने गेले, नवे आले—जुन्या गोष्टी क्रमाक्रमानें नाहींशा होऊन त्यांची जागा नवीन नवीन गोष्टींनीं घेणें हा सृष्टिक्रमच आहे. —गांगा २०२. तु०—Old order changeth yielding place to new.

जुने डोळे आणि नवे चाळे—जुन्या पद्धतींत वाढलेल्या मनुष्यांस नवीन नवीन प्रचारांत येणाऱ्या रीती पाहून फार चमत्कारिक वाटतें व त्याला त्या आवडत नाहींत. सनातनी व नवमतवादी यांच्या दृष्टिकोनांत फार मोठा फरक असतो. (गु.) जुन्नी आंख्यो, ने नवा तमाशा.

जुनें तें जुनें, म्हणून सोनें—पुढची म्हण पहा. 'वेद

आम्हीं आजवर किती परिश्रमानें कसे टिकवले याचें सविस्तर वर्णन मी करीत बसत नाहीं. तें सर्वांना माहीत आहे. जुनें तें जुनें ह्मणून सोनें ही म्हण वेदांनाहि लागू पडेल. जुन्याविषयीं ही महत्त्वबुद्धि असल्यामुळें, नवें त्या मानानें सहजच क्षुद्र व हीन वाटतें.' –केसरी २५–१०–४०.

जुनें तें सोनें—सर्व जुन्या वस्तू चांगल्या टिकाऊ व उपयुक्त असतात अशी एक समजूत आहे ती या म्हणीनें व्यक्त होते. तु०–Old is Gold. Old fish, old oil and an old friend are the best.

जुनें तें सोनें व नवें तें रत्नाचें लेणें—जुन्या गोष्टी तर चांगल्या असतातच, पण नवीन त्यापेक्षांहि सुंदर असतात. नव्या जुन्यांची यांत सांगड घातलेली दिसून येते. तु०–पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमित्यवद्यम् । –कालिदास.

जुनें सोडूं (मोडूं) नये, नवें धरूं (करूं) नये—आपली जी जुनी परंपरा अथवा चालरीत असेल, ती सोडूं नये व नवीन पद्धतीचा अंगीकार करूं नये. कारण जुन्या गोष्टी अनुभवानें चांगल्या ठरलेल्या असतात, तशा नव्या नसतात. शाहूनें मरतांना नानासाहेब पेशव्यास जी पुढील कर्तव्याची दिशा दाखविणारी आज्ञा लिहून ठेवली होती ती –'जुनें मोडूं नये नवें करूं नये' अशी होती.

जुनें हाड तें जुनेंच—म्हातारीं माणसें फार कणखर असतात.

जुने हिशोब काढणें, नवे तंटे उपस्थित करणें—जुने हिशोब शोधीत बसलें म्हणजे त्यांत कांहीं तरी कमीजास्ती आढळतें किंवा कोणाचें येणेंदेणें निघतें. पण तें फार जुनें असलें म्हणजे तें कोणी द्यावयास तयार होत नाहीं व तंट्यास मूळ होतें. याकरितां जुन्या गोष्टी उकरून काढूं नयेत.

जुन्या काळाची रहाटी, चालू काळीं न मानिती—जुन्या गोष्टी किंवा पद्धती नवीन कालांत कोणी मानित नाहींत. जुनी परंपरा हळूहळू जाऊन त्या ठिकाणीं नवीन नवीन रीतरिवाज उत्पन्न होतात. तु०–Old order changeth yielding place to new.

जुन्या किनखावाच्या गादीला ठिगळ्यांची गरदी—किनखाव हें एक उंची रेशमी कापड असतें. अशा कापडाची गादी जुनी झाली म्हणजे त्या रेशमी कापडाच्या लोभानें ती टाकून तर देववत नाहीं, पण तें कापड फाटूं लागलें म्हणजे त्यास ठिगळें देण्याचा प्रसंग येतो व तीं पुढें वारंवार द्यावीं लागतात पण तीं ठिगळें साध्या कापडाचीं दिल्यानें वाईट दिसूं लागतात. याकरितां नेहमीं अनुरूप अशा गोष्टींची योजना करावी. विजोड दिसणाऱ्या गोष्टी एकत्र आणूं नयेत व त्याकरितां जुन्याचा लोभ वाजवीपेक्षां जास्त धरूं नये. तें टाकून योग्य वेळीं नवें घ्यावें. तु०- शालजोडीला घोंगडीचें ठिगळ.

जुन्या माणसाचें लोणचें घालून ठेवीत असावें—जुनीं माणसें ही अनुभवी असल्यामुळें त्यांचा वेळेवर उपयोग होईल अशा बुद्धीनें त्यांना जपत असावें.

जुन्या मित्रासवें, क्रियानष्ट न व्हावें—जुन्या मित्रांशीं कृतघ्न होऊं नये. –सवि ५१२.

जुन्याला लाथा आणि नव्याच्या चरणीं माथा—कांहीं लोकांस सर्व जुन्या गोष्टींस नांवें ठेवण्याची व नवीन गोष्टींची स्तुति करण्याची संवय असते. अशा प्रवृत्तीची निदर्शक प्रस्तुत म्हण आहे. तु०–Worshipper of the rising sun.

जुन्याला शिव्या आणि नवीनाच्या ओंव्या—वरीलप्रमाणेंच.

जुनाट——जुनाट दुष्ट चांगला होत नाहीं—ज्या मनुष्याला दुष्टपणाची खोडी दीर्घ काल लागली असेल त्याची ती सुटत नाहीं.

जुन्नर——जुन्नरी हरहुन्नरी–जुन्नर शहरांतील लोकांची हुषारी व सोदेगिरी वर्णन करतांना वापरतात. जुन्नर शहर पूर्वीं व्यापाराकरितां फार प्रसिद्ध होतें. सर्व बंदरी माल नाणेघाटानें जुन्नरास येऊन देशावर जात असे व देशावरचा माल जुन्नराहून कोंकणांत जात असे. त्या काळांत जुन्नर येथील लोक व्यापारांत व इतर व्यवहारांत फार कुशल असत. अर्थात् इतर लोक त्यांच्याइतके चाणाक्ष नसल्यास ते व्यवहारांत जुन्नरी मनुष्यांकडून फसविले जात.

जुरत——जुरत मेहनत—धैर्याची कोशीस; मोठा पराक्रम; कष्टाचें व धाडसाचें काम. 'पूर्वीपासून जो कोणी जुरत मेहनत करीत आहे, त्यास मुलखास व खजान्यास व फौजेस कमी नाहीं.'–दिमरा १.३४.

जुलूम——जुलूम जबरदस्ती–१ जुलूम; जाच; त्रास. २ जबरदस्तीचा व्यवहार; करडा अंमल; जलाली.

जुलूम पादशाही—अमर्याद कृत्य; अतिशय जबरदस्ती; फार मोठा जुलूम; छळ, त्रास; मोठा कहर.

जुलूम बाजार—ठराविक वाराखेरीज अन्य दिवशीं भरावयास लावलेला बाजार; योग्यवेळीं नव्हे पण जुलमानें भरविलेला बाजार. पूर्वीं एखादा अधिकारी एखाद्या गांवीं

आला म्हणजे त्याच्या सोयीकरितां बाजारचा वार नसला तरी सक्तीनें बाजार भरवीत असत त्यास म्हणत. तसेंच एखादें शहर जिंकून शत्रूनें घेतलें म्हणजे नगरवासी लोक भीतीनें दुकानें बंद ठेवीत. तेव्हां लष्कराच्या सोयीकरितां सक्तीनें बाजार भरवीत त्यास म्हणत.

जुलूम करतां लोकांवर, बदला येतो माघारें—दुसऱ्यावर जुलूम केला असतां कधींतरी त्याचा आपणावर उलट परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. Oppressions are frequenty paid in their own coin. –सवि २६६५.

जुलूम चालतो तेथें शहाण्याचा वेडा होतो—ज्या ठिकाणीं जुलमी सत्ता असते त्या ठिकाणीं शहाण्या मनुष्याचीहि अक्कल गुंग होते. त्यालाहि कसें वागावें हें समजत नाहींसें होतें.

जुलूम पण गोड—कांहींकांहीं वेळां आपल्या मनाविरुद्ध एखादी गोष्ट असूनहि ती करतांना आपणांस उलट आनंदच होतो, अशा स्थितींत ही म्हण वापरतात. एकदां एका बाईनें चोरी केली. तेव्हां तिला शिक्षा म्हणून केळीं फेकून मारावें असें ठरलें. ही शिक्षा तिनें आनंदानें भोगली. कारण लोक केळीं फेंकत तीं ती झेली व खाई ! इष्टापत्ति.

जुलमाचा रामराम—अधिकाऱ्याला रामराम करावाच लागतो. पण चांगल्या अधिकाऱ्यांना आपण तो खुषीनें करतों व वाईटांना तो केलाच पाहिजे म्हणून नाखुषीनें करतों. निरुपायानें, नाखुषीनें, शिक्षेच्या धाकामुळेंच केलेली गोष्ट. 'आज या घराला रामराम ठोकण्यापेक्षां घटकाभर जुलमाचा रामराम पत्करला'.–भा ९०. आज त्याच्याकडून जुलमाचा रामराम घेऊन मी संतुष्ट व्हायला कबूल होतों, पण तेंही त्यानें केलें नाहीं !'–उग्र ३.४.

जुवा——जुवानी दिवानी—जुव्याचा नाद हा वेड लागण्यासारखा आहे.

जुवाबाजी रुपणीची पुळण, तेव्हांच गर्क करी मन–जुगाराचा नाद हा ज्याप्रमाणें भुसभुशीत वाळूची जमीन असते त्याप्रमाणें असतो. त्यांत ज्याप्रमाणें एखादा मनुष्य एकदां रुपूं लागला म्हणजे अधिक अधिक खोल जाऊं लागतो, त्याप्रमाणें जुगाराचा नाद मनुष्यास अधिक अधिक गुंतण्यास कारण होतो. Gaming, like a quick sand, may swallow a man in a moment.–सवि ११४४.

जुवाबाजी लोभाचें फळ, निराशेचें मूळ—जुगारामध्यें मनुष्यास द्रव्य मिळेल अशी आशा असते व प्रारंभीं केव्हां केव्हां लाभहि होतो, पण अखेरीस निराशा होते. Gaming is the child of avarice and father of despair.–सवि ११४३.

जुळा——जुळे सयामी भाऊ—शरीरें एकमेकांना कमरेशीं जोडलेलीं असें एक सयामी जुळें–चंग आणि एंग (१८१४-७४) कुप्रसिद्ध होतें. यावरून दोन अगदीं संलग्न गोष्टी. 'रस्ता व रेल ही जुळ्या सयामी भावांची जोडी आहे. त्यांचा समन्वय वाहतूक मंत्र्यांनीं करावा.'–केसरी १४-३-४१ पान ३. Siamese twins.

जे——जे अपघात होतात ते टाळतां येत नाहींत–अपघात ही अशीच गोष्ट आहे कीं, ती आकस्मिक घडून येते. तिच्याबद्दल पूर्वीं कांहीं तजवीज करून ठेवतां येत नाहीं, त्यामुळें ती टाळतांहि येत नाहीं. आणि म्हणूनच त्यास अपघात म्हणतात.

जें आपल्या मनीं, पावली आईभवानी—आपल्या मनांत असेल तेंच घडून आलें म्हणजे म्हणतात.

जे आरंभ शूर, तां गेलें ना मजल दूर—(गो.) जे आरंभशूर असतात त्यांची मजल दूर जाऊं शकत नाहीं. आरंभशूर पहा.

जें इच्छी परां, तें येई घरां–इच्छीपरा पहा.–पामो १६९.

जें कपाळांत तें भोगावें—नशीबीं असेल तें भोगल्याशिवाय चुकत नाहीं. 'आलिया भोगासी असावें सादर। देवावरी भार घालूनिया।'–तुगा ३६३९.

जे कां रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले॥——तोचि साधु ओळखावा। देव तेथेंचि जाणावा॥–तुगा २२१५. जो दुःखित मनुष्यास जवळ करतो त्यासच साधु म्हणून समजावें व त्यावर ईश्वराची कृपा आहे, नव्हे तो ईश्वरस्वरूपच आहे असें मानावें.

जे काई पण थाय, ते सारानेज वास्ते--(गु.) जी जी कोणती गोष्ट घडून येते ती आपला बऱ्याकरितांच असते.

जे खाय ते सवाद जाणे—(गु.) ज्याची रुचि त्याला. जो चाखून पाहील त्याला रुचि कळेल.

जे गुण बापाचे, ते गुण पोराचे—पित्याचेच गुण सामान्यतः पुत्रांत उतरतात. तु०–बाप तसा बेटा.

जे गुण बाळे, ते गुण लेंकुरवाळे—(व.) बाळपणीं मनुष्याच्या अंगीं जे गुण दृग्गोचर होतात तेच गुण तो पुढें लेंकुरवाळा झाला, त्याची पूर्ण वाढ झाली असतांनाहि कायम राहतात. त्याचा स्वभाव बदलत नाहीं. मनुष्य पुढें

कशाप्रकारचा निघेल हें लहानपणच्या त्याच्या लक्षणांवरून ताडतां येतें. Child is father to the man. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात.

जें चकाकतें तें सर्व सोनें नसतें—ज्या गोष्टी वरून चकाकित दिसतात त्या सर्व सोन्याच्याच केलेल्या असतात असें नाहीं. वस्तूचें जें स्वरूप वरून दिसतें तशीच ती आंतून असते असें समजूं नये. मनुष्याच्या बाह्य मुद्रेवरून किंवा स्वरूपावरून त्याचें अंतःकरण अजमावणें बरोबर होणार नाहीं. 'जें कांहीं सगळें चकाकित दिसे तें सर्व सोनें नसे ।' तु० -All that glitters is not gold.

जें जगाला नेटकें, तें स्वीकारावें कौतुकें—जें जगामध्यें चांगलें दिसेल, विसंगत दिसणार नाहीं त्याचा अंगीकार करणें, त्याप्रमाणें वागणें यास कांहीं हरकत नाहीं.

जे जाती देवा, ते सगळे नव्हेत बोवा—जे लोक देवदर्शनास जातात ते सर्वच कांहीं साधु नसतात. देवदर्शन घेणें हें एकच केवळ साधुत्वाचें लक्षण नव्हे व देवदर्शनास जाण्याच्या लोकांतहि अनेक लबाड लोक असण्याचा संभव असतो.

जे जाय जावा, ते पाछा नहि आवा—(गु.) जो एकदां जावा बेटास गेला तो कधीं परत येत नाहीं. गुजराथी लोक व्यापारासाठीं परदेशांत फार दूर प्राचीन काळापासून जात. यासंबंधींच पण समुद्रयाननिषेधाची वरील म्हण आहे. जावाची सफर फार धोक्याची असे,असेंवरीलम्हणीवरून दिसतें.

जें झालेंची नाहीं, तयाची वार्ता पुससि काई ॥—जी गोष्ट कधीं घडली नाहीं, तिची हकीकत विचारण्यांत अर्थ काय? " 'जें झालेंची नाहीं, तयाची वार्ता' लोकशक्तिकार खुशाल दडपूं देऊं शकतात."—केसरी १४-१०-४१.

जें दिसे, तें नासे—या जगामध्यें ज्या ज्या वस्तु दृष्टीस पडतात त्या सर्व नश्वर आहेत.

जें देखिलें डोळां, तोच खरा निर्बोळा—जें आपण आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहूं शकतो, त्याच गोष्टीबद्दल आपण खात्री देऊं शकतों.

जें देखिलें नाहीं रवीं, तें देखिलें कवीं; जें न देखे रवि, तें देखे कवि—ज्या गोष्टी सूर्यालाहि दिसत नाहींत त्या गोष्टी कवीला सहज दिसूं शकतात. कवि आपल्या कल्पनेनें ज्या गोष्टी कोणास कधीं दृष्टीस पडणार नाहींत त्यांचेंहि वर्णन सहज करूं शकतो. कवीची दृष्टि ही जणूं दिव्य दृष्टि असून त्यास कल्पनेनें या जगाच्या पलीकडच्या गोष्टीहि दिसूं शकतात, अशी समजूत आहे. दुसरा पाठ—जें न देखे रवि, तें देखे कवि. तु०—कवयः किं न पश्यंति ।

जे देवळांत जातात ते सर्वच साधु असूं शकत नाहींत—मागें 'जे जाती देवा०' पहा.

जें न कळे जेरबंदीं, ते कळे संबंधीं—(व.) जेरबंदानें बांधून ठेवून फटके मारून अगर नानाप्रकारें यातना देऊनहि जो स्वभावदोष मनुष्य उघडकीला येऊं देत नाहीं तो दोष संबंध अथवा सहवास घडल्याबरोबर व्यक्त होतो. 'अहो तो भोळा दिसतो पण मोठा छट आहे. मला त्याचा सहवास घडला आहे. मी त्याला चांगला ओळखतो. जे न कळे, जेरबंदी तें कळें संबंधीं.' याच्या उलट म्हण पुढें पहा.

जें न निघे संबंधीं, ते निघे जेरबंदीं—जी गोष्ट किंवा दोष जवळच्या माणसांना कळत नाहीं तीच गोष्ट चांगला मार दिला म्हणजे माणूस सांगून टाकतो. जवळच्या किंवा संबंधी माणसांना अशा माणसाच्या सर्वच गोष्टी कळत नसतात किंवा तोहि त्यांना सांगत नाहीं. पण त्या सर्व मारामुळें बाहेर येऊं शकतात. धाक दाखविल्याशिवाय बेरड मनुष्य खऱ्या व सर्व गोष्टींची कबूली देत नाहीं.

जें नाहीं टिळीं, त्याला कां द्यावें सुळीं—ज्याच्या प्रारब्धांत एखादी गोष्ट नाहीं, ती त्याच्या माथीं कशास मारावी, त्याबद्दल त्याला शिक्षा कां करावी? ज्याचा अपराध नाहीं त्याला दंड कशाकरितां करावयाचा!

जें नाहीं येत देतां, तें ना म्हणतां नसे चिंता—जी गोष्ट आपणाला देतां येणें शक्य नसेल ती साफ नाहीं देत म्हणून सांगावें. उगाच भलतीच गोष्ट देण्याचें पतकरून आपणावर आपत्ति ओढवून घेऊं नये. किंवा जी गोष्ट आपणाला परत देतां येणें शक्य नाहीं त्या गोष्टीचा आपण मुळींच स्वीकार करूं नये. आपणाला जर दुसऱ्याचे उपकार फेडण्याचें सामर्थ्य नसेल तर आपण ते उपकार करून घेऊं नये.

जें पिंडीं तें ब्रह्मांडीं—जी गोष्ट प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं आहे तीच सर्व जगांत दृष्टीस पडते. ब्रह्म हें सर्व विश्व व्यापून आहे व त्यामध्यें भेदाभेद नाहीं.तु०—आपणावरून जग ओळखावें. शितावरून भाताची परीक्षा.

जें पेराल तें पिकेल, जें लावाल तें फोफावेल—(व.) जें धान्य पेराल, ज्या प्रकारच्या झाडाचें बीज तुम्ही पेराल तेंच धान्य किंवा झाड जमीनींतून उगवेल. जवारी पेराल तर जवारीच निघेल. तसेंच ज्याचें बीजारोपण कराल

तें झाड यथाकालवर येऊन जोरानें वाढवयाचेंच, हा सृष्टीचा धर्मच आहे.

जें फार भुंकतें, तें चावरें नसतें--ज्या कुत्र्याला फार भुंकण्याची संवय असते तें सहसा चावत नाहीं. जो मनुष्य फार बडबड अथवा ओरड करतो त्याच्या हातून कांहीं एक होत नाहीं. तु०-A barking dog seldom bites.

जें फूल माळना, तें फूल हुंगना—(गो.) जें फूल डोक्यांत घालावयाचें नसतें तें हिंदुस्त्रिया हुंगीत नाहींत. दुसऱ्याच्या वाटेस न जावें. आपल्या कक्षेंत न येणाऱ्या गोष्टीकडे मुळींच न पाहाणें.

जे भीती मरणाला, ते जाती शरणाला--ज्यांना मरणाची भीति वाटते ते शत्रूस शरण जातात. जे पराक्रमी व शूर असतात ते कधीं मरणाला भीत नाहींत व म्हणून ते शरण जाण्यापेक्षां मरण पतकरतात, जे कार्यकर्ते असतात ते कधीं डगमगत नाहींत व हातचें कार्य विघ्नें आलीं तरी सोडीत नाहींत.

जें मनाचें समाधान, तेंच रत्नाचें निधान—कोणत्याहि गोष्टीबद्दल मनाला समाधान वाटणें, हें रत्नलाभासारखें आहे.

जे माणस एकलो पण सांचो हशे, तेना पक्षमां परमेश्वर छेज--(गु.) जो मनुष्य एकटा असूनहि सच्चा, प्रामाणिक असतो त्याचा साहायक परमेश्वर असतो. तु०-सत्याचा वाली परमेश्वर. खऱ्याचा पाठीराखा परमेश्वर.

जें सकाळीं करतां येईल तें संध्याकाळपर्यंत लांबवूं नका—कोणतेंहि काम करण्याचें कधीं दिरंगाईवर टाकूं नका. श्वः कार्यमद्य कुर्वीत पूर्वाण्हे चापराण्हिकम् । न हि प्रतीक्षते मृत्युः कृतमस्य न वा कृतम् ॥ –हितोपदेश.

जें सदाचरणास वांकडें, तें समाधानास वांकडें—जी गोष्ट सदाचरणाविरुद्ध असेल ती केल्यानें कधींहि समाधान मिळणार नाहीं.

जें सुख कार्यारंभीं, तेंच सुख उद्योगीं—एखाद्या कार्यास आरंभ करतांना जो मनास उत्साह वाटतो तोच उत्साह तें कार्य करीत असतांहि कायम ठेवावा.

जें होणार चुकेचि ना विधिबळें, बेटा रडो ना रडो ॥—वामन पंडित. होणार तें चुकत नसतें. "विनायकबोवांनीं पत्राबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली असती, तर तें पत्र तेथेंच मीं फाडून टाकलें असतें; व हें कठोर प्रकरण लिहिण्याचा प्रसंग मजवर आला नसता. पण 'जें होणार चुकेच ना विधिबळें, बेटा रडो ना रडो' हें विनायकबोवांचेच शब्दांत मलाहि म्हणण्याची पाळी आली. "–काशीचा संपूर्ण इतिहास, पान ७१.

जें होय सहजानें, तें न करी जुलमानें—जी गोष्ट सुलभपणानें दुसऱ्याची मर्जी नाखूष न करतां होण्यासारखी असेल ती बळजबरीनें दुसऱ्यास नाखूष करून सहसा करूं नये. तु०-गुळानें मरतो त्यास वीष कशास.

जेठा——जेठा मारून बसणें—१ गुडघे उभे करून बसून कमर व गुडघे यांच्यावर वस्त्र गुंडाळून बसणें. २ आळसानें बसणें; मांडी ठोकून स्वस्थ बसणें; कांहीं न करतां बसणें. ३ प्रतिष्ठितपणें बसणें.

जेटून बांधणें-धरणें—कसून, ताणून, आवळून बांधणें.

जेणें——जेणें कष्ट उदंड केले, त्याच्या घरा भाग्य आलें—जो श्रम करतो तो वैभवास चढतो.

जेथले——जेथले जोहरे खाल्ले असतील तेथें मुलगी पडेल--(व.) [जोहरे = जोंधळे] जेथें अन्नपाणी विधीनें नेमलेलें असेल त्याच घरीं मुलीला वर सांपडेल.

जेथें——जेथें अग्नीचा वास, तेथें धुराचा प्रकाश—ज्या ठिकाणीं विस्तव पेटतो त्या ठिकाणीं धूर उत्पन्न होतो. वास्तविक याच्या मुळाशीं असलेलें संस्कृत वचन याच्या उलट आहे. 'यत्र यत्र धूमस्तत्र तत्र वह्निः' ज्या ठिकाणीं धूर असतो त्या ठिकाणीं अग्नि असलाच पाहिजे. हा नैय्यायिकांचा अनुमान-प्रमाणानें एखादी गोष्ट सिद्ध करण्याचा मूळ सिद्धांत असून त्याचा उपयोग वरचेवर केलेला आढळतो.

जेथें अजमत, तेथें करामत—अजमत पहा. याच म्हणीवरून चुकीनें 'जमात तेथें करामत' अशी एक म्हण पडली आहे. जमात पहा.

जेथें अडचणी पडती, तेथें चतुराई धीर देती—ज्या ठिकाणीं अडचण उपस्थित होते त्याच ठिकाणीं चातुर्याचा उपयोग होऊन त्यापासून धीर प्राप्त होऊन त्या अडचणींतून मार्ग सांपडतो. When necessity pinches, boldness is prudence.–सवि ४१३२.

जेथें अति प्रीति चालती, तेथें फार दोष असती--ज्या मनुष्याचे फार लाड केले जातात त्याच्या ठिकाणीं दुर्गुण उत्पन्न होण्याचा संभव असतो. ज्या गोष्टीकडे आपण प्रेमानें अगर लाडानें कानाडोळा करतो ती गोष्ट बिघडण्याचा संभव असतो.

जेथें अत्तराचे दिवे लागले, तेथें झालें वाटोळें—अत्तराचा उपयोग दिव्यांत घालून जाळण्यकडे करणें हा अतिशय उधळपट्टीचा प्रकार आहे. अशा प्रकारची उधळपट्टी जेथें चालते तेथें लवकरच दिवाळें निघण्याची अगर दारिद्र येण्याची पाळी आल्यावांचून राहात नाहीं.

जेथें अधिक ज्ञान तेथें धर्म कमी—जो मनुष्य विशेष ज्ञान मिळवतो त्याच्या ठिकाणीं चिकित्सक बुद्धि जागृत होऊन त्याच्या मनांतील श्रद्धा हळूहळू कमी होते व धर्माचें अधिष्टान बहुतेक पारमार्थिक गोष्टी व त्यावर असलेली श्रद्धा यावर अवलंबून असल्यामुळें अशा मनुष्याचा धार्मिक आचाराविचारावरील विश्वास हळूहळु कमी कमी होत जातो व तो अश्रद्धावान् अथवा नास्तिक बनण्याकडे त्याचा कल होतो. More wisdom and less religion.-Itation.

जेथें आपलें धन, तेथें आपलें मन—ज्या ठिकाणीं आपलें द्रव्य ठेवलेलें असेल त्या जागेकडे आपलें सर्व लक्ष्य गुंतून गेलेलें असतें. पूर्वी जमीनीमध्यें द्रव्य पुरून ठेवण्याची चाल होती. कारण तें सुरक्षित ठेवण्याचे मार्ग त्यावेळीं फारसे नव्हते त्यामुळें ज्यानें एखाद्या ठिकाणीं द्रव्य पुरून ठेवलें असेल त्या जागेकडे त्याचें नेहमीं लक्ष्य जाणें साहजिकच असतें. त्याचप्रमाणें ज्या गोष्टींत आपणांस द्रव्य प्राप्ति होण्याचा संभव असतो त्या गोष्टींत आपलें लक्ष्य गुंततें, इतर गोष्टींकडे सहसा जात नाहीं.

जेथें आपलें मन रमतें तेंच सुंदर—जी गोष्ट आपणाला मनापासून आवडते ती आपणास सुंदर दिसते. तु०—प्रेम हें अंधळें आहे. गद्धीपर प्रीत जडी तो पद्मीन क्या इयाद है.

जेथें आशा नाहीं, तेथें यत्न व्यर्थ—जें काम फलप्रद होण्याचा मुळींच संभव नाहीं, त्या कामांत प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.–सवि ४१३४.

जेथें ईश्वर राहे, तेथें सर्व आहे—ज्या ठिकाणीं ईश्वराचें वास्तव्य आहे, जीं माणसें नेहमीं परमेश्वराचें स्मरण, चिंतन वगैरे करतात व परमेश्वरावर आपला भार टाकतात तेथें कोणत्याहि गोष्टीचें न्यून पडत नाहीं. त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. तु०–ज्या घरीं हरीचा कर आहे, त्या घरीं हरि चाकर आहे। ज्या घरीं हरीचा कर नाहीं, त्या घरीं हरि चाकर नाहीं ॥

जेथें उत्तम मध सांपडतो, तेथें उत्तम लोंकर सांपडते—मधाला जें वातावरण अनुकूल तेंच मेंढरांना अनुकूल असल्यामुळें उत्तम लोंकरहि मिळूं शकते.–ज्ञाको वि. १८, पान ६९.

जेथें उदासिन वृत्ति, तेथें देवाची वसती—जो मनुष्य ऐहिक गोष्टींविषयीं बेफिकीर असतो त्याच्या मनांत ईश्वराविषयीं श्रद्धा उत्पन्न होते व त्यामुळें परमेश्वर त्याची सर्व प्रकारें काळजी घेतो. अंगीं वैराग्य बाणल्याशिवाय परमेश्वर प्राप्ति होत नाहीं.

जेथें कायदे फार, तेथें दोष अनिवार—जितके जितके म्हणून खुलासेवार व बारीकसारीक गोष्टींबद्दल नियम केले जातात त्या मानानें त्यांतून पळवाटा काढणें सुलभ होत जातें व त्यामुळें कायद्याच्या बाबतींत जितकें खोलांत शिराव्यास जावें तों तों ते मोडण्याच्या युक्त्या वाढत जातात व अधिक गुन्हे घडत जातात.

जेथें कांहीं नाहीं, तेथें मिळत नाहीं—जेथें कांहीं उत्पन्नच होत नाहीं तेथें काय मिळणार ?

जेथें क्रोधाची चढती, तेथें बुद्धीची पडती—मनुष्याच्या मनांत जसजसें रागाचें प्राबल्य वाढत जातें तसतशी त्याची बुद्धि चालेनाशी होते. क्रोधात्भवति संमोहो संमोहात्स्मृतिविभ्रमः। स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥–गीता. Where passion in high, there reason is low. –सवि ४१३९.

जेथें खातो, तेथेंच हगतो—जेथें अन्न खावयाचें त्याच ठिकाणीं विष्टा करणें हें कृतघ्नपणाचें लक्षण आहे.

जेथें खीर खाल्ली, तेथें राख खावी काय ?—ज्या ठिकाणीं वैभवानें दिवस काढले त्या ठिकाणीं निकृष्ट स्थिति आली असतां म्हणतात. तु०- फुलें वेंचलीं तेथें गोंवऱ्या वेचणें.

जेथें गाय व्याली, तेथेंच खूर खांडावे—गाय पहा.

जेथें गांव तेथें म्हारवाडा—प्रत्येक गांवामध्यें ज्याप्रमाणें इतर जातींचीं घरें असतात तशीं महारांचीहि वसती असते. प्रत्येक ठिकाणीं आपणांस कांहीं चांगल्या गोष्टींबरोबर कांहीं वाईट गोष्टीहि आढळण्यांत येतात. जगामध्यें केवळ चांगलें असें कधीं नसतें. कांहीं गुणाबरोबरच कांहीं दोषहि प्रत्ययास येतात. गांव पहा.

जेथें गुण्यागोविंदाचें काम, तेथें वस्ती करी प्रेम—जीं माणसें परस्परांशीं गोडीगुलाबीनें वागतात, त्यांच्या ठिकाणीं परस्परांबद्दल प्रेम व आवड उत्पन्न होते.

जेथें जमल्या दोघी, तेथें झालीं उघीदुघी—(वांय.) दोघी बाया एकत्र आल्या कीं, भांडणें ठेवलेलींच.

जेथें जमात, तेथें करामत--जेथें अजमत० पहा. संघशक्तीचें बळ विशेष असतें. संहतिः कार्यसाधिका ।--बहूनामल्पसाराणां समवायो दुरत्ययः ।

जेथें जाय दुःखी, तेथें न होय सुखी--एखादा दुःखी मनुष्य कोठेंहि गेला तरी तो आपलें दुःख बरोबर घेऊन जातो, त्यामुळें त्याला कोठेंच सुख वाटत नाहीं. दुर्दैवी मनुष्य कोठेंहि गेला तरी त्याचें दुर्दैव त्यास सोडीत नाहीं. तु०--जहां जाय भूखा, तहां पडे सूखा.

जेथें जावें, तेथें डोईवर दिवस--कोठेंहि गेलें तरी सूर्य आकाशांतच दिसतो. मनुष्य कोठेंहि गेला तरी त्याला सृष्टिक्रम सर्वत्र सारखाच चाललेला आढळणार.

जेथें जावें, तेथें नांगरास फाळ--कोठेंहि गेलें तरी सामान्यतः सारखीच परिस्थिति आढळून येते. कोणत्याहि देशांत किंवा प्रांतांत पाहिलें तरी नांगराला फाळ लावावाच लागतो. फाळाशिवाय नांगरतां येईल अशी जमीन कोठेंच आढळत नाहीं.

जेथें दगड, तेथें धगड--ज्या ठिकाणीं नवरा दगडासारखा ठोंब्या असेल, तेथें धगडाचें म्हणजे जाराचें फावतें.

जेथें दांत आहेत तेथें चणे नाहींत व जेथें चणे आहेत तेथें दांत नाहींत--ज्यास खातां येतें, पचवतां येतें त्यास खावयास मिळत नाहीं व ज्यास भरपूर खावयास आहे त्यास खातां येत नाहीं व पचवितां येत नाहीं, अशी विपरीत परिस्थिति पुष्कळ ठिकाणीं आढळून येते. चणे पहा.

जेथें दुर्गुण वसतो, तेथें सूडहि असतो--जो मनुष्य दुर्गुणी असतो त्याला केव्हां ना केव्हां तरी त्याच्या दुर्गुणाचें प्रायश्चित्त मिळाल्यावांचून राहात नाहीं.

जेथें दृष्टि, तेथें वृष्टि--उदार मनुष्याच्या दृष्टीस दैन्य पडल्यास तो तें दूर करतो. याकरितां आपलीं दुःखें व अडचणी पुढें मांडल्याशिवाय त्या दूर होत नाहींत; त्या नजरेस आल्यास दूर होण्याचा संभव असतो.

जेथें दृष्टि, तेथें सृष्टि--मनुष्य जर डोळे उघडून पाहील तर त्याला अनेक चमत्कार दृष्टीस पडतील, जर त्यानें डोळे मिटून ठेवले किंवा त्याला नीट निरीक्षण करण्याची शक्ति नसली तर त्याला कांहींच दिसून येणार नाहीं.

जेथें द्वेषभाव तेथें थोरपणा नसतो--जो मनुष्य दुसऱ्याचा द्वेष करतो त्याचें मन थोर नसून हलक्या वृत्तीचें असतें. जे अंतःकरणाचे थोर आहेत ते कोणाचाहि द्वेष, मत्सर वगैरे करीत नाहींत.

जेथें धनिकाचा सत्कार, तेथें सुजनाचा थोडा आदर--जे लोक केवळ धनालाच भाळलेले असतात ते श्रीमंतांचा तेवढा मान ठेवतात. त्यांस सज्जनांची किंमत कळत नाहीं, म्हणून ते सज्जनांचा आदर करीत नाहींत.

जेथें धर्म, तेथें जय--जी गोष्ट न्यायनीतीस अनुसरून असेल तिचा शेवटीं विजय होतो. तु०--यतो धर्मस्ततो जयः ।

जेथें धान्याचा अभाव, तेथें खाणाराचा प्रभाव व जेथें धान्याचा भाव, तेथें खाणारांचा अभाव--ज्या ठिकाणीं खावयास घालण्यास अडचण असते अशा ठिकाणीं मुलेंबाळें वगैरे कुटुंबाच्या माणसांची गर्दी असते. उलट जेथें खाण्यापिण्यास भरपूर आहे अशा ठिकाणीं घरांत माणसांच्या, मुलाबाळांच्या नांवानें शुकशुकाट असतो. गरीब लोकांस मुलें फार होतात व श्रीमंत लोकांस कमी होतात. तु०--दांत आहेत तेथें चणे नाहींत, चणे आहेत तेथें दांत नाहींत.

जेथें नख नको, तेथें कुऱ्हाड (लावणें) कशाला--जी गोष्ट अगदीं सुलभतेनें, हळुवारपणानें करतां येण्यासारखी असते तेथें कठीण उपाय योजण्याचें मुळींच कारण नाहीं. तु०--गुळानें मरतो तेथें विष कशास.

जेथें नखानें काम होतें तेथें कुऱ्हाड (कशास) येते ?--वर पहा.

जेथें नाहीं दाणा, तेथें लेंकरांचा भरणा--जेथें धान्याचा अभाव० पहा.

जेथें नाहीं वस्ती, तेथें घुबड घाली भस्ती--ओसाड घरांत घुबड वसती करतें. ज्या घरांत एकटी स्त्रीच राहात आहे, तेथें ती आपल्या मनास वाटेल तसें वर्तन करते.

जेथें पाऊल टाकण्याला देवदूत भितात, तेथें संचार करण्याला मूर्खांला कांहींच वाटत नाहीं--शहाणे मनुष्य ज्या बाबतींत बोलण्यास भितात व स्तब्ध राहतात, त्या बाबतींत मूर्ख मनुष्य बेधडक वटवट करूं लागतो. "उदारमतवादी म्हणविणारा लिबरल मोर्ले हा ज्या गोष्टीला इतका प्रतिकूल, तीच गोष्ट अलीकडचे कॉन्झरव्हेटिव्ह म्हणविणारे मुत्सद्दी करूं म्हणतात. पण खरेंच आहे, 'जेथें पाऊल टाकण्याला देवदूत भितात तेथें संचार करण्याला मूर्खांला कांहींच वाटत नाहीं !' अशी म्हण आहेच ना. आणि या मताचे चर्चिल उद्यां युद्ध संपल्यावर म्हणे आम्हांला डो. स्टे. देणार." --केसरी १७-९-४०. Fools rush in where angels fear to tread. अत्युच्चैर्भवति लघीयसां हि धाष्टर्यम् । --शिशुपालवध.

जेथें पापाचा संभव, तेथें पुण्याचा अभाव--ज्या मनुष्याची पाप करण्याकडे प्रवृत्ति असते त्याच्या हातून पुण्यकृत्य होत नाहीं. किंवा ज्या मनुष्याचा जन्मच पापमय अथवा अनीतिमय व्यवहारापासून झालेला असतो, त्याची प्रवृत्ति पुण्यकृत्याकडे होत नाहीं.

जेथें पाय टाकण्याला देवदूत भितात, तेथें सैतानाचे दूत बेलाशक आंत घुसतात--वर 'जेथें पाऊल टाकणाऱ्याला०' पहा. "'जेथें पाय टाकण्याला देवदूत भितात तेथें सैतानाचे दूत बेलाशक आंत घुसतात,' या म्हणीप्रमाणें शंकरराव देवांनीं सोडून दिलेला वाद पुढें चालवावयाला 'नवयुगांतले' बृहस्पति पुढें आले आणि त्यांनीं ताळतंत्र सोडून केसरीकारांना शिव्यांची लाखोली वाहिली."-केसरी ८-११-४०.

जेथें पाया नाहीं खोल, तेथें उंच बांधणी फोल--ज्या घराचा पाया चांगला खोल व भक्कम घेतला नसेल तेथें उंच मजले उठवून कांहीं उपयोग नाहीं. ते ढासळण्याचा संभव असणार.

जेथें प्रतिष्ठा मिळवावी, तेथें अप्रतिष्ठा न करून घ्यावी--ज्या ठिकाणीं आपण मोठ्या मान्यतेनें दिवस काढले असतील त्या ठिकाणीं मानहानि करून घेण्याचा प्रसंग येऊं देऊं नये. तु०-फुलें वेंचलीं तेथें गोवऱ्या वेचणें.

जेथें प्रीति, तेथें भीति--प्रेमाच्या माणसाबद्दल फार काळजी वाटत असते व त्याला कांहीं होईल काय, झालें काय, वगैरे शंका त्याच्या गैरहजिरींत मनांत येत असतात. तु०-अतिस्नेहः पापशंकी ।

जेथें प्रीति थोडी, तेथें बहूत खोडी--जी गोष्ट आपणाला आवडत नाहीं तिला आपण अनेक नांवें ठेवतों. तु०-नावडतीचें मीठ अळणी. Faults are thick where love is thin.

जेथें फार खाणें, तेथें फार दुखणें--बाजवीपेक्षां जास्त खाल्लें असतां योग्य तऱ्हेनें पचन न होऊन रोग होण्याचा संभव असतो. तु०-अजीर्णे भोजनं विषम् ।-सुर १६२.४२३.

जेथें फार देती, तेथें फार इच्छिती--मनुष्याची हांव ज्या जागीं जों जों अधिक मिळतें तों तों वाढत जाते. न देणाऱ्याकडे कोणी अपेक्षा ठेवीत नाहींत व देणाऱ्यालाच जास्त त्रास देतात.

जेथें फार पुंजी, तेथें फार काळजी--ज्या मनुष्याजवळ संपत्ति असते त्याला तिच्या रक्षणाची नेहमी काळजी वाटत असते.

जेथें फिरे केरसुणी, तेथें वावरे लक्ष्मी--जेथें नेहमीं घरधन्याचा हात फिरत असतो तेथें सर्व व्यवस्था उत्तम ठेवली जाते. कोठें केरकचरा, घाण राहणार नाहीं अशी जेथें काळजी घेतली जाते त्या घरांत संपत्ति खेळते.

जेथें फुलें विकलीं तेथें कां गोवऱ्या विकायच्या; जेथें फुलें वेंचलीं तेथें शेण्या वेंचण्याची वेळ येणें; जेथें मोहरा वेंचल्या तेथें गोवऱ्या लावण्याची वेळ येणें--मागें पहा.

जेथें बसें जांभूळवाही, तेथें तन उठूं न पाही--जेथें शेतकरी शेतांत कष्ट करीत असतो तेथें तण वाढत नाहीं.

जेथें बाव, तेथें तान्हेल्यांची धांव--विहीर असेल तेथेंच पाणी पिण्यास तान्हेला जाणार. त्याप्रमाणें ज्या ठिकाणीं प्राप्तीची आशा आहे अशाच ठिकाणीं गरजू माणूस जात असतो. तु०-मुंगीचिया घरा कोण जाय मूळ । देखोनियां गूळ धांव घाली ॥-तुका २४४०.

जेथें बुद्धि, तेथें शांति--जो मनुष्य बुद्धिवान् असतो तो शांत असतो; तो कोणत्याहि गोष्टींत उतावळेपणा अगर गडबड, घोंटाळा करीत नाहीं. सर्व गोष्टी नीट शांतपणें, पूर्ण विचार करून करतो.

जेथें बुद्धीचें बळ, तेथें इच्छा नमून राहे-जो मनुष्य बुद्धिवान् असतो तो भलत्याच आकांक्षा बाळगीत नाहीं. तो आपल्या शक्तीप्रमाणेंच फळाची अपेक्षा करतो व त्यामुळें त्याच्या ज्या योग्य इच्छा असतात त्या तृप्त होतात व त्याला कधीं निराशा होण्याची पाळी येत नाहीं. When reason rules, appetite obeys.

जेथें भरला (भरे) डेरा, तोच गांव बरा--ज्या ठिकाणीं खाण्यास मिळतें तेंच घर लहान मुलास आवडतें; आपल्या घरींहि मग तो वेळेवर येत नाहीं. अशा वेळीं त्याला उद्देशून म्हणतात. ज्या ठिकाणीं आपला रोजगारधंदा चालून पोटापाण्याला मिळेल तोच गांव चांगला मानला पाहिजे. एरवीं फार मोठ्या सुंदर शहरांत राहून जर उपाशी राहण्याची पाळी आली, तर त्या गांवच्या सौंदर्यास किंवा मोठेपणास घेऊन काय करावयाचें.

जेथें भाव, तेथें देव--ज्या मनुष्याची भक्ति अथवा श्रद्धा ज्या ठिकाणीं बसेल त्या ठिकाणीं त्याला देवाचें वास्तव्य

प्रतीत होईल. जेथें श्रद्धा नाहीं तेथें परमेश्वरप्राप्ति होणें शक्य नाहीं. तु०—भावेन देवं कलया नरेन्द्रं।

जेथें मनुष्य तेथें द्रव्य, द्रव्य तेथें लक्ष्मी, लक्ष्मी तेथें परमानंद—माणसें द्रव्य आणतात व द्रव्य असल्यास देशांत सुखसमृद्धि आणि आनंद हीं नांदू शकतात.—शिवदि १२०.

जेथें मिळत नाहीं, तेथें मागून फळ नाहीं—ज्या ठिकाणीं आपणास फल प्राप्ति होण्याची आशा नाहीं तेथें विनाकारण तोंड वेंगाडण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

जेथें मिळाल्या दोघी तिघी, तेथें निघे उगी दुगी—दोन तीन स्त्रिया एका ठिकाणीं भेटल्या कीं लागलीच त्यांचा हेवादावा रिकाम्या पंचायती सुरू झाल्याच म्हणून समजावें. स्त्रिया एकत्र आल्या कीं कलहास सुरवात होते. व गांवांतील इतर स्त्रियांच्याहि कुचाळ्या करूं लागतात.

जेथें मुडदे, तेथें गिधाडें—ज्या ठिकाणीं प्रेतें टाकतात तेथें गिधाडें जमा होतात. जेथें खावयास मिळेल तेथें आयतखाऊंचा घोळका जमतो. तु०—असतील शितें तर मिळतील भुतें.

जेथें मुत्सद्दीपणा हरतो, तेथें सेनापतीचें कार्य सुरू होतें—सामदामादिकांनीं कार्य होत नसलें म्हणजे दंडाची योजना करावी लागते व युद्धास आरंभ होतो. Where statesmanship ends generalship begins, याचा अनुवाद. बलवंत, (रत्नगिरी) २५-९-४०.

जेथें यश तेथें द्रव्यास काय तोटा—यशाच्या मागोमाग द्रव्य आपोआप येतें.—पयां ३४४.

जेथें रत्नें वेंचलीं तेथें गोवऱ्या वेंचणें—ज्या ठिकाणीं उत्कृष्ट असें वैभव उपभोगिलें, त्याच ठिकाणीं हीन दशेंत दिवस काढण्याची पाळी येणें ही फार दुर्दैवाची गोष्ट आहे.—इंप ११२.

जेथें राजाचा शिक्का, तेथें नाहीं धरमधक्का—जेथें आपल्या हातांत अधिकार असतो तेथें आपणांस कोणी आडकाठी करीत नाहीं. राजाचा हुकूम सर्वत्र मानला जातोच. तो असला म्हणजे अडचण पडत नाहीं. तु०—'राजा करी तैसे दाम। चाम तेही चालती ॥'—तुगा ३६६०.

जेथें राज्यकारभार, तेथें दरबार—ज्या ठिकाणीं राज्यकारभाराचें काम चालतें तीच राजाची कचेरी समजावी. जो राज्यकारभार पाहतो त्याच्याच हातांत सत्ता असते.

जेथें लढाई चालती, तेथें कायदे बंद होती—युद्धकाळामध्यें सामान्य कायदे सर्व बाजूला गुंडाळून ठेवले जातात व लष्करी कायदा चालू होतो. Where drums speak out, laws hold their tongues.

जेथें लक्ष्मीचा वास, तेथें मित्रांचा प्रवेश—जेव्हां एखाद्यास वैभव प्राप्त होतें तेव्हां त्याच्याभोंवतीं सर्व मित्र गोळा होतात. तु०—कठिण समय येतां कोण कामास येतो। असतील शितें तर मिळतील भुतें. शितें तंवर तीं भुतें भोंवतीं.

जेथें वाढे ताठा, तेथें उभा सोटा—जो मनुष्य फार गर्व करूं लागतो त्याला शासन होण्याचा संभव असतो. तु०—गर्वाचें घर खालीं.

जेथें विश्वास, तेथें करावा वास—ज्या मनुष्यावर आपला विश्वास असेल त्याच्याच घरीं राहाणें योग्य होय. ज्यावर आपला भरंवसा नाहीं त्याचा आश्रय करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

जेथें विष असतें तेथेंच त्याचा उतारा सांपडतो—सामान्यतः प्रत्येक रोगावर औषध व प्रत्येक संकटावर कांहीं तरी तोड निघतेच. परमेश्वराची योजना अशी असते कीं, ज्या प्रदेशांत विषारी जनावरें किंवा पदार्थ उत्पन्न होतात त्याच प्रदेशांत त्यावर उपाय म्हणून योजावयाचे पदार्थहि उत्पन्न होतात.

जेथें शब्दांचा सुकाळ, तेथें बुद्धीचा दुष्काळ-दुकाळ—जो मनुष्य फार बडबड्या असतो त्याची अक्कल बहुधा तटपुंजी असून त्याचें ज्ञान वरवरचें असतें. जो खरा बुद्धिवान् असतो तो शांत असून फार गडबड न करतां जें करावयाचें तें शांतपणें करतो. तु०—जथ बुद्धि तथें शांति. A flow of words is no proof of wisdom.

जेथें संतोष तेथें समाधान—जो मनुष्य मिळेल त्यांत तृप्त असतो त्याची वृत्ति नेहमीं समाधानी असते. जो अतिशय हांवरा असतो त्याची कधींच तृप्ति होत नाहीं व त्यामुळें त्याच्या मनाला कधीं शांति मिळत नाहीं. सदा संतुष्टमनसः सर्वाः सुखमया दिशः।

जेथें संशय वचका, तेथें दोष पका—जो मनुष्य संशयित मुद्रेनें पाहात असतो, भयभीतपणें किंवा भीतभीत वागत असतो त्यानें कांहींतरी अपराध केला असला पाहिजे ही गोष्ट निश्चितपणें समजावी.

जेथें स्वेच्छेनें आहे स्वारी, तेथें पाऊल हलक्या

परी—आपण होऊन जें काम पत्करतो तें करणें जड वाटत नाहीं. Where the will is ready, the feet are light.-सवि ४१४८.

जेन——जेन बुद्धि—[जेन=बुरणूस] बुरणुस बुद्धि पहा.

जेनाच्या पदरीं गांठ देणें-मारणें—लेपाच्या, किंवा नमद्याच्या टोंकास गांठ मारणें शक्य नाहीं. यावरून अशक्य काम करण्याचा प्रयत्न करणें.

जेनुं——जेनुं काम तेनुं थाय, बीजा करे तो गोता खाय—(गु.) ज्याचें काम त्यालाच साधतें, दुसरा करूं म्हणेल तर होत नाहीं. मूळ म्हण—जेनां काम ते तेथी थाय, बीजो करे ते गोथां खाय. तु०-Every man to his trade.

जेपाळ——जेपाळाचा ढाळ--१ तीव्र रेचक. २ सर्व रोगांवर औषधी; सर्वौषधी चूर्ण.

***जेपाळची मात्रा, वैकुंठीची यात्रा**--जेपाळ ही एक वनस्पति असून तिचें बी जमालगोटा अतिशय तीव्र रेचक आहे. ही घेतली असतां इतके रेच होतात कीं केव्हां केव्हां मरण्याची पाळी येते.

जेब——जेब-व-जीनत--शोभा. 'त्यांचे येण्यांत रौनक अधिक होईल, जेब वजीनत येईल.'-रा ७.१९४.

जेम——जेम तेम--(गुजराथी शब्दप्रयोग) कसें-बसें; कसेंतरी; मोठ्या कष्टानें; मिनतवारीनें; साधेल तसें. 'विद्यार्थीहि......जेमतेम करून तेवढी यातायात करतात.' -नि १७७. 'सकाळीं निघाला तर जेमतेम तीन कोस जाईल.'

जेर——जेर होणें--१ हतबल होणें; हतवीर्य होणें; अशक्त होणें; कमकुवत होणें. २ पराभूत होणें; मोडून निघणें. 'मालक जेर जालियावरी आनुषंगीक धरावयाचे अशक्य काय?'-शिवदि १६२.

जेरबंद——जेरबंद उडविणें—जेरबंदानें मारणें; असुडानें, चाबकानें झोडपणें. 'ती रांड सुरळीत बोलत नाहीं याजकरितां चार जेरबंद उडविले पाहिजेत.'—ख ७.३७५३.

***जें न निघे संबंधीं तें निघे जेरबंदीं**-मागें जेंमध्यें पहा.

घोडा जेरबंदीं, मनुष्य संबंधीं (ओळखावा)--घोडा पहा. घोड्याची परीक्षा त्यावर बसून त्यास जेरबंदानें मारलें असतां तो कसा चालतो यावरून होते व मनुष्याची परीक्षा तो आपल्याशीं एखाद्या प्रसंगीं कसा वागतो यावरून होते.

जेवढा——जेवढा गूळ सोडी, तेवढी वाढे गोडी पदार्थांत जितका गूळ अधिक घालावा तितकी त्याची गोडी वाढते. Plenty makes dainty.

जेवढा व्याप, तेवढा संताप--जितका कामाचा पसारा अधिक वाढवावा त्या मानानें आपणांस अधिकाधिक त्रास होत असतो.

जेवढी करणी, तेवढी भरणी--ज्याप्रमाणें आपण काम करावें त्याप्रमाणें आपणांस त्याचें फळ मिळतें. जें आपण करावें तें आपणांसच निस्तरावें लागतें. तु०-करावें तसें भरावें.

जेवढें उंच चढावें, तेवढें खालीं पडावें--जितक्या उच्च स्थानापर्यंत आपणास चढतां येईल, त्या मानानें वेळ आल्यास आपला अधःपातहि मोठा होण्याचा संभव असतो. तु०-जो चढेल तो पडेल.

जेवढें धन, तेवढें बंधन--जितकी संपत्ति अधिक तितकी तिचें रक्षण करण्याची काळजीहि वाढत जाते.

जेवण——जेवण आणि भांडण परभारें गोड—दुसऱ्यावर जर खर्च पडत असेल, तर चांगलें चमचमीत जेवण करण्याला कांहीं हरकत नाहीं; तसेंच ज्यामध्यें आपला हित-संबंध नाहीं असें चाललेलें भांडण दुरून पाहण्यास कांहीं हरकत नाहीं.

माझें जेवण चुलींत!—एक बाई सर्वांचा स्वयंपाक करून वाढून स्वस्थ बसे. कोणीं 'जेवीत कां नाहीं?' असें विचारल्यास, माझें जेवण चुलींत! असें उत्तर देई. त्यामुळें त्या बाईच्या निःस्वार्थीपणाविषयीं आदर वाटे. एका माण-साला तिची शंका येऊन ती काय करते हें तो लपून पाहात बसला. कोणी नाहींसें पाहून तिनें चुलींत पूर्वींच खुपसून ठेवलेला कणकेचा रोडगा बाहेर काढला व गुढघ्यावर मोडून खाऊन टाकला. दुसऱ्या दिवशीं त्या माणसानें रोडग्याऐवजीं नकळत दगड ठेवला. तिनें नेहमींप्रमाणें रोडगा म्हणून काढून गुढघ्यावर हापटला. तों गुडगा फुटला! यावरून निरपेक्षतेचा ढोंगीपणा माजाविणें.

जेवण दुसऱ्या गेलें, तरी पोट आपणा मेलें--(गो.) जेवण दुसऱ्याचें तरी पोट आपलें ना. दुसऱ्याकडचें मिळालें म्हणून तें आपल्या पोटाचा अंदाज पाहूनच खाल्लें पाहिजे.

जेवणा आधीं मलशुद्धि, जेवणानंतर मुखशुद्धि--जेवण करण्यापूर्वीं शौचास जाणें व जेवण झाल्यानंतर अन्नाचा कांहीं अंश किंवा ओषटपणा दातांत वगैरे राहूं नये म्हणून कांहींतरी मुखशुद्धीकरतां पदार्थ खाणें हें आरोग्यकारक आहे.

जेवणाएवढा लाभ नाहीं, मृत्यू(मरणा)एवढी हानि नाहीं--आपण सर्व गोष्टी जेवण मिळावें म्हणून करतों; तेव्हां जेवण मिळणें हा मोठा लाभ समजावा व त्याप्रमाणें एखाद्याचा मृत्यु होणें ही त्याच्या आयुष्यांतील सर्वांत मोठी हानि होय.

जेवणा रुचि आवइनें वाळ्यारि, विद्ये रुचि गुरुनें शिकरल्यारि--(गो.) आईनें वाढलेलें अन्न रुचकर लागतें आणि गुरूनें शिकवलेली विद्या थोडी असली तरी ती अधिक फलदायक होते.

जेवणाची रुचि आणि गाण्याची गोडी ही लोकांच्या येथें असतें—घरचें जेवण बरें लागत नाहीं, तसेंच घरच्या माणसानें गाणें म्हटलेलें खपत नाहीं किंवा चांगलें लागत नाहीं. पण याच गोष्टी दुसऱ्याच्या घरच्या चांगल्या वाटतात. अशी मनोवृत्ति पुष्कळांत पाहाण्यास सांपडते.

जेवणाच्या वेळीं हरहर महादेव ! लढाईच्या वेळीं हरहर महादेव !--(वांय.) या दोन्ही परस्परविरुद्ध प्रसंगीं घोष एकच असला तरी त्यामुळें मिळणारी स्फूर्ति वेगवेगळ्या प्रकारची असते. वचन एकच पण परिणाम भिन्न.

जेवणांत तूप आणि लग्नांत रूप (हेंच खरें)—जेवणांत तुपामुळें अन्नाला गोडी येते व खाणाराला आनंद होतो; त्याचप्रमाणें वधूला वराचें किंवा वराला वधूचें रूप हेंच एक प्रिय असतें. लग्नप्रसंगीं अशा रूपालाच किंमत असते.

जेवणांत लाडू, पंक्तीला साडू—जेवणामध्यें सर्वांत महत्त्वाचा, पदार्थ मुख्य पक्वान्न म्हणजे ज्याप्रमाणें लाडू हें आहे, त्याप्रमाणें आपल्या नात्यांतील पाहुण्यांत सर्वांत महत्त्वाची व्यक्ति म्हणजे साडू होय.

जेवणांत लाडू, हत्यारांत माडू आणि सोयऱ्यांत साडू—जेवणांत सर्वांत महत्त्वाचा पदार्थ लाडू. त्याचप्रमाणें हत्यारांत महत्त्वाचें हत्यार माडू व सोयऱ्यांमध्यें मेहुणीचा नवरा साडू हा महत्त्वाचा मानला जातो.

जेवणारानें पसरला-मांडला थाळा, पण वाढणाराचा (वाढणारणीचा) जाईना चाळा—जेवणारा मनुष्य ताट वगैरे मांडून अगदीं तयारीनें बसला व जेवण्यास उताबीळ झाला तरी वाढप्यानें लवकर वाढलें पाहिजेना. तो इकडे तिकडे करीत वेळ घालवीत असला तर जेवणाऱ्यानें गर्दी करून काय उपयोग ? एखाद्या कामाची आपणास खूप गर्दी असली तरी वेळप्रसंगीं तें काम ज्या व्यक्तीकडून करून घ्यावयाचें ती व्यक्ति कितीहि क्षुद्र असली तरी तिच्या कडूनहि दिरंगाई होण्याचा संभव असतो व आपणांस कांहीं करता येत नाहीं अशी स्थिति होते.

जेवणें——**दोहोंकडून जेवणें**—कांहीं वऱ्हाडी मंडळींचा वर व वधू पक्षांशीं दोहोंशींहि नात्याचा संबंध असतो. त्यामुळें ते दोहीकडील जेवणावळींत हजर असतात. त्याप्रमाणें उभयान्वयी माणसानें दोन्ही पक्षांकडून लांच वगैरे घेणें.

एखाद्याच्या बारशाला जेवणें—एखाद्यापेक्षां वयानें मोठें असणें. यावरून त्याच्यापेक्षां अधिक अक्कल असणें; त्यापेक्षां अधिक अनुभव व शहाणपणा असणें. बारसें पहा.

दुसऱ्याच्या तोंडानें जेवणारा—१ दुसऱ्याचें ऐकून तेंच बोलणारा; स्वतःस कांहीं न समजतां दुसऱ्याच्याप्रमाणेंच बोलणारा. २ दुसऱ्याच्या तंत्रानें चालणारा; परप्रत्ययनेयबुद्धि.

जेवता गग--१ केवळ जेवण्याच्या कामाचा माणूस; केवळ खूप खाणारा; मोठा आहार असणारा; खूप खादाड. २ फुकटखाऊ; भोजनभाऊ; केवळ खाण्यास काळ; खाऊन रिकामटेकडा बसणारा.

जेविता ठाव टाकणें—१ एखादें काम करण्याशाठीं अर्ध्या जेवणावरून उठणें; हातांतील घास टाकून एखादें काम करण्यास जाणें. २ पानावरून उठणें. 'जैसें लक्ष भोजन होता पाही । तयामाजी अंत्यज जाई । मग ब्राह्मण उठती लवलाही । जेविता ठाव टाकोनी ॥

जेवूं घालणें—१ खावयास देणें; खाऊं लागणें. २ भोजन देणें; भोजनाचा खर्च सोसणें, देणें. ३ वाढणें; पदार्थ खावयास देणें.

जेवून सेवा गोड—जेवण झाल्यानंतर मग नोकरी बरी वाटते; भरल्यापोटीं मनुष्य जरा खुषींत असतो.

❀ **जेऊं न घाली माता । भिक्षा मागों नेदि पिता ।** —यथार्थदीपिका ४.१३६. आई जेऊं घालीना बाप भीक मागूं देईना, पहा.

जेव् खांपऱ्या वच् तणाक्—(गो.) [खापऱ्या = नीग्रो माणूस] जेवायला घालून भरपूर काम करून घेणें.

जेव रे पुता (बाबा) वाटींत, म्हणे मला नरटींत गोड लागतें; जेव वाटीं, तो म्हणे जेवीन नरवटीं—जेवरे बाबा वाटीमध्यें, तर तो म्हणे मी जेवतों करवंटीमध्यें. एखाद्या मनुष्याला एखादी चांगली त्याच्या फायद्याची गोष्ट करावयास सांगितली तरी ती त्याला न आवडतां त्याला भिकारीपणाच्याच गोष्टी आवडतात, अशा वृत्तीस उद्देशून ही म्हण वापरतात.

जेव रे पुता वाटींतु, माका गोड करटींतु—(गो.) वरप्रमाणेंच. मुलाला वाटींत जेव म्हटलें तर तो म्हणतो करवंटीच चांगली. चांगलें मिळत असतां वाइटाचा स्वीकार करणाऱ्याला उद्देशून म्हणतात.

जेवंक आसिल्लयाक भुरगीं नात, आनि भुरगीं आसिल्लयाक जेवंक ना—(गो.) ज्या घरीं संपत्ति आहे त्या घरीं बहुधा संतति नसायची आणि ज्या घरीं संतति पुष्कळ त्या घरीं बहुधा अन्नाची वाण असायची.

जेवंक ना जाल्यार गोठयांत वाड—(गो.) जेवण नसेल तर मला गोठयांत वाढा ! कोठें वाढावयाचें हा मुद्लांत प्रश्न नसून जेवणास काय द्यावयाचें हा प्रश्न आहे.

जेंवक नाशिल्ल्याक उश्टया आळशीक ?—(गो.) जेवण नसल्यास उष्ट्यावरच भागविलें पाहिजे. पाहिजे तितकें नाहीं तर मिळेल तितकें.

जेवच्या ना खयं चेडूं पालवा रडतां—(गो.) घरीं गोळाभर अन्न मिळायची भ्रांत आणि मुलगी मासळीसाठीं रडते

जेवच्या नाशिल्ला उष्टया आळशिक ना—(गो.) ज्याला अन्न मिळत नाहीं त्याला उष्टया पत्रावळीची किळस नसतें.

जेवच्याक आधीं, न्हिदूंक मधीं, आनी वावराक कधीं मधीं—(गो.) जेवायला आधीं बसावें, निजतांना दोघांच्या मध्यें निजावें आणि कोणी कांहीं उद्योग सांगितला तर 'कधीं मधीं करीन' असें सांगावें. अशी वृत्ति आयत खाऊ, ऐदी माणसाची असते.

जेवच्याक आसल्यारि गावंचे सोयरे—(गो.) जेवायला असलें कीं सगळे सगेसोयरे म्हणून आपल्या घरीं जमा होतात.

जेवण्याला आधीं आणि कामाला कधीं मधीं खालींपहा

जेवण्यास आधीं, निजण्यास मधीं, कामास कधीं-बिधीं—कांहीं माणसें अतिशय स्वार्थी असतात. तीं जेवणाच्या वेळीं मात्र सर्वांच्या अगोदर येतात, निजण्याच्या वेळीं थंडीवारा लागूं नये म्हणून बाजूला न निजतां सर्वांच्या मध्यें निजतात पण कामाच्या वेळीं मात्र अळंटळं करतात. अशा केवळ आपणांपुरतें पाहणाऱ्या मनुष्यांबद्दल ही म्हण वावरतात.

जेवताचि जाति निमगुवांचि—(गो.) पंक्तीला घेऊन जेवल्यानंतर मग त्याची जात विचारण्यांत अर्थ काय ! कन्या देऊन कूळ विचारण्याप्रमाणें. जेवल्यावर म्हणे जात कोण, पहा.

जेवतल्यां फुडे जेवंका, न्हातल्यां माक्षि न्हावंका—(गो.) सगळ्यांच्या आधीं जेवावें म्हणजे सगळे पदार्थ ताजे आणि भरपूर मिळतात. आणि सगळ्या लोकांचीं स्नानें झाल्यावर मग आपण स्नान करावें. म्हणजे हांड्यांतलें सगळे पाणी आपल्यालाच मिळतें.

जेवत्याची खूण वाढिता जाणे—जेवणारा मनुष्य कसा आहे किंवा त्यास काय आवडतें, त्यास काय पाहिजे असतें, या गोष्टी त्याला वाढणाऱ्या मनुष्यास चटकन माहीत होतात, तशा इतरांस कळत नाहीं. एखाद्याचें वर्म त्याच्याशीं ज्याचा संबंध येतो त्यालाच कळतें. 'वहिणी म्हणे येथें केलें तें आपण । जेवत्याची खूण वाढिता जाणें ॥'—ब १४६.६.

जेवनातिल्या देवाक उपासु, जेविल्याक निवेद्यु—(गो.) जेवींत नसलेल्या देवाला उपास, जेवलेल्याला नैवेद्य. मनुष्य हा स्वार्थी आहे. आपल्या फायद्याच्या गोष्टी तो दुसऱ्यावर लादीत असतो.

जेवले, (आणि) हातीं पायीं डेवले—मनुष्य एकदां जेवला म्हणजे तें जेवण त्याच्या हातींपायीं येतें व जेवणानंतर त्याच्या हातून कांहीं काम होत नाहीं, तो लागलाच आळसावतो.

जेवलेल्यास आग्रह, उपाश्यास नैवेद्य !—श्रीमंत ज्याच्याजवळ पुष्कळ आहे त्यांना देण्याची मोठी तयारी दाखवितात पण जरूर आहे त्यांना मात्र देण्याच्या कामीं हात आंखडतात.

जेवल्यावर म्हणे जात कोण—एक मनुष्य प्रवास करीत असतां दोन प्रहरची वेळ झाली व त्यास खूप भूक लागली. तेव्हां तो एका गृहस्थाच्या घरीं गेला व त्यास विनंति केल्यावरून त्यानें त्यास जेवावयास घातलें. जेवण वगैरे झाल्यावर त्याच्या मनांत आलें कीं, आपण याच्या घरीं जेवलों खरें, पण याची जात कोणती असेल ? आपण बाटलों बिटलों तर नाहींना ? म्हणून तो त्याच्या जातीची चौकशी करूं लागला. पण ही चौकशी करण्यांत वास्तविक कांहीं अर्थ नाहीं. त्यास चौकशी करावयाची होती तर ती आधीं करावयास पाहिजे होती म्हणजे त्यास त्याच्या हातचें अन्न चालतें किंवा नाहीं तें कळालें असतें. याप्रमाणें काम होऊन गेल्यावर मागाहून निरर्थक चौकशी करणाऱ्या मनुष्याबद्दल ही म्हण वापरतात. तु०—कन्या देउनिया कुळ । मग काय विचारावें ॥—व्यंस्तो.

जेवायला चला, म्हणे भूक नाहीं मला—हट्टी मनुष्याबद्दल म्हणतात. रागावलेला माणूस खोटेंच सांगतो.

जेवायला जाणें आणि तोंड विसरून येणें—जेवण्यास तोंड लागतेंच; तेव्हां तें विसरलें म्हणजे मुख्यच गोष्ट राहिली. ज्यासाठीं जावयाचें तीच गोष्ट विसरणें. 'काव्य-सृष्टींत काव्यदृष्टीशिवाय प्रवेश करणें म्हणजे जेवायास जाऊन तोंड विसरण्यासारखें आहे.'

जेवायला मावस भाऊ, बोडायला चुलत भाऊ—[बोडणें=दाढीमिशांचे व डोक्याचे सर्व केस काढणें.] मेजवानी झोडायचें, किंवा इतर आनंदाचें काम असेल तर जवळच्या प्रेमांतला माणूस म्हणून मावस भावाला बोलावलें जातें. पण मृताबद्दल क्रिया वगैरे कांहीं अशुभ कार्य चालविणें असेल तर चुलत भावाला, तो गोत्रज असल्यामुळें, बोलावून त्याचें मुंडण केलें जातें. आनंदाच्या वेळीं, बक्षिस घेण्यासाठीं एकाची योजना, तर यातायात सोसण्यासाठीं दुसरा भलताच; अशी वस्तुस्थिति असेल, तेव्हां ही म्हण उपयोगांत आणतात.

जेवावयास पंचामृत, आंचवावयास खारें पाणी—एखादी गोष्ट फार चांगली करावयाची पण शेवटीं शेवटीं कांहींतरी एखादी भलतीच क्षुल्लक गोष्ट करून केलेल्या सर्व चांगल्या कृत्यावर पाणी घालावयाचें, असा विसंगत प्रकार करणाराबद्दल ही म्हण वापरतात. तु०–पंचपक्वान्नाचें जेवण व मुताचें आंचवण.

रांधावें तसें जेवावें, करावें तसें पावावें—जसा आपण स्वयंपाक केला असेल तसें आपणास हिरवें पक्कें अन्न खावयास मिळतें व जशी आपण कृति करूं तसें त्या कृतीचें फळ आपणास भोगावें लागतें.

जेविल्ल्या पानार हागता—(गो.) जेवलेल्या पानावरच हगणें; निमकहराम; कृतघ्न. तु०–खावें तेथें हगावें.

जेविल्लेकडे दोनि येवजूं नये—(गो.) ज्याच्या घरीं आपण अन्न खाल्लें त्याचें वाईट कधींहि चिंतूं नये. खाल्लया-घरचे वासे मोजूं नयेत.

जेविल्या घरा वाशे मोजचें—(गो.) खाल्लया घरचें वासे मोजणें.

जेविल्यापानारी हागुनु घालनयें—(गो.) जेवलेल्या पानावर शौचविधि करूं नये. म्हणजे अन्नदात्यावर उलटूं नये.

तेथें जेवीत असला तर येथें आंचवावयास यावें—अगदीं तांतडीनें निघून यावें.–आजोच १४२.

जेवीत आशिल्याक भूक चडि, धूत आशिल्याक चिकलु चडु—(गो.) जेवीत असलेल्याला भूक जास्त, धूत (धुवीत) असलेल्याला चिखल जास्त. जो अंगावर घेऊन करणारा, निस्तरणारा असतो त्यालाच जास्त काम पडतें.

जेवीन तर तुपाशीं (दुधाशीं), नाहींतर उपाशी—ही कड किंवा ती कड; तडजोड मुळींच नसणें; ज्यासाठीं हट्ट असेल ती गोष्ट मिळाल्याखेरीज कांहीं न करणें; अतिशय हटवादीपणा; दुराग्रह.

जेवूंक नासिल्ल्याक फकी चढ—(गो.) जेवायला नसलेल्याला चवी जास्त. तु०–भिकाऱ्याला ओकारी.

जेवूंक नासिल्ल्याचे पोट व्हड—ज्याला जेवावयास मिळत नाहीं त्याचें पोट मोठें असतें. गरीब मनुष्यामागें पोरांबाळांचें लेंढार खूप लागलेलें असतें व त्यांस पोटास घालणें त्यास कठिण जातें; पण ज्याच्या घरीं समृद्धि असते त्यास स्वतः खाववत नाहीं व पोरेंबाळेंहि खावयास नसतात.

जेवून बसावें क्षणभर, रात्रीं जेवल्यावर फेरी कर—जेवण झाल्यावर थोडी विश्रांति घ्यावी व विशेषतः रात्रीचें जेवण झाल्यावर थोडी शतपावली करावी हें आरोग्याच्या दृष्टीनें चांगलें असतें. After dinner sit a while, after supper walk a mile.

जेवा—जेवा पाडणें-साधणें-काढणें—जबरदस्तीनें जेवण मिळविणें; कसेंतरी जेवण उकळणें; जेवावयास घालावयास भाग पाडणें.

जेवीं—जेवीं नवज्वरें तापलें शरीर। लागे तया क्षीर विषतुल्य॥—नवज्वर झालेल्या मनुष्यास दूध विषासारखें वाटतें. वस्तु मुळांत चांगली असली तरी कांहीं प्रसंगीं ती त्याज्य वाटते. –तुगा ३११०.

जेवो—जेवो वड तेवा टेटा, ने बाप जेवा बेटा—(गु.) वड तशी पारंबी आणि बाप तसा बेटा. जसें बीज तसा अंकुर.

जेव्हां—जेव्हां गाढव शिडी चढे, तेव्हां स्त्रियांस ज्ञान वाढे—हिब्रु म्हणीचा अनुवाद. ज्याप्रमाणें गाढव शिडीवर चढणें ही गोष्ट अशक्य आहे, त्याप्रमाणें स्त्रियां-मध्यें ज्ञानाची वृद्धि होणें अशक्य आहे, अशा हिब्रूमधील समजुतीची द्योतक ही म्हण आहे.–सवि ४०५६.

जेव्हां येते वेळ, तेव्हां होतें गाजराचें केळ—एखाद्या प्रसंगीं अशी अनुकूल संधि येते कीं, त्यावेळीं क्षुल्लक गोष्टीलाहि फार महत्त्व येतें. उदहरणार्थ फार भूक लागली म्हणजे गाजर सुद्धां केळ्यासारखें गोड लागूं लागतें. किंवा एखाद्या प्रसंगीं गाजरें सुद्धां केळ्याच्या मोलानें विकलीं जातात.

जेहवो—जेहेवो देश, वेहेवो भेस—जसा देश

तसा वेष. (हिं.) जेसा देस, वेसा भेस. (गु.) जेवा देश, तेवो वेश.

जैन——जैना हातांतुलि ऊव—(गो.) जैनाच्या हातांत ऊ आली तरी तो अहिंसक असल्यामुळें तिला मारूं शकत नाहीं. हातांत, ताब्यांत असून निष्क्रिय.

जैशी——जैशी जैशी वेळ पडे, तैसें तैसें होणें घडे—जसा प्रसंग येईल त्याप्रमाणें वर्तन करावें लागतें.

जैशी दैवाची उजरी, तैशी बुद्धि उपजे शरीरीं—ज्याप्रमाणें दैव अनुकूल किंवा प्रतिकूल असतें, त्याप्रमाणें चांगली अगर वाईट बुद्धि सुचते.—भाव ४८, ७५. मागें जशी पहा.

जैसा——जैसा कामकरी, तसें काम करी—काम करणाऱ्या मनुष्याच्या अकलेप्रमाणें तो काम करतो.

जैसा जुग, वैसा जोगी—जसा काल किंवा परिस्थिति असेल, त्याप्रमाणेंच त्या कालांतील साधूंचें वर्तन असतें. त्या त्या काळच्या समाजांतूनच जोगी उत्पन्न होतात.

जैसा जेथें जीव देखावा, तैसा तेथें पैका वसूल करावा—(ऐति.) ज्याप्रमाणें लोक असतील त्याप्रमाणें त्यांच्यापासून प्राप्ति करून घ्यावी. —पया ५७.

जैसा दाम, वैसा काम—जितके पैसे खर्च करावे त्या प्रमाणांत काम होतें. दाम तसें काम. देणावळ तशी धुणावळ वगैरे पहा.

जैसा देश, वैसा भेष—१ जसा देश तसा वेष. २ निरनिराळ्या देशाची निरनिराळी रीत. Do in Rome as Rome does. So many countries, so many customs. यस्मिन् देशे यदाचारः पारंपर्यो विधीयते ।

जैसा बोना, तैसा उगाना—जसें पेरावें तसें उगवतें.

जैसा भाव असे जेथें । तैसा देव वसे तेथें ॥—रामदास. जसा भाव तसा देव. मनुष्याची ज्याप्रमाणें श्रद्धा असेल, त्याप्रमाणें त्याला परमेश्वर पावतो. देवे तीर्थे द्विजे मंत्रे दैवज्ञे भेषजे गुरौ । यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ॥ —सुर १६८.६६८.

जैशासी तैसा भेटे, तेव्हां मजालसी थाटे—जशास तसा भेटला म्हणजे खरी एकमेकांची परिक्षा होते व खरा सभेला रंग येतो.—रामदास.

जैसी चोराची माय । प्रकट रडो न ल्हाय ।—परि आंतुच्या आंत होय । उकसा बुकसी ॥—एकनाथ. चोराच्या आईला चोराला झालेली शिक्षा ऐकून उघडपणें रडतां येत नाहीं. तिला आपलें दुःख मनांतल्या मनांत ठेवावें लागतें. चोर पहा.

जैसे कंथा घर रहे, वैसे रहे बिदेश ।—(हिं.) निकामा माणूस कोठेंहि गेला तरी त्याला लाभहानि सारखीच. —अन्योक्ति १६०५.

जैसे पिवे पाणी, वैसी होय वाणी—ज्याप्रमाणें खाणें पिणें असतें त्याप्रमाणें तोंडांतली भाषा चांगली वाईट होते. अन्नावर वाणीचा गुण अवलंबून असतो.

जैसेकु तैसा, हिजडेकु पैसा—पुढें पहा.

जैसोको तैसा, बाबुको भैसा—योग्यतेप्रमाणें सत्कार.

जो——जो उठला तो; जो पहावा तो—प्रत्येकजण; कोणीहि; भलतासलता मनुष्य.

*** जो अर्थ संपादिला तो रत्नानवत् रक्षण करावा**—(ऐति.) कुभ्याप्रमाणें संपादित धनाचें रक्षण करावें. —शिवदि १७७.

जो असे अविचारी, तो काय न करी—अविचारी मनुष्याच्या हातून कोण्या वेळीं कोणती गोष्ट होईल त्याचा नेम नाहीं.

जो आईला आंचवला, त्याचा जन्म फुकट गेला—ज्याची आई लवकर मरण पावली असेल, त्याला या जगांत खरा मायेचा प्राणि कोणी नाहींसा होतो व त्यामुळें त्याचें आयुष्य कंटाळवाणें होतें.

जो आभाळावर थुंके, तो आपल्याच तोंडावर थुंके—जो वर तोंड करून थुंकतो त्याची थुंकी त्याच्याच तोंडावर पडते. जो श्रेष्ठ मनुष्याची निंदा करतो त्यालाच लोक नीच समजतात. सूर्यावर थुंकणें.

जो आहे बहू भोळा, त्यावर ठकाचा डोळा—जो मनुष्य भोळा असतो त्याला फसवावयास लबाड लोक टपून बसलेले असतात व नेमके त्याला गांठतात.

जो इजार करील, तो भोंक ठेवील—जो एखादी गोष्ट करतो तोच त्याच्या आनुषंगिक क्रिया अथवा त्या गोष्टीस जरूर असणाऱ्या इतर गोष्टीहि करण्याची तजवीज करतो. ज्याच्यावर मुख्य गोष्टीची जबाबदारी असते, तो तदनुषंगिक गोष्टींचीहि जबाबदारी घेतो.

जो ईश्वरास मानतो, तो धर्मात्मा असतो—ज्याची परमेश्वराच्या ठिकाणीं श्रद्धा असते तो धर्मास अनुसरून चालतो; श्रद्धावान् मनुष्य धर्मनिष्ठ असतो.

जो उदकांत देवना, तो व्हाण काडिना—(गो.) जो पाण्यांत पाय ठेवीत नाहीं तो वाहाणाहि काढीत नाहीं ! साहस करणाऱ्यालाच हाल काढावे लागतात.

जो उशीरानें उठे, त्याचें काम शेष सांठे—जो उशीरानें निजून उठतो, त्याचें काम शिल्लक राहात जाऊन कांहीं दिवसांनीं तें पुष्कळ सांचतें.

जो उसने मागतो, तो दुःखी होतो—ज्याला उसनें मागावयाची पाळी येते, त्याला केव्हां केव्हां तें न मिळाल्यानें कष्टी होण्याची पाळी येते किंवा अपमान सहन करावा लागतो. He that goes a-borrowing goes a-sorrowing

जो करतो तो खाड्यांत पडतो—जो अंगावर घेऊन परोपकार बुद्धीनें एखादी गोष्ट करतो त्यालाच कधीं कधीं नुकसानी येते किंवा वाईटपणा प्राप्त होतो.

जो करी सदा धंदा, त्याचा लाभ असे बंदा—जो नेहमीं उद्योग करीत राहतो, त्याला कांहींना कांहींतरी हटकून प्राप्ति झाल्याशिवाय राहात नाहीं.

जो करूं इच्छी लोकांचा घात, त्याचा शास्ता जगन्नाथ—जो दुसऱ्याचें वाईट चिंतितो, त्याला परमेश्वर शासन करतो. चिंती परा तें येई घरा.

जो कळ सहन करतो, तो एक वेळ दुःखी होतो—आपणांस एखादें दुःख होत असेल व तें निवारण करावयाचें असेल तर त्यावर उपचार करण्याच्या वेळीं जो एकदां त्रास होईल तो सहन केला असतां त्यांतून कायमची सुटका होते. पण तेवढा सहन करण्याची आपली मनाची तयारी नसल्यास, आपणास नेहमीं थोडाफार त्रास सहन करावा लागतो. यापेक्षां अधिक त्रास संकटाच्या भीतीचा होतो.–छवि १३७०.

जो काम लोभ दूर सारी, तो सुखें वर्ते देहधारी—जो आपले विकार, आपल्या इच्छा, हाव हीं ताब्यांत ठेवतो तो नेहमीं सुखी असतो. काम व लोभ यांमध्येंच पुष्कळ दुःखांचा उगम असतो.

जो कोणी हांक मारी, त्याला प्रसन्न कावेरी—म्हैसूर संस्थानांत जनतेला कावेरी नदी कितीतरी उपकारकर्ती झाली आहे. कावेरी नदीपासून अनेक प्रकारचे लाभ होतात.

जो खाई आंबा, तो सोशी ओंळंबा—आंब्याच्या झाडावर ओंळंबे असतात, तेव्हां जो आंबे खाण्याच्या आशेनें झाडावर चढतो त्यालाच ते डसतात व त्याला त्यांचे दंश सहन करावे लागतात. ज्यानें सुखाचा उपभोग घेतला त्यास दुःखाचा वाटेकरी झालेंच पाहिजे.

जो खायगा खाक, उसकी होयगी राख—जो विस्तव खाईल त्याची राख होईल. म्हणजे जो संकटांत मुद्दाम उडी घेईल, त्याचा नाश ठरलेलाच.

जो गरजता है, सो बरसता नहीं—जे ढग नुसतेच गरजतात त्यांपासून पाऊस पडत नाहीं. तु०–गर्जेल तो पडेल काय. केचित् वृष्टिभिरार्द्रयन्ति धरणीं गर्जन्ति केचित् वृथा ।

जो गुण बाळा, तो गुण जन्मकाळा—लहान मुलाच्या ठिकाणीं जे गुण दृष्टीस पडतात ते त्याच्या जन्मभर सुटत नाहींत. जे गुण० पहा.

जो गुलाम घरीं, त्याला जगांत कोण विचारी—जे स्वदेशांत परतंत्र त्यांना इतर देशांत कांहींच मान नसतो.

जो गुळानें मरतो, त्याला विष कशाला—ज्याचा नाश सुलभतेनें होऊं शकतो त्याच्या बाबतींत कठोर उपायांचा अवलंब करण्याचें कारण काय ! गोड बोलून काम होत असल्यास कठोर भाषण कशासाठीं करावें !

जो घाबरतो तो रानभरी होतो—जो मनुष्य एखादें संकट पाहून भेदरून जातो त्याला कसें वागावें हें सुचत नाहींसें होतें.

जो चढेगा, सो गिरेगा; जो चढेल, तो पडेल—जो श्रेष्ठपणास चढतो त्यालाच एखाद्या वेळीं खालीं येण्याचा प्रसंग येतो. ज्यानें कधीं वैभव पाहिलेंच नाहीं त्याला त्याचें सुख दुःख कांहींच कळत नाहीं. He that exalteth himself shall be humbled.

जो चोंच देईल तो दाणा देईलच—परमेश्वर ज्या ज्या प्राण्यास उत्पन्न करतो त्या त्या प्राण्याच्या जीवनाची सोय तो अगोदरच करून ठेवतो. तु०–आधीं चारा मग चोंच. दानेदानेपर लिखा है खानेवालेका नाम. वृत्यर्थं नातिचेष्टेत साहि धात्रैव निर्मिता। गर्भादुत्पतितेजं तौ मातुः प्रस्रवतः स्तनौ॥ –सुर १६३.४६०.

जो जन्म देतो, तोच भाकर देतो—वरप्रमाणेंच.

जो जन्माचा कबाडी, त्याचें दरिद्र कोण फेडी—(व.) काबाडकष्ट करण्यासाठींच ज्याला देवानें जन्माला घातलें त्याचें दारिद्र्य नष्ट करण्याचें सामर्थ्य कोणांतच नाहीं; त्याच्या स्थितींत कधींच सुधारणा होत नाहीं.

जो जातांना त्वरा करतो, तो घेतांना कांहीं विसरतो—जो मनुष्य एखादें काम गडबडीनें करतो त्याच्या हातून थोडी फार तरी चूक होण्याचा संभव असतो. जो गडबडीनें बरोबर न्यावयाचें सामान बांधतो त्याची एखादी

तरी वस्तु घ्यावयाची राहते. He hath left his purse in his other breeches. –सवि १३४७.

जो जाय कुल्लु, ओ होजाय उल्लु—साधु लोकांतील म्हण. कुल्लु म्हणजे हिमालयांतील चम्मा पहाड. 'तेथें जाणारे बहुतेक साधु तेथील सुंदर स्त्रियांना पाहून गृहस्थाश्रमी होतात. म्हणूनच वरील म्हण प्रचारांत आलेली आहे.' –नर्स सुंद्राबाई १५३.

जो जो जयाचा घेतला गुण, तो तो म्यां गुरु केला जाण—मनुष्यानें प्रत्येक व्यक्तीपासून जेवढी चांगली गोष्ट असेल तेवढी घेण्याचा प्रयत्न करावा व त्या बाबतींत त्याला गुरु मानावा. दत्तानें चोवीस गुरु जे केले ते असेच एकेकाचे विशिष्ट अनुकरणीय गुण पाहून. चोवीस पहा. 'सिंहादेकंबकादेकं षट् शुनस्त्रीणिगर्दभात् । वायसात्पंचशिक्षेच्च चत्वारि कुक्कुटादपि ॥ –सुर १६२.३९७.

जो ठेंचा खातो, तो हुषार होतो—मनुष्याला निरनिराळ्या प्रकारचे अनुभव आले, कांहीं बाबतींत चट्टा बसला म्हणजे हळूहळू त्यास अक्कल यावयास लागते व अशा अनुभवानें तो हळुहळू शाहणा होतो.

जो तळें राखेल, तो पाणी चाखेल—तळ्याच्या कांठीं त्याची राखण करणारा मनुष्य त्या तळ्यांतील पाणी प्याल्याशिवाय राहणें शक्य नाहीं. त्याप्रमाणें एखादें कार्य एखाद्यावर सोंपवलें व त्यांत आपणास लाभ होण्यासारखा असला व अनुषंगानें त्यालाहि कांहीं लाभ होण्यासारखा असला तर तो त्यानें करून घेणें हें स्वाभाविकच आहे. त्याबद्दल आपण विषाद मानण्याचें कारण नाहीं.

जो तांबोळी आपलीं पानें दररोज फेरतो, त्याचीं पानें सडत नाहींत, आणि जो आपले कपडे रोज धुतो, त्याचे कपडे मळकट दिसत नाहींत—विड्याचीं पानें रोज पाहिलीं नाहींत तर तीं वाईट होतात. तसेंच रोज कपडे धुतले नाहींत तर मळकट होतात. वरील म्हण रोजच्या व्यवहारांतील आहे.–शाब २.२०२.

जो तो आपलें घोडें पुढें ढकलतो–दामटतो—प्रत्येक मनुष्य शक्य तों आपलें कार्य लवकर साधून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याप्रमाणें प्रत्येक मनुष्य आपल्याला कांहीं महत्त्व मिळावें आपणास प्रामुख्य असावें, अशी खटपट करीत असतो. आपलें घोडें पुढें दामटणें पहा.

जो तो आपलें हित पाहातो—प्रत्येक मनुष्याची दृष्टि स्वतःस लाभ व्हावा आपलें नुकसान होऊं नये याकडे असते.

जो तो आपापले घरचा राजा—इतरांच्या दृष्टीनें किंवा इतराशीं तुलना करतां एखाद्या मनुष्याची कशीहि योग्यता असली, तरी तो आपल्या घरीं पूर्ण सत्ताधिकारी व पूर्ण मालक असतो. त्याच्या घरगुती बाबतींत त्याच्यावर कोणी सत्ता गाजवूं लागला तर तो कधींहि मानणार नाहीं.

जो तो आपल्या जातीवर जावयाचाच—कोणालाहि आपला जातिस्वभाव बदलतां येत नाहीं. जात पहा.

जो थोडें बोलतो, तो शहाणा असतो—मितभाषण करणें हें एक शहाणपणाचें लक्षण आहे, कारण त्यामुळें आपले दोष, चुका वगैरे बाहेर पडण्याचा संभव कमी असतो. तु०—(अ) मौनं सर्वार्थसाधनम् । (आ) विशेषतः सर्वविदां समाजे विभूषणं मौनमपंडितानाम् !

जो दब जाता है, संसार उसेहि दबाता है—जो भिऊन वागतो त्याला लोक जास्तच दडपतात. भित्यापाठीं ब्रह्मराक्षस.

जो दुकानाचा चाकर, दुकान होय त्याचा किंकर—जो दुकान बरोबर चालण्यास वक्तशीर चाकरी करतो, त्याचा तें दुकान निर्वाह चालवितें.

जो दुसऱ्यावरी विश्वासला, त्याचा कार्यभाग बुडाला—जो स्वयेंची कष्टत गेला । तोची भला ॥–रामदास. जो मनुष्य सर्वस्वी दुसऱ्यावर अवलंबून असतो त्याचें कार्य होत नाहीं. जो स्वतःच झटून प्रयत्न करतो त्याचें कार्य लवकर सिद्धीस जातें. स्वावलंबनाचें महत्त्व यांत वर्णिलें आहे.

जो देवाला विसरला, तो पारखा झाला—ज्याच्या मनांतील परमेश्वराचें अधिष्ठान एकदां सुटलें म्हणजे त्याचा कोणत्याच गोष्टीवर विश्वास बसत नाहींसा होऊन या जगांत त्याला कांहीं अवलंबन राहात नाहीं.

जो नजर न आवे, सो भुलजावे—जी गोष्ट आपल्या नजरेसमोर नसते ती गोष्ट आपण विसरून जातों. ज्याची आपली फार दिवस दृष्टादृष्ट होत नाहीं त्याची ओळख आपण विसरतों. Out of sight, out of mind.

जो निगुऱ्या त्याचें तोंड सकाळीं पाहूं नये—[निगुऱ्या=गुरुहीन] ज्या मनुष्यानें गुरु केला नाहीं त्यास अपशकुनी समजावें. त्याचें तोंड सकाळीं पाहिल्यास अशुभ मानावें. पूर्वीं गुरु करण्याची गुरुमुखानें विद्या, बोध घेण्याची सरसहा प्रथा असे, तेव्हां वरील म्हण त्या दृष्टीनें सयुक्तिकच आहे.

जो नित्य वागे वाममार्गीं, त्याची होते कैदेंत रवानगी—जो नेहमीं वांकड्या मार्गानें जातो त्याला कधींतरी तुरुंगांत जाण्याची वेळ आल्याशिवाय राहात नाहीं.

जो फिरवी लाठी, त्याला शत्रू दाखवी पाठी—लाठीचें शिक्षण घेण्यासंबंधी हा अलीकडचा उपदेश दिसतो. (ल.) जो शूर, पराक्रमी असतो त्याला भिऊन शत्रू पळून जातात.

जो बहू इच्छा करतो, तो अडचणींत पडतो—जो फार लोभी असतो त्याची अडचण कधींच भागत नाहीं. He lacks most that longs most.

जो बायकोशीं चांगला (भला), तो खाई दहींकाला –दूधकाला—ज्याचें वर्तन आपल्या बायकोशीं गोडी गुलाबीचें असतें त्याला चांगलें चमचमीत जेवावयास मिळतें.

जो बिब्बी न मिळे तो लवंडीच सही—(अशिष्ट) दुधाचा तहान ताकावर भागवून घेणें.–पामो २४२.

जो बोलण्यांत बोलका, तो कृतींत हलका—जो नुसती तोंडानें फार बडबड करतो त्याच्या हातून कोणतीच कृति होत नाहीं.

जो बोले तोच हंसे, त्यासारखा मूर्ख नसे—स्वतःच हंसण्यासारखें बोलून स्वतःच हंसणाऱ्याला लोक मूर्ख म्हणून ओळखतात.

जो बोलेल तो करील काय, जो गर्जेल तो पडेल काय?—जो नुसता बडबड करतो त्याच्या हातून प्रत्यक्ष कृति कांहीं एक होत नाहीं. उदा०–जे ढग नुसते गडगडतात त्यांचेपासून पाऊस पडत नाहीं.

जो भजतो देवाला, त्याच्या उणेपणावरी घाला—जो परमेश्वराची भक्ति करतो त्याला देव कोणत्याहि प्रकारें उणें पडूं देत नाहीं.

जो भाषण करीत नाहीं, तो कांहीं जाणत नाहीं—जो मनुष्य कोणत्याहि प्रकारें एखाद्या विषयांत बोलूं शकत नाहीं व चर्चा चालली असतां अगदीं मौन धरून बसतो त्याला त्या बाबतींत कांहीं कळत नाहीं असें समजावें.

जो भिऊन वागे, त्याचे मागें देव लागे—जो मनुष्य भीत भीत वागतो तो अधिक अधिक संकटांत पडत जातो. कोणतेंहि संकट आलें असतां डगमगून न जातां त्यास धैर्यानें तोंड दिलें पाहिजे म्हणजे त्याचें निवारण होतें. उलट घाबरून गेल्यास त्याच्यावर अधिक संकटें येण्याचा संभव असतो. तु०–भित्यापाठीं ब्रह्मराक्षस. देवो दुर्बलघातकः। अजापुत्र पहा. (गु.) जे भुतथी बीहे, तेने भुत वलगे. Harm watch, harm catch.

जो भुलला देवाला, तेणें पापाचा संचय केला—जो परमेश्वरास विसरतो त्याच्या हातून अनेक पातकें घडण्याचा संभव असतो; कारण ज्याच्या मनांत परमेश्वराचें चिंतन चाललेलें असतें तेव्हां त्याला कोणतेंहि पापकृत्य करीत करीत असतां त्याची आठवण होते व तीमुळें तो त्या पापकर्मापासून परावृत्त होण्याचा संभव असतो; तसें नास्तिकाच्या बाबतींत होत नाहीं.

जो भ्रमण करतो, त्याला संसार नसतो—ज्या मनुष्याला नेहमीं भटकावयाची संवय लागलेली असते, त्याला नीटपणें संसार करतां येत नाहीं.

जो मनुष्य कर्जदार, त्याला नेहमीं शब्दमार—जो मनुष्य ऋणकरी असतो त्याला नेहमीं दुसऱ्याचे वाक्प्रहार सहन करावे लागतात.

जो राहे देवाच्या निर्धारीं, तो जन्म मृत्यूला दूर करी—ज्याची परमेश्वरावर पूर्ण निष्ठा असते तो या जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतून मुक्त होतो.

जो वर पाहून चालतो, तो खाड्यांत पडतो—जो सरळ रस्त्याकडे खालीं पाहून न चालतां वरतीं आकाशाकडे डोळे लावून चालतो तो खड्ड्यांत पडल्या शिवाय राहात नाहीं. जो सारासार विचार न करतां नुसता गर्वाच्या दिमाखांत असतो त्याची हानि होण्याचा संभव असतो.

जो वागे तानमान, तोच या जगीं मिळवी मान—जो एकंदर सर्व गोष्टींचा ताळमेळ पाहून वर्तन करतो त्याला मान सन्मान मिळतो.

जो विजार शिवील तो हगायला भोंक राखील–ठेवील—मार्गे, जो इजार इ. पहा.

जो शिक्षा करूं पाहतो, तो कल्याण चिंततो—जो मनुष्य आपण केलेल्या चुकीबद्दल आपणास दंड करण्याची इच्छा करतो त्याच्या मनांत आपलें पुढें बरें व्हावें, आपली चुकी करण्याची खोड जावी, अशी सदिच्छा असते, म्हणूनच तो असें करतो. तेव्हां त्याबद्दल राग मानण्याऐवजीं आदर बाळगावा.

जो श्रमी, त्याला काय कमी—जो श्रम करतो त्याला कोणत्याहि गोष्टीची उणीव भासत नाहीं. कारण त्याला ती श्रम करून मिळवतां येते.

जो सरावा पडला, तो स्वभावच जडला—कोणत्याहि गोष्टीची एकदां संवय झाली म्हणजे ती कायमची

जडते. ती सुटत नाहीं, म्हणून चांगल्या गोष्टींचा सराव करीत राहावें. Habit is second nature.

जो सवतीला वश्यीं पडला, त्याचा कारभार ढिला झाला—जो मनुष्य दोन बायका करून, त्यांपैकीं एकीच्या तंत्रानें चालूं लागतो त्याच्या सर्व संसाराचा गोंधळ होतो. (ही म्हण सवत असणारिणीनें केलेली दिसते.)

जो संसारीं नांदला, तेणें सुचाविलें देवाला—['सुचाविलें' बद्दल 'सुखविलें' असावें] जो मनुष्य संसार व्यवस्थित करतो तो परमेश्वरासहि आवडतो.

जो सारखा धांवतो, तो शर्यतीस मुकतो—केवळ धांवण्यानें शर्यत जिंकतां येत नाहीं तर दमानें व योग्य वेळीं धांवण्याचा जोर केला तरच शर्यतींत पुढें येण्याचा संभव असतो; नाहींतर मनुष्य सारखा धांवत गेल्यानें आधींच थकून जातो. त्याप्रमाणें जो मनुष्य नेहमींच आपलें सामर्थ्य खर्च न करतां तें योग्य प्रसंगाकरतां राखून ठेवतो तोच यशस्वी होतो.

जो स्पष्टवक्ता तो कपटी नसतो—जो मनुष्य स्पष्टपणें आपल्या मनांतील गोष्टी बोलून टाकतो त्याच्या मनांत कांहीं राहात नाहीं व त्याचें आंत एक बाहेर एक असें कांहीं नसतें.

जो स्वतः नम्र, तो हुकूम करण्याला योग्य—ज्याच्या ठिकाणीं स्वतःनम्रता असते तो इतरांसहि नम्रता शिकवूं शकतो व त्याची आज्ञाहि इतर लोक बरोबर पाळतात. जो स्वतः च दुसऱ्याची आज्ञा पालन करण्याच्या कामीं चुकारपणा करतो तो दुसऱ्यावरहि हुकमत गाजवूं शकत नाहीं. स्वतः शिस्तींत राहणाराच इतरांस शिस्त लावूं शकतो.–सवि १३७८.

जो हंडीमें होगा, सो रकाबीमें आवेगा—[रकाब = जेवण्याचें ताट] जर भांड्यांत असेल तर ताटांत येईल. तु०–आडांत असेल तर पोहऱ्यांत येणार.

जो हरघडी शपथ घेतो, तो घातच करतो—जो नेहमीं आपल्या प्रामाणिकपणाबद्दल शपथा वाहून त्याचें प्रदर्शन करीत असतो त्याचा प्रामाणिकपणा केवळ वरवरचा असून त्याच्या मनांत कपट आहे असें पक्कें समजावें व त्यापासून सावध असावें. तु०–The lady protests too much. He distrusts his own faith who often swears.–Italian.

जो हरिरंगीं रंगला, त्याचा संसार परतला—परमेश्वर चिंतनांत जो गढून गेला तो संसारापासून मुक्त झाला.

जों——जों जवळ ओवरा, तों जग सोयरा—जोंपर्यंत मनुष्याजवळ कांहीं माया आहे तोंपर्यंत त्याचे सर्व आप्त, बंधु त्याच्याभोंवतीं गोळा होतात. त्याजवळ कांहीं नाहींसें झालें म्हणजे सर्व सोडून जातात. संपदा बहु आलिया-घरी, सोयरे जमा होति त्या घरीं। गेलियास ती दूर होउनी, बंधुसोयरे जाति सोडुनी ॥

जों जों कोळसा उगळावा तों तों काळा निघतो—कोळसा कितीहि जरी उगाळला तरी त्यातून काळेंच निघतें; कारण त्याचें अंतरंग व बहिरंग सर्व काळेंच असतें. त्याप्रमाणें एखाद्या दुष्टाची वागणूक जों जों आपण अधिक अधिक खोलांत शिरून तपासावयास लागावें, तों तों त्याचा अधिकाधिक दुष्टपणाच बाहेर पडतो.

जों जों तोता (राघा) पढे, तों तों पिंझरेमें पडे; जों जों राघू बोले, तों तों पिंजऱ्यांत पडे—पोपटाचा जसा कंठ फुटत जातो व तो गोड गोड शब्द बोलूं लागतो तसतसा त्याचा मालक त्यास अधिकाधिक जपावयास लागतो व त्यामुळें त्याच्या वरचीं बंधनें अधिकाधिक दृढ होऊं लागतात. परस्वाधीन मनुष्य जितका जास्त गुणी असेल तितकीं त्याच्या वरचीं बंधनें अधिकाधिक दृढ होत जातात.

जों जों भिजे कामरी, तों तों भारी होय—कांबळें जों जों भिजत जातें तों तों जड होत जातें. व्याजानें कर्ज वाढत जाऊन मग डोईजड होतें.

जों जों मावळे–मावळतें, तों तों चावळे–चावळतें—म्हातारा होत चालला म्हणजे जास्त चळूं लागतो, चावळूं लागतो, बडबड करूं लागतो.

जोंवर आहे दामाजी, तोंवर हांजी हांजी—जोंपर्यंत आपणाजवळ संपत्ति असेल तोंपर्यंत लोक आपली खुशामत करतात.

जोंवर पैसा, तोंवर बैसा—वरीलप्रमाणें पैसा आहे तोंवर जगांत मान आहे. 'जोंवरि पैसा तोंवरि बैसा मंचकिं म्हणतील घ्याल हवा।'–अमृतराय.

जोंवर माती, तोंवर जाती—जोंपर्यंत आपलें शरीर आहे तोंपर्यंत आपली जात सुटत नाहीं. मनुष्याचे जातिधर्म त्याच्या मृत्यूपर्यंत सुटत नाहींत.

जोंवर श्वास, तोंवर आस—मनुष्य मरेपर्यंत नेहमीं चांगल्या गोष्टींची आशा बाळगून असतो. मनुष्य नेहमीं आशेवर जगत असतो. मनुष्याची आशा कधीं सुटत नाहीं. आशा अमर आहे. तु०–आयुष्य विषाचा प्याला। आशेनें गोडी त्याला ॥

जोंवरी देखिलें नाहीं पंचानना। तोंवरी जंबूक करी गर्जना (वल्गना)॥—जोंपर्यंत सिंहाला पाहिलें नाहीं तोंवर कोल्हे ओरडत असतात. देखणें पहा. –तुगा ३२३८.

जोंवरी सूर्यचंद्राची फेरी, तोंवरी कर्म चाले व्यवहारीं—मनुष्य यावच्चंद्रदिवाकरौ कर्म करीत असतो. या जगांतील घडामोडी विश्वाच्या अंतापर्यंत चालू राहतात.

जोकमार——जोकमारासारखा मिरविणें—(कर्ना.) गांवभर थाटमाट करून शिश्नपरायण होऊन फिरणें. कर्नाटकांत भाद्रपद शु० ८ पासून पौर्णिमेपर्यंत मोठें शिश्न असलेलें जोकमार नांवाचें एक मातीचें चित्र करून गांवांतून फिरवतात. याचा जन्म तराळाचे घरीं होऊन मृत्यु परटाच्या धुण्याच्या दगडावर होतो. परीट याचें सुतक धरतो.

जोखणें——पाणी जोखणें—परीक्षा करणें; शक्ति अजमावणें. 'तुम्ही बाळपणापासून फिरस्ते प्राणी। फिरोनि सर्व मुलुख जोखिलें पाणी॥'–प्रला ८३.१९३.

जोखीम——जोखीम उडाविणें—अंगावर धोक्याचें काम घेणें; साहस करणें.

❀ जोखमांत उडी घालतो, तो धक्का खातो—जो मनुष्य एखादें साहस अंगावर घेतो त्यास त्यापासून चट्टा बसल्याशिवाय राहात नाहीं.

जोग——जोग भरणें—१ मुरळीची पाटी धान्यानें भरणें; कोटंबा भरणें. २ जोगिणीची दीक्षा देणें; व्रत घेणें.

जोगडा——जोगडयाचें भात—एक जातीचें भात.

जोगण्या——जोगण्या बांधणें—(व.) मंत्रसामर्थ्यानें भीति घालविणें; अभय देणें.

जोगण्या लागणें—(व.) दहशत बसणें; धाक वाटणें; धास्ती बसणें.

जोगवा——दे ग बाई जोगवा!—(जोगवा मागतांना म्हणतात.) भीक मागणें; याचना करणें.

❀दे ग बाई जोगवा! म्हटल्यानें कोणीहि देत नाहीं; दे ग बाई जोगवा! म्हणून कोणी भीक घालींत नाहीं—भीक मागितल्यानें कांहीं मिळत नाहीं. आपणास पाहिजे तें स्वपराक्रमानें मिळवावें लागतें.–टि ३.५८.

जोगी——नवा जोगी आणि गांडभर (मांडभर) जटा—जटा वाढण्यास फार काळ जावा लागतो. यावरून लहानशाच कार्यानें गर्विष्ठ होऊन वागणाऱ्या इसमाबद्दल वापरतात. तु०–कालचा जोगी आणि मांडभर जटा.

जोग्याचें करडूं लाडकें—जोगी मनुष्यास कोणी आप्त इष्ट नसल्यामुळें त्याच्या प्रेमाचें अधिष्ठान त्यानें पाळलेली शेळी, कुत्रा वगैरे सारखे प्राणि हेच होतात व त्यांचाच त्याला लळा लागतो. त्याला कोणीं मारलेलें किंवा त्याचे हाल केलेले जोग्याला खपत नाहीं.

जोग्यानें कमावलें (जोडलें) आणि कुत्र्यानें खाल्लें; जोग्यांनीं जोडलें व कुत्र्यांनीं तोडलें—१ जोग्यानें एखादी गोष्ट राखून ठेवली व खूप जपून बाळगली तरी तिचा उपयोग त्याचा कोणी आप्तइष्ट नसल्यामुळें कोणा मनुष्याला होत नाहीं, तर शेवटीं त्याचा कुत्रा वगैरे कोणी पाळलेला प्राणि असतो तोच त्याची विल्हेवाट लावतो. त्याचें सुखदुःख इतर कोणा मनुष्यास नसतें. २ जोग्याचे जिन्नस ठेवण्यास सुरक्षित जागा नसल्यानें कुत्रें पळवितें.–गांगा २०३.

जोजो——जोजो करणें—लहान मुलास पाळण्यांत निजवितांना 'जो जो रे!' असें म्हणतात. त्यावरून १ निजणें. २ निजविणें.

जोड——जोड करणें—१ सांधणें; एकत्र करणें; मिलाफ करणें. २ संपादणें; मिळवणें; प्राप्त करून घेणें; संचय करणें. 'पुण्याची करावया जोड जीव हा सज्जला।'–विक ६९.

पायाची जोड करणें—कृपा संपादणें; प्रेम संपादणें; मर्जी प्रसन्न करून घेणें. 'मी आपल्या पायाची जोड केली आहे.' 'दे पायाची जोड, मोरया, दे पायाची जोड।'

जोड देणें—लाभ देणें; प्राप्त करून देणें; मिळवणें. 'संतपदाची जोड, देरे हरि।'–अमृत १०८.

जोडणें——जोडतले कमि, मोडतले चड–(गो.) जोडणारे कमी, मोडणारे जास्त. भांडण लावणारे फार, मिटविणारेच कमी.

जोडता तो मोडता, तुका किल्या (गेट) चावता—(गो.) जो मिळवतो त्यानें खर्च केला तर इतरांच्या पोटांत कां दुखावें!

अधल्याचा जोडला आणि पिढीचा मोडला–अधला पहा

जोडला तरी भट, मोडला तरी गृहस्थ—एखाद्या भटाशीं स्नेह जोडला तरी फारसा लाभ होत नाहीं व एखादा गृहस्थ जरी मोडकळीच्या स्थितीला आला तरी तो आपला मोठेपणा सोडीत नाहीं.

जोडोनिया धन उत्तम वेव्हारें। उदास विचारें वेच करी॥—तुगा २२६०. चांगला प्रामाणिक धंदा करून

पैसा मिळवावा व त्याचा विनियोग निवृत्त मार्गानें करावा, त्याचा सद्व्यय करावा.

जोडा——जोडा उचलणें--मालकाचे जोडे उचलण्याचें काम करणें. (ल.) हलकी सेवा चाकरी करणें. 'प्रसंगीं आम्ही जोडाहि उचलणार व लढाईंत मरोनहि जाणार.'—हब ६.

कोणाचा जोडा कोणाचे पायांत नसणें--अनेक लोक एखाद्या समारंभाकरितां जमलें म्हणजे बाहेर काढून ठेवलेलें जोडे एकत्र मिसळतात व परत जातांना ज्याला त्याला आपला जोडा सांपडत नाहीं व भलताच पायांत घालून जावें लागतें. यावरून अव्यवस्था असणें; घोंटाळा माजणें; गोंधळ माजणें.

जोडा(जोडे) फाडणें–झिजविणें--जास्त खेपा घातल्यानें जोडा झिजतो व फाटतो यावरून. अनेक खेपा घालणें; येरझारा घालणें; हेलपाटे घालणें; एखाद्या कामाकरितां एकसारखें दीर्घकाल फिरणें.-गांगा २१९.

जोडे मारणें; जोडेपूजा करणें--१ खरडपट्टी काढणें, ताशेरा झाडणें; खरपूस समाचार घेणें. २ फजीति उडविणें; निर्भर्त्सना करणें.

जोड्यांतला खडा--जोड्यांत एखादा खडा शिरला कीं तो टोचल्याशिवाय राहत नाहीं व बाहेर लवकर पडत नाहीं. अगदीं प्रत्यक्ष घरांतली अडचण अशी असते कीं ती सारखी तापदायक होते व लवकर संपतहि नाहीं. 'ह्या नायकिणी म्हणजे जोड्यांतल्या खड्यासारख्या. त्रास दिल्याशिवाय राहत नाहींत, लवकर सुटून जात नाहींत.'—डोंगरेकृत, रंगी नायकीण नाटक.

❀ जोडा कोठें चावतो हें घालणारालाच कळतें—ज्याच्या अडचणी त्यासच माहीत. इतरांना कळणें शक्य नसतें. पुढील इंग्रजी म्हणीचा अनुवाद–The wearer best knows where the shoe pinches him. तु०--अळवाची खाज अळवास माहीत.

जोडयाची अणी, पागोटयाची बिनी, पण घरची बायको बटकीवाणी—पोषाखाचा शोक वगैरे खूप नखरेबाजपणाचा ठेवावयाचा पण घरची स्थिति पाहूं गेलें तर बायकोच्या अंगावर मोलकरणीप्रमाणें लक्तरें असावयाचीं. अशा वरवर देखावा करणाऱ्या पण आंतून भिकारी असणाऱ्या मनुष्यांबद्दल म्हणतात.

जोडी——जोडींत गोडी असणें—ऐक्यांत फायदा असतो. एकसे दो भले. संहतिः कार्य साधिका।

जोडीवांचून गाडा ओढला जात नाहीं—एकट्या बैलाच्यानें कांहीं गाड़ी ओढत नाहीं. त्याला दुसरा बैल जोडीला लागतो. त्याप्रमाणें मनुष्य एकटा फारसें काम करूं शकत नाहीं. मोठमोठीं कामें करावयाचीं म्हणजे त्यास अनेकांचें साहाय्य लागतें.

जोडी——जोडि जोडतल्या गेलि न्हयि, खरचैतल्या गेलि—(गो.) पैसा हा मिळवणाऱ्याचा नसतो तर खर्च करणाराचा असतो. मिळवणाऱ्यानें खूप मिळवून संभाळून ठेवावें आणि दुसऱ्या कोणी तरी त्याची उधळमाधळ करावी असाच प्रकार बहुधा आढळतो.

जोडीपेक्षां मोडि चड–(गो.) आयापेक्षां खर्च अधिक.

जोडी म्हारू हाडिल्लॉ तॉ खुना झोंबिल्लॉ—(गो.) आपली भरभराट व्हावी म्हणून देवचार वश करून घरांत आणला आणि तोच उलटून आपल्या मानगुटीवर बसला. एखाद्या दुर्जनाला साह्यासाठीं बोलवावें आणि त्यानेंच पुढें आपलें सर्वस्व लुबाडावें, अशा प्रसंगीं ही म्हण वापरतात.

जोत——पुढील जोत, तसें मागील जोत—पुढील जोडलेल्या बैलांची जशी गति असेल त्यामानानें मागील बैलांची जोडी काम करते. ज्याप्रमाणें पुढारी माणसें उत्साह दाखवतील त्यामानानें मागील माणसांचा कामाचा उत्साह त्यावर अवलंबून असतो. पुढारी तसे अनुयायी.

जोत——जोत धरणें—तेज, शोभा संपादन करणें; सौंदर्य वाढणें; तजेला चढणें; चमकूं लागणें.

जोताड——जोताड लावणें--आगलावेपणा करणें; आग लावणें.

जोंद्र्यो——जंद्रो पहा. **जोंद्र्यो गेल्यो, खिणां उल्लयात्**—(गो.) पायांतल्या सांखळ्या गेल्या फक्त वण तेवढे राहिले आहेत. ऐश्वर्य नष्ट व्हावें आणि त्याची दाहक स्मृति तेवढी मागें उरावी अशा प्रसंगीं म्हणतात.

जोंधळे——जोंधळे उचलणें—जोंधळे हातांत घेऊन शपथ वाहणें. हातांत धान्य, बेल, तुळशीपत्र वगैरे घेऊन शपथ घेण्याचा पूर्वी प्रघात असे यावरून, शपथ करणें.

जोंधळे खाणें--ऋणानुबंध असणें. 'ज्याचे जोंधळे खाल्ले असतील त्याच्या घरीं पडेल' असें उपवर मुलीबद्दल म्हणतात. मागें पहा.

❀ जोंधळकुव्या आणि नांगरगव्या--अडाणी कुणब्यास उद्देशून ही म्हण वापरतात.

जळत घर भाडयानें आणि जुने जोंधळे काढयानें घेऊं नयेत—मागें जळणें पहा.

जोंधळ्याचा गोंधळ--खाण्यास असल्यावर खाणाराचा जमाव पुष्कळ मिळतो.

नासलीं मिरीं जोंधळ्याला हार जात नाहींत—मिरीं हीं तिखट असतात. तीं जरी नासलेलीं असलीं तरी जोंधळ्यापेक्षां कांहीं तरी तिखट लागणारच. एखादा वैभवशाली मनुष्य किंवा अभिमानी मनुष्य किती जरी खालावला तरी तो एखाद्या दुबळ्या मनुष्याप्रमाणें कधीं अगदीं नम्र व्हावयाचा नाहीं. तो आपला मोठेपणा कधीं सोडीत नाहीं व मानहानि करून घेणार नाहीं.

जोनग्या——जोनग्या लागणें--(व.) ज्या वस्तूची भीति वाटत असेल त्याच वस्तूचा ध्यास लागणें; टोंचणी लागणें; रुखरुख लागणें.

जोम——जोमांत असणें—१ झोकांत,थाटांत असणें; वैभवांत असणें; दिमाखानें मिरवणें. २ जोरांत, उत्साहयुक्त असणें; दमांत असणें;तारुण्याच्या,शक्तीच्या वगैरे भरांत असणें.

जोर——जोर करणें-लावणें; जोरांत येणें--जबरदस्तीनें वागणें; मस्ती करणें; मगरूरीचें वर्तन करणें; उन्मत्तपणानें उत्तरें देणें.

जोर देणें--१ पुष्टी देणें; टेंकू लावणें; आधार देणें. २ महत्त्व देणें; भर देणें; विशेषत्वानें उल्लेख करणें; मानणें. ३ अवलंबून असणें.

*जोर थोडा घुस्सा बडा--अंगांत फारसें सामर्थ्य नसतां विनाकारण रागावणें, रुसणें वगैरे प्रकार करावयाचे. 'तीं 'जोर थोडा आणि घुस्सा बडा' काय करतील !"—भाव २४.

जोरांत जोर मनगटाचा--आपल्या स्वतःच्या ठिकाणीं जोर असेल तरच वाटेल तें काम होतें. इतर साधनें, साहाय्य वगैरे पुष्कळदां कुचकामाचीं ठरतात.

जोर——जोर रट्टा खैं पेजेक, घैरंव रट्टा खैं जागेक—(गो.) कांजी मिळत नाहीं म्हणून ताप रडतो, जागा मिळत नाहीं म्हणून कोळी रडतो. ज्याला खायला नाहीं त्याच्या अंगांत ताप राहात नाहीं, जेथें जागा नाहीं तेथें कोळी घर करीत नाहीं.

जोरू——जोरू साथ, पैसा गांठ--आपली बायको नेहमीं आपल्याजवळ ठेवावी. तिला कधीं आपल्यापासून दूर ठेवूं नये; नाहींतर तिचें आपल्यावरील प्रेम कमी होतें. त्याप्रमाणेंच आपलें धन आपल्याजवळ असलें तरच वेळेवर उपयोगी पडतें. दुसऱ्याजवळ ठेवलें असतां वेळेवर कामीं येत नाहीं. 'आसकी बाप निरासकी मा' इत्यादि दोह्यांत वरील चरण आहे. आस पहा.

जोशी——जोशीबोवा कोठें गेले? गोवऱ्या थापत हात गेले ! कान गेल्याला किती दिवस झाले ? चारहि उडवे ग्यांच केले !--(व.) एका ग्रामजोशाची बायको बहिरी होती व तिला गोवऱ्या थापण्याचा उद्योग असे. एकजण जोशीबोवाकडे कांहीं कामानिमित्त आले, व त्यांनीं विचारलें जोशीबोवा कोठें गेले ? बाई गोवऱ्या थापीत होती. ती जोशीबुवांचा पत्ता सांगण्याऐवजीं म्हणते, गोवऱ्या थापून थापून हात निकामी झाले. या उत्तरावरून गृहस्थ समजला, कीं बाई बहिरी आहे. म्हणून त्यानें विचारलें, किती दिवसांपासून तुम्ही बहिऱ्या झाला ? बाई म्हणते, समोरच्या चारहि उडव्यांतील गोवऱ्या मीच आपल्या हातानें केल्या. बहिरेपणामुळें असा घोटाळा उडाला. विचारावें एक व उत्तर यावें विलक्षणच, अशा स्थितीला ही म्हण लागते.

ज्या——ज्याचा तो--१ एकएकटा; प्रत्येक; स्वतःच. 'ज्याचा तो पडला शाहणा, मग दुसऱ्यांनीं काय शिकवावें.' २ दुसऱ्यावर अवलंबून नसणारा; स्वतंत्र.

ज्याचा त्याला--सर्वांना; प्रत्येकाला; आपापला; स्वतःसंबंधीं. 'ज्याची त्याला काळजी पाहिजे, दुसरा किती पाहणार ?'

ज्याचें नांव तें--अगदीं; बिलकुल. 'पण ज्याचें नांव तें, हिचें एकच उत्तर !' —मूक.

ज्याच्या त्याच्यावर हत्यार धरणें--कोणीहि भेटेल त्यावर ताशेरा झाडणें. सरसकट सगळ्यावर टीका करणें; प्रत्येकांस त्रास देणें वगैरे. —नि ९.

ज्यांत त्यांत--प्रत्येक कामांत; हरएक गोष्टींत; प्रत्येक बाबतींत.

* ज्या गांवच्या बोरी, त्याच गांवच्या बाभळी—बोरीलाहि कांटे व बाभळीलाहि कांटे. तेव्हां एक जर म्हणू लागली कीं मी मऊ आहे, तर दुसरी विरुद्ध साक्ष देईल ना! एकाच गांवचे किंवा निकट परिचयाचे असल्यानें परस्परास पुरतेपणीं ओळखणें.

ज्या गांवाला गेले, त्या गांवचे झाले--१ जिकडे गेले तिकडेच रमले, मागची शुद्ध नाहीं, या अर्थी. २ ज्या देशाप्रमाणें वागणें. तु०—गंगागये गंगादास०

ज्या गांवास जाणें नाहीं, त्या गांवची वाट कशाला विचारावी—ज्या गोष्टीशीं आपला अर्थाअर्थी संबंध नाहीं

त्या गोष्टीची विनाकारण चौकशी कशाकरितां करावी. ' होऊनि गोसावी गोसावी । हरिकथाचि परिसावी ॥ गमन नसे ज्या गांवीं । तेथिल वाट कशास पुसावी ॥'-अमृत.

ज्या गांवीं जावें, तैसें व्हावें--ज्या गांवांत आपणास राहावयाचें असेल त्या गांवच्या रीतीप्रमाणें वागावें. तु०-When in Rome do as Rome does. देश तसा वेश.

ज्या घरीं दिली पोरी, तिला त्या घरची लागली रीतभात सारी—प्रत्येक स्त्रीला आपल्या सासऱ्याकडील घरची रीतभात लागणें स्वाभाविक आहे.

ज्या घरीं बळ असे वनितेचें । त्या घरीं धिक् जिणें पुरुषाचें॥—ज्या घरीं स्त्रियांचें वर्चस्व असतें त्या घरीं पुरुष निर्माल्यवत् असतात. तु०-अबला यत्र प्रबला बालो राजा (शिशुरवनीतो) निरक्षरो मंत्री । नहि नहि तत्र धनाशा जीविताशापि दुर्लभा भवति ॥-सुर १७०. ७४७. अनायके न वस्तव्यं न वसेद्बहुनायके । स्त्रीनायके न वस्तव्यं न वसेद्बालनायके ॥-सुर १५४. ३६.

ज्या जमिनीच्या मालकीचा पत्ता नाहीं, ती सरकारच्या घरांत जाई—जी जमीन किंवा कोणतीहि वस्तु बेवारस असते ती सरकारी म्हणून जप्त होते.

ज्या जैशी संगति, त्या तैशी गति—संगत चांगली असल्यास चांगलीं कार्यें होतात; वाईट असल्यास वाईट कर्मं उत्पन्न होऊन परिणामहि चांगला वाईट होतो. तु०-Man is known by the company he keeps.

ज्या मुखीं स्तुति, त्याच मुखीं निंदा—ज्या गोष्टीबद्दल एकदा फार चांगलें बोलावयाचें त्याच गोष्टीबद्दल पुन्हां कांहीं कारण नसतां वाईट बोलावयाचें, ही गोष्ट विसंगत आहे. आपल्या बोलण्यास कांहीं धरबंद नाहीं, एकदां एक एकदां त्याच्या उलट आपण बोलतों असें होतें.

ज्या रंगाचा चष्मा, त्या रंगाची वस्तु—चष्म्याची कांच ज्या रंगाची असेल त्या रंगाच्या सर्व वस्तू दिसतात. ज्या दृष्टीनें आपण एखाद्या गोष्टीकडे पाहावें तशी ती दिसते. सज्जनास सर्व लोक सज्जन व दुर्जनास दुर्जन दिसतात. तु०-कावीळ झालेल्या मनुष्यास सर्व पिवळें दिसतें.-संक ५.३.९१.

ज्या राष्ट्रीं चहाड कानघुसे, तेथें प्रजेस सुख नसे--ज्या राज्यामध्यें चुगलखोरांचें प्राबल्य असतें तेथें प्रजेस सुख मिळत नाहीं.

ज्या रोगावर नाहीं दवा, तो भोगायला हवा—असाध्य रोग भोगलाच पाहिजे, त्यास इलाज नाहीं. What can not be cured must be endured.-Latin.

ज्या सोन्यानें कान तुटतो तें कशाला—ज्या गोष्टीपासून आपणास त्रास होत असेल ती बहुमोल असली तरी तिचा त्याग केला पाहिजे. तिची आशा धरून किंवा बरवर दिखाऊपणाकरितां ठेवून त्रास सोसण्यांत काय अर्थ आहे ! तु०-सोन्याची सुरी झाली म्हणून उरीं खुपसावी काय !

ज्याका आसा बारा हजार माड, ताका आसा तेरा हजार रीण—(गो.) बारा हजार माडाचीं झाडें त्याला तेरा हजार कर्ज. मोठ्या लोकांचीं कर्जेंहि मोठींच असावयाचीं.

ज्याका फावता, ताका गावता--(गो.) ज्याला सामर्थ्य असेल त्याला मिळतें.

ज्याका बायल नाका, ताका बायलेचो वर्गय नाका--(गो.) ज्याला बायको आवडत नाहीं त्याला तिच्या माहेरचीं माणसें तरी कशीं आवडणार ?

ज्याका संचत जासा, ताका विपत्त आसा--(गो.) ज्याला संतति त्याला विपत्ति भोगावी लागते.

ज्याचा अंत गोड, तें चांगलेंच असतें; ज्याचा अंत गोड, तें सर्वेच गोड--ज्याचा शेवट गोड होतो तें सर्वच चांगलें वाटतें. परिणामावरून गोष्टीची परीक्षा करणें. तु०-All is well that ends well.

ज्याचा अनुभव त्याला, आपण काय बोला—जसा ज्याला एखाद्या गोष्टीचा अनुभव आला असेल, तसें त्याचें त्या गोष्टीबद्दल मत बनतें. अनुभवावरून गोष्टीची परिक्षा करणें किंवा मत बनविणें. ' चंदूसारखा सुशिक्षित नवमतवादी गुरुभजनीं लागला, त्याअर्थीं त्याला तसेंच कांहीं तरी कारण असेल. ज्याचा अनुभव त्याला, आपण काय बोला !'-कावळा आणि ढापी, पृ ५३.

ज्याचा कंटाळा,त्याचाच वानवळा; ज्याचा कंटाळा, त्याला आला वानवळा—जी गोष्ट आपणाला मुळींच आवडत नसेल तीच गोष्ट एखाद्यानें मुद्दाम वानगीकरितां म्हणून अगदीं मोठ्या आदरानें भेट म्हणून पाठविली असतां ती नाकारतां तर येत नाहीं; पण मनांतून तर आवडत नसते. अशा वेळीं मोठी चमत्कारिक स्थिति होते. आपणास एखादी गोष्ट मनापासून करावयाची नसतांना इतर कांहीं गोष्टींचें आपणावर वजन पडून, अगर प्रसंगामुळें तीच गोष्ट करावयाची पाळी येणें व तींतून सुटका होण्यास मार्ग नसला म्हणजे जी स्थिति होते ती व्यक्त करण्यास ही म्हण वापरतात.

ज्याचा खावा ठोंबरा, त्याचा राखावा उंबरा—[ठोंबरा=न दळतां अर्धवट शिजविलेलें अन्न.] ज्याचें अन्न

खावें त्याचा दरवाजा राखावा, अगर दुसरी कांहीं तरी चाकरी बजावावी हें योग्य.

ज्याचा खावा माल, त्याचे गावे ख्याल—ज्याची खावी पोळी० पहा.

ज्याचा गांव, त्याला नाहीं हगायला ठाव; ज्याचा गांव त्याला, ठाव नाहीं हगायला; ज्याचा गांव त्याला नाहीं ठाव; ज्याचा गांव त्यास बसावयास नाहीं ठाव—एखादा मनुष्य सर्व गांवाचा मालक असतांहि त्याची बारीक सारीक गोष्टींवरहि सत्ता चालूं नये व इतरांनीं मौज मारावी अशी स्थिति या म्हणीनें व्यक्त होते. तु०–मालक दिलगीर नी चोट्टा खुशाल. धन्याला धत्तुरा नि चाकराला मलीदा.

ज्याचा जार त्यासीच भार—एखादें मूल ज्यापासून जन्मतें त्यावरच त्याच्या पोषणाचा भार असतो. 'ज्याचा जार त्यासीच भार । हा आहाणा बोलती सर्वज्ञ नरा ।'–कथासारामृत १५.१२.

ज्याचा त्याचा स्वजातीकडे ओढा—प्रत्येकाला आपली जात अधिक जवळची असते व तींत मिसळून तो तिच्या कल्याणासाठीं थोडाफार झटतो. तु०–हंसीं हंस बकीं बक मिसळे, जन ओढतो स्वजातिकडे ।–मोरोपंत.

ज्याचा दंडा, त्याचा हंडा—जो जबरदस्त असेल त्याला लाभ होतो. एखादी वस्तु कोणाची आहे असा वाद उत्पन्न झाला असतां जो त्यांत जबरदस्त असतो तो घेऊन जातो व बाकीचे बघत बसतात. तु०–बळी तो कान पिळी. Might is right.

ज्याचा दर्या, त्याचें वैभव—समुद्रावर ज्या राष्ट्राची सत्ता चालते त्याचा व्यापार अप्रतिबंध चालल्यामुळें त्याची संपत्ति वाढते; तें राष्ट्र वैभव संपन्न होतें. आरमाराची महती या म्हणींत व्यक्त होते.

ज्याचा बाण, त्याची मृगया—'ज्याच्या हातीं ससा तो पारधी' याप्रमाणें. 'पण ज्याचा बाण, त्याची मृगया ! ह्या वराहाच्या कुशींत घुसलेला हा बाण आहे माझा, अर्थात् मृगयाहि माझीच !'–काळेपाणी ३७४.

ज्याचा नाहीं उपयोग, तें अर्ध मोलीहि महाग—एखादी निरुपयोगी वस्तु कमी किंमतीला मिळाली तरी ती महागच पडते. कारण तिचा उपयोग कांहीं करतां येत नाहीं व जपून मात्र ठेवावी लागते व टाकून देण्याचा धीर होत नाहीं. तु०–हत्ती फुकट मिळाला तरी महागच.

ज्याचा भार, त्याला जोजार—ज्याच्यावर एखादी जबाबदारी येऊन पडते त्याला ती पार पाडण्याकरितां कष्ट करावे लागतात. No one knows the weight of another's burden.

ज्याचा माल त्याला हाल (त्याचे हाल), कोल्हीं कुत्रीं पडलीं लाल—एखाद्या वस्तूचा मालक बाजूला राहून भलतेच लोक येऊन, ती खाऊन पिऊन मजा मारीत असतात अशा वेळीं म्हणतात. तु०–मालक दिलगीर आणि चोट्टे खुशाल. चाकराला मलीदा आणि धन्याला धत्तुरा.

ज्याचा सोटा, त्याचें राज्य—जो जबरदस्त असतो तो सर्व सत्ता बळकावून बसतो. बळी तो कान पिळी.

ज्याचा हात खालीं, त्याच्या सुरकुत्या गालीं—ज्याचा हात रिकामा असतो म्हणजे ज्याच्या जवळ संपत्ति नसते त्याचे हाल होऊन तो कृश होतो व त्याच्या गालावर सुरकुत्या पडून तो अकालीं वृद्ध होतो. An empty purse fills the face with wrinkles.–सवि ३९५.

ज्याचा हात मोडेल, त्याच्या गळ्यांत पडेल—ज्याचा हात मोडतो त्यालाच तो गळ्यांत घालून हिंडावें लागतें. जो कृति करतो त्यालाच तिचें प्रायश्चित्त मिळतें.

ज्याची ओढी जड, ताचि सोयरीक् गोड्—(गो.) ज्याची रोवळी जड त्याचा संबंध गोड. ज्याच्याजवळ पैसा आहे त्याचा स्नेह करणें कोणालाहि बरें वाटतें.

ज्याची करावी कींव, तो घेतो जीव—एखाद्या मनुष्याला आपण दया दाखवून एखाद्या प्रसंगांतून सोडवावें पण तोच पुढें आपल्या जिवावर उठतो. असे कांहीं कृतघ्न लोक असतात त्यांच्याबद्दल ही म्हण वापरतात.

ज्याची कळ त्याला—ज्याला दुःख होतें त्यालाच तें कळतें व त्यालाच त्यापासून त्रास होतो.

ज्याची कळकळ त्याला—ज्यानें त्यानें आपल्याबद्दल काळजी घ्यावी. दुसरा कोणी आपली काळजी कशाला घेईल.

ज्याची कोणाला आशा नाहीं तो गरीब—ज्या मनुष्याच्या उत्कर्षाबद्दल कोणाला आशा वाटत नसते तोच खरा गरीब. किंवा ज्याच्यापासून कांहीं प्राप्ति होण्याची आशा नसते तो खरा गरीब. He is poor indeed that can promise nothing.–सवि १३५९.

ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी—टाळी वाजविणें म्हणजे स्तुति करणें, भाषणाला मान्यता देणें, चांगलें झालें असें दाखविणें. ज्याचे आपल्यावर उपकार आहेत, जो आपला आश्रयदाता आहे त्याला दुजोरा देणें कर्तव्यच आहे. त्याची आपण स्वाभाविकपणेंच स्तुति करतो.

ज्याची खावी भाकरी, त्याची करावी चाकरी--ज्याचें अन्न आपण खात असूं त्याचें काम करणें हें आपलें कर्तव्य आहे.

ज्याची चांगली कीर्ति, तो मेला तरी भूवरतीं--जो मनुष्य उत्तम कार्य करून कीर्ति मिळवतो तो मेला तरी जिवंत; कारण त्याची कीर्ति मागें कायम राहते. तु०-(अ) मरावें परी कीर्तिरूपें उरावें। (आ) देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी। मना सज्जना हेचि क्रीया धरावी॥ (इ) सूरतसे कीरत बडी बिनपंख उडजाय। सूरत तो जाती रही कीरत कबहुं न जाय॥

ज्याची जमात, त्याची करामत--जमात पहा.

ज्याची जसी नेत, तसी त्यास बरकत--(ऐति.) नियत पहा.-सनदापत्रें पृ. १४९.

ज्याची जिव्हा फार चालती, त्याची अकल थोडी असती--जो फार बडबड करतो त्याला फारशी बुद्धि नसते असें समजावें. बुद्धिवान् मनुष्य फार न बोलतां धीमेपणानें काम करतो. उथळ मनुष्य बडबड फार करतो. तु०-उथळ पाण्यास खळखळ फार.

ज्याची तरवार खंबीर, तो हंबीर--जो मनुष्य पराक्रमी असतो तो श्रेष्ठ पदास चढतो.

ज्याची तरवार, त्याचा दरबार--ज्याच्या हातांत सामर्थ्य असेल त्याला थोरपद प्राप्त होतें. शूर मनुष्याच्या हातांत सत्ता येते व त्याची सत्ता सर्व लोक मान्य करतात.-केसरी १०-१०-३९.

ज्याची त्याला आवडली, आणावयास गेला तो म्हणे काळी--एका मनुष्यानें लग्न केलें व आपल्या बायकोला आणावयास दुसऱ्या मनुष्यास पाठविलें. त्याची बायको त्याला आवडत असे पण हा मूळ म्हणून पाठविलेला मनुष्य तिला काळी म्हणून नांवें ठेवावयास लागला! पण त्याला वास्तविक ती काळी गोरी म्हणण्याचें कारण नाहीं. तिच्या नवऱ्याला ती आवडली म्हणजे झालें. संबंध नसलेल्यानें आवडनावड दाखविणें योग्य नाहीं. ज्याचे त्याला गोड शेजाऱ्याला द्वाड.

ज्याची त्याला चोप नाहीं, शेजाऱ्याला-शेणपुंजीला झोंप नाहीं--एखाद्याला स्वतःच्या कामाची काडीची फिकीर नसते, पण शेजाऱ्याला किंवा घरच्या मोलकरणीला मात्र ती वाटते. ज्याचा फायदा व्हावयाचा त्याला कामाची चिंता नसतां ती भलत्याच तिऱ्हाइतला असणें. चोप पहा.

ज्याची नाहीं कोय, त्याची पुढची डोय--पूर्वी वस्त्यानें साफ हजामत करण्याचाच बहुधा प्रघात होता व साबणाचाहि उपयोग फारसा करण्यांत येत नसे. तसेंच ठराविक वारीच हजामत करणें योग्य समजत. त्यावेळीं केंस नरम पडण्याकरितां प्रथम डोक्यास पाणी लावून मळ वगैरे साफ निघण्याकरितां कोयीनें घासीत असत व ही क्रिया पुष्कळ वेळां न्हाव्यापुढें बसण्याच्या आधीं करीत. अशा वेळीं ज्याची कोय वगैरे घासून झाली असेल त्याचा क्रम हजामत करण्याच्या बाबतींत आधीं लागून, ज्याची झाली नसेल त्यास मागें राहावें लागे. यावरून ही म्हण पडली असावी.

ज्याची नीति सुरेख, त्याच्या तोंडीं राख, पण ज्याची नीति खोटी त्याच्या तोंडीं तूप रोटी--जो मनुष्य नीतिनियमांस अनुसरून सच्चेपणानें वागतो, लांडीलबाडी करीत नाहीं तो गरीब राहतो व जो असत्य मार्गाचा अवलंब करतो, लांच लुचपत घेतो तो श्रीमंत होतो. असा जगाचा उलटा न्याय आहे. तु०-सतीच्या दारीं न बत्ती पण शिंदळीच्या दारीं हत्ती.

ज्याची पै, त्याला लई--एकाद्याची क्षुल्लक वस्तु असली तरी ती त्याला फार मोठी वाटते.

ज्याची लागे चाड, तो उडे सात माड (ताडमाड)--ज्या मनुष्याची विशेष गरज लागते व ज्यावांचून अडतें असें वाटतें, त्याला फार गर्व चढतो.

ज्याची सर त्याला, उगीच प्रतिष्ठा कशाला--एखाद्या मनुष्यानें एखाद्या मोठ्या मनुष्याचें कितीहि अनुकरण केलें अथवा स्वतःच्या मोठेपणाची कितीहि प्रतिष्ठा दाखविली, तरी त्याला त्या खऱ्या मनुष्याची सर येत नाहीं. पोकळ डौलानें मोठ्याची बरोबरी करतां येत नाहीं.

ज्याचे अंगची मस्ती, त्याचे अंगीं जिरती--जो मनुष्य शक्तीचा फार गर्व वाहतो त्याची रग केव्हां तरी त्याच्याच कर्मामुळें जिरते. Let them fly in their own grease.

ज्याचे अंगीं नाहीं पाणी, त्याचा जीव मेल्यावाणी--ज्याच्या अंगीं कांहीं करामत किंवा पराक्रम नसेल तो मनुष्य अगदीं मेल्यासारखा निरुपयोगी, दुर्बल असतो.

ज्याचे अंगीं सामर्थ्य तो राजा--ज्याला लोकांचें कल्याण करण्याची शक्ति आहे व जो तसें करतो तोच खरा राजा. 'जो प्रजेचे हलत करील धर्म स्थापील त्यास अधिकार नाहीं असें कसें घडेल! ज्याचे अंगीं०'-शिवदि ४१२.

ज्याचें अन्न खावें, त्याचें कल्याण चिंतावें--जो

आपणास आश्रय देतो त्याचें नेहमीं बरें चिंतीत राहणें हें कृतज्ञतेचें लक्षण आहे. तु०-ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी. ज्याचें खावें अन्न त्याचें पाहूं नये उणं.

ज्याचें असेल मढें, त्याला येईल रडें—ज्याचा आप्त वगैरे मरण पावलेला असतो त्यालाच त्याबद्दल दुःख वाटत असतें. बाकीचे लोक जे प्रेत संस्काराकरितां जमलेले असतात त्यांना त्याबद्दल कांहीं वाटत नसतें.

ज्याचे आईबाप मेले, त्याचें सर्व गेलें--आईबाप हे मुलांचे एकमेव आधार होत. त्यांच्याप्रमाणें दुसरा कोणीहि कामास येत नाहीं कीं रक्षण करीत नाहीं. (गु.) जेनी जाय आई, तेनी जाय सोलसे भलाई.

ज्याचे कपाळीं बाशिंग तो नवरा--विवाहादि प्रसंगीं नवरा मुलगा ओळखण्याचें मुख्य चिन्ह म्हणजे त्याच्या कपाळीं बाशिंग असतें हें होय. कोणत्याहि जमावांत जी विशेष महत्त्वाची व्यक्ति दिसेल तीच मुख्य व्यक्ति समजावी.

ज्याचें करावें बरें, तो म्हणतो माझेंच खरें—एखाद्याला त्याच्या बऱ्याचें सांगावें किंवा त्याचें बरें करण्यास जावें तर तो त्या गोष्टीस विरोधच करतो व आपलाच हेका चालविण्याचा प्रयत्न करतो.

ज्याचें कवाड ठेंगणें, त्यानें वांकून जाणें—ज्याच्या घराचें दार ठेंगणें असेल त्यानें त्यांतून वांकून गेलें पाहिजे. जशी परिस्थिति असेल त्याप्रमाणें वागलें पाहिजे. विशेषतः वाईट दिवस आले असतां नम्रपणा धारण करावा.

ज्याचें काम तागें करचें—(गो) ज्याचें काम त्यानेंच करावें. इतरांनीं केल्यास त्यांत बिघाड झाल्यावांचून राहात नाहीं. तु०-जो दुसऱ्यावरी विश्वासला०

ज्याचें काम त्यांनीं करावें, इतरांनीं गोते खावे-फजीत पावावें—ज्याला एखादें काम करावयाचा सराव असेल किंवा त्याचा तो धंदा असेल तरच त्याला तें साधतें. भलताच मनुष्य करूं लागल्यास त्यांत त्याला फटका मिळाल्याशिवाय राहात नाहीं. मूळ म्हण गुजराथी-जेनुं काम तेनूं ठाय बिजा करे सो गोता खाय.

ज्याचें काम त्यालाच—ज्याला एखादें काम करावयाचा सराव असतो त्यालाच तें साधतें. तु०-ज्यांचें त्याला गाढव ओझ्याला.

ज्याचें कुडें त्याच्यापुढें—[कुडें = कपट, कारस्थान] दुसऱ्याचें वाईट करूं पाहिल्यानें आपलें वाईट होतें. जो कपटानें दुसऱ्यास फसवूं पाहातो तोच त्यात सांपडून फसतो. 'ज्याचें कुडें त्याजपुढेंच राहे।' -सारुह ८.४८.

ज्याचें खावें अन्न, त्याचें पाहूं नये उणं—ज्याचा आश्रय घेतला असेल त्याचे दोष काढूं नये. आश्रयदात्यावर टीका करूं नये. ज्याची खावी पोळी० पहा.

ज्याचें खावें, त्यास न निंदावें—जो आपणास आश्रय देतो त्याबद्दल वाईट बोलूं नये. त्याबद्दल कृतज्ञता बुद्धि बाळगावी.

ज्याचें खावें मीठ, त्याचें करावें नीट—ज्याचें अन्न खावें त्याच्याशीं प्रामाणिकपणानें वर्तन करावें. यावरूनच निमकहराम व निमकहलाल शब्दप्रयोग.

ज्याचे खिशांत सुर्ती, तोच मंगळमूर्ती—[सुर्ती = सुरत येथें पाडलेला रुपया, कंपनीचा रुपया] ज्याच्याजवळ द्रव्य असतें त्याला सर्व मान देतात, त्याला देवाप्रमाणें भजतात.

ज्याचे गांठीं पैका, त्याचें ऐका—जो मनुष्य श्रीमंत असतो त्याचें सर्वजण ऐकतात. सर्व लोक त्याची खुशामत करावयास तयार असतात व त्याचा शब्द झेलीत असतात.

ज्याचें घर त्याला किल्ल्यासारखें—कोणीहि मनुष्य आपल्या घरांत बसला असतां त्याला दुसरा कोणी त्रास देऊं शकत नाहीं. किल्ला पहा. तु०-Every man's house is his castle.

ज्याचे घरीं काळी, त्याची सदा दिवाळी—काळी पहा.

ज्याचे चाकर म्हणविलें, त्यासाठीं मेहनत करावी—एकदां एखाद्याचा अनुयायी म्हणून जर आपण राहिलों, तर त्याच्यासाठीं पडतील ते कष्ट केले पाहिजेत. पुढें पहा.

ज्याचें चाकर व्हावें, त्यासारखें चालावें—एकदां आपण एखाद्याची चाकरी पत्करली म्हणजे त्याच्या मर्जीप्रमाणें वर्तन केलें पाहिजे.

ज्याचें चातुर्य त्याच्या पुरतें--ज्याची बुद्धि त्यालाच उपयोगी पडते, ती दुसऱ्यास सांगून तिचा त्याला कांहीं उपयोग होत नाहीं. तु०-शिकवली बुद्धि आणि बांधली शिदोरी फारशी कामास येत नाहीं.

ज्याचें जया ध्यान, तेंच होय त्याचें मन--मनुष्य ज्याच्याबद्दल एकसारखा विचार करीत असतो तद्रूप त्याचें मन होतें व तशीच त्यास बुद्धि सुचते. कुंभारीण पहा.

ज्याचे जवळ अर्थ आहे, त्याशीं मत्सर करूं नये—श्रीमंत मनुष्याशीं स्पर्धा केल्यास त्यांत शेवटीं आपलेंच नुकसान अधिक होण्याचा संभव असतो.

ज्याचे जवळ अर्थ, त्याच्या अंगीं पुरुषार्थ—जो मनुष्य श्रीमंत असतो त्याच्या हातांत कोणतीहि गोष्ट करण्याचें सामर्थ्य असतें व म्हणून त्याला लोकहि मानतात.

ज्याचें जसें आचरण असेल तसें तो फल पावेल—करावें तसें भरावें, पहा. –रा ३.२५६.

ज्याचें जळे, त्याला कळे—ज्याचें खर्च होतें त्याला त्याबद्दल आंच लागते. एकदां एक मनुष्य एकाकडे पाहुणा म्हणून आला होता. सायंकाळीं दिवे लावण्याच्या वेळीं ओटीवर एक समई लावून ठेवण्यांत आली. तींत एक वात तेवत होती. त्या पाहुण्यानें त्यास तेवढा उजेड न पुरल्यामुळें एक चिंधी घेऊन तिच्या वाती करून सर्व नाकांत ठेवून पेटवून दिल्या. तेव्हां यजमानानें त्यास आपण हें काय करतां असें विचारलें असतां त्यानें उत्तर केलें कीं, 'तेल जळे व पीडा टळे' म्हणजे तेल जळलें असतां सर्व विघ्नें दूर होतात. तेव्हां यजमानानें उत्तर दिलें कीं, तें खरें हो! पण ज्याचें जळे त्याला कळे! असें म्हणून इतर वाती मालविल्या.

ज्याचे ज्याच्या परी, पुरवितो हरि—परमेश्वर ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें, अधिकाराप्रमाणें त्याला वागवितो व त्याचे मनोरथ पूर्ण करतो.

ज्याचें तोंड पाहूं नये त्याची गांड पाहण्याचा प्रसंग (येतो)—ज्याच्याशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध येऊं नये अशी इच्छा असते त्याच्याशीं आपणास अपमानास्पद अशा प्रकारचा संबंध ठेवण्याची पाळी आली असतां फार दुःखदायक प्रसंग येतो. तु०–अडला नारायण०

ज्याचें (होतें) त्यानें नेलें, पायां पडलें (पडणें) वायां गेलें—एखादी वस्तु दुसऱ्याची मागून आणलेली असतां ती जर त्यानें परत नेली तर त्याबद्दल वाईट वाटून काय उपयोग व त्याच्या मनांत जर ती न्यावयाचीच असेल, तर त्याला विनवणी करण्यांत तरी काय अर्थ? त्याचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं.

ज्याचे त्याला, आपल्याला उठाठेव कशाला—ज्याचें त्यानें निस्तरावें, तिऱ्हाइतास त्यांत पडण्याचें काय कारण. पुढें पहा.

ज्याचें त्याला, खटपट आम्हांला—एखादा मनुष्य अर्थाअर्थीं त्याचा कांहीं संबंध नसतां एखाद्या कामांत गुंततो; त्याला खटपट तर करावी लागते पण तीपासून त्याचा कांहीं एक फायदा न होतां, तिसऱ्याचेंच नफा नुकसान होण्याचा संभव असतो, तेव्हां तो असें म्हणतो. तु०–कोणाच्या म्हशी कोणाला उठाबशी.

ज्याचें त्याला, गाढव ओझ्याला—गाढवावर कितीहि माल असला व तो चांगला वाईट कसाहि असला तरी त्याचा त्याला कांहीं उपयोग नसतो. तो केवळ भार वाहण्याचा मालक असतो. माल धन्याचाच असतो.–गांगा १००.

ज्याचें त्याला बरें—ज्याची त्याला गोष्ट शोभून दिसते. ज्यानें त्यानें आपआपल्या योग्यतेप्रमाणें पोशाख, खाणेंपिणें वगैरे ठेवलें म्हणजे तें योग्य दिसतें. भलत्यानेंच भलतें केलें म्हणजे तें वाईट दिसतें.

ज्याचें त्याला लखलाभ असो!—ज्याची वस्तु त्यालाच ठीक दिसते व त्यालाच ती बरें वाईट फल देणारी असते. आपल्याला एखादी वस्तू किंवा कांहीं नको असेल किंवा मिळत नसेल तेव्हां म्हणतात.

ज्याचे त्याला होईना, पाहुणा दळून का खाईना—पाहुणा पहा.

ज्याचें त्यास प्रिय असतें—मनुष्याला आपली गोष्ट चांगली दिसते व आवडते. आईबापांस जसें आपलें मूल कसेंहि असलें तरी त्याचे लाड करावेसे वाटतात, त्याप्रमाणें स्वतःची कोणतीहि वस्तु आपणास आवडते. किमप्यस्ति स्वभावेन सुंदरं वाप्यसुंदरम्। यदेव रोचते यस्मै भवेत्तत्तस्य सुंदरम्॥ –सुर १६३.४७७.

ज्याचे दांत, त्याचे घशांत—एखाद्यानें दुसऱ्यास फसविण्याकरितां एखादें कारस्थान केलें असतां तें त्याच्यावरच उलटून त्यालाच शासन झालें म्हणजे ही म्हण वापरतात. तु०–ज्याचें कुडें त्याचे पुढें.

ज्याचें नशीब त्याच्या बरोबर—प्रत्येक मनुष्य आपल्या प्रारब्धाप्रमाणें या जगांत सुख दुःखें भोगतो व तो कोठेंहि गेला तरी त्याचें प्रारब्ध त्यास सुटत नाहीं. कर्मानुगो गच्छति जीव एकः।

ज्याचें नाहीं कोणी, तें पडलें भयाणवाणी—(व.) ज्याचें कोणी काळजी करणारें प्रेमाचें माणूस उरलें नाहीं त्याच्यावर कांहीं संकटप्रसंग ओढवल्यास एकटें शुश्रुषेविरहित पडावें लागतें.

ज्याचे पदरीं नाहीं पैका, त्यास वाटे बोलतां शंका—जो मनुष्य निर्धन असतो त्याला कोणाबरोबरहि वागण्यांत वगैरे फार संकोच वाटतो; कारण त्याला आपल्या गरीबीची नेहमीं लाज वाटत असते व कोणी आपला अपमान करील कीं काय ही भीति असते.

ज्याचे पदरीं पाप, तो मुंबईला जातो आपोआप—

मनुष्य मुंबईस गेला म्हणजे तेथें तो व्यसनाधीन होण्याचा संभव असतो, शिवाय त्याचें आयुष्य घरच्यापेक्षां कष्टमय होतें व घरच्या सुखास तो आंचवतो. यावरून तो पापी असल्याशिवाय कांहीं त्यास घरदार सोडून मुंबईस जाण्याची पाळी येत नाहीं असा समज.

ज्याचे पदरीं पाप, त्याला पोरी होती आपोआप—फार मुलें झालीं असतां त्याची जोपासना करणें अत्यंत कष्टदायक असतें. तेव्हां ही गोष्ट पूर्वजन्मींच्या किंवा या जन्मींच्या कांहींतरी पापकृत्यामुळेंच एखाद्याच्या वांट्यास येते अशी समजूत आहे. विशेषतः मुली झाल्या म्हणजे त्यांचीं लग्नें करण्याची आणखी एक जबाबदारी पडून तीमुळें मनुष्य मेटाकुटीस येतो. पाठभेद—ज्याचे पदरीं पाप त्याला पोरें होतीं आपोआप.

ज्याचे पदरीं संपत्ति, त्याचे आर्जव करिती—जो मनुष्य श्रीमंत असतो त्याचीं सर्व लोक आर्जवें करतात.

ज्याचें पोट दुखेल, तो ओंवा मागेल—ज्याला दुःख असतें तो तें निवारण्याच्या मार्गे असतोच. इतरांनीं प्रयत्न करण्याचें कारण उरत नाहीं.

ज्याचें पोट शेतावर, त्यानें बसावें शेताचे भेरेवर—ज्याचा निर्वाह शेतावर असतो, त्यानें त्या शेतांत पीक असतां नेहमीं बांधावर बसून राखोळी करीत असावें.

ज्याचें मन त्याला ग्वाही देतें—एखादी गोष्ट चांगली किंवा वाईट आपण केली किंवा नाहीं हें जरी दुसऱ्यास ठाऊक नसलें, तरी आपल्या मनास ठाऊक असतें व त्याची आठवण मन नेहमीं आपणांस देत असतें.

ज्याचें मन दुखविलें आहे, त्यावर विश्वासूं नये—एखाद्या मनुष्यास आपण अपकार केला असतां अथवा एखादी गोष्ट त्याच्या मनाविरुद्ध केली असतां, त्याची वृत्ति आपणांस प्रतिकूल होण्याचा संभव असतो. याकरितां त्यावर कोणत्याहि कामांत विश्वासून राहणें धोक्याचें आहे. 'चितिकां दीपितां पश्य फटां भग्नां ममैवच।भिन्नश्लिष्टा तु या प्रीतिर्न सा स्नेहेन वर्धते ॥'—पंच ३.१३०.

ज्याचें मन भोळें ताका देव दिता केळें, जाचें मन कपट ताका देव दिता थापट—(गो.) भोळ्याला देव केळें देतो व कपट्याला थप्पड देतो. सरळ वागणुकीच्या मनुष्यावर देवाची कृपा असते व कपटी मनुष्यावर देवाचा रोष होतो.

ज्याचे मनीं कपट, त्याचें होतें तळपट—जो मनुष्य कपटाचें वर्तन करतो त्याचा शेवटीं घात झाल्याशिवाय राहात नाहीं. कपटाचीं कृत्यें कांहीं काळ जरी अपकारक झालीं नाहींत तरी पापाचा घडा केव्हां तरी भरून कपटकृत्यें उघडकीस येऊन तीं माणसाला धुळीस मिळविल्याशिवाय राहात नाहींत. तु०—नाधर्मश्चरितो लोके सद्यः फलति गौरिव। शनैरावर्तमानस्तु कर्तुर्मूलानि कृन्तति ॥

ज्याचे मनगटांत जोर, तो बळी—ज्याच्या अंगांत सामर्थ्य असतें तो पराक्रमी ठरतो.

ज्याचें मनोरथावर वांचणें, त्याचें उपासावर मरणें—जो आपल्या इच्छेप्रमाणें वागून भलत्या आशेवर राहून दिवस घालवितो, तो उपाशीं मरतो.

ज्याचें मरण ज्या ठायीं, तेथें जाई आपले पायीं—जेथें एखाद्या मनुष्याचें मरण त्याच्या प्रारब्धांत लिहिलेलें असतें त्या ठिकाणीं त्याचें नशीब त्याला नेमकें घेऊन जातें. अशाबद्दल अनेक गोष्टी सांगण्यांत येतात.

ज्याचे मागें झेंगट नाहीं, तो गृहस्थ नाहीं—जो मनुष्य संसारी असतो त्याला संसारांतील अनेक कामें नेहमीं करावीं लागतात. जो संसारी नसून सदा फटिंग असतो त्याच्यामागें कांहीं व्याप नसतो.

ज्याचें यश त्याला, काय असे भलत्याला—यशाचें फळ ज्यानें श्रम केले त्यालाच मिळतें. इतरांना त्याचा काय उपयोग? मूळ तुकारामाचें पद—'ज्याचें सुख त्याला, सुख त्याला। काय असें भलत्याला ॥' असें आहे.—नव ४४८.

ज्याचें लष्कर त्याची दिल्ली—(ऐति.) दिल्ली ही राजधानी हस्तगत करण्यास मोठें लष्कर पाहिजे. तें ज्याजवळ असेल तो दिल्लीचा बादशहा होईल. ज्याच्या हातांत सत्ता असेल तो राज्य करील.—केसरी २-१-४०.

ज्याचें लागावें, त्याला द्यावें—आपण ज्याचें ऋण काढलें असेल तें त्याचें त्यास परत द्यावें. तसेंच आपण जर एखाद्याकडून उपकार करून घेतला असेल, तर त्याबद्दल त्यास उतराई व्हावें.

ज्याचें वेंचें, त्याला जाचें—ज्याचें जळे त्याला कळे, पहा.

ज्याचें वेड, त्याला गोड—एखाद्या मनुष्याला एखादा नाद असतो किंवा एखादें व्यसन असतें. त्याला कितीहि सांगितलें तरी तो नादच त्याला प्रिय असून तो कधींहि सुटत नाहीं.

ज्याचे सरे, तो दिवा लावून करे—ज्याची अन्नसामुग्री संपते त्याला रात्रीं बेरात्रीं सुद्धां कष्ट करून अन्न मिळवावें

लागतें. किंवा ज्याचें सुकृत सरतें त्याला उघड उजेडांतहि कुकर्म करण्याची बुद्धि होते व त्याचें कटु फळ त्याला मिळतें.

ज्याचें सैन्य. त्याचा देश—लष्कराशिवाय राज्य मिळत नाहीं व सांभाळतांहि येत नाहीं.–केसरी ७-११-४१.

ज्याचे हातीं ससा, तो पारधी—एकदां रानांत एक शिकारी शिकार करण्यास गेला असतां त्यानें एका सशास पकडलें. इतक्यांत दुसरा एक मनुष्य तेथें येऊन तो ससा बळकावून आपली शिकार आहे असें सांगू लागला. याप्रमाणें त्यांचा तंटा चालला असतां ते शेवटीं न्यायाधिशाकडे निकाल मागण्याकरितां गेले. न्यायाधिशानें त्यांचें दोघांचें म्हणणें ऐकून घेऊन असा निर्णय दिला कीं, ज्याच्या हातांत ससा आहे त्याचीच ती शिकार मानावी. दुसऱ्याच्या कृत्याचा आपणास फायदा घेणाऱ्याबद्दल म्हटलें जातें.–शाब २.२८१. Possession is eleven points of the law, and they say there are but twelve.

ज्याच्या गळ्यांत सरी तें सारी रात्र घोकणी करी, व ज्याचे गळ्यांत दोरी तें सारी रात्र निद्रा करी—ज्याजवळ कांहीं मालमत्ता, ऐवज असतो त्याला त्याबद्दल काळजी वाटत असल्यानें गाढ झोंप लागत नाहीं व जिवाला सारखी हुरहुर लागलेली असते. पण ज्याच्याजवळ कांहीं नसतें तो बिनघोर असून सुखानें सर्व रात्र गाढ झोंपी जातो.

ज्याच्या गाठीं पैका, त्याचें म्हणती सर्व ऐका—ज्याच्याजवळ संपत्ति असेल त्याच्या शब्दाला सर्व मान देतात.

ज्याच्या घरीं दाणा, त्याचें नांव नाना; ज्याचे जवळ पैका, त्याचे बोल ऐका—(बांय.) श्रीमंत माणसालाच सर्व महत्त्व असतें; त्याला लोक चाहातात; त्याचें ऐकतात.

ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र—समुद्र जिंकावयास आरमार पाहिजे. आरमाराचें महत्त्व पूर्वीहि कळत असे.–भूतावर भ्रमण, पान २९.

ज्याच्या तंगड्या, त्याच्या गळ्यांत—शेरास सवाशेर भेटला म्हणजे दुसऱ्याला अपकार करणाऱ्या माणसाला स्वतःच्याच हातून शिक्षा मिळते. एखाद्यानें दुसऱ्याकरितां केलेल्या कारस्थानांत त्यालाच अडकविणें. ज्याचें कुडें त्याचे पुढें.

ज्याच्या पदरीं मुलगी, त्यानें करावी सलगी—लग्नाची मुलगी असलेल्यानें दुसऱ्याशीं वैर करूं नये, तर मैत्री जोडत जावी. म्हणजे लग्नास त्रास पडणार नाहीं.

ज्याच्या पागोट्याला जरीचे गोल, गरीब म्हणतो करा माझ्या पटक्याचें मोल—मोठ्यापुढें लहानानें आपला दिमाख दाखविणें.

ज्याच्या हातीं लाठी, म्हैस त्याच्या पाठीं—मागें पहा.

ज्यांना भूतकाळ नाहीं त्यांना वर्तमानकाळ व भविष्यकाळ कोठून असणार—ज्या लोकांना पूर्वीची कांहीं परंपरा नाहीं, मागील कांहीं इतिहास नाहीं त्यांना वर्तमानकाळांतहि फारसें महत्त्व मिळत नाहीं व भाविष्यकाळीं देखील वैभव मिळण्याची आशा नाहीं. –पामो ३४५.

ज्यानें इंद्रियें जिंकलीं, त्यानें सर्व जिंकलें—जो मनुष्य आपलीं इंद्रियें आपल्या स्वाधीन ठेवतो त्याला सर्व बाबतींत यश येतें.

ज्यानें करावें पाप, त्यानेंच ओतावें माप—ज्यानें एखादें वाईट कृत्य केलें असेल त्यानेंच तें निस्तरलें पाहिजे. –संक ५.३.८५.

ज्यानें केसकरणी गिळल्या त्याला बोडकीचा काय पाड—केंस पहा. जो सुवासिनी, पति असणाऱ्या स्त्रियांसहि नाडावयास कमी करीत नाहीं त्यानें विधवांस, निराश्रितांस नागवलें तर त्यांत नवल काय ?

ज्याणँ देखलॉना राक्षिल्लॉ गोबोर, ताणँ देखलो नासण्या पीठ—(गो.) ज्यानें पाहिली नाहीं चुलींतली राख त्याला दिसलें नाचणीचें पीठ. मग काय विचारतां ?

ज्याणँ पळैली ना शिंपी, ताणें पळैलें काळूं—(गो.) ज्याला शिंपसुद्धां पाहायला मिळायची नाहीं त्याला कालव (शिंपेतला जीव) पाहायला मिळालें तर त्याचा आनंद गगनांत मावावयाचा नाहीं.

ज्यानें पाहिला नाहीं दिवा, त्यानें पाहिला आवा; ज्यानें न पाहिला आवा त्यानें पाहिला दिवा—आवा पहा.

ज्यानें फळ इच्छावें, त्यानें फूल न तोडावें—ज्याला मोठ्या लाभाची इच्छा असेल त्यानें अल्प लाभांत संतुष्ट होऊं नये.

ज्यापुढें धुपाटणें नाहीं, तो देव नाहीं—ज्याची पुजा होत नाहीं, त्याच्या देवपणांत कांहीं अर्थ नाहीं. त्याला देव म्हटलें काय व न म्हटलें काय सारखेंच. लोकांनीं मानलें तर देव नाहीं तर दगड.

ज्याप्रमाणें दुःख, त्याप्रमाणें सुख—ज्या संसारांत जसे कांहीं दिवस दुःखाचे जातात तसें कांहीं दिवस सुखाचेहि

जातात. जगामध्यें सुख दुःख हें आलटून पालटून सर्वांसच भोगावें लागतें.

ज्याला आहे भाकरी, त्याला कशाला (पाहिजे) चाकरी—ज्याला खावयास प्यावयास पुष्कळ आहे त्याला काम करण्याची जरूरी नसते.

ज्याला कर नाहीं, त्यास डर नाहीं—ज्यानें एखादी वाईट गोष्ट केली नसेल तर त्यास तीपासून अपाय होण्याची भीति नसते. जो मनुष्य चोरी वगैरे करीत नाहीं त्याला त्याबद्दल धास्ती वाटत नाहीं.

ज्याला जें अकर्तृव्य तें करूं नये—जी गोष्ट करणें एखाद्यास योग्य नसतें त्यानें ती करूं नये.

ज्याला जोडा लागतो त्याला त्याचें दुःख (कळतें)—जोडा पहा. जो जोडा घालतो त्यालाच तो कोठें व कसा चावतो तें कळतें; त्याचें दुःख इतरांस काय माहीत? ज्याच्या ठिकाणीं एखादें व्यंग असतें त्यालाच त्याची बरोबर जाणीव असते. जोडा पहा.

ज्याला तोफेच्या आवाजाचें भय वाटतें, त्यानें समरांगणांत जाऊं नये—ज्याला तोफांची भीति वाटते त्याचा लढाईत जाऊन कांहीं उपयोग होणार नाहीं. ज्याला एखाद्या कामांतील साहस झेंपणार नाहीं त्यानें त्या कामास हात घालूं नये.

ज्याला नाहीं अक्कल, त्याची घरोघर नक्कल—ज्याला बुद्धि नसते त्याची सर्व लोक चेष्टा करतात. निर्बुद्ध मनुष्य हा सर्वत्रांच्या चेष्टेचा विषय होतो.

ज्याला नाहीं अबरू, तो पडला गबरू—ज्यानें एकदां अब्रूची चाड सोडली तो अगदीं मोकाट सुटतो.

ज्याला नाहीं आगापिच्छा, त्याची सर्वच दुर्दशा—ज्याला मागेंपुढें कांहीं बंधन नाहीं, वडील माणसेंहि नाहींत व लहान मुलें वगैरेहि कोणी नाहींत, त्याची कोणीच काळजी घेत नाहीं व त्यालाहि कांहीं आशा नसल्यामुळें तो फार दुःखी असतो व त्याला कोणी विचारीत नाहीं.

ज्याला नाहीं काज, त्याला पृथ्वीचें राज—ज्याला कशाची जरूरी नाहीं, जो अगदीं संन्याशाप्रमाणें असतो, त्याला पृथ्वीचें राज्य मिळतें. ज्याला महत्त्वाकांक्षा आहे, जो त्यासाठीं धडपडतो त्याला नाहीं. असा उलटा न्याय. ज्याला कांहीं आशा, अपेक्षा नसते त्याला सर्व पृथ्वी मोकळी असते. तो पूर्णपणें स्वतंत्र असतो. त्याच्यावर कोणाची सत्ता चालत नाहीं. तु०-निस्पृहस्य तृणं जगत्।

ज्याला नाहीं कोणी, तो पडला वनीं—ज्याला कोणी आप्तसोयरा नाहीं तो रानांत पडल्याप्रमाणें एकटा ओसाड्यासारखा असतो. त्याची कोणी काळजी घेत नाहीं.

ज्याला नाहीं गोत्र, त्याला काश्यप गोत्र—गोत्र ठाऊक नसलेल्यास काश्यप गोत्र देतात.

ज्याला नाहीं प्रतिष्ठा, त्याची काय करावी थट्टा—ज्याला कांहीं मान सन्मान नाहीं, ज्याची कांहीं योग्यता नसते त्याची कोणीहि मस्करी करावी.

ज्याला नाहीं लाज, त्याला पृथ्वीचें राज्य—ज्यानें एक लाज सोडली त्याला दाही दिशा मोकळ्या असतात. तु०-एकलज्जां परित्यज्य सर्वत्र विजयी भव!

ज्याला पानाचें भय वाटतें, त्यानें वनांत जाऊं नये—ज्याला पानापासूनहि भीति वाटते त्यानें रानांत जाण्यांत अर्थ नाहीं. ज्याला एखाद्या क्षुल्लक गोष्टीपासूनहि भीति वाटते त्यानें कोणत्याहि साहसांत पडण्याचें करूं नये. येथें पान म्हणजे झाडाचें पान किंवा पान लागणें म्हणजे सर्प चावणें असाहि अर्थ संभवतो. ज्याला सापाचें भय वाटतें त्यानें रानांत सापांची भीति अधिक असल्यामुळें मुळींच जातां कामा नये.

ज्याला बुद्धि नाहीं, त्याला भांडवल नाहीं—जो मनुष्य बुद्धिवान् आहे त्याला पैशाची कधीं तूट पडत नाहीं. तो वाटेल तेथून पैसा उभा करूं शकतो पण ज्याला बुद्धि नाहीं त्याला कोठेंहि पैसा मिळूं शकत नाहीं.

ज्याचा भार, त्याला जोजवार—जोजवार पहा.–श्रुतिगुणनाटिका ७६.

ज्यावर कुत्रें भुकतें, तो चोर नव्हे—ज्या ज्या मनुष्यावर म्हणून कुत्रें भुंकूं लागेल त्या सर्वांसच चोर समजणें मूर्खपणा आहे. सर्वांसच सरसकट एका मापानें मोजूं नये.

ज्यास आहे चातुर्य, त्याचें करिती आश्चर्य—जो मनुष्य चतुर आहे त्याचें सर्वजण कौतुक करतात.

ज्यास नाहीं साळी, तो करी आईची टवाळी—मोठ्या वडील माणसाची थट्टा लहानानें केल्यास म्हणतात. सामान्यतः आपल्या मेहुणीची थट्टा जांवयानें करण्याची चाल आहे पण ज्या जांवयास मेहुणी नाहीं तो जर सासूची थट्टा करूं लागला तर त्यास मूर्ख समजतील. घरांत नाहीं मेहुणी० पहा.

ज्यास सुखदुःख होतें, त्याला तें अनुभवतें—ज्याला एखाद्या गोष्टीपासून प्रत्यक्ष चटका मिळतो त्यालाच तो जाणवतो, इतरांचा त्याच्याशीं काय संबंध? इतर लोक त्याबद्दल बेपर्वा असतात. परदुःख शीतळ.

ज्यासाठीं लुगडें तें उघडें—गुह्यभाग झांकण्यासाठीं लुगडें असतें. पण तेंच जर उघडें टाकलें तर लुगड्याचा हेतु काय ? ज्या हेतूनें मुख्यतः एखादी गोष्ट करावयाची तो हेतु जर साध्य न झाला तर ती गोष्ट करण्यांत तरी काय फायदा ?

ज्यालें——ज्यालेंपण –जन्म; आयुष्य. जिंदगी; हयात.

ज्याहां——ज्याहां तिकोनकी टोपी, व्हां ऋद्धि सिद्धि—गोऱ्या लोकांच्या डोक्यास तिकोनी पांढऱ्या टोप्या असत, त्यावरून लोक म्हणत असत. –पामो १३८.

ज्योति——बारा ज्योतिर्लिंगें—सोमनाथ (सोरटी), महाकाल (उज्जनी), केदार (बदरी), विश्वेश्वर (काशी), ओंकारेश्वर (महेश्वर), त्र्यंबकेश्वर (त्र्यंबक), घृष्णेश्वर (वेरूळ), नागनाथ (अवंढें), वैजनाथ (परळी), भीमाशंकर (खेड, भीमा), मल्लिकार्जुन (श्रीशैल), सेतुबंध (रामेश्वर).

❀ ज्योतींत ज्योत जाईल—प्रत्येक प्राणि परमात्म्याचा अंश आहे. तेव्हां तो मरण पावला म्हणजे त्याची जीवज्योति परमात्म्यांत विलीन होते ही समजूत या म्हणीनें व्यक्त होते. –संग्रामगीतें ४८.

ज्वर——अष्ट ज्वर—वात, पित्त, कफ, सन्निपात, आगंतुक, वातपित्त, वातकफ, कफपित्त.

❀ ज्वरें बिटाळलें मुख । तें दुधातें म्हणे कडू बिख॥– ज्ञानदेवी (अध्याय ९). ताप आला असला म्हणजे तोंड वाईट होतें व त्यावेळीं दूध सुद्धां कडू लागतें. त्याप्रमाणें आपलें मन ठिकाणावर नसेल किंवा व्यग्र असेल तर चांगली गोष्टहि वाईट वाटते.

ज्वानी——ज्वानी आहे तोंवर, उधळेपणाचा पश्चात्ताप कर—तारुण्यांत आपण उधळपट्टी केली तरी जोंवर तारुण्य शिल्लक आहे तोंपर्यंतच जर आपणास आपल्या उधळेपणाचा पश्चात्ताप झाला तर आपण आपल्या पुढील आयुष्याकरितां कांहींतरी तजवीज करूं शकतो.

ज्वानी तोंवर छानी—मनुष्य तरुण असतां सुंदर दिसतो तसा तो पुढें दिसत नाहीं.

ज्वानींत उमेदीची उडी, म्हातारपणीं थोडी––मनुष्य तरुण असतां त्याच्या ठिकाणीं उत्साह, जोम, साहस वगैरे गुण असतात, तसे ते वृद्धपणीं टिकून राहात नाहींत.

ज्वानींत गुलाबी शेजेवर, म्हातारपणीं कांट्यावर—तारुण्यांत जर फार उधळपट्टी केली तर म्हातारपणीं हाल काढण्याचा प्रसंग येतो; तरी अशी वेळ येऊं देऊं नये. याकरितां तारुण्यांतच जपून खर्च करावा.

ज्वारी——ज्वारी भडकणें—(व.) ज्वारी वाळणें.

झ

झक——झक मारणें—१ ढोबळ चूक करणें; भलतीच गोष्ट करणें; नसत्या फंदांत पडणें. २ निंद्यकर्म, व्यभिचार वगैरे करणें; अनीतिकारक गोष्ट करणें. ३ पश्चात्ताप होणें; स्वतःकडे दोष घेणें; चुकी कबूल करणें.

झक मारीत करणें–जाणें–देणें–येणें; झकत करणें–जाणें—इच्छा नसतांहि निरुपाय म्हणून करणें; नाइलाज म्हणून करावें लागणें; निमूटपणें करावें लागणें; निरुपायास्तव करणें भाग पडणें. ' या भरवसेनें दवडिलें लुब्धा । येईल झक्मारु म्हणोनि । '–दावि ४४०.

झक मारीत राहणें–बसणें—निरुपायानें स्वस्थ बसणें; कांहीं इलाज नाहीं म्हणून हात चोळीत बसणें; नाइलाज होणें; अगतिक होणें. ' मागें दौलत किल्ले स्वामींचे स्वामी घेतील. कर्जदार झक मारीत राहतील. '–ख १.१७७.

झक मारून झुणका खाणें—(क.) मूर्खपणा करणें; भलतीच गोष्ट करणें; गैरकृत्य करणें. याचे अनेक अशिष्ट अर्थ आहेत.

झकत——नाक दाबलें म्हणजे झकत तोंड उघडेल—नाक पहा.

झगडा——झगडाझगड—१ भांडाभांडी; कलह; भांडणतंटा; ओढाताण. २ कज्जा; खटला; वैर; शत्रुत्व.

झगडारगडा––खडाजंगी; मोठें भांडण; धडाधडी; मारामारी; कलह.

❀ आपला दाम कुडा नि वाण्याशीं झगडा––आपला पहा.

झगडा तोडी मैत्री––भांडण झालें असतां मैत्री राहात नाहीं.

झगड्याक बळ कसलें ? उत्तर येतां तसलें––(गो.) भांडणाला बळ कशानें येतें ? तर उत्तर–प्रतिउत्तरानें. एक मनुष्य स्वस्थ बसेल तर भांडण वाढत नाहीं. तु०–एका हातानें टाळी वाजत नाहीं.

झगमग——झगामगा आणि माझ्या पदराकडे बघा––नुसती छानछोकी करणाऱ्या व कामधाम किंवा व्यवहार करतां येत नसलेल्या स्त्रीबद्दल म्हणतात.

झगा——**झग्यास झगा लागणें**--संबंध येणें; सलोखा, मैत्री होणें. '(मुसलमानी) मिजाजीखालीं कोण्हाचे झग्यास कोणाचा झगा लागतां कामा नये.'–शिवदि १७५.

झंझावात——**झंजावातानें धुग्ळा फिरे आकाशानें**—वादळ उठलें म्हणजे सर्व आकाश धुळीनें व्याप्त होतें. त्याप्रमाणें एखादें मोठें भांडणतंटा वगैरे उपस्थित झाल्यास जिकडे तिकडे वातावरण बिघडून जातें, सर्वांचीं मनें अस्वस्थ होऊन कोणी कोणाशीं बोलत नाहींसें होतें व परस्परांत वितुष्ट येतें.

झट——**झट घेणें**—(व.) बालंट घेणें; विनाकारण दोषारोप करणें; आळ घेणें; कुभांड रचणें.

झट लागणें--लिगाड लागणें; व्याद मागें लागणें; झेंगट लागणें; ससेमिरा पाठीशीं लागणें; लचांड पाठीमागें लागणें. 'कीं भितां मज एका उद्धरितां लागतील फार झटें।' -मो संशय ४५.

झट लावणें--(व.) कंटाळा येईपर्यंत गप्पा मारणें; गप्पा छाटीत बसणें; बाता खापालणें.

झटाळ——**झटाळ शेट आणि फटकाळ नगरी**—व्यसनी माणूस किंवा वाईट गांव हीं सारखींच त्याज्य.

झड——**झड घालणें**--१ धांवून जाणें; झेंप घालणें. 'झडकरिं झड घाली धांव पंचानना रे।' 'तें पाहुनि कवि वदले, झड घाली लाव कीं असि ससाणा।'–रामकरुणाष्टकें. -मोद्रोण ११.५१.

झडे येणें—लोभाविष्टपणें मागें लागणें; पाठ धरणें; पिच्छा न सोडणें. 'तो गुरु नव्हे भिकारी। झडे आला॥' -दा ५.२.२०.

❀ **झड वारें येतां आसतांना माडा-मुळांत रांवचें न्हंय**--(गो.) सोसाट्याचें वारें असेल तेव्हां माडाच्या खालीं राहूं नये (कारण नारळ डोक्यांत पडून डोकें फुटावयाचें). मोठी भयंकर खळबळ उडत असेल तेव्हां त्यांत पडूं नये.

झडझडणें——**झडझडून निघणें**—मन कठोर करून सर्वांचा त्याग करून निघणें; अंतःकरण कठोर करून, मोहाचा त्याग करून निघून जाणें; सर्व सोडून जाणें.–मोमौसल१.७९.

झडती——**झडती देणें**—१ हिशेब देणें; झाडा देणें. २ अपराधाबद्दल शिक्षा भोगणें. 'जाणो स्वधर्माची देती येथोंचि वीर ते झडती॥'–मोकर्ण ३३.४३.

झणझणीत——**झणझणीत उत्तर**–तिखट, बोचणारें, वर्मी लागणारें उत्तर. 'एकदां तिला वाटलें कीं वसंतरावांना चांगलें झणझणीत उत्तर देऊन गप्प बसवावें.'-जादूगार पृ.५७.

झपाटा--**एखाद्याच्या झपाट्यांत सांपडणें**-पकडींत येणें; झापेंत सांपडणें; ताब्यांत जाणें; कचाटींत, तावडींत सांपडणें; आधीन होणें.

एका झपाट्यानें—एका झटक्यांत, तडाक्यांत, दमांत; एका घावांत; एका सपाट्यांत.

❀ **चट्टीपट्टीचा बोभाटा, झिपरी मारी झपाटा**--चट्टीपट्टी पहा.

झवणें——**झवण्यांत खोकला**--(अशिष्ट) चैनींत अडथळा, अडचण. सुखांत दुःख.

झंवण्याच्याकी किचमणी चढ--(गो.) (अशिष्ट) मुख्य काम करण्यापेक्षां घासाघासीच जास्त.

झवताना मेलों तर कुळाव्याक दोष ?—(गो. कु.) [कुळावा = लग्न जमविणारा मध्यस्थ] (अशिष्ट) आपल्याकडे दोष न घेतां कोणाला तरी दोष देण्याची वृत्ति.

झवूं द्या, नाहींतर पोट फोडूं द्या—(अशिष्ट) बाप दाखीव नाहींतर श्राद्ध कर, याप्रमाणें.

झळंबणें——**झळंबून धरणें**—झाडाला फळें वगैरे लोंबत राहणें; लोंबकळत राहणें; लटकत राहणें; ओळंबत राहणें.

झाक——**पावसानें झाक घालणें**--अंधारी येणें; ढगांची काळोखी येणें; आभाळ दाटून येणें. 'पावसानें झाक घातली परंतु पडत नाहीं.'

झाक पडणें--(व.). संध्याकाळ होणें; काळोख पडणें; तिनिसांजा होणें.

झांकडी——**झांकडी मारप**-(गो.) गप्पागोष्टी करणें.

झांकणें——**झांक उघड**--झांकणें व उघडणें; उघड झांक पहा.

झांकली मूठ--एखाद्याची अप्रकट पण वास्तविक परिस्थिति; आबांत असलेली स्थिति; अंतःस्थ परिस्थिति.

झांकलें माणिक--दिसावयाला साधा व खराखुरा थोर विद्वान् गुणी माणूस. गाजावाजा न झालेला, अप्रसिद्ध विद्वान्, कलावंत, इ.

झांकल्या पाठीचा—ज्यास एखादी सबब सांगतां येईल किंवा क्षम्य मानतां येईल असा कोणत्या तरी योग्य कारणाकरितां करावा लागलेला (अपराध, दोष.)

झांकल्या पाठीनें--प्रतिष्ठितपणें; आपला बोज कायम

ठेवून; आपली पत न घालवितां; आपल्या पदवीस हानि न पोंचेल अशा रीतीनें.

झांकल्या मुठीनें--गुपचूप; बभ्रा न करतां; गुप्तपणें; गाजावाजा न करतां; बाहेर परिस्फुटता न होऊं देतां.

झांकसापा करणें--(व.) दाबादाबी करणें; दाबून जिरवून टाकणें; दडपून टाकणें.

❀ **न्हातीचे बाल आणि खातीचे गाल झांकत नाहींत**--खाणें पहा.

झांकली मूठ सव्वा लाखाची--मूठ जोंपर्यंत झांकली आहे तोंपर्यंत आंतील वस्तूचें नक्की मोल लोकांस कळत नाहीं. तें मोल सव्वालाखहि असूं शकेल. पण एकदां कां उघडली कीं खरी किंमत कळते व ती फार थोडी असते. गुप्त ठेवण्याजोगें गुप्तच ठेवावें. व्यंग नेहमीं झांकून ठेवावें. 'एखाद्या प्रबळ शत्रूनें वर डोकें उचललें नाहीं तोंपर्यंत ही झांकली मूठ सव्वा लाखाची राहील'-V. S. २.५७.

झांकली मूठ सव्वा लाखाची, उघडली म्हणजे फुकाची--वरीलप्रमाणेंच.

झांकलें पाप, दुणें दुराचरण--पाप करणें ही गोष्ट वाईट पण तें झांकून ठेवणें ही दुप्पट वाईटपणाची गोष्ट होय.

झांकलें माणिक, बुद्धि-गुण आणिक--जो मनुष्य खरोखर विद्वान् असून आपल्या विद्वत्तेचा डांगोरा पिटीत नाहीं त्याची योग्यता फार मोठी समजावी व तो वरवर फुशारकी मारणाऱ्या विद्वानापेक्षां खरोखरच अधिक बुद्धिवान असतो म्हणूनच त्यास बाहेर बभ्रा करणें आवडत नाहीं. तु०-उथळ पाण्याला खळखळाट फार, खोल पाणी संथ वाहतें.

झांकल्या पापाला वाचा फुटते--एखादें वाईट कृत्य कितीहि गुप्त रीतीनें केलें व तें उघडकीस येऊं नये म्हणून कितीहि प्रयत्न केले तरी तें केव्हांना केव्हां तरी उघडकीस आल्यावांचून राहात नाहीं.

झांगड——झांगड झांगड-भांडाभांडी; भांडण तंटा; कलह; कर्कशा.

झांगडझिंगा--धांगडधिंगा; दंगामस्ती; गोंधळ; घोटाळा.

झांगरा——झांगरे शिकविणें; झांगरेबाजी करणें--(ना. व.) [झांगरा=उडवाउडव] उडवून देणें; पत्ता लागूं न देणें.

झांज——झांज खाणें-झाडणें—खरडा काढणें; रागावणें; ताशेरा झाडणें; खरडपट्टी काढणें. 'उगाच आमच्यावर झांज खाण्यांत काय अर्थ आहे.'

झांज पडणें-जाणें—१ झांजा वाजणें; आवाज होणें; वाद्यें वगैरे वाजणें. २ भांडाभांडी होणें; चकमक उडणें; कलह पेटणें; वाचावाची होणें.

झाजर——झाजरमाडाचे गरे खाणें—[झाजरणें = खरचटणें.] झाडावरून पडून अंग खरचटल्यामुळें पीडित होणें.

झाझा; झ्यां झ्यां——झाझा--झाझाचें करणें-म्हणणें--घोड्यावर बसल्यावर झ्यां झ्यां म्हणून त्यास पळण्यासाठीं इशारा देतात किंवा पिटाळतात. यावरून निसटून जाणें; पळून जाणें; सूंबाल्या करणें; हातावर तुरी देणें.

झांट; झ्यांट——झांट मुंडावण--(शेटें काढण्याइतकें) अतिशय क्षुद्र काम; नीच काम.

झांटावणें--झांटाप्रमाणें कःपदार्थ मानणें; कांहींहि किंमत न देणें.

❀ **देवळाची गेली-फुटली घांट तर गुरवाचें (गुरविणीचें) गेलें झ्यांट**--देऊळ पहा.

झांटमें झिंगा, आणि लष्करमें दंगा--एकीकडच्या गोष्टीचा परिणाम भलतीकडेच होणें, लावणें. देवी देवळांत व नायटे गांवांत, याप्रमाणें.

झाड——झाड उभें करणें--एखादें काम उत्कृष्ट रीतीनें वठविणें; बहार करणें. छत उभारणें पहा.

(झाडास बांधलें तर) झाड घेऊन जाणें--(ऐति.) अगदीं भ्याड असणें; हिंमत सोडून पळून जाणें. 'पाठीवर काठी उडती तोंच जें होणें तें होईल. नाहीं तर झाडास बांधलें तरी झाड घेऊन जातील.'-माब ५५.

झाडपाल्याचें औषध—झाडाचा पाला, मूळ, फळ वगैरे प्रकाराचें औषध; वनस्पतीचें औषध; जडीबुट्टीचा दवा; रानटी दवा.

कोण्या झाडाचा पाला—तिरस्कार दाखविणारा शब्दसमूह. कःपदार्थ; यःकश्चित् मनुष्य. तु०-ने रथ, मी यासि वधिन, विषतरुचा प्रभु सि कायसा पाला ॥-मोद्रोण १९.१६.

झाडाचे राऊत दिसणें-करणें--भीति वगैरेमुळें झाडें वगैरे घोडेस्वाराप्रमाणें दिसणें; भेदरून जाणें; घाबरगुंडी उडणें; धास्ती खाणें.

झाडावरचें भूत--कोणीतरी तिरस्करणीय मनुष्य; नांव सुद्धां घेऊं नये असा क्षुद्र मनुष्य; नीच इसम.

झाडास पाळणे बांधणें--(ऐति.) शांतता, संतति संपत्ति, सुख नांदणें. ' प्रजा राज्यांतच राहून झाडास पाळणें बांधले. '–इब ३९.

सुक्या झाडास वांक (बांक) लावणें--वाळलेलें झाड कधीं वांकत नाहीं त्याप्रमाणें हट्टी मनुष्य कितीहि सांगितलें तरी ऐकत नाहीं. यावरून हटवादी मनुष्यास उपदेश करणें.

झाडें कवटाळणें—(व.) झाडें निर्जीव असल्यानें आपण त्यांना कितीहि प्रेम दाखविलें तरी ते परक्याप्रमाणें सहानुभूतिशून्यच राहाणार. परक्यावरचें प्रेम फलदायी होणें नाहीं. निष्प्रेमाशीं प्रेम दाखविणें असा अर्थ.

***झाड उमटूनु पाळं फुटलिंकी पळेता**—(गो.) झाड उपटून मुळ्या किती फुटल्या तें पाहाणें; म्हणजे मूर्ख-पणाची पराकाष्ठा.

झाड जावो पण हाड न जावो—नुकसान सोसावें पण धर्मत्याग करूं नये. वंशांतील एखादा मनुष्य मरण पावला तरी हरकत नाहीं, पण बाटल्यामुळें सर्व वंशच बिघडणार तसें होणें अनिष्ट आहे. याकरितां मरण पतकरावें पण परधर्मांत जाऊं नये. स्वधर्मे निधनं श्रेयः ।

झाड जितकें सरळ तितकें त्याचें मोल अधिक—गांठी, वक्रता इ. दोष लाकडांत असले म्हणजे त्याची किंमत कमी. त्याप्रमाणें माणूस सरळ, प्रामाणिक, सत्यप्रिय नसला तर त्याची किंमत राहात नाहीं.

झाड थोडें बेरवी, मग तें कापवी—[बेरणें = भेग चीर पाडणें] झाड कापण्यापूर्वी प्रथम त्यास एक भेग किंवा चीर पाडावी व नंतर कापावें. १ कोणतेंहि काम कर-ण्यापूर्वी तें नीट आंखून व आपल्याला सुलभ पडेल अशी तजवीज करून नंतर कापावें. २ शत्रूला प्रथम पेंचांत धरून, फूट पाडून मग त्याच्यावर हल्ला करणें फायद्याचें. तु०—फोडा व झोडा.

झाड पाहून घाव, मनुष्य पाहून शब्द—झाड ज्या मानानें लहान मोठें असेल त्या मानानें कमीजास्त जोरानें त्यावर घाव घालावा व आपण ज्याच्याजवळ बोलावयाचें त्याची योग्यता पाहून त्याप्रमाणें भाषा वापरावी.

झाड बघून घाव घालावा—ज्या मानानें झाड लहान मोठें असेल त्या मानानें त्यावर कुऱ्हाड किंवा हत्यार चाल-वावें. जशास तसें.

झाडा तकीत फळ—(गो.) झाड तसें फळ.

झाडांकडे झूज खेळता, सावळेकडे लढाय खेळता—(गो.) झाडांबरोबर लढाई आणि सावलीबरोबर भांडण करणारा भांडकुदळ माणूस.

झाडाखालीं झाड वाढत नाहीं—एका झाडाच्या सावलींत, त्याच्या आश्रयानें असणारें दुसरें झाड फार वाढत नाहीं असा अनुभव. त्याचप्रमाणें एका कर्तबगार माणसा-जवळ असणारा त्याच गुणाचा दुसरा माणूस पुढें येऊं शकत नाहीं. त्यानें स्वतंत्र राहूनच पराक्रम केला पाहिजे. ' झाडाखालें झाड नव्हे ! '–दाबि ५.४०. " विष्णुपंतांच्या रंगणांत कामें करून, 'झाडाखालीं झाड वाढत नाहीं,' ह्या वृद्ध म्हणींतील बोधानें जागृत होऊन, रा. देवल बंधूंनींहि एक स्वतंत्र सरकस उभारून, आपल्या प्रथममार्गदर्शक गुरु–विष्णुपंत ह्यांच्या सरकसच्या बरोबरीस आणून ठेविले. "—छच १३१. " सन १९१३ सालीं औंध संस्थानामध्यें किर्लोस्कर वाडींतच कांच तयार करून पहिली चिमणी श्री. आत्मारामपंतांनीं फुंकली. कांचेचा कारखाना वाढूं लागल्या-नंतर ' झाडाखालीं झाड वाढत नाहीं ' या न्यायास अनु-सरून कऱ्हाड स्टेशननजीक, या कारखान्यास स्वतंत्र जागा द्यावी लागली. "—केसरी २८–११–४१.

झाडाची परीक्षा फळावरून—झाड चांगलें किंवा वाईट आहे अथवा कोणत्या जातीचें आहे याची परीक्षा त्याचें फळ खाल्ल्यानें करतां येते. कोणत्याहि कार्याचें महत्त्व-मापन त्याच्या परिणामावरून ठरवावयाचें असतें.

झाडाचीं फुलें झाडाखालींच गळतील—जेथें मूळ असतें तेथेंच त्याचा परिणाम दिसतो. जेथें कार्य घडतें त्या-ठिकाणींच त्याचा परिणाम दृष्टीस पडतो.

झाडाजवळ छाया, बुवाजवळ माया—झाडाजवळ–खालीं सांवली ही ज्याप्रमाणें असावयाचीच, त्याप्रमाणें बुवाबाजी करणाऱ्या माणसाजवळ पुष्कळ पैसा हा सांपडा-वयाचा. बुवालोक आपल्या शिष्यांकडून वाटेल तसे पैसे उपटतात.

झाडाला कान्ह(न)वले आणि आडांत गुळवणी—कान्हवलें हें एक पक्वान्न आहे. झाडाला फळें येतात. त्याला कांहीं कान्हवले येऊं शकत नाहींत व आडांत साधें पाणी असतें, गुळवणी नसते. अशक्य गोष्ट सांगणें. एखाद्याचा पाहुणचार परभारें थापा मारून करणें.

झाडें लावा, बागा मुलांनातवां ठेवा—बागेंत झाडें लावलीं असतां त्यांचीं फळें जरी आपणांस खावयास मिळालीं नाहींत तरी मुलांना किंवा नातवांना खावयास मिळतील. एखाद्या कार्यास आज आपण आरंभ केला त्याचा परिणाम आज आपणांस दिसला नाहीं; तरी चांगल्या कार्याचें फळ पुढील पिढ्यास तरी उपभोगावयास मिळतें. अक्रोडाच्या झाडाची गोष्ट अशीच सांगतात.

झाडणी——झाडणी करणें—१ झाडणें. २ अंगांतील भूतपिशाच्च काढणें. 'मन्मथें झडपिलें मन माझें। झाडणी करिल पाउल तुझें ॥'-सारुद ३.११४.-एभा ७.२०८.

झाडणें——झाडून—एकूण एक; सर्वच्या सर्व. 'यदुसचिव पौर मुख्य दूत आणविले सभेंत झाडूनी।'-मोसौप्तिक ४.२. 'शाहू महाराज झाडून अष्टप्रधान व सरदार बलावून आणून दरबार करून बसले.'-बेब १९. 'दिल्लीचा भेद झाडून मजपाशीं आहे.'-भाव २५.

झाडतां सारवतां जन्म गेला, अन् म्हणे मैनाबाई उकीरडा कोणता?—एखादी गोष्ट अनेक दिवस करीत असतांहि तीबद्दलच्या अगदीं मूलभूत गोष्टींबद्दल देखील अज्ञान दाखवावयाचें. ढोंग करणाऱ्याबद्दल योजतात.

झाडा——झाडा करणें—१ कर्ज फेडणें; व्याजमुद्दल सुद्धां सर्व बाकी फेडणें. -भाअ १८३५.२७५. २ नाश करणें; साफ करणें; सफ्फा उडविणें. 'ऐसा द्वादशबाणें झाडा केला।'-जै ३०.३७. ३ शौचविधि करणें.

झाडा घेणें—बारकाईनें तपासणें; झडती घेणें; सूक्ष्मपणें शोधणें; सर्व तपासून पाहणें. 'छप्परबंदाच्या तळाचा झाडा बारकाईनें घ्यावा.'-गुजा ४६.

झाडा सुचणें—विस्तारपूर्वक सांगणें; तपशीलवार सांगणें. 'श्रोते म्हणती न सुची झाडें।'-एरुस्व १५.१५९.

झाडा होणें—संपणें; खलास होणें; बाकी न उरणें; शिल्लक मुळींच न राहणें. 'आतां बातमी हरकारे झाडा झाले लवकरी आणीक पाठविणें.'-पेद १०.९१.

झाडेभवांडे—(व.) १ अळंटळं; हयगय; दिरंगाई; सबबी सांगणें. 'आतां कां झाडे भवांडे देता.' २ हाल अपेष्टा; दुर्दैव; कर्माचे भोग. 'आमच्या जिवाचे झाडे भवांडे आहेत.'

झाडयास जाणें—बहिर्दिशेस जाणें; शौचास जाणें.

***झाडा-साडा घेतला, हातीं पाचोळा**—सर्व चौकशी तपास करून कांहीं फलप्राप्ति न होणें.

झाडी——झाडी करणें—झाडून टाकणें; निकाल करणें; साफ करणें; धुऊन टाकणें; नाहींसा करणें; समूळ काढून टाकणें. 'स्वानंदें तृप्ति झाली। झाडी केली भवरोगा।'-एभा १०.२९.

झांपड——झांपड देणें—(व.) १ एखाद्याच्या तोंडावरून हाताचा पंजा उलटा करून डोक्यावरून खालीं उतरणें. २ (ल.) फसविणें; ठकविणें; लुबाडणें.

झांपड पडणें-येणें—झोंपेचा पगडा बसणें; झोंप येणें. 'झांपड पडली त्या श्रीरंगा।' 'जरी झोंपेची जबर झांपड आली होती तरी'-दौलत पृ. १९.

झांपडींत येणें—फसणें; भुलणें; कपटांत गुंतणें; लबाडीनें पकडलें जाणें.

झांपा——बैल गेला, झांपा केला—गरज संपल्यावर एखादी गोष्ट करणें. गोठ्याला दरवाजा नव्हता त्यामुळें बैल चोरीस जाण्याची भीति होती. करूं करूं म्हणून तसेंच राहिलें होतें. शेवटीं दुसऱ्या दिवशीं दरवाजा लागणार तों आदल्या दिवशींच बैल चोरीस गेला! (बैल थंडीनें आजारी होईल म्हणून झांपा करावयाचा, अशीहि गोष्ट सांगतात). बैल पहा.

झांबड——झांबडाझांबड-१ जोराची हिसकाहिसक; ओढाताण; झगडा; भांडण. २ लुटालूट; मारामार; गडबड; गोंधळ.

झांबडाझांबड करणें—सतावणें; छळणें. 'शहरचे लोक भवानीचे यात्रेस बाहिर आले होते, त्यांस झांबडाझांबड केलें.'-बप २१.

झाल——कोणा एखाद्यावर झाल जाणें—अमर्याद भाषण करणें; उपमर्द करणें; तोडून बोलणें.

झाला——होणें पहा.

झाला देशाचा पुढारी, तुरुंगाची वाट धरी—जो देशाचा राजकीय पुढारी होतो त्यास तुरुंगांत जाण्याची पाळी केव्हां तरी आल्यावांचून राहात नाहीं. 'देशभक्तां प्रासाद बंदिशाळा। शृंखलांच्या गुंफिल्या पुष्पमाला।'-विनायक-प्रभावती नाटक.

झाली गोष्ट परत येत नाहीं—एकदां एखादी गोष्ट होऊन गेली म्हणजे ती दुरुस्त करणें कठीण असतें. तु०-गतं न शोच्यम्। What is done, can not be undone.-French.

झाली चूक, धर मूक—आपल्या हातून चूक झाली असतां गप्प बसणें सर्वांत उत्तम; तीबद्दल वितंडवाद घालीत

बसण्यांत कांहीं अर्थ नसतो. आपली चूक निमूटपणें मान्य करण्यांत सर्वांचाच फायदा असतो.

झाली जखम भरून येते, अपयश मोठें दुःख देतें—शरीराला झालेली जखम बरी होते पण मानहानीमुळें किंवा पराजयामुळें जी मनाला व्यथा होते ती कधींहि जात नाहीं.

झाली जरा प्राप्त, शोभत नाहीं लालवस्त्र—वयोवृद्ध झाल्यावर रंगीत वस्त्रें परिधान करणें, शृंगार करणें शोभत नाहीं. त्या वयांत साधी राहाणी ठेवणेंच योग्य असतें. तु०—बुड्ढी घोडी लाल लगाम.

झाली साठ, कीं आली काठीशीं गांठ—वयाला साठ वर्षें भरलीं म्हणजे काठी टेकावयास घेतल्याशिवाय चालवत नाहीं. तु०—काठीवांचुनि नेट न पाया परि मोठें अवसान। —शारदा.

झालें आहे जवापाडें, राहीं पर्वताएवढें—उगाच थोडेसें काम झालें असून बहुतेक करावयाचें राहिलें आहे अशावेळीं वापरतात. तु०—The petty done, the undone vast या म्हणीचें भाषांतर. हत्ती गेला शेंपूट राहिलें याच्या उलट. —सह्याद्रि नोव्हेंबर १९३९.

झाले केश श्वेत, बुद्धि नाहीं येत—म्हातारपण होऊन केंस पांढरे झाल्यावर बुद्धि तरतरीत राहात नाहीं. तिला मांद्य येतेंच.

झालें खुटखुट, पडलों मुटमुट—थोडीशी भीति वाटण्यासारखें झाल्याबरोबर घाबरून जाणाऱ्या मनुष्याबद्दल योजतात. जरा खुट् झालें कीं अशा मनुष्याला भीति वाटते.

झालें तर झालें, नाहीं तर काढलीं दोन सालें—(कों.) झालें तरी वाहवा, न झालें तरी वाहवा !—गाजराची पुंगी० याप्रमाणें.

झालें तें गुदस्त—झालें तें होऊन गेलें; तें आतां मनावर घेऊं नये. गुदस्त पहा. तु०—गतम् न शोच्यम्। —पद्या २०५.

झालें तें झालें, न झालें तें होणार नाहीं—ज्या गोष्टी भूतकाळांत होऊन गेल्या त्या होऊन गेलेल्या म्हणून त्यांचेबद्दल विचार करण्याचें कारण नाहीं; व ज्या गोष्टी आतांपर्यंत घडूं शकल्या नाहींत त्या पुढेंहि होणार नाहींत, असें समजून त्यांच्याबद्दलहि काळजी करण्याचें कारण नाहीं. उगाच मागें होऊन गेलेल्या किंवा पुढें होतील अशा गोष्टींबद्दल विचार करून घाबरून जाण्याचें कारण नाहीं. फक्त वर्तमान स्थितीबद्दल विचार करणें योग्य असतें. यदभावी न तद्भावी भावी चेन्न तदन्यथा। इति चिंताविषघ्नोयमगदः किं न पीयते ॥ —सुर १६२.४२९.

झालें तें पुरवतें, अवई मोठें दुःख देतें—मागें पहा. तवईपेक्षां अवई कठिण. प्रत्यक्ष एखादें संकट गुदरलें असतां जितकी भीति वाटत नाहीं तितकी त्या संकटाच्या धास्तीमुळेंच वाटते.

झाले बहु, होतील बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा।—मोविराट. कांहीं लोक असे असतात,कीं त्यांच्याशीं तुलना करण्याजोगे पुरुष भूतकालांत किंवा वर्तमानकालांत आढळत नाहींत. एवढेंच नव्हे तर पुढेंहि होण्याची आशा नसते. एखाद्या अद्वितीय थोर माणसाबद्दल योजतात.

झाल्यावर न्याय, मग वाद सांगणें तें काय—एखादी गोष्ट प्रत्यक्ष घडून गेल्यावर व तिच्याबद्दल निकाल दिला गेल्यावर, मग त्याबद्दल पुन्हां वादविवाद तो कसला.

झाल्यावर पोट भरी, बरवें गायन करी—यथेच्छ जेवण झाल्यावर मग गाणें सुचतें, चांगलें गातां येतें. पोटांत भूक आहे तों गाणें सुचत नाहीं किंवा मनाचें चांगलें समाधान झाल्यावर मनुष्य स्तुति करूं लागतो. तु०—आधीं अन्नं मग तननं.

झाव——झाव काढणें—(व.) एखाद्याची खरडपट्टी काढणें; तासडपट्टी काढणें; ताशेरा झाडणें.

झिग——झिग्ग् जाता तें भांगार न्हय—(गो.) चकाकतें तें सगळेंच सोनें नसतें. All that glitters is not gold.

झिंगडी——झिंगडी मारप—(गो.) दारू पिणें.

झिंगणें——झिंगत चालणें—झोकांड्या खात जाणें; धुंदीमध्यें चालणें; पेंगत पेंगत जाणें.

झिंगनी——झिंगनी भात—एक प्रकारचा गोड व पौष्टिक चारा. 'वरच्या रानचा झिंगनी भात'—मसाप ४. ४. २६४.

झिंगी——झिंगी खाणें—दारू पिणें; अंमल करणें; झिंगणें; अमली पदार्थाचें सेवन करणें.

झिजवणें——आपणास झिजवावें, तेव्हां दुसऱ्यास रिझवावें—आपण जेव्हां श्रम करावे तेव्हां दुसऱ्यास संतुष्ट करतां येतें. आपण पहा.

झिपरी——झिपरी धरणें—एखाद्या स्त्रीचे केंस धरून तीस ओढलें असतां जसा तिचा उपमर्द होतो, त्याप्रमाणें

अवहेलना करणें; अपमान करणें; मानभंग करणें. 'नेणो केव्हां धरुनि झिपरी देव घेईल झाडे।'–आठल्ये.

❀ **चट्टीपट्टीचे बोभाटे, झिपरी मारी झपाटे**––चट्टीपट्टी पहा.

झिम्मा——**एखाद्याच्या घरीं भुतांनीं झिम्मा खेळणें**—भुतांनीं घरांत धिंगाणा घालणें; भुताटकीचें खेळ होणें; चमत्कार घडून येणें.

झिरपणी——**झिरपणीस लागणें-पडणें-येणें**—झुरणीस लागणें; खंगणें; क्षीण होत जाणें; झिजूं लागणें.

झिरूमिरू; झुरूमुरू——**झिरूमिरू-झुरूमुरू करणें**—१ मरणोन्मुख होणें; अत्यंत क्षीण होणें; जगतो कीं मरतो अशा स्थितींत असणें. २ आजारी असणें; दुखण्यांत पडणें; अतिशय अशक्त होणें; दुर्बल होणें.

झील——**झील उडणें-उतरणें-बिघडणें**–१ चकाकी नाहींशीं होणें; निस्तेज होणें. २ वैभव खालावत जाणें; कीर्ति, मानमरातब वगैरे नष्ट होणें; तजेला उतरणें.

झील चढणें—वैभव वाढणें; उत्कर्ष होणें; भरभराट होणें; मानमरातब, दर्जा वगैरे वाढणें.

झील चढविणें—१ प्रतिष्ठा वाढविणें; नांवारूपास आणणें; वैभव मिळवून देणें; अधिकार, पदवी वाढविणें. २ तकतकीत साफ हजामत करणें.

झील——**झील ओढणें-धरणें-देणें; झील ओढीत जाणें**—१ गातांना सुराची साथ करणें. २ री ओढणें; अनुवाद करणें. 'टाइम्स ऑफ इंडिया, पायोनिअर आदि करून तुमचें लिहिणें आधारभूत धरून झील ओढीत गेले'–विक्षिप्त ३.२०.

झुकणें——**झुकेल तो चुकेल**—ज्याचा तोल नीट राहणार नाहीं त्याच्या हातून चूक झाल्याशिवाय राहणार नाहीं. याकरितां आपला तोल नेहमीं संभाळून असावें.

झुगझुग——**झुग झुग जिणें, टुकटुक खाणें**—कसेबसे दिवस काढणें; कष्टमय स्थितींत जीवन व्यतीत करणें; हालअपेष्टांत दिवस काढणें.

झुंज——**झुंजात राहणें**—युद्धांत कामास येणें; समरभूमीवर मृत्यु येणें.

झुंजास उभें राहणें—लढाईस सिद्ध होणें; युद्धाची तयारी करणें. 'मेजवानी म्हणून दहा लक्ष रुपये घेत असल्यास उत्तम, नाहीं तर झुंजास उभें राहावें.'–भाव ११.

❀ **झुजा कोंब्यानें जगणुनि मरचें**—(गो.) झुंज खेळणाऱ्या कोंबड्याचें त्यांतच मरण. जिवावरचे खेळणारा माणूसहि त्यांतच एखाद्या दिवशीं मरतो.

झुंजविणें——कण्या-दाणे टाकून कोंबडी झुंजविणें—१ स्वतःच्या पदरास खार लावूनहि लोकांस भांडायास लावणें. २ कलागत लावणें; फूट पाडणें; भांडण लावणें; कलहास प्रवृत्त करणें. कोंबडा पहा. 'मद्रास मेलसारख्या दाणे टाकून कोंबडी झुंजवून मजा पाहणाऱ्या पत्रानें श्री. प्रकाशम् व श्री. राजगोपाळाचार्य यांचें परभारें भांडण लावून देणें, हें त्याला शोभण्यासारखेंच आहे.'–केसरी ९-१२-४१.

झुरझुर——**झुरझुर पळणें**—जवळ जवळ पावलें टाकीत पण जलद पळणें; तुरतुर पळणें.

झुरळ——**समुद्राला झुरळाची गरज लागते**—परशुरामाचें धनुष्य झुरळानें निकामी करून समुद्रावरचें संकट निवारलें. यावरून अगदीं मोठ्या माणसालासुद्धां कधीं कधीं क्षुद्र माणसाची जरूरी लागते.

झूटा——**झूटा खाय मीठेके लालच**—गोडासाठीं उष्टें खाणें. लाभासाठीं मानहानि पत्करणें; तुपासाठीं उष्टें खाणें.

झुटा झूटेसे बूरा जो सोनेका होय–खोट्या सोन्याच्या दागिन्यापेक्षां खरा वापरलेला दागिना बरा. अगदींच खोटें बिनमोलाचें घेण्यापेक्षां जुनें पण कांहीं तरी मोलाचें घेणें बरें.

झूटा न बोले तो पेट फुले—खोटें बोललें नाहीं तर पोट फुगतें. खोटें बोलण्याची एकदां खोड लागली कीं ती जन्मभर जात नाहीं.

झूटें भांडण अर्धा लाभ—खोटेंच भांडण केलें तर कांहीं तरी अर्धवट तरी लाभ होतोच. स्वतःचें कांहीं नसतां खोटेंच आपलें म्हणून कलह सुरू केला, तर तडजोडीनें शेवटीं थोडें तरी मिळतें. तु०–सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः।

झूटें भांडें अर्धा लाभ—प्रत्यक्ष पदार्थ खावयास मिळाला नाहीं व शेवटीं उष्टें भांडें हातास लागलें तरी अर्धा लाभ होतोच. सर्व मिळत नसल्यास अर्ध्यावरच समाधान मानावें. सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः। Leavings are half satisfying.

झूटेका आगे सच्चा रो मरे—खोट्यापुढें खऱ्याचें कांहीं चालत नाहीं. जगामध्यें कित्येक वेळां असत्याचाच विजय झालेला आपणांस दिसून येतो.

झूटेका मूह काला, सचेका बोलबाला—खोट्याचें तोंड काळें होतें व खऱ्याचा विजय होतो. परिणामीं नेहमीं सत्याचाच विजय होतो अशी समजूत आहे. तु०—खोटयाच्या कपाळीं कुऱ्हाडीचा घाव. सत्यमेव जयते नानृतम्।

झेंडा——झेंडा नाचविणें-मिरविणें—विवाह किंवा एखादें मोठें पराक्रमाचें कृत्य झाल्यानंतर समारंभांतील मुख्य व्यक्तीस खांद्यावर घेऊन नाच करतात; त्याला झेंडा किंवा धेंडा नाचविणें म्हणतात. ही जुनी चाल आहे. धेंडा पहा. स्वतःची प्रौढी मिरविणें; प्रतिष्ठा सांगणें; पोवाडे गाणें.

झेंडा लावणें-रोवणें—एखादा मोठा पराक्रम करणें. 'विठूचा, गजर हरिनामाचा, झेंडा रोविला।' 'दिल्ली-आग्र्यावर झेंडे रोविले।'-ऐपो २४९.

झेलणें——थुंकी-शब्द झेलणें—थुंकी हातांत घेण्याइतकी खुशामत करणें; शब्द खालीं पडूं न देणें; तोंडांतून शब्द बाहेर पडतो कीं न पडतो, इतक्यांत त्याप्रमाणें कृति करणें. अतिशय गोंडा घोळणें. थुंकी पहा.

झोक——झोकांत होणें—डौलांत, उत्तम प्रकारें होणें; वैभवांत, थाटमाटांत होणें; मोठ्या डामडौलानें एखादा समारंभ पार पडणें.

झोकणें——झोकली बातमी—बाजारगप्पा; अफवा; हूल; उडत बातमी.

झोका——झोका ठोका—बोला फुलास गांठ; काकतालीय न्याय.

झोक्या ठोक्यांत येणें—सहजगत्या दैवयोगानें घडून येणें; आकस्मिक रीतीनें घडणें; यदृच्छया होणें.

झोजा——झोजा मल्लारी—१ गबदुल; बोंगळा मनुष्य; लठ्ठ व मंद मनुष्य; लठ्ठंभारती. २ मोठ्या माणसाचा किंवा अगदीं सैल कपडा घातल्यास म्हणतात.

झोंट——झोंटधरणी—१ एकमेकांचे केंस धरून ओढणें; केशाकेशी. २ भांडण-तंटा; कलह; मारामारी. 'झोंटधरणी केशयुद्ध।'-मुआदि ३०.१६०.

झोंट——झोंटधरणी—१ झोंट माणसाकडून कर्ज वसूल करण्यासाठी केलेली खटपट. २ हांजाहांजी; गांडगुलामी.

झोटिंग——झोटिंग बादशाही-पाच्छाई-पादशाही—झोटिंग म्हणजे सैतान व त्याचें राज्य म्हणजे न्यायाविरुद्ध अमर्यादेचें राज्य; नीतिनियमाविरुद्ध कारकीर्द. १ बेबंदशाही; जुलमी राज्यकारभार. 'सुधारलेल्या राज्यपद्धतीस अनुसरून कांहीं गोष्टींत सर्वच झोटिंग पाच्छाई करतां येत नाहीं.' -टि ४.२३०. २ अंदाधुंदी; गोंधळ.

***बेबंद राज्य झोटिंग पादशहा**—ज्या ठिकाणीं कोणी राजा नसतो, कायदेकानू नसतात, केवळ अराजक असते तेथें जणूं वेताळाचेंच साम्राज्य आहे असा भास होतो.

झोंड——झोंडा झोंडगीचे पोटीं। फळें विजाती करंटीं॥—तुगा २९७४. वाईट आईबापाची संतति वाईटच निघणार.

झोडणें——झोडून घेणें—(गंजिफा) घेणी घेतांना राजाबरोबर आणखी एक पान टाकून सहा पानें घेणें.

झोप——झोपीं जाणें—१ निजणें; निद्रेच्या स्वाधीन होणें. २ एखाद्या गोष्टीची दाद नसणें.

***झोप दारिद्र्याची सोयरी**—आळसानें झोपेंत दिवस काढल्यास दारिद्र्य यावयास उशीर लागत नाहीं.

झोपाळू कुंभकर्णापरी, कैशी बांधेल शिदोरी—जो मनुष्य कुंभकर्णाप्रमाणें नेहमीं झोंप घेत असतो, तो पोटाला कसें मिळवूं शकेल.

झोपेला धोंडा, भुकेला कोंडा—मनुष्याला सपाटून भूक लागलेली असली म्हणजे कोंड्याची भाकरीसुद्धां गोड लागते. त्याप्रमाणें मनुष्य थकला असला व अगदीं झोंपेनें पेंगूं लागला म्हणजे अंगाखालीं किंवा उशाला दगड असला, तरी तो त्याला गादीगिरदीप्रमाणें वाटतो व गाढ झोंप लागते. वेळेवर जी जिन्नस असेल ती अत्युत्तम वाटते.

झोपेला लाचावला आणि साप घतो उशाला—एखादा मनुष्य झोंपेनें अगदीं पेंगला म्हणजे आपण कोठें निजतो व काय उशाला घेतो याची शुद्ध राहात नाहीं व एखादें वेटोळें घालून बसलेल्या सापावरहि डोकें टेकून तो झोंप घेतो. एखादा मनुष्य एखाद्या विकाराच्या ताब्यांत पूर्णपणें गेला म्हणजे त्याला आपण काय करतो त्याचा सुमार राहात नाहीं व तो वाटेल त्या विघ्नांत सांपडतो.

झोपा——झापा पहा.

बैल गेला न् झोपा केला—एका मनुष्याजवळ एक बैल होता. तो ज्या ठिकाणीं बांधीत असे त्या गोठ्याला दरवाजा अथवा कवाड नव्हतें. अशा स्थितींत वाघाचा उपद्रव सुरू झाला तेव्हां त्यास गोठ्यास झोपा करावयास त्याच्या बायकोनें सांगितलें, त्यानेंहि त्याप्रमाणें करण्याचा मनांत विचार केला; पण रोज कांहीं कांहीं निमित्तानें तो तें काम दिरंगाईवर टाकूं लागला. अखेरीस त्यानें एके दिवशीं

कवाड जवळ जवळ तयार केलें व दुसऱ्या दिवशीं सकाळीं गोठ्यास लावावयाचें तों त्या रात्रीं वाघानें बैलास उचलून नेलें. याप्रमाणें दिरंगाईमुळें त्याचा बैल गेला व त्याचे श्रमहि फुकट गेले. याकरितां जी गोष्ट करावयाची ती वेळेवर केली तर तिचा उपयोग होतो, नाहींतर वेळ निघून गेल्यावर तिचा कांहीं उपयोग होत नाहीं. तु०-वरातीमागून घोडें.

झोंबी पडणें—उडी पडणें; झडप घेणें. 'तुजवरि विषयाची हे पडे नित्य झोंबी।'—सारुह ४.८०.

झोला——झोला बसणें—नुकसान होणें; तोटा होणें; चट्टा बसणें.

झोळी——झोळी घेणें-सांवरणें—भीक मागणें.

झाळी कोपरगांवचा सुभा—भीक मागण्याचा धंदा. चार खुंट जहागीर पहा. घागरगडचा सुभा पहा.

ट

ट फ करणें—(प्र.) ट, ट, फ करणें. अल्प ज्ञान असणें; केवळ शब्दोच्चार करण्यापुरतें ज्ञान असणें; एखादें अक्षर केवळ वाचतां येईल इतकें कळणें. 'विद्यालयांतून जे संस्कृतज्ञ बाहेर पडतात त्यांना टफ करण्याचें सामर्थ्य आलें न आलें पुरें, कीं लगेच कोणत्याही शास्त्रावर व्याख्यान, निबंध वगैरे सुरू झालेंच.'—नि.

ट फ करीत वाचणें—अडखळत, किंवा चुका करीत वाचणें; एक एक अक्षर वाचणें; सामान्यतः मुळाक्षरें वाचतां येणें.

टला ट जुळविणें—१ अक्षराला अक्षर जुळविणें; कशीबशी रचना करणें; केवळ अर्थहीन शब्दांची जडणी करणें. २ हीन दर्जाचें काव्य करणें; केवळ प्रास साधण्यापुरेसें कविता करण्याचें ज्ञान असणें. 'असे ढ पुढें येणार आहेत हें जर त्या कवीला माहीत असतें तर त्यानेंहि टला ट जुळविण्याचे श्रम घेतले नसते.'—मूक. 'टला ट, रीला री। जन म्हणे काव्य करणारी॥'—लक्ष्मीबाई टिळक.

टक——टक पडणें—१ एकसारखें पाहात राहणें—राहावेसें वाटणें. 'डोळीया पडलें टका।'—ब २३४. २ आश्चर्यचकित होणें; आश्चर्यानें मुकें, मूढ बनणें. 'मागपासीं पडलें टक। तटस्थ ठेला मुहूर्त एक।'—एरुस्व ११.४५.

टकटक; टकमक——टकटक-टकमक पाहणें; टकटका-टकमका पाहणें—आश्चर्यानें, चकित दृष्टीनें पाहाणें. 'टकमक पाहत होते प्रभुमुखचंद्राकडेचि चातकसे।'—मो उद्योग ७. १८.

टकराघो——टकराघोच्या गोष्टी सांगणें—[टकराघो = वाचाळ] गप्पा मारणें; बाता ठोकणें; पोकळ बढाया मारणें; निरर्थक गोष्टी सांगणें; एकसारखी टकळी लावणें; सारख्या बाता खापलीत बसणें.

टंकसाळ——टंकसाळचा फुटका-फुटलेला—ज्याप्रमाणें एखादा रुपया टांकसाळेंतून बाहेर पडतांनाच त्याचा एखादा टवका उडालेला, किंवा चीर पडलेला असावा, त्याप्रमाणें जन्माचाच बिघडलेला; लहानपणापासून दुर्वृत्त; उपजत दोष असलेला; जन्मापासून व्यंग असलेला.

टकळी——टकळी पडणें—(व.) बडबड करण्याचा चाळा पडणें; फार बोलण्याची संवय असणें; वटवट करण्याची खोड असणें.

टकळी सुरू होणें—सूत काढण्याची चाती ज्याप्रमाणें सारखी चालली असते, त्याप्रमाणें तोंड सारखें चालणें; एकसारखें बोलत राहणें. 'नानूविषयीं एक सूचक प्रश्न विचारल्याबरोबर त्याची टकळी सुरू झाली.'—जादूगार पृ. ३८.

टकल——उरीं केंस, माथां टकल—ऊर पहा.

टकली माणसाचें डोकें लौकरच तासतां येतें—ज्या मनुष्याच्या डोक्याला टकल पडलेलें असतें, त्याच्या डोक्यावर फार केंस नसल्यानें त्याची हजामत लवकरच होते. ज्याच्या बाबतींत अर्धवट काम झालेलें असतें तें पुरतें करण्यास फारसे श्रम लागत नाहींत.

टकल्या नकलेस पात्र होतो—टकल्या मनुष्याची सामान्यतः लोक चेष्टा करतात. ज्यास टकल असतें तो धनवान् समजून लोक हा धनवान् नसतांहि धनवान् आहे असें समजून त्याची कुचेष्टा करतात.

टका-का——टके करणें—१ पैसा जवळ करणें; एखादी वस्तु विकून तिचे पैसे करणें; माल विकून रोख पैसे करणें; रोकड करणें. २ फायदा, नफा मिळवणें; व्यापार करून द्रव्य संपादन करणें; पैशाच्या पाठीस लागणें; लाभापाठीमागें लागणें. ३ वर्चस्व मिळवणें; वरचढ होणें; वरचष्मा करणें.

टके शेर—१ पैसा शेर; अतिशय स्वस्त. 'टका शेर भाजी टका शेर खाजा.' २ कवडी किंमतीचा; अगदीं कमी

किंमतीचा; हलका; क्षुद्र. ६ समान मूल्य; चांगलें व वाईट एकाच दरानें मिळणें; चांगल्यावाईट वस्तूंची पारख नसणें.

टक्कोभला-खरा करणें—(व.) आपलाच हट्ट खरा करणें. आपलाच हेका चालविणें.

❀ **टका करी कामकाज**—पैसा असला म्हणजे कोण तीहि गोष्ट साध्य होते. दाम करी काम. तु०-द्रव्येण सर्वे वशाः

टका-के शेर आटा, टका-के शेर खाजा—सर्वच वस्तु एकाच भावानें विकल्या जातात असें गांव. जेथें कोणाचीहि योग्य किंमत होत नाहीं, सर्वत्र अंदाधुंदी माजलेली असते असें गांव. अंधेरनगरी पहा.

टका शेर खाज्या, टका शेर भाज्या—वरीलप्रमाणेंच. मागें पहा.

टक्या कोठें रे जातोस? सख्या तोडावयास !—कोणत्याहि मित्रास वगैरे उसने पैसे दिले असतां मैत्री तुटण्यास कारण होतें. पैशामुळें मित्रामित्रांत वितुष्ट येतें.

टका——टक्के टोणपे खाणें—[टक्का=धक्का. टोणपा=काठी] ठेंचा खाणें; हालअपेष्टा भोगणें; अनुभव घेणें. 'हॅम्लेटमधला पोलोनियस हा व्यवहारांत उपयोगी पडणाऱ्या म्हणी आणणारा व टक्केटोणपे खाऊन शहाणा झालेला असा म्हातारा आहे.'-नि. चं.

❀ **टक्के टोणपे खाल्ल्यावांचून मोठेपणा-शहाणपणा येत नाहीं**—माणसास अनुभव आल्याशिवाय व व्यवहारांत पडून कांहीं ठेंचा खाल्ल्याशिवाय तो मोठा किंवा शहाणा होत नसतो. एकदम कोणी पुढें येत नाहीं.

टंगळ——टंगळमंगळ करणें—रडतखडत, नाखुषीनें चुकारपणानें एखादें काम पत्करणें; काम टाळीत असणें; अळंटळं करणें; टाळाटाळी करणें. 'जे आपल्या कामाची टंगळमंगळ करतात, त्यांना यश येत नाहीं.'—विवि.

टंगळमंगळ भाव—अळंटळं; मनापासून नसून जुलमाचा रामराम. मॅनवेरिंगनें अर्थ वेगळा दिला आहे. —मॅन १७६१.

❀ **टंगळमंगळ भाव त्याला अमळ अमळ गुण**—ज्याला स्थिरता,निष्ठा नाहीं त्याच्या ठिकाणीं गुणहि क्वचितच सांपडतात.

टट्टू——टट्टूको कोरडा, तेजीको इशारा—तट्टाला कोरड्यानें मारावें लागतें व घोड्यास नुसता इशारा पुरतो तट्टू पहा. 'तेज्या इशारती। तट्टा फोकावरी घेती॥' -तुगा १७४८. तु०—शहाण्यास शब्दाचा आणि मूर्खास टोणप्याचा मार.

टणटणा——टणटण-णां उडणें-बोलणें—टोमणा मारणें; फाडफाड बोलणें; सारखा तोंडाचा पट्टा सोडणें; शब्दांमागून शब्द बोलणें; एकसारखें बोलत राहणें.

❀ **टणटण फुटाणी न हातीं नाहीं दुगाणी**—[टणटण फुटाणी = फुटाण्याप्रमाणें टणटण उडणारी] चण्याचे फुटाणे भाजतांना ते कढईंत टणटण उडतात. दुगाणी हें अत्यंत कमी किंमतीचें नाणें आहे. दुगाणी हातीं नसणें म्हणजे अगदीं दरिद्री असणें. एखादी बाई बिलकुल दरिद्री असूनहि नम्रतेनें न वर्ततां दिमाखानें वागूं लागली असतां म्हणतात.

टपकाळ——टपकाळ दाणा सोडणें—(व.) पेरतांना घेतानें पाभरींत दाणा सोडणें.

टपलेबाजी——टपलेबाजी करणें-काढणें—थप्पडबाजी करणें; खरपूस समाचार घेणें; थापट्या मारणें; चपराक मारणें; डोक्यावर चापट्या मारणें.

टप्पा——टप्पा खाऊन येणें—१ मध्यें पडून पुन्हां उसळून पुढें जाणें; उडी घेणें; खालीं पडल्यावर पुन्हां उसळी मारणें. २ (ल.) तावडतोब परत येणें; नेमलेल्या ठिकाणीं जाऊन तात्काळ परत फिरणें. ३ गमत गमत, मध्यें विसांवा खात येणें; थांबत थांबत जाणें; पेणें करीत जाणें; बसत बसत हळूहळू जाणें.

टप्पा खाणें—१ थांबणें; विसांवा घेणें; पेणें करणें; मुकाम करणें. २ टप्पा खाऊन येणें, पहा.

टप्पे लावणें—मुकाम दर मुकाम करणें; पेणीं करणें; थांबत थांबत जाणें.

टप्प्यांत येणें—आटोक्यांत येणें; शक्तीच्या आवाक्यांत येणें; माऱ्यांत येणें; वर्चस्वाखालीं येणें.

टमटम——टमटम नगरी—१ प्रसिद्धी; डांगोरा; बभ्रा; बोभाटा; गाजावाजा. २ गप्पीदास लोकांचा गांव; थापाड्या लोकांची वस्ती.

❀ **बजबज पुरी आणि टमटम राज्य**—जो जास्त बडबड करील त्याची सत्ता वगैरे. सर्व अनागोंदी कारभार. अंदाधुंदी; गोंधळ; घोंटाळा.

टमाक——टमाक टवळी आनी गांवाची होवळी—(कु.) चैनी छटेल स्त्रीला गांवाची होळी झाली म्हणून काय होय; ती आपल्या सुखापुढें सर्व रद्द समजते.

टरकहाणी—टुरटुर; पिरपिर; बडबड; भुणभुण; कुरकुर.

टरकमोहबत—पोकळ संपादणी; लावबी भाषण; वरवर काढलेली समजूत; तोंडापुरती बतावणी.

टर्र——टर्र भर, दमडी वर–दमडींत पोटभर जेवण.

टळटळीत——टळटळीत दुपार––ऐन दुपार; दोनप्रहर; रखरखीत दुपार; ऐन मध्यान्ह; भरदोनप्रहर. ‘ टळटळीत दुपारां जन्मला रामराणा ॥ ’

टळणें——तेल जळे, पीडा टळे––देवापुढें नंदादीप जाळला असतां घरांतील इडापीडा बाहेर जाते. जळणें पहा.

टांक——टांक गुंतणें—हातचा लेख देऊन वचनास बांधून घेणें; स्वदस्तुरचा लेख दिलेला असणें.

टांक मारणें—लिहिण्यास बेणें, बसणें; लेखन करणें; लिहून काढणें; लेख तयार करणें.

टांकानें गळा कापणें––लिहिण्यानें नाश करणें; आपल्या हातच्या लेखानें एखाद्याची हानि करणें.

❀ **टांका आगळें लिहावें, घासा उणें जेवावें**—कोणतीहि गोष्ट लिहावयाची म्हणजे अगदीं सविस्तर, तपशीलवार लिहावी. एकदोन शब्द अधिकच लिहावे पण कमी लिहूं नये; पण जेवतांना मात्र नेहमीं भूक राखून एक दोन घास कमीच घेऊन जेवण आटोपावें. या दोन्ही गोष्टी पथ्यकर आहेत.

टाक——टाक टाक बोलणें––(व.) जेरीस जेणें; हताश होणें.

एखाद्याशीं टाक टाकणें—स्पर्धा करणें; बरोबरी करणें; होड बांधणें; चढाओढ करणें.

टाकोटाक-टाकोटाकीं जाणें—लगोलाग, तावडतोब जाणें; त्वरेनें निघून जाणें. ‘ तरी नाटोपे श्रीरंग । टाकोटाकीं जातसे ॥’–मुसभा १५.१८७. ‘ जिजाऊः–हें पहा, असाच अगदीं टाकोटाक वेरूळाला जा ! आणि स्वारी इकडे यायला उशीर कां लागला हें समजून घेऊन मला येऊन सांग. ’–शिसं १.१.

टाकणें——टाकणें टाकणें––१ औपचारिक रीतीनें वरवर करणें; मनापासून आपुलकीनें न करणें; केलें न केलेंसें करणें; कसेंबसें उरकणें. ‘ मी परान्न घेत नाहीं हें त्याला ठाऊक आहे; पण उगाच टाकणें टाकायला आला होता. ’ २ टाक टाकणें; स्पर्धा करणें; बरोबरी करणें.

टाकला येणें; टाकून येणें—१ नेमका येणें; निश्चितपणें नेमल्यावेळीं येणें; अगदीं वेळेवर येणें; पाहिजे तेव्हां हटकून हजर असणें. २ नेहमीं, वरचेवर येणें; एकसारखें येत असणें; वारंवार येणें; हरहमेश येणें.

टाकला रोजगार-उदीम-व्यापार—लादलेला व्यापार; मनापासून केलेला नव्हे पण अंगावर पडलेला व्यवहार; कसाबसा चालविलेला धंदा; ज्यांत गोडी लागत नाहीं, मन रमत नाहीं असा व्यापार, धंदा, उदीम, व्यवहार.

टाकली किंमत—सांगितलेली किंमत; तोंडांतून बाहेर निघेल तो आंकडा; कमजास्त न करतां मागितलेली किंमत; घासाघीस न करतां सांगितलेलें मोल देऊन टाकणें.

टाकली गांठ पडणें-भेट घेणें—खात्रीनें भेटणें; हमखास भेटणें; अगदीं जणूं काय ठरल्याप्रमाणें भेटणें.

टाकलें अन्न जेवणें—न चुकतां मिळावयाचें जेवण; अगदीं राखून ठेवलेलें जेवण.

टाकून बोलणें—अपमानास्पद बोलणें; मनाला लागेलसें बोलणें; रागाचें भाषण; उपमर्दकारक भाषण. ‘ ती संतापली म्हणजे फार टाकून बोलते. ’–इंप ४९.

❀ **टाक उशाला नि हो पायथ्याला-पायशाला**—(अशिष्ट) संभोगाची एकदम तयारी. चल तावडतोब उरकून टाकूं ! अशा अर्थी. किंवा वेश्या पैसे दिले कीं या गोष्टीला लगेच तयार होते.

टाकलें पटकूर, नी निजलें बटकूर—दासी वगैरे काम करणाऱ्या लोकांस दिवसभर काम करावें लागतें. त्यामुळें अगदीं रात्रीं दमून जातात. तसेंच त्यांच्या गरीबीमुळें त्यांस गाद्यागिरद्याहि नसतात. तेव्हां रात्रीं कोठेंहि त्यांनीं एखादें पटकूर टाकून त्यावर अंग आडवें केलें कीं त्यास झोंप लागते. त्यांना बिछाना, निवान्त जागा वगैरे कांहींहि उपचार लागत नाहींत.

टाकमटिका——टाकमटिका डामाडोल–(मुलींच्या खेळांतील गाण्याचा चरण) एखादा, मनुष्य वरून दिसावयास मोठा संभावित, डामडौली दिसतो पण आंतून लबाड असतो, अशा मनुष्याबद्दल म्हणतात.

टाकमटिका, डोक्यांत लिखा—वर मोठा थाटमाट पण आंत घाणेरडेपणा.

टांका——टांका चालता होणें—ज्याप्रमाणें शिंपी कपडे शिवावयास बसला म्हणजे टांके चालूं लागतो, त्याप्रमाणें काम सुरू होणें; आरंभ होणें; सुरुवात होणें.

टांके ढिले-ढील करणें—फार काम केल्यानें किंवा मारल्यानें शरीराचे सांधे खिळखिळे होतात. यावरून सपाटून मारणें; अवसानापलीकडे काम देणें, घेणें.

टांके ढिले-ढील होणें—१ सांधे निखळणें; शरीराची गात्रें शिथिल होणें. २ अतिशय श्रम पडणें; अंग दुखूं लागणें; अत्यंत कष्ट होणें; अंग दमून जाणें.

टांकी——टांकी चालणें--१ (दगडाला, जात्याला टांकी देतात यावरून) क्रम चालणें; सुरू असणें. २ इलाज चालणें; उपाय लागू होणें.

टांकी चालविणें—क्रम चालविणें; उद्योग सुरू ठेवणें. 'रशियानें राष्ट्रविस्ताराची व प्रांतविस्ताराची सारखी टांकी चालविली आहे.'—के.

टांकी लागणें—प्रवेश, मार्ग सांपडणें; चंचुप्रवेश होणें; उपाय लागू होणें; संधान साधणें.

टांकीचें तोंड; तोंडास टांकी दिलेली असणें--तोंडावर देवीचे वण असणें; देवीच्या वणांनीं तोंड खरबुजासारखें होणें; देवीच्या वणांची कुरूपता तोंडावर येणें.

*** टांकी घाय साहे। पाषण देव झाला आहे॥ टांकीचे घाव सोसल्याविना देवकळा-देवपण येत नाहीं; टांकीचे घाव सोसावे तेव्हां देवपणास यावें**—दगडावर टांकीनें घाव घालून मग देवमूर्ति बनवितात; म्हणजे देव बनण्याला असे घाव सोसावे लागतात. यावरून कष्ट सोसल्याशिवाय मोठेपणा मिळत नसतो. 'साहोनि टांकीघाये। पाषाण देवचि झाला पाहे।'—तुगा२७६५. 'तुका म्हणे टाकीघाये देवपण। फुटलिया जन कुला पुशी।'—तुगा२७९२.

टांग——टांग तिंबणें—(ग्राम्य) १ लग्न करणें; विवाह करणें. २ अंघोळ करणें; स्नान करणें.

टांग बांधणें--एखाद्याचें गुह्य समजून घेऊन त्यावर वरचष्मा मिळविणें; आपल्या कह्यांत आणणें; आपल्या ताब्यांत ठेवणें.

टांग मारणें—१ कुस्तींतील एक पेंच. पायानें पायावर मारून खालीं पाडणें; असा पेंच घालणें. २ फसविणें; ठकविणें; लुबाडणें. 'बाजीरावानें बोलबोलतां दोघांसही टांग मारली.'—अस्तंभा २०.

टांगड्या तोडणें--पायपिटी करणें; येरझारा घालणें; खेटे घालणें; खूप हिंडणें.

टांगेखालून जाणें—पराभूत झालेल्याला विजयी वीराच्या टांगेखालून जाण्यास लावीत. यावरून हार खाणें; जिंकलें जाणें; नामोहरम होणें; अपयश येणें.

*** ज्याच्या टांगड्या त्याच्याच गळ्यांत घालणें**—'ज्याच्या तंगड्या०' पहा.

टांगणें——गळा टांगणें--स्वर विवक्षित मर्यादेपर्यंत मोठ्या श्रमानें पोंचणें; तारस्वर उच्चारण्यांत गळ्याला फार ताण पडणें.

जीव टांगणें--अंतःकरण ओढलें जाणें; जीव गुंतून राहणें; चित्त वेधून राहणें; मन गुंतणें.

टांगल्यासारखें होणें--जीव टांगणें पहा. 'माझ्या जीवाला नाहीं तर अगदीं टांगल्यासारखं होईल.'—एकच प्याला १.३.

टांच——उंच टांच करून वागणें; टांचेला माती लागूं न देणें—घाण लागूं नये म्हणून चवड्यावर चालणें. (ल.) लक्ष्यपूर्वक, शुद्धाचरणानें वागणें; अगदीं अलिप्त निष्कलंक असणें.

टांचा घासणें—मरणोन्मुख स्थितींत पाय झाडणें; तडफडणें; हातपाय झाडणें; चरफडत असणें.

जिभेस टांचा देणें--१ जीभ आवरून बोलणें; मर्यादेनें बोलणें; आपलें भाषण फार विचारपूर्वक, दुसऱ्यास न लागेल असें करणें. २ गप्प बसणें; बोलावयाचें थांबणें.

पोटास टांचा देणें—पोटास चिमटा घेणें; पुरेसें खावयास न मिळणें; अर्धपोटीं असणें.

टांचेचें काळीज—१ पायाच्या टांचेला कांटा बोचला असतां जशी असह्य वेदना होते, त्याप्रमाणें बायकोच्या भावाला बोललेलें फार लागतें; यावरून मेहुणा; बायकोचा भाऊ. त्याचा नेहमीं कैवार घ्यावा लागतो. २ अतिशय आवडती बायको; लाडकी स्त्री. ३ जिवाचा कलिजा; प्रिय वस्तु; अतिशय आवडतें मनुष्य; प्रियपात्र; प्रेयसी.

***टांचा टुंचा चांभारवाडा, सदा घाण ढोहार-ढोरवाडा**—चांभारवाड्यामध्यें नेहमीं कातड्याला टांचे मारणें, चामडें जोडणें वगैरे कामें चाललेलीं असतात. तेथें नेहमीं अशा कामांची गर्दी व कातड्याचे तुकडे वगैरे दृष्टीस पडतात. ढोरवाड्यांत गेलें तर तेथें कातडीं कमावण्याचें काम चाललें असल्यामुळें घाण व दुर्गंधि असते. वस्तुस्थितिनिदर्शक म्हण.

टाप——टापेखालीं असणें-चालणें-राहणें-वागणें--एखाद्याच्या हुकमतींत असणें; ताब्यांत असणें; अधि-

कारामध्यें, सत्तेखालीं असणें; वर्चस्वाखालीं असणें; जरबेंत असणें.

टापटीप——टापटीप करणें—(गो.) कसातरी कष्टानें संसार करणें.

टापर——टापर वाजणें—(ना.) दिवाळें निघणें; फडशा पडणें; साफ नाहींसें होणें; खलास होणें; आटोपणें.

टाळ——टाळ वाजणें—सांठा संपणें; खलास होणें; सर्व खर्च होणें.

घोड्याचे टाळ वाजणें—(घोड्याचाअवगुण-खोड) घोडा कृश असला म्हणजे चालतांना त्याचीं ढोंपरें एकमेकांस घासूं लागतात. यावरून पायाला पाय घांसणें; घोडें मरतुकडें असणें. हरदासी तट्टूच्या वर्णनांत आहे.

टाळेस टिपरूं लागूं न देणें—टाळ आणि टिपऱ्या यांचा मिलाफ व्हावयाचा पण तो होऊं न देणें. १ आपल्या अंगावर बाजू येऊं न देणें; आपल्यावरील जबाबदारी कशी तरी वितंडवाद करून उडवून लावणें; शब्दाशब्दीमध्य आपण सुटून जाणें. २ आरोप शेकूं न देणें; आपल्या अंगीं कोणतीहि गोष्ट लागणार नाहीं अशी खबरदारी घण. स्वतः सहीसलामत सुटणें; दाद लागूं न देणें 'टाळम-टाळवेस टिपरूं लागूं न देणें' हा समान वाक्प्रचार अशुद्ध आहे.

❀**टाळ गेला मांदळ गेला, माझा धेंडा नाचूं लागल**——धेंडा पहा.

टाळकें——टाळकें शेकणें—१ मारणें; ठोकणें; चोपणें; बडविणें; खरपूस मार देणें. २ तोटा येणें; नुकसान लागणें; चट्टा बसणें.

टाळणें——टाळून बसणें—गमावणें; घालविणें; मुळावर येणें. 'ही पांढऱ्या पायाची बया घरांत आल्या बरोबर नवऱ्याला टाळून बसली.'

❀**टाळतां येणार नाहीं अशा मरणाला शूरास्त्र तृणासमान मानतें**—शूर मनुष्य कधींहि मरणाला भीत नाहीं तो शक्य तों धैर्यानें त्यास तोंड देतो पण प्रसंगच आला व जिवावर बेतली तर तो त्यापासून परावृत्त न होतां मोठ्या आनंदानें मरण पत्करतो. पराक्रमाचीं कृत्यें करतांना वीरास मरणाची लेखा नसते.

टाळा——टाळा देणें—वारणें; टाळणें; पुढें ढकलणें. 'टाळा म्यां त्यासि दिला, काळा बुध देति जाब फटकाळा॥'—मोकर्ण ४०.३९.—भर्मम ६५७. 'अफजलखान यानें आपली निखालसता दाखावली. तेव्हां प्रसंगीं पादशाहापाशीं गेल्यावर पाहून घेऊं म्हणून टाळा दिला आणि चजावरास गेले.'—मराचिशिच २३.

❀**टाळाटाळी करणें, ते समय चोरणें**—कोणत्याहि गोष्टीची टाळाटाळ करणें म्हणजे दिवसगत लावणें, ती लांबणीवर टाकणें आहे. Procrastination is the thief of time.—सवि २८१८.

टाळा——टाळा पसरणें—एकसारखें रडणें. लहान मुलें किरांकरतात, व्याधीनें सारखीं रडत असतात, तेव्हां त्यांस म्हणतात. मुलानें टाळा पसरला तो उजाडेपर्यंत मिटला नाहीं.

टाळी——टाळी देणें—कोणत्याहि खेळास आरंभ करतांना विरुद्ध बाजूचे दोन गडी परस्परांच्या हातावर हात मारून टाळी देतात यावरून. १ खेळास प्रारंभ करणें; सुरवात करणें. २ कोणतीहि गोष्ट पटली असें दर्शविणें; संमति देणें; मान्यता दर्शविणें.

टाळी पटकी—हातावर हात मारून केलेला करार; हातावर हात मारून दिलेलें वचन.

कर्णी-कानाला टाळी बसविणें—कानठळ्या बसविणें. 'तो गर्जोनि कुरुकटक कर्णीं बसवी ध्वजस्थ कपि टाळी।'-मो.

टाळी वाजणें-पिटणें—लग्नात मंगलाष्टकें संपल्यावर टाळ्या वाजावतात यावरून लग्न लागणें; विवाहबद्ध होणें. हरिमंदरी नारदें लग्न टाळी, पिटोनी म्हणे ऐक अंतारमाळी। अभिमन्युसी वत्सले लग्न झालें, हरीलागि तें ऐकतां हास्य आलें॥'—वत्सलाहरण.

एक टाळी होणें—१ जयनाद होणें; विजयानें चढून जाणें. २ निंदेनें टाळ्या पिटणें; हूर्यो करणें. 'हा वीरभाग शिशुपाळ जयीं विटाळीं। वीरामधें तुरुत होइल येकि टाळी॥'—सारुह ५.९५.

टाळीस टाळी देणें—वरिष्ठाच्या म्हणण्यास मान तुकविणें; खुषामत करणें; होस हो म्हणणें; वरवर अनुमति दर्शविणें.

टाळ्या पिटणें-वाजविणें—संमति, आनंद प्रदर्शित करणें प्रोत्साहन देणें वाटाविही नामभरें अटाळ्या। पौरांगना वाजवितात टाळ्या॥'—सारुह ५१२.

❀ **ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी**——खाणें पहा.

एका हातानें टाळी वाजत नाहीं—उत्तर-प्रत्युत्तरानें नेहमीं भांडण वाढत असतें. दोन प्रतिपक्ष असल्य शिवाय भांडण लागत नाहीं. एखाद्यानें खूप भांडण काढण्याची

खटपट केली तरी दुसऱ्या पक्षानें जर गम खाल्ली, तर भांडण होत नाहीं. एक पद्य.

टाळू——टाळू भरणें; टाळूस लावणें--लहान मुलाच्या टाळूस तेल लावून न्हाऊंमाखू घालणें.

टाळूचा दांत—सापाचा विषारी दांत. हा त्याच्या टाळूपाशीं असतो व तो त्यास फार जपतो. त्यावरून लक्षणेनें अतिशय आवडती वस्तू; प्रिय वस्तू; जीस आपण फार जपतों अशी वस्तू.

टाळूवर तेल घालणें-ओतणें—डोकें थंड राहाण्यासाठीं टाळूला तेल चोळतात यावरून. साहाय्य करणें; मदत करणें; उपयोगी पडणें; गरज भागावणें.

टाळूवर मिरे वाटणें—मिरे हे फार उष्ण असतात. ते जर डोक्यावर वाटले तर फार आग होणार यावरून. एखाद्यावर पूर्ण ताबा चालविणें; अंमल गाजविणें; पूर्णपणें अंकित करणें; ताब्यांत ठेवणें.

टाळूवर हात फिरविणें- एखाद्याबद्दल आपुलकी दाखविण्यासाठीं त्याच्या डोक्यावरून हात फिरवितात. याप्रमाणें आपुलकी दाखवून कपटानें फसविणें, बुडविणें, एखाद्यास पार सफा करणें.

(मढ्याच्या) टाळूवरचें लोणी खाणें-खाणारा—अतिशय कंजूषपणा; लोभानें हीनपणाची गोष्ट करणें. असें करणारा; नीच, हलकट, कृपण माणूस.

टिकटिक——टिकटिक करून राहणें—कसाबसा जीव धरून असणें. अत्यंत गरीबानें दिवस काढणें; कसे तरी कष्टानें दिवस घालविणें; अत्यंत हालांत असणें.

टिकला——टिकला लावणें—(व.) गंध लावणें; वर निश्चित केल्यानंतर वरास गंध लावण्याचा विधि. वाङ्‌निश्चयाचा एक विधि.

टिका——टिका कपाळीं लागणें--१ डाग लागणें; दोष येणें; अंगीं लागणें;येऊन चिकटणें. २ एखाद्या पदाची प्राप्ति होणें. राज्य वगैरे प्राप्तीच्या वेळीं कपाळास टिका लावतात यावरून.

टिका लागणें—प्रख्यात होणें; प्रसिद्धि होणें; कपाळावर लावलेल्या ठिपक्याप्रमाणें सर्वांस दिसून येणें; सर्वांस माहीत होणें; सर्व प्रसिद्ध होणें.

टिक्याचा धनी—१ मानापुरता मालक; केवळ शोभेपुरेसा अधिकार असलेला. २ नामधारी मालक; केवळ नांवापुरती सत्ता असलेला.

टिकोजी——एकला-टा टिकोजी-१ एकलकोंडा; कोणी सोबती मित्र नसलेला; स्वतःपुरतेंच पाहणारा व स्वतःमध्येंच गर्क असणारा. २ सर्व कुटुंबांत एकच उरलेला; कोणी आप्त नसलेला.

टिकोबा——टिकोबा टिकाई, विठोबा रखुमाई—घरांत विठोबा रखुमाईप्रमाणें नवरा व बायको अशीं दोनच माणसें असून पोरेंबाळें, सासुसासरा वगैरे परिवार नसला म्हणजे म्हणतात.

टिक्की——टिक्की लागणें--१ सोय लावणें; संधान बांधणें; विशेषतः जेवणाची सोय लावणें; कोठेंतरी आमंत्रण लावणें.

टिगवणें——टिगव(ल) त्याला भगव, फाडी त्याला साडी—[टिगवणें=टिकवणें] तगवी तिला भगवी, फाडी तिला साडी, पद्य.

टिटवी——टिटवी देखील समुद्र आटविते-हटविते--एका टिटवीनें समुद्रकांठीं अंडीं घातलीं होती. तीं समुद्राला भरती येऊन वाहून गेलीं तेव्हां टिटवीनें रागावून समुद्र उपसण्याचा उद्योग आरंभिला. आरंभीं ती एकटीच पण पुढें तिच्या मदतीला गरुडसुद्धां इतर सर्व पक्षी आले. एवढें बळ पाहून समुद्रांतील मासे घाबरले. त्यांनीं विष्णूची प्रार्थना केली, मग विष्णूनें समुद्राकडून त्या टिटवीचीं अंडीं परत देवविलीं. प्रथमदर्शनीं अगदीं असंभाव्य वाटणारी गोष्ट अगदीं क्षुल्लक प्राण्याकडूनहि प्रचंड उद्योगानें साध्य होते.—ज्ञा १ ६८. 'रूढीशीं लढाई करणें म्हणजे टिटवीनें समुद्र हटविण्याचें काम करणें असाच त्या काळीं वपन-विरोधाचा सत्याग्रहाचा अर्थ होता!'—नर्स सुंद्राबाई १६.

टिटवी यमाची तराळीण--टिटवीचें ओरडणें हें मृत्युसूचक आहे असें समजतात म्हणून तीस यमाची गस्त घालणारी म्हणतात. 'टिटवी यमाची तराळीण।'—भज ७३.

टिणटिण——टिणटिण उड्या मारणें--खिदळणें; धांगडधिंगा करणें; लहान मुलांनीं दंगामस्ता करणें; खेळणें; बागडणें.

टिपण——टिपणास येणें--वाघ, सिंह वगैरे प्राणी एका जागीं टपून बसून सावजावर अचानक उडी मारतात, तीस टिपण म्हणतात. यावरून आटोक्यांत येणें; माऱ्यांत येणें; टप्प्यांत येणें.

टिपरी——टिपरघाई; टिपुरघाई—नगाऱ्यावर एखादी गति वाजवीत असतां अखेरीअखेरीस ती अतिशय द्रुततालांत मोठ्या घाईघाईनें व जलद वाजवितात. या-

वरून अखेरीची घाईघाईची कामगिरी असा अर्थ होतो. मोठी आणीबाणीची हातघाईची घटना. 'क्षणभर तरवारीची टिपरघाई झाली.'

टिमकी——टिमकी देणें-वाजविणें—टिमकी वाजवून दौंडी पिटून कोणतीहि गोष्ट जाहीर करतात यावरून जाहीर करणें.

टिमकी वाजविणें—१ अपकीर्ति करणें; दुष्कीर्ति करणें. २ उदोउदो करणें; प्रशंसा, वर्णन करणें; जयजयकार करणें; फार स्तुति करणें.

❀ जेथें नगाऱ्याची घाई, तेथें टिमकी तुझें काई—नगाऱ्याचाच मोठमोठा व जलद आवाज होत असतां टिमकीचा आवाज कोणाला ऐकूं येणार ? जेथें मोठमोठ्या माणसांची गडबड व धांदल चाललेली असेल, तेथें लहानसान माणसांची दाद कसची लागते.

टिरी——टिरी पिटणें—लहान मुलांस फार आनंद झाला असतां तीं कुल्यावर हातांनीं टाळ्या बाजवितात यावरून. अत्यानंद होणें; आनंदानें नाचूं बागडूं लागणें. 'एक टिरीचा मृदंग करून । वांकुल्या दाविती वाजविती ।' —ह १०.१४५.

टिरी-टिऱ्या बडविणें—बढाई मारणें; प्रौढी मारणें; अत्यंत आनंदानें सांगणें; प्रौढी गाणें.

टिवली——टिवल्या बाव्हल्या करणें—१ रिकामें फिरणें; उनाडक्या करणें. २ बाहुलीप्रमाणें नटणें, मुरडणें; चट्टीपट्टी करणें.

टिवल्या बाव्हल्या दाखविणें—वेडावणें; तोंडें वेडींवांकडीं करणें.

टिळा——टिळा करणें—टिका पहा. राज्यावर बसविणें. राज्यावर बसवितांना गंधाचा टिकला लावतात त्यावरून. 'कीं तुम्हांसी टिळा करूं सुदिनीं ।' —कथा ३.१७.२०.

टिळाटोपी करणें—पवित्रपणाचा, मोठेपणाचा बाह्य देखावा करणें; नटणें; सजणें.

टिळा वेशीस लावणें—आमंत्रण करतांना ज्यास आमंत्रण करावयाचें त्यास अक्षता देतात; त्याप्रमाणें गंधाचा टिळा लावण्याचाहि प्रघात आहे. त्यावरून गांवच्या वेशीस गंधाचा टिळा लावून सर्वांस आमंत्रण करणें; गांवांतील सर्व लोकांस जेवावयास आमंत्रण करणें.

टिळ्याचा धनी—नाममात्र मालक. टिका पहा.

❀ टिळे पट्टे नायकाचे, घरीं-घरांत हाल बायकांचे—वरून दिसावयास मात्र मोठ्या नोकझोंकानें डामडौलानें व ऐटीनें राहणाऱ्या मनुष्याच्या घरीं दारिद्र्य असून घरच्या माणसांस नीट खावयास पुरेसेंहि नसतें, अशी स्थिति असतांना म्हणतात.

टीका——टीका करणें सोपें परंतु क्रिया करणें कठीण—एखादें कार्य दुसऱ्यानें केलें असलें म्हणजे तें असें करावयास पाहिजे होतें, तसें करावयास पाहिजे होतें, वगैरे गोष्टी काढून त्यावर चर्चा करणें किंवा त्यास नांवें ठेवणें सुलभ आहे. पण तें काम प्रत्यक्ष करणें अवघड असतें. टीका करणारे पुष्कळ लोक भेटतात, पण काम करणारे थोडे असतात.

टीकेस शीक शिकावी लागते—टीका करण्यास म्हणजे कोणतेंहि काव्य सुलभ समजण्यास जें विवेचन करावें लागतें, त्याची शिकवण शिकल्याशिवाय म्हणजे अभ्यास केल्याशिवाय तें येत नाहीं.

टीप——टीप जमणें-बसणें—सोन्याचा दागिना वगैरे करावयाचा असला म्हणजे प्रथम सोन्याचें वजन करतात. त्यास टीप म्हणतात. नंतर दागिना घडल्यावर पुन्हां वजन करतात व हीं दोन्ही वजनें बरोबर जमलीं म्हणजे टीप जमली म्हणतात यावरून. बरहुकूम जुळणें; तंतोतंत जुळणें; योग्य मिलाफ होणें.

टीपेस उतरणें—टिपणाप्रमाणें जमणें; यादीप्रमाणें असणें; यथायोग्य असणें; पसंत पडणें; जमणें.

टीर——टीर पिटणें-बडविणें—अत्यानंद झाला असतां माणूस टिऱ्या बडवितो. यावरून १ अतिशय आनंद दाखविणें. २ बढाई मारणें. टिऱ्या पहा.

टीर हालविणें—डुलत डुलत चालणें; दिमाखानें चालणें.

टुकटुक——टुकटुक दाखविणें—लहान मुलें आपण खात असतां न खाणाऱ्या दुसऱ्या मुलांस बोटें वांकडीं करून वांकुल्या दाखवितात. बोटानें वेडावणें; वांकुल्या दाखविणें; हिणविणें.

टुकटुकवाणा बसणें—फुकट टक लावून बसणें; आशाळभूतपणें व्यर्थ पाहात बसणें; व्यर्थ वाट पाहात राहणें.

❀ टुकटुक माकड, मी खातों पापड, तूं खा मेकुड; टुकटुक माकड, आम्ही खाऊं पापड, तुला देऊं मेकड—लहान मुलें एखादा पदार्थ आपण खात असतां, दुसऱ्या मुलास न मिळाला म्हणजे त्यास चिडविण्याकरितां असें म्हणतात.

टुकी——टुकी लागणें—(व.) आशाळभूतपणानें

पाहाणें; आशेनें टक लावून बसणें; मोठया लालचीनें वाट पाहात बसणें.

टुकें——टुक्यांत टंच—थोडक्यांत थाट, ऐट.

टुमणी-णें——टुमणें लावणें—मागें लागणें; तगादा, टोंचणी करणें; सारखें स्मरण, आठवण देणें. 'भय्यासाहेबांना विचारण्याविषयीं आईमागें सारखें टुमणें लावणें.'-दौलत २३३.

ॐ तट्टाला टुमणी, तेजीला इशारत——तट्टू पहा.

टुरटुर——टुरटुर लावणें—[टुरटुर=बेडकाचा आवाज] १ कुरकुर लावणें; भुंगा लावणें; भुणभुण लावणें. २ आपल्या पराक्रमाचा थोडावेळ दिमाख दाखविणें.

टूक——टूक धरणें—अगदीं नेमकी वेळ ठेवणें; त्यावेळीं वाट पाहात असणें.

टूक संभाळणें——योग्यवेळीं काळजी घेणें.

टुकेनें जेवणें-टोलणें-निजणें-औषध घेणें-औषध देणें——योग्य व काळजीपूर्वक करणें; वेळच्या वेळीं नियमितपणें व अगदीं योग्य प्रमाणांत करणें.

जेवण टुकेवर ठेवणें—प्रकृतिमानादि पाहून जेवण ठेवणें, मिताहार करणें; प्रकृतीस सोसेल असें खाणेंपिणें करणें; अगदीं जपून खाणें, पिणें.

टेक——टेक धरणें—नेट धरणें; चिकाटी धरणें; पिच्छा पुरविणें; हातांतील गोष्ट कधींहि न सोडणें. 'जों टेंक धरुनि भिडला,ज्याचें यश वीरमंडळीं मोठें॥'-मोद्रोण १५.४१.

टेक मारणें—खूप खाणें; भरपूर मागून घेऊन जेवणें; अन्नाचा चांगला समाचार घेणें.

टेकीला-स येणें—थकणें; भागणें; जेरीला येणें. 'ज्याची बाजू लंगडी किंवा कमजोर असेल, तो टेकीस येईल.' -सासं २.२११.

टेक——टेक येणें— गरोदर होणें, असणें.

टेकीस टेक उतरणें-तोलास तोल देणें; बरोबरी करणें; स्पर्धेत पुरें पडणें.

ॐ करावयाला गेले एक, पुढें आलें टेक-गुप्तपणें कृत्य केलें असतां गर्भ राहिल्यामुळें तें उघडकीस येणें. एक करावयाला गेलें असतां भलतेंच होणें; अंगलट येणें.

टेकाड——उराचें टेकाड—भरदार छाती.

कपाळाचें टेकाड—उंच कपाळ.

पोटाचें टेकाड——फुगलेलें पोट; गर्भारपण.

टेंबा-भा——टेंबा पाजळणें-[टेंभा=दिवटी,मशाल.] १ दिवा लावणें. २ डौल मारणें; प्रौढी मिरविणें. "'मी यंव करीन, त्यंव करीन' अशी बडबड करून निजामानें आपल्या कर्तृत्वाचा मोठा टेंभा पाजळला होता." 'जाधव०-जाधवरावाचा स्नेह भोंसल्यांना पाहिजे तो स्वतःचा टेंभा पाजळण्याकरितां पाहिजे आहे, असें मला तर स्पष्ट दिसतें आहे!'-शिसं १.२. 'पातिव्रत्याचा टेंभा पाजळतां पाजळतां अखेरीस त्याचा उपयोग पतीची चिता पेटवण्यांत केलास!'-उग्र ४.४. ३ (उप.) कर्तृत्व दाखविणें.

आपला टेंभा मिरविणें-चालविणें—१ वरचष्मा करणें. २ दिमाख दाखविणें; ऐट करणें. 'पुष्कळांना परोत्कर्ष अगदीं सहन होत नाहीं, व आपलाच जिकडे तिकडे टेंभा मिरवावा असें वाटत असतें.'-विवि.

टेहळणें——टेहळता पहारा—फिरता पहारा; एकसारखें फिरत राहून चालविलेला पहारा (बसून केलेला नव्हे).

टेहळता पहारेकरी—फिरता पहारेकरी; एकसारखा येरझारा करणारा; गस्तीस फिरणारा पहारेकरी.

टोकर——टोकर करणें——[टोकर=टोलार=पोकळ] (व.) १ पोकळ करणें. २ पैशाची उधळपट्टी करणें; असेल नसेल तें नाहींसें करणें.

टोकर होणें——(व.) १ पोकळ होणें. २ सत्त्व शिल्लक न राहणें. ३ दरिद्री होणें.

ॐ विंचू व्याला टोकर (टोलार) झाला——विंचवाचीं पिलें त्याचें पोट फोडून बाहेर येतात. त्यामुळें तीं बाहेर आलीं म्हणजे त्याचें पोट अगदीं पोकळ होतें व ती मरते. हालअपेष्टाच्या दुःखास अनुलक्षून म्हण.

टोकर——घरांत अठरा हात टोकर फिरतो—[टोकर=जाड लांब बांबू] लांब जाड बांबूस बांधलेल्या केरसुणीनें घर साफ करतात यावरून. (ल.) घर साफसूफ झालें आहे; आतां कांहीं मिळण्यासारखें नाहीं.

टोणगा——टोणग्याचे कपाळीं दसरा—दसऱ्याच्या दिवशीं टोणग्यास देवीला बळी देतात. यावरून प्रत्येक टोणग्यावर केव्हां ना केव्हां तरी दसऱ्याच्या दिवशीं देवीला बळी जावयाची पाळी यावयाचीच. त्याप्रमाणें ज्या मनुष्याच्या प्राक्तनांत त्याचा अनिष्ट भविष्यकाळ ठरलेला असतो तसें घडून येतें.

टोणग्याचे कानीं वाजविली किन्नरी-किंगरी; टोणग्याचे कानीं वाजविली किनरी, तो म्हणे माझी ट्रोंयच बरी——रेड्याला पुष्कळ सुंदर गायन ऐकविलें तरी तें कळण्याचें

ज्ञान त्याला नसल्यामुळें तें त्याला मुळींच आवडत नाहीं. उलट त्याचा अथवा त्याच्या सहचाऱ्यांचा आवाज कर्णकटु असला तरी त्याला तो प्रियच असतो. ज्या गोष्टींत आपणांस गम्य नाहीं ती उत्तम असली तरी तिची कांहीं किंमत नसते; उलट आपणाला आवडणारी किंवा चिरपरिचित वस्तु इतरांच्या दृष्टीनें वईट असली तरी आपणांस बरी वाटते. तु०–गांवढयापुढें वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता.

टोपर——टोपर गाणें-ठेवणें—दुसऱ्यावर ठपका ठेवणें; त्याला दोष देणें; दुसऱ्यावर दोषारोप करणें.

टोपशी-सा——टोपशी–सा उडविणें—जोरानें खरडपट्टी काढणें; तासडपट्टी करणें; ताशेरा झाडणें; खरपूस समाचार घेणें.

टोपी——टोपी घालणें—(गणेश टोपीवरून)एखाद्यास बुडविणें; फसविणें. 'हा टोपी घालिल जलनिधिसहि; मशका म्हणेल 'आटोपी'।' –मोद्रोण १४.७३.

टोपी देणें—(व.) पागोटें हिरावून घेऊन टोपी देणें अशी याची पूर्णता. पागोटें धनाचें प्रतीक होय. एखाद्याचें सर्व धन हिरावून घेऊन डोक्यांत घालण्यास पागोट्याऐवजीं त्याला टोपी अथवा चिंधी देणें. पुरें नागविणें; फसविणें; टोपी घालणें.

टोपी सलामत; टोपीचें राज्य तपो; गादी टोपी सलामत—(साहेबास द्यावयाचा आशीर्वाद) एखाद्याचें ऐश्वर्य अबाधित राहो असा आशीर्वाद देतांना म्हणतात.

टोला——टोला बसणें—१ तडाखा बसणें; नुकसान, तोटा येणें. २ (ल.) दुरुत्तर मिळणें; चांगली निंदा होणें. 'कृतघ्न पुरुषांना असेच जागोजाग टोले बसले पाहिजेत.' –आजोच २४१.

टोली——टोलीचे खोडव्या, पाऱ्याची चढाओढ [टोली = ८ कवड्या. खोडवा=एका वर्षी उसाचें पीक काढून घेतल्यावर पुन्हां फुटण्याकरितां शेतांत राखून ठेवलेलें उसाचें बुंधे.] क्षुल्लक गोष्टीबद्दल महत्त्वाच्या लोकांनीं चर्चा करणें व वेळेचा वगैरे अपव्यय करणें.

टोवणें——टोवणें भरणें—स्वतःचें भांडें भरणें; इच्छा पूर्ण होणें; इच्छित फल प्राप्त होणें.

टोळ——टोळ भैरव—टोळाप्रमाणें हिंडणारा भैरव (दांडगेश्वर). उडाणटप्पू; गांवगुंड.–दावि ११. पृ. ८१. 'दोन वेळां जेवण्यापुरतें कायतें घरांत; एरवीं टोळ भैरव गांवांत हिंडत आहेत.'

टोळ्याच्या कानीं किनरी—टोणगा पहा.

टूंय——टूंय म्हटलं कीं चालले मागें—(व.) [टूंय टूंय=टोणगा–म्हशीचा शब्द] म्हैस टूंय टूंय करून पुढें चालली कीं तिचें पारडूं त्या आवाजावरून तिचा माग काढीत तिच्यामागें धांवत येतें. त्यावरून कोणी चिथावून दिलें, कांहींहि बरावाईट उपदेश केला कीं लागलीच अनुयायी बनणें असा अर्थ. किंवा टूंय टूंय असा शब्द करणाराच्या पाठीमागें म्हैस जाते त्याप्रमाणें अविचारानें मागें जाणें. 'येथें तरुण युवक संघाचे प्रचारक येऊन व्याख्यान झोडून गेले. आमच्या शाळेंतील विद्यार्थी लगेच त्याच्या उपदेशाप्रमाणें शाळा सोडून खेडोखेडीं प्रचार करावयास निघाले. कोणी टूंय म्हटलं की लागले त्याच्या पाठीमागें.'

ट्रांय——ट्रांय ट्रांय जावप–(गो.) त्राही त्राही होणें.

ठ

ठक——ठकविद्या; ठकूविद्या—फसविण्याची कला; ठकविण्याची विद्या; लबाडी; सोदेगिरी.

ठकास ठक बनणें—जशी व्यक्ती असेल तसेंच तिच्याशीं वर्तन करावें. शठे शाठ्यम् समाचरेत्। दुष्टे दुष्टं समाचरेत्।

***ठक ठकाला फसवील, तो इतरा कां न ठकवील**—जो लबाड मनुष्य इतर आपल्यासारख्या लबाड मनुष्यासहि गोता देतो तो सामान्य मनुष्यांस सहजच चकवील यांत संशय कसचा !

ठक पडतो आपले फशीं, सर्व पाहून होती खुषी—एखाद्या लबाड मनुष्यानें केलेली लबाडी जेव्हां त्याच्याच अंगलट येऊन त्यांत त्यास धक्का बसतो तेव्हां इतरांस फार आनंद होतो.

ठकपणा दोन दिवस, खरेपणा बहुवस—खरेपणानें नेहमीं राहतां येतें, पण लबाडी करून फार दिवस निभाव लागत नाहीं.

ठकपणाविना कांहीं, ठक मानी कीं होत नाहीं—लबाड मनुष्याला नेहमीं असें वाटत असतें कीं, जगांत खरेपणानें वागतांच येत नाहीं व लबाडी केल्याशिवाय चालत नाहीं.

ठकबाजीचें घर नहीं बसता--लबाडीनें पैसे मिळवून कांहीं घरें बांधतां येत नाहीं. दुसऱ्यांना फसवून कितीहि संपत्ति मिळविली तरी ती लखलाभ होत नाहीं व टिकून राहात नाहीं. तु०--चोराचे वाडे वसत नाहींत.

ठक, महाठक आणि निवारण्या--सिद्ध, साधक वगैरे सर्व लबाड लोक एकत्र जमले म्हणजे त्यांच्या जमावास म्हणतात. एक लबाड, तर दुसरा सात लबाड व तिसरा वरवर सावाचें सोंग आणून आपणास दूर ठेवण्याचा प्रयत्न करणारा त्यांचा साथी, हे सर्व परस्पर साथीदार असतात.

ठक लोकांशीं व्यवहारे, ठकती लोक सारे--लबाड लोकांशीं व्यवहार केला असतां बहुतेक लोक फसतात.

ठकवणीचा खेळ, होत नाहीं सफळ--लबाडीनें करण्यांत नेहमीं अथवा कायमचें यश येतें असें नाहीं. केव्हां तरी ती उघडकीस आल्याशिवाय राहात नाहीं.

ठकाला ठकविणें, हें योग्य करणें--लबाड मनुष्याची लबाडी त्याच्या गळ्यांत घालणें हें फार चांगलें काम आहे. लबाड मनुष्याला फसवून लुबाडणें यांत दोष नाहीं. तु०--दगा किसीका नहीं सगा. Deceiving of a deceiver is no knavery.

ठकाला महाठक (भेटला)--एखाद्या लबाड मनुष्याला त्यापेक्षां अधिक लबाड मनुष्यानें फसविलें म्हणजे म्हणतात. शेरास सव्वाशेर. चोरावर मोर.

ठकविणें------**ठकवितात तेच सत्यवादी म्हणवितात**--जे लोक लबाड असतात, तेच वरून वरून मोठा साधुत्वाचा आव आणतात.

ठकूताई------**ठकूताईचें नटणें, हातीं पोळपाट लाटणें**--स्वयंपाकीण बाईनें कितीहि शृंगार केला तरी हातांतील पोळपाटलाटणें कांहीं सुटत नाहीं. हलक्या मनुष्यानें कितीहि मोठेपणाचा आव आणला तरी त्याची योग्यता कांहीं वाढत नाहीं.

ठं------**ठं ठं ठं ठं, ठठं ठठंठः**--तांब्या जिन्यावरून गडगडत आला त्यासंबंधीं भोजराज-कालिदासाची गोष्ट. भोजराजानें एकदां जिन्यावरून एक तांब्या घडघडत खालीं जात असतांना-ऐकला व त्याच्या आवाजावरून कालिदासास समस्या घातली. ती त्यानें पुरी केली. 'सोपानमार्गे प्रकरोति शब्दं, ठठं ठठं ठं ठठठं ठठंठः।

ठट्टा------**ठट्टा करून टाकणें**--उपहास करणें; थट्टा करणें; चेष्टेवर नेणें. थट्टा पहा.

ठट्टेवर नेणें--विनोद करणें; चेष्टा करणें; थट्टेवारी घालविणें.

ठणका------**ठणका बसविणें**--(ना.) खोड मोडणें; अद्दल घडविणें; खोडकी जिरवणें; पक्का धडा शिकविणें.

❀ **ठणक्यास दणका लागतो**--ठणकून बोलणारास शासन पाहिजे; जो फार जोरजोरानें बोलूं लागतो, त्यास चांगलें पक्कें भेटलें म्हणजे त्याचें कांहीं चालत नाहीं.

ठणठण------**ठणठणपाळ**--१ मूर्ख, दरिद्री माणूस. २ ठणठणाट; अगदीं अभाव.

❀ **भला बिचारा ठणठणपाळ**--अमरसिंग तो मर गये० पहा.

ठणठणपाळ फुटकें कपाळ, भिक्षा मागें आळोआळ--दरिद्री, भिकारी मनुष्याबद्दल म्हणतात.

ठणठणपाळ, मदन गोपाळ-जयगोपाळ--वरीलप्रमाणें.

ठमक------**ठमक आई; ठमकाई; ठमक ठाणवई**--१ थोराड व उफाड्याची स्त्री. २ ठुमकत चालणारी स्त्री; नखरेबाज स्त्री; फार नट्टापणा करून रस्त्यानें डौलानें चालत जाणारी स्त्री. ३ लहान वयांत पुष्कळ शहाणपणा दाखविणाऱ्या मुलीस प्रेमानें म्हणतात.

ठमाबाई------**ठमाबाईचे झाले बारा राम, आणि घरीं नवरोजींनीं साधलें काम**--एखादी भाविक स्त्री देवदर्शनाला गेली असतां तिला घरीं काय चाललें आहे याची कल्पनाहि नसते; पण इकडे ती घरांत नाहीं असें पाहून तिचा नवरा व्यभिचार करतो. भाबडी स्त्री व बेरकी नवरा. -संक १.३.११.

ठरविणें------**ठरवतील तें धोरण व बांधतील तें तोरण**--'कराल तें कारण आणि बांधील तें तोरण' या म्हणींत थोडा फरक करून बनविलेली म्हण. "'शेळीचे कान गोसाव्याच्या हातीं' या म्हणीप्रमाणें कॉंग्रेस पुढाऱ्यांचें जिणें परावलंबी आहे. गांधीजी ठरवतील तें त्यांचें धोरण व बांधतील तें त्यांचें तोरण."--केसरी ४-११-४१.

ठस------**ठस ठोंबरा वाटाण्याची अक्षत**--तोंडावर रोखठोक, स्पष्ट, खडखडीत उत्तर; अगदीं दाद लागूं न देणें; डाळ शिजूं न देणें; स्पष्ट जबाब.

ठसक------**ठमक देशमुखनी, बबायनी काचकुंडनी**--(अहिराणी) ऐट मोठी पण करणी दरिद्र्याची; श्रीमंतीचा डौल पण दरिद्री वागणूक.

ठसक देशमुखाची आणि ओंवाळणी काचकुलाची—वरील म्हणीचा मराठी अनुवाद.

ठाई——ठाई पडणें—सांपडणें; आकळणें. ' तौ देव कोण्या गुणें । ठाई पडे । '—दा ८.१.१५.

ठाक——ठाकठोक, बोहणी चोख-रोख—सकाळीं बोहणीच्या वेळीं नेहमीं रोखीचा व्यवहार करावा.

ठाकणें——ठाकून येणें—न विसरतां येणें; हटकून येणें. ' जिवा जन्मदारिद्य ठाकूनि आलें । '—राम१३८.

ठाकर——ठाकर हा जंगलचा बादशहा—ठाकरी लोक जंगलांतच राहात असल्यानें तें त्यांना आपल्या मालकीचें असें साहजीकच वाटतें. ' ब्राह्मणाचे जन्माला जाशील तर लिहूं लिहूं मरशील, वाण्याच्या जन्माला जाशील तर तोलूं तोलूं मरशील, ठाकराच्या जन्माला जाशील तर जंगलचा बादशाह होशील. '—गांगा २३६.

ठाका——ठाका देणें-मारणें—प्रतिष्ठेनें मिळविणें; योग्यता संभाळून संपादन करणें.

ठाकुर——ठाकुरदास मांडून बसणें—वैभवाचा, पावित्र्याचा डौल करणें, आव आणणें; प्रस्थ मांडणें.

ठाण——ठाण मांडणें—अढळ आसन ठोकणें; स्थिर राहणें; घट्ट जागा धरून बसणें. 'ठाण मांडिलें त्रिभुवनीं।'

ठाण सोडणें—तळ सोडणें; आसन सोडणें; जागा सोडून जाणें; पळून जाणें.

ठाणें——ठाणें घालणें—१ कायमचें वस्तिस्थान करणें. २ मोहीम, स्वारी करणें. ३ तळ ठोकणें. ' घातलें ठाणें जिव्हाग्रीं । '

ठाय——ठायीं करणें—सिद्ध करणें; तयार करणें; उपयुक्त करणें; प्रवृत्त करणें; योग्य करणें. ' आत्मा अधिकारी पाही । येणें निरूपणें केलें ठायीं । '—एभा २८.४९६.

ठायीं घालणें—ठिकाणीं नेमकें ठेवणें; जाग्यावर आणणें. ' नको माझे कांहीं । गुणदोष घालूं ठायीं । '

ठायीं पडणें—१ पत्ता लागणें. ' ठायीं न पडे कै गेली । '—मुरंभा ३३३. २ मेळ असणें; अनुकूल होणें. ' औषध ठाईं पडिलें देव पडना. '

***ठायींच बैसोनी करा एकचित । आवडीनें अनंत आळवावा ।**—एका ठिकाणीं बसून एकाग्र मन करावें व नंतर परमेश्वराचें ध्यान करावें. एकांतांत व एकाग्रमन केल्याशिवाय परमेश्वराकडे चित्त लागत नाहीं.

ठाव——ठाव करणें—१ पाटाचा नवरा करणें; घरठाव करणें; दुसरा घरोबा करणें. २ जेवलेल्या ठिकाणची जागा स्वच्छ करणें; पानें उचलून जागा साफ करणें; उष्टेंशेण करणें.

ठाव घेणें-पाहाणें—१ तळ शोधणें; खोलीचा अंदाज घेणें; बुडीद टाकून खोली पाहाणें. २ अजमास पाहाणें; मनाची परीक्षा करणें; अंत पाहाणें. ३ शेवटची मर्यादा गांठावयास लावणें; कडेपर्यंत नेणें.

ठाव ना ठिकाण—बेपत्ता; ज्याचें स्थळ, वसती वगैरे माहीत नाहीं असा.

खडा टाकून ठाव पाहाणें—१ अजमास काढणें; अंदाज घेणें. २ मनाची प्रवृत्ति कोणत्या बाजूस आहे हें एक दोन प्रश्न विचारून समजून घेणें.

ठाव पुसणें-फेडणें—१ पत्ता लावणें. २ नाहींसे करणें; ठिकाणांतून काढून देणें; स्थानत्याग करावयास लावणें; नायनाट करणें. ' नीवातकवचांचा ठावो फोडिला ।'—ज्ञा१.२००.

ठाव फेडणें—सूड घेणें; बदला घेणें; वैर उगविणें. ' ठाओ वैरियाचा फेडताये '—भाइसंमंत्रै १०.३. ओ. २८ पृ. ११४.

ठाव लागणें—१ सांपडणें; पत्ता लागणें; ठिकाणा लागणें. २ अंत लागणें; अजमास येणें; अंदाज होणें. ३ माहिती होणें; ठाऊक होणें; ज्ञान होणें. ४ वर येणें; उघडकीस येणें.

ठाव लावणें—शोधणें; पत्ता लावणें; माहिती करून घेणें; तपास करणें; चौकशी करणें.

चित्तानें-मनानें ठाव सांडणें-सोडणें—मन ठिकाणावर नसणें; कांहीं सुचेनासें होणें; चिंताग्रस्त होणें; घाबरणें; भीतीनें बुद्धि बावरणें.

ठाव सोडणें—स्थानत्याग करणें; जागा सोडणें; ठिकाण सोडून जाणें.

***ठाव देऊं नये कोणाला, वडवानल जाळितो समुद्राला**—कोणालाहि आश्रय देतांना फार विचार करावा, सहसा कोणाला आश्रय देऊं नये; कारण एकदां आश्रय दिला म्हणजे पुढें त्यापासून फार त्रास होण्याचा संभव असतो. उदाहरणार्थ समुद्रानें आपल्या पोटांत वडवानलाला आश्रय दिल्यामुळें तो सारखा समुद्राला जाळीत असतो.

ठाव ना गांव, लटकेंचि नांव—घर नाहीं, गांव नाहीं व अधिकारहि नाहीं.; नुसत्या नांवाचे मोठे.

ठासणें——ठासून सांगणें—निक्षून सांगणें; साफ, स्पष्टपणें सांगणें.

ठिकरी——ठिकरी तापणें—खापरीचा तुकडा तापून लाल होतो त्याप्रमाणें सपाटून भूक लागणें; क्षुधेनें व्याकूळ होणें; पोटांत आग पेटणें.

ठिकऱ्या होणें—१ तुकडे तुकडे होणें; चिंधड्या उडणें; साफ नाश होणें. २ थंडीनें ओटास वगैरे भेगा पडणें.

❀ **ठिकरी घटाला फोडते**—खडा लहानसाच असतो पण तो मोठ्या मडक्याला लागला तर तें फुटतें. लहानशी वस्तूहि मोठ्या वस्तूला मारक होते. तु०—हत्तीला अंकुश केवढा लागतो. एक ठिणगीनें अनेक घरें जळतात.

ठिकाण——ठिकाण पुसणें-मोडणें—समूळ नाश करणें; नायनाट करणें; मागमूस राहूं न देणें.

ठिकाणचा अंक—वस्तु उत्पन्न झाली तेथील किंमतीचा आंकडा; मूळ ठिकाणीं असलेली किंमत; थेटचा आंकडा.

ठिकाणचा तुटणें—ताटातूट होणें; स्थानापासून भ्रष्ट होणें; मूलस्थान, संघ, कळप, वंश, गोत्र वगैरेपासून विलग होणें; दूर होणें.

ठिकाणचा विंचू उतरणें-जाणें—विंचू चावला असतां त्याचें विष दंशस्थानापासून वर चढतें तें लवकर उतरलें तरी दंशस्थानचा ठणका बराच वेळ राहतो, तोहि थांबणें; विंचू चावलेल्या जागेची आग थांबणें.

ठिकाणची खरेदी—वस्तु उत्पन्न होते तेथील खरेदी; मूळ तयार होण्याच्या ठिकाणची खरेदी; थेटची खरेदी.

ठिकाणावर आणणें—१ पूर्वस्थितीवर आणणें; पूर्वीच्या जागीं स्थापन करणें; मूळ पदावर आणणें. २ भानावर आणणें; नीट समजूत पटेल असें करणें.

ठिकाणीं आणणें-लावणें—परत मिळविणें; जाग्यावर आणणें.

ठिकाणीं ठेवणें—योग्य जागीं ठेवणें, स्थानापन्न करणें; मूळपदावर स्थापन करणें.

ठिकाणीं येणें-लागणें—१ जागच्या जागीं येणें; मूळस्थानावर स्थित होणें. २ बस्तान बसणें; स्थिर होणें; व्यवस्था लागणें.

ठिकाणीं लावणें-पाडणें—१ पत्ता काढणें; मूळ ठिकाणचा शोध लावणें. २ आरंभापासूनची माहिती मिळविणें; सर्व लागाबांधा शोधून काढणें.

❀ **ठिकाण नाहीं लग्नाला, कोण घेईल मुलाला**—अजून लग्नसुद्धां झालें नाहीं तों पुढें होणाऱ्या मुलाला कोण घेईल म्हणून काळजी करणें. अजून कोणत्याच गोष्टीचा पत्ता नसतां भविष्यकाळाबद्दलची विनाकारण काळजी करीत राहणें. तु०—बाजारांत तुरी०

ठिणगी——ठिणग्या गाळणें—१ डोळ्यांपुढें काजवे चमकणें; एखाद्या ठिकाणीं आघात वगैरे होऊन डोळ्यांपुढें उजेड पडणें, लकाकणें. २ अतिशय संतापणें; रागावणें; क्रोधानें डोळे लाल करून आंतून ठिणग्या निघत आहेत काय असें भासविणें; संतापानें डोळे लाल करणें.

ठी——ठीस ठी मिळणें—(एका कवीची गोष्ट आहे) अनुकूल असणें; जुळणें; कबूल करणें; जमणें; होकार भरणें.

ठीक——ठीक ठीक करणें—वठणीवर आणणें. 'तरी असल्या चाकरास ठीकठीक केलें पाहिजेत !'—रा ८.२७.

ठेका——आपला ठेका चालविणें—हट्ट चालविणें; हेका धरून बसणें.

ठेका लावून देणें—आपलें वर्चस्व दुसऱ्यावर बसविणें; दुसऱ्यास आपल्या कच्छपीं लावणें; दुसऱ्याच्या मनावर आपला ताबा बसविणें; दुसऱ्यास आपल्या तंत्रानें चालावयास लावणें.

ठेकी——ठेकीला येणें—(माण.) बेजार होणें; टेकीस येणें; अगदीं अगतिक होणें.

ठेंगणा——ठेंगणा ठुसका; ठेंगणा रिंगणा—बांधेसूत; रेखलेल्या शरीराचा; रेखीव बांध्याचा.

ठेंगा——ठेंगा दाखविणें; ठेंग्यावर बसविणें—[ठेंगा = शिश्न, लिंग.] फसविणें; ठकविणें; बनविणें; प्रतारणा करणें.

ठेंगा नाचविणें—मत लादणें; वर्चस्व स्थापन करणें; आपल्या तंत्रानें चालावयास लावणें; कह्यांत आणणें.

ठेंगा नेसणें—[ठेंगा = सोटा] साफ नाकारणें; साफ नाहीं म्हणणें; निक्षून नकार देणें.

❀ **वाऱ्यावर वरात, भुसावर ठेंगा**—वाऱ्याकडे पैशाची मागणी करणें व भूस बडग्यानें बडविणें या दोन्ही गोष्टी निरर्थक आहेत. यांपासून कांहींहि फलप्राप्ति होत नाहीं. तु०—घरोघरी सांगती ज्ञान । भूस शीण कांडिती । —तुगा २८९५.

ठेंगे मारूं, फत्ते करूं--(व.) बडग्याचा उपयोग करून एखादें काम साधणें. शक्तीच्या जोरावर एखादें कार्य यशस्वी करणें; जबरदस्तीनें एखादी गोष्ट करणें.

ठेंच——ठेंच भरणें—(आगरी) लग्नांत उंबऱ्यास इळदकुंकू लावणें.–बदलापूर ३५.

ठेंच लागणें--अद्दल घडणें; प्रचीत येणें; धडा मिळणें; कांहींतरी चट्टा लागून अनुभव मिळणें.

ठेंचा खाणें--नुकसान सोसणें; चट्टा बसणें. 'आपले लोकांनीं ठेंचा खाल्या तरी पुरवल्या.'–इंप १२१. 'अंग्रे यांनीं ठेंचा खातां खातां आपल्या धंद्यांत पूर्ण सुधारणा केली असती.'–V. S. २.११५.

❀ **पुढच्यास ठेंच, मागचा शहाणा**—एखाद्या मनुष्यास एखाद्या वाटेंत ठेंच लागली म्हणजे त्याचे मागून येणारा त्या ठिकाणीं जपून चालतो. त्याप्रमाणें एखाद्या धंद्यांत किंवा कामांत एकास नुकसान आलें म्हणजे त्याच्या अनुभवावरून दुसऱ्यास शहाणपण येतें व तो जास्त जपून वागतो अगर त्या भानगडींत पडत नाहीं.

ठेंच लागल्यावांचून स्मरण होत नाहीं--एखाद्या दूरच्या मनुष्यानें आठवण केल्यास ठेंच लागते अशी समजूत आहे. यावरून उलट आपल्याला ठेंच लागल्याशिवाय आपली कोणी आठवण केली असेल असें आपल्या मनांत येत नाहीं व त्यामुळें आपल्या दूर असलेल्या मित्रांबद्दल वगैरे आपणांस स्मरण राहात नाहीं.

ठेप——ठेप देणें--१ अडथळा आणणें; प्रतिबंध करणें. २ मर्यादित करणें; अटी घालणें. ३ मुदतबंद करणें; कालावधि घालणें; मुदत ठरविणें.

ठेपेस नेणें–लावणें--पूर्वस्थळीं आणणें; निश्चित करणें; मर्यादित करणें.

ठेंबे——ठेंबेठोक--(व.) वस्ताद; पक्का; बिलंदर. 'बायको चांगली ठेंबेठोक मिळाली आहे ती त्याला वठणीवर आणल्याशिवाय राहणार नाहीं.'

ठेव——ठेवीवरचे भुंजग, वाटेवरचे मांग, सारखेच--जे लोक सापासारखा पैसा राखून ठेवतात, कधीं खर्चीत नाहींत व कोणास घेऊं देत नाहींत ते व वाटमारे मांग यांत कांहींच फरक नाहीं. दोघेहि पैशाचे सारखेच लोभी असतात व त्याकरितां दुसऱ्याचा जीवहि घेतात.

ठेवणें——ठेवावी चांगली संगत, गणले जाल त्या संख्येंत--आपण जर चांगल्या लोकांच्या सहवासांत राहिलों तर त्या लोकांतच आपली गणना होऊन लोक आपणांस प्रतिष्ठित समजत जातील. वाईट लोकांच्या संगतींत राहिल्यास लोक आपणाबद्दल प्रतिकूल मत करून घेतील. A man is known by the company he keeps. (अ) सगं: सतां किमुत मंगलमातनोति। (आ) सतां हि संगः सकलं प्रसूते।

ठेवितां उघडें कवाड, चोरीस मिळते सवड--आपणच दार उघडें ठेवल्यास चोरास चोरी करावयास आयतेंच फावतें; त्याप्रमाणें जर आपण आपला कारभार ढिला ठेवला तर लोक त्याचा फायदा घेतात व शेवटीं आपलें नुकसान होतें.

ठेवितां चांगली रीती, दैवगती उघडती--चांगल्या पद्धतीनें वागल्यास दैव आपणांस अनुकूल होतें.

ठेवितां मोठी चूल घरीं, पिशवी लहान करी--घरीं फार माणसें जेवावयास असल्यास किंवा अवाढव्य खर्च केल्यास जवळील पैसा लवकर संपतो.

ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें। चित्तीं असो द्यावें समाधान॥--तुगा ३३३६. आहे त्या स्थितींत माणसानें समाधान मानावें.

ठेवी पोट साफ, पाय उष्ण, नेहमीं गार मस्तक जाण, मग वैद्याची गरज सोड, हित तेंच समज—नेहमीं कोठा साफ ठेवला, पायांना शेक दिला, मस्तक थंड ठेवलें तर वैद्याची गरज लागत नाहीं व अशा वागण्यांत आपलाच फायदा आहे. Keep the bowels open, the head cool and the feet warm; and a fig for physician.–सवि २०६५.

ठेवी मन स्वाधीन, राहे प्रगट डौलानं--मन नेहमीं आपल्या ताब्यांत ठेवून बाहेर प्रतिष्ठितपणें व आपली अब्रू संभाळून राहावें. Keep your thoughts to yourself; let your mien be free and open.–सवि २०६९.

ठेवी सद्‌गुणी संगत, ती राहे अखंडित—सद्‌गुणी मनुष्याशीं स्नेह ठेवल्यास तो चिरकाळ टिकतो.

ठेवी स्वतंत्रतेचा बाणा, लोकीं तोच खरा शहाणा—जो मनुष्य स्वतंत्रपणें, निस्पृहतेनें वागतो तोच खरा शहाणा होय.

ठो——ठो ठो करणें-मारणें–बडविणें—बोंब मारणें.

ठोकणें——अघाडी ठोकणें—पहिला येणें; पुढें येणें; अग्रेसर होणें.

अर्जी ठोकणें—अर्ज करणें; अर्ज पाठविणें, धाडणें.

आरोळी-बोंबा ठोकणें——१ ओरडणें; बोंब मारणें; कल्ला करणें; ओरड करणें; टाहो फोडणें. २ मोठ्यानें हांक मारणें.

तंबू ठोकणें—तंबू रोवणें, बसविणें; तंबू मारणें.

दंड-बाहू ठोकणें——१ कुस्तीस तयार होणें; आव्हान देणें. २ दंड थोपटणें. ' किंचिच्छेष कुरुकटक भीमें ठोकूनि बाहु भुलविलें। '–मोशल्य ४.५.

धांव-धूम ठोकणें—पळत सुटणें; पलायन करणें; सूं बाल्या करणें.

पानें ठोकणें—जेवण्याकरितां पानें मांडणें; पानांची तयारी करणें.

फिर्याद ठोकणें—तक्रारअर्ज गुजरणें; फिर्याद मांडणें, लावणें.

बोंब ठोकणें—बोंब मारणें; आरडाओरड करणें.

ठोकून देणें——गप्प मारणें; बात मारणें; थाप ठेवून देणें; गप्प उठविणें.

ठोठावणें——ठोठावल्याशिवाय दार उघडत नाहीं——हांकाटी केल्याखेरीज, प्रयत्नाखेरीज कार्य होत नसतें. To knock till the door opens याचा अनुवाद.–केसरी ६–१२- ४१.

ठोमणा——ठोमणे ठोसरे खाल्लेला—अनुभवी; टक्केटोणपे खालेल्ला; ठेंचा लागलेला.

ठोसर——ठोसर नजर—वरवरची पाहणी; वरून वरून देखरेख; साधी टेहळणी; वरवर टाकलेली नजर, दृष्टिक्षेप. Bird's eye-view.

ठ्या——ठ्या करणें-बडविणें—पोबारा करणें; पळून जाणें.

ड

डंका——डंका देणें-वाजविणें—१ उघड करणें; प्रकट करणें; उघडकीस आणणें; डांगोरा पिटणें. २ अपकीर्ति करणें; नालस्ती करणें.

डंका लावणें—चाळिशी, चष्मा लावणें.

डगणें——डगशील तर बघशील काय ?—जो आधींच भीति घेतो तो बाहेरच पडत नाहीं; मग त्यास काय दिसणार ? भिऊन कांहीं होत नाहीं. जगांत पुढें आलेंच पाहिजे व धक्केचपेटे खाल्ल्याशिवाय कांहीं कार्य होत नाहीं.

डगर——दोन्ही डगरींवर हात ठेविणें—दोन्हीकडचा फायदा पाहणें. (पक्षनिष्ठा नसलेल्यास म्हणतात). दोन पहा. 'सर्वांचे दोहीं डगरींवर हात आहेत.'-ख ७६२७.

डफरें——डफऱ्यावर पडणें—नांवाचा बोभाटा होणें; दुर्लौकिक होणें.

डब——डबेंत राहणें—ताब्यांत राहणें.

डबघाई; डबघई——डबघा(घ)ईला येणें——[डब (फ) घाई=डफावर गाणें म्हणतांना तें संपण्याच्या वेळेस डफ घाईनें वाजवितात, अशी घाई.] डबघाई यांतील ' डब ' याचें डुबणें या धातूशीं साम्य कल्पून प्रत्यक्ष बुडण्याच्या बेतास आलेला असाहि अर्थ करतात. नाश होण्याच्या स्थितीला पोंचणें; खालावणें. 'एका व्यापारांत (जॉनसन् यांस) मोठी ठोकर लागून तो अगदीं डबघईस आला.'–नि ६५७. ' स्कॉटलंडच्या मुशाफरींत अनेक वेळां समुद्रावर वादळ सुटून होडी डबघाईस आली होती. ' टिपरघाई पहा.

डबडें——डबड्यांत तेल नेणें—कंगाल होणें; गरिबी येणें.

डबा——डबा देणें——(व.) चोरानें डब्यांतील सर्व ऐवज काढून घेऊन खालीं डबाच ठेवणें. चोरानें आंतील ऐवज घेऊन फक्त रिकामा डबा दिला त्यावरून. बुडविणें; नागविणें.

डबा बसणें——नुकसान होणें.

डर——कर नाहीं त्यास डर कशाला ?——ज्या मनुष्यानें एखादी वाईट गोष्ट केली नसेल त्याला तीपासून भिण्याचें कांहीं कारण नाहीं. ज्यास कर नाहीं० पहा.

डल्ला——डल्ला मारणें-देणें—एखाद्याचा पैसा लुबाडणें; अपहार करणें; हात मारणें; लुटणें.

डवकार——डवकारपणा करणें-दाखविणें—कोणतेंहि काम आपण स्वतः करून अंगलट आलें असतां नाकडोळे फेंदारून आपल्या कृत्याचें समर्थन करणें.

डहाक——डहाक पिटणें—[डहाक; डाहक = एक वाद्य] दौंडी पिटणें; डांगोरा पिटणें; बभ्रा करणें; चहूंकडे करणें.

डहाक वाजणें—एखाद्याच्या नांवाचा बभ्रा होणें; अपकीर्ति होणें; दुर्लौकिक होणें.

***बुडबुड डाहकं, वडाले वाळकं, पिपळाले काकडया लागल्यारे बुवा! लागल्यारे बुवा**—वडाच्या झाडाला वाळकें लागणें, तसेंच पिंपळाच्या झाडाला काकड्या लागणें हे अद्‌भुत चमत्कार होत. हे प्रत्यक्ष घडल्याची वार्ता डाहकें (लहान नगारा) वाजवून लोकांस जाहीर करण्याची ही घोषणा आहे. कांहीं लोकोत्तर चमत्कार घडला असतां त्याकडे लक्ष वेधण्यासाठीं प्रयत्न करणारास अनुलक्षून ही उक्ति आहे.

डाई——डाई पडणें—१ डावांत सांपडणें; हरणें. २ गुरफटणें; गुंतणें. 'खेळ खेळुन न पडे जो डाई। तोच उमजला आपल्या ठायीं।'–मध्व १६८.

डाक——डाक भरणें—[डाक = एक वाद्य] पूजा करणें; मांड मांडणें, भरणें. 'मुंजाबाची डाक भरोनी मेसाई आळविली हो।'–भज ५९. डहाक पहा.

डॉक्टर——डाक्टराचें सर्टिफिकीट, इंजनेराचें इष्टमेट आणि पोलिसाचा संशय—या तीन गोष्टींचा कोणी विश्वास धरूं नये. त्यांमध्यें काय असेल त्याचा नेम नाहीं व तीं कधीं प्रामाणिक व अचूक असावयाचीं नाहींत.

डाग——डाग देणें; डागण्या देणें—लागेल असें बोलणें; टोंचून बोलणें; मर्मावर आघात करणें.

हळदीचा डाग लावणें—नाममात्र लग्न करणें; विवाह होऊन परस्परांची भेटहि न होणें; विवाहापासून वियोग होणें. 'डाग हळदीचा लाऊन गेला। फार दिवस झाले बाई त्याला।'–होला ११६.१५०.

*** डाग जातो, खोड राहती**—एखाद्या दुर्गुणाबद्दल एखाद्या मुलास डाग दिला तरी तो डाग कांहीं दिवसांनीं बरा होतो; पण त्याचा दुर्गुण सुटत नाहीं. एकदां एखादी वाईट संवय लागली म्हणजे ती सहसा सुटत नाहीं. तु०–जो गुण बाळा तो जन्मकाळा.

डाग झाला जुना आणि मला पतिव्रता म्हणा—१ जुना पहा. व्यभिचार केल्याबद्दल एका स्त्रीला डाग दिले होते. ते नाहींसे झाल्यावर ती पतिव्रता म्हणून मिरवूं लागली तरी तिच्या व्यभिचाराची खूण म्हणून डाग जरी दिसेनासे झाले तरी लोकांच्या स्मरणांतून कांहीं ती गोष्ट जात नाहीं. २ [डाग म्हणजे जिन्नस] वस्तु आतां जुनी झाली तेव्हां तिला भाव काय! साहजिकच 'वृद्धनारी पतिव्रता' याप्रमाणें वृद्ध बाई आपल्याला पतिव्रता म्हणविणार.

डांगोरा——डांगोरा पिटणें-वाजविणें—डांडोरा पिटणें. जाहीर, प्रसिद्ध करणें; दवंडी पिटणें; बोभाटा करणें. 'चोरटा शिंदळ ऐसा पिटूं दांडोरा।'–तुगा १८५.

डांभणें——बंदूक डांभणें—लाकण लावून ठेवणें. एक प्रकारची अशी रचना करून ठेवतात कीं वाघ वगैरेनें भक्ष्यास धक्का लावल्याबरोबर बंदुकीचा चाप ओढला जाऊन त्यावर नेमकी गोळी उडावी. या रचनेस म्हणतात.

डामडौल——डामडौलें कुटुंबाची हानि, चांगले रीतीची नुकसानी—विनाकारण पोकळ दिखाऊपणा केल्यास त्यांत कुटुंबाचें नुकसान होतें व कुटुंबांतील माणसांस वाईट वळण लागतें.

डाय——डायीस गेला, पैसा झाला—इं. डाय म्हणजे धातूवर ठसा उमटविण्याचा सांचा. त्या सांच्यांत धातूचा, तांब्याचा तुकडा पडला असतां तो पैसा होऊन बाहेर पडतो. त्याप्रमाणें एखाद्या विधींतून बाहेर पडलें, एखाद्याच्या परिवारांत सांपडलें म्हणजे त्या गोष्टीचा शिक्का बसतो व त्याच्या पंक्तीस मनुष्य बसतो. जसें शेंडी काढली कीं लोक संन्यासी म्हणूं लागतात, भगवें नेसलें कीं बैरागी समजतात.

डाली——डाली पडणें—खंड पडणें. 'चालूं सालीं पिकाला डाली पडल्या आहेत.'

डाव——डाव देणें—पाळी देणें; हार येणें. खेळामध्यें स्वतःवर दुसऱ्याचा डाव देण्याची वेळ येणें.

डाव देवाचा—(खेळांत) प्रारंभीं पडेल तें दान गणेशास म्हणून वाहतात त्याप्रमाणें देवाला पहिलें दान देणें. हुकलेला डाव देवाचा म्हणून पुन्हां खेळतात. देव गजानन करणें, म्हणणें. 'लगेच तो म्हणाला हा डाव देवाचा. सुनंदाला हें आवडलें नाहीं.'–सुदे ६.

डाव पडणें—१ प्राप्त होणें; घडणें. २ अनुकूल परिस्थिति येणें; लाभाची गोष्ट घडणें. ३ फांशानें खेळणें. 'मियां नक्षत्रीं डाव पाडावा। चंद्र चेंडुवालागीं देयावा।'–ज्ञा ११.५८१.

डाव फेडणें—अंगावर आलेली बाजू फेडणें; हार फेडणें; आपल्यावर आलेली बाजू परतविणें. 'डाव डाव कचका, कुमार लचका, आमचा डाव फेडून द्या।' असें मुलांचें गाणें.

डाव बसविणें—(सोंगट्या) रंगसही झालेल्या चारी सोंगट्या आपल्या पटावरील घरांच्या तीन रांगांपैकीं मधल्या रांगेंत आंत जातील अशा बसविणें; योग्य जागीं सोंगट्या बसविणें; अनुकूल स्थलीं सोंगट्या ठेवणें.

डाव लागणें—अंगावर बाजू येणें; हरणें; खेळण्यामध्यें प्रतिपक्षानें जिंकणें.

डाव साधणें—१ जिंकणें; यश येणें; काम साधणें. २ द्वेषबुद्धीनें दुसऱ्याचें नुकसान करणें; कपटानें संधि साधून शत्रूस मारणें. ३ सूड उगविणें; आपला इष्ट हेतु बहुधा कपटानें सिद्धीस नेणें.

❀ **डाव डाव कचक्या, कुमारी लचक्या, आमचा डावक्या कोठें गेला**—एखाद्यावर डाव आला असतां त्यानें दिला नाहीं तर त्यास चिडविण्यासाठीं म्हणतात. 'डाव डाव कचका, कुमारी लचका, आमचा डाव फेडून द्या !' असा पाठभेद.

फांसा पडेल तो डाव, राजा बोलेल तो न्याव—कोणचेंहि दान पडणें हें फांशावर अवलंबून असतें, आपल्या हातांत नसतें. त्याप्रमाणें कोणत्या बाजूनें न्याय द्यावयाचा हें सर्वस्वीं राजाच्या हातांत असतें.

डाव——डाव असतां हात भरूं (भाजूं) नये—[डाव = चमचा, पळी] पदार्थ ऊन असला व जवळ पळी असेल तर तो पदार्थ हातानें न काढतां पळीनें काढणें योग्य होय. हातानें काढल्यास हात भाजण्याचा संभव असतो. जेथें इतर साधनांनीं एखादी गोष्ट साध्य होत असेल तेथें ती स्वतः करण्याच्या भरीस पडूं नये. तींत धोका येण्याचा संभव असतो.

पात्रांत असला तर डावेंत येईल—भांड्यांत असेल तर पळींत येणार. तु०—आडांत असेल तर पोहऱ्यांत येईल.

डावा——डावा डोळा पाण्यानें भरणें—दुःख होणें; डोळ्यांत पाणी येण; रडूं येणें. 'नका टाकून जाऊं डावा डोळा पाण्यानें माझा भरला ।' —लावणी.

डावी उजवी देणें—(देवास कौल लावण्याच्या प्रकारावरून) नकार होकार देणें.

डावें उजवें करणें—पक्षपात करणें.

डावें उजवें कळणें—[डावें = वाकडें, वाईट. उजवें = सरळ] चांगलें वाईट कळणें; व्यवहारज्ञान असणें; छक्के पंजे ओळखणें. 'या ब्राह्मणाला डावें उजवें कांहीं कळत नाहीं. हा अगदीं सरळ माणूस आहे.'

डावी——डावी पेटणें—एखाद्यावर अतिशय रागावणें; जळफळणें.

डाहाळी——डाहाळ्या पडणें--(व.) गळणें; लुला पडणें; निर्बल होणें; आंखडणें. 'ही वार्ता ऐकतांच त्याच्या हातापायाच्या डाहाळ्या पडल्या.'

❀ **धरायला डाहाळी अन् बसायला सावली (नसणें)**—[डाहाळी = झाडाची फांदी; थोडाफार तरी आश्रय.] ज्यास कांहींहि आश्रय नाहीं त्यास वरीलप्रमाणें कांहींहि नाहीं या अर्थी असें म्हणतात. (निराश्रित स्त्री, माणूस इ. बद्दल वापरतात.)

डाळ——डाळ न विकणें—बेत सिद्धीस न जाणें; फसणें; अपयश येणें. 'त्याची डाळ त्याच्या पराक्रमापुढें विकली नाहीं.'—विवि ८.६.११०.

डाळ न शिजणें—(तुरीची डाळ लवकर शिजत नाहीं.) कार्यभाग न साधणें; दाद न लागणें; यश न येणें.—पामो ६७. 'दोघांत फूट पाडल्याशिवाय आपली डाळ शिजत नाहीं हें विसूभाऊला वाटलें.'—अस्तंभा ९६.

डाळ महाग करणें--(व.) माजणें; मस्तीला येणें; मगरूर होणें; उन्मत्त बनणें.

डाळ शिजणें--कार्यभाग होणें; अनुकूलता प्राप्त होणें. 'आपली डाळ शिजावी ही त्याची नेहमींची इच्छा असावी.' -V. S. २.२१९.

डाळ शिजूं देणें—चालू देणें; वाव देणें. 'माझें लग्न होण्यापूर्वी वेगळें निघण्यासाठीं तिनें नाना तऱ्हेच्या खटपटी केल्या. पण तिची डाळ कोणीं शिजूं दिली नाहीं.'—पकोधे.

❀ **डाळ घालावी दाटणींत आणि बायको-लेंक घालावी अटणींत**—ज्याप्रमाणें वरणाची डाळ चांगली दाटल्याशिवाय वरण मिळून येत नाहीं तर डाळ पाणी वेगळें होतें, त्याप्रमाणें मुलीस चांगलें धाकांत ठेवल्याशिवाय तिला चांगले गुण लागत नाहींत. दाळ, अटणी पहा.

डाळ रोटी, सब बात खोटी—जेवणामध्यें डाळरोटीनें जें समाधान आहे तें इतर कितीहि पदार्थ खाल्ले तरी होत नाहीं.

डाळ शिजत नाहीं आणि वरण उकळत नाहीं—कोणतीच गोष्ट साधत नाहीं.

डाळीसाळीचें कांडण, नि सवतीसवतींचें भांडण—हीं घरोघर चालावयाचींच, त्यांत नवीन कांहीं नाहीं. या नित्य परिचित गोष्टी आहेत.

डिचकोली——डिचकोलीची पत्रावळ—पोटांत कांहीं नसल्यामुळें तें अगदीं खपाटीस गेलें म्हणजे त्यास उद्देशून म्हणतात. अगदीं पातळ झालेलें पोट.

डिंबिया——(धरणीं) डिंबिया घालणें—दंडवत घालणें; नमस्कार घालणें. 'तव सकलैकिं कर जोडुनी । डिंबिया घातलिया धरणीं ।' —खिपु १.१.१७७.

डीक-ग——डिकास तेल—(तेल ज्याप्रमाणें डिकांत बेमालूम मिसळतें तसें) अगदीं ठीक, बरोबर; जसें पाहिजे तसें; योग्य प्रमाणांत; बेतशीर; बेतास बेत.

डिगाचें पिढें—पाटाच्या फळ्यांना डिंक लावला असेल तर पाटावर बसणाऱ्या इसमाच्या ढुंगणाला तो पाट चिकटून बसेल, लौकर सुटणार नाहीं. एखादा मनुष्य एका ठिकाणावर बसून गप्पाष्टकें झोडूं लागला कीं तो इतका तल्लीन होतो कीं तो लौकर जागचा उठत नाहीं. अशा मनुष्याला डिगाचें पिढें म्हणतात.

डुई——डुई देणें—डोकें देऊन राहाणें; चिकाटी धरणें. ' मर्दांनीं दिल्या डुया घेतल्या लुटी रात्री समयाला । '-ऐपो २८४. डोई पहा.

डुकर——डुकर खळीस येणें—(ऐति.) हट्टास पेटणें; इरेस पडणें; माघारें फिरून हल्ला करणें. ' दत्ताजी शिंदे जसा डुकर खळीस येतो तैसे इरेस पडून मारामार केली. '-भाब ३४;११२.

डुकर मारुंकय व्हेल्यार रडता, पोसुंकय व्हेल्यार रडता—(गो.) डुकराला मारायला न्यायला लागलें तरी तो ओरडतो आणि बाळगायला न्यायला लागलें तरीहि ओरडतो. एखाद्याचें वाईट करा अथवा बरें करा, त्याची रड कांहीं सुटत नाहीं.

डुकरा खीं कोंडा सुख; डुकराक कोंडाचें सुख—(गो.) डुकराला चिखलाच्या डबक्यांतच सुख वाटायचें. वाईट माणसाला वाईट गोष्टीचीच आवड असते. हीन माणसाची अभिरुचि हीनच असायची. तु०-शेणामाजीं वाडे बांधुनि राहति शेणकिडे ।

डुबर——डुबर तासणें—[डुबर = ढुंगण] खोडकी जिरावणें.

डेरा——डेरा देणें; डेरेदाखल होणें—पूर्वी मोहिमांतून मुक्काम करावयाच्या जागीं डेरे ठोकीत. यावरून मुक्काम करणें; तळ देणें. ' श्रीमंत कालच गारपिरावर डेरेदाखल झाले. ' -भाऊ ४.२.

डेऱ्याचे दांडे होणें—तंबूचीं फक्त लांकडें शिल्लक राहणें; कर्जानें अडचणींत येणें; हैराण होणें; वैभव जाऊन निकृष्ट दशा येणें. -हसं होकै १७.

डेवणें——जेवल्यें आणि हातींपायीं डेवल्यें—जेवण झाल्याबरोबर मनुष्याच्या अंगांत सुस्ती, आळस येतो. जेवणें पहा. तु०-बामण जेवला नि फुकट गेला.

डोई——डोई उचलणें—नांवलौकिकास चढणें; वर येणें; डोकें वर काढणें; उत्कर्ष होणें; ऊर्जितदशा येणें; भरभराट होणें.

डोई उठणें— डोकें दुखूं लागणें (कोंकणांत डोकें उकलणें म्हणतात). डोकें चढणें; शिरोवेदना होणें.

डोई उठविणें-त्रास, उपद्रव देणें; कटकट करणें; त्रासून सोडणें; माथेफोड करणें. कपाळ उठविणें पहा.

डोई करणें—हजामत करणें; केंस काढणें; श्मश्रू करणें.

डोई (वर) काढणें—उदयास येणें; वैभवास चढणें; उत्कर्ष होणें; भरभराट होणें; ऊर्जितदशा येणें.

डोई खाजविणें-१ त्रास, उपद्रव देणें; कटकट लावणें; सतावणें. २ आठवण करण्याचा यत्न करणें; आठवणें; स्मरण करून पाहणें. ३ विचारांत पडणें; सुचेनासें होणें.

डोई टेकणें--१ अत्याग्रह करून (जेवावयास वगैरे) बसविणें, राहविणें. अत्यंत नम्रतापूर्वक विनंति करून ठेवून घेणें; पायां पडणें. २ थकणें; खचणें; अशक्त होणें; गळणें; टेकीस येणें. ३ आधार घेणें; आश्रय करणें; अवलंबून राहणें.

डोई ठिकाणावर येणें—शुद्धीवर येणें; भानावर येणें; उमजणें; ताळ्यावर येणें.

डोई ताविणें—१ उन्हांत डोकें तापवून घेणें; अत्यंत परिश्रम, त्रास घेणें; कष्ट करणें; हाल करून घेणें. २ संताप करून घेणें; तापणें.

डोई देऊन बसणें; डोई देणें-१ निश्चयानें, चिकाटीनें एखादें काम करण्यास बसणें. २ (निंदार्थी) लोचटपणानें आणखी राहणें-बसणें (पाहुण्यानें). ३ एखाद्याला बुडवून पुन्हां शांत असणें; कांहींच घडलें नाहीं असें दाखविणें; निर्लज्जपणें वागविणें.

डोई देणें-मारणें—१ मदत करणें; साहाय्य करणें. २ निश्चयपूर्वक कामास बसणें.

डोई पिटणें-शोक करणें; कपाळावर हात मारून आक्रोश करणें; मोठमोठ्यानें डोकें आपटून व ओरडून दुःख करणें.

डोई फिरणें—१ वेडें होणें; भ्रमिष्ट होणें. २ रागानें बेफाम होणें; बेभान होणें; देहभान विसरणें.

डोई फोडणें-१ बारीक रीतीनें विचार करणें; डोक्याला त्रास करून घेणें; एकसारखा विचार करीत राहणें. २ त्रागा करणें; आक्रोश करणें; अतिशय हट्ट करणें; डोकेंफोड करणें.

डोई भणाणणें--डोकें फिरणें; भ्रमणें; भ्रमिष्ट होणें; सुचेनासें होणें; डोक्यांत चक्कर येऊं लागणें.

डोई मारणें—१ शिरच्छेद करणें; डोकें उडविणें; ठार मारणें. २ नुकसान करणें; बुडविणें; अशाभंग करणें; अगदीं सफा करणें.

डोईचा चेंडू करणें—(चेंडूप्रमाणें डोकें हालविणें) १ सपाटून शिव्या देणें; भडकणें; अति रागावणें. २ (डोकें चेंडूप्रमाणें करवूं देणें) मानहानी किंवा शिव्याशाप घेणें; उपमर्द सहन करणें.

डोईचें उखळ करणें—१ आग पाखडणें; संतापणें; त्रासणें; रागावणें. २ वाईट रीतीनें वागविलें असतां सहन करणें; अपमान सहन करणें; उपमर्द शांतपणें साहणें; तोंड देणें. ३ हाल सोसणें; दुःख सहन करणें; कोणत्याहि स्थितीस मान वांकविणें.

डोईचे केंस नाहींसे करणें—खरडपट्टी काढणें; तासडपट्टी करणें; पुरी उडविणें; अगदीं जेरीस आणणें; फजीती करणें; रागें भरणें.

डोईचें (डोकीवरचें) खांद्यावर येणें—जड ओझें हलकें झालें म्हणजे मनुष्य खांद्यावर घेतो व त्यास थोडें बरें वाटतें. यावरून चिंता, काळजी दूर होणें; हलकी होणें; संकटाचें निराकरण होणें; दुःख सुसह होणें.

डोईचे वाटेनें—निमुटपणें, सरळपणें; नम्रतेनें; आढेवेढे न घेतां (घेणें, देणें, कर्ज फेडणें इ.).

डोईचे वाटेनें कर्ज देणें—(कर्ज देण्याकरितां डोक्यानें चालणें.) १ तावडतोब कर्ज फेडणें, निवारण करणें; बेबाक करणें; कर्ज समूळ फेडून टाकणें. २ कष्ट, हमाली करून कर्जफेड करणें; अत्यंत मेहनत करून कर्ज वारणें.

डोईचे वाटेनें घेणें—नम्रतापूर्वक (साष्टांग नमस्कार घालून) घेणें, स्वीकारणें; मुकाट्यानें घेणें; निमूटपणें स्वीकारणें.

डोईचे वाटेनें देणें—नम्रतापूर्वक देणें; मान खाली घालून, अत्यंत विनयपूर्वक देणें.

डोईत राख घालणें—बैरागी लोक डोकें राखेनें माखतात तेव्हां तसें वैतागानें बैरागी होणें; संतापानें बेफाम होणें; अतिशय क्रोधयुक्त होणें; फार रागावणें, चरफडणें; त्रागा करणें.

डोईनें चालणें—उन्मत्त होणें; मगरूर होणें; माजणें. अभिमानानें, ताठयानें चालणें; गर्व होणें–वाहणें.

डोईनें चालत येणें—नम्रपणानें येणें; नम्रपणा धरणें; विनय धारण करणें; नमस्कार करणें; दंडवत घालणें.

डोईनें चालूं लागणें—अतिशय गर्विष्ठपणानें वागणें; उर्मट होणें; माजणें; बेमुर्वतखोरपणें वागणें.

डोईवर खापर-हंडी फोडणें-फुटणें—१ निरपराधी असतां एखाद्याच्या माथीं दोष लावणें, ठपका ठेवणें; अधिक्षेप करणें. २ (वाईट कृत्याचा) आळ, आरोप ठेवणें. कुभांड रचणें; बालंट रचणें.

डोईवर घेणें—१ एखादी गोष्ट पत्करणें; त्याची जबाबदारी घेणें; शिरावर घेणें; अंगीकारणें; काम उचलणें. २ वाईटपणा, दोष स्वतःवर घेणें; पतकर घेणें; अंगीं लावून घेणें; ओढून घेणें.

डोईवर चढणें—१ एखाद्याला न जुमानणें; वरचढ होणें; वरचष्मा मिळविणें. २ त्याविरुद्ध बंड करणें; न मानणें.

डोईवर दिवस-सूर्य येणें—दुपार होणें; माथ्यावर सूर्य येणें; भर दोन प्रहर होणें; सूर्य मध्यान्हीं येणें.

डोईवर धूळ घालणें—१ चिंतेमुळें दुःखित होणें; दुःखाची दुस्सहता दाखविणें. २ एखाद्या कामाच्या पाठीमागें लागल्यामुळें अत्यंत हालअपेष्टा भोगणें.

डोईवर पदर येणें—१ वैधव्य प्राप्त होणें; पति मृत्यु पावणें. २ (ल.) लोकांत येण्याची लाज वाटणें; कमीपणा आल्यामुळें बाहेर तोंड काढतां न येणें; उघड माथ्यानें फिरणें अशक्य होणें; उजळ माथ्यानें फिरतां न येणें.

डोईवर बसणें—१ शिरजोर होणें; जुमानीनासा होणें; विरुद्ध उठणें; वरपगडा होणें. २ वरचढ होणें; वरचष्मा करूं लागणें. ३ फार पुढें जाणें; आटोक्याच्या पलीकडे जाणें.

डोईवर बसविणें—(बायको, चाकर, मुलगा यांचा) वाजवीपेक्षां जास्त गौरव करणें, त्यांच्या मतानें चालणें; अधिक मान देणें; फाजील लाड करणें; तंत्रानें चालणें; वरपगडा होऊं देणें.

डोईवर मिरे वाटणें—१ एखाद्यावर वर्चस्व ठेवणें. २ मुळींच न जुमानणें; वरचढ होणें; कस्पटाप्रमाणें लेखणें. ३ हात दाखविणें; प्रभाव दाखविणें; फसविणें.

डोईवर विळविणें—१ एखाद्यावर चुकीनें दोष लादणें; दोषारोप ठेवणें; आळ घेणें; आरोप ठेवणें. २ जबाबदारी टाकणें; दुसऱ्याच्या शिरावर काम लादणें.

डोईवर शेकणें—व्यापारांत नुकसान होणें; धंदा अंगावर येणें; तोटा होणें; चट्टा बसणें; अंगावर शेकणें.

डोईवर हात घेऊन येणें—१ रिकाम्या हातांनीं, इच्छित वस्तु न मिळाल्यानें हात हालवीत परत येणें. काम न करतां तसेंच परत येणें, अपयश घेऊन येणें. २ निराश होणें.

डोईवर हात ठेवणें—१ आशीर्वाद देणें. २ (ल.) फसविणें, लुबाडणें, ठकविणें.

डोईवर हात ठेवून जाणें--सर्वस्वी नागविलें जाणें; (रिक्तहस्तें) कफल्लक होऊन निघून जाणें.

डोईवर हात फिरविणें—फसविणें; लुटणें. 'एखादं बावळं रत्न गळ्यांत पडलं असतं म्हणजे मग त्या भावंडांनीं ......चांगला डोक्यावरून हात फिरवून आपल्याला मुलं-बाळं संभाळायला लावलं नसतं तर काय म्हणाल तें ऐकेन!' —जग हें असें आहे.

डोईवर होणें--वरचढ होणें; जास्त अधिकार मिळणें; वर्चस्व मिळविणें; पुढें जाणें.

डोईवरून पाणी जाणें--पूर आला असतां डोक्या-वरून पाणी जाणें त्याप्रमाणें. १ अनाथ, निराधार होणें; संकट व नुकसानी यांमुळें लाचार होणें; सर्वस्वास मुकणें; कंगाल होणें. २ कळस, पराकाष्ठा, शिकस्त होणें; मर्यादेबाहेर होणें; हद्द होणें.

(हजारांचे) डोईस पाणी लावणें--हजार लोकांना तें म्हणतील तें करून खूष ठेवण्याचा प्रयत्न करणें, त्यांची मर्जी संपादन करणें, सुप्रसन्न करणें.

डोईस पाणी लावून ठेवणें--हजामतीपूर्वी केंस मऊ व्हावेत म्हणून डोक्याला पाणी लावतात. शिक्षा भोगावयास तयार होणें, सज्ज असणें; पारिपत्य भोगण्यास सिद्ध होणें; संकटास तोंड देण्यास तयार होणें; पाठीस तेल लावून ठेवणें याप्रमाणें.

❀ **डोईं धरला तर बोडका, हातीं धरला तर रोडका**--(ज्याच्यापासून कोणत्याहि प्रकारें कांहींहि निष्पन्न होत नाहीं अशा मनुष्याविषयीं ह्या म्हणीचा उपयोग करितात.) डोक्याकडे धरावयास जावें तों टक्कल पडलेलें असल्यामुळें धरण्यास केंस इ. नसलेला व हातांत धरावयास जावें तों रोड असल्यामुळें हातांतून सहज निसटणारा. याप्रमाणें ज्याचें कांहींच हातास लागणार नाहीं असा कफल्लक, निष्कांचन मनुष्य.

डोई मोठी, अक्कल थोटी—डोकें मोठें असून आंत मेंदू नसणें. शरीर, मानमरातब, समाजांतील स्थान वगैरे मोठें असून बुद्धीचा अभाव असणें.

डोईला टक्कल पडलें, उखळ पांढरें झालें—टक्कल पडलेला मनुष्य बहुधा श्रीमंत असतो अशी समजूत आहे, तीस अनुसरून ही म्हण वापरतात. तु०-क्वचित्काणा भवे-त्साधुः क्वचित् गानी पतिव्रता। क्वचिद्दतांलको मूर्खः खल्वाटो निर्धनः क्वचित् ॥

डोकें——डोई पहा. **डोकें असणें**--अक्कल असणें; मेंदू असणें; बुद्धि असणें.

डोकें आपटून प्राण देणें--वैतागानें, त्राग्यानें डोकें फोडून घेणें; आत्महत्या करणें.

डोकें काढणें---प्रगति करणें; वर येणें; श्रेष्ठ पदास चढणें. —गांगा २३४.

डोकें खरडणें-तासणें--अकुशलपणें हजामत करणें; तासडपट्टी करणें; भादरणें.

डोकें खाजविणें—(आठवण करतांना माणूस डोकें खाजविल्यासारखें करतो. डोकें चोळल्यानें मेंदूला चालना मिळते अशी समजूत.) आठविण्याचा प्रयत्न करणें. 'साहेब पगाराच्या लखोट्यांत पाहूं लागले तों पन्नास रुपयांची नोट कमी! आपण कोणास दिली किंवा कोठें ठेविली असें वाटून त्यांनीं बरेंच डोकें खाजविलें, पण कांहीं आठवण होईना.' —जग हें असें आहे. डोई पहा.

डोकें खुपसून बसणें—एखाद्या गोष्टींत सारखें लक्ष्य घालून बसणें.

डोकें चालविणें—युक्ति काढणें; बुद्धि खर्च करून कांहींतरी मार्ग काढणें.

डोकें टेकणें—डोई टेकणें पहा. 'गरजू लोकांस अप-मान सोसून डोकें टेकावें लागतें.' —विवि ८.६.११३.

डोकें ठिकाणावर नसणें—भ्रमिष्ट होणें; वेडें होणें.

डोकें थंड होणें—रागानें डोकें तापतें तें शांत होणें.

डोकें दगडासारखें जड होणें--सुन्न वाटणें; कांहीं विचार सुचत नाहींसें होणें; बुद्धि न चालणें.

डोकें धरून बसणें—पिच्छा पुरविणें; सारखें पाठीस लागणें; खनपटीस बसणें.

डोकें बथ्थड होणें—कांहीं उपाय न सुचणें; बुद्धि चालेनाशी होणें.

डोकें भडकणें—त्वेष, चीड येणें; अत्यंत संताप येणें. 'या अनत्याचारी चळवळींत कुणाचेंहि डोकें भडकूं देतां कामा नये.' —के २७-५-३०.

डोकें मठ्ठ होणें—कळेनासें होणें; सुचेनासें होणें; निर्बुद्ध होणें.

डोकें हलविणें—१ वैभवाला चढणें. २ मानेनें संमति किंवा नापसंती दर्शविणें.

डोकीवरचें ओझें खांद्यावर करणें—भार, जबाब-

दारी थोडी कमी करणें. 'तात्यासाहेबांचा विचार यमुनाबाईला, गोपाळरावांना देऊन डोकीवरचें ओझें खांद्यावर करावें असा झालासें वाटलें.' —आजोच २०.

डोकी-डोक्यावरचें ओझें खांद्यावर येणें—संकट हलकें होणें; सुसह्य होणें.

डोक्याचा—न्हावी; हजाम; नापित. 'एक राजा सलो तेच्या डोक्यांत सलें शिंग··तें डोक्याच्याला उमगलें.' —लोक २.२८.

डोक्याचे केंस जाणें—१ अतिशय दुःख-श्रम यांमुळें टक्कल पडणें. २ अतिशय त्रास, नुकसान होणें.

डोक्यांत दगड घालणें—१ ठार मारणें; २ नाश करणें; साफ बुडविणें.

डोक्यांत प्रकाश पडणें—१ समजणें; उमजणें; कळून येणें. २ पटणें; खात्री होणें; लक्ष्यांत बरोबर येणें. 'व्हाइसरायांच्या डोक्यांत प्रकाश पडला.' —के २६-७-३०.

डोक्यांत बटाटे भरलेले असणें—मंदबुद्धी, जड असणें. 'त्याच्या डोक्यांत बटाटे भरल्यासारखे दिसतें.'

डोक्यांत राख घालणें—डोई पहा. तिरसटपणानें वागणें; अतिशय रागावणें; संतापणें; त्रागा करणें. 'पुढचा मागचा विचार न करतां एकदम डोक्यांत राख घालणें बरें नव्हे.'—मोरप्र ४.—भक्तमयूर केकावली पृ. ३६. 'अरे बटो, तू असा संतापून आपल्या डोक्यांत राख घालूं नकोस.' —शाब २.१९६.

डोक्यानें करणें—अकलेनें करणें; बुद्धि वापरणें.

डोक्याला टक्कल पडणें—१ अतिशय विचार करणें. २ श्रीमंतीचें लक्षण. खल्वाट पहा. ३ डोक्याचे केस जाणें पहा.

डोक्याला ताण बसणें—मेंदूला जास्त श्रम करण्याची जरूरी पडणें; विचार करावा लागणें; मानसिक श्रम करावें लागणें.

डोक्यावर केंस न ठेवणें—पुरी हजामत करणें. (ल.) खरडपट्टी काढणें; बोडंती करणें.

डोक्यावर मिरे वाटणें—डोई पहा. मिऱ्यांची आग फार होते. ते नवऱ्याच्या डोक्यावर वांटण्याला स्त्रीचें वर्चस्व केवढें पाहिजे! १ वरचष्मा करणें; वरचढपणा करणें; आपल्या तंत्रानें वागावयास लावणें. 'सगळ्यांच्या डोक्यावर मिरें वांटण्यासाठीं हा नाना पुन्हा परतेल.' —अस्तंभा ५४. २ बनविणें; फसविणें; ठकविणें.

डोक्यावरचा पदर काढणें—१ माणसांतून उठून जाणें; अमर्यादपणें वर्तन करणें; रीत सोडणें. २ मान अपमान, जनापवाद यांकडे लक्ष न देतां करावयास उद्युक्त होणें.

डोक्यावरून पाणी जाणें-फिरणें—अगदीं परमावधि, शिकस्त होणें; कळसास पोंचणें. 'साऱ्या दिवसभर उपद्व्याप करून वर्षाचे कांठीं शेंदोनशें रुपये मिळाले म्हणजे डोक्यावरून पाणी फिरलें!'

डोक्यावरून पावसाळा जाणें—१ वर्ष जाणें; वय होणें; वयानें मोठें होणें. 'सोनपाटलाच्या डोक्यावरून साठाहून अधिक पावसाळे गेले होते.'—कोरकि ४८१. २ वयपरत्वें अनुभव येणें; पोक्तपणा येणें.

* **डोकें का खोकें**—डोक्यामध्यें कांहीं मेंदू आहे का अगदीं पोकळ आहे. बुद्धि आहे किंवा अगदीं निर्बुद्ध आहे.

डोकीला मिळेना एरंडेल, बाईल मागते मोगरेल—अत्यंत अडचणीची, दारिद्र्याची स्थिति असतां चोजले करणें.

डोक्याचें नांव कपाळ आणि कपाळाचें नांव डोकें—तेंच तें; एकच. भटाचें नांव कानभट पहा.

डोक्यावर पदर, दिल्लीवर नजर—एकीकडे मोठा विनयाचा आव आणावयाचा आणि त्याच वेळीं अनीतिमय गुप्त कारस्थानें, लबाड्या करीत असावयाचें.

डोक्यावर माळ आणि सापाचा आळ—बैरागी लोक जटेभोंवतीं माळ गुंडाळतात ती सापासारखी दिसते.

डोक्यावर मोळी आणि मागती पोळी—लांकडें विकणाऱ्या स्त्रीनें पोळी खावयास मागणें; गरीब असून बडेजाव करणें; दरिद्री असून मिजास करणें.

डोक्यावरचें कर्ज खांद्यावर आलें—कर्जाचा बोजा जरा कमी झाला; कर्ज वारण्याच्या आटोक्यांत आलें.

डोंगर——**डोंगर खणून (पोखरून) उंदीर काढणें**—१ अचाट परिश्रम पण त्याची फलश्रुति फारच अल्प. २ अल्प फायद्यासाठीं फार मोठी यातायात.

डोंगरावरून उडी टाकणें—मोठा आव आणून क्षुल्लक गोष्ट करणें. उदा०—गाजावाजा करून हलकी देणगी देणें.

डोंगरीं दिवा लावणें—(पेंढारी, लुटारू इ. ना भिऊन डोंगरांत जाऊन राहणें, वस्ती करणें; एकीकडे जाऊन राहणें. 'चाल राघो डोंगरीं माझ्या दिवा लागो।'तुकाराम—भारूड.

डोंगरीं मोर नाचविणें--वर वर काम करणें; क्षुद्र लोकांवर ताबा चालविणें. -इसं होकै २३.

*** डोंगर करती आटापिटा, हातीं लागे उंदीर पोरटा**--एकदां डोंगरास प्रसूतिवेदना होऊं लागल्या म्हणून तो फार मोठमोठ्यानें ओरडूं लागला व हातपाय झाडूं लागला म्हणून आजूबाजूचे सर्व लोक तो चमत्कार पाहावयास जमा झाले. अखेरीस दीर्घ काळ वेदना सहन केल्यानंतर त्याच्या कुशींतून एक लहानसें उंदराचें पिटुकुलें बाहेर पडलें. याप्रमाणें मोठा आव आणल्यानंतर अगदीं अल्प गोष्ट घडून आली म्हणजे म्हणतात. तु०-डोंगर व्याला उंदीर झाला. पुढें पहा.

डोंगर कोरला, उंदीर काढला; डोंगर कोरून-पोखरून उंदीर काढला; डोंगर पोखरला, उंदीर निघाला—अतिशय परिश्रम करून फारच अल्प फळ हातीं घेणें. फार मोठ्या परिश्रमाला अत्यंत अल्प फळ लाभलें असतां म्हणतात. गाजावाजा फार मोठा पण शेवटीं बाहेर पडलें काय, तर अगदीं क्षुल्लक गोष्ट.

डोंगर महंमदाकडे नाहीं आला तर महंमद डोंगराकडे जाईल—दोघांनीं मिळून जर एखादें काम करावयाचें असलें आणि त्यांतील एक दुसऱ्याकडे गेला नाहीं तर दुसऱ्यानें पहिल्याकडे येऊन पण काम साध्य करणें योग्य होय. म्हणजे कोणीतरी एकानें पड खाऊन कार्यभाग साधला पाहिजे. If the mountain will not come to Mahomet, Mahomet must come to the mountain.

डोंगर व्याला, उंदीर झाला; (गो.) डोंगर विलो अनि उंदीर जालो—डोंगर व्याला आणि झालें काय तर उंदीर जन्माला आला! मोठ्या उद्योगाला अल्पसें फल येणें.

दुरून डोंगर साजरा--दूर पहा.

डोंगरचे आंवळे व समुद्राचें-सागरचें मीठ--आंवळे आणि मीठ यांची गांठ पडणें फार मुष्कील; पण लोणच्यांतल्याप्रमाणें जेव्हां ती पडते तेव्हां तो अकल्पित योगायोग व सुसंगम म्हणावयाचा. 'डोंगरचे आंवळे समुद्राचें मीठ। गोडि अकल्पित झाली अविट।'-प्रला८४.१९०.

डोंगराएवढी हांव, तिळाएवढी धांव--महत्त्वाकांक्षा फार मोठी पण सामर्थ्य,कर्तबगारी फार कमी असल्यास म्हणतात.

डोंगराक सुत घालां, आयलयार डोंगर आयलो, ना जालयार सूत गेलें--(गो.) डोंगराभोवतीं सुताचा वेढा घातला आहे. आला तर डोंगर ओढून येईल; बरें, न आला तर सूतच फुकट जाईल. तु०-गाजराची पुंगी.

डोंगरास दुःख आणि शिंपीभर औषध; डोंगरास दुखणें व शिंपलींत-शिंपींत औषध--जसें दुखणें मोठें तसें औषधहि फार मोठें पाहिजे. फार मोठ्या संकटावर उपाय करण्याचें साधन अगदीं किरकोळ; तें कसें चालणार? रोगाप्रमाणें त्याचें निवारण करण्याचें साधनहि मोठें व समर्थ पाहिजे. जेथें अतिशय मोठ्या वस्तूची गरज असेल तेथें अतिशय अल्पांत काम करूं पाहणें. "बीदरच्या नुकसानीला निजाम सरकारनें पन्नास हजार रुपयांची मदत केली आहे; त्यांतून जाळण्यांत आलेला बाजार बांधावयाचा आहे व दुकानदारांना आपले धंदे सुरू करण्यासाठीं पंचवीस हजार रुपयांची देणगी देण्यांत आली आहे. हा प्रकार म्हणजे 'डोंगराला दुखणें व शिंपलींत औषध' अशांतला आहे." -केसरी ३१-५-४०; २८-३-४१.

डोंगा——**डोंगा ढकली कारभार**-(व.)[डोंगा=होडी] नदीला मोठा जरी पूर असला तरी हलगरजी नावाडी उतारूंच्या नुकसानीची किंवा जिवाची पर्वा न बाळगतां पैशाच्या लोभानें डोंगा पुरांत ढकलतो. डोंगा बुडण्याचा प्रसंग आल्यास नावाडी तर कसातरी तरतो पण उतारू मरतात. यावरून हलगरजीपणाचें काम. 'त्याचा डोंगा ढकली कारभार म्हणून बदनामी झाली.'

डोचकें; डोसकें——**तुझं डोसकं!**—एखाद्याला कांहीं कळलें नाहीं म्हणजे वैतागानें म्हणतात.

डोचकें कीं बोचकें; डोचकें जावो कीं बोचकें जावो--बोचकें सांभाळतांना डोचकें गेलें तरी हरकत नाहीं. बोचकें तरी राहूं दे, नाहींतर डोचकें मारून मग बोचकें घेऊन जा, असें नेणारास सांगावयाचें. याप्रमाणें सोक्षमोक्ष लावणें; कोणत्याहि प्रकारें माघार न घेणें. शेंडी तुटो कीं पारंबी तुटो, याप्रमाणें शेवट करणें; अगदीं हट्टास पेटणें; मुळींच सुद्धां मागें न घेणें.

डोण——**पिकेल डोण, तर खाईल कोण**--विजापूरजवळ डोण नांवाचा प्रांत आहे. तो इतका सुपीक आहे कीं, एक वर्ष जर तेथें पीक आलें तर बारा वर्षांची बेगमी होते. मात्र तेथें दरवर्षी बहुधा पाऊस कमी पडत असल्यामुळें चांगलें पीक येत नाहीं.

डोंब——**डोंब पाजळणें-होणें**--अंगाची लाही लाही

होणें; आगआग होणें. 'बोल न निघे तिचे वदनीं । परी हृदयीं डोंब पाजळला ॥'–नव २१.१३६.

डोंब मारणें—आगीचा लोळ उठणें; आग पसरणें.

डोम——डोम डोम करीत फिरणें––वणवण करीत जाणें. 'ज्याच्यासाठीं सगळा देश डोईवर घेऊन डोम डोम करीत फिरत होते, त्या पुरुषाचा तेथेही थांग लागेना.'–पामो १३९.

डोमडी——डोमडी बायको एकाची, गोरी बायको लोकाची––(व.) ज्याची बायको कुरूप असते तिच्याकडे कोणी पाहात नाहीं, पण सुंदर बायकोवर अनेकांचा डोळा असतो. चांगल्या वस्तूला मागणी फार. सामान्य वस्तूकडे कोणी पाहात नाहीं. ती ज्याची त्याला लखलाभ होते.

डोलची——डोलची बेग––पखालीचा धनी; घागरगडचा सुभेदार; पाणक्या; कावडी वाहणारा.

डोलणें——डोलावली मान, धरते कान––एखाद्या गोष्टीस संमति दिल्यावर ती मागाहून नाकरतां येत नाहीं. एकदां कबूल केल्यावर मग ती गोष्ट केल्याशिवाय राहतां येत नाहीं.

डोला——डोला जाणें––(शिवी) मढें जाणें; मरणें.

डोसी——डोसी मुई (मरी), पोरी आवी––(गु.) म्हातारी मेली, मुलगी आली. आजा मेला नातू झाला, पहा.

डोह——डोहांत-डोहीं पडणें––संकटांत पडणें; अडचणींत सांपडणें; गोत्यांत येणें. 'स्वामीच्या पायाशिवाय दुसरीकडे चित्त नाहीं. परंतु लढल्याचे डोहीं पडलों आहे.' –पेद २९.२७०.

***डोहाच्या जागीं डोहो पडतील**–पावसाळ्यांत नदीला भरपूर पाणी असलें म्हणजे डोह कोठें व सामान्य पात्र कोठें तें बरोबर दिसत नाहीं. पण पावसाळा गेल्यावर इतर ठिकाणचें पाणी कमी होऊन डोह दिसूं लागतात. त्याप्रमाणें कांहींहि सोंग केलें तरी माणसाचें खरें शील बाहेर पडणारच; खोट्याच्या कपाळीं कुऱ्हाडीचा घाव सरतेशेवटीं बसेलच बसेल या अर्थी.

डोहाच्या ठिकाणीं डोहच पडतील, निवळ जाईना आणि गढूल येईना—वर प्रमाणें. मूळ पदावर येणें.

डोहाळा——भिकेचा डोहाळा आठविणें––ज्यामुळें भीक मागण्याची वेळ येईल असे ढंग करणें, वागणें.

***डोहाळ्याचे वेळीं हंसली आणि जन्माच्या वेळीं रडली**–डोहाळ्यांच्या वेळचीं डोहाळ-जेवणें खातांना आनंद होतो पण प्रसूतीच्या वेळीं दुःख होतें. एखादी गोष्ट करतांना चांगलें वाटतें पण तिचे परिणाम भोगतांना कष्ट होतात.

पोराचें चिन्ह डोहाळ्यावरून ओळखावें; डोहाळ्यावरून मुलाचें लक्षण ओळखावें—मातेला गरोदरपणीं ज्या इच्छा होतात त्यांवरून पुढें होणाऱ्या मुलाच्या स्वभावासंबंधीं अनुमान काढतां येतें. तु०–मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात.

डोळस——डोळसाचे डोळे कामाचे आणि अंधळ्याचे डोळे शोभेचे––ज्या डोळ्यांनीं पाहतां येतें ते उपयोगी असतात, व ज्या डोळ्यांनीं दिसत नाहीं ते नुसते दिखाऊ असतात. यावरून नुसत्या दिखाऊ गोष्टींपेक्षां उपयुक्त वस्तू जास्त महत्त्वाच्या होत.

डोळसाला माशी लागते—अगदीं काळजीपूर्वक व व्यवस्थित वागणाऱ्यालाच नुकसानी पोंचणें.

डोळा——डोळा असणें––एखाद्या वस्तूची प्राप्ति व्हावी अशी इच्छा मनांत बाळगिणें. डोळा ठेवणें पहा. 'पण मध्यें कांहीं घोटाळा होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. मुंबईच्या जागेवर दोघांतिघांचा डोळा होता. त्यांच्या खटपटी चाललेल्याच होत्या.'–पकोघे.

डोळा उघडत नाहीं—१ डोळे धुंद झालेले आहेत; मदोन्मत्त झाला आहे; गर्वानें पुढें मागें कांहीं दिसत नाहीं. २ पाऊस एकसारखा पडत असल्यामुळें सूर्यदर्शन होत नाहीं.

डोळा ओळखणें—दुसऱ्याच्या मनाचा कल समजणें, आशय, अभिप्राय ताडणें; मनांतील हेतु जाणणें; डोळ्यावरून मनांतील विचार ओळखणें.

डोळा घालणें-मारणें—१ डोळा मिचकावून खूण करणें; नेत्रसंकेत करणें; डोळ्यानें खूण, इषारा करणें. २ आपलें प्रेम व्यक्त करण्यासाठीं एखाद्या (बाई) कडे पाहून डोळे मिचकावणें; अपांगवीक्षण करणें; तिरप्या नजरेनें पाहणें; वांकड्या नजरेनें पाहणें; डाव्या डोळ्यानें पाहणें. 'सरकारनीं माझ्याकडे पाहून डोळा घातला.'–जादुगार पृ. १९.

डोळा चुकविणें––नजर चुकविणें; टाळणें; दृष्टीस न पडणें; भेट घेण्याचें टाकणें; नजरेला नजर भिडूं न देणें.

डोळा जाणणें-समजणें-ताडणें––मनांतील गोष्ट जाणणें; हेतु ओळखणें; इशारा पटणें.

डोळा ठेवणें––१ पाळत ठेवणें; नजर ठेवणें; सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करणें. 'तो आपल्यावर चांगला डोळा

ठेवील.' –निरभ्रचंद्र ३२. २ हेतु धरणें; एखाद्या गोष्टीबद्दल आकांक्षा बाळगणें.

डोळा देणें--बारीक नजर ठेवणें; नीट पाहणें; निरीक्षण करणें. ' गृध्रासम डोळा दिधला । ' –संग्रामगीतें ४१.

डोळा पाहणें--१ प्रत्यक्ष पाहाणें; समक्ष दृष्टि टाकून पाहणें. २ डोळे वटारून पाहाणें; रागानें पाहणें; ताठ डोळ्यांनीं पाहणें; डोळे ताणून पाहणें.

डोळां प्राण ठेवणें--डोळ्यांत प्राण ठेवणें पहा. अगदीं मरणोन्मुख होणें; प्राण जातांना भेटीची इच्छा धरून बसणें; केवळ भेटीकरितां, पाहण्याकरितां जीव धरून बसणें. ' माझी माता शोके करून । डोळां प्राण ठेवील कीं ।'

डोळा बांधणें—दुसऱ्या झाडाच्या फांदीला सालीमध्यें खांच करून निराळ्या झाडाचा डोळा कापून बसविणें; कलम करणें.

डोळाभर झोंप—चांगली झोंप; गाढ झोंप; शांत झोंप.

डोळा येणें—१ नवीन दृष्टि प्राप्त होणें. २ डोळ्याचा रोग होणें. 'गोरक्ष बोलीले स्वामी डोळा आला।'-सप्र२.१४७.

डोळा लवणें--डोळा स्फुरण पावणें; पापण्या फुरफुरणें; नेत्रस्पंदन. पुरुषांचा उजवा व बायकांचा डावा डोळा स्फुरण पावल्यास तें शुभदायक समजतात. 'लवतो माझा डावा डोळा। तळमळ तळमळ जीव करी । कधीं भेटेल मजला देव हरि ॥'

डोळा लागणें–निद्रा येणें; झोंप लागणें; निजणें. 'चिंताज्वरांत माझा रात्रौ नाहींच लागला डोळा।'–मोकृष्ण ८३-३५. ' घटकाभर डोळा लागला होता.'–रत्नप्रभा २२. ' क्षणभरि तिस लागे जागृतीमाजि डोळा ।'–सारुह ४.४७.

डोळे उगारणें—डोळे वटारणें; डोळे फाडून पाहणें; रागानें पाहणें.

डोळे उघडणें--आपलें कर्तव्य, हिताहित वगैरेकडे लक्ष पोंचणें; सावध होणें. अनुभवानें, चट्टा बसल्यानें, नुकसान झाल्यानें शहाणे होणें; ताळ्यावर येणें. 'आतां तरी याचे डोळे उघडले असले म्हणजे पुष्कळच चांगलें झालें म्हणावयाचें.' –उषःकाल. 'अजून तुझे डोळे उघडले नाहींत.'-अस्तंभा६६. 'हे डोळे उघडा निदान आतां तरी ।'–टेकाडे.

डोळे उरफाटणें-फिरणें-चढणें--(श्रीमंतीमुळें)मदांध होणें; डोळ्यावर धुंदी येणें; डोळ्यांवर झांपड येणें. डोळे चढणें पहा.

डोळे (मोठे-एवढे-केवढे) करणें--डोळे वटारणें; रागावून पाहाणें; डोळे फाडून पाहाणें. 'मीं नुसतें त्याचें नांव घेतलें मात्र तों बाईसाहेबांनीं केवढे डोळे केले तें तूं पाहिलेंस ना ?'–फाल्गुनराव.

डोळे खाणें--पेंगणें; डुलकी घेणें; डोळ्यांवर झोपेची झांपड येणें.

डोळेगांवचीं कवाडें लागणें—अंध होणें; डोळे जाणें; डोळे मिटणें.

डोळे चढणें—(दारूनें, जाग्रणानें, उन्हानें, रागानें) डोळे उग्र दिसणें; डोळे लाल होणें; डोळे वटारल्यासारखे दिसणें; डोळे ताठरणें.

डोळे चढवून बोलणें—रागानें बोलणें; क्रोधानें डोळे वटारून भाषण करणें; संतापून बोलणें.

डोळे जळणें—१ डोळ्याची आग होणें. २ द्वेषामुळें बरें न पाहावणें; जळफळणें; पाहवेनासें होणें; मत्सर वाटणें; हेवा वाटणें; वैभवादि सहन न होणें.

डोळे जाणें--१ अंधत्व येणें; दृष्टि जाणें; डोळे फुटणें. २ आलेले डोळे बरे होणें.

डोळेझांक करणें—हयगय, दुर्लक्ष करणें; काणाडोळा करणें. 'निपटच सखि, डोळेझांक केली प्रसूनें ॥'–सारुह३.७२.

डोळे झांकणें-ढांपणें—१ मरणें. २ दुर्लक्ष, हयगय करणें; कानाडोळा करणें; डोळेझांक करणें. ३ डोळे मिटणें; प्राण सोडणें. ' आतां माझे एकदां लौकर डोळे झांकतील तर बरें. '–निरभ्रचन्द्र १५७.

डोळे टळटळीत भरणें—अश्रूंनीं डोळे भरून येणें; डोळ्यांत अश्रू भरून येणें.

डोळे तळावणें-खुडकणें--डोळे लाल होणें; उष्णतेनें बिघडणें; डोळ्यांची आग होणें; डोळे रुक्ष वाटणें.

डोळे ताठणें--अरेराव, मगरूर बनणें, होणें; उन्मत्त होणें; मदान्ध होणें; गर्विष्ठ होणें; ताठ्यानें वागणें, पाहणें.

डोळे ताणून पाहाणें; डोळे फांकणें--तीक्ष्ण नजरेनें पाहणें; फार लक्ष्यपूर्वक पाहणें; डोळे शक्य तितके विस्तृत करून पाहणें.

डोळे तांबडे पिवळे करणें--रागानें लाल होणें; उग्र नजरेनें, डोळे फाडून पाहणें; डोळे वटारून पाहणें.

डोळे निवणें-निववणें-थंड होणें--मनांतील इच्छा पूर्ण झालेली पाहून समाधान वाटणें; संतोष होणें; एखादी ईप्सित, प्रिय वस्तु पाहून समाधान पावणें; कृतकृत्य होणें. ' कृष्णा म्हणे निवविले डोळे त्वां बा यदूत्तमा माजे । '–मोऐषिक ३.३१.

डोळे निवळणें--१ डोळे येऊन बरे होणें; डोळ्यांचा रोग जाणें; डोळे फिरून पूर्ववत् स्वच्छ होणें. २ (ल.) (वेडानंतर) पूर्ववत् ताळ्यावर, शुद्धीवर येणें. ३ समजणें; उमजणें; अनुभवानें कळून येणें.

डोळे पठारास-पाताळांत जाणें--आजार, अशक्तता इ. मुळें डोळे खोल जाणें.

डोळे पांढरे करणें--१ (डोळे पांढरे होईतोंपर्यंत) अत्यंत क्रूरपणाची शिक्षा देणें; अतिशय हाल करणें; मरणोन्मुख अवस्था करणें. २ मृत्युपंथास लागणें; मृत्युसमीप येणें. 'हे शेवटले शब्द पंड्याजींनीं दांतओठ खाऊन उच्चारले आणि मानगूट धरलेली बेचक अशा तऱ्हेनें दाबली कीं भास्करभाऊचे डोळे पांढरे होण्याची अवस्था झाली.' –जग हें असें आहे.

डोळे पापी--डोळ्यांना नेहमीं विलासी, विषयी, कामुक असें मानण्यांत येतें; प्रथम पाप करतात ते डोळेच. पापदृष्टि; कामुक नजर; दोषिक दृष्टि.

डोळे पाहून वागणें-चालणें--एखाद्याच्या मनाचा कल पाहून वागणें; तव्येत ओळखणें; इषारा समजून वर्तन करणें; मर्जीप्रमाणें वागणें; नेत्रसंकेतानुरूप वर्तन करणें.

डोळे पिंजारणें-फिंदारणें-फाडणें--(रागानें) डोळे वटारणें; क्रूर मुद्रा करणें; डोळे ताणून पाहणें.

डोळे पुसणें--१ रडावयास लागणें; वाईट वाटणें; डोळ्यांत पाणी येणें. २ सांत्वन करणें; अश्रु पुसून आश्वासन, समाधान देणें.

डोळे पोंढळणें--डोळे खोल जाणें; डोळ्यांभोंवतीं खळगे पडणें.

डोळे फाटणें—१ आशा जास्त जास्त वाढणें; महत्त्वाकांक्षी बनणें; मदान्ध होणें. 'अशा स्थितींत सगळा कारभार परशुरामभाऊंच्या हातीं असल्यामुळें त्यांचेहि डोळे फाटले.' –V.S. २.७८. २ आश्चर्यचकित होणें; दिङ्मूढ होणें; विस्फारित नेत्रांनीं पाहणें; थक्क होणें.

डोळे फाडणें—१ रागावणें; डोळे वटारून पाहणें. २ अंतकाळीं डोळे निश्चळ उघडे ठेवणें; डोळे थिजणें.

डोळे फिरणें—१ घेरी, चक्कर येणें. २ (ल.) मगरूर, उन्मत्त होणें. ३ (मरणसमयीं) डोळे फिरवूं लागणें. ४ (करारासंबंधीं) बेत फिरणें; मत बदलणें; माघार घेणें.

डोळे फिरविणें—(रागानें) डोळे वटारणें; चेहरा उग्र करणें; अवकृपेनें पाहणें. 'नयने फिरवी, झाडी करचरण, म्हणे पुरे! रडे तदपी।'–मोमंत्रभाग १०.१२२.

डोळे फुटणें—अंध होणें; डोळे जाणें. एखाद्यानें कांहीं लाथाडले असतां म्हणतात. २ दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून मत्सरग्रस्त होणें; असूयायुक्त होणें; हेवा वाटणें.

डोळे फोडून वाचणें--लक्षपूर्वक वाचणें; अगदीं बारकाईनें, सूक्ष्मदृष्टीनें पाहून वाचणें.

डोळे बांधणें--१ भारणें; नजरबंदी करणें (जादूटोणा इ. नीं). २ डोळ्यांत माती फेकणें; फसविणें. ३ डोळा भरणें; डोळा भरून कलम करणें.

डोळे भरून पाहणें; डोळेभर-डोळ्यांभर पाहणें--तृप्ति होईपर्यंत एखादी वस्तु पाहणें. 'पाहीन डोळे भरून हरी। दुजी उरीं ठेवीना ॥'–एकनाथ.

डोळे मिटणें--मरणें; डोळे झांकणें; मृत्यु येणें. 'आदिमाये, माझ्या डोळ्यांनीं हें पाहण्यापूर्वीं माझे डोळे कां मिटले नाहींत.'–बाय ५.२.

डोळे मुरडणें--१ वांकडी नजर करून, संशयित नजरेनें पाहणें. २ काण्या डोळ्यानें पाहणें; एके बाजूस पाहणें; नेत्रकटाक्ष फेकणें; अपांगवीक्षण. 'डोळे मुरडुनि सहज बघे ती।'–शाकुंतल. 'वारियानें कुंडल हाले। डोळे मुरडित राधा चाले॥'–एकनाथ.

डोळे मोडणें-मारणें—१ डोळे मिचकावणें; डोळ्यानें खुणा करणें. 'डोळे मोडून वांकुल्या दावी। घुलकावित मान पै।' २ ऐटीनें, चोखंदळपणानें डोळे उचलणें, वर करणें; नखऱ्यानें पाहाणें.

डोळे येणें—अंधत्व जाऊन दृष्टि प्राप्त होणें. 'शोकें रडतां डोळे जावे, गेले कधीं न यावे, गा!'–मोवन १३.९७.

डोळे येणें-विणें—डोळ्यांस रोग येणें.

डोळे लवणें—डोळ्याच्या पापणीचें स्फुरण होणें (शुभाशुभ सूचक). पुरुषांचा उजवा व बायकांचा डावा डोळा लवणें हे शुभसूचक लक्षण समजतात. नेत्रस्पंदन.

डोळे लाल करणें-वटारणें—१ रागावणें; क्रोधानें डोळे फाडून पाहणें.–मोकर्ण २१.१३. २ एखाद्यावर उलटणें; संतापानें पाहणें.

डोळे होणें—कळून येणें; समजणें; माहिती होणें; सावध होणें (कामधंदा, अभ्यास इ. संबंधीं.)

रुप्याचे डोळे होणें—डोळे पांढरे होणें; मरणोन्मुख होणें.

डोळयाआड—नजरेपलीकडे; पाठीमागें; परोक्ष; अप्रत्यक्षतः; नजरेआड. म्हण०-डोळयाआड मसणपाड.

डोळयांचा अंधार करणें—दिसत असतां न पाहिल्या सारखें वागणें; नीट लक्ष्य न देणें; उजेडांत चुकणें; धडधडीत चूक करणें.

डोळयांचीं खोबरें-डोळयांच्या खांचा-डोळयांची भिंत होणें--डोळे फुटणें; अंधत्व येणें; कांहीं एक दिसेनासें होणें; दृष्टि जाणें.

दोहों डोळयांची मुरवत राखणें—एखाद्याकडे पाहावयास, नजर भिडवावयास भिणें, कचरणें; लाजणें; वर नजर करून पाहण्याची छाती नसणें; डोळा चुकविणें.

डोळयांचें खोबरें होणें—अंध बनणें; न दिसणें. 'तेव्हां तुझ्या डोळयांचें खोबरें झालें होतें असें मला आतां म्हटलें पाहिजे.'-शाब २.२२०.

डोळयाचें पारणें फिटणें-होणें—[पारणें = ईप्सितार्थसिद्धीचा समारंभ.] उत्कंठेनें अपेक्षिलेली वस्तु पाहावयास मिळणें; फार दिवस इच्छिलेली गोष्ट घडून येणें; मनांतील हेतु सिद्धीस गेलेला पाहणें. 'त्याला फटके बसलेले पाहून माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें.'-इंप १६२.-प्रभाकर पदें.

डोळयांच्या वाती करणें—डोळयास फार श्रम देणें; डोळे ताणणें; डोळयांनीं जास्त काम करणें; बारीक नजरेनें काम करून डोळयांस त्रास करून घेणें.

डोळयांत कुरूप-कुरुंद असणें—१ असूया वाटणें; एखाद्याविषयीं मत्सरग्रस्त असणें. २ डोळे लाल, कुरुंदी रंगाचे असणें. 'त्याचे डोळयांत कुरुंद असल्यामुळें त्याची मुद्रा उग्र दिसत होती.'-पाणकळा १०.

डोळयांत खुपणें-सलणें—१ डोळयास वेदना होणें. २ (ल.) मत्सरग्रस्त होणें; मन द्वेषबुद्धियुक्त, कलुषित असणें (दुसऱ्याचे गुण, धन इ. पाहून); हेवा वाटणें. 'ब्राह्मण कणसा खुपतो तुमच्या नेत्रीं, नसो, सवे काढा।' -मोआदि ९.३९.

डोळयांत गंगाजमना येणें; डोळे भरून येणें—रडूं येणें; अश्रु येणें; रडें कोसळणें.

डोळयांत जहर उतरणें—दुसऱ्याचें वैभव इ. पाहून हेवा वाटणें; डोळयांत सलणें, खुपणें; द्वेषानें पाहणें; मत्सरग्रस्त दृष्टि होणें.

डोळयांत तेल घालून—डोळयांत तेल घातलें असतां ते स्वच्छ होतात व साफ उघडे राहातात व त्यामुळें स्पष्ट दिसतें यावरून. अगदीं काळजीनें; बारकाईनें; सूक्ष्म दृष्टीनें. "'अगदीं डोळयांत तेल घालून' म्हणून म्हणतात त्याप्रमाणें ह्यांच्या केसांचीही हालचाल लक्षपूर्वक देखून, रेंखल्याप्रमाणें आपला मोहराही त्याच रोखानें तत्क्षणीं फिरवूं लागला." -छच ७२.

डोळयांत तेल घालून जपणें—फार सूक्ष्मपणें लक्ष्य ठेवणें; अतिशय काळजीनें जपणें; लक्ष देणें; काळजी घेणें.

डोळयांत तेल घालून पाहणें—अगदीं जागरूकतेनें पाहणें; सूक्ष्म नजरेनें पाहणें; पाळत ठेवणें; बारीक चौकशी करणें. 'जितक्या जवळ अंतरावर तो भेटेल तितके आपले श्रम वांचतिल, असें म्हणून डोळयांत तेल घालून नीट उभ्या रस्त्यानें तो एकसारखा पहात होता.'-शाब २.२१४.

डोळयांत तेल घालून बसणें—अतिशय काळजी घेणें. '(आधारग्रंथाशीं) हा लेख मिळवून पाहण्याला विद्वान् व मार्मिक वाचक एकसारखें डोळयांत तेल घालून बसले असतील.'-पामो ५४२. 'इकडची अशी व्यवस्था झालेली. वरांत हा प्रकार. आतां तर डोळयांत तेल घालून मला बसायला पाहिजे!'--एकच प्याला ३.४.

डोळयांत धूळ टाकणें; डोळ्यात धूळ-माती घालणें -फेकणें—डोळयांत धूळ टाकलीं असतां दिसेनासें होतें यावरून. फसविणें; ठकविणें; बनविणें; देखत देखत भुलथाप देऊन फसविणें. 'तींच पुढें एकमेकाच्या डोळयांत धूळ फेंकण्यासाठीं संधि पहात असतात!'-एकच प्याला.

डोळयांत पाणी असणें--१ लाज वाटणें; विनय, मर्यादा असणें. २ डोळे सतेज असणें. ३ पाणीदार असणें.

डोळयांत पाणी आणणें—रडणें; अश्रुमोचन करणें. 'डोळयांत पाणी आणून कर.'-इंप २०.

डोळयांत पाणी नसणें—१ तेजस्वी, चलाख, हुषार नसणें. २ लाज न वाटणें; आदर न वाटणें; निर्लज्ज बनणें; बेमुर्वत असणें; भीड मर्यादा न बाळगणें.

डोळयांत पाणी येणें—डोळे अश्रूंनीं भरणें; रडूं येणें. -मोशल्य ४.५९.

डोळयांत प्राण ठेवणें—एखादी गोष्ट पाहिल्यावर मग मरावयास तयार असणें; मरण्यापूर्वी एखाद्या गोष्टीची इच्छा धरणें. डोळां प्राण ठेवणें पहा.

डोळयांत प्राण येणें-उतरणें—१ मरण्याच्या द्वारीं असणें. २ इच्छित वस्तु (माणूस इ.) पाहण्यामिळण्याकरितांच केवळ प्राण गुंतलेले असणें.

डोळ्यांत भरणें—१ दृष्टीला आनंद, संतोष देणें. २ पटणें; मान्य होणें. ' त्याची कामगिरी डोळ्यांत भरते. ' –अस्तंभा ४६.

डोळ्यांत मर्यादा राहणें—मर्यादा पाळणें.

डोळ्यांत माती पडणें—मत्सर वाटणें; द्वेष करणें.

डोळ्यांत मावणें–समावणें—(डोळ्यांनीं खाल्ला जाणें) रागानें पाहण्यानें घाबरून जाणें. (नकारार्थी वाक्यांत उपयोग करतात.) ' तूं किती डोळे ताणलेस तरी मी कांहीं तुझ्या डोळ्यांत मावणार नाहीं. '

डोळ्यांत रक्त उतरणें—वीरश्री अंगांत संचरणें. –संग्रामगीतें ३०.

डोळ्यांत वात घालून बसणें—ताटकळत, वाट पाहात मार्ग प्रतीक्षा करणें; अतिशय उत्सुकतेनें वाटेकडे डोळे लावून बसणें. डोळ्यांत तेल घालून, पहा.

डोळ्यांत शरम नसणें—निर्लज्ज बनणें; निर्भीड होणें; भीडमुरवत न ठेवणें. डोळ्यांत पाणी नसणें, पहा.

डोळ्यांत हराम उतरणें—एखाद्याच्या दृष्टीनें वाईट असणें, ठरणें.

डोळ्यांतलें पाणी मरणें–(व.) मनावरचा बोज भीति उडणें; विनय दूर होणें. ' पुरुषांत मुलींना मिसळूं दिलें म्हणजे मुलींच्या डोळ्यांतलें पाणी मरतें.'

डोळ्यांतील काजळ चोरणें—एखाद्याच्या डोळ्यांतील काजळ चोरणें किती अवघड आहे. अशी चोरी करणारा किती कुशल व धीट असला पाहिजे. यावरून अगदीं न कळत, पाहतां पाहतां चोरी करणें; हातचलाखीनें चोरी करणें, बनविणें, ठकविणें, फसविणें.

डोळ्यांतून उतरविणें–अपमान करणें; गैरमर्जी करणें; मनांतून उतरविणें; नाराजी करणें.

डोळ्यांतून पाणी काढणें—रडणें; अश्रु गाळणें. 'असें वारंवार डोळ्यांतून पाणी काढीत राहूं नये.'–रत्न ४.४. 'तुम्ही उगीच डोळ्यांतून पाणी कां काढतां?'–निरभ्रचंद्र २९.

डोळ्यांना पदर लावणें—अश्रु पुसण्यासाठीं पदर डोळ्यांना लावतात. रडणें; अश्रु गाळणें. 'आनंदीबाईनीं डोळ्यांना पदर लावला.'–इंप १७. 'लावून पदर डोळ्याला।' –संग्रामगीतें ६३.

डोळ्यांना पाणी आणणें—रडणें. 'न्हाणी क्षतजें कोपें आणी तैं पार्थ लोचनीं पाणी ।'–मोभीष्म ३.२७.

डोळ्यांनीं उजेडणें—सारी रात्र जागून काढणें; मुळींच झोप न येणें; सारी रात्र डोळा न लागणें.

डोळ्यांनीं मारणें—१ प्रेमकटाक्षांनीं प्रहार करणें; प्रेमकटाक्ष टाकणें. २ खुणा करणें; नेत्रसंकेत करणें.

डोळ्यांनीं रात्रं-दिवस काढणें—एकसारखें जागत बसून रात्र-दिवस घालविणें.

डाव्या डोळ्यानें—१ तिरस्कारानें. २ चोरून; वांकड्या नजरेनें. 'डाव्या डोळ्यानें तुमच्याकडे पाह्याचेसुद्धां नाहींत.' –झांमू ६१.

वांकड्या डोळ्यानें पाहणें–१ कानाडोळा करून पाहणें; भीतभीत पण उत्कट इच्छेनें पाहणें. २ वाईट बुद्धीनें पाहाणें.

डोळ्यानें भुई दिसेनाशी होणें—उन्मत्त होणें (संपत्ति इ. नीं); मदान्ध होणें.

डोळ्यांपुढें अंधेरी येणें—एकदम दिसेनासें होणें. ' त्याच्या डोळ्यापुढें क्षणभर अंधेरी आली ! '–जादूगार पृ. ६. खालीं पहा.

डोळ्यांपुढें काजवे दिसणें–चमकणें–नाचूं लागणें—कानशिलांत बसल्यावर किंवा घेरी आली असतां डोळ्यापुढें कांहीं चमकल्यासारखें वाटतें. यावरून एकदम धसका बसणें; घाबरणें; भोंवळ येणें; धक्का बसणें. ' ब्रिटिश मालावर बहिष्कार पडला तर त्यांच्या डोळ्यापुढें काजवे नाचूं लागतील. ' –केसरी २४–६–३०.

डोळ्याला–शीं डोळा लागणें—डोळे मिटणें; झोंप लागणें.–' रात्रभर मुलाचा डोळ्याला डोळा लागला नाहीं. '

डोळ्याला पाणी येणें—अश्रूंनीं डोळे भरणें; वाईट वाटणें; रडूं येणें. ' आलें डोळ्याला बहु वर्षाकालीं जसें नदा पाणी । ' –मोशल्य ३०.२०.

डोळ्यांवर कातडें ओढणें—डोळ्यांवर कातडें ओढलें म्हणजे ते झांकले, कीं कांहीं दिसत नाहीं. यावरून मुद्दाम उपेक्षा करणें. १ डोळेझांक करणें; काणाडोळा करणें; लक्ष न देणें. –गांगा २१.–प्रभाकर पदें पृ. १६०. २ बेदरकारपणें, बेफामपणें वागणें; धुंद होणें; विचार न करतां एखादी गोष्ट करणें.

डोळ्यांवर धुंदी–धूर येणें—मदांध होणें; गर्वानें लहान मोठें, चांगलें वाईट दिसेनासें होणें.

डोळ्यांवर पडळ–मांद येणें–चढणें—डोळ्याला रोग झाला असतां जसें दिसत नाहीं त्याप्रमाणें गर्वानें अंध होणें; गर्वानें कोणास न जुमानणें; मदोन्मत्त होणें; गर्विष्ठपणानें वागणें.

डोळ्यांवर येणें--१ डोळ्यांत सलणें;हेवा वाटूं लागणें; मत्सर वाटणें. २ (कीर्ति, पैका यांनीं) पूर्णपणें फुगून जाणें; धुंद होणें.

डोळ्यांशीं डोळा मिळविणें-भिडविणें--एकमेकांकडे पाहणें;नजरेशीं नजर भिडविणें;उद्धटपणानें टक लावून पाहणें.

डोळ्यांस टिपें-पाणी येणें--डोळ्यांत अश्रू येणें; रडूं येणें.

डोळ्यांस पाटा(पट्टा) बांधणें--डोळ्यावर पट्टा बांधणें. डोळे मिटणें; कानाडोळा करणें; न पाहिल्यासारखें करणें; दुर्लक्ष करणें.

डोळ्यांस पाणी लावणें—१ नेत्राचमन करणें. २ अनुकूल करून घेणें; संतोषविणें; खूष करणें. ३ सांतवन करणें. (इं.) Eye-wash. 'आतांशा उगेच बाबाच्या डोळ्यांस पाणी लावण्यासाठीं इकडे येते.'–रत्न ३.३.

❀ **फुटका डोळा काजळानें साजरा**–व्यंग झांकण्याचा प्रयत्न; वरून रंगरंगोटी करून अंतरंग झांकणें.

डोळा काणा असावा, मुलूख काणा असूं नये-- पाठभेद–डोळा काणा असावा पण मुलूख काणा नसावा. दृष्टीला अंधत्व असलें तरी चालेल परंतु अव्यवस्था असूं नये. काणा पहा.

डोळा न फुटे, काडी न मोडे; डोळा तर फूटूं नये आणि काडी तर मोडूं नये—अगदीं सरळ, निस्पृह व कुशल वर्तन कीं ज्यामुळें दुसऱ्याची व आपलीहि मानहानि होत नाहीं. अगदीं लक्षपूर्वक,कौशल्यानें काम करणें.काडी पहा.

डोळा वांकडा करावा पण मन वांकडें करूं नये-- एखाद्यास पाहिजे तर रागें भरावें पण त्याच्याबद्दल मनांत किंतु ठेवूं नये.

डोळे अंधारीं, उजेड बाहेरीं—भलतीकडेच लक्ष्य दिलें असतां जी गोष्ट आपणांस पाहावयाची ती दिसणार नाहीं.

डोळे असून पाहावयाचें नाहीं, कान असून ऐकावयाचें नाहीं--समोर कांहीं बऱ्या वाईट गोष्टी चालल्या असल्या तरी त्याकडे मुळींच लक्ष न देणें. जणूं डोळे आणि कान हीं इंद्रियें नाहींत असें धरून वागणें.–शारदा नाटक. –नर्स सुंद्राबाई १०९.

डोळे आल्यावरी, प्रकाशाचा त्रास करी--डोळे दुखत असतां प्रकाशाकडे पाहावत नाहीं. चोराणां चंद्रमा रिपुः। इतरांना जी गोष्ट चांगली ती कुमार्गी माणसाला त्रासदायक वाटते.

डोळे काढिले आणि कपाळ हलकें झालें--कपाळ दुखी बरी करण्याकरितां डोळे काढण्याचा उपाय करणें म्हणजे अल्प लाभासाठीं मोठी हानि करून घेण्यासारखें आहे. पुढें पहा.

डोळे गेले कपाळ राहिलें–१ दृष्टि काढल्यामुळें कपाळशूळ थांबला. पण कायमची दृष्टि गेली म्हणजे थोड्या लाभासाठीं मोठा तोटा करून घेणें. २ वृद्धावस्था प्राप्त झाल्यामुळें डोळ्यानें दिसेनासें झालें पण दैव कायम आहे.

डोळे गेल्यावर पापण्याचा काय उपयोग—पापण्या या डोळ्यांचें संरक्षण करण्याकरितां असतात. मुख्य गोष्ट गेल्यावर आनुषंगिक गोष्टी आपोआपच निरुपयोगी ठरतात.

डोळे चिरीव चांगले, वृद्धपणीं सरक्या झाले— तरुणपणीं सुंदर दिसणारे डोळेहि वृद्धपणीं वाईट दिसू लागतात. कालांतरानें प्रत्येक गोष्टीच्या ठिकाणीं असलेलें सौंदर्य नष्ट होतें.

डोळे झांकून द्यावें दुकानदारानें, चौकशी करून घ्यावें घेणारानें—दुकानदार वस्तु देतांना कांहीं फारशी चौकशी करून देत नाहीं. कारण त्यास आपला माल खपवावयाचा असतो; पण घेणारानें नीट पाहून तपासून घेतला पाहिजे; नाहींतर वाईट माल त्याच्या गळ्यांत पडावयाचा. एकाच्या जें हिताचें तेंच दुसऱ्याच्या तोट्याचें.

डोळे पाहात नाहीं, कान ऐकत नाहीं, पाय चालत नाहीं, यावर औषध कोणी देत नाहीं—वृद्धपणीं मनुष्याच्या सर्व शक्ति क्षीण होतात, पण त्यास कांहीं इलाज नसतो.

डोळे फुटले तरी हिशेब बुडत नाहीं–आपल्या डोळ्यांना दिसत नसलें तरी आपलें देणें घेणें आपणाला सुटत नाहीं. आपण डोळे मिटले तरी जगाला आपण दिसत असतोच.

डोळे मिटले म्हणजे चहूंकडे अंधारच–आपण डोळे मिटले म्हणजे आपणांस कांहीं दिसत नाहींसें होतें. आपण एखाद्या वस्तूकडे पाहावयाचेंच नाहीं असें म्हटलें, तर ती आपणांस दिसणार नाहीं.

डोळे मोठे केले म्हणून मी आंत मावणार नाहीं— एखाद्याकडे रागानें पाहिलें तरी त्यास तेवढ्यामुळें कांहीं इजा पोंचत नाहीं.

दोन डोळे शेजारीं, भेट नाहीं संसारीं–डोळ्यांप्रमाणें शेजारीं राहत असूनहि क्वचितच भेटत असलेल्या मित्रांसंबंधीं योजतात.

डोळ्या अवलोकन साहे, जिवा तसें मन आहे—

ज्याप्रमाणें शरीरास डोळ्यांपासून बाहेरील गोष्टींचें ज्ञान होतें, त्याप्रमाणें आत्म्यास मनाकडून ज्ञानप्राप्ति होते.

डोळ्याआड स्मशानपाड; डोळ्याआड (आणि) मसणपाड–पार—जी गोष्ट किंवा जो मनुष्य आपल्यासमोर नाहीं, आपणांस दिसत नाहीं तो मेल्यासारखाच आहे; तो मेला काय किंवा जिवंत काय त्याचा आपणास काय उपयोग ? दृष्टीआड सृष्टि अशा अर्थानेंहि वापरतात.

डोळ्याकानाचें अंतर, चार बोटांचा फेर; डोळ्याचें तें खरें, कानाचें तें खोटें––डोळे व कान यांत चार बोटांचें अंतर असतें. यावरून पाहिलेल्या आणि ऐकलेल्या गोष्टींत नेहमीं अंतर असतें. ज्याप्रमाणें आपण प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवतो त्याप्रमाणें ऐकलेल्या गोष्टीवर ठेवीत नाहीं.

डोळ्याचे डोळे कामाचे आणि अंधळ्याचे डोळे शोभेचे––डोळस पहा.

डोळ्यांचें पाणी आणि कर्जाची बोळवणी–डोळ्यांचें पाणी कधीं सरत नाहीं त्याप्रमाणें एकदां कर्ज केलें कीं तें कधीं फिटत नाहीं. किंवा रडून भेकून कर्ज निवारून घेणें.

डोळ्यांच्या कवड्या, नांव शेखरोषन—[रोषन = प्रकाश] नांव मात्र सुंदर, प्रकाशाचा पुतळा पण डोळे पाहावयास गेलें तर खांचा झालेल्या. नांव सोनुबाई० पहा.

डोळ्यांच्या खांचा, नांव कुमुदिनी—वरप्रमाणें. नांव सुंदर पण स्वरूप ओंगळ. चांगलें नांव असून रूप चांगलें नसलें तर त्या नुसत्या नांवाचा काय उपयोग.

डोळ्यांत अंजन, पायांत पैंजण—ज्याप्रमाणें पायांत पैंजण घातल्यानें ते सुंदर दिसतात, त्याप्रमाणें डोळ्यांत काजळ घातल्यानें ते सुंदर दिसतात. नट्टापट्टा.

डोळ्यांत असूं, तोंडावर हंसूं—एखाद्या वेळीं एका गोष्टीबद्दल आनंद तर त्याच गोष्टीपासून दुसऱ्या दृष्टीनें दुःख, असे परस्परविरुद्ध विकार उत्पन्न होतात त्या वेळीं म्हणतात. उदा०–पतीकडे आनंदानें जाणारी नववधू मातृपितृवियोगाबद्दल दुःख करीत असते.

डोळ्यांत असूं नाहीं, पोटांत माया नाहीं—ज्याचेबद्दल आपणाला प्रेम वाटत नाहीं त्यास कमी जास्त झाल्यास आपल्या डोळ्यांस पाणी येत नाहीं किंवा दुःख होत नाहीं.

डोळ्यांत केर–कुसर व कानांत फूंकर—रोग एका ठिकाणीं व उपाय भलत्याच जागीं. रोग एक व उपाय दुसराच.

डोळ्यांत केर, गांडींत फुंकर—वरच्याचा पाठभेद.

डोळ्यांत जर एक कण राहात नाहीं, तर हिशेबांत एक पै कशी सामावेल—ज्याप्रमाणें डोळ्यांत बारीक केरहि सहन होत नाहीं, त्याप्रमाणें हिशोबाच्या कामीं अगदीं क्षुल्लक चूकहि कामा येत नाहीं.

डोळ्यांत बोट घातलें तरी दिसत नाहीं—दुसऱ्यानें आपल्या अगदीं जवळ येऊन जरी आपल्या डोळ्यांत बोट घातलें, तरी तो तोंपर्यंत दिसणार नाहीं असा काळोख. अतिशय निबिड काळोख पडला असतां म्हणतात.

दुसऱ्याच्या डोळ्यांत बोट पटकन जातें–शिरतें—दुसऱ्याचे दोष चट्कन् कळतात. दोषैकदृष्टीबद्दल वापरतात.

दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें, आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं—दुसऱ्याचे बारीक सारीकहि दोष दिसतात पण आपले ढोबळ दोषहि दिसत नाहींत. दुसरा पहा.

डोळ्यांना नाहीं असूं, मेली माझी सासू—सासूसाठीं कोण जांवई किंवा सून रडणार ? तिचें दुःख कोणी दाखवील तर तें ढोंग समजावें.

डोळ्याला पाणी, ढुंगणाला पाद, अशा जेवणाला काय स्वाद—अतिशय तिखट व वातूळ पदार्थ खाल्ल्यानें कसें समाधान होणार.

डोळ्याला रोग, तिथें हाताला औषध काय उपयोग ?—ज्या ठिकाणीं रोग आहे त्याच ठिकाणीं औषध पाहिजे. मागें डोळ्यांत केर० पहा.

डोळ्यांवरच्या झांपडेला थापटेचा खुराक—डोळ्यांवर झांपड आली असतां थप्पड मारली म्हणजे ती उडते. आपलें एखाद्या गोष्टीकडे दुर्लक्ष झालें असतां चांगली चाट बसली म्हणजे आपण जागे होतों.

डोळ्यांसारखें तेज नाहीं, पोरासारखें फळ नाहीं––डोळ्यांतील तेजाची जशी कोणी बरोबरी करूं शकत नाहीं त्याप्रमाणें पुत्रजन्मासारखा आनंद दुसऱ्या कशानें होत नाहीं.

डौर——डौर वाहणें––उपहास करणें. बहिरोबाचे भक्त जे भराडी हे डौरावर रूपकाचीं गाणीं जीं म्हणतात त्याचा सूर उपहासपर असतो यावरून. 'ते आइकोनि डौर वाहे। विद्वांसु जो।' –ज्ञा १३.८२५. 'डौर वाहूनि सांगणें निजहितार्थ। या कारणें मी डौरकार जालों।'–एकनाथ भारूड.

ढ

ढ——[गाढव या शब्दांत ढ हें अक्षर आहे.] १ अक्षरशत्रु; अशिक्षित. २ अडाणी; मूर्ख; मठ्ठ. 'मोठा ढ जरी असला तरी वरचेवर डोळ्यांसमोरून व कानांवरून जाणाऱ्या गोष्टी त्याचे मनांत कांहींना कांहीं तरी बिंबतीलच.'–नि.

ढग——ढग हे कधींहि वाऱ्याच्या विरुद्ध दिशेस जात नाहींत—ढग वाऱ्याबरोबर तो नेईल त्या दिशेनें वाहात जातात. कधीं त्याच्या उलट दिशेनें जात नाहींत. तसे कांहीं लोक आपल्या धन्याच्या वगैरे मर्जीनुरूप, त्याचा कल पाहून वागतात; त्याच्या विरुद्ध कधीं वर्तन करीत नाहींत.

ढगच नसते तर विजेची मौज तरी कशी दिसली असती—पार्श्वभूमीमुळें वस्तूला उठाव येतो. ढग काळेकुट्ट व गडद व त्यांवर तेजस्वी वीज चमकली म्हणजे तें दृश्य फार मनोहर असतें.

ढंग——ढंग करणें—डामडौल, थाटमाट करणें; नटणें, मुरडणें; चाळे करणें; थेर करणें.

ढंग दाखविणें—१ दिमाख बडेजाव दाखविणें. २ आव घालणें, आणणें. ३ भलभलत्या गोष्टी करणें.

आपल्या ढंगावर येणें—खरें स्वरूप प्रगट करणें.

ढबू——आयत गबू आणि पैसा ढबू—दिसण्यांत मोठा पण प्रत्यक्ष महत्त्वानें कमी असा.

देखण्यांत-दिसण्यांत ढब्बू, चालण्यांत शिबराई—वास्तविक गुणांनीं कमी असून बाहेरून जास्त किंमत दाखविणारा. दिसण्यांत मोठा पण कामाच्या दृष्टीनें निरुपयोगी मनुष्य; दिखाऊ चांगली पण कुचकामाची गोष्ट.

ढलपी——ढलपीचें लांकूड आणि लांकडाची ढलपी करणें—अतिशय नीटनेटक्या रीतीनें व काटकसरीनें व्यवस्था करणें; अतिशय जपून खर्च करणें. 'सव्वा तपाच्या आंत ढलपीचें लांकूड अन् लांकडाची ढलपी करून वर्षाबाईनीं आणि पुढें वसंतानें काडीची माडी केली.'–मारीन मुस्कटांत. र. रं. माला.

आठ हात लांकूड, नऊ हात ढलपी—अतिशयोक्तीची गोष्ट; गप्पा; बात. काकडी व बी पहा. तु०–मिया मूठभर दाढी हातभर.

ढवळणें——ढवळलेल्या पाण्यांत, मासे धरावे निवांत—पाणी गढूळ झालें म्हणजे माशांना कांहीं दिसत नाहींसें होतें व मग ते लवकर जाळ्यांत सांपडतात किंवा सहज धरतां येतात. त्याप्रमाणें देशांत गडबड उडाली म्हणजे आपला फायदा करून घ्यावा. Love to fish in troubled waters.–सवि २२४३.

ढवळा——म्हातारपणीं ढवळा मणी—'वृद्धा नारी पतिव्रता।' याप्रमाणें.

ढवळा मणी, ओंगळवाणी—वृद्धावस्था प्राप्त होऊन केंस पिकल्यावर मनुष्य चांगला दिसत नाहीं.

ढवळ्याशेजारीं बांधला पवळा, वाण नाहीं पण गुण लागला–लागतो—[ढवळा=पांढरा. पवळा–पोंवळा =पोवळ्यासारखा, गुलाबी रंगाचा.] दोन वेगवेगळ्या चांगल्या रंगांचे बैल शेजारीं शेजारीं बांधलें तर त्यांच्या रंगांत फरक पडत नाहीं पण गुणांत पडतो. म्हणजे वाईट गुण मात्र लवकर लागतात. चांगले गुण लागत नाहींत. गुण पहा.

ढवा——मिणमिण दिवा, कृपणाचा केवा, गाजराचा मेवा व हिजड्याचा ढवा (हे चार अनुपयोगी)—ज्याचा उजेड पडत नाहीं असा बारीक वात असलेला दिवा, कंजूष मनुष्याचा धनाचा सांठा, गाजरांची मिठाई व हिजडा असणारा नवरा हे निरुपयोगी होत. गाजर पहा.

ढसर——हाताचा ढसर—सढळ; उदार हाताचा.

ढस्मर——खाण्यापिण्याची तंगचाई, नमोनारायणाची ढस्मर—[ढस्मर=समृद्धि, चंगळ] नमस्कार, चमत्कार वगैरे दिखाऊ आतिथ्याची रेलचेल पण खावयास घालण्याच्या कामीं मात्र कंजूषपणा; वरवर दिखाऊ देखावा पुष्कळ असून आंत कांहीं राम नसला म्हणजे म्हणतात.

ढळढळवणी——ढळढळवणी, शाबास ग सुग्रणी—एखादा पदार्थ खूब पातळ, बेचव, पांचट केला तर तो करणारीला सुग्रण कोण म्हणेल व तिला शाबासकी कसली द्यावयाची? इकडे हुशार म्हणून वाखाणणी करावयाची व पाहूं गेलें असतां कोणतेंहि काम करण्याची अक्कल नसावयाची, असा उलटा प्रकार. कामांत नांवाजलेल्या माणसानें कांहीं बिघडविलें म्हणजे म्हणतात.

ढळणें——ढळता कांटा; ढळती दोरी; ढळती नजर—१ हाताचा सढळपणा; उदारपणा. २ सैलपणा; ढिलेपणा. ३ कृपादृष्टि; अनुकूल वृत्ति. 'महाराजांनीं एजंट

साहेबांची ढळती नजर आहे हें धोरण ठेवून दिवसाढवळ्या सडकून जुलूम चालवला. '–विक्षिप्त ३.२४१.

ढाक——ढाक नाहीं ढगारा, फुटका नगारा—अगदीं निकृष्टावस्था दाखविण्यासाठीं योजतात.

ढाणक——ढाणकास देणें—[ढाणक=अंत्यज लोक] महारांस देऊन टाकणें; देशोधडीस लावणें. ' तुझा शिरच्छेद करून तुझीं रांडापोरें ढाणकास देईन.'–भाब ३०.

ढापणें——ढापली मूठ लाखाची–झांकली मूठ पहा.

ढाल——ढाला देणें—१ युद्धास सिद्ध होऊन सैन्याचा तळ देणें. 'दिल्या ढाला मैदानांत परांड्याच्या बाजूला ।–ऐपो २३४. २ आव्हान देणें; युद्धास आमंत्रण देणें. ३ प्रवासास निघणें.

ढाला फिरविणें––१ निशाणांचा म्हणजे सैन्याचा रोख बदलणें; विशिष्ट दिशेनें सैन्य नेणें. २ चाल करून जाणें. ' शिंदे–होळकर यांनीं गंडकीकडे ढाला फिरवितांच तें वर्तमान त्या राजास गेलें. '–पेब ५४.

ढाला फिरविणें; उलटी ढाल देणें––लढाई संपवून सैन्य माघारें फिरणें; निशाणें फिरविणें. ' मग सरकारचा कूच तेथून होऊन पुण्याकडे ढाला फिरविल्या. '–पेब १५२.

ढाला माघारीं देणें––वरप्रमाणें. स्वारी परतणें; सैन्यानें तोंड वळवून परत घराकडे निघणें. ' अटकेपर्यंत मुलूख काबीज करून ढाला माघाऱ्या दिल्या. '–भाब ३३.

ढालगज——ढालगज भवानी––[ढालगज=निशाणाचा हत्ती. ज्या हत्तीवर सैन्याचें मुख्य निशाण लावलेलें असतें तो. हा हत्ती फार धीट व शूर असावा लागतो.–आपटे कोश] १ मोठी शूर, धीट, उपद्व्यापी बाई. (वाईट अर्थी वापरतात). २ ढालगज हत्ती सर्व सैन्याच्या पुढें मिरवत असतो त्याप्रमाणें नटून थटून पुढें पुढें करणारा जहांबाज स्त्री. ३ साहसी, अमर्याद स्त्री. (सामा.) उलाढाली, उपद्व्यापी स्त्री.

ढाळ——ढाळ देणें—तेज वाढविणें; प्रभा फांकणें. सतेज दिसणें. ' मुक्तमणी ढाळ देत । '–वेसीस्व ९.१२७.

ढाळ——ढाळ देणें––१ नोकरास बडतर्फ करणें. २ टाळाटाळी करणें; चुकविणें.

ढाळ——ढाळाखालीं चालणें—नेहमींप्रमाणें वर्तन करणें; परंपरेप्रमाणें, पद्धतीप्रमाणें वागणें; रीतीप्रमाणें वागणूक करणें.

ढाळाखालीं–ढाळीं पडणें; ढाळ पडणें–लागणें—पद्धत, रीत पडणें; सराव होणें; संवयीचें होणें.

ढाळी——धरायला ढाळी, न बसायला सांवली—कोणताहि आश्रय नसणें, पूर्णपणें निराश्रित असणें; निराधार स्थिति. डाहाळी पहा.

ढिला——कमरेचा ढिला—पौरुषहीन; नपुंसक.

कासोट्याचा ढिला—व्यभिचारी. कासोटा पहा.

ढीग——ढीग करणें–पाडणें—अतोनात काम करणें.

ढील——ढील पडणें—कामाची हयगय होणें; शिथिलता येणें.

ढुंकणें——ढुंकून न पाहाणें–विचारणें—मुळींच न विचारणें; दुर्लक्ष करणें. 'सकळ रसिक प्रिया त्या न ढुकोनहि पाहती समस्त बक । '–मोवन १२.२८.

ढुंगण——ढुंगण दाखविणें—१ पराजित होणें; अपयश घेऊन फिरणें; पाठ फिरविणें पहा. २ खालीं पहा.

ढुंगण फिरविणें—१ पाठमोरा होणें; पाठ फिरविणें; २ दुर्लक्ष करणें; अवमानणें. ' मी इतके बोललों तरी तो ढुंगण फिरवून निघून गेला. '

ढुंगणाचें सोडून डोकीस गुंडाळणें—निर्लज्ज असणें, होणें; रीत सोडून वर्तन करणें; असभ्यपणाची वागणूक करणें; लोकाचाराविरुद्ध वागणें.

ढुंगणावर आपटणें—चांगली अद्दल घडणें; एखाद्या कामांत मोठी नुकसानी होणें; आपटी मिळणें; चट्टा बसणें.

ढुंगणास हात पोंचणें—लहान मुलांचे हात ढुंगणास पोंचत नाहींत तों त्यांस तें धुण्याकरितां दुसऱ्यांची जरूर लागते. मोठे झाल्यावर ती लागत नाहीं यावरून. वयांत येणें; स्वतंत्र बनणें.२ कोणाची जरूर लागत नाहींसें होणें; बेपर्वा बनणें.

***ढुंगण दाखवावें पण दांत नाहीं दाखवूं**—१एखाद्या गोष्टीकडे दुर्लक्ष करावें पण तिचा उपहास करूं नये. २ एखाद्याजवळ कुऱ्यानें वागावें पण कधीं याचना करूं नये.

ढुंगण पाहून पाट, तोंड पाहून टिळा—जशी ज्याची योग्यता असेल तसा त्यास मान मिळतो किंवा द्यावा.

ढुंगण फाटे पण ढबला नहीं फाटे—१ इतका मजबूत कपडा कीं तो कधींच फाटणार नाहीं. अंगाची चामडी जाईल, पण कपडा फाटणार नाहीं. २ अंगास इजा पोंचली तरी कपडा फाटूं न देणारा. शरीरापेक्षांहि कपड्याची जास्त काळजी घेणारा. ३ कंजूष मनुष्य. तु०–चमडी देगा पण दमडी नहीं देगा.

ढुंगण हाणा, पण (मला)पाटलीण म्हणा—(अशिष्ट) पाटलीण होण्यासाठीं वाटेल तें करून घेण्यास तयार. पूर्वी पाटलास व अर्थात् त्याच्या बायकोस-पाटलिणीस गांवांत फार मान असे. तेव्हां पाटलीण होण्यासाठीं अनेक स्त्रियांची धडपड असे. मानासाठीं शीलाकडेहि न पाहाणें.

ढुंगणाखालीं आरी, चांभार पोरें मारी—एखादी वस्तु जवळच असून तिचा गांवभर तपास करावयाचा. गांड पहा. तु०-काखेंत कळसा गांवाला वळसा.

ढुंगणाचें सोडलें आणि डोक्याला गुंडाळिलें—सर्व लाज सोडणें; निर्लज्जपणाचें वर्तन करणें; पूर्णपणें निर्लज्ज बनणें; लोकरीतीविरुद्ध वर्तन करणें.

ढुंगणाला फाटकें तुटकें, आणि डोक्याला नेटकें—वर दिसावयास खूप नट्टापट्टा करावयाचा पण खालीं घाणेरडें नेसावयाचें. अर्धवट दिखाऊपणा.

ढुंगणास नाहीं खेंडा, पण दिमाखाचा झेंडा—पोकळ ऐट; अंगावर घ्यावयास चांगलेसें कपडे नसतांहि उगाच प्रौढी मिरवणें. खेंडा पहा.

ढुंगणास हात पोहोंचले !—कृतकृत्य झाल्यावर किंवा अंगीकृत कार्य नीटपणें पार पाडल्यावर माणूस ढुंगणावर हात ठेवून विश्रांतीसाठीं उभा राहतो. किंवा लहान मुलाला ढुंगण धुतां येते तेव्हां तो वागतो तसें. स्वतंत्र बनणें; कोणाची जरूरी न लागणें. ढुंगणास हात पोंचणें, पहा.

ढुंगा; ढुंगाड——ढुंगा नाहीं नेसूं आणि राजियाचा दंभू—ढुंगणाला नाहीं वस्त्र आणि रिकामा डौल मात्र राजा सारखा. -केसरी ३-११-३९. घरावर नाहीं कौल० पहा.

तोंडच्या बाता, ढुंगाड खाय लाता—तोंडानें खूप बाता मारावयाच्या व ऐट करावयाची, पण एकीकडे होणारा अपमान सहन करीत असावयाचें.

दुढा(द्ढा)चार्य—[कानडी दोड्ड = मोठा, श्रेष्ठ + आचार्य = चांगला पट्टीचा पंडित, मोठा माणूस.] (निंदार्थी) लब्धप्रतिष्ठित माणूस; झब्बू. 'तुमचें लोकांनीं ऐकावें असें काय तुम्ही मोठे दुढ्ढाचार्य आहां ?'

ढे ढे——ढेढे वाजणें—सूप वाजणें पहा.

ढेकर——ढेकर देणें-देऊन बसणें—परद्रव्याचा अपहार करून तें जिरविणें; तळीराम गार करणें.

ढेंकूण——ढेंकणासारखें रगडून टाकणें—सहज चिरडून टाकणें; लीलेनें नाश करणें.

❀ **ढेंकूण मारायला तलवार कशाला ? ढेंकूण मारायला ब्रह्मास्त्राचें आवाहन-जप कशाला पाहिजे ?**—किरकोळ काम करावयास कांहीं फार मोठी तयारी करावी लागत नाहीं. क्षुद्र मनुष्यास शिक्षा करण्यास फार मोठ्या मनुष्यास सांगावयास नको. तु०-नखानें काम होतें तेथें कुऱ्हाड कशास !

ढेंकणाच्या संगें, हिरा भंगे; ढेकणाचे संगें हिरा जो भंगला।—कुसंगें नाडला साधु तैसा ॥ -तुगा ३५६४. ढेंकणाच्या रक्तामुळें हिरा फुटतो अशी समजूत आहे तीवरून. दुर्जनाच्या संगतीनें थोर मनुष्यासहि हानि पोंचते.

ढेंकणास ढेंकूण काय खातो—लबाड लोक एकमेकांस मारक होत नाहींत. इतरांस लुबाडतात. चोरांमध्यें आपसांत व्यवहारासाठीं चांगली नीतिमत्ता असते. (हिंस्र पशूदेखील एके ठिकाणीं शांततेनें राहूं शकतात.)

ढेकूळ——ढेकळाप्रमाणें विरणें-विरघळणें—१ शरमणें; जिरणें; मनांत थिजणें. २ तेजोहीन, हतवीर्य होणें.

ढेंग——ढेंगा-गे पसरणें-१ लांब टांगा टाकीत जाणें. २ पाय ताणणें; पसरणें.

ढेंगेखालून जाणें--अपमान सहन करणें. एखाद्याच्या टांगांमधून जाणें, हा पराभव झाल्याचें दर्शक आहे. टांगा पहा.

❀ **ढेंग बघून पिढें, तोंड बघून विडे**- ढुंगण पाहून पाट० पहा.जशी मनुष्याची योग्यता असेल त्याप्रमाणें त्याची बडदास्त होते. योग्यतेप्रमाणें सत्कार. तोंड पहा.

ढेढें——ढेढें फिटणें--पावसाळा सरणें. 'कां वार्षियें ढेंढें फिटे। जेव्हां शारदीयेचा अनुघड्ड फुटे।'-ज्ञा९.१०२.

ढोंग——ढोंग केवढें, तर घोडनदीएवढें-अतिशय ढोंगी मनुष्य.-मॅन ११२९. [यावरून घोडनदी ही मोठी दिसते पण ती तशी नाहीं].

ढोंग धतोरा, हातीं कटोरा—ढोंगी मनुष्याच्या नादीं लागल्यास शेवटीं हानि होते.

ढोंगी——ढोंगी एकतऱ्हेचे प्राणी, ती नसे ईश्वरकरणी—ढोंगी लोक ईश्वरानें उत्पन्न केलेले नव्हेत ! ढोंगी लोक लबाडी करून फसवितात त्यांना कांहीं ईश्वर साहाय्य नसतो किंवा ते करतात ती गोष्ट सत्य, स्वाभाविक नसते, तसा नुसता भास होतो.-सवि १७०८.

ढोंगी वेष धरतो, शेवटीं उजेडास येतो--कपटी मनुष्यानें कितीहि बतावणी केली तरी त्याचें कपट शेवटीं बाहेर पडतें.

ढोप——कोपनाथापुढें ढोपनाथ--(कर्ना.) करवीर

(दक्षिण काशी) माहात्म्य वर्णनांत–१ खिद्रापूर कोपनाथ, २ वांगी बंकनाथ, ३ संकेश्वर शंखनाथ, हीं शंकराचीं स्थानें आहेत. त्यांपैकीं खिद्रापूरचा कोपनाथ याच्यापुढें ढोपनाथ म्हणून एक देव बसविला आहे. याचें दर्शन अगोदर घेऊन नंतर कोपनाथाचें दर्शन घ्यावें लागतें. यावरून इकडील भागांत ही म्हण रूढ झाली आहे. सांबा अगोदर नंदी.

ढोपर——ढोपरखुंटीस येणें—ढोपर टेंकून उभें राहाण्याच्या दशेस येणें. १ वृद्ध होणें. २ मेटाकुटीस येणें.

ढोर—ढोरांत ढोर, पोरांत पोर—वाटेल तेथें सामावणारा. जसें असेल तसें वागणारा.

ढोरानें ढोर मेलें, कुत्र्याच्या गळ्यांत घाटरूं आलें—चोर सोडून संन्याशास शिक्षा. वड्याचें तेल वांग्यावर.

ढोल——वाजत ढोलानें–१ वाजतगाजत; मोठ्या थाटानें; जयजयकारानें; थाटामाटांत. २उघडपणें; निर्भयपणें, राजरोस.

❀ **ढोलाचा साक्षीदार दंडा**— उंदराला मांजर साक्षी याप्रमाणें.

ढोलकें——ढोलकें पिटणें--स्तोम माजविणें; बडेजावी गाणें; गाजावाजा करणें. ' एकानें सुधारणेच्या तत्त्वाचें ढोलकें पिटावें व त्याच्या बगलबच्चयांनीं भोंवतीं उड्या मारून..... '–टि ४.७९.

ढोलकें फोडणें—गुप्त गोष्ट उघड करणें; बभ्रा करणें; बोभाटा करणें.

ढोलकें वाजणें—१ गाजावाजा होणें. २ बोभाटा, दुष्कीर्ति होणें.

❀ **ढोलक्यास दोहींकडून थापा–थोबाडी**--ढोलक्यास दोन तोंडें असतात व त्यास दोन्ही तोंडांवर थापटतात; त्याप्रमाणें जो दुतोंडी मनुष्य असतो तो दोघांस खूष करण्याचा प्रयत्न करतो पण त्यास दोघांकडूनहि शेवटीं दोष मिळतो.

ढ्या——ढ्या ढ्या वाजणें—१ बोभाटा होणें. २ दिवाळें निघणें.

त

त——त म्हणतां तपेलें—एखाद्या साध्या गोष्टीवरून अगर चिन्हावरून सबंध परिस्थितीचें आकलन करणें, मूळ शोधणें वगैरे. तु०–ता म्हणतां ताकभात.

तकतक——तकतक करणें—(व.) चुळबुळ करणें; उत्कंठित अधीर होणें.

तकली——तकली माल्ल्यार खोंकली गेली—(गो.) डोकें तोडलें म्हणजे खोकला गेलाच. लहान अडचण निवारण्यासाठीं मोठ्याचा बळी देणें. तु०–गळा कापला खोकला गेला. डोळे गेले कपाळ राहिलें.

तकसीम——तकसीमी देणें–लावणें--ताब्यांत देणें; जिम्मा करणें; हवालीं करणें.

तक्र——तक्रं शक्रस्य दुर्लभम् ।—ही एक समस्या पुढीलप्रमाणें निरनिराळ्या प्रकारांनीं पूर्ण करण्यांत येते. (अ) भोजनान्ते च किं पेयं, जयन्तः कस्य वै सुतः । कथं विष्णुपदं प्रोक्तं, तक्रं शक्रस्य दुर्लभम् ॥ (आ) अमृतं दुर्लभं नृणां देवानामुदकं तथा । पितॄणां दुर्लभः पुत्रः, तक्रं शक्रस्य दुर्लभम् ॥ (इ) अक्रत्वर्थमिति ज्ञात्वा शक्रो न हुतवान्पुरा। अदत्तमिति शास्त्रार्थात्, तक्रं शक्रस्य दुर्लभम् ॥ (ई) घृतं न श्रूयते कर्णे दधि स्वप्नेपि दुर्लभम् । मुग्धे दुग्धस्य का वार्ता, तक्रं शक्रस्य दुर्लभम् ॥ (उ) शुंठीलवणसंयुक्तं कामिनीकरमर्दितम् । मधुमाधवयोर्मध्ये, तक्रं शक्रस्य दुर्लभम् ॥ सामान्यतः ताकाचें महत्त्व पटवून देण्यासाठीं 'तक्रं शक्रस्य दुर्लभम्' हें सुभाषित वापरण्यांत येतें. ताक हें इन्द्रालाहि दुर्मिळ आहे. कारण स्वर्गांत फक्त अमृत असतें. तेथें ताक कोठून मिळणार ? कांहीं क्षुल्लक वस्तु मोठ्यांसहि दुर्मिळ असतात. ' बाबा तक्र शक्रासि दुल्लभ म्हणती भले ।'–सप्र ८.९.

तग——तग निघणें—टिकाव लागणें; निभाव लागणें; तडीस लागणें. ' गमलें ते नग न निघे सोसुनि कुलिशोत्थ दाह तग ज्यातें । '–मोभीष्म ७.१८.

तंग——तंग करणें—१ आंवळणें; घट्ट बांधणें. २ (एखाद्यास) पेचांत धरणें; अडचणींत आणणें; चेंपणें; खूप त्रास देणें. ' प्रथमतां झुन्जीं त्यास तङ्ग केला तेव्हांच त्याच आंच बसली. '–ख ८४७.

तंग होणें--(गो.) (जीव) अवस्थ होणें; ग्लानि येणें; त्रासणें; दमणें; थकणें; बेजार होणें. ' फार वेळां शौचास झाल्यामुळें जीव फ़ार तंग झाला आहे. '

❀ **घोड्यास तंग, पुरुषास वंग**—घोड्याला ताब्यांत ठेवण्यास तंगाची जरूरी फार असते;त्याप्रमाणें पुरुषांना कामविकार ताब्यांत ठेवण्याकरितां वंगभस्म देण्यांत येतें.

तंगचाई——**खाण्यापिण्याची तंगचाई, व नमो नारायणाची ढस्मर**—ढस्मर पहा.

तंगडी——**तंगडी तोडून घेणें; तंगड्या तोडणें**——चालण्याचे श्रम घेणें; कष्टाची पर्वा न करतां चालत जाणें. 'तुझ्याकरितां मी तंगड्या तोडून घेऊन आलों तें व्यर्थ झालें.'

तगदीर——**तगदीरके आगे तजवीज क्या कर सके**—कितीहि प्रयत्न व तजवीज केली तरी नशिबापुढें ती निष्फळ ठरते.

तगवणें——**तगवी तिला भगवी, फाडी तिला साडी**—जी सून आपलीं लुगडीं जास्त दिवस टिकवते, लवकर फाडून टाकीत नाहीं, तिला लवकर लवकर नवीं लुगडीं मिळत नाहींत व त्यामुळें विटलेलीं लुगडींच फाटेपर्यंत म्हणजे बरेच दिवस नेसावीं लागतात. याचे उलट जिचीं लुगडीं लवकर फाटतात तिला वरचेवर नवीं विकत घेऊन देणें भाग पडतें, त्यामुळें तिला नेहमीं नवीं लुगडीं नेसावयास मिळतात. चांगल्या कृतींचें गोष्टीचें श्रेय क्वचितच मिळतें. तु०—मेहनती दिलगीर चोट्टे हुशार.

तगिरी——**(एखाद्याला) तगिरीचें वस्त्र देणें**—[तागिरी = बडतर्फी] कामावरून दूर करणें; बडतर्फ करणें; रजा देणें; निरोप देणें.

तजवीज——**तजविजीनें करणें**—(ऐति.) चातुर्यानें, कौशल्यानें कोणतेंहि काम करावें; जपून वागावें; आपला आब राखून व परिस्थितींचें योग्य आकलन करून स्वतःस इजा न पोंचेल अशा रीतीनें कार्य करीत असावें. 'तजाविजेनें सांभाळून काम करावें, जातीनिशीं जाया होऊं नये, सरदारीनें काम करावें.'—रा १.२४९.

तजा——**तजा उजरणें**—(चांभारी) जोड्यावरील सागळ व्यवस्थित कापणें.

तजा मोडणें—(चांभारी) सागळीस मोड पाडणें.

तट——**(एखादी गोष्ट) तटास लावणें**—तंट्यास कारण होणें; भांडणास निमित्त होणें; दुफळी माजण्यास कारण होणें; एखाद्या गोष्टीमुळें जिद्दीस पेटणें.

तटका——**तटका तुटणें-राहाणें**—थोडक्यांत आणि ताबडतोब (एखाद्या गोष्टीचा) शेवटचा निकाल लावणें; तंटा मिटविणें; कज्जा तोडून टाकणें; कलहाचा शेवट करणें. 'प्रपंच तटका तुटला । मार्ग फुटला ।'—दावि २०९.

तटका तोडणें-तोडून टाकणें—१ निक्षून, साफ, रोकडें उत्तर देणें; भीड मुरवत न धरितां स्पष्ट सांगणें. एक घाव दोन तुकडे करणें. २ भांडण मिटविणें; निकाल करणें; कलह संपविणें. ३ (एखाद्याचा) एकदम संबंध तोडणें; नातें तोडून टाकणें; मैत्री वगैरे तोडणें. 'मी तोडुनि आलों तटका। तो जिवा लागला चटका।'—मध्व २२०.

तंटा——**तंटा उचलणें**——भांडण उपस्थित करणें; तंटा लावणें; कलह सुरू करणें.

❀**तंटा तुटण्या अंतीं, दोघांची हानि होती**——एखादा कलह लागला असतां परिणामीं असें दिसून येतें कीं, त्यांत पडणाऱ्या दोन्ही पक्षांचें नुकसान होतें.

तंटा मिटवायाला गेला, आणि गव्हाची कणीक करून आला——भांडणाचा निकाल लावावयास जावें तों अधिकच हानि गळ्यांत येतें. गव्हाची कणीक करणें, पहा. दोन पक्षांमध्यें भांडण होतें; त्यांचें कांहीं देणें घेणें होतें. अखेरीस त्याचा असा निकाल लागला कीं, एकानें दुसऱ्यास कांहीं अमुक इतके गहूं द्यावे. पण तेवढ्यानें समाधान न होऊन तो पुन्हा तंटा सुरू करून न्यायाधिशाकडे गेला. न्यायाधिशानें असा निकाल दिला कीं, गहूं देण्याच्या ऐवजीं तेवढ्याच गव्हाची कणीक करून द्यावी. याप्रमाणें अधिकच त्रास गळ्यांत पडला.

तटाणी——**कोठें इंद्राचा ऐरावत, कोठें श्यामभटाची तटाणी**—दोन गोष्टींमधील अतिशय मोठा विरोध दाखवितांना योजतात. ऐरावत पहा.

तटी——**तटी कापणें**—(गो.) पळ काढणें.

तट्ट——**तट्ट देणें**—सोंगटीच्या डावांत दुसऱ्यावर डाव करणें; बिनतोड बाजू करणें.

तट्टी——**तट्टीस जाणें**—शौचास जाणें.

❀ **तटिये बागलाक पितळी बीग**—(गो.) तट्टीच्या दाराला चांगलें पितळेचें कुलूप लावल्यास त्याचा काय उपयोग ? योग्यतेप्रमाणें वागणूक पाहिजे.

तट्टू——**पंचहत्यारी तट्टू**—रोडकें, मरतुकडें घोडें. यास चालविण्याकरितां १ तोंड, २ हात, २ पाय अशीं ५ हत्यारें चालू करावीं लागतात. 'माझे तट्टू पण तट्टू ! पंचहत्यारी तट्टू !' (ग्राम्य कवित्व)

हरदासी तट्टू—ज्या घोड्याच्या मागच्या तंगड्या चालतांना एकमेकांस लागतात असें रोडकें अंगावर गोमाशा खेळत असलेलें तट्टू.

❀**भादव्यांत भद्दू, आश्विनांत तट्टू (पुष्ट होतात)**

—भाद्रपदांत श्राद्धीय जेवणें जेवून ब्राह्मण व आश्विनांतील हिरवें गवत खाऊन घोडे पुष्ट बनतात.

तट्टु माझा रतनघोस, मागें सरे-चाले कोस कोस—मागें सरण्याची आदत ज्या घोड्याला असते त्याला यांत उपरोधिकपणें रतनघोसाची उपमा दिली आहे. मागें मागें सरणारें खराब तट्टू असा अर्थ. —त्राटिक नाटक.

तट्टाला ढुमणी, तेजीला इशारत—जो उमदा जातीवंत घोडा असेल त्यास चालण्याकरितां नुसती खूण केली कीं पुरेशी असते; पण एखाद्या तट्टाला जलद चालवावयाचें असलें तर काठीनें मारावें लागतें. तु०—शहाण्यास शब्दाचा व मूर्खास टोणप्याचा मार. ' तेज्या इशारती। तट्टा फोकावरी घेती। '—तुगा ३७४८.

तड——तड घेणें—शेवटास नेणें; कडेस पोंचविणें; निकाल लावणें.

तडीचा पोहणार—(कांठाकांठानें पोहणारा) १ बेहिमती; धमक नसणारा. २ वरवर पाहणारा; काळजी करणारा.

तडकशीं——तडकशीं तोडणें-धरणें; तडकशा धरणें—जुलूम करणें; गांजणें; छळणें; तगादा लावणें.

तडका——तडका तोडणें—निकड, तगादा लावणें; ढुमणें लावणें.

तडकें——तडकें तुटलें, मडकें फुटलें—शिंकें तुटलें म्हणजे वरचें मडकेंहि खालीं पडून फुटतें.

तडतडा——पोटांत तडतड-डा तोडणें—कळवळा, कींव येणें; आंतडें तुटणें.

तढण——तढणीं लागणें—तडस लागणें; ताण बसणें; रग लागणें.

तण-न——तण-न खाई धन—(शेतांत) गवत फार वाढलें म्हणजे तें काढण्यास बराच खर्च येतो. शेतांत निकामी गवत, कुंदा, हरळी वगैरे फार माजली म्हणजे त्या ठिकाणीं पीक येत नाहींसें होतें व अशा रीतीनें हळूहळू शेत नापीक होतें. तणाचा विस्तार दुर्लक्ष झाल्यास सर्व शेत नापीक होतें. तणाचा विस्तार शेतास घातक होतो. यावरून एखाद्या क्षुल्लक गोष्टीकडे वेळींच लक्ष्य न दिल्यास ती पुढें डोईजड होते. One year's seeding, ten years' weeding.

तण लासून गोबोर—(गो.) गवत जाळलें तर राख मात्र व्हावयाची; त्याचे कांहीं कोळसे पडायाचे नाहींत.

तणा घराचानें उज्जानें खेळ नये—(गो.) ज्याचें घर गवतानें शाकारलेलें असेल त्यानें विस्तवाचे खेळ खेळूं नयेत. तसें केल्यास केव्हां घर पेट घेईल तें सांगतां येणार नाहीं. पाठभेद—कोलवा घराच्यानें०

तणग्या——तणग्या लावणें--ताणून देणें; खुशाल निजणें.

तणावा——तणावा तुटणें--तंबूच्या तणावा तुटल्यास तंबू खालीं बसतो. यावरून आधार, आश्रय नाहींसा होणें. ' कारभारी यांचे पेचामुळें आमचे दौलतेच्या तणावा तुटत चालल्या.'–ख १.९९.

तंत——तंतीं प्राण उरणें-लावणें--१ कंठीं प्राण येणें; आसन्नमरण असणें; अगदीं तंतुमय प्राण उरणें. (षष्ठ्यन्त कर्ता) २ (एखादी वस्तु) अतिशय जीर्ण होणें; केवळ तंतु उरणें.

तंतीं लागणें--सुरळीत चालणें; नीट वागणें. 'तूं लागसी आजिपासून तंतीं।'–सारुह ७.१०४.

तत्त्व——तत्त्वमसीशीं गांठ घालणें--[सर्व वेदांतांचें सार ' तत्त्वमसि' यांत आहे. लक्षणेनें तत्त्वमसि म्हणजे पैसा.] १ पैसा मिळविण्यावर लक्ष देणें; केवळ पैसा पाहणें. २ मुख्य महत्त्वाच्या गोष्टीकडे तेवढें लक्ष देणें; आपला लाभ पाहणें.

तत्र——तत्रशीं उभा न करणें-राहूं न देणें—(एखाद्यास) समोर, जवळपास उभें राहूं न देणें; उभा न करणें; जवळ फिरकूं न देणें; संबंध सोडणें.

तत्रशीं लागूं न देणें—(आपल्या कामाचा) कोणास मागमूस, पत्ता लागूं न देणें; थांग लागूं न देणें.

तन——तन देणें—शरीर समर्पण करणें; संकटाला तोंड देणें; पुढें पडणें; प्राण देणें; खर्चणें. ' इंग्रजांपाशीं तोफांचा मार फार; तेव्हां लोकांनीं तन न दिलें.'–ख १०२४.

तनमनधन—शरीर, आत्मा व संपत्ति (सर्वस्व). ' तनमनधन माझें राघवा रूप तूझें।'–राम करुणाष्टकें.

तन लागणें—एखाद्या विषयाकडे अंतःकरणवृत्ति, सर्वात्मना गुंतली जाणें; मन गुंतणें; ध्यान लागणें; ध्यास लागणें.

***तन गेलें, पण गेलें, आतां काय उरली बाकी ! तरुणपणचा मित्र विचारी, खुशाल आहेस का काकी !**--तारुण्य गेल्यावर तारुण्याचा उपभोक्ताहि आपली हेळसांड करतो.

तन गेलें मन गेलें, म्हातारपणीं न्हाण आलें,

सरमडाचें मखर केलें, तेंहि वाऱ्यानें उडून गेलें--सर्व आयुष्य फुकट गेलें, शरीर क्षीण होऊन गेलें, मनाचा उत्साह नाहींसा झाला, अशा स्थितींत कधीं न होणारी गोष्ट घडली व वृद्धपणीं रजोदर्शन झालें ! पण मखर घालावयास दुसरें कांहीं सांपडेना; म्हणून बाजरीच्या कडब्याचें मखर घातलें तों तेंहि वाऱ्यानें उडून गेलें !! एखादी गोष्ट नीट व्हावयाची नसली म्हणजे सर्व अडचणी येतात. तु०-नकटीच्या लग्नाला सतराशें विघ्नें.

तन मन धन, कर गुरूला अर्पण--मनुष्यानें सर्वस्वीं गुरूस शरण जावें. पूर्वी गुरुमहिमा फार असे.

तननं——आधीं अननं, मग तननं—आधीं पोटाची व्यवस्था व मग मौजेच्या गोष्टी. पोट भरल्याशिवाय दुसरी कोणतीहि गोष्ट करावयास सुचत नाहीं. तु०-आधीं पोटोबा मग विठोबा.

तनाई——तनाई-तनाय तुटणें; तनया तुटणें—(उप.) ताणे तुटणें; बंद तुटणें; वैदिक ब्राह्मण कर्कश तारस्वरानें वेदघोष करूं लागले असतां अथवा गवई घसा खरडून ताना घेत असतां उपरोधानें हा वाक्प्रचार योजतात. (ल.) (एखाद्याचा) आश्रयदाता नाहींसा होणें; आधार तुटणें. तणावा तुटणें पहा.

तनु——तनुचतुष्टय—देहाचे चार भेद : १ स्थूल, २ सूक्ष्म, ३ कारण, ४ महाकारण.

तप——तपीं बसणें—१ (अक्षरशः) धर्माचरणार्थ, पुण्यसंचयार्थ देहदंडयुक्त तप आचरणें; व्रत, नियम घेणें; कांहीं नेम धरणें. २ (ल.) अधिकारच्युत, बेकार होऊन घरीं बसणें

(करून करून) तपीं बसणें--एकसारखीं पापें करीत राहून त्यानंतर साधुवृत्तीचा आव आणणें.

तपें तपणें-तपश्चर्या करणें; खडतर व्रत, नियम इत्यादींचें पालन करणें. 'जे तीर्थ करितां भागले । अनंत जन्मीं तपें तपले ।'

❀ **तप केल्यास बळ, वृक्ष लावल्यास फळ**-तप केल्यानें अंगीं सामर्थ्य येतें व झाड लावल्यास फळाची प्राप्ति होते, वायां जात नाहीं.

तपेलें——तपेलें बुडणें—उपजीविकेचें साधन नाहींसें होणें.

❀ **तपलांतुलें व्हेल्यारि कपलांतुले व्हरद वे ?**—(गो.) तपेल्यांतलें अन्न नेलें म्हणून नशिबांतलें कोण हिरावून नेऊं शकेल !

तपेलिकी लांब दोरी, तपेलें सांभाळ पोरी !—मंगळा-गौर वगैरे जागविण्यासाठीं रात्रीं मुली जमून खेळत असतात व सामान्यतः कोणी निजत नाहीं; पण त्या मुलींपैकीं जर एखादी निजली तर तिला दोरीनें तपेलें वगैरे एखाद्या मोठ्या वस्तूशीं बांधून ठेवून 'तपेलिकी लांब दोरी, तपेलें संभाळ पोरी' याप्रमाणें ओरड करून तीस जागें करतात. यावरून निजूं न देणें.

तप्त——तप्तदिव्य करणें-पूर्वी खोटा खऱ्याचा निवाडा करण्यासाठीं आरोपीला उकळत्या तेलांतील एखादा पदार्थ (रवा) काढण्यास सांगत. हें दिव्य करणें म्हणजे भयंकर शिक्षा भोगण्यास प्रवृत्त होण्यासारखें असे. यावरून, सत्यासाठीं वाटेल तें करण्यास तयार असणें.

तबा——तबा होणें—(ना.) नाश होणें.

तंबाखू; तमाखू—तंबाखू ओढणें—विडी, चिलीम वगैरे मध्यें तंबाखू घालून पेटवून त्याचा धूर ओढणें; धूम्रपान करणें; विड्या ओढण; फुंकणे. 'तंबाखु वोढित प्रतिदिनीं।'-सप्र २.३९.

❀ **तंबाखू दीयते दानं, बटवादानं विशेषतः ।**—एखाद्या तंबाखू ओढणारास अगर खाणारास तंबाखू देणें ही फार चांगली गोष्ट आहे. तथापि पानें, सुपाऱ्या, कात, चुना वगैरे तंबाखूसह घाललेला एखादा मोठासा बटवा दिला तर तें विशेष चांगलें. तंबाखू खाणाऱ्याची म्हण दिसते.

तमाखूकी निंदा करे होय इसका सत्यानाश—जो मनुष्य तंबाखूला नांवें ठेवतो त्याचा सत्यानाश होईल. तमाखूचा पक्षपाती थट्टेनें म्हणतो.

तबियत——तबियत लागणें--(एखाद्या गोष्टीकडे) मनाचा कल लागणें; मर्जी असणें; मन रमणें; प्रवृत्ति होणें; आवडणें.

तबियतीनें चालणें-वागणें-असणें—(एखाद्याच्या) मर्जीप्रमाणें वागणें, चालणें, असणें; कलानें घेणें; तंत्रानें चालणें.

तबियतीनें चालविणें-वागविणें-घेणें-वापरणें—(एकाद्या मनुष्याच्या, वस्तूच्या) प्रकृतिमान, मगदूर इकडे लक्ष्य देऊन वागविणें, वापरणें इ.; जपून वागविणें; काळजी घेणें.

तंबी——तंबी देणें-भरणें-धमकी देणें; धाक घालणें.

तंबी होणें—जेर होणें; तंग होणें; ताण बसणें; गळचेपी होणें. 'अवघ्यांचें एकदिलानें मुखलिफाची तंबी व्हावी.' -पया ४७२.

तंबू——तंबू ताणून निजणें—तंबूतल्याप्रमाणें किंवा

अंगाचा तंबू करून स्वस्थ झोपणें; संसार इ.ची काळजी सोडून निजणें, झोंप घेणें; निश्चिंतपणें झोंप घेणें.

तमतम——तमतम पूजा—(कर्ना.) आपल्यापुरती तजवीज, व्यवस्था (करणें.)

तमा——तमातमानें —तावातावानें; रागारागानें. ' तिनें तमातमानें साबू लावून धोतराचे हळदीचे डाग धुऊन काढले !'-पाणकळा ३५.

तमाचा——तमाचा मारे मुह लाल रखते है— तोंडांत चपराक मारल्यास तोंड लाल होतें. मारण्याची आठ वण कधीं बुजत नाहीं.

तमाशा——तमाशा दाखविणें—(ल.) चोप देणें; चोपणें; बडविणें; मारणें. 'बऱ्या बोलानें हें काम कर, नाहीं-तर तुला तमाशा दाखवीन.'

तमाशा पाहणें—दुसऱ्याचा नाश होत असतां, दुरून पाहणें; दुसऱ्याच्या अडचणीकडे पाहून गंमत वाटणें; अड चणीची जाणीव न होतां रमत गमत दिवस घालविणें ' आपलाच आपण नाश करून घ्यावा असें ज्याचे चित्तांत असेल त्याचे मनांत तमाशा पहावा असें येईल. '-पया २१२

तयार——तयार ठेवी चरकी चाती, कापूस देणें ईश्वरा हातीं—मनुष्यानें सूत कातण्याकरितां खूप चरखे आणि चात्या तयार करून ठेवल्या तरी कापूसच जर न पिकला तर तो काय करणार आणि कापूस पिकणें तर ईश्वराच्या स्वाधीन आहे. मानवानें कितीहि खटपट केली तरी ईश्वरी साहाय्यावांचून त्याच्या हातून कोणतीहि कृति घडू शकत नाहीं. तथापि मनुष्यानें आपलें कर्तव्य तें करून सोडावें.-सवि ११५२.

तर——तरपार करणें—[तर=मर्यादा, हद्द] हद्द पार करणें; बाहेर घालविणें.

तर——तरीपार करणें—[तर=तरी] नदीपलीकडे खाडीवरून, समुद्रावरून, समुद्रांतून होडी इ. नीं पलीकडे नेणें, पोहोंचविणें.

तरंग——तरंग उठणें—पाण्यांत लाटा उत्पन्न होऊन पाणी वरखालीं होतें त्याप्रमाणें परिस्थितींत बदल वरचेवर होत जाणें; चांगले वाईट दिवस येणें; आयुष्यांत चढउता राचे प्रसंग येणें. 'हें राजकारण आहे. असे तरंग किती उठतील. दिल विकल्यास पुढें कसें कराल ? '-हब ५५.

तरड——तरडी पेटणें-लावणें—रागावणें;संतापणें.

तरण——नवरा रडतो तरणास आणि वऱ्हाडी रडतात वरणास--[तरण=वरणाची डाळ शिजवून काढलेलें पाणी] जेथें जांवयास सुद्धां तरणासाठीं हट्ट घ्यावा लागतो तेथें वऱ्हाडी मंडळींना वरण कोठून मिळणार ? मुख्य माणसाची सुद्धां जेथें बरदास्त नाहीं तेथें इतरांस कोण विचारतो ? तुलना-जावई रडे अळणास आणि व्याही रडे कळणास.

तरणा; तरुण——तरणा पडला धरणीं आणि म्हातारी बनली हरणी--म्हातारीचा तरणाताठा मुलगा तो शरपंजरीं पडला आहे, पण या म्हातारीला तरुणपणाचें बळ आलें आहे पहा ! तरुण माणसें दुबळीं व वृद्ध माणसें चपळ दिसलीं म्हणजे म्हणतात.

तरुण फार मरतात, नंतर म्हातारे जातात—वृद्ध मनुष्य असतात ते नेहमीं म्हणतात कीं तरुण लोक फार मरतात; कारण त्यांच्या डोळ्यादेखत बरेच लोक मेलेले त्यांस दिसतात; पण ते वृद्ध गृहस्थहि पुढें मरण पावतातच. मरण कोणास चुकत नाहीं. थोडें आगेंमागें एवढेंच कायतें.

तरुण वकील, वृद्ध वैद्य—वकील करावयाचा झाल्यास तरुण तरतरीत करावा; कारण तारुण्यांत बुद्धि कुशाग्र असते. पण वैद्याचें औषध घ्यावयाचें असल्यास वृद्ध वैद्याकडे जावें; कारण त्यास अनुभव अधिक असतो.

तरणेपणीं हालेहुले, म्हातारपणीं शेंडो फुटे—तरुणपणांत रंगढंग करावयाचे व म्हातारपणीं अगदीं कोठच्या गांवचे नाहींत असें आचरण ठेवावयाचें. तु०-वृद्धा नारी पतिव्रता.

म्हाताऱ्यानें केलें नांव, तरण्यानें वाहविलें गांव— १ कर्तृत्ववान् बापाची प्रजा कधीं कधीं नादान निघते या गोष्टीस अनुलक्षून ही म्हण आहे. २ पुनर्वसु व पुष्य नक्षत्रांच्या पावसास उद्देशून ही म्हण आहे ! [तरणा पाऊस = पुष्याचा पाऊस. म्हातारा पाऊस = पुनर्वसूचा पाऊस.]

तरुणाचे कोळसे, म्हाताऱ्याला बाळसें—तरुण मनुष्याला मृत्यु येतो व म्हाताऱ्याला अधिक अधिक बाळसें चढत असतें.

तरणी; तरुणी——तरणी जान, तिचें खाण्यावर ध्यान—(वांय.) तरुण स्त्रीचें लक्ष साहाजिकच खाण्यापिण्यावर असावयाचें. तु०-लेक होईल तों खाऊन घ्यावें, सून येईल तों लेवून घ्यावें.

तरणी पांढरे नि वृद्धा काळे केंस उपटी—एका वृद्ध

माणसाला दोन बायका होत्या. एक तरणी व दुसरी म्हातारी. पहिली नवरा तरणा दिसावा म्हणून पांढरे केंस उपटी व दुसरी आपल्याजोगता दिसावा म्हणून काळे केंस उपटी. या दोहोंच्या केंस उपटण्यामुळें त्याच्या डोक्याचें साफ टक्कल झालें ! दोन आपत्तींमध्यें सांपडलेला.

तरणी बाईल पोटांतु जाळ–(गो.) वृद्धाला तरणीसाठीं बायको म्हणजे सदैव चिंतेचा विषय. वृद्धस्य तरुणी विषम् ।

तरणीचे गाल आणि म्हातारीचे हाल—१ तरुण स्त्रीचे गाल ज्याप्रमाणें वर आल्याशिवाय राहात नाहींत, त्याप्रमाणें म्हातारीचे हाल दृष्टीस पडल्यावांचून राहात नाहींत. ['म्हातारीचे बाल' असाहि पाठभेद असावा. त्यापक्षीं म्हातारीचे केंस पांढरे झाल्यावांचून किंवा दिसल्यावांचून राहात नाहींत.] २ तरुणीच्या सौंदर्याचें कौतुक होतें व म्हातारीकडे लक्ष जात नाहीं. एखाद्यास दोन बायका असल्या म्हणजे तरुण बायकोच्या गालांचें तो चुंबन घेण्यास उत्सुक असतो व म्हातारीकडे ढुंकूनहि पाहात नाहीं; त्यामुळें तिचे हाल होतात.–मॅन १३२१.

तरुणपण——**तरुणपणीं जो व्यासंगी, तो म्हातारपणीं सुखासंगी**—जो मनुष्य तारुण्यांत कष्ट करून द्रव्य मिळवून ठेवतो, त्याला वृद्धपणीं सुखांत दिवस काढतां येतात.

तरुणपणीं नम्र होशी, वृद्धपणीं मान घेशी—जो मनुष्य तारुण्यामध्यें नम्रतेनें वागतो त्याला वृद्धपणीं सर्व लोक मान देतात; कारण तारुण्यांत त्यानें कोणास दुखवलेलें नसतें.

तरुणपणीं बाईल मेली, नवरा अश्रु ढाळी—तारुण्यांत पत्नी मेली असतां फार दुःख होतें. यौवने च मृता भार्या पातकं किमतःपरम् ।

तरुणपणीं बुद्धि, म्हातारपणीं शक्ति, याचें नांव चांगली स्थिति--तारुण्यांत बुद्धि चांगली तीव्र असणें व वृद्धपणीं सर्व गात्रें शाबूत असलीं म्हणजे आयुष्य सुखांत जातें. यापरतें अधिक भाग्य कोणतें ?

तरुणपणीं रक्षावें, म्हातारपणीं खर्चावें—तरुणपणीं राखलें म्हणजे धनसंचय केला असतां तो वृद्धपणीं कामास येतो.

तरुणपणीं राग येतो इतका वृद्धपणीं नसतो, चाळवून आला असतां नाहीं होत कमता—मनुष्य तारुण्यांत जितका रागीट असतो तितका वृद्धपणीं नसतो; कारण त्यावेळीं त्याचा जोम व रग बरीच कमी झालेली असते; पण त्यास मुद्दाम राग आणला तर मात्र मग तो त्यास अनावर होतो. –सवि २५८१.

तरुणपणीं लाज, म्हातारपणीं खाज--कांहीं गोष्टी ज्या तारुण्यांत करावयाच्या त्या त्या वेळीं करण्यास लाज वाटते, पण वृद्धपणीं विशेष कराव्याशा वाटतात. अशा विसंगत वृत्तीचीं कांहीं माणसें असतात, त्यांस उद्देशून ही म्हण वापरतात.

तरुणपणीं शिंदळकी, म्हातारपणीं कुंटणकी—जी स्त्री तरुणपणीं व्यभिचारी असते ती म्हातारपणीं स्वतः व्यभिचार करतां न आला, तरी कुंटणगिरी करून इतर स्त्रियांस वाईट मार्गास लावते.

तरणें——**तरतें कूळ**--कर्ज दिलें असतां बुडविणार नाहीं असें कूळ; विश्वासाचें, खात्रीचें कूळ.

तरतें बुडतें पाहाणें--नफानुकसान काय आहे याचा विचार करणें.

तरतरा——**राऊत असे खरमरा, तर घोडा चाले तरतरा**--घोड्यावर बसणारा खंबीर असेल तरच घोडा जलद चालतो. घोडा मांडी ओळखतो. काम करून घेणारा खरमरीत असल्यास काम करणारा (गडी) चपळाईनें काम करतो.

तरमुंडी——**तरमुंडी देणें**--तुटून पडणें. 'भीष्म म्हणे भीम धरा याचि तुम्ही सर्व वीर तरमुंडी।'-मोभीष्म५.४३.

तर(ल)वार——**लोंबती तरवार**—डोक्यावर नेहमीं तरवार लोंबत असली म्हणजे तिच्या भयानें मनुष्य सावधगिरीनें राहतो; यावरून भीतीचें कारण; भीतीची जाणीव. 'जमिनीचा मालक आपणास केव्हां जमिनींतून काढून लावील या भितीची लोंबती तरवार असली म्हणजे जमिनीस कष्ट काम चांगलें होतें.'

तर(ल)वार उपसून येणें—चालून येणें; युद्धास, भांडणास सिद्ध होणें; अंगावर येणें; हल्ला करणें.

तरवार करणें—पराक्रम करणें; तरवार गाजविणें. 'घोडे चालवून तरवारा केल्या. लोक रणास फार आले.' मराचिशिच २४.

तर(ल)वार गाजविणें–मारणें—(युद्ध इ.कांत) पराक्रम दाखविणें; शूरपणाचें कृत्य करणें; शौर्यानें लढणें; युद्धांत चांगली कामगिरी करणें.

(वर) तलवार धरणें—मारामारी, उपद्रव, दंगा

करणें. 'गांवखेड्यावर तरवार धरावयाची नाहीं याजप्रो त्याजकडील बोलणीं जहलीं.'—बापूगोप २५.

तर(ल)वारी धारेवर वागविणें-धरणें-चालविणें—(एखाद्यास) कडक शिस्तीखालीं ठेवणें; जरबेंत ठेवणें; धाकांत ठेवणें; बंदोबस्तांत ठेवणें.

तरवारीचे वनीं चालणें—धारेवर धरल्याप्रमाणें वागणें; अगदीं बिकट परिस्थितींत काम करणें; धोक्याचें काम पतकरणें. 'तरवारीचे वनीं चालणें तशी राजसेवा दुर्घट.'

***तरवार पाजलि पाजलि, घरच्या म्हातारिये कुर्टारी घाल्ली**—(गो) तलवार पाजळायची, पाजळायची आणि घरच्या म्हातारीच्या कमरेवर वार करावयाचा! कुटुंबाचा पालक म्हणून घरच्या माणसांना छळणें यांत शौर्य नाहींच, उलट तो भ्याडपणा आहे.

तरवार पाजविली, आणि घरच्या म्हातारीवर गाजविली—गरीब मनुष्यावर, दुबळ्या माणसावर आपली सत्ता चालविणें; आपल्या शक्तीचा उपयोग निराधार मनुष्यास त्रास देण्याकडे करणें.

तरवार मारल्याची, विद्या केल्याची—ज्याच्या अंगांत पराक्रम आहे त्याला शस्त्रांचा उपयोग होतो; तसेंच ज्याच्या अंगीं करामत आहे, ज्यास बुद्धि आहे तो विद्येचा उपयोग करूं शकतो. इतरांस त्यांचेपासून कांहीं फायदा होत नाहीं.

तरवारिच्या धारेपुढें राव येत, पोण जिभेपुढें राव न जो—(गो.) तरवारीच्या धारेपुढें राहातां येईल पण बोलणाराची जीभ एकदां सैल सुटली कीं तिच्यापुढें राहाणें कठीण होतें.

तरसाद——तरसाद बाबुडणें—[तरसाद = (गो.) एक तरवार] तरवार फिरविणें.

तरळ——तरळ होणें—(व.) अजीर्णामुळें जुलाब होणें; मोडशी होणें. 'हिंवज्वर आणि तरळा। ओकिती वऱ्हाडिणी सकळां।'—ह २४.१११.

तर्क——तर्क धरगे म्हातारे, घर घेतलें मेल्यानें—एका म्हातारीजवळ बरेंच द्रव्य होतें. तें तिनें घरांत बरेंच ठिकाणीं पुरून ठेविलें होतें. घरांत फक्त म्हातारी आणि तिची सून होती. एका रात्रीं घरांत चोर शिरून त्यांनीं एका ठिकाणचें द्रव्य उकरून काढलें. म्हातारी जागी होती ती त्यांस म्हणते, 'अरे अमक्या ठिकाणचें द्रव्य घेतलेंस, आतां अमक्या ठिकाणचें तरी घेऊं नकोस.' त्यानें तेथलेंहि द्रव्य घेतलें. असा क्रम एकामागून एक चालला. सून दुसऱ्या खोलींत निजली होती, पण जागी होती. तिनें म्हातारीचा भोळेपणा पाहून म्हटलें, 'तर्क धरगे म्हातारे! घर घेतलें मेल्यानें.' यावरून अत्यंत भोळेपणा.

तर्र——तर्रबत्तर बोलणें—बडबडणें; विसंगत बोलणें.

तऱ्हा——तऱ्हतऱ्हा करणें—१ मनस्वी चेष्टा, चाळे, ढंग करणें. २ (कर्माची षष्ठी) (एखाद्यास) अनेक प्रकारांनीं छळणें; त्रास देणें; (एखाद्याची) कुचेष्टा करणें.

तऱ्हा देणें—निराळा प्रकार, युक्ति करणें; विलक्षण कृत्य करणें. "'सरदार जोरावर, तेव्हां याशीं बिघडलें तर राज्याचा नाश होतो. चांगले नव्हे. आपणच सर्व गोष्टीस तऱ्हा द्यावी ही गोष्ट चांगली.' अशी मसलत करून नानांनीं आपले ठिकाणीं महायात्रेस जाण्याची तयारी केली."—पेब १२८.

तऱ्हेस जाणें—विक्षिप्त, चमत्कारिक बनणें; स्वैरपणानें, विलक्षण रीतीनें, स्वतःच्या लहरीनें वागणें; तऱ्हेवाईक वर्तणूक करणें.

तऱ्हेस-तऱ्हे देणें—(एखाद्यास) बेफामपणानें, उच्छृंखलपणानें, वागण्यास प्रवृत्त करणें.

तऱ्हेस-तऱ्हीं भरणें; तऱ्हेस पेटणें—भलत्याच गोष्टीच्या नादीं लागणें; हट्टास पेटणें; हट्टाची लहर येणें. 'तऱ्हे भरोंच नये! सुचावे नाना उपाये।'—दा ११.५.११ 'हें पोर एकदां तऱ्हीं भरलें म्हणजे कोणाचें ऐकत नाहीं.'

तलफ(ब)——तलफ(ब) चढणें—पगार तुंबणें; पगाराची बाकी राहणें. 'त्या समयीं आरबांची तलफ चढली होती. ती सरकारनें तलफ दिली.'—पेब ११७.

तलाव——तलावपर जाना, और पियासे आना—तळ्यावर जाऊन तान्हेलें परत येणें. समुद्रांत जाऊन कोरडा तो कोरडा.

तलावा——तलाव्यास जाणें—शत्रूच्या माऱ्याच्या जागा वगैरे पाहाण्याकरितां जाणें; टेहळणी करणें. 'पहिले दिवशीं सरकारची खडी फौज तलाव्यास गेली.'—भारतवर्ष ऐपया २७.

तवई——तवई पुरवते, अवई पुरवत नाहीं—अवई पहा.

तवईपेक्षां अवई कठिण—अवई पहा.

तवकल——तवकल तवाला, खुदापर हवाला—ईश्वरावर हवाला ठेवून कोणतीहि गोष्ट करणें.

तवसें——एक हात तवसें, नऊ हात बी—एक हात काकडी व नऊ हात बी; अवाच्या सव्वा मारलेली थाप.

तु०-सात हात लांकूड नऊ हात ढलपी. सांगोसांगी वडाला वांगीं.

तवा——तवा तगारी, दोमण ज्वारी—तवा आणि परात आहे तों दोन मण जोंधळ्याच्या भाकरी कां नाहीं भाजतां येणार ? (!)

तवा तापला आहे तर भाकरी भाजून घ्या; (गो.) तवो तापिल्या वेळारि रोटि भाजून घेवंका—तवा तापलेला आहे तोंच भाकरी भाजून घ्यावी. योग्य समय आला आहे तोंच आपलें कार्य साधून घ्यावें. दिरंगाई केली कीं फसलें.

तवेकी तेरी, हाथकी मेरी—तव्यावरची (भाकरी) तुझी, हातांतली माझी. आपल्या जवळचें तें आपलें. तव्यावरील रोटी जेव्हां तयार होईल तेव्हां ती तुझी, तूं ती घे पण तयार होऊन हातीं आली ती रोटी माझी. ज्याचा भयंकर उतावळा स्वभाव त्याला ही म्हण लागू आहे.

तस्करी——मस्करी करतां तस्करी होते—एखादी गोष्ट आपण थट्टेनें लपवून ठेवली तर पुढें चोरीचा आळ येण्याचा संभव असतो. किंवा एखाद्यानें थट्टेनें लपविलेली गोष्ट पुढें विस्मरणानें तशीच राहिल्यास परत न देण्याची बुद्धि होते. थट्टेनें चोरून ठेवलेला जिन्नस पुढें चोरीचा जिन्नस होतो.

तह——तह कबूल, तपशील नाकबूल—समेट करावा हें कबूल पण त्याच्या अटी मात्र अमान्य. तत्त्व कबूल पण तपशील नाकबूल.

तहान——तहान घालविणें-मोडणें—तहान शांत करणें; तृषा शमन करणें; तहान भागवणें.

तहान लागल्यावर विहीर खोदणें-खणणें—अगदीं ऐनवेळीं तरतूद करण्यास लागणें. यामुळें गरज भागण्यास फार उशीर होतो. आयत्या वेळीं जरूरीची वस्तु शोधणें; संकट गुदरण्यापूर्वी त्याचा उपाय शोधून न ठेवून आयत्या वेळी धांवाधांव करणें. तु०-प्रोद्दीप्ते भवने तु कूपखननं प्रत्युद्यमः कीदृशः ।

तहान लाडू भूक लाडू—तात्पुरती भूक व तहान शमविण्यासाठीं फराळाचे जिन्नस. 'त्या वीरमातेनें दोघांस जवळ बसवून पाठीवर हात फिरवून त्यांच्या हातीं तहान० दिले.' —बाजीराव. 'तिनें आपल्या मुलास तहान लाडू भूक लाडू करून दिले.' —लोक २.५०.

***तहान लागल्यास मूत प्याला, तो भूक लागल्यास विष्टा खाईल**—जो एक अनिष्ट गोष्ट करतो तो दुसरीहि तीपेक्षां वाईट गोष्ट करण्यास मागें पुढें पाहात नाहीं, किंवा ती करण्याचा संभव असतो.

तळ——तळ करणें—मुक्काम करून राहाणें; डेरा देणें; बिऱ्हाड लावणें; पेणें करणें; तात्पुरतें राहणें.

तळ घालून बसणें—१ (एखाद्या ठिकाणीं) कायम वस्तीच्या इराद्यानें राहाणें, उतरणें; आसन, ठाण मांडणें. २ दुसऱ्याचा पैसा गिळंकृत करून, लुबाडून बेदरकारपणें स्वस्थ आणि निर्धास्त राहाणें; तळ मारणें.

तळ झाडणें—१ (ल.) मुळावरच घाव घालणें; समूळ नाश करणें. २ ज्याप्रमाणें सैन्याचा वगैरे तळ हालला म्हणजे तेथें राहिलेल्या झाडून साऱ्या वस्तू कोणी तरी घेऊन जाऊन जागा साफ करतात त्याप्रमाणें; किंवा भांड्यांतील जिन्नस किंवा कणगींतील दाणे संपले म्हणजे तळ झाडून साफ करतात त्याप्रमाणें. सर्व सामग्री, बेगमी खाऊन फस्त करणें.

तळ थांबणें—(एखाद्याचें) आसन स्थिरावणें; जन्माची सोय लावणें; थाऱ्यास, ठिकाणीं लागणें.

तळ देणें-ठोकणें—मुक्काम करणें; ठाणें ठोकणें; हातपाय पसरणें.

तळ न थांबणें—स्थिर न राहणें; सारखें फिरत राहणें; एखाद्याच्या पायाला भोंवरा पडणें; बूड स्थिर नसणें; भटकभोंवरी करणें.

तळ मारणें—तळ घालून बसणें; तळ देणें.

तळ लागणें-पडणें—(कर्माची षष्ठी) (सामग्री, बेगमी इ.) जवळ जवळ फस्त होणें; संपण्याच्या बेतांत येणें; सांठ्याच्या बुडाशीं जाणें; सांठा खलास होणें.

तळची-तळपायाची आग मस्तकास जाणें—(कर्त्याची षष्ठी) रागानें नखशिखांत संतप्त होणें; अतिशय राग येणें. 'कारटा असा द्वाड निघाला म्हणून शिवाजी महाराजांच्या तळव्याची आग मस्तकाला गेली.' —संभाजी.

तळचें मडकें हाणणें-फोडणें—मडक्याच्या उतरंडींतील सर्वांत खालचें मडकें फोडणें. (ल.) मुळावर घाव घालणें; समूळ नाश करणें; आश्रय, आधार काढून घेणें.

तळावर बसणें-राहणें—१ विपन्नावस्थेस येणें; अवदशेस येणें; अकिंचन होणें. २ (ल.) घरीं बसणें; समाइकीच्या वांटणींतील भागास मुकणें (चोर, लुटारू, यांच्यापैकीं घरीं बसणाऱ्यास लुटीचा कांहींहि भाग देत नसत. त्यावरून). ३ धंद्याच्या ठिकाणीं, नेहमींच्या जागीं असणें.

तळावर बसविणें—एखाद्यास समाईक वांटणींतील भाग न देणें; त्याच्या कपाळीं वाटण्याच्या अक्षता लावणें.

❀ **तळ काढी कळ**—(बायकांत रुढ) [तळ=तळहाताला कंड सुटणें. कळ=भांडण] तळहाताला कंड सुटूं लागली कीं भांडण उपस्थित व्हावयाचेंच, अशी समजूत.

तळाशीं पोहोंचल्याशिवाय वर बुडबुडे येत नाहींत—एखादी वस्तु विहीरींत पडली असतां ती तळाशीं पोंचली म्हणजे मग वर बुडबुडे आलेले दिसूं लागतात. यावरून एखादी क्रिया पूर्ण घडल्यानंतर तिचे परिणाम दिसूं लागतात तु०-यत्र धूमः तत्र वन्हिः। पिकल्यावांचून विकत नाहीं.

तळीं भोंक, वर झांकण—एखाद्या भांड्यांत एखादा पदार्थ ठेवावयाचा असला व त्याच्या तळास जर भोंक असल तर तो जाऊं नये म्हणून वर झांकण ठेवण्याचा काय उपयोग. तो तळांतूनच निघून जाईल. तेव्हां दोष एकीकडे आणि उपाय भलतीकडे करून कांहीं उपयोग नाहीं. तळचें भोंक प्रथम बुजविलें पाहिजे व मग पाहिजे तर झांकण ठेवावें. वरवर उपाय करून कांहीं उपयोग नाहीं. दोष मूळांतूनच काढून टाकला पाहिजे.

तळघर——**तळघरचें धन माजघरांत आलें**—एखादी गुप्त ठेवलेली गोष्ट उघडकीस आली म्हणजे म्हणतात.

तळती——**खरचणाराचें खरचतें, मग काय गेलें तळतीचें, काय गेलें वळतीचें ?**—मालक जर खर्च करावयास तयार असला व वाटेल तेवढा पदार्थ करण्यास सिद्ध असला तर तो करणाऱ्यानें कुरकुर कशास करावी. तुलना-खर्चणाऱ्याचें खरचतें व कोठवळ्याचें पोट दुखतें. खर्चणें पहा.

तळपट——**तळपट उडविणें**—साफ नायनाट करणें; समूळ उध्वस्त करणें.

तळपट वाजणें—१ दिवाळें निघणें, वाजणें. २नाश होणें.

तळपट होणें—सत्यानाश होणें; वाटोळें होणें. 'म्हणति आदित्यादि सत्या त्या मेल्याचें समूळ तळपट हो ॥'-मोसभा ५.८७.-मोविराट ६.७८.

तळवा——**तळव्याची आग मस्तकास जाणें**—अतिशय राग येणें; रागानें अंगाची लाहीलाही होणें. 'हें ऐकतांच मल्हारराव याचे तळव्याची आग मस्तकास जाऊन क्षणभर दंग झाला. '-भाव ८;२१.

❀**तळव्यास लोणी आणि नेत्रास (मस्तकास) थंडी**-तळपायास लोणी लावलें असतां डोळ्यांची होणारी आग शांत होते किंवा डोकें थंड होतें. एका ठिकाणीं उपाय केला असतां गुण दुसरीकडेच येणें. एका ठिकाणीं कार्य केलें असतां त्याचा परिणाम दुसरीकडे दिसून येणें.

तळहात——**तळहाताच्या फोडासारखें वागविणें**-तळहाताच्या फोडाला ज्याप्रमाणें आपण फार हळुवारपणें वागवितों त्याप्रमाणें फार जपणें, काळजी घेणें. तु०-उत्तर म्हणे, नको गे पायां पडतों बृहन्नडे सोड। जोड दिली, दुखवुं नको, केवळ पितृकरतलस्थ हा फोड ॥-मोविराट २३.७४.

तळहातावर-मनगटावर-कपाळावर केंस येणें—ज्या शरीराच्या भागाचा उपयोग करावा लागत नाहीं त्या भागावर केंस उगवतात. यावरून निष्क्रिय असणें; दुबळें होणें; नालायक असणें.

तळहातावर मेखा सोसणार—अतिशय कष्ट, हाल, वेदना सोसणार.

तळहातावर शीर घेणें—जिवाची पर्वा न बाळगतां कार्याला उद्युक्त होणें.

तळहातास केंस उगवणें-येणें—असमर्थ होणें. बहुधा निषेधार्थी प्रयोग. 'माझे तळहातास कांहीं केस आले नाहींत. '-इब ५.

❀ **तळहातानें चंद्र सूर्य झांकत नाहीं**—अल्प साधनांनीं मोठीं कार्यें घडून येत नाहींत.

तळी——(**एखाद्याची**) **तळी उचलणें**—१ सर्वांनीं कट करून (एखाद्यास) हांकून लावणें, पदच्युत करणें. २ सर्वांनीं मिळून एखाद्याचा उपहास, थट्टा आरंभणें.

(**एखाद्या कार्याची**) **तळी उचलणें-भरणें**—खंडोबाची तळी अनेक जण हात लावून उचलतात, भरतात यावरून. एखादें कार्य करण्यास सर्वांनीं हातभार लावणें; सर्वांनीं मिळून एकजुटीनें एखादें कार्य सिद्धीस नेणें. 'कशी उचलली तळी मिळाले ते बाराभाई।'-ऐपो ४११.

तळी भरणें—१ नारळ, विडा, खारीक, भंडार इ. वस्तूंनीं तळी (उचलण्याकरितां) सिद्ध करणें. २ (कार्याची षष्ठी) (एखाद्या दरिद्री मनुष्यास) अवश्य वस्तू, पैसा इ. पुरवून मदत करणें. -गांगा २६२. ३ तळी उचलणें पहा.

तळीराम——**तळीराम गार करणें-होणें**—१ आपणास इष्ट तें साध्य करून स्वस्थ बसणें; उपभोग्य वस्तूचा उपभोग घेऊन स्वतःची इच्छा तृप्त करून स्वस्थ बसणें; ढेकर देणें. २ जवळ पुष्कळशी संपत्ति असल्यामुळें स्वस्थ बसणें.

'त्यांनीं आपल्या स्वतःचा ताळिराम गार केला असला तर त्यांत कांहीं नवल नाहीं.'–V. S. २.६१.

तळुव——तळुत्र विस्मरुनु तेल दवरप; ताळू विसरून तेल घालप—(गो.) ताळू सोडून डोक्याला तेल लावणें. प्रथम तेल लावतांना टाळूवर तेल ओततात व मग इतरकडे लावतात. आपल्या ज्ञातीविरुद्ध जाणाऱ्या माणसाबद्दल ही म्हण वापरतात.

तळें——तळें खणून पाणी पाजलें—अतिशय कष्ट करून एखादी गोष्ट साध्य करणें.

तळें राखतलो उदकाक मरना—(गो.) तळें राखणारा पाण्यावांचून मरत नाहीं. आपत्कालासाठीं तरतूद करणारा सुखी असतो. तळें राखील तो पाणी चाखील. ज्याला तळ्याच्या रखवालीची कामगिरी मिळाली आहे, त्याला पाण्याची उणीव नसते.

तळें राखतलो उदाक पितलो—(गो.) तळें राखील तो पाणी चाखील. जो श्रम करतो तो त्यांत थोडाबहुत आपला स्वार्थ साधणारच. पुढें पहा.

तळें राखील तो पाणी चाखील--सोंपविलेल्या कामापासून, राखावयास दिलेल्या वस्तूपासून मनुष्य आपला थोडाबहुत फायदा करून घेतोच.–V. S. २.६१.

तळियेंत नासिल्लें पाटांत खंयचें ?--तळ्यांतच पाणी नसलें तर तें पाटांत कुठून येणार ? आडांत नसेल तर पोहऱ्यांत कोठून येईल.

तळयां बुडिलो शेळया थाइ धरता—(गो.) तळ्यांत बुडलेला शेवाळ्याचाहि आधार धरतो. बुडत्याला काडीचा आधार.

तळयासुत्त भोंवनु, परतूनु आयलो तान्नेवनु--(गो.) तळ्याभोंवतीं फिरून पाणी पिऊन तहान न भागवतां परत येणें. पाण्यांत राहून कोरडा.

तळ्याच्या आशेनें ढोंकें मरायचीं---ढोंक नांवाचा एक पक्षी आहे तो तळ्याच्या आसपास राहतो व मासे खाऊन उपजीविका करतो. तो एकदां चालावयास लागला असतां आतां तळें येईल मग तळें येईल असें करतां करतां चालून चालून श्रमानें व निराशेनें मरण पावतो. त्यावरून शेवटपर्यंत आशा करीत राहून शेवटीं निराश होऊन मरणाची पाळी येणें.

तळ्याच्या आशेनें सुसर मेली—वरप्रमाणेंच. तळ्यास पोंचण्याकरितां सुसर निघाली ती तळ्यास न पोंचतांच वाटेंत मेली. यावरून फलनिष्पत्ति न झाल्यामुळें अखेरीस निराश होऊन मरणें.

तळ्याच्या कांठीं गळ टाकला, उद्योगाविण वायां गेला—तळ्यामध्यें गळ टाकण्याऐवजीं जर बाहेर टाकला तर त्यांत मासा कसा येणार. जवळ साधनें असलीं तरी त्यांचा योग्य उपयोग केला नाहीं तर कांहीं साध्य होत नाहीं.

तळेगांव——तळेगांवचा माळी, आठ दिसांची पाळी—कोणतीहि गोष्ट दूर असली म्हणजे ती सहजसाध्य नसते व त्यामुळें नुकसान पोंचतें.

ता——ता म्हणतां ताकभात समजणें—'ता' हें अक्षर उच्चारल्याबरोबर पुढलीं तीन (क, भा, त) अक्षरें ओळखून त्याप्रमाणें वागणें, याला चांगला तर्क म्हणतात. तर्कानें बरोबर अंदाज करणें. (ल.) स्थळ, काळ, वृत्त व वर्तमान इकडे लक्ष देऊन कोणतीहि गोष्ट चटकन तर्कानें जाणणें; त म्हणतां तपेलें समजणें.

ताईत——गळ्यांतला ताईत; जिवाचा ताईत–अतिशय प्रेमाचा, आवडता माणूस; कंठमणि. 'कालिदास, भवभूति, बाणभट्ट यांच्यासारखे प्रतिभावान् कवि सरस्वती देवीच्या गळ्यांतले ताईत होत.'–निचं.

गळ्यांत ताईत बांधणें--गळ्यांत ताईत बांधणें हें शूर मनुष्याचें लक्षण समजत. हल्लींसुद्धां पैलवान गळ्यांत ताईत बांधतात.

ताक——ताकपिठ्या--ताक आणि पीठ एवढेंच घेऊन कथा करणारा हरदास, पुराणिक. (ल.) १ अल्पविद्य, नवशिक्या धंदेवाईक. २ फारशी प्रतिष्ठा नसलेला. ३ अतिशय थोडें मूल्य घेऊन काम करणारा.

(धर्माचें) ताक पिणें--एखादी वस्तु (तीहि क्षुल्लक) घरीं मिळणारी असून दुसऱ्यापासून तिचा अभिलाष धरणें. 'कोण वर्तणुक कसी रोज स्वदृष्टीनें पहातां। समजुन पुरतेपणें ताक कां धर्माचें पितां॥'–होला १०८.

ताकभातखाऊ--(उप.) कोंकणस्थ. 'ताकभातखाऊ म्हणती, तयांनींच करणी केली आजला अचाट।'-विनायक.

ताकाचें पाणी; ताकाचा थेंब--१ ताकाचा थोडा अंश; थोडेसें ताक. २ ताक, ताकवणी, दह्याची कवडी, दुधाची धार, लोण्याचा कण इ. शब्दांप्रमाणें वरील शब्द ताकाचे अतिशय लहान परिमाण, अंश दर्शवितो.

ॐ ताकय धवें दुधय धवें (गो.) ताकहि शुभ्र आणि दूधहि शुभ्र असतें. पण त्या दोघांचें मोल मात्र सारखें नसतें.

ताका आर्धीं म्हशीचें भांडण—बाजारांत तुरी याप्रमाणें. —मसाप ४४.

ताका आयिल्याक म्हशी मोल इत्याक ?--(गो.) ताक घ्यायला येणाऱ्याला म्हशीची किंमत कशाला ! रिकामी चवकशी.

ताकाक येवुनु रुक्को (मडकें) निपयिता—(गो.) ताक मागायला येऊन गाडगें लपवण्यांत फायदा काय ?

ताकांतलें बाढूं, आमां तलँ बाढूं, पानार येक्य पण्णा !--(गो.) 'हें देऊं कां तें देऊं ? कां तें चालेल ? असें नुसतें विचारीत राहायचें पण द्यायचें नाहीं. कांहींचें असलें बोलघेवडें दातृत्व. तु०—बोलाचीच कढी बोलाचाचि भात । जेवुनिया तृप्त कोण झाला ॥

ताकापुरती आजीबाई—ज्या बाईजवळून आपणास ताक मागून आणावयाचें असेल तिला थोडें गौरवून बोललें म्हणजे आपलें काम सुलभ होतें. पण तो गौरव मनापासून नसून आपलें काम भागण्यापुरताच असतो. असेंच सर्व कार्यसाधु लोक करतात.

ताकापुरतें रामायण-एका श्रीमंताच्या घरीं एक गरीब माधुकरी मागून अध्यन करणारा ताक मागण्यास जात असे. प्रत्येक वेळीं मालकीणबाई काय शिकतोस म्हणून विचारीत. त्यास रामायण शिकतो म्हणून उत्तर देत असे. एके दिवशीं मला रामायण सांगत नाहींस तर ताक देत नाहीं म्हटल्या-वरून त्यानें एका श्लोकांत रामायणाचें तात्पर्य सांगितलें. तो श्लोकः—आदौ रामतपोवनाभिगमनं हत्वा मृगं कांचनं, वैदेहीहरणं जटायुमरणं सुग्रीवसंभाषणं । वालीनिर्दलनं समुद्रतरणं लंकापुरीदाहनं, पश्चात् रावणकुंभकर्णहननं एतद्धि रामायणं ॥ याप्रमाणें श्लोक म्हणून निघून जाऊं लागला. बाईनीं येवढेंच रामायण काय म्हणून त्यास विचारलें. त्यानें होय, ताकापुरतें रामायण येवढेंच ! म्हणून निघून गेला. २ एक बाई दुसरीच्या घरीं ताकाकरितां गेली व तिला ताक मिळेपर्यंत तिनें रामायणकथा सांगितली व तें मिळाल्याबरोबर कथा संपविली व चालू लागली. म्हणजे रामायण ताकासाठींच होतें ! जेवढें ताक मिळण्याचा संभव असेल तेवढीच खुशा-मत; ताक थोडें तर खुशामतहि थोडीच. आपल्या कार्या-पुरती आर्जव. "इंग्लंड युद्धांत गुंतलें असल्यामुळें आपली गरज सहज भागवितां यावी म्हणून लष्करांतील कांहीं जागांच्या बाबतींत गोरा इंग्रज व काळा हिंदी यांतील भेदभाव नष्ट झाला आहे असें वारंवार जाहीर करण्यांत येत आहे; पण ही सवलत तात्पुरती असून हें सर्व 'ताकापुरतें रामायण' आहे असें दिसतें !"—केसरी १३-८-४०. 'ताका पुरतें रामायण आमचें शीकुन गाय ।'—होला १२३.१५९.

ताका मिठाक गांठ—(गो.) १ ताक व मीठ यांची (कशीतरी) भेट. ताक आहे तर मीठ नाहीं, मीठ आहे तर ताक नाहीं अशी स्थिति. किंवा केवळ ताक व मीठ एवढेंच तोंडीं लावणें असणें. २ (ल.) काटकसर करून कसा तरी केलेला संसार; अत्यंत अडचणींत दिवस काढणें.

ताकाला जाऊन भांडें-गाडगें लपविणें—दुसऱ्या-जवळ कांहीं मागावयाचें झालें तर तें उघडउघड किंवा सरळ न मागतां आढेवेढे घेऊन मागणें; दुसऱ्याची याचना कर-ण्याचें पत्करून याचनेकरितां तोंड वेंगाडण्यास कचरणें.

ताकास तूर नसणें—एकवाक्यता नसणें; मेळ नसणें; ठिकाणा नसणें.

ताकास तूर लागूं न देणें—मुळींच दाद न लागूं देणें; (एखाद्या) गोष्टीचा दुसऱ्यास बिलकूल थांग लागूं न देणें; टाळाटाळी करून स्वतःच्या मनांतील विचार दुसऱ्यास समजूं न देणें. 'मला तो ताकास तूर लागूं देत नाहीं.' —कोकि ३२१.

ताकास दूध म्हणणें—योग्यता नसतां प्रसंगीं महत्त्व देणें. 'आयत्या वेळीं कांहींना फुरसत नव्हती, तर कांहींना सवड झाली नाहीं त्यामुळें ताकालाच दूध म्हटलें.' —नवाकाळ १७-४-२५.

***येरे माझ्या मागल्या, ताककण्या चांगल्या**—नवीन चांगली परिस्थिति-सुस्थिति लाभली तरी ताककण्या खाण्याचें सोडीत नाहीं. मूळची वागणूक न सोडण्याबद्दल म्हणतात.

जिच्या घरीं ताक, तिचें वरतीं गेलें नाक--ज्या बाईच्या घरीं ताक होतें तिला फार तोरा असतो. जिच्या पहा. आपण एखादी वस्तु दुसऱ्याकडे मागावयास गेलों म्हणजे साहजिकच आपणाकडे कमीपणा व ज्याच्याकडे जातो त्याच्याकडे मोठेपणा येतो व अशा वेळीं तो बडेजावाच्या गोष्टी सांगूं लागल्यास ऐकून घ्याव्या लागतात.

ताक तें ताक व दूध तें दूध--दोन गोष्टी वरून दिसा-वयास सारख्या दिसल्या तरी त्यांचे गुण निरनिराळे प्रत्ययास येणारच. तु०—काचःकाचो मणिर्मणिः ।

ताक नाशी भाजी, घर नाशी शेजी--भाजींत ताक घातलें तर तिची चव बिघडते व शेजारणीचा हात घरांत शिरला कीं घरांत कलागत लागते.

तांक नी भांत आंव्ळांचीं देंठीं—(मुद्दाम कोंकणांतील सानुनासिक उच्चार घालून म्हणतात.) कोंकणस्थांचें साधें व आवश्यक म्हणून मानण्यांत येणारें अन्न. पण त्यांना हिणविण्यासाठीं ही म्हण वापरतात.

दुधानें तोंड पोळलें म्हणजे ताक फुंकून प्यावें लागतें—एकदां वाईट अनुभव आला म्हणजे मनुष्य अधिक जपून वागतो. क्षीरेण दग्धजिह्वस्तक्रं फूत्कृत्य पामरः पिबति । दग्भिनमवलोक्य जनस्तद्वन्मां शङ्कते स्वया त्यक्तम् ॥

ताक माडा-मुळांत व्हरून सूर म्हुण पियेता—(गो.) माडाखालीं बसून ताक पिणें म्हणजे दुसऱ्यास वाटावें कीं हा सूर (नारळाची दारू) पितो आहे. पोकळ मोठेपणा मिरविणें. तु०-मिशांना तूप लावणें.

ताकादुधाचा निकाल-निवाडा होईल--ताक व दूध दोन्ही ज़री पांढरी दिसलीं तरी चाखून पाहिल्यास ताक कोणतें व दूध कोणतें हें ताबडतोब ध्यानांत येतें. तेव्हां प्रत्यक्ष चव घेऊन या प्रश्नाचा सहज निकाल लावतां येईल. याप्रमाणें जेथें असा संशय येतो तेथें परीक्षा करणें सोपें असतें. वर पहा.

ताकाकरितां भीक मागायची तर भांडें कां लपवावें; ताकाला जावें मग भांडें कां लपवावें--जी गोष्ट आपणास करावयाची आहे ती राजरोसपणें करीत जावी. तीबद्दल संकोच बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. -टि ३.२५५. ताकाला जाऊन भांडें लपविणें, पहा.

ताकांत ढेंगणें घातलें, सून पिईना गिऱ्हाईक घेईना!--(अशिष्ट) वाईट गोष्ट कोणासहि नकोच वाटणार. पुढें पहा.

ताकांत पडली माशी, सून कांहीं पिईना, गिऱ्हाईक कांहीं घेईना--एक म्हातारी ताक विकीत असे. एकदा एक गिऱ्हाईक ताक विकत घ्यावयास आलें असतां सून तें मोजून देत असतांना त्यांत एक माशी पडली. तेव्हां गिऱ्हाईक कांहीं तें ताक घेईना. तेव्हां त्या म्हातारीनें तें फुकट जाऊं नये म्हणून सुनेस पिऊन टाकण्यास सांगितलें. पण माशी पडलेली असल्यामुळें ओकारी येईल या भीतीनें सून तें पिण्यास कबूल होईना. अशा रीतीनें त्या म्हातारीस मोठी पंचाईत येऊन पडली. ताक फुकट गेलेलें तर तिच्यानें बघवेना व सूनहि तें पिईना व गिऱ्हाईकहि घेईना. तेव्हां तिचा जीव थोडा थोडा होऊं लागला. अशा रीतीनें अगदीं बारीकसारीक गोष्टींनीहि नुकसान झालेलें पाहवत नाहीं अशा वृत्तीच्या लोकांस अनुलक्षून ही म्हण वापरतात.

ताकानें पोळला, तो दुधानें पोळेल—ताक पितांना एखाद्या वेळीं ज्याचें तोंड भाजतें त्याचें तोंड दुधानें भाजणारच. कारण ताक नेहमीं थंडच असतें. पण दूध पिण्याकरितां नेहमीं ऊन करण्यांत येतें. यावरून जेथें भीतीचें मुळींच कारण नाहीं त्या ठिकाणींहि ज्यास भय वाटतें त्यास भीति असण्याचा संभव असलेल्या ठिकाणीं भय हटकून वाटणारच.

ताकडी——ताकडेचो एक दिक्कु उंचारि गेल्यारि आनेकु तग्गु बताचि—(गो.) तराजूचें एक पारडें खालीं गेलें कीं दुसरें आपोआप वर जातें. एकाचा अपकर्ष तो दुसऱ्याचा उत्कर्ष अशी स्वाभाविक स्थिति.

ताका——ताका फावना म्हाका रूण ना--(गो.) तुला प्राप्ति नाहीं, मला कर्ज नाहीं. मिळून दोघे सारखे.

तांग——तांगा कोंबी तिन तांगां मसालो—(गो.) [तांग = १६ पै; एक आणा.] आण्याची कोंबडी आणि तीन आण्यांचा मसाला. अडक्याची भवानी० पहा.

तागा——ताग्याला ठेवणें-लावणें—(कर्ना.) व्यवस्थित मांडणी करणें; निश्चित ठिकाणीं ठेवणें; जिमेस देणें. ' गाडींतील सामान जिकडचे तिकडे ताग्यास लावून आलों.'

ताजा——ताज्या घोड्यावरच्या गोमाशा—जोंपर्यंत ऐश्वर्यकाळ, भरभराट आहे तोंपर्यंतच जवळ असणारा, पुढें पुढें करणारा. " जशी जशी लोकांची अभिरुचि बदलत जाते तसें तसें नाटककाराचें आयुष्य कमी कमी होत जातें व लोकही ' ताज्या घोड्यावरच्या गोमाशा ' या म्हणीप्रमाणें एखाद्या नाटककाराच्या नाटकावरची त्यांची भक्ति कमी झाली म्हणजे तो जिवंत आहे कां मेला आहे, त्याच्या अंगीं कांहीं गुण आहेत कां नाहींत याची पंचाईतही करीत नाहींत." -मुजुमदार, डोंगरे चरित्र.

ताट——ताटाखालचीं मांजरें असणें-बनणें—अतिशय मिंधें होणें; परप्रत्ययनेयबुद्धि असणें; दुसऱ्याच्या पूर्णपणें कह्यांत असणें; पूर्णपणें दुसऱ्याच्या तंत्रानें वागणें. ' संस्थानिक हीं ताटाखालचीं मांजरें असतांना तेथें नेमला जाणारा दिवाण साम्राज्य सरकारचें हित पाहणार नाहीं हें संभवनीय नाहीं. ' -केसरी १२-९-४१.

ताटाखालचें मांजर—पूर्णपणें आधीन; परतंत्र; दुसऱ्याच्या छापाखालीं असणारा. ' आम्ही राज्यकर्ते आहों आणि सैरंध्री आमच्या ताटाखालचें मांजर आहे. ' -कीचकवध. ' आमच्या युनिव्हर्सिट्या, कॉलेजें, सरकारच्या ताटाखालचीं मांजरें होत. ' -टि ३.२७. ' हीं कारकुनं म्हणजे ताटाखालचीं मांजरं, हें आलंच मांजर जिभल्या चाटीत. ' -सत्वपरीक्षा.

ताटाचा मानकरी—राजेलोकांच्या पंक्तीस जेवण्यास बसण्याचा मान असलेला.

ताटाला बसणें—जेवायला बसणें; पंक्तीस बसणें; पंक्तीचा लाभ देणं; बरोबर जेवण करणें. ' आतां ह्या सर्व मंडळींनीं आमच्या बरोबर ताटाला बसावें अशी माझी इच्छा आहे. ' –स्वप १२९.

ताटावरचें–ताटावरून पाटावर, पाटावरचें–पाटावरून ताटावर—कांहीं काम न पडणें. श्रीमंतांच्या बायका काम न करतां आळसांत व चैनींत वेळ घालवितात, त्यावरून हा वाक्प्रचार झाला.

ताटावरून ओढणें–उठविणें—(एखाद्यास) जेवतां जेवतां उठविणें; (एखादा) जेवीत असतांना त्याचा अपमान करून त्याला उठविणें; अन्नावरून उठविणें; तोंडचा घास काढणें.

❀ **सोन्याचें ताट, परंतु कुडाचा आधार–आश्रय–उठिंगण**—१ स्वतः चांगला अब्रूदार पण कुसंगतींत असलेला मनुष्य; हलक्या माणसाच्या मुठींत राहणारा चांगला मोठा मनुष्य; चांगला पण अकुलीन माणूस २ मोठ्याला हलक्याची देखील गरज लागते या अर्थी. ' सोन्याचें ताट झाले तरी त्यास कुडाचें उठिंगण पाहिजे. ' –पेष ४.

आयतमाऱ्या आणि ताटशिंगाऱ्या—एकदम जेवण्याच्या वेळीं येऊन आयतोबाप्रमाणें ताटावर बसणारा.

ताटांत जेव तर म्हण खापरांत जेवीन—एखाद्या मनुष्याला चांगली गोष्ट करावयास सांगितली असतां, तें न पटून त्याची प्रवृत्ति गलिच्छ गोष्ट करण्याकडेच होते, याचें हें उदाहरण आहे. तु०–जेवरे पुना वाटींत तर मा जेवीन करटींत.

ताटांत सांडलें आणि वाटींत सांडलें, तरी तें पथ्यावर पडलें—पुढें पहा.

ताटांत सांडलें काय आणि वाटींत सांडलें काय, एकच—कोठेंहि सांडलें तरी एकाच्याच पोटांत जाणार, वायां जात नाहीं. " संभाजीराजे व व्यंकोजीराजे कोणी परके नाहींत त्यांच्याकडे असलेला मुलूख आपल्याकडेच असल्यासारखा आहे. ' ताटांत० ' " –बाजीराव.–गांगा २०७.

ताटांतलें सरत नाहीं, खाण्यावांचून उठवत नाहीं—एखादा मनुष्य भूक नसतांना परंतु एखादा पदार्थ खूप खावा अशी इच्छा मनांत येऊन जेवावयास बसला म्हणजे त्याची अशी अवस्था होते. खाववत तर नाहीं पण टाकूनहि द्यावेसें वाटत नाहीं. अधाशी वृत्तीचा मनुष्य.

ताटाबरोबर कांठ; ताटाबरोबर कांठहि जाता—जुगार इत्यादिकांत उधळून दिलेला बराच मोठा ऐवज परत मिळविण्याच्या प्रयत्नांत उरलासुरला ऐवज खर्च करून टाकणें. [एका मनुष्यानें जुगारांत सर्व संपत्ति घालविली. शेवटीं एक चांदीचें ताट शिल्लक राहिलें होतें तेंहि जुगार खेळून घालविलें. परंतु घरीं येऊन पाहतो तों त्या ताटाच्या कांठाचा एक तुकडा पडलेला मागें राहिलेला आढळला. तेव्हां या तुकड्यापासून आरंभ करून पुन्हां आपण आपलें ताट व नंतर सर्व संपत्ति परत मिळवूं, अशा आशेनें तो पुन्हां जुगार खेळावयास गेला; परंतु ताट परत मिळण्याच्या ऐवजीं जिकडे ताट तिकडेच त्याचा कांठहि गेला !]

एका ताटीं जेवणें आणि घास मोजणें—एक पहा.

ताटकळी—ताटकळ्या देत बसणें—एखाद्यासाठीं फार खोळंबून बसणें; ताटकळणें; वाट पाहत असतां अगदीं कंटाळून जाणें.

ताटी—ताटी कापणें—१ हातावर तुरी देणें; गोबारा करणें; गुपचुप पळ काढणें; पसार होणें. २ अव्हेर करणें; अंतर देणें.

ताटी कापून जाणें—निसटून जाणें; पळून जाणें; हातावर तुरी देऊन जाणें. ' कांहीं तरी कामकाज असेल म्हणून ही शक्कल काढलीस. कोठून तरी ताटी कापून जाण्याचा विचार दिसतो. ' –शेक्स. नाट्यमाला, वेनिस व्यापारी ५.

ताठणें—ताठून चालणें—छाती काढून चालणें; गर्व करणें; आढ्यता बाळगणें.

ताठ्यानें वागणें—कोणाचीहि परवा न करणें; आपल्याच तोऱ्यानें वागणें; गुर्मींत असणें.

❀ **नाकीं नाहीं कांटा आणि कोरड्याच ताठा**—शेखी मिरविण्यासारखें जवळ कांहीं नसणारांचा ताठा असणें, हास्यास्पद होय; पोकळ डौल; रिकामी मोठेपणाची ऐट.

ताड—ताडमाड उडणें—अतिशय आनंदून, शेफारून जाणें; फार चढून जाणें.

ताडमाडास जाणें—(राजा) ताडमाड सुजणें; अतिशय सूज येणें.

❀**ताडाची सांवली, घडीची बाई, आंब्याखालीं उभी नाहीं**—एखाद्या ताडाच्या झाडाला सांवली फार नसते. तेव्हां आंब्यासारख्या मोठ्या झाडाच्या सांवलीचा आश्रय घेत-

ल्यास तो दीर्घ काल टिकतो. तसेंच लग्नाची बायको ज्याप्रमाणें आपल्या सत्तेची व नेहेमींची त्याप्रमाणें वेश्यादि कोणी नसते. तेव्हां ज्याचा आश्रय किंवा सहवास तात्पुरता आहे अशाची कास धरण्यापेक्षां चिरंतन किंवा दीर्घकाल टिकेल अशाचा आश्रय घेणें अधिक चांगलें.

ताडाच्या झाडाखालीं दूध प्याला तरी तो ताडी प्याला असें लोक समजतात—१ लोक वरवर दिसणाऱ्या गोष्टीवरून आपलें मत बनवितात. वास्तविक खरा प्रकार काय आहे याची चौकशी करण्याच्या भानगडींत पडत नाहींत. तेव्हां शिष्टाचार सोडून कांहीं करूं नये. २ वाईटाच्या संगतीनें, चांगल्यासहि कमीपणा येतो.

ताडणें——ताडी पाळी तो यजमान, न करी तो दुसमान—जो मारझोड करतो पण पोषण करतो तोच मालक व जो कांहींच करीत नाहीं, केवळ कामापुरता संबंध ठेवतो, त्याला शत्रूसमान लेखावा. He who gives blows is a master, he who gives none is a dog. –सवि १५७०.

ताण——(एखाद्यावर) ताण तोडणें—एखाद्यावर तणतणणें; ताशेरा झाडणें; रागावणें; खरडपट्टी काढणें.

ताण देणें—१ लांबणीवर टाकणें; खोळंबा, विलंब करणें; दिरंगाई लावणें; ताटकळत ठेवणें. २ लंघन, उपास करणें.

ताणपट्टी देणें—कामाकरितां इकडून तिकडे पळाविणें, येरझारा घालविणें. 'त्यानें मला संध्याकाळपर्यंत खूप ताणपट्टी दिली.

ताणणें——हातपाय ताणून निजणें–अगदीं निश्चिंत ऐसपैस निजणें. (ल.) बेफिकीर असणें.

तात——तातस्य कूपोयमिति ब्रुवाणाः क्षारं जलं कापुरुषाः पिबंति।—आपल्या वाडवडिलांची विहीर म्हणून कांहीं अनुदार लोक खारेंच पाणी पितात. अगदीं कूपमंडूक, सनातनी वृत्तीचे लोक.

तांत——गळयाला तांत लागणें—प्राणांताची पाळी येणें; संकट गुदरणें; गळफांस लागणें; जिवाशीं बेतणें. गळा पहा.

***तांत बाजे, और राग बुझे**—सुरावट ऐकल्याबरोबर ती कोणत्या रागाची आहे हें ताबडतोब कळून येतें. थोडें बोलणें ऐकल्यावर लगेच मनांतलें कळून येतें. –सवि ६२१.

तांतीं——तांतयांत आसताना साद घालता–(गो.) अंड्यांत असतांनाच पिलें साद घालतात. अद्याप बालवय असतांनाच कांहीं जणांना आपला मोठेपणा प्रस्थापित करावासा वाटतो. तु०–काल मेला आज पितर झाला. लहान-तोंडीं मोठा घास.

तांतू——तोंडांत तांतू मिळाल्याबरोबर चिवटच गिळणें—[तांतू=टोंक. चिवट=सुताची लगड] थोडासा अवसर, प्रवेश मिळतांच दुसऱ्याचें सर्वस्व अपहरण करणें, मालक होऊन बसणें. तु०–चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः।

तांदूळ——तांदूळ तर जीव, सॉयरॉ तर प्राण—(गो.) तांदूळ खर्च होतील तेंहि पाहवत नाहींत, आणि पाहुण्याला जा म्हणावें तर तो अगदीं जिवाभावाचा. दोन तुल्यबल कार्यें पुढें आलीं असतां कोणतें धरावें आणि कोणतें सोडावें अशी विवंचना उत्पन्न होणें.

तांदूळहि जिवसा, पाहुणाहि जिवसा–घरांत तांदूळहि असावेत व पाहुणेहि असावेत. तांदूळहि संपतां कामा नये व पाहुणाहि उपाशीं राहतां कामा नये. पण या दोन्ही गोष्टी अशक्य. जीव–जिवसा पहा.

तान——तानमें तान हिंदुस्तान, और सब गलतान है—[तान=स्थान] सर्व देशांत हिंदुस्तान हा देश श्रेष्ठ होय, इतर सर्व देश भिकार आहेत.

तान——तानगाभणें; तानगाभास जाणें—पोर अंगावर पिण्यासारखें असतांनाच गाभण राहाणें (जनावरानें); अंगावर तान्हें पीत असतांच गरोदर होणें.

तान——तान घालणें–धरणें—लहान मुलाच्या तान रोगावर (अंगाला थंडावा येण्याकरितां पानें इ. बांधून,) उपाय करणें.

तान——ताणे बांय खणप—(गो.) तहान लागल्यावेळीं विहीर खणणें. तहान पहा.

तान्ने घाबाने मिटा खलु पिवंचो—(गो.) तहानेनें जीव कासावीस झाला असतां मिठाचें पाणीसुद्धां चालतें. तु०–भुकेला कोंडा, निजायला धोंडा.

ताना——ताना पाजन करणें—शिरा ताणणें; तणतणणें; रागावणें; चरफडणें.

तानाजी——तानाजी, नाहींतर नाजी—अतिप्रसिद्ध पुरुष अथवा अगदीं अप्रसिद्ध व्यक्ति. 'दत्तु भटजींची महत्त्वाकांक्षा अशी कीं, होईन तानाजी नाहींतर नाजी'. तु०–जेवीन तर तुपाशीं नाहींतर उपाशीं.

तानी; तान्ही——तानीला लावा वनीं, पारठीला लावा थानीं—तान्ह्या वासराला रानांत चरावयास सोडावयाचें

व पारठ्या वासराला पाजावयाचें; म्हणजे अगदीं उलट कृति करणें. ज्यास द्यावयाचें त्यास न देतां भलत्यास देणें.

तान्हें गेलें राना, धोड्याला आला पान्हा—(व.) तान्ह्या मुलासाठीं आईला पान्हा फुटतो, स्तनांत दूध येतें. पण तान्हें मूल रानांत किंवा दूर गेल्यामुळें त्या पान्ह्याचा उपयोग जवळ असलेला धोड्या (मोठा मुलगा)च करूं लागतो. मोठें मूल लहान मुलाप्रमाणें करूं लागल्यास असें म्हणतात.

तान्हें गेलें राना, पारठें लाविलें थाना—तानीला लावा वगैरे० पहा.

तान्हेला——तान्हेली गाय, चिखल खाय—तहान फार लागली व पाणी मिळालें नाहीं तर एखादी गाय ओला चिखलहि ओलाव्याकरितां खाऊं लागते. मनुष्य अगतिक झाला म्हणजे चांगलें वाईट कांहीं पाहूं शकत नाहीं. कशीतरी गरज भागविण्यामागें असतो.

ताप——तापत्रय—१ (अ) आधिदैविक–विद्युत्पतन, अतिवात, अतिवृष्टि इ. (आ) आध्यात्मिक–ज्वर, शूल, शिरोवेदना इ. (इ) आधिभौतिक–पाण्यांत बुडणें, चौर्य-भय, व्याघ्रभय, इ. २ (ल.) दारिद्य.–ज्ञा ३.२५४. –केका १२२. 'त्रापत्रयानें तापविलें, देह माझे कष्टले ।' –दत्ताचा धांवा.

❀ तापत्रयाला जोड–जोडा नाहीं—दुःखातिशयाच्या बाबतींत त्रिविध तापांची बरोबरी कोणी करूं शकत नाहीं.

ताप म्हणे मी मायबाप—तापापुढें कोणाचें चालत नाहीं. सर्व रोगांत ताप हा भयंकर आहे. बहुतेक सर्व रोगांच्या आरंभीं ताप येतो.

तापट——तापट प्रकृतीचा असतो, तो उतार-वयाचा दिसतो—जो मनुष्य शीघ्रकोपी असतो, त्याचेवर लवकर म्हातारपणाची कळा येते. जो थंड प्रकृतीचा असतो तो लवकर वृद्ध होत नाहीं.–सवि ५११.

तापणें——गळा तापणें—कांहीं वेळ गायन केल्यानें कंठांतून बराच मोठा व चांगला स्वर निघावा अशी वेळ येणें. गाऊन गाऊन स्वर लागणें; गातां गातां आवाज खुलणें.

तापल्या तव्यावर उभें करणें—छळ करण्याचा एक प्रकार. अतिशय छळ करणें. 'वरील गोष्टी महाराजांना तापल्या तव्यावर उभे करून विचारल्या तर ते देखील नाहींं म्हणणार नाहींत.'–विक्षिप्त १.५४.

तापल्या तव्यावर नाचणें—कडक नि तापट स्वभावाच्या व्यक्तीच्या हाताखालीं काम करणें कठीण असतें. असल्या वरिष्ठाची मर्जी केव्हां खप्पा होईल याचा नेम नसतो. तेव्हां त्याच्या हाताखालच्या व्यक्तींना या राजेश्रींची मर्जी सांभाळतां सांभाळतां मुष्कील होतें. तापल्या तव्यावर नाचतांना जसें थकून नाचणें थांबवलें तर पायाला चटके बसायचे नि चट-क्याच्या धाकानें थकलें असतांहि नाचत राहिलें तर कंठीं प्राण यायचे. खप्पी माणसाची मर्जी सांभाळतांना तसें होतें !

तापल्या तव्यावर पोळ्या भाजणें--एकदां तवा तापलेला असला म्हणजे पोळया लवकर लवकर होतात. एखाद्या आलेल्या संधीचा फायदा करून घेणें. तु०–वाहत्या गंगेंत हात धुवून घेणें.

तापल्या तव्यावर (पोळी–भाकरी) भाजून घेणें–वर प्रमाणेंच. एखाद्या कार्यांत दुसरें कार्य सहजासहजीं होण्यासारखें असल्यास, अवश्य करून घेणें. Strike when the iron is hot.

तापल्या पाठीनें—अंगांत उमेद, जोम, ताकद आहे तोंपर्यंत; अवसान असेपर्यंत; अंगांत रंग आहे तों.

❀ तापलिया तेला बावन चंदन । बुंदें एक क्षण शीतळ करी॥–उत्तम बावन चंदन तें कीं जें तापलेल्या तेलांत टाकिलें असतां तेल एकदम थंड करतें. म्हणजे पारख या प्रकारचीं अस्सल पाहिजे. –तुगा ३०२४.

तापल्या उदकान घरां लासनात—(गो.) तापलेल्या पाण्यानें घरें जळत नाहीं. त्याला विस्तवच लागतो. ऊन पाण्यानें घरें जळत नाहींत. पहा.

तापल्या तव्यार उदक घालें, हुस्स जालें--(गो.) तापलेल्या तव्यावर पाणी घातलें कीं हुऽऽस्स् असा आवाज होऊन तें जळून जातें. चांगली गोष्ट एखाद्याला सांगावयाची झाली तरी ती त्याच्या मनःसंतापाच्या वेळीं सांगूं नये. त्यावेळीं तिचा योग्य तो परिणाम होत नाहीं.

तापल्या तव्यावर थंडपाणी--तापलेल्या तव्यावर थंड पाणी टाकलें तर तवा थंड होतो नि थंड पाणी थोडें गरम होतें. तसेंच संगतीनें माणसांच्या गुणांची, संवयींची देवाण घेवाण होते हा भावार्थ.

तापल्या तव्यावरची भाकरी, तशी ठेवावी हुशारी–ज्याप्रमाणें तापलेल्या तव्यावर भाकरी भाजून घेतांना तिच्याकडे लक्ष्य ठेवून ती भाजेल पण करपणार नाहीं व तवा तापलेला आहे तोंच व थंड होण्याच्या आंत भाजेल अशी दक्षता घ्यावी लागते; त्याप्रमाणें मनुष्यानें व्यवहारांत दक्ष असावें लागतें. मनुष्यानें आलेल्या संधीचा नेहमीं फायदा घेत असावें, कोणतीहि संधि फुकट घालवूं नये.

तापल्या पाण्यास चव नसते-येत नाहीं—पाणी तापविलें असतां बेचव होतें. एकदां मैत्री बिघडली कीं पुन्हां नीट पूर्ववत् सांधत नाहीं.

तापतोबारा——**तापतोबारा आणि फुटका नगारा**—[तापतोबारा=रागाचें अवडंबर, चडफडाट] रागांत उगीच बडबड करावयाची; त्याला कोणी किंमत देत नाहीं कीं त्यापासून कांहीं निष्पन्न होत नाहीं.

तापी——**तापीदर्शनें, रेवास्मरणें, गंगास्नानें आणि यमुनापानें**-तापीचें दर्शन घेतल्यानें, नर्मदेचें स्मरण केल्यानें, गंगेचें स्नान केल्यानें व यमुनेचें पाणी प्याल्यानें पुण्यप्राप्ति होते. या चार नद्या मोठ्या व पवित्र आहेत.

ताफा——**ताफा बसणें**—१ टोळी जमणें. २ घर बसणें; कर्ता गेल्यामुळें कुटुंब मोडकळीस येणें.

तांब——**तांब झडणें**--खरडपट्टी निघणें.

तांब झाडणें—ताशेरा झाडणें; खरडपट्टी काढणें.

तांबडा——**तांबडा कंदिल**-धोक्याची सूचना [अशी सूचना देण्यासाठीं धोक्याच्या जागीं तांबड्या कांचेचा दिवा लावितात यावरून]. Red Signal. तु०-लाल बाहुटा.

तांबडा होणें—अतिशय संतापणें, रागावणें.

तांबडें पाणी—दारू (पिण्याची). तिचा रंग लाल असतो यावरून.

तांबडें फुटणें-सूर्योदयापूर्वीं आकाश तांबूस रंगाचें होतें. त्यावरून अरुणोदय होणें, उजाडणें.

तांबडें लष्कर—(उप.) विधवांचा तांडा. (विकेशा विधवा तांबडीं लुगडीं नेसतात यावरून).

तांबड्या घोड्या वर बसणें—दारू पिणें.

तांबड्या माडाचें सोडण--(गो.) थापबाजी करणें

❀ **तांबड्याचे आशेनें पांढरें हरवावें**-अधिक चांगलें मिळविण्याकरितां जवळ असेल तें गमावून बसणें.

तांबसाळ——**तांबसाळ फुटणें**---तांबडें फुटणें; अरुणोदयाची वेळ होणें. 'मी तांबसाळ फुटणेच्या पूर्वीं येतो.'

ताबा——**ताबेदार तट्टू आणि बजरबट्टू**-आपल्या वळणातलें, मालकीचें तट्टू असलें म्हणजे तें फार चलाख असतें; किंवा ताबेदार माणसाला चलाख व्हावेंच लागतें.

तांबें——**तांब्याच्या झेंटांचा**—खणखणीत (मनुष्य).

तांब्या——**तांब्या ठेवणें**-बहिर्दिशेस जाण्याची तयारी असणें, करणें. (मोठ्याच्या घरीं गडी शौचकुपांत तांब्या नेऊन ठेवतो यावरून). 'तांब्या ठेवावयास सांग । '-सप्र २.७१.

तांब्या पालथा-उपडा पडणें-घालणें—(बायकी) आपल्या तांब्याला कोणी शिवूं नये म्हणून विटाळशा बायका तो पालथा घालतात. यावरून रजस्वला, विटाळशी होणें, बसणें.

तांम्र——**तांम्रा येणें**--तांब चढणें; गंजणें. 'केवळ मुसलमानीस तांम्रा आला.बामणी बादशाही जहाली.'-भाब२१.

तामील; तामिली——**तामील-ली करणें**-अंमल करणें; जारी करणें; बरहुकूम कृति करणें. 'श्रीमंतांचा हुकूम तामिली करण्याच्या उद्योगाला ते लागले.'-इंप ५१.

ताम्रपट——**ताम्रपट देणें**—सनद वगैरे तांब्याच्या पत्र्यावर-ताम्रपटावर लिहून देत. यावरून, कायम अधिकार देणें; कायमचा हक्क देणें; कायमची सनद देणें.

तार——(**एखाद्याची**) **तार ओळखणें-जाणणें**—(एखाद्याच्या) मनाचा कल, इच्छा, अभिप्राय, धोरण तर्कानें जाणणें; रोख समजणें.

तार चालणें—(व.) मात्रा चालणें.

(**एखाद्याची**) **तार राखणें-संभाळणें**—एखाद्याची मर्जी, तबियत राखणें, संभाळणें; मर्जी राखून वागणें.

तार——**तार उपटणें**—(ग्राम्य) शेट उपटणें.

तारा तोडणें - १ (रागानें, उर्मटपणानें) गर्जना करणें; शिरा ताणून बोलणें; गर्जणें. २ भलतेंसलतें बोलणें; उद्धटपणानें, दुसऱ्याचा अपमान होईल असें बोलणें.

तारा मिळविणें--वाद्यांच्या तारा स्वरांत लावणें.

तारेवरील कसरत—सर्कशींत तारेवरून चालण्याचा प्रयोग करतात. यांत चालणाऱ्याला फार कौशल्यानें व धिटाईनें काम करावें लागतें. यावरून अतिशय कुशलतेचें काम; अतिशय कष्टाचें व जोखमीचें काम.

तारेस उभा करणें—मर्जीस उतरणें; मनास येणें.

(**एखाद्याच्या**) **तारेस उभा राहणें; तारेनें वागणें-चालणें**—एखाद्याच्या मर्जीप्रमाण वागणें, चालणें.

तारेस लागणें-असणें - एखाद्या गोष्टीच्या इच्छेंत, विचारांत गुंगून जाणें; त्या तारेंत असणें; नादीं लागणें; लुब्ध होऊन जाणं; गुंगींत असणें; तंद्री लागणें.

तारक——**तारकमंत्र**—वाराणसी काशी क्षेत्रांत मरणकाळीं शिवदूत येऊन मंत्र उपदेश (कानांत) करतात त्यामुळें मुक्ति मिळते अशी धार्मिक भावना आहे. असा तारक

मंत्राचा उपदेश होतो म्हणून त्या क्षेत्रास मरणाऱ्या प्रत्येक इसमाचा उजवा कान वर असतो म्हणतात. काश्यां तु मरणान्मुक्तिः ।

तारक पारख——तारखी पारखीनें राहणें—सावधपणानें, हुषारीनें राहाणें. ' तारखी पारखीनें रहावें तें न करतां मुकाम करीत खंडण्या घेत चालिले. ' —भाब १०२.

तारता——मारत्यापेक्षां तारता अधिक—मारणाऱ्यापेक्षां रक्षण करणारा केव्हांहि अधिक योग्यतेचा होय; शिक्षा करणाऱ्यापेक्षां दया, क्षमा करणारा मनुष्य अधिक श्रेष्ठ, उदार समजला जातो.

तारत्यापुढें मारत्याचा हात चालत नाहीं, तारत्यापुढें मारत्याचें चालत नाहीं——रक्षण करणारा असेल, तर तो कोणत्याहि परिस्थितींत रक्षण करतोच, नाश करणाराचें बल त्याच्यापुढें लंगडें पडतें. ' पण तारत्यापुढें मारत्याचा हात चालत नाहीं हेंच अखेरीस खरें ठरलें ! '—उग्र ४.४.

तारळें——तारळें शाहरं, बहू गुलजारं । तारळीचे तीरीं, भक्ती नवलाईची सारी ।—(तारळेकर–देशपांडे कोशांतील). तारळेकरांनीं आपला गांव म्हणून तेथील हा गंमतीदार गांवमाहात्म्यपर श्लोक म्हणून कोशांत दिला असेल.

तारा——तारे तुटणें—१ आकाशांत तारे इकडून तिकडे अकस्मात् सरकणें; उल्का पडणें. २ गाण्यांत चमकणें; प्रावीण्य दाखविणें. ३ (उप.) गर्दभगायन करणें. ' काय गाण्याचे तारे तुटतात हो ! '

तारे तुटणें-तोडणें—असंबद्ध, वेडेपणाचें भाषण करणें; मूर्खासारखें बोलणें. ' मूर्खत्वाचें तुटती तारे । '—विक ३. ' या व्याख्यानांत त्यानें काय काय तारे तोडले आहेत म्हणून सांगू ! '—विक्षिप्त २.५.

तारांबळ होणें-उडणें—[तारंबळ, तारामळ, तारांबळ = ताराबल; नक्षत्रांची अनुकुलता.] १ ' तदेव लग्नं सुदिनं तदेव ताराबलं चंद्रबलं तदेव ' हा मंगलाष्टकाचा श्लोक मुहूर्ताची घटका संपत आली म्हणजे फार घाईनें म्हणतात. यावरून घाई, धांदल होणें. ' मी आपुल्या गृहींचें एक । तारंबळ होतसे ॥ '—नव २०.५५. ' जिजाऊ–(रुसव्याच्या स्वरानें) माझी अशी तारांबळ उडावी, आणि आपण मौज पहात रहावें हें चांगलं वाटलं ना ! '—शिसं १.१. २ अडचण; ओढगस्तपणा; हाल. ' आपलें सैन्य इंग्रजांपाशीं चाकरीस ठेवण्याचा तह करण्याविषयीं गव्हर्नराचा नानास आग्रह चालला होता; पण त्यास त्यांतला मतलब कळून एकंदर राज्याची जरी तारांबळ झाली होती तरी तो कबूल झाला नाहीं. '—निबंधमाला.

तारी——तारी दुड्डु दिवनु पोवनु बप्प—(गो.) तरीला पैसे देऊन पुन्हां नदी पोहून जावयाचें ! खाणावळ देऊन पुन्हां उपाशीच ! पैसे जाऊन हात हलवीत परत येणें.

तारुण्य——तारुण्यांत आली, तरी बाळदशा नाहीं गेली—वयांत येऊनहि पोरकटपणा करणें; समजूत न येणें.

तारुण्यांत विलास, वृद्धपणीं वनवास—तरुण असतांना चैन करण्यामध्यें सर्व धन दौलत उडवून टाकली म्हणजे म्हातारपणांत अरण्यांत जाऊन राहण्याची पाळी येते. म्हणजे हाल होतात. याकरितां प्रथमपासूनच विचार करावा.

तारुण्यांत स्वमौर्ख्य कळे, तर सदां सुख मिळे—तरुणपणीं जर आपल्या वागणुकींतील दोष आपणांस कळून येतील व पटतील, तर सर्व आयुष्य सुखानें जाण्यास हरकत पडणार नाहीं.

तारूं——तारूं कुळ्यासकट गिळप—(गो.) डोलकाठीसह तारूं गिळणें. (ल.) सर्वच स्वाहा करणें.

***तारूं कांठावर असतें तेव्हां परीक्षा काय होणार**—गलबताची परीक्षा करावयाची तर ती समुद्रांत सोडूनच केली पाहिजे. Judge not of a ship when she lies on the stocks.–Italian. —सवि २०४७.

तारूं भरूंक गेल्लो आयलो, पोट भरूंक गेल्लो येंबकना—(गो.) तारवावर माल भरण्यास गेलेले परत आले, पण पोट भरण्यास गेलेले (तारवावरचे नोकर) मात्र परत आले नाहींत. पोट लहान असून तारूं मोठें असतें; पण तारूं भरणें हें पोट भरण्यापेक्षां सोपें असतें !

भटास तारूं व गावल्यास गोरूं—गावींत लोक हे दर्यावर्दी आहेत; त्यांस गलबताचा उपयोग खरा व गुराचा तितका उपयोग नाहीं व भटास गायढोर जितकें उपयोगी पडेल त्या मानानें गलबताचा कांहींच उपयोग नसतो. यावरून भलत्याच मनुष्यास भलतीच गोष्ट देणें; अयोग्य गोष्टीची सांगड बांधणें. गावल्यास गुरूं व गुराख्यास तारूं, पहा.

तार्वा भरी गॅल्लॉ घरा पावलॅ आनि पॉटा भरी गॅलॉ घरा पावना-(गो.) तारवाची भरती करायला गेलेला माणूस ती करून घरीं पोंचला; पण पोटाची भरती करायला गेलेला माणूस मात्र परत आला नाहीं. सगळे खळगे भरून निघतील, पण पोटाची खळगी मात्र भरत नाहीं, अशा अर्थानें म्हणतात. बर पहा.

तारें——आधींच तारें आणि त्यांत शिरलें वारें—आधींच वेडगळ आणि त्यांत भूतबाधा झाल्यास त्या वेड्या माणसाच्या चेष्टा किती वर्णाव्या. तु०—आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला.

तारो——तारो दुबे, भणे ते भुले—(गु.) ज्याला (चांगलें) पोहतां येतें तोच बुडण्याचा संभव असतो. ज्यास पोहतां येत नाहीं तो कधीं पाण्याच्या वाटेस जातच नाहीं. त्याचप्रमाणें जो म्हणतो किंवा पढतो त्याच्या हातूनच चूक होण्याचा संभव असतो, जो कांहीं म्हणतच नाहीं त्याच्याकडून चूक होण्याचा कधींच संभव नाहीं. आपण पाहतोंच कीं चांगले पोहणारेच नेहेमीं बुडतात. याप्रमाणें जो कोणतीहि गोष्ट करीत नाहीं त्याचेकडे दोष येण्याचा संभव नसतो; पण अशा निष्क्रिय माणसापेक्षां करून केव्हां केव्हां चुकणाऱ्यासच लोक अधिक मानतात. तु०—शाहणा नाडतो, पोहणार बुडतो.

ताल——तालताल उडणें—१ मरमसाट बोलणें; मगरूरीचीं भाषणें करणें. २ टाळाटाळाचीं उत्तरें देणें. ताडमाड पहा.

ताल तोडणें—बढाया मारणें; लंब्याबाता झोंकणें. ताळतंत्र सोडून बोलणें.—मोअनु ५.४४.

ताले——ताले शिकंदर असणें—नशीब बलवत्तर असणें. 'इशा०:—राजेसाहेब, शहाजी भोंसल्याचे ताले शिकंदर आहेत यांत शंका नाहीं.'—शिसं ३.४.

❀**असे त्याचे दैवाचे ताले कीं, कुत्र्यावर नौबत चाले**—एखाद्याचें भाग्य असें कांहीं विलक्षण असतें कीं, त्याच्या कुत्र्यावर सुद्धां नौबत झडत असते. एखाद्या अकर्तृत्ववान पण भाग्यशाली मनुष्याबद्दल योजतात.

ताव——ताव देणें—तापाविणें.

(एखाद्याला) ताव देणें—१ एखाद्याची खरडपट्टी काढणें; हजेरी घेणें; त्यास दपटशा देणें. २ चांगलें मारणें; बुडविणें (व्यापार इ. कांत).

मिशावर ताव देणें—'बरें आहे, पाहून घेईन !' इ. पौरुषवाचक शब्द बोलून मिशावर हात फिरविणें; रागानें चरफडणें; सूडाची प्रतिज्ञा करणें.

ताव देणें-मारणें—१ व्यापारधंदा इ. कांत नफा मिळविणें; घबाड सांपडणें. २ व्यापार इ.कांत ठोकर, बूड येणें.

(एखाद्या वस्तूवर, पैशावर) ताव देणें-मारणें—एखादी वस्तु पळविणें; लुबाडणें; लांबविणें; (कारकुनी कसबानें) गिळंकृत करणें.

(एखाद्या खाद्यावर) ताव देणें-मारणें—तो जिन्नस सपाटून खाणें; त्यावर हात मारणें; फन्ना उडविणें.

(एखाद्या कार्याचा) ताव येणें—एखादें कार्य करण्याबद्दल इसळी, सुरसुरी येणें.

तावणें——तावून सुलाखून घेणें—सोनें कोठल्या प्रतीचें आहे हें समजण्यासाठीं तें तापवून त्यास भोंक पाडतात. यावरून फार काळजीपूर्वक, कसोशीनें पारखून घेणें.

तास——ताशीं-सीं लागणें—(पीक इ.) चांगलें वाढीस लागणें.

तास——तास वाजतो, अंमल गाजतो—प्रहर झाल्याचा सूचक असा टोला तासावर दिला म्हणजे एखाद्याचा अंमल चालू आहे असें स्पष्टपणें कळून येतें.

तासाआड बैल आणि दिसाआड बायको, मारावी—नांगरास जुंपलेल्या बैलास मधून मधून मारल्याशिवाय तो बरोबर काम देत नाहीं, त्याप्रमाणें स्त्रीला चांगली धाकांत ठेवल्याशिवाय ती मनाप्रमाणें वागत नाहीं.

तासणें——तासून निजणें-बसणें—निश्चिंतपणें, आरामशीर, निर्वेधपणानें स्वस्थ निजणें, बसणें.

ताळ——ताळ देणें—१ एखादा गात असतांना त्याचा ठेका धरणें. २ (ल.) एखाद्याची री ओढणें; त्याला अनुसरणें, मदत करणें.

ताळ सोडणें—मर्यादा, धरबंद सोडणें; बेफामपणें वागणें. 'छे ! सासूबाई काय म्हणतील ? म्हणतील यांनीं अगदीं ताळच सोडला. काय, बायकांना घेऊन एका ठिकाणीं काय बसतात !'—पकोघे.

ताळ्यावर येणें—पुन्हां नीट मार्गावर येणें; शुद्धीवर येणें.

❀ **ताळ ना तंत्र, उगाच पोकळ यंत्र**—अतिशय अव्यवस्थितपणें चाललेली गोष्ट.

ताळ——ताळ पडणें—बेबनाव होणें; खटका उडणें. 'दोघांमध्यें ताळ पडोन गेलें। ये भीमकीचें परि कार्य झालें।'—सारुह ८.३५.

ताळकिळा——ताळकिळ्यान कवडां धांपलीं, घुम्यांगर जेवणां जालीं—(गो.) एखाद्याच्या घरीं टाकळ्याचीं पानें मिटायच्या वेळीं म्हणजे संध्याकाळीं जेवणें होणें, अशा प्रसंगीं म्हणतात.

तिकडे——संकेतार्थी पति, यजमान. पूर्वीं कुलीन स्त्रिया नवऱ्याच्या नांवाचा उच्चार न करतां मोघम बोलत. 'घरीं

—घरांत ', ' स्वारी ', ' तिकडे—तिकडचा—तिकडून ' इ. शब्द वापरीत. घरीं पहा.

तिखट——तिखटजाळ आग—अतिशय तिखट; भयंकर तिखट; आगीसारखें तिखट.

तिखट मीठ लावून सांगणें—तोलणें—पदार्थाला तिखट मीठ लाविल्यास तो चवदार लागतो. त्याचप्रमाणें एखादा प्रसंग मनोरंजक करण्यासाठीं फुगवून अथवा बनवून, आपल्या पदरचें, कल्पनेनें कांहीं आंत घालून सांगणें; (गोष्ट इ.) खुलवून सांगणें; अतिशयोक्ति करणें. 'मृगांकमाले, तूं मात्र अधन्य खरी ! तुझ्यानें आपलें प्रेम तिखट मीठ लावून सांगणें होणार नाहीं ! यास्तव तूं अशीच स्तब्ध रहा.'—नाट्यकथार्णव

❀ **कानांमागून आलें, तिखट झालें; कानांमागून आलें शिंगट, तें झालें तिखट**—गाय वगैरे प्राण्यांस कान उपजतच असतात पण शिंगें मागाहून फुटतात. पण तीं कानापेक्षां तीक्ष्ण असतात. यावरून कांहीं कांहीं लोक थोडाफार अधिकार प्राप्त झाल्याबरोबर तो गाजविण्यास उतावीळ असतात व जुन्या लोकांवरहि ताण करतात अशांस उद्देशून ही म्हण वापरतात.

पुढें तिखट आणि मागें पोंचट—वरून दिसावयास किंवा प्रारंभीं चांगला रुबाबदार दिसणारा, किंवा मोठा चलाख व कर्तबगार दिसणारा मनुष्य असून कांहीं दिवसांनीं पाहावें तों अगदींच नालायक ठरणारा मनुष्य. आरंभीं धीट, फुशारक्या मारणारा पण लगेंच हातपाय गाळणारा मनुष्य. बाभळीचा कांटा पुढें तिखट आणि मागें पोंचट, अशा मूळ स्वरूपांत ही म्हण रूढ आहे. कांटा पहा.

तिखट आहे तर मीठ नाहीं, मीठ आहे तर तिखट नाहीं—एक आहे तर एक नाहीं म्हणजे धड कोणत्याच गोष्टींचा मेळ नसला म्हणजे म्हणतात. तसेंच अगदीं विपन्नावस्था दाखविण्यास, खाण्याचे हाल व्यक्त करण्यासहि ही म्हण योजतात.

तिखें——(मनीं—अंगीं तीन मण अथवा नव मण)

तिखें जाळणें—[तिखें = पोलाद] १ अभिमानाचा ताठा असणें; गुर्मी असणें; तोऱ्यांत असणें. २ रागानें जळफळणें; हाडवैर धरणें; चरफडणें.

❀ **तिक्याबिगर लॉरगण पास्ता ?**—(गो.) पोलादावांचून लोखंडाला धार चढत नाहीं. बुद्धिमत्तेवांचून माणूस चमकत नाहीं.

तिघे——**तिघांच्या तीन वाटा करणें**—१ फाटाफूट करणें; ऐक्याचा भंग करणें; फूट पाडणें. २ उधळून लावणें.

❀ **तिघांचीं तीन दारें**—तीन मनुष्यें असून त्यांची एकत्र कधीं गांठ न पडणें; प्रत्येकाचा मार्ग, दिशा निराळ्या असणें; एकोप्याचा अभाव.

तिघांत ना तेरांत, ना शेरभर सुतळींत—कशांत कांहीं मेळ नाहीं अशी स्थिति. तु०—तीन तेरा० !

तिघावरचा आरा, लावील कोण थारा—एखादी गोष्ट अनेक प्रकारें विस्कळित झाली असतां ती सुव्यवस्थितपणें संघटित करणें फार कठिण असतें.

तिघावरची किकळी आणि घराचा वांसा निखळी—[किकळी = तिफळी !] घरामध्यें एकदां तीन मतें होऊन तिफळी माजली, गृहकलह शिरला म्हणजे घरांतील ऐक्य बिघडतें व घर मोडण्याच्या पंथास लागतें.

तिडीक——**तिडका खाणें—सोसणें—देणें**—श्रम, कष्ट करणें, सोसणें; कळ सोसणें; त्रास सहन करणें.

तिडका देऊन करणें—जिवापाड मेहनत करून एखादें कार्य साधणें; अटोकाट प्रयत्न करून पार पाडणें.

तिडका देणें—१ प्रसूतिवेदना होणें; प्रसूत होणें. २ (ल.) सर्वशक्ति एकवटून जोराचा प्रयत्न करणें.

तिडका देत बसणें—विव्हळणें (व्यथेनें); कुंथणें; कण्हणें; दुःखानें व्याकूळ होणें.

एके तिडकेनें करणें—एकदम, एका दमानें करणें; एकदां खूप जोर करून करणें; एकदां कळ सोसून पार पाडणें.

❀ **एक तिडीक दे आणि घरची धनीण हो**—स्त्रीस प्रसूत होणें ही फार कष्टकारक गोष्ट वाटते, पण ज्या स्त्रीस मूल होतें तीच घरांत सर्वांची आवडती होते व म्हणून तिचा सर्व घरांत डौल चालतो. तेव्हां ज्या स्त्रीस घरधनीण व्हावयाचें असेल तिनें मूल होण्याचा त्रास सहन केला पाहिजे. एक पहा.

पायाची तिडीक मस्तकास गेली—तळपायाची आग मस्तकास जाणें, पहा. कोणी अतिशय रागावला म्हणजे म्हणतात.

तिनिसांजा——**फुटक्या तिनिसांजा**—ऐन संध्याकाळीं; सूर्यास्तसमयीं.

तिमाजी——**तिमाजी नाईक**—अगदीं चिक्कू, कवडीचुंबक माणूस. [हरि नारायण आपटे यांच्या 'आजकालच्या गोष्टीं'पैकीं 'मधली स्थिति' या कादंबरींत तिमाजी नाईक नांवाचा अगदीं कृपण माणूस दाखविला आहे.]

तिरका——**तिरकमशेट**—१ चकणा, तिरवें पाहणारा माणूस. २ आपण मोठे व्यापारी, पेढीवाले आहों असा बहाणा करणारा लहान धंदेवाला.

❋ तिरका डोळा, गुणाचा पोळा--तिरवे पाहणारे लोक मोठे धूर्त, गुणी असतात.

तिरगी——तिरगा मिरगीवर येणें--अरेतुरेवर येणें; मारामारीपर्यंत येणें.

तिरगो——तिरगो तिणाण्णा करीत हिंडणें--(क.) वणवण हिंडणें; भटकणें.

तिरडी——तिरडी उचलणें—(स्मशानीं पोंचविणें) एखाद्या विरुद्ध कट करून त्यास काढणें, ठार मारणें; नाय नाट करणें.

तिरडी करणें—तिरस्कारपूर्वक त्याग करणें.

तिरडी काढणें—एखाद्याचें मरण इच्छिणें; मरणाची तजवीज करणें.

तिरपीट——तिरपीट उडणें—[तिरपीट = त्रिपथ; तीन वाटा] वामनानें बळीजवळ त्रिपादभूमि मागून जेव्हां तीन खंडें व्यापिलीं तेव्हां बाळिराजा घाबरला. या कथेवरून किंवा पुढें तीन वाटा फुटत असल्या म्हणजे जो घोंटाळा होतो त्यावरून धांदल, तारांबळ, गोंधळ उडणें. त्रेधा उडणें, पहा. "' तूं खरं सांगितलंस तर बरं, नाहीं तर मी तुला पोलिसांत गुदरून देईन !' इतकें दरडावल्यावर मग काय विचारतां ! पंड्याजीची तिरपीटच उडाली.''–जग हें असें आहे.

तिरफटणें——तिरफटत जाणें—जरुरीशिवाय इकडे तिकडे वेळीं अवेळीं फिरणें. 'मी त्याचेकडे गेलों त्यावेळीं तो घरीं नव्हता, कोठें तरी तिरफटत गेला असेल.'

तिरफटून लावणें—परतून लावणें; हाकलणें, हाकलून देणें. 'शेतांत जनावरें आलीं होतीं परंतु गड्यांनीं त्यांना तिरफटून लावलें.'

तिरशिंगराव – १ जो दुसऱ्याशीं तिरसटपणानें वागतो व सारखा चिडचिड करतो असा माणूस. २ पराक्रमाचा आव आणणारा माणूस.

तिरस्थळी——तिरस्थळी यात्रा—[काशी, प्रयाग व गया या तीन स्थळांची यात्रा ती त्रिस्थळी] अवधूतासारखी वृत्ति. जेवणें, बसणें, निजणें वगैरे वेगवेगळ्या ठिकाणीं करणें. निरनिराळ्या जागीं निरनिराळ्या गोष्टी कराव्या लागणें. त्रिस्थली यात्रा पहा.

तिल——तिलतुल्यप्राय—तिळाएवढा; अगदीं अल्प; अत्यंत थोडा; अल्पप्रमाणवाचक शब्दप्रयोग.

❋ तिल तडके, दिन भडके—ऊन पडूं लागलें म्हणजे तिळाचीं बोंडें फुटून तीळ बाहेर पडूं लागतात. जसजसा तीळ पिकून त्याचीं बोंडें फुटूं लागतात तसतसें शरद ऋतूंतील ऊन तापूं लागतें.

तिलांजलि——तिलांजलि घेणें-घेऊन उभा राहाणें —(एखाद्याच्या नांवावर अथवा त्याचे नांवाची). श्राद्धाच्या वेळीं मृताच्या नांवानें तिलांजलि द्यावी लागते यावरून, एखाद्याच्या मरणाची वाट पाहणें. 'मोरोबादादा तिलांजली घेऊन उभा आहे असें इंग्रजांना कळलें.'–V. S. २.१२९.

तिलांजलि देणें सोडणें-सोडून देणें—(एखाद्या वस्तूची) आशा, हक्क, संबंध सोडणें. 'जिनें मला जन्म दिला तिला मी नुसती आसवांचा तिलांजलि देऊं नये का ?' गुणमंजूषा 'बबा, कन्यादानासाठीं इकडच्या हातावर तुम्हीं जें उदक सोडलंत, त्यानंच माझ्या माहेरच्या नांवाला तिलांजलि दिलीत !'–एकच प्याला ३.४.

तिसरा——तिसरा पाय—[दोन पायच नसून तिसरा आहे असें दाखविणें. इतकी तयारी, उत्साह] १ एखादें काम करण्याविषयीं अगदीं उतावीळ, फार उत्साही असणाऱ्याबद्दल योजतात. 'जेवावयाला म्हटलें तर तिसरा पाय.' २ फार उतावळेपणा. 'त्याला दाखवाल तें तो सांगेल किंवा सांगाल तें तो दाखवील. त्याला दाखविण्याची मात्र भीड धरतां कामा नये, म्हणजे सांगायला तिसरा पाय !'–विकारविलसित.

ह्याचें तिसरेंच एक--१ ह्या पहिल्या दोहोंशीं याचें जुळत नाहीं. २ (ल.) विचित्र, विलक्षण मत, मार्ग.

❋ तिसर नि घर विसर—[घर विसरणें = पुन्हां क्रिया न करणें.] एकदां, दोनदां, एखादी क्रिया हातून घडली व कटु अनुभव आला म्हणजे बहुधा तिसऱ्यानें ती क्रिया करण्याला मन घेत नाहीं, असा या म्हणीचा भावार्थ. तु०–इजा बिजा तिजा.

तिस्मारखां—तीसमारका (तीस माशा मारणारा) असाहि प्रयोग करतात. [तीस + मारणें + खान ? = तीस माशा मारणारा !] या नांवाचा पूर्वी एक योद्धा होऊन गेला. (ल.) एका सपाट्यास तीस माणसें मारणारा. १ अरेराव, रागीट कडक माणूस. 'शाळेचे सरमास्तर स्वभावानें मोठें गर्विष्ठ व तिस्मारखां होते.'–नि ६५८. २ चिडखोर, आसिक्र माणूस. तिरशिंगराव पहा.

ती——ती अल्लाची गाय आहे, मागून गेलें तर पाय झाडते, पुढून गेलें तर शिंग हलविते—(वांय.) व्याजोक्तीनें म्हणतात. अशा मारकट गाईला 'अल्लाची गाय' कोण म्हणेल ? गाय पहा.

ती गेली पण ते गेले नाहींत—[ती=दृष्टि. ते=पाय] (सांकेतिक) डोळे गेले पण पाय शाबूत आहेत.

तीथ——तीथ धरणें-नेमणें-ठरविणें—लग्न वगैरेचा मुहूर्त निश्चित करणें; कार्याचा दिवस ठरविणें; तिथिनिश्चय करणें.

*तीथ आहे तर भट नाहीं,भट आहे तर तीथ नाहीं—अवश्यक गोष्टींचा मेळ न जमणें; एक तरी न्यून असणें एखाद्या कार्याला दोन गोष्टींची आवश्यकता असते पण पुष्कळदां त्या दोहोंपैकीं एकच अनुकूल असते, दोन्ही एकदम नसतात.

तिथीशिवाय महिना नाहीं, कुणब्याशिवाय गांव नाहीं—ज्याप्रमाणें प्रत्येक महिन्यांत तिथी असतातच किंवा तीस तिथींचा महिना होतो त्याप्रमाणें प्रत्येक गांवांत कुणब्यांचीं घरें असावयाचींच. कुणब्याचें घर नाहीं असा गांव आढळत नाहीं किंबहुना कुणब्यांचीं घरें एकत्र असलीं म्हणजेच त्यास गांव म्हणतात.

तीन——तीन गोष्टींचे अनेक गट खालीं दिले आहेत.

तीन अग्नि—१ दक्षिण, २ गार्हपत्य, ३ आवहनीय.

तीन अमावास्या—१ आषाढ अमा० (दीपपूजा), २ श्रावण अमा० (पिठोरी), ३ भाद्रपद अमा० (सर्वपित्री).

तीन अवस्था—१ उत्पत्ति, २ स्थिति, ३ लय.

तीन अश्रु—१ आनंदाश्रु, २ दुःखाश्रु, ३ नक्राश्रु.

तीन ऋणें—१ देवऋण, २ पितृऋण, ३ ऋषिऋण.

तीन ऋतु—१ उन्हाळा, २ पावसाळा, ३ हिंवाळा.

तीन ऋषि—१ देवऋषि, २ ब्रह्मऋषि, ३ राजऋषि.

तीन कष्ट—१ कायिक, २ वाचिक, ३ मानसिक.

तीन काळ—१ भूत, २ वर्तमान, ३ भविष्य.

तीन गकार—१ गणक, २ गणिका, ३ गणिती.

तीन गण—१ देवगण, २ मनुष्यगण, ३ राक्षसगण.

तीन गुण—१ सत्त्व, २ रजस्, ३ तमस्.

तीन चांगलेपण—१ रूप, २ गुण, ३ शील.

तीन तंटयाचीं कारणें—१ कनक, २ कांता, ३ कृषि (जमीन).

तीन देहावस्था—१ बाल्य, २ तारुण्य, ३ वार्धक्य.

तीन धकार—१ धश्चोट, २ धनशेट, ३ धाम्या.

तीन, न फिरविल्यानें बिघडणारे—१ घोडा, २ भाकर, ३ विड्यांचीं पानें.

तीन नाडया—१ (अ) १ कफ, २ वात, ३ पित्त. (आ) १ इडा, २ पिंगला, ३ सुषुम्ना.

तीन पीठें—१ व्यासपीठ, २ पूजापीठ, ३ दीपपीठ.

तीन पुरुषप्रकार—१ शश, २ वृषभ, ३ अश्व.

तीन पोट भरण्याच्या जागा—१ कोठी, २ थट्टी, ३ पागा. कोठी पहा.

तीन मद—१ धनमद, २ विद्यामद, ३ शक्तिमद.

तीन, मर्दनानें वाढणारे—१ ऊस, २ चंदन, ३ स्त्री. इक्षुर्दंडास्तिलाः शूद्राः कामिनी हेममेदिनी। दधिचंदन तांबूले मर्दनं गुणवर्धनम् ॥-सुर १६०.३२७.

तीन लोक—१ स्वर्ग, २ मृत्यु, ३ पाताल.

तीन वकार—१ वकील, २ वक्कल, ३ वैद्य.

तीन वायु—१ शीतल, २ मंद, ३ सुगंध.

तीन वारकरी वैशिष्टयें—१ टाळ, २ माळ, ३ पताका.

तीन वृत्ति—(अ) १ बाल, २ सिद्ध, ३ पिशाच. (आ) १ बाल, २ उन्मत्त, ३ पिशाच.

तीन वेद—१ ऋग्वेद, २ यजुर्वेद, ३ सामवेद.

तीन संध्या—१ प्रातः, २ माध्याह्न, ३ सायं.

तीन संन्याशाचीं वैशिष्टयें—१ छाटी, २ दंड, ३ कमंडलू.

तीन साक्षी—१ कांची कामाक्षी, २ मदुरा मीनाक्षी, ३ काशी विशालाक्षी.

तीन सुखी—१ थट्टींतला रेडा, २ नायकिणीचा भाऊ, ३ नाटककंपनीचा मॅनेजर.

तीन, क्षेत्रांतील द्रव्यें—१ होळी,२ पोळी, ३ टाळी.

तीन अडकून सीताराम—(करं.) घोटाळयांत पाडणें. ‘ त्या गृहस्थानें तीन अडकून सीताराम केल्यामुळें आम्हांला कोठें जातां येईना.

तीन चव्वल खर्च होणें—चवल खर्च होणें म्हणजे पदराला खार लागणें; कांहीं नुकसान सोसावें लागणें; अंगावर शेकणें. ‘ हवी तशी गप्प उडवायला लोकांचे तीन चव्वल थोडेच खर्च होताहेत. ’ -विक्षिप्त २. १३९.

तीन चव्वल देणें-लागणें—ऋणकरी असणें. आज्ञांकित असणें; अवलंबून असणें; मिंधें असणें. 'मी काय त्याचे तीन चव्वल देणें लागतो म्हणून त्याचें बोलणें ऐकून घ्यावें.'

तीन ताड उडणें--ताड पहा. गर्व करणें; उन्मत्त होणें.

तीन तेरा गोष्टी—१ अरेरावीनें, दांडगाईचें भाषण. २ असंबद्ध, विसंगत भाषण. ३ व्यर्थ बहाणे; केवळ सबबी.

तीन तेरा होणें—दाणादाण उडणें; पांगणें. 'सगळ्या फौजेची दाणादाण होऊन तीन तेरा झाले!'—पामो ५४७

तीन पांच करणें--(व.) तीन पांच या दोन्ही संख्या चाराच्या मागेंपुढें आहेत. तीन किंमत योग्य कीं चार, कीं पांच असा केव्हां केव्हां वादविवाद उत्पन्न होतो त्यावरून. तक्रार करणें. 'तीन पांच कराल तर जोड्यानं मारीन.'

तीन फातार मांडप--(गो.) तीन धोंडे मांडले असतां नवीन चूल होते यावरून स्वतंत्र चूल मांडून घरांतून वेगळे होणें; स्वतंत्र संसार घेऊन बसणें; तीन धोंडे मांडणें; निराळी चूल करणें.

तीन वाटेची माती न मिळणें—कंगाल, दरिद्री असणें. 'त्याचे घरीं तीन वाटेची माती सुद्धां मिळणार नाहीं.'

❀ **तीन आमंत्रणें आलीं, मनाची गडबड झाली**—कोठें कोठें जावें अशी दोलाचल स्थिति. सर्वच ठिकाणीं गेल्यास प्राप्ति पुष्कळ होईल पण तें जमणार कसें? अशी चिंता. अति हांव.

तीन कोनी टोपी जिकडे फिरेल तिकडे सारखीच—१ जुनी साहेबी टोपी तिकोनी असे. ती जिकडे फिरवावी तिकडे सारखीच बसे. व दिसे. याप्रमाणें इंग्रजी राज्य. २ टोपीला तीन कोन असले म्हणजे तिची पुढची बाजू कोणती आहे हें नक्की कळत नाहीं. तिहींपैकीं कोणतीहि बाजू पुढें केली तरी सारखीच वाटते. याप्रमाणें एखाद्या मनुष्याच्या वागणुकींत निश्चित तत्त्व न दिसतां अनेक गोष्टींकडे त्याचा कल दिसून येत असला म्हणजे त्याची मानसिक वृत्ति नक्की कशी आहे तें कळत नाहीं व तो जें ज्यावेळीं बोलेल तें तेवढ्यापुरतें त्याचें मत असें आपण समजतों. ३ (गु.) त्रण खुणांनी टोपी, जेम फेरवो तेम फरे. त्रण खुणांनी टोपीनो विश्वास नहि. ही वरील सारखीच गुजराथी म्हण मराठ्यांना उद्देशून वापरीत.

तीन टक्के आदा व त्रेपन टक्के खर्च—प्राप्ति थोडी व त्यामानानें खर्च अवाढव्य.

तीन टक्के जमा, त्रेपन्न टक्के उचापत—आदा थोडा व कर्ज फार.

तीन तेरा, नऊ बारा-अठरा; तीन तेरा, आठ अठरा—पांगापांग; दाणादाण; उध्वस्त; फांकलेलें, पांगलेलें असणें; गोंधळ; घोंटाळा.

तीन तेरा नव बारा (सांगणें)—पोकळ, गैरलागू भलभलत्या सबबी सांगणें; बाता; गप्पा.

तीन दगडांत त्रिभुवन आठवतें; तीन धोंडे मांडले कीं त्रिभुवन आठवतें—स्वतंत्र संसार थाटून चूल मांडल्यावर माणसाला गृहस्थाश्रमांतील सुखदुःखाचा अनुभव येतो. व त्या त्रासानें त्याला नको नकोसें होतें. संसाराची जबाबदारी किती मोठी असते हें यांत दाखविलें आहे. चूल मांडली कीं विवंचना सुरू होते. नवीन संसार थाटला कीं सर्व गोष्टींचा ससेमिरा मागें लागतो व त्यांतल्यात्यांत माध्यान्हकाळची काळजी सर्वांत मोठी असते.

तीन दिवस संन्याशी, गांवांत उपवासी—एखाद्या गावांत कोणाची दाद दीर्घ काळपर्यंतहि न लागणें, म्हणजे गांवांत पद्धत, रीत नसणें; बेबंदशाही कारभार असणें.

तीन दिवसांचा कोल्हा!—कुत्रीं कोल्हीं वगैरेंच्या पिलांचे डोळे जन्मतांच मिटलेले असून कांहीं दिवसांनीं उघडतात. यावरून ज्याचे डोळे उघडले नाहींत असा मनुष्य जगांतील अनुभव घेतलेल्या मनुष्यास व्यवहारज्ञान सांगतो. तु०–कालचा पोर!

तीन पैशाची झटापटी, लाख रुपयांची मलमपट्टी—तीन पैशाकरितां मारामारी केली त्यांत जो मार लागला ती दुखापत बरी करण्याकरितां लाख रुपये औषधांत खर्च करावे लागले. एखादे वेळीं क्षुल्लक कारणासाठीं मारामारी किंवा भांडण होऊन तन्निवारणार्थ शेंकडों रुपये खर्च होतात.

तीन म्हैन्यांच्या खाणाक एका दिसाचो जोर पुरो—(गो.) तीन महिने खाऊन आलेली शक्ति एका दिवसाच्या तापानें पार जाते. तु०–तेली सांचवी धार धार, खुदा नेतो एकच वार.

तीन लक्षामाजीं एक पतिव्रता—खऱ्या पतिव्रता स्त्रिया फारच क्वचित आढळतात. लोकसंख्येंत त्यांचें प्रमाण काय पडतें हें सांगितलें आहे.

तीन शेटं नाहींत मग पसाभर राख कशाला—(अशिष्ट) केंस काढण्यास पूर्वीं राख व हरताळ यांचा उपयोग करीत. थोड्या गोष्टीचा मोठा पाल्हाळ लावायचा. एक-

दम मुद्दा न सांगतां उगीच मोठी प्रस्तावना करून वेळ घेणाऱ्यास म्हणतात.

तीन शेंडे, साघरबोंडें आणि लाल तोंडे, हे बाढल्यावांचून राहाणार नाहींत—कोणत्याहि ठिकाणीं एकदां मारवाडी, निवडुंग व इंग्रज लोक यांचा प्रवेश झाला म्हणजे हळूहळू ते सर्व जागा व्यापून टाकल्याशिवाय राहात नाहींत

तीनि तूं करि, चवतें हाव करनु दितां—(गो.) तीन तूं कर, चवथें मी करतों. दुसऱ्याला खूप राबवायचें आणि आपण नाममात्र श्रम करून सगळें काम आपणच केलें अशी थोरवी मिरवायची अशी प्रवृत्ति.

तीनशें——तीनशांचा राहिला घरीं, दो पैशांचा ऊठबैस करी—तीनशें रुपये खर्च करून ज्यानें लग्न लाविलें त्यास घरीं टाकून जारकर्म करणारी स्त्री दोन पैसे देणाराकरितां ऊठबैस करून त्याची मार्गप्रतीक्षा करते !

तीर——तीरावरच हातपाय गळाले, तो कितीसा पोहणार—ज्यास पाण्यांत उतरण्याचाच धीर होत नाहीं त्याच्या हातून पोहणें कसचें होणार ? जो एखाद्या कामांत किंवा धंद्यांत पडावयालाच भितो त्याचा त्या व्यवहारांत तग लागणें कठीण.

तीर्थ——तीर्थ-तीर्थयात्रा करणें—१ गंगादि तीर्थांस जाऊन स्नानादि यात्राविधि करणें; तीर्थाच्या ठिकाणीं श्राद्धें करणें. २ तीर्थांस भेट देणें.

*** वाहिली ती गंगा, राहिलें तें तीर्थ**—कांहींहि केलें तरी, कोणत्याहि बाजूनें फायदाच. झालें तें चांगलेंच होतें, आहे तेंहि चांगलेंच, असें मानण्याचा उपदेश करतांना योजितात. गंगा पहा.

तीर्थाच्या आटीं, एक भक्तीची कसोटी—अनेक तीर्थें हिंडण्याचे श्रम करण्यापेक्षां परमेश्वराची निस्सीम भक्ति करणें अधिक श्रेयस्कर होय.

तीर्थीं केलें स्नान, चुकेल काय मरण—अनेक तीर्थांत स्नान केलें तरी त्या पुण्याईनें कांहीं मरण टाळतां येत नाहीं.

तीर्थीं गेल्यावांचून मुंडण होत नाहीं—तीर्थाच्या ठिकाणीं मुंडण करावें असें धर्मशास्त्रानें सांगितलें आहे. त्याशिवाय यात्रेचें फल मिळत नाहीं; म्हणून मुंडण करावेंच लागतें. सक्ति केल्याशिवाय सुखासुखी कोणी काम करीत नाहीं. १ बऱ्या बोलानें कोणी ऐकत नाहीं. सोनारानें कान टोंचल्या शिवाय समज पडत नाहीं. २ श्रमावांचून फल मिळत नाहीं. तु०—(गु.) तिरथ वगर (अथवा, तिरथ गया विना) मुंडाय नहि.

तीर्थोदकं च वन्हिश्च नान्यतः शुद्धिमर्हतः।—(उत्तररामचरित्र १.१३.) तीर्थक्षेत्रांतील पाणी व अग्नि यांना शुद्ध करण्यास दुसरें कोण आहे ? ते स्वतःच नेहेमीं शुद्ध व पुनीत असतात. कधींहि अपवित्र होत नाहींत.—एकच प्याला २.३.

तीस——विशीं विद्या, तिशीं धन—वीस वर्षें पूर्ण होईपर्यंत किंवा विशी संपेपर्यंत म्हणजे २९ पर्यंत विद्यार्जन करावें. व तीस वर्षें पूर्ण होईपर्यंत किंवा तिशी संपेपर्यंत म्हणजे ३९ पर्यंत द्रव्यार्जन करावें. या दोन्ही गोष्टी याच वयांत साध्य होतात. तो काल गेल्यावर पुढें साध्य होत नाहींत.

तीळ——तीळ खाऊन व्रत मोडणें—(एक तीळ खाल्ल्यानेंहि उपवास मोडतो यावरून) थोडक्या लाभाकारितां अधर्म्य, वाईट गोष्टी करणें.

तीळ घालून कूळ उच्चारण—(गो.) विकृत श्राद्ध करणें. स्वतःचे तीळ देऊन तर्पण करणें.

तीळ तीळ—१ थोडें थोडें; जरा जरा; किंचित्; अल्प. 'औषध नित्य तिळतीळ खात जा.' २ हळूहळू; धीरे धीरे.

तीळ—तिळ तीळ जीव तुटणें—सारखी काळजी, हुरहुर लागणें; अतिशय चिंता वाटणें; झुरणें. 'तिळ तीळ तुटे ग जीव सदा चैन नच पडे।'—सत्यविजय. 'अन् जीव तर तिळतीळ तुटणें.'—जादुगार पृ. ७४.

तीळ तुटणें—मृताच्या दहाव्या दिवशीं निकट संबंधीयांनीं त्यास तिळांजळी द्यावयाची असते. यावरून सोयर, सुतक (तिलांजलीचा) संबंध सुटणें; नातें तुटणें; पिळ्या तुटणें.

तीळ दान देणें—१ (मृतमनुष्यास तिलांजलि देतात यावरून) तिलांजलि देणें; संबंध सोडणें; त्याग करणें. २ एखाद्या पर्व दिवशीं तीर्थाच्या ठिकाणीं स्नान, तिलदान करतात तें. 'ऐसा श्रीकृष्णार्जुन। संवादसंगमीं स्नान। करूनि देतसें तिळदान। अहंतेचें॥'—ज्ञा १८.१६१९.

तोंडीं तीळ न भिजणें—तीळ हें अगदीं लहान धान्य आहे त्याचा दाणा तोंडांत टाकल्याबरोबर भिजतो पण इतका थोडा वेळहि एखादी गुप्त गोष्ट एखाद्याच्या तोंडांत राहात नाहीं. एखादी गुप्त गोष्ट तोंडात, मनांत न राहणें.

तीळपापड होणें—तिळाचे पापड अतिशय, किंवा लवकर फुलतात यावरून (अंगाचा) संताप होणें; रागानें

लाल होणें; रागानें अंगाची आग आग होणें. ‘ माझ्या आवडत्या अंगाचा तिळपापड होऊन गेला.’–नाकु ३.३९. [कोणी ‘ तळपापड ’ (तळलेला पापड) अशी व्युत्पत्ति लावतात.]

तिळागुणी येणें—[तिळागुणी = ऐक्य; प्रेम.] अनुकूल होणें; प्रीति वाढणें.

तिळीं असणें––१ (एखाद्याच्या) कह्यांत, अध्यीं वचनांत असणें. २ (व.) एकरास असणें. ३ (व.) ऐकण्यांत असणें.

तिळीं थेंब पडणें—(कपाळावरच्या तिळावर घामाचा थेंब पडणें किंवा तिळावर तापलेल्या तेलाचा थेंब पडणें.) संतप्त होणें; अतिशय रागावणें.

तिळीं येणें—१ दुसऱ्याच्या कह्यांत, सत्तेंत येणें, स्वाधीन होणें. ‘ देव तिळीं आला । गोडें गोड जीव धाला ।’–तुगा २०३८. २ अनुकूल होणें; सख्य, प्रेम ठेवणें. पुढें पहा.

❀ **तीळ खा तिळागुणी या, गूळ खा गोडसे बोला**–तिळगूळ देतांना म्हणतात. तिळांमध्यें ज्याप्रमाणें स्नेह (तेल) असतो, त्याप्रमाणें मैत्री वाढवावी, व गुळाप्रमाणें मधुर भाषण करावें अशी प्रार्थना करण्यांत येते. तिळगूळ घ्या, गोड बोला.

तीळ खाऊन तीर्थ बुडविलें; (गो.) तीळु खावुनु व्रत भ्रष्ट––तीळ खाऊन व्रतभ्रष्ट होणें. एखादा नैतिक गुन्हा करायचा तर त्यामुळें सगळ्या जन्माचें कल्याण होईल असा तरी करावा. उगीच क्षुद्र गरजेसाठीं एखादें पाप करायचें आणि कीर्तीला कायमचा कलंक लावून घ्यायचा, असें करण्यांत फायदा काय !

तीळ खाल्ला तिळाइतकी भूक गेली—तीळ ही अगदीं लहान वस्तु आहे. एवढासा तीळ कोणी खाल्ला तर त्याची भूक त्यानें नाहींशी होणार नाहीं हें उघड आहे. पण त्या प्रमाणांत तर त्याची भूक कमी होईल ना. थोडी जर प्राप्ति झाली तरी तेवढ्याच लाभानें थोडें तरी समाधान होईलच असें मानिलें पाहिजे.

तीळ घेतले नि कोळ फेकलें—तीळ पक्क झाले म्हणजे सोंगतात व रोप्यांच्या पेंड्या बांधून उन्हांत सुकत ठेवतात. पेंड्या कडक वाळल्या म्हणजे त्या झोडतात. म्हणजे तिळाचे दाणे खालीं पडतात व वाळलेल्या काड्या, ज्यास कोळ म्हणतात तें फेकून देतात. वस्तूचा उपयुक्त अंश तेवढा घेऊन फोल राहिलेला भाग टाकतात. ‘ तिचीं मुलें तेवढीं नवऱ्यानें घेतलीं व तिला हाकलून दिलें. तीळ घेतले नि कोळ फेकून दिलें. ’

तीळ तांदूळ एक झाले, वाटाणे गडगडत गेले—कांहीं झालें तरी एका वर्गांतील, जातींतील, माणसें भांडलीं तरी पुढें मागें एक होणार. त्यांना बाजूला सारून आपण मध्यें घुसणारे मात्र शेवटीं बाजूला पडतात.

शेजीची केली आस आणि तीळ तीळ तुटे मांस—शेजारणीवर अवलंबून राहून एखादी गोष्ट केली असतां ती अंगलट येते व तीपासून त्रास होतो.

तिळभर करावें आणि डोंगरभर गर्जावें—(ऐति.) थोड्याशा कामाचा मोठा गवगवा करणें. जाहिरातबाजी. ‘ आजचा काळ असा आहे जें ‘ तिळ० ’ पण तुमचें घराणें डोंगरभर करून तीळभरहि सांगत नाहीं ! ’–गजेंद्रमोक्ष १.५५.

तिळभर चतुराईचें मोल, शेरभर हुन्नराचें तेल––अल्पशा बुद्धीचें कार्य पुष्कळ कारागिरीनें केलेल्या कार्याच्या बरोबरीचें असतें. शारीरिक श्रमाचें कार्य व बौद्धिक कार्य यांची तुलना होऊं शकत नाहीं.

तिळभर दुखणें, मणभर कुथणें—एखाद्या क्षुल्लक गोष्टीचा फार बोभाटा, बाऊ करणें.

तिळाइतकें नातें व गगनाइतकी मैत्री—नात्याचा संबंध कितीहि दूरचा व अल्प असला तरी तो फार दाट व अनेक दिवसांच्या मैत्रीपेक्षांहि अधिक आहे. तु०–Blood is thicker than water.

तिळा जोन्नो भिकंभटाक—(गो.) तिळाचा द्रोण भिकंभटाला दान करायचा. अमुक वस्तु अमुक्याच्या योग्यतेची असें म्हणतांना वापरतात.

तिळाचा भात नाहीं, जांवई गोत नाहीं, सून माय बहीण नाहीं––(व.) तिळाचा जसा भात होत नाहीं, तसें जांवयाचे ठिकाणीं सासूसासऱ्याबद्दल आपलेपणा उत्पन्न होत नाहीं आणि सुनेच्या ठिकाणीं सासूबद्दल खरें प्रेम असत नाहीं.

तुकडा——**तुकडा तोडून देणें**–भीड अथवा मुरवत न धरितां स्पष्ट उत्तर देणें; रोखठोक जबाब देणें; साफ नाहीं म्हणून सांगणें; संबंध तोडणें.

तुकडा देणें–वांटा, हिस्सा देणें; वेगळें करणें; वांटप करणें.

तुकडे पडणें––१ मोठी व चुरशीची चढाओढ लागणें. २ महाग होणें; दुर्मिळ होणें. (ज्यांचे तुकडे तुकडे करून थोडी थोडी विक्री करतां येईल अशा पदार्थांच्या किंमती-

संबंधीं योजतात). ' मांजरपाटाचे धान्याचे-आंब्याचे-गुळाचे तुकडे पडतात. '

(कामाचे) तुकडे पडणें--सर्वांच्या वांटणीस थोडें-थोडें येऊन लवकर संपणें; झपाट्यानें, लवकर होणें; चट्कन उरकणें.

(हात, पाय, मान, कमर, पाठ वगैरेचे) तुकडे पडणें—अतिश्रमानें थकून जाणें; मरगळीस येणें; दमणें. ' चालून चालून पायाचे तुकडे पडले. '

तुकडा-डे मोडणें—(निंदार्थी प्रयोग.) पोटांत अन्न घालणें; क्षुधाशमन करणें; जेवणें; खाणें. ' आपल्या घरीं तुकडा मोडावयास पाऊणशें माणूस होतें. ' -कोकि ८८.

तुका——केलें तुका, झालें माका--(गो.) केलें तुला पण झालें मला ! एक सासू आपल्या सुनेचा फार हेवा करीत असे. तिच्या मनांत आपल्या मुलास मारून सुनेस विधवा करावयाचें होतें. अशा हेतूनें तिनें एक दिवशीं आपला पति व पुत्र असे जेवावयास बसले असतां मुलाच्या ताटांत विषयुक्त पदार्थ वाढला. पण सुनेस ही गोष्ट माहीत असल्यामुळें, तिनें पतीचें ताट सासऱ्यापुढें ठेवलें व सासऱ्याचें ताट पतीपुढें ठेवलें. पुढें जेवण झाल्यावर सासरा विषबाधा होऊन मरण पावला. तेव्हां सासू दुःखानें म्हणूं लागली कीं, केलें तुका पण झालें माका.

तुका ना माका, घाल सुण्यास—(गो.) आपणास मिळत नसल्यास दुसऱ्यास मिळूं नये म्हणून त्याचा नाश करावयाचा. तुला ना मला घाल कुत्र्याला. (अहि.) तुले न मले घाल कुत्राले.

तुकामाका पडाना, तुझे बगर जायना—(गो.) तुझें माझें जुळत नाहीं पण तुझ्याशिवाय माझें चालत नाहीं.

तुका——तुका म्हणे उगी—उगीच रहावें । जें जें होईल तें तें पहावें ॥—तुगा ३२८३. तुकाराम असा उपदेश करितो कीं मनुष्याच्या हातांत कांहीं एक नसून सृष्टिक्रम हा अव्याहत चालला आहे. त्यांत मनुष्याच्या हातून कांहीं फरक होऊं शकत नाहीं. तेव्हां त्यानें धडपड न करतां स्वस्थ बसून जग कसें काय चालतें तें पाहात राहावें व आपलें काम तेवढें आपण करावें, इतर भानगडींत पडूं नये. -शाब १.१००,१३८.

तुका म्हणे उगी रावचें, कितें जाता तें पळोवचें—(गो.) वरप्रमाणें. कांहीं कांहीं प्रसंग असे येतात कीं, त्यावेळीं स्वस्थ बसून जें होईल तें पाहाणें याखेरीज गत्यंतर नसतें.

तुका म्हणे ऐशा नरा । मोजून माराव्या पैजारा ॥—लबाड मनुष्यास चांगली शिक्षा केली पाहिजे.-तुगा.

तुका म्हणे करून दावी । त्याचे पाय माझे जिवीं ॥—(बोल बोलतां वाटे सोपें । करणी करितां टीर कांपे ॥ या अभंगाचा शेवट.-तुगा २३२४.) जो मनुष्य नुसतें बडबडण्यापेक्षां प्रत्यक्ष कृति करून दाखवितो, तो मला वंद्य आहे. तु०-आधीं केलें मग सांगितलें ।-रामदास.

तुका म्हणे येथें, पाहिजे जातीचें ।-येर गाबाळाचें काय काम ॥-तुगा ३५८७. वरवर सोंग आणून काम होत नसतें. मूळचाच गुण, विद्या पाहिजे. वाटेल त्याला वाटेल ती गोष्ट येत नसते हें पटविण्यासाठीं वरील चरण म्हणतात. " शास्त्री:- खरं आहे बुवा ! सूपशास्त्रांत असा सांप्रदायिक मनुष्यच पाहिजे. ' तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें ! ' " -एकच प्याला १.४.

तुकाई——तुकाई तुळजापुरीं, नायटे मुलखांत—देवी देवळांत व नायटे गांवांत, पहा. एका गोष्टीचा परिणाम भलत्याच गोष्टीवर होणें. देवळांत देवी रुसली तरी त्यापासून गांवांतील लोकांस नायट्यांच्या उपद्रवानें त्रास होतो.

तुकाराम——तुकाराम बुवाची मेख--न उकलण्यासारखें कोडें; गूढ. (तुकारामाच्या कांहीं अभंगांत जो गूढ अर्थ भरला आहे तो कोणालाच निश्चयपूर्वक उकलतां येत नाहीं, यावरून.)

तुकारामाची म्हैस—दूध न देणारी, फक्त शेणाकरितां बाळगलेली म्हैस.

तुक्का——लागला तर तीर, नाहींतर तुक्का—[तुक्का=फाळाच्या ऐवजीं नुसता लांकडी गोळा टोंकास बसविलेला बाण.] बाण मारणारे लोक कांहीं बिनफाळाचे बाण, तुक्के जवळ बाळगतात. त्यांचा उपयोग नेमाचा अजमास घेण्याकरितां, अभ्यास करण्याकरितां वगैरे करतात. प्रथम तुक्का मारून तो कोठें पडतो याचा अंदाज घेतल्यावर खरा बाण कोठपर्यंत पोचेल, कोठें पडेल, याचा अंदाज येतो. एखाद्या निशाणावर बाण मारणारा एक मनुष्य बाण मारून पाही व तो जर बरोबर लागला तर सांगे पहा मी कसा नेमका बाण मारला आहे. जर न लागला तर केवळ नेम अजमावण्याकरितां मी तुक्का मारला आहे असें म्हणत असे. त्याप्रमाणेंच एखाद्या मनुष्याला उद्देशून व्याजोक्तीनें, किंवा अप्रत्यक्ष बोलून पाहावयाचें; त्यावर एखादा आरोप सहज थट्टेनें केल्यासारखें करावयाचें. जर तो आरोप खरा ठरला तर ठीकच

नाहींतर थट्टेवर न्यावयाचें. तु०—बराचसा चिखल टाकला असतां थोडा तरी डकून राहतो. खडा टाकून पाहणें. शेणाचा पोहो माती घेऊन उठतो. If you cast mud some will stick.

तुझा——तुझा बा कांदे खाई, तुझी आई सोलून देई—एखाद्याची निर्भत्सना करण्याकरितां म्हणतात. कांदे खाणें हें कांहीं कुटुंबांत अगदीं धर्मबाह्य मानतात.

तुझा मंत्र नोहे बरा, माझा बैल चुके मोऱ्हा—तुझ्या नादीं लागून कांहीं उपयोग नाहीं. माझ्या बैलाकडे लक्ष्य न दिल्यास तो मात्र चुकण्याचा संभव आहे.

तुझा माझा रस गळे, तुला पाहून जीव जळे—परस्परांचे वरवर उपचार चांगले असतात, पण एकमेकांचीं अन्तःकरणें शुद्ध नसल्यानें विपरीत भाव उत्पन्न होतो.

तुझी दाढी जळो पण माझा दिवा लागो—दुसऱ्याचें नुकसान झालें तरी चालेल पण आपला फायदा पाहावयाचा. तुलना—एकाची जळते दाढी०

तुझें घर जळो दे, माझी वांगी भाजूं दे—वरीलप्रमाणें. दुसऱ्याचें नुकसान होत असलें तरी आपला फायदा करून घेणें.

तुझें तें माझें व माझें तें माझेंच; तुझें तें माझें, माझें तें माझ्या बापाचें!—अतिशय स्वार्थी वृत्ति.—गांगा २०५.

तुझें मन माझे साक्षीशीं आणि माझें मन तुझे परीक्षेशीं—मनाला मन ओळखतें व आकर्षिलें जातें.—पामो २७९.

तुझें माझें पटेना, तुझ्यावांचून गमेना—तुझें माझें जमेना पहा. मागें पहा.

तुझें मीठ आळणी—एकाद्यास कांहीं तरी खोटा दोष देऊन त्यास कमीपणा आणणें. असा भावार्थ.

तुझें राहूं दे थडे, माझें घे कडे—तुझें मूल थडीवर, नदीकांठीं ठेव पण माझें कडेवर घेऊन चल. तुझें काम बाजूस राहूं दे, माझें मात्र अंगावर घेऊन कर असा भावार्थ.

तुझ्या आईनें का कोकिळा खाऊं घातल्या होत्या!—गोड आवाजाच्या माणसास म्हणतात. कोकिळा ही सुंदर गाण्याबद्दल प्रसिद्ध आहे.

तुझ्या कामांत भट पडो!—शेवटच्या बाजीरावाच्या कारकीर्दींत भटांचें राजकरणांत फार प्राबल्य असे व त्यामुळें काम बिघडे. त्यावरून वरील म्हण ही शापाप्रमाणें प्रचारांत आली. कामांत भट पडल्यास काम नासणारच.

तुझ्या नांवाचें मंगळसूत्र तोडून टाकून तुझ्या नांवांचें कुंकू पुसतें—पतीचा त्याग करणें; संबंध सोडणें. घेणेंमध्यें पहा.—इंप ११२.

तुझ्या बारशाच्या घुगऱ्या खाल्ल्या आहेत; तुझ्या बारशाला जेवलों आहे—दुसऱ्यापेक्षां आपण मोठे आहों, अधिक हुशार आहों, त्यास पुरून उरण्यासारखे आहों असा अभिप्राय व्यक्त करण्याकरितां ही म्हण वापरतात. घुगऱ्या पहा.

तुझ्याशिवाय गमेना, तुझें माझें पटेना—मागें पहा.

तुझ्या शेंड्यार, मज्या बोंड्यार—(गो.) दुसऱ्याला नुसता दाखवून आपण एखादा पदार्थ गिळंकृत करणें.

तुझ्या हाताला का इंचु डसला होता?—(व.) सुनेनें काम न करतां तें कुणा दुसऱ्याकडून करवलें तर सासू सुनेस म्हणते. तुला करायला काय झालें होतें या अर्थी. तु०—तुझे हात का केळीं खावयास गेले होते?

तुटणें——तुटून पडणें—१ (कामाला) निश्चयानें आणि जोरानें लागणें. २ (मनुष्याच्या) अंगावर चवताळून जाणें, त्याला शिव्या देत सुटणें; अतिशय रागावून बोलणें. ३ जोराचा हल्ला करणें; चालून जाणें. 'मराठ्यांची फौज निजामाच्या लष्करावर इतकी निकरानें तुटून पडली कीं, मोगल फौजेस ताबडतोब औरंगाबादेकडे पळ काढावा लागला.'

❀ **तुटली मैत्री जडली जाती, अखंडित चालत नसती**—एकदां मैत्री तुटली तर ती पुन्हां जोडली जाईल पण हा सांधा फार दिवस टिकत नाहीं. कितीहि प्रयत्न केला तरी पूर्वीप्रमाणें मैत्री राहूं शकत नाहीं.—सवि १८. पुढील म्हण पहा.

फुटलें मोतीं तुटलें मन सांधत नाहीं—सांधूं न शके विधाता—एकदां मोतीं फुटलें कीं तें कधींच नीटपणें सांधलें जात नाहीं. त्याचप्रमाणें मनाचें आहे. मन एकदां बिघडलें कीं तें पूर्ववत् निर्मळ राहात नाहीं. अवज्ञात्रुटितं प्रेम नवीकर्तुं क ईश्वरः। संधिं न याति स्फुटितं लाक्षालेपेन मौक्तिकम्॥ —सुर १५८.२२१

नखानें तुटेल त्यास कुऱ्हाड कशास पाहिजे!—जी गोष्ट सुलभपणें होऊं शकते ती करण्यास व्यर्थ आटापीटा कशासाठीं करावा! चिलीट मारण्यास गदा कशाला!

तुणतुणें——तुणतुणें वाजविणें—लावणें—कुरकुर लावणें; भुणभुण लावणें; गाऱ्हाणें गात असणें. ऐकणार न!

कंटाळा आला तरी पुन्हां पुन्हां आपलीच हकीकत सांगत सुटणें; आपलीच गोष्ट पुन्हां पुन्हां काढणें; स्वतःचें मत प्रतिपादणें. 'देशांत किती जोरानें विचारक्रांति चालली आहे, याची या लोकांस दादच नाहीं, आपलें प्रायश्चित्ताचें तुणतुणें तें अद्याप वाजवीतच आहेत.'

❀**मोर नाचे म्हणून तुणतुणें नाचे**—तुणतुणें नांवाचा एक पक्षी आहे. तो मोराप्रमाणें नाचण्याचा वेडावांकडा प्रयत्न करतो. तु०—मोर नाचे म्हणून लांडोर नाचे.

तुंबडी——तुंबडी भरणें—[तुंबडी=लहान भोपळा —भिक्षापात्र.] भिकाऱ्याला तुंबडीभर भिक्षा मिळाली कीं त्याचें समाधान. १ आपल्या पदरांत पाहिजे तितकें पाडून घेणें. २ स्वतःचा फायदा करून घेणें; स्वार्थ साधणें. 'मुक्या जनावराच्या तोंडांतलें काढून तूं आपली तुंबडी भरलीस, त्याचें पातक कोठें रे फेडशील ?'—रंगराव.

❀ **रिकामा न्हावी, कुडाला तुंबड्या लावी**—कूड पहा.

तुंबारा——तुंबारा बसणें—ज्याप्रमाणें पाण्याच्या प्रवाहामध्यें बांध घातला असतां पाणी तुंबून राहतें त्याप्रमाणें अडथळ्यामुळें दाटून राहणें; अडथळा होणें. 'बरेच दिवस त्यांच्या आवेशाला तुंबारा बसला होता तो एकदम खुला झाला.'—पामो ३४७.

तुम——तुम करते हम करते, पण जरा जरा फेर पडते—(घेडगुजरी भाषा) सर्वच लोक आपआपल्या परीनें काम करतात पण प्रत्येकाच्या पद्धतींत व कृतींत फरक असतो. सर्वांचें काम एकसारखें होत नसतें.

तुम तांडेल हम तांडेल, घमत कोण सांडेल ?—प्रत्येक खलाशी जर मी तांडेल (वरचा अधिकारी) असें म्हणूं लागला, तर गलबतामध्यें झिरपून येणारें पाणी (घमत) कोण काढून टाकील ? हलकें काम कोणींतरी करावयाला हवेंच. तु०—तूं राणी मी राणी, पाटाचें पाणी कोण आणी.

तुम लढो, हम कपडे संभालते—धोका असलेली गोष्ट दुसऱ्यावर सोंपवून आपण हलकेंसलकें बिनधोक्याचें काम करावयाचें.

तुमबे चुप, हमबे चूप—परस्परांचीं वर्मे परस्परांस माहीत असलीं म्हणजे गप राहण्यांतच दोघांचाहि फायदा असतो.

तुमचा-चें——तुमचे पायसमक्ष—तुमच्या पायाची शपथ घेऊन; तुमचे पाय साक्ष ठेवून.

❀**तुमचा खेळ होतो पण आमचा जीव जातो**—कांहीं मुलें एका तळ्याच्या कांठीं जमून भाकरीचा खेळ खेळत होतीं. ते मारीत असलेले दगड तळ्यांतील बेडकांना लागत. तेव्हां तळ्यांतील एक म्हातारा बेडूक वर येऊन त्यांना वरीलप्रमाणें सांगूं लागला. एकाचा खेळ दुसऱ्याच्या नुकसानीस कारण होतो.

तुमची आमची विडी, बसल्या बसल्या फुंका—बसल्या बसल्या कसातरी वेळ काढणें. थोडक्यांत स्नेह संपादन करणें. बिनखर्चीं परभारें स्नेह संपादन करणें. तुमची विडी तुम्ही ओढा, आमची आम्ही ओढतों. पाठभेद—तुमची विडी आमची काडी, बसल्या बसल्या फुंकू. यांत काडीवाल्याचा निवळ स्वार्थ दिसतो.

तुमचें तुम्हाला, खटपट आम्हाला—रिकामी खटपट. तु०—ज्याचें त्याला गाढव ओझ्याला. अकाबाईच्या म्हशी बकाबाईला उठाबशी.

तुमचें तें आमचें, आमचें तें हॅंः हॅंः !—दुसऱ्याची वस्तु बळकावयाची व स्वतःच्या बद्दल गोष्ट उडवून लावावयाची असा आप्पलपोटेपणा. तुझें तें माझें० पहा.

तुमचे पोहे नि आमचा कोंडा, फुंकून फुंकून खाऊं—कोंड्याला कांहीं पैसे पडत नाहींत; शिवाय तो तर मुळीं काढून टाकून पोहे खावयाचे असतात. यावरून निव्वळ आपमतलबीपणा. "आंतापर्यंत इस्थोनिया, लटव्हिया, लिथुआनिया या छोट्या देशांशीं रशियानें जे करार केलें आहेत त्यांचें स्वरूप पाहतां हें धोरण 'तुझे पोहे नि माझा कोंडा फुंकून फुंकून खाऊं' या स्वरूपाचें आहे."—त्रिकाळ ८-१०-३९.

तुमचें मरणें तसें माझें आग रिघणें—मागें पहा.

तुमच्या दारीचा कुतरा, नका मोकलूं दातारा—मी अगदीं दारांत पडून राहिलेल्या कुत्र्याप्रमाणें लीन होऊन तुमचा आश्रय घेऊन राहिलों आहे तरी मला हांकून लावूं नका. अतिशय नम्रपणाची याचना, प्रार्थना.

तुम्ही——तुम्ही आम्ही एक, कंठाळीला मेख—आम्ही तुम्ही एक० पहा. कंठाळी पहा.—पामो २८८. "ब्रिटिश सरकारनें हिंदी लोकांना आपल्यापैकीं समजण्याचें कितीहि सोंग आणलें, तरी तें त्यांना परकीयांप्रमाणेंच लेखीत असल्याचें त्यांच्या अनेक कृत्यांवरून व विशेषतः चालू युद्धांत हिंदी लोकांची आजमितीपर्यंत उपेक्षा केली गेली आहे त्यावरून सिद्ध झालें आहे. 'तुम्ही आम्ही एक व कंठाळीला मेख' असा इंग्रज मुत्सद्यांचा व व्हाइसरॉयांसारख्या बड्या अधिकाऱ्यांचा कावा असून, तो हिंदुस्थानांतील राजकीय पक्ष जाणून आहे."—केसरी ११-६-४०.

तुम्ही आम्ही गोड, तिसऱ्याचा लोड(लोढणें)—समोर असलेल्याची स्तुति व हजर नसेल त्याची निंदा. तोंडदेखलें बोलणें.

तुम्ही आम्ही भाऊ, गाठोडयाला हात नका लावूं-एकीकडे अगदीं जवळचें नातें सांगावयाचें पण मुद्याचा प्रश्न आला म्हणजे दूर दूर राहावयाचें;स्वतःला कोणत्याहि प्रकारें झळ लागूं द्यावयाची नाहीं. तु०—तुम्ही आम्ही एक०

तुम्ही आम्ही भाऊ भाऊ, तुमचें आमचें आम्हीच खाऊं—निव्वळ स्वार्थीपणा.तुझें तें माझें व माझें तें माझेंच. —न. चिं. केळकर, विलायतचीं बातमीपत्रें.

तुम्ही करा वटवट, मी आहे निगरगट्ट—बोललेलें निमूटपणें ऐकणें पण कांहीं कृति न करणें; दुसऱ्यानें आपणाबद्दल केलेल्या तक्रारीकडे पूर्णपणें दुर्लक्ष करणें; नुसतें ऐकून घेणें; काणाडोळा करणें. असें करणाऱ्या व्यक्तीबद्दल म्हणतात.

तुम्ही तुमच्या भरांत, आम्ही तुमच्या केरांत—मनुष्य वैभवास चढला म्हणजे पूर्वीचे ऋणानुबंधी लोक कस्पटाप्रमाणें लेखूं लागतो या गोष्टीस अनुलक्षून म्हणतात.

तुम्हीं दिलं थोडं, त्यां दिलं घोडं—(व.) तुम्हाला सोद्यानें फसवून तुमच्यापासून बरेंच द्रव्य उपटून नेलें, पण मीं त्यांत भोळेपणानें आणखी भरती टाकून माझें घोडेंहि त्याला दिलें. तुम्ही एक भोळे मी सात भोळी.

तुम्ही पाहाल तें आमच्यानें बोलवावयाचें नाहीं—इतकें दोघांत अंतर; दर्जामध्यें, अधिकारामध्यें कमजास्तपणा.

तुरमुंडी——तुरमुंडी देणें — डोंबी देणें;कोडगेपणानें, हट्टानें बसणें. तरमुंडी पहा.

तुरा—— (डोक्याला) तुरा लावणें—विजयी, पराक्रमी वीराच्या डोक्याला तुरा खोंवून त्याचा सत्कार करण्याची पूर्वीं चाल असे. मोठा पराक्रम करणें; कीर्ति, प्रतिष्ठा मिळविणें; शौर्य गाजविणें; पराक्रमाचा कळस करणें. A feather in one's cap.

तुरा लावून फिरणें—१ तुरा लावणें. २ दोष अंगीं लागला असतां त्याचें निराकरण होवो अगर न होवो, प्रतिष्ठितपणें मिरविणें.

तुराटी——तुराटी नाहीं गांड खाजवायला आणि आमंत्रण सगळया गांवाला—(व.) जवळ कांहींहि नसतां एखादें मोठें अवडंबर माजाविणें; मोठा दिमाख दाखविणें.

तुरुक——तुरुक होडीस-हांडीस पडणें—[तुरुक = तुर्क. होड = पैज, पण.] तुर्कांच्या पणाचा ऐवज होणें. (ल.) दुष्टांच्या हातीं पडणें. 'परंतु आम्हीं मुलें बायकांनीं तुरुक-होडीस पडावें इतकें मात्र उरलें.'—भाव ५१. हट्टास पेटणें; निकरावर येणें; इरेस पडणें. 'तुरुक हांडीस देशमुखी पडली होती.'—रा ३. ६६.

तुरुत——तुरुत्दान महापुण्य—[तुरुत्=त्वरित] जें कांहीं द्यावयाचें तें तात्काळ देऊन टाकणें चांगलें. शुभस्य शीघ्रं या अर्थीं. तु०—धर्मस्य त्वरिता गतिः।

तुला——गाजराची तुला आणि विमानाची वाट—गाजरांचें तुलादान करून म्हणजे अगदीं स्वल्प धर्म करून, स्वर्गांतून विमान येईल अशी अपेक्षा करणें. क्षुल्लक गोष्टीबद्दल किंवा यत्नाबद्दल मोठया बक्षीसाची अथवा फळाची अपेक्षा करणें.

तुष——तुषकंडणन्याय—[तुष=धान्यावरचें टरफल] काथ्याकूट; निष्फळ प्रयत्न. 'यांत खरा कोण आणि खोटा कोण याचा विचार करीत बसणें म्हणजे तुष० न्यायाप्रमाणें व्यर्थ काथ्या कुटणें होय.'—नि. चं. तु०—तूस कांडून हातास फोड. घुसळितां ताक कांडितां भूस। साध्य नाहीं क्लेश जाती वांया।—तुगा ३२१८.

तुळस——तुळस उचलणें—शपथ घेण्यासाठीं बेल, तुळस इ. पवित्र वस्तु वापरीत. यावरून शपथ घेणें.

तुळस उपटून भांग लावणें—चांगली वस्तु टाकून वाइटाचा अंगीकार करणें; वाईट मनुष्य पदरीं ठेवण्याकरितां चांगल्या मनुष्यास काढून टाकणें.

तुळशीपत्र कानांत घालून बसणें—ऐकलें न ऐकलेंसें करून स्वस्थ राहाणें; लक्ष्य न देणें; ऐकूनहि मौन धारण करून बसणें.

तुळशीपत्र ठेवणें—एखादी वस्तु दान करतांना तीवर तुळशीपत्र ठेवतात. यावरून १ हक्क सोडणें; कृष्णार्पण करणें; देवास वाहणें. २ परभारें दुसऱ्याची वस्तु तिसऱ्यास देऊन टाकणें.

तुळशीपत्र तोलणें—शपथ वाहाणें. 'द्या तर तो मला तुळशीपत्र तोडून.'—मोरप्र ११.

तुळशीचे मुळांत कांदा लावावा लागणें—१ चांगला हेतु सिद्धीस नेण्यास वाईट साधनांचा उपयोग करण्याविषयींची सबब सांगणें. २ वाइटांतून चांगलें काढण्याचा प्रयत्न करणें.

तुळशीच्या झाडास कांटे लागणें—चांगल्या कृत्यास वाईट फळें येणें. —विक्षिप्त ३.४९.

तुळशींत भांग—चांगल्यांच्या समुदायांत चुकून एखादा वाईट माणूसहि आढळतो. सज्जनाच्या पोटीं क्वचित् दुर्जन निपजतो.

❀ **तुळशींत भांग व भांगेंत तुळस**—चांगल्या व वाईट गोष्टी एका ठिकाणींच पिकतात.

तूं——हूं तर भांडीं घांस तूं-सुखावह न होणारें असें काम दुसऱ्यास करण्यास सांगणें. दोन सोबती प्रवासास निघाले असतां एका ठिकाणीं त्यांनीं मुक्काम केला. तेव्हां स्वयंपाक करून दोघेजण जेवले. पण जेवल्यानंतर अंगांत आळस आल्यामुळें भांडीं कोणीं घांसावीं याबद्दल त्यांच्यांत वाचा-वाची सुरू झाली. प्रत्येक जण म्हणे कीं दुसऱ्यानें भांडीं घांसावीं. अखेरीस त्यांच्यामध्यें असा करार ठरला कीं, दोघांनींहि स्वस्थ बसावें व कोणींहि तोंडांतून अवाक्षर काढूं नये. जो प्रथम बोलेल त्यानें भांडीं घांसावीं. याप्रमाणें बराच वेळ गेला. दोघेहि बोलण्यास उत्सुक असून प्रथम कोणीं बोलावें असा त्यांस प्रश्न पडला. अखेरीस त्यांपैकीं एकास स्तब्ध बसणें अशक्य होऊन त्यानें दुसऱ्यास हूं ! म्हणून हांक मारली. त्याबरोबर त्यानें उत्तर दिलें, हूं तर भांडीं घांस तूं.

तूं आलीस नटत, पण मला नाहीं बरें वाटत—एकाला उत्साह व दुसऱ्याला तितकाच निरुत्साह वाटणें; एखाद्याच्या आनंदावर विरजण घालणें.

तूं इमानसे गाव, हम सोता है—तूं चांगलें गायन कर, मी तोंपर्यंत झोंप घेतो. दुसऱ्यास कष्ट करावयास लावून आपण मजा मारणें.

तूं कर माझ्या पोळ्या, मी वळतें तुझ्या शेळ्या—कामाची वांटणी किंवा अदलाबदल करणें.

तूं कर वटवट-कटकट, मी आहे निगरगट्ट, माझा गुरु बळकट—दुसऱ्यानें कितीहि कुरकुर, बडबड केली तरी तिकडे लक्ष्य द्यावयाचें नाहीं. मागें पहा.

तूं डालडाल, मैं पानपान—'तूं प्रत्येक डाहाळीवर तर मी प्रत्येक पानावर.' एकानें बढाई मारली कीं मी झाडावर खांदोखांदीं अगदीं सगळीकडे हिंडून आलों आहे. तर दुसऱ्यानें त्यावर कडी केली कीं, तूं फांदोफांदींच हिंडला असशील, मी तर पानोपानीं हिंडलों आहे. तुझ्यापेक्षां मला अधिक माहिती आहे. तु०—नाऱ्या जाणे वारा, केशा जाणे साडेतेरा.

• **तूं दळ माझें आणि मी दळीन गांवच्या पाटलाचें**—आपलें काम दुसऱ्यास सांगावयाचें; कारण काय तर तिसऱ्याचेंच कांहीं रिकामकें काम करावयाचें आहे म्हणून ! लष्करच्या भाकरी भाजणें.

तूं नाहीं तर तुझ्या बापानें शिव्या दिल्या असतील—कोणीकडून तरी दूषण ठेवणें व त्याचा वचपा काढणें. [एक तहानलेलें कोंकरूं नदीवर पाणी पिण्यास गेलें. तेथें एक लांडगा पाणी पीत होता. तेव्हां त्यापासून दूर व खालच्या बाजूस वाहाणाऱ्या पाण्यापाशीं जाऊन तें पाणी पिऊं लागलें. लांडग्यास कांहीं कुरापत काढून त्याला खावयाचें होतें. तेव्हां 'माझें पाणी उष्टें करतोस ! काल⋯नाहीं तर तूं गुदस्ता शिव्या दिल्यास !... त्यावेळीं तूं जन्मला नव्हतास म्हणतोस ! तर तुझ्या बापानें मला शिव्या दिल्या !'—इ. बोलून त्या कोंकराला लांडग्यानें खाऊन टाकिलें.]

तूं फिरलास झाडोझाड, मी फिरलों पानोपान—तूं डालडाल० पहा.

तूं मगेधीं ऑजें धाड, हांव तुगेधीं जेवूच्या यॅतां—(गो.) तूं माझ्या घरीं फळफळावळीनें भरलेली पाटी धाड आणि मी तुझ्या घरीं जेवायला येतों. दुसऱ्याकडून हवें तसें उकळायाचें आणि आपण मात्र दमडीसुद्धां खर्चायची नाहीं, अशी स्वार्थी प्रवृत्ति.

तूं मर ग भाजे, मी नवरा साजे—(व.) पति आपल्या नकोशा झालेल्या पत्नीला म्हणतो, 'हे भार्ये, तूं मरेनास एकदांची. तूं मेलीस म्हणजे माझ्या कपाळची कटकट जाईल. मी मग दुसरें लग्न करीन व सुखी होईन.' ही म्हण पत्नीबद्दल पतीची बेपर्वा वृत्ति दर्शविते.

तूं मला अन् मी तुला—आपण एकमेकांला आधार. आपल्याला दुसरा कोणी नको.

तूं मी एक, गठली मेख—मागें पहा.

तूं मी सारखी, चल जाऊं द्वारकी—दोन स्त्रिया एकमेकींचे वर्म माहीत असलेल्या भेटल्या म्हणजे परस्परांबद्दल मग कांहीं न बोलतां त्यांतून मार्ग काढण्याचा विचार करतात.

तूं मुझकूं, तो मैं तुझकूं—१ तूं मला अन् मी तुला. २ जशास तसें.

तूं राणी, मी राणी, गांडीवर पाणी घालावें कोणीं?

तूं राणी, मी राणी, पाटाचें पाणी कोण आणी—सर्वच जर राणीप्रमाणें काम न करतां बसल्या तर काम कोणीं करावयाचें ? तु०—तुम तांडेल०

तूं रानोरान तर मी झाडोझाड—शेरास सव्वाशेर. मागें पहा. तूं डालोडाल तो हम पतोपते.

तूं लंड तर मी भंड—शेरास सव्वाशेर.

तूं स्वयंपाक कर, मी जेवेन! तूं अंथरूण घाल, मी निजेन! आणि काय मदत पाहिजे!—कष्टाचीं कामें दुसऱ्यास सांगून त्याचें फळ आपण घ्यावयाचें, अशा प्रकारचें सहकार्य.

तूंहि राणी, मीहि राणी, चाकर मिळेना पृथ्वींत कोणी—वरप्रमाणेंच. आळशी माणसाचें काम पडून राहतें.

तुकाय फें आनि तुझ्या बापाय कयू बी फें—(गो.) [फें=तुच्छतादर्शक शब्द. तु०-इं. fie] तुला आणि तुझ्या बापालासुद्धां मी जुमानीत नाहीं अशा अर्थानें म्हणतात.

तुगेलें म्हळ्ळेलें मगेलें, मगेलें म्हळ्ळेलें येंयेंयें—(गो.) तुमचें तें आमचेंच आणि आमचें तेंहि आमचेंच, अशी स्वार्थपरायण वृत्ति.

तुगेलें बजें व्हावंच्याक मगली व्होणं झरवंचिकी?—(गो.) तुझें ओझें वाहायला माझ्या वहाणा कशाला झिजवायच्या? दुसऱ्याच्या मुळींच उपयोगी न पडणें.

तुगेल्या गोठ्यांतलें वासरूं मोरूं—(गो.) तुझ्या गोठ्यांतलें वासरूं मरो! दुबळ्या माणसांना आपल्या शत्रूचा प्रतिकार करतां येत नाहीं. तीं नुसतीं 'तुझें तळपट होईल' असें म्हणून बोटें मोडतात.वरील म्हण त्याच प्रकारची आहे.

तुगेल्या तार्वारि मगेलें अर्द फोपळ—(गो.) तुझ्या तारवावर माझी अर्धी सुपारी. तूं एवढें ओझें नेणार आहेस त्यांत माझी ही लहानशी वस्तु तुला न्यायला जड होणार नाहीं, अशा युक्तिवाद करून आपलें ओझें त्याच्यावर लादणें.

तुला न मला, घाल कुत्र्याला—दोघांचा एखाद्या गोष्टीच्या मालकीबद्दल किंवा पदार्थाबद्दल तंटा लागला असतां, त्या मालाचा मात्र नाश होतो किंवा तिसराच कोणी घेऊन जातो व भांडणारांच्या पदरांत कांहींच पडत नाहीं.कुत्रा पहा.

तुला मला पटेना, तुजवांचून गिळेना—मागें पहा.

तुशीं मशीं रस गळे, उराशीं फुणकं जळे—(व.) [फुणकें = वाटल्या डाळीचा उकडीव वडा.] दोघांची इतकी सलगी झाली आहे कीं, एकावांचून दुसऱ्याचें पान हालत नाहीं. तेव्हां त्या फाजील सलगीकडे, रस गळण्याकडे पाहून हे उद्गार आहेत. एकाचें फुणकें दोघांच्या उराशीं जळण्याइतके ऊर जवळ जवळ येतात इतकें अति संघटन.

तूट——तूट पडणें—कमी येणें; उणीव भासणें.

तूप——तूप तुकडा—हलकें भिकार अन्न; कांहीं तरी खाणें. कापशीकर घोरपडे सेनापति यांचे घरीं श्रीराम कुलदैवत आहे. म्हणून रामनवमीचा नवरात्र उत्सव असतो. त्यावरून एक पुढें दिलेलें ग्राम्य कवित्व रचलेलें आहे–श्रीरामाच्या मूर्ति सेनापतीच्या घरांत राहत्याति। नवरात्राच्या मंदी तुप तुकडा उगिच गिळुन बसत्याती ॥

तुपाचे आशेनें उष्टें खाणें—कांहीं लाभ असेल तर माणूस हलकें काम करण्यास तयार होतो. उष्ट्यांत जर तूप असेल तर तें खाण्यांत फायदा. तु०–(गो.) तुपा–आशेर लेंडे गिळले. तुपाची लालसा० पहा.

तुपाचे घागरीवर उंदराचें पिटकुलें बसणें—सांबाच्या पिंडीवरचा विंचू याप्रमाणें. तो मारणें आवश्यक पण सांबाचा अपमान होतो. त्याचप्रमाणेंच तुपाच्या घागरीवरच्या उंदराचें आहे. उंदीर मारावा तर तुपाचें मडकें फुटण्याचा संभव. "आम्ही त्यास पिसाळलिया कुतरियाची गत केली असती परंतु 'तुपाचे घागरीवर उंदराचें पिटकुलें बसतें' तैसा प्रकार जाला."–भाव ३६.

तुपांतली माशी पिळून खाणारा–खाणें—तुपांत पडलेली माशी काढल्यावर तिच्या अंगाला लागून कांहीं तुपाचा अंश फुकट जाईल म्हणून ती चोखून खाण्याइतका लोभी, कृपण मनुष्य; कंजूष मनुष्य; मख्खीचोष.–शाव ३.११.

❀ **रात्रीं खा तूप आणि सकाळीं बघ रूप; अवशीं खाई तूप आणि सकाळीं पाहीं रूप**—रात्रीं तूप खालें नाहीं तों सकाळीं लठ्ठ होण्याची अपेक्षा करणारा. काम केलें नाहीं तोंच त्याचें फळ मिळण्याची अपेक्षा. –टि ३.२४.

तूप खाऊन रूप येतां—(गो.) तूप खालें म्हणून रूप येत नाहीं.

तूप खातल्या चेडीलें रूप (गांडि) पळेल्यारि कळता—(गो.) तूप खाणाऱ्या मुलीचें रूप ताबडतोब कळून येतें.

तूप खाल्ल्यालें रूप समजता—(गो.) तूप खाणाराचें रूप लागलेंच समजून येतें. समाधानी चेहऱ्यावरून माणूस सुखी आणि ऐश्वर्यवान् असल्याचें कळतें.

तूप गूळ असले तर गव्हाची गोडी—गव्हाची पोळी खावयाची तर तीवरोबर भरपूर तूप व साखर किंवा गूळ असेल तरच ती गोड लागते. त्याप्रमाणें सर्व गोष्टी यथाप्रमाण ठीक जुळल्या तरच एकंदर शोभा येते; नाहींतर एक अतिशय, चांगली वस्तु असून सभोंवतीं भिकार असल्या तर शोभा येत नाहीं. याकरितां सर्व वस्तु एकमेळाच्या असाव्या.

तूप गेलें, तेल गेलें, धुपाटणें हातीं आलें—तेल पहा. –शाब ३.६८.

तूप तृणाचें, तेल कणाचें—जें जनावर केवळ चारा खाऊन राहील, ज्यास धान्य वगैरे आंबोणांतून घातलें जाणार नाहीं त्याचें तूप चांगलें होतें. जें धान्य चांगलें भरडलें जातें त्यांतून तेल साफ निघतें.

तूप दिव्याला आणि तेल माव्याला—दिव्यामध्यें तेलाच्या ऐवजीं तूप घालावयाचें आणि माव्यामध्यें तुपाच्या ऐवजीं तेल घालावयाचें याप्रमाणें. उलटा प्रयत्न करणें; भलत्याच गोष्टीचा भलत्याच कामीं उपयोग.

तूपसाखर रोडका आणि भाजीपाला धडका—जो मनुष्य तूपसाखर खातो तो कृश असतो व जो भाजीपाला खातो तो धडधाकट असतो. श्रीमंत लोक मिष्टान्न फार खातात पण तें त्यांस पचत नाहीं, म्हणून त्यांच्या अंगीं लागत नाहीं. गरीब मनुष्य भाजीभाकरीचें साधें अन्न खातो तें पचावयास सुलभ असतें व तो श्रम करतो त्यामुळें त्यास तें पचतें. म्हणून तो चांगला सशक्त व निरोगी असतो.

तुपा आस्तेऽ लेंडा गिळता—(गो.) चांगल्या गोष्टीच्या आशेनें वाईट गोष्ट करणें.

तुपाची लालसा आणि उष्ट्याची आशा—तुपाच्या आशेनें मनुष्य उष्टें खाण्यास तयार होतो. कांहीं लाभ होईल या आशेनें मनुष्य एखादें हलकें काम करावयास तयार होतो.

तूर——हातावर तुरी देणें-देऊन पळणें—तुरी हातावर राहात नाहींत, घरंगळत जातात यावरून हा वाक्प्रचार वाटाण्याच्या अक्षतांप्रमाणें असावा. दुसऱ्यास फसवून पळून जाणें.

तुरियेरि चणु मूळ खांडचें—तुरीच्या झाडावर चढून तिचें मूळ कापणें हा मूर्खपणा असामान्यच.

तुरीची काठी तुरीबर झाडणें-झाडावी—१ योग्य ठिकाणीं योग्य तेंच करणें. २ जेवढें उत्पन्न तेवढाच खर्च करणें. ३ जेथील तेथेंच विल्हेवाट लावणें. काठी; कांटी पहा.

❀तुरीबरोबर बरड चिरडला जातो—बरड म्हणजे एक जातीचा किडा. याला पंख असतात. कडधान्य जुनें झालें म्हणजे तो तें पोखरतो व त्यांत राहतो. त्याला उडतां येतें. अशावेळीं तें धान्य भरडून त्याची डाळ करतात. व तो त्या वेळीं भरडला जातो. तुरीस कीड लागली असतां ती भरडली म्हणजे तींतील कीडहि चिरडली जाते. मुख्य गोष्टीबरोबर आनुषंगिक गोष्टींसहि होणारा त्रास सहन करावा लागतो.

तूस——तूस कांडून हातास फोड—तूस कितीहि कांडले तरी त्यापासून कांहीं मिळत नाहीं व केलेले श्रम मात्र फुकट जातात. याप्रमाणें व्यर्थ श्रम करणें; निष्फळ कष्ट करणें. (गो.) तुसु कांडूनु हाता फोड. तुषकंडण पहा.

तुसवां तुलो उजो दुसदुसचो चड—(गो.) भाताच्या कोंड्याचा विस्तव जास्त धुमसतो.

तुसवां थाडनु तेल येदवे ?—(गो.) कोंड्यापासून तेल येईल काय ? निष्फळ प्रयत्न.

तृण——तृण ओंवाळणें—दृष्ट काढणें. –जामदारकृत 'तुळसीदास रामायण', मराठी भाषांतर पान १६७.

तृण दांतांत धरणें; दांतीं तृण धरणें—पराभूत माणसानें आपण जनावराप्रमाणें सर्वस्वीं तुमच्या अंकित आहों हें दाखविण्यासाठीं तोंडांत गवत धरून जेत्यापुढें येण्याची पूर्वीं चाल असे. यावरून अभिमान सोडून शरण जाणें. 'आणि ते टोप्या काढून व दांतीं तृण धरून श्रीमंत अप्पासाहेबांना शरण आले.'–V. S. २.४३.

तृणपंचमूल—१ दर्भ, २ शर, ३ काश, ४ इक्षु, ५ शालि.

तृणाचा शेक—गवत पेटवून त्याचा धग घेत बसलें असतां तें लवकर जळून जातें; त्याचा शेक फार वेळ टिकत नाहीं. यावरून तुटपुंजी गोष्ट; क्षणिक टिकणारी वस्तु.

तृणाची गरज-चाड; तृणाइतकी चाड—मुळींच इच्छा नसणें.

तृणाची शेज करणें—संततीकरितां स्त्रीनें असा नवस करणें. प्रसूत झाल्यानंतर नऊ दिवस गवतावर निजणें. [उदेपूर येथील राजे प्रतापसिंहानें चितोड परत मिळेपर्यंत गवतावर निजावयाचें अशी प्रतिज्ञा केल्यामुळें,सध्यांहि गादीखालीं थोडें गवत घालून निजतात.]

❀ तृणतुल्य पुरुष जरी, सधन स्त्रीच्या बरोबरी—पुरुष जरी किती गरीब झाला तरी तो श्रीमंत स्त्रीची बरोबरी करतो. पुरुष जात्या उदार असतो व स्त्री स्वभावतःच कंजुष असते. तेव्हां सधन स्त्रीच्या हातून सहसा पैसा सुटत नाहीं. पण गरीबहि पुरुष सढळ हातानें खर्च करतो. A man of straw is worth a woman of gold.–French.–सवि १८३.

तृणाचें शेकणें, मूर्खाचें बोलणें—तृणाचें शेकणें जसें निष्फल, क्षणिक, तसेंच मूर्खाचें भाषण होय.

तृणाला चाड आहे ती त्याला नाहीं—तो कोणालाहि आवडत नाहीं; किंवा त्याला कोणी मुळींच चाहात नाहीं.

तृतीय——त्यानें तृतीय पंथ केला—ह्याचें तिसरेंच एक; भलतीच गोष्ट बोलणें, करणें; अपेक्षेविरुद्ध वागणें.

तृतीय प्रकृति होणें—नपुंसक होणें. 'घोरपड आपल्या शेपटीचा तडाखा देते व तसा तो मिळाला तर मनुष्य तृतीय प्रकृति होतो.'—केसरी १६-३-३७ पान १६.

तृप्त——तृप्ताला भोजन—पोट भरलेल्या माणसालाच जेवूं घालणें; ज्याला नसेल त्याला न देतां ज्याला पोटभर आहे त्यालाच आणखी देणें ही वृत्ति.

॥तृप्त ज्याचें मन, तो सधन—ज्याच्याजवळ मनाची समाधानी असते तोच खरा श्रीमंत होय. तु०—श्रीमान् कोण म्हणावा ? जो नर संतुष्ट चित्तिं नित्य असे।

ते——तेच म्हणावे सुजन, ठेविती भोग निजाधीन—जे आपल्या वृत्ति अथवा भोगप्रवृत्ति स्वाधीन ठेवतात, म्हणजे संयमी असतात तेच खरे सज्जन होत.—सवि १२३०.

तें नाहीं ललाटीं, आणि पाऊस पडे शेताकांठीं—जर शेतकऱ्याच्या नशिबांत नसेल तर पाऊस पडला तरी तो त्याच्या शेताबाहेर पडतो, शेतांत पडत नाहीं.

तॅ फिरंगी मॅलॅ, तॅ डॅवॅ गॅलॅ—(गो.) ते पूर्वींचे फिरंगी मेले आणि ते त्यावेळचे पावहि गेले. 'ते हि नो दिवसा गताः।' अशा अर्थानें म्हणतात.

तेंकून आयलां तॅं लकौन दिवचॅं—(गो.) जें आपणांस धडक द्यायला येईल त्याला तिथल्या तिथें दूर ढकलून द्यावें.

तेंकडे——तेंकुडेन म्हॉवु काडप—(गो.) लांब काठीनें मध गोळा करणें. एखादा माणूस मूर्खपणानें वागून अपयश पावतो तेव्हां ही म्हण योजतात.

तेजाब——तेजाब काढणें—१ सोनें गाळणें. २ हिणकस सोन्यामध्यें दुप्पट चांदी घालून ॲल्युमिनमच्या भांड्यांत नायट्रिक ॲसिडच्या साहाय्यानें आंच देऊन शुद्ध सोनें काढणें.

तेजी——तेजा इशारत, तट्टा फोका धरिती—[तेजी =चलाख आणि उमदा घोडा. फोक=बडगा.] चलाख घोड्याला नुसती सूचना पुरे; तट्टाला बडगा लागतो. तट्टू पहा. 'तेज्या इशारती। तट्टा फोकावरि घेती॥' तुगा ३७४८. A nod for a wiseman and a rod for a fool.

हिमायतीचा गाढव, तेजीस लाथ मारतो—वशिल्याचा गाढव घोड्यापेक्षां वरचढ होतो. वशिल्याचा मूर्ख मनुष्य शाहण्या माणसापेक्षांहि श्रेष्ठपदावर चढतांना आढळतो.

तेंडलें——तेंडलेक माटोव, माट्वाक तेंडलें—(गो.) [तेंडलें=तोंडलें. माटोव=मांडव.] तोंडल्यास मांडव आणि मांडवास तोंडलें.' मी आणि माझा नाऱ्या' याप्रमाणें.

तेंडल्याक बियो चड, मोटव्याक बुद चड—(गो.) तेंडलें (तोंडलें) नांवाच्या लहान फळांत ज्याप्रमाणें फार बिया असतात, त्याप्रमाणें मोटव्या म्हणजे खुजा माणसाच्या ठिकाणीं फार बुद्धि असते. खुजा हुषार असतो अशी समजूत.

तेथें——तेथें संताप, जे स्थळीं व्याप—व्याप तितका संताप. 'हें सत्य अत्यबाधित तेथें संताप जे स्थळीं व्याप।'—भक्तमयूरकेका ९४. जेथें पहा.

तेरडा——तेरड्याचा रंग—तेरडा नांवाचें लहान झुडूप आहे. त्याच्या फुलाला निरनिराळे रंग असतात व ते रोज बदलतात; पण तें फूल झाडावर तीन दिवसांच्या वर राहत नाहीं यावरून. क्षणिक वरचेवर बदलणारी गोष्ट.

॥तेरड्याचा रंग तीन दिवस—थोडे दिवस फार जोमानें चालून बंद पडणारी संस्था, उद्योग इ. संबंधीं योजतात. थोडे दिवस भपका दाखवून एखादें कार्य थांबणें.—शाब १.१००.

तेरड्याचे रंग तीन दिवस, सरड्याचे रंग दिवसांतून तीन—तेरड्याचे रंग तीन दिवसांनीं तरी बदलतात पण सरडा दिवसांतून तीनदां रंग बदलतो. म्हणजे इतका चंचल वृत्तीचा, घटकेघटकेनें नवीन तऱ्हा करणारा माणूस.

तेरा——तेराबारा चालणें—(बारा कीं तेरा याबद्दल वाद.) वाद चालणें; कलागत चालणें. तीन पहा.

तेरा-री——तेरीमेरी करणें; तेरीमेरीवर येणें—[तेरी माका० ही शिवी, यावरून] आईमाईवर येणें; वर्दळीवर येणें; अरेतुरेवर येणें.

॥तेरे उपर मेरा पाव, थोटा म्हणे मी राव—थोटा माणूस दुसऱ्याच्या खांद्यावर बसून वरचढपणा गाजवितो. कांहींतरी कलागत काढून भांडणें.

तेरे पितर सडक फू; तेरे पितर सरग भये—गया येथें श्राद्धें करून मुख्यतः विष्णुपदावर पिंडदान केलें म्हणजे तेथील गयावळ 'तेरे पितर सरग भये' असें तोंडानें म्हणून पितर स्वर्गास पोंचले असें सांगतो. या ठिकाणीं त्रिस्थळीची म्हणजे प्रयाग, काशी व गया ही यात्रा पूर्ण होते. यावरून एखादी गोष्ट तडीस पोंचणें, पूर्ण होणें असा अर्थ होतो.

तेरेबी चीप, मेरेबी चीप—दोन लबाड मनुष्य एकत्र आले व त्यांच्या लबाड्या परस्परांस माहीत असल्या म्हणजे दोघेहि एकमेकांबद्दल बोलत नाहींत व याप्रमाणें गप बसण्यांतच त्यांचा फायदा असतो.

तेरें——तेऱ्या पान्नावेलें उद्क—(गो.) अळवाच्या पानावरचें पाणी. अस्थिर संसार. अळवावरचें पाणी, पहा.

***बहिरें ऐके तेरें, आणि अचरट मागें सांबारें**—कांहीं तरी बोललेले शब्द ऐकून बहिऱ्यास तेरें (अळू) शब्द ऐकूं आलासें वाटतें व तो शब्द ऐकून एखादा बावळट मनुष्य लागलाच तेऱ्याचें सांबारें मागूं लागतो. याप्रमाणें कशास कांहीं पत्ता नाहीं असा घोटाळा.

तेल——तेल काढणें—१ पिळून, शोषून घेऊन एखाद्या पदार्थाचा रस, सत्त्व काढणें. २ (ल.) खरपूस चोप देणें, कुटणें.

तेल घालणें—(एखाद्या कामांत त्या) कामाची खराबी होईल अशी कांहीं तरी वस्तु अथवा भीड मध्यें घालणें. बिब्बा घालणें, पहा.

तेल घेणें—(स्त्रीविषयीं हा वाक्प्रचार योजीत असतात) आपल्या स्वतःला देवाकडे लावणें; एखाद्या देवाच्या उपयोगाकरितां कसबीण बनणें; गरतपणा सोडून भावीण होणें. देवाच्या दिव्यांतील थोडेसें तेल डोक्यावर घालण्यानें ती आपला उद्देश जाहीर करते. म्हणून लग्न झालेली स्त्री तेल खरेदी करणें ह्या अर्थी 'तेल घेणें' असें म्हणत नसून 'तेल ठेवणें' असें म्हणते व तिला तेल खरेदी करावयास सांगावयाचें असल्यास 'तेल घे' म्हणून न सांगतां 'तेल ठेव' असें सांगण्याचा रिवाज आहे. ह्या अर्थी 'तेल जिरविणें' असेंहि म्हणत असतात.

तेल चढविणें–उतरविणें–(बायकी) उष्ट्या हळदीचे वेळीं वधूपक्षाकडून वरपक्षाकडे आलेलें तेल परटिणीकडून (किंवा ज्याच्या त्याच्या चालीप्रमाणें एखाद्या स्त्रीकडून) वराच्या पावलास, अंगास व डोक्यास आंब्याच्या पानानें तीन वेळ लावणें. आणि तोच अनुक्रम तीन वेळ उलटा करणें म्हणजे तेल उतरविणें.

तेल जिरविणें—तेल घेणें, पहा.

तेल लागणें—अंगास तेल लावलेला (अभ्यंग) कोणत्याहि कामाला उपयोगी पडत नाहीं यावरून. महाग, दुर्मिळ, अप्राप्त होणें, असणें (मनुष्य, वस्तु इ.)

(पाठीला) तेल लावून ठेवणें—(पाठीला तेल लावलें असतां वर बसणारा मार तितकासा लागत नाहीं.) मार खाण्याची तयारी ठेवणें.

तेलाची वरव तुपावर—तेल ज्यास्त झालें कीं तें तुपाऐवजीं वापरतात. !

***तॅल काट्टल्याचँ भँड सुकूता**—(गो.) उद्योग करणारालाच श्रम होतात.

तेल गेलें तूप गेलें, हातीं धुपाटणें आलें—दोन फायद्याच्या गोष्टी असतां मूर्खपणामुळें हातच्या दोन्ही जाऊं देऊन मनुष्य पुन्हां कोराकरकरीत राहणें अशा अर्थी योजतात.–V. S. २.२०. [प्रवासांत असतांना एका गृहस्थानें नोकराला तेल आणि तूप आणावयास पाठविलें. नोकरानें घरून भांडीं घेतलीं नव्हतीं. तेव्हां वाटेवरच्या देवळांत जाऊन धुपाटणें (धूपपात्र) घेतलें. व धुपाटण्याच्या जास्त खोल भागांत वाण्यास तेल घालण्यास सांगितलें. तुपाची वेळ आली तेव्हां तो भाग पालथा करून दुसऱ्या भागांत तूप घेतलें. घरीं तुपाचा भाग वर धरून आला तेव्हां मालकानें विचारलें? "तेल कोठें आहे ?" तें दाखविण्यासाठीं तुपाचा भाग पालथा केला तों तूपहि सांडलें. राहातां राहिलें धुपाटणें !] दुहेरी नुकसान.

तेल जळता देवळाचें, भटानें कित्या रडचें—(गो.) देवस्थानचें तेल जळतें त्याबद्दल पुजाऱ्यानें कां हळहळावें ?

तेल जळे, पीडा टळे; तेल जळे, पीडा टळे, पण ज्याचें जळे त्याला कळे—जळणें, टळणें पहा.

तेल दिव्याला आणि तूप माव्याला—योग्य उपयोग. याच्या उलटहि म्हण आहे. तूप पहा.

तेल पाहिजे दिव्याला, बैल धरी घाण्याला—दिवा लावावयाची वेळ झाली व त्याकरितां तेल पाहिजे म्हणून घाण्याला बैल जुंपून तेल काढण्याची तयारी करणें. म्हणजे आयत्या वेळीं आरंभापासून तयारी करूं लागणें. तु०–तहान लागली म्हणजे विहीर खणणें; घराला आग लागली असतां विहीर खणणें.

पोरचें पोर गेलें आणि तेलबोळाचें मागणें आलें—प्रसूतीनंतर मूल मेल्यावर आणखी कातबोळाचे पैसे द्यावे लागले. निरर्थक खर्च व परिश्रम; व्यर्थ शीण. कातबोळ पहा.

तेल येवंचे वेळारि घाणो मोळ्ळो—(गो.) तेल निघण्याच्या वेळीं घाणा मोडला. ऐन लाभाच्या प्रसंगीं साधन निकामीं होणें.

तेला अंगार उदक—(गो.) तेल लावून स्नान केलें कीं गार पाणीसुद्धां बाधत नाहीं. प्रतिकार विधान आधींच योजून ठेवलेलें असलें कीं मग संकटें बाधत नाहींत.

तेला आयदानाची पशा बचना—(गो.) तेलाच्या भांड्याचा कितीहि धुतलें तरी ओशटपणा जात नाहीं. दुर्गुणी माणूस आपला स्वभाव सोडीत नाहीं.

तेलकरी——तेलकरी रडे आणि नारळकरीहि रडे—दोघे आपापल्यापरी दुःखी.

तेलवाली——तेलवालीचें दुणावलें, मीठवालीचें गमावलें**--(याच्या उलटहि म्हण आहे) एकदां तेलवाली आणि मीठवाली आपलें सामान गाढवावर लादून चालल्या असतां गाढव नदींत शिरलें व बाहेर पडलें. तेव्हां तेल पाण्यानें वाढलें पण मीठ विरघळून कमी झालें. पुन्हां एकदां गाढवावरचें सामान खालीं पडलें तेव्हां तेल जमिनींत जिरून गेलें पण मीठखडे धूळ मिसळून वाढले ! –मॅन १७६६. एकाच वेळीं एकाचा लाभ तर दुसऱ्याचा तोटा.

तेली——तेली खसम करना, और रूखा खाना—तेल्याशीं लग्न करून कोरडी भाकर खाणें. थोर आश्रय करून दरिद्रता भोगणें. वेळेवर फायदा करून घेण्याची तरी अकल लागते.

तेली झाला म्हणून तेलानें गांड धूत नसतो—(व.) तेल्याच्या घरीं तेल पुष्कळ असतें म्हणून ढुंगण धुवायला त्याचा कांहीं उपयोग न होतां त्यासाठीं पाणीच लागतें. एकाद्याच्या घरीं दुर्मिळ वस्तूसुद्धां विपुल असली तरी सवंग जिनसेचा उपयोग ज्या कामीं व्हावयाचा त्या कामीं त्या दुर्मिळ वस्तूचा उपयोग होऊं शकत नाहीं. त्यासाठीं श्रीमंत मनुष्यहि साध्या जिनसा वापरतो.

तेली (तेलण) राखे धारोधार, खुदा लिजावे एकी बार; तेली सांचे धारोधार, खुदानी एकच बार—तेली धार धार करून खोटें माप देऊन तेल किंवा पैसा सांठवतो, पण परमेश्वर याबद्दल त्याला शिक्षा करतोच. ती अशी कीं, तेलाची सर्वच घागर एकदम फुटून किंवा चोरी होऊन सर्व एकदमच गमावून बसतो. कृपण पैसे सांठवतो पण एखाद्या वेळीं कांहीं कारणानें सर्वच गमावतो.

तेली, ससा, गुरव, म्हसा, गांवा गेला तो येइल कसा ?—तेली, ससा, गुरव आणि रेडा एकदां गेले म्हणजे तिकडेच रमतात. ते परत येतील असा भरंवसा नाहीं.

तेल्याचा बैल, सदा अंधळा—तेल्याच्या बैलाला घाण्याला जुंपलें म्हणजे डोळेझांपणें लावावें लागतें; त्यामुळें डोळे असून त्याला पाहतां येत नाहीं.

तेल्याचा मेला बैल आणि परटीण जाते सती—कशास कांहीं ताळमेळ नाहीं.

तेल्याचें तेल जळे, मशालजीची गांड जळे—तेल्याचें जसें नुकसान तसेंच मशालजीचेंहि नुकसान.

तेल्याचो बैल मेलो, बोंब मार घामणा—तेल्याचा मेला बैल० पहा.

तेल्याच्या पांघरुणाला कधीं डाग पडणार आहे ?—तेल्याचीं वस्त्रें तेलानेंच इतकीं बरबटलेलीं असतात कीं, त्यावर दुसरा कसला डाग दिसूनच येत नाहीं.

तेल्याच्या बैलाचें घाण्यांतच तेल निघतें—तेल्याच्या बैलाला नेहमीं घाण्याला जुंपल्यामुळें त्याचें तेथेंच अगदीं कांडात् निघतें.

तेल्यावर रुसली, अंधारांत बसली—तेल्याशीं भांडण झाल्यामुळें तेल घेतलें नाहीं तर रात्रीं काळोखांत बसावयाची पाळी येते. ज्याची गरज पडते त्याजवळ तंटा केला तर त्याची झळ आपणास लागते. याकरितां अशा बाबतींत विचार करून तंटा टाळला पाहिजे. तु०–तेलिणीशीं रुसला वेडा । रागें कोरडें खातो भीडा ॥ –तुगा ३२८४.

तेलीण——तेलीणबाई रुसली व अंधारांत बसली—मॅन १७६३. चुकीची शब्दयोजना. 'तेलीणीशीं रुसला अंधारांत बसला' अशी पाहिजे.

तेलीण सांचवी धारोधार, अल्ला नेतो एकच वार—तेली पहा.

तेलणीनें केला धडा आणि बुधला झाला उपडा—तेल वजन करण्याकरितां धडा करीत आहे, इतक्यांत तेलाचा बुधलाच उपडा होऊन सर्व तेल सांडून जाणें. एखादी गोष्ट सिद्धीस जाण्याच्या बेतांत आहे तोंच सर्व काम बिघडून जाणें.

तेलिणीशीं रुसला, अंधारांत बसला—तेल्यावर रुसली० पहा.

तेलंग——तेलंगभट— तेलंगणांतून येणारे ब्राह्मण फार चिकट व लोचट असून ते आगांतुकी करतात. यावरून तसा १ लोचटपणा करणारा माणूस. २ आगंतुक.

तेवशी——तेवशीन गेल्यार न्हय, हेवशीन गेल्यार बांय—(गो.) त्या वाटेनें गेल्यास नदी लागते व या वाटेनें गेल्यास विहीर लागते. दोन्ही बाजूंस संकटें असलीं म्हणजे पडणारा पेंच. तु०—इकडे आड तिकडे विहीर.

तेहतीस——तेहतीस कोटी देव--११ रुद्र, १२ आदित्य, १ प्रजापती, १ वषट्कार, ८वसु मिळून ३३ देव. या सर्वांचे गण मिळून ३३ कोटी देव होतात. त्रयस्त्रिंशद्वै देवाः, अष्टा वसवः, द्वादशादित्या, एकादशरुद्राः प्रजापतिश्च वषट्कारश्च ।

❀ **तेहतीशी करीत नाहीं अशी बत्तिशी करते**—जी गोष्ट सर्व देवांस करतां येत नाहीं ती गोष्ट दांतांनीं म्हणजे शब्द बोलण्यानें होते. एखाद्या अयोग्य शब्दानें भयंकर नुकसान होण्याची वेळ येते. याकरितां तोंडाबाहेर शब्द काढावयाचे ते फार जपून काढले पाहिजेत. तु०—जिव्हाग्रे बन्धनं प्राप्तं जिह्वाग्रे मरणं धृवम् ।—सुर १५५.८७.

तैल——**तैलबुद्धि**—तेलाचा एक थेंब पाण्यावर पडला असतां तो पाणी व्यापून राहतो त्याप्रमाणें विषयांत किंचित् प्रवेश झाल्यावर सर्व विषय तात्काल आकलन केला जातो अशी बुद्धि. कुशाग्र बुद्धि.

तो——**तो आपल्या टोपींतून बोलत आहे, सुध्या तोंडानें नव्हे**—साहेबाचा पोशाख चढविल्यावर त्याच्या प्रमाणें अधिकाराचा, मोठेपणाचा अंगीं संचार होतो. अधिकाराचा गर्व दाखविणारी म्हण.—ना. सी. फडके, साहित्य आणि संसार, पान ४३.

तो औषधाप्रमाणें बोलतो—मितभाषी मनुष्याबद्दल म्हणतात.

तो करील ती पूर्व दिशा—एखाद्याच्या हातीं अबाधित सत्ता असली म्हणजे म्हणतात.'करील ती पूर्वदिशा'पहा

तो काय राजा आहे?—एखाद्याला सर्व साधनें अनुकूल असतां त्याबद्दल ही म्हण योजतात.

तो जातीचा रंगारी, मनास वाटेल तसें–तेंच करी—रंगारी मनुष्यास रोज निरनिराळ्या रंगांचे कपडे वापरणें शक्य आहे. यावरून तो रोज आपले कपडे पालटूं शकतो. एखाद्यामध्यें कांहीं स्थिरता नाहीं असें दाखविण्याकरितां योजतात.

तो पाप देणार नाहीं तर पुण्य कोठून देणार—जो मनुष्य आपल्याला नको असलेली अनिष्ट वस्तुहि देत नाहीं तो उपयुक्त वस्तु कशी देईल. दुसऱ्याच्या कधींहि उपयोगी पडणार नाहीं अशा मनुष्याबद्दल म्हणतात. तु०—करंगळीवर मुतणार नाहीं असा.

तोकटें जाणें——(कु.) नुकसान होणें.

तोड——**तोड करणें**—मात करणें; वर, पुढें जाणें. 'पुढें कित्येकांनीं यावरही तोड करण्याचें मनांत आणलें.'—नि ८.

तोड काढणें-पाडणें—अडचणींतून बाहेर पडण्याचा मार्ग, युक्ति काढणें; उपाय सुचविणें. 'शेवटीं पापपुण्याच्या विचारांतून त्यांनीं एक तोड काढिली.'—जादुगार पृ. २३.

तोडीवर येणें-घेणें—समेट करणें; तोड पाडणें.

तोडीस तोड देणें—१ प्रतिपक्षाचा डाव हाणून पाडणें; त्याच्यावर मात करणें; त्याच्यावर तोड करणें. २ जशास तसें वागणें; दुसऱ्याच्या सामर्थ्याप्रमाणें, कृतीप्रमाणें आपण आपलें सामर्थ्य दाखविणें.

तोडीस नेणें—वादांतील मुद्यांचा निकाल लावणें.

❀ **तोडीस तोड व जोडीस जोड**—तुल्यबल प्रतिपक्षी भेटले असतां म्हणतात. —इंप १४३.

तोंड——**तोंड आणणें**—(आट्यापाट्यांचा खेळ) शेवटची पाटी खेळून मागें वळून जाऊन पुन्हां एक एक खेळत येणें; पाणी आणणें; लोणी आणणें.

तोंड आंबट करणें—(एखाद्यानें) असंतुष्ट, निराशायुक्त मुद्रा धारण करणें; नापसंती दाखविणें.

तोंड आवरणें-आटोपणें-संभाळणें—जपून बोलणें; बोलण्याला आळा घालणें; अमर्याद भाषण, अभक्ष्यभक्षण यांपासून निवृत्त होणें.

तोंड उजळ करणें—कलंक, बदनामी, दुष्कीर्ति काढून टाकणें. 'गेलें साल तुर्कस्थानास जरी पराकाष्ठेचें जड गेलें, तरी त्यांनीं साऱ्या एशियाचें तोंड उजळ केलें.'—नि.

तोंड उतरणें—(निराश, आजार, इ. मुळें) चेहरा म्लान होणें; सुकणें, फिका पडणें; निस्तेज होणें; मुख कोमेजणें.

तोंड उष्टें करणें—(अन्नाचा) एखादा–दुसरा घास, एक दोन घास खाणें; जेवणाचें नुसतें नांव करणें.

तोंड करणें—बडबड, वटवट, बकबक करणें; उद्धटपणानें, निर्लज्जपणानें बोलणें. 'असें सुमारें तासभर तोंड केल्यावर चिमू वन्सं थकल्या आणि आपोआपच मुकाट्यानें बसल्या.'

तोंड करून बोलणें—निर्लज्जपणें, आपला (लहान) दर्जा सोडून बोलणें; मर्यादा सोडून बोलणें; उर्मटपणें बोलणें.

तोंड काळें करणें—१ काळें करणें; नाहींसे होणें; दृष्टीआड होणें; बेपत्ता होणें. २ (उप.) एखादा ठपका, तोहमत अंगावर आल्यामुळें निघून, पळून, निसटून जाणें; हाता-

वर तुरी देणें; दृष्टीस न पडणें. ३ दाढीमिशा तोंडावर उगवल्यामुळें तोंड काळें होणें. ' रुद्र०-तरुणपणीं मेले तोंड काळें करतात. '-बाय. १.३. ४ अपकीर्ति करणें; डाग लावणें; कलंक लावणें. ' केलें होतें माजें कद्रूच्या मलिन तुंड लेकांही । '-मोअश्व २.१७५.

तोंड काळें (ठिक्कर) पाडणें—नामुष्की आणणें; लाजविणें. ' जिजाऊ-अधमा ! तुम्हां मोंगल लोकांचा नक्षा उतरून आज मीं तुमचीं तोंडें काळीं ठिक्कर पाडलीं आहेत!' -शिसं ४.२.

तोंड गोड करणें—१ (एखाद्याला) लांच देणें; खूष करणें; हात ओला करणें. २ मेजवानी देणें; गोड खावयास घालणें; पेढे देणें (चांगली गोष्ट, फायदा इ. बद्दल)

तोंड गोरेंमोरें करणें—(कोणी रागें भरल्यामुळें, मनास वाईट वाटल्यामुळें) निराशेची, लाजलेपणाची मुद्रा धारण करणें; रडावयास येणें; खिन्न मुद्रा धारण करणें. -कवठेकर-चांदण्यांतील सांवल्या.

तोंडघशीं पडणें—१ तोंडावर पडणें; तोंड फुटणें.' तो तोंडघसींच पडे करितां दंवप्रहार बहु रागो गे ॥ ' -मोमंत्र १०.५३७. २ एखाद्या कामांत फसणें, फशीं पडणें.

तोंडघशीं पाडणें—१ तोंडावर पाडणें; तोंड फोडणें. ' प्रभु पाडी तोंडघशीं, फरफर ओढी धरूनि पुच्छातें ॥ ' २ फशीं पाडणें; अगोदर आश्वासन देऊन त्याप्रमाणें न करणें व फसविणें. ' आज ज्यांनीं ज्यांनीं मला तोंडघशीं पाडलें आहे त्यांवर पहा कसा सूड उगवतों तो ! '-शिसं ४.२.

तोंड घालणें—(दोघे बोलत असतां तिसऱ्यानें) संबंध नसतां मध्येंच बोलणें; मध्यें पडणें; बीचमें मेरा चांदभाई करणें.

तोंड घेऊन जाणें—तोंड लपविणें; निघून जाणें; काळें करणें पहा. ' ज्या दिवशीं ती तोंड घेऊन जायला सांगेल त्या दिवशीं मी तोंड घेऊन जाईन झालं. '-निरभ्रचंद्र ३.

तोंड घेऊन येणें—एखाद्यानें सोंपविलेलें काम न करतां त्यानें तसेंच परत येणें. ' असें सर्वांनीं करावें. जो मामलेदार असें करून तोंड घेऊन येईल त्याचें मुखावलोकन न करितां फिरोन सेवा न सांगतां त्यास घरींच बसवावें.'-मराआ १९.

तोंड घेणें—१ बोंबलत सुटणें; ताशेरा झाडणें; बोंबलपट्टी करणें. २ तोंडांतून लाळ गळावी म्हणून पारा इ. तोंड आणणारीं औषधें घेणें. ' मीं वैद्याकडून तोंड घेतलें आहे. '

तोंड चुकविणें—हातून एखादा अपराध घडला असतां कोणी रागें भरेल या भीतीनें, किंवा काम वगैरे टाळण्यासाठीं चुकारतट्टूपणानें एखाद्यापासून आपलें तोंड लपविणें; दृष्टीस न पडणें; छपून असणें; दृष्टिआड होणें; मागें मागें राहणें.

तोंड जळणें—एक प्रकारची शिवी. अपकीर्ति होणें; काळें करणें.' हा मेल्यानों जळलीं त्यांचीं तोंडें !' -मोरप्र १५.

तोंड टाकणें-टाकून बोलणें—१ (क्रोधावेशानें) अपशब्दांचा वर्षाव करणें; निर्भर्त्सना करून बोलणें; खरडपट्टी काढणें; अद्वातद्वा बोलणें. ' तूं नोकर-माणसांवर उगीच तोंड टाकलेंस. ' २ (घोडा इ. जनावरानें) चावण्यासाठींच तोंड पुढें करणें. ' ह्या घोड्याला तोंड टाकण्याची भारी खोड आहे, ती घालविली पाहिजे. '

तोंड ठेचणारा-फाडणारा—(एखाद्या) उद्धट, बडबड्या माणसास गप्प बसविण्याची हातोटी ज्यास साधली आहे असा; उद्दामपणानें, गर्वानें बोलणाऱ्या व्यक्तीस रोखठोक उत्तर देऊन चूप बसविणारा.

तोंड तोडणें—(ना.) एखादी वस्तु मिळविण्याकरितां एखाद्याच्या पाठीस लागणें; त्याच्यापुढें तोंड वेंगाडणें; गयावया करणें.

तोंड दाखविणें—पुढें जाणें; भेटणें; समोर येणें. ' मरणाहून अपेश वोखटें. अपजय घेऊन नानासाहेबांस व भाऊसाहेबांस तोंड काय दाखवावें. '-भाव ५९.

तोंड दाबणें—लांचलुचपत देऊन (एखाद्याचें) तोंड बंद करणें; (एखाद्यास) वश करणें; गप्प करणें; मिंधा करून गप्प बसविणें.

तोंडदाबी—(एखाद्यानें) गुप्त बातमी फोडूं नये म्हणून, प्रतिकूल बोलूं नये म्हणून त्यास लांच देऊन त्याचें तोंड दाबण्याची, वश करण्याची क्रिया; याकरितां दिलेला लांच; आमिष. ' तो गांवकामगारांची तोंडदाबी करतो. '-गुजा २१.

तोंड दिसणें—एखाद्याची आपण केलेली योग्य निर्भर्त्सना दुसरी बाजू न कळतां लोकांच्या नजरेस येणें व आपणच वाईट ठरणें (पण ज्याची निर्भर्त्सना केली असेल त्याचें वर्तन सुधारण्याची आशा नसणें); अपेश येणें; वरवर दोषी आहे असें वाटणें; बोलण्यामुळें दोषी ठरणें. ' मी तुला रागें भरलों म्हणजे माझें तोंड मात्र दिसेल, पण तूं आपला आहे तसाच रहाणार ! '

तोंड देखरें(लें) बोलणें—एखाद्यासमोर त्यास खूष करण्याकरितां त्याला अनुकूल असें बोलणें; वरवरचें

बोलणें; मनांत नसतां उगाच बरें वाटावें म्हणून चांगलें बोलणें. ' हें तोंडदेखरें बोलणें मला समजतें. '—मोरप्र १६.

तोंड देणें—१ पारा वगैरे देऊन तोंडाच्या आंतील त्वचा सुजविणें; तोंड आणविणें. ' वैद्यबोवा म्हणाले कीं. त्याला तोंड दिलें आहे. ' २ सैन्याच्या अग्रभागीं राहून शत्रूवर हल्ला करणें; चाल करणें; युद्ध करणें. ३ (एखाद्याचा) प्रतिपक्षी होऊन राहणें; लढावयाला सिद्ध होणें. आव्हान स्वीकारणें. ४ (आट्यापाट्यांचा खेळ) शेवटची पार्ट खेळून परत येणाऱ्या गड्याकडे पाटी धरणारानें तोंड फिरविणें. ५ एखाद्या गोष्टीला न भितां तींतून धैर्यानें पार पाडण्याची तयारी ठेवणें; प्रतिकार करणें.

तोंड धरणें—१ अन्न सेवन करण्याची तोंडाची शक्ति आजार वगैरे कारणांमुळें नाहींशी होणें. ' त्याचें तोंड धरलें आहे, त्याला चमच्याचमच्यानें दूध पाजावें लागतें.' २ (एखाद्याची) बोलण्याची शक्ति नाहींशी करणें. ३ (एखाद्याला आपल्या) तावडींत, कबजांत आणणें. ' मी त्याचें तोंड धरलें आहे, तो आतां काय करणार ! ' ४ बोलण्याची बंदी करणें. ' बोलणाराचें तोंड धरवत नाहीं. ' ' त्यांच्या विरुद्ध बोलणाऱ्या माणसाचें तोंड आपण धरलें पाहिजे ! ' —जादूगार पृ. ५७.

तोंड धुवून येणें—(प्र.) नागझरीवरून तोंड धुवून ये ! नागझरी पहा. (उप.) एखाद्याची विनंति कधींहि मान्य होणार नाहीं असें म्हणून फेटाळून लावतांना योजण्याचा तिरस्कारदर्शक वाक्प्रचार.

तोंड निपटणें—आजार,उपवास इ. कारणांमुळें (एखाद्याचे) गाल खोल जाणें, चेहरा सुकणें. ' महिनाभर हें मूल तापानें आजारी होतें, त्याचें तोंड पहा कसें निपटलें आहे तें!'

तोंड पडणें—१ सुरुवात होणें; आरंभ होणें; सुरू होणें. 'लढाईस तोंड पडलें. ' २ (गळूं इ. कांस) छिद्र पडणें; फुटणें; वाहूं लागणें.

तोंड पसरणें-वेंगाडणें—१ खिन्नपणाची, केंविलवाणी मुद्रा धारण करणें; गयावया करणें. २ हीनदीनपणानें याचना करणें; प्रार्थना करणें; भिक्षा मागणें.

तोंड पाघळणें—१ न बोलावयाची गोष्ट कोणा एकापाशीं बोलून टाकणें; बडबडणें. २ (ल.) गुप्त गोष्ट बाहेर फोडणें, फुटूं देणें. ३ मुखरस पाघळण. काय गळतें० पहा.

तोंड पाडणें—१ शत्रूचा वेढा, एखादें कोडें, तुंबलेला डाव, पडलेली अडचण इ. पासून मुक्तता होण्यासाठीं उपायाला सुरुवात करणें; चंचुप्रवेश करणें; शिरकाव करणें. २ छिद्र पाडणें; तुंबारा मोकळा करणें.

तोंड पाहणें—१ (एखाद्याच्या) आश्रयाची, मदतीची अपेक्षा करून असणें. 'आम्ही पडलों गरीब, म्हणून आम्हाला सावकाराचीं तोंडें पाहण्याची पाळी वारंवार येते.' २ (एखाद्यानें) स्वतःच्या शक्तीचा, कर्तृत्वाचा अजमास करणें. 'तूं असें करीन म्हणतोस, पण आधीं आपलें तोंड पहा!' ३ बोलणाराचें भाषण नुसतें ऐकणें, पण त्यानें सांगितलेलें करावयास किंवा केलेला बोध अनुसरावयास प्रवृत्त न होतां स्वस्थ बसून राहणें. 'म्हणती हाणा, मारा, पाडा, घ्या, काय पाहतां तोंडा ।'—मोद्रोण ३ १२५. ४ (हेटाळणीच्या स्वरानें) सामर्थ्य, कर्तृत्वशक्ति यांचा अंदाज करणें. 'तोंड पहा या लढणाऱ्याचें !'—शिसं १.३. ५ जन्मलेल्या मुलाचें प्रथमच तोंड पाहणें. मुलगी माहेरीं असेल तर मुलाकडील मंडळी तिच्याकरितां खणलुगडें, मुलाकरितां दागिने व कपडे, बाळंतविड्याचें सामान वगैरे घेऊन जाऊन चांगल्या मुहूर्तावर मुलाचें तोंड पाहतात.

तोंड पाहात बसणें—काय करावें, कसें करावें या विवंचनेंत असणें; कांहीं न करतां स्वस्थ बसणें.

तोंड पिटणें—१ बडबड करणें. 'पश्चिम द्वारींचें कवाड। सदा वाऱ्यानें करी खडखड । तैशी न करी बडबड । वृथा तोंड पिटीना ।'—एभा १०.२३१. २ दुःखानें तोंडावर मारून घेणें.

तोंड फिरणें—१ आजारानें, पदार्थाच्या अधिक सेवनानें तोंडाची रुचि नाहींशी होणें; तोंड वाईट होणें; तोंडास चव नाहींशी होणें; तोंड विटणें. २ तोंडांतून शिव्यांचा वर्षाव होऊं लागणें; अपशब्द काढणें; भरमसाटपणें बोलणें. 'तो रागावला म्हणजे कोणावर त्याचें तोंड फिरेल ह्याचा नेम नाहीं.'

तोंड फिरविणें—१ तोंडाची चव नाहींशी करणें. २ शिव्यांचा वर्षाव करीत सुटणें. 'तो रागावला म्हणजे तुमच्यावर देखील तोंड फिरवायला कचरणार नाहीं.' ३ (वितळत असलेला किंवा तापविला जात असलेला धातु इ. कानें) रंगामध्यें फरक दाखविणें, रंग पालटणें. 'ह्या तांब्यानें अद्याप तोंड फिरविलें नाहीं, आणखी पुष्कळ आंच दिली पाहिजे.' ४ दुसऱ्या दिशेकडे पाहणें; विशिष्ट गोष्टीकडे लक्ष्य न देतां

इतर गोष्टींकडे प्रवृत्ति दाखविणें. ५ गतीची दिशा बदलणें; दुसऱ्या दिशेला, माघारें वळणें.

तोंड फुटणें—१ थंडीमुळें तोंडाची बाह्य त्वचा खरखरीत होणें, भेगलणें; तोंडाची त्वचा रुक्ष होणें. २ (एखाद्याची) फजिती उडणें; पत नाहींशी होणें; नाचक्की होणें; अभिमान गलित होण्याजोगा अपमान, शिक्षा इत्यादि होणें. ३ अपयश येणें; तोंडघशीं पडणें. ४चट्टा बसणें;नुकसान पोंचणें.

तोंड फुटाण्यासारखें फुटणें—फार बोलणें; घालून पाडून, रागानें बोलणें. 'कोण ग बाई त्या वऱ्हाडणींचीं तोंडें फाडफाड फुटाण्यासारखीं फुटत होतीं.'—फाटक नाटयछटा १.

तोंड फोडून घेणें—पश्चात्ताप करणें; स्वतःची चूक कबूल करण्याची वेळ येणें. 'तुमचें तुम्हास तोंड फोडून घ्यावें लागेल.'—विक्षिप्त ३.२५०. तोंड पिटणें (२) पहा.

तोंड बंद करणें—१ जीभ आवरणें; जपून बोलणें; गप्प बसणें; स्तब्ध राहणें. २ (एखाद्याला) लांच देऊन गप्प बसविणें; वश करून घेणें; तोंडास कुलूप घालणें.

तोंड बंदावर राखणें—खाण्याला किंवा बोलण्याला आळा घालणें; खाणें व बोलणें यांस मर्यादा घालणें; नियमितपणें बोलणें व खाणें. 'तूं आपलें तोंड बंदावर राखिलें नाहींस तर अजीर्णानें आजारी पडशील.'

तोंड बांधणें—लांच देऊन (एखाद्याचें) तोंड बंद करणें; (एखाद्यानें) गुप्त गोष्ट फोडूं नये म्हणून पैसे देऊन त्यास गप्प बसविणें; तोंडास कुलूप घालणें; बोलणार नाहीं असें करणें तोंड दाबणें पहा.

तोंड बाहेर काढणें—१ तोंड दाखविणें; राजरोसपणें समाजांत हिंडणें (बहुधा निषेधार्थी प्रयोग). 'तुरुंगांतून सुटून आल्यावर त्यानें आज दोन वर्षांत एकदांहि तोंड बाहेर काढलें नाहीं!' २ फिरण्यासाठीं, कामकाजासाठीं घराबाहेर पडणें; बाहेर निघणें. 'हा संततधार पाऊस अगदीं घराबाहेर तोंड बाहेर काढूं देत नाहीं.'

तोंड बिघडणें—एखाद्या आजारामुळें वगैरे तोंड बेचव होणें; तोंडास अरुचि उत्पन्न होणें; विटणें; अन्न वगैरे गोड लागत नाहींसें होणें.

तोंडभर-भरून बोलणें—भीड, संकोच, भीति न धरतां मन मोकळेपणानें भरपूर, अघळपघळ बोलणें; दुसऱ्याचें आणि आपलें समाधान व्हावयाजोगें अघळपघळ बोलणें; मनमानेसें बोलणें; अनिर्बंध भाषण करणें.

तोंडभरून साखर घालणें—(एखाद्याचें) तोंड साखरेनें भरणें; (एखाद्याच्या) कामगिरीबद्दल, विजयाबद्दल संतोषादाखल त्याचें तोंड साखरेनें भरणें; (एखाद्याच्या) कामगिरीबद्दल गोड भरपूर मोबदला देणें; खूप करणें; संतुष्ट करणें.

तोंड मागणें—(आटयापाटयांचा खेळ) लोण घेऊन परत जातांना पाटीवरील गड्यास आपणाकडे तोंड फिरविण्यास सांगणें. तोंड मागितल्यावर पाटीवरील गडी आपलें तोंड फिरवितो त्यास 'तोंड देणें' म्हणतात.

तोंड माजणें—१ मिष्टान्न खावयाची चटक लागल्यानें साध्या पदार्थांबद्दल अरुचि उत्पन्न होणें. २ शिव्या देण्याची, फटकळपणानें बोलण्याची खोड लागणें.

तोंड मातीसारखें, शेणासारखें होणें—(आजारानें) तोंडाची चव नाहींशी होणें; तोंड विटणें, फिरणें; अन्नद्वेष होणें.

तोंड मिचकणें—दांतओठ खाणें;क्रोधानें तोंड मिटून धरणें.

तोंड येणें—१ तोंडाच्या आंतल्या बाजूच्या त्वचेस फोड येऊन ती हुळहुळी होणें व लाळ गळूं लागणें. २ (कर.) लहान मूल बोलूं लागणें. 'आमच्या मुलाला तोंड आलें आहे' = तो बोलावयास लागला आहे.

तोंड रंगविणें—१ विडा खाऊन ओंठ तांबडेलाल करून घेणें. २ (ल.) (एखाद्याचें थोबाड) थोंबाडींत मारून लालभडक करून सोडणें; चांगली तोंडांत मारणें.

तोंड लागणें—(लढाई, वादविवाद, अंगीकृत कार्य इ. कांस) सुरुवात होणें; प्रारंभ होणें. 'तेव्हां युद्धास तोंड लागलें.'—इमं २९०.

तोंड लागणें—१ प्यावयासाठीं एखादें पेय ओंठाशीं नेणें. २ सामर्थ्य, ताकद असणें. 'तुझें काय तोंड लागलें आहे!' असा वाक्प्रचार आहे.

तोंड वर करणें—उजागरीनें वागणें; उघडपणें व्यवहार करणें. 'महाराजांस व त्यांची खोटी कळकळ बाळगणारांस तोंड वर करण्यास जागा नाहीं.'—विक्षिप्त ३.१६४.

तोंड वाईट करणें—१ निराशेची मुद्रा धारण करणें; म्लानवदन होणें; खिन्न मुद्रा धारण करणें. २ (ताप इ. कांमुळें) तोंडास अरुचि येणें; विटणें; अन्नद्वेष होणें.

तोंड वांकडें करणें—१ वेडावून दाखविणें; वांकुल्या दाखविणें; चिडविणें. २ नापसंती दर्शविणें; तोंड मुरडणें; तोंड फिरविणें.

तोंड वाजविणें-वाजणें—एकसारखें बोलत सुटणें; निरर्थक बडबड करणें; बकबकणें; वटवट करणें; भांडण करणें.

' आमचे कान देखील दुखूं लागले यांचें ऐकतां ऐकतां; पण यांचें तोंड कांहीं रहात नाहीं वाजायचें. '-त्राटिका.

तोंड वासणें—१ निराशेनें दुःखानें तोंड उघडणें व तें बराच वेळ तसेंच ठेवणें. २ याचना करण्यासाठीं तोंड उघडणें, वेंगाडणें. 'कांहो माझी सांड केली हृषीकेशी । आम्ही कोणापाशीं । तोंड वासों ॥'-नामदेव.-मोद्रोण २३.१५; -आश्रम ५.३७.

तोंड वासून पडणें—शक्तीच्या क्षीणतेमुळें, उत्साह, तेज, वगैरे नष्ट झाल्यामुळें, गतप्राण झाल्यामुळें, आपसरून पडणें. ' तो पडला सिंहनिहतमत्त द्विपसाचि तोंड वासून । '-मोउद्योग १३.२०५.

तोंड विचकणें—दीन मुद्रेनें आणि केंविलवाण्या स्वरानें याचना करणें. तोंड वेंगाडणें; दीनपणें भिक्षा वगैरे मागणें.

तोंड वेंगाडणें—दांत, तोंड विचकणें; करुणा भाकणें. ' माझी मुलगी तशी राहिली तरी चालेल पण तोंड वेंगाडायचा नाहीं.'-मोरप्र १६.

तोंड वेट(ड)विणें—(काव्य) (एखाद्यास) वेडावून दाखविण्यासाठीं त्याच्यापुढें तोंड वेडेंवाकडें करणें.

तोंड शेणासारखें पडणें—(लाजिरवाणें कृत्य केल्यानें) तोंड उतरणें; निस्तेज होणें; काळवंडणें; म्लानमुख होणें; खिन्नवदन होणें; मुद्रा काळी पडणें.

तोंड संभाळणें—जपून बोलणें; जीभ आवरणें; भलतेसलते शब्द तोंडांतून बाहेर पडूं न देणें; अमर्याद बोलण्यास आळा घालणें.

तोंड सुटणें—चराचरां, फडाफडां, अद्वातद्वा बोलूं लागणें; भरमसाटपणें बोलणें.

तोंड सुरू होणें—बडबडीला, शिव्यांना सुरुवात होणें; तोंडाचा पट्टा सुटणें. ' आजोबांचें तोंड जें काय सुरू झालें तें कांहीं विचारूंच नका. '-पकोघे.

तोंड सोडणें—१ फडाफडां, अद्वातद्वा बोलूं लागणें; अमर्याद बोलणें. २ अधाशासारखें खात सुटणें; तोंड मोकळें सोडणें.

तोंड हातीं-हातावर धरणें—१ तोंड सोडणें (दोन्ही अर्थीं) पहा. २ बोलून पुरेसें करणें; फार बोलणें. 'आईनें तर आपलें तोंड जसें कांहीं हातींच धरलें होतें.'-आजोच ९.

तोंडचा—१ विरुद्ध, उलट दिशेचा; समोरून येणारा (वारा, ऊन, भरती इ.). २ ज्याची कर्तबगारी केवळ तोंडांतच, बोलण्यांतच आहे, क्रियेंत दिसून येत नाहीं असा. ' तोंडचा शिपाई-कारकून-सुग्रण-खबरदार.' ३ तोंडानें सांगितलेला, निवेदन केलेला, तोंडी केलेला (व्यवहार, हिशेब, पुरावा इ.). याच्या उलट लेखी.

तोंडचा-तोंडीचा घास काढणें-हिरून घेणें—१ (एखाद्याची) अगदीं आटोक्यांत आलेली वस्तु, पदरीं पडावयास आलेला लाभ हिसकावून घेणें; हातातोंडीं आलेली गोष्ट हिरावून घेणें. २ (एखाद्याच्या) अन्नावर पाणी पाडणें; अन्नांत माती कालविणें; वृत्तिच्छेद करणें; पोटास मिळूं न देणें; पोटावर पाय आणणें.

तोंडचा-तोंडींचा घास देणें—(ल.) (एखाद्यास) अतिशय प्रेमानें, ममतेनें वागविणें; प्रसंगविशेषीं आपण उपाशीं राहून दुसऱ्यास खावयास देणें. आपल्या अन्नांत भागीदार करणें.

तोंडचा चतुर—बोलण्यांत पटाईत; वाक्पटु; वादविवादांत निष्णात; चर्चा करण्यांत कुशल.

तोंडचा जार—नुकत्याच जन्मलेल्या मुलाच्या तोंडांतील फेंस, चिकटा; ओठावरचा जार; जन्मप्रसंगींचा तोंडावरचा पातळ पापुद्रा. (विशेषतः तुझ्या, त्याच्या तोंडाचा जार वाळला नाहीं = तूं, तो अजून केवळ बालक आहेस अशा वाक्यांत उपयोग). ' त्यांचें तोंडचें जार वाळलें नाहीं! त्यांनीं एवढा पराक्रम करून मारतां मारतां मेले. '-भाब७४.

तोंडचा नीट—१ बोलून भला; चांगला बोलकाचालका; सौजन्ययुक्त. २ युक्तायुक्त विचार करून बोलणारा; योग्य भाषण करणारा. ३ हजरजबाबी; अस्खलीत बोलणारा.

तोंडचा फटकळ—शिवराळ; उघडतोंड्या; अश्लील, शिवराळ भाषण करणारा; भरमसाटपणें बोलणारा; अद्वातद्वा बोलणारा; जिभेला हाड नाहीं असा.

तोंडचा रागीट—जहाल; तिखट; कडक भाषण करणारा.

तोंडचा शिनळ—१ इष्कबाज, फंदी म्हणून नांव मिळविण्याची इच्छा करणारा; स्त्रियांची खोटी खुषमस्करी करणारा; स्त्रियांच्या कृपेची खोटी फुशारकी मारणारा. २ निरर्गल व अश्लील भाषण करणारा; शिवराळ.

तोंड(डा)ची गोष्ट—सहजसाध्य, अतिशय सोपी गोष्ट, काम; केवळ बोलण्यानें होणारी; बोलण्याइतकी सोपी. ' वाघ मारणें तोंडची गोष्ट नव्हे. '

तोंडचे तोंडीं; तोंडोतोंडीं—प्रत्यक्षाप्रत्यक्ष; तोंडानें; बोलाचालीनें.

तोंडचे-तोंडी व्यवहार—केवळ तोंडानें बोलून, बोलाचालीनें झालेला, होणारा व्यवहार, धंदा. याच्या उलट लेखी व्यवहार.

तोंडचें पाणी पळणें—घाबरणें; तोंड भीतीनें कोरडें पडणें; कोरड सुटणें. 'आतां तर पुरुषोत्तमरावाच्या तोंडचें पाणी पळालें.'–इंप ३७.

तोंडचें पायचें—(कों.) गुरांच्या तोंडास व पायांस होणारा रोग.

तोंडचे हिशेब—कागदावर आंकडेमोड न करतां मनांतल्या मनांत कांहीं आडाख्यांच्या मदतीनें करावयाचे हिशेब.

तोंडचें, तोंडावरचें पाणी पळणें-उडणें; तोंड कोरडें पडणें—(भीति इ. कांमुळें) तोंडांतील ओलावा नाहींसा होणें. (भीतीमुळें) चेहरा फिका पडणें; यावरून, घाबरून जाणें. 'हें बघ, सकाळपासून माझ्या तोंडचं पाणी पळालं आहे. सांग ग काय झालं तें, असं काय करतेस.'–पकोघे. 'अशी माझ्या मुलाची अवस्था पाहून माझ्या तोंडचें पाणी पळालें.'–शाव २.२४८. 'एल्फिन्स्टन पुण्यास आला म्हणजे कांहीं स्वस्थ बसणार नाहीं, आपल्यामागें त्याचा ससेमिरा खास लागेल, हें मनांत येऊन त्याच्या (बाजीरावाच्या) तोंडचें पाणी पळालें.'–एल्फिन्स्टन चरित्र १.१७५.

तोंडचें पाणी पळविणें—घाबरवून सोडणें; हबेलंडी उडविणें. 'पण भाऊंनीं त्यांच्यावर एकदम हल्ला करून त्यांच्या तोंडचें पाणी पळविलें.'–V. S. २.२०५.

तोंडाचा खट्याळ-फटकळ-फटकाळ-फटकूळ-बाईट-शिनळ—शिवराळ; तोंडाळ; अश्लील बोलणारा.

तोंडाचा खबरदार-बहादर-बळकट—बोलण्यांत चतुर, हुषार; बोलण्याची हातोटी ज्याला साधली आहे असा.

तोंडाचा गयाळ; तोंडगयाळ—जिभेचा हलका; चुरचोंबडा; लुतरा; बडबड्या; ज्याच्या तोंडीं तीळ भिजत नाहीं असा.

तोंडाचा गोड—मधुभाषी; गोड बोलणारा; गोडबोल्या.

तोंडाचा जड—१ बोलतांना लागणारा; रेंकत बोलणारा; फार थोडें बोलणारा; अस्पष्ट भाषण करणारा. २ मितभाषी; कमी बोलणारा.

तोंडाचा तिखट—कडक भाषा वापरणारा; लागेलसें बोलणारा; खरमरीत, स्पष्ट, झोंबणारें, कठोर भाषण करणारा

तोंडाचा तोफखाना सुटणें-सुरू होणें—भरमसाटपणें बोलूं लागणें; कडाक्याचें भाषण सुरू होणें; (एखाद्याची) अद्वातद्वा बोलण्याची क्रिया सुरू होणें; शिव्यांचा वर्षाव होऊं लागणें.

तोंडाचा पट्टा चालणें-सुटणें-सोडणें—भरमसाटपणें बोलणें; एकसारखें बोलत राहणें; अद्वातद्वा बोलणें; शिव्यांचा भडिमार सुरू होणें. (एखाद्यानें) शिव्यांचा भडिमार सुरू करणें; जीभ मोकळी सोडणें; (एखाद्याची) खरडपट्टी आरंभिणें.

तोंडाचा पालट—खाद्य पदार्थांत केलेला बदल; रुचिपालट; तोंडास रुचि येईल असा अन्नांत केलेला फेरबदल; अन्नांतील, खाण्यांतील फरक, बदल.

तोंडाचा मिठा—मिष्ट भाषण करणारा; गोडबोल्या; मिठ्ठास बोलणारा. तोंडचा गोड पहा.

तोंडाचा हलका—सहज बोलून टाकणारा; उतावीळपणें बोलणारा; चुरचोंबडा; भडभड्या; विचार न करतां बोलणारा; फटकळ.

तोंडाचा हुक्का होणें—तोंड सुकून जाणें; म्लानवदन होणें.

तोंडाची गांड करणें—तोंड शब्दोच्चाराचें साधन होय. व हा अवयव पवित्र मानला जातो. उलट गांड मलोत्सर्गाचें साधन असल्यामुळें अपवित्र मानला जातो. तोंड पवित्र असून त्यांतून बाहेर पडणारें वचन आचरणांत न आणलें तर त्याला अधोद्वाराप्रमाणें अपवित्रता येते. त्यावरून वचन न पाळणें; आपला शब्द खोटा करणें. 'आम्ही वाटेल तितकी घस सोसूं पण तोंडाची गांड नाहीं करणार!'

तोंडाची चुंबळ—१ दुसऱ्यास वेडावून दाखविण्याकरितां चुंबळीसारखी केलेली ओठांची रचना; वांकडें तोंड. २ दांत पडल्यामुळें ओठांचें बोळकें होतें तशी तोंडाची आकृति.

तोंडाची टकळी—वटवट; बडबड; वाटेल तसें बोलणें. एकसारखें बोलणें.

तोंडाची वाफ दवडणें-खरचणें-फुकट घालविणें-सोडणें—१ मूर्खास उपदेश करतांना, निरर्थक, निरुपयोगी, निष्फळ भाषण करणें. २ ज्यावर विश्वास बसणार नाहीं असें भाषण करणें; मूर्खपणानें बोलणें; वल्गना करणें; बाता मारणें. 'जरी स्वभावानें कृपण असले, तरी तोंडच्या वाफा सोडण्यांत मोठे उदार होतात.'–V. S. २.१७.

तोंडाचें बोळकें होणें—(म्हातारपणामुळें) तोंडांतील सर्व दांत पडणें.

तोंडांत आलेला घास टाकणें—एखादी गोष्ट अगदीं सिद्ध होत आली असतां ती तशीच सोडून देणें. ' वडील मंडळीस असें वाटतें कीं आपल्या मुलानें तोंडांत आलेला घास टाकून नवा पाव नवा डाव न करतां आपल्या जुन्या धंद्यांत पडावें. '–गांगा १२१.

तोंडांत खाणें–मारून घेणें—१ गालांत चपराक खाणें; मार मिळणें. २ पराभूत होणें; हार जाणें. ३ फजिती झाल्यानंतर शहाणपणा शिकणें; नुकसान सोसून धडा शिकणें, बोध मिळविणें. कानास खडा लावणें, पहा.

तोंडांत जडणें—थोबाडींत, गालांत बसणें (चपराक, थप्पड इ.)

तोंडांत–तोंडीं तीळभर न राहणें; तोंडीं तीळ न भिजणें—लावालावी करण्याची संवय असणें; पोटांत कोण तीहि गोष्ट न राहणें. तीळ भिजेल इतका वेळहि तोंडांत एखादी गोष्ट न राहणें; अगदीं क्षुद्र अशी गुप्त गोष्टहि पोटांत न ठेवणें; कोणतीहि लहानसहान गोष्ट गुप्त ठेवूं न शकणें. तीळ पहा.

तोंडांत तोंड घालणें—१ (ल.) प्रेम, मैत्री इ. भावानें वागणें; मोठ्या प्रेमाचा, मित्रपणाचा अविर्भाव आणून वागणें. २ एकमेकांचें चुंबन घेणें.

तोंडांत देणें—(एखाद्याच्या) थोबाडींत मारणें; गालांत चपराक मारणें.

तोंडांत बोट–बोटें घालणें—(आश्चर्य वाटल्यास माणूस साहजिक तोंडांत बोट घालतो.) (ल.) आश्चर्य-चकित होणें; थक्क होणें; विस्मय पावणें. 'देवर्षि मुखीं घालुनि बोट म्हणे, हा ! सुयोधना कुटिला ! ।'–मो द्रोण १०.४१. ' त्याची अलौकिक हुशारी पाहून शहाणपणाची घमेंड मारणाऱ्या विजातियांनीं तोंडांत बोटें घालावीं.'–V.S. २.७०.

तोंडांत भडकावणें—चपराक मारणें; तोंडांत देणें पहा.

तोंडांत–तोंडीं माती घालणें—१ खाण्यास अन्न नसणें; अतिशय हाल, कष्ट सोसावे लागणें. २ एखाद्याचा वृत्तिच्छेद करणें; तोंडचें अन्न काढणें. ३ (एखाद्यानें) अतिशय दुःखाकुल, शोकाकुल होणें. 'ऊर, माथा बडवून, तोंडीं माती घालूं लागली.'–भाव ७५.

तोंडांत–तोंडीं माती पडणें—१ (एखाद्याची) उपासमार होणें. २ मरणें. ३ नुकसान होणें. 'कइक झाले अमर कइकाच्या तोंडीं पडली माती'–विवि ८.४.८०.

तोंडांत शेण घालणें—(एखाद्याची) फजिती करणें; (एखाद्यास) नांवें ठेवणें; खरडपट्टी काढणें.

तोंडांत साखर असणें—(एखाद्याचें) तोंड, वाणी गोड असणें; गोड बोलत असणें; मधुभाषणी असणें; गोडबोल्या.

तोंडांत साखर घालणें—१ तोंडभरून साखर घालणें, पहा. आनंदविणें; गोड पदार्थ बक्षिसादाखल देणें. २ (उप.) तोंडांत शेण घालणें. 'सावित्रीबाईच्या तोंडांत लोक जेव्हां फारच साखर घालीत, तेव्हां तिनें दोनतीन जुनेरीं एकत्र शिवून जानकीबाईला द्यावीं.'–रंगराव.

तोंडांत साखर पडणें—१ म्हणालास तसें होवो ! आनंदाचा दिवस उगवो ! तुमची वाणी चांगली ठरो ! अशी इच्छा करणें. एखाद्याचें बोलणें खरें व्हावें अशी इच्छा. 'देव करो आणि तुमच्या तोंडांत साखर पडो !'–विवि. २ (एखाद्याला) आनंदाचा प्रसंग, दिवस येणें.

तोंडांतून ब्र काढणें—(तोंडांतून) अधिक उणें अक्षर काढणें, उच्चारणें; किंचित्‌हि शब्दोच्चार करणें. ' आंतल्या आंत चूर होऊन मेलें पाहिजे, तोंडांतून ब्र काढण्याची सोय नाहीं.' –विकारविलसित.

तोंडानें पाप भरणें; तोंडें पाप घेणें—लोकांचीं पातकें उच्चारणें; लोकांचे दोष बोलून दाखविणें; वाईट बोलण्याची हौस यथेच्छ पुरवून घेणें; लोकांचीं पापें उच्चारून जिव्हा विटाळणें. 'कैसीं वो मानुसें । सपाइनि परवसें । तोंडें पाप घेती कांइसें । वायांवीण ॥'–शिशु २१६.

तोंडापुढें—अगदीं जिव्हाग्रीं; मुखोद्गत.

तोंडापुढें टिकणें—उत्तरास प्रत्युत्तर देतां येणें; एखाद्याच्या बोलण्यास न भिणें. ' मी बाई कुठं तुमच्या तोंडापुढें टिकणार !'–मोरप्र १०.

तोंडापुरता–तोंडावर गोड–मधुर पण खोटें बोलणारा; दुतोंड्या; वरवर गोड बोलणारा व आंतून कपटी असलेला; उघडपणें प्रिय भाषण करणारा व मनांत निराळेंच असणारा.

तोंडार मारप—(गो.) तोंडांत मारणें. (एखाद्याच्या) पदरांत चूक बांधणें; वरमण्यासारखें उत्तर देणें.

तोंडार ल्हायो उडप—(गो.) फार जलद, अस्खलित बोलणें; लाह्या फुटणें.

तोंडाला काळोखी आणणें–लावणें–बेअब्रू, नापत करणें.

तोंडाला कुत्रें बांधणें–बांधलेलें असणें—भांडखोर मनुष्याबद्दल म्हणतात. कुत्र्याप्रमाणें ज्याच्या त्याच्यावर तोंड टाकतो. ताळतंत्र सोडून बोलणें.

तोंडाला कुलूप–खीळ घालणें— गप बसणें, बसविणें. 'नको बोलूं भांडा । खीळ घालुनि बैसे तोंडा ॥'–तुकाराम. 'यांच्या तोंडाला कुलूप घालील अशी त्या औषधावरची कडी आहे आमच्याजवळ !'–एकचप्याला ४.४. 'व्हाइसरॉयाच्या तोंडाला कुलूप बसलें आहे.'–केसरी १०-६-३०. तोंडास कुलुप लावणें, पहा.

तोंडाला टांकी दिलेली असणें—देवीच्या खोलवणांनीं तोंड भरलेलें असणें; तोंडावर देवीचे वण फार असणें.

तोंडाला–स पाणी सुटणें—एखादा खाद्यपदार्थ खावासा वाटला कीं लाळ सुटते, यावरून. मोह होणें; लोभ सुटणें; हांव सुटणें; प्राप्तीची इच्छा होणें. 'अरे तिला पाहिली नाहींस तरी तोंडाला पाणी सुटतं अं !'–मोरप्र १९. 'तेव्हां त्याच्या तोंडाला अधिक पाणी सुटलें.'–V. S. २.१२९.

तोंडाला–स पानें पुसणें—फसविणें; चकविणें; छकविणें; भोळसाविणें; भोंदणें; तोंडावरून हात फिरविणें.–मोगोपीगोडवा ४०. 'हिंदी लोकांच्या तोंडाला पानें पुसण्यानें कार्यभाग होणार नाहीं.'–केसरी १४-६ ३०.अस्तंभा २१,७८.

तोंडाला फांटा फुटणें—भलभलतें बोलणें; भरमसाट विधानें करणें; मूळ मुद्दा सोडून भलतेंच बोलत सुटणें; हवें तसें अमर्याद भाषण करूं लागणें.

तोंडाला हाड नसणें—(प्र.) जिभेला हाड नसणें. बोलण्याचा सुमार नसणें; भरमसाटपणें बोलणें.

तोंडाला हात देणें—तोंड बंद करण्याचा प्रयत्न करणें; वटवट, बडबड थांबविणें; बोलूं न देणें. 'बाईसाहेब, तुमचीं लुगडीं धुवायला सांगा–एकदां सोडून सात वेळां धुईन–पण एवढ्या गोष्टींत नका माझ्या तोंडाला हात देऊं.'–एकचप्याला ४.२.

तोंडावर—१ समक्ष; डोळ्यांदेखत; प्रत्यक्ष समोरासमोर. २ (ल.) निर्भयपणें; भीड न धरतां. 'मी त्याच्या तोंडावर त्याला लुच्चा म्हणण्यास भिणार नाहीं.'

तोंडावर चार तुकडे फेंकून देणें—समजूत काढणें; थोडेंफार देऊन गप्प बसविणें.–केसरी १७-६-३०.

तोंडावर तुकडा टाकणें—(एखाद्यानें) गप्प बसावें, प्रतिकूल बोलूं नये म्हणून त्याला थोडेसें कांहीं देणें, थोडें देऊन समजूत काढणें.

तोंडावर–ला तोंड देणें—१ (एखाद्यास) विरोध करणें; विरुद्ध बोलणें. २ (एखाद्यास) उद्धटपणानें, अविनयानें, दांडगेपणानें उत्तर देणें; उत्तरास प्रत्युत्तर देणें.

तोंडावर तोंड पडणें—दोघांची गांठ पडून संभाषण, बोलाचाल होणें; समोरासमोर वादविवाद होणें; उत्तर प्रत्युत्तर होणें.

तोंडावर थुंकणें—(एखाद्याची) निर्भर्त्सना, छीःथू करणें; धिक्कार करणें. २ अपकीर्ति होणें; छीःथू होणें. 'लोक तोंडावर थुंकतील.'–अस्तंभा १९५.

तोंडावर देणें—१ तोंडांत देणें पहा. 'देउनि तोंडावरि हरि पळ काढी, घाव घेउनी मागें ।'–मोमंत्रभा १०.५३७. 'काय भीड यांची द्या कीं तोंडावरी ।'–दावि ३०२. २ पुढें करणें; मान्याच्या जागीं ठेवणें; आघाडीस पाठविणें; प्रथम बळी देणें.

तोंडावर नक्षत्र पडणें–(एखाद्यानें) तोंडाळपणा करणें; शिवराळ असणें; नेहमीं अपशब्दांनीं तोंड भरलेलें असणें. 'ह्याजकरितां तोंडावर नक्षत्र पडलेल्या पोरास म्या बोलाविलें म्हणून हे मला शब्द लावीत नाहींत.'–बाळ २.१४२.

तोंडावर पडप—(गो.) थोबाडींत (चपराक) बसणें.

तोंडावर पदर येणें—१ वैधव्य प्राप्त होणें. 'तिच्या तोंडावर पदर आला म्हणून ती बाहेर पडत नाहीं.' २ लज्जेनें तोंड लपविण्याजोगी स्थिति होणें.

तोंडावर पाणी असणें–चेहरा तेजस्वी, तजेलदार असणें; चेहरा टवटवीत असणें. 'दोन दिवस तोंडावर पाणी असतें तोंपर्यंत लोक.. नादीं लागतात.'–विवि.

तोंडावर मारणें—(एखाद्याला) पराभूत करणें. तोंडांत देणें पहा.

तोंडावर सांगणें–बोलणें—(एखाद्याच्या) समक्ष, निर्भीडपणें, बेडरपणें सांगणें, बोलणें; स्पष्टपणें बोलणें.

तोंडावर हात ठेवणें—तोंडाला हात देणें, पहा. तोंड दाबणें; गप्प बसविणें; चूप करणें. 'दवलतरावांनीं त्याच्या तोंडावर हात ठेवला.'–अस्तंभा २२.

तोंडावरची माशी न उडणें—अगदीं गरीब बावळा, मेंगरूळ माणूस असला म्हणजे म्हणतात.

तोंडावरून–तोंडावर हात फिरविणें—(एखाद्यास) गोड बोलून, फूस लावून, भुलथाप देऊन फसविणें; भोंदणें छकविणें; बनविणें; ठकविणें; लुबाडणें.

तोंडाशीं तोंड देणें—(हलक्या दर्जाच्या व्यक्तीनें वरिष्ठाशीं) आपला दर्जा विसरून बरोबरीच्या नात्यानें, अविनयानें बोलणें, व्यवहार करणें; समोरासमोर उत्तर प्रत्युत्तर करणें; पायरी सोडून बोलणें.

तोंडास काळोखी-काजळी लावणें—(एखाद्याची) बेअब्रू, नाचक्की होणें; दुष्कीर्ति होणें; नांवाला कलंक लावणें.

तोंडास कुलूप लावणें—१ अगदीं न बोलणें; मौन धरणें. २ लांच देणें; गप्प बसविणें; मिंधेकरून न बोलेसें करणें. 'वर्तमानपत्रकारांच्या तोंडास कुलुप लावण्यास शिवाजी महाराज तत्पर असत.'—विक्षिप्त २.६४.

तोंडास तोंड—१ वादविवाद; वाग्युद्ध; हमरीतुमरी; धसाफसी. २ (क्रिवि.) समक्षासमक्ष; समोरासमोर; प्रत्यक्ष.

तोंडास-ला तोंड देणें—१ तोंडाशीं तोंड देणें, पहा. २ मार्मिकपणें, खरमरीतपणें उत्तर देणें. ३ उत्तरप्रत्युत्तर करून भांडण वाढविणें. 'जितकी थट्टा करावयाची असेल तितकी करून घे. तुझ्या तोंडास तोंड देण्याची कांहीं सोय नाहीं.' —मूकनायक. 'तोंडाला तोंड दिलंस तर तिथल्या तिथं तोंडाचीं दोन तोंडं करून देऊन दामदुपटीनें उसनं फेडीन!' —एकच प्याला १.२.

तोंडास तोंड न दिसणें—(पहांटेस) तोंड न ओळखतां येण्याइतका अंधेर असणें. (झुंजुमुंजु पहांटेविषयीं वर्णन करतांना हा वाक्प्रचार योजतात).

तोंडास-तोंडीं बसणें—(श्लोक, शब्द इ.) स्पष्ट, बिनचूक, भरभर म्हणण्याइतका पाठ होणें. 'तो श्लोक दहा वेळां पुस्तकांत पाहून म्हण, म्हणजे तो तुझ्या तोंडीं बसेल.'

तोंडास येईल तें बोलणें—विचार न करतां भरमसाटपणानें वाटेल तें बोलणें; अद्वातद्वा, अपशब्द बोलणें; वटवट, बडबड करणें.

तोंडास-तोंडीं लागणें—१ (एखाद्याच्या) तोंडास तोंड देणें; उलट उत्तरें देणें. २ हुज्जत घालणें; वादविवाद करण्यास तयार होणें.

तोंडास हळद लावणें—(एखाद्यास) दोष देणें; नापसंती दर्शविणें.

(एखाद्याच्या) तोंडासमोर—१ (एखाद्याच्या) समक्ष; अगदीं समोर; डोळ्यांदेखत. २ अगदीं मुखोद्गत; जिव्हाग्रीं. तोंडापुढें पहा. 'हा श्लोक माझ्या अगदीं तोंडासमोर आहे.'

तोंडासारखें-तोंड देखल्या बोलणें—(एखाद्याची) स्तुति, खुशामत करण्याकरितां त्याच्याच मताची, म्हणण्याची री ओढणें; त्याचें मन न दुखवेल असें बोलणें.

तोंडीं काढणें—१ खाल्लेलें उलटून पाडणें; ओकारी देणें. २ (एखाद्यास त्यानें) केलेले उपकार बोलून दाखवून टोमणा मारणें.

तोंडीं खीळ पडणें—तोंड बंद होणें; गप्प बसणें; स्तब्ध बसणें भाग पडणें. 'अवघ्या कोल्यांचें मर्म अंडीं। धरितां तोंडीं खीळ पडे।'

तोंडीं घास येणें—अन्नास लागणें; पोटाचा उद्योग मिळणें; चालणें. (एखाद्यास) घासभर अन्न मिळणें; चरितार्थाचें साधन मिळणें; पोटापाण्याची व्यवस्था होणें.

तोंडीं तीळ न भिजणें—१ (तापानें, संतापून ओरडण्यानें, रडण्यानें) तोंड शुष्क होणें, कोरडें पडणें. २ तोंडांत तीळ० पहा.

तोंडीं तृण धरणें—दातीं तृण धरणें, पहा.

तोंडीं देणें—(एखाद्यास एखाद्या माणसाच्या, कठिण कार्याच्या) सपाट्यांत, तडाख्यांत, जबड्यांत, तावडींत लोटणें, देणें; (एखाद्यास) हाल दुःख सोसण्यास पुढें करणें.

लहान तोंडीं मोठा घास घेणें—१ (एखाद्यानें) आपल्या आवांक्याबाहेरचें काम हातीं घेणें. २ वडील, वरिष्ठ माणसास शहाणपण शिकविणें.

तोंडीं येऊन बुडणें-नासणें—(एखादी वस्तु, पीक इ.) अगदीं परिपक्व दशेस, परिणतावस्थेस येऊन, ऐन भरांत येऊन नाहींशीं होणें; वाईट होणें. हातातोंडाशीं येऊन गमावणें.

तोंडीं येणें—१ (पारा इ. औषधानें) रोग बाहेर येणें. २ ऐन भरांत, परिपक्व दशेस, पूर्णावस्थेस येणें.

तोंडीं रक्त-रगत लागणें—१ वाघ इ. हिंस्र पशूला माणसाच्या रक्ताची चटक लागून तो माणसावर टपून बसणें. २ (ल.) लांच-लुचपत खाण्याची चटक लागणें. ३ (बायकी) स्वतःचीं मुलें मरणें. मूलमारी असा दोष असणें.

तोंडीं लागणें—१ (एखाद्यास एखाद्या वस्तूची, खाद्याची चव, सुख प्रथमच कळून त्याची त्यास) चटक लागणें; आवड उत्पन्न होणें. 'ह्याच्या तोंडीं भात लागला म्हणून भाकर आवडत नाहीं.' २ (एखाद्याच्या) तोंडास तोंड देणें; उद्धटपणानें, आपला दर्जा विसरून उलट जबाब देणें. ३ हुज्जत घालणें; वादविवादास प्रवृत्त होणें; तोंडास लागणें, पहा. 'सुज्ञ आहेत ते दूषकांच्या तोंडीं लागत नसतात.' —नि ४. (युद्ध, भांडण इत्यादि) आणीबाणीच्या ठिकाणीं, आघाडीस, अग्रभागीं असणें.

तोंडीलावणें—(नाम) १ जेवतांना तोंडास रुचि आणणारा भाजी, चटणी इ. सारखा मधून मधून खावयाचा, चमचमीत पदार्थ. २ करमणुकीकरितां, बोलण्याला विषय म्हणून एखादा जवळचा माणूस. लिंबलोणचें.

तोंडीं लावणें--(क्रि.) १ जेवतांना भाजी, चटणी इ. चमचमीत पदार्थानें रुचिपालट करणें. 'आज तोंडीं लावावयाला भाजीविजी कांहीं केली नाहीं काय ?' २ विसारा दाखल पैसे देणें.

तोंडीं लिहिणें नसणें--कांहीं विद्या नसणें. 'मुलगा म्हणाला, माझ्या तोंडीं कांहीं लिहिणें नाहीं.'-मसाप १.३.३१.

तोंडें मागितलेली किंमत--(एखाद्या वस्तूची) दुकानदारानें सांगितलेली व झिगझिग वगैरे न करतां गिऱ्हाइकानें दिलेली किंमत. एकदां सांगितलेली किंमत.

तोंडें मानलेला-मानला--(तोंडच्या) शब्दानें, वचनानें मानलेला (बाप, भाऊ, मुलगा इ.); धर्माचा, पुण्याचा पहा.

तोंडें वांकडीं करणें--वेडावून दाखविणें; वेडावणें; वांकुल्या दाखविणें.

❀ **तोंड आसल्यारि काशी वचूनु येवयेद**--(गो.) तोंड असल्यावर काशीला जाऊन यायला कांहींच हरकत नाहीं. चौकशी करून कोणतीहि गोष्ट साध्य होते. सामान्यतः मुखदुर्बळ माणसाला सांगतांना म्हणतात.

तोंड आहे कीं तोबरा--घोड्याला तोबरा दिला कीं तो सारखा खात असतो. यावरून भरमसाटपणें खाणारा किंवा बोलणारा यास उद्देशून म्हणतात. 'किती खातोस', किती बोलतोस' या अर्थी.

तोंड करी-मारी बाता, गांड-ढुंगण-कुबड खाई लाथा—एकीकडे अपमान होत असतां, निकृष्ट स्थिति असतां तोंडानें फुशारकी मारणारा मनुष्य.

तोंड गोड असलें तर सर्व कांहीं होतें—मनुष्याला जर लोकांस संतोष होईल असें बोलण्याची कला अवगत असली, तर त्याला आपलें सर्व काम साधून घेतां येतें.

तोंड गोड असलें म्हणजे मनुष्य काशीहून रामेश्वरापर्यंत जातो--मनुष्याजवळ पैसा नसला किंवा वाट माहीत नसली तरी दुसऱ्यास गोड लागेल असें बोलण्याची कला अवगत असली, तर त्यास साहाय्यहि मिळतें व मार्गहि दाखविणारे मिळून त्याचें काशीपासून रामेश्वरची यात्रा करण्यासारखें अवघड कामहि सिद्धीस जातें.

तोंड चोपडा, मनांत वांकडा—वरून बोलावयास गोड पण आंतून कपटी मनुष्य. चोपडा पहा.

तोंड दाबून-धरून-बांधून बुक्यांचा मार—[पूर्वी यज्ञामध्यें बोकड मारीत असत. त्यानें ओरडूं नये म्हणून त्याच्या तोंडांत डाळ वगैरे देऊन व एका हातानें तोंड दाबून धरून त्यास पोटावर बुकलून मारीत असत. यावरून] आपलें नुकसान होत असतां किंवा आपणास त्रास होत असतांहि त्याबद्दल कुरकुर किंवा तक्रार करतां येत नाहीं अशी अगतिक स्थिति. एखाद्याचा विनाकारण छळ होऊन त्यास त्याविरुद्ध तक्रार करतां न येणें; एखाद्यास अन्यायानें वागवून त्याविरुद्ध त्यानें कागाळी केल्यास त्यास बेगुमानपणें शिक्षा करणें. 'बायकांचा जन्म म्हणजे तोंड दाबून बुक्क्याचा मार, म्हणतात तें अक्षरशः खरें आहे.'-पकोधे. गांगा २१७.

तोंड देखे आणि गोष्टी सांगे—मनुष्य पाहून त्याच्या चेहऱ्यावर जसे भाव दिसतील त्याप्रमाणें त्यास अनुलक्षून भाषण करणारा; तोंडपुजेपणा करणारा; खुशामती.

तोंड धुते दुपारीं, जेवते रात्रीं—कोणत्याहि कामास काळ वेळ न पाहतां केव्हां तरी करणें. गैरशिस्त वागणूक.

तोंड नाहीं तोबरा, पोट नाहीं नगारा—एखाद्या मनुष्याच्या बोलण्यास व खाण्यास अगदीं ताळतंत्र नसला म्हणजे म्हणतात.

तोंड पाहून मुशाहिरा, घोडा पाहून खरारा—जशी ज्याची योग्यता असेल, त्याप्रमाणें त्याला वागणूक देणें.

तोंड पोरीचें, भोंक मोरीचें—कांहीं मुली फार फटकळ असतात. त्यांच्या तोंडून वाटेल ते घाण व अर्वाच्य शब्द बाहेर पडण्याचा संभव असतो. अद्वातद्वा बोलणारी मुलगी, स्त्री.

दुधानें तोंड पोळलें म्हणजे ताकसुद्धां फुंकून प्यावें लागतें—दूध पहा.

तोंड फिरे तिकडे-तेथें अवदसा फिरे—घरांत फार वाचावाची होऊं लागली म्हणजे हळूहळू गृहकलह उत्पन्न होऊन घरास निकृष्टदशा येते. पुढें पहा.

तोंड फिरे तिकडे अवदसा फिरे, हात फिरे तिकडे लक्ष्मी फिरे--जो मनुष्य नुसताच बडबड करतो, काम करीत नाहीं, त्यास निकृष्ट दशा प्राप्त होते व जो बोलत नाहीं पण हातांनीं सारखें काम करीत असतो त्याला सुस्थिति प्राप्त होते.

तोंड बोलतें, पाठीला अहेर मिळतो-मार खावा लागतो--एखादा अपशब्द तोंडानें उच्चारला जातो पण त्याबद्दल मार पाठीस खावा लागतो. वड्याचें तेल वांग्यावर.

तोंडभर विडा नि गांडभर बोडा-लवडा--(अश्लील) एखादी गोष्ट भरपूर असणें; समृद्धि; पाहिजे तितकें, यथेच्छ असणें.

तोंड भांग्राचें, कान पितळीचे—(गो.) तोंड सोन्याचें कान पितळेचें. बोलून गोड पण हलक्या कानाचा माणूस.

तोंड लहान करचें, मन व्हड करचें--(गो.) बोलावें कमी पण मनानें मोठें असावें.

तोंड वांकडें, पण दैव फांकडें--दिसावयास बेंगरूळ, निस्तेज पण नशीबानें सुस्थिति उपभोगणारा मनुष्य.

तोंड वांकडें म्हळ्यार हारसो वांकडो म्हणूं येत?-(गो.) तोंड वांकडें असल्यावर आरसा वांकडा आहे, असें कसें म्हणतां येईल?-तु०-नाचतां येईना अंगण वांकडें.

तोंड सैल आहे पण मूठ सैल नाहीं—तोंडानें बोलण्यांत उदार, अघळपघळ पण हातातून मात्र कांहीं सुटावयाचें नाहीं. उदारपणाचा डौल आणणाऱ्या कृपणाबद्दल म्हणतात. पुढें पहा.

तोंडा तकीत घासु घेवंका; तोंडाकड घासु होडु—(गो.) तोंडांत राहील तेवढाच घास घ्यावा.

तोंडा लागली हळद--(गो.) एखाद्याला कौतुकमिश्र रागानें बोलतांना म्हणतात. 'तुझ्या हातून अमुक झालें किंवा तमुक घडलें नाहींना, हात् तुझ्या तोंडाला हळद लागो!'

तोंडाकडे बघून हंसावें अन् मागें वळून नाक मुरडावें—समोर तोंडावर प्रेमाचें बोलणें पण पाठ वळली कीं निंदा करावयाची, अशी वृत्ति.

तोंडाचा गाजा आणि पेटीचा बाजा—अतिशय बडबड करणारा मनुष्य; ज्याच्या तोंडाचा सारखा पेटीप्रमाणें आवाज चालू आहे असा वाचाळ मनुष्य.

तोंडाचा गोड, हाताचा जड-झोंड—गोड व अघळपघळ भाषण करणारा पण प्रत्यक्ष कांहींहि मदत, पैसा न देणारा. तोंडानें गोड बोलून प्रत्यक्ष वागणूक उलट करणारा; तोंडानें उदार पण हातानें कंजूष.

तोंडाची बाभळी कोणा नाहीं झाडायाला यायची—तोंडाचा फोलकटपणा कोणाला काढून टाकतां येत नाहीं. बोलणाराचें तोंड धरवत नाहीं.

तोंडाचें बोळकें, शब्द निघती फिके—दांत पडल्यावर उच्चार स्पष्ट होत नाहींत.

तोंडाच्या बाता, घरा बाईल भीक मागता--बाहेर मोठमोठ्या गप्पा मारतो पण घरीं पाहावें तों बायको भीक मागते. तु०-टिळेटाळे नायकाचे घरीं हाल बायकांचे.

तोंडांत कोणय घालीत गिळूंक आपणेंच जाय—(गो.) तोंडांत कोणीतरी घालील पण गिळण्याचें काम आपल्यालाच करायला हवें. स्वतः हातपाय हलविलेच पाहिजेत.

तोंडांत घास, मानेस फास—Many slips between the cup and the lip याचा (सवि. चा) अनुवाद. मिळालेली गोष्ट उपभोगण्याचें नशीबीं आहे कीं नाहीं हें कोणास ठाऊक. कारण दैव हें विचित्रच आहे. (हिं.) मुहमें निवाळा शिरपर टोला.

तोंडांत मोग, काळजांत रोग--[मोग=(गो.) लोभ, मोह] मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम्। याप्रमाणें.

तोंडांतलें उत्तर तोंडांत उलें—(गो.) आपण एखादी गोष्ट बोलणार तोंच ती घडून यावी अशावेळीं म्हणतात.

तोंडांतु बोट गल्लारी चबुंक कोळुन त्तिलें—(गो.) तोंडांत बोट घातलें असतां चावण्याचें माहीत नाहीं. अगदीं गरीब, निरपराधी माणूस.

तोंडानं बरो, पोटांन विखाचो पोळो—(गो.) तोंड गोड पण पोटांत विष किंवा रोग. तोंडांत मोग, पहा.

तोंडानु गोडु खाकयांतु सुरि—(गो.) तोंडानें गोड, खाकेंत सुरी. गोड गोड बोलून गळा कापणें.

तोंडापरीस जबडा थोर—दिसावयास साधा पण परिणामीं अधिक घातक.

तोंडापुरता मांडा--१ भूक भागेल एवढीच पोळी. (ल.) जेमतेम गरज भागेल एवढाच जरूर त्या वस्तूचा पुरवठा. २ (चुकीनें) तोंडासमोर गोड बोलणें.

आपल्या तोंडाभोंवतीं आपणच दिवा ओवाळून घेणें--स्वतःची फुशारकी स्वतःच सांगणें; आपलीच बडेजावी करणें, मिरविणें.-विवि ८.४.८३.

तोंडाला पदर आणि गांवाला गजर-नजर--मर्यादा राखण्यासाठीं इकडे तोंडावरून पदर घ्यावयाचा, पण बोलणें एवढें मोठें कीं सर्व गांवांत ऐकू जाईल असें. तसेंच सर्व लक्ष घराबाहेर.

तोंडावर गोड, मनांत फोड—वरून बोलावयास मधुर भाषण करणारा पण मनांतून कपटी स्वभावाचा मनुष्य.

तोंडावर तेवढी जिभलीची लवलव—नुसती पोकळ बडबड; तोंडापुरती खुशामत.

तोंडावर हांजी हांजी, नि मागें दगलबाजी—तोंडावर गोड० पहा.

तोंडावर हात आणि गांडींत बोट—(अशिष्ट) वर गोडगोड बोलून आंतून नाश करण्याची खटपट.

तोंडावर हात फिरवणें, कसें करून फसविणें—समोर तोंडावर गोड बोलून आंतून विश्वासघात करणें; वरून मधुर भाषण करून फसविणें.

तोंडावरून मनुष्याची परीक्षा, नि अंगणावरून घराची परीक्षा—मनुष्याच्या चेहऱ्यावरून त्याच्या स्वभावाबद्दल अनुमान काढतां येतें व अंगणाकडे दृष्टि टाकल्यावरोबर घरांतील व्यवस्थेसंबंधीं अनुमान करतां येतें. कारण घराची कळा अंगण सांगतें.

तोंडास मिठी, कपाळास आठी—नेहमीं दुर्मुखलेला, चिडखोर, तोंडावाटे शब्द न काढणारा, पण मनांतल्या मनांत कुढणारा अशाबद्दल योजतात.

तोंडासारखा सारथी जवळ असल्यास काय कमी—आपणास एखाद्या ठिकाणीं जावयाचें असून आपणास वाट माहीत नसली, तरी आपलें तोंड आपणास वाट दाखवितें. म्हणजे ठिकठिकाणीं विचारपूस करून आपणास योग्य स्थळीं जातां येतें. पण तोंड न उघडल्यास मार्ग सांपडत नाहीं. तोंड असल्यार० पहा.

तोंडीं करतां आदरमान, श्रम न करतां बहुमान—आपण जर दुसऱ्यास चांगलें आदरानें वागविलें, गोड शब्द व नम्र भाषा वापरली तर त्याच्याकरितां आपण कांहीं खटपट केली नाहीं तरी तो आपल्यास मान देतो.

तोंडीं तीळ, गांडीं बुधली—तोंडांत तीळ घातल्याबरोबर त्याचें तेल दुसऱ्या द्वारानें बाहेर पडेल अशी अपेक्षा. एखादी गोष्ट केल्याबरोबर तात्काळ तिचें फळ मिळेल असा अयोग्य उतावळेपणा दाखविणें. तु०—पी हळद आणि हो गोरी.

तोडणें——तोडून घेणें—तुकडा पाडून घेणें; वेगळें करून घेणें; पृथक् करून घेणें; खंडानें, मक्त्यानें, इजारा करून (शेत इ.) स्वतंत्रपणें वहिवाटीस घेणें; वेगळें करून, वांटणी करून घेणें.

तोडून देणें—खंडानें, मक्त्यानें, इजारा करून वांटणी करून देणें.

तोडर——तोडरीं घालणें-बांधणें—[पायाला बांधणें —शत्रूला कल्पनेनें किंवा तोरड्यावर त्याची मूर्ति काढून] (एखाद्यावर) हुकूम, अधिकार, सत्ता गाजविणें; गुलाम करणें; स्वाधीन करून घेणें; कबज्यांत ठेवणें; जिंकणें. ‘ कलिकाळ तोडरीं बांधोन। लंकेस सुखें नांदेका ॥ ’ ‘ कामादि सहा वैरी। येणें उपदेश शस्त्रधारी। जिणोनि घालितां तोडरीं। मग संसारीं अरि नाहीं ॥ ’—एभा ९.१०५. ‘ काम क्रोध जेणें घातलें तोडरीं। विदारिले वरी। लोभ दंभ ॥ ’

तोंडाळ——हाताळ पुरवतो पण तोंडाळ पुरवत नाहीं—शिवराळ माणसापेक्षां चोर बरा.

तोंडाळ बरा पण गांडाळ वाईट—बडबड्या माणूस पतकरतो पण भ्याड, आंतून कलागती लावणारा, कुचका माणूस नको.

तोतया——तोतयेगिरी—(ऐति.) तोतया बनून फसविणें. पेशवाईत तोतये बरेच होऊन गेले. भाऊसाहेब पेशवे, सवाई माधवरावाची बायको यशदाबाई व आणखी कांहीं थोर माणसें यांचे तोतये निघाले होते.

तोफ——तोफेच्या तोंडीं देणें—१ (एखाद्यास) तोफेच्या समोर उभें करून त्याच्यावर तोफेंतून एक गोळा सोडणें, त्याला तोफेनें उडविणें; ठार करणें. २ (ल.) (एखाद्यास) संकटाच्या, कठीण परिस्थितीच्या तोंडीं देणें. ३ (एखाद्या कृत्याचे) दुष्परिणाम भोगण्यास एखाद्यास पुढें करणें.

तोबरा——राखेचा तोबरा—(ऐति.) मोगलाईत अपराध्याला तोबऱ्यांत राख घालून त्यांत त्यास तोंड खुपसण्यास लावीत असत व अशी शिक्षा देत असत.

तोबऱ्याला पुढें, लगामाला (पाठीं)मागें—तोबऱ्यांत दाणा असतो म्हणून घोडा तो पुढें होऊन घेतो; पण लगाम घालतांना आढेवेढे घेतो. कामचुकार, भोजनभाऊ, आयतोजी इसमासंबंधीं योजतात. खायला आधीं कामाला कधींमधीं, पहा.—गांगा १५९.

तोबा——तोबा तोबा करणें—(मुसलमानी)‘तोबा’ असे दुःखाचे उद्गार काढणें. दुःख, यातना होणें. ‘ तेव्हां रोहिले शिपाई हीरपळून तोबा तोबा करूं लागले. ’—पामो ४७९.

तोरड——तोरडीं घालणें—पाडाव करणें; जिंकणें. तोडर पहा. ‘ जयाची कामना धांवडी। काळ घातला तोरडीं। ’

तोरा——तोरा मिरविणें—दिमाख दाखविणें; प्रौढी मारणें; ऐट करणें.

❀ **तोरा सरदाराचा व उजेड सणकाडीचा**—बडा घर पोकळ वासा. ऐट सरदारीची असावयाची पण घरीं दिवा लावावयास तेलहि नसावयाचें; त्यामुळें तेल्याच्या मशाली

ऐवजीं सणकाड्यांची चूड घेऊन जाण्याची पाळी यावयाची. रिकामा डौल.

तोरि——तोरि फुगल्यारि मुडया एदी जातवे—(गो.) तुरी फुगल्यावर मुड्याएवढी होईल काय? प्रत्येकाच्या मोठेपणाला कांहीं सीमा असते.

तोरीक काटु ना, काट्टाक तोरिना—(गो.) कशास कांहीं पत्ता नाहीं.

तोल——तोलंतोलाचा—१ बरोबरीचा; सारख्या दर्जाचा, किंमतीचा, हिंमतीचा; जोडीस अनुरूप. २ (ल.) बहुमोल; भारी.

तोल देणें—(दुसऱ्याचा अपराध, अपकार) सहन करणें; पोटांत घालणें; दम खाणें; गई, क्षमा करणें; (दुसऱ्याच्या मतास मान देऊन, आपलें मत बाजूस ठेवून त्याच्या मतास) मान्यता, अनुमति, संमति देणें; आपला हेका सोडणें; संमति देणें; अनुमति देणें; आपला होकार देणें; मान देणें; मान त्याच्या बाजूनें झुकविणें.

तोल संभाळणें—१ समता, साम्य, समतोलपणा राखणें; झोंक जाऊं न देणें; इकडे तिकडे न झुकणें. २ मर्जी संभाळणें; अनुरूप वागणें; योग्यतेनुरूप वागणूक करणें.

तोलास तोल देणें-घेणें—१ भारंभार घेणें, देणें. २ (ल.) (द्रव्य, व्यय, शौर्य, वक्तृत्व इ. बाबतींत) दुसऱ्याशीं बरोबरी करणें; टक्कर देणें; स्पर्धा करणें. तोडीस तोड देणें पहा.

❀ जसा वारा वाहेल तसा तोल द्यावा—जशी परिस्थिति येईल त्याप्रमाणें वर्तन करावें. वारा येईल तशी पाठ द्यावी.

तोलदारी——तोलदारी खाशाची व घरीं कळा जोशाची—ऐट सरदाराची पण राहणी भटासारखी; वरून श्रीमंतीचा देखावा पण घरीं दारिद्र्य.

तोलदारीचा हेवा आणि सणकाडीचा दिवा—मागें तोरा पहा. आपल्यापेक्षां उच्च दर्जाच्या माणसाशीं, अंगीं पात्रता नसतांहि स्पर्धा करणें हा मूर्खपणा होय.

तोल——तोल आसल्याबगर धोल वाजता?—(गो.) टोला असल्यावांचून ढोल वाजत नाहीं. प्रत्येक कार्याला त्याच्या आवश्यक साधनाची जरूर असते.

तोसदान——तोसदान वाढणें—१ बडेजाव, ऐश्वर्य वाढणें. २ लठ्ठ होणें.

तोळा——तोळामासा पाहणें--जोखून पाहणें; हाताचा जड असणें; कृपण, चिक्कू असणें.

तोळामासा प्रकृति--थोडाहि फरक झाला असतां बिघडते अशी अति नाजुक प्रकृति.

❀ तोळा मुखत्यारीचें मोल, शेरभर चतुराई समतोल--अल्पशी सत्ता किंवा स्वातंत्र्य असेल तर तें पुष्कळशा बुद्धीइतकेंच काम देईल. तु०—सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं. मूळ इंग्रजी--One ounce of discretion is worth a pound of wit.–सवि २६३५.

त्याग——त्यागाशिवाय पूजा नाहीं--कष्ट केल्याशिवाय मान मिळत नाहीं.–केसरी २३-६-२५.

त्याचा-नें——त्याचा गळा व माझा नळा जेव्हां एकत्र होईल तेव्हां काम उरकेल.–गळा पहा.

त्याचा बाप तोच; त्याचाच काका तो; त्याचेंच नांव तें—समान, सदृश गोष्टीबद्दल म्हणतात. दोन्ही सारखेच; एकासारखाच दुसरा. चुकलेला शब्द, संज्ञा कोणी दुरुस्त केली असतां 'तो न् तो सारखाच' अशा अर्थानें वापरतात.

त्याची दक्षिण तर आमची उत्तर; त्याची पूर्व तर आमची पश्चिम; त्याचें आडवें तर आमचें उभें; त्याचें हां तर आमचें ना; त्याचें पांढरें तर आमचें काळें--एकमेकांच्या अगदीं विरुद्ध. दक्षिण—उत्तर टोंकांइतकें अंतर; अगदीं विषमता, विरुद्धता.

त्याचें काळें खपतें पण आमचें आलें खपत नाहीं—एखाद्याचा हलका पदार्थहि चांगली किंमत आणतो पण दुसऱ्याचा चांगला पदार्थहि पडून राहातो. यासाठीं माल खपविण्याची कला अवगत असावी लागते.

त्याचें बोलणें भाजीपाला--एखाद्याच्या शब्दास मुळींच मान, किंमत नसणें.

त्याच्या इयाटीं आहे तें तुमच्या लझाटीं नाहीं--एक इतका भाग्यवान् कीं दुसरा त्यापुढें कांहींच नाहीं.

त्याच्या पोटांत काळें आहे--कपटी मनुष्याबद्दल म्हणतात.

त्याच्या मनाचा ठाव घेतला, त्याचा रोख निराळा दिसला--खडा टाकून पाहणें; मनाचा कल ओळखून वागणें.

त्याच्याशीं भागीदारी केली, आणि शेवटीं शेंडी गुंतली—भलत्याच मनुष्याशीं पातीनें व्यवहार केला, संबंध ठेवला म्हणजे शेवटीं ठोकर बसते.

त्यानें पायानें मारलेली गांठ तुला हातानें सुटणार नाहीं; (गो.) ताणें पायांनीं गांठायल्लें हाच्यान सोडौं

नज—त्यानें पायांनीं दिलेल्या गांठी तुला हातांनीं सोडतां येत नाहींत. एक अगदीं बेरकी तर दुसरा तितकाच भोळा.

त्रयी—(एखाद्याची) त्रयी उद्धरणें—[त्रयी = मागच्या तीन पिढ्या. बाप, आजा, पणजा]. (एखाद्याला) आईबापावरून शिव्या देणें; त्याचे पितर उद्धरणें.

त्रयीमध्यें उगवलेला—१ तिन्ही वेदांत पारंगत. २ (उप.) चोरी, चहाडी व शिनळकी यांत प्रवीण.

त्रयोदश—**त्रयोदशगुणी विडा**—या विड्यांतील १३ गुण पुढील आहेत:-१ कटु, २ तीक्ष्ण, ३ उष्ण, ४ मधुर, ५ क्षार, ६ कषाय, ७ वातघ्न, ८ कफनाशक, ९ कृमिहर, १० दुर्गंधिनाशक, ११ मुखभूषण, १२ शुद्धीकरण, १३ कामसंदीपन. विडा खाण्यापासून त्रयोदशगुणी फायदे—तांबूलमुखरोगनाशनिपुणं संवर्धनं तेजसो, नित्यं जाठरवन्हिवृद्धिजननं दुर्गंधदोषापहं। वस्त्रालंकरणं प्रहर्षजननं विद्वत्कृपाप्रेरणं, कामस्यायतनं समुद्भवकरं लक्ष्म्यः सुखस्यास्पदम्॥ –पामो ४३९. त्रयोदशगुणी विडा याचा अर्थ तेरा पदार्थ एकत्र करून केलेला विडा असा कोणी कोणी समजतात; पण वास्तविक तसें नसून विड्यामध्यें तेरा आरोग्यदायक गुण आहेत ते वर दिले आहेत.

त्राटिका—१ एका राक्षसिणीचें नांव. २ एका मराठी नाटकांतील स्त्रीपात्र. ३ (ल.) अगदीं जहांबाज स्त्री.

त्रास—**त्रास त्रास करणें**—जुलुमाविरुद्ध बोभाटा, ओरड करणें.

त्रास त्रास देणें—गांजणें; हाल करणें; अतिशय छळ करणें; जुलुमानें संतापून, हैराण करून सोडणें.

त्राहि—**त्राहि त्राहि करून सोडणें**—[सं. त्राहि= रक्षण कर, तार] देवा! आतां माझें रक्षण कर अशी प्रार्थना करण्याचा प्रसंग येणें. अतिशय छळणें. 'परकीय सत्तेखालीं त्राहि त्राहि करून सोडलेल्या आर्यावर्तांत हिंदुस्तानवासी जनाला धन्य धन्य म्हणून मानून घेण्याजोग्या ज्या कांहीं गोष्टी .... आहेत, त्यांतलीच ही एक अभिमानास्पद गोष्ट आहे.' –पामो ६०१.

त्राहि त्राहि भगवान्—त्राहि त्राहि भगवन्! म्हणजे परमेश्वरा माझें रक्षण कर, मला तार अशी प्रार्थना. अशा प्रार्थनेची वेळ येणें. –शाव. २.२२८. "डाडोकानीज बेटांतील र्‍होड्स् बेटावर वैमानिक तळ प्रस्थापून हिटलरला ईजिप्त, इराक, पॅलेस्टाईन, मोसल या ब्रिटिश भागांवर हल्ले चढवून तेथें त्यांना 'त्राहि भगवन्' करून सोडणें अशक्य नाहीं." –केसरी १७-६-४१. "कारण, नाहींतर प्रत्यहीं उत्तरोत्तर २७ कुरापती आणि ५६ कलागती आणि फिर्यादी तक्रारी उत्पन्न होऊन त्या मिटवितां मिटवितां त्याच्या आईआजीस पण 'त्राहि भगवान्'च होऊन गेलें असतें." –छच ७.

त्रि—तीन पहा. **त्रिकटु**—मिरीं, पिंपळी आणि सुंठ यांचें मिश्रण.

त्रिकार्षिक—सुंठ, अतिविष व मुस्ता गवत.

त्रिखंड—(अ) पृथ्वी, आकाश, पाताळ. (आ) युरोप, आशिया, आफ्रिका.

त्रिखंडांत न मावणें—परमावधीचें, शेवटचें टोंक गांठणें. अतिशय होणें; सीमा होणें. 'मुलगा झाल्याबरोबर तिचा आनंद त्रिखंडांत मावेना.'

त्रिगण—धर्म, अर्थ, काम.

त्रिगुण—सत्त्व, रज, तम.

त्रिजात—दालचिनी, तमालपत्र, एलची.

त्रिदोष—कफ, वात, पित्त.

त्रिपीडाऽस्तु दिनादिने—मोठ्या माणसाला पुढील तीन पीडा असाव्यात असा आशीर्वाद दिल्याची कथा आहे. १ भोजने बाळपीडा, २ याचकपीडा, ३ शयने स्त्रीपीडा. म्हणजे घरांत मुलें असावींत, संपत्ति असल्यानें याचक दारीं यावेत व सेवातत्पर स्त्री असावी.

त्रिफला—हिरडा, आंवळा व बेहडा.

त्रिभुवन—स्वर्ग, मृत्यु, पाताळ.

त्रिभुवन आठवणें—मोठें दुःख होणें. ब्रह्मांड आठवणें, पहा. 'त्रिभुवन आठवतें! म्हणतात तें अशाच वेळेस.' —छच ४४.

त्रिमधु—तूप, साखर, मध.

त्रिमूर्ति—ब्रह्मा, विष्णु, महेश.

त्रिलोक—स्वर्ग, मृत्यु, पाताळ.

त्रिलोह—सोनें, रुपें, तांबें. सोन्याचे पत्रे दहा भाग, तांब्याचे पत्रे बारा भाग, रुप्याचे पत्रे पंधरा भाग हीं एकत्र करून झालेली धातु.

त्रिवार लिलांव—तीनवार म्हटलें म्हणजे लिलांव कायम होतो यावरून कायम करणें. 'कायदे कौन्सिलापुढें हें बिल आणून त्याचें त्रिवार लिलाव करण्याचे श्रम तरी सरकारनें कां घ्यावेत.'– टि २.२६४.

त्रिविद्या—ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद.

त्रिविध—(तापत्रय)—कायिक, वाचिक, मानसिक.

त्रिविध गंडांत—१ नक्षत्रगंडांत, २ तिथिगंडांत व ३ लग्नगंडांत.

त्रिवेणी—गंगा, यमुना व सरस्वती यांचा संगम. हा अहलाबादला आहे.

त्रिवेद—त्रिविद्या पहा.

त्रिशंकु—एक पौराणिक राजा. हरिश्चंद्राचा पिता. हा सदेह स्वर्गलोकीं गेला तेव्हां देवांनीं त्याला खालीं लोटून दिलें; पण विश्वामित्रानें आपल्या पुण्याईनें त्याला वर चढविण्याचा चंग बांधला. त्यामुळें तो अधांतरींच लोंबत राहिला. यावरून धड इकडे नाहीं धड तिकडे नाहीं, अशी स्थिति असणारा माणूस.

त्रिशंकु रायागेलो स्वर्गु—(गो.) त्रिशंकु राजाचा स्वर्ग. त्रिशंकूला मध्येंच लोंबकळत राहावें लागलें, त्याप्रमाणें. 'इदं च नास्ति परं न लभ्यते' अशी एखाद्याची स्थिति होणें.

त्रिशूल—कटिशूल (कामेच्छा), मस्तकशूल, पोटशूल.

त्रिस्थळी यात्रा—प्रयाग, काशी व गया या तीन स्थळींची यात्रा. १ काशीस दंडण, २-प्रयागीं मुंडण, ३ गयेस पिंडण. (ल.) एकाच माणसाला अनेक ठिकाणचीं कामें करावीं लागलीं असतां जी त्याची धांदल होते तीविषयीं म्हणतात. 'कोठें पुणें, कोठें बडोदें, आणि कोठें हैदराबाद. त्रिस्थळी यात्रा, पण आम्ही ती अवघ्या दहा दिवसांत करून आलों.'

त्रेधा—त्रेधा उडणें—(त्रि + धा = तीन प्रकार) गडबड उडणें; धांदल होणें. त्रेधा निदधे पदम् ।-ऋग्वेद.

त्रेपन्न—त्रेपन्न टिकल्याचा—जारज या अर्थी एक शिवी.

त्वम्—त्वयार्धं मयार्धं—अर्धं तुझें अर्धं माझें. (सामा.) लबाडीनें मिळविलेली वस्तु वांटून घेणें; सिद्धसाधक बनून तिसऱ्यांस फसविणें व लाभामध्यें सहभागी होणें.

त्वरा—त्वरेबर येणें—(एखादें काम इ.) लवकर, झटपट करणें; झपाटणें.

****झर झर त्वरेस मोल आहे**—कोणतीहि गोष्ट लवकर केल्यास फायदा होतो; दिरंगाई केल्यास वेळ निघून जाण्याचा संभव असतो; वेळाची किंमत असते.

थ

थक्क—थक्क करणें; थक्क करून सोडणें—चकित करणें; आश्चर्य वाटावयास लाविणें. 'आपला जोसेफू जगाला थक्क करून सोडील········हें त्या बिचारीच्या स्वप्नांतही कधीं आलें नसेल !' -केळकर-ग्यारिबाल्डी.

थट्टा—थट्टा आधीं करूं नये, मग बोंब मारूं नये—प्रथम कोणाची मस्करी करूं नये व केली तर मग तिचे जे परिणाम होतील, ते भोगावयास तयार झालें पाहिजे.

थट्टा आधीं गोड, मग कडू—कोणाचीहि थट्टा करतांना प्रथम मौज वाटते, पण अनेक प्रसंगीं थट्टेची मस्करी होते. थट्टा केलेला मनुष्य चिडतो. थट्टा योग्य मर्यादेंत राहात नाहीं व त्याचा शेवट वितुष्ट येण्यांत होतो. तु०-मस्करीची कुस्करी होते.

थट्टा करणें अर्धें मरण आहे—थट्टा सहन न झाल्यास ज्याची थट्टा केली तो काय गैरभाषणें करील याचा नेम नसून तीं अगदीं निमूटपणें ऐकून घेणें भाग होतें. ही स्थिति अर्ध्या मरणाची होय. ज्याची थट्टा करावी तो अपमान करण्याचा संभव असतो व मग तो सहन करावा लागतो.

थट्टा करून बाक्षिस करी, न देण्याची बरोबरी—जो आपली प्रथम कुचेष्टा करून मग आपणांस कांहीं देतो तो आणि मुळींच न देणारा दोघेहि सारखेच. A civil denial is better than a rude grant.-सवि २९.

थट्टा निकरानें करिती, मैत्री विषप्राय वाटती—जे लोक अतिशय मस्करी करतात त्यांच्याशीं मैत्री करावयास कोणी तयार नसतो; ती मैत्री फार काळ टिकत नाहीं. A bitter jest is the poison of friend-ship. -सवि ७.

थट्टेची होते मस्करी; थट्टेची होती मस्करी आणि मस्करीची कुस्करी—थट्टा करावयास लागलें म्हणजे तिला सुमार राहात नाहीं व शेवटीं त्याचा परिणाम भांडण होण्यांत होतो.

थट्टेच्या लबाड्या, त्याच दुःखाच्या उड्या—प्रथम थट्टेनें म्हणून एखादी गोष्ट करावयाची व पुढें ती तशीच दडपून चालवावयाची म्हणजे एखाद्याची वस्तु प्रथम थट्टेनें

म्हणून ध्यावयाची व त्यास विस्मरण पडल्यास ती गिळंकृत करावयाची, असा कांहीं लोकांचा स्वभाव असतो; पण अशा थट्टेनें लबाड्या करावयाची एकदां संवय झाली म्हणजे तिचा परिणाम पुढें चोरी करण्याची संवय लागण्यांत होऊन वाईट परिणाम होण्याची भीति असते. तस्करी पहा. Jesting lies bring serious sorrows. –सवि २०३७.

थट्टेंत शब्द खरे खोटे, बोलतां कांहीं न वाटे-- थट्टेमध्यें आपण खऱ्या खोट्याची तितकी परवा करीत नाहीं. [Many a true word spoken in jest असें मूळ आहे; त्याचा वरील अनुवाद चुकीचा दिसतो. –सवि २२८०]

थट्टी——कोठी थट्टी पागा, पोट भरायची जागा--कोठी पहा.

थड-डी——थडीस लावणें-जाणें-येणें—शेवटास जाणें; कडेस पोंचणें; पुरें करणें; पार पाडणें.

थडीस लावणें-नेणें-आणणें-घालणें-पोहोंचविणें-- अखेरपर्यंत साहाय्य करणें; सिद्धीस, शेवटास नेणें; कडेस पोंचविणें; तीरास नेणें. " माधवजी ! आजि तुम्ही मित्र थडीला म्हणोनि ' ओ ' लावा ॥ " –मोद्रोण ११.१८.

***ही थड, ना ती थड**—मध्येंच लोंबल्यासारखी स्थिति; निराश्रितपणाची स्थिति; इकडे आधार नाहीं कीं तिकडे आधार नाहीं अशी स्थिति. त्रिशंकुवत् स्थिति.

थंड——थंड करणें—मोहरमच्या दहाव्या दिवशीं ताबूत थंडे करतात त्यावरून. १ विसर्जन करणें. २ शेवट करणें.

थंड पाणी ओतणें—बिस्तवावर थंड पाणी ओतलें असतां तो विझून जातो यावरून. (ल.) एखादें कार्य बंद पाडणें. एखाद्याचा उत्साहभंग करणें; एखाद्याचा हुरूप नाहींसा करणें; निरुत्साह करणें.

थंड होणें-पडणें-पावणें--१ मेल्यावर मनुष्याचें शरीर गार पडतें यावरून मरणें; मृत्यु पावणें; गार पडणें. ' उत्तम लोकासि तुझा सेवक होऊनि थंड पावेल ।'–मोअनु ८.४१. २ बंद पडणें.

थंडा फराळ—थंड वाऱ्यापाण्याचा फराळ. कांहीं न खातां उपाशीं राहणें. ' तुम्ही फार झालें तर आजापणजा-पर्यंत पितरांचा समाचार घेतां; पण पणज्यांच्या बापाची वाट काय ? त्यांनीं थंडा फराळ करून नित्य दिगंबर असावें कीं काय–'—आगरकर. [एका गृहस्थाकडे नेहमीं पुष्कळ पाहुणे येण्याची पद्धति असे व ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें बडदास्त ठेविली जात असे. अशा ठिकाणीं एक गृहस्थ पाहुणे गेले. सायंकाळीं जेवणाची वेळ झाली तेव्हां प्रथम मुलांची वगैरे पंगत बसली त्यावेळीं घरांतील नोकर त्यास विचारावयास आले कीं, आपण या पंक्तीस जेवणार कीं मोठ्या पंक्तीस ? तेव्हां त्यानें मोठ्या पंक्तीस असें उत्तर दिलें. पुढें दुसरी पंगत बसली तेव्हां नोकरानें विचारलें कीं, आपण या पंक्तीस जेवणार कीं खाशांच्या पंक्तीस ? तेव्हां यास वाटलें कीं या पंक्तीपेक्षां खाशांच्या पंक्तीस कांहीं विशेष असेल. म्हणून त्यानें विचारलें खाशांच्या पंक्तीस काय आहे ? त्यानें सांगि-तलें 'थंडा फराळ.' तेव्हां पाहुणा खाशांच्या पंक्तीस राहिला. पुढें घरचें यजमान संध्या वगैरे आटोपून पाटावर येऊन बसले. तेव्हां पाहुण्यांचाहि पाट त्यांच्या शेजारीं मांडण्यांत आला. पुढें प्रत्येकाच्या पुढें एक एक थंड पाण्याचा तांब्या ठेव-ण्यांत आला व यजमानांनीं तो तोंडास लावतांच पाहुण्या-सहि थंड पाणी पिऊन रात्र काढावी लागली !]

थंडावलेल्यास उबारा आणणें--ज्याप्रमाणें मनुष्य मरतेवेळीं थंड पडत जातो, पण जिवंत रहावयाचा असला म्हणजे त्यांत पुन्हां उष्णता वाढूं लागते, त्याप्रमाणें काम बंद पडलेल्या संस्थांस पुनरुज्जीवित करणें, त्यांस चालू करणें; पुन्हां नवीन उत्साह निर्माण करणें.–टि २.९.

*** थंड काळजानें सूड घेणें, हें दुष्टाचें आचरण**– कोणत्याहि प्रकारें भावनावश न होतां बिनदिक्कत एखा-द्याचा सूड घेणें हें काम दुष्ट माणूसच करूं जाणें. Revenge in cold blood is the devil's own act and deed.– सवि २९२७.

थंडी——थंडी गेली, बंडी केली--हिंवाळा गेल्या-वर गरम कपडे करणें; जरूर संपल्यानंतर एखादी गोष्ट करणें. तु०–वरातीमागून घोडें; बैल गेला झोंपा केला.

थंडी येतांना मुका घेते आणि जातांना पायां पडते– (विनोदी) हिंवाळा सुरू झाला म्हणजे प्रथम ओठ, तोंड वगैरे फुटतात व अखेरीस पायांस भेगा पडतात.

थंडीकू मीरा, और गरमीकू मीरा—शैत्य झालें असतां मिरीं खातात व उष्णता झाली असतांहि थंडाई घेतात तींत मिरीं घालतात. सर्वांला एकच औषध. रोग निराळे पण औषध एकच. तु०–To blow hot and cold by the same breath.

थंडीस बंडी, खाण्यास अंडीं, पिण्यास ब्रँडी, निज-ण्यास रंडी--अर्थ उघड आहे. चैनी सुधारकांबद्दल उपहासार्थी वापरतात.

थंडीस बंडी, चैनीस रंडी—हिंव वाजत असल्यास गरम बंडी घालावी व चैन करावयाची झाल्यास वेश्येकडे जावें. तु०-संतत्यै दाररतिः कण्डूशमनार्थं चेटिकागमनम् ।

थंडेंत कांबळ जड कोणाक ?--(गो.) थंडींत कांबळें कोणास जड होणार ? हितकारी, उपयुक्त गोष्टी कोणास त्रासदायक वाटत नाहींत.

थबकट——थबकट बसणें--एकदम जोरानें ढुंगणावर बसणें; फतकल घालून बसणें.

थयथयाट——थयथयाट करणें—(रागानें) पाय आपटणें; आदळआपट करणें. [थयथय हा शब्द नाचणारिणींच्या घांगऱ्यांचा होतो.] 'स्वयंवरा मम नटवा आला । धनु सोडेना, बाण चढविना । करि थयथयाट ॥ थाट समरिंचा० ॥ '–द्रौपदी.

थयुं——थयासो थयुं, एम् जलदी बोलशूं—(गु.) जें झालें असेल तें होवो पण काय झालें तें तर लवकर सांगशील कीं नाहीं ? एखादी भयंकर बातमी कळावयाची असतां ती कळल्यानंतर जितकी भीति वाटते त्यापेक्षां ती कळण्यापूर्वीची अनिश्चित स्थिति अधिक त्रासदायक असते.

थयुं तें थयुं, न थयुं ते थाय नहीं--(गु.) जे झालें तें झालें, जें झालें नाहीं तें कधींच होणारें नसतें. ज्या गोष्टी व्हावयाच्या त्या तशाच होतात व ज्या व्हावयाच्या नसतात त्या करूं गेलें तरी होत नाहींत. तु०–यदभावी न तद्भावी भाविचेन्न तदन्यथा ।–भगवद्गीता.

थर——थरास जाणें-येणें—निकाल लागणें; शेवट होणें; कडेस लागणें; कोणत्या तरी शेवटास पोहोंचणें (काम). 'त्याचा माझा वाद पडला आहे, मग कोणत्या थरास जातो पाहावें.'

थरथर——थरथरां कांपणें—अतिशय भिऊन जाणें; कंप सुटणें. 'कांपे सांद्र विनाकरा थरथरां भूपृष्ठि जीवें फुटे ॥ '–मोकुशलवो. १३.२५.

थळ——थळ घेणें-देणें-नेमणें-ठरविणें-मागणें जमिनीच्या मालकीची अथवा बांधाचीं भांडणें तोडण्यास कबूल करणें, देणें, नेमणें इ.

❀**थळीचें गुरूं आणि कुळवंताचें लेंकरूं**--ज्या गुरास घराची संवय असेल तें, किंवा जें घरींच वाढलें आहे तें गुरूं कधीं घर सोडून जात नाहीं व कुलवंताचें मूल कधीं कुलाच्या परंपरेविरुद्ध वागणूक करीत नाहीं.

थळथळ——थळथळेंचें सग्ग भंगार नयी—(गो.) पाठभेद–लकलकता तें सगळेंच भांगर न्हंय. चकाकतें तें सर्वच सोनें नसतें. तु०–All that glitters is not gold.

थाकी——थाकी उतरणें-साधणें-आणणें--अनुकरण, नकल, विडंबन करणें.

थांग——थांग पाहणें—समुद्राची खोली मोजणें; ठाय घेणें; खोलीचा अंदाज घेणें.

थांग लावणें-पाडणें—तपास करणें; पत्ता लावणें; शोध करणें.

थाट——थाट करणें—नटणें; शृंगार करणें; सजणें; नट्टापट्टा करणें.

थाट बसणें—(घोड्यावर) ताठ, सरळ रेषेंत बसणें.

थाटमाट-मांड—१ उपकरणांची मांडणी; डामडौलाची जुळणी. २ (राहण्याच्या हेतूनें, सुखवस्तीसूचक) व्यवस्थेशीर मांडणी (सामानाची, कामाची); मोठा पण चांगला व्यवस्थित जम. (क्रि० करणें; पडणें; बसणें). 'थाटमाट सदनिं नवा बघुनि वाटतें । ' ३ पोषाख, अलंकार घालणें; नटणें (एखाद्या प्रसंगाकरतां); डौलानें बाहेर पडणें; डौल शोभा; दिखाव.

थान——थान गुंतणें—(रोगामुळें)थानांतील शिरांना सूज येणें, ठणका लागणें.

थान देणें—आमा प्यावयास देणें; पाजणें; अंगावर घेणें.

थान विसरणें—थानाची आठवण न होणें; आईला प्यावयाची (मुलास, वांसरास) नैसर्गिक बुद्धि नसणें.

❀ **थानांन बाडली म्होण बायल न्हय, आनी ढेंगान बाडलो म्होण दादलो न्हय**—(गो.) (अशिष्ट) अवयव नुसते आकारानें मोठे झाले म्हणून कांहीं जाणतेपणा येत नाहीं.

थाप——थाप-थापा देणें—बात झोकणें; कांहीं तरी सांगून आपलें काम करून घेणें. राग घालविणें.

थाप मारणें—१ थोबाडींत देणें; चपराक मारणें; ठोकणें; पिटणें; मार देणें. 'बळें थाप मारून मूगूट नेला' –राक १.४५. २ फसविणें; चकविणें. ३ गप्प, बात झोकणें.

थापडी——इधर थापडी, उधर थापडी—सर्वकडून थपडा बसणें; जिकडे जावें तिकडे फजीती उडणें.

थापाड्या——थापाड्याच्या घरीं बारा औतं, अन् बघायला गेलं तर एकहीं नव्हतं—(वांय.) माझ्या घरीं बारा औतें आहेत, मी इतका मोठा शेतकरी आहे असें

सांगणाऱ्याच्या घरीं जाऊन पाहावें तों काय ! एकहि औत नाहीं ! नुसती थापेबाजी.

थाया——थाया भरणें—हट्ट करणें; हेका धरणें. ' थाया भरूनि करूं काय दुजें दिसेना !'–हरिराजकृत मुद्गलाचार्यविरचित रामायणाचें भाषांतर २१.

थार——थार नसणें—(जागा न सांपडणें). वाण असणें (अन्न, धान्य इ. ची); तूट पडणें; जाग्यावर नसणें.

थारा मोडणें—आश्रय नाहींसा करणें; आधार तोडणें. राहाण्याच्या जागेचा नाश करणें; निराश्रित करणें.

थारा सुटणें—मनाची शांति ढळणें; चलबिचल होणें; भयग्रस्त होणें.

थारीं थांबणें—स्वस्थानीं बसणें; स्थिर राहणें; स्थित होणें; कायम होणें; जाग्यावर येऊन बसणें.

थारीं बसणें-पडणें-(शब्दशः व लक्षणेनें) वसती करणें; (वस्तु, मनुष्य, पिशाच यांनीं) आश्रय करणें; स्थान धरून बसणें.

मडकें थारीं बसणें—स्थिर व निर्भय स्थिति प्राप्त होणें; निश्चित स्थान प्राप्त होणें; थाऱ्यावर येणें; सुस्थित असें बसणें.

❀ **जिथें मिळाला थारा, तोच गांव बरा**—ज्या गांवांत आपणांस आश्रय मिळेल तेंच गांव आपणांस आवडतें, त्याचीच स्तुति करावी. इतर गांवें पुष्कळ चांगलीं असलीं तरी आपणांस काय उपयोग ? गांव पहा. जिथें पहा पाठभेद–जिथें भरेल दरा, तोच गांव बरा.

थाळा-ळी——थाळा बसणें—चांगलें व जोरदार पीक येणें. ' पिकाचा–धान्याचा–शेताचा थाळा बसला. '

थाळा भरणें—वरपक्षाकडील विहीण एका थाळ्यांत नवरीमुलीच्या अंगावर घालण्यासाठीं दागिने मांडून ठेवते. हा थाळा भरलेला दिसला म्हणजे वधूपक्षास आनंद होतो. नवरीमुलीस सूनमुखाच्या वेळीं पुष्कळ दागिने घालणें.

थाळा वाजणें—कांहीं शिल्लक नाहीं अशी सूचना देण्यासाठीं थाळा वाजवितात. (खाद्य पदार्थ, पैसा इ.) संपणें; खलास होणें.

थाळा वाजविणें—कोणत्याहि गोष्टीची द्वाही फिरविणें (बायकी) मूल जन्मास आल्याबरोबर कांशाचा थाळा वाजवून आनंद प्रदर्शित करणें; दौंडी पिटणें; जाहीर करणें.

थाळी फिरविणें—पैसे मागणें.–गांगा २२२.

❀ **घेतला थाळा, चालला जेवावयाला**—आगंतुक मनुष्याच्या वर्णनपर.

थिल्लर——थिल्लर आणि गोदावरी, केवीं पावे बरोबरी—पाण्याचें डबकें आणि गोदावरी नदी यांची तुलना कशी होईल. एखाद्या क्षुद्र गोष्टीची मोठया गोष्टीशीं तुलना करून काय उपयोग.

बेडूक थिल्लरीं, बसोनि सागरा धिक्कारी ।—बेडकाला आपलें डबकेंच फार मोठें वाटतें व तो त्यापुढें समुद्रास तुच्छ लेखतो. एखादा मनुष्य स्वतःस फार मोठा समजून थोर मनुष्याचा धिक्कार करतो हा त्याचा मूर्खपणा होय. ' बसणें थिल्लरीं । बेडुक सागरा धिक्कारी । '–तुगा २८९४.

थुंकणें——थुंकलेलें परत घेव नये, गिळलेलें माकशि हाणयें—(गो.) थुंकी परत घेऊं नये, गिळलेलें माघारी आणूं नये. जें झालें तें झालें, तें बदलूं नये.

थुका; थुंका-की——थुका घालणें—पूर्वी शाळेतल्या मुलास थोडा वेळ बाहेर जावें लागल्यास एका दगडावर तो थुंके व ती थुंकी वाळेपर्यंत त्याला परत यावें लागे.

थुका घालून काम करणें—(थुकी वाळेतों करणें) जलद काम करणें; अतिशय त्वरेनें करणें.

थुकला थुका चाटणें—थुंकी चाटणें. निंदापर, वाईट शब्द, वचन, आश्वासन परत घेणें; दिलेली वाचा परत घेणें; शब्द परत घेणें.

थुंका-की झेलणें—श्रीमंतांना थुंकावयाचें झाल्यास जवळ पिकदाणी नसल्यास त्यांचे आश्रित त्यांच्यापुढें ओंजळ करून त्यांत ती घेतात. त्याप्रमाणें हांजी हांजी करणें; गुलामी वृत्ति दाखविणें; गुलामाप्रमाणें चाकरी करणें. 'जानकीबाईनें साऱ्यांच्या पुढें पुढें करावें, सावित्रीबाईची तर तिनें जशी थुंकी झेलावी, पण त्या निर्दय सावित्रीबाईला दया येईल तर रामाचें नांव ! '–रंगराव. 'हमकू रे आला थुंका । ओंजळींत मग या टाका।। ' –सन्मित्र समाज मेळ्याचें पद. ' आणि अत्यंत खुशामती, थुंकी झेलणारा असल्यामुळें (त्रिंबकजी डेंगळा), आपल्या उलट वागून संतापवील हें ही मनांत आणावयास नको. '–एल्फिन्स्टन चरित्र १.१६३.

थुंका-की तोंडावर उडविणें—छीः थूः करणें; निंदा करणें; शिव्या देणें; अपमान करणें; मानखंडना करणें; निर्भर्त्सना करणें.

थुंकी तोंडावर घेणें-उडणें-येणें—हांसें, फजीती करून घेणें; अपमान होणें.

थुंकी न ओलांडणें--दुसऱ्याच्या छंदानें वर्तणें; दुसऱ्याच्या शब्दाबाहेर न जाणें: आज्ञेंत असणें; तंत्रानें चालणें

(मृत्यूनें) थुंकून टाकणें—नको असलेली वस्तु थुंकून टाकतो त्याप्रमाणें यमानें माणसास टाकून देणें—म्हणजे तो वांचणें. मृतप्राय स्थितींतून बचावणें.

थुंक्यानें घर साजरें करणें—(व.) सामान्यतः घर सडासंमार्जनानें, रंगसफेतीनें साजरें, सुशोभित करतात, पण त्याला पैसा लागतो. पैसा ज्याजवळ नाहीं त्याला मग मोफत मिळणाऱ्या थुंक्यानें घर चिकणचोपडें करण्याचा प्रसंग यावयाचा. त्यावरून आपला कर्मीपणा लोकांत उघड होऊं न देण्याचा प्रयत्न करणें.

❀ थुक्यानें भिजती, चांदण्यानें वाळती—निसत्त्व, निकस जमीन (जी लवकर ओली होते व लवकर वाळते.)

थुंट——थुंटसरि ताणयें, मोडसरि बगसू नयें—(गो.) तुटेपर्यंत ओढूं नये, मोडेपर्यंत वाकवूं नये. तुटणें पहा.

थुत्री——थुत्रींत देणें—तोंडांत मारणें; थोबाडींत मारणें; कानशिलांत भडकाविणें.

थूः——थूः तुमच्या तोंडावर !; थूः त्येच्या जिनगानावर !—(एखाद्याच्या तोंडावर थुंकणें) धिक्कार करणें; तिरस्कार करणें; निर्भर्त्सना करणें. -गड आला पण सिंह गेला. -इं १४४.

थेटणें——थेटून बसणें--खेटून बसणें; बिनदिक्कत, आगांतूकपणानें, आपल्यापेक्षां मोठया दर्जाच्या माणसाजवळ जाऊन बसणें. 'तो गर्दींतून ढकलाढकली करीत थेट श्रीमंतांना थेटून बसला.'

थेंब——थेंबे थेंबे एकडे जाले, तळें सगळें भरनु गेलें—(गो.) थेंब थेंब एक ठिकाणीं झाले, तळें सगळें भरून गेलें. पुढें पहा.

थेंबें थेंबें तळें सांचे—अगदीं लहान लहान वस्तूंचा संग्रह कालांतरानें फार मोठा बनतो. -टि ४.५१०. तु०-जलबिंदुनिपातेन क्रमशः पूर्यते घटः ।

थेंबें थेंबें तळें सांचतें, खडयाखडयानें डोकें फुटतें—ज्याप्रमाणें थोडा थोडा संचय करीत गेल्यानें बराच सांठा होतो त्याप्रमाणें लहान लहान चुक्या करीत गेल्यानें पुढें मोठें नुकसान होतें.

थेंबें थेंबें तळें सांचें आणि असेंच वाढणें पैशाचें—थेंबा थेंबानें तळें बनतें त्याप्रमाणें थोडा थोडा सांचवून पैसा वाढतो. जलबिन्दुनिपातेन क्रमशः पूर्यते घटः । स हेतुः सर्वविद्यानां धर्मस्य च धनस्य च ॥ Little and often fills the purse.

थेर——थेर करणें; थेर थेर करणें—नांवालौकिकाची चाड न धरतां लोक नांवें ठेवतील अशा प्रकारें वागणें; मोठेपणाचा, नाजूकपणाचा आव घालणें; तऱ्हेतऱ्हा करणें; चाळे करणें; चेष्टा करणें. 'याचा धंदा काय ? तर रंग गाहून थेर करायचा.'—विकारविलसित.

❀ थेर नाचतं थेरांत, कोंबडं नाचतंय केरांत—नाच्या तमाशांत नाचतो म्हणून इकडे कोंबडा केरांतच नाचतो. तु०-मोर नाचतो म्हणून लांडोरहि नाचते. एकीनें गळयांत सरी घातली म्हणून दुसरीनें दोरी घालणें.

थेराची मैना, शिमग्याला नेईना—शिमग्याचीहि वाट न पाहतांच ही थेर करणारी बाई आतांपासूनच तऱ्हातऱ्हा करते आहे. अक्षयीची चवचाल.

थैक——थैक म्हणतां ब्रह्महत्या—थैक ! किंवा हैक ! हा गुरें हांकण्याचा शब्द आहे. एखादवेळीं गुराला सहज हैक म्हटल्यास त्यानें पुढें असणाऱ्या ब्राह्मणास मारावें व त्यामुळें आपणावर निष्कारण ब्रह्महत्येचें पातक यावें. त्याप्रमाणें आपल्या सहज केलेल्या कृत्याचा अनिष्ट परिणाम होण्याची भीति वाटणें. -कोकि १०६.

थैमान——थैमान घालणें-मांडणें--धिंगाणा, चाळे करणें; आदळ-आपट, आरडाओरड वगैरे करणें.

थैय्या——थैय्या घेणें--गडबडा लोळणें; ओरडणें; नाचणें; थैमान घालणें.

थैली——थैल्यांचीं तोंडें खुलीं होणें—भरमसाटपणें पैसा खर्च करणें; पैसा देऊन लोकांचीं तोंडें बंद करणें. 'थैल्यांचीं तोंडें खुलीं ठेवलीं आहेत म्हणून बाळासाहेबांच्या जुलमास कोणी प्रतिरोध करीत नाहीं.'—विक्षिप्त १.३.

थोंट——उठवळ सासू, थोंट जांवई--[थोंट= पाजी] सासू व जांवई दोघेहि उच्छृंखळ स्वभावाचे असल्यास त्यांची वागणूक मर्यादशील राहात नाहीं.

थोटा——थोटाचें कीं भटाचें—(गो.) थोट्याचें असेना कीं भटाचें असेना ! मी घेणार.

थोटें-मोडकें कुशीचें, पोल-सोल शेताचें—(गो.) आपल्या शेताचें धान्य कितीहि हिणकस असलें तरी तें आप-

त्याला आवडतें; तसें स्वतःचें मूल लंगडें लुळें असलें तरी आपलें लाडकें असतें. तु०-चिंबचळें शेतचें आणि थोटें पांगळें पोटचें.

थोडका——**थोडक्यांत गोड-गोडी; थोडी तेथें गोडी**—'अति तेथें माती' याच्या उलट. सर्व कांहीं प्रमाणशीर व थोडें असावें.

थोडक्यांत गोडी, फारांत लबाडी—कोणतीहि गोष्ट अल्प प्रमाणांत केली असतां बरी दिसते. मर्यादेबाहेर गेल्यास त्याचे परिणाम वाईट होतात.

थोडक्यांत गोडी साजरी आणि विनोदाची लकेरी—प्रत्येक गोष्ट विशेषतः थट्टा अल्प प्रमाणांत केलेली खपते अधिक प्रसंग झाल्यास विकोपास जाते.

थोडक्यांत नटावें नि प्रेमानें भेटावें—या म्हणींत समाजात वागतांना कसें वर्तन असावें हें थोडक्या शब्दात सांगितलें आहे. आपल्या ऐपतीबाहेर खर्च करूं नये आणि समाजांतील घटकांशीं प्रेमानें नि सलोख्यानें राहावें.

थोडा——**थोडा खाना, बहु धिंगाणा**--खाणें थोडें मचमच फार, पहा.

थोडा खाना, बनारसका रहिना--अर्धभाकरी राहावें पण काशींत रहावें. काशींत राहून उपास पडले तरी पत्करलें पण कुग्रामांत पोटभर मिळालें तरी राहूं नये.

थोडा खाना, बनावसे रहना--थोडें खावें पण रुबाबानें रहाव.

थोडा खाना लज्जितका, बहुत खाना फज्जितका--थोड्यांत गोडी फारांत लबाडी. थोडें खाल्ल्यास त्याची चव लागते, तें गोड लागतें. फार खाल्ल्यास त्याची रुचि राहात नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यापासून पुढें फार त्रास होतो.

थोडाहि गुण मिळतां घ्यावा—एखादा माणूस वाईट असला तरी त्याच्यांत जो थोडा गुण असेल त्याकडे पाहून तेवढ्यापुरताच त्याच्याशीं स्नेह करावा. त्याला अजीबात दूर करूं नये.

थोडी अक्कल ठेवी, कामें बहूत मिळवी--थोडीशी बुद्धि चालविली असतां पुष्कळ काम मिळतें.

थोडी ममता लावावी, फार वेळ चालवावी—प्रेम बेतानें करावें पण तें स्थिर असावें. Love me little love me long.

थोडी हयगई करणें, नुकसानी करून घेणें--एखाद्या कामांत किंचितहि निष्काळजीपणा किंवा हलगर्जी झाली तरी मोठें नुकसान होण्याचा संभव असतो. तु०—मिठाची केली वाण लोणच्याची केली घाण.

थोडें असतां लवकर सुधारतें, थोडी वस्तु लवकर खपते--चूक थोडी असल्यास लवकर सुधारतां येते. त्याचप्रमाणें वस्तु अल्प असली म्हणजे तिला मोल अधिक येतें, तिला मागणी फार असते. Little said is soon amended and a little gear is soon spended. -साव २२०५.

थोडें आहे त्याचा भोग कर, अधिकाची इच्छा न धर—जें आपणाजवळ थोडें फार असेल त्याचा उपभोग घेऊन समाधान मानावें. अधिकाचा लोभ केल्यास तें न मिळतां असमाधान मात्र उत्पन्न होतें.

थोडें खाणें लजनीचें, फार खाणें फजितीचें--थोडा खाना लज्जितका० पहा.

थोडें थोडें पाप करी, तो मोठेंहि आचरी--जो लहान लहान दुष्कृत्यें करून तीं पचवतो त्याच्या हातून पुढें मोठमोठे अपराधहि घडतात.

थोडें थोडें मिळूनच जास्त होत असतें—कोणतीहि गोष्ट एकदम मोठी किंवा जास्त होत नसते. थोडथोड्यानेंच वाढ होते. —मन्वंतर, सप्टेंबर १९४०. तु०—येवें येवें तळें सांचे.

थोडें थोडें समयीं खातो, तो सदां पुष्ट होतो—जो मिताहारी असून योग्य वेळीं भोजन करतो तो निरोगी राहून पुष्ट होतो.

थोडें बोलणें, बहूत करणें—बोलावें थोडें पण कृति पुष्कळ करावी. थोडें करून विनाकारण फार बडबड करूं नये. याच्या उलट म्हण—करणें थोडें मचमच फार.

थोडें वाचणें-बोलणें, बहू शोधणें-ऐकणें, सर्व मनांत राहणें (हीं ज्ञानवृद्धीचीं लक्षणें)—थोडें थोडें वाचन करीत असावें, थोडी फार चर्चा करावी, अनेक गोष्टींचा शोध करावा, अनेक लोकांचें बोलणें, भाषण वगैरे ऐकावें व सर्व गोष्टी मनांत ठसवून घेऊन त्यांचें स्मरण ठेवलें असतां या सर्व गोष्टींपासून ज्ञान वाढतें.

थोड्यांत गोडी आणि फारांत लबाडी-थोडका पहा.

थोड्यानें उदार व बहुतानें कृपण—थोडें फार देण्यांत उदार वृत्ति दाखवावी पण वाजवीपेक्षां जास्त देण्याच्या बाबतींत कृपणपणा आचरावा.

थोप——**थोप राखणें-ठेवणें-धरणें**—मूळचें सोभा·

ळणें; आहे तें चालविणें; पद्धतीप्रमाणें वागणें; परंपरा सांभाळणें, चालविणें.

थोबाड——थोबाड फुटणें--थोबाडींत बसणें फजीती होणें. 'आतां शास्त्र खोटें म्हणणारांचें थोबाड फुटलें की नाहीं!' —ज्ञाव २.१७८.

थोबाड फोडणें--१ तोंडांत मारणें; कानशिलांत देणें. चपराक लगावणें; ठोकणें; मारणें. २ (ल.) चांगली अद्दल घडविणें; तोंडघशीं पाडणें.

थोबाड रंगविणें—तोंडांत मारली असतां गाल लाल होतात यावरून तोंडांत मारणें; चपराक मारणें; कानशिलांत देणें. 'भर सभेंत रंगलेलं थोबाड कुणा रगडून काढीत नाहीं;' —एकच प्याला १.४.

थोबाडांत माती घालणें—तोंडांत माती घालणें. शरमविणें; फजीती करणें; लज्जास्पद स्थितीस नेणें.

थोमार——थोमार देणें—(व.) बेदम मार देणें

थोर——(दिवा) थोर करणें--(दिवा) मालावणें

थोर-थोरल्या घरचा--(विपरीत लक्षणेनें) मोठ्या कुळांतील, म्हणजे महार अथवा परवारी. याप्रमाणेंच हिंदींत भंग्याला मेहतर म्हणतात.

*थोर आहेत त्यांचें लिहिणें बोलणेंच प्रमाण असतें—थोर मनाच्या मनुष्यानें लिहिलेलें सत्य मानावयास हरकत नाहीं. कारण तो कधीं त्याच्या उलट वर्तन करणार नाहीं व आपला शब्द तो खरा केल्याशिवाय राहणार नाहीं. —नय १६८.

थोर गृहस्थ द्रव्यावीण, जैसा योद्धा शस्त्रहीन—थोर घराण्यांतील मनुष्य द्रव्यहीन झाला असतां त्याची स्थिति जशी एखादा मोठा योद्धा जवळ शस्त्र नसतांना असहाय होतो तशी होते.

थोर घरीं लेंक द्यावी, भेटायाची शिराणी—मोठ्या मनुष्याच्या घरीं आपली मुलगी दिली असतां त्याच्या घरीं गेलें असतां आपली दादहि लागत नाहीं व मुलीला भेटण्याचीहि मुष्कील होते.

थोर मनुष्याचा राग थोडा वेळ टिकतो—जे लोक अंतःकरणानें मोठे असतात त्यांच्या मनांत राग आला तरी तो क्षणिक टिकतो. ते लागलीच उदार अंतःकरणानें क्षमा करतात.

थोर लोकांच्या बकवा, लोक म्हणती वाहवा—मोठे लोक कांहींहि ताळतंत्र नसलेलें बोलले तरी त्यांची लोक स्तुति करतात. उदा०—बैल गाभणा नववा महिना.

थोर वाढला येरंड। तरी कां होईल इक्षुदंड॥—एरंड कितीहि मोठा झालें, तरी त्याच्या ठिकाणीं उंसाचे गुण येऊं शकत नाहींत; त्याप्रमाणें नीच मनुष्य कितीहि श्रेष्ठ पदास चढला तरी त्याचें मन मोठें होऊं शकत नाहीं. 'उंच वाढला एरंड०' पहा. It is not growing like a tree, makes a man better be.

थोरा घरचें श्वान, त्यास सर्वहि देती मान—समर्थांचे घरचें श्वान। त्यास सर्वही देती मान।—व्यंकटेशस्तोत्र. मोठ्या घरच्या सर्वच गोष्टीस मान असतो, मग ती गोष्ट अगदीं क्षुल्लक का असेना. मोठ्याच्या आश्रयाचा प्रभावच असा असतो.

थोराचें दुखणें आणि मणभर कुंथणें—मोठे लोक जरासे जरी आजारी पडले तरी ते फार हळवे असल्यानें त्याचा बोभाटा सर्वत्र होतो.

थोराच्या पाठबळावर लोकांवर जुलूम—एखाद्या क्षुद्र मनुष्यास मोठ्याचा आधार असला, तर तो अतिशय जाचक होतो. तु०—अन्यस्माल्लब्धपदः नीचः प्रायेण दुःसहो भवति। रविरपि न दहति तादृक् यादृक् दहति वालुकानिकरः॥

थोरानें भक्षिलें तें औषधासाठीं, गरिबानें भक्षिलें तर पोटासाठीं--खाणें पहा.

थोरपणा——थोरपणा आहे तेथें वांकडेपणा होणार नाहीं—जे लोक मनानें थोर आहेत त्यांच्या हातून कपटी वर्तन घडत नाहीं. ते सरळपणानें वागतात.-पया२३०.

थोरपणा येतो दैवानें, सभ्य न होय त्या योगानें—एखादा मनुष्य केवळ आपल्या नशीबाच्या जोरावर श्रेष्ठ पदास चढला, आपल्या कर्तबगारीनें नव्हे, तर त्यामुळें त्याच्या अंगीं कांहीं सभ्यता येत नाहीं. त्याची संस्कृति हीनच राहते.

थोरपणा राखणें तर याचना न करणें—आपला मोठेपणा राखावयाचा असेल तर कोणाकडे याचना करूं नये. कारण याचना करूं लागल्यास अपमान होतो.

थोरली आई—१ अक्काबाई; दारिद्य; अवदसा; दारिद्य देवता. याचे उलट धाकटी आई=श्रीमंतीची देवता —लक्ष्मी. या दोन देवताबद्दल कर्नाटकांत श्रावण मासांत बायका शुक्रवारीं कथा सांगतात. थोरल्या आईला सायाक्का व लहान आईला देयाक्का म्हणतात. २ मातृभूमी; स्वदेश.

थोरल्या आईचे डोहाळे आठविणें—भिकेचे डोहाळे लागणें.

विभाग पहिला

समाप्त